OXFORD

ENGLISH-MARATHI DICTIONARY

R. V. DHONGDE

NEW

SHOUT
SHARE
IT

NATIONAL UNIVERSITY
LIBRARY SAN DIEGO

NON CIRCULATING

English - Marathi Dictionary
इंग्रजी - मराठी शब्दकोश

English - Marathi Dictionary
इंग्रजी - मराठी शब्दकोश

Ramesh V. Dhongde
रमेश वा. धोंगडे

मुंबई
ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस
कलकत्ता चेन्नई दिल्ली

OXFORD
UNIVERSITY PRESS

Oxford House, Apollo Bunder, Mumbai 400001

Oxford University Press is a department of the University of Oxford.
It furthers the University's objective of excellence in research, scholarship
and education by publishing worldwide in

Oxford New York
Athens Auckland Bangkok Bogota Buenos Aires Calcutta
Cape Town Chennai Dar es Salaam Delhi Florence Hong Kong Istanbul
Karachi Kuala Lumpur Madrid Melbourne Mexico City Mumbai
Nairobi Paris Sao Paulo Singapore Taipei Tokyo Toronto Warsaw

with associated companies in

Berlin Ibadan

© Oxford University Press 1997

ISBN 0 19 564244 9

© English wordlist, arrangement and source material
Oxford University Press, Oxford 1980, 1983, 1991

© Marathi Transliteration Oxford University Press, India 1997

Sixth Impression 1999

Typeset by Aksharchhaya, 2035 Sadashiv Peth, Tilak Road, Pune 411030.
Printed at Sanman & Co, Andheri, Mumbai 400059 and published by Manzar Khan,
Oxford University Press, Oxford House, Apollo Bunder, Mumbai 400001.

प्रस्तावना

प्रस्तुतचा इंग्रजी-मराठी शब्दकोश हा केवळ इंग्रजी शब्दांचे भाषांतर करणारा कोश नाही. त्याची अनेक वैशिष्ट्ये आहेत.

या कोशातील २६००० इंग्रजी शब्द हे अनेक परिश्रमानंतर गोळा केलेले पायाभूत शब्द आहेत. प्रत्येक शब्दाची व्याकरणविषयक आवश्यक ती माहिती सोपे मराठी पारिभाषिक शब्द वापरून दिलेली आहे. वाचकाला त्याचा खूप उपयोग होईल. इंग्रजी शब्दाचा प्रत्यक्ष वापर केल्याची उदाहरणे जागोजागी दिली आहेत. ही उदाहरणे कोशासाठी कृत्रिमपणे केलेली नाहीत. इंग्रजीचा प्रत्यक्ष वापर असलेल्या उदाहरणांतून ती निवडली आहेत. म्हणजेच, उदाहरणातला वापर हा इंग्रजी भाषकांचा नित्याचा वापर आहे. भाषेतील शब्दाचा वापर हा संदर्भानुसार योग्य-अयोग्य ठरतो. शब्द कुणी, कुठे, कसा आणि केव्हा वापरायचा यातून भाषेची बोली, सामाजिक स्तरावरील तिचे कार्य वगैरे गोष्टी समजतात. शब्दाबाबतचे असे सामाजिक संदर्भ या कोशात जागोजागी दिलेले आहेत. भाषेचा काटेकोर आणि अचूक वापर करण्याची इच्छा असणाऱ्या वाचकाला ही माहिती मोलाची वाटेल. प्रत्येक शब्दाचा उच्चार देवनागरी अक्षरे वापरून दिला आहे. मात्र ट़, ड़, फ़, व्ह़, थ़, द़ या व्यंजनांचे मराठीतील उच्चारण आणि इंग्रजीतील उच्चारण यात खूप फरक आहे. इतर व्यंजने आणि स्वरही उच्चारणाबाबत समान नाहीत. वाचकाने हे ध्यानात घेऊन इंग्रजीतील ध्वनिउच्चारण माहीत करून घेणे आवश्यक आहे. तसा सराव झाल्यावर देवनागरी लेखनाचा उपयोग अधिक फायदेशीर ठरेल. शब्दांचे अर्थ देताना मूळ इंग्रजी-इंग्रजी कोशातील व्याख्या शक्य तेथे आहेत तशाच ठेवल्या आहेत. त्यानंतर मराठी पर्याय दिले आहेत. मराठी पर्याय देताना अर्थातच बोली भाषा, शिष्ट प्रयोग, निषिद्ध प्रयोग वगैरेंचा विचार केला आहे. त्यामुळे हे पर्याय वाचकास उपयुक्त होतील. इंग्रजी उदाहरणाचे भाषांतर शब्दशः न करता मराठी ढंगाने करण्यामागे हाच दृष्टिकोन आहे.

हा कोश भाषांतरकार, विद्यार्थी, शिक्षक, इंग्रजीचे मराठी अभ्यासक, मराठीचे इंग्रजी अभ्यासक, इंग्रजीत व्यवहार करणारी मराठी माणसे या सर्वांना उपयुक्त आणि मार्गदर्शक ठरेल.

दोन भाषात पूर्ण साधर्म्य कधीच नसते. इंग्रजी शब्दांना दिलेले मराठी पर्याय हे म्हणूनच पूर्णार्थाने पर्याय नसतात. त्यातून इंग्रजी अर्थाची साधारण कल्पना येते एवढेच. तसे नसते तर इंग्रजी आणि मराठी यात फरकच राहिला नसता. द्विभाषा कोशाचा वापर करताना हे भान ठेवणे जरूरीचे आहे. मात्र रूपातील फरक हा स्पष्ट असला तरी अर्थातील साधर्म्य शक्य तेवढे स्पष्ट करणे हे कोशकाराचे काम. म्हणूनच कवी म्हणतात :

पात्र सोने वा असो मृत्तिकेचे
वेड तुझिया आतील अमृताचे ।

रमेश वा. धोंगडे

ऋणनिर्देश

या कोशाच्या संपादनात श्रीमती धनवंती हर्डीकर आणि ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसच्या संपादकीय विभागाने बहुमोल साहाय्य केले. डेक्कन कॉलेजचे ग्रंथपाल श्री. कुलकर्णी आणि ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसच्या पुणे येथील शाखेने वेळोवेळी मदत केली. या सर्वांचा आणि माझ्या कुटुंबियांचा मी ऋणी आहे.

रमेश वा. धोंगडे

अनुक्रमणिका

प्रस्तावना v

ऋणनिर्देश vi

संक्षिप्त रूपे आणि चिन्हे यांची सूची ix

शब्दकोशाचा वापर x

अक्षरलेखन xii

ध्वनिचिन्हदर्शिका xiv

शब्दकोश 1-817

सर्वसामान्य अनियमित क्रियापदे 818

संक्षिप्त रूपे आणि चिन्हे यांची सूची

[*अक*]	अकर्मक (intransitive)
[*अगण*]	अगणनीय (uncountable)
अनौप	अनौपचारिक (informal)
अभिद क्रि	अभिवृत्तिदर्शक क्रियापद (modal verb)
अमे	अमेरिकन (American)
अलं	अलंकारिक (rhetorical)
उ.अव्यय	उभयान्वयी अव्यय (conjunction)
उद्गा	उद्गारवाचक (interjection)
उदा	उदाहरणार्थ (for example)
अे.व	अेकवचन/अेकवचनी (singular)
औप	औपचारिक (formal)
काव्य	काव्यात्म (poetical)
क्रि	क्रियापद (verb)
क्रिब	पदबंधरूपी क्रियापद (phrasal verb)
क्रिवि	क्रियाविशेषण (adverb)
खास	खास करून, विशेषतः (especially)
[*गण*]	गणनीय (countable)
गंमत	गंमतीशीर (jocular)
ना	नाम (noun)
पसंती	पसंतीदर्शक (approving)
पर्या	पर्यायोक्त (euphemistic)
पुरा	पुरातन (archaic)
ब.व	बहुवचन/बहुवचनी (plural)
ब्रि	ब्रिटिश (British)
भूत	भूतकाल (past tense)
भूत वि	भूतकालवाचक धातुविशेषण (past participle)
मालक	मालक संस्था किंवा मालकी दाखविणारा (proprietary)
ला	लाक्षणिक (figurative)
वर्त वि	वर्तमानकालवाचक धातुविशेषण (present participle)
वाक्प्र	वाक्प्रचार (idiom)
व्रात्य	व्रात्यप्रयोग (slang)
वि	विशेषण (adjective)
शब्दयो	शब्दयोगी अव्यय (preposition)
[*सक*]	सकर्मक (transitive)
सना	सर्वनाम (pronoun)
सहा.क्रि	सहाय्यक क्रियापद (auxiliary verb)
संरू	संक्षिप्त रूप (abbreviation)
स्कॉट	स्कॉटिश (Scottish)
स्त्री	स्त्रीलिंग (feminine)
⚠	निषिद्ध (taboo)

टीप : इंग्रजीत **sb** हा somebody चा तर **sth** हा something चा संक्षेप आहे.

शब्दकोशाचा वापर

मुख्य शब्द

मुख्य शब्द ठळक टाइपमधे दिले आहेत.

dance
table

जेव्हा दोन मुख्य शब्दांचे लेखन समान असून अर्थ मात्र वेगळे आहेत, अशा ठिकाणी त्यांना क्रमांक दिले आहेत.

head^{1}
head^{2}

सामासिक शब्द आणि साधित शब्द

सामासिक शब्द दोन किंवा अधिक शब्द मिळून होतात (उदा *housework*). साधित शब्द मूळ शब्दांना प्रत्यय लावून होतात (उदा *huge* पासून *hugely*). हे दोन्ही प्रकारचे शब्द मुख्य नोंदीच्या अर्थविवरणानंतर ठळक टाइपमधे दिले आहेत.

huge /ह्यूज्/ *वि* खूप मोठा, प्रचंड. **hugely** *क्रिवि* खूप.

house^{1} /हाउस/ *ना* [*गण*] . . . **'housework** *ना* [*अगण*] घरकाम, उदा स्वयंपाकपाणी, झाडलोट.

वाक्प्रचार आणि पदबंधरूपी क्रियापदे

इंग्रजी भाषा शिकणाऱ्याच्या प्रमुख अडचणींपैकी एक अडचण म्हणजे वाक्प्रचार आणि पदबंधरूपी क्रियापदे यांचा अर्थ न समजणे. या दोन्हींमधे मुख्य क्रियापदाच्या अर्थावरून वाक्प्रचाराचा किंवा पदबंधरूपी क्रियापदाचा अर्थ कळत नाही. या शब्दकोशात वाक्प्रचार आणि क्रियापदबंध ठळक टाइपमधे दिले आहेत. त्यांच्या सुस्पष्ट व्याख्या दिल्या असून त्यांचा वापर समजण्यासाठी उदाहरणे दिली आहेत :

hook /हुक्/ *ना* [*गण*] १ एखादी गोष्ट पकडण्यासाठी किंवा टांगून ठेवण्यासाठी प्लॅस्टिक किंवा धातू वळवून केलेला आकडा. २ (मुष्टियुद्धात) ढोपराने मारलेला ठोसा. ३ (*वाक्प्र*) **off the 'hook** (**क**) जागेवर नसलेला टेलिफोन रिसीव्हर. (**ख**) (*अनौप*) अडचणीतून बाहेर पडलेला, निभावलेला : *let/get sb off the ~, एखाद्याला अडचणीतून बाहेर पडू देणे/काढणे.*

नामे

ज्या नामांचा अेकवचनी (उदा a dog) आणि/किंवा बहुवचनी (उदा some dogs) वापर होतो त्यांना [*गण*] (गणनीय) नामे म्हटले आहे :

label /'लेइब्ल्/ *ना* [*गण*]

ज्या नामांचे बहुवचन होत नाही (उदा sugar, milk) त्यांना [*अगण*] (अगणनीय) म्हटले आहे. या नामांबरोबर some, much, a lot of, enough वगैरे शब्दांचा वापर होतो :

linen /'लिनिन्/ *ना* [*अगण*]

काही नामे गणनीय किंवा अगणनीय अशा दोन्ही प्रकारांनी वापरता येतात. त्यांना [*गण, अगण*] असे म्हटले आहे. उदाहरणार्थ, **coffee** हे नाम *Two coffees please* या वाक्यात [*गण*] आहे तर *Have we got any coffee left?* या वाक्यात [*अगण*] आहे. इंग्रजीतील बहुतेक नामांचे बहुवचन नामाला *s* लावून – उदा *dog - dogs* किंवा *es* लावून – उदा *church - churches* असे नियमित स्वरूपात होते. नामाचे बहुवचन असे नियमित नसेल तेथे कोशात त्याचे अनियमित रूप दिले आहे :

man^{1} /मॅन्/ *ना* (*ब.व* **men** /मेन/)
lady /'लेइडि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**)
life /लाइफ्/ *ना* (*ब.व* **lives** /लाइव्ह्झ्/)

विशेषणे

एकावयवी आणि व्यंजनान्त अशा सर्व विशेषणांना (उदा *kind, green*) शेवटी *-er* हा प्रत्यय लावून तर-वाचक तर *-est* हा प्रत्यय लावून तम-वाचक विशेषणे बनतात. एक किंवा दोन अवयवे असणारी पण याहून वेगळी असणारी विशेषणे *-r, -st, -ier, -iest* हे प्रत्यय घेतात. कोशात त्यांची नोंद आहे :

free /फ्री/ *वि* (**~r** /-अ(र्)/, **~st**)
gentle /'जेन्ट्ल्/ *वि* (**~r** /-ल(र्)/, **~st** /-लिस्ट्/)
happy /'हॅपि/ *वि* (**-ier, -iest**)

क्रियापदे

क्रियापदाच्या भूतकाल (*भूत*) आणि भूतकालवाचक धातुविशेषण (*भूत वि*) रूपांचे लेखन आणि उच्चारण अनियमित असेल तर ती रूपे मुख्य नोंदीच्या प्रारंभीच दिली आहेत:

know /नउ/ *क्रि* (*भूत* **knew** /न्यू; *अमे* नू/, *भूत वि* **~n** /नउन्/)

rise^1 /राइझ्/ *क्रि* (*भूत* **rose** /रउझ्/, *भूत वि* **~n** /रिझ्न्/)

व्यंजनांचे द्वित्व: व्यंजनान्त अशा अनेक क्रियापदांची भूतकाल रूपे, भूतकालवाचक धातुविशेषणे किंवा वर्तमानकालवाचक धातुविशेषणे होताना अंत्य व्यंजनाचे द्वित्व होते (उदा stop-stopped-stopping). काही विशेषणांच्या अंत्य व्यंजनाचेही द्वित्व होते (उदा hot-hotter-hottest). या गोष्टी कोशात दाखविल्या आहेत:

rot /रॉट्/ *क्रि* (**-tt-**)

sad /सॅड्/ *वि* (**~der, ~dest**)

क्रियापदे, विशेषणे आणि नामे यांच्या नंतर येणारी शब्दयोगी अव्यये

अनेक क्रियापदे, विशेषणे आणि नामे यांच्या नंतर काही विशिष्ट शब्दयोगी अव्यये नियमितपणे येतात. त्यातील महत्त्वाची अशी अनेक शब्दयोगी अव्यये कोशात दाखविली आहेत. कंसात दिलेली शब्दयोगी अव्यये अनेकदा शब्दाच्या नंतर येतात तर कंसात नसणारी शब्दयोगी अव्यये **नेहमीच** शब्दाच्या नंतर येतात:

familiarize /फ'मिलिअराइझ्/ *क्रि* [*सक*] *with*//

sensitive /'सेन्सटिव्ह्/ *वि* १ (*to*)//

वलय ○

एकाच नोंदीत दोन उदाहरणे आली तर त्यामधे हे वलयचिन्ह वापरले आहे:

have^1 . . . *I ~/I've finished,* माझे झाले ○ *She has/she's gone, ती गेली आहे.*

लाटरेषा ~

~ हे चिन्ह उदाहरणात मुख्य शब्दाच्या ऐवजी वापरले आहे:

fight /फाइट्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **fought** /फॉऽट्/) १ [*अक, सक*] एखाद्या विरुद्ध हाताच्या किंवा शस्त्राच्या सामर्थ्याचा वापर करणे: (*ला*) ~ *against poverty, दारिद्र्याविरुद्ध लढणे.*

बहुवचनी रूप देतानाही मुख्य शब्दाच्या जागी हे चिन्ह वापरले आहे. हायफन (-) हा मुख्य शब्दातील एखाद्या भागासाठी वापरला आहे:

tomato /ट'माटउ; *अमे* -मेट्-/ *ना* [*गण*] (*ब.व* **~es**)

fifty /'फिफ्टि/ *संना, वि, ना* [*गण*] (*ब.व* **-ies**)

कॅपिटल अक्षरानंतर हे चिन्ह आले तर ते कॅपिटल अक्षराविना ठरलेल्या शब्दासाठी येते:

according to /अ'कॉऽडिङ् टू/ *शब्दयो* १ -ने किंवा -मधे दिल्याप्रमाणे/सांगितल्याप्रमाणे: *A~ to a recent report*

तिरका दंड

तिरक्या दंडाचे चिन्ह पदबंधातील पर्यायी निवड दाखविते. उदाहरणार्थ:

at first/second hand याचा अर्थ *at first hand* आणि *at second hand* हे दोन्ही पर्याय इंग्रजीत उपलब्ध आहेत.

कंस ( )

एखादा पदबंध किंवा एखादे वाक्य यातील शब्द गाळणे शक्य असेल तर ते शब्द कंसात दिले आहेत. उदाहरणार्थ:

get sth over (with) म्हणजे *get sth over* आणि *get sth over with* हे दोन्ही पर्याय शक्य आहेत.

बाण ➪

बाणाचे चिन्ह उलट-संदर्भ दाखवते म्हणजे ते कोशातील अशा शब्दाचा संदर्भ देते की तेथे अधिक माहिती उपलब्ध होईल.

make^1 . . . **make up ground** ➪ GROUND^1.

संक्षिप्त रूपे

इंग्रजीतील संक्षिप्त रूपाचे प्रथम पूर्ण रूप देऊन नंतर त्याचा मराठीत अर्थ दिला आहे. उपलब्ध असल्यास मराठीत संक्षिप्त रूप दिले आहे. उदा

PS *संरू* (पत्राच्या शेवटी) postscript, ता.क.

अक्षरलेखन

शब्दाच्या सुरुवातीचा ध्वनी कसा लिहितात हे माहीत नसले तर तो शब्द कोशात शोधणे अवघड जाते. अशा काही प्रमुख अडचणी पुढे दिल्या आहेत :

पहिले अक्षर अनुच्चारित असणे

wh- यांचा उच्चार कधीकधी /ह्-/ असा होतो. उ५: *who, whole.*

wr- यांचा उच्चार /र्-/ असा होतो. उदा *write, wrist.*

kn- यांचा उच्चार /न्-/ असा होतो. उदा *knife, know.*

त्याचप्रमाणे

ho- यांचा उच्चार कधीकधी /ऑ-/ असा होतो. उदा *honest, honour.*

ps- यांचा उच्चार /स्-/ असा होतो. उदा *psychology.*

pn- यांचा उच्चार /न्-/ असा होतो. उदा *pneumonia.*

दुसरे अक्षर अनुच्चारित असणे

wh- यांचा उच्चार कधीकधी /व्-/ असा होतो. उदा *which, whether.*

gu- यांचा उच्चार कधीकधी /ग्-/ असा होतो. उदा *guest, guess.*

gh- यांचा उच्चार /ग्-/ असा होतो. उदा *ghost, ghastly.*

त्याचप्रमाणे

bu- यांचा उच्चार कधीकधी /ब्-/ असा होतो. उदा *build, buoy.*

पहिली दोन अक्षरे विशिष्ट ध्वनीसाठी असणे

ph- यांचा उच्चार /फ्-/ असा होतो. उदा *photo.* हा मराठी फ पेक्षा वेगळा आहे.

qu- बहुधा सर्व ठिकाणी यांचा उच्चार /क्व्-/ असा होतो. उदा *quick.*

ch- यांचा उच्चार कधीकधी /क्-/ असा होतो. उदा *chorus.*

लक्षात ठेवा

c- याचा उच्चार /क्-/ असा होतो. उदा *call* किंवा /स्-/ असा होतो. उदा *centre.*

g- याचा उच्चार /ग्-/ असा होतो. उदा *good* किंवा /ज्-/ असा होतो. उदा *general.*

कोशामधे शोधूनही एखादा शब्द तुम्हाला सापडला नाही तर पुढील यादीची मदत घ्या :

शब्दाच्या सुरुवातीचा ध्वनी	**त्याचे संभवनीय अक्षरलेखन**
फ्-	**ph-** उदा *photo*
ग्-	**gh-** उदा *ghost* किंवा **gu-** उदा *guest*
ह्-	**wh-** उदा *who, whole*
क्-	**ch-** उदा *character*
क्व्-	**qu-** उदा *quick*
न्-	**kn-** उदा *knife* किंवा **pn-** उदा *pneumonia*
र्-	**wr-** उदा *write*
स्-	**c-** उदा *centre* किंवा **ps-** उदा *psychology*
ज्-	**j-** उदा *job* किंवा **g-** उदा *general*
श्-	**sh-** उदा *shop* किंवा **ch-** उदा *chalet*
ई-/अी-	**ea-** उदा *each*
इ-/अि-	**e-** उदा *enjoy*
अे-	**a-** उदा *any*
आ-	**au-** उदा *aunt*
ऑ-	**ho-** उदा *honest*
ऑऽ-	**au-** उदा *author* किंवा **oa-** उदा *oar*
अ-	**a-** उदा *awake* किंवा **o-** उदा *obey*
अऽ-	**ear-** उदा *early* किंवा **ir-** उदा *irk*
अेइ-	**ai-** उदा *aim* किंवा **ei-** उदा *eight*
अउ-	**oa-** उदा *oath*
अइ-	**ei-** उदा *either*
यू-	**eu-** उदा *eucalyptus*

ध्वनिचिन्हदर्शिका

स्वर आणि द्विस्वर

ई/अी	उदा see /सी/	अऽ	उदा fur /फऽर्/
इ/अि	उदा sit /सिट्/	अ	उदा ago /अ'गउ/
अे	उदा ten /टेन्/	अेइ	उदा page /पेइज्/
अॅ	उदा hat /हॅट्/	अउ	उदा home /हउम्/
आ	उदा arm /आम्/	आइ	उदा five /फाइव्ह्/
ऑ	उदा got /गॉट्/	आउ	उदा now /नाउ/
ऑऽ	उदा saw /सॉऽ/	ऑइ	उदा join /जॉइन्/
उ/अु	उदा put /पुट्/	इअ/अिअ	उदा near /निअ(र्)/
ऊ/अू	उदा too /टू/	अेअ	उदा hair /हेअ(र्)/
अ़ी	उदा cup /कै़प्/	उअ	उदा pure /प्युअ(र्)/

टीप : अि, अी, अु, अू हे पर्याय लेखन सोयीसाठी दिले आहेत. उदा pure मधील उ /प्युअ(र्)/ असा लिहिला आहे. ऊकार आणि वेलांटी हे स्वरदर्शक आहेत. इअ, उअ, अेइ, अउ, आइ, आउ, ऑइ, अेअ हे आठ द्विस्वर आहेत, म्हणजे त्यांचा उच्चार एका स्वराकडून दुसऱ्या स्वराकडे असा सलगपणे किंवा लगोलग होतो. उदा join चा उच्चार /जॉइन्/ असा एकावयवी आहे. /जॉ·इन्/ असा दोन अवयवांचा नाही.

व्यंजने

प्	उदा pen /पेन्/	स्	उदा so /सउ/
ब	उदा bad /बॅड्/	ज़्	उदा zoo /ज़ू/
ट्	उदा tea /टी/	श्	उदा she /शी/
ड्	उदा did /डिड्/	झ्	उदा vision /व्हिझन्/
क्	उदा cat /कॅट्/	ह्	उदा how /हाउ/
ग्	उदा got /गॉट्/	म्	उदा man /मॅन्/
च्	उदा chin /चिन्/	न्	उदा no /नउ/
ज्	उदा June /जून्/	ङ्	उदा sing /सिङ्/
फ्	उदा fall /फॉल्/	ल्	उदा leg /लेग्/
व्ह्	उदा voice /व्हॉइस्/	र्	उदा red /रेड्/
थ्	उदा thin /थिन्/	य्	उदा yes /येस्/
द्	उदा then /देन्/	व	उदा wet /वेट्/

टीप : पायमोडके व्यंजनचिन्ह म्हणजे स्वराविना व्यंजन. म्हणून man /मॅन्/ च्या उच्चारात न् नंतर अ नाही. जेथे पायमोडके चिन्ह नाही तेथे अ सह व्यंजनाचा उच्चार होतो.

ट्, ड्, फ्, व्ह्, थ्, द् ही चिन्हे विशेष महत्त्वाची आहेत. या अक्षरांनी दाखविले जाणारे मराठी व्यंजनध्वनी इंग्रजी व्यंजनध्वनींपेक्षा खूप वेगळे आहे. ज़, झ, ज यातील फरक मराठीत साधारणपणे पुढील शब्दांवरून दाखविता येईल : झाड, झेंडा, जिना.

/ ' / हे चिन्ह शब्दातील बलस्थान दाखविते. म्हणजे ज्या शब्दावयापुढे हे चिन्ह येते तो शब्दावयव म्हणताना त्यावर जोर येतो. उदा about /अ'बाउद्/

/ ͵ / हे चिन्ह शब्दातील उपबलस्थान दाखविते. म्हणजे ज्या शब्दावयापुढे हे चिन्ह येते त्या शब्दावयावर कमी जोर येतो. उदा academic /͵ॲक'डेमिक्/

(र्) शब्दाच्या अन्त्यस्थानी असलेल्या 'र्' नंतर जर स्वराने सुरू होणारा शब्द आला तरच ब्रिटिश इंग्रजीत 'र्' चा उच्चार होतो. अन्यथा तो गाळला जातो.

/ - / ध्वनिलेखनातील पुनरावृत्त भागाच्या पुढे आणि/किंवा मागे हायफन् किंवा जोडरेघ हे चिन्ह आल्यास तो पुनरावृत्त भागच फक्त बदलतो असे समजावे.

/ ऽ / अ किंवा ऑ नंतर येणारे हे चिन्ह त्याचा दीर्घ उच्चार दाखविते.

/ · / अवयवदर्शक हे चिन्ह दोन अवयवातील सीमा दाखविण्यासाठी आवश्यक तेथेच वापरले आहे. उदा assemble /अ'सेम्·ब्ल्/, piety /'पाइ·अटि/

A a

A, a^{1} /अेइ/ *ना* [*गण*] (*ब.व* **A's a's** /अेइझ/) इंग्रजी वर्णमालेतील पहिले अक्षर. **A level** *ना* [*गण*] (*ब्रि*) विद्यापीठ प्रवेशासाठी आवश्यक असणारी व साधारणपणे वयाच्या अठराव्या वर्षी देण्यात येणारी एखाद्या विषयाची परीक्षा.

A^{2} *संरू* ampere(s), विद्युत्प्रवाहाचे एकक, याचे संक्षिप्त रूप.

a /अ; अधिक बलयुक्त रूप अेइ/ (तसेच **an** /अन्; अधिक बलयुक्त रूप ॲन्/) *अनिश्चिततादर्शी उपपद* (पुढे स्वर असल्यास *an* वापरतात) १ एक : *a book* ○ *a teacher* ○ *a million pounds, पुस्तक, शिक्षक, एक दशलक्ष पौंड.* २ (संख्या, राशी, गट वगैरे दाखविण्यास): *a lot of money, बरेच पैसे.* ३ प्रत्येक, दर, प्रती : *70 miles an hour, दर तासाला ७० मैल.*

aback /अ'बॅक्/ *क्रिवि* (*क्रिब*) **take sb aback** ➪ TAKE^{1}.

abacus /'ॲबकस/ *ना* [*गण*] सरकणाऱ्या मण्यांच्या दांड्या असलेली आणि मोजण्यासाठी किंवा आकडेमोडीसाठी वापरण्यात येणारी चौकट.

abandon /अ'बॅन्डन/ *क्रि* [*सक*] १ एखादी गोष्ट पूर्णपणे सोडून दूर जाणे, त्याग करणे. २ सोडून देणे : ~ *an idea, एखादी कल्पना सोडून देणे.* ३ (*औप*) ~ **oneself to** एखाद्या भावनेच्या संपूर्ण आहारी जाणे. **abandoned** (*वि*) १ वापरात नसलेला. २ (वागणुकीबाबत) निरंकुश, भन्नाट, बेबंद. **abandonment** *ना* [*अगण*] त्याग; चिंता वगैरे पासून मुक्ती.

abashed /अ'बॅश्ट/ *वि* गोंधळलेला, लज्जित.

abate /अ'बेइट/ *क्रि* [*अक*] (*औप*) (वारा व वेदना याबाबत खास वापर) जोर कमी होणे, उतार पडणे. **abatement** *ना* [*अगण*] : *noise ~ment, आवाज, गडबड कमी होणे.*

abattoir /'ॲबट्वा(र्); *अमे* ,ॲब'ट्वार/ *ना* [*गण*] कत्तलखाना, खाटीकखाना.

abbess /'ॲबेस/ *ना* [*गण*] ख्रिस्ती जोगिणींच्या मठाची प्रमुख, कॉन्व्हेन्टची प्रमुख.

abbey /'ॲबि/ *ना* [*गण*] ख्रिस्ती संन्यस्त स्त्रीपुरुष जेथे रहात किंवा राहतात तो मठ.

abbot /'ॲबट/ *ना* [*गण*] ख्रिस्ती मठाधिपती, मोनॅस्ट्रिचा प्रमुख.

abbreviate /अे'ब्रीव्हिअेइट/ *क्रि* [*सक*] शब्द किंवा पदबंधाचा संक्षेप करणे. **abbreviation** /अ,ब्रीव्हि'अेइश्न्/ *ना* [*गण*] शब्द किंवा पदबंधाचे संक्षिप्त रूप.

abdicate /'ॲब्डिकेइट/ *क्रि* [*अक, सक*] (वरिष्ठ पद, , महत्त्वाची जबाबदारी वगैरेचा) त्याग करणे, पदत्याग करणे. **abdication** /,ॲब्डि'केइश्न्/ *ना* [*अगण*] पदत्याग.

abdomen /'ॲब्डमन/ *ना* [*गण*] (छाती व कमर यामधील) जठर, आतडी यांचा समावेश असणारा शरीराचा भाग, उदर. **abdominal** /ॲब्'डॉमिन्ल/ *वि* उदराचा.

abduct /अब्'डॅक्ट, ॲब्-/ *क्रि* [*सक*] एखाद्याला बळजबरीने, बेकायदेशीररीत्या पळवून नेणे, अपहरण करणे. **abduction** /अब्'डॅक्श्न, ॲब-/ *ना* [*गण, अगण*] अपहरण.

aberration /ॲब'रेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] स्वाभाविक, नेहमीप्रमाणे नसलेली वागणूक किंवा कृती, करण्या-वागण्यातील विक्षिप्तपणा.

abet /अ'बेट/ *क्रि* (**-tt-**) (*वाक्प्र*) **aid and abet** ➪ AID.

abhor /अब्'हॉऽ(र्)/ क्रि (**-rr-**) [*सक*] (*औप*) कमालीचा तिरस्कार करणे. **abhorrence** /अब्'हॉरन्स/ *ना* [*अगण*] तिरस्कार. **abhorrent** /-अन्ट/ *वि* तिरस्करणीय वाटावा असा.

abide /अ'बाइड/ *क्रि* १ [*सक*] सहन करणे, सहन होणे : *She can't ~ that man, तिला तो माणूस अगदी नकोसा वाटतो.* २ [*अक*] *by//* कायदा, वचन वगैरे पाळणे. **abiding** *वि* कायमचा, अतूट.

ability /अ'बिलटि/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) कौशल्य किंवा ताकद.

abject /'ॲब्जेक्ट/ *वि* (*औप*) १ दरिद्री, अतिशय खालावलेली हलाखीची (परिस्थिती) : ~ *poverty, कमालीचे दारिद्र्य, आत्यंतिक दारिद्र्य.* २ स्वाभिमानशून्य, गर्हणीय, कणाहीन. **abjectly** *क्रिवि* लाचारीने.

ablaze /अ'ब्लेइझ्/ *वि* १ जळणारे, जळते; पेटते, पेटलेले. २ (*ला*) तेजाने चमकणारा, दीप्तिमान, झळाळता.

able /'अेइब्ल्/ *वि* (**~r, ~st**) १ *to//* एखादी गोष्ट करण्याची ताकद, साधने किंवा संधी असणारा : *Are you ~ to come with us? तू आमच्या बरोबर येऊ शकशील?* २ हुशार, समर्थ, कुशल. **,able-'bodied** *वि* शारीरिकदृष्ट्या ताकदवान, समर्थ, धट्टाकट्टा, धडधाकट. **ably** *क्रिवि* समर्थपणे.

abnormal /ॲब्'नॉऽम्ल्/ *वि* अस्वाभाविक, विचित्र; सहसा न आढळणारा. **abnormality** /,ॲब्नॉऽ'मॅलटि/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) अनैसर्गिकता, विकृती. **abnormally** *क्रिवि* विचित्रपणे, विलक्षण, अविहितपणे.

aboard /अ'बॉऽड्/ *क्रिवि, शब्दयो* जहाजावर किंवा जहाजात, विमानात, आगगाडीत किंवा आगगाडीमधे, बसमधे.

abode /अ'बउड्/ *ना* [*अे.व*] (*औप*) १ घर, निवास, निवासस्थान. २ (*वाक्प्र*) (**of**) **,no fixed a'bode** राहण्यासाठी कायमचे घर नसणे.

abolish /अ'बॉलिश्/ *क्रि* [*सक*] नष्ट करणे, रद्द करणे, काढून किंवा पाडून टाकणे : ~ *taxes, कर रद्द करणे.* **abolition** /ॲब'लिश्न्/ *ना* [*अगण*] नष्ट करणे.

abominable /अ'बॉमिनब्ल्; *अमे* -मन्-/ *वि* १ (*अनौप*) असुखकारी, त्रासदायक, वाईट : ~ *weather, वाईट हवा.* २ (*औप*) तिरस्करणीय, किळसवाणा, उबग आणणारा : ~ *behaviour, तिरस्करणीय वागणूक.* **abominably** *क्रिवि* तिरस्कार वाटावा अशा पद्धतीने.

aboriginal /,ॲब'रिजन्ल्/ *वि* एखाद्या प्रदेशात फार पूर्वीपासून म्हणजेच सुरवातीपासून रहात आलेली (माणसे किंवा जनावरे), आदिवासी. **aboriginal** (किंवा **Aboriginal**) *ना* [*गण*] ऑस्ट्रेलियातील आदिवासी.

aborigine /,ॲब'रिजनि/ *ना* [*गण*] ऑस्ट्रेलियातील आदिवासी.

abort /अ'बॉऽट्/ *क्रि* [*अक, सक*] १ गर्भपात होणे/करणे, भ्रूणहत्या करणे. २ एखादी गोष्ट पूर्ण होण्याआधीच थांबवणे : ~ *a space flight, अंतराळातील उड्डाण थांबवणे.* **abortion** /अ'बॉऽश्न्/ *ना* [*गण, अगण*] गर्भपात, भ्रूणहत्या. **abortive** *वि* अपयशी, निष्फळ.

abound /अ'बाउन्ड्/ *क्रि* [*अक*] (*in/with*)// मोठ्या संख्येने किंवा मोठ्या प्रमाणात असणे किंवा उपलब्ध असणे, वैपुल्य असणे.

about^1 /अ'बाउट्/ *शब्दयो* १ विषयक, विषयी, बाबत : *a book ~ flowers, फुलांविषयीचे पुस्तक.* २ -भर, इकडेतिकडे : *walking ~ the town, शहरभर भटकणे.* ३ सुमारास, मधे (व्यग्र असताना) : *And while you're ~ it, . . . तू ते करत असताना.* ४ (*वाक्प्र*) **be about to do sth** लवकरच काहीतरी करणार असणे, काही करण्याच्या बेतात असणे, त्वरित कारवाई करण्याचा विचार असणे. **how/what about . . .?** त्याचं काय? (**क**) (सूचना करताना, सुचवताना, प्रस्ताव करताना वापर) : *How ~ some more tea? आणखी थोडा चहा घेणार?* (ख) (माहिती विचारताना वापर) : *What ~ the money – do we have enough? पैशाचं काय – आहेत का आपल्याकडे पुरेसे?*

about^2 /अ'बाउट्/ *क्रिवि* १ अंदाजे, साधारणपणे, जवळजवळ : *It costs ~ £100, त्याची किंमत साधारण १०० पौंड आहे.* २ विविध दिशांनी, दाही दिशांनी : *The children were rushing ~, मुले सगळीकडे धावत होती.* ३ जिकडेतिकडे, इतस्ततः : *papers flying ~ the room, खोलीभर उडणारे कागद.* ४ आसपास, आजूबाजूस : *There was no one ~, जवळपास कुणी नव्हतं.* **a,bout 'turn** *ना* [*गण*] (मत किंवा भूमिका) एकदम बदलणे, पलटी खाणे, कोलांटी उडी मारणे.

above^1 /अ'बव्ह्/ *शब्दयो* १ वर, -च्या वरून : *fly ~ the clouds, ढगावरून उडणे.* २ संख्या, किंमत, वजन यात जास्त, वरचढ. ३ आदरभावनेमुळे शंका घेण्यापलीकडे, संशयातीत : *be ~ stealing/suspicion, चोरी किंवा इतर संशय घेण्यापलिकडे.* ४ (*वाक्प्र*) **above all** सर्वात महत्त्वाचे (म्हणजे). **above one's head** ➪ HEAD.

above^2 /अ'बव्ह्/ *क्रिवि* १ उंचावरचा, वरचा : *the shelf ~, वरची मांडणी.* २ (पुस्तक

वगैरेच्या) आधीच्या भागात : *See ~, page 16, आधीचे पृष्ठ १६ पहा.*

abrasion /अ'ब्रेइझ्न्/ *ना* १ [*अगण*] घासणे किंवा चोळणे. २ [*गण*] (त्वचेवरचे) खरचटणे, ओरखडा.

abrasive /अ'ब्रेइसिव्ह्/ *वि* १ घासून वस्तू मऊ करण्यासाठी वापरण्यात येणारा; खरखरीत, खडबडीत. २ (*ला*) उद्धट, आगाऊ, कठोर : *an ~ manner, रासवट पद्धती.*

abreast /अ'ब्रेस्ट्/ *क्रिवि* १ बरोबरीने, खांद्यास खांदा लावून. २ (*वाक्प्र*) **be/keep abreast of sth** एखाद्या गोष्टीची साद्यंत माहिती असणे, बित्तंबातमी असणे.

abridge /अ'ब्रिज्/ *क्रि* [*सक*] पुस्तक वगैरेचा संक्षेप करणे, संक्षिप्त रूपात देणे. **abridgement** *ना* [*गण, अगण*] संक्षेप.

abroad /अ'ब्रॉऽड्/ *क्रिवि* परदेशी, देशाबाहेर : *travel ~, परदेशी जाणे, परदेशप्रवास करणे.*

abrupt /अ'ब्रप्ट्/ *वि* १ एकाएकी आणि अनपेक्षित, अचानक, अकस्मात : *an ~ stop, अकस्मात खंड.* २ तुटक, तुसडी, कोरडी (वागणूक). **abruptly** *क्रिवि* एकाएकी. **abruptness** *ना* [*अगण*] आकस्मितपणा.

abscess /'ॲब्सेस्/ *ना* [*गण*] पू झालेला, ठणकणारा फोड, सपूयक्षत, विद्रधी, गळू.

abscond /अब्'स्कॉन्ड्/ *क्रि* [*अक*] (*औप*) अचानक कुणालाही न सांगता निघून जाणे किंवा नाहीसे होणे, फरारी होणे, दडी मारणे.

absence /'ॲब्सेन्स्/ *ना* १ [*अगण*] गैरहजेरी, अनुपस्थिती : *~ from school, शाळेतील गैरहजेरी.* २ [*ए.व*] अभाव, नसणे : *the ~ of information, माहितीचा अभाव.*

absent^{1} /'ॲब्सन्ट्/ *वि from//* ठिकाणावर नसलेला, अनुपस्थित, गैरहजर. **,absent-'minded** *वि* लक्ष दुसरीकडे असलेला, अनवधानी, विसराळू, विसरभोळा.

absent^{2} /अब्'सेन्ट्/ *क्रि* (*औप*) **~ oneself (from)** एखाद्या गोष्टीपासून, स्थळापासून दूर राहणे, हजर नसणे, उपस्थित नसणे.

absentee /,ॲब्सन्'टी/ *ना* [*गण*] गैरहजर असणारी व्यक्ती, अनुपस्थित व्यक्ती.

absolute /'ॲब्सलूट्/ *वि* १ पूर्ण, पुरता, संपूर्ण : *~ trust, पूर्ण विश्वास.* २ निश्चित; निःसंशय : *~ proof, निश्चित पुरावा.* ३ निरंकुश सत्ता असलेला, संपूर्ण स्वामित्त्व असलेला : *an ~ ruler, सर्वसत्ताधीश.* ४ दुसऱ्या गोष्टींशी तुलना करून न मोजता येणारा, स्वयंसिद्ध (स्वायत्त, स्वाधीन, विशुद्ध) : *an ~ standard, स्वयंसिद्ध प्रमाण.* **absolutely** *क्रिवि* १ संपूर्णतः, पूर्णपणे, निखालस. २ /ॲब्स'लूटली/ (*अनौप*) (सहमती दाखविण्यासाठी वापर) अगदी!

absolve /अब्'सॉल्व्ह्/ *क्रि* [*सक*] *from/of//* (*औप*) एखाद्याला निर्दोष ठरवणे, (आरोप, जबाबदारी, कर्तव्ये वैगरेतून) मुक्त करणे.

absorb /अब्'सॉऽब्/ *क्रि* [*सक*] १ (द्रव पदार्थ, उष्णता, प्रकाश वगैरे) शोषणे, शोषून घेणे. २ लक्ष वेधून घेणे, गढून जाणे, व्यग्र होणे : *~ed in her work, तिच्या कामात गुंग.* **absorbent** *वि* द्रव सहजपणे शोषून घेणारा, द्रवशोषक. **absorption** /अब्'सॉऽप्श्न्/ *ना* [*अगण*] व्यग्रता.

abstain /अब्'स्टेइन्/ *क्रि* [*अक*] १ *(from)//* दारू पिणे वगैरे (व्यसनांपासून) दूर राहणे, मादक पदार्थ वर्ज्य करणे. २ प्रस्तावाच्या बाजूने किंवा विरुद्ध मतदान न करणे, प्रस्तावावरील मतदानात तटस्थ राहणे.

abstemious /अब्'स्टीमिअस्/ *वि* खाणेपिणे बेताने करणारा, मिताहारी, लघ्वाशी; नेमस्त, संयमी.

abstention /अब्'स्टेन्श्न्/ *ना* [*गण, अगण*] मतदानात तटस्थ राहणे (abstain २ प्रमाणे).

abstinence /'ॲब्स्टिनेन्स्/ *ना* [*अगण*] मादकपदार्थ सेवनापासून दूर राहण्याची पद्धती किंवा रिवाज, मदिरावर्जन (abstain १ प्रमाणे).

abstract /'ॲब्स्ट्रॅक्ट्/ *वि* १ शारीरिक किंवा प्रत्यक्ष अस्तित्व नसलेला, कल्पनास्वरूपातील, अमूर्त : *Beauty is ~, सौंदर्य अमूर्त असते.* २ (कलेच्या संदर्भात) वस्तू किंवा गोष्टी वास्तवरूपात न दाखविणारा, अमूर्त, संबंधभावरहित. ३ भाववाचक, अमूर्त अशा गुण किंवा स्थितीचा उल्लेख करणारे (नाम),

उदा *freedom, स्वातंत्र्य.* **abstract** *ना* [*गण*] एखाद्या पुस्तकाचे सार; सारांश.

absurd /अब्'सऽड्/ *वि* असमंजस, बिनडोक; मूर्खपणाचा, हास्यास्पद, खुळचट. **absurdity** *ना* [*अगण, गण*] (*ब.व* **-ies**) विवेकशून्यता; वेडेपणा, मूर्खपणा. **absurdly** *क्रिवि* वेडेपणाने.

abundance /अ'बैन्डेन्स/ *ना* [*अगण, ए.व*] जरूरीपेक्षा जास्त असणे, भरपूर प्रमाणात असणे, विपुलता. **abundant** /डन्ट्/ *वि* विपुल. **abundantly** *क्रिवि* प्राचुर्याने, उदंड.

abuse¹ /अ'ब्यूझ्/ *क्रि* [*सक*] १ गैरवापर करणे, दुरुपयोग करणे. २ छळ करणे, क्रूरपणे वागवणे. ३ एखाद्याला शिव्या देणे, शिवीगाळ करणे, एखाद्याविषयी अद्वातद्वा बोलणे.

abuse² /अ'ब्यूस/ *ना* १ [*अगण*] उद्धट किंवा कठोर शब्द, उणेदुणे बोलणे, निंदा : *hurl ~ at sb, एखाद्याची निंदा नालस्ती करणे.* २ [*गण, अगण*] दुरुपयोग, गैरवापर : *the ~ of power, सत्तेचा दुरुपयोग.* **abusive** *वि* शिवीगाळ करणारा, ग्राम्य भाषा वापरणारा.

abysmal /अ'बिझ्मल/ *वि* फारच वाईट : *an ~ failure, दारुण अपयश.* **abysmally** *क्रिवि* कल्पनातीत, धक्कादायकरीत्या.

abyss /अ'बिस्/ *ना* [*गण*] तळही दिसणार नाही असे खोल विवर.

academic /ॲक'डेमिक्/ *वि* १ अध्ययन-अध्यापन विषयक, शैक्षणिक. २ केवळ सैद्धान्तिक चर्चेचा पण व्यवहारात निरुपयोगी असा, पांडित्यदर्शक पण अव्यवहार्य. **academic** *ना* [*गण*] विद्यापीठीय किंवा महाविद्यालयीन प्राध्यापक. **academically** /-क्लि/ *क्रिवि* शैक्षणिकदृष्ट्या.

academy /अ'कॅडमी/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) विशेष प्रशिक्षण देणारी संस्था : *a music ~, संगीत/गायन विद्यालय.* २ कलांमध्ये रस असणाऱ्या लोकांची संस्था, समाज, मंडळ.

accede /अक्'सीड्/ *क्रि* [*अक*] (*to*)// (*औप*) विनंती, सूचना वगैरे स्वीकारणे किंवा मान्य करणे, रुकार देणे.

accelerate /अक्'सेलरइट्/ *क्रि* [*अक, सक*] गती वाढवणे, वेग देणे/येणे. **acceleration** /अक्,सेल'रेइशन्/ *ना* [*अगण*] प्रवेग, गतिवर्धन, वेगवाढ. **accelerator** *ना* [*गण*] मोटार वगैरे वाहनात गाडीचा वेग वाढवण्यासाठी असणारी पायाने दाबायची कळ, ॲक्सिलरेटर, वेगवर्धक, गतिवर्धक.

accent /'ॲक्सेन्ट्, 'ॲक्सन्ट्/ *ना* [*गण*] १ एखाद्या व्यक्तीची, किंवा एखाद्या भागातील/राष्ट्रातील बोलण्याची विशिष्ट पद्धत, रीती. २ अक्षराच्या वर किंवा खाली वापरायचे विशिष्ट चिन्ह, उदा *café* या शब्दातील *e* अक्षरावरचे चिन्ह. ३ एखाद्या गोष्टीवर दिलेला विशेष भर किंवा जोर. **accent** /ॲक्'सेन्ट्/ *क्रि* [*सक*] (शब्दावर किंवा शब्दाच्या एखाद्या अवयवावर) वल, जोर किंवा आघात देणे.

accentuate /अक्'सेन्चुअेइट्/ *क्रि* [*सक*] जास्त महत्त्व किंवा जास्त भर देणे, उठाव देणे : *The tight shirt ~d his fat stomach, तंग शर्टामुळे त्याचे पुढे आलेले पोट उठून दिसत होते.*

accept /अक्'सेप्ट्/ *क्रि* १ [*अक, सक*] (दिलेली गोष्ट) स्वीकारणे, घ्यावयाचे मान्य करणे, (प्रस्ताव वगैरेला) संमती देणे : *~ a present, भेटवस्तू स्वीकारणे.* २ [*सक*] मान्य करणे, कबूल करणे किंवा विश्वास ठेवणे : *~ the truth, सत्य स्वीकारणे.* **acceptable** *वि* स्वीकार्य, स्वीकारार्ह; चालू शकणारा किंवा स्वागत करण्याजोगा. **acceptance** *ना* [*अगण, गण*] स्वीकृती.

access /'ॲक्सेस्/ *ना* [*अगण*] (*to*)// १ एखाद्या ठिकाणी शिरण्याचा मार्ग. २ एखादी गोष्ट वापरण्याची संधी किंवा हक्क. **access** *क्रि* [*सक*] (संगणकाकडून) माहिती मिळवणे. **accessible** *वि* सहज घेता येण्याजोगा किंवा वापरता येण्याजोगा; उपलब्ध, सुगम.

accession /ॲक्'सेशन्/ *ना* [*अगण*] उच्च स्थान मिळणे, उच्चस्थान वा पद ग्रहण : *the king's ~ to the throne, राजाचे राज्यारोहण किंवा गादीवर येणे.*

accessory /अक्'सेसरि/ *ना* [*गण*] १ उपयुक्त पण आवश्यक नसणारी अशी वस्तू : *car accessories, मोटारीतील आवश्यक नसणाऱ्या परंतु उपभोगाच्या वस्तू, जोडवस्तू.* २ (तसेच **accessary**) (*कायदा*) गुन्हेगाराला मदत करणारा, गुन्हेगाराचा साथीदार.

accident /'ॲक्सिडन्ट्/ *ना* १ [*गण*]

अनपेक्षितपणे घडणारा प्रसंग, विशेषतः शारीरिक इजा करणारा किंवा नुकसानकारक, अपघात. २ (*वाक्प्र*) **by accident** योगायोगाने, यदृच्छेने, दैवयोगाने, दैववशात्. **accidental** /ॲक्सि'डेन्ट्ल्/ *वि* अपघाती, दैवघटित, यदृच्छाभूत. **accidentally** /-टलि/ *क्रिवि* योगायोगाने.

acclaim /अ'क्लेइम्/ *क्रि* [*सक*] (*औप*) मनःपूर्वक दणदणीत स्वागत करणे, जयजयकार करणे. **acclaim** *ना* [*अगण*] (*औप*) भव्य स्वागत, जयजयकार.

acclimatize /अ'क्लाइमटाइझ्/ *क्रि* [*अक, सक*] (*to*)// (स्वतःला) नवीन वातावरणाची किंवा नवीन हवामानाची सवय करणे, नवीन वातावरण/हवापाण्यातील बदल अंगवळणी पाडणे.

accolade /'ॲकलेइड्; *अमे* ,ॲक'लेइड्/ *ना* [*गण*] (*औप*) प्रशंसा, पसंती.

accommodate /अ'कॉमडेइट्/ *क्रि* [*सक*] १ एखाद्याची राहण्याची सोय करणे. २ एखाद्याला उपकृत करणे, मदत करणे. **accommodating** *वि* मदत करणारा, उपकारी. **accommodation** /अ,कॉम'डेइश्न्/ *ना* [*अगण*] राहण्यासाठी खोल्या.

accompaniment /अ'कम्पनिमन्ट्/ *ना* [*गण*] १ एखाद्या वस्तूबरोबर जाणारी वस्तू, बरोबर वापरण्यात येणारी वस्तू. २ गायकाला किंवा वादकाला साथ देणारे संगीत, साथसंगत.

accompanist /अ'कम्पनिस्ट्/ *ना* [*गण*] गायकाला किंवा वादकाला वाद्याची साथ करणारा, गायनातील किंवा वादनातील साथीदार.

accompany /अ'कम्पनि/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] १ एखाद्याच्या बरोबर (कुठेतरी) जाणे. २ एकाच वेळी असणे किंवा घडणे, बरोबर असणे किंवा येणे : *wind accompanied by rain, पावसाबरोबर येणारं वादळ किंवा वारा आणि पाऊस.* ३ (गायकाबरोबर किंवा दुसऱ्या वादकाबरोबर वादकाने) साथीला असणे.

accomplice /अ'कम्प्लिस्; *अमे* अ'कॉम्-/ *ना* [*गण*] वाईट गोष्ट करण्यात मदत करणारा, साथीदार.

accomplish /अ'कम्प्लिश्; *अमे* अ'कॉम्-/ *क्रि* [*सक*] (एखादी गोष्ट) करण्यात यशस्वी होणे, साध्य करणे, तडीस नेणे. **accomplished** *वि* कुशल, तरबेज. **accomplishment** *ना* १ [*अगण*] यशस्वी संपादन, सिद्धी, सिद्धता, यशस्वी पूर्ती. २ [*गण*] कसब, नैपुण्य : *Ability to play the piano well is quite an ~, पियानो चांगला वाजवता येणं हे एक कसबच आहे.*

accord /अ'कॉऽड्/ *ना* (*वाक्प्र*) **in accord (with sth/sb)** (एखाद्या गोष्टीशी/व्यक्तीशी) सुसंवाद राखत, एकमताने. **of one's own accord** स्वेच्छेने, आपखुशीने, सुखासुखी. **accord** *क्रि* [*अक*] *with*// (*औप*) एखाद्या गोष्टीशी सहमत होणे/असणे, जुळणे, जमणे.

accordance /अ'कॉऽडन्स्/ *ना* (*वाक्प्र*) **in accordance with sth** बरहुकूम, अन्वये, त्याप्रमाणे, तदनुसार.

accordingly /अ'कॉऽडिङ्लि/ *क्रिवि* आत्ताच सांगितलेल्या कारणामुळे; त्यासाठी, म्हणून.

according to /अ'कॉऽडिङ् टू/ *शब्दयो* १ -ने किंवा -मधे दिल्याप्रमाणे/सांगितल्याप्रमाणे, अनुसार : *A~ to a recent report, people in Britain don't take enough exercise, अलीकडील एका वृत्तान्तानुसार/वृत्तान्तात दिल्याप्रमाणे, ब्रिटनमधले लोक पुरेसा व्यायाम घेत नाहीत.* ○ *A~ to my doctor, I ought to go on a diet, माझ्या डॉक्टरांच्या म्हणण्याप्रमाणे/माझ्या डॉक्टरांच्या मते मी पथ्यपाणी करणे आवश्यक आहे.* २ तत्त्वाशी सुसंगत अशा प्रकारे, तत्त्वानुसार : *act ~ to one's principles, आपल्या तत्त्वानुसार वागणे.* ३ -च्या प्रमाणात : *arranged ~ to size, आकाराच्या प्रमाणात लावलेला/आयोजित केलेला.*

accordion /अ'कॉऽडिअन्/ *ना* [*गण*] स्वरपट्ट्या आणि भाता असणारे एक वाद्य, स्वरपटल असणारे वाद्य.

accost /अे'कॉस्ट्; *अमे* अ'कॉऽस्ट्/ *क्रि* [*सक*] आपण होऊन (खास करून अपरिचित माणसाशी) बोलणे, हटकणे.

account^1 /अ'काउन्ट्/ *ना* १ [*गण*] वृत्तान्त : *give an ~ of the meeting, सभेचा वृत्तान्त देणे.* २ [*गण*] बँकेत ठेवलेले पैसे, खाते :

open a bank ~, बँकेत पैसे ठेवणे किंवा खाते उघडणे. ३ **accounts** [*ब.व*] पैसे मिळाल्याची आणि खर्च केल्याची तपशीलवार नोंद, जमाखर्च. ४ (*वाक्प्र*) **of great, no, etc ac'count** फार, कमी वगैरे महत्त्वाचे. **on ac'count of sth** एखाद्या गोष्टीमुळे. **on no account** कोणत्याही कारणास्तव नाही. **take ac'count of sth, take sth into ac'count** एखादी गोष्ट विचारात घेणे किंवा लक्षात घेणे; विचार करणे.

account^2 /अ'काउन्ट्/ *क्रि* (*क्रिब*) **account for sth** (क) एखाद्या गोष्टीची कारणमीमांसा असणे, एखाद्या गोष्टीचे कारण/उत्तर असणे : *This ~s for his behaviour, हे त्याच्या वागणुकीमागचे कारण/वागणुकीचे उत्तर आहे.* (ख) (पैशाचा) खर्च कसा झाला याचे स्पष्टीकरण/विवरण देणे. **accountable** *वि* जबाबदार.

accountant /अ'काउन्टन्ट्/ *ना* [*गण*] हिशेब लिहिणारा किंवा तपासणारा माणूस, हिशेबनीस, हिशेबतपासनीस, फडणवीस, वैयायिक, लेखापाल. **accountancy** /-टन्सि/ *ना* [*अगण*] हिशेबनिसाचा व्यवसाय. **accounting** *ना* [*अगण*] हिशेबनिसाचे काम.

accredited /अ'क्रेडिटिड्/ *वि* अधिकृत, अधिकृत मान्यताप्राप्त : *our ~ representative, आमचा (मान्यताप्राप्त) प्रतिनिधी.*

accrue /अ'क्रू/ *क्रि* [*अक*] (*औप*) (खास करून पैसा) वाढणे, भर पडणे, वाढीव स्वरूपात लाभणे.

accumulate /अ'क्यूम्युलेइट्/ *क्रि* [*अक, सक*] वाढणे, वाढवणे, साठणे, साठवणे, साचणे, साचवणे, संचय करणे. **accumulation** /अ,क्यूम्यु'लेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] साठा, संचय, संग्रह.

accurate /'ॲक्युरट्/ *वि* तंतोतंत, काटेकोर; बरोबर, अचूक. **accuracy** /-रसि/ *ना* [*अगण*] अचूकपणा, काटेकोरपणा. **accurately** *क्रिवि* अचूकपणे, बरोबर, काटेकोरपणे.

accusation /,ॲक्यू'झेइश्न्/ *ना* [*गण*] एखाद्या माणसावर गैरकृत्य केल्याचा आरोप करणे, दोषारोपण.

accuse /अ'क्यूझ्/ *क्रि* [*सक*] (*of*)// एखाद्याने गैरकृत्य केले असे म्हणणे, आरोप करणे/ठेवणे, दोष देणे, दूषण देणे, आळ घेणे : *~ sb of theft, एखाद्यावर चोरीचा आरोप करणे/आळ घेणे.* **the accused** *ना* [*गण*] (*ब.व* **the accused**) आरोपी, गुन्हा केला असल्याचा संशय ज्याच्यावर आहे तो माणूस – संशयित. **accuser** *ना* [*गण*] आरोप करणारा, फिर्यादी, वादी, आरोपक.

accustom /अ'कॅस्टम्/ *क्रि* [*सक*] एखाद्या गोष्टीची स्वतःला, दुसऱ्याला, दुसऱ्या गोष्टीला सवय करणे, सवय लावणे. **accustomed** *वि* नेहमीचा, नित्याचा, रोजचा, सवयीतील.

ace /एइस्/ *ना* [*गण*] १ पत्त्यातील एक्का. २ (*अनौप*) अतिशय कुशल, निपुण, तरबेज, निष्णात : *an ~ footballer, फुटबॉल खेळण्यात तरबेज असणारा.*

ache /एइक्/ *ना* [*गण*] (सामासिक शब्दात जास्त वापर) सतत दुखणे, वेदना, दुःख, शूल : *headache, डोकेदुखी, डोके दुखणे.* **ache** *क्रि* [*अक*] १ दुखणे, ठणकणे : *My head ~s, माझं डोकं दुखतंय्/ठणकतंय्.* २ *for/to//* एखादी गोष्ट निकडीने हवी असणे, ध्यास लागणे, आस लागणे, ओढ लागणे : *He is aching for home, त्याला घरी जायचा ध्यास लागलाय्.* ○ *~ to go home, घरी जायला खंतावणे, घरी जायची ओढ लागणे.*

achieve /अ'चीव्ह्/ *क्रि* [*सक*] प्रयत्नपूर्वक मिळवणे किंवा साध्य करणे; एखादी गोष्ट साध्य करून घेणे किंवा मिळवणे : *~ one's aim, हेतू साध्य करणे.* **achievement** *ना* [*गण, अगण*] कामगिरी, मोठे काम.

Achilles /अ'किलीझ्/ *ना* (*वाक्प्र*) **Achilles' heel** एखाद्याच्या स्वभावातील किंवा चरित्रातील वर्मस्थान, कमजोर जागा. **Achilles' tendon** *ना* [*गण*] पायातील मागचे स्नायू (पोटरी वगैरे भागातील) आणि टाच यांना जोडणारी स्नायूंची दोरी, कंडरा, ढोणशीर किंवा घोडशीर.

acid /'ॲसिड्/ *ना* १ [*अगण, गण*] (*रसायनशास्त्र*) हायड्रोजनयुक्त असा भाजून भोके पाडणारा पदार्थ, ॲसिड, तेजाब, आम्ल. २ (*वाक्प्र*) **the 'acid test** एखाद्या गोष्टीची सत्त्वपरीक्षा, कसोटी, एखाद्या गोष्टीचा खरा

कस पाहण्याची परीक्षा. **acid** *वि* १ आंबट, आम्ल. २ (*ला*) निर्दय, खोचक. **,acid 'rain** *ना* [*अगण*] झाडे, पिके नष्ट करणारा ॲसिडयुक्त पाऊस.

acknowledge /अक्'नॉलिज्/ *क्रि* [*सक*] एखाद्या गोष्टीतील सत्य स्वीकारणे, जाणणे, कबूल करणे, मान्य करणे : *I ~ my mistake, मला माझी चूक मान्य आहे.* २ एखादी गोष्ट (पत्र वगैरे) मिळाल्याचे कळविणे, पोच देणे. ३ एखाद्याला आपण पाहिले आहे असे दाखवणे, ओळख देणे, दखल घेणे. ४ कृतज्ञता व्यक्त करणे, आभार प्रदर्शित करणे. **acknowledgement** (तसेच **acknowledgment**) *ना* [*गण, अगण*] कबुली; पोच; आभार, श्रेयनिर्देश, ऋणनिर्देश.

acne /'ॲक्नि/ *ना* [*अगण*] तोंड, मान यावरचे मुरमाचे फोड, पुरळ, यौवनपीटिका.

acorn /'अेइकॉऽन्/ *ना* [*गण*] ओक वृक्षाचे फळ.

acoustic /अ'कूस्टिक्/ *वि* ध्वनिविषयक, श्रवणविषयक. **acoustics** *ना* १ (*ब.व*) एखाद्या सभागृहातील गायन किंवा भाषण नीट ऐकू येण्यासाठी उपकारक किंवा अपायकारक असे त्या सभागृहाचे रचना-विशेष, संरचनेचे श्रवणविशेष घटक. २ [*अगण*] ध्वनिशास्त्र, नादविद्या.

acquaint /अ'क्वेइन्ट्/ *क्रि* [*सक*] *with*// एखाद्या गोष्टीची स्वतःला किंवा दुसऱ्याला माहिती करून देणे किंवा तिचा परिचय करून देणे. **acquaintance** *ना* १ [*गण*] थोडासा परिचय किंवा थोडीशी ओळख असणारी व्यक्ती, तोंडओळख असणारी व्यक्ती. २ [*अगण*] (*with*)// तोंडओळखीची, अल्पपरिचित व्यक्ती किंवा गोष्ट, साधारण माहितीची व्यक्ती किंवा गोष्ट. ३ (*वाक्प्र*) **make sb's acquaintance** एखाद्याशी ओळख/परिचय होणे किंवा करून घेणे; व्यक्तिशः भेटणे. **acquainted** *वि* (*with*)// व्यक्तिशः माहितीचा किंवा ओळखीचा.

acquiesce /,ॲक्वि'अेस्/ *क्रि* [*अक*] (*in*)// (*औप*) मुकाट्याने स्वीकारणे, मूकसंमती देणे, बिनविरोध राजी होणे किंवा मान्य करणे. **acquiescence** *ना* [*अगण*] मूकसंमती, मान्यता.

acquire /अ'क्वाइअ(र्)/ *क्रि* [*सक*] स्वकष्टाने, स्वसामर्थ्याने मिळवणे, स्वतःच्या हिमतीवर प्राप्त करणे किंवा कमावणे; संपादन करणे, ताब्यात येणे, प्राप्त होणे. **acquisition** /,ॲक्वि'झ़िश्न्/ *ना* १ [*गण*] मिळवलेली किंवा ताब्यात घेतलेली गोष्ट. २ [*अगण*] संपादन, मिळवण्याचे कार्य. **acquisitive** /अ'क्विझ़टिव्ह्/ *वि* वस्तू मिळवण्याची, संपादन करण्याची हाव असणारा, त्यात रस असणारा.

acquit /अ'क्विट्/ *क्रि* (**-tt-**) १ [*सक*] एखाद्याला निर्दोष ठरवणे, दोषमुक्त करणे, एखाद्याची आरोपातून मुक्तता करणे. २ ~ **oneself** घालून दिलेल्या मार्गाने वागणे : *He ~ed himself very well, तो अगदी नियमानुसार पद्धतशीरपणे वागला.* **acquittal** *ना* [*गण, अगण*] न्यायालयात केलेली एखाद्याच्या निर्दोष सुटकेची घोषणा.

acre /'अेइक(र्)/ *ना* [*गण*] जमिनीचे एक मोजमाप; ४८४० चौरस यार्ड (किंवा ४०५० चौरस मीटर किंवा ४३५६० चौरस फूट). **acreage** /'अेइकरिज्/ *ना* [*अगण*] एकरात मोजलेले क्षेत्र.

acrid /'ॲक्रिड्/ *वि* (खास करून वास आणि चव याबाबत वापर) तिखट, झणझणीत, कडू; तीव्र, कडक.

acrimonious /,ॲक्रि'मउनिअस्/ *वि* (*औप*) (खास करून भांडणाबाबत वापर) कडाक्याचे. **acrimony** /'ॲक्रिमनि; *अमे* -मउनि/ *ना* [*अगण*] कटुभाषण, कडक भाषा.

acrobat /'ॲक्रबॅट/ *ना* [*गण*] दोरीवरून चालण्यासारखी खास करून सर्कशीतील अवघड आणि शारीरिक चपळाईची कामे करणारा माणूस; डोंबारी, कोल्हाटी. **acrobatic** /,ॲक्र'बॅटिक्/ *वि* अंगचापल्यविषयक; डोंबाऱ्याचा. **acrobatics** *ना* [*ब.व*] अंगचापल्यकला, उड्या मारण्याची विद्या, कसरत.

acronym /'ॲक्रनिम्/ *ना* [*गण*] एखाद्या बहुशब्दीय नावातील शब्दांची सुरुवातीची अक्षरे घेऊन तयार केलेला शब्द, उदा WHO (World Health Organization), नूमवि (नूतन मराठी विद्यालय).

across /अ'क्रॉस; *अमे* अ'क्रॉऽस/ *क्रिवि, शब्दयो* १ एका बाजूपासून दुसऱ्या बाजूपर्यंत : *swim ~ the lake, तळ्याच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत म्हणजेच तळे पोहून ओलांडणे.* २ -च्या पलीकडे, विरुद्ध बाजूला : *My house is just ~ the street, माझे घर रस्त्याच्या पलीकडेच आहे.*

acrylic /अ'क्रिलिक्/ *वि* रासायनिक पदार्थापासून बनविलेल्या कृत्रिम धाग्याचे (कापड).

act^1 /ॲक्ट्/ *क्रि* १ काहीतरी करणे, कृती करणे; वागणे : *We must ~ quickly, आपण काहीतरी त्वरित करायला हवे.* २ [*अक, सक*] नाटकात किंवा चित्रपटात काम करणे, भूमिका करणे. ३ (*क्रिब*) **act as sb/sth** एखाद्या पदावर काम करणे, एखाद्या पदाचा कार्यभार सांभाळणे, -चे काम करणे किंवा कार्य करणे. **acting** *ना* [*अगण*] अभिनय, बतावणी, भूमिका करण्यातले कौशल्य. **acting** *वि* दुसऱ्या व्यक्तीचे काही काळापुरते काम करणारा, प्रभारी, हंगामी : *the ~ing manager, प्रभारी व्यवस्थापक.*

act^2 /ॲक्ट्/ *ना* [*गण*] १ कृत्य, कर्म, केलेले काम : *an ~ of kindness, उपकारकर्म, दयाळूपणाचे कृत्य.* २ कृती, काहीतरी करण्याची प्रक्रिया : *caught in the ~ of stealing, चोरी करताना पकडला.* ३ शासनाने केलेला कायदा : *an A~ of Parliament, संसदेने केलेला कायदा, अधिनियम.* ४ नाटकाचा भाग, अंक. ५ अनेक लहानलहान भागांची किंवा कृतींची साखळी असणाऱ्या प्रयोगातील किंवा खेळातील एक कृती : *a circus ~, सर्कसमधली कृती, कसरत.* ६ (*अनौप*) सोंग, ढोंग, बतावणी, आव : *put on an ~, सोंग आणणे, आव आणणे.* ७ (*वाक्प्र*) **an ˌact of 'God** अनियंत्रित नैसर्गिक शक्तींनी घडवलेली घटना, ईश्वरी करणी, देवाची करणी.

action /'ॲक्शन्/ *ना* १ [*अगण*] एखादी गोष्ट करण्याची पद्धती, कारवाई, कृती : *take ~ to stop the rise in crime, गुन्ह्याचे वाढते प्रमाण रोखण्यासाठी कारवाई किंवा कृती करणे.* २ [*गण*] कृत्य, कर्म, केलेले काम. ३ [*अगण*] एखादे पुस्तक, एखादी कथा वगैरेतील प्रमुख घटना. ४ [*अगण*] लढाई, युद्धातील कारवाई : *He was killed in ~, तो लष्करी कारवाईत किंवा चकमकीत मारला गेला.* ५ [*गण*] कोर्टात केलेला आरोप वगैरे : *bring an ~ against sb, एखाद्या विरुद्ध कोर्टकारवाई करणे, दाद मागणे.* ६ (*वाक्प्र*) **into 'action** कार्यवाहीत. **out of 'action** बंद पडणे, कार्यरत नसणे.

activate /'ॲक्टिव्हेइट्/ *क्रि* [*सक*] एखादी गोष्ट सुरू होणे किंवा करणे, चालू होणे, कार्यान्वित होणे किंवा करणे.

active /'ॲक्टिव्ह्/ *वि* १ काम करणारा, क्रियावान्, कार्यक्षम; उद्योगी, कामसू, तडफदार. २ (*व्याकरण*) सकर्मक कर्तरी (प्रयोग), उद्देश कर्तृवाचक असणारे (वाक्य), उदा *'She drives the car', 'ती गाडी चालवते.'* **the active** *ना* [*अे.व*] सकर्मक कर्तरी असे क्रियापदरूप. **actively** *क्रिवि* कामसूपणे, तडफदारीने; कर्तरी (प्रयोगी).

activist /'ॲक्टिव्हिस्ट्/ *ना* [*गण*] कार्यकर्ता, क्रियाशील सभासद (खास करून राजकीय क्षेत्रातील).

activity /ॲक्'टिव्हटि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] कामसूपणा, क्रियाशील असण्याची स्थिती; वर्दळ, धामधूम : *a lot of ~ in the street, रस्त्यावरील धामधूम किंवा वर्दळ.* २ [*गण, खास ब.व*] कार्य; उपक्रम, कार्यक्रम : *social activities, सामाजिक कार्य, समाजोपयोगी कार्यक्रम किंवा सामाजिक उपक्रम.*

actor /'ॲक्ट(र्)/ *ना* [*गण*] (*स्त्री* **actress** /'ॲक्ट्रिस्/) नट (*स्त्री* नटी), चित्रपट किंवा नाटकातील कलाकार किंवा कलावंत, रंगकर्मी.

actual /'ॲक्चुअल्/ *वि* वास्तविक; खरा, सत्य. **actually** /'ॲक्चुलि/ *क्रिवि* १ खरे, खरे पाहता, खरोखर; वास्तविक पाहता, वस्तुतः, प्रत्यक्षात : *what ~ly happened, खरं काय घडलं.* २ (आश्चर्यदर्शक) : *He ~ly expected me to pay! मी पैसे द्यावे असं त्याला खरोखरच वाटलं!*

acumen /'ॲक्युमेन्/ *ना* [*अगण*] (*औप*) वस्तू नीटपणे समजण्याची आणि जोखण्याची क्षमता, कुशाग्रबुद्धी, दृष्टी.

acupuncture /'ॲक्युपङ्क्च(र्)/ *ना* [*अगण*] (*वैद्यकशास्त्र*) शरीरात सुया टोचून रोग बरा करण्याचा उपाय, सूचीछिद्रोपाय.

acute /अ'क्यूऽट/ *वि* (**-r, -st**) खूप, कमालीचा; तीव्र : *suffer ~ hardship, खूप कष्ट सोसणे, कमालीचे हाल काढणे.* २ अतिसंवेदनशील, तल्लख, तीक्ष्ण : *an ~ sense of hearing, तीक्ष्ण श्रवणशक्ती.* **acute 'accent** *ना* [*गण*] (इंग्रजी) अक्षरावर दिलेले चिन्ह, उदा *café* या शब्दातील *e* वरील चिन्ह. **acute 'angle** *ना* [*गण*] ९० अंशापेक्षा लहान असणारा कोन, लघुकोन. **acutely** *क्रिवि* कमालीचे, तीव्रतेने. **acuteness** *ना* [*अगण*] तीव्रता; तीक्ष्णता.

AD /ˌअेइ 'डी/ *संरू* ख्रिस्ताच्या जन्मापासून मोजलेले (वर्ष), ख्रिस्तजन्मानंतर . . . . वे वर्ष (वर्षी), इसवी सन.

ad /ॲड्/ *ना* [*गण*] (*अनौप*) ADVERTISEMENT जाहिरात (➪ ADVERTISE) या शब्दाचे संक्षिप्त रूप.

adamant /'ॲडमन्ट्/ *वि* (*औप*) काहीही झाले तरी स्वतःचे मत न बदलणारा, ठाम किंवा घट्ट भूमिका घेणारा, अविचल, हटवादी.

Adam's apple /ˌॲडम्ज़् 'ॲप्ल्/ *ना* [*गण*] गळ्याच्या पुढील भागावरील उंचवटा, कंठ, कंठमणी, घांटी.

adapt /अ'डॅप्ट्/ *क्रि* [*सक*] नवीन परिस्थिती किंवा वापर वगैरेसाठी साजेसा करून घेणे, फेरफार करून योग्य करणे, अनुरूप करणे. **adaptable** *वि* बदलाभिमुख, जुळेल असे करण्याजोगा, जुळवून घेणारा. **adaptation** /ˌॲडॅप्'टेइशन्/ *ना* [*गण, अगण*] जुळवून घेण्याची प्रक्रिया किंवा त्याचा परिणाम; रूपांतर : *an ~ation of the play for television, दूरदर्शनसाठी केलेले नाटकाचे रूपांतर.* **adaptor** *ना* [*गण*] अनेक गुड्या एकाच घरात (सॉकेटमध्ये) जोडल्या जातील अशी विजेची एक प्रकारची गुडदी किंवा खोचणी.

add /ॲड्/ *क्रि* १ [*सक*] कशाततरी भर घालणे, मिसळणे : *A ~ the flour to the milk, दुधात पीठ मिसळा.* २ [*अक, सक*] (*up*)// (आकड्यांची) बेरीज करणे, आगम करणे. ३ [*सक*] (आणखी काहीतरी) बोलणे, आणखी पुढे म्हणणे. ४ (*क्रिब*) **add up** (*अनौप*) जुळणारा असणे, अर्थ असणे; बरोबर वाटणे : *It just doesn't ~ up, हे बरोबर नाही वाटत, हे जुळत नाही (याच्याशी).* **add up to sth** पर्यवसान होणे, दाखविणे, दर्शविणे.

adder /'ॲड(र्)/ *ना* [*गण*] आकाराने लहान असा एक विषारी साप.

addict /'ॲडिक्ट्/ *ना* [*गण*] १ मादक पदार्थ (दारू वगैरे) सेवनाच्या आधीन झालेला माणूस, व्यसनाधीन, या गोष्टींना नादावलेला किंवा सोकावलेला माणूस. २ एखाद्या गोष्टीची अति रुची, फार आवड असणारी व्यक्ती : *a TV ~, दूरदर्शनला नादावलेला माणूस, दूरदर्शनचा शौकी.* **addicted** /अ'डिक्टिड्/ *वि* (*to*)// एखादी गोष्ट घेण्यापासून परावृत्त न होऊ शकणारा, नादी लागलेला, आसक्त : *~ed to drugs, मादक पदार्थांच्या आहारी गेलेला.* **addiction** /अ'डिक्शन्/ *ना* [*अगण, गण*] चटक, व्यसन, खोड, आसक्ती. **addictive** /अ'डिक्टिव्ह्/ *वि* चटक लावणारा, व्यसन जडवणारा.

addition /अ'डिशन्/ *ना* १ [*अगण*] बेरीज, भर. २ [*गण*] जादा घातलेले काही, वाढ. ३ (*वाक्प्र*) **in addition (to sth/sb)** जादा, अधिक गोष्ट, माणूस वगैरे. **additional** /-शन्ल्/ *वि* जादा, अधिक, अधि-. **additionally** /-शनलि/ *क्रिवि* भर म्हणून, जादा म्हणून.

additive /'ॲडिटिव्ह्/ *ना* [*गण*] एखाद्या गोष्टीत, विशेषतः अन्नपदार्थात भर घातलेला पदार्थ, मिश्रित पदार्थ.

address /अ'ड्रेस; *अमे* 'ॲड्रेस्/ *ना* [*गण*] राहणाऱ्याचा घरक्रमांक, रस्ता, त्याचे गाव वगैरे, पत्ता. २ औपचारिक भाषण, अभिभाषण. **address** *क्रि* [*सक*] १ नाव व पत्ता लिहिणे. २ भाषण करणे.

adept /'ॲडेप्ट्, अ'डेप्ट्/ *वि* (*at/in*)// (एखादी गोष्ट करण्यात) वाकबगार, निपुण, प्रवीण, पटाईत, निष्णात.

adequate /'ॲडिक्वट्/ *वि* पुरेसा, पुरता; समाधानकारक. **adequately** *क्रिवि* पुरेशा प्रमाणात, हवा तेवढा; समाधानकारकपणे.

adhere /अड्'हिअ(र्)/ *क्रि* [*अक*] (*औप*) १ *to*// एखाद्या गोष्टीला घट्ट चिकटून राहणे. २ *to*// (*ला*) (क) नियम वगैरेला धरून चालणे किंवा वागणे. (ख) एखाद्या मताला वगैरे पाठिंबा देणे, पुष्टी देणे, दुजोरा देणे. **adherent**

/अड्'हिरन्ट्/ *ना* [*गण*] एखादी व्यक्ती, गट वगैरेंना पाठिंबा देणारा किंवा एखाद्या गटाचा/व्यक्तीचा माणूस, अनुयायी. **adherence** /-रन्स्/ *ना* [*अगण*] चिकटून असणे, अनुयायित्व; निष्ठा.

adhesive /अड्'हीसिव्ह्/ *वि* चिकटू शकणारा, चिकट. **adhesion** /अड्'हीझ्न्/ *ना* [*अगण*] चिकटून असणे; निष्ठा, सलगी. **adhesive** *ना* [*गण, अगण*] चिकटवण्यासाठी वापरण्यात येणारा पदार्थ, उदा डिंक.

ad hoc /,ॲड् 'हॉक्/ *वि, क्रिवि* तात्पुरता (केलेला किंवा आणलेला), तात्कालिक (हेतू किंवा कारणासाठी केलेला), त्या त्या वेळेपुरता, तदर्थ, वेळ मारून नेण्यापुरता; मुद्दाम ठरवून अथवा योजना आखून न केलेला.

adjacent /अ'जेइस्न्ट्/ *वि* (*to*)// एखाद्या गोष्टीच्या पुढचा, लगतचा, निकटचा, संलग्न, समीप.

adjective /'ॲजिक्टिव्ह्/ *ना* [*गण*] (*व्याकरण*) नामाचे वर्णन करणारा शब्द, विशेषण, उदा *green* in *green grass, हिरवे गवत* मधील *हिरवे.* **adjectival** /ॲजेक्'टाइव्ह्ल्/ *वि* विशेषण, विशेषणयुक्त.

adjoin /अ'जॉइन्/ *क्रि* [*अक*] (*औप*) शेजारी असणे, लागून असणे, लगत असणे : *~ing rooms, शेजारच्या, लागून असलेल्या खोल्या.*

adjourn /अ'जऽन्/ *क्रि* [*सक*] (सभा) तहकूब करणे, स्थगित करणे, त्या वेळेपुरती थांबवणे. **adjournment** *ना* [*अग, अगण*] तहकुबी, स्थगिती, निर्यापण.

adjudicate /अ'जूडिकेइट्/ *क्रि* [*अक, सक*] (*औप*) अधिकृत निर्णय किंवा निकाल देणे, निवाडा करणे, फैसला करणे. **adjudication** /अ,जूडि'केइश्न्/ *ना* [*अगण*] अधिकृत निर्णय, निवाडा, फैसला. **adjudicator** *ना* [*गण*] निवाडा किंवा फैसला करणारा.

adjunct /'ॲजेङ्क्ट्/ *ना* [*गण*] (*to/of*)// दुसऱ्या एखाद्या गोष्टीला जोडलेली पण तीहून कमी महत्त्वाची असणारी गोष्ट, आनुषंगिक किंवा अनुयोगी गोष्ट, उपांग.

adjust /अ'जेस्ट्/ *क्रि* १ [*सक*] एखादी गोष्ट सुधारण्यासाठी दुरुस्त करणे, बदलणे. २ [*अक, सक*] (*to*)// नवीन परिस्थितीची सवय होणे, अंगवळणी पडणे, परिस्थितीशी जुळवून घेणे. **adjustable** *वि* बदलानुकारी, नव्या परिस्थितीशी जुळवून घेणारा. **adjustment** *ना* [*गण, अगण*] एखादी गोष्ट सुधारण्यासाठी केलेली दुरुस्ती, केलेला बदल; जुळवून घेणे.

ad lib /,ॲड् 'लिब्/ *वि, क्रिवि* पूर्वतयारीविना केलेले, बोललेले वगैरे, पदरचे, आयत्यावेळचे, आयत्यावेळी. **ad lib** *क्रि* (-bb-) [*अक*] आयत्यावेळी भाषण करणे, कला सादर करणे वगैरे.

administer /अड्'मिनिस्ट(र्)/ *क्रि* [*सक*] १ चालवणे, व्यवस्था पाहणे : ~ *a hospital, इस्पितळ चालवणे, इस्पितळाचा कारभार पाहणे.* २ (*औप*) देणे : ~ *punishment/a drug, शिक्षा देणे किंवा ठोठावणे, औषध देणे.*

administration /अड्,मिनि'स्ट्रेइश्न्/ *ना* १ [*अगण*] सार्वजनिक कामाचे किंवा उद्योगाचे प्रशासन, त्यांचा कारभार. २ [*अगण*] प्रशासन करण्याची प्रक्रिया, कारभाराची पद्धती. ३ (बहुधा **the Administration**) [*गण*] (खास *अमे*) शासन, सरकार : *the Clinton A~, क्लिंटन यांचे सरकार, शासन.* **administrative** /अड्'मिनिस्ट्रटिव्ह्; *अमे* -स्ट्रेइटिव्ह्/ *वि* प्रशासकीय, कारभाराचा. **administrator** /अड्'मिनिस्ट्रेइट(र्)/ *ना* [*गण*] प्रशासक; कारभारी.

admirable /'ॲड्मरब्ल्/ *वि* कौतुकास्पद, गौरवास्पद, प्रशंसनीय; उत्तम, उत्कृष्ट, नामी. **admirably** *क्रिवि* कौतुक करावे असे; उत्तम रीतीने, फार चांगले.

admiral /'ॲड्मरल्/ *ना* [*गण*] नौदलातील उच्च श्रेणीचा अधिकारी, नौसेनाधिपती.

admire /अड्'माइअ(र्)/ *क्रि* [*सक*] चांगले मत असणे, कौतुक वाटणे, कौतुकाने पाहणे, कौतुक करणे, सानंदाश्चर्य वाटणे. **admiration** /,ॲड्म'रेश्न्/ *ना* [*अगण*] आदर, पसंती किंवा आनंद यांची भावना, वाहवा, कौतुक. **admirer** *ना* [*गण*] चाहता, प्रशंसक, **admiring** *वि*: *admiring glances, कौतुकाचे कटाक्ष, कौतुकाच्या नजरा, कौतुक भरल्या डोळ्यांनी.*

admissible /अड्'मिसब्ल्/ *वि* १ (*कायदा*) परवानगी देण्याजोगा, दाखल करून

घेण्याजोगा, ग्राह्य : ~ *evidence, ग्राह्य किंवा दाखल करून घेण्याजोगा पुरावा.* २ (*औप*) स्वीकारार्ह.

admission /अड्'मिश्न्/ *ना* १ [*अगण*] एखादी इमारत, संस्था, शाळा वगैरेत प्रवेश. २ [*अगण*] एखाद्या सार्वजनिक ठिकाणी प्रवेश करण्यासाठी घेण्यात येणारे पैसे, प्रवेशशुल्क, प्रवेश फी. ३ [*गण*] एखाद्या गोष्टीची सत्यता मानणे, कबुली, कबुलीजबाब.

admit /अड्'मिट्/ *क्रि* (**-tt-**) [*सक*] १ प्रवेश देणे, प्रवेश करण्यास परवानगी देणे; आत येऊ देणे, आत घेणे. २ (चूक) मान्य करणे, कबूल करणे : *I ~ that I was wrong, मी हे मान्य करतो किंवा कबूल करतो की माझी चूक झाली.* **admittance** *ना* [*अगण*] प्रवेशाचा हक्क. **admittedly** *क्रिवि* कबूल केल्याप्रमाणे, मान्य केल्यानुसार.

admonish /अड्'मॉनिश्/ *क्रि* [*सक*] (*औप*) एखाद्याला सौम्य भाषेत त्याने चूक केल्याची समज देणे, कानपिचक्या देणे, कान उपटणे.

ad nauseam /,ॲड् 'नॉऽझिॲम्/ *क्रिवि* त्रास होण्याएवढे किंवा कटकट वाटण्याइतके पुन्हापुन्हा, वारंवार : *She played the same records ~, कटकट वाटावी इतक्यांदा तिने त्याच त्याच ध्वनिमुद्रिका लावल्या, वीट येईतो तिने त्याच त्याच ध्वनिमुद्रिका लावल्या.*

ado /अ'डू/ *ना* [*अगण*] खटाटोप, उपद्व्याप, घोळ; उशीर, विलंब : *without further ~, जास्त विलंब न लावता.*

adolescent /,ॲड'लेस्न्ट्/ *वि, ना* [*गण*] बाल्यावस्था आणि प्रौढावस्था यामधल्या अवस्थेतील कमी वयाचा मुलगा/मुलाचा, पौगंडावस्थेतील मुलगी/मुलगा किंवा अशा मुलां(संबंधी)चा. **adolescence** /-'लेस्न्स्/ *ना* [*अगण*] पौगंडावस्था.

adopt /अ'डॉप्ट्/ *क्रि* [*सक*] १ (दुसऱ्याचे) मूल स्वतःच्या कुटुंबात कायदेशीर अपत्य म्हणून घेणे, दत्तक घेणे. २ एखादी जीवनपद्धती, रीत वगैरे स्वीकारणे किंवा अंगिकारणे. **adoption** /अ'डॉप्श्न्/ *ना* [*अगण, गण*] दत्तकविधान; अंगिकार, ग्रहण. **adoptive** *वि* दत्तक; स्वीकारलेला.

adore /अ'डॉऽ(र्)/ *क्रि* [*सक*] १ खूप प्रेम आणि आदर करणे; पूजा करणे. २ (*अनौप*) खूप आवडणे. **adorable** *वि* प्रेम वाटावे असा; अतिशय आवडण्याजोगा असा, मोहक : *an adorable child/puppy, मोहक मूल/कुत्र्याचं पिलू.* **adoration** /,ॲड'रेइश्न्/ *ना* [*अगण*] भक्ती, पूजन, प्रेम.

adorn /अ'डॉऽन्/ *क्रि* [*सक*] सुंदर करणे, आकर्षक करणे; सुशोभित करणे, अलंकारणे, सजवणे. **adornment** *ना* [*गण*] सजावट, शृंगार, शोभा.

adrenalin /अ'ड्रेनलिन्/ *ना* [*अगण*] राग, भीती यामुळे शरीरात निर्माण होणारे आणि हृदयाच्या स्पंदनाची गती वाढविणारे एक द्रव्य.

adrift /अ'ड्रिफ्ट्/ *वि* (होड्यांविषयी) मुक्तपणे तरंगणारी; वहावलेली, भरकटलेली.

adulation /,ॲड्यु'लेइश्न्; *अमे* ॲजु'ले-/ *ना* [*अगण*] (*औप*) अतिस्तुती, अतिप्रशंसा, खुशामत.

adult /'ॲडैल्ट्, तसेच अ'डैल्ट्/ *ना* [*गण*], *वि* पूर्ण वाढलेला, वयात आलेला, प्रौढ, वयस्क (माणूस किंवा प्राणी). **adulthood** *ना* [*अगण*] पूर्ण वाढीची, वयात आल्याची अवस्था किंवा प्रौढत्व.

adulterate /अ'डैल्टरेइट्/ *क्रि* [*सक*] दुसरा पदार्थ मिसळून गुणवत्ता किंवा प्रत कमी करणे, भेसळ करणे.

adultery /अ'डैल्टरि/ *ना* [*अगण*] विवाहित स्त्री किंवा पुरुषाने दुसऱ्या विवाहित पुरुष किंवा स्त्रीशी सहमतीने केलेला समागम, व्यभिचार, विवाहबाह्य संबंध. **adulterer** /-टर(र्)/ *ना* [*गण*] (*स्त्री* **adulteress** /-टरिस्/) विवाहबाह्य संबंध ठेवणारा पुरुष/ठेवणारी स्त्री, बाहेरख्याली. **adulterous** /-टरस्/ *वि* व्यभिचारी, बदफैली.

advance^1 /अड्'व्हान्स्; *अमे* -व्हॅन्स्/ १ [*अक, सक*] पुढे सरणे, पुढे येणे, आगेकूच करणे. २ [*अक*] मुदतीपूर्वी किंवा आधीच (पैसे) देणे, आगाऊ पैसे देणे; उधार किंवा उसने देणे. **advanced** *वि* १ जीवनात किंवा प्रगतीमध्ये पुढे गेलेला, पुढारलेला, प्रगत : *~d in years, वयाने मोठा म्हणजे वृद्ध.* २ प्राथमिक नाही असा : *~d studies, प्रगत अभ्यास, वरचा अभ्यास.* **advancement** *ना* [*अगण*] पुढे

जाण्याची क्रिया; प्रगती किंवा बढती.

advance^{2} /अड्'व्हान्स्; *अमे* -व्हॅन्स/ *ना* [*गण, अगण*] पुढे जाणे, आगेकूच; प्रगती. २ [*गण*] आगाऊ रक्कम, अग्रिम धन; कर्ज, उचल. ३ **advances** [*ब.व*] एखाद्याशी जवळीक किंवा सलगी करण्याचे प्रयत्न, लगट करण्याचे प्रयत्न. ४ (*वाक्प्र*) **in advance (of sth)** एखाद्या गोष्टीपूर्वी, आधी. **advance** *वि* आधीच दिलेला किंवा केलेला, पूर्व : *an ~ warning, पूर्व सूचना.*

advantage /अड्'व्हान्टिज्; *अमे* -व्हॅन्-/ *ना* १ [*गण*] अधिक मोका मिळण्यास उपयोगी ठरणारी गोष्ट, फायदा. २ [*अगण*] फायदा, नफा, लाभ, प्राप्ती. ३ (*वाक्प्र*) **take advantage of sb** एखाद्याचा वापर करणे, एखाद्याचा गैरफायदा घेणे. **take advantage of sth** एखाद्या गोष्टीचा चांगला वापर करणे, फायदा घेणे. **advantageous** /,ॲड्व्हन्'टेइजस/ *वि* फायदेशीर, किफायतशीर.

advent /'ॲड्व्हन्ट्/ *ना* **the advent** [*अे.व*] *of*// महत्त्वाच्या घटनेचे किंवा प्रसंगाचे आगमन, त्याचा आगम.

adventure /अड्'व्हेन्च(र्)/ *ना* १ [*गण*] उत्कंठा वाढविणारा किंवा धोकादायक प्रवास किंवा कृती, साहस. २ [*अगण*] उत्कंठा, सनसनाटीपणा; धोका. **adventurer** *ना* [*गण*] साहसप्रिय किंवा साहसी माणूस. **adventurous** *वि* १ साहसप्रिय, साहसी. २ उत्कंठापूर्ण.

adverb /'ॲड्व्हऽब्/ *ना* [*गण*] (*व्याकरण*) क्रियापद, विशेषण, किंवा दुसरे क्रियाविशेषण याविषयी जास्त माहिती देणारा शब्द, क्रियाविशेषण, उदा *quickly* in *run quickly*, *जोरात पळणे* मधला *जोरात* शब्द. **adverbial** /ॲड्'व्हऽबिअल्/ *वि, ना* [*गण*] क्रियाविशेषण, क्रियाविशेषणात्मक.

adversary /'ॲड्व्हसरि; *अमे* -सेरि/ *ना* [*अगण*] (*ब.व* **-ies**) (*औप*) शत्रू, वैरी; प्रतिस्पर्धी, विरुद्ध बाजूचा, विरोधी.

adverse /'ॲड्व्हऽस्/ *वि* प्रतिकूल, विरुद्ध : *~ conditions, प्रतिकूल परिस्थिती.* **adversely** *क्रिवि* विरुद्ध, प्रतिकूल अशा पद्धतीने. **adversity** /अड्'व्हऽसटि/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) विपत्ती, आपत्ती, अडचण, संकट.

advert /'ॲड्व्हऽट्/ *ना* [*गण*] (*अनौप*) ADVERTISEMENT जाहिरात (➪ ADVERTISE) याचे संक्षिप्त रूप.

advertise /'ॲड्व्हटाइझ्/ *क्रि* [*सक*] वस्तू (खास करून विक्रीसाठी) उपलब्ध आहे हे लोकांना वर्तमानपत्रे वगैरेमध्ये सूचनापत्र देऊन कळवणे, जाहिरात देणे. **advertisement** /अड्'व्हऽटिस्मन्ट्; *अमे* ,ॲड्व्हर्'टाइझ्मन्ट्/ *ना* [*गण*] वर्तमानपत्र, दूरदर्शन वगैरेमधून दिलेले एखाद्या वस्तूच्या विक्रीबाबतचे सूचनापत्र किंवा निवेदन, जाहिरात, प्रसिद्धीकरण. **advertiser** *ना* [*गण*] जाहिरातदार, जाहीर करणारा. **advertising** *ना* [*अगण*] जाहिरातीची कला, जाहिरात करणे.

advice /अड्'व्हाइस्/ *ना* [*अगण*] एखाद्याला त्याने काय करावे (किंवा करू नये) याविषयी दिलेले मत, उपदेश, सल्ला.

advise /अड्'व्हाइझ्/ *क्रि* [*सक*] १ सल्ला देणे, उपदेश करणे. २ (*of*)// (खास *वाणिज्य*) एखाद्या बाबीची सूचना देणे, कळवणे : *~ sb of a delivery date, एखाद्याला बटवड्याचा दिनांक कळवणे.* **advisable** *वि* सल्ला म्हणून देण्यास योग्य; समंजस किंवा शहाणा, विवेकी. **adviser** (तसेच खास *अमे* **advisor**) *ना* [*गण*] सल्ला देणारा, उपदेश करणारा, सल्लागार **advisory** *वि* सल्ला देणारा, सल्लागार.

advocate /'ॲड्व्हकट्/ *ना* [*गण*] एखाद्या व्यक्तीची किंवा एखाद्या कल्पनेची बाजू घेऊन (विशेषतः न्यायालयात) बोलणारा, अधिवक्ता, समर्थक. **advocate** /'ॲड्व्हकेइट्/ *क्रि* [*सक*] बाजू घेणे, पाठिंबा देणे, समर्थन करणे.

aerial /'अेअरिअल्/ *वि* अंतरिक्षातून किंवा आकाशातून (घेतलेला, आलेला वगैरे), अंतरिक्षीय, आकाशीय, हवाई : *an ~'photograph, अंतरिक्षातून घेतलेले छायाचित्र.* **aerial** *ना* [*गण*] दूरदर्शन किंवा आकाशवाणी यांचे संदेश घेणारी वायर किंवा कांबी.

aerobatics /,अेअर'बॅटिक्स्/ *ना* [*ब.व*] विमानांच्या आकाशातील कसरती, हवाई प्रात्यक्षिके.

aerobics /अेअ'रउबिक्स्/ *ना* [तसेच ब.व क्रियापदासह अे.व] शरीरातील प्राणवायूचे प्रमाण वाढविण्यासाठी केलेला व्यायाम.

aerodrome /'अेअरड्रउम्/ *ना* [*गण*] (विशेषतः *ब्रि जुना, अप्रचलित*) छोटा विमानतळ.

aerodynamics /,अेअरउडाइ'नॅमिक्स्/ *ना* [*अगण*] आकाशात किंवा हवेत संचार करणाऱ्या वस्तूंवर प्रभाव पाडणाऱ्या शक्तींचा विचार करणारे विज्ञान, वायुगतिशास्त्र, वायुगतियामिक. **aerodynamic** *वि* वायुगतिशास्त्रीय.

aeronautics /,अेअर'नॉऽटिक्स्/ *ना* [*अगण*] विमानोड्डाण कला किंवा शास्त्र, विमानसंचारशास्त्र.

aeroplane /'अेअरप्लेइन/ *ना* [*गण*] पंख असणारे आणि एक किंवा अधिक इंजिन असणारे विमान.

aerosol /'अेअरसॉल्; *अमे* -सॉऽल्/ *ना* [*गण*] द्रवपदार्थाचा बारिक फवारा मारण्याचे एक छोटे भांडे किंवा कुपी.

aerospace /'अेअरउस्पेइस्/ *ना* [*अगण*] पृथ्वीभोवतीचे वातावरण आणि त्यापलीकडील अवकाश.

aesthetic /ईस्'थेटिक्; *अमे* अेस्'थेटिक्/ *वि* सौंदर्यानुभवाचा, सौंदर्याचा आस्वाद घेण्यासंबंधीचा. **aesthetically** /-क्लि/ *क्रिवि* सौंदर्यानुभवाच्या दृष्टीने. **aesthetics** *ना* [*अगण*] सौंदर्याचा विचार करणारी एक तत्त्वज्ञान-शाखा, सौंदर्यशास्त्र.

afar /अ'फा(र्)/ *क्रिवि* (*वाक्प्र*) **from a'far** खूप दूरून, खूप लांबून.

affable /'ॲफब्ल्/ *वि* मनमिळाऊ, सौहार्दपूर्ण. **affably** *क्रिवि* मनमिळाऊपणे, दिलखुलासपणे.

affair /अ'फेअ(र्)/ *ना* १ [*गण*, बहुधा *अे.व*] घटना किंवा घटनानुक्रम, काम किंवा प्रकरण. २ [*अे.व*] काही करायला पाहिजे असा प्रश्न; एखाद्याशी संबंधित असणारे काम किंवा तसा प्रश्न, अखत्यारीतले काम. ३ **affairs** [*ब.व*] (क) सार्वजनिक हिताच्या गोष्टी. (ख) खाजगी गोष्ट, वैयक्तिक कामे. ४ [*गण*] विवाहबाह्य संबंध, लफडे, भानगड.

affect /अ'फेक्ट्/ *क्रि* [*सक*] परिणाम करणे : *The cold climate ~ed her health, थंडीचा तिच्या तब्बेतीवर परिणाम झाला.* **affectation** /,ॲफेक्'टेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] अनैसर्गिक वागणूक, विचित्र वर्तन, तोरा. **affected** *वि* अनैसर्गिक; कृत्रिम, दिखाऊ, वरपांगी, उसना.

affection /अ'फेक्श्न्/ *ना* [*अगण*] ममता, ममत्व, स्नेहभाव; प्रेम. **affectionate** /-शनट्/ *वि* मायाळू, वत्सल; प्रेमळ. **affectionately** *क्रिवि* मायाळूपणे, ममतेने; प्रेमळपणे, प्रेमाने.

affidavit /,ॲफि'डेइव्हिट्/ *ना* [*गण*] (*कायदा*) शपथ घेऊन लिहिलेले आणि पुरावा म्हणून वापरले जाणारे पत्र, प्रतिज्ञापत्र, शपथपूर्वक लेखी जबानी.

affiliate /अ'फिलिअेइट्/ *क्रि* [*अक, सक*] (संघटनेच्या संदर्भात खास वापर) मोठ्या संघटनेला किंवा संस्थेला जोडणे, संलग्न होणे. **affiliation** /अ'फिलि'अेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] संलग्नीकरण, उपकृष्टता.

affinity /अ'फिनटि/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) १ दृढ संबंध, जिव्हाळ्याचे संबंध; सोयरीक. २ खास आवड, ओढ, रुची, जिव्हाळा : *She feels a strong ~ for him, तिला त्याच्याविषयी फार ओढ वाटते.*

affirm /अ'फऽम्/ *क्रि* [*सक*] (*औप*) सांगणे, जाहीर करणे. **affirmation** /,ॲफ'मेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] निश्चित सांगणे, जाहीर करणे. **affirmative** *वि* (शब्द, उत्तरे वगैरेच्या संदर्भात) रुकार मान्यतादर्शक, संमतीदर्शक; होकारार्थी. **affirmative** *ना* १ [*गण*] होकारार्थी शब्द. २ (*वाक्प्र*) **in the affirmative** (*औप*) होकारार्थी (उत्तर), दिलेला रुकार.

affix^{1} /अ'फिक्स्/ *क्रि* [*सक*] (*औप*) चिकटवणे, लावणे; जोडणे.

affix^{2} /'ॲफिक्स्/ *ना* [*अगण*] (*व्याकरण*) पूर्वप्रत्यय किंवा उत्तरप्रत्यय, प्रत्यय, उदा un- किंवा -ly.

afflict /अ'फ्लिक्ट्/ *क्रि* [*सक*] दुःख किंवा त्रास देणे, दुखावणे. **affliction** /अ'फ्लिक्श्न्/ *ना* [*गण, अगण*] (*औप*) दुःख, दुःखाचे मूळ.

affluent /'ॲफ्लुअन्ट्/ *वि* श्रीमंत, पैसेवाला; धनवान, संपन्न. **affluence** /-लुअन्स्/ *ना* [*अगण*] श्रीमंती, संपत्ती, ऐश्वर्य; समृद्धी, संपन्नता.

afford /अ'फॉऽड्/ *क्रि* [*सक*] १ एखाद्या गोष्टीसाठी पुरेसे पैसे, वेळ, जागा वगैरे असणे; एखादी गोष्ट पैसा, वेळ किंवा जागा वगैरे या दृष्टीने देणे परवडणे. २ कोणताही धोका न पत्करता एखादी गोष्ट करता येणे : *We can't ~ to lose such experienced workers, एवढे अनुभवी कामगार हातचे घालवणे आम्हाला परवडणार नाही.*

affront /अ'फ्रन्ट्/ *क्रि* [*सक*] अपमान करणे, उपमर्द करणे, स्वाभिमान दुखावणे, अस्मितेला धक्का लावणे. **affront** *ना* [*गण*] अपमान.

afield /अ'फील्ड्/ *क्रिवि* (*वाक्प्र*) **far afield** खूप दूर – विशेषतः घरापासून, फार लांब.

afloat /अ'फ्लउट्/ *वि* १ तरंगता, पाण्यावरचा, तरता. २ जहाजावर. ३ ऋणमुक्त, कर्जमुक्त.

afoot /अ'फुट्/ *वि* तयार होत असलेला, घाटत असलेला.

aforementioned /अ,फॉऽमेन्शन्ड/ (तसेच **aforesaid** /अ'फॉऽसेड्/) *वि* (*औप*) पूर्वी किंवा आधी उल्लेखिलेले, पूर्वोक्त, उपरोक्त, पूर्वी म्हटल्याप्रमाणे.

afraid /अ'फ्रेइड्/ *वि* १ (*of/to*)// कशालातरी किंवा कुणालातरी घाबरलेला, भ्यायलेला, काहीतरी वाईट घडेल या कल्पनेने भयभीत झालेला : *He was ~ of spiders, त्याला कोळ्यांची भीती वाटायची* ○ *~ to go out in the dark, अंधारात बाहेर जायला घाबरणारा.* २ (*वाक्प्र*) **I'm afraid** मला खेद वाटतो; मला वाईट वाटते : *I'm ~ we'll arrive late, आपण उशिरा पोचू याबद्दल मला खेद वाटतो.*

afresh /अ'फ्रेश्/ *क्रिवि* (औप) पुन्हा, परत, पुनश्च.

after /'आफ्ट(र्); *अमे* 'ॲफ्-/ *शब्दयो* १ नंतर : *leave ~ lunch, जेवणानंतर जाणे, जेवण झाल्यावर जाणे.* २ पाठोपाठ, मागोमाग, नंतर : *C comes ~ B in the alphabet, वर्णमालेत B नंतर किंवा B च्या पाठोपाठ C येतो.* ○ *Year ~ year he would visit her, वर्षानुवर्ष तो तिला भेटत असे.* ३ -च्या कारणाने, -च्या मुळे, नंतर : *A~ what he said, I don't ever want to see him again, तो असे बोलल्यानंतर/बोलल्यामुळे मला त्याला परत भेटायची मुळीच इच्छा नाही.* ४ मागे लागणे, शोधात असणे, मागावर असणे : *The police are ~ my brother, पोलीस माझ्या भावाच्या मागे लागले आहेत/माझ्या भावाच्या शोधात आहेत.* ५ तरीही : *A~ everything I've done for you, you're leaving me now! मी तुझं एवढं केलं तरीही/एवढं करूनही तू मात्र आता मला सोडून चाललास!* ६ -च्या पद्धतीने, -च्या सारखे, -च्या धरतीचे, -च्या शैलीतील, बरहुकुम : *a painting ~ Rembrandt, रेम्ब्रान्टच्या पद्धतीचे चित्र, रेम्ब्रान्टच्या शैलीतील चित्र.* ७ (*वाक्प्र*) **,after 'all** एवढं करूनही, सांगूनही, वाटूनही, एवढी अपेक्षा करूनही, अखेर; शेवटी, अखेरीस, सरतेशेवटी, काही झाले तरी. **after** *क्रिवि, उ अव्यय* त्या काळानंतर, त्या वेळेनंतर, नंतर : *She died three days ~ (I had left), (मी गेल्यावर) तीन दिवसानंतर ती मरण पावली.* **'after-effect** *ना* [*गण, बहुधा ब.व*] (विशेषतः असुखकर, तापदायक) नंतर होणारा परिणाम. **'afterthought** *ना* [*गण*] मागून सुचणारी कल्पना, पश्चातबुद्धी.

aftermath /'आफ्टमॅथ् (*ब्रि* तसेच -माथ्)/ *ना* [*गण*] युद्ध अथवा तशाच एखाद्या वाईट गोष्टीचा परिणाम.

afternoon /,आफ्ट'नून्; *अमे* ॲफ्-/ *ना* [*अगण, गण*] ढळढळीत दुपार (मध्यान्ह) आणि संध्याकाळ यांच्या मधला दिवसाचा भाग, तिसरा प्रहर, दुपार.

afterwards (*अमे* तसेच **afterward**) /'आफ्टवड्झ्; *अमे* 'ॲफ्-/ *क्रिवि* काही वेळानंतर, त्यानंतर.

again /अ'गेन्, अ'गेइन्/ *क्रिवि* १ पुन्हा एकदा, आणखी एकवार : *try ~ later, जरा वेळाने आणखी एक वेळ प्रयत्न करणे.* २ पहिल्या ठिकाणी, जागी किंवा अवस्थेत : *I was glad to be home ~, पुन्हा घरी आल्यावर मला आनंद झाला, पुन्हा एकदा घरात असण्याचा मला आनंद झाला.* ३ पहिल्या पेक्षा जादा, अधिक, आणखी : *as many/much ~, पुन्हा तेवढंच किंवा तितकंच जास्त, म्हणजे दुप्पट.* ४ (*वाक्प्र*)

a,gain and a'gain पुन्हापुन्हा, वारंवार; खूपदा, खूप वेळा.

against /अ'गेन्स्ट्, अ'गेइन्स्ट्/ *शब्दयो* १ -ला टेकून, -ला लागून : *The ladder was leaning ~ the wall, शिडी भिंतीला टेकवलेली होती.* २ -च्या विरुद्ध : *swim ~ the current, प्रवाहाविरुद्ध पोहणे* ○ *~ the law, कायद्याविरुद्ध.* ३ -च्या विरुद्ध, वर (उठून दिसणे) : *The trees were black ~ the sky, आकाशाच्या पार्श्वभूमीवर झाडे काळी दिसत होती.* ४ -च्या पासून संरक्षण म्हणून प्रतिबंधासाठी; -ला तोंड देण्यासाठी : *an injection ~ measles, गोवराच्या प्रतिबंधासाठी लस.*

age^1 /अेइज्/ *ना* १ [*गण, अगण*] एखाद्या जीवाचे किंवा वस्तूचे वय. २ [*अगण*] आयुष्याचा उत्तरार्ध, जीवनाचा शेवटचा भाग, म्हातारपण, उतारवय, वृद्धत्व : *Wisdom comes with ~, वृद्धत्वाबरोबर शहाणपण येते, वय झालं की शहाणपण येतं.* ३ [*गण*] इतिहासाचा खंड, युग : *the Elizabethan ~, एलिझाबेथचा कालखंड, म्हणजे ज्या काळात एलिझाबेथ राणी होती तो.* ○ *the Tilak ~, टिळकयुग.* ४ [*गण,* बहुधा *ब.व*] (*अनौप*) खूप दीर्घ काळ, युगानुयुगे : *waiting for ~s, दीर्घ काळ वाट पाहणे.* ५ (*वाक्प्र*) **,be/,come of 'age** (कायदा) सज्ञान होणे, वयात येणे. **,under 'age** वयाने लहान, कमी वयाचा, कोवळा. **'age-group** *ना* [*गण*] एका वयोगटातील लोक, समवयस्क लोक. **'age limit** *ना* [*गण*] एखादी गोष्ट करण्यासाठी आवश्यक असणारी किमान किंवा कमाल वयोमर्यादा, वयाची अट. **,age-'old** *वि* दीर्घकाळ अस्तित्वात असणारा, दीर्घकालीन.

age^2 /अेइज्/ *क्रि* (*वर्त वि* **ageing** or **aging**, *भूत* **aged** /अेइज्ड्/) [*अक, सक*] वृद्ध होणे, म्हातारा होणे, जुना होणे किंवा तसे होण्यास कारणीभूत होणे. **aged** *वि* १ /अेइज्ड्/ -च्या वयाचा : *a boy ~ ten, दहा वर्षाचा मुलगा.* २ /'अेइजिड्/ खूप वृद्ध, म्हातारा. **the aged** /'अेइजिड्/ *ना* [*ब.व*] खूप म्हातारे, खूप वृद्ध लोक. **ageing** (तसेच **aging**) *ना* [*अगण*] वृद्ध होण्याची प्रक्रिया, जुने होण्याची प्रक्रिया. **ageing** *वि* वृद्ध होत असलेला किंवा जुना होत असलेला.

agency /'अेइजन्सि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) प्रतिनिधीचे, एजंटचे किंवा अडत्याचे काम करणारा : *a travel ~, प्रवासविषयक कामे करणारा किंवा प्रवासी एजंट.*

agenda /अ'जेन्डा/ *ना* [*गण*] एखाद्या सभेत चर्चा करण्याच्या गोष्टी, सभेत उपस्थित करायचे विषय, विषयपत्रिका.

agent /'अेइजन्ट्/ *ना* [*गण*] १ दुसऱ्याचे काम करणारा प्रतिनिधी, गुमास्ता, अडत्या : *an estate ~, स्थावर मिळकतीचा अडत्या.* २ परिणाम करणारी व्यक्ती किंवा गोष्ट, कारक : *Rain and wind are ~s that wear away rocks, पाऊस आणि वारा हे खडकांची झीज करणारे कारक आहेत.*

aggravate /'ॲग्रव्हेइट्/ *क्रि* [*सक*] १ अधिक कठीण किंवा दुःसह करणे, बिघडवणे. २ (*अनौप*) चीड आणणे, राग आणणे : *an aggravating delay, चीड/संताप आणणारा विलंब/उशीर.* **aggravation** /,ॲग्र'व्हेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] अधिक वाईट करणे, अधिक बिघाड; चीड, संताप.

aggregate /'ॲग्रिगट्/ *ना* [*गण*] एकूण रक्कम, एकंदर.

aggression /अ'ग्रेइश्न्/ *ना* [*अगण*] संतापाच्या भावना. २ भांडण किंवा युद्ध सुरू करू शकणारी कृती, आगळीक, कुरापत. **aggressor** /अ'ग्रेस(र्)/ *ना* [*गण*] युद्धास सुरुवात करणारा देश किंवा मारामारी सुरू करणारी व्यक्ती, आक्रमक, आगळीक काढणारा.

aggressive /अ'ग्रेसिव्ह्/ *वि* १ आक्रमक, तापट, रागीट, तडकू, भडकू. २ अतिशय धडाडीचा, तडफदार, आग्रही : *an ~ salesman, धडाडीचा विक्रेता.* **aggressively** *क्रिवि* आक्रमकतेने, धडाडीने. **aggressiveness** *ना* [*अगण*] आक्रमकता, धडाडी, तडफ.

aggrieved /अ'ग्रीव्ह्ड्/ *वि* (*औप*) राग आणि कडवटपणा आलेला – विशेषतः अन्याय्य वागणुकीमुळे, अन्यायाने संतप्त, उद्विग्न.

aggro /'ॲग्रउ/ *ना* [*अगण*] (*ब्रि व्रात्य*) त्रासदायक किंवा आक्रमक वागणूक, आगाऊपणा.

aghast /अ'गास्ट्; *अमे* अ'गॅस्ट्/ *वि* विस्मित,

भयचकित, चक्रावलेला, दिङ्मूढ.

agile /'ॲजाइल्; *अमे* 'ॲज्ल्/ *वि* वेगाने पण सहजपणे हालचाल करू शकणारा, चपळ. **agility** /अ'जिलटि/ *ना* [*अगण*] चापल्य, चपळाई.

aging ➪ AGE^{2}.

agitate /'ॲजिटेइट्/ *क्रि* १ [*सक*] एखाद्याला व्याकूळ किंवा कासावीस किंवा आतुर करणे; सतावणे, हैराण करणे. २ [*अक*] *for/against*// एखाद्या गोष्टीच्या बाजूने किंवा विरुद्ध जाहीरपणे चर्चा करणे, साठी किंवा विरुद्ध चळवळ करणे किंवा आघाडी उघडणे, आंदोलन करणे. ३ [*सक*] एखादा पातळ पदार्थ जोरजोरात हलवणे, घुसळणे. **agitation** /,ॲजि'टेइश्न्/ *ना* [*अगण*] सतावणे; चळवळ, आंदोलन. **agitator** *ना* [*गण*] बदलासाठी (विशेषतः राजकीय) चळवळ करणारा, आंदोलक.

aglow /अ'ग्लउ/ *वि* उजळलेला (चेहरा), (आनंदाने) चमकणारा, (प्रकाशरंग) लखलखीत, चकचकीत.

AGM /,एइ जी 'एम/ *संरू* (खास *ब्रि*) annual general meeting, वार्षिक सर्वसाधारण सभा; प्रतिवर्षी कंपनी, क्लब वगैरेंनी पदाधिकारी निवड, झालेल्या कामाचे वृतान्तवाचन वगैरेसाठी बोलावलेली सभा.

agnostic /ॲग्'नॉस्टिक्/ *ना* [*गण*], *वि* परमेश्वराविषयी काहीही समजणे शक्य नाही अशी श्रद्धा असणारा (माणूस), अज्ञेयवादी.

ago /अ'गउ/ *क्रिवि* यापूर्वी : *The train left five minutes ~, पाचच मिनिटांपूर्वी गाडी सुटली.*

agog /अ'गॉग्/ *वि* उत्सुक आणि उत्कंठित, आतुर आणि उत्तेजित.

agonize /'ॲगनाइझ्/ *क्रि* [*अक*] (*over/about*)// एखाद्या गोष्टीविषयी दीर्घ काळ चिंतेत असणे, चिंताक्रान्त असणे. **agonized** *वि* तीव्र वेदनाग्रस्त, वेदना/क्लेश व्यक्त करणारा. **agonizing** *वि* वेदना देणारा, यातनामय, वेदनापूर्ण, क्लेशकारक.

agony /'ॲगनि/ *ना* [*अगण, गण*] (*ब.व* **-ies**) क्लेश, अति दुःख, वेदना, तीव्र वेदना, ठणका, यातना. **'agony aunt** *ना* [*गण*] (*ब्रि* *अनौप* किंवा *गंमत*) वर्तमानपत्र किंवा मासिकात वाचकांनी खाजगी गोष्टींविषयी सल्ला मागण्यासाठी लिहिलेल्या पत्रांना उत्तरे देणारी स्त्री.

agrarian /अ'ग्रेअरिअन्/ *वि* जमिनीचा, विशेषतः शेतजमिनीचा.

agree /अ'ग्री/ *क्रि* १ [*अक*] (*with*)// एखाद्याशी सहमत असणे, एखाद्यासारखेच मत असणे : *I ~ with you that money is the problem, पैशाचा प्रश्न आहे या तुझ्या मताशी मी सहमत आहे.* २ [*अक*] *to*// एखादी गोष्ट करण्यास सहमती देणे, राजी असणे, संमती देणे : *My boss ~d to let me go home early, मला लवकर घरी जायची संमती माझ्या वरिष्ठांनी दिली.* ३ [*अक, सक*] (*on*)// ठरणे, ठरवणे, मान्य होणे, मान्यता देणे. ४ [*अक, सक*] (*with*)// एखाद्या गोष्टीला पसंती देणे, एखादी गोष्ट मान्य असणे, स्वीकारणे. ५ [*अक*] मेळ बसणे, पटणे, एकमेकांशी जुळणे, सारखे असणे : *The two descriptions do not ~, या दोन वर्णनांचा मेळ बसत नाही, ती जुळत नाहीत.* ६ [*अक*] (*with*)// (व्याकरण) (क्रियापदे वगैरेंच्या संबंधी) लिंग, वचन, पुरुष या बाबत वाक्यातील दुसऱ्या शब्दाशी सुसंवाद असणे, एखाद्या शब्दाचे त्याच वाक्यातील दुसऱ्या शब्दाप्रमाणे लिंग, वचन, पुरुष असणे. ७ (*वाक्प्र*) **be agreed** एकमत होणे. ८ (*क्रिब*) **agree with sb** (अन्नाबाबत) तब्येतीला मानवणे, तब्येतीला चालणे. **agreeable** *वि* १ गोड, रुजू, प्रसन्न. २ तयार, राजीखुशीने हो म्हणणारा. **agreeably** *क्रिवि* आनंदाने. **agreement** *ना* १ [*गण*] एखाद्याशी केलेला करार, एखाद्याला दिलेले वचन, (एखाद्याबरोबर केलेल्या वाटाघाटीतून निघालेली सन्मान्य तडजोड). २ [*अगण*] मतैक्य, संमती, मान्यता, एकमत : *The two sides failed to reach ~ment, दोन्ही बाजूंचे मतैक्य होऊ शकले नाही.*

agriculture /'ॲग्रिकल्च(र)/ *ना* [*अगण*] शेती, शेतकी, कृषिविद्या. **agricultural** /ॲग्रि'कल्चरल्/ *वि* शेतीविषयक, कृषि, कृषिविषयक.

aground /अ'ग्राउन्ड्/ *क्रिवि, वि* (जहाजांसंबंधी) पाणी उथळ असल्यामुळे

जमिनीला लागलेली किंवा तळाला स्पर्श करणारी.

ahead /अ'हेड्/ *क्रिवि* काळ किंवा स्थळ यात पुढे, आघाडीवर : *go/plan ~, पुढे जाणे, पुढची योजना करणे.* **a'head of** *शब्दयो* १ अधिक पुढे (काळ किंवा स्थळ यात). २ अधिक पुढे गेलेला : *be years ~ of one's rivals, स्वतःच्या प्रतिस्पर्ध्यांच्या कित्येक वर्षे पुढे असणे.*

aid /अेइड्/ *ना* १ [*अगण*] मदत, साहाय्य : *with the ~ of a friend, एका मित्राच्या मदतीने.* २ [*गण*] मदत करणारी गोष्ट किंवा व्यक्ती : *teaching ~s, अध्यापनाची मदत (सामुग्री).* ३ [*अगण*] एखाद्या गरजू देशाला पाठवलेले अन्न, पैसे वगैरे. ४ (*वाक्प्र*) **what is sth in aid of?** (*अनौप*) एखाद्या गोष्टीचे प्रयोजन काय? **aid** *क्रि* १ [*सक*] (*औप*) मदत करणे, मदत देणे, साहाय्य करणे. २ (*वाक्प्र*) **,aid and a'bet** (विशेषतः *कायदा*) (एखाद्यास) गुन्हा करण्यास चिथावणी किंवा फूस देणे किंवा त्यात मदत करणे.

aide /अेइड्/ *ना* [*गण*] वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याचा साहाय्यक किंवा मदतनीस : *presidential ~s; अध्यक्षांचे/राष्ट्रपतींचे साहाय्यक.*

AIDS (तसेच **Aids**) /अेइड्झ्/ *संरू* Acquired Immune Deficiency Syndrome, अक्वायर्ड इम्यून डेफिशन्सी सिन्ड्रोम चे संक्षिप्त रूप; माणसाची नैसर्गिक रोगप्रतिकारशक्ती नष्ट करणारा एक भयानक रोग.

ailing /'अेइलिङ्/ *वि* बरं नसलेला; आजारी, दुखणेकरी. **ailment** /'अेइल्मन्ट्/ *ना* [*गण*] आजार, (विशेषतः किरकोळ) दुखणे.

aim /अेइम्/ *क्रि* १ [*अक, सक*] (*at*)// एखाद्या गोष्टीवर (शस्त्राचा किंवा वस्तूचा) नेम धरणे. २ [*अक*] (*at/for*)// एखाद्या गोष्टीकडे लक्ष वळवणे किंवा त्यासाठी प्रयत्न करणे; मिळवण्याचा बेत करणे, योजणे, हेतू धरणे किंवा बाळगणे : *~ at increasing exports, निर्यात वाढविण्याकडे लक्ष देणे किंवा तसा उद्देश असणे.* ३ [*सक*] (शेरा वगैरे) रोखाने करणे, अनुलक्षून करणे, रोख असणे : *My remarks were not ~ed at you, माझे शेरे तुझ्या रोखाने किंवा तुला अनुलक्षून केले नव्हते, माझ्या बोलण्याचा रोख तुझ्यावर नव्हता.* **aim** *ना* १ [*गण*] उद्देश, प्रयोजन; हेतू : *Her ~ is to be famous, प्रसिद्ध होण्याचा किंवा प्रसिद्धी मिळवण्याचा तिचा हेतू आहे.* २ [*अगण*] नेम धरण्याची क्रिया. **aimless** *वि* विनाकारण, निर्हेतुक, निरुद्देश. **aimlessly** *क्रिवि* निर्हेतुकपणे.

ain't /अेइन्ट्/ (प्रमाणेतर इंग्रजीत बोलताना वापर) १ am/is/are not यांचे संक्षिप्त रूप : *Things ~ what they used to be, पूर्वीसारख्या गोष्टी राहिलेल्या नाहीत आता.* २ have/has not यांचे संक्षिप्त रूप : *You ~ seen nothing yet, तू अजून काहीच पाहिलेले नाहीस.*

air^{1} /अेअ(र्)/ *ना* १ [*अगण*] वेगवेगळ्या वायूंचे बनलेले व आपण श्वसनावाटे आत घेतो ते मिश्रण, हवा. २ [*अगण*] पृथ्वीचे वातावरण : *travel by ~, हवेतून प्रवास करणे म्हणजे विमानाने प्रवास करणे.* ३ [*गण*] स्वरूप, अविर्भाव, आव : *an ~ of importance, आपण महत्त्वाची व्यक्ती आहोत असा अविर्भाव.* ४ (*वाक्प्र*) **give oneself/put on airs** दुसऱ्यावर छाप पाडण्यासाठी कृत्रिमपणे किंवा खोटे वागणे, आव आणणे. **in the 'air** (क) (बातमी, मत वगैरेंच्याबाबत) एका माणसाकडून दुसऱ्या माणसाकडे जाणे, कर्णोपकर्णी होणे. (ख) अनिश्चित. **,on/,off the 'air** आकाशवाणीवरून किंवा दूरदर्शनवरून प्रसारित किंवा अप्रसारित. **airborne** /,अेअबॉऽन्/ *वि* १ हवेने फैलावणारा, हवेच्या द्वारे येणारा. २ (विमानाच्या बाबत) उडते. **'air-conditioning** *ना* [*अगण*] खोलीला किंवा इमारतीला थंड व कोरडी हवा पुरविणारी यंत्रणा, हवेचे सुखद नियमन. **'air-conditioned** *वि* वातानुकूलित. **'aircraft** *ना* [*गण*] (*ब.व* **aircraft**) कोणतेही उडणारे वायुवाहन, उदा विमान किंवा हेलिकॉप्टर. **'aircraft-carrier** *ना* [*गण*] विमानवाहू युद्धनौका. **'airfield** *ना* [*गण*] विमानाच्या उड्डाणासाठी किंवा ते उतरण्यासाठी असलेली मोकळी जागा. **'air force** *ना* [*गण*] देशाच्या सैन्यशक्तीतील हवेतून लढाई करणारे सैन्य, वायुदल. **'air-hostess** *ना* [*गण*] विमानातील

प्रवाशांची देखभाल करणारी सेविका, हवाईसुंदरी. **'airlift** *ना* [*गण*] विमानाने लोकांची किंवा मालाची ने-आण किंवा वाहतुक. **'airlift** *क्रि* [*सक*] अशा प्रकारे वाहतुक करणे. **'airline** *ना* [*गण*] प्रवासी किंवा माल यांची विमानाने वाहतुक करणारी कंपनी. **'airliner** *ना* [*गण*] प्रवाशांची ने-आण करणारे मोठे विमान. **'airmail** *ना* [*अगण*] विमानाने डाक पाठवण्याची व्यवस्था. **'airplane** /'अेअरप्लेइन्/ *ना* [*गण*] (*अमे*) = AEROPLANE. **'airport** *ना* [*गण*] विमाने जेथून सुटतात आणि जेथे उतरतात आणि जेथे प्रवाशांना थांबण्यासाठी इमारती बांधलेल्या असतात ते स्थळ, विमानतळ, हवाई-स्थानक. **'air raid** *ना* [*गण*] विमानांनी केलेला हल्ला, हवाईहल्ला. **'airship** *ना* [*गण*] हवेपेक्षा हलक्या वायूने भरलेले, पंख नसलेले आणि इंजिनाच्या सहाय्याने जाणारे विमान किंवा वायुवाहन. **'airspace** *ना* [*अगण*] एखाद्या देशावरील वातावरणाचा त्या देशाच्या मालकीचा समजला जाणारा भाग, देशमालकीचे वातावरणक्षेत्र. **'airstrip** *ना* [*गण*] विमानाच्या उड्डाण वा उतरण्यासाठीची धावपट्टी. **'air terminal** *ना* [*गण*] जेथून प्रवासी विमानतळाकडे जातात ती शहरातील विमान-प्रवाशांसाठी असलेली इमारत. **'airtight** *वि* हवा बाहेर किंवा आत येण्यास प्रतिबंध करणारा, हवाबंद, वाताभेद्य, वातागम्य. **,air-to-'air** *वि* एका उडणाऱ्या विमानातून दुसऱ्या उडणाऱ्या विमानावर (झाडलेला किंवा सोडलेला). **air traffic controller** *ना* [*गण*] वैमानिकांना उतरण्यासंबंधी किंवा विमानमार्गासंबंधी रेडिओ-संदेश देणारा माणूस, हवाई वाहतुक नियंत्रक. **'airway** *ना* [*गण*] विमानाचा नेहमीचा मार्ग, विमानमार्ग. **'airworthy** *वि* उड्डाणसुरक्षित, उड्डाणास योग्य.

air^{2} /अेअ(र्)/ *क्रि* १ [*अक, सक*] (कपडे वगैरे) वाळवण्यासाठी उबदार जागेत ठेवणे, (कपडे) वाळवणे किंवा वाळत घालणे. २ [*सक*] स्वच्छ हवा (घरात) येऊ देणे, वायुविजन होऊ देणे, खेळती हवा ठेवणे. ३ [*सक*] इतर लोकांना माहिती होऊ देणे, प्रसिद्ध करणे : *~ one's opinions, मतप्रदर्शन करणे.* **airing** *ना* [*अ.व*] *give the blankets a good ~ing, पांघरुणे हवेवर किंवा उन्हात टाकणे, पांघरुणांना (विशेषतः लोकरीची) ती टिकण्यासाठी ऊन देणे.* ○ (*ला*) *give one's views an ~ing, स्वतःची मते सार्वजनिकरीत्या प्रदर्शित करणे, स्वतःच्या मतांचे जाहीर प्रदर्शन करणे.* **'airing cupboard** *ना* [*गण*] पांघरुणे, पंचे वगैरे वाळवण्याचे उबदार कपाट.

airless /'अेअलिस्/ *वि* पुरेशी स्वच्छ मोकळी हवा नसलेला, कोंदट, खेळती हवा नसलेला.

airy /'अेअरि/ *वि* (**-ier, -iest**) १ खेळती हवा असलेला, हवेशीर. २ हलकाफुलका, यथातथा, मनःपूर्वक नसलेला, वरवरचा. **airily** *क्रिवि* फार गंभीरपणे न घेता, उडतउडत.

aisle /आइल्/ *ना* [*गण*] प्रेक्षागृहातील खुर्च्यांच्या रांगांतील उभा मार्ग, मोठमोठ्या दुकानातील मांडव्यांमधील मार्ग, जायची वाट.

ajar /अ'जा(र्)/ *वि* (दारासंबंधी) फट असलेले, अर्धवट उघडलेले, किलकिले.

akin /अ'किन्/ *वि* *to//* (*औप*) एखाद्या गोष्टीसारखे, समान.

à la carte /आऽ लाऽ 'काऽट्/ *वि* (हॉटेलमधील जेवणाबाबत) थाळी न मागवता वेगवेगळे पदार्थ मागवलेले, मेन्यूकार्ड पाहून मागवलेल्या पदार्थांचे.

alacrity /अ'लॅक्रटि/ *ना* [*अगण*] (*औप*) तत्पर कृती, उतावीळपणाची कृती, तडकाफडकी केलेले काम, तातडीची हालचाल, तातडी : *He accepted her offer with ~, त्याने तिची मागणी तातडीने स्वीकारली.*

alarm /अ'लाम्/ *ना* १ [*अगण*] संकटामुळे एकाएकी निर्माण झालेली भीती, धास्ती. २ [*गण*] धोक्याची सूचना देणारे साधन, भयसूचक घंटा, गजर : *a fire ~, आग लागल्याची सूचना देणारा गजर* ○ *sound/raise the ~, भयसूचक भोंगा, घंटा, गजर वाजवणे.* **alarm** *क्रि* [*सक*] धास्तावणे, भिववणे, भेडसावणे, भयभीत करणे. **a'larm clock** *ना* [*गण*] हव्या त्यावेळी गजर करून उठवणारे घड्याळ, गजराचे घड्याळ. **alarming** *वि* भयानक, भयावह.

alas /अ'लॅस्/ *उद्गा* (*अप्रचलित, जुना किंवा अलं*) (दुःख किंवा खंत दाखवणारा उद्गार) हाय्!

albatross /'ॲल्बट्रॉस्/ *ना* [*गण*] जाळीदार पावले असलेला, मोठा, पांढरा समुद्र-पक्षी.

albeit /,ऑऽल्'बीइट्/ *उ अव्यय* (*अप्रचलित* किंवा *औप*) जरी, यद्यपि : *a useful, ~ brief, description, त्रोटक किंवा संक्षिप्त असले तरी उपयोगी असे वर्णन.*

albino /ॲल्'बीनउ; *अमे* -'बाइ-/ *ना* [*गण*] (*ब. व* **~s**) कातडी आणि केस पांढरे पडलेला व डोळे तांबुस गुलाबी झालेला प्राणी किंवा माणूस.

album /'ॲल्बम्/ *ना* [*गण*] १ छायाचित्रे, तिकिटे वगैरे ठेवण्याचे पुस्तक, छायाचित्रपुस्तक. २ मोठी (बराच वेळ वाजणारी) ध्वनिमुद्रिका.

alcohol /'ॲल्कहॉल्; *अमे* -हॉऽल्/ *ना* [*अगण*] बिअर, दारू, व्हिस्की यासारख्या पेयातील शुद्ध रंगहीन द्रव, मद्यार्क, मद्यसार. **alcoholic** /,ॲल्क'हॉलिक; *अमे* -हॉऽल-/ *वि* मद्यार्क असणारा, मद्यार्कधर्मी. **alcoholic** *ना* [*गण*] मद्यार्काचे व्यसन लागलेला, मद्यपी. **alcoholism** *ना* [*अगण*] दीर्घकाळ खूप मद्यार्क घेतल्याने झालेला रोग, मद्यविकार.

alcove /'ॲल्कउव्ह्/ *ना* [*गण*] कोनाड्याप्रमाणे भिंत आत घेतल्याने (बसण्यासाठी) तयार झालेली/केलेली खोलीतील जागा, (बसायचा) कोनाडा, (बसायची) देवळी.

ale /एइल्/ *ना* [*अगण, गण*] एक प्रकारची कडक बिअर.

alert /अ'लऽट्/ *वि* पूर्ण सावध आणि कृती करण्यास सिद्ध असा, जागृत व कृतिशील, दक्ष, हुश्शार, सतर्क, होशियार. **alert** *ना* [*गण*] १ धोक्याची सूचना, धोक्याचा इशारा. २ (*वाक्प्र*) **on the a'lert** संभाव्य धोक्याला तोंड देण्यास सिद्ध असलेला. **alert** *क्रि* [*सक*] एखाद्याला धोक्याची सूचना देणे, धोक्याचा इशारा देणे.

A level ➪ A, a^1

algae /'ॲल्जी, तसेच 'ॲल्गाइ/ *ना* [*ब.व*] बहुधा पाण्यात आढळणारी वनस्पती, जलशैवाल, शेवाळे, (वनस्पती शास्त्र) शैववाल.

algebra /'ॲल्जिब्रा/ *ना* [*अगण*] संख्या दर्शविण्यासाठी अक्षरांचा वापर करणारी एक गणिताची शाखा, अक्षरगणित, बीजगणित.

alias /'एइलिअस्/ *ना* [*गण*] खोटे नाव – विशेषतः गुन्हेगाराने घेतलेले. **alias** *क्रिवि* ऊर्फ, तथा : *Joe Sykes, alias John Smith जो साइक्स्, ऊर्फ जॉन स्मिथ.*

alibi /'ॲलिबाइ/ *ना* [*गण*] गुन्हा घडला त्यावेळी एखादा माणूस घटनास्थळाऐवजी दुसरीकडे होता असे सिद्ध करणारा पुरावा, अन्यत्र उपस्थितीचा पुरावा.

alien /'एइलिअन्/ *ना* [*गण*] १ जेथे राहतो त्या राष्ट्राचा नागरिक नसलेली व्यक्ती, बाहेरचा माणूस, परदेशी, उपरा. २ दुसऱ्या जगातून आलेला प्राणी, वेगळ्या जगाचा प्राणी. **alien** *वि* १ परकीय, परदेशी. २ माहीत नसलेला, अनोळखी आणि अपरिचित.

alienate /'एइलिअनेइट्/ *क्रि* [*सक*] एखाद्याची मैत्री तोडणे, एखाद्याला दूर ठेवणे, एखाद्याला दुरावलेपणाची वागणूक देणे. **alienation** /,एलिअ'नेइश्न्/ *ना* [*अगण*] दुरावलेपण, परकीकरण, परकेपणा.

alight^1 /अ'लाइट्/ *वि* पेटलेला, जळता, धगधगता, तेवता.

alight^2 /अ'लाइट्/ *क्रि* [*अक*] (*औप*) १ बस वगैरे वाहनातून खाली उतरणे. २ (पक्ष्याबाबत) आकाशातून/उंचावरून खाली येऊन उतरणे किंवा बसणे.

align /अ'लाइन्/ *क्रि* १ [*सक*] रांगेत ठेवणे, सरळ ओळीत घेणे किंवा मांडणे. २ **~ oneself with** एखाद्याशी हातमिळवणी करणे, एखाद्याला जाऊन मिळणे, सहमत होणे, पाठिंबा देणे : *They ~ed themselves with the socialists, ते समाजवाद्यांना मिळाले, त्यांनी समाजवाद्यांना पाठिंबा दिला.* **alignment** *ना* [*गण, अगण*] हातमिळवणी, एकीकरण, पाठिंबा; मजकूर, चित्रे वगैरे यांची सरळ रेषेतील रचना.

alike /अ'लाइक्/ *वि* एखाद्यासारखे एक. **alike** *क्रिवि* त्याचप्रमाणे, एकाच मार्गाने, तसेच.

alimentary /,ॲलि'मेन्टरि/ *वि* अन्न व पचनाविषयीचा, खाण्यापिण्याबाबतचा. **the ,alimentary ca'nal** *ना* [*गण*] मुखापासून ढुंगणापर्यंत अन्न जाण्याचा नलिकेसारखा मार्ग.

alimony /'ॲलिमनि; *अमे* -मउनि/ *ना* [*अगण*] घटस्फोटानंतर एखाद्याला नवऱ्याला

किंवा बायकोला नियमितपणे द्यायला लागणारी रक्कम, पोटगी.

alive /अ'लाइव्ह्/ *वि* १ जिवंत. २ कार्यरत, जिवंत, ताजातवाना. ३ अस्तित्वात असणारा. ४ (*वाक्प्र*) **alive to sth** एखाद्या गोष्टीची जाणीव असणारा. **alive with sth** गजबजलेला, (जिवंत गोर्ष्टींनी) भरलेला.

alkali /'ॲल्कलाइ/ *ना* [*गण, अगण*] (*रसायनशास्त्र*) आम्लाशी संयोग झाल्यावर ज्याच्यापासून क्षार तयार होतात तो पदार्थ, अल्कली.

all^{1} /ऑऽल/ १ (बहुवचनी नामांसह वापर) सर्व; पूर्ण संख्येने/एकूण एक : *A~ the people have come, सर्व लोक आलेले आहेत.* २ (अगणनीय नामांसह वापर) संपूर्ण राशी : *We've lost ~ the money, आमची पैशाची संपूर्ण रक्कम/आमचे सर्व पैसे हरवले आहेत.* ३ कोणताही : *beyond ~ doubt, कोणत्याही संशयापलिकडे.*

all^{2} /ऑऽल/ *सना* १ संपूर्ण संख्या किंवा राशी : *They were ~ broken, ते सर्व फुटलेले होते* ○ *Take ~ of it, ते सगळे घे.* २ फक्त एक गोष्ट, एकमेव गोष्ट; प्रत्येक गोष्ट : *A~ I want is some peace! मला फक्त शांतता हवी आहे!* ३ (*वाक्प्र*) **all in 'all** सर्व गोष्टींचा विचार केल्यावर, साकल्याने विचार करता. **(not) at all** मुळीच, अजिबात, कोणत्याही प्रकारे (नाही) : *I didn't enjoy it at all, मला त्यात मुळीच गंमत वाटली नाही.* **in all** सर्व मिळून, एकूण. **,not at 'all** (कोणी आभार मानल्यावर द्यायचे नम्रतादर्शक उत्तर) त्यात काय विशेष.

all^{3} /ऑऽल्/ *क्रिवि* १ पूर्णपणे, संपूर्णतः, संपूर्णतया, आख्खा, सबंध : *dressed ~ in black, पूर्णपणे काळा पोषाख केलेला.* २ (खेळात) दोन्ही बाजूंना, दोन्ही पक्षांत : *The score was four ~, दोन्ही पक्षांना चार चार गुण मिळाले.* ३ (*वाक्प्र*) **all a'long** (*अनौप*) सर्व वेळ, सारा वेळ, नेहमीच, सतत. **all 'in** फार दमलेला, थकलेला. **all over** सगळीकडे, सर्वत्र. **all 'right** (तसेच *अनौप*) **alright** **(क)** समाधानकारक, ठीक. **(ख)** सुखरूप, खुशाल, क्षेम. **(ग)** (सहमती किंवा मान्यता दाखविण्यास वापर). **all the better, harder, etc** फारच चांगले/उत्तम, जोमाने/जोराने, वगैरे : *We'll have to work ~ the harder when we get back from our holidays, सुट्टी संपवून परत गेल्यावर आपल्याला खूप जोरात काम करावे लागेल.* **,all 'there** पूर्णतः निरोगी किंवा सावध मनाने. **,all the 'same** ➪ SAME. **all too** ➪ TOO. **be all for (doing) sth** एखादी गोष्ट करायलाच हवी असे ठामपणे वाटणे, असा विश्वास बाळगणे. **be all the same to sb** सर्व सारखेच म्हणजे काहीच महत्त्वाचे किंवा पसंतीचे नसणे, काही फरक नसणे : *It is ~ the same to me when you go, तू आता गेलास काय आणि नंतर गेलास काय मला सारखेच.* **not all that** फार नाही. **the ,all 'clear** *ना* [*अे.व*] धोका संपल्याची सूचना देणारा गजर, भोंगा, इशारा, संदेश. **,all-'in** *वि* सर्व मिळून, सर्वसमावेशक : *an ,~-in 'price, सर्व गोष्टी मिळून किंमत, सर्व गोष्टींसकटची किंमत.* **'all out** *क्रिवि* सर्व शक्तिनिशी, सर्व सामर्थ्य एकवटून : *The team is going ~ out to win, सर्व शक्ती पणास लावून संघ विजय मिळवण्याचा प्रयत्न करणार आहे* ○ *an ~ out effort, सर्व शक्तिनिशी केलेला प्रयत्न, हरउपाय प्रयत्नांची कसोशी.* **,all-'rounder** *ना* [*गण*] विविध कौशल्ये किंवा गुण अंगी असणारा माणूस, विविध गुणसंपन्न, अष्टपैलू व्यक्ती.

Allah /'ॲल; *भारतीय* 'अल्ला/ *ना* [*अे.व*] मुस्लीम समाजातील देवाचे नाव, अल्ला.

allay /अ'लेइ/ *क्रि* [*सक*] (*औप*) (भीती, शंका वगैरे) कमी करणे, शमवणे.

allegation /,ॲलि'गेइश्न्/ *ना* [*गण*] पुराव्याशिवाय केलेला आरोप, बिनबुडाचा दोषारोप, आळ.

allege /अ'लेज्/ *क्रि* [*सक*] (*औप*) पुरावा न देता आरोप करणे : *He ~s he was misled about the time, वेळेबाबत त्याची दिशाभूल करण्यात झाली असा त्याचा आरोप आहे.* **alleged** *वि* आरोप केलेला, आरोपित. **allegedly** *क्रिवि* समज असलेला, आरोपकेला आहे असा.

allegiance /अ'लिजन्स्/ *ना* [*अगण*] एखादा शासक, एखादी तत्त्वप्रणाली वगैरेवर असलेली निष्ठा, स्वामिभक्ती, पाठिंबा.

allegory /'ॲलिगरि; *अमे* 'ॲलिगॉऽरि/ *ना* [*गण*] (*ब.व* -ies) ज्यातील पात्रे ही सत्य, सहनशीलता वगैरे सारख्या सद्‌गुणांची मानवी रूपे असतात अशी कथा, दृष्टान्तकथा, रूपककथा, रूपक. **allegorical** /,ॲलि'गॉरिक्ल्; *अमे* ,ॲलि'गॉऽरक्ल्/ *वि* रूपकात्मक.

alleluia /,ॲलि'लूय/ *ना* [*गण*] उद्‌वा (देवाच्या स्तुतीचे शब्द).

allergy /'ॲलजि/ *ना* [*गण*] (*ब.व* -ies) काही विशिष्ट प्रकारच्या अन्नाबाबत अहितकारक प्रतिक्रिया निर्माण करणारी शरीराची आरोग्यविषयक स्थिती, वावडं (असण्याची स्थिती), असोशी. **allergic** /अ'लऽजिक्/ *वि* वावडं असलेला, असोशी.

alleviate /अ'लीव्हिएइट्/ *क्रि* [*सक*] (वेदना किंवा आजार) कमी करणे, त्यांना उतार पाडणे, उपशमन करणे. **alleviation** /अ,लीव्हि'एइश्न्/ *ना* [*अगण*] उपशमन, उतार.

alley /'ॲलि/ *ना* [*गण*] १ अरुंद रस्ता, गल्ली, आळी. २ स्किटल्स सारख्या खेळात लागणारी लांब व अरुंद धावपट्टी.

alliance /अ'लाइअन्स्/ *ना* [*गण*] देश, गट वगैरेंची एका विशिष्ट हेतूसाठी एकदिलाने काम करण्यासाठी झालेली दोस्ती, मैत्री किंवा यासाठी झालेला करार किंवा तह.

allied ➪ ALLY^2.

alligator /'ॲलिगेइट(र्)/ *ना* [*गण*] अमेरिकेत आढळणारा सुसरीसारखा एक सरपटणारा प्राणी; (सुसर किंवा मगर यापेक्षा अधिक सुस्त असणारा आणि जरा लहान जबड्याचा प्राणी).

allocate /'ॲलकेइट्/ *क्रि* [*सक*] भाग म्हणून किंवा काही कारणासाठी पैसे वगैरे देणे, विभागून देणे, वाटणी करणे, वाटप करणे. **allocation** /,ॲल'केइश्न्/ *ना* [*गण, अगण*] विभाजन, वाटणी, वाटप.

allot /अ'लॉट्/ *क्रि* (-tt-) [*सक*] वाटा म्हणून देणे, भाग देणे (बहुधा एखाद्याच्या मर्जीनुसार). **allotment** *ना* [*गण*] १ दिलेली रक्कम/राशी किंवा दिलेला भाग. २ (खास *ब्रि*) भाजीपाला वाढवण्यासाठी एखाद्याने दिलेला किंवा घेतलेला जमिनीचा लहान तुकडा.

allow /अ'लाउ/ *क्रि* [*सक*] १ (एखाद्याला) काही करण्याची परवानगी देणे; (एखादी गोष्ट) होऊ देणे, घडू देणे; अनुमती देणे, जाऊ, करू वगैरे देणे : *You're not ~ed to smoke in this room, तुला या खोलीत धुम्रपान करण्यास परवानगी नाही (म्हणजेच मनाई आहे), तुला या खोलीत धुम्रपान करू दिले जाणार नाही.* २ (वेळ किंवा पैसा) देणे, उपलब्ध करणे. ३ (*क्रिब*) **allow for sth** एखादी गोष्ट विचारात घेणे, लक्षात घेणे : *~ for traffic delays, वाहतुकीतील (व्यत्यय/अडथळे यामुळे होणारा) विलंब लक्षात घेणे.* **allowable** *वि* परवानगी देण्याजोगा; लक्षात घेण्यासारखा; मान्य करण्यासारखा. **allowance** *ना* १ [*गण*] नियमितपणे दिलेले पैसे, भत्ता. २ (*वाक्प्र*) **make allowances for sth** निर्णय घेताना एखाद्या गोष्टीचा विचार करणे, ती गोष्ट विचारात घेणे.

alloy /'ॲलॉइ/ *ना* [*गण, अगण*] धातूंचे मिश्रण; मिश्रधातू.

allude /अ'लूड्/ *क्रि* [*अक*] *to//* (*औप*) एखाद्या गोष्टीचा आडवळणाने उल्लेख करणे, ध्वनित करणे. **allusion** /अ'लूझ्न्/ *ना* [*गण, अगण*] अप्रत्यक्ष उल्लेख.

alluring /अ'लुअरिङ्/ *वि* आकर्षक; मोहक.

ally^1 /'ॲलाइ/ *ना* [*गण*] (*ब.व* -ies) पाठिंबा देण्यास करारबद्ध असा देश किंवा माणूस; तहाने मित्र झालेला देश किंवा माणूस.

ally^2 /अ'लाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* -ied) [*अक, सक*] ~ **oneself with/to** एखाद्या माणसाशी किंवा एखाद्या गोष्टीशी कराराने संबंध जोडणे, विवाहसंबंध जोडणे किंवा करणे. **allied** *वि* *to//* एखाद्या गोष्टीशी संबंध जोडलेला; सारखा, तत्सदृश.

almanac /'ऑऽल्मनॅक्; *अमे* 'ॲल्/ *ना* [*गण*] सूर्य, चन्द्र, भरती-ओहोटी वगैरेंची माहिती देणारे आणि दरवर्षी प्रसिद्ध होणारे पुस्तक, पंचांग.

almighty /ऑऽल्'माइटि/ *वि* (*अनौप*) थोर, महान. **the Almighty** *ना* [*ए.व*] परमेश्वर.

almond /'आमन्ड्/ *ना* [*गण*] पीचसारख्या एका झाडाचे कठीण कवचाचे बी, बदाम.

almost /'ऑऽल्मउस्ट्/ *क्रिवि* जवळजवळ,

बहुतकरून : ~ *everywhere/impossible, जवळजवळ सगळीकडे/अशक्य.*

alms /आम्झ्/ *ना* [*ब.व*] (*अप्रचलित* किंवा *जुना*) गरीब लोकांना दिलेले पैसे, कपडे वगैरे, भिक्षा; भीक, दान.

aloft /अ'लॉफ्ट्; *अमे* अ'लॉऽफ्ट्/ *क्रिवि* (*औप*) उंच, वर हवेत.

alone /अ'लउन्/ *वि, क्रिवि* १ इतर लोकांशिवाय, एकटा : *living ~, एकटा राहणारा.* २ फक्त : *You ~ can help me, फक्त तूच मला मदत करू शकशील.* ३ (*वाक्प्र*) **go it a'lone** कोणाच्याही मदतीविना एखादी गोष्ट करणे, एकट्याने करणे.

along /अ'लॉङ्; *अमे* अ'लॉङ्/ *शब्दयो* १ एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत : *walk ~ the street, रस्त्याच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत चालणे.* २ लागून, खेटून, कडेकडेचा, बाजूने : *a path ~ the river, नदीच्या कडेकडेने जाणारा रस्ता, नदीला लागून जाणारा रस्ता.* **along** *क्रिवि* १ बरोबर, सह; पुढे : *come ~! चल बरोबर, असा पुढे ये!* २ इतरांसह, बरोबर : *Can I bring some friends ~? माझे काही मित्र बरोबर आले तर चालेल?* ३ (*वाक्प्र*) **along with sth** एखाद्या गोष्टीबरोबर, एखाद्या गोष्टी सकट/सह. **a'longside** *क्रिवि, शब्दयो* (एकमेकांच्या) अगदी बाजूला, अगदी बरोबर, जवळजवळ असलेले/ठेवलेले, शेजारून, शेजारील.

aloof /अ'लूफ्/ *वि* स्वभावाने थंड आणि अंतर राखणारा, अलिप्त; तुटक, कधी न मिसळणारा. **aloofness** *ना* [*अगण*] अलिप्तपणा, तुटकपणा.

aloud /अ'लाउड्/ *क्रिवि* ऐकू जाईल एवढ्या मोठ्या आवाजात, मोठ्याने : *read the letter ~, मोठ्याने पत्र वाचणे.*

alphabet /'ॲल्फबेट्/ *ना* [*गण*] एखाद्या भाषेत लिहिण्यासाठी वापरायच्या अक्षरांचा क्रमाने लावलेला संच, वर्णानुक्रम, अक्षरमाला, वर्णमाला, अक्षरविल्हे. **alphabetical** /,ॲल्फ'बेटिक्ल्/ *वि* अक्षरमालेतील अक्षरांच्या क्रमानुसार, वर्णानुक्रमी, विल्हेवार. **alphabetically** *क्रिवि* अक्षरानुक्रमाने, विल्हेवार.

already /ऑऽल्'रेडि/ *क्रिवि* १ यापूर्वी, याआधीच, मागे : *I've ~ told them what happened, काय घडले ते मी त्यांना आधीच सांगितले आहे.* २ अपेक्षेपेक्षा आधी, अपेक्षेपेक्षा लवकर, आत्ताच, एवढ्यातच : *You're not leaving us ~, are you? तुम्ही अपेक्षेपेक्षा आधीच आम्हाला सोडून जाणार नाही, खरं ना?* किंवा *आताच आम्हाला सोडून जाणार की काय?*

alright = ALL RIGHT (ALL^{3})

Alsatian /ॲल्'सेइशन्/ *ना* [*गण*] मोठा, लांडग्यासारखा दिसणारा कुत्रा.

also /'ऑऽल्सउ/ *क्रिवि* शिवाय, भरीला, जोडीला, सुद्धा, देखील.

altar /'ऑऽल्ट(र्)/ *ना* [*गण*] धार्मिक कार्यात वापरले जाणारे टेबल; वेदी.

alter /ऑऽल्ट(र्)/ *क्रि* [*अक, सक*] बदलवणे; बदलणे, पालटणे. **alteration** /,ऑऽल्ट'रेइशन्/ *ना* [*गण, अगण*] बदल, फेरफार.

alternate^{1} /ऑऽल्'टऽनट्; *अमे* 'ऑऽल्टर्नट्/ *वि* १ (दोन गोष्टींविषयी) एकामागोमाग किंवा एकापाठोपाठ घडणारा किंवा येणारा. २ एका आड एक : *on ~ days, दिवसा आड,* उदा सोमवारी, बुधवारी, शुक्रवारी. **alternatively** *क्रिवि* आलटून पालटून, आळीपाळीने.

alternate^{2} /'ऑऽल्टनेइट्/ *क्रि* [*अक, सक*] (*between/with*)// एकामागोमाग एक किंवा एकापाठोपाठ एक घडणे व होणे : *The weather will ~ between sunshine and rain, एकदा ऊन एकदा पाऊस अशी हवा पडेल.* **alternating 'current** *ना* [*अगण*] नियमितपणे दिशा बदलणारा विद्युत्प्रवाह. **alternation** /,ऑऽल्ट'नेइशन्/ *ना* [*अगण, गण*] अदलाबदलीने, आलटूनपालटून होणे; एकामागोमाग एक हा क्रम.

alternative /ऑऽल्'टऽनटिव्ह्/ *वि* १ एखाद्या गोष्टीऐवजी वापरता येणारा, त्या ऐवजीचा, पर्यायी : *an ~ means of transport, वाहतुकीचे पर्यायी साधन.* २ नेहमीपेक्षा वेगळ्या पद्धतीचा किंवा वेगळ्या प्रमाणाचा, नेहमीपेक्षा वेगळा असा : *A~ medicine includes homeopathy and acupuncture, वेगळ्या प्रकारचा औषधोपचार*

म्हणजे होमिओपथी (समचिकीत्सा) आणि ॲक्युपंक्चर (सूचीछिद्रोपाय). **alternative** *ना* [*गण*] १ अनेक शक्यतांपैकी एक शक्यता. २ दोन गोष्टींतील निवड. **alternatively** *क्रिवि* विकल्पाने.

although /ऑऽल्'दउ/ *उ अव्यय* जरी.

altitude /'ॲल्टिट्यूड्; *अमे* -टूड्/ *ना* [*गण*] समुद्रसपाटीपासूनची उंची, उच्चता.

alto /'ॲल्टउ/ *ना* [*गण*] (*ब.व* -s) १ उच्च सप्तकात गाणारा पुरुष किंवा मंद्र सप्तकात गाणारी स्त्री (या गायकांसाठी असणारे संगीत). २ दोन क्रमांकाची सुराची उच्चता म्हणजेच मध्यम उच्चता असणारे वाद्य : *an ~ saxophone, मर्दानी उच्च आवाजाचा सॅक्सोफोन.*

altogether /,ऑऽल्ट'गेद(र्)/ *क्रिवि* १ पूर्णपणे, पूर्णतया, अगदीच : *It is not ~ surprising that she failed the exam, ती परीक्षेत नापास झाली हे पूर्णपणे आश्चर्यकारक/ धक्कादायक नाही, ती नापास झाली हे अगदीच आश्चर्यकारक आहे असं नाही.* २ एकूण, सर्व मिळून, एकंदर.

altruism /'ॲल्ट्रूइझम्/ *ना* [*अगण*] निःस्वार्थीपणा, जनहित. **altruist** /-इस्ट्/ *ना* [*गण*] निःस्वार्थी माणूस, जनहितैषी. **altruistic** /,ॲल्ट्रू'इस्टिक्/ *वि* निःस्वार्थी, जनहितवादी.

aluminium /,ॲल्यु'मिनिअम्/ (*अमे* **aluminum** /अ'लूमिनम्/) *ना* [*अगण*] हलका व रुपेरी रंगाचा एक धातू.

always /'ऑऽल्वेइझ्/ *क्रिवि* १ नेहमी, सदैव, सदोदित, एकसारखा : *You should ~ use a seat-belt in a car, तुम्ही गाडीमधील सीटचा पट्टा नेहमीच वापरायला हवा.* २ नित्य, सदा, नेहमी, सर्वकाळ : *I'll ~ love her, माझे तिच्यावर नित्य प्रेम असेल, मी तिच्यावर सदा प्रेमच करीन.*

am^{1} ➪ BE.

am^{2} /,अेइ 'अेम्/ *संरू* मध्यान्हीपूर्वी, दुपारचे १२ वाजण्यापूर्वी, सकाळी : *9 am, सकाळी ९ वाजता* किंवा दुपारी *१२ वाजण्यापूर्वीचे ९ वाजता.*

amalgamate /अ'मॅल्गमेइट्/ *क्रि* [*अक, सक*] (संघटना) एकत्र येणे/करणे, ऐक्य होणे/करणे, जोडणे, एक करणे, सम्मीलीकरण होणे/करणे. **amalgamation** /अ,मॅलग'मेइशन्/ *ना* [*अगण, गण*] एकी, ऐक्य; सम्मीलन, संयोग, एकत्रीकरण.

amass /अ'मॅस्/ *क्रि* [*सक*] मोठ्या प्रमाणात जमवणे, गोळा करणे किंवा संग्रहित करणे.

amateur /'ॲमट(र्)/ *ना* [*गण*] एखादी गोष्ट द्रव्यप्राप्तीसाठी न करता केवळ हौस म्हणून करणारा माणूस, हौशी (कलावंत वगैरे). **amateurish** *वि* (धंदेवाईक माणसाचे किंवा सराईताचे) कौशल्य नसलेला, अकुशल, हौशी.

amaze /अ'मेइझ्/ *क्रि* [*सक*] आश्चर्याने थक्क होणे, आश्चर्यचकित करणे : *~d at the news, बातमीने आश्चर्यचकित झाला.* **amazement** *ना* [*अगण*] आश्चर्य, अचंबा, विस्मय. **amazing** *वि* विस्मयकारक, आश्चर्यकारक.

ambassador /ॲम्'बॅसड(र्)/ *ना* [*गण*] परदेशात स्वतःच्या देशाचे प्रतिनिधित्व करणारा उच्चाधिकारी, राजदूत.

amber /'ॲम्ब(र्)/ *ना* [*अगण*] (क) जडजवाहीर करताना वापरण्यात येणारा एक टणक, पिवळसर-तपकिरी पदार्थ, अंबर, तैलस्फटिक. (ख) त्याचा रंग.

ambidextrous /,ॲम्बि'डेक्स्ट्रस्/ *वि* डावा आणि उजवा हे दोन्ही हात सारख्याच कौशल्याने वापरणारा.

ambiguous /,ॲम्'बिग्युअस्/ *वि* एकापेक्षा जास्त अर्थ असणारा, द्व्यर्थी, अनेकार्थी; संदिग्ध. **ambiguity** /,ॲम्बि'ग्यूअटि/ *ना* [*अगण, गण*] (*ब.व* **-ies**) अनेकार्थता; संदिग्धता.

ambition /ॲम्'बिशन्/ *ना* (क) [*अगण*] यश मिळवण्याची जोरदार इच्छा, महत्त्वाकांक्षा, जिगीषा. (ख) [*गण*] अशा इच्छेचे, आकांक्षेचे लक्ष्य, एखाद्या गोष्टीची महत्त्वाकांक्षा, कामना किंवा लालसा : *achieve one's ~(s), महत्त्वाकांक्षा पूर्ण करणे, कामना सफल होणे.* **ambitious** /-शस्/ *वि* महत्त्वाकांक्षी.

amble /'ॲम्बल्/ *क्रि* [*अक*] सावकाश आरामात चालणे, रमतगमत हिंडणे, आरामात फिरणे. **amble** *ना* [*अे.व*] संथ गतीची चाल, मजेत भटकणे.

ambulance /'ॲम्ब्युलन्स्/ *ना* [*गण*]

आजारी किंवा जखमी माणसाला – विशेषतः दवाखान्यात – नेण्यासाठी वापरायचे वाहन, रुग्णवाहिका.

ambush /'ॲम्बुश्/ *ना* [*अगण, गण*] अचानक हल्ला (करण्यासाठी दबा धरून बसणे). **ambush** *क्रि* [*सक*] लपलेल्या जागेवरून किंवा दबा धरून हल्ला करणे.

ameba (*अमे*) ➪ AMOEBA.

amen /आ'मेन्, अेइ'मेन्/ *उद्गा* (प्रार्थनेच्या शेवटी वापर) तसे घडो, तथास्तु.

amenable /अ'मीनब्ल्/ *वि* खुशीने एखादी गोष्ट मान्य करणारा किंवा एखादी गोष्ट करण्यास राजी होणारा, मन वळवता येण्याजोगा.

amend /अ'मेन्ड्/ *क्रि* [*सक*] बदलणे, बदल करणे; सुधारणे, दुरुस्ती करणे. **amendment** *ना* [*गण, अगण*] बदल, सुधारणा, दुरुस्ती.

amends /अ'मेन्ड्झ्/ *ना* [*ब.व*] (*वाक्प्र*) **make amends (for sth)** आपण एखादी हानीकारक, कठोर अशी गोष्ट केली असल्यास त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करण्यासाठी एखादी गोष्ट करणे, चुकीची भरपाई करणे.

amenity /अ'मीनटि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) बाग, दुकाने वगैरेसारख्या जीवन सुखदायी किंवा सोयीचे करणाऱ्या गोष्टी, सुविधा, सुखसोयी.

American /अ'मेरिकन्/ *वि* दक्षिण किंवा उत्तर अमेरिकेचा – विशेषतः यूएस्‌एचा (संयुक्त संस्थानाचा), अमेरिकन. **American** *ना* [*गण*] अमेरिकेतील, विशेषतः यूएस्‌एतील व्यक्ती किंवा तेथला नागरिक. **American 'football** *ना* [*अगण*] रगबीसारखाच अमेरिकेतील फुटबॉलचा खेळ.

amethyst /'ॲमिथिस्ट्/ *ना* [*गण*] जांभुळसर रंगाचा मौल्यवान खडा, याकूत.

amiable /'अेइमिअब्ल्/ *वि* प्रसन्न आणि आपुलकी असणारा, आकर्षक आणि स्नेहशील. **amiably** *क्रिवि* मजेत, आनंदाने, प्रेमळपणे.

amicable /'ॲमिकब्ल्/ *वि* स्नेहपूर्ण आणि शांत, मैत्रीपूर्ण आणि शांत, सौहार्दपूर्ण : *reach an ~ agreement, मैत्रीपूर्ण तडजोड होणे, मित्रत्वाने क़रार होणे.* **amicably** *क्रिवि* गोडीच्या, सौहार्दपूर्ण वातावरणात, खेळीमेळीने.

amid /अ'मिड्/ (तसेच **amidst** /अ'मिड्स्ट्/) *शब्दयो* (*अप्रचलित* किंवा *औप*) -च्या मधे, मध्ये, मध्यभागी, मधोमध.

amiss /अ'मिस्/ *वि, क्रिवि* (जुना) १ चुकलेले, चुकून, भलते : *Something seems to be ~, काहीतरी चुकलंय असं दिसतंय.* २ (*वाक्प्र*) **take sth a'miss** एखाद्या गोष्टीने अपमानित होणे, एखाद्या गोष्टीचा राग येणे.

ammonia /अ'मउनिअ/ *ना* [*अगण*] स्फोटके, खते वगैरे करताना वापरला जाणारा, उग्र वासाचा वायू, मूत्रवायू, अमोद.

ammunition /,अम्यु'निश्न्/ *ना* [*अगण*] बंदुकीच्या गोळ्या, बॉम्ब वगैरेंचा पुरवठा, दारुगोळा.

amnesia /ॲम्'नीझ़िअ; *अमे* -नीझ़/ *ना* [*अगण*] स्मृती जाणे, स्मृतिभ्रंश.

amnesty /'ॲम्नस्टि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) सर्वसाधारण माफी – विशेषतः राजकीय अपराधांसाठी.

amoeba /अ'मीब/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s** किंवा **-ae** /-बी/) एकपेशीय सूक्ष्म सजीव, अमीबा, आदिजीव. **amoebic** /-बिक्/ *वि* अमिबाचा, अमिबीय.

amok /अ'मॉक्/ (तसेच **amuck** /अ'मक्/) *क्रिवि* (*वाक्प्र*) **run amok** ➪ RUN^1.

among /अ'मङ्/ (तसेच **amongst** /अ'मङ्स्ट्/) *शब्दयो* १ -ने वेढलेला, -च्या मध्यभागी : *found it ~ a pile of papers, कागदांच्या ढिगामध्ये हे सापडले.* २ गणनेत, संख्येत; मधे समाविष्ट : *~ the best in the world, जगातील सर्वोत्कृष्ट म्हणून गणल्या गेलेल्यात, अशा सर्वोत्कृष्ट (माणसां) मधे सामाविष्ट होणारा.* ३ एखाद्या गटातील प्रत्येक सभासदाला (भागशः) : *distribute the books ~ the class, वर्गात/वर्गातील प्रत्येकाला पुस्तके वाटणे, वर्गातील सर्वांना पुस्तके वाटणे.*

amorous /'ॲमरस्/ *वि* (विशेषतः लैंगिक) प्रेम दाखविणारा, कामुक, शृंगारिक. **amorously** *क्रिवि* कामुकपणे, शृंगारिकपणे.

amount /अ'माउन्ट्/ *ना* [*गण*] राशी, रास किंवा एकंदर संख्या, एकूण रक्कम : *a large ~ of money, पैशाची मोठी राशी/रक्कम.*

amount *क्रि* [*अक*] *to//* एखाद्या गोष्टीएवढा असणे, एखाद्या गोष्टीच्या बरोबरीने असणे किंवा होणे, सारखे होणे.

amp /ॲम्प्/ *ना* [*गण*] (*अनौप*) AMPERE चे संक्षिप्त रूप.

ampere /'ॲम्पेअ(र्); *अमे* 'ॲम्पिअर/ *ना* [*गण*] विद्युत्प्रवाह मोजण्याचा एकक, विद्युत्प्रवाह मोजण्याचे परिमाण.

amphibian /ॲम्'फिबिअन्/ *ना* [*गण*] बेडकासारखा पाण्यात व जमिनीवरही राहू शकणारा प्राणी, भूजलचर. **amphibious** /-बिअस्/ *वि* जमीन व पाणी या दोन्ही ठिकाणी राहणारा, उभयचर.

amphitheatre (*अमे* **-ter**) /'ॲम्फिथिअट(र्)/ *ना* [*गण*] मधे मोकळी जागा असून भोवती पायऱ्यापायऱ्यांच्या आसनरांगा असणारी छप्पर नसलेली गोलाकृती किंवा अंडाकृती इमारत, बदामी प्रेक्षागृह.

ample /'ॲम्प्ल्/ *वि* गरजेपेक्षा अधिक, जरूरीपेक्षा जास्त, पुष्कळ, विपुल, रगड. **amply** *क्रिवि* पुष्कळ, भरपूर, मोठ्या प्रमाणावर, सविस्तरपणे.

amplify /'ॲम्प्लिफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] १ शक्तीमधे वाढ करणे, वाढवणे : ~ *the sound, आवाज वाढवणे म्हणजे मोठा करणे.* २ अधिक तपशील देणे, विशद करणे. **amplification** /,ॲम्प्लिफि'केइशन्/ *ना* [*अगण*] शक्तिवाढ; विस्तार, विशदीकरण. **amplifier** *ना* [*गण*] आवाज किंवा संदेश मोठे करणारे उपकरण.

amputate /'ॲम्प्युटेइट्/ *क्रि* [*अक, सक*] (हात किंवा पाय) कापून काढणे. **amputation** /,ॲम्प्यु'टेइशन्/ *ना* [*अगण, गण*] अंगच्छेदन.

amuck ➪ AMOK.

amulet /'ॲम्युलिट्/ *ना* [*गण*] अशुभ किंवा वाईट गोष्टीपासून रक्षण करण्यासाठी अंगावर घातलेली वस्तू, दुष्ट शक्तीपासून रक्षण करणारा ताईत.

amuse /अ'म्यूझ्/ *क्रि* [*सक*] १ (एखाद्याला) हसवणे किंवा एखाद्याची करमणूक करणे, एखाद्याचे मनोरंजन करणे. २ (एखाद्याचा) वेळ आनंदात घालवणे. **amusement** *ना* १ [*गण*] आनंदात किंवा मजेत वेळ घालवण्याचे साधन, करमणुकीचे साधन. २ [*अगण*] करमणूक, मनोरंजन, गंमत. **amusing** *वि* एखाद्याला हसविणारा, गमतीशीर.

an ➪ A.

anachronism /अ'नॅक्रनिझम्/ *ना* [*गण*] जुनाट किंवा कालबाह्य झालेली, त्या काळाशी न जुळणारी गोष्ट किंवा व्यक्ती, कालविपर्यस्तपणा.

anaconda /,ॲन'कॉन्ड/ *ना* [*गण*] प्राण्यांना चिरडून ठार मारणारा दक्षिण अमेरिकेतील एक मोठा साप, विजेसारखे शरीर लवणारा सीलोनमधील एक सर्प.

anaemia /अ'नीमिअ/ *ना* [*अगण*] रक्तातील तांबड्या पेशींची कमतरता (त्यामुळे माणूस निस्तेज दिसतो), रक्तक्षय. **anaemic** /-मिक्/ *वि* रक्तक्षयी.

anaesthesia /,ॲनिस्'थीझिअ/ *ना* [*अगण*] वेदना वगैरे न जाणवण्याची स्थिती, संवेदनहीनता, बधिरता. **anaesthetic** /,ॲनिस्'थेटिक्/ *ना* [*गण, अगण*] वेदना जाणवणे बंद करणारा पदार्थ, संवेदना किंवा शुद्ध हरवणारा पदार्थ. **anaesthetist** /अ'नीस्थटिस्ट्/ *ना* [*गण*] शस्त्रक्रियेपूर्वी आणि शस्त्रक्रियेच्या वेळी रोग्याला वेदना थांबविणारा पदार्थ देणारा म्हणजे त्यासाठी औषध/इंजेक्शन देणारा डॉक्टर, भूल देणारा डॉक्टर. **anaesthetize** /अ'नीस्थटाइझ्/ *क्रि* [*सक*] (एखाद्याला) संवेदना हरवण्याचे औषध देणे, भूल देणे.

anagram /'ॲनग्रॅम्/ *ना* [*गण*] एखाद्या शब्दातील अक्षरांचा क्रम बदलून केलेला दुसरा शब्द, अक्षरविपर्ययसिद्ध शब्द : *'Stare' is an ~ of 'tears', stare हा शब्द tears या शब्दातील अक्षरांचा क्रम बदलून केलेला शब्द आहे.*

analogy /अ'नॅलजि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) १ [*गण*] काही बाबतीतले साम्य, समानता किंवा सादृश्य, काहीसा सारखेपणा : *an ~ between the heart and a pump, पंप आणि हृदय यातील सादृश्य.* २ [*अगण*] एखादी गोष्ट दुसऱ्या गोष्टीशी तुलना करून समजावून सांगणे, तुल्यभाव. **analogous** /-लगस्/ *वि* सारखा, सदृश.

analyse /'ॲनलाइझ़्/ *क्रि* [*सक*] एखाद्या गोष्टीची बारकाईने तपासणी करणे, एखाद्या गोष्टीच्या विविध अंगांचा विचार/अभ्यास करणे, पृथक्करण करणे, विश्लेषण करणे.

analysis /अ'नॅलसिस्/ *ना* (*ब.व* **-yses** /-असीझ़्/) (**क**) [*अगण, गण*] एखाद्या गोष्टीचे पृथक्करण करून केलेला अभ्यास, विश्लेषण, मीमांसा, छाननी. (**ख**) [*गण*] बारकाईने केलेल्या अभ्यासाचे विधान, विश्लेषणसार, विवेचनसार. **analyst** /'ॲनलिस्ट्/ *ना* [*गण*] १ पृथक्करण – विशेषतः रसायनांचे – करणारा माणूस, छाननीकार, (रसायन) विश्लेषक, अभ्यासक. २ **psychoanalyst** मनोविश्लेषण करणारा. **analytic** /,ॲन'लिटिक्/ (तसेच **analytical** /-क्ल्/) *वि* पृथक्करणसंबंधी, परिच्छेदीय, वैश्लेषिक.

analyze (*अमे*) = ANALYSE.

anarchy /'ॲनकि/ *ना* [*अगण*] निर्नायकी अवस्था, अराजक; बेबंदशाही, अनागोंदी, गोंधळ. **anarchist** *ना* [*गण*] अराजकवादी, राजसत्ताविरोधी, शासनविरोधक.

anatomy /अ'नॅटमि/ *ना* [*अगण, गण*] (*ब.व* **-ies**) प्राणिशरीररचनाशास्त्र, शारीरशास्त्र, शरीरशास्त्र, शारीर. **anatomical** /,ॲन'टॉमिक्ल्/ *वि* शरीरशास्त्रीय.

ancestor /'ॲन्सेस्ट(र्)/ *ना* [*गण*] पूर्वज, पितर, वाडवडील. **ancestral** /ॲन्'सेस्ट्रल्/ *वि* पूर्वजांचा, वडिलार्जित, पिढीजात, वडिलोपार्जित. **ancestry** /-ट्रि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) वाडवडीलकी, पूर्वजपरंपरा.

anchor /'ॲङ्क(र्)/ *ना* [*गण*] जहाज पुढे जाऊ नये म्हणून जहाजातून पाण्यात सोडलेला धातूचा अवजड तुकडा, नांगर, लंगर. **anchor** *क्रि* [*अक, सक*] लंगर/नांगर टाकणे, हालचाल थांबवणे, स्थिर करणे. **anchorage** *ना* [*गण*] सुरक्षितपणे जहाजांचा नांगर टाकण्याची जागा, ओखा, ठेवण, नांगरवाडा.

anchovy /'ॲन्चव्हि; *अमे* 'अन्चउव्हि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) उग्र वासाचा समुद्रातील एक छोटा मासा, मांदेळी मासा.

ancient /'एइन्शन्ट्/ *वि* १ फार पूर्वीच्या काळचा, प्राचीन : ~ *Greece, प्राचीन ग्रीस.* २ फार जुना, वयोवृद्ध.

ancillary /ॲन्'सिलरि; *अमे* 'ॲन्सलेरि/ *वि* पूरक, साहाय्यभूत; जादा, एखाद्या मोठ्या गोष्टीबरोबर येणारा.

and /अन्ड्, अन्, अधिक बलयुक्त रूप ॲन्ड्/ *उ अव्यय* १ तसेच; शिवाय, खेरीज, आणखी, आणि, अन् : *bread ~ butter, पाव आणि लोणी.* २ नंतर; ह्या पाठोपाठ, आणि : *She came in ~ sat down, ती आत आली आणि खाली बसली.* ३ याचा परिणाम म्हणून, परिणामतः, या कारणाने, म्हणजे, आणि : *Work hard ~ you'll succeed, खूप कष्ट घे म्हणजे यश मिळेल, कष्ट केल्यावरच* (परिणामतः) *यश मिळेल.* ४ (सातत्यदर्शक) : *for hours ~ hours, तासन्तास.* ५ (*अनौप*) (*to* च्या ऐवजी काही क्रियापदात याचा वापर करतात) : *Try ~ come early, लवकर यायचा प्रयत्न कर.*

anecdote /'ॲनिक्डउट्/ *ना* [*गण*] एखाद्या (खऱ्याखुऱ्या) माणसाविषयीची प्रत्यक्ष घडलेली छोटी, रंजक गोष्ट किंवा एखादा छोटा, रंजक घडलेला प्रसंग, चुटका, किस्सा.

anemia, anemic (*अमे*) = ANAEMIA, ANAEMIC.

anemone /अ'नेमनि/ *ना* [*गण*] चांदणीच्या आकाराची फुले असणारे एक लहान झुडुप.

anesthesia (*अमे*) = ANAESTHESIA.

anew /अ'न्यू; *अमे* अ'नू/ *क्रिवि* (बहुधा *अलं*) पुन्हा, परत, फिरून.

angel /'एइन्ज्ल्/ *ना* [*गण*] १ देवदूत. २ सुंदर आणि दयाळू व्यक्ती. **angelic** /ॲन्'जेलिक्/ *वि* देवदूतासारखा.

anger /'ॲङ्ग(र्)/ *ना* [*अगण*] भांडण किंवा मारामारी याला कारणीभूत असणारी भावना, राग, क्रोध, संताप, कोप. **anger** *क्रि* [*सक*] (एखाद्याला) रागाला आणणे, प्रक्षुब्ध करणे, चिडवणे, संतापायला लावणे.

angle^1 /'ॲङ्गल्/ *ना* [*गण*] १ दोन मिळणाऱ्या रेषांच्या मधली जागा, कोन, कोण. २ कोपरा. ३ (*ला*) दृष्टिकोन. ४ (*वाक्प्र*) **at an 'angle** वाकडातिकडा. **angle** *क्रि* [*सक*] १ तिरके ठेवणे किंवा जाणे, कलते होणे किंवा ठेवणे. २ एका विशिष्ट दृष्टिकोनातून मांडणे, डूब देणे.

angle^2 /'ॲङ्गल्/ *क्रि.* [*अक*] १ गळाने मासे पकडणे. २ *for*// (*अनौप*) एखादी गोष्ट आडवळणाने मिळवण्याचा प्रयत्न करणे, एखाद्या गोष्टीसाठी छुपे प्रयत्न करणे: *~ for compliments, स्तुतीसाठी किंवा प्रशंसेसाठी आडून प्रयत्न करणे.* **angler** *ना* [*गण*] गळाने मासे मारणारा, गळकरी. **angling** *ना* [*अगण*] मासे धरण्याची कला, मासे धरण्याची क्रीडा, मच्छिमारीची कला.

Anglican /'ॲङ्ग्लिकन्/ *ना* [*गण*], *वि* इंग्लंडच्या चर्चचा (सभासद).

Anglicize /'ॲङ्ग्लिसाइझ्/ *क्रि* [*सक*] इंग्रजी करणे, इंग्रजाळणे, इंग्रजी आचारविचाराचे करणे, आंग्लाळणे.

Anglo- /'ॲङ्ग्लउ/ *पूर्वप्रत्यय* इंग्लंडचा किंवा ब्रिटनचा, इंग्लिश किंवा ब्रिटिश: *Anglo-American, अमेरिकेत राहणारा पण मूळ इंग्लंडचा असणारा माणूस, मूळ ब्रिटिश असा अमेरिकन.*

angry /'ॲङ्ग्रि/ *वि* (**-ier, -iest**) १ रागावलेला, कोपाविष्ट, संतापलेला, क्रुद्ध, चिडलेला. २ (जखमेविषयी) क्लेशकारक, दुखणारी; जळजळणारी, आगआग होणारी. **angrily** *क्रिवि* रागाने, संतापून, चिडून.

anguish /'ॲङ्ग्विश्/ *ना* [*अगण*] शारीरिक किंवा मानसिक असे मोठे दुःख, मोठी वेदना, मनस्ताप, यातना. **anguished** *वि* दुःखाने तडफडणारा, तळमळणारा, व्याकूळ, कासाविस झालेला.

angular /'ॲङ्ग्युल(र्)/ *वि* १ कानेकोपरे असलेला, टोकदार, खाचाखोचा असलेला, कंगोरे असणारा. २ (व्यक्तीबाबत) लुकडा, हाडं बाहेर आलेला, हडकुळा, काटकुळा.

animal /'ॲनिम्ल्/ *ना* [*गण*] १ (क) स्पर्शज्ञान असणारा आणि हालचाल करू शकणारा प्राणी. (ख) मनुष्य सोडून असा इतर कोणताही प्राणी, मानवेतर जीव किंवा प्राणी, पशू. २ रासवट माणूस, जंगली माणूस. **animal** *वि* १ प्राण्यांचा, प्राणिविषयक. २ शारीरिक, शरीराचा, इंद्रियजन्य, देहाचा.

animate^1 /'ॲनिमद्/ *वि* सजीव, जिवंत.

animate^2 /'ॲनिमेइद्/ *क्रि* [*सक*] जिवंत करणे, सजीव करणे, प्राण आणणे किंवा घालणे, चेतविणे; चैतन्यमय, तरतरीत करणे, जिवंत करणे, जिवंतपणा आणणे. **animated** *वि* चैतन्यमय, तरतरीत. **,animated car'toon** *ना* [*गण*] = CARTOON २. **animation** /,अनि'मेइश्न्/ *ना* [*अगण*] १ जिवंतपणा, चेतना. २ व्यंगचित्रातील प्राणी खऱ्या प्राण्यांसारखे हालतेचालते करण्याची प्रक्रिया.

animosity /,अनि'मॉसटि/ *ना* [*अगण, गण*] (*ब.व* **-ies**) कमालीचा द्वेष, वैरभाव, खुन्नस.

ankle /'ॲङ्क्ल्/ *ना* [*गण*] पाऊल आणि वरचा पाय यांना जोडणारा सांधा, घोटा.

annals /'ॲन्ल्झ्/ *ना* [*ब.व*] ऐतिहासिक कागदपत्रे, बखरी, ऐतिहासिक वृत्तान्त.

annex /अ'नेक्स्/ *क्रि* [*सक*] (जमिनीचा वगैरे) ताबा घेणे, (जमीन वगैरे) ताब्यात घेणे, अतिक्रमण करून ताब्यात घेणे. **annexation** /,ॲनेक्'सेइश्न्/ *ना* [*अगण, गण*] (एखाद्या राज्याशी) सामीलीकरण, अनुबंधन.

annexe (तसेच खास *अमे* **annex**) /'ॲनेक्स्/ *ना* [*गण*] मुख्य किंवा मोठ्या इमारतीला जोडलेले बांधकाम, जोड-इमारत, विस्तारगृह, उपभवन: *the hospital ~, हॉस्पिटलची जोड-इमारत.*

annihilate /अ'नाइअलेइट्/ *क्रि* [*सक*] संपूर्ण नष्ट करणे, पूर्ण विध्वंस/विनाश करणे, समूळ उच्छेद करणे. **annihilation** /अ,नाइअ'लेइश्न्/ *ना* [*अगण*] विध्वंस, नाश, उच्छेद.

anniversary /,ॲनि'व्हऽसरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) एखादी खास घटना घडलेल्या दिवसाची आठवण, स्मृतिदिन, प्रतिवार्षिक, प्रतिसांवत्सरिक; वाढदिवस, वर्धापनदिन, जयंती, पुण्यतिथी यासारखा वर्षदिन: *a wedding ~, लग्नाचा वाढदिवस.*

annotate /'ॲनटेइट्/ *क्रि* [*सक*] (एखाद्या पुस्तकाला वगैरे) टीपा लिहिणे किंवा देणे. **annotation** /,ॲन'टेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] टिप्पणी, टीपा, भाष्य.

announce /अ'नाउन्स्/ *क्रि* [*सक*] जाहीर करणे, घोषणा करणे. **announcement** *ना* [*गण*] घोषणा, जाहीर निवेदन. **announcer** *ना* [*गण*] दूरदर्शन किंवा आकाशवाणीवर कार्यक्रमाचे निवेदन करणारा, निवेदक.

annoy /अ'नॉइ/ *क्रि* [*सक*] थोडा राग आणणे, चिडवणे; त्रास देणे, त्रस्त करणे. **annoyance** *ना* [*अगण, गण*] उपद्रव, त्रास, वैताग.

annual /'ॲन्युअल्/ *वि* १ दरवर्षी एकदा होणारा, वार्षिक, प्रतिवार्षिक. २ वर्षासाठी मोजलेला, वार्षिक अंदाज : ~ *income, वार्षिक उत्पन्न.* **annual** *ना* [*गण*] १ दरवर्षी प्रसिद्ध होणारा वेगळ्या मजकुराचा पण त्याच नावाचा अंक, वार्षिक अंक, वार्षिक. २ एक वर्ष टिकणारे झाड, वर्षजीवी वनस्पती, वर्षायू. **annually** *क्रिवि* प्रतिवर्षी, दरवर्षी, दरसाल, सालिना.

annuity /अ'न्यूअटि; *अमे* -'नू-/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) एखाद्याला दरवर्षी दिले जाणारे ठराविक पैसे, वर्षासन, वार्षिकी.

annul /अ'नेल्/ *क्रि* (**-ll-**) [*सक*] एखादी गोष्ट कायदेशीररीत्या वैध नाही असे जाहीर करणे; रद्दबातल करणे, रद्द करणे, विलोपन करणे. **annulment** *ना* [*गण, अगण*] विलोपन.

anode /'ॲनउड्/ *ना* [*गण*] धन वीज भरलेले विद्युदग्र, धनाग्र.

anoint /अ'नॉइन्ट्/ *क्रि* [*सक*] धार्मिक विधी म्हणून तेल लावणे.

anomaly /अ'नॉमलि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) (*औप*) संगतवार नसणारी गोष्ट, नेहमीच्या साधारण नियमात न बसणारी अशी काही गोष्ट, विसंगती, प्रमाणविरूद्धता, नियमविरूद्धता, असंगती : *the apparent ~ of the decision, या निर्णयातून प्रथमदर्शनी स्पष्ट होणारी असंगती.* **anomalous** /-लस्/ *वि* असंगत, असंबद्ध, नियमाविरुद्ध.

anon¹ /अ'नॉन्/ *संरू* anonymous निनावी, अनामिक.

anon² /अ'नॉन्/ *क्रिवि* (*अप्रचलित*) लवकरच, लागलीच.

anonymous /अ'नॉनिमस्/ *वि* जाहीर न केलेल्या नावाचा, नाव गुपित ठेवलेला; निनावी, अनामिक : *The author wishes to remain ~, आपले नाव प्रसिद्ध न करण्याची लेखकाची इच्छा आहे, लेखकाला आपले नाव गुप्त राहवे असे वाटते.* **anonymity** /,ॲन'निमटि/ *ना* [*अगण*] निनावीपणा, नावाबाबतची गुप्तता, अनामिकत्व.

anorak /'ॲनरॅक्/ *ना* [*गण*] अंगची टोपी असलेला जलाभेद्य कोट, टोपड्याचा पाणबंद कोट.

anorexia /,ॲन'रेक्सिअ/ *ना* [*अगण*] १ ज्यात खाण्यावरील इच्छा उडते असा एक गंभीर आजार, अग्निमांद्य, क्षुधाभाव, भूक मंदावणे. २ (तसेच **anorexia nervosa** /नऽ'व्हउस/) एक मानसिक रोग की ज्यामुळे लठ्ठ होण्याची भीती वाटून रोगी अन्न खाण्याचे टाळतो आणि परिणामतः त्याचं वजन झपाट्याने घटते. **anorexic** /-'रेक्सिक्/ *वि* लठ्ठ होऊ अशा भीतीने पछाडलेला आणि त्यामुळे कृश झालेला.

another /अ'नेद(र्)/ *वि, सना* १ आणखी एक, अजून एक, आणिक एक : *have ~ cup of tea, आणखी एक कप चहा घेणे.* २ भिन्न असा, दुसरा, अन्य, वेगळा : *do that ~ time, ते दुसऱ्या/पुढच्या/अन्य वेळी करणे.* ३ तत्सम, (जणू) दुसरा, तसाच दुसरा, प्रति : *~ Einstein, दुसरा आइनस्टाईन* ○ *~ Shivaji, प्रतिशिवाजी.*

answer /'आन्स(र्); *अमे* 'ॲन्सर्/ *ना* [*गण*] १ एखाद्या गोष्टीला किंवा व्यक्तीला प्रतिसाद म्हणून लिहिलेली किंवा बोललेली गोष्ट; उत्तर, जबाब. २ (प्रश्नाचे) उत्तर : *The ~ to 3+7 is 10, ३+७ चे उत्तर १० असे आहे.* **answer** *क्रि* १ [*अक, सक*] एखाद्याला किंवा एखाद्याचे उत्तर देणे : *Think before you ~, विचार करून उत्तर दे, उत्तर देण्यापूर्वी विचार कर.* ○ *~ the phone,फोन घेणे आणि बोलणे* ○ *~ the door, दार वाजवल्यावर दार उघडणे.* २ (*क्रिब*) **answer (sb) back** (एखाद्याला) उर्मटपणे उत्तर देणे, उलट बोलणे. **answer for sb/sth** (क) एखाद्या गोष्टीस जबाबदार असणे (ख) एखाद्याला पाठिंबा देण्यासाठी बोलणे. **answerable** *वि* जबाबदार : *~ for one's actions, स्वतःच्या कृत्यास जबाबदार.*

ant /ॲन्ट्/ *ना* [*गण*] पोटाने घसरत जाणारा आणि संघटित गटांत राहणारा कीटक, मुंगी.

antagonism /ॲन्'टॅगनिझ़म्/ *ना* [*अगण*] विरोध, शत्रुत्व; नावड, द्वेष. **antagonist** /-निस्ट्/ *ना* [*गण*] विरोधक, शत्रू, प्रतिस्पर्धी.

antagonistic /ॲन्टॅग'निस्टिक्/ *वि* विरोधी, द्वेष करणारा, वैरभावाचा.

antagonize /ॲन्'टॅगनाइझ़्/ *क्रि* [*सक*] वितुष्ट आणणे, शत्रुत्व आणणे, विरोधी बनवणे, विरोधात उभे करणे; राग आणणे, संतप्त करणे.

Antarctic /ॲन्'टाक्टिक्/ *वि* दक्षिण ध्रुवाजवळच्या अतिशीत प्रदेशातील. **the Antarctic** *ना* [*ए.व*] दक्षिण ध्रुवाजवळचे अतिशीत प्रदेश.

antecedent /,ॲन्टि'सीड्न्ट्/ *ना* १ [*गण*] (*औप*) आधी येणारी गोष्ट, पूर्वगत गोष्ट, पूर्व (शब्द), अग्र (पद). २ **antecedents** [*ब.व*] पूर्वज.

antediluvian /,ॲन्टिडि'लूव्हिअन्/ *वि* (*अनौप* किंवा *गंमत*) अगदी जुनाट, अप्रचलित, कल्पान्तापूर्वीचा; जुन्या पद्धतीचा, जुनापुराणा.

antelope /'ॲन्टिलउप्/ *ना* [*गण*] करवतीसारख्या शिंगाचे हरीण किंवा हरण, कुरंग, काळवीट.

antenatal /,ॲन्टि'नेइट्ल्/ *वि* (क) जन्मापूर्वीच्या अस्तित्वात असणारा किंवा घडणारा. (ख) गर्भवती स्त्रियांसाठी असलेला : *an ~ clinic, गर्भवती स्त्रियांसाठीचे किंवा प्रसूतिपूर्व सेवेचे इस्पितळ.*

antenna /ॲन्'टेन/ *ना* [*गण*] १ (*ब.व* **-e** /-नी/) किड्याची मिशी, संवेदनाग्र, स्पर्शा, स्पृशा. २ (*ब.व* ~s) (*अमे*) दूरदर्शन किंवा आकाशवाणी यांचे संदेश घेणारी कांबी किंवा वायर, ॲरियल.

anthem /'ॲन्थम्/ *ना* [*गण*] चर्चमधे म्हणण्यात येणारे किंवा एखाद्या विशिष्ट प्रसंगासाठी लिहिलेले गीत.

anthology /ॲन्'थॉलजि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) लेखांचा – विशेषतः कवितांचा – संग्रह, साहित्यसंग्रह, गद्य-पद्य वेचे.

anthropoid /'ॲन्थ्रपॉइड्/ *वि* मानवसदृश, शरीराने मनुष्यासारखा असणारा.

anthropology /,ॲन्थ्र'पॉलेजि/ *ना* [*अगण*] मानवजातीचा अभ्यास करणारे शास्त्र, मानववंशशास्त्र. **anthropologist** *ना* [*गण*] मानववंशशास्त्रज्ञ.

anti- /'ॲन्टि/ *पूर्वप्रत्यय* विरुद्ध, प्रति-, निवारक, -विघातक, -द्रोही, -विरोधी, -प्रतिबंधक : *,anti-'aircraft, विमानविरोधी.*

antibiotic /,ॲन्टिबाइ'ऑटिक्/ *ना* [*गण*], *वि* (पेनिसिलिन वगैरेसारखे शक्तिमान द्रव्य) जे सूक्ष्मजंतू किंवा अणुजीव नष्ट करते, प्रतिजैविक (पदार्थ).

antibody /'ॲन्टिबॉडि/ *ना* [*गण*] (*ब.व.* **-ies**) घातक अणुजीव नष्ट करणारे आणि रक्तात तयार होणारे एक द्रव्य, मारक द्रव्य, प्रतिद्रव्य.

anticipate /ॲन्'टिसिपेइट्/ *क्रि* [*सक*] १ अपेक्षा करणे, एखादी गोष्ट होईल/घडेल असे वाटणे : *We ~ trouble, गडबड होणार असे आम्हाला वाटते.* २ काय घडू शकेल ते पाहणे आणि त्याप्रमाणे कारवाई करणे, अपेक्षा असल्याने तयारीत असणे. **anticipation** /ॲन्,टिसिपेइश्न्/ *ना* [*अगण*] अपेक्षा, पूर्वकल्पना.

anticlimax /,ॲन्टि'क्लाइमॅक्स्/ *ना* [*गण*] उत्सुकता वाढविणाऱ्या गोष्टीचा निराशाजनक शेवट, प्रतिसारालंकार.

anticlockwise /,ॲन्टि'क्लॉक्वाइझ़्/ *क्रिवि*, *वि* घड्याळाचे काटे फिरतात त्याच्याविरुद्ध दिशेने, वामावर्त, अपसव्य.

antics /'ॲन्टिक्स्/ *ना* [*ब. व*] विचित्र किंवा गमतीशीर कृती किंवा वर्तन, चाळे, माकडचेष्टा : *the children's ~, मुलांचे चाळे.*

anticyclone /,ॲन्टि'साइक्लउन्/ *ना* [*गण*] वातावरणाच्या प्रचंड दाबाचा पट्टा, प्रत्यावर्त, प्रतिविवर्त, प्रतिचक्रवात.

antidote /'ॲन्टिडउट्/ *ना* [*गण*] विष किंवा रोग यांच्या परिणामाला प्रतिबंध करणारे द्रव्य, विषावरचा उतारा, विषहारक किंवा विषनाशक द्रव्य.

antifreeze /'ॲन्टिफ्रीझ़्/ *ना* [*अगण*] पाणी गोठू नये (विशेषतः मोटारीच्या रेडिएटर किंवा प्रारणीमधले) म्हणून त्यात घालण्यात येणारे द्रव्य, गोठणविरोधक.

antiquated /'ॲन्टिक्वेइटिड्/ *वि* जुना, गतकालीन, हल्ली वापरात नसलेला, अप्रचलित, जुन्या पद्धतीचा, जुनापुराणा.

antique /ॲन्'टीक्/ *वि*, *ना* [*गण*] जुना पण

मौल्यवान असा (अशी वस्तू), पुराण (वस्तू) : *~ furniture, जुने किंमती फर्निचर.*

antiquity /ॲन्'टिक्वटि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] प्राचीन काळ, पुरातनकाल. २ [*गण, बहुधा ब.व*] पुरातन वास्तू, चित्रे वगैरे. ३ [*अगण*] मोठे युग, प्राक्काल.

antiseptic /,ॲन्टि'सेप्टिक्/ *ना* [*गण*], *वि* अणुजीव नष्ट करून रोगाला प्रतिबंध करणारे (द्रव्य), पूतिनाशक (द्रव्य).

antisocial /,ॲन्टि'सउशल्/ *वि* १ लोकात न मिसळणारा, सामाजिक संपर्क टाळणारा; मैत्री टाळणारा, तुसडा. २ इतर लोकांना उपद्रवकारक, समाजविघातक : *~ elements, समाजकंटक.*

antithesis /ॲन्'टिथसिस्/ *ना* [*गण*] (*औप*) (*ब.व* **-ses** /-सीझ्/) (*औप*) अगदी विरुद्ध गोष्ट, दुसरे टोक, उलट (गोष्ट).

antler /'ॲन्ट्ल(र्)/ *ना* [*गण*] हरणाचे शिंग, मृगशृंग.

antonym /'ॲन्टनिम्/ *ना* [*गण*] विरुद्ध अर्थाचा शब्द, विरुद्धार्थी शब्द, विरुद्ध शब्द : *'Hot' is the ~ of 'cold', 'गरम' हा शब्द 'थंड' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द आहे.*

anus /'अेइनस्/ *ना* [*गण*] शरीरातील घनरूप घाण बाहेर पडण्याचे छिद्र, गुदद्वार.

anvil /'ॲन्व्हिल्/ *ना* [*गण*] लोखंडाला ठोकून ठोकून आकार देताना खाली धरण्यात येणारी लोखंडाची मोठी बैठक, ऐरण.

anxiety /ॲङ्'झाइअटि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण, गण*] कळकळ आणि भीती – विशेषतः काय घडेल याची, काळजी, चिंता, घोर. २ [*अगण*] तीव्र इच्छा, अधीरता : *~ to please, खुश करण्याची तीव्र इच्छा किंवा आतुरता.*

anxious /'ॲङ्क्शस्/ *वि* १ काळजी वाटणारा किंवा करणारा, चिंताक्रांत, सचिंत, हुरहुर लागलेला. २ काळजी करण्यासारखा किंवा वाढवणारा, चिंता उत्पन्न करणारा : *an ~ time, काळजी वाढवणारा काळ.* ३ *for; to//* एखाद्या गोष्टीची तीव्र इच्छा असणारा, फार उत्सुक किंवा आतुर : *He's very ~ to meet you, तो तुला भेटायला फार उत्सुक आहे.* **anxiously** *क्रिवि* चिंतातूरपणे; उत्सुकतेने.

any /'अेनि/ *वि, सना* १ थोडा, थोडासा, काही (अंशी) : *Have you got ~ milk? तुझ्याकडे थोडं दूध आहे?* ○ *I haven't read ~ books by Tolstoy, मी टॉल्स्टॉयची काहीही पुस्तके वाचलेली नाहीत.* २ कोणतं का असेना/होईना, कोणतंही (एक) : *Take ~ card you like, कोणतंही एक कार्ड घे, कोणताही एक पत्ता घे.* **any** *क्रिवि* मुळीच, अगदी : *I can't run ~ faster, मला यापेक्षा जास्त जोरात मुळीच पळता येणार नाही.*

anybody /'अेनिबॉडि/ (तसेच **anyone** /'अेनिवँन्/) *सना* १ कुणी (मनुष्य) : *Did ~ see you? तुला कुणी पाहिलं का?* २ खूप लोकांपैकी एक माणूस, कुणीही (एक/माणूस) : *A~ will tell you, तुला कुणीही सांगेल.*

anyhow /'अेनिहाउ/ *क्रिवि* १ (तसेच **anyway** /'अेनिवेइ/) सर्व गोष्टी असूनही, असं असलं तरी, हे सर्व खरं असलं तरी, काही झालं तरी : *It's too late now, ~, पण असं असलं तरी आता खूपच उशीर झालाय्.* २ फार काळजी न घेता, कसंबसं, कसंतरी : *do the work ~, कसंबसं काम उरकून टाकणे, कसंतरी काम करणे/संपवणे.*

anyone = ANYBODY.

anyplace /'अेनिप्लेइस्/ (*अमे*) = ANYWHERE.

anything /'अेनिथिङ्/ *सना* १ कोणतीही (महत्त्वाची) गोष्ट, काहीही (विशेष) : *Has ~ unusual happened? काही विशेष घडलंय?* २ काहीतरी (जे असेल ते), काहीही : *I'm so hungry; I'll eat ~! मला इतकी भूक लागली आहे की मला काहीही खायला चालेल, मला इतकी भूक आहे की मी काहीही खाईन.* ३ (*वाक्प्र*) **anything but** नक्कीच नाही, मुळीच नाही, तेवढं सोडून बोला!

anyway ⇨ ANYHOW १.

anywhere /'अेनिवेअ(र्); *अमे* -ह्वेअर/ *क्रिवि* १ कोणत्याही जागी, कोणीकडेही, कुठेही. २ (*वाक्प्र*) **get anywhere** ⇨ GET.

aorta /अेइ'ऑऽट/ *ना* [*गण*] हृदयापासून रक्त नेणारी मुख्य रक्तनलिका, जवनिका, महाधमनी.

apart /अ'पाट्/ *क्रिवि* १ लांब, दूर : *The houses are 500 metres ~, ती घरे*

एकमेकांपासून पाचशे मीटर अंतरावर आहेत. २ वेगवेगळा, विभक्त (पणे), वेगळा : *They're living ~, ते वेगळे राहतात.* ३ तुकडेतुकडे, विखरून : *It fell ~, ते विखरून पडले, पडून त्याचे तुकडेतुकडे झाले.* **apart from** *शब्दयो* १ -चा अपवाद करता/सोडता, खेरीज, एक (एखादी गोष्ट) सोडली तर. २ तितक्याच चांगल्या रीतीने किंवा प्रकारे, तेवढेच.

apartheid /अ'पाट्हाइट्, -हेइट्/ *ना* [*अगण*] (दक्षिण आफ्रिकेतील) वेगवेगळ्या वंशाच्या लोकांना वेगवेगळे ठेवण्याचे म्हणजे भेद करण्याचे पूर्वीच्या शासनाचे अधिकृत धोरण, वर्णद्वेषाचे किंवा वर्णभेदाचे धोरण.

apartment /अ'पाट्मन्ट्/ *ना* [*गण*] १ (*अमे*) flat^1 पहा; सदनिका, फ्लॅट, घरासारखा वापर करण्याच्या एकाच मजल्यावरील खोल्या. २ मोठी खोली, दालन.

apathy /'ॲपथि/ *ना* [*अगण*] उत्साहाचा किंवा लक्ष असण्याचा अभाव, निरुत्साह, औदासीन्य, उदासीनपणा, दुर्लक्ष, शिथिलपणा. **apathetic** /,ॲप'थेटिक्/ *वि* उदासीन, निरुत्साही.

ape /अेइप्/ *ना* [*गण*] चिम्पान्झी किंवा गोरीला सारखे बिनशेपटीचे माकड. **ape** *क्रि* [*सक*] (एखाद्याची) नक्कल करणे, अनुकरण करणे.

aperitif /अ'पेरटिफ्; *अमे* अ,पेर'टीफ्/ *ना* [*गण*] जेवणापूर्वी घ्यायचे मद्य.

aperture /'ॲपच(र्)/ *ना* [*गण*] (*औप*) लहान भोक किंवा वाट उदा कॅमेऱ्याच्या भिंगातील, छिद्र, रंध्र.

apex /'अेइपेक्स्/ *ना* [*गण*] (*ब.व* **-es** किंवा **apices** /'अेइपिसीझ्/) उच्चतम बिंदू, शिरोबिंदू, कळस, अग्र, शेंडा : *the ~ of a triangle, त्रिकोणाचा शिरोबिंदू.*

apiece /अ'पीस्/ *क्रिवि* प्रत्येकी, हरेक : *costing Re 1 ~, प्रत्येकी एक रुपया.*

aplomb /अ'प्लॉम्/ *ना* [*अगण*] आत्मविश्वास आणि आत्मसंयम.

apologetic /अ,पॉल'जेटिक्/ *वि* एखाद्या गोष्टीबाबत खेद व्यक्त करणारा, अपराधीपणाचा भाव असणारा, ओशाळलेला, दिलगीर. **apologetically** /-क्लि/ *क्रिवि* अपराधी भावनेने, खेदपूर्वक, दिलगिरीने.

apologize /अ'पॉलजाइझ्/ *क्रि* [*अक*] क्षमायाचना करणे, क्षमा मागणे, चुकलं म्हणणे, माफी मागणे, दिलगिरी व्यक्त करणे : *I must ~ for being late, उशिरा आल्याबद्दल मी क्षमा मागितली पाहिजे.*

apology /अ'पॉलजि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) १ एखाद्याच्या भावना दुखावल्याबद्दल, काही गैर केल्याबद्दल वगैरे आपणास वाईट वाटते असे केलेले विधान, क्षमायाचना, दिलगिरी. २ (*वाक्प्र*) **an apology for sth** एखाद्या गोष्टीचे निकृष्ट उदाहरण, भिकार मासला.

apostle /अ'पॉस्ल्/ *ना* [*गण*] १ ख्रिस्ताने स्वतःच्या शिकवणीच्या प्रसारासाठी पाठविलेल्या बाराजणातील कोणीही एक. २ नवीन धर्माचा किंवा नवीन चळवळीचा प्रमुख/जनक.

apostrophe /अ'पॉस्ट्रफि/ *ना* [*गण*] अक्षर किंवा अक्षरे गाळली आहेत असे दाखविणारे (') हे चिन्ह, उदा *I am* च्या ऐवजी *I'm*.

appal (*अमे* तसेच **appall**) /अ'पॉऽल्/ *क्रि* (**-ll-**) [*सक*] भयभीत करणे, भयाने थक्क होणे, सर्द होणे, गार होणे, तोंडचे पाणी पळणे, हवालदील होणे/करणे : *We were ~led at the news, आम्ही त्या बातमीने थक्क झालो.* **appalling** *वि* थक्क करणारा, धक्कादायक.

apparatus /,ॲप'रेइटस्; *अमे* -रॅटस्/ *ना* [*अगण, गण*] एखाद्या विशिष्ट कार्यासाठी वापरायची सामग्री किंवा हत्यारे, उपकरणे, साधने.

apparent /अ'पॅरन्ट्/ *वि* १ स्पष्टपणे दिसणारे, उघड : *for no ~ reason, कोणतेही उघड कारण नसताना.* २ दिसलेले पण खरे असेलच असे नसणारे, वरवर दिसणारे पण खरे नसणारे, वरकरणी, प्रत्यक्ष नसणारे : *an ~ lack of knowledge, वरकरणी दिसणारा ज्ञानाचा अभाव.* **apparently** *क्रिवि* उघडपणे; वरवर पाहता.

apparition /,ॲप'रिश्न्/ *ना* [*गण*] भूत.

appeal /अ'पील्/ *क्रि* [*अक*] १ *for//* एखाद्या गोष्टीसाठी कळकळीची विनंती करणे, (मदतीचे) आवाहन करणे : *~ for help/money, मदतीचे आवाहन करणे, पैसे देण्याची विनंती करणे.* २ नवीन निर्णयासाठी वरच्या

कोर्टात जाणे, अपील करणे. ३ *to*// एखाद्याला आकर्षक वाटणे, एखाद्याचे मन वेधणे: *The idea of camping does not ~ to me, तंबूत राहण्याची कल्पना मला फारशी आकर्षक वाटत नाही.* **appeal** *ना* १ [*गण*] कळकळीची विनंती, आवाहन, हाक; (*कायदा*) प्रार्थना, याचिका. २ [*अगण*] आकर्षकता, मोहकता: *'sex ~, लैंगिक स्तरावरील मोहकता.* **appealing** *वि* १ आकर्षक, मनमोहक. २ एखाद्याला दया वाटावी असा, केविलवाणा, मन पिळवटणारा.

appear /अ'पिअ(र्)/ *क्रि* [*अक*] १ दिसणे; दृष्टोत्पत्तीस येणे, दिसू लागणे: *A ship ~ed on the horizon, क्षितिजावर एक जहाज दिसू लागले.* २ येणे, पोहोचणे. ३ उपलब्ध होणे, सार्वजनिकरीत्या स्वतःला सादर करणे, जनतेत स्वतःला प्रकट करणे, प्रकाशित होणे, प्रसिद्ध होणे: *Her latest book ~s in the spring, वसंतऋतूमधे तिचे नवीन पुस्तक येत आहे.* ४ कोर्टात हजर राहणे. ५ दिसणे, वाटते आहे असे दिसणे, भासणे: *That explanation ~s (to be) reasonable, ते स्पष्टीकरण ठीक वाटते – वरवर तरी योग्य भासते.* **appearance** *ना* १ [*गण*] दृष्टीस पडण्याची क्रिया, दिसणे. २ [*गण, अगण*] एखादी गोष्ट किंवा एखादा माणूस लोकांना कसा दिसेल ते, पेहेराव, दर्शन: *an untidy ~ance, गबाळा पेहेराव, अव्यवस्थितपणाचे दर्शन.* ३ (*वाक्प्र*) **,put in an ap'pearance** एखाद्या सभेला, भोजन समारंभाला वगैरे थोडा वेळ जाऊन येणे, समारंभाला तोंड दाखवून येणे, हजेरी लावून येणे. **to all ap'pearances** वरवर तरी असे दिसणे, बाह्यतः दिसणे.

appease /अ'पीझ़्/ *क्रि* [*सक*] (*औप*) (एखाद्याचा) राग, विशेषतः त्याच्या मनाप्रमाणे वागून, त्याचे समाधान करून शांत करणे. **appeasement** *ना* [*अगण*] शांतवन, शमन.

append /अ'पेन्ड्/ *क्रि* [*सक*] (*औप*) जोडणे, पुरवणी देणे किंवा लावणे (विशेषतः लेखनात). **appendage** *ना* [*गण*] एखाद्या मोठ्या गोष्टीला लावलेला जोड, पुरवणी, परिशिष्ट, शेपूट.

appendicitis /अ,पेन्डि'साइटिस्/ *ना* [*अगण*] आन्त्रपुच्छाचा रोग (पहा APPENDIX २).

appendix /अ'पेन्डिक्स्/ *ना* [*गण*] १ (*ब.व* **-dices** /-डिसीझ़्/) पुस्तकाच्या शेवटी जोडलेला जादा भाग, परिशिष्ट. २ (*ब.व* **-es**) आतड्यांना जोडलेले एक छोटेसे इंद्रिय, आन्त्रपुच्छ.

appetite /'ॲपिटाइट्/ *ना* [*गण, अगण*] तीव्र इच्छा – विशेषतः भोजनाची, भूक, क्षुधा.

appetizer /'ॲपिटाइझ़(र्)/ *ना* [*गण*] भूक वाढविण्यासाठी घेण्याचा किंवा पिण्याचा पदार्थ, क्षुधावर्धक, भूक प्रदीप्त करणारा पदार्थ, पाचन. **appetizing** *वि* भूक वाढविणारे, पाचक.

applaud /अ'प्लॉड्/ *क्रि* १ [*अक, सक*] टाळ्या वाजवून (एखाद्या गोष्टीला किंवा माणसाला) पसंती देणे किंवा शाबासकी देणे. २ [*सक*] स्तुती करणे, प्रशंसा करणे. **applause** /अ'प्लॉझ़्/ *ना* [*अगण*] टाळ्यांचा गजर, शाबासकी, वाहवा.

apple /ॲप्ल्/ *ना* [*गण*] घट्ट गराचे गोलाकार फळ, सफरचंद.

appliance /अ'प्लाइअन्स्/ *ना* [*गण*] उपकरण, साधन, यंत्र.

applicable /अ'प्लिकब्ल्, तसेच 'ॲप्लिकब्ल्/ *वि* (*to*)// एखाद्या गोष्टीशी किंवा व्यक्तीशी संबद्ध, लागू असलेले.

applicant /'ॲप्लिकन्ट्/ *ना* [*गण*] नोकरीसाठी वगैरे अर्ज करणारा माणूस, अर्जदार.

application /,ॲप्लि'केइश्न्/ *ना* १ [*गण, अगण*] विनंती: *an ~ (form) for a job, नोकरीसाठी विनंती (अर्ज).* २ [*अगण, गण*] एखादी गोष्ट व्यवहारोपयोगी करण्याची क्रिया, विनियोग, उपयोजन: *the practical ~s of the invention, या शोधाचे व्यवहारात उपयोग करण्याचे प्रयत्न, शोधाचे उपयोजन.* ३ [*अगण*] कष्ट, परिश्रम; प्रयत्नांची पराकाष्ठा, प्रयास.

apply /अ'प्लाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) १ [*अक*] (*for*)// एखादी गोष्ट रीतसर किंवा अधिकृतपणे मागणे, त्यासाठी अर्ज करणे: *~ for a job/visa, नोकरी/व्हिसा याची रीतसर मागणी करणे किंवा त्यासाठी अर्ज करणे.* २ [*अक*] (*to*)// एखाद्या व्यक्तीशी किंवा गोष्टीशी संबद्ध असणे, त्यांना लागू पडणे,

लागणे : *This rule does not ~ to you, हा नियम तुला लागू पडत नाही.* ३ [*सक*] (विचार किंवा शक्ती) केंद्रित करणे : *~ oneself/one's mind to the problem, स्वतःचे लक्ष/मन प्रश्नावर केंद्रित करणे.* ४ [*सक*] कामास लावणे, कार्यान्वित करणे, वापरणे, उपयोगात आणणे : *~ the brakes, ब्रेक लावणे/वापरणे* ○ *~ modern technology, आधुनिक तंत्रज्ञान वापरणे.* ५ [*सक*] एखादी गोष्ट पृष्ठभागावर चोळणे किंवा लावणे : *~ ointment to the cut, जखमेवर मलम लावणे.* **applied** *वि* व्यावहारिक उपयोगासाठी वापरलेला, उपयोजित, प्रयुक्त : *applied science, उपयोजित विज्ञान, प्रयुक्त विज्ञान.*

appoint /अ'पॉइन्ट्/ *क्रि* [*सक*] १ (एखाद्याची) नोकरीसाठी नियुक्ती करणे. २ (*औप*) निश्चित करणे, ठरवणे, निर्णय घेणे, नियोजित करणे : *the ~ed time, ठरलेली वेळ, नियोजित वेळ.* **appointment** *ना* १ (क) [*गण, अगण*] एखाद्याची कामावर केलेली नेमणूक, नियुक्ती. (ख) [*गण*] एखाद्याची जेथे नेमणूक केली आहे ते पद किंवा जागा, विहित कार्य. २ [*गण, अगण*] एखाद्याची भेट घेण्याची व्यवस्था किंवा तरतूद, नियोजित भेट, ठरवलेली गाठभेट.

appraise /अ'प्रेइझ्/ *क्रि* [*सक*] (*औप*) किंमत करणे, महत्त्व ओळखणे. **appraisal** *ना* [*गण, अगण*] एखाद्या गोष्टीची आजमावणी, मूल्यमापन.

appreciable /अ'प्रीशबल्/ *वि* लक्षात येण्याजोगा, डोळ्यात भरणारा : *an ~ difference, लक्षात येण्याजोगा फरक.* **appreciably** *क्रिवि* लक्षात येईल अशा प्रकारे, जाणवण्याइतके.

appreciate /अ'प्रीशिअेइट्/ *क्रि* १ [*सक*] (एखादी गोष्ट) समजणे आणि (तिचा) आनंद लुटणे, दाद देणे, रसग्रहण करणे : *~ classical music, शास्त्रीय संगीत समजून त्याचा आस्वाद घेणे.* २ [*सक*] आभारी असणे, कृतज्ञ असणे, उपकृत असणे : *I really ~ all your help, मी तुझ्या सर्व मदतीबद्दल खरंच फार आभारी आहे.* ३ [*सक*] पूर्णपणे समजणे, पूर्ण कल्पना असणे/येणे : *I ~ your problems, but am not able to help, मला तुझ्या अडचणींची पूर्ण कल्पना आहे पण तुला मी मदत करू शकत नाही.* ४ [*अक*] (जमीन वगैरेबाबत) किंमत वाढणे. **appreciation** /अ,प्रीशि'अेइश्न्/ *ना* [*अगण, गण*] रसंग्रहण, रसास्वाद; कृतज्ञता, उपकाराची जाणीव, समज. **appreciative** /-शटिव्ह्/ *वि* रसग्राही, मार्मिक, पसंतीचा.

apprehend /,ॲप्रि'हेन्ड्/ *क्रि* [*सक*] (*औप*) १ पकडणे, अटक करणे. २ समजणे, कळणे.

apprehension /,ॲप्रि'हेन्श्न्/ *ना* [*अगण, गण*] काळजी किंवा भीती, धास्ती. **apprehensive** /-हेन्सिव्ह्/ *वि* काळजीत पडलेला, धास्तावलेला.

apprentice /अ'प्रेन्टिस्/ *ना* [*गण*] कारागिरीचे काम शिकणारा, एखाद्या व्यवसायाचे कौशल्य शिकणारा, शिकाऊ उमेदवार. **apprentice** *क्रि* [*सक*] (*to*)// एखाद्याला शिकाऊ उमेदवार करणे : *He is ~d to a plumber, नळाचे काम करणाऱ्याकडे तो शिकाऊ म्हणून काम करतोय.* **apprenticeship** /अ'प्रेन्टिशिप्/ *ना* [*गण, अगण*] उमेदवारीचा काळ, उमेदवारी.

approach /अ'प्रउच्/ *क्रि* १ [*अक, सक*] (एखाद्या व्यक्तीच्या किंवा गोष्टीच्या) जवळ जाणे किंवा येणे. २ [*सक*] विनंती करणे किंवा मानाने देऊ करणे : *~ the manager for a pay rise, पगारवाढीसाठी व्यवस्थापकाला विनंती करणे.* ३ [*सक*] हाताळणे : *How shall I ~ this problem? हा प्रश्न मी कसा हाताळावा?* **approach** *ना* [*गण*] १ [बहुधा *अे.व*] जवळ येण्याची कृती, येणे. २ रस्ता, मार्ग, वाट वगैरे. ३ एखादी गोष्ट हाताळण्याची पद्धती, (प्रश्न) सोडवण्याची पद्धत. **approachable** *वि* सौजन्यपूर्ण आणि संवाद करता येण्याजोगा, भेट घेण्याजोगता.

appropriate^1 /अ'प्रउप्रिअट्/ *वि* योग्य, साजेसा, बरोबर. **appropriately** *क्रिवि* योग्य रीतीने, बरोबर मार्गाने.

appropriate^2 /अ'प्रउप्रिअेइट्/ *क्रि* [*सक*] १ (स्वतःची नसलेली गोष्ट) स्वतःच्या कामासाठी वापरणे. २ काही विशिष्ट हेतूने बाजूला काढून ठेवणे, नावाने काढून ठेवणे. **appropriation** /अ,प्रउप्रि'अेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] अपहार, गैरवापर; बाजूला

काढून ठेवलेली गोष्ट.

approval /अ'प्रूव्ह्ल्/ *ना* [*अगण*] एखादी व्यक्ती किंवा गोष्ट चांगली किंवा स्वीकारण्याजोगी आहे असे दाखविणे किंवा अशी भावना, पसंती, पाठिंबा, मान्यता, मंजुरी : *Your plans have my ~, तुझ्या योजनांना माझा पाठिंबा आहे.* २ (*वाक्प्र*) **on approval** पसंत न पडल्यास पैसे न देता परत करायचा (माल वगैरे).

approve /अ'प्रूव्ह्/ *क्रि* १ [*अक*] (*of*)// एखादी व्यक्ती किंवा गोष्ट चांगली किंवा स्वीकारणीय आहे असे वाटणे किंवा दाखवणे, पसंती दाखविणे, पसंती दर्शविणे. २ [*सक*] एखादी गोष्ट अधिकृतपणे मान्य करणे, स्वीकारणे. **approvingly** *क्रिवि* पसंतीने, पाठिंबा दर्शवीत.

approximate^{1} /अ'प्रॉक्सिमट्/ *वि* जवळजवळ बरोबर किंवा अचूक पण संपूर्णतः नाही, जवळजवळ, साधारण. **approximately** *क्रिवि* साधारणपणे, जवळजवळ, अंदाजे : *~ly 1000 students, साधारणपणे १००० विद्यार्थी.*

approximate^{2} /अ'प्रॉक्सिमेइट्/ *क्रि* [*अक*] *to*// एखाद्या गोष्टीच्या अगदी जवळ येणे, जवळपास येणे. **approximation** /अ'प्रॉक्सि'मेइश्न्/ *ना* [*गण*] अंदाज, अदमास.

apricot /'अेइप्रिकॉट्/ *ना* (**क**) [*गण*] गोलाकार, लहान व मधे बी असलेले पिवळसर रंगाचे एक फळ, जर्दाळू. (**ख**) [*अगण*] पिवळसर नारिंगी रंग.

April /'अेइप्रल्/ ना [*अगण, गण*] इंग्रजी वर्षातला चौथा महिना : *on A~ the first, एप्रिलच्या एक तारखेला* ○ *on the first of A~, एक एप्रिलला* ○ (*अमे*) *on A~ first, एप्रिल एकला* ○ *She was born in A~, ती एप्रिलमधे जन्मली* ○ *last/next A~, गेल्या/येत्या एप्रिलला.*

apron /'अेइप्रन्/ *ना* [*गण*] कपडे स्वच्छ ठेवण्यासाठी (काम करताना) शरीराच्या पुढच्या बाजूवर घालायचा कपडा, वर बांधण्याचे मलवस्त्र.

apt /ॲप्ट्/ *वि* १ योग्य, उचित, चोख, उपयुक्त : *an ~ remark, योग्य शेरा.* २ *to*// संभव असणारा, एखादी गोष्ट करू पाहणारा, -जोगा, पात्र : *~ to be forgetful, विसराळूपणा करेल असा.* ३ भरभर शिकणारा, शीघ्रपाठी, तत्पर. **aptly** *क्रिवि* चोखपणे, योग्यपणे. **aptness** *ना* [*अगण*] चोखपणा; सुयोग्यता; तत्परता.

aptitude /'ॲप्टिट्यूड्; *अमे* -टूड्/ *ना* [*गण, अगण*] नैसर्गिक क्षमता किंवा कौशल्य, स्वाभाविक कल.

Aqualung /'ॲक्वलँड्/ *ना* [*गण*] (*मालक*) पाण्याखाली पोहताना श्वासोच्छ्वासासाठी वापरायचे उपकरण.

aquamarine /'ॲक्वम'रीन्/ *ना* (**क**) [*गण*] निळसर हिरव्या रंगाचे रत्न, खडा. (**ख**) [*अगण*] निळसर हिरवा रंग.

aquarium /अ'क्वेअरिअम्/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s** किंवा **~ria** /-रिअ/) जिवंत मासे ठेवण्यासाठी काचेच्या पेट्या (असणारी इमारत), मत्स्यालय.

aquatic /अ'क्वॅटिक्/ *वि* १ पाण्यात राहणारे किंवा वाढणारे (प्राणी किंवा वनस्पती). २ पाण्यात किंवा पाण्यावर होणारे (खेळ).

aqueduct /'ॲक्विडँक्ट्/ *ना* [*गण*] दरीवरून पाणी वाहून नेणारा पूल, सेतुप्रणाल.

Arabic /'ॲरबिक्/ *वि* अरबांचे, अरबी. **Arabic** *ना* [*अगण*] अरबांची भाषा. **Arabic 'numeral** *ना* [*गण*] अंक १, २, ३ वगैरे.

arable /'ॲरब्ल्/ *वि* (जमीनविषयक) धान्य पिकविण्यास योग्य, जिराईत, लागवडीस उपयोगी, काळी.

arbitrary /'आबिट्ररि; *अमे* 'आर्बिट्रेरि/ *वि* १ अपघाताने घडणारा म्हणजेच कारणपरंपरा नसलेला, अनियंत्रित, अहेतूक. २ अमर्याद सत्ता वापरणारा, स्वैर, निरंकुश. **arbitrarily** *क्रिवि* अहेतूकपणे, स्वैरपणे.

arbitrate /'आबिट्रेइट्/ *क्रि* [*अक, सक*] (*between*)// दोन गटांतील (वाद, तंटा, वगैरेत) मध्यस्थी करणे, ते मिटवणे, निर्णय करणे, लवाद करणे. **arbitration** /आबि'ट्रेइश्न्/ *ना* [*अगण*] न्यायाधीश म्हणून नेमलेल्या माणसाने सोडवलेला तंटा, त्याचा निवाडा किंवा निर्णय, लवाद कार्यवाही. **arbitrator** *ना* [*गण*] लवाद.

arc /आक्/ *ना* [*गण*] वर्तुळाकार रेषेचा भाग, परिघाचा भाग, कंस.

arcade /आकेइड्/ *ना* [*गण*] दुकाने असलेला कमानीदार छपराचा रस्ता, दुकाने असलेली महिरपी रांग.

arch /आच्/ *ना* [*गण*] कमानदार बांधकाम उदा पुलाखालच्या आधाराची कमान. **arch** *क्रि* [*अक, सक*] कमान करणे : *The cat ~ed its back, मांजराने पाठीची कमान केली.*

archaeology /,आकि'ऑलजि/ *ना* [*अगण*] पुरातन काळातील घरे, हत्यारे वगैरे अवशेषांचा अभ्यास करणारे शास्त्र, पुरातनवस्तुशास्त्र, पुरातत्त्वशास्त्र, पुरातत्त्वविद्या. **archaeological** /आकिअ'लॉजिक्ल्/ *वि* पुरातनवस्तुशास्त्रीय, पुरातत्त्वशास्त्रीय, **archaeologist** *ना* [*गण*] पुरातत्त्वशास्त्रज्ञ, पुरातत्त्वविद्यावेत्ता.

archaic /आ'केइइक्/ *वि* (बहुधा शब्दांच्या संबंधी) वापरात नसणारे, अप्रचलित, जुने, प्राचीन.

archangel /'आकेइन्ज्ल्/ *ना* [*गण*] मुख्य देवदूत (पहा ANGEL १), सर्वात श्रेष्ठ देवदूत.

archbishop /आच्'बिशप्/ *ना* [*गण*] मुख्य बिशप, प्रमुख धर्माध्यक्ष.

archer /'आच(र्)/ *ना* [*गण*] धनुष्यबाणाने तीर मारणारा माणूस, तिरंदाज, धनुर्धर, धनुर्धारी. **archery** *ना* [*अगण*] धनुष्यबाणाने तीर मारण्याची विद्या किंवा कौशल्य, धनुर्विद्या, तिरंदाजी.

archipelago /,आकि'पेलगउ/ *ना* [*गण*] (*ब.व* ~**s** किंवा ~**es**) छोट्या बेटांचा समूह, द्वीपसमूह.

architect /'आकिटेक्ट्/ *ना* [*गण*] इमारतीचे नकाशे काढणारा, गृहशिल्पी, स्थपती, वास्तुविद्याविशारद, स्थापत्य विशारद. **architecture** /-टेक्च(र्)/ *ना* [*अगण*] वास्तुविद्या, वास्तुकला, स्थापत्य, इमारतशास्त्र, गृहनिर्माणविद्या, वास्तुकला शैली, बांधकामाची शैली. **architectural** /आकि'टेक्चरल्/ *वि* वास्तुविद्याविषयक, वास्तुकलेचा.

archives /'आकाइव्ह्झ्/ *ना* [*ब.व*] ऐतिहासिक कागदपत्रे, पुराभिलेख, त्यांचा संग्रह, ऐतिहासिक दप्तर, राजकार्यलेखरक्षणस्थान.

Arctic /'आक्टिक्/ *वि* उत्तर ध्रुवाजवळच्या थंड प्रदेशाविषयीचा, उत्तरध्रुव-शीतप्रदेशीय. **the Arctic** *ना* [*अे.व*] उत्तरध्रुवाजवळचा शीतप्रदेश.

ardent /'आड्न्ट्/ *वि* अतिशय उत्साही, हौशी, उत्कट, सळसळत्या रक्ताचा; कडवा. **ardently** *क्रिवि* उत्साहाने, हौसेने, उत्कटतेने; कडवेपणाने.

arduous /'आड्युअस्; *अमे* -ज्यु-/ *वि* खूप परिश्रम किंवा ताकद लागणारा, कष्टसाध्य, जिकिरीचा, आयासप्राप्य. **arduously** *क्रिवि* परिश्रमपूर्वक, कष्टाने, महत्प्रयासाने.

are ➪ BE.

area /'अेअरिअ/ *ना* १ [*गण, अगण*] एखाद्या पृष्ठभागाची व्याप्ती किंवा परिमाण, क्षेत्र, लांबीरुंदी, क्षेत्रफळ. २ [*गण*] भूपृष्ठाचा भाग, भूखंड, प्रदेश : *desert ~s, वाळवंटी प्रदेश, वाळवंटी भाग.* ३ [*गण*] (*ला*) कार्याची व्याप्ती, कार्यक्षेत्र : *different ~s of human experience, मानवी अनुभवाची विविध क्षेत्रे, अनुभूतीची विविध व्याप्ती.*

arena /अ'रीन/ *ना* [*गण*] १ खेळांसाठी वगैरे वापरायचे बंदिस्त मैदान, आखाडा, रिंगण. २ (*ला*) स्पर्धा किंवा उपक्रम यासाठीची जागा, यांचे क्षेत्र : *in the political ~, राजकीय क्षेत्रात, राजकीय आखाड्यात.*

aren't /आन्ट्/ are not नाहीत चे संक्षिप्त रूप. ➪ BE.

argue /'आग्यू/ *क्रि* १ [*अक*] मतभेद व्यक्त करणे, वादविवाद/वादावादी करणे, भांडणे, तंटा करणे, बोलाचाली होणे. २ [*अक, सक*] *for/against//* बाजूने किंवा विरुद्ध बोलणे, एखाद्या गोष्टीच्या बाजूने किंवा विरुद्ध कारणे देणे. ३ [*सक*] (*औप*) चर्चा करणे, वाद-प्रतिवाद करणे, युक्तिवाद करणे : *The lawyers ~d the case, वकिलांनी खटल्याबाबत वाद-प्रतिवाद केले.* **arguable** /'आग्युअब्ल्/ *वि* अनिश्चित, खात्रीपूर्वक नसलेला, शंकास्पद, विश्वास न ठेवण्याजोगा. **arguably** *क्रिवि.*

argument /'आग्युमन्ट्/ *ना* १ [*गण*] मतभेद, मतभिन्नता. २ [*गण, अगण*] चर्चा, वाद, युक्तिवाद, बाजूचे किंवा विरुद्धचे कारण,

कारणमीमांसा. **argumentative** /,आग्यु'मेन्टटिव्ह्/ *वि* वाद घालणारा, वितंडवादी.

aria /'आरिअ/ *ना* [*गण*] एखाद्या संगितिकेत वगैरे एका माणसाने म्हणायचे गाणे.

arid /'ॲरिड/ *वि* १ (जमीनविषयक) कोरडी, रुक्ष, रखरखीत. २ रटाळ, नीरस, कंटाळवाणा; अनाकर्षक, लक्ष वेधून न घेणारा असा सामान्य.

arise /अ'राइझ़्/ *क्रि* (*भूत* **arose** /अ'रउझ़्/, *भूत वि* **~n** /अ'रिझ़्न्/) [*अक*] अस्तित्वात येणे, उद्‌भवणे, निर्माण होणे, उपटणे: *A difficulty has ~n, एक अडचण निर्माण झालीय.*

aristocracy /,ॲरि'स्टॉक्रसि/ *ना* [*गण*, तसेच ब.व क्रियापदासह अे.व] (*ब.व* **-ies**) समाजातील अत्युच्च म्हणजे वरचा वर्ग – विशेषतः सरदार, रावबहादूर वगैरे उपाधी असणाऱ्या लोकांचा वर्ग, उच्चस्तरीय लोक, अभिजात खानदानी वर्ग. **aristocrat** /'ॲरिस्टोक्रॅट; *अमे* अ'रिस्ट/ *ना* [*गण*] सरदार वर्गाचा सभासद, अभिजातवर्गीय (राजपुरुष/स्त्री), उमराव. **aristocratic** /,ॲरिस्ट'क्रॅटिक्; *अमे* अ'रिस्ट-/ *वि* अभिजात, खानदानी.

arithmetic /अ'रिथ्मटिक्/ *ना* [*अगण*] अंकांनी गणती करण्याची गणिताची एक शाखा, अंकगणित. **arithmetical** /,ॲरिथ्'मेटिक्ल्/ *वि* अंकगणितीय.

ark /आक्/ *ना* [*गण*] (बायबलमधील) नोआचे जहाज.

arm^1 /आम्/ *ना* [*गण*] १ (क) शरीराचा खांद्यापासून पंजापर्यंतचा भाग, हात, बाहू, भुज. (ख) हात झाकणारा कपड्याचा भाग, बाही, हात. २ हाताचा आकार असणारे काहीतरी: *the ~s of a chair, खुर्चीचे हात.* ३ एखाद्या राष्ट्राच्या संरक्षणदलाचा एक भाग किंवा विभाग. ४ (*वाक्प्र*) **,arm in 'arm** (दोन माणसांबाबत) हातात हात घालून. **'armchair** *ना* [*गण*] हात ठेवण्याची सोय असलेली खुर्ची, आरामखुर्ची. **'armpit** *ना* [*गण*] खांद्याजवळचा हाताखालचा खोलगट भाग, काख.

arm^2 /आम्/ *क्रि* १ [*अक, सक*] (एखाद्याला) शस्त्रास्त्रे पुरविणे, शस्त्रसज्ज करणे. २ (*वाक्प्र*) **,armed to the 'teeth** चिकार शस्त्रास्त्रांनी सज्ज असलेला. **the ,armed 'forces** *ना* [*ब.व*] एखाद्या देशाचे भूदल, नौदल आणि वायुदल, एखाद्या देशाचे सैन्य किंवा संरक्षणदल किंवा त्याची सेना.

armada /आ'माड/ *ना* [*गण*] युद्धनौकांचा मोठा समूह, आरमार.

armadillo /,आम'डिलउ/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s**) दक्षिण अमेरिकेतील हाडांचे मोठे खवलेखवले असणारा एक लहान प्राणी, आर्माडिलो.

armament /'आममन्ट्/ *ना* १ [*गण*, बहुधा *ब.व*] शस्त्रास्त्रे – खासकरून मोठ्या तोफा, शस्त्रसंभार. २ [*अगण*] युद्धासाठी सैन्याला शस्त्रसज्ज करण्याची प्रक्रिया.

armistice /'आमिस्टिस्/ *ना* [*गण*] युद्धकाळातील काही काळ युद्ध थांबवण्याचा करार, तात्पुरता शस्त्रसंधी, युद्धविराम, लढाईची तहकुबी.

armour (*अमे* **-or**) /'आम(र्)/ *ना* [*अगण*] १ लढाईत शरीररक्षणासाठी घालावयाचे धातूचे कवच, चिलखत. २ रणगाडे, बोटी वगैरेंचे धातूचे आवरण. **armoured** (*अमे* **-or-**) *वि* चिलखताचे आवरण घातलेला चिलखती. **armoury** (*अमे* **-or-**) *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) शस्त्रास्त्रे ठेवण्याची जागा, शस्त्रागार, शिलेखाना.

arms /आम्झ़्/ *ना* [*ब.व*] १ शस्त्रास्त्रे. २ (*वाक्प्र*) **take up 'arms** (*औप*) युद्धाला जाणे म्हणजे त्याची तयारी करणे, युद्ध पुकारणे. **(be) up in 'arms (about/over sth)** एखाद्या गोष्टीचा तीव्र निषेध करणे, बंड करणे. **the 'arms race** *ना* [*अे.व*] राष्ट्राराष्ट्रांतील शस्त्रबळासाठीची स्पर्धा, शस्त्रास्त्रस्पर्धा.

army /'आमि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ (क) [*गण*] एखाद्या देशाचे जमिनीवर लढणारे सैन्य, भूदल, फौज, लष्कर. (ख) **the army** [*अे.व*] सैनिकीपेशा, लष्करीपेशा, संरक्षणसेवा: *join the ~, लष्करीपेशा स्वीकारणे, संरक्षणसेवेत दाखल होणे.* २ [*गण*] मोठा गट: *an ~ of volunteers, स्वयंसेवकांची फौज, स्वयंसेवकांचा ताफा.*

aroma /अ'रउम/ *ना* [*गण*] सुगंध, सुवास. **aromatic** /,ॲर'मॅटिक/ *वि* सुगंधी, सुवासिक.

arose ARISE चा *भूत.*

around /अ'राउन्ड्/ *क्रिवि, शब्दयो* १ (एखाद्या गोष्टीभोवती) गोलाकार गतीने, भोवती : *The earth moves ~ the sun, पृथ्वी सूर्याभोवती फिरते.* २ -कडे किंवा विविध ठिकाणी, इकडेतिकडे, इतस्ततः, सगळीकडे : *walk ~ the exhibition, प्रदर्शनात इकडेतिकडे फिरणे.* ३ (-च्या) सर्व बाजूंनी, चोहीकडून : *The children gathered ~, चोहीकडून मुले जमा झाली.* ४ मिळू शकेलसा, उपलब्ध, उपस्थित : *Is anyone ~? कोणी आहे का?* ५ जवळ, जवळपास, जवळजवळ, सुमारास : *It's ~ six o'clock, जवळजवळ सहा वाजले, सुमारे सहा वाजले.*

arouse /अ'राउझ्/ *क्रि* [*सक*] १ (*औप*) झोपेतून उठवणे, जागे करणे. २ चेतवणे, कार्यप्रवृत्त करणे : *~ suspicion, शंका निर्माण करणे.*

arr संरू १ arrives येतो/येते/येतं चे संक्षिप्त रूप. २ arranged (by) (संगीताबाबत) (-ने) आयोजिलेला चे संक्षिप्त रूप.

arrange /अ'रेइन्ज्/ *क्रि* १ [*सक*] व्यवस्था करणे, आयोजन करणे, योजणे : *~ a holiday, सुट्टीचा बेत करणे.* २ [*अक, सक*] (एखादी गोष्ट करण्याचा) बेत आखणे, कार्यक्रम ठरविणे, योजना करणे : *We ~d to meet at one o'clock, आम्ही एक वाजता भेटायचे ठरविले.* ३ [*अक, सक*] (एखाद्या गोष्टीविषयी) करार होणे : *~ a loan, कर्जाचा करार होणे, व्यवस्था करणे.* ४ [*सक*] व्यवस्थित लावणे, मांडणे किंवा ठेवणे, आकर्षक करणे : *~ flowers, पुष्परचना करणे.* ५ [*सक*] एखादी संगीतरचना एखाद्या विशिष्ट वाद्यावर बसविण्यासाठी अनुरूप करणे किंवा बसविण्यायोग्य करणे. **arrangement** *ना* १ **arrangements** [*ब.व*] योजना, तयारी. २ [*गण*] करार, योजना, आखणी. ३ [*गण*] आकर्षक पद्धतीने मांडण्याचा (पहा ARRANGE ४) किंवा संगीतरचना अनुरूप करण्याचा (पहा ARRANGE ५) परिणाम किंवा त्याचे फलित : *a flower ~ment, पुष्परचना ○ an ~ment for piano, पियानोवर बसविण्यायोग्य केलेली (संगीत) रचना.* ४ [*अगण*] आखणी, योजना.

array /अ'रेइ/ ना [*गण*] छाप पाडणाऱ्या गोष्टींची मोठी भव्य मालिका.

arrears /अ'रिअझ्/ *ना* १ [*ब.व*] देणे असलेले पैसे, थकबाकी. २ (*वाक्प्र*) **be in arrears (with sth)** पैसे देण्यास उशीर होणे, पैसे देण्यास विलंब होणे.

arrest /अ'रेस्ट्/ *क्रि* [*सक*] १ (एखाद्याला) कायदेशीर अधिकारात पकडणे. २ (*औप*) एखादी प्रक्रिया थांबवणे, कुंठित करणे, बंद करणे. ३ (ल. ..) वेधणे, खेचून घेणे. **arrest** *ना* १ [*गण*] 'अटक, थांबवणे, लक्ष वेधणे. २ (*वाक्प्र*) **under arrest** पोलिसांनी पकडलेला किंवा कैद केलेला.

arrival /अ'राइव्हल्/ *ना* १ [*अगण*] येणे, पोहोचणे, आगमन, आगम. २ [*गण*] येणारी व्यक्ती किंवा गोष्ट, दाखल होणारा : *The new ~ (ie baby) is a girl, नवीन आलेला पाहुणा (म्हणजे मूल) मुलगी आहे.*

arrive /अ'राइव्ह्/ *क्रि* [*अक*] १ स्थळी/जागी पोहोचणे : *~ home, घरी पाहोचणे.* २ येणे : *The great day has ~d! तो महत्त्वाचा दिवस आला आहे!* ३ (*अनौप*) यशस्वी होणे. ४ (*क्रिब*) **arrive at sth** एखाद्या गोष्टीप्रत येणे, पोहोचणे : *~ at a decision, निर्णयाप्रत येणे.*

arrogant /'ॲरगन्ट्/ *वि* घमेंडीने आणि उद्धटपणे वागणारा, गर्विष्ठ, मगरूर. **arrogance** /-गन्स्/ *ना* [*अगण*] घमेंड, मग्रूरी, उद्धटपणा. **arrogantly** *क्रिवि* पोकळ गर्वाने, मगरूरीने, उद्दामपणे.

arrow /'ॲरउ/ ना [*गण*] १ धनुष्यातून मारायची अणकुचीदार कामटी, बाण, शर, तीर. २ दिशा दाखविण्यासाठी वापरले जाणारे चिन्ह (➔).

arse /आस्/ *ना* [*गण*] १ (⚠ *व्रात्य*) कुल्ले, टेरी, ढुंगण, गांड, बूड. २ मनुष्य, माणूस : *you stupid ~! मूर्ख माणसा!* **arse** *क्रि* (*क्रिब*) **arse about/around** (⚠ *ब्रि व्रात्य*) मूर्खासारखे वागणे, बावळटपणा करणे.

arsenal /'आसन्ल्/ *ना* [*गण*] शस्त्रास्त्रे किंवा दारुगोळा जेथे ठेवतात किंवा करतात ती जागा, शस्त्रागार, शिलेखाना, शस्त्रास्त्रसाठा, दारुगोळा कारखाना.

arsenic /'आस्निक्/ *ना* [*गण*] जालीम

विषकारी द्रव्य.

arson /'आस्न्/ *ना* [*अगण*] मालमत्तेला आग लावण्याचा गुन्हा, जाळपोळ.

art /आट्/ *ना* १ [*अगण*] सौंदर्यनिर्मिती किंवा सौंदर्याविष्कार – विशेषतः चित्रकला, शिल्पकला वगैरेंमधला : *an ~ gallery, कलादालन.* २ **arts** [*ब.व*] भाषा, इतिहास, यासारखे वैज्ञानिक विषयांहून अगदी भिन्न असे अभ्यासाचे विषय, कलाविषय. ३ [*गण, अगण*] एखादी गोष्ट करण्यातले कौशल्य, कसब, कला.

artefact (तसेच **artifact**) /'आटिफॅक्ट्/ *ना* [*गण*] मानवनिर्मित वस्तू.

artery /'आटरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) १ हृदयापासून शरीराकडे रक्त नेणाऱ्या वाहिनीतील एक रक्तवाहिनी, शुद्धरक्तवाहिनी, धमनी, रोहिणी. २ मुख्य रस्ता, रेलमार्ग वगैरे. **arterial** /आ'टिअरिअल्/ *वि* रक्तवाहिनीचा, धमनीचा; मुख्य.

artful /'आट्फ़ल्/ *वि* आपल्याला हवे ते मिळवण्यात चतुर आणि हिकमती, कावेबाज, लबाड. **artfully** *क्रिवि* लबाडीने, कावेबाजपणे.

arthritis /आ'थ्राइटिस्/ *ना* [*अगण*] शरीरातील सांध्यावरील सूज व त्याच्या वेदना, सांधेदुखी, संधिवात. **arthritic** /आ'थ्रिटिक्/ *वि* सांधेदुखीचा, संधिवाताचा.

artichoke /'आटिचउक्/ *ना* [*गण*] १ (तसेच **globe 'artichoke**) शेंड्याला घट्ट, पानासारखे खवले असलेली व त्याची भाजी म्हणून उपयोग होणारी एक वनस्पती. २ **Jerusalem artichoke** /ज,रूसलम 'आटिचउक्/ पांढरी मुळे असलेली व भाजी म्हणून वापरली जाणारी एक वनस्पती.

article /'आटिक्ल्/ *ना* [*गण*] १ एकेक किंवा स्वतंत्र गोष्ट : *~s of clothing, वेगवेगळे कपडे.* २ वर्तमानपत्र वगैरेमधील लेख. ३ (*कायदा*) करारातील एकेक भाग, कलम. ४ (*व्याकरण*) a, an किंवा the हे शब्द, उपपद, व्याप्तिवाचक.

articulate^{1} /आ'टिक्युलट्/ *वि* १ स्वतःची मते स्पष्ट शब्दात मांडू शकणारा (माणूस), बोलण्यात वाकबगार. २ (बोलण्याबाबत) स्पष्ट उच्चारातील, स्पष्टोच्चारित, स्वच्छ वाणीतील. **articulately** *क्रिवि* सुस्पष्ट शब्दात, स्वच्छपणे.

articulate^{2} /आ'टिक्युलेइट्/ *क्रि* [*अक, सक*] १ (एखादी गोष्ट) स्पष्टपणे मांडणे, स्वच्छ शब्दात सांगणे. २ सांधणे, सांधा जोडणे. **articulated** *वि* दोन भाग एका साखळीने जोडलेली आणि त्यामुळे सहजपणे वळू शकणारी (लॉरी), जोड-. **articulation** /आ,टिक्यु'लेइश्न्/ *ना* [*अगण*] स्पष्ट शब्दात अभिव्यक्ती; उच्चारण.

artifact = ARTEFACT.

artificial /,आटि'फिश्ल्/ *वि* १ नैसर्गिक नसलेला, कृत्रिम, अस्वाभाविक, मानवनिर्मित. २ कृतक, खोटा, अप्रामाणिक. **artificially** *क्रिवि* कृत्रिमपणे.

artillery /आ'टिलरि/ *ना* [*अगण*] मोठ्या जड तोफा वापरणाऱ्या भूदलाचा एक विभाग, तोफखाना विभाग.

artisan /,आटि'झॅन्; *अमे* 'आर्टिझ्न्/ *ना* [*गण*] (*औप*) एखाद्या हस्तकौशल्याच्या धंद्यात निपुण असणारा माणूस, कारागीर.

artist /'आटिस्ट्/ *ना* [*गण*] १ ललितकलेतील, विशेषतः चित्रकलेसारख्या एखाद्या कलेची उपासना करणारा माणूस, कलावंत. २ एखादी गोष्ट सफाईदारपणे करणारा माणूस, कसलेला कलाकार. ३ = ARTISTE. **artistic** /आ'टिस्टिक्/ *वि* १ एखाद्या कलेतील कौशल्य दाखविणारा, कलात्मक, कलापूर्ण. २ कला किंवा कलाकारासंबंधीचा. **artistically** /-क्लि/ *क्रिवि* कलापूर्णतेने, कलात्मकतेने. **artistry** *ना* [*अगण*] एखाद्या कलावंताची कला किंवा कलाकृती.

artiste /आ'टीस्ट्/ *ना* [*गण*] व्यावसायिक कलाकार (गायक, नर्तक, अभिनेता वगैरे).

arty /'आटि/ *वि* (*अनौप अधिक्षेपी*) कलात्मकतेचा आव आणणारा.

as /अझ्; अधिक बलयुक्त रूप ॲझ्/ *शब्दयो* १ (एखाद्यासारखा, एखाद्याप्रमाणे) दिसणारा : *dressed as a policeman, पोलिसासारखा पोषाख केलेला.* २ एखाद्या व्यक्ती किंवा गोष्टीसारखे कार्य किंवा स्वभाव असणारा, अमुक व्यक्ती किंवा गोष्ट म्हणून कार्य करणारा,

उपयोगी असणारा : *a career as a teacher, शिक्षकी पेशा, शिक्षक म्हणून काम करणे* ○ *treat as friends, मित्रांसारखी वागणूक देणे, मित्र म्हणून वागणूक देणे.* **as** *क्रिवि* **as . . . as** (तुलना करताना वापर) जेवढा . . . तेवढा, जितका . . . तितका, जसा . . . तसा : *as tall as his father, वडलांएवढा उंच/जेवढे वडिल उंच तेवढा* ○ *Run as fast as you can! जितकं जोरात तुला पळता येईल तितकं जोरात पळ!* **as** उ. *अव्यय* १ जेव्हा, ज्यावेळी : *I saw her as I was leaving, मी बाहेर पडत असताना तिला पाहिलं, मी जेव्हा बाहेर पडत होते तेंव्हा मी तिला पाहिलं.* २ मुळे, करिता, म्हणून, कारणाने, यासाठी : *As you were out, I left a message, तू घरी नसल्यामुळे/नव्हतास म्हणून मी निरोप ठेवला.* ३ जरी : *Young as I am, I know what I want to be, मी जरी वयाने लहान असलो तरी मला काय व्हायचंय ते मला माहीत आहे.* ४ प्रमाणे, तसे, पद्धतीने : *Do as I say, मी सांगतो तसे कर.* ५ (*वाक्प्र*) **as for sb/sth, as to sth** एखाद्या व्यक्ती/गोष्टी संबंधी, बाबत; विषयी. **as from,** (खास *अमे*) **as of** (एखादी गोष्ट सुरू होते तेंव्हापासूनचा काळ दाखविणारा) पासून : *a new job as from Monday, सोमवारपासूनचे नवीन काम.* **as if/though** जसा काही, जणुकाही. **,as it 'is** खरे पाहता, वस्तुतः, प्रत्यक्षात. **,as it 'were** जसा काही, म्हणतात तसा. **as much** तसं : *I thought as much, मला वाटलंच तसं.* **as per** -च्या प्रमाणे, त्यानुसार, बरहुकूम : *work as per instructions, सूचना दिल्याप्रमाणे काम करणे.*

asbestos /ॲस्'बेस्टॉस/ *ना* [*अगण*] करड्या रंगाचा, न जळणारा पदार्थ.

ascend /अ'सेन्ड्/ *क्रि* १ [*अक, सक*] (*औप*) एखाद्या गोष्टीच्या वर जाणे, चढणे. २ (*वाक्प्र*) **ascend the throne** (*औप*) राजा किंवा राणी होणे, राज्यारोहण करणे. **ascendancy** *ना* [*अगण*] (*औप*) वर्चस्व, सत्ता, परिणाम, प्रभाव. **ascendant** *ना* (*वाक्प्र*) **in the a'scendant** वर्चस्व असणारा, प्रभाव असणारा, नियंत्रण करणारा किंवा नियंत्रणाची जवळजवळ सत्ता असणारा.

ascent /अ'सेन्ट्/ *ना* [*गण*] आरोहण, उन्नती; चढण, चढाव, घाटी.

ascertain /,ॲस'टेइन्/ *क्रि* [*सक*] (*औप*) शोधून काढणे, खातरजमा करून घेणे, खात्री करून घेणे, शहानिशा करणे, निर्धारण करणे.

ascribe /अ'स्क्राइब्/ *क्रि* [*सक*] *to//* एखाद्या माणसाशी किंवा गोष्टीशी संबंध जोडणे, त्याच्याशी कारणपरंपरा जोडणे, त्याच्यात कारण शोधणे, त्यावर खापर फोडणे, त्याला बोल लावणे : ~ *failure to bad luck, अपयशाचे खापर नशिबावर फोडणे.*

aseptic /,अेइ'सेप्टिक्; *अमे* अ'सेप्-/ *वि* जीवाणूंपासून मुक्त, पू नसलेला, पूविहीन, स्वच्छ.

asexual /,अेइ'सेक्शुअल्/ *वि* १ स्त्री-पुरुष हा लिंगभेद नसलेला किंवा लैंगिक अवयव नसलेला, अलिंग, अलिंगी, अलैंगिक. २ लैंगिक संबंधात रुची नसणारा.

ash¹ /ॲश्/ *ना* १ [*अगण*] (तसेच **ashes**) [*ब.व*] एखादी गोष्ट जळल्यानंतर उरणारी भुकटी, भस्म, रक्षा, राख. २ [*ब.व*] प्रेत जळल्यानंतर उरणारी राख, रक्षा. **'ashtray** *ना* [*गण*] (सिग्रेट, विडी वगैरेतील) तंबाखूच्या राखेसाठी असलेले भांडे, रक्षापात्र.

ash² /ॲश्/ *ना* (**क**) [*गण*] टणक लाकूड असणारे एक झाड. (**ख**) [*अगण*] या झाडाचे लाकूड.

ashamed /अ'शेइम्ड्/ *वि* लाज वाटणारा, लज्जित, शरमिंदा.

ashore /अ'शॉऽ(र्)/ *क्रिवि* किनाऱ्यावर, किनारी.

aside /अ'साइड्/ *क्रिवि* एका बाजूला, एकीकडे : *He laid the book ~, त्याने पुस्तक बाजूला ठेवले.* **aside** *ना* [*गण*] इतरांनी ऐकायचे नाही असे किंवा इतर ऐकत नाहीत असे गृहीत धरून केलेले भाषण, एकीकंडे.

ask /आस्क्/ *क्रि* १ [*अक, सक*] माहिती मिळविण्यासाठी एखाद्याला प्रश्न विचारणे, विचारणे, पृच्छा करणे, प्रश्न करणे, सवाल टाकणे : *I ~ed him where he lived, तो कुठे राहतो ते मी त्याला विचारले* ○ *'What time is it?' she ~ed, 'किती वाजले?' तिने विचारले.* २ [*अक, सक*] (एखाद्याला) काही करण्यास सांगणे, काही करण्याची विनंती करणे : *I ~ed* *them to close the window, मी त्यांना खिडकी बंद करायला सांगितली.* ३ [*सक*] निमंत्रण करणे, बोलावणे, आमंत्रण देणे : *A~ him to the party, त्याला मेजवानीला बोलवा.* ४ (*वाक्प्र*) **'ask for it/trouble** (*अनौप*) संकट निर्माण होईल असे वागणे, कटकटीला निमंत्रण देणे. ५ (*क्रिब*) **ask after sb** एखाद्याच्या तब्बेतीची विचारपूस करणे. **ask for sb/sth** एखाद्याला भेटायचे आहे किंवा त्याच्याशी बोलायचे आहे असे म्हणणे किंवा एखादी गोष्ट मागणे/पाहिजे असणे.

askance /अ'स्कॅन्स्/ *क्रिवि* (*वाक्प्र*) **look askance at sb/sth** एखाद्या गोष्टीकडे किंवा माणसाकडे संशयाने पाहणे, अविश्वासाने पाहणे.

askew /अ'स्क्यू/ *वि, क्रिवि* सरळ किंवा सपाट स्थितीत नसणारा, वाकडा, तिरका, वाकडातिकडा.

asleep /अ'स्लीप्/ *वि* १ झोपलेला, निद्रिस्त. २ (हात किंवा पाय यांच्या संबंधात) संवेदना नसणारा, सुन्न, बधीर, मुंग्या आलेला.

asp /ॲस्प्/ *ना* [*गण*] उत्तर आफ्रिकेतील एक लहान विषारी साप.

asparagus /अ'स्पॅरगस्/ *ना* [*अगण*] जिचे हिरवे कोंब भाजी म्हणून खातात अशी एक वनस्पती, शतावरी.

aspect /'ॲस्पेक्ट्/ *ना* [*गण*] १ एखाद्या विचाराधीन बाबीचे विशिष्ट अंग किंवा तिची विशिष्ट बाजू, पैलू. २ (*औप*) इमारतीच्या दर्शनिक भागाची दिशा, इमारतीचे तोंड जिकडे आहे ती दिशा.

aspersion /अ'स्पऽश्न्; *अमे* -झ्न्/ *ना* (*वाक्प्र*) **cast aspersions on sb/sth** ➪ CAST¹.

asphalt /'ॲस्फॅल्ट्; *अमे* -फॉऽल्ट्/ *ना* [*अगण*] रस्त्याचा पृष्ठभाग करण्यासाठी वापरण्यात येणारा काळा पदार्थ, डांबरासारखा पदार्थ, आशुपाल. **asphalt** *क्रि* [*सक*] आशुपालचे (विशेषतः रस्त्यावर) आवरण घालणे, त्याचा थर देणे.

asphyxiate /अस्'फिक्सिअेइट्/ *क्रि* [*सक*] एखाद्याला हवेच्या अभावाने आजारी पाडणे किंवा मारणे, श्वासावरोधन करून मारणे, गुदमरून मारणे. **asphyxiation** /अस,फिक्सि'अेइश्न्/ *ना* [*अगण*] गुदमरणे.

aspirate /'ॲस्परट्/ *ना* [*गण*] (*ध्वनिशास्त्र*) 'ह'युक्त ध्वनी, हकार, महाप्राणस्फुट. **aspirate** /'ॲस्परेइट्/ *क्रि* [*सक*] हकारयुक्त ध्वनी म्हणणे, महाप्राणस्फुट ध्वनी काढणे.

aspire /अ'स्पाइ·अ(र्)/ *क्रि* [*अक*] *to//* एखादी गोष्ट मिळविण्याची जबरदस्त इच्छा असणे, मनोरथ करणे, महत्त्वाकांक्षा असणे. **aspiration** /,ॲस्प'रेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] जबरदस्त आकांक्षा, महत्त्वाकांक्षा, मनोरथ, तृष्णा.

aspirin /'ॲस्प्रिन्, 'ॲस्परिन्/ *ना* [*गण, अगण*] वेदनाशामक आणि तापहारक असे औषध किंवा त्याची गोळी, सस्वेदकाम्ल.

ass¹ /ॲस्/ *ना* [*गण*] १ गाढव. २ (*अनौप*) मुर्ख माणूस, बेवकूफ किंवा गाढव माणूस, गधडा.

ass² /ॲस्/ *ना* [*गण*] (⚠ *अमे व्रात्य*) पहा ARSE १.

assail /अ'सेइल्/ *क्रि* [*सक*] (*औप*) हल्ला करणे, तुटून पडणे. **assailant** *ना* [*गण*] (*औप*) मारेकरी, हल्लेखोर.

assassin /अ'सॅसिन्; *अमे* -सन्/ *ना* [*गण*] एखाद्या व्यक्तीचा खून करणारा, दग्याने मारणारा, मारेकरी. **assassinate** /अ'सॅसिनेइट्; *अमे* -सन्/ *क्रि* [*सक*] (महत्त्वाच्या व्यक्तीचा) खून करणे, हत्या करणे. **assassination** /अ,सॅसि'नेइश्न्; *अमे* -स'नेइश्न्/ *ना* [*अगण, गण*] हत्या, खून.

assault /अ'सॉऽल्ट्/ ना [*गण, अगण*] अचानक केलेला क्रूर/हिंसक हल्ला, (बेसावध असताना केलेला) प्राणघातक हल्ला, घाला. **assault** *क्रि* [*सक*] (एखाद्यावर) प्राणघातक हल्ला करणे, घाला घालणे.

assemble /अ'सेम्·ब्ल्/ *क्रि* १ [*अक, सक*] गोळा होणे किंवा करणे, एकत्र येणे किंवा करणे, जमा होणे किंवा करणे. २ [*सक*] (एखाद्या गोष्टीचे) भाग जुळवणे, एकत्र करणे.

assembly /अ'सेम्ब्लि/ ना (*ब.व* **-ies**) १ [*गण*] एखाद्या कारणासाठी जमणाऱ्या माणसांचा गट, सभा, मेळा, समुदाय. २ [*अगण*] भाग एकत्र करण्याची किंवा जोडण्याची कृती, एकत्रीकरण, संघात,

एकत्रीकरण. **as'sembly line** *ना* [*गण*] एखाद्या उत्पादनाचे भाग क्रमाक्रमाने जुळत ते पुढे सरकेल अशा रीतीने केलेली यंत्रे व कामगार यांची रचना किंवा साखळी, जुळणीची साखळी, संघातसरणी, संघातमाला, जुळवणीसारणी.

assent /अ'सेन्ट्/ *ना* [*अगण*] (*औप*) मान्यता, संमती, अनुमती. **assent** *क्रि* [*अक*] (*to*)// (*औप*) एखादी गोष्ट मान्य करणे, तिला रुकार देणे.

assert /अ'सऽट्/ *क्रि* [*सक*] १ एखादी गोष्ट ठासून सांगणे, निश्चयपूर्वक वागून इतरांना (आपल्या अधिकाराची वगैरे) जाणीव देणे, ठामपणे मांडणे, हिरीरीने मांडणे, निश्चयपूर्वक बोलणे. २ इतरजण आपला अधिकार वगैरे मानतील अशा पद्धतीने निश्चयपूर्वक वागणे, निश्चयाने वागणे, ठामपणे वागणे, अधिकार बजावणे. ३ ~ **oneself** आत्मविश्वासाने व खंबीरपणे वागणे, पाय रोवून उभे राहणे. **assertion** /अ'सऽश्न्/ *ना* [*अगण, गण*] प्रतिपादन. **assertive** *वि* आत्मविश्वास असलेला, खंबीर.

assess /अ'सेस्/ *क्रि* [*सक*] १ एखाद्याचे महत्त्व, त्याची योग्यता वगैरे मोजणे, पारखणे, मोजमाप करणे. २ किंमत ठरवणे, किंमत करणे. **assessment** *ना* [*गण, अगण*] मोजमाप; मूल्यनिर्धारण. **assessor** *ना* [*गण*] एखाद्या गोष्टीचे मूल्य ठरविणारा, निर्धारक.

asset /'ॲसेट्/ *ना* [*गण*] १ महत्त्वाचा माणूस, गुण किंवा महत्त्वाचे कौशल्य, विशेष. २ (बहुधा *ब.व*) कर्ज फेडण्यास पुरेशी अशी मालमत्ता, जायदाद, मत्ता वगैरे.

assign /अ'साइन्/ *क्रि* [*सक*] १ भाग किंवा काम देणे, काम नेमून देणे. २ नेमणे, नेमणूक करणे. ३ वेळ, जागा वगैरे निश्चित करणे किंवा ठरवून देणे; नाव देणे. **assignment** *ना* १ [*गण*] नेमलेले किंवा दिलेले काम; नेमून दिलेली कामगिरी. २ [*अगण*] काम नेमण्याची क्रिया, नेमणूक.

assimilate /अ'सिमलेइट्/ *क्रि* १ [*सक*] आत घेणे, आत जिरवणे; अन्न, माहिती, कल्पना वगैरे घेणे, जिरवणे, आत्मसात् करणे. २ [*अक, सक*] एखाद/दुसऱ्या गटात किंवा राज्यात विलीन होणे/करणे, मिसळून जाणे: *immigrants ~d into the country they moved to, स्थलांतर केलेल्या देशात निर्वासित मिसळून गेले, त्या देशाशी एकरूप झाले.* **assimilation** /अ,सिम'लेइश्न्/ *ना* [*अगण*] पचनी पडणे; एकीकरण; एकरूपता.

assist /अ'सिस्ट्/ *क्रि* [*अक, सक*] (*औप*) मदत करणे, साहाय्य करणे. **assistance** *ना* [*अगण*] (*औप*) मदत, साहाय्य. **assistant** *ना* [*गण*] साहाय्यक, सहायक, मदतनीस: *a shop-~, दुकानातील साहाय्यक/सहायक, मदतनीस.*

associate^1 /अ'सउशिएइट्/ *क्रि* १ [*सक*] (*with*)// जोडणे, संलग्न करणे; सांगड घालणे, मनाने संबंध जोडणे/लावणे, बरोबर येणे/जाणे, साहचर्य असणे: *Whisky is often ~d with Scotland, व्हिस्कीचा अनेकदा स्कॉटलंडशी संबंध लावला जातो, व्हिस्की म्हटले की बरोबर स्कॉटलंड आलेच* ○ *the problems ~d with homelessness, बेघरपणाशी संबंधित असणारे प्रश्न.* २ [*अक, सक*] *with*// एखाद्या व्यक्ती किंवा गोष्टीबरोबर काम करणे; पाठिंबा देणे: ~ *with people one doesn't really like, न आवडणाऱ्या लोकांबरोबर काम करणे, त्यांची संगत घडणे.*

associate^2 /अ'सउशिअट्/ *ना* [*गण*] भागीदार किंवा सहकारी: *business ~s, धंद्यातील भागीदार/सहकारी.*

association /अ'सउसि'एइश्न्/ *ना* १ [*गण*] एखाद्या (विशिष्ट) कारणासाठी एकत्र आलेल्या लोकांचा गट, मंडळी, मंडळ, सभा, समाज. २ [*अगण*] एकत्र येण्याची कृती, सहयोग. ३ [*गण*] मनात असणारा संबंध, अनुबंध, बंध. ४ (*वाक्प्र*) **in associ'ation with sb** एखाद्याच्या सह, संयुक्तपणे, एखाद्याच्या सहयोगाने. **As,sociation 'Football** *ना* [*अगण*] प्रत्येकी अकरा खेळाडू असणारे दोन पक्ष एकमेकाच्या हद्दीत किंवा गोलात पायाने चेंडू घालविण्याचा प्रयत्न करतात तो खेळ, फुटबॉल, (*ब्रि*) सॉकर.

assorted /अ'सॉऽटिड्/ *वि* विविध प्रकारचे; मिसळलेला, संमिश्र. **assortment** /अ'सॉऽट्मन्ट्/ *ना* [*गण*] विल्हेवारीने किंवा प्रतवारीने लावलेला संग्रह, वर्गीकृत संचय,

अनेक तऱ्हा जमवून केलेला संग्रह.

assume /अ'स्यूम्; *अमे* अ'सूम्/ *क्रि* [*सक*] १ पुरावा नसताना (एखादी गोष्ट) सत्य आहे असे मानणे, खरे आहे असे धरून चालणे, गृहीत धरणे. २ वापरण्यास किंवा घेण्यास किंवा येण्यास सुरुवात करणे, आपल्याकडे घेणे, अंगीकार करणे, धारण करणे : ~ *control, ताबा घेणे* ○ ~ *a greater importance, अधिक महत्त्व येण्यास सुरुवात होणे.* ३ सोंग करणे (चेहऱ्यावरच्या भावाचे किंवा वर्तनाचे), वरवर दाखवणे, आव आणणे, बहाणा करणे : ~ *ignorance, अज्ञानाचे सोंग घेणे, माहीत नाही असे दाखवणे.* **assumption** /अ'सम्प्श्‌न्/ *ना* १ [*गण*] आधाराविना खरी आहे अशी मानलेली गोष्ट, गृहीत, धरून चाललेली गोष्ट. २ [*अगण*] गृहीत धरण्याची कृती.

assurance /अ'शॉऽरन्स्; *अमे* अ'शुअरन्स्/ *ना* १ [*अगण*] स्वतःच्या ताकदीवरील, क्षमतेवरील विश्वास, आत्मविश्वास. २ [*गण*] वचन, खात्री : *give an ~, वचन देणे, शब्द देणे.* ३ [*अगण*] (खास *ब्रि*) विमा, इन्शुअरन्स : *life ~, जीवन विमा, आयुर्विमा.*

assure /अ'शॉऽर्; *अमे* अ'शुअ(र्)/ *क्रि* [*सक*] १ (एखाद्याला) निश्चयपूर्वक किंवा आत्मविश्वासाने सांगणे, खात्री देणे, भरवसा देणे : *I ~ you that the money will be safe with me, पैसे माझ्याजवळ सुरक्षित राहतील याची मी तुला खात्री देतो.* २ (स्वतःची/एखाद्याची) खात्री पटवणे, निश्चिती असणे, शाश्वती देणे. ३ विमा उतरवणे (खास करून आयुर्विमा). **assured** *वि* आत्मविश्वासयुक्त, खात्री झालेला.

asterisk /'ॲस्टरिस्क्/ *ना* [*गण*] चांदणीचे चिन्ह, चौफुली, तारांकित करण्याचे चिन्ह (*).

astern /अ'स्टऽन्/ *क्रिवि* जहाजाच्या मागच्या टोकाला, मागील बाजूस.

asteroid /'ॲस्टरॉइड्/ *ना* [*गण*] खूप लहान असणारा ग्रह, लघुग्रह.

asthma /'ॲस्म; *अमे* 'ॲझ्म/ *ना* [*अगण*] श्वास घेणे अवघड करणारा छातीचा एक रोग, दमा, धाप. **asthmatic** /ॲस्'मॅटिक्; *अमे* ॲझ्-/ *वि* दमेकरी.

astonish /अ'स्टॉनिश्/ *क्रि* [*सक*] खूप आश्चर्यचकित करणे, विस्मित करणे, थक्क करणे. **astonishing** *वि* आश्चर्यचकित करणारा, थक्क करणारा, विस्मयकारक, विस्मयजनक. **astonishment** *ना* [*अगण*] आश्चर्य, महदाश्चर्य, विस्मय, अचंबा.

astound /अ'स्टाउन्ड्/ *क्रि* [*सक*] दिङ्मूढ करणे, विस्मित करणे, आश्चर्याने थक्क करणे, अवाक् करणे, चाट पाडणे, सर्द करणे.

astral /'ॲस्ट्रल्/ *वि* तारकांचा, ताऱ्यांचा.

astray /अ'स्ट्रेइ/ *क्रिवि* योग्य मार्गापासून दूर, भलतीकडे, आडवाटेने, उत्पथ.

astride /अ'स्ट्राइड्/ *वि, शब्दयो* दोन्हीकडे पाय टाकून.

astrology /अ'स्ट्रॉलजि/ *ना* [*अगण*] मानवी जीवनावर ताऱ्यांचा प्रभाव असतो या समजुतीने ताऱ्यांचा केलेला अभ्यास, फलज्योतिष, ग्रहफलशास्त्र, ज्योतिष. **astrological** /,ॲस्ट्र'लॉजिक्‌ल्/ *वि* फलज्योतिषविषयक. **astrologer** /-ज(र्)/ *ना* [*गण*] फलज्योतिषी, ग्रहताऱ्यांचा एखाद्याच्या जीवनावर काय परिणाम होईल हे भविष्य सांगणारा, ज्योतिषी.

astronaut /'ॲस्ट्रनॉऽट्/ *ना* [*गण*] अवकाशयानातून प्रवास करणारा, अवकाशयात्री, अंतराळवीर.

astronomy /अ'स्ट्रॉनमि/ *ना* [*अगण*] ग्रहताऱ्यांचा वैज्ञानिक अभ्यास, खगोलशास्त्र. **astronomer** /-नम(र्)/ *ना* खगोलशास्त्रज्ञ. **astronomical** /,ॲस्ट्र'नॉमिक्‌ल्/ *वि* १ खगोलशास्त्रीय. २ (*अनौप*) आकार, किंमत वगैरेत खूप मोठा, मोठ्या खर्चाचा, अतिभव्य.

astute /अ'स्ट्यूट्; *अमे* अ'स्टूट्/ *वि* वरचढ कसे व्हायचे हे पटकन् ओळखण्यात हुशार किंवा तरबेज, चतुर, चाणाक्ष, धूर्त, बिलंदर. **astutely** *क्रिवि* धूर्तपणे, चतुरपणे. **astuteness** *ना* [*अगण*] चतुराई, धूर्तपणा, बिलंदरपणा.

asylum /अ'साइलम्/ *ना* १ [*गण*] (*जुना, अप्रचलित*) मनोरुग्णांसाठी असलेले इस्पितळ, वेड्याचे इस्पितळ. २ [*अगण*] आश्रय, सहारा : *political ~, राजकीय आश्रय/सरंक्षण.*

at /अट्; अधिक बलयुक्त रूप ॲट्/ *शब्दयो* १ (स्थलदर्शक) : *at the station, स्टेशनवर* ○ *study languages at university,*

विद्यापीठात भाषांचा अभ्यास करणे. २ -कडे : *look at her, तिच्याकडे बघ* ○ *guess at the meaning, अर्थाचा अंदाज करणे.* ३ (एखाद्या गोष्टीपासूनचे अंतरदर्शक) : *hold sth at arm's length, एखादी गोष्ट हातभर दूर धरणे.* ४ (विशिष्ट वेळदर्शक) : *at two o'clock, दोन वाजता, दोनला.* ५ (वयदर्शक) : *He got married at (the age of) 24, त्याचे (वयाच्या) चोविसाव्या वर्षी लग्न झाले.* ६ (स्थिती किंवा क्रियासातत्यदर्शक) : *at war, युद्धात गुंतलेला.* ७ -ने, -द्वारे : *shocked at the news, बातमीने थक्क झाला.* ८ (दर, किंमत, वेग वगैरे दर्शक) : *driving at 70 mph, ताशी सत्तर मैल वेगाने गाडी चालवत* ○ *exports valued at £ 1 million, दहा लाख पौंड किंमतीची निर्यात, दहा लाख पौंडांची निर्यात.* ९ (क्षमतादर्शक अर्थाने *वि* नंतर वापर) : *good at music, संगीतात चांगला.*

ate EAT चा *भूत.*

atheism /'अेइथिइझ्म्/ *ना* [*अगण*] परमेश्वर नाही असा विश्वास, नास्तिकवाद, निरीश्वरवाद. **atheist** /'अेइथिइस्ट्/ *ना* [*गण*] निरीश्वरवादी, नास्तिक.

athlete /'ॲथ्लीट्/ *ना* [*गण*] शारीरिक खेळ किंवा कसरतीचे शिक्षण घेतलेला माणूस, शारीरिक कसरतपटू, व्यायामपटू, मैदानी खेळात निपुण. **athletic** /ॲथ्'लेटिक्/ *वि* १ मैदानी खेळ किंवा खेळाडूविषयक. २ शरीराने सशक्त व दणकट. **athletics** *ना* [*अगण*] मैदानी खेळ, शारीरिक व्यायामप्रकार, खेळ – विशेषतः धावणे, उड्या मारणे यासारखे.

atlas /'ॲट्लस्/ *ना* [*गण*] नकाशांचे पुस्तक.

atmosphere /'ॲट्मस्फिअ(र्)/ *ना* [*अे.व*] १ **the atmosphere** पृथ्वीभोवतीचे वायू, वातावरण. २ हवा. ३ एखाद्या ठिकाणाबाबतची एकंदर कल्पना, तापमान : *a friendly ~, मैत्रीपूर्ण वातावरण, सौहार्दपूर्ण वातावरण.* **atmospheric** /,ॲट्मस्'फेरिक्/ *वि* वातावरणविषयक.

atoll /'ॲटॉल्/ *ना* [*गण*] खारट पाण्याच्या तळ्याभोवतालचा गोलाकार प्रवाळ-खडक, प्रवाळी कंकण-द्वीप.

atom /'ॲटम्/ *ना* [*गण*] १ एखाद्या मूलद्रव्याचा रासायनिक बदलात भाग घेऊ शकणारा लघुतम घटक, अणू. २ (*ला*) फार लहान/अल्प राशी. **atomic** /अ'टॉमिक्/ *वि* आणव, अणूविषयक, अण्विक. **a,tomic 'bomb** (तसेच **'atom bomb**) *ना* [*गण*] अणुविच्छेदनाने स्फोटक शक्ती निर्माण करणारा बॉम्ब, अणुबॉम्ब, अण्वस्त्र.

atrocious /अ'ट्रउशस्/ *वि* १ अतिक्रूर, निर्दय, निर्घृण, अत्याचारी, राक्षसी. २ (*अनौप*) फार वाईट : *~ weather, वाईट हवा.* **atrociously** *क्रिवि* क्रूरपणे, निर्घृणतेने, अत्याचारीपणाने.

atrocity /अ'ट्रॉसटि/ *ना* (*ब.व* -ies) १ [*गण*] क्रूरकर्म, अत्याचार. २ [*अगण*] दुष्टपणा, अधमपणा.

attach /अ'टॅच्/ *क्रि* १ [*सक*] दोन गोष्टी जोडणे किंवा बांधणे, संलग्न करणे. २ [*सक*] सभासद किंवा सोबती म्हणून सामील करणे. ३ [*अक, सक*] *to*// एखाद्या गोष्टीशी जोडणे, तिला देणे : *~ importance to her speech, तिच्या बोलण्याला महत्त्व देणे.* ४ (*वाक्प्र*) **be attached to sb/sth** एखादी व्यक्ती किंवा गोष्ट प्रिय असणे, त्यावर प्रेम असणे. **attachment** *ना* १ [*गण*] जोडायची गोष्ट, जोड. २ [*अगण*] *to*// एखाद्या गोष्टीची किंवा व्यक्तीची आवड, ओढ.

attaché /अ'टॅशेइ; *अमे* ॲट'शेइ/ *ना* [*गण*] एखाद्या दूतावासातल्या कर्मचारी वर्गापैकी एक; राजदूत सहायक. **at'taché case** *ना* [*गण*] कागदपत्रे ठेवण्याची लहान पेटी, पत्रधानी.

attack /अ'टॅक्/ *ना* १ [*गण, अगण*] (क) एखाद्या वस्तूचा किंवा व्यक्तीचा पराभव करण्यासाठी किंवा तिला इजा करण्यासाठी केलेला हिंसक प्रयत्न, हल्ला, घाला, चढाई. (ख) भाषण किंवा लेखन या द्वारे केलेली प्रखर टीका. २ [*गण*] अचानक आलेला आजार, झटका. **attack** *क्रि* १ [*अक, सक*] एखाद्या व्यक्तीवर किंवा वस्तूवर हल्ला करणे, घाला घालणे, तुटून पडणे, चढाई करणे; टीका करणे, घसरणे. २ [*सक*] उत्साहाने आणि जोमाने एखाद्या गोष्टीकडे वळणे किंवा तिचा समाचार घेणे. **attacker** *ना* [*गण*] हल्लेखोर.

attain /अ'टेइन्/ *क्रि* [*सक*] (*औप*)

मिळवण्यात यशस्वी होणे; प्राप्त करणे, मिळवणे, संपादणे. **attainable** *वि* मिळवण्याजोगा, प्राप्य. **attainment** *ना* १ [*अगण*] यशप्राप्ती; प्राप्ती. २ [*गण*] कौशल्य किंवा क्षमता; (कामगिरी).

attempt /अ'टेम्प्ट्/ *क्रि* [*सक*] प्रयत्न करणे : ~ *to escape, निसटण्याचा/पळून जाण्याचा प्रयत्न करणे.* **attempt** *ना* [*गण*] १ एखादी गोष्ट करण्याचा प्रयत्न, यत्न, खटपट. २ (*वाक्प्र*) **an attempt on sb's life** एखाद्याला ठार मारण्याचा प्रयत्न.

attend /अ'टेन्ड्/ *क्रि* १ [*सक*] उपस्थित असणे, हजर राहणे : ~ *a meeting, सभेला उपस्थित राहणे.* २ [*अक*] *to*// एखाद्या गोष्टीशी संबंधित असणे, त्याकडे लक्ष असणे; हाती घेणे, हाताळणे, हात घालणे. ३ [*अक*] (*to*)// (*औप*) एखाद्या गोष्टीचा नीट विचार करणे. **attendance** *ना* १ [*गण, अगण*] शाळेतील वगैरे हजेरी, उपस्थिती. २ [*गण*] उपस्थित लोक : *a large ~ance, मोठी उपस्थिती.* **attendant** *ना* [*गण*] एखाद्या सार्वजनिक ठिकाणी सेवा करणारा माणूस, सेवक, नोकर.

attention /अ'टेन्श्न्/ *ना* [*अगण*] १ लक्ष, ध्यान : *pay ~, लक्ष देणे.* २ खास काळजी किंवा विशेष कृती : *My old car needs some ~, माझ्या जुन्या गाडीकडे जरा नीट बघायला हवं/त्यासाठी काही खास करायला हवं.* ३ ताठ आणि न हालता उभे राहण्याची सैनिकाची अवस्था, सावधान किंवा 'दक्ष' स्थिती.

attentive /अ'टेन्टिव्ह्/ *वि* लक्ष देणारा, सावध, जागृत. **attentively** *क्रिवि* लक्षपूर्वक, सावधपणे, एकाग्रचित्ताने.

attest /अ'टेस्ट्/ *क्रि* [*अक, सक*] (*to*)// (*औप*) एखादी गोष्ट सत्य आहे असे सिद्ध करणे किंवा दाखवणे, खातरजमा करणे.

attic /'ॲटिक्/ *ना* [*गण*] घरातील वरची छपरालगतची खोली, पोटमाळा, कातरमाळा, माळा.

attitude /'ॲटिट्यूड्; *अमे* -टूड्/ *ना* [*गण*] १ विचार करण्याची किंवा वागण्याची दिशा किंवा बाजू, दृष्टिकोन, वृत्ती. २ (*औप*) अंगस्थिती, शरीरस्थिती (उभी, निजलेली, टेकलेली वगैरे अवस्था).

attorney /अ'टऽनि/ *ना* [*गण*] (*अमे*) वकील, मुखत्यार.

attract /अ'ट्रॅक्ट्/ *क्रि* [*सक*] १ (एखादी गोष्ट) खेचणे, खेचून घेणे, आकर्षित करणे, ओढणे : *a magnet ~s steel, लोहचुंबक लोखंडाला खेचून घेतो.* २ एखाद्याचे लक्ष/मन आकर्षित करणे, चित्त वेधून घेणे, लक्ष वेधणे : *a window display that ~s customers, गिऱ्हाईकाचे लक्ष वेधणारा दुकानाच्या दर्शनी काचेच्या कपाटात मांडलेला माल.* ३ सुखद वाटणे, आल्हादक वाटणे. **attraction** /अ'ट्रॅक्श्न्/ *ना* १ [*अगण*] आकर्षित करण्याची शक्ती किंवा कृती, आकर्षण. २ [*गण*] मन वेधणारी गोष्ट, आकर्षण, प्रलोभन. **attractive** *वि* आकर्षक, मनोहर, मोहक, मनोवेधक.

attribute /अ'ट्रिब्यूट/ *क्रि* [*सक*] *to*// एखादी गोष्ट कशामुळे किंवा कुणामुळे तरी झाली किंवा त्याच्याशी संबंधित आहे, त्याचीच आहे असे मानणे, श्रेय देणे, संबंध लावणे : ~ *her success to hard work, तिच्या यशाचे श्रेय तिच्या परिश्रमाला देणे.* **attribute** /'ॲट्रिब्युट्/ *ना* [*गण*] एखाद्या माणसाचा किंवा वस्तूचा गुण, गुणविशेष.

attributive /अ'ट्रिब्युटिव्ह्/ *वि* (*व्याकरण*) नामापूर्वी येणारा (शब्द)/(विशेषण).

aubergine /'अउबझीन्/ *ना* [*गण, अगण*] गर्द जांभळ्या रंगाचे भाजी म्हणून वापरले जाणारे फळ, वांगे.

auburn /'ऑऽबन्/ *वि* (विशेषतः केसांविषयी) तांबूस, तपकिरी, पिंगट.

auction /'ऑऽक्श्न्/ *ना* [*गण, अगण*] सर्वात जास्त किंमत देणाऱ्याला माल देण्याच्या पद्धतीने करण्यात येणारी सार्वजनिक विक्री, लिलाव. **auction** *क्रि* [*सक*] लिलाव करणे, लिलावात काढणे. **auctioneer** /,ऑऽक्श'निअ(र्)/ *ना* [*गण*] लिलाव-प्रमुख, लिलाववाला.

audacious /ऑऽ'डेइशस्/ *वि* धीट आणि धाडसी (पण अनादर करणारा), धाडसी (पण उद्धट), बिनधास्त (पण बेमुरवत). **audaciously** *क्रिवि* बिनधास्तपणे. **audacity** /ऑऽ'डॅसटि/ *ना* [*अगण*] **औद्धत्य, उद्धटपणा,**

बेफिकिरी, बिनधास्तपणा.

audible /'ऑऽडब्ल्/ *वि* ऐकू येईल असा, श्रवणशक्य. **audibly** *क्रिवि* ऐकू येईल अशा रीतीने, कानी पडेलसा.

audience /'ऑऽडिअन्स्/ *ना* [*गण*] १ एखादी गोष्ट किंवा व्यक्ती पाहण्यासाठी किंवा ऐकण्यासाठी जमलेला लोकांचा समुदाय, श्रोते किंवा श्रोतृजन, प्रेक्षक. २ प्रसारित होणारा कार्यक्रम पाहणारे किंवा ऐकणारे लोक. ३ एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीची औपचारिक गाठभेट : *an ~ with the Queen,* राणीची भेट.

audio /'ऑऽडिअउ/ *वि* ऐकण्याविषयी किंवा ध्वनिविषयी, श्राव्य- किंवा ध्वनि-. **,audio-'visual** *वि* ध्वनी आणि दृश्य यांचा वापर करणारा, दृक्श्राव्य.

audit /'ऑऽडिट्/ *ना* [*गण*] धंद्याच्या जमाखर्च किंवा हिशेबांची अधिकृत तपासणी, आर्थिक व्यवहार तपासणी, लेखापरीक्षा. **audit** *क्रि* [*सक*] (हिशेब) तपासणे, लेखापरीक्षा करणे. **auditor** *ना* [*गण*] हिशेब-तपासनीस, तजकरनीस, लेखापरीक्षक.

audition /ऑऽ'डिश्न्/ *ना* [*गण*] नट, गायक वगैरेंचा चाचणीसाठीचा छोटा कार्यक्रम, कलाकाराच्या चाचणीच्या वेळचा प्रयोग, आवाजपरीक्षा. **audition** *क्रि* [*सक, अक*] अशा तऱ्हेची चाचणी देणे (घेणे).

auditorium /ऑऽडि'टॉऽरिअम्/ *ना* [*गण*] प्रेक्षक किंवा श्रोते जेथे बसतात ती इमारतीतील जागा, प्रेक्षागृह, प्रेक्षागार.

augment /ऑऽग्'मेन्ट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) वाढवणे.

augur /'ऑऽग(र्)/ *क्रि* (*वाक्प्र*) **augur 'well/'ill for sb/sth** (*औप*) एखाद्या गोष्टीच्या/व्यक्तीच्या भविष्याविषयी शुभ/अशुभ सूचक चिन्ह असणे, येणाऱ्या चांगल्या/वाईट गोष्टींची नांदी असणे, शकुन/अपशकुन असणे.

August /'ऑऽगस्ट्/ *ना* [*अगण, गण*] इंग्रजी वर्षाचा आठवा महिना (APRIL खालील उदाहरणे पहा).

august /ऑऽ'गैस्ट्/ *वि* (*औप*) आदरयुक्त भीती निर्माण करणारा, दबदबा निर्माण करणारा, वचक असणारा; भव्य.

aunt /आन्ट्; *अमे* ॲन्ट्/ *ना* [*गण*] वडलांची किंवा आईची बहीण, आत्या किंवा मावशी; वडलांच्या किंवा आईच्या भावाची बायको, काकू किंवा मामी. **auntie** (तसेच **aunty**) *ना* [*गण*] (*अनौप*) आत्या, मावशी, काकू, मामी.

au pair /,अउ 'पेअ(र्)/ *ना* [*गण*] एखाद्या कुटुंबात राहून त्यांची भाषा शिकणारा, त्या कुटुंबाच्या घरकामात साहाय्य करणारा परदेशी तरुण किंवा तरुणी.

aura /'ऑऽर/ *ना* [*गण*] एखाद्या व्यक्तीपासून किंवा स्थानापासून निर्माण झाला असे वाटणारा गुण किंवा भाव.

aural /'ऑऽरल्/ *वि* ऐकण्याविषयीचा किंवा कानाविषयीचा, कर्ण-, श्रवण-.

auspices /'ऑऽस्पिसिझ/ *ना* [*ब.व*] (*वाक्प्र*) **under the auspices of sb/sth** (*औप*) एखाद्याच्या मदतीने आणि पाठिंब्याने, -च्या विद्यमाने, -च्या कृपाछत्राखाली.

auspicious /ऑऽ'स्पिशस्/ *वि* (*औप*) भावी यशाचे निदर्शक, उज्वलभविष्यसूचक; अनुकूल, आश्वासक. **auspiciously** *क्रिवि* उज्वलभविष्यसूचक किंवा अनुकूल रीतीने.

austere /ऑ'स्टिअ(र्); तसेच ऑऽ'स्टिअ(र्)/ *वि* १ डामडौल किंवा भपका नसलेला; साधा. २ चैन किंवा उधळपट्टी आणि ऐषाराम नसलेला; साधा आणि काटेकोर. **austerely** *क्रिवि* साधेपणाने आणि काटेकोरपणाने, उधळपट्टी न करता. **austerity** /ऑ'स्टेरटि; तसेच ऑऽ'स्टेरटि/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) साधेपणा, काटेकोरपणा.

authentic /ऑऽ'थेन्टिक्/ *वि* खरा, सत्य म्हणून ज्ञात, अस्सल, अधिप्रमाणित. **authentically** /-क्लि/ *क्रिवि* अस्सलपणाने. **authenticate** *क्रि* [*सक*] खरेपणा सिद्ध करणे, शाबीत करणे, अस्सलपणा दाखवणे, अधिप्रमाणन करणे. **authentication** /ऑऽ,थेन्टि'केइश्न्/ *ना* [*अगण*] अधिप्रमाणन. **authenticity** *ना* [*अगण*] खरा असल्याचा गुण, खरेपणा, सत्यता, अस्सलपणा.

author /'ऑऽथ(र्)/ *ना* [*गण*] १ लेखक. २ एखादी गोष्ट सुरू करणारा किंवा निर्माण

करणारा माणूस, निर्माता, जनक. **authoress** /'ऑऽथरिस्/ *ना* [*गण*] स्त्री-लेखक, लेखिका. **authorship** *ना* [*अगण*] ग्रंथकर्तृत्व.

authoritative /ऑऽ'थॉरटटिव्ह्; *अमे* -टेइटिव्ह/ *वि* १ अधिकारदर्शक, अधिकारयुक्त, अधिकारी, विश्वासार्ह. २ अधिकाराने दिलेला, सप्रमाण, अधिकारवाणीने दिलेला; अधिकृत. **authoritatively** *क्रिवि* अधिकारवाणीने, अधिकाराने, सप्रमाण.

authority /ऑऽ'थॉरटि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ (क) [*अगण*] आज्ञा देण्याची सत्ता, अधिकार, हुकमत. (ख) [*गण*] अशी सत्ता/अधिकार असणारी व्यक्ती किंवा गट, अधिकारी. २ [*गण*] तज्ञ, अधिकारी व्यक्ती : *She's an ~ on physics, ती पदार्थविज्ञानातील अधिकारी व्यक्ती आहे.*

authorize /'ऑऽथराइझ्/ *क्रि* [*सक*] एखाद्या गोष्टीला अधिकृत परवानगी देणे, अधिकार देणे, मुखत्यार करणे. **authorization** /,ऑऽथराइ'झेइश्न्; *अमे* रि'झ्-/ *ना* [*अगण*] मुखत्यारी, अधिकृत परवानगी.

autobiography /,ऑऽटबाइ'ऑग्रफि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) एखाद्या माणसाची त्यानेच लिहिलेली जीवन कहाणी, आत्मचरित्र. **autobiographical** /,ऑटबाइअ'ग्रॅफिक्ल्/ *वि* आत्मचरित्रात्मक.

autocrat /'ऑऽटक्रॅट्/ *ना* [*गण*] (क) अमर्याद सत्ता असणारा राज्यकर्ता, अनियंत्रित सत्ताधारी, स्वायत्ताधिपती. (ख) अनियंत्रित सत्ताधाऱ्याप्रमाणे वागणारा, स्वेच्छाधारी, एकाधिकारशाहीने वागणारा. **autocratic** /,ऑऽट'क्रॅटिक/ *वि* हूकूमशाही, एकाधिकारशाही पद्धतीचा.

autograph /'ऑऽटग्राफ्; *अमे* -ग्रॅफ्/ *ना* [*गण*] प्रसिद्ध माणसाची स्वाक्षरी, मोठ्या माणसाची सही. **autograph** *क्रि* [*सक*] (कशावर तरी) स्वहस्ताक्षरात आपले नाव लिहिणे, सही किंवा स्वाक्षरी करणे.

automate /'ऑऽटमेइट्/ *क्रि* [*सक*] स्वयंचलित यंत्राने चालू करणे.

automatic /,ऑऽट'मॅटिक्/ *वि* १ (यंत्राबाबत) माणसाच्या नियंत्रणाविना स्वतःच चालणारे, स्वयंगती, स्वयंगतिक, स्वधीनगतिक, स्वयंचलित. २ (कृतीबाबत) विचाराला अवसर न देऊन केलेली, आपोआप होणारी. **automatic** *ना* [*गण*] स्वयंचलित बंदूक, यंत्र वगैरे. **automatically** /-क्लि/ *क्रिवि* आपोआप, स्वयंचलनाने.

automation /,ऑऽट'मेइश्न्/ *ना* [*अगण*] पूर्वी माणसे जे काम करत त्यासाठी यंत्रांचा वापर करणे, स्वयंचलन.

automobile /'ऑऽटमबील/ *ना* [*गण*] (खास *अमे*) मोटार, कार.

autonomous /ऑऽ'टॉनमस्/ *वि* स्वयंशासित, स्वसत्ताक, स्वायत्त. **autonomy** /-मि/ *ना* [*अगण*] स्वायत्तता.

autopsy /'ऑऽटॉप्सि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) मृत्युचे कारण शोधण्यासाठी शरीराची केलेली वैद्यकीय तपासणी, शवविच्छेदन.

autumn /'ऑउटम्/ *ना* [*अगण, गण*] उन्हाळा आणि हिवाळा या दोन ऋतूंमधील वर्षाचा काळ, हा ऋतू. **autumnal** /ऑऽटम्नल्/ *वि* या ऋतूचे, या कालातील.

auxiliary /ऑऽग्'झिलिअरि/ *वि* साहाय्यकारी, साह्यकारी, साहाय्यक, उपकारक; जादा, अधिक. **auxiliary** *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) मदत किंवा साहाय्य करणारी गोष्ट किंवा व्यक्ती, मदतगार. **au,xiliary 'verb** *ना* [*गण*] इंग्रजीत मुख्य क्रियापदाबरोबर काळ, अभिवृत्ती वगैरे दाखविण्यासाठी आणि प्रश्नरूप वाक्य करण्यासाठी वापरले जाणारे क्रियापद, साहाय्यक क्रियापद, उदा *Do you know where he has gone? तो कुठे गेलाय् तुला माहितीये?* या प्रश्नातील *do* आणि *has* ही क्रियापदे.

avail /अ'व्हेइल्/ *क्रि* (*औप*) **~ oneself of** एखाद्या गोष्टीचा वापर करणे. **avail** *ना* (*वाक्प्र*) **of no a'vail** (*औप*) अनुपयोगी, अनुपयुक्त, कुचकामी, व्यर्थ. **to no a'vail, without a'vail** फुकट, व्यर्थ, अयशस्वी.

available /अ'व्हेइलब्ल्/ *वि* वापरता किंवा मिळवता येण्याजोगा, उपलब्ध, मिळण्याजोगा : *There are no tickets ~, तिकिटे उपलब्ध नाहीत.* **availability** /अ,व्हेइल'बिलटि/ *ना* [*अगण*] उपलब्धता.

avalanche /'ॲव्हलान्श्; *अमे -लॅन्च्/ ना* [*गण*] १ पर्वतावरून एकदम मोठ्या प्रमाणावर खाली कोसळणारे हिम, हिमावसरण, बर्फलोट. २ (*ला*) मोठी राशी, लोट : *an ~ of letters, पत्रांचा लोट/पूर.*

avarice /'ॲव्हरिस्/ *ना* [*अगण*] (*औप*) धनलोभ, (पैशाची वगैरे) हाव. **avaricious** /,ॲव्ह'रिशस्/ *वि* लोभी, हावरट.

avenge /अ'व्हेन्ज्/ *क्रि* [*सक*] एखाद्याने केलेल्या दृष्कृत्याबद्दल त्याला शिक्षा करणे किंवा इजा करणे, बदला घेणे, सूड घेणे : *~ his father's death, वडलांच्या मृत्युचा सूड घेणे.*

avenue /'ॲव्हन्यू; *अमे* -नू/ *ना* [*गण*] १ दुतर्फा झाडे असलेला रस्ता, झाडीचा रस्ता. २ (*ला*) एखादी गोष्ट मिळवण्याचा मार्ग : *explore several ~s, अनेक मार्गांचा अवलंब करणे, अनेक मार्ग चोखाळून पाहणे.*

average /'ॲव्हरिज्/ *ना* १ [*गण*] अनेक राशींच्या बेरजेला राशींच्या संख्येने भागल्यावर येणारे उत्तर, सरासरी, मध्यमान. २ [*अगण*] नेहमीचे सर्वसाधारण प्रमाण किंवा पातळी, सर्वसामान्य श्रेणी. **average** *वि the ~ age, सर्वसामान्य/सर्वसाधारण/सरासरी वय.* **average** *क्रि* १ [*अक, सक*] सरासरी काढणे. २ [*सक*] सर्वसाधारण परिमाण असणे/होणे : *~ 200 miles a day, दर दिवशी साधारणपणे दोनशे मैल होणे.*

averse /अ'व्हऽस्/ *वि to//* (*औप*) (एखाद्या गोष्टीच्या) विरोधी, विरुद्ध, प्रतिकूल : *not ~ to new ideas, नवीन कल्पनांचा तिटकारा नसणारा.*

aversion /अ'व्हऽश्न्; *अमे* अ'व्हऽझ्न्/ *ना* १ [*गण, अगण*] तीव्र नावड, तिटकारा. २ [*गण*] न आवडणारी गोष्ट किंवा व्यक्ती.

avert /अ'व्हऽट्/ *क्रि* [*सक*] १ (एखादी अप्रिय गोष्ट) घडू न देणे, (ती गोष्ट) टाळणे, निवारण करणे. २ (*औप*) (दृष्टी) दुसरीकडे वळवणे, नजर फिरवणे, (पाहण्याचे) टाळणे.

aviary /'एइव्हिअरि; *अमे* -व्हि·एरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) पक्षी ठेवण्यासाठी केलेला मोठा पिंजरा किंवा जाळीची खोली.

aviation /,एइव्हि'एइश्न्/ *ना* [*अगण*] (विमानासारखे) वायुवाहन उडविण्याचे/चालविण्याचे शास्त्र किंवा त्याचा सराव, विमानचालन.

avid /'अव्हिड्/ *वि* आतुर, हपापलेला, उत्सुक. **avidly** *क्रिवि* आतुरतेने, मन लावून.

avocado /,ॲव्ह'काडउ/ *ना* [*गण*] (*ब.व* **-s**) पेरू किंवा नासपतीसारख्या आकाराचे उष्णकटिबंधातील हिरव्या रंगाचे एक फळ.

avoid /अ'व्हॉइड्/ *क्रि* [*सक*] १ (एखाद्या गोष्टीपासून) दूर राहणे, तिच्याकडे पाठ फिरवणे, टाळणे, चुकवणे, वर्ज करणे. २ (एखादी गोष्ट) घडू न देणे; प्रतिबंध करणे. **avoidable** *वि* चुकवण्याजोगा, टाळता येण्यासारखा. **avoidance** *ना* [*अगण*] टाळाटाळ, वर्जन; प्रतिबंध.

avoirdupois /,ॲव्हड'पॉइझ्/ *ना* [*अगण*] दशमान पद्धतीपेक्षा वेगळी, पौंड हे परिमाण असणारी ब्रिटिश मापन पद्धती.

avow /अ'व्हाउ/ *क्रि* [*सक*] (*औप*) (एखादी गोष्ट) उघडपणे सांगणे, जाहीर करणे.

await /अ'वेइट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) वाट पाहणे, प्रतीक्षा करणे.

awake^1 /अ'वेइक्/ *वि* जागा, जागृत, सावध.

awake^2 /अ'वेइक्/ *क्रि* (*भूत* **awoke** /अ'वउक्/ *भूत वि* **awoken** /अ'वउकन्/) [*अक, सक*] जागे होणे, उठणे, जागे करणे, उठवणे.

awaken /अ'वेइकन्/ *क्रि* १ [*अक, सक*] उठणे, उठवणे, जागे होणे, जागे करणे. २ [*सक*] जागृत करणे, सक्रीय करणे, कामाला लावणे, कार्यरत करणे : *~ sb's interest, एखाद्याची आस्था जागृत करणे.* ३ (*क्रिब*) **awaken sb to sth** एखाद्याला एखाद्या गोष्टीची जाणीव करून देणे, एखाद्याच्या लक्षात एखादी गोष्ट आणून देणे. **awakening** /-क्निङ्/ *ना* [*अ.व*] जागृत करण्याची क्रिया, जागृती, प्रबोधन.

award /अ'वॉऽड्/ *क्रि* [*सक*] एखादी गोष्ट एखाद्याला देण्याचा अधिकृत निर्णय देणे, बक्षीस देणे, निवाडा करणे : *~ her first prize, तिला पहिले बक्षीस देणे.* **award** *ना* [*गण*] बक्षीस : *an ~ for bravery, शौर्यासाठी बक्षीस.*

aware /अ'वेअ(र्)/ *वि of/that//* एखाद्या गोष्टीची माहिती असणारा, एखादी गोष्ट

कळलेला. **awareness** *ना* [*अगण*] जाणीव.

away /अ'वेइ/ *क्रिवि* १ एखाद्या गोष्टीपासून काही अंतरावर, दूर, लांब : *The sea is two miles ~, समुद्र दोन मैल लांब आहे.* २ सतत, एकसारखा : *He was working ~, तो सतत काम करत होता.* ३ (हळूहळू नाहीसे होणे या अर्थाने) : *The water boiled ~, पाणी उकळून संपून गेले, उकळणारे पाणी आटून गेले.* ४ (खेळ) प्रतिस्पर्ध्यांच्या मैदानावर : *play the next match ~, पुढची मॅच प्रतिस्पर्ध्यांच्या मैदानावर खेळणे.*

awe /ऑऽ/ *ना* [*अगण*] भीतीयुक्त आदर, दरारा, वचक. **'awe-inspiring** *वि* दरारा निर्माण करणारा, वचक बसवणारा. **awesome** *वि* दरारा/दबदबा वाटेल असा, भयचकीत करणारा.

awful /'ऑऽफ्ल्/ *वि* १ भयानक, भीषण : *an ~ accident, भीषण अपघात.* २ (*अनौप*) फार वाईट, भयानक; फार मोठा : *~ weather, फार वाईट/भयानक हवा.* **awfully** /'ऑऽफ्लि/ *क्रिवि* (*अनौप*) फारच, खूपच, भयानक : *~ly hot, भयानक उकाडा, फारच गरम.*

awhile /अ'वाइल्; *अमे* अ'ह्वाइल्/ *क्रिवि* (*औप*) थोडा वेळ, काही काळ.

awkward /'ऑऽक्वड्/ *वि* १ हालचालीत सफाई नसलेला; बेढब, बेडौल, अस्ताव्यस्त, ओबडधोबड. २ वापरायला अवघड. ३ गैरसोय किंवा अडचण निर्माण करणारा, गैरसोयीचा, अडचणीचा, भलता : *arrive at an ~ time, भलत्यावेळी येणे.* ४ बुचकळ्यात पाडणारा, अवघडल्यासारखा : *an ~ silence, अवघडल्यासारखं वाटायला लावणारी शांतता.* **awkwardly** *क्रिवि* अस्ताव्यस्तपणे, बेढबपणे, अवघडून. **awkwardness** *ना* [*अगण*] अवघडलेपणा, अकुशलता.

awning /'ऑऽनिङ्/ *ना* [*गण*] ऊन-पावसापासून संरक्षण करण्यासाठी केलेले ताडपत्री किंवा कापडाचे छप्पर, चांदणी, चांदवा, सायवान, शमिना.

awoke AWAKE^2 चा *भूत.*

awoken AWAKE^2 चे *भूत वि.*

axe (तसेच खास *अमे* **ax**) /ॲक्स्/ *ना* [*गण*] १ लाकूड तोडायचे हत्यार, कुऱ्हाड. २ (*वाक्प्र*) **,have an 'axe to grind** एखादी गोष्ट करण्यास काही खाजगी कारणे असणे, मतलब किंवा स्वार्थ असणे. **axe** *क्रि* [*सक*] (नोकऱ्या वगैरे) एकदम कमी करणे, मोठी कपात करणे, नष्ट करणे.

axiom /'ॲक्सिअम्/ *ना* [*गण*] सत्य किंवा सिद्ध म्हणून स्वीकारलेले तत्त्व, स्वयंसिद्ध तत्त्व, स्वतःप्रमाण सिद्ध. **axiomatic** /,ॲक्सिअ'मॅटिक्/ *वि* उघडपणे खरे असणारे, प्रत्यक्षसिद्ध, स्वयंसिद्ध, स्वतःप्रमाण.

axis /'ॲक्सिस्/ *ना* [*गण*] (*ब.व* **axes** /'ॲक्सीझ़/) १ फिरणाऱ्या वस्तूच्या मध्यातून जाणारी काल्पनिक रेषा, आस : *the earth's ~, पृथ्वीचा आस.* २ आलेखामधील स्थिर संदर्भ म्हणून वापरण्यात येणारी उभी किंवा आडवी रेषा, अक्ष.

axle /'ॲक्स्ल्/ *ना* [*गण*] चाक ज्याच्याभोवती फिरते तो दांडा, कणा, आस.

aye (तसेच **ay**) /आइ/ *उद्‌गा* (*पुरा*) (*किंवा बोलींमध्ये वापर*) होय, हो. **aye** *ना* [*गण*] एखाद्या गोष्टीला अनुकूलता दाखविणारे मत किंवा असे मत देणारा, होयवादी, होयबा.

azure /'ॲझ़(र्); तसेच 'ॲझ्युअ(र्)/ *वि, ना* [*अगण*] निळा, निळाभोर, अस्मानी.

B b

B, b /बी/ *ना* [*गण*] (*ब.व* **B's, b's** /बीझ़/) इंग्रजी वर्णमालेतील दुसरे अक्षर.

b. *संरू* born जन्म याचे संक्षिप्त रूप.

babble /'बॅब्ल्/ *क्रि* [*अक*] भरभर किंवा मुर्खासारखे बोलणे, बरळणे, बडबड करणे; वटवट करणे. **babble** *ना* [*अे.व*] वटवट, बरळणे, बकबक.

babe /बेइब्/ *ना* [*गण*] (*पुरा*) बाळ, तान्हुले.

baboon /ब'बून्; *अमे* बॅ-/ ना [*गण*] एक प्रकारचे मोठे माकड, मोठे दात, लांब शेपूट आणि टोकदार तोंडाचे आफ्रिकेतील वानर.

baby /'बेइबि/ ना [*गण*] (*ब.व* **-ies**) १ अगदी लहान मूल, बालक, बाळ. २ (*व्रात्य* खास *अमे*) तरुणी, विशेषतः एखाद्याची मैत्रीण – गर्लफ्रेन्ड. **babyish** *वि* लहान

मुलाचा किंवा लहान मुलासारखा, कुक्कुल्या बाळासारखा. **'babysit** *क्रि* (-tt-, *भूत, भूत वि* -sat) [*अक*] आई-वडील बाहेर गेले असता मुलांना सांभाळणे, मूल सांभाळणे. **'babysitter** *ना* [*गण*] मूल सांभाळण्याचे काम करणारा.

bachelor /'बॅचल(र्)/ *ना* [*गण*] १ अविवाहित पुरुष. २ **Bachelor** विद्यापीठाची प्रथम पदवी धारण करणारा, प्रथमपदवीधारक : *a ,B~ of 'Arts/'Science, कला/विज्ञान पदवीधारक, पदवीधर, बी.ए. किंवा बी.एस्सी.*

back^1 /बॅक्/ *ना* [*गण*] १ मानेपासून कुल्ल्यांपर्यंतचा/ढुंगणापर्यंतचा मानवी शरीराचा भाग, पाठ. २ एखाद्या वस्तूच्या दर्शनी भागापासूनचा सर्वात दूरचा भाग, मागचा भाग; कमी वापरला जाणारा किंवा कमी महत्त्वाचा भाग : *sit in the ~ of the car, मोटारीच्या मागच्या बाजूला बसणे* ○ *the ~ of a cheque, धनादेशाची मागची बाजू.* ३ खुर्चीचा टेकून बसायचा भाग, खुर्चीची पाठ. ४ (*वाक्प्र*) **,back to 'front** मागची बाजू पुढे झालेला, उलटा. **behind sb's 'back** एखाद्याला नकळत, एखाद्याच्या पाठीमागे किंवा पश्चात, एखाद्याच्या अपरोक्ष. **get/put sb's 'back up** (*अनौप*) एखाद्याला चिडवणे, खिजवणे, राग आणणे, वैताग देणे, पाठीमागे लागणे. **get off sb's 'back** (*अनौप*) एखाद्याला त्रास देणे थांबवणे, पिच्छा सोडणे. **put one's 'back into sth** एखाद्या गोष्टीवर खूप काम करणे, खूप धडपड करणे, झगडणे. **back** *वि* एखाद्या गोष्टीच्या मागच्या बाजूचा, एखाद्या गोष्टीच्या मागील बाजूचा : *the ~ door, मागचे दार.* **'backache** *ना* [*अगण, गण*] पाठदुखी, पाठीचे दुखणे. **,back-'bencher** *ना* [*गण*] (*ब्रि*) सत्ताधारी पक्षात किंवा विरोधी पक्षात कोणतेही अधिकृत पद नसलेला संसदेचा समासद. **'backbone** *ना* १ [*गण*] पाठीच्या मध्यभागी असणारी अस्थिंची रांग, पाठीचा कणा, पृष्ठवंश. २ [*अे.व*] (*ला*) मुख्याधार, कणा. ३ [*अगण*] (*ला*) स्वभावातील कणखरपणा, धारिष्ट्य. **'backbreaking** *वि* (कामासंबंधी) फार अवघड, जिकीरीचे, काटा ढिला करणारे. **'background** *ना* १ [*अे.व*] (क) एखाद्या दृश्यातील मुख्य व्यक्ती किंवा वस्तू यांच्या पाठीमागचा भाग, पार्श्वभूमी. (ख) (*ला*) एखाद्या गोष्टीवर प्रभाव पाडणारी अथवा परिणाम घडविणारी परिस्थिती किंवा घटना, पार्श्वभूमी. २ [*गण*] एखाद्याचा सामाजिक वर्ग किंवा दर्जा, त्याचे शिक्षण वगैरे. **'backhand** *ना* [*गण*] हाताचा मागचा भाग पुढे करून टेनिसमधे वगैरे मारलेला फटका. **,back-'handed** *वि* ,१ हाताच्या पाठीने खेळलेला/दिलेला (फटका, ठोसा वगैरे). २ अप्रत्यक्ष आणि उपरोधिक : *a ,~handed 'compliment, खोचक स्तुती, शालजोडीतला.* **backless** *वि* पाठ नसलेला, पाठीकडून उघडा (असा स्त्रियांचा पोषाख). **'backlog** *ना* [*गण*] उरलेले काम, बाकी राहिलेले काम, अनुशेष. **,back 'number** *ना* [*गण*] वर्तमानपत्र वगैरेचा मागचा अंक, जुना अंक. **'backpack** *ना* [*गण*] (खास *अमे*) पाठीवरची पिशवी, रक्सॅक. **'backside** *ना* [*गण*] (*अनौप*) ढुंगण, कुल्ले. **'backstage** *क्रिवि* रंगभूमीच्या बाजूच्या आणि मागच्या जागी, पडद्यामागे. **'backstroke** *ना* [*अगण*] पाठीवर पोहणे. **'backwater** *ना* [*गण*] १ नदीच्या मुख्य प्रवाहापासून दूर असलेला, संथ पाण्याचा, आणि कडेच्या धारेचे पाणी मिळणारा नदीचा भाग, नदीचे उपपात्र, प्रतिप्रवाह, पश्चजल. २ (*ला*) नवीन कल्पना, प्रगती वगैरेंचा स्पर्शही न झालेली जागा, ठिकाण वगैरे, जुनाट पद्धतीची संस्था, ठिकाण.

back^2 /बॅक्/ *क्रिवि* १ पाठीमागे, पाठीमागच्या बाजूस, पाठीकडे, मागे; पुढील बाजूपासून किंवा मध्यापासून दूर, मागे : *Stand ~, please, कृपया जरा मागे उभे रहा, जरा मागे व्हा.* २ परत पूर्वीच्या किंवा पहिल्या जागी/अवस्थेत : *Put the book ~ on the shelf, पुस्तक शेल्फवर परत (पहिल्या) जागेवर ठेवणे.* ३ (काळाच्या संबंधात) पूर्वी, मागे : *a few years ~, काही वर्षांपूर्वी.* ४ उलट, उलटून : *hit him ~, त्याला उलट मारणे* ○ *I'll phone you ~, मी तुला उलट फोन करीन.* ५ (*वाक्प्र*) **,back and 'forth** मागेपुढे, इकडून तिकडे. **'backbiting** *ना* [*अगण*] एखादा हजर नसताना त्याच्याविषयी वाईट बोलणे, पाठीमागे निंदा करणे, चहाड्या करणे. **'backdate** *क्रि* [*सक*] एखादी गोष्ट उलटून गेलेल्या तारखेपासून वैध होती असे म्हणणे, (एखादी

गोष्ट मागपासून लागू आहे हे दाखविण्यास) मागची तारीख टाकणे. **'backfire** *क्रि* [*अक*] १ (वाहनांच्या संबंधात) इंजिनमधून किंवा धूर सोडण्याच्या जागेतून मोठा आवाज येणे. २ (*ला*) (एखादी योजना वगैरे) (जबाबदार असणाऱ्या लोकांच्या दृष्टीने) फसणे, भलतेच होणे, उलटणे. **'backlash** *ना* [*अे.व*] एखाद्या घटनेची तीव्र, विशेषतः हिंसक प्रतिक्रिया, विपरीत परिणाम, कटू पडसाद.

back^3 /बॅक्/ *क्रि* १ [*अक, सक*] मागे घेणे : ~ *a car, गाडी मागे घेणे.* २ [*अक*] *onto*// मागच्या बाजूने दिसणे, पिछाडीस असणे : *The house ~s onto the park, घराच्या मागच्या बाजूने बाग दिसते, घराच्या पिछाडीस बाग आहे.* ३ [*सक*] मदत किंवा पाठिंबा देणे, आधार देणे. ४ [*सक*] (एखाद्या घोड्यावर वगैरे) पैज लावणे. ५ [*सक*] पाठ झाकणे. ६ (*क्रिब*) **back 'down** आधी केलेली मागणी किंवा सांगितलेला हक्क मागे घेणे, सोडून देणे. **back out (of sth)** (करारातून वगैरे) अंग काढून घेणे. **back sb/sth up** (क) एखाद्याला प्रोत्साहन किंवा पाठिंबा देणे. (ख) काही सिद्ध करण्यासाठी पुरावा देणे. (ग) (*संगणन*) (फाईलची वगैरे) जादा प्रत करणे. **backer** *ना* [*गण*] पाठिंबा किंवा मदत (विशेषतः आर्थिक) करणारा, मदतनीस. **backing** *ना* [*अगण*] १ पाठिंबा किंवा मदत. २ एखाद्या गोष्टीची पाठ बनविण्यासाठी वापरले जाणारे साहित्य. **'backup** *ना* १ [*अगण*] जादा आधार, पुस्ती. २ [*अगण, गण*] (*संगणन*) (फाईलची वगैरे) जादा प्रत.

backgammon /'बॅक्गॅमन्/ *ना* [*अगण*] पट आणि फासे घेऊन खेळायचा एक खेळ, फासे टाकून सोंगट्या फिरवण्याचा एक खेळ.

backward /'बॅक्वड्/ *वि* १ पाठीमागचा : *a ~ glance, पाठीमागे टाकलेली दृष्टी/नजर, मागे टाकलेला कटाक्ष.* २ सर्वसामान्य प्रमाणापेक्षा कमी प्रगत, मागास, मागासलेला : *a ~ child, मागासलेले मूल.* **backwards** (तसेच **backward**) *क्रिवि* १ पाठीकडे, मागे, मागच्या बाजूला. २ शेवटाकडून, उलट, उफराटा : *say the alphabet ~s, वर्णमाला शेवटाकडून म्हणणे, उलट क्रमाने म्हणणे.*

bacon /'बेइकन्/ *ना* [*अगण*] डुकराच्या पाठीचे किंवा दोन्ही बाजूंचे खारावलेले किंवा जाळावर टांगून सुकवलेले मांस.

bacteria /बॅक्'टिअरिअ/ *ना* [*ब.व*] (*अे.व* **-ium** /-अिअम्/) रोग निर्माण करणारे सूक्ष्मजंतू, सूक्ष्मजीव, जीवाणू, शाकाणू आणि अणुजीव. **bacterial** /-रिअल्/ *वि* अणुजीवसंबंधी, जीवाणुविषयक.

bad /बॅड्/ *वि* (**worse** /वऽस्/, **worst** /वऽस्ट्/) १ नीच किंवा हलक्या प्रतीचा, भिकार, फालतू, बंडल : *a ~ actor, कनिष्ठ प्रतीचा नट, फालतू नट.* २ दुष्ट, अनैतिक, कु-. ३ दुःखदायक, वाईट : ~ *news, वाईट बातमी.* ४ (नको असलेल्या किंवा अनिष्ट गोष्टींबाबत) गंभीर; भयंकर : *a ~ mistake, गंभीर चूक* ○ *in a ~ mood, मनःस्थिती ठीक नसलेला, तापलेला.* ५ (अन्नाबाबत) नासका, सडका, खराब : *The fish has gone ~, मासा सडलाय/खराब झालाय.* ६ आजारी, दुखणारा किंवा रोगग्रस्त, बरं नसलेला : *a ~ back, दुखणारी पाठ.* ७ अहितकारक, अपायकारक : *Smoking is ~ for you, धूम्रपान तुला अपायकारक आहे.* ८ (*वाक्प्र*) **be in sb's bad books** ➪ BOOK^1. **be bad 'luck** दुर्भाग्य असणे, नशीब वाईट असणे. **,bad 'blood** द्वेष, राग, मत्सर. **go from ,bad to 'worse** (वाईट परिस्थितीबाबत) अधिक वाईट होणे, बिघडणे, चिघळणे. **have a bad night** ➪ NIGHT. **not (so) 'bad** (*अनौप*) ठीक, चांगलं. **too bad** (*अनौप*) दुर्दैवी; खेदकारक : *It's too ~ she's ill, ती आजारी आहे हे दुर्दैवच.* **,bad 'debt** *ना* [*गण*] न फिटणारे कर्ज, बुडणारे कर्ज. **baddy** *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) (*अनौप*) सिनेमा, नाटक वगैरेतला वाईट माणूस, दुष्ट माणूस, व्हिलन. **,bad 'language** *ना* [*अगण*] अपमानकारक किंवा उद्दाम भाषा. **badly** *क्रिवि* (**worse, worst**) १ वाईट पद्धतीने, गंभीररीत्या. २ फार, निकडीने; खूप, मोठ्या प्रमाणात : *~ly wounded, गंभीररीत्या जखमी* ○ *need some money ~ly, काही पैशाची फार गरज असणे.* ३ (*वाक्प्र*) **badly 'off** वाईट (विशेषतः आर्थिक) परिस्थितीत. **badness** *ना* [*अगण*] वाईटपणा, खराबी. **bad-'tempered** *वि* चिडचिडा, रागावलेला, तापट, तिरसट.

bade BID^2 चा *भूत.*

badge /बॅज्/ *ना* [*गण*] धंदा, सभासदत्व, हुद्दा वगैरे दाखविण्यासाठी अंगावर/कपड्यावर लावलेले चिन्ह, बिल्ला, बिरुद.

badger^1 /'बॅज(र्)/ *ना* [*गण*] डोक्यावर काळे पांढरे पट्टे असणारा, जमिनीत बिळे करून राहणारा आणि रात्री बाहेर पडणारा एक लहान प्राणी.

badger^2 /'बॅज(र्)/ *क्रि* [*सक*] एखाद्याला प्रश्न वगैरे विचारून त्रस्त करणे, भुणभुण लावणे, टुमणे लावणे, प्रश्नांचा भडीमार करून जेरीस आणणे.

badminton /'बॅड्मिन्टन्/ *ना* [*अगण*] उंच जाळ्यावरून रॅकेटने फूल मारून खेळायचा टेनिससारखा एक खेळ.

baffle /'बॅफ्ल्/ *क्रि* [*सक*] समजण्यास अवघड जाणे, गोंधळवणे, गोंधळून टाकणे.

bag^1 /बॅग्/ *ना* १ [*गण*] वरच्या बाजूने उघडणारे एक लवचिक पात्र, पिशवी, थैली, बटवा : *a paper ~, कागदाची पिशवी.* २ **bags** [*ब.व*] *of//* (*अनौप*) विपुलता, वैपुल्य. ३ (*वाक्प्र*) **in the 'bag** (*अनौप*) निश्चितपणे जिंकता किंवा मिळवता वगैरे येण्यासारखा.

bag^2 /बॅग्/ *क्रि* (-gg-) [*सक*] १ पिशवीत ठेवणे, टाकणे. २ (जनावर किंवा पक्षी) मारणे किंवा पकडणे. ३ (*अनौप*) मिळवणे, पटकावणे.

baggage /'बॅगिज्/ *ना* [*अगण*] = LUGGAGE.

baggy /'बॅगि/ *वि* (-ier, -iest) घोळदार, घळघळीत : ~ *trousers, घोळदार पायजमा/ पॅन्ट.*

bagpipes /'बॅगपाइप्स्/ *ना* [*ब.व*] हवेची पिशवी किंवा भाता आणि नळ्या असलेले एक वाद्य, पिशवीचे पंचवेणुवाद्य.

bail /बेइल्/ *ना* [*अगण*] **(क)** खटला सुरू होईपर्यंत आरोपीला मुक्त ठेवण्यासाठी दिलेले पैसे, जामिनाची रक्कम, जमानत, जामीन. **(ख)** आरोपीला जामीन देऊन मुक्तपणे फिरण्याची दिलेली परवानगी, जामिनावर सुटका. **bail** *क्रि* (*क्रिब*) **bail sb out** **(क)** जामिनाची रक्कम भरून एखाद्याला सोडविणे. **(ख)** (*ला*) एखाद्याला (विशेषतः आर्थिक) संकटातून वाचविणे, अशा संकटात मदत करणे.

bail^2 (तसेच **bale**) /बेइल्/ *क्रि* [*अक, सक*] (बोटीतून पाणी) बाहेर टाकणे, बाहेर काढणे, (होडीतील पाणी) उपसणे.

bail^3 /बेइल्/ *ना* [*गण*] (क्रिकेटमधे) यष्टीवर ठेवायची विटी.

bailiff /'बेइलिफ्/ *ना* [*गण*] १ ज्याच्यावर कर्ज आहे त्याच्याकडून माल वगैरे घेणारा न्यायालयीन अधिकारी, (नाझराचा) वर्तक. २ (*ब्रि*) जमीनदाराचा प्रतिनिधी, जमीनमालकाचा मुनीम किंवा कारभारी.

bait /बेइट्/ *ना* [*अगण*] १ मासा पकडण्यासाठी गळाला लावलेला किंवा प्राणी पकडण्यासाठी सापळ्यात ठेवलेला अन्नाचा तुकडा किंवा घास. २ (*ला*) मोह पाडण्यासाठी किंवा आकर्षित करण्यासाठी वापरलेली गोष्ट, आमिष, प्रलोभन, लालूच. **bait** *क्रि* [*सक*] १ गळाला अन्न लावणे किंवा सापळ्यात अन्न ठेवणे. २ एखाद्याला चिडवणे, त्याची थट्टा करून त्याला भडकवणे, जेरीस आणणे.

bake /बेइक्/ *क्रि* १ [*अक, सक*] भट्टीमधे भाजणे. २ [*अक, सक*] तापवून कडक करणे, भाजणे. ३ [*अक*] (*अनौप*) गरम होणे, उकडणे : *It's baking today! आज भाजून निघतय्, आज उकडहंडी होतेय्!* **baker** *ना* [*गण*] पाव वगैरे भाजून (म्हणजे तयार करून) तो विकणारा माणूस, बेकरीवाला, पाववाला. **bakery** *ना* [*गण*] (*ब.व* -ies) जेथे पाव तयार करून विकला जातो ती जागा. **'baking-powder** *ना* [*अगण*] केक वगैरे करताना, ते फुगण्यासाठी किंवा हलके होण्यासाठी वापरायची पावडर.

balance^1 /'बॅलन्स्/ *ना* १ [*अगण*] स्थिर राहण्याची अवस्था, तोल : *keep/lose one's ~, तोल राखणे/तोल जाणे.* २ [*गण*] वजन करण्यासाठी वापरायचे उपकरण, तराजू, वजनकाटा. ३ [*अगण, अ.व*] दोन विरुद्ध बाजू किंवा दोन विरोधी पक्ष समान किंवा समप्रमाण असतील अशी अवस्था; समतोल : *a ~ between work and play, काम आणि खेळ यातला समतोल.* ४ [*गण*] बँकेतील खात्यावरील रक्कम, खात्यातील शिल्लक किंवा बाकी. ५ [*गण*] काही देणे दिल्यावर उरलेले

देणे, देय रक्कम, बाकी देणे. ६ (*वाक्प्र*) **in the balance** अनिश्चित, अनिर्णित. **on 'balance** सर्व बाबींचा विचार करता, एकंदरीने, एकूण पाहता. **'balance sheet** *ना* [*गण*] मिळालेले पैसे, खर्च केलेले पैसे आणि त्यातील फरक यांचे लेखी वृत्त, आढावापत्रक, शिलकबंद, ताळेबंद.

balance^{2} /'बॅलन्स्/ *क्रि* १ (क) [*सक*] एखादी गोष्ट स्थिर ठेवणे, तोल राखणे. (ख) [*अक*] तोल सावरून उभे राहणे किंवा शरीराचा तोल सावरणे : *He ~d on the edge of the table, त्याने टेबलाच्या टोकावर शरीराचा तोल सावरून धरला.* २ [*सक*] (दोन वस्तू, योजना वगैरेंची) तुलना करणे; समान महत्त्व देणे. ३ [*सक*] स्वतःच्या आर्थिक येणे व देणे यांची हिशेबवहीत तुलना करणे.

balcony /'बॅल्कनि/ *ना* [*गण*] (*ब.व* -ies) १ इमारतीच्या बाहेरच्या अंगाला बांधलेली, कठडा असणारी सपाट जागा, सज्जा, गॅलरी. २ चित्रपटगृहातील किंवा नाट्यगृहामधील वरच्या मजल्यावरची बसायची जागा.

bald /बॉऽल्ड्/ *वि* १ डोक्यावर तुरळक केस असलेला किंवा अजिबात केस नसलेला, टक्कल असलेला. २ (*ला*) साधा, रुक्ष, नीरस : *a ~ statement, अगदी रुक्ष विधान/बोलणे.* **balding** *वि* बोडके होणारे, केस विरळ होत असलेले. **baldly** *क्रिवि* रुक्षपणे, अगदी साधेपणाने. **baldness** *ना* [*अगण*] बोडकेपणा; रुक्षपणा, साधेपणा.

bale^{1} /बेइल्/ *ना* [*गण*] गवताची पेंढी, कापडाचा गट्ठा.

bale^{2} /बेइल्/ *क्रि* १ = BAIL^{2}. २ (*क्रिव*) **bale out (of sth)** (विमानातून) हवाईछत्रीच्या साहाय्याने बाहेर उडी मारणे.

balk (तसेच **baulk**) /बॉऽक्/ *क्रि* [*अक*] (*at*)// एखादी गोष्ट करण्यास किंवा करून पाहण्यास नाखुष असणे, राजी नसणे, तयार नसणे.

ball^{1} /बॉऽल/ *ना* [*गण*] १ चेंडू. २ गोलाकार पुंजका, गोळा, गुंडा, गुंडाळी : *a ~ of wool, ऊनाचा गुंडा.* ३ गोलाकार सांधा, उलूखलसंधी : *the ~ of one's foot, पायाची बोटे जोडली जातात तो सांधा, पेराच्या खालचा गोलाकार भाग, चवडा.* ४ [बहुधा *ब.व*] (*अनौप*) वृषण. ५ (*वाक्प्र*) **keep/start the 'ball rolling** एखादे कार्य चालू ठेवणे किंवा सुरू करणे. **(be) on the 'ball** (*अनौप*) नवीन कल्पना वगैरेचे ध्यान असणे, त्याची जाणीव असणे, अद्ययावत् माहिती असणे. **'ball game** *ना* १ (क) [*गण*] चेंडूचा खेळ. (ख) [*अगण*] (*अमे*) बेसबॉल. २ [*गण*] (*अनौप*) परिस्थिती, नवीन परिस्थिती. **'ball-point** (तसेच **,ball-point 'pen**) *ना* [*गण*] शाई कागदावर उतरण्यासाठी टोकाला छोटी गोळी असलेले पेन, बॉलपेन.

ball^{2} /बॉऽल/ *ना* [*गण*] १ औपचारिकपणे नृत्यासाठी जमलेला मोठा समूह/समाज, नृत्यासाठी जमलेले स्त्री-पुरुष. २ (*वाक्प्र*) **have a 'ball** (*अनौप*) चांगला वेळ जाणे, मजेत वेळ जाणे. **'ballroom** *ना* [*गण*] नाचासाठी वापरायचा मोठा हॉल, नृत्यगृह.

ballad /'बॅलड्/ *ना* [*गण*] कथा सांगणारी साधी कविता किंवा गाणे, पोवाडा, कथाकाव्य.

ballast /'बॅलस्ट्/ *ना* [*अगण*] १ बोट स्थिर राहण्यासाठी तीमधे टाकायचे अवजड वजन. २ आकाशयानातून किंवा मोठ्या फुग्यातून (वजन कमी करण्यासाठी) आणि त्याने अधिक उंच जावे म्हणून बाहेर टाकला जाणारा वाळू वगैरेसारखा माल.

ballerina /,बॅल'रीन/ *ना* [*गण*] नृत्यनाट्यातील नर्तिका.

ballet /'बॅलेइ/ *ना* १ (क) [*अगण*] संभाषण न वापरता फक्त हावभाव व नाच याद्वारे कथा सांगण्याची पद्धत, नृत्यनाट्य. (ख) [*गण*] नृत्यनाट्याचा प्रयोग. २ [*गण*] नृत्यनाट्यपथक.

ballistics /ब'लिस्टिक्स्/ *ना* [*अगण*] हवेतून सोडलेल्या वस्तूंच्या हालचालींचा अभ्यास, उत्क्षेपशास्त्र, क्षेपणशास्त्र. **bal,listic 'missile** *ना* [*गण*] सुरुवातीला शक्ती दिलेले आणि नियंत्रित केलेले पण पुढे स्वतःहून लक्ष्यावर उतरणारे क्षेपणास्त्र.

balloon /ब'लून्/ *ना* [*गण*] १ गडद रंगाचा, हवा भरलेला रबरी फुगा. २ (तसेच **hot-'air balloon**) हवेत वर तरंगावी म्हणून हवा किंवा इतर काही वायू भरलेली आणि खाली प्रवासी नेण्यासाठी मोठी टोपली असलेली अशी

मोठी गोलाकार पिशवी, फुगा. **balloon** *क्रि* [*अक*] फुग्यासारखे फुगणे. **balloonist** *ना* [*गण*] फुग्याच्या (पहा BALLOON २) साहाय्याने आकाशभ्रमण करणारा माणूस.

ballot /'बॅलट्/ *ना* १ [*गण, अगण*] गुप्त मतदानात वापरली जाणारी मतपत्रिका. २ [*गण*] नोंद झालेली मते. **ballot** *क्रि* १ [*अक*] मतपत्रिकेद्वारे मतदान करणे. २ [*सक*] मते घेऊन एखाद्या गटाचा दृष्टीकोन समजावून घेणे. **'ballot-box** *ना* [*गण*] मतपत्रिका टाकण्याची पेटी, मतपेटी.

balm /बाम्/ *ना* [*अगण, गण*] १ वेदनाशामक तेल, उपशामक मलम किंवा अंजन. २ (*ला*) सुखदायक किंवा सुखकारक गोष्ट. **balmy** *वि* **(-ier, -iest)** १ (हवेबाबत) हळुवार आणि उबदार. २ बरं करणारा, गुणकारी. ३ (खास *अमे*) = BARMY.

balsa /'बॉऽल्स/ *ना* [*अगण, गण*] उष्ण कटिबंधातील एक अमेरिकन झाड (किंवा त्याचे हलके लाकूड).

balustrade /,बॅल'स्ट्रेइड्/ *ना* [*गण*] वर पट्टी किंवा कठडा असलेली सज्जाला लावायची उभ्या पट्ट्यांची किंवा गजांची रांग, गॅलरीचा गजांचा कठडा.

bamboo / बॅम्'बू/ ना [*गण, अगण*] बांबू.

ban /बॅन्/ *क्रि* **(-nn-)** [*सक*] बंदी घालणे. **ban** *ना* [*गण*] मनाई, प्रतिबंध, निषेध.

banal /ब'नाल्; *अमे* 'बेइन्ल्/ *वि* अतिसामान्य आणि रुक्ष, क्षुल्लक : ~ *remarks, क्षुल्लक किंवा फडतुस टीकाटिप्पणी.*

banana /ब'नान; *अमे* ब'नॅन/ *ना* [*गण*] केळे.

band /बॅन्ड्/ *ना* [*गण*] १ लोकप्रिय संगीत वाजवणाऱ्या लोकांचा समूह, वाद्यवृन्द. २ माणसांचा गट, टोळी : *a ~ of robbers, दरोडेखोरांची टोळी.* ३ एखाद्या गोष्टीची पातळ सपाट अशी पट्टी, एकत्र बांधण्यासाठी किंवा एखाद्या वस्तूभोवती बांधण्यासाठी वापरायची पट्टी, बंध. ४ आकडे, राशी वगैरेची मर्यादित व्याप्ती, मर्यादा : *an income ~, प्राप्तीची मर्यादा.* **band** *क्रि* [*अक*] *together*// एखाद्या गटात एकत्र होणे, जमाव एकत्र येणे, जमणे. **'bandstand** *ना* [*गण*] वाद्यवृन्दासाठी बंदिस्त नसलेला असा किंवा उघड्यावरचा मंच, खुला मंच. **'bandwagon** *ना* (*वाक्प्र*) **jump/climb on the 'bandwagon** (*अनौप*) एखादी फॅशनेबल किंवा यशस्वी गोष्ट करणाऱ्या लोकांत जाऊन मिसळणे, वारे पाहून तोंड फिरवणे.

bandage /'बॅन्डिज्/ *ना* [*गण*] जखमेभोवती गुंडाळायची कापडाची पट्टी. **bandage** *क्रि* [*सक*] जखमेवर पट्टी बांधणे, मलमपट्टी करणे.

bandit /'बॅन्डिट्/ *ना* [*गण*] शस्त्र असणारा दरोडेखोर, डाकू, लुटारू.

bandy^{1} /'बॅन्डि/ (*भूत, भूत वि* -ied) १ (*वाक्प्र*) **bandy 'words** (*अप्रचलित*) भांडणे, खडाजंगी होणे. २ (*क्रिब*) **bandy sth about** (माहिती, कल्पना वगैरे) विचार न करता इतरांना सांगणे, सांगत सुटणे, डंका पिटणे, गावभर सांगत सुटणे.

bandy^{2} /'बॅन्डि/ *वि* **(-ier, -iest)** (पायांबाबत) गुडघ्याशी बाहेरच्या बाजूला वाकलेले, फेंगडे.

bang /बॅङ्/ *ना* [*गण*] एकदम आलेला मोठा आवाज; धडक, आपटी. **bang** *क्रि* १ [*अक, सक*] प्रचंड आवाज होणे; जोराने आपटणे किंवा धडकणे : *The door ~ed shut, दार धाडकन् बंद झाले* ○ *She ~ed her knee on the desk, तिचा गुडघा बाकावर जोराने आपटला.* २ (*वाक्प्र*) **bang one's head against a brick wall** ⇨ HEAD^{1}. **bang** *क्रिवि* (*अनौप*) बरोबर, अचूकपणे : ~ *in the middle, बरोबर मध्यभागी.*

banger /'बॅङ्अ(र्)/ *ना* [*गण*] (*ब्रि अनौप*) १ सॉसिज, चिरून स्वादिष्ट केलेले आणि आवरणात भरलेले मांस. २ आवाज काढणारे दारुकाम, फटाके. ३ आवाज करणारी जुनी मोटारगाडी.

bangle /'बॅङ्ग्ल्/ *ना* [*गण*] मनगटात किंवा पायात घालायचा दागिना, बांगडी, कडे.

banish /'बॅनिश्/ *क्रि* [*सक*] १ शिक्षा म्हणून दूर पाठविणे, हद्दपार करणे, तडीपार करणे. २ मनातून (विचार वगैरे) घालविणे, काढून टाकणे, हद्दपार करणे. **banishment** *ना* [*अगण*] हद्दपारी.

banister /'बॅनिस्ट(र्)/ *ना* [*गण,* खास करून *ब.व*] जिन्याच्या कडेचे छोटे खांब व त्यावरील

पट्टी, जिन्याचा कठडा.

banjo /'बॅन्जउ/ *ना* [*गण*] [*ब.व* ~s] गिटारच्या जातीचे खाली गोलाकार असलेले, तारा हातांनी छेडून वाजवायचे एक वाद्य.

bank^1 /बॅङ्क्/ *ना* [*गण*] १ पैसे सुरक्षित ठेवण्याची जागा, पेढी. २ साठा ठेवण्याची जागा : *a blood ~, रक्तपेढी.* **bank** *क्रि* १ [*सक*] बँकेत (पैसे) ठेवणे किंवा टाकणे. २ (*क्रिब*) **bank on sb/sth** एखाद्या माणसावर/गोष्टीवर अवलंबून राहणे, मदार टाकणे, भिस्त ठेवणे. **banker** *ना* [*गण*] बँकेचा मालक, संचालक किंवा व्यवस्थापक. **,bank 'holiday** *ना* [*गण*] बँकेला असलेली अधिकृत सार्वजनिक सुट्टी. **banking** *ना* [*अगण*] बँक व्यवसाय, बँक चालविण्याचा उद्योग. **'banknote** *ना* [*गण*] बँकेची (रोख पैशाऐवजी चालणारी) कागदी नोट, हुंडी.

bank^2 /बॅङ्क्/ *ना* [*गण*] १ नदी वगैरेच्या बाजूची चढाची जमीन, काठ, किनारा, तीर. २ उतरत्या कडा असलेले टेकाड, बांध, बंधारा. ३ (बर्फ, ढग वगैरेचा) ढिगारा किंवा गठ्ठा. **bank** *क्रि* [*अक*] (विमानाबाबत) वळताना एक बाजू वर व एक खाली करून म्हणजेच एका कुशीवर होऊन पुढे जाणे.

bank^3 /बॅङ्क्/ *ना* [*गण*] एकसारख्या वस्तूंची मालिका किंवा रांग : *a ~ of switches, बटणांची मालिका.*

bankrupt /'बॅङ्क्रप्ट्/ *वि* १ देणी देण्यास असमर्थ असलेला, दिवाळखोर, कर्जबाजारी, कफल्लक. २ (*ला*) एखाद्या चांगल्या गोष्टीचा पूर्ण अभाव असलेला, दिवाळखोर. **bankrupt** *ना* [*गण*] दिवाळखोर माणूस. **bankruptcy** /-रप्सि/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* -ies) दिवाळखोरी, कर्जबाजारीपणा, कफल्लकपणा.

banner /'बॅन(र्)/ *ना* [*गण*] कवायत करणाऱ्यांनी न्यायची आणि संदेश लिहिलेली कापडाची मोठी पताका, (संचलनातील निशाण किंवा ध्वज).

banns /बॅन्झ्/ *ना* [*ब.व*] होणाऱ्या लग्नाची चर्चमधे केलेली जाहीर घोषणा, लग्नाची द्वाही किंवा जाहीरपत्रिका.

banquet /'बॅङ्क्विट्/ *ना* [*गण*] मोठी औपचारिक मेजवानी, अधिकृत शाही खाना.

bantam /'बॅन्टम्/ लहान जातीचे कोंबडीचे पिल्लू.

banter /'बॅन्ट(र्)/ *ना* [*अगण*] थट्टामस्करी, चेष्टा, खेळीमेळीची टिंगल. **banter** *क्रि* [*अक*] थट्टामस्करी करणे, चेष्टा करणे.

baptism /'बॅप्टिझम्/ *ना* १ [*गण, अगण*] चर्चचा सभासद करून घेण्यासाठी एखाद्यावर पाणी शिंपडण्याचा किंवा एखाद्याला पाण्यात भिजवण्याचा केलेला संस्कार – यावेळी बऱ्याचदा ख्रिस्ती चर्चच्या सभासदत्वाची खूण म्हणून सभासदाचे नवीन नावही ठेवले जाते, चर्चमधील जलसंस्कार, बाप्तिस्मा. २ (*वाक्प्र*) **,baptism of 'fire** (क) सैनिकाचा युद्धाचा पहिलाच अनुभव. (ख) दुःखद किंवा कटू अनुभवाची ओळख, वाईट अनुभवाचा परिचय. **baptize** /बॅप्'टाइझ्/ *क्रि* [*सक*] बाप्तिस्मा देणे, ख्रिस्ती धर्मदीक्षा देण्यासाठी जलसंस्कार करणे.

bar^1 /बा(र्)/ *ना* १ [*गण*] घनपदार्थाचा लांब तुकडा : *an iron ~, लोखंडाची सळई किंवा पट्ट* ○ *a ~ of chocolate, चॉकलेटचा मोठा तुकडा,* (*सबंध*) *मोठी वडी.* २ [*गण*] खिडकी किंवा दाराला लावलेले लाकडी किंवा धातूचे गज : *be behind ~s, तुरुंगात असणे, गजाआड असणे.* ३ [*गण*] दारू वगैरे देतात तो कठड्याचा कट्ट किंवा ती खोली, मद्यपानगृह. ४ [*गण*] रंग, प्रकाश वगैरेची अरुंद पट्टी. ५ [*गण*] (*ला* अटकाव, आडकाठी : *Poor health is a ~ t success, प्रकृती अस्वास्थ्य हे यश मिळवण्यातल आडकाठी आहे.* ६ [*गण*] (*संगीत*) स्वरपट्टिका ७ [*गण*] कोर्टातील कठड्याचा पिंजरा : *the prisoner at the ~, पिंजऱ्यातील आरोपी.* ८ **the bar** [*अे.व,* तसेच ब.व क्रियापदासह अे.व] सनदी वकिलांचा धंदा (किंवा तो करणा सर्व), वकीलमंडळ : *be called to the ~ सनदी वकील किंवा बॅरिस्टर होणे.* **bar code** *ना* [*गण*] विकायच्या मालावर छापलेल्या आ संगणकाला माहिती देणाऱ्या लहान मोठ्य समांतर रेषांचा गट. **'barman** *ना* [*गण*] (ख **'barmaid**) मद्यपानगृहात मद्यपेये देणार सेवक. **'bartender** *ना* [*गण*] (खास *अमे* मद्यपानगृहातील सेवक.

bar^2 /बा(र्)/ *क्रि* **(-rr-)** १ दांडी लावणे

अडसर लावणे, गज लावून (बंद करणे). २ अडथळा आणणे, रोखणे, अडवणे : ~ *the way, रस्ता अडवणे.* ३ प्रतिबंध करणे, बंदी घालणे, मनाई करणे : *She was ~red from (entering) the competition, तिला स्पर्धेत भाग घेण्यावर बंदी घालण्यात आली.*

ar^{3} /बा(र्)/ *शब्दयो* १ सोडून, अपवाद करता, खेरीज. २ (*वाक्प्र*) **bar none** निरपवाद.

arb /बाब्/ *ना* [*गण*] मासे पकडायच्या गळाचा टोकदार आकडा, गळाचे टोक, गळाचा काटा. **barbed** *वि* काटेरी : *~ed wire, काटेरी तार.*

arbarian /बा'बेअरिअन्/ *वि, ना* [*गण*] रानटी, जंगली, असंस्कृत (माणूस). **barbaric** /बा'बॅरिक्/ *वि* १ रानटी, जंगली. २ जंगली आणि क्रूर. **barbarity** /बा'बॅरटि/ *ना* [*अगण, गण*] (*ब.व* **-ies**) निर्दयता, निष्ठुरता, अति क्रूरपणा. **barbarous** /'बाबरस्/ *वि* क्रूर, निर्दयी किंवा रासवट.

arbecue /'बाबिक्यू/ *ना* [*गण*] १ घराबाहेर अन्न शिजवण्यास वापरायची धातूची चौकट किंवा जाळी. २ अशा जाळीवर शिजवलेल्या अन्नाची उघड्यावर दिलेली मेजवानी किंवा पार्टी. **barbecue** *क्रि* [*सक*] घराबाहेर बाबिक्यूवर स्वयंपाक करणे.

arber /'बाब(र्)/ *ना* [*गण*] पुरुषांचे केस कापण्याचे काम करणारा, न्हावी, नाभिक, हजाम.

arbiturate /बा'बिट्युरट्/ *ना* [*गण*] झोप आणणारे औषध.

ard /बाड्/ *ना* [*गण*] (*पुरा*) कवी, शाहीर, भाट.

are /बेअ(र्)/ *वि* (**~r, ~st**) १ अंगावर काहीही नसलेला, अनावृत्त, उघडा, नागडा. २ रिकामा : ~ *cupboards, रिकामी कपाटे.* ३ जेमतेम पुरेलंसे; प्राथमिक, साधा, मुद्द्याचा. **bare** *क्रि* (*सक*) उघडे पाडणे, अनावृत्त करणे. **'bareback** *वि, क्रिवि* घोड्याच्या उघड्या पाठीवर, खोगीर न घातलेल्या पाठीवर. **'barefaced** *वि* निर्लज्ज, निलाजरा; उद्धट, फटकळ. **'barefoot** *वि, क्रिवि* पायात बूट, मोजे वगैरे न घालता, अनवाणी. **barely** *क्रिवि* कसाबसा, जेमतेम. **bareness** *ना* [*अगण*] उघडेपणा, बोडकेपणा.

bargain /'बागिन्/ *ना* [*गण*] १ एखादी गोष्ट करण्याचा, विकण्याचा, विकत घेण्याचा करार, सौदा, साट. २ कमी दरात विकण्यात येणारी वस्तू, स्वस्तात विकण्यात येत असलेली वस्तू. ३ (*वाक्प्र*) **into/in the bargain** (*अनौप*) शिवाय, भरीला. **bargain** *क्रि* १ [*अक*] किंमत, विक्रीच्या अटी वगैरेंची खरेदीपूर्वी चर्चा करणे, सौदा करणे ,किंवा पटवणे, घासाघीस करणे. २ (*क्रिब*) **bargain for/on sth** (*अनौप*) एखादी गोष्ट स्वीकारण्याची तयारी असणे; अपेक्षा असणे : *get more than you had ~ed for, अपेक्षेपेक्षा जास्त मिळणे.*

barge^{1} /बाज्/ *ना* [*गण*] सपाट तळ असलेली नौका किंवा होडी, पडाव.

barge^{2} /बाज्/ *क्रि* (*अनौप*) १ [*अक*] घुसणे, ढकलाढकली करून गर्दीतून पुढे येणे. २ (*क्रिब*) **barge in** संभाषणात मधेच व्यत्यय आणून बोलणे, मधे तोंड घालणे.

baritone /'बॅरिटउन्/ *ना* [*गण*] मध्यम पट्टीतील (पुरुषाचा) गायचा आवाज.

bark^{1} /बाक्/ *ना* [*गण*] कुत्र्याचे भुंकणे. **bark** *क्रि* १ [*अक*] (कुत्र्यांबाबत) भुंकणे. २ [*सक*] उच्चरवाने बोलणे, बेंबीच्या देठापासून ओरडणे, बोंबलणे, कोकलणे : ~ *out orders, उच्चरवाने हुकूम देणे, ओरडून आज्ञा देणे.*

bark^{2} /बाक्/ *ना* [*अगण*] झाडाचे बाह्य आवरण, साल, वल्क.

barley /'बालि/ *ना* [*अगण*] ज्याचा उपयोग अन्न म्हणून व बिअर व व्हिस्की बनविण्यास होतो असे एक (तृण) धान्य, सातू, जव.

barmy /'बामि/ *वि* (**-ier, -iest**) (*ब्रि अनौप*) मूर्खपणाचे, वेडेपणाचे; चक्रम.

barn /बान्/ *ना* [*गण*] वाळलेले गवत, कडबा वगैरे साठवून ठेवायची शेतावरील इमारत, कोठार, कडब्याची पडळ.

barnacle /'बानकल्/ *ना* [*गण*] पाण्याखालील वस्तूंना चिकटून राहणारा एक शिंपल्यातला लहान मासा.

barometer /ब'रॉमिट(र्)/ *ना* [*गण*] हवेचा दाब मोजून हवामानाचा अंदाज वर्तविणारे उपकरण, वायुभारमापक, वायुदाबमापक : (*ला*) *a ~ of public feeling, लोकांच्या*

भावनेचे निदर्शक.

baron /'बॅरन्/ *ना* [*गण*] १ ब्रिटिश मानकऱ्यांतील सर्वात कनिष्ठ मानकरी उमराव (ती पदवी). २ सत्ता आणि संपत्ती यात श्रेष्ठ असलेला उद्योगपती, बडा उद्योगपती. **baroness** *ना* [*गण*] १ बॅरनच्या श्रेणीतील स्त्री. २ बॅरनची बायको. **baronet** /'बॅरनिट्/ *ना* [*गण*] वंशपरंपरेने मिळणारे बॅरनपेक्षा कनिष्ठ श्रेणीचे पण सरदारापेक्षा वरच्या श्रेणीचे उमरावपद.

baroque /ब'रॉक्; *अमे* ब'रउक्/ *वि* खूप कलाकुसर असलेल्या आणि सतराव्या आणि अठराव्या शतकात युरोपात प्रसिद्ध असलेल्या शैलीतील.

barrack /'बॅरक्/ *क्रि* [*अक, सक*] एखाद्याला मधेच थांबविण्यासाठी जोराने ओरडणे, आरडाओरडा करून अडथळा आणणे.

barracks /'बॅरक्स्/ *ना* [*गण, अ.व* किंवा *ब.व क्रि*] सैनिकांना राहण्यासाठी असणारी मोठी इमारत/इमारती.

barrage /'बॅराझ्; *अमे* ब'राझ्/ *ना* [*गण*] १ सतत चालणारा तुफानी गोळीबार, तोफांचा भडिमार: (*ला*) *a ~ of complaints, तक्रारींचा भडिमार.* २ पाण्याची पातळी मर्यादित ठेवण्यासाठी नदीला घातलेला कृत्रिम बांध.

barrel /'बॅरल्/ *ना* [*गण*] १ (क) द्रवपदार्थ ठेवायचे गोलाकार भांडे, पिंप. (ख) पिंपभर. २ गोळी ज्यातून मारली जाते ती बंदुकीची नळी. **'barrel-organ** *ना* [*गण*] दांडा फिरवून वाजवायचे एक यांत्रिक वाद्य.

barren /'बॅरन्/ *वि* १ पिके, फळे, झाडे उपजवू न शकणारी, नापीक (जमीन), वांझ किंवा वांझोटी (स्त्री, झाड), भाकड (गाय, म्हैस वगैरे). २ (*ला*) किंमत किंवा औत्सुक्य नसलेला, निष्फळ, फुकटचा, व्यर्थ: *a ~ discussion, निष्फळ चर्चा.*

barricade /,बॅरि'केइड्/ *ना* [*गण*] रस्ता वगैरे अडवण्यासाठी निर्माण केलेला अडथळा. **barricade** *क्रि* [*सक*] (रस्ता वगैरे) अडवणे, त्यात अडथळे निर्माण करणे.

barrier /'बॅरिअ(र्)/ *ना* [*गण*] १ गती किंवा प्रगती रोखणारी किंवा नियंत्रित करणारी गोष्ट, बंधन, अडथळा: (*ला*) *~s to world peace, जागतिक शांततेतील अडथळे.* २ लोकांना विभक्त ठेवणारी गोष्ट, अडथळा, भिंत, कुंपण, बंधन: *the language ~, भाषेचा अडथळा, भाषिक भिंती किंवा कुंपणे.*

barring /'बारिङ्/ *शब्दयो* अपवाद सोडता, सोडून.

barrister /'बॅरिस्ट(र्)/ *ना* [*गण*] (इंग्रजी कायद्यात) उच्च न्यायालयात वकीली करण्याचा अधिकार असणारा, पहिल्या वर्गाचा सनदी वकील.

barrow /'बॅरउ/ *ना* [*गण*] १ = WHEELBARROW (WHEEL). २ हातानी ओढायची लहान गाडी, हातगाडी.

barter /'बाट(र्)/ *क्रि* [*अक, सक*] वस्तूंच्या बदल्यात दुसऱ्या वस्तू देणे, वस्तुविनिमय करणे. **barter** *ना* [*अगण*] वस्तुविनिमय, नगास नग देणे.

base^1 /बेइस्/ *ना* [*गण*] १ एखाद्या गोष्टीचा खालचा आधाराचा भाग, पाया, तळ. २ (*ला*) आरंभ बिंदू, मूळ. ३ ज्याच्यात इतर गोष्टी मिसळल्या जातात तो मुख्य पदार्थ: *a drink with a rum ~, रम मध्ये (इतर पेये मिसळून) बनविलेले पेय.* ४ सैन्य वगैरे जेथे आपला साठा ठेवतात ती जागा, कोठार, साठा, तळ. **base** *क्रि* [*सक*] १ *on//* एखाद्या गोष्टीचा उपयोग सुरुवातीला करून त्यावर दुसरी गोष्ट रचणे, आधार घेणे: *a story ~d on real life, सत्य घटनेवर/प्रत्यक्ष जीवनावर आधारित कथा.* २ एखाद्याला एखाद्या जागी काम करण्यासाठी ठेवणे: *a company ~d in Cairo, कैरोत ठेवलेली तुकडी, कैरोतील तुकडी.* **baseless** *वि* बिनबुडाचा, काहीही आधार नसलेला.

base^2 /बेइस्/ *वि* (~r, ~st) १ (*औप*) अनैतिक, पाजी; अनादरणीय, निंद्य, नीच. २ (धातूच्या बाबत) कमी प्रतीचा, कमी किमतीचा, हलका.

baseball /'बेइस्बॉऽल्/ *ना* [*अगण*] नऊनऊ गडी असणाऱ्या दोन संघातील बॅ आणि चेंडूचा एक अमेरिकन खेळ, सीमाचेंडू.

basement /'बेइस्मन्ट्/ *ना* [*गण*] जमिनीच्याही खाली असणारा एखाद्या इमारतीचा अगदी खालचा मजला, तळघर.

bases १ BASIS चे *ब.व.* २ BASE^1 चे *ब.व.*

ash /बॅश्/ *क्रि* [*सक*] (*अनौप*) जोराने मारणे, फटका देणे. **bash** *ना* [*गण*] (*अनौप*) १ जोराचा फटका, ठोसा. २ (*वाक्प्र*) **have a bash at sth** (*अनौप*) एखादी गोष्ट करायचा प्रयत्न करणे.

ashful /'बॅश्फ़ुल्/ *वि* लाजाळू, लाजरा, संकोची. **bashfully** *क्रिवि* लाजत, संकोचाने.

asic /'बेइसिक्/ *वि* प्राथमिक, मूलभूत किंवा सर्वात महत्त्वाचे; पायाभूत : *the ~ facts, पायाभूत वास्तविके, मूलभूत सत्यगोष्टी किंवा तथ्य.* **basically** *क्रिवि* सर्वात महत्त्वाचा असा, मुख्यतः, प्रामुख्याने; मूलतः. **basics** *ना* [*ब.व*] वास्तविके किंवा महत्त्वाची अंगे, मूलतत्त्वे.

asil /'बॅझ्ल्/ *ना* [*अगण*] गोड वास असणारी एक तुळशीच्या जातीची औषधी वनस्पती.

asin /'बेइस्न्/ *ना* [*गण*] १ = WASHBASIN (WASH^1). २ द्रवपदार्थ किंवा अन्न ठेवण्याचे गोलाकार मोठ्या तोंडाचे भांडे, तसराळे. ३ पाणी साचते ती खोलगट जागा, द्रोणी. ४ नदीकडे पाणी वाहत जाणारे क्षेत्र, थडी; नदीचा पाणवठा.

asis /'बेइसिस्/ *ना* [*गण*] (*ब.व* **bases** /'बेइसीझ्/) १ एखादी गोष्ट ज्याच्यापासून वाढली तो सर्वात महत्त्वाचा भाग; पाया, बूड : *arguments that have a firm ~, भक्कम पायावर आधारलेली कारणमीमांसा किंवा तसा युक्तिवाद.* २ एखादी गोष्ट करण्याचा मार्ग किंवा त्याची रीत किंवा पद्धत : *a service run on a commercial ~, व्यापारी पद्धतीवर आधारलेली सेवा, व्यापारी तत्त्वावर देण्यात येणारी सेवा-सुविधा.*

ask /बास्क्; *अमे* बॅस्क्/ *क्रि* [*अक*] (*in*)// कोवळे ऊन खाण्यासाठी उन्हात बसणे किंवा पहुडणे, कोवळे ऊन खात बसणे किंवा पडणे : (*ला*) *~ in sb's approval, एखाद्याची मर्जी संपादणे, एखाद्याच्या पसंतीची पावती घेणे.*

asket /'बास्किट्; *अमे* 'बॅस्-/ *ना* [*गण*] वेत किंवा काड्यांनी विणून तयार केलेले एक पात्र, टोपली, पाटी, परडी : *a shopping ~, बाजार करण्याची परडी, टोपली.* **basketball** *ना* [*अगण*] टोपलीच्या आकाराच्या उंच जाळ्यात चेंडू टाकण्याचा दोन संघातील खेळ, बास्केटबॉल.

bass^1 /'बेइस्/ *ना* [*गण*] १ खालच्या पट्टीचा किंवा मंद सप्तकाचा आवाज (असणारा गायक). २ = DOUBLEBASS (DOUBLE^1). **bass** *वि* खालच्या आवाजाचा, घोगरा.

bass^2 /बॅस्/ *ना* [*गण*] खाऱ्या किंवा गोड्या पाण्यातला, काटेरी कल्ले असणारा खाण्याचा मासा.

bassoon /ब'सून्/ *ना* [*गण*] लाकडी नळीचे, खालच्या आवाजाचे एक फुंकून वाजवायचे वाद्य, भोंबारा.

bastard /'बास्टड्; *अमे* 'बॅस्-/ *ना* [*गण*] १ अविवाहित स्त्री-पुरुषाचे मूल, अनौरस संतती. २ (*अधिक्षेपी व्रात्य*) नको असलेला, हलकट, हरामखोर. ३ (*व्रात्य*) दुर्दैवी माणूस, बिचारा, फुटक्या नशिबाचा : *The poor ~ has just lost his job, बिचाऱ्याची आताच नोकरी गेली.*

baste^1 /बेइस्ट्/ *क्रि* [*सक*] मांस शिजवताना त्यावर चरबी घालणे.

baste^2 /बेइस्ट्/ *क्रि* [*सक*] मोठे टाके घालून तात्पुरते असे तुकडे तुकडे शिवणे, धावत्या दोऱ्याची कच्ची शिवण घालणे.

bastion /'बॅस्टिअन्/ *ना* [*गण*] १ किल्ल्याचा वगैरे उठून दिसणारा भाग, बुरूज. २ (*ला*) एखाद्या तत्त्वाचे किंवा श्रद्धेचे समर्थन किंवा रक्षण करणारे स्थळ, बालेकिल्ला.

bat^1 /बॅट्/ *ना* [*गण*] १ क्रिकेट, बेसबॉल वगैरेमधे चेंडू मारण्यासाठी वापरायची विशिष्ट आकाराची लाकडाची फळी, दांडफळी, बॅट. २ (*वाक्प्र*) **,off one's own 'bat** (*अनौप*) आपण होऊन, कुणीही न सांगता/शिकवता. **bat** *क्रि* (-tt-) [*अक*] बॅट वापरणे, फलंदाजी करणे. **'batsman** *ना* [*गण*] क्रिकेटमधे बॅटिंग करणारा किंवा बॅट वापरणारा खेळाडू, फलंदाज. **batter** *ना* [*गण*] (खास बेसबॉलमधे) बॅटिंग करणारा किंवा बॅट वापरणारा खेळाडू, फलंदाज.

bat^2 /बॅट्/ *ना* [*गण*] रात्री उडणारा, उंदरासारखा एक छोटा प्राणी, वटवाघूळ, वाघूळ, पाकोळी.

bat^3 /बॅट्/ *क्रि* (-tt-) (*वाक्प्र*) **not bat an 'eyelid** (*अनौप*) आश्चर्य न दाखवणे, काहीही

आश्चर्य न वाटणे.

batch /बॅच्/ *ना* [*गण*] वस्तूंचा किंवा माणसांचा गट, तुकडी.

bath /बाथ्; *अमे* बॅथ्/ ना (*ब.व* **~s** /बाद्झ्; *अमे* बॅद्झ्/) १ [*गण*] पाण्यात बसून आंघोळ करायचा पाण्याचा छोटासा हौद किंवा मोठा टब. २ [*गण*] पाण्याच्या हौदात किंवा टबात बसून केलेली आंघोळ. ३ **baths** (*ब.व*) पोहण्याचा सार्वजनिक तलाव. **bath** *क्रि* १ [*सक*] आंघोळ घालणे, न्हाऊ घालणे : *~ a baby, तान्ह्या मुलाला न्हाऊ घालणे.* २ [*अक*] हौदाच्या पाण्यात बसून अंग धुणे. **'bathrobe** *ना* [*गण*] १ स्नानानंतर किंवा स्नानापूर्वी घालतात तो मऊ, जाड कापडाचा (टॉवेलचा) सैलसर अंगरखा. २ (*अमे*) झोपून उठल्यावर घालायचा सैलसर अंगरखा. **'bathroom** *ना* [*गण*] १ आंघोळीच्या पाण्याचा टब असलेली खोली, न्हाणीघर, स्नानगृह. २ (खास *अमे*) स्वच्छतागृह, प्रसाधनकक्ष. **'bath-tub** *ना* [*गण*] आंघोळीच्या पाण्याचा हौद किंवा टब.

bathe /बेइद्/ *क्रि* १ [*अक*] (खास *ब्रि*) समुद्रात वगैरे पोहणे, जलविहार करणे. २ [*अक*] (*अमे*) पाण्याच्या हौदात किंवा टबात बसून अंग धुणे. ३ [*सक*] पाण्याने धुणे किंवा स्वच्छ करणे. **bathe** *ना* [*अे.व*] पोहणे, जलविहार. **bather** *ना* [*गण*] पोहणारा.

batman /'बॅट्मन्/ *ना* [*गण*] (*ब.व* **-men** /मन्/) (*ब्रि*) सेनादलातील अधिकाऱ्याचा खाजगी नोकर.

baton /'बॅटन्, 'बॅटॉन्; *अमे* ब'टॉन्/ *ना* [*गण*] १ वाद्यवृन्दाचे संचलन करणाऱ्याच्या हातातील छोटीशी छडी. २ पोलीस-अधिकाऱ्याच्या हातातील दंडुका.

battalion /ब'टॅलिअन्/ *ना* [*गण*] अनेक तुकड्यांचे मिळून झालेले सैन्यदल, पलटण.

batten /'बॅटन्/ *ना* [*गण*] लाकडाची मोठी फळी. **batten** *क्रि* [*सक*] *down*// फळ्या ठोकून एखादी गोष्ट मजबूत करणे, एखादी गोष्ट पट्ट्या मारून भक्कम करणे.

batter^{1} /बॅट(र)/ *क्रि* जोराने आणि पुन्हापुन्हा मारणे, बदडणे, कुदलणे. **battered** *वि* वय, खूप वापर वगैरे कारणांनी आकार बदललेला, विस्कटलेला, पोतेरं झालेला. **'battering-ram** *ना* [*गण*] भिंती वगैरे फोडण्यासाठी पूर्वी वापरत असलेला लाकडाचा मोठा ओंडका, लोलगदायंत्र.

batter^{2} /बॅट(र)/ *ना* [*अगण*] पीठ, अंडी, दूध वगैरेंचे सैलसर मिश्रण : *fish fried in ~, पीठ लावून तळलेला मासा, माशाचे भजे.*

battery /'बॅटरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) १ वीज पुरवठा करण्याचे एक उपकरण, विद्युत्घटमाला, विजेरी. २ तोफांची तुकडी, मोठ्या तोफा असणारी लष्कराची तुकडी. ३ कोंबड्या ठेवायच्या पिंजऱ्यांची रांग किंवा माला. ४ सारख्या वस्तूंचा मोठा संच, सजातीय वस्तुमाला : *a ~ of cameras/tests,* कॅमेऱ्यांची *माला, चाचणी-मालिका.*

battle /'बॅट्ल्/ *ना* १ [*गण, अगण*] सशस्‍ सैन्यांची लढाई, युद्ध. २ [*गण*] (*ला* कोणताही संघर्ष, चकमक : *a ~ of words* *वाग्युद्ध, शाब्दिक खडाजंगी.* **battle** *क्रि* [*अक* लढणे, युद्ध करणे; संघर्ष, सामना करणे *battling against poverty, गरिबीविरु* *किंवा दारिद्र्याविरुद्ध झगडणे.* **battlefield** न [*गण*] लढाईची जागा, रणांगण, युद्धभूमी **'battleship** *ना* [*गण*] मोठ्या तोफांनी सुसज्ज अशी मोठी चिलखती युद्धनौका.

battlements /'बॅट्ल्मन्ट्स्/ *ना* [*ब.व* गोळ्या, बाण वगैरे मारण्यासाठी छिद्रे असलेल किल्ल्याच्या वरच्या भागावरील भिंत, जंग्यांच भिंत.

batty /'बॅटि/ *वि* (**-ier, -iest**) (*अनौप* थोडासा वेडसर, वेडपट, चक्रम.

bauble /'बॉऽब्ल्/ *ना* [*गण*] भपकेबाज परं स्वस्त दागिना, सवंग, नकली, खोटा दागिना

baulk = BALK.

bawdy /'बॉऽडि/ *वि* (**-ier, -iest**) लैंगि गोष्टींसंबंधी अर्वाच्य पण मजेदा अचकटविचकट, फाजील, चावट.

bawl /बॉऽल्/ *क्रि* [*अक, सक*] मोठ्य ओरडणे किंवा म्हणणे, बेंबीच्या देठापास ओरडणे, किंचाळणे, कोकलणे, घसा फोड म्हणणे.

bay^{1} /बेइ/ *ना* [*गण*] आतल्या बाजूने वळ असलेला किनारा, उपसागर.

bay^{2} /बेइ/ *ना* [*गण*] विशिष्ट कारणास

वापरली जाणारी जागा किंवा इमारतीचा भाग, उपगृह, छपरी खण : *a 'loading ~, माल भरण्याची जागा.* **,bay 'window** *ना* [*गण*] बाहेरच्या बाजूच्या भिंतीतून पुढे आलेली आणि तीन्ही बाजूंना काचेची तावदाने असलेली खिडकी.

bay^3 /बेइ/ *क्रि* [*अक*] (मोठ्या कुत्र्यांबाबत) खास करून शिकार करताना मोठ्याने खोल आवाजात व दीर्घ स्वरात भुंकणे. **bay** *ना* (*वाक्प्र*) **hold/keep sb/sth at 'bay** (शत्रू वगैरेंना) पुढे येण्यास मज्जाव करणे, रोखून धरणे, दूर ठेवणे.

bay^4 (तसेच **'bay-tree**) /बेइ/ *ना* [*गण*] ज्याची हिरवीगार पाने स्वयंपाकात वापरतात असे एक झाड, तमालपत्र.

bayonet /'बइ·अनिट्/ *ना* [*गण*] बंदुकीच्या टोकावर लावलेले लांब धारदार पाते, संगीन. **bayonet** *क्रि* [*सक*] संगिनीने भोसकणे.

bazaar /ब'झ़ा(र्)/ *ना* [*गण*] १ (पौर्वात्य देशात) लहान लहान दुकानांचा किंवा गाळ्यांचा समूह किंवा गट, बाजार. २ कुणाच्या मदतीसाठी केलेली मालाची विक्री, (एखाद्या संस्थेच्या) मदतीसाठी भरलेला मजेचा बाजार.

bazooka /ब'झ़ूक/ *ना* [*गण*] खांद्यावर ठेवायची आणि विशेषतः रणगाड्यांवर क्षेपणास्त्रांचा मारा करणारी लांब पण वाहून नेण्याजोगी बंदूक.

BBC /,बी बी 'सी/ *संरू* British Broadcasting Corporation, ब्रिटिश ध्वनिक्षेपण मंडळ.

BC /,बी 'सी/ *संरू* येशू ख्रिस्ताच्या जन्मापूर्वी, इसवी सन पूर्व.

be^1 /बि; अधिक बलयुक्त रूप बी/ *सहा. क्रि* (*प्र. पुरुष अे.व वर्तमान काळ* **am** /अम्, म्; अधिक बलयुक्त रूप ॲम्/, *तृ. पुरुष अे.व वर्तमान काळ* **is** /स्, झ्; अधिक बलयुक्त रूप इझ्/, *प्र. पुरुष ब.व वर्तमान काळ, द्वि. पुरुष अे.व आणि ब.व वर्तमान काळ, तृ. पुरुष ब.व वर्तमान काळ* **are** /अ(र्); अधिक बलयुक्त रूप आ(र्)/, *प्र. पुरुष अे.व भूत, तृ. पुरुष अे.व भूत* **was** /वझ्; अधिक बलयुक्त रूप वॉझ्; अमे वैझ्/, *प्र. पुरुष ब.व भूत, द्वि. पुरुष भूत, तृ. पुरुष ब.व भूत* **were** /व(र्); अधिक बलयुक्त रूप वऽ(र्)/, *वर्त वि* **being** /'बीइङ्/, *भूत वि* **been** /बीन् (तसेच *अमे*) बिन्/). १ (वर्तमानकाळवाचक विशेषणाबरोबर अपूर्ण काळ (किंवा क्रियाव्याप्ती) दाखविण्यासाठी वापर) : *They are reading, ते वाचताहेत.* २ (भूतकालवाचक विशेषणाबरोबर कर्मणी प्रयोगात वापर) : *He was killed, तो मारला गेला.* ३ (*to* + साधारण रूप याबरोबर वापर) (क) must हवे/पाहिजे : *You are to report to the police at 10 o'clock, दहा वाजता तुला पोलिसांना भेटायला हवं/पोलिसांपुढे हजर व्हायला पाहिजे.* (ख) (भविष्यकालीन तरतूद किंवा पुढचा हेतू दाखवण्यासाठी) : *The President is to visit London in May, राष्ट्रपती मेमधे लंडनला भेट देणार आहेत, त्यांचा लंडनला भेट देण्यांचा इरादा आहे.*

be^2 /बि, अधिक बलयुक्त रूप बी/ *क्रि* (वर्तमान आणि भूतकालीन सर्व रूपांसाठी ⇨ BE^1) [*अक*] १ असणे, अस्तित्वात असणे, आहे; घडणे, होणे; राहणे : *Is there a God? देव आहे का?* २ जागी असणे : *The lamp is on the table, दिवा टेबलावर आहे.* ३ विशिष्ट नाव, गुण, परिस्थिती असणे : *This is Mrs Khan, या श्रीमती खान, यांचं नाव श्रीमती खान (असं आहे)* ○ *The film was very funny,* चित्रपट मजेशीर होता ○ *I'll be 35 next year, पुढच्या वर्षी मी पस्तीस वर्षांचा असेन/होईन.* ४ (मालकी दाखविण्यासाठी वापर) : *The money is not yours, ते पैसे तुझे नाहीत.* ५ होणे : *He wants to be a teacher, त्याला शिक्षक व्हायचं आहे.* ६ (किंमत, संख्या वगैरेबाबत समानतादर्शक वापर) : *That will be £85.95, त्याची किंमत ८५.९५ पौंड एवढी होईल/आहे.* ७ जाणे; भेट देणे : *Have you been to college today? तू आज कॉलेजात गेला होतास?* ८ (*वाक्प्र*) **be out in the open** ⇨ OPEN^1.

beach /बीच्/ *ना* [*गण*] वाळू किंवा गोटे यांनी आच्छादलेला समुद्रकिनारा, पुळण, पुलिन. **beach** *क्रि* [*सक*] पाण्यातून नाव किनाऱ्यावर आणणे. **'beach-ball** *ना* [*गण*] समुद्रकिनाऱ्यावर खेळण्यासाठी वापरायचा मोठा पण हलका चेंडू. **'beachhead** *ना* [*गण*] आक्रमण करणाऱ्या सैन्याने किनाऱ्यावर ठोकलेला भक्कम तळ. **'beachwear** *ना*

[*अगण*] उन्हात पहुडण्यासाठी, पोहण्यासाठी वगैरे वापरायचे कपडे.

beacon /'बीकन्/ *ना* [*गण*] संदेश देण्यासाठी किंवा धोक्याची सूचना देण्यासाठी वापरण्यात येणारा दिवा किंवा जाळ.

bead /बीड्/ *ना* १ (क) [*गण*] माळेत ओवण्यासाठी भोक असलेली, काच, प्लॅस्टिक वगैरेची गोल गोटी, मणी. (ख) **beads** [*ब.व*] मण्यांची माळ. २ [*गण*] द्रवपदार्थाचा थेंब, बिंदू : *~s of sweat, घामाचे थेंब, घर्मबिंदू, स्वेदबिंदू.*

beady /'बीडि/ *वि* (-ier, -iest) (डोळ्यांबाबत) छोटे व चमकदार.

beak /बीक्/ *ना* [*गण*] पक्ष्याच्या तोंडाचा टणक भाग, चोच, चंचू.

beaker /'बीक(र्)/ *ना* [*गण*] १ उंच अरुंद तोंडाचा मद्याचा प्याला, पडघीचा पेला. २ रसायनशास्त्रात वापरायचे एक काचेचे भांडे, चंचुपात्र.

beam /बीम्/ *ना* [*गण*] १ इमारतीच्या काही भागाचे वजन पेलण्यासाठी वापरण्यात येणारी धातूची किंवा लाकडाची मोठी दांडी, तुळई. २ सूर्य, मशाल वगैरेपासूनची प्रकाशरेषा, किरण, शलाका. ३ चेहऱ्यावरचे प्रसन्न स्मित किंवा डोळ्यातील चमक. ४ वायुवाहनाला (विमान वगैरे) मार्गदर्शन करणारा रेडिओ संदेश किंवा सांवाहिक संदेश. **beam** *क्रि* १ [*अक*] (सूर्य वगैरे बाबत) प्रकाश आणि उष्णता देणे किंवा उत्सर्जन करणे. २ [*अक*] (*ला*) आनंदाने स्मितहास्य करणे, चेहरा टवटवणे. ३ [*सक*] रेडिओ लहरींच्या द्वारे विशिष्ट दिशेला संदेश पाठवणे.

bean /बीन्/ *ना* [*गण*] १ अन्न म्हणून वापरण्यात येणारी शेंगेतील बी, त्याचे झाड : *'soya ~s, सोयाबीन* ○ *'coffee ~s, कॉफीच्या बिया.* २ (*वाक्प्र*) **full of 'beans** (*अनौप*) भरपूर उत्साह किंवा अंगात रग असणारा, जोमदार; जिवंत, रसरशीत.

bear^1 /बेअ(र्)/ *ना* [*गण*] एक मोठा वजनदार केसाळ प्राणी, अस्वल, भालू.

bear^2 /बेअ(र्)/ *क्रि* (*भूत* **bore** /बॉऽ(र्)/ *भूत वि* **borne** /बॉऽन्/) १ [*सक*] (*औप*) नेणे, वाहून नेणे. २ [*सक*] आधार देणे, पेलणे : *The ice is too thin to ~ your weight, तुझं वजन पेलण्याइतका बर्फाचा थर जाड नाही, बर्फाचं आवरण इतकं पातळ आहे की त्याला तुझं वजन पेलवणार नाही.* ३ [*सक*] असणे, दाखवणे, दिसणे : *The letter bore her signature, पत्राखाली तिची सही होती, पत्रावर तिची सही दिसत होती.* ४ [*सक*] असुखकर गोष्ट स्वीकारणे, सहन करणे : *~ pain without complaining, वेदना/दुःख निमूटपणे सहन करणे.* ५ [*सक*] (झाडाला फुले, फळे वगैरे) येणे, धारण करणे. ६ [*सक*] (*औप*) जन्म देणे : *~ a child, मुलाला जन्म देणे.* ७ [*सक*] (*औप*) मनात (विशिष्ट भावना) असणे, बाळगणे, घर करणे : *I ~ them no resentment, माझ्या मनात त्यांच्याविषयी तिरस्कार नाही.* ८ [*अक*] एखाद्या दिशेला किंचित् वळणे : *The road ~s left, रस्ता किंचित् डावीकडे वळतो.* ९ [*सक*] योग्यतेचे असणे, टिकाव धरणे, निभाव लागणे : *The plan will not ~ close examination, काटेकोर परीक्षेत या योजनेचा निभाव लागणार नाही, काटेकोरपणे परिशीलन केल्यास ही योजना टिकाव धरणार नाही.* १० (*वाक्प्र*) **bear the 'brunt of sth** एखाद्या गोष्टीचा तडाखा किंवा मुख्य प्रहार झेलणे, झळ सोसणे : *~ the brunt of an attack/sb's anger, हल्ल्याचा मुख्य फटका बसणे, एखाद्याच्या रागाची अधिकाधिक झळ सोसणे.* **bear sth in mind** ⇨ MIND^1. **bear witness to sth** (*औप*) एखाद्या गोष्टीचे चिन्ह किंवा तिचा पुरावा असणे. **bring sth to bear** एखादी गोष्ट वापरणे किंवा तिला दिशा देणे : *bring pressure to ~ on him to change his mind, त्याच्यावर दबाव आणून त्याचे मन बदलायला लावणे, दबावाचा वापर करून त्याचे मन बदलणे.* **can't bear sb/sth** एखादी गोष्ट किंवा व्यक्ती अजिबात न आवडणे, तिचा तिरस्कार करणे, उबग येणे. ११ (*क्रिब*) **bear 'down on sb/sth** एखाद्यावर चालून येणे, दिशेने पुढे सरसावणे, जलद गतीने आणि भिववत जाणे. **bear sb/sth 'out** एखाद्या गोष्टीला/व्यक्तीला पुष्टी देणे, त्याची खात्री करणे, पाठिंबा देणे, सिद्ध होणे. **bear 'up** संकटात भक्कमपणे उभे राहणे, संकटकाळी अविचल राहणे, संकटाला न घाबरता तोंड देणे.

'bear with sb एखाद्याला शांतपणे सहन करणे, त्याबाबत सहनशील असणे. **bearable** *वि* सोसण्यासारखे, सहन करण्याजोगे.

beard /बिअड्/ *ना* [*गण*] पुरुषाच्या गालावर आणि हनुवटीवर वाढणारे केस, दाढी. **bearded** *वि* दाढीवाला.

bearer /'बेअर(र्)/ *ना* [*गण*] १ पत्र किंवा निरोप आणणारा माणूस, निरोप्या. २ शवपेटी वाहून नेणारा माणूस, खांदेकरी. ३ वठवण्यासाठी चेक घेऊन आलेला, चेकधारक.

bearing /'बेअरिङ्/ *ना* १ [*अे.व*] (*औप*) उभं राहण्याची लकब किंवा वागण्याची तऱ्हा, रुबाब, ढंग. २ [*अगण*] प्रस्तुतता; संबंध: *That has no ~ on the subject, या विषयाशी त्याचा काहीही संबंध नाही, ते या विषयाबाबत अप्रस्तुत आहे.* ३ [*गण*] होकायंत्रावर दाखवलेली दिशा. ४ **bearings** [*ब.व*] स्वतःच्या (खऱ्या) स्थितीची माहिती: *get/lose one's ~s, भान सुटणे किंवा आपण कुठे आहोत याचा विसर पडणे.*

beast /बीस्ट्/ *ना* [*गण*] १ (*जुना, अप्रचलित किंवा औप*) चार पायाचा मोठा प्राणी, चतुष्पाद, जनावर, पशू. २ क्रूर, दुष्ट माणूस, पशू. **beastly** *वि* (*अनौप*) भयानक, अतिशय वाईट.

beat^{1} /बीट्/ *क्रि* (*भूत* **beat, ~en** /'बीट्न्/) १ [*सक*] पुन्हापुन्हा मारणे, विशेषतः काठीने झोडपणे, चोपणे. २ [*सक*] मारून एखाद्या गोष्टीचा आकार बदलणे: *~ metal flat, धातू ठोकून सपाट करणे.* ३ [*अक, सक*] नियमितपणे (वरखाली) होणे, ठोके पडणे, स्पंदन होणे: *His heart was still ~ing, त्याचे हृदयाचे स्पंदन अद्याप चालू होते, त्याच्या हृदयाचे अजून ठोके पडत होते.* ४ [*सक*] एकजीव करणे, तिंबणे: *~ eggs, अंडी एकजीव करणे किंवा फेसणे.* ५ [*सक*] पराभव करणे, हरवणे: *She ~ me at chess, तिने मला बुद्धिबळात हरवले.* ६ (*वाक्प्र*) **,beat about the 'bush** एखाद्या गोष्टीविषयी आडूनआडून बोलणे, पाल्हाळ लावणे. **'beat it** (*व्रात्य*) चालू लाग, चल फुट, चल हाल, कतर. **beat a re'treat** घाईने माघार घेणे, मागे जाणे. **beat 'time** नियमित हालचाली/हातवारे करून संगीताचा ताल व्यक्त करणे. **,off the ,beaten 'track** एखाद्या शांत एकांत स्थळी. ७ (*क्रिव*) **beat down** (सूर्याबाबत) प्रखरतेने तळपणे, आग ओकणे. **beat sb down** (विक्रेत्याला) किंमत कमी करायला लावणे, भाव उतरवणे. **beat sb up** एखाद्याला बेदम मारहाण करणे, बुकलणे, तुडवणे, लाथाबुक्क्या मारणे. **beat** *वि* दमलेला, थकलेला: *I'm dead ~, मी फार थकलोय.* **beaten** *वि* ठोकून तयार केलेला, तावून सुलाखून निघालेला. **beater** *ना* [*गण*] धुपाटणे. **beating** *ना* [*गण*] १ माराची शिक्षा, मारझोड, मारहाण. २ पराभव, पराजय.

beat^{2} /बीट्/ *ना* [*गण*] १ पुन्हापुन्हा दिलेल्या आघाताचा आवाज, ठेका: *the ~ of a drum, ढोलकी किंवा पडघमचा ठेका, ढोलकीचे बोल.* २ काव्य, संगीत यातील ताल. ३ पोलीस अधिकाऱ्याचा वगैरे नियमितपणे गस्त घालण्याचा किंवा पहारा देण्याचा मार्ग, गस्तीचा रस्ता.

beautician /ब्यू'टिश्न्/ *ना* [*गण*] सुंदर बनवण्याचे उपाय करणारा माणूस, सौंदर्यप्रसाधन करून देणारी व्यक्ती, सौंदर्यकार.

beautiful /'ब्यूटिफ्ल्/ *वि* मनाला किंवा इंद्रियांना आनंद देणारा, सुंदर, मनोहर. **beautifully** *क्रिवि* मनोहरपणे, इंद्रियांना आल्हादकारी, सौंदर्यपूर्णतेने. **beautify** /'ब्यूटिफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] सुंदर करणे, मनोहारी करणे.

beauty /'ब्यूटि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] सुंदर असण्याचा गुण किंवा तशी अवस्था, सौंदर्य, लावण्य. २ [*गण*] सुंदर व्यक्ती किंवा वस्तू, लोभसवाणी गोष्ट. **'beauty salon** (तसेच **'beauty parlour**) *ना* [*गण*] अधिक सुंदर दिसण्यासाठी स्त्रियांवर जेथे उपचार केले जातात ते स्थळ, सौंदर्यवर्धनालय. **'beauty spot** *ना* [*गण*] जेथून निसर्गाचे सौंदर्य दिसते ती जागा, सौंदर्यस्थळ.

beaver /'बीव्ह(र्)/ *ना* [*गण*] पाण्यात आणि जमिनीवर राहणारा आणि पाण्याच्या झऱ्यात बांध घालणारा एक केसाळ प्राणी. **beaver** *क्रि* (*क्रिव*) **beaver away** (*अनौप खास ब्रि*) कष्ट करणे, खूप श्रम घेणे.

became BECOME चा भूत.

because /बि'कॉझ्; *अमे* कॉऽझ्/ *उ अव्यय* या

कारणाने, यामुळे, म्हणून : *I did it ~ they asked me, त्यांनी मला सांगितल्यामुळे मी ते केले.* **because of** *शब्दयो* -च्या मुळे, -च्या कारणाने, -च्या करता/साठी : *He couldn't walk fast ~ of his bad leg, दुखऱ्या पायामुळे त्याला भरभर चालता आले नाही.*

beckon /'बेकन्/ *क्रि* [*अक, सक*] हात हालवून किंवा बोटाने खूण करून एखाद्याला जवळ बोलावणे.

become /बि'कम्/ *क्रि* (*भूत* **became** /बि'केइम्/, *भूत वि* **become**) (बहुधा *वि* सह वापर) १ व्हायला लागणे किंवा होणे : *They soon became angry, लवकरच ते रागावले किंवा क्रुद्ध झाले* ○ *~a doctor, डॉक्टर होणे.* २ [*सक*] (*औप*) शोभणे, युक्त असणे, साजेसे असणे, चांगले दिसणे : *That hat ~s you, ती हॅट तुला शोभते.* ३ (*वाक्‌प्र*) **what becomes of sb** एखाद्याला/एखाद्याचं काय होतंय्. **becoming** *वि* (*औप*) आकर्षक, शोभिवंत, शोभादायक.

bed^{1} /बेड्/ *ना* [*गण*] १ झोपण्यासाठी असलेला फर्निचरचा एक प्रकार, शय्या, पलंग, शेज, बिछाना. २ नदीचा किंवा समुद्राचा तळ, गव. ३ एखाद्या वस्तूखालचा सपाट पाया, बैठक. ४ झाडे वाढविण्यासाठीचा जमिनीचा भाग, वाफा, चिरा. ५ (*वाक्‌प्र*) **go to bed with sb** (*अनौप*) एखाद्या बरोबर संभोग करणे, शय्यासोबत करणे. **'bedclothes** *ना* [*ब.व*] बिछान्यावरची अंथरायची चादर, पांघरुणे वगैरे. **'bedpan** *ना* [*गण*] अंथरुणात पडून असणाऱ्या रुग्णाने शौचासाठी वापरायचे भांडे, परसाकडचे भांडे, रोग्याचे मलपात्र. **'bedridden** *वि* अंथरुणावरून उठू न शकणारा रुग्ण, अंथरुणाला खिळलेला. **'bedroom** *ना* [*गण*] झोपायची खोली, शयनगृह. **'bedside** *ना* [*ए.व*] बिछान्याची कड, अंथरुणाशेजारची जागा. **,bed'sitter** (तसेच **'bedsit**) *ना* [*गण*] उठण्याबसण्याची आणि झोपायची अशी एकच खोली, बैठकीची आणि निजायची खोली. **'bedspread** *ना* [*गण*] बिछान्यावर घालायची शोभेची चादर, झोपण्यासाठी बिछान्याचा वापर करायचा नसेल तेव्हा बिछान्यावर घातलेली चादर, पलंगपोस. **'bedstead** *ना* [*गण*] बिछान्यावरची गादी वगैरे आणि स्प्रिंग्ज यांना आधार देणारी चौकट, पलंग, मंचक, खाट, बाज, ज्याच्यावर अंथरुण घालायचे ती चौपाई. **'bedtime** *ना* [*अगण*] झोपी जाण्याची वेळ, निजायची वेळ.

bed^{2} /बेड्/ *क्रि* (**-dd-**) [*सक*] १ गच्च बसवणे, पक्के/घट्ट बसवणे : *The bricks are ~ded in the concrete, काँक्रीटमधे विटा घट्ट बसवल्या आहेत.* २ रोप लावणे. ३ (*अनौप*) संभोग करणे, जुगणे. ४ (*क्रिब*) **'bed down** रात्रीचा आसरा घेणे, (नेहमीच्या जागी नसताना कशीबशी) रात्र काढणे, तात्पुरती झोपायची सोय करणे. **bed sb down** एखाद्याला रात्रीचा आसरा देणे, एखाद्याला झोपायला ठेऊन घेणे, झोपवणे. **bedding** *ना* [*अगण*] अंथरुण-पांघरुण, बिस्तर.

bedevil /बि'डेव्ह्ल्/ *क्रि* (**-ll-**; *अमे* **-l-**) [*सक*] (*औप*) एखाद्याला खूप त्रास देणे, सतावणे, छळणे, हैराण करणे.

bedlam /'बेड्लम्/ *ना* [*अगण*] प्रचंड गोंधळ, गोंगाट आणि गोंधळ.

bedraggled /बि'ड्रॅग्ल्ड्/ *वि* ओला किंवा मळल्याने गबाळा दिसणारा, भिजल्याने किंवा घाण झाल्याने बिघडलेला किंवा विस्कटलेला.

bee /बी/ *ना* [*गण*] १ चावणारा आणि मध गोळा करणारा कीटक, मधमाशी, मधुमक्षिका. २ (*वाक्‌प्र*) **have a 'bee in one's bonnet** एखाद्या गोष्टीचा सतत विचार करणे किंवा तिची सतत चिंता करणे. **make a beeline for sth/sb** /'बीलाइन्/ एखाद्या व्यक्तीकडे किंवा गोष्टीकडे तडक जाणे, थेट जाणे. **'beehive** *ना* [*गण*] मधमाश्या पाळण्याची पेटी, मधुमक्षिकापेटी.

beech /बीच्/ *ना* [*गण*] मऊ सालीचे, चमकणाऱ्या पानांचे आणि कठीण कवचाची छोटी फळे येणारे एक झाड.

beef /बीफ्/ *ना* [*अगण*] गाय, बैल, खोंड यांचे मांस. **beef** *क्रि* [*अक*] (*ग्राम्य*) तक्रार करणे, भुणभुण करणे. **'beefsteak** *ना* [*अगण*] गोमांसाचा मोठा तुकडा. **beefy** *वि* (**-ier, -iest**) बलदंड, दणकट आणि गुबगुबीत.

been BE चे *भूत वि.*

beer /बिअ(र्)/ *ना* [*अगण, गण*] सातूपासून केलेले आणि हॉपच्या फुलांचा वास असलेले

एक मद्य, यवसुरा. **beery** *वि* बिअरचे किंवा बिअरसारखे.

beet /बीट्/ *ना* [*अगण, गण*] १ अन्नसंचय करणारे मूळ असलेली (आणि या मुळांचा वापर अन्न म्हणून किंवा साखर करण्यासाठी होतो) अशी एक वनस्पती, चुकुंदर. २ (*अमे*) बीटचा कंद. **'beetroot** *ना* [*अगण, गण*] बीटचा तांबडा कांदा – याचा अन्नात वापर करतात.

beetle /बीट्ल्/ *ना* [*गण*] टणक पंख असलेला एक किडा, भुंगा.

befall /बि'फॉऽल्/ *क्रि* (*भूत* **befell** /बि'फेल्/, *भूत वि* **~en** /बि'फॉऽलन्/) [*अक, सक*] (*पुरा*) (एखाद्यावर प्रसंग) ओढवणे, गुदरणे.

befit /बि'फिट्/ *क्रि* (**-tt-**) [*सक*] (*औप*) सोयीचे किंवा युक्त असणे, शोभणे, साजेलसे होणे. **befitting** *वि* साजेलसा, शोभेलसा; योग्य, चपखल.

before /बि'फॉऽ(र्)/ *शब्दयो* १ -च्या पूर्वी, आधी, तत्पूर्वी : *the day ~ yesterday, कालच्या आधीचा दिवस, परवा.* २ -च्या पुढे; -च्या आधी/पूर्वी : *B comes ~ C in the alphabet, वर्णमालेत C च्या आधी B येतो.* **before** *क्रिवि* (कालाबाबत) आधी, पूर्वी; आधीच, केव्हाच : *I have seen that film ~, मी तो चित्रपट आधीच पाहिलाय्.* **before** *उ अव्यय* आधी, पूर्वी : *Do it ~ you forget, विसरण्यापूर्वी तू ते कर.*

beforehand /बि'फॉऽहॅन्ड्/ *क्रिवि* आगाऊ; आधी, पूर्वी.

befriend /बि'फ्रेन्ड्/ *क्रि* [*सक*] एखाद्याची मैत्री करणे, दोस्ती करणे.

beg /बेग्/ *क्रि* (**-gg-**) १ [*अक, सक*] (*for*)// (अन्न, पैसा वगैरे) मागणे, भीक मागणे. २ [*अक, सक*] कळकळीने विनंती करणे, आर्जव करणे, याचना करणे : *I ~ you to stay, तू थांबावस अशी मी तुला कळकळीची विनंती करतो.* ३ (*वाक्प्र*) **I beg to differ** मी सहमत नाही, मला नाही तसं वाटत. **go 'begging** (वस्तूंबाबत) कुणाला नको असणे, कुणी गिऱ्हाईक नसणे. **I beg your pardon** (क) कृपया परत सांगा, पुन्हा म्हणा. (ख) मी दिलगीर आहे, मला खेद वाटतो; माफ करा.

beggar /'बेग(र्)/ *ना* [*गण*] भीक मागून राहणारा माणूस, भिकारी, याचक.

begin /बि'गिन्/ *क्रि* (**-nn-**, *भूत* **began** /बि'गॅन्/, *भूत वि* **begun** /बि'गन्/) १ [*अक, सक*] सुरू होणे, सुरुवात करणे, प्रारंभ करणे, -आयला लागणे : *~ to read a new book, नवीन पुस्तक वाचायला सुरुवात करणे* ○ *The film ~s at ten, चित्रपट दहाला सुरू होतो* ○ *~ to feel ill, बरं न वाटणे, कसंतरी वाटायला लागणे.* २ '(*वाक्प्र*) **to begin with** सुरुवातीला; प्रथमतः, पहिली गोष्ट म्हणजे. **beginner** *ना* [*गण*] एखादी गोष्ट नुकतीच शिकायला लागलेला माणूस, नवशिका. **beginning** *ना* [*गण, अगण*] प्रारंभ, सुरुवात, आरंभ बिंदू.

begrudge /बि'ग्रेज्/ *क्रि* [*सक*] हेवा किंवा मत्सर वाटणे, तिरस्कार वाटणे : *I do not ~ them their success, मला त्यांच्या यशाचा हेवा वाटत नाही.*

behalf /बि'हाफ्; *अमे* बि'हॅफ्/ *ना* (*वाक्प्र*) **on behalf of sb** एखाद्याचा प्रतिनिधी म्हणून, एखाद्याच्या वतीने : *I'm speaking on Ann's ~, मी ॲनच्या वतीने बोलतोय्.*

behave /बि'हेइव्ह्/ *क्रि* १ [*अक*] विशिष्ट रीतीने वागणे : *~ well, नीट/चांगले वागणे.* २ **~ oneself** चांगले वर्तन किंवा चांगली वागणूक दाखविणे, नीट वागणे, रीतभात असणे. **behaviour** (*अमे* **-ior**) *ना* [*अगण*] वागण्याची रीत, वागणूक, वर्तन.

behead /बि'हेड्/ *क्रि* [*सक*] शिरकाण किंवा शिरच्छेद करणे, डोके उडवणे.

behind^{1} /बि'हाइन्ड्/ *शब्दयो* १ पाठीमागे, पाठी, मागे, माघारी : *Hide ~ the tree, झाडामागे लप.* २ मागे असणे, कमी प्रगती असणे : *He's ~ the rest of the class, तो वर्गाच्या मागे आहे.* ३ -च्या बाजूने; -च्या मागे (पाठिंबादर्शक). ४ (-मागचे) कारण असणे; जबाबदार असणे : *What's ~ the smart suit, then? या छानछोकीच्या पोशाखामागचे मग कारण काय?* **behind** *क्रिवि* १ एखाद्या व्यक्तीच्या किंवा गोष्टीच्या मागे किंवा मागच्या बाजूस, मागोमाग : *The children followed ~ their parents, मुले त्यांच्या आई-वडलांच्या*

मागोमाग गेली. २ इतर सर्व गेल्यावर मागे उरलेले किंवा राहिलेले, शिल्लक : *stay ~ after school, शाळा सुटल्यावर मागे थांबणे.* ३ (*in/with*)// विशिष्ट मुदतीत पैसे परत करण्यात किंवा काम पूर्ण करण्यात मागे : *be ~ with the rent, भाडे देण्यात मागे असणे, वेळेवर भाडे न देणे.*

behind^2 /बि'हाइन्ड्/ *ना* [*गण*] (*अनौप पर्या*) ढुंगण, पार्श्वभाग.

behindhand /बि'हाइन्ड्हॅन्ड्/ *क्रिवि* उशिरा, उशीर, विलंबाने : *be ~ with one's work, कामात उशीर होणे, विलंबाने काम करणे.*

beige /बेइझ्/ *वि, ना* [*अगण*] फिकट पिवळसर तपकिरी (रंगाचा), पिंगट.

being^1 BE चे *वर्तमानकाळवाचक विशेषण.*

being^2 /'बीइङ्/ *ना* १ [*अगण*] अस्तित्व : *The society came into ~ in 1990, ही संस्था १९९० मधे अस्तित्वात आली म्हणजे तिची स्थापना झाली.* २ [*गण*] जिवंत प्राणी, प्राणिमात्र, जीवजंतू : *human ~s, मनुष्य प्राणी.*

belated /बि'लेइटिड्/ *वि* खूप उशिराने येणारे, विलंबित. **belatedly** *क्रिवि* उशिराने, दिरंगाईने.

belch /बेल्च्/ *क्रि* १ [*अक*] पोटातील वायू मोठा आवाज काढून तोंडावाटे बाहेर काढणे, ढेकर देणे. २ [*सक*] (धूर वगैरे) मोठ्या प्रमाणात बाहेर टाकणे, (धूर) ओकणे. **belch** *ना* [*गण*] ढेकर.

belfry /'बेल्फ्रि/ *ना* [*गण*] (*ब.व* -ies) घंटा बांधलेला मनोरा, घंटागृह, घंटाघुमट.

belief /बि'लीफ्/ *ना* १ [*अगण*] एखादी गोष्ट किंवा व्यक्ती प्रत्यक्षात आहे, खरी आहे आणि विश्वासार्ह आहे अशी भावना, विश्वास : *~ in her honesty, तिच्या प्रामाणिकपणावरील विश्वास.* २ [*गण*] एखादी गोष्ट सत्य आहे असे मानणे, समजूत, श्रद्धा : *religious ~s, धार्मिक श्रद्धा.*

believe /बि'लीव्ह्/ *क्रि* १ [*सक*] एखाद्या गोष्टीच्या सत्यतेची खात्री असणे. २ [*सक*] समजणे, धरून चालणे. ३ [*अक*] धार्मिक श्रद्धा असणे. ४ (*क्रिब*) **believe in sb/sth** (क) एखादी वस्तू किंवा व्यक्ती अस्तित्वात असण्याची खात्री असणे. (ख) एखाद्या गोष्टीच्या मौलिकतेची/महत्त्वाची खात्री असणे, त्यावर विश्वास असणे : *He ~s in getting plenty of exercise, भरपूर व्यायाम करण्यावर त्याचा विश्वास आहे.* **believable** *वि* विश्वासार्ह, खरे मानण्याजोगे. **believer** *ना* [*गण*] श्रद्धाळू.

belittle /बि'लिट्ल्/ *क्रि* [*सक*] एखादी गोष्ट किरकोळ आहे असे वाटायला लावणे, एखाद्याचे महत्त्व कमी करणे, कमी किंवा हीन लेखणे : *Don't ~ your achievements, स्वतःची कामगिरी कमी लेखू नकोस.*

bell /बेल्/ *ना* [*गण*] १ (क) वाजवल्यानंतर घणाणणारी घुमटाकार अशी धातूची वस्तू, घंटा. (ख) घणघण करणारे दारावरच्या घंटेसारखे कोणतेही उपकरण. २ घंटेच्या आकाराची वस्तू. **'bellpush** *ना* [*गण*] विद्युत्‌घंटा वाजवण्यासाठी ओढावयाची किंवा दाबायची कळ, घंटेचे बटण.

belligerent /बि'लिजरन्ट्/ *वि* वाद घालण्यास किंवा मारामारी करण्यास उत्सुक, भांडखोर, युद्धपिपासू.

bellow /'बेलउ/ *क्रि* [*अक, सक*] मोठ्याने ओरडणे, शंख करणे, गर्जना करणे.

bellows /'बेलउझ्/ *ना* [*ब.व*] (जाळाला वगैरे) वारा घालण्यासाठी वापरायचे उपकरण, भाता.

belly /'बेलि/ *ना* [*गण*] (*ब.व* -ies) १ (क) छातीखालचा जठर आणि आतडी असणारा भाग, उदर. (ख) पोट, दोंद. २ एखाद्या गोष्टीचा पुढे आलेला गोलाकार भाग. **'bellyache** *ना* [*गण, अगण*] (*अनौप*) पोटदुखी. **'bellyache** *क्रि* [*अक*] (*अनौप*) सतत तक्रार करणे, भुणभुण करणे, कुरकुर करणे. **'bellyful** *ना* [*गण*] (*अनौप*) पुरेसा, हवा तेवढा; जादा, चिकार : *I've had a ~ful of your noise, खूप झाला तुझा गोंगाट, तुझी दंगामस्ती आता बस झाली.*

belong /बि'लॉङ्; *अमे* -लॉऽङ्/ *क्रि* [*अक*] १ *to*// मालकीचे असणे, स्वतःचे असणे : *These books ~ to me, ही पुस्तके माझी आहेत.* २ *to*// सभासद असणे : *~ to a club, मंडळाचा सभासद असणे.* ३ योग्य जागा असणे, जागच्या असणे : *The plates ~ in this* *cupboard, या ताटल्या/प्लेटस् या कपाटातल्या आहेत.* **belongings** *ना* [*ब.व*] वैयक्तिक मालकीच्या वस्तू.

beloved *वि* १ /बि'लैव्ह्ड्/ अति प्रिय : *He was ~ by all who knew him, ज्यांना तो माहित होता त्या सर्वांना तो फार प्रिय होता.* २ /बि'लैव्हिड्/ अति प्रिय, जिवलग : *my ~ husband, माझा प्रिय नवरा.* **beloved** /बि'लव्हिड्/ *ना* [*गण*] खूप प्रिय व्यक्ती, प्रियकर/प्रेयसी.

below /बि'लउ/ *शब्दयो, क्रिवि* खालच्या बाजूला, खाली : *We saw the sea ~ us, आम्हाला खाली समुद्र दिसला* ○ *The temperature was ~ freezing point, तापमान गोठणबिंदूच्या खाली होते* ○ *For details, see ~, तपशिलासाठी खाली पहा.*

belt /बेल्ट्/ *ना* [*गण*] १ कमरेभोवती बांधायची पट्टी, कमरपट्टा. २ मशीनमधील फिरणारा किंवा वस्तू वाहून नेणारा धातूचा गोलाकार पट्टा. ३ विशिष्ट गुणविशेष असलेले क्षेत्र, कटिबंध, वलय; झोन, परिमंडळ, प्रदेश : *the copper ~, तांब्याचा प्रदेश.* ४ (*वाक्प्र*) **below the belt** (*अनौप*) गैर, अन्याय्य, विषम. **belt** *क्रि* १ [*सक*] पट्ट्याने बांधणे, पट्टा बांधणे. २ [*सक*] (*अनौप*) मारणे, ठोक देणे, चोप देणे. ३ [*अक*] (*अनौप*) जलद जाणे, भरभर जाणे : *~ing along the road, रस्त्याने भरभर जाणे.* ४ (*क्रिब*) **belt up** (*व्रात्य*) गप्प बसणे, चूप बसणे, तोंड बंद करणे. **belting** *ना* [*गण*] (*अनौप*) मारहाण, बडवाबडवी, धुलाई.

bemoan /बि'मउन्/ *क्रि* [*सक*] (*औप*) दुःख करणे, शोक करणे.

bench /बेइन्च्/ *ना* १ [*गण*] लंबुळके आसन, बाक. २ [*गण*] काम करण्याचे लंबुळके टेबल. ३ **the bench** [*अे.व*] (क) न्यायाधीशाची बसायची जागा, न्यायासन. (ख) [तसेच ब.व क्रियापदासह अे.व] न्यायाधीशांचा गट, न्यायमंडळ.

bend /बेन्ड्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **bent** /बेन्ट्/) १ [*अक, सक*] वळण देणे किंवा सरळ न होणे, वाकणे, वाकवणे, बाक देणे : *~ the wire, वायर वाकवणे.* २ [*अक, सक*] खाली वाकणे किंवा वाकवणे, कमरेत वाकणे : *B~ down and touch your toes, खाली वाक आणि अंगठे धर.* ३ (*वाक्प्र*) **be bent on (doing) sth** एखादी गोष्ट करण्याचा निश्चय करणे, हट्टास पेटणे. **bend over backwards** आटोकाट प्रयत्न करणे, शर्थ करणे. **bend** *ना* १ [*गण*] वळण, मोड, वाकण : *a ~ in the road, रस्त्याचे वळण.* २ **the bends** [*ब.व*] समुद्राच्या तळापासून झटकन वर आल्यास पाणबुड्यांना होणाऱ्या वेदना. ३ (*वाक्प्र*) **round the bend** (*अनौप*) वेडा, खुळचट.

beneath /बि'नीथ्/ *शब्दयो, क्रिवि* (*औप*) १ खाली. २ कमीपणाचे, खालच्या दर्जाचे : *~ contempt, तिरस्काराच्याही लायकीचा नसलेला, तिरस्कारापेक्षाही खालचा.*

benediction /,बेनि'डिक्शन्/ *ना* [*गण, अगण*] धार्मिक भावनेचा आशीर्वाद, दुवा.

benefactor /'बेनिफॅक्ट(र्)/ *ना* [*गण*] पैसे वगैरे देणारा, दाता, उपकारकर्ता. **benefactress** /-फॅक्ट्रिस्/ *ना* [*गण*] दाती, उपकारकर्ती.

beneficial /,बेनि'फिश्ल्/ *वि* शुभकारक, लाभदायक, हितकारक; उपयोगी, उपयुक्त, फायद्याचा.

beneficiary /,बेनि'फिशरि; *अमे* -फिशिअेरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) एखाद्या इच्छापत्रानुसार पैसे वगैरेसारख्या गोष्टी ज्या माणसाला मिळतात तो, हिताधिकारी.

benefit /'बेनिफिट्/ *ना* १ (क) [*अे.व, अगण*] फायदा, लाभ : *have the ~ of a good education, चांगल्या शिक्षणाचा फायदा असणे.* (ख) [*गण*] फायद्याची गोष्ट : *the ~s of modern medicine, आधुनिक वैद्यकशास्त्रापासून मिळणारे फायदे.* २ [*अगण, गण*] गरीब, आजारी वगैरे लोकांना शासनाने दिलेली आर्थिक मदत : *sickness ~, आजारपणातील आर्थिक साहाय्य.* ३ (*वाक्प्र*) **for sb's benefit** एखाद्याच्या मदतीसाठी. **give somebody the ,benefit of the 'doubt** विरुद्ध बाजूचा स्पष्ट पुरावा नसल्याने एखाद्याची बाजू बरोबर आहे असे मानणे, संशयाचा फायदा देणे. **benefit** *क्रि* १ [*सक*] कल्याण करणे, उपकारक ठरणे. २ [*अक*]

फायदा मिळणे, लाभ होणे.

benevolent /बि'नेव्हलन्ट्/ *वि* दयाळू, कृपाळू, उपकारी. **benevolence** /-लन्स्/ *ना* [*अगण*] परोपकारबुद्धी, जनहितदृष्टी.

benign /बि'नाइन्/ *वि* १ दयाळू आणि सज्जन (माणूस). २ (रोगाबाबत) फार गंभीर नसलेला, सौम्य.

bent^{1} BEND चा *भूत.*

bent^{2} /बेन्ट्/ *ना* [*गण,* बहुधा *अे.व*] नैसर्गिक कौशल्य, उपजत कला, दैवी देणगी : *a ~ for languages, भाषा शिकण्याची उपजत कला.*

bent^{3} /बेन्ट्/ *वि* (*व्रात्य* खास *ब्रि*) १ अप्रामाणिक. २ समलिंगी आकर्षण असणारा.

bequeath /बि'क्वीद्/ *क्रि* [सक] (*औप*) मरणानंतर (मालमत्ता वगैरे) एखाद्याला देणे, वारसा ठरवणे. **bequest** /बि'क्वेस्ट्/ *ना* [*गण*] (*औप*) मृत्युपत्रानुसार मिळालेली मालमत्ता, वारसापत्रानुसार आलेली संपत्ती.

berate /बि'रेइट्/ *क्रि* [सक] (*औप*) दम देणे, कानउघाडणी करणे, खरडपट्टी काढणे.

bereaved /बि'रीव्ह्ड्/ *वि* (*औप*) नातेवाईक किंवा मित्र यांच्या मृत्यूने दुरावलेला, मृत्यूने झालेला वियोग भोगणारा. **bereavement** /बि'रीव्ह्मन्ट्/ *ना* [*अगण, गण*] मरणाने केलेली ताटातूट, वियोग.

bereft /बि'रेफ्ट्/ *वि of//* (*औप*) एखाद्या गोष्टीचा संपूर्ण अभाव असलेला, हीन, विना, एखादी गोष्ट नसलेला : ~ *of all hope, कोणतीही आशा नसलेला, पूर्णपणे निराश.*

beret /'बेरेइ *अमे* ब'रेइ/ *ना* [*गण*] गोलाकार मऊ चपटी, काठ नसलेली टोपी.

berry /'बेरि/ *ना* [*गण*] (*ब.व* -ies) बारीक बी असलेले एक छोटे, मऊ फळ, अनष्ठिल : *black~, गौरीफळ ○ mulberry, तुती.*

berserk /ब'झऽक्/ *वि* (*वाक्प्र*) **go berserk** अतिशय रागावणे, रागाने बेभान होणे.

berth /बऽथ्/ *ना* [*गण*] १ जहाज, आगगाडी वगैरेत झोपायची जागा, शायिका. २ बंदरातील जहाजे नांगरण्याची जागा. **berth** *क्रि* [*अक, सक*] (जहाज) नांगरणे, किनाऱ्याला स्थिर करणे.

beseech /बि'सीच्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **besought** /बि'सॉऽट्/ तसेच ~ed) [सक] (*औप*) मनधरणी करणे, पाय धरणे, दादापुता करणे.

beset /बि'सेट्/ *क्रि* (-tt-, *भूत, भूत वि* **beset**) [सक] (*औप*) (बहुधा कर्मणी) पुन्हा पुन्हा उपद्रव देणे, सतत त्रास देणे, भंडावणे, घेरणे : ~ *by problems, अनेक प्रश्नांनी भंडावलेला, समस्यांनी घेरलेला.*

beside /बि'साइड्/ *शब्दयो* १ -च्या बाजूला, -च्या जवळ, -च्या पाशी : *Sit ~ me, माझ्यापाशी/मजजवळ बैस.* २ (*वाक्प्र*) **be'side oneself** स्वतःवरचा ताबा सुटलेला; कमालीचा रागावलेला वगैरे, रागाने वगैरे बेभान, धुंद.

besides /बि'साइड्झ्/ *शब्दयो* -च्या शिवाय, -च्या खेरीज. **besides** *क्रिवि* शिवाय, या खेरीज अधिक; तसेच, तद्वत, त्याचप्रमाणे.

besiege /बि'सीज्/ *क्रि* [सक] (एखाद्या स्थळाला) सैन्याने वेढा देणे, गराडा घालणे, घेरा घालणे : (*ला*) *The Prime Minister was ~d by reporters, पंतप्रधानांना वार्ताहरांनी वेढा घातला.*

bespoke /बि'स्पउक्/ *वि* (कपड्यांबाबत) गिऱ्हाइकाच्या मापात बेतलेला किंवा तयार केलेला.

best^{1} /बेस्ट्/ *वि* १ GOOD^{1} ची *उच्चतमभावदर्शक श्रेणी* सर्वोत्तम प्रकारचा, सर्वोत्कृष्ट : *the ~ dinner I've ever tasted, मी घेतलेले सर्वोत्कृष्ट भोजन.* २ WELL^{2} ची *उच्चतमभावदर्शक श्रेणी* सर्वोत्तम प्रकृतीचा, सर्वोत्कृष्ट परिस्थितीचा : *She is very ill but always feels ~ in the morning, ती खूप आजारी आहे पण तिला सकाळी सर्वात छान वाटते.* ,**best 'man** *ना* [*गण*] लग्नात नवरदेवाबरोबर असणारा, करवला.

best^{2} /बेस्ट्/ *क्रिवि* WELL^{3} ची *उच्चतमभावदर्शक श्रेणी* १ सर्वोत्कृष्ट पद्धतीने : *He works ~ in the mornings, सकाळी त्याचं काम उत्कृष्ट होतं.* २ सर्वाधिक (श्रेणीने); सर्वात जास्त : *I enjoyed her first book ~, मला तिचे पहिले पुस्तक सर्वात जास्त आवडले.* ३ (*वाक्प्र*) **as ,best one 'can** शक्य तितक्या चांगल्या प्रकारे. ,**best'seller** *ना* [*गण*] खूप

खपणारे पुस्तक वगैरे.

best^{3} /बेस्ट्/ *ना* [*अे.व*] १ जे सर्वोत्कृष्ट आहे ते : *want the ~ for one's children, स्वतःच्या मुलांसाठी सर्वोत्कृष्ट असे हवे असणे.* २ सर्वोत्कृष्ट प्रयत्न, पराकाष्ठा, शिकस्त : *do one's ~, पराकाष्ठा करणे, प्रयत्नांची शिकस्त करणे.* ३ (*वाक्प्र*) **all the 'best** (*अनौप*) (निरोप घेताना वापर) तुझे सर्व काही चांगले होईल अशी आशा करतो, सर्व ठीक होवो. **at 'best** अगदी सर्व गोष्टी अनुकूल समजून विचार केला तर. **at its/one's best** सर्वोत्कृष्ट स्थितीमधे किंवा रूपात. **the best of both worlds** दोन वेगळ्या किंवा विभिन्न कार्यांचा फायदा, दोन्हीकडचे फायदे. **make the best of sth** (कठीण किंवा प्रतिकूल परिस्थितीत) होईल तेवढा चांगला प्रयत्न करणे, शक्य तेवढा उत्तम प्रयत्न करणे.

bestial /'बेस्टिअल्; *अमे* 'बेस्चल्/ *वि* अति क्रूर, दुष्ट, पाशवी. **bestiality** /,बेस्टि'ॲलटि; *अमे* बेस्चि-/ *ना* [*अगण*] क्रौर्य, दुष्टपणा, पाशवीपणा.

bestow /बि'स्टउ/ *क्रि* [*सक*] (*औप*) देणे, प्रदान करणे : *They ~ed an honour on her, त्यांनी तिला बहुमान प्रदान केला.*

bet /बेट्/ *क्रि* (**-tt-**, *भूत, भूत वि* **bet** किंवा **betted**) [*अक, सक*] १ रेसवर किंवा कोणत्याही अनिश्चित गोष्टीवर पैसे लावणे, पैज मारणे. २ (*अनौप*) खात्री असणे : *I ~ they'll come late, ते उशिरा येतील याची मला खात्री आहे; आपली पैज, ते उशिरा येतील.* **bet** *ना* [*गण*] (क) एखाद्या भविष्यातील गोष्टीवर पैसे लावायची व्यवस्था, पैज. (ख) अशा तऱ्हेने लावलेले पैसे. **better** *ना* [*गण*] पैज लावणारा.

betray /बि'ट्रेइ/ *क्रि* [*सक*] १ (एखाद्याला फसवून) पकडून देणे; विश्वासघात करणे, बेइमानी करणे, गद्दारी करणे. २ गुप्त गोष्ट सांगणे, बाहेर फोडणे. ३ अहेतुकपणे दाखवणे, अभावितपणे दर्शविणे : *His face ~ed his guilt, त्याचा चेहराच त्याचा अपराध दाखवत होता, त्याच्या चेहऱ्यावरच त्याचा अपराध दिसत होता.* **betrayal** /बि'ट्रेइ·अल्/ *ना* [*गण, अगण*] विश्वासघात, बेइमानी, गद्दारी. **betrayer** *ना* [*गण*] विश्वासघातकी, गद्दार.

betrothed /बि'ट्रउद्ड्/ *वि* (*औप*) वाग्विवाहित, वाग्दत्त.

better^{1} /'बेट(र्)/ *वि* १ GOOD^{1} ची *तरभावदर्शक श्रेणी* अधिक चांगल्या प्रतीचा : *~ weather than yesterday, कालच्या पेक्षा चांगली हवा.* २ WELL^{2} ची *तरभावदर्शक श्रेणी* एखाद्या आजारातून बरा झालेला किंवा सुधारलेला किंवा उठलेला : *She has been much ~ since her operation, शस्त्रक्रियेनंतर आता ती खूप सुधारली आहे.* ३ (*वाक्प्र*) **one's better 'half** (*अनौप गंमत*) एखाद्याची बायको/एखादीचा नवरा, अर्धांगी.

better^{2} /'बेट(र्)/ *क्रिवि* WELL^{3} ची *तरभावदर्शक श्रेणी* १ अधिक चांगल्या प्रकारे, जास्त चांगला : *You play tennis ~ than I do, माझ्यापेक्षा तू टेनिस जास्त चांगला खेळतोस.* २ (*वाक्प्र*) **be better 'off** अधिक चांगल्या (विशेषतः आर्थिक) परिस्थितीत असणे. **had better** अधिक शहाणपणाचे किंवा योग्य ठरेल : *You'd ~ go soon, तू लवकर जाणे शहाणपणाचे ठरेल, तू लवकर जायला पाहिजेस.* **know better (than to do sth)** एखादी गोष्ट न करण्याइतकी अक्कल असणे, न करायचे समजणे.

better^{3} /'बेट(र्)/ *ना* [*अे.व*] १ अधिक चांगले असे काही : *I expected ~ from him, त्याच्याकडून अधिक चांगल्याची माझी अपेक्षा होती.* २ (*वाक्प्र*) **get the better of sb** एखाद्यावर मात करणे, वर्चस्व मिळवणे.

better^{4} /'बेट(र्)/ *क्रि* [*सक*] १ अधिक चांगले करणे. २ सुधारणे : *~ oneself, स्वतःची सामाजिक प्रतिष्ठा सुधारणे किंवा वाढवणे.*

between /बि'ट्वीन्/ *शब्दयो* १ दोन बिंदूंमधे, दोहोंतील, दोघांच्या मधे, दरम्यान, दरम्यानच्या काळात : *Q comes ~ P and R in the alphabet, इंग्रजी वर्णमालेत Q हे अक्षर P आणि R च्या मधे येते* ○ *Children must go to school ~ 5 and 16, वयाच्या पाच ते सोळाच्या दरम्यान मुलांनी शाळेत जायला हवे.* २ (संबंध किंवा नातेदर्शक) : *fly ~ London and Paris, लंडन ते पॅरिस (च्या दरम्यान) विमानाने जाणे* ○ *the link ~ unemployment and crime, बेकारी आणि गुन्हेगारी यातील संबंध.* ३ मिळून, वाटून : *We drank a bottle* *of water ~ us, आम्ही दोघात मिळून पाण्याची एक बाटली संपवली.* ४ सहकार्याने, एकत्रित प्रयत्नाने किंवा कष्टाने: *B~ them, they collected £500, दोघांच्या कष्टाने ५०० पौंड त्यांनी जमवले.* **between** *क्रिवि* १ (तसेच **in between**) दोन बिंदूंच्या मधल्या भागात किंवा मधल्या काळात, मध्यान्तरात, मधल्या जागेत, मधल्या काळात. २ (*वाक्प्र*) **,few and far be'tween** क्वचित्, दुर्मिळ.

bevel /'बेव्ह्ल्/ *क्रि* (**-ll-**; *अमे* **-l-**) [*सक*] उतरती कडा काढणे.

beverage /'बेव्हरिज्/ *ना* [*गण*] (*औप*) पाणी सोडून इतर कोणतेही पेय.

bevy /'बेव्हि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) मोठा गट, जथा, घोळका.

beware /बि'वेअ(र्)/ *क्रि* [*अक*] (*of*)// एखाद्या धोकादायक किंवा हानिकारक वस्तू किंवा व्यक्तीपासून सावध राहणे: *B~ of the dog! कुत्र्यापासून सावध रहा.*

bewilder /बि'विल्ड(र्)/ *क्रि* [*सक*] गोंधळविणे, भांबावणे, गोंधळात टाकणे: *~ed by the noise and lights, उजेड आणि आवाजाने गोंधळलेला.* **bewildering** *वि* गोंधळात टाकणारा, भ्रमात टाकणारा.

bewitch /बि'विच्/ *क्रि* [*सक*] १ जादुटोणा करणे, जादूने भारणे. २ अत्यानंद होणे, आनंदित करणे; भुरळ पाडणे, मोहित करणे. **bewitching** *वि* झपाटणारा, भुरळ पाडणारा; चित्तवेधक, मोहक.

beyond /बि'यॉन्ड्/ *शब्दयो* १ दुसऱ्या बाजूला, पलीकडे, पार: *The path continues ~ the village, गावाच्या पलीकडून रस्ता पुढे जातो.* २ मर्यादेपलीकडे, आटोक्याबाहेर: *What happened was ~ my control, जे काय घडले ते माझ्या आटोक्याबाहेरचे होते.* ३ (*वाक्प्र*) **be beyond sb** (*अनौप*) एखाद्याच्या आकलना पलीकडचे, एखाद्याला न समजण्याजोगे. **beyond** *क्रिवि* पुढे, पलीकडे.

bias /'बाइअस्/ *ना* [*अगण, गण*] एखाद्या पक्षाची किंवा व्यक्तीची उघड बाजू घेऊन निर्णय घेताना अन्याय्य होण्याची वृत्ती, पक्षपाती वृत्ती. **bias** *क्रि* (**-s-, -ss-**) [*सक*] (बहुधा कर्मणी) पक्षपाती निर्णय देणे: *a ~ed jury, पक्षपाती ज्यूरी, पूर्वग्रहदूषित पंचमंडळी.*

bib /बिब्/ *ना* [*गण*] १ लहान मुलाच्या हनुवटीखाली बांधलेला कापडाचा तुकडा, लाळोत्रे, लाळेरे. २ मलवस्त्राचा वरचा भाग.

bible /'बाइब्ल्/ *ना* १ (क) **the Bible** (*ए.व*) ज्यू आणि ख्रिस्ती धर्माचा पवित्र धर्मग्रंथ, ख्रिस्तपुराण. (ख) [*गण*] या धर्मग्रंथाची प्रत. २ [*गण*] (*ला*) प्रमाणभूत ग्रंथ: *the gardeners' ~, माळ्यांचा प्रमाणभूत ग्रंथ.* **biblical** /'बिब्लिक्ल्/ *वि* बायबलमधला, बायबलचा.

bibliography /,बिब्लि'ऑग्रफि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) एखाद्या विषयावरच्या पुस्तकांची आणि लिखाणांची यादी, ग्रंथसूची. **bibliographer** /-फ(र्)/ *ना* [*गण*] ग्रंथसूचीकार.

bicentenary /,बाइसेन्'टीनरि; *अमे* -'सेन्टनेरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) एखाद्या घटनेचा २०० वा वार्षिक स्मृतिदिन; द्विशतकमहोत्सव, द्विशताब्दी.

bicentennial /,बाइसेन्'टेनिअल्/ *वि* द्विशतवार्षिक. **bicentennial** *ना* [*गण*] = BICENTENARY.

biceps /'बाइसेप्स्/ *ना* [*गण*] (*ब.व* **biceps**) दंडातील मोठा स्नायू, द्विशिरस्स्नायू, बाहुपिंडक, द्विशिरस्क स्नायू, दंडाची बेटकुळी.

bicker /'बिक(र्)/ *क्रि* [*अक*] शुल्लक कारणावरून भांडण करणे, तणतणणे, कुरबुर होणे.

bicycle /'बाइसिक्ल्/ *ना* [*गण*] पायटा मारून चालवायचे दोन चाकांचे वाहन, दुचाकी, सायकल. **bicycle** *क्रि* [*अक*] (*जुना, अप्रचलित*) सायकल चालवणे.

bid /बिड्/ *क्रि* (**-dd-**, *भूत, भूत वि* **bid** क्रमांक २ चा अर्थ असताना *भूत* बहुधा **bade** /बॅड्/, *भूत वि* **-den** /'बिड्न्/) १ [*अक, सक*] एखादी गोष्ट विकत घेण्यासाठी किंमत सांगणे, भाव सांगणे. २ [*सक*] (*पुरा* किंवा *औप*) (क) हुकूम देणे, आज्ञा करणे, पाचारण करणे: *She bade me (to) come in, आत येण्याची तिने मला आज्ञा केली.* (ख) स्वागतशील अशी प्रार्थना करणे, भेट घेताना वगैरे म्हणणे: *~ sb farewell, एखाद्याचा निरोप घेणे.* **bid** *ना* [*गण*] १ एखादी गोष्ट करण्याचा प्रयत्न: *a* *rescue ~, सुटकेचा प्रयत्न.* २ एखादी गोष्ट विकत घेण्यासाठी देऊ केलेली किंमत, बोली. **bidder** *ना* [*गण*] किंमत सांगणारा, भाव देणारा, बोलीदार. **bidding** *ना* [*अगण*] आज्ञा, सांगी, (किमतीच्या) बोली.

bide /बाइड्/ *क्रि* (*वाक्प्र*) **bide one's time** चांगल्या संधीची वाट पाहणे, योग्य वेळेची प्रतीक्षा करणे.

biennial /बाइ'ऐनिअल्/ *वि* १ दर दोन वर्षांनी घडणारा, द्वैवार्षिक. २ दोन वर्षे टिकणारा.

bier /बिअ(र्)/ *ना* [*गण*] शवपेटिका किंवा प्रेताला ठेवण्याचा हालवता येण्यासारखा स्टॅन्ड, ताटी, तिरडी.

bifocal /,बाइ'फउकल्/ *वि* (चष्म्याबाबत) लांबचे आणि जवळचे असे दोन्ही दिसण्यासाठी भिंगे असलेला, द्विकेंद्रक. **bifocals** *ना* [*ब.व*] द्विकेंद्रक भिंगे/काचा असलेला चष्मा.

big /बिग्/ *वि* (~ger, ~gest) १ मोठ्या आकाराचा, महत्त्वाचा वगैरे, महान्: *~ feet, मोठी पावले* ○ *a ~ match, महत्त्वाची मॅच.* २ (*अनौप खास अमे*) लोकप्रिय. ३ (*वाक्प्र*) **a big noise/shot** (*अनौप*) महत्त्वाचा माणूस, बडी आसामी, वजनदार माणूस. **big 'game** *ना* [*अगण*] मौज म्हणून करायच्या शिकारीतील मोठे प्राणी. **'big-head** *ना* [*गण*] (*अनौप*) आढ्यतेखोर किंवा घमेंडखोर माणूस, शिष्ठ. **'bigwig** *ना* [*गण*] (*अनौप*) महत्त्वाचा माणूस, बडी आसामी, बडे प्रस्थ.

bigamy /'बिगमि/ *ना* [*अगण*] एकाशी कायदेशीरपणे विवाह झालेला असताना दुसरा विवाह करणे (किंवा करण्याचा गुन्हा), द्विपत्नित्व किंवा द्विपतित्व. **bigamist** *ना* [*गण*] पहिला पती किंवा पहिली पत्नी जिवंत असता दुसरा विवाह करण्याचा गुन्हा करणारी व्यक्ती. **bigamous** *वि* आधीचे लग्न झाले असता दुसरे लग्न करणारा.

bigot /'बिगट्/ *ना* [*गण*] कडवी मते असणारा व ती न बदलणारा माणूस, हटवादी, दुराग्रही. **bigoted** *वि* असहिष्णू आणि संकुचित मनोवृत्तीचा, मतांध, कडवा. **bigotry** *ना* [*अगण*] मतांधता, धर्म, प्रांत वगैरेंचे वेड, कट्टरपणा.

bike /बाइक्/ *ना* [*गण*] (*अनौप*) BICYCLE चे संक्षिप्त रूप.

bikini /बि'कीनि/ *ना* [*गण*] (पोहण्यासाठी किंवा उन्हात पहुडण्यासाठी स्त्रियांनी वापरायचा दोन (तोकड्या) कपड्यांचा संच, स्त्रियांचा दोन पाखांचा पोहण्याचा पोशाख.

bilateral /,बाइ'लॅटरल्/ *वि* दोन बाजूंमधील, द्विपक्षी: *a ~ agreement, द्विपक्षी करार.*

bile /बाइल्/ *ना* [*अगण*] यकृतात निर्माण होणारा रस.

bilge /बिल्ज्/ *ना* [*अगण*] (*व्रात्य*) मूर्खासारखी बडबड, भंकस, बकणे.

bilingual /,बाइ'लिङ्ग्वल्/ *वि* दोन भाषा येणारा किंवा वापरणारा, द्विभाषक (व्यक्ती), द्विभाषिक (राज्य वगैरे).

bilious /'बिलिअस्/ *वि* आजाऱ्यासारखे वाटणारा, बरं न वाटणारा.

bill^1 /बिल्/ *ना* [*गण*] १ माल आणि सेवा यासाठी देय असलेल्या रकमेचा कागद, देयक. २ संसदेपुढे चर्चेसाठी ठेवण्यात येणारा कायद्याचा प्रस्ताव, विधेयक. ३ (*अमे*) कागदी नोट. ४ छापलेली नोटीस, भिंतीवर लावायचे छापील निवेदन, जाहिरात. ५ (*वाक्प्र*) **fill/fit the 'bill** एखाद्या गोष्टीसाठी योग्य असणे. **bill** *क्रि* [*सक*] १ देयक पाठविणे. २ कार्यक्रमाची घोषणा करणे, जाहीर होणे: *He is ~ed to appear as Othello, तो ऑथेल्लोच्या भूमिकेत येणार असे जाहीर झाले आहे.*

bill^2 /बिल्/ *ना* [*गण*] पक्ष्याची चोच, चंचू.

billet /'बिलिट्/ *ना* [*गण*] इतर नागरीकांबरोबर जेथे सैनिकांनाही राहायला जागा देतात असे खाजगी मालकीचे घर. **billet** *क्रि* [*सक*] सैनिकांना नागरी वस्तीत राहावयास जागा देणे.

billiards /'बिलिअड्झ्/ *ना* (ए.व क्रियापदासह) चेंडू आणि लांब काठ्या वापरून टेबलावर खेळायचा एक खेळ.

billion /'बिलिअन्/ *वि, ना* [*गण*] १ एक सहस्र दशलक्ष, १०००,०००,०००, शंभर कोटी. २ (*ब्रि*) एक लक्ष कोटी, १०००,०००,०००,०००.

billow /'बिलउ/ *ना* [*गण*] लाटेसारखी

फुगणारी (उदाहरणार्थ धूर) राशी, कल्लोळ. **billow** *क्रि* [*अक*] लाटालाटा येणे, कल्लोळ उठणे. **billowy** *वि* लाटेसारखा उसळणारा.

billy-goat /'बिलिं गउट्/ *ना* [*गण*] बकरा.

bin /बिन्/ *ना* [*गण*] वस्तू साठवण्याचे किंवा कचरा टाकण्याचे मोठे पात्र, (कचरा) कुंडी, (धान्यासाठी) कणगा.

binary /'बाइनरि/ *वि* शून्य आणि एक यांनी बांधलेल्या अंकपद्धतीचा, द्विक्रम, द्विमान.

bind /बाइन्ड्/ (*भूत, भूत वि* **bound** /बाउन्ड्/) *क्रि* १ [*सक*] **(क)** दोरीने बांधणे किंवा घट्ट करणे : ~ *the prisoner's legs to the chair, कैद्याचे पाय खुर्चीला बांधणे.* **(ख)** (*ला*) धरून राहणे, चिकटून राहणे, एकत्र येणे, गुंतणे : *bound by friendship, मैत्रीमुळे एकत्र आलेले, मैत्रीच्या बंधनाने वेढलेले किंवा बंधनात गुंतलेले.* २ [*सक*] : (पुस्तकाची) वेष्टणाशी बांधणी करणे : *a book bound in leather, कातडी बांधणीचे पुस्तक.* ३ [*सक*] एखाद्याला वचन किंवा कर्तव्य पाळायला लावणे, वचनबद्ध करणे, शपथ देणे : ~ *her to secrecy, तिला गुप्ततेची शपथ देणे.* ४ [*अक, सक*] एकत्रित करणे, घट्ट गोळा करणे, एकजीव करणे. **bind** *ना* [*अे.व*] (*अनौप*) उपद्रव, कटकट. **binder** *ना* [*गण*] १ एकत्र ठेवणारे वेष्टण किंवा कव्हर. २ पुस्तक-बांधणीचा व्यवसाय करणारा, बांधणीकार. **binding** *ना* [*गण*] पुस्तकाचे वेष्टण, कव्हर.

binge /बिन्ज्/ *ना* [*गण*] (*अनौप*) १ चिक्कार खाण्या-पिण्याचा वेळ, खाणे आणि खूप दारू पिणे यांची लयलूट करण्याचा वेळ. २ एखाद्या गोष्टीचा अतिरेक करण्याचा प्रसंग, धमाल, मोका : *a shopping ~, खरेदीची धमाल* किंवा *धमाल खरेदी.*

bingo /'बिङ्गउ/ *ना* [*अगण*] आकड्याचा जुगार, आकडे लावणे.

binoculars /बि'नॉक्युलझ्/ *ना* [*ब.व*] लांबच्या गोष्टी जवळ आहेत असे दाखवणारे आणि दोन डोळ्यांसाठी दोन अशी भिंगे असलेले एक उपकरण, दुर्बीण, जोडदुर्बीण, दुडोळी, द्विनेत्री दुर्बीण.

biochemistry /,बाइ·अउ'केमिस्ट्रि/ *ना* [*अगण*] सजीवातील रासायनिक प्रक्रियांचा अभ्यास, जीवरसायनशास्त्र. **biochemist** *ना* [*गण*] जीवरसायनशास्त्राचा अभ्यासक किंवा जीवरसायनशास्त्रज्ञ.

biodegradable /,बाइ·अउडि'ग्रेइडब्ल्/ *वि* जीवाणूंच्या साहाय्याने कुजवता येण्यासारखा, जीवाणूद्वारा अपघटनक्षम.

biography /बाइ'ऑग्रफि/ *ना* [*गण*] (*ब.व* **~ies**) एखाद्या माणसाची दुसऱ्या माणसाने लिहिलेली जीवनकथा, चरित्र. **biographer** /-फ(र्)/ *ना* [*गण*] चरित्र लिहिणारा, चरित्रकार, चरित्रलेखक. **biographical** /,बाइ·अ'ग्रॅफिक्ल्/ *वि* चरित्राचा, चरित्रवर्णनाचा, चरित्रात्मक.

biology /बाइ'ऑलजि/ *ना* [*अगण*] सजीवांचा वैज्ञानिकदृष्ट्या केलेला अभ्यास, जीवशास्त्र, जैवविद्या. **biological** /,बाइअ'लॉजिक्ल्/ *वि* जीवशास्त्रीय, जैव. **biologist** *ना* [*गण*] जीवशास्त्रअभ्यासक किंवा जीवशास्त्रज्ञ.

birch /बऽच्/ *ना* १ [*अगण, गण*] मऊ सालीचे आणि बारीक फांद्यांचे एक झाड (किंवा त्याचे लाकूड), भोजवृक्ष, भूर्ज. **the birch** [*अे.व*] पूर्वी शिक्षा करण्यासाठी वापरली जाणारी भोजवृक्षाची काठी, छडी.

bird /बऽड्/ *ना* [*गण*] १ पिसे आणि पंख असलेला आणि बहुधा उडू शकणारा प्राणी, पक्षी, खग, पाखरू. २ (*व्रात्य* खास *ब्रि*) पाखरू, तरुण मुलगी, पोरगी. **,bird of 'prey** *ना* [*गण*] इतर पक्षी किंवा प्राणी मारून खाणारा (गरुड, ससाणा यासारखा) पक्षी, शिकारी पक्षी.

biro /'बाइअ·रउ/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s**) (*मालक*) एक प्रकारचे बॉलपेन.

birth /बऽथ्/ *ना* १ [*गण, अगण*] जन्मण्याची प्रक्रिया, जन्म, जनन, निपज. २ [*अगण*] जात, कूळ, मूळ, उगम : *Russian by ~, जन्माने रशियन, मूळचा रशियन.* ३ [*अे.व*] सुरुवात, प्रारंभ : *the ~ of socialism, समाजवादाचा जन्म म्हणजे त्याची सुरुवात.* ४ (*वाक्प्र*) **give birth (to sb/sth)** जन्म देणे, उत्पन्न होणे, जन्माला घालणे, एखाद्या गोष्टीतून निष्पत्ती होणे. **'birth control** *ना* [*अगण*] संतती नियमन (किंवा त्याच्या पद्धती). **'birthday**

ना [*गण*] वाढदिवस, जन्मदिन. **'birthmark** *ना* [*गण*] जन्मल्यापासून अंगावर असणारी वैशिष्ट्यपूर्ण खूण, जन्मखूण. **'birth rate** *ना* [*गण*] दर हजार लोकांनी एक वर्षात निर्माण केलेल्या प्रजेची संख्या, जननप्रमाण.

biscuit /'बिस्किट्/ *ना* [*गण*] लहान, चपटी, पातळ, कुरकुरीत अशी भाजून केलेली वडी; बिस्किट.

bisect /बाइ'सेक्ट्/ *क्रि* [*सक*] दोन भाग करणे, दुभागणे.

bishop /'बिशप्/ *ना* [*गण*] १ वरच्या दर्जाचा खिस्ती धर्माधिकारी. २ बुद्धिबळातील एक सोंगटी, उंट. **bishopric** /-रिक्/ *ना* [*गण*] बिशपाचे पद किंवा त्याच्या अधिकारातला प्रांत.

bison /बाइस्न्/ *ना* [*गण*] (*ब.व* **bison**) अमेरिकन म्हैस, युरोपिअन गवा.

bistro /'बीस्ट्रउ/ *ना* [*गण*] (*ब.व* ~**s**) छोटे उपहारगृह.

bit^{1} BITE चा *भूत.*

bit^{2} /बिट्/ *ना* १ [*गण*] लहान तुकडा किंवा लहान राशी : *a ~ of paper, कागदाचा तुकडा.* २ (*वाक्प्र*) **a bit** (क) जरासा, थोडासा : *a ~ tired, थोडासा दमलेला.* (ख) थोडा वेळ, थोडे दूर, थोडे अंतर, जरा : *Wait a ~! थोडा वेळ थांब!* किंवा *जरा थांब!* **bit by 'bit** हळूहळू. **do one's 'bit** (*अनौप*) (एखाद्या कामातील) स्वतःचा वाटा उचलणे, आपलं काम करणे. **every bit as good, bad etc.** तितकाच चांगला, वाईट वगैरे. **not a 'bit** मुळीच नाही, अजिबात नाही.

bit^{3} /बिट्/ *ना* [*गण*] १ घोड्याच्या तोंडात दिलेला लगामाचा भाग. २ गिरमिटासारख्या हत्यारातील भोके पाडणारा भाग.

bit^{4} /बिट्/ *ना* [*गण*] (*संगणन*) माहितीचा एकक.

bitch /बिच्/ *ना* [*गण*] १ कुत्र्यातील मादी, कुत्री. २ (*व्रात्य अधिक्षेपी*) वाईट स्त्री, छिनाल, फिंदर.

bite /बाइट्/ *क्रि* (*भूत* **bit** /बिट्/, *भूत वि* **bitten** /'बिट्न्/) १ [*अक, सक*] (एखादी गोष्ट) दातांनी कापणे, दातांनी चावणे, तुकडा करणे. २ [*अक, सक*] (साप किंवा किडे यांच्याबाबत) चावणे, डसणे, डंख करणे. ३ [*अक*] (माशांबाबत) गळाचे आमिष खाणे किंवा चावणे, गळाला लागणे. ४ [*अक*] घट्ट पकडणे; परिणामकारक होणे, परिणाम जाणवणे : *The miners' strike is beginning to ~, खाण कामगारांच्या संपाचा परिणाम जाणवू लागला आहे.* ५ (*वाक्प्र*) **bite sb's head off** (*अनौप*) एखाद्यावर संतापून टीका करणे, एखाद्याची हजामत किंवा चंपी करणे. **bite off ,more than one can 'chew** (*अनौप*) कुवतीपलिकडची गोष्ट करण्याचा प्रयत्न करणे. **bite** *ना* १ [*गण*] (क) चावा, डंख. (ख) चावून काढलेला तुकडा. २ [*अ.व*] (*अनौप*) अन्न : *I haven't had a ~ (to eat) all day, सबंध दिवसात मला खायला मिळाले नाही.* ३ [*गण*] चावल्याने किंवा दंश केल्याने झालेली जखम, दात उठणे. **biting** *वि* तीक्ष्ण; झोंबणारा, बोचणारा, चावरा, चावणारा : *a biting wind, चावरा वारा.*

bitter /'बिट(र्)/ *वि* १ तीक्ष्ण, असुखकर अशी चव; कडू, गोड नाही असा, कटू. २ रागावलेला किंवा द्वेषाने पछाडलेला : *~ enemies, हाडवैरी.* ३ दुःखदायक, क्लेशकारक, घोर : *a ~ disappointment, दुःखदायक किंवा घोर निराशा.* ४ खूप थंड, अतिशीत : *a ~ wind, गार झोंबरा वारा.* **bitter** *ना* [*अगण*] (*ब्रि*) हॉपच्या फुलांचा उग्र वास असणारी कडवट बिअर. **bitterly** *क्रिवि* मोठ्या दुःखाने : *~ly cold/disappointed, दुःखदायक थंडी/निराशा.* **bitterness** *ना* [*अगण*] कडवटपणा, दुःख.

bitumen /'बिट्युमन्; *अमे* ब'टूमन्/ *ना* [*गण*] रस्ते करताना वापरण्यात येणारा चिकट काळा पदार्थ, शिलाजतु.

bivouac /'बव्हुॲक्/ *ना* [*गण*] तंबू नसलेला तात्पुरता तळ, उघड्यावरचा तळ. **bivouac** *क्रि* (-ck-) [*अक*] उघड्या तळावर राहणे.

bizarre /बि'झा(र्)/ *वि* खूप अपरिचित, विचित्र, विक्षिप्त.

blab /ब्लॅब्/ *क्रि* (-bb-) [*अक*] (*व्रात्य*) बडबडताना गुपित गोष्ट सांगून टाकणे, वटवट करताना गुप्त गोष्ट फोडणे.

black /ब्लॅक्/ *वि* १ कृष्णवर्ण, काळा. २ कृष्णवर्णीय, हबशी, शिंदी. ३ घाणेरडा. ४ (कॉफीबाबत) दूध नसलेली. ५ आशेवाचून,

आशा नसलेला : *The future looks ~, भविष्य अंधःकारमय दिसते म्हणजे भविष्यात काही आशा नाही.* ६ खूप रागावलेला, कृद्ध : *a ~ look, रागाचा कटाक्ष.* ७ (विनोदाबाबत) मजेशीर किंवा विनोदी परंतु दुःखद घटनांबाबतचा, काळा (विनोद). **black** *ना* १ [*अगण*] काळा रंग. २ [*गण*] काळ्या रंगाचा माणूस, हबशी, नीग्रो. **black** *क्रि* [*सक*] १ काळे करणे. २ (माल वगैरेला) हात लावण्यास नकार देणे, बहिष्कार घालणे : *The strikers ~ed the cargo, बोटीवरच्या मालाला हात लावण्यास संपकऱ्यांनी नकार दिला.* ३ (*क्रिब*) **black 'out** शुद्ध हरपणे, अंधेरी येणे. **black sth out** दिवे बंद करणे आणि खिडक्यांवर पडदे टाकणे, प्रकाशबंदी करणे. **'blackberry** *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) झुडुपावर येणारे काळ्या रंगाचे एक रानटी फळ, गौरीफळ, काळी तुती. **'blackbird** *ना* [*गण*] काळ्या किंवा तपकिरी रंगाची पिसे असलेला, युरोपात आढळणारा एक सर्वसामान्य पक्षी. **'blackboard** *ना* [*गण*] शाळेत लिहिण्यासाठी वापरतात तो फळा, फलक. **,black'currant** गडद जांभळ्या रंगाचे झुडुपांवर येणारे एक लहान फळ. **blacken** *क्रि* १ [*अक, सक*] काळे होणे किंवा करणे, अधिक काळे करणे किंवा होणे. २ [*सक*] एखाद्याविषयी हानिकारक गोष्टी बोलणे, एखाद्याच्या नावाला काळिमा लावणे. **black 'eye** *ना* [*गण*] डोळ्याभोवतीचे माराने झालेले काळे वलय. **'blackhead** *ना* [*गण*] काळे टोक असणारा त्वचेवरचा डाग. **,black 'ice** *ना* [*अगण*] रस्त्यावरील बर्फाचा चटकन दिसून न येणारा असा पातळ, पारदर्शक थर. **'blackleg** *ना* [*गण*] इतर लोक संपावर असताना काम करणारा माणूस, सोदा, संपफोड्या. **'blacklist** *ना* [*गण*] धोकादायक किंवा शिक्षेस पात्र अशा लोकांची यादी, काळी सूची. **'blacklist** *क्रि* [*सक*] काळ्या सूचीत नाव घालणे. **blackly** *क्रिवि* गडदपणे, निराशेने, दुष्टपणे, रागाने. **,black 'magic** *ना* [*अगण*] दुष्ट कारणांसाठी वापरायची जादू, जादूटोणा, कुविद्या, चेटुक. **'blackmail** *ना* [*अगण*] १ एखाद्याबाबतच्या वाईट गोष्टींची वाच्यता करण्याची धमकी देऊन पैसे उकळणे, धमकीने पैसे काढणे. २ दबाव आणण्यासाठी दिलेल्या धमक्या, दबाव आणण्यासाठी बिंगे फोडण्याच्या धमक्यांचा वापर. **'blackmail** *क्रि* [*सक*] गौप्यस्फोटाची धमकी देऊन एखाद्याला एखादी गोष्ट करायला भाग पाडणे. **'blackmailer** *ना* [*गण*] धमकीने पैसे उकळणारा, बिंगजीवी. **,black 'market** *ना* [*गण,* बहुधा *अ.व*] मालाची बेकायदेशीर खरेदी आणि विक्री, काळाबाजार. **blackness** *ना* [*अगण*] काळेपणा, कालिमा, कृष्णवर्ण, काळा रंग. **'blackout** *ना* [*गण*] १ युद्ध चालू असताना रात्री सर्व दिवे बंद करण्याचा आणि खिडक्यांना पडदे लावण्याचा काळ, प्रकाशबंदी. २ वीज गेल्याने झालेला अंधार. ३ तात्पुरती शुद्ध जाणे, क्षणैक बेशुद्धी. ४ वार्ता देऊन माहिती बाहेर पाठवण्यावर बंदी, वार्तांबंदी, वृत्तनिवेदन बंदी : *a news ~out, बातम्यांवर बंदी, माहिती प्रसारणास बंदी.* **,black 'sheep** *ना* [*गण*] कुटुंबाला लाज वाटेल असे वागणारा, घराण्याला काळोखी फासणारा, कुलकलंक. **'blacksmith** /-स्मिथ्/ *ना* [*गण*] लोखंडापासून वस्तू बनविणारा, लोहार.

bladder /'ब्लॅड(र्)/ *ना* [*गण*] मूत्र साठविणारे शरीरातील इंद्रिय, मूत्राशय, आशय.

blade /ब्लेइड्/ *ना* [*गण*] १ सुरी, वस्तरा वगैरेंची धारदार कड, पाते, पान. २ वल्हे वगैरेचा मोठा, चपटा भाग. ३ गवताचे लांब, अरुंद असे पान, गवताचे पाते.

blame /ब्लेइम्/ *क्रि* १ [*सक*] एखाद्या वाईट गोष्टीबाबत एखाद्या व्यक्तीला किंवा वस्तूला जबाबदार धरणे, दोष देणे, बोल लावणे. २ (*वाक्प्र*) **be to blame (for sth)** एखाद्या वाईट गोष्टीबद्दल जबाबदार असणे, दोषी असणे. **blame** *ना* [*अगण*] वाईट गोष्टीची जबाबदारी, दूषण, दोष, ठपका, इलजाम. **blameless** *वि* कोणतीही गैर गोष्ट केलेली नसलेला, निर्दोष, निष्कलंक. **blameworthy** *वि* गैरगोष्ट केलेला, दोषास्पद, निंद्य.

blanch /ब्लान्च्; *अमे* ब्लॅन्च्/ *क्रि* [*अक, सक*] पांढरे होणे किंवा करणे, निस्तेज किंवा फिके करणे किंवा होणे.

blancmange /ब्ल'मॉन्झ्/ *ना* [*गण, अगण*] दुधाचे जेलीसारखे केलेले पुडिंग, दुधाचा चिकचिकित पदार्थ.

bland /ब्लॅन्ड्/ *वि* १ सज्जन, विनम्र आणि भावनांचा अतिरेक होऊ न देणारा. २ (अन्नाबाबत) फारशी चव नसलेले, मसालेदार नसलेले, सपक. ३ रुक्ष, रटाळ. **blandly** *क्रिवि* निर्विकारपणे, मख्खपणे. **blandness** *ना* [*अगण*] रुक्षपणा, निर्विकारपणा.

blank /ब्लॅङ्क्/ १ (कागदाबाबत) काहीही न लिहिलेला, कोरा. २ कुठलाही भाव न दाखविणारा, निर्विकार; रिकामा, रिता : *a ~ look, शून्य दृष्टी, रिती नजर.* **blank** *ना* [*गण*] १ एखाद्या कागदपत्र वगैरेतील मोकळी जागा. २ गोळी नसलेले काडतूस. **,blank 'cheque** *ना* [*गण*] १ रक्कम न लिहिता सही केलेली हुंडी, कोरा चेक, कोरा धनादेश. २ (*ला*) एखाद्याला हवे ते करण्याची पूर्ण मुभा, हवे ते करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य. **blankly** *क्रिवि* निर्विकारपणे, शून्यपणे, रितेपणाने. **,blank 'verse** *ना* [*अगण*] यमक नसणारे काव्य, निर्यमक काव्य, मुक्तछंदातील काव्य.

blanket /'ब्लॅङ्किट्/ *ना* [*गण*] गादीवर घालायची जाड उबदार चादर : (*ला*) *a ~ of snow, हिमाची शाल.* **blanket** *क्रि* [*सक*] आच्छादणे, पांघरणे. **blanket** *वि* सर्वसमावेशक, सर्वांचा एकत्रित असा : *~ criticism, सर्वांचा समावेश असलेली समीक्षा.*

blare /ब्लेअ(र्)/ *क्रि* [*अक, सक*] मोठा कर्कश आवाज करणे. **blare** *ना* [*अगण*] कर्कश आवाज.

blasé /'ब्लाझेइ; *अमे* ब्ला'झेइ/ *वि* पूर्वी अनुभव घेतलेला असल्यामुळे औत्सुक्य किंवा रस न घेणारा, वीट आलेला; निर्ढावलेला.

blaspheme /ब्लॅस्'फीम्/ *क्रि* [*अक, सक*] परमेश्वराविषयी किंवा पवित्र गोष्टींविषयी वाईट किंवा अनादराने बोलणे, ईश्वराची निंदा करणे. **blasphemous** /'ब्लॅस्फमस्/ *वि* ईश्वरनिंदेचा. **blasphemy** /'ब्लॅस्फमि/ *ना* [*अगण, गण*] (*ब.व* **-ies**) ईश्वरनिंदा, देवनिर्भत्सना, पावित्र्यभंग, पावित्र्यविडंबन.

blast /ब्लास्ट्; *अमे* ब्लॅस्ट्/ *ना* [*गण*] १ मोठा स्फोट (आणि त्यातून निर्माण होणारा हवेचा प्रचंड दाब). २ अचानक जोराने वाहणारा वारा, वाऱ्याचा झोत. ३ (सनईसारख्या फुंकून वाजवायच्या) वाद्याचा आवाज. ४ (*वाक्प्र*) **at full 'blast** (शक्य तेवढ्या) सर्व शक्तीनिशी, पूर्ण भरात. **blast** *क्रि* १ [*अक, सक*] स्फोटके वापरून एखादी गोष्ट फोडणे किंवा नष्ट करणे. २ (*क्रिव*) **blast 'off** (अंतराळ वाहनाबाबत) जमिनीवरून उड्डाण करणे. **blast** *उद्गा* (राग किंवा त्रासिकपणा दाखविण्यासाठी वापर). **'blast-furnace** *ना* [*गण*] अशुद्ध लोह वितळवण्यासाठी वापरायची भट्टी. **'blast-off** *ना* [*गण*] अंतराळवाहनाचे उड्डाण.

blatant /ब्लेइटन्ट्/ *वि* उघडउघड, स्वच्छ, स्पष्ट; निर्लज्ज, बेदरकार, निलाजरा. **blatantly** *क्रिवि* उघडउघड, स्पष्टपणे; निलाजरेपणाने, कशाचीही तमा न बाळगता.

blaze /ब्लेइझ्/ *ना* १ [*गण*] (क) तळपती ज्वाला, प्रखर ज्योत, दैदीप्यमान अग्निशिखा. (ख) मोठी घातक आग, आगीचा डोंब. २ [*अ.व*] झगमगाटाचे प्रदर्शन : (*ला*) *a ~ of publicity, प्रसिद्धीचा प्रकाशझोत.* **blaze** *क्रि* [*अक*] १ प्रखरपणे तेवणे, भडका होणे, धगधगणे. २ तळपणे. ३ उत्कट भावना दाखवणे : *blazing with anger, रागाने जळणारा, धगधगत्या क्रोधाने.* **blazing** *वि* तळपता, धगधगता, दैदीप्यमान.

blazer /ब्लेइझे(र्)/ *ना* [*गण*] सैल जाकीट, कोट – बहुधा एखाद्या शाळेची किंवा खेळाडू संघाची निशाणी.

bleach /ब्लीच्/ *क्रि* [*अक, सक*] पांढरे करणे, शुभ्र होणे, रुपेरी होणे, फिके करणे, विरंजन करणे. **bleach** *ना* [*अगण*] कापड पांढरे शुभ्र करण्यासाठी किंवा एखादी गोष्ट स्वच्छ करण्यासाठी वापरायचे रसायन, शुभ्रकक्षार, विरंजन चूर्ण, विरंजन.

bleak /ब्लीक्/ *वि* थंड आणि असुखकारक : *a ~ night, सर्द रात्र* ○ (*ला*) *The future looks ~, भविष्य निराशाजनक किंवा अंधःकारमय दिसते.* **bleakly** *क्रिवि* निराशेने.

bleary /'ब्लिअरि/ *वि* (**-ier, -iest**) (डोळ्यांबाबत) दुखरे आणि थकलेले, तारवटलेले, लालसर आणि ओढलेले. **blearily** *क्रिवि* जडावलेपणाने, तारवटून.

bleat /ब्लीट्/ *क्रि* [*अक*], *ना* [*अगण*] बकरी किंवा शेळीसारखा आवाज (काढणे); बे बे (करणे).

bleed /ब्लीड्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **bled** /ब्लेड्/) १ [*अक*] रक्त जाणे, रक्त वाहणे, रक्ताळणे, रक्तस्राव होणे. २ [*सक*] रक्त काढणे. ३ [*सक*] द्रवपदार्थ किंवा हवा काढणे.

blemish /'ब्लेमिश्/ *ना* [*गण*] एखाद्या गोष्टीच्या सुरेखपणाला बाधा आणणारा डाग, कलंक, लांच्छन. **blemish** *क्रि* [*सक*] डागाळणे, कलंकित करणे, बट्टा लावणे : *His reputation has been ~ed, त्याची कीर्ती कलंकित झाली, त्याच्या नावाला बट्टा लागला.*

blend /ब्लेन्ड्/ *क्रि* १ [*अक, सक*] मिसळणे, एकत्र कँरणे. २ (*क्रिब*) **blend in** वेगळेपणा न जाणवण्याइतके मिसळणे, मिसळून जाणे, एकरूप होणे, बेमालूम मिसळणे. **blend** *ना* [*गण*] मिश्रण. **blender** *ना* [*गण*] (खास *अमे*) द्रव मिश्रक, मिक्सरमधील द्रवांसाठी वापरायचे भांडे/भाग.

bless /ब्लेस्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **~ed** /ब्लेस्ट्/) [*सक*] १ देवकृपेची याचना करणे, अनुग्रह करणे, आशीर्वाद देणे. २ पवित्र करणे, पावन करणे. **blessed** /'ब्लेसिड्/ *वि* १ पवित्र, पावन. २ कल्याणकारी, सुखी. **blessing** *ना* १ [*गण*] आनंद देणारे असे काही, वरदान. २ [*अगण*] आशीर्वाद, पाठिंबा, संमती. ३ [*गण*] देवाची कृपा, भगवंताचा प्रसाद.

blew BLOW^1 चा *भूत.*

blight /ब्लाइट्/ *ना* १ [*अगण*] वनस्पतींचा रोग, कीड, चिकटा, अंगक्षय. २ [*गण*] वाईट प्रभाव. **blight** *क्रि* [*सक*] वाईट प्रभाव असणे; नासवणे, बिघडवणे.

blind^1 /ब्लाइन्ड्/ *वि* १ पाहू न शकणारा, आंधळा, अंध. २ (*to*)// एखादी गोष्ट पाहू न शकणे किंवा पाहण्यास राजी नसणे, डोळेझाक करणे, आंधळे होणे : *~ to the dangers involved, यातील धोके न पाहू शकणारा किंवा धोक्याबाबत आंधळा असणारा.* ३ विवेकशून्य : *~ obedience, आंधळा आज्ञाधारकपणा.* ४ (*वाक्प्र*) **as blind as a 'bat** नीट न पाहू शकणारा, आंधळा. **blind 'drunk** (*अनौप*) तर्र, टाइट. **the blind** *ना* [*ब.व*] आंधळे लोक, अंध. **,blind 'alley** *ना* [*गण*] १ बाहेर पडता न येणारा अरुंद रस्ता, एका बाजूने बंद गल्ली. २ (*ला*) कोणताही चांगला परिणाम न होणारा मार्ग, निष्फळ प्रयत्न. **blindly** *क्रिवि* आंधळेपणाने, अंधतेने. **blindness** *ना* [*अगण*] आंधळेपणा, अंधत्व. **'blind spot** *ना* [*गण*] १ मोटार चालवणाऱ्याला रस्त्याचा न दिसणारा भाग, अंधस्थान. २ (*ला*) एखाद्याला समजू न शकणारा विषय किंवा भाग.

blind^2 /ब्लाइन्ड/ *क्रि* [*सक*] १ आंधळे करणे, अंध करणे. २ एखाद्या गोष्टीमुळे विवेक, अंदाज वगैरे नष्ट होणे, विवेकशून्य होणे, बुद्धिभ्रंश करणे : *~ed by love, प्रेमाने आंधळा झालेला.*

blind^3 /ब्लाइन्ड/ *ना* [*गण*] खिडकीवरील खाली ओढायचा पडदा.

blindfold /'ब्लाइन्डफउल्ड्/ *क्रि* [*सक*] एखाद्याचे डोळे पट्टीने, फडक्याने बांधणे, डोळ्यावर पट्टी बांधणे. **blindfold** *ना* [*गण*] डोळ्यावरील पट्टी किंवा फडके. **blindfold** *वि, क्रिवि* डोळ्यावर पट्टी बांधलेला, आवृतनेत्र.

blink /'ब्लिङ्क्/ *क्रि* १ [*अक, सक*] (डोळ्यांची) जलद उघडझाप करणे किंवा होणे, (डोळे) मिचकावणे. २ [*अक*] (प्रकाशाची) उघडझाप होणे किंवा करणे. **blink** *ना* १ [*गण*] उघडझाप. २ (*वाक्प्र*) **on the blink** (*अनौप*) (यंत्राबाबत) नीट न चालणारे, नादुरुस्त झालेले, बिघाड झालेले.

blinkers /'ब्लिङकझ़्/ *ना* [*ब.व*] घोड्याला बाजूकडचे दिसू नये म्हणून लगामाला लावलेल्या व घोड्याच्या डोळ्यांच्या बाजूला येणाऱ्या चामड्याच्या पट्ट्या, झापडे, अंधेऱ्या.

bliss /'ब्लिस्/ *ना* [*अगण*] निर्भेळ आनंद. **blissful** *वि* आनंदी. **blissfully** *क्रिवि* आनंदाने.

blister /'ब्लिस्ट(र्)/ *ना* [*गण*] १ (भाजल्याने, चप्पल चावल्याने वगैरे) कातडीखाली येणारा पाणी असलेला फोड, पांढरा फोड, पुळी. २ रंग वगैरे वरचे पोपडे. **blister** *क्रि* [*अक, सक*] फोड येणे (येण्यास कारणीभूत होणे).

blithe /'ब्लाइद्/ *वि* आनंदी आणि स्वच्छंदी, रंगेल.

blitz /'ब्लिटस्/ *ना* [*गण*] १ अचानक झालेला प्रखर हल्ला (विशेषतः आकाशातून झालेला), हवाईहल्ला. २ (*ला*) निकराचा प्रयत्न, जमीन-अस्मान एक करण्याची कृती : *have a ~ on* *the garden, बागेसाठी जोरदार प्रयत्न करणे.*

blizzard /'ब्लिझड्/ *ना* [*गण*] जोरदार हिमवादळ, हिम-वावटळ.

bloated /'ब्लऊटिड्/ *वि* फुगलेला, टम्म.

blob /'ब्लॉब्/ *ना* [*गण*] द्रवाचा थेंब, ठिपका, छोट्या गोळ्यासारखा आकार.

bloc /'ब्लॉक्/ *ना* [*गण*] समान हितसंबंधांनी एकत्र आलेला राष्ट्रे वगैरेचा गट.

block /'ब्लॉक्/ *ना* [*गण*] १ मोठ्या आकाराचा टणक तुकडा, ओंडा, ठोकळा : *a ~ of ice/stone, बर्फाचा तुकडा, दगडाचा चिरा.* २ वेगवेगळे भाग असणारी मोठी इमारत : *a ~ of flats, फ्लॅट्स् असलेली इमारत, स्वतंत्र घरांची मोठी इमारत.* ३ चारही बाजूंनी रस्त्यांनी वेढलेल्या इमारतींचे संकुल. ४ अनेक वस्तूंचा एकत्रित असा मोठा गट : *a ~ of theatre seats, चित्रपटगृहातील आसनांचा गट, एक गठ्ठा आसने.* ५ अडथळा, तुंबारा : *a ~ in the drain, सांडपाण्याच्या मार्गातील तुंबारा.* **block** *क्रि* [*सक*] १ हालचाल किंवा प्रवाह रोखणे किंवा अवघड करणे, अडथळा निर्माण करणे : *roads ~ed by snow, बर्फाच्या अडथळ्यांनी दुष्कर झालेले रस्ते.* २ गती रुद्ध करणे, थांबवणे, ठप्प करणे, बंद पाडणे, रोकणे. **,block 'letters** (तसेच **,block 'capitals**) *ना* [*ब.व*] (इंग्रजी मूळाक्षरातील) मोठी अक्षरे, कॅपिटल अक्षरे.

blockade /ब्लॉ'केइड्/ *ना* [*गण*] माल किंवा माणसे आत जाऊ नयेत किंवा बाहेर येऊ नयेत म्हणून घातलेला वेढा, नाकेबंदी, कोंडमारा. **blockade** *क्रि* [*सक*] नाकेबंदी करणे.

blockage /'ब्लॉकिज्/ *ना* [*गण*] हालचाल, गती, किंवा प्रवाह रोखणारा, कोंडी, अवरोध; अडथळा : *a ~ in a pipe, पाईपमधला अडथळा किंवा तुंबारा.*

bloke /ब्लउक्/ *ना* [*गण*] (*ब्रि अनौप*) पुरुष, गडी.

blond (तसेच स्त्रीच्याबाबत बहुधा **blonde**) /ब्लॉन्ड्/ *ना* [*गण*], *वि* सोनेरी किंवा फिकट रंगाचे केस असणारा माणूस, सोनकेशी.

blood /ब्लड्/ *ना* [*अगण*] १ शरीरात वाहणारा तांबडा द्रवपदार्थ, रक्त. २ (*औप*) कुल, वंश, कुळी, वंशपरंपरा : *a woman of noble ~, चांगल्या कुळातील स्त्री, कुलीन किंवा घरंदाज स्त्री.* ३ (*वाक्प्र*) **make sb's 'blood boil** एखाद्याला खूप संताप आणणे, एखाद्याचे रक्त उसळवणे, तळपायाची आग मस्तकास जाणे. **make sb's 'blood run cold** एखाद्याच्या मनात भयंकर भीती उत्पन्न करणे, एखाद्याचे रक्त गोठवणे किंवा थिजवणे. **new/fresh 'blood** नवीन कल्पना असणारा, नवीन सभासद, नवीन/ताज्या दमाचा/रक्ताचा माणूस. **'blood bath** *ना* [*गण*] अनेक लोकांची निर्घृण हत्या, कत्तल, हत्याकांड. **'blood-curdling** *वि* भयानक, भयंकर, रक्त गोठवणारा, थरकाप उडवणारा. **'blood donor** *ना* [*गण*] दुसऱ्याला देण्यासाठी स्वतःचे रक्त देणारा माणूस, रक्तदाता. **'blood group** (तसेच **'blood type**) *ना* [*गण*] मानवी रक्तगट. **'bloodhound** *ना* [*गण*] माग काढण्यासाठी वापरायचा कुत्रा, शोध घेणारा मोठा कुत्रा. **bloodless** *वि* १ अतिशय निस्तेज, पांढुरका, नीरक्त. २ रक्त न सांडता केलेला, रक्तहीन, अहिंसक. **'blood poisoning** *ना* [*अगण*] विषारी जीवाणूंनी रक्त दूषित होणे, विषारी जीवाणू संक्रामित रक्त, विषबाधित रक्त. **'blood pressure** *ना* [*अगण*] धमनीतील रक्ताचा मोजलेला दाब, रक्तदाब. **'bloodshed** *ना* [*अगण*] लोकांना ठार मारणे किंवा इजा करणे, रक्तपात. **'bloodshot** *वि* (डोळ्यांबाबत) लाल, आरक्त. **'blood sports** *ना* [*ब.व*] ज्यामधे जनावरे किंवा पक्षी मारले जातात असे खेळ. **'bloodstained** *वि* रक्ताने माखलेला, रक्तलांच्छित. **'bloodstream** *ना* [*गण*] शरीरात वाहणारे रक्त, रक्तप्रवाह. **'bloodthirsty** *वि* क्रूर आणि हत्या करायला सोकावलेला, रक्तपिपासू; हिंसाचारात रस असणारा. **'blood-vessel** *ना* [*गण*] शरीरातील रक्त वाहून नेणारी नलिका, शीर, रक्तवाहिनी.

bloody /'ब्लडि/ *वि* (**-ier, -iest**) १ रक्ताने माखलेला, रक्ताळलेला. २ खूप रक्तपातासह, रक्तरंजित. ३ (⚠ *ब्रि अनौप*) (भर किंवा जोर देण्यासाठी वापर) : *You ~ idiot! ए साल्या मढ्या!* **bloodily** *क्रिवि* हिंसात्मक पद्धतीने. **bloody** *क्रिवि* (⚠ *ब्रि अनौप*) (जोर किंवा भर देण्यासाठी वापर) : *too ~ quick,* फार

साला चपळ. ,**bloody-'minded** *वि* (*ब्रि अनौप*) जाणूनबुजून आडमुठेपणा करणारा.

bloom /ब्लूम्/ *ना* [*गण*] १ फूल. २ (*वाक्प्र*) **in (full) bloom** बहरलेला, फुललेला. **bloom** *क्रि* [*अक*] १ फुले येणे, फुलणे, बहरणे. २(*ला*) तब्बेतीत असणे, जोमात असणे.

blossom /'ब्लॉसम्/ *ना* १ [*गण*] फूल, फळझाडांचा मोहर, फुलोरा. २ (*वाक्प्र*) **in (full) blossom** मोहरलेला, फुललेला. **blossom** *क्रि* [*अक*] १ मोहर येणे, फुले येणे. २ (*ला*) जोमदारपणे वाढणे, उत्कर्ष किंवा भरभराट होणे.

blot /ब्लॉट्/ *ना* [*गण*] १ शाईचा वगैरे डाग. २ दोष, कलंक : *a ~ on his character, त्याच्या चारित्र्यावरचा डाग.* **blot** *क्रि* (-tt-) [*सक*] १ डाग पाडणे. २ टिपकागदाने ओली शाई वाळवणे किंवा टिपणे. ३ (*क्रिब*) **blot sth out** एखादी गोष्ट लपविणे किंवा झाकणे : *Thick clouds ~ted out the view, गच्च भरून आलेल्या ढगांनी ते दृश्य झाकले.* **blotter** *ना* [*गण*] टिपकागदाचा मोठा ताव. **'blotting-paper** *ना* [*अगण*] शाई टिपायचा कागद, टिपकागद.

blotch /ब्लॉच्/ *ना* [*गण*] रंग फरपटल्याचा किंवा उडाल्याचा वाकडातिकडा डाग.

blouse /ब्लाउझ्; *अमे* ब्लाउस्/ *ना* [*गण*] बायकांचा एक सदरेवजा कपडा, पोलके.

blow^{1} /ब्लउ/ *क्रि* (*भूत* **blew** /ब्लू/, *भूत वि* **~n** /ब्लउन्/) १ [*अक*] (वाऱ्याबाबत) वाहणे, सुटणे. २ [*अक, सक*] (वाऱ्याबाबत) हालणे, हालवणे, उडणे, उडवणे : *The wind blew my hat off, वाऱ्याने माझी टोपी दूर उडून गेली.* ३ [*अक, सक*] तोंडातून (हवा) सोडणे, फुंकणे, फुंकर मारणे. ४ [*सक*] (नाकातून) जोराने हवा बाहेर सोडून साफ करणे, नाक शिंकरणे. ५ [*सक*] फुंकून आकार देणे किंवा काढणे, फुगा करणे, फुगविणे : *~ bubbles, साबणाच्या पाण्याचे फुगे काढणे.* ६ [*अक, सक*] (पितळी वाद्यातून) आवाज काढणे, (तोंडाने वाद्य) वाजवणे, फुंकणे. ७ [*अक, सक*] विजेच्या दाबाने वितळणे किंवा वितळवणे : *A fuse has ~n, वितळतार किंवा फ्यूज उडाला किंवा गेला.* ८ [*सक*] (*अनौप*) (पैसे) फुकट खर्च करणे, (पैसे) वाया घालवणे, (पैसे) उडवणे. ९ (*वाक्प्र*) **blow sb's brains out** (*अनौप*) डोक्यात गोळ्या झाडून एखाद्याचा खून करणे. **blow sb's mind** (*व्रात्य*) एखाद्याच्या मनात आनंदाची किंवा आश्चर्याची भावना निर्माण करणे, हालवून सोडणे, झपाटून टाकणे, मनातून उडणे. **blow one's own 'trumpet** (*अनौप*) स्वतःच्या कार्याची प्रशंसा करणे, आत्मस्तुती करणे, स्वतःची टिमकी वाजवणे. १० (*क्रिब*) **blow (sth) out** फुंकून विझवणे : *~ out a candle, मेणबत्ती फुंकून विझवणे किंवा फुंकणे.* **blow over** काही गंभीर परिणाम न होता मावळणे किंवा विरून जाणे, आपोआप नाहीसे होणे, शांत होणे, शमणे, थंडावणे : *The argument will soon ~ over, हा वाद लवकरच थंडावेल.* **blow up** (क) स्फोट होणे. (ख) अचानक आणि जोराने सुरू होणे : *A storm is ~ing up, अचानक मोठे वादळ सुरू होतेय्.* (ग) (*अनौप*) मनावरचा ताबा सुटून रागावणे, रागाचा स्फोट होणे, राग उफाळणे, भडकणे. **blow sth up** (क) स्फोट घडवून उडवणे किंवा नष्ट करणे. (ख) हवा भरणे, हवेने फुगवणे. (ग) एखादी गोष्ट मोठी करणे, मोठ्या आकारात करणे. **'blowlamp** (तसेच **'blowtorch**) *ना* [*गण*] ज्वाळेची दिशा विशिष्ट पृष्ठभागाकडे वळवणारे वातींचे घर : उदा जुना रंग काढताना, झाळणी. **'blow-out** *ना* [*गण*] १ मोटारीचे टायर फुटणे. २ तेल विहिरीतून अचानक सुरू झालेला व आटोक्यात न येणारा तेल किंवा वायूचा स्रोत, तेल किंवा तेलवायूचे उत्सर्जन. ३ (*व्रात्य*) मोठे जेवण, मेजवानी, साग्रसंगीत जेवण. **'blow-up** *ना* [*गण*] लहान छायाचित्रावरून मोठे केलेले छायाचित्र.

blow^{2} /ब्लउ/ *ना* [*गण*] फुंकण्याची, शिंकण्याची कृती : *Give your nose a good ~, तू नाक चांगले शिंकर.*

blow^{3} /ब्लउ/ *ना* [*गण*] १ हाताने किंवा शस्त्राने केलेला प्रहार, गुद्दा, ठोसा, वार, टोला. २ अचानक ओढवलेले दुर्दैव, दुर्दैवाचा घाला, दुर्भाग्याचा आघात. ३ (*वाक्प्र*) **come to 'blows** मारामारी सुरू करणे, गुद्द्यावर येणे. ,**blow-by-'blow** *वि* घडलेल्या गोष्टींची

संगतवार माहिती देणारे, इत्थंभूत.

blower /ब्लउ·अ(र्)/ *ना* [*गण*] १ हवेचा फवारा मारणारे उपकरण, इंजिनमधे हवा खेळविणारा पंखा. २ (*ब्रि अनौप*) टेलिफोन, दूरध्वनी.

blown BLOW^{1} चे *भूत वि.*

blubber /ब्लब(र्)/ *ना* [*अगण*] देवमाशाची चरबी.

bludgeon /'ब्लजन्/ *क्रि* [*सक*] १ (*अनौप*) (एखाद्याला) जड वस्तूने मारणे, ठोकणे. २ (*ला*) एखादी गोष्ट करण्याची बळजबरी करणे.

blue /ब्लू/ *वि* १ निरभ्र आकाशाचा रंग असलेला, नील, आकाशी, निळा. २ (*अनौप*) दुःखी; निराश, खचलेला, उदास. ३ लैंगिक विषयाबाबत असभ्य, अश्लील : *a ~ film, अश्लील चित्रपट, लिंगवासनेचा चित्रपट.* **blue** *ना* १ [*अगण*] निळा रंग, आकाशी रंग. २ **the blues** (क) (तसेच ब.व क्रियापदासह ए.व) दक्षिण अमेरिकेतील संथ, दुःखी संगीत. (ख) [*ब.व*] (*अनौप*) दुःख, विषाद. ३ (*वाक्प्र*) **out of the 'blue** अचानक, अनपेक्षितपणे, एकाएकी. **'bluebell** *ना* [*गण*] घंटेच्या आकाराची व निळ्या रंगाची फुले येणारे एक फुलझाड. **,blue-'blooded** *वि* खानदानी रक्ताचा, सरदार घराण्यातला, उच्च कुळातला. **'bluebottle** *ना* [*गण*] मोठ्या व निळ्या पोटाची माशी. **,blue-'collar** *वि* कष्टकरी, श्रमजीवी, अंगमेहनतीचे काम करणाऱ्यांचा. **'blueprint** *ना* [*गण*] एखाद्या योजनेचे तपशीलवार वर्णन, नीलप्रत, आरेखन. **bluish** *वि* निळसर.

bluff^{1} /ब्लफ्/ *क्रि* [*अक, सक*] आपण अधिक हुषार, सामर्थ्यवान वगैरे असल्याचा बहाणा करून एखाद्याला फसवणे, थापा मारणे, ठकवणे, गंडवणे. **bluff** *ना* [*गण, अगण*] थापा, बनवाबनवी, भूलथापा.

bluff^{2} /ब्लफ्/ *वि* (माणसाबाबत) दांडगट पण मोकळ्या मनाचा, दांडगा पण उमदा.

blunder /ब्लन्ड(र्)/ *ना* [*गण*] मूर्खपणाची किंवा निष्काळजीपणाची चूक, घोडचूक, ढोबळ चूक, गाढवपणा. **blunder** *क्रि* [*अक*] १ घोडचूक करणे. २ अनिश्चितपणे किंवा भोंगळपणे हालचाल करणे, धडपडणे.

blunt /ब्लन्ट्/ *वि* १ तीक्ष्ण धार किंवा टोक नसलेला, बोथट, लोणीकाप्या. २ (माणसाबाबत) विनम्र नसणारा, रोखठोक, सडेतोड. **blunt** *क्रि* [*सक*] बोथट करणे. **bluntness** *ना* [*अगण*] बोथटपणा; सडेतोडपणा, रोखठोकपणा.

blur /ब्लऽ(र्)/ *ना* [*गण*] स्पष्टपणे दिसू न शकणारी गोष्ट, अस्पष्ट गोष्ट. **blur** *क्रि* (-rr-) [*अक, सक*] अस्पष्ट होणे किंवा करणे, अंधुक होणे, पुसट होणे.

blurb /ब्लऽब्/ *ना* [*गण*] पुस्तकातील आशयाचे संक्षिप्त वर्णन, ग्रंथपरिचयात्मक थोडक्यात लेखन.

blurt /ब्लऽट्/ *क्रि* (*क्रिब*) **blurt sth out** एखादी गोष्ट विचार न करता पटकन् बोलणे, भकणे, अभावितपणे बोलून जाणे.

blush /ब्लश्/ *क्रि* [*अक*] लाजेने किंवा गोंधळल्याने चेहऱ्यावर लाली येणे, लाजणे, लाजेने चूर होणे, शरमणे. **blush** *ना* [*गण*] लज्जेची गालावरील लाली.

bluster /ब्लस्ट(र्)/ *क्रि* [*अक*] १ (वाऱ्याबाबत) जोराने किंवा सोसाट्याने वाहणे, घोंघावणे. २ रागाने आवाज चढवून बोलणे, आरडाओरडा करणे. **bluster** *ना* [*अगण*] (वाऱ्याचा) सोसाटा; आरडाओरडा. **blustery** *वि* (हवेबाबत) वादळी, वावधानाची, सोसाट्याची.

boa /'बउ·अ/ **'boa constrictor** *ना* [*गण*] प्राण्यांना चिरडून ठार मारणारा दक्षिण अमेरिकेतील एक मोठा साप, अजगर.

boar /बॉऽ(र्)/ *ना* [*गण*] १ नर डुक्कर. २ रानडुक्कर.

board^{1} /बॉऽड्/ *ना* १ [*गण*] (क) लाकडाचा मोठा पातळ सपाट असा तुकडा, फळी : *a 'floor-~, लाकडी तक्त्याची जमीन.* (ख) विशिष्ट कारणासाठी वापरला जाणारा लाकडाचा सपाट तुकडा, फळा : *a 'notice-~, सूचना फलक.* २ [*गण*] खेळण्यासाठी विशिष्ट आकृत्या काढलेला पृष्ठभाग, पट : *Chess is a '~ game, बुद्धिबळ हा पटावरचा खेळ आहे.* ३ [*गण*] एखाद्या व्यवसायाचे नियंत्रण करणारा माणसांचा गट, मंडळ, मंडळी : *the ~ of directors, संचालक मंडळ.* ४ [*अगण*]

भाड्याच्या जागेत मिळणारे जेवणखाण : *pay for ~ and lodging, राहण्याच्या आणि खाण्याच्या व्यवस्थेसाठी* पैसे देणे, *निवास व भोजनास पैसे देणे.* ५ (*वाक्प्र*) **above 'board** प्रामाणिक आणि मोकळा, सचोटीचा आणि उघड. **a,cross the 'board** सर्व सभासद किंवा गट मिळून किंवा या सर्वांबाबतचा : *an a'cross the ~ wage increase, सर्व सभासदांना रोजगार वाढ.* **go by the 'board** अयशस्वी होणे, पूर्णपणे फसणे; सोडून देणे, रद्दबातल करणे. **on 'board** जहाज, विमान, आगगाडी वगैरेमधे किंवा यांवर. **take sth on 'board** (*अनौप*) एखादी गोष्ट स्वीकारणे, हाती घेणे.

board^{2} /बॉऽड्/ *क्रि* १ [*सक*] फळ्या घालणे, तक्तपोशी करणे. २ [*सक*] (*औप*) (जहाजावर वगैरे) चढणे. ३ [*अक, सक*] जेवणखाण मिळणे किंवा त्याची सोय करणे. **boarder** *ना* [*गण*] बोर्डिंग-स्कूलमधे किंवा जेवण व राहणे यांची सोय असलेल्या शाळेत राहणारा विद्यार्थी, निवासी विद्यार्थी, छात्रावासी. **'boarding card** *ना* [*गण*] विमानात किंवा जहाजात बसण्यासाठीची प्रवेशिका. **'boarding-house** *ना* [*गण*] राहण्याची व जेवणाची सोय असलेले खाजगी गृह, भोजनवसतिगृह, खाणावळ. **'boarding-school** *ना* [*गण*] विद्यार्थ्यांच्या जेवण्याच्या व राहण्याच्या सोयीची शाळा, निवासी शाळा, वसतिगृहाची शाळा.

boast /बउस्ट्/ *क्रि* १ [*अक, सक*] (*about/ of*)// स्वतःचे कार्य, स्वतःची संपत्ती वगैरेविषयी फाजील अभिमानाने बोलणे, बढाया मारणे, फुशारकी मारणे, ऐट असणे : *~ about one's new car, नवीन गाडीची ऐट दाखवणे किंवा मिजास मारणे.* २ [*सक*] (अभिमान वाटावा असे काही) स्वतःजवळ असणे : *The hotel ~s a fine swimming-pool, हॉटेलात उत्तम पोहण्याचा तलाव आहे याचा अभिमान आहे, हॉटेलची अभिमानास्पद बाब म्हणजे त्यातील सुंदर पोहण्याचा तलाव.* **boast** *ना* [*गण*] बढाई, फुशारकी, मिजास. **boastful** *वि* बढाईखोर, फुशारक्या मारणारा. **boastfully** *क्रिवि* फुशारकीने, बढाईखोरपणे, गर्वाने.

boat /बउट्/ *ना* [*गण*] १ लहान आकाराचे उघडे व पाण्यावरून प्रवास करण्यासाठी वापरायचे तारू, नाव, होडी, नौका : *a 'rowing-~, वल्हवायची नाव.* २ कोणतेही गलबत, जहाज. **boat** *क्रि* [*सक*] नावेतून – विशेषतः गंमत म्हणून – प्रवास करणे : *go ~ing, नौकानयन करणे.* **'boat-house** *ना* [*गण*] होड्या ठेवण्याची छपराची जागा. **'boat-train** *ना* [*गण*] जहाजाकडे प्रवाशाला नेणारी किंवा जहाजाकडे आणणारी आगगाडी.

boatswain (तसेच **bo'sn, bos'n, bo'sun**) /बउसन्/ *ना* [*गण*] गलबतावरील वरिष्ठ अधिकारी.

bob^{1} /बॉब्/ *क्रि* (**-bb-**) [*अक*] वरखाली होणे, हेलकावे खाणे : *a cork ~bing on the water, पाण्यावर हेलकावणारे बूच.*

bob^{2} /बॉब्/ *क्रि* (**-bb-**) [*सक*] (स्त्रीचे) केस बारीक करणे, कापून आखूड करणे. **bob** *ना* [*गण*] आखूड केसांची किंवा केस कापायची फॅशन किंवा पद्धत.

bobbin /'बॉबिन्/ *ना* [*गण*] मशीनमधील धागा पकडणारी छोटी फिरकी.

bobsleigh /'बॉब्स्लेइ/ (तसेच **bobsled** /-स्लेड्/) *ना* [*गण*] लाकूड किंवा धातूच्या दोन लांब पट्ट्यांवर ठोकलेली आणि बर्फावरून घसरणारी चौकट, शर्यतींकरता वापरण्यात येणारी बर्फावरची घसरगाडी.

bode /बउड्/ *क्रि* (*वाक्प्र*) **bode 'well/'ill (for sb/sth)** (*औप*) भविष्यसूचक शुभ किंवा अशुभ शकून असणे, सुचिन्ह किंवा दुश्चिन्ह असणे, शुभ/अशुभ सूचन करणे.

bodice /'बॉडिस्/ *ना* [*गण*] स्त्रीच्या पोषाखाचा वरचा कपडा, चोळी, कंचुकी.

bodily /'बॉडिलि/ *वि* मानवी शरीराचा; शारीरिक. **bodily** *क्रिवि* १ सर्व शरीर एकवटून किंवा पकडून, पूर्णपणे उचलून. २ पूर्णपणे, एकत्रितपणे.

body /'बॉडि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) १ (क) प्राण्याचे किंवा माणसाचे शरीर, सबंध शारीरिक ठेवण. (ख) मृत देह, प्रेत, कलेवर. (ग) डोके व गात्रे सोडून उरलेला शरीराचा मुख्य भाग, धड, अंग. २ एखाद्या वस्तूचा मुख्य भाग : *the ~ of a car, मोटारीचा मुख्य भाग.* ३ एकत्रितपणे काम करणाऱ्या लोकांचा गट, मंडळी, मंडळ : *a parliamentary ~, संसदगट, संसदीय मंडळ.*

४ मोठी राशी; वस्तुमान, भार, साठा : *a ~ of water, पाण्याचा मोठा साठा, जलभार.* ५ एखाद्या द्रव्याचा तुकडा किंवा भाग; वस्तू : *heavenly bodies, आकाशातील ग्रह, तारे किंवा ग्रहगोल, खगोल.* **'bodyguard** *ना* [*गण*] एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीचे संरक्षण करणारा माणूस किंवा माणसांचा गट, अंगरक्षक, अंगरक्षक दल. **'bodywork** *ना* [*अगण*] मोटारीचा बाहेरचा मुख्य भाग.

bog /बॉग्/ *ना* [*गण*] १ ओल्या लिबलिबीत जमिनीचे क्षेत्र, दलदल, रुतण, अनूप. २ (*ब्रि व्रात्य*) संडास. **bog** *क्रि* (**-gg-**) (*वाक्प्र*) **be/get bogged down** अडकून पडल्याने हालचाल करणे अशक्य होणे, रुतणे : (*ला*) *get ~ed down in small details, तपशिलात अडकून पडणे, तपशिलात हरवणे.* **boggy** *वि* दलदलीची.

bogey = BOGY.

boggle /'बॉग्ल्/ *क्रि* [*अक*] (*at*)// (*अनौप*) कल्पना करणे अवघड असणे, गोंधळून जाणे : *The mind ~s (at the idea), मन त्या कल्पनेने गोंधळून जाते किंवा बुचकळ्यात पडते.*

bogus /'बउगस्/ *वि* खोटा, बनावट.

bogy (तसेच **bogey**) /'बउगि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) काल्पनिक दुष्ट भूत, बागुलबुवा.

boil^1 /बॉइल्/ *क्रि* १ [*अक, सक*] (द्रवपदार्थाबाबत) तापवल्यामुळे बुडबुडे येऊन वाफ होणे किंवा करणे, उकळणे, आधण येणे, कढणे, खदखदणे, उत्कलन होणे/करणे : *The kettle is ~ing, किटली(तील पाणी) उकळते आहे, किटलीला आधण आले आहे.* २ [*सक*] उकळत्या पाण्यात शिजवणे, उकडणे : *~ an egg, अंडे उकडणे.* ३ [*अक*] संतापणे, राग खदखदणे, राग उसळणे. ४ (*वाक्प्र*) **boil 'dry** (द्रवपदार्थाबाबत) संपेपर्यंत उकळणे, आटून संपणे, आटून संपेपर्यंत उकळणे. ५ (*क्रिब*) **boil away** (द्रवपदार्थाबाबत) आटून संपेपर्यंत उकळणे. **boil down to sth** मुख्य भाग किंवा मुद्दा असणे, सार असणे, मतितार्थ असणे, मुद्द्याची गोष्ट असणे : *It all ~s down to what you really want, तुला खरोखर काय पाहिजे आहे हाच खरा मुद्दा आहे.* **boil over** (क) (द्रवपदार्थाबाबत) उकळून भांड्याच्याबाहेर सांडणे, उतू जाणे. (ख) शक्तीपलीकडे जाणे, आटोक्याबाहेर जाणे, उफाळून येणे; रागाने तोल जाणे, उसळणे. **boil** *ना* (*वाक्प्र*) **bring sth/come to the 'boil** उकळायला लागणे, उकळी आणणे. **boiling 'hot** *वि* फार गरम, उकळते. **'boiling-point** *ना* [*गण*] एखादा द्रवपदार्थ ज्या तापमानास उकळतो ते तापमान किंवा तो तापमानबिंदू, उत्कलन बिंदू.

boil^2 /'बॉइल्/ *ना* [*गण*] कातडीखालची तांबूस रंगाची संसर्गदूषित सूज, गळू, फोड.

boiler /'बॉइल(र्)/ *ना* [*गण*] पाणी गरम करून देणारी यंत्रणा; पाणी तापवण्याची सोय असलेले मोठे पात्र, पाणी गरम करायचा बंब, उकळाण. **'boiler suit** *ना* [*गण*] एक कापेचा धबडग्याचे काम करतेवेळी वापरायचा कपडा.

boisterous /'बॉइस्टरस्/ *वि* (एखाद्या व्यक्तीबाबत) आनंदी आणि बडबड्या, गडबड उडवून देणारा.

bold /बउल्ड्/ *वि* १ धोके पत्करण्यास न घाबरणारा, धीट; धाडसी. २ लाजरा किंवा गरीब नसणारा, भीडभाड न बाळगणारा. ३ उठून दिसणारा, स्पष्ट किंवा ठळक, ठसठशीत : *~ design, उठून दिसणारी नक्षी.* **boldly** *क्रिवि* धीटपणे, न डगमगता, न लाजता. **boldness** *ना* [*अगण*] धीटपणा, धिटाई; उद्धटपणा; ठसठशीतपणा.

bollard /बॉलाड्/ *ना* [*गण*] पादचारीमार्ग आणि रस्ता यांच्या सीमेवरचा लहान जाड खांब किंवा ट्रॅफिक-आयलंडभोवतालचे जाड खांबे, आडखांब, आडखुंटे.

bolster /'बउल्स्ट(र्)/ *ना* [*गण*] लंबुळकी उशी, लोड. **bolster** *क्रि* [*सक*] (*up*)// आधार देणे, टेकू देणे; उत्तेजन देणे, भक्कम पाठिंबा देणे.

bolt /बउल्ट्/ *ना* [*गण*] १ कोयंडा किंवा खोबणीत सरकवून दार बंद करायची धातूची पट्टी, कडी, खीळ, अडसर. २ वस्तू घट्ट पकडण्यासाठी किंवा बसण्यासाठी वापरायचे मळसूत्र आणि त्याची फिरकी. ३ विजेचे चमकणे, विद्युत्‌रेखा. ४ झटकन् पळून जाण्याची क्रिया, सटकणे, निसटणे, पसार होणे : *make a*

~ *for it*, *पलायन करणे.* **bolt** *क्रि* १ [*अक, सक*] कडी घालणे, अडसर लावणे. २ [*अक*] (खास घोड्याबाबत) जोराने पळणे, उधळणे, बेफाम धावणे. ३ [*सक*] (*down*)// घाईने, न थांबता (अन्न) गिळणे, गपागप खाणे, गट्ट करणे. **bolt** *क्रिवि* (*वाक्प्र*) **bolt 'upright** अगदी ताठ, पाठीत न वाकता.

bomb /बॉम्/ *ना* १ [*गण*] स्फोटके भरलेला गोळा, कुलपी गोळा, बॉम्बगोळा. २ **the bomb** [*अे.व*] अणुबॉम्ब, अण्वस्त्र. **bomb** *क्रि* [*सक*] बॉम्बचा मारा करणे, बॉम्ब गोळ्याचा भडिमार करणे, बॉम्ब टाकणे. **bomber** *ना* [*गण*] १ बॉम्बगोळा किंवा बॉम्ब टाकणारे विमान, बॉम्बफेकी विमान. २ बॉम्ब टाकणारा किंवा पेरणारा माणूस. **'bombshell** *ना* [*गण*] (*अनौप*) मोठा धक्का, हादरा.

bombard /बॉम्'बाड्/ *क्रि* [*सक*] १ मोठ्या तोफातून बॉम्बगोळे किंवा दारूचे गोळे उडवून हल्ला करणे, बॉम्बगोळ्यांचा भडिमार करणे. २ (*ला*) प्रश्नांचा वगैरे भडिमार करणे. **bombardment** *ना* [*गण, अगण*] भडिमार.

bona fide /,बउन 'फाइडि/ *वि, क्रिवि* यथातथ्य(पणे), खराखुरा, खरेखुरेपणाने, विश्वसनीय (रीतीने).

bond /बॉन्ड्/ *ना* १ [*गण*] लोकांना किंवा गटांना एकत्र जोडणारा बंध: *~s of friendship, मैत्रीचे बंध.* २ [*गण*] लेखी कायदेशीर करार, करारनामा. ३ [*गण*] शासनाला वगैरे पैसे दिले असून ते सव्याज परत मिळतील असे आश्वासन देणारे हमीपत्र किंवा प्रमाणपत्र, कर्जरोखा. ४ **bonds** [*ब.व*] कैद्याला बांधण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या दोऱ्या किंवा साखळ्या, बेड्या, शृंखला. **bond** *क्रि* [*सक*] एकत्र करणे, जोडणे.

bondage /'बॉन्डिज्/ *ना* [*अगण*] (*जुना, अप्रचलित* किंवा *औप*) गुलामगिरी, दास्य, वेठबिगारी.

bone /बउन्/ *ना* १ [*गण, अगण*] एखाद्या प्राण्याच्या कठीण भागांनी बनलेला सापळ्याचा कोणताही भाग, हाड, अस्थी. २ (*वाक्प्र*) **feel sth in one's 'bones** एखाद्या गोष्टीची खात्री वाटणे, आतून वाटणे. **have a 'bone to pick with sb** एखाद्याकडे तक्रार करण्यासारखी एखादी गोष्ट असणे, एखाद्या गोष्टीवरून भांडण काढणे. **make no bones about (doing) sth** एखादी गोष्ट करण्यास न कचरणे. **bone** *क्रि* [*सक*] हाडे काढणे, मांसातील हाडे निवडून काढणे. **,bone-'dry** *वि* पूर्णपणे वाळलेला, खडखडीत कोरडा. **,bone 'idle** अत्यंत आळशी, हाडाचा आळशी.

bonfire /'बॉन्फाइअ(र्)/ *ना* [*गण*] घराबाहेर पेटवलेला मोठा जाळ, शेकोटी, होळी.

bonnet /'बॉनिट्/ *ना* [*गण*] १ मोटारीच्या इंजिनवरील झाकण किंवा आवरण. २ हनुवटीखाली बंद बांधायची लहान मुलाची किंवा स्त्रीची टोपी, टोपडे.

bonny /'बॉनि/ *वि* (**-ier, -iest**) (*पसंती खास स्कॉट*) आरोग्यसंपन्न, निरोगी दिसणारा, गुटगुटीत.

bonus /'बउनस्/ *ना* [*गण*] १ नेहमीपेक्षा जादाचा पगार, अधिलाभांश. २ अपेक्षेपेक्षा जास्त असे काहीही सुखकर, दुधात साखर.

bony /'बउनि/ *वि* (**-ier, -iest**) १ खूप हाडे असणारा: *This fish is ~, ह्या माशात खूप हाडे आहेत.* २ हडकुळा; हाडे बाहेर आलेला, हाडे निघालेला.

boo /बू/ *उद्गा, ना* [*गण*] (*ब.व* ~**s**) नापसंती दाखविण्यासाठी तोंडातून काढलेला आवाज, हुर्रऽ. **boo** *क्रि* [*अक, सक*] टर उडविणे, हुर्रऽ असा आवाज करणे, हुर्रेवडी उडवणे.

booby prize /'बूबि प्राइझ्/ *ना* [*गण*] स्पर्धेत सर्वात शेवटी येणाऱ्याला देण्यात येणारे बक्षीस.

booby trap /'बूबि ट्रॅप्/ *ना* [*गण*] लांबून अपायकारक न वाटणारी पण हात लावताच इजा करणारी किंवा जिवे मारणारी वस्तू, सापळा. **booby-trap** *क्रि* (**-pp-**) [*सक*] प्राणघातक, स्फोटक अशी वस्तू हळूच ठेवणे, सापळा लावणे.

book^1 /बुक्/ *ना* १ [*गण*] छापलेल्या कागदांचा एका वेष्टणात बांधलेला संच, पुस्तक, ग्रंथ. २ [*गण*] पुस्तकाच्या पानांसारख्या एकत्र बांधलेल्या गोष्टी: *a ~ of stamps, तिकिटांचे पुस्तक.* ३ **books** [*ब.व*] हिशेबाच्या वह्या, खातेवह्या. ४ [*गण*] बायबल

वगैरेसारख्या मोठ्या लिखित ग्रंथाचा भाग, खंड. ५ (*वाक्प्र*) **be in sb's good/bad 'books** (*अनौप*) एखाद्याची कृपा/अवकृपा असणे, एखाद्याची मर्जी/गैरमर्जी असणे. **'bookcase** *ना* [*गण*] पुस्तके ठेवण्यासाठीचे शेल्फ किंवा अलमारी, पुस्तक-मांडणी. **'book club** *ना* [*गण*] सभासदांना कमी किमतीत पुस्तके विकणारे मंडळ. **'bookkeeping** *ना* [*अगण*] व्यवसाय व्यवहाराचे हिशेब ठेवणे, लेखाकार्य, जमाखर्च. **'bookkeeper** *ना* [*गण*] हिशेब ठेवणारा, हिशेबनीस. **'bookmaker** *ना* [*गण*] घोड्यांच्या शर्यतीवर लावायचे पैसे जमा करणारा, पैशाच्या पैजांची व्यवस्था करणारा. **'bookmark** *ना* [*गण*] खुणेसाठी ठेवायचा पुस्तकातील कागद किंवा दोरा. **'bookshop** *ना* [*गण*] पुस्तक विक्रीचे दुकान, पुस्तकांचे दुकान. **'bookstall** *ना* [*गण*] पुस्तके, मासिके वगैरे विकण्याचे छोटे दुकान, ग्रंथविक्रीकेंद्र. **'book token** *ना* [*गण*] ज्याच्या बदल्यात पुस्तक विकत मिळते ते कार्ड किंवा कूपन, पुस्तकतिकीट. **'bookworm** *ना* [*गण*] वाचनाची खूप आवड असणारा माणूस, पुस्तकातील किडा.

book^2 /बुक्/ *क्रि* १ [*अक, सक*] (तिकिटांची वगैरे) आगाऊ मागणी करणे किंवा नोंदणे; आरक्षण करणे किंवा राखून ठेवणे. २ [*सक*] कायदेशीर कारवाई करण्यासाठी एखाद्याचे नाव लिहिणे : *be ~ed for speeding, वेगाने जाण्याबद्दल किंवा वेगमर्यादा मोडल्याबद्दल नाव लिहिले जाणे.* **bookable** *वि* आरक्षण करता येण्यासारखा, राखीव म्हणून ठेवलेला. **booking** *ना* [*गण*] आरक्षण. **'booking-office** *ना* [*गण*] तिकिटविक्रीची कचेरी.

bookie /'बुकि/ *ना* [*गण*] (*अनौप*) **bookmaker** (➪ BOOK^1) चे संक्षिप्त रूप.

'booklet /'बुक्लिट्/ *ना* [*गण*] कागदाचे वेष्टण असलेले छोटेसे कमी पानांचे पुस्तक, पुस्तिका.

boom^1 /बूम्/ *ना* [*गण*] एकदम झालेली वाढ (उदा धंद्यात), तेजी. **boom** *क्रि* [*अक*] तेजीत असणे : *Sales are ~ing, विक्री तेजीत आहे.*

boom^2 /बूम्/ *क्रि* १ [*अक*] मोठा घुमणारा आवाज करणे. २ [*अक, सक*] (*out*)// खोल, घुमणाऱ्या आवाजात म्हणणे. **boom** *ना* [*गण*] घणाघाती आवाज, गंभीर घुमणारा आवाज, ढमढम.

boom^3 /बूम्/ *क्रि* १ शिडाचे कापड तळाशी लांब ताणण्याकरता वापरलेली काठी, शिडाची तळकाठी. २ मायक्रोफोन/माईकची हालवता फिरवता येण्याजोगी लांब जोडकाठी.

boomerang /'बूमरॅङ्/ *ना* [*गण*] (ऑस्ट्रेलियातील आदिवासी वापरतात ती) मारल्यानंतर ,फिरून मारणाऱ्याच्या हातात येणारी वाकडी लाकडी काठी.

boon /बून्/ *ना* [*गण*] कृतज्ञता वाटावी असे काही, अनुग्रह, वर, वरदान; फायदा, लाभ.

boor /बुअ(र्)/ *ना* [*गण*] रासवट माणूस, जंगली. **boorish** *वि* रानटी, जंगली, रासवट.

boost /बूस्ट्/ *क्रि* [*सक*] ताकद किंवा किंमत वाढविणे. **boost** *ना* [*गण*] शक्तिवाढ, मूल्यवाढ. **booster** *ना* [*गण*] १ शक्ती किंवा किंमत वाढविणारे काही, उत्क्षेपक. २ एखाद्या औषधाचे जादा इंजेक्शन.

boot /बूट्/ *ना* [*गण*] १ घोट्यापर्यंत किंवा कधी पोटरीपर्यंत येणारे पादत्राण किंवा जोडा. २ मोटारीच्या मागे सामान ठेवण्यासाठी असलेली जागा. ३ (*वाक्प्र*) **give sb/get the 'boot** (*अनौप*) एखाद्याला कामावरून काढून टाकणे, हाकलणे किंवा कामावरून बडतर्फ होणे. **put the 'boot in** (*अनौप*) एखाद्याला लाथा मारणे, तुडवणे. **boot** *क्रि* १ [*सक*] लाथ मारणे, पायाने उडवणे. २ (*क्रिब*) **boot sb out (of sth)** (*अनौप*) एखाद्याला जागा किंवा नोकरी सोडायला भाग पाडणे, लाथ घालणे.

booth /बूद्; *अमे* बूथ्/ *ना* [*गण*] १ मालविक्रीचे छोटे दुकान. २ छोटी बंदिस्त जागा, टपरी : *a telephone ~, टेलिफोन करण्याची टपरी, दूरध्वनी केंद्र.*

booze /बूझ्/ *ना* [*गण*] (*अनौप*) मादक पेय, मद्यार्कयुक्त पेय. **booze** *क्रि* [*अक*] (*अनौप*) दारू पिणे, झोकणे, तर्र होणे, ढोसणे, दारू पिऊन झिंगणे. **boozer** *ना* [*गण*] (*अनौप*) १ दारुड्या, दारुबाज, नशाबाज. २ (*ब्रि*) गुत्ता, अड्डा. **'booze-up** *ना* [*गण*] (*ब्रि अनौप*) चिकार दारू पिण्याची पार्टी किंवा त्याचा प्रसंग, ओली पार्टी.

bop /बॉप्/ *ना* [*गण, अगण*] (*अनौप*) पॉप संगीतावर केलेले नृत्य. **bop** *क्रि* **(-pp-)** [*अक*] (*अनौप*) पॉप संगीतावर नृत्य करणे.

border /'बॉऽड(र्)/ *ना* [*गण*] १ दोन देशातील सीमा, सरहद्द. २ कड, काठ. ३ बागेतील हिरवळी काठचा फुलझाडे लावण्याचा पट्टा. **border** *क्रि* १ [*अक, सक*] (*on*)// (दुसऱ्या देशाला) लागून असणे. २ (*क्रिब*) **border on sth** एखाद्या गोष्टीसारखे असणे : *a state of excitement ~ing on madness, वेडासारखा असणारा आवेश, वेड लागल्यासारखा क्षोभ.* **'borderline** *ना* [*गण*] सीमारेषा, हद्द दाखवणारी रेषा. **'borderline** *वि* दोन वेगळ्या श्रेणी किंवा कोटीमधील : *a ~line candidate, पास-नापासाच्या सीमेवरचा, पास होऊ शकेल किंवा नापासही होऊ शकेल असा विद्यार्थी, काठावर पास होणारा उमेदवार.*

bore^1 /बॉऽ(र्)/ *क्रि* [*सक*] एखाद्याला थकवा आणि कंटाळा आणणे. **bore** *ना* [*गण*] कंटाळा आणणारी व्यक्ती किंवा गोष्ट. **boredom** /-डम्/ *ना* [*अगण*] कंटाळा. **boring** *वि* कंटाळवाणा; रटाळ.

bore^2 /बॉऽ(र्)/ *क्रि* [*अक, सक*] विशेष हत्याराने एखाद्या वस्तूला गोल, खोल असे भोक पाडणे, छिद्र पाडणे, विंधणे. **bore** *ना* [*गण*] १ हत्याराने पाडलेले भोक, छिद्र. २ बंदुकीच्या नळीतील पोकळी (किंवा तिचा आतील व्यास).

bore^3 BEAR^2 चा *भूत.*

born /बॉऽन्/ *क्रि* **be born** जन्म होऊन जगात येणे, जन्मणे, जन्माला येणे : *I was ~ in 1943, मी १९४३ मधे जन्मलो, माझा जन्म १९४३चा.* **born** *वि* उपजत कौशल्य किंवा सामर्थ्य असलेला, जन्मतः, जन्मजात : *be a ~ leader, उपजत नेता असणे, जन्मल्यापासूनच नेतृत्वगुण असणे.* **-born** (नामे किंवा विशेषणे करण्यासाठी) जन्माने विशिष्ट देशाचे राष्ट्रीयत्व किंवा नागरिकत्व असणारा : *Dutch-~, जन्माने डच असणे म्हणजे डच म्हणून जन्मलेला.* **,born-a'gain** *वि* एखाद्या गोष्टीवर विशेषतः धर्मावर नव्याने श्रद्धा बसलेला : *a ~-again Christian, नव्याने ख्रिस्ती-धर्माभिमानी झालेला.*

borne BEAR^2 चे *भूत वि.*

borough /'बैर; *अमे* -रउ/ *ना* [*गण*] शहर किंवा मोठ्या शहराचा तालुका, परगणा, -पुर.

borrow /'बॉरउ/ *क्रि* [*अक, सक*] (दुसऱ्याच्या मालकीची वस्तू) परत बोलीवर घेणे किंवा वापरणे, उसनी घेणे, उसनवारीने घेणे, वापरायला मागणे. **borrower** *ना* [*गण*] ऋण काढणारा, ऋणको, रिणको, कर्जदार.

Borstal /'बॉऽस्ट्ल्/ *ना* [*गण, अगण*] बाल गुन्हेगारांसाठीची तुरुंगातली शाळा, किशोर सुधारालय.

bosom /'बुझ़म्/ *ना* १ [*गण*] (*जुना* किंवा *अप्रचलित*) माणसाची छाती, ऊर, विशेषतः स्त्रीचे स्तन, वक्ष, वक्षस्थळ. २ **the bosom of sth** [*अे.व*] (*जुना* किंवा *अप्रचलित*) एखाद्या गोष्टीची प्रेमाने घेतलेली काळजी आणि तिला प्रेमाने दिलेला आसरा, लाड, लाडात वाढणारा, तळहातावरच्या फोडासारखा जपलेला : *in the ~ of one's family, कुटुंबातील लाडामधे.* **bosom 'friend** *ना* [*गण*] जीवश्चकंठश्च मित्र, लंगोटीयार, जानीदोस्त, जिवलग मित्र.

boss /बॉस्/ *ना* [*गण*] (*अनौप*) इतरांवर वचक ठेवून त्यांना आज्ञा देणारा माणूस, साहेब, धनी, दादा. **boss** *क्रि* [*सक*] (*about/ around*)// (*अनौप*) एखाद्याला आज्ञा देणे, फर्मावणे, हुकूम देणे. **bossy** *वि* **(-ier, -iest)** हुकूम सोडण्याची आवड असणारा, दादागिरी करणारा.

botany /'बॉटनि/ *ना* [*अगण*] वनस्पतींचा शास्त्रीय पद्धतीने केलेला अभ्यास, वनस्पतीशास्त्र, वानसशास्त्र. **botanical** /ब'टॅनिक्ल्/ *वि* वानसशास्त्रीय, वनस्पतींचे. **botanist** *ना* [*गण*] वानसशास्त्रज्ञ किंवा वनस्पतींचा अभ्यासक.

botch /बॉच्/ *क्रि* [*सक*] गबाळे किंवा वाईट काम करून एखादी गोष्ट बिघडवणे, कसेबसे काम करणे. **botch** *ना* [*गण*] ओबडधोबड काम, गबाळे काम.

both /बउथ्/ *वि, सना* दोघे, दोन्ही; एक आणि दुसरा, हे एक आणि ते : *B~ the books are expensive, दोन्ही पुस्तके महाग आहेत* ○ *His parents are ~ dead, त्याचे आई आणि वडील दोघेही हयात नाहीत.* **both** *क्रिवि* दोन्हीकडे किंवा दोन्ही बाबतीत खरे, दोन्ही ठिकाणी : *She* *has houses in ~ London and Paris, लंडन आणि पॅरिस या दोन्ही ठिकाणी तिची घरे आहेत.*

bother /'बॉद(र्)/ *क्रि* १ [*सक*] त्रास देणे, त्रस्त करणे, पीडा देणे, छळणे : *Is something ~ing you? तुला कशाचा त्रास होतोय का? तू कशाची चिंता करतोयस्? तुला काय होतंय्?* २ [*अक, सक*] कष्ट घेणे, वेळ खर्च करणे : *Don't ~ to stand up, उभे राहण्याचे कष्ट घेऊ नकोस, नको उभा राहूस!* **bother** *ना* [*अे.व*] त्रासदायक गोष्ट, पीडा, छळणारी गोष्ट; उगद्रव, कटकट. **bothersome** *वि* त्रासदायक, उपद्रवकारक.

bottle /'बॉट्ल्/ *ना* १ [*गण*] (क) द्रवपदार्थ ठेवण्याचे लहान गळ्याचे पात्र, बाटली, कुपी. (ख) बाटलीतील पदार्थ. २ [*गण*] लहान बालकाला दूध पाजायची बाटली, मुलाची दुधाची बाटली; अशा बाटलीतील दूध. ३ [*अगण*] (*ब्रि व्रात्य*) धैर्य, धाडस, धमक. **bottle** *क्रि* १ [*सक*] बाटलीत भरणे, बाटल्या भरणे. २ (*क्रिब*) **bottle sth up** तीव्र भावना न दाखविणे, दाबून ठेवणे, दडपणे. **'bottleneck** *ना* [*गण*] १ वाहतुकीचा वेग कमी करणारा रस्त्याचा अरुंद भाग. २ गती किंवा प्रगती कमी करणारी कोणतीही गोष्ट.

bottom /'बॉटम्/ *ना* १ [*गण, बहुधा अे.व*] सगळ्यात खालचा भाग किंवा खालचे टोक, तळ, बूड. २ [*गण*] माणूस ज्याच्यावर बसतो तो शरीराचा भाग, बूड. ३ [*अे.व*] समुद्र, तळे वगैरेची खालची जमीन, तळ, ठाव. ४ [*गण, बहुधा अे.व*] शेवटचे टोक : *at the ~ of the garden, बागेच्या टोकाला.* ५ [*अे.व*] वर्ग, संस्था वगैरेतील सर्वात खालची जागा. ६ (*वाक्प्र*) **at the 'bottom of sth** एखाद्या गोष्टीचे मुळातले कारण, तळाशी असलेले कारण. **get to the 'bottom of sth** एखाद्या गोष्टीचे मूळ किंवा खरे कारण शोधून काढणे, तळ गाठणे. **bottom** *क्रि* (*क्रिब*) **bottom out** नीच स्तरावर जाणे, पार तळाला पोहोचणे. **bottomless** *वि* अथांग, खूप खोल, अतल; अमर्याद. **the ,bottom 'line** *ना* [*अे.व*] (*अनौप*) सर्वात महत्त्वाचा किंवा निर्णायक मुद्दा.

bough /बाउ/ *ना* [*गण*] झाडाची मोठी फांदी, शाखा.

bought BUY चा *भूत, भूत वि.*

boulder /'बउल्ड(र्)/ *ना* [*गण*] धोंडा, मोठा गोटा, गोलाकार शिलाखंड.

bounce /बाउन्स्/ *क्रि* १ [*अक, सक*] चेंडू वगैरे एखाद्या गोष्टीवर आपटून मागे येणे, उडणे, उसळणे, टप्पा खाणे. २ [*अक, सक*] वरखाली होणे, झुलणे, झोके घेणे. ३ [*अक, सक*] टुणकन् येणे, धाडकन् येणे : *She ~d into the room, ती धाडकन् खोलीत आली.* ४ [*अक*] (*अनौप*) (धनादेशाबाबत) खात्यावर तेवढे पैसे नसल्याने परत पाठवला जाणे. **bounce** *ना* [*गण*] टप्पा, उसळी. **bouncer** *ना* [*गण*] त्रास देणाऱ्या माणसाची उचलबांगडी करणारा क्लबमधील गडी किंवा रखवालदार. **bouncing** *वि* दणकट आणि काटक, धिप्पाड, मजबूत.

bound^{1} BIND चा *भूत, भूत वि.*

bound^{2} /बाउन्ड्/ *वि* १ *to*// (क) एखादी गोष्ट करण्याबाबत निश्चित, नक्की, निःसंशय : *He is ~ to win, तो नक्की जिंकेल.* (ख) एखादी गोष्ट करण्यास कायद्याने किंवा कर्तव्याने बांधलेला, बंधनकारक. २ (*वाक्प्र*) **bound 'up in sth** एखाद्या गोष्टीत गुंतलेला, व्यग्र. **bound 'up with sth** एखाद्या गोष्टीशी निकटचा संबंध असलेला, जवळचे संबंध असलेला.

bound^{3} /बाउन्ड्/ *वि* (*for*)// विशिष्ट ठिकाणी जाणारा, -कडे/-ला जाणारा : *a ship ~ for Rotterdam, रोटरडॅमला जाणारे जहाज.*

bound^{4} /बाउन्ड्/ *क्रि* [*सक*] (बहुधा कर्मणी) एखाद्या (प्रदेशाच्या) सीमेलगत असणे, भोवताली असणे : *an airfield ~ed by woods, वनराईने वेढलेला विमानतळ/हवाई अड्डा.*

bound^{5} /बाउन्ड्/ *क्रि* [*अक*] उडी मारणे; उड्या मारत चालणे, दुडक्या चालीने जाणे. **bound** *ना* [*गण*] उंच उडी किंवा लांब उडी.

boundary /'बाउन्ड्रि/ *ना* [*गण*] (*ब.व* -ies) मर्यादा दाखविणारी रेषा, सीमा, हद्द, बांध.

boundless /'बाउन्ड्लिस/ *वि* अमर्याद, असीम, निस्सीम.

bounds /बाउन्ड्झ्/ *ना* [*ब.व*] १ हद्द, मर्यादा. २ (*वाक्प्र*) **out of 'bounds (to**

sb) (एखाद्या जागेबाबत) (एखाद्याला) प्रवेश करण्यास बंदी असलेला, सीमाबंदी.

bounty /'बाउन्टि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] (*जुना* किंवा *अप्रचलित*) दातृत्व, दानत, औदार्य, उदारपणा. २ [*गण*] (*जुना* किंवा *अप्रचलित*) उदारपणे दिलेली बक्षिसी. ३ [*गण*] बक्षीस म्हणून दिलेले पैसे, रोख इनाम. **'bountiful** *वि* उदार, दानशूर.

bouquet /बु'केइ, बउ'केइ/ *ना* १ [*गण*] पुष्पगुच्छ. २ [*अे.व*] मद्याचा धुंद वास.

bourgeois /'बॉऽझ्वा, ,बुअर'झ्वा/ *ना* [*गण*], *वि* १ मालमत्ता असणारा मध्यमवर्गीय (माणूस). २ (*अधिक्षेपी*) मालमत्ता, संपत्ती जमवण्यात गुंतलेला किंवा व्यग्र (माणूस), पांढरपेशा (माणूस). **bourgeoisie** /,बॉऽझ्वा'झ़ि, ,बुअ'झ्वाझ़ी/ *ना* [*अे.व* तसेच *ब.व* क्रियापदाबरोबर *अे.व*] (*अधिक्षेपी*) मध्यमवर्ग.

bout /बाउट्/ *ना* [*गण*] आजार किंवा एखाद्या कृतीचा लहानसा कालखंड, आजाराचे अवसान.

boutique /बू'टीक्/ *ना* [*गण*] छोटे दुकान – विशेषतः अत्याधुनिक कपड्यांचे.

bow^1 /बाउ/ *क्रि* १ [*अक, सक*] आदराने किंवा स्वागतार्थ पुढे वाकणे. २ (*क्रिब*) **bow out (of sth)** एखाद्या गोष्टीत भाग घ्यायचे बंद करणे, एखाद्या गोष्टीतून अंग/पाय काढून घेणे. **bow to sth** एखाद्या गोष्टीपुढे शरणागती पत्करणे, नमणे, वाकणे, दबणे; एखादी गोष्ट स्वीकारणे, मान्य करणे, तिला रुकार देणे : *I ~ to your authority, तुझ्या अधिकारापुढे मी नतमस्तक आहे, तुझा अधिकार मी मान्य करतो.* **bow** *ना* [*गण*] नमस्कार, लवून केलेले वंदन.

bow^2 /बउ/ *ना* [*गण*] १ बाण मारण्यासाठी ताणलेल्या दोरीने वाकवलेली काठी, धनुष्य, कमटा, चाप. २ घोड्याचे लांब केस दोन्ही टोकांना आवळून तयार केलेली व्हायोलिन किंवा सारंगी वगैरे वाजवण्यासाठी वापरायची लाकडी काठी, सारंगी वगैरे वाजवायचा कमानदार गज किंवा धनुकली. ३ छान दिसण्यासाठी रिबनचे किंवा रेशमी पट्टीचे बांधलेले फूल. **,bow-'legged** *वि* गुडघ्याशी बाहेरच्या बाजूला बाकलेले पाय असणारा, बाकदार पायांचा, फेंगडा. **,bow-'tie** *ना* [*गण*] पुरुषांच्या नेकटायचे गळ्यावर बांधलेले फूल किंवा बो, नेकटायची गळ्यापाशी असलेली गोलाकार रचना. **,bow-'window** *ना* [*गण*] निमगोल खिडकी.

bow^3 /बाउ/ *ना* [*गण*] जहाजाचा पुढचा भाग, गलबताची नाळ.

bowel /'बाउअल्/ *ना* [*गण,* बहुधा *ब.व*] १ आतडे. २ सर्वांत आतील, खोल भाग, अंतर्भाग, अभ्यंतर : *in the ~s of the earth, पृथ्वीच्या अंतर्भागात, पोटात.*

bowl^1 /बउल्/ *ना* [*गण*] १ (क) अन्न किंवा पातळ पदार्थांसाठी वापरायचे खोलगट गोलाकार भांडे. (ख) बाउलमधील पदार्थ. २ एखाद्या गोष्टीचा उथळ गोलाकार भाग.

bowl^2 /बउल्/ *क्रि* १ (क) [*अक, सक*] क्रिकेटमधे फलंदाजाकडे (चेंडू) टाकणे. (ख) [*सक*] (*out*)// क्रिकेटमधे (फलंदाजाच्या) मागची यष्टी गोलंदाजाने चेंडूने पाडून त्याला बाद करणे. २ [*अक*] मोठा लाकडी चेंडू एका छोट्या लाकडी चेंडूकडे ढकलण्याचा एक खेळ खेळणे किंवा लाकडी ठोकळे चेंडूने पाडण्याचा खेळ खेळणे. ३ (*क्रिब*) **bowl sb over** (क) धडक देऊन एखाद्याला पाडणे, उडवणे, धक्का देणे. (ख) एखाद्याला आश्चर्यचकित करणे, आश्चर्याचा धक्का देणे. **bowl** *ना* १ [*गण*] काष्ठगोलकांच्या खेळात किंवा लाकडी ठोकळे पाडण्याच्या खेळात वापरायचा चेंडू. २ **bowls** (अे.व क्रियापदाबरोबर) एका छोट्या लाकडी चेंडूकडे मोठे लाकडी चेंडू जास्तीत जास्त जवळ ढकलण्याचा आणि गवतावर खेळण्याचा एक खेळ.

bowler^1 /'बउल(र्)/ *ना* [*गण*] चेंडू टाकणारा माणूस, गोलंदाज.

bowler^2 (तसेच **,bowler 'hat**) /'बउल(र्)/ *ना* [*गण*] पुरुषांची टणक गोलाकार हॅट.

bowling /'बउलिङ्/ *ना* [*अगण*] आखलेल्या पट्टीतून मोठा लाकडी चेंडू टाकून बाटलीच्या आकाराचे लाकडी ठोकळे पाडण्याचा एक खेळ.

box^1 /बॉक्स्/ *ना* १ [*गण*] (क) वस्तू ठेवण्यासाठी झाकण असलेले एक टणक पात्र, पेटी, संदूक, खोके. (ख) पेटीतील वस्तू किंवा

खोक्यातील वस्तू. २ [*गण*] (क) वेगळी बंदिस्त जागा किंवा वेगळा बंदिस्त खण : *a ~ in a heatre, नाट्य/चित्रपटगृहातील बॉक्स.* (ख) विशिष्ट कारणासाठी वापरायचा छोटासा खण किंवा छोटीशी टपरी, पेटीसारखी झोपडी : *a elephone ~, दूरध्वनीची टपरी.* ३ [*गण*] छापील अर्जातील लिहिण्यासाठी मोकळी सोडलेली जागा. ४ **the box** [*अे.व*] (*ब्रि अनौप*) दूरदर्शनचा संच, दूरदर्शन. **box** *क्रि* १ [*सक*] पेटीत किंवा खोक्यात घालणे किंवा ठेवणे. २ (*क्रिब*) **box sb/sth in** एखाद्या माणसाला किंवा व्यक्तीला चहूकडून घेरणे, त्याला अरुंद जागेत गाठणे, कोंडी करणे. **'box number** *ना* [*गण*] वर्तमानपत्रातील जाहिरातीत उत्तर पाठविण्यासाठी दिलेला पत्त्याऐवजीचा क्रमांक. **'box office** *ना* [*गण*] चित्रपटगृह वगैरे ठिकाणी तिकीट-विक्रीचे कार्यालय.

ox^{2} /बॉक्स्/ *क्रि* [*अक, सक*] हातात जाड मोजे घालून एखाद्याला खेळ म्हणून गुद्दे मारणे, मुष्टीयुद्ध करणे. **boxer** *ना* [*गण*] १ मुष्टीयोद्धा. २ बुलडॉग या जातीच्या कुत्र्याचा एक प्रकार. **boxing** *ना* [*अगण*] मुष्टियुद्ध, ठोसे मारण्याचा खेळ.

oxing Day /ˌबॉक्सिङ् डेइ/ *ना* [*अगण, गण*] खिसमस दिनानंतर म्हणजे २५ डिसेंबर नंतरचा पहिला दिवस (रविवार सोडून).

oy /बॉइ/ *ना* [*गण*] नर बालक, छोकरा, वयाने लहान पुरुष, मुलगा, पोरगा. **'boyfriend** *ना* [*गण*] मुलीचा किंवा स्त्रीचा खास पुरुष मित्र. **boyhood** *ना* [*अगण*] पोरवयाचा काळ, किशोरावस्था, बालपण. **boyish** *वि* एखाद्या लहान मुलासारखा, लहान मुलासाठी, लहान मुलाचा, बालसदृश.

oycott /'बॉइकॉट्/ *क्रि* [*सक*] (एखाद्या गोष्टीशी) संबंध न ठेवणे किंवा तिच्यात भाग न घेणे, बहिष्कार घालणे. **boycott** *ना* [*गण*] बहिष्कार.

a /ब्रा/ *ना* [*गण*] स्तनांना आधार देणारे स्त्रीचे अंतर्वस्त्र, बॉडी.

ace /ब्रेइस्/ *क्रि* १ **~ oneself (for/to)** एखाद्या संकटाला किंवा दुःखाला तोंड देण्याची तयारी करणे, सज्ज होणे. २ [*सक*] (हात किंवा पाय) घट्ट रोवून शरीराचा तोल सावरणे, स्थिर राहणे. ३ [*सक*] बळकट करणे, घट्ट किंवा दृढ करणे; आधार देणे, बळकटी आणणे. **brace** *ना* १ [*गण*] दात सरळ करण्यासाठी वापरायचे तारांचे उपकरण – विशेषतः लहान मुलांसाठी, दाताला लावायच्या तारा. २ [*गण*] सरळ करणारे किंवा आधार देणारे काहीतरी. ३ **braces** [*ब.व*] (*ब्रि*) चड्डी किंवा पॅन्ट घट्ट करण्यासाठी खांद्यावरून लावायचे पट्टे, विजारीचे खांदेबंद. **bracing** *वि* जोम देणारा, उत्साहवर्धक : *the bracing sea air, समुद्रावरची उत्साहवर्धक हवा.*

bracelet /'ब्रेइस्लिट्/ *ना* [*गण*] मनगटाभोवती घालायचा शोभादायक पट्टा, मनगटावरची साखळी, मनगट्या.

bracken /'ब्रॅकन्/ *ना* [*अगण*] पिसासारख्या फांद्यांचे हिरव्या रंगाचे मोठे झुडूप, नेच्यांचा एक मोठा प्रकार.

bracket /'ब्रॅकिट्/ *ना* [*गण*] १ [बहुधा ब.व] शब्दांभोवती करायच्या लिखित चिन्हद्वयातील कोणतेही एक चिन्ह – उदाहरणार्थ ( ), कंस. २ मांडणीच्या आडव्या फळीला आधार देण्यासाठी मारायची पट्टी. ३ दिलेल्या मर्यादितील गट : *the 20–30 age ~, वीस ते तीस हा वयोगट.* **bracket** *क्रि* [*सक*] १ कंसात घालणे, कंसात लिहिणे. २ एकत्र करणे, जोडणे.

brackish /'ब्रॅकिश्/ *वि* (पाण्याबाबत) थोडेसे खारट, मचूळ.

brag /ब्रॅग्/ *क्रि* (**-gg-**) [*अक, सक*] (एखाद्या गोष्टीबाबत) फाजील अभिमानाने किंवा गर्वाने बोलणे, गर्व करणे, बढाई मारणे, शेखी मिरवणे, घमेंड मारणे.

braid /ब्रेइड्/ *ना* १ [*अगण*] रेशमाचे वगैरे धागे विणून कपड्यांसाठी किंवा कापडांसाठी आकर्षक अशी केलेली पट्टी किंवा किनार, गुंफलेला गोफ. २ [*गण*] (*अमे*) वेणी. **braid** *क्रि* [*सक*] (*अमे*) केसांची वेणी घालणे.

Braille /ब्रेइल्/ *ना* [*अगण*] उंचवट्याचे ठिपके असलेली अंधांसाठी वापरली जाणारी लिपी.

brain /ब्रेइन्/ *ना* [*गण*] १ विचार, भावना वगैरेवर नियंत्रण ठेवणारे शरीरातील एक

इन्द्रिय, मेंदू. २ मन, बुद्धी : *have a good ~, चांगली/तल्लख बुद्धी असणे, बुद्धिमान असणे.* ३ (*अनौप*) हुशार माणूस, बुद्धिवान व्यक्ती, डोकेबाज. ४ (*वाक्प्र*) **have sth on the brain** (*अनौप*) एखाद्या गोष्टीचा सतत विचार करणे, सतत डोक्यात असणे. **brain** *क्रि* [*सक*] डोक्यावर जोरात प्रहार करून ठार मारणे, डोके फोडणे. **'brain-child** *ना* [*अे.व*] एखाद्याची मूळ कल्पना. **'brain drain** *ना* [*गण*] बुद्धिमान तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ वगैरेंचे देशाटण, बुद्धिमंतांनी देश सोडणे, बुद्धीची धूप. **brainless** *वि* निर्बुद्ध, मूर्ख, बिनडोक, बेअक्कल. **'brainstorm** *ना* [*गण*] (*ब्रि*) अचानक होणारा मनक्षोभ, बुद्धिभ्रम. **'brainwash** *क्रि* [*सक*] मनावर प्रचंड दडपण आणून एखाद्याला नवीन कल्पना, श्रद्धा स्वीकारायला भाग पाडणे. **'brainwave** *ना* [*गण*] (*अनौप*) एकदम सुचलेली अफलातून कल्पना, नामी युक्ती. **brainy** *वि* (**-ier, -iest**) (*अनौप*) हुशार, बुद्धिवान्, चलाख, तेज.

braise /ब्रेइझ्/ *क्रि* [*सक*] (मांस किंवा भाज्या) झाकण घालून मंदाग्नीवर शिजवणे, मंदाग्नीवर वाफलवणे.

brake /ब्रेइक्/ *ना* [*गण*] वाहनाचा वेग कमी करण्याची किंवा ते थांबवण्याची युक्ती किंवा कळ. **brake** *क्रि* [*अक, सक*] ब्रेक वापरून वेग कमी करणे किंवा ब्रेक लावून वाहन थांबवणे.

bramble /'ब्रॅम्ब्ल्/ *ना* [*गण*] रानटी काटेरी झुडुप; गौरीफळाचे झाड.

bran /ब्रॅन्/ *ना* [*अगण*] धान्याचे बाहेरचे कवच, कोंडा, तूस.

branch /ब्रान्च्; *अमे* ब्रॅन्च्/ *ना* [*गण*] १ झाडाच्या खोडातून फुटणारा भाग, शाखा, फांदी. २ रेल्वे, रस्ता वगैरे यांचे फुटणे, फाटा. ३ कुटुंब, संस्था वगैरेची शाखा : *a ~ office, शाखा कार्यालय.* **branch** *क्रि* १ [*अक*] फांद्या फुटणे. २ (*क्रिब*) **branch 'off** मुख्य रस्ता सोडून लहान रस्त्याला वळणे. **branch 'out** कार्यव्याप्ती किंवा कार्यकक्षा वाढविणे किंवा विस्तारणे.

brand /ब्रॅन्ड्/ *ना* [*गण*] १ मालाची विशिष्ट छापाची निर्मिती : *the cheapest ~ of margarine, स्वस्त छापाचे मार्जरिन किंवा लोणी.* २ विशिष्ट प्रकार : *a strange ~ of humour, विनोदाचा एक विचित्र प्रकार.* ३ मालकीची खूण म्हणून प्राण्याच्या कातडीवर भाजून उठवलेला शिक्का, डाग. **brand** *क्रि* [*सक*] १ कातडीवर भाजून शिक्का उठवणे, डागणे. २ शिक्का बसणे, बदनाम करणे, नाव बद्दू होणे : *He was ~ed (as) a thief, चोर म्हणून त्याला शिक्का बसला* किंवा *चोर म्हणून त्याचे नाव कायमचे बद्दू झाले.* **,brand-'new** *क्रि* अगदी नवीन, कोरा करकरीत.

brandish /'ब्रॅन्डिश्/ *क्रि* [*सक*] धमकी देण्यासाठी (एखादे शस्त्र) हवेत फिरवणे, परजणे.

brandy /'ब्रॅन्डि/ *ना* [*अगण, गण*] (*ब.व* **-ies**) द्राक्षापासून केलेले तीव्र मद्य, द्राक्षापासून केलेली कडक दारू.

brash /ब्रॅश्/ *वि* उद्दामपणे किंवा आक्रमक वृत्तीने आत्मविश्वास असणारा, प्रौढी सांगणारा.

brass /ब्रास्; *अमे* ब्रॅस्/ *ना* १ [*अगण*] चकाकीत पिवळ्या रंगाचा धातू, पितळ. २ [*अगण, गण, बहुधा ब.व*] पितळी वस्तू. ३ **the brass** [*अे.व*, तसेच ब.व क्रियापदासह अे.व] फुंकून वाजवायची पितळ्याची वाद्ये (वाजवणारे लोक). ४ [*अगण*] (*ब्रि व्रात्य*) पैसे. **,brass 'band** *ना* [*गण*] फुंकून वाजवायची वाद्ये आणि आघात करून वाजवायची वाद्ये वाजविणारा समूह किंवा वृन्द, वादकांचा ताफा, वाजंत्रीवाले.

brassière /'ब्रॅसिअ(र्); *अमे* ब्र'झ़िअर्/ न [*गण*] (*औप*) = BRA.

brat /ब्रॅट्/ *ना* [*गण*] (*अधिक्षेपी*) (वळप नसणारे) मूल, अगोचर मूल, कारटे.

bravado /ब्र'व्हाडउ/ *ना* [*अगण*] धीटपणा पोकळ किंवा अनावश्यक प्रदर्शन, वल्गना फुशारकी.

brave /ब्रेइव्ह्/ *वि* (**~r, ~st**) १ धोका किंव संकट यांना सामोरा जाणारा, शूर, मर्द; भिणारा, धीट, निर्भय. २ हिम्मतदार, धैर्यशाली **brave** *क्रि* [*सक*] न भिता संकटाला सामो जाणे, तोंड देणे, न डगमगणे. **bravely** *क्रि* शूरपणे, निर्भयपणे, धीराने. **braver**

'ब्रेइव्हरि/ *ना* [*अगण*] शौर्य; निर्भयता; धमक.

avo /ˌब्रा'व्हउ/ *उद्गा, ना* [*गण*] (*ब.व* ~**s**) छान केले!' अशा अर्थाने ओरडणे, शाब्बास!

awl /ब्रॉऽल्/ *ना* [*गण*] भांडण, हमरीतुमरी, खडाजंगी. **brawl** *क्रि* [*अक*] मोठमोठ्याने मांडाभांडी करणे, खडाजंगी होणे.

awny /'ब्रॉऽनि/ *वि* ताकदवान आणि धष्टपुष्ट, पिळदार शरीराचा.

ay /ब्रेइ/ *ना* [*गण*] गाढवाचे ओरडणे. **bray** *क्रि* [*अक*] (गाढव) ओरडणे, हाहू करणे, गाढवासारखे ओरडणे.

azen /'ब्रेइझ्न्/ *वि* खूप धीट, बिनदिक्कत; निर्लज्ज.

azier /'ब्रेइझिअ(र्)/ *ना* [*गण*] विस्तव ठेवायचे धातूचे भांडे, कोळशाची शेगडी.

each /ब्रीच्/ *ना* १ [*गण, अगण*] कायदा किंवा करार यांचा भंग, कायदेभंग, करारभंग वगैरे. २ [*गण*] मैत्रीपूर्ण संबंधातील बाधा. ३ [*गण*] (*औप*) भिंतीतील वगैरे खिंडार, भगदाड. **breach** *क्रि* [*सक*] १ (कायद्याचा वगैरे) भंग करणे, उल्लंघन करणे, तोडणे. २ (*औप*) भगदाड किंवा खिंडार पाडणे. **ˌbreach of the 'peace** *ना* [*गण, बहुधा अे.व*] (*कायदा*) सार्वजनिक ठिकाणी केलेली मारामारी, शांतताभंग.

read /ब्रेड्/ *ना* [*अगण*] १ कणीक, पाणी आणि बहुधा किण्व (यीस्ट) यापासून बनवलेला आणि भट्टीमधे भाजलेला एक अन्नपदार्थ, पाव. २ (*व्रात्य*) पैसे. ३ (*वाक्प्र*) **on the 'breadline** फार गरीब, दरिद्री. **'breadcrumb** *ना* [*गण, बहुधा ब.व*] पावाचा अगदी छोटा तुकडा. **'breadwinner** *ना* [*गण*] कुटुंबातील मिळवता माणूस, कमावणारा.

readth /ब्रेड्थ्, ब्रेट्थ्/ *ना* [*अगण*] १ एका बाजूकडून दुसऱ्या बाजूकडचे अंतर; रुंदी. २ पसारा, विस्तार; व्याप्ती.

reak^1 /ब्रइक्/ *क्रि* (*भूत* **broke** /ब्रउक्/, *भूत वि* **broken** /'ब्रउकन्/) १ [*अक, सक*] तुकडे होणे, तुकडे करणे, फुटणे, फोडणे: *Glass ~s easily, काच सहज फुटते* ○ *~ a plate, बशी फोडणे.* २ [*अक, सक*] फुटून होणे किंवा फोडून करणे: *~ open the boxes, पेट्या फोडून उघडणे.* ३ [*अक, सक*] बिघडल्यामुळे निरुपयोगी होणे किंवा करणे, नादुरुस्त होणे: *My watch has broken, माझे घड्याळ बिघडून निरुपयोगी झालंय्* म्हणजेच *माझे घड्याळ मोडलंय्.* ४ [*सक*] (कायदा, वचन वगैरे) मोडणे, न पाळणे, उल्लंघन करणे. ५ [*अक*] (*off*)// एखादी गोष्ट करण्याचे थांबवणे, बंद करणे, सोडून देणे. ६ [*सक*] खंड पाडणे, खंडित करणे, व्यत्यय आणणे: *~ one's journey, प्रवासात ख़ंड पाडणे म्हणजे मध्ये मुक्काम करणे* ○ *~ the silence, शांततेचा भंग करणे.* ७ [*अक*] उजाडणे; सुरू होणे: *Day was ~ing, दिवस उजाडत होता.* ८ [*अक, सक*] दुबळे करणे किंवा नष्ट करणे, खच्ची करणे: *~ the power of the unions, संघटनांची ताकद खच्ची करणे किंवा संघटना दुबळ्या करणे* ○ *His wife's death broke him, त्याच्या पत्नीच्या मृत्यूने तो खचला.* ९ [*सक*] प्रभाव किंवा परिणाम क्षीण करणे, खच्ची करणे. १० [*सक*] (*of*)// (एखाद्याची) एखादी सवय मोडण्यात यश येणे. ११ [*अक*] (हवामानाबाबत) दीर्घकाळच्या टिकून राहण्यानंतर एकदम बदलणे किंवा बदल होणे. १२ [*अक, सक*] जाहीर करणे, प्रसिद्ध करणे, प्रकट करणे: *~ the news, बातमी प्रकट करणे किंवा फोडणे.* १३ [*अक*] (मुलाच्या आवाजाबाबत) फुटणे, घोगरा होणे. १४ [*सक*] (पूर्वीच्या कामगिरीपेक्षा) अधिक चांगली कामगिरी करणे, उच्चांक मोडणे. १५ [*सक*] (गुप्त भाषा) वाचणे, (सांकेतिक लेख) उलगडणे. १६ (*वाक्प्र*) **break the 'back of sth** एखाद्या गोष्टीचा सर्वात अवघड आणि मोठा भाग संपवणे. **break 'even** काहीही नफा किंवा तोटा न होणे, मुद्दल भरून काढणे. **break fresh/new 'ground** नवीन पद्धती, कार्य वगैरे शोधून काढणे किंवा सुरू करणे. **ˌbreak the 'ice** जमलेल्या लोकांचे एकमेकांशी सौहार्दपूर्ण नाते जोडणे, त्यांच्यात परस्परांविषयी आपुलकी निर्माण करणे – उदा पार्टीच्या वेळी. **break 'wind** (*पर्या*) आतड्यातून हवा सोडणे, पादणे. **make or break sb/sth** एखादी व्यक्ती किंवा गोष्ट यशस्वी करणे किंवा पराभूत करणे. १७ (क्रिब) **break away (from sb/sth)** एखाद्या व्यक्ती किंवा गोष्टीपासून दूर होणे, तुटणे,

अलग होणे; सोडून देणे, त्याग करणे (उदा राजकीय पक्ष). **break down** (क) (यंत्राबाबत) बंद पडणे. (ख) अयशस्वी होणे; कोसळणे, मोडकळीस येणे, संपुष्टात येणे : *Talks between the two sides have broken down, दोन्ही पक्षातील बोलणी अयशस्वी झाली किंवा संपुष्टात आली.* (ग) भावना अनावर होणे, भावना उफाळून येणे. **break sth down** (क) एखादी गोष्ट नष्ट करणे, मोडून काढणे : *~ down resistance, विरोध किंवा प्रतिकार मोडून काढणे.* (ख) विश्लेषण करणे; वर्गीकरण करणे : *~ down expenses, खर्चाचे वर्गीकरण करणे किंवा त्याची वर्गवारी देणे.* **break in** (क) एखाद्या इमारतीत बळजबरीने घुसणे. (ख) (*on*)// संभाषणात अडथळा आणणे, खंड पाडणे, मधेच येणे किंवा बोलणे. **break sb/sth in** शिस्त लावणे, शिक्षण देणे, रूळवणे. **break into sth** (क) (घरात) घुसणे, (घर) फोडून आत जाणे. (ख) एकदम सुरू होणे, अचानक काहीतरी करायला लागणे : *~ into laughter/a run, एकदम हसायला/पळायला लागणे.* (ग) (साचवलेले किंवा शिल्लक टाकलेले पैसे) खर्च करू लागणे. **break off** गप्प होणे, बोलायचे थांबणे. **break (sth) off** बळाने वेगळे करणे, तोडणे, मोडणे. **break sth off** एकदम संपुष्टात आणणे : *They've broken off their engagement, त्यांनी त्यांचा ठरलेला विवाह मोडला.* **break out** (क) (अनिष्ट गोष्ट) एकदम सुरू होणे : *Fire broke out, अचानक आग भडकली.* (ख) (*of*)// तुरुंगातून निसटणे, पळणे. (ग) (*in*)// एकदम उगवणे किंवा उमटणे, येणे, व्यापून टाकणे, भरणे : *~ out in spots, चट्टे उमटणे, डाग डाग येणे किंवा पडणे.* **break through (sth)** (क) तोडून पुढे जाणे, जबरदस्तीने घुसणे. (ख) (सूर्याबाबत) (ढगांमागून) डोकावणे, दिसणे. **break up** (क) (माणसांच्या गटाबाबत) वेगवेगळ्या दिशेला जाणे, पांगणे. (ख) (*ब्रि*) (शाळा किंवा शाळेतील विद्यार्थ्यांबाबत) सुट्टी लागणे. (ग) (*with*)// एखाद्याबरोबरचे संबंध तोडून टाकणे. **break (sth) up** (क) (एखाद्या गोष्टीचे) विभाजन होणे किंवा करणे, तुकडे होणे किंवा करणे. (ख) एखाद्या गोष्टीचा शेवट करणे, उधळणे, संपणे : *Their marriage is ~ing up, त्यांचे विवाहसंबंध तुटण्याच्या मार्गा आहेत.* **'breakable** *वि* सहज फुटणारे कि तुटणारे. **'breakaway** *वि* फुटून निघालेल लोकांचा (उदा राजकीय पक्षातून), फुटिरांच **'break-in** *ना* [*गण*] इमारतीतील घुसखोर **'break-out** *ना* [*गण*] तुरुंगातून पलाय **'breakthrough** *ना* [*गण*] महत्त्वाची घट किंवा महत्त्वाचा शोध, नवी वाट. **'breaku** *ना* [*गण*] (विशेषतः संबंध वगैरे) संप संपुष्टता.

break² /ब्रेइक्/ *ना* [*गण*] १ एखादी गो जिथे फुटली आहे ती जागा, तडा, खिंडार : *a in a pipe, पाईपमधील तडा किंवा भोक.* २ फ जागा, अंतर. ३ विश्रांती, विसावा; -सा थांबायचा वेळ, मधला वेळ, सुट्टी : *a lunch भोजनासाठी थांबायचा वेळ, जेवणाची सुट्टी.* एखाद्या सतत चाललेल्या गोष्टीतील खी अडथळा, खंड : *a ~ with traditio परंपरेतील खंड* किंवा *परंपरेशी फारकत.* (*अनौप*) भाग्योदय, नशिबाची जोड. (*वाक्प्र*) **break of day** पहाट. **make break for it** निसटणे (म्हणजे निसटण्या प्रयत्न करणे).

breakage /'ब्रेइकिज्/ *ना* १ [*गण*] फुटले गोष्ट, फूटतूट, मोडतोड. २ [*गण, अग* फोडण्याची किंवा फुटण्याची क्रिया.

breakdown /'ब्रेइक्डाउन्/ *ना* [*गण*] यंत्रातील बिघाड. २ विस्कळित होणे, खं अपयश, कोलमडणे. ३ एखाद्याच्या तब्बे मधील (विशेषतः मानसिक स्वास्थ्याती बिघाड, दुबळेपणा : *a ,nervous '~, मानसि दौर्बल्य, नाउमेद.* ४ सांख्यिकी विश्लेषण : *a of expenses, खर्चाचा आकडेवार हिशोब.*

breaker /'ब्रेइक(र्)/ *ना* [*गण*] १ फे होऊन फुटणारी मोठी लाट, फुटणारी कि फेसाळणारी लाट. २ एखादी गोष्ट मोडण व्यक्ती किंवा गोष्ट, उल्लंघन करणारा, करणारा : *a 'law-~, कायदेभंग करणारा.*

breakfast /'ब्रेक्फस्ट्/ *ना* [*गण, अग* दिवसाच्या सुरुवातीचे खाणे, नाश्ता, न्याहा **breakfast** *क्रि* [*अक*] नाश्ता किंवा न्याह करणे.

breakneck /'ब्रेइक्नेक्/ *वि* भया

गाचा, जलद, जीवघेणा: *at ~ speed, यानक (जलद) वेगाने.*

akwater /'ब्रेइक्वॉट(र्)/ *ना* [*गण*] दराच्या सुरक्षिततेसाठी समुद्रात बांधलेली त.

ast /ब्रेस्ट्/ *ना* [*गण*] १ स्त्रीच्या शरीराच्या ग्र उत्पन्न करणाऱ्या दोन भागांपैकी कोणताही क भाग, स्तन, थान, वक्ष. २ (*अलं*) शरीराचा च्चा पुढचा भाग, छाती, ऊर. **'breast-one** *ना* [*गण*] छातीच्या फासळ्यामधले तळ सपाट उभे हाड, बरगड्यातील गलास्थी. **'breast-stroke** *ना* [*अगण*] हण्याचा एक हात, गोल हात.

ath /ब्रेथ्/ *ना* १ [*अगण*] फुप्फुसात नलेली आणि त्यातून बाहेर टाकलेली हवा, सोच्छ्वास. २ [*गण*] फुप्फुसात हवा घेण्याची करी क्रिया, श्वास. ३ [*अे.व*] वाऱ्याची मंद ळचाल, लहर, झुळूक. ४ (*वाक्प्र*) **get ne's breath back** नेहमीसारखा सोच्छ्वास पुन्हा करणे. **out of 'breath** रजोराने श्वासोच्छ्वास करणे, उदा खूप ठाल्यावर, धापा टाकणे, दम लागणे. **take 's 'breath away** एखाद्याला आश्चर्याचा क्का देणे. **under one's 'breath** नबुजत, हळू आवाजात, खालच्या आवाजात. **eathless** *वि* १ दम लागलेला, धापा कणारा. २ श्वास रोखलेला किंवा जवळजवळ पडलेला, उदा भीतीने. **breathlessly** *वि* धापा टाकत; श्वास अडकून. **'breath-king** *वि* विस्मयकारक, स्तिमित करणारा, स रोखून धरायला लावणारा.

athalyser (*अमे* **-lyz-**) /'ब्रेथ-इझ़(र्)/ *ना* [*गण*] वाहनचालकाच्या सोच्छ्वासात किती मद्यार्क आहे हे मोजण्याचे लेसांकडचे एक साधन.

athe /ब्रीद्/ *क्रि* १ [*अक, सक*] फुप्फुसात घेणे व ती बाहेर टाकणे, श्वासोच्छ्वास णे, श्वसन करणे. २ [*सक*] अगदी शांतपणे गणे; कुजबुजणे, हलक्या आवाजात बोलणे. *सक*] (भावना, गुणविशेष वगैरे) दाखविणे, रविणे. ४ (*वाक्प्र*) **breathe again** वपूर्ण किंवा काळजी करण्यासारख्या ठानंतर सुटकेचा निश्वास टाकणे म्हणजेच वरचे ओझे एकदम उतरणे. **breathe down sb's 'neck** (*अनौप*) एखाद्यावर बारकाईने लक्ष ठेवणे, एखाद्यावर सक्त नजर ठेवणे. **breather** *ना* [*गण*] (*अनौप*) थोडासा अवधी, थोडी विश्रांती, फुरसत.

breeches /'ब्रीचिझ्/ *ना* [*ब.व*] गुडघ्यापर्यंत येणारी व गुडघ्याजवळ घट्ट बसणारी घोळदार सुरवार किंवा चोळणा, मांडचोळणा.

breed /ब्रीड्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **bred** /ब्रेड्/) १ [*सक*] उत्पत्ती किंवा पैदास करण्यासाठी (प्राणी) ठेवणे किंवा पाळणे: *~ horses/ cattle, घोड्यांची किंवा गुराढोरांची पैदास करणे.* २ [*अक*] (प्राण्यांबाबत) गाभण राहणे, फळणे, विणे, अवलाद उत्पन्न करणे. ३ [*सक*] पालनपोषण करणे, वाढवणे; वळण लावणे: *a well-bred child, चांगले वळण असलेलं मूल.* ४ [*सक*] -च्याकडे नेणे, परिणती किंवा पर्यवसान होणे; उत्पन्न करणे, जन्मास घालणे, प्रादुर्भाव करणे: *Dirt ~s disease, घाण (किंवा कचरा) रोगराई उत्पन्न करते.* **breed** *ना* [*गण*] १ प्राण्याची विशिष्ट जात. २ खास प्रकारचा माणूस: *a new ~ of manager, व्यवस्थापकाची नवी जात.* **breeder** *ना* [*गण*] जनावरांची पैदास करणारा माणूस, जनावरे पाळणारा. **breeding** *ना* [*अगण*] १ नवीन जनावरांची पैदास, पशुसंवर्धन, गुरांची निपज. २ चांगले वळण, चांगली रीतभात, सुसंस्कार; शिक्षण: *a man of good ~ing, सुसंस्कारित मनुष्य* किंवा *घरंदाज व्यक्ती.*

breeze /ब्रीझ्/ *ना* [*गण, अगण*] मंद वारा, झुळूक. **breeze** *क्रि* (*क्रिव*) **breeze in, out, etc** (*अनौप*) विशिष्ट बाजूला सहज म्हणून आणि आनंदाने जाणे, टपकणे, अलगद येणे. **breezy** *वि* १ थोडासा वारा असणारा, हवेशीर. २ आनंदी आणि आत्मविश्वासपूर्ण. **breezily** *क्रिवि* आनंदाने व निश्चितपणे.

brethren /'ब्रेद्रन्/ *ना* [*ब.व*] (*पुरा*) भाऊ, बंधू, बांधव.

brevity /'ब्रेव्हटि/ *ना* [*अगण*] (*औप*) संक्षिप्तता, अल्पता: *the ~ of life, जीवनाची अल्पता, जीवनाचा अल्पकाळ.*

brew /ब्रू/ *क्रि* १ [*अक, सक*] (चहा, कॉफी किंवा बियर) तयार करणे. २ [*अक*] (दुःखदायक किंवा कटू गोष्टीबाबत) वाढणे,

शिजणे. **brew** *ना* [*गण*] तयार करण्याचा परिणाम, आसव. **brewer** *ना* [*गण*] बियर गाळणारा माणूस, कलाल, काळण. **brewery** /ब्रूअरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) बियर तयार करण्याची जागा, आसवशाला, आसवनी.

bribe /ब्राइब्/ *ना* [*गण*] एखाद्याला एखादी गोष्ट करण्यासाठी दिलेले काही, लाच, चिरमिरी. **bribe** *क्रि* [*सक*] लाच देणे, तोंड दाबणे, हात ओले करणे. **bribery** /'ब्राइबरि/ *ना* [*अगण*] लाच देणे किंवा घेणे, लाचखाऊपणा.

bric-à-brac /'ब्रिकब्रॅक्/ *ना* [*अगण*] कमी किमतीचे छोटे छोटे दागिने, किरकोळ दागदागिने, सटरफटर अलंकार, किडूकमिडूक.

brick /ब्रिक्/ *ना* [*गण, अगण*] भाजलेल्या मातीचा बांधकामात वापरायचा ठोकळा, वीट, इष्टिका. **brick** *क्रि* (*क्रिव*) **brick sth in/up** भगदाड विटांनी बुजवणे किंवा बंद करणे, वीटकाम करून प्रवेश अडवणे. **'bricklayer** *ना* [*गण*] विटांनी बांधकाम करणारा, गवंडी. **'brick work** *ना* [*अगण*] वीटकाम.

bridal /'ब्राइड्ल्/ *वि* वधूचा किंवा विवाहाचा, नवदांपत्याचा, लग्नाचा.

bride /ब्राइड्/ *ना* [*गण*] सौभाग्यकांक्षिणी, वधू, नवरीमुलगी; नवविवाहित स्त्री, नवपरिणिता, नवोढा. **'bridegroom** *ना* [*गण*] विवाह होणारा पुरुष, वर, नवरदेव; नवविवाहित पुरुष. **'bridesmaid** *ना* [*गण*] वधूबरोबरची मैत्रीण किंवा तिला मदत करणारी मुलगी, करवली.

bridge¹ /ब्रिज्/ *ना* [*गण*] १ नदी वगैरे पार करून जाण्यासाठीचे बांधकाम, पूल, सेतू, दादर. २ (*ला*) वेगवेगळ्या गोष्टी जोडणारी गोष्ट. ३ जेथून बोटीचे नियंत्रण होते असा बोटीतील उंच भाग. ४ नाकाचा वरचा भाग. ५ ज्यावर तारा बसवल्या जातात तो व्हायोलिन वगैरे वाद्यांचा भाग. **bridge** *क्रि* [*सक*] पूल बांधणे. **'bridgehead** *ना* [*गण*] शत्रूच्या प्रदेशात जिंकलेली मोक्याची जागा.

bridge² /ब्रिज्/ *ना* [*अगण*] चार लोकांनी खेळायचा एक पत्त्याचा डाव.

bridle /'ब्राइड्ल्/ *ना* [*गण*] घोड्याच्या सरंजामाचा त्याच्या डोक्यावरील भाग, जेरबंद. **bridle** *क्रि* १ [*सक*] (घोड्याला) लगा
घालणे. २ [*सक*] (*ला*) ताबा ठेवणे, नियंत्र
ठेवणे, आवर घालणे : ~ *one's emotion*
स्वतःच्या भावनांना आवर घालणे. ३ [*अक*] डो
वर आणि मागे झुकवून राग व्यक्त कर
चेहेरा वर करून राग दाखवणे.

brief¹ /ब्रीफ्/ *वि* १ थोडावेळ टिकणा
अल्पजीवी, क्षणभंगूर. २ थोडक्या शब्दांतल
मोजक्या शब्दांतला, संक्षिप्त. ३ (कपड्य
बाबत) आखूड, लांडा. ४ (*वाक्प्र*) **in bri**
थोड्या शब्दांत, थोडक्यात, संक्षेपाने. **brief**
क्रिवि संक्षेपाने, थोडक्यात.

brief² /ब्रीफ्/ *ना* [*गण*] एखाद्या विशि
कामगिरीबाबत माहिती व सूचना, टाचा
brief *क्रि* [*सक*] टाचण देणे, कामगिरीबा
माहिती व सूचना देणे. **'briefcase** *ना* [*ग*
कागदपत्रे वगैरे ठेवण्यासाठी चामड्याची च
बॅग.

briefs /ब्रीफ्स्/ *ना* [*ब.व*] तंग व आर
विजार, घट्ट चड्डी.

brigade /ब्रि'गेइड्/ *ना* [*गण*] १ बहुधा
फलटणींचा एक गट, लष्करी पथक. २ विशि
कारणासाठी बनविलेली संघटना : *the fire*
अग्निशामक दल. **brigadier** /,ब्रिग'डिअ(
ना [*गण*] लष्करीपथकाचा (ब्रिगेडचा) प्रमु

bright /ब्राइट्/ *वि* १ भरपूर प्रकाश दे
किंवा परावर्तित करणारा, प्रकाश
तळपणारा, तेजस्वी. २ (रंगाबाबत) भडक
आनंदी, उत्साही; आनंदी, खुष. ४ हु
चाणाक्ष, तेज. ५ भविष्यात यशस्वी हो
असा, उज्ज्वल : *The future looks*
भविष्यकाळ उज्ज्वल दिसतो. **brighten**
[*अक, सक*] प्रकाशमान होणे किंवा क
उजळणे, तेजाळणे, तेजस्वी होणे किंवा क
brightly *क्रिवि* तेजाने, झकपक. **brig**
ness *ना* [*अगण*] तेज, प्रभा, कांती, दी

brilliant /'ब्रिलिअन्ट्/ *वि* १ अ
तेजःपुंज, तळपणारा, चकाकणारा. २ अ
बुद्धिमान. ३ (*अनौप*) फार छान, उत्तम,
brilliance /-लिअन्स्/ *ना* [*अगण*]
द्युती, झळाळी. **brilliantly** *क्रिवि*
चांगला; यशस्वीपणे, झळाळीने, तेजस्व
आनंदाने.

rim /ब्रिम्/ *ना* [*गण*] १ कपाचा वगैरे काठ. २ हॅटची कड. **brim** *क्रि* (**-mm-**) १ [*अक*] (*with*)// काठोकाठ भरणे, ओतप्रोत भरणे, तुडुंब भरणे. २ (*क्रिब*) **brim over** भरून वाहणे, बाहेर येणे.

rine /ब्राइन्/ *ना* [*अगण*] अन्न टिकवण्यासाठी वापरायचे खारट पाणी, पाणखार, मिठवणी.

ring /ब्रिङ्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **brought** /ब्रॉऽट्/) [*सक*] १ बोलणाऱ्याकडे किंवा तो/ती ज्या स्थळाबाबत बोलत आहे त्या स्थळाकडे नेणे किंवा आणणे : *B~ my coat, माझा कोट आण* ○ *He brought his dog with him, त्याने आपल्याबरोबर त्याचा कुत्रा आणला.* २ घडवणे, आणणे; निर्माण करणे, उत्पन्न करणे : *Spring ~s warm weather, वसंत उबदार हवा आणतो किंवा निर्माण करतो* ○ *The story brought tears to her eyes, त्या कथेने तिच्या डोळ्याला पाणी आणले.* ३ एखाद्या विशिष्ट अवस्थेप्रत किंवा स्थितीप्रत नेणे : ~ *water to the boil,* ie boil it, *पाणी उकळायला आणणे म्हणजे उकळणे.* ४ एखाद्याचे किंवा स्वतःचे मन वळवून किंवा सक्तीने एखादी गोष्ट करण्यास भाग पाडणे, एखादी गोष्ट करण्याचा धीर होणे, एखादी गोष्ट करवणे : *I can't ~ myself to tell him, मला त्याला हे स्वतः सांगवत नाही म्हणजेच त्याला हे सांगायचा धीर मला होत नाही.* ५ (*against*)// (*कायदा*) (खटला वगैरे) सुरू करणे, दाखल करणे : ~ *a charge against sb, एखाद्यावर आरोप दाखल करणे.* ६ (*वाक्प्र*) **bring sth to a 'head** ➪ HEAD^1. **bring sth to mind** ➪ MIND^1. **bring sth into the open** ➪ OPEN^1. ७ (*क्रिब*) **bring sth about** एखादी गोष्ट घडवून आणणे. **bring sb/sth back** (क) परत करणे, आणणे, माघारी आणणे : ~ *back a book, पुस्तक परत आणणे* ○ *I brought the children back,* ie home, *मी मुलं माघारी आणली म्हणजे मी मुलांना परत घेऊन आलो.* (ख) एखाद्या गोष्टीची आठवण काढणे, याद येणे. (ग) पुन्हा आणणे, पुनरुज्जीवित करणे : ~ *back hanging, फाशी देण्याची प्रथा पुन्हा आणणे.* **bring sth/sb down** (क) पाडणे, उलथवून टाकणे : ~ *down the government, सरकार पाडणे.* (ख) कमी करणे, खाली आणणे, उतरवणे : ~ *prices down, किंमती खाली आणणे.* (ग) (विमान वगैरे वायुवाहन) खाली पाडणे किंवा जमिनीवर आणायला भाग पाडणे. **bring sth forward** (क) अलीकडे घेणे, आधी घेणे : ~ *the meeting forward, बैठक आधी घेणे.* (ख) चर्चेसाठी पुढे ठेवणे किंवा मांडणे; उपस्थित करणे. **bring sth/sb in** (क) नव्याने आणणे, चालू करणे : ~ *in a new fashion/legislation, नवीन फॅशन/कायदा किंवा विधिविधान आणणे.* (ख) फायदा करणे, नफा मिळवून देणे. (ग) एखाद्या तज्ज्ञाचा सल्लागार वगैरे म्हणून सेवा उपलब्ध करून देणे : ~ *in a scientist to check pollution, प्रदूषण थांबवण्यास शास्त्रज्ञाची सेवा उपलब्ध करणे म्हणजे त्याचा सल्ला घेणे म्हणजेच त्याला आणणे.* **bring sth off** (*अनौप*) एखादी गोष्ट यशस्वीपणे करता येणे, करून दाखविणे, आव्हान पेलणे. **bring sth on** परिणाम होणे किंवा घडवणे; उत्पन्न करणे : *The rain brought on his cold, पावसाने त्याला सर्दी झाली.* **bring sb out** (क) संपावर नेणे, संप करायला लावणे : *Union leaders brought out the workers, कामगार पुढाऱ्यांनी कामगारांना संप करायला लावला.* (ख) एखाद्याला धीट करणे, लाजाळूपणा कमी करणे : *His first year at college brought him out a little, कॉलेजमधे एक वर्ष गेल्यावर त्याचा लाजाळूपणा जरा कमी झाला.* **bring sth out** (क) दाखविणे, दिसून येणे; स्पष्ट करणे, उघड करणे : ~ *out the meaning, अर्थ स्पष्ट करणे* ○ *brought out her kindness, तिचा दयाळूपणा दिसून आला.* (ख) निर्मिती करणे, तयार करणे किंवा प्रसिद्ध/प्रकाशित करणे : ~ *out a new type of computer, नवीन प्रकारचा संगणक तयार करणे.* **bring sb round** (क) एखाद्याला शुद्धीवर आणणे. (ख) एखाद्याचे मतपरिवर्तन घडवणे, पटवणे, गटवणे. **bring sb up** (मुलांना) वाढवणे आणि वळण लावणे, त्यांचे पालन करणे व त्यांच्यावर संस्कार करणे : *brought up to be polite, विनम्रतेचे शिक्षण दिले किंवा आदबशीर वागण्याचे वळण लावले.* **bring sb/sth up** (क) एखाद्या गोष्टीकडे किंवा व्यक्तीकडे लक्ष वेधणे; एखाद्या गोष्टीचा किंवा व्यक्तीचा उल्लेख करणे, उपस्थित करणे : ~ *up the subject of* *salaries, पगाराचा मुद्दा उपस्थित करणे.* (ख) ओकणे, उलटी होणे.

brink /ब्रिङ्क्/ *ना* [*गण*] एखाद्या जागेची धोक्याची कड, तट, काठ : (*ला*) *on the ~ of war, युद्धाच्या काठावर.*

brisk /ब्रिस्क्/ *वि* जलद हालचाल करणारा, चपळ; उल्हासी : *walk at a ~ pace, जलद गतीने किंवा झटझट चालणे.* **briskly** *क्रिवि* चपळाईने; उत्साहाने.

bristle /'ब्रिस्ल्/ *ना* [*गण, अगण*] बारीक राठ केस – विशेषतः ब्रशाचे. **bristle** *क्रि* [*अक*] १ (केसांबाबत) राठपणे किंवा कडकपणे उभे राहणे. २ (*ला*) रागाने लालबुंद होणे. ३ (*क्रिव*) **bristle with sth** एखादी गोष्ट मोठ्या प्रमाणावर असणे.

brittle /'ब्रिट्ल्/ *वि* टणक पण सहज फुटणारा, ठिसूळ, भंगूर : *~ glass, कडक पण नाजुक काच.*

broach /ब्रउच्/ *क्रि* [*सक*] (एखाद्या विषयाची) चर्चा सुरू करणे, एखाद्या विषयाबाबत एखाद्याशी बोलणे.

broad /ब्रॉऽड्/ *वि* १ एका बाजूपासून दुसऱ्या बाजूपर्यंत मधे खूप अंतर असणारा; रुंद. २ मोठा प्रदेश व्यापणारा, विस्तीर्ण, विस्तृत : (*ला*) *a ~ range of subjects, अनेक प्रकारचे विविध विषय.* ३ स्वच्छ, स्पष्ट; उघड : *a ~ grin, तोंडाच्या या टोकापासून ते त्या टोकापर्यंत दिसणारे हास्य, दात दिसणारे हास्य.* ४ तपशील न दिलेला, ढोबळ, स्थूल; सर्वसामान्य, एकंदर : *a ~ outline of a speech, भाषणाची स्थूल रूपरेषा.* ५ (बोलण्याबाबत) प्रादेशिक वैशिष्ट्य असणारे. ६ (*वाक्प्र*) **in broad 'daylight** दिवसाच्या प्रकाशात, भर दिवसा, दिवसा ढवळ्या. **broaden** *क्रि* [*अक, सक*] अधिक रुंद करणे किंवा होणे, रुंदावणे. **broadly** *क्रिवि* सर्वसाधारणपणे, सामान्यतः, एकंदरीत : *~ly speaking, सर्वसाधारणपणे बोलायचे झाल्यास.* **,broad'minded** *वि* मोठ्या मनाचा, उदार आणि सहिष्णू.

broadcast /'ब्रॉऽड्कास्ट्; *अमे* -कॅस्ट्/ *ना* [*गण*] आकाशवाणी किंवा दूरदर्शनचा कार्यक्रम. **broadcast** *क्रि* (*भूत, भूत वि* **broadcast**) [*अक, सक*] (आकाशवाणीचे किंवा दूरदर्शनचे/ TV कार्यक्रम) प्रसारित होणे किंवा करणे, क्षेपित होणे किंवा करणे, त्यांचे क्षेपण/प्रसारण होणे किंवा करणे. **broadcaster** *ना* [*गण*] आकाशवाणी किंवा दूरदर्शनवर भाषण करणारा किंवा चर्चा, मुलाखती यासारख्या कार्यक्रमात भाग घेणारा, प्रसारक. **broadcasting** *ना* [*अगण*] प्रसारण, ध्वनिक्षेपण.

broadside /'ब्रॉऽड्साइड्/ *ना* [*गण*] १ जहाजाच्या एका बाजूच्या सर्व तोफांनी केलेला भडीमार, गलबताच्या रुंद बाजूकडून सर्व तोफांनी केलेली डागणी. २ (*ला*) शाब्दिक भडिमार, कडक टीका, जहाल किंवा खरमरीत (शब्दांचा) हल्ला.

broccoli /'ब्रॉकलि/ *ना* [*अगण*] हिरवट रंगाचे फुलदांडे येणारी एक प्रकारची भाजी, फुलकोबीचा एक प्रकार.

brochure /'ब्रउश(र्); *अमे* ब्रउ'शुअर/ *ना* [*गण*] माहिती किंवा जाहिराती असणारी एक पुस्तिका, हस्तपुस्तिका.

broil /ब्रॉइल्/ *क्रि* [*सक*] (खास *अमे*) शेगडीवर किंवा जाळावर (अन्न) भाजणे.

broke^{1} BREAK^{1} चा *भूत.*

broke^{2} /ब्रउक्/ *वि* (*अनौप*) १ पैसे नसलेला, कफल्लक, दिवाळखोर, कंगाल. २ (*वाक्प्र*) **flat broke** पूर्ण कफल्लक.

broken^{1} BREAK^{1} चे *भूत वि.*

broken^{2} /'ब्रउकन्/ *वि* १ सलग नसलेला, तुटका, खंडित; व्यत्यय आलेला, मधेच मोडलेला, अर्धवट : *~ sleep, अर्धवट झोप.* २ (परभाषेबाबत) अशुद्ध बोललेली, चुका करत बोललेली, तोडकीमोडकी. ३ (व्यक्तीबाबत) आजार किंवा दुर्दैवाने क्षीण झालेला, शक्तिहीन, हताश, भग्नहृदय. **,broken 'home** *ना* [*गण*] आई-वडलांनी घटस्फोट घेतलेले किंवा आई-वडील विभक्त झालेले कुटुंब, मोडलेले घर.

broker /'ब्रउक(र्)/ *ना* [*गण*] खरेदी-विक्री करणारा माणूस – उदाहरणार्थ व्यापारी शेअर्स किंवा भागपत्रे इतरांसाठी खरीदणारा किंवा विकणारा, दलाल.

brolly /'ब्रॉलि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) (*अनौप* खास *ब्रि*) छत्री.

bronchial /'ब्रॉङ्किअल्/ *वि* श्वास-

नलिकेतील नलिकांचा, श्वसनी-.

bronchitis /ब्रॉङ्'काइटिस्/ *ना* [*अगण*] श्वासनलिकेतील नळ्यांना आलेली सूज किंवा त्यांचा दाह, लघुश्वासनलिकादाह.

bronze /ब्रॉन्झ़्/ *ना* १ [*अगण*] तांबे आणि कथिल यांचा मिश्रधातू, कांस्य, कासे. २ [*अगण*] तांबूस तपकिरी रंग. ३ [*गण*] कांस्याचे केलेले काही; कांस्य पदक. **bronze** *क्रि* [*सक*] तांबूस-तपकिरी रंगाचे करणे. **bronze 'medal** *ना* [*गण*] स्पर्धेमधे विशेषतः क्रीडास्पर्धेत तिसरे बक्षीस म्हणून दिलेले पदक, कांस्यपदक.

brooch /ब्रउच्/ *ना* [*गण*] पोषाखावर लावलेला अलंकार, अडकवणी.

brood /ब्रूड्/ *ना* [*गण*] १ एकाच वेळी जन्मलेली किंवा एकाच उबवणीत तयार झालेली पिल्ले. २ (*गंमत*) कुटुंबातील खूप मुले, पिलावळ, पोरवडा, फलटण. **brood** *क्रि* [*अक*] १ अंडी उबवण्यासाठी त्यांवर बसणे, रोवण घेणे, पाखर घालणे. २ सचिंत होऊन दीर्घकाळ विचार करणे, चिन्ता करणे, कुढणे : *~ing over her problems, स्वतःच्या अडचणींची चिंता करणारी, समस्यांनी काळजीत पडलेली.* **broody** *वि* १ (कोंबडीबाबत) अंडी घालायला किंवा उबवायला आलेली. २ दुःखी आणि गप्प, मुकाटपणे कुढणारा, कुढा.

brook /ब्रुक्/ *ना* [*गण*] लहान प्रवाह, झरा, निर्झर, ओहळ.

broom /ब्रूम्/ *ना* [*गण*] लांब दांडा असणारी जमीन साफ करायची झाडणी, कुंचा, झाडू.

broth /ब्रॉथ्; *अमे* ब्रॉऽथ्/ *ना* [*अगण*] एक प्रकारचे सूप, भाज्या किंवा तांदळाचे कढण.

brothel /'ब्रॉथ्ल्/ *ना* [*गण*] वेश्यागृह, कुंटणखाना.

brother /'ब्रद(र्)/ *ना* [*गण*] १ स्वतःच्याच किंवा ज्या व्यक्तीचा उल्लेख केला आहे त्याच्याच आईवडलांचा मुलगा, भाऊ, बंधू. २ एकाच समाजात, व्यवसायात वगैरे असणारा माणूस, (व्यवसाय) बंधू, (जात) भाई. ३ (*ब.व* **brethren** /'ब्रेद्रन्/) (क) धार्मिक संस्थेतील पुरुष सभासद. (ख) काही विशिष्ट ख्रिस्ती चर्चेसचा सभासद. **brotherhood** *ना* १ [*अगण*] भावाभावातील सख्यत्वाची भावना, बंधुता, बंधुत्व. २ [*गण*] समाज किंवा संघटना (यांचे सभासद). **'brother-in-law** *ना* [*गण*] (*ब.व* **~s-in-law**) बायकोचा भाऊ, शालक, मेहुणा; नवऱ्याचा भाऊ, दीर, भावजी; बहिणीचा नवरा, मेहुणा. **brotherly** *क्रिवि* बंधुभावाने.

brought BRING चे *भूत, भूत वि.*

brow /ब्राउ/ *ना* [*गण*] १ कपाळ. २ भुवई, भ्रुकुटी. ३ टेकडीच्या टोकावरचा उंचवटा.

browbeat /'ब्राउबीट्/ *क्रि* (*भूत* **browbeat**, *भूत वि* **~en** /बीट्न्/) [*सक*] एखाद्याला एखादी गोष्ट करण्यासाठी घाबरवून सोडणे, धमकी देणे, दमात घेऊन करून घेणे.

brown /ब्राउन्/ *वि, ना* [*गण, अगण*] भाजलेल्या पावाचा किंवा दूध घालून केलेल्या कॉफीचा रंग (असणारा), तपकिरी, उदी. **brown** *क्रि* [*अक*] तपकिरी होणे किंवा करणे.

browse /ब्राउझ़्/ *क्रि* [*अक*] १ सहज आरामात पुस्तके वाचणे, पुस्तक चाळणे, मधूनमधून वाचणे. २ गवत, पाला खाणे, चरणे. **browse** *ना* [*गण, बहुधा अे.व*] पुस्तके चाळणे.

bruise /ब्रूझ़्/ *ना* [*गण*] एखाद्या आघातानी शरीराला झालेली जखम ज्याच्यामुळे त्वचेच्या रंगात बदल होतो. **bruise** *क्रि* १ [*सक*] ठेचणे, जखम करणे. २ [*अक*] जखमेचे परिणाम दाखवणे.

brunette /ब्रू'नेट्/ *ना* [*गण*] गर्द तपकिरी रंगाचे केस असलेली गौरवर्णीय स्त्री.

brunt /ब्रन्ट्/ *ना* (*वाक्प्र*) **bear the 'brunt of sth** ➪ BEAR^2.

brush^1 /ब्रश्/ *ना* [*गण*] १ बारीक राठ केस असलेले आणि सफाई, रंगकाम वगैरेसाठी वापरण्यात येणारे एक साधन, कुंचला : *a tooth-~, दात घासायचा ब्रश.* २ [*अे.व*] ब्रशने रंगवणे, साफ करणे वगैरे केलेले काम. ३ [*गण*] वाद किंवा झगडा, चकमक, झटापट : *a nasty ~ with his boss, वरिष्ठांबरोबर त्याची झालेली वादावादी किंवा उडालेला तीव्र खटका.* ४ [*अगण*] छोटी झाडे-झुडपे (किंवा त्यांनी व्यापलेली जमीन), खुरटी झाडी व जाळ्या (यांनी व्यापलेली जमीन).

brush^2 /ब्रश्/ *क्रि* [*सक*] १ ब्रशने साफ

करणे. २ जाताना हळूच धक्का लागणे, ओझरता स्पर्श होणे. ३ (*क्रिव*) **brush sth aside** एखाद्या गोष्टीकडे लक्ष न देणे किंवा दुर्लक्ष करणे, काणाडोळा करणे. **brush sth up, brush up on sth** विसरलेल्या गोष्टीचा पुन्हा अभ्यास करणे किंवा सराव करणे, त्याला उजाळा देणे : *~ up (on) your French, तुझे फ्रेंच जरा घासूनपुसून स्वच्छ कर म्हणजे त्याचा पुन्हा अभ्यास कर.*

brusque /ब्रूस्क्; *अमे* ब्रैस्क्/ *वि* रानटी आणि उद्धट, फटकळ, रासवट. **brusquely** *क्रिवि* रासवटपणे, बेमुरवतपणे, भीडभाड न ठेवता. **brusqueness** *ना* [*अगण*] रासवटपणा, बेमुरवतखोरपणा.

Brussels sprout /ˌब्रैसल्झ् 'स्प्राउट्/ *ना* [*गण*] छोट्या कोबीसारखी दिसणारी एक भाजी.

brutal /'ब्रूटल्/ *वि* क्रूर, अमानुष, पशुवत्, पाशवी; असंस्कृत, रानटी, जंगली. **brutality** /ब्रू'टॅलटि/ *ना* [*अगण, गण*] (*ब.व* **-ies**) क्रौर्य, अमानुषपणा; जंगलीपणा. **brutally** *क्रिवि* क्रूरपणे, निर्घृणपणे; रानटीपणाने.

brute /ब्रूट्/ *ना* [*गण*] १ पशू, जनावर (विशेषतः मोठे व भयानक). २ निष्ठूर बथ्थड माणूस, निर्दय कोरड्या मनाचा माणूस. **brute** *वि* विचारहीन आणि शारीरिक : *~ force, पाशवी बळ.* **brutish** *वि* पशुवत्, पाशवी, जनावरासारखा.

bubble /'बैबल्/ *ना* [*गण*] १ (हवेतील) द्रवपदार्थाचा आत हवा किंवा वायू असलेला तरंगता गोळा, फुगा. २ (द्रवपदार्थात) हवा किंवा वायूचा गोळा, बुडबुडा. **bubble** *क्रि* [*अक*] १ बुडबुडे काढणे, निघणे किंवा बुडबुड्यांचा आवाज करणे. २ (*ला*) आनंदाने भरून जाणे. **'bubble gum** *ना* [*अगण*] फुगा काढता येण्याजोगे च्युइंग गम किंवा एक गोडसर चिवट पदार्थ. **bubbly** *वि* (**-ier, -iest**) १ बुडबुडे असणारा, बुद्बुदणारा. २ आनंदी आणि उसळणारा म्हणजे उत्साही.

buck¹ /बैक्/ *ना* [*गण*] काळवीट, हरीण, रानससा किंवा साधा ससा यातील नर.

buck² /बैक्/ *क्रि* १ [*अक*] (घोड्याबाबत) चारही पाय उचलून दौडणे, चौखूर उधळणे. २ (*क्रिव*) **buck 'up** घाई करणे, चटपट आवरणे. **buck (sb) up** (एखाद्याला) प्रोत्साहन देणे, त्याचा उत्साह वाढवणे.

buck³ /बैक्/ *ना* [*गण*] (*अमे अनौप*) अमेरिकन डॉलर.

buck⁴ /बैक्/ *ना* **the buck** [*अे.व*] (*अनौप*) जबाबदारी : *to pass the ~, जबाबदारी टाळणे किंवा झटकणे.*

bucket /'बैकिट्/ *ना* [*गण*] १ द्रवपदार्थ नेण्यासाठी वापरले जाणारे कडीचे गोलाकार पात्र, बादली. २ (तसेच **'bucketful**) एक बादली भरून असणारा पदार्थ, बादलीभर. **bucket** *क्रि* [*अक*] (*down*)// (*अनौप*) (पावसाबाबत) धोधो पडणे, मुसळधार पडणे.

buckle /'बैक्ल्/ *ना* [*गण*] पट्टा वगैरे घट्ट करण्यासाठी असणारे धातूचे किंवा प्लॅस्टिकचे अडकवण, बक्कल. **buckle** *क्रि* [*अक, सक*] १ बक्कल लावून घट्ट करणे. २ वाकणे – विशेषतः उष्णतेने किंवा दाबाने. ३ (*क्रिव*) **buckle down (to sth)** (*अनौप*) निश्चयाने सुरुवात करणे, मनाचा निश्चय करून प्रारंभ करणे.

bud /बैड्/ *ना* [*गण*] उमलण्यापूर्वीचे फूल किंवा पान, कळी, कळा, अंकूर, पानांचा मुरमा, कोंब, मुकुल, कलिका. **bud** *क्रि* (**-dd-**) [*अक*] कळ्या येणे, कोंब येणे. **budding** *वि* चांगला वाढणारा, उगवता, होतकरू, उदयोन्मुख.

Buddhism /'बुद्धिझम्/ *ना* [*अगण*] उत्तर हिंदुस्तानातील तत्त्वज्ञ सिद्धार्थ गौतम किंवा बुद्ध यांच्या शिकवणुकीवर आधारलेला आशिया खंडातील एक धर्म. **Buddhist** /'बुद्धिस्ट्/ *ना* [*गण*], *वि* बौद्ध.

buddy /बैडि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) (*अनौप खास अमे*) मित्र, दोस्त, यार.

budge /बैज्/ *क्रि* [*अक, सक*] थोडेसे हालणे, सरकणे : *The stone won't ~, तो दगड अजिबात हालेना.*

budgerigar /'बैजरिगा(र्)/ *ना* [*गण*] एक रंगीबेरंगी ऑस्ट्रेलियन पक्षी – अनेकदा आवडता पक्षी म्हणून पाळतात.

budget /'बैजिट्/ *ना* [*गण*] विशिष्ट काळामधे किती पैसे खर्च करायचे याचा आराखडा, खर्चाचे अंदाजपत्रक. **budget** *क्रि* [*अक*]

(for)// एखाद्या गोष्टीवर खर्च करायच्या पैशाची तरतूद करणे किंवा त्याचे नियोजन करणे. **budget** *वि* स्वस्त, कमी किमतीचा : ~ *holidays, स्वस्तात होऊ शकणारा किंवा परवडेल असा सुटीचा कार्यक्रम.*

buff¹ /बफ्/ *ना* [*अगण*] फिक्का पिवळट रंग. **buff** *क्रि* [*सक*] मऊ वस्तूने पॉलिश करणे.

buff² /बफ्/ *ना* [*गण*] एखाद्या विषयाची भरपूर माहिती असणारा माणूस : *a computer ~, संगणक जाणकार.*

buffalo /'बफलउ/ *ना* [*गण*] (*ब.व* **buffalo** किंवा **~es**) मोठा रानटी रेडा, म्हैस.

buffer /'बफ(र्)/ *ना* [*गण*] रेल्वेच्या इंजिनावर आघात कमी करण्यासाठी लावलेल्या तबकड्या व स्प्रिंगचे एक उपकरण किंवा एक भाग, आघात प्रतिबंधक तबकडी, उभयरोधी.

buffet¹ /'बुफेइ; *अमे* ब'फेइ/ *ना* [*गण*] १ खाद्यपेये विकत घेण्याचे आणि खाण्याचे केंद्र किंवा काउंटर (उदा रेल्वे-स्टेशनवरील). २ वेगवेगळे पदार्थ असलेले आणि पाहुण्यांनी स्वतःच्या हाताने वाढून घेण्याचे जेवण.

buffet² /'बफिट्/ *क्रि* [*सक*] इकडून तिकडे ढकलणे किंवा जोराने आदळणे, झोडपणे : *~ed by the wind, वाऱ्याने झोडपलेला.*

buffoon /ब'फून्/ *ना* [*गण*] विदूषक, मस्कऱ्या.

bug /बग्/ *ना* [*गण*] १ लहान किडा. २ (*अनौप*) जंतू (किंवा त्याने निर्माण होणारा रोग). ३ (*अनौप*) एखाद्या गोष्टीत असलेला खूप रस किंवा त्याची तीव्र ओढ, वेड : *He's got the cooking ~! त्याला स्वयंपाकाचे वेड लागलंय्!* ४ (*अनौप*) एखाद्या यंत्रातील, विशेषतः संगणकातील, बिघाड, दोष. ५ (*अनौप*) छोटा, लपवलेला मायक्रोफोन, सूक्ष्मश्रवण किंवा ध्वनिग्राहक. **bug** *क्रि* (**-gg-**) [*सक*] १ छोटा ध्वनिग्राहक गुप्तपणे ठेवणे. २ (*अनौप*) सतत त्रास देणे, वैताग आणणे, उच्छाद देणे.

bugbear /'बग्बेअ(र्)/ *ना* [*गण*] न आवडणारी किंवा त्रासदायक गोष्ट.

bugger /'बग(र्)/ *ना* [*गण*] (⚠ *अनौप* खास *ब्रि*) १ त्रासदायक माणूस किंवा गोष्ट, वैताग देणारा. २ व्यक्ती : *Poor ~! His wife left him last week, गरीब बिचारा! त्याची बायको त्याला गेल्या आठवड्यात सोडून गेली.* **bugger** (*उद्वा*) (⚠ *अनौप* खास *ब्रि*) (राग किंवा वैताग व्यक्त करण्यास वापर).

bugle /'ब्यूग्ल्/ *ना* [*गण*] लहान तुतारीसारखे एक वाद्य, बिगुल, मोरशिंग, शिंग. **bugler** *ना* [*गण*] शिंग किंवा बिगुल वाजविणारा.

build¹ /बिल्ड्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **built** /बिल्ट्/) [*सक*] १ वेगवेगळे भाग वगैरे एकत्र करून तयार करणे, बांधणे. २ विकसित करणे, घडविणे, वाढवणे, स्थापन करणे : *~ a better future, भविष्यकाळ उज्ज्वल घडविणे किंवा त्याची योजना करणे.* ३ (*क्रिब*) **build on sth** एखाद्या गोष्टीचा पाया करून त्यावर पुढच्या प्रगतीची उभारणी करणे, एखाद्या गोष्टीच्या आधारावर पुढचे पाऊल टाकणे. **build sth on sth** एखाद्या गोष्टीवर दुसरी गोष्ट रचणे, बांधणे, आधारणे. **build (sth) up** मोठे करणे; वाढणे, वाढवणे : *Traffic is ~ing up, रहदारी वाढतेय्* ○ *~ up a business, धंदा उभारणे किंवा वाढवणे.* **build sb/sth up** एखाद्या गोष्टीची किंवा व्यक्तीची खूप स्तुती करणे, प्रशंसा करणे. **builder** *ना* [*गण*] इमारती बांधणारा, बांधकाम व्यावसायिक. **'build-up** *ना* [*गण*] १ हळूहळू होत असलेली वाढ, साठा, जमणे. २ चांगले वर्णन, स्तुतीपर वर्णन. **,built-'in** *वि* एखाद्या बांधणीत अंतर्भूत केलेला, समावेश असलेला. **,built-'up** *वि* बांधकामे झालेली किंवा असलेली.

build² /बिल्ड्/ *ना* [*अगण, गण*] शरीराची आकृती आणि आकार, बांधा, ठेवण.

building /'बिल्डिङ्/ *ना* [*गण*] १ भिंती आणि छप्पर असलेले बांधकाम, इमारत, इमला. २ [*अगण*] घर-बांधणी (व्यवसाय), बांधकाम (व्यवसाय). **'building society** *ना* [*गण*] (*ब्रि*) गुंतवणुकीसाठी पैसे स्वीकारणारी आणि घर विकत घेण्यासाठी लोकांना कर्ज देणारी संस्था.

bulb /बल्ब्/ *ना* [*गण*] १ विजेच्या दिव्याचा पेरूसारख्या आकाराचा काचेचा भाग, काचेचा गोल किंवा चंबू. २ काही वनस्पतींचे जमिनीखालचे जाड गोलाकार खोड, कांदा,

गड्डा, कंद. **bulbous** *वि* गोल आणि जाड, कंदरूप; गरगरीत, ढब्बू.

bulge /बैल्झ़्/ *क्रि* [*अक*] बाहेरच्या अंगाला फुगणे, पुढे येणे. **bulge** *ना* [*गण*] फुगवटा, फुगा.

bulk /बैल्क्/ *ना* १ [*अगण*] (विशेष मोठा असा) आकार किंवा मोठी राशी. २ [*गण*] मोठी आकृती किंवा मोठे वस्तुमान. ३ **the bulk of sth** [*अे.व*] एखाद्या गोष्टीचा मुख्य भाग, मोठा हिस्सा. ४ (*वाक्प्र*) **in bulk** मोठ्या प्रमाणात, गठ्ठ्याने. **bulky** *वि* (**-ier, -iest**) मोठा, लठ्ठ; हालवण्यास अवघड, अवजड.

bull /बुल्/ *ना* [*गण*] १ खच्चीकरण न केलेला बैल, वळू, आंडील बैल, खोंड, तरणा सांड, पोळ, वृषभ. २ हत्ती, देवमासा आणि इतर मोठ्या प्राण्यांतील नर. ३ (*वाक्प्र*) **a 'bull in a 'china shop** अकुशल मनुष्य, कौशल्याचे काम आडदांडपणे करणारा. **take the bull by the 'horns** संकटाला धैर्याने सामोरे जाणे, न डगमगता तोंड देणे. **'bulldog** *ना* [*गण*] मोठे डोके आणि जाड आखूड मान असलेला एक बलाढ्य कुत्रा. **'bull's-eye** *ना* [*गण*] निशाणाचा मध्य. **'bullshit** *ना* [*अगण*], *उद्‌गा* (⚠ *व्रात्य*) मूर्खपणा, वेडेपणा, कचरा, बेअक्कलपणा.

bulldoze /'बुल्डउझ़्/ *क्रि* [*सक*] १ बुलडोझरने सपाट किंवा साफ करणे, बुलडोझरने हालवणे. २ (*ला*) (एखाद्यावर) एखादी गोष्ट करण्याची सक्ती करणे, करायला भाग पाडणे, करायला लावणे. **bulldozer** *ना* [*गण*] मातीचे प्रचंड ढिगारे उचलून टाकणारा मोठा ट्रॅक्टर, बलीवर्द यंत्र.

bullet /'बुलिट्/ *ना* [*गण*] बंदुकीतून मारलेला गोल किंवा टोकदार असा धातूचा तुकडा, बंदुकीची गोळी. **'bullet-proof** *वि* बंदुकीची गोळी आरपार न जाऊ देणारा, गोळीरोधक, बंदुकीच्या गोळीला अभेद्य : *~-proof glass, बंदुकीच्या गोळीला अभेद्य अशी काच.*

bulletin /'बुलटिन्/ *ना* [*गण*] अधिकृत छोटे वार्तापत्र, परिपत्रक, पत्रक.

bullion /'बुलिअन्/ *ना* [*अगण*] सोन्या-रुप्याच्या लगडी, सोन्याचा किंवा चांदीचा मोठा साठा/विटा.

bullock /'बुलक्/ *ना* [*गण*] खच्चीकरण केलेला बैल, बडवलेला बैल.

bully /'बुलि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) स्वतःची ताकद दुर्बल माणसांना घाबरविण्यासाठी किंवा अपाय करण्यासाठी वापरणारा माणूस, पुंड, गरिबांचा काळ, दादा. **bully** *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] बळाचा वापर दम देण्यासाठी करणे, दादागिरी करणे, धमकावणे, पुंडाई करणे.

bulrush /'बुल्रैश्/ *ना* [*गण*] दलदलीत वाढणारे एक मोठ्या जातीचे लव्हाळे, पानकणीस.

bulwark /'बुल्वक्/ *ना* [*गण*] १ संरक्षण म्हणून उभारलेली भिंत, तटबंदी. २ (*ला*) रक्षण करणारे काहीतरी, संरक्षण, सुरक्षा.

bum¹ /बैम्/ *ना* [*गण*] (*अनौप खास ब्रि*) ढुंगण, कुल्ले, टेरी.

bum² /बैम्/ *ना* [*गण*] (*अनौप खास अमे*) १ भटक्या, सडाफटिंग. २ आळशी माणूस, ऐदी. **bum** *क्रि* (*क्रिब*) **bum a'round** (*अनौप*) काही विशेष न करता वेळ घालवणे, फुकट वेळ घालवणे, टिवल्याबावल्या करणे.

bumble-bee /'बैम्ब्ल्-बी/ *ना* [*गण*] मोठ्याने गूं गूं करणारी एक मोठी केसाळ माशी, मोठी मधमाशी.

bump /बैम्प्/ *क्रि* १ [*अक, सक*] आदळणे, आपटणे, धडकणे, एखाद्या गोष्टीवर धडपडणे, उसळणे : *I ~ed into the chair in the dark, अंधारात मी खुर्चीवर आदळलो.* २ [*अक*] खडखडत किंवा रखडत जाणे, रँ रँ करत पुढे जाणे किंवा हालणे, गचके खात जाणे : *The old bus ~ed along the mountain road, डोंगर रस्त्यावरून ती जुनाट बस खडखडत गेली.* ३ (*क्रिब*) **bump into sb** (*अनौप*) योगायोगाने गाठ पडणे, एखादा माणूस अनपेक्षितपणे भेटणे, अचानक भेट होणे. **bump sb off** (*अनौप*) खून करणे, ठार मारणे. **bump sth up** (*अनौप*) एखादी गोष्ट वाढनणे. **bump** *ना* [*गण*] १ थाप किंवा गुद्दा (यांचा बद्द आवाज). २ रस्त्यावरील उंचवटे किंवा उंच भाग. ३ अंगावर आलेले टेंगूळ, आवाळू. **bumpy** *वि* (**-ier, -iest**) खडबडीत, खड्डेखुड्डे असलेला, उंचसखल.

bumper^{1} /'बम्प(र्)/ *ना* [*गण*] मोटारीच्या मागे आणि पुढे असणारा आणि मोटारीला धडक वगैरेपासून संरक्षण देणारा दांडा, धडकपट्टी, संरक्षक कांब.

bumper^{2} /'बम्प(र्)/ *वि* भरघोस, रगड, भरगच्च, नेहमीपेक्षा जादा : *a ~ harvest, भरघोस पीक, सोळा आणे पीक.*

bumpkin /'बैम्प्किन्/ *ना* [*गण*] (*बहुधा अधिक्षेपी*) खेडवळ माणूस, गावंढळ माणूस, गावंढ्या.

bun /बैन्/ *ना* [*गण*] १ छोटा गोल गोड केक. २ मागच्या बाजूला केसांची (विशेषतः बायकांच्या) मारलेली गाठ, आंबाडा, बुचडा.

bunch /बैन्च्/ *ना* [*गण*] १ एकत्र बांधलेल्या लहान सारख्या वस्तू किंवा एकत्र वाढणाऱ्या लहान लहान समान जातीच्या गोष्टी, जुडगा, गुच्छ, झुबका, घोस, तुरा, घड : *a ~ of flowers/grapes, पुष्पगुच्छ, फुलांचा झेला/ द्राक्षांचा घड.* २ (*अनौप*) गट : *They're an interesting ~ of people, उत्सुकता वाटावी असा तो एक लोकांचा गट आहे, ते टोळके मजेशीर आहे.* **bunch** *क्रि* [*अक, सक*] (*together/up*)// जुडी करणे, घोस होणे.

bundle /बैन्ड्ल्/ *ना* १ [*गण*] एकत्र बांधलेल्या किंवा गुंडाळलेल्या गोष्टी, गाठोडे, बोचके, गड्डी, भारा : *old clothes tied into a ~, जुन्या कपड्यांचे गाठोडे.* २ **a bundle of sth** [*ए.व*] एखाद्या गोष्टीची रास किंवा त्याचा गोळा : *He's a ~ of nerves, तो म्हणजे अगदी एक नसांचा जुडगा आहे म्हणजेच तो खूप नर्व्हस आहे* ○ *a ~ of sticks, काठ्यांचा जुडगा/मोळी.* **bundle** *क्रि* १ [*सक*] (*up*)// गाठोडे किंवा जुडगा करणे/बांधणे. २ [*अक, सक*] घाईघाईने किंवा बळेबळे जाणे किंवा पाठवणे, कोंबणे : *They ~d him into a taxi, त्यांनी त्याला टॅक्सीत कोंबले.*

bung /बैङ्/ *ना* [*गण*] सुरई किंवा पिंपाचे तोंड बंद करण्याची वस्तू, बूच, गुडदी. **bung** *क्रि* [*सक*] १ (*ब्रि अनौप*) बेफिकिरीने किंवा धसमुसळेपणाने फेकणे किंवा ठेवणे, टाकणे. २ *up*// (भोक किंवा तोंड) बंद करणे.

bungalow /'बङ्गलउ/ *ना* [*गण*] एक मजली घर, बंगला.

bungle /बैङ्ग्ल्/ *क्रि* [*अक, सक*] अव्यवस्थितपणे करणे, ओबडधोबडपणे करणे, गबाळ काम करणे, काहीतरीच करून ठेवणे.

bunion /'बैन्यन्/ *ना* [*गण*] दुखरा फोड – विशेषतः पायाच्या अंगठ्यावरचा.

bunk^{1} /बैङ्क्/ *ना* [*गण*] १ बोटीच्या वगैरे भिंतीवर बसवलेले अरुंद शयन, झोपायची फळी, भिंतीवरचा बिछाना. २ एकाच्या थोड्या वर दुसरा अशा रचनेच्या शयनातील एक शयन, कप्प्याचे शयन.

bunk^{2} /बैङ्क्/ *ना* (*वाक्प्र*) **do a 'bunk** (*ब्रि अनौप*) पळून जाणे, गायब होणे, पळ काढणे.

bunker /'बैङ्क(र्)/ *ना* [*गण*] १ कोळसे ठेवण्याचे पात्र, कोळशाचा पेटारा. २ सैनिकांच्या आसऱ्यासाठी भक्कम बांधकामाची जमिनीखालची जागा. ३ गोल्फच्या मैदानावरील वाळूचा खोलगट भाग किंवा वाळू भरलेला खड्डा.

bunny /बैनि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) (हा शब्द मुले वापरतात) ससा.

buoy /बॉइ/ *ना* [*गण*] समुद्राच्या तळाला पक्की केलेली व धोका, खडक वगैरे दाखविणारी एक तरंगती वस्तू, खडक दाखविणारे पाण्यावरचे तरते शंकू, धोका दाखविणारा पाण्यावरचा बोयरा. **buoy** *क्रि* (*क्रिब*) **buoy sb/sth up** (क) एखादी गोष्ट तरंगती ठेवणे. (ख) (*ला*) एखाद्याला प्रोत्साहन देणे.

buoyant /'बॉइ·अन्ट्/ *वि* १ तरंगू शकणारा, तरणशील; प्लावक. २ (*ला*) आनंदी, उत्साही, खेळकर. ३ (*ला*) (शेअर बाजार वगैरेबाबत) भरपूर धंदा असल्यामुळे चढत्या किंमती असणारा. **buoyancy** /-अन्सि/ *ना* [*अगण*] तरणशक्ती; उद्धरणशक्ती, प्लावकता; आनंदी वृत्ती, उल्हसितपणा. **buoyantly** *क्रिवि* हलकेपणे, अलगदपणे, तरंगत; आनंदाने, उल्हासाने.

burden /'बऽडन्/ *ना* [*गण*] १ (*औप*) जड भार, ओझे, बारदान. २ (*ला*) अवघड जबाबदारी, कठीण कर्तव्य, गळ्यावरची धोंड : *the ~ of taxation, करांचे ओझे.* **burden** *क्रि* [*सक*] भार टाकणे, ओझे लादणे. **bur-**

densome /-सम्/ *वि* दुःसह, जाचक, चिंताजनक, दमछाक करणारा, डोक्यावरच्या ओझ्यासारखा.

bureau /'ब्युअरउ; *अमे* ब्यु'रउ/ *ना* [*गण*] (*ब.व* **~x** किंवा **~s** /-रउझ्/) १ (*ब्रि*) लिहिण्यासाठी वापरायचा, खणांचा मोठा डेस्क. २ (*अमे*) विशिष्ट पद्धतीचे बेताच्या उंचीचे खणांचे कपाट. ३ (खास *अमे*) शासकीय विभाग किंवा सरकारी खाते. ४ कचेरी.

bureaucracy /ब्युअ'रॉक्रसि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ (क) [*अगण*] नियुक्त असा सरकारी अधिकाऱ्यांचा वर्ग, नोकरशाही. (ख) [*गण*] अशा अधिकाऱ्यांची शासन यंत्रणा. २ [*अगण*] (*अधिक्षेपी*) अनावश्यक आणि गुंतागुंतीचे अधिकृत नियम, नियमांचे जंजाळ. **bureaucrat** /'ब्युअरक्रॅट्/ *ना* [*गण*] (बरेचदा *अधिक्षेपी*) सरकारी खात्यातील अधिकारी, शासकीय अधिकारी, नोकरशहा. **bureaucratic** /,ब्युअर'क्रॅटिक्/ *वि* नोकरशहांचा, नियमांचे अवडंबर असणारा, नोकरशाहीशी संबंधित.

burglar /'बऽग्ल(र्)/ *ना* [*गण*] चोरी करण्यासाठी घरफोडी करणारा, घरफोड्या. **'burglar-proof** *वि* चोरट्यांपासून किंवा घरफोडी करणाऱ्यांपासून सुरक्षित केलेला. **burglary** *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) चोरी करण्यासाठी घरात घुसण्याचा गुन्हा, घरफोडी. **burgle** (*अमे* **burglarize**) /'बऽग्ल्/ *क्रि* [*सक*] चोरी करण्यासाठी घरफोडी करणे.

burial /'बेरिअल्/ *ना* [*गण, अगण*] प्रेत पुरण्याचा विधी, दफन, मूठमाती.

burly /'बऽलि/ *वि* (**-ier, -iest**) जाड दणकट शरीराचा, आडव्या अंगाचा.

burn /बऽन्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **~t** /बऽन्ट्/ किंवा विशेषतः *अमे* **~ed** /बऽन्ड्/) १ [*अक*] आग लागणे, जळणे. २ [*सक*] आगीने किंवा ॲसिडने नष्ट करणे किंवा इजा करणे, जाळून भस्म करणे : *~ old papers, जुने कागद जाळणे.* ३ [*सक*] तापविण्यासाठी किंवा उजेडासाठी वापरणे, जाळणे : *~ coal in a fire, कोळसे जाळणे.* ४ [*अक, सक*] जास्त धग देऊन (शिजलेला पदार्थ) खराब करणे, जाळणे, करपणे : *Sorry, I've ~t the toast, माफ कर, मी टोस्ट जाळला म्हणजे टोस्ट करपला.* ५ [*अक*] (चेहऱ्याबाबत) लाजेने किंवा शरमेने लाल होणे. ६ [*अक*] *with//* रागावणे, जळफळणे. ७ (*क्रिब*) **burn (sth) down** (एखादी गोष्ट) जाळून नष्ट करणे, भस्मसात करणे, बेचिराख करणे. **burn (itself) out** (जाळाबाबत) इंधनाच्या अभावी जळायचे थांबणे, जळून जाणे. **burn oneself out** खूप काम करून स्वतःला दमविणे, हाडाची काडे करणे. **burn sth out** एखादी गोष्ट जळून खाक होणे किंवा करणे, जाळून टाकणे किंवा जळून जाणे : *the ~t-out wreck of a car, जळून खाक झालेली मोटार, जळलेल्या मोटारीचे अवशेष.* **burn** *ना* [*गण*] भाजल्याची जखम. **burner** *ना* [*गण*] स्टोव्ह, हीटर वगैरे उपकरणांचा जाळ येण्याचा भाग, जाळाचे तोंड, जाळणी. **burning** *वि* १ तीव्र, कमालीचा, कडक : *a ~ing thirst/desire, कमालीची तहान, तीव्र लालसा.* २ खूप महत्त्वाचा, ज्वलंत; निकडीचा, तातडीचा : *the burning question, ज्वलंत प्रश्न.*

burnish /'बऽनिश्/ *क्रि* [*सक*] घासून उजळ करणे, जिल्हई देणे, ओप देणे.

burp /बऽप्/ *ना* [*गण*], *क्रि* [*अक*] (*अनौप*) ढेकर देणे.

burrow /'बरउ/ *ना* [*गण*] ससा वगैरे प्राण्यांनी जमिनीत केलेले बीळ, विवर. **burrow** *क्रि* [*अक, सक*] बीळ करणे, पोखरणे.

bursar /'बऽस(र्)/ *ना* [*गण*] शाळा किंवा कॉलेजमधे पैशाची व्यवस्था करणारा माणूस, खजिनदार. **bursary** *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) विद्यार्थ्याला दिलेले अनुदान, छात्रवृत्ती, शिष्यवृत्ती.

burst /बऽस्ट्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **burst**) १ [*अक, सक*] विशेषतः आतल्या दाबाने फुटणे किंवा फुटून तुकडे होणे : *The tyre ~ suddenly, टायर अचानकपणे फुटले.* ○ *The river ~ its banks, नदीने काठ फोडले म्हणजे नदीचे पाणी पात्राबाहेर आले.* २ [*अक*] *(with)//* स्फोट होण्याच्या बेताला येण्याइतपत भरणे, फुटायला येण्याइतके ठासणे, ओतप्रोत भरणे : *She was ~ing with anger, तिच्या मनात खच्चून राग होता, तिचं मन रागानं ओतप्रोत भरलं होतं.* ३ (*वाक्प्र*) **be bursting to do**

sth एखादी गोष्ट करण्यास उत्सुक असणे, हात शिवशिवणे, नेटाला येणे. **burst (sth) open** एखादी गोष्ट अचानकपणे उघडणे किंवा जोराने उघडणे, धाडकन् उघडणे. ४ (*क्रिब*) **burst in on sb/sth** एखाद्या माणसाला किंवा गोष्टीला अचानकपणे अडथळा करणे, मधे कडमडणे, टपकणे. **burst into sth** एखादी गोष्ट एकाएकी येणे किंवा निर्माण होणे : *~ into tears/laughter, अश्रूंचा बांध फुटणे, रडू कोसळणे, हसू येणे, हास्यकल्लोळ होणे.* **burst into, out of, etc sth** विशिष्ट दिशेने/च्या कडे वगैरे वेगाने आणि जोराने जाणे. **burst out** (क) एकदम भावनावेगाने बोलणे. (ख) एकाएकी सुरू करणे किंवा करायला लागणे : *~ out crying, रडायला लागणे, एकाएकी रडू लागणे.* **burst** *ना* [*गण*] १ फुटणे; स्फोट, उकल. २ अल्पकाळचा जोरदार प्रयत्न : *a ~ of energy, उत्साहाचे उधाण.* ३ तोंड फुटणे, मारा, धडाका : *a ~ of gunfire, तोफांचा धडाका.*

bury /'बेरि/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] १ प्रेत थडग्यात पुरणे, प्रेताला मूठमाती देणे. २ जमिनीखाली दडवणे; लपवून ठेवणे : *buried treasure, जमिनीत पुरलेले धन* ○ *She buried (ie hid) her face in her hands, तिने आपल्या हातात तोंड लपविले किंवा आपल्या हाताने तोंड झाकले.* ३ **~ oneself in** एखाद्या गोष्टीवर संपूर्ण लक्ष केंद्रित करणे, पूर्ण लक्ष गुंतवणे. ४ (*वाक्प्र*) **,bury the 'hatchet** भांडण मिटवणे, शत्रुत्व संपुष्टात आणणे किंवा सोडणे.

bus /बस्/ *ना* [*गण*] प्रवाशांना नेणारी मोठी मोटरगाडी. **bus** *क्रि* (**-s-** तसेच **-ss-**) [*अक, सक*] बसने जाणे, बसने नेणे. **'bus-stop** *ना* [*गण*] बस थांबण्याचे नियमित स्थान, बसथांबा.

bush /बुश्/ *ना* १ [*गण*] दाट पण बुटके असे जाड खोडाचे झाड, झुडूप. २ **the bush** [*अगण*] लागवडीखाली नसलेली जंगलातील जमीन, झाडीचा प्रदेश, रान, रानवा – उदाहरणार्थ ऑस्ट्रेलिया किंवा आफ्रिकेतील पडीत जमिनी. **bushy** *वि* (**-ier, -iest**) दाट : *~y eyebrows, दाट, केसाळ भुवया.*

business /'बिझ्निस्/ *ना* १ [*अगण*] खरेदी आणि विक्री करण्याचे कार्य, धंदा; व्यापार. २ [*गण*] माल विकणारी किंवा सेवा उपलब्ध करून देणारी संघटना. ३ [*गण, अगण*] एखाद्याचा नेहमीचा व्यवसाय. ४ [*अगण*] कर्तव्य; काम, नेमून दिलेली कामगिरी. ५ [*अगण*] लक्ष द्यायच्या गोष्टी, हाती घ्यायची कामे. ६ [*ए.व*] गोष्ट, बाब, काम; प्रकरण : *Let's forget the whole ~, ते सर्व प्रकरण/ती सर्व गोष्ट विसरून जाऊ या.* ७ (*वाक्प्र*) **get down to 'business** जे काम केलेच पाहिजे ते करायला लागणे, मुद्द्याला हात घालणे. **go out of 'business** दिवाळखोर किंवा कफल्लक होणे, दिवाळे वाजणे, धंदा बसणे. **have no 'business to do sth** एखादी गोष्ट करण्यास अधिकार नसणे, हक्क नसणे. **'businesslike** *वि* सुव्यवस्थित; कार्यक्षम, व्यावहारिक. **'businessman, 'business-woman** *ना* [*गण*] व्यापारी पुरुष, स्त्री, व्यावसायिक.

busker /'बस्क(र्)/ *ना* [*गण*] (*अनौप*) रस्त्यावर वगैरे वाद्य वाजवून पैसे मिळवणारा माणूस.

bust^{1} /बस्ट्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **bust** किंवा **~ed**) [*सक*] (*अनौप*) फोडणे; ठिकऱ्या करणे, चक्काचूर करणे. **bust** *वि* (*अनौप*) १ फुटलेला, मोडलेला. २ (*वाक्प्र*) **go bust** (उद्योगधंद्याच्या बाबत) दिवाळे वाजणे, तीनतेरा होणे, बुडीत जाणे.

bust^{2} /बस्ट्/ *ना* [*गण*] १ एखाद्या माणसाचा डोके व खांदे यापर्यंतचा पुतळा, अर्धपुतळा. २ स्त्रीचे उरोज, वक्ष.

bustle /बस्ल्/ *क्रि* [*अक*] घाईघाईने आणि उत्साहाने वावरणे, धांदल उडणे, धावाधाव करणे. **bustle** *ना* [*अगण*] धांदल, धावाधाव.

busy /'बिझि/ *वि* (**-ier, -iest**) १ खूप कामे असलेला, उद्योगी; एखाद्या चालू कामात व्यग्र, कामात गर्क, कामात गुंतलेला : *I'm ~ all day so I won't be able to help you, मी दिवसभर कामात असल्याने मला तुला मदत करता यायची नाही किंवा तुझ्याकडे लक्ष देता येणार नाही.* २ कामाचा, कार्यव्याप्त : *a ~ day, धावपळीचा दिवस, दिवसभर काम असलेला दिवस.* ३ (दूरध्वनीबाबत) चालू, वापरात असलेला. **busily** *वि* लक्षपूर्वक, सक्रीयपणे.

busy *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] ~ **oneself** स्वतःला कामात गुंतवून घेणे, एखाद्या कामात पूर्ण लक्ष घालणे.

but^1 /बद्; अधिक बलयुक्त रूप बैट्/ उ. *अव्यय* (विरोध दाखवण्यासाठी वापर): *Tom went to the party, ~ his brother didn't, टॉम पार्टीला गेला पण त्याचा भाऊ नाही गेला.*

but^2 /बद्; अधिक बलयुक्त रूप बैट्/ *शब्दयो* १ शिवाय, विना, वाचून, खेरीज: *nothing to eat ~ bread and cheese, पाव आणि चीजवाचून काहीही खायला नाही.* २ (*वाक्प्र*) **'but for sb/sth** एखाद्या गोष्टीवाचून, एखादी गोष्ट/व्यक्ती नसती तर: *B~ for your help we should not have finished on time, तुझी मदत नसती तर आमचं इतक्या वेळेत आटोपलं नसतं.*

but^3 /बैट्, तसेच बद्/ *क्रिवि* (*औप किंवा जुना, अप्रचलित*) फक्त: *We can ~ try, आपण फक्त प्रयत्न करू शकतो.*

butcher /'बुच(र्)/ *ना* [*गण*] १ अन्नासाठी किंवा मांस विकण्यासाठी जनावरांना मारायचे काम करणारा माणूस, कसाई, खाटीक. २ निष्ठूर खूनी, कसाई, खाटीक. **butcher** *क्रि* [*सक*] १ जनावरे मारून त्यांचे मांस काढणे. २ निर्घृणपणे मारणे, कत्तल करणे, कापाकापी करणे. **butchery** *ना* [*अगण*] अनावश्यक क्रूर हत्या, हत्याकांड, कत्तल, कापाकापी.

butler /'बैट्ल(र्)/ *ना* [*गण*] घरातील प्रमुख पुरुष नोकर, वाकनीस.

butt^1 /बैट्/ *ना* [*गण*] १ रायफल सारख्या शस्त्राचे पाठीमागचे जाडसर टोक, बंदुकीचे बूड. २ सिग्रेटचे वगैरे न जळलेले टोक, थोटूक.

butt^2 /बैट्/ *ना* [*गण*] मोठे पिंप.

butt^3 /बैट्/ *ना* [*गण*] ज्याला नेहमी चिडवले जाते किंवा ज्याची नेहमी टिंगल होते असा माणूस.

butt^4 /बैट्/ *क्रि* १ [*सक*] डोक्याने मारणे किंवा टोलवणे, ढुश्शी देणे. २ [*क्रिब*] **butt in (on sb/sth)** एखाद्याच्या संभाषणात मधेच बोलणे किंवा अडथळा आणणे, तोंड घालणे, नाक खुपसणे.

butter /'बैट(र्)/ *ना* [*अगण*] साईपासून केलेला पिवळसर स्निग्ध पदार्थ – पाव वगैरेला लावण्यासाठी वापर, लोणी, मस्का. **butter** *क्रि* १ [*सक*] लोणी लावणे. २ (*क्रिब*) **butter sb up** (*अनौप*) खुषमस्करी करणे, लोणी/मस्का लावणे. **'buttercup** *ना* [*गण*] छोटी पिवळी फुले येणारे एक जंगली झाड. **'butterscotch** *ना* [*अगण*] लोणी आणि साखर एकत्र कढवून केलेला कडक गोड पदार्थ.

butterfly /'बैटफ्लाइ/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) लांब बारीक शरीर आणि मोठे रंगीत पंख असलेला किडा, फुलपाखरू, पाकोळी, पतंग.

buttock /'बैटक्/ *ना* [*गण, खास ब.व*] ज्यावर माणूस बसतो त्या दोन गोलाकार मांसल भागांपैकी कोणताही एक, कुल्ला, टेरी, ढुंगण, बूड, पुठ्ठा, नितंब.

button /'बैट्न्/ *ना* [*गण*] १ कपडे (घातल्यावर) बंद करण्यासाठी वापरायची त्यांवर शिवलेली एक छोटी गोलाकार चकती, गुंडी, बटण. २ जी दाबल्यावर मशीन, घंटा वगैरे कार्यरत होते ती कळ, गुंडी. **button** *क्रि* [*अक, सक*] बटण लावून बंद करणे, बटण लावणे. **'buttonhole** *ना* [*गण*] १ बटण घालायचे भोक, काजे. २ जाकीट किंवा कोटावर लावलेले फूल. **'buttonhole** *क्रि* [*सक*] एखाद्याला थांबवून आपले म्हणणे ऐकायला लावणे, वाट अडवून ऐकवणे.

buttress /'बैट्रिस्/ *ना* [*गण*] भिंतीला आधार देणारे बांधकाम, टेकू, पुस्ती, मत्स्य, धिरा. **buttress** *क्रि* [*सक*] आधार देणे, बळकट करणे.

buxom /'बैक्सम्/ *वि* (स्त्रीबाबत) गुटगुटीत, गबदुल व निरोगी.

buy /बाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **bought** /बॉऽट्/) [*सक*] १ पैसे देऊन एखादी गोष्ट घेणे, विकत घेणे, खरीदणे. २ (*अनौप*) स्वीकारणे, विश्वास ठेवणे, पटणे. ३ (*क्रिब*) **buy sb out** स्वतःचे नियंत्रण ठेवण्याकरता दुसऱ्याला धंद्यातील भागीदारी सोडण्यासाठी पैसे देणे, विकत घेणे. **buy** *ना* [*गण*] विकत घेतलेली गोष्ट, खरेदी: *a good ~, चांगली खरेदी.* **buyer** *ना* [*गण*] विकत घेणारा, गिऱ्हाईक, विशेषतः दुकानात ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर माल घेणारा खरीददार, घाऊक खरीददार.

buzz /बैझ़्/ *क्रि* १ [*अक*] गूं गूं करणे, गुंजन करणे, गुंजणे, घोंघों करणे, घोंघावणे. २ [*अक*] (*with*)// उत्साहाने केलेल्या संभाषणाने भरून जाणे, गजबजून जाणे, आवाजांनी बहरणे. ३ [*अक*] भरभर आणि उद्योगीपणाने हालचाल करणे, लगबगीने जाणे. ४ [*सक*] घंटा वाजवून बोलावणे, एखाद्या इमारतीतील अंतर्गत दूरभाष वापरून एखाद्याला बोलावणे, फोन करणे. ५ (*क्रिब*) **buzz 'off** (*अनौप*) दूर जाणे, कटणे. **buzz** *ना* १ [*गण*] गुंजन, घोंघों आवाज, गुंजारव, रुंजी. २ [*अ.व*] (*अनौप खास अमे*) आनंद किंवा उल्हासाची भावना, चैतन्य, जिवंतपणा. ३ (*वाक्प्र*) **give sb a 'buzz** (*अनौप*) एखाद्याला फोन करणे. **buzzer** *ना* [*गण*] विजेवर चालणारी घंटा, विद्युत्‌घंटा, गुंजक.

buzzard /बैझड्/ *ना* [*गण*] मोठा ससाणा, पावशा, शिकरा.

by¹ /बाइ/ *शब्दयो* १ जवळ, शेजारी, पाशी: *Sit by me, माझ्याजवळ बैस.* २ -तून, आतून, -ने: *come in by the back door, मागील दाराने येणे.* ३ वरून पुढे, जवळून पुढे: *She walked by me, ती माझ्याजवळून पुढे गेली.* ४ पर्यंत, पत्तर, पूर्वी: *finish the work by tomorrow, उद्यापर्यंत काम संपवणे.* ५ मधे, -त, -ई, -आ: *The enemy attacked by night, शत्रूने रात्री हल्ला केला.* ६ कृती, सत्ता किंवा साधन या द्वारे, कडून, करवी, -ने: *The soldiers were shot by terrorists, अतिरेक्यांकडून जवान मारले गेले* ○ *a play by Shaw, शॉनी लिहिलेलं नाटक, शॉंचे नाटक* ○ *pay by cheque, चेकने पैसे देणे* ○ *travel by train, आगगाडीने प्रवास करणे.* ७ परिणामत:; कारणाने, म्हणून, -च्या योगे/मुळे, -ने: *meet by chance, योगायोगाने भेटणे.* ८ (शरीराचा स्पर्श केलेला भाग दाखवताना): *take sb by the hand, एखाद्याला हात धरून नेणे.* ९ एखादी गोष्ट प्रमाण किंवा घटक म्हणून वापरणे, गणिक, -ने: *get paid by the hour, तासावर पैसे मिळणे* ○ *sell material by the metre, मीटरने माल विकणे.* १० घटकांत, एककात, गटाने: *The children came in two by two, दोनदोनच्या गटाने मुले आत आली.* ११ (आयत, चौकोन वगैरेची लांबी-रुंदी दाखविताना): *a room 18 feet by 20 feet, लांबी अठरा व रुंदी वीसची खोली, अठरा बाय वीसची खोली.* १२ -ने, -च्या मापाने किंवा मर्यादिने, -च्या अंतराने: *The bullet missed him by ten millimetres, दहा मिलीमीटरच्या अंतराने त्याला लागायची गोळी हुकली.* १३ -च्या मते, -च्या अन्वये, -च्यानुसार, -च्याप्रमाणे: *By law, his parents should be informed, ,कायद्यानुसार त्याच्या आईवडलांना कळवायला हवे.*

by² /बाइ/ *क्रिवि* १ वरून पुढे: *drive by, गाडीने पुढे जाणे.* २ जवळ, शेजारी.

bye /बाइ/ (तसेच **bye-bye** /,बाइ'बाइ/) *उद्‌गा* (*अनौप*) निरोप घेताना किंवा देताना म्हणावयाचा शब्द, टाटा, अच्छा.

by-election /'बाइ-इलेक्‌श्‌न्/ *ना* [*गण*] संसद सदस्याने राजीनामा दिल्यास किंवा तो मृत झाल्यास त्याच्या जागी नवीन सदस्य आणण्यासाठी घेतलेली निवडणूक, पोटनिवडणूक.

bygone /'बाइगॉन्/ *वि* गत, गेलेला, पूर्वीचा: *in ~ days, गेलेल्या दिवसात, गतकाली.* **bygones** *ना* (*वाक्प्र*) **let ,bygones be 'bygones** पूर्वीचे वैमनस्य विसरून जा आणि क्षमा करा, झालंगेलं विसरून जा, झालंगेलं गंगेला मिळालं.

by-law (तसेच **bye-law**) /'बाइलॉऽ/ *ना* [*गण*] स्थानिक प्राधिकाऱ्याने किंवा प्राधिकरणाने केलेला कायदा किंवा नियम, उपविधी.

bypass /'बाइपास्; *अमे* -पॅस्/ *ना* [*गण*] शहरामधून जाण्याऐवजी शहराच्या बाहेरून जाणारा हमरस्ता, छोटी सडक, उपमार्ग. **bypass** *क्रि* [*सक*] १ उपमार्ग तयार करणे. २ उपमार्ग वापरून एखादी गोष्ट टाळणे किंवा चुकवणे: (*ला*) *~ the problem, प्रश्नाला बगल देणे, प्रश्न बाजूला टाकणे, समस्या चुकवणे, डावलणे.*

by-product /'बाइप्रॉडिक्ट्/ *ना* [*गण*] एखाद्या गोष्टीच्या उत्पादनात अन्य काही केलेले उत्पादन, उपपदार्थ, आनुषंगिक उत्पादन.

bystander /'बाइस्टॅन्ड(र्)/ *ना* [*गण*] जवळ उभा असणारा पण समोर घडणाऱ्या प्रसंगात

भाग न घेणारा माणूस, बघ्या.

byte /बाइट्/ *ना* [*गण*] (*संगणन*) चिन्ह किंवा वर्णदर्शक अशा द्विअंकी संख्येचा, संगणकाची स्मृती (क्षमता) मोजण्यासाठी वापरला जाणारा ठराविक संख्येत असणारा द्विमान अंकांचा सीमित संच.

byword /'बाइवऽड्/ *ना* [*गण*] १ *for//* खास गुणविशेषासाठी प्रसिद्ध असणारी एखादी व्यक्ती किंवा वस्तू. २ सर्वमान्य शब्द, सर्वपरिचित शब्द.

C c

C, c /सी/ *ना* [*गण*] (*ब.व* **C's c's** /सीझ़्/) इंग्रजी वर्णमालेतील तिसरे अक्षर.

C *संरू* १ Celsius सेल्सियस. २ १०० ही संख्या दाखवणारा रोमन अंक.

c *संरू* १ cent(s) सेन्ट्(स्). २ century शतक. ३ (तसेच **ca**) (विशेषतः तारखांपूर्वी) सुमारे, अंदाजे.

cab /कॅब्/ *ना* [*गण*] १ टॅक्सी, भाडोत्री गाडी. २ रेल्वे इंजिन, लॉरी वगैरेमधे चालक जेथे बसतो तो भाग.

cabaret /'कॅबरेइ; *अमे* ,कॅब'रेइ/ *ना* [*अगण*, *गण*] उपहारगृहे, नाइटक्लब वगैरे ठिकाणी सादर केलेले गायन आणि नृत्य.

cabbage /'कॅबिज्/ *ना* [*गण*, *अगण*] जाड हिरव्या पानांचा गोल गड्डा असणारी भाजी, कोबी.

cabin /'कॅबिन/ *ना* [*गण*] १ विमानासारख्या वायुवाहनातील तसेच जहाज वगैरेमधील छोटीशी खोली. २ लाकडाची छोटी झोपडी, खोपट. **'cabin cruiser** *ना* [*गण*] = CRUISER २ (➪ CRUISE).

cabinet /'कॅबिनिट्/ *ना* [*गण*] १ खण किंवा कप्पे असलेले जड सामान ठेवायचे कपाट, खानेदारपेटी. २ **the Cabinet** [तसेच ब.व क्रियापदासह अे.व] शासनातील प्रमुख मंत्र्यांचा गट, मंत्रिमंडळ.

cable /'केइब्ल्/ *ना* १ [*गण*, *अगण*] जाड दणकट दोर, लंगरदोर. २ [*गण*] विद्युत्वाहक वायरींची जुडी. ३ [*गण*] तार. **cable** *क्रि* [*सक*] (एखाद्याला) तारायंत्राने (संदेश) पाठवणे, तारसंदेश देणे, तार करणे. **'cable-car** *ना* [*गण*] लोकांना पर्वतावर वगैरे नेण्यासाठी असणारी जाड दोरखंडाने बांधलेली आणि सरकत्या दोरखंडाने ओढली जाणारी गाडी. **cable 'television** *ना* [*अगण*] वर्गणीदारांना वायरींच्या द्वारे दूरदर्शन कार्यक्रम प्रक्षेपित करण्याची यंत्रणा.

cache /कॅश्/ *ना* [*गण*] दडवलेला साठा, गुप्त साठा : *a drugs ~, मादक द्रव्यांचा गुप्त साठा.*

cackle /'कॅक्ल्/ *ना* १ [*अगण*] कोंबडीने केलेला मोठा क्लक्क्लक् असा आवाज, कलकल, कुक्कुटनाद. २ [*गण*] मोठ्याने हसणे, खदाखदा किंवा फिदीफिदी हसणे. **cackle** *क्रि* [*अक*] १ (कोंबडीबाबत) पक्पक् करणे, खुटखुट करणे. २ (माणसाबाबत) खदाखदा किंवा फिदीफिदी हसणे.

cactus /'कॅक्टस्/ *ना* [*गण*] (*ब.व* **~es** किंवा **-ti** /-टाइ/) जाड गीरदार खोडाचे आणि बहुधा तीक्ष्णवर्ध म्हणजे टोकदार काटे असलेले झाड, निवडुंग.

cadet /क'डेट्/ *ना* [*गण*] सैन्य किंवा पोलिसात प्रशिक्षण घेणारा तरुण माणूस, छात्रसैनिक, छात्रपोलीस.

cadge /कॅज्/ *क्रि* [*अक*, *सक*] (*अनौप*) विनवण्या करून (रास्त नसतानाही) मिळवणे, मागे लागून पदरात पाडणे.

café /'कॅफेइ; *अमे* कॅ'फेइ/ *ना* [*गण*] माफक पदार्थ आणि पेये मिळणारे छोटेसे उपहारगृह.

cafeteria /,कॅफ'टिअरिअ/ *ना* [*गण*] हवे ते खाद्यपदार्थ काउंटरवरून स्वतः नेण्याची पद्धत असणारे उपहारगृह.

caffeine /'कॅफीन्/ *ना* [*अगण*] चहाच्या पानांत किंवा कॉफीच्या बियांत असणारे उत्तेजक द्रव्य.

cage /केइज्/ *ना* [*गण*] पक्षी किंवा प्राणी ठेवण्यासाठी दांड्या किंवा वायरचे केलेले घर, पिंजरा, पंजर. **cage** *क्रि* [*सक*] पिंजऱ्यात ठेवणे, कोंडणे.

cagey /'केइजि/ *वि* मनातले न कळू देणारा, आतल्या गाठीचा, फारसे न बोलणारा.

cagoule /क'गूल्/ *ना* [*गण*] कपडे न भिजण्यासाठी घालायचा अंगची टोपी

असणारा, हलका, लांब, जलरोधक कोट.

cairn /केअर्न्/ *ना* [*गण*] खूण म्हणून किंवा आठवण म्हणून रचलेला दगडांचा ढीग.

cajole /क'जउल्/ *क्रि* [*सक*] एखाद्याला फसवून किंवा स्तुती करून राजी करणे, खुषामत करणे, बाबापुता करून मन वळवणे.

cake /केइक्/ *ना* १ [*गण, अगण*] पीठ, अंडी, लोणी वगैरे मिश्रणापासून बनलेला भट्टीमधे भाजलेला एक गोड अन्नपदार्थ. २ [*गण*] कोणत्याही मिश्रणापासून गोलाकार चपट्या आकारात तयार केलेला खाद्यपदार्थ, वडी : *'fish ~s, माशाच्या वड्या.* ३ [*गण*] एखाद्या द्रव्याचा/पदार्थाचा विशिष्ट आकारातील तुकडा : *a ~ of soap, साबणाची वडी.* **cake** *क्रि* [*सक*] (चिखलाने वगैरे) माखणे, ओलसर घट्ट पदार्थाचे आवरण चढणे, बरबटणे.

calamity /क'लॅमटि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) मोठे संकट, मोठी आपत्ती, विपत्ती, अरिष्ट, आपदा, दुर्धर प्रसंग.

calcium /'कॅल्सिअम्/ *ना* [*अगण*] मऊ, पांढरे असे (अमिश्र शुद्ध) मूलद्रव्य, धातूंपैकी एक द्विसंयुजी मूलद्रव्य.

calculable /'कॅल्क्युलबल्/ *वि* गणना करण्याजोगा, गण्य, मोजता येण्यासारखा, मोजमाप करण्यासारखा.

calculate /'कॅल्क्युलेइट्/ *क्रि* १ [*अक, सक*] अंकांच्या साहाय्याने शोधून काढणे, गणित करणे, हिशेब करणे : *~ the cost, किंमत काढणे.* २ (*वाक्प्र*) **be calculated to do sth** इच्छित परिणाम साधण्याचा हेतू असणे, एखाद्या गोष्टीचे गणित मनात असणे, ठरवून करणे : *~d to attract attention, लक्ष वेधण्यासाठीच केलेले/असलेले.* **calculating** *वि* (*अधिक्षेपी*) आपला हेतू साध्य करण्यासाठी लबाडी, कपट करणारा, हिशेबी, आपमतलबी, मतलबी. **calculation** /ˌकॅल्क्यु'लेइश्न्/ *ना* [*गण; अगण*] गणन, गणना, गणितकृत्य, हिशेब; अंदाज, अजमास. **calculator** *ना* [*गण*] आकडेमोड करण्यासाठी वापरण्यात येणारे एक छोटे इलेक्ट्रॉनिक उपकरण, परिगणक, गणनयंत्र.

calendar /'कॅलिन्ड(र्)/ *ना* [*गण*] १ विशिष्ट वर्षाचे महिने, आठवडे आणि दिवस दाखवणारे पत्रक, दिनदर्शिका. २ कालविभाजनाची पद्धती : *the Hindu ~, हिंदू दिनगणना पद्धती.*

calf^1 /काफ्; *अमे* कॅफ्/ *ना* (*ब.व* **calves** /काव्ह्झ्; *अमे* कॅव्ह्झ्/) १ [*गण*] (क) गाईगुरांचे पाडस, वासरू, पिल्लू. (ख) सील, देवमासा किंवा काही इतर प्राण्यांचे पिल्लू. २ (तसेच **'calfskin**) वासराच्या कातड्यापासून बनवलेले चामडे.

calf^2 /काफ्; *अमे* कॅफ्/ *ना* [*गण*] (*ब.व* **calves** /काव्ह्झ्; *अमे* कॅव्ह्झ्/) गुडघा आणि घोटा यामधील पायाचा मागचा भाग, पोटरी.

calibre (*अमे* **-ber**) /'कॅलिब(र्)/ *ना* १ [*अगण*] गुणवत्ता, प्रत; क्षमता, बौद्धिक कुवत : *Her work is of the highest ~, तिचे काम उच्च प्रतीचे आहे.* २ [*गण*] नळीचा किंवा तोफेच्या नळीचा आतील व्यास.

calipers = CALLIPERS.

call^1 /कॉऽल्/ *क्रि* १ [*अक, सक*] (एखादी गोष्ट) मोठ्याने सांगणे किंवा म्हणणे; ओरडणे. २ [*सक*] टेलिफोन करून किंवा मोठ्याने ओरडून वगैरे (एखाद्याला) येण्यास सांगणे किंवा येण्याची आज्ञा करणे, टेलिफोनवरून बोलावणे, ओरडून यायला सांगणे : *~ the police, पोलिसांना बोलावणे.* ३ [*अक*] भेटण्यासाठी येणे, उभ्याउभ्या येणे. ४ [*अक, सक*] (एखाद्याला) फोन करणे. ५ [*सक*] एखादी गोष्ट घडवण्यासाठी किंवा करण्यासाठी बोलावणे; जाहीर करणे, हाक देणे, पुकारणे : *~ a meeting/election/strike, बैठक बोलावणे, निवडणूक जाहीर करणे, संप पुकारणे.* ६ [*सक*] नाव असणे, नाव देणे किंवा ठेवणे : *Her husband is ~ed Dick, तिच्या नवऱ्याचे नाव डिक आहे.* ७ [*सक*] वाटणे, (आपले मत व्यक्त करण्यासाठी) म्हणणे : *I ~ his behaviour very selfish, त्याची वागणूक फार आप्पलपोटी आहे असे मला वाटते किंवा असे मी म्हणेन.* ८ [*सक*] उठवणे : *Please ~ me at 7 o'clock, कृपया मला सातला उठव.* ९ (*वाक्प्र*) **call sb's bluff** एखाद्याला तो जी धमकी देतो ते करायला लावायचे आव्हान देणे, आव्हान स्वीकारणे. **call it a day** (*अनौप*) एखादी गोष्ट करण्याचे थांबवणे. **call sth to mind** ⇨ MIND^1. **call sb 'names** एखाद्याचा अपमान करणे, शिव्या देणे, नावे ठेवणे. **call**

the 'tune (*अनौप*) परिस्थितीवर नियंत्रण ठेवता येणे, हुकमत चालणे, राज्य असणे. १० (*क्रिब*) **call by** वाटेने जात असता थोडा वेळ भेट देणे, जाताना येऊन जाणे, वाटेत धावती भेट देणे. **call for sb/sth** (**क**) एखाद्या घरी वगैरे कुणाला आणायला किंवा काही घ्यायला जाणे. (**ख**) एखाद्या गोष्टीची जरूरी असणे किंवा ती आवश्यक असणे : *the problem ~s for immediate action, या समस्येवर त्वरित कार्यवाही होण्याची गरज आहे.* **call sb in** एखाद्याला बोलावून मदत करण्याची विनंती करणे, मदतीला बोलावणे, बोलावून आणणे. **call sb/sth off** (सैनिक, शोध घेणारी कुत्री वगैरेना) हल्ला करणे किंवा शोध घेणे थांबवण्याचा हुकूम सोडणे, शोध घेण्याचे किंवा हल्ला करण्याचे बंद करणे. **call sth off** (नियोजित गोष्ट) रद्द करणे, मागे घेणे : *The trip was ~ed off, सफर रद्द केली गेली.* **call on sb** एखाद्याला थोडा वेळ भेटणे, एखाद्याकडे चक्कर मारणे. **call on/upon sb** (एखाद्या गोष्टीसाठी) एखाद्याला औपचारिक निमंत्रण देणे किंवा त्याला विनंती करणे. **call sb out** (क) आणीबाणीत एखाद्याची मदत मागणे : *~ the fire brigade, अग्निशामक दलाची मदत मागणे.* (**ख**) एखाद्याला संपावर जाण्याचा आदेश देणे. **call sb up** (क) (खास *अमे*) एखाद्याला फोन करणे, एखाद्याशी फोनवर बोलणे. (**ख**) सैन्यात दाखल होण्याची एखाद्याला आज्ञा देणे, सैन्यात जायला सांगणे. **caller** *ना* [*गण*] थोडा वेळ येऊन भेटणारा, भेट देणारा, फोन करणारा, फोनवर असणारा. **'call-up** *ना* [*अगण, गण*] सैन्यात भरती होण्याचा हुकूम, सैन्यभरतीचा आदेश.

call^{2} /कॉऽल/ *ना* १ [*गण*] हळी, हाक; आरोळी, गर्जना. २ [*गण*] दूरध्वनीवरचे संभाषण. ३ [*गण*] एखाद्या पक्ष्याने केलेला विशिष्ट आवाज, पक्ष्याची शीळ. ४ [*गण*] धावती भेट. ५ [*गण*] येण्याचा हुकूम किंवा येण्याचे निमंत्रण. ६ [*अगण*] एखाद्या वस्तूची मागणी. ७ (*वाक्प्र*) **(be) on 'call** (उदा डॉक्टरबाबत) उपलब्ध असणे, गरज पडल्यास मिळू शकणे. **'call-box** *ना* [*गण*] = TELEPHONE-BOX (TELEPHONE). **'call-girl** *ना* [*गण*] टेलिफोनवरून भेटीची वेळ ठरवून येणारी वेश्या.

calligraphy /क'लिग्रफि/ *ना* [*अगण*] सुंदर हस्ताक्षर (कला), अक्षरलेखन (कला).

calling /'कॉऽलिङ्/ *ना* [*गण*] व्यवसाय किंवा धंदा.

callipers (तसेच **calipers**) /'कॅलिपझ्/ *ना* [*ब.व*] १ गोलाकार वस्तूंचा व्यास मोजण्याचे साधन, कैवार, कमानदार कंपास, मापनकैची. २ दुबळ्या किंवा जखम झालेल्या पायाला आधार देण्यासाठी वापरायच्या धातूच्या कांबी, पायाच्या पट्ट्या.

callous /'कॅलस्/ *वि* क्रूरपणे निर्दयी आणि असंवेदनाशील, दुष्ट आणि उलट्या काळजाचा.

callow /'कॅलउ/ *वि* (*अधिक्षेपी*) फारच लहान आणि अननुभवी, पोरटोर, नवशिका, कच्चा.

callus /'कॅलस्/ *ना* [*गण*] कातडीचा जाड, घट्ट भाग, घट्टा.

calm /काम् तसेच *अमे* काल्म्/ *वि* १ क्षुब्ध न झालेला, शांत, अक्षुब्ध. २ (**क**) (समुद्राबाबत) मोठ्या लाटा नसलेला, निवांत, शांत, संथ. (**ख**) (हवेबाबत) वादळी नसलेली, शांत. **calm** *ना* [*अगण, गण*] शांत अवस्था किंवा काळ, शांतता, शांती. **calm** *क्रि* [*अक, सक*] (*down*)// शांत होणे किंवा करणे, शमणे, निवणे, शमवणे. **calmly** *क्रिवि* शांत, शांतपणे. **calmness** *ना* [*अगण*] शांतपणा, निवांतपणा, शांतता, सामसूम.

calorie /'कॅलरि/ *ना* [*गण*] १ उष्णतेचे एकक, ऊष्मांक. २ अन्नातून मिळणाऱ्या जोमाचे एकक, ओव.

calve /काव्ह्; *अमे* कॅव्ह्/ *क्रि* [*अक*] वासराला जन्म देणे, विणे.

calves CALF$^{1, 2}$ चे *ब.व.*

calypso /क'लिप्सउ/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s**) वेस्ट इंडीजमधले एक प्रकारचे गाणे.

camber /'कॅम्ब(र्)/ *ना* [*गण*] रस्त्याच्या मध्यभागी आलेला जरासा उंचवटा, रस्त्याचा बाक.

camcorder /'कॅम्कॉऽड(र्)/ *ना* [*गण*] अंगचा ध्वनिमुद्रक असलेला बरोबर नेता येण्यासारखा व्हिडिओ-कॅमेरा.

came COME चा भूत.

camel /'कॅम्ल्/ *ना* [*गण*] लांब मानेचा आणि

पाठीवर एखाददुसरे कुबड किंवा मदार असलेला प्राणी, उंट.

cameo /'कॅमि·अउ/ *ना* [*गण*] (*ब.व* ~s) १ नक्षीच्या उठावाचे दागिना म्हणून वापरायचे रत्न. २ छोटा पण चांगला वर्णनात्मक किंवा अभिनय करायचा उतारा, नाट्यछटा.

camera /'कॅमर/ *ना* [*गण*] छायाचित्रण किंवा चलत्‌चित्रण करायचे उपकरण, कोटर, छायाचित्रक.

camouflage /'कॅमफ्लाझ/ *ना* [*गण, अगण*] रंग, जाळी, झाडाच्या फांद्या वगैरेनी एखादी गोष्ट किंवा व्यक्ती लपविण्यासाठी तयार केलेले आवरण, छद्मावरण, रंगानुकूलन. **camouflage** *क्रि* [*सक*] आवरणाखाली लपविणे, फांद्या, रंग वगैरेचा बुरखा घेणे, रंगानुकूलन करणे.

camp /'कॅम्प्/ *ना* [*गण*] १ लोकांना तात्पुरते राहण्यासाठी केलेल्या झोपड्या किंवा तंबू असलेली जागा, तळ, छावणी, गोट. २ समान राजकीय तत्त्वे असलेल्या लोकांचा गट, गोट. **camp** *क्रि* [*अक*] छावणी किंवा तंबू ठोकणे; सुट्टी तंबूत घालविणे: *We go ~ing every summer, दर वसंत ऋतूत आम्ही तंबूत राहून सुट्टी घालवतो.* **camper** *ना* [*गण*] सुट्टीत तंबू ठोकून राहणारा माणूस, छावणी करून राहणारा.

campaign /कॅम्'पेइन्/ *ना* [*गण*] १ सहेतुकपणे केलेल्या नियोजित कार्याची साखळी, मोहीम: *an advertising ~, जाहीरातीची मोहीम.* २ युद्धकाळातील लष्करी कारवायांची साखळी, लष्करी मोहीम, स्वारी. **campaign** *क्रि* [*अक*] मोहीमेत भाग घेणे. **campaigner** *ना* [*गण*] मोहीम काढणारा, मोहीमेवर जाऊन आलेला शिपाई.

campus /'कॅम्पस/ शाळा, महाविद्यालय किंवा विद्यापीठ यांची जमीन किंवा यांचा परिसर, अंगण, विद्यापीठक्षेत्र वगैरे.

can^1 /कन्; अधिक बलयुक्त रूप कॅन्/ *अभिद क्रि* (*नकार* **cannot** /'कॅनॉट्/, *संक्षेप* **can't** /कान्ट्; *अमे* कॅन्ट्/; *भूत* **could** /कड्, अधिक बलयुक्त रूप कुड्/, *नकार* **could not**, *संक्षेप* **couldn't** /'कुड्न्ट्/) १ समर्थ असणे किंवा कसे करायचे माहीत असणे, शकणे, -ता येणे, -आयला येणे: *C~ you ski? तुला स्की करता येतं? तुला बर्फावरून सरकता येतं?* २ (इंद्रियग्रहण क्रियापदांसह वापर): *C~ you hear that cuckoo? तुला त्या कोकिळेचा आवाज ऐकू येतोय?* ३ परवानगी असणे, -ऊ शकणे: *You ~ borrow my car if you want to, तुला हवी असेल तर तू माझी गाडी नेऊ शकतोस, वाटलं तर माझी गाडी ने.* ४ (विनंतीदर्शक): *C~ you help me? मला मदत करू शकशील? मला मदत करशील?* ५ (वर्तमानकालीन शक्यतादर्शक): *That ~'t be true! ते खरं असणं शक्य नाही!*

can^2 /कॅन्/ *ना* [*गण*] (क) अन्न किंवा द्रवपदार्थांसाठीचे धातूचे पात्र, डबा: *a ~ of beans, कडधान्याचा डबा, पावट्यासारख्या बियांचा डबा.* (ख) डब्यातील पदार्थ. **can** *क्रि* (**-nn-**) [*सक*] (अन्नपदार्थ वगैरे) डब्यात भरणे, हवाबंद करणे. **cannery** *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) अन्न डब्यात भरण्याची जागा, डबे हवाबंद करण्याचे केन्द्र.

canal /क'नॅल/ *ना* [*गण*] नौकांनी प्रवास करण्यासाठी किंवा शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी मनुष्यनिर्मित असा जलमार्ग, कालवा.

canary /क'नेअरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) एक छोटा पिवळा पक्षी – हा पुष्कळदा पिंजऱ्यात ठेऊन पाळतात.

cancel /'कॅन्स्‌ल्/ *क्रि* (**-ll-**; *अमे* **-l-**) [*सक*] १ (पूर्वी ठरविलेली गोष्ट) होणार नाही किंवा करणार नाही असे सांगणे, रद्द करणे किंवा होणे: *The meeting was ~led, सभा रद्द झाली, सभा रद्द करण्यात आली.* २ (काही लिहिलेल्यावर) काट मारणे; (पोस्टाच्या तिकीटावर वगैरे) खूण करणे, फुली मारणे. ३ (*क्रिब*) **cancel (sth) out** सारखाच परिणाम होणे, प्रतिशह देऊन परिणाम खोडणे; समतोल करणे, एकमेकाला काट देऊन आहे तीच स्थिती राहणे. **cancellation** /,कॅन्स'लेइशन्/ *ना* [*गण, अगण*] रद्द करणे.

cancer /'कॅन्स(र्)/ *ना* १ [*गण, अगण*] शरीरातील रोगग्रस्त वाढ, कर्कटरोग, कर्करोग. २ **Cancer** ⇨ TROPIC. **cancerous** *वि* कॅन्सरचा/कर्करोगाचा किंवा कॅन्सरसारखा/कर्करोगासारखा.

candid /'कॅन्डिड्/ *वि* विचार न लपविणारा, मनमोकळा; प्रांजळ, खुला, स्पष्टवक्ता, सरळ : *a ~ discussion, खुली चर्चा.* **candidly** *क्रिवि* खुल्लम्खुल्ला, मनमोकळेपणाने, आडपडदा न ठेवता.

candidate /'कॅन्डिडट्; *अमे* -डेइट्/ *ना* [*गण*] १ नोकरी किंवा निवडणुकीसाठी विचारात घेतला जाणारा माणूस, उमेदवार. २ परीक्षा देणारा माणूस, परीक्षेचा विद्यार्थी.

candied /'कॅन्डिड्/ *वि* साखरेचे आवरण असलेला, पाकवलेला, पाकातला.

candle /'कॅन्ड्ल्/ *ना* [*गण*] वात असलेली आणि लावल्यावर उजेड देणारी मेणाची काडी, मेणबत्ती. **'candlestick** *ना* [*गण*] मेणबत्तीचे घर.

candour (*अमे* **-dor**) /'कॅन्ड(र्)/ *ना* [*अगण*] मोकळेपणाचा गुण, मनमोकळेपणा, खुलेपणा; स्पष्टवक्तेपणा, सरळपणा.

candy /'कॅन्डि/ *ना* (*ब.व* **-ies** (खास *अमे*)) १ [*अगण*] साखरेची मिठाई किंवा चॉकलेट. २ [*गण*] साखरेची गोळी, चॉकलेट, बत्तासा वगैरे.

cane /केइन्/ *ना* १ (क) [*गण*] बांबू, ऊस वगैरेचे खोड, वेत, फोक. (ख) [*अगण*] फर्निचर करण्यासाठी वापरायचा वेत किंवा त्यासारखे खोड. २ [*गण*] एखाद्या रोपाला आधार देण्यासाठी वापरलेला फोक, चालताना आधारासाठी वापरायची वेताची छडी. ३ **the cane** [*अ.व*] छडी मारून मुलांना केलेली शिक्षा, छडीचा प्रसाद. **cane** *क्रि* [*सक*] छडी मारणे, छडीमार किंवा लाठीमार करणे.

canine /'केइनाइन्/ *वि* कुत्र्याच्या जातीचा, कुत्र्यासारखा, रदनक.

canister /'कॅनिस्ट(र्)/ *ना* [*गण*] १ (पत्र्याची) झाकण असलेली डबी. २ तोफेतून मारायचा नळकांडीसारखा गोळा, लंबुळका कुलपीगोळा.

canker /'कॅङ्क(र्)/ *ना* [*अगण*] १ झाडांचा एक रोग, वल्क व्रण, वल्क विकार, कीड, कसर किंवा वाळवी. २ व्रण किंवा चरणारे क्षत निर्माण करणारा रोग. ३ (*ला*) फैलावणारा वाईट परिणाम, पोखरणारी कीड.

cannabis /'कॅनबिस्/ *ना* [*अगण*] विडीप्रमाणे ओढल्यावर नशा आणणारे भांगेच्या रोपापासून बनणारे एक मादक द्रव्य, भांग, गांजा.

cannery ⇨ CAN^2

cannibal /'कॅनिब्ल्/ *ना* [*गण*] (क) माणसाचे मांस खाणारा मनुष्य, नरभक्षक. (ख) स्वतःच्या जातीचे प्राणी खाणारे प्राणी, स्वजातिभक्षक. **cannibalism** /-बलिझम्/ *ना* [*अगण*] नरमांसभक्षण, स्वजातिभक्षण. **cannibalize** /-बलाइझ्/ *क्रि* [*सक*] एका यंत्राचे किंवा गाडीचे भाग सुटे करून दुसऱ्यासाठी वापरणे.

cannon /'कॅनन्/ *ना* [*गण*] (*ब.व* **cannon**) १ धातूचे भरीव गोळे मारण्याची जुन्या पद्धतीची तोफ, उखळी तोफ, उल्हाटयंत्र. २ (विमान, जेट वगैरे) वायुवाहनातून आपोआप बॉम्बगोळे टाकणारी तोफ, विमानातील स्वयंचलित तोफ.

cannot ⇨ CAN^1.

canoe /क'नू/ *ना* [*गण*] वल्ह्याने चालवायची हलकी अरुंद नाव. **canoe** *क्रि* [*अक*] नावेने प्रवास करणे. **canoeist** *ना* [*गण*] नाव वल्हवणारा, नावाडी, नाखवा.

canon /'कॅनन्/ *ना* [*गण*] १ बिशप असलेल्या मुख्य चर्चमधील म्हणजेच विशेष अधिकार असणारा धर्मगुरू. २ (*औप*) सर्वसाधारण दंडक किंवा तत्त्व : *offend the ~s of good taste, सदभिरुचीचे नियम मोडणे, सदभिरुचीच्या तत्त्वाला धक्का देणे.* **canonical** /क'नॉनिक्ल्/ *वि* ख्रिस्ती चर्चच्या नियमानुसार. **canonize** /'कॅननाइझ्/ *क्रि* [*सक*] एखादी व्यक्ती संत असल्याचे अधिकृतपणे जाहीर करणे, ख्रिस्ती संत असल्याचे चर्चने घोषित करणे. **,canon 'law** *ना* [*अगण*] ख्रिस्ती चर्चचा नियम, विशिष्ट चर्चपुरता मर्यादित असणारा ख्रिस्ती धर्मनियम.

canopy /'कॅनपि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) १ (बहुधा कापडाचे) शय्या, सिंहासन वगैरेवरील आच्छादन किंवा छत, चांदवा, छत्र, मेघडंबरी. २ वायुवाहनातील चालकाच्या जागेवरचे छत, पायलटच्या डोक्यावरील विमानातले छप्पर.

cant /कॅन्ट्/ *ना* [*अगण*] अप्रामाणिक किंवा लबाडीचे बोलणे, मानभावी बोलणे.

can't cannot ➪ CAN¹.

cantankerous /कॅन्'टॅङ्करस्/ *वि* तापट, तिरसट, चिडखोर; भांडखोर, भांडकुदळ, चिडचिडा.

canteen /कॅन्'टीन्/ *ना* [*गण*] १ कारखाना, शाळा किंवा कचेरीमधले जेवणाचे ठिकाण किंवा उपहारगृह. २ (*ब्रि*) सुऱ्या, काटे, चमचे यांचे संच ठेवण्याची पेटी.

canter /'कॅन्ट(र्)/ *ना* [*गण, बहुधा अ.व*] चालीपेक्षा वेगवान पण भरधाव वेगापेक्षा कमी गतीची अशी घोड्याची चाल, तुर्की दुडकी चाल, चौकचाल. **canter** *क्रि* [*अक, सक*] दुडक्या चालीने जाणे.

cantilever /'कॅन्टिलीव्ह(र्)/ *ना* [*गण*] भिंतीवरून किंवा तळापासून निघालेली आणि पुलाला वगैरे आधार देणारी तुळई किंवा कमान, खांबासारखी पल्लेदार कमान (उदा पुलाला आधार देणारी), बाण, आडा.

canvas /'कॅन्व्हस्/ *ना* (क) [*अगण*] तंबू, शिडे, तैलचित्र वगैरेसाठी वापरायचे, जाडेभरडे टिकाऊ कापड, किंतान, ताट. (ख) [*गण*] (अशा कापडावर काढलेले) ऑइल-पेंटिंग किंवा तैलचित्र.

canvass /'कॅन्व्हस्/ *क्रि* [*अक, सक*] लोकांचा पाठिंबा (राजकीय प्रणालीला) मिळवण्यासाठी हिंडणे, प्रचार करणे. **canvasser** *ना* [*गण*] प्रचारक.

canyon /'कॅन्यन्/ *ना* [*गण*] खोल दरी.

cap /कॅप्/ *ना* [*गण*] १ कड नसलेली मऊ चपटी हॅट, टोपी. २ झाकण उदा बाटली किंवा टूथपेस्टच्या तोंडावरचे. **cap** *क्रि* (-pp-) [*सक*] १ टोपी घालणे; झाकण लावणे. २ पूर्वीपेक्षा अधिक चांगली गोष्ट सांगणे किंवा पूर्वीच्या कामापेक्षा अधिक चांगले काम करणे, कळस करणे, शिरपेच चढवणे. ३ (एखाद्या खेळाडूची) राष्ट्रीय संघासाठी निवड करणे.

capability /ˌकेइप'बिलटि/ *ना* (*ब.व* -ies) १ [*अगण, गण*] एखादी गोष्ट करण्याची क्षमता; सामर्थ्य, ताकद, कुवत : *a country's nuclear ~, एखाद्या देशाची अण्विक क्षमता म्हणजेच अण्वस्त्रांचा वापर करण्याचे सामर्थ्य.* २ [*बहुधा ब.व*] अविकसित क्षमता.

capable /'केइपब्ल्/ *वि* १ *of*// एखादी गोष्ट करण्याची क्षमता, कुवत किंवा धमक असलेला : *You are ~ of producing better work than this, यापेक्षा जास्त चांगले काम करण्याची क्षमता तुझ्यात आहे.* २ समर्थ, ताकदीचा, कार्यक्षम; हुशार : *a ~ person, कार्यक्षम किंवा हुशार माणूस.* **capably** *क्रिवि* ताकदीने, समर्थपणे.

capacity /क'पॅसटि/ *ना* (*ब.व* -ies) १ [*अगण*] एखादी गोष्ट जेवढं तयार करू शकते किंवा सामावून घेऊ शकते ते प्रमाण किंवा राशी, घेण्याची किंवा निर्माण करण्याची क्षमता, धारकता : *a hall with a seating ~ of 750, ७५० माणसे बसू शकतील एवढी क्षमता असलेला किंवा एवढा हॉल.* २ [*गण, अगण*] ताकद किंवा क्षमता. ३ [*गण*] अधिकार, स्थान : *in my ~ as manager, मॅनेजर म्हणून असलेल्या माझ्या अधिकारात.*

cape¹ /केइप्/ *ना* [*गण*] बिनबाह्याचा लांडा पण घोळदार अंगरखा, आखूड झुलीसारखे वस्त्र.

cape² /केइप्/ *ना* [*गण*] समुद्रात घुसलेला जमिनीचा भाग, भूशिर.

capillary /क'पिलेरि; *अमे* 'कॅपिलरि/ *ना* [*गण*] (*ब.व* -ies) लहान अरुंद नलिका – विशेषतः अगदी बारीक रक्तनलिका, सूक्ष्मवाहिनी, केशवाहिनी, केशिका, परिवाहिनी, केशनलिका.

capital /'कॅपिट्ल्/ *ना* १ [*गण*] एखाद्या देशाच्या वगैरे शासनाचे केंद्र असलेले शहर किंवा नगर, राजधानी. २ [*अगण*] अधिक पैसा मिळवण्यासाठी वापरलेला पैसा, मुद्दल, एखादा धंदा सुरू करण्यासाठी वापरायचा पैसा, भांडवल, मूलधन. ३ [*गण*] (तसेच **capital letter**) मोठे अक्षर – उदा A, पहिले अक्षर. ४ (*वाक्प्र*) **make capital (out) of sth** एखाद्या परिस्थितीचा स्वतःच्या फायद्यासाठी वापर करणे, परिस्थितीचा लाभ उठवणे, एखाद्या गोष्टीचे भांडवल करणे. **capital** *वि* मृत्यूची शिक्षा असलेला, देहांत शिक्षेचा, देहदंडाचा, मृत्युदंडाचा.

capitalism /'कॅपिटलिझ़म्/ *ना* [*अगण*] एखाद्या देशाच्या सरकारच्या ऐवजी खाजगी मालकांच्या सत्तेने नियंत्रित केलेल्या

उद्योगधंद्यांची अर्थव्यवस्था, भांडवलशाही. **capitalist** /-लिस्ट्/ *ना* [*गण*] १ भांडवलशाहीला पाठिंबा देणारा माणूस, भांडवलदारधार्जिणा. २ भांडवल असणारा माणूस, भांडवलदार. **capitalist** *वि* भांडवलशाही.

capitalize /'कॅपिटलाइझ्/ *क्रि* १ [*सक*] मोठ्या (कॅपिटल) अक्षरात लिहिणे. २ [*सक*] भांडवलात घालणे, भांडवलरूप करणे. ३ (*क्रिव*) **capitalize on sth** एखाद्या गोष्टीचे भांडवल करणे, एखाद्या गोष्टीचा स्वतःच्या फायद्यासाठी वापर करणे.

capitulate /क'पिच्युलेइट्/ *क्रि* [*अक*] (*to*)// एखाद्याला शरण जाणे, शरणागती पत्करणे. **capitulation** /क,पिच्यु'लेइश्न्/ *ना* [*अगण*] शरणागती.

Capricorn ⇨ TROPIC.

capsize /कॅप'साइझ्; *अमे* 'कॅप्साइझ्/ *क्रि* [*अक, सक*] (नौकेबाबत) डुबी खाणे किंवा देणे, उलथणे, उलटणे किंवा उलटवणे.

capstan /'कॅप्स्टन्/ *ना* [*गण*] बोटीचा नांगर उचलण्यासाठी वळवायचा उंच सरळ खांब, दांड्या फिरवून नांगर उचलण्याचे यंत्र, उच्चालक यंत्र.

capsule /'कॅप्स्यूल्; *अमे* 'कॅप्सूल्/ *ना* [*गण*] १ आत औषध असलेली गिळायची गोळी, पुटिका, संपुटिका. २ अंतराळवाहनातील लोकांना बसायची जागा किंवा हत्यारे ठेवायची जागा, अवकाशयानातील सामग्री किंवा अंतराळवीर असणारा आणि विलग होऊ शकणारा भाग.

captain /'कॅप्टिन्/ *ना* [*गण*] १ खेळाडूंच्या संघाचा नायक, संघनायक. २ जहाज किंवा वायुवाहनाचा प्रमुख, कप्तान. ३ सैन्यातील मध्यमश्रेणीचा अधिकारी. **captain** *क्रि* [*सक*] नेतृत्व करणे.

caption /'कॅप्श्न्/ *ना* [*गण*] चित्राबरोबर किंवा व्यंगचित्राबरोबर ते स्पष्ट करण्यासाठी छापलेले शब्द, शीर्षक, मथळा.

captivate /'कॅप्टिव्हेइट्/ *क्रि* [*सक*] मंत्रमुग्ध करणे, गुंग करणे, मोहवणे, मोहित करणे, भारणे : *~d by her beauty, तिच्या सौंदर्याने मोहित झालेला, तिच्या सौंदर्यावर भाळलेला.*

captive /'कॅप्टिव्ह्/ *ना* [*गण*], *वि* पकडलेला किंवा कैद केलेला (माणूस किंवा प्राणी), बंदीवान. **captivity** /कॅप्'टिव्हटि/ *ना* [*अगण*] बंदी, कैद, बंदीवास.

captor /'कॅप्ट(र्)/ *ना* [*गण*] माणसाला किंवा जनावराला पकडणारा, कैद करणारा.

capture /'कॅप्च(र्)/ *क्रि* [*सक*] १ कैद करणे, कारागृहात टाकणे, पकडणे. २ बळाचा वापर करून घेणे किंवा जिंकणे, काबीज करणे, सर करणे, ताब्यात घेणे. ३ चित्र, चित्रपट वगैरेमधे प्रतिबिंबित/सादर करण्यात यशस्वी होणे, यामधे नेमके पकडणे. **capture** *ना* १ [*अगण*] धरपकड, पकडापकडी. २ [*गण*] पकडलेली व्यक्ती किंवा गोष्ट, जिंकलेला माणूस वगैरे, ताब्यात घेतलेली गोष्ट.

car /का(र्)/ *ना* [*गण*] १ प्रवाशांना नेणारी मोटार किंवा मोटारगाडी. २ रेल्वेचा डबा : *a dining ~, जेवण मिळण्याचा डबा.* **'car-boot sale** *ना* [*गण*] नको असलेल्या गोष्टी गाडीत सामान ठेवायच्या जागी टाकून रस्त्यावर नेऊन केलेली विक्री, गाडीतून केलेली जुन्या मालाची विक्री. **'car park** *ना* [*गण*] गाड्या उभ्या करण्याची जागा, गाडीतळ.

carafe /क'रॅफ्/ *ना* [*गण*] दारू किंवा पाणी वाढण्यासाठी ठेवलेले काचेचे भांडे, काचेचा जग किंवा सुरई.

caramel /'कॅरमेल्/ *ना* १ [*अगण*] अन्नाला रंग आणि चव देण्यासाठी केलेला साखरपाक. २ साखरेच्या पाकाची चोखायची गोळी.

carat /'कॅरट्/ *ना* [*गण*] १ मौल्यवान खडे मोजण्यासाठी प्रमाणित वजन. २ सोन्याची शुद्धता ठरविण्याचे एक प्रमाण.

caravan /'कॅरव्हॅन्/ *ना* [*गण*] १ मोटारीने ओढायचे चाकावरचे छोटे घर. २ आत राहण्याची सोय असलेली आच्छादलेली बैलगाडी, तट्ट्याची बंद गाडी. ३ वाळवंटातून प्रवास करणारी माणसे आणि त्यांची जनावरे यांचा जथा, तांडा.

carbohydrate /,काबउ'हाइड्रेइट्/ *ना* [*गण, अगण*] बटाटा, साखर यासारख्या अन्नपदार्थातील ऊर्जा देणारे द्रव्य, कार्बन, हायड्रोजन आणि ऑक्सिजन यापासून बनणारे एक कार्बनी संयुग.

carbon /'काबन्/ *ना* १ [*अगण*] हिरे, कोळसा आणि सर्व सजीव प्राण्यांत सापडणारे अधातू मूलद्रव्य, कर्ब. २ [*गण*] = CARBON COPY. ३ [*गण, अगण*] = CARBON PAPER. **,carbon 'copy** *ना* [*गण*] कार्बन पेपर घालून काढलेली प्रत, कार्बनप्रत. **'carbon paper** *ना* [*गण, अगण*] प्रत काढण्यासाठी एका बाजूने रंग किंवा शाई लावलेला पातळ कागद.

carbuncle /'काबङ्क्ल्/ *ना* [*गण*] कातडीखालचे मोठे दुखणारे गळू, बेंड, काळपुळी.

carburettor /,काब'रेट(र्)/ (*अमे* **-t-** /*अमे* 'कार्बरिइटर्/) *ना* [*गण*] पेट्रोल आणि हवा यांचा संयोग होणारा इंजिनमधील भाग, मिश्रक, बाष्पझोतकारक.

carcass /'काकस्/ *ना* [*गण*] प्राण्याचे मृत शरीर, मढे, शव, कलेवर.

card /काड्/ *ना* १ [*गण, अगण*] विविध कारणांसाठी वापरायचा जाड कागदाचा तुकडा, पत्र, पत्रिका : *a Christmas ~, ख्रिसमस भेटकार्ड* ○ *a membership ~, सभासदपत्र* ○ *a post ~, पोस्टाचे पत्र.* २ [*गण*] = PLAYING CARD (PLAY^{2}). ३ (*वाक्प्र*) **lay/put one's 'cards on the table,** स्वतःच्या हेतूंविषयी प्रामाणिक असणे, इरादा स्पष्ट करणे. **on the cards** (*अनौप*) संभवनीय, दाट शक्यतेचा.

cardboard /'काड्बॉऽड्/ *ना* [*अगण*] जाड कडक कागड, पुठ्ठा.

cardiac /'काडिॲक्/ *वि* हृदयाचा, हृद्-.

cardigan /'काडिगन्/ *ना* [*गण*] पुढे बटणे किंवा चेन असलेला लोकरीचा विणलेला कोट, लांब बाह्यांचा पुढे बटणे किंवा चेन असलेला स्वेटर.

cardinal^{1} /'काडिन्ल्/ *वि* (*औप*) सर्वात महत्त्वाचा, मुख्य, प्रधान, आधारभूत. **cardinal** (तसेच **,cardinal 'number**) *ना* [*गण*] संख्यादर्शक पूर्णांक, मूलांक, उदा १, २ किंवा ५.

cardinal^{2} /'काडिन्ल्/ *ना* [*गण*] वरिष्ठ रोमन कॅथलिक धर्मगुरू, पोपच्या खालचा धर्माधिकारी.

care^{1} /केअ(र्)/ *ना* १ [*अगण*] गंभीर विचार किंवा नीट लक्ष, काळजी : *arrange the flowers with ~, काळजीपूर्वक पुष्परचना करणे* ○ *Take ~ when crossing the road, रस्ता ओलांडताना काळजी घे किंवा नीट लक्ष दे.* २ [*अगण*] संरक्षण, देखभाल, देखरेख, निगा, जतन : *The child was left in his sister's ~, त्याच्या बहिणीकडे देखभालीसाठी मूल देण्यात आले म्हणजेच त्याच्या बहिणीने मुलाचे जतन केले.* ३ [*गण, अगण*] चिंता, काळजी, घोर : *without a ~ in the world, जगात कोणतीही काळजी नसलेला, काळजीमुक्त.* ४ (*वाक्प्र*) **take care of oneself/sb/sth** (क) एखाद्याच्या किंवा स्वतःच्या सुरक्षिततेची आणि कुशलाची तजवीज करणे, काळजी घेणे. (ख) एखाद्या व्यक्तीस किंवा गोष्टीस जबाबदार असणे, एखाद्याची जबाबदारी घेणे. **take sb into care** उपचारार्थ लहान मुलांच्या आरोग्यकेंद्रात एखाद्या मुलाला दाखल करणे, सरकारी बालकेंद्रात, बालकल्याणकेंद्रात किंवा अनाथाश्रमात ठेवणे. **'carefree** *वि* काळजी नसलेला, चिंतामुक्त. **careful** *वि* १ (व्यक्तिबाबत) सावध, सावधान, दक्ष; लक्ष देणारा, आपण काय करतोय हे समजणारा, विचारपूर्वक. २ काळजीपूर्वक केलेला : *a ~ful piece of work, काळजीपूर्वक केलेली निर्मिती.* **carefully** *क्रिवि* विचारपूर्वक, काळजीपूर्वक. **carefulness** *ना* [*अगण*] काळजी, सावधानता. **careless** *वि* १ काळजी न करणारा, निष्काळजी, बेजबाबदार, अविचारी. २ काळजी न घेतल्याने झालेला, बेजबाबदारपणे केलेला, दुर्लक्षाने झालेला. ३ बेफिकीर, काहीही मनावर न घेणारा; सहज म्हणून झालेला. **carelessly** *क्रिवि* निष्काळजीपणे, कसेबसे; बेफिकिरीने, बेजबाबदारपणे, सहज म्हणून, फारसे लक्ष न देता, अभावितपणे. **carelessness** *ना* [*अगण*] निष्काळजीपणा, बेफिकिरी, हयगय.

care^{2} /केअ(र्)/ *क्रि* [*अक*] १ (*about*)// काळजी असणे, आस्था असणे, संबंधित असणे : *I ~ about this country's future, या देशाच्या भवितव्याची मला काळजी आहे.* २ *for; to*// (**औप**) एखादी गोष्ट (करणे) आवडणे किंवा तशी इच्छा असणे : *Would you ~ to go for a walk? तुला फिरायला जायला आवडेल का? म्हणजेच आपण फिरायला जायचं का?* ३ (**क्रिब**) **care for sb** (क)

एखाद्याची काळजी घेणे; लक्ष देणे. (ख) आवडणे किंवा प्रेम करणे.

career /क'रिअ(र्)/ *ना* [*गण*] १ पेशा किंवा व्यवसाय, जीविका. २ जीवनातली प्रगती, जीवनातले यश, प्रगतिपट. **career** *क्रि* [*अक*] भरधाव जाणे, वेगाने पुढे जाणे, सुसाट धावणे : *~ down the hill, टेकडीवरून वेगाने खाली येणे.*

caress /क'रेस्/ *ना* [*गण*] प्रेमाचा स्पर्श, ममतेचा स्पर्श. **caress** *क्रि* [*सक*] प्रेमाने स्पर्श करणे, मायेचा हात फिरवणे, कुरवाळणे.

caretaker /'केअटेइक(र्)/ *ना* [*गण*] एखाद्या इमारतीची काळजी घेणारा माणूस, देखरेखीसाठी नेमलेला माणूस.

cargo /'कागउ/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* ~**es**; *अमे* ~**s**) विमानातून किंवा जहाजातून आणलेले सामान.

caricature /'कॅरिकच्युअ(र्)/ *ना* [*गण*] एखाद्या माणसाच्या काही विशेषांवर भर देऊन गंमत करणारे किंवा त्याची चेष्टा करणारे असे त्याचे काढलेले चित्र किंवा शब्दचित्र, विडंबन करणारे चित्र किंवा वर्णन, व्यंगचित्र. **caricature** *क्रि* [*सक*] (एखाद्याचे) विडंबनचित्र काढणे किंवा रेखाटणे, चेष्टा किंवा खिल्ली उडवणारे चित्र काढणे किंवा वर्णन करणे, (एखाद्याचे) व्यंगचित्र काढणे.

carnage /'कानिज्/ *ना* [*अगण*] अनेक लोकांची हत्या, हत्याकांड, रक्तपात, मोठी हिंसा.

carnal /'कान्ल्/ *वि* (*औप*) शरीराचा, दैहिक शारीर, शारीरिक; विषयी, लैंगिक, इंद्रिय विषयक, वैषयिक.

carnation /का'नेइश्न्/ *ना* [*गण*] गोड वासाचे पांढरी, गुलाबी किंवा तांबडी फुले येणारे एक झाड.

carnival /'कानिव्ह्ल्/ *ना* [*गण*] सार्वजनिक उत्सव, सण.

carnivore /'कानिव्हॉऽ(र्)/ *ना* [*गण*] मांसाहारी प्राणी. **carnivorous** /'कानिव्हरस्/ *वि* मांसाहारी, क्रव्याद.

carol /'कॅरल्/ *ना* [*गण*] आनंदगीत, विशेषतः खिसमसचे प्रार्थनागीत.

carp^{1} /काप्/ *ना* [*गण*] (*ब.व* **carp**) गोड्या पाण्यातील एक मोठा मासा, रोहीमासा.

carp^{2} /काप्/ *क्रि* [*अक*] (*at/about*)// क्षुल्लक कारणावरून सतत तक्रार करणे, कुरकुर करणे, भुणभुण लावणे.

carpenter /'कापन्ट(र्)/ *ना* [*गण*] लाकडी सामान बनविणारा किंवा दुरुस्त करणारा, सुतार. **carpentry** (/-ट्रि/) *ना* [*अगण*] सुतारकाम.

carpet /'कापिट्/ *ना* [*गण*] जमिनीवर अंथरायचे जाड कापड, सतरंजी, बैठक, गालिचा. **carpet** *क्रि* [*सक*] गालिचा अंथरणे किंवा गालिचा अंथरल्याप्रमाणे असणे, (जणू) गालिचा घालणे.

carriage /'कॅरिज्/ *ना* १ [*गण*] रेल्वेचा प्रवाशांचा डबा किंवा बोगी. २ [*गण*] घोड्याचा टांगा, घोडागाडी. ३ [*अगण*] मालाची ने-आण (करण्याचे भाडे), आणणावळ. ४ [*गण*] एखाद्या यंत्रातील (इतर भागांची सरकवासरकवी करण्यासाठीचा) सरकता किंवा फिरता भाग : *a typewriter ~, टाईपरायटरचा रोलर ज्याच्यावर फिरतो तो भाग.* **'carriageway** *ना* [*गण*] गाड्या धावण्यासाठीचा रस्ता, रस्त्याच्या दोन भागांपैकी एकाच दिशेने गाड्या धावण्याचा कोणताही एक भाग, गाड्या धावण्याचा रस्त्यावरचा पट्ट्याने दाखवलेला मार्ग.

carrier /'कॅरिअ(र्)/ *ना* [*गण*] १ माल नेणारी व्यक्ती किंवा कंपनी, माल पोहोचविण्याचे काम करणारा माणूस किंवा तशी संस्था. २ स्वतः रोगाने ग्रस्त न होता पण इतरांकडे रोगजंतू पसरवणारा माणूस किंवा प्राणी, रोगजंतूवाहक, वाहनिक, रोगवाहक. **'carrier bag** *ना* [*गण*] दुकानातून खरेदी केलेल्या वस्तू नेण्यासाठी वापरायची कागदाची किंवा प्लॅस्टिकची पिशवी, सामानाची पिशवी.

carrot /'कॅरट्/ *ना* [*गण*] नारिंगी किंवा भगव्या रंगाचे भाजी म्हणून वापरायचे (अन्नसंचयी) मूळ, गाजर.

carry /'कॅरि/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) १ (क) वजन पेलून एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेणे, भार वाहणे, उचलून नेणे, वाहून नेणे : *~ the boxes upstairs, खोकी माडीवर* उचलून

नेणे. (ख) पेलणे, वजन सहन करणे, भार घेणे : *The pillars ~ the whole roof, खांब छपराचा सर्व भार घेतात किंवा पेलतात* म्हणजेच *छपराचा सर्व भार खांबांवर आहे.* २ [सक] जवळ असणे किंवा बाळगणे, बरोबर असणे किंवा घेणे : *I never ~ much money, मी फारसे पैसे बरोबर घेत नाही* म्हणजेच *मी फारसे पैसे बाळगत नाही.* ३ [सक] (पाईप, वायर्स वगैरेबाबत) (पाणी, तेल, वीज वगैरे) भरलेली असून पुढे नेणे. ४ [सक] परिणामतः येणे किंवा असणे, परिणाम म्हणून येणे : *Power carries great responsibility, सत्तेबरोबर मोठी जबाबदारीही येते.* ५ [सक] (वर्तमानपत्राबाबत) आत असणे किंवा देणे (उदा कथा), समाविष्ट करणे. ६ [सक] (बहुधा कर्मणी) मताला टाकून पास होणे किंवा मान्य होणे किंवा मान्यता घेणे, संमत करणे : *The proposal was carried, ठराव पास झाला, प्रस्ताव संमत झाला.* ७ [अक] (आवाजाबाबत) दूर अंतरावर ऐकू येणे, दूरवर पोहोचणे : *His voice doesn't ~ very far, त्याचा आवाज फार दूर पोहोचत नाही.* ८ (*वाक्प्र*) **be/get carried away** वाहवत जाणे, स्वतःवरचा ताबा सुटण्याइतके आतुर होणे, तोल जाणे. ९ (*क्रिब*) **carry sth off** एखादी गोष्ट जिंकणे, पटकावणे, जिंकून आणणे. **carry on (with/doing sth)** एखादी गोष्ट करत राहणे, चालू ठेवणे : *~ on reading, वाचन चालू ठेवणे.* **carry on (with sb)** (*अनौप*) लफडे असणे, भानगड असणे, विवाहबाह्य संबंध असणे. **carry sth on** एखाद्या गोष्टीत भाग घेणे; करणे, हाती घेणे. **carry sth out** एखादी गोष्ट करणे, अंमलात आणणे; पूर्ण करणे, शेवटास नेणे : *~ out a plan, एखादी योजना तडीस नेणे.* **carry sth through** एखादी गोष्ट यशस्वीपणे पूर्ण करणे, यशस्वीपणे राबविणे. **carry sb through sth** एखाद्याला संकटकाळात मदत करणे, अडचणीवर मात करण्यास मदत करणे.

cart /काट्/ *ना* [*गण*] १ माल वाहून नेण्याची (बहुधा घोड्याने ओढायची) गाडी, खटारगाडी. २ (*वाक्प्र*) **put the ˌcart before the 'horse** चुकीच्या क्रमाने गोष्टी करणे, उलटसुलट गोष्टी करणे. **cart** *क्रि* [*सक*] १ गाडीतून नेणे. २ (*अनौप*) नेणे, वाहणे : *~ing parcels around, इकडेतिकडे गट्ठे नेणे.* **'cart-horse** *ना* [*गण*] कष्टाची कामे करण्यासाठी वापरायचा तगडा घोडा, गाडीचा घोडा. **'cart-wheel** *ना* [*गण*] हातपाय कडेला ताणून एका बाजूने हातावरून मारलेली चक्राकार उडी, कुशीवरची चक्राकार उडी.

carte blanche /ˌकाट ब्लॉन्श्/ *ना* [*गण*] संपूर्ण स्वातंत्र्य, पूर्णाधिकार, पूर्ण मुभा.

cartilage /'काटिलिज्/ *ना* [*अगण*] प्राण्यांच्या हाडांवरील पांढरा लवचिक पक्का पेशीबंध किंवा अशी ऊती, कास्थी, मृदू अस्थी, कूर्चा.

carton /'काट्न्/ *ना* [*गण*] पुठ्ठ्याचे किंवा प्लॅस्टिकचे खोके.

cartoon /का'टून्/ *ना* [*गण*] १ वर्तमानपत्र वगैरेमधील गमतीशीर किंवा विनोदी चित्रे किंवा चित्रमाला, हास्यचित्र, व्यंगचित्र. २ चित्रशृंखलेची छायाचित्रे घेऊन केलेला चित्रपट. **cartoonist** *ना* [*गण*] व्यंगचित्रकार.

cartridge /'काट्रिज्/ *ना* [*गण*] १ बंदुकीतून मारायच्या गोळीच्या मागे जोडलेली स्फोटक दारू असणारी नळी किंवा कुपी, काडतूस. २ रेकॉर्ड-प्लेअरचा पिन असणारा भाग, फोनोचा पिन असणारा हात. ३ सीलबंद बाटली किंवा कुपी : *an ink ~, शाईची सीलबंद नळी.*

carve /काव्ह्/ *क्रि* [*अक, सक*] १ दगड किंवा लाकडामधे छिलके काढून एखादी आकृती तयार करणे, कोरणे, खोदणे : *~ one's initials on a tree, झाडावर स्वतःच्या नावाची आद्याक्षरे कोरणे.* २ (शिजवलेल्या मांसाचे) पातळ तुकडे करणे, कापणे. ३ (*क्रिब*) **carve sth out** खूप परिश्रम घेऊन तयार करणे (उदा स्वतःची जीविका). **carver** *ना* [*गण*] कोरीव काम करणारा माणूस, शिल्पकार. **carving** *ना* [*गण*] दगडात वगैरे कोरलेले काही. **'carving knife** *ना* [*गण*] मांस कापण्यासाठी वापरायचा मोठा धारदार सुरा.

cascade /कॅ'स्केइड्/ *ना* [*गण*] धबधबा. **cascade** *क्रि* [*अक*] धोधो किंवा धबाधब पडणे.

case^1 /केइस्/ १ [*गण*] एखादी गोष्ट घडल्याचे उदाहरण, बाब, घटना : *a clear ~ of blackmail, धमकी देऊन पैसे उकळण्याचे ढळढळीत उदाहरण* ○ *In most ~s, no extra* *charge is made, बहुतेक बाबतीत जादा किंमत आकारली जात नाही.* २ **the case** [*अे.व*] प्रत्यक्ष परिस्थिती, सद्यस्थिती : *If that is the ~, you will have to work hard, तसे असेल तर (म्हणजे तू म्हणतोस तशी परिस्थिती असेल तर) तुला कष्ट करायला हवेत.* ३ [*गण*] एखाद्या रोगाचे किंवा हानीचे (इजेचे) प्रत्यक्ष उदाहरण, रोगी किंवा पीडित. ४ [*गण*] पोलीस तपास करत असलेले प्रकरण, पोलीस-चौकशी चालू असलेली बाब किंवा घटना. ५ [*गण*] (क) कोर्टात निकाल लागायची बाब, कोर्टात गेलेले प्रकरण. (ख) [बहुधा *अे.व*] एखाद्या वाद-विवादात एखाद्या बाजूला पाठिंबा देणारी किंवा ती खोडून काढणारी वास्तविके, चर्चेतील पुराव्यांची एक बाजू. ६ [*अगण, गण*] दुसऱ्या शब्दाशी संबंध दाखविणारे शब्दाचे रूप, शब्दाचे विभक्तीरूप. ७ (*वाक्प्र*) **a case in 'point** ज्या विषयाची चर्चा चालली आहे त्याच्याशी संबंधित अशी बाब किंवा असे उदाहरण. **in 'any case** काहीही होवो, काही झाले तरी. **in case of sth** एखादी गोष्ट घडल्यास किंवा असल्यास : *In ~ of emergency, phone the police, आणीबाणीची परिस्थिती उद्‌भवल्यास पोलीसांना फोन कर.* **in 'that case** तसे असेल तर. **(just) in case** एखादी गोष्ट होण्याची शक्यता असल्याने, एखादी गोष्ट होईल म्हणून : *Take an umbrella in ~ it rains, पाऊस पडायची शक्यता असल्याने छत्री घे.* **,case 'history** *ना* [*गण*] एखाद्या व्यक्तीच्या तब्बेतीचा, पूर्वीच्या दुखण्यांचा वगैरे इतिहास किंवा त्यांची नोंद, (रुग्णाचा) पूर्वेतिहास.

case^2 /केइस्/ *ना* [*गण*] १ खोके, पेटी, डबी वगैरे. २ सूटकेस. **case** *क्रि* [*सक*] पेटीत ठेवणे.

casement /'केइस्मन्ट्/ *ना* [*गण*] दाराप्रमाणे उघडणारी खिडकी.

cash /कॅश्/ *ना* [*अगण*] १ नोटा किंवा नाणी या स्वरूपातील पैसे, नगद, रोकड. २ (*अनौप*) कोणत्याही स्वरूपातील पैसा, संपत्ती. **cash** *क्रि* १ [*सक*] (चेक वगैरेच्या) बदल्यात पैसे घेणे, (चेक वगैरे) वटवणे. २ (*क्रिब*) **cash in on sth** एखाद्या गोष्टीचा फायदा उठवणे, लाभ उठवणे; एखाद्या गोष्टीने फायदा होणे, लाभ होणे. **'cash crop** *ना* [*गण*] नगदी पीक. **'cash dispenser** *ना* [*गण*] स्वतःचे कार्ड घातल्यावर आणि गुप्त क्रमांक दिल्यावर पैसे देणारे बँकेच्या बाहेर बसविलेले यंत्र. **'cash register** *ना* [*गण*] मिळालेली रोकड नोंदवून जमा करणारे दुकानातील यंत्र.

cashew /'कॅशू/ *ना* [*गण*] डबल-बीच्या आकाराची बी असलेली फळे देणारे उष्णकटिबंधातील एक झाड, काजू.

cashier /कॅ'शिअ(र्)/ *ना* [*गण*] बँक, दुकान वगैरेमधे पैसे घेण्याचे आणि देण्याचे काम करणारा माणूस, रोखपाल.

cashmere /,कॅश'मिअ(र्)/ *ना* [*अगण*] चांगल्या प्रतीची मऊ लोकर, काश्मिरी लोकर.

casing /'केइसिङ्/ *ना* [*गण*] (सुरक्षिततेसाठीचे) आवरण, कव्हर.

casino /क'सीनउ/ *ना* [*गण*] (*ब.व* ~s) जुगार आणि इतर मौजमजेसाठीची जागा किंवा इमारत, द्यूतगृह, नृत्यद्यूतशाला.

cask /कास्क्; *अमे* कॅस्क्/ द्रवपदार्थ ठेवायचे पिंप.

casket /'कास्किट्; *अमे* 'कॅस्-/ *ना* [*गण*] १ रत्ने, पत्ते वगैरे जपून ठेवण्याची पेटी, छोटी संदूक. २ (*अमे*) शवपेटी.

cassava /क'साव/ *ना* [*गण, अगण*] तवकील काढायची मुळे असलेले उष्णकटिबंधातील एक झाड – ही मुळे अन्न म्हणून खातात.

casserole /'कॅसरउल्/ *ना* (क) [*गण*] अन्न शिजवायचे झाकणाचे पातेले. (ख) [*गण, अगण*] अशा पातेल्यात मंदाग्नीवर शिजवलेले अन्न.

cassette /क'सेट्/ *ना* [*गण*] चुंबकीय फीत किंवा फिल्म असलेली लहान बंद डबी.

cassock /'कॅसक्/ *ना* [*गण*] ख्रिस्ती धर्माधिकारी कपड्यावरून घालतात तो झगा.

cast^1 /कास्ट्; *अमे* कॅस्ट्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **cast**) [*सक*] १ फेकणे, टाकणे; पडू देणे : *~ a net, जाळे टाकणे* ○ *Snakes ~ their skins, साप कात टाकतात.* ○ *(ला) The tree ~ a long shadow, झाडाची सावली लांबवर पडली होती* ○ *~ a glance at sb, एखाद्याकडे नजर टाकणे, दृष्टीक्षेप करणे.* ○ *~ doubt on his* *claims, त्याने केलेल्या दाव्यांबाबत शंका व्यक्त करणे.* २ धातूचा रस मुशीत ओतून एखादी वस्तू बनवणे : *~ a statue, ओतीव पुतळा करणे.* ३ नाटकात काम देणे, (नटाला) भूमिका देणे. ४ (*वाक्प्र*) **cast aspersions on sb/sth** (*औप*) एखाद्या व्यक्ती किंवा गोष्टीविषयी वाईट विधान करणे, हानीकारक मत मांडणे, बदनामीकारक टीका करणे. **cast an eye/one's eyes over sth** एखादी गोष्ट चटकन् तपासणे किंवा भरभर पाहणे, घाईने नजरेखालून घालणे. **cast light on sth** ⇨ LIGHT^{1}. **cast lots** ⇨ LOT^{3}. ५ (*क्रिब*) **cast sb/sth aside** एखाद्या व्यक्ती किंवा गोष्टीपासून सुटका करून घेणे, एखादी गोष्ट दूर फेकून देणे, कुचकामी म्हणून बाजूला ठेवणे. **cast (sth) off** (जहाजाचे) दोर सोडणे. **cast sth off** दूर फेकून देणे, त्याग करणे. **casting** *ना* [*गण*] धातुरस मुशीत ओतून तयार केलेली वस्तू, ओतीव वस्तू, साच्यातून काढलेली वस्तू, ओतकाम. **,casting 'vote** *ना* [*गण*] समान मते पडल्यावर देण्यात येणारे निर्णायक मत. **cast 'iron** *ना* [*अगण*] साच्यात ओतून केलेला लोखंडाचा एक मिश्र धातू, ओतीव लोखंड, बीड. **cast-iron** *वि* १ बिडाचा. २ (*ला*) बळकट, भक्कम : *a ~-iron excuse, बळकट सबब, शंभरटक्के पटणारे कारण.* **'cast-off** *ना* [*गण, बहुधा ब.व*], *वि* मूळ मालकाला नको असणारा (कपडा), जुने टाकलेले (कपडे).

cast^{2} /कास्ट्; *अमे* कॅस्ट्/ *ना* [*गण*] १ नाटकातील वगैरे भूमिका करणारे कलावंत, भूमिका, कलाकार, पात्र-योजना. २ एखादी गोष्ट फेकण्याची कृती, फेक. ३ (क) साच्यात ओतून केलेली वस्तू, छापातून काढलेली वस्तू. (ख) छाप, साचा, मूस.

castanets /,कॅस्ट'नेट्स/ *ना* [*ब.व*] बोटात धरून वाजवायच्या शिंपल्याच्या आकाराच्या लाकडी पट्ट्या किंवा झांजा, लाकडी चिपळ्या.

castaway /'कास्टवेइ/ *ना* [*गण*] बुडालेल्या बोटीतून बचावलेला माणूस, फुटक्या तारूतला प्रवासी.

caste /कास्ट्/ *ना* [*गण*] हिंदू समाजातील एक वर्ग, जात.

castigate /'कॅस्टिगेइट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) कडक टीका करणे, धारेवर धरणे, खरमरीत टीका करणे, वाभाडे काढणे.

castle /'कास्ल्; *अमे* 'कॅस्ल्/ *ना* [*गण*] १ शत्रूपासून संरक्षण करण्यासाठी वापरायची जाड भिंतींची जुनी मोठी इमारत, किल्ला, कोट, गढी. २ बुद्धिबळातील एक सोंगटी, हत्ती.

castor (तसेच **caster**) /'कास्ट(र्); *अमे* 'कॅस्-/ *ना* [*गण*] १ खुर्चीला वगैरे लावलेले छोटेसे चाक, खुर्ची वगैरेच्या पायाचे सरकवायचे चाक. २ वर भोके असलेले साखर वगैरे ठेवायचे पात्र; साखर, मीठ वगैरेची भोकाची बाटली. **,castor 'sugar** *ना* [*अगण*] अतिशय मऊ अशी पांढरी शुभ्र साखर, पिठीसाखर.

castor oil /,कास्टर् 'ऑइल; *अमे* 'कॅस्टर् ऑइल/ *ना* [*अगण*] औषधासाठी वापरायचे घट्ट पिवळसर तेल, एरंडेल.

castrate /कॅस्'ट्रेइट्; *अमे* 'कॅस्ट्रेइट्/ *क्रि* [*सक*] पशूतील नराचे अंड काढणे, अंडच्छेदन करणे, खोजा करणे, खच्ची करणे. **castration** /कॅ'स्ट्रेइश्न्/ *ना* [*अगण*] खच्चीकरण, अंडच्छेदन.

casual /'कॅजुअल्/ *वि* १ अनौपचारिक, ठरवून न केलेला; गंभीरपणा नसलेला : *~ clothes, साधा, घरचा पोषाख.* २ योगायोगाने किंवा प्रयत्न न करता झालेला : *a ~ meeting, सहज झालेली भेट.* ३ तात्पुरता, कायमचा नसलेला : *~ work, तात्पुरते काम.* **casually** *क्रिवि* न ठरवता; सहज म्हणून; साधेपणाने, काही विशेष न करता.

casualty /'कॅजुअल्टि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) युद्ध किंवा अपघातात जखमी किंवा मृत झालेली व्यक्ती, जखमी, बळी.

cat /कॅट्/ *ना* [*गण*] (क) एक छोटासा केसाळ, हौसेने पाळण्यात येणारा प्राणी, मांजर. (ख) मांजर या गोत्रातील वाघ, सिंह यासारखा प्राणी. **'cat burglar** *ना* [*गण*] भिंती, पाईप यावरून चढून घरात घुसणारा चोरटा किंवा घरफोड्या. **'catcall** *ना* [*गण*] नापसंती दाखवण्यास मारलेली मोठी कर्कश शिट्टी. **'catnap** *ना* [*गण*] लहान झोप, कावळ्याची झोप.

catacombs /'कॅटकूम्झ्; *अमे* -कउम्झ्/ *ना* [*ब.व*] मृतदेह पुरण्यासाठी बांधलेली

जमिनीखालची भुयारे, शववापिका.

catalogue (*अमे* तसेच **-log**) /'कॅटलॉग्; *अमे* -लॉऽग्/ *ना* [*गण*] विषयांची यादी – उदा सामानाची यादी, तालिका. **catalogue** *क्रि* [*सक*] यादी करणे.

catalyst /'कॅटलिस्ट्/ *ना* [*गण*] बदलाचा वेग वाढवणारे किंवा बदल घडवून आणणारे पण स्वतःत बदल न होऊ देणारे असे द्रव्य, निदेशक, योगवाही पदार्थ, उत्प्रेरक.

catapult /'कॅटपेल्ट्/ *ना* [*गण*] दुबळक्यावर ताणली जाणारी दोरी असणारी दगड मारायची काठी, गलोल. **catapult** *क्रि* [*सक*] गलोलीने (जणू) मारणे, अचानक (फेकल्याप्रमाणे) पुढे येणे.

cataract /'कॅटरॅक्ट्/ *ना* [*गण*] १ उंचावरून पडणारा मोठा धबधबा, प्रपात. २ अंधत्व आणणारा नेत्ररोग, डोळ्यात फूल पडणे, मोतीबिंदू.

catarrh /क'टा(र्)/ *ना* [*गण*] नाक आणि घशात जळजळ होऊन नाकातून पाणी येणे, घशाला सूज येऊन आलेले पडसे, सर्दी, शैत्य.

catastrophe /क'टॅस्ट्रफि/ *ना* [*गण*] अचानक कोसळलेले संकट किंवा दुर्भाग्य, मोठा अनर्थ किंवा मोठे आरिष्ट, आपत्ती, विप्लव. **catastrophic** /,कॅट्'स्ट्रॉफिक्/ *वि* अनर्थकारी, हानिकारक.

catch^1 /कॅच्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **caught** /कॉऽट्/) १ [*सक*] (एखादी गतिमान वस्तू) थांबवून पकडणे – विशेषतः हातांनी, झेलणे : ~ *a ball, चेंडू पकडणे.* २ [*सक*] धरणे, ताब्यात घेणे, घट्ट पकडणे : ~ *a thief, चोर धरणे किंवा पकडणे.* ३ [*सक*] एखादी गोष्ट करताना सापडणे किंवा आढळणे : ~ *sb stealing, चोरी करताना सापडणे.* ४ [*सक*] वेळेवर (गाडी वगैरे) पकडणे किंवा गाठणे. ५ [*अक, सक*] अडकणे किंवा अडकवणे, सापडणे, गुंतणे किंवा गुंतवणे : *I caught my fingers in the door, माझी बोटे दाराच्या फटीत सापडली.* ६ [*सक*] -ने आजारी पडणे : ~ *a cold, सर्दीने आजारी पडणे म्हणजेच सर्दी होणे.* ७ [*सक*] (एखादी गोष्ट) ऐकणे किंवा ऐकू येणे; समजणे : *I didn't quite ~ your name, मला तुझं नाव नीट ऐकू नाही आलं.* ८ [*सक*] फटका देणे किंवा बसणे, लगावणे. ९ (*वाक्प्र*) **be ,caught 'up in sth** एखाद्या गोष्टीत (अनिच्छेने) अडकणे, फंदात पडणे. **catch sb's at'tention/eye** एखाद्याचे लक्ष वेधणे. **catch sb's fancy** ➪ FANCY^1. **catch 'fire** आग लागणे, पेटणे, पेट घेणे. **catch sb 'napping** (*अनौप*) एखाद्याचे लक्ष नाही हे ओळखणे, दुर्लक्ष करताना पकडणे. **catch sb red-'handed** एखाद्याला वाईट गोष्ट करताना पकडणे, पुराव्यानिशी पकडणे. **catch sight of sb/sth** एखादी गोष्ट किंवा व्यक्ती क्षणभर दिसणे, दृष्टीस पडणे. १० (*क्रिव*) **,catch 'on** (*अनौप*) प्रसिद्ध किंवा लोकप्रिय होणे, झपाट्याने पसरणे. **,catch 'on (to sth)** (*अनौप*) एखादी गोष्ट समजणे, ध्यानात येणे. **,catch sb 'out** एखाद्याची चूक किंवा अज्ञान दाखवून देणे. **,catch 'up (with sb), ,catch sb 'up** एखाद्याची बरोबरी करणे, त्याच्या श्रेणीला पोहोचणे, त्याला गाठणे. **,catch 'up on sth** एखादी गोष्ट करण्यास जास्त वेळ देणे किंवा जादा वेळ खर्चणे. **catching** *वि* (रोगाबाबत) साथीचा, लागण होणारा. **'catchment ,area** /'कॅच्मन्ट्/ *ना* [*गण*] १ ज्या भागातून पावसाचे पाणी एखाद्या नदीकडे वगैरे वाहत जाते तो भाग, पाणलोट क्षेत्र. २ एखाद्या शाळेत, हॉस्पिटलमधे वगैरे जेथून लोक पाठविले जातात ते ठिकाण. **'catch-phrase** *ना* [*गण*] खूप लोक खूपदा (पण बहुधा थोडाच काल) वापरतात ते शब्द, वापरून गुळगुळीत झालेली उक्ती. **catchy** *वि* (**-ier, -iest**) (गाण्याच्या चालीबाबत) लक्षात राहायला सोपी, पकड घेणारी.

catch^2 /कॅच्/ *ना* [*गण*] १ पकडण्याची – विशेषतः चेंडू – कृती, झेल. २ पकडलेल्या गोष्टी. ३ दार किंवा कुलूप लावण्याची युक्ती, कडी, अडसर. ४ सहज न लक्षात येणारी अडचण, गुप्त मेख : *There must be a ~ in this somewhere, यात काहीतरी गुप्त मेख असावी.*

categorical /,कॅट'गॉरिक्ल्; *अमे* -गॉऽर्-/ *वि* (विधानाबाबत) बिनशर्त; स्वच्छ, स्पष्ट; निःसंदिग्ध, ठाम. **categorically** /-क्लि/ *क्रिवि* बिनशर्त, निःसंदिग्धपणे, ठामपणे.

category /'कॅटगरि; *अमे* -गॉऽरि/ *ना* [*गण*]

(*ब.व* **-ies**) एखाद्या पूर्ण व्यवस्थेतील एक गट; वर्ग, प्रवर्ग. **categorize** /-गराइझ़्/ *क्रि* [*सक*] प्रवर्ग ठरविणे.

cater /'केइट(र्)/ *क्रि* [*अक*] (*for*)// १ समारंभात वगैरे एखाद्याला अन्न वाढणे किंवा त्याची सेवा करणे. २ एखाद्याला हवी असलेली गोष्ट देणे किंवा पुरवणे, एखाद्याचे समाधान करणे : *television programmes ~ing for all tastes, वेगवेगळ्या रुचीच्या लोकांना समाधान देणारे दूरदर्शनचे कार्यक्रम.* **caterer** *ना* [*गण*] जेवणाचा कंत्राटदार, खाद्यपेयप्रबंधक.

caterpillar /'कॅटपिल(र्)/ *ना* [*गण*] १ फुलपाखराची किंवा पतंगाची अळी, सुरवंट. २ (तसेच **Caterpillar track**) (*मालक*) ट्रॅक्टर किंवा रणगाड्याच्या चाकाभोवती फिरणारा अखंड पट्टा.

catgut /'कॅट्गट्/ *ना* [*अगण*] व्हायोलिनच्या तारा किंवा टेनिसच्या रॅकेटमधे वगैरे वापरायचा चिवट पातळ दोरा.

cathedral /क'थीड्रल्/ *ना* [*गण*] बिशपच्या अधिकाराखालील जिल्ह्यातील मुख्य चर्च.

cathode /'कॅथउड्/ *ना* [*गण*] विजेरीतील ऋण वैजिक प्रस्थ, ऋणप्रस्थ, ऋणाग्र.

catholic /'कॅथलिक्/ *वि* १ **Catholic** = ROMAN CATHOLIC (ROMAN). २ (*औप*) विविध गोष्टींचा समावेश असलेला, जास्त समावेशक; सर्वसमावेशक : *have ~ tastes, सर्वसमावेशक आवडी असणे.* **Catholic** *ना* [*गण*] = ROMAN CATHOLIC (ROMAN). **Catholicism** /क'थॉलसिझ़्म्/ *ना* [*अगण*] रोमन कॅथलिक चर्चची शिकवण, श्रद्धा वगैरे.

cattle /'कॅट्ल्/ *ना* [*ब.व*] गाईबैल वगैरे, गुरेढोरे, जित्राब.

catty /'कॅटि/ *वि* (**-ier, -iest**) खूप कठोर आणि तुच्छतापूर्ण, मत्सरी.

caught CATCH^1 चा *भूत, भूत वि.*

cauldron /'कॉऽल्ड्रन्/ *ना* [*गण*] पदार्थ उकळण्याचे मोठे खोलगट भांडे, मोठी कढई, हंडा.

cauliflower /'कॉलिफ्लाउअ(र्); *अमे* 'कॉऽलि-/ *ना* [*गण, अगण*] मोठा पांढरा फुलदांडा असलेली भाजी, फुलकोबी, फ्लॉवर.

cause /कॉऽझ़्/ *ना* १ [*गण, अगण*] परिणाम निर्माण करणारे काहीतरी, कारण; एखादी गोष्ट घडवून आणणारी अशी वस्तू वगैरे, कारण, निमित्त : *the ~ of the fire,* आगीचे कारण. २ [*अगण*] (*for*)// कारण, कारणपरंपरा : *have ~ for complaint, तक्रारीला कारण असणे.* ३ [*गण*] भरभक्कम पाठिंबा असलेली चळवळ किंवा तसे ध्येय : *the ~ of world peace, जागतिक शांततेचे ध्येय.* **cause** *क्रि* [*सक*] कारण असणे : *What ~d his death? त्याचा मृत्यू कोणत्या कारणाने झाला?*

causeway /'कॉऽझ़्वेइ/ *ना* [*गण*] पाणथळ किंवा दलदलीच्या जागेतला किंचित उंचावर बांधलेला रस्ता, बांधाचा रस्ता.

caustic /'कॉऽस्टिक्/ *वि* १ रासायनिक प्रक्रियेने ज्वलन होऊ शकणारा, दाहक : *~ soda, दाहकसोडा.* २ (*ला*) (शेऱ्यांबाबत) कडवट आणि टीकात्म, मर्मभेदक. **caustically** *क्रिवि* खवचटपणे, कडवटपणे.

caution /'कॉऽश्न्/ *ना* १ [*अगण*] सावधगिरी, खबरदारी. २ ताकीद, इशारा, सूचना देणारे शब्द. **caution** *क्रि* [*सक*] धोक्याची सूचना देणे, ताकीद देणे. **cautionary** /'कॉऽशनरि; *अमे* -नेरि/ *वि* सूचक, सावध करणारा.

cautious /कॉऽशस्/ *वि* सावध, जागरुक, सावधान, दक्ष. **cautiously** *क्रिवि* सावधपणे, जागरुकतेने; खबरदारी घेऊन.

cavalcade /,कॅव्ह्ल्'केइड्/ *ना* [*गण*] घोड्यांवरून, गाड्यांतून वगैरे निघालेली लोकांची मिरवणूक, स्वारी.

cavalry /'कॅव्ह्ल्रि/ *ना* [*गण, तसेच ब.व* क्रियापदासह अे.व] (*ब.व* **-ies**) (पूर्वीच्या काळी) घोड्यावरून लढणारे (आणि आता) चिलखती गाड्यांतून लढणारे सैनिक, घोडदळ, चिलखती गाड्यांची फौज.

cave /केइव्ह्/ *ना* [*गण*] कड्यातील किंवा डोंगरातील किंवा जमिनीखालील पोकळ जागा, गुहा, विवर, कंदर, गुंफा. **cave** *क्रि* (*क्रिब*) **cave in** आतल्या बाजूला पडणे, आत ढासळणे; कोसळणे.

cavern /'कॅव्हन्/ *ना* [*गण*] मोठी गुहा, कपार, कुहर. **cavernous** *वि* कपारीसारखा, प्रचंड

गुहेसारखा; रुंद आणि खोल.

caviare (तसेच **caviar** /'कॅव्हिआ(र्)/) *ना* [*अगण*] विशिष्ट जातींच्या मोठ्या माशांची खारावलेली आणि खाद्यपदार्थ म्हणून वापरायची अंडी.

cavity /'कॅव्हटि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) (*औप*) एखाद्या घन गोष्टीतील लहानसे भोक – उदाहरणार्थ दातातील भोक, छिद्र, रंध्र, खळगा.

cayenne /केइ'अेन्/ **,cayenne 'pepper** *ना* [*अगण*] एक प्रकारची तांबडी तिखट मिरपूड.

CB /,सी 'बी/ *संरू* citizens' band.

cc /,सी'सी/ *संरू* cubic centimetre, घन सेंटीमीटर, इंजिनाच्या शक्तीचे मोजमाप करण्याचे एक परिमाण.

CD /,सी 'डी/ *संरू* compact disc, छोटी ध्वनिमुद्रिका.

cease/ सीस्/ *क्रि* [*अक, सक*] (*औप*) थांबणे, थांबवणे, बंद करणे. **,cease-'fire** *ना* [*गण*] युद्ध किंवा लढाई थांबविण्याचा करार, युद्धबंदीकरार. **ceaseless** *वि* न थांबता केलेला, अखंड, सतत, अथक. **ceaselessly** *क्रिवि* अथकपणे, अखंडितपणे, विश्रांती न घेता.

cedar /'सीड(र्)/ *ना* (क) [*गण*] टणक पण सुगंधी लाकूड असलेला एक उंच सदाहरित वृक्ष, देवदार, गंधतरू. (ख) [*अगण*] या झाडाचे लाकूड.

ceiling /'सीलिङ्/ *ना* [*गण*] १ खोलीचा डोक्यावरचा पृष्ठभाग, छत, तक्तपोशी. २ अधिकृत वरची किंवा उच्च मर्यादा, कमाल मर्यादा : *a price/wage ~, किमतीवरची किंवा रोजगारावरची मर्यादा.*

celebrate /'सेलिब्रेइट्/ *क्रि* १ [*अक, सक*] एखादा प्रसंग मौज करून स्मरणीय करणे, साजरा करणे. २ [*सक*] (*औप*) स्तुती किंवा प्रशंसा करणे; सन्मान करणे. **celebrated** *वि* प्रसिद्ध, ख्यातनाम. **celebration** /,सेलि'ब्रेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] साजरा करणे, उत्सव, मौजमजा, समारंभ.

celebrity /सि'लेब्रटि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*गण*] प्रसिद्ध व्यक्ती, उत्सवमूर्ती, ख्यातकीर्त व्यक्ती, प्रस्थ, नामांकित व्यक्ती, धेंड. २ [*अगण*] प्रसिद्धी, कीर्ती, नावलौकिक.

celery /'सेलरि/ *ना* [*अगण*] जिचे पांढरे तुरे कच्चे खातात अशी एक वनस्पती.

celestial /सि'लेस्टिअल्; *अमे* -च्ल्/ *वि* (*अनौप*) आकाशातील, आकाशस्थ; स्वर्गीय.

celibate /'सेलिबट्/ *वि* अविवाहित असणारा किंवा लैंगिकदृष्ट्या निष्क्रीय – विशेषतः धार्मिक कारणांसाठी, ब्रह्मचारी, अकामी. **celibacy** /-बसि/ *ना* [*अगण*] ब्रह्मचर्य, विषयोदासीनता. **celibate** *ना* [*गण*] ब्रह्मचारी, ब्रह्मचर्य पाळणारा माणूस.

cell /सेल्/ *ना* [*गण*] १ लहान खोली : *a prison ~, तुरुंगातली खोली.* २ रासायनिक प्रक्रियेने विद्युत्प्रवाह निर्माण करण्याचे छोटे साधन, वीजघट, विद्युत्घट. ३ सजीव पदार्थाचा सूक्ष्म घटक, पेशी, पेशिका, कोशिका. ४ माणसांचा लहान गट – उदाहरणार्थ, गुप्त संघटनेतील.

cellar /'सेल(र्)/ *ना* [*गण*] साठा करण्याची जमिनीखालची खोली, तळघर : *a wine ~, मद्याचे तळघर.*

cello /'चेलउ/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s**) गुडघ्यात धरून वाजवायचे एक प्रकारचे मोठे व्हायोलिन. **cellist** /'चेलिस्ट्/ *ना* [*गण*] हे वाद्य वाजविणारा, चेलउवादक.

Cellophane /'सेलफेइन्/ *ना* [*अगण*] (*मालक*) वस्तू गुंडाळण्यासाठी वापरायचा पातळ पारदर्शक ताव.

cellular /'सेल्युल(र्)/ *वि* १ पेशींनी युक्त, पेशिकामय. २ (घोंगड्या/पांघरुण वगैरे बाबत) सैल विणीचे.

Celsius /'सेल्सिअस्/ *वि, ना* [*अगण*] पाण्याचा गोठण बिंदू ०° आणि उत्कलन बिंदू १००° अशा परिमाणातील उष्णतामापन.

cement /सि'मेन्ट्/ *ना* [*अगण*] १ पाणी मिसळल्यावर दगडासारखी घट्ट होणारी आणि बांधकामात वापरली जाणारी राखाडी रंगाची पावडर किंवा भुकटी. २ एक प्रकारचा डिंक, डकवण. **cement** *क्रि* [*सक*] सिमेंटने (जणू) जोडणे, सांधणे.

cemetery /'सेमट्रि; *अमे* -टेरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) मृतदेह पुरण्याची जागा, कबरस्तान.

cenotaph /'सेनटाफ्; *अमे* -टॅफ्/ *ना* [*गण*]

युद्धात मरण पावलेल्या लोकांच्या स्मरणार्थ बांधलेले स्मारक, छत्री.

censor /'सेन्स(र्)/ *ना* [*गण*] पुस्तके, चित्रपट वगैरेची तपासणी करून त्यातील अश्लील किंवा बदनामीकारक, भावना दुखावणारा भाग काढून टाकणारा अधिकृतपणे नेमलेला अधिकारी, परिनिरीक्षक. **censor** *क्रि* [*सक*] (पुस्तक वगैरेची) तपासणी करून त्यातील आक्षेपार्ह भाग काढून टाकणे, परिनिरीक्षण करणे. **censorship** *ना* [*अगण*] असे भाग काढून टाकण्याची कृती किंवा पद्धती, परिनिरीक्षण.

censure /'सेन्श(र्)/ *क्रि* (*औप*) कडक टीका करणे, निर्भत्सना करणे, निंदा करणे; कडक निषेध करणे, कान उपटणे. **censure** *ना* [*अगण*] टीका; निर्भत्सना.

census /'सेन्सस्/ *ना* [*गण*] अधिकृत मोजणी – विशेषतः एखाद्या देशाच्या लोकसंख्येची, लोकसंख्यागणन, जनगणना, खानेसुमारी, शिरगणती.

cent /सेन्ट्/ *ना* [*गण*] पैशाच्या मुख्य नाण्याचा – उदाहरणार्थ डॉलर वगैरेचा – शंभरावा भाग, एकशतांश डॉलर.

centaur /'सेन्टॉऽ(र्)/ *ना* [*गण*] (ग्रीक पुराणातील) डोके, हात आणि अर्धे शरीर माणसाचे आणि बाकीचा अर्धा भाग आणि पाय घोड्याचे असा एक प्राणी, तुंबरू, नराश्व.

centenarian /,सेन्टि'नेअरिअन्/ *ना* [*गण*], *वि* शंभर वर्षे किंवा त्याहून जास्त वय असलेला (माणूस), शतायुषी, शतायू.

centenary /सेन्'टीनरि; *अमे* 'सेन्टनेरि/ *ना* [*गण*] (*ब.व* -ies) शंभरावा वाढदिवस, शतवार्षिकोत्सव, शताब्दी.

centennial /सेन्'टेनिअल/ *ना* [*गण*] (*अमे*) शताब्दी.

center (*अमे*) = CENTRE.

centigrade /'सेन्टिग्रेड्/ *वि*, *ना* [*गण*] = CELSIUS.

centimetre (*अमे* -meter) [*गण*] मेट्रिक पद्धतीतील लांबीचे परिमाण; मीटरचा १०० वा भाग.

centipede /'सेन्टिपीड्/ *ना* [*गण*] खूप पाय असलेला लहान सरपटणारा प्राणी, शतपाद, गोम.

central /'सेन्ट्रल्/ *वि* १ मध्याकडे किंवा मध्याचा, मध्यवर्ती, केन्द्रीय. २ सर्वात महत्त्वाचा; मुख्य. **,central 'heating** *ना* [*अगण*] पाईप आणि रेडिएटर यांच्या द्वारे एका मध्यवर्ती केन्द्रातून संपूर्ण इमारत उबदार ठेवण्याची पद्धती, हवा उबदार ठेवण्याची मध्यवर्ती व्यवस्था. **centrally** *क्रिवि* मध्यापासून, मध्यभागी.

centralize /'सेन्ट्रलाइझ्/ *क्रि* [*अक, सक*] एका मध्यवर्ती अधिकाराच्या नियंत्रणाखाली आणणे, एका सत्तेखाली आणणे, एकछत्री कारभार असणे, केन्द्रीकरण करणे. **centralization** /,सेन्ट्रलाइ'झेइश्न्; *अमे* -लि'झे-/ *ना* [*अगण*] केन्द्रीकरण, मध्यवर्तीकरण.

centre /'सेन्ट(र्)/ *ना* १ [*गण*] मध्यबिंदू किंवा मध्यभाग, केन्द्रबिंदू किंवा केन्द्रस्थान, मध्य, केन्द्र. २ एखाद्या विशिष्ट व्यवहाराचे केन्द्र : *a 'shopping ~, मध्यवर्ती बाजार, भांडार-संकुल.* ३ लोकांच्या कुतुहलाचा विषय किंवा त्यांचे लक्ष वेधणारे केन्द्र : *the ~ of attention, लक्ष वेधणारे केन्द्र.* ४ (विशेषतः **the centre**) [*अ.व*] उजवे आणि डावे या दोन टोकांमधील मधली नेमस्त अशी राजकीय भूमिका, मध्यममार्गी. **centre** *क्रि* (*क्रिब*) **centre (sth) on/around sb/sth** एखाद्या व्यक्तीकडे किंवा गोष्टीकडे मुख्य लक्ष केन्द्रित होणे किंवा करणे, लक्ष वेधणे.

centrifugal /,सेन्ट्रि'फ्यूग्ल्, तसेच सेन्'ट्रिफ्युग्ल्/ *वि* केन्द्रापासून दूर जाणारा, केन्द्रापसारी, केन्द्रापकर्षी, केन्द्रोत्सारी, अपमध्य : *~ force, केन्द्रोत्सारी प्रेरक किंवा बल.*

century /'सेन्चरि/ *ना* [*गण*] (*ब.व* -ies) १ शंभर वर्षांचा काळ, शतक. २ (क्रिकेटमध्ये) एका खेळाडूच्या शंभर धावा, शतक.

ceramic /सि'रॅमिक्/ *वि* भांड्यांच्या बाबतीतला, भांडीविषयक, कुंभकारविषयक. **ceramics** *ना* १ [*अगण*] भांडी तयार करण्याची आणि सुशोभित करण्याची कला, कुलालकला. २ [*ब.व*] चिनी मातीच्या बनविलेल्या वस्तू, अपारदर्शक काचेची शिल्पे.

cereal /'सिअरिअल्/ *ना* [*अगण, गण*] १ गहू, बार्ली यासारखी खाण्यासाठी वापरण्यात येणारी तृणधान्ये, शूकधान्य. २ तृणधान्यापासून

तयार केलेले अन्न : *breakfast ~s, नाश्त्याच्या वेळी खायचे धान्याचे पदार्थ.*

ceremonial /,सेरि'मउनिअल्/ *वि* समारंभाचा, उत्सवी : *a ~ occasion, समारंभाचा प्रसंग, मंगलविधींचा प्रसंग.* **ceremonial** *ना* [*गण, अगण*] समारंभाचे नियम, समारंभाचे विधी. **ceremonially** /-निअलि/ *क्रिवि* समारंभपूर्वक.

ceremonious /,सेरि'मउनिअस्/ *वि* अतिशय औपचारिक आणि आदरशील, शिष्टाचारानुरुप. **ceremoniously** *क्रिवि* यथाविधी, शिष्टाचारानुसार.

ceremony /'सेरिमनि; *अमे* -मउनि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*गण*] एखाद्या विशेष प्रसंगी करावयाचे विधिपूर्वक कर्म, धार्मिक उपचार वगैरे. २ शिष्टाचार.

certain /'सऽट्न्/ *वि* १ कोणत्याही शंकेविना, निःसंशय; निश्चित, नक्की. २ (*to*)// निश्चितपणे होणारे : *They're ~ to win the game, ते नक्कीच मॅच जिंकतील.* ३ नाव न घेतलेला पण विशिष्ट, काही एक विशिष्ट : *on ~ conditions, काही विशिष्ट अटींवर.* ४ किंचित्, काहीसा; थोडासा, काही : *a ~ coldness in his attitude, त्याच्या वृत्तीतील एक थोडासा/काहीसा थंडपणा.* ५ (*वाक्प्र*) **make certain** खात्री होण्यासाठी काही करणे : *Make ~ that no bones are broken, हाडे मोडलेली नाहीत याची खात्री करून घे.* **certainly** *क्रिवि* १ निःसंशयपणे; निश्चितपणे, नक्की. २ (प्रश्नांना उत्तर देताना) अर्थात्; हो, नक्की. **certainty** *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] निश्चितता, खात्री. २ [*अगण*] खात्रीशीर गोष्ट, निश्चित गोष्ट.

certificate /स'टिफिकट्/ *ना* [*गण*] काही वास्तविके किंवा सत्य गोष्टी नमूद करणारे कागदपत्र, खातरीपत्र, प्रमाणपत्र, दाखला : *a 'birth ~, जन्मदाखला* किंवा *जन्मतारीख प्रमाणपत्र.*

certify /'सऽटिफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] (एखादी गोष्ट खरी आहे असे) रीतसर जाहीर करणे, प्रमाणित करणे : *~ him dead/insane, तो मेला/वेडा आहे असे प्रमाणित करणे.*

cessation /से'सेइश्न्/ *ना* [*अगण, गण*] (*औप*) थांबविण्याची कृती, बंद करणे.

cesspit /'सेस्पिट्/ (तसेच **cesspool** /'सेस्पूल/) *ना* [*गण*] गटारातील पाणी जेथे सोडतात ते (घाणपाणी आणि मलमूत्र तात्पुरते साठविण्याचे) जमिनीखालचे कुंड किंवा टाकी, मलकुंडी.

CFC /,सी 'एफ् सी/ *संरू* क्लोरोफ्लोरोकार्बन, रेफ्रिजरेटर, फवारणीचे रंग किंवा कीटकनाशके वगैरेमधे वापरण्यात येणाऱ्या आणि पृथ्वीवरील पर्यावरणाला अपायकारक समजल्या जाणाऱ्या अनेक वायूंपैकी कोणताही वायू.

chafe /चेइफ्/ *क्रि* १ [*अक, सक*] चोळून लाल होणे किंवा करणे, घासून फोड येणे. २ [*अक*] (*at/under*) एखाद्या गोष्टीमुळे घायकुतीला येणे, चडफडणे, बेचैन होणे : *~ at the delay, विलंबामुळे अस्वस्थ होणे.*

chaff /चाफ्; *अमे* चॅफ्/ *ना* [*अगण*] धान्य अन्न म्हणून वापरात आणण्यापूर्वी जे काढून टाकले जाते असे धान्याचे बाहेरील आवरण, तूस, भुसकट.

chagrin /'शॅग्रिन्; *अमे* श'ग्रीन्/ *ना* [*अगण*] (*औप*) निराशा किंवा गोंधळ, नाराजी, हिरमोड.

chain /चेइन्/ *ना* १ [*गण, अगण*] धातूच्या कड्यांची गुंफलेली माळ, साखळी, शृंखला. २ [*गण*] जोडलेल्या वस्तूंची माळ, माला : *a ~ of mountains / shops / events, पर्वतराजी, दुकानांची मालिका, घटनांची साखळी.* **chain** *क्रि* [*सक*] (जणू) साखळीने बांधणे, शृंखलाबद्ध करणे. **,chain re'action** *ना* [*गण*] एकातून दुसरा याप्रकारे उद्भवलेल्या प्रसंगांची साखळी, क्रियापरंपरा. **'chain-smoke** *क्रि* [*अक, सक*] सतत सिग्रेट्स् ओढणे, एकामागोमाग एक अशा सिग्रेट्स् फुंकणे, सतत धूम्रपान करणे. **'chain-smoker** एकसारखा सिग्रेट्स् ओढणारा किंवा बिड्या फुंकणारा, सतत धूम्रपान करणारा. **'chain-store** *ना* [*गण*] एकाच कंपनीच्या एकसारख्या अशा अनेक दुकानांतील एक दुकान.

chair /चेअ(र्)/ *ना* १ एक माणूस बसू शकेल असे पाठ आणि पाय असलेले आणि हालविता येण्याजोगे आसन, खुर्ची. २ **the chair** [*अे.व*] सभेच्या अध्यक्षस्थानी असणारी व्यक्ती, अध्यक्ष किंवा अध्यक्षस्थान. ३ [*गण*] विद्यापीठातील प्रोफेसराची जागा, अध्यासन.

chair *क्रि* [*सक*] सभेच्या अध्यक्षस्थानी असणे. **'chairman, 'chairperson, 'chairwoman** *ना* [*गण*] सभेचा अध्यक्ष, अध्यक्षा.

chalet /'शॅलेइ/ *ना* [*गण*] १ स्वित्सर्लंडमधील पर्वतांवर बांधतात ती लाकडाची झोपडी. २ पर्यटन स्थळावरचे छोटेसे घर किंवा राहण्याची जागा.

chalk /चॉऽक्/ *ना* (क) [*अगण*] एक प्रकारचा मऊ पांढरा खडक, खडू. (ख) [*गण, अगण*] लिहिण्यासाठी किंवा रेखाटनासाठी तयार केलेल्या खडूच्या कांड्या. **chalk** *क्रि* १ [*अक, सक*] खडूने लिहिणे किंवा रेखाटणे. २ (*क्रिब*) **chalk sth up** (यश) मिळवणे किंवा संपादन करणे. **chalky** *वि* **(-ier, -iest)** खडूसारखा.

challenge /'चॅलिन्ज्/ *ना* [*गण*] १ कठीण किंवा कष्टसाध्य काम, आव्हान. २ एखाद्या खेळात, मुकाबल्यात वगैरे भाग घेण्यासाठी केलेले पाचारण, आव्हान, ललकारी. **challenge** *क्रि* [*सक*] १ एखाद्याला मुकाबल्यासाठी, खेळात भाग घेण्यासाठी वगैरे आमंत्रण देणे, आव्हान देणे, ललकारणे. २ एखाद्या गोष्टीच्या सभ्यतेविषयी, युक्ततेविषयी वगैरे शंका घेणे. **challenger** *ना* [*गण*] आव्हान देणारा किंवा स्वीकारणारा, प्रतिस्पर्धी, आव्हानक. **challenging** *वि* कठीण आणि कष्टप्रद, आव्हानात्मक, अवघड.

chamber /'चेइम्ब(र्)/ *ना* १ [*गण*] (पूर्वीचा वापर) खोली, कक्ष. २ [*गण*] कायदे करणाऱ्या व्यक्तींचा गट (किंवा त्यांची खोली), कायदेमंडळ. ३ **chambers** [*ब.व*] न्यायमूर्ती आणि बॅरिस्टरांच्या खोल्या किंवा कक्ष. ४ [*गण*] बंदिस्त जागा, कप्पा : *the ~s of the heart, हृदयाचे कप्पे.* **'chambermaid** *ना* [*गण*] हॉटेलमधील (झोपायच्या) खोल्या झाडून आवरणारी मोलकरीण, हॉटेलातील खोल्या झाडणारी बाई. **'chamber music** *ना* [*अगण*] कमी किंवा मर्यादित संख्येच्या वादकांनी वाजवायचे शास्त्रीय संगीत. **,chamber of 'commerce** *ना* [*गण*] स्थानिक पातळीवर धंदेवाईक हितसंबंध सुधारण्यासाठी व्यापाऱ्यांनी केलेली संघटना, वाणिज्य मंडळ.

chameleon /क'मीलिअन्/ *ना* [*गण*] आजूबाजूच्या परिस्थितीनुसार रंग बदलणारा सरडा, गिरगीट.

chamois शॅम्वा; *अमे* 'शॅमि/ *ना* [*गण*] (*ब.व* **chamois**) बकरीसारखे लहान हरिण, शामायी मृग. **'chamois leather** /'शॅमि/ *ना* [*गण, अगण*] बकरी वगैरेच्या कातडीपासून बनवलेले मऊ कातडी कापड, शमायचर्म.

champ^{1} /चॅम्प्/ *क्रि* [*अक*] १ (खास करून घोड्यांबाबत) आवाज करीत चावणे, जोरजोराने चघळणे, मचमच करणे. २ अधीर होणे, अस्वस्थ असणे, काय करू आणि काय नको असे होणे.

champ^{2} /चॅम्प्/ *ना* [*गण*] (*अनौप*) = CHAMPION १.

champagne /शॅम्'पेइन्/ *ना* [*अगण, गण*] चमकणारे पांढरेशुभ्र फ्रेंच मद्य.

champion /'चॅम्पिअन्/ *ना* [*गण*] १ स्पर्धा जिंकणारा माणूस, संघ वगैरे, विजेता (स्पर्धक, संघ वगैरे). २ एखाद्या व्यक्तीच्या किंवा तत्त्वाच्या बाजूने उभा असणारा, एखाद्या व्यक्तीचे किंवा तत्त्वाचे समर्थन करणारा, पुरस्कर्ता, कैवारी : *a ~ of women's rights, स्त्रियांच्या हक्कांचा खंदा पुरस्कर्ता.* **champion** *क्रि* [*सक*] पाठिंबा देणे, पुरस्कार करणे; कैवार घेणे, समर्थन किंवा संरक्षण करणे, कड घेणे. **championship** *ना* १ [*गण*] विजेता शोधण्यासाठी घेतलेली स्पर्धा, विजेती स्पर्धा. २ [*गण*] विजेतेपद. ३ [*अगण*] कैवार, समर्थन करण्याची कृती.

chance /चान्स्; *अमे* चॅन्स्/ *ना* १ [*अगण*] काही कारण नसताना नशिबाने गोष्टी घडण्याची रीत; दैवयोग, नशीब. २ [*गण, अगण*] शक्यता; संभवनीयता : *no ~ of winning, जिंकण्याची सुतराम् शक्यता नाही.* ३ [*गण*] संधी, वाव : *have a ~ to make an apology, खेद व्यक्त करण्याची संधी मिळणे.* ४ (*वाक्प्र*) **by 'chance** योगायोगाने, यदृच्छेने, चुकुनमाकून. **on the (off) chance** -च्या आशेने. **take a 'chance on (sth)** धोका पत्करून एखादी गोष्ट करणे, कामात धोका स्वीकारणे. **chance** *क्रि* १ [*अक*] (*औप*) योगायोगाने होणे, सुदैवाने किंवा दुर्दैवाने असणे किंवा होणे : *I ~d to be there, मी योगायोगाने*

तिथे होतो. २ [सक] धोका पत्करणे. **chancy** *वि* (-ier, -iest) (*अनौप*) धोकादायक.

chancel /'चान्स्ल्; *अमे* 'चॅन्स्ल्/ *ना* [*गण*] चर्चचा पूर्वेकडील वेदी असणारा भाग.

chancellor /'चान्सल(र्); *अमे* 'चॅन्स्-/ *ना* [*गण*] १ काही देशांतील शासनव्यवस्थेचा प्रमुख. २ (*ब्रि*) काही विद्यापीठांतील मानद प्रमुख, कुलपती. **,Chancellor of the Ex'chequer** *ना* [*गण*] (*ब्रि*) अर्थखात्याची जबाबदारी सांभाळणारा सरकारी मंत्री, कोषाध्यक्ष.

chandelier /,शॅन्ड'लिअ(र्)/ *ना* [*गण*] अनेक दिवे किंवा मेणबत्त्या लावण्यासाठी शाखा असलेला शोभेचा टांगता दिवा, झुंबर.

change^{1} /चेइन्ज्/ *क्रि* १ [*अक, सक*] वेगळे होणे किंवा करणे, बदलणे, बदल होणे किंवा करणे, पालटणे : *Our plans have ~d, आपल्या योजना बदलल्या आहेत* ○ *Water ~s into steam, पाण्याची वाफ होते* किंवा *पाण्याचे वाफेत रूपांतर होते* ○ *~ one's attitude, स्वतःची दृष्टी बदलणे, वृत्ती बदलणे.* २ [*सक*] एखादी गोष्ट बदलून त्या जागी दुसरी गोष्ट ठेवणे किंवा आणणे, बदलणे : *~ a light bulb, बल्ब बदलणे.* ३ [*अक, सक*] कपडे बदलणे. ४ [*अक, सक*] गाडी, बस वगैरे बदलणे. ५ [*सक*] बंद्या पैशाची मोड घेणे किंवा देणे किंवा परकीय चलन घेणे किंवा देणे. ६ (*वाक्प्र*) **change 'hands** मालकी बदलणे. **change one's mind** स्वतःचे मत बदलणे किंवा स्वतःचा निर्णय बदलणे. **,change one's 'tune** स्वतःची वृत्ती, वागणूक वगैरे बदलणे. ७ (*क्रिब*) **,change 'over (from sth) (to sth)** एखादी पद्धती बदलून दुसरी पद्धती आणणे. **changeable** *वि* वारंवार बदलणारा. **'change-over** *ना* [*गण*] एक व्यवस्था बदलून दुसरी व्यवस्था येणे, व्यवस्थान्तरण.

change^{2} /चेइन्ज्/ *ना* १ [*गण, अगण*] बदलण्याची कृती, बदल. २ [*गण*] एका ऐवजी दुसरे काही आणलेले किंवा घातलेले, बदललेली गोष्ट : *~ of name/clothes, नावातील बदल, बदललेले कपडे.* ३ [*अगण*] (क) दिलेल्या पैशांपेक्षा घेतलेली वस्तू कमी किमतीची असताना परत दिलेले पैसे, उरलेले पैसे, बाकीचे पैसे. (ख) कमी किमतीची नाणी, सुटे पैसे, चिल्लर. ४ (*वाक्प्र*) **for a change** नेहमी घडणाऱ्या गोष्टींपेक्षा वेगळे काही असणे, विविधतेसाठी बदल म्हणून.

channel /'चॅन्ल्/ *ना* [*गण*] १ द्रवपदार्थ वाहतो तो मार्ग, सारणी, पाट, पन्हळ. २ पाण्याचा अरुंद पट्टा, खाडी : *the English C~, इंग्लिश खाडी.* ३ बातम्या, माहिती मिळण्याचा मार्ग : *Your complaint must be made through the proper ~s, तू रास्त मार्गाने तक्रार करायला हवीस.* ४ दूरदर्शनचे केन्द्र. **channel** *क्रि* (-ll-; *अमे* तसेच -l-) [*सक*] १ पाट काढणे. २ मार्गातून नेणे; दिशा दाखवणे, वळवणे : (*ला*) *~ all our resources into the new scheme, नवीन योजनेकडे आपली सर्व साधनसंपत्ती वळवणे.*

chant /चान्ट्/ *क्रि* [*अक, सक*] १ एकसुरात काही म्हणणे किंवा गाणे. २ एखादी गोष्ट पुन्हापुन्हा पण तालात म्हणणे किंवा गाणे, मंत्र म्हणणे. **chant** *ना* [*गण*] मंत्र; घोष.

chaos /'केइऑस्/ *ना* [*अगण*] संपूर्ण अव्यवस्था किंवा गोंधळ, अनागोंदी, बजबजपुरी. **chaotic** /केइ'ऑटिक्/ *वि* गोंधळाचा, अतिशय अव्यवस्थित.

chap^{1} /चॅप्/ *ना* [*गण*] (*अनौप* विशेषतः *ब्रि*) मुलगा किंवा पुरुष माणूस, गडी.

chap^{2} /चॅप्/ *क्रि* (-pp-) [*अक, सक*] (त्वचेबाबत) भेग पडणे/पाडणे, भेगाळणे, खरखरीत आणि सुजट होणे, फुटणे : *~ped lips, फुटलेले ओठ.*

chapel /'चॅप्ल्/ *ना* [*गण*] १ ख्रिस्ती पूजेसाठी वापरली जाणारी – उदा शाळा किंवा हॉस्पिटल येथील – जागा, प्रार्थना मंदीर. २ चर्चमधील वेदी असेलेली छोटीशी जागा – बहुधा खाजगी प्रार्थनेसाठी वापरली जाणारी.

chaplain /'चॅप्लिन्/ *ना* [*गण*] इस्पितळ, लष्कर, तुरुंग वगैरे ठिकाणचा ख्रिस्ती धर्माधिकारी.

chapter /'चॅप्ट(र्)/ *ना* [*गण*] १ (बहुधा अनुक्रम असलेला) पुस्तकाचा मुख्य भाग, अध्याय, प्रकरण, सर्ग. २ काळाचा भाग, पर्व.

char^{1} /चा(र्)/ *ना* (-rr-) [*अक, सक*] जळून काळे होणे किंवा करणे, कोळसा होणे किंवा करणे.

char^2 /चा(र्)/ **'charwoman** *ना* [*गण*] (*ब्रि*) घर किंवा कचेरीची साफसफाई करण्यासाठी ठेवलेली मोलकरीण, झाडणारी बाई, झाडूवाली.

character /'कॅरक्ट(र्)/ *ना* १ [*गण*] एखादा माणूस, देश वगैरेचे वेगळेपण दाखविणारे गुण, स्वभाव, स्वरूप, विशेष धर्म : *The ~ of the town has changed over the years, अनेक वर्षांच्या कालावधीत या नगराचे स्वरूप पालटले आहे.* २ [*अगण*] एखाद्या गोष्टीचे गुणधर्म किंवा तिचे विशेष स्वरूप : *discussions that were confidential in ~, गोपनीय स्वरूपाच्या चर्चा.* ३ [*अगण*] (**क**) व्यक्तिविशेष, स्वत्व : *house with no ~, स्वत्व नसलेले घर.* (**ख**) नैतिक कणखरपणा, मनोबल, करारीपणा : *a woman of ~, चारित्र्यवान करारी स्त्री.* ४ [*गण*] नाटक, कादंबरी वगैरेमधील पात्र, भूमिका. ५ [*गण*] (*अनौप*) विक्षिप्त माणूस, वल्ली. ६ [*गण*] लिहिण्यासाठी किंवा छपाईसाठी वापरायचे अक्षर किंवा चिन्ह : *Chinese ~s, चिनी अक्षरे.* ७ (*वाक्प्र*) **in/out of character** स्वभावानुरूप/स्वभावाला न शोभणारा, विशिष्ट माणसाला साजेसा/विसंगत. **characterless** *वि* रटाळ, रंगहीन; सामान्य.

characteristic /,कॅरक्ट'रिस्टिक्/ *वि* लक्षणीय, विशिष्ट. **characteristic** *ना* [*गण*] गुणविशेष, लक्षण, वैशिष्ट्य. **characteristically** /-क्लि/ *क्रिवि* वैशिष्ट्यानुसार.

characterize /'कॅरक्टराइझ्/ *क्रि* [*सक*] १ वर्णन करणे, स्वभावविशेष सांगणे. २ खास वैशिष्ट्य असणे, लक्षण असणे.

charade /श'राड्; *अमे* श'रेइड्/ *ना* १ **charades** (अे.व क्रियापदासह) एका संघाने केलेल्या हालचाली, अभिनय यावरून दुसऱ्या संघाने त्याचा शब्द ओळखायचा असा एक सांघिक खेळ, कृतीच्या अभिनयावरूनच शब्द ओळखायचा खेळ, शब्दसमस्या. २ [*गण*] (*ला*) वेडेपणाचे आणि उघडपणे दिसणारे सोंग, नाटक.

charcoal /'चाकउल्/ *ना* [*अगण*] रेखाटनासाठी, जळणासाठी वगैरे वापरायचा लाकडी कोळसा, लोणारी कोळसा.

charge^1 /चाज्/ *क्रि* १ [*अक, सक*] भाव लावणे, किंमत लावणे किंवा घेणे, आकारणे : *They ~d me Rs 50 for the repair, त्यांनी दुरुस्तीचे मला पन्नास रुपये लावले.* २ [*सक*] *to*// एखाद्याकडून येणे असल्याची नोंद करणे, खात्यावर लिहून ठेवणे, नावावर मांडणे : *C~ it to his account, हे त्याच्या खात्यावर/नावावर लिहून ठेव.* ३ [*सक*] (*with*)// एखाद्यावर एखाद्या गोष्टीचा आरोप करणे किंवा ठेवणे – विशेषतः कोर्टात : *He was ~d with murder, त्याच्यावर खुनाचा आरोप ठेवण्यात आला.* ४ [*अक, सक*] पुढे होऊन एखाद्यावर हल्ला करणे, चालून जाणे, तुटून पडणे. ५ [*सक*] विजेरी विद्युत्‌भारित करणे. ६ [*सक*] *with*// (विशेषतः कर्मणी प्रयोगात) भावावेगाने भरणे, भरून येणे, भारणे : *a voice ~d with tension, तणावाने किंवा चिंतेने भारलेला आवाज.* ७ [*सक*] *with*// (*औप*) (एखाद्यावर) कामगिरी सोपविणे किंवा जबाबदारी टाकणे.

charge^2 /चाज्/ *ना* १ [*गण*] माल किंवा सेवेसाठी आकारलेली किंमत, भाव, दर, दाम. २ [*गण*] एखाद्याने गुन्हा केला आहे असा केलेला दावा, आरोप : *a ~ of murder, खुनाचा आरोप.* ३ [*अगण*] जबाबदारी आणि नियंत्रण, जोखीम, कार्यभार : *take ~ of the department, विभागाचा कार्यभार स्वीकारणे.*

chargé d'affaires /,शाझेइ डॅ'फेअ(र्)/ *ना* [*गण*] (*ब.व* **chargés d'affaires**) उपराजदूत, कार्यदूत.

chariot /'चॅरिअट्/ *ना* [*गण*] छप्पर नसलेले घोड्याने ओढायचे असे पूर्वीच्या काळी लढाईत वापरण्यात येणारे वाहन, रथ. **charioteer** /,चॅरिअ'टिअ(र्)/ *ना* [*गण*] रथाचा चालक, सारथी.

charisma /क'रिझ्म/ *ना* [*अगण*] उत्साह आणि निष्ठा निर्माण करण्याची शक्ती, व्यक्तिमत्वाची मोहिनी, आकर्षकता. **charismatic** /,कॅरझ्'मॅटिक्/ *वि* उत्साह आणि स्फूर्ती देणारा : *a ~tic politician, (कार्यकर्त्यात) चैतन्य उत्पन्न करणारा राजकारणी/नेता.*

charitable /'चॅरटब्ल्/ *वि* १ दयाळू वृत्तीचा, कृपाळू. २ गरजूंना मदत करणाऱ्या संस्थेचा, धर्मादाय संस्थेशी संबंधित. **charitably** *क्रिवि* दयाळूपणे.

charity /'चॅरटि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*गण*] गरजूंना मदत करणारी संस्था, धर्मादाय संस्था. २ [*अगण*] दयाळूपणा, परोपकार. ३ [*अगण*] गरीब लोकांना दिलेले पैसे, अन्न वगैरे दान, दानधर्म.

charlatan /'शालटन्/ *ना* [*गण*] आपल्याला ज्ञान आहे किंवा विद्या अवगत आहे असे ढोंग करणारा माणूस, बुवा, ढोंगीबाबा, भोंदू माणूस.

charm /चाम्/ *ना* १ (क) [*अगण*] लोकांना आनंदित करण्याची शक्ती; मोहिनी, भुरळ. (ख) [*गण*] मोहक गुण, मोहकता. २ [*गण*] चांगल्या भाग्यासाठी अंगावर घालायची वस्तू, ताईत. ३ [*गण*] भुरळ, मोहिनी मंत्र, चेटुक. **charm** *क्रि* [*सक*] १ मोह घालणे, रंजन करणे, आकर्षून घेणे. २ जादू करणे. **charming** *वि* प्रसन्न, मोहक.

chart /चाट्/ *ना* १ [*गण*] माहिती देणारी रेखाकृती, आलेख, तक्ता वगैरे. २ [*गण*] समुद्राचा नकाशा, समुद्रपट. ३ **the charts** (*ब.व*) पॉप संगीताच्या सर्वाधिक खपाच्या ध्वनिमुद्रिकांची साप्ताहिक नोंद. **chart** *क्रि* [*सक*] तक्ता तयार करणे.

charter /'चाट(र्)/ *ना* [*गण*] १ काही अधिकार, खास हक्क, तत्त्वे वगैरे देणारे अधिकृत पत्रक, सनद, फर्मान. २ विमान किंवा जहाज भाड्याने घेणे, करारावर घेणे: *a '~ flight, करारनाम्याच्या विमानाचे उड्डाण, करारबद्ध विमान.* **charter** *क्रि* [*सक*] विमान, जहाज वगैरे काही विशिष्ट कारणासाठी भाड्याने घेणे, करारावर घेणे. **chartered** *वि* एखाद्या विशिष्ट व्यवसायाच्या निमयांनुसार पात्र असलेला, सनदी: *a ,~ed ac'countant, सनदी लेखापाल.*

charwoman ➪ CHAR^{2}.

chase /चेइस्/ *क्रि* [*अक, सक*] (*after*)// एखाद्याला पकडण्यासाठी किंवा पिटाळण्यासाठी त्याच्या मागे धावणे, पाठलाग करणे, मागे लागणे. **chase** *ना* [*गण*] पाठलाग.

chasm /'कॅझम्/ *ना* [*गण*] १ जमिनीतली खोल भेग, चीर, भगदाड; घळ. २ [*ला*] हितसंबंधातील वगैरे मोठी तफावत, दरी.

chassis /'शॅसि/ *ना* [*गण*] (*ब.व* **chassis** /'शॅसिझ्/) एखादे वाहन ज्यावर बांधले जाते तो सांगाडा, न्याधार, साटा.

chaste /चेइस्ट्/ *वि* १ शुद्ध, निर्मल; गुणी, पवित्र. २ गैर लैंगिक कृती न करणारा, अव्यभिचारी, निष्कलंक, सदाचरणी, सद्वर्तनी. ३ (रीती किंवा रुचीबाबत) साधी.

chasten /'चेइस्न्/ *क्रि* [*सक*] (*औप*) शिक्षा करून किंवा दुःख देऊन ताळ्यावर आणणे, प्रायश्चित्त देऊन शुद्ध करणे; खोड मोडून वठणीवर आणणे किंवा सुधारणे.

chastise /चॅ'स्टाइझ्/ *क्रि* [*सक*] (*औप*) कडक शिक्षा करणे, शासन करणे. **chastisement** *ना* [*अगण*] शिक्षा, शासन.

chastity /'चॅस्टटि/ *ना* [*अगण*] शुद्धता, निर्मळपणा; पावित्र्य, सद्गुण, सद्वर्तन; निष्कलंकितपणा, अव्यभिचार.

chat /चॅट्/ *ना* [*गण*] मैत्रीपूर्ण अनौपचारिक बोलणे, गप्पा, गप्पागोष्टी. **chat** *क्रि* (**-tt-**) १ [*अक*] गप्पा मारणे. २ (*क्रिब*) **chat sb up** (*ब्रि अनौप*) एखाद्याशी (विशेषतः मुलाने मुलीशी किंवा मुलीने मुलाशी) मैत्री करण्यासाठी किंवा काही हेतूने प्रेमाने गप्पा मारणे, गुजगोष्टी करणे. **chatty** *वि* (**-ier, -iest**) गप्पिष्ट, गोष्टीवेल्हाळ.

château /'शॅटउ; *अमे* शॅ'टउ/ *ना* [*गण*] (*ब.व* **~x** /-टउझ्/) फ्रान्समधील किल्ला किंवा ग्रामीण भागातील भलामोठा वाडा, गढी, महाल.

chatter /'चॅट(र्)/ *क्रि* [*अक*] १ भरभर आणि सतत फालतू गोष्टींविषयी बोलणे, वटवट करणे, बकबक करणे. २ (पक्षी किंवा माकडांबाबत) उच्चरवाने तेचतेच आवाज काढणे, चिवचिव करणे, चीची करणे. ३ (दातांबाबत) भीतीने किंवा थंडीने वाजणे, कडकडणे. **chatter** *ना* [*गण*] १ अखंडित भरभर बोलणे, बडबड, वटवट, बकबक. २ चिवचिवाट, कलकल; कडकड. **'chatterbox** *ना* [*गण*] वटवट करणारा माणूस, बडबड्या, बोलघेवडा.

chauffeur /'शऊफ(र्); *अमे* शउ'फऽर्/ *ना* [*गण*] खाजगी गाडी चालविण्यासाठी ठेवलेला भाडोत्री माणूस, भाडोत्री चालक. **chauffeur** *क्रि* [*सक*] एखाद्याला त्याचा भाडोत्री चालक म्हणून गाडीतून नेणे, भाडोत्री गाडी चालवणे.

chauvinism /'शउव्हिनिझम्/ *ना* [*अगण*]

स्वतःचा देश किंवा समलिंगी व्यक्तींच्या श्रेष्ठत्वाचा दुराभिमान, पुरुषी अहंकार, आंधळा प्रांताभिमान. **chauvinist** /-इस्ट्/ *ना* [*गण*] प्रांतीयवादी माणूस, संकुचित राष्ट्रवादी, पुरुषश्रेष्ठत्वाभिमानी, स्त्रीश्रेष्ठत्वाभिमानी. **chauvinistic** /शउव्हि'निस्टिक्/ *वि* वृथाभिमानी (देश, लिंग यांबाबत), दुराभिमानी.

cheap /चीप्/ *वि* १ कमी पैसे लागणारा, स्वस्त. २ भिकार दर्जाचा, कनिष्ठ प्रतीचा, निकृष्ट : *~ and nasty, निकृष्ट आणि घाणेरडा.* ३ हलका आणि अशोभनीय : *a ~ joke, असभ्य विनोद.* **cheapen** *क्रि* [*अक, सक*] स्वस्त करणे, किंमत कमी करणे, स्वतःची किंमत कमी करून घेणे; खालच्या पातळीला जाणे. **cheaply** *क्रिवि* स्वस्तात, बाजारूपणे. **cheapness** *ना* [*अगण*] स्वस्ताई, अल्पमोल; कनिष्ठ प्रत, निकृष्टपणा, असभ्यपणा.

cheat /चीट्/ *क्रि* १ [*अक*] अप्रामाणिकपणे वागणे, फसवणे : *~ in an examination, परीक्षेत लबाडी करणे.* २ [*क्रिब*] **cheat sb (out) of sth** एखाद्याला फसवून काही घेणे, ठकवून काही मिळवणे, एखादी गोष्ट बनवाबनवी करून घेणे. **cheat** *ना* [*गण*] दुसऱ्यांना फसवणारा, अप्रामाणिक मनुष्य.

check^1 /चेक्/ *क्रि* १ (क) [*अक, सक*] परीक्षा करून किंवा शोध घेऊन एखाद्या गोष्टीची खात्री करून घेणे, तपासणी करणे, तपासणे. (ख) [*सक*] एखादी गोष्ट खरी, बिनधोक, समाधानकारक वगैरे आहे की नाही याची खातरजमा करण्यासाठी तिची परीक्षा करणे, तपासणे, अंदाज घेणे. २ [*सक*] थांबवणे, आवर घालणे, अटकाव करणे, रोखणे, खीळ घालणे : *~ the enemy's progress, शत्रूची आगेकूच रोखणे.* ३ (*क्रिब*) **check in** विमानतळ, हॉटेल वगैरे ठिकाणी आपण आल्याची नोंद करणे. **checkout** बिलाचे पैसे देऊन हॉटेल सोडणे. **check up on (sth)** (किंवा खास करून *अमे*) **check sth out** एखादी गोष्ट खरी, निर्धोक, बरोबर वगैरे आहे की नाही हे शोधून काढण्यासाठी तिची तपासणी करणे, कसून तपास करणे किंवा झडती घेणे. **'check-in** *ना* [*गण*] विमानतळ वगैरे ठिकाणी असलेली आपण आल्याची नोंद करण्याची जागा. **'check-out** *ना* [*गण*] सुपर-मार्केटमधे गिऱ्हाईक जेथे घेतलेल्या मालाचे पैसे देते ते ठिकाण. **'checkpoint** *ना* [*गण*] सरहद्दीवरील वगैरे प्रवासी आणि वाहने तपासायचे केन्द्र, तपासणी नाका. **'check-up** *ना* [*गण*] वैद्यकीय तपासणी.

check^2 /चेक्/ *ना* १ [*गण*] एखादी गोष्ट खरी, बिनधोक, समाधानकारक वगैरे आहे की नाही याची खात्री करून घ्यायला करण्यात येणारा तपास, तपासणी. २ [*अगण*] आवर, ताबा : *hold/keep one's emotions in ~, स्वतःच्या भावनांवर ताबा ठेवणे.* ३ [*अे.व*] (बुद्धिबळात) प्रतिस्पर्ध्याच्या राजावर हल्ला करण्याची स्थिती, प्रतिस्पर्ध्याच्या राजाला दिलेला शह. ४ [*गण*] (*अमे*) उपहारगृहातील देयक (बिल). ५ [*गण*] (*अमे*) = CHEQUE.

check^3 /चेक्/ *ना* [*अगण, गण*] एकमेकांना छेदणाऱ्या रेषांनी केलेल्या चौकटींचा आकृतिबंध; चौकोनांचा पट.

checkered (*अमे*) = CHEQUERED.

checkmate /'चेक्मेइट्/ *ना* [*अगण*] १ (बुद्धिबळात) एखाद्या खेळाडूला स्वतःचा राजा न वाचवता येण्यासारखी म्हणजेच प्रतिस्पर्ध्याने डाव जिंकल्याची स्थिती, मात. २ (*ला*) संपूर्ण पराभव, पराजय.

cheek /चीक्/ *ना* १ [*गण*] डोळ्याखालचा चेहऱ्याचा भाग, गाल, कपोल, गालफड. २ [*अगण*] उद्धट आणि अनादरपूर्वक वर्तन किंवा भाषण, उद्दामपणा, अनादर. **cheek** *क्रि* [*सक*] उद्धटपणे बोलणे, उलटून बोलणे. **cheeky** *वि* (-ier, -iest) उद्धट, उद्दाम. **cheekily** *क्रिवि* उद्धटपणे, उद्दामपणे.

cheer^1 /चिअ(र्)/ *क्रि* १ [*अक, सक*] स्तुती, प्रशंसा, पाठिंबा व्यक्त करण्यासाठी ओरडणे, प्रोत्साहन देणे, जयजयकार करणे. २ [*सक*] एखाद्याला सुख, आनंद किंवा प्रोत्साहन देणे, प्रफुल्ल करणे : *~ing news, आनंददायी वार्ता किंवा प्रफुल्लित करणारे वृत्त.* ३ (*क्रिब*) **cheer (sb) up** एखाद्याला खुलवणे किंवा उत्साही बनवणे, उमेद देणे.

cheer^2 /चिअ(र्)/ *ना* १ [*गण*] वाहवा, प्रशंसा, जयजयकार. २ [*अगण*] (*पुरा*) आनंद, संतोष. ३ **cheers** [*ब.व*] (मद्य घेण्यापूर्वी

लोक म्हणतात ते) तुझी प्रकृती चांगली राहो! **cheerful** /'चिअफ्ल्/ *वि* आनंदी. **cheerfully** *क्रिवि* आनंदाने, उत्साहाने. **cheerless** *वि* दुःखी, कष्टी; उदास, खट्टू, निरुत्साही.

cheerio /,चिअरि'अउ/ *उद्‌वा* (*ब्रि अनौप*) (निरोप घेताना म्हटले जाणारे) अच्छा! येतो!

cheery /'चिअरि/ *वि* **(-ier, -iest)** जिवंत आणि आनंदी, उत्साहाने रसरसलेला, उल्हासित. **cheerily** *क्रिवि* आनंदाने, उत्साहाने, उल्हासाने.

cheese /चीझ्/ *ना* [*अगण, गण*] दुधापासून बनवलेला एक घट्ट खाद्य पदार्थ, पनीर. **'cheesecake** *ना* [*गण, अगण*] बिस्किटांच्या चुऱ्यावर पनीर पसरून भाजलेला एक पदार्थ. **'cheesecloth** *ना* [*अगण*] सैल विणीच्या धाग्यांचे सुती कापड. **,cheesed 'off** *वि* (*ब्रि अनौप*) त्रस्त, वैतागलेला, कंटाळलेला किंवा निराश, नाउमेद.

cheetah /'चीता/ *ना* [*गण*] मांजर कुळातील जोराने पळू शकणारे अंगावर ठिपके असणारे आफ्रिकेतील एक जंगली जनावर, चित्ता.

chef /शेफ्/ *ना* [*गण*] हॉटेल, उपहारगृह वगैरे ठिकाणचा प्रमुख आचारी.

chemical /'केमिक्ल्/ *वि* रासायनिक. **chemical** *ना* [*गण*] रासायनिक पदार्थ, रसायन (द्रव्य). **chemically** /-क्लि/ *क्रिवि* रसायनाद्वारे.

chemist /'केमिस्ट्/ *ना* [*गण*] १ औषधे तयार करून विकणारा तसेच सौंदर्यप्रसाधने आणि स्वच्छतागृहातील उपयोगाच्या (साबण वगैरे) वस्तू विकणारा माणूस, रसायनी, भेषजी, औषधविक्रेता. २ रसायनशास्त्रज्ञ किंवा रसायनशास्त्राचा अभ्यासक.

chemistry /'केमिस्ट्रि/ *ना* [*अगण*] घटकद्रव्यांची रचना आणि त्यांच्या संयुगांचा अभ्यास करणारे शास्त्र, रसायन(शास्त्र).

cheque /चेक्/ *ना* [*गण*] पैसे देण्याचा बँकेला आदेश देणारा कागदावरचा लेख, दर्शनी हुंडी, धनादेश. **'cheque-book** *ना* [*गण*] छापील धनादेशांचे पुस्तक. **'cheque card** *ना* [*गण*] बँकेने खातेदाराला दिलेले आणि त्याचे काही ठराविक रकमेपर्यंतचे धनादेश वठवले जातील अशी हमी देणारे पत्रक.

chequered /'चेकड्/ *वि* बरे-वाईट भाग असणारा, भाग्यात चढ-उतार असलेला : *a ~ history, चढउताराचा पूर्वेतिहास.*

cherish /'चेरिश्/ *क्रि* [*सक*] (*औप*) १ प्रेमाने बाळगणे, उराशी बाळगणे; काळजी करणे, निगराणी करणे. २ मनात बाळगणे, मनात (आशा वगैरे) ठेवणे : *~ed memories, मनात साठवलेल्या स्मृती.*

cherry /'चेरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) मोठी बी असलेले लाल किंवा काळ्या रंगाचे एक गोल, छोटे फळ.

cherub /'चेरब्/ *ना* [*गण*] १ (*ब.व* **~im** /-इम्/) एक प्रकारचा देवदूत. २ (*ब.व* **~s**) देखणं मूल, रूपवान मूल.

chess /चेस्/ *ना* [*अगण*] दोघांनी खेळायचा एक पट, बुद्धिबळ.

chest /चेस्ट्/ *ना* १ [*गण*] शरीराचा पुढचा आणि वरचा भाग, छाती, वक्ष. २ [*गण*] मोठी दणकट पेटी, पेटारा, संदूक. ३ (*वाक्प्र*) **,get sth off one's 'chest** (*अनौप*) खूप दिवस मनाशी ठरवलेली गोष्ट बोलणे, बोलून मन हलके करणे, एकदाचे बोलून मोकळे होणे. **,chest of 'drawers** *ना* [*गण*] काढता घालता येणारे ओढायचे कप्पे असलेले कपाट.

chestnut /'चेस्नैट्/ *ना* [*गण*] तांबूस तपकिरी रंगाचे कठीण कवचाचे गुळगुळीत फळ (किंवा त्याचे झाड). **chestnut** *वि* तांबूस तपकिरी, तांबूस पिंगट.

chew /चू/ *क्रि* १ [*अक, सक*] दाताने (अन्नाचे) पीठ करणे, चावणे, चघळणे, चर्वण करणे. २ (*क्रिब*) **chew sth over** (*अनौप*) एखाद्या गोष्टीचा सावकाश पण बारकाईने विचार करणे. **chew** *ना* [*गण*] चघळणे, चर्वण. **'chewing-gum** *ना* [*गण*] खूप वेळ चघळत बसण्याचा पण न गिळण्याचा गोड चिकट पदार्थ. **chewy** *वि* **(-ier, -iest)** चावून चावून खाण्याचा; चावण्यासारखा.

chic /शीक्/ *वि* फॅशनेबल, नखरेबाज; नवीन धर्तीचा, दिमाखदार.

chick /चिक्/ *ना* [*गण*] पक्ष्याचे – विशेषतः कोंबडीचे – पिलू.

chicken /'चिकिन्/ *ना* (क) पक्ष्याचे – विशेषतः कोंबडीचे – पिलू. (ख) [*अगण*]

कोंबडीचे मांस. **chicken** *वि* (*व्रात्य*) भित्रा, भेदरट. **chicken** *क्रि* (*क्रिब*) **chicken out (of sth)** (*अनौप*) भीतीमुळे एखादी गोष्ट न करण्याचे ठरविणे, पळ काढणे, शेपूट घालणे. **'chickenpox** /-पॉक्स्/ *ना* [*अगण*] अंगावर तांबूस पुरळ येणारा विशेषतः लहान मुलांना होणारा रोग, कांजिण्या.

chicory /'चिकरि/ *ना* [*अगण*] (क) सॅलडमधे जिची हिरवी पाने कच्ची खातात अशी एक वनस्पती. (ख) या वनस्पतीचे भाजून आणि भुकटी करून कॉफीबरोबर वापरायचे मूळ.

chief /चीफ्/ *ना* [*गण*] नेता किंवा शास्ता; सर्वश्रेष्ठ अधिकारी. **chief** *वि* १ सर्वात जास्त महत्त्वाचा; मुख्य, प्रमुख. २ सर्वोच्च श्रेणीतला, प्रमुख, सर. **Chief 'Constable** *ना* [*गण*] (*ब्रि*) विशिष्ट विभागातील पोलीसांचा प्रमुख. **chiefly** *क्रिवि* प्रामुख्याने, मुख्यतः. **-in-'chief** (सामासिक शब्दांत) श्रेष्ठतम, सर्वोच्च : *the Commander-in-~, सरसेनापती, मुख्य सेनापती.*

chieftain /'चीफ्टन्/ *ना* [*गण*] टोळी-प्रमुख, जमातीचा प्रमुख, कबिल्याचा सरदार.

child /चाइल्ड्/ *ना* [*गण*] (*ब.व* **children** /'चिल्ड्रन्/) १ बालक, बाळ, मूल, मुलगा, पोर, लेकरू. २ मुलगा किंवा मुलगी, पुत्र किंवा कन्या. **'childbirth** *ना* [*अगण*] मुलाला जन्म देणे, बाळंतपण. **childhood** *ना* [*अगण*] बाल्यावस्था, बालपण, शैशव. **childish** *वि* (मोठ्या माणसाबाबत) लहान मुलासारखे वागणारा, पोरकट. **childless** *वि* मूल नसणारा, निपुत्रिक, अपत्यहीन. **'child-like** *वि* साधा, सरळ; निष्पाप, भोळा. **'child-minder** *ना* [*गण*] मुले सांभाळणारी व्यक्ती, विशेषतः आई-वडील कामावर जाणाऱ्या मुलांना सांभाळणारी व्यक्ती.

chill /चिल/ *क्रि* १ [*अक, सक*] थंड होणे किंवा करणे. २ [*सक*] एखाद्याला भयभीत करणे, घाबरवणे, थिजवणे. **chill** *ना* १ [*अे.व*] बोचरी थंडी, झोंबणारा गारवा. २ [*गण*] गारव्याने आणि ओलीने आलेला आजार, सर्दी, हीव. **chilly** *वि* (-ier, -iest) १ थंड, गार. २ (*ला*) रुक्ष, थंड, परकेपणाचा.

chilli (*अमे* **chili**) /'चिलि/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* ~**es**) हिरवी किंवा तांबडी तिखट मिरची. **,chilli con 'carne** *ना* [*गण, अगण*] मांस, टॉमेटो, पावटे वगैरे वाफेवर शिजवून तयार केलेला आणि स्वादासाठी मिरच्या घातलेला पदार्थ.

chime /चाइम्/ *ना* [*गण*] १ सुरावटीत वाजणाऱ्या घंटांचा संच (किंवा त्यांचा नाद). **chime** *क्रि* [*अक, सक*] (घंटांबाबत) नाद करणे, वाजणे, समनाद करणे.

chimney /'चिम्नि/ *ना* [*गण*] चुलीचा धूर जाण्याचा मार्ग, धुराडें. **'chimney-pot** *ना* [*गण*] धुराड्याच्या तोंडाला जोडलेला छोटा नळा. **'chimney-stack** *ना* [*गण*] छपरातून बाहेर आलेल्या धुराड्यांच्या नळकांड्यांचा समूह. **'chimney-sweep** *ना* [*गण*] धुराड्यातील काजळी काढून ते साफ करणारा माणूस.

chimp /चिम्प्/ *ना* [*गण*] (*अनौप*) चिम्पान्झी.

chimpanzee /,चिम्पन्'झी, -पॅन्-/ *ना* [*गण*] आफ्रिकेतील एक बिनशेपटीचे वानर.

chin /चिन्/ *ना* [*गण*] मुखाखालचा चेहऱ्याचा भाग, हनुवटी.

china /'चाइन/ *ना* [*अगण*] (क) मऊ, पक्की भाजलेली आणि चकाकी दिलेली पांढरी माती, चिनी माती. (ख) या मातीपासून केलेल्या कप, बशा वगैरे वस्तू, चिनी मातीची भांडी, खेळणी वगैरे.

chink^{1} /चिङ्क्/ *ना* [*गण*] छोटासा गेलेला तडा, चीर.

chink^{2} /चिङ्क्/ *क्रि* [*अक*], *ना* [*गण*] कपबशा, नाणी वगैरेचा एकमेकांवर वाजून आवाज होणे, खणखण आवाज होणे.

chip /चिप्/ *ना* [*गण*] १ [बहुधा *ब.व*] चरबीत तळलेली बटाट्याची पातळ चकती : *fish and '~s, मासे आणि बटाट्याच्या चकत्या.* २ (क) एखाद्या गोष्टीचा फुटल्यामुळे उडालेला पातळसा तुकडा, टवका, ठिकरी, कपची. (ख) टवका उडालेली जागा. ३ जुगारात पैसे निर्देशित करण्यासाठी वापरला जाणारा प्लॅस्टिकचा तुकडा. ४ MICROCHIP चा संक्षेप. ५ (*वाक्प्र*) **have a 'chip on one's shoulder** (*अनौप*) आपल्याला वाईट

वागणूक मिळाली असे वाटून चिडणे, संतापणे, भडकणे. **chip** *क्रि* (**-pp-**) १ [*अक, सक*] कडेचा तुकडा उडणे किंवा उडवणे, टवका जाणे. २ (*क्रिब*) **chip 'in (with sth)** (*अनौप*) (**क**) संभाषण चालू असताना मधेच बोलणे, संभाषणामधे भाग घेणे किंवा प्रवेश करणे : *She ~ped in with a couple of useful comments, तिने संभाषण चालू असताना मधे येऊन दोन उपयुक्त सूचना केल्या.* (**ख**) (पैसे) देणे.

chiropodist /कि'रॉपडिस्ट्/ *ना* [*गण*] पायांच्या किरकोळ दुखण्यांवर उपचार करणारा माणूस. **chiropody** /-डि/ *ना* [*अगण*] पादोपचार.

chirp /चऽप्/ *क्रि* [*अक*], *ना* [*गण*] चिवचिवणे, पक्ष्यांची किलबिल. **chirpy** *वि* (-**ier, -iest** (*ब्रि*)) (*अनौप*) उत्साही आणि आनंदी.

chisel /'चिझ़्ल्/ *ना* [*गण*] दगड किंवा लाकूड कापायचे एक टोकदार हत्यार, छिन्नी. **chisel** *क्रि* (**-ll-;** *अमे* तसेच **-l-**) [*सक*] छिन्नीने कापणे किंवा घडवणे.

chit /चिट्/ *ना* [*गण*] पेय वगैरेसारख्या गोष्टी घेतल्यावर त्याची किंमत दाखविणारा कागद, बिल.

chivalry /'शिव्हल्रि/ *ना* [*अगण*] १ मध्ययुगीन सरदारांचे रीतिरिवाज आणि आचारधर्म. २ चांगल्या पद्धती किंवा रीती – उदाहरणार्थ, मानाने वागवणे, अदबीने बोलणे वगैरे, दिलदारपणा, स्त्रीदाक्षिण्य. **chivalrous** /'शिव्हल्रस्/ *वि* दिलदार, सभ्य वर्तनाचा, स्त्रीदाक्षिण्य असणारा.

chlorine /'क्लॉऽरीन्/ *ना* [*अगण*] उग्र वासाचे एक रासायनिक जंतुनाशक द्रव्य, आवर्ती कोष्टकाच्या सातव्या गणातील वायुरूपी मूलद्रव्य.

chloro-flurocarbon /क्लॉऽर-ˌफ्लुअरउ'काबन्/ *ना* [*गण*] = CFC.

chlorophyll /'क्लॉरफिल्; *अमे* 'क्लॉऽर्-/ *ना* [*अगण*] सूर्यप्रकाशातील ऊर्जा शोषून घेऊन वाढीस मदत करणारे वनस्पतींतील एक हिरवे द्रव्य, हरितद्रव्य, पिंजक.

chocolate /'चॉक्लद्/ *ना* (**क**) [*अगण*] कोकोपासून तयार केलेला तपकिरी रंगाचा मिठाईसारखा गोड पदार्थ, चॉकलेट. (**ख**) [*गण*] चॉकलेटचा थर असलेला गोड पदार्थ. (**ग**) [*अगण*] चॉकलेटचे गरम पेय. **chocolate** *वि* गडद तपकिरी.

choice /चॉइस्/ *ना* १ [*गण*] निवड करण्याची क्रिया, निवड, पसंती. २ [*अगण*] निवडीचा हक्क किंवा निवडीची शक्यता : *I had no ~ but to leave, निघून जाण्याखेरीज मला (निवडीचा) दुसरा पर्याय नव्हता.* ३ [*गण*] निवड करण्यास उपलब्ध अशी विविधता, निवड करण्याकरता अनेक वस्तू : *a large ~ of restaurants, निवड करायला अनेक उपहारगृहे.* ४ [*गण*] निवडलेली वस्तू किंवा व्यक्ती : *I don't like his ~ of friends, मला त्याने निवडलेले मित्र आवडत नाहीत* किंवा *त्याची मित्रांची निवड मला पसंत नाही.* **choice** *वि* असाधारणपणे चांगला, निवडक, खास : *~ fruit, निवडक फळे.*

choir /'क्वाइअ(र्)/ *ना* [*गण*] (**क**) गाणाऱ्यांचा समूह, गायकवृंद, गानवृंद. (**ख**) गायकवृंद जेथे बसतो ती चर्चमधील जागा.

choke /चउक्/ *क्रि* १ [*अक, सक*] श्वासनलिकेत अडथळा आल्याने श्वास घेणे अवघड होणे किंवा करणे, गुदमरणे, दम कोंडणे. २ [*सक*] (मार्ग) बंद करणे किंवा गाळाने भरणे, तुंबणे : *the drains are ~d with dead leaves, गटार पालापाचोळ्याने तुंबले आहे.* ३ (*क्रिब*) **choke sth back** (तीव्र भावना) दाबून ठेवणे, कोंडून ठेवणे, आतल्या आत दाबणे. **choke** *ना* [*गण*] पेट्रोल इंजिनात हवेचा प्रवाह सोडण्याकरता असलेली झडप, पेट्रोल इंजिनात हवेचा प्रवाह सुरू करण्याची मूठ.

cholera /'कॉलर/ *ना* [*अगण*] उष्ण हवामानाच्या देशांतील एक संसर्गजन्य आणि प्राणघातक रोग, पटकी, महामारी.

cholesterol /क'लेस्टरॉल्/ *ना* [*अगण*] प्राण्यांच्या शरीरातील द्रवपदार्थ (द्रायु) आणि पेशीबंध (ऊती) यात आढळणारा चरबीयुक्त (मेद) पदार्थ.

choose /चूझ़्/ *क्रि* (*भूत* **chose** /चउझ़्/, *भूत वि* **chosen** /'चउझ़्न्/) १ [*अक, सक*]

अनेक उपलब्ध पर्यायांतून एखादा विशिष्ट पर्याय घेण्याचे ठरविणे, निवड करणे: *You can't have all of the sweets, you must ~ one, तुला सर्व खाऊ मिळणार नाही, तू एक काहीतरी निवड.* २ [सक] ठरविणे, निर्णय घेणे, निर्णय करणे: *She chose to become a doctor, तिने डॉक्टर होण्याचे ठरवले.*

chop /चॉप्/ *क्रि* (-pp-) [सक] कुऱ्हाड, चाकू वगैरे वापरून तुकडे करणे, खांडणे. **chop** *ना* [*गण*] १ तुकडा पाडणारा घाव, फटका. २ डुक्कर किंवा मेंढीच्या मांसाचा हाडुक असलेला तुकडा.

chopper /'चॉप(र्)/ *ना* [*गण*] १ खांडोळ्या करण्याचे हत्यार, काप करायचे हत्यार. २ (*अनौप*) हेलिकॉप्टर.

choppy /'चॉपि/ *वि* (-ier, -iest) (समुद्राबाबत) लगेच फुटणाऱ्या लहान लहान लाटांनी उसळणारा.

chopsticks /'चॉप्स्टिक्स्/ *ना* [*ब.व*] चीन, जपान वगैरे देशात जेवण करताना अन्न उचलून तोंडापर्यंत नेण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या काड्या, जेवायच्या लाकडी काड्या.

choral /'कॉऽरल्/ *वि* वृंदगायनाचा, गायकगणविषयक.

chord /कॉऽड्/ *ना* [*गण*] १ संगीताचे एकाचवेळी छेडलेले सूर, स्वरवेणी, स्वरझंकार; सूरत्रयी. २ (*गणित*) वर्तुळाच्या परिघावरील दोन बिंदू जोडणारी रेषा, जीवा, ज्या.

chore /चॉऽ(र्)/ *ना* [*गण*] नित्याचे किंवा कंटाळवाणे काम, नित्यकर्म, रोजचे कामधाम.

choreography /,कॉरि'ऑग्रफि; *अमे* ,कॉऽरि-/ *ना* [*अगण*] रंगमंचावर करायच्या नृत्याची मांडणी आणि रचना करण्याची कला, नृत्यांकनकला, नृत्यदिग्दर्शन. **choreographer** /-फ(र्)/ *ना* [*गण*] नृत्यदिग्दर्शक.

chorister /'कॉरिस्ट(र्)/ *ना* [*गण*] वृंदगायनात किंवा समूहगायनात गाणारा गायक.

chorus /'कॉऽरस्/ *ना* [*गण*] १ समूहगायक (किंवा त्याच्यासाठीचे संगीत – समूहगायन). २ प्रत्येक कडव्यानंतर म्हणायच्या गीतातील ओळी, ध्रुवपद. ३ सर्व लोकांनी एकत्रपणे म्हटलेले काही, जमावाचा घोषा: *a ~ of approval, संमतीचे अनेकमुखी शब्द.* **chorus** *क्रि* [*सक*] समूहाने गाणे किंवा सर्वांनी एकत्रितपणे म्हणणे.

chose CHOOSE चा *भूतकाळ.*

chosen CHOOSE चे *भूत वि.*

Christ /क्राइस्ट्/ (तसेच **,Jesus 'Christ** /'जीझस्/) *ना* [*अे.व*] ख्रिस्ती धर्मसंस्थापक, येशू ख्रिस्त.

christen /'क्रिस्न्/ *क्रि* [*सक*] १ बाप्तिस्मा करून (विशेषतः लहान मुलाचा) ख्रिश्चन चर्चमधे घेणे, ख्रिस्तीधर्मात स्वीकारणे; बाप्तिस्माचे वेळी एखाद्याचे नाव ठेवणे. २ (*ला*) एखादी गोष्ट प्रथमच वापरणे, उद्घाटन करणे. **christening** *ना* [*गण*] बाप्तिस्मा, ख्रिस्ती धर्मात घेण्याचा विधी; ख्रिस्ती नामकरण; उद्घाटन किंवा सुरुवात.

Christendom /'क्रिस्न्डम्/ *ना* [*अे.व*] (*औप*) जगातील सर्व ख्रिस्ती लोक.

Christian /'क्रिस्चन्/ *ना* [*गण*] ख्रिस्ती धर्मावर श्रद्धा ठेवणारा माणूस, ख्रिस्ती माणूस. **Christian** *वि* १ ख्रिस्ती धर्माचा, ख्रिस्ती. २ ख्रिस्ती माणसाचे गुण असणारा; दयाळू. **Christianity** /,क्रिस्टि'ॲनटि/ *ना* [*अगण*] ख्रिस्त हा देवाचा पुत्र ही श्रद्धा बाळगणारा आणि त्याच्या शिकवणुकीवर आधारलेला धर्म. **'Christian name** *ना* [*गण*] ठेवलेले नाव, व्यक्तीचे नाव.

Christmas /'क्रिस्मस्/ (तसेच **,Christmas 'Day**) *ना* [*अगण, गण*] ख्रिस्ताच्या जन्म दिवसाचा वार्षिक उत्सव; २५ डिसेंबर, नाताळ.

chrome /क्रउम्/ *ना* [*अगण*] क्रोमियम – विशेषतः इतर धातूंवर संरक्षणासाठी मुलामा द्यावयाचे.

chromium /'क्रउमिअम्/ *ना* [*अगण*] इतर धातूंवर चमकणारा संरक्षक मुलामा देण्यासाठी वापरले जाणारे धातुरूप मूलद्रव्य.

chromosome /'क्रउमसउम्/ *ना* [*गण*] प्राण्यांच्या आणि वनस्पतींच्या पेशीतील जीनवाहक सूत्र, गुणसूत्र.

chronic /'क्रॉनिक्/ *वि* १ (आजाराबाबत) दीर्घकाळ टिकणारा. २ (*ब्रि अनौप*) फार वाईट, भीषण, कमालीचा गंभीर. **chronically**

/-क्लि/ *क्रिवि* कमालीचा, फारच वाईट.

chronicle /'क्रॉनिक्ल्/ *ना* [*गण*] ऐतिहासिक घटनांची नोंद, कालक्रमवृत्तांत, बखर. **chronicle** *क्रि* [*सक*] बखरीत नोंद करणे.

chronology /क्र'नॉलजि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] कालनिश्चिती करण्याचे शास्त्र, कालगणनाविद्या. २ [*गण*] घटनांचा कालक्रम. **chronological** /,क्रॉन'लॉजिक्ल्/ *वि* कालानुक्रमी, कालक्रमानुसारी. **chronologically** /-क्लि/ *क्रिवि* कालक्रमानुसारे.

chronometer /क्र'नॉमिट(र्)/ *ना* [*गण*] बिनचूक घड्याळ, सूक्ष्म कालमापकयंत्र, कालमापक.

chrysalis /'क्रिसलिस्/ *ना* [*गण*] फुलपाखरू किंवा पतंग होण्यापूर्वीची कवचासारखी अशी कीटकाची अवस्था, कोष, आवृत कोशित.

chrysanthemum /क्रि'सॅन्थमम्/ *ना* [*गण*] उठावदार रंगाची फुले येणारे एक शोभेचे फुलझाड.

chubby /'चैबि/ *वि* (**-ier, -iest**) जरासा जाडसर, गुबगुबीत, गबदुल, गोबरा.

chuck¹ /चैक्/ *क्रि* [*सक*] (*अनौप*) १ फेकणे, टाकणे. २ सोडून देणे, टाकणे; त्याग करणे : *She's just ~ed her boy-friend, तिने तिच्या मित्राला सोडून दिलंय् म्हणजेच त्याच्याशी संबंध तोडले आहेत.*

chuck² /चैक्/ *ना* [*गण*] १ ज्याच्यावर काम करायचे ती वस्तू पकडणारा लेथचा किंवा खरातीचा भाग, पकडणारा चांद, कातयंत्रातील थाळी. २ गिरमिटातील भोके पाडण्याचा खिळा धरणारा भाग, कांबेची पकड.

chuckle /'चैक्ल्/ *क्रि* [*अक*] गालातल्या गालात हसणे. **chuckle** *ना* [*गण*] मंद स्मित, गालात हसणे.

chum /चैम्/ *ना* [*गण*] (*जुना किंवा अप्रचलित, अनौप*) मित्र, यार, दोस्त. **chummy** *वि* (**-ier, -iest**) मित्रत्वाचा.

chump /चैम्प्/ *ना* [*गण*] १ (*अनौप*) मूर्ख माणूस, मठ्ठ, टोणगा. २ मांसाचा जाड तुकडा.

chunk /चैङ्क्/ *ना* [*गण*] १ मोठा जाड तुकडा, खंड. २ (*अनौप*) मोठी रक्कम, घबाड.

chunky *वि* (**-ier, -iest**) बुटका आणि जाड, गिड्डा.

church /चऽच्/ *ना* १ [*गण*] ख्रिस्ती लोकांच्या सार्वजनिक उपासनेची इमारत, सार्वजनिक ख्रिस्ती देवालय. २ **Church** [*गण*] ख्रिस्ती लोकांचा विशिष्ट पंथ : *the Anglican ~, अँग्लिकन चर्च.* ३ **the Church** [*अे.व*] ख्रिस्ती पुरोहिताचा व्यवसाय : *go into/enter the C~, ख्रिस्ती पुरोहितवृत्ती स्वीकारणे.* **'churchyard** *ना* [*गण*] चर्चभोवतालची दफनभूमी.

churn /चऽन्/ *ना* [*गण*] १ साय घुसळून लोणी काढायचे भांडे. २ दूध न्यायचे मोठे धातूचे भांडे. **churn** *क्रि* १ [*सक*] (दूध किंवा साय) लोणी काढण्यासाठी घुसळणे. २ [*अक, सक*] जोराने हालचाल करणे, घुसळणे. ३ (*क्रिब*) **churn sth out** (*अनौप*) मोठ्या प्रमाणात निर्माण करणे, पैदास करणे.

chute /शूट्/ *ना* [*गण*] ज्याच्यावरून घसरत वस्तू खाली येतात तो उतरता मार्ग, घसरण.

chutney /'चैट्नि/ *ना* [*अगण*] फळे, मसाला वगैरे यांचे तिखट मिश्रण, चटणी.

cider /'साइड(र्)/ *ना* [*अगण*] सफरचंदाची दारू.

cigar /सि'गा(र्)/ *ना* [*गण*] तंबाखूची पाने भरलेली व धुम्रपानासाठी केलेली घट्ट सुरळी, (मोठ्या आकाराची) विडी.

cigarette /,सिग'रेट्; *अमे* 'सिगरट्/ *ना* [*गण*] पातळ कागदात तंबाखूचा मऊ चुरा भरून धुम्रपानासाठी केलेली सुरळी, विडी.

cinder /'सिन्ड(र्)/ *ना* [*गण, बहुधा ब.व*] अर्धवट जळालेल्या कोळशाचा वगैरे लहान तुकडा, निखारा, फुपाटा.

cinema /'सिनम, 'सिनमा/ *ना* १ [*गण*] चित्रपट दाखवायची जागा, चित्रपटगृह. २ [*अे.व*] चित्रपटकला किंवा चित्रपट व्यवसाय.

cinnamon /'सिनमन्/ *ना* [*अगण*] स्वयंपाकात वापरायचा पिवळसर-तपकिरी रंगाचा एक मसाल्याचा पदार्थ, दालचिनी.

cipher (तसेच **cypher**) /'साइफ(र्)/ *ना* १ [*गण, अगण*] नेहमीच्या अक्षरासाठी वेगळी चिन्हे किंवा भिन्न अक्षरे वापरून लिहिण्याची गुप्त पद्धती, गुप्तलिपी, सांकेतिकलिपी. २

[*गण*] (*ला अधिक्षेपी*) काहीही महत्त्व नसलेली व्यक्ती किंवा वस्तू, कवडीमोलाचा किंवा दीड दमडीचा माणूस, क्षुल्लक बाब.

circa /'सऽक/ *शब्दयो* (दिनांक किंवा वर्ष दाखवताना वापर) सुमारास: *born ~ 150 BC, इ. स. पू. १५० च्या सुमारास जन्म.*

circle /'सऽक्ल्/ *ना* [*गण*] १ मध्यबिंदूपासून समान अंतर ठेवून जाणारी वक्र रेषा (किंवा तिने आखलेले क्षेत्र), वर्तुळ, वृत्त. २ चक्र, कडे, रिंगण. ३ लोकांचा गट, मंडळ: *our ~ of friends, आपले मित्रमंडळ.* ४ रंगमंदिर, चित्रपटगृह वगैरेतील माडीवरील किंवा वरच्या मजल्यावरील जागा. **circle** *क्रि* [*अक, सक*] वर्तुळाकार फिरणे, भोवती गोल करून फिरणे, रिंगण धरणे.

circuit /'सऽकिट्/ *ना* [*गण*] १ एखाद्या स्थळाभोवतालचा प्रवास किंवा रेषा, वाटोळ्या मार्गाने जाणे, फेरा, गिरकांडी, परिक्रम: *a racing ~, रेसचा वर्तुळाकार पट्टा किंवा मार्ग, रेसचा परिक्रम.* २ विद्युत्प्रवाह फिरण्याचा पूर्ण मार्ग, विद्युत्सरणी, विद्युत्परिपथ. ३ घटनांची किंवा स्थळांची मालिका: *a lecture ~, व्याख्यानांची मालिका.* **circuitous** /स'क्यू·इटस्/ *वि* (*औप*) लांबचा आणि आडमार्गी: *a ~ous route, मोठा फेरा पडणारा मार्ग.*

circular /'सऽक्युल(र्)/ *वि* १ वर्तुळाकार; गोल. २ गोलगोल जाणारा: *a ~ route, गोलाकार मार्ग, चक्राकार मार्ग.* **circular** *ना* [*गण*] खूप लोकांना पाठवायचे छापील पत्रक, छापील जाहिरात वगैरे, परिपत्रक.

circulate /'सऽक्युलेइट्/ *क्रि* [*अक, सक*] १ गोलाकार फिरणे किंवा फिरवणे; मोकळेपणाने फिरणे, फिरवणे. २ एका माणसाकडून दुसऱ्या माणसाकडे जाणे, प्रसृत होणे. **circulation** /,सऽक्यु'लेइश्न्/ *ना* १ [*गण, अगण*] शरीरातील रक्ताचे चलनवलन, रक्ताभिसरण. २ [*अगण*] (क) एका माणसाकडून दुसऱ्याकडे जाणे, कर्णोपकर्णी होणे, प्रसार: *the ~ of news, बातम्या पसरणे.* (ख) प्रचारात असण्याची स्थिती: *There are only a few of the new coins in ~, नवीन नाण्यांपैकी फारच थोडी नाणी प्रचारात आहेत म्हणजे वापरात आहेत.* ३ [*गण*] वर्तमानपत्राच्या वगैरे विकल्या जाणाऱ्या प्रतींची संख्या, खप.

circumcise /'सऽकम्साइझ्/ *क्रि* [*सक*] (पुरुषाच्या किंवा मुलाच्या) शिश्नाच्या टोकाचे कातडे कापणे, सुंता करणे. **circumcision** /,सऽकम्'सिझ्न्/ *ना* [*गण, अगण*] सुंता.

circumference /स'कैम्फरन्स्/ *ना* [*गण*] (क) एखाद्या गोलाची सीमारेषा, वर्तुळरेषा. (ख) गोलाभोवतालच्या सीमारेषेची लांबी, परीघ: *the earth's ~, पृथ्वीचा परीघ.*

circumflex /'सऽकम्फ्लेक्स्/ *ना* [*गण*] स्वरचिन्हावर द्यायची खूण – उदाहरणार्थ फ्रेंच शब्द rôle मधे.

circumnavigate /,सऽकम्'नॅव्हिगेट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) जहाजातून प्रवास करणे – विशेषतः जगाची सफर करणे, गलबताने पृथ्वीप्रदक्षिणा करणे. **circumnavigation** /,सऽकम्,नॅव्हि'गेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] गलबताने केलेली पृथ्वीप्रदक्षिणा, परिनावक.

circumspect /'सऽकम्स्पेक्ट्/ *वि* (*औप*) सावध, दक्ष, काळजीपूर्वक, सावधान, पर्यवधानी.

circumstance /'सऽकम्स्टन्स्/ *ना* १ [*गण, बहुधा ब.व*] एखाद्या घटनेमागची किंवा कृतीमागची परिस्थिती, दशा: *the ~s of his death, तो ज्या परिस्थितीत मेला ती परिस्थिती.* २ **circumstances** [*ब.व*] आर्थिक स्थिती, आर्थिक दशा. ३ (*वाक्प्र*) **in/under the 'circumstances** या परिस्थितीत, अशा वेळी. **in/under no circumstances** कोणत्याही परिस्थितीत नाही, अजिबात नाही.

circumstantial /,सऽकम्'स्टॅन्श्ल्/ *वि* १ (पुराव्याबाबत) एखादी गोष्ट स्पष्टपणे सुचविणारा पण ती सिद्ध मात्र करू न शकणारा, परिस्थितिजन्य, आनुषंगिक माहितीचा आधार असणारा, अप्रत्यक्ष. २ (वर्णनाबाबत) बारीकसारीक तपशील देणारे, सविस्तर.

circus /'सऽकस्/ *ना* [*गण*] १ जनावरांचे खेळ, माणसांच्या कसरती वगैरेचा बहुधा मोठ्या तंबूत केलेला प्रयोग. २ (*ब्रि*) (स्थलनामाबाबत) अनेक रस्ते जेथे मिळतात अशी शहरातली जागा, मोठा नाका: *Piccadilly C~, पिकडिली नाका.*

cistern /'सिस्टन्/ *ना* [*गण*] संडासावरची

वगैरे पाण्याची टाकी.

cite /साइट/ *क्रि* [*सक*] (*औप*) १ उदाहरण म्हणून देणे, एखाद्या मुद्द्याला आधार म्हणून देणे, वानगीदाखल देणे, पुराव्यासाठी उद्धृत करणे. २ (*कायदा*) न्यायालयात हजर होण्याचा आदेश देणे. **citation** /साइ'टेइशन्/ *ना* (क) [*अगण*] एखाद्याला किंवा एखादे वचन उद्धृत करण्याची कृती, अवतरण देणे. (ख) [*गण*] अवतरण.

citizen /'सिटिझ़्न्/ *ना* [*गण*] १ एखाद्या देशाचा सभासद म्हणून असणारे सर्व हक्क वापरणारा माणूस, नागरिक. २ शहरात किंवा नगरात राहणारा माणूस, नगरवासी, पौर. **,citizens' 'band** *ना* [*अे.व*] स्थानिक संदेशन किंवा संप्रेषणासाठी लोकांनी वापरलेली रेडिओ-कंपने, स्थानिक दळणवळणासाठी लोकांनी रेडिओमार्फत वापरायची विद्युत्कर्षुकीय शक्तीची उपयुक्त कंप्रता, नागरी कंप्रतापट्टा. **citizenship** *ना* [*अगण*] नागरिकाचे हक्क, कर्तव्य आणि त्यांचे नागरिकत्व.

citric acid /,सिट्रिक् 'ॲसिड्/ *ना* [*अगण*] संत्री, लिंबे यासारख्या फळांपासून मिळणारे एक फिके अम्ल; जंबीर अम्ल.

citrus /'सिट्रस्/ *ना* [*गण*] संत्रे, लिंबू, इडलिंबू, पपनस यासारख्या आंबट फळांच्या झाडांच्या वर्गातील झाड, जंबीर : *~ fruit, लिंबू किंवा लिंबासारखे फळ, जंबीरफळ.*

city /'सिटि/ *ना* (*ब.व* -ies) १ [*गण*] (क) मोठे महत्त्वाचे नगर, शहर. (ख) [तसेच ब.व क्रियापदासह अे.व] शहरात राहणारे सर्व लोक, सर्व शहरवासी. २ **the City** [*अे.व*] लंडनमधील आर्थिक उलाढालीचे केन्द्र.

civic /'सिव्हिक्/ *वि* नगराचा, शहराचा किंवा त्यातील लोकांचा, नागरिकत्वाबाबतचा, शहरी, शहरवासींचा.

civil /'सिव्ह्ल्/ *वि* १ एखाद्या देशाच्या नागरिकांचा, नागरी. २ सैन्याशी संबंधित नसणारा, असैनिकी. ३ सभ्य. **,civil engi'neering** *ना* [*अगण*] रस्ते, पूल वगैरे यांची आखणी आणि बांधकाम, स्थापत्य अभियांत्रिकी. **civility** /सि'व्हिलटि/ *ना* (*ब.व* -ies) (*औप*) १ [*अगण*] सभ्यता, शिष्टता, सौजन्य. २ [*गण*, बहुधा *ब.व*] सभ्य वर्तन, शिष्टाचार. **civilly** /'सिव्हलि/ *वि* सभ्यतेने, भलेपणाने. **,civil 'rights** *ना* [*ब.व*] प्रत्येक नागरिकाचे स्वातंत्र्य आणि समता हे हक्क, नागरी अधिकार. **,civil 'servant** *ना* [*गण*] नागरी (प्रशासकीय) सेवेत काम करणारा माणूस, नागरी सेवक. **the ,Civil 'Service** *ना* [*अे.व*] (क) सर्व शासकीय खाती, सरकारी खाती, नागरी सेवा. (ख) (अे.व किंवा ब.व क्रियापदासह) सरकारी खात्यांत काम करणारे सर्व लोक, शासकीय कर्मचारी, मुलकी खात्यातील नोकर. **,civil 'war** *ना* [*गण, अगण*] एकाच देशातील दोन गटातील युद्ध, यादवी युद्ध.

civilian /सि'व्हिलिअन्/ *ना* [*गण*], *वि* सैन्यात नसणारा (माणूस), असैनिकी व्यक्ती, नागरिक.

civilization /,सिव्हलाइ'झ़ेइशन्; *अमे* -लि'झ़े-/ *ना* १ [*अगण*] मानवी समाजाच्या विकासाची आणि संघटनाची प्रगत अवस्था, मानवी सुधारणा, संस्कृती. २ [*गण, अगण*] एखाद्या समाजाची एका विशिष्ट काळातील आणि एखाद्या विशिष्ट प्रदेशातील जीवनपद्धती किंवा त्याचा सुसंस्कृतपणा, संस्कृती : *the history of western ~, पाश्चात्य संस्कृतीचा इतिहास.*

civilize /'सिव्हलाइझ़्/ *क्रि* [*सक*] १ संस्कृतीत आणणे, सुसंस्कृत करणे : *a ~d society, सुसंस्कृत समाज.* २ एखाद्याची वागणूक आणि चालरीत सुधारणे.

clad /क्लॅड्/ *वि* (*जुना, अप्रचलित* किंवा *औप*) वस्त्रविभूषित, कपडे ल्यालेला.

claim /क्लेइम्/ *क्रि* [*सक*] १ (पुरावा न देता एखादे) सत्य आहे असे म्हणणे, दावा करणे : *He ~s to be a British citizen, तो ब्रिटिश नागरिक असल्याचा दावा करतो.* २ स्वतःचा हक्क आहे म्हणून मागणी करणे, हक्क सांगणे, हक्काने मागणी करणे. ३ (*औप*) (संकट, दुर्घटना वगैरेबाबत) मृत्यू घडवणे, मृत्यूस कारणीभूत होणे, बळी घेणे, जीव घेणे : *The earthquake ~ed thousands of lives, भूकंपाने हजारोंचे बळी घेतले.* **claim** *ना* १ [*गण*] एखादी गोष्ट सत्य आहे असे म्हणणे, दावा. २ [*गण*] एखाद्या गोष्टीची हक्क म्हणून केलेली मागणी, देयस्व : *an insurance ~,*

विम्याची मागणी, विम्याचा देयस्व. ३ [*अगण, गण*] एखाद्या गोष्टीवरील हक्क किंवा अधिकार. **claimant** *ना* [*गण*] हक्क सांगणारा, मागणीदार, हक्कदार, देयस्वी.

clairvoyance /क्लेअ'व्हॉइ·अन्स्/ *ना* [*अगण*] मनःचक्षूंनी भविष्यातील गोष्टी पाहण्याची शक्ती, अंतर्ज्ञान. **clairvoyant** /-अन्ट्/ *ना* [*गण*], *वि* भविष्यवेत्ता, भविष्यज्ञानी, अंतर्ज्ञानी.

clam /क्लॅम्/ *ना* [*गण*] शिंपल्यातील एक मोठा मासा. **clam** *क्रि* (**-mm-**) (*क्रिब*) **clam up** (*अनौप*) शांत होणे, गप्प बसणे.

clamber /'क्लॅम्ब(र्)/ *क्रि* [*अक*] कष्टाने चढणे, कसेबसे वर जाणे.

clammy /'क्लॅमि/ *वि* (**-ier, -iest**) ओलसर दमट असल्याने असुखकारक.

clamour (*अमे* **-or**) /'क्लॅम(र्)/ *ना* [*गण, अगण*] मोठा गोंधळाचा आवाज, गदारोळ, गलका, प्रचंड गोंधळ, गोंगाट, कलकलाट. **clamour** *क्रि* [*अक*] (*for*)// गोंधळ घालून एखादी गोष्ट मागणे, जोरजोरात ओरडून मागणे.

clamp /क्लॅम्प्/ *ना* [*गण*] साधारणतः मळसूत्राच्या सहाय्याने वस्तू एकत्रित, घट्ट धरून ठेवण्याची एक युक्ती किंवा तसे साधन, पकड, माकडी. **clamp** *क्रि* १ [*सक*] क्लॅम्पने घट्ट करणे किंवा जाम करणे. २ (*क्रिब*) **clamp down on sb/sth** अधिकृतपणे नियंत्रण ठेवणे, अंमल बसवणे. **'clampdown** *ना* [*गण*] दबाव, बंदी, नियंत्रण.

clan /क्लॅन्/ *ना* [*गण*] (विशेषतः स्कॉटलंडमधील) मोठ्या विस्ताराचे कुटुंब, गोत्र.

clandestine /क्लॅन्'डेस्टिन्/ *वि* (*औप*) गुप्त, चोरटेपणाने केलेला: *a ~ organization, गुप्त संघटना.*

clang /क्लॅङ्/ *ना* [*गण*] मोठा घुमणारा आवाज. **clang** *क्रि* [*अक, सक*] (एखाद्या गोष्टीचा) मोठा आवाज करणे.

clank /क्लॅङ्क्/ *ना* [*गण*] धातूच्या साखळ्या, तलवारी वगैरे आपटून होणारा आवाज, खुळखुळ आवाज, खणखणाट. **clank** *क्रि* [*अक, सक*] खुळखुळ आवाज करणे, खणखणाट करणे.

clap /क्लॅप्/ *क्रि* (**-pp-**) १ [*अक, सक*] हातावर हात मारणे – खास करून पसंती दाखविण्यासाठी, टाळ्या वाजवणे. २ [*सक*] पंजाने हलकीशी थाप मारणे: *~ sb on the back, पाठीवर थाप मारणे, पाठीवर शाबासकी देणे.* ३ [*सक*] (*अनौप*) पटकन् आत घालणे – विशेषतः तुरुंगात, डांबणे. **clap** *ना* [*गण*] १ टाळीचा आवाज किंवा टाळी वाजवण्याची क्रिया, टाळी. २ मोठा आवाज – विशेषतः विजेचा कडकडाट. **,clapped 'out** *वि* (*ब्रि अनौप*) वापरून झिजलेला किंवा जीर्ण झालेला: *a ~ped out old car, वापरून वापरून झिजलेली जुनाट गाडी.*

claret /'क्लॅरट्/ *ना* [*अगण, गण*] एक प्रकारचे लाल फ्रेंच मद्य. **claret** *वि* तांबडे भडक.

clarify /'क्लॅरिफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] समजण्यासाठी सोपे आणि स्पष्ट करणे, खुलासा करणे. **clarification** /,क्लॅरिफि'केइश्न्/ *ना* [*अगण*] स्पष्टीकरण, खुलासा.

clarinet /,क्लॅर'नेट्/ *ना* [*गण*] सनई, शहनाई, पिपाणी. **clarinettist** *ना* [*गण*] पिपाणीवाला, सनईवादक.

clarity /'क्लॅरटि/ *ना* [*अगण*] स्पष्टता, स्वच्छपणा, निःसंदिग्धता.

clash /क्लॅश्/ *क्रि* १ [*अक*] भांडणे, मारामारी करणे किंवा वाद घालणे. २ [*अक*] (कल्पना, आखणी वगैरेबाबत) एकमेकांच्या विरुद्ध असणे, परस्परविरोधी असणे; न जुळणे. ३ [*अक*] (घटनांबाबत) एकाच वेळी घडून गैरसोय होणे, परस्परांना छेद देणे. ४ [*अक, सक*] आपटून मोठा कर्कश आवाज होणे किंवा करणे, एकमेकांवर आपटणे. **clash** *ना* [*गण*] १ मतभेद. २ आदळण्याचा आवाज, आपटण्याचा आवाज.

clasp /क्लास्प्; *अमे* क्लॅस्प्/ *ना* [*गण*] १ दोन टोके एकत्र बांधण्याची युक्ती, फासा, अडकण, चाप. २ घट्ट पकड; मिठी, कव. **clasp** *क्रि* [*सक*] १ घट्ट धरणे, मिठी मारणे, कवेत घेणे, कवटाळणे. २ फासा लावून घट्ट करणे, आवळणे.

class /क्लास्; *अमे* क्लॅस्/ *ना* १ (क) [*गण*] विशिष्ट स्तरावरचा सामाजिक गट, वर्ग: *the* *middle ~es, मध्यम वर्ग.* (ख) [*अगण*] लोकांना वर्गवार विभागणारी पद्धती, वर्गव्यवस्था. २ [*गण*] (क) एकत्र शिकविल्या जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा गट, वर्ग. (ख) विद्यार्थ्यांना शिकविण्याचा काल, तास, तासिका. ३ [*गण*] समान गुणाच्या वस्तूंचा संग्रह, प्रकार. ४ [*अगण*] (*अनौप*) वरचा दर्जा किंवा वरची श्रेणी, उत्कृष्ट प्रत, अव्वल दर्जा. **class** *क्रि* [*सक*] प्रकार पाडणे; वर्गवारी करणे. **'classroom** *ना* [*गण*] शाळेत विद्यार्थ्यांना जेथे शिकवतात ती खोली, वर्ग. **classy** *वि* **(-ier, -iest)** (*अनौप*) फॅशनेबल; ढंगदार, वळणदार.

classic /'क्लॅसिक्/ *वि* १ नमुनेदार, खास, विशिष्ट, चांगला : *a ~ example, उत्तम किंवा नमुनेदार उदाहरण.* २ उत्कृष्ट, उत्तम, सरस, पहिल्या प्रतीचा : *a ~ film, उत्कृष्ट चित्रपट.* **classic** *ना* १ [*गण*] उच्च प्रतीचा किंवा श्रेष्ठ आणि चिरंतन असा अभिजात ग्रंथ, लेखक, किंवा कलेचा वगैरे नमुना. २ **classics** (अे.व क्रियापदासह) प्राचीन ग्रीक आणि रोमन वाङ्मय (किंवा त्याचा अभ्यास).

classical /'क्लॅसिक्ल/ *वि* १ प्राचीन ग्रीस आणि रोम यांच्या शैलीचा. २ पारंपरिक, प्राचीन परंपरेचा. ३ (संगीताबाबत) पारंपरिक – विशेषतः १७५० ते १८०० या काळातले; शास्त्रीय. **classically** /-कलि/ *क्रिवि* साधेपणामुळे आकर्षक अशा तऱ्हेने.

classify /'क्लॅसिफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] वर्गवारी करणे. **classification** /,क्लॅसिफि'केइश्न्/ *ना* [*गण, अगण*] वर्गवारी, प्रतवारी. **classified** *वि* अधिकृतपणे गोपनीय.

clatter /'क्लॅट(र्)/ *ना* [*अे.व*] वस्तू एकमेकांवर सतत आपटल्याने होणारा आवाज, खटखट, खडखड. **clatter** *क्रि* [*अक*] खडखड आवाज करणे.

clause /क्लॉऽझ्/ *ना* [*गण*] १ (*व्याकरण*) कर्ता आणि क्रियापद असणारा पदबंध, पोटवाक्य, उपवाक्य. २ (*कायदा*) कायदेशीर लेखाचा एका विभाग, खंड, कलम.

claustrophobia /,क्लॉऽस्ट्र'फउबिअ/ *ना* [*अगण*] बंद जागेत कोंडले जाऊ अशी अवास्तव भीती, संवरणभीती.

claw /क्लॉऽ/ *ना* [*गण*] १ प्राणी किंवा पक्ष्याच्या पावलाच्या टोकाला असणारे कडक आणि बाकदार असे नख, नखी. २ खेकड्यासारख्या जलचरांच्या पायाचे टोकदार टोक, आकडा. ३ वस्तू अडकवून उचलण्याचे साधन, आकडी, गळाचा काटा. **claw** *क्रि* [*अक, सक*] (*at*)*//* नखाने बोचकारणे किंवा ओरबाडणे.

clay /क्लेइ/ *ना* [*अगण*] भाजल्यानंतर कडक होणारा आणि विटा, गाडगी वगैरे करण्यासाठी वापरला जाणारा मातीचा घट्ट, चिकट चिखल, चिकणमाती किंवा कुंभारमाती, मृत्तिका, शाडूमाती, क्लिदा.

clean^{1} /क्लीन्/ *वि* १ घाण न लागलेला, न मळलेला, स्वच्छ, विमल, निर्मळ. २ न वापरलेला, कोराकरकरीत : *a ~ piece of paper, कोऱ्या कागदाचा तुकडा.* ३ असभ्य नसलेला, अश्लील किंवा घाणेरडा नसलेला, शुद्ध : *a ~ joke, शुद्ध किंवा निर्भेळ विनोद.* ४ सरळ, खडबडीत नसलेला, कंगोरे नसलेला; नियमित : *a ~ cut, सरळ वार, सरळ घाव.* ५ (*वाक्प्र*) **make a clean 'breast of sth** एखादी गोष्ट प्रामाणिकपणे व पूर्णतः कबूल करणे. **clean** *क्रिवि* १ अगदी सरळ, पूर्णपणे, अजिबात : *I ~ forgot about it, मी ते अगदी पूर्णपणे विसरून गेलो.* २ (*वाक्प्र*) **come clean** प्रामाणिकपणे सांगून टाकणे, मोकळेपणाने कबूल करणे. **,clean-'cut** *वि* १ स्पष्टपणे आखलेला, रेखीव. २ टापटिपीचा. **,clean-'shaven** *वि* दाढी-मिशा काढलेला, गुळगुळीत चेहऱ्याचा, घोटून दाढी केलेला.

clean^{2} /क्लीन्/ *क्रि* १ [*सक*] (एखादी गोष्ट) साफ किंवा स्वच्छ करणे, धुणे. २ (*क्रिब*) **clean sb out** (*अनौप*) एखाद्याचे सर्व पैसे घेणे, एखाद्याला बुडवणे/धुणे. **clean sth out** (एखाद्या कपाटाचा खण किंवा एखादी खोली वगैरे) आतून साफ करणे, मोकळा करणे. **clean (sth) up** (क) (एखाद्या जागेचा) केर-कचरा काढणे, झाडून साफ करणे. (ख) पैसा मिळवणे किंवा जिंकणे, चिकार पैसा करणे. **clean sth up** एखाद्या ठिकाणचे गुन्हेगार, समाजकंटक वगैरे यांची हकालपट्टी करणे, गुंडांपासून मुक्त करणे. **clean** *ना*

[*अे.व*] साफसफाई, स्वच्छता करणे. **cleaner** *ना* [*गण*] १ साफसफाई करणारी व्यक्ती किंवा वस्तू : *a 'vacuum ~, कचरा ओढणारा निर्वात पोकळी स्वच्छक.* २ पाण्याऐवजी रसायनांच्या द्वारे कपड्याची धुलाई करून देणारे दुकान, कोरड्या धुलाईचे केन्द्र, ड्रायक्लीनिंगचे दुकान.

cleanliness /'क्लेन्लिनेस्/ *ना* [*अगण*] स्वच्छता, शुचिर्भूतता.

cleanly /'क्लीन्लि/ *क्रिवि* सहजपणे; साफ, सरळ, अलगदपणे.

cleanse /क्लेन्झ्/ *क्रि* [*सक*] शुचिर्भूत करणे, स्वच्छ, शुद्ध करणे. **cleanser** *ना* [*गण*] स्वच्छ करणारा पदार्थ, शुद्धीकारक पदार्थ.

clear^1 /क्लिअ(र्)/ *वि* १ मधून पाहण्यास सोपा, पलीकडचे पाहता येण्याजोगा, स्वच्छ : *~ glass, स्वच्छ काच.* २ समजण्यास, पाहण्यास किंवा ऐकण्यास सोपा, स्पष्ट : *a ~ explanation of the problems, समस्यांचे सुस्पष्ट विवेचन.* ३ उघड; निश्चित : *a ~ case of cheating, उघड उघड फसवणुकीचा प्रकार.* ४ निःसंशय, मनात शंका किंवा गोंधळ नसलेला; निश्चित : *I'm not ~ about what I should do, मी काय करावं याबाबत माझं अजून नक्की असं काही नाही म्हणजेच काय करायचं याबाबत माझ्या मनात गोंधळ आहे.* ५ काही अडचणी नसलेला, निर्वेध, निष्कंटक, मोकळा. ६ (*of*)// स्पर्श न होणारा, दूर. ७ ढग किंवा धुके नसलेले (आकाश), निरभ्र, लख्ख : *a ~ sky, निरभ्र आकाश.* ८ डाग नसलेला, स्वच्छ : *~ skin, नितळ कांती.* ९ अपराधी भावना नसलेला, साफ : *a ~ conscience, अपराधी भावना नसलेले मन.* १० (पैशाबाबत) निव्वळ : *~ profit, निव्वळ नफा.* ११ (*वाक्प्र*) **make sth/oneself 'clear** एखादी गोष्ट स्पष्ट करणे किंवा स्वतःचे मत स्पष्ट करणे. **clear** *ना* (*वाक्प्र*) **in the 'clear** (*अनौप*) धोका किंवा संशय यापासून मुक्त, धोका नसलेला. **clear** *क्रिवि* १ स्पष्टपणे, साफ : *I can hear you loud and ~, मला तुझे बोलणे स्पष्टपणे ऐकू येते आहे.* २ पूर्णपणे : *The prisoner got ~ away, तो कैदी पूर्णपणे निसटला.* ३ वाटेतून दूर : *Stand ~ of the doors, दारातून दूर व्हा, दारापासून दूर उभा रहा.* ४ (*वाक्प्र*) **keep/stay/steer clear of sb/sth** एखाद्याला टाळणे, एखाद्यापासून दूर राहणे. **,clear-'cut** *वि* समजायला सोपा, सुगम; सुस्पष्ट. **,clear-'headed** *वि* स्पष्टपणे विचार करू शकणारा, भ्रम नसणारा, शांत डोक्याने विचार करणारा. **clearly** *क्रिवि* स्पष्टपणे; उघडपणे. **,clear 'sighted** *वि* स्पष्टपणे विचार करणारा, नीट समजणारा, दृष्टी स्वच्छ असलेला.

clear^2 /क्लिअ(र्)/ *क्रि* १ [*सक*] नको असलेली गोष्ट काढून टाकणे, अडगळ किंवा पसारा आवरणे, साफ करणे. २ [*सक*] स्पर्श न करता जाणे किंवा उडी मारणे, न लागता पार करणे, अलगदपणे ओलांडणे : *The horse ~ed the fence, घोड्याने कुंपणाला स्पर्श न करता वरून उडी मारली.* ३ [*अक*] (धुक्याबाबत) हळूहळू लुप्त होणे, विरणे. ४ [*सक*] एखादी गोष्ट अधिकृतपणे पास होणे, रीतसर शिक्कामोर्तब होणे. ५ [*सक*] (*of*)// एखाद्याला अपराधातून मुक्त करणे, एखाद्याला निर्दोष ठरवून सोडणे. ६ (*वाक्प्र*) **clear the 'air** मनमोकळेपणाने किंवा खुली चर्चा करून शंका, अनाठायी भीती काढून टाकणे. ७ (*क्रिब*) **clear (sth) away** एखादी जागा नीटनेटकी करण्यासाठी तेथील सामान किंवा अडगळ हालवणे, जागा मोकळी करणे. **clear off** (*अनौप*) दूर जाणे, चालू लागणे. **clear out (of)** (*अनौप*) निघून जाणे, सटकणे. **clear sth out** नको असलेल्या गोष्टी काढून टाकून मोकळे करणे किंवा नीटनेटके करणे : *~ out the cupboards, कपाटे आवरणे किंवा नीट लावणे.* **clear up** (हवामानाबाबत) (पाऊस थांबून) उघडीप होणे, (ढग जाऊन) निवळणे, लख्ख ऊन पडणे. **clear (sth) up** आवरणे, साफ करणे, आवराआवरी करणे, (स्वयंपाकघरात) झाकपाक करणे. **clear sth up** एखाद्या गोष्टीबाबतची शंका दूर करणे; सोडवणे, उलगडा करणे, उकलणे : *~ up a mystery, गूढ उकलणे, रहस्याचा उलगडा करणे.*

clearance /'क्लिअरन्स्/ *ना* १ [*गण, अगण*] नको असलेल्या गोष्टी काढून टाकण्याची कृती, आवराआवरी, निर्मूलन. २ [*गण, अगण*] दोन गोष्टींमधली मोकळी जागा. ३ [*अगण*] अधिकृत परवानगी किंवा संमती.

clearing /'क्लिअरिङ्/ *ना* [*गण*] झाडे तोडून

साफ केलेली जंगलातली मोकळी जागा.

cleavage /'क्लीव्हिज/ *ना* [*गण*] १ स्त्रीच्या दोन स्तनांमधली जागा. २ (*औप*) विभाजन; फट, भेद.

clef /क्लेफ्/ *ना* [*गण*] सुरयोजन दाखविणाऱ्या संगीताच्या ओळीच्या सुरुवातीचे सुरांची उंची दाखविणारे चिन्ह.

clemency /'क्लेमन्सि/ *ना* [*अगण*] (*औप*) दया.

clench /क्लेन्च्/ *क्रि* [*सक*] आवळून बंद करणे; घट्ट पकडणे, आवळून धरणे : *~ one's fists, मुठी आवळणे.*

clergy /'क्लऽजि/ *ना* [*ब.व*] ख्रिस्ती धर्माधिकारी मंडळ किंवा ख्रिस्ती पुरोहितवर्ग. **'clergyman** /'क्लऽजिमन्/ *ना* [*गण*] ख्रिस्ती पुरोहित, पाद्री.

clerical /'क्लेरिक्ल्/ *वि* १ कारकुनाचा, कारकुनासंबंधीचा. २ ख्रिस्ती पुरोहितवर्गाचा.

clerk /क्लाक्; *अमे* क्लऽक्/ *ना* [*गण*] कचेरी, दुकान वगैरे ठिकाणी कागदपत्र, हिशेब वगैरे ठेवण्याचे काम करणारा माणूस, कारकून, लेखनिक, लिपिक.

clever /'क्लेव्ह(र्)/ *वि* १ शिकण्यात किंवा समजण्यात विलंब न लावणारा, हुशार, चलाख. २ कुशल, चतुर; नामी, परिणामकारक, प्रभावी : *a ~ scheme, नामी योजना.* **cleverly** *क्रिवि* कुशलतेने; हुशारीने, चलाखीने. **cleverness** *ना* [*अगण*] हुशारी; कौशल्य, चतुराई.

cliché /'क्लीशेइ; *अमे* क्ली'शेइ/ *ना* [*गण*] सतत वापरून गुळगुळीत झालेले म्हणजेच अर्थ हरवलेले वचन किंवा अशी कल्पना.

click /क्लिक्/ *ना* [*गण*] (कुलपात किल्ली फिरवताना होतो तसा) लहानसा पण स्पष्ट आवाज, टिकटिक. **click** *क्रि* १ [*अक, सक*] लहानसा पण स्पष्ट आवाज करणे, टिकटिक आवाज करणे. २ [*अक*] (*अनौप*) एकदम लक्षात येणे.

client /'क्लाइ·अन्ट्/ *ना* [*गण*] १ व्यावसायिक व्यक्तीकडून सल्ला किंवा मदत घेणारा माणूस, कूळ, (*कायदा*) अशील. २ गिऱ्हाईक, ग्राहक.

clientele /,क्लीअन्'टेल्; *अमे* ,क्लाइअन्-/ *ना* [*अ.व*] (अ.वचनी किंवा ब.वचनी क्रियापदासह) कुळे, गिऱ्हाईक यांचा वर्ग, ग्राहकवर्ग.

cliff /क्लिफ्/ *ना* [*गण*] सरळ उभा कडा – विशेषतः समुद्रकाठचा, सुळका, खडपा.

climactic /क्लाइ'मॅक्टिक्/ *वि* (*औप*) कळस गाठणारा, उत्कर्षबिंदूकडे नेणारा.

climate /'क्लाइमिट्/ *ना* १ [*गण, अगण*] एखाद्या ठिकाणचे सर्वसाधारण हवामान, हवापाणी, स्थानिक ऋतुमान. २ [*गण*] सर्वसाधारण वृत्ती किंवा भावना. **climatic** /क्लाइ'मॅटिक्/ *वि* हवामानासंबंधीचा.

climax /'क्लाइमॅक्स्/ *ना* [*गण*] कथेतील वगैरे – बहुधा शेवटी शेवटी येणारा – उत्कंठा वाढविणारा उत्कर्षबिंदू, उत्कंठेचा कळस, शिखर. **climax** *क्रि* [*अक, सक*] एखादी गोष्ट उत्कर्षबिंदूपर्यंत नेणे, कळस गाठणे, शिखराला किंवा कळसाला पोहोचणे.

climb /क्लाइम्/ *क्रि* १ [*अक, सक*] एखाद्या गोष्टीवर चढणे – विशेषतः हातापायाच्या आधारे चढणे. २ [*अक*] एखाद्या विशिष्ट दिशेकडे कष्टाने जाणे, कष्टाने बाहेर पडणे : *~ out of the lorry, लॉरीतून कसेबसे बाहेर येणे.* ३ [*अक*] (विमानासारख्या वायुवाहनाबाबत) आकाशात झेप घेणे, वर चढणे. ४ [*अक*] (वनस्पतींबाबत) वरवर जाणे, वरच्या दिशेने वाढणे. ५ (*वाक्प्र*) **climb on the bandwagon** ⇨ BAND. ६ (*क्रिब*) **climb down** (*अनौप*) चूक मान्य करणे. **climb** *ना* [*गण*] १ चढण्याची क्रिया, आरोहण. २ चढण्याची जागा, चढण. **'climb-down** [*गण*] चुकीची कबुली. **climber** *ना* [*गण*] १ चढणारा माणूस, आरोहक, चढाईत. २ वरवर चढणारी वेल किंवा वनस्पती.

clinch /क्लिन्च्/ *क्रि* [*सक*] १ (*अनौप*) (करार किंवा युक्तिवाद) पक्का करणे, नक्की करणे. २ बाहूंमधे धरणे, पकडणे, आलिंगन देणे, मिठी मारणे. **clinch** *ना* [*गण*] मिठी, पकड.

cling /क्लिङ्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **clung** /क्लङ्/) [*अक*] घट्ट पकडणे, कवटाळणे. **'cling film** *ना* [*अगण*] अन्नावर वेष्टण

म्हणून वापरायचा प्लॅस्टिकचा पारदर्शक पातळ कागद.

clinic /'क्लिनिक्/ *ना* [*गण*] रोग्यांवर तज्ज्ञ डॉक्टरांकडून जिथे उपचार केले जातात किंवा सल्ला दिला जातो असा दवाखाना/इस्पितळ किंवा त्याचा भाग किंवा असे ठिकाण, रोग चिकित्सालय : *a children's ~, लहान मुलांचे चिकित्सालय.* **clinical** *वि* १ चिकित्सालयविषयक, चिकित्साविषयक, वैद्यकीय उपचाराबाबतचा. २ थंड आणि भावनाशून्य, कोरडा आणि भावनाहीन. ३ (खोली किंवा इमारतीबाबत) अगदी साधी, न नटवलेली.

clink /क्लिङ्क्/ *ना* [*गण*] ग्लासांची वगैरे किणकिण, छन्छन्. **clink** *क्रि* [*अक, सक*] असा आवाज होणे, असा आवाज करणे.

clip^1 /क्लिप्/ *ना* [*गण*] वस्तू धरण्यासाठी केलेला तारेचा लहान चाप, चिमटा : *a 'paper-~, कागदांना लावायचा छोटा चिमटा.* **clip** *क्रि* **(-pp-)** [*अक, सक*] चाप लावून घट्ट करणे, चाप लावणे, चिमट्यात घट्ट पकडणे. **'clipboard** *ना* [*गण*] कागद घट्ट लावण्यासाठी वर चाप असलेला जाड पुठ्ठा.

clip^2 /क्लिप्/ *क्रि* **(-pp-)** [*सक*] १ कात्रीने वगैरे कापणे, कातरणे. २ (*अनौप*) फाडकन् मारणे, थप्पड मारणे. **clip** *ना* [*गण*] १ काप देणे, छाट. २ (*अनौप*) थप्पड, चापट. **clippers** *ना* [*ब.व*] कातरण्याचे साधन, छाटकामाचे हत्यार. **clipping** *ना* [*गण*] १ कापलेला तुकडा, कातरलेला तुकडा. २ (खास *अमे*) कात्रण.

clique /क्लीक्/ *ना* [*गण*] (बहुधा *अधिक्षेपी*) घनिष्ट संबंध असलेल्या माणसांचा गट, कंपू, चौकडी.

cloak /क्लउक्/ *ना* १ [*गण*] स्वतंत्र बाह्या नसलेला सैल अंगरखा, बाह्या वगैरे नसलेले, कपड्यांवरून घालावयाचे सैलसर वस्त्र. २ [*ए.व*] (*ला*) लपवून ठेवण्याचे किंवा झाकण्यासाठीचे आवरण, बुरखा : *a ~ of secrecy, गुप्ततेचा बुरखा.* **cloak** *क्रि* [*सक*] झाकणे किंवा लपवणे. **'cloakroom** *ना* [*गण*] १ कोट, हॅट वगैरे ठेवण्याची जागा. २ (*ब्रि पर्या*) प्रसाधन कक्ष, प्रसाधनगृह, स्वच्छतागृह, शौचालय.

clock /क्लॉक्/ *ना* १ [*गण*] वेळ मोजणारे आणि दाखवणारे उपकरण, घड्याळ. २ (*वाक्प्र*) **put/turn the 'clock back** जुन्या कल्पना वगैरेकडे पुन्हा वळणे, जुन्यापुराण्या गोष्टी परत आणणे. **round the 'clock** रात्रंदिवस, अहर्निश. **clock** *क्रि* १ [*सक*] वेळ मोजणे, घड्याळावर वेळ घेणे. (*क्रिब*) **clock in/out** कामावर येण्याजाण्याची वेळ लिहिणे, वेळेची नोंद करणे. **clock sth up** (वेळ, वेग वगैरे) गाठणे. **'clockwise** *क्रिवि, वि* घड्याळाचे काटे ज्या दिशेने फिरतात त्या दिशेने, सव्य. **'clockwork** *ना* [*अगण*] १ किल्ली दिल्यावर चालू होणारे यंत्र. २ (*वाक्प्र*) **like 'clockwork** काहीही अडचण न येता, सहज; सरळपणे, सुरळीतपणे.

clod /क्लॉड्/ *ना* [*गण*] मातीचे ढेकूळ, चिखलाचा गोळा, ढेपसा.

clog^1 /क्लॉग्/ *ना* [*गण*] लाकडी बूट.

clog^2 /क्लॉग्/ *क्रि* **(-gg-)** [*अक, सक*] (*up*)// बंद होणे किंवा करणे, अडणे किंवा अडवणे.

cloister /'क्लॉइस्ट(र्)/ *ना* [*गण*] ख्रिस्ती चर्च, मठ किंवा महाविद्यालय वगैरेमधील चौकोनी आकाराचा वरून छप्पर असलेला मार्ग, परिक्रम, ओवरी. **cloistered** *वि* धामधुमीच्या जगापासून दूर, एकांत असलेला.

close^1 /क्लउझ्/ *क्रि* १ [*अक, सक*] बंद होणे/करणे : *~ the door, दरवाजा बंद करणे ○ The shop ~s at 5 pm, दुकान पाच वाजता बंद होते.* २ [*अक, सक*] संपणे, संपवणे, शेवट करणे : *~ a meeting, सभा संपवणे.* ३ (*वाक्प्र*) **close one's 'eyes to sth** एखाद्या गोष्टीकडे दुर्लक्ष करणे, लक्ष न देणे, डोळेझाक करणे. ४ (*क्रिब*) **close 'down** (आकाशवाणी किंवा दूरदर्शन केन्द्राबाबत) प्रसारण बंद करणे. **close (sth) down** (कारखाना, धंदा वगैरेबाबत) बंद करणे, टाळा लावणे. **close in (on sb/sth)** एखाद्याच्या अगदी जवळ येणे, जवळ येऊन ठेपणे; हळूहळू घेरणे किंवा वेढणे. **close** *ना* [*ए.व*] (*औप*) कालाचा किंवा कृतीचा शेवट किंवा अखेर : *at the ~ of the day, दिवसाच्या शेवटी, दिवसा अखेरीस.* **,closed-,circuit 'television**

ना [*अगण*] वायरच्या आधारे मर्यादित संख्येच्या दर्शकांना दूरदर्शनचे संदेश पाठविण्याची पद्धती. **'close-down** *ना* [*गण*] बंद करण्याची कृती, बंद. **closed 'shop** *ना* [*गण*] एका विशिष्ट कामगार संघटनेच्याच सभासदांना नोकरी करण्याची परवानगी असलेला असा कारखाना, उद्योग वगैरे.

close^{2} /क्लउस/ *वि* (**~r, ~st**) १ जवळ, समीप. २ (क) जवळच्या नात्याचा : *~ relatives, जवळचे नातेवाईक.* (ख) जवळचा, घनिष्ट, जवळिकीचा : *a ~ friend, जवळचा मित्र, जिवलग मित्र.* ३ पूर्ण, बारकाईने केलेला, सूक्ष्म : *~ inspection, सूक्ष्म तपासणी* किंवा *कसून केलेली परीक्षा.* ४ अगदी कमी फरकाने जिंकलेला, निसटता, अटीतटीचा : *a ~ race, अटीतटीची शर्यत.* ५ कोंदट, गुदमरवणारी, दाटीवाटीची, खबदाडीची (जागा). ६ (*वाक्प्र*) **a ,close 'call/'shave** जवळजवळ संकटासारखा; मरता मरता वाचलेला, थोडक्यात बचावलेला. **close** *क्रिवि* मागोमाग, लगोलग, खेटून : *follow ~ behind, मागोमाग येणे.* **,close-'fitting** *वि* (कपड्यांबाबत) अंगाला घट्ट बसणारे, तंग, टंच. **,close-'knit** *वि* (लोकांच्या गटाबाबत) समान श्रद्धा, कामे वगैरेमुळे, अगदी जवळ आलेला, एका गोटातील, अगदी जवळचा. **closely** *क्रिवि* नीट, लक्षपूर्वक, सूक्ष्मतेने; अटीतटीने; हुबेहुबपणे, बरहुकूम; दाटीवाटीने, चिकटून; अगदी जवळून. **closeness** *ना* [*अगण*] जवळीक, सलोखा, सख्य; कोंदटपणा, गिचडी. **,close-'set** *वि* अगदी जवळ जवळ असणारा, खेटून किंवा लागून असणारा : *,~-set 'eyes, अगदी जवळ जवळ असणारे डोळे म्हणजेच मधे कमी अंतर असणारे डोळे.* **'close-up** *ना* [*गण*] अगदी जवळून घेतलेले छायाचित्र.

close^{3} /क्लउस/ *ना* [*गण*] १ एका टोकाला बंद असणारा रस्ता. २ चर्चमधील मैदान किंवा मोकळी जागा.

closet /'क्लॉझित/ *ना* [*गण*] (खास करून *अमे*) कपाट, अलमारी. **closet** *वि* गोपनीय, गुप्त. **closet** *क्रि* [*सक*] खाजगी खोलीत बंद करून घेणे.

closure /'क्लउझ(र्)/ *ना* [*गण, अगण*] बंद करणे : *the ~ of the factory, कारखाना बंद करणे.*

clot /क्लॉट्/ *ना* [*गण*] १ द्रवात तयार होणारी गुठळी – विशेषतः रक्तातील गाठ. २ (*ब्रि अनौप*) वेडा, मूर्ख माणूस. **clot** *क्रि* (**-tt-**) [*अक*] गाठी होणे, गुठळ्या बनणे.

cloth /क्लॉथ्; *अमे* क्लॉऽथ्/ *ना* (क) [*अगण*] कापूस, लोकर वगैरे विणून तयार केलेले कापड. (ख) [*गण*] खास कारणासाठी वापरायचा कापडाचा मोठा तुकडा, वस्त्र : *a 'table~, टेबलावरचे कापड.*

clothe /क्लउद/ *क्रि* [*सक*] वस्त्र पुरवणे, कपडे नेसवणे, कपडे घालणे.

clothes /क्लउद्झ; *अमे* क्लउझ/ *ना* [*ब.व*] माणसाचे अंग झाकणारी वस्त्रे, कपडे, वसने. **'clothes-horse** *ना* [*गण*] घरात कपडे वाळत घालण्यासाठी केलेला काठ्यांचा सांगाडा. **'clothes-line** *ना* [*गण*] दोन खांबांना किंवा खुंट्यांना बांधलेली धुतलेले कपडे वाळत घालायची दोरी, तार वगैरे. **'clothes-peg** *ना* [*गण*] दोरीवर वाळत टाकलेल्या कपड्यांना लावण्याचा लाकडी, प्लास्टिकचा किंवा धातूचा चिमटा.

clothing /'क्लउदिङ्/ *ना* [*अगण*] कपडे.

cloud /क्लाउड्/ *ना* १ [*गण, अगण*] आकाशात दिसणारी पाण्याची वाफ (किंवा तिचा पुंजका), ढग. २ [*गण*] धूळ, धूर वगैरेचा हवेतील ढग. ३ [*गण*] (*ला*) दुःख, अनिश्चितता वगैरे निर्माण करणारी गोष्ट, सावट. ४ (*वाक्प्र*) **under a 'cloud** बदनामीत; संशयास्पद स्थितीत, किटाळ आलेला. **cloud** *क्रि* १ [*अक, सक*] झाकोळणे, धूसर होणे किंवा करणे, ढग येणे : *The sky ~ed over, आकाशात ढग भरून आले, आकाश ढगांनी झाकोळले.* २ [*सक*] गोंधळात पाडणे. **cloudy** *वि* (**-ier, -iest**) १ ढगांनी झाकोळलेले (उदा आकाश), अभ्राच्छादित. २ अस्पष्ट.

clout /क्लाउट्/ *क्रि* [*सक*] (*अनौप*) ठोसा मारणे, बडवणे, जोराने लगावून देणे. **clout** *ना* (*अनौप*) १ [*गण*] ठोसा. २ [*अगण*] सत्ता किंवा प्रभाव.

clove^{1} /क्लउव्ह्/ *ना* [*गण*] उष्णकटिबंधातील

एका झाडाची मसाल्याच्या पदार्थात वापरायची वाळलेली कळी, लवंग.

clove^2 /क्लउव्ह्/ *ना* [*गण*] कंदाचा वेगळा होऊ शकणारा एक लहान भाग, पाकळी : *a ~ of garlic, लसणाची पाकळी.*

clover /'क्लउव्ह(र्)/ *ना* [*अगण, गण*] दर देठाला साधारणतः तीन पाने असणारी एक छोटी वनस्पती.

clown /क्लाउन्/ *ना* [*गण*] (क) लोकांना हसविण्यासाठी बावळटपणाच्या गोष्टी करणारा सर्कशीतील एक कलाकार, विदूषक. (ख) वेड्यासारखे वागणारा माणूस, विदूषक, आचरट माणूस. **clown** *क्रि* [*अक*] वेड्यासारखे वागणे, आचरटपणा करणे, वेडपटपणा करणे, वेडेचार करणे.

club /क्लब्/ *ना* [*गण*] १ (क) खेळ, करमणूक यासाठी एकत्र येणाऱ्या लोकांचा गट, संघ, मंडळ. (ख) अशा संघाची इमारत, संघाची भेटण्याची जागा. २ शस्त्र म्हणून वापरायची जाड आणि जड अशी काठी, दंडुका. ३ गोल्फमधे वापरण्यात येणारी चेंडू मारायची आकडीदार काठी. ४ तीन पानांचे काळ्या रंगात चित्र असलेला पत्ता, किलवर. **club** *क्रि* (**-bb-**) १ [*सक*] काठीने किंवा दंडुक्याने मारणे. २ (*क्रिब*) **club together** एकत्र वर्गणी काढणे किंवा जमवणे, एखाद्या गोष्टीसाठी एकत्रितपणे पैसे देणे.

cluck /क्लक्/ *क्रि* [*अक*] *ना* [*गण*] कोंबडी-सारखा पक्पक् आवाज (करणे), खुटखुट किंवा खुंटखुटणे.

clue /क्लू/ *ना* [*गण*] १ एखाद्या प्रश्नाचे उत्तर शोधताना मदत करणारी गोष्ट, सुगावा, थांगपत्ता, धागा, धागादोरा. २ (*वाक्प्र*) **not have a 'clue** (*अनौप*) काहीही माहिती नसणे, काहीच कल्पना नसणे. **clueless** *वि* (*अनौप अधिक्षेपी*) बथ्थड, मठ्ठ, अडाणी.

clump^1 /क्लम्प्/ *ना* [*गण*] गट (विशेषतः झाडांचा), झाडी.

clump^2 /क्लम्प्/ *क्रि* [*अक*] दाणदाण पाय टाकत कसेतरी चालणे, फतक्फतक् चालणे.

clumsy /क्लम्झि/ *वि* (**-ier, -iest**) १ हालचालीत सफाईदारपणा आणि डौल नसलेला, बेडौल, बेढब आणि वेंधळा. २ वापरायला सोयीचा नसलेला, नसता बोजा असा, बोंगा वाटावा असा, बोजड. ३ बथ्थड, बावळट. **clumsily** *क्रिवि* बेडौलपणे, गलथानपणे; बोजडपणे; ओबडधोबडपणे. **clumsiness** *ना* [*अगण*] बेढबपणा; ओबडधोबडपणा.

clung CLING चा *भूत, भूत वि.*

cluster /क्लस्ट(र्)/ *ना* [*गण*] वस्तूंचा जुडगा, पुंजका, जोड, जडणी. **cluster** *क्रि* [*अक*] जमाव करणे, घोळका करणे, जमणे, जमा होणे.

clutch^1 /क्लच्/ *क्रि* [*अक, सक*] हाताने घट्ट पकडणे/पकडण्याचा प्रयत्न करणे, मुठीत धरणे, गच्च धरणे. **clutch** *ना* १ [*गण*] गच्च धरणे, घट्ट पकड. २ **clutches** [*ब.व*] (*अनौप*) नियंत्रणाची सत्ता, कबजा : *be in sb's ~es, एखाद्याच्या तावडीत असणे.* ३ [*गण*] मोटर (चलित्र) असलेल्या वाहनाच्या इंजिन आणि गिअर (दंतचक्र) जोडण्याची किंवा विलग करण्याची युक्ती, गत्यन्तरक, सोडदांडी, पकड.

clutch^2 /क्लच्/ *ना* [*गण*] पक्षी उबवित असलेल्या अंड्यांचा समूह, उबवण्याची अंडी, वीण.

clutter /क्लट(र्)/ *ना* [*अगण*] अस्ताव्यस्त पसरलेल्या अनावश्यक किंवा नको असलेल्या गोष्टी, कुचकामी गोष्टींचा पसारा. **clutter** *क्रि* [*सक*] (खोलीत, टेबलवर वगैरे) पसारा करणे.

cm *संरू* (*ब.व* **cm** किंवा **~s**) सेंटीमीटर.

CND /,सी एन् 'डी/ Campaign for Nuclear Disarmament अण्वस्त्रमुक्तीची मोहीम.

Co *संरू* Company १, कंपनी, कं.

c/o /,सी 'अउ/ *संरू* (ज्याच्या नावावर पत्र वगैरे पाठवायचे तो दुसऱ्याकडे राहत असल्यास त्या दुसऱ्याच्या नावपत्त्यापूर्वी लिहिण्यात येणारा संक्षेप) care of, द्वारा, मार्फत.

coach^1 /कउच्/ *ना* [*गण*] १ मोठ्या प्रवासात प्रवाशांना नेणारी बस. २ रेल्वेचा डबा. ३ घोड्यांनी ओढायची गाडी, घोडागाडी.

coach^2 /कउच्/ *क्रि* [*सक*] एखाद्याला परीक्षेसाठी शिकवणे किंवा खेळासाठी तयार करणे, खेळाचे किंवा परीक्षा देण्याचे प्रशिक्षण देणे किंवा त्याचा सराव देणे. **coach** *ना* [*गण*]

संघाला किंवा व्यक्तीला शिक्षण देणारा माणूस, प्रशिक्षक, वस्ताद, गुरू.

coagulate /कउ'ॲग्युलेइट्/ *क्रि* [*अक, सक*] द्रवाचे अर्धवट घट्ट अशा पदार्थात रूपांतर होणे, विरजणे, साकळणे, दाटणे, किलाटन होणे, किलाटणे.

coal /कउल्/ *ना* [*गण, अगण*] एक काळ्या रंगाचे आणि जळणासाठी वापरले जाणारे खनिज (किंवा त्याचा तुकडा), खाणीतील कोळसा, दगडी कोळसा. **'coal-face** *ना* [*गण*] कोळशाच्या खाणीतील कोळसा जेथून कापून काढला जातो असा पृष्ठभाग. **'coal-field** *ना* [*गण*] कोळशाच्या खाणीचा प्रदेश. **'coal-mine** *ना* [*गण*] जमिनीखालची कोळसा खोदून काढण्याची जागा, कोळशाची खाण. **'coal-miner** *ना* [*गण*] कोळशाच्या खाणीत कोळसा खोदून काढण्याचे काम करणारा माणूस, कोळशाच्या खाणीतील कामगार, खाण-कामगार.

coalesce /,कउ·अ'लेस्/ *क्रि* [*अक*] (*औप*) एकत्र येऊन मिळणे, संगम होणे, मिलाफ होणे.

coalition /,कउ·अ'लिश्न्/ *ना* [*गण*] राजकीय पक्षांनी काही खास कारणासाठी एकत्र येणे, जूट, संयोग, युती.

coarse /कॉऽस्/ *वि* **(~r, ~st)** १ जाडाभरडा, खरखरीत; तलम नसणारा. २ उद्धट, उद्दाम आणि असभ्य, रासवट, घिसाड्या, ग्राम्य. **coarsely** *क्रिवि* उद्धटपणे, जंगलीपणाने. **coarsen** /'कॉऽस्न्/ *क्रि* [*अक, सक*] खरबरीत होणे/करणे. **coarseness** *ना* [*अगण*] खरबरीतपणा, धोबडपणा, रांगडेपणा, ग्राम्यता.

coast /कउस्ट्/ *ना* [*गण*] १ समुद्रालगतची जमीन, समुद्रकाठ, समुद्रतीर, समुद्रकिनारा. २ (*वाक्प्र*) **the ,coast is 'clear** (*अनौप*) दुसऱ्याला दिसण्याची किंवा पकडले जाण्याची भीती नाही. **coast** *क्रि* [*अक*] उतारावरून आपोआप, शक्ती खर्च न करता जाणे, घरंगळणे. **coastal** *वि* किनाऱ्यावरचा, किनारपट्टीतील, समुद्रपट्टीय. **'coastguard** *ना* [*गण, तसेच ब.व क्रियापदासह अे.व*] किनाऱ्यावर गस्त घालणारा पोलीस किंवा पोलीसांची तुकडी. **'coastline** *ना* [*गण*] समुद्र किनारपट्टी, समुद्रकिनाऱ्याची रेखा.

coat /कउट्/ *ना* [*गण*] १ वरून घालायचा बाह्या असलेला आणि बहुधा पुढून गुंड्यांनी बंद करायचा एक कपडा, कोट. २ जनावराच्या अंगावरील केस किंवा मऊ लव. ३ पृष्ठभागावर द्यायचा थर, हात : *~ of paint, रंगाचा हात.* **coat** *क्रि* [*सक*] थर किंवा आवरण देऊन एखादी गोष्ट झाकणे. **'coat-hanger** *ना* [*गण*] कपडे लावण्यासाठी खांद्याच्या आकाराची वक्राकार धातूची किंवा लाकडाची पट्टी. **coating** *ना* [*गण*] पातळ थर, पातळ हात, अवगुंठन. **,coat of 'arms** *ना* [*गण*] सरदार घराणे किंवा एखादे प्रसिद्ध नगर यांनी मानचिन्ह म्हणून वापरायची ढालीवरील नक्षी, ढालीवरील कुलमानद्योतक चिन्ह.

coax /कउक्स्/ *क्रि* [*सक*] १ हळूहळू किंवा कलाकलाने एखाद्याचे मन वळवणे, गोंजारून आळवणे, लाडीगोडी लावणे. २ (*क्रिब*) **coax sth out of/from sb** आर्जव करून किंवा लाडीगोडी लावून एखादी गोष्ट मिळवणे, बाबापुता करून पदरात पाडणे.

cob /कॉब्/ *ना* [*गण*] १ आखूड पायांचा दमदार घोडा, तट्टू, याबू. २ हंस पक्ष्यातील नर. ३ = CORN-COB (CORN^1).

cobble^1 /'कॉब्ल्/ (तसेच **'cobble-stone**) *ना* रस्त्यावर पसरण्यात येणारे गोलाकार खडे, खडी. **cobbled** *वि* वाटोळ्या गोट्यांनी केलेला.

cobble^2 /'कॉब्ल्/ *क्रि* (*क्रिब*) **cobble sth together** कसेबसे घाईने एकत्र करणे, कसाबसा घडविणे.

cobbler /'कॉब्ल(र्)/ *ना* [*गण*] बूट दुरुस्त करणारा, चांभार, मोची.

cobra /'कउब्र/ *ना* [*गण*] भारत आणि आफ्रिकेत आढळणारा विषारी सर्प, नाग, भुजंग.

cobweb /'कॉब्वेब्/ *ना* [*गण*] कोळ्याचे जाळे, कोळीष्टक.

cocaine /कउ'केइन्/ *ना* [*अगण*] व्यसनाधीन माणसाने नशेसाठी घेतलेले मादक द्रव्य, एक उत्तेजक पदार्थ.

cock^1 /कॉक्/ *ना* [*गण*] नर पक्षी – विशेषतः कोंबडा.

cock^2 /कॉक्/ *ना* [*गण*] १ नळीतून येणाऱ्या

द्रवपदार्थाचा ओघ नियंत्रित करणारी झडप, नळ. २ बंदुकीची तरफ, बंदुकीचा घोडा, चाप.

cock^3 /कॉक्/ *क्रि* [*सक*] १ उभे करणे, टवकारणे : *The horse ~ed its ears, घोड्याने कान टवकारले.* २ गोळी झाडण्यासाठी बंदुकीचा घोडा ओढणे. ३ (*क्रिब*) **cock sth up** (*ब्रि अनौप*) एखादी गोष्ट बिघडवणे, बोऱ्या करणे, बट्ट्याबोळ करणे, वाट लावणे. **'cock-up** *ना* [*गण*] (*ब्रि अनौप*) घोडचूक करणे.

cockatoo /,कॉक'टू/ *ना* [*गण*] (*ब.व* ~s) मोठा तुरा असलेला एक पोपट.

cockerel /'कॉकरल/ *ना* [*गण*] तरुण कोंबडा.

cock-eyed /'कॉक् आइड्/ *वि* (*अनौप*) १ सरळ नसणारा; वक्र, तिरका. २ मूर्खपणाचा, वेडपट : *a ~ plan, वेडगळ योजना.*

cockle /'कॉकल्/ *ना* [*गण*] कठीण कवचाचा एक खावयाचा लहान जलचर, शिंपलीतील मासा.

cockney /'कॉक्नि/ *ना* (क) [*गण*] लंडनचा – विशेषतः लंडनच्या पूर्वभागातला – रहिवासी (बहुधा कामगार वर्गातील). (ख) [*अगण*] या रहिवाशांची (इंग्रजी) बोली.

cockpit /'कॉक्पिट्/ *ना* [*गण*] लहान वायुवाहनातील वैमानिकाची बसायची जागा.

cockroach /'कॉक्रउच्/ *ना* [*गण*] विशेषतः दमट जागी राहणारा गडद तपकिरी रंगाचा एक किडा, झुरळ.

cocksure /,कॉक्'शॉऽ(र्); *अमे* -'शुअर/ *वि* (*अनौप*) फाजील आत्मविश्वासपूर्वक, अवाजवी खात्रीचा.

cocktail /'कॉक्टेइल/ *ना* [*गण*] १ मद्यमिश्रण. २ फळांचे किंवा खेकडा वगैरे सारख्या मृदुकाय कवची जलचरांच्या मांसाचे मिश्रण : *a ,prawn '~, कोळंबीचे मिश्रण.*

cocky /'कॉकि/ *वि* (**-ier, -iest**) (*अनौप*) फाजील आत्मविश्वास असणारा, शिष्ट, भापर.

cocoa /'कउकउ/ *ना* (क) [*अगण*] कडवट चॉकलेटसारख्या चवीची तपकिरी पावडर. (ख) [*अगण, गण*] कोकोचे गरम पेय.

coconut /'कउकनट्/ *ना* [*गण*] शेंड्या असलेले कठीण कवचाचे आणि आत खायचा गर आणि दुधी रंगाचे पाणी असलेले एक मोठे फळ, नारळ.

cocoon /क'कून्/ *ना* [*गण*] कोशाच्या अवस्थेत असताना स्वतःच्या सुरक्षिततेसाठी कीटक-अळीने तयार केलेले रेशमी आवरण, अंडकोश, पिलवकोश, रेशमी कोश.

cod /कॉड्/ *ना* (क) [*गण*] (*ब.व* **cod**) मोठा समुद्रमासा. (ख) [*अगण*] याचे (अन्न म्हणून खाल्ले जाणारे) मांस.

coddle /'कॉड्ल/ *क्रि* [*सक*] एखाद्याला खूप ममतेने वागविणे, मायेने सांभाळणे, लाड करणे.

code /कउड्/ *ना* १ [*गण*] नियमावली आणि तत्त्वप्रणाली, धर्म : *a ~ of behaviour, वागणुकीचे नियम, आचारधर्म.* २ [*गण, अगण*] शब्द किंवा अक्षरांऐवजी दुसरेच शब्द किंवा अक्षरे वापरून लिहायची गुप्त लेखन-पद्धती, सांकेतिक लिपी, गुप्त लिपी : *break the ~ the enemy use to send messages, शत्रूने संदेश पाठविण्यासाठी वापरलेली गुप्त लिपी उलगडणे किंवा गुप्त लेख वाचणे, सांकेतिक भाषेतला मजकूर वाचणे.* ३ [*गण*] यंत्राद्वारे संदेश पाठविण्यासाठी वापरली जाणारी चिन्ह-व्यवस्था, सांकेतिक लिपी. **code** *क्रि* [*सक*] सांकेतिक भाषेत लिहिणे, सांकेतिक भाषा तयार करून त्यात लिहिणे.

coed /,कउ'अेड्/ *ना* [*गण*] (विशेषतः *अमे अनौप*) सहशिक्षण देणाऱ्या कॉलेजमधील विद्यार्थिनी, मुलामुलींच्या महाविद्यालयातील मुलगी. **coed** *वि* (*अनौप*) सहशिक्षणविषयक.

coeducation /,कउअेजु'कइश्न्/ *ना* [*अगण*] मुलामुलींना एकत्रपणे देण्यात येणारे शिक्षण, सहशिक्षण. **coeducational** *वि* सहशिक्षणविषयक, सहशिक्षणाचा.

coerce /कउ'अऽस्/ *क्रि* [*सक*] (*औप*) एखादी गोष्ट करण्याची एखाद्याला सक्ती करणे, बळजबरी करणे, करायला लावणे. **coercion** /-'अऽश्न्; *अमे* -'अऽझ्न्/ *ना* [*अगण*] सक्ती, बळजबरी. **coercive** *वि* सक्तीचा, बळजबरीचा.

coexist /,कउइग्'झिस्ट्/ *क्रि* [*अक*] एकाच वेळी किंवा एकाच ठिकाणी (अस्तित्वात) असणे, एकत्र नांदणे. **coexistence** *ना* [*अगण*] (देशांबाबत) सहजीवन : *peaceful ~*

शांततामय सहजीवन.

coffee /'कॉफि; *अमे* 'कॉऽफि/ *ना* (क) [*अगण*] कॉफीच्या झाडाच्या बिया (किंवा त्यांची भाजून केलेली भुकटी). (ख) [*अगण, गण*] कॉफीच्या पावडरीत गरम पाणी घालून केलेले पेय, पिण्याची गरम कॉफी.

coffer /'कॉफ(र्)/ *ना* १ [*गण*] पैसे ठेवायची मोठी जाड पेटी, पैशाची संदूक, खजिन्याची पेटी. २ **coffers** [*ब.व*] (*औप*) पैशाचा साठा, खजिना, कोशागार, धनसंचय.

coffin /'कॉफिन्/ *ना* [*गण*] प्रेत पुरताना किंवा जाळताना ज्यात ठेवले जाते ती पेटी, शवपेटी.

cog /कॉग्/ *ना* [*गण*] १ दुसऱ्या चाकाच्या दात्यांना फिरविणाऱ्या एखाद्या चाकाच्या दात्यांतील एक दाता, चाकाचा दात. २ (*वाक्प्र*) **a cog in a ma'chine** मोठ्या संघटनेतील कमी महत्त्वाचा पण आवश्यक असा माणूस. **'cog-wheel** *ना* [*गण*] कडेला दाते असणारे चाक.

cogent /'कउजन्ट्/ *वि* (*औप*) (विवेचन, कारणमीमांसा वगैरेबाबत) भक्कम, सबळ; खात्री पटवणारे, पटणारे.

cognac /'कॉन्यॅक्/ *ना* [*अगण*] एक प्रकारची ब्रॅण्डी, मद्याचा एक प्रकार.

cohabit /कउ'हॅबिट्/ *क्रि* [*अक*] (*औप*) (विवाह न झालेल्या जोडप्याविषयी) नवरा-बायकोसारखे राहणे, सहसंग करणे. **cohabitation** /,कउहॅबि'टेइशन्/ *ना* [*अगण*] सहवास, सहसंग, एकत्र राहणे, अविवाहित सहजीवन.

cohere /कउ'हिअ(र्)/ *क्रि* [*अक*] (*औप*) १ एखादे वस्तुमान म्हणून किंवा एखाद्या भारात एकमेकाला चिकटून राहणे, एकवटून राहणे, संसंग करणे. २ (कल्पना वगैरेबाबत) तार्किक सुसूत्रता किंवा सुसंगती असणे, तर्कनिष्ठ गुंफण असणे. **coherent** /-'हिअरन्ट्/ *वि* (कल्पना, भाषण वगैरेबाबत) संगतवार, तर्कसुसंगत, तार्किक सुसूत्रता असणारा; स्पष्ट आणि सुबोध, स्वच्छ आणि समजायला सोपे. **coherence** /-रन्स्/ *ना* [*अगण*] एकवटलेपणा; सुसंगती, सुसूत्रता. **coherently** *क्रिवि* संगतवार, तार्किक सुसूत्रतेने; स्पष्टपणे.

cohesion /कउ'हीझन्/ *ना* [*अगण*] चिकटून राहण्याचा कल, संसक्ती, संलग्नता, संसंग; एकी, एकता. **cohesive** /-'हीसिव्ह्/ *वि* चिकटणारा, संलग्नशील, सुसंगत.

coil /कॉइल्/ *क्रि* [*अक, सक*] गोलाकार गुंडाळणे, वेटोळे घालणे. **coil** *ना* [*गण*] १ दोरीची वगैरे केलेली गुंडाळी. २ एक वलय किंवा वेटोळा, वेढा, वळे. ३ गर्भारशी राहू नये म्हणून स्त्रीच्या गर्भाशयात घातलेली चकती, लूप.

coin /कॉइन्/ *ना* [*गण*] पैसा म्हणून वापरण्यात येणारा धातुचा तुकडा, नाणे. **coin** *क्रि* [*सक*] १ नाणी तयार करणे, नाणे पाडणे. २ (नवीन शब्द) तयार करणे किंवा बनवणे. **coinage** /'कॉइनिज्/ *ना* [*अगण*] एखाद्या देशातील चलनी नाणी.

coincide /,कउ·इन्'साइड्/ *क्रि* [*अक*] १ (घटनांबाबत) एकाच वेळी घडणे. २ (मते किंवा कल्पनांबाबत) समान असणे, सारखे असणे. ३ (वस्तूंबाबत) तेवढीच जागा व्यापणे, एकसंपाती असणे.

coincidence /कउ'इन्सिडन्स्/ *ना* [*गण, अगण*] दोन-तीन गोष्टी योगायोगाने एकाच वेळी घडणे (किंवा तसा घडण्याचा प्रसंग), योगायोग, संपात : *It was pure ~ that we were both travelling on the same plane, अगदी योगायोगाने आम्ही दोघे एकाच विमानाने प्रवास करत होतो.* **coincidental** /कउ,इन्सि'डेन्ट्ल्/ *वि* योगायोगाचा, अवचितपणाचा.

coke /कउक्/ *ना* [*अगण*] दगडी कोळशातील वायुरूप पदार्थ काढून घेतल्यानंतर उरलेला आणि इंधन म्हणून वापरायचा पदार्थ.

colander (तसेच **cullender**) /'कॅलन्ड(र्)/ *ना* [*गण*] अन्नातील पाणी काढून टाकण्यासाठी खूप भोके असलेला कुंड्या, रोळी.

cold^{1} /कउल्ड्/ *वि* १ नीच तपमानाचा, थंड, शीत. २ (अन्नाबाबत) गरम नसलेले, गार, थंड. ३ स्नेहपूर्ण नसलेला, स्नेहशून्य, थंड, भावनाशून्य : *a ~ stare/welcome, थंड दृष्टिक्षेप, थंडे स्वागत.* ४ बेशुद्ध : *knock sb out ~, एखाद्याला ठोसा देऊन बेशुद्ध पाडणे.* ५ (*वाक्प्र*) **get/have cold 'feet** (*अनौप*) एखादी गोष्ट करण्यास घाबरणे, कचरणे. **give sb/get the cold 'shoulder**

एखाद्याला स्नेहशून्य रीतीने किंवा कोरडेपणाने वागवणे, थंडपणे वागणे/अशा रीतीने वागविले जाणे. **in cold 'blood** जाणूनबुजून निर्दयपणे आणि मनाला काही न वाटता, निर्घृणपणे: *kill sb in ~ blood, एखाद्याचा निर्घृण खून करणे, अमानुषपणे खून करणे.* **pour/throw cold 'water on sth** एखाद्या गोष्टीबाबत निरुत्साह दाखवणे, उत्साहभंग किंवा नाउमेद करणे. **,cold-'blooded** *वि* १ (प्राण्यांबाबत) हवामानानुसार रक्ताचे तपमान बदलणारा, शीतरक्त (असणारा). २ निर्दयी; निष्ठूर, क्रूर. **,cold-'hearted** *वि* निर्दयी, पाषाण हृदयी, उलट्या काळजाचा. **coldly** *क्रिवि* थंडपणे, कोरडेपणाने, भावनाहीनतेने. **coldness** *ना* [*अगण*] गारवा, थंडपणा, कोरडेपणा, भावशून्यता. **,cold 'war** *ना* [*अे.व*] राष्ट्राराष्ट्रांतील प्रत्यक्ष युद्ध न करता होणारा तीव्र राजकीय संघर्ष, शीतयुद्ध.

cold^2 /कउल्ड्/ *ना* १ [*अगण*] कमी तपमान, थंडी. २ [*गण, अगण*] नाक किंवा घसा यांचा आजार, सर्दी. ३ (*वाक्प्र*) **(be left) out in the 'cold** दुर्लक्षित राहणे, उपेक्षित राहणे, बाजूला टाकले जाणे.

coleslaw /'कउल्स्लॉऽ/ *ना* [*अगण*] बारीक चिरलेली किंवा किसलेली कच्ची कोबी, गाजरे वगैरेत अंड्याचा पिवळा भाग आणि तेल यापासून बनविलेला मेयनेझ सॉस मिसळून तयार केलेला कोशिंबिरीसारखा पदार्थ.

colic /'कॉलिक्/ *ना* [*अगण*] जठर आणि आतडी यात होणारी तीव्र वेदना, पोटशूल, पोटसूळ.

collaborate /क'लॅबरेइट्/ *क्रि* [*अक*] १ एकत्र काम करणे, सहभाग असणे, साथ देणे. २ (*with*)// शत्रूला मदत करणे. **collaboration** /क'लॅब'रेइश्न्/ *ना* [*अगण*] सहभाग. **collaborator** *ना* [*गण*] सहभागी व्यक्ती, साथीदार, जोडीदार.

collage /'कॉलाझ; *अमे* क'लाझ/ *ना* [*गण*] कागद, कापड वगैरेचे तुकडे चिकटवून तयार केलेले चित्र.

collapse /क'लॅप्स्/ *क्रि* १ [*अक*] एकाएकी खाली पडणे किंवा येणे, कोसळणे: *The building ~ed in the earthquake, भूकंपात ती इमारत कोसळली.* २ [*अक*] आजाराने किंवा अतिश्रमाने खाली पडणे (आणि शुद्ध हरपणे), एकदम बसणे, कोसळणे. ३ [*अक*] अचानक पूर्णतया मोडून पडणे, ढासळणे. ४ [*अक, सक*] सरळ छोटी घडी होणे किंवा करणे, मिटणे: *The table ~s to fit into the cupboard, टेबल खाली पाडून आत कपाटात घालता येते.* **collapse** *ना* [*अे.व*]: *the ~ of the company, कंपनी मोडकळीस येणे, कंपनीचा ऱ्हास.* **collapsible** *वि* घडी घालून पाडता येण्याजोगा (बांधून ठेवण्यासाठी वगैरे), उघडता-मिटता.

collar /'कॉल(र्)/ *ना* [*गण*] १ मानेभोवतालचा कपड्याचा भाग, गळपट्टी. २ कुत्रा किंवा एखाद्या दुसऱ्या प्राण्याच्या गळ्यात घालायचा चामड्याचा पट्टा, तोक. **collar** *क्रि* [*सक*] पकडणे, घट्ट धरणे, गाठणे. **'collarbone** *ना* [*गण*] वक्षास्थी आणि स्कंधफलक यांना जोडणारे हाड किंवा अस्थी, अक्षक, जत्रु, सरीचे हाड.

collate /क'लेइट्/ *क्रि* [*सक*] तपासणीसाठी आणि तुलनेसाठी (माहिती) गोळा करून संकलन करणे आणि पडताळून पाहणे.

collateral /क'लॅटरल्/ *ना* [*अगण*] कर्जासाठी तारण म्हणून घेतलेली संपत्ती किंवा मालमत्ता, सांपार्श्विक हमी.

colleague /'कॉलीग्/ *ना* [*गण*] बरोबर काम करणारा माणूस, सहकारी.

collect /क'लेक्ट्/ *क्रि* १ [*अक, सक*] एकत्र होणे, एकत्र करणे, जमा होणे, जमा करणे, गोळा होणे, गोळा करणे: *~ the empty glasses, रिकामे ग्लास एकत्र करणे* ○ *A crowd ~ed at the scene of the accident, अपघाताच्या जागी गर्दी गोळा झाली.* २ [*अक*] (तिकिटे वगैरे) छंद म्हणून जमवणे, जमा करणे. ३ [*अक, सक*] (*for*)// एखाद्या गोष्टीसाठी/व्यक्तीसाठी अनेक लोकांकडून वर्गणी गोळा करणे, निधी जमवणे: *~ money for charity, धर्मादायसाठी पैसे जमवणे.* ४ [*सक*] आणणे, घेऊन येणे: *~ a child from school, शाळेतून मुलाला घरी आणणे.* ५ [*सक*] स्वतःचा किंवा स्वतःच्या विचारांचा तोल सावरणे, मन आवरणे. **collect** *वि, क्रिवि* (*अमे*) (टेलिफोन

कॉलबाबत) फोन घेणाऱ्याने पैसे भरायचे अशी व्यवस्था असलेला. **collected** *वि* शांत आणि संयमी, स्थिरचित्त, स्थिरबुद्धी. **collection** /क'लेक्श्न्/ *ना* १ [*अगण*] मिळवणे, गोळा करणे. २ [*गण*] वस्तूंचा मिळवलेला संचय, संग्रह. ३ [*गण*] जमवलेला निधी. **collective** *वि* एखाद्या गटाचा किंवा समाजाचा, सामुदायिक; सहभागी. **collectively** *क्रिवि* सर्व मिळून, एकत्रितपणे; एकवटून. **collector** *ना* [*गण*] गोळा करणारा माणूस, संग्राहक : *a 'ticket-~or, तिकिटे गोळा करणारा.*

college /'कॉलिज्/ *ना* [*गण*] १ उच्च शिक्षण देणारी संस्था; विद्यापीठाचा भाग, महाविद्यालय. २ व्यावसायिक लोकांचा संघटित गट, सभा, समाज : *the Royal C~ of Surgeons, शल्यचिकित्सकांचे रॉयल कॉलेज.*

collide /क'लाइड्/ *क्रि* [*अक*] (*with*)// १ (गतिमान वस्तू किंवा लोकांबाबत) एकमेकांवर आपटणे, आदळणे, एखाद्या गोष्टीला धडकणे, टक्कर होणे. २ विरुद्ध असणे, संघर्ष होणे.

collier /'कॉलिअ(र्)/ *ना* [*गण*] खाण-कामगार.

colliery /'कॉलिअरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) कोळशाची खाण.

collision /क'लिझ्न्/ *ना* [*गण, अगण*] आपटण्याची घटना, धडक, टक्कर.

colloquial /क'लउक्विअल्/ *वि* (शब्द, शैली वगैरेबाबत) रोजच्या संभाषणास योग्य, बोलभाषेचा, बोलीभाषेचा; ग्रांथिक किंवा औपचारिक नसलेला. **colloquialism** *ना* [*गण*] बोलीभाषेतला शब्द किंवा शब्दप्रयोग. **colloquially** *क्रिवि* बोलीभाषेत, बोलभाषेमधे.

collude /क'लूड्/ *क्रि* [*अक*] (*with*)// (*औप*) एखाद्याबरोबर चोरून आणि लबाडीने काम करणे, संगनमत करणे. **collusion** /क'लूझ्न्/ *ना* [*अगण*] संगनमत.

colon^1 /'कउलन्/ *ना* [*गण*] (:) हे विरामचिन्ह, द्विबिंदुचिन्ह.

colon^2 /'कउलन्/ *ना* [*गण*] मोठ्या आतड्याचा शेवटचा भाग, बृहदांत्र, ग्रहणी, मलमार्ग, स्थूलांत्र.

colonel /'कऽन्ल्/ *ना* [*गण*] लष्करातील किंवा अमेरिकन वायुदलातील मध्यम श्रेणीचा अधिकारी.

colonial /क'लउनिअल्/ *वि* वसाहतीचा, देशशाखेचा, वसाहती. **colonial** *ना* [*गण*] वसाहतीतला मनुष्य. **colonialism** *ना* [*अगण*] देशाच्या वसाहती स्थापण्याचे धोरण, वसाहतवाद. **colonialist** *ना* [*गण*], *वि* वसाहतवादी.

colonist /'कॉलनिस्ट्/ *ना* [*गण*] एखाद्या जागी जाऊन स्वतःची वसाहत करणारा माणूस, वसाहत करणारा, वसाहतकार.

colonize /'कॉलनाइझ्/ *क्रि* [*सक*] एखाद्या जागी वसाहत करणे, स्वतःच्या देशाची शाखा वसवणे. **colonization** /,कॉलनाइ'झ़ेइश्न्; *अमे* -नि'झ़े-/ *ना* [*अगण*] वसाहत वसविणे, वसाहतीकरण.

colonnade /,कॉल'नेइड्/ *ना* [*गण*] खांबांची रांग, स्तंभावली.

colony /'कॉलनि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) १ दुसऱ्या देशातून आलेल्या लोकांनी एखाद्या देशात केलेले वास्तव्य आणि बसविलेली सत्ता, वसाहत, राज्यशाखा. २ समान हितसंबंध असणाऱ्या आणि एकाच ठिकाणी राहणाऱ्या लोकांचा गट, वसाहत, वस्ती, वाडी किंवा वाडा.

color (*अमे*) = COLOUR^{1,2}.

colossal /क'लॉस्ल्/ *वि* खूप मोठा, प्रचंड, भव्य, विशाल, विराट.

colossus /क'लॉसस्/ *ना* [*गण*] (*ब.व* **-lossi** /-लॉसाइ/ किंवा **-es**) १ भव्य मूर्ती, मोठा पुतळा. २ मोठ्या आकाराचा, मोठे महत्त्व असलेला वगैरे माणूस, बडा माणूस, बडे प्रस्थ, धेंड.

colour^1 /'कैल(र्)/ *ना* १ (**क**) [*अगण*] वेगवेगळ्या तरंगलांबीचा प्रकाश परावर्तित झाल्यामुळे दिसणारे एखाद्या गोष्टीचे स्वरूप किंवा दृश्य रंग. (**ख**) [*गण*] असे विशिष्ट रूप म्हणजेच लालपण, हिरवेपण वगैरे, रंग. २ [*अगण*] कातडीचे दृश्य रूप म्हणजेच कातडीचा रंग, वर्ण. ३ **colours** [*ब.व*] (**क**) संघ, शाळा वगैरेचे सभासदत्व दाखविणारे (कपड्यावर लावायचे) चिन्ह, बॅज, बिल्ला. (**ख**) निशाण, ध्वज, झेंडा. ४ [*गण*] आकर्षक

तपशील; कुतुहल जागवणारे किंवा चित्तवेधक असे काही. ५ (*वाक्प्र*) **off colour** (*अनौप*) बरे नसलेला; आजारी. **with ˌflying ˈcolours** अतिशय यशस्वीरीत्या, नेत्रदीपक पद्धतीने (मिळवणे). **ˈcolour bar** *ना* [*गण*] काही वंशाच्या लोकांना – विशेषतः कृष्णवर्णीय लोकांना – वेगळी वागणूक देणे, वर्णभेद, वर्णरोध. **ˌcolour-ˈblind** *वि* रंगांतील फरक न दिसणारा, रंगांधळा, रंगांध. **colourful** *वि* १ उठावदार रंगाचा, रंगीबेरंगी. २ रम्य आणि कुतुहल वाढवणारा, उत्सुकता वाढवणारा. **colourless** *वि* १ रंगहीन. २ रटाळ आणि कंटाळवाणा, रद्दड. **ˈcolour supplement** *ना* [*गण*] (*ब्रि*) रविवारच्या वर्तमानपत्रांबरोबर फुकट येणारी, रंगीत चित्रे असेलेली पुरवणी, रंगीत पुरवणी.

colour^{2} /ˈकॅल(र्)/ *क्रि* १ [*सक*] रंग देणे. २ [*अक*] लाजणे. ३ [*सक*] परिणाम होणे, प्रभाव पाडणे. ४ (*क्रिब*) **colour sth in** (चित्रात वगैरे) रंग भरणे. **coloured** *वि* १ (उल्लेख केलेला) रंग असलेला, (विशिष्ट) रंगाचा, -रंगी; केवळ कृष्णधवल नसलेला. २ पांढरी कातडी नसलेल्या वंशाचा, गौरवर्णीय नसलेला. **colouring** *ना* १ [*अगण*] (क) एखाद्या गोष्टीचे रंग. (ख) एखाद्याच्या कातडीचा रंग, एखाद्याचा वर्ण. २ [*गण, अगण*] अन्नपदार्थांना रंग देणारे द्रव्य, खायचा रंग.

colt /कउल्ट्/ *ना* [*गण*] जवान घोडा, शिंगरू.

column /ˈकॉलम्/ *ना* [*गण*] १ (क) इमारतीला आधार देणारा किंवा स्वतंत्र उभा केलेला खांब, स्तंभ. (ख) खांबाच्या आकाराचे काही : *a ~ of smoke, धुराचा लोंढा किंवा लोट.* २ मोठ्या रांगेने चाललेले लोक, माणसांची फळी. ३ (क) वर्तमानपत्रातील लेख, स्तंभ. (ख) छापलेल्या पानावरचा उभा विभाग, रकाना. **columnist** /-निस्ट्/ *ना* [*गण*] वृत्तपत्रात लिहिणारा स्तंभलेखक.

coma /ˈकउम/ *ना* [*गण*] गाढ बेशुद्धावस्था, निश्चेतनावस्था.

comb /कउम्/ *ना* [*गण*] १ केस विंचरण्यासाठी असलेली धातूची किंवा प्लॅस्टिकची दात असलेली पट्टी, कंगवा, फणी. २ [बहुधा *ए.व*] विंचरणे : *give one's hair a ~, केस विंचरणे, केसावरून कंगवा फिरवणे.* ३ [*गण, अगण*] = HONEYCOMB (HONEY). **comb** *क्रि* [*सक*] १ कंगव्याने (केस) विंचरणे. २ कसून शोध घेणे, विंचरून काढणे, पिंजून काढणे.

combat /ˈकॉम्बॅट/ *ना* [*गण, अगण*], *क्रि* [*अक, सक*] लढणे, युद्ध करणे; संघर्ष. **combatant** /-बटन्ट्/ *ना* [*गण*] लढणारा माणूस, लढवय्या, योद्धा. **combatant** *वि* लढाईचा, लढणारा.

combination /ˌकॉम्बिˈनेइश्न्/ *ना* १ [*गण*] एकत्रित आलेले किंवा एकत्र केलेले लोक किंवा वस्तू, संयोग : *a ~ of traditional and modern architecture, जुन्या आणि नव्या वास्तुकलांचा संयोग.* २ [*अगण*] एकत्र करण्याची कृती, संयोग, सम्मीलिनीकरण. ३ [*गण*] सेफ वगैरे उघडण्यासाठी आवश्यक असलेली अंक किंवा अक्षरे यांची माला, कुलूप उघडण्यासाठीचा नंबर किंवा अक्षरे.

combine^{1} /कम्ˈबाइन्/ *क्रि* [*अक, सक*] एकत्र करणे, मिसळणे, संयोग होणे.

combine^{2} /ˈकॉम्बाइन्/ *ना* [*गण*] एकत्र काम करणाऱ्या लोकांचा किंवा औद्योगिक संस्थांचा गट, संयुक्त संघ. **ˌcombine ˈharvester** *ना* [*गण*] धान्य कापायचे आणि झोडायचे यंत्र.

combustible /कम्ˈबॅस्टब्ल्/ *वि* सहजपणे पेट घेऊन जळणारा, ज्वालाग्रही, ज्वलनशील, जळाऊ.

combustion /कम्ˈबॅस्चन्/ *ना* [*अगण*] ज्वलनाची प्रक्रिया, ज्वलनक्रिया, ज्वलन.

come /कॅम्/ *क्रि* (*भूत* **came** /केइम्/, *भूत वि* **come**) [*अक*] १ (क) बोलणाऱ्याकडे किंवा तो ज्या ठिकाणी बोलावितो आहे त्याकडे जाणे, येणे : *~ and talk to me, माझ्याकडे ये आणि बोल.* (ख) आगमन होणे, येणे. २ विशिष्ट अंतराचा प्रवास करणे, प्रवासात विशिष्ट अंतर कापणे : *We've ~ thirty miles since lunch, जेवणानंतर आतापर्यंत आपण तीस मैल अंतर कापलंय.* ३ पोहोचणे, ठेपणे; पसरणे : *The path ~s right up to the gate, रस्ता अगदी दारापर्यंत येतो.* ४ घडणे; उद्भवणे : *Christmas ~s once a year, वर्षाकाठी एकदा नाताळ येतो.* ५ असणे, अस्तित्वात असणे;

मिळणे, उपलब्ध होणे: *This dress ~s in several different colours, हा पोषाख अनेक वेगळ्या रंगांत मिळतो.* ६ होणे: ~ *loose, ढिले होणे, सैल होणे.* ७ *to*// सुरू होणे, व्हायला लागणे: ~ *to realize the truth, सत्य कळायला सुरुवात होणे.* ८ *to/into*// एखाद्या अवस्थेला येऊन ठेपणे: ~ *to an end, शेवटाला येणे, संपत येणे.* ९ (*वाक्प्र*) **come to grips with sth** ➪ GRIP. **come to a 'head** ➪ HEAD^1. **come loose** ➪ LOOSE. **come to nothing** अयशस्वी होणे, विफल होणे. **come out into the open** ➪ OPEN^1. **come what may** काहीही होवो, काय वाटेल ते घडो. **how come (. . .)?** (*अनौप*) (. . . हे) कसं काय घडलं? (. . . हे) कसं काय? **to come** भविष्यकाळात, पुढील काळात: *for several years to ~, पुढे येणाऱ्या कित्येक वर्षांत.* १० (*क्रिव*) **come a'bout** होणे, घडणे. **come across sb/sth** योगायोगाने सापडणे किंवा भेटणे, नशिबाने येणे. **come a'long** (क) आगमन होणे: *When the right job ~s along, she'll take it, योग्य नोकरी मिळताच ती ती घेईल.* (ख) प्रगती करणे, विकास होणे, सुधारणा होणे: *Her work is coming along nicely, तिचं काम छान चाललंय.* (ग) = COME ON **ग**. **come a'part** तुकडे होणे, फुटणे, भुगा होणे. **come at sb (with sth)** हल्ला करणे, चालून येणे: *He came at me with a knife, तो माझ्यावर चाकू घेऊन चालून आला.* **come 'back** परत येणे. **come 'back (to sb)** आठवणे. **come before sb/sth** कारवाईसाठी एखाद्यापुढे येणे, निर्णय घेण्यासाठी एखादी गोष्ट एखाद्याकडे येणे. **come between A and B** मध्ये येणे, ढवळाढवळ करणे. **'come by sth** मिळणे: *Good jobs are hard to ~ by these days, हल्ली चांगल्या नोकऱ्या मिळणे अवघड आहे.* **come 'down** (क) कोसळणे. (ख) (पाऊस, किंमती वगैरेबाबत) पडणे, खाली येणे. (ग) (एखाद्या गोष्टीच्या बाजूने, विरुद्ध किंवा साठी) निर्णयाप्रत पोहोचणे, निर्णयाला येणे. **come down to sb** (रूढी, कथा वगैरेबाबत) परंपरेने येणे, पिढ्यान् पिढ्या चालत येणे. **come down to sth** (क) एखाद्या बिंदूपर्यंत पोहोचणे, येणे: *Her hair ~s down to her waist, तिचे केस कमरेपर्यंत येतात.* (ख) दुसऱ्या शब्दांत सांगणे: *What it ~s down to is that if your work doesn't improve you'll have to leave, दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर तुझे काम सुधारले नाही तर तुला काम सोडावे लागेल.* **come in** (क) (भरतीबाबत) जमिनीकडे येणे, वाढणे. (ख) चाल पडणे, रूढ होणे, फॅशन येणे. (ग) मिळकत म्हणून येणे, मिळणे. (घ) भाग असणे, एखाद्या गोष्टीत भाग घेण्यास मिळणे: *Where do I ~ in? यात माझा सहभाग काय?* किंवा *यात मी कुठे येतो?* **come in for sth** (शिक्षा, टीका वगैरेचे) लक्ष्य बनणे. **come into sth** वारसाने येणे किंवा मिळणे. **'come of sth** फलित निघणे, परिणाम म्हणून हाती येणे. **come off** (क) काढता येणे, निघणे: *Will these dirty marks ~ off, हे घाण डाग निघतील का?* (ख) होणे, घडणे, येणे: *Did your holiday ~ off?, तुला सुट्टी लागली/ मिळाली का?* (ग) (योजना वगैरेबाबत) यशस्वी होणे, फळ येणे: *The experiment did not ~ off, प्रयोग यशस्वी झाला नाही.* **come off (sth)** (क) तुटणे, निघणे: *The button has ~ off my coat, माझ्या कोटाचे बटण निघालंय.* (ख) घोड्यावरून, सायकलवरून वगैरे पडणे. **come on** (क) (नटाबाबत) रंगभूमीवर प्रवेश करणे, रंगमंचावर पाय ठेवणे. (ख) = COME ALONG **ख**. (ग) (एखाद्याला प्रोत्साहन देताना, चुचकारताना किंवा आव्हान देताना वापरायचे शब्द): *C~ on, if we don't hurry we'll be late, चला, घाई नाही केली तर आपल्याला उशीर होईल.* (घ) (पाऊस, रात्र, आजार वगैरेबाबत) सुरू होणे, येणे: *I think he has a cold coming on, मला वाटते त्याला सर्दी होणार आहे.* **come 'out** (क) दिसू लागणे, दृष्टोत्पत्तीस येणे; येणे, दिसणे: *The rain stopped and the sun came out, पाऊस थांबला आणि सूर्य दिसू लागला.* (ख) बाहेर येणे, दिसून येणे, माहीत होणे; प्रसिद्ध होणे: *The truth came out eventually, यथावकाश सत्य बाहेर पडले.* (ग) (कामगारांबाबत) संप करणे, संपावर जाणे. (घ) छायाचित्रात वगैरे स्पष्ट दिसणे. **come 'out (of sth)** निघणे, जाणे, एखाद्या गोष्टीपासून दूर होणे: *Will the* *stains ~ out? डाग निघतील का?* **come out in sth** एखादी गोष्ट ठिबके किंवा डाग यांनी व्यापणे, फोड, डाग वगैरे पसरणे, त्यांनी फुलणे : *~ out in a rash, अंगावर पुरळ किंवा फोड फुलणे.* **come out with sth** काहीतरी बोलणे किंवा सांगणे, व्यक्त करणे : *~ out with the strangest remarks, अत्यंत विलक्षण प्रतिक्रिया व्यक्त करणे.* **come over** (क) एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी भेटीसाठी जाणे, भेट देणे : *C~ over to Scotland for a holiday, सुट्टीत स्कॉटलंडला या.* (ख) कळणे, समजणे, स्पष्ट होणे : *Your position didn't really ~ over in your speech, तुझ्या बोलण्यातून तुझी भूमिका कळली नाही.* **come over sb** (भावना वगैरेबाबत) ग्रासणे, झपाटणे, काही होणे : *a feeling of dizziness came over him, घेरी आल्यासारखे त्याला झाले.* **come 'round** (क) आडमार्गाने येणे. (ख) भेट देणे : *C~ round to my place for the evening, संध्याकाळी माझ्या घरी चक्कर टाक.* (ग) पुन्हा होणे किंवा घडणे, पुन्हा येणे : *Christmas seems to ~ round quicker every year, दरवर्षी नाताळ फार लवकर लवकर येतो असे वाटते.* (घ) पुन्हा शुद्धीवर येणे. (च) दुसऱ्या एखाद्याची मते, दृष्टीकोन स्वीकारणे, त्याच्या बाजूने होणे, त्याच्याकडे झुकणे. **come 'through** (संदेश, सिग्नल वगैरेबाबत) येणे, पोहोचणे. **come through (sth)** गंभीर आजारातून उठणे किंवा संकटातून सहीसलामत सुटणे, इजा होण्याचे टळणे. **come 'to** = COME ROUND घ. **,come to 'sth** किंमत होणे, एकूण (रक्कम) येणे; एवढे होणे, इतके येणे : *The bill came to £20, बिल वीस पौंडाइतके आले.* **come to sb** एखाद्याला सुचणे : *The idea came to me in a dream, स्वप्नात मला ही कल्पना सुचली.* **come under sth** (क) एखाद्या शीर्षकाखाली येणे, एखाद्या वर्गात मोडणे. (ख) एखाद्या गोष्टीच्या प्रभावाखाली किंवा दबावाखाली वगैरे येणे : *~ under her influence, तिच्या प्रभावाखाली येणे.* **come 'up** (क) (रोपे वगैरेबाबत) जमिनीतून वर येणे, उगवणे, तरारणे. (ख) उल्लेख होणे, चर्चेसाठी वगैरे येणे : *The question hasn't ~ up yet, तो प्रश्न अजून आलाच नाही.* (ग) उपस्थित होणे, घडणे, निर्माण होणे : *A couple of problems have ~ up so I'll be late home from work, (अचानक) काही अडचणी आल्या आहेत त्यामुळे कामावरून घरी यायला मला उशीर होईल.* **come up against sb/sth** (प्रश्न वगैरे) पडणे, (अडचणींना वगैरे) तोंड द्यायला लागणे. **come up (to sth)** एखाद्या गोष्टीपर्यंत पोहोचणे, पातळी, दर्जा, अपेक्षा वगैरे गाठणे : *The water came up to my waist, पाणी माझ्या कमरेपर्यंत आले.* **come up with sth** सापडणे, देणे, तयार करणे : *~ up with a solution, उपाय किंवा उत्तर मिळणे किंवा सापडणे.* **come upon sb/sth** अनपेक्षितपणे मिळणे, अचानक दिसणे, आढळणे : *~ upon a group of children playing, मधेच काही मुले खेळताना आढळणे.* **comeback** *ना* [*गण,* बहुधा *अे.व*] पूर्वीच्या (चांगल्या किंवा मानाच्या) जागी परत येणे, यशस्वी पुनरागमन. **come-down** *ना* [*गण,* बहुधा *अे.व*] सत्ता, प्रतिष्ठा, स्थान वगैरे गमावणे, अधःपात, खाली येणे, घसरगुंडी, घसरण. **coming** *वि* भविष्यातील, आगामी, पुढे येणारा : *in the coming months, पुढे येणाऱ्या महिन्यांत* किंवा *आगामी काळात.* **coming** *ना* १ [*अे.व*] येणे, आगमन : *the coming of spring, वसंत ऋतूचे आगमन.* २ (*वाक्प्र*) **,comings and 'goings** आगमन आणि प्रस्थान, आवक-जावक, ये-जा.

comedian /क'मीडिअन्/ *ना* [*गण*] १ (स्त्री **comedienne** /क,मीडि'एन/) लोकांना हसविणारा कलाकार, विनोदी पात्र, विनोदवीर. २ विनोद निर्माण होईल असे वागणारा, गमत्या.

comedy /'कॉमडि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*गण*] करमणूक करणारे नाटक किंवा तसा चित्रपट, आनंदपर्यवसायी नाटक किंवा चित्रपट, सुखात्मिका. २ [*अगण*] एखाद्या गोष्टीचा करमणुकीचा भाग, गमतीचा भाग.

comet /'कॉमिट्/ *ना* [*गण*] सूर्याभोवती फिरणारा, तेजःपुंज पुच्छ असलेल्या ताऱ्यासारखा एक आकाशगोल, धूमकेतू.

comfort /'कम्फट्/ *ना* १ [*अगण*] वेदनारहित किंवा चिंतारहित अशी स्थिती, सुख, स्वास्थ्य. २ [*अगण*] पीडिताला दाखविलेली सहानुभूती, दया : *words of ~, दिलासा देणारे शब्द,*

आश्वासक शब्द. ३ [*अे.व*] मदत किंवा सुटका करणारी व्यक्ती किंवा वस्तू, दिलासा देणारा. ४ [*गण, बहुधा ब.व*] शारीरिक सुख देऊन जीवन अधिक आनंददायी करणारी वस्तू, सुखसोय, सुखसाधन. **comfort** *क्रि* [*सक*] एखाद्याचे दुःख किंवा चिंता कमी करणे, दुःख हलके करणे, काळजी दूर करणे. **comfortable** /'कैम्फ्टब्ल्; *अमे* -फर्ट-/ *वि* १ शरीराला आराम देणारा : *a ~able chair, आरामदायी खुर्ची.* २ चिंतामुक्त करणारा, निश्चिंत, आरामाचा : *a ~able job, आरामाची नोकरी.* ३ (*अनौप*) सुखवस्तू (कुटुंब), बऱ्यापैकी श्रीमंत, सधन. ४ जरूरीपेक्षा जादा, गरजेहून अधिक. **comfortably** *क्रिवि* सुखाने, सुखासमाधानाने; सुस्थितीत, विनाकाळजी; आरामात.

comic /'कॉमिक्/ *वि* १ लोकांना हसवणारा. २ सुखात्मिकेबाबतचा. **comic** *ना* [*गण*] १ विनोदवीर. २ लहान मुलांचे चित्रातून गोष्टी सांगणारे मासिक, चित्रकथा मासिक, चित्रकथांक. **comical** *वि* लोकांना हसविणारा, हास्योत्पादक, हशा पिकविणारा. **comic 'strip** *ना* [*गण*] करमणूक करणारी गोष्ट सांगणारी चित्रांची साखळी, मनोरंजक कथेची चित्रशृंखला, चित्रपट्टी किंवा चित्रकथा.

comma /'कॉम/ *ना* [*गण*] (,) असे विरामचिन्ह, स्वल्पविराम.

command /क'मान्ड्; *अमे* -मॅन्ड्/ *क्रि* १ [*अक, सक*] आज्ञा देणे, हुकूम सोडणे, फर्मावणे. २ [*सक*] लायकीने मिळवणे किंवा मिळणे : *~ respect, आदर दिला जाणे, इज्जत असणे, मानणे.* ३ [*सक*] देखरेखीखाली असणे, ताब्यात असणे, हुकमतीखाली असणे : *~ a regiment, फलटण हुकमतीखाली असणे म्हणजेच फलटणीचा प्रमुख असणे.* ४ [*सक*] (एखादे स्थळ) स्पष्ट दिसणे, -चा नीट अंदाज येणे : *a ~ing position over the valley, दरी नीट दिसेल अशी जागा.* **command** *ना* १ [*गण*] आज्ञा, हुकूम, समादेश. २ [*अगण*] ताबा, वर्चस्व; आधिपत्य : *In ~ of a ship, जहाजाचे आधिपत्य.* ३ **Command** [*गण*] सैन्याचा किंवा हवाईदलाचा एक भाग, उपविभाग. ४ [*अगण, अे.व*] एखादी गोष्ट वापरण्याचे कौशल्य, प्रभुत्व, वाकबगारी : *a good ~ of French, फ्रेंचवरील प्रभुत्व.*

commandant /,कॉमन्'डॅन्ट्/ *ना* [*गण*] लष्करी तळाचा प्रमुख अधिकारी, समादेशक.

commandeer /,कॉमन्'डिअ(र्)/ *क्रि* [*सक*] अधिकृत कारणांसाठी – विशेषतः संरक्षणविषयक कारणांसाठी – एखादी गोष्ट ताब्यात घेणे किंवा वर्चस्वाखाली आणणे.

commander /क'मान्ड(र्); *अमे* -'मॅन्-/ *ना* [*गण*] १ हुकमत ठेवणारा माणूस, दलनायक. २ नौदलातील मध्यम श्रेणीचा अधिकारी.

commandment /क'मान्ड्मन्ट्; *अमे* -'मॅन्ड्-/ *ना* [*गण*] देवाने दिलेला कायदा, ईश्वरी आदेश.

commando /क'मान्डउ; *अमे* -'मॅन्-/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s** किंवा **~es**) झटकन छापा घालण्याचे खास प्रशिक्षण दिलेल्या सैनिकांचे पथक (किंवा त्यातला एक सैनिक), विशेष सुरक्षा पथक.

commemorate /क'मेमरेइट्/ *क्रि* [*सक*] (एखाद्या व्यक्तीची किंवा घटनेची) स्मृती ठेवणे, स्मृतिदिन किंवा स्मृतिवर्ष साजरे करणे, स्मरण करणे. **commemoration** /क,मेम'रेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] स्मारक, स्मृती. **commemorative** /-रटिव्ह्/ *वि* स्मरणार्थ, स्मृत्यर्थ.

commence /क'मेन्स्/ *क्रि* [*अक, सक*] (*औप*) सुरू होणे, सुरू करणे; आरंभ होणे, आरंभ करणे. **commencement** *ना* [*अगण*] सुरुवात; आरंभ, प्रारंभ.

commend /क'मेन्ड्/ *क्रि* [*सक*] (*औप*) १ स्तुती करणे, प्रशंसा करणे; प्रशस्ती करणे. २ **~ oneself to** एखाद्याच्या पसंतीस उतरणे, पसंत पडणे. **commendable** *वि* स्तुत्य, प्रशंसनीय. **commendation** /,कॉमेन्'डेइश्न्/ *ना* [*अगण, गण*] स्तुती, शाबासकी.

commensurate /क'मेन्शरट्/ *ना* *with*// (*औप*) एखाद्या गोष्टीच्या योग्य परिमाणात, समपरिमाणात, साजेसा : *pay ~ with the importance of the job, कामाच्या महत्त्वाच्या प्रमाणात पैसे देणे, कामाच्या महत्त्वाला साजेसा पगार.*

comment /'कॉमेन्ट्/ *ना* [*गण, अगण*] लिखित किंवा तोंडी असे मतप्रदर्शन, अभिप्राय, भाष्य, टीकाटिप्पणी. **comment** *क्रि* [*अक*]

(on)// एखाद्या गोष्टीवर मतप्रदर्शन करणे, भाष्य करणे, टीकाटिप्पणी करणे.

commentary /'कॉमन्ट्रि; *अमे* -टेरि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*गण, अगण*] एखादा प्रसंग घडत असताना त्याचे आकाशवाणीवरून केलेले वर्णन, समालोचन, धावते वर्णन : *a ~ on a football match, फुटबॉल मॅचची कॉमेन्ट्री किंवा त्याचे समालोचन.* २ [*गण*] एखादे पुस्तक वगैरेचे स्पष्टीकरण, भाष्य, वृत्ती, टीका.

commentate /'कॉमन्टेइट्/ *क्रि* [*अक*] (खेळाचे) समालोचन करणे, कॉमेन्ट्री करणे. **commentator** *ना* [*गण*] समालोचक.

commerce /'कॉमऽस्/ *ना* [*अगण*] मालाची खरेदी-विक्री, धंदा; व्यापार.

commercial /क'मऽश्ल्/ *वि* १ व्यापारविषयक, व्यापारी. २ किफायतशीर, फायदेशीर. ३ (आकाशवाणी किंवा दूरदर्शन याबाबत) जाहिरातीचे उत्पन्न असणारा, जाहिरातींवर चालणारा. **commercial** *ना* [*गण*] आकाशवाणी किंवा दूरदर्शनची जाहिरात. **commercialized** *वि* प्रामुख्याने फायद्याशी संबंधित असा, फक्त नफ्याचा उद्देश असलेला. **commercially** /-शलि/ *क्रिवि* धंद्याच्या दृष्टीने. **com,mercial 'traveller** *ना* [*गण*] वेगवेगळ्या दुकानात जाऊन एखाद्या कंपनीचा माल विकणे आणि मागणी नोंदविणे असे काम करणारा माणूस, कंपनीचा मालविक्रेता किंवा फिरता विक्रेता, प्रतिनिधी, एजंट.

commiserate /क'मिझरेइट्/ *क्रि* [*अक*] *(with)//* (*औप*) सहानुभूती दाखवणे : *I ~d with her on the loss of her job, तिची नोकरी गेल्यावर मी सहानुभूती व्यक्त केली म्हणजेच मी तिच्या दुःखात सहभागी झालो.* **commiseration** /क,मिझ़'रेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] सहानुभूती व्यक्त करणे, अनुकंपा वाटणे.

commission /क'मिश्न्/ *ना* १ [*गण*] एखाद्यावर सोपवलेले काम, कंत्राट. २ [*गण, अगण*] विक्रेत्याला त्याच्या कामासाठी दिलेले पैसे, दलाली. ३ [*गण*] एखाद्या गोष्टीची चौकशी करून त्यावर अहवाल देण्यासाठी अधिकृतपणे नेमलेले मंडळ, आयोग. ४ [*गण*] संरक्षण दलात अधिकारी म्हणून नेमले आहे अशा आशयाचे अधिकृत पत्र, संरक्षणदल अधिकाऱ्याचे नेमणूकपत्र. **commission** *क्रि* [*सक*] १ (एखाद्याला) एखादे काम करण्यास अधिकृतपणे नेमणे. २ अधिकृत नेमणूकपत्राने (एखाद्याची) सैन्यात अधिकारपदावर नेमणूक करणे.

commissionaire /क,मिश'नेअ(र्)/ *ना* [*गण*] (विशेषकरून *ब्रि*) चित्रपटगृह, नाट्यगृह, उपहारगृह वगैरे ठिकाणी प्रवेशद्वारापाशी असणारा गणवेषधारी सेवक.

commissioner /क'मिशन(र्)/ *ना* [*गण*] १ आयोगाचा सदस्य. २ शासकीय प्रतिनिधी.

commit /क'मिट्/ *क्रि* **(-tt-)** [*सक*] १ (एखादी चूक किंवा वेडेपणा) करणे. २ *(to)//* एखादी गोष्ट करण्याचे वचन देणे, त्यासाठी वचनबद्ध असणे : *The government has ~ted itself to fighting inflation, चलनवाढ रोखण्यास सरकार वचनबद्ध आहे.* ३ **~ oneself** ठामपणे आपली मते मांडणे, तत्त्वाला बांधील राहणे. ४ एखाद्याला तुरुंगात किंवा इस्पितळात पाठवणे, सुरक्षिततेसाठी दाखल करणे. **commitment** *ना* १ [*गण*] आश्वासन, जबाबदारी. २ [*अगण*] निष्ठा, समर्पण वृत्ती.

committee /क'मिटि/ *ना* [*गण,* तसेच ब.व क्रियापदासह अे.व] एखाद्या विशिष्ट गोष्टीसाठी नेमलेल्या व्यक्तींचा गट, समिती.

commodity /क'मॉडटि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) उपयुक्त वस्तू – विशेषतः विक्रीची वस्तू, विक्रेय वस्तू.

common^{1} /'कॉमन्/ *वि* १ अनेकदा अनेक स्थळी आढळणारा किंवा होणारा, सर्वसामान्य; नेहमीचा, नित्याचा. २ दोन किंवा अधिक लोकांचा किंवा त्यांनी वापरण्याचा; उभयविध, सामाईक : *a ~ interest, सामाईक हित, सामान्य हितसंबंध* ○ *~ knowledge, सामाईक ज्ञान.* ३ (*अधिक्षेपी*) (लोकांबाबत) शिष्टाचार न पाळणारा; सवंग, मवाली. **,common 'ground** *ना* [*अगण*] समान दृष्टिकोन, मते किंवा उद्दिष्टे. **,common 'law** *ना* [*अगण*] (विशेषतः इंग्लंडमधे) परंपरा आणि पूर्वीच्या न्यायनिवाड्यांवर आधारलेला अलिखित नियम

किंवा संकेत. **'common-law** *वि* अलिखित संकेताचा, अलिखित विधिवत्. **commonly** *क्रिवि* सामान्यतः, सर्वसाधारणपणे. **the ˌCommon 'Market** *ना* [*अे.व*] युरोपिअन इकॉनॉमिक कम्युनिटी, युरोपीय सामाईक बाजारपेठ किंवा युरोपिअन आर्थिक संघ; युरोपातील काही राष्ट्रांचा परस्परांतील व्यापार वाढविण्यासाठी स्थापन केलेला आर्थिक संघ. **'commonplace** *वि* सामान्य, काहीही वैशिष्ट्य नसलेला. **ˌcommon 'sense** *ना* [*अगण*] आयुष्यात अनुभवामुळे मिळालेले व्यावहारिक शहाणपण, व्यवहारज्ञान.

common^2 /'कॉमन्/ *ना* १ [*गण*] कुणीही वापरावी अशी कुंपण वगैरे नसलेली मोकळी जागा. २ (*वाक्प्र*) **have sth in common** समान हितसंबंध, गुणविशेष, आवडीनिवडी वगैरे असणे. **in common with sb/sth** एखाद्याबरोबर, दुसऱ्यासह मिळून.

commoner /'कॉमन(र्)/ *ना* [*गण*] सरदार किंवा उमराव घराण्यातला नसणारा, सामान्य माणूस.

Commons /'कॉमन्झ़्/ *ना* **the Commons** [*अे.व*, तसेच ब.व क्रियापदासह अे.व] ब्रिटिश शासनापैकी ज्या सभागृहाचे प्रतिनिधी लोकांनी निवडलेले असतात ते सभागृह, त्यातील सर्व सदस्य, ब्रिटिश हाऊस ऑफ कॉमन्स (किंवा त्याचे सदस्य).

commonwealth /'कॉमन्वेल्थ्/ *ना* १ [*गण*] स्वेच्छेने राजकीय संबंध जोडलेल्या राष्ट्रांचा संघ: *the C~ of Australia, ऑस्ट्रेलियन राष्ट्रसंघ.* २ **the Commonwealth** [*अे.व*] पूर्वी ब्रिटिश राजवटीच्या वसाहती किंवा मर्यादित स्वराज्य असणाऱ्या वसाहती असलेल्या परंतू आता स्वतंत्र सार्वभौम राष्ट्रे असलेल्या राष्ट्रांचा संघ, राष्ट्रकुल.

commotion /क'मउश्न्/ *ना* [*अे.व, अगण*] गोंधळ, गोंगाट, कल्लोळ.

communal /'कॉम्युन्ल्, क'म्यून्ल्/ *वि* लोकांच्या विशिष्ट गटाचा, सामूहिक; जातीय.

commune^1 /'कॉम्यून्/ *ना* [*गण*] १ एकत्र राहणाऱ्या आणि कामे व संपत्तीत समान भार उचलणाऱ्या लोकांचा वर्ग, संघ. २ (फ्रान्स वगैरे मधे) स्थानिक स्वराज्यसंस्थेचा सर्वात लहान घटक.

commune^2 /क'म्यून्/ *क्रि* [*अक*] *with*// एखाद्या गोष्टीशी नाते जोडणे, जवळीक करणे; एखाद्याशी संवाद साधणे: ~ *with nature, निसर्गाशी संवाद साधणे.*

communicate /क'म्यूनिकेइट्/ *क्रि* १ [*अक, सक*] एखादी गोष्ट जाहीर करणे, व्यक्त होणे/करणे, कळणे/कळवणे. २ [*सक*] (रोग) पसरविणे, लागण करणे, प्रसार करणे. ३ [*अक*] (खोल्यांबाबत) जोडणे: *a communicating door, मधले दार, जोडणारे दार.* **communication** /कˌम्यूनि'केइश्न्/ *ना* १ [*अगण*] व्यक्त करणे, बोधन, संदेशवहन. २ [*गण*] (*औप*) पत्र, फोन वगैरे, संपर्क. ३ **communications** [*ब.व*] माहिती पाठविण्याची साधने, पद्धती – विशेषतः इलेक्ट्रॉनिक्सची, संपर्क; प्रवासाची साधने. **communicative** /-कटिव्ह्; *अमे* -केइटिव्ह्/ *वि* माहिती देण्यास किंवा बोलण्यास राजी असणारा, बोलका, मनमोकळा.

communion /क'म्यूनिअन्/ *ना* [*अगण*] १ (*औप*) विचार, भावना यातील सहभाग, सख्य, बंधुत्व. २ **Communion** पाव आणि मद्य सर्वांनी वाटून घेण्याचा ख्रिस्ती धर्मविधी, ख्रिस्ती सहभोजनविधी.

communiqué /क'म्यूनिकेइ; *अमे* कˌम्यून'केइ/ *ना* [*गण*] अधिकृत निवेदन, अभिपत्रक.

communism /'कॉम्युनिझ़म्/ *ना* [*अगण*] (क) ज्यात खाजगी मालकी नसते आणि ज्यात उत्पादनाची साधने समाजातील सर्व लोकांची असतात अशी आर्थिक, सामाजिक व्यवस्था, समाजवादी व्यवस्था, साम्यवादी व्यवस्था. (ख) **Communism** अशी समाजव्यवस्था आणू पाहणारी राजकीय चळवळ किंवा राजकीय तत्त्वज्ञान, साम्यवाद; अशी प्रत्यक्षात असलेली व्यवस्था – उदा पूर्वीच्या सोविएत संघराज्यातील व्यवस्था. **communist** /-निस्ट्/ *ना* [*गण*], *वि* साम्यवादी.

community /क'म्यूनटि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ **the community** [*अे.व*] एका ठिकाणी राहणारे लोक, समाज, जमात. २ [*गण,* तसेच

ब.व क्रियापदासह अे.व] समान हितसंबंध असलेल्या लोकांचा गट, समाज. ३ [*अगण*] सहभागाची स्थिती, सामूहिकता. **community charge** *ना* [*अे.व*] (इंग्लंडमधे) प्रत्येक प्रौढ व्यक्तीने भरायचा स्थानिक कर.

commute /क'म्यूट्/ *क्रि* १ [*अक*] घर आणि कामाची जागा असा नियमितपणे प्रवास करणे. २ [*सक*] मूळ शिक्षेऐवजी जरा कमी शिक्षा करणे, हलकी शिक्षा देणे. **commuter** *ना* [*गण*] कचेरीत वगैरे जाण्यासाठी प्रवास करणारा, दैनंदिन प्रवासी.

compact¹ /कम्'पॅक्ट्/ *वि* एकत्र घट्ट बांधलेला किंवा ठेवलेला; थोड्याशा जागेत व्यवस्थित बसवलेला. **,compact 'disc** *ना* [*गण*] लेझर किरणांनी कार्यान्वित होऊन ध्वनी किंवा माहिती मुद्रित करणे आणि पुन्हा वाजवणे यासाठी असलेली गोलाकार चकती. **compactly** *क्रिवि* आटोपशीरपणे, घट्टपणे. **compactness** *ना* [*अगण*] घनीकरण; आटोपशीरपणा.

compact² /'कॉम्पॅक्ट्/ *ना* [*गण*] तोंडाला लावायच्या पावडरीची छोटीशी डबी.

companion /कम्'पॅनिअन्/ *ना* [*गण*] दुसऱ्याबरोबर वेळ घालवणारा किंवा प्रवास करणारा माणूस, सोबती. **companionship** *ना* [*अगण*] मित्रांतील किंवा सहचरांतील संबंध, मैत्री, संगती, साहचर्य.

company /'कम्पनि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*गण*] व्यापारी संघटना, व्यावसायिक संस्था. २ [*गण*] एकत्र काम करणाऱ्या लोकांचा गट, मंडळी : *an opera ~, ऑपेरा मंडळी.* ३ [*अगण*] दुसऱ्यांबरोबर असणे, सोबत, संगत : *He is good/bad ~, त्याची सोबत चांगली/वाईट आहे म्हणजेच त्याच्याबरोबर जाण्यात मजा/कटकट आहे.* ४ [*अगण*] लोकांचा गट; भेट देणारे, पाहुणे. ५ [*अगण*] ज्यांच्याबरोबर ऊठबस असते ते लोक, संगत, सवंगडी, मित्रमैत्रिणी : *That girl keeps very bad ~, त्या मुलीचा मित्रपरिवार चांगला नाही, तिची संगत वाईट आहे.* ६ [*गण*] एखाद्या फलटणीतली सैनिकांची तुकडी.

comparable /'कॉम्परब्ल्/ *वि* तुलना करण्याजोगा; समान, सारखा.

comparative /कम्'पॅरटिव्ह्/ *वि* १ तुलनेचा, तौलनिक. २ तुलनेने; सापेक्ष : *living in ~ comfort, तुलनेने सुस्थितीत असणारा.* ३ (*व्याकरण*) आधिक्य दाखविणारा विशेषण किंवा क्रियाविशेषणांचा, तरभावदर्शक – उदा better, worse : *'Better' is the ~ form of 'good', 'Better' हे 'good' चे तरभावदर्शक रूप आहे.* **comparative** *ना* [*गण*] (*व्याकरण*) विशेषण किंवा क्रियाविशेषण यांचे तरभावद्दर्शक रूप. **comparatively** *क्रिवि* तुलनेने, तुलना करता.

compare /कम्'पेअ(र्)/ *क्रि* १ [*सक*] (*with/to*)// दिलेल्या गोष्टी कितपत समान आहेत आणि कितपत वेगळ्या आहेत हे पाहण्यासाठी त्यांची परीक्षा करणे, तुलना करणे : *~ the results of one test with the results of another, एका परीक्षेच्या निकालांची दुसऱ्या परीक्षेच्या निकालांशी तुलना करणे.* २ [*सक*] *A to B*// दोन गोष्टींतील/व्यक्तींतील साम्य दाखवणे. ३ [*अक*] *with*// तुलना होऊ शकणे, तुलनेस योग्य असणे, तोडीचा असणे. ४ (*वाक्प्र*) **compare 'notes** मतांची किंवा विचारांची देवाणघेवाण करणे.

comparison /कम्'पॅरिस्न्/ *ना* १ [*गण, अगण*] तुलना. २ [*अगण*] साम्य : *There is no ~ between them, त्या दोहोत काहीच साम्य नाही म्हणजेच त्या दोहोंची तुलनाच करता येणार नाही.* ३ (*वाक्प्र*) **by/in comparison (with sb/sth)** एखाद्या गोष्टीशी किंवा व्यक्तीशी तुलना करता.

compartment /कम्'पाट्मन्ट्/ *ना* [*गण*] रेल्वेच्या डब्याचा भाग, डब्याचा कप्पा; एखाद्या गोष्टीचा वेगळा भाग, कप्पा.

compass /'कम्पस्/ *ना* १ [*गण*] कायम उत्तरेकडे टोक राहणारी सुई असलेले एक दिशादर्शक साधन, होकायंत्र. २ **compasses** [*ब.व*] इंग्रजी V च्या आकाराचे वर्तुळ काढण्यासाठी वापरण्याचे उपकरण, कंपास. ३ [*गण*] (*औप*) कक्षा, आवाका; व्याप्ती : *beyond the ~ of the human mind, मानवी मनाच्या कक्षेबाहेरचा.*

compassion /कम्'पॅश्न्/ *ना* [*अगण*] इतरांच्या दुःखाबाबत येणारी कणव, अनुकंपा. **compassionate** /-शनट्/ *वि* अनुकंपा

वाटणारा किंवा दाखवणारा, कळवळा असलेला, कनवाळू, दयाळू. **compassionately** *क्रिवि* अनुकंपेने, कणवपूर्वक.

compatible /कम्'पॅटब्ल्/ *वि* (उदा लोक, कल्पना किंवा तत्वे याबाबत) एकत्र राहू शकणारा, जुळता, मिळता. **compatibility** /कम्,पॅट'बिलटि/ *ना* [*अगण*] सहत्व, विरोधाभाव.

compatriot /कम्'पॅट्रिअट्; *अमे* -'पेइट्/ *ना* [*गण*] एकाच देशाचा नागरिक, देशबांधव.

compel /कम्'पेल्/ *क्रि* (-ll-) [*सक*] (*औप*) एखाद्याला एखादी गोष्ट करण्यास भाग पाडणे, सक्ती करणे, बळजबरी करणे. **compelling** *वि* विश्वास बसावा असा, पटणारा, खात्रीलायक.

compensate /'कॉम्पेन्सेइट्/ *क्रि* [*अक, सक*] (*for*)// (एखाद्याला) त्याचे नुकसान किंवा तोटा वगैरे भरून काढण्यासाठी काही देऊ करणे किंवा पैसे देणे, नुकसान भरून काढणे किंवा देणे, भरपाई करणे. **compensation** /,कॉम्पेन्'सेइश्न्/ *ना* १ [*अगण*] नुकसान भरून देणे. २ [*अगण, गण*] भरपाई म्हणून दिलेली गोष्ट, (नुकसान) भरपाई.

compère /'कॉम्पेअ(र्)/ *ना* [*गण*] आकाशवाणी किंवा दूरदर्शनच्या कार्यक्रमात भाग घेणाऱ्यांची तसेच निमंत्रितांची ओळख करून देणारी व्यक्ती, सूत्रसंचालक. **compère** *क्रि* [*सक*] सूत्रसंचालन करणे.

compete /कम्'पीट्/ *क्रि* [*अक*] स्पर्धा, शर्यत वगैरेत भाग घेणे, स्पर्धेत उतरणे; इतरांचा पराभव करून जिंकण्याचा प्रयत्न करणे, लढवणे : ~ *against/with others, इतरांबरोबर मुकाबला करणे.*

competence /'कॉम्पिटन्स्/ *ना* [*अगण*] १ क्षमता असणे; क्षमता, सामर्थ्य. २ (*औप*) कायदेशीर अधिकार. **competent** /-टन्ट्/ *वि* एखादी गोष्ट करण्यासाठीचे ज्ञान, कौशल्य, सामर्थ्य वगैरे असणारा, सक्षम. **competently** *क्रिवि* क्षमतेने, सक्षमपणे.

competition /,कॉम्प'टिश्न्/ *ना* १ [*गण*] स्पर्धा, चढाओढ : *a photography ~, छायाचित्र स्पर्धा.* २ [*अगण*] जिंकण्याची धडपड; स्पर्धात्मकता. **competitive** /कम्'पेटटिव्ह्/ *वि* १ स्पर्धात्मक. २ चढाओढ करण्यास उत्सुक.

competitor /कम्'पेटिट(र्)/ *ना* [*गण*] स्पर्धक, चढाओढ करणारा, प्रतिस्पर्धी.

compile /कम्'पाइल्/ *क्रि* [*सक*] माहिती गोळा करून (पुस्तक, वृत्तांत वगैरे) तयार करणे, संग्रहित करणे, संकलन करणे. **compilation** /,कॉम्पि'लेइश्न्/ *ना* १ [*अगण*] संग्रहण, संकलन. २ [*गण*] संग्रहित किंवा संकलित केलेले असे काही. **compiler** *ना* [*गण*] संग्राहक, संकलक.

complacent /कम्'प्लेइस्न्ट्/ *वि* (*बहुधा अधिक्षेपी*) आरामी, थंडपणे समाधानी, आत्मसंतुष्ट. **complacency** /-स्न्-सि/ *ना* [*अगण*] आत्मसंतुष्टता. **complacently** *क्रिवि* आत्मसंतुष्टपणे.

complain /कम्'प्लेइन्/ *क्रि* [*अक*] आपले असमाधान किंवा नाराजी व्यक्त करणे, तक्रार करणे : ~ *about the food, अन्नाबाबत तक्रार करणे.*

complaint /कम्'प्लेइन्ट्/ *ना* १ [*गण, अगण*] तक्रार (निवेदन). २ [*गण*] आजार; रोग.

complement /'कॉम्प्लिमन्ट्/ *ना* [*गण*] १ एखाद्या गोष्टीबरोबर नीट जाणारी किंवा योग्य असणारी आणि त्या गोष्टीला पूर्णत्व देणारी गोष्ट, पूरक गोष्ट : *Wine is a perfect ~ to a meal, जेवणाची उत्तम पूर्णता करणारी गोष्ट म्हणजे मद्य.* २ आवश्यक असणारी एकूण संख्या किंवा आकडा. ३ (*व्याकरण*) इंग्रजीतील be, become यासारख्या क्रियापदानंतर येणारा आणि कर्त्याविषयी अधिक माहिती देणारा विशेषण किंवा नाम या जातीचा शब्द, विधिपूरक : *In 'I'm unhappy', 'unhappy' is the ~, 'I'm unhappy' या इंग्रजी वाक्यात 'unhappy' हे विधिपूरक आहे.* **complement** *क्रि* [*सक*] एखादी गोष्ट पूर्ण करणे, एकमेकांस पूरक असणे. **complementary** /,कॉम्प्लि'मेन्ट्रि/ *वि* परस्पर पूरक.

complete /कम्'प्लीट्/ *वि* १ संपूर्ण, परिपूर्ण, समग्र; पूर्ण, सगळा. २ पूर्ण झालेला, संपलेला; शेवटास नेलेला, समाप्त केलेला. ३ सर्वार्थाने, कोणत्याही दृष्टीने; पूर्ण, संपूर्ण : *a ~ surprise,*

सर्वार्थानि आश्चर्य, पूर्ण आश्चर्य. **complete** *क्रि* [सक] १ संपवणे, पूर्ण करणे. २ (अर्ज) भरणे, पूर्ण करणे. **completely** *क्रिवि* प्रत्येक बाबतीत, पूर्णतया. **completeness** *ना* [*अगण*] पूर्णत्व, परिपूर्णता. **completion** /कम्'प्लीशन्/ *ना* [*अगण*] पूर्ती, पूर्ण करणे.

complex^{1} /'कॉम्प्लेक्स्; *अमे* कम्'प्लेक्स्/ *वि* वेगवेगळ्या भागांनी बनवलेला, संकीर्ण, संश्लिष्ट, गुंतागुंतीचा; समजायला किंवा समजवून सांगायला अवघड, क्लिष्ट. **complexity** /कम्'प्लेक्सटि/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) गुंतागुंत, संश्लिष्टता, श्लिष्टता; क्लिष्टता.

complex^{2} /'कॉम्प्लेक्स्/ *ना* [*गण*] १ समान किंवा जोडलेल्या गोष्टींचा गट, संकुल: *a sports ~, क्रीडासंकुल.* २ पूर्वीच्या अनुभवातून निष्पन्न झालेली अनैसर्गिक मनोवृत्ती, गंड.

complexion /कम्'प्लेक्शन्/ *ना* [*गण*] १ त्वचेचा नैसर्गिक वर्ण किंवा गुण, वाण, अंगकांती: *a dark/fair ~, शामल/गौर अंगकांती.* २ [बहुधा *ए.व*] एखाद्या गोष्टीचे सर्वसाधारण रूप, डौल.

compliance /कम्'प्लाइअन्स्/ *ना* [*अगण*] (*औप*) मान्य करण्याची कृती, मान्यता, संमती. **compliant** /-अन्ट्/ *वि* बधणारा, आज्ञाधारक.

complicate /'कॉम्प्लिकेइट्/ *क्रि* [*सक*] एखादी गोष्ट करायला, समजायला किंवा हाताळायला अवघड करून ठेवणे, गुंतागुंत करणे. **complicated** *वि* अनेक वेगवेगळ्या गोष्टी एकत्र असल्याने समजायला किंवा स्पष्ट करण्यास अवघड असलेला, गुंतागुंतीचा, किचकट, जटिल. **complication** /,कॉम्प्लि'केइशन्/ *ना* [*गण*] परिस्थिती अवघड करणारी गोष्ट, गुंता वाढवणारी गोष्ट, समस्या.

complicity /कम्'प्लिसटि/ *ना* [*अगण*] (*औप*) गुन्हा करण्यात एखाद्याला मदत करणे, सह-अपराधिता.

compliment /'कॉम्प्लिमन्ट्/ *ना* १ [*गण*] स्तुती किंवा कौतुकाचा शब्द, प्रशंसोद्गार. २ **compliments** [*ब.व*] (*औप*) नमस्कार किंवा सद्भावना, सदिच्छा, अभिवादन, प्रणाम. **compliment** /-मेन्ट्/ *क्रि* [*सक*] स्तुती किंवा कौतुक करणे, वाखाणणे, प्रशंसा करणे. **complimentary** /,कॉम्प्लि'मेन्ट्रि/ *वि* १ स्तुतिवाचक, प्रशंसात्मक. २ फुकट दिलेला, विनाशुल्क, मानार्थ: *~ary tickets, फुकटची तिकिटे, पास.*

comply /कम्'प्लाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*अक*] (*with*)// (*औप*) एखादी गोष्ट करण्यास अनुमती देणे, संमती देणे; आज्ञा पाळणे, ऐकणे, आदेश पाळणे.

component /कम्'पउनन्ट्/ *ना* [*गण*] एखाद्या गोष्टीचा भाग, घटक. **component** *वि* विभागीय, घटक.

compose /कम्'पउझ्/ *क्रि* १ [*अक, सक*] (संगीत, कविता, पत्र वगैरे) लिहिणे, रचणे. २ **~ oneself** स्वतःवर ताबा ठेवणे, स्वतःला सावरणे. ३ (*वाक्प्र*) **be composed of sb/sth** काही गोष्टी/व्यक्ती भाग म्हणून असणे, विविध गोष्टींचा असणे, (विविध घटकांनी) बनणे. **composed** *वि* शांत, संयमी. **composer** *ना* [*गण*] संगीत रचणारा, संगीतकार.

composite /'कॉम्पझिट्/ *ना* [*गण*], *वि* विविध घटकांनी बनलेला, संयुक्त, संमिश्र.

composition /,कॉम्प'झिशन्/ *ना* १ [*गण*] रचना – उदा संगीतरचना. २ [*अगण*] रचना करण्याची कृती. ३ [*गण*] शाळेत करायच्या लेखन-कार्याचा नमुना, निबंध. ४ [*अगण*] एखाद्या वस्तूचे घटक, भाग, घडण: *the chemical ~ of the soil, मातीची रासायनिक घडण.*

compost /'कॉम्पॉस्ट्/ *ना* [*अगण*] कुजलेल्या वनस्पती, शेण वगैरेचे केलेले आणि जमिनीचा कस वाढविणारे एक मिश्रण किंवा खत.

composure /कम्'पउझ(र्)/ *ना* [*अगण*] (*औप*) शांतपणा, संयमशीलता.

compound^{1} /'कॉम्पाउन्ड्/ *ना* [*गण*] १ दोन किंवा अधिक भागांची बनलेली गोष्ट, संयुग. २ (*व्याकरण*) दोन किंवा अधिक पदांपासून बनविलेले पद, समास, सामासिक शब्द, उदा policeman हा शब्द police आणि man यापासून बनवलेला आहे. **com-**

pound *वि* संयुक्त, सामासिक. ,**compound 'interest** *ना* [*अगण*] मुद्दल आणि त्यावरचे व्याज या दोन्हींवर दिलेले व्याज, चक्रवाढ व्याज.

compound^2 /कम्'पाउन्ड्/ *क्रि* [*सक*] (*औप*) १ एकत्र करणे, मिश्रण करणे, मिसळणे : ~ *several chemicals, अनेक रसायने मिसळणे.* २ (एखादी वाईट गोष्ट) आणखी वाईट करणे, अधिक बिघडवणे.

compound^3 /'कॉम्पाउन्ड्/ *ना* [*गण*] इमारती वगैरे असलेली बंदिस्त जागा, आवार.

comprehend /,कॉम्प्रि'हेन्ड्/ *क्रि* [*सक*] (*औप*) १ पूर्णपणे समजणे, पूर्ण आकलन होणे. २ (*औप*) समावेश करणे, अंतर्भाव करणे.

comprehension /,कॉम्प्रि'हेन्श्न्/ *ना* १ [*अगण*] एखादी गोष्ट समजण्याची शक्ती, आकलन शक्ती. २ [*गण*] आकलन सुधारण्यासाठी केलेला अभ्यास किंवा प्रश्न. **comprehensible** /-'हेन्सब्ल्/ *वि* संपूर्ण समजू शकणारे, पूर्ण आकलनीय.

comprehensive /,कॉम्प्रि'हेन्सिव्ह्/ *वि* १ प्रत्येक गोष्टीचा अंतर्भाव असणारा, सर्वसमावेशक, परिपूर्ण : *a ~ description, परिपूर्ण किंवा इत्थंभूत वर्णन.* २ (*ब्रि*) (शिक्षणाबाबत) एकाच शाळेत विविध क्षमता असणाऱ्या विद्यार्थ्यांना सामावून घेणारे, सर्वंकष, बहुविषयग्राही. **comprehensive school** *ना* [*गण*] (*ब्रि*) विविध क्षमता असणाऱ्या विद्यार्थ्यांना शिकवणारी मोठी माध्यमिक शाळा.

compress /कम्'प्रेस्/ *क्रि* [*सक*] १ लहान जागेत बळेच घालणे, कोंबणे, दाटीवाटीने ठेवणे; एकत्र दाबणे, ठोसणे. २ (कल्पना वगैरे) कमी शब्दांत मांडणे, थोडक्यात सांगणे. **compression** /-प्रेश्न्/ *ना* [*अगण*] दाब, संकोचन.

comprise /कम्'प्राइझ्/ *क्रि* [*सक*] भाग म्हणून असणे; भागांचा बनणे : *a committee comprising people of widely differing views, अतिशय वेगवेगळ्या मतांच्या लोकांची बनलेली समिती ○ The Indian Parliament ~s the Lok Sabha and the Rajya Sabha, भारतीय संसद लोकसभा आणि राज्यसभा यांची बनलेली आहे.*

compromise /'कॉम्प्रमाइझ्/ *ना* [*गण, अगण*] प्रत्येक पक्षाने काही गोष्टी सोडून देऊन वाद मिटवणे, समझोता, समेट, तडजोड. **compromise** *क्रि* १ [*अक*] समझोता किंवा समेट घडवणे, तडजोड करणे. २ [*सक*] धोक्याच्या किंवा खजिल करणाऱ्या परिस्थितीत आणणे, धोक्यात आणणे.

compulsion /कम्'पल्श्न्/ *ना* १ [*अगण*] सक्ती करणे, बळजबरी, सक्ती. २ [*गण*] तीव्र इच्छा; निकड.

compulsive /कम्'पल्सिव्ह्/ *वि* १ तीव्र इच्छेने निर्माण झालेला, झपाटल्याप्रमाणे एखादी गोष्ट करणारा : *a ~ liar, खोटे बोलण्यास सरावलेला, खोटे बोलण्याचे व्यसन असलेला.* २ (पुस्तक, चित्रपट वगैरेबाबत) अतिशय रमणीय, दिलखेचक.

compulsory /कम्'पल्सरि/ *वि* केलाच पाहिजे असा, अनिवार्य; सक्तीने कायद्यानुसार आवश्यक, बंधनकारक.

compunction /कम्'पङ्क्·श्न्/ *ना* [*अगण*] (*औप*) अपराधी भावना, मनाची टोचणी, चुटपूट.

compute /कम्'प्यूट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) मोजणे, गणन करणे. **computation** /,कॉम्प्यू'टेइश्न्/ *ना* [*अगण, गण*] गणन, मोजणी.

computer /कम्'प्यूट(र्)/ *ना* [*गण*] माहिती साठवणारे, देणारे आणि तिचे विश्लेषण करणारे, तसेच गणन करणारे, यंत्रावर नियंत्रण ठेवणारे एक इलेक्ट्रॉनिक साधन, संगणक. **computerize** *क्रि* [*सक*] एखादे काम करण्यासाठी संगणक वापरणे. **computerization** /कम्,प्यूटराइ'झेइश्न्; *अमे* -रि'झे-/ *ना* [*अगण*] संगणकीकरण, संगणकाचा वापर.

comrade /'कॉम्रेइड्; *अमे* -रॅड्/ *ना* [*गण*] १ राजकीय पक्षाचा किंवा कामगार संघटनेचा सहसभासद, साथी, भाई. २ (*जुना, अप्रचलित*) मित्र, दोस्त, सवंगडी, सहचर. **comradeship** *ना* [*अगण*] साथ, सोबत, संगती.

Con /कॉन्/ *संरू* (*ब्रि राजकारण*) Conservative हुजूर पक्ष; पुराणमतवादी पक्ष.

con /कॉन्/ *क्रि* (-nn-) [*सक*] (*अनौप*) चलाखी करणे; फसवणे. **con** *ना* [*गण*]

(*अनौप*) चलाखी, फसवणूक. **'con man** *ना* [*गण*] लोकांना भुलवून त्यांच्याकडून पैसे वगैरे घेणारा, भामटा, लफंगा.

concave /'कॉङ्केइव्ह/ *वि* अंतर्गोल, अंतर्वक्र.

conceal /कन्'सील/ *क्रि* [*सक*] लपणे, दडणे; गुप्त ठेवणे, दडवणे. **concealment** *ना* [*अगण*] लपविणे, दडवादडवी.

concede /कन्'सीड्/ *क्रि* १ [*सक*] एखादी गोष्ट खरी आहे असे मान्य करणे, कबूल करणे. २ [*अक, सक*] पराभव मान्य करणे. ३ [*सक*] (एखादी गोष्ट) हक्क म्हणून देणे.

conceit /कन्'सीट्/ *ना* [*अगण*] स्वतःविषयीचे फार चांगले मत, घमेंड, अहंकार, तोरा. **conceited** *वि* घमेंडखोर, तोरेबाज.

conceive /कन्'सीव्ह/ *क्रि* [*अक, सक*] १ (*of*)// मनात कल्पना, नवीन विचार वगैरे करणे; कल्पना करणे. २ गर्भारशी होणे किंवा राहणे, गर्भधारणा होणे. **conceivable** *वि* विश्वास ठेवण्यासारखा, विश्वासार्ह; कल्पनीय, कल्पना करण्याजोगा. **conceivably** *क्रिवि* बहुधा, शक्य.

concentrate /'कॉन्सन्'ट्रेइट/ *क्रि* १ [*अक*] (*on*)// संपूर्ण लक्ष देणे, लक्ष केन्द्रित करणे, सर्व भर देणे : *~ on one's work, स्वतःच्या कामावर लक्ष एकवटणे.* २ [*अक, सक*] एकत्र आणणे किंवा एकत्रित होणे, जमणे किंवा जमवणे. ३ [*सक*] (एखाद्या द्रवपदार्थाची वगैरे) तीव्रता वाढवणे. **concentrate** *ना* [*गण, अगण*] तीव्रता वाढलेला द्रवपदार्थ, अर्क, काढा.

concentration /,कॉन्सन्'ट्रेइशन्/ *ना* १ [*अगण*] पूर्ण लक्ष एकवटणे, व्यग्रता, मग्नता, एकतानता. २ [*गण*] वस्तू किंवा माणसांचे एकत्रीकरण, एकत्र गोळा होणे. **concen'tration camp** *ना* [*गण*] राजकीय कैद्यांचा तुरुंग, छळछावणी.

concentric /कन्'सेन्ट्रिक्/ *वि* (वर्तुळांविषयी) एकच मध्यबिंदू असणारी, समकेन्द्री, सममध्य.

concept /'कॉन्सेप्ट्/ *ना* [*गण*] सर्वसाधारण कल्पना, संकल्पना.

conception /कन्'सेप्शन्/ *ना* १ (क) [*अगण*] मनात कल्पना करणे किंवा येणे. (ख) [*गण*] मनात केलेली कल्पना. २ [*अगण*] गर्भधारणा.

concern^1 /कन्'सऽन्/ *क्रि* १ [*सक*] काळजी वाटणे : *I'm ~ed about her safety, मला तिच्या सुरक्षिततेची काळजी वाटते.* २ **~ oneself with** व्यग्र असणे, एखाद्या गोष्टीत गढणे. ३ [*सक*] महत्त्वाचे असणे, एखाद्याशी संबंधित असणे; परिणाम होणे. ४ [*सक*] -च्या विषयी असणे. ५ (*वाक्प्र*) **as far as sb/sth is concerned** एखाद्याला किंवा एखाद्या गोष्टीचा ज्या रीतीने किंवा ज्या प्रमाणात संबंध आहे ते लक्षात घेता, एखाद्याबाबत म्हणायचे तर : *As far as I'm ~ed, it doesn't matter what you do, माझ्याबाबत बोलायचे तर तू काय करतोस हे महत्त्वाचे नाही* किंवा *माझ्यापुरते म्हणशील तर तू काय करतोस याला महत्त्व नाही.* **concerning** *शब्दयो* बाबत, संबंधी.

concern^2 /कन्'सऽन्/ *ना* १ [*अगण*] काळजी, चिंता. २ [*गण*] एखाद्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असे काही. ३ [*गण*] धंदा; कंपनी, मंडळी : *a profitable ~, फायदेशीर धंदा.*

concert /'कॉन्सट्/ *ना* १ [*गण*] संगीत मैफल, बैठक, जलसा. २ (*वाक्प्र*) **in 'concert** (क) मैफल करणे. (ख) (*औप*) एकदिलाने काम करणे, एकत्रित काम करणे.

concerted /कन्'सऽटिड्/ *वि* लोकांनी एकत्र येऊन केलेला, एकवटलेला : *make a ~ effort, एकजुटीने प्रयत्न करणे.*

concertina /,कॉन्स'टीन/ *ना* [*गण*] दोन्ही बाजूंनी भाते दाबून आणि पट्ट्यावर बोटे फिरवून वाजवायचे वाद्य, बेंडबाजा. **concertina** *क्रि* [*अक*] दोन्ही बाजूनी घड्या घालून मिटणे.

concerto /कन्'चेअटउ, -चऽट्-/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s**) इतर वाद्ये फक्त साथीला घेऊन मुख्यतः एकाच वाद्यावर वाजवायची संगीत-रचना.

concession /कन्'सेशन्/ *ना* १ (क) [*अगण*] मान्यता, कबुली. (ख) [*गण*] चर्चेनंतर मान्य केलेली गोष्ट, आश्वासन. २ [*गण*] एखादी गोष्ट करण्यास एखाद्याला दिलेला खास अधिकार, सवलत : *a ~ to drill for oil, तेलविहिरी खोदण्याची सवलत.*

conciliate /कन्'सिलिअेइट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) एखाद्याचा राग कमी करणे, जुळवून घेणे, समेट करणे. **conciliation** /कन्,सिलि'अेइश्न्/ *ना* [*अगण*] गोडी, सामोपचार, समेट. **conciliatory** /-अिअटरि; *अमे* -अिअेटॉऽरि/ *वि* जुळवून घेणारा, गोडीगुलाबीचा, समेटाचा.

concise /कन्'साइस्/ *वि* कमी शब्दांत भरपूर माहिती देणारा, अल्पाक्षरी : *a ~ report, संक्षिप्त वृत्तांत.* **concisely** *क्रिवि* थोडक्यात. **conciseness** *ना* [*अगण*] संक्षिप्तपणा, अल्पाक्षरता.

conclude /कन्'क्लूड्/ *क्रि* १ [*अक, सक*] (बहुधा *औप*) समाप्त होणे किंवा करणे, संपविणे. २ [*सक*] चर्चेनंतर एखाद्या गोष्टीवर विश्वास ठेवणे, निर्णयास येणे, निष्कर्ष काढणे : *The jury ~d that he was guilty, तो दोषी आहे या निर्णयास पंच आले.* ३ [*सक*] योजणे आणि घडवून आणणे : *~ an agreement, करार घडवून आणणे.* **conclusion** /-'क्लूज्न्/ *ना* [*गण*] १ शेवट. २ निर्णय, निष्कर्ष (लेख वगैरे साहित्यातील शेवटचा भाग). **conclusive** /-'क्लूसिव्ह्/ *वि* (पुरावा वगैरे बाबत) निःसंशय; खात्रीलायक, निर्णायक. **conclusively** *क्रिवि* निःसंशयपणे; निर्णायकपणे.

concoct /कन्'कॉक्ट्/ *क्रि* [*सक*] १ अनेक गोष्टी मिसळून करणे. २ (गोष्ट, सबब वगैरे) बनवून सांगणे, रचून सांगणे. **concoction** /-'कॉक्‌श्न्/ *ना* १ [*गण*] मिश्रण, मिसळ. २ [*अगण*] एकत्र करणे, मिसळणे.

concord /'कॉङ्कॉऽड्/ *ना* [*अगण*] (*औप*) मेळ, सलोखा, ऐक्य, सुसंवाद.

concourse /'कॉङ्कॉऽस्/ *ना* [*गण*] खूप लोक एकत्र येतात ती जागा.

concrete /'कॉङ्क्रीट्/ *ना* [*अगण*] सिमेंट, वाळू, खडी वगैरे मिसळून बांधकामासाठी तयार केलेले मिश्रण. **concrete** *क्रि* [*सक*] काँक्रीट पसरणे, त्याचा थर देणे. **concrete** *वि* १ द्रव्य रूपात असणारा, मूर्त; स्पर्श वगैरे करता येण्याजोगा, इंद्रियगोचर. २ निश्चित; संदिग्ध नसणारा, स्पष्ट, प्रत्यक्ष : *a ~ suggestion, निश्चित सूचना.*

concur /कॉन्'कऽ(र्)/ *क्रि* (-rr-) [*अक*] (*औप*) १ मान्य होणे, संमती देणे. २ (घटना वगैरेबाबत) एकाच वेळी घडणे. **concurrence** /-'करन्स्/ *ना* [*अगण*] अनुमती, संमती; एकाच वेळी घडणे, सहघटन. **concurrent** /-'करन्ट्/ *वि* समवर्ती, एकसंपाती, त्याचवेळी घडणारा; सहघटक. **concurrently** *क्रिवि* एक समयावच्छेदेकरून, एकाच वेळी.

concuss /कन्'कस्/ *क्रि* [*सक*] जोराच्या आघाताने किंवा जोराने हालवून (एखाद्याच्या मेंदूला) इजा करणे, बधीर करणे. **concussion** /-'कश्न्/ *ना* [*अगण*] बधीरता, सुन्नपणा, समाघात.

condemn /कन्'डेम्/ *क्रि* [*सक*] १ (एखाद्या व्यक्तीबाबत किंवा गोष्टीबाबत) नापसंती व्यक्त करणे. २ *to*// (**क**) (*कायदा*) शिक्षा देणे, शिक्षा ठोठावणे : *He was ~ed to death, त्याला मृत्यूची शिक्षा ठोठावण्यात आली.* (**ख**) एखाद्याला नको असलेली गोष्ट स्वीकारायला लावणे, माथी मारणे : *~ed to a job she hates, तिला तिरस्कार वाटणारे कामच तिच्या माथी मारले गेले.* ३ (एखादी इमारत वगैरे) वापरण्यास धोक्याची आहे असे अधिकृतपणे जाहीर करणे, वापरण्यास अयोग्य म्हणून ठरवणे. **condemnation** /,कॉन्डेम्'नेइश्न्/ *ना* [*अगण, गण*] निर्भर्त्सना, टीका.

condense /कन्'डेन्स्/ *क्रि* १ [*अक, सक*] (**क**) (द्रवाबाबत) गोठणे, थिजणे, थिजवणे, गोठवणे, आटवणे. (**ख**) (वायु किंवा वाफेबाबत) द्रवीभवन होणे, द्रवात रूपांतर करणे. २ [*सक*] कमी शब्दांत व्यक्त करणे, संक्षेप करणे : *~ a speech, भाषण संक्षिप्त करणे.* **condensation** /,कॉन्डेन्'सेइश्न्/ *ना* [*अगण*] १ गोठण्याची स्थिती, द्रवीभवन; संक्षिप्तता, संक्षेप. २ वाफेचे द्रवीभवन होऊन तिचे एखाद्या पृष्ठभागावर जमा झालेले थेंब. **condenser** *ना* [*गण*] दाटण, संघत्रक.

condescend /,कॉन्डि'सेन्ड्/ *क्रि* [*सक*] (*to*)// (*अधिक्षेपी*) इतरांपेक्षा आपण सरस आहोत अशा तोऱ्यात एखादी गोष्ट करणे, मोठी मेहेरबानी करणे, उपकार केल्याप्रमाणे वागणे : *The manager ~ed to talk to the workers, मेहरबानी केल्याप्रमाणे मॅनेजर कामगारांशी बोलला.* **condescending** *वि* उपकार

केल्यागत, शिष्ट, मेहेरबानीचा. **condescension** /-'सेन्‌श्‌न्/ *ना* [*अगण*] गर्व, अहंपणा दाखवत उपकाराचा आणलेला आव.

condiment /'कॉन्‌डिमन्ट्/ *ना* [*गण*] मसाला – उदा मीठ, मिरे वगैरे.

condition^{1} /कन्'डिश्‌न्/ *ना* १ [*अे.व*] एखाद्या गोष्टीची अवस्था; स्थिती : *a car in good ~, चांगल्या स्थितीतील गाडी.* २ **conditions** [*ब.व*] परिस्थिती, वातावरण. ३ [*गण*] (**क**) एखादी गोष्ट घडण्यासाठी आवश्यक असणारी गोष्ट, अट, उपाधी : *One of the ~s of the job is that you can drive, तुला गाडी चालवता येणं ही त्या नोकरीची एक अट आहे.* (**ख**) करार किंवा कंत्राट यातील आवश्यक म्हणून दिलेली बाब, करारातील अट. ४ [*अगण*] तब्बेत, तंदुरुस्ती : *be out of ~, प्रकृती ठीक नसणे.* ५ [*गण*] आजारपण. ६ (*वाक्‌प्र*) **on condition that** जर असेल तर, या अटीवर.

condition^{2} /कन्'डिश्‌न्/ *क्रि* [*सक*] १ महत्त्वाचा परिणाम घडवणे, संस्कार करणे. २ विशिष्ट पद्धतीने विचार करण्याची किंवा वागण्याची सवय लावणे, वळण लावणे. **conditioner** *ना* [*गण*] केस चमकदार आणि निरोगी राहण्यासाठी लावायचा द्रवपदार्थ. **conditioning** *ना* [*अगण*] संस्कार, वळण.

conditional /कन्'डिशन्‌ल्/ *वि* १ (*on*)// कशावर तरी अवलंबून असणारा, सशर्त : *Payment is ~ on satisfactory completion of the work, समाधानपूर्वक काम पूर्ण करण्यावर पैसे देणे अवलंबून आहे.* २ (*व्याकरण*) (उपवाक्याबाबत) if किंवा unless या शब्दांनी सुरू होणारे इंग्रजी उपवाक्य, संकेत (वाक्य). **conditionally** /-शनलि/ *क्रिवि* सशर्त, काही अटींवर.

condolence /कन्'डउलन्स्/ *ना* [*अगण, गण,* विशेषतः *ब.व*] सांत्वन, सहानुभूती किंवा शोक व्यक्त करणे, दुःखातील सहभागाची भावना.

condom /'कॉन्‌डम्/ *ना* [*गण*] संततिनियमनासाठी पुरुषाने संभोगाच्या वेळी शिस्नावर बसवायचे रबरी आवरण, निरोध.

condone /कन्'डउन्/ *क्रि* [*सक*] (वाईट वर्तनाकडे) दुर्लक्ष करणे, काणाडोळा करणे; क्षमा करणे, माफ करणे.

conducive /कन्'ड्यूसिव्ह्; *अमे* -'डूस्-/ *वि to*// एखादी गोष्ट घडण्यास मदत करणारा किंवा उपयुक्त होणारा, उपयोगी, उपकारक, पोषक : *~ to health, आरोग्याला उपयुक्त.*

conduct^{1} /कन्'डैक्ट्/ *क्रि* १ [*सक*] आयोजन आणि मार्गदर्शन करणे : *~ a survey, आखणी करून सर्वेक्षण करणे.* २ ~ **oneself** (*औप*) विशिष्ट रीतीने वागणे, आब राखणे. ३ [*अक, सक*] (वाद्यवृंद वगैरेच्या) प्रयोगाचे संचलन करणे. ४ [*सक*] उष्णता, वीज वगैरे जाऊ देणे, त्यांचे वहन करणे. **conduction** /-डैक्‌श्‌न्/ *ना* [*अगण*] उष्णतेचे किंवा विजेचे वहन, विद्युत्‌वहन. **conductor** *ना* [*गण*] १ वाद्यवृंदाचा वगैरे संचालक. २ (*स्त्री* **conductress** /-डैक्‌ट्रिस्/) (*ब्रि*) बसमधे तिकिटे देणारा माणूस, वाहक. ३ विद्युत्‌वाहक किंवा उष्णतावाहक.

conduct^{2} /'कॉन्‌डैक्ट्/ *ना* [*अगण*] १ वागणूक, वर्तन. २ एखाद्या गोष्टीच्या व्यवस्थापनाची किंवा दिग्दर्शनाची पद्धत.

cone /कउन्/ *ना* [*गण*] १ (**क**) पायाला चपटा गोलाकार आणि टोकाला अणकुचीदार असणारा घनपदार्थ, शंकू. (**ख**) शंकूच्या आकाराचा : *an ice-cream ~, आईस्क्रीमचा कोन.* २ फर, पाईन यासारख्या सदाहरित झाडांचे फळ.

confection /कन्'फेक्‌श्‌न्/ *ना* [*गण*] (*औप*) गोड पदार्थ घालून तयार केलेला अन्नपदार्थ, मिठाई. **confectioner** /-शन(र्)/ *ना* [*गण*] मिठाई, केक करून विकणारा माणूस, मिठाईवाला, हलवाई. **confectionery** *ना* [*अगण*] मिठाई, केक वगैरे.

confederacy /कन्'फेडरसि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) राज्ये, लोक वगैरेचा संघ, संघराज्य, संयुक्तराज्य.

confederate /कन्'फेडरट्/ *ना* [*गण*] एखाद्याबरोबर – विशेषतः बेकायदा किंवा गुप्त कार्यात – काम करणारा माणूस, संगनमत करणारा माणूस, साथीदार.

confederation /कन्,फेड'रेइश्‌न्/ *ना* [*गण*] लहान गटांची किंवा राज्यांची संघटना, संघराज्य.

confer /कन्'फऽ(र्)/ *क्रि* (**-rr-**) (*औप*) १ [*अक*] (*with*)// एखाद्याशी चर्चा करणे, मसलत करणे, विचारांची देवाण-घेवाण करणे. २ [*सक*] (*on*)// मानचिन्ह, मानसन्मान किंवा लाभ देणे, प्रदान करणे : *~ authority on sb, एखाद्याला अधिकार सुपूर्द करणे.*

conference /'कॉन्फरन्स्/ *ना* [*गण*] १ चर्चेसाठीची भेट किंवा बैठक, परिषद. २ (*वाक्प्र*) **in conference** औपचारिक बैठकीत.

confess /कन्'फेस्/ *क्रि* [*अक, सक*] १ (अपराध) मान्य करणे किंवा कबूल करणे. २ (विशेषतः रोमन कॅथलिक चर्चबाबत) धर्मगुरूपुढे आपली पापे औपचारिकरीत्या सांगणे, स्वतःच्या पापाचा पाढा वाचणे. **confession** /-'फेश्न्/ *ना* [*गण, अगण*] १ स्वतःच्या अपराधाची कबुली. २ (चर्चमधील) पापनिवेदन. **confessional** /-'फेशन्ल्/ *ना* [*गण*] जिथे धर्मगुरू बसून पापनिवेदन ऐकतो ती चर्चमधील एकांताची जागा.

confetti /कन्'फेटि/ *ना* (अे.व क्रियापदासह) विवाहाच्या वेळी टाकण्यात येणारे रंगीत कागदांचे तुकडे.

confidant (स्त्री **-dante**) /,कॉन्फि'डॅन्ट्/ *ना* [*गण*] आपली गुपिते ज्याच्याजवळ विश्वासाने सांगावीत असा माणूस, विश्वासातील व्यक्ती.

confide /कन्'फाइड्/ *क्रि* १ [*सक*] गुपित सांगणे. २ (*क्रिब*) **confide in sb** विश्वासातल्या माणसाला आपली गुप्त गोष्ट सांगणे, विश्वास टाकणे.

confidence /'कॉन्फिडन्स्/ *ना* १ [*अगण*] गाढ विश्वास, भरोसा. २ [*अगण*] स्वतःच्या सामर्थ्यावर विश्वास, आत्मविश्वास. ३ [*गण*] एखाद्याला सांगितलेले गुपित, गुह्य. ४ (*वाक्प्र*) **in (strict) confidence** गुप्ततेने, गुपित म्हणून, विश्वासाने. **take sb into one's confidence** एखाद्याला गुप्त गोष्ट सांगणे, विश्वासात घेणे. **confident** /-डन्ट्/ *वि* आत्मविश्वासपूर्वक, खात्री असणारा. **confidently** *क्रिवि* आत्मविश्वासाने, ठामपणे.

confidential /,कॉन्फि'डेन्शल्/ *वि* १ गुप्त ठेवायचा, गोपनीय. २ गुप्त गोष्टी विश्वासाने सांगितलेला, विश्वासू. **confidentiality** /-,डेन्शि'अॅलटि/ *ना* [*अगण*] गोपनीयता; विश्वासूपणा. **confidentially** /-शलि/ *क्रिवि* विश्वासाने, विश्वासपूर्वक; गुप्त म्हणून; खासगी म्हणून.

configuration /कन्'फिग'रेइश्न्; *अमे* -,फिग्यु'रेइश्न्/ *ना* (*औप*) एखाद्या गोष्टीच्या विविध भागांची रचना, विशिष्ट आंतररचनेमुळे निर्माण होणारे बाह्यरूप, समाकार, मांडणी, व्यूह, घाटणी.

confine /कन्'फाइन्/ *क्रि* [*सक*] १ (*to*)// विशिष्ट मयदित ठेवणे, विशिष्ट भागापुरता बद्ध किंवा मर्यादित असणे : *The illness was ~d to the village, त्या रोगाचा प्रसार फक्त त्या गावापुरताच मर्यादित होता.* २ जखडून ठेवणे, खिळवून ठेवणे : *~d to bed with a fever, तापाने अंथरुणाला खिळलेला.* **confined** *वि* (अवकाशाबाबत) कोंडलेला, बंदिस्त; मर्यादित, बंधनातील. **confinement** *ना* १ [*अगण*] स्थानबद्धता, कोंडी, बंदी. २ [*गण, अगण*] बाळंतपण, प्रसूती. **confines** /'कॉन्फाइन्ज़्/ *ना* [*ब.व*] (*औप*) मर्यादा; सरहद्द, हद्द, सीमा.

confirm /कन्'फऽम्/ *क्रि* [*सक*] १ एखादी गोष्ट खरी आहे असे दाखविणे किंवा सिद्ध करणे, खरा ठरणे किंवा ठरवणे, शाबित करणे : *The announcement ~ed my suspicions, त्या घोषणेने माझ्या शंका खऱ्या ठरल्या.* २ एखादी गोष्ट निश्चित आहे असे म्हणणे किंवा लिहिणे, दुजोरा देणे : *Please write to ~ the details, तपशीलांबाबत खात्री करून घेण्यासाठी कृपया पत्र लिहा.* ३ (बहुधा कर्मणी) ख्रिस्ती चर्चचा सभासद करून घेणे, ख्रिस्ती धर्मातील दृढीकरणसंस्कार करणे. ४ (बहुधा कर्मणी) नोकरीत वगैरे कायम करणे. **confirmation** /,कॉन्फ'मेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] सिद्धता, खात्री, पुरावा; दुजोरा; दृढीकरण संस्कार; (नोकरीतील) स्थायीकरण. **confirmed** *वि* दृढ, ज्यात बदल होणार नाही असा, पक्का : *a ~ed bachelor, कडक ब्रह्मचारी किंवा पक्का ब्रह्मचारी.*

confiscate /'कॉन्फिस्केइट्/ *क्रि* [*सक*] काहीही पैसे न देता – विशेषतः शिक्षा म्हणून – (एखाद्याची मालमत्ता) ताब्यात घेणे, जप्त करणे, (मालमत्तेवर) जप्ती आणणे. **confis-**

cation /,कॉन्फि'स्केइश्न्/ *ना* [*गण, अगण*] जप्ती, सरकारजमा करणे, अधिहरण.

conflagration /,कॉन्फ्ल'ग्रेइश्न्/ *ना* [*गण*] (*औप*) मोठी विनाशकारी आग, आगीचा डोंब.

conflict /'कॉन्फ्लिक्ट्/ *ना* [*गण, अगण*] १ संघर्ष, मारामारी किंवा गंभीर मतभिन्नता. २ (मते वगैरेबाबत) विरोध; मतभेद. **conflict** /कन्'फ्लिक्ट्/ *क्रि* [*अक*] विरोधी असणे, विरुद्ध असणे, विरोधात जाणे.

conform /कन्'फॉऽम्/ *क्रि* [*अक*] १ (*to*)// सर्वमान्य दंडक, नियम यांच्याशी जुळणे, अनुरूप असणे. २ *with/to* एखाद्या गोष्टीशी जुळणे, मिळणे, साजेसा असणे. **conformist** *ना* [*गण*] जुळते घेणारा माणूस, अनुसरणारा माणूस. **conformity** *ना* [*अगण*] अनुसरण, अनुरूपता.

confound /कन्'फाउन्ड्/ *क्रि* [*सक*] (*जुना किंवा अप्रचलित, औप*) एखाद्याला आश्चर्यचकित करून गोंधळात टाकणे, संभ्रमात पाडणे.

confront /कन्'फ्रन्ट्/ *क्रि* [*सक*] १ (*with*)// अवघड किंवा अप्रिय गोष्टीला एखाद्याला तोंड देण्यास भाग पाडणे. २ समोरासमोर भेटणे; विरोध करणे. **confrontation** /,कॉन्फ्रन्'टेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] तीव्र विरोध (किंवा त्याचा प्रसंग), कडवा प्रतिकार, मुकाबला.

confuse /कन्'फ्यूझ्/ *क्रि* [*सक*] १ एखाद्याला भलतेच समजणे, दोहोत घोटाळा करणे : *You have ~d him and/with his brother, तू त्याच्यात आणि त्याच्या भावात घोटाळा करतीयेस्.* २ एखाद्याला स्वच्छ विचार करणे अशक्य करणे, गोंधळवणे, गोंधळात टाकणे : *I'm ~d, मी गोंधळून गेलोय्.* ३ एखादी गोष्ट संदिग्ध करणे, अवघड करणे. **confusion** /-'फ्यूझ्न्/ *ना* [*अगण*] घोटाळा; गोंधळ, भ्रम, संभ्रमितता.

congeal /कन्'जील्/ *क्रि* [*अक, सक*] (द्रवाबाबत) दाटणे, दाटवणे, घट्ट होणे, घट्ट करणे, थिजणे, थिजवणे.

congenial /कन्'जीनिअल्/ *वि* १ प्रसन्न, आनंदी : *a ~ atmosphere, प्रसन्न वातावरण.* २ समभावी, समप्रकृतीचा, आपल्या स्वभावाला जुळणारा. **congenially** *क्रिवि* जुळतेपणाने, स्वभावसाधर्म्याने.

congenital /कन्'जेनिट्ल्/ *वि* (रोग वगैरेबाबत) जन्मतः, जन्मजात, जन्मापासून, उपजत, अंगचा.

congested /कन्'जेस्टिड्/ *वि* खच्च भरलेला; गर्दीचा, दाटीवाटीचा : *streets ~ with traffic, रहदारीने गजबजलेले रस्ते किंवा रहदारीची दाटी असणारे रस्ते.* **congestion** /-'जेश्न्/ *ना* [*अगण*] दाट वस्ती.

conglomerate /कन्'ग्लॉमरट्/ *ना* [*गण*] अनेक व्यवसाय संस्था असणारी मोठी व्यापारी संघटना. **conglomeration** /कन्,ग्लॉम'रेइश्न्/ *ना* [*गण*] अनेक वस्तूंचा गठ्ठा, झुबका, विभिन्न गोष्टींची बांधलेली मोट.

congratulate /कन्'ग्रॅच्युलेइट्/ *क्रि* [*सक*] एखाद्याच्या यशाबाबत, भाग्याबाबत वगैरे आनंद व्यक्त करणे, चांगल्या गोष्टीबाबत एखाद्याचे अभिनंदन करणे : *~ sb on good exam results, परीक्षेतील उत्तम निकालाबद्दल एखाद्याचे अभिनंदन करणे.* **congratulations** /कन्,ग्रॅचु'लेइश्न्झ्/ *उद्गा* (अभिनंदन करताना वापरायचा शब्द) अभिनंदन!

congregate /'कॉङ्ग्रिगेइट्/ *क्रि* [*अक*] एकत्र होणे, गोळा होणे, जमणे. **congregation** /,कॉङ्ग्रि'गेइश्न्/ *ना* [*गण*] नियमितपणे चर्चमधे येणाऱ्या लोकांचा संघ, ख्रिस्तीधर्मसमाज. **congregational** *वि* स्वतंत्र ख्रिस्तीचर्चसंघाचा.

congress /'कॉङ्ग्रेस्; *अमे* -ग्रस्/ *ना* [*गण*, तसेच ब.व क्रियापदासह ए.व] १ चर्चेसाठीची औपचारिक बैठक, परिषद. २ **Congress** कायदे बनविणारी सभा, विधिसभा, महासभा – उदा अमेरिकेतील. ३ (भारतातील) काँग्रेस पक्ष. **congressional** /कन्'ग्रेशन्ल्/ *वि* (अमेरिकेच्या) महासभेचा. **'Congressman/ 'Congresswoman** *ना* [*गण*] १ अमेरिकेच्या महासभेचा सभासद, काँग्रेस प्रतिनिधी. २ भारतीय काँग्रेस पक्षाचा सभासद.

congruent /'कॉङ्ग्रुअन्ट्/ *वि* (त्रिकोणांबाबत) समभुज आणि समकोन; सरूप, समरूप, एकरूप.

congruous /'कॉङ्ग्रुअस्/ *वि* (*औप*) योग्य, अनुरूप; चपखल.

conical /'कॉनिक्ल्/ *वि* शंकूच्या आकाराचा, शंक्वाकृती.

conifer /'कॉनिफ(र्), तसेच 'कउन्-/ *ना* [*गण*] शंकूच्या आकाराची फळे येणारा पाइन, फर यासारखा सूचिपर्णी वृक्ष, शंकुमंत, शंकुवृक्षजाती, शंकुधारी वृक्ष. **coniferous** /क'निफरस्; *अमे* कउ'न्-/ *वि* सूचिपर्णी वृक्षांचा.

conjecture /कन्'जेक्च(र्)/ *क्रि* [*अक, सक*] (*औप*) अंदाज करणे. **conjecture** *ना* [*गण, अगण*] (*औप*) अंदाज, अदमास, अनुमान. **conjectural** *वि* अनुमानधक्क्याचा.

conjugal /'कॉन्जुग्ल्/ *वि* (*औप*) पतिपत्नी संबंधविषयक, दांपत्याचा, वैवाहिक.

conjunction /कन्'जेङ्क्शन्/ *ना* १ [*गण*] (*व्याकरण*) दोन शब्द, पदबंध किंवा वाक्ये जोडणारा शब्द – उदा इंग्रजीतील and, but, or यासारखे शब्द, उभयान्वयी अव्यय. २ [*गण, अगण*] (*औप*) जोडणी, संधी. ३ (*वाक्प्र*) **in conjunction with sb/sth** एखाद्या व्यक्तीसह किंवा गोष्टीसह, संयुक्तपणे.

conjure /'कन्ज(र्)/ *क्रि* १ [*अक*] जादू वाटावी अशी हातचलाखी करणे, जादू करणे. २ (*क्रिव*) **conjure sth up** मनपटलावर उभे करणे, मनःचक्षूंसमोर दिसणे. **conjurer** (तसेच **-or**) *ना* [*गण*] हातचलाखी करणारा माणूस, जादू करणारा, जादूगार.

conk /कॉङ्क्/ (*क्रिव*) **conk out** (*अनौप*) (क) (यंत्राबाबत) बंद पडणे, निकामी होणे : *His old car has ~ed out, त्याची जुनी गाडी निकामी झाली आहे.* (ख) (व्यक्तीविषयी) दमणे, झोपणे किंवा मरणे.

connect /क'नेक्ट्/ *क्रि* १ [*अक, सक*] एकत्र येणे किंवा आणणे; जोडणे : *~ two wires, दोन वायरी जोडणे.* २ [*सक*] परस्पर संबंधित असे मानणे, मनाने संबंध जोडणे.

connection (*ब्रि* तसेच **connexion**) /कन्'अेक्शन्/ *ना* १ (क) [*अगण*] जोडणे, संबंध, अन्वय. (ख) [*गण*] दोन गोष्टी जोडल्या जातात तो बिंदू, संयोग बिंदू; संबंध. २ [*गण*] प्रवासाच्या पुढच्या टप्प्यात प्रवाशांना पुढे घेऊन जाणारी आगगाडी, विमान वगैरे. ३ [*गण, बहुधा ब.व*] धंद्यातील माहितगार, व्यवसायातील माहितीचा माणूस. ४ (*वाक्प्र*) **in connection with sb/sth** एखाद्या विषयी किंवा संबंधी, एखाद्याच्या संदर्भात.

connive /क'नाइव्ह्/ *क्रि* [*अक*] *at//* दुर्लक्ष करणे किंवा एखादी वाईट गोष्ट घडू देणे, डोळेझाक करणे, डोळ्यावर कातडे ओढणे. **connivance** *ना* [*अगण*] काणाडोळा करणे, डोळेझाक.

connoisseur /,कॉन'सऽ(र्)/ *ना* [*गण*] अन्न, कला यातील तज्ज्ञ, कलाभिज्ञ, दर्दी, मुरब्बी, पारखी.

connotation /,कॉन'टेइश्न्/ *ना* [*गण विशेषतः ब.व*] एखाद्या शब्दाच्या प्रमुख अर्थाखेरीज सूचित होणारा अर्थ, कल्पना वगैरे, लक्षणा, ध्वनित अर्थ : *Be careful not to use slang words that have obscene ~s, अश्लील अर्थ ध्वनित करणारे व्रात्य शब्द न वापरण्याची काळजी घे.*

conquer /'कॉङ्क(र्)/ *क्रि* [*सक*] १ बळाचा वापर करून ताब्यात घेणे, जिंकून घेणे, सर करणे. २ पराभव करणे किंवा मात करणे : (*ला*) *You must ~ your fear of driving, गाडी चालविण्यात तुला जी भीती वाटते तिच्यावर तुला विजय मिळवला पाहिजे.* **conqueror** *ना* [*गण*] जेता, विजेता.

conquest /'कॉङ्क्वेस्ट्/ *ना* १ [*अगण*] देशावर, लोकांवर वगैरे मिळवलेला विजय. २ [*गण*] पादाक्रांत करून मिळवलेले काही, जितवस्तू, जिंकलेला भाग.

conscience /'कॉन्शन्स्/ *ना* १ [*गण, अगण*] सदसद्विवेकबुद्धी, बरेवाईट समजण्याची शक्ती : *have a clear/guilty ~, मन स्वच्छ असणे/मनात अपराधी भावना असणे* (म्हणजे *आपण बरे/वाईट केले असे वाटणे*). २ (*वाक्प्र*) **(have sth) on one's conscience** एखाद्या गोष्टीची मनाला टोचणी लागणे.

conscientious /,कॉन्शि'अेन्शस्/ *वि* (एखाद्या व्यक्तीबाबत किंवा तिच्या कृतीबाबत) अगदी काळजीपूर्वक, बारीकसारीक विचार करणारा, विचारपूर्वक. **conscientiously**

क्रिवि विचारपूर्वक, पूर्ण विचारान्ती. **conscientiousness** *ना* [*अगण*] विचारपूर्वकता.

conscious /'कॉन्शस्/ *वि* १ सावध, सावधान, शुद्धीत असणारा. २ (*of*) एखादी गोष्ट माहीत असणारा, ज्ञात असणारा, तिची जाणीव असणारा. ३ जाणूनबुजून, जाणीवपूर्वक, हेतुतः, मुद्दाम : *make a ~ effort, जाणीवपूर्वक प्रयत्न करणे.* **consciously** *क्रिवि* जाणीवपूर्वक, मुद्दाम. **consciousness** *ना* [*अगण*] शुद्ध : *regain ~ness after an accident, अपघातानंतर परत शुद्ध येणे.*

conscript /कन्'स्क्रिप्ट्/ *क्रि* [*सक*] कायदा करून सैन्यात जाण्याची सक्ती करणे, सक्तीने लष्करात भरती करणे. **conscript** /'कॉन्स्क्रिप्ट्/ *ना* [*गण*] सक्तीने लष्करात भरती केलेला माणूस, सक्ती सैनिक. **conscription** /-'स्क्रिप्श्न्/ *ना* [*अगण*] सक्तीची लष्करभरती.

consecrate /'कॉन्सिक्रेइट्/ *क्रि* [*सक*] १ एखादी गोष्ट पवित्र आहे असे अधिकृतपणे जाहीर करणे, अभिषिक्त करणे, अभिमंत्रित करणे, पूजनीय ठरवणे : *~ a church, चर्चचे विधिपूर्वक उद्‌घाटन करणे म्हणजेच समारंभपूर्वक चर्च वापरण्यास सुरुवात करणे.* २ एखाद्या खास (धार्मिक) कारणासाठी राखून ठेवणे, पाळणे, समर्पण करणे. **consecration** /,कॉन्सि'क्रेइश्न्/ *ना* [*अगण*] धर्मप्रतिष्ठित करणे.

consecutive /कन्'सेक्युटिव्ह्/ *वि* एकामागोमाग एक येणारा, सलग, आनुक्रमिक, अखंडित. **consecutively** *क्रिवि* सलगपणे, ओळीने, एकापाठोपाठ एक.

consensus /कन्'सेन्सस्/ *ना* [*गण, अगण*] सर्वानुमत, सर्वसाधारण संमती.

consent /कन्'सेन्ट्/ *क्रि* [*अक*] (*to*)// संमती देणे किंवा परवानगी देणे, अनुमती देणे, रुकार देणे. **consent** *ना* [*अगण*] संमती, अनुमती; परवानगी, अनुज्ञा.

consequence /'कॉन्सिक्वन्स्; *अमे* -क्वेन्स्/ *ना* १ [*गण*] परिणाम, निष्पत्ती : *the political ~s of the decision, निर्णयाचे राजकीय परिणाम.* २ [*अगण*] (*औप*) महत्त्व : *It is of no ~, त्याला महत्त्व नाही.*

consequent /'कॉन्सिक्वन्ट्/ *वि* (*औप*) परिणामी, निष्पन्न झालेला, आनुषंगिक. **consequently** *क्रिवि* परिणामतः, (याची) निष्पत्ती म्हणून, त्यामुळे.

consequential /,कॉन्सि'क्वेन्श्ल्/ *वि* (*औप*) १ परिणामी, निष्पन्न झालेला, आनुषंगिक. २ महत्त्वाचा.

conservation /,कॉन्स'व्हेइश्न्/ *ना* [*अगण*] १ वाया घालवणे, खराब करणे वगैरे गोष्टींना आळा घालणे, नुकसानीपासून बचाव, संरक्षण. २ नैसर्गिक परिसराचे संरक्षण करणे, पर्यावरणाचे संरक्षण करणे. **conservationist** *ना* [*गण*] पर्यावरणाचे संतुलन राखण्यात रस असलेला माणूस, पर्यावरणवादी.

conservative /कन्'सऽव्हटिव्ह्/ *वि* १ मोठ्या आणि अचानक होणाऱ्या बदलाला विरोध करणारा, स्थितिप्रिय, मंदसुधारणावादी. २ **Conservative** कॉन्झरव्हेटिव्ह किंवा हुजूर पक्षाचा. ३ काळजीपूर्वक वागणारा; सौम्य प्रवृत्तीचा, मवाळ, नेमस्त, माफक : *a ~ estimate, मर्यादित किंवा वाजवी अंदाजपत्रक.* **conservative** *ना* [*गण*] १ नेमस्त, पुराणमतवादी, रुढी व नीतिनियमांचे काळजीपूर्वक पालन करणारी व्यक्ती. २ **Conservative** कॉन्झरव्हेटिव्ह किंवा हुजूर पक्षाचा सदस्य. **conservatively** *क्रिवि* पुराणमतवादी पद्धतीने, स्थितिप्रियतेने; जुन्या पद्धतीने, रुढ मार्गाने. **the Conservative Party** *ना* [*अे.व*] (*ब्रि राजकारण*) कॉन्झरव्हेटिव्ह किंवा हुजूर पक्ष, भांडवलशाहीला पाठिंबा देणारा आणि समाजवादाला विरोध करणारा ब्रिटनमधला एक प्रमुख राजकीय पक्ष. **conservatism** /-टिझ्म्/ *ना* [*अगण*] स्थितिप्रियता, पुराणमतवाद.

conservatory /कन्'सऽव्हट्रि; *अमे* -टॉऽरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) १ काचेच्या भिंती आणि छप्पर असणारी रोपे वाढविण्याची खोली, रोपांचे काचगृह. २ संगीत, नृत्य, नाटक वगैरेचे शिक्षण देणारे विद्यालय.

conserve /कन्'सऽव्ह्/ *क्रि* [*सक*] एखादी गोष्ट बदलण्यास, नाहीशी किंवा नष्ट होण्यास प्रतिबंध करणे, पालन करणे, सांभाळणे, राखणे. **conserve** /'कॉन्सऽव्ह्/ *ना* [*गण, अगण*] (*औप*) फळांचे मोठे तुकडे असणारा

जॅम, फळांचा मुरंबा.

consider /कन्'सिड(र्)/ *क्रि* [*सक*] १ विचार करणे, विचारात घेणे. २ वाटणे; मानणे : *We ~ this (to be) very important, आम्हाला हे फार महत्त्वाचे वाटते.* ३ लक्षात घेणे, विचारात घेणे, विचार करणे : *~ the feelings of others, इतरांच्या भावनांचा विचार करणे.* **considered** *वि* विचारान्ती बनवलेले : *a ~ed opinion, विचारान्ती बनवलेले किंवा विचारपूर्वक बनवलेले मत.*

considerable /कन्'सिडरब्ल्/ *वि* राशी किंवा आकाराने मोठा, बराच मोठा. **considerably** /-रब्लि/ *क्रिवि* खूप, पुष्कळ : *It's considerably colder today, आज खूपच गारठा आहे.*

considerate /कन्'सिडरट्/ *वि* इतरांच्या गरजांचा विचार करणारा आणि दयाळू, समजुतदार. **considerately** *क्रिवि* समजुतदारपणे.

consideration /कन्,सिड'रेइश्न्/ *ना* १ [*अगण*] काळजीपूर्वक विचार. २ [*अगण*] इतरांचा विचार, आस्था. ३ [*गण*] एखादी गोष्ट ठरवताना लक्षात घ्यायची गोष्ट, विचारात घेण्यासारखी गोष्ट : *Cost is just one of the ~s, किंमत ही अनेक गोष्टींपैकी एक लक्षात घेण्याची गोष्ट आहे.* ४ [*गण*] (*औप*) बक्षीस; पैसा, कमाई. ५ (*वाक्प्र*) **take sth into consideration** एखादा निकाल देण्यापूर्वी किंवा निर्णय घेण्यापूर्वी एखाद्या गोष्टीचा विचार करणे, विचारात घेणे.

considering /कन्'सिडरिङ्/ *शब्दयो, उ.अव्यय* विचार करता, लक्षात घेतले तर : *She's very active, ~ her age, तिचं वय लक्षात घेतलं तर ती खूप काम करते किंवा धडपडी आहे.*

consign /कन्'साइन्/ *क्रि* [*सक*] १ (माल वगैरे) पाठवणे, धाडणे. २ (*औप*) ताब्यात देणे, हाती देणे; स्वाधीन करणे : *~ the boy to his brother's care, मुलाला भावाच्या हवाली करणे.* **consignment** *ना* १ [*अगण*] (माल वगैरे) पाठवणे. २ [*गण*] आलेला किंवा धाडलेला माल.

consist /कन्'सिस्ट्/ *क्रि* [*अक*] (*क्रिब*) **consist of** -चा बनणे, होणे : *a meal ~ing of soup and bread, सूप आणि पाव यांचे जेवण.* **consist in** मुख्य भाग असणे.

consistency /कन्'सिस्टन्सि/ *ना* १ [*अगण*] (वागणूक) सुसंगत असण्याचा गुण, सुसंगती, सुसंबद्धता. २ [*गण, अगण*] (*ब.व* -ies) (विशेषतः द्रवाची) घनता, घट्टपणा, सांद्रता.

consistent /कन्'सिस्टन्ट्/ *वि* १ (*पसंती*) (व्यक्तीच्या वागणुकीबाबत वगैरे) न बदलणारा, अविचल, सातत्य राखणारा. २ (*with*)// सुसंगत, जुळणारा, शोभेसा, साजेसा : *injuries ~ with the accident, अपघाताला सुसंगत जखमा.* **consistently** *क्रिवि* सातत्याने; सुसंगतपणे.

consolation /,कॉन्स'लेइश्न्/ *ना* १ [*अगण*] सांत्वन : *a few words of ~, सांत्वनाचे चार शब्द.* २ [*गण*] सांत्वन करणारी व्यक्ती किंवा गोष्ट.

console^1 /कन्'सउल्/ *क्रि* [*सक*] सांत्वन करणे, सहानुभूती व्यक्त करणे, समजूत घालणे.

console^2 /'कॉन्सउल्/ *ना* [*गण*] इलेक्ट्रॉनिक उपकरणे चालविणाऱ्या कळींचा फलक, नियंत्रक पट.

consolidate /कन्'सॉलिडेइट्/ *क्रि* [*अक, सक*] १ बळकट होणे/करणे, पक्का किंवा मजबूत होणे/करणे. २ (*व्यापार*) एकात करणे, एकत्र करणे : *~ all his debts, त्याची सर्व कर्जे एकत्र करणे.* **consolidation** /कन्,सॉलि'डेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] मजबुतीकरण, दृढीकरण.

consommé /कन्'सॉमेइ; *अमे* ,कॉन्स्'मेइ/ *ना* [*अगण*] मांसाचे पातळ, पारदर्शी सूप.

consonant /'कॉन्सनन्ट्/ *ना* [*गण*] (क) उच्छ्वासावाटे बाहेर पडणारी हवा जीभ, ओठ वगैरेनी (अंशतः) अडविल्यामुळे निर्माण होणारा भाषेतील ध्वनी, व्यंजन. (ख) व्यंजनध्वनी दाखविणारे अक्षर, व्यंजनदर्शक वर्ण – उदाहरणार्थ इंग्रजीत b, c किंवा d.

consort^1 /'कॉन्सॉऽट्/ *क्रि* [*गण*] बायको किंवा नवरा – विशेषतः राज्यकर्त्या व्यक्तीची/चा.

consort^{2} /कन्'सॉऽट्/ *क्रि* [*अक*] *with*// (बहुधा *अधिक्षेपी*) संगतीत वेळ घालवणे, -च्या सहवासात असणे: *~ing with criminals, गुन्हेगारांच्या सहवासात.*

consortium /कन्'सॉऽटिअम्; *अमे* 'सॉऽर्शिअम्/ *ना* (*ब.व* **-tia** /-टिअ; *अमे* -शिअ/) [*गण*] (अे.व किंवा ब.व क्रियापदासह) समान ध्येय असणाऱ्या व्यापार कंपन्या, पतपेढ्या वगैरेचे मंडळ.

conspicuous /कन्'स्पिक्युअस्/ *वि* सहज दिसणारा, डोळ्यात भरणारा; लक्षात येणारा, जाणवणारा. **conspicuously** *क्रिवि* डोळ्यात भरेल असा; लक्षात येईल असा, जाणवण्यासारखा.

conspiracy /कन्'स्पिरसि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] कट करणे, कारस्थान. २ [*गण*] खलबत, कट, कारस्थानी योजना.

conspire /कन्'स्पाइअ(र्)/ *क्रि* [*अक*] १ (*with/against*)// इतरांसह गुप्त योजना करणे, कटकारस्थान रचणे, गुप्त व्यूह रचणे, खलबत करणे, कट करणे: *~ to kill the king, राजाला मारण्याचा डाव रचणे किंवा कट करणे* ○ *He ~d with others against the government, सरकारविरुद्ध त्याने इतरांबरोबर कट रचला* किंवा *सरकारविरुद्धच्या कारस्थानात इतरांबरोबर तो सामील होता.* २ *against*// एखाद्याविरुद्ध एकत्रपणे काम करणे, संगनमताने काम करणे, -च्या विरुद्ध एकत्र येणे, -च्या विरुद्ध जुळून येणे: *Circumstances ~d against them, परिस्थिती त्यांच्याविरुद्ध होती* किंवा *सर्व परिस्थिती त्यांच्या विरुद्ध जुळून आली.* **conspirator** /कन्'स्पिरट(र्)/ *ना* [*गण*] कट करणारा, कटवाला, कारस्थानी.

constable /कॅन्स्टब्ल्; *अमे* 'कॉन्-/ *ना* [*गण*] (*ब्रि जुना, अप्रचलित*) सर्वात कनिष्ठ श्रेणीचा पोलीस किंवा महिलापोलीस, शिपाई, हवालदार. **constabulary** /कन्'स्टॅब्युलरि; *अमे* -लेरि/ *ना* [*गण, तसेच* ब.व क्रियापदासह अे.व] (*ब.व* **-ies**) एखाद्या विशिष्ट भागातील पोलीसदल, शिपाईदल.

constant /'कॉन्स्टन्ट्/ *वि* १ सततचा, कायम चालणारा, अखंड, अनहत: *~ noise, सततचा गोंगाट.* २ न बदलणारा, स्थिर, अविचल, नित्य: *a ~ temperature, स्थिर तापमान.* **constancy** *ना* [*अगण*] बदल न होणारी स्थिती, अविचलता.

constellation /,कॉन्स्ट'लेइश्न्/ *ना* [*गण*] एखादे नाव असलेला तारकासमूह, नक्षत्र.

consternation /,कॉन्स्ट'नेइश्न्/ *ना* [*अगण*] आश्चर्य, भीती आणि काळजीची भावना.

constipated /'कॉन्स्टिपेइटिड्/ *वि* आतड्यातील मल सहजतेने उत्सर्जित करणे शक्य नसलेला, बद्धकोष्ठ. **constipation** /,कॉन्स्टि'पेइश्न्/ *ना* [*अगण*] बद्धकोष्ठता, मलावरोध.

constituency /कन्'स्टिट्युअन्सि/ *ना* [*गण*] (अे.व किंवा ब.व क्रियापदासह) (*ब.व* **-ies**) संसदेला वगैरे प्रतिनिधी जेथून पाठवला जातो तो भाग (किंवा त्या भागातले मतदार), मतदारसंघ.

constituent /कन्'स्टिट्युअन्ट्/ *वि* १ संपूर्ण अशा एखाद्या गोष्टीचा भाग, अंश, घटक. २ (सभा वगैरे बाबत) राजकीय संविधान बदलण्याची सत्ता किंवा अधिकार असलेला, संविधायी. **constituent** *ना* [*गण*] १ मतदारसंघाचा सभासद. २ घटक, भाग.

constitute /'कॉन्स्टिट्यूट्/ *क्रि* [*सक*] १ पूर्ण करणे, -चे बनणे किंवा होणे: *Twelve months ~ a year, बारा महिन्यांचे एक वर्ष होते.* २ असणे, होणे: *The decision to build the road ~s a real threat to the countryside, हा रस्ता बांधण्याचा निर्णय म्हणजे या ग्रामीण परिसरावरचे खरोखर एक संकटच आहे.*

constitution /,कॉन्स्टि'ट्यूश्न्; *अमे* -'टूश्न्/ *ना* १ [*गण*] एखाद्या देशाचा कारभार ज्यानुसार चालतो ती तत्वे आणि कायदे यांचा संच, संविधान, घटना. २ [*गण*] एखाद्या माणसाची शारीरिक ठेवण आणि स्थिती, प्रकृती, तब्बेत: *a strong ~, दणकट प्रकृती.* ३ [*गण*] एखाद्या गोष्टीची सर्वसाधारण रचना किंवा ठेवण. **constitutional** *वि* एखाद्या देशाच्या कायद्याला अनुसरून, घटनेचा, घटनाधिष्ठित, संविधानात्मक. **constitutionally** /-अलि/

क्रिवि प्रकृतीमानाने; संविधानानुसार, घटनात्मकदृष्ट्या.

constrain /कन्'स्ट्रेइन्/ *क्रि* [*सक*] (*औप*) एखाद्याचे मन वळवून किंवा त्याच्यावर दबाव आणून त्याला एखादी गोष्ट करावयास भाग पाडणे, एखादी गोष्ट करायला लावणे, दडपण आणून करून घेणे : *I felt ~ed to obey, मला आज्ञा पाळणे भाग पडले.*

constraint /कन्'स्ट्रेइन्द्/ *ना* १ [*गण*] (कार्यावर वगैरे) बंधन आणणारी गोष्ट किंवा मर्यादा घालणारी गोष्ट, मर्यादा, बंधन, निर्बंध : *One of the ~s on the project will be the money available, उपलब्ध होऊ शकणारा पैसा ही या प्रकल्पाची एक मर्यादा राहील किंवा उपलब्ध होऊ शकणाऱ्या पैशाचा विचार करता या प्रकल्पाला मर्यादा आहेत.* २ [*अगण*] बळजबरी, होणारी सक्ती, लादले जाणे, नियंत्रण.

constrict /कन्'स्ट्रिक्द्/ *क्रि* [*सक*] घट्ट करणे, मर्यादित करणे, आवळणे, संकुचित करणे : *a tight collar ~ing the neck, गळा आवळणारी म्हणजेच गळ्याला गच्च बसणारी घट्ट कॉलर.* **constriction** /कन्'स्ट्रिक्शन्/ *ना* १ [*अगण*] आवळणे, संकोच, आकुंचन. २ [*गण*] आवळणारी किंवा घट्ट करणारी गोष्ट, संकोचक, निर्बंध : (*लां*) *the ~s of prison life, तुरुंगातील जीवनावरील निर्बंध.*

construct /कन्'स्ट्रक्द्/ *क्रि* [*सक*] बांधणे, रचणे.

construction /कन्'स्ट्रक्शन्/ *ना* १ [*अगण*] बांधण्याची कृती किंवा पद्धत, बांधकाम : *The new bridge is still under ~, नवीन पुलाचे बांधकाम अजून चालू आहे.* २ [*गण*] संरचना, रचना, उभारणी; बांधकाम. ३ [*गण*] (*औप*) समजून घेण्याचा मार्ग, अन्वय; अर्थ : *I would put a different ~ on her behaviour, मी तिच्या वागण्याचा अर्थ वेगळा करीन, तिच्या वागण्याचा अर्थ मला निराळाच वाटतो.*

constructive /कन्'स्ट्रक्टिव्ह्/ *वि* मदत करणारा, विधायक; उपयुक्त, उपयोगी : *~ suggestions, विधायक किंवा उपयुक्त सूचना.* **constructively** *क्रिवि* विधायकपणे, उपयोगी पडेल असा.

consul /'कॉन्स्ल्/ *ना* [*गण*] परदेशी राहून तेथे राहणाऱ्या स्वतःच्या देशबांधवांना मदत करण्यासाठी त्याच्या शासनाने अधिकृतपणे नेमलेला अधिकारी, परराष्ट्र दूत. **consular** /'कॉन्स्युल(र्); *अमे* -सल्-/ *वि* परराष्ट्र दूताचा किंवा दूतविषयक. **consulate** /'कॉन्स्युलद्; *अमे* -सल्-/ *ना* [*गण*] परराष्ट्रदूताचे कार्यालय, वकिलात, दूतावास.

consult /कन्'सैल्द्/ *क्रि* १ [*सक*] विचारण्यासाठी किंवा माहिती घेण्यासाठी (एखाद्या माणसाकडे) जाणे, (ग्रंथ वगैरे) पाहणे, सल्ला घेणे, मदत घेणे, विचार घेणे : *~ the doctor about a sore throat, घसा बसल्यावर डॉक्टरचा सल्ला घेणे.* २ [*अक*] *with//* एखाद्याबरोबर चर्चा करणे, सल्ला-मसलत करणे, विचारविनिमय करणे : *~ with one's friends, मित्रांशी विचारविनिमय करणे.*

consultant /कन्'सैल्टन्द्/ *ना* [*गण*] १ सल्ला देण्यासाठी त्याकरिताचे शुल्क देऊन नेमलेला तज्ज्ञ, संमंत्रक, सल्लागार. २ (*ब्रि*) वैद्यकशास्त्रातील एखाद्या विशिष्ट शाखेचे विशेष ज्ञान घेतलेला इस्पितळातील ज्येष्ठ डॉक्टर : *a ~ surgeon, विशेष शल्यचिकित्सक.*

consultation /,कॉन्सल्'टेइशन्/ *ना* १ [*अगण*] सल्ला घेणे किंवा देणे, विचारविनिमय. २ [*गण*] चर्चा करण्यासाठीची बैठक – उदाहरणार्थ, रोग्याच्या आजाराविषयीची.

consume /कन्'स्यूम्; *अमे* -'सूम्/ *क्रि* [*सक*] १ वापरणे : *Some types of car ~ less petrol than others, काही प्रकारच्या गाड्या कमी पेट्रोल वापरतात किंवा कमी पेट्रोलवर चालतात.* २ (आग वगैरेबाबत) खाक करणे, भस्मसात् करणे, नष्ट करणे. ३ (*औप*) खाणे किंवा पिणे. **consuming** *वि* फार तीव्र, प्रबळ, ग्रासणारा : *a ~ passion, प्रबळ किंवा घेरणारी वासना.*

consumer /कन्'स्यूम(र्); *अमे* -सू-/ *ना* [*गण*] माल विकत घेणारा, खरीददार, ग्राहक, उपभोक्ता. **consumer durables** = DURABLES (DURABLE). **consumer goods** *ना* [*ब.व*] ग्राहक विकत घेतो त्या अन्न, कपडे वगैरेसारख्या वस्तू, उपभोग्य माल.

consummate /'कॉन्समेइद्/ *क्रि* [*सक*]

(*औप*) १ पूर्ण किंवा परिपूर्ण करणे, निर्दोष करणे. २ संभोग करून कायदेशीरपणाने विवाहपूर्ती करणे. **consummation** /ˌकॉन्स'मेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] पूर्ती; संभोगान्त विवाहपूर्ती.

consumption /कन्'सम्प्श्न्/ *ना* [*अगण*] (क) अन्न, साधनसंपत्ती वगैरेचा वापर, खप, भक्षण : *This food is not fit for human ~, हे अन्न माणसाने खाण्याच्या लायकीचे नाही.* (ख) वापरलेली राशी : *measure a car's fuel ~, गाडीच्या इंधन वापराचे मोजमाप करणे म्हणजे गाडीला किती इंधन लागते ते मोजणे.*

contact /'कॉन्टॅक्ट्/ *ना* १ [*अगण*] स्पर्श : *Her hand came into ~ with a hot surface, तिच्या हाताला एका गरम पृष्ठभागाचा स्पर्श झाला म्हणजेच एक गरम पृष्ठभाग लागला.* २ [*अगण*] संपर्क : *Stay in ~ with your parents, आपल्या आई-वडलांशी संपर्क ठेव.* ३ [*गण*] संपर्क ठेवण्याची कृती, संबंध ठेवणे : *a job involving contacts with other companies, इतर कंपन्यांशी संबंध येतील अशी नोकरी.* ४ [*गण*] भेटणारा – विशेषतः मदत करणारा माणूस, संबंधी : *He has several ~s in the building trade, बांधकाम व्यवसायात त्याचे अनेक संबंधी आहेत.* ५ [*गण*] विजेचे कनेक्शन, विद्युत संबंध. **contact** /'कॉन्टॅक्ट्, कन्'टॅक्ट्/ *क्रि* [*सक*] फोन, पत्र वगैरेतून एखाद्याशी संपर्क साधणे, भेटणे : *Where can I ~ you next week? पुढच्या आठवड्यात तुझ्याशी कुठे संपर्क साधू किंवा तुला कुठं गाठायचं?* **'contact lens** *ना* [*गण*] दृष्टी सुधारण्यासाठी डोळ्याच्या पडद्यावर घातलेले पातळ भिंग.

contagion /कन्'टेइजन्/ *ना* १ [*अगण*] इतर लोकांना स्पर्श करून किंवा त्यांच्या संपर्कात राहून रोग फैलावणे, रोगाचा संसर्ग. २ [*गण*] संसर्गजन्य रोग, स्पर्शजन्य रोग. **contagious** /-टेइजस्/ *वि* १ (क) (रोगाबाबत) सांसर्गिक, संसर्गजन्य, स्पर्शसंचारी, स्पर्शजन्य. (ख) (व्यक्तीबाबत) संसर्गाने पसरणारा रोग झालेला. २ एका माणसाकडून दुसऱ्या माणसाकडे सहज जाणारा, सांसर्गिक, लागण होणारा, साथीचा : *contagious laughter, हसायची लागण* किंवा *हास्याची साथ.*

contain /कन्'टेइन्/ *क्रि* [*सक*] १ मावणे, सामावणे : *a bottle ~ing two litres of milk, दोन लिटर दूध मावणारी बाटली.* २ (भावना, शत्रूचे सैन्य वगैरे) काबूत ठेवणे, त्यावर नियंत्रण ठेवणे, ताब्यात ठेवणे : *trying to ~ her anger, स्वतःचा राग आवरायचा तिचा प्रयत्न.*

container /कन्'टेइन(र्)/ *ना* [*गण*] १ एखादी गोष्ट ठेवण्यासाठी वापरायची बाटली, खोके, डबा वगैरे, पात्र, भांडे : *a ~ for sugar, साखरेचे भांडे* किंवा *साखरेचा डबा.* २ माल पाठवण्याची पत्र्याची मोठी पेटी, ट्रंक.

contaminate /कन्'टॅमिनेइट्/ *क्रि* [*सक*] खराब करणे किंवा दूषित करणे : *~d food, दूषित अन्नपदार्थ.* **contamination** /कन्ˌटॅमि'नेइश्न्/ *ना* [*अगण*] दूषित करणे, दूषितीकरण, मलीनता, संदूषण.

contemplate /'कॉन्टम्प्लेइट्/ *क्रि* [*सक*] १ विचार करणे; करण्याचा विचार करणे : *~ visiting London, लंडनला जाण्याचा विचार करणे.* २ (*औप*) बारकाईने पाहणे, अवलोकन करणे, लक्ष देऊन पाहणे, पाहून विचार करणे, विचारपूर्वक न्याहाळणे : *~ a picture, चित्राचे सूक्ष्म अवलोकन करणे.* **contemplation** /ˌकॉन्टम्'प्लेइश्न्/ *ना* [*अगण*] विचार करणे; खोलवर विचार करणे, चिंतन. **contemplative** /कन्'टेम्प्लटिव्ह्/ *वि* विचारी, चिंतनशील.

contemporary /कन्'टेम्प्ररि; *अमे* -परेरि/ *वि* १ हल्लीच्या काळचा, वर्तमानकालीन; आधुनिक. २ एकाच काळचा, समकालीन : *a play by Shakespeare accompanied by ~ music, शेक्सपिअरचे नाटक आणि बरोबरीला त्या काळचे संगीत.* **contemporary** *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) एकाच काळी राहणारी दोन माणसे, समकालीन : *Shakespeare and his contemporaries, शेक्सपिअर आणि त्याचे समकालीन.*

contempt /कन्'टेम्प्ट्/ *ना* [*अगण*] (*for*)// १ एखाद्या गोष्टीला किंवा व्यक्तीला किंमत नसल्याची आणि म्हणून त्याचा आदर न करण्याची भावना, तुच्छता, तिरस्कार, घृणा, अवहेलना : *feel ~ for people who are cruel to animals, प्राण्यांशी क्रूरपणे वागणाऱ्या*

लोकांचा तिरस्कार वाटणे. २ (नियम, धोका वगैरे बाबत) अनादर, तुच्छता : *her ~ for the risks, (त्यातील) धोक्यांबाबतची तिची बेपर्वाई किंवा तिला वाटणारी तुच्छता.* **contemptible** /-अब्‌ल्/ *वि* तिरस्करणीय, घृणास्पद, गर्हणीय. **con,tempt of 'court** *ना* [*अगण*] कोर्टाचे किंवा न्यामूर्तींचे न ऐकणे, कोर्टाची बेअदबी. **contemptuous** /-च्युअस्/ *वि* तिरस्कारयुक्त, तुच्छतापूर्ण.

contend /कन्'टेन्ड्/ *क्रि* १ [*अक*] *with/against//* एखाद्या व्यक्तीशी/गोष्टीशी स्पर्धा करणे, झगडणे. २ [*सक*] युक्तिवाद करणे; आपला मुद्दा मांडणे, स्वतःचे मत प्रतिपादन करणे, दावा करणे : *~ that the theory was wrong, ती उपपत्ती चुकीची होती असा दावा करणे.* **contender** *ना* [*गण*] स्पर्धेत भाग घेणारा, स्पर्धक, इच्छुक.

content^1 /कन्'टेन्ट्/ *वि* समाधानी, संतुष्ट; आनंदी, खुश : *~ to stay at home, घरी बसण्यात समाधानी असणारा.* **content** *ना* [*अगण*] समाधान, संतोष. **content** *क्रि* [*सक*] एखाद्याला समाधानी किंवा संतुष्ट करणे. **contented** *वि* समाधानी, संतुष्ट. **contentedly** *क्रिवि* समाधानाने, संतोषाने. **contentment** *ना* [*अगण*] समाधानीपणा, समाधान, संतुष्टपणा, संतोष, आनंद, तृप्ती.

content^2 /'कॉन्टेन्ट्/ *ना* १ **contents** [*ब.व*] एखाद्या गोष्टीमधे असणाऱ्या गोष्टी, आतल्या गोष्टी, अंतर्भूत गोष्टी : *the ~s of her bag, तिच्या पिशवीतील गोष्टी.* २ **contents** [*ब.व*] पुस्तकात समाविष्ट केलेल्या प्रकरणांची यादी, अनुक्रमणिका. ३ [*अे.व*] एखाद्या पुस्तकाचा, कार्यक्रमाचा वगैरे विषय, आशय. ४ [*अे.व*] एखाद्या पदार्थातील एखाद्या द्रव्याचा अंश : *the silver ~ of a coin, नाण्यातील चांदीचा भाग किंवा अंश.*

contention /कन्'टेन्शन्/ *ना* १ [*अगण*] भांडण, तंटा किंवा वादविवाद, म्हणणे, युक्तिवाद. २ [*गण*] वादविवादात वगैरे केलेला दावा. **contentious** /-शस्/ *वि* वादविवादप्रिय, भांडखोर; वादविवाद उत्पन्न करणारा, वादाचा, वावदूक.

contest^1 /'कॉन्टेस्ट्/ *ना* [*गण*] मारामारी, लढत; सामना, स्पर्धा, चढाओढ.

contest^2 /कन्'टेस्ट्/ *क्रि* [*सक*] १ एखादी गोष्ट चुकीची आहे असा दावा करणे. २ (स्पर्धेत वगैरे) जिंकण्यासाठी भाग घेणे, विजयासाठी लढणे किंवा स्पर्धेत उतरणे : *~ an election, निवडणूक लढवणे.* **contestant** *ना* [*गण*] स्पर्धेत भाग घेणारा माणूस, स्पर्धक, प्रतिस्पर्धी.

context /'कॉन्टेक्स्ट्/ *ना* [*गण, अगण*] १ जेथे एखादा शब्द वापरला गेला असेल ते वाक्य, पदबंध वगैरे, संदर्भ. २ एखादी घटना घडते ती परिस्थिती, घटनेचा संदर्भ.

continent /'कॉन्टिनन्ट्/ *ना* १ [*गण*] (युरोप, आशिया, आफ्रिका वगैरे सारखा) मोठ्या भूभागांपैकी एक, मोठा भूप्रदेश, खंड. २ **the Continent** [*अे.व*] युरोपचा मुख्य भूप्रदेश, (इंग्लंड सोडून) युरोप खंड. **continental** /,कॉन्टि'नेन्ट्ल्/ *वि* १ खंडाचा, त्या खंडाचे वैशिष्ट्य दाखवणारा. २ (तसेच **Continental**) इंग्लंडव्यतिरिक्त इतर युरोपचा, युरोपीय : *a C~al holiday, युरोपात उपभोगायची सुट्टी.*

contingency /कन्'टिन्जन्सि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) संभाव्य घटना, संभावना, आगंतुक घटना, आकस्मिक घटना : *prepared for every ~, कोणत्याही संभाव्य गोष्टीला तोंड देण्यास तयार.*

contingent^1 /कन्'टिन्जन्ट्/ *ना* [*गण*] १ मोठे सैन्यदल, नौदल वगैरेचा भाग; फौजेची तुकडी. २ लोकांच्या मोठ्या समूहाचा एक भाग.

contingent^2 /कन्'टिन्जन्ट्/ *वि* दैवावर किंवा योगायोगावर अवलंबून असणारा, आकस्मिक, दैवयोगाचा, आगंतुक, यादृच्छिक.

continual /कन्'टिन्युअल्/ *वि* सर्वकाळ घडणारा किंवा अनेकदा घडणारा, निरंतर, वारंवार : *~ rain, सतत पाऊस* ○ *~ interruptions, वारंवार येणारे खंड.* **continually** *क्रिवि* पुन्हापुन्हा, सतत; निरंतर, अखंड, अविरत.

continuation /कन्,टिन्यु'अेइशन्/ *ना* १ [*अगण, अे.व*] पुढे चालू ठेवण्याची कृती, चालू असणे. २ [*गण*] एखाद्या गोष्टीचा विस्तार किंवा तिचे दुसऱ्या गोष्टीला जोडून पुढे चालू राहणे : *This road is a ~ of the highway,*

हमरस्त्याचाच पुढे वाढलेला भाग म्हणजे हा रस्ता.

continue /कन्'टिन्यू/ *क्रि* [*अक, सक*] १ पुढे जाणे/नेणे, पुढे सरकणे/सरकवणे : ~ *up the hill, टेकडीवर चढत राहणे.* २ एखादी गोष्ट घडत किंवा करत राहणे, एखादी क्रिया चालू राहणे किंवा ठेवणे : ~ *running, पळत राहणे* ○ *~d her visits to the hospital, दवाखान्यास भेट देणे तिने चालू ठेवले.* ३ थांबल्यावर पुन्हा चालू करणे, पुन्हा सुरू करणे.

continuity /,कॉन्टि'न्यूअटि/ *ना* [*अगण*] १ सतत चालू असण्याची स्थिती, सातत्य, सलगता. २ एखाद्या गोष्टीच्या अंतर्गत घटकांतील तार्किक संबंध, दुवा : *The story lacks ~, या कथेत काही दुवे नाहीत* किंवा *या कथेत (कथेच्या निवेदनात) सलगता नाही.*

continuous /कन्'टिन्युअस्/ *वि* न थांबता पुढे जाणारी (गोष्ट वगैरे) : *a ~ line/noise/flow, एकसारखी चालणारी रांग, एकसारखा चालणारा गोंगाट, एकसारखी वाहणारी धार.* **continuously** *क्रिवि* सतत, एकसारखा. **con'tinuous tense** *ना* [*गण*] (*व्याकरण*) be या क्रियापदाचे रूप आणि क्रियापदाला -ing प्रत्यय लावून बनलेले रूप या दोहोंनी बनलेला आणि क्रिया ही काही काळ चालू आहे असे दाखविणारा क्रियापदबंध – उदा I am singing, अपूर्ण काळ.

contort /कन्'टॉऽट्/ *क्रि* [*सक*] वाकडेतिकडे किंवा वेडेवाकडे करणे : *a face ~ed with pain, वेदनेने वाकडातिकडा झालेला चेहेरा.* **contortion** /कन्'टॉऽशन्/ *ना* [*गण, अगण*] वेडेवाकडे होणे.

contour /'कॉन्टुअ(र्)/ *ना* [*गण*] किनारा, मानवी आकृती वगैरेची रूपरेखा, परिघाकृती, रूपरेषा, बाह्यरेखा. **'contour line** *ना* [*गण*] समुद्रसपाटीपासून समान उंची दाखविणारे नकाशावरील बिंदू जोडणारी रेषा, समोच्च रेषा.

contraband /'कॉन्ट्रबॅन्ड्/ *ना* [*अगण*] बेकायदेशीरपणे देशात आणलेला किंवा देशाबाहेर नेलेला माल, निषिद्ध वस्तू, वर्जित माल.

contraception /,कॉन्ट्र'सेप्शन्/ *ना* [*अगण*] गर्भधारणाविरोध, गर्भरोध, संततिप्रतिबंध. **contraceptive** /-'सेप्टिव्ह्/ *ना* [*गण*], *वि* संततिप्रतिबंधक (औषध, साधन वगैरे), कुटुंबनियोजनाचे साधन, संततिनिरोधक साधन.

contract^1 /'कॉन्ट्रॅक्ट्/ *ना* [*गण, अगण*] दोन व्यक्ती, गट, राज्ये वगैरेमधील अधिकृत करार, संविदा : *a ~ between a person and his/her employer, एखादी व्यक्ती व तिला नोकरीवर ठेवणारा मालक यांच्यातील करार* ○ *The builder is under ~ to finish the house by the end of June, जूनअखेरपर्यंत घर पूर्ण करण्याचा बिल्डरचा करार आहे म्हणजे कराराचे बंधन बिल्डरवर आहे.* **contractual** /कन्'ट्रॅक्चुअल्/ *वि* कराराचा, करारातील.

contract^2 /कन्'ट्रॅक्ट्/ *क्रि* १ [*अक, सक*] कायदेशीर करार करणे : ~ *with the firm to supply goods, संस्थेशी माल पुरवण्याचा करार करणे.* २ [*सक*] (रोग) लागणे, लागण होणे, संसर्ग होणे. ३ [*सक*] (*औप*) (कर्ज वगैरे) काढणे. ४ (*क्रिब*) **contract out (of sth)** एखाद्या गोष्टीत भाग न घेणे.

contract^3 /कन्'ट्रॅक्ट्/ *क्रि* [*अक, सक*] लहान होणे किंवा करणे, आकसणे, आकुंचन पावणे : *metal ~s as it cools, थंड होताना धातू आकुंचन पावतो.* **contraction** /कन्'ट्रॅक्शन्/ *ना* १ [*अगण*] आकुंचन पावणे, संकोच, आकुंचन. २ [*गण*] शब्दाचे संक्षिप्त रूप, शब्दाचा संक्षेप : *'Can't' is a ~ion of 'cannot', 'Can't' हे 'cannot' चे संक्षिप्त रूप आहे.* ३ [*गण*] जन्म देण्यापूर्वी गर्भाशयाचे होणारे आकुंचन, बाळंतपणापूर्वीचे गर्भाशयाचे आवळले जाणे.

contradict /,कॉन्ट्र'डिक्ट्/ *क्रि* [*सक*] १ एखादा माणूस किंवा एखादे विधान वगैरे चूक आहे असे म्हणणे, विरोध करणे : *Don't ~ your mother, आपल्या आईला विरोध करू नको किंवा तिला चूक म्हणू नको.* २ (वास्तविके, विधान वगैरेबाबत) विरुद्ध असणे, विसंगत असणे : *Her account ~s what you said, तू जे म्हणालास त्याच्याशी विसंगत असा तिचा वृत्तांत आहे.* **contradiction** *ना* [*गण, अगण*] विसंगती, विरोधी भाग, व्याघात. **contradictory** *वि* न जुळणारा, विसंगत, परस्परविरोधी : *~ory accounts of the acci-*

dent, अपघाताबाबतचे परस्परविरोधी वृत्तांत.

contraflow /'कॉन्ट्रफ्लउ/ *ना* [*गण, अगण*] रस्त्याच्या अर्ध्या भागातून नेहमीच्या दिशेने जाणारी वाहने दुसऱ्या अर्ध्या भागातून सोडून समोरून येणाऱ्या वाहनांबरोबर त्यांना रस्ता विभागून वापरण्यासाठी वळवणे, विरुद्धप्रवाह.

contralto /कन्'ट्रॅल्टउ/ *ना* [*गण, अगण*] मंद्र सप्तकात गाणारी स्त्री.

contraption /कन्'ट्रॅप्शन्/ *ना* [*गण*] (*अनौप*) विचित्र किंवा गुंतागुंतीचे साधन.

contrary^1 /कॉन्ट्ररि; *अमे* -ट्रेरि/ *वि* (*to*)// विरुद्ध, उलट; अगदी वेगळा, भिन्न, विपरित : *~ to what you believe, तुला वाटतं (तुझा विश्वास आहे) त्याच्या अगदी उलट.*

contrary^2 /'कॉन्ट्ररि; *अमे* -ट्रेरि/ *ना* १ **the contrary** [*अे.व*] विरुद्ध बाजू, उलट बाजू किंवा बाब : *The ~ is true, उलट गोष्ट खरी आहे.* २ (*वाक्प्र*) **on the 'contrary** विरुद्ध बाजू खरी आहे, उलट, खरं सांगायचं तर : *I've never said I don't like music; on the ~, I like it a lot, मला संगीत आवडत नाही असं मी कधीच म्हणालो नाही; उलट मला संगीत फारच आवडतं.* **to the 'contrary** विरुद्धचा : *I shall continue to believe this until I get proof to the ~, विरुद्धचा पुरावा मिळेपर्यंत मी याच गोष्टीवर विश्वास ठेवत राहीन.*

contrary^3 /कन्'ट्रेअरि/ *वि* (*अनौप*) ऐकायला, मदत करायला वगैरे तयार नसणारा, अडेलतट्टू, आडमुठा : *Don't be so ~! एवढा आडमुठेपणा करू नकोस!* किंवा *आडमुठा आहेस झालं!* **contrariness** *ना* [*अगण*] अडेलतट्टूपणा, आडमुठेपणा.

contrast /कन्'ट्रास्ट्/ *क्रि* १ [*सक*] फरक स्पष्ट होण्यासाठी तुलना करणे, तुलना करून भेद दाखवणे. २ [*अक*] फरक असणे, विभिन्न असणे, अंतर किंवा भेद दिसणे : *the ~ing cultures of Africa and Europe, विभिन्न असणाऱ्या युरोप आणि आफ्रिकेतील संस्कृती.* **contrast** /'कॉन्ट्रास्ट्/ *ना* [*गण, अगण*] स्पष्टपणे दिसणारा विरोध किंवा फरक, विभिन्नता, वैधर्म्य, विरोधाभास.

contravene /,कॉन्ट्र'व्हीन्/ *क्रि* [*सक*] (कायदा, नियम वगैरे) मोडणे, भंग करणे, धुडकावणे. **contravention** /,कॉन्ट्र'व्हेन्शन्/ *ना* [*गण, अगण*] (नियम, कायदे) भंग, (नियम) दूर सारणे किंवा गुंडाळून ठेवणे.

contretemps /'कॉन्ट्रटॉम्/ *ना* [*गण*] दुर्दैवी घटना, चूक; पीछेहाट.

contribute /कन्'ट्रिब्यूट्/ *क्रि* १ [*अक, सक*] (*to/towards*)// (पैसे, मदत, कल्पना वगैरे) देण्यात इतरांबरोबर सहभागी होणे, सहभाग घेणे, वाटा उचलणे. २ [*अक*] *to*// होण्यास कारण होणे, कारणीभूत होणे : *~ to her success, तिच्या यशाला कारणीभूत होणे.* ३ [*अक, सक*] वर्तमानपत्र वगैरेसाठी (लेख वगैरे) लिहिणे. **contribution** /,कॉन्ट्रि'ब्यूशन्/ *ना* [*गण, अगण*] वर्गणी, सहभाग, वाटा, मदत, अंशदान; लेखनातील सहभाग, लेख. **contributor** *ना* [*गण*] पैसे वगैरे देणारा माणूस, अंशदाता, वर्गणीदार, सहभागी; लेख देणारा, लेखक. **contributory** /कन्'ट्रिब्युटरि/ *वि* अंशदातात्मक वाटा देण्याचा, सहभागी, साहाय्यकारी, कारक.

contrite /'कॉन्ट्राइट्/ *वि* हातून घडलेल्या अन्यायाबाबत दुःख वाटणारा, दिलगीर, पश्चात्तापपूर्वक. **contritely** *क्रिवि* पश्चात्तापाने, दिलगिरीने, खेदाने. **contrition** /कन्'ट्रिशन्/ *ना* [*अगण*] दिलगिरी, पश्चात्ताप, खेद.

contrive /कन्'ट्राइव्ह्/ *क्रि* [*सक*] १ (एखादी गोष्ट) करण्याचा मार्ग काढणे : *~ to live on a small income, अल्प उत्पन्नात राहण्याचा मार्ग काढणे.* २ युक्ती शोधणे, शोध लावणे, हिकमत लढवणे : *~ a way of avoiding paying tax, कर भरायला न लागण्याची युक्ती शोधणे.* **contrivance** *ना* १ [*अगण*] युक्ती शोधणे, हिकमत लढवणे, शक्कल. २ [*गण*] लावलेला शोध, युक्ती, हिकमत.

control /कन्'ट्रउल्/ *ना* १ [*अगण*] दिशा देण्याची, आज्ञा देण्याची, मर्यादा घालण्याची शक्ती किंवा सामर्थ्य, नियंत्रणशक्ती, ताबा : *She lost ~ of the car on the ice, बर्फावरून जाताना तिचा गाडीवरचा ताबा सुटला.* २ [*गण*] आळा घालणारी गोष्ट, नियंत्रण : *~s on pollution, प्रदूषण रोखण्याची नियंत्रणे.* ३ [*गण*] एखाद्या प्रयोगाच्या परिणामांची तुलना करण्यासाठी वापरायचा मानक. ४ [बहुधा

ब.व] यंत्र वगैरेंच्या चालण्यावर नियंत्रण ठेवणारे साधन, नियंत्रक. ५ (*वाक्प्र*) **be in control (of sth)** एखाद्या गोष्टीवर नियंत्रण किंवा सत्ता असणे, देखरेखीखाली असणे, आटोक्यात असणे. **out of con'trol** नियंत्रण सुटलेला, ताबा सुटलेला, आटोक्याबाहेर गेलेला : *The car went out of ~, गाडीवरचा ताबा सुटला.* **under control** यशस्वीपणे व्यवस्थापित किंवा अंमलबजावणीखाली असलेला, नियंत्रणाखाली, काबूत, आटोक्यात : *The fire was brought under ~, आग आटोक्यात आणली गेली.* **control** *क्रि* (-ll-) [*सक*] १ एखाद्यावर सत्ता असणे, ताब्यात असणे, नियंत्रण असणे, आवरणे : ~ *one's temper, राग आवरणे.* २ (रहदारी, किंमती वगैरे) नियंत्रित करणे, शिस्तीत नेणे. ३ तपासणे, तपासणी करणे, पारखणे : *inspection to ~ quality, गुणवत्ता पारखण्यासाठी तपासणी.* **controller** *ना* [*गण*] काहीतरी सांभाळणारा माणूस, विशेषतः मोठ्या संस्थेचा एखादा विभाग; नियंत्रक.

controversy /'कॉन्ट्रव्हऽसि, कन्'ट्रॉव्हसि/ *ना* (*ब.व* **-ies**) [*गण, अगण*] बरेच लोक उलटसुलट मते मांडतात अशी सार्वजनिक चर्चा, जाहीर मतभेदाचा प्रश्न, वाद : ~ *over the building of a new motorway, नवीन मोटाररस्ता करण्यासंबंधीचा वाद.* **controversial** /,कॉन्ट्र'व्हऽशल्/ *वि* वादग्रस्त, वांध्यात असलेला. **controversially** *क्रिवि* वादग्रस्तरीत्या.

conundrum /क'नैनन्ड्रम्/ *ना* [*गण, बहुधा अे.व*] १ गमतीसाठी विचारलेला आणि उत्तरात श्लेष किंवा विनोद असलेला प्रश्न, कोड्याचा प्रश्न, उखाणा. २ कूटप्रश्न, गोंधळात टाकणारी समस्या.

conurbation /कॉनऽ'बेइशन्/ *ना* [*गण*] एकमेकांजवळ पसरणाऱ्या मोठ्या गावांनी बनलेली शहरवस्ती, शहरीभाग.

convalesce /,कॉन्व्ह'लेस्/ *क्रि* [*अक*] आजारानंतर तब्बेत सुधारणे, प्रकृती ठीक होणे. **convalescence** *ना* [*अे.व, अगण*] आजारपणातून उठणे (यासाठीचा काळ), बरे होणे, प्रकृती सुधारणे, पालवी, पुनरारोग्यप्राप्ती. **convalescent** *ना* [*गण*], *वि* दुखण्यातून उठणारा (माणूस), तब्बेत सुधारणारा (माणूस), हिंडू-फिरू लागलेला.

convene /कन्'व्हीन्/ *क्रि* [*अक, सक*] (बैठकीसाठी वगैरे) एकत्र बोलावणे, जमणे, गोळा होणे किंवा करणे, (बैठक, सभा वगैरे) घेणे, आमंत्रित करणे. **convener** (तसेच **-venor**) *ना* [*गण*] बैठक बोलावणारा, सभेचा निमंत्रक, आमंत्रक.

convenience /कन्'व्हीनिअन्स्/ *ना* १ [*अगण*] सोय, अनुकूलता. २ [*गण*] सोयीचे साधन, सुखसोय : *Central heating is one of the ~s of modern houses, आधुनिक घरांतील अनेक सुखसोयींपैकी हवा उबदार ठेवण्याची मध्यवर्ती यंत्रणा ही एक सोय.*

convenient /कन्'व्हीनिअन्ट्/ *वि* उत्तम प्रकारे एखाद्याची गरज भागविणारा, सोयीचा, अनुकूल; योग्य, जुळता : *a ~ place to stay, राहण्यास सोयीची जागा.* **conveniently** *क्रिवि* सोईने, सोयिस्करपणे.

convent /'कॉन्व्हन्ट्; *अमे* -व्हेन्ट्/ *ना* [*गण*] जोगिणींचा संघ राहतो ती जागा, जोगिणींचा मठ.

convention /कन्'व्हेन्शन्/ *ना* १ [*गण*] एखादी संस्था, राजकीय पक्ष वगैरेच्या सभासदांची सभा किंवा बैठक, अधिवेशन : *a scientists' ~, वैज्ञानिकांचे अधिवेशन.* २ (**क**) [*अगण*] लोकांनी कसे वागावे याबाबत अलिखित सर्वसाधारण संकेत, लोकरीती, जनरूढी. (**ख**) [*गण*] पद्धत, चाल, रीत, रिवाज : *the ~s of international trade, आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या पद्धती किंवा रिवाज.* ३ [*गण*] राज्ये, राज्यकर्ते वगैरेमधील करार, ठराव, बोली. **conventional** *वि* रीतीवर आधारित, चाली पाळणारा, रूढ, पारंपरिक, परंपरेने चालत आलेला. **conventionally** *क्रिवि* लोकरीतीने, रिवाजानुसार.

converge /कन्'व्हऽज्/ *क्रि* [*अक*] (रेषा, गतिमान वस्तू वगैरेबाबत) एकमेकांकडे येऊन एका बिंदूत मिळणे, एककेन्द्राभिमुख होणे : *a village where two roads ~, दोन रस्ते जिथे मिळतात ते खेडे.* **convergence** *ना* [*अगण*] एककेन्द्राभिमुखता, एककेन्द्राभिसारकता, केन्द्राभिसरण. **convergent** *वि* एककेन्द्राभि-

मुखी, एककेन्द्राभिसारी, केन्द्राभिमुख, एका बिंदूत मिळणारे.

conversant /कन्'व्हऽसन्ट्/ *वि with*// एखाद्या गोष्टीचे ज्ञान किंवा तिचा अनुभव असलेला, अभिज्ञ, सुपरिचित : *~ with modern teaching methods, आधुनिक अध्यापन पद्धतींशी सुपरिचित.*

conversation /,कॉन्व्ह'सेइश्न्/ *ना* १ [*अगण*] अनौपचारिक गप्पा, शिळोप्याच्या गोष्टी, बोलणे : *the art of ~, संभाषणकला.* २ [*गण*] अनौपचारिक भाषण, संभाषण : *hold a ~, संभाषण करणे.* **conversational** *वि* (शब्द वगैरेबाबत) संभाषणात किंवा नित्याच्या बोलण्यात वापरला जाणारा, संभाषणात्मक : *a ~ tone/style, संभाषणात्मक सूर/शैली.*

converse¹ /कन्'व्हऽस्/ *क्रि* [*अक*] (*with*)// (*औप*) बोलणे, संभाषण करणे.

converse² /'कॉन्व्हऽस्/ **the converse** *ना* [*अे.व*] विरुद्ध किंवा उलट गोष्ट, व्यत्यास, व्युत्क्रम, विलोम : *The ~ is true, (याचा) व्यत्यास खरा आहे.* **converse** *वि* विरुद्ध, उलट. **conversely** *क्रिवि* उलट, व्यत्यासाने, विलोमतः.

conversion /कन्'व्हऽश्न्; *अमे* कन्'व्हऽर्झ्न्/ *ना* [*गण, अगण*] १ रूपबदल, रूपान्तर, रूपपरिवर्तन : *the ~ of the barn into a house, कडबा ठेवण्याच्या पडळीचे घरामधे रूपान्तर.* २ धर्मान्तर.

convert¹ /कन्'व्हऽट्/ *क्रि* [*अक, सक*] १ एखाद्या गोष्टीच्या रूपात, वापरात वगैरे बदल करणे : *~ a house into flats, घराचे रूपान्तर फ्लॅटमधे करणे.* २ एखाद्याच्या श्रद्धा वगैरे बदलणे, धर्ममत पालटणे, धर्म बदलणे : *~ him to Christianity, त्याला ख्रिश्चन धर्मात आणणे किंवा त्याचे ख्रिस्ती धर्मान्तरण करणे.* **convertible** /-अब्ल्/ *वि* परिवर्तनीय, रूपान्तर करण्याजोगा, बदलानुकारी. **convertible** *ना* [*गण*] काढते-घालते छप्पर असणारी गाडी.

convert² /'कॉन्व्हऽट्/ *ना* [*गण*] धर्मान्तर केलेला माणूस, बाटगा.

convex /'कॉन्व्हेक्स्/ *वि* बाहेरच्या बाजूने गोलाकार असलेला, बहिर्गोल, बहिर्वक्र, कूर्मपृष्ठाकार, उत्तल : *~ mirror, बहिर्गोल आरसा.*

convey /कन्'व्हेइ/ *क्रि* [*सक*] १ नेणे; वाहणे, वाहून नेणे : *goods ~ed by rail, रेल्वेने नेलेला माल.* २ (*to*)// (भावना, कल्पना वगैरे) मांडणे, प्रदर्शित करणे, कळवणे : *She ~ed her fears to her friends, तिने आपल्या मैत्रिणींना तिला वाटणारी भीती कळवली.* **conveyance** *ना* [*गण, अगण*] घेऊन जाणे (यासाठीचे वाहन), प्रवासाचे वाहन, यान. **conveyancing** *ना* [*अगण*] मालमत्तेचे कायदेशीर हस्तान्तरण, अभिहस्तान्तरण, फरोक्तखत. **conveyor** (तसेच **-veyer**) *ना* [*गण*] वाहून नेणारी व्यक्ती किंवा वस्तू, वाहक किंवा वाहन. **con'veyor belt** *ना* [*गण*] (उदा कारखान्यातला) वस्तू वाहून नेणारा आणि चाकावर फिरणारा पट्टा, वाहकपट्टा.

convict /कन्'व्हिक्ट्/ *क्रि* [*सक*] (न्यायालय, न्यायमूर्ती वगैरेबाबत) एखाद्याने गुन्हा केला आहे असे जाहीर करणे, अपराधी ठरवणे, दोषी ठरवणे : *She was ~ed of theft, चोरीच्या गुन्ह्यात तिला दोषी ठरवण्यात आले किंवा तिच्यावर चोरीचा गुन्हा शाबित झाला.* **convict** /'कॉन्व्हिक्ट्/ *ना* [*गण*] गुन्हा सिद्ध होऊन तुरुंगात पाठवलेला माणूस, सिद्धदोषी, शिक्षा भोगणारा गुन्हेगार.

conviction /कन्'व्हिक्श्न्/ *ना* [*गण, अगण*] १ अपराध सिद्ध करणे, दोषसिद्धी, अपराध शाबिती. २ दृढ विश्वास, गाढ श्रद्धा : *a ~ that what she said was true, ती जे काय म्हणाली ते खरे असल्याचा दृढ विश्वास.*

convince /कन्'व्हिन्स्/ *क्रि* [*सक*] (*of*)// एखाद्याची खात्री पटवणे; समजूत पटवणे, खात्री पटवणे : *I ~ed her that I was right, माझं बरोबर होतं याची मी तिला खात्री पटवली ○ ~ sb of the truth, सत्य काय आहे याची एखाद्याला खात्री पटणे.* **convincing** *वि* खात्री पटविणारा, खात्रीलायक, विश्वासार्ह : *a convincing argument, खात्री पटविणारा युक्तिवाद.* **convincingly** *क्रिवि* विश्वास बसावा असा, खात्रीलायकरीत्या.

convivial /कन्'व्हिव्हिअल्/ *वि* उत्साही आणि आनंदी, मौजेचा : *a ~ person/evening, उत्साही आणि आनंदी माणूस/प्रसन्न,*

धुंद संध्याकाळ. **conviviality** /कन्‌,व्हिव्हि'ॲलटि/ *ना* [*अगण*] प्रसन्नता, उत्सवीपणा.

convoluted /'कॉन्व्हलूटिड्/ *वि* १ वक्राकार, वाकवलेला; गुंडाळलेला, वेटाळलेला. २ (*ला*) (युक्तिवाद वगैरेबाबत) समजण्यास अवघड; क्लिष्ट.

convolution /,कॉन्व्ह'लूश्न्/ *ना* [*गण*, बहुधा *ब.व*] वक्रता, पीळ; गुंडाळी, वेटोळे : (*ला*) *the ~s of the plot, कथानकातील गुंतागुंत किंवा वळणे.*

convoy /'कॉन्व्हॉइ/ *ना* [*गण*] (क) एकत्र प्रवास करणाऱ्या बोटींचा किंवा वाहनांचा समूह किंवा तांडा. (ख) लढाऊ जहाजांचे संरक्षण असलेला जहाजांचा समूह किंवा काफिला. **convoy** *क्रि* [*सक*] (लढाऊ जहाज वगैरेबाबत) इतर जहाजांना संरक्षण देण्यासाठी त्यांच्याबरोबर प्रवास करणे.

convulse /कन्'व्हल्स्/ *क्रि* [*सक*] जोराच्या आणि अनियंत्रित हालचाली करणे, आचके देणे, झटके देणे : *a city ~d by riots, दंगेधोपे यांनी ढवळून निघालेले किंवा हालवून सोडलेले शहर.* **convulsion** /-व्हल्श्न्/ *ना* [*गण*] १ [बहुधा *ब.व*] शरीराचे झटके, आचके, आकडी. २ गदारोळ, ढवळणे. **convulsive** *वि* झटक्याचा, वेड्यावाकड्या हालचालीचा.

coo /कू/ *क्रि* १ [*अक*] कबुतरासारखा हलका घुमणारा आवाज करणे, कबुतरासारखे घुमणे, घूघू किंवा गुटरगुम करणे. २ [*सक*] हलक्या आवाजात बोलणे, कुजबुजणे. **coo** *ना* [*गण*] घुमणे; कुजबूज.

cook /कुक्/ *क्रि* १ (क) [*अक, सक*] अन्न शिजवणे, रांधणे, स्वयंपाक करणे : *~ breakfast/dinner, नाश्ता/भोजन बनवणे किंवा तयार करणे.* (ख) [*अक*] स्वयंपाक तयार होणे, अन्न तयार होणे, शिजणे. २ [*सक*] (*अनौप अधिक्षेपी*) फसवण्यासाठी हिशेब वगैरे बदलणे, बनावट तयार करणे : *~ the figures, बनावट आकडे घालणे.* **cook** *ना* [*गण*] स्वयंपाकी, आचारी, स्वयंपाकीण. **cooker** *ना* [*गण*] अन्न शिजवण्याचे एक उपकरण. **cookery** *ना* [*अगण*] स्वयंपाकाची पद्धत, पाकशास्त्र, पाककला. **cooking** *ना* [*अगण*] अन्नपदार्थ शिजवण्याची क्रिया, स्वयंपाक, पाकक्रिया.

cookie /'कुकि/ *ना* [*गण*] (*अमे*) १ बिस्किट. २ (*अनौप*) माणूस, व्यक्ती : *a tough ~, दणकट माणूस, कडक माणूस.*

cool^1 /कूल्/ *वि* १ अगदी गरम किंवा अगदी थंडगार नसलेला; आल्हादकारक गार असा, गारवा असलेला : *It feels ~ in the shade, सावलीत गार वाटते.* २ शांत; अविचल, धीरगंभीर, धिमा, उतावळा नसलेला : *stay ~ in spite of danger, धोक्याच्या वेळीही शांत राहणे किंवा संकटातही धिमे असणे.* ३ कशात रस न घेणारा, उदास, थंड, मख्ख, निरुत्साही : *He was ~ about the suggestion, त्या सूचनेबाबत तो उदासीन होता किंवा त्या सूचनेबाबत त्याने फारसा उत्साह दाखवला नाही.* ४ (*अनौप*) (एखादी रक्कम खूप मोठी आहे असे सुचवताना वापर) : *a ~ five million pounds! घसघशीत किंवा दणदणीत पन्नास लाख पौंड!* ५ (*अनौप*) उत्तम, फारच चांगला; छान : *real ~ music, फार मस्त संगीत.* **cool** *ना* १ **the cool** [*अ.व*] गार हवा, गारव्याची जागा; गारवा : *sitting in the ~, गारव्याला बसणे.* २ (*वाक्प्र*) **keep/lose one's cool** (*अनौप*) शांत राहणे/उखडणे. **,cool-'headed** *वि* चटकन् उतावीळ किंवा चिंताग्रस्त न होणारा, संयमी; शांत, शांत डोक्याचा. **coolly** *क्रिवि* शांतपणे, थंड डोक्याने. **coolness** *ना* [*अगण*] गारवा; शांतपणा; निरुत्साह, उदासी.

cool^2 /कूल्/ *क्रि* [*अक, सक*] १ (*down/off*)// गारवा येणे, थंड करणे/होणे : *Have a drink to ~ down, गार वाटण्यासाठी पेय घे.* २ (*क्रिब*) **cool down/off** शांत होणे, कमी उतावीळ होणे.

coop /कूप्/ *ना* [*गण*] पिंजरा – विशेषतः कोंबड्या ठेवायचा, खुराडे. **coop** *क्रि* (*क्रिब*) **coop up** लहान जागेत डांबणे : *prisoners ~ed up in cells, छोट्या छोट्या कोठड्यांमधे डांबलेले कैदी.*

co-operate /कउ'ऑपरेइट्/ *क्रि* [*अक*] एखादी गोष्ट मिळवण्यास एकत्र काम करणे, सहकार्य करणे : *They ~ed on the project, त्यांनी त्या प्रकल्पावर सहकार्य केले.* **co-operation** /कउ,ऑप'रेइश्न्/ *ना* [*अगण*] १ समान ध्येयासाठी एकत्रितपणे काम करणे,

सहकार्य, सहयोग. २ मदत करण्याची इच्छा. **co-operative** /-परटिव्ह्/ *वि* १ एकत्रित, सहयोगी, सहकारी. २ सहकार्यास तत्पर. **co-operative** *ना* [*गण*] सहकारी शेती, व्यवसाय वगैरे.

co-opt /कउ'ऑप्ट्/ *क्रि* [*सक*] (समितीच्या सभासदांबाबत) मतदान करून एखाद्याला सभासद करणे, बहुमताने एखाद्याला सभासदत्व देणे, स्वीकृत सभासद करणे.

co-ordinate^1 /,कउ'ऑऽडिनेइट्/ *क्रि* [*सक*] (*with*)// (कृती, अवयव वगैरे) एकत्रितपणे काम करतील असे करणे, सुसूत्रता आणणे, नियमन करणे, समन्वय करणे : *~ efforts to get the project finished, प्रकल्प पूर्ण करण्यास सर्व प्रयत्नांत सुसूत्रता आणणे.* **co-ordination** /,कउ,ऑऽडि'नेइश्न्/ *ना* [*अगण*] सुसूत्रीकरण, समन्वय, सुसूत्रता, नियमन. **co-ordinator** *ना* [*गण*] समन्वयक, सूत्रसंचालक.

co-ordinate^2 /कउ'ऑऽडिनट्/ *ना* १ [*गण*] नकाशा किंवा आलेख यावरील विशिष्ट बिंदू दाखविणाऱ्या अक्षरयुग्म किंवा अंकयुग्मातील अंक किंवा अक्षर, निर्बंधक. २ **co-ordinates** [*ब.व*] एकाच रंगाचे वेगवेगळे असणारे पण एकाच वेळी घालायचे कपडे.

cop^1 /कॉप्/ *ना* [*गण*] (*व्रात्य*) पोलीस, हवालदार, पांडू किंवा मामा.

cop^2 /कॉप्/ *क्रि* (**-pp-**) [*सक*] (*व्रात्य*) १ मिळणे; बसणे : *~ a bang on the head, डोक्यावर ठोसा बसणे.* २ (*क्रिब*) **cop out** (*अधिक्षेपी*) एखादी गोष्ट करण्याचे टाळणे, अळंटळं करणे, खिसकणे. **'cop-out** *ना* [*गण*] (*व्रात्य अधिक्षेपी*) एखादी गोष्ट न करणे किंवा न करण्यास सबब सांगणे, सबब, खिसकी, शेंडी लावणे.

cope /कउप्/ *क्रि* [*अक*] (*with*)// यशस्वीपणे हाताळणे, पेलवणे : *She couldn't ~ with all her work, तिला तिचे सर्व काम पेलवेना.*

copier ⇨ COPY^2.

copious /'कउपिअस्/ *वि* (*औप*) भरपूर, उदंड : *a ~ supply, भरपूर पुरवठा.* **copiously** *क्रिवि* सढळपणे, पुरेशा रीतीने, उदंड हस्ते.

copper^1 /'कॉप(र्)/ *ना* १ [*अगण*] तांबूस रंगाचा एक धातू, तांबे, ताम्र : *~ wire, तांब्याची वायर किंवा तार.* २ [*अगण*] ताम्रवर्ण, तांबूस रंग. ३ [*गण*] कमी किमतीचे तांब्याचे नाणे – पै, दमडी वगैरे.

copper^2 /'कॉप(र्)/ *ना* [*गण*] (*व्रात्य*) पोलीस.

copse /कॉप्स्/ *ना* [*गण*] झाडाझुडपांचा लहानसा भाग, झाडीचा भाग, खुंटांचे रान.

copulate /'कॉप्युलेइट्/ *क्रि* [*अक*] (*with*)// (*औप*) (खास करून जनावरांबाबत) संभोग करणे, जुगणे, चढणे. **copulation** /,कॉप्यु'लेइश्न्/ *ना* [*अगण*] संभोग, समागम.

copy^1 /'कॉपि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) १ हुबेहूब आवृत्ती – विशेषतः पत्र, चित्र वगैरेची, नक्कल, प्रत : *Put a ~ of the letter in the file, फाईलमधे या पत्राची एक प्रत ठेव.* २ पुस्तक, वर्तमानपत्र वगैरेच्या अनेक प्रतींपैकी एक प्रत : *The library has two copies of this book, ग्रंथालयात या पुस्तकाच्या दोन प्रती आहेत.* **'copycat** *ना* [*गण*] (*अनौप, अधिक्षेपी*) एखाद्या माणसाच्या वर्तनाची, कपड्यांची नक्कल करणारा, अनुकरण करणारा.

copy^2 /'कॉपि/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) १ [*सक*] (क) लिखित नक्कल करणे, आहे तसे उतरविणे : *He wrote the sentence on the blackboard and told the children to ~ it into their books, त्याने फळ्यावर वाक्य लिहिले आणि मुलांना वहीत ते उतरवायला सांगितले.* (ख) प्रत काढणे : *~ a document on the photocopier, छायाचित्रप्रती काढणाऱ्या यंत्रावर कागदपत्राची प्रत काढणे किंवा नकल घेणे.* २ [*सक*] अनुकरण करणे, एखादा करतो तसे करणे : *The teacher told the class to ~ his movements, आपल्या हालचालींप्रमाणे हालचाली करण्यास शिक्षकाने मुलांना सांगितले.* ३ [*अक*] परीक्षेत दुसऱ्याचे पाहून लिहिणे, कॉपी करून लबाडी करणे. **copier** *ना* [*गण*] प्रती काढणारे यंत्र.

copyright /'कॉपिराइट्/ *ना* [*अगण, गण*] स्वतःचे लेखन छापून प्रकाशित करण्याचा लेखक/लेखिकेचा कायदेशीर हक्क, प्रतिलिपी

अधिकार, लेखाधिकार. **copyright** *क्रि* [*सक*] पुस्तकाचे वगैरे लेखाधिकार अशा रीतीने जपणे.

coral /'कॉरल; *अमे* 'कॉऽरल/ *ना* [*अगण*] समुद्रतळाशी काही लहान प्राण्यांनी बनविलेला लाल, गुलाबी किंवा पांढरा असा एक टणक पदार्थ, प्रवाळ, पोवळे. **coral** *वि* पोवळ्याचा.

cord /कॉऽड/ *ना* १ [*गण, अगण*] दोरीपेक्षा जाड, पिळ्यापिळ्यांची बनलेली अशी एक लांब पातळ वस्तू, रज्जू, रस्सी, दोर, दोरखंड. २ [*गण*] दोरीसारखा शरीराचा एक भाग: *the vocal ~s, ध्वनिरज्जू, कंठध्वनिरज्जू, स्वरतंतू, स्वरयंत्र.*

cordial^1 /'कॉऽडिअल; *अमे* 'कॉऽर्जल/ *वि* मैत्रिपूर्ण आणि हार्दिक: *a ~ welcome/smile, हार्दिक स्वागत/स्मित.* **cordially** *क्रिवि* मनःपूर्वक, हार्दिकरीत्या.

cordial^2 /'कॉऽडिअल/ *ना* [*अगण*] (*ब्रि*) मद्यार्क नसलेले एक गोड पेय: *lime ~, लिंबाचे गोड पेय, सरबत.*

cordon /'कॉऽड्न/ *ना* [*गण*] लोकांची संरक्षक फळी किंवा साखळी – इतरांनी एखाद्या क्षेत्रात येऊ नये किंवा त्याच्या बाहेर जाऊ नये यासाठी केलेली: *a police ~, पोलिसांची फळी.* **cordon** *क्रि* (*क्रिब*) **cordon off** माणसांची साखळी करणे, फळी उभी करणे: *The army ~ed off the area, सैन्याने त्या भागाला वेढा घातला किंवा फळी उभी करून तो भाग बंद केला.*

corduroy /'कॉऽडरॉइ/ *ना* [*अगण*] मऊ लव असलेले जाड सुती कापड: *~ trousers, कॉडरॉयची पॅन्ट.*

core /कॉऽ(र्)/ *ना* [*गण*] १ सफरचंद किंवा पेअरसारख्या फळांचा मध्यभाग, गाभा. २ कोणत्याही गोष्टीचा सर्वात महत्त्वाचा किंवा मध्यवर्ती भाग: *the ~ of the problem, समस्येचा गाभा, प्रश्नाचा गाभा.* ३ (*वाक्प्र*) **to the 'core** संपूर्णतः, पूर्णपणे; काटेकोरपणे, पुरता, मुळापासून: *shocked to the ~, मुळापासून हादरलेला.* **core** *क्रि* [*सक*] (सफरचंद वगैरेचा) गाभा काढणे, फळातील गीर काढणे.

cork /कॉऽक्/ *ना* १ [*अगण*] एक प्रकारच्या ओक वृक्षाची हलकी दाबता येणारी साल: *~ table mats, टेबलावर घालण्याच्या कॉर्कच्या चटया किंवा कॉर्कची टेबल-अंथरणी.* २ [*गण*] या सालीच्या भागापासून बनवलेले बाटलीचे बूच. **cork** *क्रि* [*सक*] (बाटलीला वगैरे) बूच घालणे, बूच लावणे. **'corkscrew** *ना* [*गण*] बुचे काढण्याचे हत्यार, मळसूत्र.

corn^1 /कॉऽन्/ *ना* [*अगण*] १ वेगवेगळ्या धान्याचे दाणे. २ (विशेषतः *अमे*) मका. **corn-cob** *ना* [*गण*] मक्याच्या दांड्यावरील जेथे दाणे येतात तो कणसाचा टणक भाग, कणसाचे बुरखुंड. **'cornflour** *ना* [*अगण*] मक्याचे पीठ. **,corn on the 'cob** *ना* [*गण*] कणसासकट शिजवलेले मक्याचे दाणे.

corn^2 /कॉऽन्/ *ना* [*गण*] पायावरील कातडीचा टणक झालेला भाग, घट्टा, कुरूप, भोवरी.

cornea /'कॉऽनिअ/ *ना* [*गण*] बुब्बुळावरचे चिवट पारदर्शक आवरण, पारपटल.

corned beef /,कॉऽन्ड् 'बीफ्/ *ना* [*अगण*] मिठात खारावलेले गोमांस.

corner /'कॉऽन(र्)/ *ना* [*गण*] १ दोन रेषा किंवा दोन पृष्ठभाग मिळतात ती जागा, कोपरा, कानाकोपरा. २ गुप्त जागा, आडजागा. ३ भाग: *from all ~s of the earth, जगाच्या सर्व कानाकोपऱ्यांतून.* ४ (*अनौप*) अडचणीची किंवा विचित्र परिस्थिती: *in a (tight) ~, कोपऱ्यात गाठलेला किंवा खिंडीत गाठलेला.* ५ (*वाक्प्र*) **turn the 'corner** एखाद्या गोष्टीच्या अवघड, धोकादायक अवस्थेतून बाहेर पडणे, सावरणे, संकटातून पार पडणे. **corner** *क्रि* १ [*सक*] संकटात टाकणे, पेचात पकडणे; अडकवणे, कोंडीत पकडणे, कोंडी करणे: *~ed by the police, पोलिसांनी अडकवलेला किंवा कोंडीत पकडलेला.* २ [*अक*] रस्त्याचे वळण घेणे, वळणे: *a car designed for fast ~ing, भरकन वळण घेऊ शकेल अशी तयार केलेली गाडी.*

cornet /'कॉऽनिट्/ *ना* [*गण*] १ तोंडाने फुंकून वाजवण्याचे लहान शिंगासारखे वाद्य. २ शंकूच्या आकाराचे आईस्क्रीम वगैरे ठेवण्यासाठीचे पातळ बिस्किट.

cornice /'कॉऽनिस्/ *ना* [*गण*] खांबाच्या टोकाला किंवा छप्पर आणि भिंत यांच्या सापटीत केलेला कलात्मक पट्टा, छतपट्टी, गोठ.

corny /'कॉऽनि/ *वि* (-ier, -iest) अतिपरिचयाचा, भावनावश, बटबटीतपणे भावना व्यक्त करणारा.

coronary /'कॉरन्रि; *अमे* 'कॉऽरनरि/ *वि* हृदयाकडे रक्त वाहून नेणाऱ्या धमन्यांचा, हृद्रोहिणीचा, परिहृद. **coronary** *ना* [*गण*] (*ब.व* -ies) (तसेच **coronary thrombosis**) हृदयातील रक्तवाहिनीत रक्ताची गाठ येऊन रक्तप्रवाह बंद पडणे – यातून हृदयाचे नुकसान होते किंवा मृत्यू येतो, हृद्रोहिणीतील रक्तगाठ.

coronation /,कॉर'नेइश्न्; *अमे* ,कॉऽर्-/ *ना* [*गण*] राजाला किंवा राणीला राज्याभिषेक करण्याच्या सोहळा, राज्याभिषेकोत्सव.

coroner /'कॉरन(र्); *अमे* 'कॉऽर्-/ *ना* [*गण*] (*ब्रि*) अपघाती किंवा संशयास्पद मृत्यूचे कारण शोधणारा अधिकारी, अपमृत्युनिर्णेता.

coronet /'कॉरनेद्; *अमे* 'कॉऽर्-/ *ना* [*गण*] सरदार, उमराव वगैरे श्रेणीच्या पुरुषाने किंवा स्त्रीने घालायचा मुकुट, टोप.

corporal^1 /'कॉऽपरल्/ *वि* शारीरिक : ~ *punishment, शारीरिक शिक्षा.*

corporal^2 /'कॉऽपरल्/ *ना* [*गण*] लष्करातील सार्जंटच्या खालच्या दर्जाचा राजादिष्ट नसलेला अधिकारी.

corporate /'कॉऽपरद्/ *वि* १ मोठ्या उद्योगधंद्याचा, निगमविषयक, निगम. २ एखाद्या गटाच्या सर्व लोकांचा भाग असलेला, सांघिक : ~ *responsibility, सांघिक जबाबदारी.*

corporation /,कॉऽप'रेइश्न्/ *ना* [*गण,* तसेच ब.व क्रियापदासह अे.व] १ (खास करून *ब्रि*) एखाद्या शहराच्या शासनव्यवस्थेसाठी निवडलेल्या लोकांचा गट, नगरपालिका. २ मोठा उद्योगधंदा किंवा मोठी कंपनी, निगम.

corps /कॉऽ(र्)/ *ना* [*गण*] (*ब.व* **corps** /कॉऽझ्/) १ सैन्याचा एक भाग, काही विभागांचे मिळून केलेले एक सैन्यदल, पथक. २ सैन्यातील तांत्रिक विभाग, तंत्रज्ञ पथक : *the Medical C~, वैद्यकीय सैन्यपथक.* ३ एखाद्या विशिष्ट कार्यात गढलेले लोक : *the diplomatic ~, राजनैतिकसंबंध पथक.*

corpse /कॉऽप्स्/ *ना* [*गण*] मृत शरीर, प्रेत, शव – खास करून माणसाचे.

corpulent /'कॉऽप्युलन्ट्/ *वि* (*औप*) जाड, लठ्ठ, फोपशा.

corpuscle /'कॉऽपस्ल्/ *ना* [*गण*] रक्तातील तांबडी किंवा पांढरी पेशी, कणिका.

corral /क'राल्/ *ना* [*गण*] घोडे, गुरे वगैरे ठेवण्याची जागा, गोठा. **corral** *क्रि* (-ll-; *अमे* -l-) [*सक*] गुरे गोठ्यात पाठवणे किंवा गुरांना गोठ्यात ठेवणे.

correct^1 /क'रेक्ट्/ *वि* १ खरा, सत्य, बरोबर; अचूक, निर्दोष : *the ~ answer, बरोबर/अचूक उत्तर* ○ *the ~ way to do it, हे करण्याचा अचूक किंवा बरोबर मार्ग.* २ (वागण्याची पद्धत, पोषाख वगैरेबाबत) योग्य; सभ्य, शिष्ट. **correctly** *क्रिवि* खरेपणाने; बरोबर, बिनचुकपणे. **correctness** *ना* [*अगण*] सत्यता, खरेपणा; बरोबर असणे, निर्दोषपणा; अचूकपणा.

correct^2 /क'रेक्ट/ *क्रि* [*सक*] १ दुरुस्त करणे, बरोबर करणे; चुका काढून टाकणे : ~ *sb's spelling, एखाद्याचे शुद्धलेखन दुरुस्त करणे.* २ अचूक किंवा निर्दोष करण्यासाठी बदल करणे : *glasses to ~ your eyesight, तुझा दृष्टिदोष घालवण्यासाठीचा चष्मा.* **correction** /क'रेक्श्न्/ *ना* १ [*गण*] एखादी गोष्ट सुधारण्यासाठी केलेला बदल, दुरुस्ती : *corrections written in red ink, तांबड्या शाईने केलेल्या दुरुस्त्या.* २ [*अगण*] दुरुस्ती करणे, सुधारणा. ३ [*अगण*] शिक्षा. **corrective** *ना* [*गण*], *वि* दुरुस्त करणारी (गोष्ट), सुधार, दोष-निवारक.

correlate /'कॉरलेइट्; *अमे* 'कॉऽर्-/ *क्रि* [*अक, सक*] (*with*)// परस्परसंबंधित असणे, सहसंबंधी असणे; दोन गोष्टींतील परस्परसंबंध दाखवणे : *The results of the two tests do not ~, दोन चाचणींचे निकाल एकमेकांशी संबंधित नाहीत.* **correlation** /,कॉर'लेइश्न्/ *ना* [*अगण*] दृढसंबंध, सहसंबंध, परस्परसंबंध.

correspond /,कॉरि'स्पॉन्ड्; *अमे* ,कॉऽर्-/ *क्रि* [*अक*] १ (*with/to*)// सारखे असणे, तसेच असणे; जुळते असणे, जुळणे, सुसंवाद असणे : *Your account doesn't ~ with hers, तुझी हकीगत तिने दिलेल्या हकीगतीशी*

जुळत नाही. २ (*with*)// पत्रव्यवहार करणे. **corresponding** *वि* तदनुरूप, संवादी. **correspondingly** *क्रिवि* संवादी.

correspondence /ˌकॉरि'स्पॉन्डन्स्; *अमे* ˌकॉऽर्-/ *ना* १ [*गण, अगण*] सुसंवाद, अनुरूपता; सारखेपणा : *a close ~ between the two texts, दोन पाठ्यांतील सारखेपणा.* २ [*अगण*] पत्रव्यवहार, पत्रलेखन; पत्रे. **correspondent** *ना* [*गण*] १ ज्याच्याबरोबर पत्रव्यवहार आहे तो माणूस. २ वर्तमानपत्र, आकाशवाणी, दूरदर्शन यांना वृत्त पाठवणारा – विशेषतः परदेशातून, वार्ताहर, बातमीदार.

corridor /'कॉरिडॉऽ(र्); *अमे* 'कॉऽर्-/ *ना* [*गण*] खोल्यांच्या दारांबाहेरचा लांब अरुंद असा जागेचा पट्टा, छन्नमार्ग, वीथी.

corroborate /क'रॉबरेइट्/ *क्रि* [*सक*] (एखादे विधान, समज वगैरेच्या) सत्यतेविषयी खात्री देणे, पुष्टी देणे : *I can ~ what she said, ती काय म्हणाली याला मी आधार देऊ शकतो.* **corroboration** /कˌरॉब'रेइश्न्/ *ना* [*अगण*] पुष्टी, पाठिंबा देणारा पुरावा.

corrode /क'रउड्/ *क्रि* [*अक, सक*] नष्ट होणे किंवा नष्ट करणे, विशेषतः रासायनिक प्रक्रियेने; गंजणे. **corrosion** /क'रउझ्न्/ *ना* [*अगण*] (क) रासायनिक प्रक्रियेने नष्ट होणे. (ख) असा नष्ट झालेला भाग किंवा प्रदेश. **corrosive** /क'रउसिव्ह्/ *ना* [*गण*], *वि* नष्ट करणारे (द्रव्य), भक्षक.

corrugated /'कॉरगेइटिड्; *अमे* 'कॉऽर्-/ *वि* समांतर गोलाकार घड्या असलेला, पन्हळी : *~ iron/cardboard, पन्हळी पत्रा/पुठ्ठा.*

corrupt /क'रप्ट्/ *वि* १ अनैतिक, भ्रष्ट : *a ~ society/mind, भ्रष्ट समाज/मन.* २ अप्रामाणिक, विशेषतः लाचखाऊ : *a ~ business deal, लाच देऊन केलेला धंद्यातील व्यवहार.* **corrupt** *क्रि* [*अक, सक*] अनीतिमान होणे, सडणे; नीतिभ्रष्ट करणे, नासवणे : *~ing young people, तरुणांना नासवणे.* **corruption** /क'रप्श्न्/ *ना* [*अगण*] भ्रष्टाचार, लाचखाऊपणा. **corruptly** *क्रिवि* भ्रष्टपणे.

corset /'कॉऽसिट्/ *ना* [*गण*] कंबर आणि नितंब यांना आकार येण्यासाठी आतून घालायचे कपडे.

cortege /कॉऽटेइझ्/ *ना* [*गण*] शवयात्रा, प्रेतयात्रा; लवाजमा.

cosh /कॉश्/ *ना* [*गण*] (*ब्रि*) आत धातू वगैरे भरलेली आणि दुसऱ्याला मारण्यासाठी वापरायची नळी किंवा रबरी ट्यूब.

cosmetic /कॉझ्'मेटिक्/ *ना* [*गण*] सुंदर दिसण्यासाठी अंगाला – विशेषतः चेहेऱ्याला – लावायचे द्रव्य, सौंदर्यप्रसाधन. **cosmetic** *वि* १ सौंदर्यप्रसाधन म्हणून वापरायचा. २ (*ला बहुधा अधिक्षेपी*) सौंदर्यवर्धक, नटवायचा, नटवा : *These are just ~ improvements to the system, they do not really change anything, व्यवस्थेतील या केवळ वरवरच्या नटव्या सुधारणा आहेत, त्यातून काहीही खरा बदल होणार नाही.*

cosmic /'कॉझ्मिक्/ *वि* संपूर्ण विश्वाचा किंवा अंतरिक्षाचा, वैश्विक, अंतरिक्षीय.

cosmonaut /'कॉझ्मनॉऽट्/ *ना* [*गण*] पूर्वीच्या सोव्हिएट महासंघाचा अंतराळवीर.

cosmopolitan /ˌकॉझ्म'पॉलिटन्/ *वि* १ जगाच्या सर्व भागांतला, सर्वदेशीय : *a ~ gathering, सर्वदेशीय संमेलन.* २ (*पसंती*) जगाचा प्रदीर्घ अनुभव असलेला (आणि त्यामुळे स्वागतशील आणि सहनशील असणारा), सर्वांना सामावून घेणारा असा उदारवृत्तीचा.

cosmos /'कॉझ्मॉस्/ **the cosmos** *ना* [*अ.व*] विश्व, अंतरिक्ष.

cost^{1} /कॉस्ट्; *अमे* कॉऽस्ट्/ *ना* १ [*गण, अगण*] एखाद्या गोष्टीसाठी दिलेली किंमत, भाव : *the high ~ of repairs, दुरुस्तीची भरमसाट किंमत.* २ [*अ.व, अगण*] एखादी गोष्ट मिळण्यासाठी आवश्यक असणारी गोष्ट, मोजावी लागलेली किंमत : *the ~ of victory, विजयाची किंमत.* ३ **costs** [*ब.व*] एखाद्या खटल्याचा खर्च, दावाखर्च. ४ (*वाक्प्र*) **at 'all costs** सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणून, काहीही किंमत द्यावी लागली तरी, काहीही झालं तरी. **to one's 'cost** एखाद्याचा तोटा करून, एखाद्याला एखादी गोष्ट गमवावी लागून. **costly** *वि* (**-ier, -iest**) १ खूप किंमत द्यावी लागणारा, महाग; किमती, मौल्यवान. २ तोट्याचा, नुकसानकारक : *a ~ly mistake,*

महागात पडलेली चूक.

cost^2 /कॉस्ट्; *अमे* कॉऽस्ट्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **cost** अर्थ ३ मधे **~ed**) १ [*अक*] किंमत किंवा भाव असणे; भाव पडणे, दाम पडणे : *shoes ~ing £20, वीस पौंड किमतीचे बूट.* २ [*अक*] नुकसान सोसणे, किंमत मोजावी लागणे; गरज असणे, लागणे : *a mistake that ~ him his life, त्या चुकीसाठी त्याला जिवाची किंमत मोजावी लागली किंवा जीव गमवावा लागला* ○ *~ a great deal of effort, खूप प्रयत्नांची गरज असणे.* ३ [*सक*] (*व्यापार*) किमतीचे मोजमाप करणे, भावाची छाननी करणे. **costing** *ना* [*गण, अगण*] (*वाणिज्य* किंवा *व्यापार*) किंमती निश्चित करणे किंवा ठरविणे, परिव्यय.

co-star /'कउस्टा(र्)/ *ना* [*गण*] इतर प्रमुख कलाकारांबरोबर चित्रपटात वगैरे काम करणारा प्रसिद्ध कलाकार, सहकलाकार. **co-star** *क्रि* (**-rr-**) [*अक*] सहकलाकार असणे, (मोठा कलाकार) सोबत म्हणून असणे.

costume /'कॉस्ट्यूम्; *अमे* -टूम्/ *ना* १ [*गण, अगण*] वेष, वेष करण्याची शैली – विशेषतः एका विशिष्ट काळातील, वेषभूषा. २ [*गण*] रंगभूमीवर काम करताना नटांनी घालायचे कपडे.

cosy /'कउझि/ *वि* (**-ier, -iest**) उबदार आणि सुखद : *a ~ room/feeling, सुखकारक आरामाची खोली, सुखकारक किंवा निवाऱ्याची भावना* ○ (*ला*) *a ~ little talk,* सुखदुःखाच्या चार गोष्टी, *हितगुज, गुजगोष्टी.* **cosily** *क्रिवि* उबदारपणे; सुखाने. **cosiness** *ना* [*अगण*] उबदारपणा, सुख. **cosy** *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) चहाचे भांडे गरम ठेवण्यासाठीची टोपी, लेपडीची टोपी.

cot /कॉट्/ *ना* [*गण*] १ (*ब्रि*) लहान मुलाचा बिछाना. २ (*अमे*) बोटीवरील वगैरे लहान अरुंद बिछाना, साधा छोटा पलंग.

cottage /'कॉटिज्/ *ना* [*गण*] (विशेषतः खेडेगावातील) छोटे घर.

cotton^1 /'कॉट्न्/ *ना* [*अगण*] १ धागा, कापड ज्यापासून बनवतात तो पांढरा मऊ पदार्थ, कापूस. २ कापसाचा धागा किंवा सुती कापड : *a ~ dress, सुती पोषाख.* **,cotton 'wool** *ना* [*अगण*] आधारासाठी किंवा मलमपट्टीसाठी वापरायचा मऊ, ओलसरपणा शोषून घेणारा कापसाचा तुकडा.

cotton^2 /'कॉट्न्/ *क्रि* (*क्रिब*) **cotton on (to sth)** (*अनौप*) कळून चुकणे, डोक्यात प्रकाश पडणे.

couch^1 /काउच्/ *ना* [*गण*] बिछान्यासारखे लंबुळके आसन, कोच.

couch^2 /काउच्/ *क्रि* [*सक*] (*in*)// (*औप*) व्यक्त करणे, आविष्कार करणे, देणे : *a reply ~ed in friendly terms, स्नेहपूर्ण शब्दांत दिलेले उत्तर.*

couchette /कू'शेट्/ *ना* [*गण*] रेल्वेच्या डब्यातील मिटवून ठेवता येणारा बिछाना, घडीचा बिछाना, बर्थ.

cougar /'कूगऽ(र्)/ *ना* [*गण*] (खास करून *अमे*) = PUMA.

cough /कॉफ्/ *क्रि* १ [*अक*] फुप्फुसातून हवा जोराने आणि आवाज करत बाहेर टाकणे, खोकणे, खोकला येणे : *The smoke made me ~, धुराने मला खोकला आला.* २ [*सक*] (*up*)// खाकरून बाहेर काढणे, खोकून काढणे. **cough** *ना* १ [*गण*] खोकणे, खोकण्याचा आवाज. २ [*अे.व*] खोकण्याचा आजार, खोकला.

could^1 /कड्; अधिक बलयुक्त रूप कुड्/ *अभिद क्रि* (नकार **could not,** संक्षेप **couldn't** /'कुड्न्ट्/) १ (विनंती करताना वापर) : *C~ I use your phone? तुझा फोन जरा वापरू? किंवा तुझ्या फोनवरून फोन करू?* २ (परिणामदर्शक) : *We were so tired, we ~ have slept for days! आम्ही इतके दमलो होतो की कित्येक दिवस झोपलो असतो!* ३ (शक्यतादर्शक) : *You ~ be right, कदाचित तुझं बरोबर असेल.* ४ (सूचना करताना वापर) : *You ~ ask her to go with you, तुझ्याबरोबर यायला तुला तिला सांगता येईल.*

could^2 CAN^1 चा *भूत.*

couldn't could not ➪ COULD^1.

council /'काउन्स्ल्/ *ना* [*गण,* तसेच ब.व क्रियापदासह अे.व] एखाद्या शहराचा, मोठ्या गावाचा वगैरे कारभार पाहणे, सल्ला देणे, नियम करणे वगैरे कामासाठी निवडून दिलेले

प्रतिनिधीमंडळ, नगरपरिषद : *a ~ meeting, प्रतिनिधीमंडळाची सभा, परिषदेची बैठक.* **'council house** *ना* [*गण*] स्थानिक परिषदेच्या मालकीचे पण लोकांना भाड्याने दिलेले घर. **councillor** (*अमे* **councilor**) /'काउन्सल(र्)/ *ना* [*गण*] परिषदेचा सभासद, नगरपिता, नगरसेवक.

counsel /'काउन्सल्/ *ना* १ [*अगण*] उपदेश, सल्ला; सूचना. २ [*गण*] (*ब.व* **counsel**) एखाद्या खटल्यात काम करणारा बॅरिस्टर, खटला चालवणारा वकील. **counsel** *क्रि* (**-ll-**; *अमे* **-l-**) [*सक*] (*औप*) उपदेश करणे, सल्ला देणे : *He ~ed her to leave, त्याने तिला निघून जाण्याचा सल्ला दिला.* **counsellor** (*अमे* **counselor**) *ना* [*गण*] १ सल्लागार. २ (*अमे*) वकील.

count^{1} /काउन्ट्/ *क्रि* १ [*अक*] ओळीने अंक म्हणणे किंवा मोजणे : *C~ from 1 to 10, एक ते दहा अंक मोज/म्हण.* २ [*सक*] (*up*)// एकूण संख्या मोजणे, गिनती करणे : *C~ the people in the room, खोलीतील एकूण माणसे मोज.* ३ [*सक*] अंतर्भाव करणे, समावेश करणे, जमेस धरणे : *ten people, ~ing Ann, ॲन धरून दहा माणसे.* ४ [*सक*] समजणे, मानणे : *~ oneself lucky, स्वतःला नशीबवान समजणे.* ५ [*अक*] (क) महत्त्वाचा असणे, किमती असणे : *every minute ~s, प्रत्येक क्षण महत्त्वाचा आहे.* (ख) वैध मानणे, धरणे : *That goal didn't ~ because the game was over, खेळ संपला होता म्हणून तो गोल धरला गेला नाही.* ६ (*क्रिब*) **count (sth) against sb** एखाद्याच्या विरोधात जाणे, एखाद्याला नडणे किंवा भोवणे : *Will my past mistakes ~ against me? माझ्या पूर्वीच्या चुका मला भोवणार की काय?* **count on sb** एखाद्यावर अवलंबून राहणे, विसंबणे, एखाद्याच्या भरवशावर राहणे : *I'm ~ing on you to help, तू मदत करशील या भरवशावर मी आहे.* **count sb/sth out** (क) एकेक करून हळूहळू मोजणे – उदा नाणी सावकाश एकेक मोजणे. (ख) जमेस न धरणे, वगळून मोजणे : *C~ me out, I'm not going, मला जमेस धरू नको कारण मी जात नाहीये किंवा मला जाणाऱ्यात मोजू नकोस कारण मी जात नाहीये.* **countable** *वि* मोजता येण्यासारखे, गण्य, गणनीय : *'House' is a ~able noun, इंग्रजीत 'house' हे गणनीय नाम आहे.* **'countdown** *ना* [*गण*] क्षेपणास्त्र उडविण्यापूर्वी वगैरे शून्यापर्यंत उलट अंक मोजणे, उतरत्या क्रमाची अंकमोजणी, उलटी अंकमोज.

count^{2} /काउन्ट्/ *ना* [*गण*] १ गणना, गिनती; मोजलेली संख्या : *There were 50 at the last ~, शेवटच्या गिनतीमधे पन्नास होते.* २ (*कायदा*) आरोप, तोहमतीतील सदर : *a ~ of robbery, दरोड्याचा आरोप.* ३ (*वाक्प्र*) **keep/lose 'count of sth** किती आहेत हे माहीत असणे/नसणे, आकडा ठेवणे/न ठेवणे.

count^{3} /काउन्ट्/ *ना* [*गण*] इटली, फ्रान्स वगैरे देशातील सरदार किंवा उमराव.

countenance /'काउन्टनन्स्/ *ना* १ [*गण*] (*औप*) चेहेरा (किंवा त्यावरील भाव). २ [*अगण*] पाठिंबा, आधार; मान्यता : *give/lend ~ to a plan, एखाद्या योजनेला पाठिंबा देणे किंवा मान्यता देणे.* **countenance** *क्रि* [*सक*] (*औप*) पाठिंबा देणे, मान्यता देणे : *I cannot ~ violence, मी हिंसाचाराला मान्यता देऊ शकत नाही.*

counter^{1} /'काउन्ट(र्)/ *ना* [*गण*] दुकान, बँक, वगैरेतील माल ठेवायची किंवा वस्तू विकायची सपाट जागा, फलक, खिडकी.

counter^{2} /'काउन्ट(र्)/ *ना* [*गण*] १ डाव वगैरे मोजण्यासाठी वापरायची तबकडी, गणित्र. २ बदली देण्याची गोष्ट, बदल्यात द्यायची वस्तू : *a bargaining ~, सौदा करण्यात वापरायची वस्तू.*

counter^{3} /'काउन्ट(र्)/ *क्रिवि to*// विरुद्ध दिशेने, उलट; विरुद्ध : *Her theories ran ~ to the evidence, पुराव्याच्या विरुद्ध जाणारे असे तिचे सिद्धान्त होते.*

counter^{4} /'काउन्ट(र्)/ *क्रि* [*अक, सक*] (*with*)// टीकेला वगैरे प्रत्युत्तर देणे, विरुद्ध मते मांडणे, खंडन करणे : *~ed his arguments with her own opinion, स्वतःची मते मांडून तिने त्याचे मुद्दे खोडले.*

counter- /'काउन्ट(र्)-/ (सामासिक शब्दांत). १ दिशा किंवा परिणाम यात विरुद्ध, विरोधी, उलट, अनु- : *,~-pro'ductive, अनुत्पादक,*

उत्पादनविरोधी. २ प्रत्युत्तर म्हणून केलेला, प्रति- : *'~-attack, प्रतिहल्ला.* ३ त्यासारखा, संवादी, दुसरा तसाच : *'~part, दुसरी त्यासारखी व्यक्ती किंवा वस्तू.*

counteract /,काउन्ट'रॅक्ट्/ *क्रि* [*सक*] (एखादी कृती, शक्ती, विष वगैरेचा) परिणाम कमी करणे : *try to ~ the bad influence of TV, दूरदर्शनचा दुष्परिणाम कमी करण्याचा प्रयत्न करणे.*

counter-attack /'काउन्टर् अटॅक्/ *ना* [*गण*], *क्रि* [*अक*] शत्रूने केलेल्या हल्ल्याला उत्तर (देणे), प्रतिचढाई/प्रतिहल्ला (करणे), प्रतिशह (देणे).

counterbalance /'काउन्ट'बॅलन्स्/ *ना* [*गण*] समतोल राखणारे समान वजन किंवा जोर. **counterbalance** /,काउन्ट'बॅलन्स्/ *क्रि* [*सक*] समतोल राखणे, तोलणे.

counter-espionage /,काउन्टर् 'अेस्पिअनाझ्/ *ना* [*अगण*] शत्रूच्या हेरगिरीविरुद्धची कारवाई, प्रतिहेरगिरी.

counterfeit /'काउन्टफिट्/ *ना* [*गण*], *वि* फसवण्यासाठी केलेली नक्कल, नकली, बनावट : *~ banknotes, बँकेच्या बनावट नोटा, खोट्या नोटा.* **counterfeit** *क्रि* [*सक*] (नाणी, हस्ताक्षर वगैरे) बनावट करणे. **counterfeiter** *ना* [*गण*] खोटी नाणी करणारा माणूस, बनावट नोटा करणारा माणूस.

counterfoil /'काउन्टफॉइल्/ *ना* [*गण*] चेक वगैरेचा वेगळा काढता येणारा आणि नोंद म्हणून वापरता येणारा भाग किंवा तुकडा, प्रतिपत्र.

countermand /,काउन्ट'मान्ड्; *अमे* -'मॅन्ड्/ *क्रि* [*सक*] (पूर्वी दिलेला आदेश) रद्द करणे, बदलणे.

counterpart /'काउन्टपाट्/ *ना* [*गण*] एखाद्या व्यक्ती किंवा वस्तूसारखी दुसरी तशीच व्यक्ती किंवा वस्तू, समान गुणधर्मांची दुसरी गोष्ट, प्रतिरूप.

counter-productive /,काउन्ट-प्र'डॅक्टिव्ह्/ *वि* अपेक्षेपेक्षा भलताच किंवा योजल्याच्या उलट परिणाम करणारा, विपरीत परिणामाचा : *Her anger was ~ : it just made him refuse to help at all, तिच्या रागाचा परिणाम विपरीत झाला : त्याने काहीही मदत करण्याचेच नाकारले.*

countersign /'काउन्टसाइन्/ *क्रि* [*सक*] (पूर्वी सही केलेल्या कागदपत्रावर ते) वैध होण्यासाठी पुन्हा सही करणे, जोडसही करणे, प्रतिस्वाक्षरी करणे.

countess /'काउन्टिस्/ *ना* [*गण*] १ सरदार किंवा उमरावाची बायको. २ सरदार किंवा उमराव या श्रेणीची स्त्री.

countless /'काउन्ट्लिस्/ *वि* अगणित, असंख्य, खूप : *I've been there ~ times, मी तेथे खूपदा गेलो आहे.*

country /'कॅन्ट्रि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*गण*] राजकीयदृष्ट्या स्वतंत्र असलेला भूप्रदेश, राज्य; राष्ट्र, देश. २ **the country** [*अे.व*] एखाद्या देशाचे लोक, देशवासी : *a politician loved by the whole ~, देशातील सर्व लोकांना प्रिय असणारा राजकारणी.* ३ **the country** [*अे.व*] शहराबाहेरचा भूभाग, ग्रामीण भाग, ग्रामीण परिसर; शेतीसाठी वापरलेली राने, जंगले वगैरे, लागवडीखालील भूभाग : *~ life/people, ग्रामीण जीवन/लोक.* ४ (*वाक्प्र*) **go to the country** (एखाद्या सरकारबाबत) सार्वत्रिक निवडणूक घेणे.

countryman /'कॅन्ट्रिमन्/ (*स्त्री* **countrywoman** /'कॅन्ट्रिवुमन्/) *ना* [*गण*] १ खेड्यापाड्यात राहणारा माणूस, ग्रामीण भागातला माणूस. २ एखादा माणूस राहतो त्याच देशात राहणारा दुसरा माणूस, देशबांधव.

countryside /'कॅन्ट्रिसाइड्/ **the countryside** *ना* [*अे.व*] ग्रामीण भाग; लागवडीखालील भूभाग.

county /'काउन्टि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) स्थानिक शासनासाठी राष्ट्राचा किंवा राज्याचा केलेला विभाग.

coup /कू/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s** /कूझ्/) १ अनपेक्षितपणे केलेली यशस्वी कारवाई : *This deal was a ~ for her, हा व्यवहार तिच्यासाठी एक अनपेक्षित यशस्वी कारवाई होती.* २ (तसेच **coup d'état** /कू देइ'टा/) बेकायदेशीरपणे एखाद्या देशाची सत्ता हस्तगत करणे, बहुधा हिंसाचाराने बंड करून सत्ता घेणे.

couple^1 /'कॅप्ल्/ *ना* [*गण*] १ बरोबर

असणाऱ्या किंवा परस्परसंबंधी अशा दोन व्यक्ती किंवा वर्स्तू, जोडी, युग्म : *a married ~, विवाहित जोडपे.* २ (*वाक्प्र*) **a couple of** (*अनौप*) थोडे, एकदोन : *a ~ of drinks/ days, थोडी पेये/थोडे दिवस, एकदोन दिवस.*

couple^{2} /'कैप्ल्/ *क्रि* (*with*)// १ [*सक*] (दोन गोष्टी) जोडणे. २ [*सक*] (दोन कल्पना, वास्तविके वगैरे) बरोबर धरणे, जोडणे : *His illness, ~d with his lack of money, prevented him leaving, त्याच्या आजाराने, आणि त्याबरोबरच्या पैशाच्या चणचणीने, त्याला जाता आले नाही.* ३ [*अक*] (*जुना, अप्रचलित* किंवा *अलं*) लैंगिक संयोग करणे, संभोग करणे, मैथुन करणे.

coupon /'कूपॉन्/ *ना* [*गण*] १ एखादी गोष्ट करण्याचा किंवा मिळण्याचा अधिकार देणारे तिकिट, प्रतिपत्र. २ एखाद्या स्पर्धेत भाग घेण्यासाठी, माल मागविण्यासाठी वगैरे वापरायचा, बरेचदा वर्तमानपत्रातून कापून काढलेला छापील अर्ज.

courage /'कैरिज्/ *ना* [*अगण*] एखादा धोका, एखादे दुःख यांना सामोरे जाताना स्वतःच्या भीतीवर नियंत्रण ठेवण्याचे सामर्थ्य, धीर, धाडस, धीटाई, निर्भयता : *show ~ in a battle, लढाईत धाडस दाखवणे.* **courageous** /क'रेइजस्/ *वि* निर्भय, धाडसी, धीट. **courageously** *क्रिवि* धीटपणे, धाडसाने.

courgette /कॉऽ'झेट्/ *ना* [*गण*] दोडक्यासारखी दिसणारी एक फळभाजी.

courier /'कुरिअ(र्)/ *ना* [*गण*] १ प्रवासाची योजना करणे, प्रवाशांबरोबर जाणे वगैरे कामे करणारा माणूस. २ बातम्या, महत्त्वाची कागदपत्रे वगैरे नेणारा माणूस, निरोप्या, जासूद.

course^{1} /कॉऽस्/ *ना* १ [*गण*] एखाद्या गोष्टीचा मार्ग किंवा तिची दिशा, ओघ : *the ~ of a river/aircraft, नदीचा मार्ग, वायुवाहनाची दिशा.* २ [*गण*] (बरेचद. सामासिक शब्दांत) घोड्यांच्या शर्यतीसारखे खेळ जिथे घेतले जातात ती जागा, मैदान : *a golf-~, गोल्फचे मैदान* ○ *a race~, रेसचे मैदान.* ३ [*अे.व*] कालाचा ओघ, कालाचा प्रवाह : *the ~ of history, इतिहासाचा क्रम किंवा ओघ.* ४ [*गण*] पाठ, व्याख्याने वगैरेची साखळी, शिक्षणक्रम, व्याख्यानमाला : *a French ~, फ्रेंच शिक्षणक्रम.* ५ [*गण*] (*वैद्यकशास्त्र*) उपचार वगैरेची साखळी : *a ~ of injections, इंजेक्शन्सची साखळी.* ६ [*गण*] जेवणातील एक भाग, एक वाढणे : *the fish ~, मासे वाढणे.* ७ (*वाक्प्र*) **(as) a matter of course** अपेक्षित असे काही, नेहमीचे असे काही, नेहमीप्रमाणे. **in the course of** मधे, -च्या काळात, दरम्यान. **in ,due 'course** योग्य वेळी. **of course** साहजिकपणे; निश्चितपणे, अर्थात. **run/take its 'course** नेहमीच्या पद्धतीने संपणे, आपल्या मार्गाने जाणे.

course^{2} /कॉऽस्/ *क्रि* [*अक*] (*औप*) (द्रवपदार्थांबाबत) जोराने वाहणे, घळघळ, भळभळ वाहणे : *The blood ~d through his veins, त्याच्या शिरांतून रक्त सळसळू लागले.*

court^{1} /कॉऽट्/ *ना* १ [*गण, अगण*] जेथे कायदेशीर खटले चालतात ते ठिकाण, न्यायालय. २ **the court** [*अे.व*] न्यायालयात हजर असलेली – विशेषतः न्यायाधीश वगैरे – न्यायदानाशी संबंधित माणसे. ३ [*गण, अगण*] मोठा राज्यकर्ता, त्याचे कुटुंब, कर्मचारी वगैरे (यांचे राहण्याचे ठिकाण), राजपरिवार, राजवाडा, राजप्रासाद, दरबार. ४ [*गण*] (बरेचदा सामासिक शब्दांत) चेंडूने खेळायच्या काही खेळांसाठी आखलेले पटांगण, आखलेले मैदान : *a tennis ~, टेनिसचे मैदान.* ५ [*गण*] (तसेच **'courtyard**) बाजूने भिंती असलेले पण वरून मोकळे असलेले अंगण, आवार.

court^{2} /कॉऽट्/ *क्रि* १ (*जुना, अप्रचलित*) (**क**) [*सक*] लग्नाच्या आशेने एखाद्याचे किंवा एखादीचे प्रेम संपादण्याचा प्रयत्न करणे, प्रियाराधन करणे, प्रेमचेष्टा करणे. (**ख**) [*अक*] (जोडप्याबाबत) एकत्र वेळ घालविणे – विशेषतः पुढे लग्नाचा इरादा असताना. २ [*सक*] (बरेचदा *अधिक्षेपी*) एखाद्याची कृपा किंवा त्याचा पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न करणे, गोंडा घोळणे, पुढेपुढे करणे : *~ sb's favour, एखाद्याची मर्जी संपादणे.* ३ [*सक*] धोका पत्करणे : *~ disaster, भयानक संकटाचा धोका पत्करणे.*

courteous /'कऽटिअस्/ *वि* चांगल्या रीतीभाती असणारा, नम्र वागणुकीचा, नम्र, सज्जन, सौजन्यपूर्ण : *a ~ person/request,*

नम्र माणूस/विनंती. **courteously** *क्रिवि* नम्रपणे, सौजन्याने.

courtesy /'कऽटसि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] नम्रतेची वागणूक, सौजन्याची वागणूक, सुजनत्व. २ [*गण*] सौजन्यपूर्ण कृती, नम्र कृती, उद्‌गार वगैरे, विनयपूर्ण भाषण. ३ (*वाक्प्र*) **by courtesy of** एखाद्याच्या सौजन्याने किंवा अनुज्ञेने.

courtier /'कॉऽटिअ(र्)/ *ना* [*गण*] राजाच्या किंवा राणीच्या दरबारातील माणूस, दरबारी.

court martial /,कॉऽट्‌ 'माश्‌ल्‌/ *ना* [*गण*] (*ब.व* **courts martial**) लष्करी कायद्याविरुद्ध केलेल्या अपराधाची चौकशी करणारे न्यायालय, लष्करी न्यायालय; लष्करी न्यायालयातील सुनावणी किंवा खटला. **court martial** *क्रि* (**-ll-**; *अमे* **-l-**) [*सक*] (*for*)// एखाद्यावर लष्करी न्यायालयात खटला चालवणे.

courtship /'कॉऽट्‌शिप्‌/ *ना* [*गण, अगण*] प्रियाराधन (किंवा त्याचा काळ).

courtyard /'कॉऽट्‌याड्‌/ = COURT^{1} ५.

cousin /'कझ्‌न्‌/ *ना* [*गण*] एखाद्याच्या काकाचा, मामाचा, आत्याचा किंवा मावशीचा मुलगा/मुलगी, चुलत भाऊ/बहीण, मामेभाऊ/बहीण, आतेभाऊ/बहीण, मावस भाऊ/बहीण.

cove /कउव्ह्‌/ *ना* [*गण*] लहान आखात, लहान वाकण, छोटी खाडी, फासूक.

cover^{1} /'कव्ह(र्)/ *क्रि* १ [*सक*] (*up/over*)// एखाद्या गोष्टीवर किंवा गोष्टीपुढे दुसरी गोष्ट ठेवणे, झाकणे; अशा रीतीने एखादी गोष्ट लपवणे किंवा सुरक्षित ठेवणे : *~ a table with a cloth, कापड टाकून टेबल झाकणे* ○ *~ one's face, तोंड झाकणे* ○ *~ (up) the body, शरीर झाकणे.* २ [*सक*] (*in/with*)// (खास करून कर्मणी) एखाद्या गोष्टीवर थर देणे, आच्छादणे, माखणे : *hills ~ed with snow, बर्फाच्छादित डोंगर* ○ *boots ~ed in mud, चिखलाने माखलेले बूट.* ३ [*सक*] (ठराविक अंतर) प्रवास करणे, अंतर कापणे : *~ 100 miles in a day, एका दिवसात १०० मैल अंतर कापणे.* ४ [*सक*] (पैशाबाबत) पुरेसे असणे, पुरणे, भागणे : *Will £20 ~ your expenses? वीस पौंडात तुझा खर्च भागेल?* ५ [*सक*] समावेश करणे, व्याप्त करणे : *Her researches ~ed a wide field, तिच्या संशोधनात खूप मोठ्या क्षेत्राचा समावेश होता किंवा तिच्या संशोधनाची व्याप्ती मोठी होती.* ६ [*सक*] (वार्ताहराबाबत) (घटनेची) वार्ता देणे, बातमी देणे : *I've been asked to ~ the election, निवडणुकीच्या सर्व बातम्या देण्याचे काम माझ्यावर सोपवले आहे.* ७ [*अक*] (*for*)// एखाद्याच्या अनुपस्थितीत त्याचे काम करणे. ८ [*सक*] एखाद्यावर बंदूक रोखून धरणे : *We've got him ~ed, आम्ही त्याला बंदुकीने रोखून धरले आहे.* ९ (*वाक्प्र*) **cover one's tracks** आपण कुठे होतो किंवा काय करत होतो याचा मागमूस न ठेवणे. १० (*क्रिब*) **cover up** (*अधिक्षेपी*) (एखादी भानगड, विचित्र घटना वगैरे) दडवून ठेवणे, गुप्त ठेवणे. **cover up for sb** एखाद्याच्या चुका, त्याचे गुन्हे वगैरे त्याच्या सुरक्षिततेसाठी किंवा त्याला वाचविण्यासाठी गुप्त ठेवणे, झाकून ठेवणे. **coverage** *ना* [*अगण*] वार्ताहराने घटनेचे दिलेले वृत्त, वर्तमानपत्रातील मजकूर किंवा वृत्तांत. **covered** *वि* (*in/with*)// बहरलेला, खूप असलेला, लगडलेला : *trees ~ed in blossom, मोहोराने लगडलेली झाडे.* **'cover-up** *ना* [*गण*] (*अधिक्षेपी*) एखादी चूक, गुन्हा लपविण्याची कृती, बहाणा.

cover^{2} /'कव्ह(र्)/ *ना* १ [*गण*] (क) झाकणारी गोष्ट, झाकण, आच्छादन : *a chair ~, खुर्चीचे आच्छादन.* (ख) झाकण. २ [*गण*] पुस्तक, मासिक वगैरेचे बाहेरचे जाड कागदाचे आवरण, ग्रंथवेष्टण, मुखपृष्ठ आणि मलपृष्ठ. ३ [*अगण*] आसरा देणारी जागा, निवाऱ्याची जागा : *seek ~ under some trees, झाडांखाली निवारा शोधणे.* ४ **the covers** [*ब.व*] बिछान्यावरच्या चादरी. ५ [बहुधा *ए.व*] (*for*)// एखादी गोष्ट गुप्त ठेवण्याचे साधन, मिष : *a business that is a ~ for drug dealing, मादक पदार्थांच्या व्यापारासाठी वरवर दाखवायचा धंदा किंवा धंद्याच्या मिषाने मादक पदार्थांचा चोरटा व्यवहार.* ६ [*अगण*] हल्ल्यापासून बचाव, संरक्षण : *Aircraft gave the infantry ~, विमानदळाने पायदळाला संरक्षण दिले.* ७ [*अगण*] नुकसान, हानी वगैरेवरचा विमा. ८ [*गण*] वेष्टण, पाकीट. ९ (*वाक्प्र*) **under cover of** लपलेला, दडलेला : *under ~ of darkness, अंधारात*

लपलेला, काळोखाच्या पडद्यामागे.

covert /'कॅव्हद्; *अमे* 'कउव्हऽट्/ *वि* अर्धवट लपलेला; उघड नसलेला; गुप्त : *a ~ glance/threat, चोरटी नजर, गुप्त धमकी.* **covertly** *क्रिवि* गुप्तपणे, चोरून.

cow^1 /काउ/ *ना* [*गण*] १ वृषभ कुळातील संपूर्ण वाढ झालेली मादी, गाय. २ हत्ती, गेंडा, देवमासा वगैरे सस्तन प्राण्यांतील मादी. ३ (*अधिक्षेपी व्रात्य*) स्त्री : *You silly ~! मूर्ख मादे!* **'cowboy** *ना* [*गण*] १ पश्चिम अमेरिकेतील गुराखी. २ (*ब्रि अनौप*) वाईट किंवा अप्रामाणिकपणे काम करणारा नळवाला, गवंडी वगैरे.

cow^2 /काउ/ *क्रि* [*सक*] एखाद्याला घाबरवून त्याला आपल्याला हवं ते करायला लावणे, धमकी देऊन करून घेणे : *He was ~ed into giving them all his money, त्याला धमकावून त्याचे सर्व पैसे काढून घेण्यात आले.*

coward /'काउअड्/ *ना* [*गण*] (*अधिक्षेपी*) भीतीने हादरून जाणारा माणूस, भित्रा, भित्री भागूबाई; धोका, जबाबदारी वगैरे टाळणारा, भेकड, नेभळट. **cowardly** *वि* (*अधिक्षेपी*) भित्रा, भेदरट, भ्याड; भेकड, नेभळट : *a ~ attack, भ्याड हल्ला.* **cowardice** /-डिस्/ *ना* [*अगण*] (*अधिक्षेपी*) भित्र्या माणसाच्या भावना किंवा त्याची वागणूक, भ्याडपणा, भेकडपणा.

cower /'काउअ(र्)/ *क्रि* [*अक*] भीतीने, थंडीने वगैरे खाली वाकून मागे फिरणे, भयाने दबकणे.

cowl /काउल्/ *ना* [*गण*] १ ख्रिस्ती मठवाशाची मोठी टोपी किंवा टोपडे. २ धुराड्यावरील पत्र्याची टोपी.

cox /कॉक्स्/ (तसेच (*औप*) **coxswain** /'कॉक्स्‌न्/) *ना* [*गण*] वल्हवायच्या बोटीला विशेषतः शर्यतीमध्ये दिशा देणारा माणूस, सुकाणू धरणारा, तांडेल. **cox** *क्रि* [*अक, सक*] सुकाणू धरणे, तांडेल होणे.

coy /कॉइ/ *वि* १ लाजाळू, संकोची वगैरे (आहे असे दाखविणारा) : *a ~ smile, लज्जायुक्त स्मित.* २ माहिती देण्यास, प्रश्नांची उत्तरे देण्यास वगैरे नाखूष असणारा, टाळाटाळ करणारा, अबोल, घुमा : *She was a little ~ about her past, तिच्या भूतकाळाबाबत ती जराशी गप्पच होती.* **coyly** *क्रिवि* लाजत, संकोचाने; टाळाटाळ करत, उडतउडत. **coyness** *ना* [*अगण*] लाजाळूपणा, संकोचीपणा.

coyote /कॉइ'अउटि; *अमे* 'काइअउट्/ *ना* [*गण*] उत्तर अमेरिकेच्या पश्चिम भागात आढळणारा एक लहान लांडगा.

crab /क्रॅब्/ *ना* (क) [*गण*] दहा पायांचा एक मृदुकायकवची प्राणी, खेकडा. (ख) [*अगण*] खाण्यासाठी वापरायचे त्याचे मांस.

crabby /'क्रॅबि/ *वि* **(-ier, -iest)** (*अनौप*) तापट, रागीट, चिडखोर : *in a ~ mood, चिडखोर मनस्थितीत असलेला, तापलेला.*

crack^1 /क्रॅक्/ *ना* [*गण*] १ तडा, चीर गेलेली रेषा : *a ~ in a cup/the ice, कपाचा तडा, बर्फातील चीर.* २ कडकड किंवा तडतड आवाज : *the ~ of a whip/rifle, चाबकाचा काडकाड आवाज, बंदुकीचा खडखड आवाज.* ३ जोराचा ठोसा, गुद्दा : *a ~ on the head, डोक्यावरचा फटका.* ४ (*अनौप*) हुशारीचा किंवा चपखल शेरा; विनोद, चुटका : *She made a ~ about his baldness, त्याच्या टकलावर तिने विनोद केला.* ५ (*वाक्प्र*) **the crack of 'dawn** (*अनौप*) भल्या पहाटे. **crack** *वि* उत्तम; फारच कौशल्यपूर्ण : *She's a ~ shot, तिचा नेम फारच छान आहे.*

crack^2 /क्रॅक/ *क्रि* १ [*अक, सक*] भेग पडणे किंवा पाडणे, तडकणे, भेगाळणे : *~ a plate, प्लेट तडकणे* ○ *The ice ~ed, बर्फाला भेगा पडल्या.* २ [*अक, सक*] काडकाड आवाज येणे किंवा काढणे : *~ a whip, चाबकाचा काडकाड आवाज काढणे.* ३ [*सक*] फोडणे, उकलणे, मोडणे, तुकडे करणे : *~ a safe, तिजोरी किंवा लॉकर फोडणे* ○ *~ nuts, कठीण कवचाची फळे फोडणे, भुईमुगाचा शेंगा फोडणे.* ४ [*सक*] जोराने आपटणे किंवा आदळणे : *~ one's head on the door, दारावर डोके आपटणे.* ५ [*अक, सक*] प्रतिकार थंडावणे : *She finally ~ed and told the truth, शेवटी तिचा विरोध थंडावला आणि तिने खरे काय ते सांगितले.* ६ [*सक*] (*अनौप*) (कोडे वगैरे) सोडवणे, उकलणे : *~ a code, सांकेतिक लिपी उकलणे म्हणजे वाचणे.* ७ [*अक*] (आवाजाबाबत) अचानक घोगरा होणे; (मुलाचा आवाज किंवा कंठ) फुटणे. ८ [*सक*] (*अनौप*) (विनोद)

सांगणे. ९ (*वाक्प्र*) **get 'cracking** (*अनौप*) व्यग्र होऊ लागणे, काम करण्यात गुंतणे. १० (*क्रिब*) **crack down (on sb/sth)** कडक होणे, आवळणे, शिस्त कडक करणे : *~ down on crime, गुन्हेगारीवर कडक नजर ठेवणे.* **crack up** (*अनौप*) शारीरिक किंवा मानसिक आरोग्य बिघडणे, क्षीण होणे, शक्तिपात होणे, खिन्न होणे, दुबळे होणे. **'crack-down** *ना* [*गण*] अचानक केलेली कडक कारवाई : *a police ~-down on vandalism, गुंडगिरीविरुद्धची पोलिसांची कडक कारवाई.* **cracked** *वि* (*अनौप*) चक्रम, वेडा : *You must be ~ed to drive so fast! एवढ्या जोरात गाडी चालवायला तू वेडाच असला पाहिजेस!*

crack^3 /क्रॅक्/ *ना* [*अगण*] (*व्रात्य*) शुद्ध आणि तीव्र स्वरूपातले कोकेन (मादक पदार्थ).

cracker /'क्रॅक(र्)/ *ना* [*गण*] १ बऱ्याचदा चीजबरोबर खाल्ले जाणारे पातळ कुरकुरीत बिस्किट. २ फाडफाड आवाज करणारी उडवायची दारू, फटाका. ३ कागदात गुंडाळलेल्या आणि ओढल्यानंतर फाट्कन् आवाज करणाऱ्या पुठ्ठ्याच्या नळीचे एक खेळणे.

crackers /'क्रॅकझ़्/ *वि* (*ब्रि अनौप*) वेडा; वेडपट, आचरट.

crackle /'क्रॅक्ल्/ *क्रि* [*अक*] काटक्या जळताना होतो तसा तडतड आवाज होणे, कडकड आवाज होणे : *Dry leaves ~d under our feet, आमच्या पायाखाली वाळक्या पानांचा करकर आवाज होत होता.* **crackle** *ना* [*अे.व, अगण*] कडकड आवाज.

crackpot /'क्रॅक्पॉट्/ *ना* [*गण*] (*अनौप*) विक्षिप्त किंवा वेडा माणूस, भंगड : *a ~ idea/person, वेडगळ कल्पना/माणूस.*

cradle /क्रेइड्ल्/ *ना* [*गण*] १ लहान मुलाचा बिछाना, पाळणा. २ (*ला*) एखाद्या गोष्टीचे उगमस्थान, जन्मस्थान : *the ~ of Western culture, पाश्चात्य संस्कृतीचे जन्मस्थान.* ३ पाळण्यासारखी दिसणारी कोणतीही गोष्ट, झोका. **cradle** *क्रि* [*सक*] पाळण्यात ठेवणे किंवा घालणे, पाळण्यातल्यासारखे अलगद ठेवणे/धरणे.

craft /क्राफ्ट्; *अमे* क्रॅफ्ट्/ *ना* १ [*गण*] हाताचे कसब (आवश्यक असणारा व्यवसाय), कारागिरी : *the potter's ~, कुंभाराचे कसब.* २ [*गण*] (*ब.व* **craft**) जहाज, होडी, विमान, अंतरिक्षयान. ३ [*अगण*] (*औप अधिक्षेपी*) फसवण्यातील कसब, चलाखी, हिकमत; लबाडी, लुच्चेगिरी, कावा. **-craft** (सामासिक शब्दांत) : *handi~/needle~, हस्तव्यवसाय, हस्तकला/भरतकाम.* **'craftsman** *ना* [*गण*] (*ब.व* **-men**) कारागीर, कसबी कामगार, शिल्पी. **'craftsmanship** *ना* [*अगण*] कारागिरी, कसबीपणा, हस्तकौशल्य.

crafty /'क्राफ्टि; *अमे* 'क्रॅफ्टि/ *वि* (**-ier, -iest**) फसवेगिरीत तरबेज असलेला; लबाड, लुच्चा, धूर्त, कावेबाज. **craftily** *क्रिवि* चलाखीने; लबाडीने, धूर्तपणे. **craftiness** *ना* [*अगण*] हिकमतीपणा, चलाखी, लबाडी, धूर्तपणा, कावेबाजपणा.

crag /क्रॅग्/ *ना* [*गण*] खडकाचा उभा सुळका, कडा. **craggy** *वि* (**-ier, -iest**) १ खूप कडे असलेला, सुळक्यांचा. २ (एखाद्याच्या चेहेऱ्याबाबत) ठसठशीत, नाकीडोळी मोठा आणि स्पष्ट रेखा असलेला.

cram /क्रॅम्/ *क्रि* (**-mm-**) १ [*सक*] (*in/into/with*)// एखाद्या गोष्टीत एखादी गोष्ट भरपूर घालणे, ढोसणे, कोंबणे, खच्चून भरणे : *~ the clothes into the suitcase, सूटकेसमधे कपडे कोंबणे* ○ *~ the file with papers, कागदांनी फाईल गच्च भरणे.* २ [*अक*] (*for*)// परीक्षेसाठी वगैरे खूप अभ्यास करणे, कुथणे.

cramp^1 /क्रॅम्प्/ *ना* [*गण, बहुधा ब.व, अगण*] स्नायूंचे अचानक झालेले आणि वेदनाकारक आकुंचन, पेटका, वांब.

cramp^2 /क्रॅम्प्/ *क्रि* १ [*सक*] (बहुधा कर्मणी) जराही अवसर न देणे, प्रगती किंवा वाढ खुंटवणे; अटकाव करणे : *feel ~ed by the rules, नियमांनी जखडल्यासारखे वाटणे.* २ (*वाक्प्र*) **cramp sb's 'style** (*अनौप*) एखादा ज्या पद्धतीने एखादी गोष्ट करू इच्छितो त्या पद्धतीत अडथळा आणणे, विचका करणे, कडमडणे. **cramped** *वि* अपुरी जागा असलेला : *~ed conditions, जखडणाऱ्या अटी, गिचमीड.*

crampon /'क्रॅम्पॉन्/ *ना* [*गण*] बर्फावर चढण्यासाठी बुटाबरोबर घालायची खिळे

असलेली लोखंडी पट्टी.

cranberry /'क्रॅन्बरि; *अमे* -बेरि/ *ना* [*गण*] किंचित् आंबट लाल रंगाची छोट्या आकाराची बेरी – हिची जेली किंवा सॉस करतात.

crane^{1} /क्रेइन्/ *ना* [*गण*] १ लांब मानेचा आणि लांब पायांचा पाण्यातून चालणारा पक्षी, बक, बगळा, करकोचा. २ वजन उचलायचा मोठा हात असलेले यंत्र, यारी.

crane^{2} /क्रेइन्/ *क्रि* [*अक, सक*] नीट दिसण्यासाठी वगैरे मान लांब करणे: *Children ~ed to see the animals, प्राणी पाहण्यासाठी मुले माना वेळावत होती* किंवा *माना वेळावून मुले प्राणी पाहात होती.*

cranium /'क्रेइनिअम्/ *ना* [*गण*] (*ब.व* ~s किंवा **crania** /'क्रेइनिअ/) (*शरीरशास्त्र*) कवटी, कर्पर. **cranial** *वि* कर्पर.

crank^{1} /क्रॅङ्क्/ *ना* [*गण*] इंग्रजी L च्या आकाराचे वस्तू फिरवायचे हॅंडल, वक्रदांडा, भुजा, कलथा. **crank** *क्रि* [*सक*] (*up*)// वाकदांडा फिरवून हालवणे: *~ the engine, इंजिनाला दांडा फिरवणे* म्हणजेच *दांडा फिरवून इंजिन चालू करणे.* **'crankshaft** *ना* [*गण*] वाकदांड्याने फिरणारा दंड, भुजदंड, वक्रधुरा.

crank^{2} /क्रॅङ्क्/ *ना* [*गण*] (*अधिक्षेपी*) विचित्र पण पक्क्या कल्पना असणारा माणूस, लहरी माणूस. **cranky** *वि* (**-ier, -iest**) (*अनौप अधिक्षेपी*) १ (लोकांबाबत) लहरी, विचित्र; विक्षिप्त, एककल्ली. २ (*अमे*) तापट, तिरसिंगराव.

cranny /'क्रॅनि/ *ना* [*गण*] १ भिंतीतील बीळ, फट, सांध. २ (*वाक्प्र*) **every nook and cranny** ➪ NOOK.

crap /क्रॅप्/ *क्रि* (**-pp-**) [*अक*] (*व्रात्य* ⚠) आतड्यातील निरुपयोगी द्रव्य बाहेर टाकणे, हगणे. **crap** *ना* (⚠) १ [*अगण*] विष्टा, गू. २ [*अे.व*] हागण्याची क्रिया, परसाकडे. ३ [*अगण*] मूर्खपणा, निरर्थकता; कचरा, भंकसपणा. **crappy** *वि* (**-ier, -iest**) (*व्रात्य*) वाईट; किंमतशून्य, शेण.

crash^{1} /क्रॅश्/ *ना* [*गण*] १ [बहुधा *अे.व*] जोराने पडणे, कोसळणे, चक्काचूर होणे (किंवा त्याचा आवाज): *The dishes fell with a ~ to the floor, डिशेस् खळ्कन् जमिनीवर पडल्या.* २ वाहनाची टक्कर होऊन झालेला अपघात: *a car ~, मोटार अपघात.* ३ पूर्ण कोलमडणे, बट्ट्याबोळ होणे – उदा धंद्याचा. **crash** *वि* झटपट परिणाम दिसण्यासाठी किंवा फळ मिळण्यासाठी केलेला, तातडीचा: *a ~ course in French, फ्रेंच शिकण्याचा तातडीचा वर्ग.* **crash** *क्रिवि* कडाडत. **'crash-helmet** *ना* [*गण*] डोक्याच्या सुरक्षिततेसाठी घालायचे शिरस्त्राण – उदा मोटरसायकलस्वाराचे. **,crash-'land'** *क्रि* [*अक, सक*] आणीबाणीच्या परिस्थितीत (विमान) उतरविणे, कसेबसे उतरविणे. **,crash-'landing** *ना* [*गण*] अशा प्रकाराने विमान उतरणे.

crash^{2} /क्रॅश्/ *क्रि* १ [*अक, सक*] जोराने आपटणे, टक्कर होणे, कडकडाट होऊन कोसळणे: *The tree crashed through the window, झाड खिडकीत घुसून कोसळले.* २ [*अक, सक*] टक्कर होणे किंवा देणे, आदळणे: *~ the car (into a wall), गाडी भिंतीवर आदळणे.* ३ [*अक*] मोठा आवाज करणे, कडाडणे, गडगडाट होणे: *The thunder ~ed, वीज कडाडली.* ४ [*अक, सक*] एकदम जोराने जाणे किंवा नेणे, घुसणे, सपासप जाणे: *an elephant ~ing through the trees, झाडातून झपाझप जाणारा हत्ती.* ५ [*अक*] (धंदा वगैरे) पडणे, कोसळणे, साफ बसणे.

crass /क्रॅस्/ *वि* (*औप अधिक्षेपी*) १ मूर्ख, अडाणी वगैरे: *a ~ idiot, अगदी अडाणी, निव्वळ वेडा.* २ पूर्ण, अतिशय: *~ stupidity, ठार वेडेपणा, अगदी वेडेपणा.*

crate /क्रेइट्/ *ना* [*गण*] माल ठेवण्यासाठीचे मोठे लाकडी खोके, पेटारा, पट्ट्यापट्ट्याचा पिंजरा. **crate** *क्रि* [*सक*] खोक्यात ठेवणे.

crater /'क्रेइट(र्)/ *ना* [*गण*] १ ज्वालामुखीचे तोंड, ज्वालामुखीचे कुंड. २ बॉम्ब पडून झालेला खड्डा, बॉम्बने केलेले विवर.

cravat /क्र'व्हॅट्/ *ना* [*गण*] पुरुषांनी गळ्याभोवती घालायचा कापडी पट्टा, जुन्या तऱ्हेचा टाय, गळपट्टा.

crave /क्रेइव्ह्/ *क्रि* [*सक*] (*for*)// तीव्र इच्छा होणे, आसावणे, आच लागणे: *~ for a cigarette, सिग्रेटची तलफ येणे.* **craving** *ना* [*गण*] आशा, तीव्र इच्छा, आस.

crawl /क्रॉऽल्/ *क्रि* [*अक*] १ जमिनीवर हळूहळू सरकणे, हात आणि गुडघे टेकून सरकणे, सरपटणे, रांगणे : *The baby ~ed along the floor, मूल जमिनीवर रांगले.* २ अतिशय हळूहळू जाणे, मुंगीच्या पावलाने सरकणे : *traffic ~ing into London, लंडनकडे हळूहळू सरकणारी वाहतूक.* ३ *with//* (खास करून अपूर्ण काळात) सरपटणाऱ्या गोष्टींनी भरणे, वळवळणाऱ्या कीटकांनी भरणे : *a floor ~ing with ants, मुंग्यांनी भरलेली जमीन.* ४ *to//* (*अनौप*) एखाद्याच्या मनासारखे वागून, त्याचा अनुनय करून वगैरे एखाद्याची मर्जी संपादणे. ५ (*वाक्प्र*) **make one's flesh crawl** ➪ FLESH. **crawl** *ना* १ [*गण*] रांगणे, सरपट. २ **the crawl** [*अे.व*] झपाट्याने पुढे जाण्याचा एक पोहण्याचा हात (पद्धत). **crawler** *ना* (*अनौप अधिक्षेपी*) सरपटणारा माणूस, कणा नसणारा माणूस, लाचार माणूस.

crayon /'क्रेइअन्/ *ना* [*गण*] रंगीत मऊ खडू किंवा मेण यापासून बनविलेली पेन्सिल. **crayon** *क्रि* [*सक*] क्रेयॉनने चित्र काढणे.

craze /क्रेइझ्/ *ना* [*गण*] (क) बहुधा तात्पुरती पण सर्वांना वाटणारी अशी एखाद्या गोष्टीची आवड, वेड, टूम, खूळ. (ख) असे वेड लावणारी गोष्ट.

crazed /क्रेइझ्ड्/ *वि* (*with*)// वेडापिसा झालेला, नादावलेला; खुळा, वेडाखुळा.

crazy /'क्रेइझि/ *वि* (**-ier, -iest**) १ वेडा झालेला, वेड असलेला, अत्यंत उत्सुक : *~ about football, फुटबॉलचे वेड असलेला.* २ (*अनौप*) पिसाट, भ्रमिष्ट; वेडा. ३ (*अनौप*) वेडपट, मूर्ख; डोके जागेवर नसलेला, समजुतदारपणा नसलेला, असमंजस : *a ~ idea, अफलातून कल्पना.* **crazily** *क्रिवि* वेड्यासारखा. **craziness** *ना* [*अगण*] वेडेपणा, खुळचटपणा.

creak /क्रीक्/ *क्रि* [*अक*], *ना* [*गण*] गंजलेल्या दाराचा उघडताना होणाऱ्या आवाजासारखा कर्कश आवाज (करणे), (दार) कुरकुरणे, कर्र कर्र आवाज (करणे) : *The branches ~ed in the wind, वाऱ्याने फांद्या करकरल्या.* **creaky** *वि* (**-ier, -iest**) करकर वाजणारा.

cream /क्रीम्/ *ना* १ [*अगण*] दुधाचा घट्ट पिवळसर स्निग्धांश, साय, मलई. २ [*अगण*] मलईसारखा दिसणारा कोणताही पदार्थ : *'furniture ~, फर्निचरचे पॉलिश.* ३ **the cream** [*अे.व*] उत्तम भाग : *the ~ of society, समाजातला उत्तम भाग, उत्तम वर्ग.* ४ [*अगण*] पिवळसर पांढरा रंग. **cream** *वि* पिवळसर पांढरा. **cream** *क्रि* [*सक*] १ (दुधातून) मलई किंवा साय काढणे. २ (बटाटे वगैरे) गाळ करणे, लगदा करणे. ३ (*क्रिब*) **cream off** उत्तम भाग घेणे. **creamy** *वि* (**-ier, -iest**) मलईसारखा, मऊ आणि सत्वयुक्त; मलई असलेला, साईचा.

crease /क्रीस्/ *ना* [*गण*] १ कागदाची किंवा कापडाची घडी, दुमड, दूण. २ त्वचेवरील सुरकुती. ३ क्रिकेटच्या धावपट्टीवरील फलंदाज, गोलंदाज वगैरेच्या जागा दाखविण्यासाठी मारलेली पांढरी रेघ, विकेटजवळ मारलेली रेषा. **crease** *क्रि* [*अक, सक*] घडी होणे किंवा घडी घालणे.

create /क्रि'अेइट्/ *क्रि* [*सक*] १ (एखादी गोष्ट) अस्तित्वात आणणे, निर्माण करणे; नवनिर्मिती करणे, पूर्वी नसलेली गोष्ट मुळापासून तयार करणे. २ परिणाम होणे, परिणती होणे; निर्माण करणे : *~ problems, समस्या निर्माण करणे.*

creation /क्रि'अेइश्न्/ *ना* १ [*अगण*] निर्मिती : *the ~ of the world, जगाची निर्मिती.* २ (तसेच **Creation**) [*अगण*] सर्व निर्मित गोष्टी, सृष्टी, सृजन. ३ [*गण*] निर्माण केलेली किंवा तयार केलेली गोष्ट, निर्मिती.

creative /क्रि'अेइटिव्ह्/ *वि* १ निर्मितिक्षम, सृजनशील, सर्जनशील : *a ~ person who writes and paints, लेखन करणारा आणि चित्र काढणारा सर्जनशील माणूस.* २ निर्मितीचा : *the ~ act, काहीतरी नवीन करण्याची कृती, नवनिर्माण.* **creatively** *क्रिवि* सर्जनशीलतेने. **creativity** /,क्रीअेइ'टिव्हटि/ *ना* [*अगण*] सर्जनशीलता, निर्मितीक्षमता.

creator /क्रि'अेइट(र्)/ *ना* १ [*गण*] निर्मिती करणारा माणूस, जनक, निर्माता : *the ~ of this novel, या कादंबरीचा जनक.* २ **the Creator** [*अे.व*] सृष्टीचा कर्ता, परमेश्वर, जगत्‌जननी, विश्वकर्ता.

creature /'क्रीच(र्)/ *ना* [*गण*] सजीव प्राणी, जंतु: *all God's ~s, सर्व देवाचे प्राणिमात्र, देवाने निर्माण केलेले सर्व जीवजंतू.*

crèche /क्रेइश्/ *ना* [*गण*] आईवडील कामावर गेले असताना मुले सांभाळण्यासाठी असलेले ठिकाण, पाळणाघर.

credentials /क्रि'डेन्‌श्ल्स्/ १ *ना* [*ब.व*] एखादी व्यक्ती आपण जे आहोत असे म्हणते ते खरे आहे असे सिद्ध करणारी कागदपत्रे, विश्वासपत्रे. २ एखाद्या व्यक्तीची योग्यता ठरविणारे गुण वगैरे: *Does she have the ~ for this demanding work? या कष्टाच्या (किंवा अवघड) कामाला आवश्यक असे गुण तिच्यात आहेत का?* ३ (*कायदा*) अधिकारपत्रे.

credible /'क्रेडब्ल्/ *वि* विश्वास ठेवण्यासारखा, विश्वासार्ह: *a ~ story/explanation, विश्वास बसेल अशी गोष्ट/असे स्पष्टीकरण.* **credibility** /,क्रेड'बिलटि/ *ना* [*अगण*] विश्वासार्हता. **credibly** /-अब्लि/ *क्रिवि* विश्वास टाकण्याजोग्या मार्गाने, खरे वाटावे अशा रीतीने.

credit^{1} /'क्रेडिट्/ *ना* १ [*अगण*] वस्तू घेण्याचा पण कालान्तराने पैसे देण्याचा करार, उधारी, पत: *buy a car on ~, उधारीवर गाडी घेणे.* २ [*अगण*] एखादी व्यक्ती, कंपनी वगैरे कर्ज फेडू शकेल असा इतरांना वाटणारा विश्वास, पत: *have good/poor ~, चांगली/वाईट पत असणे.* ३ [*अगण*] बँकखात्यावर असणारी रक्कम. ४ [*गण*] बँकेने वगैरे उधारीवर दिलेली रक्कम. ५ [*गण*] मिळालेल्या पैशाची खात्यावर जमा केल्याची नोंद. ६ [*अगण*] श्रद्धा; विश्वास: *give ~ to her story, तिच्या सांगण्यावर विश्वास बसेल असे करणे किंवा होणे.* ७ [*अगण*] स्तुती, श्रेय, वाखाणणी; मान्यता, संमती: *get/be given all the ~ for sth, एखाद्या गोष्टीचे संपूर्ण श्रेय मिळणे.* ८ [*अ.व*] *to*// कीर्ती वाढविणारा, नावलौकिक वाढविणारी व्यक्ती, भूषण: *She's a ~ to her family, कुटुंबाच्या नावलौकिकात तिने भर घातली, कुटुंबाचे ती एक भूषण आहे.* ९ [*गण*] (*अमे*) विद्यार्थ्याने पूर्ण केलेला अभ्यासक्रम किंवा शिक्षणक्रम. १० (*वाक्प्र*) **be to sb's credit** एखाद्यास गौरवास पात्र करणे, कौतुकास पात्र करणे. **'credit card** *ना* [*गण*] पतीवर माल घेण्याची परवानगी देणारे कार्ड. **'credit-worthy** *वि* पत ठेवण्यात धोका नाही अशी मान्यता मिळालेला, पतयोग्य, पतवाला. **'credit-worthiness** *ना* [*अगण*] पतयोग्यता.

credit^{2} /'क्रेडिट्/ *क्रि* [*सक*] १ (*with*)// एखाद्याकडे एखादी गोष्ट, एखादा गुण आहे असे समजणे, समज असणे: *I ~ed you with more sense, तुला जास्त कळतं/जास्त अक्कल आहे असं मला वाटलं.* २ (खात्यावर) पैसे जमा करणे. ३ विश्वास ठेवणे: *Would you ~ it? तुझा यावर विश्वास बसेल/आहे?*

creditable /'क्रेडिटब्ल्/ *वि* (पूर्णांशाने नाही पण काही अंशी) स्तुती करण्यास योग्य, स्तुत्य, कौतुकास्पद, चांगला: *a ~ piece of work, चांगली कामगिरी, कौतुक करण्यासारखी गोष्ट, प्रशंसनीय निर्मिती.* **creditably** *क्रिवि* छान, उत्तम रीतीने.

creditor /'क्रेडिट(र्)/ *ना* [*गण*] ज्याला पैसे देणे लागतो तो माणूस, धनको.

credulous /'क्रेड्युलस्; *अमे* -ज-/ *वि* एखाद्या गोष्टीवर पटकन् विश्वास टाकणारा, भोळसर, दुधखुळा. **credulity** /क्रिड्यूलटि/ *ना* [*अगण*] भोळसटपणा.

creed /क्रीड्/ *ना* [*गण*] श्रद्धा – खास करून धार्मिक श्रद्धा, संप्रदाय, पंथ.

creek /क्रीक्; *अमे* क्रिक्/ *ना* [*गण*] १ (*ब्रि*) किनाऱ्यापासून आत येणारा पाण्याचा अरुंद प्रवाह किंवा नदीकाठ चिरून आलेला नदीचा भाग, खाडी. २ (*अमे*) लहान नदी, उपनदी.

creep /क्रीप्/ *क्रि* [*अक*] (*भूत, भूत वि* **crept** /क्रेप्ट्/) १ खाली वाकून हळूहळू आणि आवाज न करता जाणे किंवा सरकणे, दबकत जाणे: *The thief crept along the corridor, वीथी किंवा पॅसेजमधून चोर दबकत पुढे सरकला* ○ (*ला*) *Old age is ~ing up on me, म्हातारपण हळूहळू माझ्याकडे सरकतंय्.* २ (वनस्पतींबाबत) भिंतीवर वगैरे वाढणे. ३ (*वाक्प्र*) **make one's flesh creep** ➪ FLESH. **creep** *ना* १ [*गण*] (*अनौप अधिक्षेपी*) तिरस्करणीय माणूस – विशेषतः हांजीहांजी करून फायदा लुटणारा, लाळघोट्या. २ (*वाक्प्र*) **give sb the creeps** (*अनौप*) एखाद्याच्या मनात भीती किंवा अप्रीती निर्माण

करणे, घाबरवणे, अंगावर काटा येणे, अंगावर शहारे येणे. **creeper** *ना* [*गण*] भिंतीवर वगैरे चढणारी वनस्पती, वेल.

creepy /'क्रीपि/ *वि* (-ier, -iest) (*अनौप*) भीती दाखविणारा, भीतीदायक किंवा भ्यायलेला, भेदरलेला : *a ~ house/atmosphere, भीतीदायक घर/वातावरण.*

creepy-crawly /,क्रीपि'क्रॉऽलि/ *ना* [*गण*] (*अनौप* खास करून *गंमत*) कीटक, कोळी वगैरे – बाऊ.

cremate /क्रि'मेइट्/ *क्रि* [*सक*] प्रेताला अग्नी देणे. **cremation** /-'मेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] प्रेताग्नी देणे, सरणावर ठेवणे, प्रेतदहन, अन्त्यसंस्कार. **crematorium** /,क्रेम'टॉऽरिअम्/ *ना* [*गण*] (*ब.व* ~s किंवा **-oria** /-'ऑऽरिअ/) प्रेताला अग्नी देण्याची जागा, स्मशान.

creosote /'क्रिअसउट्/ *ना* [*अगण*] लाकूड टिकण्यासाठी त्याला लावायचे एक तपकिरी रंगाचे तेल, काष्ठतेल.

crepe (तसेच **crêpe**) /क्रेइप्/ *ना* [*अगण*] १ सुरकुत्या असलेला कागद किंवा कापड : *a ~ blouse, क्रेपच्या कापडाचा झंपर.* २ सुरकुत्या असलेले रबर. ३ कणीक, अंडी, दूध, साखर यापासून बनविलेला आणि तळलेला पातळ असा केक.

crept CREEP चा *भूत, भूत वि.*

crescendo /क्रि'शेन्डउ/ *ना* [*गण*] (*ब.व* ~s) १ (*संगीत*) आवाजात हळूहळू होणारा चढ, आरोह. २ (*ला*) (हळूहळू वाढणाऱ्या तीव्रतेचा, गोंगाटाचा वगैरे) कळस, कहर. **crescendo** *वि, क्रिवि* चढ्या आवाजाचा, कमालीचा : *a ~ passage, कळस गाठणारा उतारा.*

crescent /'क्रेज़्न्ट्, 'क्रेस्न्ट्/ *ना* [*गण*] १ चन्द्रकोर (किंवा त्या आकाराचे काही). २ अर्धवर्तुळाकारात बांधलेल्या घरांची रांग.

cress /क्रेस्/ *ना* [*अगण*] सॅलडमधे वापरायच्या तिखट चवीच्या पानांची वनस्पती, आळीव.

crest /क्रेस्ट्/ *ना* [*गण*] १ पक्ष्याच्या डोक्यावरील पिसांचा तुरा. २ (क) टेकडीचे टोक, शिखर, डोंगरमाथा. (ख) मोठ्या लाटेचे पांढरे शुभ्र टोक. ३ कुलाच्या ढालीवरील रेखाटन – बहुधा पत्र लिहिण्याच्या कागदावर वगैरे छापलेले. ४ सैनिकाच्या शिरस्त्राणावरील सजावट. **crest** *क्रि* [*सक*] (टेकडी वगैरेच्या) शिखरावर पोहोचणे.

crestfallen /'क्रेस्ट्फॉऽलन्/ *वि* अतिशय दुःखी किंवा निराश, खिन्न.

cretin /'क्रेटिन्/ *ना* [*गण*] १ (*अपमानकारक* ⚠) मूर्ख माणूस, येडबंबू. २. (*वैद्यक*) ओबडधोबड शरीराचा किंवा कुरूप आणि मंद बुद्धीचा माणूस.

crevasse /क्रि'व्हॅस्/ *ना* [*गण*] बर्फाच्या पातळ थरातील (विशेषतः हिमनदीतील) खोल भेग, खोल तडा.

crevice /'क्रेव्हिस्/ *ना* [*गण*] खडकातील किंवा भिंतीतील वगैरे भेग, चीर, फट.

crew /क्रूऽ/ *ना* [*गण*] १ जहाज किंवा वायुवाहनावर काम करणारे लोक, जहाज, विमान वगैरेवरील कर्मचारी; अधिकारी वर्ग सोडून इतर असे कर्मचारी. २ कर्मचाऱ्यांचा ताफा : *a camera ~, कॅमेरा तंत्रज्ञांचा ताफा.* **crew** *क्रि* [*अक, सक*] कर्मचारी वर्ग म्हणून काम करणे.

crib^{1} /क्रिब्/ *ना* [*गण*] १ लहान मुलाचा बिछाना, बाजूने दांड्या असलेला छोटा पलंग, पलंगडी. २ जनावरांचे खाद्य घालण्याचे लाकडी जाळीचे पात्र, कोटंबा.

crib^{2} /क्रिब्/ *ना* [*गण*] १ दुसऱ्याच्या लेखनातील चोरून लिहिलेला (कॉपी केलेला) मजकूर : *The teacher said my exam answer was a ~, शिक्षक म्हणाले की माझं उत्तर कॉपी करून लिहिलेलं आहे.* २ समजण्यासाठी वापरायचे पुस्तक वगैरे – उदा परभाषेतील अभ्यास करायच्या पुस्तकाचे भाषांतर, गाईड. **crib** *क्रि* (-bb-) [*अक, सक*] (एखाद्याचे) चोरून पाहून लिहिणे, कॉपी करणे.

crick /क्रिक्/ *ना* [*अे.व*] अवटळा – विशेषतः मानेचा, मानेच्या स्नायूंचा पेटका, मान ताठणे किंवा अवघडणे.

cricket^{1} /'क्रिकिट्/ *ना* [*अगण*] चेंडू यष्टीकडे टाकायचा आणि फलंदाजाने तो मारायचा असा अकरा खेळाडूंच्या दोन संघांनी हिरवळीवर खेळायचा एक चेंडूचा खेळ, चेंडू-फळीचा खेळ :

a ~ match, क्रिकेटची मॅच. **cricketer** *ना* [*गण*] क्रिकेटवीर, क्रिकेटचा खेळाडू.

cricket^{2} /'क्रिकिट्/ *ना* [*गण*] पिंगट रंगाचा, कर्कश आवाज करणारा आणि उड्या मारणारा एक लहान कीटक, रातकिडा, राळ.

cried CRY^{2} चा *भूत, भूत वि.*

cries १ CRY^{2} चे *तृ. पुरुष अे.व वर्तमान काळ रूप.* २ CRY^{1} चे *ब.व.*

crime /क्राइम्/ *ना* १ [*गण*] कायद्याने दंडनीय अपराध, गुन्हा: *commit a ~, गुन्हा करणे.* २ [*अगण*] गुन्हेगारी. ३ **a crime** [*अे.व*] लाज वाटावी अशी किंवा मूर्खपणाची कृती, वेडेपणा: *It's a ~ to waste money like that, पैसे असे उडवणे मूर्खपणाचे आहे.* **criminal** /'क्रिमिन्‌ल्/ *वि* १ गुन्हेविषयक, दंडनीय, फौजदारी: *a ~ offence, दंडनीय अपराध, फौजदारी गुन्हा ○ ~ law, फौजदारी कायदा.* २ मूर्खपणाचा, वेडेपणाचा किंवा लाजिरवाणा: *It's ~ not to use your talents fully, तुझ्या अंगच्या गुणांचा वापर न करणे मूर्खपणाचे आहे.* **criminal** *ना* [*गण*] गुन्हेगार. **criminally** /-नलि/ *क्रिवि* गुन्हा असावा असा, अन्यायकारक.

crimson /'क्रिम्·झन्/ *वि, ना* [*अगण*] गडद लाल (रंग), किरमिजी (रंग), लालिमा.

cringe /क्रिन्ज्/ *क्रि* [*अक*] १ भीतीने मागे सरणे किंवा खाली वाकणे, दबणे, मागे फिरणे. २ (*to/before*)// एखाद्या सामर्थ्यवान माणसापुढे लीनपणे वागणे, लोटांगण घालणे: *Don't always ~ to the boss, वरिष्ठांपुढे किंवा साहेबापुढे नेहमीच लोटांगण घालू नकोस.*

crinkle /'क्रिङ्·कल्/ *ना* [*गण*] त्वचा, कागद वगैरेवरची लहान सुरकुती. **crinkle** *क्रि* [*अक, सक*] सुरकुत्या पडणे, चुरगाळणे: *~d paper, सुरकुत्या पडलेला किंवा चुरगाळलेला कागद.*

cripple /'क्रिप्‌ल्/ *ना* [*गण*] मणक्याला किंवा पायाला इजा झाल्याने नीटपणे हालचाल करू न शकणारा माणूस, पांगळा, पंगू, अपंग. **cripple** *क्रि* [*सक*] (बहुधा कर्मणी) १ पांगळा करणे, पंगू करणे: *~d by a back injury, पाठीला इजा झाल्याने पंगू झालेला.* २ (*ला*) बलहीन होणे, क्षीण होणे, धोक्यात येणे: *~d by debt, कर्जाने खचलेला.*

crisis /'क्राइसिस्/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **crises** /-सीझ्/) संकटकाळ, धोक्याचा काळ, कठीण समय, आणीबाणीची परिस्थिती; निर्णायक क्षण: *an economic ~, आर्थिक आणीबाणी ○ a country in ~, संकटात पडलेला देश.*

crisp /क्रिस्प्/ *वि* १ (क) (खास करून अन्नपदार्थांबाबत) कडक, कोरडा आणि सहज मोडणारा, खुसखुशीत, कुरकुरीत, ठिसूळ: *a ~ biscuit, कुरकुरीत बिस्किट ○ ~ snow, ठिसूळ बर्फ.* (ख) (खास करून भाज्या, फळे याबाबत) ताजा, टवटवीत: *a ~ lettuce, ताजी टवटवीत लेटिस किंवा सॅलड.* (ग) (खास करून कागदाबाबत) जरासा कडक, करकरीत: *~ banknotes, (कोऱ्या) करकरीत बँकनोटा.* २ (हवामानाबाबत) थंड, धुकट, कडक हिमवृष्टीचे: *a ~ winter morning, थंडीतील धुकट सकाळ.* ३ (एखाद्याच्या बोलण्याबाबत, वागण्याबाबत वगैरे) नेमका आणि चटपटीत, काटेकोर, चलाख: *a ~ reply, चलाखीचे उत्तर.* **crisp** *ना* [*गण, बहुधा ब.व*] तळून वाळवलेल्या आणि पाकिटात भरलेल्या बटाट्याच्या पातळ चकत्या, वेफर्स. **crisp** *क्रि* [*अक, सक*] कुरकुरीत होणे/करणे. **crisply** *क्रिवि* नेमकेपणाने. **crispness** *ना* [*अगण*] (हवेतला) स्वच्छपणा; (बोलण्यातला) नेमकेपणा. **crispy** *वि* (**-ier, -iest**) (*अनौप*) कुरकुरीत; टवटवीत.

criss-cross /'क्रिस्क्रॉस्/ *वि* उभ्या-आडव्या रेघांचा: *a ~ pattern, उभ्या-आडव्या रेघांची आकृती.* **criss-cross** *क्रि* [*अक, सक*] उभ्या-आडव्या रेघांची आकृती काढणे: *roads ~ing the country, ग्रामीण भागाला व्यापणारे उभे-आडवे रस्ते.*

criterion /क्राइ'टिअरिअन्/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ria** /-रिअ/) एखादी गोष्ट मोजण्याचे मानक, (निर्णय)प्रमाण.

critic /'क्रिटिक्/ *ना* [*गण*] १ साहित्य, कला, संगीत वगैरेबाबत आपली मते मांडणारा माणूस, टीकाकार, समीक्षक: *The ~s liked the play, समीक्षकांना नाटक आवडले.* २ दोष दाखवणारा किंवा नापसंती व्यक्त करणारा माणूस, टीकाकार.

critical /'क्रिटिक्ल्/ *वि* १ दोष दाखविणारा; नापसंती व्यक्त करणारा : *a ~ remark, नापसंतीचा शेरा.* २ साहित्य, कला वगैरेबाबत मूल्यमापन करणारा, चिकित्सा करणारा : *a ~ review, समालोचक परीक्षण, चिकित्सक परीक्षण.* ३ आणीबाणीचा, कसोटी पाहणारा : *a ~ decision, कसोटी घेणारा निर्णय.* **critically** /-अिक्लि/ *क्रिवि* गंभीररीत्या : *~ly ill, गंभीररीत्या आजारी.*

criticism /'क्रिटिसिझ़म्/ *ना* १ **(क)** [*अगण*] साहित्य, ग्रंथ वगैरेचे परीक्षण करण्याची कला, समीक्षा : *literary ~, साहित्य-समीक्षा.* **(ख)** [*गण*] अशा तऱ्हेने केलेली समीक्षा, समीक्षण, टीकावाङ्मय. २ **(क)** [*अगण*] दोषदिग्दर्शन, टीका; नापसंती : *I can't stand her constant ~, मला तिची सततची टीका सहन होत नाही.* **(ख)** [*गण*] टीका करणारा शेरा.

criticize /'क्रिटिसाइझ़्/ *क्रि* १ [*अक, सक*] टीका करणे, दोष दाखविणे : *Don't ~ my work, माझ्या कामावर टीका करू नकोस.* २ [*सक*] (खास करून साहित्य, कला वगैरेची) समीक्षा करणे, स्वतःचे मत मांडणे.

critique /क्रि'टीक्/ *ना* [*गण*] समालोचन, विवेचक टीका : *The book contains a ~ of her ideas, तिच्या कल्पनांचे समालोचन या पुस्तकात आहे.*

croak /क्रउक्/ *ना* [*गण*] बेडकाचे घोगरे, कर्कश ओरडणे, डराव् डराव्. **croak** *क्रि* १ [*अक*] डराव् डराव् करणे. २ [*अक, सक*] घोगऱ्या आवाजात बोलणे.

crockery /'क्रॉकरि/ *ना* [*अगण*] माती भाजून किंवा चिनी मातीपासून केलेले कप, डिशेस् वगैरे, काचेच्या कपबशा, बरण्या, काचसामान.

crocodile /'क्रॉकडाइल्/ *ना* [*गण*] १ उष्ण प्रदेशात नद्यांजवळ आढळणारा लांब शरीराचा व लांब शेपटीचा एक मोठा सरपटणारा प्राणी, सुसर, मगर, नक्र. २ (*अनौप*) जोडीने जाणाऱ्या लोकांची, विशेषतः शालेय विद्यार्थ्यांची, मोठी रांग. ३ (*वाक्प्र*) **'crocodile tears** खोटे दुःख, दांभिक दुःख, नक्राश्रू.

crocus /'क्रउकस्/ *ना* [*गण*] वसंत ऋतूच्या सुरुवातीस येणाऱ्या पांढऱ्या, पिवळ्या, जांभळ्या फुलांचे एक लहान झाड.

croissant /'क्व्सॉङ्, *अमे* क्र'सॉङ्/ *ना* [*गण*] कोरीच्या आकाराचा पातळ तुकड्यांच्या पेस्ट्रीचे आवरण असलेला छोटा केक.

crony /'क्रउनि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) (*अधिक्षेपी*) मित्र; शेपूट.

crook /क्रुक्/ *ना* [*गण*] १ (*अनौप*) गुन्हेगार, गुंड. २ बाक, वळण. ३ एका टोकाला आकडी असलेली काठी, विशेषतः मेंढपाळ वापरतात ती. **crook** *क्रि* [*सक*] (खास करून हात किंवा बोट) वाकवणे.

crooked /'क्रुकिड्/ *वि* १ सरळ नसलेला, वाकडा, वक्र : *a ~ line, वक्र रेषा.* २ (*अनौप*) अप्रामाणिक, ढोंगी, भोंदू, कपटी : *a ~ politician, भोंदू राजकारणी.* **crookedly** *क्रिवि* वाकडेपणाने, कपटाने, छद्मीपणे.

crop^1 /क्रॉप्/ *ना* १ [*गण*] एका वर्षात किंवा मोसमात होणारे धान्य, गवत, फळे वगैरेचे एकूण उत्पादन, पीक, पीकपाणी : *a good ~ of wheat, गव्हाचं चांगलं पीक.* २ **crops** [*ब.व*] शेतात उगवणारं पीक, उभं पीक. ३ [*अे.व*] *of//* माणसांचा किंवा वस्तूंचा गट किंवा समूह : *a new ~ of problems, प्रश्नांचे नवनवीन संच.*

crop^2 /क्रॉप्/ *क्रि* **(-pp-)** [*सक*] १ (एखाद्याचे केस, घोड्याची शेपूट) बारीक कापणे, छाटणे. २ (जनावरांबाबत) (गवत, झाडे वगैरेचे) शेंडे खाणे; चरणे. ३ (*क्रिब*) **crop up** अचानक उद्‌भवणे, उपस्थित होणे : *A new problem has ~ped up, एक नवीनच प्रश्न उद्‌भवलाय.*

croquet /'क्रउकेइ; *अमे* क्रउ'केइ/ *ना* [*अगण*] छोट्या कमानीतून चेंडू पार करण्याचा गवतावर खेळायचा एक खेळ.

cross^1 /क्रॉस; *अमे* क्रॉऽस/ *ना* १ [*गण*] एकमेकांवर रेघ ओढून किंवा दोन छेदणाऱ्या रेषांची केलेली खूण – उदा ×. २ **(क) the Cross** [*अे.व*] एक उभा खांब आणि वरच्या बाजूला आडवा दांडा मारून केलेला आणि येशू ख्रिस्ताला ज्यावर ठोकून बसवले तो क्रूस. **(ख)** [*गण*] ख्रिस्ताला क्रूसावर चढवण्याची प्रतिकात्मक खूण, त्याची निशाणी म्हणून वापरायचा क्रूस. **(ग)** [*गण*] ख्रिस्ती धर्मगुरूने हाताने केलेली क्रूसाची खूण. ३ (*औप*) दुःख, दुःखाचे ओझे, भोग : *We all have our ~ to bear, आपणापैकी प्रत्येकालाच त्याचे त्याचे भोग*

भोगायलाच लागतात. ४ (क) दोन विजातीय प्राण्यांपासून प्रसवलेला प्राणी किंवा संकराने तयार केलेली वनस्पती. (ख) दोन गोष्टींचे मिश्रण, संकर.

cross^{2} /क्रॉस्; *अमे* क्रॉऽस्/ *क्रि* १ [*अक, सक*] पार करणे, ओलांडणे; या टोकापासून त्या टोकापर्यंत पसरणे, वरून पलीकडे जाणे : *a bridge ~ing the road, रस्त्यावरून पलीकडे जाणारा पूल.* २ [*सक*] एकमेकावर ठेवणे : *~ one's arms, हाताची घडी घालणे.* ३ [*सक*] रेघ किंवा रेघा मारणे : *~ a cheque,* चेक *खात्यावरच भरला जावा यासाठी त्यावर कोपऱ्यात दोन आडव्या रेघा मारणे.* ४ [*अक*] एकमेकाला ओलांडून किंवा भेटून पुढे जाणे : *The letters ~ed in the post, पोस्टात पत्रे क्रॉस झाली.* ५ [*सक*] एखाद्याला एखादी गोष्ट करण्यापासून रोखणे, प्रतिबंध करणे; (एखाद्याच्या योजनेला, प्रस्तावाला वगैरे) विरोध करणे, मधे येणे : *You shouldn't ~ her in business, धंद्यात तू तिला विरोध करू नयेस.* ६ [*सक*] (*with*)// दोन भिन्न जातीय प्राण्यांचा किंवा वनस्पतींचा संकर करून नवीन प्राणी किंवा वनस्पती पैदा करणे, संकरित उत्पादन घेणे, संकरित करणे : *~ different varieties of rose, गुलाबाच्या विविध जाती संकरित करणे.* ७ ~ **oneself** ख्रिस्ती क्रूसाची खूण करणे. ८ (*वाक्प्र*) **cross one's 'mind** (कल्पना वगैरे) मनात येणे, मनाला (कल्पना, विचार) शिवणे. ९ (*क्रिब*) **cross sth off/out/through** रेघ मारून एखादी गोष्ट रद्दबातल करणे किंवा काढून टाकणे, काट मारणे : *C~ her name off the list, यादीतून तिचे नाव काढून टाक ○ C~ his name out, त्याच्या नावावर काट मार.*

cross^{3} /क्रॉस्; *अमे* क्रॉऽस्/ *वि* १ रागावलेला, चिडलेला : *I was ~ with him for being late, उशिरा आल्याबद्दल मी त्याच्यावर चिडलो होतो ○ She's ~ about this, ती ह्या बाबतीत चिडलेली आहे.* २ (वाऱ्यांबाबत) एका बाजूने वाहणारा : *a ~ breeze, एका बाजूने वाहणारा/ येणारा वारा.* **crossly** *क्रिवि* रागाने, उलटून. **crossness** *ना* [*अगण*] तापटपणा, उद्धटपणा.

crossbow /'क्रॉस्बउ; *अमे* 'क्रॉऽस्-/ *ना* [*गण*] खाचा असलेल्या फळीवर बसवलेले आणि चाप ओढून बाण मारण्याचे एक भारी धनुष्य, दस्त्याचा कमठा.

crossbred /'क्रॉस्ब्रेड्; *अमे* 'क्रॉऽस्-/ *वि* दोन जातींच्या संकरातून पैदा केलेला, संकरित, मिश्र पैदाशीचा : *a ~ horse, संकरित जातीचा घोडा.*

crossbreed /'क्रॉस्ब्रीड्; *अमे* क्रॉऽस्-/ *ना* [*गण*] संकरित किंवा मिश्र पैदाशीचा प्राणी, वनस्पती वगैरे.

cross-check /ˌक्रॉस् 'चेक्; *अमे* ˌक्रॉऽस्/ *क्रि* [*अक, सक*] (एखादी पद्धत, एखादे गणन वगैरे) दुसरी वेगळी पद्धत वापरून किंवा वेगळ्या मार्गाने माहिती मिळवून वगैरे तपासणे, प्रतितपासणी करणे. **cross-check** /'क्रॉस्चेक्/ *ना* [*गण*] प्रतितपासणी.

cross-country /ˌक्रॉस् 'कैन्ट्रि; *अमे* क्रॉऽस्/ *वि, क्रिवि* रस्त्यातून न जाता शेताशेतातून जाणारा, रानावनातून जाणारा : *a ~ race, रानामळ्यातून जाणारी शर्यत.*

cross-examine /ˌक्रॉस् इग्'झॅमिन्; *अमे* क्रॉऽस्/ *क्रि* [*सक*] पूर्वी दिलेली जबानी तपासून पाहण्यासाठी बारीकसारीक प्रश्न विचारणे जसे कोर्टात, उलट तपासणी घेणे. **cross-examination** *ना* [*गण, अगण*] उलट तपासणी, झाडाझडती.

cross-eyed /'क्रॉसाइड्; *अमे* 'क्रॉऽस्-/ *वि* एका किंवा दोन्ही डोळ्यांनी चकणा, काणा, तिरळा.

crossfire /'क्रॉस्फाइअ(र्); *अमे* 'क्रॉऽस्-/ *ना* [*अगण*] विविध बाजूंनी झाडलेल्या आणि एकमेकांना ओलांडणाऱ्या बंदुकीच्या फैरी.

crossing /'क्रॉसिङ्; *अमे* 'क्रॉऽस्-/ *ना* [*गण*] १ दोन रस्ते, रेल्वेचे रूळ वगैरे मिळतात ती जागा, (रस्त्यांबाबत) चौक, (रेल्वे रूळांबाबत) ओलांडणी. २ LEVEL CROSSING (LEVEL^{1}) चा संक्षेप. ३ नदी किंवा समुद्र ओलांडण्याचा प्रवास, समुद्रपर्यटण : *a stormy ~ of the Atlantic, खवळलेला अटलांटिक समुद्र पार करणे.*

cross-legged /ˌक्रॉस् 'लेग्ड्; *अमे* ˌक्रॉऽस्/ *क्रिवि* पायावर पाय टाकून : *sitting ~, अढी घालून बसणे.*

cross-piece /'क्रॉस्पीस्; *अमे* 'क्रॉऽस्-/ *ना*

[*गण*] एखाद्या रचनेतील किंवा उपकरणातील भागाला दुसरा आडवा जोडलेला भाग, उलट बाजूचा भाग.

cross-purposes /ˌक्रॉस् 'पऽपसिझ्; *अमे* ˌक्रॉस्-/ *ना* (*वाक्प्र*) **at cross 'purposes** (दोन माणसे किंवा गट यांच्याबाबत) दुसऱ्याबाबत गैरसमज करणे, एकमेकाविरुद्ध, एकमेकाच्या उलट.

cross-reference /ˌक्रॉस् 'रेफ्रन्स्; *अमे* ˌक्रॉऽस्-/ *ना* [*गण*] पुस्तकाचे किंवा फाईलचे दुसरे एखादे पान पहा अशी सूचना देणारी टीप, अन्योन्यसंदर्भ, प्रतिसंदर्भ, पूरक संदर्भ.

crossroads /'क्रॉस्रउड्झ्; *अमे* 'क्रॉऽस्-/ *ना* [*गण*] (*ब.व* **crossroads**) १ दोन किंवा अधिक रस्ते जिथे मिळतात ती जागा, काटरस्ता. २ (*वाक्प्र*) **at a/the 'crossroads** महत्त्वाचा निर्णय घ्यायचाय् अशी वेळ, कलाटणी देणारा क्षण, निर्णायक क्षण.

cross-section /ˌक्रॉस् 'सेक्श्न्; *अमे* ˌक्रॉऽस्/ *ना* [*गण*] १ एखाद्या गोष्टीचा घेतलेला छेद, काटछेट, स्तरछेद, लंबच्छेद. २ (*ला*) एखाद्या समूहाचा प्रातिनिधिक नमुना : *a ~ of society, समाजाचा प्रातिनिधिक विभाग.*

crossword /'क्रॉस्वऽड्; *अमे* 'क्रॉऽस्/ *ना* [*गण*] दिलेल्या सूचक वाक्यांच्या आधारे शब्द ओळखून उभ्या-आडव्या चौकोनांत ते भरून सोडवायचे कोडे, शब्दकोडे.

crotch /क्रॉच्/ *ना* [*गण*] माणसाचे पाय किंवा पॅन्टचे पाय जोडले जातात ती जागा, बेचके.

crouch /क्राउच्/ *क्रि* [*अक*] गुडघ्यात वाकून खाली होणे, दबा धरून बसणे, पायावर बसणे : *~ down on the floor, जमिनीवर पायावर बसणे.* **crouch** *ना* [*अे.व*] दबा धरून बसण्याची अवस्था.

croupier /'क्रूप्यि; *अमे* -पिअर्/ *ना* [*गण*] पत्त्याचा वगैरे जुगार खेळतात त्या टेबलाचा मालक किंवा व्यवस्थापक.

crow^{1} /क्रउ/ *ना* १ [*गण*] कर्कश आवाजाच्या विविध प्रकारच्या काळ्या पक्ष्यांतील एक पक्षी, कावळा. २ (*वाक्प्र*) **as the 'crow flies** सरळ : *It's ten miles away, as the ~ flies, सरळ अंतराने येथून ते दहा मैलांवर आहे.* **'crow's-feet** *ना* [*ब.व*] डोळ्याच्या कडेला असलेल्या त्वचेवरील रेषा, डोळ्याभोवतालच्या सुरकुत्या. **'crow's-nest** *ना* [*गण*] जहाजाच्या शिडावरील टेहळणी करण्याचा माळा.

crow^{2} /क्रउ/ *क्रि* [*अक*] १ (कोंबड्याबाबत) कर्कश आवाज काढणे, कावकाव करणे, कोकणे. २ (*over*)// यशाबाबत आनंद व्यक्त करणे, तोरा मिरवणे, ऐट दाखविणे : *~ing over her profits, झालेल्या नफ्याबाबत तिने तोरा मिरवला.* **crow** *ना* [बहुधा *अे.व*] कावकाव.

crowbar /'क्रउबा(र्)/ *ना* [*गण*] अवजड वस्तू हालवण्यास, मोठी खोकी फोडण्यास वगैरे वापरायची मोठी लोखंडी सळई, वाकडे टोक असलेली तरफेची पहार.

crowd /क्राउड्/ *ना* [*गण,* तसेच ब.व क्रियापदासह अे.व] १ लोकांचा मोठा समूह, झुंड, गर्दी : *a ~ of tourists, पर्यटकांची झुंड.* २ (*अनौप*) काही कारणाने जमलेले लोक, जमाव : *the golfing ~, गोल्फ-प्रेक्षकांचा जमाव.* **crowd** *क्रि* १ [*अक*] जमाव जमणे, गर्दी करणे : *~ around the stage, स्टेजभोवती गर्दी करणे.* २ [*सक*] (खोलीत, जागेवर वगैरे) गर्दी करणे, झुंबड उडणे : *Tourists ~ed the beach, समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांची झुंबड उडाली.* ३ [*सक*] (*अनौप*) एखाद्यावर वजन आणणे, दडपण आणणे. **crowded** *वि* फार गर्दी/दाटी झालेला : *a ~ room, दाटी झालेली खोली.*

crown^{1} /क्राउन्/ *ना* १ [*गण*] राजाचा किंवा राणीचा मुकुट, किरीट. २ **the Crown** [*अे.व*] राजसत्ता. ३ [*गण*] डोंगर, टोपी, डोके वगैरेचे शिखर.

crown^{2} /क्राऊन्/ *क्रि* [*सक*] १ (राजा किंवा राणीला) मुकुट घालणे. २ (*with*)// (बहुधा कर्मणी) (क) (*औप*) माथ्यावर असणे : *a hill ~ed with a wood, माथ्यावर जंगल असलेला डोंगर.* (ख) अचूकपणे किंवा योग्य रीतीने पूर्ण होणे, परिपूर्ण होणे : *a project ~ed with success, यशस्वीपणे पूर्ण झालेला प्रकल्प.* ३ (*वाक्प्र*) **to crown it 'all** सर्वात शेवटची वाईट घटना असणे, सर्वावर कळस म्हणजे. **crowning** *वि* परिपूर्ण करणारा : *a ~ing achievement,* (यशाची) *परिपूर्णता करणारी कृती, शिरपेच वाटावे असे यश.*

crucial /'क्रूश्ल्/ *वि* निर्णायक स्वरूपाचा : *a ~ decision, फार महत्त्वाचा निर्णय.* **crucially** /-शलि/ *क्रिवि* सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे.

crucifix /'क्रूसिफिक्स्/ *ना* [*गण*] ख्रिस्ताची प्रतिमा असलेला क्रूस.

crucifixion /,क्रूसि'फिक्शन्/ *ना* [*गण, अगण*] क्रूसावर चढविणे.

crucify /'क्रूसिफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] १ क्रूसावर चढवून खिळे ठोकून एखाद्याला ठार मारणे. २ (*अनौप*) फार कडक टीका, शिक्षा वगैरे करणे.

crude /क्रूड्/ *वि* १ (द्रव्यांबाबत) नैसर्गिक स्वरूपातील आणि परिष्करण न केलेली : *~ oil, क्रूड तेल, अशुद्ध तेल, अशोधित तेल.* २ (क) सफाईदारपणे न केलेला; ओबडधोबड, बटबटीत : *~ tools, ओबडधोबड साधने किंवा अवजारे.* (ख) उद्धट आणि गावंढळ, गावठी, चावट : *~ jokes, गावंढळ विनोद.* **crudely** *क्रिवि* बटबटीतपणे; उद्धटपणे, गावठीपणे.

cruel /क्रूअल्/ *वि* १ (लोकांबाबत) इतरांच्या दुःखात आनंद मानणारा, क्रूर, कठोर. २ पीडादायक, तापदायक : *~ treatment, क्लेशकारक/तापदायक वागणूक.* **cruelly** *क्रिवि* कठोरपणे, क्रूरपणे; क्लेश देऊन. **cruelty** *ना* १ [*अगण*] निष्ठुरता, क्रौर्य. २ [*गण, बहुधा ब.व*] (*ब.व* **-ies**) कठोर कर्म, छळ.

cruet /'क्रूइट्/ *ना* [*गण*] मीठ, मीरपूड, तेल, व्हिनिगर वगैरेच्या टेबलावर ठेवायच्या बाटल्यांचा स्टॅन्ड.

cruise /क्रूझ्/ *क्रि* [*अक*] १ गमतीसाठी बोट चालवणे किंवा युद्धकाळात शत्रूच्या युद्धनौका येताहेत किंवा काय यावर टेहेळणी करणे. २ (मोटारी, वायुवाहन वगैरेबाबत) कमीत कमी इंधनाचा वापर होईल अशा वेगाने प्रवास करणे : *~ along at 50 miles per hour, ताशी पन्नास मैल वेगाने इंधनबचत करत प्रवास करणे.* **cruise** *ना* [*गण*] मौजेची सफर, मजेचे समुद्रपर्यटन. **cruiser** *ना* [*गण*] १ जलद जाणारी युद्धनौका, लढाऊ जहाज. २ झोपण्याची सोय असलेली मोटरबोट. **'cruise missile** *ना* [*गण*] कमी उंचीवरून जाऊ शकणारे स्वनियंत्रित क्षेपणास्त्र.

crumb /क्रॅम्/ *ना* [*गण*] १ कोरड्या अन्नाचा - विशेषतः पावाचा - तुकडा. २ अत्यल्प रक्कम.

crumble /क्रॅम्ब्ल्/ *क्रि* १ [*अक, सक*] मोडून पडणे, भुगा होणे/करणे, चुराडा होणे/करणे, चुरा होणे/करणे, कोसळणे. २ [*अक*] (*ला*) संपुष्टात येणे : *Their marriage ~d, त्यांचे लग्न संपुष्टात आले.* **crumbly** *वि* (**-ier, -iest**) चटकन् भुगा होणारा, भुसभुशीत.

crumple /'क्रॅम्प्ल्/ *क्रि* (*up*)// १ [*अक, सक*] बोळा होणे/करणे, चोळामोळा होणे/करणे : *material that ~s easily, चटकन् चुरगळणारा पदार्थ.* २ [*अक*] (*ला*) संपणे; गळून पडणे : *Her resistance ~d, तिचा प्रतिकार गळून पडला.*

crunch /क्रॅन्च्/ *क्रि* १ [*सक*] (*up*)// खाताना दातांचा आवाज करणे, दातांनी कुरकुर आवाज करणे. २ [*अक, सक*] चिरडणे, आवाज करत चुरडणे : *The snow ~ed under our feet, आमच्या पायाखाली बर्फ चुरडून आवाज येत होता.* **crunch** *ना* [*ए.व*] १ चुरडण्याची क्रिया किंवा आवाज, कुरकुर, कुडकुड. २ **the crunch** (*अनौप*) आणीबाणी : *when the ~ comes, आणीबाणी उदभवल्यावर.*

crusade /क्रू'सेइड्/ *ना* [*गण*] (*for/against*)// एखाद्या चांगल्या गोष्टीसाठी किंवा वाईट गोष्टी विरुद्ध संघर्ष, धर्मयुद्ध. **crusade** *क्रि* [*अक*] अशा संघर्षात, धर्मयुद्धात भाग घेणे. **crusader** *ना* [*गण*] धर्मयोद्धा, वीर.

crush^{1} /क्रश्/ *क्रि* १ [*सक*] दाबून मोडणे किंवा इजा करणे, चेंगरणे : *Her hand was ~ed by the heavy door, त्या जाड दारात तिचा हात चेंगरला.* २ [*सक*] एखाद्या कठीण गोष्टीचा भुगा करणे किंवा ठिकऱ्या करणे, कुटणे, चेचणे, ठेचणे. ३ [*अक, सक*] चोळामोळा करणे/होणे : *clothes ~ed in a suitcase, सूटकेसमधे चोळामोळा झालेले कपडे.* ४ [*सक*] पूर्ण पराभव करणे, नेस्तनाबूत करणे, चिरडून टाकणे. ५ [*अक*] अरुंद जागेत ढकलाढकली करत घुसणे, रेटारेटीने आत जाणे : *Crowds ~ed into the theatre, नाट्यगृहात झुंडी रेटारेटीने आत आल्या.* **crushing** *वि* १ दणदणीत : *a ~ing defeat, दणदणीत पराभव.* २ नामुष्कीचा, उपमर्दकारक :

a ~ing remark, उपमर्दकारक शेरा.

crush^2 /क्रैश्/ *ना* १ [*अे.व*] रेटारेटीची गर्दी, कमालीची गर्दी. २ [*गण*] (*on*)// कमालीची पण बऱ्याचदा तात्पुरती आवड, वेड.

crust /क्रैस्ट्/ *ना* [*गण, अगण*] १ पावाचा वरचा कडक भाग; पाय, टार्ट यांचा पापुद्रा. २ टणक पृष्ठभाग, कवच: *the earth's ~, पृथ्वीचे कवच.* **crusty** *वि* (**-ier, -iest**) १ पापुद्रा असणारा; पापुद्र्यासारखा: *~y bread, पापुद्र्याचा किंवा कुरकुरीत पाव.* २ (*अनौप*) तापट, भडकू.

crustacean /क्रै'स्टेइश्न्/ *ना* [*गण*] मृदुकायकवची जलचर, लपायला कवच असलेला खेकड्यासारखा जलचर, कवची अपृष्ठवंशी जलचर.

crutch /क्रैच्/ *ना* [*गण*] १ लंगड्या माणसाने चालण्यासाठी वापरायची खाकेत घालायची काठी, कुबडी. २ (*ला*) आधार देणारी व्यक्ती किंवा वस्तू. ३ = CROTCH.

crux /क्रैक्स्/ *ना* [*गण*] एखाद्या समस्येचा सर्वात महत्त्वाचा किंवा अवघड भाग, मेख.

cry^1 /क्राइ/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*गण*] दुःख, वेदना वगैरे व्यक्त करणारा मोठा आवाज, आक्रोश, विलाप, रुदन: *a ~ for help, मदतीसाठीचा आकांत.* २ [*अे.व*] रडण्याची क्रिया किंवा काल, रडे: *have a good ~, पोटभर रडणे.* ३ [*गण*] जनावराची आरोळी किंवा पक्ष्यांचा किलकिलाट: *the ~ of the thrush, गाणाऱ्या पक्ष्याची शीळ.* ४ (*वाक्प्र*) **a far cry from** अगदी वेगळा.

cry^2 /क्राइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) १ [*अक*] (*for; over, with*)// रडणे, अश्रू ढाळणे; शोक करणे, टाहो फोडणे: *~ with pain, वेदनेने रडणे* ○ *He was ~ing for his mother, तो आईसाठी शोक करीत होता.* २ [*अक*] (लोक किंवा जनावरांबाबत) भीती, वेदना वगैरे व्यक्त करण्यासाठी ओरडणे, केकटणे: *~ out in surprise, आश्चर्याने ओरडणे.* ३ [*अक, सक*] ओरडून सांगणे, कडाडणे: *'Get out!' he cried, 'चालता हो!' तो कडाडला.* ४ (*क्रिब*) **cry off** नियोजित कार्यक्रम वगैरे रद्द करणे. **cry out for** एखादी गोष्ट तातडीने लागणे, गरज असणे. **'cry-baby** *ना* [*गण*] काही कारण नसताना किंवा लगेच रडणारा, रड्या, रडूबाई.

crypt /क्रिप्ट्/ *ना* [*गण*] चर्चमधील तळघर – प्रेत पुरण्यासाठीचे.

cryptic /'क्रिप्टिक्/ *वि* प्रच्छन्न अर्थाचा, गूढ.

crystal /'क्रिस्ट्ल्/ *ना* १ (क) [*अगण*] रंगहीन पारदर्शक खनिज – उदाहरणार्थ क्वार्ट्झ, स्फटिक. (ख) [*गण*] ह्याचा तुकडा, विशेषतः अलंकार म्हणून वापरायचा, खडा. २ [*अगण*] उच्च प्रतीची काच, बिलोरी काच. ३ [*गण*] काही द्रव्यांचा नैसर्गिक आकार, स्फटिक: *salt ~s, मिठाचे स्फटिक.* ४ [*गण*] (*अमे*) घड्याळाची काच. **crystalline** *वि* १ स्फटिकाचा; स्फटिकासारखा. २ (*औप*) अतिशय स्वच्छ, स्पष्ट: *~ water, स्वच्छ पाणी.* **crystallize** *क्रि* १ [*अक, सक*] स्फटिक बनवणे, स्फटिक होणे. २ [*अक, सक*] (*ला*) (कल्पना, योजना वगैरे) स्पष्ट करणे, स्वच्छ होणे. ३ [*सक*] (फळ) साखरेत मुरवणे, मुरंबा करणे.

cub /कैब्/ *ना* [*गण*] सिंहाचे, अस्वलाचे, लांडग्याचे वगैरे पिल्लू, सिंह वगैरेचा छावा, बछडा.

cubby-hole /'कैबि हउल्/ *ना* [*गण*] छोटी बंदिस्त जागा किंवा खोली.

cube /क्यूब्/ *ना* [*गण*] १ एकाच आकाराच्या चौकोनांच्या सहा बाजू असलेला घनपदार्थ, सहा समभुज चौकोनांचा बनलेला घन, घन. २ (*गणित*) एका आकड्याला त्याच आकड्याने दोनदा गुणून (उदा ५ × ५ × ५) येणारा गुणाकार, घन, त्रिघात. **cube** *क्रि* [*सक*] (खास करून कर्मणी) एखाद्या आकड्याला त्याच आकड्याने दोनदा गुणणे, घन करणे: *3 ~d is 27, ३ चा घन करून २७ येतात.* **cubic** /'क्यूबिक्/ *वि* १ घनाच्या आकाराचा; घनाचा. २ लांबी, रुंदी आणि उंची यांच्या गुणाकाराने आलेला: *a ~ metre, एक घन मीटर.*

cubicle /'क्यूबिक्ल्/ *ना* [*गण*] मोठ्या खोलीचे विभाजन करून होणारा लहान भाग, कप्पा.

cuckoo /'कुकू/ *ना* [*गण*] इंग्रजीत कुकू किंवा मराठीत कुहूकुहू असा आवाज करणारा आणि इतर पक्ष्यांच्या घरट्यात आपली अंडी

घालणारा पक्षी, कोकिळा.

cucumber /'क्यूकैम्ब(र्)/ *ना* [*गण, अगण*] कच्चे खायचे असे भरपूर गर असणारे लांब हिरवे फळ (किंवा त्याचा वेल), काकडी (किंवा काकडीचा वेल).

cud /कैड्/ *ना* [*अगण*] गुरे वगैरे पोटातून अन्न परत तोंडात आणून चावतात ते अन्न, रवंथाचा घास.

cuddle /'कड्ल्/ *क्रि* १ [*सक*] प्रेमाने हाताने घट्ट जवळ धरणे, कवटाळणे, मिठीत घेणे : *~ a child, मुलाला कवटाळणे.* २ (*क्रिब*) **cuddle up** खेटून सुखाने झोपणे, बिलगून निजणे : *She ~d up to her father, ती वडलांना बिलगून निजली, ती वडलांच्या कुशीत निजली.* **cuddle** *ना* [*गण*] कवटाळण्याची क्रिया; मिठी. **cuddly** *वि* (**-ier, -iest**) (*अनौप*) मिठी माराविशी वाटणारा, जवळ घ्यावंसं वाटणारा.

cudgel /'कैज्ल्/ *ना* [*गण*] १ जाड आखूड काठी, दांडका, सोटा. २ (*वाक्प्र*) **take up the cudgels** भरघोस पाठिंबा देणे, कडवे समर्थन करणे. **cudgel** *क्रि* (**-ll-**; *अमे* **-l-**) [*सक*] सोट्याने मारणे.

cue^1 /क्यू/ *ना* [*गण*] १ एखाद्याची बोलायची किंवा काही करण्याची पाळी आहे – विशेषतः नाटकात – अशी सूचना देणारा शब्द, हावभाव वगैरे, सूचक किंवा खुणेचा शब्द किंवा हालचाल : *The actor came in on ~, सूचना मिळताच नट रंगभूमीवर आला.* २ कसे वागावे, काय करावे याची सूचना, सूचन.

cue^2 /क्यू/ *ना* [*गण*] स्नूकर, बिलियर्डस् वगैरे खेळात चेंडू मारण्याची लांब पातळ काठी.

cuff^1 /कैफ्/ *ना* [*गण*] १ मनगटावरील बाहीचे टोक, मुहळी, मनगटपट्टी. २ (*वाक्प्र*) **off the 'cuff** (बोलणे, शेरा वगैरेबाबत) आयत्यावेळी केलेला, विचार वगैरे न करता, उत्स्फूर्तपणे केलेला. **'cuff-link** *ना* [*गण*] शर्टाच्या कफचे बटण.

cuff^2 /कैफ्/ *क्रि* [*सक*] चपराक मारणे, धपाटा घालणे, चापटी/थप्पड मारणे. **cuff** *ना* [*गण*] चपराक, धपाटा, चापटी, थप्पड.

cuisine /क्वि'झीन्/ *ना* [*अगण*] स्वयंपाक (किंवा त्याची रीत), पाकक्रिया (किंवा पाकशैली).

cul-de-sac /'कैल् द सॅक्/ *ना* [*गण*] एकाच बाजूने मोकळा असलेला रस्ता, बंद आळी.

culinary /'कैलिनरि; *अमे* -नेरि/ *वि* स्वयंपाकाचा, पाकक्रियासंबंधीचा.

cullender = COLANDER.

culminate /'कैल्मिनेइट्/ *क्रि* [*अक*] *in*// परिणत होणे, (परिणाम म्हणून) घडणे, परिणाम होणे; कळस होणे : *~ in success, यशामध्ये परिणत होणे किंवा परिणामी यश मिळणे.* **culmination** /,कल्मि'नेइशन्/ *ना* [*अ.व*] परिणती; कळस.

culpable /'कैल्पब्ल्/ *वि* दोषास्पद, दोष देण्याजोगा, दोषास पात्र; सदोष. **culpability** *ना* [*अगण*] दोषपात्रता; सदोषता. **culpably** *क्रिवि* दोष द्यावा अशा रीतीने.

culprit /'कैल्प्रिट्/ *ना* [*गण*] अपराधी, गुन्हेगार, आरोपी.

cult /कैल्ट्/ *ना* [*गण*] १ धार्मिक उपचारांची पद्धती, उपासनामार्ग, पंथ. २ एखादी व्यक्ती, गोष्ट, रिवाज वगैरेवरील निष्ठा. ३ लोकप्रिय फॅशन : *a ~ film, लोकप्रिय फॅशनचा चित्रपट.*

cultivate /'कैल्टिव्हेइट्/ *क्रि* [*सक*] १ मशागत करून (जमीन) लागवडीखाली आणणे. २ (पीक) वाढण्यास मदत करणे, पिकवणे. ३ वेळ देऊन, काळजी घेऊन एखादी गोष्ट वाढविणे, जोपासना करणे : *~d her interest in literature, साहित्याची तिची आवड वाढवली.* ४ एखाद्याची मैत्री संपादण्यासाठी वेळ, लक्ष देणे, संधान बांधणे, सूत जमवणे. **cultivated** *वि* चांगली आवड जोपासलेला, चालण्या-बोलण्यात चांगले वळण असलेला. **cultivation** /,कैल्टि'व्हेइशन्/ *ना* [*अगण*] लागवड, मशागत; पिकवणे; जोपासणी; सूत जमवणे.

culture /'कैल्च(र्)/ *ना* १ [*अगण*] कला, साहित्य वगैरे (जाणण्याची, आस्वाद घेण्याची क्षमता), सुसंस्कृतपणा. २ [*अगण, गण*] कलेची, विचारांची वगैरे विशिष्ट अभिव्यक्ती : *Greek ~, ग्रीक (कलेची) अभिव्यक्ती.* ३ [*अगण*] पीके वगैरे वाढविणे, जोपासना. ४ [*गण*] (*जीवशास्त्र*) चिकित्सा किंवा संशोधनासाठी वाढविलेल्या पेशी, सूक्ष्मजीवजंतू

वगैरे, जीवाणुसंवर्ध. **cultural** *वि* सांस्कृतिक. **cultured** *वि* (लोकांबाबत) साहित्यकलास्वादक, कलारसिक. **'culture shock** *ना* [*गण*] परदेशी लोकांशी पहिल्यांदा संपर्क आल्यावर येणारी गोंधळलेपणाची किंवा चिंतेची भावना, सांस्कृतिक संभ्रमावस्था.

cumbersome /ˌकॅम्बसम्/ *वि* १ नेण्यास अवजड आणि गैरसोयीचा, सुटसुटीत नसणारा, अवाढव्य. २ मंद आणि अकार्यक्षम.

cumulative /'क्यूम्युलटिव्ह्; *अमे* -लेइटिव्ह्/ *वि* एकेकाची भर पडत राशी किंवा सामर्थ्य यात वाढ होणारा, संकलित, संचित.

cunning /'कॅनिङ्/ *वि* दुसऱ्याला फसवण्यात चतुर असणारा, लबाड, धूर्त : *a ~ trick, धूर्तपणाची खेळी* किंवा *लांडीलबाडी.* **cunning** *ना* [*अगण*] धूर्तपणा, लबाडी. **cunningly** *क्रिवि* धूर्तपणे, लबाडीने.

cunt /कॅन्ट/ *ना* [*गण*] (*अपमानकारक* ⚠ *व्रात्य*) १ स्त्रीचे लिंग, पुच्ची. २ (*अधिक्षेपी*) वाईट माणूस, मादरचोद.

cup^1 /कॅप्/ *ना* [*गण*] १ चहा, कॉफी वगैरे पिण्याचे कानाचे भांडे. २ कपातला पदार्थ किंवा त्यातले पेय. ३ स्पर्धेत बक्षीस म्हणून दिला जाणारा सुवर्णचषक किंवा चांदीचा चषक. ४ कपासारखी दिसणारी वस्तू. ५ (*वाक्प्र*) **not sb's cup of 'tea** (*अनौप*) एखाद्याच्या आवडीचे नसलेले (काही). **cupful** *ना* [*गण*] कपभर.

cup^2 /कॅप्/ *क्रि* **(-pp-)** [*सक*] हाताने कपाचा आकार करणे; कपात असल्याप्रमाणे एखादी गोष्ट हातात धरणे : *~ one's chin in one's hands, हातांनी कपाचा आकार करून त्यावर हनुवटी टेकवणे.*

cupboard /'कॅबड्/ *ना* [*गण*] पुढे दारे असलेले आणि आत कप्पे असलेले फर्निचर, कपाट.

curable /'क्युअरब्ल्/ *वि* बरा होण्यासारखा, बरा होऊ शकणारा.

curate /'क्युअरट्/ *ना* [*गण*] परगण्यातील ख्रिस्ती धर्मगुरूला मदत करणारा पाद्री, व्हिकरला मदत करणारा ख्रिस्ती आचार्य.

curative /'क्युअरटिव्ह्/ *वि* बरा करणारा.

curator /क्युअ'रेइट(र्); तसेच *अमे* 'क्युअरटर्/ *ना* [*गण*] संग्रहालय, कलादालन वगैरेची व्यवस्था पाहणारा माणूस, अभिरक्षक.

curb /कऽब्/ *ना* [*गण*] १ (*on*)// आवर घालणारी गोष्ट, बंधन. २ घोड्याला काबूत ठेवण्यासाठी त्याच्या जबड्याखाली असणारी पट्टी, जेरकडी. ३ (खास करून *अमे*) = KERB. **curb** *क्रि* [*सक*] १ आवर घालणे, पायबंद घालणे, काबूत ठेवणे; नियंत्रण करणे, ताब्यात ठेवणे : *~ one's joy, आनंदावर ताबा ठेवणे.* २ जेरकडीने घोड्यावर नियंत्रण ठेवणे.

curd /कऽड्/ *ना* १ [*गण, बहुधा ब.व*] दही. २ [*अगण*] (सामासिक शब्दांत वापर) दह्यासारखा पदार्थ : *ˌlemon-'~, लिंबाच्या स्वादाचे दही.*

curdle /'कऽड्ल्/ *क्रि* [*अक, सक*] दही बनणे, विरजण लावणे/लागणे.

cure /क्युअ(र्)/ *क्रि* [*सक*] १ (*of*)// एखाद्याला (आजारातून) बरा करणे : *~d of a serious illness, गंभीर दुखण्यातून उठलेला किंवा बरा झालेला.* २ एखादी गोष्ट थांबवणे, बंद करणे : *a policy to ~ inflation, चलनवाढ थांबवण्याचे धोरण.* ३ एखादी वाईट किंवा मूर्खपणाची गोष्ट करण्यास एखाद्याला परावृत्त करणे : *~ sb of an obsession, एखाद्याला एखाद्या लागलेल्या वेडापासून किंवा ध्यासापासून परावृत्त करणे, एखाद्याच्या डोक्यातील वेड काढून टाकणे.* ४ मांस, मासे वगैरे टिकवण्यासाठी त्यावर प्रक्रिया करणे, साठवण करणे. **cure** *ना* १ [*गण, बहुधा अ.व*] तब्बेत सुधारणे. २ [*गण*] बरे करणारी गोष्ट, उपाय : *a ~ for arthritis, संधिवातावरचा उपाय.*

curfew /'कऽफ्यू/ *ना* [*गण*] लोकांनी घरात राहण्याचा काल किंवा तशी सूचना, संचारबंदी.

curio /'क्युअरि·अउ/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s**) क्वचित आढळणारी किंवा असामान्य अशी लहान वस्तू, अपूर्ववस्तू.

curiosity /ˌक्युअरि'ऑसटि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] एखाद्या गोष्टीत रस.असणे किंवा एखादी गोष्ट शिकण्यास उत्सुक असणे, उत्सुकता, जिज्ञासा, चौकसबुद्धी. २ [*गण*] दुर्मिळ किंवा चमत्कारिक वस्तू.

curious /'क्युअरिअस्/ *वि* १ शिकण्यास, समजून घेण्यास उत्सुक, जिज्ञासू, चौकस : ~

about how a machine works, यंत्र कसे चालते याबाबत माहिती घेण्यास उत्सुक. २ *about//* (*अधिक्षेपी*) इतरांच्या भानगडीत नाक खुपसणारा, नसती उठाठेव करणारा, चांभार चौकशा करणारा. ३ चमत्कारिक, विलक्षण; अपूर्व, असामान्य. **curiously** *क्रिवि* उत्सुकतेने, जिज्ञासुवृत्तीने; भोचकपणे; विचित्रपणे, विलक्षण.

curl /क्ऽल्/ *ना* [*गण*] वेटोळ्या आकाराची वस्तू – विशेषतः केस. **curl** *क्रि* १ [*अक, सक*] कुरळे होणे/करणे, वेटोळे घालणे. २ [*अक*] विळख्याने वाढणे, वेटोळ्या आकारात वाढणे; वेटोळा घालणे/होणे : *a plant ~ing round a post, खांबाभोवती वेढे घालत वाढणारी वनस्पती.* ३ (*क्रिब*) **curl up** पाय मुडपून ओणवे बसणे किंवा पडणे, छातीजवळ पाय ओढून पाठीत वाकून निजणे. **curly** *वि* (**-ier, -iest**) कुरळे, वेटोळ्या वेटोळ्याचे.

currant /'कँरन्ट्/ *ना* [*गण*] १ केकमधे वगैरे वापरायचे छोटे वाळके द्राक्ष, बेदाणा, मनुका. २ (सामासिक शब्दांत वापर) छोटी काळी, तांबडी, पांढरी फळे (असलेले झुडूप) : *black ~s, काळी फळे.*

currency /'कँरन्सि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण, गण*] एखाद्या देशाचे चलन. २ [*अगण*] सर्वसामान्यपणे वापरात असण्याची स्थिती, विश्वास बसण्याची स्थिती.

current^1 /कँरन्ट्/ *वि* १ आताचा, सांप्रतकालीन; आता घडणारा, चालू, सद्यस्थितीतील : *~ affairs, चालू घडामोडी.* २ सर्वसामान्य वापरात असणारा, प्रघात असणारा, सर्वसामान्यपणे स्वीकृत, प्रचारातील. **,current ac'count** *ना* [*गण*] पूर्वसूचना न देता पैसे काढता येण्याची परवानगी असणारे बँकेतील खाते, चालू खाते. **currently** *क्रिवि* सांप्रतकाली, वर्तमानकाळात, सध्या; सद्य परिस्थितीत, आता.

current^2 /'कँरन्ट्/ *ना* १ [*गण*] पाण्याचा, हवेचा, वायूचा वगैरे प्रवाह. २ [*अगण, अे.व*] विद्युत्प्रवाह, विजेचा प्रवाह. ३ [*गण*] घटना, विचार वगैरेचा प्रवाह, ओघ.

curriculum /क्'रिक्युलम्/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s** किंवा **-la** /-ल/) शाळा, महाविद्यालय वगैरेतील अभ्यासक्रम, शिक्षणक्रम. **curriculum vitae** /'व्हीटाइ/ *ना* [*गण*] नोकरीसाठी अर्ज करताना द्यायचा स्वतःच्या शैक्षणिक गुणवत्तेचा आणि अनुभवाचा संक्षिप्त वृत्तांत.

curry^1 /'कँरि/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) मांस, मासे, अंडी, भाज्या वगैरे शिजवून तिखट मसाला घालून केलेला पदार्थ, रस्सा. **curried** *वि* (मांस वगैरेबाबत) तिखट मसाला घालून शिजवलेला.

curry^2 /'कँरि/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) (*वाक्प्र*) **curry favour (with sb)** एखाद्याची स्तुती करून त्याची मर्जी संपादण्याचा प्रयत्न करणे, एखाद्याला मस्का लावणे.

curse^1 /कऽस्/ *ना* १ [*गण*] राग व्यक्त करण्यासाठी उच्चारलेले अपशब्द, शिवी. २ [*अे.व*] एखाद्याला शिक्षा करण्यासाठी किंवा त्याचा नाश करण्यासाठी उच्चारलेले शब्द, तळतळाट, शाप : *The witch put a ~ on him, चेटकिणीने त्याला शाप दिला.* ३ [*गण*] दुःख भोगण्याचे कारण, शाप.

curse^2 /कऽस्/ *क्रि* १ [*अक, सक*] एखाद्याला शिव्याशाप देणे, बोल घालणे : *She was cursing her bad luck, ती तिच्या दुर्दैवाला/कमनशिबाला बोल घालत होती.* २ [*सक*] शाप देणे. ३ [*सक*] *with//* (बहुधा कर्मणी) एखाद्या गोष्टीमुळे दुःख भोगणे, एखाद्या गोष्टीचा शाप असणे : *a man ~d with arthritis, संधिवाताचा शाप असणारा माणूस.* **cursed** *वि* /'कऽसिड्/ फार वाईट, भयानक : *a ~d nuisance, भयानक कटकट.*

cursor /'कऽस(र्)/ *ना* [*गण*] (*संगणन*) संगणकाच्या पडद्यावर हालणारा आणि सामुग्री कुठे घालायची ती जागा दाखविणारा बिंदू.

cursory /'कऽसरि/ *वि* (बऱ्याचदा *अधिक्षेपी*) पटकन् केलेला, वरवरचा; फार घाईचा आणि त्रोटक. **cursorily** *क्रिवि* वरवर; घाईघाईने.

curt /कऽट्/ *वि* (बोलणाऱ्याबाबत किंवा बोलण्याबात) त्रोटक, तुटक; संक्षिप्त, थोडक्यात : *a ~ refusal, ताडकन् दिलेला नकार, तात्काळ/साफ नकार.* **curtly** *क्रिवि* फट्कन्. **'curtness** *ना* [*अगण*] तुटकपणा, तुसडेपणा.

curtail /कɜ'टेइल्/ *क्रि* [*सक*] काटछाट करणे, कमी करणे, संक्षेप करणे; मर्यादित करणे, वेसण घालणे : ~ *sb's activities, एखाद्याचे कार्यक्षेत्र मर्यादित करणे, एखाद्याच्या कारवाया कमी करणे.* **curtailment** *ना* [*गण, अगण*] कपात; मर्यादा आणणे.

curtain /'कɜट्न्/ *ना* १ [*गण*] खिडकी झाकण्यासाठी, खोलीचे दोन भाग करण्यासाठी वगैरे वापरायचे कापड वगैरे, पडदा : *draw the ~s, पडदे सोडणे किंवा टाकणे.* २ [*गण*] रंगभूमीवरील पडदा, रंगपटल. ३ [*गण*] झाकणारी, दूर ठेवणारी अशी कोणतीही गोष्ट : *a ~ of mist, धुक्याचा पडदा.* ४ **curtains** [*ब.व*] (*for*)// (*अनौप*) मृत्यू किंवा शेवट, अन्त : *It's ~s for us if they find out what you've done! तू काय केलंयस् हे जर त्यांना कळून आले तर तो आपला शेवटच ठरेल!* **curtain** *क्रि* [*सक*] पडदे लावणे.

curtsey (तसेच **curtsy**) /'कɜट्सि/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s, -ies**) (स्त्रीने) आदर व्यक्त करण्यास गुडघे वाकवण्याची कृती. **curtsey** (तसेच **curtsy**) *क्रि* (*भूत, भूत वि* **~ed** किंवा **-ied**) [*अक*] आदर व्यक्त करण्यास गुडघ्यात वाकून अभिवादन करणे.

curve /कɜव्ह्/ *ना* [*गण*] कोन नसलेली आणि सरळ नसलेली रेषा, वक्ररेषा. **curve** *क्रि* १ [*अक, सक*] वक्ररेषा काढणे, रेषा वळणे/वळवणे, बाक असणे/देणे. २ [*अक*] वाकडे वळणे, वक्राकार जाणे.

cushion /'कुश्न्/ *ना* [*गण*] १ मऊ कापूस वगैरे भरलेली आणि गुडघे टेकवणे किंवा आरामात बसणे यासाठी वापरायची पिशवी, उशी. २ उशीसारखे काही : *a ~ of air, हवेची उशी.* **cushion** *क्रि* [*सक*] १ (एखाद्या आघाताचा वगैरे) जोर कमी करणे. २ (*from*)// एखाद्याचे दुःखद गोष्टीपासून संरक्षण करणे.

cushy /'कुशि/ *वि* (**-ier, -iest**) (बहुधा *अधिक्षेपी*) (नोकरीबाबत वगैरे) फार कष्टाची नसलेली, आरामाची; सोपी.

custard /'कॅस्टड्/ *ना* [*अगण*] अंडी आणि दूध यांचे खास चव आणलेले गोड मिश्रण.

custodian /कॅ'स्टउडिअन्/ *ना* [*गण*] एखादी व्यक्ती किंवा गोष्ट – विशेषतः सार्वजनिक इमारत ज्याच्या देखभालीखाली आहे तो, देखभाल करणारा, राखणदार, परिरक्षक.

custody /'कॅस्टडि/ *ना* [*अगण*] १ काळजी घेणे किंवा राखण (याचे कर्तव्य किंवा त्याचा अधिकार), ताबा : ~ *of her child, तिच्या मुलाचा ताबा किंवा त्याचे रक्षण.* २ खटला चालू असतानाची कैद : *be in ~, कैदेत असणे.*

custom /'कॅस्टम्/ *ना* १ [*अगण*] एखाद्या सामाजिक गटातील सभासदांना मान्य असणारी वागणुकीची पद्धती, प्रथा, शिरस्ता, रिवाज. २ [*गण*] एखादी गोष्ट करण्याची किंवा वागण्याची पद्धती, रीत : *ancient ~s, प्राचीन चालीरीती.* ३ [*अगण*] एखाद्या दुकानाचा वगैरे नियमित वापर, गिऱ्हाइकी. **customary** /-मरि; *अमे* -मेरि/ *वि* रिवाजानुसार, प्रथेनुसार, नेहमीचा. **,custom-'built, ,custom-'made** *वि* गिऱ्हाइकाच्या इच्छेनुसार केलेला, ग्राहकानुसारी.

customer /'कॅस्टम(र्)/ *ना* [*गण*] दुकानात वगैरे माल विकत घेणारा किंवा सेवा वापरणारा माणूस, गिऱ्हाईक, ग्राहक.

customs /'कॅस्टम्झ्/ *ना* [*ब.व*] १ आयात केलेल्या मालावर भरायचा कर, आयातशुल्क, सीमाशुल्क. २ **Customs** आयातशुल्क वसूल करण्याची जागा – उदा विमानतळावरची.

cut^{1} /कॅट्/ *क्रि* (**-tt-**, *भूत, भूत वि* **cut**) १ [*अक, सक*] धारदार वस्तूने कापणे किंवा जखम करणे, छेद घेणे : *I ~ my hand with a knife, सुरीने माझा हात कापला गेला.* २ [*सक*] (**क**) (*off*)// एखाद्या मोठ्या गोष्टीपासून एखादा भाग सुरीने वगैरे कापून काढणे : ~ *(off) a piece of cake, केकचा तुकडा कापणे.* (**ख**) सुरीने वगैरे कापून तुकडे करणे, फोडी करणे : ~ *the cake, केकचे कापून तुकडे करणे.* ३ [*सक*] कापून बारीक/लहान करणे, बारीक कापणे : ~ *sb's hair, एखाद्याचे केस कापणे.* ४ [*अक*] (**क**) (सुरी वगैरे बाबत) कापण्यास योग्य असणे, धार असणे, कापू शकणे. (**ख**) (जी वस्तू कापायची तीबाबत) कापण्यास सुलभ असणे, कापता येण्यासारखी असणे. ५ [*सक*] शारीरिक किंवा मानसिक वेदना देणे, घरे पाडणे : *His remarks ~ me deeply, त्याचे*

शब्द माझ्या काळजाला घरे पाडतात. ६ [*सक*] (रेषेबाबत) (दुसऱ्या रेषेने) छेदणे. ७ [*सक*] कमी करणे, काटछाट करणे : ~ *taxes, कर कमी करणे.* ८ (क) [*सक*] (चित्रफीत, ध्वनिफीत वगैरेचा) भाग कापणे; संकलन करणे : *~ some scenes from a film, एखाद्या चित्रफीतीतून काही देखावे (सीन्स) काढून टाकणे.* (ख) [*अक*] चित्रीकरण करण्याचे किंवा ध्वनिमुद्रण करण्याचे थांबवणे. ९ [*सक*] (*अनौप*) (वर्गाला वगैरे) दांडी मारणे, बुडवणे. १० (*वाक्प्र*) **cut and dried** पूर्णपणे निश्चित केलेला आणि बदलता न येणारा, पक्का. **cut both/two 'ways** एखाद्याच्या बाजूने आणि विरुद्ध असे दोन्ही परिणाम असणारा, दुधारी. **cut 'corners** सोप्या पद्धतीने, घाईने आणि बऱ्याचदा निष्काळजीपणे काम करणे, कसेतरी उरकणे, वेळ मारणे. **cut sb dead** राग व्यक्त करण्यासाठी वगैरे एखाद्याला पाहिले न पाहिल्यासारखे करणे, ओळख नाही असे दाखवणे. **cut it 'fine** जेमतेम पुरेल एवढेच पैसे, वेळ, जागा, वगैरे देणे, कटाकटीने करणे, कसेबसे गाठणे. **cut 'loose** (*अनौप*) काही धरबंध न बाळगता वागणे किंवा बोलणे, आडपडदा न ठेवता बोलणे किंवा वागणे. **cut one's losses** जास्त तोटा होण्यापूर्वी आतबट्ट्याचा धंदा किंवा व्यवहार बंद करणे. **,cut no 'ice (with sb)** (एखाद्यावर) परिणाम करण्यात किंवा छाप पाडण्यात अपयश येणे, परिणामशून्य होणे. **cut sb to the 'quick** एखाद्याच्या भावना दुखावणे, मनाला लागणे. **cut sb/sth 'short** एखाद्याचे बोलणे बंद करणे; संभाषणात व्यत्यय आणणे, एखादा बोलत असता मधेच अडवणे, संभाषण तोडणे. ११ (*क्रिब*) **cut across sth** (क) अंतर कमी करण्यासाठी मैदान वगैरेच्या मधून जाणे. (ख) (वर्ग विभागणीशी) न जुळणे, सर्व थरांना छेदून जाणे : *~ across social barriers, सामाजिक बंधनांना छेदून जाणे.* **cut sth back, cut back (on sth)** (क) (झुडुपे वगैरे) खोडापाशी कापणे. (ख) कमी करणे, कपात करणे : *~ back (on) the number of workers, कामगारांच्या संख्येत कपात करणे.* **cut down** कापून पाडणे, तोडणे : *~ down a tree, झाड तोडणे.* **cut sth down, cut down on (sth)** कमी करणे, घट करणे : *~ down on one's smoking, स्वतःचे धूम्रपान कमी करणे.* **cut 'in (on)** (क) मधेच बोलणे, मधेच बोलून संभाषणाचा ओघ खंडित करणे. (ख) एखाद्या वाहनाच्या पुढे अगदी कमी अंतर ठेवून गाडी चालवणे, दुसऱ्या गाडीच्या अगदी जवळून गाडी पुढे नेणे. **cut sb 'off** व्यत्यय आणणे : *be ~ off while talking on the phone, फोनवर बोलत असता लाईन तुटणे.* **cut sb/sth off** एखाद्याला एखाद्या गोष्टीचा पुरवठा करणे बंद करणे : *~ off the gas, गॅसपुरवठा बंद करणे.* **cut sth off** (क) कापून (काही) काढून टाकणे. (ख) अडथळा आणणे, प्रतिबंध करणे : *~ off their retreat, माघार घेण्यात त्यांना अडथळा आणला* किंवा *त्यांची माघार रोखली.* (ग) अलग करणे, वेगळे पाडणे : *a town ~ off by floods, पुरामुळे संपर्क तुटलेले शहर.* **cut sth open** भोक पाडणे, कापून उकलणे. **cut out** (इंजिन वगैरे बाबत) चालायचे थांबणे, बंद पडणे. **cut sth out** (क) कापून बाजूला काढणे. (ख) कापून आकार देणे किंवा तयार करणे : *~ out a dress, पोषाख/कपडे बेतणे.* (ग) (*अनौप*) गाळून टाकणे. (घ) (*अनौप*) एखादी गोष्ट करण्याचे किंवा वापरण्याचे बंद करणे : *~ out cigarettes, सिगारेटस् ओढण्याचे थांबवणे.* **(not) be cut out for/to be sth** एखाद्या गोष्टीला आवश्यक असणारे कसब असणे (किंवा नसणे) : *I'm not ~ out to be a teacher, शिक्षक होण्याचे कसब माझ्यात नाही.* **cut up** (क) एखादी गोष्ट कापून तिचे तुकडे करणे. (ख) (*अनौप*) एखाद्याला दुःखी करणे. **'cut-back** *ना* [*गण*] कपात, काटछाट. **'cut-out** *ना* [*गण*] १ पुठ्ठा, कागद, कार्डबोर्ड वगैरेतून कापलेला आकार किंवा चित्र. २ यंत्र वगैरे बंद करण्याची क्लुप्ती. **,cut-'price** *वि* किंमत कमी केलेला, सवलतीच्या दराचा; स्वस्त.

cut^2 /कैट्/ *ना* [*गण*] १ सुरीने वगैरे कापलेला भाग, छेद. २ सुऱ्याचा वगैरे वार. ३ कापण्याची क्रिया, कर्तन : *Your hair needs a ~, तुझे केस कापायला झालेत.* ४ (*in*)// कपात, काटछाट : *a ~ in taxes, करातील कपात.* ५ एखाद्या गोष्टीचा भाग कापण्याची कृती, काटछाट, कापाकापी : *make some ~s in the film, चित्रपटात काही काटछाट करणे.* ६

एखाद्या मोठ्या गोष्टीचा कापलेला भाग. ७ कपडे, केस वगैरे कापण्याची शैली किंवा ढब, कातरकामाची शैली : *a suit with a loose ~, सैलसर बेतलेला सूट.* ८ (*अनौप*) भाग, वाटा : *a ~ of the profits, नफ्यातील वाटा.* ९ (*वाक्प्र*) **a cut above sb/sth** एखाद्यापेक्षा अधिक चांगला, श्रेष्ठ.

cute /क्यूट्/ *वि* १ आकर्षक, सुंदर किंवा मोहक. २ (*अनौप* खास करून *अमे*) (फार) हुशार, तरतरीत; तल्लख बुद्धीचा, तेज. **cutely** *क्रिवि* हुशारीने. **cuteness** *ना* [*अगण*] हुशारी, तल्लखपणा.

cuticle /'क्यूटिक्ल्/ *ना* [*गण*] बोटांच्या नखांखालचा त्वचेचा थर, नखांखालची बाह्यत्वचा.

cutlery /'कॅट्लरि/ *ना* [*अगण*] जेवताना वापरायच्या सुरी, काटे वगैरेसारख्या वस्तू.

cutlet /'कॅट्लिट्/ *ना* [*गण*] १ मांस किंवा माशाचा तुकडा. २ आत भाज्या आणि वरून पिठाचे आवरण असलेला एक पदार्थ.

cutter /'कट(र्)/ *ना* १ [*गण*] कापणारी वस्तू किंवा व्यक्ती. २ **cutters** [*ब.व*] (खास करून सामासिक शब्दांत वापर) कापण्याचे हत्यार. ३ [*गण*] एक प्रकारची लहान नाव.

cutthroat /'कैट्थ्रउट्/ *वि* निर्दय, जीवघेणा.

cutting^{1} /कैटिङ्/ *वि* (मत, शेरा वगैरेबाबत) उपरोधिक; जिव्हारी लागणारा.

cutting^{2} /'कटिङ्/ *ना* [*गण*] १ वर्तमानपत्र वगैरेतील कात्रण. २ रस्ता, रेल्वेरूळ वगैरेसाठी टेकाड वगैरे पोखरून केलेला रस्ता, रस्त्यातील खिंड. ३ नवीन झाड येण्यासाठी लावलेले खोड, झाडाची रोवलेली फांदी.

CV /,सी 'व्ही/ *संरू* curriculum vitae शैक्षणिक गुणवत्ता आणि अनुभव यांचा संक्षिप्त वृत्तांत.

cyanide /'साइअनाइड्/ *ना* [*अगण*] एक जहरी विष, कान्नद.

cycle /'साइक्ल्/ *ना* [*गण*] १ ठराविक काळानंतर पुन्हा पुन्हा घडणाऱ्या घटनांची साखळी, आवर्तन, घटनाचक्र, कालचक्र : *the ~ of the seasons, ऋतूंचे कालचक्र, ऋतुचक्र.* २ (*अनौप*) दुचाकी, सायकल किंवा मोटारसायकल, फटफटी. **cycle** *क्रि* [*अक*] सायकल चालविणे. **cyclical** /'सिक्लिक्ल्/ *वि* पुन्हा पुन्हा घडणाऱ्या, चक्राकार. **cyclist** *ना* [*गण*] सायकलस्वार.

cyclone /'साइक्लउन्/ *ना* [*गण*] एखाद्या शांत केंद्राभोवती सुसाट फिरणारा वारा, चक्रीवादळ, आवर्त, वावटळ. **cyclonic** /साइ'क्लॉनिक्/ *वि* चक्रीवादळाचा, आवर्ती.

cygnet /'सिग्निट्/ *ना* [*गण*] राजहंसाचे पिल्लू, बालहंस.

cylinder /'सिलिन्ड(र्)/ *ना* [*गण*] १ गोलाकृती सरळ बाजूंचा लांब भरीव किंवा पोकळ असा आकार, नळकांडे, वर्तुळस्तंभ, वृत्तचिती, दंडगोल. २ गॅस किंवा वाफ यामुळे जेथे पिस्टनला गती मिळते ती इंजिनातील जागा, धोटा. **cylindrical** /सि'लिन्ड्रिक्ल्/ *वि* वृत्तचितीच्या आकाराचा, दंडगोलाकार.

cymbal /'सिम्ब्ल्/ *ना* [*गण*] झांज, टाळ.

cynic /'सिनिक्/ *ना* [*गण*] कोणीही माणूस जे काय करतो त्यामागे चांगले किंवा प्रामाणिक उद्देश आहेत यावर विश्वास न ठेवणारा माणूस, वक्रदर्शी, उपेक्षावादी. **cynical** *वि* वक्रभावी, सर्वतुच्छक : *a ~al remark, सर्वतुच्छक शेरा.* **cynically** /-क्लि/ *क्रिवि* उपेक्षावादाने, वक्रभावाने. **cynicism** /'सिनिसिझम्/ *ना* [*अगण*] उपेक्षावाद, वक्रदर्शी माणसाचा दृष्टिकोन.

cypher = CIPHER.

cypress /'साइप्रस्/ *ना* [*गण*] काळसर हिरव्या रंगाच्या पानांचा आणि टणक लाकूड असलेला एक सदाहरित वृक्षाचा प्रकार, उदा सुरूचे झाड, देवदार.

cyst /सिस्ट्/ *ना* [*गण*] द्रवपदार्थ असणारा पोकळ असा शरीरातील एक अवयव, गाठ, आवाळू, अवगुंठ.

cystitis /सि'स्टाइटिस्/ *ना* [*अगण*] मूत्राशयाला आलेली सूज, मूत्राशयदाह.

czar, czarina = TSAR, TSARINA.

D d

D, d /डी/ *ना* [*गण*] (*ब.व* **D's, d's** /डीझ्/) १ इंग्रजी वर्णमालेतील चौथे अक्षर. २ ५०० या

अंकासाठीचा रोमन अंक.

d. DIED या शब्दाचे *संरू: d. 1924, मृत्यू १९२४.*

'd HAD किंवा WOULD चे संक्षिप्त रूप: उदाहरणार्थ *I'd*, हे *I had/would* साठी किंवा *she'd* हे *she had/would* साठी.

dab /डॅब्/ *क्रि* **(-bb-)** [*सक*] हलक्या हाताने स्पर्श करणे: *~ one's face dry, हलकेच तोंड पुसणे.* **dab** *ना* [*गण*] पृष्ठभागावर दिलेला रंगाचा वगैरे ठिपका, पातळ थर.

dabble /'डॅब्ल्/ *क्रि* १ [*अक*] (*in*)// एखाद्या विषयात वरवर औत्सुक्य असणे, फारसे गंभीरपणे त्याकडे लक्ष न देणे, हौस म्हणून अभ्यास करणे. २ [*सक*] पाण्यात हलकेच हातपाय हालवणे.

dachshund /'डॅक्सहुन्ड्/ *ना* [*गण*] अगदी लहान पाय असलेला एक छोटा कुत्रा.

dad /डॅड्/ *ना* [*गण*] (*अनौप*) वडील, बाबा.

daddy /'डॅडि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) (मुलांच्या बोलण्यात वापर) वडील, बाबा.

daffodil /'डॅफडिल्/ *ना* [*गण*] कर्णा किंवा ब्यूगलसारखा आकार असणारे वसंत ऋतूत फुलणारे एक पिवळे फूल.

daft /डाफ्ट्/ *वि* (*अनौप*) मूर्ख, वेडपट.

dagger /'डॅग(र्)/ *ना* [*गण*] खंजीर, कट्यार.

daily /'डेइलि/ *वि, क्रिवि* दररोज येणारा किंवा घडणारा, सुट्टीचा रविवार सोडून प्रत्येक/दर दिवशी येणारा किंवा होणारा. **daily** *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) दैनिक, रोज येणारे वर्तमानपत्र.

dainty /'डेइन्टि/ *वि* **(-ier, -iest)** सुंदर आणि नाजुक. **daintily** *क्रिवि* सुंदर आणि नाजुकपणे.

dairy /'डेअरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) १ लोणी, चीज वगैरे तयार करण्याचे ठिकाण, दुग्धशाळा. २ दूध, लोणी, अंडी वगैरे विकण्याचे दुकान, दुग्धालय. **'dairy cattle** *ना* [*अगण*] दुधासाठी पाळलेल्या गायीम्हशी.

daisy /'डेइझि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) मध्यभागी पिवळसर असणारे पांढऱ्या पाकळ्यांचे एक छोटे फूल.

dale /डेइल्/ *ना* [*गण*] (*काव्य*) दरी, झुरी.

dam /डॅम्/ *ना* [*गण*] पाणी अडविण्यासाठी घातलेला बंधारा, धरण. **dam** *क्रि* **(-mm-)** [*सक*] १ बंधारा घालणे, धरण बांधणे. २ (*ला*) (भावना) आवरून धरणे किंवा त्यावर नियंत्रण ठेवणे.

damage /'डॅमिज्/ *ना* १ [*अगण*] हानी; नुकसान: *The fire caused great ~, आगीने मोठे नुकसान झाले.* २ **damages** [*ब.व*] (*कायदा*) नुकसान किंवा हानी करणाऱ्यापासून मागितलेले पैसे, नुकसान भरपाई. **damage** *क्रि* [*सक*] हॅनी करणे/पोहोचविणे; नुकसान करणे/पोहोचविणे.

dame /डेइम्/ *ना* [*गण*] १ सरदार या बिरुदाच्या तोडीचे स्त्रीसाठी असणारे बिरुद, अशा बिरुदाची स्त्री: *D~ Janet Baker,* डेम *जेनेट बेकर.* २ (*अमे व्रात्य*) स्त्री.

damn /डॅम्/ *उद्‌वा* (*अनौप*) (राग किंवा वैताग व्यक्त करण्यासाठी वापर). **damn** *क्रि* [*सक*] १ (देवाबाबत) नरकयातना भोगावयास लावणे, नरकात टाकणे. २ एखादी गोष्ट वाईट किंवा भिकार आहे असे म्हणणे, खरमरीत टीका करणे, वाभाडे काढणे. **damn** *ना* (*वाक्प्र*) **not care/give a damn** (*अनौप*) दिक्कत न बाळगणे, काहीही पर्वा न करणे. **damnation** /-नेइश्न्/ *ना* [*अगण*] नरकवास.

damned /डॅम्ड्/ *वि* (*अनौप*) (वैताग व्यक्त करण्यास वापर): *You ~ fool! अरे गधड्या!* **damned** *क्रिवि* (*अनौप*) फार, खूप: *~ lucky, फारच नशीबवान.*

damp^1 /डॅम्प्/ *वि* ओलसर, दमट: *a ~ cloth, ओलसर कापड.* **damp** *ना* [*अगण*] ओलसर किंवा दमट असण्याची स्थिती, ओलावा, ओल. **dampness** *ना* [*अगण*] ओलसरपणा, दमटपणा.

damp^2 /डॅम्प्/ *क्रि* [*सक*] १ ओले करणे, दमट करणे. २ (तसेच **dampen** /'डॅम्पन्/) कमी/क्षीण करणे, दुःखी करणे, आनंदावर विरजण पाडणे: *~ed his enthusiasm, त्याच्या उत्साहावर पाणी पडले.* ३ (*क्रिब*) **damp sth down** जाळ कमी करणे, आग मंद राहील असे करणे.

damper /'डॅम्प(र्)/ *ना* [*गण*] १ नाउमेद करणारी गोष्ट किंवा व्यक्ती: *put a ~ on the party, मेजवानीचा हिरमोड करणे.* २ जाळावर

जाणाऱ्या हवेचा झोत नियंत्रित करणारा धातूचा छोटा सपाट तुकडा, प्रतिबंधक पट.

damson /'डॅम्झ्न्/ *ना* [*गण*] मनुका (किंवा त्याचे झाड).

dance /डान्स्/ *ना* [*गण*] १ संगीताच्या तालावर केलेल्या हालचाली आणि पदन्यास, नृत्य, नाच. २ सार्वजनिक नृत्यसमारंभ. **dance** *क्रि* १ [*अक*] तालात पावले टाकणे आणि हालचाल करणे, नृत्य करणे, नाचणे. २ [*सक*] एखादा नृत्यप्रकार करणे. **dancer** *ना* [*गण*] नर्तक/नर्तकी. **dancing** *ना* [*अगण*] नृत्यकला: *a dancing teacher, नृत्य शिकवणारा शिक्षक.*

dandelion /'डॅन्डिलाइ·अन्/ *ना* [*गण*] पिवळीधमक फुले येणारे एक छोटे जंगली फुलझाड.

dandruff /'डॅन्ड्रफ्/ *ना* [*अगण*] डोक्यावरील केसांतील मृत कातडीचे बारीकबारीक तुकडे, डोक्यातील कोंडा.

danger /'डेइन्ज(र्)/ *ना* १ [*अगण*] हानी पोहोचण्याची किंवा मरण ओढवण्याची शक्यता, धोका. २ [*गण*] धोकादायक वस्तू किंवा व्यक्ती. ३ (*वाक्प्र*) **in danger** मरणाचा किंवा हानी होण्याचा संभव असणे, धोका असणे. **out of danger** गंभीर आजार टळणे, धोका टळणे. **dangerous** *वि* धोकादायक. **dangerously** *क्रिवि* धोकादायकपणे.

dangle /'डॅङ्ग्ल्/ *क्रि* [*अक, सक*] सैलपणे टांगणे, लोंबकळणे, लटकणे.

dank /डॅङ्क्/ *वि* त्रासदायकरीत्या थंड आणि ओलसर: *a ~ cellar/cave, सर्द तळघर, दमट थंड गुहा.*

dare^1 /डेअ(र्)/ *अभिद क्रि* (*वर्तमान काल, सर्व पुरुष* **dare**, *नकार* **dare not** किंवा **daren't** /डेअन्ट्/) एखादी गोष्ट करण्याचे धाडस असणे, धजणे, हिंमत होणे: *I ~n't ask him, त्याला विचारायचे धाडस माझ्यात नाही* ○ *D~ we try again? परत प्रयत्न करायची आपली हिंमत आहे?*

dare^2 /डेअ(र्)/ *क्रि* १ [*सक*] *to*// एखादी कठीण किंवा धोकादायक गोष्ट करण्याचे आव्हान देणे: *I ~ you to jump off the tree, मार बरं/दाखवच मारून झाडावरून उडी!* २ [*अक*] (*to*)// एखादी गोष्ट करण्याचे धाडस असणे, हिंमत/शामत असणे: *No one ~d (to) speak, कोणाला बोलायचे धाडस झाले नाही.* **dare** *ना* (*वाक्प्र*) **do sth for a dare** आव्हान दिले म्हणून काही करणे, आव्हान स्वीकारून करणे. **'daredevil** *ना* [*गण*] धाडस करणारा माणूस, धाडसी.

daring /'डेअरिङ्/ *वि* धीट आणि धाडसी. **daringly** *क्रिवि* धाडसीपणाने, धीटपणे.

dark^1 /डाक्/ *वि* १ प्रकाशहीन किंवा कमी प्रकाशाचा, अंधारमय: *a ~ night/room, अंधारी रात्र/खोली.* २ (रंगाबाबत) पांढरट किंवा फिक्यापेक्षा काळसर किंवा गडदकडे झुकणारा, गडद: *~ blue, गडद निळा.* ३ (त्वचेबाबत) उजळ नसलेली, गौर नाही अशी. ४ निराशाजनक; वाईट: *look on the ~ side of things, गोष्टींच्या वाईट अंगाकडे पाहणे, वाईट बाजू पाहणे.* ५ (*वाक्प्र*) **a ˌdark 'horse** स्वतःची खास कौशल्ये दडवून ठेवणारा माणूस, अज्ञात असे काही असणारा माणूस. **darken** *क्रि* [*अक, सक*] अंधार होणे/करणे, अंधारणे; गडद करणे, काळपट करणे; (दुःखाचे) सावट येणे. **darkly** *क्रिवि* गूढपणे; उदासीनपणे. **darkness** *ना* [*अगण*] काळोख.

dark^2 /डाक्/ *ना* [*अगण*] १ अंधार, काळोख: *sit in the ~, अंधारात बसणे.* २ (*वाक्प्र*) **after/before dark** सूर्यास्तानंतर/पूर्वी. **be/keep sb in the dark** अज्ञानात/अंधारात असणे किंवा एखाद्याला ठेवणे.

darling /'डालिङ्/ *ना* [*गण*] अत्यंत प्रिय असं माणूस, लाडका, प्रिय.

darn /डान्/ *क्रि* [*अक, सक*] रफू करणे: *~ sb's socks, पायमोजे रफू करणे.* **darn** *ना* [*गण*] रफू केलेले कपड्याचे भोक.

dart^1 /डाट्/ *ना* १ [*गण*] नेमबाजीच्या खेळात फेकून मारायचा लहान तीक्ष्ण तीर. २ **darts** (अे.व क्रियापदासह) लक्ष्यावर छोटे बाण फेकून मारण्याचा खेळ, तिरंदाजीचा खेळ.

dart^2 /डाट्/ *क्रि* [*अक*] चपळपणे/चपळाईने हालचाल करणे, बाणाप्रमाणे निसटणे.

dash^1 /डॅश्/ *ना* [*गण*] १ अचानक केलेली वेगवान हालचाल, उसळी, मुसंडी: *make a ~*

for the bus, बसकडे उसळी मारणे. २ चिमूटभर : *a ~ of pepper, चिमूटभर मीरपूड.* ३ जोडरेघेचे (–) विरामचिन्ह, योगचिन्ह. **'dashboard** *ना* [*गण*] चालकासमोरच्या काचेखालची गतिदर्शक वगैरे असणारी मोटारीतील जागा.

dash^{2} /डॅश/ *क्रि* १ [*अक*] वेगाने पळणे, सुसाट जाणे : *~ across the road, रस्ता वेगाने/झपाट्याने ओलांडणे.* २ [*सक*] जोराने फेकणे, फेकून देणे. ३ [*सक*] (एखाद्याच्या आशा) नष्ट करणे, धुळीस मिळवणे. **dashing** *वि* भरपूर आत्मविश्वास आणि खास शैली असणारा, तडफदार.

data /'डेइट/ *ना* [*अगण*] संगणकाने विश्लेषण करायची माहिती किंवा वास्तविके; सामग्री, आत्त. **'database** *ना* [*गण*] संगणकामधे असलेली नीट लावलेली माहिती. **data-'processing** *ना* [*अगण*] संगणकातील सामग्रीवर केलेल्या विविध प्रक्रिया.

date^{1} /डेइट/ *ना* [*गण*] १ एखाद्या घटनेचा दिनांक, महिना आणि वर्ष : *My ~ of birth is 1 June 1943, १ जून १९४३ ही माझी जन्मतारीख आहे.* २ (*अनौप*) (क) एक मुलगा आणि एक मुलगी अशा दोन मित्रांची भेट, तरुण-तरुणीचा एकांत. (ख) (खास करून *अमे*) अशा भेटीसाठी ठरलेला मित्र किंवा मैत्रीण. ३ (*वाक्प्र*) **(be/go) ,out of 'date** प्रचारात नसणे, जुनापुराणा होणे. **to date** येथवर; आत्तापर्यंत, आजपावेतो. **(be/bring) ,up to 'date** अद्ययावत् (असणे/करणे)

date^{2} /डेइट/ *क्रि* १ [*सक*] तारीख घालणे : *The letter was ~d 23 July, पत्रावर २३ जुलै अशी तारीख (लिहिली) होती.* २ [*अक*] *from/back to*// -च्या पासून (अस्तित्वात) असणे : *The Church ~s from the twelfth century, हे चर्च बाराव्या शतकापासून आहे.* ३ [*अक*] अप्रचलित/जुना होणे. ४ [*सक*] (*अनौप* खास करून *अमे*) मुलाने मैत्रिणीबरोबर आणि मुलीने मित्राबरोबर नियमितपणे एकांत करणे. **dated** /'डेइटिड्/ *वि* जुना/अप्रचलित.

date^{3} /डेइट/ *ना* [*गण*] तपकिरी रंगाचे लहान चिकट फळ, खजूर.

daub /डॉऽब/ *क्रि* [*सक*] (रंग, प्लॅस्टर वगैरेचा) फराटा मारणे, लेथडणे.

daughter /'डॉऽट(र्)/ *ना* [*गण*] एखाद्याची मुलगी, कन्या. **'daughter-in-law** *ना* [*गण*] (*ब.व* **~s-in-law**) एखाद्याच्या मुलाची पत्नी, सून.

daunting /'डॉऽन्टिङ्/ *वि* कठीण म्हणून नाउमेद करणारा, भीती वाटावी असा, धाक वाटावा असा.

dawdle /'डॉऽड्ल्/ *क्रि* [*अक*] आळसाने हळूहळू सरकणे, रमत गमत जाणे, रेंगाळणे, वेळ काढणे.

dawn /डॉऽन्/ *ना* १ [*गण, अगण*] पहाट, प्रातःकाळ. २ [*ए.व*] (*ला*) सुरुवात, प्रारंभ : *the ~ of civilization, संस्कृतीचा प्रारंभ.* **dawn** *क्रि* [*अक*] १ पहाट होणे, झुंजूमुंजू होणे. २ (*on*)// एखादी गोष्ट स्पष्ट होणे : *The truth began to ~ on him, सत्य काय आहे ते हळूहळू त्याला स्पष्ट होऊ लागले.*

day /डेइ/ *ना* १ [*गण*] २४ तासांचा काळ, दिवस, दिन. २ [*गण, अगण*] सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंतचा काळ, दिवस. ३ [*गण*] कामाचे तास. ४ [*गण, अगण*] कालखंड, काळ : *in the ~s of the Roman Empire, रोमन साम्राज्याच्या काळात.* ५ (*वाक्प्र*) **any day (now)** अगदी लवकरच, नजिकच्या भविष्यकाळात. **day and night** ⇨ NIGHT. **day in, day out, day after day** दिवसानुदिवस. **sb/sth's days are numbered** एखाद्याचे दिवस भरणे, एखाद्याचा शेवट जवळ येणे. **make sb's day** (*अनौप*) एखाद्याला खूप आनंद देणे. **one day** एके दिवशी (भूतकाळ/भविष्यकाळ). **'daybreak** *ना* [*अगण*] पहाट, दिवस/तांबड फुटायच्यावेळी. **'day-dream** *क्रि* [*अक*] *ना* [*गण*] काल्पनिक सुख (त्याचा आनंद लुटणे), दिवास्वप्न (त्यात रमणे). **'daylight** *ना* [*अगण*] १ दिवसाचा प्रकाश, उजेड. २ पहाट, उषःकाल. **'day-time** *ना* [*अगण*] सूर्योदय ते सूर्यास्त यामधला काळ, दिवसाढवळ्या.

daze /डेइझ्/ *क्रि* [*सक*] स्पष्टपणे विचार करणे अशक्य करणे, थक्क करणे, भांबावणे, सुन्न करणे. **daze** *ना* (*वाक्प्र*) **in a daze** भांबावलेल्या अवस्थेत.

dazzle /'डॅझ्‌ल्/ *क्रि* [*सक*] १ प्रखर प्रकाशामुळे एखाद्याला पाहणे अशक्य करणे, दिपणे, दिपवणे. २ भव्य प्रदर्शनाने दिपवणे.

dB decibel(s) चे *संरू*, ध्वनिमहत्तेचा एकक.

DDT /,डी डी 'टी/ *ना* [*अगण*] एक प्रभावी धोकादायक जंतुनाशक.

dead /डेड्/ *वि* १ (माणसे, प्राणी, वनस्पती यांचेबाबत) जिवंत नसलेले, मृत. २ (भाषा, रीती वगैरेबाबत) अप्रचलित. ३ (शरीराच्या भागाबाबत) संवेदनाहीन, बधीर – उदा थंडीने. ४ पूर्ण; निरपवाद, अगदी : *a ~ stop, पूर्ण बंद, ठप्प.* ५ चालू नसणारा, बंद : *The telephone went ~, फोन बंद पडला.* ६ निष्क्रिय, थंडावलेला : *The town is ~ after 10 o'clock, दहानंतर शहर थंडावते.* ७ (*ला*) (रंग, ध्वनी वगैरेबाबत) फिका, उदास. ८ (*वाक्प्र*) **a dead 'loss** (*व्रात्य*) वाया गेलेला, निरुपयोगी, पुचाट. **dead** *क्रिवि* पूर्णपणे; अगदी : *~ certain/accurate, पूर्ण खात्री असलेला/अगदी बरोबर.* **the dead** *ना* [*ब.व*] मृत व्यक्ती, मेलेली माणसे. **,dead 'end** *ना* [*गण*] अधिक प्रगती होण्याची सुतराम शक्यता नसलेली परिस्थिती किंवा जागा, खुंटलेला मार्ग. **'deadline** *ना* [*गण*] काम पूर्ण करण्याची अंतिम तारीख, मर्यादा : *meet/miss a ~ line, अंतिम तारीख गाठणे/होऊन जाणे.*

deaden /'डेड्‌न्/ *क्रि* [*सक*] तीव्रता कमी करणे.

deadlock /'डेड्‌लॉक्/ *ना* [*गण, अगण*] एकमत होण्यात संपूर्ण अपयश, बोलणी कुंठित होणे.

deadly /'डेड्‌लि/ *वि* **(-ier, -iest)** १ मृत्यू आणणारा, प्राणघातक, खतरनाक, जिवाला अपायकारक : *a ~ poison, प्राणघातक विष.* २ (*अनौप*) रटाळ; कंटाळवाणा. **deadly** *क्रिवि* (*अनौप*) अतिशय, गंभीररीत्या : *~ serious, अतिशय गंभीर/चिंताजनक.*

deaf /डेफ्/ *वि* १ ऐकू न येणारा, बहिरा. २ *to*// न ऐकणारा, ऐकून न घेणारा, कानावर हात ठेवलेला. **the deaf** *ना* [*ब.व*] बहिरे लोक, बधिर. **,deaf-and-'dumb** *वि* मूकबधिर. **,deaf 'mute** *ना* [*गण*] बहिरा आणि मुका असा माणूस. **deafness** *ना* [*अगण*] बहिरेपणा.

deafen /'डेफ्‌न्/ *क्रि* [*सक*] एखाद्याला ऐकू येणे अशक्य करणे, बधिर करणे : *~ed by the noise, आवाजाने कान बधिर होणे* किंवा *कानठळ्या बसणे.*

deal^{1} /डील्/ *ना* (*वाक्प्र*) **a good/great deal** मोठ्या प्रमाणात, खूप, बक्कळ : *a good ~ of money, बक्कळ पैसा* ○ *I see him a great ~, मी त्याला खूपदा भेटतो.*

deal^{2} /डील्/ *ना* [*गण*] १ (धंदा) करार, सौदा. २ पत्त्याच्या खेळात पत्ते देणे, पत्ते वाटणे.

deal^{3} /डील्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **~t** */डेल्ट्/*) १ [*अक, सक*] पत्ते वाटणे. २ [*सक*] (ठोसा) देणे किंवा मारणे, लगावणे. ३ (*क्रिब*) **deal in sth** (मालाची) खरेदीविक्री करणे; व्यापार करणे, व्यवसाय करणे, धंदा करणे : *~ in second-hand cars, जुन्या गाड्या विकण्याचा धंदा करणे.* **deal with sb** एखाद्याशी व्यवहार करणे. **deal with sth** (क) एखाद्या गोष्टीकडे लक्ष देणे; हाताळणे. (ख) एखाद्या गोष्टीविषयी किंवा संबंधी असणे; चर्चा करणे : *a book ~ing with Africa, आफ्रिकेसंबंधीचे पुस्तक.* **dealer** *ना* [*गण*] १ पत्ते वाटणारा. २ व्यावसायिक, व्यापारी, विक्रेता. **dealings** *ना* [*ब.व*] व्यावसायिक किंवा व्यक्तिगत संबंध : *have ~ings with sb, एखाद्याशी व्यवहार असणे.*

dean /डीन्/ *ना* [*गण*] १ अनेक परगणे किंवा एक चर्च यांची जबाबदारी असणारा ख्रिस्ती धर्मगुरू. २ विद्यापीठातील विभाग-प्रमुख.

dear /डिअ(र्)/ *वि* १ प्रिय, लाडका; प्रिय वाटावा असा, प्रेमळ. २ (पत्रांच्या सुरुवातीला वापर) : *~ Madam/Sir, प्रिय बाईसाहेब/महाशय.* ३ (*ब्रि*) महाग. ४ (*to*)// मौल्यवान. **dear** *क्रिवि* खूप किंमत मोजून. **dear** *ना* [*गण*] १ प्रेमळ व्यक्ती, प्रिय व्यक्ती. २ (एखाद्याशी प्रेमाने बोलताना) : *Yes, ~, हो, लाडक्या/लाडके.* **dear** *उद्‌गा* (आश्चर्य, उतावीळपणा वगैरे व्यक्त करताना) : *Oh ~! अरेच्चा!* ○ *D~ me! अरेरे!/अगाई!/बाई ग!* **dearly** *क्रिवि* १ खूप, फार. २ (*ला*) फार किंमत मोजून, महागात.

dearth /डऽथ्/ *ना* [*अे.व*] (*of*)// (*औप*)

एखाद्या गोष्टीचा तुटवडा, अभाव.

death /डेथ्/ *ना* १ [*गण*] मरणे, मृत्यू; ठार होणे, हत. २ [*अगण*] जीवनाचा अंत; मृतावस्था. ३ [*अे.व*] (*ला*) नाश : *the ~ of one's hopes, एखाद्याच्या आशाआकांक्षांचा विनाश.* ४ (*वाक्प्र*) **bored/sick, etc to death of sth** एखाद्या गोष्टीला विटणे किंवा कंटाळणे. **put sb to death** एखाद्याला फाशी देणे किंवा सुळावर देणे; ठार करणे. **deathly** *वि, क्रिवि* मेल्याप्रमाणे, मरणप्राय, मृत्यूसमान. **'death penalty** *ना* [*अे.व*] एखाद्या गुन्ह्यासाठी दिलेली देहदंडाची शिक्षा. **'death-trap** *ना* [*गण*] खतरनाक जागा किंवा वाहन, मृत्यूचा सापळा. **'death-warrant** *ना* [*गण*] एखाद्याला फाशी देण्याची अधिकृत सूचना, मृत्यूदंड अधिपत्र.

débâcle /डेइ'बाकल्/ *ना* [*गण*] पूर्ण आणि अचानक असे अपयश, धुव्वा, सपशेल हार.

debase /डि'बेइस्/ *क्रि* [*सक*] एखाद्याचे मूल्य किंवा गुणवत्ता कमी करणे, हिणकस करणे, मलीन करणे. **debasement** *ना* [*गण*] नीचता, हीनत्वदर्शन.

debate /डि'बेइट्/ *ना* [*गण, अगण*] सार्वजनिक सभेत किंवा संसदेत केलेली औपचारिक चर्चा, वादविवाद. **debate** *क्रि* [*अक, सक*] वादविवाद करणे, चर्चा करणे; विचार करणे. **debatable** *वि* अनिश्चित; वादग्रस्त.

debauched /डि'बॉऽच्ट्/ *वि* (*औप*) अनैतिक, व्यभिचारी. **debauchery** /-चरि/ *ना* [*अगण*] व्यभिचार, अनीती.

debilitating /डि'बिलिटेइटिङ्/ *वि* अशक्त करणारा, क्षीण करणारा : *a ~ illness, शक्तिपात करणारा आजार.*

debit /'डेबिट्/ *ना* [*गण*] खात्यावर रक्कम खर्ची घातलेली किंवा जमा केलेली नोंद, नावे खाती नोंद. **debit** *क्रि* [*सक*] (खात्यावरून) देण्यासाठी पैसे काढणे.

debris /'डेइब्री; *अमे* ड'ब्री/ *ना* [*अगण*] फुटून विखुरलेले तुकडे, दगडविटांचा वगैरे खच, ढिगारा.

debt /डेट्/ *ना* १ [*गण*] एखाद्याला देणे असलेली रक्कम, ऋण, कर्ज. २ [*अगण*] ऋणबद्ध : *be in/out of ~, ऋणात असणे/ऋणातून मुक्त होणे.* ३ [*गण, अगण*] एखाद्याने केलेल्या मदतीची किंवा दयेची परतफेड करण्याची इच्छा, कृतज्ञता भाव. **debtor** *ना* [*गण*] देणेकरी, ऋणी, कर्जदार.

début /'डेइब्यू; *अमे* डि'ब्यू/ *ना* [*गण*] एखाद्या नटाचा, गायकाचा वगैरे पहिला जाहीर कार्यक्रम : *make one's ~, पदार्पण करणे.*

decade /'डेकेइड्; तसेच खास करून *अमे* डि'केइड्/ *ना* [*गण*] दहा वर्षांचा काल, दशक.

decadent /'डेकडन्ट्/ *वि* नीतिमत्तेची नीच बिंदूपर्यंतची घसरण दाखविणारा, नैतिक ऱ्हासाचा : *~ behaviour/society, नैतिक ऱ्हासाची वागणूक/घसरलेला समाज.* **decadence** /-डन्स्/ *ना* [*अगण*] नैतिक ऱ्हास, उतरती कळा.

decaffeinated /,डी'कॅफिनेइटिड्/ *वि* (कॉफीबाबत) कॅफीन काढलेले, कॅफीनरहित.

decant /डि'कॅन्ट्/ *क्रि* [*सक*] एका बाटलीतील दारू वगैरे दुसऱ्या पात्रात ओतणे. **decanter** *ना* [*गण*] बूच असलेली दारूची काचेची बाटली.

decapitate /डि'कॅपिटेइट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) शिरच्छेद करून मारणे, मुंडके उडवणे.

decay /डि'केइ/ *क्रि* १ [*अक, सक*] वाईट होणे किंवा करणे, बिघडणे, ऱ्हास पावणे. २ [*अक*] क्षीण होणे, प्रकृती ढासळणे. **decay** *ना* [*अगण*] ऱ्हास, क्षय : *tooth ~, दंतक्षय.*

deceased /डि'सीस्ट्/ **the deceased** *ना* [*गण*] (*ब.व* **the deceased**) (*औप*) नुकतीच मृत झालेली व्यक्ती, मयत.

deceit /डि'सीट्/ *ना* [*अगण, गण*] एखाद्या असत्य गोष्टीवर दुसऱ्याचा विश्वास बसावा अशी वागणूक, लबाडी, फसवाफसवी, फसवणूक. **deceitful** *वि* १ फसवा, लबाडीचा. २ फसवणूक करणारा : *~ful words, वंचना करणारे शब्द.* **deceitfully** *क्रिवि* कपटाने. **deceitfulness** *ना* [*अगण*] लबाडी, कपट, फसवेगिरी.

deceive /डि'सीव्ह्/ *क्रि* [*सक*] असत्य गोष्टीवर एखाद्याचा विश्वास बसवणे, एखाद्याला फसवणे, ठकवणे, गंडा घालणे, घुलवणे. **deceiver** *ना* [*गण*] फसवणारा.

December /डि'सेम्ब(र्)/ *ना* [*अगण, गण*] इंग्रजी वर्षाचा बारावा महिना, डिसेंबर (*April* या शब्दाखालील उदाहरणे पहा).

decent /'डीसन्ट्/ *वि* १ योग्य आणि अनुरूप; मान्य होणारा, उचित : *wear ~ clothes to the party, पार्टीसाठी उचित किंवा शोभेलसा पोषाख घालणे.* २ लोकांना धक्का देईल किंवा त्यांची पंचाईत होईल किंवा त्यांना लाज वाटेल असा नसणारा, सभ्य : *~ behaviour, सभ्य वर्तन.* **decency** /'डीस्न्सि/ *ना* [*अगण*] भलेपणा; सभ्यता. **decently** *क्रिवि* उचितपणे, योग्य रीतीने; सभ्यपणे.

deception /डि'सेप्श्न्/ *ना* १ [*अगण*] फसवणूक, लबाडी : *obtain sth by ~, एखादी गोष्ट कपटमार्गाने मिळवणे.* २ [*गण*] फसवण्यासाठी केलेली कृती.

deceptive /डि'सेप्टिव्ह्/ *वि* फसवा, भ्रामक, भ्रान्त : *a ~ appearance, भ्रामक रूप.* **deceptively** *क्रिवि* वरवर पाहता, फसवेपणाने.

decibel /'डेसिबेल्/ *ना* [*गण*] ध्वनीची तीव्रता मोजण्याचे परिमाण, ध्वनीच्या मोठेपणासंबंधीचा एकक.

decide /डि'साइड्/ *क्रि* १ [*अक*] विचार करून निर्णय घेणे, ठरवणे : *I ~d to leave, मी जाण्याचे ठरवले.* २ [*सक*] एखाद्याला ठरवायला लावणे. ३ [*सक*] (प्रश्नांचे किंवा शंकेचे) निरसन करणे, निराकरण करणे; एखाद्या गोष्टीबाबत मत देणे, सांगता येणे. **decided** *वि* १ स्पष्ट; पक्का, निश्चित. २ (लोकांबाबत) ठाम, निश्चय केलेला. **decidedly** *क्रिवि* निश्चितपणे.

deciduous /डि'सिड्युअस्/ *वि* (झाडांबाबत) शरद ऋतूमधे पाने झडणारा, गलनशील, पर्णमोची, हंगामी.

decimal /'डेसिम्ल्/ *वि* दहादहाचा किंवा दहाव्या भागाचा, दशांश, दशमान : *~ currency, दशमान चलन.* **decimal** *ना* [*गण*] दशांश, शतांश वगैरे परिमाणात मोजला जाणारा अपूर्णांक – उदा ०.२५ (पंचवीस शतांश), दशांश अपूर्णांक. **decimalize** /-मलाइझ्/ *क्रि* [*अक, सक*] दशांश पद्धती स्वीकारणे. **decimalization** /ˌडेसिमलाइ'झेइश्न्; *अमे* -लि'झ्-/ *ना* [*अगण*] दशमानीकरण. **ˌdecimal 'point** *ना* [*गण*] दशांश चिन्ह, दशांश पद्धतीमधील पूर्णांकानंतर येणारे टिंब – उदा १०.२५.

decimate /'डेसिमेइट्/ *क्रि* [*सक*] १ मोठ्या प्रमाणात संहार करणे, नाश करणे. २ (*ला*) कमी करणे, घटवणे.

decipher /ˌडि'साइफ(र्)/ *क्रि* [*सक*] (सांकेतिक लिपीत किंवा वाईट हस्ताक्षरात लिहिलेल्या मजकुराचा) अर्थ लावणे, वाचणे.

decision /डि'सिझ्न्/ *ना* १ [*गण, अगण*] केलेला विचार, निश्चय : *come to/reach/make a ~, निश्चय करणे, विचाराप्रत येणे, निर्णयास पोहोचणे.* २ [*अगण*] निर्णय घेऊन कृती करण्याची क्षमता, निश्चयीपणा. **decisive** /डि'साइसिव्ह्/ *वि* १ स्पष्ट निकाल असणारा, निर्णायक. २ निश्चयी. **decisively** *क्रिवि* निर्णायक पद्धतीने, निश्चयाने. **decisiveness** *ना* [*अगण*] निश्चयीपणा.

deck¹ /डेक्/ *ना* [*गण*] १ बोट, बस वगैरेतील पृष्ठभाग, तक्तपोशी, उभे राहण्याचा फलक, नौतल. २ स्टिरिओ सिस्टिममधील ध्वनिमुद्रिका किंवा ध्वनिफीत चालवणारा भाग. ३ पत्त्यांचा कॅट, पत्त्यांचा जोड. **'deck-chair** *ना* [*गण*] घराबाहेर बसण्यासाठी वापरायची कापडाची घडीची खुर्ची.

deck² /डेक्/ *क्रि* [*सक*] (*out*)// सजवणे, सुशोभित करणे : *streets ~ed out with flags, ध्वज लावून सुशोभित केलेले रस्ते.*

declare /डि'क्लेअ(र्)/ *क्रि* [*अक, सक*] १ अधिकृतपणे घोषित करणे; जाहीर करणे, प्रसिद्ध करणे. २ ठामपणे प्रतिज्ञापूर्वक म्हणणे. ३ कस्टम अधिकाऱ्याला (आयात केलेल्या मालाबाबत) सांगणे : *Have you anything to ~? तुम्हाला काही घोषित करायचंय?* **declaration** /ˌडेक्ल'रेइश्न्/ *ना* [*गण*] घोषणा; प्रतिज्ञापत्र.

decline¹ /डि'क्लाइन्/ *ना* [*गण, अगण*] हळूहळू पण सतत होणारी गुणवत्ता, सत्ता, महत्त्व वगैरेतील घट, अवनती, क्षय, पड : *a ~ in population, लोकसंख्येतील घट.*

decline² /डि'क्लाइन्/ *क्रि* १ [*अक*] क्षय होणे, क्षीण होणे, खालावणे, उतरणे. २ [*अक, सक*] एखाद्या गोष्टीला नकार देणे; नाकारणे,

संमती न देणे.

decode /,डी'कउड्/ *क्रि* [*सक*] (सांकेतिक भाषेतील निरोप) वाचणे, कळणे, अर्थ लावणे.

decompose /,डीकम्'पउझ़्/ *क्रि* [*अक, सक*] सडणे, सडवणे, कुजणे, कुजवणे, विघटन होणे/करणे, अपघटन करणे. **decomposition** /,डीकॉम्प'झ़िश्न्/ *ना* [*अगण*] कुजणे, विघटन.

decor /'डेइकॉऽ(र्); *अमे* डेइ'कॉऽ(र्)/ *ना* [*अगण, अे.व*] एखाद्या खोलीत फर्निचर वगैरे लावून ती सुशोभित करण्याची पद्धती.

decorate /'डेकरेइट्/ *क्रि* १ [*सक*] अलंकार वगैरे घालून अधिक सुंदर करणे, नटवणे, सुशोभित करणे, सजवणे, शृंगारणे. २ [*अक, सक*] इमारतीला किंवा खोलीला रंगरंगोटी करणे. ३ [*सक*] पदक देणे, सन्मानचिन्ह देणे : *~d for bravery, शूरपणासाठी पदक दिलेला.* **decoration** /,डेक'रेइश्न्/ *ना* १ [*अगण*] आरास, सजावट, प्रसाधन; रंगसफेती. २ [*गण*] आरास करण्याची वस्तू : *Christmas ~s, नाताळच्या आरास करण्याच्या गोष्टी.* ३ सन्मानचिन्ह, पदक. **decorative** /'डेकरटिव्ह्; *अमे* -रेइट्-/ *वि* अलंकृत किंवा सुशोभित करण्यास योग्य, अलंकारोपयोगी. **decorator** *ना* [*गण*] रंगरंगोटी करणारा, सजावटकार, प्रसाधक.

decoy /'डीकॉइ/ *ना* [*गण*] १ इतर पक्ष्यांना शिकारीसाठी किंवा पकडण्यासाठी भुलवून आणणारा (खरा किंवा कृत्रिम) पक्षी. २ (*ला*) दुसऱ्याला फशी पाडणारी व्यक्ती किंवा वस्तू, प्रलोभक.

decrease /डि'क्रीस्/ *क्रि* [*अक, सक*] आखूड, लहान किंवा कमी होणे/करणे : *Sales are decreasing, खप कमी होतोय्* किंवा *विक्री मंदावलीय्.* **decrease** /'डीक्रीस्/ *ना* [*गण, अगण*] घट : *a small ~ in exports, निर्यातीमधील किंचित् घट.*

decree /डिक्री/ *ना* [*गण*] १ कायद्याप्रमाणे प्रभावी अशी आज्ञा, हुकूमनामा : *by royal ~, राजाज्ञेने.* २ काही न्यायालयांचा निकाल. **decree** *क्रि* [*सक*] हुकूम काढणे/देणे, फर्मान काढणे.

decrepit /डि'क्रेपिट्/ *वि* वार्धक्याने क्षीण झालेला, जराजर्जर.

dedicate /'डेडिकेइट्/ *क्रि* [*सक*] *to//* १ स्वतःला किंवा स्वतःचा वेळ, ताकद वगैरे एखाद्या विशिष्ट कार्याला वाहून घेणे, समर्पण करणे. २ (लेखकाबाबत) आदरभाव किंवा स्नेहभाव व्यक्त करण्यासाठी ग्रंथाच्या सुरुवातीला एखाद्याचे नाव लिहिणे, अर्पणपत्रिका लिहिणे. **dedicated** *वि* वाहून घेतलेला, समर्प्रित वृत्तीचा. **dedication** /,डेडि'केइश्न्/ *ना* [*गण, अगण*] समर्पित वृत्ती, समर्पण; अर्पणपत्रिका.

deduce /डि'ड्यूस्/ *क्रि* [*सक*] बुद्धिनिष्ठपणे एखाद्या निष्कर्षाप्रत पोहोचणे, तर्क करणे, अनुमान काढणे.

deduct /डि'डैक्ट्/ *क्रि* [*सक*] (रक्कम, भाग) कापून घेणे : *~ Rs 50 from her salary, तिच्या पगारातून ५० रुपये कापून घेणे.*

deduction /डि'डैक्श्न्/ *ना* [*गण, अगण*] १ कापायची रक्कम, कापणी : *tax ~s, करापोटी कापायची रक्कम किंवा कापलेली रक्कम.* २ तर्क (करून आलेले अनुमान), निगमन.

deed /डीड्/ *ना* [*गण*] १ (*औप*) केलेले असे काही, कृत्य; कृती, क्रिया, काम. २ (*कायदा*) सही-शिक्क्यानिशीचे दस्तऐवज – विशेषतः मालकीबाबतचे, विलेख.

deem /डीम्/ *क्रि* [*सक*] मानणे.

deep^1 /डीप्/ *वि* १ वरपासून किंवा पृष्ठभागापासून खूप खालपर्यंत जाणारा, खोल : *a ~ river, खोल नदी ○ a hole one metre ~, एक मीटर खोलीचे बीळ.* २ (*ला*) गंभीर, गहन : *a ~ book, एक गहन ग्रंथ.* ३ (आवाजाबाबत) खोल, गंभीर. ४ (रंग किंवा भावनांबाबत) गडद, दाट, गहिरा; तीव्र, भयंकर : *~ hatred, भयंकर द्वेष.* ५ (झोपेबाबत) सहज न जाणारी, गाढ. ६ *in//* गढलेला, व्यग्र, बुडालेला : *~ in thought/a book, विचारात/पुस्तकात गढलेला.* ७ (*वाक्प्र*) **go off the 'deep end** खूप रागावणे. **in deep 'water** अडचणीत, कटकटीत. **deeply** *क्रिवि* तीव्रतेने, फार, खोलवर : *~ly hurt by your remarks, तुझ्या शब्दांनी फारफार दुखावलेला.*

deep^2 /डीप्/ *क्रिवि* खूप खोल किंवा खूप

आतमधे. **,deep-'freeze** *ना* [*गण*] फ्रिज् किंवा फ्रीझ. **,deep-'rooted** *वि* सहजपणे काढता न येणारा; पक्का, घट्ट, खोलवर पाळंमुळं असलेला : *~-rooted suspicions, खोलवर रुजलेल्या शंका.* **,deep-'seated** *वि* ठाम किंवा पक्का बसलेला : *~-seated fears, पक्की भीती.*

deepen /'डीपन्/ *क्रि* [*अक, सक*] खोल होणे/करणे, अधिक खोल करणे, अधिक गडद करणे, जास्त तीव्र करणे, गडद होणे/करणे, गहिरा होणे/करणे.

deer /डिअ(र्)/ *ना* [*गण*] (*ब.व* **deer**) एक चपळ, देखणा प्राणी – याच्या नराला फाट्याची शिंगे (=ANTLERS) असतात, हरिण; काळवीट, चितळ.

deface /डि'फेइस्/ *क्रि* [*सक*] रूप किंवा पृष्ठभाग खराब करणे, विद्रूप करणे.

defame /डि'फेइम्/ *क्रि* [*सक*] (*औप*) एखाद्याच्या कीर्तीला झळ पोहोचवणे, अपकीर्ती करणे, बदनामी करणे. **defamation** /,डेफ'मेइश्न्/ *ना* [*अगण*] अपकीर्ती, बदनामी.

default /डि'फॉऽल्ट्/ *क्रि* [*अक*] कर्जाचा हप्ता, कर्तव्य, कोर्टातील उपस्थिती चुकवणे, हप्ता न देणे, कर्तव्यास चुकणे, कसूर करणे, कोर्टात हजर न होणे. **default** *ना* [*अगण*] अशा तऱ्हेने केलेली चुकवाचुकवी, खाडा : *win a game by ~, प्रतिस्पर्ध्याच्या अनुपस्थितीमुळे मॅच जिंकणे.* **defaulter** *ना* [*गण*] कर्ज चुकविणारा, कर्ज-चुकव्या, थकबाकीदार.

defeat /डि'फीट्/ *क्रि* [*सक*] १ एखाद्यावर विजय मिळवणे, एखाद्याचा पराजय/पराभव करणे. २ पाडाव करणे, भंग करणे, धुळीस मिळवणे : *Our hopes were ~ed, आमच्या आशा धुळीस मिळाल्या.* **defeat** *ना* [*गण, अगण*] पराभव करण्याची अवस्था, पराभव, पराजय, पाडाव.

defect^1 /'डीफेक्ट्/ *ना* [*गण*] दोष, चूक; उणेपणा, अपूर्णता, व्यंग. **defective** /डि'फेक्टिव्ह्/ *वि* सदोष; अपूर्ण, उणा.

defect^2 /डि'फेक्ट्/ *क्रि* [*अक*] स्वतःचा देश, पक्ष वगैरे सोडून दुसऱ्या देशाला, पक्षाला वगैरे मिळणे, देशबदल/दलबदल करणे, देशांतर/पक्षांतर करणे. **defection** /डि'फेक्श्न्/ *ना* [*गण, अगण*] देशांतर किंवा पक्षांतर, दलबदलूपणा. **defector** *ना* [*गण*] देशांतर/पक्षांतर करणारा माणूस, दलबदलू, फितूर.

defence (*अमे* -fense) /डि'फेन्स्/ *ना* १ [*अगण*] संरक्षण, सुरक्षा. २ [*गण*] संरक्षण-व्यवस्था किंवा सामग्री : *the country's ~s, देशाची संरक्षण-व्यवस्था.* ३ [*गण, अगण*] (*कायदा*) (**क**) आरोपाला दिलेले उत्तर, बचाव. (**ख**) **the defence** (अे.व किंवा ब.व क्रियापदासह) आरोपीचा/चे वकील, बचाव पक्षाचा/चे वकील. **defenceless** *वि* स्वतःचे संरक्षण/बचाव करता न येणारा, असंरक्षित, हतबल, निःशस्त्र.

defend /डि'फेन्ड्/ *क्रि* [*सक*] १ (*from/against*)// संरक्षण करणे; सुरक्षित करणे. २ पाठिंबा व्यक्त करणे, लिहून किंवा बोलून पाठिंबा देणे : *~ a decision, निर्णयाला पाठिंबा देणे, निर्णयाचे समर्थन करणे.* **defendant** *ना* [*गण*] कोर्टात ज्याच्यावर केस चालू आहे तो, प्रतिवादी. **defender** *ना* [*गण*] १ संरक्षण करणारा, संरक्षक, त्राता, कैवारी; समर्थक. २ (खेळामधे) गोलजवळच्या भागाचे रक्षण करणारा खेळाडू, बचावफळीचा खेळाडू, पिछाडीचा खेळाडू. **defensible** /डि'फेन्सबल्/ *वि* संरक्षण करण्याजोगा, रक्षणीय; समर्थनीय.

defensive /डि'फेन्सिव्ह्/ *वि* संरक्षणोपयोगी, सुरक्षार्थी. **defensive** *ना* (*वाक्प्र*) **on the defensive** टीकेपासून स्वतःचे संरक्षण करण्यास अतिउत्सुक, बचावात्मक. **defensively** *क्रिवि* बचावात्मक.

defer /डि'फऽ(र्)/ *क्रि* (**-rr-**) १ [*अक*] *to*// मान राखण्यासाठी सहमती दर्शविणे, आदरापोटी मानणे, भीड ठेवणे : *I ~ to her experience, तिचा अनुभव मी आदरापोटी मानतो.* २ [*सक*] उशीर करणे, लांबणीवर टाकणे : *~ payment, रक्कम देण्यात विलंब करणे.* **deference** /'डेफरन्स्/ *ना* [*अगण*] आदरापोटी दुसऱ्याचे मानण्याची वृत्ती, भिडस्तपणा.

defiance /डि'फाइ·अन्स्/ *ना* [*अगण*] उघडपणे केलेला विरोध किंवा आज्ञाभंग, अवज्ञा, अवमान; धुडकावणे : *in ~ of my orders, माझ्या आज्ञा धुडकावून.* **defiant**

/-अन्ट्/ *वि* उद्धट, उद्दाम. **defiantly** *क्रिवि* उद्दामपणे, बेमुर्वतखोरपणे.

deficiency /डि'फिश्न्सि/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) अभाव, त्रूटी, न्यूनता. **deficient** /-श्न्ट्/ *वि* अभावपूर्ण, अपूर्ण; अपुरा : ~ *in vitamins, अपुरी जीवनसत्त्वे असलेला.*

deficit /'डेफिसिट्/ *ना* [*गण*] (रकमेची) तूट.

defile /डि'फाइल्/ *क्रि* [*सक*] (*औप*) घाण करणे, अशुद्ध करणे, अपवित्र करणे, दूषित करणे, कलंकित करणे, भ्रष्ट करणे.

define /डि'फाइन्/ *क्रि* [*सक*] १ निश्चित अर्थ (उदा शब्दांचा) सांगणे, व्याख्या करणे. २ स्पष्टपणे सांगणे किंवा दाखविणे, सुस्पष्ट करणे : ~ *a judge's powers, न्यायमूर्तींचे अधिकार स्पष्ट करणे.* **definable** *वि* निश्चित करण्याजोगा, व्याख्या देण्यासारखा.

definite /'डेफिनट्/ *वि* स्पष्ट; निःसंशय, निश्चित. **,definite 'article** *ना* [*गण*] इंग्रजीतील *the* हा शब्द. **definitely** *क्रिवि* १ निश्चितपणे, निःसंशय : *~ly not true, निश्चितपणे खरे नसणारे (काही), निःसंशय खोटे.* २ (*अनौप*) (एखाद्या प्रश्नाच्या उत्तरात वापरताना) होय; नक्कीच, निश्चितपणे.

definition /,डेफि'निश्न्/ *ना* १ [*गण*] शब्दाचा अर्थ स्पष्ट करणारे विधान, व्याख्या. २ [*अगण*] सुस्पष्ट कडा : *The photograph lacks ~, छायाचित्राच्या कडा स्पष्ट नाहीत.*

definitive /डि'फिनटिव्ह्/ *वि* निश्चित, ठरलेला, पक्का; निर्णायक; बदल किंवा भर घालणे अनावश्यक असलेला, नियत.

deflate /डि'फ्लेइट्/ *क्रि* [*सक*] १ (टायर वगैरेतील) हवा सोडून ते लहान करणे. २ (*ला*) एखाद्याचे महत्त्व कमी करणे, एखाद्याची हवा काढणे. ३ /,डी'फ्लेइट्/ (अर्थव्यवस्थेतील) चलनातील पैशाची रक्कम कमी करणे, चलनसंकोच करणे. **deflation** /डि'फ्लेइश्न्/ *ना* [*अगण*] चलनसंकोच.

deflect /डि'फ्लेक्ट्/ *क्रि* [*अक, सक*] नियोजित मार्ग किंवा उद्दिष्ट यापासून दूर होणे/नेणे : ~ *a bullet/criticism, गोळी/टीका भलतीकडे वाहवणे.* **deflection** /डि'फ्लेक्श्न्/ *ना* [*गण, अगण*] मार्गच्युती, विचलन.

deform /डि'फॉऽम्/ *क्रि* [*सक*] रूप किंवा आकार बिघडवणे, विरूप करणे : *a ~ed foot, वाकडा (झालेला) पाय.* **deformity** *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) कुरूपता, व्यंग, विकृती.

defraud /डि'फ्रॉऽड्/ *क्रि* [*सक*] (एखाद्याला) फसवणे, गंडवणे : *~ed him of £100, त्याला १०० पौंडाला फसवले.*

defrost /,डी'फ्रॉस्ट्; *अमे* -फ्रॉऽस्ट्/ *क्रि* [*सक*] (फ्रिज, अन्न वगैरेवरील) बर्फ काढणे.

deft /डेफ्ट्/ *वि* (*at*)// चपळ आणि कुशल (विशेषतः हाताने करायच्या कामात). **deftly** *क्रिवि* कुशलतेने. **deftness** *ना* [*अगण*] कुशलता, चतुराई.

defunct /डि'फङ्क्ट्/ *वि* (*औप*) वापरात नसलेला किंवा प्रभाव नसलेला, बंद, मृत, निकामी.

defuse /,डी'फ्यूझ्/ *क्रि* [*सक*] १ बॉम्बचा फ्यूज काढणे, बॉम्ब निकामी करणे. २ (*ला*) (कठीण परिस्थितीतील) धोकादायक तणाव कमी करणे, क्षुब्ध वातावरण निवळेल असे करणे.

defy /डि'फाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] १ उघडपणे प्रतिकार करणे, धुडकावणे; आज्ञा न मानणे, अवज्ञा करणे, न ऐकणे. २ (एखाद्याला) आव्हान देणे. ३ अशक्य कोटीतले होणे : ~ *description, वर्णन करणे अशक्य होणे.*

degenerate /डि'जेनरेइट्/ *क्रि* [*अक*] गुणवत्ता, कृती वगैरेबाबत खाली घसरणे, अवनती होणे, अधोगती होणे. **degenerate** /-नरट्/ *वि* नैतिक अधिष्ठान नसलेला, अधःपतित, ऱ्हासमान.

degrade /डि'ग्रेइड्/ *क्रि* [*सक*] योग्यता/किंमत कमी करणे, हलक्या/खालच्या पातळीवर आणणे, अप्रतिष्ठा करणे : ~ *oneself by cheating, फसवणूक करून स्वतःची किंमत कमी करणे.* **degradation** /,डेग्र'डेइश्न्/ *ना* [*अगण*] अधोगती, अप्रतिष्ठा, मानहानी.

degree /डि'ग्री/ *ना* [*गण*] १ प्रमाण, अंश, श्रेणी : *a high ~ of accuracy, कमालीचा/उच्च श्रेणीचा काटेकोरपणा* ○ *not in the slightest ~ interested, अल्पांशानेही रस नसणारा.* २ तपमान मोजण्याचा घटक, अंश : *ten ~s Celsius (10°C), दहा अंश*

सेल्सिअस. ३ कोन मोजण्याचा घटक : *an angle of 30 ~s (30°), ३० अंशाचा कोन (३०°).* ४ विद्यापीठ किंवा महाविद्यालयाने दिलेली पदवी. ५ (*वाक्प्र*) **by de'grees** हळूहळू, अंशाअंशाने.

dehydrate /,डी'हाइड्रेइट्/ *क्रि* [*सक*] पाणी काढून टाकणे (विशेषतः अन्न टिकविण्यासाठी).

de-ice /,डी'आइस्/ *क्रि* [*सक*] बर्फ काढून टाकणे.

deign /डेइन्/ *क्रि* [*सक*] एखादी गोष्ट करून उपकृत करणे, अनुग्रह करणे, मेहेरबानी करणे : *She didn't ~ to speak to me, माझ्याशी बोलण्याची मेहेरबानी तिने केली नाही.*

deity /'डेइ·अटि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) देव किंवा देवता.

dejected /डि'जेक्टिड्/ *वि* दुःखी किंवा उदास, खिन्न, विषण्ण. **dejection** /-क्शन्/ *ना* [*अगण*] उदासी, खिन्नता, विषण्णता, विषाद.

delay /डि'लेइ/ *क्रि* १ [*अक, सक*] उशीर होणे/करणे, कालहरण होणे/करणे किंवा वेग मंदावणे, विलंब लागणे/लावणे, खोळंबा होणे/करणे, खोटी करणे : *I was ~ed by the traffic, वाहतुकीमुळे मला उशीर झाला.*

delectable /डि'लेक्टब्ल्/ *वि* (*औप*) (खास करून अन्नाबाबत) संतोषकारक, मन प्रसन्न करणारे.

delegate^{1} /'डेलिगट्/ *ना* [*गण*] सभेमध्ये आपली मते मांडण्यासाठी लोकांनी नियुक्त केलेला माणूस, प्रतिनिधी.

delegate^{2} /'डेलिगेइट्/ *क्रि* [*सक*] प्रतिनिधी म्हणून एखाद्याची नियुक्ती करणे; एखाद्याला (हक्क, जबाबदारी वगैरे) देणे, अधिकार देणे. **delegation** /,डेलि'गेइशन्/ *ना* १ [*अगण*] प्रतिनिधी-नियुक्ती. २ [*गण*] प्रतिनिधी मंडळ.

delete /डि'लीट्/ *क्रि* [*सक*] (लिहिलेले किंवा छापलेले) काढून टाकणे, गाळणे, काट मारणे. **deletion** /डि'लीशन्/ *ना* [*गण, अगण*] गाळणे, वगळणे, विलोपन.

deliberate^{1} /डि'लिबरट्/ *वि* १ सहेतुक, विचारपूर्वक : *a ~ insult, ठरवून केलेला अपमान.* २ (बोलण्यात, वागण्यात) धीमा आणि सावध, सावकाशीचा आणि काळजीपूर्वक. **deliberately** *क्रिवि* विचारपूर्वक, मुद्दाम, जाणूनबुजून; सावधपणे आणि धीमेपणाने.

deliberate^{2} /डि'लिबरेइट्/ *क्रि* [*अक, सक*] (*about/on*)// (*औप*) एखाद्या विषयाचा खूप काळजीपूर्वक विचार करणे किंवा त्यावर खूप सावधपणे किंवा जबाबदारीने बोलणे, सारासारविचार करणे, साधकबाधक विचार करणे.

deliberation /डि,लिब'रेइशन्/ *ना* १ [*गण, अगण*] सारासार विचार, साधकबाधक विचार. २ [*अगण*] बोलण्या-चालण्यातील धिमेपणा, सावकाशी.

delicacy /'डेलिकसि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] नाजुकपणा, रमणीयता, कोमलता. २ [*गण*] रुचकर अन्न, स्वादिष्ट अन्न, पक्वान्न : *a local ~, स्थानिक (लोकांचे) पक्वान्न, खास पदार्थ.*

delicate /'डेलिकट्/ *वि* १ मनोहर आणि कोमल, सुंदर; छान. २ (रंगाबाबत) सौम्य, नाजुक. ३ काळजीपूर्वक हाताळणी किंवा वापर आवश्यक असलेला, नाजुक : *a ~ vase/situation, नाजुक काचपात्र/परिस्थिती.* ४ चटकन् आजारी पडणारा, नाजुक प्रकृतीचा : *~ health, नाजुक तब्बेत.* ५ बारकावे किंवा सूक्ष्म फरक किंवा बदल दाखविणारा : *a ~ instrument, सूक्ष्म प्रकारचे उपकरण.* **delicately** *क्रिवि* नाजुकपणे, कोमलतेने.

delicatessen /,डेलिक'टेस्न्/ *ना* [*गण*] तयार अन्नपदार्थ – विशेषतः सहसा न मिळणारे किंवा बाहेरून मागवलेले – विकण्याचे दुकान.

delicious /डि'लिशस्/ *वि* रुचकर, स्वादिष्ट, खमंग.

delight^{1} /डि'लाइट्/ *ना* १ [*अगण*] मोठा आनंद, आल्हाद, हर्ष : *take ~ in being a parent, पालक असण्यात आनंद वाटणे.* २ [*गण*] आनंदाचे कारण, आनंदकंद. **delightful** *वि* आनंददायी, भन्नाट, आल्हाददायक, मस्त. **delightfully** *क्रिवि* आनंद देत.

delight^{2} /डि'लाइट्/ *क्रि* १ [*सक*] आनंद देणे. २ [*अक*] आनंद होणे किंवा मिळणे : *She ~s in working hard, खूप काम करण्यात तिला आनंद मिळतो.* ३ (*वाक्प्र*) **be delighted** आनंदित होणे.

delineate /डि'लिनि·अेइट/ *क्रि* [*सक*] (*औप*) आखून किंवा वर्णन करून एखादी गोष्ट दाखविणे, रूपरेषा स्पष्ट करणे.

delinquent /डि'लिङ्क्वन्ट्/ *ना* [*गण*], *वि* वाईट वागणारा किंवा चूक करणारा (माणूस), गुन्हेगार, अपराधी. **delinquency** /-क्वन्सि/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* -ies) गुन्हेगारी, अपराध, दुष्कर्म.

delirious /डि'लिरिअस्/ *वि* १ भ्रमिष्ट, बेहोष, शुद्ध नसलेला. २ (*ला*) आनंदाने धुंद, उन्मादित. **deliriously** *क्रिवि* आनंदाने बेभान होऊन.

delirium /डि'लिरिअम्/ *ना* [*अगण*] १ भ्रम – विशेषतः तापात होणारा, वात, भ्रमिष्टपणा. २ (*ला*) उन्माद.

deliver /डि'लिव्ह(र्)/ *क्रि* १ [*अक, सक*] (पत्रे, माल वगैरे) घरपोच करणे, ग्राहकांना देणे : *~ milk/newspapers, दुधाचा रतीब घालणे, वर्तमानपत्र टाकणे.* २ [*सक*] सार्वजनिक ठिकाणी (भाषण) देणे : *~ a lecture, व्याख्यान देणे.* ३ [*सक*] बाळंत करणे, बाळंत होण्यात मदत करणे, बाळंतपण करणे. ४ (*वाक्प्र*) **deliver the goods** ➪ GOODS.

delivery /डि'लिव्हरि/ *ना* (*ब.व* -ies) १ [*अगण, गण*] (पत्रे, माल वगैरे) पोहोचते करणे, वाटप, बटवडा, पोचवणी. २ [*गण*] मुलाचा जन्म, बाळंतपण, प्रसूती : *The mother had an easy ~, त्या आईचे बाळंतपण सोपे होते.* ३ [*गण, अे.व, अगण*] व्याख्यानात वगैरे बोलण्याची पद्धत, भाषणसरणी, बोलण्याची ढब. ४ (*वाक्प्र*) **take delivery (of sth)** एखादी गोष्ट येऊन पोहोचणे, घेणे, मिळणे.

delta /'डेल्ट/ *ना* [*गण*] नदीच्या मुखापाशी नदीला जेथे फाटे फुटतात तो त्रिकोणी प्रदेश, त्रिभुज प्रदेश, मुख प्रदेश.

delude /डि'लूड्/ *क्रि* [*सक*] फसवणे, चकवणे, भ्रमात पाडणे, वंचना करणे.

deluge /'डेल्यूज्/ *ना* [*गण*] १ मुसळधार पाऊस, धुंवाधार पाऊस. २ (*ला*) एखाद्या गोष्टीची प्रचंड राशी, पूर : *a ~ of letters, पत्रांचा पाऊस/पूर.* **deluge** *क्रि* [*सक*] एखाद्याला काही गोष्टी प्रचंड प्रमाणात देणे, भडिमार करणे, पाऊस/खच पाडणे : *~d with questions, प्रश्नांचा खच पडणे किंवा भडिमार होणे.*

delusion /डि'लूझ्न्/ *ना* [*गण, अगण*] भ्रम, भ्रांती : *under the ~ that he is Napoleon, आपण नेपोलिअन आहोत या भ्रमात.*

deluxe /डि'लैक्स्/ *वि* उच्च श्रेणीचा, पहिल्या प्रतीचा : *a ~ hotel, पहिल्या प्रतीचे हॉटेल.*

delve /'डेल्व्ह्/ *क्रि* [*अक*] *in/into//* एखाद्या गोष्टीचा शोध घेणे, आत शिरून पत्ता काढणे : *~ into the past, भूतकाळाचा शोध घेणे.*

Dem Democrat(ic) चे संरू.

demand^{1} /डि'मान्ड्; *अमे* डि'मॅन्ड्/ *ना* १ [*गण*] मागणी : *the workers' ~s for higher pay, वाढीव पगारासाठीची कामगारांची मागणी.* २ [*अगण*] एखादी गोष्ट वापरण्याची/घेण्याची लोकांची इच्छा, मागणी, भाव : *no ~ for history graduates, इतिहासाच्या पदवीधरांना भाव नाही ○ Our goods are in great ~, आमच्या मालाला मोठी मागणी/खूप भाव आहे –* म्हणजेच खूप लोकांना तो हवा आहे. (*वाक्प्र*) **on demand** मागितल्यावर, मागणी केल्यास.

demand^{2} /डि'मान्ड्; *अमे* डि'मॅन्ड्/ *क्रि* [*सक*] १ हुकूम करून मागणे, मागणी करणे, फर्मावणे. २ (*औप*) आवश्यक असणे, जरूरी असणे : *work ~ing great care, खूप काळजी घेण्याची आवश्यकता असणारे काम.* **demanding** *वि* (क) खूप कष्टाचे, मोठ्या कौशल्याचे वगैरे : *a ~ing job, मोठ्या कौशल्याचे काम.* (ख) इतरांना कामाला जुंपणारा : *a ~ing boss, पिदवून घेणारा वरिष्ठ.*

demarcate /'डीमाकेइट्/ *क्रि* [*सक*] सीमारेषा निश्चित करणे. **demarcation** /,डीमा'केइश्न्/ *ना* [*अगण, गण*] सरहद्द ठरविणे, सीमांकन.

demean /डि'मीन्/ *क्रि* [*सक*] (*औप*) **~ oneself** स्वतःचा कमीपणा होईल असे वागणे, स्वतःची अप्रतिष्ठा करणे.

demeanour (*अमे* -or) /डि'मीन(र्)/ *ना* [*गण, बहुधा अे.व*] (*औप*) वागणूक, वर्तन.

demented /डि'मेन्टिड्/ *वि* वेडा.

demerara (तसेच **demerara sugar**) /,डेम'रेअर/ *ना* [*अगण*] फिकट तांबूस साखर.

demilitarize /डि'मिलिटराइझ़्/ *क्रि* [*सक*] एखाद्या ठिकाणाहून सैन्य काढून घेणे, निर्लष्करीकरण करणे.

demise /डि'माइझ़्/ *ना* [*अे.व*] १ (*औप*) मृत्यू, निधन. २ (*ला*) शेवट, अखेर किंवा अपयश.

demist /डी'मिस्ट्/ *क्रि* [*सक*] (मोटारीच्या काचेवरून) धुके बाजूला करणे.

democracy /डि'मॉक्रसि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*गण, अगण*] निवडून दिलेल्या प्रतिनिधींमार्फत सर्व लोकांचा सहभाग असणारे शासन (किंवा अशा शासनाचा देश), लोकशाही. २ [*अगण*] निर्णय प्रकियेत सहभागी असणाऱ्या सभासदांचे एखाद्या संघटनेवरील नियंत्रण : *industrial ~, औद्योगिक लोकशाही.*

democrat /'डेमक्रॅट्/ *ना* [*गण*] १ लोकशाहीला पाठिंबा देणारा माणूस, लोकशाहीवादी. २ **Democrat** (*अमे*) डेमोक्रॅटिक पक्षाचा सभासद. **democratic** /,डेम'क्रॅटिक्/ *वि* लोकशाहीचा किंवा लोकशाहीवादी. **democratically** *क्रिवि* लोकशाही मार्गाने.

demolish /डि'मॉलिश्/ *क्रि* [*सक*] १ (जुन्या इमारती) पाडणे. २ (*ला*) (एखादी उपपत्ती, एखादा सिद्धान्त) खोडून काढणे, खंडन करणे. **demolition** /,डेम'लिश्न्/ *ना* [*गण, अगण*] पाडापाड; खंडन.

demon /'डीमन्/ *ना* [*गण*] १ राक्षस, भूत, पिशाच. २ (*औप*) राक्षसी ताकद असणारा. **demonic** /डी'मॉनिक्/ *वि* राक्षसी, असुरी; प्रमाणबाह्य.

demonstrable /'डेमन्स्ट्रब्ल्; *अमे* डि'मॉन्स्ट्रब्ल्/ *वि* सिद्ध करण्याजोगा, दाखवण्याजोगा, प्रात्यक्षिक दाखविता येईल असा. **demonstrably** *क्रिवि* उघड, स्पष्टपणे.

demonstrate /'डेमन्स्ट्रेइट्/ *क्रि* १ [*सक*] उदाहरणे देऊन स्पष्ट करणे किंवा पुरावे देऊन सिद्ध करणे, सप्रमाण दाखवणे. २ [*अक*] निदर्शन करणे. **demonstrator** *ना* [*गण*] १ निदर्शक. २ प्रयोगनिर्देशक.

demonstration /,डेमन्'स्ट्रेइश्न्/ *ना* १ [*गण, अगण*] एखादी गोष्ट कशी चालते किंवा प्रत्यक्ष स्थिती काय आहे हे दाखविण्याची कृती, प्रयोगनिर्देशन. २ [*गण*] मते किंवा भावना व्यक्त करण्यासाठी लोकांनी – उदाहरणार्थ कामगार, विद्यार्थी यांनी – केलेले निदर्शन. **demonstrative** /डि'मॉन्स्ट्रटिव्ह्/ *वि* १ भावना व्यक्त करणारा, भावनिदर्शक. २ (*व्याकरण*) (सर्वनामाबाबत) कोणती व्यक्ती किंवा वस्तू हे दाखविण्यासाठी वापरलेले *this, those* यांसारखे निर्देशक (सर्वनाम).

demoralize /डि'मॉरलाइझ़्; *अमे* -मॉऽर्-/ *क्रि* [*सक*] एखाद्याचे धैर्य, आत्मविश्वास वगैरे नष्ट करणे, नाउमेद करणे, उत्साहभंग करणे : *~d unemployed school-leavers, नाउमेद झालेले, बेकार असे शाळा सोडलेले विद्यार्थी.*

demote /,डी'मउट्/ *क्रि* [*सक*] खालच्या श्रेणीवर आणणे, पदावनत करणे.

demure /डि'म्युअ(र्)/ *वि* शांत, गंभीर आणि लाजरा, धीरगंभीर, नम्र : *a ~ young woman, शांत, गंभीर तरुणी.* **demurely** *क्रिवि* धीरगंभीरपणे, नम्रपणे.

den /डेन्/ *ना* [*गण*] १ जंगली श्वापदाचे दृष्टीआड असलेले राहायचे ठिकाण, गुहा. २ (*अनौप*) स्वतःचे काम किंवा छंद करण्याची, घरातील छोटीसी शांत खोली.

denationalize /,डी'नॅशनलाइझ़्/ *क्रि* [*सक*] एखादा राष्ट्रीय उद्योग खाजगी मालकीकडे सोपविणे, खाजगीकरण करणे. **denationalization** /,डी,नॅशनलाइ'झ़ेइश्न्; *अमे* -लि'झ़्-/ *ना* [*अगण*] खाजगीकरण.

denial /डि'नाइ·अल्/ *ना* १ एखादी गोष्ट खोटी आहे असे म्हणणे. २ [*गण, अगण*] नाकबुली, नकार; (मागणी वगैरेची) अमान्यता.

denigrate /'डेनिग्रेइट्/ *क्रि* [*सक*] एखादी गोष्ट भिकार, हलकी आहे असे (गैरवाजवीपणे) म्हणणे, बदनामी करणे, कमी लेखणे.

denim /'डेनिम्/ *ना* १ [*अगण*] घट्ट विणीचे सुती कापड. २ **denims** [*ब.व*] (खास करून निळ्या रंगाच्या) डेनिमपासून केलेल्या जीन्स.

denomination /डि,नॉमि'नेइश्न्/ *ना* [*गण*] १ धार्मिक गट, पंथ, संप्रदाय. २ पैशाचे किंवा मोजमापाचे परिमाण, घटक. **denominational** *वि* सांप्रदायिक, पंथाचा, पंथिक.

denominator /डि'नॉमिनेइट(र्)/ *ना* [*गण*] अपूर्णांकाचा छेद, छेदक, भाजक – उदा $\frac{३}{४}$ मधील ४.

denote /डि'नउट्/ *क्रि* [*सक*] १ चिन्ह किंवा लक्षण असणे, नाव असणे, निशाणी असणे; प्रतिनिधित्व करणे. २ निर्देश करणे, दाखवणे : *His silence ~d criticism, त्याचे मौन टीकेचे निदर्शक होते.*

denounce /डि'नाउन्स्/ *क्रि* [*सक*] एखाद्याविरुद्ध जाहीरपणे बोलणे, उघडपणे टीका करणे, धिक्कार करणे, जाहीर निषेध करणे : *~ sb as a spy, एखाद्यावर तो परकीय हेर असल्याची उघडपणे टीका करणे.*

dense /डेन्स्/ *वि* (**~r, ~st**) १ (लोक आणि गोष्टींबाबत) गर्दीचा, भरगच्च, दाट : *~ traffic, वाहतुकीची गर्दी.* २ मधून पाहण्यास अवघड, दाट : *~ fog, दाट धुके.* ३ (*अनौप*) मूर्ख, मद्द. **densely** *क्रिवि* दाटीने, भरगच्चपणे.

density /'डेन्सटि/ *ना* (*ब.व* -ies) १ [*अगण*] दाटी, दाटपणा. २ [*गण, अगण*] (*भौतिकशास्त्र*) वस्तुमान आणि आकारमान यातील संबंध, घनता.

dent /डेन्ट्/ *ना* कठीण पृष्ठभागावर आघाताने पडलेला खड्डा, पोचा. **dent** *क्रि* [*सक*] ठोसा मारून किंवा आघाताने पोचा आणणे.

dental /'डेन्ट्ल्/ *वि* दातांचा, दंत-.

dentist /'डेन्टिस्ट्/ *ना* [*गण*] दातांची काळजी घेणारा माणूस, दातांचा डॉक्टर, दंतवैद्य. **dentistry** *ना* [*अगण*] दंतवैद्याचे काम, दंतवैद्यकी.

denunciation /डि,नॅन्सि'अेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] जाहीर निषेध, जाहीर टीका किंवा धिक्कार.

deny /डि'नाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* -ied) [*सक*] १ एखादी गोष्ट असत्य आहे असे म्हणणे, नाकबूल करणे. २ एखाद्याने मागितलेली किंवा त्याला हवी असलेली गोष्ट न देणे, नाकारणे, अमान्य करणे.

deodorant /,डी'अउडरन्ट्/ *ना* [*गण, अगण*] अंगाची किंवा घामाची दुर्गंधी घालवणारे द्रव्य.

dep departs चे संरू.

depart /डि'पाट्/ *क्रि* [*अक*] (*औप*) दूर जाणे; सोडणे, सुटणे : *The train ~s from platform 3, फलाट क्र. ३ वरून गाडी सुटते* ○ *~ from the truth, सत्यापासून दूर जाणे.*

department /डि'पाट्मन्ट्/ *ना* [*गण*] शासन, उद्योग, दुकान, विद्यापीठ वगैरेचा एखादा विभाग. **de'partment store** *ना* [*गण*] वेगवेगळ्या विभागात माल विकण्याचे मोठे दुकान, विविध वस्तुभांडार.

departure /डि'पाच(र्)/ *ना* [*गण, अगण*] दूर जाणे, प्रयाण, प्रस्थान.

depend /डि'पेन्ड्/ *क्रि* [*अक*] १ *on//* (क) टिकून राहण्यासाठी एखाद्या व्यक्तीच्या किंवा वस्तूच्या आधाराची गरज असणे, अवलंबून राहणे : *Children ~ on their parents, मुले त्यांच्या आई-वडलांवर अवलंबून असतात.* (ख) एखाद्यावर विश्वास असणे, भिस्त असणे; खात्री असणे, भरवसा ठेवणे : *You can ~ on John not to be late, जॉन उशीरा येणार नाही याची तू खात्री बाळग.* २ *on//* कार्यकारणभावाने अवलंबून असणे, कारणावर अवलंबून असणे : *Our success ~s on how hard we work, आपण किती कष्ट करू यावर आपले यश अवलंबून आहे.* **dependable** *वि* विसंबून राहण्याजोगा, विश्वासार्ह, भरवशाचा : *a ~able friend, विश्वास टाकावा असा मित्र.*

dependant (तसेच खास करून *अमे* **-ent**) /डि'पेन्डन्ट्/ *ना* [*गण*] अन्नवस्त्रनिवाऱ्यासाठी दुसऱ्यावर अवलंबून असणारा माणूस, आश्रित, अनुजीवी.

dependence /डि'पेन्डन्स्/ *ना* [*अगण*] १ जगण्यासाठी सतत एखाद्या गोष्टीवर अवलंबून राहणे, आधीनता : *~ on drugs/foreign imports, मादक द्रव्य/परदेशातून केलेली आयात यावरची आधीनता.* २ विश्वास, भरवसा, मदार.

dependent /डि'पेन्डन्ट्/ *वि* १ कशावरतरी/कुणावरतरी अवलंबून असणारा : *~ on her parents, आईवडलांवर अवलंबून असणारी ती.* २ (वस्तुस्थिती वगैरेनी) निर्णित, ठरवलेला : *~ on your passing the exam, तुझ्या परीक्षा पास होण्यावर अवलंबून असलेला.* **dependent** *ना* [*गण*] (खास करून *अमे*) आश्रित.

depict /डि'पिक्ट्/ *क्रि* [*सक*] चित्र काढणे, रेखाटणे; शब्दांत रेखाटणे किंवा वर्णन करणे, शब्दबद्ध करणे. **depiction** /-क्शन्/ *ना* [*अगण, गण*] रेखाटन; शब्दचित्र, शब्दबद्ध वर्णन.

deplete /डि'प्लीट्/ *क्रि* [*सक*] खूप कमी करणे, घटणे, रिकामा करणे, आटणे: *Our food supplies are badly ~d, आपले अन्नधान्य साठे फारच कमी झालेत.* **depletion** /-ईशन्/ *ना* [*अगण*] घट, कमतरता.

deplore /डि'प्लॉऽर्/ *क्रि* [*सक*] तीव्र नापसंती दाखविणे, खेद व्यक्त करणे. **deplorable** *वि* फार वाईट, शोचनीय; खेदकारक.

deploy /डि'प्लॉइ/ *क्रि* [*अक, सक*] (सैन्याबाबत) युद्धासाठी सज्ज होणे/करणे, तैनात करणे, धाडणे.

deport /डि'पॉऽट्/ *क्रि* [*सक*] (नको असलेल्या माणसास) देशाबाहेर हाकलणे, हद्दपार करणे, निर्वासित करणे, तडीपार करणे. **deportation** /,डीपॉऽ'टेइशन्/ *ना* [*गण, अगण*] देशाबाहेर हकालपट्टी, देशान्तरवास.

depose /डि'पउझ्/ *क्रि* [*सक*] (राज्यकर्त्याला) सत्तेवरून हटवणे, पदच्युत करणे, राज्यभ्रष्ट करणे.

deposit^{1} /डि'पॉझ़िट्/ *ना* १ [*गण*] खात्यावर (खास करून बचत खात्यावर) जमा असलेली रक्कम, ठेव. २ [*गण*] देय असलेल्या मोठ्या रकमेतील दिलेला काही भाग, इसार. ३ [*गण*] एखादी गोष्ट भाड्याने घेण्यापूर्वी द्यायची रक्कम, अनामत. ४ [*गण, अगण*] नदीचा वगैरे गाळ. **de'posit account** *ना* [*गण*] जमा रकमेवर व्याज मिळण्याचे बँकेतील खाते, ठेव खाते.

deposit^{2} /डि'पॉझ़िट्/ *क्रि* [*सक*] १ (*औप*) ठेवणे, न्यास करणे. २ (नदीबाबत) गाळमाती टाकणे. ३ बँकेत (विशेषतः व्याज मिळवण्यासाठी) पैसे ठेवणे; (मूल्यवान वस्तू) सुरक्षित जागी ठेवणे.

depot /'डेपउ; *अमे* 'डीपउ/ *ना* १ (क) कोठार, कोठी, भांडार; वखार. (ख) बस वगैरे ठेवायची जागा, ठाणे, आगार. २ (*अमे*) रेल्वेस्टेशन किंवा बसस्टेशन, स्थानक.

depraved /डि'प्रेइव्ह्ड्/ *वि* नैतिकदृष्ट्या वाईट, दूषणास्पद, दुष्ट, दुराचारी, बदमाष. **depravity** /डि'प्रॅव्हटि/ *ना* [*अगण, गण*] दुराचरण, भ्रष्टपणा.

deprecate /'डेप्रकेइट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) नापसंती दाखविणे, खेद प्रदर्शित करणे, टीका करणे.

depreciate /डि'प्रीशिअेइट्/ *क्रि* [*अक*] किमत कमी होणे. **depreciation** /डि,प्रीशि'अेइशन्/ *ना* [*गण, अगण*] भावउतार, घसारा.

depress /डि'प्रेस्/ *क्रि* [*सक*] १ दुःखी करणे, विषण्ण करणे: *feel very ~ed, फार उदास वाटणे/मन खिन्न होणे.* २ किंमत कमी करणे, मंदी आणणे: *~ prices, भाव उतरवणे.* ३ (*औप*) दडपणे, खाली दाबणे. **depressing** *वि* उदास, खिन्न, दुःखीकष्टी: *a ~ film, खिन्न करणारा चित्रपट.*

depression /डि'प्रेशन्/ *ना* १ [*अगण*] उदासी, खिन्नता, दुःखी अवस्था. २ [*गण*] कमी आर्थिक उलाढाल, बेकारी, दारिद्र्य यांचा काळ, मंदी. ३ [*गण*] खाच, खळगा. ४ [*गण*] कमी दाबाच्या हवेच्या पट्ट्याचा प्रदेश, न्यूनदाब प्रदेश, अवनत प्रदेश.

deprive /डि'प्राइव्ह्/ *क्रि* [*सक*] *of//* एखादी गोष्ट (एखाद्याकडून) हिरावून घेणे: *~ people of freedom, लोकांचे स्वातंत्र्य हिरावून घेणे.* **deprivation** /,डेप्रि'व्हेइशन्/ *ना* [*गण, अगण*] हिरावून घेण्याची स्थिती, नागवणूक, हरण (उदा अधिकारहरण). **deprived** *वि* अन्नवस्त्रनिवारा नसलेला, वंचित.

Dept Department चे *संरू.*

depth /डेप्थ्/ *ना* १ [*गण, अगण*] वरून तळापर्यंतचे किंवा पुढून मागपर्यंतचे अंतर, खोली. २ [*अगण*] गंभीर विचार, भावना वगैरे: *a writer of great ~, खूप गांभीर्याचे लेखन करणारा लेखक.* ३ (*वाक्प्र*) **in 'depth** तपशीलवार; खोलात जाऊन, सांगोपांग. **out of one's depth** (क) आपल्या उंचीपेक्षा अधिक खोल पाण्यात. (ख) एखाद्याच्या समजशक्तीच्या पलीकडच्या किंवा आवाक्याबाहेरच्या परिस्थितीत.

deputation /,डेप्यु'टेइशन्/ *ना* [*गण*]

(अ.व किंवा ब.व क्रियापदासह) इतरांच्या वतीने बोलणाऱ्या किंवा काम करणाऱ्या लोकांचा गट, प्रतिनिधी (मंडळ).

deputize /'डेप्युटाइझ/ *क्रि* [*अक*] प्रतिनिधी म्हणून काम करणे: ~ *for the manager, मॅनेजरचा मुखत्यार म्हणून काम करणे.*

deputy /'डेप्युटि/ *ना* [*गण*] (*ब.व* -ies) १ एखाद्या शाळेच्या किंवा संस्थेच्या मुख्याच्या खालचा दुसऱ्या क्रमांकाचा माणूस, दुय्यम व्यक्ती, उप- (उदा उपमुख्याध्यापक). २ (एखाद्याच्या अनुपस्थितीत त्याचा) अधिकार सोपविलेली व्यक्ती, प्रतिनियुक्त.

derail /डि'रेइल/ *क्रि* [*सक*] (गाडी) रूळावरून दूर नेणे, गाडी रूळावरून घसरवणे. **derailment** *ना* [*गण, अगण*] (गाडीची) घसरण.

deranged /डि'रेइन्ज्ड्/ *वि* सामान्यपणे विचार किंवा कृती करू न शकणारा – विशेषतः मानसिक दुर्बलतेमुळे, बुद्धिभ्रंश झालेला, भ्रमिष्ट.

derelict /'डेरलिक्ट्/ *वि* सोडून दिलेला, उजाड, टाकून दिलेला: *a ~ house, कुणी राहत नसलेलं घर.* **dereliction** /,डेर'लिक्शन्/ *ना* [*अगण*] उपेक्षा.

derision /डि'रिझ्न्/ *ना* [*अगण*] उपहास, थट्टा, चेष्टा.

derisory /डि'राइसरि/ *वि* गंभीरपणे दखल न घेण्याजोगा, क्षुल्लक.

derivation /,डेरि'व्हेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] शब्दाचे मूळ किंवा शब्दाचा विकास, व्युत्पत्ती, शब्दसिद्धी. **derivative** /डि'रिव्हटिव्ह्/ *वि, ना* [*गण*] साधित (शब्द), व्युत्पन्न (शब्द).

derive /डि'राइव्ह्/ *क्रि* १ [*सक*] मिळणे, संपादणे; मिळवणे, प्राप्त करून घेणे: ~ *pleasure from sth, एखाद्या गोष्टीपासून आनंद मिळवणे.* २ [*अक*] *from*// पासून येणे: *words ~d from Latin, लॅटिनपासून आलेले शब्द.*

derogatory /डि'रॉगट्रि; *अमे* -टॉडरि/ *वि* अनादर दाखवणारा, मानहानीकारक, अप्रतिष्ठाकारक.

derrick /'डेरिक्/ *ना* [*गण*] १ बोटीतील सामान हालविण्याची मोठी यारी/क्रेन. २ तेल-उपसा करणारी यंत्रसामग्री वगैरे ठेवायची तेलाच्या विहिरीवरची चौकट.

descend /डि'सेन्ड्/ *क्रि* १ [*अक, सक*] (*औप*) खाली जाणे/येणे, अवतरणे. २ (*वाक्प्र*) **be descended from sb/sth** एखाद्या गोष्टी/व्यक्ती पासून येणे म्हणजेच ती व्यक्ती पूर्वज असणे किंवा ती गोष्ट मूळ असणे, वंशज होणे. ३ (*क्रिब*) **descend on sb/sth** एखाद्याला अचानक भेटणे, एखाद्यावर अचानक हल्ला करणे. **descendant** *ना* एखाद्या प्राण्यापासून जन्मलेला प्राणी किंवा व्यक्तीपासून जन्मलेली व्यक्ती, वंशज, संतती: *the ~ants of Queen Victoria, व्हिक्टोरिया राणीचे वंशज.*

descent /डि'सेन्ट्/ *ना* १ [*गण,* बहुधा *अ.व*] खाली येणे/जाणे. २ [*गण*] उतार, उतरण, अवरोह. ३ [*अगण*] कुल/कुळ, वंश; मूळ, उगम: *of French ~, फ्रेंच वंशीय.*

describe /डि'स्क्राइब्/ *क्रि* [*सक*] १ एखादी गोष्ट/व्यक्ती कशी आहे ते सांगणे, वर्णन करणे. २ (*औप*) काढणे: ~ *a circle, वर्तुळ काढणे.*

description /डि'स्क्रिप्श्न्/ *ना* १ [*गण, अगण*] एखादी गोष्ट/व्यक्ती कशी आहे याचे निवेदन, वर्णन. २ [*गण*] जात, प्रकार किंवा तऱ्हा: *boats of every ~, हरतऱ्हेच्या नौका.* **descriptive** /डि'स्क्रिप्टिव्ह्/ *वि* वर्णनात्मक.

desecrate /'डेसिक्रेइट्/ *क्रि* [*सक*] (एखादे पवित्र स्थान किंवा पवित्र गोष्ट) बिघडवणे किंवा भ्रष्ट करणे, पावित्र्यभंग करणे, विटाळणे, विटंबना करणे. **desecration** /,डेसि'क्रेइश्न्/ *ना* [*अगण*] पावित्र्यभंग, विटंबना.

desegregate /,डी'सेग्रिगेइट्/ *क्रि* [*सक*] विलगीकरण (विशेषतः वांशिक) थांबवणे किंवा बंद करणे: ~ *schools, (वंशवार) शाळा वेगळ्या ठेवण्याची प्रथा बंद करणे.* **desegregation** /,डी'सेग्रि'गेइश्न्/ *ना* [*अगण*] विलगीकरण-बंदी, अविलग्नीकरण.

desert^{1} /डि'झःट्/ *क्रि* १ [*सक*] दूर जाणे, सोडून जाणे. २ [*सक*] काहीही मदतीशिवाय एखाद्याला सोडणे, निराधार सोडणे, वाऱ्यावर सोडणे: ~ *one's family, कुटुंबाला टाकून*

जाणे. ३ [*अक, सक*] परवानगी न घेता (खास करून सैन्यदल) सोडणे, फरारी होणे, सैन्यातून पळून जाणे. **deserter** *ना* सैन्यातून पळून जाणारा, फरारी, पळपुटा माणूस. **desertion** /डि'झ़ऽश्न्/ *ना* [*गण, अगण*] परित्याग; सैन्यातून पलायन.

desert^{2} /'डेझ़द्/ *ना* [*गण, अगण*] पाणी, झाडे नसलेला आणि वालुकामय मोठा भूप्रदेश, वाळवंट, मरू. **,desert 'island** *ना* [*गण*] माणसांची वस्ती नसलेले उष्णकटिबंधातील बेट.

deserts /डि'झ़ऽद्स्/ *ना* [*ब.व*] एखाद्याला योग्य ते मिळालेले माप : *get one's just ~, योग्य माप मिळणे.*

deserve /डि'झ़ऽव्ह्/ *क्रि* [*सक*] (बक्षीस, शिक्षा वगैरे) देण्यास योग्य असे असणे किंवा काही करणे, लायक असणे/होणे : *She ~d to win, ती जिंकण्यास लायक होती.*

design /डि'झ़ाइन्/ *ना* १ (क) [*गण*] एखादी गोष्ट बनविण्यासाठीचा आराखडा, नकाशा, आकृतिबंध, अभिकल्प. (ख) [*अगण*] नकाशे किंवा आराखडे काढण्याची कला, रचना. २ [*गण*] रेषांनी किंवा आकारांनी वगैरे काढलेली नक्षी. ३ [*अगण*] एखाद्या यंत्राचा, इमारतीचा सर्वसाधारण नकाशा, आराखडा. ४ [*गण, अगण*] योजना; हेतू, मतलब. **design** *क्रि* [*सक*] १ एखाद्या (तयार करायच्या) गोष्टीचा नकाशा किंवा आराखडा काढणे. २ योजना करणे, रचणे, हेतू असणे, उद्देश ठेवणे : *a room ~ed for children, मुलांसाठी केलेली खोली.* **designer** *ना* [*गण*] नकाशा काढणारा, -कार (उदा वेषभूषाकार), अभिकल्पक.

designate /'डेझ़िग्नेइद्/ *क्रि* [*सक*] १ एखाद्या विशिष्ट कामगिरीसाठी किंवा उद्दिष्टासाठी एखाद्याची निवड करणे, नेमणूक करणे, नियुक्त करणे. २ स्पष्टपणे निर्देश करणे, नाव देणे, नेमणे.

desirable /डि'झ़ाइअरब्ल्/ *वि* करण्याच्या किंवा मिळवण्याच्या योग्यतेचा, स्पृहणीय, इष्ट. **desirability** /डि,झ़ाइअर'बिलटि/ *ना* [*अगण*] इष्टता, स्पृहणीयता.

desire /डि'झ़ाइअ(र्)/ *ना* १ [*गण, अगण*] तीव्र इच्छा, अभिलाषा, लालसा, वासना : *no ~ to be rich/for wealth, श्रीमंत होण्याची/संपत्तीची लालसा नाही.* २ [*गण*] वांछित/इच्छित गोष्ट. **desire** *क्रि* [*सक*] (*औप*) मनापासून इच्छिणे, अभिलाषा धरणे.

desist /ढि'झ़िस्ट्/ *क्रि* [*अक*] (*from*)// (*औप*) एखादी गोष्ट करणे थांबवणे, सोडून देणे.

desk /डेस्क्/ *ना* [*गण*] सपाट किंवा कलती फळी असलेले वाचन, लेखन किंवा इतर काम यासाठी वापरायचे टेबल, लिहिण्याचा बाक, मेज. **,desk-top 'publishing** *ना* [*अगण*] पुस्तकांची वगैरे जुळणी आणि छपाई संगणक आणि लेझर प्रिन्टरच्या साहाय्याने करणे.

desolate /'डेसलद्/ *वि* १ (स्थलाबाबत) निर्जन, ओसाड, उजाड, निर्मनुष्य. २ एकटा आणि उदास. **desolation** /,डेस'लेइश्न्/ *ना* [*अगण*] उजाडपणा; विषण्णता, खिन्नता, उदासीनता.

despair /डि'स्पेअ(र्)/ *ना* [*अगण*] निराशा, नैराश्य, हताशपणा. **despair** *क्रि* [*अक*] (*of*)// निराश होणे, आशा सुटणे, मनाने खचणे : *~ of ever getting better, सुधारण्याची आशा सुटणे.*

despatch = DISPATCH.

desperate /'डेस्परद्/ *वि* १ निराशाजनक परिस्थिती सुधारण्यास वाट्टेल ते करायला तयार असणारा, जिवावर उदार, बेताल. २ प्रत्येक गोष्ट फसल्यानंतर शेवटचा उपाय म्हणून केलेला, अखेरचा, निकराचा : *a ~ attempt to save her, तिला वाचविण्याचा अखेरचा प्रयत्न.* ३ फार मोठी गरज असलेला, कमालीची गरज असलेला : *~ for money, पैशाची भयानक गरज असलेला.* ४ फार कठीण, हलाखीचा : *a ~ situation, कठीण परिस्थिती/हलाखीची परिस्थिती.* **desperately** *क्रिवि* हलाखीने, भयानक, फार वाईटरीत्या. **desperation** /,डेस्प'रेइश्न्/ *ना* [*अगण*] उद्विग्नता, उद्वेग; हातघाई.

despicable /डि'स्पिकब्ल्/ *वि* तिरस्करणीय, घृणास्पद.

despise /डि'स्पाइझ़्/ *क्रि* [*सक*] महत्त्वाचा नाही म्हणून किंवा क्षुल्लक आहे म्हणून

तिरस्कार वाटणे, तुच्छ लेखणे, कःपदार्थ मानणे.

despite /डि'स्पाइट्/ *शब्दयो* (विरोध दाखविण्यासाठी वापर) : *still a clear thinker, ~ his old age, वार्धक्य असूनही (किंवा याही वयात) स्वच्छपणे विचार करणारा.*

despondent /डि'स्पॉन्डन्ट्/ *वि* निराश झालेला, विषण्ण, खिन्न, उदास. **despondency** /-डन्सि/ *ना* [*अगण*] विषाद, विषण्णता, नैराश्य. **despondently** *क्रिवि* निराशेने, विषण्णतेने.

despot /'डेस्पॉट्/ *ना* [*गण*] अमर्याद सत्ता असलेला – विशेषतः तिचा दुरुपयोग करणारा – शासक, अनियंत्रित आणि जुलमी सत्ताधीश. **despotic** /डि'स्पॉटिक्/ *वि* जुलमी, बेबंद.

dessert /डि'झऽट्/ *ना* [*गण, अगण*] जेवणानंतर खायचे गोड पक्वान्न, मुखशुद्धीची मिठाई. **des'sert spoon** *ना* [*गण*] लांबट गोलाकार मध्यम आकाराचा चमचा.

destination /,डेस्टि'नेइश्न्/ *ना* [*गण*] एखादी गोष्ट/व्यक्ती जिकडे जात आहे ते ठिकाण, इष्टस्थळ, मुक्कामाचे ठिकाण.

destined /'डेस्टिन्ड्/ *वि* १ योजलेला, निश्चित असलेला, ठरवलेला, पूर्वयोजित : *She was ~ to become famous, तिची सुप्रसिद्धी विधिलिखित होती.* २ *for//* -कडे जाणारा; पूर्वनियोजित स्थळाकडे जाणारा.

destiny /'डेस्टिनि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*गण*] नियतीने ठरविलेले भविष्य, प्राक्तन, प्रारब्ध. २ [*अगण*] नियती, दैव.

destitute /'डेस्टिट्यूट्; *अमे* -टूट्/ *वि* अन्नवस्त्रनिवारा नसलेला, अनाथ, निराश्रित, बेघर. **destitution** /,डेस्टि'ट्यूश्न्; *अमे* -टू-/ *ना* [*अगण*] निराश्रितपणा, निराधारपणा.

destroy /डि'स्ट्रॉइ/ *क्रि* [*सक*] १ तुकडे करणे, मोडणे, भंग करणे; शेवट करणे, नाश/नष्ट करणे. २ आजारी प्राण्याला मारणे किंवा ठार करणे. **destroyer** *ना* [*गण*] (क) नष्ट करणारी व्यक्ती किंवा गोष्ट, संहारक, नाशक. (ख) जलद जाणारी लहान युद्धनौका, विनाशिका.

destruction /डि'स्ट्रक्श्न्/ *ना* [*अगण*] विध्वंस; नाश, विनाश, संहार. **destructive** /-क्टिव्ह्/ *वि* विध्वंसक, मोडतोड करणारा, विनाशकारी, संहारक; नष्ट करण्याची आवड असलेला, विध्वंसप्रिय, विघातक.

detach /डि'टॅच्/ *क्रि* [*सक*] सोडून वेगळे करणे, मोकळे करून विलग करणे, निराळा करणे/काढणे, वियुक्त करणे. **detached** *वि* (क) (घराबाबत) दुसऱ्या (घराला) न जोडलेले, स्वतंत्र. (ख) संबंध नसलेला, अलग, अलिप्त; भावना दूर ठेवलेला, तुटक, पाघळून न जाणारा. **detachment** ,*ना* (क) [*अगण*] अलिप्तता; तुटकपणा, कोरडेपणा. (ख) [*गण*] मुख्य फलटणीतून पाठवलेला सैनिकांचा वेगळा गट, तुकडी.

detail^1 /'डीटेइल्; *अमे* डि'टेइल्/ *ना* [*गण, अगण*] छोटेसे पण विशिष्ट असे वास्तविक किंवा असा घटक, बारीकसारीक गोष्ट, तपशील : *describe sth in ~, एखाद्या गोष्टीचे तपशीलवार वर्णन करणे.*

detail^2 /'डीटेइल्; *अमे* डि'टेइल्/ *क्रि* [*सक*] १ तपशीलाने वर्णन करणे, सविस्तर वर्णन करणे. २ खास कामगिरीवर नेमणे, कामावर विशेष नेमणूक करणे.

detain /डि'टेइन्/ *क्रि* [*सक*] सोडून जाण्यास प्रतिबंध करणे, डांबून ठेवणे, अडकवणे, रोखणे, स्थानबद्ध करणे; खोळंबा/उशीर करणे. **detainee** /,डीटेइ'नी/ *ना* [*गण*] वरिष्ठ अधिकाऱ्यांनी खास करून राजकीय कारणांसाठी अडकवून ठेवलेली व्यक्ती, स्थानबद्ध व्यक्ती.

detect /डि'टेक्ट्/ *क्रि* [*सक*] अस्तित्व किंवा उपस्थिती शोधून काढणे, उघडकीस आणणे, तपास लावणे. **detection** *ना* [*अगण*] तपास, शोध. **detective** *ना* [*गण*] गुन्हा शोधून काढणारा माणूस – विशेषतः पोलीस अधिकारी, गुप्त पोलीस, गुप्तचर. **detector** *ना* [*गण*] एखादी गोष्ट शोधण्याचे साधन, शोधक, अभिमापक.

detention /डि'टेन्श्न्/ *ना* १ [*अगण*] खास करून राजकीय कारणासाठी एखाद्याला केलेली स्थानबद्धता, अटकाव. २ [*गण, अगण*] शाळा सुटल्यानंतर वाईट वागणाऱ्या मुलांना थांबवून ठेवण्याची शिक्षा.

deter /डि'टऽ(र्)/ *क्रि* (**-rr-**) [*सक*] (*from*)// एखाद्याला एखादी गोष्ट करण्यापासून परावृत्त

करणे किंवा त्यास प्रतिबंध करणे, मोडता घालणे, पराङ्मुख करणे.

detergent /डि'टऽजन्ट्/ *ना* [*गण, अगण*] कपडे, भांडी वगैरे स्वच्छं करण्यासाठी वापरायची पावडर किंवा द्रवपदार्थ, धुलाई पावडर किंवा द्रव, निर्मलक.

deteriorate /डि'टिअरिअरेइट्/ *क्रि* [*अक*] आणखी बिघडणे, खराब होणे, खालावणे : *His health ~d, त्याची प्रकृती खालावली.* **deterioration** /डि,टिअरिअ'रेइश्न्/ *ना* [*अगण*] ऱ्हास, खालावणे, उतरती कमान, अपकर्ष.

determination /डि,टऽमि'नेइश्न्/ *ना* [*अगण, गण*] १ एखादी गोष्ट यशस्वीपणे करण्याची जिद्द, निश्चय, मनसुबा, निर्धार : *a ~ to improve one's English, स्वतःचे इंग्रजी सुधारण्याचा निर्धार.* २ ठरवणे, पक्के करणे, निर्धारण.

determine /डि'टऽमिन्/ *क्रि* १ [*सक*] ठरवणे, निश्चित करणे, नियंत्रित करणे किंवा कारणीभूत होणे : *Our living standards are ~d by our income, आपल्या उत्पन्नातूनच आपले राहणीमान निश्चित होते किंवा ठरते.* २ [*सक*] शोधून काढणे, अचूक निदान करणे : *~ what happened, काय घडले याचे अचूक निदान करणे.* ३ [*सक*] ठरवणे, निश्चित/पक्के करणे : *~ party policy, पक्षाचे धोरण ठरवणे.* ४ [*सक*] (*औप*) एखादी गोष्ट करण्याचा ठाम निश्चय करणे, संकल्प सोडणे. **determined** *वि* एखादी गोष्ट यशस्वीपणे करण्याचा निर्धार असलेला, निग्रह केलेला, करारी : *~d to win, जिंकण्याचा निग्रह केलेला.*

deterrent /डि'टेरन्ट्; *अमे* -'टऽ-/ *ना* [*गण*] एखाद्याला एखादी गोष्ट करण्यापासून परावृत्त करणारी गोष्ट, प्रतिरोधक, परावर्तक, निवारक गोष्ट : *the nuclear ~, अण्वस्त्रांचा प्रतिरोधक म्हणजेच युद्ध सुरू करण्यास देशांना नाउमेद करणारी अशी अण्वस्त्रांची भीती.*

detest /डि'टेस्ट्/ *क्रि* [*सक*] तीव्र द्वेष वाटणे, तिरस्कार करणे, मनापासून तिटकारा असणे. **detestable** *वि* तिरस्करणीय, गर्हणीय, तिटकारा वाटण्याजोगा.

dethrone /डी'थ्रउन्/ *क्रि* [*सक*] सत्ताधीशाला पदच्युत करणे, राज्यभ्रष्ट करणे, गादीवरून खाली खेचणे.

detonate /'डेटनेइट्/ *क्रि* [*अक, सक*] स्फोट घडवणे, बार उडवणे. **detonation** /,डेट'नेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] बार, स्फोट, धडाका. **detonator** *ना* [*गण*] बॉम्बचा स्फोट करण्याचा भाग, भडका उडवण्याचा भाग, स्फोटन यंत्र, विस्फोटक.

detour /'डीटुअ(र्); *अमे* डि'टुअर्/ *ना* [*गण*] चक्कर, फेरी, वळसा; वेगळा/बदललेला मार्ग : *make a ~ round the floods, पुराभोवती वळसा मारणे.*

detract /डि'ट्रॅक्ट्/ *क्रि* [*अक*] *from*// एखाद्या गोष्टीची किंमत किंवा परिणाम कमी करणे.

detriment /'डेट्रिमन्ट्/ *ना* [*अगण*] नुकसान; हानी : *She works hard to the ~ of her health, तिचे फार काम करणे तिच्या तब्बेतीला हानीकारक आहे* ○ *without ~ to her health, तिच्या तब्बेतीला हानी न पोहोचवता.* **detrimental** /,डेट्रि'मेन्ट्ल्/ *वि* (*to*)// हानीकारक, उपद्रवकारक, घातक.

deuce /ड्यूस्; *अमे* डूस्/ *ना* [*गण*] (टेनिसमधे) प्रत्येक खेळाडूला मिळालेले ४० गुण.

devalue /,डी'व्हॅल्यू/ *क्रि* [*सक*] चलनाची किंमत कमी करणे, अवमूलन/अवमूल्यन करणे. **devaluation** /,डीव्हॅल्यु'अेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] अवमूल्यन/अवमूलन.

devastate /'डेव्हस्टेइट्/ *क्रि* [*सक*] पूर्णपणे नष्ट करणे, समूळ नाश/उच्छेद करणे, उध्वस्त करणे : (*ला*) *~d by his death, त्याच्या मृत्यूमुळे उद्ध्वस्त झालेले.* **devastation** /,डेव्ह'स्टेइश्न्/ *ना* [*अगण*] विध्वंस, नासधूस, नाश, उच्छेद.

develop /डि'व्हेलप्/ *क्रि* १ [*अक, सक*] वाढणे/वाढवणे, विकसित होणे/करणे, मोठे करणे, प्रगल्भ करणे : *The argument ~ed into a fight, चर्चेचे पर्यवसान मारामारीत झाले.* २ [*अक, सक*] हळूहळू परिणत होणे, हळूहळू अस्तित्वात येणे किंवा आणणे : *~ a cough, खोकला येऊ/वाढू लागणे.* ३ [*सक*] चित्रफितीवरून छायाचित्र तयार करणे, फोटो घेतलेल्या फिल्मवरून निगेटिव्ह तयार करणे, चित्रव्यक्ती करणे. ४ [*सक*] इमारतीच्या

बांधकामासाठी जमीन विकसित करून त्याची किंमत वाढविणे. **developer** *ना* [*गण*] जमीन विकसित करणारी व्यक्ती किंवा कंपनी, विकासक. **development** *ना* [*अगण*] (क) विकास, वाढ. (ख) नवीन घटना किंवा नवीन परिस्थिती, ताजी घडामोड. (ग) नवीन इमारतींनी विकसित झालेला भूभाग.

deviate /'डीव्हिएइट/ *क्रि* [*अक*] *from//* सर्वमान्य, सर्वसाधारण वगैरे असे जे आहे त्यापासून दूर जाणे, चळणे, मार्गापासून ढळणे, विचलित होणे, बहकणे, उल्लंघन करणे. **deviation** /,डीव्हि'अेइशन्/ *ना* [*गण, अगण*] मार्गच्युती, विपथन, उल्लंघन, विचलन, अपगम.

device /डि'व्हाइस्/ *ना* [*गण*] १ विशिष्ट हेतूने केलेली वस्तू, शोधून काढलेले यंत्र. २ युक्ती; क्लृप्ती, करामत.

devil /'डेव्ह्ल्/ *ना* [*गण*] १ **the Devil** दुष्कर्माचा सर्वात वरचा कर्ता; सैतान. २ वाईट भूत. ३ (*अनौप*) खोडकर माणूस, डॅम्बिस, डामरट. ४ (*वाक्प्र*) **devil's advocate** वादासाठी एखाद्यावर टीका करणारा माणूस.

devious /'डीव्हिअस्/ *वि* धूर्त, लबाड; फसवणारा, कपटी.

devise /डि'व्हाइझ्/ *क्रि* [*सक*] (एखादी योजना, पद्धत वगैरे) योजणे, तयार करणे, शोधून काढणे.

devoid /डि'व्हॉइड्/ *वि* *of//* एखाद्या गोष्टीशिवाय, विरहित, विना, वाचून : *~ of any ability, कोणत्याही क्षमतेविना/ सामर्थ्याविना.*

devolution /,डीव्ह'लूशन्; *अमे* ,डेव्ह-/ *ना* [*अगण*] केन्द्र सरकारकडून राज्य सरकारांकडे सत्तेचे हस्तांतरण.

devote /डि'व्हउट्/ *क्रि* [*सक*] *to//* (स्वतःला, स्वतःचा वेळ, पैसा वगैरे) देऊन टाकणे, वाहून टाकणे, अर्पण करणे. **devoted** *वि* (*to*)// खूप ममताळू, एकनिष्ठ, भक्त, समर्पित. **devotee** /,डेव्ह'टी/ *ना* [*गण*] एखाद्या गोष्टीला वाहून घेतलेला माणूस, भक्त. **devotion** /डि'व्हउशन्/ *ना* (क) [*अगण*] दृढ, नितांत प्रेम, भक्ती. (ख) [*गण, बहुधा ब.व*] प्रार्थना, भजन.

devour /डि'व्हाउ·अ(र्)/ *क्रि* [*सक*] १ अधाशीपणे किंवा भुकेने व्याकूळ होऊन खाणे, गट्ट करणे. २ (*ला*) गिळंकृत करणे, वापरून टाकणे किंवा संपवणे, नष्ट करणे : *forests ~ed by fire, आगीने भस्मसात केलेली जंगले.*

devout /डि'व्हाउट्/ *वि* १ खूप धार्मिक, भाविक. २ (प्रार्थना, सदिच्छा वगैरेबाबत) श्रद्धापूर्ण; मनःपूर्वक, कळकळीचा.

dew /ड्यू; *अमे* डू/ *ना* [*अगण*] रात्री थंड पृष्ठभागावर गोळा होणारे पाण्याचे थेंब, दव. **dewy** *वि* दवाचा. **'dewdrop** *ना* [*गण*] दवबिंदू.

dexterity /,डेक्'स्टेरटि/ *ना* [*अगण*] कौशल्य – विशेषतः हातांचे, कसब, हस्तनैपुण्य, शिताफी. **dexterous, dextrous** /'डेक्स्ट्रस्/ *वि* हाताचा कुशल; हस्तकुशल.

diabetes /,डाइअ'बीटीझ्/ *ना* [*अगण*] रक्तात फाजील साखर असण्याचा रोग, मधुमेह. **diabetic** /-'बेटिक्/ *वि, ना* [*गण*] मधुमेहाच्या रोग्याचा किंवा रोग्यासाठी, मधुमेही.

diabolical /,डाइअ'बॉलिक्ल्/ *वि* १ अतिदुष्ट, अतिक्रूर. २ (*अनौप*) फार वाईट : *~ weather, वाईट हवा.*

diagnose /'डाइ·अग्नउझ्/ *क्रि* [*सक*] (आजाराची किंवा चुकीची) काळजीपूर्वक तपासणी करून निदान करणे. **diagnosis** /,डाइ·अग्'नउसिस्/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-noses** /सीझ्/) (आजाराचे किंवा चुकीचे केलेले) निदान. **diagnostic** /,डाइ·अग्'नॉस्टिक्/ *वि* लक्षणसूचक, निदान करणारा.

diagonal /डाइ'ॲगन्ल्/ *ना* [*गण*], *वि* आयत किंवा चौरसाच्या समोरासमोरील कोनबिंदू जोडणारी रेषा, कर्ण, कणरिषा. **diagonally** *क्रिवि* कर्णातून.

diagram /'डाइअग्रॅम्/ *ना* [*गण*] एखादी गोष्ट स्पष्ट करण्यासाठी किंवा उदाहरणाने दाखविण्यासाठी काढलेले रेखाचित्र किंवा नकाशा, आकृती, परिलेख. **diagrammatic** /,डाइअग्र'मॅटिक्/ *वि* आकृतीरूप.

dial /'डाइअल्/ *ना* [*गण*] १ आकडे काढलेली

घड्याळाची किंवा मापकाची तबकडी. २ आकडे घातलेली, भोके असलेली, आणि ते आकडे फिरवून फोन लावायची सोय असलेली फोनवरची फिरती तबकडी. **dial** *क्रि* (**-ll-**; *अमे* **-l-**) [*अक, सक*] टेलिफोनच्या तबकडीवरून नंबर फिरवणे. **'dialling tone** *ना* [*गण*] फोनचा नंबर फिरवण्यापूर्वी फोनवर ऐकू येणारा आवाज.

dialect /'डाइअलेक्ट्/ *ना* [*गण, अगण*] एखाद्या भूप्रदेशाच्या एखाद्या भागात बोलली जाणारी पोटभाषा, बोली : *the Yorkshire ~, यॉर्कशायर बोली.*

dialogue (*अमे* **-log**) /'डाइअलॉग्; *अमे* -लॉऽग/ *ना* १ [*अगण*] दोन गटांतील प्रतिनिधींमधला संवाद : *~ between the superpowers, महासत्तांमधील संवाद.* २ [*गण, अगण*] नाटक किंवा प्रत्यक्ष जीवनातील संभाषण किंवा बोलणे.

diameter /डाइ'ॲमिट(र्)/ *ना* [*गण*] वर्तुळमध्यातून काढलेली आणि वर्तुळाच्या दोन्ही बाजूंना स्पर्श करणारी रेषा, व्यास, वर्तुळमध्यरेषा.

diametrically /,डाइअ'मेट्रिक्लि/ *क्रिवि* पूर्णपणे : *~ opposed, अगदी विरुद्ध.*

diamond /'डाइअमन्ड्/ *ना* १ [*गण, अगण*] अत्यंत कठिण, दैदिप्यमान असा एक मौल्यवान खडा, हिरा. २ [*गण*] समभुज पण काटकोन नसलेला चौकोन. ३ [*गण*] अशा चौकोनांचा छाप असलेला खेळायचा पत्ता, चौकटचे पान. **,diamond 'jubilee** *ना* [*गण*] एखाद्या महत्त्वाच्या घटनेचा ६० वा वार्षिक दिन, हीरक महोत्सव.

diaper /'डाइअप(र्); तसेच *अमे* 'डाइपर/ *ना* [*गण*] (*अमे*) कपडे स्वच्छ ठेवण्यासाठी लहान मुलाच्या पायावर सोडायचा घडीचा रुमाल.

diaphragm /'डाइअफ्रॅम्/ *ना* [*गण*] १ छाती आणि पोट यांच्यामधला स्नायू, मध्यपटल. २ एखाद्या उपकरणातील (उदा टेलिफोन रिसीव्हर) पातळ, कंप पावणारी चकती.

diarrhoea (*अमे* **-rrhea**) /,डाइअ'रिअ/ *ना* [*अगण*] वारंवार होणारे पाण्यासारखे पातळ जुलाब, अतिसार, ढेंढाळी, हगवण.

diary /'डाइअरि/ *ना* [*गण*] (**-ies**) रोजच्या घटना, भेटी वगैरे लिहून ठेवण्याची वही, दैनंदिनी, रोजनिशी : *keep* (ie write regularly in) *a ~, रोजनिशी ठेवणे (म्हणजे लिहिणे).*

dice /डाइस्/ *ना* [*गण*] (*ब.व* **dice**) आकड्यांसाठी ठिपके काढलेला चौकोनी आकाराचा आणि खेळात वापरायचा फासा. **dice** *क्रि* [*सक*] १ (अन्नपदार्थ) लहान चौकोनी आकारात कापणे, वड्या कापणे. २ (*वाक्प्र*) **dice with 'death** जिवावर उदार होणे, जिवाची बाजी लावणे.

dictate /डिक्'टेइट्; *अमे* 'डिक्टेइट्/ *क्रि* [*अक, सक*] १ (पत्र वगैरे) दुसऱ्याने लिहिण्यासाठी मोठ्याने सांगणे, मजकूर सांगणे. २ अधिकारवाणीने हुकूम देणे किंवा सांगणे, फर्मावणे, आज्ञा करणे. **dictation** /-टेइश्न्/ *ना* १ [*अगण*] लेखनार्थ मोठ्याने सांगण्याची कृती; हुकूम सोडण्याची कृती. २ [*गण*] मोठ्याने सांगितल्यावर लिहिलेला मजकूर, श्रुतिलेखन.

dictator /,डिक्'टेइट(र्); *अमे* 'डिक्टेइटर/ *ना* (*अधिक्षेपी*) एखाद्या देशाचा सर्वसत्ताधीश, हुकूमशहा. **dictatorial** /,डिक्ट'टॉऽरिअल्/ *वि* सर्वसत्ताधाऱ्याचा, हुकूमशाही. **dictatorship** *ना* [*गण, अगण*] हुकूमशहाचे शासन (असणारा देश), हुकूमशाही.

diction /'डिक्श्न्/ *ना* [*अगण*] एखाद्याच्या बोलण्यातील स्पष्टपणा.

dictionary /'डिक्शन्रि; *अमे* -नेरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) एखाद्या भाषेतील वर्णानुक्रमाने लावलेल्या आणि अर्थ दिलेल्या शब्दांचा ग्रंथ, शब्दकोश.

did DO चा *भूत.*

didn't म्हणजे did not ➪ DO

die^1 /डाइ/ *ना* [*गण*] नाणी, पदके वगैरेवर छाप उठविण्याचा धातूचा ठोकळा, शिक्का, साचा, मुद्रा.

die^2 /डाइ/ *क्रि* (*वर्त. वि* **dying** /'डाइ·इङ्/) [*अक*] १ मरणे, मृत होणे; आयुष्याचा अंत होणे, आयुष्य संपणे. २ (*ला*) अस्तित्व संपणे : *love that will never ~, कधीही न संपणारे प्रेम.* ३ *for; to//* एखाद्या गोष्टीची तीव्र इच्छा

असणे, आस लागणे, आसुसणे : *dying for a drink, पेय पिण्यास आसुसलेला* ○ *dying to tell her, तिला सांगण्यासाठी अधीर झालेला.* ४ (*वाक्प्र*) **die laughing** (*अनौप*) फार हसणे, पोट दुखेपर्यंत हसणे. ५ (*क्रिब*) **die away** हळूहळू कमी होऊन संपणे, थंडावणे, निमणे. **die down** जोर कमी होणे, मंदावणे. **die out** पूर्णपणे लुप्त होणे, नष्ट होणे.

diesel /'डीझ़्ल्/ *ना* १ [*गण*] डिझेल इंजिन असलेले वाहन – विशेषतः आगगाडी, डिझेलवर चालणारी गाडी. २ [*अगण*] (तसेच **'diesel oil**) डिझेल इंजिनात इंधन म्हणून वापरायचे जड तेल. **'diesel engine** *ना* [*गण*] अंतर्ज्वलनावर चालणारे आणि बस, आगगाडी, लॉरी वगैरेत वापरले जाणारे इंजिन.

diet /'डाइअट्/ *ना* १ [*गण, अगण*] नेहमी खाण्याचे अन्न, आहार. २ [*गण*] वजन कमी करण्यासाठी खायचे अन्न, पथ्य : *be/go on a ~, पथ्य पाळणे/करणे/असणे.* **diet** *क्रि* [*अक*] वजन कमी करण्यासाठी खास अन्न घेणे.

differ /'डिफ(र्)/ *क्रि* [*अक*] १ (*from*)// वेगळे/भिन्न असणे. २ मतभेद असणे, सहमत नसणे : *I'm sorry to ~ with you on that, याबात माझे तुझ्याशी मतभेद आहेत याचे मला वाईट वाटते.* **difference** /'डिफ्रन्स्/ *ना* १ [*गण, अगण*] भेद, वेगळेपणा, असमानता, वैधर्म्य : *the ~ in their ages, त्यांच्या वयातील फरक.* २ [*अ.व*] दोन गोष्टींतील फरक किंवा अंतर, तफावत : *The ~ between 7 and 18 is 11, १८ आणि ७ मधे ११ चा फरक आहे.* ३ [*गण*] मतभेद. ४ (*वाक्प्र*) **not make any/the slightest difference** फारसा फरक न पडणे म्हणजेच फरक महत्त्वाचा नसणे, (फरकामुळे) न बिघडणे.

different /'डिफ्रन्ट्/ *वि* १ (*from; अनौप to; अमे than*)// एखाद्या प्रमाणे/सारखे नसलेला, वेगळा, एखाद्याहून भिन्न. २ अलग, वेगवेगळा; स्पष्टपणे निराळा, विभिन्न : *several ~ people, खूप निरनिराळे लोक.*

differentiate /ˌडिफ'रेन्शिअेइट्/ *क्रि* [*अक, सक*] *between A and B; A from B*// दोन किंवा अधिक गोष्टींतील फरक दाखवणे किंवा वैधर्म्य दाखवणे; एखाद्या गोष्टीचा इतरांपासूनचा फरक दाखवणे, फरक करणे.

difficult /'डिफिकल्ट्/ *वि* १ सोपा नसलेला, अवघड; कौशल्य किंवा प्रयत्न यांची आवश्यकता असलेला, कठीण, दुष्कर, श्रमाचा, कष्टकारक : *find sth ~ to understand, एखादी गोष्ट समजायला अवघड वाटणे.* २ (लोकांबाबत) लवकर प्रसन्न/खुष न होणारा, दुराराध्य, मर्जी संपादण्यास अवघड, सुखासुखी न पावणारा; चटकन् रागावणारा किंवा दुखावणारा. **difficulty** *ना* (*ब.व* **-ies**) १ [*गण*] समजायला अवघड अशी गोष्ट, अडचण, शंका. २ [*अगण*] कठीण भाग, कठीणपणा, काठिण्य, बिकटपणा, दुर्बोध भाग.

diffident /'डिफिडन्ट्/ *वि* आत्मविश्वास नसलेला, भेदरट, शामळू; लाजरा, संकोची, भिडस्त. **diffidence** /-डन्स्/ *ना* [*अगण*] स्वतःविषयीचा अविश्वास.

diffuse /डि'फ्यूझ्/ *क्रि* [*अक, सक*] (प्रकाशाबाबत) चहूबाजूंनी पसरणे किंवा पसरवणे, फाकणे, विखुरणे. **diffuse** /डि'फ्यूस्/ *वि* १ विखुरलेला, पसरलेला : *~ light, विकीर्ण प्रकाश.* २ शब्दबंबाळ, शब्दावडंबर असलेला, पाल्हाळिक; अघळपघळ, सैल. **diffusion** /-ऊझ्न्/ *ना* [*अगण*] प्रसारण, विकिरण.

dig^1 /डिग्/ *ना* [*गण*] १ लहान ढुशी, कोपरखळी : *a ~ in the ribs, बरगडीत दिलेली ढुशी.* २ टीकात्मक शेरा, कोपरखळी : *That was a ~ at Ray, रेला मारलेली ती कोपरखळी होती.* ३ पुराणवस्तूशास्त्रीय उत्खनन. ४ **digs** [*ब.व*] (*ब्रि*) लॉज.

dig^2 /डिग्/ *क्रि* (**-gg-**, *भूत, भूत वि* **dug** /डग्/) १ [*अक, सक*] (जमीन) कुदळीने वगैरे खणणे, खोदणे, उकरणे; खणून रस्ता करणे, खोदून वाट काढणे; (बीळ वगैरे) पाडणे. २ [*सक*] खणून मिळवणे : *~ potatoes, खणून बटाटे काढणे.* ३ (*क्रिब*) **dig sb/sth out (of sth)** (**क**) एखादी गोष्ट उकरून काढणे. (**ख**) (*अनौप*) शोधून/हुडकून काढणे. **dig sth up** उकरून एखादी गोष्ट दूर करणे किंवा नीट तपास करून एखादी गोष्ट शोधणे.

digest^1 /डि'जेस्ट्, डाइ-/ *क्रि* १ (**क**) [*सक*] शरीराच्या उपयोगासाठी पोटामधे अन्नाचे

रूपान्तर करणे, पचन करणे, (अन्न) पचवणे. (ख) [*अक*] (अन्नाबाबत) पचणे, पचन होणे. २ [*सक*] पूर्णपणे समजणे.

digest^2 /'डाइजेस्ट्/ *ना* [*गण*] छोटे संक्षिप्त वृत्त; सारांश.

digit /'डिजिट्/ *ना* [*गण*] १ ० ते ९ या दहामधला कोणताही एक अंक. २ (*औप*) हाताचे किंवा पायाचे बोट. **digital** *वि* अंकांनी राशी मोजण्याचा, अंकीय, अंकराशीचा : *a ~al watch, अंक असलेले घड्याळ.*

dignified /'डिग्निफाइड्/ *वि* प्रतिष्ठा दाखविणारा, प्रतिष्ठित.

dignitary /'डिग्निटरि; *अमे* -टेरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) (*औप*) प्रतिष्ठित माणूस, मोठी असामी, बडा माणूस.

dignity /'डिग्निटि/ *ना* १ [*अगण*] शांत आणि समजुतदार वर्तन, भारदस्त वागणूक. २ [*अगण*] आदर वाटावा असा गुण; खरी किंमत किंवा खरी प्रतिष्ठा. ३ (*वाक्प्र*) **beneath one's dignity** एखाद्याने करावे असे महत्त्वाचे नसणे, कमी/हलक्या दर्जाचे असणे.

digress /डाइ'ग्रेस्/ *क्रि* [*अक*] (*from*)// लेखनात किंवा भाषणात मूळ विषय सोडून दुसरीकडे जाणे, भरकटणे, विषयान्तर करणे. **digression** /-'ग्रेश्न्/ *ना* [*अगण, गण*] विषयान्तर, अवान्तरपणा, फापटपसारा.

digs ➪ DIG^1 ४.

dike (तसेच **dyke**) /डाइक्/ *ना* [*गण*] १ पाणी अडविण्याचा मातीचा बांध, भित्ती. २ खंदक.

dilapidated /डि'लॅपिडेइटिड्/ *वि* (इमारतींबाबत) जुन्या आणि ढासळणाऱ्या, मोडकळीला आलेल्या, पडित.

dilate /डाइ'लेइट्/ *क्रि* [*अक, सक*] (खास करून डोळ्यांबाबत) मोठे होणे/करणे, विस्फारणे.

dilemma /डि'लेम/ *ना* [*गण*] दोन पैकी एकाची निवड करण्याचा अवघड प्रसंग, इकडे आड तिकडे विहीर अशी परिस्थिती, कात्रीत सापडण्याची स्थिती, शृंगापत्ती, द्विधा मनस्थिती.

diligent /'डिलिजन्ट्/ *वि* कष्टाळू, मेहनती, उद्योगी; काळजीपूर्वक प्रयत्न करणारा : *a ~ worker, कष्टाळू कामगार.* **diligence** /-जन्स्/ *ना* [*अगण*] मेहनत, कष्ट, व्यासंग. **diligently** *क्रिवि* मेहनतीने, काळजीपूर्वक.

dilute /डाइ'लूट्/ *क्रि* [*सक*] (*with*)// पाणी मिसळून एखाद्या द्रवाची तीव्रता कमी करणे, सौम्य करणे, फिका करणे. **dilution** /-'लूश्न्/ *ना* [*अगण, गण*] पातळ/कमजोर/सौम्य करण्याची क्रिया.

dim /डिम्/ *वि* (**-mer, -mest**) १ प्रखर नसलेला, मंद, अंधूक : *in a ~ light, अंधूक प्रकाशात.* २ पहाण्यास सोपा नाही असा, अस्पष्ट, धूसर. ३ (*ला*) अस्पष्ट, पुसट; संदिग्ध : *~ memories, अंधूक/पुसटशा आठवणी.* ४ (*अनौप*) हुशार नसलेला, मंद बुद्धीचा. ५ (*वाक्प्र*) **take a dim view of sth** एखादी गोष्ट चुकीची किंवा अयोग्य आहे असे समजणे. **dim** *क्रि* (**-mm-**) [*अक, सक*] मंद/अंधूक करणे; धूसर/पुसट होणे. **dimly** *क्रिवि* अंधूकपणे; पुसटपणे. **dimness** *ना* [*अगण*] अंधूकपणा.

dime /डाइम्/ *ना* [*गण*] दहा सेंटच्या किमतीचे एक अमेरिकन किंवा कॅनेडियन नाणे.

dimension /डि'मेन्श्न्/ *ना* १ [*गण*] लांबी, रुंदी किंवा उंची याचे मोजमाप, माप, परिमाण. २ **dimensions** [*ब.व*] व्याप्ती, विस्तार, परिसीमा : *the ~s of the problem, या प्रश्नाची व्याप्ती.* ३ [*गण*] (*ला*) बाजू, परिमाण, स्वरूप. **dimensional** /-शनल्/ (सामासिक विशेषणांत) अंकाने निर्देश केलेल्या परिमितीएवढा : *two-~al, द्विमिती, द्विपरिमाणात्मक.*

diminish /डि'मिनिश्/ *क्रि* [*अक, सक*] लहान होणे/करणे, कमी होणे/करणे : *Our chances of success are ~ing, आपल्या विजयाच्या शक्यता कमी होत आहेत.*

diminutive /डि'मिन्युटिव्ह्/ *वि* फार लहान, खुजा, लघु.

dimple /'डिम्प्ल्/ *ना* [*गण*] गालावरील किंवा हनुवटीखालील खळी.

din /डिन्/ *ना* [*अगण, अे.व*] मोठा कर्कश आवाज, घणघणाट. **din** *क्रि* (**-nn-**) (*क्रिब*) **din sth into sb** एखादी गोष्ट एखाद्याला

पुन्हापुन्हा सांगणे, ठाकून ठोकून सांगणे.

dine /डाइन्/ *क्रि* १ [*अक*] (*औप*) दिवसाचे मुख्य जेवण (बहुधा सायंकाळी) घेणे. २ (*क्रिव*) **dine out** हॉटेलात वगैरे बाहेर जेवण घेणे. **'dining-car** *ना* [*गण*] रेल्वेतील जेवणाचा डबा. **'dining-room** *ना* [*गण*] जेवणाची खोली.

dinghy /'डिङ्गि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) उघडी लहान बोट.

dingy /'डिन्जि/ *वि* (**-ier, -iest**) घाणेरडा दिसणारा, मळकट; निस्तेज, दुर्मुख. **dinginess** घाणेरडेपणा, मलीनता; दुर्मुखलेपणा.

dining ➪ DINE.

dinner /'डिन(र्)/ *ना* [*गण, अगण*] दुपारी किंवा उशिराने संध्याकाळी घेतलेले दिवसातले मुख्य जेवण. **'dinner-jacket** *ना* [*गण*] संध्याकाळच्या समारंभांसाठी पुरुषांनी घालायचे काळ्या रंगाचे जाकीट.

dinosaur /'डाइनसॉऽ(र्)/ *ना* [*गण*] सध्या अस्तित्वात नसलेला इतिहासपूर्व काळातील एक सरपटणारा प्राणी.

diocese /'डाइअसिस्/ *ना* [*गण*] ख्रिस्ती धर्माध्यक्ष किंवा बिशपच्या देखरेखीखालचा भाग.

dip /डिप्/ *क्रि* (**-pp-**) १ [*सक*] द्रवपदार्थात थोडावेळ बुडवणे, बुचकळणे. २ [*अक*] बुडणे, खाली जाणे; पडणे : *The sun ~ped below the horizon, सूर्य क्षितिजाखाली गेला.* ३ [*सक*] (प्रकाशकिरण) खाली करणे : *~ the headlights of a car, गाडीच्या दिव्यांचा झोत खाली वळवणे.* ४ (*क्रिव*) **dip into sth** (क) (शिल्लक टाकलेल्या पैशातून) खर्च करणे. (ख) (एखादे पुस्तक) थोडा वेळ वाचणे, चाळणे, वरवर पाहणे. **dip** *ना* १ [*गण*] बुडवण्याची कृती; वरवर चाळणे. २ [*गण*] बुडी, डुबी. ३ [*गण, अगण*] अन्न लावून खाण्याचा मलईसारखा पातळ पदार्थ. ४ [*गण*] खाली जाणारा उतार.

diphtheria /डिफ्'थिअरिअ/ *ना* [*अगण*] घशाचा गंभीर आजार, घटसर्प.

diphthong /'डिफ्थॉङ्; *अमे* -थॉऽङ्/ *ना* [*गण*] दोन स्वरांचा संयोग किंवा मिलाफ – उदा *pipe* या शब्दातील /आइ/, द्विस्वर.

diploma /डि'प्लउम/ *ना* [*गण*] विद्यार्थी परीक्षा वगैरे पास झाला आहे असे दाखविणारा अधिकृत कागद, शैक्षणिक गुणवत्ता पत्र, पदवी पत्र; पदविका.

diplomacy /डि'प्लउमसि/ *ना* [*अगण*] १ राष्ट्राराष्ट्रांतील संबंधांचे व्यवस्थापन, राजनीती. २ लोकांशी वागण्याचे कौशल्य; मुत्सद्देगिरी, चातुर्य.

diplomat /'डिप्लमॅट्/ *ना* [*गण*] परराष्ट्र संबंधांचे व्यवस्थापन करणारा, राजनीतिज्ञ. **diplomatic** /,डिप्ल'मॅटिक्/ *वि* १ राजनैतिक, राजनीतीबाबतचा : *work in the ~ic service, राजनैतिक सेवेत काम करणे.* २ वागण्यात कुशल; मुत्सद्दी, चतुर. **diplomatically** *क्रिवि* मुत्सद्देगिरीने, चातुर्याने.

dire /'डाइअ(र्)/ *वि* भयानक, भयंकर.

direct^{1} /डि'रेक्ट्, डाइ-/ *वि* १ सरळ जाणारा, थेट : *a ~ route, थेट मार्ग.* २ मधे कोणीही/काहीही नसलेला, साक्षात्, उघड : *a ~ result, उघड/धडधडीत परिणाम.* ३ मनमोकळा आणि प्रामाणिक; सरळमार्गी. ४ बरोब्बर, अगदी : *the ~ opposite, बरोब्बर उलट.* **direct** *क्रिवि* प्रवासात मधे खंड पडू न देता : *travel ~ to Rome, मधे कुठेही न थांबता सरळ रोमला जाणे.* **direct 'current** *ना* [*अगण*] फक्त एका दिशेने वाहणारा विद्युत्प्रवाह, सरल प्रवाह, दिष्ट धारा. **direct 'debit** *ना* [*गण*] स्वतःच्या खात्यावरून दुसऱ्या कुणाला पैसे काढू देण्याची बँकेला दिलेली सूचना. **directness** *ना* [*अगण*] थेटपणा, सरळपणा, रोखठोकपणा. **direct 'object** *ना* [*गण*] (*व्याकरण*) क्रियापदातील कृतीचा ज्यावर परिणाम होतो ते नाम, तो नामपदबंध किंवा ते नामवाचक वाक्य – उदा *He took the money* म्हणजे *त्याने पैसे घेतले* या वाक्यातील *the money* किंवा *पैसे* हे कर्म, प्रत्यक्ष कर्म. **direct 'speech** *ना* [*अगण*] बोलणाऱ्याचे प्रत्यक्ष भाषण, तोंडचे शब्द.

direct^{2} /डि'रेक्ट्, डाइ-/ *क्रि* [*सक*] १ एखाद्या ठिकाणी कसे जायचे ते (एखाद्याला) सांगणे, रस्ता सांगणे : *Can you ~ me to the station, please? कृपया मला स्टेशनचा रस्ता सांगता?* २ आयोजन करणे किंवा नियंत्रित करणे, सूत्रे सांभाळणे; व्यवस्था करणे, दिग्दर्शन

करणे : ~ *a project/film, प्रकल्पाची व्यवस्था करणे/चित्रपटाचे दिग्दर्शन करणे.* ३ देणे, वळवणे, लक्ष देणे : ~ *one's attention to a more important matter, अधिक महत्त्वाच्या गोष्टीकडे लक्ष देणे.* ४ (*औप*) आज्ञा करणे किंवा सूचना देणे.

direction /डि'रेक्श्न्; डाइ-/ *ना* १ [*गण*] जिकडे एखादा माणूस जातो किंवा बघतो किंवा एखादी गोष्ट जाते ती दिशा : *run off in the opposite ~, विरुद्ध दिशेला धूम ठोकणे.* २ **directions** [*ब.व*] सूचना. ३ [*अगण*] देखरेख, व्यवस्था, दिग्दर्शन : *under my ~, माझ्या देखरेखीखाली.*

directive /डि'रेक्टिव्ह्, डाय्-/ *ना* [*गण*] (*औप*) अधिकृत आदेश, निदेश.

directly /डि'रेक्द्लि, डाइ-/ *क्रिवि* १ सरळ/प्रत्यक्ष मार्गाने; बरोबर, अचूकपणे. २ लगेच, ताबडतोब. **directly** *उ.अव्यय* नाही तोच, तत्क्षणी : *I came ~ I knew, मला समजताच मी आलो.*

director /डि'रेक्ट(र्), डाइ-/ *ना* [*गण*] १ व्यवस्थापक – विशेषतः औद्योगिक कंपनीचा, संचालक. २ नाटक, चित्रपट यांचे दिग्दर्शन करणारा माणूस, दिग्दर्शक. **directorship** *ना* [*अगण*] संचालकपद.

directory /डि'रेक्टरि, डाइ-/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) टेलिफोन ग्राहकांची नावे, पत्ते आणि फोन नंबर असलेले पुस्तक, दूरध्वनी क्रमांक सूची, दूरसंचार निर्देशिका.

dirt /डऽट्/ *ना* [*अगण*] १ घाण – उदा धूळ, चिखल, कचरा. २ (*अनौप*) वाईट भाषण, कुटाळकी, घाणेरडे बोलणे; लोकापवाद, प्रवाद. ३ (*अनौप*) विष्टा, शी : *dog ~ on my shoe, माझ्या बुटांवर कुत्र्याची शी.* **,dirt 'cheap** *वि* (*अनौप*) फार स्वस्त, कवडी मोलाचा.

dirty /'डऽटि/ *वि* (**-ier, -iest**) १ स्वच्छ नसलेला, अस्वच्छ, खराब, घाणेरडा : ~ *water, घाणेरडे पाणी.* २ दुष्ट, क्रूर; अन्याय्य, अयोग्य, अनुचित : *a ~ trick, अयोग्य चलाखी.* ३ लैंगिक गोष्टींविषयी घाणेरडेपणाने बोलणारा, ग्राम्य, अश्लील : *a ~ joke, घाणेरडा/अश्लील विनोद.* ४ नापसंतीदर्शक : *give sb a ~ look, एखाद्याकडे नापसंतीदर्शक नजर टाकणे किंवा नजरेने पाहणे.* **dirty** *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] घाण करणे, खराब करणे.

disable /डिस्'एइब्ल्/ *क्रि* [*सक*] एखाद्याला शारीरिक हालचाल करणे अशक्य करणे, अपंग करणे. **disability** /,डिस'बिलटि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*गण*] असमर्थ किंवा अपंग करणारे असे काही. २ [*अगण*] (*औप*) अपंगत्व, विकलांगपणा. **disabled** *वि* अपंग, विकलांग. **disablement** *ना* [*अगण*] विकलांग होण्याची प्रक्रिया किंवा स्थिती, विकलांग अवस्था.

disabuse /,डिस'ब्यूझ्/ *क्रि* [*सक*] *of*// एखाद्याच्या डोक्यातील चुकीच्या कल्पना काढून टाकणे.

disadvantage /,डिसड्'व्हान्टिज्; *अमे* -'व्हॅन्-/ *ना* [*गण*] १ प्रतिकूल अवस्था किंवा स्थिती, तोटा. २ (*वाक्प्र*) **to sb's disadvantage** (*औप*) एखाद्याला अहितकारक, एखाद्याच्या विरुद्ध, गैरसोयीचा. **disadvantaged** *वि* सामाजिक किंवा आर्थिक गैरसोयींनी ग्रस्त, मागास. **disadvantageous** /,डिसॅड्व्हान्'टेइजस्; *अमे* -व्हॅन्-/ *वि* अहितकारी, तोट्याचा, हानीकारक.

disagree /,डिस'ग्री/ *क्रि* [*अक*] १ मतभिन्नता असणे, वेगळी मते असणे : *I ~ with you/with what you say, तुझ्याशी/तू काय म्हणतोस त्याच्याशी मी सहमत नाही.* २ वेगळे/विभिन्न असणे. ३ (*क्रिब*) **disagree with sb** (अन्नाबाबत) आजारी करणे, न मानवणे. **disagreeable** *वि* असुखकारक, न रूचणारा, अप्रिय. **disagreeably** *क्रिवि* कडवटपणे, फटकळपणे, कटकट करून. **disagreement** *ना* [*गण, अगण*] मतभेद, बेबनाव.

disappear /,डिस'पिअ(र्)/ *क्रि* [*अक*] १ नजरेआड होणे, दिसेनासा होणे. २ अस्तित्व संपणे, नष्ट होणे, नाहीसा होणे. **disappearance** *ना* [*गण, अगण*] नाहीसे होणे; गायब होणे; नष्ट होणे, नाश.

disappoint /,डिस'पॉइन्ट्/ *क्रि* [*सक*] अपेक्षित असे न घडणे किंवा न करणे, अपेक्षाभंग होणे/करणे. **disappointed** *वि* दुःखी, निराश, अपेक्षाभंग झालेला. **disap-**

pointing *वि* निराशाजनक, अपेक्षाभंग करणारा. **disappointingly** *क्रिवि* निराशाजनक रीतीने. **disappointment** *ना* १ [*अगण*] निराशा, अपेक्षाभंग. २ [*गण*] निराशा करणारा, काहीतरी निराशाजनक.

disapprove /ˌडिस'प्रूव्ह/ *क्रि* [*अक*] (*of*)// एखादी व्यक्ती किंवा गोष्ट वाईट आहे असे म्हणणे किंवा वाटणे, अमान्य करणे, नापसंती दाखवणे. **disapproval** *ना* [*अगण*] नापसंती, नामंजुरी.

disarm /डिस्'आम्/ *क्रि* १ [*सक*] एखाद्याची सर्व शस्त्रे काढून घेणे, एखाद्याला निःशस्त्र करणे. २ [*अक*] (देशाबाबत) शस्त्रास्त्रे (विशेषतः अण्वस्त्रे) वापरणे बंद करणे, निःशस्त्रीकरण करणे. ३ [*सक*] एखाद्याचा राग, विरोध कमी करणे, नरम करणे, राग वगैरे गळून पडेल असे करणे. **disarmament** *ना* [*अगण*] निःशस्त्रीकरण, अण्वस्त्रमुक्ती.

disarray /ˌडिस'रेइ/ *ना* [*अगण*] (*औप*) व्यवस्थापनातील घोळ, अव्यवस्था, गोंधळ : *in ~, गोंधळात.*

disassociate = DISSOCIATE.

disaster /डि'ज़ास्ट(र्); *अमे* -'ज़ॅस्-/ *ना* [*गण*] अचानक उद्‌भवलेले दुर्भाग्य, दुर्दैवाचा घाला. अरिष्ट; भयानक अपघात, अनर्थ, दुर्धर प्रसंग, दुर्घटना. **disastrous** /डि'ज़ास्ट्रस्; *अमे* -ज़ॅस्-/ *वि* भीषण, विदारक; अनर्थकारी, विल्हेवाट लावणारा. **disastrously** *क्रिवि* भीषणपणे, महाभयंकर रीतीने; भयानकपणे, वाट लावेल अशा पद्धतीने.

disband /डिस्'बॅन्ड्/ *क्रि* [*अक, सक*] (लोकांचा गट किंवा संघटना) फुटणे/फोडणे, विखरणे, विस्कळित होणे.

disbelieve /डिस्बि'लीव्ह्/ *क्रि* [*सक*] विश्वास न टाकणे, अविश्वास दाखवणे, शंका घेणे. **disbelief** /-बि'लीफ्/ *ना* [*अगण*] अविश्वास, शंका.

disc (तसेच खास करून *अमे* **disk**) /डिस्क्/ *ना* [*गण*] १ चपटी, पातळ, गोलाकार अशी काही वस्तू – उदा ध्वनिमुद्रिका, तबकडी. २ मणक्यातील लवचिक कूर्चा, अंतःकूर्चेची चकती : *a slipped ~, अंतःकूर्चा सरकणे.* **'disc jockey** *ना* [*गण*] आकाशवाणीवर किंवा डिस्को क्लबमधे लोकप्रिय गाण्यांच्या ध्वनिमुद्रिका लावणारा किंवा त्यांची ओळख करून देणारी व्यक्ती.

discard /डि'स्काड्/ *क्रि* [*सक*] पासून मुक्त होणे, त्याग करणे; टाकून/फेकून/सोडून देणे, झुगारणे.

discern /डि'सऽन्/ *क्रि* [*सक*] (*औप*) समजणे, ओळखणे, लक्षात येणे; प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहणे, दृष्टीस येणे. **discernible** *वि* दृष्टोत्पत्तीस पडणारा, दिसणारा. **discerning** *वि* (*पसंती*) सूक्ष्मदर्शी, विवेकी, शहाणा. **discernment** *ना* [*अगण*] विवेकबुद्धी, तीक्ष्ण बुद्धी, चाणाक्षपणा.

discharge /डिस्'चाऽज्/ *क्रि* १ [*सक*] (घरी वगैरे) जाण्यास (एखाद्याला) परवानगी देणे, एखाद्याला सोडणे; (एखाद्याला) दूर धाडणे. २ [*सक*] (*औप*) (कर्तव्य) करणे/बजावणे. ३ [*अक, सक*] (द्रव, वायू वगैरे) बाहेर टाकणे, विसर्जन करणे. ४ [*सक*] बोटीवरून (माल) उतरवणे, खाली करणे. ५ [*सक*] (*औप*) (ऋण/कर्ज) फेडणे. **discharge** /'डिस्चाऽज्/ *ना* १ [*अगण*] रवानगी, पाठवणी; उत्सर्जन/विसर्जन. २ [*अगण, गण*] विसर्जित केलेले किंवा बाहेर टाकलेले असे काही, स्राव.

disciple /डि'साइप्‌ल्/ *ना* [*गण*] धार्मिक किंवा राजकीय वगैरे पुढाऱ्याचा अनुयायी, शिष्य, चेला.

discipline /'डिसिप्लिन्/ *ना* १ (क) [*अगण*] आज्ञाधारकपणा, संयमन वगैरे गोष्टी शिकवण्याचे प्रशिक्षण, शिस्त. (ख) [*अगण*] अशा शिक्षणाचा परिणाम – उदा सैनिकांची शिस्त. २ [*अगण*] शिक्षा. ३ [*गण*] (*औप*) ज्ञानक्षेत्र, ज्ञानशाखा, विषय. **discipline** *क्रि* [*सक*] १ आज्ञाधारक करणे, शिस्त/वळण लावणे. २ शिक्षा करणे.

disclaim /डिस्'क्लेइम्/ *क्रि* [*सक*] (*औप*) (एखादी जबाबदारी) नाकारणे, अंग/हात झाडणे, कानावर हात ठेवणे.

disclose /डिस्'क्लउझ़्/ *क्रि* [*सक*] (क) एखादी गोष्ट जाहीर करणे, उघड करणे, प्रकट करणे. (ख) उजेडात आणणे, दाखवणे. **disclosure** /-'क्लउझ(र्)/ *ना* [*अगण, गण*]

प्रकटन; उघडकीस आलेली गोष्ट.

disco /'डिस्कउ/ (तसेच **discotheque** /'डिस्कोटेक्/) *ना* [*गण*] (*ब.व* **~s**) पॉप संगीताच्या ध्वनिमुद्रिका लावून लोक जिथे नाच करतात तो क्लब किंवा ती पार्टी वगैरे.

discolour (*अमे* **-or**) /डिस्'कँल(र्)/ *क्रि* [*अक, सक*] रंग बदलणे – वाईट रंग होणे, रंग पालटणे. **discoloration** /,डिस्कँल'रेइश्न्/ *ना* [*अगण, गण*] रंग-बदल, रंग विटण्याची क्रिया.

discomfort /डिस्'कँम्फट्/ *ना* (क) [*अगण*] सुखसोयीची कमतरता, गैरसोय; हलकीशी वेदना, किंचित् क्लेश. (ख) [*गण*] गैरसोय करणारी गोष्ट; तापदायक गोष्ट.

disconcert /,डिस्कन्'सऽट्/ *क्रि* [*सक*] पंचाईत करणे, अडचणीत आणणे, बेचैन करणे, काळजीत पाडणे, चिंतातुर करणे.

disconnect /,डिस्क'नेक्ट्/ *क्रि* [*सक*] *A (from B)*// एखादी गोष्ट दुसरीपासून वेगळी करणे, पृथक् करणे; संबंध तोडणे. **disconnected** *वि* (बोलण्यातील किंवा लेखनातील कल्पना/विचार याबाबत) असंबद्ध, असंकलित, पसरट.

disconsolate /डिस्'कॉन्सलट्/ *वि* (*औप*) दुःखी आणि निराश, उदास, कष्टी, विमनस्क. **disconsolately** *क्रिवि* उदासीनपणे, विषण्णतेने.

discontent /,डिस्कन्'टेन्ट्/ *ना* [*अगण*] (*with*)// असमाधान, असंतुष्टता. **discontented** *वि* अतृप्त, असंतुष्ट, असमाधानी.

discontinue /,डिस्कन्'टिन्यू/ *क्रि* [*सक*] (*औप*) शेवट करणे; बंद करणे, सोडून देणे.

discord /'डिस्कॉऽड्/ *ना* १ [*अगण*] (*औप*) मतभेद, मतभिन्नता, असहमती; भांडण, वाद. २ (क) [*अगण*] संगीताच्या सुरातील संवादीपणाचा अभाव, विसंवाद. (ख) [*गण*] घडलेला विसंवाद. **discordant** /डि'स्कॉऽडन्ट्/ *वि* विसंवादी.

discotheque = DISCO.

discount^1 /'डिस्काउन्ट्/ *ना* [*गण*] किमतीतील सूट.

discount^2 /डिस्'काउन्ट्; *अमे* 'डिस्काउन्ट्/ *क्रि* [*सक*] (एखादी गोष्ट) क्षुल्लक आहे किंवा खोटी आहे असे मानणे, जमेस न धरणे, कमी लेखणे.

discourage /डि'स्कँरिज्/ *क्रि* [*सक*] १ नाउमेद करणे, धैर्य खचवणे, हिरमोड करणे : *~d by failure, अपयशाने खचलेला/नाउमेद झालेला.* २ एखाद्याला एखादी गोष्ट करण्यापासून परावृत्त करणे, मोडता घालणे : *~ children from smoking, धूम्रपान करण्यापासून मुलांना परावृत्त करणे.* **discouragement** *ना* [*अगण, गण*] नाउमेद करणारी गोष्ट; मोडता, पाठिंब्याचा अभाव.

discourse /'डिस्कॉऽस्/ *ना* [*गण, अगण*] (*औप*) महत्त्वाचे किंवा गंभीर स्वरूपाचे भाषण किंवा संभाषण, प्रवचन, व्याख्यान.

discourteous /डिस्'कऽटिअस्/ *वि* (*औप*) असभ्य; उद्धट. **discourteously** *क्रिवि* उद्धटपणे. **discourtesy** /-'कऽटसि/ *ना* [*अगण*] उद्दाम वागणूक, असभ्य वर्तन.

discover /डिस्'कँव्ह(र्)/ *क्रि* [*सक*] १ प्रथमतःच आढळणे किंवा लक्षात येणे. २ समजून येणे; शोधून काढणे, शोध लावणे, शोधणे. **discoverer** *ना* [*गण*] शोध लावणारा. **discovery** /डि'स्कँव्हरि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] शोध; सुगावा. २ [*गण*] शोधून काढलेली वस्तू, शोध.

discredit /डिस्'क्रेडिट्/ *क्रि* [*सक*] १ बदनाम करणे, एखाद्याचे नाव बद्दू करणे. २ खोटे किंवा संशयास्पद वाटेल असे करणे, विश्वास उडवणे. **discredit** *ना* [*अगण*] आदर किंवा लौकिक कमी होणे, काळिमा, अपकीर्ती.

discreet /डि'स्क्रीट्/ *वि* उक्ती किंवा कृती तोलून मापून करणारा, सावध, काळजीपूर्वक वागणारा, तारतम्य बाळगणारा, धोरणी. **discreetly** *क्रिवि* तारतम्याने, धोरणाने.

discrepancy /डि'स्क्रेपन्सि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) दोन गोष्टींतील फरक, विसंगती.

discretion /डि'स्क्रेशन्/ *ना* [*अगण*] १ चांगला अंदाज, तारतम्य, विवेक. २ काय करावे हे ठरवण्याचे स्वातंत्र्य, स्वाधीनता : *use your own ~, स्वतःची बुद्धी/स्वतःचा विवेक वापर.*

discriminate /डि'स्क्रिमिनेइट्/ *क्रि* [*अक*]

१ (*between*)// फरक करणे, भेद करणे. २ *against/in favour of*// एखाद्याला इतरांपेक्षा अधिक चांगली/वाईट वागणूक देणे, भेदभाव करणे, दुजाभाव दाखवणे. **discriminating** *वि* चोखंदळ. **discrimination** /डि,स्क्रिमि'नेइश्न्/ *ना* [*अगण*] फरक करणे; भेदभाव.

discus /'डिस्कस्/ *ना* [*गण*] मैदानी खेळात टाकायची जड, गोल तबकडी, थाळी.

discuss /डि'स्कैस्/ *क्रि* [*सक*] एखाद्या गोष्टीविषयी बोलणे किंवा लिहिणे, चर्चा करणे. **discussion** *ना* [*गण, अगण*] चर्चा, उहापोह, वादविवाद.

disdain /डिस्'डेइन्/ *ना* [*अगण*] एखादी व्यक्ती किंवा गोष्ट आदरास पात्र नाही अशी भावना, तुच्छता, तिरस्कार, तिटकारा. **disdain** *क्रि* [*सक*] १ तिरस्कार/तिटकारा वाटणे. २ क्षुल्लक मानून दुर्लक्ष करणे, कस्पटासमान मानणे, एखादी गोष्ट करण्याचे तिरस्काराने अव्हेरणे. **disdainful** *वि* तिरस्कारयुक्त, तुच्छकर.

disease /डि'झ़ीझ़्/ *ना* [*गण, अगण*] आजार, रोग, दुखणे, विकार. **diseased** *वि* रुग्ण, रोगी, आजारी, दुखणेकरी.

disembark /,डिसिम्'बाक्/ *क्रि* [*अक*] (*from*)// जहाज, विमान किंवा बसमधून उतरणे. **disembarkation** /,डिसेम्बा'केइश्न्/ *ना* [*अगण*] (किनारा, विमानतळ, स्टॅण्ड वगैरेवर) उतरणे.

disenchanted /,डिसिन्'चान्टिड्; *अमे* -'चॅन्ट्-/ *वि* (*with*)// एखाद्या गोष्टीविषयीचे चांगले मत नष्ट झालेला, भ्रमनिरास झालेला, डोळे उघडलेला.

disengage /,डिसिन्'गेइज्/ *क्रि* १ [*सक*] (*from*)// सोडणे, सुटका करणे, मोकळा करणे. २ [*अक*] युद्ध/मारामारी थांबणे.

disentangle /,डिसिन्'टॅङ्ग्ल्/ *क्रि* [*सक*] १ गाठी सोडणे, गुंता सोडवणे. २ (*from*)// एखाद्या गुंतागुंतीच्या किंवा किचकट गोष्टीपासून एखाद्याची सुटका करणे, मोकळा करणे.

disfigure /डिस्'फिग(र्); *अमे* -ग्यर्/ *क्रि* [*सक*] कुरूप करणे, खराब करणे. **disfigurement** *ना* [*गण, अगण*] कुरूपपणा, विद्रुपता.

disgorge /डिस्'गॉऽज्/ *क्रि* [*अक, सक*] बाहेर ओतणे किंवा सोडणे, (धूर, घाण वगैरे) ओकणे.

disgrace /डिस्'ग्रेइस्/ *ना* १ [*अगण*] वाईट वागणुकीतून होणारी बेअब्रू, लज्जास्पद गोष्ट, बदनामी, अप्रतिष्ठा. २ [*अ.व*] लाज वाटावी अशी व्यक्ती किंवा गोष्ट, कलंक, निंद्य गोष्ट. **disgrace** *क्रि* [*सक*] लाज आणणे, अब्रू घालवणे, तोंडाला काळे फासणे. **disgraceful** *वि* फार वाईट, गलिच्छ, लाजिरवाणा, लांच्छनास्पद, अब्रूचे धिंडवडे काढणारा.

disgruntled /डिस्'ग्रैन्ट्ल्ड्/ *वि* चिडलेला आणि असमाधानी, नाराज, असंतुष्ट.

disguise /डिस्'गाइझ़्/ *क्रि* [*सक*] १ ओळखू येऊ नये म्हणून वेष पालटणे, स्वरूप बदलणे, वेषान्तर करणे, सोंग घेणे. २ लपवणे, झाकणे, दिसू न देणे : ~ *one's anger, राग लपवणे.* **disguise** *ना* १ [*गण*] लपविण्यासाठीचा वेष, कपटवेष, सोंग. २ [*अगण*] वेषान्तर.

disgust /डिस्'गैस्ट्/ *ना* [*अगण*] तीव्र नावड, घृणा, शिसारी, उबग. **disgust** *क्रि* [*सक*] शिसारी आणणे, उबग आणणे. **disgusted** *वि* उबग आलेला, वीट आलेला. **disgusting** *वि* उबग आणणारा, घृणास्पद, तिरस्करणीय.

dish /डिश्/ *ना* १ [*गण*] अन्न वाढायचे उथळ पात्र, थाळी, ताटली, ताट. २ [*गण*] जेवणातील विशिष्ट पदार्थ, जिन्नस. ३ **the dishes** [*ब.व*] जेवणासाठी वापरायची थाळी, कुंडे, कप वगैरे भांडी; ताटवाट्या. **dish** *क्रि* (*क्रिब*) **dish sth out** एखादी गोष्ट खूप देणे, खूप वाटणे : ~ *out leaflets/compliments, पत्रके/सदिच्छा वाटणे.* **dish sth up** ताटात (अन्न) वाढणे. **'dishcloth** *ना* [*गण*] ताटे, तवे वगैरे धुण्याचे कापड, ताटे पुसण्याचे फडके. **'dishwasher** *ना* [*गण*] ताटे, वाट्या अशी खरकटी भांडी धुण्याचे यंत्र.

dishearten /डिस्'हाट्न्/ *क्रि* [*सक*] एखाद्याचा आत्मविश्वास घालवणे, मनोभंग करणे, निराश करणे.

dishevelled (*अमे* -l-) /डि'शेव्ह्ल्ड्/ *वि* (कपडे किंवा केस याबाबत) अस्ताव्यस्त, खूप विस्कटलेले, पिंजारलेले (केस).

dishonest /डिस्'ऑनिस्ट्/ *वि* अप्रामाणिक, लबाड, हरामखोर. **dishonestly** *क्रिवि* अप्रामाणिकपणे. **dishonesty** *ना* [*अगण*] अप्रामाणिकपणा, लबाडी.

dishonour (*अमे* **-or**) /डिस्'ऑन(र्)/ *ना* [*अगण, अे.व*] (*औप*) मानहानी, अप्रतिष्ठा, अपकीर्ती, नाचक्की. **dishonour** *क्रि* [*सक*] (*औप*) १ मानहानी करणे, नाक कापणे, पाणउतारा करणे. २ (बँकेबाबत) (चेक) वठविण्यास नकार देणे, (चेक) नाकारणे. **dishonourable** *वि* लबाडीचा, अप्रतिष्ठितपणाचा, अश्लाघ्य.

disillusion /,डिसि'लूझ्न्/ *क्रि* [*सक*] सत्य परिस्थिती सांगून एखाद्याच्या गोड स्वप्नांना धक्का देणे, भ्रमनिरास करणे, डोळे उघडणे. **disillusioned** *वि* भ्रमनिरास झालेला, डोळे उघडलेला. **disillusionment** *ना* [*अगण*] भ्रमनिरास.

disinclined /,डिसिन्'क्लाइन्ड्/ *वि* (*for, to*)// तयार नसलेला, कल नसलेला, इच्छा नसलेला, नाखूष : *~ for study, अभ्यासाकडे कल नसलेला* ○ *~ to leave,* जाण्यास राजी *नसलेला.*

disinfect /,डिसिन्'फेक्ट्/ *क्रि* [*सक*] जंतुनाशक द्रव्याने साफ करणे, जंतुहीन करणे : *~ a wound, जखम जंतुनाशक औषधाने धुणे.* **disinfectant** *ना* [*अगण, गण*] जंतुविरहित करण्याचे द्रव्य.

disinformation /डिस्,इन्फ'मेइश्न्/ *ना* [*अगण*] खोटी किंवा चुकीची माहिती – विशेषतः सरकारने दिलेली, दिशाभूल करणारी माहिती.

disinherit /,डिसिन्'हेरिट्/ *क्रि* [*सक*] वारसा काढून घेणे, वारसाहक्क रद्द करणे.

disintegrate /डिस्'इन्टिग्रेइट्/ *क्रि* [*अक*] लहान लहान तुकडे होणे, विभाजन होणे, विघटन होणे. **disintegration** /डिस्,इन्टि'ग्रेइश्न्/ *ना* [*अगण*] विघटन, विभाजन.

disinterested /डिस्'इन्ट्रस्टिड्/ *वि* वैयक्तिक फायद्यात रस नसलेला, निःस्पृह, उदासीन, निरपेक्ष.

disjointed /डिस्'जॉइन्टिड्/ *वि* (शब्द, विचार वगैरेबाबत) स्पष्ट असे एक सूत्र नसलेला, असंबद्ध, पूर्वापरसंबंधरहित, सुसूत्र नसलेला.

disk /डिस्क्/ *ना* [*गण*] १ (खास करून *अमे*) = DISC. २ माहिति जमवून ठेवण्यासाठी संगणकात वापरण्यात येणारी चपटी गोलाकार चुंबकीय चकती. **'disk drive** *ना* [*गण*] संगणकातील डिस्कवर माहिती आणणारे किंवा तीपासून माहिती नेणारे साधन.

dislike /डिस्'लाइक्/ *क्रि* [*सक*] न आवडणे. **dislike** *ना* १ [*अगण*] एखाद्या गोष्टीची/व्यक्तीची नावड, अरुची. २ [*गण*] एखाद्याला न आवडणारी गोष्ट, अप्रिय गोष्ट.

dislocate /'डिस्लकेइट्; *अमे* -लउ-/ *क्रि* [*सक*] १ हाड सरकणे, सांधा निखळणे. २ (वाहतूक, यंत्रणा वगैरे) विस्कळीत करणे, अव्यवस्थित करणे. **dislocation** /,डिस्ल'केइश्न्; *अमे* -लउ-/ *ना* [*अगण, गण*] (हाड) निखळणे; (वाहतुकीचा) विस्कळितपणा.

dislodge /डिस्'लॉज्/ *क्रि* [*सक*] एखाद्या भक्कम स्थानावरून हलवणे किंवा ढकलणे, उखडणे, हुसकणे, तळी उचलणे, उचलबांगडी करणे.

disloyal /डिस्'लॉइ·अल्/ एकनिष्ठ नसलेला, बेइमान, द्रोही, निमकहराम. **disloyally** *क्रिवि* बेइमानपणे. **disloyalty** *ना* [*अगण*] बेइमानी, द्रोह, हरामी.

dismal /'डिझ्मल्/ *वि* दुःखी, उदास, भयाण; उद्वेगजनक, फारच वाईट. **dismally** *क्रिवि* उदासपणे, भयाण.

dismantle /डिस्'मॅन्ट्ल्/ *क्रि* [*सक*] सुटेसुटे करणे, खोलणे : *~ a machine/engine, यंत्र/इंजिन खोलणे.*

dismay /डिस्'मेइ/ *ना* [*अगण*] भीती आणि निरुत्साहाची भावना, धास्ती, भय, चिंता. **dismay** *क्रि* [*सक*] एखाद्याला भीती घालणे, भयग्रस्त करणे, धास्तावणे.

dismember /डिस्'मेम्ब(र्)/ *क्रि* [*सक*] १ हातपाय तोडणे. २ एखाद्या (देश वगैरेचे) विभाजन/तुकडे करणे.

dismiss /डिस्'मिस्/ *क्रि* [*सक*] १ (सेवकाला) कामावरून काढणे, बडतर्फ करणे, पदच्युत करणे. २ जाऊ देणे; दूर पाठवणे. ३ (डोक्यातील विचार वगैरे) काढून टाकणे,

हाकलणे. ४ (*कायदा*) (कोर्टातील दावा) फेटाळणे. **dismissal** *ना* [*अगण, गण*] बडतर्फी, हकालपट्टी, पदच्युती; काढून टाकणे, फेटाळणी, नकार.

disobedient /,डिस'बीडिअन्ट्/ *वि* आज्ञा न पाळणारा, अवज्ञा करणारा. **disobedience** /-अन्स्/ *ना* [*अगण*] अवज्ञा, हुकमाची पायमल्ली. **disobediently** *क्रिवि* अवज्ञा करून, हुकूम मोडून.

disobey /,डिस'बेइ/ *क्रि* [*अक, सक*] (एखाद्या व्यक्तीची, कायद्याची वगैरे) आज्ञा धुडकावणे, आज्ञाभंग करणे.

disorder /डिस्'ऑऽडड(र्)/ *ना* १ [*अगण*] व्यवस्थितपणाचा अभाव, अव्यवस्था, गलथानपणा; गोंधळ. २ [*गण, अगण*] सार्वजनिक लूटमार, दंगेधोपे. ३ [*गण, अगण*] मनाचा किंवा शरीराचा आजार, विकृती, विकार, व्याधी. **disorder** *क्रि* [*सक*] अव्यवस्था, गोंधळ माजवणे. **disorderly** *वि* गलथान; दंगेखोर.

disorganize /डिस्'ऑऽगनाइझ्/ *क्रि* [*सक*] व्यवस्थित गोष्टीत अव्यवस्था आणणे, घोटाळा करणे, अस्ताव्यस्त करणे, घडी मोडणे.

disorientate /डिस्'ऑऽरिअन्टेइट्/ (तसेच विशेषतः *अमे* **disorient** /डिस्'ऑऽरिअन्ट्/) *क्रि* [*सक*] दिशांचे भान पूर्णपणे सुटणे, दिशा ओळखू न येणे; गोंधळवून टाकणे. **disorientation** /डिस्,ऑऽरिअन्'टेइश्न्/ *ना* [*अगण*] हरपलेले दिशाभान.

disown /डिस्'अउन्/ *क्रि* [*सक*] एखाद्या गोष्टीशी/व्यक्तीशी संबंध तोडून टाकणे, संबंध नाकारणे.

disparaging /डि'स्पॅरिजिङ्/ *वि* एखादी व्यक्ती/वस्तू महत्त्वाची नाही असे सुचवणारा, किंमत कमी करणारा; उपहासपूर्ण.

disparate /'डिस्परट्/ *वि* (*औप*) तुलना न करण्याइतके वेगळे, विषम, विजोड, विभिन्न. **disparity** /डि'स्पॅरटि/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) भेद, फरक, विषमता, तफावत.

dispassionate /डि'स्पॅशनट्/ *वि* भावनांच्या आहारी न गेलेला, निर्विकार बुद्धीचा, थंडपणाचा, समतोल. **dispassionately** *क्रिवि* निरपेक्ष बुद्धीने, वाहवून न जाता.

dispatch (तसेच **despatch**) /डि'स्पॅच्/ *क्रि* [*सक*] (*औप*) १ पाठवणे, धाडणे. २ लवकर संपवणे, भरभर आवरणे. **dispatch** (तसेच **despatch**) *ना* १ [*अगण*] (*औप*) पाठवणे. २ पाठवलेला निरोप किंवा वृत्तांत. ३ [*अगण*] (*औप*) वेग, चपळाई.

dispel /डि'स्पेल्/ *क्रि* (**-ll-**) [*सक*] नाहीसा करणे, घालवणे : ~ *doubts, शंका दूर करणे.*

dispense /डि'स्पेन्स्/ *क्रि* [*सक*] १ (*औप*) देऊन टाकणे; वाटणे. २ (औषध) तयार करून देणे. ३ (*क्रिब*) **dispense with sth** एखाद्या गोष्टीविना भागवणे, एखाद्या गोष्टीविना काम करणे; सुटका करून घेणे. **dispensary** /डि'स्पेन्सरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) औषधे देतात ती जागा, दवाखाना. **dispensation** /,डिस्पेन्'सेइश्न्/ *ना* (*औप*) १ [*अगण*] वाटप, वितरण. २ [*अगण, गण*] बहुधा निषिद्ध असे काही करण्यासाठी दिलेली खास परवानगी.

disperse /डि'स्पऽस्/ *क्रि* [*अक, सक*] चोहीकडे विखुरणे, उधळणे, पांगणे, दाही दिशांना पसरणे. **dispersal** *ना* [*अगण*] पसरणे, पांगापांग, उधळण.

dispirited /डि'स्पिरिटिड्/ *वि* निरुत्साही, मरगळलेला, खट्टू; उदास, खिन्न, मनोधैर्य खचलेला.

displace /डिस्'प्लेइस्/ *क्रि* [*सक*] १ एखादी गोष्ट तिच्या नेहमीच्या/योग्य जागेवरून हालवणे, स्थलान्तर करणे, विस्थापित करणे. २ एखाद्याची जागा घेणे, जागी दुसरे येणे. **displacement** *ना* [*अगण*] विस्थापन, हटवणे.

display /डि'स्प्लेइ/ *क्रि* [*सक*] दाखवणे; प्रदर्शन करणे/मांडणे. **display** *ना* [*गण*] प्रदर्शन, मांडणे, देखावा; प्रदर्शनात मांडलेली गोष्ट, दाखवायला ठेवलेली वस्तू.

displease /डिस्'प्लीझ्/ *क्रि* [*सक*] नाखूष करणे, दुखावणे, वाटेला जाणे, नाराज करणे, राग ओढवून घेणे. **displeasure** /डिस्'प्लेझ(र्)/ *ना* [*अगण*] नाखुषी, राग, अवकृपा, खप्पामर्जी.

dispose /डि'स्पउझ्/ *क्रि* (*क्रिब*) **dispose of sth** नको असलेल्या गोष्टीतून सुटका करून घेणे, विल्हेवाट लावणे, वाट/वासलात

लावणे, निकालात काढणे. **disposable** /डि'स्पउझब्ल्/ *वि* १ वापरून फेकून देण्यासारखा : ~ *tissues, वापरून फेकून द्यायचे कागदी रुमाल.* २ वापरता येण्याजोगा : ~ *income, वापरता येण्याजोगे उत्पन्न, रकमा कापून घेतल्यावर उरलेले निव्वळ उत्पन्न.* **disposal** *ना* १ [*अगण*] विल्हेवाट, निरवानिरव. २ (*वाक्प्र*) **at one's disposal** हवे तेव्हा वापरायला असणारा, कधीही उपयोग/वापर करता येईल असा. **disposed** *वि* १ (*to*)// एखादी गोष्ट करायला राजी, कल असलेला. २ (*वाक्प्र*) **well/favourably disposed towards sb/sth** एखाद्याबाबत चांगले मत असणे, अनुकूल असणे. **disposition** /,डिस्प'झिशन्/ *ना* [*अगण*] (*औप*) माणसाची नैसर्गिक प्रवृत्ती, प्रकृती, स्वभाव.

dispossess /,डिस्प'झेस्/ *क्रि* [*सक*] (*of*)// एखाद्याची मालमत्ता वगैरे काढून घेणे, ताब्यातून काढून घेणे.

disproportionate /,डिस्प्र'पॉऽशनद्/ *वि* खूप मोठा किंवा खूप लहान, विषम. **disproportionately** *क्रिवि* विषम पद्धतीने, प्रमाण न राखता.

disprove /,डिस्'प्रूव्ह्/ *क्रि* [*सक*] एखादी गोष्ट चुकीची किंवा असत्य आहे असे दाखवणे, नाशाबीत करणे, खंडन करणे.

dispute /डि'स्प्यूद्/ *ना* [*गण, अगण*] असहमती, मतभेद किंवा वाद. **dispute** *क्रि* १ [*सक*] वाद घालणे; शंका घेणे. २ [*अक*] (*with*)// युक्तिवाद करणे, चर्चा/वादविवाद करणे.

disqualify /डिस्'क्वॉलिफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] (*from*)// एखाद्याला एखादी गोष्ट करण्यास अधिकृतपणे प्रतिबंध करणे, अपात्र ठरवणे, अनर्ह ठरवणे. **disqualification** /डिस्,क्वॉलिफि'केइशन्/ *ना* [*अगण, गण*] अपात्रता, अनर्हता.

disquiet /डिस्'क्वाइअद्/ *ना* [*अगण*] (*औप*) काळजी किंवा चिंता, अस्वस्थता. **disquiet** *क्रि* [*सक*] (*औप*) चिंताग्रस्त करणे, अस्वस्थ करणे.

disregard /,डिस्रि'गाड्/ *क्रि* [*सक*] लक्ष न देणे; दुर्लक्ष करणे, उपेक्षा करणे. **disregard** *ना* [*अगण*] दुर्लक्ष, बेपर्वाई, अवमान, बेफिकिरी.

disrepair /,डिस्रि'पेअ(र्)/ *ना* [*अगण*] दुरुस्तीची गरज असण्याची स्थिती, मोडकळीची अवस्था, नादुरुस्ती.

disrepute /,डिस्रि'प्यूद्/ *ना* [*अगण*] लोकांचे चांगले मत गमावल्याची स्थिती, दुर्लौकिक, अपकीर्ती, नाचक्की, लोकापवाद : *bring the sport into ~, खेळ बदनाम करणे.* **disreputable** /डिस्'रेप्युटब्ल्/ *वि* बदनाम झालेला, कुप्रसिद्ध, कुविख्यात : *a disreputable nightclub, कुप्रसिद्ध नाईटक्लब.*

disrespect /,डिस्रि'स्पेक्द्/ *ना* [*अगण*] अनादर; उद्धटपणा. **disrespectful** *वि* अवमानकारक, अपमानकारक; उद्धट.

disrupt /डिस्'रेप्ट्/ *क्रि* [*सक*] विस्कळित करणे, उधळून लावणे, खीळ घालणे : ~ *a public meeting, सार्वजनिक सभा उधळणे.* **disruption** /-रेप्शन्/ *ना* [*गण, अगण*] विस्कळितपणा, अव्यवस्था. **disruptive** *वि* विस्कळित करणारा, यंत्रणा मोडकळीस आणणारा : *a ~ive influence, विघातक परिणाम.*

dissatisfy /डि'सॅटिस्फाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] समाधान करू न शकणे; असंतुष्ट करणे, नाखूष करणे.

dissect /डि'सेक्ट्/ *क्रि* [*सक*] (मृत शरीर) तपासणीसाठी फाडणे, चिरफाड करणे, शवविच्छेदन करणे. **dissection** /डि'सेक्शन्/ *ना* [*अगण, गण*] शवविच्छेदन.

disseminate /डि'सेमिनेइद्/ *क्रि* [*सक*] (*औप*) (माहिती) प्रसारित करणे, फैलाव करणे. **dissemination** /डि,सेमि'नेइशन्/ *ना* [*अगण*] प्रसार, फैलाव.

dissension /डि'सेन्शन्/ *ना* [*अगण, गण*] मतभेद, भांडण, लाथाळी.

dissent /डि'सेन्ट्/ *ना* [*अगण*] मतभेद, मतान्तर. **dissent** *क्रि* [*अक*] (*from*)// (*औप*) एखाद्या मताशी असहमत असणे, निराळे मत असणे. **dissenter** *ना* [*गण*] भिन्न मताचा/मतभेद असलेला माणूस.

dissertation /,डिस'टेइशन्/ *ना* [*गण*] (*on*)// मोठा लिखित निबंध, प्रबंध.

disservice /डिस्'सऽव्हिस्/ *ना* [*गण, बहुधा*

अे.व] हानीकारक कृती, नुकसानकारक गोष्ट, अपाय : *do sb a ~, एखाद्याला अपायकारक असे काही करणे.*

dissident /'डिसिडन्ट्/ *ना* [*गण*] अधिकृत शासकीय मतांशी असहमत असणारा माणूस; (पक्षातील वगैरे) फुटीर.

dissimilar /डि'सिमिल(र्)/ *वि* असमान, भिन्न. **dissimilarity** /,डिसिमि'लॅरटि/ *ना* [*अगण, गण*] (*ब.व* -ies) असमानता किंवा भिन्नता, फरक.

dissipated /'डिसिपेइटिड्/ *वि* अपायकारक, क्षुद्र अशा चैनीच्या गोष्टीत आयुष्य फुकट घालविणारा, उथळ्या, खुशालचेंडू, व्यसनासक्त.

dissociate /डि'सउशिअेइट्/ (तसेच **disassociate** /,डिस'सउशिअेइट्/) *क्रि* [*सक*] १ ~ **oneself from** एखाद्या गोष्टीला आपला पाठिंबा नाही किंवा त्याच्याशी आपला संबंध नाही असे म्हणणे. २ *A from B*// दोन गोष्टी मनात वेगळ्या करणे. **dissociation** /डि,सउसि'अेइश्न्/ *ना* [*अगण*] संबंध तोडणे, अलगपणा, वेगवेगळेपणा.

dissolve /डि'झ़ॉल्व्ह्/ *क्रि* १ [*अक*] (घन वस्तू) द्रव होणे, विरघळणे : *Salt ~s in water, मीठ पाण्यात विरघळते.* २ [*सक*] विरघळवणे, विद्राव करणे : *D~ the salt in water, पाण्यामधे मीठ विरघळवा.* ३ [*सक*] बरखास्त करणे : *~ parliament, संसद बरखास्त करणे.* ४ (*वाक्प्र*) **dissolve into tears/laughter** रडू येणे/हसू फुटणे. **dissolution** /,डिस'लूश्न्/ *ना* [*गण, अगण*] विवाह, बैठक वगैरे मोडणे.

dissuade /डि'स्वेइड्/ *क्रि* [*सक*] (*from*)// एखाद्याने एखादी गोष्ट करू नये असा त्याला सल्ला देणे, न करण्यासाठी मन वळवणे : *~ sb from leaving, एखाद्याला न जाण्याचा सल्ला देणे.*

distance /'डिस्टन्स्/ *ना* १ [*गण, अगण*] दोन बिंदूंमधील किंवा दोन स्थळांतील अंतर. २ [*अगण*] दूर अंतर. ३ [*गण, अगण*] दूरचे ठिकाण : *listen from a ~, दुरून ऐकणे.* ४ (*वाक्प्र*) **go the distance** स्पर्धेच्या शेवटपर्यंत पळत, लढत वगैरे राहणे. **distance** *क्रि* [*सक*] (*from*)// मनाने किंवा भावनेने एखाद्याला दूर करणे, एखाद्यापासून अंतर राखून वागणे, चार हात दूर ठेवणे.

distant /'डिस्टन्ट्/ *वि* १ दूरचा, लांबचा. २ (लोकांबाबत) जवळच्या नात्यातला नसलेला : *a ~ cousin, लांबचा चुलत वगैरे भाऊ/बहीण.* ३ ओळख न दाखविणारा, परकेपणाचा. **distantly** *क्रिवि* लांबून, दुरून, परकेपणाने.

distaste /डिस्'टेइस्ट्/ *ना* [*अगण, अे.व*] नावड, अप्रीती, नापसंती. **distasteful** *वि* न आवडणारा, नापसंत.

distil (*अमे* **distill**) /डि'स्टिल्/ *क्रि* (-ll-) [*सक*] १ (*from*)// (क) एखाद्या द्रवाचे उष्णतेने वायूत रूपान्तर करून नंतर तो वायू थंड करून त्यापासून द्रवबिंदू मिळवणे, उर्ध्वपातन किंवा उफाळणी करणे. (ख) (मद्य वगैरे) गाळणे, आसव बनवणे. २ (*from*)// एखाद्या गोष्टीपासून एखादी गोष्ट काढणे/शिकणे : *advice ~led from years of experience, अनेक वर्षांच्या दीर्घ अनुभवातून काढलेला/मिळालेला शहाणपणा/उपदेश.* **distillation** /,डिस्टि'लेइश्न्/ *ना* [*अगण*] उर्ध्वपातन, गाळणी, गाळून काढलेला पदार्थ. **distillery** *ना* [*गण*] मद्य गाळतात ती जागा, दारूभट्टी, मद्यार्कशाळा, आसवनी.

distinct /डि'स्टिङ्क्ट्/ *वि* १ स्पष्टपणे निराळा; वेगळा, भिन्न. २ सहज ऐकू येणारा किंवा सुस्पष्ट दिसणारा. **distinctly** *क्रिवि* स्पष्टपणे, वेगळा, भिन्नपणे, नीटपणे.

distinction /डि'स्टिङ्क्श्न्/ *ना* १ [*गण, अगण*] (*between A and B*)// दोन गोष्टींतील फरक किंवा वेगळेपणा, गुणविशेष, विशेष लक्षण. २ [*अगण*] सफाई, उत्कृष्टता. ३ [*गण*] मानचिन्ह किंवा गौरवचिन्ह.

distinctive /डि'स्टिङ्क्टिव्ह्/ *वि* एखाद्या गोष्टीचा वेगळेपणा दाखविणारा, गुणविशेषाचा. **distinctively** *क्रिवि* विशेषत्वाने.

distinguish /डि'स्टिङ्ग्विश्/ *क्रि* १ [*अक, सक*] (*between*) *A and B; A from B*// दोन गोष्टींतील फरक समजणे, दोन गोष्टीत फरक दिसणे. २ [*सक*] *A* (*from B*)// (क) दोन गोष्टीत फरक दाखवणे. (ख) एखाद्या गोष्टीचा/व्यक्तीचा विशेष गुण किंवा विशेष

लक्षण असणे. ३ [*सक*] ऐकू येणे किंवा पाहू शकणे. ४ ~ **oneself** एखादी गोष्ट फार चांगल्या रीतीने करणे, विशेष प्राविण्य दाखवणे. **distinguishable** *वि* वेगळेपणाने उठून दिसणारे, विशेष; ऐकू येऊ शकणारे किंवा दिसू शकणारे. **distinguished** *वि* ख्यातनाम, प्रतिष्ठित, प्रख्यात, यशस्वी.

distort /डि'स्टॉऽट्/ *क्रि* [*सक*] १ ओढाताण करून किंवा पिरगळून एखाद्या गोष्टीचा मूळ आकार बदलणे, वाकडा करणे, आकार बिघडवणे. २ खोटा वृत्तांत देणे, विपर्यास करणे : *~ the facts, सत्य परिस्थितीचा विपर्यास करणे.* **distortion** /डि'स्टॉऽश्न्/ *ना* [*गण, अगण*] विरूपीकरण, विरूपण; विपर्यास.

distract /डि'स्ट्रॅक्ट्/ *क्रि* [*सक*] एखाद्याचे लक्ष भलतीकडे वळवणे, लक्ष विचलित करणे, मन चाळवणे. **distracted** *वि* चिंतेमुळे नीट विचार करू न शकणारा, भांबावलेला, विमनस्क. **distraction** /डि'स्ट्रॅक्श्न्/ *ना* १ [*गण, अगण*] लक्ष विचलित करणारी आवाज वगैरे सारखी गोष्ट, मन चाळवणारी गोष्ट. २ [*गण*] मन रिझवणारी गोष्ट, करमणूक.

distraught /डि'स्ट्रॉऽट्/ *वि* खूप निराश आणि चिंताग्रस्त झालेला, सुन्न.

distress /डि'स्ट्रेस्/ *ना* [*अगण*] १ मोठे दुःख, वेदना, यातना, पीडा. २ संकट : *a ship in ~, संकटात सापडलेले जहाज.* **distress** *क्रि* [*सक*] यातना/पीडा देणे, दुःख देणे. **distressing** *वि* दुःखदायक, भयानक, धक्कादायक : *~ news, मन सुन्न करणारी बातमी, क्लेशकारक बातमी.*

distribute /डि'स्ट्रिब्यूट्/ *क्रि* [*सक*] १ वाटणे, वाटप करणे, देणे. २ पसरणे, विखरणे. **distribution** /,डिस्ट्रि'ब्यूश्न्/ *ना* [*गण, अगण*] वाटप, वाटणी, वितरण. **distributor** /डि'स्ट्रिब्युट(र्)/ *ना* [*गण*] १ दुकानांना माल पुरवणारा माणूस, वितरक. २ इंजिनातील प्लगकडे विद्युत्प्रवाह पाठवणारी युक्ती, वितरित्र.

district /'डिस्ट्रिक्ट्/ *ना* [*गण*] एखाद्या शहराचा किंवा देशाचा भाग, जिल्हा.

distrust /डिस्'ट्रॅस्ट्/ *क्रि* [*सक*] एखाद्यावर विश्वास नसणे, भरवसा नसणे. **distrust** *ना* [*अगण, अ.व*] अविश्वास, शंका, साशंकता.

distrustful *वि* विश्वास न टाकण्याजोगा, बेभरवशाचा.

disturb /डि'स्टऽब्/ *क्रि* [*सक*] १ शांतताभंग करणे किंवा व्यवस्था विस्कळित करणे, लुडबुड करणे; व्यत्यय आणणे, मधेमधे येणे. २ व्यथित करणे, अस्वस्थ करणे. **disturbance** *ना* १ [*गण, अगण*] शांतताभंग, सुव्यवस्थाभंग; व्यत्यय, खंड; अस्वस्थता, अस्वस्थ करणारी गोष्ट. २ [*गण*] सार्वजनिक हिंसक घटना, उलथापालथ. **disturbed** *वि* मनाने किंवा भावनांबाबत आजारी, मानसिक असंतुलनाचा.

disunity /डिस्'यूनटि/ *ना* [*अगण*] (*औप*) एकीचा अभाव, बेकी, फाटाफूट, बेदिली; मतभेद.

disuse /डिस्'यूस्/ *ना* [*अगण*] वापरात नसल्याची अवस्था, अनुपयोग : *fall into ~, वापरातून जाणे किंवा वापरात नसणे.* **disused** /-'यूझ्ड्/ *वि* वापरात नसलेला, प्रचारात नसलेला.

ditch /डिच्/ *ना* [*गण*] पाणी साठविण्यासाठी किंवा दुसरीकडे नेण्यासाठी खणलेला अरुंद चर, खंदक. **ditch** *क्रि* [*सक*] (*अनौप*) एखाद्याशी असलेले संबंध तोडणे : *She ~ed her boy-friend, तिने तिच्या मित्राशी असलेले संबंध तोडले.*

dither /'डिद(र्)/ *क्रि* [*अक*] काय करावे याचा निर्णय न घेता येणे, दही खाऊ मही खाऊ करणे.

ditto /'डिटउ/ *ना* [*गण*] (*ब.व* ~s) (शब्दांची पुनरुक्ती टाळण्यासाठी यादीमध्ये वगैरे वापरायचा शब्द) पुन्हा तीच गोष्ट, पूर्वोक्त, कित्ता, तथैव.

ditty /'डिटि/ *ना* [*गण*] (*ब.व* -ies) लहान सोपे गीत.

divan /डि'व्हॅन्; *अमे* 'दाइव्हॅन्/ *ना* [*गण*] पाठ नसलेली बसायची लांब ठेंगणी बैठक, दिवाण.

dive /डाइव्ह्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **dived**; *अमे* तसेच *भूत* **dove** /डउव्ह्/) [*अक*] १ डोके खाली करून पाण्यात उडी मारणे, सुरकांडी मारणे. २ पाण्याखाली जाणे/पोहणे. ३ (विमानाबाबत) खाली झेप घेणे. ४ एखाद्या दिशेने वेगाने सरकणे/झेपावणे, तिरासारखे जाणे : *~ under the bed, बिछान्याखाली झेप*

घेणे. ५ (*क्रिब*) **dive into sth** एखादी गोष्ट करण्यास खूप उत्साहाने सुरुवात करणे, बुडी मारणे. **dive** *ना* [*गण*] १ सुरकांडी. २ मवाल्यांचा अड्डा किंवा गुत्ता. **diver** *ना* [*गण*] पाण्यात बुडी मारणारा माणूस – विशेषतः पाण्याखाली जाऊन काम करणारा, पाणबुड्या. **'diving-board** *ना* [*गण*] पोहण्याच्या तलावात उडी मारण्याची फळी.

diverge /डाइ'व्हऽज्/ *क्रि* [*अक*] अधिक वेगळे होणे, फाकणे, पसरणे, भिन्नमार्ग होणे; फरक असणे, भिन्न असणे. **divergence** /-जन्स्/ *ना* [*गण, अगण*] फाटा फुटणे, अपसरण; फरक, भिन्नता. **divergent** /-जन्ट्/ *वि* विभिन्न.

diverse /डाइ'व्हऽस्/ *वि* वेगवेगळ्या प्रकारचा, विविध : ~ *interests, विविध हितसंबंध किंवा रुची.* **diversity** *ना* [*अगण, अे.व*] फरक, विभिन्नता; विविधता, वैविध्य.

diversify /डाइ'व्हऽसिफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*अक, सक*] (माल, हितसंबंध वगैरेत) विविधता आणणे. **diversification** /डाइ,व्हऽसिफि'केइशन्/ *ना* [*अगण*] वैविध्य आणणे.

diversion /डाइ'व्हऽशन्; *अमे* -व्हऽर्झन्/ *ना* १ [*गण*] दुसरीकडे लक्ष वेधणारी गोष्ट : *create a ~, दुसरीकडे लक्ष वेधणे.* २ [*गण*] वाहतुकीसाठी काढलेला वेगळा रस्ता, फाटा, उपमार्ग. ३ [*अगण, गण*] दिशा किंवा मार्ग बदलणे : *the ~ of a river, नदीचा मार्ग-बदल.* **diversionary** *वि* दुसरीकडे लक्ष वेधणारा : *~ary tactic, लक्ष दुसरीकडे वळवणारी कृती.*

divert /डाइ'व्हऽट्/ *क्रि* [*सक*] (*from, to*)// १ एखाद्या गोष्टीचा मार्ग, वापर वगैरे बदलणे, वळवणे, फिरवणे : ~ *traffic, वाहतूक वळवणे* ○ ~ *money to education, शिक्षणाकडे पैसा वळवणे.* २ मनोरंजन करणे, करमणूक करणे.

divide /डि'व्हाइड्/ *क्रि* १ [*अक, सक*] तुकडे होणे, विभागणे; वेगळे करणे, विभाजन करणे/होणे, विभक्त करणे. २ [*अक, सक*] (लोकांत) फूट पाडणे, (लोकांत) मतभेद असणे. ३ [*सक*] *by*// एखाद्या संख्येत दुसरी एखादी संख्या कितीवेळा आहे ते शोधणे, भागाकार करणे, भाग देणे : *30 ~d by 6 is 5, ३० ला ६ ने भागल्यावर ५ येतात.* **divide** *ना* [*गण*] भेद. **dividers** *ना* [*ब.व*] रेषा, कोन वगैरेचे मोजमाप करण्याचे साधन, द्विभाजक.

dividend /'डिव्हिडेन्ड्/ *ना* [*गण*] एखाद्या कंपनीच्या भागधारकांना देण्यात येणारा नफ्यातील हिस्सा, लाभांश.

divine^{1} /डि'व्हाइन्/ *वि* १ देवाचा किंवा देवासारखा, ईश्वरी. २ (*अनौप*) स्वर्गीय, छान. **divinely** *क्रिवि* स्वर्गीय तऱ्हेने. **divinity** /डि'व्हिनटि/ *ना* १ [*अगण*] धर्मशास्त्र, ईश्वरविद्या. २ [*अगण*] ईश्वरापासून निघालेला, देवपण, ईश्वरी अंश. ३ [*गण*] देव किंवा देवता.

divine^{2} /डि'व्हाइन्/ *क्रि* [*सक*] (*औप*) अंदाज करून ओळखणे, अदमास करणे.

divisible /डि'व्हिझ़ब्ल्/ *वि* विभाजन करण्याजोगा, विभाज्य : *4 is ~ by 2, ४ ला २ ने भाग देता येतो.*

division /डि'व्हिझ्न्/ *ना* १ [*अगण*] विभाजन किंवा विभाजित, विभागणी. २ [*गण*] एखादी गोष्ट विभागल्यावर येणारा भाग. ३ [*गण*] मोठ्या संघटनेचा किंवा संस्थेचा विभाग : *the 'sales division, विक्री विभाग.* ४ [*गण, अगण*] मतभेद, फाटाफूट. ५ [*अगण*] संख्या भागण्याची प्रक्रिया, भागाकार. ६ [*गण*] (विशेषतः *ब्रि*) (संसदेमधे) मत. ७ [*गण*] खेळाडूंच्या संघांचा एक विभाग. **divisional** /-झन्ल्/ *वि* विभागीय.

divisive /डि'व्हाइसिव्ह्/ *वि* मतभेद उत्पन्न करणारा, विभाजनवादी, विभाजक.

divorce /डि'व्हॉऽस्/ *ना* १ [*गण, अगण*] कायदेशीरपणे संपुष्टात आलेला विवाह-संबंध, घटस्फोट, काडीमोड. २ [*गण*] एखादा संबंध तोडणे, संबंध-समाप्ती; विलग होणे, वेगळे राहणे. **divorce** *क्रि* १ [*सक*] घटस्फोट घेणे, काडीमोड करणे : ~ *sb, एखाद्याला घटस्फोट देणे* ○ *get ~d, घटस्फोट घेणे/मिळवणे.* २ [*सक*] *from*// एखादी गोष्ट दुसरीपासून वेगळी किंवा विभक्त करणे, अलग करणे. **divorcee** /डि,व्हॉऽ'सी/ *ना* [*गण*] घटस्फोट घेतलेली व्यक्ती, घटस्फोटित व्यक्ती.

divulge /डाइ'व्हल्ज्/ *क्रि* [*सक*] (एखादे गुपित) फोडणे, गौप्यस्फोट करणे, बकणे.

D I Y /,डी आइ 'वाइ/ *ना* [*अगण*] Do It

Yourself आपण स्वतः करा, तुम्ही करू शकाल (असे); घरातील दुरुस्त्या, सजावट वगैरे स्वतः करणे.

dizzy /'डिझि/ *वि* (**-ier, -iest**) १ (एखाद्या व्यक्तीबाबत) भोवतालचे सर्व गरगर फिरते आहे अशी भावना होणारा, चक्कर/भोवळ आलेला, ज्याला गरगरते असा; स्वतःचा तोल सावरू न शकणारा, भेलकांडणारा. २ गरगरायला लावणारा, चक्कर/भोवळ आणणारा : ~ *heights, भोवळ आणणारी उंची.* **dizzily** *क्रिवि* घेरी येऊन. **dizziness** *ना* [*अगण*] भोवळ, चक्कर, गरगरणे.

DJ /,डी'जेइ/ *संरू* (*अनौप*) १ dinner-jacket म्हणजे भोजनासाठीचे जाकीट याचे संक्षिप्त रूप. २ disc jockey म्हणजे रेडिओ किंवा दूरदर्शनवर गाणी लावण्यापूर्वीचे निवेदन करणारा याचे संक्षिप्त रूप.

do^1 /डू/ *सहा. क्रि* (*नकार* **do not**, *संक्षेप* **don't** /डउन्ट्/; *तृतीय पुरुष अे.व वर्तमानकाळ* **does** /डझ़्; अधिक बलयुक्त रूप डैझ़्/ *नकार* **does not**, *संक्षेप* **doesn't** /'डैझ़्न्ट्/; *भूत* **did** /डिड्/, *नकार* **did not**, *संक्षेप* **didn't** /'डिड्न्ट्/; *भूत वि* **done** /डैन्/) १ (क) (नकारार्थी वाक्ये किंवा प्रश्नार्थक वाक्ये करताना क्रियापदापुढे वापर) : *I don't like fish, मला मासे आवडत नाहीत* ○ *Do you believe him? तुझा त्याच्यावर विश्वास बसतो?* (ख) (वाक्याच्या शेवटी प्रश्न करण्यास वापर) : *You live in Hastings, don't you? तू हेस्टिंग्जमधे राहतोस, हो ना?* २ (क्रियापद होकारार्थी आहे यावर जोर देण्यासाठी वापर) : *He 'does look tired, तो दमलेलाच दिसतोय* ○ *'Do shut up! चूप बस ना!* ३ (क्रियापदाची पुनरुक्ती टाळण्यासाठी वापर) : *She runs faster than I do, माझ्यापेक्षा ती जास्त जोरात पळते.*

do^2 /डू/ *क्रि* (*तृतीय पुरुष अे.व वर्तमानकाळ* **does** /डैझ़्/, *भूत* **did** /डिड्/, *भूत वि* **done** /डैन्/) १ [*सक*] (एखादी कृती) करणे : *What are you doing now? तू आता काय करतोयस्?* २ [*सक*] तयार करणे किंवा घडवणे, -वर काम करणे : *do a drawing, एखाद्या चित्रावर काम करणे* ○ *Do science* (ie study) *at school, शाळेत विज्ञान शिकणे.* ३ [*सक*] उत्तर शोधणे; सोडवणे : *do a puzzle, कोडे सोडवणे.* ४ [*सक*] (एखादी गोष्ट) नीट करणे, स्वच्छ करणे वगैरे : *do one's hair, केस नीट करणे* ○ *do the cooking, स्वयंपाक करणे.* ५ [*अक, सक*] वागणे; कृती करणे : *do as you please, तुला हवं ते कर म्हणजेच तुला हवं तसं वाग* ○ *do one's best, जास्तीत जास्त प्रयत्न करणे म्हणजेच प्रयत्नांची शिकस्त करणे.* ६ [*सक*] (अंतर) जाणे/कापणे, (अंतराचा) प्रवास करणे : *How many miles did you do? तू किती मैल अंतर कापलेस?* ७ [*अक, सक*] (*for*)// पुरेसे असणे, पुरणे : *'Can you lend me some money?' 'Yes – will £10 do (for you)?', 'मला काही पैसे उसने देशील?' 'हो, दहा पौंड पुरतील?'* ८ [*अक*] प्रगती असणे : *She's doing well at school, तिची शाळेत चांगली प्रगती आहे.* ९. [*सक*] फसवणे, पैशाला गंडा घालणे, ठकवणे : *You've been done! तुला गंडा घातलाय्!* १० (*वाक्प्र*) **be/have to do with sb/sth** एखाद्या गोष्टीशी/व्यक्तीशी संबंधित असणे, त्याविषयी असणे : *The letter is to do with the trip to France, फ्रान्सला जाण्याबाबतचे ते पत्र आहे.* **,how do you 'do** (एखाद्याशी ओळख करून दिली जात असता म्हणायचे वाक्य). **what do you do (for a living)?** तुम्ही काय करता? म्हणजे तुमचा पोटापाण्याचा व्यवसाय काय? ११ (*क्रिब*) **do away with oneself/sb** स्वतःला/एखाद्याला ठार करणे, आत्महत्या करणे, दुसऱ्याचा जीव घेणे, स्वतःला/दुसऱ्याला खतम करणे. **do away with sth** (*अनौप*) एखादी गोष्ट काढून टाकणे, ती गोष्ट नाहीशी करणे. **do sb/sth down** (*अनौप*) लोकांच्या नजरेतून उतरवणे, मनातून उतरवणे. **do for sb** एखाद्याचे घरकाम करणे. **do for sb/sth** (*अनौप*) (बहुधा *कर्मणी*) एखादी गोष्ट/व्यक्ती नष्ट करणे, त्याची वाट लावणे : *If we can't borrow the money we're done for, आपल्याला उधार पैसे मिळाले नाहीत तर आपली वाटच लागेल.* **do for sth** (*अनौप*) एखादी गोष्ट मिळवणे : *What will you do for lunch? तू जेवणाचे काय करणार? म्हणजेच कसे मिळवणार?* **do sb 'in** (*अनौप*) (क) एखाद्याला मारणे, ठार करणे. (ख)

एखाद्याला पुरते दमवणे : *You look done in! तू खूप दमलेला दिसतोस.* **do sth out** (*अनौप*) (खोली, कपाट वगैरे) स्वच्छ करणे आणि नीट लावणे, आवरणे, सजवणे. **do sb out of sth** (*अनौप*) एखाद्याला एखादी गोष्ट मिळू न देणे – विशेषतः लबाडी करून, एखाद्याला फसवून वंचित करणे. **do sb 'over** (*अनौप*) एखाद्याला बेदम मारणे, बदडणे. **do (sth) up** बांधणे, लावणे, घट्ट करणे. **do sth up** खोली, इमारत वगैरे दुरुस्त करून पुन्हा सजवणे, नूतनीकरण करणे. **do with sth** एखादी गोष्ट हवी असणे, गरज असणे : *I could do with a cold drink! मला एका थंड पेयाची गरज आहे!* **do sth with oneself** एखादी गोष्ट करण्यात आपला वेळ घालवणे : *What does Simon do with himself at weekends? सुट्टीच्या दिवशी सायमन वेळ कसा घालवतो?* **do sth with sth** एखादी गोष्ट ठेवणे, वापरणे, लपवणे वगैरे : *What have you done with my keys? तू माझ्या किल्ल्या कुठे ठेवल्यास/टाकल्यास?* **do without (sb/sth)** एखाद्या गोष्टीशिवाय किंवा व्यक्तीशिवाय काम करणे, चालवणे, राहणे वगैरे. **,do-'gooder** *ना* [*गण*] (बऱ्याचदा *अधिक्षेपी*) इतरांवर उपकार करण्यासाठी फाजील धडपड करणारा माणूस, गावमामा.

do^{3} /डू/ *ना* [*गण*] (*ब.व* **dos** किंवा **do's** /डूझ्/) १ (*ब्रि अनौप*) मेजवानी. २ (*वाक्प्र*) **do's and don'ts** /,डूझन्'डउन्ट्झ/ नियम.

docile /'डउसाइल्; *अमे* 'डॉस्ल्/ *वि* शांत आणि सहजपणे ताब्यात राहणारा, गरीब, नाठाळ नसणारा.

dock^{1} /डॉक्/ *ना* [*गण*] जहाजांवर माल भरायची आणि जहाजावरील माल उतरवायची किंवा जहाजे दुरुस्त करायची जागा, गोदी. **dock** *क्रि* १ [*अक, सक*] (जहाजाबाबत) गोदीत येणे किंवा आणणे. २ [*अक*] (दोन अंतराळयानांबाबत) अंतराळात जोडणे. **docker** *ना* [*गण*] जहाजावरील मालाची चढउतार करणारा माणूस, गोदी कामगार. **'dockland** *ना* [*अगण, गण*] जहाजे बांधण्याच्या जागेभोवतालचा भाग, डॉकयार्ड भोवतीचा प्रदेश. **'dockyard** *ना* [*गण*] जहाजे बांधण्याची किंवा दुरुस्त करण्याची जागा, नौनिर्मितीस्थान.

dock^{2} /डॉक्/ *ना* [*गण*] कैद्याने उभे राहण्याची कोर्टातील जागा, आरोपीचा पिंजरा.

dock^{3} /डॉक्/ *क्रि* [*सक*] १ (प्राण्याची) शेपूट कापणे. २ (एखाद्याच्या पगारातील पैसे) कापून घेणे.

doctor /'डॉक्ट(र्)/ *ना* [*गण*] १ औषधोपचाराचे शिक्षण घेतलेला, वैद्य. २ विद्यापीठातील सर्वोच्च पदवी मिळालेला माणूस. **doctor** *क्रि* [*सक*] १ लोकांना फसविण्यासाठी एखादी गोष्ट बदलणे, खोटे करणे, बनावट करणे : ~ *the figures, आकडे बदलणे.* २ (मांजर किंवा कुत्र्याला) वांझ करणे, खच्ची करणे. **doctorate** /-टरट्/ *ना* [*गण*] विद्यापीठाची सर्वोच्च पदवी, विद्यावाचस्पती.

doctrinaire /,डॉक्ट्रि'नेअ(र्)/ *वि* (*औप अधिक्षेपी*) व्यावहारिक अडचणींचा विचार न करता केवळ सिद्धान्तावर भर देणारा, पोथीपंडित, तत्त्वाग्रही, हटवादी : ~ *attitudes, केवळ तत्त्वाग्रही दृष्टिकोन.*

doctrine /'डॉक्ट्रिन्/ *ना* [*गण, अगण*] शिकवण, उपदेश; श्रद्धा, सिद्धान्त, मत. **doctrinal** /डॉक्'ट्राइन्ल्; *अमे* /'डॉक्ट्रिन्ल्/ *वि* सैद्धान्तिक, मताग्रही.

document /'डॉक्युमन्ट्/ *ना* [*गण*] माहिती, पुरावा वगैरे देणारे कागदपत्र, दस्तऐवज, लेख. **document** /-मेन्ट्/ *क्रि* [*सक*] कागदोपत्री पुरावा देणे किंवा आधार देणे, नोंद करणे. **documentation** /,डॉक्युमेन्'टेइश्न्/ *ना* [*अगण*] पुरावा म्हणून वापरलेली कागदपत्रे.

documentary /,डॉक्यु'मेन्ट्रि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) माहिती देणारा आणि वस्तुस्थिती दाखविणारा चित्रपट किंवा रेडिओ, दूरदर्शन यांवरील कार्यक्रम, माहितीपट. **documentary** *वि* कागदोपत्री, लिखित किंवा दस्तऐवजातील स्वरूपाचा : ~ *evidence, कागदोपत्री पुरावा.*

dodge /डॉज्/ *क्रि* १ [*अक, सक*] एखादी गोष्ट किंवा व्यक्तीला टाळण्यासाठी पटकन् बाजूला होणे, हुकवणे, चुकवणे, झुकांडी देणे. २ [*सक*] लबाडी करून टाळणे, धूर्तपणे चुकवणे. **dodge** *ना* [*गण*] १ चुकवणे, पटकन् बाजूला

होणे. २ युक्ती, शक्कल, कावेबाजपणा. **dodger** *ना* [*गण*] कावेबाज माणूस, निसटणारा माणूस. **dodgy** /'डॉजि/ *वि* (*अनौप*) लुच्चा, धूर्त, कावेबाज; धोकादायक.

doe /डउ/ *ना* [*गण*] हरिणी, सशाची मादी, रेनडिअरची मादी.

does ➪ DO^{1,2}.

doesn't does not ➪ DO^1.

dog^1 /डॉग्; *अमे* डॉऽग्/ *ना* [*गण*] १ (क) शिकार, राखण यासाठी किंवा आवड म्हणून पाळलेला प्राणी, कुत्रे. (ख) कुत्रा. २ **the dogs** [*ब.व*] शिकारी कुत्र्यांची शर्यत (आणि त्यावर लावलेली पैज). ३ (*वाक्प्र*) **a ,dog in the 'manger** आपल्याला नको असलेली गोष्टही इतरांना भोगू न देणारा माणूस, गव्हाणीतला कुत्रा. **a dog's life** फार कष्टाचे जिणे, कुत्र्याचे जिणे. **go to the 'dogs** (एखादा देश, संस्था याबाबत) त्याचे चांगले गुणविशेष नष्ट होणे, दैना होणे, लयाला जाणे. **'dog-collar** *ना* [*गण*] १ कुत्र्यासाठी केलेली कॉलर. २ (*अनौप*) ख्रिस्ती पाद्र्याची पांढरी कडक कॉलर. **'dog-eared** *वि* (पुस्तकाबाबत) वापरून वापरून पानांच्या कोपऱ्यांना घड्या पडलेले. **'doghouse** *ना* [*गण*] १ (*अमे*) कुत्र्याचे खुराडे. २ (*वाक्प्र*) **in the doghouse** (*अनौप*) बदनामी झालेला, छीथू झालेला. **dog-tired** *वि* (*अनौप*) खूप दमलेला.

dog^2 /डॉग्; *अमे* डॉऽग्/ *क्रि* (**-gg-**) [*सक*] पाठीस लागणे, पिच्छा पुरवणे, मागे लागणे : (*ला*) *~ged by illness, आजाराने पिच्छा पुरवलेला.*

dogged /'डॉगिड्/ *वि* सहजपणे माघार न घेणारा, न हटणारा, ताठर; निश्चय केलेला, पक्का, पिच्छा न सोडणारा. **doggedly** *क्रिवि* ठामपणे, नेटाने.

dogma /'डॉग्म; *अमे* 'डॉऽग्म/ *ना* [*गण*, *अगण*] (विशेषतः धार्मिकबाबतीत) प्रश्न न विचारता स्वीकारायची मते, आग्रही मत, प्रमाणवचन, श्रद्धेयमत. **dogmatic** /डॉग्'मॅटिक्; *अमे* डॉऽग्-/ *वि* भिन्न मतांचा आदर न करता स्वतःची मते ठामपणे मांडणारा, कट्टर, कडवा, हेकेखोर. **dogmatically** /-क्लि/ *क्रिवि* कट्टरपणे, कडवेपणाने, हेकेखोरपणाने.

do-gooder ➪ DO^2.

dogsbody /'डॉग्झ्बॉडि; *अमे* डॉऽग्-/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) (*ब्रि अनौप*) इतरांची कंटाळवाणी, न आवडणारी अशी कामे करणारा माणूस, हरकाम्या.

doldrums /'डॉल्ड्रम्झ्/ *ना* (*वाक्प्र*) **in the 'doldrums** १ दुःखी, खिन्न, उदास. २ प्रगती न करणारा, ठप्प.

dole /डउल्/ *ना* **the dole** [*ए.व*] (*ब्रि अनौप*) बेकार लोकांना शासनाने नियमितपणे द्यायचे पैसे, बेकारभत्ता : *be/go on the ~, बेकारभत्ता मिळणे.* **dole** *क्रि* (*क्रिब*) **dole sth out** (अन्न, पैसे वगैरे) थोडेथोडे वाटणे.

doleful /'डउल्फ़ल्/ *वि* दुःखी, उदास. **dolefully** *क्रिवि* दुःखाने, रडवेपणाने.

doll /डॉल्; *अमे* डॉऽल/ *ना* [*गण*] लहान मुलाला खेळायला द्यायची माणसाची किंवा तान्ह्या मुलाची प्रतिकृती, बाहुली. **doll** *क्रि* (*क्रिब*) **doll oneself up** (*अनौप*) नीटनेटका पोषाख करणे, नटणे.

dollar /'डॉल(र्)/ *ना* [*गण*] १ अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया वगैरे देशातील पैशाचे परिमाण. २ एक डॉलरची नोट किंवा नाणे.

dollop /'डॉलप्/ *ना* [*गण*] (*अनौप*) अन्नाचा वगैरे मऊ, पसरलेला ढीग.

dolphin /'डॉल्फिन्/ *ना* [*गण*] समुद्रात राहणारा, बुद्धिमान, मोठ्या माशासारखा दिसणारा एक प्राणी.

domain /डउ'मेइन्/ *ना* [*गण*] (*औप*) १ ज्ञानाचे किंवा कामाचे क्षेत्र. २ एखाद्याच्या अखत्यारीतील प्रदेश, राज्य.

dome /डउम्/ *ना* [*गण*] गोलाकार छप्पर, घुमट. **domed** *वि* घुमटाकार.

domestic /ड'मेस्टिक्/ *वि* १ कौटुंबिक, घरगुती, घरचा : *~ duties, कौटुंबिक कर्तव्ये, घरची कामे.* २ एखाद्या विशिष्ट देशातील, देशान्तर्गत, अंतर्गत; परकीय नाही असा, बाहेरच्यांचा नसलेला : *~ policies, देशान्तर्गत धोरणे.* ३ (प्राण्यांबाबत) जंगली नसलेले, घरात किंवा शेतात पाळायचे, पाळीव. **domestic**

(तसेच **domestic 'help**) *ना* [*गण*] घरकाम करणारा नोकर, मोलकरीण, गडी. **domesticated** *वि* १ (जनावरांबाबत) माणसाळलेले. २ (माणसांबाबत) घरचे काम आणि घरी राहणे यात आनंद मानणारा, घरकामाची आवड असणारा. **domestic 'science** *ना* [*अगण*] = HOME ECONOMICS (HOME^1).

dominant /'डॉमिनन्ट्/ *वि* सर्वात महत्त्वाचा किंवा सामर्थ्यशाली, सर्वोच्च अधिकाराचा, प्रभावी : *a ~ position, सर्वोच्च अधिकाराचे स्थान.* **dominance** /-नन्स्/ *ना* [*अगण*] प्रभुत्व, स्वामित्व, प्रभाव, वर्चस्व, हुकमत, प्राबल्य.

dominate /'डॉमिनेइट्/ *क्रि* १ [*अक, सक*] (माणसे, घटना वगैरे यांवर) नियंत्रण असणे, प्रभाव असणे, हुकमत असणे, वर्चस्व असणे. २ [*सक*] सर्वात महत्त्वाची गोष्ट होणे, प्रमुख असणे. ३ [*सक*] (एखाद्या भागात) सर्वांच्या डोळ्यात भरणे, प्रमुख आकर्षण असणे : *The Castle ~s the whole city, किल्ला शहरातले प्रमुख आकर्षण आहे.* **domination** /,डॉमि'नेइश्न्/ *ना* [*अगण*] वर्चस्व; प्रभाव.

domineering /,डॉमि'निअरिङ्/ *वि* कडवटपणे इतरांना स्वतःच्या ताब्यात ठेवणारा, कजाग, खाष्ट, सासुरवास करणारा.

dominion /ड'मिनिअन्/ *ना* १ [*अगण*] (*औप*) राज्य करण्याचा अधिकार, सत्ताधिकार, पूर्णसत्ता. २ [*गण*] शासकाच्या नियंत्रणाखालचा प्रदेश, शासित प्रदेश.

domino /'डॉमिनउ/ *ना* (*ब.व* ~es) १ [*गण*] ठिपके असलेली लाकडाची लहान सपाट पट्टी. २ **dominoes** (अे.व क्रियापदासह) असे अनेक डॉमिनो वापरून खेळायचा एक खेळ.

don /डॉन्/ *ना* [*गण*] (*ब्रि*) विद्यापीठातील शिक्षक.

donate /डउ'नेइट्; *अमे* 'डउनेइट्/ *क्रि* [*सक*] (*to*)// एखाद्या संस्थेला (पैसे, वस्तू वगैरे) देणे, मदत देणे, देणगी देणे. **donation** /डउ'नेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] मदत, देणगी.

done^1 DO^{1,2} चा भूत.

done^2 /डन्/ *वि* १ संपलेला, खलास. २ (अन्नाबाबत) नीट शिजलेले. ३ सामाजिक दृष्ट्या योग्य, उचित.

donkey /'डॉङ्कि/ *ना* [*गण*] १ मोठ्या कानाचा आणि लहान घोड्यासारखा दिसणारा एक प्राणी, गाढव. २ (*वाक्प्र*) **'donkey's years** (*अनौप*) फार मोठा काळ, दीर्घकाळ.

donor /'डउन(र्)/ *ना* [*गण*] दाता, देणारा : *a blood ~, रक्तदाता.*

don't do nót ⇨ DO^1

doodle /'डूड्ल्/ *क्रि* [*अक*] भलत्याच गोष्टीचा विचार करत रेघोट्या मारणे. **doodle** *ना* [*गण*] रेघोट्या, चितारणे.

doom /डूम्/ *ना* [*अगण*] न टळणारे अरिष्ट, प्राक्तन, भोग. **doomed** *वि* (एखाद्या वाईट गोष्टीविषयी) अटळ, न चुकणारी, निश्चित : *be ~ed to die/to failure, मरण/अपयश न चुकणारे असणे.* **doomsday** /'डूम्झ्डेइ/ *ना* [*अे.व*] जगाचा शेवट, कल्पान्त.

door /डॉऽ(र्)/ *ना* [*गण*] १ इमारत, खोली वगैरेचा प्रवेश बंद करण्यासाठी वापरायची लाकूड वगैरेची फळी, दार, कवाड, दरवाजा. २ = DOORWAY. ३ (*वाक्प्र*) **,door-to-'door** माल विकण्यासाठी दारोदार जाणे : *a ,~-to-~ 'salesman, दारोदार फिरणारा विक्रेता.* **next 'door (to sb/sth)** शेजारच्या इमारतीत/खोलीत : *go next ~ to borrow some milk, थोडे उसने दूध आणायला शेजारच्या घरी जाणे.* **(be) on the 'door** (सार्वजनिक सभेच्या ठिकाणी) तिकिटे वगैरे गोळा करण्यास दारावर (उभे राहणे). **out of 'doors** इमारतीच्या बाहेर; बाहेरच्या बाजूस, दाराबाहेर. **'doorbell** *ना* [*गण*] भेटीला येणाऱ्या व्यक्तीने वाजवायची दारावरची घंटा. **'doorstep** *ना* [*गण*] दारासमोरील पायरी. **'doorway** *ना* [*गण*] प्रवेशद्वार.

dope /डउप्/ *ना* (*अनौप*) १ [*अगण*] अपायकारक मादक द्रव्य. २ [*गण*] मूर्ख माणूस. **dope** *क्रि* [*सक*] मादक द्रव्य देणे, उत्तेजक पदार्थ देणे. **dopey** (तसेच **dopy**) *वि* (*अनौप*) १ झोपेला आलेला – मादक द्रव्य घेतल्यासारखा, तारवटलेला. २ मूर्ख.

dormant /'डॉऽमन्ट्/ *वि* सुप्त, निद्रिस्त : *a ~ volcano, सुप्त ज्वालामुखी.*

dormitory /'डॉऽमिट्रि; *अमे* -'टॉऽरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) खूप लोक झोपू शकतील असे मोठे शयनगृह.

dormouse /'डॉऽमाउस्/ *ना* [*गण*] (*ब.व* **dormice** /'डॉऽमाइस्/) उंदरासारखा दिसणारा एक छोटा प्राणी, रानउंदीर.

dosage /'डउसिज्/ *ना* [*गण,* बहुधा *अे.व*] औषधाचा हिस्सा, मात्रा.

dose /डउस्/ *ना* [*गण*] १ एकावेळी घ्यायचा औषधाचा घोट, औषध-परिमाण. २ तापदायक अनुभव, इंगा : *a ~ of flu, फ्लूचा इंगा.* **dose** *क्रि* [*सक*] (*with*)// (स्वतःला किंवा दुसऱ्याला) एखाद्या गोष्टीचा डोस देणे.

doss /डॉस्/ *क्रि* (*क्रिब*) **doss down** (*ब्रि व्रात्य*) झोपण्यासाठी पडणे – विशेषतः अंथरुण नसताना. **'doss-house** *ना* [*गण*] (*ब्रि व्रात्य*) अगदी स्वस्तातले लॉजिंग.

dossier /'डॉसिअेइ; *अमे* तसेच 'डॉऽसिअर्/ *ना* [*गण*] एखाद्या व्यक्ती किंवा घटनेबाबत माहिती देणारी कागदपत्रे.

dot /डॉट्/ *ना* [*गण*] १ लहान गोलाकार चिन्ह, ठिपका, टिंब. २ (*वाक्प्र*) **on the dot** अगदी वेळेवर, बरोबर त्या क्षणी. **dot** *क्रि* (**-tt-**) [*सक*] १ टिंब/ठिपका देणे. २ (बहुधा कर्मणी) अंकित करणे; विखुरणे : *The sky was ~ted with stars, आकाश चांदण्यांनी अंकित झाले होते/तारांकित असे आकाश.*

dotage /'डउटिज्/ *ना* (*वाक्प्र*) **in one's dotage** वार्धक्यामुळे मनाने दुबळा झालेला, म्हातारचळ झालेला.

dote /डउट्/ *क्रि* [*अक*] *on*// एखाद्याचा फार लळा लागणे, प्रेमाने वेडावून जाणे : *~ on a child, एखाद्या मुलावर अति प्रेम करणे.*

dotty /'डॉटि/ *वि* (**-ier, -iest**) (*ब्रि अनौप*) किंचित् वेडसर, चक्रम.

double^{1} /'डेबल्/ *वि* १ दुपटीने जादा, मोठा, चांगला वगैरे, दुप्पट : *Her income is ~ what it was a year ago, वर्षापूर्वी असलेल्या उत्पन्नाच्या दुप्पट उत्पन्न आज तिचे आहे.* २ दोन भाग असलेला किंवा दुहेरी वापर करण्याजोगा : *~ doors, दोन दारे* ○ *'otter' is spelt with a ~ t, 'otter' हा शब्द लिहिताना दोन t काढतात.* ३ दोन माणसांसाठी केलेला/असलेला : *a ~ bed, जोडशय्या, जोड-पलंग.* **,double-'bass** *ना* [*गण*] व्हायोलिनच्या जातीचे सर्वात मोठे असे एक वाद्य. **,double 'chin** *ना* [*गण*] हनुवटीखालची (मांसल) घडी. **,double-'dealing** *ना* [*अगण*] कपट-वर्तन, मागे एक पुढे एक असे वागणे, दुटप्पी स्वभाव. **,double-'decker** *ना* [*गण*] दुमजली बस. **,double 'Dutch** *ना* [*अगण*] (*ब्रि अनौप*) न समजू शकणारे अक्षर किंवा बोलणे, वटवट, भंकस.

double^{2} /'डेबल्/ *क्रिवि* दोनदा; दोन भागांत, दुहेरी : *fold a blanket ~, पांघरुणाची दुहेरी घडी करणे.* **,double-'barrelled** *वि* (बंदुकीबाबत) दोन नळ्यांची. **,double-'book** *क्रि* [*अक, सक*] एकापेक्षा जास्त माणसांकरता (तिकीट, हॉटेल वगैरे) आरक्षित करणे. **,double-'breasted** *वि* (कोटाबाबत) छातीवर दोन कापा असून बटणांच्या दोन पट्ट्या असलेला. **,double-'check** *क्रि* [*अक, सक*] (एखादी गोष्ट) दोनदा तपासणे. **,double-'cross** *क्रि* [*सक*] (*अनौप*) एखाद्याचा विश्वास संपादन करून मग त्याला फसवणे, गोड बोलून ठकवणे. **,double-'edged** *वि* (*ला*) (शेऱ्याबाबत) चांगला आणि वाईट असे दोन्ही अर्थ असणारा. **,double-'glazing** *ना* [*अगण*] उष्णता बाहेर जाऊ नये म्हणून खिडकीला लावलेली दुहेरी काच. **,double-'jointed** *वि* (बोटे, हात वगैरेबाबत) पुढे-मागे वाकेल अशा प्रकारे सांधे असलेला. **,double-'quick** *वि, क्रिवि* (*अनौप*) फार जलद, फार जलदीने.

double^{3} /'डेबल्/ *ना* १ [*अगण*] दुप्पट : *He's paid ~ for the same job, त्याच कामासाठी त्याला दुप्पट पैसे मिळतात.* २ [*गण*] एखाद्या दुसऱ्या माणसासारख्या हुबेहूब दिसणारा माणूस. ३ **doubles** [*ब.व*] एकेका बाजूला दोन-दोन खेळाडू असलेला खेळ, दुहेरी खेळ. ४ (*वाक्प्र*) **at the double** (*अनौप*) चटकन्.

double^{4} /'डेबल्/ *क्रि* १ [*अक, सक*] दुप्पट होणे/करणे : *the price has ~d, किंमत दुप्पट झालीये.* २ [*सक*] दुहेरी करणे. ३ (*क्रिब*) **double as sb/sth** दुसऱ्या कामासाठी/उपयोगासाठी असणे, आणखी उपयोग होणे.

double back विरुद्ध दिशेने मागे फिरणे, उलटणे. **double (sb) up** वाकणे, वाकवणे : *be ~d up with laughter, हसून हसून वाकणे, हसून मुरकुंडी वळणे.*

doubly /डैब्लि/ *क्रिवि* (विशेषणापूर्वी वापर) दोनदा : *make ~ sure, दोनदा खात्री करून घेणे.*

doubt /डाउट्/ *ना* १ [*गण, अगण*] अनिश्चिततेची भावना, शंका, संशय. २ (*वाक्प्र*) **in 'doubt** अनिश्चित. **,no 'doubt** बहुतकरून, जास्त संभव असलेला. **without doubt** निश्चितपणे, निःसंशयपणे. **doubt** *क्रि* [*अक, सक*] (एखाद्या गोष्टीची) अनिश्चितता वाटणे, भरवसा न वाटणे, शंका येणे; (एखाद्या गोष्टीच्या) खरेपणाविषयी शंका येणे. **doubtful** *वि* १ अनिश्चित, शंकास्पद. २ असंभवनीय. **doubtless** *क्रिवि* जवळजवळ नक्की, बहुतकरून, संभाव्यपणे.

dough /डउ/ *ना* [*अगण*] १ पोळी, पाव करण्यासाठी पाण्याने मळलेले पीठ, कणीक. २ (*व्रात्य*) पैसे. **'doughnut** *ना* [*गण*] चरबीत शिजवलेल्या गोड कणकेपासून तयार केलेला छोटासा, बहुधा गोल आकाराचा केक.

douse (तसेच **dowse**) /डाउस्/ *क्रि* [*सक*] १ (अंगावर वगैरे) पाणी टाकणे, पाणी मारणे. २ (आग, अग्नी) विझवणे.

dove¹ /डव्ह्/ *ना* [*गण*] १ कबुतराच्या जातीतला पक्षी, पारवा. २ (*ला*) शांतताप्रिय माणूस. **dovecote** /'डैव्ह्कॉट्, तसेच 'डव्ह्कउट्/ *ना* [*गण*] कबुतरे आणि पारवे यांच्यासाठीची छोटीशी जागा, खुराडे.

dove² (*अमे*) DIVE चा *भूत.*

dovetail /'डव्ह्टेइल्/ *ना* [*गण*] लाकडाच्या दोन फळ्या एकत्र ठोकण्यासाठी वापरायचा सांधा, सांध्याची खोबणी, कळाशी, दाता. **dovetail** *क्रि* १ [*सक*] कळाशीने दोन लाकडे जोडणे, कळाशी करणे. २ [*अक*] (*ला*) चप्प बसणे, फिट्ट बसणे.

dowdy /'डाउडि/ *वि* (**-ier, -iest**) (लोकांबाबत) जुन्या फॅशनचे अनाकर्षक कपडे घातलेला, गबाळ्या.

down¹ /डाउन्/ *क्रिवि* १ खाली : *jump ~, खाली उडी मारणे.* २ खाली, जमिनीसपाट, पालथा : *knock sb ~, एखाद्याला भुईसपाट करणे/पालथा पाडणे.* ३ (क) महत्त्वाच्या केन्द्रापासून दूर : *move ~ from London, लंडनपासून दूरवर जाणे.* (ख) दक्षिणेकडे. ४ (कपात दाखविणारा/कमी होतोय अशा अर्थाचा) *calm/settle ~, शांत/स्थिर होणे ○ Prices are ~, भाव कमी झालेत.* ५ कागदावर (लिहिलेले) : *Copy/Take this ~, नक्कल करून घ्या/हे लिहून घ्या.* ६ (*वाक्प्र*) **be/go down with sth** आजार लागणे, आजारी पडणे. **down 'under** (*अनौप*) ऑस्ट्रेलियात. **down with sb/sth** एखाद्या गोष्टीपासून किंवा व्यक्तीपासून सुटका मिळवण्याची इच्छा व्यक्त करताना वापरायचे : *D~ with fascism! फॅसिझमचा धिक्कार असो!* **'down-and-out** *ना* [*गण*] घरदार, नोकरी नसणारा दरिद्री माणूस. **,down-to-'earth** *वि* व्यवहारवादी; शहाणा, जमिनीवर पाय असणारा.

down² /डाउन्/ *शब्दयो* १ खाली : *roll ~ the hill, टेकडीवरून खाली घरंगळणे.* २ वर, बाजूने : *live ~ the street, त्याच रस्त्यावर जरा पुढे राहणे.*

down³ /डाउन्/ *वि* १ खाली जाणारा : *the ~ escalator, खाली जाणारा/सरकणारा जिना.* २ दुःखी : *feel ~, दुःख होणे, उदास वाटणे.* ३ काम न करणारा, चालू नसणारा : *The computer is ~ again, संगणक पुन्हा बंद पडला.* **,down 'payment** *ना* [*गण*] खरेदी करताना एकूण किमतीपैकी प्रथम रोख देण्याची रक्कम.

down⁴ /डाउन्/ *क्रि* [*सक*] १ पटकन् गिळणे. २ (एखाद्याला) ठोसा देऊन जमिनीवर पाडणे, खाली पाडणे.

down⁵ /डाउन्/ *ना* [*अगण*] मऊ पिसे किंवा लव : *duck ~, बदकाची मऊ पिसे.*

downcast /'डाउन्कास्ट्; *अमे* -कॅस्ट्/ *वि* १ दुःखी; निराश, खिन्न. २ (डोळ्यांबाबत) जमिनीवर खिळलेले, खाली केलेली (नजर).

downfall /'डाउन्फॉऽल्/ *ना* [*ए.व*] सत्तेवरून किंवा यशाच्या शिखरावरून खाली येणे, पाडाव होणे; पाडावाचे कारण.

downgrade /'डाउन्ग्रेइड्/ *क्रि* [*सक*] (एखाद्या गोष्टीचे) महत्त्व कमी करणे, हिणकस करणे.

down-hearted /ˌडाउन्'हाटिड्/ *वि* दुःखी; उदास, खिन्न, मनाने खचलेला.

downhill /ˌडाउन्'हिल्/ *क्रिवि* १ उतारावरून खाली. २ (*वाक्प्र*) **go downhill** अधिक वाईट होणे, घसरणीला लागणे. **downhill** *वि* उताराला लागलेला.

Downing Street /'डाउनिङ् स्ट्रीट्/ *ना* [*अे.व*] (क) लंडनमधील पंतप्रधानांचे निवासस्थान असलेला रस्ता. (ख) (*ला*) ब्रिटिश पंतप्रधान किंवा ब्रिटिश सरकार.

downpour /'डाउन्पॉ(र्)/ *ना* [*गण*] मुसळधार पाऊस.

downright /'डाउन्राइट्/ *वि* (एखाद्या वाईट गोष्टीविषयी) पूर्णतः, निखालस : *a ~ lie, धादांत खोटे.* **downright** *क्रिवि* पूर्णपणे, पक्का : *~ rude, पक्का उद्धट.*

downs /डाउन्झ्/ *ना* **the downs** [*ब.व*] टेकाडांचा प्रदेश, डोंगराळ प्रदेश.

downstairs /ˌडाउन्'स्टेअझ्/ *क्रिवि, वि* खालच्या मजल्यावर, तळमजल्याला.

downstream /ˌडाउन्'स्ट्रीम्/ *क्रिवि* नदी वाहते त्या दिशेने, प्रवाहाच्या दिशेला.

downtown /ˌडाउन्'टाउन्/ *क्रिवि, वि* (खास करून *अमे*) एखाद्या शहराच्या मध्यवर्ती भागात, गावठाणात.

downtrodden /'डाउन्ट्रॉड्न्/ *वि* वाईट वागणूक मिळालेला, दलित, पददलित : *~ workers, पददलित/तळागाळातले कष्टकरी.*

downward /'डाउन्वड्/ *वि* खाली जाणारा. **downwards** (तसेच **downward**) *क्रिवि* खाली जाणारा.

dowry /'डाउरि/ *ना* [*गण*] (-ies) वधुपित्याने वराला दिलेले पैसे किंवा मालमत्ता, हुंडा, देज.

dowse = DOUSE

doz DOZEN चे संरू.

doze /डउझ्/ *क्रि* [*अक*] छोटीशी झोप घेणे, डुलकी घेणे. **doze** *ना* [*गण, बहुधा अे.व*] डुलकी, पेंग. **dozy** *वि* (-ier, -iest) १ पेंगुळलेला. २ (*अनौप*) मूर्ख.

dozen /'डझ्न्/ *ना* (*ब.व* ~s किंवा एखादी गोष्ट मोजताना **dozen**) १ बाराचा संच. २ (*वाक्प्र*) **talk, etc nineteen to the dozen** भरभर आणि सतत बोलणे वगैरे.

Dr *संरू* १ डॉक्टर. २ (रस्त्यांच्या नावात) ड्राइव्ह.

drab /ड्रॅब्/ *वि* (~ber, ~best) रटाळ; कंटाळवाणा, अनाकर्षक. **drabness** *ना* [*अगण*] कंटाळवाणेपणा, रटाळपणा.

draft /ड्राफ्ट्; *अमे* ड्रॅफ्ट्/ *ना* १ [*गण*] एखाद्या गोष्टीचा कच्चा मसुदा, कच्चा खर्डा. २ [*गण*] पैसे देण्याची बँकेची लेखी आज्ञा, धनाकर्ष, हुंडी. ३ **the draft** [*अे.व*] (*अमे*) = CALL-UP (CALL^1) सैन्यात भरती होण्याची आज्ञा. ४ [*गण*] (*अमे*) ⇨ DRAUGHT. **draft** *क्रि* [*सक*] १ कच्चा मसुदा करणे, खर्डा करणे. २ (लोकांना) विशिष्ट कामगिरीवर पाठवणे. ३ (*अमे*) लष्करभरतीची सक्ती करणे. **draftsman** *ना* [*गण*] (*ब.व* -men) १ नवीन कायद्याचा मसुदा करणारा माणूस; प्रारूपकार. २ (*अमे*) = DRAUGHTSMAN (DRAUGHT)

drafty /'ड्रॅफ्टि/ *वि* (*अमे*) = DRAUGHTY (DRAUGHT)

drag /ड्रॅग्/ *क्रि* (-gg-) १ [*सक*] (एखादी जड किंवा मोठी वस्तू) श्रमाने किंवा कष्टाने ओढणे, फरफटत नेणे. २ [*अक*] हळूहळू आणि कष्टाने चालणे, पाय ओढत चालणे. ३ [*सक*] एखाद्या ठिकाणी जाण्याची सक्ती करणे : *She ~ged herself out of bed, तिने स्वतःला अंथरुणातून बळेबळे बाहेर काढले.* ४ [*अक*] (वेळेबाबत) हळूहळू जाणे, मुंगीच्या पावलाने जाणे, सावकाश सरकणे. ५ [*सक*] जाळे टाकून (नदीचा, तळ्याचा वगैरे) तळ शोधणे. ६ (*वाक्प्र*) **drag one's 'feet/'heels** एखादी गोष्ट मुद्दाम हळूहळू करणे, वेळकाढूपणा करणे. ७ (*क्रिब*) **drag on** दीर्घकाळ चालू राहणे, रखडणे. **drag sth out** एखादी बैठक वगैरे जास्त काळ चालू ठेवणे, रेंगाळत ठेवणे. **drag sth out of sb** माहिती देण्याची एखाद्यावर सक्ती करणे, काढून घेणे. **drag sth up** दुःखद किंवा अडचणीत आणणाऱ्या घटनेचा पुन्हा उल्लेख करणे, मागची गोष्ट पुन्हा उकरून काढणे. **drag** *ना* १ [*अे.व*] (*व्रात्य*) कंटाळवाणी गोष्ट किंवा व्यक्ती, ब्याद, कटकट. २ [*अगण*] (*व्रात्य*) पुरुषाने घातलेले स्त्रीचे कपडे, पुरुषाचा स्त्रीवेष : *in ~, स्त्रीवेषात.* ३

[*गण*] (*व्रात्य*) सिग्रेट्चा वगैरे धूर आत ओढणे. ४ [*अे.व*] *on*// (*अनौप*) प्रगतीला खीळ घालणारा माणूस किंवा तशी गोष्ट.

dragon /'ड्रॅगन्/ *ना* [*गण*] १ आग ओकणारा, पंख आणि नखे असलेला मोठ्या सरडयासारखा दिसणारा एक काल्पनिक प्राणी. २ तापट, दुष्ट म्हातारी स्त्री, कैदाशीण, कर्कशा.

drain /ड्रेइन्/ *ना* १ [*गण*] मैला किंवा सांडपाणी वाहून नेणारा पाईप किंवा गटार. २ (*वाक्प्र*) **a drain on sth** पैसा, शक्ती वगैरे भरपूर प्रमाणात खर्च करणारी गोष्ट, गळती : *a ~ on one's resources, एखाद्याच्या साधन सामग्रीला किंवा उत्पन्नाला लागलेली गळती.* **(go) down the drain** फुकट जाणे, अपव्यय होणे. **drain** *क्रि* १ [*अक, सक*] (*away/off; from*)// (द्रवपदार्थ) वाहून जाणे/नेणे : *The water ~ed away, पाणी वाहून गेले* ○ *She ~ed the oil from the engine, तिने इंजिनातले तेल काढून टाकले.* २ [*सक*] (प्याला) रिकामा करणे. ३ [*अक, सक*] द्रवपदार्थ वाहून गेल्यावर कोरडे होणे, कोरडे करणे, निथळणे : *Leave the dishes to ~, डिशेस् निथळू दे.* ४ [*सक*] जास्त क्षीण किंवा हिणकस करणे. **drainage** *ना* [*अगण*] १ मैला किंवा सांडपाण्याच्या निचऱ्याची व्यवस्था, जलनिःसारण, जलोत्सारण. २ निचरा करण्याची क्रिया. **'draining-board** (*अमे* **'drain-board**) *ना* [*गण*] सिंकला लागून असलेला आणि ताटवाट्या निथळत ठेवण्याचा कट्टा. **'drain-pipe** *ना* [*गण*] इमारतीच्या छपरावरून पावसाचे पाणी जमिनीवर आणणारा पाईप, सांडपणी वाहून नेणारा पाईप, पन्हळ व पाईप.

drake /ड्रेइक्/ *ना* [*गण*] बदकांतील नर.

drama /'ड्राम/ *ना* १ [*गण*] नाट्यगृह, आकाशवाणी, दूरदर्शन वगैरेसाठीचे नाटक. २ [*अगण*] सर्वसाधारण नाटके : *Elizabethan ~, एलिझबेथच्या काळातील नाटके.* ३ [*गण, अगण*] उत्सुकता शिगेला पाहोचविणाऱ्या घटना, नाट्यमय प्रसंग. **dramatic** /ड्र'मॅटिक्/ *वि* १ उत्कंठा वाढविणारा किंवा परिणामकारक : *a ~tic development, नाट्यमय घडामोड.* २ रंगभूमीविषयक. **dramatically** /-क्लि/ *क्रिवि* नाट्यपूर्ण रीतीने. **dramatics** /ड्र'मॅटिक्स्/ *ना* [*अगण*] १ (अे.व क्रियापदासह) नाट्यनिर्मिती किंवा अभिनयकला, नाट्यकला. २ [*ब.व*] (*अधिक्षेपी*) अतिउल्हासाचे वर्तन, उतावळेपणा, (वागणुकीतला) नाटकीपणा. **dramatist** /'ड्रॅमटिस्ट्/ *ना* [*गण*] नाटककार, नाट्यलेखक. **dramatize** /'ड्रॅमटाइझ्/ *क्रि* [*सक*] १ (कथेचे) नाट्यरूपान्तर करणे. २ (एखादा प्रसंग) अधिक रंगतदार करणे, खुलवणे, तिखटमीठ लावून सांगणे. **dramatization** /,ड्रॅमटाइ'झेइशन्/ *ना* [*गण, अगण*] : *a ~tization of the novel, कादंबरीचे नाट्यरूपान्तर.*

drank DRINK चा *भूत.*

drape /ड्रेइप्/ *क्रि* [*सक*] १ (कापड वगैरे) सैलपणे टांगून ठेवणे, (कापडाने) लपेटणे. २ (*in/with*)// वस्त्रविभूषित करणे, कापडाने वगैरे झाकणे. ३ *round/over*// (शरीराचा हात, पाय यासारखा भाग) आरामात टेकवणे. **drape** *ना* [*गण, बहुधा ब.व*] (*अमे*) पडदे. **draper** *ना* [*गण*] (*ब्रि*) कापडाचा दुकानदार, कापडविक्या. **drapery** *ना* (*ब.व* **-ies**) १ [*गण, अगण*] टांगलेले कापड वगैरे. २ [*अगण*] (*ब्रि*) कापडविक्याचा धंदा किंवा त्याचा माल.

drastic /'ड्रॅस्टिक्/ *वि* कडक, जालीम; मोठा, महत्त्वाचा, लक्षणीय : *a ~ shortage of food, अन्नाचा मोठा तुटवडा.* **drastically** /-क्लि/ *क्रिवि* मोठ्या प्रमाणात.

draught /ड्राफ्ट्/ (*अमे* **draft** /ड्रॅफ्ट्/) *ना* १ [*गण*] वाऱ्याची झुळुक, झोत, आत येणारा वारा. २ [*गण*] घुटका, घोट. ३ (*वाक्प्र*) **on draught** (बिअर वगैरेबाबत) पिंपातून घेतलेली. **draught** *वि* १ (बिअर वगैरेबाबत) पिंपातून ओतून दिलेली. २ (जनावरांबाबत) ओझी वाहणारे, वजन ओढणारे. **draughtsman** (*अमे* **draftsman**) *ना* [*गण*] (*ब.व* **-men**) १ मशीन, इमारत वगैरेचे नकाशे काढणारा माणूस, आरेखक. २ रेखाटन करण्यात किंवा चित्रे काढण्यात तरबेज असणारा माणूस. **draughty** *वि* (**-ier, -iest**) थंड वारे वाहणारा, गार वाऱ्याचा.

draughts /ड्राफ्ट्स्/ *ना* (अे.व क्रियापदासह) पटावर २४ सोंगट्या घेऊन दोघांनी खेळायचा खेळ.

draw^1 /ड्रॉऽ/ *क्रि* (*भूत* **drew** /ड्रू/, *भूत वि* **~n** /ड्रॉऽन्/) १ [*अक, सक*] पेन, पेन्सिलने वगैरे चित्र काढणे, रेखाटणे. २ [*अक*] एखाद्या विशिष्ट दिशेत जाणे, रोखाने सरकणे : *The train drew into the station, गाडी स्टेशनच्या दिशेने सरकली/स्टेशनकडे आली.* ३ [*सक*] ओढणे : *The horses drew the coach along, घोडे गाडी ओढू लागले* ○ *~ the curtains,* (खिडकीवर वगैरे) *पडदे ओढणे/सरकवणे.* ४ [*सक*] *from/out of*// (बाहेर) काढणे : *~ a gun from one's pocket, खिशातून पिस्तूल काढणे.* ५ [*सक*] आकर्षित करणे, खेचून घेणे : *~ a crowd, गर्दी खेचणे.* ६ [*सक*] साठा, उगम वगैरेतून काढणे, घेणे किंवा मिळवणे : *~ water from a well, विहिरीतून पाणी काढणे/शिंदणे* ○ *~ one's salary, पगार काढणे.* ७ [*सक*] अभ्यास, चर्चा वगैरे करून काढणे किंवा मिळवणे : *~ a conclusion/comparision, निष्कर्ष काढणे/तुलना करणे* किंवा *साधर्म्य शोधून काढणे.* ८ [*अक, सक*] कोणत्याही संघाचा विजय न होता खेळ संपणे, सामना अनिर्णित राहणे : *The match was ~n, सामना अनिर्णित राहिला.* ९ [*अक, सक*] (श्वास) घेणे. १० [*अक, सक*] *(from)*// (भाग्यवान, विजेता वगैरे कोण हे) काढणे : *~ the winning ticket, विजयी तिकीट (किंवा त्याचा क्रमांक) काढणे, सोडत करणे.* ११ (*वाक्प्र*) **draw a 'blank** काहीही न सापडणे किंवा मिळणे, काहीही निष्पन्न न होणे. **draw lots** ➪ LOT^3. **draw the line at sth** एखादी गोष्ट करण्यास नकार देणे, त्या गोष्टीपाशी थांबणे, त्या गोष्टीची मर्यादा आखणे. १२ (*क्रिव*) **draw back (from sth/doing sth)** निश्चय न झाल्याने एखादी गोष्ट न करणे, कृती न करणे, मागे सरणे. **draw in** (दिवसाबाबत) लहान होणे, लवकर अंधार पडणे. **draw sb in, draw sb into sth** एखाद्याला एखाद्या गोष्टीत भाग घ्यायला लावणे, एखाद्याला मनाविरुद्ध सामील करून घेणे, गुंतवणे. **draw on** (वेळेबाबत) जवळ येणे, होत येणे. **draw on sth** एखाद्या गोष्टीचा वापर करणे, उपयोग करणे : *~ on sb's experience, एखाद्याच्या अनुभवाचा वापर करणे.* **draw out** (दिवस) मोठा होणे, लांबणे. **draw sb out** एखाद्याला बोलते करणे. **draw sth out** (चर्चा वगैरे) लांबवणे. **draw up** (वाहनाबाबत) थांबणे, येऊन ठेपणे. **draw oneself up** ताठ उभे राहणे. **draw sth up** (यादी, योजना वगैरे) तयार करणे, आखणे.

draw^2 /ड्रॉऽ/ *ना* [*गण*] १ कोणताही संघ विजयी झाला नाही असे घोषित करणारा सामन्याचा निकाल, अनिर्णित (सामना). २ [बहुधा *अे.व*] सोडत (काढणे); लॉटरी. ३ [बहुधा *अे.व*] बऱ्याच लोकांना आकर्षित करणारी वस्तू किंवा व्यक्ती, लोकांचे आकर्षण.

drawback /'ड्रॉऽबॅक्/ *ना* [*गण*] उणीव, दोष, व्यंग, कमीपणा; प्रश्न, समस्या, अडचण.

drawer /ड्रॉऽ(र्)/ *ना* [*गण*] कपाट, टेबल वगैरेचा पेटीसारखा सरकता भाग, खण.

drawing /'ड्रॉऽ·इङ्/ *ना* १ [*गण*] चित्र, रेखाटण, तसबीर. २ [*अगण*] चित्रकला. **'drawing-pin** *ना* [*गण*] सपाट बोंडाची आखूड टाचणी, फलक टोची. **'drawing-room** *ना* [*गण*] (*जुना, अप्रचलित*) पाहुण्यांना बसवायची खोली, बैठकीची खोली, दिवाणखाना.

drawl /ड्रॉऽल्/ *क्रि* [*अक, सक*] एखादी गोष्ट आवाज लांबवून हळूहळू म्हणणे, हेल काढून बोलणे. **drawl** *ना* [*अे.व*] हेल.

drawn^1 DRAW^1 चे *भूत वि.*

drawn^2 /ड्रॉऽन्/ *वि* (एखादी व्यक्ती किंवा तिचा चेहेरा याबाबत) दमलेला किंवा चिंताक्रांत, सचिंत.

dread /ड्रेड्/ *क्रि* [*सक*] खूप भिणे, घाबरणे, भीती वाटणे. **dread** *ना* [*अगण*] भय, भीती, घबराट, चिंता, धास्ती. **dreaded** *वि* दहशत वाटणारा; भयंकर, भयानक. **dreadful** *वि* फारच वाईट; भयानक, भयंकर. **dreadfully** *क्रिवि* भयानक, भयंकर; फार, अतिशय.

dream /ड्रीम्/ *ना* १ [*गण*] झोपेमधे माणसाच्या मनात येणारे विचार किंवा त्याला दिसणारी दृश्ये, स्वप्न. २ [*गण*] मनात सतत असणारी पण घडू न शकणारी गोष्ट : *his ~ of becoming president, अध्यक्ष बनण्याचे त्याचे स्वप्न.* ३ [*अे.व*] (*अनौप*) अचंबा वाटावा अशी व्यक्ती किंवा गोष्ट, स्वप्नातच भेटणारा. **dream** *क्रि* (*भूत, भूत वि* **~t** /ड्रेम्ड्/ किंवा

खास करून *अमे* ~ed) १ [*अक, सक*] स्वप्न पडणे, स्वप्न पाहणे, स्वप्नात अनुभवणे. २ [*अक, सक*] कल्पना करणे, स्वप्नरंजन करणे. ३ (*वाक्प्र*) **not dream of sth/doing sth** एखादी गोष्ट करण्याचा विचारही नसणे, स्वप्नातही न वाटणे; एखादी गोष्ट कधीही न करणे, स्वप्नातही न करणे : *I wouldn't ~ of allowing you to pay, तुला पैसे देऊ देण्याचा विचार मला स्वप्नातही शिवणार नाही.* ४ (*क्रिव*) **dream sth up** मूर्खपणाने विचार करणे, मूर्खपणाची गोष्ट मनात धरणे. **dream** *वि* (*अनौप*) स्वप्नातल्यासारखा, आश्चर्यकारक, स्वप्नवत् सुरेख : *a ~ house, स्वप्नातले घर.* **dreamer** *ना* [*गण*] १ स्वप्न पाहणारा. २ (*अधिक्षेपी*) अशक्य गोष्टीची कल्पना करणारा, स्वप्नात राहणारा. **dreamless** *वि* (निद्रेबाबत) स्वप्ने न पडणारी, स्वप्नहीन. **dreamlike** *वि* स्वप्नवत्; खरे नसणारे आणि विलक्षण. **dreamy** *वि* (-ier, -iest) १ (व्यक्तीबाबत) स्वतःच्या कामाशी संबंधित नसणारे विचार बाळगणारा, स्वप्नाळू. २ संदिग्ध; वास्तवात नसणारा. ३ शांत आणि प्रसन्न. **dreamily** *क्रिवि* स्वप्नात असल्याप्रमाणे.

dreary /'ड्रिअरि/ *वि* (-ier, -iest) कंटाळवाणा; उदास करणारा. **drearily** /-रलि/ *क्रिवि* कंटाळवाणेपणाने, अनाकर्षकपणे. **dreariness** *ना* [*अगण*] कंटाळवाणेपणा; उदासवाणेपणा.

dredge /ड्रेज्/ *क्रि* १ [*सक*] गाळ काढणाऱ्या नौकेने (नदी वगैरे) स्वच्छ करणे, साफ करणे. २ (*क्रिव*) **dredge sth up** विसरलेल्या वाईट गोष्टीचा पुनरुच्चार करणे. **dredger** *ना* [*गण*] नदी, पाट वगैरेतील गाळ काढण्याची यंत्रणा असणारी नौका.

dregs /ड्रेग्झ्/ *ना* [*ब.व*] १ द्रवपदार्थाच्या तळाशी बसणारा गाळ. २ (*अधिक्षेपी*) सर्वात निरुपयोगी भिकार असा भाग : *the ~ of society, समाजातील गाळ.*

drench /ड्रेन्च्/ *क्रि* [*सक*] भिजवून चिंब करणे : *We were ~ed in the rain, आम्ही पावसात चिंब भिजलो.*

dress^1 /ड्रेस्/ *ना* १ [*गण*] स्त्रीने किंवा मुलीने अंगात घालायचा सलग असा बाहेरचा कपडा. २ [*अगण*] कपडे, वेष : *formal ~, समारंभाचे किंवा प्रसंगानुरूप कपडे, एखाद्या वेळी करायचा पोषाख.* **'dressmaker** *ना* [*गण*] कपडे बनवणारी व्यक्ती – विशेषतः स्त्री. **'dress rehearsal** *ना* [*गण*] वेषभूषा, प्रकाशयोजना यासह केलेली शेवटची तालीम, संपूर्ण रंगीत तालीम.

dress^2 /ड्रेस्/ *क्रि* १ [*अक, सक*] कपडे करणे, वेषभूषा करणे. २ [*अक*] समारंभाचा पोषाख करणे : *~ for dinner, भोजनासाठी खास असे कपडे घालणे.* ३ [*सक*] सुशोभित करणे, सजवणे : *~ a shop window, दुकानाची दर्शनी खिडकी सजवणे.* ४ [*सक*] (जखम) स्वच्छ करून बांधणे. ५ [*सक*] शिजवण्यासाठी किंवा जेवणासाठी (अन्न) तयार करणे. ६ (*वाक्प्र*) **dressed to 'kill** (*अनौप*) भिन्नलिंगी व्यक्तीचे मन आकर्षित करण्यासाठी वेषभूषा करणे किंवा शृंगार करणे. ७ (*क्रिव*) **dress sb down** एखाद्यावर चिडून टीका करणे. **dress up** (क) चांगले कपडे करणे. (ख) (विशेषतः लहान मुलांबाबत) गंमत म्हणून नेहमीपेक्षा वेगळे कपडे घालणे.

dresser /'ड्रेस(र्)/ *ना* [*गण*] (विशेषतः *ब्रि*) वर डिशेस् ठेवण्यासाठी कप्पे आणि खाली कपाटे असलेले स्वयंपाकघरातील फर्निचर.

dressing /'ड्रेसिङ्/ *ना* १ [*गण, अगण*] जखमेवर बांधायची मलमपट्टी. २ [*गण, अगण*] सॅलडवर घालायचा सॉस किंवा रस. **'dressing-gown** *ना* [*गण*] पायजम्यावर वगैरे घालायचा सैलसर अंगरखा. **'dressing-table** *ना* [*गण*] शयनगृहातील खणाचे आणि वर आरसा असलेले टेबल.

drew DRAW^1 चा *भूत.*

dribble /'ड्रिब्ल्/ *क्रि* १ [*अक*] तोंडातून लाळ वगैरे गळणे, लाळ पाघळणे. २ [*अक, सक*] (द्रवपदार्थ) ठिबकणे, थेंबथेंब गळणे/पाडणे. ३ [*अक, सक*] हळूहळू मारत (चेंडू) पुढे नेणे. **dribble** *ना* [*गण*, बहुधा *ए.व*] गळती, ठिबकणे.

dried DRY चा *भूत, भूत वि.*

drier ➪ DRY

drift /ड्रिफ्ट्/ *क्रि* [*अक*] १ पाण्याच्या प्रवाहाबरोबर किंवा वाऱ्याच्या झोताबरोबर

वाहत जाणे. २ (लोकांबाबत) दिशाहीनतेने भटकणे किंवा राहणे, भरकटणे. **drift** *ना* १ [*अगण*] प्रवाहाबरोबर वाहत जाण्याची क्रिया, भरकटणे. २ [*गण*] वाऱ्याबरोबर आलेल्या हिमाचा साचलेला थर, हिमथर. ३ [*गण, अगण*] (*ला*) हळूहळू होणारी हालचाल किंवा बदल, रोख. ४ [*अे.व*] सर्वसाधारण अर्थ, एकंदर अर्थ : *the ~ of her argument, तिच्या म्हणण्याचा एकंदरीत अर्थ.* **drifter** *ना* [*गण*] भरकटलेला माणूस.

drill^1 /ड्रिल्/ *ना* [*गण*] भोक पाडायचे यंत्र, वेधनी, वेधनयंत्र, गिरमिट, छिद्रक. **drill** *क्रि* [*अक, सक*] वेधनीने भोक पाडणे.

drill^2 /ड्रिल्/ *ना* १ [*गण*] एखादी गोष्ट शिकविण्यासाठी ती पुन्हा पुन्हा करण्यावर भर देणारा स्वाध्याय: *pronunciation ~, उच्चारण घोटण्याचा स्वाध्याय.* २ [*अगण*] सैनिकांना शिक्षण देण्याची पद्धती, कवाईत. ३ [*गण*] आणीबाणीच्या काळात कृती करण्याचा योग्य मार्ग : *a fire ~, आग विझवण्याचा सराव.* **drill** *क्रि* [*अक, सक*] पुन्हापुन्हा करायला लावून शिकवणे, सराव देणे, घोटून घेणे.

drily ➪ DRY

drink /ड्रिङ्क्/ *क्रि* (*भूत* **drank** /ड्रॅङ्क्/, *भूत वि* **drunk** /ड्रॅङ्क्/) १ [*अक, सक*] (द्रवपदार्थ) तोंडात घेणे आणि गिळणे, पिणे. २ [*अक*] दारू/मद्य घेणे/पिणे. ३ (*वाक्प्र*) **drink sb's health** (*औप*) एखाद्या विषयी आदरभावना व सद्भावना व्यक्त करण्यासाठी मद्याचा पेला हवेत उंच धरून मग ते मद्य पिणे. **drink like a fish** (*अनौप*) चिकार दारू पिणे, दारू ढोसणे. ४ (*क्रिब*) **drink sth in** एखादी गोष्ट अगदी लक्षपूर्वक पाहणे किंवा ऐकणे, एखाद्या भाषणाचे आकंठपान करणे. **drink to sb/sth** एखाद्याला आनंद व्हावा अशी इच्छा व्यक्त करणे, एखाद्याचे भले चिंतणे, आशीर्वाद देणे. **drink** *ना* [*गण, अगण*] १ पेय. २ मद्य. **drinkable** *वि* पिण्याजोगे. **drinker** *ना* [*गण*] (बहुधा खूप) दारू पिणारा, मद्यपी, दारुडा.

drip /ड्रिप्/ *क्रि* (**-pp-**) [*अक, सक*] १ ठिबकणे, थेंबथेंब पडणे. २ (*वाक्प्र*) **,dripping 'wet** खूप ओला, थबथबणारा ओला, चिंब ओला. **drip** *ना* [*गण*] १ पडणाऱ्या द्रवाचे थेंब, थबथब. २ (वैद्यक) द्रवरूपी अन्न वगैरे थेट रोग्याच्या शिरेत सोडण्याचे साधन. ३ (*व्रात्य*) मंद बुद्धीचा कमकुवत माणूस, डच्चड माणूस. **,drip-'dry** *वि* (कपड्यांबाबत) टांगल्यावर पाणी गाळून लवकर कोरडे होणारे, पाणी पडून चटकन् वाळणारे. **dripping** *ना* [*अगण*] भाजलेल्या मांसातील चरबी.

drive^1 /ड्राइव्ह्/ *क्रि* (*भूत* **drove** /ड्रउव्ह्/, *भूत वि* **~n** /'ड्रिव्ह्न्/) १ [*अक, सक*] (वाहन) कार्यान्वित करून ताब्यात ठेवणे, चालवणे. २ [*सक*] (एखाद्याला) गाडीतून नेणे. ३ [*सक*] (माणसे किंवा जनावरे) हाकलणे, हाकणे. ४ [*सक*] (मशीन) चालवणारी शक्ती असणे. ५ [*सक*] (चेंडू) जोराने टोलावणे/मारणे. ६ [*सक*] ठोकणे: *~ a nail into wood, लाकडात खिळा ठोकणे.* ७ [*सक*] एखाद्याला विशिष्ट मनस्थितीत ढकलणे: *You're driving me mad! मला वेड लागेल असे तू करतोयस् किंवा तुझ्यामुळे माझ्यावर वेड लागण्याची पाळी आली आहे.* ८ (*वाक्प्र*) **be driving at** रोख असणे, अर्थ असणे: *What are you driving at? तुला काय म्हणायचं/सुचवायचं आहे?* **drive a hard 'bargain** व्यापारी करारात दुसऱ्याचे म्हणणे सहजासहजी मान्य न करणे. **'drive-in** *ना, वि* गाडीत बसल्याबसल्या खाता येणे, मनोरंजन होणे वगैरेची सोय होऊ शकेल अशी (जागा). **driver** *ना* [*गण*] वाहन चालविणारा माणूस, वाहनचालक. **'driving-licence** (*अमे* **driver's license**) *ना* [*गण*] गाडी चालविण्याची परवानगी आहे असे दाखविणारा अधिकृत पुरावा, चालकत्वाचा परवाना.

drive^2 /ड्राइव्ह्/ *ना* १ [*गण*] गाडीतून प्रवास. २ [*गण*] (*अमे* बहुधा **'driveway**) घराकडे जाणारा खाजगी रस्ता. ३ [*गण*] गोल्फ, टेनिस वगैरेमधे मारलेला जोरदार फटका. ४ [*अगण*] धमक, धडाडी. ५ [*गण*] तीव्र इच्छा, वासना. ६ [*गण*] संघटित प्रयत्न; प्रचार, मोहीम : *an export ~, निर्यातीची मोहीम.*

drivel /'ड्रिव्ह्ल्/ *ना* [*अगण*] खुळचटपणा, भंपकपणा.

drizzle /'ड्रिझ्ल्/ *ना* [*अगण*] रिमझिम किंवा झिमझिम पाऊस, पावसाची बुरबुर. **drizzle** *क्रि* [*अक*] (*it* या शब्दासह वापर) रिमझिम

पाऊस पडणे.

drone /ड्रउन्/ *क्रि* १ [*अक*] घूं घूं आवाज करणे, घरघरणे. २ (*क्रिब*) **drone on** कंटाळवाण्या आवाजात दीर्घकाळ बोलत बसणे, पिळणे. **drone** *ना* १ [*अे.व*] घरघर, घूं घूं आवाज; गुणगुण. २ [*गण*] मधमाशीचा नर. ३ [*गण*] (*ब्रि अधिक्षेपी*) काम न करणारा, भोजनभाऊ.

drool /ड्रूल्/ *क्रि* [*अक*] १ लाळ गळणे, तोंडाला पाणी सुटणे. २ (*over*)// (*अनौप*) एखादी गोष्ट/ व्यक्ती खूप आवडते असे मूर्खपणाने दाखविणे.

droop /ड्रूप्/ *क्रि* [*अक*] अशक्तपणामुळे पुढे वाकणे किंवा जीव नसल्याप्रमाणे खाली लोंबणे, पडणे.

drop^1 /ड्रॉप्/ *क्रि* (**-pp-**) १ [*अक, सक*] पडणे किंवा पाडणे, (हातातून) सुटणे किंवा टाकणे. २ [*अक*] कमी होणे, उतरणे, खाली येणे. ३ [*सक*] (*off*)// एखाद्याला गाडीने वगैरे सोडणे. ४ [*सक*] (*from*)// वगळणे: *He's been ~ped from the team, संघातून त्याला वगळण्यात आले आहे.* ५ [*सक*] (*अनौप*) (पत्राद्वारे वगैरे) निरोप धाडणे; सहज म्हणून बोलणे, शब्द टाकून पाहणे. ६ [*सक*] (एखादी गोष्ट) करण्याचे किंवा बोलण्याचे थांबवणे, सोडून देणे. ७ (*वाक्प्र*) **drop sb a line** (*अनौप*) एखाद्याला छोटेसे पत्र पाठवणे, चार ओळी लिहिणे. ८ (*क्रिब*) **drop back** हळूहळू चालून इतरांच्या मागे पडणे. **drop by/in/ round, drop in on sb** सहज म्हणून/ जाता जाता एखाद्याला भेट देणे. **drop off** (क) झोप लागणे. (ख) कमी होणे. **drop out (of sth)** (क) कॉलेज वगैरे अभ्यासक्रम पूर्ण न करताच सोडणे. (ख) एखाद्या कामातून माघार घेणे, अंग काढून घेणे. **'drop-out** *ना* [*गण*] (शाळा वगैरे) सोडणारा, गळती झालेला माणूस. **droppings** *ना* [*ब.व*] जनावरे किंवा पक्षी यांची विष्टा.

drop^2 /ड्रॉप्/ *ना* १ [*गण*] थेंब. २ **drops** [*ब.व*] औषधाचे थेंब. ३ [*गण*] (गोड) गोळी – उदा लिमलेटची. ४ [*अे.व*] खोल उभे अंतर, खोली, उभी उंची: *a ~ of 500 metres, ५०० मीटरची सरळसोट खोली.* ५ [*अे.व*] (*ला*) कमी होणे, घट: *a ~ in prices, किमतीतील घट.* ६ (*वाक्प्र*) **at the ,drop of a 'hat** आढेवढे न घेता, पटकन्.

drought /ड्राउट्/ *ना* [*गण, अगण*] कोरड्या हवामानाचा मोठा काळ, सुकवा, अवर्षण, दुष्काळ.

drove^1 DRIVE^1 चा *भूत.*

drove^2 /ड्रउव्ह्/ *ना* [*गण*] खूप मोठा गट, झुंड, तांडा: *~s of visitors, पाहुण्यांचे/ प्रवाशांचे तांडे, भेटीला येणाऱ्यांच्या झुंडी.*

drown /ड्राउन्/ *क्रि* १ [*अक, सक*] पाण्यात दम घुटून मरणे, बुडून मरणे, बुडवून मारणे. २ [*सक*] (*out*)// (आवाजाबाबत) एखादा आवाज दुसऱ्या मोठ्या आवाजात बुडून जाणे. ३ (*वाक्प्र*) **drown one's 'sorrows** दुःख विसरण्यासाठी स्वतःला दारूत बुडवून घेणे.

drowsy /'ड्राउझि/ *वि* (**-ier, -iest**) झोपेला आलेला, पेंगुळलेला, गुंग. **drowsily** *क्रिवि* पेंगुळल्या अवस्थेत, झोपेत, झोपाळूपणे, तंद्रीत. **drowsiness** *ना* [*अगण*] झोपेची तंद्री किंवा गुंगी.

drudge /ड्रिज्/ *ना* [*गण*] कठीण कंटाळवाणे काम करणारा माणूस, काबाडकष्ट करणारा. **drudgery** /-अरि/ *ना* [*अगण*] काबाडकष्ट, हमाली काम, कुत्तेघशी.

drug /ड्रिग्/ *ना* [*गण*] १ औषधी द्रव्य. २ कोकेन, हेरोइन यासारखा तात्पुरत्या सुखासाठी वापरला जाणारा अमली पदार्थ, मादक द्रव्य: *He's on ~s, तो मादक पदार्थ घेतो.* **drug** *क्रि* (**-gg-**) [*सक*] १ (अन्नात वगैरे) घातक अमली पदार्थ मिसळणे. २ अमली पदार्थ देऊन एखाद्याला बेशुद्ध करणे. **'drug addict** *ना* [*गण*] मादक द्रव्याच्या आधीन झालेला. **'drugstore** *ना* [*गण*] (*अमे*) औषधांबरोबरच इतर अनेक वस्तू आणि खाण्याचे पदार्थ विकणारे दुकान.

drum /ड्रिम्/ *ना* [*गण*] १ पोकळ, चक्राकार पट्टीवर कातडे ताणून बसवून तयार केलेले एक वाद्य, ढोल, पडघम. २ धातूचे मोठे गोलाकार भांडे, पिंप: *an oil ~, तेलाचे पिंप.* **drum** *क्रि* (**-mm-**) १ [*अक*] ढोल वाजवणे. २ [*अक, सक*] एखाद्या (टेबलासारख्या) पृष्ठभागावर बोटांनी ताल धरणे, (टेबलावर वगैरे) वाजवणे. ३ (*क्रिब*) **drum sth into sb** पुन्हापुन्हा

सांगून एखाद्याच्या डोक्यात ती गोष्ट न विसरेल अशी बसवणे, ठोकून बसवणे. **drum sth up** पाठिंबा, गिऱ्हाईक वगैरे मिळविण्यासाठी धडपड करणे. **drummer** *ना* [*गण*] ढोल वाजवणारा, ढोलकीवाला. **'drumstick** *ना* [*गण*] १ ढोल वाजवायची काठी, टिपरी. २ शेवग्याची शेंग.

drunk^1 DRINK चे *भूत वि.*

drunk^2 /ड्रंङ्क्/ *वि* दारू पिऊन तर्र झालेला, प्यालेला, झिंगलेला. **drunk** (तसेच **drunkard** /-अड्/) *ना* [*गण*] झिंगणारा माणूस, दारुड्या, दारुबाज, मद्यपी. **drunken** *वि* दारू चढलेला, नशा चढलेला, कैफातला. २ झिंगलेला, प्यालेला. **drunkenly** *क्रिवि* नशेमधे, झिंगून. **drunkenness** *ना* [*अगण*] कैफ, नशा, झिंग.

dry /ड्राइ/ *वि* (**drier, driest**) १ कोरडा, शुष्क : *a ~ cloth, कोरडे/वाळलेले कापड* ○ *~ paint, वाळलेला रंग* ○ *~ weather,* कोरडी *हवा.* २ (दारूबाबत) गोड नसलेली. ३ (विनोदाबाबत) गंभीरतेचा आव आणणारा; उपरोधिक. ४ रटाळ; रुक्ष, अनाकर्षक : *a ~ speech, रटाळ भाषण.* **drier** (तसेच **dryer**) /'ड्राइअ(र्)/ *ना* [*गण*] वाळवणारे यंत्र : *a clothes drier, कपडे वाळवायचे यंत्र.* **dry** *क्रि* (*भूत, भूत वि* **dried**) १ [*अक, सक*] वाळणे, वाळवणे, सुकणे, सुकवणे. २ (*क्रिब*) **dry (sth) out** पूर्णपणे/कडक वाळवणे. **dry up** (क) (पुरवठ्याबाबत) संपणे. (ख) शब्द विसरल्याने बोलणे अशक्य होणे. **dry (sth) up** डिशेस् धुतल्यानंतर फडक्याने कोरड्या करणे, ताटे पुसणे. **,dry-'clean** *क्रि* [*सक*] पाण्याऐवजी एखादे रसायन वापरून (कपडे वगैरे) स्वच्छ करणे. **,dry-'cleaner** *ना* [*गण*] कपडे ड्रायक्लीन करणारा. **,dry-'cleaning** *ना* [*अगण*] कपड्यांची रासायनिक धुलाई. **,dry 'dock** *ना* [*गण*] जहाज दुरुस्त करण्यासाठी पंपाने पाणी काढून कोरडी केलेली गोदी. **dryly** (तसेच **drily**) /'ड्राइलि/ *क्रिवि* उपरोधाने. **dryness** *ना* [*अगण*] कोरडेपणा; रूक्षता, उपरोध. **,dry 'rot** *ना* [*अगण*] लाकडाचा भुगा करणारा रोग.

dual /'ड्यू·अल्; *अमे* 'डू·अल्/ *वि* दोन भागांचा, दुहेरी, द्वि; दुप्पट. **,dual 'carriageway** *ना* [*गण*] गवताचा पट्टा वगैरेने मंध्यभागी दुभागलेला रस्ता.

dub /डब्/ *क्रि* (**-bb-**) [*सक*] १ (एखाद्याला) टोपण नाव देणे, दुसरे नाव ठेवणे. २ एखाद्या चित्रपटातील मूळ संवाद दुसऱ्या भाषेत भाषान्तरीत करणे.

dubious /'ड्यूबिअस्; *अमे* 'डू-/ *वि* शंका निर्माण करणारा, शंकास्पद; शंकेची भावना असलेला, साशंक. **dubiously** *क्रिवि* शंकास्पद रीतीने, साशंक पद्धतीने.

duchess /'डचिस्/ *ना* [*गण*] १ ड्यूकची पत्नी किंवा विधवा. २ ड्यूकची श्रेणी असलेली स्त्री.

duchy /'डचि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) ड्यूक किंवा डचेसची जमीन.

duck^1 /डक्/ *ना* (*ब.व* **duck** किंवा ~s) १ (क) [*गण*] बदक. (ख) [*गण*] बदकाची मादी. (ग) [*अगण*] बदकाचे मांस. २ [*गण*] (क्रिकेटमधे) फलंदाजाची शून्य धावसंख्या.

duck^2 /डक्/ *क्रि* १ [*अक, सक*] पटकन् (डोके) खाली करणे, वाकणे, चुकवणे, हुकवणे. २ [*सक*] एखाद्याला पाण्यात डुब्बी देणे. ३ [*अक, सक*] (*out of*)// एखादी जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न करणे.

duckling /'डक्लिङ्/ *ना* [*गण*] बदकाचे पिलू.

duct /डक्ट्/ *ना* [*गण*] हवा किंवा पाणी वाहून नेणारी नळी किंवा वाहिनी.

dud /डड्/ *ना* [*गण*], *वि* (*अनौप*) निरुपयोगी किंवा किंमत नसलेली गोष्ट, कुचकामी वस्तू : *a ~ cheque, कुचकामी धनादेश.*

due /ड्यू; *अमे* डू/ *वि* १ देय असलेला, एखाद्याकडून पैसे येणे असलेला, ज्याचे देणे आहे असा; एखाद्याला पैसे देणे असलेला, ज्याला देणं आहे असा. २ अपेक्षित, ठरलेला : *The train is ~ (to arrive) at 1.30, दीडला गाडी यावी* किंवा *दीड वाजता गाडी अपेक्षित आहे.* ३ योग्य, उचित, रास्त. ४ *to*// -च्या मुळे, -च्या कारणाने : *Her success is ~ to hard work, खूप कष्ट घेतल्यामुळे तिला यश मिळाले.* **due** *क्रिवि* (होकायंत्रावरील दिशांबाबत) बरोबर : *~ east, बरोबर पूर्वेला.* **due** *ना* १ [*अे.व*] एखाद्याला त्याचा हक्क म्हणून द्यायची

गोष्ट. २ **dues** [*ब.व*] सभासदत्वाची वगैरे देय असलेली वर्गणी, येणे रक्कम.

duel /'ड्यूअल्; *अमे* 'डूअल्/ *ना* [*गण*] १ (पूर्वीच्या काळी) दोन व्यक्तींमधील तलवारी किंवा बंदुका यांनी अधिकृतपणे करायची लढाई, द्वंद्वयुद्ध. २ दोन माणसांतील किंवा गटांतील स्पर्धा. **duel** *क्रि* (-ll-; *अमे* -l-) [*अक*] द्वंद्वयुद्ध करणे.

duet /ड्यू'अेट्; *अमे* डू'अेट्/ *ना* [*गण*] दोघांनी वाजवायचे किंवा म्हणायचे संगीत, द्वंद्वगीत, जुगलबंदी.

duffle-coat (तसेच **duffel-coat**) /'डफ्ल्कउट्/ *ना* [*गण*] जाड लोकरीच्या कापडाचा, अंगची टोपी असणारा आणि बटणाऐवजी बंद असणारा कोट.

dug DIG^2 चा *भूत, भूत वि.*

dug-out /'डगाउट्/ *ना* [*गण*] १ झाडाचा बुंधा कोरून केलेली लंबुळकी नाव. २ जमीन खणून केलेली छपराची निवाऱ्याची/लपायची जागा; जमिनीत खणलेला चर.

duke /ड्यूक्; *अमे* डूक/ *ना* [*गण*] सर्वोच्च श्रेणीचा सरदार. **dukedom** *ना* [*गण*] १ सर्वोच्च सरदाराची श्रेणी किंवा त्याचा किताब. २ ड्यूकच्या आधिपत्याखालील मुलूख.

dull /डल्/ *वि* १ तेजस्वी, लखलखीत किंवा स्पष्ट नसलेला, मंद, फिका, अस्पष्ट. २ समजण्यात मंद बुद्धीचा, ढ, मठ्ठ. ३ अनाकर्षक; कंटाळवाणा. ४ टोकदार नसलेला, बोथट, कमी तीक्ष्ण : *a ~ knife/ache, बोथट सुरी, कमी तीक्ष्ण ठणका.* **dull** *क्रि* [*अक, सक*] बोथट होणे/करणे. **dullness** *ना* [*अगण*] कंटाळवाणेपणा. **dully** /डल्·लि/ *क्रिवि* मरगळेपणाने.

duly /'ड्यूलि; *अमे* 'डूलि/ *क्रिवि* १ योग्य पद्धतीने/रीतीने; योग्य वेळी.

dumb /डम्/ *वि* १ बोलू न शकणारा, मुका. २ बोलण्यास तयार नसलेला, मौन बाळगणारा. ३ (*अनौप अधिक्षेपी*) मूर्ख, मठ्ठ. **dumbly** *क्रिवि* मुक्याने, मठ्ठपणे. **dumbness** *ना* [*अगण*] मुकेपण, मठ्ठपणा.

dumbfounded /डम्'फाउन्डिड्/ *वि* आश्चर्याने अवाक् झालेला, सर्द, गार, बोबडी वळलेला.

dummy /'डमि/ *ना* [*गण*] (*ब.व* -ies) १ दुकानात कपडे दाखविण्यासाठी वगैरे केलेला खऱ्या माणसासारखा दिसणारा पुतळा, नक्कल. २ चित्रपटात प्रमुख नटाच्या जागी तसाच पेहेराव वगैरे करून काम करणारा माणूस. ३ (*ब्रि*) स्तनाग्रासारखे दिसणारे लहान मुलाला चोखायला द्यायचे रबराचे बूच, निपल. **,dummy 'run** *ना* [*गण*] खऱ्या प्रयोगापूर्वी सरावासाठी किंवा चाचणीसाठी केलेला प्रयत्न, (सोंगट्यात) देवाचे/धर्माचे दान.

dump /डम्प्/ *क्रि* [*सक*] १ (नको असलेली गोष्ट) एखाद्या ठिकाणी टाकणे : *~ rubbish in the river, नदीत कचरा टाकणे.* २ एखादी गोष्ट निष्काळजीपणे ठेवणे/टाकणे, फेकणे. ३ (*अधिक्षेपी*) स्वदेशात उठाव नसलेला माल दुसऱ्या देशात कमी किमतीला विकून टाकणे. **dump** *ना* [*गण*] १ कचरा टाकायची जागा, अडगळीची जागा, कचरापट्टी. २ सैन्यसामग्रीचे दुकान. ३ (*अनौप अधिक्षेपी*) घाणेरडी जागा, गचाळ जागा. ४ (*वाक्प्र*) **down in the dumps** दुःखी, उदास. **'dumper truck** *ना* [*गण*] माती, कचरा वगैरे वाहून नेणारा ट्रक, कचरागाडी.

dumpling /'डम्प्लिङ्/ *ना* [*गण*] मांस किंवा फळे यांबरोबर खायचा कणकेचा शिजवलेला गोळा.

dumpy /'डम्पि/ *वि* (-ier, -iest) बुटका आणि जाड, गिड्डा.

dunce /डन्स्/ *ना* [*गण*] (*अधिक्षेपी*) शाळेत मागे पडणारा विद्यार्थी, शिकण्यात मंद असणारा विद्यार्थी.

dune /ड्यून्; *अमे* डून्/ (तसेच **'sand-dune**) *ना* [*गण*] वाऱ्याने तयार झालेले वाळूचे लांब, फार उंच नसलेले टेकाड, वाळूटेकाड.

dung /डङ्/ *ना* [*अगण*] जनावरांची विष्टा, शेण.

dungarees /,डङ्ग'रीझ्/ *ना* [*ब.व*] सुती कापडाचा लेंग्यासारखा पायघोळ कपडा.

dungeon /'डन्जन्/ *ना* [*गण*] तळघरातील अंधारकोठडी.

dunk /डङ्क्/ *क्रि* [*सक*] (पातळ कालवणात) अन्न खाण्यापूर्वी बुडवणे, (अन्न) एखाद्या पातळ

पदार्थात भिजवून/त्याला लावून खाणे.

duo /'ड्यूअउ; *अमे* 'डूअउ/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s**) प्रयोग करणाऱ्यांची जोडी, कलाकारांची दुक्कल.

dupe /ड्यूप्; *अमे* डूप्/ *क्रि* [*सक*] फसवणे, टोपी घालणे, गंडवणे. **dupe** *ना* [*गण*] ठकवला गेलेला माणूस, भोळसर.

duplex /'ड्यूप्लेक्स्; *अमे* 'डू-/ *ना* [*गण*] (*अमे*) १ जोडघर. २ दुमजली फ्लॅट.

duplicate^{1} /'ड्यूप्लिकेइट्; *अमे* 'डूप्लकेइट्/ *क्रि* [*सक*] हुबेहूब नक्कल करणे. **duplication** /,ड्यूप्लि'केइश्न्; *अमे* ,डूप्ल'केइश्न्/ *ना* [*अगण*] हुबेहूब नक्कल, प्रतिकृती. **duplicator** *ना* [*गण*] कागदपत्रांची नक्कल काढणारे मशीन.

duplicate^{2} /'ड्यूप्लिकट्; *अमे* 'डूप्लकट्/ *वि* एखाद्या गोष्टीसारखा हुबेहूब दिसणारा; एकसारखा, जसाच्या तसा, सरूप. **duplicate** *ना* [*गण*] १ एखाद्यासारखा हुबेहूब दिसणारा, प्रतिलिपी. २ (*वाक्प्र*) **in duplicate** दोन नकलात.

durable /'ड्युअरब्ल्; *अमे* 'डु-/ *वि* दीर्घकाळ टिकणारा, टिकाऊ. **durables** *ना* [*ब.व*] खूप काळ टिकणाऱ्या धुलाई-यंत्रासारख्या वस्तू, टिकाऊ वस्तू.

duration /ड्यु'रेइश्न्; *अमे* डु-/ *ना* [*अगण*] एखाद्या गोष्टीचा (म्हणजे ती असण्याचा) कालावधी.

duress /ड्यु'रेस्; *अमे* डु-/ *ना* [*अगण*] धमकी, जबरदस्ती, बळजबरी : *under ~, धाकदपटशाखाली.*

during /'ड्युअरिङ्; *अमे* 'डु-/ *शब्दयो* १ संपूर्ण (काळा) मधे, त्या काळात, -च्या काळात, भर. २ मधे कधीतरी : *He died ~ the night, तो रात्री कधीतरी मेला.*

dusk /डस्क्/ *ना* [*अगण*] रात्र पडण्यापूर्वीचा काळ, तिन्हिसांजा. **dusky** *वि* (**-ier, -iest**) अंधुक, धूसर; काळोखी, अंधारी.

dust /डस्ट्/ *ना* [*अगण*] धूळ, धुरळा. **dust** *क्रि* [*सक*] १ धूळ पुसणे. २ पावडर शिंपडणे. **'dustbin** *ना* [*गण*] घरातील कचऱ्याचा डबा, कचरापेटी. **'dust bowl** *ना* [*गण*] अवर्षण वगैरेने निष्पर्ण झालेला भाग, वैराण भाग. **'dust-cart** *ना* [*गण*] कचरापेट्यातून कचरा गोळा करण्याची लॉरी. **duster** *ना* [*गण*] फर्निचरवरची धूळ झटकण्याचे फडके, झटकणी. **'dust-jacket** *ना* [*गण*] पुस्तकाला घालायचे कागदाचे सुटे कव्हर. **'dustman** /-मन्/ *ना* [*गण*] (*ब.व* **-men**) कचरा टाकणारा माणूस. **dustpan** *ना* [*गण*] कचरा ओढून घ्यायचे चपटे भांडे, केरपात्र. **dust-sheet** *ना* [*गण*] धूळ बसू नये म्हणून फर्निचरवर घालायचे मोठे कापड. **dusty** *वि* (**-ier, -iest**) धुळीने भरलेला, धुळकट, धुळीचा.

Dutch /डच्/ *वि* १ नेदरलंड किंवा हॉलंडचा, हॉलंडवासी किंवा हॉलंडची भाषा. २ (*वाक्प्र*) **go Dutch (with sb)** खर्च वाटून घेणे.

duty /'ड्यूटि; *अमे* 'डूटि/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) १ एखाद्याने केलेच पाहिजे असे काही, कर्तव्य, दिलेले काम. २ कर : *customs duties, सीमाशुल्क.* ३ (*वाक्प्र*) **on/off duty** कामावर असणारा/नसणारा. **dutiful** *वि* आदर आणि आज्ञाधारकपणा अंगी असणारा, कर्तव्यदक्ष, कर्तव्यतत्पर. **dutifully** *क्रिवि* कर्तव्यदक्षतेने, कर्तव्यतत्परतेने. **,duty-'free** *वि, क्रिवि* (मालाबाबत) सीमाशुल्कात सूट मिळून देशात आयात करता येण्याजोगा.

duvet /'डूव्हेइ/ *ना* [*गण*] पांघरण्यासाठी वापरायची मऊ पिसे भरून केलेली दुलई किंवा रजई.

dwarf /ड्वॉऽफ्/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s**) सर्वसाधारण उंचीपेक्षा खूप कमी उंची असणारा माणूस, प्राणी किंवा तसे झाड, खुजा, वामन. **dwarf** *क्रि* [*सक*] एखादा लहान दिसेल/खुजा दिसेल असे करणे.

dwell /ड्वेल्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **dwelt** /ड्वेल्ट्/) १ [*अक*] (*पुरा* किंवा *अलं*) (एखाद्या स्थळी) राहणे, निवास करणे. २ (*क्रिब*) **dwell on sth** एखाद्या गोष्टीचा खूप विचार करणे, तीवर खूप बोलणे किंवा लिहिणे. **dweller** *ना* [*गण*] (सामासिक नामांत) उल्लेखित स्थळी राहणारा माणूस, -वासी : *city-~ers, शहरवासी.* **dwelling** *ना* [*गण*] (*औप*) घर, निवास, धाम.

dwindle /'ड्विन्ड्ल्/ *क्रि* [*अक*] संख्या,

आकार, राशी वगैरे कमी होणे, घटणे.

dye /डाइ/ *क्रि* (*वर्त वि* ~**ing**) [*सक*] रंगात बुडवून एखादी गोष्ट रंगीत करणे, रंगवणे. **dye** *ना* [*गण, अगण*] कापडाला वगैरे देण्याचा रंग. **,dyed-in-the-'wool** *वि* आग्रही मते असलेला.

dying ➪ DIE^{2}

dyke = DIKE

dynamic /डाइ'नॅमिक्/ *वि* १ गती किंवा कार्यत्वरा निर्माण करणाऱ्या प्रेरकाचा, गतिक. २ कार्यरत, जोशपूर्ण. **dynamically** /-क्लि/ *क्रिवि* जोशपूर्णपणे, जिवंतपणे. **dynamics** *ना* [*अगण*] (अेकवचनी क्रियापदासह) गती आणि प्रेरक यांचा अभ्यास करणारी भौतिकशास्त्राची एक उपशाखा, गतिशास्त्र, गतिकी. **dynamism** /'डाइनमिझ़म्/ *ना* [*अगण*] जोशपूर्णता, तरतरीतपणा.

dynamite /'डाइनमाइट्/ *ना* [*अगण*] १ शक्तिशाली स्फोटक, अभिस्फोटक. २ (*ला*) धक्का देणारा किंवा उत्तेजित करणारा माणूस, प्रक्षोभक व्यक्ती. **dynamite** *क्रि* [*सक*] स्फोटके वापरून एखादी गोष्ट उडवणे, सुरूंग लावणे.

dynamo /'डाइनमउ/ *ना* [*गण*] (*ब.व* ~**s**) पाणी वगैरेच्या प्रवाहाच्या जोरापासून वीज निर्माण करणारे यंत्र, विद्युत्जनित्र.

dynasty /'डिनस्टि; *अमे* 'डाइ-/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) एकाच घराण्यातील राज्यकर्ते, राजवंश, राजघराणे.

dysentery /'डिसन्ट्रि; *अमे* -टेरि/ *ना* [*अगण*] आतड्याचा वेदनाकारक रोग, आमांश, आव, प्रवाहिका.

dyslexia /डिस्'लेक्सिअ; *अमे* -लेक्श/ *ना* [*अगण*] लेखन आणि वाचनातील अनैसर्गिक अडचण. **dyslexic** /-लेक्सिक्/ *ना* [*गण*], *वि* लेखन आणि वाचनातील अनैसर्गिक अडचण असलेली (व्यक्ती).

E e

E, e /ई किंवा अी/ *ना* [*गण*] (*ब.व* **E's, e's** /ईझ़/) इंग्रजी वर्णमालेतील पाचवे अक्षर. **'E number** *ना* [*गण*] अन्नात मिसळलेला पदार्थ दाखविणारा कोड नंबर.

E *संरू* १ (विशेषतः विजेच्या प्लगवर) earth, भूसंपर्कन. २ east(ern) पूर्व : *E Sussex, पूर्व ससेक्स.*

each /ईच्/ *वि* (दोन किंवा त्यापेक्षा जास्त गोष्टींबाबत) प्रत्येक, हरेक, दर : *a ring on ~ finger, प्रत्येक बोटात अंगठी.* **each** *सना* प्रत्येक, (गटातील) प्रत्येकजण : *~ of the girls, प्रत्येक मुलगी.* **each** *क्रिवि* प्रत्येकासाठी, प्रत्येकी : *They cost £10 each, त्या प्रत्येकाची किंमत दहा पौंड आहे.* **each 'other** (क्रियापदांचे कर्म किंवा शब्दयोगी म्हणून फक्त वापर) एकमेक, एक दुसरा : *Paul and Sue helped ~ other, पॉल आणि सूने एकमेकाला मदत केली.*

eager /'ईग(र्)/ *वि* (*for; to*)// एखादी गोष्ट करण्यासाठी किंवा मिळवण्यासाठी उत्सुक, उतावीळ, आसक्त : *~ for success, यशासाठी/यश मिळविण्यास उत्सुक.* **eagerly** *क्रिवि* उत्सुकतेने. **eagerness** *ना* [*अगण*] उत्सुकता, उतावीळपणा.

eagle /'ईग्ल्/ *ना* [*गण*] लहान लहान प्राणी खाणारा एक मोठा ताकदवान पक्षी, गरुड. **,eagle-'eyed** *वि* बारीकसारीक तपशील पाहण्यात तरबेज.

ear^{1} /इअ(र्)/ *ना* १ [*गण*] कान, कर्ण. २ [*अे.व*] ऐकण्याचे ज्ञान, श्रवणज्ञान, कान : *She has a good ~ for music, तिला संगीताचा कान आहे.* ३ (*वाक्प्र*) **(be) all 'ears** तन्मयतेने ऐकणे. **(be) up to one's 'ears in sth** एखाद्या गोष्टीत पूर्ण गढलेला/बुडालेला असणे. **'earache** *ना* [*अगण, अे.व*] कानदुखी. **'ear-drum** *ना* [*गण*] ध्वनिलहरींनी कंप पावणारा कानातील त्वचेचा ताणलेला पडदा, कर्णपटल. **'ear-ring** *ना* [*गण*] कानात घालायचा अलंकार, कुंडल. **'earshot** *ना* [*अगण*] (*वाक्प्र*) **out of/within earshot** ऐकू येण्याच्या टप्प्याबाहेरचा/टप्प्यातला.

ear^{2} /इअ(र्)/ *ना* [*गण*] गहू, सातू वगैरे धान्याचे दाणे असणारे कणीस.

earl /अऽल्/ *ना* [*गण*] (*स्त्री* **countess**) मार्किसच्याखालची पण वाइकाउन्टच्या वरची अशी ब्रिटिश सरदाराची श्रेणी किंवा अशा श्रेणीचा सरदार. **earldom** *ना* [*गण*] अर्लची पदवी/किताब किंवा अर्लचा मुलूख.

early /'अऽलि/ *वि, क्रिवि* (**-ier, -iest**) आरंभाच्या जवळचा, लवकरचा, अलिकडचा, प्रारंभीचा : *in the ~ morning, भल्या सकाळी/सकाळी लवकर.* २ नेहमीच्या किंवा अपेक्षित वेळेपूर्वी, वेळेआधी : *The bus arrived ~, बस वेळेआधीच आली.* ३ (*वाक्प्र*) **at the earliest** लवकरात लवकर. **an 'early bird** (गंमत) लवकर येणारा/उठणारा माणूस. **early 'closing day** *ना* [*गण*] (*ब्रि*) प्रत्येक आठवड्यातील दुपारी लवकर दुकाने बंद करण्याचा ठराविक दिवस. **early 'warning system** *ना* [*गण*] शत्रूची क्षेपणास्त्रे किंवा विमाने येत असल्याचा इशारा देणारी रडार केन्द्रे.

earmark /'इअमाक्/ *क्रि* [*सक*] विशिष्ट हेतूसाठी राखून ठेवणे : *money ~ed for research, संशोधनासाठी राखून ठेवलेले पैसे.*

earn /अऽन्/ *क्रि* १ [*अक, सक*] काम/कष्ट करून (पैसे) मिळवणे, (पैसे) कमावणे. २ [*सक*] स्वतःच्या कर्तबगारीवर (एखादी लायक गोष्ट) मिळवणे, कर्तृत्वावर संपादणे. **earner** *ना* [*गण*] कमावणारा, कमावता. **earnings** *ना* [*ब.व*] कमावलेले/अर्जित पैसे, मिळकत, कमाई.

earnest /'अऽनिस्ट्/ *वि* गंभीर, आस्थेवाईक, मनःपूर्वक; निश्चित, निश्चयपूर्वक. **earnest** *ना* (*वाक्प्र*) **in earnest** कळकळीने; निश्चयाने. **earnestness** *ना* [*अगण*] कळकळ, आस्था, मनःपूतपणा; निश्चय.

earth /अऽथ्/ *ना* १ (बहुधा **the earth**) [*अे.व*] हे जग, पृथ्वी. २ [*अे.व*] भूपृष्ठ; जमीन. ३ [*अगण*] माती, मृत्तिका. ४ [*गण*] जंगली प्राण्याचे बीळ, विवर. ५ [*गण,* बहुधा *अे.व*] (विशेषतः *ब्रि*) विद्युत्प्रवाह जमिनीत सोडणारी वायर, भूयोगतार, भू-तार. ६ (*वाक्प्र*) **charge, cost, etc the earth** (*अनौप*) खूप पैसे आकारणे, पडणे वगैरे. **how, why, etc on 'earth** (*अनौप*) (भर देण्यासाठी वापर) : *What on ~ are you doing? तू काऽय करतोयस?/तुझं चाललंय तरी काय?* **earth** *क्रि* [*सक*] (*ब्रि*) (बहुधा *कर्मणी*) विजेवर चालणाऱ्या उपकरणाला भूयोग करण्याची तार जोडणे. **earthly** *वि* १ ऐहिक, इहलोकीचा, येथला; परलोकातला नसलेला, अध्यात्मिक नसलेला. २ (*अनौप*) शक्य : *no ~ly use, उपयोगाची शक्यता नाही/कोणत्याही कारणाने उपयुक्त नाही.* **earthquake** /'अऽथ्क्वेइक्/ *ना* [*गण*] भूकंप. **'earthworm** *ना* [*गण*] गांडूळ. **earthy** *वि* १ मातीचा, मृत्तिकेसमान. २ रोखठोक, सरळसरळ : *an ~y sense of humour, रोखठोक/निखळ विनोदबुद्धी.*

earthenware /'अऽथ्न्वेअ(र्)/ *ना* [*अगण*] मातीची भांडी, मृत्तिकापात्र.

ease /ईझ्/ *ना* [*अगण*] १ अडचण नसणे, सहजता : *do sth with ~, एखादी गोष्ट सहजपणे करणे.* २ चैन, सुख, आराम. ३ (*वाक्प्र*) **at (one's) 'ease** आरामात, निश्चिंतपणाने, विना काळजी. **ease** *क्रि* १ [*अक, सक*] अवघडपणा कमी होणे/करणे, वेदना कमी होणे/करणे. २ [*अक, सक*] तीव्रता कमी होणे/करणे, हलके होणे/करणे. ३ [*सक*] एखाद्याला हलकेच आणि काळजीपूर्वक हालवणे : *~ the injured man out of the car, जखमी माणसाला गाडीतून हलकेच/अलगद बाहेर काढणे.* ४ (*क्रिब*) **,ease 'off/'up** कमी होणे, ढिले होणे.

easel /'ईझ्ल्/ *ना* [*गण*] फळा किंवा चित्र लावायची लाकडी चौकट, लाकडी घोडा.

east /ईस्ट्/ *ना* [*अे.व*] १ **the east** क्षितिजावरचा सूर्य जिथे उगवतो तो बिंदू, उगवती, पूर्व, प्राची. २ **the East** (क) आशिया खंडातील देश – विशेषतः चीन व जपान. (ख) युरोपच्या पूर्वेकडील जगाचा भाग : *the Middle E~, मध्यपूर्व.* (ग) एखाद्या देशाचा पूर्वेकडील भाग. **east** *वि* १ पूर्वेकडील. २ (वाऱ्यांबाबत) पूर्वेकडचा. **east** *क्रिवि* पूर्वेकडे. **eastbound** /'ईस्ट्बाउन्ड्/ *वि* पूर्वेकडे जाणारा. **easterly** /'ईस्टलि/ *वि, क्रिवि* १ पूर्वेकडचा, पूर्वेकडे. २ (वाऱ्यांबाबत) पूर्वेकडून येणारा. **eastern** /'ईस्टन्/ (तसेच **Eastern**) *वि* पौर्वात्य, पूर्वेकडील जगाचा किंवा देशाच्या भागाचा. **eastward**

/'ईस्टवड्/ *वि* पूर्वेकडे जाणारा. **eastward(s)** *क्रिवि* पूर्वेकडे.

Easter /'ईस्ट(र्)/ *ना* [*अगण*] ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाचा दिवस म्हणून ख्रिस्ती लोक साजरा करतात तो दिवस.

easy /'ईझ़ि/ *वि* (-ier, -iest) १ अवघड नाही असा, सोपा, सुलभ. २ चिंतामुक्त, वेदनाविरहित, संकटमुक्त, आरामाचा. **easily** /'ईझ़लि/ *क्रिवि* १ विना कष्ट/अडचण, सहज. २ विना संशय, निःसंशयपणे : *easily the best, निःशंकपणे सर्वोत्तम.* **easy** *क्रिवि* (*वाक्प्र*) **go easy on sb** मऊपणाने/(दोषांकडे) थोडे दुर्लक्ष करून (वागवणे किंवा वागणे). **go easy on sth** फार वापर न करणे, जपून वापरणे : *Go ~ on the milk, दूध जपून वापर.* **take it/things easy** फार कष्ट/त्रास न घेणे. **,easy 'chair** *ना* [*गण*] मोठी आरामखुर्ची. **easy'going** *वि* लवकर व्यथित/कष्टी न होणारा, शांत.

eat /ईट्/ *क्रि* (*भूत* **ate** /अेट्; *अमे* अेइट्/, *भूत वि* **~en** /'ईट्न्/) १ [*अक, सक*] अन्नाचा घास तोंडात घेणे व गिळणे, खाणे, जेवणे, भक्षण करणे. २ (*वाक्प्र*) **eat one's heart out** दुःखी/खिन्न होणे. **,eat one's 'words** चूक कबूल करणे, शब्द मागे घेणे. ३ (*क्रिब*) **eat sth away** एखादी गोष्ट हळूहळू नष्ट करणे, हळूहळू खाऊन टाकणे. **eat into sth** (क) नष्ट करणे, झिजवणे. (ख) वेळ, पुरवठा, बचत वगैरे संपवणे/खाणे. **eatable** *वि* खाण्यास योग्य, खाद्य(पदार्थ). **eater** *ना* [*गण*] खाणारा : *a big eater, खूप खाणारा/खादाड/खवैय्या.*

eaves /ईव्ह्झ्/ *ना* [*ब.व*] छपराच्या अधांतरी कडा, वळचण, पागोळ्या.

eavesdrop /'ईव्ह्झ्ड्रॉप्/ *क्रि* (-pp-) [*अक*] (*on*)// दुसऱ्याचे खाजगी संभाषण चोरून ऐकणे. **eavesdropper** *ना* [*गण*] चोरून ऐकणारा.

ebb /अेब्/ *क्रि* [*अक*] १ समुद्राचे पाणी जमिनीकडून समुद्राकडे जाणे, ओहोटी येणे. २ (*ला*) कमी किंवा क्षीण होणे. **ebb** *ना* (बहुधा **the ebb**) [*अे.व*] आहोटी, सुकती.

ebony /'अेबनि/ *ना* [*अगण*] काळे टणक लाकूड, टेंबुरणीचे लाकूड. **ebony** *वि* काळा, कंच काळा.

eccentric /इक्'सेन्ट्रिक्/ *वि* १ (माणसाविषयी किंवा त्याच्या वर्तनाविषयी) असाधारण; विचित्र, विक्षिप्त, तऱ्हेवाईक. २ (वर्तुळांविषयी) विभिन्न केन्द्रे असलेली, विषमकेन्द्री. **eccentric** *ना* [*गण*] तऱ्हेवाईक माणूस. **eccentricity** /,अेक्सेन्'ट्रिसटि/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* -ies) विक्षिप्तपणा (किंवा तसे वर्तन).

ecclesiastical /इ,क्लीझ़ि'ॲस्टिकल्/ *वि* ख्रिस्ती चर्चचा किंवा ख्रिस्ती धर्मगुरूचा.

echo /'अेकउ/ *ना* [*गण*] (*ब.व* ~es) प्रतिध्वनी, पडसाद. **echo** *क्रि* १ [*अक*] प्रतिध्वनी येणे, पडसाद उमटणे. २ [*सक*] (एखाद्याचे शब्द) फिरून म्हणणे, सहमती दाखविणे.

eclair /इ'क्लेअ(र्), अेइ'क्लेअ(र्)/ *ना* [*गण*] साय किंवा क्रीम आणि वर चॉकलेटचा थर अशा रूपातली पेस्ट्री.

eclipse /इ'क्लिप्स्/ *ना* [*गण*] १ (सूर्याबाबत) सूर्यप्रकाशाला चंद्राचा अडथळा म्हणजेच सूर्यबिंब चंद्राने झाकोळणे, सूर्यग्रहण. २ (चंद्राबाबत) पृथ्वीची सावली चंद्रावर पडल्याने चंद्रप्रकाशाला होणारा अडथळा, चंद्रग्रहण. **eclipse** *क्रि* [*सक*] (*ला*) एखाद्याचे महत्त्व तुलनेने कमी करणे, एखाद्याचे महत्त्व झाकोळणे, त्याला ग्रहण लागणे.

ecology /इ'कॉलजि/ *ना* [*अगण*] जीवसृष्टी आणि भोवतालची परिस्थिती यांचे परस्पर संबंध (किंवा त्यांचा अभ्यास), परिस्थितीकी, स्थलविज्ञान, परिस्थितिविज्ञान, आदिवासिक, प्राणिपरिस्थिती विज्ञान, पर्यावरण. **ecological** /,इक'लॉजिकल्/ *वि* जीवसृष्टीच्या भौतिक परिस्थितीचा किंवा त्याविषयक. **ecologist** /-जिस्ट्/ *ना* [*गण*] परिस्थितीविज्ञानाचा अभ्यासक किंवा तज्ज्ञ.

economic /,ईक'नॉमिक्, ,अेक-/ *वि* १ व्यापार आणि उद्योगाशी संबंधित; आर्थिक, अर्थशास्त्रविषयक, अर्थशास्त्रीय. २ फायदेशीर, किफायतशीर. **economical** *वि* पैसा, वेळ वगैरे यांचा काळजीपूर्वक वापर करणारा, काटकसरीचा. **economically** /-क्लि/

क्रिवि काटकसरीने, बचत करून; आर्थिकदृष्ट्या.

economics /,ईक'नॉमिक्स्; ,एक-/ *ना* (अे.व क्रियापदासह) माल आणि संपत्ती यांचे उत्पादन, वाटप आणि वापर यांचे शास्त्र, अर्थशास्त्र. **economist** /इ'कॉनमिस्ट्/ *ना* अर्थशास्त्राचा अभ्यासक, अर्थशास्त्रज्ञ.

economize /इ'कॉनमाइझ्/ *क्रि* [*अक*] पैसे वाचवणे, बचत करणे; कमी पैसे खर्च करणे, काटकसर करणे.

economy /इ'कॉनमि/ *ना* (*ब.व* -ies) १ (अनेकदा **the economy**) [*गण*] देशाची अर्थव्यवस्था, आर्थिक घडी. २ [*गण, अगण*] पैशाची, वेळेची वगैरे बचत (किंवा तिचे उदाहरण), काटकसर. **economy** *वि* स्वस्त, कमी खर्चाचा : *~ class air travel, कमी पैशातल्या/स्वस्त वर्गाचा विमान-प्रवास.*

ecstasy /'एक्स्टसि/ *ना* [*अगण, गण*] (*ब.व* -ies) मोठ्या आनंदाची भावना, परमानंद, हर्षोत्फुल्लता. **ecstatic** /इक्'स्टॅटिक्/ *वि* अत्यानंदाचा, परमानंदाचा. **ecstatically** /-क्लि/ *क्रिवि* अत्यानंदाने, उन्मादाने.

eddy /'एडि/ *ना* [*गण*] (*ब.व* -ies) पाण्याची किंवा वाऱ्याची चक्राकार गती, भोवरा, आवर्त. **eddy** *क्रि* (*भूत, भूत वि* -ied) [*अक*] चक्राकार फिरणे, गरगर फिरणे, गिरक्या घेणे.

edge /एज्/ *ना* [*गण*] १ एखाद्या वस्तूचा किंवा पृष्ठभागाचा बाहेरचा भाग, कड, कडा, किनार : *the ~ of the bed, अंथरूणाची कड.* २ सुरीची धार असणारी बाजू, पाते. ३ (*वाक्प्र*) **have the edge on/over sb/sth** (*अनौप*) एखाद्या व्यक्ती/वस्तू पेक्षा थोडे अधिक चांगले असणे, एखाद्या गोष्टीचा फायदा असणे. **on 'edge** मानसिक तणावात, तंग होऊन. **take the edge off sth** क्षीण करणे, बोच काढणे, पारा उतरवणे. **edge** *क्रि* १ [*सक*] कुंपण घालणे, वेढणे. २ [*अक, सक*] एखाद्या दिशेकडे संथपणे जाणे : *She ~d (her way) along the cliff, कड्याच्या टोकाने ती सावकाश चालली होती.* **edging** *ना* [*गण, अगण*] अरुंद पट्टी, कड. **edgy** *वि* (*अनौप*) चिडखोर, मनाची घालमेल होणारा.

edible /'एडिब्ल्/ *वि* खाण्याचा, खाण्याजोगा, खाद्य.

edit /'एडिट्/ *क्रि* [*सक*] १ (दुसऱ्याचे लेखन) प्रसिद्ध करण्यासाठी तयार करणे, संपादन करणे. २ (एखादे वर्तमानपत्र, मासिक वगैरे) प्रसिद्ध करण्यास दिशा देणे. ३ विविध भाग निवडून आणि एकत्र करून (एखादा चित्रपट, दूरदर्शनवरचा कार्यक्रम वगैरे) तयार करणे. **editor** *ना* [*गण*] पुस्तक, वर्तमानपत्र वगैरे संपादित करणारा माणूस, संपादक.

edition /इ'डिश्न्/ *ना* [*गण*] १ पुस्तक छापले जाते ते रूप : *a paperback ~, पेपरबॅक रूपातील (पुस्तक).* २ एखाद्या पुस्तकाच्या एकावेळी काढलेल्या एकूण प्रती, आवृत्ती.

editorial /,एडि'टॉऽरिअल्/ *वि* संपादकाचा, संपादकीय. **editorial** *ना* [*गण*] वर्तमानपत्रातील संपादकाचे मनोगत सांगणारा लेख, संपादकीय.

educate /'एज्युकेइट्/ *क्रि* [*सक*] एखाद्याच्या मनाला आणि चारित्र्याला वळण देणे; शिकवणे, शिक्षण देणे. **education** /एज्यु'केइश्न्/ *ना* [*अगण*] १ शिक्षण देणे, वळण लावणे, शिक्षण. २ अशा शिक्षणातून प्राप्त होणारे ज्ञान आणि शील. **educational** /एज्यु'केइशन्ल्/ वि शैक्षणिक.

EEC /,ई ई 'सी/ European Economic Community म्हणजे युरोपीय आर्थिक संघ याचे म्हणजेच the Common Market किंवा सामाईक बाजारपेठेचे *संरू.*

eel /ईल्/ *ना* [*गण*] सापासारखा दिसणारा लांब असा मासा, वाम, वांब.

eerie /'इअरि/ *वि* (~r, ~st) गूढ आणि भीतिदायक. **eerily** / इअरलि/ *क्रिवि* गूढ आणि भयानक रीतीने.

effect /इ'फेक्ट्/ *ना* १ [*गण, अगण*] एखाद्या गोष्टीने झालेला बदल; परिणाम, निष्पत्ती. २ [*गण*] वाचक, श्रोता वगैरेवर होणारा परिणाम. ३ **effects** [*ब.व*] (*औप*) वैयक्तिक मालकीच्या वस्तू, चीजवस्तू. ४ (*वाक्प्र*) **bring/put sth into effect** एखादी गोष्ट वापरात आणणे, अमलात आणणे, चालू करणे. **in effect** (क) प्रत्यक्षपणे, वस्तुतः; खरोखर. (ख) चालू, वैध, वापरला जाणारा. **take effect** लागू होणे, जारी होणे, चालू होणे,

लागणे. **effect** *क्रि* [*सक*] (*औप*) एखादी गोष्ट घडवणे, घडवून आणणे.

effective /इ'फेक्टिव्ह्/ *वि* १ अपेक्षित परिणाम घडवून आणणारा, परिणामकारक : *the most ~ method, सर्वांत परिणामकारक पद्धती.* २ प्रत्यक्ष, अस्तित्वात असलेला : *the club's ~ membership, क्लबचे प्रत्यक्ष सभासदत्व.* **effectively** *क्रिवि* परिणामकारकतेने, प्रभावी रीतीने. **effectiveness** *ना* [*अगण*] परिणामकारकता.

effectual /इ'फेक्चुअल्/ *वि* (*औप*) हवे ते/अपेक्षित असलेले परिणाम घडविणारा/साधणारा : *an ~ remedy, परिणाम साधणारा उपाय.*

effeminate /इ'फेमिनट्/ *वि* (*अधिक्षेपी*) (पुरुषाबाबत) बायकी, नामर्द.

effervesce /,अेफ'व्हेस्/ *क्रि* [*अक*] हवेचे बुडबुडे येणे. **effervescence** /-'व्हेस्न्स्/ *ना* [*अगण*] १ हवेचे बुडबुडे येणे. २ उल्हासित वर्तन. **effervescent** /-'व्हेस्न्ट्/ *वि* बुडबुडे येणारा; उल्हासाने/उत्साहाने फुललेला/खदखदणारा.

efficient /इ'फिश्न्ट्/ *वि* १ कार्यदक्ष, कार्यक्षम : *an ~ manager, कार्यक्षम व्यवस्थापक.* २ (यंत्राबाबत वगैरे) चांगले काम देणारे. **efficiency** /-श्न्सि/ *ना* [*अगण*] कार्यक्षमता. **efficiently** *क्रिवि* कार्यक्षमतेने.

effigy /'अेफिजि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) माणसाची आकृती किंवा प्रतिमा.

effort /'अेफट्/ *ना* १ [*अगण*] शक्तीचा वापर, श्रम, सायास : *a waste of time and ~, पैसा आणि श्रम यांचा अपव्यय.* २ [*गण*] प्रयत्न : *make an ~ to escape, निसटून जाण्याचा प्रयत्न करणे.* **effortless** *वि* विनासायास, विनाप्रयत्न, आपसूक. **effortlessly** *क्रिवि* विनासायास, अनायसे.

effrontery /इ'फ्रन्टरि/ *ना* [*अगण*] धिटाई, निलाजरे धाडस, बेशरम उद्धटपणा.

effusive /इ'फ्यूसिव्ह्/ *वि* भावनातिरेकी. **effusively** *क्रिवि* भावनातिरेकाने, तोंड भरून, भरभरून.

EFL /,ई अेफ् 'अेल्/ *संरू* English as a Foreign Language म्हणजे परभाषा म्हणून इंग्रजी याचे संक्षिप्त रूप.

eg /,ई 'जी/ *संरू* for example म्हणजे उदाहरणार्थचे संक्षिप्त रूप, उदा.

egg^1 /अेग्/ *ना* १ [*गण*] वरून कठीण कवच असणारी आणि आतमधे पक्ष्याचे पिलू असणारी गोलाकार गोष्ट, अंडे. २ [*गण, अगण*] खाण्यात वापरले जाणारे कोंबडीचे अंडे. ३ प्रजोत्पादक स्त्री-पेशी, स्त्री बीज, डिंबपेशी. ४ (*वाक्प्र*) **,put all one's ,eggs in one 'basket** एकाच गोष्टीवर सर्व पैसा, वेळ लावून धोका पत्करणे. **'egg-cup** *ना* [*गण*] उकडलेले अंडे ठेवायचे छोटेसे भांडे/कप. **'egghead** *ना* [*गण*] (*अनौप अधिक्षेपी*) अति बुद्धिमान माणूस, अतिविद्वान, अतिशहाणा. **'egg-plant** *ना* [*गण, अगण*] (खास करून *अमे*) वांगे.

egg^2 /अेग्/ *क्रि* (*क्रिब*) **egg sb on** एखाद्याला एखादी गोष्ट करण्यास प्रवृत्त करणे, प्रोत्साहन देणे, चिथावणे, फूस लावणे.

ego /'अेगउ, 'ईगउ/ *ना* [*गण*] (*ब.व* ~s) स्वतःविषयीचे फार चांगले मत, अहंपणा, अहंभाव, अहंकार.

egocentric /,अेगउ'सेन्ट्रिक्; *अमे* 'ईग्-/ *वि* फक्त स्वतःचा विचार करणारा, आप्पलपोटा, आत्मकेन्द्री.

egoism /'अेगउइझम्; *अमे* 'ईग्-/ *ना* [*अगण*] आत्मकेन्द्रीवृत्ती, मीपणा; स्वार्थ, आप्पलपोटेपणा. **egoist** /-इस्ट्/ *ना* [*गण*] आत्मकेन्द्री व्यक्ती, अहंमन्य किंवा अहंकारी माणूस.

egotism /'अेगउटिझम्; *अमे* 'ईग्-/ *ना* [*अगण*] आत्मस्तुती, प्रौढी, ममत्व, आत्मश्लाघा, आत्मगौरव; स्वार्थीपणा. **egotist** /-टिस्ट्/ *ना* [*गण*] स्वार्थी माणूस. **egotistic** /,अेग'टिस्टिक्; *अमे* 'ईग्-/ (तसेच **egotistical**) *वि* गर्विष्ठ, स्वतःचा बडेजाव सांगणारा, आत्मकेन्द्री.

eiderdown /'आइडडाउन्/ *ना* [*गण*] जाड, उबदार पांघरूण.

eight /अेइट्/ *सना, वि, ना* [*गण*] ८, आठ. **eighth** /अेइट्थ्/ *सना, वि* ८ वा, आठवा. **eighth** *सना, ना* [*गण*] $\frac{1}{8}$.

eighteen /,अेइ'टीन्/ *सना, वि, ना* [*गण*]

१८, अठरा. **eighteenth** /,अेइ'टीन्थ्/ *सना, वि* १८ वा, अठरावा. **eighteenth** *सना, ना* [*गण*] $\frac{१}{१८}$.

eighty /'अेइटि/ *सना, वि, ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) ८०, ऐंशी. **eightieth** *सना, वि* ८० वा, ऐंशीवा. **eightieth** *सना, ना* [*गण*] $\frac{१}{८०}$.

either /'आइद(र्), 'ईदर/ *वि, सना* दोहोपैकी कोणताही एक : *park on ~ side of the road, रस्त्याच्या (दोहोपैकी) कोणत्याही बाजूला गाडी उभी करणे.* **either** *क्रिवि, उ. अव्यय* **१** (दोन नकारार्थी क्रियापदांनंतर वापर) : *I don't like the red tie and I don't like the blue one ~, मला तो तांबडा टाय आवडत नाही आणि तो निळा देखील आवडत नाही* म्हणजेच मला ते दोन्ही टाय आवडत नाहीत. **२ either ... or ...** (पर्याय दाखवताना वापर) : *You can ~ write or phone for the book, पुस्तकासाठी तू एक पत्र तरी लिहू शकतोस किंवा फोन करू शकतोस.*

eject /इ'जेक्ट्/ *क्रि* [*सक*] (*from*)// बाहेर टाकणे किंवा काढणे. **ejection** /इ'जेक्शन्/ *ना* [*अगण*] बाहेर टाकणे, निस्सारण. **ejector seat** *ना* [*गण*] आणीबाणीच्या परिस्थितीत विमानातून वैमानिकाला बाहेर फेकणारे आसन.

eke /ईक्/ *क्रि* (*क्रिब*) **eke sth out** कमी असलेल्या गोष्टीचा पुरवठा जास्तीत जास्त टिकवणे.

elaborate /इ'लॅबरद्/ *वि* गुंतागुंतीचा; बारीकसारीक तपशीलाचा. **elaborate** /इ'लॅबरेइट्/ *क्रि* [*अक, सक*] (*on*)// एखाद्या गोष्टीचे तपशीलाने वर्णन करणे, एखाद्या गोष्टीवर तपशीलपूर्वक काम करणे. **elaborately** *क्रिवि* बारीकसारीक नक्षीदारपणाने, काळजीपूर्वकपणे बारकावे राखून, विस्ताराने. **elaboration** /इ,लॅब'रेइश्न्/ *ना* [*अगण, गण*] विस्तार, तपशीलवार वर्णन/चर्चा वगैरे; गुंतागुंत.

elapse /इ'लॅप्स्/ *क्रि* [*अक*] (*औप*) (वेळेबाबत) जाणे, लोटणे.

elastic /इ'लॅस्टिक्/ *वि* **१** ताणले किंवा दाबले असता पुन्हा मूळच्या जागी/अवस्थेत येणारा, स्थितिस्थापक, लवचिक **२** (*ला*) पक्का न झालेला : *Our plans are fairly ~, आमच्या योजना खूपच लवचिक आहेत.* **elastic** *ना* [*अगण*] लवचिक साहित्य/पदार्थ. **e,lastic 'band** *ना* [*गण*] रबराची गोलाकार कडी किंवा कागद वगैरे एकत्र ठेवण्याचे रबर. **elasticity** /,इलॅ'स्टिसटि, 'ईल्-/ *ना* [*अगण*] स्थितिस्थापकत्व, लवचिकता.

elated /इ'लेइटिड्/ *वि* (*at/by*)// खूप आनंदित, खुष, हर्षोत्फुल्ल, आनंदाने बेहोष झालेला. **elation** /इ'लेइश्न्/ *ना* [*अगण*] हर्ष, आनंद, प्रमोद.

elbow /'अेल्बउ/ *ना* [*गण*] **(क)** हाताचे कोपर, ढोपर. **(ख)** कोटाचे कोपर किंवा ढोपरावरचा कोटाच्या हाताचा भाग. **elbow** *क्रि* **१** (*क्रिब*) **elbow sb aside** एखाद्याला कोपराने बाजूला ढकलणे, कोपराने ढोसणे. **elbow one's way** कोपराने इतरांना ढोसून मार्ग काढणे. **'elbow-grease** *ना* [*अगण*] (*अनौप*) हातानी करायचे कठीण काम. **'elbow-room** *ना* [*अगण*] (*अनौप*) हालचालीसाठी किंवा काम करण्यासाठी पुरेशी मोकळी जागा.

elder¹ /'अेल्ड(र्)/ *वि* (कुटुंबातील दोन सदस्यांबाबत) वयाने मोठा, ज्येष्ठ, थोरला : *my ~ brother, माझा मोठा भाऊ* किंवा *माझे वडील बंधू.* **elder** *ना* **१ my, etc elder** [*अ.व*] माझ्यापेक्षा वगैरे ज्येष्ठ. **२** [*गण*] वयाने आणि अधिकाराने ज्येष्ठ व्यक्ती, वडीलधारे माणूस. **३** [*गण*] काही ख्रिस्ती चर्चमधील अधिकारी, ज्येष्ठपाद्री. **elderly** *वि* वडील, बऱ्यापैकी प्रौढ. **,elder 'statesman** *ना* [*गण*] ज्येष्ठ आणि आदरणीय राजकीय नेता.

elder² /'अेल्ड(र्)/ *ना* [*गण*] पांढरी फुले आणि तांबडी किंवा काळी बेरी येणारे एक लहान झाड.

eldest /'अेल्डिस्ट्/ *वि, ना* [*गण*] (तीन किंवा अधिक माणसांबाबत) वयाने सर्वात मोठा, ज्येष्ठतम.

elect /इ'लेक्ट्/ *क्रि* [*सक*] **१** मतदान करून (एखाद्याला) निवडणे, निवडून देणे. **२** (*औप*) ठरविणे, निर्णय घेणे : *They ~ed to stay, त्यांनी राहण्याचे निश्चित केले.* **elect** *वि* (*औप*)

निवडून आलेला पण अद्याप कार्यभार न उचललेला : *the president ~, निवडणूकसिद्ध राष्ट्रपती.* **elector** *ना* [*गण*] मतदानाचा हक्क असणारा माणूस, मतदार. **electoral** /इ'लेक्टरल्/ *वि* निवडणुकीचा, निवडणूक-, निर्वाचक. **electorate** /इ'लेक्टरट्/ *ना* [*गण,* तसेच ब.व क्रियापदासह अे.व] सर्व मतदार, मतदारगण.

election /इ'लेक्श्न्/ *ना* [*गण, अगण*] मतदान करून प्रतिनिधींची केलेली निवड, निवडणूक.

electric /इ'लेक्ट्रिक्/ *वि* १ विजेवर चालणारा किंवा वीज निर्मिती करणारा : *an ~ fire, विजेची शेगडी* ○ *an ~ motor, विजेवर चालणारी मोटर.* २ (*ला*) भावना चेतविणारा. **electrical** *वि* विजेवर चालणारा किंवा विजेशी संबंधित असा. **electrically** /-क्लि/ *क्रिवि* विजेवर, विजेने. **the e,lectric 'chair** *ना* [*अे.व*] (खास करून *अमे*) शॉक देऊन मारण्याची खुर्ची. **e,lectric 'shock** *ना* [*गण*] विजेचा धक्का.

electrician /इ,लेक्'ट्रिश्न्/ *ना* [*गण*] विजेची सामग्री बसवणारा किंवा ती दुरुस्त करणारा माणूस, वीजतंत्री.

electricity /इ,लेक्'ट्रिसटि/ *ना* [*अगण*] १ तापविणे, उजेड करणे, यंत्रे चालविणे वगैरेसाठी वापरायची एक ऊर्जा, विद्युत्-ऊर्जा, वीज. २ विद्युत्पुरवठा, पुरवलेली वीज : *Don't waste ~, वीज वाया घालवू नकोस/विजेचा अपव्यय करू नका.*

electrify /इ'लेक्ट्रिफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] १ वीज पुरविणे, विद्युतीकरण करणे. २ (*ला*) एकदम चैतन्य आणणे, प्रेरणा देणे.

electrocute /इ'लेक्ट्रक्यूट्/ *क्रि* [*सक*] विद्युत्प्रवाह वापरून एखाद्याला ठार मारणे, विजेचा झटका देऊन मारणे. **electrocution** /इ,लेक्ट्र'क्यूश्न्/ *ना* [*अगण*] विजेचा शॉक देऊन केलेली हत्या, विद्युत्मारण.

electrode /इ'लेक्ट्रउड्/ *ना* [*गण*] विजेरीमधे वगैरे ज्या बिंदूतून विद्युत्प्रवाह आत येतो किंवा बाहेर जातो तो बिंदू, विद्युताग्र, विद्युत्प्रस्थ.

electron /इ'लेक्ट्रॉन्/ *ना* [*गण*] ऋणात्मक विद्युत भार असलेला अणूमधील एक सूक्ष्म बिंदू, विद्युत्परमाणू, ऋणबीजक. **electronic** /,इलेक्'ट्रॉनिक्/ *वि* १ विद्युत्परमाणूच्या प्रवाहावर चालणारा किंवा त्यांनी तयार केलेला : *an ~ calculator, विद्युत्परमाणूचा गणक.* २ संगणक वगैरे सारख्या इलेक्ट्रॉनिक सामग्रीबाबतचा. **electronically** /-क्लि/ *क्रिवि* विद्युत्परमाणूच्या साहाय्याने. **electronics** /,इलेक्'ट्रॉनिक्स्/ *ना* [*अगण*] (अे.व क्रियापदासह) इलेक्ट्रॉनिक साधनांचे शास्त्र किंवा त्यांचा विकास.

elegant /'अेलिगन्ट्/ *वि* सदभिरुची असणारा, रसिक; शानदार, सुरेख. **elegance** /-गन्स्/ *ना* [*अगण*] लावण्य, सुरेखपणा. **elegantly** *क्रिवि* सुरेखपणे, सफाईदारपणे.

element /'अेलिमन्ट्/ *ना* १ [*गण*] (*in/of*)// संपूर्णातील एक भाग, घटक, अवयव : *Justice is only one ~ in good government, न्याययंत्रणा हा चांगल्या शासनव्यवस्थेतील फक्त एक घटक आहे.* २ [*गण,* बहुधा *अे.व*] अल्प प्रमाण, लवलेश; अल्पांश : *an ~ of truth in their story, त्यांच्या गोष्टीत सत्याचा लवलेश.* ३ [*गण*] अधिक सोप्या द्रव्यात ज्याचे विभाजन होणार नाही असे रासायनिक द्रव्य, मूलद्रव्य. ४ **the elements** [*ब.व*] नैसर्गिक शक्ती, महाभूते; खराब हवामान. ५ **elements** [*ब.व*] एखाद्या विषयाची पायाभूत तत्त्वे, मूलतत्त्वे. ६ [*गण*] विद्युत किटली वगैरे उपकरणातील उष्णता देणारा भाग. ७ (*वाक्प्र*) **in/out of one's 'element** आवडणारे/ नावडणारे काम करणारा.

elementary /,अेलि'मेन्ट्रि/ *वि* १ एखाद्या गोष्टीच्या प्राथमिक किंवा पहिल्या अवस्थेतील : *~ maths, प्राथमिक गणित.* २ साधा; प्रगत नसलेला, प्राथमिक : *an ~ question, अगदी साधा/प्राथमिक स्वरूपाचा प्रश्न.* **ele'mentary ,school** *ना* [*गण*] (*अमे*) पाच ते बारा वयोगटातील मुलांची शाळा, प्राथमिक शाळा.

elephant /'अेलिफन्ट्/ *ना* [*गण*] चार पाय, मोठे दात (सुळे) आणि सोंड असणारा अवाढव्य प्राणी, हत्ती, गज.

elevate /'अेलिव्हेइट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) १

वर उचलणे; उंच करणे, उंचावणे. २ (मन किंवा नीतिमत्ता) सुधारणे, वरच्या पातळीवर नेणे.

elevation /,अेलि'व्हेइश्न्/ *ना* १ [*अे.व*] उच्च करण्याची कृती, उन्नती. २ [*गण*] समुद्रसपाटीपासूनची उंची. ३ [*गण*] इमारतीच्या एका बाजूचे आरेखन.

elevator /'अेलिव्हेइट(र्)/ *ना* [*गण*] १ (*अमे*) वर चढवणारे यंत्र, लिफ्ट, उद्वाहक. २ धान्य, माल वगैरे एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर चढविण्याचे यंत्र, उन्नायी.

eleven /इ'लेव्ह्न्/ *सना, वि, ना* [*गण*] ११, अकरा. **elevenses** /-झ़िझ़/ *ना* [*अगण*] (अे.व क्रियापदासह) (*ब्रि अनौप*) सकाळच्या अर्ध्या भागानंतर घ्यायचे खाणे – अनेकदा कॉफी आणि बिस्किटे या स्वरूपाचे. **eleventh** /इ'लेव्ह्न्थ्/ *सना, वि* ११ वा, अकरावा. **eleventh** *सना, ना* [*गण*] $\frac{१}{११}$.

elf /अेल्फ्/ *ना* [*गण*] (*ब.व* **elves** /अेल्व्ह्झ्/) लहान खट्याळ परी.

elicit /इ'लिसिट्/ *क्रि* [*सक*] (*from*)// (*औप*) एखाद्याकडून (माहिती वगैरे) काढणे, मिळवणे, काढून घेणे.

eligible /'अेलिजब्ल्/ *वि* (*for, to*)// अनुरूप, योग्य; आवश्यक गुणवत्ता असलेला, पात्र : *~ for a job, एखाद्या नोकरीस पात्र.* **eligibility** /,अेलिज'बिलटि/ *ना* [*अगण*] पात्रता.

eliminate /इ'लिमिनेइट्/ *क्रि* [*सक*] पूर्णपणे काढून टाकणे, वगळणे. **elimination** /इ,लिमि'नेइश्न्/ *ना* [*अगण*] वगळणे.

élite /अेइ'लीट्/ *ना* [*गण*] समाजातील महत्त्वाच्या आणि वजनदार व्यक्तींचा गट, अभिजन, शिष्टजन. **élitism** /-इझ़म्/ *ना* [*अगण*] (अनेकदा *अधिक्षेपी*) अभिजनांची वाढ करणारी व्यवस्था (किंवा तीवरील विश्वास), अभिजनवादी व्यवस्था. **élitist** /-टिस्ट्/ *ना* [*गण*], *वि* अभिजनवादी.

elk /अेल्क्/ *ना* [*गण*] मोठे हरीण.

ellipse /इ'लिप्स्/ *ना* [*गण*] अंडाकार, लंबवर्तुळाकार, लंबवृत्त. **elliptical** /इ'लिप्टिक्ल्/ *वि* लंबवर्तुळाकार.

elm /अेल्म्/ *ना* (क) [*गण*] (तसेच **'elm tree**) रुंद पानांचे एक उंच झाड. (ख) [*अगण*] एल्मचे टणक वजनदार लाकूड.

elocution /,अेल'क्यूश्न्/ *ना* [*अगण*] स्पष्ट किंवा शुद्ध बोलण्याची कला, भाषणकला, वक्तृत्वकला.

elongate /'ईलॉङ्गेइट्; *अमे* इ'लॉङ्-/ *क्रि* [*सक*] लांब करणे, ताणणे.

elope /इ'लउप्/ *क्रि* [*अक*] लग्न करण्यासाठी चोरून पळून जाणे, (स्त्रीबाबत) हात धरून निघून जाणे. **elopement** *ना* [*गण, अगण*] विवाहासाठी केलेले पलायन, पळून जाणे.

eloquence /'अेलक्वन्स्/ *ना* [*अगण*] स्वतःचे विचार नीटपणे मांडण्यासाठी किंवा इतरांचे मतपरिवर्तन करण्यासाठी भाषेचा केलेला कौशल्यपूर्ण उपयोग, वक्तृत्व, वाक्चातुर्य. **eloquent** /-अन्ट्/ *वि* वाक्पटू, वाक्चतुर, रसाळ. **eloquently** *क्रिवि* वक्तृत्वपूर्ण रीतीने.

else /अेल्स्/ *क्रिवि* १ आणखी; शिवाय, खेरीज : *Have you anything ~ to do? तुला आणखी काही करायचंय्?* ○ *We went to the cinema and nowhere ~, आम्ही फक्त सिनेमाला गेलो, आणखी कुठेही नाही म्हणजेच दुसरीकडे कुठेही नाही.* २ (*वाक्प्र*) **or else** अन्यथा; नाही तर : *Run or ~ you'll be late, पळ नाहीतर उशीर होईल.* **elsewhere** /,अेल्स्'वेअ(र्); *अमे* -'व्हेअर/ *क्रिवि* दुसरीकडे, अन्यत्र.

ELT /,ई अेल् 'टी/ *संरू* English Language Teaching इंग्रजी भाषा शिक्षण.

elucidate /इ'लूसिडेइट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) एखादी गोष्ट स्पष्ट करणे; विवेचन करणे, विस्ताराने मांडणे. **elucidation** /इ,लूसि'डेइश्न्/ *ना* [*अगण*] स्पष्टीकरण; विवेचन.

elude /इ'लूड्/ *क्रि* [*सक*] १ एखाद्या गोष्टीपासून सुटका करून घेणे, (कचाट्यातून) सुटणे, निसटणे; टाळणे, दूर ठेवणे. २ (एखादी सत्य गोष्ट, नाव वगैरे) लक्षात न राहणे, न आठवणे. **elusive** /इ'लूसिव्ह्/ *वि* सापडण्यास, वर्णन करण्यास किंवा लक्षात ठेवण्यास अवघड.

elves ELF चे *ब.व.*

emaciated /इ'मेइशिअेइटिड्/ *वि* फार अशक्त आणि लुकडा, हडकुळा, खप्पड, रोड, कृश. **emaciation** /इ,मेइसि'अेइश्न्/ *ना* [*अगण*] कृशता, रोडावलेपणा.

emanate /'अेमनेइट्/ *क्रि* [*अक*] *from*// (*औप*) एखाद्या गोष्टीपासून/व्यक्तीपासून उद्‌भवणे, निपजणे, निर्माण होणे, प्रसृत होणे.

emancipate /इ'मॅन्सिपेइट्/ *क्रि* [*सक*] (एखाद्याला) मुक्त करणे – विशेषतः राजकीय किंवा सामाजिक बंधनातून बंधमुक्त करणे, जोखडातून सोडवणे. **emancipation** /इ,मॅन्सि'पेइश्न्/ मुक्ती, बंधमुक्तता, दास्यविमोचन.

embalm /इम्'बाम्; *अमे* तसेच -'बाल्म्/ *क्रि* [*सक*] रसायने वगैरे वापरून (मृतदेह) जतन करणे, प्रेतात मसाला भरणे.

embankment /इम्'बॅङ्क्मन्ट्/ *ना* [*गण*] पाण्याला घातलेला मातीचा बंधारा किंवा रेल्वेचे रूळ, रस्ते यांना आधारासाठी घातलेला बांध.

embargo /इम्'बागउ/ *ना* [*गण*] (*ब.व* **~es** /-गउझ़्/) (*on*)// व्यापारावर घातलेला अधिकृत बंदी हुकूम, व्यापारबंदी. **embargo** *क्रि* (*भूत, भूत वि* **~ed** /-गउड्/) [*सक*] व्यापारबंदी घालणे.

embark /इम्'बाक्/ *क्रि* १ [*अक*] जहाजात चढणे, जहाजात बसणे. २ (*क्रिब*) **embark on/upon sth** काहीतरी नवीन किंवा अवघड गोष्ट सुरू करणे/हाती घेणे. **embarkation** /,अेम्बा'केइश्न्/ *ना* [*अगण, गण*] नवा प्रारंभ; जहाजात चढणे.

embarrass /इम्'बॅरस्/ *क्रि* [*सक*] एखाद्याला लाज वाटायला लावणे, त्याची पंचाईत करणे, त्याचे भांडे फुटेल असे करणे, गांगरवणे, पेचात आणणे: *His smile ~ed her, त्याच्या स्मिताने ती गोंधळात पडली.* **embarrassing** *वि*: *an ~ing mistake, पेचात आणणारी चूक.* **embarrassingly** *क्रिवि* लाज वाटावी अशा प्रकारे. **embarrassment** *ना* [*अगण, गण*] गोंधळ, पंचाईत.

embassy /'अेम्बसि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) राजदूताची कचेरी आणि सेवकवर्ग, दूतावास.

embed /इम्'बेड्/ *क्रि* (**-dd-**) [*सक*] (*in*)// (बहुधा कर्मणी) (एखादी गोष्ट) मोठ्या पसाऱ्यात बसवणे, खोल घालणे, आत बसविणे.

embellish /इम्'बेलिश्/ *क्रि* [*सक*] (*with*)// १ (बहुधा कर्मणी) सजवून सुशोभित करणे, नटवणे. २ आकर्षक करण्यासाठी (गोष्टीत) भर घालणे, गोष्ट वाढविणे, तिखटमीठ लावून सांगणे. **embellishment** *ना* [*गण, अगण*] अलंकरण, नटविणे; पदरचे घालणे.

ember /'अेम्ब(र्)/ *ना* [*गण,* बहुधा *ब.व*] विझणाऱ्या शेगडीतील पेटलेला कोळसा, निखारा.

embezzle /इम्'बेझ़ल्/ *क्रि* [*अक, सक*] (सांभाळण्यासाठी दिलेल्या) पैशाचा स्वतःच्या फायद्यासाठी बेकायदेशीर वापर करणे, पैशाचा अपहार करणे, अफरातफर करणे.

embitter /इम्'बिट(र्)/ *क्रि* [*सक*] (बहुधा कर्मणी) एखाद्याच्या मनात द्वेष, मत्सर, राग या भावना जागृत करणे, कटू करणे, दुखावणे, कटुता आणणे.

emblem /'अेम्ब्लम्/ *ना* [*गण*] प्रतीक, बोधचिन्ह, निशाणी: *The dove is an ~ of peace, कबुतर शांतीचे प्रतीक आहे.*

embody /इम्'बॉडि/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] (*in*)// (*औप*) (कल्पना, विशेष वगैरे) मूर्त करणे, व्यक्त करणे; समावेश करणे, सामील करणे. **embodiment** *ना* [*अे.व*] मूर्ती, आदर्श: *She is the embodiment of honesty, ती म्हणजे मूर्तिमंत प्रामाणिकपणा.*

embossed /इम्'बॉस्ट्; *अमे* -बॉऽस्ट्/ *वि* १ (पृष्ठभागाबाबत) उठावाचे नक्षीकाम असलेला. २ (नक्षीकामाबाबत) उठावाचे, पृष्ठभागापासून वर आलेले.

embrace /इम्'ब्रेइस्/ *क्रि* १ [*अक, सक*] एखाद्याला प्रेमाने मिठीत घेण, आलिंगन देणे. २ [*सक*] (*औप*) (एखादा धर्म, एखादे तत्त्व) खुषीने स्वीकारणे, अंगिकारणे. ३ [*सक*] (*औप*) समावेश/समाविष्ट करणे, अंतर्भूत करणे. **embrace** *ना* [*गण*] आलिंगन, मिठी, कवळणी: *a loving ~, प्रेमळ आलिंगन.*

embroider /इम्'ब्रॉऽड(र्)/ *क्रि* १ [*अक, सक*] भरतकाम करणे, कशिदा काढणे. २ [*सक*] एखादी गोष्ट रंगतदार करण्यास तीत

पदरचे घालणे, कल्पनेने वाढवणे. **embroidery** *ना* [*गण, अगण*] भरतकाम.

embryo /'एम्ब्रि·अउ/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s** /-अउझ़्/) १ जन्मापूर्वीचा फारशी वाढ न झालेला जीव, गर्भ, पिंड, भ्रूण. २ (*वाक्प्र*) **in 'embryo** असलेले पण वाढ न झालेले, बीजावस्थेत. **embryonic** /,एम्ब्रि'ऑनिक्/ *वि* अंकुरावस्थेतील, अपरिणत.

emerald /'एमरल्ड्/ *ना* [*गण*] हिरवागार मौल्यवान खडा, पाचू, मरकत. **emerald** *वि* पाचूच्या रंगाचा, पाचूसारखा गर्द हिरवा.

emerge /इ'मऽज्/ *क्रि* [*अक*] १ बाहेर येणे, उद्भवणे, उत्पत्ती होणे; दृष्टिपथात येणे, दिसू लागणे. २ (वास्तविकांबाबत) उजेडात येणे, माहीत होणे, ज्ञात होणे. **emergence** /-जन्स्/ *ना* [*अगण*] उद्भव, उदय. **emergent** /-जन्ट्/ *वि* उदयाला येणारा, महत्त्व प्राप्त होणारा; नवीन.

emergency /इ'मऽजन्सि/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) तातडीने कृती करण्याची गरज असलेली गंभीर परिस्थिती, आणीबाणी.

emigrate /'एमिग्रेइट्/ *क्रि* [*अक*] दुसऱ्या देशात वास्तव्य करण्यासाठी स्वतःचा देश सोडणे, स्थलान्तर करणे, उत्प्रवास करणे, देशान्तर करणे. **emigrant** /'एमिग्रन्ट्/ *ना* [*गण*] स्थलान्तर/देशान्तर करणारा माणूस, स्थलान्तरित व्यक्ती, उत्प्रवासी. **emigration** /,एमि'ग्रेइश्न्/ *ना* [*अगण*] स्थलान्तर, देशान्तर, उत्प्रवास.

eminent /'एमिनन्ट्/ *वि* (व्यक्तीबाबत) प्रसिद्ध, मान्यवर, नामवंत. **eminence** /-अन्स्/ *ना* [*अगण*] महत्त्व, प्रतिष्ठा, लौकिक. **eminently** *क्रिवि* (*औप*) पुष्कळ, प्रामुख्याने; उघडपणे, स्पष्टपणे : *~ly qualified, चांगला/खूप अर्हताप्राप्त.*

emir /ए'मिअ(र्)/ *ना* [*गण*] मुसलमान राज्यकर्ता, अमीर. **emirate** /'एमिअरेइट्/ *ना* [*गण*] अमीराच्या अखत्यारीतील मुलुख, अमीरी.

emit /इ'मिट्/ *क्रि* (**-tt-**) [*सक*] (*औप*) बाहेर टाकणे, उत्सर्जन करणे. **emission** /इ'मिश्न्/ *ना* [*अगण, गण*] उत्सर्जन.

emotion /इ'मउश्न्/ *ना* [*गण, अगण*] तीव्र भावना – उदा प्रेम, आनंद, भीती किंवा द्वेष. **emotional** /-शन्ल्/ *वि* १ भावनांचा. २ भावस्पर्शी : *an ~al speech, भावस्पर्शी भाषण.* ३ भावविवश, भावनावश, भावनातिरेक. **emotionally** *क्रिवि* भावनावेगाने, भावपूर्णतेने.

emotive /इ'मउटिव्ह्/ *वि* तीव्र भावना उद्दीपित करणारा, भावनांना आवाहन करणारा.

emperor /'एम्पर(र्)/ *ना* [*गण*] साम्राज्याचा राज्यकर्ता/शासक, सम्राट.

emphasis /'एम्फसिस्/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ases** /-असीझ़्/) १ एखाद्या गोष्टीला दिलेले खास महत्त्व, भर. २ शब्दावर दिलेला जास्त जोर, भर, आघात, शब्दबल. **emphasize** /-असाइझ़्/ *क्रि* [*सक*] महत्त्व देणे; भर/जोर देणे. **emphatic** /इम्'फॅटिक्/ *वि* जोर/भर देणारा, जोरदार. **emphatically** /-क्लि/ *क्रिवि* जोरदारपणे.

empire /'एम्पाइअ(र्)/ *ना* [*गण*] एका राज्यकर्त्याच्या किंवा सरकारच्या नियंत्रणाखाली असलेला राज्यांचा गट, साम्राज्य.

empirical /इम्'पिरिक्ल्/ *वि* (ज्ञानाबाबत) सिद्धान्तापेक्षा प्रत्यक्ष अवलोकन आणि प्रयोग यावर आधारलेले, अनुभवजन्य, अनुभवसिद्ध, आनुभविक.

employ /इम्'प्लॉइ/ *क्रि* [*सक*] १ एखाद्याला पगारी काम देणे, नोकरी देणे. २ (*औप*) वापरणे, उपयोग करणे. **employable** *वि* नोकरीला लावण्याजोगा. **employee** /,एम्प्लॉइ'ई; तसेच इम्'प्लॉइ·ई/ *ना* [*गण*] नोकरदार, सेवक, कर्मचारी. **employer** *ना* [*गण*] इतरांना नोकरीवर ठेवणारा माणूस, मालक, नियोक्ता. **employment** *ना* [*अगण*] १ नियमित पगार मिळणारे काम, नोकरी, सेवा, नियुक्ती. २ लोकांना नोकरीवर ठेवण्याची कृती, सेवायोजन.

empower /इम्'पाउअ(र्)/ *क्रि* [*सक*] (*औप*) (बहुधा कर्मणी) (एखाद्याला) कायदेशीर अधिकार देणे, शक्ती/अधिकार प्रदान करणे.

empress /'एम्प्रिस्/ *ना* [*गण*] एखाद्या साम्राज्याची राज्यकर्ती, सम्राज्ञी; सम्राटाची पत्नी.

empty /'एम्प्टि/ *वि* (**-ier, -iest**) १ आत काहीही नसलेला, रिता, रिकामा, मोकळा. २

काहीही अर्थ किंवा किंमत नसलेला : ~ *promises, पोकळ/कोरडी आश्वासने.* **empties** *ना* [*ब.व*] रिकाम्या बाटल्या, रिकामी खोकी वगैरे. **emptiness** /-टिनिस्/ *ना* [*अगण*] रितेपणा, पोकळी. **empty** *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*अक, सक*] मोकळे/रिकामे होणे/करणे, रिक्त होणे. **,empty-'handed** *वि* काहीही घेऊन न आलेला किंवा काहीही घेऊन न जाणारा, रिक्तहस्त. **,empty-'headed** *वि* मूर्ख, बिनडोक, रिकाम्या डोक्याचा; वेडपट, चक्कर.

emu /'ईम्यू/ *ना* [*गण*] उडू न शकणारा शहामृगासारखा एक ऑस्ट्रेलियन पक्षी.

emulate /'अेम्युलेइट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) एखाद्याची हुबेहूब किंवा जरा अधिकच नक्कल करणे, बरोबरी करणे, वरचढ होण्याचा प्रयत्न करणे, अनुकरण करणे. **emulation** /,अेम्यु'लेइश्न्/ *ना* [*अगण*] नक्कल, बरोबरी.

emulsion /इ'मल्श्न्/ *ना* [*अगण, गण*] तेल किंवा चरबी असलेले औषध किंवा रंग.

enable /इ'नेइब्ल्/ *क्रि* [*सक*] *to//* (एखाद्याला) एखादी गोष्ट करणे शक्य करणे, समर्थ करणे.

enamel /इ'नॅम्ल्/ *ना* [*अगण*] १ काचेसारखे धातूवर किंवा भांड्यावर चढवायचे आवरण, काचवण. २ दातांवरचे कठीण आवरण, दातावरचे लुकण, दंतवल्क. **enamel** *क्रि* (**-ll-**; *अमे* तसेच **-l-**) [*सक*] काचवण घालणे.

enamoured (*अमे* **-ored**) /इ'नॅमड्/ *वि* *of//* लुब्ध, मोहात पडलेला, भुरळ पडलेला.

enchant /इन्'चान्ट्/ *क्रि* [*सक*] आनंद देणे, मंत्रमुग्ध करणे. **enchanted** /-इड्/ *वि* मंत्रमुग्ध, मोहित. **enchanting** *वि* आनंद देणारा, मंत्रमुग्ध करणारा, मोहिनी टाकणारा. **enchantment** *ना* [*अगण, गण*] मोह, भुरळ.

encircle /इन्'सऽकल्/ *क्रि* [*सक*] वेढणे, गराडा घालणे.

enclave /'अेन्क्लेइव्ह्/ *ना* [*गण*] एखाद्या देशाचा दुसऱ्या देशाने वेढलेला भाग, परवृत्त प्रदेश.

enclose /इन्'क्लउझ्/ *क्रि* [*सक*] १ भोवताली कुंपण, तट वगैरे घालणे, आवार करणे. २ पाकिटात घालणे. **enclosure** /इन्'क्लउझ(र्)/ *ना* [*गण*] १ कुंपण घातलेली जागा, बंदिस्त जागा. २ पाकिटात पत्राबरोबर धाडलेले कागद, सहपत्र.

encore /'ऑङ्कॉऽ(र्)/ *उद्वा, ना* [*गण*] पुन्हा तेच करा (अशी) प्रेक्षकांनी केलेली मागणी, वन्स मोअर!

encounter /इन्'काउन्ट(र्)/ *क्रि* [*सक*] (*औप*) (एखाद्या अवघड गोष्टीशी किंवा मन वळवण्यास अवघड असलेल्या व्यक्तीशी अचानकपणे) गाठ पडणे, भेट होणे. **encounter** *ना* [*गण*] अचानक पडलेली (विशेषतः कडवट) गाठ, भेट.

encourage /इन्'करिज्/ *क्रि* [*सक*] पाठिंबा, उत्तेजन देणे, प्रोत्साहन देणे : *They ~d him to come, त्याने यावे म्हणून त्यांनी प्रोत्साहन दिले.* **encouragement** *ना* [*अगण, गण*] प्रोत्साहन, उत्तेजन. **encouraging** *वि* उत्साहवर्धक, आशादायक : *encouraging news, उत्साहवर्धक बातमी.*

encroach /इन्'क्रउच्/ *क्रि* [*अक*] (*on*)// (*औप*) योग्य किंवा नैसर्गिक सीमेच्या पलीकडे जाणे, अतिक्रमण करणे, हद्द ओलांडणे : ~ *on sb's rights, एखाद्याच्या हक्कांवर अतिक्रमण करणे.*

encyclopedia (तसेच **-paedia**) /इन्,साइक्ल'पीडिअ/ *ना* [*गण*] एखाद्या विषयावर किंवा सर्व विषयांवर माहिती देणारे आणि बहुधा वर्णानुक्रमी रचना असणारे पुस्तक किंवा पुस्तके, विश्वकोश, ज्ञानकोश. **encyclopedic** (तसेच **-paedic**) /-'पीडिक्/ *वि* संपूर्ण आणि इत्थंभूत, विस्तृत आणि परिपूर्ण.

end /अेन्ड्/ *ना* [*गण*] १ एखादी गोष्ट जिथे थांबते तो बिंदू, शेवटचे टोक, अंत; एखाद्या गोष्टीचा अखेरचा भाग, शेवट, अखेर : *at the ~ of the street/war, रस्त्याच्या शेवटी/युद्धाच्या शेवटी.* २ उरलेला भाग, शेवटचा भाग : *cigarette ~, सिग्रेटचे थोटूक.* ३ उद्दिष्ट किंवा हेतू : *with this ~ in view, हे उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेऊन.* ४ (*वाक्प्र*) **in the 'end** शेवटी; अंतिमतः, सरतेशेवटी. **make ends meet** राहण्यापुरते कसेबसे पुरतील इतके पैसे मिळवणे, हातातोंडाशी गाठ असणे. **no 'end of sth** (*अनौप*) पुष्कळ, खूप. **on 'end** (क)

ताठ, उभा. (**ख**) सतत, एकसारखा : *rain for days on ~, कित्येक दिवस सतत पडणारा पाऊस.* **put an end to sth** एखादी गोष्ट थांबवणे/बंद करणे. **end** *क्रि* १ [*अक, सक*] संपणे, संपवणे. २ (*क्रिब*) **end up** एखाद्या गोष्टीत अखेर होणे, परिणती होणे. **ending** *ना* [*गण*] शब्दाचा, कथेचा वगैरे अखेरचा भाग, शेवट. **endless** /-'लिस्/ *वि* शेवट नसलेला, अंत नसलेला, अनंत. **endlessly** *क्रिवि* सतत, न थांबता. अखंड.

endanger /इन्'डेइन्ज(र्)/ *क्रि* [*सक*] धोक्यात घालणे/आणणे, धोका निर्माण करणे.

endear /इन्'डिअ(र्)/ *क्रि* [*सक*] *to//* (*औप*) प्रिय करणे, आवडेलसा करणे. **endearment** *ना* [*गण, अगण*] प्रेमळपणा, प्रेम.

endeavour (*अमे* **-or**) /इन्'डेव्ह(र्)/ *क्रि* [*अक*] *to//* (*औप*) प्रयत्न करणे. **endeavour** *ना* (*औप*) १ [*गण*] प्रयत्न. २ [*अगण*] कष्ट; प्रयास.

endemic /अेन्'डेमिक्/ *वि* (*औप*) (खास करून रोगाबाबत) बऱ्याचदा विशिष्ट जागी आढळणारा, प्रदेशनिष्ठ, देशज.

endorse /इन्'डॉऽस्/ *क्रि* [*सक*] १ सार्वजनिक रीतीने संमती देणे किंवा पाठिंबा देणे, पुष्टी देणे. २ (चेकच्या) पाठीमागे नाव लिहिणे/सही करणे, पृष्ठांकन करणे. ३ (बहुधा कर्मणी) (वाहन चालवण्याच्या परवान्यावर) वाहतूक नियमाचा भंग केल्याची नोंद करणे. **endorsement** *ना* [*गण, अगण*] उघड संमती/अनुमती किंवा पाठिंबा, पुष्टी; पृष्ठिका, पृष्ठांकन; परवान्यावरील गुन्ह्याची नोंद.

endow /इन्'डाउ/ *क्रि* [*सक*] १ (एखाद्या शाळेला वगैरे) सतत उत्पन्न मिळेल अशा रीतीने देणगी देणे, स्थायी निधी देणे. २ (*वाक्प्र*) **be endowed with sth** जन्मतःच एखादा गुण किंवा एखादी कला असणे, एखादी गोष्ट जन्मापासून असणे/जन्मजात असणे. **endowment** *ना* [*गण, अगण*] देणगी, स्थायी दान; प्रज्ञा, जन्मजात/उपजत कला किंवा गुण, नैसर्गिक देणगी, ईश्वरी देणगी.

endure /इन्'ड्युअ(र्); *अमे* -'डुअर/ *क्रि* १ [*सक*] (दुःख, वेदना वगैरे) शांतपणे सोसणे, सहन करणे. २ [*अक*] टिकून राहणे, तगणे. **endurance** *ना* [*अगण*] सहनशक्ती; टिकण्याची क्षमता, तग. **enduring** *वि* टिकाऊ.

enemy /'अेनमि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*गण*] एखाद्याचा द्वेष करणारा किंवा त्याला इजा करू इच्छिणारा माणूस, शत्रू, दुष्मन. २ **the enemy** [*अे.व*] (अे.व किंवा ब.व क्रियापदासह) शत्रू राष्ट्र (किंवा त्याचे सैन्य).

energy /'अेनजि/ *ना* १ [*अगण*] जोमाने किंवा उत्साहाने काम करण्याची शक्ती, ताकद, हिंमत. २ **energies** [*ब.व*] काम करण्यासाठी माणसाजवळ असणारी ताकद, कर्तुत्व शक्ती. ३ [*अगण*] यंत्रे वगैरे चालविण्यासाठी वापरली जाणारी शक्ती, ऊर्जा : *atomic ~, अणुऊर्जा, अण्विक शक्ती, अणुशक्ती.* **energetic** /,अेन'जेटिक्/ *वि* उत्साहपूर्ण, उत्साही, तरतरीत, हिमती. **energetically** /-क्लि/ *क्रिवि* जोरदारपणे; तडफेने.

enfold /इन्'फउल्ड्/ *क्रि* [*सक*] (*औप*) हातांनी कवटाळणे, कवेत घेणे, आलिंगन देणे.

enforce /इन्'फॉऽस्/ *क्रि* [*सक*] (कायदा वगैरे) पाळण्याची लोकांवर सक्ती करणे, भाग पाडणे, लादणे. **enforceable** *वि* लादण्याजोगा, सक्ती करण्यासारखा. **enforcement** *ना* [*अगण*] सक्ती, बळजबरी.

engage /इन्'गेइज्/ *क्रि* १ [*सक*] (*औप*) (एखाद्याला) कामाला लावणे. २ [*सक*] (*औप*) (लक्ष वगैरे) वेधणे, खेचून घेणे. ३ [*अक, सक*] (यंत्राच्या भागांबाबत) एकमेकात गुंतणे, अडकणे/अडकवणे. ४ (*क्रिब*) **engage (sb) in sth** (एखाद्याला) एखाद्या गोष्टीत गुंतवून ठेवणे, व्यग्र ठेवणे. **engaged** *वि* १ लग्न ठरलेला, वाङ्निश्चय झालेला. २ वापर चालू असलेला, मोकळा नसलेला; व्यग्र. **engagement** *ना* [*गण*] १ वाङ्निश्चय. २ ठरवलेली भेट. ३ (*औप*) लढाई. **engaging** *वि* आनंददायी; सुंदर, आकर्षक.

engine /'अेन्जिन्/ *ना* [*गण*] १ ऊर्जेचे गतीमधे रूपान्तर करणारे यंत्र, अभियंत्र. २ आगगाडीचे इंजिन. **'engine-driver** *ना* [*गण*] आगगाडी चालवणारा माणूस, रेल्वेचालक.

engineer /,एन्जि'निअ(र्)/ *ना* [*गण*] १ रेल्वे, पूल, यंत्रे वगैरेचे आराखडे काढणारा, शिल्पिक, अभियंता. २ इंजिनवर नियंत्रण ठेवणारा. **engineer** *क्रि* [*सक*] आयोजणे, योजणे – विशेषतः नकळत किंवा गुप्तपणे सूत्र हालवणे. **engineering** *ना* [*अगण*] इंजिनिअरचा धंदा किंवा त्याचे काम, अभियांत्रिकी.

English /'इङ्ग्लिश्/ *ना* १ [*अगण*] इंग्रजी भाषा. २ **the English** [*ब.व*] इंग्लिश लोक, ब्रिटिश लोक, इंग्रज. **English** *वि* इंग्लंडचा, इंग्रज लोक किंवा इंग्रजी भाषा यांबाबतचा. **Englishman** /-मन्/ (*ब.व* **-men**) **Englishwoman** (*ब.व* **-women**) *ना* [*गण*] इंग्लंडमधे जन्मलेली व्यक्ती.

engrave /इन्'ग्रेइव्ह्/ *क्रि* [*सक*] १ *A on B/ B (with A)*// टणक पृष्ठभागावर शब्द किंवा चित्र कोरणे, खोदून काढणे. २ (*वाक्प्र*) **be engraved on sb's mind, memory, etc** मनावर वगैरे कोरले जाणे, घट्ट ठसा उमटणे. **engraver** *ना* [*गण*] कोरीव काम करणारा. **engraving** *ना* १ [*गण*] कोरीव चित्र असलेल्या धातूच्या ठशाने चित्र छापणे. २ [*अगण*] कोरीवकाम, नकसकाम.

engross /इन्'ग्रउस्/ *क्रि* [*सक*] (बहुधा *कर्मणी*) (एखाद्याचे) सर्व लक्ष वेधून घेणे : *~ed in her work, तिच्या कामात गर्क/बुडालेली.*

engulf /इन्'गल्फ्/ *क्रि* [*सक*] वेढणे, दिसेनासे करणे : *The hotel was ~ed in flames, ज्वालांनी हॉटेल पूर्णपणे वेढले.*

enhance /इन्'हान्स्; *अमे* -'हॅन्स्/ *क्रि* [*सक*] (एखाद्याची गुणवत्ता) वाढवणे किंवा सुधारणे, गुणसंवर्धन करणे. **enhancement** *ना* [*अगण, गण*] वाढ, गुणसंवर्धन.

enigma /इ'निग्म्/ *ना* [*गण*] रहस्य, कोडे. **enigmatic** /,एनिग्'मॅटिक्/ *वि* कोड्यात पाडणारा, रहस्यपूर्ण. **enigmatically** /-क्लि/ *क्रिवि* कोड्यात पाडण्यासारखा.

enjoy /इन्'जॉइ/ *क्रि* [*सक*] १ आनंद लुटणे, मौज करणे. २ (एखादी गोष्ट) नशीबाने असणे, सुदैवाने लाभणे : *~ good health, सुदैवाने चांगली तब्बेत लाभणे.* ३ **~ oneself** आनंद उपभोगणे. **enjoyable** *वि* आनंद देणारा, आवडणारा. **enjoyably** *क्रिवि* आनंदाने, आनंद उपभोगत. **enjoyment** *ना* [*अगण, गण*] आनंद, मजा, उपभोग; आनंददायी गोष्ट.

enlarge /इन्'लाज्/ *क्रि* १ [*अक, सक*] मोठे होणे/करणे, आकार वाढणे/वाढवणे, विस्तार करणे. २ (*क्रिब*) **enlarge on sth** (*औप*) एखाद्या गोष्टीविषयी अधिक/विस्ताराने बोलणे किंवा लिहिणे. **enlargement** *ना* [*गण, अगण*] आकार मोठा केलेली गोष्ट, प्रवर्धन, परिवर्धन.

enlighten /इन्'लाइट्न्/ *क्रि* [*सक*] (एखाद्याला) अधिक ज्ञान किंवा समज देणे, प्रबोधन करणे. **enlightenment** *ना* [*अगण*] प्रबोधन, उद्‌बोधन.

enlist /इन्'लिस्ट्/ *क्रि* १ [*अक, सक*] सैन्यात भरती होणे, (एखाद्याला) संरक्षण दलात घालणे. २ [*सक*] (एखाद्याचा) पाठिंबा किंवा मदत मिळवणे. **enlistment** *ना* [*अगण, गण*] सैन्यात भरती होणे, सैन्यभरती.

enormity /इ'नॉऽमटि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*गण, अगण*] (*औप*) दुष्टपणा, महाभयंकरपणा. २ [*अगण*] प्रचंड रूप, उग्र स्वरूप, अवाढव्यपणा.

enormous /इ'नॉऽमस्/ *वि* खूप मोठा, प्रचंड. **enormously** *क्रिवि* मोठ्या प्रमाणात; अतिशय, फार.

enough /इ'नफ्/ *वि, सना* हवा तेवढा, पुरेसा, जरूरी एवढा : *Is £100 ~? १०० पौंड पुरतील?* **enough** *क्रिवि* १ तितकासा, पुरेसा : *not old ~, तितकासा जुना नाही.* २ (*वाक्प्र*) **oddly, strangely, etc enough** हे विचित्र वगैरे आहे, पण . . ., विचित्र, वगैरे खरेच पण . . .

enquire, enquiry = INQUIRE, INQUIRY.

enraged /इन्'रेइज्ड्/ *वि* खूप रागावलेला, संतप्त.

enrich /इन्'रिच्/ *क्रि* [*सक*] १ (*with*)// एखाद्या गोष्टीची भर घालून (एखाद्या गोष्टीची) गुणवत्ता वाढवणे : *soil ~ed with fertilizer, खतांनी कस वाढवलेली जमीन म्हणजेच खते वापरून जमिनीचा वाढवलेला कस.* २ अधिक श्रीमंत करणे, संपन्न करणे. **enrichment** *ना*

[*अगण*] गुणवर्धन, समृद्धीकरण.

enrol (तसेच विशेषतः *अमे* **-ll**) /इन्'रउल्/ *क्रि* (**-ll-**) [*अक, सक*] (एखाद्याला) एखाद्या कॉलेजचा किंवा अभ्यासक्रमाचा सभासद करणे, पटावर नाव दाखल करणे. **enrolment** *ना* [*अगण, गण*] पटावरची दाखल नावे, नावनोंदणी.

en route /ˌऑन् 'रूट्/ *क्रिवि* (*फ्रेंच*) वाटेवर.

ensemble /ऑन्'सॉम्ब्ल्/ *ना* [*गण*] १ वस्तूंचा संच, गण, वृंद. २ एकत्रितपणे वाजविणारा वाद्यवृंद.

ensign /'अेन्सन्, तसेच 'अेन्साइन्/ *ना* [*गण*] १ जहाजावरील निशाण. २ अमेरिकन नौदलातील कनिष्ठ अधिकारी.

ensue /इन्'स्यू; *अमे* -'सू/ *क्रि* [*अक*] -च्या पासून निर्माण होणे, परिणाम म्हणून घडणे; पाठोपाठ येणे, मागोमाग येणे.

ensure (*अमे* **insure**) /इन्'शॉऽ(र्); *अमे* इन्'शुअर्/ *क्रि* [*सक*] (एखादी गोष्ट) घडेल अशी व्यवस्था करणे, हमी देणे, खात्री करणे.

entail /इन्'टेइल्/ *क्रि* [*सक*] आवश्यक करणे : *Your plan ~s a lot of work, तुझ्या योजनेमधे खूप काम करणे आवश्यक आहे.*

entangled /इन्'टॅङ्ग्लड्/ *वि* (*in*)// एखाद्या गोष्टीत अडकलेला, गुंतलेला; फंदात पडलेला. **entanglement** *ना* [*गण, अगण*] गुंतागुंत, गुंतलेपणा.

enter /'अेन्ट(र्)/ *क्रि* १ [*अक, सक*] आत येणे/जाणे, प्रवेश करणे. २ [*सक*] सभासद होणे; रुजू होणे, दाखल होणे : *~ university, विद्यापीठात दाखल होणे/जाऊ लागणे.* ३ [*सक*] वहीत किंवा यादीत तपशील लिहिणे, बारकावे नोंदणे. ४ [*अक, सक*] (स्पर्धेत, परीक्षेत वगैरे) भाग घेणे, उतरणे. ५ (*क्रिब*) **enter into sth** (**क**) एखाद्या गोष्टीस सुरुवात करणे, एखादी गोष्ट करायला लागणे. (**ख**) एखाद्या गोष्टीचा भाग बनणे, त्यामधे येणे. **enter on/ upon sth** (*औप*) प्रारंभ करणे.

enterprise /'अेन्टप्राइझ्/ *ना* १ [*गण*] नवीन किंवा आव्हानात्मक योजना किंवा असा उपक्रम. २ [*अगण*] धाडस आणि उत्साह. ३ [*गण*] व्यावसायिक कंपनी किंवा संस्था, फर्म. ४ [*अगण*] उद्योग : *private ~, खाजगी उद्योग.* **enterprising** *वि* धाडसी व उत्साही, धडाडीचा.

entertain /ˌअेन्ट'टेइन्/ *क्रि* १ [*अक, सक*] (एखाद्याचे) मनोरंजन करणे, करमणूक करणे, मन रिझवणे. २ [*अक, सक*] (एखाद्याची) खाण्यापिण्याची सोय स्वतःच्या घरी करणे, घरी पाहुणचार करणे. ३ [*सक*] एखाद्या गोष्टीचा विचार करणे, कल्पना मनात बाळगणे. **entertainer** *ना* [*गण*] लोकांची करमणूक करणारा माणूस, मनोरंजनकार. **entertaining** *वि* करमणुकीचा, मनोरंजक. **entertainment** *ना* १ [*अगण*] करमणूक, मनोरंजन. २ [*गण*] करमणुकीचा सार्वजनिक प्रयोग.

enthral (तसेच खास करून *अमे* **-ll**) /इन्'थ्रॉऽल्/ *क्रि* (**-ll-**) [*सक*] एखाद्याचे संपूर्ण लक्ष वेधणे, रंगून टाकणे, तल्लीन करणे.

enthuse /इन्'थ्यूझ्; *अमे* -थूऽझ्/ *क्रि* [*अक*] (*about/over*)// एखाद्या गोष्टीविषयी खूप उत्साहाने बोलणे.

enthusiasm /इन्'थ्यूझिॲझम्; *अमे* -'थू/ *ना* [*अगण*] खूप उत्साह, कळकळ किंवा कौतुक; औत्सुक्य. **enthusiast** /-ॲस्ट्/ *ना* [*गण*] एखाद्या गोष्टीची तीव्र आवड असलेली व्यक्ती, उत्साही माणूस. **enthusiastic** /इन्ˌथ्यूझि'ॲस्टिक्; *अमे* -थू-/ *वि* उत्साही. **enthusiastically** /-क्लि/ *क्रिवि* उत्साहाने.

entice /इन्'टाइस्/ *क्रि* [*सक*] प्रलोभन दाखवून एखाद्याला वश करणे किंवा मोहात पाडणे, भुरळ पाडणे, भुलवणे, लालूच दाखवणे. **enticement** *ना* [*गण, अगण*] लालूच, भूल, भुरळ.

entire /इन्'टाइअ(र्)/ *वि* संपूर्ण, पुरता, समग्र. **entirely** *क्रिवि* पूर्णपणे. **entirety** /इन्'टाइअरटि/ *ना* [*अगण*] पूर्णांश, पूर्णता.

entitle /इन्'टाइट्ल्/ *क्रि* [*सक*] १ (पुस्तकाला वगैरे) नाव देणे, शीर्षक देणे. २ *to*// एखादी गोष्ट असण्याचा किंवा करण्याचा हक्क देणे, अधिकार असणे/देणे. **entitlement** *ना* [*अगण, गण*] हक्क.

entity /'अेन्टटि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) (*औप*) स्वतंत्र अस्तित्व असणारी गोष्ट, वस्तू.

entourage /ˌऑन्टु'राझ्/ *ना* [*गण*, तसेच ब.व क्रियापदासह ए.व] मोठ्या माणसाबरोबर

असणारी माणसे, लवाजमा, सरंजाम.

entrance^1 /'अेन्ट्रन्स्/ *ना* १ [*गण*] आत येण्याचा दरवाजा, मार्ग वगैरे, प्रवेश. २ [*अगण, गण*] (केलेला) प्रवेश. ३ [*अगण*] प्रवेशाचा अधिकार.

entrance^2 /इन्'ट्रान्स्; *अमे* -'ट्रॅन्स्/ *क्रि* [*सक*] मंत्रमुग्ध करणे/होणे, तन्मय होणे, समाधी लागणे: *~d by the music, संगीताने देहभान हरपलेला.*

entrant /'अेन्ट्रन्ट्/ *ना* [*गण*] एखाद्या स्पर्धेत, व्यवसायात वगैरे उतरणारा माणूस, स्पर्धक, प्रवेशार्थी.

entreat /इन्'ट्रीट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) विनवणी करणे, मिनतवारी करणे, नाकदुऱ्या काढणे. **entreaty** *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) विनवणी, कळकळीची विनंती.

entrenched /इन्'ट्रेन्च्ट्/ *वि* (कल्पना वगैरेबाबत) घट्ट बसलेला, भरभक्कम.

entrepreneur /,ऑन्ट्रप्र'नऽ(र्)/ *ना* [*गण*] नवीन व्यवसाय सुरू करणारा.

entrust /इन्'ट्रस्ट्/ *क्रि* [*सक*] *with; to//* एखाद्यावर एखादी गोष्ट सोपवणे, हवाली करणे: *~ the job to him ○ ~ him with the job, त्याच्यावर काम सोपवणे.*

entry /'अेन्ट्रि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*गण*] आत जाणे किंवा आत येणे, प्रवेश. २ [*अगण*] प्रवेशाधिकार. ३ [*गण*] प्रवेशद्वार. ४ [*गण*] यादीतील नोंद: *dictionary entries, शब्दकोशातील नोंदी.*

enumerate /इ'न्यूमरेइट्; *अमे* इ'नू-/ *क्रि* [*सक*] (यादीतील वस्तू) एकानंतर एक अशा मोजणे, गणन करणे, मोजणे. **enumeration** /इ,न्यूम'रेइश्न्; *अमे* इ'नू-/ *ना* [*अगण*] गणन, यादी.

enunciate /इ'नैन्सिअेइट्/ *क्रि* [*अक, सक*] (शब्दांचा) स्पष्ट उच्चार करणे. **enunciation** /इ,नैन्सि'अेइश्न्/ *ना* [*अगण, गण*] उच्चारण.

envelop /इन्'व्हलप्/ *क्रि* [*सक*] पूर्णपणे आवरण घालणे, वेष्टण घालणे, लपेटणे, भोवतालून गुंडाळणे: *~ed in fog, धुक्यात लपेटलेला.* **envelopment** *ना* [*अगण*] आवरण घालणे; आवरण, वेष्टण.

envelope /'अेन्व्हलउप्, तसेच 'ऑन्-/ *ना* पत्राचे पाकीट.

enviable /'अेन्व्हिअब्ल्/ *वि* हवाहवासा वाटणारा; हेवा वाटावा असा.

envious /'अेन्व्हिअस्/ *वि* हेवा करणारा. **enviously** *क्रिवि* असूयेने.

environment /इन्'व्हाइअरन्मन्ट्/ *ना* [*गण, अगण*] लोक राहतात ती परिस्थिती किंवा तो सभोवताल, परिसर, पर्यावरण. **environmental** /इन्,व्हाइअरन्'मेन्ट्ल्/ *वि* परिसराचा, सभोवतालच्या परिस्थितीबाबतचा, पर्यावरणाचा. **environmentalist** /इन्,व्हाइअरन्'मेन्टलिस्ट्/ *ना* [*गण*] नैसर्गिक परिस्थितीचे जतन करण्याची इच्छा असणारा माणूस, पर्यावरणवादी.

envisage /इन्'व्हिसिज्/ *क्रि* [*सक*] भविष्यात होऊ शकणाऱ्या गोष्टीची कल्पना असणे, अंदाज येणे.

envoy /'अेन्व्हॉइ/ *ना* [*गण*] १ दूत, निरोप्या किंवा प्रतिनिधी, जासूद. २ राजदूत.

envy /'अेन्व्हि/ *ना* १ [*अगण*] दुसऱ्याकडे असणाऱ्या वस्तूची अभिलाषा धरण्याने येणारे असमाधान, हेवा, असूया, असोशी. २ (*वाक्प्र*) **the envy of sb** एखाद्याला हवी असणारी गोष्ट, अभिलाषा असणारी गोष्ट. **envy** *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] एखाद्याचा हेवा वाटणे, असूया वाटणे.

enzyme /'अेन्झाइम्/ *ना* [*गण*] जिवंत पेशीत निर्माण होणारे आणि रासायनिक बदल घडवून आणणारे एक रासायनिक द्रव्य, वितंचक.

epaulette (तसेच विशेषतः *अमे* **-let**) /'अेपलेट्/ *ना* [*गण*] गणवेषातील खांद्यावरचा बिल्ला, पट्टा वगैरे, सैनिकी स्कंधभूषण.

ephemeral /इ'फेमरल्/ *वि* क्षणभंगूर, अल्पायुषी, अल्पजीवी.

epic /'अेपिक्/ *ना* [*गण*] थोर व्यक्तींच्या कामगिरींबाबतचे दीर्घ काव्य, चित्रपट वगैरे, महाकाव्य. **epic** *वि* अविस्मरणीय; महान्.

epidemic /,अेपि'डेमिक्/ *ना* [*गण*] लोकात चटकन् फैलावणारा रोग, साथ.

epilepsy /'अेपिलेप्सि/ *ना* [*अगण*] जोरात

फिट्स् येऊन बेशुद्ध करणारा रोग, फेपरे, अपस्मार. **epileptic** /ˌएपि'लेप्टिक्/ *वि, ना* [*गण*] फेपऱ्याचा; फेपरे येणारा माणूस.

epilogue /'एपिलॉग्/ (*अमे* -log /-लॉऽग्/) *ना* [*गण*] पुस्तकाचा किंवा नाटकाचा शेवटचा भाग, उपसंहार, समारोप.

episode /'एपिसउड्/ *ना* [*गण*] १ महत्त्वाचा प्रसंग किंवा महत्त्वाचा काळ. २ दूरदर्शन वगैरेवरील मालिकेमधील एक प्रकरण, भाग.

epitaph /'एपिटाफ्; *अमे* -टॅफ्/ *ना* [*गण*] थडग्यावरचा लेख.

epithet /'एपिथेट्/ *ना* [*गण*] एखाद्याचे वर्णन करणारे विशेषण, उपाधी.

epitome /इ'पिटमि/ *ना* [*गण*] एखाद्या गुणाचे, प्रकाराचे उत्तम उदाहरण, आदर्श (नमुना): *She is the ~ of kindness, ती दयाळूपणाचा आदर्श नमुना आहे किंवा माणसाने दयाळू कसे असावे याचे उत्तम उदाहरण म्हणजे ती.* **epitomize** /इ'पिटमाइझ्/ *क्रि* [*सक*] आदर्श असणे, उत्तम उदाहरण असणे.

epoch /'ईपॉक्; *अमे* 'एपक्/ *ना* [*गण*] महत्त्वाच्या घटनांनी किंवा विशेषांनी व्यापलेला एखादा काळ, युग.

equable /'एक्वब्ल्/ *वि* सम; फार बदल न होणारा: *an ~ climate/temper, सम हवामान/समवृत्ती.*

equal /'ईक्वल्/ *वि* १ आकार, संख्या, मूल्य वगैरेत सारखा, समान. २ *to*// एखादी गोष्ट करण्यास समर्थ, लायक: *~ to the task, कामाला समर्थ.* **equal** *ना* [*गण*] दुसऱ्यास तोड अशी व्यक्ती किंवा वस्तू, बरोबरीचा किंवा तोलाचा माणूस. **equal** *क्रि* (**-ll-**; *अमे* **-l-**) [*सक*] एखाद्याच्या बरोबरीचा असणे, समान असणे. **equality** /इ'क्वॉलटि/ *ना* [*अगण*] समानता, सारखेपणा, समता. **equalize** *क्रि* [*अक, सक*] समान होणे/करणे, एकसारखा होणे/करणे. **equally** *क्रिवि* १ त्याच पद्धतीने, समानतेने. २ त्याचप्रमाणे, तसेच, सारखे, तेवढेच.

equate /इ'क्वेइट्/ *क्रि* [*सक*] समान मानणे, बरोबरी करणे: *You cannot ~ these two systems of Government, शासनाच्या या दोन पद्धती तू एकाच मापाने मोजू शकत नाहीस म्हणजेच त्यांना तू समान मानू शकत नाहीस.*

equation /इ'क्वेइश्न्/ *ना* [*गण*] दोन राशी समान आहेत असे विधान, समीकरण: $2x + 5 = 11$, २क्ष + ५ = ११ हे समीकरण आहे.

equator /इ'क्वेइट(र्)/ *ना* **the equator** [*अे.व*] उत्तर आणि दक्षिण ध्रुवापासून समान अंतरावर पृथ्वीच्या पृष्ठभागावर काढलेली काल्पनिक गोलाकार रेषा, विषुववृत्त, भूमध्यरेषा. **equatorial** /ˌएक्व'टॉऽरिअल्/ *वि* विषुववृत्तीय.

equestrian /इ'क्वेस्ट्रिअन्/ *वि* घोड्यावर स्वार होण्याबाबतचा, अश्वारूढ.

equilibrium /ˌईक्वि'लिब्रिअम्, तसेच एक्-/ *ना* [*अगण*] (*औप*) समतोल (स्थिती).

equinox /'ईक्विनॉक्स्, तसेच 'एक्-/ *ना* [*गण*] दिवस आणि रात्र यांचा समान अवधी असण्याचा वर्षातील काळ.

equip /इ'क्विप्/ *क्रि* (**-pp-**) [*सक*] (*with*)// विशिष्ट हेतूसाठी एखाद्याला आवश्यक ते देणे, सज्ज करणे, सिद्ध करणे, पुरवणे. **equipment** *ना* [*अगण*] विशिष्ट कामासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टी, साधनसामग्री: *office ~ment, कार्यालयीन सामग्री.*

equitable /'एक्विटब्ल्/ *वि* न्याय्य, यथायोग्य: *an ~ tax system, न्याय्य करपद्धती.* **equitably** *क्रिवि* न्याय्य रीतीने.

equity /'एक्वटि/ *ना* १ [*अगण*] (*औप*) न्याय, समता, निःपक्षपात. २ **equities** [*ब.व*] ठराविक असे व्याज न मिळणारे शेअर्स आणि रोखे, न्यायिके.

equivalent /इ'क्विव्हलन्ट्/ *वि, ना* [*गण*] समान कार्य, महत्त्व वगैरे असणारे असे काही, समतुल्य गोष्ट.

equivocal /इ'क्विव्हकल्/ *वि* (*औप*) निश्चित अर्थ नसलेला किंवा दोन अर्थ असलेला, द्व्यर्थी, संदिग्ध, मोघम: *an ~ answer, संदिग्ध उत्तर.* **equivocate** /इ'क्विव्हकेइट्/ *क्रि* [*अक*] (*औप*) संदिग्धपणे बोलणे, दुग्ध्यात ठेवणे, गुळमुळीत बोलणे.

era /'इअर/ *ना* [*गण*] एखाद्या महत्त्वाच्या घडामोडीचा किंवा टप्प्याचा ऐतिहासिक कालखंड, अमदानी, काल, महाकल्प.

eradicate /इ'रॅडिकेइद्/ *क्रि* [*सक*] (एखादी वाईट गोष्ट) संपवून टाकणे, नष्ट करणे, उच्चाटन करणे. **eradication** /इ,रॅडि'केइश्न्/ *ना* [*अगण*] उच्चाटन, निर्मूलन.

erase /इ'रेइझ्; *अमे* -स्/ *क्रि* [*सक*] (डाग वगैरे) काढणे, पुसून टाकणे : (*ला*) *~d the event from his memory, त्याच्या स्मृतीतून ती घटना (त्याने) पुसून टाकली.* **eraser** *ना* [*गण*] (खास करून *अमे*) खोडरबर.

erect /इ'रेक्द्/ *क्रि* [*सक*] १ (*औप*) बांधणे; स्थापन करणे. २ ठोकणे किंवा उभा करणे : *~ a tent, तंबू ठोकणे.* **erect** *वि* ताठ : *stand ~, ताठ उभं राहणे.* **erection** /इ'रेक्श्न्/ *ना* १ [*अगण*] स्थापना, बांधणे; उभारणी. २ [*गण*] (*औप*) इमारत, बांधकाम. ३ [*गण*] पुरुषाच्या शिस्नाचे उत्थापन, लिंगाचे दांडरणे आणि ताठणे.

erode /इ'रउड्/ *क्रि* [*सक*] (बहुधा कर्मणी) (समुद्र, वारे वगैरेबाबत) (खडक वगैरे) झिजवून नष्ट करणे, धुपवणे, झिजवणे. **erosion** /इ'रउझ्न्/ *ना* [*अगण*] झीज, अपक्षरण.

erotic /इ'रॉटिक्/ *वि* लैंगिक वासना चाळविणारा, शृंगारिक.

err /अऽ(र्); *अमे* अेअर्/ *क्रि* [*अक*] (*औप*) चूक करणे, चुकणे, प्रमाद होणे.

errand /'अेरन्ड्/ *ना* [*गण*] (उदा दुकानातून काही आणण्यासाठी वगैरे केलेली) खेप, चक्कर.

erratic /इ'रॅटिक्/ *वि* अनियमित, बेभरवशाचा, लहरी. **erratically** /-क्लि/ *क्रिवि* लहरीने, अनियमितपणे.

erroneous /इ'रउनिअस्/ *वि* (*औप*) (मत, श्रद्धा वगैरेबाबत) चुकीचा, गैर.

error /'अेर(र्)/ *ना* १ [*गण*] चूक, प्रमाद. २ [*अगण*] भूल, चूक : *do it in ~, अनवधानाने/ चुकून करणे.*

erudite /'अेरूडाइद्/ *वि* (*औप*) विद्वान, पंडित.

erupt /इ'रॅप्द्/ *क्रि* [*अक*] १ (ज्वालामुखीबाबत) ज्वालारस बाहेर येणे, ज्वालामुखीचा स्फोट होणे. २ जोराने सुरू होणे, उफाळणे, तोंड फुटणे : *Fighting ~ed on the streets, रस्त्यावर मारामारी सुरू झाली.* **eruption** /इ'रप्श्न्/ *ना* [*गण, अगण*] स्फोट; उफाळणे; तोंड फुटणे, सुरुवात.

escalate /'अेस्कलेइद्/ *क्रि* [*अक, सक*] गंभीर स्वरूप धारण करणे, वाढणे, पसरणे. **escalation** /,अेस्क'लेईश्न्/ *ना* [*अगण, गण*] प्रसार.

escalator /'अेस्कलेइट(र्)/ *ना* [*गण*] चलसोपान, सरकता जिना.

escapade /'अेस्कपेइड्/ *ना* [*गण*] धाडसी कृत्य, आततायी कृती.

escape /इ'स्केइप्/ *क्रि* १ [*अक*] (*from*)// तुरुंगातून किंवा दुसऱ्याच्या कह्यातून निसटणे, सटकणे, पळणे. २ [*अक*] (*from*)// (वायू, द्रवपदार्थ वगैरेबाबत) बाहेर पडणे, निघून जाणे. ३ [*अक, सक*] (एखादी नको असणारी किंवा अप्रिय गोष्ट) टाळणे, चुकवणे. ४ [*सक*] लक्षात न राहणे, न आठवणे, विसरणे : *Her name ~s me, तिचे नाव मला आठवत नाही.* **escape** *ना* १ [*गण, अगण*] पलायन, सुटका. २ [*गण*] वायू गळती किंवा द्रवाची गळती. **escapism** *ना* [*अगण*] स्वतःचे प्रश्न विसरले जातील अशी कृती, पलायनवाद. **escapist** *वि, ना* [*गण*] पलायनवादी.

escort /'अेस्कॉऽद्/ *ना* [*गण*] एखाद्याचे संरक्षण करण्यासाठी बरोबर असलेली व्यक्ती किंवा अशी माणसे, गाड्या वगैरे, अंगरक्षक, संरक्षक. **escort** /इ'स्कॉऽद्/ *क्रि* [*सक*] एखाद्याच्या संरक्षणासाठी त्याबरोबर जाणे, संरक्षण देणे, रक्षक म्हणून जाणे.

esophagus (*अमे*) = OESOPHAGUS.

esoteric /,अेसउ'टेरिक्, ,ईसउ-/ *वि* (*औप*) फक्त एखाद्या छोट्या गटाला समजेल असा, फार थोड्यांना कळेल असा, गुप्त, गूढ.

especially /इ'स्पेशलि/ *वि* १ विशेषतः, खास करून : *I love the country, ~ in spring, मला शहराबाहेरचा निसर्गप्रदेश फार आवडतो – विशेषतः वसंत ऋतूमधे.* २ खूप मोठ्या प्रमाणात, विशेष करून : *This is ~ true of old people, हे विशेष करून वृद्धांबाबत खरे आहे.*

espionage /'अेस्पिअनाझ्/ *ना* [*अगण*] हेरगिरी.

essay /'एसेइ/ *ना* [*गण*] एखाद्या विषयावरील लेख, निबंध. **essayist** *ना* [*गण*] निबंधकार.

essence /'एस्न्स्/ *ना* १ [*अगण*] एखाद्या गोष्टीचा सर्वात महत्त्वाचा गुण, विशेष, व्यक्तिवैशिष्ट्य, प्रधानलक्षण. २ [*गण, अगण*] अर्क. ३ (*वाक्प्र*) **in 'essence** मुख्यतः, प्रामुख्याने.

essential /इ'सेन्श्ल्/ *वि* १ सर्वात महत्त्वाचा; अत्यावश्यक. २ पायाभूत, मूळ : *an ~ part of English character, इंग्रजी स्वभावाचा मूळ भाग किंवा सर्वात महत्त्वाचे अंग.* **essential** *ना* [*गण,* बहुधा *ब.व*] सर्वात महत्त्वाची किंवा अत्यावश्यक गोष्ट, मुख्यघटक, मूलतत्त्व. **essentially** /-शलि/ *क्रिवि* प्रामुख्याने किंवा खरोखर.

establish /इ'स्टॅब्लिश्/ *क्रि* [*सक*] १ (एखादा उद्योग, पद्धत वगैरे) सुरू करणे, स्थापणे; निर्माण करणे. २ एखाद्या स्थानावर किंवा कामात स्वतःला स्थान मिळवणे, स्वतःचे स्थान निर्माण करणे, सुप्रतिष्ठित होणे. ३ (एखादे वास्तविक वगैरे) सिद्ध करणे. **establishment** *ना* १ [*अगण*] स्थापना. २ [*गण*] (*औप*) व्यापारी किंवा मोठी संस्था. ३ **the Establishment** [*अे.व*] (खास करून *ब्रि* अनेकदा *अधिक्षेपी*) सत्ताधारी वर्ग किंवा व्यवस्था.

estate /इ'स्टेइट्/ *ना* १ [*गण*] एकाची मालकी असणारी शहराबाहेरील भागातील जमीन. २ [*गण*] (खास करून *ब्रि*) कारखाने किंवा निवासी इमारत असणारा मोठा भूखंड : *a housing ~, वसाहत.* ३ [*अगण, गण*] (*कायदा*) एखाद्याची सर्व संपत्ती आणि मालमत्ता, स्थावर. **estate agent** *ना* [*गण*] इतरांकरता घरांची खरेदी-विक्री करणारा एजंट. **estate car** *ना* [*गण*] मागच्या सीटच्या मागे सामान ठेवण्यासाठी जागा असलेली आणि मागे दार असलेली गाडी.

esteem /इ'स्टीम्/ *ना* [*अगण*] (*औप*) चांगले मत; आदर. **esteem** *क्रि* [*सक*] (*औप*) आदर करणे, पूजनीय मानणे.

esthetic (*अमे*) = AESTHETIC.

estimate /'एस्टिमेइट्/ *क्रि* [*सक*] १ (रकमेचा किंवा किमतीचा) साधारण अंदाज करणे, अदमास करणे. २ (एखाद्या गोष्टीविषयी) मत बनवणे, अंदाज बांधणे. **estimate** /'एस्टिमट्/ *ना* [*गण*] राशी, किंमत वगैरेचा अंदाज. **estimation** /,एस्टि'मेइश्न्/ *ना* [*अगण*] हिशेब, अंदाज; मत.

estuary /'एस्च्युअरि; *अमे* -उएरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) भरती आणि नदीचा प्रवाह यांचे संगमस्थान, नदीमुख.

etc /इट्'सेटर, एट्-/ *संरू* आणि यासारख्या इतर गोष्टी वगैरे; आणि इतर/उरलेल्या गोष्टी.

etch /एच्/ *क्रि* [*अक, सक*] धातूच्या पत्र्यावर (चित्र वगैरे) काढण्यासाठी सुई आणि ॲसिड वापरणे. **etching** *ना* १ [*अगण*] आम्ललेखन. २ [*गण*] आम्ललेखनावरून छापलेले चित्र.

eternal /इ'टऽन्ल्/ *वि* १ सतत टिकणारा, अक्षय, नित्य. २ (*अनौप*) कधीही न संपेलसे वाटणारे, अनंत, अखंड : *~ fighting, अखंड युद्ध.* **eternally** /-नलि/ *क्रिवि* सतत; अखंडपणे.

eternity /इ'टऽनटि/ *ना* १ [*अगण*] (*औप*) अनंत काल – विशेषतः मृत्यूनंतरचा, अनंत. २ [बहुधा *अे.व*] (*अनौप*) दीर्घकाळ.

ether /'ईथ(र्)/ *ना* [*अगण*] मद्यापासून बनवलेला एक रंगहीन द्रवपदार्थ. **ethereal** /इ'थिअरिअल्/ *वि* खूप नाजूक आणि हलका, तरल.

ethic /'एथिक्/ *ना* १ [*अे.व*] नैतिक तत्त्वांची प्रणाली : *the Christian ~, ख्रिस्ती नीतिप्रणाली.* २ **ethics** (क) [*ब.व*] नीतितत्त्वे, नैतिक मूल्ये. (ख) (अे.व क्रियापदासह) नीतिशास्त्र. **ethical** *वि* १ नीतिविषयक, नैतिक. २ नीतिशुद्ध. **ethically** *क्रिवि* नैतिकदृष्ट्या.

ethnic /'एथ्निक्/ *वि* एखाद्या राष्ट्रीय, वंशीय किंवा आदिवासी गटाचा, मानववंशीय. **ethnically** /-क्लि/ *क्रिवि* वंशदृष्ट्या.

etiquette /'एटिकेट्/ *ना* [*अगण*] चांगल्या वागणुकीचे नियम, शिष्टाचार.

etymology /,एटि'मॉलजि/ *ना* [*अगण*] शब्दांच्या इतिहासाचा अभ्यास, व्युत्पत्तिशास्त्र, निरुक्त.

eucalyptus /यूक'लिप्टस्/ *ना* [*गण*]

ज्याच्यापासून औषधी तेल काढतात असा एक उंच सदाहरित वृक्ष, निलगिरी.

euphemism /'यूफमिझ़म्/ *ना* [*गण, अगण*] अप्रिय गोष्टीचा उल्लेख करण्यासाठी वापरायचा चांगला किंवा सभ्य शब्द, सौम्यशब्दप्रयोग : *'Pass away' is a euphemism for 'die', (इंग्रजीत) 'Pass away' (निवर्तणे) हा 'die' (मरणे) चा सौम्य शब्द आहे.* **euphemistic** /यूफ'मिस्टिक्/ *वि* सौम्य/ मधुर शब्द प्रयोजनाचा.

euphoria /यू'फॉऽरिअ/ *ना* [*अगण*] खूप आनंदाची अशी उत्तेजक भावना, अत्यानंद. **euphoric** /यू'फॉरिक्; *अमे* -'फॉऽर्-/ *वि* अत्यानंदाचा.

euthanasia /यूथ'नेइझ़िअ; *अमे* -नेइझ/ *ना* [*अगण*] असाध्य रोगाने पछाडलेल्या लोकांना वेदनारहित मृत्यू देणे, दयामरण.

evacuate /इ'व्हॅक्युअेइट्/ *क्रि* [*सक*] लोकांना धोक्याच्या जागेपासून हालवून सुरक्षित स्थळी नेणे : *~ (children from) the city, (मुलांना) शहरातून सुरक्षित स्थळी हालवणे.* **evacuation** /इ,व्हॅक्यु'अेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] सुरक्षित जागी स्थलांतर.

evade /इ'व्हेइड्/ *क्रि* [*सक*] १ (एखादी गोष्ट) करण्याचे किंवा हाताळण्याचे टाळणे, चुकवणे : *~ (answering) a question, प्रश्नाला उत्तर देण्याचे टाळणे.* २ (एखाद्या गोष्टीपासून किंवा व्यक्तीपासून) दोन हात दूर राहणे, अंतर ठेवून राहणे, फंदात न पडणे.

evaluate /इ'व्हॅल्युअेइट्/ *क्रि* [*सक*] किंमत करणे, मूल्य ठरवणे, गुणवत्ता तपासणे, पारख/ परीक्षा करणे. **evaluation** /इ,व्हॅल्यु'अेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] मूल्यांकन, पारख, परीक्षा.

evangelical /,ईव्हॅन्'जेलिक्ल्/ *वि* ख्रिस्तावरील वैयक्तिक श्रद्धेनेच मोक्ष मिळतो असे समजणाऱ्या ख्रिस्ती पंथाचा.

evangelist /इ'व्हॅन्जलिस्ट्/ *ना* [*गण*] १ गॉस्पेल्स किंवा ख्रिस्ताचे शुभवर्तमान लिहिणाऱ्या लेखकांतील एक लेखक. २ ख्रिस्ती धर्मार्थ विविध ठिकाणी सभा घेण्यासाठी फिरणारा ख्रिस्ती उपदेशक. **evangelistic** /इ,व्हॅन्ज'लिस्टिक/ *वि* इव्हॅन्जलिस्ट धर्मोपदेशकाचा.

evaporate /इ'व्हॅपरेइट्/ *क्रि* १ [*अक, सक*] वाफ होणे/करणे, बाष्पीभवन होणे/करणे. २ [*अक*] नाहीसा होणे, दिसेनासा होणे. **evaporation** /इ,व्हॅप'रेइश्न्/ *ना* [*अगण*] बाष्पीभवन.

evasion /इ'व्हेइझ़्न्/ *ना* [*गण, अगण*] एखादी गोष्ट टाळणे, चुकवणूक, अळम्टळम्. **evasive** /इ'व्हेइसिव्ह्/ *वि* टाळाटाळ करणारा, बगल देणारा. **evasively** *क्रिवि* अळम्टळम् करत, टाळाटाळ करत.

eve /ईव्ह्/ *ना* [*गण,* बहुधा *अे.व*] १ धार्मिक सणाच्या आधीचा दिवस. २ एखाद्या गोष्टीच्या अगदी आधीचा काळ : *on the ~ of the election, निवडणुकीच्या काळी* म्हणजेच *निवडणुकीच्या आदल्या दिवशी.*

even^{1} /'ईव्ह्न्/ *क्रिवि* १ (एखाद्या अनपेक्षित किंवा आश्चर्यकारक अशा गोष्टीवर भर देण्यासाठी वापर) देखील, सुद्धा : *Anyone can understand this. E~ a child, हे कुणालाही समजेल – अगदी (शेंबड्या) मुलाला देखील.* २ (तरभावश्रेणीवर भर देण्यासाठी वापर) आणखी, अधिक : *You know ~ less than I do, माझ्यापेक्षाही जास्त कमी तुला माहितीये.* ३ (*वाक्प्र*) **even if/though** तरीही, तरीसुद्धा : *I'll get there ~ if I have to walk, मला चालावे लागले तरीसुद्धा मी तेथे पोहोचेन.* **,even 'now/'so/'then** असे असूनही, अशा परिस्थितीत देखील वगैरे : *I told him, but ~ then he didn't believe me, मी त्याला सांगितले पण तरीही त्याचा माझ्यावर विश्वास बसला नाही.*

even^{2} /'ईव्ह्न्/ *वि* १ सारखा आणि सपाट : *an ~ surface, सपाट पृष्ठभाग.* २ नियमित; स्थिर : *an ~ temperature, सम तपमान.* ३ (रक्कम किंवा अंतराबाबत) समान, सारखा. ४ (अंकांबाबत) दोनने भाग जाणारा, सम. ५ समतोल, तुल्यबळ : *The two teams are very ~, दोन्ही संघ तुल्यबळ आहेत.* ६ (*वाक्प्र*) **get even with sb** एखाद्यावर सूड घेणे. **on an even keel** स्थिर. **even** *क्रि* (*क्रिब*) **even (sth) out/up** समतोल करणे, समान करणे, सपाट करणे. **,even-'handed** *वि* न्याय्य. **evenly** *क्रिवि* सारखेपणाने,

बरोबरीने. **evenness** *ना* [*अगण*] समानता, सारखेपणा, सपाटी. **,even-'tempered** *वि* शांत, सहज न रागावणारा.

evening /'ईव्हनिङ्/ *ना* [*गण, अगण*] मध्यान्ह किंवा दुपार ते रात्रीच्या झोपण्याचा काल यामधील दिवसाचा भाग, संध्याकाळ. **'evening dress** *ना* १ [*अगण*] रात्र किंवा संध्याकाळच्या खास समारंभासाठी घालायचा पोषाख. २ [*गण*] स्त्रीचा समारंभाचा पोषाख.

event /इ'व्हेन्ट्/ *ना* [*गण*] १ (महत्त्वाची) घटना. २ खेळांच्या स्पर्धांतील एखादी स्पर्धा किंवा लढत. ३ (*वाक्प्र*) **at 'all events** काहीही होवो, काहीही झालं तरी. **in the event of sth** (*औप*) असं (काही) झालं तर, अशा परिस्थितीत. **eventful** /-फ्ल्/ *वि* महत्त्वाच्या घडामोडींचा किंवा घटनांचा.

eventual /इ'व्हेन्चुअल्/ *वि* परिणामतः होणारा/घडणारा. **eventuality** /इ,व्हेनचु'ॲलटि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) (*औप*) संभाव्य घटना किंवा संभाव्य परिणाम. **eventually** *क्रिवि* सरतेशेवटी, अखेरीस : *They ~ly agreed to pay the bill, सरतेशेवटी त्यांनी बिल भरण्याचे मान्य केले.*

ever /'अेव्ह(र्)/ *क्रिवि* १ कधीही, कोणत्याही काळी : *Nothing ~ happens here, येथे कधीही काहीही घडत नाही* ○ *Do you ~ wish you were rich? आपण श्रीमंत असावं असं कधी तुला वाटतं?* ○ *the best work you've ~ done, तू आतापर्यंत केलेल्या कामातील सर्वोत्तम काम.* २ **ever-** (सामासिक शब्दांत) नेहमी, सदा, सतत : *the ~-increasing number of students, सतत वाढणारी विद्यार्थी-संख्या.* ३ (आश्चर्य व्यक्त करण्यासाठी प्रश्नात वापर) : *What ~ do you mean? तुझं म्हणणं तरी काय?* ४ (*वाक्प्र*) **for ever** ➪ FOREVER १. **ever since** तेव्हापासून आत्तापावेतो : *She's liked reading ~ since she was a child, लहानपणापासूनच तिला वाचनाची आवड आहे.* **ever so/such** (*अनौप*) खूप, चिकार : *~ so rich, चिकार श्रीमंत.*

evergreen /'अेव्हग्रीन्/ *ना* [*गण*], *वि* (झाडे किंवा झुडपे यांबाबत) वर्षभर हिरवी पाने असणारे, सदाहरित.

everlasting /,अेव्ह'लास्टिङ्; *अमे* -लॅस्ट्-/ *वि* कायम टिकणारा, शाश्वत.

every /'अेव्हरि/ *वि* १ प्रत्येक : *E~ child passed the exam, प्रत्येक मूल परीक्षा पास झालं.* २ सर्व संभवनीय, शक्य ते सर्व : *You have ~ reason to be satisfied, तुला समाधान वाटावे अशी सर्वच कारणे आहेत.* ३ (एखादी गोष्ट न चुकता घडते असे दाखवताना) दर : *She phones ~ week, ती दर आठवड्याला फोन करते.* ४ (*वाक्प्र*) **every other** एकाड एक : *~ other day, दर दिवसाआड* (जसे सोमवार, बुधवार आणि शुक्रवार). **'everybody** (तसेच **'everyone**) *सना* प्रत्येक माणूस, प्रत्येकजण, हरेक व्यक्ती. **'everyday** *वि* सामान्य; दररोज, दर दिवशी. **'everything** *सना* सर्व गोष्टी, प्रत्येक गोष्ट न् गोष्ट : *E~thing was destroyed, प्रत्येक गोष्ट नष्ट करण्यात आली.* **'everywhere** *क्रिवि* सर्वत्र, सगळीकडे.

evict /इ'व्हिक्ट्/ *क्रि* [*सक*] (एखाद्याला) कायद्याच्या आधारे घर खाली करावयास लावणे, निष्कासित करणे. **eviction** /-क्शन्/ *ना* [*गण, अगण*] निष्कासन, (कायदेशीर) हकालपट्टी.

evidence /'अेव्हिडन्स्/ *ना* [*अगण*] १ (खास करून *कायदा*) एखादी गोष्ट सिद्ध करणारे किंवा तिच्यावर विश्वास बसवणारे असे काही, पुरावा, प्रमाण. २ (*वाक्प्र*) **in evidence** उपस्थित आणि स्पष्टपणे दिसणारा.

evident /'अेव्हिडन्ट्/ *वि* स्पष्ट, सरळ दिसणारा; उघड. **evidently** *क्रिवि* उघडउघड, उघडपणे.

evil /'ईव्ह्ल्/ *वि* दुष्ट; अपायकारक. **evil** *ना* १ [*अगण*] दुष्टपणा, कुकर्म. २ [*गण*] फार वाईट गोष्ट. **evilly** /-व्हलि/ *क्रिवि* वाईट रीतीने.

evocative /इ'व्हॉकटिव्ह्/ *वि* जुन्या आठवणी, भावबंध जागे करणारा, स्मृतींना उजळा देणारा : *an ~ picture, स्मृती, भावना वगैरे जागृत करणारे चित्र.*

evoke /इ'व्हउक्/ *क्रि* [*सक*] (जुन्या स्मृती, भावबंध) जागे/जागृत करणे, (आठवणींना वगैरे) आवाहन करणे.

evolution /,ईव्ह'लूश्न्; *अमे* 'एव्ह-/ *ना* [*अगण*] सुरुवातीच्या साध्या जीवांपासून पुढे क्रमाक्रमाने वनस्पती, प्राणी कसे निर्माण झाले ते सांगणारा सिद्धान्त, उत्क्रान्तिवाद.

evolve /इ'व्हॉल्व्ह/ *क्रि* [*अक, सक*] हळूहळू विकसित होणे/करणे, उत्क्रान्त होणे.

ewe /यू/ *ना* [*गण*] मेंढी.

exacerbate /इग्'झॅसबेइट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) (एखादी बिघडलेली गोष्ट) आणखी बिघडवणे, आणखी वाईट करणे, चिघळणे किंवा चिघळवणे.

exact^{1} /इग्'झॅक्ट्/ *वि* बारीकसारीक गोष्टीतही बरोबर, काटेकोर; अचूक : *the ~ time, बरोब्बर वेळ.* **exactitude** /-इट्यूड्; *अमे* -टूड्/ *ना* [*अगण*] नेमकेपणा, काटेकोरपणा; अचूकपणा. **exactly** *क्रिवि* १ बरोबर; अचूकपणे. २ (उत्तर म्हणून वापर) तुझं म्हणणं बरोबर आहे किंवा अगदी खरं. **exactness** *ना* [*अगण*] अचूकपणा, नेमकेपणा, काटेकोरपणा.

exact^{2} /इग्'झॅक्ट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) (एखादी गोष्ट) हक्काने मागून मिळवणे, सक्तीने घेणे : *~ obedience, आज्ञापालन करून घेणे.* **exacting** *वि* खूप कष्टाचा आणि काळजीचा, खडतर, कडक.

exaggerate /इग्'झॅजरेइट्/ *क्रि* [*अक, सक*] एखादी गोष्ट फुगवून सांगणे, अतिशयोक्ती करणे, राईचा पर्वत करणे, विपर्यास करणे. **exaggeration** /इग्,झॅज'रेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] अतिशयोक्ती.

exam /इग्'झॅम्/ *ना* [*गण*] (*अनौप*) EXAMINATION १ चा संक्षेप, परीक्षा.

examination /इग्,झॅमि'नेइश्न्/ *ना* १ [*गण*] ज्ञान किंवा क्षमतेची परीक्षा, चाचणी. २ [*अगण, गण*] परीक्षा घेण्याची कृती, परीक्षा घेणे/करणे.

examine /इग्'झॅमिन्/ *क्रि* [*सक*] १ काळजीपूर्वक पाहणे, पारखणे. २ ज्ञान किंवा क्षमता तपासण्यासाठी प्रश्न विचारणे, परीक्षा घेणे. **examiner** *ना* [*गण*] परीक्षक.

example /इग्'झाम्प्ल्; *अमे* -झॅम्-/ *ना* [*गण*] १ सर्वसामान्य नियम दाखविणारी किंवा एखाद्या वर्गाचे प्रतिनिधित्व करणारी गोष्ट, उदाहरण : *a fine ~ of Norman architecture, नॉर्मन स्थापत्याचे उत्तम उदाहरण.* २ अनुकरण करावे अशी व्यक्ती किंवा असा नमुना, अनुकरणीय गोष्ट, आदर्श नमुना, वस्तुपाठ : *His bravery is an ~ to us all, त्याचे शौर्य हा आपणा सर्वांना एक आदर्श आहे.* ३ (*वाक्प्र*) **for example** उदाहरणार्थ : *Many women, Alison for ~, have a job and a family, खूप स्त्रियांना नोकरी असते आणि कुटुंबही असते – उदाहरणार्थ ॲलिसन.* **make an example of sb** इतरांना जरब बसावी म्हणून एखाद्याला शिक्षा करणे.

exasperate /इग्'झॅस्परेइट्/ *क्रि* [*सक*] वैताग देणे, छळणे, चिथवणे. **exasperation** /इग्,झॅस्प'रेइश्न्/ *ना* [*अगण*] वैताग, छळ.

excavate /'एक्स्कव्हेइट्/ *क्रि* [*सक*] खणून एखादी गोष्ट शोधून काढणे, उत्खनन करणे : *~ a hole/buried city, खड्डा खणून घेणे/ गाडलेल्या शहराचे उत्खनन करणे.* **excavation** /,एक्स्क'व्हेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] उत्खनन. **excavator** *ना* [*गण*] उत्खनन करणारा माणूस किंवा उत्खनन करायचे यंत्र.

exceed /इक्'सीड्/ *क्रि* [*सक*] १ अधिक असणे, वर जाणे. २ (मर्यादेच्या किंवा नियमाच्या) बाहेर जाणे, ओलांडणे : *~ the speed limit, वेगमर्यादा ओलांडणे म्हणजेच दिलेल्या वेगमर्यादेपेक्षा जास्त वेगाने गाडी चालवणे.* **exceedingly** *क्रिवि* (*औप*) अतिशय, पराकाष्ठेचा.

excel /इक्'सेल्/ *क्रि* (-ll-) [*अक*] *at/in//* तरबेज असणे, वरचढ असणे, श्रेष्ठ असणे.

Excellency /'एक्सलन्सि/ *ना* [*गण*] (*ब.व* -ies) परराष्ट्रदूत, गव्हर्नर वगैरेसारख्या अधिकाऱ्यांची पदवी किंवा किताब.

excellent /'एक्सलन्ट्/ *वि* फार चांगले, उत्कृष्ट. **excellence** /-लन्स्/ *ना* [*अगण*] उत्कृष्टपणा. **excellently** *क्रिवि* उत्कृष्टपणे, अतिशय चांगल्या पद्धतीने.

except /इक्'सेप्ट्/ *शब्दयो* शिवाय, विना; सोडून, वगळून : *The shop is open every day ~ Sunday, रविवार सोडून दुकान रोज उघडे असते.* **except** *क्रि* [*सक*] (*औप*) (बहुधा कर्मणी) वगळणे, गाळणे; सोडून देणे,

अपवाद करणे.

exception /इक्'सेप्श्न्/ *ना* १ [*गण*] अपवाद केलेली व्यक्ती, वस्तू वगैरे : *All the students did well, with the ~ of Jo, who failed, जोचा अपवाद वगळता सर्व विद्यार्थी पास झाले – जो नापास झाला.* २ (*वाक्प्र*) **make an exception (of sb/sth)** एखाद्याचा अपवाद करणे, एखाद्याला खास सूट वगैरे देणे. **take exception to sth** एखाद्या गोष्टीला हरकत घेणे, प्रत्यवाय करणे. **exceptional** /-शन्ल्/ *वि* अपवादात्मक, असाधारण; फार छान, उत्कृष्ट. **exceptionally** /-शनलि/ *क्रिवि* असाधारपणे; अपवादात्मकरीत्या; फार छान.

excerpt /'अेक्सऽप्ट्/ *ना* [*गण*] एखादे पुस्तक, चित्रपट वगैरेतील घेतलेला एक भाग, वेचा, उतारा.

excess /इक्'सेस्/ *ना* १ [*अ.व*] *of*// नेहमीपेक्षा किंवा गरजेपेक्षा जास्त अशी एखादी गोष्ट, फाजील गोष्ट. २ **excesses** [*ब.व*] (*औप*) वाईट किंवा दुष्टपणाची वागणूक, अत्याचार. ३ (*वाक्प्र*) **in excess of sth** एखाद्या गोष्टीपेक्षा जास्त, अधिक, रग्गड. **to excess** फार, फाजील, चिकार : *drink to ~, चिकार पिणे.* **excess** /'अेक्सेस्/ *वि* जादा, अतिरेक, आधिक्य : *,~ 'baggage, जादा सामान.* **excessive** *वि* खूप, फाजील, बेसुमार. **excessively** *क्रिवि* फारच, जरा जास्तच, अतिशय.

exchange /इक्स्'चेइन्ज्/ *क्रि* [*सक*] (एखादी गोष्ट) देऊन तीबदलीत दुसरी गोष्ट मिळवणे, देवाणघेवाण करणे, विनिमय करणे : *~ pounds for dollars, पौंडांचा डॉलरमधे विनिमय करणे.* **exchange** *ना* १ [*गण, अगण*] विनिमय करणे, देवाणघेवाण. २ [*गण*] (रागाचे) संभाषण, झकाझकी, तोंडातोंडी, बोलाचाली, खटका. ३ [*गण*] व्यापारासाठी लोक एकत्र येतात ती जागा : *the 'Stock E~, हुंडीबाजार.* ४ = TELEPHONE EXCHANGE (TELEPHONE). **exchange rate** *ना* [*गण*] एखाद्या देशाच्या चलनाची दुसऱ्या देशाच्या चलनातील किंमत, विनिमय दर.

exchequer /इक्स्'चेक(र्)/ *ना* **the Exchequer** [*अ.व*] (*ब्रि*) सार्वजनिक संपत्ती बाळगणारे सरकारी खाते, राज्यकोष : *the Chancellor of the E~, राज्यकोषाचा कुलपती म्हणजेच या सार्वजनिक पैशाच्या विभागाचा प्रमुख.*

excise /'अेक्साइझ्/ *ना* [*अगण*] देशात उत्पादन होत असलेल्या काही मालावरील कर, उत्पादनशुल्क.

excite /इक्'साइद्/ *क्रि* [*सक*] १ (एखाद्याच्या) भावना उद्दीपित करणे, भावना चेतवणे. २ (भावना किंवा प्रतिसाद) निर्माण करणे, उद्दीपन करणे, चेतवणे, उत्तेजित करणे. **excitable** *वि* सहज चेतवला जाणारा, लवकर क्षुब्ध होणारा. **excited** *वि* चेतवलेला, उद्दीप्त, क्षोभित, क्षुब्ध, चेकाळलेला, आनंदाने धुंद. **excitedly** *क्रिवि* उत्तेजितपणे. **excitement** *ना* [*अगण, गण*] खळबळ, क्षोभ, सनसनाटी. **exciting** *वि* खळबळ उडवून देणारा, सनसनाटी.

exclaim /इक्'स्क्लेइम्/ *क्रि* [*अक, सक*] एकदम मोठ्याने बोलणे, उद्गारणे. **exclamation** /,अेक्स्क्ल'मेइश्न्/ *ना* [*गण*] काढलेले उद्गार, आरोळी. **exclamation mark** (*अमे* **exclamation point**) *ना* [*गण*] उद्गारवाचक चिन्ह, (!) अशी खूण.

exclude /इक्'स्क्लूड्/ *क्रि* [*सक*] १ (एखाद्याला) बाजूला ठेवणे/टाकणे, बाहेर ठेवणे, वगळणे; समावेश न करणे, न मोजणे. २ (एखादी गोष्ट) मनातून काढून टाकणे, डोक्यातून काढून टाकणे, मनातून हद्दपार करणे : *~ the idea of failure, अपयशाची कल्पना मनातून काढून टाकणे.* **exclusion** /-लूझ्न्/ *ना* [*अगण*] वगळणूक, व्यावृत्ती, बहिष्कृती.

exclusive /इक्'स्क्लूसिव्ह्/ *वि* १ (एखाद्या गटाबाबत) काळजीपूर्वक निवडलेल्या लोकांचा, खास लोकांचा. २ विशिष्ट वर्गाच्या लोकांसाठी मर्यादित – विशेषतः श्रीमंत वर्गाच्या, खास श्रीमंतांचा. **exclusive** *ना* [*गण*] एकाच वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेला वृत्तांत. **exclusively** *क्रिवि* फक्त, केवळ.

excommunicate /,अेक्स्क'म्यूनिकेइट्/ *क्रि* [*सक*] (एखाद्याला) ख्रिश्चन चर्चमधून काढून टाकणे, बहिष्कृत करणे. **excommu-**

nication /,अेक्स्क,म्यूनि'केइशन्/ *ना* [*अगण, गण*] बहिष्कृती, बहिष्कार.

excrement /'अेक्स्क्रिमन्ट्/ *ना* [*अगण*] (*औप*) शरीरातून बाहेर टाकली जाणारी घन रूपातील घाण, विष्टा, शी.

excrete /इक्'स्क्रीट्/ *क्रि* [*सक*] शरीरातून घाण बाहेर टाकणे, शी करणे, हगणे.

excruciating /इक्'स्क्रूशिअेइटिङ्/ *वि* (वेदनेबाबत) फार वाईट, अति, तीव्र. **excruciatingly** *क्रिवि* अतिशय.

excursion /इक्'स्कऽशन्; *अमे* -अऽर्झन्/ *ना* [*गण*] मौजेखातर केलेला छोटासा प्रवास, सहल.

excuse /इक्'स्क्यूस्/ *ना* [*गण*] स्वतःच्या वागणुकीसंबंधी दिलेले कारण किंवा स्पष्टीकरण, सबब. **excusable** /इक्'स्क्यूझ्बल्/ *वि* क्षम्य, माफ करण्याजोगा. **excuse** /इक्'स्क्यूझ्/ *क्रि* [*सक*] १ माफ करणे, क्षमा करणे. २ (*from*)// (एखाद्याला) जबाबदारीतून मुक्त करणे, सोडवणूक करणे. ३ समर्थन करणे : *Nothing can ~ such rudeness, अशा उद्धटपणाचे कशानेही समर्थन होणार नाही.* ४ (*वाक्प्र*) **excuse me** (क) मधेच बोलताना किंवा असहमती वगैरे दर्शविताना नम्रपणे व्यक्त केलेला खेद, माफ करा. (ख) (*अमे*) तुम्ही काय म्हणालात ते पुन्हा सांगा, परत बोला.

execute /'अेक्सिक्यूट्/ *क्रि* [*सक*] १ (*औप*) (सांगितलेले काम) करणे, सांगितल्याप्रमाणे वागणे; कार्यवाही करणे, अंमलबजावणी करणे : *~ a plan, योजना कार्यान्वित करणे.* २ कायदेशीर शिक्षा म्हणून मृत्युदंड देणे, फाशी देणे. **execution** /,अेक्सि'क्यूशन्/ *ना* १ [*अगण*] (*औप*) एखाद्या योजनेची केलेली कार्यवाही, एखाद्या कामाची कारवाई, अंमलबजावणी. २ [*गण, अगण*] फाशी, मृत्युदंड. **executioner** /,अेक्सि'क्यूशन(र्)/ *ना* [*गण*] फाशी देणारा (माणूस).

executive /इग्'झेक्युटिव्ह्/ *वि* व्यवस्थापन आणि कार्यवाही याबाबतचा, कार्यकारी. **executive** *ना* १ [*गण*] औद्योगिक संस्थेतील अंमलबजावणी करणारा अधिकारी, मोठा अधिकारी. २ **the executive** [*अे.व*] निर्णयांची किंवा कायद्याची अंमलबजावणी करणारा शासनाचा विभाग, कार्यकारी विभाग.

executor /इग्'झेक्युट(र्)/ *ना* [*गण*] मृत्युपत्रातील बाबींची कार्यवाही करणारा माणूस, मृत्युपत्र व्यवस्थापक.

exemplify /इग्'झेम्प्लिफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] (एखाद्या गोष्टीचे) उदाहरण असणे/देणे, दाखला देणे. **exemplification** /इग्'झेम्प्लिफि'केइशन्/ *ना* [*अगण, गण*] उदाहरण, दाखला.

exempt /इग्'झेम्प्ट्/ *वि* (*from*)// सूट दिलेला, सवलत दिलेला. **exempt** *क्रि* [*सक*] (*from*)// (एखाद्याला) एखाद्या गोष्टीची सूट किंवा सवलत देणे. **exemption** /इग्'झेम्प्शन्/ *ना* [*अगण, गण*] सूट, सुटका, सवलत.

exercise /'अेक्ससाइझ्/ *ना* १ [*अगण*] शरीराच्या स्वास्थ्यासाठी केलेली कसरत, व्यायाम : *Jogging is good ~, पळायला जाणे हा चांगला व्यायाम आहे.* २ [*गण*] सराव देण्यासाठीची कृती, अभ्यास : *maths ~s, गणिताचे अभ्यास(प्रश्न).* ३ [*अगण*] काळजीपूर्वक केलेला वापर, बजावणी : *the ~ of authority, अधिकाराचा योग्य वापर.* **exercise** *क्रि* १ [*अक, सक*] व्यायाम करणे, तालीम करणे, कसरत करणे. २ [*सक*] (अधिकार किंवा हक्काचा) काळजीपूर्वक वापर करणे, बजावणे. **'exercise book** *ना* [*गण*] वही – विशेषतः शाळेच्या अभ्यासाची.

exert /इग्'झऽट्/ *क्रि* [*सक*] १ (एखाद्या जोरदार किंवा शक्तिशाली गोष्टीचा) हेतू साध्य करण्यास वापर करणे : *~ pressure on sb to do sth, एखाद्यावर काहीतरी करण्यास दबाव आणणे.* २ **~ oneself** प्रयत्न करणे, कष्ट घेणे. **exertion** /इग्'झऽशन्; *अमे* -अऽर्शन्/ *ना* [*गण, अगण*] श्रम, प्रयत्न, कष्ट.

exhale /अेक्स्'हेइल्/ *क्रि* [*अक, सक*] उच्छ्वास टाकणे, श्वास सोडणे. **exhalation** /,अेक्सह'लेइशन्/ *ना* [*गण, अगण*] उच्छ्वास.

exhaust /इग्'झॉऽस्ट्/ *क्रि* [*सक*] १ एखाद्याला दमवणे, थकवणे, जेरीस आणणे. २ (एखादी गोष्ट) वापरून संपवणे. **exhaust** *ना*

(**क**) [*गण*] इंजिनातून धूर, हवा वगैरे बाहेर टाकण्याची नळी, निष्कास नळी, बहिःसर्जक नळी. (**ख**) [*अगण*] इंजिनाने बाहेर टाकलेला धूर. **exhausted** *वि* खूप दमलेला, थकलेला. **exhaustion** /इग्'झ़ॉऽस्चन्/ *ना* [*अगण*] थकवा, दम, शीण. **exhaustive** *वि* परिपूर्ण, साक्षेपी.

exhibit /इग्'झ़िबिट्/ *क्रि* [*सक*] १ (*औप*) (गुण) प्रदर्शित करणे, दाखविणे. २ सार्वजनिक रीतीने विक्री वगैरेसाठी दर्शन घडवणे, प्रदर्शन करणे. **exhibit** *ना* [*गण*] १ वस्तुसंग्रहालयातील वगैरे प्रदर्शनीय वस्तू. २ पुराव्यासाठी कोर्टात दाखल केलेला कागद, लेख वगैरे, प्रदर्शित. **exhibitor** *ना* [*गण*] चित्रांचे वगैरे प्रदर्शन करणारा, प्रदर्शक.

exhibition /,अेक्सि'बिश्न्/ *ना* १ [*गण*] चित्रांचे वगैरे प्रदर्शन. २ [*गण*] (बहुधा *अे.व*) दाखवणे, प्रदर्शन : *an ~ of bad manners, वळण नसल्याचे प्रदर्शन.* **exhibitionism** /-शनिझ़म्/ *ना* [*अगण*] आपल्याकडे लक्ष वेधावे अशी वागणूक, प्रदर्शन-प्रवृत्ती. **exhibitionist** *ना* [*गण*] स्वतःचे प्रदर्शन मांडणारा, स्वतःची टिमकी वाजवणारा.

exhilarate /इग्'झ़िलरेइट्/ *क्रि* [*सक*] (बहुधा कर्मणी) (एखाद्याला) खूप आनंदित आणि उल्हासित करणे. **exhilaration** /इग्,झ़िल'रेइश्न्/ *ना* [*अगण*] संतोष, आनंद.

exhort /इग्'झ़ॉऽट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) कळकळीची विनंती करणे, उपदेश करणे : *~ed them to try harder, आणखी प्रयत्न करण्यासाठी त्यांना गळ घातली.* **exhortation** /,अेग्झ़ॉऽ'टेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] विनवणी, विज्ञापना, उपदेश.

exile /'अेक्साइल्/ *ना* १ [*अगण*] स्वतःच्या देशातून हद्दपार होणे, देशपारी, हद्दपारी : *live in ~, हद्दपारीत राहणे.* २ [*गण*] हद्दपार केलेला माणूस. **exile** *क्रि* [*सक*] हद्दपार करणे.

exist /इग्'झ़िस्ट्/ *क्रि* [*अक*] असणे, वास्तवात असणे; अस्तित्वात असणे, जिवंत असणे. **existence** *ना* १ [*अगण*] अस्तित्व : *believe in the ~ence of God, परमेश्वराच्या अस्तित्वावर विश्वास असणे.* २ [*अे.व*] जीवन(मार्ग), जगणे : *miserable ~ence, हलाखीचे जीवन.* **existent** *वि* (*औप*) जिवंत; उपलब्ध, प्रत्यक्ष, अस्तित्वात असलेला.

exit /'अेक्सिट्/ *ना* [*गण*] १ सार्वजनिक इमारतीतून बाहेर पडण्याचा मार्ग, निर्गम मार्ग. २ एखादे ठिकाण सोडणे, निघून जाणे, गमन. **exit** *क्रि* [*अक*] बाहेर जाणे, निर्गमन करणे, निघून जाणे; (खास करून नटाबाबत) रंगभूमीवरून जाणे.

exonerate /इग्'झ़ॉनरेइट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) (एखाद्याला) दोषमुक्त करणे. **exoneration** /इग्,झ़ॉन'रेइश्न्/ *ना* [*अगण*] दोषमुक्ती.

exorbitant /इग्'झ़ॉऽबिटन्ट्/ *वि* (किमतीबाबत) चढी, कमालीची महाग किंवा जास्त, भडकलेली, महागडी. **exorbitantly** *क्रिवि* वाटेल त्या दराने, भडकलेल्या भावाने, अतिशय, बेसुमार.

exorcize /'अेक्सॉऽसाइझ़्/ *क्रि* [*सक*] प्रार्थना करून भुते पळवणे, मंत्राने शुद्धी करणे, भूत काढणे. **exorcism** /-सिझ़म्/ *ना* [*अगण, गण*]. **exorcist** *ना* [*गण*] भुते काढणारा, मांत्रिक.

exotic /इग्'झ़ॉटिक्/ *वि* १ दुसऱ्या देशाचा, विलायती, विदेशी; इथले नसलेले, परकीय : *~ fruits, विदेशी फळे.* २ नेहमीपेक्षा वेगळा असल्याने आकर्षक, वेगळेपणाने आनंद देणारा.

expand /इक्'स्पॅन्ड्/ *क्रि* १ [*अक, सक*] आकाराने मोठे होणे/करणे, वाढणे/वाढविणे, प्रसरण पावणे : *Metals ~ when heated, उष्णतेने धातू प्रसरण पावतात* ○ *~ a business, व्यवसाय/धंदा वाढवणे.* २ (*क्रिब*) **expand on sth** एखाद्या गोष्टीविषयी अधिक माहिती देणे, विस्तृत विवेचन करणे, विस्ताराने सांगणे.

expanse /इक्'स्पॅन्स्/ *ना* [*गण*] (जमीन, समुद्र वगैरेचा) मोठा पट्टा किंवा टापू, सपाटी.

expansion /इक्'स्पॅन्श्न्/ *ना* [*अगण*] केलेला विस्तार; प्रसरण. **expansionism** /-शनिझ़म्/ *ना* [*अगण*] (खास करून *अधिक्षेपी*) आपल्या जमिनीचा किंवा व्यवसायाचा विस्तार करण्याचे धोरण, विस्तारवाद. **expansionist** *वि* विस्तारवादी.

expansive /इक्'स्पॅन्सिव्ह्/ *वि*

(माणसाबाबत) बोलका, बडबड्या, मनमोकळा.

expatriate /ˌअेक्स्'पॅट्रिअट्; *अमे* -'पेइट्-/ *ना* [*गण*] स्वतःच्या देशाबाहेर राहणारा (माणूस), विजनवासी.

expect /इक्'स्पेक्ट्/ *क्रि* १ [*सक*] (एखादी गोष्ट) घडेल असे वाटणे, अपेक्षा करणे, आशा असणे. २ (*वाक्प्र*) **be expecting** गर्भवती असणे. **expectancy** *ना* [*अगण*] (*औप*) अपेक्षा, आशा, कांक्षा. **expectant** *वि* १ (चांगल्याची) अपेक्षा करणारा. २ गर्भारशी. **expectation** /ˌअेक्स्पेक्'टेइशन्/ *ना* [*गण, अगण*] अपेक्षा, आशा.

expedient /इक्'स्पीडिअन्ट्/ *वि, ना* [*गण*] (*औप*) हेतू साध्य करण्यास उपयुक्त पण कदाचित नैतिकदृष्ट्या वाईट असा (मार्ग किंवा असे कृत्य), तातुरत्या स्वरूपाचा किंवा फायद्याचा (उपाय). **expediency** /-अन्सि/ *ना* [*अगण*] तात्पुरता फायदा, उपयुक्तता.

expedition /ˌअेक्स्पि'डिशन्/ *ना* [*गण*] (क) विशिष्ट हेतूने आणि योजनापूर्वक केलेला प्रवास, मोहीम. (ख) मोहिमेवरचे लोक. **expeditionary** /-शनरि; *अमे* -नेरि/ *वि* (लष्कराबाबत) परदेशात युद्धासाठी पाठवलेले, (लष्करी) मोहिमेवरचे.

expel /इक्'स्पेल/ *क्रि* (-ll-) [*सक*] १ शाळेतून, संस्थेतून वगैरे (एखाद्याला) काढून टाकणे, हाकलणे. २ जोराने बाहेर फेकणे, टाकणे, उत्सर्जन करणे : ~ *air from the lungs, फुप्फुसातून हवा बाहेर टाकणे.*

expend /इक्'स्पेन्ड्/ *क्रि* [*सक*] (*औप*) (पैसा, वेळ किंवा शक्ती) खर्च करणे. **expendable** *वि* (*औप*) एखाद्या उद्दिष्टासाठी वापरायचा किंवा नष्ट करायचा, दवडण्याजोगा.

expenditure /इक्'स्पेन्डिच(र्)/ *ना* [*अगण, गण*] १ एखाद्या गोष्टीवर केलेला खर्च. २ पैसा, शक्ती वगैरेचा व्यय, वापर.

expense /इक्'स्पेन्स्/ *ना* १ [*अगण, गण*] (पैशाचा) खर्च; किंमत. २ **expenses** [*ब.व*] विशिष्ट कारणासाठी खर्च केलेले पैसे : *travelling ~s, प्रवास खर्च.* ३ (*वाक्प्र*) **at sb's expense** (क) एखाद्याच्या खर्चाने. (ख) (विनोदाबाबत) एखाद्याला गाढव/मामा बनवून.

expensive /इक्'स्पेन्सिव्ह्/ *वि* खूप पैसे लागणारा, महाग, किंमती. **expensively** *क्रिवि* खूप पैसे खर्च करून, खर्चिकपणाने.

experience /इक्'स्पिअरिअन्स्/ *ना* १ [*अगण*] गोष्टी पाहून किंवा करून मिळणारे ज्ञान, अनुभव : *learn by ~, अनुभवाने शिकणे.* २ [*गण*] परिणाम करणारी घटना : *a happy ~, आनंददायक घडामोड.* **experience** *क्रि* [*सक*] (एखाद्या गोष्टीचा) अनुभव घेणे/येणे; वाटणे, जाणवणे : ~ *difficulty/pain, अडचणी येणे, वेदना जाणवणे.* **experienced** *वि* अनुभवी, जाणता.

experiment /इक्'स्पेरिमन्ट्/ *ना* [*गण, अगण*] (विशेषतः विज्ञानात) एखाद्या गोष्टीचा नीट अभ्यास करण्यासाठी केलेला प्रयोग. **experiment** *क्रि* [*अक*] प्रयोग करणे. **experimental** /इक्ˌस्पेरि'मेन्ट्ल्/ *वि* प्रायोगिक. **experimentation** /इक्ˌस्पेरिमेन्'टेइशन्/ *ना* [*अगण*] प्रयोग; संशोधन.

expert /'अेक्स्पऽट्/ *ना* [*गण*] खास ज्ञान किंवा कौशल्य असणारा माणूस, तज्ज्ञ. **expert** *वि* तज्ज्ञाचा, निपुण, कुशल. **expertly** *क्रिवि* निपुणतेने, कुशलतेने.

expertise /ˌअेक्स्पऽ'टीझ्/ *ना* [*अगण*] गाढ ज्ञान, कुशलता, अनुभवीपणा.

expire /इक्'स्पाइअ(र्)/ *क्रि* [*अक*] १ (मुदत असणाऱ्या गोष्टीबाबत) मुदत संपणे : *My passport has ~d, माझ्या पासपोर्टची मुदत संपलीय्.* २ (*जुना औप*) श्वास/प्राण सोडणे. **expiry** /इक्'स्पाइअरि/ *ना* [*अगण*] करार वगैरेच्या विधिग्राह्यतेच्या काळाची समाप्ती, मुदत समाप्ती.

explain /इक्'स्प्लेइन्/ *क्रि* १ [*अक, सक*] (एखादी गोष्ट) स्पष्ट करणे, अर्थ सांगणे, विशद करणे. २ [*सक*] कारणे देणे : ~ *one's behaviour, स्वतःच्या वागण्याचा खुलासा करणे.* ३ [*क्रिब*] **explain sth away** एखाद्या गोष्टीबाबत दोषी न ठरवण्यासाठीची कारणे देणे, दोषारोपाला उत्तर देणे. **explanation** /ˌअेक्स्प्ल'नेइशन्/ *ना* १ [*गण*] स्पष्टीकरण, विवरण. २ [*अगण*] स्पष्टीकरण करणे, विशदीकरण, उपपादन. **explanatory** /इक्'स्प्लॅनट्रि; *अमे* -टॉऽरि/ *वि* (विधानांबाबत) स्पष्टीकरण देणारी, अर्थ

स्पष्ट करणारी.

explicit /इक्'स्प्लिसिट्/ *वि* १ (विधानांबाबत) अर्थाबाबत स्पष्ट आणि पूर्ण, निःसंदिग्ध आणि स्पष्ट. २ (लोकांबाबत) एखादी गोष्ट उघडपणे स्वच्छ शब्दात मांडणारा, कोणताही आडपडदा न ठेवता बोलणारा, हातचे न राखता बोलणारा. **explicitly** *क्रिवि* स्पष्टपणे, उघडपणे, न लपवता, खुल्लमखुल्ला. **explicitness** *ना* [*अगण*] स्पष्टपणा, असंदिग्धता, मोकळेपणा.

explode /इक्'स्प्लउड्/ *क्रि* १ [*अक, सक*] बहुधा नुकसान करणारा स्फोट होणे/करणे, भडका उडणे. २ [*अक*] (लोकांबाबत) एकदम राग उफाळून येणे, एकदम तडकणे.

exploit^{1} /इक्'स्प्लॉइट्/ *क्रि* [*सक*] १ स्वतःच्या फायद्यासाठी एखाद्याचा वापर करणे, पिळवणूक करणे, शोषण करणे. २ फायद्यासाठी पूर्ण वापर करणे, उपभोग करून घेणे : ~ *oil reserves, तेलाच्या साठ्यांचा पूर्ण वापर करणे.* **exploitation** /,अेक्स्प्लॉइ'टेइशन्/ *ना* [*अगण*] शोषण, पिळवणूक; पूर्ण वापर.

exploit^{2} /'अेक्स्प्लॉइट्/ *ना* [*गण*] मर्दुमकी, धाडसी किंवा शूरपणाची कृती, पराक्रम.

explore /इक्'स्प्लॉऽ(र्)/ *क्रि* [*सक*] १ एखाद्या देशाची माहिती होण्यासाठी त्यामधे प्रवास करणे. २ काळजीपूर्वक तपासणे किंवा शोध घेणे, समन्वेषण करणे, पडताळून पाहणे : ~ *different possibilities, विविध शक्यतांचा अंदाज घेणे किंवा शोध घेणे.* **exploration** /,अेक्स्प्ल'रेइशन्/ *ना* [*अगण, गण*] शोधमोहीम; शोध, परीक्षा, समन्वेषण. **exploratory** /इक्'स्प्लॉरट्रि; *अमे* -टॉऽरि/ *वि* समन्वेषक, शोध/अंदाज घेण्यासाठी केलेला. **explorer** *ना* [*गण*] शोधक-प्रवासी; अन्वेषक.

explosion /इक्'स्प्लउझ्न्/ *ना* [*गण*] १ स्फोट (किंवा स्फोटाचा आवाज). २ रागाचा स्फोट, भडका. ३ एकदम मोठ्या प्रमाणात झालेली वाढ, उत्स्फोट : *the population ~, लोकसंख्येचा उत्स्फोट.*

explosive /इक्'स्प्लउसिव्ह्/ *ना* [*गण*], *वि* विस्फोटक (द्रव्य). **explosively** *वि* फुटून, धाडदिशी.

exponent /इक्'स्पउनन्ट्/ *ना* [*गण*] एखाद्या मताचा/तत्त्वाचा आग्रही, प्रवक्ता.

export /इक्'स्पॉऽट्/ *क्रि* [*अक, सक*] विक्रीसाठी माल परदेशी पाठवणे, निर्यात करणे. **export** /'अेक्स्पॉऽट्/ *ना* १ [*अगण*] निर्यात (व्यवसाय). २ [*गण*] निर्यात माल. **exporter** *ना* [*गण*] माल निर्यात करणारा माणूस, देश किंवा अशी संस्था, निर्यातदार.

expose /इक्'स्पउझ्/ *क्रि* [*सक*] १ अनावृत्त करणे, आवरण काढणे; उघड करणे, दर्शनास मोकळे करणे; असुरक्षित ठेवणे. २ दाखवणे, उघड करणे; (गुपित किंवा लबाडी) उघडकीस आणणे, उघडी करणे. ३ (छायाचित्र कलेत) (चित्रफितीवर) उजेड पडू देणे. **exposure** /इक्'स्पउझ(र्)/ *ना* [*अगण, गण*] असंरक्षितपणा, उघडा होणे; अनावृत्ती, प्रसिद्धी, प्रकटीकरण; (चित्रफीत) उजेडात आणणे.

expound /इक्'स्पाउन्ड्/ *क्रि* [*सक*] (*औप*) तपशीलाने (एखादी गोष्ट) स्पष्ट करणे किंवा विशद करणे : ~ *a theory, सिद्धान्ताचे विवरण करणे.*

express^{1} /इक्'स्प्रेस्/ *क्रि* [*सक*] १ शब्दांनी किंवा नजरेने व्यक्त करणे, अभिव्यक्त करणे : ~ *an opinion, मत व्यक्त करणे.* २ ~ **oneself** स्वतःचे विचार किंवा भावना व्यक्त करणे किंवा बोलून दाखवणे.

express^{2} /इक्'स्प्रेस्/ *वि* १ जलद जाणारा : *an ~ letter, जलद सेवेने जाणारे पत्र.* २ (*औप*) स्पष्टपणे व्यक्त झालेला : *his ~ wish, त्याने स्पष्ट केलेली इच्छा.* **express** *क्रिवि* जलद डाकेने. **express** (तसेच **express train**) *ना* [*गण*] जलद गाडी. **expressly** *क्रिवि* निश्चितपणे, नक्की; स्पष्टपणे, उघडपणे. **expressway** *ना* [*गण*] (*अमे*) मोटाररस्ता.

expression /इक्'स्प्रेश्न्/ *ना* १ [*गण, अगण*] अभिव्यक्ती (किंवा तिचे उदाहरण). २ [*गण*] शब्द किंवा उक्ती : *a polite ~, विनयपूर्ण उक्ती, नम्रतेचे बोलणे.* ३ [*गण*] चेहऱ्यावरचा भाव : *an angry ~, रागीट मुद्रा.* ४ [*अगण*] अभिनय करताना किंवा गाताना व्यक्त केलेला भाव. **expressionless** *वि* भावशून्य, निर्विकार.

expressive /इक्'स्प्रेसिव्ह्/ *वि* भावदर्शी, विचार किंवा भावना व्यक्त करणारा, बोलका.

expressively *क्रिवि* भावदर्शीपणाने. **expressiveness** *ना* [*अगण*] भावदर्शीपणा, बोलकेपणा.

expropriate /अेक्स्'प्रउप्रिअेइट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) सार्वजनिक वापरासाठी ताब्यात घेणे, स्वामित्वहरण करणे.

expulsion /इक्'स्पल्श्न्/ *ना* [*गण, अगण*] काढून टाकण्याची कृती, हकालपट्टी.

exquisite /'अेक्स्क्विझिट्; तसेच इक्'स्क्विझिट्/ *वि* अतिसुंदर, मनोहर; कौशल्यपूर्ण, अप्रतिम कुशलतेचा. **exquisitely** *क्रिवि* सुंदरतेने; कुशलतेने.

extend /इक्'स्टेन्ड्/ *क्रि* १ [*अक*] (अवकाश किंवा भूमीबाबत) पसरणे, जाणे: *The park ~s to the river, नदीपर्यंत उद्यान पसरले आहे.* २ [*सक*] मोठे करणे, वाढवणे, विस्तार करणे: *~ the house, घर मोठे करणे.* ३ [*सक*] (शरीराचा भाग) पूर्णपणे ताणणे, लांब करणे. ४ [*सक*] (*औप*) देणे: *~ an invitation, निमंत्रण देणे.*

extension /इक्'स्टेन्श्न्/ *ना* १ [*अगण*] वाढविण्याची कृती. २ [*गण*] वाढवलेला भाग, विस्तारित भाग: *a new ~ to the hospital, इस्पितळाचा नवा विस्तारित भाग.* ३ [*गण*] एखाद्या संस्थेतील अंतर्गत दूरध्वनी व्यवस्था, विस्तारित दूरध्वनी.

extensive /इक्'स्टेन्सिव्ह्/ *वि* विस्तृत, व्यापक, गडगंज, अवाढव्य, मोठ्या प्रमाणातील. **extensively** *क्रिवि* व्यापक स्वरूपात, विस्तारपूर्वक.

extent /इक्'स्टेन्ट्/ *ना* १ [*अगण*] लांबी; व्याप्ती, पल्ला, आवाका: *the ~ of the damage, नुकसानीची व्याप्ती* म्हणजेच *नुकसानीचे प्रमाण.* २ [*अे.व*] प्रमाण: *to some ~, काही प्रमाणात.*

extenuating /इक्'स्टेन्युअेइटिङ्/ *वि* (*औप*) कारणमीमांसा देऊन वाईट गोष्टीची गंभीरता कमी करणारा, उपशामक, सौम्यकारी: *~ circumstances, उपशामक परिस्थिती* किंवा *गंभीरपणा कमी करणारी परिस्थिती.*

exterior /इक्'स्टिअरिअ(र्)/ *ना* [*गण*] बाह्यरूप किंवा बाहेरचा भाग. **exterior** *वि* बाहेरून येणारा किंवा बाहेरच्या भागाचा, बाह्य.

exterminate /इक्'स्टऽमिनेइट्/ *क्रि* [*सक*] (माणसे किंवा जनावरे यांचा) पूर्ण नाश करणे, निर्मूलन करणे, हटवणे. **extermination** /इक्,स्टऽमि'नेइश्न्/ *ना* [*अगण*] निर्मूलन, उच्चाटन, उच्छेद, समूळ नाश, निर्दालन.

external /इक्'स्टऽन्ल्/ *वि* बाहेरचा, बाह्य: *~ injuries, बाहेरच्या जखमा म्हणजे शरीराच्या आत नसलेल्या.* **externally** /-नलि/ *क्रिवि* बाहेरून, बाह्यतः.

extinct /इक्'स्टिङ्क्ट्/ *वि* १ (प्राण्याच्या जातीविषयी) अस्तित्वात नसलेली, लुप्त, नष्ट, अस्तंगत. २ (ज्वालामुखीच्याबाबत) मृत, मृतप्राय. **extinction** /इक्'स्टिङ्क्श्न्/ *ना* [*अगण*] लोप, नाश.

extinguish /इक्'स्टिङ्ग्विश्/ *क्रि* [*सक*] (*औप*) १ (आग वगैरे) विझवणे, मालवणे. २ (आशा, प्रेम वगैरे) नष्ट करणे, नाहीसे करणे. **extinguisher** = FIRE EXTINGUISHER (FIRE^{1}).

extol /इक्'स्टउल्/ *क्रि* (-ll-) [*सक*] (*औप*) प्रशंसा करणे, तोंड भरून स्तुती करणे, वाखाणणे.

extort /इक्'स्टॉऽट्/ *क्रि* [*सक*] दम देऊन किंवा बळाचा वापर करून मिळवणे, बळे वसूल करणे, जुलूम जबरदस्तीने घेणे. **extortion** /इक्'स्टॉऽश्न्/ *ना* [*अगण, गण*] सक्तीची वसुली. **extortionate** /-शनट्/ *वि* (*अधिक्षेपी*) (मागण्या किंवा किंमतींबाबत) जबरी, चढ्या, अवाजवी.

extra /'अेक्स्ट्र/ *वि* जरूरीपेक्षा किंवा नेहमीपेक्षा जादा, जास्त; अधिक, अधि-: *~ pay, जादा पगार.* **extra** *क्रिवि* १ नेहमीपेक्षा जास्त, असाधारण: *an ~ strong box, जादा बळकट पेटी.* २ अधिक, वेगळा: *price £1.75, postage ~, किंमत पावणेदोन पौंड, टपालखर्च वेगळा.* **extra** *ना* [*गण*] १ जादा गोष्टी. २ गर्दीचा प्रसंग वगैरे सारख्या प्रसंगात छोट्याशा कामासाठी घेतलेला नट, जादा नट. ३ वर्तमानपत्राचा खास अंक.

extract /इक्'स्ट्रॅक्ट्/ *क्रि* [*सक*] १ (प्रयत्नाने एखादी गोष्ट बाहेर) काढणे किंवा ओढणे. २ बळाचा वापर करून घेणे: *~ money from* *sb, एखाद्याकडून पैसे उकळणे.* ३ (पिळून रस वगैरे) काढणे. **extract** /'अेक्स्ट्रॅक्ट्/ *ना* [*गण*] १ सिनेमा किंवा पुस्तकाचा लहान भाग, वेचा, उतारा. २ पिळून काढलेले द्रव्य, अर्क : *beef ~, गोमांसार्क.* **extraction** /इक्'स्ट्रॅक्श्न्/ *ना* १ [*गण, अगण*] काढणे, ओढणे : *the ~ion of information/a tooth, माहिती/दात काढणे.* २ [*अगण*] (कुटुंबाचे) मूळ : *of French ~ion, फ्रेंच कुळातला/मूळ फ्रेंच.*

extra-curricular /,अेक्स्ट्रक'रिक्यल(र्)/ *वि* शाळा किंवा महाविद्यालयातील क्रमिक अभ्यासक्रमाबाहेरचा, अभ्यासेतर.

extradite /'अेक्स्ट्रडाइट्/ *क्रि* [*सक*] आरोपीला जेथे त्याने गुन्हा केला असेल त्या देशात परत पाठवणे, प्रत्यर्पण करणे. **extradition** /,अेक्स्ट्र'डिश्न्/ *ना* [*अगण, गण*] आरोपीप्रत्यर्पण.

extra-marital /,अेक्स्ट्र'मॅरिट्ल्/ *वि* (लैंगिक संबंधांबाबत) विवाहबाह्य.

extraneous /इक्'स्ट्रेइनिअस्/ *वि* (*औप*) हाती असलेल्या कामाशी संबंध नसलेला, अप्रस्तुत, असंगत, अप्रासंगिक.

extraordinary /इक्'स्ट्रॉऽड्न्रि; *अमे* -डनेरि/ *वि* १ असाधारण, अलौकिक; अविस्मरणीय, विशेष : *~ beauty, अलौकिक सौंदर्य.* २ विलक्षण, चमत्कारिक. **extraordinarily** *क्रिवि* असाधारण असे, अलौकिकपणे; विशेषत्वाने.

extrapolate /इक्'स्ट्रॅपलेइट्/ *क्रि* [*अक, सक*] (*औप*) माहीत असलेल्या गोष्टींवरून अंदाज बांधणे, भाकीत करणे. **extrapolation** /इक्,स्ट्रॅप'लेइश्न्/ *ना* [*अगण*] उपलब्ध माहितीवरून बांधलेला अंदाज, भविष्य, भाकीत.

extraterrestrial /,अेक्स्ट्रट'रेस्ट्रिअल्/ *वि* पृथ्वीबाहेरचा, परग्रहावरचा.

extravagant /इक्'स्ट्रॅव्हगन्ट्/ *वि* १ पैसे वगैरे दवडणारा, उधळ्या, खर्चिक. २ (कल्पना किंवा वर्तनाबाबत) अवाजवी, अनावश्यक. **extravagance** /-गन्स्/ *ना* [*अगण, गण*] उधळपट्टी, अपव्यय. **extravagantly** *क्रिवि* उधळेपणाने.

extravaganza /इक्,स्ट्रॅव्ह'गॅन्झ/ *ना* [*गण*] विविधरंगी करमणूक, मोठा/भव्य समारंभ, समारोह, थाटामाटाचा कार्यक्रम.

extreme /इक्'स्ट्रीम्/ *वि* १ अति, तीव्र : *in ~ pain, अतीव वेदनेत.* २ दूरचा, टोकाचा, अगदी लांबचा : *the ~ north of the country, देशाचा अतिउत्तर भाग.* ३ (अनेकदा *अधिक्षेपी*) टोकाचा; बेहद्द : *~ opinions, टोकाची मते.* **extreme** *ना* [*गण*] १ परस्पर विरोधी भावना किंवा उलटी स्थिती : *Love and hate are ~s, प्रेम आणि द्वेष या परस्पर विरोधी भावना आहेत.* २ उच्चतम प्रमाण, सर्वोच्च अंश : *the ~s of heat in the desert, वाळवंटातील कमालीचे तपमान किंवा उष्म्याचा कळस.* **extremely** *क्रिवि* अतिशय, फार.

extremist /इक्'स्ट्रीमिस्ट्/ *ना* [*गण*], *वि* (बहुधा *अधिक्षेपी*) *ना* [*गण*] जहाल राजकीय मते असणारा माणूस; (*भारतीय*) (बहुधा सशस्त्र) अतिरेकी.

extremity /इक्'स्ट्रेमटि/ *ना* (*ब.व* -ies) १ [*अे.व*] (*औप*) उच्चतम प्रमाण किंवा अंश, कहर, परमावधी. २ (क) [*गण*] (*औप*) टोक, शेवट. (ख) **extremities** [*ब.व*] माणसाचे हातपाय.

extricate /'अेक्स्ट्रिकेइट्/ *क्रि* [*सक*] सुटका करून घेणे, कठीण परिस्थिती, सापळा वगैरेतून सोडवणूक करून घेणे.

extrovert /'अेक्स्ट्रव्हऽट्/ *ना* [*गण*] हसरा, बोलका माणूस, बहिर्मुख व्यक्ती, बहिर्वर्त.

exuberant /इग्'झ्यूबरन्ट्; *अमे* -झू-/ *वि* उत्साही; जिवंत, सळसळत्या रक्ताचा, गरम रक्ताचा. **exuberance** /-अन्स्/ *ना* [*अगण*] उत्साह; जिवंतपणा, चैतन्य. **exuberantly** *क्रिवि* उत्साहाने; जोषात.

exude /इग्'झ्यूड्; *अमे* -'झूड्/ *क्रि* (*औप*) १ [*अक, सक*] (द्रवाचे थेंब) स्रवणे, गळणे, पाझरणे, झिरपणे, रंध्रातून टाकणे/सोडणे. २ [*सक*] (भावना) जोरदारपणे व्यक्त करणे : *~ happiness, मोठा आनंद व्यक्त करणे किंवा आनंद ओसंडणे.*

exult /इग्'झल्ट्/ *क्रि* [*अक*] (*औप*) मोठा आनंद व्यक्त करणे; आनंदित होणे, आनंद लुटणे, हर्षोत्फुल्ल होणे. **exultant** *वि* आनंदाने नाचणारा, हर्षोत्फुल्ल. **exultation**

संग्राम. **'war-game** *ना* [*गण*] सराव देण्यासाठी केलेली, लुटुपुटुची लढाई. **'war-head** *ना* [*गण*] क्षेपणास्त्राचे स्फोटक टोक, स्फोटकाग्र. **'warring** *वि* युद्ध करणारा, युद्धग्रस्त : *~ring tribes, युद्धात व्यग्र असणाऱ्या टोळ्या.* **'warlike** *वि* १ युद्धास सज्ज. २ युद्धप्रिय, संघर्षप्रिय; आक्रमक. **'war-path** *ना* (*वाक्प्र*) **on the 'war-path** (*अनौप*) युद्धास तयार, संघर्षास तयार. **'warship** *ना* [*गण*] युद्धनौका. **'wartime** *ना* [*अगण*] युद्धकाळ.

warble /'वॉऽब्‌ल्/ *क्रि* [*अक, सक*] (विशेषतः पक्ष्याबाबत) लकेर मारणे. **warbler** *ना* [*गण*] गाणारा पक्षी.

ward /वॉऽड्/ *ना* [*गण*] १ इस्पितळातील स्वतंत्र खोली, कक्ष. २ स्थानिक स्वराज्यसंस्थेचा एक भाग, प्रभाग. ३ पाल्य. **ward** *क्रि* (*क्रिब*) **ward sth off** वाईट किंवा धोकादायक गोष्ट टाळणे, हुकवणे, चुकवणे.

warden /'वॉऽड्न्/ *ना* [*गण*] एखाद्या गोष्टीचा रक्षक : *the ~ of a youth hostel, तरुणांच्या वसतिगृहाचा अधीक्षक.*

warder /'वॉऽड(र्)/ *ना* [*गण*] (*स्त्री* **wardress** /'वॉऽड्रिस्/) (*ब्रि*) तुरुंग-रक्षक.

wardrobe /'वॉऽड्रउब्/ *ना* [*गण*] १ कपडे टांगायचे उंच कपाट. २ [बहुधा *अे.व*] एखाद्याचा कपड्याचा साठा/संग्रह, एकूण कपडेलत्ते. ३ नाटक-मंडळीचे पोषाख.

ware /वेअ(र्)/ *ना* १ [*अगण*] (विशेषतः सामासिक शब्दांत) -चा माल : *'silver ~, चांदीची भांडी.* २ **wares** [*ब.व*] (*जुना, अप्रचलित*) विक्रीच्या वस्तू. **'warehouse** *ना* [*गण*] माल साठवण्याची इमारत, वखार.

warm /वॉऽम्/ *वि* १ ऊन, कढत; थंड आणि खूप उष्ण यामधला : *~ water, कढत पाणी.* २ (कपड्यांबाबत) गरम : *a ~ jumper, गरम झंपर.* ३ मित्रत्वाचा, सौहार्दपूर्ण : *a ~ welcome, प्रेमळ स्वागत.* ४ (रंगांबाबत) तजेलदार आणि रम्य. **warm** *क्रि* १ [*अक, सक*] गरम होणे/करणे. २ (*क्रिब*) **warm to sb/sth** (क) एखादा माणूस आवडू लागणे. (ख) एखाद्या गोष्टीत विशेष रस घेणे. **warm up** खेळ सुरू होण्यापूर्वी सराव करणे. **warm (sth) up** अधिक जोमदार/जिवंत होणे/करणे. **,warm-'blooded** *वि* (प्राण्यांबाबत) रक्ताचे तपमान स्थिर असणारा. **,warm-'hearted** *वि* दयाळू, उदार, उमदा. **warmly** *क्रिवि* गरम रीतीने; प्रेमळपणे. **warmth** *ना* [*अगण*] उबदारपणा; प्रेमळपणा.

warn /वॉऽन्/ *क्रि* [*सक*] सावधानतेची किंवा धोक्याची सूचना देणे, इशारा देणे : *I ~ed her that it would cost a lot, त्याला खूप खर्च येईल अशी ताकीद मी तिला दिली होती* ○ *They were ~ed not to climb the mountain in bad weather, खराब हवामानात गिर्यारोहण करणे धोक्याचे आहे अशी पूर्वसूचना त्यांना देण्यात आली होती.* **warning** *ना* [*गण, अगण*] इशारा, धोक्याची पूर्वसूचना, ताकीद : *He didn't listen to my ~ing, माझ्या इशाऱ्याकडे त्याने लक्ष दिले नाही.* **warning** *वि* इशारा देणारा : *~ing signals, इशारा देणारे संदेश.*

warp /वॉऽप्/ *क्रि* १ [*अक, सक*] वाकणे, वाकवणे : *Some wood ~s in hot weather, गरम हवामानात काही लाकडांना बाक येतो.* २ [*सक*] (*ला*) वाईट परिणाम होणे, बहकवणे : *a ~ed mind, बहकलेले किंवा वाकड्या मार्गाने जाणारे मन.* **warp** *ना* [*गण,* बहुधा *अे.व*] वाकलेपण, बाक, तिरकेपणा.

warrant /'वॉरन्ट्; *अमे* 'वॉऽर्-/ *ना* [*गण*] एखादी गोष्ट करण्याचे अधिकारपत्र, अधिपत्र : *a ~ for his arrest, त्याला पकडण्याचा लेखी हुकूम.* **warrant** *क्रि* [*सक*] (*औप*) आवश्यकता दाखविणे, योग्य आहे याची खात्री देणे. **warranty** *ना* [*अगण, गण*] (*ब.व* **-ies**) (लेखी किंवा छापील) हमी.

warren /'वॉरन्; *अमे* 'वॉऽरन्/ *ना* [*गण*] १ सशांची खूप बिळे आहेत अशी जागा, सशांचे रान. २ (*ला*) सहजपणे रस्ता चुकेल अशी इमारत किंवा शहर.

warrior /'वॉरिअ(र्); *अमे* 'वॉऽर्-/ *ना* [*गण*] (*औप*) (विशेषतः पूर्वीच्या काळी) योद्धा; लढवय्या, वीर.

wart /वॉऽट्/ *ना* [*गण*] कातडीवरची मस, चामखीळ.

wary /'वेअरि/ *वि* (**-ier, -iest**) दक्ष, मागचापुढचा विचार करणारा, सावध. **warily** *क्रिवि* सावधपणे, दक्षतेने.

was ➪ BE.

wash^1 /वॉश/ *क्रि* १ [*सक*] धुणे, पाण्याने वगैरे साफ करणे : ~ *one's hands/clothes, हात/कपडे धुणे.* २ [*अक*] आंघोळ करणे : *I had to ~ and dress in a hurry, मला घाईने आंघोळ करून कपडे घालायला लागले.* ३ [*अक*] (वस्तू किंवा साहित्याबाबत) धुतले जाणे, स्वच्छ होणे : *Does this sweater ~ well? हा स्वेटर चांगला धुता येतो का?* ४ [*अक, सक*] वाहत जाणे, वाहून नेणे : *Pieces of the wrecked boat were ~ed to the shore, फुटलेल्या बोटीचे तुकडे किनाऱ्यावर तरंगत आले.* ५ [*अक*] (*अनौप*) स्वीकार्य होणे, टिकणे : *That argument/excuse just won't ~, ते म्हणणे/ती सबब मुळीच पटणार नाही.* ६ (*वाक्प्र*) **wash one's hands of sth** एखाद्या गोष्टीतून अंग काढून घेणे, संबंध न ठेवणे, हात झटकणे. ७ (*क्रिब*) **wash sth away** (पाण्याबाबत) वाहून नेणे. **wash sth down** (क) खूप पाणी वापरून धुऊन काढणे, आंघोळ घालणे. (ख) पाणी पिऊन घास ढकलणे, खाताना पाण्याचे घोट घेणे, खाऊन झाल्यावर काहीतरी पिणे. **wash sth out** (क) डाग धुऊन काढणे. (ख) (पावसाबाबत) (खेळ) थांबवणे किंवा सुरू होऊ न देणे, खेळावर पाणी पडणे. **wash (sth) up** (डिशेस, ताटे, वाट्या वगैरे) जेवणानंतर साफ करणे, (भांडी) घासणे. **washable** *वि* धुता येण्यासारखा, धुऊन खराब न होणारा. **'wash-basin** *ना* [*गण*] हात, तोंड धुण्याचे खोलगट भांडे. **,washed 'out** *वि* १ फिका झालेला, विटलेला. २ निस्तेज आणि थकलेला. **,washing-'up** *ना* [*गण*] जेवणानंतर ताटे, वाट्या, वगैरे धुणे/घासणे. **washing-'up 'liquid** *ना* [*अगण*] जेवणानंतरची भांडी घासण्याचा साबणाच्या पाण्यासारखा दाट द्रवपदार्थ. **'wash-out** *ना* [*गण*] (*अनौप*) पूर्ण अपयश, धुव्वा. **'washroom** *ना* [*गण*] (*अमे*) संडास, मोरी.

wash^2 /वॉश/ *ना* १ [*गण,* बहुधा *अ.व*] धुणे : *Give the car a good ~, गाडी छान धुऊन काढ.* २ **the wash** [*अ.व*] धुवायचे/धुण्याचे कपडे, धुणे. ३ नावेमुळे हालणारे पाणी, नावेच्या मागच्या बाजूला उठणाऱ्या लाटा.

washer /'वॉश(र्); *अमे* 'वॉऽ-/ *ना* [*गण*] १ स्क्रू किंवा जोड घट्ट बसवण्यासाठी वापरायची धातूची, रबराची वगैरे पातळ चकती, वायसर. २ (*अनौप*) धुण्याचे यंत्र, धुलाई यंत्र.

washing /'वॉशिङ्; *अमे* 'वॉऽ-/ *ना* [*अगण*] १ धुण्याचे कपडे, धुणे. २ धुणे, स्वच्छ करणे. **'washing-machine** *ना* [*गण*] धुलाई यंत्र, कपडे धुण्याचे यंत्र. **'washing-powder** *ना* [*अगण*] कपडे धुण्याच्या साबणाची पावडर.

wasn't /'वॉझ़्न्ट्; *अमे* 'वैझ़्न्ट्/ was not चा संक्षेप ➪ BE.

wasp /वॉस्प्/ *ना* [*गण*] काळे पिवळे पट्टे असलेला आणि शेपटीत नांगी असणारा एक उडता किडा, गांधीलमाशी.

wastage /'वेइस्टिज्/ *ना* [*अगण*] १ फुकट घालवलेला माल, वस्तू वगैरे. २ घट : *natural ~, नैसर्गिक घट.*

waste^1 /वेइस्ट्/ *क्रि* [*सक*] १ भलत्या गोष्टीवर (पैसा किंवा वेळ) वाया घालवणे, व्यर्थ खर्च करणे, दवडणे. २ पुरता वापर न करणे : *~ an opportunity, संधी वाया घालवणे.* ३ (*औप*) अशक्त आणि कृश करणे.

waste^2 /वेइस्ट्/ *ना* १ [*अगण, अ.व*] फुकट घालवणे, नासधूस : *a ~ of time, वेळ वाया घालवणे.* २ [*अगण*] टाकाऊ माल, अन्न वगैरे : *industrial ~, उद्योगातील फुकट जाणाऱ्या गोष्टी.* ३ [*अगण, गण,* बहुधा *ब.व*] उजाड जमीन, पडीक जमीन : *the ~s of the Sahara, सहाराची वैराण जमीन.* ४ (*वाक्प्र*) **go/run to waste** फुकट घालवणे. **waste** *वि* १ (जमिनीबाबत) ओसाड, पडीक : ~ *ground, ओसाड जमीन.* २ फेकून देण्याच्या लायकीचा, टाकाऊ : *~-paper, टाकाऊ/कचरा कागद.* **wasteful** *वि* फुकट घालवणारा, नुकसानकारक : *~ful processes, निरर्थक प्रक्रिया.* **wastefully** *क्रिवि* निरर्थकपणे, नुकसानकारक रीतीने. **,waste-'paper basket** *ना* [*गण*] केराची टोपली.

watch^1 /वॉच्/ *क्रि* १ [*अक, सक*] काळजीपूर्वक पाहणे, निरखणे. २ [*सक*] (*अनौप*) काळजी घेणे : ~ *one's language/manners, भाषेची/वागण्याची काळजी घेणे.* ३ (*वाक्प्र*) **watch one's step** ➪ STEP^1. ४ (*क्रिब*) **watch 'out** काळजी घेणे. **'watch over sb/sth** एखाद्या माणसावर/वस्तूवर पाहारा ठेवणे, राखण करणे; काळजी घेणे. **watcher** *ना* [*गण*] निरीक्षक, काळजीपूर्वक पाहणारा.

watch^2 /वॉच्/ *ना* १ [*गण*] मनगटी घड्याळ. २ [*अे.व, अगण*] नजर ठेवणे, लक्ष ठेवणे : *I kept (a) close ~ on her, मी तिच्यावर सक्त पाळत ठेवली.* ३ [*अे.व*] पाळत ठेवणारा माणूस किंवा गट. ४ [*गण*] बोटीवरील कामाचा काळ. **'watch-dog** *ना* [*गण*] १ राखण करणारा कुत्रा. २ (*ला*) लोकांचे हक्क सुरक्षित राखणारी व्यक्ती किंवा कमिटी, जागृती-मंडळ. **watchful** *वि* सक्त नजर ठेवणारा. **'watchman** /-मन्/ *ना* [*गण*] (*ब.व* **-men** /-मन्/) इमारतीचा गुरखा, रखवालदार. **'watchword** *ना* [*गण*] एखाद्या गटाचे तत्त्व किंवा ब्रीद सांगणारे वाक्य किंवा शब्द, ब्रीदवाक्य, परवलीचा शब्द.

water^1 /'वॉऽट(र्)/ *ना* १ (**क**) [*अगण*] पाणी, जल. (**ख**) [*अगण*] घरांना केला जाणारा पाणीपुरवठा. (**ग**) [*अे.व*] जलाशय; तळे, नदी वगैरे : *He fell in the ~ and drowned, तो पाण्यात पडला आणि बुडाला.* (**घ**) [*अे.व*] समुद्र, तळे वगैरेचा पृष्ठभाग : *swim under ~, पाण्याखालून पोहणे.* २ **waters** [*ब.व*] (**क**) जलाशय, पाण्याचा साठा. (**ख**) एखाद्या देशाला लागून असणारा समुद्र : *in British ~s, ब्रिटनच्या समुद्रात.* ३ (*वाक्प्र*) **under 'water** पाण्याखाली. **'water-cannon** *ना* [*गण*] गर्दी पांगविण्यासाठी पाण्याचे फवारे मारण्याचे यंत्र, पाणतोफ. **'water-closet** *ना* [*गण*] (*जुना अप्रचलित*) संडास, शौचालय. **'water-colour** (*अमे* **-color**) *ना* (**क**) **water-colours** [*ब व*] पाण्यात (तेलात नव्हे) मिसळून केलेले रंग (**ख**) [*गण*] अशा रंगांनी काढलेले चित्र. **'water-cress** *ना* [*अगण*] पांढरी फुले येणारी तिखट पानांची एक खायची वनस्पती. **'waterfall** *ना* [*गण*] धबधबा. **'waterfront** *ना* [*गण, बहुधा अे.व*] बंदर, समुद्र वगैरेच्या जवळच्या शहराचा भाग किंवा रस्ता. **'water-hole** *ना* [*गण*] जनावरे पाणी पिण्यास जातात तो पाणवठा. **waterlogged** /-लॉग्ड्; *अमे* -लॉऽग्ड्/ *वि* १ (जमिनीबाबत) खूप ओली. २ (नावेबाबत) जलमय, पाणी शिरलेली. **'watermark** *ना* [*गण*] काही कागदांमधे असलेले आणि उजेडासमोर कागद धरल्यावर त्यात दिसणारे डिझाइन, पाणखूण, गर्भचिन्ह. **'water-melon** *ना* [*गण*] कलिंगड. **'water-mill** *ना* [*गण*] पाणचक्की. **'waterproof** *ना* [*गण*], *वि* जलरोधक (थर किंवा लेप). **'water-proof** *क्रि* [*सक*] जलरोधक करणे. **'watershed** *ना* [*गण*] १ नद्यांचे विभाजन करणारी उंचवट्याची जागा किंवा पठार, पाणंदी. २ (*ला*) महत्त्वाचे बदल होण्याचा क्षण, ऐतिहासिक क्षण. **'waterside** *ना* [*अे.व*] नदीकाठ, तळ्याचा काठ. **'water-ski** *क्रि* [*अक*] नौकेमागे पाण्यावर घसरपट्टीने जाणे. **'water-skiing** *ना* [*अगण*] पट्ट्यांवर उभे राहून बोटीच्या मागोमाग पाण्यावरून ओढले जाणे. **'water-table** *ना* [*गण*] जमिनीखालची पाण्याची पातळी, जलरेषा, जलस्तर. **'watertight** *वि* १ जलप्रतिबंधक, पाणबंद. २ (*ला*) (करार वगैरेबाबत) ज्यात कुठल्याही गैरसमजाला किंवा पळवाटेला वाव नाही असा, अगदी काटेकोर, कप्पेबंद. **'waterway** *ना* [*गण*] जलमार्ग, वाहतुकीचा कालवा. **'waterworks** *ना* (तसेच ब.व क्रियापदासह अे.व) १ विशिष्ट भागात पाणीपुरवठा करणारे केन्द्र, जलकेन्द्र. २ (*वाक्प्र*) **turn on the 'waterworks** (*अनौप अधिक्षेपी*) रडणे, डोळ्यातून पाणी काढणे.

water^2 /'वॉऽट(र्)/ *क्रि* १ [*सक*] पाणी ओतणे, पाणी घालणे : ~ *the lawn, कुरणावर पाणी मारणे.* २ [*सक*] (जनावराला) पाणी पाजणे. ३ [*अक*] (डोळे किंवा तोंड याबाबत) पाणी येणे, पाणी सुटणे. ४ (*क्रिब*) **water sth down** (**क**) पाणी घालून द्राव पातळ किंवा फिका करणे. (**ख**) (*ला*) परिणाम क्षीण करणे, नरम करणे : ~ *down a speech, भाषण नरम करणे.* **'watering-can** *ना* [*गण*] पाण्याची झारी.

watery /'वॉऽटरि/ *वि* १ खूप पाणी असलेला,

पाणीदार, पचपचीत. २ (रंगांबाबत) फिका; पुसट, हलकासा.

watt /वॉट्/ *ना* [*गण*] विद्युत्-शक्तीचे एक परिमाण.

wave /वेइव्ह्/ *क्रि* १ [*अक, सक*] भेट होताच (हात उंचावून) हालवणे. २ [*सक*] हाताने पुढे जायची किंवा सरकण्याची खूण करणे: *The guard ~d us on, पहारेकऱ्याने हाताने आम्हाला पुढे जाण्याची खूण केली.* ३ [*सक*] हातात धरून हालवणे, फडकावणे: *~ a flag, हातात निशाण फडकावणे.* ४ [*अक*] पुढे-मागे वाकणे, डोलणे: *branches waving in the wind, वाऱ्यावर डुलणाऱ्या फांद्या.* ५ (*क्रिव*) **wave sth aside** फारसे महत्त्वाचे नाही म्हणून बाजूला सारणे, झटकून टाकणे. **wave** *ना* [*गण*] १ लाट, लहर. २ हालवणे: *With a ~ of his hand, he turned away, हात उंचावून दाखवत तो दूर गेला.* ३ लाटेसारखा आकार: *the ~s in her hair, तिच्या केसांची नागमोडी वळणे.* ४ अचानक झालेली वाढ (आणि प्रसार): *a ~ of panic, भीतीची लाट म्हणजेच घबराट.* ५ प्रकाश, उष्णता यांचे स्वरूप किंवा यांचा आकार: *radio ~s, रेडिओ लहरी.* **'wavelength** *ना* [*गण*] १ दोन प्रकाशलहरी वगैरे मधील अंतर, तरंगलांबी. २ विशिष्ट रेडिओ केन्द्राच्या रेडिओ-लहरीची (किंवा ध्वनिलहरीची) लांबी. **wavy** *वि* (**-ier, -iest**) नागमोडी, लाटालाटांचा: *a wavy line, नागमोडी रेषा ○ wavy hair, नागमोडी केस.*

waver /'वेइव्ह(र्)/ *क्रि* [*अक*] १ लटपटणे, डळमळणे. २ निर्णय घेण्यात काकू करणे, घोटाळणे. ३ हेलकावणे, डोलणे.

wax^1 /वॅक्स्/ *ना* [*अगण*] मेण. **wax** *क्रि* [*सक*] मेण लावून पॉलिश करणे: *~ the floor, जमिनीला मेणाचा थर देणे.*

wax^2 /वॅक्स्/ *क्रि* [*अक*] १ (चंद्राबाबत) कलेकलेने वाढणे. २ (*अलं*) होणे, वाढणे: *~ eloquent, बोलणे रसाळ होणे.*

way^1 /वेइ/ *ना* १ [*गण*] एखादी गोष्ट करण्याचा मार्ग, उपाय: *the best ~ to help people, लोकांना मदत करण्याचा सर्वोत्तम मार्ग.* २ [*अे.व*] रीत, पद्धती: *I dislike the rude ~ in which he spoke to us, तो ज्या उद्धट रीतीने आमच्याशी बोलला ती मला अजिबात पसंत नाही.* ३ [*गण*] एखाद्या गोष्टीची विशिष्ट बाजू; मुद्दा: *In some ~s, I agree with you, काही बाबतीत मी तुझ्याशी सहमत आहे.* ४ **ways** [*ब.व*] सवयी: *She is not going to change her ~s, ती तिच्या सवयी बदलणार नाही.* ५ [*गण*] रस्ता, पथ वगैरे. ६ [*गण*] एखाद्या ठिकाणी जाण्याचा मार्ग, वाट: *ask sb the ~ to the airport, विमानतळावर जाण्याचा मार्ग एखाद्याला विचारणे.* ७ [*अे.व*] दिशा, बाजू: *He went the other ~, तो दुसऱ्या दिशेने गेला.* ८ [*अे.व*] अंतर: *It's a long ~ to London, लंडन खूप दूर आहे किंवा खूप अंतरावर आहे.* ९ [*अे.व*] (क्रियापदानंतर) प्रगती, चाल: *He made his ~ home, त्याने घरचा रस्ता धरला म्हणजे तो घरी गेला.* १० (*वाक्प्र*) **by the 'way** (बोलताना नवीन विषय उपस्थित करताना वापर) दुसरं असं की. **by way of sth** (*औप*) म्हणून: *say something by ~ of introduction, प्रस्तावना म्हणून काही सांगणे.* **get/have one's (own) 'way** स्वतःला हवे ते करणे, आपल्या मनाप्रमाणेच करणे – बहुधा विरोध असतानाही. **give 'way** कोलमडणे, मोडून पडणे. **give way to sb/sth** (क) एखाद्याला पहिले जाऊ देणे. (ख) एखाद्याच्या जागी येणे, ऐवजी येणे: *Sorrow gave ~ to smiles, दुःखाच्या जागी स्मित झळकले.* (ग) अनिच्छेने अखेर देऊन टाकणे: *Finally he gave ~ to their demands, शेवटी त्याने त्यांच्या मागण्या मान्य केल्या.* **go out of one's way (to do sth)** एखादी गोष्ट नेहमीचा परिपाठ बाजूला ठेऊन करणे, विशेष लक्ष घालून करणे. **go one's own 'way** स्वतःला हवे ते करणे. **make 'way (for sb/sth)** एखाद्याला जाऊ देणे, वाट देणे. **,no 'way** (*अनौप*) नक्की/निश्चितपणे नाही; नाही. **on one's 'way** जाताना, येताना, वाटेवर. **,out of the 'way** (क) संपलेला. (ख) दूरचा. (ग) क्वचित् आढळणारा. **out of/in the 'way** अडथळा नसलेला/असलेला, मार्गातील धोंड दूर झालेला/असलेला, सोयीचा/गैरसोयीचा. **under 'way** प्रगतिपथावर असलेला, चालू असून पुढे जाणारा. **way of**

'life व्यक्तीचा किंवा संघाचा जीवनक्रम, त्यांच्या श्रद्धा, सवयी, वागण्याच्या रीती.

way^2 /वेइ/ *क्रिवि (अनौप)* खूप आधी, पूर्वी, खूप दूर : *She finished the race ~ ahead of the others, इतरांच्या कितीतरी आधी तिने शर्यत पूर्ण केली.* **,way-'out** *वि (अनौप)* वेगळा, विचित्र, मळलेली वाट सोडणारा.

waylay /,वेइ'लेइ/ *क्रि (भूत, भूत वि* **-laid** */-'लेइड्/)* [*सक*] वाटेत दबा धरून एखाद्यावर हल्ला करून त्याला लुटणे, वाटमारी करणे.

wayward /'वेइवड्/ *वि* हट्टी, द्वाड, औलाद, हूड : *a ~ child, हूड मुलगा.*

WC /,डब्ल्यू 'सी/ *संरू* water-closet, संडास.

we /वी/ *सना* (क्रियापदाचा कर्ता म्हणून वापर) मी आणि इतर, आम्ही : *We are all going to visit him, आम्ही सर्व त्याला भेटणार आहोत.*

weak /वीक्/ *वि* १ क्षीण, दुर्बल, अशक्त : *He's still ~ after his illness, आजारपणानंतर अजूनही तो अशक्तच आहे.* २ सहजपणे वाकणारा, हरणारा किंवा मोडणारा, कमकुवत : *a ~ joint/team, कमकुवत सांधा/संघ.* ३ इतरांचे चटकन् ऐकणारा; कणखर नसलेला, लेचापेचा : *a ~ leader, पिळपिळीत नेता.* ४ खात्री न पटवणारा, विश्वासार्ह न वाटणारा : *a ~ argument, कमजोर किंवा लंगडे समर्थन.* ५ सहज न दिसणारा, अंधुक; फिका : *~ sound/light, क्षीण आवाज/प्रकाश.* ६ कमजोर, फार चांगला नसलेला : *~ at mathematics, गणितात कच्चा.* ७ पाणीदार, फिका : *~ tea, फिका चहा.* **weaken** *क्रि* [*अक, सक*] क्षीण होणे/करणे. **,weak-'kneed** *वि (ला)* भेदरट; निश्चय करू न शकणारा, अस्थिर मनाचा. **weakling** /'वीक्लिङ्/ *ना* [*गण*] (*अधिक्षेपी*) दुबळा माणूस, बुळा. **weakly** *क्रिवि* क्षीणपणाने. **weakness** *ना* १ [*अगण*] अशक्तपणा. २ [*गण*] दोष, उणीव, कमजोरी, वर्मस्थान : *We all have our little ~nesses, आपणा सर्वांनाच काहीतरी कमजोरी असते.* ३ [*गण*] पराकोटीची आवड : *a ~ for cream cakes, क्रीमकेकची आवड.*

wealth /वेल्थ्/ *ना* १ [*अगण*] संपत्ती, मालमत्ता किंवा धन (यांची प्राप्ती). २ [*अ.व*] (*औप*) चिकार साठा, बहुमूल्य ठेवा : *a book with a ~ of illustrations, अनेक उदाहरणे असलेले पुस्तक.* **wealthy** *वि* **(-ier, -iest)** श्रीमंत, धनाढ्य.

wean /वीन्/ *क्रि* १ [*सक*] मुलाला अंगावर पाजायचे हळूहळू कमी करून त्याला अन्नाची सवय करण्यास सुरुवात करणे. २ (*क्रिब*) **wean sb from sth** एखाद्याला एखाद्या गोष्टीपासून हळूहळू परावृत्त करणे.

weapon /'वेपन्/ *ना* [*गण*] शस्त्र. **weaponry** *ना* [*अगण*] शस्त्रास्त्रे.

wear^1 /वेअ(र्)/ *क्रि (भूत* **wore** /वॉऽ(र्)/, *भूत वि* **worn** /वॉऽन्/) १ [*सक*] अंगात (कपडे) घालणे, नेसणे : *~ a dress, पोषाख चढवणे/घालणे.* २ [*सक*] चेहऱ्यावर विशिष्ट भाव असणे : *~ a smile, चेहऱ्यावर हास्य/स्मित असणे.* ३ [*अक, सक*] वापरून बाद होणे/करणे : *The carpets are starting to ~, गालिचे वापरून वापरून खराब व्हायला लागलेत.* ४ [*अक*] टिकाऊ असणे : *These shoes have worn well, हे बूट छान टिकलेत्.* ५ [*सक*] (*अनौप*) स्वीकारणे किंवा सहन करणे. ६ (*क्रिब*) **wear (sth) away** वापरून वापरून निरुपयोगी किंवा खराब होणे/करणे. **wear (sth) down** कृश होणे/करणे, झिजणे/झिजवणे. **wear sb down** एखाद्याला क्षीण करणे, खिळखिळा करणे. **wear off** हळूहळू दिसेनासा होणे, लुप्त होणे. **wear on** (वेळेबाबत) हळूहळू जाणे. **wear (sth) out** वापरून झिजवणे किंवा निरुपयोगी करणे. **wear sb out** एखाद्याला खूप दमवणे, एखाद्याची दमछाक करणे.

wear^2 /वेअ(र्)/ *ना* [*अगण*] १ नेसणे, घालणे : *a dress for evening ~, संध्याकाळी घालायचा पोषाख.* २ कपडे : *'mens~, पुरुषांचे कपडे.* ३ वापरून झालेली खराबी : *The carpet is showing signs of ~, गालिचा विटायला लागलाय.* ४ वापरता येण्यासारखी अवस्था, टिकण्याची क्षमता : *There's a lot of ~ in those shoes yet, हे बूट अजून खूप दिवस टिकतील.* ५ (*वाक्प्र*) **,wear and 'tear** वापरून झालेले नुकसान, झीज.

weary /'विअरि/ *वि* **(-ier, -iest)** खूप दमलेला, शिणलेला. **wearily** *क्रिवि* दमून,

थकून भागून. **weariness** *ना* [*अगण*] थकवा, दमणूक. **weary** *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*अक, सक*] (*of*)// दमणे/दमवणे, थकणे/थकवणे, कंटाळणे.

weasel /'वीझ़ल्/ *ना* [*गण*] तांबूस रंगाचा एक तापट छोटा प्राणी, अंगुष.

weather^{1} /'वेद(र्)/ *ना* १ [*अगण*] विशिष्ट प्रदेशातील आणि विशिष्ट काळातील हवामान. २ (*वाक्प्र*) **under the 'weather** (*अनौप*) किंचित् बरं नसलेला, थोडासा आजारी. **'weather-beaten** *वि* उन्हाने रापलेला, ऊनपाऊस खाल्लेला. **'weather forecast** *ना* [*गण*] हवामानाचा अंदाज. **'weatherman** *ना* [*गण*] (*ब.व* **-men** /-मेन्/) (*अनौप*) विशेषतः दूरदर्शन किंवा रेडिओवरून हवामानाचा अंदाज सांगणारा माणूस. **'weatherproof** *वि* पाऊसवारा यांचा परिणाम न होणारा. **'weather-vane** *ना* [*गण*] उंच इमारतीवर लावलेला वाऱ्याची दिशा दाखविणारा फिरता बाण, वातकुक्कुट.

weather^{2} /'वेद(र्)/ *क्रि* १ [*अक, सक*] ऊनपावसाने रंग किंवा आकार बदलणे. २ [*सक*] सहीसलामत सुटणे : ~ *a storm/crisis, वादळातून/कठीण प्रसंगातून बचावणे.*

weave /वीव्ह्/ *क्रि* (*भूत* **wove** /वउव्ह्/ किंवा अर्थ क्र. ४ मधे **~d**, *भूत वि* **woven** /'वउव्हन्/ किंवा अर्थ क्र. ४ मधे **~d**) १ [*अंक, सक*] कापड विणणे. २ [*सक*] (पाने, फुले) ओवणे किंवा गुंफणे : ~ *flowers into a wreath, फुलांची माळ गुंफणे.* ३ [*सक*] (*ला*) (गोष्ट) रचणे. ४ [*अक, सक*] अडथळे चुकवत वाट कापणे : ~ *through the traffic, रहदारीतून वाट काढणे.* **weave** *ना* [*गण*] वीण. **weaver** *ना* [*गण*] विणकर.

web /वेब्/ *ना* [*गण*] १ कोळ्याचे जाळे, कोळीष्टक. २ (*ला*) किचकट रचना. ३ बदक, बेडूक वगैरेच्या पायाच्या बोटांना जोडणारा पडदा, जाळ. **webbed** *वि* बोटे पडद्याने जोडलेली असणारा.

wed /वेड्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **~ded** किंवा **wed**) [*अक, सक*] (विशेषतः *जुना अप्रचलित*) लग्न होणे/करणे.

we'd /वीड्/ १ we had ➪ HAVE. २ we would ➪ WILL^{1}, WOULD^{1}.

wedding /'वेडिङ्/ *ना* [*गण*] विवाहसमारंभ, लग्नसोहळा. **'wedding-ring** *ना* [*गण*] लग्नाची खूण म्हणून घालायची अंगठी.

wedge /वेज्/ *ना* [*गण*] १ एखादी गोष्ट फोडण्यासाठी किंवा दोन गोष्टी अलग ठेवण्यासाठी वापरायचा V या आकाराचा धातूचा, लाकडाचा वगैरे तुकडा, पाचर. २ पाचरीच्या आकाराची गोष्ट : *a ~ of cake, पाचरीच्या आकाराचा केक.* **wedge** *क्रि* [*सक*] पाचर ठोकून (केल्यासारखे) घट्ट करणे : ~ *the door open, पाचर मारून दार उघडे ठेवणे.*

wedlock /'वेड्लॉक्/ *ना* [*अगण*] (*जुना अप्रचलित*) विवाहितावस्था, वैवाहिक संबंध.

Wednesday /'वेन्झ्डि/ *ना* [*अगण, गण*] आठवड्यातील चौथा म्हणजे मंगळवारनंतरचा दिवस, बुधवार. (Monday खालील उदाहरणे पहा.)

wee /वी/ *वि* (*स्कॉट*) लहान, छोटासा, थोडासा.

weed /वीड्/ *ना* [*गण*] १ नको असलेली रानटी वनस्पती, माजलेले रान. २ (*अनौप*) कृश मनुष्य, लुकडा किंवा किडकिडीत माणूस. **weed** *क्रि* १ [*अक, सक*] नको असलेले गवत काढणे, वेणणे. २ (*क्रिब*) **weed sth/sb out** एखादी गोष्ट/व्यक्ती काढून टाकणे : ~ *out the lazy students, आळशी विद्यार्थी काढून टाकणे.* **weedy** *वि* (**-ier, -iest**) १ तृण वाढलेला, रान माजलेला. २ (*अनौप*) किडकिडीत, कृश.

week /वीक्/ *ना* [*गण*] १ सात दिवसांचा काळ (विशेषतः रविवार ते शनिवारपर्यंतचा), आठवडा. २ कामावर खर्च केलेला आठवड्यातला काळ : *a 35-hour week, (कामाच्या) ३५ तासांचा आठवडा.* ३ (*वाक्प्र*) **ˌweek after 'week, week in, week 'out** दर आठवड्याला. **'weekday** *ना* [*गण*] (शनिवार आणि) रविवार सोडून कोणताही दिवस. **ˌweek'end** *ना* [*गण*] शनिवार-रविवार. **weekly** *वि, क्रिवि* दर आठवड्याला होणारा, साप्ताहिक. **weekly** *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) आठवड्यातून एकदा प्रसिद्ध होणारे वर्तमानपत्र वगैरे, साप्ताहिक.

weep /वीप्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **wept** /वेप्ट्/) [*अक, सक*] (*औप*) रडणे, (अश्रू) ढाळणे. **weeping** *वि* (झाडाबाबत) फांद्या वाकलेले.

weigh /वेइ/ *क्रि* [*सक*] १ वजन करणे : *She ~ed herself on the scales, तिने काट्यावर स्वतःचे वजन केले.* २ (वजन) असणे/होणे : *~ 10 kilograms, दहा किलो (वजन) असणे.* ३ (*up*)// (एखाद्या गोष्टीचा) काळजीपूर्वक विचार करणे, तोलून मापून पहाणे. ४ काळजीपूर्वक तुलना करणे : *~ one plan against another, एका योजनेशी दुसऱ्या योजनेची तुलना करणे.* ५ (*वाक्प्र*) **weigh 'anchor** बोट चालवण्यापूर्वी पाण्यातून नांगर वर उचलणे. ६ (*क्रिब*) **weigh sb down** (क) एखाद्यावर ओझे घालणे. (ख) एखाद्याला चिंतातूर किंवा निराश करणे. **weigh in (with sth)** (*अनौप*) (महत्त्वाचा) मुद्दा मांडून चर्चेत भाग घेणे. **weigh on sb** एखाद्याला काळजीत टाकणे. **weigh sth out** एखाद्या गोष्टीचे वजन करणे.

weight /वेइट्/ *ना* १ [*अगण*] वजन, भार : *My ~ is 70 kilograms, माझे वजन ७० किलो आहे.* २ [*गण*] धातूचे वजनाचे माप, वजन : *a 100-gram weight, शंभर ग्रॅमचे वजन.* ३ [*गण*] जड वस्तू, ओझे. ४ [*गण, अगण*] वजनाचे परिमाण. ५ [*अगण*] महत्त्व किंवा परिणाम : *opinions that carry ~, किंमत असलेली मते.* ४ [*अे.व*] काळजी, चिंता, समस्या : *feel a great ~ of responsibility, जबाबदारीची काळजी किंवा जबाबदारीचे ओझे वाटणे.* ७ (*वाक्प्र*) **be/take a weight off one's mind** ➪ MIND^{1}. **,over/,under 'weight** जादा/कमी वजन असणे. **put on/ lose 'weight** (माणसाबाबत) जाड/बारीक होणे किंवा वजन वाढणे/वजन कमी होणे. **weight** *क्रि* [*सक*] १ (*down*)// वजन घालून जड करणे. २ (बहुधा कर्मणी) एखाद्या व्यक्तीला किंवा गटाला फायदा होईल अशी व्यवस्था करणे : *The law is ~ed towards rich people, श्रीमंत लोकांच्या बाजूला झुकणारा हा कायदा आहे.* **weightless** *वि* वजनरहित. **'weight-lifting** *ना* [*अगण*] वजन उचलण्याचा व्यायाम. **'weight-lifter** *ना* [*गण*] वजन उचलणारा पटू. **weighty** *वि* (**-ier, -iest**) १ जड. २ (*ला*) महत्त्वाचा किंवा गंभीर.

weir /विअ(र्)/ *ना* [*गण*] नदीच्या पाण्याला घातलेला बंधारा, बांध.

weird /विअड्/ *वि* १ विचित्र; अस्वाभाविक : *~ shrieks, विलक्षण किंकाळ्या.* २ (*अनौप*) अस्वाभाविक आणि अपारंपरिक, भलता. **weirdly** *क्रिवि* विचित्रपणे. **weirdness** *ना* [*अगण*] विचित्रपणा.

welcome /'वेल्कम्/ *क्रि* [*सक*] १ स्वागत करणे. २ आनंदाने स्वीकारणे : *The decision has been ~ed by everyone, या निर्णयाचे प्रत्येकाने स्वागत केले आहे.* **welcome** *उद्गा* (येणाऱ्या माणसाचे स्वागत करताना वापर) : *W~ home! तुझे घरामधे स्वागत असो!* **welcome** *ना* [*गण*] स्वागत. **welcome** *वि* १ आनंददायक, इष्ट, स्वागतार्ह : *a ~ change, आनंददायक बदल.* २ *to*// एखादी गोष्ट करण्यास मोकळा असलेला : *You're ~ to use my car, माझी गाडी तू कधीही वापरू शकतोस.* ३ (*वाक्प्र*) **you're 'welcome** (आभार मानल्यावर द्यावयाचा विनम्र प्रतिसाद).

weld /वेल्ड्/ *क्रि* [*सक*] धातूचे तुकडे धातू तापवून जोडणे, सांधणे. **weld** *ना* [*गण*] असा जोडलेला सांधा. **welder** *ना* [*गण*] संधाता.

welfare /'वेल्फेअ(र्)/ *ना* [*अगण*] आरोग्य, सौख्य आणि आनंद, कल्याण : **the ,welfare 'state** *ना* [*अे.व*] रुग्ण, बेकार आणि वृद्ध वगैरे लोकांची काळजी घेणारी शासकीय यंत्रणा, कल्याणकारी राज्य.

well^{1} /वेल्/ *उद्गा* (आश्चर्य, मान्यता, अनिश्चितता वगैरे दाखविण्यासाठी वापर) भले : *W~, . . . I don't know about that, मला त्याची कल्पना नाही* ○ *W~, ~, so you've come at last, ठीके! ठीके! आलास तू शेवटी!*

well^{2} /वेल्/ *वि* (**better** /'बेट(र्)/, **best** /बेस्ट्/) १ बरा, खडखडीत : *feel/get ~, बरे वाटणे/होणे.* २ क्षेम, कुशल : *All is not ~ at home, घरी सर्व ठीक नाही.* ३ बरे, उचित : *It would be ~ to start early, लवकर निघणे बरे होईल.*

well^{3} /वेल्/ *क्रिवि* (**better** /'बेट(र्)/, **best**

/बेस्ट्/) १ योग्य, चांगल्या किंवा समाधानकारक मार्गाने: *The children behaved ~, मुले चांगली/नीट वागली.* २ पूर्ण, भरपूर: *Shake the mixture ~, मिश्रण पूर्ण हालवून घ्या.* ३ वाजवीपणाने: *You may ~ be right, तू वाजवीपणाने कदाचित् बरोबर असशील.* ४ खूप, मोठ्या प्रमाणात: *drive at ~ over the speed limit, वेगमर्यादेपेक्षा खूप जास्त वेगाने गाडी चालवणे.* ५ (*वाक्प्र*) **as well (as sb/sth)** (एखाद्या गोष्टी/व्यक्ती) खेरीज अधिक, आणि सुद्धा, देखील. **do 'well** यश येणे; प्रगती करणे. **do well to do sth** एखादी गोष्ट करणे शहाणपणाचे असणे. **leave/let well a'lone** एखाद्या चांगल्या झालेल्या गोष्टीत ढवळाढवळ न करणे. **may/might (just) as well do sth** परिस्थितीचा विचार करता एखादी गोष्ट करणे उचित ठरणे. **,very 'well** (संमती दाखवताना वापर – बहुधा नाखुषीने) ठीक. **,well and 'truly** पूर्णपणे. **well done** (अभिनंदन किंवा प्रशंसा करण्यासाठी वापर) शाब्बास! **well in (with sb)** एखाद्याशी चांगले संबंध असणे. **well 'off** विशेषतः आर्थिकदृष्ट्या सुस्थितीत. **,well 'out of sth** एखाद्या गोष्टीत न अडकण्याचे सद्भाग्य (असणे). **,well-ad'vised** *वि* समजूतदार; शहाणा. **'well-being** *ना* [*अगण*] आनंदात, ठाकठीक वगैरे असण्याची स्थिती, क्षेम, कुशल. **,well-'bred** *वि* चांगल्या चालीरीती असलेला, घरंदाज. **,well-con'nected** *वि* महत्त्वाच्या व्यक्तींशी नात्याचे किंवा मित्रत्वाचे संबंध असलेला. **,well-'done** *वि* पूर्ण शिजवलेला. **,well-'earned** *वि* पूर्ण लायकी असलेला, पात्र. **,well-'heeled** *वि* (*अनौप*) श्रीमंत. **,well-in'formed** *वि* बहुश्रुत, जाणकार. **,well-in'tentioned** सद्हेतुपूर्ण पण बहुधा अपयशी. **,well-'known** *वि* प्रसिद्ध, ख्यातनाम. **,well-'meaning** *वि* = WELL-INTENTIONED. **wellnigh** /'वेल्नाइ/ *क्रिवि* (*औप*) जवळजवळ, प्रायः. **,well-'read** *वि* खूप वाचन केलेला, बहुश्रुत; जाणकार, व्युत्पन्न. **,well-'spoken** *वि* समयोचित भाषण करणारा. **,well-'timed** *वि* यथोचित केलेला, बोललेला, योग्यवेळी केलेला. **,well-to-'do** *वि* सधन, सुखवस्तू. **'well-wisher** *ना* [*गण*] हितचिंतक.

well^4 /वेल्/ *ना* [*गण*] १ पाण्याची किंवा तेलाची विहीर. २ इमारतीतील जिना किंवा लिफ्ट यांची जागा. **well** *क्रि* [*अक*] (*up*)// विहिरीतील पाण्यासारखे वर येणे, वाहणे, ओसंडणे: *Tears ~ed up in his eyes, त्याच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले.*

we'll /वील्/ १ we shall ➪ SHALL. २ we will ➪ WILL^1.

wellington (तसेच **,wellington 'boot**) /'वेलिङ्टन्/ *ना* [*गण*] गुडघ्यापर्यंत येणारे गमबूट.

welter /'वेल्ट(र्)/ *ना* [*अे.व*] खिचडी, सरमिसळ: *a ~ of details, तपशिलांची खिचडी.*

wend /'वेन्ड्/ *क्रि* (*वाक्प्र*) **wend one's way** (*पुरा* किंवा *काव्य*) हळूहळू चालणे, रस्ता काटणे.

went GO^1 चा *भूत.*

wept WEEP चा *भूत, भूत वि.*

were ➪ BE.

we're /विअ(र्)/ we are ➪ BE.

weren't /वऽन्ट्/ were not ➪ BE.

werewolf /'विअवुल्फ्/ *ना* [*गण*] (*ब.व* **-wolves** /-वुल्व्ह्झ्/) (कथांमधे) लांडग्यामधे रूपांतर होणारा माणूस.

west /वेस्ट्/ *ना* [*अे.व*] १ **the west** पश्चिम दिशा. २ **the West** (क) युरोप आणि अमेरिकेतले (पूर्वी कम्युनिस्ट नसलेले) देश, पाश्चिमात्य देश/राष्ट्रे. (ख) देशाचा पश्चिम विभाग. **west** *वि* १ पश्चिमेचा, पाश्चिमात्य. २ (वाऱ्यांबाबत) पश्चिमेकडचा. **west** *क्रिवि* पश्चिमेला. **'westbound** /'वेस्ट्बाउन्ड्/ *वि* पश्चिमेला जाणारा. **westerly** *वि, क्रिवि* १ पश्चिमेचा. २ (वाऱ्यांबाबत) पश्चिमेकडून येणारा. **westward** /'वेस्ट्वड्/ *वि* पश्चिमेला. **westward(s)** *क्रिवि* पश्चिमेला.

western /'वेस्टन्/ *वि* **Western** जगाच्या किंवा देशाच्या पश्चिमेकडचा, पाश्चिमात्य. **western** *ना* [*गण*] १९ व्या शतकातील पश्चिम अमेरिकेतील गुराख्यांबाबतचा चित्रपट किंवा त्यावरचे पुस्तक. **westerner** *ना* [*गण*] पाश्चिमात्य देशातून आलेला किंवा तिकडे

राहणारा माणूस. **westernize** *क्रि* [*सक*] पाश्चिमात्यीकरण करणे, पश्चिमेकडच्या देशांच्या कल्पना, संस्था आणणे.

wet /वेट्/ *वि* (**~ter, ~test**) १ पाण्याने किंवा द्रवाने भिजलेला, ओला : *~ clothes/roads, ओले कपडे/रस्ते.* २ पावसाळी : *~ weather, पावसाळी हवा.* ३ (रंग, सिमेंट वगैरेबाबत) ओला, न वाळलेला. ४ (*अनौप अधिक्षेपी*) पिळपिळा, दुबळा; हेतुहीन. ५ (*वाक्प्र*) **a ,wet 'blanket** (*अनौप*) दुसऱ्यांना आनंद न मानू देणारा किंवा उपभोगू न देणारा माणूस, आनंदावर विरजण घालणारा माणूस. **,wet 'through** ओलाचिंब. **wet** *ना* १ **the wet** [*ए.व*] आर्द्र हवा, ओलसर हवा. २ [*गण*] (*ब्रि अनौप*) मवाळ पुराणमतवादी राजकारणी. **wet** *क्रि* (**-tt-**, *भूत, भूत वि* **wet** किंवा **~ted**) [*सक*] (एखाद्याला) भिजवणे. **'wet suit** *ना* [*गण*] पाण्याखालून पोहणाऱ्याने उबदारपणासाठी वापरायचा रबरी कपडा.

we've /वीव्ह्/ we have ➪ HAVE.

whack /वॅक्; *अमे* व्हॅक्/ *क्रि* [*सक*] दाणकन् मारणे, ठाणकन् मारणे, सपासप मारणे. **whack** *ना* [*गण*] १ सणकन् दिलेला ठोसा (किंवा त्याचा आवाज)/थप्पड. २ (*अनौप*) हिस्सा. **whacked** *वि* (*अनौप*) दमलेला. **whacking** *ना* [*गण*] (*जुना अप्रचलित अनौप*) बदडणे, लगावणे. **whacking** *वि* (*अनौप*) खूप मोठा.

whale /वेइल्; *अमे* व्हेइल्/ *ना* १ [*गण*] तेल आणि मांसासाठी पकडला जाणारा समुद्रातला एक मोठा मासा, देवमासा. २ (*वाक्प्र*) **have a 'whale of a time** (*अनौप*) मजा लुटणे. **whaler** *ना* [*गण*] १ देवमासे पकडण्यासाठी वापरायचे जहाज. २ देवमासे पकडणारा माणूस. **whaling** *ना* [*अगण*] देवमाशांची शिकार.

wharf /वॉऽफ्; *अमे* व्हॉऽर्फ्/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s** किंवा **wharves** /वॉऽव्ह्झ्; *अमे* व्हॉऽर्व्ह्झ्/) माल उतरवण्यासाठी किंवा चढवण्यासाठी जहाज बांधायची जागा, धक्का.

what /वॉट्; *अमे* व्हॉट्/ *वि, सना* १ (एखाद्या व्यक्ती किंवा गोष्टीविषयी माहिती विचारताना प्रश्नार्थक वाक्यात वापर) काय : *W~ time is it? किती वाजले?* ○ *W~ are you reading? तू काय वाचतोयस्?* २ ती गोष्ट, ते : *Tell me ~ happened next, नंतर काय झालं ते मला सांग.* ३ (आश्चर्य व्यक्त करण्यासाठी वापर) : *W~ a good idea! काय छान कल्पना आहे!* ४ (*वाक्प्र*) **what about . . . ?** ➪ ABOUT^{1}. **what for** कशासाठी : *W~ is this tool used for? हे हत्यार कशासाठी वापरतात?* ○ *W~ did you do that for? तू ते कशासाठी/का केलंस्?* **what if** तर काय होईल. **what's more** अधिक महत्त्वाचं काय (तर). **what's 'what** कोणत्या गोष्टी महत्त्वाच्या, उपयुक्त वगैरे, कशाचं काय किंवा काय काय. **what with sth** (विशेषतः वाईट कारणांची यादी देताना वापर) त्याचं काय.

whatever /वॉट्'अेव्ह(र्); *अमे* व्हॉट्-/ *वि, सना* १ काहीही किंवा प्रत्येक (गोष्ट) : *You can eat ~ you like, तुला हवं ते खा.* २ काही झालं तरी : *Keep calm, ~ happens, काही झालं तरी शांत रहा.* ३ (आश्चर्य व्यक्त करण्यासाठी प्रश्नार्थक वाक्यात वापर) काय : *W~ do you mean? काय म्हणणं काय तुझं?* **whatever, whatsoever** *क्रिवि* (अधिक जोर देण्यासाठी वापर) काहीही : *no doubt ~, काहीही शंका नाही.*

wheat /वीट्; *अमे* व्हीट्/ *ना* [*अगण*] गहू किंवा गव्हाचे ताट.

wheedle /'वीड्ल्; *अमे* 'व्हीड्ल्/ *क्रि* [*अक, सक*] (*अधिक्षेपी*) खुशामत करून मिळवण्याचा प्रयत्न करणे, गोड बोलून काम साधणे : *She ~d the money out of her brother, भावाशी गोडगोड बोलून तिने पैसे काढले.*

wheel /वील्; *अमे* व्हील्/ *ना* [*गण*] १ चाक, चक्र. २ = STEERING-WHEEL (STEER). ३ (*वाक्प्र*) **at/behind the 'wheel** (क) गाडी वगैरे चालवणारा. (ख) (*ला*) ताब्यात असणारा. **wheel** *क्रि* १ [*सक*] (चाकाचे वाहन) ओढणे किंवा ढकलणे. २ [*अक*] वर्तुळाकार फिरणे, चक्राकार फिरणे, घिरट्या घालणे. ३ (*वाक्प्र*) **,wheel and 'deal** (*अनौप* विशेषतः *अमे*) धंद्यामधे बहुधा लबाडीने सौदेबाजी करणे. **'wheelbarrow** *ना* [*गण*] एका चाकाची दोन दांडे असलेली ढकलगाडी. **'wheelchair** *ना* [*गण*] चाकाची खुर्ची –

चालता न येणाऱ्या माणसासाठीची. **-wheeled** (सामासिक विशेषणे बनवताना वापर) (निर्देशित)-चाके असलेला, -चाकी : *three-wheeled vehicle, तीनचाकी वाहन.*

wheeze /वीझ्; *अमे* ह्वीझ्/ *क्रि* [*अक*] श्वास घेताना घरघर आवाज येणे. **wheeze** *ना* [*गण*] घरघर. **wheezy** *वि* **(-ier, -iest)** घरघरणारा.

whelk /वेल्क्; *अमे* ह्वेल्क्/ *ना* [*गण*] गोगलगायीसारखा एक समुद्र-प्राणी, डिंब, कोका.

when /वेन्; *अमे* ह्वेन्/ *क्रिवि* १ (प्रश्नार्थक वाक्यात वापर) केव्हा, कधी : *W~ did you come? तू कधी आलास?* २ (कालदर्शक शब्दांच्या किंवा पदबंधांच्या शेवटी वापर) जेव्हा, ज्यावेळी : *Sunday is the day ~ few people work, रविवार हा असा दिवस आहे की जेव्हा फार कमी लोक काम करतात* ○ *Her last visit to the town was in May, ~ she saw the new hospital, मेमधे तिने शहराला दिलेली शेवटची भेट, ज्यावेळी तिने हॉस्पिटल बघितले.* **when** उ. *अव्यय* १ जेव्हा, ज्यावेळी : *It was raining ~ we arrived, ज्यावेळी आम्ही आलो त्यावेळी पाऊस पडत होता.* २ विचारात घेता; जरी : *Why buy a new car ~ your present one runs well? जर सध्याची गाडी चांगली चालतीय् तर नवीन गाडी कशाला घ्यायची?*

whence /वेन्स्; *अमे* ह्वेन्स्/ *क्रिवि* (*पुरा* किंवा *औप*) कोठून.

whenever /वेन्'अेव्ह(र्); *अमे* ह्वेन्-/ उ.*अव्यय* १ कधीही, कोणत्याही वेळी, जेव्हा कधी : *I'll discuss it ~ you like, जेव्हा कधी तुला वाटेल/हवं असेल तेव्हा मी याची चर्चा करीन.* २ जेव्हा होईल तेव्हा, वेळ मिळताच : *I go ~ I can, जेव्हा शक्य होईल तेव्हा मी जातो.* **whenever** *क्रिवि* (आश्चर्य व्यक्त करण्यासाठी प्रश्नार्थक वाक्यात वापर) जेव्हा.

where /वेअ(र्); *अमे* ह्वेअ(र्)/ *क्रिवि* १ (प्रश्नार्थक वाक्यात वापर) कोठे, कुठं : *W~ does he live? तो कुठं राहतो?* २ (स्थलदर्शक शब्दांच्या किंवा पदबंधांच्या शेवटी वापर) जेथे, ज्या ठिकाणी : *This is the place ~ you last saw it, हीच ती जागा की जिथे तू ते शेवटचं पाहिलंस* ○ *India is one of the few countries ~ people drive on the left, भारत हा जगातील फार थोड्या देशांपैकी एक असा देश आहे की जिथे लोक डाव्या बाजूने वाहने चालवतात* ○ *He then went to London, ~ he stayed for three days, नंतर तो लंडनला गेला, जिथे तो तीन दिवस राहिला.* **where** उ.*अव्यय* जिथे, जेथून : *Put it ~ we can all see it, आपण सर्व जेथून नीट पाहू शकू अशा ठिकाणी ते ठेव.* **'whereabouts** *क्रिवि* (प्रश्नार्थक वाक्यात वापर) कशाजवळ, कुठे : *W~abouts did you find it? कशाजवळ तुला ते सापडलं?* **'whereabouts** *ना* [*गण*, अे.व किंवा ब.व क्रियापदासह वापर] ठावठिकाणा, थांगपत्ता : *Her ~abouts is/are unknown, तिचा ठावठिकाणा माहीत नाही.* **where'as** उ.*अव्यय* उलट; त्यावेळी मात्र : *He gets to work late every day ~ she is always early, तो कामावर रोज उशिरा येतो, उलट ती मात्र नेहमी लवकर येते.* **where'by** *क्रिवि* (*औप*) ज्यायोगे : *He thought of a plan ~ he might escape, त्याने एक योजना आखली ज्यायोगे त्याला सुटता आले असते.* **whereu'pon** उ.*अव्यय* (*औप*) ज्यानंतर; आणि नंतर, मग, त्यावर.

wherever /वेअर्'अेव्ह(र्); *अमे* ,ह्वेअर्-/ उ.*अव्यय* १ कुठेही; कुठे जिथे असेल तिथे : *I'll find him, ~ he is, तो जिथं असेल तेथून मी त्याला शोधून काढीन.* २ सर्वत्र; प्रत्येक ठिकाणी : *Crowds of people queue to see her ~ she goes, ती जेथे जाईल त्या प्रत्येक ठिकाणी तिला पाहण्यासाठी लोकांची रीघ लागते.* **wherever** *क्रिवि* (आश्चर्य व्यक्त करण्यासाठी प्रश्नार्थक वाक्यात वापर) जेथे.

wherewithal /'वेअविदॉडल्; *अमे* 'ह्वेअर्-/ *ना* **the wherewithal** [*अे.व*] (*औप*) विशिष्ट कार्यासाठी लागणारा पैसा, पैशाची तरतूद : *Does he have the ~ to buy a car? गाडी घ्यायला त्याच्याकडे पैशाची तजवीज आहे का?*

whet /वेट्; *अमे* ह्वेट्/ *क्रि* **(-tt-)** (*वाक्प्र*) **whet sb's appetite for sth** एखाद्याची एखाद्या गोष्टीची भूक वाढवणे.

whether /'वेद(र्); *अमे* ह्वेदर्/ *उ.अव्यय* (निवड किंवा शंका व्यक्त करताना वापर) की : *I don't know ~ to accept or refuse, मला कळत नाही की स्वीकारावं की नाकारावं.*

which /विच्; *अमे* ह्विच्/ १ *वि, सना* (निवडीचे स्वातंत्र्य असताना प्रश्नार्थक वाक्यात वापर) : *W~ way shall we go – up the hill or along the road? आपण कसं जायचं? टेकडीवरून की रस्त्याने?* २ *सना* (आधी उल्लेख केलेल्या गोष्टीचा निर्देश करताना वापर) जो, जी, जे : *This is the car ~ she drove, हीच ती गाडी जी तिनं चालवली ○ His best film, ~ won many awards, was about Gandhi, त्याचा सर्वोत्कृष्ट चित्रपट, की ज्याला अनेक पारितोषिके मिळाली, तो म्हणजे गांधींवरचा चित्रपट.* ३ *सना* (*औप*) (आत्ताच जे बोललो त्याचा पुन्हा उल्लेख करताना वापर) : *He said he had lost the key, ~ was untrue, त्याची किल्ली हरवली असं तो म्हणाला – जे खोटं होतं किंवा जी थाप होती.*

whichever /विच्'अेव्ह(र्); *अमे* ह्विच्-/ *वि, सना* १ जी कोणती व्यक्ती किंवा वस्तू, जी काय : *Take ~ hat you like best, तुला जी कोणती टोपी अधिक आवडेल ती तू घे.* २ जो कोणताही, जी कोणतीही, जे कोणतेही : *W~ way you travel, it is expensive, ज्या कोणत्याही मार्गे तू प्रवास करशील तो महागच आहे.* **whichever** *वि, सना* (आश्चर्य व्यक्त करण्यासाठी प्रश्नार्थक वाक्यात वापर) जो, जी, जे.

whiff /विफ्; *अमे* ह्विफ्/ *ना* [*गण*] १ किंचितसा घेतलेला वास, थोडेसे हुंगणे. २ (*ला*) लहान निधी.

while /वाइल्; *अमे* ह्वाइल्/ *उ.अव्यय* १ -च्या वेळी, विशिष्ट काळात : *She fell asleep ~ watching television, दूरदर्शन पाहात असताना तिला झोप लागली.* २ (विरोध दाखविण्यासाठी वापर) तर : *She likes tea, ~ I prefer coffee, तिला चहा आवडतो तर मी कॉफी पसंत करतो.* ३ (*औप*) जरी : *W~ I want to help, I do not think I can, मला जरी मदत करायची इच्छा असली तरी मला नाही वाटत मी ती करू शकेन.* **while** *ना* [*अे.व*] वेळ, काळ : *for a long ~,* दीर्घकाळापर्यंत. **while** *क्रि* (*क्रिब*) **while sth away** आरामात वेळ घालवणे.

whilst /वाइल्स्ट्; *अमे* ह्वाइल्स्ट्/ *उ.अव्यय* = WHILE.

whim /विम्; *अमे* ह्विम्/ *ना* [*गण, अगण*] हुक्की, लहर, तलफ.

whimper /'विम्प(र्); *अमे* 'ह्वि-/ *क्रि* [*अक*] मुसमुसत रडणे, कुरकुरणे. **whimper** *ना* [*गण*] कुरकुर, ,धुसमुस.

whimsical /'विम्झ़िक्ल्; *अमे* 'ह्वि-/ *वि* लहरी, वेड घेणारा, चक्कर, तऱ्हेवाईक.

whine /वाइन्; *अमे* ह्वाइन्/ *ना* [*गण*] मोठ्याने केकाटणे, कोकलणे. **whine** *क्रि* [*अक*] १ केकाटणे : *The dog was whining to come in, आत येण्यासाठी कुत्रं केकाटत होतं.* २ तक्रार करणे, भुणभुण करणे : *a child that never stops whining, सतत भुणभुण करणारे किंवा किरकिरणारे मूल.*

whinny /'विनि; *अमे* 'ह्वि-/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) घोड्याचे फुरफुरणे, घोड्याचे सौम्य खिंकाळणे. **whinny** *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*अक*] फुरफुर आवाज करणे, सौम्य खिंकाळणे.

whip^{1} /विप्; *अमे* ह्विप्/ *ना* १ [*गण*] चाबूक. २ [*गण*] एखाद्या प्रश्नावर सभागृहात उपस्थित राहून मत देण्याची आज्ञा (देणारा राजकीय पक्षाचा सभासद), राजकीय पक्षाचा प्रतोद. ३ [*गण, अगण*] अंडी, साय वगैरे घोटून केलेला पदार्थ.

whip^{2} /विप्; *अमे* ह्विप्/ *क्रि* (**-pp-**) १ [*सक*] चाबूक मारणे. २ [*अक, सक*] पटकन् किंवा झटकन् हालणे/काढणे : *He ~ped out a knife, त्याने पटकन् चाकू दाखवला किंवा काढला.* ३ [*सक*] (साय, अंडी वगैरे) घट्ट, एकजीव होईपर्यंत घोटणे. ४ (*क्रिब*) **whip sth up** (लोकांच्या) भावना प्रक्षुब्ध करणे, भडकावणे किंवा चेतावणे. **whipping** *ना* [*गण, अगण*] चाबकाने फोडणे, चाबकाचे फटके. **'whip-round** *ना* [*गण*] (*ब्रि अनौप*) एखाद्या गटाकडून जमवलेली वर्गणी.

whirl /वऽल्; *अमे* ह्व-/ *क्रि* १ [*अक, सक*] गोलगोल फिरणे/फिरवणे, गरगर फिरणे/फिरवणे, गिरकी घेणे. २ [*अक*] फिरणे; गोंधळणे : *Her mind was ~ing, तिचे मन*

गोंधळून गेले. **whirl** *ना* [*अ.व*] १ गिरकी, भिरकांडी. २ कामांची किंवा घटनांची जलद मालिका. ३ गोंधळ. ४ (*वाक्प्र*) **give sth a 'whirl** (*अनौप*) एखादी गोष्ट करून पाहणे. **'whirlpool** *ना* [*गण*] पाण्याचा जोरदार भोवरा. **'whirlwind** *ना* [*गण*] वावटळ, चक्रवात, झंझावात: (*ला*) *a ~wind romance, झंझावाती प्रेमप्रकरण.*

whirr (तसेच विशेषतः *अमे* **whir**) /वऽ(र्); *अमे* ह्व-/ *ना* [*गण,* बहुधा *अ.व*] वेगाने फिरणाऱ्या यंत्राची घरघर, पक्ष्याच्या पंखांची फडफड, पंखांची सपसप. **whirr** (तसेच विशेषतः *अमे* **whir**) *क्रि* [*अक*] घरघर आवाज करणे, फडफड आवाज करणे.

whisk /विस्क्; *अमे* ह्व-/ *क्रि* [*सक*] १ एखादी व्यक्ती/वस्तू झटकन् दूर नेणे, त्वरेने बाजूला नेणे: *They ~ed him off to prison, त्यांनी त्याला झटकन् तुरुंगाकडे नेले.* २ (अंडी, साय वगैरे) फेसणे. **whisk** *ना* [*गण*] अंडी वगैरे फेसण्याचे हाताने धरायचे एक साधन.

whisker /'विस्क(र्); *अमे* 'ह्वि-/ *ना* १ [*गण*] मांजराच्या वगैरे मिशा. २ **whiskers** [*ब.व*] माणसाचे कल्ले.

whisky (*अमे* किंवा *आयरिश* **whiskey**) /'विस्कि; *अमे* 'ह्वि-/ *ना* [*अगण, गण*] (*ब.व* **-ies**) धान्यापासून बनवलेली एक कडक दारू.

whisper /'विस्प(र्); *अमे* 'ह्वि-/ *क्रि* १ [*अक, सक*] (**क**) कुजबुजणे, हलक्या आवाजात बोलणे. (**ख**) एखादी गोष्ट गुपचुप बोलणे, इतरांना कळू न देता बोलणे. २ [*अक*] (उदा वारा किंवा पानांबाबत) सळसळणे. **whisper** *ना* [*गण*] कुजबूज.

whist /विस्ट्; *अमे* ह्विस्ट्/ *ना* [*अगण*] चार गड्यात खेळायचा एक पत्त्यांचा खेळ.

whistle /'विसल्; *अमे* 'ह्वि-/ *ना* [*गण*] १ ओठांनी वाजवलेली शिट्टी किंवा शीळ: (*ला*) *the ~ of the wind through the trees, झाडातून येणारी वाऱ्याची शीळ.* २ वाजवायची शिट्टी. **whistle** *क्रि* १ (**क**) [*अक*] शिट्टी वाजवणे, शीळ घालणे. (**ख**) [*सक*] शिट्टीवर चाल वाजवणे. २ सुईऽ आवाज करत वेगाने जाणे: *The bullets ~d past us, बंदुकीच्या गोळ्या सुईऽ करत आमच्या जवळून गेल्या.*

white /वाइट्; *अमे* ह्वाइट्/ *वि* (~r, ~st) १ हिमासारखा शुभ्र, पांढरा स्वच्छ. २ गोऱ्या कातडीच्या लोकांचा, श्वेतवर्णीय. ३ धक्का वगैरे बसल्याने पांढरा फटक (झालेला). ४ (कॉफीबाबत) दूध किंवा साय घातलेली. ५ (*वाक्प्र*) **a white elephant** खूप महाग पण निरुपयोगी गोष्ट, पांढरा हत्ती. **a white lie** किरकोळ खोटेपणा. **white** *ना* १ [*अगण*] पांढरा रंग, धवल वर्ण. २ [*गण*] श्वेतवर्णीय माणूस. ३ [*गण, अगण*] अंड्यातील पांढरा पदार्थ, पांढरा बलक (= YOLK). ४ [*गण*] डोळ्यातला पांढरा भाग, कौडी. **,white-'collar** *वि* पांढरपेशांचा – श्रमजीवींचा नव्हे. **the 'White House** *ना* [*अ.व*] अमेरिकन अध्यक्ष (किंवा त्याचे सरकारी निवासस्थान). **whiten** *क्रि* [*अक, सक*] पांढरे होणे/करणे. **whiteness** *ना* [*अगण*] पांढरेपणा, धवलता. **,White 'Paper** *ना* [*गण*] एखाद्या गोष्टीबाबत शासन काय पावले उचलणार त्याचा अधिकृत वृत्तांत, श्वेतपत्रिका. **'whitewash** *ना* १ [*अगण*] भिंतीला लावायचा पाण्यात भिजवलेला चुना. २ [*गण, अगण*] (*ला*) चुकांवर केलेली सारवासारव, रंगसफेदी. **'whitewash** *क्रि* [*सक*] १ भिंतीला चुना फासणे. २ (*ला*) (चुका झाकण्यासाठी) रंगसफेदी करणे.

Whitsun /'विट्स्न्; *अमे* 'ह्वि-/ *ना* [*अगण, गण*] ईस्टरच्या सणानंतरचा सातवा रविवार आणि त्यानंतरचा आठवडा.

whittle /'विट्ल्; *अमे* 'ह्वि-/ *क्रि* १ [*अक, सक*] (लाकडाच्या) बारीक ढलप्या काढणे, (लाकूड) तासणे. २ (*क्रिब*) **whittle sth down/away** झिजवणे, हळूहळू कमी करणे किंवा घटणे: *The value of our savings is being slowly ~d down by inflation, चलनवाढीमुळे आपण बचत केलेल्या पैशांची किंमत कमी होतेय्.*

whiz /विझ्; *अमे* ह्विझ्/ *क्रि* (**-zz-**) [*अक*] (*अनौप*) १ वेगाने जाणे. २ हवेतून वेगाने जाताना सुईऽ किंवा झूऽ असा आवाज करणे.

whiz-kid /'विझ्किड्; *अमे* 'ह्विझ्/ *ना* [*गण*] (*अनौप*) झटपट यशाचे शिखर गाठणारा माणूस.

who /हू/ *सना* १ (कर्त्याच्या स्थानी असलेल्या

माणसाविषयी प्रश्न विचारताना वापर) कोण: *W~ is the woman in the black hat? काळी हॅट घातलेली ती बाई कोण आहे?* २ (*अनौप*) (क्रियापद किंवा शब्दयोगी यांचे कर्म म्हणून वापर) कोण: *W~ are you phoning, तू कुणाला फोन करतोयस्? ○ W~ do you want to speak to? तुला कुणाशी बोलायचंय्?* ३ (पूर्वी उल्लेख केलेल्या व्यक्तीचा निर्देश करताना वापर) जो (कोणी): *The people ~ called yesterday want to buy the house, त्या लोकांना, जे काल आले होते, घर विकत घ्यायचंय् ○ My husband, ~ has been ill, hopes to see you soon, माझा नवरा, जो आजारी आहे, तुझी लवकरच भेट होईल अशी आशा करतोय्.*

whoever /हू'अेव्ह(र्)/ *सना* १ तो माणूस जो, जो कोणी: *W~ says that is a liar, जो कोणी असं म्हणतो तो खोटारडा आहे ○ You must speak to ~ is the head of the department, जो कोणी विभाग-प्रमुख आहे त्याच्याशी तुला बोललं पाहिजे.* २ कोणीका: *W~ rings, I don't want to speak to them, कोणीका फोन करेना, मला त्यांच्याशी बोलायची इच्छा नाही.* **whoever** *सना* (आश्चर्य व्यक्त करताना प्रश्नार्थक वाक्यात वापर) कोण.

whole /हउल्/ *वि* १ पूर्ण; सबंध: *He told us the ~ story, त्याने आम्हाला संपूर्ण हकीगत सांगितली.* २ इजा किंवा नुकसान न झालेला, धड, शाबूत; न मोडलेला: *She swallowed the sweet ~, तिने अख्खी गोळी गिळली.* ३ (*वाक्प्र*) **go the whole hog** (*अनौप*) एखादी गोष्ट मन लावून, पूर्णपणे किंवा कुचराई न करता करणे. **whole** *ना* १ **the whole** [*अे.व*] *of//* एखाद्या गोष्टीचा संपूर्ण भाग, समग्र गोष्ट. २ [*गण*] पूर्ण गोष्ट. ३ (*वाक्प्र*) **on the whole** एकंदरीत. **,whole-'hearted** *वि* पूर्ण पाठिंब्याचा, मनापासूनचा. **,whole-'heartedly** *क्रिवि* मनापासून, पूर्ण पाठिंब्याने. **'wholemeal** *ना* [*अगण*] पूर्ण धान्याचे म्हणजे टरफले न काढलेल्या धान्याचे पीठ. **,whole 'number** *ना* [*गण*] पूर्णांक – उदा १, ३, २७ वगैरे. **wholly** /'हउलि/ *क्रिवि* संपूर्णपणे; सबंध: *I'm not wholly convinced, माझी पूर्ण खात्री पटलेली नाही.*

wholesale /'हउल्सेइल्/ *ना* [*अगण*] गिऱ्हाइकांना माल देणाऱ्या दुकानदारांना (विशेषतः मोठ्या प्रमाणावर) माल विकणे, घाऊक विक्री, ठोक विक्री. **wholesale** *वि, क्रिवि* १ घाऊक विक्रीचा. २ मोठ्या प्रमाणावर: *the ~ slaughter of animals, प्राण्यांची प्रचंड प्रमाणावरील हत्त्या.* **wholesaler** *ना* [*गण*] घाऊक व्यापारी.

wholesome /'हउल्सम्/ *वि* १ (अन्नाबाबत) आरोग्यकारक. २ (*पसंती*) नैतिकदृष्ट्या हितकारक, हितावह; चांगला.

whom /हूम्/ *सना* (*औप*) १ (क्रियापद किंवा शब्दयोगी यांचे कर्म म्हणून प्रश्नार्थक वाक्यात वापर) कोणाला: *W~ did she invite? तिने कोणाला आमंत्रण दिले?* २ (क्रियापद किंवा शब्दयोगी यांचे कर्म म्हणून व्यक्तीचा निर्देश करताना वापर) ज्या (कुणा)ला: *The person to ~ this letter is addressed died two years ago, ज्या माणसाला हे पत्र लिहिलंय् तो दोन वर्षांपूर्वीच मेला.*

whoop /हूप्, वूप्; *अमे* ह्वूप्/ *ना* [*गण*] १ आनंदाची आरोळी, आनंदाचा चित्कार. २ खोकल्याची ढास. **whoop** *क्रि* [*अक*] चित्कार करणे, आरोळी ठोकणे: *~ing with joy, आनंदाने आरोळी ठोकणे.* **'whooping cough** *ना* [*अगण*] लहान मुलांना होणारा एक रोग – डांग्या खोकला.

whore /हॉऽ(र्)/ *ना* [*गण*] (*जुना अप्रचलित किंवा अधिक्षेपी*) वेश्या, छिनाल.

whose /हूझ्/ १ *सना, वि* (प्रश्नार्थक वाक्यात वापर) कोणाचा, कोणाची, कोणाचं: *W~ (house) is that? कुणाचं (घर) आहे ते?* २ *सना* (पूर्वी उल्लेख केलेल्या एखाद्या व्यक्तीचा निर्देश करताना वापर) ज्याचा, ज्याची, ज्याचे: *These are the children ~ mother is a doctor, ही ती मुले की ज्यांची आई डॉक्टर आहे.*

why /वाइ; *अमे* ह्वाइ/ *क्रिवि* १ (प्रश्नार्थक वाक्यात वापर) का: *W~ are you late? तुला उशीर का झाला?* २ कोणत्या कारणाने, कशामुळे, का: *Nobody understands ~ she left him, ती त्याला का सोडून गेली हे कुणालाच कळत नाही.* ३ (*वाक्प्र*) **why not** (सूचना करताना वापर) का नाही: *W~ not* *go home? घरी जायला काय हरकत आहे? किंवा घरी का नाही जाऊ?*

wick /विक्/ *ना* १ [*गण*] दिव्याची किंवा मेणबत्तीची जळती वात. २ (*वाक्प्र*) **get on sb's wick** (*ब्रि अनौप*) एखाद्याला सतावणे किंवा त्रास देणे, उच्छाद मांडणे.

wicked /'विकिड्/ *वि* १ नैतिकदृष्ट्या वाईट, पाजी, दुष्ट, हलकट. २ दुसऱ्याला इजा करणारा, अपायकारक. ३ खट्याळ : *a ~ grin, खट्याळ हसू.* **wickedly** *क्रिवि* दुष्टपणे; अपायकारक रीतीने किंवा दुष्ट बुद्धीने; खट्याळपणे. **wickedness** *ना* [*अगण*] दुष्टपणा, अपायकारकता; खट्याळपणा, रंगेलपणा.

wicker /'विक(र्)/ *ना* [*अगण*] विणलेला वेत किंवा फांद्या. **'wicker-work** *ना* [*अगण*] वेताच्या खुर्च्या, टोपल्या वगैरे.

wicket /'विकिट्/ *ना* [*गण*] (क) (क्रिकेटमधे) तीन स्टंप्स्, यष्टी. (ख) दोन बाजूच्या स्टंप्स्मधील हिरवळीची जागा.

wide /वाइड्/ *वि* (~r, ~st) १ रुंद : *a ~ river, रुंद पात्राची नदी.* २ रुंदीचा, विस्तीर्ण : *12 metres ~, १२ मीटर रुंदीचा.* ३ विविध गोष्टींचा समावेश असणारा, वैविध्यपूर्ण : *a ~ range of interests, विविध आवडींचा पट.* ४ लक्ष्यापासून दूर : *His shot was ~, त्याचा नेम भलतीकडेच गेला.* ५ (*वाक्प्र*) **give sb a wide berth** एखाद्याला टाळणे, हुलकावणी देणे. **wide of the 'mark** चुकलेला, भलतीकडे गेलेला. **wide** *क्रिवि* पूर्णपणे : *He was ~ awake, तो टक्क जागा होता* ○ *~ open, पूर्णपणे खुला.* **,wide-'eyed** *वि* आश्चर्याने (आणि अननुभवाने) डोळे विस्फारलेला. **widely** *क्रिवि* १ मोठ्या प्रमाणावर : *Prices vary ~ly from shop to shop, दुकानादुकानात किंमतीत मोठा फरक आहे.* २ विस्तीर्ण भागावर, दूरवर, लांबवर : *travel ~ly, दूरवर प्रवास करणे.* ३ खूप लोकांना, अनेकांना : *It is ~ly known that . . ., सर्वजनात/जगात सर्वत्र हे माहीत आहे की . . . .* **widen** *क्रि* [*अक, सक*] रुंद होणे/करणे, वाढवणे. **'widespread** *वि* सर्वत्र पसरलेला.

widow /'विडउ/ *ना* [*गण*] विधवा. **widow** *क्रि* [*सक*] (बहुधा कर्मणी) विधवा करणे किंवा विधुर करणे. **widower** *ना* [*गण*] विधुर.

width /विड्थ्, विट्थ्/ *ना* [*अगण, गण*] रुंदी.

wield /वील्ड्/ *क्रि* [*सक*] जवळ असून वापरणे : *~ an axe, कुऱ्हाड वापरणे* ○ *~ power, सत्ता वापरणे.*

wife /वाइफ्/ *ना* [*गण*] (*ब.व* **wives** /वाइव्ह्झ्/) पत्नी, बायको.

wig /विग्/ डोक्यावर घालायचा केसांचा टोप.

wiggle /'विग्ल्/ *क्रि* [*अक, सक*] या बाजूकडून त्या बाजूकडे हालणे/हालवणे, डोलणे/डोलवणे : *The baby was wiggling its toes, मूल पायाची बोटे हालवत होते.* **wiggle** *ना* [*गण*] डोलवणे.

wigwam /'विग्वॅम्; *अमे* -वाम्/ *ना* [*गण*] उत्तर अमेरिकेतील रेड इंडियन माणसाची झोपडी किंवा तंबू.

wild /वाइल्ड्/ *वि* १ (क) (प्राणी, पक्षी वगैरेबाबत) वन्य, हिंस्र, जंगली; पाळीव नसलेला. (ख) (वनस्पतींबाबत) रानटी, रान-. २ (लोकांबाबत) रानटी, असंस्कृत. ३ (जमिनीबाबत) लागवडीसाठी आणि वस्तीसाठी न वापरलेली. ४ वादळी : *~ weather, वादळी हवा.* ५ बेफाम, उच्छृंखल, उनाड, बेबंद. ६ काही विचार न करता केलेला, स्वैर : *a ~ guess, स्वैर अंदाज.* ७ *about//* (अनौप) एखाद्या गोष्टीबाबत अतिउत्साही. ८ (*वाक्प्र*) **run 'wild** ➪ RUN^1. **wild** *ना* १ **the wild** [*अे.व*] नैसर्गिक परिस्थिती. २ **the wilds** [*ब.व*] दूरचा रानावनाचा भाग. **,wildcat 'strike** *ना* [*गण*] अचानकपणे पुकारलेला अनधिकृत संप. **,wild-'goose chase** *ना* [*गण*] (*अनौप*) न सापडू शकणाऱ्या व्यक्तीचा किंवा गोष्टीचा घेतलेला तपास, सुवर्णमृगाचा शोध. **'wildlife** *ना* [*अगण*] वन्यपशू, पक्षी वगैरे. **wildly** *क्रिवि* १ रानटी पद्धतीने. २ (*अनौप*) अतिशय, कमालीचा. **wildness** *ना* [*अगण*] रानजमीन; बेफामपणा.

wilderness /'विल्डनिस्/ *ना* [*गण,* बहुधा *अे.व*] १ लागवडीखाली नसलेली जमीन, रान, अरण्य. २ (*वांक्प्र*) **in the 'wilderness** कोणतेही राजकीय पद किंवा महत्त्व नसलेला,

सत्ताभ्रष्ट.

wiles /वाइल्झ्/ *ना* [*ब.व*] एखाद्याला फसवण्यासाठी केलेला कावा, कपट.

wilful (*अमे* तसेच **willful** /'विल्फ्ल्/) *वि* १ (वाईट गोष्टीबाबत) हेतुपुरस्सर, मुद्दाम केलेला, जाणूनबुजून केलेला. २ (माणसाबाबत) स्वतःला हवं ते करून घेणारा, हट्टी. **wilfully** *क्रिवि* बुद्ध्या; हेकेखोरपणे.

will^1 /विल्/ *अभिद क्रि* (*संक्षेप* **'ll** /ल्/, *नकार* **will not** *संक्षेप* **won't** /वउन्ट्/, *भूत* **would** /वड्/ *अधिक बलयुक्त रूप* /वुड्/, *संक्षेप* **'d** /ड्/, *नकार* **would not,** *संक्षेप* **wouldn't** /'वुड्न्ट्/) १ (भविष्यकाळ व्यक्त करण्यास वापर): *He ~/He'll be here tomorrow, तो उद्या येथे असेल.* २ (सांप्रत काळात काय असण्याची शक्यता आहे हे व्यक्त करण्यास वापर): *That ~ be the postman at the door, दारात पोस्टमन असेल.* ३ (इच्छा किंवा पक्का हेतू दाखवण्यास वापर): *We ~ not obey you, आम्ही तुमचं ऐकणार नाही.* ४ (विनंती किंवा आमंत्रण दर्शक): *W~ you come this way please? कृपया तुम्ही इकडून येता?* ५ (आज्ञा देताना वापर): *You ~ carry out my instructions! तू माझ्या सूचनांची अंमलबजावणी करायची आहेस!* ६ (सर्वसाधारण सत्य सांगण्यास वापर): *Oil ~ float on water, तेल पाण्यावर तरंगेल/तरंगते.* ७ (सवयी वर्णन करण्यास वापर): *She would sit there, hour after hour, doing nothing, काहीही न करता तासन्तास ती नुसती बसून राहायची.* ८ (आग्रह, हट्ट दाखवण्यास वापर): *He '~ smoke between courses at dinner, रात्रीच्या जेवणाचे वेळी अन्न वाढतेवेळी मधूनमधून तो आवर्जून धूम्रपान करतो.*

will^2 /विल्/ *क्रि* [*सक*] १ इच्छाशक्तीच्या जोरावर एखादी गोष्ट घडवून आणण्याचा प्रयत्न करणे. २ (*औप*) मृत्युपत्र करून एखाद्याला संपत्ती, जायदाद वगैरे देणे.

will^3 /विल्/ *ना* १ [*अगण, अे.व*] स्वतःचे वर्तन आणि विचार यावर नियंत्रण ठेवण्यासाठीची मनःशक्ती, मनोप्रेरणा. २ [*अगण, अे.व*] (तसेच **'will-power**) [*अगण*] इच्छाशक्ती: *He has a strong/weak ~, त्याची इच्छाशक्ती प्रबळ/क्षीण आहे.* ३ [*अगण, गण*] निश्चय, निर्धार: *the ~ to live, जीवनेच्छा, जगण्याची ईर्षा.* ४ [*अगण*] एखाद्याची इच्छा, मर्जी: *the ~ of God, परमेश्वराची इच्छा, देवाचे मन.* ५ [*गण*] मृत्युपत्र किंवा इच्छापत्र. ६ (*वाक्प्र*) **at will** हवे तेव्हा, मनास येईल/वाटेल तेव्हा/तसे.

willing /'विलिङ्/ *वि* (*to*)// एखादी गोष्ट करण्यास राजी; तयार: *~ to learn, शिकायला तयार.* २ स्वेच्छेने आणि उत्साहाने काम करणारा: *a ~ helper, स्वतःच्या मनाने मदत करणारा.* **willingly** *क्रिवि* स्वेच्छेने, राजीखुषीने. **willingness** *ना* [*अगण*] स्वेच्छा, राजीखुषी.

willow (तसेच **'willow-tree**) /'विलउ/ *ना* [*गण*] पातळ लवचिक फांद्या असणारे एक झाड, वाळुंज.

wilt /विल्ट्/ *क्रि* [*अक*] १ (वनस्पतींबाबत) सुकणे, वाळू लागणे, कोमेजणे. २ (*ला*) (माणसांबाबत) क्षीण होणे, हतबल होणे.

wily /'वाइलि/ *वि* (**-ier, -iest**) कावेबाज, धूर्त, लबाड.

wimp /विम्प्/ *ना* [*गण*] (*अनौप अधिक्षेपी*) पुळचट – विशेषतः पुरुष.

win /विन्/ (**-nn-**, *भूत, भूत वि* **won** /वन्/) *क्रि* १ [*अक, सक*] खेळ, स्पर्धा वगैरे जिंकणे. २ [*सक*] स्पर्धेतील यशाचे बक्षीस मिळणे, पटकावणे. ३ [*सक*] मिळवणे, संपादन करणे: *try to ~ support for one's ideas, स्वतःच्या कल्पनांना पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न करणे.* ४ (*वाक्प्र*) **win (sth) ,hands 'down** एखादी गोष्ट सहजपणे जिंकणे, हसत जिंकणे. ५ (*क्रिब*) **win sb over/round** एखाद्याचे मन वळवून त्याला आपल्या बाजूचे करणे. **win** *ना* [*गण*] यश, विजय. **winner** *ना* [*गण*] विजेता. **winning** *वि* १ जिंकणारा. २ आकर्षक; आनंददायक: *a ~ning smile, प्रसन्न स्मित/हास्य.* **winnings** *ना* [*ब.व*] जिंकलेले पैसे.

wince /विन्स्/ *क्रि* [*अक*] चेहऱ्यावर वेदना थरारणे. **wince** *ना* [*गण*] थरारणे, वेदनेची चमक.

winch /विन्च्/ *ना.* [*गण*] जड वजन उचलण्याचे किंवा ओढण्याचे रहाटासारखे यंत्र.

winch *क्रि* [*सक*] यंत्राने वजन उचलणे.

wind¹ /विन्ड्/ *ना* १ [*गण, अगण*] वारा. २ [*अगण*] व्यायामासाठी आवश्यक असा श्वास. ३ [*अगण*] पोटातील वात. ४ (*वाक्प्र*) **get wind of sth** (*अनौप*) इतरांना जे एखाद्याला कळू नये असे वाटते ते त्याला कळणे, नको ते कानावर येणे, गुणगुण लागणे. **put the wind up sb** (*अनौप*) एखाद्याला भिववणे. **wind** *क्रि* [*सक*] एखाद्याला धापा टाकायला लावणे, दमछाक करणे. **'windfall** *ना* [*गण*] १ वाऱ्याने पडलेले झाडाचे फळ. २ (*ला*) ध्यानीमनी नसताना उजळलेले भाग्य. **'wind instrument** *ना* [*गण*] फुंकून वाजवायचे वाद्य, वायुवाद्य, वाजंत्री. **'windmill** *ना* [*गण*] पवनचक्की. **'windpipe** *ना* [*गण*] घशातून फुफ्फुसांना जोडणारी श्वासनलिका. **'windscreen** (*अमे* **'windshield**) मोटारीची पुढच्या बाजूची काचेची खिडकी. **'windscreen wiper** *ना* [*गण*] मोटारीच्या पुढच्या काचेवर पडणारे पावसाचे पाणी दूर करणारे विजेवर चालणारे रबरी पट्टीसारखे एक साधन. **'windsurfing** *ना* [*अगण*] शीड बांधलेल्या फळीवर उभे राहून काठावर आदळणाऱ्या लाटांवर आरूढ होण्याचा एक खेळ. **'windsurfer** *ना* [*गण*] असा खेळ करणारा माणूस. **'wind-swept** *वि* (क) वादळ, वारे यांपासून सुरक्षित नसलेला, त्यांचा परिणाम होणारा. (ख) वाऱ्याने (केस, वेष वगैरे) विस्कटलेला. **windy** *वि* (**-ier, -iest**) खूप वारे असलेला, वारा सुटलेला : *a ~y day, वारा सुटलेला दिवस.*

wind² /वाइन्ड्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **wound** /वाउन्ड्/) १ [*अक, सक*] नागमोडी जाणे (किंवा जायला लावणे), वाकडातिकडा जाणे : *The river ~s (its way) through the countryside, ग्रामीणभागातून ही नदी नागमोडी वाहत जाते किंवा ही नदी डोंगरदऱ्यातून, रानावनातून नागमोडी वळणे घेत जाते.* २ [*सक*] गुंडाळी करणे. ३ [*सक*] (*up*)// घड्याळाला किल्ली देणे. ४ (*क्रिव*) **wind sth back, down, forward, etc** दांडा फिरवून मागे, खाली, पुढे वगैरे करणे किंवा सरकवणे : *~ a window down, (मोटारची) खिडकी खाली करणे.* **wind down** (क) (घड्याळाबाबत) मागे पडून बंद पडणे. (ख) (*अनौप*) (माणसाबाबत) आराम करणे. **wind (sth) down** (धंदा वगैरे) हळूहळू कमी करणे. **wind up** (*अनौप*) विशिष्ट ठिकाणी किंवा परिस्थितीत येऊन थबकणे, परिणती होणे : *We eventually wound up in a little cottage by the sea, शेवटी समुद्रकाठच्या एका छोट्या झोपडीत येऊन आम्ही धडकलो.* **wind (sth) up** एखादी गोष्ट संपवणे, शेवट करणे, गुंडाळणे. **wind sb up** (*अनौप*) एखाद्याला भडकवण्यासाठी त्याची खोडी काढणे, त्रास देणे.

window /'विन्डउ/ *ना* [*गण*] प्रकाश किंवा हवा येण्यासाठी केलेली खिडकी, झरोका. **'window-box** *ना* [*गण*] फुले वाढवण्यासाठी ठेवलेली खिडकीतील पेटी किंवा चौकोनी कुंडी. **'window-dressing** *ना* [*अगण*] दुकानात दर्शनी भागात आकर्षक पद्धतीने माल लावणे. **'window-pane** *ना* [*गण*] खिडकीची काच. **'window-shopping** *ना* [*अगण*] विकत घेण्याचा हेतू नसताना दुकानातला माल बघत जाणे. **'window-sill** *ना* [*गण*] खिडकीचा खालचा कट्टा, तळसरी.

wine /वाइन्/ *ना* [*गण, अगण*] द्राक्षे वगैरे फळांपासून बनविलेले मद्य, दारू, मदिरा. **wine** *क्रि* (*वाक्प्र*) **,wine and 'dine** एखाद्याचे भोजन आणि मद्य देऊन आदरातिथ्य करणे किंवा त्याला प्रसन्न करणे; असे आदरातिथ्य केले जाणे.

wing /विङ्/ *ना* १ [*गण*] पंख. २ [*गण*] विमानाचा पंख. ३ [*गण*] इमारतीची एखाद्या दिशेने वाढवलेली बाजू : *add a new ~ to a hospital, इस्पितळाला नवीन भाग जोडणे.* ४ [*गण*] चाकाभोवतीचा मोटारीचा भाग. ५ [*गण, बहुधा अे.व*] खास करून राजकीय पक्षातील विशिष्ट मते आणि कार्य असणारा गट, फळी, आघाडी : *the left/right ~, डावी/उजवी फळी.* ६ [*गण*] फुटबॉल, हॉकी वगैरेच्या मैदानाची बाजूची किंवा कडेची जागा/पट्टी. ७ **the wings** [*ब.व*] रंगभूमीवरील प्रेक्षकांना न दिसणाऱ्या बाजू, पार्श्वपट, रंगपट. ८ (*वाक्प्र*) **take sb under one's 'wing** एखाद्याला आसरा देऊन त्याचे रक्षण करणे, पंखाखाली

घेणे, पदराखाली घेणे. **wing** *क्रि* १ [*अक, सक*] उडणे. २ [*सक*] किंचित् जखमी करणे. **winged** *वि* पंख असलेला, उडणारा. **winger** *ना* [*गण*] (फुटबॉल, हॉकी वगैरे खेळात) मैदानाच्या बाजूकडून खेळणारा गडी. **'wing-span** *ना* [*गण*] पक्ष्याचे किंवा विमानाचे पंख पूर्ण पसरल्यावर होणारे अंतर.

wink /विङ्क्/ *क्रि* [*अक*] १ (*at*)// डोळे मिचकावणे. २ (तारा किंवा प्रकाश यांबाबत) चमचमणे. **wink** *ना* १ [*गण*] डोळे मिचकावून केलेली खूण, डोळा घालणे, नेत्रपल्लवी. २ [*अे.व*] झोपेचा चुटका, डुलकी : *I didn't sleep a ~, मला घटकाभर देखील झोप लागली नाही म्हणजेच जराही डोळा लागला नाही.* ३ (*वाक्प्र*) **have forty 'winks** (*अनौप*) दिवसा थोडीशी वामकुक्षी करणे, थोडावेळ पडणे.

winkle /'विङ्कल्/ *ना* [*गण*] समुद्रात सापडणारी आणि खाण्यासाठी वापरली जाणारी एक गोगलगाय.

winner, winning ➪ WIN.

winter /'विन्ट(र्)/ *ना* [*अगण, गण*] हिवाळा, थंडीचे दिवस. **winter** *क्रि* [*अक*] (*औप*) हिवाळा काढणे. **,winter 'sports** *ना* [*ब.व*] हिमावर खेळायचे खेळ, हिमक्रीडा. **wintry** /'विन्ट्रि/ *वि* हिवाळी.

wipe /वाइप्/ *क्रि* [*सक*] १ (एखादी गोष्ट) साफ किंवा कोरडी करण्यासाठी (धूळ, पाणी वगैरे) पुसणे : *~ the dishes with a cloth, फडक्याने डिशेस् पुसणे* ○ *~ the writing off the blackboard, फळ्यावरचे अक्षर पुसून टाकणे.* २ (*क्रिब*) **wipe sth out** (क) पूर्ण नाश करणे, विध्वंस करणे, नामशेष करणे : *War ~d out whole villages, युद्धात अख्खी गावंच्या गावं नष्ट झाली.* (ख) (कर्ज) रद्द करणे. **wipe sth up** एखाद्या वस्तूवर बसलेली धूळ किंवा सांडलेले पाणी वगैरे फडक्याने स्वच्छ करणे, कोरडे करणे : *W~ up the milk you spilt, तू सांडलेलं दूध पुसून घे* ○ *~ up the cups, कप कोरडे करणे.* **wipe** *ना* [*गण*] पुसणे, कोरडे करणे.

wire /'वाइअ(र्)/ *ना* १ [*गण, अगण*] तार. २ [*गण*] (*अनौप* विशेषतः *अमे*) पोस्टाची तार. **wire** *क्रि* [*सक*] १ तारेने बांधणे. २ तार जोडून विद्युत्प्रवाह सुरू करणे. ३ (*अमे*) तार पाठवणे/करणे. **wiring** *ना* [*अगण*] वीजेच्या तारांचे जाळे. **wiry** *वि* १ तारेसारखा चिवट. २ (माणसाबाबत) काटक.

wireless /'वाइअलिस्/ *ना* [*गण*] (*जुना अप्रचलित*) रेडिओ.

wisdom /'विझ़डम्/ *ना* [*अगण*] १ शहाणपण, सुजाणता. २ (*औप*) शहाणपणाचे विचार, बोधवचने, सुविचार. **'wisdom tooth** *ना* [*गण*] वयाच्या विसाव्या वर्षानंतर येणारी अक्कल दाढ.

wise /वाइझ़्/ *वि* (**~r, ~st**) १ शहाणा, सूज्ञ, जाणता. २ (*वाक्प्र*) **none the 'wiser** अधिक शहाणा न झालेला, आहे तसाच राहिलेला. **wisely** *क्रिवि* शहाणपणाने, सूज्ञपणे; विवेकाने.

wish /विश्/ *क्रि* १ [*सक*] *to*// (*औप*) एखादी गोष्ट करण्याची इच्छा असणे, मनात असणे : *He ~es to be alone, त्याला एकांत हवाय्.* २ [*सक*] (अशक्य गोष्ट) सत्य असण्याची इच्छा/आशा बाळगणे : *I ~ (that) I could be an astronaut, आपण अंतराळवीर असावं असं मला फार वाटतं.* ३ [*सक*] एखाद्याला शुभेच्छा वगैरे देणे, यश चिंतणे : *~ sb good luck/happy birthday, एखाद्याला 'गुड लक' देणे/वाढदिवसाच्या शुभेच्छा देणे.* ४ [*अक*] (*for*)// हवे ते घडावे असे वाटणे किंवा अशी प्रार्थना करणे, मनोरथ करणे : *Blow out the candles and wish!* (वाढदिवसाच्या केकवरच्या) *मेणबत्त्या फुंक आणि मनोरथ कर किंवा मनोकामना पूर्ण होवो असे म्हण.* **wish** *ना* १ [*गण*] इच्छा, कामना : *I have no ~ to interfere, but . . . , हस्तक्षेप करण्याची माझी इच्छा नाही, पण . . . .* २ [*गण*] इच्छित वस्तू, इष्ट वस्तू, ईप्सित. ३ **wishes** [*ब.व*] एखाद्याच्या भल्यासाठी (व्यक्त केलेल्या) सद्भावना, शुभेच्छा : *My father sends his best ~es, माझ्या वडलांनी शुभेच्छा/शुभकामना पाठवल्या आहेत.* **,wishful 'thinking** *ना* [*अगण*] आपली इच्छा आहे म्हणून केवळ एखादी गोष्ट खरी होईल असा विश्वास, दिवास्वप्न.

wishy-washy /'विशिवॉशी; *अमे* -वॉऽशि/

वि (*अनौप*) कसाबसा असा, यथातथा असा; संदिग्ध आणि अनिश्चित, गुळमुळीत.

wisp /विस्प्/ *ना* [*गण*] छोटी जुडी; पुंजका : *a ~ of hair/smoke, केसांचा/धुराचा पुंजका.* **wispy** *वि* पुंजक्याचा.

wistful /'विस्ट्फुल्/ *वि* गेलेल्या किंवा मिळू न शकणाऱ्या गोष्टीचा खेद करणारा, खंतावलेला. **wistfully** /-फलि/ *क्रिवि* खंतावून.

wit /विट्/ *ना* १ (क) [*अगण*] स्वतःचे विचार आकर्षक आणि चलाख रीतीने मांडण्याची क्षमता, बुद्धिचातुर्य, चमकदारपणा. (ख) [*गण*] बुद्धिचातुर्य असणारा माणूस, चतुर मनुष्य. २ (तसेच **wits**) [*अगण, ब.व*] चांगली समज; बुद्धिमत्ता. ३ (*वाक्प्र*) **at one's wits' 'end** पूर्ण भांबावलेला, बुचकळ्यात पडलेला. **have/keep one's 'wits about one** तयारीत असणे, सज्ज असणे. **scare, frighten, etc sb out of his/her 'wits** एखाद्याला खूप घाबरवून सोडणे. **witticism** /'विटिसिझम्/ *ना* [*गण*] चमकदार उक्ती, चपखल बोलणे. **witty** *वि* (**-ier, -iest**) उच्च विनोदयुक्त, खटकेबाज. **wittily** *क्रिवि* उत्तम विनोदपूर्ण शैलीत, खटकेबाजपणे.

witch /विच्/ *ना* [*गण*] चेटूक करणारी स्त्री, चेटकीण. **'witchcraft** *ना* [*अगण*] चेटुक, जादूटोणा. **'witch-doctor** *ना* [*गण*] अद्भूत शक्तीने किंवा चमत्कार करून रोग बरे करणारा माणूस. **'witch-hunt** *ना* [*गण*] अप्रिय विचार मांडणाऱ्या लोकांना धडा शिकवण्यासाठी त्यांचा केलेला शोध किंवा पाठलाग.

with /विद्, विथ्/ *शब्दयो* १ (क) सह, बरोबर, जवळ : *live ~ one's parents, स्वतःच्या आईवडलांबरोबर राहणे* ○ *discuss it ~ an expert, तज्ज्ञाबरोबर चर्चा करणे.* (ख) पाशी, जवळ : *leave a child ~ a baby-sitter, मूल सांभाळणाऱ्या व्यक्तीपाशी मूल ठेवणे.* २ असलेला, युक्त : *a coat ~ two pockets, दोन खिसे असलेला कोट* ○ *a girl ~ blue eyes, निळ्या डोळ्यांची मुलगी.* ३ (क) (साधनदर्शक) -ने : *Cut it ~ a knife, सुरीने ते काप.* (ख) (वापरलेले द्रव्य दाखविण्यासाठी वापर) -ने : *Fill the bottle ~ water, बाटली पाण्याने भर.* ४ बाजूचा, पक्षपाती : *The managers are ~ us, व्यवस्थापक आपल्याबरोबर आहेत.* ५ विरुद्ध, -शी : *argue ~ Rosie, रोझीशी वाद घालणे.* ६ -मुळे, -ने, कारणाने : *tremble ~ fear, भीतीने लटपटणे.* ७ (एखाद्या क्रियेची रीत दाखवण्यास वापर) -ने : *look at one's daughter ~ pride, स्वतःच्या मुलीकडे अभिमानाने पाहणे.* ८ -च्या दिशेने, बरोबर : *sail ~ the wind, वाऱ्याच्या दिशेने नौका नेणे.* ९ बाबत : *Be patient ~ them, त्यांच्याबाबत जरा सबुरीने घे.* १० -मुळे आणि बरोबर, -ने : *skill comes ~ experience, अनुभवाने कौशल्य येते.* ११ तरीही, एखाद्या गोष्टीसकट : *W~ all her faults, we still like her, तिच्या सर्व दोषांसकट आम्हाला ती आवडते.* १२ (*वाक्प्र*) **be 'with (sb)** (*अनौप*) एखादा काय म्हणतोय् ते समजणे : *I'm not really ~ you, I'm afraid, so could you explain it again? मला वाटतं तू काय म्हणतोयस् ते माझ्या लक्षात येत नाहीये – तू परत नीट सांगशील का सारं?* **'with it** (*जुना अप्रचलित व्रात्य*) (क) फॅशनेबल, लोकप्रिय. (ख) जाणकार, सूज्ञ.

withdraw /विद्'ड्रॉऽ; तसेच विथ्'ड्-/ *क्रि* (*भूत* **-drew** /-ड्रू/, *भूत वि* **~n** /-'ड्रॉऽन्/) १ [*सक*] (एखादी गोष्ट) काढून घेणे : *~ money from one's bank account, बँकेतील स्वतःच्या खात्यावरचे पैसे काढून घेणे.* २ [*अक, सक*] (*औप*) दूर जाणे/नेणे, हालणे/हालवणे : *~ troops from the battle, युद्धातून सैन्य काढून घेणे किंवा हालवणे.* ३ [*अक, सक*] भाग न घेणे, माघार घेणे किंवा घ्यायला लावणे : *~ from an argument, वादातून माघार घेणे.* ४ [*सक*] (वचन, निवेदन वगैरे) मागे घेणे : *If I don't have a reply by tonight I shall ~ my offer, आज रात्रीपर्यंत जर मला उत्तर मिळालं नाही तर दिलेला प्रस्ताव मी मागे घेईन.* **withdrawal** /'-ड्रॉऽअल्/ *ना* [*गण, अगण*] माघार, मागे घेणे. **withdrawal symptoms** *ना* [*ब.व*] अमली पदार्थाचे व्यसन असणाऱ्या माणसाने ते बंद केल्यानंतर त्याला भोगावे लागणारे तापदायक परिणाम. **withdrawn** *वि* (माणसाबाबत) फार शांत आणि बुजरा, लाजाळू.

wither /'विद(र्)/ *क्रि* [*अक, सक*] सुकणे/सुकवणे, कोमेजून मरणे : *The hot summer* *had ~ed the grass, कडक उन्हाळ्याने गवत* कोळपून गेले ○ (*ला*) *Their hopes ~ed, त्यांच्या आशा कोमेजल्या.* **withering** *वि* लाज वाटायला लावणारा, शरमेची भावना निर्माण करणारा : *a ~ing look, ओशाळलेपणा आणणारा कटाक्ष.*

withhold /विद्'हउल्ड्; तसेच विथ्'ह्-/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-held** /-हेल्ड्/) [*सक*] (*औप*) देण्यास नाकारणे, अडवणे, रोखून ठेवणे : ~ *permission, परवानगी रोखून धरणे.*

within /वि'दिन्/ *शब्दयो* बाहेर किंवा पलीकडे नाही; आतमधे : ~ *the city walls, शहराच्या तटबंदीच्या आत* ○ ~ *seven days, सात दिवसांच्या आत.* **within** *क्रिवि* (*औप*) आतल्याआत : *I could feel the anger rising ~, आतल्याआत माझा पारा चढत होता हे मला कळत होतं.*

without /वि'दाउद्/ *शब्दयो* १ विना, शिवाय, वाचून : *You can't buy things ~ money, पैशावाचून तुम्ही गोष्टी विकत नाही घेऊ शकत.* २ (क्रियापदाला *-ing* प्रत्यय लावून नकारार्थी वापर) : *He can't speak German ~ making mistakes,* चुका केल्याविना त्याला जर्मन *बोलता येत नाही.*

withstand /विद्'स्टॅन्ड्, तसेच विथ्'स्-/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-stood** /-'स्टुड्/) [*सक*] (*औप*) न डगमगता सहन करणे, शूरपणे झेलणे; प्रतिकार करणे : ~ *an attack, हल्ला परतवून लावणे* ○ ~ *hard weather, खराब हवामान सहन करणे.*

witness /'विट्‌निस्/ *ना* [*गण*] १ साक्षी माणूस. २ न्यायालयातील साक्षीदार. ३ एखाद्या माणसाने केलेली सही खरी आहे हे निश्चित करण्यासाठी त्या कागदपत्रावर सही करणारी व्यक्ती. ४ (*औप*) साक्ष, पुरावा. **witness** *क्रि* [*सक*] १ साक्षी असणे : ~ *an accident, अपघाताला साक्षी असणे.* २ दस्तऐवज करताना साक्षीदार होणे. **'witness-box** *ना* [*गण*] साक्षीदाराचा पिंजरा.

witticism, witty ⇨ WIT.

wives WIFE चे *ब.व.*

wizard /'विझड्/ *ना* [*गण*] १ (विशेषतः परीकथांमधे) जादूगार. २ खूप चातुर्य किंवा क्षमता असणारा माणूस, दादा : *a financial ~, अर्थव्यवहारातील दादा.*

wizened /'विझन्ड्/ *वि* सुरकुत्या पडलेला.

wobble /'वॉब्ल्/ *क्रि* [*अक, सक*] लटपटणे, डुगडुगणे, कापणे. **wobbly** *वि* (*अनौप*) लटपटणारा, डुगडुगणारा : *a wobbly chair, डुगडुगणारी खुर्ची.*

woe /वउ/ *ना* (*जुना अप्रचलित* किंवा *औप*) १ [*अगण*] मोठे दुःख, शोक. २ **woes** [*ब.व*] संकटे, अरिष्टे. **woeful** *वि* (*औप*) १ दुःखदायक. २ फार वाईट.

wok /वॉक्/ *ना* [*गण*] घमेल्याच्या आकाराचे चिनी स्वयंपाकाचे भांडे.

woke WAKE^1 चा *भूत.*

woken WAKE^1 चे *भूत वि.*

wolf /वुल्फ्/ *ना* [*गण*] (*ब.व* **wolves** /वुल्व्ह्झ्/) लांडगा. **wolf** *क्रि* [*सक*] (*down*)// (*अनौप*) हावरटाप्रमाणे बकाबका खाणे, अधाशीपणे खाणे.

woman /'वुमन्/ *ना* (*ब.व* **women** /'विमिन्/) १ [*गण*] स्त्री, बाई. २ [*अगण*] सर्वसाधारण स्त्री. ३ **the woman** [*अे.व*] स्त्रीच्या स्वभावातला स्त्रीपणा, स्त्री. **womanhood** *ना* [*अगण*] स्त्रीचे गुण, स्त्रीत्व, स्त्रीधर्म. **womanizer** *ना* [*गण*] स्त्रियांना वश करणारा किंवा नादी लावणारा पुरुष. **'womankind** *ना* [*अगण*] (*औप*) स्त्री-जात, स्त्रीवर्ग. **womanly** *वि* (स्त्रीबाबत) स्त्रीला साजेसा, स्त्रीसुलभ. **ˌWomen's Libe'ration** *ना* [*अगण*] पुरुषांप्रमाणेच आर्थिक आणि सामाजिक हक्क असण्याचे स्त्रियांचे स्वातंत्र्य, स्त्रीमुक्ती.

womb /वूम्/ *ना* [*गण*] जन्मापूर्वी मूल जेथे वाढते ते स्त्रीच्या शरीरातील इंद्रिय, गर्भाशय.

won WIN चा *भूत, भूत वि.*

wonder /'वॅन्ड(र्)/ *क्रि* १ [*अक, सक*] आश्चर्य वाटणे/करणे; स्वतःला विचारणे : *I ~ who she is, ती कोण आहे असा मला प्रश्न पडलाय्.* २ [*अक*] (विनम्रपणे विनंती करताना वापर) : *I ~ if you could come earlier, मला विचारायचंय् की तू जरा लवकर येऊ शकशील?* ३ [*अक*] (*at*)// (औप) एखाद्या गोष्टीचा अचंबा वाटणे, नवल वाटणे : *I ~*

that you weren't killed, तू मारला गेला नाहीस याचं मला नवल वाटतं. **wonder** *ना* १ (**क**) [*अगण*] आश्चर्यभावना, अचंबा. (**ख**) [*गण*] आश्चर्यचकित करणारी गोष्ट: *the ~s of modern medicine, आधुनिक अद्‌भूत औषधांची किमया* ○ *a ~ drug, विस्मयकारक औषध.* २ (*वाक्‌प्र*) **do/work wonders** अनपेक्षितपणे चांगले परिणाम घडणे. **it's a wonder that...** हे आश्चर्यकारक आहे...: *It's a ~ that they weren't all killed, ते सर्व ठार झाले नाहीत हे आश्चर्यच आहे.* **no/little/small wonder** आश्चर्य वाटायला नको, यात आश्चर्य नाही. **wonderful** *वि* फार छान, सुंदर; आश्चर्यकारक. **wonderfully** *क्रिवि* फार चांगल्या रीतीने; आश्चर्यकारक रीतीने.

wonky /'वॉङ्कि/ *वि* (*ब्रि अनौप*) डळमळीत; दुबळा.

won't /वउन्ट्/ **will not** ➪ WILL¹.

woo /वू/ *क्रि* [*सक*] १ अनुनय करणे: *~ voters, मतदारांचा अनुनय करणे.* २ (*जुना अप्रचलित*) एखाद्या स्त्रीने आपल्याशी लग्न करावे म्हणून प्रेमाराधना करणे, प्रेमयाचना करणे.

wood /वुड्/ *ना* १ [*अगण*] लाकूड, काष्ठ. २ [*गण,* बहुधा *ब.व*] अरण्यापेक्षा लहान असे वन किंवा जंगल, झाडी. ३ (*वाक्‌प्र*) **,out of the 'wood(s)** (*अनौप*) संकटातून बचावलेला, संकटमुक्त. **wooded** *वि* झाडांनी घेरलेला/झाकलेला, भोवती झाडी असलेला. **wooden** *वि* १ लाकडी. २ वागण्यात आखडू किंवा वेंधळा. **'woodland** /-लन्ड्/ *ना* [*अगण*] झाडीचा प्रदेश, राई. **'woodpecker** *ना* [*गण*] सुतार पक्षी. **'woodwind** /-विन्ड्/ *ना* [*अे.व*] (अे.व किंवा ब.व क्रियापदासह) फुंकून वाजवायची वाद्ये (किंवा त्यांचे वादक) – उदा पावा. **'woodwork** *ना* [*अगण*] १ इमारतीचा लाकूड-कामाचा भाग. २ काष्ठकला, लाकडापासून वस्तू बनविण्याची कला. **'woodworm** *ना* [*अगण, गण*] लाकूड खाणारी कीड (किंवा तिने केलेली हानी, वाळवी. **woody** *वि* (**-ier, -iest**) १ गर्द झाडीचा: *a ~y hillside, झाडी असलेली टेकडी.* २ लाकडाचा, लाकडासारखा.

woof /वुफ्/ *उद्‌गा, ना* [*गण*] (*अनौप*) कुत्र्याचे भुंकणे, भूऽ भूऽ.

wool /वुल्/ *ना* [*अगण*] (**क**) बकरी वगैरे प्राण्याची मऊ लोकर. (**ख**) लोकरीचा धागा किंवा कापड. **woollen** (*अमे* **-l-**) *वि* लोकरीचा. **woollens** (*अमे* **-l-**) *ना* [*ब.व*] लोकरीचे कपडे. **woolly** (*अमे तसेच* **-l-**) *वि* (**-ier, -iest**) १ लोकरीचा किंवा लोकरीसारखा. २ (माणसे किंवा त्यांच्या कल्पना याबाबत) गोंधळलेला; स्पष्ट नसणारा. **woolly** *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) (*अनौप*) लोकरीचा स्वेटर.

word /वऽड्/ *ना* १ [*गण*] लिखित किंवा बोललेला शब्द. २ [*गण*] शेरा किंवा निवेदन: *Don't say a ~ about it, त्याबाबत एक शब्दही/अक्षरही बोलू नकोस.* ३ [*गण*] संभाषण: *have a ~/a few ~s with sb, एखाद्याशी चार शब्द बोलणे.* ४ [*अगण*] बातमी; निरोप: *Please send me ~ of your arrival, तू कधी येणार तेव्हा निरोप धाड.* ५ [*अे.व*] वचन: *I give you my ~ that I will come back, मी परत येईन असं वचन/असा शब्द तुला देतो.* ६ (बहुधा **the word**) [*अे.व*] आज्ञा, हुकूम; आदेश: *The officer gave the ~ to fire, गोळीबार करण्याचा आदेश अधिकाऱ्याने दिला.* ७ (*वाक्‌प्र*) **by ,word of 'mouth** लिखित नाही म्हणजे तोंडी (भाषेत). **have 'words with sb** एखाद्याशी भांडण करणे, शब्दाशब्दी करणे. **in 'other words** दुसऱ्या/वेगळ्या शब्दांत सांगायचे तर. **in a 'word** थोडक्यात. **not in so many 'words** अगदी याच शब्दांत नाही पण याच अर्थाने. **take sb's 'word for it** एखाद्याच्या शब्दावर विश्वास ठेवणे. **too funny, stupid, etc for 'words** (*अनौप*) फारच किंवा शब्दांनी वर्णन करण्यापलीकडच्या विनोदी पद्धतीने वगैरे. **,word for 'word** शब्दशः. **word** *क्रि* [*सक*] शब्दांत व्यक्त करणे, शब्दबद्ध करणे. **wording** *ना* [*अे.व*] वापरलेले शब्द, शब्दप्रयोग. **,word-'perfect** *वि* अचूकपणे पाठ असलेला. **'word processor** *ना* [*गण*] टंकलिखित केलेले शब्द दुरुस्त, संपादित किंवा छापील करण्यासाठी ते वाचायला पडद्यावर दाखविण्याचे

साधन, टाइप केलेले शब्द दृश्य स्वरूपात दाखविणारे साधन. **wordy** *वि* (**-ier, -iest**) शब्दबंबाळ.

wore WEAR^1 चा *भूत.*

work^1 /वऽक्/ *ना* १ [*अगण*] पैसे मिळवण्याकरता केलेले काहीतरी, कामधंदा, नोकरी : *He's been looking for ~ for a year, गेले वर्षभर तो कामाच्या शोधात आहे.* २ [*अगण*] मानसिक किंवा शारीरिक काम : *Do you like hard ~? तुला कष्टाचे काम आवडते?* ३ [*अगण*] करायचे काम : *I've plenty of ~ to do, मला चिकार कामं आहेत.* ४ [*अगण*] केलेले काम किंवा कामाचे फळ : *the ~ of young sculptors, तरुण शिल्पकारांचे काम.* ५ [*गण*] साहित्यकृती, संगीतकृती, कलाकृती वगैरे : *the ~s of Shakespeare, शेक्सपिअरच्या कलाकृती.* ६ **works** (अे.व किंवा ब.व क्रियापदासह वापर) औद्योगिक प्रक्रिया करण्याचे ठिकाण : *a 'gas ~, खनिजवायू करण्याचे ठिकाण.* ७ **works** [*ब.व*] बांधकाम किंवा दुरुस्तीची कामे : *'road-~, रस्ता-दुरुस्तीची कामे.* ८ **the works** [*ब.व*] यंत्राचे हालणारे भाग. ९ (*वाक्प्र*) **at 'work** **(क)** कामाच्या जागी, कामावर. **(ख)** चालू, कार्यान्वित : *new technology at ~, वापरातले नवीन तंत्रज्ञान.* **set to 'work** सुरू करणे. **have one's 'work cut out** दिलेल्या वेळात काहीतरी अवघड काम करायला लागणे. **in 'work/out of 'work** नोकरी असणारा/नसणारा. **'work-bench** *ना* [*गण*] हत्यारे घेऊन काम करायचे टेबल. **'workbook** *ना* [*गण*] प्रश्न दिलेली आणि उत्तरे लिहिण्यासाठी जागा सोडलेली विद्यार्थ्यांची वही, कार्यपुस्तिका. **'work-force** *ना* [*गण*, तसेच ब.व क्रियापदासह अे.व] कारखाना, कचेरी वगैरेतील एकंदर कर्मचारी. **'workload** *ना* [*गण*] एखाद्याचा कार्यभार. **'workman** *ना* [*गण*] श्रमिक, कर्मकार. **'workmanlike** *वि* नीट केलेले, सुबक; कौशल्यपूर्ण. **'workmanship** *ना* [*अगण*] कारागिरी, कसब. **,work of 'art** *ना* [*गण*] उत्तम चित्र, शिल्प वगैरे, कलाकृती. **'workshop** *ना* [*गण*] १ वस्तू तयार करण्याची किंवा दुरुस्त करण्याची जागा, कर्मशाळा. २ सांघिक चर्चा आणि प्रत्यक्ष कृती करण्याचा काळ, कार्यशाळा. **'work-shy** *वि* कामचुकार; आळशी. **'work top** *ना* [*गण*] स्वयंपाकघारातील अन्न शिजवण्याचा ओटा.

work^2 /वऽक्/ *क्रि* १ [*अक*] काम करणे – विशेषतः नोकरी म्हणून, चाकरी करणे : *I've been ~ing hard all day, मी दिवसभर खूप काम करत आलोय्.* २ [*अक*] व्यवस्थित चालणे; चालू असणे : *The lift is not ~ing, लिफ्ट चालू नाहीये.* ३ [*अक*] फलद्रुप होणे; यशस्वी होणे : *Will your plan ~? तुझी योजना यशस्वी होईल का?* ४ [*सक*] एखाद्याला काम करायला लावणे, कार्यान्वित करणे. ५ [*सक*] चालू करणे; व्यवस्था पाहणे : *~ a mine, खाणीची व्यवस्था पाहणे.* ६ [*सक*] (जमीन) लागवडीखाली आणणे, मशागत करणे. ७ [*अक*] (*against/for*)*//* एखाद्या गोष्टीचा बोऱ्या वाजवणे/एखादी गोष्ट साध्य करणे : *a politician who ~s for peace, शांततेसाठी काम करणारा राजकीय नेता.* ८ [*सक*] दाबून, मळून, घाव घालून वगैरे आकार देणे किंवा तयार करणे : *~ clay/dough, मातीचा चिखल करणे/कणीक मळणे.* ९ [*अक, सक*] हळूहळू कष्टाने पुढे सरकणे, मार्ग काढणे : *~ one's way through a boring book, कंटाळवाणे पुस्तक हळूहळू संपवणे/वाचत आणणे.* १० (*वाक्प्र*) **work loose** ➪ LOOSE. **work to 'rule** विलंब करण्याच्या हेतूने नियमाप्रमाणेच काम करणे. **work wonders** ➪ WONDER. ११ (*क्रिब*) **work sth off** काम करून एखादी गोष्ट विसरणे किंवा तीपासून सुटका करणे : *He ~ed off his anger by digging the garden, बागेत खणून त्याने आलेला राग मागे टाकला.* **work out** **(क)** आखल्याप्रमाणे होणे : *The situation ~ed out well, परिस्थितीत हवी तशी प्रगती झाली.* **(ख)** व्यायाम करणे. **work out at sth** विशिष्ट गोष्टीइतकी, रकमेइतकी वगैरे होणे : *The total ~s out at £180, बेरीज १८० पौंडाइतकी होतेय्.* **work sb out** (*अनौप*) एखाद्याला समजून घेणे. **work sth out** **(क)** मोजून किंवा हिशेब करून काढणे : *~ out the new price, हिशेब करून नवीन किंमत ठरवणे.* **(ख)** उत्तर शोधणे; प्रश्न सोडवणे : *~ out a problem, प्रश्नावरचे उत्तर शोधणे.* **(ग)**

एखादी गोष्ट आखणे, योजणे : ~ *out a new scheme, नवीन योजना आखणे.* **work sb/ oneself up** स्वतःला/एखाद्याला खूप बेचैन/ अस्वस्थ करणे, मनाला लावून घेणे : *He gets very ~ed up about criticism, तो टीका मनाला फार लावून घेतो.* **work sth up** हळूहळू वाढवणे : ~ *up business, धंदा हळूहळू वाढवणे* ○ *I can't ~ up much energy to go out, बाहेर जाण्याइतकी ताकद मला नाही आणता येणार.* **work up to sth** परिणत होणे : *The music ~ed up to a lively finish, ते संगीत दमदार शेवटात परिणत झाले.* **worker** *ना* [*गण*] कामगार, कर्मचारी. **'work-out** *ना* [*गण*] व्यायामाचा काळ. **,work-to-'rule** *ना* [*गण*] निषेध म्हणून नियमाप्रमाणे केलेले काम.

workable /'वऽकब्‌ल्/ *वि* चांगला करता येण्याजोगा किंवा चांगला होण्याजोगा : *a ~ plan, यशस्वी होऊ शकणारी योजना.*

workaholic /,वऽक'हॉलिक्/ *ना* [*गण*] (*अनौप*) कामाविना राहू न शकणारा, कामाचे व्यसन असणारा.

working /'वऽकिङ्/ *वि* १ काम करणारा : *the ~ population, काम करणारे लोक.* २ कामाचा : ~ *hours/clothes, कामाचे तास/ कामावरचा पोषाख.* ३ कामचलाऊ : *a ~ knowledge of Russian, रशियनचे कामचलाऊ किंवा कामापुरते ज्ञान.* ४ (*वाक्प्र*) **in 'working order** काम करू शकणारा, चालू. **working** *ना* १ **workings** [*ब.व*] यंत्र, संघटना वगैरेची कार्यपद्धती. २ [*गण*] खाण. **the ,working 'class** *ना* [*गण*] समाजातला श्रमजीवी किंवा कष्टकरी वर्ग. **,working-'class** *वि* श्रमजीवीवर्गाचा. **'working party** *ना* [*गण*] विशिष्ट विषयावर काम करणाऱ्या माणसांचा गट.

world /वऽल्ड्/ *ना* १ **the world** [*अ.व*] (क) पृथ्वीवरील देश आणि त्यातली माणसे, जग. (ख) विशिष्ट जग : *the French-speaking ~, फ्रेंच भाषकांचे जग.* २ [*गण*] ग्रह : *life on other ~s, इतर ग्रहांवरील जीवन.* ३ [*गण*] अस्तित्वकाळ आणि अस्तित्वस्थिती, लोक : *this ~ and the next, हे जग आणि यानंतरचे जग म्हणजेच इहलोक आणि परलोक.* ४ **the world** [*अ.व*] (क) संसार, प्रपंच : *a man/ woman of the ~, प्रापंचिक पुरुष/स्त्री म्हणजेच जगाचा अनुभव असणारी व्यक्ती.* (ख) प्रत्येकजण : *I don't want the whole ~ to know about it, मला सगळ्या जगाला हे कळायला नकोय्.* ५ [*गण*] विशिष्ट प्रकारचे लोक किंवा वस्तू, विशिष्ट काम करणारे प्राणी किंवा लोक : *the insect ~, किड्यांचे जग* ○ *the ~ of sport, क्रीडाजगत्.* ६ (*वाक्प्र*) **how, why, where, etc in the world** (जोर देण्यासाठी वापर) : *How in the ~ did you manage to do it? तू कसं काय बुवा ते करू शकलास?* **,out of this 'world** (*अनौप*) निश्चितपणे आश्चर्यकारक, नामी. **a/ the 'world of difference/good, etc** (*अनौप*) मोठा फरक वगैरे : *My holiday did me a ~ of good, सुट्टीमुळे मला खूप फरक पडला.* **,world-'class** *वि* सर्वोत्कृष्ट, सर्वोत्तम, अव्वल दर्जाचा. **,world-'famous** *वि* जगविख्यात, विश्वविख्यात. **worldly** *वि* १ ऐहिक, लौकिक. २ जगाचा अनुभव असलेला. **worldliness** *ना* [*अगण*] ऐहिकता, लौकिकता; अनुभवीपणा. **,world 'power** *ना* [*गण*] महासत्ता, जगातील एक शक्तिशाली देश. **,world 'war** *ना* [*गण*] जागतिक युद्ध, महायुद्ध. **,world-'wide** *वि, क्रिवि* सर्वत्र असणारा, घडणारा, जगभरचा.

worm /वऽम्/ *ना* [*गण*] १ (क) किडा, कीटक, कृमी. (ख) कीटकाची एक अवस्था, अळी : *'wood~, लाकूड पोखरणारी कीड, वाळवी.* २ (*अनौप अधिक्षेपी*) क्षुद्र, दुबळा माणूस. **worm** *क्रि* [*अक, सक*] हळूहळू किंवा कष्टाने वाट काढणे : *He ~ed his way through the narrow tunnel, त्या अरुंद बोगद्यातून त्याने वाट काढली.*

worn¹ WEAR¹ चे *भूत वि.*

worn² /वॉऽन्/ *वि* वापरून खराब झालेला, जुना. **,worn-'out** *वि* १ वापरून बाद झालेला, झिजलेला. २ खूप दमलेला.

worry /'वरि/ *क्रि* (*भूत, भूत वि* -ied) १ [*अक*] (*about*)// एखाद्या व्यक्तीची/गोष्टीची काळजी करणे/वाटणे, चिंता करणे : *I'm worried about my son, मला मुलाची काळजी वाटते.* २ [*सक*] एखाद्याला काळजीत टाकणे,

त्रास देणे. ३ [सक] दातात पकडून हालवणे, लचके तोडणे: *The dog was ~ing a rat, कुत्रा घुशीचे लचके तोडत होता.* **worried** *वि* सचिंत, चिंताक्रांत; त्रासलेला. **worry** *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] चिंता, काळजी. २ [*गण*] चिंता उत्पन्न करणारे काही; वैताग देणारी गोष्ट. **worrying** *वि* काळजीयुक्त, काळजीकारक.

worse /वऽस्/ BAD चे *तरभाववदर्शक वि* १ इतका चांगला नसलेला, कमी दर्जाचा: *Her work is bad, but his is ~, तिचे काम वाईट आहे, पण त्याचे काम तिच्याहूनही अधिक वाईट आहे.* २ प्रकृतीने वाईट, खराब तब्येतीचा: *She got ~ in the night, रात्री तिची तब्येत जास्त बिघडली.* ३ (*वाक्प्र*) **be none the 'worse (for sth)** (एखाद्या गोष्टीचा) वाईट परिणाम न होणे, एखाद्या गोष्टीमुळे काही न बिघडणे. **the ,worse for 'wear** खूप वापरल्याने खराब झालेले, दमलेले वगैरे. **worse** *क्रिवि* १ अधिक वाईट: *She cooks badly, but I cook ~, ती स्वयंपाक वाईट करते पण मी त्याहूनही वाईट.* २ पूर्वीपेक्षा जास्त: *It's raining ~ than ever, कधीही नव्हता इतका पाऊस पडतोय्.* ३ (*वाक्प्र*) **,worse 'off** अधिक दरिद्री, दुःखी किंवा खराब तब्येतीचा. **worse** *ना* [*अगण*] अधिक वाईट गोष्टी. **worsen** *क्रि* [*अक, सक*] अधिक वाईट होणे/करणे, बिघडणे/बिघडवणे.

worship /'वऽशिप्/ *ना* [*अगण*] १ देवाविषयी भक्तिभाव, प्रेम किंवा आदर. २ एखाद्यावरचे प्रेम, कौतुक, ममत्व. **worship** *क्रि* (**-pp-**; *अमे* **-p-**) [*अक, सक*] आदर करणे, मानणे, पूजा करणे. **worshipper** (*अमे* **-p-**) *ना* [*गण*] भक्त.

worst /वऽस्ट्/ BAD चे *उच्चतमभाववदर्शक वि* सर्वात वाईट किंवा हीन प्रतीचा: *the ~ storm for years, कैक वर्षांतील सर्वात वाईट वादळ.* **worst** *क्रिवि* अतिशय वाईट रीतीने. **worst** *ना* १ **the worst** [*अ.व*] सर्वात वाईट भाग, परिस्थिती, घटना वगैरे. २ (*वाक्प्र*) **at (the) 'worst** वाईटात वाईट, जास्तीत जास्त वाईट (म्हणजे). **if the ,worst comes to the 'worst** सर्वात वाईट गोष्ट घडली तरी.

worth /वऽथ्/ *वि* १ किंमत: *a car ~ £5000, ५००० पौंड किमतीची गाडी.* २ (एखादी गोष्ट करण्याचे) चीज करणारा, श्रेयस्कर: *The book is ~ reading, पुस्तक वाचण्यासारखे/वाचण्याच्या लायकीचे आहे.* ३ (*वाक्प्र*) **for ,all one is 'worth** (*अनौप*) सर्वशक्तीने, पराकाष्ठा करून. **'worth it** पैसा, वेळ, खटपट वगैरे सार्थकी लागेल असा. **,worth sb's 'while** एखाद्याला उपयुक्त, साजेसा किंवा हितकारक. **worth** *ना* [*अगण*] १ एखादी वस्तू विकत घेण्यासाठी लागणारे पैसे, किंमत: *a pound's ~ of apples, एक पौंड किमतीची सफरचंदे.* २ मूल्य, किंमत, महत्त्व. **worthless** *वि* १ किंमत नसलेला, क्षुल्लक, फालतू. २ (माणसाबाबत) दुर्गुणी. **worth'while** *वि* पैसा, शक्ती, वेळ वगैरे खर्च करण्यास योग्य असा, लायकीचा.

worthy /'वऽदि/ *वि* (**-ier, -iest**) १ (*of*)// योग्य, पात्र: *~ of blame, दोषास्पद, नावे ठेवण्यासारखा.* २ आदरणीय.

would^{1} /वड्; अधिक बलयुक्त रूप वुड्/ *अभिद क्रि* (*संक्षेप* **'d** /ड्/, *नकार* **would not**, *संक्षेप* **wouldn't** /'वुड्न्ट्/) १ (क) (कल्पित गोष्टीचा परिणाम सांगताना वापर): *If he shaved his beard off, he ~ look much younger, त्याने दाढी काढून टाकली तर तो खूप तरुण दिसेल.* (ख) (नम्र विनंती करताना वापर): *W~ you open a window, please? कृपया एक खिडकी उघडाल का?* २ (मत व्यक्त करताना वापर): *I ~ think the film will last about 90 minutes, मला वाटतं हा चित्रपट ९० मिनिटे चालेल किंवा ९० मिनिटांचा आहे.* ३ (प्रस्ताव मांडताना, निमंत्रण देताना किंवा आग्रह करताना वापर): *W~ you like a sandwich? तुला सँडविच देऊ?* ४ (इच्छा किंवा आवड व्यक्त करताना वापर): *I'd love a cup of coffee, मला एक कप कॉफी आवडेल.* **'would-be** *वि* भावी, होऊ घातलेला: *a ~-be artist, भावी कलाकार.*

would^{2} WILL^{1} चा *भूत.*

wouldn't १ would not ➪ WILL^{1}. २ would not ➪ WOULD^{1}.

wound^{1} /वून्ड्/ *ना* [*गण*] जखम, इजा: *a bullet ~, (बंदुकीच्या) गोळीने झालेली जखम.* **wound** *क्रि* [*सक*] १ जखम करणे, जखमी

करणे. २ (एखाद्याच्या भावना वगैरे) दुखावणे.

wound^{2} WIND^{2} चा *भूत, भूत वि.*

wove WEAVE चा *भूत.*

woven WEAVE चे *भूत वि.*

wow /वाउ/ *उद्‌वा (अनौप)* (आश्चर्य किंवा कौतुक व्यक्त करताना वापर) वाः!

wrangle /'रॅङ्‌ग्ल्/ *क्रि [अक] ना [गण]* वादावादी (होणे), बाचाबाची (करणे).

wrap /रॅप्/ *क्रि* (-**pp**-) *[सक]* १ कशात तरी गुंडाळणे, झाकणे; भोवतालून वेष्टण घालणे : *~ (up) a parcel, पार्सल वेष्टणात घालणे ○ W~ a cloth round your leg, तुझ्या पायाला कापड गुंडाळ.* २ *(वाक्प्र)* **be wrapped up in sb/sth** *(अनौप)* एखाद्या व्यक्तीत/गोष्टीत गुंतून पडणे. ३ *(क्रिब)* **wrap (sb/oneself) up** स्वतःला/एखाद्याला गरम कपडे घालणे. **wrap sth up** *(अनौप)* (काम, करार वगैरे) पूर्ण करणे. **wrap** *ना [गण]* स्कार्फसारखा बाहेरून अंगावर घ्यायचा कपडा. **wrapper** *ना [गण]* कागदाचे वेष्टण. **wrapping** *ना [गण, अगण]* वेष्टणासाठी वापरायची गोष्ट.

wrath /रॉथ्; *अमे* रॅथ्/ *ना [अगण] (औप किंवा जुना अप्रचलित)* क्रोध.

wreak /रीक्/ *क्रि [सक] (औप)* (हानिकारक गोष्ट) घडवणे.

wreath /रीथ्/ *ना [गण] (ब.व* ~**s** /रीद्झ्/) विशेषतः समाधीवर वाहायचे पुष्पचक्र.

wreathe /रीद्/ *क्रि [सक] (in/with)// (औप)* (बहुधा कर्मणी) वेढणे, लपेटणे : *hills ~d in mist, धुक्याने लपेटलेल्या टेकड्या.*

wreck /रेक्/ *ना [गण]* १ अपघातामधे चक्काचूर झालेली गाडी, विमान वगैरे. २ वादळात मोडतोड झालेले जहाज. ३ *(अनौप)* तब्येत ढासळलेला माणूस, खालावलेला माणूस. **wreck** *क्रि [सक]* नष्ट करणे : *The train had been ~ed by vandals, गुंडांनी आगगाडीची नासधूस केलेली होती ○ (ला) The weather ~ed all our plans, हवेने आमच्या सर्व योजनांचा धुव्वा उडवला.* **wreckage** *ना [अगण]* नासधूस झालेले अवशेष, भग्नावशेष, फूटतूट.

wren /रेन्/ *ना [गण]* तपकिरी रंगाचा गाणारा एक छोटा पक्षी.

wrench /रेन्च्/ *क्रि [सक]* १ जोरात ढकलणे/ओढणे, हिसका देणे, पिरगळणे : *~ a door open, दरवाजा हिसका देऊन उघडणे.* २ (पाय वगैरे) मुरगळणे. **wrench** *ना* १ *[गण]* हिसका. २ *[गण] (अमे)* स्पॅनर, पाना. ३ *[ए.व]* दुःखद किंवा क्लेशकारक वियोग, ताटातूट.

wrestle /'रेस्ल्/ *क्रि [अक]* १ *(with)//* कुस्ती करणे, झोंबी घेणे. २ *with//* (प्रश्नाशी) झोंबी घेणे, (प्रश्नाला) भिडणे. **wrestler** *ना [गण]* कुस्तीगीर, पहिलवान.

wretch /रेच्/ *ना [गण]* दुर्दैवी माणूस; ब्याद.

wretched /'रेचिड्/ *वि* १ दुःखी, हैराण : *His stomach-ache made him feel ~, पोटदुखीने तो अगदी हैराण झाला.* २ अतिशय त्रस्त करणारा, दुःख देणारा. ३ *(अनौप)* वैताग आणणारा : *That ~ dog! ते वैताग आणणारं कुत्रं!* **wretchedly** *क्रिवि* दुःखाने, हैराण होऊन; वैतागाने. **wretchedness** *ना [अगण]* दुःखी भावना, क्लेश.

wriggle /'रिग्ल्/ *क्रि* १ *[अक, सक]* चुळबूळ करणे : *Stop wriggling and sit still! चुळबूळ न करता स्वस्थ बस!* २ *(क्रिब)* **wriggle out of doing sth** *(अनौप)* अप्रिय गोष्ट करण्याचे टाळणे, हात झटकणे, अंग काढून घेणे. **wriggle** *ना [गण]* चुळबूळ.

wring /रिङ्/ *क्रि (भूत, भूत वि* **wrung** /रंङ्/) *[सक]* १ *(out)//* (ओला कपडा वगैरे) पिळणे. २ *(ला)* एखाद्याकडून (पैसे, कबुली वगैरे) बळजबरीने काढणे, उकळणे, द्यायला लावणे. ३ (पक्ष्याची) मान मुरगाळणे. ४ *(वाक्प्र)* **,wring one's 'hands** दुःखाने, काळजीने हातपाय झाडणे, आळोखेपिळोखे देणे. **,wringing 'wet** गच्च ओला. **wringer** *ना [गण]* ओले कपडे पिळण्याचे यंत्र.

wrinkle /'रिङ्क्ल्/ *ना [गण, बहुधा ब.व]* वयामुळे त्वचेवर पडणारी सुरकुती. **wrinkle** *क्रि [अक, सक]* सुरकुत्या पडणे/पाडणे. **wrinkly** *वि* सुरकुत्यांचा.

wrist /रिस्ट्/ *ना [गण]* मनगट. **'wrist watch** *ना [गण]* मनगटी घड्याळ.

writ /रिट्/ *ना* [*गण*] एखाद्याला एखादी गोष्ट करण्याचा किंवा न करण्याचा हुकूम देणारे अधिकृत कायदेशीर पत्र, लेखी ताकीद.

write /राइट्/ *क्रि* (*भूत* **wrote** /रउट्/, *भूत वि* **written** /'रिट्न्/) १ [*अक, सक*] लिहिणे, लेखन करणे. २ [*सक*] लिखित स्वरूपात देणे, लिहून काढणे : *~ a report/book, अहवाल/पुस्तक लिहिणे.* ३ [*अक, सक*] (पत्र) लिहिणे आणि पाठवणे : *She promised to ~ to me every week, दर आठवड्याला पत्र पाठवीन असे तिने मला कबूल केले.* ४ [*सक*] हवी ती माहिती लिहून पूर्ण करणे, लिहून देणे, भरणे : *~ a cheque,* चेक *लिहिणे.* ५ (*वाक्प्र*) **be written all over sb's 'face** एखाद्याच्या चेहऱ्यावरून स्पष्ट होणे, चेहरा सांगणे. ६ (*क्रिब*) **write sth down** कागदावर उतरवणे. **write off/away (to sb/sth)** (एखाद्या कंपनीला वगैरे) पत्र लिहून माहिती विचारणे, माल मागवणे वगैरे. **write sb/sth off** (क) एखाद्याचे नाव टाकणे, झटकून टाकणे. (ख) दुरुस्त करता येणार नाही इतके नुकसान करणे. (ग) (कर्ज) माफ करणे. **write sth out** पूर्ण लिहून काढणे. **write sth up** एखाद्या गोष्टीची पूर्ण लेखी नोंद करणे. **'write-off** *ना* [*गण*] दुरुस्ती पलीकडे मोडतोड झालेले वाहन. **'write-up** *ना* [*गण*] घटनेचा लेखी वृत्तांत.

writer /'राइट(र्)/ *ना* [*गण*] १ लेखनिक. २ लेखक.

writhe /राइद्/ *क्रि* [*अक*] वेदनेने गडाबडा लोळणे, दुःखाने तडफडणे.

writing /'राइटिङ्/ *ना* १ [*अगण*] लिहिणे, लेखनकृती; लिहिलेला किंवा छापलेला मजकूर. २ [*अगण*] हस्ताक्षर. ३ **writings** [*ब.व*] लेखकाच्या लिखित (साहित्य)कृती, ग्रंथसंपदा. **'writing-paper** *ना* [*अगण*] (बहुधा चांगल्या प्रतीचा) पत्रे लिहिण्याचा कागद.

written WRITE चे *भूत वि.*

wrong /रॉङ्; *अमे* रॉऽङ्/ *वि* १ नैतिकदृष्ट्या अयोग्य, गैर : *It is ~ to steal, चोरी करणे वाईट आहे.* २ असत्य किंवा चूक, चुकलेला, गल्लत झालेला : *a ~ answer,* चुकीचे उत्तर ○ *prove that sb is ~,* एखादा चुकतोय् असे *सिद्ध करणे.* ३ चुकीचा, भलता, अनिष्ट : *catch the ~ train, चुकीची गाडी पकडणे.* ४ बिघडलेला : *What's ~ with the engine? इंजिनाला काय झालंय्?* **wrong** *क्रिवि* १ चुकीच्या पद्धतीने : *You've spelt my name ~, तू माझं नाव चुकीचं लिहिलंयस्.* २ (*वाक्प्र*) **go 'wrong** (क) चूक करणे, प्रमाद घडणे. (ख) (यंत्राबाबत) नीट काम न करणे, नीट न चालणे. (ग) वाईट परिणाम होणे, अयशस्वी होणे. **wrong** *ना* १ [*अगण*] जे चूक/अयोग्य आहे ते : *know the difference between right and ~,* बरोबर *काय आणि चूक काय यातला फरक कळणे.* २ [*गण*] (*औप*) अन्याय्य कृती. ३ (*वाक्प्र*) **in the 'wrong** चुकीस जबाबदार; दोषी, अपराधी. **on the wrong 'track** ➪ TRACK. **wrong** *क्रि* [*सक*] अन्याय करणे, गैर वागणूक देणे. **'wrongdoer** *ना* [*गण*] अन्याय करणारा. **'wrongdoing** *ना* [*अगण*] अन्याय करणे, चुकी. **wrongful** *वि* अन्याय्य, बेकायदेशीर, अनुचित : *~ful dismissal (from a job), (नोकरीवरून) अन्याय्य रीतीने कमी करणे, अवैध बडतर्फी.* **wrongfully** *क्रिवि* अन्यायकारकपणे, अयोग्य रीतीने. **wrongly** *क्रिवि* चुकीने, गैर पद्धतीने.

wrote WRITE चा *भूत.*

wrought iron /ˌरॉऽट् 'आइ·अन्/ *ना* [*अगण*] घडीव लोखंड.

wrung WRING चा *भूत, भूत वि.*

wry /राइ/ *वि* १ किंचित् उपरोधिक : *a ~ smile, उपरोधिक हसू.* २ नापसंतीदर्शक वाकडातिकडा : *a ~ face, वाकडातिकडा केलेला चेहरा.* **wryly** *क्रिवि* उपरोधिकपणे; त्रासून.

X x

X, x /अेक्स्/ *ना* [*गण*] (*ब.व* **X's, x's** /'अेक्सिझ़्/) १ इंग्रजी वर्णमालेतील चोविसावे अक्षर. २ रोमन संख्येचा १० आकडा. ३ (*गणित*) माहीत नसलेली राशी, क्ष.

xenophobia /ˌझ़ेन'फउबिअ/ *ना* [*अगण*] परकीय माणसांची प्रचंड भीती किंवा कमालीची नावड, परकीयभीतिगंड.

Xerox /'झ़िअरॉक्स्/ *ना* [*गण*] (*मालक*) (**क**) छायाचित्रप्रती काढणारे यंत्र. (**ख**) झेरॉक्स प्रत. **xerox** *क्रि* [*सक*] झेरॉक्स यंत्रावर प्रत काढणे.

Xmas /'क्रिस्मेस्, 'अेक्स्मस/ *ना* [*अगण, गण*] (*अनौप*) ख्रिसमस्, नाताळ.

X-ray /'अेक्स् रेइ/ *ना* [*गण*] (**क**) घनवस्तूतून आरपार जाऊ शकणारे आणि घनवस्तूंचा आतील भाग दाखविणारे एकप्रकारचे किरण, क्ष-किरण. (**ख**) क्ष-किरणांच्या साहाय्याने काढलेले छायाचित्र : *a chest ~, छातीचा एक्स्-रे.* **X-ray** *क्रि* [*सक*] एखाद्याचा एक्स्-रे काढणे किंवा त्याच्यावर क्ष-किरणांचा उपचार करणे.

xylophone /'झ़ाइलफउन्/ *ना* [*गण*] लाकडाच्या पट्ट्यांवर छोट्या लाकडी हातोड्या मारून वाजवावयाचे एक वाद्य.

Y y

Y, y /वाइ/ *ना* [*गण*] (*ब.व* **Y's, y's** /वाइझ़/) इंग्रजी वर्णमालेतील पंचविसावे अक्षर. **Y-fronts** *ना* [*ब.व*] (*ब्रि मालक*) पुढे उलट्या Y च्या आकाराची फट असलेली आणि दुणी असलेली पुरुषांची आतली चड्डी.

yacht /यॉट्/ *ना* [*गण*] **१** विशेषतः नौकानयनस्पर्धेत वापरायची हलकी शिडाची नौका, विहारनौका. **२** मोटरवर चालणारी मोठी विहार नौका. **yachting** *ना* [*अगण*] अशा नौका चालविण्याची कला किंवा त्यांच्या स्पर्धा.

yam /यॅम्/ *ना* [*गण*] (कोनफळाच्या किंवा सुरणाच्या जातीचा) पांढरा कंद येणारी वेल.

Yank /यॅङ्क्/ *ना* [*गण*] (*ब्रि अनौप अधिक्षेपी*) अमेरिकन माणूस.

yank /यॅङ्क्/ *क्रि* [*अक, सक*] (एखादी गोष्ट) एकदम जोरात ओढणे, उपटणे, उपसणे.

yap /यॅप्/ *क्रि* (**-pp-**) [*अक*] **१** (कुत्र्याबाबत) भुंकणे. **२** (*अनौप*) वेड्यासारखी जोरजोरात बडबड करणे.

yard^{1} /याड्/ *ना* [*गण*] लांबी मोजायचे एक परिमाण, ३ फूट किंवा ०.९१४ मीटर इतकी लांबी. **'yardstick** *ना* [*गण*] (*ला*) मोजमाप, मोजपट्टी.

yard^{2} /याड्/ *ना* [*गण*] **१** (बहुधा बंदिस्त असे) इमारतीजवळचे पक्क्या जमिनीचे अंगण, वाडगे. **२** विशिष्ट प्रकारच्या कार्याकरता बंदिस्त जागा, आवार : *a 'ship-~, जहाजांचा तळ.*

yarn /यान्/ *ना* **१** [*अगण*] विणण्याचा धागा, सूत. **२** [*गण*] (*अनौप*) कथा, गोष्ट.

yawn /यॉऽन्/ *क्रि* [*अक*] **१** कंटाळून किंवा झोपेला आल्यावर जांभई देणे. **२** आ वासणे : *a ~ing gap, आ वासलेली दरी.* **yawn** *ना* [*गण*] जांभई देणे, जांभई.

yd *संरू* (*ब.व* **~s**) yard^{1} यार्ड.

yeah /येअ/ *उद्वा* (*अनौप*) होय, हो.

year /यिअ(र्), तसेच यऽ(र्)/ *ना* [*गण*] **१** पृथ्वीला सूर्याभोवती एक प्रदक्षिणा घालण्यास लागणारा काळ, वर्ष. **२** १ जानेवारी ते ३१ डिसेंबर हा ३६५ (किंवा ३६६) दिवसांचा काळ, वर्ष. **३** संस्थेचे वगैरे कामकाजाचे वर्ष : *the financial/school ~, आर्थिक/शालेय वर्ष.* **४** (*वाक्प्र*) **,all (the) year 'round** वर्षभर. **year 'in, year ,out, year after 'year** वर्षानुवर्षे, खूप वर्षे. **yearly** *वि, क्रिवि* वर्षातून एकदा किंवा दरसाल होणारा, वार्षिक.

yearn /यऽन्/ *क्रि* [*अक*] *for, to//* आस लागणे : *He ~ed for his home, त्याला घराचा ध्यास लागला.* **yearning** *ना* [*गण, अगण*] आस, तीव्र इच्छा, ओढ.

yeast /यीस्ट्/ *ना* [*गण, अगण*] बियर, मद्य करण्यासाठी किंवा पाव हलका करण्यासाठी वापरायचे द्रव्य, किण्व, खमीर.

yell /येल्/ *क्रि* [*अक, सक*] केकाटणे, कोकलणे, मोठ्याने ओरडणे. **yell** *ना* [*गण*] आरोळी.

yellow /'येलउ/ *वि* **१** सोन्यासारखा पिवळा. **२** (*अनौप अधिक्षेपी*) घाबरट, भेकड, भागुबाई. **yellow** *क्रि* [*अक, सक*] पिवळे पडणे/करणे : *The papers had ~ed with age, जुने झाल्यामुळे कागद पिवळे पडले होते.* **yellowish** *वि* पिवळसर. **,yellow 'pages** *ना* (अे.व किंवा ब.व क्रियापदासह) दूरध्वनि-निर्देशिकेतील कंपन्यांबाबतची माहिती देणारी वेगळी पिवळी पाने, कंपन्यांची त्यांच्या सेवेनुसार यादी असलेली दूरध्वनि-निर्देशिका.

yelp /येल्प्/ *क्रि* [*अक*] *ना* [*गण*] विशेषतः वेदनेने ओरडणे, किंचाळणे, किंकाळी.

yen^1 /येन्/ *ना* [*गण*] (*ब.व* **yen**) जपानमधील एक नाणे.

yen^2 /येन्/ *ना* [बहुधा *अ.व*] (*अनौप*) इच्छा : *a ~ to visit India, भारताला भेट देण्याची इच्छा.*

yes /येस्/ *उद्वा* (संमती, होकार वगैरे देताना वापर) हो, होय : *Y~, I'll come with you, हो, मी तुझ्याबरोबर येईन.* **yes** *ना* [*गण*] 'हो' हा शब्द किंवा उत्तर.

yesterday /'येस्टडि, -डेइ/ *क्रिवि, ना* [*अगण*] १ काल. २ परवापरवाच, थोड्या दिवसांपूर्वी, अगदी अलीकडे.

yet /येट्/ *क्रिवि* १ आत्तापावेतो, अद्याप, आजपर्यंत; तोपर्यंत : *They haven't come ~, ते अद्याप आलेले नाहीत.* २ भविष्यकाळात : *She may surprise us all ~, ती आपणा सर्वांनाच अजूनही/पुढे थक्क करेल.* ३ आणखी : *~ another government report, आणखी एक सरकारी अहवाल.* ४ अद्याप : *I have ~ to meet him, मला अजून/अद्याप त्याला भेटायचंय् म्हणजेच मी त्याला अजून भेटलेलो नाही.* ५ (*वाक्प्र*) **as 'yet** अद्याप पावेतो, आजपावेतो, तोपर्यंत. **yet** *उ.अव्यय* पण (त्याचवेळी) : *a clever ~ simple idea, हुशारीची पण साधी कल्पना.*

yew (तसेच **'yew-tree**) /यू/ *ना* [*गण*] तांबडी फळे येणारे गडद हिरव्या पानांचे एक झाड.

Y-fronts ➪ Y, y.

yield /यील्ड्/ *क्रि* १ [सक] स्वाभाविकपणे देणे, निपजणे, उत्पन्न होणे : *The tax increase would ~ £10 million a year, करवाढीतून १० लाख पौंडाचे उत्पन्न मिळेल.* २ [*अक*] (*to*)// (*औप*) बळी पडणे, शरण जाणे : *~ to temptation, मोहाला बळी पडणे.* ३ [सक] (*औप*) हवाली करणे. **yield** *ना* [*गण*] उत्पन्न, निपज : *a ~ of three tonnes of wheat per hectare, दर हेक्टरला तीन टन गव्हाचे उत्पन्न.* **yielding** *वि* १ सहज वाकणारा, नमणारा. २ (*ला*) इतरांच्या इच्छा मानणारा, वश होणारा.

yippee /'यिपी/ *उद्वा* (*अनौप*) (आनंद किंवा उत्कंठा व्यक्त करण्यास वापर) हुर्यो! आहा!

yodel /'यउड्ल्/ *क्रि* (**-ll-**; *अमे* **-l-**) [*अक, सक*] आवाज वर-खाली करत गाणे.

yoga /'यउग/ *ना* [*अगण*] ध्यान करण्याची आणि आत्मसंयमनाची हिंदू पद्धती, योग.

yoghurt /'यॉगट; *अमे* 'यउगर्ट्/ *ना* [*अगण, गण*] दूध विरजून केलेला एक किंचित् घट्ट, आंबट अन्नपदार्थ.

yoke /यउक्/ *ना* १ [*गण*] गाडीला किंवा नांगराला जुपलेल्या बैलाच्या मानेवर ठेवलेले लाकडी जोखड, जू, धुरा. २ [*अ.व*] (*औप ला*) जाचक निर्बंध : *freed from the ~ of slavery, गुलामगिरीच्या जोखडातून सुटका झालेला.*

yokel /'यउक्ल्/ *ना* [*गण*] (*गंमत किंवा अधिक्षेपी*) साधा खेडवळ माणूस, पावटा.

yolk /यउक्/ *ना* [*गण, अगण*] अंड्यातील पिवळा बलक.

yonder /'यॉन्ड(र्)/ *वि, क्रिवि* (*पुरा*) पलीकडे किंवा पलीकडचा, पैलतीरी.

you /यू/ *सना* (क्रियापदाचा कर्ता, क्रियापद किंवा शब्दयोगीचे कर्म म्हणून वापर) १ ज्याच्याशी बोलताहोत तो माणूस किंवा ती माणसं, तू, तुम्ही, आपण. २ (*अनौप*) प्रत्येकजण; कुणीही : *It's easier to cycle with the wind behind ~, वारा जर तुमच्या मागून येत असेल तर सायकल चालवणे अधिक सोपे जाते.*

you'd /यूड्/ १ you had ➪ HAVE. २ you would ➪ WILL^1, WOULD^1.

you'll /यूल्/ you will ➪ WILL^1.

young /यैङ्/ *वि* (**~er** /-ङ्ग(र्)/, **~est** /-ङ्गिस्ट्/) तरुण, वयाने लहान : *a ~ woman/nation, तरुण स्त्री/राष्ट्र.* **young** *ना* [*ब.व*] १ वयाने लहान असलेला प्राणी किंवा पक्षी; पिलू, बालक. २ **the young** तरुण मुले/स्त्री-पुरुष. **youngish** *वि* खूप तरुण. **youngster** /-स्ट(र्)/ *ना* [*गण*] तरुण माणूस.

your /यॉऽ(र्); *अमे* युअर/ *वि* तुझा, तुमचा, आपला : *How old are ~ children? तुझी मुलं किती वर्षांची आहेत?* **yours** /यॉऽझ़्; *अमे*

युअझ़/ *सना* १ तुझा, तुमचा, आपला : *Is that book ~s? ते पुस्तक तुझंय् का?* २ (बहुधा **Yours**) (पत्राच्या शेवटी वापर) : *Y~s faithfully/sincerely/truly, आपला विश्वासू/ तुझाच.*

you're /युअ(र्), तसेच यॉऽ(र्)/ you are ➪ BE.

yourself /यॉऽ'सेल्फ़; *अमे* युअर्'सेल्फ़/ *सना* (*ब.व* **-selves** /-'सेल्व्ह्झ़/) १ (एखादा माणूस किंवा माणसे करत असलेल्या कृतीचा परिणाम त्यांच्यावरच होत असेल तेव्हा आत्मवाचक म्हणून वापर) तुला स्वतःला, तुम्हाला स्वतःला : *Have you hurt ~? तू स्वतःलाच लागवून घेतलंस् का?* २ (जोर देण्यासाठी वापर) : *You told me so ~, तू स्वतःच मला तसं सांगितलंस्.* ३ (*वाक्प्र*) **(all) by your'self / your'selves** (क) एकट्याने. (ख) कुणाच्या मदतीशिवाय.

youth /यूथ्/ *ना* (*ब.व* **~s** /यूद्झ़/) १ [*अगण*] यौवनावस्था, यौवनकाल, तारुण्यावस्था, तारुण्यकाल : *in my ~, माझ्या तरुणपणात.* २ [*गण*] तरुण माणूस, युवक. ३ (तसेच **the youth**) (ब.व क्रियापदासह अे.व) तरुणवर्ग, युवक. **youthful** *वि* तरुण; तरुण दिसणारा : *a ~ful appearance, तारुण्यपूर्ण दिसणे.* **'youth hostel** *ना* [*गण*] सुट्टीत पर्यटन करणाऱ्या तरुणांसाठी बांधलेले स्वस्त निवासगृह.

you've /यूव्ह्/ you have ➪ HAVE.

yuck /यक्/ *उद्‌वा* (*अनौप*) (घृणा व्यक्त करण्यासाठी वापर) शी!

yule /यूल्/ *ना* [*अगण*] (*पुरा*) ख्रिसमस, नाताळ.

yuppie /'यपि/ *ना* [*गण*] (*अनौप*) महत्त्वाकांक्षी आणि पैसे कमावणारा तरुण व्यावसायिक.

Z z

Z, z /झ़ेड्; *अमे* झ़ी/ *ना* [*गण*] (*ब.व* **Z's, z's** /झ़ेड्झ़; *अमे* झ़ीझ़/) इंग्रजी वर्णमालेतील सव्विसावे अक्षर.

zany /'झ़ेइनि/ *वि* **(-ier, -iest)** (*अनौप*) विदूषकी.

zeal /झ़ील्/ *ना* [*अगण*] (*औप*) उत्साह. **zealous** /'झ़ेलस्/ *वि* उत्साही.

zealot /'झ़ेलट्/ *ना* [*गण*] (कधीकधी *अधिक्षेपी*) खास करून धर्म, राजकारण वगैरेतला अतिउत्साही माणूस.

zebra /'झ़ेब्र, 'झ़ीब्र/ *ना* [*गण*] काळे-पांढरे पट्टे असणारा घोड्याच्या जातीचा एक आफ्रिकन प्राणी. **,zebra 'crossing** *ना* [*गण*] (ब्रिटनमधे) पादचाऱ्यांना रस्ता ओलांडण्यासाठी रस्त्यावर मारलेले काळे-पांढरे पट्टे, पादचारी-पट्टा.

zenith /'झ़ेनिथ्/ *ना* [*गण*] यश, कीर्ती वगैरेचे अत्युच्च शिखर.

zero /'झ़िअरउ/ *सना, वि, ना* [*गण*] (*ब.व* **~s**) १ ०; शून्य. २ नीचांक; काहीही नाही. ३ मोजपट्टीवरील + आणि - यांच्या मधला बिंदू : *The temperature was ten degrees below ~, तपमान ० खाली १० अंश – म्हणजे -१० अंश – होते.* **zero** *क्रि* (*क्रिब*) **zero in on sth** एखाद्या गोष्टीवर सरळ नेम धरणे, लक्ष्याच्या दिशेने जाणे, वेध घेणे. **'zero-hour** *ना* [*अगण*] विशेषतः लष्करी कारवाई सुरू करण्याचा काल, शून्यप्रहर, आक्रमण वेळ.

zest /झ़ेस्ट्/ *ना* १ [*अगण, अे.व*] (क) खूप मजा, खूप आनंद. (ख) वाढलेली मौज, अधिक जोम. २ [*अगण*] लिंबू किंवा संत्र्याची बाहेरची साल.

zigzag /'झ़िग्झ़ॅग्/ *ना* [*गण*] नागमोडी रेषा. **zigzag** *क्रि* **(-gg-)** [*अक*] नागमोडी जाणे : *The path ~s up the cliff, रस्ता कड्यावरून नागमोडी जातो.*

zinc /झ़िङ्क्/ *ना* [*अगण*] निळसर पांढरा धातू, जस्त.

zip (तसेच **'zip-fastener**) /झ़िप्/ *ना* [*गण*] पिशव्यांची वगैरे चेन, सरकबंद. **zip** *क्रि* **(-pp-)** [*सक*] चेन लावणे किंवा उघडणे. **Zip code** *ना* [*गण*] (*अमे*) पोस्टाचा क्रमांक, पिनकोड. **zipper** *ना* [*गण*] (विशेषतः *अमे*) चेन, सरकबंद.

zither /'झ़िद(र्)/ *ना* [*गण*] खूप तारा असलेले एक सपाट तंतुवाद्य.

zodiac /'ज़ाउडिॲक्/ *ना* **the zodiac** [*अे.व*] बारा भागात विभागलेला आणि चंद्र, सूर्य वगैरेच्या जागा दाखविणारा आकाशातील काल्पनिक पट्टा, ग्रहपथ, राशीचक्र.

zombie /'ज़ॉम्बि/ *ना* [*गण*] (*अनौप*) परिस्थितीचे भान न ठेवता, विचार न करता वागणारा माणूस, उतावळा माणूस.

zone /ज़ाउन्/ *ना* [*गण*] विशिष्ट विशेष किंवा उपयोग असणारा प्रांत, क्षेत्र, परिमंडळ, टापा : *a time ~, काल-क्षेत्र* ○ *a nuclear-free ~, अण्वस्त्रमुक्त प्रदेश.*

zoo /ज़ू/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s**) प्राणिसंग्रहालय.

zoology /ज़ाउ'ऑलजि/ *ना* [*अगण*] प्राणिविज्ञान, प्राणिशास्त्र. **zoological** /,ज़ाउअ'लॉजिक्ल्/ *वि* प्राणिशास्त्रीय. **zoologist** *ना* [*गण*] प्राणिशास्त्रज्ञ, प्राणिशास्त्राचा अभ्यासक, प्राणिवैज्ञानिक.

zoom /ज़ूम्/ *क्रि* [*अक*] १ सूऽ करत वेगाने जाणे. २ (*ला अनौप*) एकदम वाढणे, वर सरकणे. ३ (*क्रिब*) **zoom in/out** (कॅमेऱ्याबाबत) ज्याचे छायाचित्र घ्यायचे ती वस्तू जवळ/दूर आहे असे भासवणे. **'zoom lens** *ना* , [*गण*] वस्तू लहान-मोठी दाखविण्याची क्षमता असणारी कॅमेऱ्यातील भिंगे.

zucchini /ज़ु'कीनि/ *ना* [*गण*] (*ब.व* **zucchini** किंवा **~s**) (विशेषतः *अमे*) लांब, हिरवी पण आतून पांढरी असणारी एक भाजी.

सर्वसामान्य अनियमित क्रियापदे

मूळ रूप	भूतकाल	भूतकालवाचक धातुविशेषण
(दोन रूपे दिली असतील तर अर्थामधे फरक आहे की नाही हे कोशातील नोंदीत पाहावे)		
arise	arose	arisen
awake	awoke	awoken
be	was, were	been
bear	bore	borne
beat	beat	beaten
become	became	become
begin	began	begun
bend	bent	bent
beseech	besought, beseeched	besought, beseeched
beset	beset	beset
bet	bet, betted	bet, betted
bid	bid, bade	bid, bidden
bind	bound	bound
bite	bit	bitten
bleed	bled	bled
blow	blew	blown
break	broke	broken
breed	bred	bred
bring	brought	brought
broadcast	broadcast	broadcast
build	built	built
burn	burnt, burned	burnt, burned
burst	burst	burst
buy	bought	bought
cast	cast	cast
catch	caught	caught
choose	chose	chosen
cling	clung	clung
come	came	come
cost	cost, costed	cost, costed
creep	crept	crept
cut	cut	cut

मूळ रूप	भूतकाल	भूतकालवाचक धातुविशेषण
deal	dealt	dealt
dig	dug	dug
do	did	done
draw	drew	drawn
dream	dreamt, dreamed	dreamt, dreamed
drink	drank	drunk
drive	drove	driven
dwell	dwelt	dwelt
eat	ate	eaten
fall	fell	fallen
feed	fed	fed
feel	felt	felt
fight	fought	fought
flee	fled	fled
fling	flung	flung
fly	flew	flown
forbid	forbade	forbidden
forecast	forecast, forecasted	forecast, forecasted
foresee	foresaw	foreseen
foretell	foretold	foretold
forget	forgot	forgotten
forgive	forgave	forgiven
forsake	forsook	forsaken
freeze	froze	frozen
get	got	got
give	gave	given
go	went	gone
grind	ground	ground
grow	grew	grown
hang	hung, hanged	hung, hanged
have	had	had
hear	heard	heard
hide	hid	hidden
hit	hit	hit
hold	held	held
hurt	hurt	hurt
keep	kept	kept

मूळ रूप	**भूतकाल**	**भूतकालवाचक धातुविशेषण**
kneel	knelt	knelt
knit	knitted, knit	knitted, knit
know	knew	known
lay	laid	laid
lead	led	led
lean	leant, leaned	leant, leaned
leap	leapt, leaped	leapt, leaped
learn	learnt, learned	learnt, learned
leave	left	left
lend	lent	lent
let	let	let
lie[2]	lay	lain
light	lit, lighted	lit, lighted
lose	lost	lost
make	made	made
mean	meant	meant
meet	met	met
mislay	mislaid	mislaid
mislead	misled	misled
misspell	misspelled, misspelt	misspelled, misspelt
mistake	mistook	mistaken
misunderstand	misunderstood	misunderstood
mow	mowed	mown, mowed
outdo	outdid	outdone
outgrow	outgrew	outgrown
outshine	outshone	outshone
overcome	overcame	overcome
overdo	overdid	overdone
overhang	overhung	overhung
overhear	overheard	overheard
override	overrode	overridden
overrun	overran	overrun
oversee	oversaw	overseen
overshoot	overshot	overshot
oversleep	overslept	overslept
overtake	overtook	overtaken
overthrow	overthrew	overthrown

आवडी किंवा एकसारखे काम असलेल्या लोकांचा गट, समव्यवसायी मंडळी. ३ [*गण*] (*अमे*) पुरुषांचे विद्यापीठ-विद्यार्थी मंडळ.

fraternize /'फ्रॅटनाइझ़्/ *क्रि* [*अक*] (*with*)// बंधुभाव ठेवणे, मैत्री करणे : ~ *with the enemy, शत्रूशी मित्रभाव ठेवणे.* **fraternization** /,फ्रॅटनाइ'झ़ेइश्न्; *अमे* -नि'झ़्-/ *ना* [*अगण*] बंधुभाव निर्मिती.

fraud /फ्रॉऽड्/ *ना* १ [*गण, अगण*] इतरांना फसवून बेकायदेशीरपणे पैसे मिळवणे, पैशाचे अपहरण. २ [*गण*] इतरांना फसवणारा, बनवाबनवी करणारा. **fraudulent** /'फ्रॉऽड्युलन्ट्; *अमे* -जु-/ *वि* फसवणुकीने मिळवलेले किंवा केलेले; लबाड, कपटी.

fraught /फ्रॉऽट्/ *वि* १ *with*// परिपूर्ण, युक्त, भरलेला : ~ *with danger, धोकापूर्ण, भयावह.* २ तंग, चिंतायुक्त.

fray /फ्रेइ/ *क्रि* [*अक, सक*] १ (कापड वगैरे) विरणे, घसमटणे, धस लागणे. २ (*ला*) तणावाचा करणे, तणातणीचे होणे.

freak /फ्रीक्/ *ना* [*गण*] १ क्वचित् होणारा/घडणारा प्रसंग, अपूर्व घटना, चमत्कारिक घटना/गोष्ट : *a ~ storm, अभूतपूर्व वादळ.* २ चमत्कारिक माणूस, लहरी व्यक्ती. ३ (*अनौप*) वेडावलेला, छांदिष्ट, नादिष्ट : *a jazz ~, जॅझ संगीताने वेडावलेला.* **freakish** *वि* चमत्कारिक; अपूर्व, विचित्र.

freckle /'फ्रेक्ल्/ *ना* [*गण, बहुधा ब.व*] त्वचेवरचा लहान तपकिरी डाग. **freckled** *वि* ठिपके/डाग असलेला.

free /फ्री/ *वि* (**~r** /-अ(र्)/, **~st**) १ बंदिवासात नसलेला, मोकळा, बंधमुक्त; कोठेही जाऊ शकणारा, स्वतंत्र. २ दुसऱ्या व्यक्ती, नियम, सरकारच्या बंधनातून मुक्त, स्वतंत्र : *a ~ press, स्वतंत्र वृत्तपत्रे.* ३ अबद्ध; सुटा : *the ~ end of a rope, दोर चे सुटे टोक.* ४ बंद न केलेला, न अडवलेला, अबद्ध; स्वच्छ, मोकळा : *a ~ flow of water, पाण्याचा मोकळा स्रोत.* ५ *from/of*// एखाद्या असुखकारक/त्रासदायक गोष्टीपासून मुक्त/सुटका झालेला : ~ *from pain/blame, वेदनामुक्त/दोषमुक्त.* ६ फुकट, मोफत. ७ मुक्त, विना : *tax ~, करमुक्त.* ८ (**क**) मोकळा, न वापरलेला : *a ~ seat, मोकळी खुर्ची.* (**ख**) (व्यक्तीबाबत) वेळ असलेला, मोकळा. ९ *with*// स्वेच्छेने/मनापासून देणारा : *He's ~ with his time, तो (इतरांसाठी) आनंदाने वेळ देतो.* १० (*वाक्प्र*) **free and easy** मोकळ्या मनाचा, अनौपचारिक. **a free 'hand** हवे तसे वागायला/करायला मोकळा, पूर्ण स्वातंत्र्य असणे, स्वमुखत्यार असणे. **free** *क्रिवि* १ फुकट, विनामूल्य. २ मोकळा; सुटा. ३ (*वाक्प्र*) **make free with sth** एखाद्याला अनादराने वागवणे; एखादी वस्तू स्वतःची असल्यासारखीच वापरणे. **free** *क्रि* [*सक*] मुक्त करणे, सुटका करणे. **,free 'enterprise** *ना* [*अगण*] सरकारी नियंत्रणे नसलेला व्यापार, मुक्त अर्थव्यवस्था. **'free-for-all** *ना* [*गण*] सगळे सहभागी होतात अशी हाणामारी, बेबंद मारामारी. **'free-hand** *वि, क्रिवि* उपकरणाच्या मदतीशिवाय हाताने (काढलेले). **'freelance** /-लान्स्; *अमे* -लॅन्स्/ *ना* [*गण*], *वि, क्रिवि* अनेक मालकांसाठी काम करणाऱ्या लेखक, कलाकार वगैरेनी केलेले. **'freelance** *क्रि* [*अक*] कोणाचेही नोकर न होता काम करणे. **freely** *क्रिवि* मोकळेपणाने, निर्बंधपणे; तत्परतेने, सहजपणे. **,free-'range** *वि* स्वाभाविक परिस्थितीत ठेवलेल्या कोंबड्यांनी निर्माण केलेली (अंडी). **,free 'speech** *ना* [*अगण*] स्वतःची मते जाहीरपणे व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य, भाषण-स्वातंत्र्य. **,free 'trade** *ना* [*अगण*] माल आणण्यावर कर किंवा निर्बंध नसलेला मुक्त व्यापार, खुला व्यापार. **'freeway** *ना* [*गण*] (*अमे*) मोटारींचा रस्ता. **,free 'will** *ना* [*अगण*] १ स्वयंनिर्णयाची क्षमता, इच्छास्वातंत्र्य, प्राकाम्य. २ ईश्वर, देव वगैरेऐवजी स्वकर्तृत्वावर विश्वास, मानवी स्वायत्ततेचे तत्त्व.

freedom /'फ्रीडम्/ *ना* १ [*अगण*] स्वातंत्र्य. २ [*गण, अगण*] (*of*)// भाषण किंवा वर्तनाचा हक्क : ~ *of worship, पूजा-अर्चेचे स्वातंत्र्य.*

freeze /फ्रीझ़्/ *क्रि* (*भूत* **froze** /फ्रउझ़्/, *भूत वि* **frozen** /'फ्रउझ़्न्/) १ [*अक, सक*] (खास करून पाण्याबाबत) बर्फ होणे/करणे, गोठणे/गोठवणे. २ [*अक*] (*It* या शब्दासह वापर) (हवेबाबत) पाण्याचा बर्फ होईल इतके गार असणे : *It's freezing today, आज गोठवणारी*

थंडी आहे. ३ [*अक*] कडाक्याची थंडी वाजणे, गारठणे. ४ [*सक*] गोठणबिंदूच्या खालच्या तपमानात (अन्नपदार्थ वगैरे) ठेवणे : *frozen peas, गोठवलेले मटार/वाटाणे.* ५ [*अक, सक*] (एखाद्या माणसाला किंवा प्राण्याला) अचानक थांबवणे, थिजून उभे राहणे : *~ with terror, भयाने थिजणे.* ६ [*सक*] (किंमती, पगार वगैरे) एका ठराविक पातळीवर स्थिर करणे, गोठवणे. ७ (*वाक्प्र*) **,freeze to 'death** थंडीने गारठून मरणे. ८ (*क्रिब*) **freeze over/up** हिमाने झाकून जाणे किंवा बंद होणे. **freeze** *ना* [*गण*] १ गोठवणाऱ्या थंडीचा काळ. २ पगार, किंमती वगैरे गोठवणे. **'freezer** *ना* [*गण*] अन्नपदार्थ गोठवून ठेवण्याचा रेफ्रिजरेटर, हिमयंत्र. **'freezing-point** *ना* [*अगण, गण*] द्रव-पदार्थ, विशेषतः पाणी, ज्या तपमानाला गोठते ते तपमान, गोठणबिंदू, हिमबिंदू.

freight /फ्रेइट्/ *ना* [*अगण*] विमान, जहाज वगैरेने पाठवायचा माल. **freight** *क्रि* [*सक*] (माल) पाठवणे किंवा नेणे. **freighter** *ना* [*गण*] मालवाहू बोट किंवा विमान, मालबोट.

French /फ्रेन्च्/ *ना* १ [*अगण*] फ्रेंच भाषा. २ **the French** [*ब.व*] फ्रेंच लोक. **French** *वि* फ्रान्सचा, फ्रेंच लोकांचा किंवा फ्रेंच भाषेचा. **,French 'fries** *ना* [*ब.व*] (खास करून *अमे*) बटाट्याच्या चकत्या. **,French 'window** *ना* [*गण, बहुधा ब.व*] बागेकडे किंवा गॅलरीत उघडणारे काचेचे दार.

frenzy /फ्रेन्झ़ि/ *ना* [*ए.व, अगण*] उन्माद, आवेश, बेभानपणा, पिसाटपणा. **frenzied** /'फ्रेन्झ़िड/ *वि* उन्माद आलेला, बेभान, पिसाट.

frequency /'फ्रीक्वन्सि/ *ना* (*ब.व* -ies) १ [*अगण*] एखादी गोष्ट पुन्हापुन्हा होण्याचे प्रमाण, वारंवारता, पौनःपुन्य, आवर्तता. २ [*गण*] रेडिओ लहरीच्या कंपनाचे प्रमाण, कंप्रता, कंपनसंख्या.

frequent^{1} /'फ्रीक्वन्ट्/ *वि* वारंवार घडणारा. **frequently** *क्रिवि* वारंवार.

frequent^{2} /फ्री'क्वेन्ट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) एखाद्या ठिकाणी वारंवार जाणे, पुन्हापुन्हा जाणे.

fresco /'फ्रेस्कउ/ *ना* [*गण*] (*ब.व* ~s किंवा ~es /-कउझ़्/) प्लॅस्टर वाळण्यापूर्वी भिंतीवर काढलेले चित्र, गिलावचित्र, भित्तिलेपचित्र.

fresh /फ्रेश्/ *वि* १ नवीन किंवा वेगळा : *make a ~ start, नव्याने सुरुवात करणे.* २ नव्याने केलेला; ताजा : *~ bread, ताजा पाव.* ३ (अन्नाबाबत) डब्यात टिकवलेले किंवा गोठवलेले असे नसलेले, ताजे. ४ (पाण्याबाबत) खारे नसलेले, गोडे. ५ (हवेबाबत) थंड आणि वाऱ्याची, मोकळी, थंड. ६ (रंगाबाबत) स्वच्छ आणि भडक. ७ न दमलेला; पुन्हा ताजातवाना झालेला. ८ (*अनौप*) भिन्नलिंगी व्यक्तीशी वागताना फार धीट, उत्छृंखल, चावट. ९ *from/out of*// एखाद्या ठिकाणाहून नुकताच आलेला : *students ~ from college, नुकतेच महाविद्यालयातून बाहेर पडलेले विद्यार्थी.* **freshly** *क्रिवि* (बहुधा *भूत वि* सह) नुकताच, आताच : *~ly painted, नुकताच रंगवलेला.* **freshness** *ना* [*अगण*] नवेपणा, ताजेपणा, ताजवा; आल्हाद; उमदेपणा, टवटवीतपणा. **'freshwater** *वि* गोडे पाणी असलेला, गोड्या पाण्याचा किंवा गोड्या पाण्यात राहणारा.

freshen /'फ्रेश्न्/ *क्रि* १ [*सक*] (एखादी गोष्ट) ताजी टवटवीत करणे. २ [*अक*] (वाऱ्याबाबत) जोर येणे. ३ (*क्रिब*) **freshen (oneself) up** आंघोळ करून ताजेतवाने होणे.

fret^{1} /फ्रेट्/ *क्रि* (-tt-) [*अक, सक*] (*about*)// एखाद्या गोष्टीची काळजी करणे/करायला लावणे, भुणभुण करणे, कुरकुर करणे. **fretful** /-फ्ल्/ *वि* चिंताक्रांत, चिडचिडा, भुणभुण करणारा. **fretfully** *क्रिवि* कुरकुरत.

fret^{2} /फ्रेट्/ *ना* [*गण*] गिटार वगैरे तंतुवाद्यावरील धातुपट्टीची खूण, सारिका, पडदी.

friar /'फ्राइअ(र्)/ *ना* [*गण*] ख्रिस्ती धर्मातील विशिष्ट पंथाचा अनुयायी, गोसावी.

friction /'फ्रिकश्न्/ *ना* १ [*अगण*] दोन वस्तूंचे एकमेकांवर घासणे, घर्षण. २ [*गण, अगण*] माणसांतील विसंवाद, संघर्ष.

Friday /'फ्राइडि/ *ना* [*अगण, गण*] आठवड्याचा सहावा म्हणजे गुरुवारनंतर येणारा वार, शुक्रवार. (*Monday* खालील उदाहरणे पहा.)

fridge /फ्रिज्/ *ना* [*गण*] रेफ्रिजरेटरचे (बोलभाषेतील) संक्षिप्त रूप.

fried FRY चा *भूत, भूत वि.*

friend /फ्रेन्ड्/ *ना* [*गण*] १ ओळखीची आणि आवडती पण नातेवाईक नसलेली व्यक्ती, मित्र, दोस्त, यार. २ पाठीराखा, कैवारी, साथी : *a ~ of the arts, कलांचा पाठीराखा.* ३ (*वाक्प्र*) **be/make 'friends (with sb)** (एखाद्याशी) मैत्री करणे, सख्य जोडणे. **friendless** *वि* मित्रहीन. **friendly** *वि* (**-ier, -iest**) १ स्नेहपूर्ण, मैत्रीपूर्ण. २ (वाद, खेळ वगैरेबाबत) खेळीमेळीचा, मित्रत्वाचा. **friendliness** *ना* [*अगण*] सौहार्द, मैत्री, स्नेहभाव. **friendship** *ना* [*गण, अगण*] मैत्री, दोस्ती, स्नेह.

frieze /फ्रीझ्/ *ना* [*गण*] छपराला लागून असलेली भिंतीवरची कलाकुसरीची पट्टी, कोरीव नक्षीपट.

frigate /'फ्रिगट्/ *ना* [*गण*] लहान, जलद लढाऊ बोट.

fright /फ्राइट्/ *ना* [*अगण, गण*] अचानक वाटलेले भय, भीती.

frighten /'फ्राइट्न्/ *क्रि* [*सक*] (एखाद्याला) भिववणे, भेडसावणे, घाबरवणे, भीती घालणे, भयभीत करणे. **frightened** *वि* भेदरलेला, भ्यालेला, भयभीत. **frightening** *वि* भयावह, भयकारक. **frighteningly** *क्रिवि* धडकी भरावी अशा रीतीने, भयावहपणे.

frightful /'फ्राइट्फ्ल्/ *वि* १ भयानक, भयंकर. २ (*अनौप*) कमालीचा, फारच; फार वाईट. **frightfully** /-फलि/ *क्रिवि* (*अनौप*) फार, अतिशय.

frigid /'फ्रिजिड्/ *वि* १ अतिशय थंड, शीत. २ (स्त्रीबाबत) लैंगिक इच्छा/कामवासना नसलेली, थंड. **frigidity** /फ्रि'जिडटि/ *ना* [*अगण*] थंडपणा, कामोदासीनता. **frigidly** *क्रिवि* थंडपणाने.

frill /फ्रिल्/ *ना* [*गण*] १ कपड्यावरील नक्षीदार झालर. २ [बहुधा *ब.व*] (*ला*) उगाच घातलेली भर, भरताड. **frilly** *वि* झालर असलेला.

fringe /फ्रिन्ज्/ *ना* [*गण*] १ कपाळावरील केशकलाप. २ सतरंजी, रग वगैरेच्या दशायुक्त कडा. ३ कड, काठ : *on the ~ of the forest/crowd, जंगलाच्या/गर्दीच्या कडेला.*

frisk /फ्रिस्क्/ *क्रि* १ [*अक*] बागडणे, हुंदडणे. २ शस्त्रे लपविली आहेत का हे पाहण्यासाठी एखाद्याचे कपडे चाचपणे. **frisky** *वि* (**-ier, -iest**) जिवंत, खेळकर, हुंदडणारा.

fritter^1 /'फ्रिट(र्)/ *क्रि* (*क्रिब*) **fritter sth away** पैसा किंवा वेळ व्यर्थ खर्च करणे, वृथा घालवणे, फुकट घालवणे.

fritter^2 /'फ्रिट(र्)/ *ना* [*गण*] दूध, अंडी, मैदा यांच्या पिठात फळे, मांस वगैरे भरून तळलेले काप.

frivolous /'फ्रिव्हलस्/ *वि* गांभीर्य नसलेला; क्षुल्लक, किरकोळ, फालतू, वेडेपणाचा. **frivolity** /फ्रि'व्हॉलटि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] वेडेपणाचे वागणे, वेडेपणा, आचरटपणा. २ [*गण*] वेडगळ कृत्य किंवा शेरा, (कृती, बोलण्यातील) उथळपणा. **frivolously** *क्रिवि* उथळपणाने, वेडपटपणाने.

frizzy /'फ्रिझि/ *वि* (केसांबाबत) कुरळे.

fro /फ्रउ/ *क्रिवि* (*वाक्प्र*) **to and fro** ➪ TO^3.

frog /फ्रॉग्; *अमे* फ्रॉऽग्/ *ना* [*गण*] जमिनीवर आणि पाण्यात राहणारा छोटा, शीत रक्ताचा प्राणी, बेडूक, मंडूक. **'frogman** /-मन्/ *ना* [*गण*] (*ब.व* **-men**) रबरी पोषाख केलेला, श्वासोच्छ्वासाची सामुग्री असणारा पाण्याखालून पोहणारा माणूस.

frolic /'फ्रॉलिक्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ked**) [*अक*] बागडणे, उंडारणे. **frolic** *ना* [*ए.व*] बागडणे.

from /फ्रम्; *अधिक बलयुक्त रूप* फ्रॉम्/ *शब्दयो* १ (सुरुवातीचे स्थानदर्शक) -ऊन, -हून, पासून : *go ~ London to Oxford, लंडनहून ऑक्सफर्डला जाणे.* २ (काळाचा प्रारंभदर्शक), -ऊन, -हून, पासून : *on holiday ~ 1 May, १ मेपासून सुट्टीवर.* ३ (प्रेषकदर्शक) -कडून : *a letter ~ my brother, माझ्या भावाकडून आलेले/भावाचे पत्र.* ४ (उगमदर्शक) मधली, मधून : *quotations ~ Shakespeare, शेक्सपिअरमधली अवतरणे.* ५ (दोन स्थानांतील अंतरदर्शक) पासून : *ten miles ~ the sea, समुद्रापासून दहा मैल.* ६ (नीचांकदर्शक) पासून : *Tickets cost ~ £3 to £12, तिकिटाचे दर ३ पौंडापासून ते १२ पौंडापर्यंत आहेत.* ७ (एखादी गोष्ट ज्यापासून केली आहे ते द्रव्यदर्शक)

पासून: *Wine is made ~ grapes, द्राक्षापासून दारू करतात.* ८ (दूर नेणे किंवा विलग करणे दर्शक) पासून, -तून: *Take the money ~ my purse, माझ्या पाकिटातून पैसे घे.* ९ (संरक्षण किंवा प्रतिबंधदर्शक) पासून: *save a boy ~ drowning, मुलाला बुडण्यापासून वाचवणे ○ prevent sb ~ sleeping, एखाद्याला झोपेपासून परावृत्त करणे.* १० (कारणदर्शक) -ने, पासून, -मुळे: *suffer ~ cold and hunger, थंडी आणि भूक यांनी पिडणे.* ११ (बदलदर्शक) पासून, -ऊन, -हून: *~ bad to worse, वाईटापासून आणखी वाईटाकडे.* १२ (एखाद्या गोष्टीचा) विचार करता, -वरून: *reach a decision ~ the evidence, पुराव्यावरून निर्णय घेणे.*

front /फ्रॅन्ट्/ *ना* १ (खास करून **the front**) [*अे.व*] दर्शनी भाग: *the ~ of a building, इमारतीचा दर्शनी भाग.* २ **the front** [*अे.व*] समुद्रालगतचा रस्ता. ३ **the front** [*अे.व*] लढाई होत असल्याची जागा, आघाडी. ४ [*अे.व*] (अनेकदा खोटा किंवा उसना) आव, आविर्भाव: *put on a brave ~, धीटपणाचा आव आणणे.* ५ [*गण*] थंड आणि उष्ण हवा यांतील सीमारेषा. ६ [*अे.व*] (*अनौप*) एखादे बेकायदेशीर किंवा गुप्त कार्य लपवून ठेवणारी गोष्ट किंवा व्यक्ती. ७ [*गण*] विशिष्ट कार्यक्षेत्र, आघाडी: *on the financial ~, आर्थिक आघाडीवर.* ८ (*वाक्प्र*) **in front** सर्वात पुढे; आघाडीवर, पुरोभागी. **in front of** (क) (एखाद्याच्या) पुढे, समोर. (ख) (एखाद्याच्या) समक्ष, डोळ्यादेखत, उपस्थितीत. **front** *क्रि* [*अक, सक*] (एखाद्या गोष्टीकडे) तोंड असणे, तोंड करणे: *hotels that ~ onto the sea, समुद्राकडे तोंड असलेली हॉटेल्स.* **frontage** /-इज्/ *ना* [*गण*] इमारतीच्या किंवा भूखंडाच्या दर्शनी भागाची व्याप्ती. **frontal** *वि* पुढचा, पुढून केलेला, पुढे असलेला/तोंडावरचा. **the ˌfront 'line** *ना* [*गण*] शत्रूला भिडणारी युद्धाची आघाडी. **ˌfront-'page** *वि* वर्तमानपत्राच्या पहिल्या पानावर येणारा.

frontier /'फ्रॅन्टिअ(र्); *अमे* फ्रन्'टिअर्/ *ना* [*गण*] १ दोन देशांच्या सरहद्दीजवळचा प्रदेश. २ [*ब.व*] परिसीमा: *the ~ of science, विज्ञानाच्या परिसीमा.*

frost /'फ्रॉस्ट्; *अमे* फ्रॉऽस्ट्/ *ना* १ [*गण, अगण*] गोठणबिंदूच्या खालचे तपमान (किंवा त्याचा काळ), कडाक्याची थंडी. २ [*अगण*] जमीन, झाडे यांवर थिजलेली पाण्याची वाफ, तुहिन, दव, हिमतुषार. **frost** *क्रि* १ [*सक*] दव पडणे. २ [*सक*] अपारदर्शक करण्यासाठी (काच) खडबडीत करणे. ३ [*सक*] (खास करून *अमे*) केकवर पिठीसाखर पेरणे. ४ (*क्रिब*) **frost over/up** दवात लपेटणे किंवा दवाने झाकणे. **'frost-bite** *ना* [*अगण*] कडक थंडीने हातापायाच्या बोटांना झालेली इजा. **'frost-bitten** *वि* थंडीने इजा झालेला, हिमदग्ध. **frosty** *वि* (**-ier, -iest**) १ दवाने थंड झालेला. २ (*ला*) प्रेमहीन, कोरडा, स्नेहहीन: *a ~y welcome, कोरडे स्वागत.*

froth /फ्रॉथ्; *अमे* फ्रॉऽथ्/ *ना* [*अगण*] १ बिअर वगैरेवर येणारा फेस. २ (*अधिक्षेपी*) हलकेफुलके पण निरर्थक बोलणे किंवा अशा कल्पना वगैरे. **froth** *क्रि* [*अक*] फेस असणे किंवा निर्माण करणे. **frothy** *वि* (**-ier, -iest**) फेसासारखा किंवा फेसाळ.

frown /फ्राउन्/ *क्रि* १ [*अक*] (राग किंवा चिंता वगैरे व्यक्त करण्यास) भुवया आकुंचित करणे/होणे, आठ्या घालणे/पडणे. २ (*क्रिब*) **frown on/upon sth** एखाद्या गोष्टीबाबत नापसंती दाखवणे. **frown** *ना* [*गण*] आठी: *with a ~ on his face, चेहेऱ्यावर आठी आणून.*

froze FREEZE चा *भूत.*

frozen FREEZE चे *भूत वि.*

frugal /'फ्रूग्ल्/ *वि* १ वाया न घालविणारा, काटकसरी; मितव्ययी. २ कमी पैशाचा/खर्चाचा, स्वस्तातला; छोटासा, लहानसा; साधा: *a ~ supper, साधे जेवण.*

fruit /फ्रूट्/ *ना* १ [*गण, अगण*] फळ. २ [*गण*] (*वनस्पतिशास्त्र*) बिया असलेले फल, बीजकोश. ३ (खास करून **the fruits**) [*ब.व*] कष्टाचे फळ. **fruitful** *वि* (*ला*) फलदायी, यशस्वी. **fruitless** *वि* (*ला*) निष्फळ, अयशस्वी. **fruity** *वि* (**-ier, -iest**) १ फळाचा, फळासारखा. २ (*अनौप*) (आवाजाबाबत) कसदार, भरदार, प्रसन्न.

fruition /फ्रू'इश्न्/ *ना* (*वाक्प्र*) **come to**

fruition (*औप*) (योजना, आशा वगैरेबाबत) फलद्रुप होणे, फळास येणे, यशस्वी/पूर्ण होणे.

frustrate /फ्र'स्ट्रेइट्; *अमे* 'फ्रस्ट्रेइट्/ *क्रि* [*सक*] १ (एखाद्याला) कामात आडकाठी आणणे, मोडता घालणे; निराश करणे, नाउमेद करणे. २ (योजना) यशस्वी न होऊ देणे, विफल करणे. **frustrated** *वि* नाउमेद, निराश, हताश; असंतुष्ट. **frustration** /फ्र'स्ट्रेइश्न्/ *ना* [*अगण, गण*] नैराश्य; वैफल्य.

fry /फ्राइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **fried** /फ्राइड्/) [*अक, सक*] गरम चरबी किंवा तेलात शिजवणे, तळणे, परतणे. **'frying-pan** (*अमे* **'fry-pan**) *ना* [*गण*] १ तळणीचे उथळ भांडे, कढई. २ (*वाक्प्र*) **out of the 'frying-pan into the 'fire** अधिक वाईट परिस्थितीत, आगीतून फुफाट्यात, सुपातून जात्यात.

ft feet, foot चे *संरू.*

fuck /फक्/ *क्रि* [*अक, सक*] (⚠ *व्रात्य*) १ झवणे. २ (राग, वैताग दाखविण्यासाठी वापर) : *F~ (it)! झवा!* ३ (*क्रिब*) **fuck 'off** दूर जाणे, पाय काढणे. **fuck** *ना* [*गण*] (⚠ *व्रात्य*) झवाझवी. **,fuck-'all** *ना* [*अगण*] (⚠ *व्रात्य*) काहीही नाही. **fucking** *वि, क्रिवि* (⚠ *व्रात्य*) (राग किंवा वैताग व्यक्त करताना जोर देण्यासाठी वापर) वेडझवा.

fudge¹ /फज्/ *ना* [*अगण*] साखर, लोणी, दूध वगैरे यापासून बनवलेला एक मऊ तांबूस गोड पदार्थ.

fudge² /फज्/ *क्रि* [*सक*] (*अनौप*) (एखाद्या गोष्टीविषयी) ठामपणे बोलण्याचे किंवा ठाम भूमिका घेण्याचे टाळणे, टाळाटाळ करणे.

fuel /'फ्यूअल/ *ना* [*अगण*] (कोळसा, तेल यांसारखा) जाळल्यावर उष्णता किंवा ऊर्जा देणारा पदार्थ, इंधन, जळण, सर्पण. **fuel** *क्रि* (**-ll-**; *अमे* **-l-**) [*सक*] १ इंधन पुरवणे. २ (वाईट परिस्थिती) आणखी बिघडवणे, भर घालणे : *to ~ inflation, चलनफुगवटा आणखी वाढवणे.*

fugitive /'फ्यूजटिव्ह्/ *ना* [*गण*] (*from*)// पळपुटा माणूस, फरारी : *~ from famine, दुष्काळात परागंदा झालेला माणूस.*

fulfil (*अमे* **fulfill**) /फुल्'फिल्/ *क्रि* (**-ll-**) [*सक*] १ (एखादे काम, कर्तव्य, वचन वगैरे) पूर्ण करणे, पार पाडणे. २ **~ oneself** स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि अंगभूत गुणांचा पूर्ण विकास करणे, स्वतःची उन्नती करणे. **fulfilment** *ना* [*अगण*] पूर्ती.

full /फुल्/ *वि* १ जास्तीत जास्त भरलेला, ओतप्रोत : *a ~ bottle, पूर्ण भरलेली बाटली.* २ पोटभर. ३ सर्व, पूर्ण : *give ~ details, पूर्ण तपशील देणे.* ४ गुब्रगुबीत, भरलेला, टंच : *a ~ figure/face, भरदार शरीर/गुबगुबीत चेहेरा.* ५ (कपड्यांबाबत) घळघळीत, ढगळ : *a ~ skirt, ढगळा घागरा.* ६ (*of*)// एकाच गोष्टीचा विचार करणारा, एककल्ली : (*अधिक्षेपी*) *He's ~ of himself, तो स्वतःच्याच तोऱ्यात असतो.* ७ (*वाक्प्र*) **(at) full speed/pelt/tilt** भरधाव वेगाने. **in full** पूर्णपणे, पूर्णतया. **to the 'full** शक्य तेवढे, भरभरून, हवे तेवढे, मनसोक्त : *enjoy life to the ~, आयुष्याचा मनसोक्त आनंद लुटणे.* **full** *क्रिवि* १ बरोबर, नेमका; सरळ : *hit him ~ in the face, सरळ त्याच्या तोंडावर आपटले.* २ अगदी, पुरते : *You knew ~ well that he was lying, तो थापा मारतोय हे तुला अगदी नीट/पुरतं ठाऊक होतं.* **,full-'board** *ना* [*अगण*] हॉटेलातील जेवणासह राहण्याची सोय. **,full-length** *वि* १ (चित्र, आरसा वगैरेबाबत) पूर्ण, पूर्ण आकृती दिसणारा, मोठा. २ लहान न केलेला, आहे तसा, पूर्ण. **,full 'moon** *ना* [*गण*] पौर्णिमेचा चन्द्र, पूर्णचन्द्र. **fullness** (तसेच **fulness**) *ना* [*अगण*] पूर्णता; भरलेपणा. **,full-'scale** *वि* १ (चित्र, आरेखन वगैरेबाबत) प्रत्यक्ष वस्तूच्या आकाराचे, पूर्णाकृती. २ संपूर्ण : *a ~-scale inquiry, संपूर्ण चौकशी.* **,full 'stop** (तसेच **full point**) *ना* [*गण*] १ वाक्याच्या शेवटी द्यायचे पूर्णविरामाचे (.) चिन्ह. २ (*क्रिब*) **come to a full stop** पूर्णपणे थांबणे. **,full-'time** *वि, क्रिवि* पूर्णवेळ काम करणारा किंवा काम असलेला. **fully** *क्रिवि* १ पूर्णपणे, संपूर्णतः. २ कमीतकमी, किमान : *The journey took ~y two hours, प्रवासाला कमीतकमी दोन तास लागले.*

fumble /'फम्‌ब्‌ल्/ *क्रि* [*अक*] हातांनी चाचपडणे.

fume /फ्यूम्/ *ना* [*गण, बहुधा ब.व*] धूर, धूम

किंवा उग्र वासाचा वायू. **fume** *क्रि* [*अक*] १ धूर ओकणे, धुमसणे. २ (*ला*) संतापणे.

fun /फन्/ *ना* [*अगण*] १ गंमत; मजा. २ खेळकरपणा, मौज. ३ (*वाक्प्र*) **for 'fun** गमतीसाठी, मौज म्हणून. **in 'fun** गमतीने, चेष्टेत. **make fun of sb/sth** एखाद्याची टर उडवणे, थट्टा करणे. **'fun-fair** *ना* [*गण*] वेगवेगळी यंत्रे, खेळ, प्रदर्शने वगैरे मैदानावर मांडून केलेली करमणूक.

function /'फङ्क्·शन्/ *ना* [*गण*] १ एखाद्या गोष्टीचा हेतू, (किंवा एखाद्या व्यक्तीचे) कार्य. २ औपचारिक समारंभ, कार्यक्रम. **function** *क्रि* [*अक*] कार्यरत होणे, काम करणे: *The lift doesn't ~, लिफ्ट चालू नाही.* **functional** /-शनल्/ *वि* १ देखाव्यासाठी नसून प्रत्यक्षात उपयोगी असणारा. २ कार्यकारी; कार्यक्षम.

fund /फन्ड्/ *ना* [*गण*] १ विशिष्ट हेतूसाठी असलेला निधी. २ पुरवठा, भांडार, साठा: *a large ~ of experience, अनुभवाचे भांडार.* **fund** *क्रि* [*सक*] निधी उपलब्ध करणे, पैसा पुरवणे.

fundamental /ˌफन्ड'मेन्ट्ल्/ *वि* मौलिक, खूप महत्त्वाचा; मूलभूत किंवा अत्यावश्यक, जरूरीचा. **fundamental** [*गण,* बहुधा *ब.व*] मूलतत्त्व. **fundamentalism** /-टलिझम्/ *ना* [*अगण*] बायबल, कुराण यासारख्या धर्मग्रंथातील प्रत्येक गोष्ट सत्य आहे अशी श्रद्धा, मूलतत्त्ववाद. **fundamentalist** *ना* [*गण*], *वि* मूलतत्त्ववादी. **fundamentally** /-टलि/ *क्रिवि* मूलतः; मुळात.

funeral /'फ्यूनरल्/ *ना* [*गण*] प्रेताचे विधिपूर्वक दफन किंवा दहन, अन्त्यविधी, अन्त्यसंस्कार.

fungus /'फङ्गस्/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-gi** /-गाइ, तसेच -जाइ/ किंवा **~es** /-गसिझ्/) कुजणाऱ्या पदार्थावर (उदा जुनाट लाकूड) वाढणारी पर्णहीन वनस्पती, बुरशी, कवक.

funnel /'फनल्/ *ना* [*गण*] १ वरच्या टोकाला रुंद व खाली अरुंद असलेली आणि द्रवपदार्थ ओतायला वापरायची नळी, नरसाळे, चिमणी, चाडी. २ वाफेच्या इंजिनावरील किंवा जहाजावरील धुराडे. **funnel** *क्रि* (**-ll-**; *अमे* **-l-**) [*अक, सक*] नरसाळ्यातून किंवा अरुंद जागेतून ओतणे.

funny /'फनि/ *वि* (**-ier, -iest**) १ हसू आणणारा, विनोदी; मौजेचा, गंमतशीर, गंमतीदार. २ विचित्र, विक्षिप्त. **funnily** *क्रिवि* गंमत म्हणजे; विचित्रपणे. **'funny-bone** *ना* [*गण*] कोपराचा संवेदनशील भाग.

fur /फऽ(र्)/ *ना* १ [*अगण*] मांजर, ससा वगैरे प्राण्यांवरचे केसाळ आवरण, मऊ लव, मृदुलोम. २ [*गण*] प्राण्यांचे केसाळ कातडे (किंवा त्यापासून केलेले कपडे). ३ [*अगण*] किटली, नळी वगैरेच्या आतील बाजूचे घट्ट करड्या रंगाचे आवरण. **furry** *वि* (**-ier, -iest**) मऊ लव असलेला.

furious /'फ्युअरिअस्/ *वि* १ संतप्त, क्रुद्ध, खूप रागावलेला. २ प्रचंड, दारुण; घनघोर: *a ~ storm, प्रचंड वादळ.* **furiously** *क्रिवि* संतापाने, बेफामपणे.

furlong /'फऽलॉङ्; *अमे* -लॉऽङ्/ *ना* [*गण*] २२० यार्ड किंवा २०१ मीटर्सचे अंतर.

furnace /'फऽनिस्/ *ना* [*गण*] धातू वितळविण्याची भट्टी.

furnish /'फऽनिश्/ *क्रि* [*सक*] १ फर्निचर ठेवणे, फर्निचरने सजवणे. २ (*औप*) पुरवणे, पुरवठा करणे. **furnishings** *ना* (*ब.व*) फर्निचर आणि इतर उपकरणे.

furniture /'फऽनिच(र्)/ *ना* [*अगण*] मोठ्या, हालवता येण्यासारख्या टेबल, खुर्च्या वगैरेसारख्या घरातील किंवा कचेरीतील वस्तू.

furrier /'फरिअ(र्)/ *ना* [*गण*] मऊ लव असलेले कापड करणारा किंवा विकणारा माणूस.

furrow /'फरऊ/ *ना* [*गण*] १ नांगराच्या फाळाने जमिनीला पाडलेली भेग, सरी, तास, सीता. २ चेहऱ्यावरील सुरकुती. **furrow** *क्रि* [*सक*] सुरकुत्या पाडणे, दुमडणे: *a ~ed brow, कपाळावर आणलेल्या आठ्या.*

furry ⇨ FUR.

further /'फऽद(र्)/ *क्रिवि* १ अधिक अंतर (काळातील किंवा जागेतील): *It's not safe to go any ~, अधिक पुढे जाणे धोक्याचे आहे.* २ शिवाय; तसेच: *F~, it has come to my attention ...., शिवाय, मला असं दिसून*

आलंय् की . . . . ३ अधिक/मोठ्या प्रमाणात, जास्त. **further** *वि* १ (काळात किंवा जागेने) अधिक दूरचा/लांबचा. २ अधिक, जास्त : ~ *information, अधिक माहिती.* **further** *क्रि* [*सक*] वाढविण्यास/प्रगती करण्यास मदत करणे, हातभार लावणे. **furtherance** *ना* [*अगण*] (*औप*) उन्नती, अभिवृद्धी, उत्कर्ष. **,further edu'cation** *ना* [*अगण*] १६ वयाच्या पुढच्या व्यक्तींना द्यायचे औपचारिक – पण विद्यापीठीय किंवा तांत्रिक नव्हे असे – शिक्षण. **furthermore** *क्रिवि* शिवाय. **furthermost** *वि* सर्वात लांबचा किंवा दूरचा.

furthest /'फऽदिस्ट्/ *वि, क्रिवि* ⇨ FAR.

furtive /'फऽटिव्ह्/ *वि* कोणाच्या लक्षात येणार नाही असा चोरटा (व्यवहार, हालचाली वगैरे), चोरीचा, गुप्त. **furtively** *क्रिवि* चोरटेपणाने. **furtiveness** *ना* [*अगण*] चोरटेपणा.

fury /'फ्युअरि/ *ना* [*अगण, गण*] प्रकोप, त्वेष; क्रोध, संताप.

fuse^1 /फ्यूझ्/ *ना* [*गण*] तारेचा छोटा तुकडा जो वितळला की विद्युत परिपथात खंड येतो, वितळतार. **fuse** *क्रि* [*अक, सक*] १ फ्यूज उडून बंद होणे : ~ *the lights, फ्यूज उडून दिवे जाणे.* २ तापल्याने वितळणे, तापवून वितळविणे; वितळवून जोडणे, डाग देणे.

fuse^2 /फ्यूझ्/ *ना* [*गण*] १ फटाका किंवा बाँबची वात, प्रज्वलक. २ (*अमे* तसेच **fuze**) बाँबचा स्फोट घडवून आणणारी त्याच्यातील युक्ती.

fuselage /'फ्यूझलाझ; *अमे* -स-/ *ना* [*गण*] विमानाचा पिंजरा, विमानाचे शरीर.

fusion /'फ्यूझन्/ *ना* [*गण, अगण*] अनेक गोष्टींचा मिलाफ, एकीकरण, संयोग, विलयन.

fuss /फस/ *ना* १ [*अगण, अे.व*] उगाचच केलेली धांदल, निरर्थक गडबड. २ (*वाक्प्र*) **make a fuss of sb** एखाद्याची अति काळजी घेणे, फाजील महत्त्व देणे. **fuss** *क्रि* [*अक*] लहानसहान गोष्टींचा फार बाऊ करणे, आऊचा बाऊ करणे. **fussy** *वि* (**-ier, -iest**) १ (*about*)// बारीकसारीक गोष्टींत फार लक्ष घालणारा. २ धांदरट, गडबड्या. ३ (पोषाख किंवा रीतीबाबत) भडक, बटबटीतपणे सजवलेला. **fussily** *क्रिवि* व्यर्थ धांदलीने; भडकपणे.

futile /'फ्यूटाइल्; *अमे* -टल्/ *वि* निष्फळ, व्यर्थ; अयशस्वी : *a ~ attempt, निष्फळ प्रयत्न.* **futility** /फ्यू'टिलटि/ *ना* [*अगण*] निष्फळता, व्यर्थपणा, निरर्थकता, पोकळपणा.

future /'फ्यूच(र्)/ *ना* १ **the future** [*अे.व*] वर्तमानानंतर येईल तो काळ, भविष्यकाळ : *in the ~, भविष्यकाळात.* २ [*गण*] भवितव्य : *The company's future is uncertain, कंपनीचे भवितव्य अनिश्चित आहे.* ३ [*अगण*] यशाची शक्यता, भवितव्य, सिद्धिसंभव : *There is no future in this job, या कामात काही भवितव्य नाही.* ४ (*वाक्प्र*) **in future** यापुढे/इथून पुढे, भविष्यात. **future** *वि* भावी, भविष्यकालीन.

futuristic /,फ्यूच'रिस्टिक्/ *वि* अद्ययावत् आणि वेगळा दिसणारा, भविष्यकाळी.

fuzz /फझ्/ *ना* [*अगण*] मऊ लव. **fuzzy** *वि* (**-ier, -iest**) १ (केसांबाबत) घट्ट कुरळे. २ (कापड वगैरेबाबत) मऊ आणि केसाकेसाचे. ३ आकार किंवा रूपरेषेत अस्पष्ट, धूसर. **fuzzily** *क्रिवि* अस्पष्टपणे. **fuzziness** *ना* [*अगण*] अस्पष्टता, धूसरपणा.

G g

G, g /जी/ *ना* [*गण*] (*ब.व* **G's, g's** /जीझ़्/) इंग्रजी वर्णमालेतील सातवे अक्षर.

g *संरू* ग्रॅम/ग्रॅम्स, ग्रॅ : *500g, ५०० ग्रॅ.*

gabardine (तसेच **gaberdine**) /'गॅबडीन्, ,गॅब'डीन/ *ना* १ [*अगण*] जाड दणकट कापड. २ [*गण*] अशा कापडाचा केलेला पावसाळी कोट.

gabble /'गॅब्ल्/ *क्रि* [*अक, सक*] न समजेल असे भरभर बोलणे, वटवट करणे. **gabble** *ना* [*अगण*] भरभर बोलणे, वटवट, बकबक.

gable /'गेइब्ल्/ *ना* [*गण*] उतरत्या छपराला आधार देणारा बाहेरच्या भिंतीचा त्रिकोणी भाग, चांदई.

gad /गॅड्/ *क्रि* (**-dd-**) (*क्रिब*) **gad about/ around** (*अनौप*) स्वतःच्या आनंदासाठी एका

ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे, भटकणे, उनाडणे.

gadget /'गॅजिट्/ *ना* [*गण*] छोटेसे यंत्र किंवा उपकरण, कळयंत्र. **gadgetry** *ना* [*अगण*] उपकरणे.

Gaelic /'गेइलिक्/ *ना* [*अगण*], *वि* १ आयर्लंडमधील केल्ट लोकांची (भाषा). २ /'गॅलिक्, तसेच 'गेइलिक्/ स्कॉटलंडमधील केल्ट लोकांची (भाषा).

gaffe /गॅफ्/ *ना* [*गण*] अनवधानाने केलेली कृती किंवा बोलणे, चूक, गफलत.

gag /गॅग्/ *ना* [*गण*] १ एखाद्याला बोलता येऊ नये म्हणून त्याच्या तोंडात कोंबलेला बोळा, तुंबरा. २ विनोद. **gag** *क्रि* (-gg-) [*सक*] तोंडात बोळा कोंबणे, एखाद्याचे तोंड बांधणे.

gaga /'गागा/ *वि* (*अनौप*) म्हातारचळ लागलेला, भ्रमिष्ट.

gage (*अमे*) = GAUGE.

gaggle /'गॅग्ल्/ *ना* [*गण*] १ हंसांचा थवा. २ कलकल/गडबड करणाऱ्या लोकांचा गट.

gaiety /'गेइअटि/ *ना* [*अगण*] आनंदीपणा, उल्हास; रंगेलपणा.

gaily /'गेइलि/ *क्रिवि* आनंदाने, उल्हासाने; रंगेलपणाने.

gain^1 /गेइन्/ *क्रि* [*अक, सक*] १ (काहीतरी हवे असलेले) मिळणे/मिळवणे, संपादणे : ~ *experience/an advantage, अनुभव/फायदा मिळणे.* २ वेग घेणे, वजन वाढणे. ३ (घड्याळाबाबत) पुढे जाणे : *My watch ~s two minutes a day, माझे घड्याळ रोज दोन मिनिटे पुढे जाते.* ४ (*वाक्प्र*) **gain ground** ➪ GROUND^1. **gain 'time** सबबी सांगून, हळूहळू विचार करून वगैरे वेळ काढणे. ५ (*क्रिब*) **gain on sb/sth** रेसमधे वगैरे, एखाद्याच्या अगदी जवळ येणे, बरोबर येणे, गाठणे.

gain^2 /गेइन्/ *ना* [*गण, अगण*] राशीतील किंवा पैशातील वाढ, लाभ, फायदा, लाभांश. **gainful** /-फ्ल्/ *वि* किफायतशीर : ~ *ful employment, फायदेशीर नोकरी.*

gait /गेइट्/ *ना* [*गण*] चालण्याची ढब, डौल.

gala /'गाल; *अमे* 'गेइल/ *ना* [*गण*] खास सार्वजनिक समारंभ किंवा करमणुकीचा कार्यक्रम, उत्सव.

galaxy /'गॅलक्सि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*गण*] मोठा तारकासमूह, तारामंडल, आकाशगंगा. २ **the Galaxy** [*अे.व*] पृथ्वी, इतर ग्रह, सूर्य, इतर तारे हे ज्याचे भाग आहेत आणि जे आकाशात फिकट पट्ट्यासारखे दिसते ते आपले तारामंडल, आपली आकाशगंगा. ३ (*ला*) प्रसिद्ध लोकांचा वर्ग, नामवंतांचे मंडल : *a ~ of famous singers, प्रसिद्ध गायकांचा वृंद.* **galactic** /ग'लॅक्टिक्/ *वि* आकाशगंगेबाबत.

gale /गेइल्/ *ना* [*गण*] १ सोसाट्याचा/वादळी वारा, झंझावात. २ हास्य वगैरेचा उमाळा.

gall^1 /गॉऽल्/ *ना* [*अगण*] १ = BILE. २ औद्धत्य, भलती हिंमत. **'gall-bladder** *ना* [*गण*] पित्त साठवणारा, यकृताशी जोडलेला शरीराचा भाग, पित्ताशय. **'gall stone** *ना* [*गण*] पित्ताशयातील खडा.

gall^2 /गॉऽल्/ *क्रि* [*सक*] चीड आणणे, संताप आणणे, खिजवणे.

gallant /'गॅलन्ट्/ *वि* १ शूर, मर्द. २ (पुरुषाबाबत) स्त्रियांची इज्जत करणारा, स्त्रीदाक्षिण्यशील. **gallantly** *क्रिवि* शूरपणाने; उमदेपणाने, स्त्रीदाक्षिण्याने. **gallantry** *ना* [*अगण*] पराक्रम, शूरत्व; स्त्री-दाक्षिण्य.

galleon /'गॅलिअन्/ *ना* [*गण*] १५ ते १७ व्या शतकातील स्पॅनिश शिडाचे जहाज.

gallery /'गॅलरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) १ कलावस्तूंचे प्रदर्शन करण्यासाठीची इमारत किंवा हॉल, कलादालन. २ हॉल किंवा चर्चमधे भिंतीला लागून केलेला कट्टा, कक्ष. ३ चित्रपटगृहातील माडीवरची आसने. ४ खाणीतील रस्ता.

galley /'गॅलि/ *ना* [*गण*] १ (पूर्वी) शिडे आणि वल्ही असलेले लंबुळके सपाट जहाज. २ जहाजावरील स्वयंपाकघर.

gallivant /ˌगॅलि'व्हन्ट्, 'गॅलिव्हॅन्ट्/ *क्रि* (*क्रिब*) **gallivant about** (*अनौप*) मौजमजेसाठी प्रवास करणे, मजेने हिंडणे.

gallon /'गॅलन्/ *ना* [*गण*] द्रवपदार्थ मोजण्याचे परिमाण, चार क्वार्टस् किंवा आठ पाइन्टस् (४.५ लिटर्स).

gallop /'गॅलप्/ *ना* [*गण*] घोड्याची वेगवान

दौड, चौकचाल, दुडांणचाल, भरधाव चाल : *at full ~, भरधाव वेगाने.* **gallop** *क्रि* १ [*अक, सक*] (घोडा) भरधाव वेगाने नेणे, घोडदौड करणे. २ [*अक*] (*अनौप*) घाई करणे.

gallows /'गॅलउझ्/ *ना* (बहुधा अे.व क्रियापदासह) गुन्हेगारांना टांगून मारण्याची लाकडी चौकट, वधस्तंभ.

galore /ग'लॉऽ(र्)/ *क्रिवि* भरपूर, विपुल : *prizes ~, विपुल बक्षिसे.*

galvanize /'गॅल्व्हनाइझ्/ *क्रि* [*सक*] १ गंजू नये म्हणून (लोखंडावर) जस्ताचा मुलामा देणे, जशदलेपन करणे. २ (*into*)// (एखाद्याला) धक्का देऊन काही करण्यास प्रवृत्त करणे.

gambit /'गॅम्बिद्/ *ना* [*गण*] १ बुद्धिबळातील (नंतर) फायदा करून देणारी सुरुवातीची खेळी, डावाची सुरुवात. २ (*ला*) कोणतीही पहिली खेळी, डावपेचाचा पहिला भाग.

gamble /'गॅम्‌·बल्/ *क्रि* [*अक*] १ जुगार खेळणे, द्यूत खेळणे. २ (*क्रिब*) **gamble on sth** एखाद्या गोष्टीचा धोका पत्करणे. **gamble** *ना* [*गण*] पैसे मिळवण्यासाठी किंवा यशासाठी पत्करलेला धोका, उडी. **gambler** *ना* [*गण*] जुगारी. **gambling** *ना* [*अगण*] जुगार, द्यूत.

gambol /'गॅम्‌·ब्ल्/ *क्रि* (-ll- *अमे* तसेच -l-) [*अक*] आनंदाने उड्या मारणे, नाचणे-बागडणे, बोकळणे.

game^{1} /गेइम्/ *ना* १ [*गण*] नियमबद्ध खेळ. २ **games** [*ब.व*] खेळ – विशेषतः मैदानी खेळांच्या स्पर्धा. ३ [*गण*] टेनिस वगैरेच्या मॅचचा एक भाग. ४ [*गण*] खेळाची सामग्री – उदा पट आणि फासे. ५ [*गण*] (*अनौप*) गुप्त योजना किंवा कपट, खेळी. ६ [*गण*] (*अनौप*) खेळ, उद्योग, धंदा : *Politics is a power ~, राजकारण हा सत्तेचा खेळ आहे.* ७ [*अगण*] प्राणी किंवा पक्ष्यांची केलेली शिकार, पारध. ८ (*वाक्प्र*) **give the 'game away** एखादे गुपित निष्काळजीपणे फोडणे. **(be) ˌoff one's 'game** नेहमीसारखे चांगले खेळण्यास असमर्थ असणे. **'gamekeeper** *ना* [*गण*] शिकारीचे राखण करण्यास नेमलेला माणूस, मृगयारक्षक.

game^{2} /गेइम्/ *वि* धाडसी, धोक्यात उडी घालणारा, साहसी. **gamely** *क्रिवि* धाडसाने.

gammon /'गॅमन्/ *ना* [*अगण*] डुकराची शेकून भाजलेली किंवा खारवून वाळवलेली मागची तंगडी.

gamut /गॅमद्/ *ना* **the gamut** [*अे.व*] एखाद्या गोष्टीची सर्व विविध रूपे, तरतऱ्हा, विभिन्न प्रकार.

gander /'गॅन्ड(र्)/ *ना* [*गण*] नर हंस, कलहंस.

gang /गॅङ्/ *ना* [*गण,* तसेच ब.व क्रियापदासह अे.व] १ गुंडांची किंवा कामगारांची टोळी, कंपू. २ तरुणांचा समूह किंवा घोळका. **gang** *क्रि* (*क्रिब*) **gang up (on sb)** (एखाद्याच्या विरुद्ध) एकत्र येणे.

gangling /'गॅङ्ग्लिङ्/ *वि* (व्यक्तीबाबत) उंच, लुकडा आणि बेढब, फाटका, बेडौल.

gangrene /'गॅङ्ग्रीन्/ *ना* [*अगण*] रक्तप्रवाह बंद पडून शरीराचा भाग मृतवत् होणे, कोथ. **gangrenous** /'गॅङ्ग्रिनस्/ *वि* सडलेला, मृतवत् झालेला.

gangster /'गॅङ्स्ट(र्)/ *ना* [*गण*] सशस्त्र टोळीतील गुंड.

gangway /'गॅङ्वेइ/ *ना* [*गण*] १ बोटीवरून किनाऱ्यावर टाकायचा हालता पूल. २ खुर्च्यांच्या रांगांतील मोकळी जागा.

gaol (*अमे* बहुधा **jail**) /जेइल्/ *ना* [*गण, अगण*] तुरुंग, कारागृह, कैदखाना. **gaol** (*अमे* बहुधा **jail**) *क्रि* [*सक*] (एखाद्याला) तुरुंगात टाकणे. **gaoler** (*अमे* बहुधा **jailer**) *ना* [*गण*] तुरुंगाधिकारी.

gap /गॅप्/ *ना* [*गण*] १ एखाद्या वस्तूतील चीर किंवा दोन वस्तूंतील फट. २ मोकळा काळ, अवसर : *~ between school and university, शाळा आणि विद्यापीठ यातील मधला काळ* म्हणजेच *शालेय शिक्षण संपल्यानंतरचा आणि विद्यापीठीय शिक्षण सुरू होण्यापूर्वीचा मधला काळ.* ३ (*ला*) अभाव, त्रूटी; अलगपणा : *~s in one's knowledge, एखाद्याच्या ज्ञानातील त्रूटी.*

gape /गेइप्/ *क्रि* [*अक*] १ आश्चर्याने तोंडाचा चंबू करून पाहणे, आ वासून पाहणे. २ सताड उघडा : *a gaping hole, उघडे विवर/भोक.* **gape** *ना* [*गण*] वासलेला आ.

garage /'गॅराझ्, 'गॅरिज्; *अमे* ग'राझ्/ *ना* [*गण*] १ इमारतीतील गाडी ठेवण्याची जागा, गाडीघर. २ गाड्या दुरुस्त करण्याचे ठिकाण. **garage** *क्रि* [*सक*] गॅरेजमधे वाहन ठेवणे.

garbage /'गाबिज्/ *ना* [*अगण*] (खास करून *अमे*) कचरा. **'garbage can** *ना* [*गण*] (*अमे*) कचरापेटी, कचऱ्याचा डबा.

garbled /'गाब्ल्ड्/ *वि* गोंधळात पाडणारा आणि अर्धवट, अपुरा : *a ~ message, गोंधळात पाडणारा अर्धवट निरोप.*

garden /'गाड्न्/ *ना* १ [*गण, अगण*] फुलं, भाजीपाला वगैरे उगविण्याकरिता वापरलेली खाजगी जमीन, बाग, मळा. २ **gardens** [*ब.व*] सार्वजनिक उद्यान, पार्क. **garden** *क्रि* [*अक*] बागकाम करणे. **'garden centre** *ना* [*गण*] बागेतील रोपे, हत्यारे वगैरे विकण्याचे केन्द्र. **gardener** *ना* [*गण*] बागकाम करणारा माणूस, माळी. **gardening** *ना* [*अगण*] बागकाम. **garden party** *ना* [*गण*] बागेत दिलेले औपचारिक भोजन.

gargle /'गाग्ल्/ *क्रि* [*अक*] गुळण्या करून घसा धुणे. **gargle** *ना* १ [*गण*] गुळण्यासाठी वापरायचा द्रवपदार्थ. २ [*ए.व*] (केलेली) गुळणी.

gargoyle /'गागॉइल्/ *ना* [*गण*] पावसाचे पाणी निचरण्यासाठी चर्च वगैरेच्या छपरावरील हिडीस प्राण्याची दगडी मूर्ती.

garish /'गेअरिश्/ *वि* फार भडक, प्रखर. **garishly** *क्रिवि* भडकपणे.

garland /'गालन्ड्/ *ना* [*गण*] फुलांचा हार, माळ, गजरा. **garland** *क्रि* [*सक*] हार घालणे.

garlic /'गालिक्/ *ना* [*अगण*] लसूण.

garment /'गामन्ट्/ *ना* [*गण*] (*औप*) कपडा, वस्त्र.

garnish /'गानिश्/ *क्रि* [*सक*] (अन्नपदार्थ) सजवणे किंवा नटवणे. **garnish** *ना* [*गण*] (अन्न) सजवण्यासाठी वापरायची गोष्ट.

garret /'गॅरट्/ *ना* [*गण*] घराच्या अगदी वरची छोटी खोली, माळ्यावरची खोली, कातरमाळा.

garrison /'गॅरिसन्/ *ना* [*गण*, तसेच ब.व क्रियापदासह ए.व] किल्ला किंवा शहरातील सैनिकांचा तळ, छावणी. **garrison** *क्रि* [*सक*] सैनिकांचा तळ ठोकून रक्षण करणे.

garrulous /'गॅरलस्/ *वि* (*औप*) बडबड्या, भशाळ, वाचाळ.

garter /'गाट(र्)/ *ना* [*गण*] पायमोजा किंवा स्टॉकिंग खाली घसरू नये म्हणून वापरायची ताणली जाणारी पट्टी, मोजेबंद.

gas /गॅस्/ *ना* (*ब.व* **~es**; *अमे* तसेच **~ses**) १ [*गण, अगण*] हवेसारखा पदार्थ, वायू. २ [*अगण*] स्वयंपाक करण्यास वगैरे वापरायचा गॅस. ३ [*अगण*] (*अमे अनौप*) पेट्रोल. **gas** *क्रि* (**-ss-**) [*सक*] (एखाद्याला) गॅस देऊन मारणे. **'gasbag** *ना* [*गण*] (*अनौप अधिक्षेपी*) सतत बडबड करणारा माणूस. **gaseous** /'गॅसिअस, 'गेइसिअस्/ *वि* वायुरूप, वायूचा, वायुवत्. **'gas-fitter** *ना* [*गण*] गॅसपाईप, गॅस-हीटर्स, कुकर्स वगैरे जोडणारा/लावणारा माणूस. **'gaslight** *ना* [*गण, अगण*] गॅसच्या ज्वलनाने पडणारा प्रकाश, गॅसबत्तीचा उजेड. **'gasman** /-मॅन्/ *ना* [*गण*] (*ब.व* **-men** /-मेन्/) (*अनौप*) गॅस वापरल्याची नोंद करणाऱ्या मीटरवरून बिल करणारा किंवा गॅस हीटर्स वगैरे दुरुस्त करणारा माणूस. **'gas mask** *ना* [*गण*] विषारी वायूंपासून संरक्षण करणारे श्वासोच्छ्वासाचे उपकरण, वायुत्राण. **'gas station** *ना* [*गण*] (*अमे*) पेट्रोल पंप. **gassy** *वि* (**-ier, -iest**) वायुरूप, वायुवत्; वायुयुक्त : *~sy beer, वायुयुक्त बियर.* **'gasworks** *ना* [*गण*] (*ब.व* **gasworks**) कोळशापासून गॅस बनवण्याचे केन्द्र.

gash /गॅश्/ *ना* [*गण*] (*in*)// घाव, खोल जखम. **gash** *क्रि* [*सक*] घाव घालणे.

gasket /'गॅस्किट्/ *ना* [*गण*] दोन धातूच्या पट्ट्यांतील सांध्यातून तेल, वाफ वगैरे निसदू नये म्हणून त्यात घालायची मऊ, चपटी अशी पट्टी किंवा रिंग.

gasoline (तसेच **gasolene**) /'गॅसलीन्/ *ना* [*अगण*] (*अमे*) पेट्रोल, वायुतैल.

gasp /गास्प्/ *क्रि* १ [*अक*] आश्चर्य, वेदना वगैरेमुळे जोरजोराने श्वासोच्छ्वास करणे; धाप लागणे, धापा टाकणे. २ [*सक*] धापा टाकत बोलणे. **gasp** *ना* [*गण*] धाप, दम.

gastric /'गॅस्ट्रिक्/ *वि* जठराचा, जाठर, पोटाचा : ~ *ulcers, जठर व्रण, आमांशयिक व्रण.*

gastro-enteritis /,गॅस्ट्रउ,एन्ट'राइटिस्/ *ना* [*अगण*] आतडी आणि जठर यांना सूज येऊन वेदना होणारा रोग, जठरत्रिदाह.

gate /गेइट्/ *ना* [*गण*] १ दार. २ विमानतळाच्या इमारतीतून विमानात जाण्याचा मार्ग. ३ खेळ पाहण्यास आलेले प्रेक्षक (किंवा त्यांनी दिलेले पैसे). **'gatecrash** *क्रि* [*अक, सक*] (पार्टीला) निमंत्रण नसताना जाणे, आगंतुकासारखे जाणे. **'gatecrasher** *ना* [*गण*] आगंतुक. **'gatepost** *ना* [*गण*] दाराचा खांब. **'gateway** *ना* [*गण*] १ प्रवेशद्वाराचा मार्ग. २ [बहुधा *अे.व*] *to//* (*ला*) एखादी गोष्ट साध्य करण्याचा मार्ग : *the ~way to success, यशाचा मार्ग.*

gâteau /'गॅटउ; *अमे* गॅ'टउ/ *ना* [*गण*] (*ब.व* ~x किंवा ~s) मोठा, रुचकर क्रीमकेक.

gather /'गॅद(र्)/ *क्रि* १ [*अक, सक*] एकत्र येणे/करणे, गोळा होणे/करणे. २ [*सक*] (फळे, फुले वगैरे) वेचणे, टिपणे, खुडणे. ३ [*सक*] हळूहळू जमवणे, मिळवणे, जमा करणे : ~ *information, माहिती मिळवणे.* ४ [*सक*] समजणे, कळणे : *I ~ she's looking for a job, ती नोकरीच्या शोधात आहे असं मला कळतं.* ५ [*सक*] प्रमाण वाढणे, अधिक होणे : ~ *speed, वेग वाढणे.* ६ [*सक*] (कपडा) चुण्या करून आवळणे. **gathering** *ना* [*गण*] संमेलन.

gauche /गउश्/ *वि* लोकांमधे कसे वागावे व कसे बोलावे याची जाण नसणारा.

gaudy /'गॉऽडि/ *वि* (**-ier, -iest**) (*अधिक्षेपी*) भडक, बटबटीत. **gaudily** *क्रिवि* बटबटीतपणे, भडकपणे.

gauge (*अमे तसेच* **gage**) /गेइज्/ *ना* [*गण*] १ मोजायचे माप, मापक, परिमाण : *a petrol ~, पेट्रोल मोजायचे माप.* २ रेल्वेच्या दोन रूळांमधले अंतर. ३ जाडी, विशेषतः धातूची पट्टी, तार किंवा वायर यांची. ४ (*ला*) तुलनेचे साधन; मोजमाप : *a ~ of her progress, तिच्या प्रगतीचे मोजमाप.* **gauge** *क्रि* [*सक*] १ बरोबर तोलणे, मोजणे. २ (*ला*) अंदाज करणे.

gaunt /गॉऽन्ट्/ *वि* (माणसाबाबत) आजार किंवा उपासमारीने कृश झालेला, लुकडा, रोड, हाडकुळा. **gauntness** *ना* [*अगण*] काटकुळेपणा, लुकडेपणा.

gauntlet /'गॉऽन्ट्लिट्/ *ना* [*गण*] मनगट झाकणारा जाडजुड, दणकट हातमोजा.

gauze /गॉऽझ्/ *ना* [*अगण*] जखमेवर बांधायचे पातळ, जाळीदार कापड.

gave GIVE^{1} चा *भूत.*

gawky /'गॉऽकि/ *वि* (**-ier, -iest**) (विशेषतः उंच व्यक्तीबाबत) बेढब, बेडौल. **gawkiness** *ना* [*अगण*] बेढबपणा, बेडौलपणा.

gawp /गॉऽप्/ *क्रि* [*अक*] (*अनौप*) मूर्खासारखे किंवा बेशरमपणे टक लावून पाहणे, टकमक पाहणे.

gay /गेइ/ *वि* १ समलिंगी आकर्षण असणारा. २ आनंदी; उल्हसित : ~ *laughter/colours, प्रसन्न हास्य/रंग.* **gay** *ना* [*गण*] समलिंगी आकर्षण असणारा माणूस.

gaze /गेइझ्/ *क्रि* [*अक*] (*at*)*//* लांबवर एकटक पाहणे, एकाग्र दृष्टीने पाहणे, अनिमिष नेत्रांनी पाहणे. **gaze** *ना* [*अे.व*] टक, अनिमिष दृष्टी.

gazelle /ग'झेल्/ *ना* [*गण*] छोटे दिमाखदार हरीण, मृग.

gazette /ग'झेट्/ *ना* [*गण*] कायदेशीर नोटिसा, वार्ता वगैरे देणारे शासकीय वार्तापत्र, राजपत्र, सरकारी आज्ञापत्र.

gazump /ग'झम्प्/ *क्रि* [*सक*] (*ब्रि अनौप अधिक्षेपी*) (बहुधा कर्मणी) (खरीददाराशी) किंमतीचा सौदा झाल्यावर घराची किंमत वाढवणे.

GB /,जी'बी/ *संरू* Great Britain.

GCSE /,जी सी एस् 'ई/ *ना* [*गण*] (*ब्रि*) General Certificate of Secondary Education याचे संक्षिप्त रूप; साधारण १६ वर्षाच्या शालेय विद्यार्थ्यांनि दिलेली एखाद्या विषयाची परीक्षा.

GDR /,जी डी 'आ(र्)/ *संरू* German Democratic Republic म्हणजेच पूर्वीचा

पूर्व जर्मनी.

gear /गिअ(र्)/ *ना* १ [*गण, अगण*] यंत्रातील दात्यांच्या एकत्र काम करणाऱ्या चाकांचा संच, दंतुरचक्र, दंतचक्र, गतिमाला, चक्रण: *The car has five ~s, ही पाच गिअरची गाडी आहे* ○ *change ~, गिअर बदलणे.* २ [*गण*] सामग्री: *camping ~, तळ ठोकण्याची सामग्री.* ३ [*अगण*] कळ, चक्रे वगैरेनी युक्त असे उपकरण: *the 'landing-~ of an aircraft, विमानाचे उतरण्याचे साधन किंवा जमिनीवर टेकण्याचे साधन.* **gear** *क्रि* (*क्रिब*) **gear sth to/towards sth** विशिष्ट उद्दिष्टासाठी एखादी गोष्ट जुळती करणे किंवा योजणे, तजवीजीला लागणे: *The whole city is ~ed to the needs of tourists, पर्यटकांच्या गरजा भागविण्यास सर्व शहर तजवीजीला लागले आहे.* **gear (sb) up (for/to sth)** (एखाद्याला) (एखाद्या गोष्टीसाठी) तयार करणे, तयार होणे. **'gearbox** *ना* [*गण*] यंत्राच्या किंवा मोटारीच्या गिअर्सची पेटी. **'gear-lever, 'gear-stick** (*अमे* बहुधा **'gearshift**) *ना* [*गण*] गिअर बदलण्याची तरफ/दांडी.

geese GOOSE चे *ब.व.*

gelatine /'जेलटीन्, -टिन्/ (तसेच विशेषतः *अमे* **gelatin** /-टिन्/) *ना* [*अगण*] जेली करताना वापरायचा रंगहीन चवहीन पदार्थ, शुद्ध सरस, साका.

gelding /'गेल्डिङ्/ *ना* [*गण*] खच्ची केलेला घोडा, बडवलेला घोडा.

gelignite /'जेलिग्नाइट्/ *ना* [*अगण*] शक्तिशाली स्फोटक.

gem /जेम्/ *ना* [*गण*] १ रत्न, जवाहीर. २ (*ला*) फार महत्त्वाची वस्तू किंवा व्यक्ती, हिरा.

gender /'जेन्ड(र्)/ *ना* [*गण, अगण*] १ (*व्याकरण*) लिंग – पुल्लिंग, स्त्रीलिंग, नपुंसकलिंग वगैरे. २ (*औप*) स्त्री-पुरुष लिंगभेद, लिंग.

gene /जीन्/ *ना* [*गण*] वांशिकता ठरविणारा पेशीतील घटक, जनुक.

genealogy /,जीनि'ॲलजि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] वंशाच्या इतिहासाचा अभ्यास, वंशवृक्ष, वंशावळ. २ [*गण*] घराण्याचा इतिहास दाखविणारा पट, वंशवृक्ष. **genealogical** /,जीनिअ'लॉजिक्ल्/ *वि* वंशवृक्षीय, वंशावळीचा.

general /'जेन्रल्/ *वि* १ सर्वांना किंवा बहुतेकांना लागू पडणारा, सर्वसाधारण, सर्वसामान्य: *of ~ interest, सर्वसामान्यांच्या जिव्हाळ्याचा.* २ खास असा नसलेला, सामान्य: *~ knowledge, सामान्यज्ञान.* ३ तपशीलवार नसलेला, एकंदर, साधारण: *~ impressions, सर्वसाधारण मतं.* ४ (उपाधीबाबत) प्रमुख, मुख्य: *the ,Postmaster-'General, प्रमुख पोस्टमास्तर.* ५ (*वाक्प्र*) **in 'general** सर्वसाधारणपणे, सामान्यतः, बहुधा. **general** *ना* [*गण*] वरिष्ठ सैन्याधिकारी, सेनापती. **general anaes'thetic** *ना* [*गण*] सर्व शरीरावर परिणाम घडविणारे बधिरीकरण. **,general e'lection** सर्व मतदारांनी राष्ट्रीय संसदेसाठी प्रतिनिधी निवडण्याकरिता घेतलेली निवडणूक, सार्वत्रिक निवडणूक. **generality** /,जेन'रॅलटि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*गण*] सर्वसाधारण विधान, अविशेष विधान. २ [*अगण*] सर्वसामान्यत्व. **generally** *क्रिवि* १ बहुधा, सर्वसाधारणपणे: *I ~ly get up early, मी बहुतेक वेळा लवकर उठतो.* २ बहुसंख्य लोकांना: *The plan was ~ly welcomed, या योजनेचे सर्वसाधारणपणे/बहुसंख्य लोकांनी स्वागत केले.* ३ एकंदर पाहता, सर्वसाधारणपणे; तपशील बाजूला ठेऊन: *~ly speaking, एकंदरीत सांगायचे झाले तर.* **,general prac'titioner** *ना* [*गण*] सर्व प्रकारच्या रोगांवर दवाखान्यात किंवा घरी जाऊन औषधे देणारा डॉक्टर. **,general 'strike** *ना* [*गण*] बहुसंख्य किंवा सर्व कामगारांनी केलेला संप, सार्वत्रिक संप.

generalize /'जेन्रलाइझ्/ *क्रि* [*अक*] सर्वसाधारण विधान करणे, व्यापक नियम/सिद्धान्त बांधणे. **generalization** /,जेन्रलाइ'झेश्न्; *अमे* -लि'झ्/ *ना* [*गण, अगण*] सर्वसामान्य विधान, व्यापक अर्थाने केलेला नियम.

generate /'जेनरेइट्/ *क्रि* [*सक*] निर्माण करणे, उत्पन्न करणे: *~ electricity, विद्युत्‌निर्मिती करणे.* **generative** /'जेनरटिव्ह्/ *वि* निर्माण करणारा, सर्जक, जनक. **generator** *ना* [*गण*] विद्युत निर्माण

करणारे यंत्र, विद्युत्‌जनित्र.

generation /ˌजेन'रेइश्न्/ *ना* १ [*गण*] एकाच काळातले/काळात जन्मलेले लोक, पिढी. २ [*गण*] कुटुंबाची पिढी. ३ [*अगण*] निर्मिती, उत्पादन, जनन: *the ~ of heat, उष्णतेची निर्मिती.*

generic /जि'नेरिक्/ *वि* (*औप*) सर्व गटाला/जातीला सामान्य असा, प्रजातीय, प्रजातीः **generically** /-क्लि/ *क्रिवि* प्रजातीचा विचार करता, प्रजातिगत.

generous /'जेनरस्/ *वि* १ उदार, मुक्तहस्ते देणारा: *He's ~ with his money, त्याचा हात पैसे देण्यात सढळ आहे.* २ नेहमीपेक्षा खूप मोठा, भरभक्कम, भरपूर. **generosity** /ˌजेन'रॉसटि/ *ना* [*अगण*] औदार्य, सढळपणा. **generously** *क्रिवि* सढळपणे, उदारपणे; भरपूर.

genetic /जि'नेटिक्/ *वि* जीनबाबतचा, जीनात्मक, जीनी. **genetically** /-क्लि/ *क्रिवि* जीनने, जीनात्मकतेने. **genetics** *ना* (अे.व क्रियापदासह) एका पिढीतून दुसऱ्या पिढीकडे गुणविशेष कसे जातात याचा अभ्यास, अनुवंशशास्त्र, आनुवंशिकी.

genial /'जीनिअल्/ *वि* उदार आणि प्रसन्न, मनमिळाऊ. **genially** *क्रिवि* मनमिळाऊपणे.

genital /'जेनिट्ल्/ *वि* प्राण्यांच्या पुनरुत्पादक अवयवांविषयक, जननविषयक. **genitals** *ना* [*ब.व*] जननेन्द्रिये, लिंग.

genius /'जीनिअस्/ *ना* १ (क) [*अगण*] कुशाग्र बुद्धी, असामान्य कर्तृत्व, प्रतिभा, लोकोत्तर बुद्धी. (ख) [*गण*] अशी व्यक्ती. २ [*अे.व*] असामान्य स्वाभाविक शक्ती: *have a ~ for languages, असामान्य स्वाभाविक भाषाप्रभुत्व.*

genocide /'जेनसाइड्/ *ना* [*अगण*] एखाद्या राष्ट्राचा किंवा जातीचा नाश, वंशविच्छेद, जातिसंहार, राष्ट्रसंहार.

genre /'झान्‌र्/ *ना* (*औप*) रीती किंवा प्रकार; वर्ग.

gent /जेन्ट्/ *ना* १ [*गण*] (*अनौप* किंवा *गंमत*) सद्‌गृहस्थ, भला माणूस. २ **the Gents** (*क्रि अनौप*) (बहुधा अे.व क्रियापदासह) पुरुषांसाठीचे सार्वजनिक प्रसाधनकक्ष.

genteel /जेन्'टील्/ *वि* सभ्य – विशेषतः जरा जादाच सभ्य/सालस.

gentile /'जेन्टाइल्/ *ना* [*गण*], *वि* ज्यू नसलेला (माणूस), यहुदीतर.

gentle /'जेन्·द्ल्/ *वि* (**~r** /-ल(र्)/, **~st** /-लिस्ट्/) कठोर किंवा तापट नसलेला, मृदू किंवा शांत, सौम्य. **gentleness** *ना* [*अगण*] शांतवृत्ती, मृदुता किंवा कोमलता. **gently** /-लि/ *क्रिवि* शांतवृत्तीने, सौम्यपणे, हलकेच.

gentleman /'जेन्·द्ल्मन्/ *ना* [*गण*] (*ब.व* **-men** /-मन्/) १ सभ्य आणि शिष्टाचार पाळणारा, सद्‌गृहस्थ, सज्जन. २ (सभ्य वापर) कोणीही माणूस. ३ (*जुना, अप्रचलित*) पैसा आणि प्रतिष्ठा असणारा माणूस, प्रतिष्ठित. **gentlemanly** *वि* (*औप* किंवा *अप्रचलित*) सज्जन, सभ्य गृहस्थाचा किंवा सभ्य गृहस्थाप्रमाणे.

gentry /'जेन्ट्रि/ *ना* **the gentry** [*ब.व*] सरदार-उमरावांच्या खालचे पण समाजातील वरच्या वर्गातील लोक, उच्चवर्गीय लोक, शिष्टजन.

genuine /'जेन्युइन्/ *वि* खरा, अस्सल; सत्य. **genuinely** *क्रिवि* खरेपणाने, खरोखर; सत्य रीतीने. **genuineness** *ना* [*अगण*] खरेपणा, अस्सलपणा; सत्यता.

genus /'जीनस्/ *ना* [*गण*] (*ब.व* **genera** /'जेनर/) एकाच कुळातील प्राणी किंवा वनस्पती यांचा विभाग, प्रजाती, गोत्र.

geography /जि'ऑग्रफि/ *ना* [*अगण*] १ भूपृष्ठ, हवामान, देश, लोक वगैरेचा अभ्यास करणारे शास्त्र, भूगोल. २ एखाद्या विशिष्ट भूप्रदेशाचे भौगोलिक विशेष. **geographer** /-फ(र्)/ *ना* [*गण*] भूगोलतज्ज्ञ. **geographical** /ˌजिअ'ग्रॅफिक्ल्/ *वि* भौगोलिक. **geographically** /-क्लि/ *क्रिवि* भौगोलिक-दृष्ट्या.

geology /जि'ऑलजि/ *ना* [*अगण*] १ पृथ्वीचे खडक, कवच वगैरेचा अभ्यास करणारे शास्त्र, भूशास्त्र, भूविज्ञान, भूगर्भशास्त्र. २ विशिष्ट भूप्रदेशातील खडक वगैरे भूशास्त्रीय विशेषांचा अभ्यास. **geological** /जिअ'लॉजिक्ल्/ *वि* भूवैज्ञानिक, भूशास्त्रीय. **geologically** /-क्लि/ *क्रिवि* भूविज्ञानाच्या दृष्टीने. **geolo-**

gist /जि'ऑलजिस्ट्/ *ना* [*गण*] भूवैज्ञानिक, भूगर्भशास्त्रज्ञ.

geometry /जि'ऑमट्रि/ *ना* [*अगण*] रेघा, कोन आणि आकृती यांच्यातील परस्पर संबंधांचा अभ्यास, भूमिती. **geometric** /जिअ'मेट्रिक्/ (तसेच **geometrical**) *वि* भूमितीय.

geranium /ज'रेइनिअम्/ *ना* [*गण*] तांबडी, गुलाबी किंवा पांढरी फुले येणारे एक फुलझाड.

geriatrics /,जेरि'ॲट्रिक्स्/ *ना* (अे.व क्रियापदासह) म्हाताऱ्या लोकांचे आरोग्यशास्त्र, वृद्धोपचार. **geriatric** *वि* वृद्धोपचारविषयक, वृद्धांच्या आरोग्यविषयक.

germ /जऽम्/ *ना* १ [*गण*] रोगाचे कारण असू शकणारा सूक्ष्म जीव, जंतू. २ [*अे.व*] *of//* सुरुवात, बीज : *the ~ of an idea, एखाद्या कल्पनेचे बीज.*

German /'जऽमन्/ *ना* १ [*अगण*] जर्मन भाषा. २ [*गण*] जर्मन व्यक्ती. **German** *वि* जर्मन देशाचा, जर्मन भाषेचा, जर्मन लोकांचा, जर्मन. **,German 'measles** *ना* [*अगण*] अंगावर पुरळ उठविणारा एक रोग, गोवर.

germinate /'जऽमिनेइट्/ *क्रि* [*अक, सक*] बियांना मोड येणे, अंकुर फुटणे, अंकुर वाढवणे. **germination** /,जऽमि'नेइश्न्/ *ना* [*अगण*] अंकुरोद्भव, अंकुरण.

gerund /'जेरन्ड्/ *ना* [*गण*] नामाप्रमाणे वापर करायचे असे इंग्रजी क्रियापदाला *-ing* प्रत्यय लावून केलेले रूप (उदा 'fond of swimming', 'पोहण्याची आवड').

gestation /जे'स्टेइश्न्/ *ना* [*अगण*] गर्भारशीपणाचा काळ किंवा प्रक्रिया, गर्भावस्था, गर्भारपण, गर्भवहन.

gesticulate /जे'स्टिक्युलेइट्/ *क्रि* [*अक*] (*औप*) आपल्या भावना/विचार व्यक्त करण्यासाठी हातवारे करणे, हावभाव करणे. **gesticulation** /जे,स्टिक्यु'लेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] हातवारे, अंगविक्षेप, हावभाव, नखरा.

gesture /'जेस्च(र्)/ *ना* १ [*गण, अगण*] कल्पना, भावना वगैरे व्यक्त करण्यासाठी केलेले हातवारे किंवा चेहऱ्याची हालचाल, हावभाव, कायिक अभिनय. २ [*गण*] (*ला*) भावना व्यक्त करणारी कृती, -सूचक कृती : *a ~ of support/defiance, पाठिंबा दर्शविणारी किंवा बंडखोरी दर्शविणारी कृती.*

get /गेट्/ *क्रि* (**-tt-**, *भूत, भूत वि* **got** /गॉट्; *अमे भूत वि* **gotten** /'गॉट्न्/) १ [*सक*] मिळवणे, मिळणे : *~ a new car, नवी गाडी मिळवणे.* २ [*सक*] पोहोचणे, पावणे : *~ a letter, पत्र मिळणे/पोहोचणे.* ३ [*सक*] आणणे, घेऊन येणे : *G~ your coat, तुझा कोट घेऊन ये.* ४ [*सक*] शिक्षा म्हणून मिळणे/होणे : *~ six months, सहा महिन्यांची मिळणे म्हणजे सहा महिने तुरुंगात जाणे.* ५ [*सक*] -ने प्रवास करणे, प्रवासास मिळणे : *~ a plane to Rome, रोमला जायला विमान मिळणे.* ६ [*सक*] ग्रासणे : *~ flu/a headache, फ्लू होणे/डोके दुखणे.* ७ [*सक*] (जेवण वगैरे) बनविणे. ८ [*सक*] (**क**) पकडणे : *The police got the robber, पोलिसांनी दरोडेखोराला पकडले.* (**ख**) ठार करणे; शिक्षा करणे : *I'll ~ you for that! मी तुला त्याची शिक्षा करीन.* ९ [*अक, सक*] होणे, करणे, घेणे : *~ wet/dressed, ओले होणे/कपडे घालणे/करणे* ○ *~ a box open, पेटी उघडून घेणे* ○ *G~ your hair cut, तू केस कापून घे* ○ *He got* (ie was) *killed in an accident, तो अपघातात मेला.* १० [*अक*] (**क**) एखादी पातळी गाठणे, एखाद्या स्थितीला येणे/पोहोचणे : *~ to know someone, एखाद्याची ओळख होणे.* (**ख**) एखादी गोष्ट करायला लागणे, प्रारंभ करणे : *We soon got talking, लवकरच आम्ही एकमेकांशी बोलू लागलो.* ११ [*सक*] एखाद्याकडून एखादी गोष्ट करवणे : *I can't ~ her to understand, तिला समजेल असं मला काही करता येत नाही* ○ *He got me to help him with his homework, त्याच्या गृहपाठात त्याने मला मदत करायला लावली.* १२ [*अक, सक*] हालणे/हालवणे (बहुधा कष्टाने), कसेबसे सरकवणे : *~ off the bus, बसमधून कसेबसे उतरणे* ○ *We can't ~ the piano downstairs, हा पियानो आम्हाला खालच्या मजल्यावर नेता येत नाही* ○ *~ a message to sb, एखाद्याला निरोप पाठवणे.* १३ [*अक*] *to//* येणे, पोहोचणे : *~ home early, घरी लवकर येणे* ○ *What time did you ~ to London? तू लंडनला किती वाजता पोहोचलास?* १४ [*सक*] (*अनौप*) समजणे, कळणे : *I don't ~*

you, मला तुझं समजत नाही. १५ [सक] (*अनौप*) गोंधळवणे, बुचकळ्यात पाडणे : *That's got you! त्याने तू भांबवलायस्.* १६ [सक] त्रास देणे, वैताग आणणे : *Loud pop music really ~s me, मोठ्या आवाजातील पॉप संगीताने मला वैताग येतो.* १७ (*वाक्प्र*) **get into a groove** ➪ GROOVE. **get somewhere/anywhere/nowhere** (*अनौप*) काहीतरी/काहीही मिळवणे/न मिळवणे : *I tried to persuade him but I got nowhere, त्याचं मन वळवायचा मी प्रयत्न केला पण त्यातून काहीही निघेना म्हणजेच मला अपयश आले.* **get to grips** ➪ GRIP. १८ (*क्रिब*) **get (sth) a'cross (to sb)** समजावून देणे, पोहोचणे, पोहोचवणे. **get a'head (of sb)** (एखाद्यापेक्षा) जास्त प्रगती करणे, (एखाद्याच्या) पुढे जाणे. **get a'long** = GET ON (WITH STH) (क). **get a'long (with sb)** = GET ON (WITH SB). **'get at sb** (*अनौप*) एखाद्यावर टीका करणे : *Stop ~ting at me! माझ्यावर टीका करणे बंद कर!* **get at sth** **(क)** पोहोचणे. **(ख)** शोधणे, सापडणे : *~ at the truth, सत्य सापडणे.* **be getting at sth** अप्रत्यक्षपणे सूचित करणे : *What are you ~ting at? तुला काय सुचवायचंय्?* **get a'way** **(क)** सटकणे, निसटणे, पळून जाणे : *Two prisoners got away, दोन कैदी निसटले.* **(ख)** सुट्टी मिळणे, सुट्टीवर जाणे : *~ away for two weeks in France, दोन आठवडे फ्रान्सला सुट्टीवर जाणे.* **get away with sth** चूक करून शिक्षा न होणे, प्रकरणातून सहीसलामत सुटणे : *~ away with cheating, फसवणूक करूनही काही न होता बाहेर पडणे.* **get by** कसेबसे राहणे, जगणे, तग धरून राहणे : *~ by on a small salary, कमी पगारात कसेबसे भागवणे/चालवणे.* **get sb 'down** (*अनौप*) एखाद्याला निराश करणे, उदास करणे. **get sth down** एखादी गोष्ट कष्टाने गिळणे. **get down to sth** एखादी गोष्ट करण्यास मनापासून सुरुवात करणे, एखादी गोष्ट मनावर घेऊन करणे : *~ down to work/business, कामाला/धंद्याला मनापासून प्रारंभ करणे.* **get in** येणे : *The train got in late, गाडी उशिरा आली.* **get sb in** एखादी गोष्ट/काम करण्यास एखाद्याला बोलावणे : *~ someone in to fix the TV, टीव्ही लावायला एखाद्याला बोलावणे.* **get sth in** एखाद्या गोष्टीचा साठा करणे, पुरवठ्याला पडेल एवढे ठेवणे : *~ some coal in for the winter, हिवाळ्यासाठी कोळसा साठवणे.* **get in with sb** (*अनौप*) एखाद्याशी मैत्री करणे – बहुधा स्वतःच्या फायद्यासाठी. **get into sth** **(क)** स्वतःला अडचणीत आणणे, संकटात टाकणे : *~ into trouble, संकटात पडणे.* **(ख)** सवय लावणे : *~ into the habit of rising at 6 am, सकाळी ६ ला उठण्याची सवय लावणे* ○ *Don't ~ into drugs! मादक द्रव्याच्या सेवनाची सवय लावून घेऊ नकोस म्हणजेच त्यांचे व्यसन लावून घेऊ नकोस.* **(ग)** एखाद्या गोष्टीत रस घेणे, मन रमणे : *I can't ~ into this book, माझं मन या पुस्तकात रमत नाही.* **(घ)** एखादी गोष्ट सुरू करणे : *~ into a fight/conversation, मारामारीला/संभाषणाला सुरुवात करणे/करायला लागणे.* **(च)** एखाद्या क्षेत्रात काम करू लागणे, एखाद्या क्षेत्रात पडणे : *~ into journalism, पत्रकारितेत पडणे.* **get (sb) 'off** (एखाद्याला) दुसरीकडे पाठवणे, धाडणे : *~ the children off to school, मुलांना शाळेत पाठवणे.* **get (sb) off (with sth)** शिक्षा न होता सुटणे/शिक्षा न करता सुटू देणे किंवा थोडक्यावर भागणे : *She got off with just a fine, थोड्याशा दंडावर तिचे निभावले.* **get on (with sb)** एखाद्याशी जुळणे, मैत्री होणे, पटणे : *We don't ~ on, आमचं पटत नाही* ○ *Do you ~ on with your boss? तुझं तुझ्या वरिष्ठांशी पटतं?* **get on (with sth)** **(क)** प्रगती करणे : *How are you ~ting on with your new job? तुझं नव्या नोकरीत कसं काय चाललंय्?* **(ख)** चालू ठेवणे, करत राहणे : *G~ on with your work, काम चालू ठेव.* **be getting on** (*अनौप*) **(क)** वय होणे, वय वाढणे. **(ख)** उशीर होणे : *It's ~ting on, so I must go home, उशीर होतोय्, म्हणून मला आता घरी गेलं पाहिजे.* **get 'out** **(क)** निसटणे, सुटणे. **(ख)** सर्वश्रुत होणे, सर्वांना कळणे : *The secret got out, रहस्य/गुपित फुटले/उघड झाले.* **get out of sth/doing sth** एखादी गोष्ट (जी करायला पाहिजे) करण्यास टाळणे. **get over sth** **(क)** एखाद्या गोष्टीतून

सावरणे : *I haven't yet got over my mother's death, आईच्या मृत्यूच्या दुःखातून मी अजून बाहेर आलो नाही.* (ख) मात करणे, ओलांडणे : *~ over one's shyness, लाजाळूपणा सोडणे.* **get sth over (to sb)** एखाद्याला एखादी गोष्ट स्पष्ट करणे. **get sth over (with)** (*अनौप*) नको असलेली गोष्ट संपणे, संपवणे, संपून जाणे : *I'm glad I've got my exams over with, एकदाची परीक्षा संपली याचा मला आनंद होतोय्.* **get round sb** स्तुती करून एखाद्याला राजी करणे, गोडगोड बोलून मन वळवणे : *She knows how to ~ round her father, गोडीगुलाबीने वडलांचे मन कसे वळवायचे हे तिला माहीत आहे.* **get round sth** नियम वगैरे न तोडता त्यातून पळवाट शोधणे. **get round to sth/doing sth** खूप उशीर लावून करणे. **get through** संपवणे, वापरून टाकणे : *~ through £100 a week, दर आठवड्याला १०० पौंड संपवणे.* **get through (sth)** (परीक्षेत वगैरे) यशस्वी होणे, पास होणे. **get 'through (to sb)** एखाद्याशी – खास करून फोनवर – संपर्क साधणे. **get (sth) 'through to sb** एखाद्याला एखादी गोष्ट समजविण्यात यशस्वी होणे, एखाद्याला पटवून देणे : *I just can't ~ through to them (that this is wrong), (हे अयोग्य आहे) हे काही मला त्यांना पटवून देता येत नाहीये.* **get to'gether (with sb)** भेटणे, एकत्र येणे : *~ together for a drink, (पेय) पानासाठी एकत्र येणे.* **get up** (क) (झोपेतून) उठणे, अंथरूणातून उठणे. (ख) बसलेले उठणे, उठून उभे राहणे. **get up to sth** (क) पोहोचणे : *~ up to page ten, दहाव्या पानापर्यंत पोहोचणे/येणे.* (ख) खोड्या करणे, काहीतरी अनपेक्षित असे करणे : *What have you been ~ting up to? तुझे काय उद्योग चाललेत?* **'getaway** *ना* [*गण*] सुटका : *a fast ~away, जलद सुटका.* **'get-together** *ना* [*गण*] (*अनौप*) संमेलन, मेळावा. **'get-up** *ना* [*गण*] (*अनौप*) नेहमीचा नसलेला असा पोषाख, वेष. **,get-up-and-'go** *ना* [*अगण*] (*अनौप*) उत्साह.

geyser /'गीझ्(र्); *अमे* 'गाइझर्/ *ना* [*गण*] १ गरम पाण्याचा झरा, उन्हाळे. २ पाणी तापवण्याचे विद्युत उपकरण.

ghastly /'गास्ट्लि; *अमे* 'गॅस्ट्लि/ *वि* (**-ier, -iest**) १ भयानक, थरकाप उठवणारा : *a ~ accident, भीषण अपघात.* २ (*अनौप*) फार वाईट : *a ~ mistake, भयानक चूक.* ३ निस्तेज आणि आजारी.

ghetto /'गेटउ/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s**) (अनेकदा *अधिक्षेपी*) अल्पसंख्य लोक किंवा अतिशय गरीब लोक राहतात तो शहराचा भाग, अशी वस्ती. **'ghetto blaster** *ना* [*गण*] (*अनौप*) मोठा, शक्तिशाली पण हातात नेण्यासारखा रेडिओ आणि कॅसेट प्लेअर.

ghost /गउस्ट/ *ना* १ [*गण*] जिवंत व्यक्तीला दिसू शकणारा मृत व्यक्तीचा आत्मा, भूत, पिशाच्च. २ [*ए.व*] (*ला*) अत्यल्प, अगदी कमी : *the ~ of a chance, अगदी कमी शक्यता.* ३ (*वाक्प्र*) **give up the 'ghost** मरणे. **ghostly** *वि* भुताचा, भुताप्रमाणे. **'ghost town** *ना* [*गण*] पूर्वी दाट लोकवस्ती असलेले पण आता ओसाड गाव, निर्जन नगर. **'ghost-writer** *ना* [*गण*] स्वतःचे नाव न लावता दुसऱ्याच्या नावावर लिहिणारा लेखक.

GI /,जी 'आइ/ *ना* [*गण*] अमेरिकन सैनिक.

giant /'जाइअन्ट्/ *ना* [*गण*] (*स्त्री* **~ess**) (कथेतील) अवाढव्य आणि बलवान अशी व्यक्ती, राक्षस. **giant** *वि* अवाढव्य, अजस्त्र.

gibberish /'जिबरिश्/ *ना* [*गण*] निरर्थक बडबड; अर्थहीनता, मूर्खपणा.

gibbon /'गिबन्/ *ना* [*गण*] लांब हाताचे वानर, ऊलुक.

gibe (तसेच **jibe**) /जाइब्/ *क्रि* [*अक*] (*at*)// एखाद्याची खिल्ली उडवणे, टोमणा मारणे, कोपरखळी मारणे. **gibe** (तसेच **jibe**) *ना* [*गण*] टोमणा, कोपरखळी.

giblets /'जिब्लिट्स्/ *ना* [*ब.व*] पक्ष्याचे शिजवलेले हृदय, यकृत वगैरे.

giddy /'गिडि/ *वि* (**-ier, -iest**) सगळं गोल फिरतंय् आणि आपण पडणार आहोत अशी भावना असलेला, चक्कर आल्यासारखा, भोवळ आल्यासारखा. **giddiness** *ना* [*अगण*] गरगरण्याची भावना.

gift /गिफ्ट्/ *ना* [*गण*] १ बक्षीस; भेटवस्तू. २ उपजत कला, अंग, ईश्वरी देणगी : *a ~ for languages, भाषा आत्मसात करण्याचे अंग.* ३

(*वाक्प्र*) **the gift of the 'gab** सहजसुंदर आणि लाघवी बोलण्याची कला. **gifted** *वि* गुणी.

gig /गिग्/ *ना* [*गण*] (*अनौप*) पॉप किंवा जॅझ संगीताचा प्रयोग किंवा मैफल.

gigantic /जाइ'गॅन्टिक्/ *वि* प्रचंड, अफाट.

giggle /'गिग्ल्/ *क्रि* [*अक*] (*at*)// मूर्खासारखे हळूहळू हसणे, खिदखिदणे, फिसफिस हसणे. **giggle** *ना* १ [*गण*] वेडपटासारखे हास्य. २ [*अे.व*] (*अनौप*) गमतीसाठी केलेले काहीतरी.

gild /गिल्ड्/ *क्रि* [*सक*] सोन्याचा मुलामा देणे.

gill^{1} /गिल्/ *ना* [*गण, बहुधा ब.व*] माशाचे श्वसनेन्द्रिय, कल्ला, क्लोम.

gill^{2} /जिल्/ *ना* [*गण*] द्रवपदार्थ मोजण्याचे एक परिमाण; पाव (१/४) पाईंट (०.१४२ लिटर).

gilt /गिल्ट्/ *ना* [*अगण*] मुलामा देण्याचे द्रव्य.

gimmick /'गिमिक्/ *ना* [*गण*] लक्ष वेधण्यासाठी केलेली कृती, देखावा किंवा वापरलेली गोष्ट. **gimmicky** *वि* दिखाऊ.

gin /'जिन्/ *ना* [*गण*] रंगहीन पण कडक असे एक मद्य.

ginger /'जिन्ज(र्)/ *ना* [*अगण*] १ आल्याची वनस्पती, आले. २ नारिंगी-तपकिरीसर रंग. **ginger** *क्रि* (*क्रिब*) **ginger sb/sth up** एखाद्याला अधिक उत्साही करणे. **ginger-'ale, ginger-'beer** *ना* [*अगण*] मद्यार्क नसलेले आणि आल्याचा स्वाद असलेले पेय, आर्द्रकासव. **'gingerbread** *ना* [*अगण*] आल्याचा स्वाद असलेला केक.

gingerly /'जिन्जलि/ *क्रिवि* अतिशय काळजीपूर्वक, बेताबेताने; चाचरत, अनिच्छेने, आढेवेढे घेत.

gingham /'गिङम्/ *ना* [*अगण*] चट्ट्यापट्ट्याचे किंवा चौकटीचे सुती कापड.

gipsy = GYPSY.

giraffe /जि'राफ्; *अमे* ज'रॅफ्/ *ना* [*गण*] लांब मानेचा, लांब पायांचा एक आफ्रिकी प्राणी.

girder /'गऽड(र्)/ *ना* [*गण*] मजला, छप्पर, पूल वगैरेना आधार देण्यासाठी वापरायची जाड, मजबूत लोखंडी कांब, तुळई.

girdle /'गऽड्ल्/ *ना* [*गण*] १ कपडे नीट राहण्यासाठी कमरेला बांधायचा पट्टा, मेखला, कमरपट्टा. २ शरीराला आकार देण्यासाठी कंबरेभोवतालच्या भागावर घालायचे अंतर्वस्त्र. **girdle** *क्रि* [*सक*] (*अलं*) वेढणे : *a lake ~d with trees, वृक्षांनी वेढलेले सरोवर.*

girl /गऽल्/ *ना* [*गण*] मुलगी, बाला, बालिका; कन्या, मुलगी; पोरगी, तरुणी. **'girl-friend** *ना* [*गण*] १ मुलाची किंवा पुरुषाची खास मैत्रीण. २ मैत्रीण. **Girl 'Guide** *ना* [*गण*] व्यवहारोपयोगी कौशल्ये आणि मदत करण्याची वृत्ती यांची जोपासना करणारी मुलींची एक संघटना, बालिका-स्काउट, वीरबाला. **girlhood** *ना* [*अगण*] बालिकावय, मुलीचे बालपण. **girlish** *वि* मुलीसारखा, मुलींचा.

giro /'जाइरउ/ *ना* (*ब.व* ~**s**) १ [*अगण, गण*] एका बँकेतील किंवा पोस्टातील खात्यावरची रक्कम दुसऱ्या बँक किंवा पोस्ट खात्यावर थेट बदलण्याची पद्धती. २ [*गण*] (*ब्रि*) सामाजिक सुरक्षिततेच्या खर्चासाठी शासनाने दिलेला धनादेश.

girth /गऽथ्/ *ना* १ [*गण, अगण*] (*औप*) घेर, लपेटी : *the ~ of a tree, झाडाचा घेर.* २ [*गण*] घोड्यावरील खोगीर जागेवर राहण्यासाठी घोड्याला बांधलेला पट्टा, तंग.

gist /जिस्ट्/ *ना* **the gist** [*अे.व*] सार, मुद्द्याची गोष्ट, महत्त्वाचा भाग : *Tell me the ~ of what she said, ती काय म्हणाली ते थोडक्यात मला सांग.*

give^{1} /गिव्ह्/ *क्रि* (*भूत* **gave** /गेइव्ह्/, *भूत वि* **given** /गिव्ह्न्/) १ [*सक*] एखाद्याला (एखादी गोष्ट) देणे : *G~ her a cheque, तिला धनादेश दे* ○ *Have you been ~n the books you need? तुला हवी असलेली पुस्तके तुला देण्यात आली आहेत का?* २ [*सक*] *for*// बदल्यात (पैसे) देणे, -करिता देणे : *I gave (her) £500 for the car, गाडीसाठी मी तिला ५०० पौंड दिले.* ३ [*सक*] पुरवणे, देणे : *a book giving information on schools, शाळांची माहिति देणारे पुस्तक.* ४ [*सक*] परवानगी देणे : *G~ her a week to decide, निर्णय घ्यायला तिला एक आठवडा दे.* ५ [*सक*] निर्माण करणे, देणे : *~ trouble, त्रास देणे* ○ *Does your back ~ you pain? तुझी पाठ दुखते काय?* ६ [*सक*] तोंडातून काढणे (हसू,

कण्हण्याचा आवाज वगैरे). ७ [सक] शब्दांत व्यक्त करणे : ~ *an account of one's journey*, *आपल्या प्रवासाचा वृत्तांत देणे/सांगणे* ○ *She gave a speech to parliament*, *तिने संसदेत भाषण केले/व्याख्यान दिले.* ८ [सक] सार्वजनिक/जाहीर प्रयोग करणे : ~ *a poetry reading*, *काव्यवाचन करणे.* ९ [सक] (कृती) करणे : ~ *a wave*, *हात हालवणे* ○ *He gave the door a kick*, *त्याने दाराला एक लाथ दिली/मारली.* १० [सक] यजमान म्हणून (मेजवानी, भोजन वगैरे) देणे. ११ [*अक*] दाबाखाली वाकणे, ताणले जाणे : *The plank gave a little when I stepped on it*, *मी पाय ठेवल्यावर फळी थोडीशी वाकली.* १२ (*वाक्प्र*) **ˌgive and ˈtake** देवाणघेवाण करणे, समझोता करणे/करण्यात तयारी दाखविणे : *You have to ~ and take in a marriage*, *लग्नात तुम्हाला तडजोड करावीच लागते.* **give ground** ➪ GROUND¹. **give or take sth** (*अनौप*) कमीजास्त, इकडेतिकडे : *It takes an hour to get to Hastings, ~ or take a few minutes*, *हेस्टिंग्जला जायला एक तास लागतो, पाचदहा मिनिटे इकडेतिकडे.* **give sb sth on a plate** ➪ PLATE. १३ (*क्रिब*) **give sth away** फुकट देऊन टाकणे, वाटून टाकणे. **give sth/sb away** एखाद्याचा विश्वासघात करणे, एखादी गोष्ट फोडणे : ~ *away secrets*, *गुप्त माहिती फोडणे.* **give sth back (to sb), give sb back sth** एखाद्याला एखादी गोष्ट परत करणे : *G~ the book back (to him)*, *(त्याला) पुस्तक परत दे/कर* ○ *G~ him back the book*, *त्याला पुस्तक परत कर.* **give ˈin (to sb/sth)** ताब्यात देणे, वश होणे, शरण येणे. **give sth off** धूर, वास वगैरे सोडणे, बाहेर टाकणे. **give ˈout** (क) (पुरवठा, ताकद वगैरे) संपुष्टात येणे, संपणे. (ख) (मोटार वगैरेबाबत) बंद पडणे. **give sth out** वाटणे : *give out prizes/leaflets*, *बक्षिसे/पत्रके वाटणे.* **give over (doing sth)** (*अनौप*) एखादी गोष्ट करण्याचे थांबवणे, बंद करणे. **give sb up** (क) एखाद्याबाबत आशा सोडणे : *The doctors have ~n him up*, *डॉक्टरांनी त्याची आशा सोडली आहे.* (ख) एखाद्याशी संबंध तोडणे. **give (sth) up** एखादी गोष्ट करायचे सोडून देणे : *She has ~n up trying to change him*, *त्याला बदलायचा नाद तिने सोडून दिलाय.* **give sth up** (क) एखाद्या गोष्टीचा त्याग करणे, ती सोडून देणे : *I've ~n up smoking*, *मी सिग्रेट ओढायचे सोडून दिलंय* ○ *I gave up my job*, *मी माझ्या नोकरीचा त्याग केला.* (ख) दुसऱ्याला देऊन टाकणे : *He gave up his seat to the old man*, *त्याने आपली जागा एका वृद्ध माणसाला दिली.* **give sb/oneself/sth up** एखाद्याला शरण येणे, स्वाधीन होणे : *He gave himself up to the police*, *त्याने स्वतःला पोलिसांच्या स्वाधीन केले.* **given** *वि* ठरलेला, विवक्षित : *at the ~n time*, *ठरलेल्या वेळी.* **given** *शब्दयो* लक्षात घेता, -च्या मानाने : *He runs very fast ~n his size*, *त्याच्या आकाराच्या मानाने/शरीरयष्टीच्या मानाने तो खूपच जोरात पळतो.* **ˈgive-away** *ना* [*गण*] (*अनौप*) (क) फुकट दिलेली गोष्ट, मोफत वस्तू. (ख) गुपित उघड करणारी गोष्ट, खरं सांगणारी गोष्ट.

give² /गिव्ह्/ *ना* १ [*अगण*] ओझ्याखाली वाकण्याचा किंवा ताणला जाण्याचा गुण, बाक, पसरटपणा : *This rope has too much ~ in it*, *या दोराला फार झोका येतो.* २ (*वाक्प्र*) **ˌgive and ˈtake** तडजोड वृत्ती, देवाणघेवाण : *There must be ~ and take in a marriage*, *लग्न म्हणजे तडजोड आलीच.*

glacial /ˈग्लेइसिअल्; *अमे* ˈग्लेइश्ल्/ *वि* हिमरूप, बर्फमय किंवा हिमानीयुगाचा/हिमयुगाचा/हिमनद युगाचा.

glacier /ˈग्लॅसिअ(र्); *अमे* ˈग्लेइशर्/ *ना* [*गण*] दऱ्यातून हळूहळू घसरणारे हिम, हिमनदी, हिमानी, हिमवाह.

glad /ग्लॅड्/ *वि* (**~der, ~dest**) १ आनंदी, हर्षित. २ (*जुना किंवा अप्रचलित*) आनंददायी, शुभ : ~ *news*, *आनंदवार्ता.* **gladden** /ग्लॅड्न्/ *क्रि* [सक] आनंद देणे, संतुष्ट करणे, उल्हसित करणे. **gladly** आनंदाने; आपखुषीने, स्वेच्छेने : *I will ~ly help you*, *मी आनंदाने/स्वखुषीने तुला मदत करीन.* **gladness** *ना* [*अगण*] आनंद, हर्ष, मोह, संतोष.

glade /ग्लेइड्/ *ना* [*गण*] (*अलं*) जंगलातील मोकळी जागा.

gladiator /'ग्लॅडिअेइट(र्)/ *ना* [*गण*] (प्राचीन रोममधे) सार्वजनिक प्रसंगी आखाड्यात (शस्त्रांनी) युद्ध करण्यात तरबेज असणारा माणूस, असिक्रीडक.

glamour (*अमे* तसेच **-or**) /'ग्लॅम(र्)/ *ना* [*अगण*] १ दिलखेचक प्रभाव, छाप पाडण्याचा गुण, मोहकता. २ मादक सौंदर्य, मोहमयी रूप. **glamorize** *क्रि* [*सक*] एखादी गोष्ट आहे त्याच्यापेक्षा अधिक मोहक भासवणे, भपका निर्माण करणे, आकर्षणाचे वलय निर्माण करणे. **glamorous** *वि* आकर्षक, भुरळ घालणारा.

glance /ग्लान्स्; *अमे* ग्लॅन्स्/ *क्रि* [*अक*] १ दृष्टिक्षेप टाकणे, नजर टाकणे. २ (*क्रिब*) **glance off sth** (चेंडू वगैरे) आपटून उडणे. **glance** *ना* [*गण*] १ दृष्टिक्षेप, नजर, कटाक्ष. २ (*वाक्प्र*) **at a glance** क्षणार्धात, पाहिल्यापाहिल्या.

gland /ग्लॅन्ड्/ *ना* [*गण*] (*शरीरशास्त्र*) शरीरात विशिष्ट द्रव्य निर्माण करणारी (जे शरीर वापरते किंवा काढून टाकते) ग्रंथी, प्रपिंड. **glandular** /-ड्युल(र्); *अमे* -झुल(र्)/ *वि* ग्रंथिल.

glare /ग्लेअ(र्)/ *क्रि* [*अक*] १ (*at*)// रागाने पाहणे, डोळे फाडून/वटारून पाहणे, गुरकावून पाहणे. २ तळपणे, झळाळणे. **glare** *ना* १ [*गण*] रागाची नजर, क्रुद्ध दृष्टी. २ [*अगण*] डोळे दिपवणारा प्रकाश, प्रखर प्रकाश, झकाकी, भकभकीत प्रकाश, दीप्ती. **glaring** /'ग्लेअरिङ्/ *वि* १ भकभकीत, दिपवणारा. २ क्रुद्ध. ३ (*ला*) उघडउघड असा वाईट दिसणारा : *a glaring mistake, उघडपणे डोळ्यात भरणारी चूक.*

glass /ग्लास्; *अमे* ग्लॅस्/ *ना* १ [*अगण*] काच. २ [*गण*] काचेचा पेला/प्याला; काचेच्या पेल्यातील पेय : *a ~ of milk, दुधाचा पेला/प्याला.* ३ **glasses** [*ब.व*] चष्मा, आरशी. **'glasshouse** *ना* [*गण*] रोपे वगैरे वाढवण्याचे काचेचे घर, काचगृह. **'glassware** /-वेअ(र्)/ *ना* [*अगण*] काचेची भांडी. **'glassworks** *ना* [*गण*] (ए.व किंवा ब.व क्रियापदासह) काचकारखाना. **glassy** *वि* **(-ier, -iest)** १ गुळगुळीत आणि चमकदार. २ (*ला*) निर्विकार, शुष्क : *a ~y stare, निर्विकार दृष्टी.*

glaze /ग्लेइझ्/ *क्रि* १ [*सक*] काचा लावणे : *~ a window, खिडकीला काचा बसवणे.* २ पातळ चकाकदार असा मुलामा देणे : *~ pottery, मातीच्या भांड्यांना काचेसारखा चकचकीत करणारा मुलामा देणे, झिलई देणे.* ३ (*क्रिब*) **glaze over** (डोळ्यांबाबत) निस्तेज होणे. **glaze** *ना* [*गण, अगण*] पातळ, चकचकीत मुलामा, चकाकी. **glazier** /'ग्लेइझिअ(र्); *अमे* -झर्/ *ना* [*गण*] खिडक्यांना काचा बसवणारा.

gleam /ग्लीम्/ *ना* [*गण*] १ प्रकाशरेखा, किरण. २ (*ला*) एखाद्या गोष्टीचे छोटेसे चिन्ह/लक्षण : *a ~ of hope, आशेचा किरण.* **gleam** *क्रि* [*अक*] किरण पसरणे, उजेड पडणे, चकाकणे.

glean /ग्लीन्/ *क्रि* [*सक*] (वास्तविके, बातम्या वगैरे) प्रयत्नपूर्वक हळूहळू जमा करणे.

glee /ग्ली/ *ना* [*अगण*] (*at*)// समाधानाचा आनंद, संतोष, विजयाचा आनंद. **gleeful** /-फ़ल्/ *वि* आनंदी. **gleefully** *क्रिवि* सुखसमाधानाने, हर्षभराने.

glen /ग्लेन्/ *ना* [*गण*] अरुंद दरी, घळ – विशेषतः स्कॉटलंड किंवा आयर्लंडमधील.

glib /ग्लिब्/ *वि* (**~ber, ~best**) (*अधिक्षेपी*) आत्मविश्वासाने पण अप्रामाणिकपणे बोललेले, वरवर गोड असे, ठोकून/दडपून दिलेले : *a ~ answer, दडपेगिरीचे उत्तर.* **glibly** *क्रिवि* मानभावीपणे. **glibness** *ना* [*अगण*] मानभावीपणा, वरकरणी गोडभाषीपणा.

glide /ग्लाइड्/ *क्रि* [*अक*] १ अलगद आणि सहजपणे सरकणे. २ इंजिनाविना उडणे, तरंगणे. **glide** *ना* [*गण*] अलगद आणि सहज गती, तरंगणे. **glider** *ना* [*गण*] इंजिन नसलेले वायुवाहन किंवा आकाशयान, तरंगी. **gliding** *ना* [*अगण*] अशा वायुवाहनातून उडण्याचा खेळ.

glimmer /'ग्लिम(र्)/ *क्रि* [*अक*] लुकलुकणे, मिणमिणणे. **glimmer** *ना* [*गण*] १ (प्रकाशाची) लुकलुक, अंधुक मिणमिणता प्रकाश. २ (*ला*) लहान चिन्ह, लक्षण : *a ~ of interest, गम्य असल्याचे लक्षण.*

glimpse /ग्लिम्प्स्/ *ना* [*गण*] ओझरते अपूर्ण दर्शन : *catch a ~ of the secret* *papers, गुप्त कागदपत्रांचे ओझरते दर्शन होणे.* **glimpse** *क्रि* [*सक*] ओझरते दर्शन होणे, झलक दिसणे.

glint /ग्लिन्ट्/ *क्रि* [*अक*] चमकणे. **glint** *ना* [*गण*] चमक.

glisten /'ग्लिस्न्/ *क्रि* [*अक*] (खास करून ओलसर पृष्ठभागाबाबत) चकाकणे.

glitter /'ग्लिट(र्)/ *क्रि* [*अक*] झळाळणे, चकाकणे : *~ing jewels, झळाळणारी रत्ने.* **glitter** *ना* [*अगण*] १ झळाळी, चकाकी, कान्ती. २ (*ला*) आकर्षकता, मनोहरपणा; उत्कंठा, औत्सुक्य : *the ~ of show business, सार्वजनिक करमणुकीच्या उद्योगातील किंवा लोकरंजन व्यवसायातील आकर्षकपणा.*

gloat /ग्लउट्/ *क्रि* [*अक*] (*over*)// आपल्या यशात किंवा दुसऱ्याच्या पराभवात आनंद मानणे. **gloatingly** *क्रिवि* वाईट आनंदाने.

global /'ग्लउब्ल्/ *वि* १ सर्व जगाचा, जागतिक, अखिल पृथ्वीचा. २ सर्वंकष. **globally** /-बलि/ *क्रिवि* जगभर; सर्वंकषपणे.

globe /ग्लउब्/ *ना* १ [*गण*] पृथ्वीची प्रतिकृती, पृथ्वीचा गोळा. २ **the globe** [*अे.व*] पृथ्वी.

globule /'ग्लॉब्यूल्/ *ना* [*गण*] (*औप*) अतिशय लहान थेंब, विशेषतः द्रवाचा.

gloom /ग्लूम्/ *ना* [*अगण*] १ अंधार, काळोख. २ निराशा आणि दुःख, उदासी, खिन्नता, विषण्णता. **gloomy** *वि* (**-ier, -iest**) १ अंधारा, काळोखी. २ विषण्ण, खिन्न. **gloomily** /-इलि/ *क्रिवि* खिन्नपणे, विषण्णतेने.

glorify /'ग्लॉऽरिफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] १ एखाद्याला जास्त महत्त्व देणे, फुगवणे, उदात्तीकरण करणे : *His cottage is just a glorified barn, त्याचं शेतातलं घर म्हणजे जरा झकपक केलेलं धान्याचं कोठार आहे.* २ स्तुती करून (देवाची) पूजा करणे, महती गाणे. **glorification** /,ग्लॉऽरिफि'केइश्न्/ *ना* [*अगण*] उदात्तीकरण.

glorious /'ग्लॉऽरिअस्/ *वि* १ गौरवशाली, तेजस्वी : *a ~ victory, गौरवशाली विजय.* २ महान, खूप मोठा, वैभवशाली. **gloriously** *क्रिवि* गौरवाने; महानतेने.

glory /'ग्लॉऽरि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] ख्याती, प्रसिद्धी, सन्मान. २ [*अगण*] गौरव, पूज्यभाव : *~ to God, परमेश्वराच्या गौरवार्थ.* ३ [*अगण*] अलौकिक सौंदर्य : *the ~ of a sunset, सूर्यास्ताचे अलौकिक सौंदर्य.* ४ [*गण*] वैभव : *the glories of ancient Rome, प्राचीन रोमचे वैभव.* **glory** *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*अक*] *in*// आनंदात दंग होणे.

gloss¹ /ग्लॉस्/ *ना* [*अगण, अे.व*] १ एखाद्या पृष्ठभागावरची चकाकी, झिलई. २ (*ला*) फसवा सुरेखपणा, दिखाऊपणा. **gloss** *क्रि* (*क्रिब*) **gloss over sth** (एखादा प्रश्न, दोष वगैरे) दडविण्याचा प्रयत्न करणे, गांभीर्य कमी करणे. **'gloss paint** *ना* [*अगण*] चकाकीचा रंग, लकाकी रंग. **glossy** *वि* (**-ier, -iest**) गुळगुळीत आणि चकाकणारा, तकतकीत : *~y magazines, रंगीत गुळगुळीत मासिके म्हणजेच भारी कागदावर बहुरंगी चित्रे काढलेली मासिके.*

gloss² /ग्लॉस्/ *ना* [*गण*] पुस्तकातील शब्दावर केलेली टिप्पणी, खुलासा. **gloss** *क्रि* [*सक*] टिप्पणी करणे, भाष्य करणे.

glossary /'ग्लॉसरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) शब्दांच्या अर्थाची मूळाक्षरक्रमाने केलेली यादी, शब्दार्थबोधिनी, कठिण शब्दार्थसंग्रह.

glove /ग्लव्ह्/ *ना* [*गण*] हाताला झाकणारा मोजा, हातमोजा.

glow /ग्लउ/ *क्रि* [*अक*] १ ज्वाला नसूनही प्रकाश आणि उष्णता बाहेर टाकणे, निखारणे, फुलणे, धगधगणे : *~ing coal, धगधगणारे निखारे.* २ चेहऱ्यावर लाली पसरणे, आरक्त होणे. ३ तळपणे, चकाकणे. **glow** *ना* [*अे.व*] चकाकी : *the ~ of a sunset, सूर्यास्ताचा रक्तिमा.* **glowing** *वि* स्तुतिपूर्ण; उत्साहपूर्ण : *a ~ing report, गौरवपूर्ण वृत्तांत.*

glower /'ग्लाउअ(र्)/ *क्रि* [*अक*] (*at*)// रागाने पाहणे.

glucose /'ग्लूकउस्/ *ना* [*अगण*] फळात असणारी नैसर्गिक साखर, द्राक्षशर्करा.

glue /ग्लू/ *ना* [*अगण, गण*] वस्तू चिकटविण्याचा चिकट घट्ट द्रव, सरस. **glue** *क्रि* [*सक*] १ डिंकाने किंवा सरसाने चिकटविणे. २ (*वाक्प्र*) **glued to sth** (*अनौप*) सतत जवळ असणारा, चिकटलेला : *They were ~d* *to the television, दूरदर्शनला ते चिकटून होते.* **'glue-sniffing** *ना* [*अगण*] सरसाचा वाफारा मादक पदार्थासारखा हुंगणे.

glum /ग्लैम्/ *वि* (**~mer, ~mest**) दुःखी; उदास, खिन्न. **glumly** *क्रिवि* निराशेने, खिन्नपणे.

glut /ग्लैट्/ *क्रि* (**-tt-**) [*सक*] फाजील पुरवठा करणे, रेलचेल होणे : *The market is ~ted with cheap apples, स्वस्त सफरचंदांची बाजारात अगदी रेलचेल झाली आहे.* **glut** *ना* [*गण, बहुधा ए.व*] फाजील पुरवठा, आधिक्य.

glutton /'ग्लैट्न्/ *ना* [*गण*] १ खादाड माणूस, हावरा, अधाशी. २ (*अनौप*) एखाद्या अवघड किंवा वाईट गोष्टीची हाव असणारा : *a ~ for punishment, शिक्षेची आवड असणारा.* **gluttonous** /-टनस्/ *वि* हावरा, अधाशी, खादाड. **gluttony** *ना* [*अगण*] आधाशीपणाचे खाणे.

glycerine /'ग्लिसरीन्/ (*अमे* **glycerin** /-रिन्/) *ना* [*अगण*] औषधे आणि स्फोटके यात वापरला जाणारा एक रंगहीन घट्ट द्रवपदार्थ, घृतोल, घृतीन.

gm GRAM(S) ग्रॅम्स् चे संक्षिप्त रूप.

gnarled /'नाल्ड्/ *वि* (झाडांबाबत) खडबडीत आणि वाकडीतिकडी, गाठाळ.

gnash /नॅश्/ *क्रि* [*सक*] दातावर दात घासणे, दात कडकडावणे, दातओठ खाणे.

gnat /नॅट्/ *ना* [*गण*] दोन पंखांची, चावणारी, एक छोटी माशी, चिलट, मच्छर, डास.

gnaw /नॉऽ/ *क्रि* [*अक, सक*] १ कुरतडणे, कंडारणे. २ (*ला*) (एखाद्याचे मन) खाणे : *guilt ~ing at his conscience, त्याच्या सद्सद्विवेकबुद्धीला खाणारी/कुरतडणारी/टोचणारी/डाचणारी अपराधाची भावना.*

gnome /नउम्/ *ना* [*गण*] १ (गोष्टींमधे) जमिनीखाली राहणारा एक छोटा वृद्ध माणूस. २ बागेत शोभेसाठी केलेला अशा माणसाचा पुतळा. **gnomic** /'नउमिक्/ *वि* सूत्रवत्, मार्मिक.

go^1 /गउ/ *क्रि* (*वर्तमानकाळी तृतीय पुरुषी अेकवचन* **goes** /गउझ्/, *भूत* **went** /वेन्ट्/, *भूत वि* **gone** /गॉन्; *अमे* गॉऽन्/) [*अक*] १ (**क**) एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे : *go home/for a walk/on holiday/to the cinema, घरी/फिरायला/सुट्टीवर/सिनेमाला जाणे.* (**ख**) सरकणे; प्रवास करणे, अंतरावर जाणे : *go five miles to get a doctor, डॉक्टर मिळायला पाच मैल जाणे.* २ सोडणे, निघणे : *It's time for us to go, आपली निघायची वेळ झालीये/आपण निघायला हवं.* ३ पर्यंत जाणे; पोहोचणे : *This road goes to London, हा रस्ता लंडनला जातो.* ४ *to*// एखाद्या ठिकाणी नियमितपणे जाणे : *go to school/church, शाळेला/चर्चला जाणे.* ५ नेहमीची जागा असणे; ठेवलेले असणे : *The book goes on the shelf, हे पुस्तक शेल्फात जागेवर जाऊ दे.* ६ बसणे : *This key won't go (in the lock), ही किल्ली (या कुलुपात) जात नाही/(या कुलुपाला) बसत नाही.* ७ प्रगती करणे, चालणे : *How are things going? कसं काय चाललंय्?* ○ *The party went very well, पार्टी छान प्रकारे पार पडली.* ८ काम करणे/देणे : *This clock doesn't go, हे घड्याळ चालत नाही.* ९ (खास करून हुकूम सोडताना) सुरू करणे : *One, two, three, go! एक, दोन, तीन, चला!* १० ठराविक आवाज करणे, वाजणे : *The bell went at 3 p.m., दुपारी तीनला घंटा झाली* ○ *The clock goes 'tick-tick', घड्याळ टिक्टिक् करते.* ११ शब्द असणे, चाल असणे : *How does the poem/song go? कवितेचे शब्द काय आहेत?/गाण्याची चाल कशी आहे?* १२ स्थिती प्राप्त होणे/बदलणे; होणे : *go from bad to worse/go to sleep, अधिक वाईट स्थिती येणे/झोपी जाणे* ○ *go mad/blind, वेडे/आंधळे होणे.* १३ स्थितीस येणे, होणे : *go hungry/armed, भूक लागणे किंवा भुकेला होणे, सशस्त्र होणे.* १४ (**क**) संपणे, देऊन टाकणे वगैरे : *Supplies of coal went very quickly, कोळशाचा पुरवठा पटकन् संपला.* (**ख**) (*to, for*)// विकला जाणे : *The car went to a dealer for £500, विक्रेत्याकडे गाडी ५०० पौंडाला गेली.* १५ अधिक वाईट होणे, जास्त बिघडणे; बंद पडणे, निकामी होणे : *My sight is going, माझी दृष्टी खराब होतेय्* ○ *The car battery has gone, गाडीची बॅटरी निकामी झालीये.* १६ (वेळेबाबत) जाणे, घालवणे : *two hours to go before lunch, जेवणापूर्वीचे दोन तास (अजून) जायचेत.* १७

(*वाक्प्र*) **'anything goes** (*अनौप*) काहीही चालतं/खपतं. **be going to do (sth)** (क) उद्देश/इरादा असणे; योजणे : *We're going to sell our house, आमचा घर विकायचा इरादा आहे.* (ख) संभवनीय असणे : *It's going to rain, पाऊस पडण्याचा संभव आहे.* **go and do sth** (*अनौप*) काहीतरी मूर्खासारखे करणे : *That stupid girl went and lost her watch, मूर्खासारखं ती वेडी मुलगी घड्याळ हरवून बसली.* **go to seed** ➪ SEED. **go to waste** ➪ WASTE². **there goes sth** (*अनौप*) (एखादी गोष्ट हरवल्यावर खेद व्यक्त करण्यासाठी वापर) : *There goes my chance of getting the job, नोकरी मिळण्याची माझी संधी गेली म्हणजेच मला ती नक्की मिळणार नाही.* १८ (*क्रिव*) **go a'bout** एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे, वणवण फिरणे. **go about sth** सुरुवात करणे : *How do you go about writing a novel? तू कादंबरी लिहायला कसा प्रारंभ करतोस?* **go after sb/sth** जिंकण्याचा किंवा मिळवण्याचा प्रयत्न करणे. **go against sb/sth** (क) एखाद्याला विरोध करणे, त्याच्या विरोधी जाणे : *Don't go against my wishes, माझ्या इच्छेविरुद्ध जाऊ नकोस.* (ख) एखाद्याच्या विरोधात असणे : *The verdict went against him, निकाल त्याच्या विरुद्ध गेला.* **go a'head** चालू राहणे; होणे : *The tennis match went ahead in spite of the weather, खराब हवामान असूनही टेनिस मॅच झाली.* **go a'long** चालू राहणे. **go a'long with sb/sth** (क) एखाद्याबरोबर जाणे, साथ देणे. (ख) एखादी गोष्ट मान्य होणे, मानणे : *Will they go along with the plan? त्यांना ही योजना पटेल का?* **go at sb/sth** (क) एखाद्यावर हल्ला करणे. (ख) एखाद्या गोष्टीवर परिश्रम घेणे. **go a'way** (क) निघून जाणे, दूर जाणे. (ख) नाहीसे होणे : *Has the pain gone away? वेदना नाहीशी झाली का?* **go 'back** (क) परत येणे, परतणे. (ख) काळ किंवा अवकाश यात मागे जाणे : *Our family goes back 300 years, आमच्या घराण्याचा इतिहास गेल्या ३०० वर्षांचा आहे.* **go back on sth** (दिलेला शब्द) न पाळणे, (शब्द) फिरवणे : *go back on one's word, शब्द फिरवणे.* **go 'by** (काळाबाबत) जाणे, सरकणे, सरणे : *The days go by so slowly, दिवस अगदी मंद गतीने जात आहेत.* **'go by sth** एखाद्या गोष्टीप्रमाणे जाणे/चालणे : *I always go by what my doctor says, मी नेहमीच डॉक्टरांच्या म्हणण्याप्रमाणे वागतो.* **go 'down** (क) (जहाज वगैरेबाबत) बुडणे. (ख) (सूर्य, चन्द्र वगैरेबाबत) बुडणे, मावळणे. (ग) (अन्नाबाबत) गिळणे. (घ) (समुद्र, वारा वगैरेबाबत) शांत होणे. (च) (किंमती, तपमान वगैरेबाबत) खाली येणे. **go 'down (in sth)** लिहिले जाणे, नोंद होणे : *Her name will go down in history, तिचे नाव इतिहासात लिहिले जाईल.* **go down well/badly (with sb)** (शेरा, प्रयोग वगैरेबाबत) स्वागत होणे/न होणे. **go down with sth** एखाद्या रोगाने पछाडणे, आजारी पडणे : *go down with flu, फ्लूने आजारी पडणे.* **go for sb/sth** (क) एखाद्याला घेऊन येणे, आणणे. (ख) हल्ला करणे : *The dog went for him, कुत्र्याने त्याच्यावर हल्ला केला.* (ग) लागू पडणे : *What she said goes for me too, ती जे काय म्हणाली ते मलाही लागू पडते.* (घ) (*अनौप*) आवडणे. **go 'in** (क) प्रवेश करणे, आत जाणे. (ख) (सूर्य, चन्द्र वगैरेबाबत) ढगांमागे जाणे/दडणे. **go in for sth** (क) (स्पर्धेत वगैरे) उतरणे. (ख) एखाद्या गोष्टीत रस घेणे : *go in for golf, गोल्फचा शौकीन असणे.* **go into sth** (क) (गाडी वगैरेबाबत) एखाद्या गोष्टीवर आदळणे, ठोकर देणे. (ख) प्रवेश करणे : *go into the Army, सैन्यात जाणे/भरती होणे.* (ग) तपासणे : *go into (the) details, तपशीलाने तपासणी करणे.* (घ) एखादी गोष्ट करण्यास सुरुवात करणे : *go into a long explanation, सविस्तर विवेचन करू लागणे.* **go 'off** (क) स्फोट होणे; उडणे. (ख) (अन्न वगैरेबाबत) नासणे, खराब होणे : *The milk has gone off, दूध नासलंय.* (ग) चालू राहणे, होणे : *The party went off well, पार्टी छान झाली.* **go off sb/sth** एखादी गोष्ट/व्यक्ती आवडण्याचे थांबणे. **go 'on** (क) (वेळेबाबत) जाणे. (ख) (दिवा वगैरेबाबत) लागणे, उजळणे. (ग) चालू राहणे : *The meeting went on for hours, बैठक अनेक तास चालली.* (घ) घडणे : *What's going on here? इथे काय*

चाललंय्? **go 'on (about sb/sth)** एखाद्याविषयी दीर्घकाळ बोलणे. **go 'on (at sb)** एखाद्यावर टीका करणे. **go on (with sth/doing sth)** एखादी गोष्ट करत राहणे, चालू ठेवणे. **go on to sth/to do sth** नंतर एखाद्या गोष्टीबाबत बोलणे किंवा एखादी गोष्ट करणे. **go 'out** (क) पार्टीला वगैरे जाणे : *I don't go out much at weekends, आठवड्याच्या शेवटी मी सहसा बाहेर पार्टीला वगैरे जात नाही.* (ख) (आग, दिवा वगैरेबाबत) विझणे, जाणे. (ग) फॅशनमधून जाणे. **go 'out (together), go out with sb** (*अनौप*) एखाद्याशी प्रणयाचे किंवा लैंगिक संबंध असणे. **go over sth** एखादी गोष्ट बारकाईने पाहणे/तपासणे. **go 'round** (क) प्रत्येकाला मिळेल एवढे असणे : *There aren't enough apples to go round, सर्वांना पुरतील एवढी सफरचंदे नाहीयेत्.* (ख) दूरच्या मार्गाने जाणे. **go round (to)** भेट देणे : *We're going round to see Sarah, आम्ही सॅराला भेटायला जाणार आहोत.* **go round with sb** अनेकदा सहवासात असणे, बरोबर असणे. **go 'through** यशस्वीपणे पूर्ण करणे : *The deal didn't go through, व्यवहार पूर्ण झाला नाही.* **go through sth** (क) विस्तृत विवेचन करणे. (ख) तपासणे : *go through the papers, पेपर्स तपासणे.* (ग) भोगणे; सहन करणे. (घ) (पैसे) वापरून टाकणे, संपवणे. **go through with sth** एखादी गोष्ट – विशेषतः कठीण किंवा कडवट अशी गोष्ट -- पूर्ण करणे. **go to/towards sth** देणगीदाखल देणे : *All profits go to charity, सर्व नफा धर्मार्थाकडे जातो.* **go 'under** (क) बुडणे. (ख) (*ला*) अपयश येणे, अयशस्वी ठरणे. **go 'up** (क) वाढणे. (ख) बांधून होणे. (ग) स्फोटामधे नष्ट होणे : *The petrol station went up in flames, पेट्रोल पंप स्फोट होऊन जळून खाक झाला.* (घ) (किंमतीबाबत) वाढणे, भडकणे. **go up sth** चढणे. **go with sb** (क) बरोबर जाणे, साथ करणे. (ख) मुलाला मैत्रीण किंवा मुलीला मित्र म्हणून कुणी असणे. **go together, go with sth** शोभणे, मॅच होणे : *Do green curtains go with a pink carpet? गुलाबी कार्पेटला हिरवे पडदे खुलून दिसतात का?* **go without (sth)** वाचून राहणे : *go without food for four days, अन्नाविना चार दिवस राहणे.* **'go-ahead** *ना* **the go-ahead** [*अे.व*] काही करण्यास परवानगी, हिरवा कंदील. **'go-ahead** *वि* नवीन पद्धती वापरण्याची इच्छा असणारा, नवनवीन प्रयोग करणारा. **'go-'slow** *ना* [*गण*] कामगारांनी संथ गतीने काम करून व्यक्त केलेला निषेध, संथगती कामाचा निषेध.

go^2 /गउ/, *ना* (*ब.व* **~es** /गउझ्/) १ [*गण*] खेळात खेळायची एखाद्याची पाळी. २ [*गण*] प्रयत्न : *'I can't lift this box', 'Let me have a go', 'मला नाही ही पेटी उचलत', 'मी बघतो प्रयत्न करून'.* ३ [*अगण*] (*अनौप*) उत्साह, शक्ती : *He's full of go, तो खूप उत्साही आहे.* ४ (*वाक्प्र*) **be on the 'go** (*अनौप*) खूप उत्साही, चळवळ्या असणे. **It's all 'go** (*अनौप*) ते खूप व्यग्र/गजबजलेलं आहे. **make a 'go of sth** (*अनौप*) एखाद्या गोष्टीतून यश पदरात पाडणे.

goad /गउड्/ *क्रि* १ [*सक*] (*into*)// (एखाद्याला) सतत हैराण करणे, टोचणे : *He ~ed me into an angry reply, माझ्या तोंडून रागाचे उत्तर येईल इतके त्याने मला सतावले.* २ (*क्रिब*) **goad sb on** एखाद्याला एखादी गोष्ट करण्यास उद्युक्त करणे. **goad** *ना* [*गण*] गुराढोरांना पिटाळण्यासाठी वापरायची टोकदार काठी, टोचायची काठी, पराणी, अरी.

goal /गउल्/ *ना* [*गण*] १ (क) (फुटबॉल, हॉकी वगैरेमधे) गुण मिळवण्यासाठी चेंडू ज्यात मारायचा ते दोन खांब, दवडीची हद्द. (ख) गोलमधे चेंडू मारून मिळवलेला गुण. २ (*ला*) ध्येय, उद्देश, हेतू. **'goalkeeper** *ना* [*गण*] गोलमध्ये उभं राहून प्रतिस्पर्धी गटापासून गोलची रक्षा करणारा, गोलरक्षक. **'goal-post** *ना* [*गण*] गोलाचा खांब.

goat /गउट्/ *ना* [*गण*] १ बकरा/बकरी, बोकड/शेळी. २ (*वाक्प्र*) **get sb's 'goat** (*अनौप*) एखाद्याला सतावणे, हैराण करणे.

gobble^1 /'गॉब्ल्/ *क्रि* [*अक, सक*] अधाशीपणे खाणे, बकाबका खाणे.

gobble^2 /'गॉब्ल्/ *क्रि* [*अक*] *ना* [*गण*] टर्की कोंबड्याप्रमाणे कुडकुड आवाज (करणे).

go-between /'गउबिट्वीन्/ *ना* [*गण*] दोन

माणसांतील निरोप्या, मध्यस्थ.

goblet /'गॉब्लिट्/ *ना* [*गण*] काचेचे किंवा धातूचे बिनकानाचे उंच पात्र.

goblin /'गॉब्लिन्/ *ना* [*गण*] (परीकथेमधे) छोटासा, कुरूप असणारा पण खोड्या करणारा प्राणी.

god /गॉड्/ *ना* १ [*गण*] निसर्गावर सत्ता असणारा आणि मानवी व्यवहार नियंत्रित करणारा परमेश्वर, देव. २ **God** [*अे.व*] (खास करून ख्रिस्ती, ज्यू, इस्लाम या धर्मात) विश्वकर्ता आणि विश्वनियंता. ३ [*गण*] मोठ्या कौतुकाचा किंवा प्रेमाचा विषय असलेली व्यक्ती किंवा वस्तू. ४ **the gods** [*ब.व*] थिएटरमधील उंच ठिकाणची आसने. ५ (*वाक्प्र*) **God willing** ठरवल्याप्रमाणे झाले तर, ईश्वरी कृपेने. **'godchild, 'god-daughter, 'godson** *ना* [*गण*] मानलेला मुलगा/मुलगी, धर्मसंतान, धर्मपुत्र, धर्मकन्या. **goddess** /'गॉडिस्/ *ना* [*गण*] देवता. **'godfather, 'godmother, 'godparent** *ना* [*गण*] बाप्तिशमाच्या वेळी मुलाच्या धर्मशिक्षणाची जबाबदारी स्वीकारणारा माणूस, धर्मपिता, धर्ममाता, धर्मपालक. **'god-fearing** *वि* धर्मभोळा, सश्रद्ध. **'god-forsaken** *वि* (स्थळाबाबत) उदास आणि निर्जन. **godless** *वि* नास्तिक, अश्रद्ध; दुष्ट. **'godlike** *वि* देववत्, ईश्वरसमान. **godly** *वि* (-ier, -iest) धार्मिक प्रवृत्तीचा, धर्मनिष्ठ. **godliness** *ना* [*अगण*] देवपणा. **'godsend** *ना* [*गण*] अनपेक्षित भाग्य.

goggle /'गॉग्ल्/ *क्रि* [*अक*] (*at*)// डोळे मोठे करून पाहणे, डोळे वटारणे. **goggles** *ना* [*ब.व*] पाणी, वारा, धूळ वगैरेपासून संरक्षण करणारा चष्मा, काळा चष्मा, उन्हाचा चष्मा.

going /'गउइङ्/ *ना* १ [*अे.व*] निघणे, प्रयाण. २ [*अगण*] कामाचा किंवा प्रवासाचा वेग: *It was good ~ to get to York so quickly, छान वेगामुळेच यॉर्कला इतक्या लवकर आलो.* **going** *वि* (*वाक्प्र*) **a ,going con'cern** किफायतशीर धंदा. **the ,going 'rate** नेहमीचा दर. **,goings-'on** *ना* [*ब.व*] विचित्र घटना.

go-kart /'गउकाट्/ *ना* [*गण*] छोटी, बसकी, छप्पर नसलेली रेसची गाडी.

gold /गउल्ड्/ *ना* १ [*अगण*] सोने, सुवर्ण. २ [*अगण*] सोन्याचे दागदागिने, सोन्याची नाणी वगैरे, सोनंनाणं. ३ [*अगण, गण*] सोनेरी (पिवळाधमक) रंग. ४ [*गण*] (*खेळ*) सुवर्णपदक. **goldfish** *ना* [*गण*] (*ब.व* **goldfish**) घरात पाळायचे सोनेरी तांबूस मासे. **,gold 'foil** (तसेच **,gold-'leaf**) *ना* [*अगण*] सोनेरी ताव, बेगड. **,gold-'medal** *ना* [*गण*] खास करून क्रीडास्पर्धेतील विजेत्याला दिले जाणारे सुवर्णपदक. **'gold-mine** *ना* [*गण*] १ सुवर्णखाण, सोन्याची खाण. २ (*ला*) नफा देणारा यशस्वी धंदा. **'gold-rush** *ना* [*गण*] सोने सापडले आहे त्या ठिकाणी होणारी झुंबड. **'goldsmith** *ना* [*गण*] सोन्याच्या वस्तू बनविणारा सोनार, सुवर्णकार.

golden /'गउल्डन्/ *वि* १ सोनेरी, सुवर्ण. २ उत्कृष्ट, अत्युत्तम: *a ~ opportunity, सुवर्णसंधी.* ३ (*वाक्प्र*) **a golden handshake** एखादी व्यक्ती एखादी कंपनी जेव्हा सोडते तेव्हा तिला मिळणारी मोठी रक्कम. **golden jubilee** *ना* [*गण*] पन्नासावा वार्षिक महोत्सव, सुवर्णजयंती. **,golden 'rule** *ना* [*गण*] वर्तनाचा महत्त्वाचा नियम, उत्तम नीतिनियम.

golf /'गॉल्फ्/ *ना* [*अगण*] नऊ किंवा अठरा भोकांत वाकड्या यष्टीने चेंडू मारून घालवायचा हिरवळीवरचा एक खेळ. **'golf ball** *ना* [*गण*] गोल्फ खेळायचा चेंडू. **'golf club** *ना* [*गण*] गोल्फ खेळणाऱ्यांचे मंडळ; गोल्फ खेळण्याचे मैदान. **'golf-club** *ना* [*गण*] चेंडू मारायची गोल्फची लांब यष्टी. **'golf-course** *ना* [*गण*] गोल्फ खेळायचे मैदान. **golfer** *ना* [*गण*] गोल्फ खेळाडू.

gone GO^{1} चे *भूत वि.*

gong /गॉङ्/ *ना* [*गण*] आघात करून वाजवायची धातूची मोठी गोल थाळी, तास.

gonorrhoea (तसेच **gonorrhea**) /,गॉन'रिअ/ *ना* [*अगण*] लैंगिक संबंधातून प्रादुर्भाव होणारा रोग, परमा.

good^{1} /गुड्/ *वि* (**better** /'बेट(र्)/, **best** /बेस्ट्/) १ उच्च प्रतीचा, चांगला: *very ~ exam results, परीक्षेचे फार चांगले निकाल.* २ सुखकारक, छान; आनंददायक, मस्त: ~

news/weather, चांगली बातमी/हवा ○ *a ~ time, मस्त वेळ.* ३ एखाद्या कामात वाकबगार, कुशल : *a ~ teacher, चांगला शिक्षक* ○ *~ at languages, भाषेत वाकबगार.* ४ नैतिकदृष्ट्या योग्य किंवा स्वीकार्य, सत् : *~ deeds, सत्कृत्ये.* ५ (विशेषतः लहान मुलाच्या बाबतीत) सद्वर्तनी, सालस. ६ फायदेशीर; उचित, साजेसा : *Milk is ~ for you, तुला दूध फायद्याचं आहे.* ७ दयाळू : *They were very ~ to her when she was ill, ती आजारी असताना ते तिच्याशी फार चांगले वागले.* ८ (परि)पूर्ण : *a ~ sleep, मस्त झोप.* ९ **good for sth** (क) (दिलेल्या रकमेची) विश्वासार्हता असलेला : *My credit is ~ for £500, माझं क्रेडिट/माझी पत ५०० पौंडाइतकं/इतकी चांगलं/चांगली आहे.* (ख) वैध, चालणारा : *tickets ~ for three months, तीन महिने चालणारी तिकिटे.* (ग) टिकण्याची शक्यता असलेला : *The car's ~ for a few months yet, ही गाडी अजून काही महिने टिकेल/जाईल.* १० (स्वागत करताना आणि निरोप देताना वापर) : *G~ morning/afternoon, शुभप्रभात!* किंवा *रामराम!* ११ **a good . . .** (क) खूप, पुष्कळ : *a ~ many people, पुष्कळ लोक.* (ख) -पेक्षा कमी नाही : *a ~ three miles to the station, स्टेशन तीन मैलापेक्षा कमी नाही म्हणजेच चांगले तीन मैलाइतक्या अंतरावरचे स्टेशन.* १२ (उद्गारवाचक वाक्यात वापर) : *G~ Heavens! बाप रे!* १३ (संमती, मान्यता वगैरे दाखवताना वापर) : *'I've finished!' 'G~!', 'माझं झालं!', 'छान्!'* १४ (*वाक्प्र*) **a good deal** ➪ DEAL¹. **a good 'job** (*अनौप*) भाग्याची परिस्थिती, सुदैव. **a good many** ➪ MANY. **all in good time** आता नाही तरी काही काळाने (चांगली गोष्ट घडेल). **as good as** जवळजवळ : *as ~ as finished, जवळजवळ संपलेलं.* **as good as gold** फार चांगल्या वागणुकीचा, काही त्रास नसलेला. **be a good thing** (क) नशिबवान असणे, भाग्यवान असणे. (ख) चांगली कल्पना असणे. **do sb a good turn** एखाद्याला उपकारक किंवा उपयोगी असे काही करणे. **for good measure** आधी दिलेल्या रकमेत भर म्हणून. **good and** (*अनौप*) पूर्णपणे : *I won't go until I'm ~ and ready, मी पूर्ण तयार झाल्याशिवाय जाणार नाही.* **good for 'sb, 'you, 'them, etc** (*अनौप*) (एखाद्याच्या यशाबाबत आनंद किंवा मान्यता दर्शविण्यास वापर). **good 'grief** (*अनौप*) (आश्चर्य किंवा इतर तीव्र भावना व्यक्त करण्यास वापर). **,good 'luck** (एखाद्याचे अभिष्टचिंतन करताना वापर). **have a good mind to do sth** एखादी गोष्ट करण्याची इच्छा असणे, मनातून करण्याचे असणे. **have a good night** ➪ NIGHT. **in good time** लवकरच. **make good** यशस्वी होणे. **'good-for-nothing** *ना* [*गण*], *वि* आळशी किंवा भिकार (माणूस), कुचकामी (माणूस). **,Good 'Friday** *ना* [*अगण, गण*] ईस्टर रविवारच्या आधीचा शुक्रवार, ख्रिस्ताच्या दुःखभोगाच्या स्मरणाचा शुक्रवार. **,good-'humoured** *वि* आनंदी आणि स्नेहपूर्ण, खेळीमेळीचा. **,good-'looking** *वि* देखणा; सुंदर, सुरेख. **,good-'natured** *वि* दयाळू आणि स्नेहपूर्ण, सुस्वभावी, सालस. **,good 'sense** *ना* [*अगण*] शहाण्यासारखे वागण्याची क्षमता. **,good-'tempered** *वि* सहज न चिडणारा, शांत.

good² /गुड/ *ना* [*अगण*] १ नैतिकदृष्ट्या बरोबर आणि योग्य असलेले, सत्कर्म, पुण्य : *~ and evil, पापपुण्य.* २ फायदेशीर, हित : *It's for your own ~, हे तुझ्याच भल्यासाठी आहे.* ३ (*वाक्प्र*) **be no/not much 'good** (फारसे) उपयोगाचे नसणे, किंमत नसणे : *It's no ~ talking to them, त्यांच्याशी बोलून उपयोग नाही.* **do (sb) 'good** एखाद्याच्या हिताचे असणे : *Drinking the medicine will do you ~, औषध घेणे तुझ्या हिताचे आहे.* **for 'good** कायमचा, सततचा. **up to no 'good** काहीतरी भलते करण्यामागे, गैरकृत्यात मग्न.

goodbye /,गुड्'बाइ/ *उद्गा*, *ना* [*गण*] (निरोप घेताना किंवा देताना वापर) बराय्! टा टा!

goodness /'गुड्निस/ *ना* [*अगण*] १ चांगुलपणा, भलेपणा. २ अन्नातील पोषक द्रव्य : *Brown bread is full of ~, ब्राउन ब्रेडमधे खूप पोषक द्रव्ये असतात.* ३ (आश्चर्य, सुटका, वैताग वगैरे भाव व्यक्त करण्यास वापर) : *My*

~! अरे देवा! ○ *For goodness' sake! अरेच्या! बापरे!*

goods /गुड्झ्/ *ना* [*ब.व*] १ विक्रीचा माल; जंगम मालमत्ता : *electrical ~, विजेवर चालणारा माल.* २ आगगाडीतून पाठवायचा माल : *a ~ train, मालगाडी.* ३ (*वाक्प्र*) **come up with/deliver the 'goods** (*अनौप*) बोलल्याप्रमाणे करणे, वचनपूर्ती करणे.

goodwill /,गुड्'विल्/ *ना* [*अगण*] १ सदिच्छा, सद्भावना. २ एखाद्या व्यवसायाची प्रतिष्ठा (किंवा तिची किंमत), पत, ख्यातिमूल्य.

goody /'गुडि/ *ना* [*अगण*] (*ब.व* **-ies**) (*अनौप*) १ (बहुधा *ब.व*) आवडीचे (विशेषतः खाणे) काहीतरी खास. २ चित्रपट, पुस्तक वगैरेतला नायक.

goose /गूस्/ *ना* (*ब.व* **geese** /गीस्/) १ [*गण*] हंस, कादंब. २ [*गण*] हंसी. ३ [*अगण*] हंसाचे मांस. **'goose-flesh** *ना* [*अगण*] (तसेच **'goose-pimples** [*ब.व*]) भीतीने किंवा थंडीने अंगावर येणारा काटा, शहारे.

gooseberry /'गुझ्बरि; *अमे* 'गूस्बेरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) लव असणारी हिरवी आंबट फळे/बेरी (येणारे झुडुप).

gorge^1 /गॉऽज्/ *ना* [*गण*] अरुंद आणि एकदम सरळपणे खोल असणारी दरी, अरुंद खिंड, निदरी.

gorge^2 /गॉऽज्/ *क्रि* [*अक, सक*] ~ **(oneself) (on)** अधाशासारखे खाणे, बकाबका खाणे.

gorgeous /'गॉऽजस्/ *वि* १ (*अनौप*) आनंददायी, सुखकारक; आश्चर्यकारक. २ आकर्षक, लक्षवेधक, भव्य. **gorgeously** *क्रिवि* भपकेदारपणे.

gorilla /ग'रिल/ *ना* [*गण*] आफ्रिकेतले मोठे वानर.

gorse /गॉऽस्/ *ना* [*अगण*] पिवळी फुले, अणकुचीदार काटे असलेला एक सदाहरित वृक्ष, पिवळा काटेरी धोतरा.

gory /'गॉऽरि/ *वि* **(-ier, -iest)** रक्तपात आणि मृत्यू यांनी भरलेला, रक्तरंजित : *a ~ film, रक्तबंबाळ चित्रपट.*

gosh /गॉश्/ *उद्गा* (*अनौप*) (आश्चर्य व्यक्त करणारे) वा!

gosling /'गॉझ्लिङ्/ *ना* [*गण*] हंसाचे पिलू.

gospel /'गॉस्प्ल्/ *ना* १ (*बायबल*) (क) **the Gospel** [*अे.व*] येशूचे चरित्र आणि त्याची शिकवण. (ख) **Gospel** [*गण*] न्यू टेस्टामेंट या ख्रिस्ती धर्मग्रंथाच्या पहिल्या चार पुस्तकांपैकी कोणतेही एक पुस्तक. २ [*अगण*] सत्य.

gossamer /'गॉसम(र्)/ *ना* [*अगण*] रेशमाचा तलम धागा.

gossip /'गॉसिप्/ *ना* १ [*अगण*] इतर लोकांविषयी – विशेषतः त्यांच्या खाजगी बाबींविषयी – गप्पा, कुटाळक्या. २ [*गण*] चकाट्या पिटणे ज्याला आवडते तो माणूस, गप्पाड्या. **gossip** *क्रि* [*अक*] चकाट्या पिटणे, गप्पा मारणे.

got GET चा *भूत, भूत वि.*

gotten (*अमे*) GET चे *भूत वि.*

gouge /गाउज्/ *ना* [*गण*] लाकडात खाचा पाडण्याचे अर्धगोलाकार पाते असलेले एक हत्यार, विंधण्याचे अऊत, नाख्या, सच्या. **gouge** *क्रि* १ [*सक*] एखाद्या गोष्टीला भोक पाडणे, विंधणे. २ (*क्रिव*) **gouge sth out** टोकदार हत्याराने किंवा बोटाने दाबून एखादी गोष्ट बाहेर काढणे, उपसून काढणे.

goulash /'गूलॅश्/ *ना* [*गण, अगण*] गोमांस आणि भाज्या यांचा रस्सा.

gourd /गुअड्/ *ना* [*गण*] १ एक प्रकारची वेल (किंवा तिचे जाड सालीचे मोठे फळ), भोपळा, घोसाळे. २ घोसाळे किंवा भोपळा वाळवून केलेली बाटली किंवा त्याचे भांडे.

gourmet /'गुअमेइ/ *ना* [*गण*] चांगले खाण्या-पिण्याची माहिती असणारा तज्ज्ञ, खाबूतज्ज्ञ, खवैय्या.

gout /गाउट्/ *ना* [*अगण*] हातापायाची बोटे आणि सांधे यांना सूज येण्याचा रोग, संधिवात.

govern /'गेव्ह्न्/ *क्रि* १ [*अक, सक*] (नगर, देश वगैरेवर) राज्य असणे/करणे, शासन असणे/शासित करणे. २ [*सक*] नियंत्रण ठेवणे, परिणाम घडवणे : *The law of supply and demand ~s the prices of goods, मालाच्या किंमती मागणी आणि पुरवठ्याच्या तत्त्वाने नियंत्रित होतात.* **governing** /'गेव्हनिङ्/ *वि* नियंत्रण/

शासन करण्याचा अधिकार असणारा, नियामक, अधिशासक : *the ~ing body of a school, शाळेचे नियामक मंडळ.*

governess /'गीव्हनिस्/ *ना* [*गण*] एखाद्या कुटुंबात राहून मुलांना शिकवण्याचे काम करणारी स्त्री, मुलांची बाई.

government /'गीव्हन्मन्ट्/ *ना* १ [*गण,* तसेच ब.व क्रियापदासह अे.व] राज्य किंवा देशावर शासन करणारा वर्ग, शासन, सरकार. २ [*अगण*] शासनपद्धती, शासनयंत्रणा : *democratic ~, लोकशाही शासनयंत्रणा/ शासनपद्धती.*

governor /'गीव्हन(र्)/ *ना* [*गण*] १ एखादा प्रांत किंवा (अमेरिकेतील) राज्य यावर शासन करणारी व्यक्ती, शासक; (भारतात) राज्यपाल. २ संस्थाप्रमुख; नियामक मंडळाचा सभासद : *a prison/school ~, शाळा/तुरुंग यांच्या नियामक मंडळाचा सभासद.*

gown /गाउन्/ *ना* [*गण*] १ काही खास प्रसंगी वापरायचा बायकांचा पायघोळ पोषाख. २ न्यायमूर्ती, विद्यापीठ सभासद वगैरेंनी वापरायचा बहुधा काळ्या रंगाचा सैल, पायघोळ अंगरखा.

GP /,जी 'पी/ *संरू* general practitioner.

grab /ग्रॅब्/ *क्रि* **(-bb-)** [*अक, सक*] अचानकपणे धसमुसळेपणाने एखादी गोष्ट घेणे, हडप करणे, ओढून घेणे, हिसकावणे. **grab** *ना* [*गण*] १ झडप, डल्ला, पकड. २ (*वाक्प्र*) **up for 'grabs** (*अनौप*) कुणीही घ्यावे असे.

grace /ग्रेइस्/ *ना* १ [*अगण*] हालचालीतील सौंदर्य, डौल, नखरा, सहजसुंदरता. २ [*अगण*] एखादी गोष्ट पूर्ण करण्यास, पैसे भरण्यास वगैरे दिलेला जादा वेळ, वाढीव मुदत : *give sb a week's ~, एखाद्याला आठवड्याची वाढीव मुदत देणे.* ३ [*अगण*] सदिच्छा, कृपा. ४ [*अगण, गण*] जेवणापूर्वी किंवा नंतर म्हणायची कृतज्ञतेची प्रार्थना. ५ [*अगण*] परमेश्वराची लोकांवरील कृपा. ६ (*वाक्प्र*) **with (a) bad/good 'grace** अनिच्छेने/स्वेच्छेने. **grace** *क्रि* [*सक*] (*औप*) १ शोभा आणणे. २ मान देणे, बहुमान करणे, प्रतिष्ठा देणे : *The Queen is gracing us with her presence, स्वतःच्या उपस्थितीने राणी आम्हाला सन्मानित करत आहे.* **graceful** /-फ्ल्/ *वि* गोजिरा, डौलदार, लालित्यपूर्ण : *a ~ful dancer, सौष्ठवपूर्ण नर्तक.* **gracefully** *क्रिवि* डौलदारपणे, सफाईदारपणे, सहजसुंदरतेने. **graceless** *वि* सफाईदारपणा नसणारा, ओबडधोबड; उद्धट, धष्टोट.

gracious /'ग्रेइशस्/ *वि* १ विनम्र, सज्जन, अदबशीर; दयाळू. २ सुखाचा, आरामाचा : *~ living, सुखसमृद्धीचे जीवन.* **graciously** *क्रिवि* विनम्रपणे. **graciousness** *ना* [*अगण*] विनम्रपणा.

grade /ग्रेइड्/ *ना* [*गण*] १ गुणवत्ता किंवा स्थान यातील श्रेणी किंवा दर्जा : *different ~s of pay, पगाराच्या विविध श्रेणी.* २ शाळेतील कामाच्या प्रगतीबाबत दिलेले गुण. ३ (*अमे*) शाळेतील इयत्ता. ४ (*अमे*) चढ, उतार, विक्षेपक, प्रवणता. ५ (*वाक्प्र*) **make the 'grade** (*अनौप*) आवश्यक मानक/प्रमाण/ गुणवत्ता प्राप्त करणे. **grade** *क्रि* [*सक*] श्रेणीवार लावणे, प्रतवारी लावणे; (शाळेतील कामाला) गुण देणे. **'grade school** *ना* [*गण*] (*अमे*) प्राथमिक शाळा.

gradient /'ग्रेइडिअन्ट्/ *ना* [*गण*] रस्त्याचा, रेल्वेचा उतार, विक्षेपक.

gradual /'ग्रॅजुअल्/ *वि* हळूहळू घडणारा, संथ गतीचा; अचानक न घडणारा. **gradually** /-जुलि/ *क्रिवि* हळूहळू.

graduate^{1} /'ग्रॅजुअट्/ *ना* [*गण*] १ विद्यापीठाची किंवा महाविद्यालयाची पदवी असलेली व्यक्ती, पदवीधर. २ (*अमे*) एखाद्या शिक्षण संस्थेत अभ्यासक्रम पूर्ण केलेला विद्यार्थी.

graduate^{2} /'ग्रॅजुअेइट्/ *क्रि* १ [*अक*] (क) पदवीचा अभ्यास पूर्ण करणे : *~ in law, कायद्याची पदवी घेणे.* २ [*सक*] प्रतवारीने विभागणे; मोजण्यासाठी एकसारखे विभाग करणे, मापांकन करणे. ३ [*अक*] अधिक महत्त्वाच्या किंवा अवघड गोष्टीकडे जाणे. **graduation** /,ग्रॅजु'अेइश्न्/ *ना* १ [*अगण*] पदवीदान समारंभ. २ [*गण*] माप दाखविणारी खूण, अंकन.

graffiti /ग्र'फीटि/ *ना* [*ब.व, अगण*] भिंतीवरील चित्र किंवा लेख, भित्तिचित्र, भित्तिलेख.

graft^{1} /ग्राफ्ट्; *अमे* ग्रॅफ्ट्/ *ना* [*गण*] १ नव्या

वाढीकरता एका वनस्पतीचा दुसऱ्या वनस्पतीवर बसवलेला तुकडा, फांदीचे कलम. २ (*वैद्यक*) हाड, त्वचा वगैरेचा दुसऱ्या शरीरात किंवा त्याच शरीरात दुसरीकडे बसविलेला तुकडा, हाडाचे किंवा त्वचेचे कलम. **graft** *क्रि* [*सक*] कलम करणे.

graft^2 /ग्राफ्ट्; *अमे* ग्रॅफ्ट्/· *ना* [*अगण*] (*ब्रि*) कष्टाचे काम.

grain /ग्रेइन्/ *ना* १ (क) [*अगण*] गहू, तांदूळ वगैरेचे दाणे, धान्याचे दाणे. (ख) [*गण*] धान्याचा एक दाणा. २ [*गण*] छोटासा खडा : *~s of sand, वाळूचे खडे.* ३ [*गण*] (*ला*) अल्पांश : *a ~ of truth, सत्याचा लवलेश.* ४ [*अगण, गण*] लाकूड वगैरेवरील शिरा, रेषा. ५ (*वाक्प्र*) **be/go against the 'grain** विचित्र असणे, नकोसे असणे, न रुचणारे असणे. **take sth with a grain of salt** ➪ SALT.

gram (तसेच **gramme**) /ग्रॅम्/ *ना* [*गण*] वजनाचे एक मेट्रिक परिमाण.

grammar /ग्रॅम(र्)/ *ना* [*गण, अगण*] शब्दांची रूपे आणि वाक्यांची रचना यांचे नियम (सांगणारे पुस्तक), व्याकरण (ग्रंथ). **grammarian** /ग्र'मेअरिअन्/ *ना* [*गण*] व्याकरणकार, वैय्याकरणी. **'grammar school** *ना* [*गण*] शालेय शिक्षणाची ब्रिटनमधील एक प्रकारची माध्यमिक शाळा. **grammatical** /ग्र'मॅटिक्ल्/ *वि* व्याकरण नियमाप्रमाणे बरोबर, व्याकरणिक. **grammatically** /-क्लि/ *क्रिवि* व्याकरणदृष्ट्या.

gramophone /'ग्रॅमफउन्/ *ना* [*गण*] (*जुना, अप्रचलित*) रेकॉर्ड-प्लेअर.

granary /'ग्रॅनरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) धान्याचे कोठार, गुदाम.

grand /ग्रॅन्ड्/ *वि* १ भव्य, विशाल, वेधक : *a ~ palace, भव्य राजवाडा.* २ (बहुधा *अधिक्षेपी*) अहंकारी, घमेंडखोर; बडा. ३ (*अनौप*) मस्त, भन्नाट : *We had a ~ time, आमचा वेळ मस्त गेला.* ४ पूर्ण, भरलेला; अंतिम, एकूण : *the ~ total, एकूण बेरीज.* **grand** *ना* [*गण*] १ (*ब.व* **grand**) (*व्रात्य*) १००० डॉलर्स/पौंड. २ आडव्या तारा असणारा मोठा पियानो. **grandly** *क्रिवि* भव्यपणे. **,grand 'piano** *ना* [*गण*] आडव्या तारा असणारा मोठा पियानो. **'grandstand** *ना* [*गण*] खेळ पाहण्यासाठी आसनांच्या रांगा असणारी मोठी इमारत.

grand- (कौटुंबिक नाती दाखविण्यासाठी सामासिक शब्दांत वापर). **'grandchild** (*ब.व* **-children**) नातवंड. **'granddaughter** *ना* [*गण*] नात. **'grandson** *ना* [*गण*] नातू. **'grandfather** आजोबा. **'grandmother** आजी. **'grandparent** *ना* [*गण*] आजी/आजोबा. **'grandfather clock** *ना* [*गण*] उंच लाकडी पेटीतले घड्याळ.

grand-dad (तसेच **grandad**) /'ग्रॅन्डॅड्/ *ना* (*ब्रि अनौप*) आजोबा.

grandeur /'ग्रॅन्ज(र्)/ *ना* [*अगण*] महानता, मोठेपणा, विशालता; भव्यता, भव्यदिव्यपणा.

grandiose /'ग्रॅन्डिअउस्/ *वि* (बहुधा *अधिक्षेपी*) मोठ्या प्रमाणावर आणि लोकांच्या मनात भरेल असा योजलेला, भपकेबाज, अवाढव्य.

grandma /'ग्रॅन्मा/ *ना* [*गण*] (*अनौप*) आजी.

grandpa /'ग्रॅन्पा/ *ना* [*गण*] (*अनौप*) आजोबा, आजा.

granite /'ग्रॅनिट्/ *ना* [*अगण*] करड्या किंवा तांबूस रंगाचा बांधकामात वापरायचा कठीण दगड, वज्रतुंडाचा दगड; कणाश्म.

granny (तसेच **grannie**) /'ग्रॅनि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) (*अनौप*) आजी. **'granny flat** *ना* [*गण*] (*अनौप*) नातेवाईकाच्या घरातील आजीची खोली.

grant /ग्रान्ट्/ *क्रि* [*सक*] १ (*औप*) देण्याचे किंवा परवानगी देण्याचे मान्य करणे : *~ sb's request, एखाद्याची विनंती मान्य करणे.* २ (*औप*) (एखादी गोष्ट खरी आहे असे) मान्य करणे. ३ (*वाक्प्र*) **take sb/sth for 'granted** अतिपरिचयाने एखाद्याला किंमत न देणे. **take sth for 'granted** एखादी गोष्ट धरून चालणे, चर्चा न करता गृहीत धरणे. **grant** *ना* [*गण*] अनुदान, मदत, विशेषतः सरकारकडून.

granulated /'ग्रॅन्युलेइटिड्/ *वि* (साखरेबाबत) दाणेदार, रवाळ, कणीदार, बारीक

पावडरीसारखी नाही.

granule /'ग्रॅन्यूल/ *ना* [*गण*] छोटा दाणा, कण.

grape /ग्रेइप्/ *ना* [*गण*] द्राक्ष. **'grapevine** *ना* १ [*गण*] द्राक्षवेल. २ [*अ.व*] (*ला*) कचेरीतील वगैरे बातमी मिळण्याचा अनधिकृत मार्ग : *heard about it on the ~-vine, याबाबत अनधिकृत सूत्रांकडून समजले.*

grapefruit /'ग्रेइप्फ्रूट्/ *ना* [*गण*] (*ब.व* **grapefruit** किंवा **~s**) संत्र्यासारखे दिसणारे पण तितके गोड नसणारे एक फळ.

graph /ग्राफ्; *अमे* ग्रॅफ्/ *ना* [*गण*] दोन बदलणाऱ्या राशींचे संबंध दाखविणारा आलेख. **'graph paper** *ना* [*अगण*] आलेखाचा, (एकाच आकाराच्या छोट्या) चौकटी असलेला कागद.

graphic /'ग्रॅफिक्/ *वि* १ दृश्य प्रतिकांचा – उदाहरणार्थ अक्षरे किंवा चित्र : *~ design, विविध आकाराचे चित्र, चित्रालेख.* २ (वर्णनांबाबत) स्पष्ट आणि तपशीलवार. **graphically** /-क्लि/ *क्रिवि* स्पष्टपणे : *~ally described, स्पष्टपणे वर्णन केलेला, अर्थव्यक्ती गुणयुक्त वर्णन.* **graphics** *ना* [*ब.व*] अक्षरलेखन, चित्रलेखन, वगैरे.

graphite /'ग्रॅफाइट्/ *ना* [*अगण*] पेन्सिलीत वापरायचे मऊ काळे द्रव्य, स्फटिकी कार्बनचा एक प्रकार, लेखपाषाण, शिसे.

grapple /'ग्रॅप्ल्/ *क्रि* [*अक*] (*with*)// १ एखाद्याशी झटापट करणे, झोंबणे. २ (*ला*) एखाद्या प्रश्नाला सामोरे जाणे, भिडणे.

grasp /ग्रास्प्; *अमे* ग्रॅस्प्/ *क्रि* [*सक*] १ हाताने गच्च पकडणे, धरणे. २ (एखादी गोष्ट) पूर्णपणे समजणे, कळणे, आकलन होणे. ३ (*क्रिब*) **grasp at sth** एखादी गोष्ट पकडण्याचा/धरण्याचा प्रयत्न करणे : *~ at an opportunity, संधी साधणे.* **grasp** *ना* [*गण*, बहुधा *अे.व*] १ घट्ट पकड. २ आकलन, समज. **grasping** *वि* (*अधिक्षेपी*) पैशाला लालचावलेला, लोभी.

grass /ग्रास; *अमे* ग्रॅस्/ *ना* १ [*अगण*] गवत, तृण. २ [*गण*] तृणजाती. ३ [*अगण*] गवताळ जमीन : *Don't walk on the ~, गवतावरून चालू नकोस.* ४ [*अगण*] (*व्रात्य*) भांग. ५ [*गण*] (*ब्रि व्रात्य*) पोलिसांना गुन्हेगाराची माहिती देणारा, वर्दी, खबऱ्या. ६ (*वाक्प्र*) **(not) let the grass grow under one's feet** एखादी गोष्ट करण्यास चालढकल (न) करणे, वेळ (न) पाळणे. **grass** *क्रि* १ [*सक*] गवताने झाकणे/आच्छादणे. २ [*अक*] (*ब्रि व्रात्य*) गुन्हेगाराची पोलिसांना खबर देणे. **,grass 'roots** *ना* [*ब.व*] खास करून राजकारणातील सामान्य लोक, सामान्य कार्यकर्ते. **grassy** *वि* (-ier, -iest) गवताच्छादित.

grasshopper /'ग्रासहॉप(र्); *अमे* 'ग्रॅस्-/ *ना* [*गण*] चिवचिव आवाज करणारा आणि उड्या मारणारा एक कीटक, नाकतोडा, टोळ.

grate^{1} /ग्रेइट्/ *ना* [*गण*] शेगडीवरची धातूची जाळी, आगटी.

grate^{2} /ग्रेइट्/ *क्रि* १ [*सक*] खडबडीत पृष्ठभागावर घासून छोटे छोटे तुकडे करणे, किसणे : *~d cheese, किसलेले चीज.* २ [*अक*] खरवडणे, घासून खरवडण्याचा आवाज करणे, खरखर वाजणे. ३ [*अक*] (*on*)// (*ला*) त्रास देणे : *~ on sb's nerves, डोके उठवणे.* **grater** *ना* [*गण*] किसणी. **grating** *वि* त्रासदायक.

grateful /'ग्रेइट्फल्/ *वि* आभारी, कृतज्ञ : *I'm ~ to you for your help, तुझ्या मदतीबद्दल मी तुझा आभारी आहे.* **gratefully** /-फलि/ *क्रिवि* कृतज्ञतेने.

gratify /'ग्रॅटिफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] (*औप*) समाधान करणे, प्रसन्न करणे, तृप्त करणे. **gratification** /,ग्रॅटिफि'केइश्न्/ *ना* [*अगण, गण*] समाधान, तृप्ती. **gratifying** *वि* (*औप*) समाधानकारक, संतोषकारक, तृप्त करणारा.

grating /'ग्रेइटिङ्/ *ना* [*गण*] खिडकी वगैरेची लोखंडी जाळी.

gratitude /'ग्रॅटिट्यूड्; *अमे* -टूड्/ *ना* [*अगण*] कृतज्ञता; आभार : *feel ~, कृतज्ञता वाटणे.*

gratuitous /ग्र'ट्यूइटस्; *अमे* -'टू-/ *वि* (*औप अधिक्षेपी*) अनावश्यक; अकारण, हकनाक : *~ violence on television, दूरदर्शनवरील नाहक हिंसाचार.* **gratuitous-**

ly *क्रिवि* विनाकारण, कारण नसताना.

gratuity /ग्र'ट्यूअटि; *अमे* -'टू-/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) १ सेवेच्या बदल्यात दिलेले पैसे. २ (*ब्रि*) सेवानिवृत्त होणाऱ्या माणसाला मिळणारे पैसे, उपदान.

grave^{1} /ग्रेइव्ह्/ *ना* [*गण*] प्रेत पुरण्याकरता जमिनीतला खळगा, थडगे, कबर. **'gravestone** *ना* [*गण*] थडग्यावरील दगड. **'graveyard** *ना* [*गण*] स्मशान, कबरस्तान.

grave^{2} /ग्रेइव्ह्/ *वि* (**~r, ~st**) गंभीर : *a ~ situation, गंभीर परिस्थिती.* **gravely** *क्रिवि* गंभीरपणे.

gravel /'ग्रॅव्ह्ल्/ *ना* [*अगण*] रस्त्यावर घालण्याकरता वगैरे वापरली जाणारी मोठ्या खड्यांची वाळू, रेव, कंकर. **gravel** *क्रि* (**-ll-**; *अमे* तसेच **-l-**) [*सक*] खडी/जाड वाळू टाकणे. **gravelly** /'ग्रॅव्हलि/ *वि* १ खड्याखड्यांचा. २ (*ला*) (आवाजाबाबत) खोल आणि घोगरा.

gravitate /'ग्रॅव्हिटेइट्/ *क्रि* [*अक*] *towards/to*// एखाद्या गोष्टीकडे सरकणे, झुकणे, कलणे, आकर्षित होणे. **gravitation** /,ग्रॅव्हि'टेइश्न्/ *ना* [*अगण*] गुरुत्वाकर्षण.

gravity /ग्रॅव्हटि/ *ना* [*अगण*] १ पृथ्वीच्या केंद्राकडे वस्तूंना आकर्षित करणारी शक्ती, गुरुत्वाकर्षण. २ गांभीर्य : *the ~ of the situation, परिस्थितीचे गांभीर्य.*

gravy /'ग्रेइव्हि/ *ना* [*अगण*] मांस शिजताना त्याचा सुटणारा रस; पातळ मसाला.

gray (विशेषतः *अमे*) = GREY.

graze^{1} /ग्रेइझ्/ *क्रि* १ [*अक*] (गुरे, शेळ्यामेंढ्या वगैरेबाबत) चरणे, गवत किंवा चारा खाणे. २ [*सक*] चारणे, चरायला नेणे.

graze^{2} /ग्रेइझ्/ *क्रि* [*सक*] १ कातडे सोलणे. २ खरचटणे, घासटणे, चाटून जाणे. **graze** *ना* [*गण*] खरचटलेली जागा.

grease /ग्रीस्/ *ना* [*अगण*] १ प्राण्याची मऊ चरबी, मेद. २ घट्ट तेलकट पदार्थ, वंगण. **grease** *क्रि* [*सक*] वंगण घालणे. २ (*वाक्प्र*) **grease sb's palm** (*अनौप*) लाच देणे, एखाद्याचे हात ओले करणे. **like greased lightning** (*अनौप*) खूप वेगाने, जलद. **,grease-proof 'paper** *ना* [*अगण*] वंगणरोधक कागद. **greasy** *वि* (**-ier, -iest**) वंगणाने किंवा चिकट तेलाने माखलेले. **greasily** *क्रिवि* तेलकटपणाने.

great /ग्रेइट्/ *वि* १ आकाराने, वजनाने किंवा अंशाने खूप मोठा, प्रचंड, महा : *of ~ importance, मोठा महत्त्वाचा.* २ नामवंत, थोर, प्रख्यात, प्रसिद्ध, महान : *a ~ artist, महान कलाकार.* ३ (*अनौप*) मजेचा, मस्त : *a ~ time on holiday, सुट्टीचा मस्त वेळ.* ४ (*अनौप*) भव्य, अफलातून : *What a ~ idea! काय अफलातून/नामी कल्पना आहे!* ५ धडधाकट, छान; उत्कृष्ट : *I feel ~ today, मला आज खूप छान वाटतंय्.* ६ (*अनौप*) (जोर देण्यासाठी वापर) : *Look at that ~ big tree! ते मोऽठ्ठं झाड पहा!* ७ (*वाक्प्र*) **a great deal** ➪ DEAL^{1}. **a great many** ➪ MANY. **,Great 'Britain** *ना* [*ए.व*] इंग्लंड, वेल्स आणि स्कॉटलंड. **greatly** *क्रिवि* (*औप*) खूप, भरपूर. **greatness** *ना* [*अगण*] मोठेपणा, ख्याती; महत्त्व, थोरवी.

great- (एक पिढी आधी असे दाखवण्यासाठी सामासिक शब्दांत वापर) : *~-uncle, वडलांचे किंवा आईचे काका/मामा* ○ *,~-'grandson, मुलाचा किंवा मुलीचा नातू.*

greed /ग्रीड्/ *ना* [*अगण*] (*for*)// अन्नाची, पैशाची वगैरे हाव, लोभ, अधाशीपणा. **greedy** *वि* (**-ier, -iest**) हावरट, लोभी. **greedily** *क्रिवि* हावरटपणे, अधाशासारखे, लोभाने.

green^{1} /ग्रीन्/ *वि* १ हिरवा, पोपटी, हरित. २ (फळाबाबत) कच्चे, अपक्व. ३ निस्तेज, फिका; आजारी. ४ (*अनौप*) अननुभवी, कच्चा; पक्का नसणारा, सहज फसणारा. ५ मत्सरग्रस्त : *~ with envy, असूयेने भारलेला.* ६ (खास करून राजकारण किंवा राजकीय क्षेत्रात वापर) पर्यावरणाच्या संरक्षणाची काळजी असलेला, पर्यावरणवादी. ७ (*वाक्प्र*) **give sb/get the green 'light** (*अनौप*) हिरवा कंदील दाखवणे, एखादी गोष्ट करण्यास संमती किंवा परवानगी देणे/मिळणे. **,green 'belt** *ना* [*गण*] शहरातील राखून ठेवलेली आणि बांधकामावर खूप नियंत्रण असणारी मोकळी जागा, हरित पट्टा. **,green 'fingers** *ना* [*ब.व*] (*अनौप*) बागकामातील कौशल्य.

'greengrocer *ना* [*गण*] (*ब्रि*) भाजीवाला. **'greenhouse** *ना* [*गण*] रोपे वाढविण्यासाठीचे काचगृह. **'greenhouse effect** *ना* [*अे.व*] हवेतील कर्बादिप्रणिलचे किंवा कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण वाढल्याने पृथ्वीच्या वातावरणाच्या तपमानात हळूहळू होणारी वाढ. **greenness** *ना* [*अगण*] हिरवळ, हिरवेपणा; अननुभवीपणा.

green^2 /ग्रीन्/ *ना* १ [*अगण, गण*] हिरवा रंग. २ **greens** [*ब.व*] हिरव्या पालेभाज्या. ३ [*गण*] गवत वाढलेली जमीन, कुरण : *the village ~, गावचे कुरण, गावरान.* ४ [*गण*] गोल्फच्या मैदानावरील गोल्फच्या गलीभोवतालची मऊ हिरवळ.

greenery /'ग्रीनरि/ *ना* [*अगण*] हिरवी पाने आणि झाडे, हिरवळ.

greet /ग्रीट्/ *क्रि* [*सक*] १ स्वागत करणे, अभिवादन करणे, नमस्कार करणे. २ (दृश्य आणि आवाज यांबाबत) अचानक नजरेस पडणे, कानावर पडणे. **greeting** *ना* [*गण*] एखादा भेटल्यावर किंवा एखाद्याला लिहिनाता प्रथम वापरायचे शब्द – उदा *'हॅलो'* किंवा *'प्रिय भाऊ'* किंवा *'सप्रेम नमस्कार'*.

gregarious /ग्रि'गेअरिअस्/ *वि* १ इतरांच्या संगतीत राहायला आवडणारा, माणसं हवी असणारा. २ कळपात राहणारा.

grenade /ग्र'नेइड्/ *ना* [*गण*] हातानी टाकायचा बॉम्बगोळा, हिंगणबेट.

grew GROW चा *भूत.*

grey (तसेच विशेषतः *अमे* **gray**) /ग्रेइ/ *वि* १ काळपट पांढऱ्या रंगाचा, राखाडी रंगाचा, करडा. २ रुपेरी किंवा फिक्क्या केसांचा. **grey** *ना* [*अगण, गण*] करडा किंवा राखी रंग. **grey** *क्रि* [*अक*] करडा होणे, (केस) पिकणे. **'grey matter** *ना* [*अगण*] (*अनौप*) बुद्धी, अक्कल.

greyhound /'ग्रेइहाउन्ड्/ *ना* [*गण*] जोरात पळू शकणारा अंगाने बारीक असणारा कुत्रा, एक शिकारी कुत्रा.

grid /ग्रिड्/ *ना* [*गण*] १ जाळी, जाळीचे दार : *a 'cattle ~, गुरांच्या गोठ्याचे जाळीचे दार.* २ (क) चौकटीची जाळी. (ख) नकाशावरील चौकोनांचे जाळे. ३ वीज पुरवठा करणारी वायरची जाळी.

grief /ग्रीफ्/ *ना* १ [*अगण*] (*at/over*)// तीव्र दुःख, शोक. २ [*गण*] शोककारक घटना. ३ (*वाक्प्र*) **come to 'grief** अपयश येणे; अपघात होणे.

grievance /'ग्रीव्ह्न्स्/ *ना* [*गण*] (*against*)// तक्रारीचे खरे किंवा काल्पनिक कारण, गाऱ्हाणे.

grieve /ग्रीव्ह्/ *क्रि* (*औप*) १ [*अक*] शोक करणे, दुःख करणे, दुःखात असणे. २ [*सक*] एखाद्याला दुःख देणे.

grill /ग्रिल्/ *ना* [*गण*] १ अन्न शिजवायच्या पेटीतील धगीवर अन्नपदार्थ ठेवण्यासाठीची धातूची फळी. २ अशा प्रकारे शिजवलेले अन्न – विशेषतः मांस : *a mixed ~, मांस आणि इतर पदार्थ एकत्रितपणे भाजून केलेला पदार्थ.* **grill** *क्रि* १ [*अक, सक*] जाळावर धरून अन्न तयार करणे. २ [*सक*] एखाद्यावर प्रश्नांचा भडिमार करणे, प्रश्नांची सरबत्ती सोडणे.

grille (तसेच **grill**) /ग्रिल्/ *ना* [*गण*] मोकळ्या जागेवरील – उदाहरणार्थ खिडकीतली – जाळीची चौकट.

grim /ग्रिम्/ *वि* (**-mer, -mest**) १ असुखकारक, वाईट, दुःखद : *~ news, वाईट बातमी, अशुभ वार्ता.* २ गंभीर, चिंताग्रस्त; निश्चयी, करारी : *~-faced, करारी चेहऱ्याचा, उग्र मुद्रेचा.* **grimly** *क्रिवि* गंभीरपणे, काळजीच्या सुरात.

grimace /ग्रि'मेइस्; *अमे* 'ग्रिमस्/ *ना* [*गण*] चेहरा वेडावाकडा करणे, वाकुली. **grimace** *क्रि* [*अक*] वाकुल्या दाखवणे, तोंडे करणे.

grime /ग्राइम्/ *ना* [*अगण*] (एखाद्या गोष्टीवर बसलेली) धूळ, कचरा. **grimy** *वि* (**-ier, -iest**) घाणेरडा, अस्वच्छ, धुळकट.

grin /ग्रिन्/ *क्रि* (**-nn-**) [*अक*] १ दात विचकून हसणे. २ (*वाक्प्र*) **grin and 'bear it** तक्रार न करता दुःख, निराशा सहन करणे. **grin** *ना* [*गण*] दात विचकून केलेले हास्य.

grind /ग्राइन्ड्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **ground** /ग्राउन्ड्/) [*सक*] १ पीठ करणे, दळणे : *~ corn into flour, धान्याचे पीठ करणे.* २ घासून धार करणे, परजणे, पाजळणे : *~ a knife, सुऱ्याला धार लावणे.* ३ घट्ट धरणे किंवा दाबणे, जोराने घासणे : *~ one's teeth,* करकर

दात खाणे. ४ (*वाक्प्र*) **grind to a 'halt** हळूहळू थांबणे, हळूहळू थंडावणे. ५ (*क्रिब*) **grind sb down** एखाद्याला दुष्टपणे वागवणे, भरडून काढणे. **grind** *ना* [*अे.व*] १ दळणे; धार लावणे. २ (*अनौप*) कंटाळवाणे कष्टाचे काम. **grinder** *ना* [*गण*] दळणारा माणूस किंवा दळायचे यंत्र, जाते. **'grindstone** *ना* [*गण*] धार देण्याची दगडी तळी.

grip /ग्रिप्/ *क्रि* (**-pp-**) १ [*अक, सक*] पकडणे, पकड घेणे, घट्ट धरणे. २ [*सक*] (*ला*) लक्ष वेधून घेणे, लक्ष खिळवणे: *a ~ping film, खिळवून ठेवणारा चित्रपट.* **grip** *ना* १ [*अे.व*] घट्ट पकड. २ [*गण*] पकडून ठेवणारी वस्तू, चिमटा, मूठ. ३ [*गण*] (*अमे*) प्रवासाची छोटी बॅग. ४ (*वाक्प्र*) **come/get to grips with sth** (एखाद्या प्रश्नाचा) गंभीरपणे विचार करू लागणे.

grisly /'ग्रिझ्लि/ *वि* थरकाप उडवणारा, हादरवून सोडणारा, दारुण.

gristle /ग्रिस्ल्/ *ना* [*अगण*] मांसातील कडक भाग, कूर्चा.

grit /ग्रिट्/ *ना* [*अगण*] १ दगडाचे किंवा वाळूचे खडे, रेव, कंकर. २ धीर, हिंमत. **grit** *क्रि* (**-tt-**) [*सक*] १ रेव टाकणे – विशेषतः बर्फाळ रस्त्यावर. २ (*वाक्प्र*) **grit one's teeth** (**क**) तोंड गच्च मिटणे, दात आवळणे. (**ख**) (*ला*) हिंमत दाखवणे, खंबीरपणा दाखवणे. **gritty** *वि* (**-ier, -iest**) रेवाळ; कणखर, हिंमती.

groan /ग्रउन्/ *क्रि* [*अक*] *ना* [*गण*] निराशेने किंवा दुःखाने विव्हळणे, कुंथणे: *She ~ed with pain, ती दुःखाने विव्हळत होती.*

grocer /ग्रउस(र्)/ *ना* [*गण*] अन्नधान्य आणि गृहोपयोगी वस्तू विकणारा दुकानदार, किराणामालाचा दुकानदार, वाणी. **groceries** *ना* [*ब.व*] किराणामाल.

groggy /'ग्रॉगि/ *वि* (**-ier, -iest**) आजारपणाने वगैरे अशक्त झालेला, तोळामासा प्रकृतीचा.

groin /ग्रॉइन्/ *ना* [*गण*] पाय जिथे मिळतात तो शरीराचा भाग, मांडीचा सांधा, जांघ.

groom /ग्रूम्/ *ना* [*गण*] १ घोड्यांची निगा राखणारा माणूस, अश्वरक्षक, मोतद्दार. २ नवरदेव, वर, नवरामुलगा. **groom** *क्रि* [*सक*] १ (घोड्याला) खरारा करणे. २ (एखाद्याची) एखाद्या कामासाठी तयारी करून घेणे, तालीम देणे. **groomed** *वि* व्यवस्थित, टापटिपीचा: *a well ~ed young man, टापटिपीचा तरुण माणूस.*

groove /ग्रूव्ह्/ *ना* [*गण*] १ लांब अरुंद चर, खोबणी, खाच, पन्हळ. २ (*वाक्प्र*) **get into/be stuck in a groove** विशिष्ट जीवनक्रमात स्वतःला अडकवून घेणे. **grooved** *वि* खाचा असलेला.

grope /ग्रउप्/ *क्रि* १ [*अक*] अंधारात चाचपल्यासारखे करणे, चाचपडणे: *~ for one's glasses, चष्म्यासाठी चाचपडणे.* २ [*सक*] (*अनौप अधिक्षेपी*) लैंगिक वासना शमविण्यासाठी एखाद्याला हाताळणे, दाबादाबी करणे.

gross^1 /ग्रउस्/ *ना* [*गण*] (*ब.व* **gross**) १४४, बारा डझन.

gross^2 /ग्रउस्/ *वि* १ खूप जाड, लठ्ठ, अगडबंब. २ ग्राम्य, असभ्य. ३ (अन्यायाबाबत) स्पष्ट, उघडउघड, धडधडीत: *~ injustice, धडधडीत अन्याय.* ४ एकूण, एकंदर: *~ income, एकूण उत्पन्न म्हणजे कर वजा न करता येणारे उत्पन्न.* **gross** *क्रि* [*सक*] एकूण उत्पन्न मिळवणे, एकंदर कमाई करणे. **grossly** *क्रिवि* असभ्यपणे; उघडउघड. **grossness** *ना* [*अगण*] स्थूलपणा; ओबडधोबडपणा; हलकटपणा; विचकटपणा.

grotesque /ग्रउ'टेस्क्/ *वि* विचित्र, अनैसर्गिक आणि कुरूप, बेढब, विक्षिप्त, वेडाविद्रा. **grotesquely** *क्रिवि* विक्षिप्तपणे.

grotto /'ग्रॉटउ/ *ना* [*गण*] (*ब.व* ~**es** किंवा ~**s**) गुहा, गुंफा.

ground^1 /ग्राउन्ड्/ *ना* १ **the ground** [*अे.व*] पृथ्वीचा घनरूप पृष्ठभाग, जमीन, भूमी, भूपृष्ठ: *fall to the ~, जमिनीवर पडणे.* २ [*अगण*] भूक्षेत्र, जमिनीचा तुकडा. ३ [*अगण*] माती, जमीन: *Stony/marshy ~, खडकाळ/दलदलीची जमीन.* ४ [*गण*] एका विशिष्ट हेतूसाठी वापरला जाणारा जमिनीचा तुकडा, मैदान, क्रीडांगण: *a 'football ~, फुटबॉलचे मैदान* ○ *a play~, खेळायचे मैदान, क्रीडांगण, पटांगण.* ५ **grounds** [*ब.व*] इमारती

भोवतालची जागा किंवा बाग : *the palace ~s, राजवाडा बाग, राजप्रासाद परिसर.* ६ [*अगण*] (*ला*) चर्चेचे किंवा जिव्हाळ्याचे क्षेत्र : *The programme covered a lot of ~, या कार्यक्रमात अनेक समान आवडीच्या क्षेत्रांचा विचार झाला* ○ *Common ~ between the two sides, दोन पक्षांचे सामाईक क्षेत्र म्हणजे त्यांच्यात एकमत होईल असे क्षेत्र.* ७ [*गण,* खास करून *ब.व*] कारण : *~s for divorce, घटस्फोटाची कारणे.* ८ **grounds** [*ब.व*] द्रवाच्या तळाचा गाळ, रेंदा : *'coffee-~s, कॉफीचा गाळ.* ९ (*वाक्प्र*) **gain/make up ground (on sb/sth)** हळूहळू एखाद्याच्या बरोबर येणे, जोडीला येणे : (*ला*) *gain ~ on one's competitors, स्वतःच्या स्पर्धकांच्या जोडीला येणे.* **get off the ground** (प्रकल्पाबाबत) यशस्वी सुरुवात करणे, श्रीगणेशा करणे. **give/lose 'ground (to sb/sth)** एखाद्यावर मात करण्याची संधी गमावणे, मागे पडणे. **hold/keep/stand one's 'ground** स्वतःची जागा, मत वगैरे न सोडणे, घट्ट धरून राहणे; पराजय न स्वीकारणे, शरण न येणे, सोडून न देणे. **ˌground 'floor** *ना* [*अ.व*] (*ब्रि*) जमिनीलगतचा मजला, खालचा मजला, तळ मजला. **groundless** *वि* काही आधार नसलेला, अनाठायी : *~less fears, अनाठायी भीती.* **'groundsheet** *ना* [*गण*] जमिनीवर पसरायचे जलरोधक कापड. **'groundwork** *ना* [*अगण*] पुढच्या अभ्यासाची किंवा कामाची तयारी, पूर्वतयारी.

ground^{2} /ग्राउन्ड्/ *क्रि* १ [*अक, सक*] (जहाज) किनाऱ्याला लावणे, जमिनीवर टेकणे. २ [*सक*] (विमान किंवा वैमानिक) सक्तीने खाली उतरवणे, खाली ठेवणे. ३ (*क्रिब*) **ground sb in sth** एखाद्याला एखाद्या विषयाची मूलतत्त्वे शिकवणे, एखाद्या विषयाचा पाया करून घेणे. **ground sth on sth** एखाद्या गोष्टीवर श्रद्धा वगैरे आधारणे, त्याचा आधार घेणे. **grounding** *ना* [*अ.व*] एखाद्या विषयाच्या मूलतत्त्वांचे अध्यापन, पाया करून घेणे.

ground^{3} GRIND चा *भूत, भूत वि.*

group /ग्रूप/ *ना* [*गण,* तसेच ब.व क्रियापदासह *अ.व*] माणसांचा किंवा वस्तूंचा गट, गण. **group** *क्रि* [*अक, सक*] गट करणे.

grouse^{1} /ग्राउस्/ *ना* [*गण*] (*ब.व* **grouse**) मौजेच्या शिकारीसाठी किंवा खाण्यासाठी मारायचा एक लहान लठ्ठ पक्षी.

grouse^{2} /ग्राउस्/ *क्रि* [*अक*] (*अनौप*) तक्रार करणे, कुरकुर करणे; किटकिट करणे. **grouse** *ना* [*गण*] तक्रार.

grove /ग्रउव्ह्/ *ना* [*गण*] झाडी, राई, उपवन.

grovel /'ग्रॉव्ह्ल्/ *क्रि* (**-ll-**; *अमे* **-l-**) [*अक*] (*अधिक्षेपी*) मर्जी संपादन करण्यास नतमस्तक होणे, गुडघे टेकणे, लोटांगण घालणे. **groveller** *ना* [*गण*] लोटांगण घालणारा, कणाहीन माणूस.

grow /ग्रउ/ *क्रि* (*भूत* **grew** /ग्रू/, *भूत वि* **~n** /ग्रउन्/) १ [*अक*] आकाराने वाढणे, फुगणे. २ [*अक, सक*] वाढणे, वाढवणे : *Plants ~ from seeds, बियांपासून झाडे वाढतात/उगवतात* ○ *~ a beard, दाढी वाढवणे.* ३ (बहुधा विशेषणासह वापर) होणे : *~ older, मोठे/म्हातारे होणे.* ४ (*क्रिब*) **grow on sb** अधिक आकर्षक बनणे, मनात भरणे : *The picture will ~ on you, ते चित्र तुझ्या अधिकाधिक मनात भरेल.* **grow out of sth** (क) एखादा कपडा अंगाला न येणे, अंगापेक्षा लहान होणे. (ख) एखादी गोष्ट करण्यास लहान नसणे, वयाला न शोभणे : *~ out of playing with toys, खेळणी खेळायचे वय निघून जाणे.* **grow up** (क) वयात येणे, मोठा होणे. (ख) उदयास येणे, वाढू लागणे : *A warm friendship grew up between them, त्यांच्यात गाढ मैत्री वाढू लागली.*

growl /ग्राउल्/ *क्रि* [*अक*] *ना* [*गण*] गुरगुरणे : *The dog ~ed at the burglars, चोरट्यांवर कुत्रे गुरगुरले.*

grown /ग्रउन्/ *वि* प्रौढ; परिपक्व. **ˌgrown 'up** *वि* प्रौढ; परिपक्व. **'grown-up** *ना* [*गण*] प्रौढ, मोठा माणूस.

growth /ग्रउथ्/ *ना* १ [*अगण*] वाढ; विकास. २ [*गण*] वाढणारे काहीतरी : *three days' ~ of beard, तीन दिवसांची वाढलेली दाढी.* ३ [*गण*] शरीरावर वाढणारा रोगट फोड, शरीरात किंवा शरीरावर वाढलेले आवाळू.

grub^{1} /ग्रिब्/ *ना* १ [*गण*] किड्याची पहिली अवस्था, अळी. २ [*अगण*] (*व्रात्य*) अन्न, तुकडे.

grub^{2} /ग्रिब्/ *क्रि* **(-bb-)** [*अक*] एखादी गोष्ट शोधण्यास माती उकरणे, जमीन खोदणे.

grubby /'ग्रिबि/ *वि* **(-ier, -iest)** घाणेरडा, गलिच्छ, गबाळा.

grudge /ग्रिज्/ *क्रि* [*सक*] देण्यास किंवा घेण्यास नाखूष असणे : *I ~ paying so much for such bad goods, इतक्या वाईट मालाला एवढे पैसे देण्यास मी तयार नाही/मी नाखूष आहे.* **grudge** *ना* [*गण*] हेवा, मत्सर, सल, अढी, आकस : *have a ~ against sb, एखाद्याविषयी मनात अढी असणे* किंवा *एखाद्यावर खार खाणे.* **grudging** *वि* नाखूष, अनिच्छ. **grudgingly** *क्रिवि* नाखुषीने, अनिच्छेने.

gruelling (*अमे* **grueling**) /'ग्रूअलिङ्/ *वि* खूप कष्टाचा, कठीण, खडतर, दमछाक करणारा.

gruesome /'ग्रूसम्/ *वि* भयानक, भीषण. **gruesomely** भीषणपणे, भयानकपणे.

gruff /ग्रिफ्/ *वि* उद्धट, उद्दाम, कठोर, कोरडा. **gruffly** *क्रिवि* कठोरपणे, तुटकपणे. **gruffness** *ना* [*अगण*] तुटकपणा, कोरडेपणा, कठोरपणा.

grumble /'ग्रिम्ब्ल्/ *क्रि* [*अक*] तक्रार करणे, कुरकुरणे. **grumble** *ना* [*गण*] तक्रार, कुरकुर.

grumpy /'ग्रिम्पि/ *वि* **(-ier, -iest)** चिडका, तडकू, तापट, तिखट. **grumpily** *क्रिवि* चिडून, तिखटपणे.

grunt /ग्रिन्ट्/ *क्रि* [*अक*] **(क)** (विशेषतः डुकरांबाबत) चीची करणे, रेकणे, डुरकणे. **(ख)** (लोकांबाबत) रेकणे. **grunt** *ना* [*गण*] घू घू आवाज, रेकण्याचा आवाज.

guarantee /,गॅरन्'टी/ *ना* [*गण*] १ ठराविक अटी पूर्ण केल्या जातील असे दिलेले (बहुधा लिखित) वचन, हमी, खात्री : *The repairs to this watch are covered by the guarantee, या घड्याळाच्या दुरुस्तीची हमी दिलेली आहे.* २ एखाद्याने घेतलेल्या कर्जाची तो परतफेड करेल असे जबाबदारीवर दिलेले वचन, जामीन. **guarantee** *क्रि* [*सक*] १ हमी/खात्री देणे. २ वचन देणे : *We cannot ~ that trains will arrive on time, गाड्या वेळेवर येतील याची खात्री आम्ही देऊ शकत नाही.*

guarantor /,गॅरन्'टॉऽ(र्)/ *ना* [*गण*] (*कायदा*) जामीनदार.

guard /गाड्/ *ना* १ [*अगण*] हल्ल्याला तोंड देण्यास सज्ज असण्याची अवस्था, दक्षता, सतर्कता : *a soldier on ~, पहाऱ्यावरचा सैनिक.* २ [*गण*] रखवालदार, शिपाई, देखरेख करणारा माणूस, पहारेकरी. ३ **the guard** [*गण,* तसेच ब.व क्रियापदासह अे.व] एखाद्याचे रक्षण करण्यासाठी असलेले सैनिक, सुरक्षा सैनिक, दक्षता पथक : *the ~ of honour, सलामी देणारे सैनिक, मानवंदना.* ४ [*गण*] (*ब्रि*) आगगाडीचा पालक-अधिकारी. ५ [*गण*] (खास करून सामासिक शब्दांत) संरक्षण करणारी गोष्ट : *'fire-~, आगीपासून बचाव करणारी वस्तू.* **guard** *क्रि* १ [*सक*] रक्षण करणे, राखणे. २ [*सक*] (एखादा) पळून जाऊ नये म्हणून देखरेख करणे, पहारा ठेवणे. ३ (*क्रिब*) **guard against sth** एखाद्या गोष्टीला प्रतिबंध करण्यासाठी काळजी घेणे. **guarded** *वि* फार काही न बोलणारा किंवा दाखवणारा, जपून केलेला, सावधगिरीचा.

guardian /'गाडिअन्/ *ना* [*गण*] लहान मुलाच्या काळजीची जबाबदारी स्वीकारलेला माणूस, पालक. **guardianship** *ना* [*अगण*] पालकत्व.

guerrilla (तसेच **guerilla**) /ग'रिल/ *ना* [*गण*] टोळीटोळीने हल्ला करणाऱ्या अनधिकृत सैन्यातील लढवय्या, गनीम.

guess /गेस्/ *क्रि* १ [*अक, सक*] (एखाद्या गोष्टीची) पूर्ण माहिती न घेता मत बनविणे किंवा उत्तर देणे, अंदाज करणे, अनमानधक्क्याने सांगणे. २ [*सक*] (*अनौप* विशेषतः *अमे*) समजणे, धरून चालणे. **guess** *ना* [*गण*] १ (*at*)// अंदाज बांधण्याचा प्रयत्न, अंदाज, अदमास, होरा. २ अंदाजे बनविलेले मत, अंदाज. **'guesswork** *ना* [*अगण*] अंदाज करणे.

guest /गेस्ट्/ *ना* [*गण*] १ हॉटेलात किंवा घरी आलेला पाहुणा, अतिथी. २ चित्रपटगृह, हॉटेल वगैरे ठिकाणी बोलावलेला पाहुणा, निमंत्रित. ३

एखाद्या कार्यक्रमात भाग घेणारा, पाहुणा कलाकार. ४ (*वाक्प्र*) **be my 'guest** (*अनौप*) हो, जरूर. **'guest-house** *ना* [*गण*] लहान हॉटेल, विश्राम-गृह, अतिथी गृह.

guffaw /ग'फॉऽ/ *क्रि* [*अक*] *ना* [*गण*] गडागडा हसणे, खदाखदा हसणे.

guidance /'गाइड्न्स्/ *ना* [*अगण*] मदत किंवा सल्ला, मार्गदर्शन.

guide /गाइड्/ *ना* [*गण*] १ मार्गदर्शन करणारा माणूस, मार्गदर्शक; वाटाड्या. २ एखाद्याच्या वागणुकीवर वगैरे परिणाम करणारी व्यक्ती, गुरू. ३ (तसेच **'guidebook**) एखाद्या स्थलाची माहिती देणारे पुस्तक. ४ माहिती देणारे पुस्तक, मार्गदर्शिका, मार्गप्रदीप : *a ~ to plants, वनस्पतिविषयक मार्गदर्शिका.* ५ **Guide** वीरबाला. **guide** *क्रि* [*सक*] मार्गदर्शन करणे, वाट दाखविणे. **,guided 'missile** *ना* [*गण*] उड्डाणात नियंत्रित करता येणारे क्षेपणास्त्र. **'guide-line** *ना* [*गण, बहुधा ब.व*] एखादी गोष्ट करण्याविषयीचे मार्गदर्शन, मार्गदर्शक तत्त्वे.

guild /गिल्ड्/ *ना* [*गण*] एकाच धंद्यातील किंवा समान हितसंबंध असणारी मंडळी, श्रेणी.

guile /गाइल्/ *ना* [*अगण*] लबाडी, फसवेगिरी, कावा.

guillotine /'गिलटीन्/ *ना* [*गण*] १ गुन्हेगारांचा शिरच्छेद करणारे यंत्र. २ कागदाचे ताव कापायचे यंत्र. ३ (*ला ब्रि राजकारण*) संसदेत चर्चा करण्यावरील वेळेचे बंधन, कालमर्यादा. **guillotine** *क्रि* [*सक*] गिलोटिनने शिरच्छेद करणे.

guilt /गिल्ट्/ *ना* [*अगण*] १ चुकल्यामुळे वाटणारी अपराधी भावना. २ अपराधाबाबतची जबाबदारी, बोल, दोष. **guilty** *वि* (**-ier, -iest**) १ अपराधी, दोषी. २ अपराधी वाटणारा. **guiltily** *क्रिवि* ओशाळपणे, अपराधीपणे.

guinea /'गिनि/ *ना* [*गण*] (खास करून पूर्वी ब्रिटनमधे) २१ शिलिंग (१.०५ पौंड).

guinea-pig /'गिनिपिग्/ *ना* [*गण*] १ मोठ्या उंदरासारखा दिसणारा आखूड कानांचा एक पाळीव प्राणी. २ प्रयोगासाठी वापरली जाणारी व्यक्ती.

guise /गाइझ्/ *ना* [*गण*] (*औप*) वेष, बाह्यमुद्रा.

guitar /गि'टा(र्)/ *ना* [*गण*] सहा तारांचे बोटांनी छेडायचे सारंगीसारखे एक वाद्य. **guitarist** *ना* [*गण*] गिटारवादक.

gulf /गॅल्फ्/ *ना* [*गण*] १ जमिनीने जवळजवळ पूर्णपणे वेढलेला समुद्राचा भाग, आखात : *the ~ of Mexico, मेक्सिकोचे आखात.* २ (*between*)// (*ला*) मतभेद, मतभिन्नता, (मनातील) दरी.

gull /गॅल्/ *ना* [*गण*] मोठ्या पंखांचा एक समुद्रपक्षी, कुरव.

gullet /गॅलिट्/ *ना* [*गण*] मुख आणि जठर यांना जोडणारा अन्नमार्ग, अन्ननलिका.

gullible /'गॅलब्ल्/ *वि* सहज फसला जाणारा, भोळा.

gulp /गॅल्प्/ *क्रि* [*सक*] पटकन् गिळणे, घोट घेणे. **gulp** *ना* [*गण*] घोट, गिळंकृत करणे.

gum¹ /गॅम्/ *ना* [*गण, बहुधा ब.व*] दातांभोवतीचे घट्ट मांस, हिरडी.

gum² /गॅम्/ *ना* १ [*अगण*] काही झाडांपासून मिळणारा चिकट पदार्थ, (झाडांचा) डिंक. २ [*अगण*] चिंगम. ३ [*गण*] फळाचा स्वाद असणारी गोळी. **gum** *क्रि* (**-mm-**) [*सक*] डिंकाने चिकटवणे; डिंक लावणे. **'gumboot** *ना* [*गण*] गुडघ्यापर्यंत असणारे रबरी बूट. **gummy** *वि* (**-ier, -iest**) चिकट. **'gum-tree** *ना* [*गण*] निलगिरीचे झाड.

gun /गॅन्/ *ना* [*गण*] धातूच्या नळीतून गोळ्या किंवा तोफेचे गोळे झाडणारे शस्त्र, तोफ; बंदूक. **gun** *क्रि* (**-nn-**) (*क्रिब*) **gun sb down** (*अनौप*) एखाद्याला मारण्याकरता गोळी घालणे, बंदुकीने टिपणे. **gun for sb** (*अनौप*) एखाद्यावर हल्ला करण्याच्या संधीची वाट पाहणे, नेम धरून असणे. **'gunboat** *ना* [*गण*] तोफांनी सज्ज असलेली छोटी युद्धनौका. **gunfire** *ना* [*अगण*] तोफांचा भडीमार. **'gunman** /-मन्/ *ना* [*गण*] (*ब.व* **-men** /-मन्/) बंदुकधारी दरोडेखोर, खुनी, हत्यारी. **gunner** /'गॅन(र्)/ *ना* [*गण*] तोफा डागणारा सैनिक. **'gunpoint** *ना* (*वाक्प्र*) **at 'gunpoint** बंदुकीच्या/गोळी घालण्याच्या धाकाने. **'gunpowder** *ना* [*अगण*] स्फोटक दारू.

'gunshot *ना* १ [*गण*] तोफ डागणे, बंदुकीची किंवा तोफेची फैर. २ [*अगण*] तोफेचा किंवा बंदुकीचा टप्पा. **'gunsmith** *ना* [*गण*] बंदुक तयार करणारा किंवा दुरुस्त करणारा.

gurgle /'गऽग्ल्/ *क्रि* [*अक*] *ना* [*गण*] वाहत्या पाण्याचा बुद्बुद् आवाज (करणे), बुडबुडणे, खळखळणे.

gush /गॅश्/ *क्रि* [*अक*] १ उफाळून वर येणे, उफाळणे, भळभळ वाहणे, बांध फुटणे : *blood ~ing from a wound, जखमेतून भळभळ वाहणारे रक्त.* २ (*अधिक्षेपी*) अति उत्साहाने बोलणे, रंगात येऊन बोलणे, दाट बोलणे. **gush** *ना* [*अे.व*] एकदम झालेला उद्रेक, चिळकांडी, धार, उधाण. **gushing** *वि* ऊर भरून/तोंड भरून केलेला, उफाळणारा.

gust /गॅस्ट्/ *ना* [*गण*] वाऱ्याचा झोत, वावधान, सोसाट्याचा वारा. **gusty** *वि* (**-ier, -iest**) वादळी, वावधानाचा.

gut /गॅट्/ *ना* १ **guts** [*ब.व*] (*अनौप*) (**क**) जठर आणि आतडी. (**ख**) (*ला*) इंजिन, यंत्र वगैरेचे मुख्य भाग. २ **guts** [*ब.व*] (*अनौप*) धाडस आणि निश्चय, हिंमत, धमक, पाणी. ३ [*गण*] आतडे, कोथळा, अशनी. ४ [*अगण*] जनावरांच्या आतड्यांपासून तयार केलेली दोरी. **gut** *क्रि* (**-tt-**) [*सक*] १ (माशाचा वगैरे) कोथळा बाहेर काढणे. २ आतून नष्ट करणे : *a house ~ted by fire, आगीने आतून जळालेले घर.* **gut** *वि* विचाराऐवजी भावनांवर अधिष्ठित : *a ~ reaction, भावनिक प्रतिक्रिया.*

gutter /'गॅट(र्)/ *ना* १ [*गण*] छपराच्या कडेखालचे किंवा रस्त्याच्या बाजूचे, पावसाचे पाणी वाहून नेणारे गटार, पन्हळ. २ **the gutter** [*अे.व*] (*ला*) निकृष्ट जीवन, हलाखी. **the 'gutter press** *ना* [*अे.व*] (*अधिक्षेपी*) वावड्या आणि भडक बातम्या छापणारी वर्तमानपत्रे, गटार पत्रे.

guy^1 /गाइ/ *ना* [*गण*] १ (*अनौप*) माणूस, इसम. २ पाच नोव्हेंबरला ब्रिटनमधे जुन्या कपड्यात नटवलेली आणि जाळायची माणसाची प्रतिकृती.

guy^2 /गाइ/ *ना* [*गण*] तंबू वगैरे स्थिर राहावा म्हणून वापरलेला दोर.

guzzle /'गॅझ्ल्/ *क्रि* [*अक, सक*] (*अनौप*) हावरेपणाने खाणे किंवा पिणे, ढोसणे, कोंबणे.

gym /जिम्/ *ना* (*अनौप*) १ [*गण*] व्यायामशाळा. २ [*अगण*] कसरत. **'gymshoe** *ना* [*गण*] रबरी तळवा असलेला कॅन्व्हसचा बूट.

gymkhana /जिम्'खान/ *ना* [*गण*] घोड्यावर बसण्याची म्हणजेच घोडदौडीची सार्वजनिक स्पर्धा; व्यायामशाळा.

gymnasium /जिम्'नेइझिअम्/ *ना* [*गण*] शरीरसौष्ठवाचे व्यायाम करण्यासाठी वापरायच्या साधनांनी युक्त अशी व्यायामशाळा.

gymnast /'जिम्नॅस्ट्/ *ना* [*गण*] जिम्नॅस्टिक खेळाडू, कसरतपटू.

gymnastics /जिम्'नॅस्टिक्स्/ *ना* [*ब.व*] कसरतीचे व्यायाम, शरीरचापल्य व्यायाम. **gymnastic** *वि* शरीरचापल्याचा, कसरतीचा.

gynaecology (*अमे* **gynec-**) /,गाइन'कॉलेजि/ *ना* [*अगण*] स्त्रीच्या गर्भविषयक रोगांचे आणि त्यावरील उपचारांचे शास्त्र, स्त्रीरोगचिकित्साशास्त्र. **gynaecological** (*अमे* **gynec-**) /,गाइनक'लॉजिक्ल्/ *वि* स्त्रीरोगचिकित्साशास्त्रविषयक. **gynaecologist** (*अमे* **gynec-**) *ना* [*गण*] स्त्रीरोगचिकित्सातज्ज्ञ, स्त्रीरोगचिकित्सक.

gypsy (तसेच **gipsy**) /'जिप्सि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) तांड्याने फिरणाऱ्या जमातीचा माणूस, लमाणांसारख्या भटक्या जमातीचा माणूस.

gyrate /,जाइ'रेइट्; *अमे* 'जाइरेइट्/ *क्रि* [*अक*] गोलगोल फिरणे, गरगर फिरणे, चक्कर घेणे. **gyration** /,जाइ'रेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] चक्राकार गती, फेरा.

H h

H, h /अेइच्/ *ना* [*गण*] (*ब.व* **H's, h's** /'अेइचिझ्/) इंग्रजी वर्णमालेतील आठवे अक्षर.

haberdasher /'हॅबर्डॅश(र्)/ *ना* [*गण*] १ (*ब्रि*) पिना, दोरा, कापड वगैरे विकणारा दुकानदार. २ (*अमे*) पुरुषांचे कपडे विकणारा दुकानदार. **haberdashery** *ना* [*अगण*]

अशा दुकानदाराने विकायचा माल.

habit /'हॅबिट्/ *ना* १ [*गण, अगण*] एखाद्या व्यक्तीची नेहमीची कृती किंवा रीत, सवय : *Smoking is a bad ~, धूम्रपान करणे ही वाईट सवय आहे.* २ [*गण*] (ख्रिस्ती) भिक्षू किंवा भिक्षुणीचा पायघोळ अंगरखा. ३ (*वाक्प्र*) **make a habit of (doing) sth** एखादी गोष्ट नियमितपणे करणे, नेमाने करणे.

habitable /'हॅबिटब्ल्/ *वि* राहण्यासारखा, निवासयोग्य.

habitat /'हॅबिटॅट्/ *ना* [*गण*] प्राण्याचे राहण्याचे नैसर्गिक ठिकाण किंवा वसतिस्थान, वनस्पतीचे नैसर्गिक स्थान किंवा उत्पत्तीस्थान.

habitation /,हॅबि'टेइश्न्/ *ना* [*अगण*] राहणे, निवास : *houses fit for ~, निवासयोग्य घरे.*

habitual /ह'बिचुअल्/ *वि* १ नेहमीचा, सर्वसामान्य. २ सवयीने केलेला, सवय झालेला : *a ~ smoker, धूम्रपानाची सवय झालेला.* **habitually** *क्रिवि* सवयीने नेहमीच.

hack^{1} /हॅक्/ *क्रि* [*अक, सक*] घाव घालणे, तोडणे, तुकडे करणे. **'hack-saw** *ना* [*गण*] धातूचा पत्रा कापायची करवत.

hack^{2} /हॅक्/ *ना* [*गण*] लेखक म्हणून जिकिरीचे पण रटाळ काम करणारा माणूस, खर्डेघाशी करणारा लेखक.

hacker /'हॅक(र्)/ *ना* [*गण*] विनापरवानगी एखाद्या कंपनीच्या संगणकातील माहिती वापरणारा माणूस.

hackneyed /'हॅक्निड्/ *वि* (उक्ती, शब्दप्रयोग वगैरे बाबत) चावून चोथा झालेला, गुळगुळीत.

had HAVE चा *भूत, भूत वि.*

haddock /'हॅडक्/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **haddock**) खाण्यासाठी वापरला जाणारा एक समुद्रातला मासा.

hadn't /'हॅड्न्ट्/ had not ➪ HAVE.

haemophilia (तसेच खास करून *अमे* **hem-**) /,हीम'फिलिअ/ *ना* [*अगण*] लहानशी जखम झाल्यावरही खूप रक्त जाते असा रोग. **haemophiliac** (तसेच खास करून *अमे* **hem-**) /-लिॲक्/ *ना* [*गण*] असा रोग झालेला माणूस.

haemorrhage (तसेच खास करून *अमे* **hem-**) /'हेमरिज्/ *ना* [*गण, अगण*] रक्तस्राव.

haemorrhoids (तसेच खास करून *अमे* **hem-**) /'हेमरॉइड्झ्/ *ना* [*ब.व*] गुदद्वारातील शिरांना आलेली सूज.

hag /हॅग्/ *ना* [*गण*] (*अधिक्षेपी*) कुरूप म्हातारी, थेरडी.

haggard /'हॅगड्/ *वि* काळजीने थकल्यासारखा दिसणारा, चिन्ताक्रान्त.

haggis /'हॅगिस्/ *ना* [*गण, अगण*] बकरीच्या जठरात बकरीचे मांस भरून शिजवलेला एक स्कॉटिश अन्नपदार्थ.

haggle /'हॅग्ल्/ *क्रि* [*अक*] (*over/about*)// किंमतीबाबत घासाघीस करणे.

hail^{1} /हेइल्/ *ना* १ [*अगण*] गारा (पडणारा पाऊस). २ [*अे.व*] (*ला*) मोठ्या संख्येने आणि खूप जोराने येणारे काहीतरी, फैर, मारा : *a ~ of bullets, गोळ्यांचा वर्षाव/सडा.* **hail** *क्रि* १ [*अक*] (*it* सह वापर) गारा पडणे. २ [*अक, सक*] (*ला*) खाली येणे, कोसळणे, जोराने देणे. **'hailstone** *ना* [*गण*] (पावसाची) गार. **'hailstorm** *ना* [*गण*] गारांचे वादळ, गारपीट.

hail^{2} /हेइल्/ *क्रि* १ [*सक*] लक्ष वेधण्यासाठी एखाद्याला हाका मारणे; स्वागत करणे, २ [*सक*] थांबवण्यासाठी टॅक्सीला खूण करणे, टॅक्सीला हात करणे. ३ [*सक*] जाहीररीत्या महत्त्व वगैरे मान्य करणे : *They ~ed him as their hero, त्यांनी त्याला जाहीरपणे आपला महान नेता म्हणून निवडले* किंवा *त्यांनी त्याचे नेतृत्व मान्य केले.* ४ [*अक*] *from*// एखाद्या ठिकाणाहून येणे, मूळ गाव असणे.

hair /हेअ(र्)/ *ना* १ (क) [*गण*] (अंगावरचा किंवा डोक्यावरचा) केस. (ख) [*अगण*] केशसंभार, केस. २ (*वाक्प्र*) **(by) a ,hair's 'breadth** अगदी कमी अंतरावरून, चाटून, अगदी घासून, केसभर अंतरावर. **make one's hair stand on end** भीतीने काटा आणणे/येणे, घाबरवून सोडणे, भीतीने केस ताठ होणे. **'haircut** *ना* [*गण*] केस कापण्याची तऱ्हा. **'hair-do** *ना* [*गण*] (*ब.व*

-dos) (*अनौप*) स्त्रीचे केस नीटनेटके करणे, केशरचना (करणे), वेणीफणी करणे. **'hairdresser** *ना* [*गण*] केशरचना, केशभूषा करणारी व्यक्ती. **'hair-grip** *ना* [*गण*] केस धरून नीट बसवण्याचा चिमटा, केसांचा चाप. **'hair-line** *ना* [*गण*] १ कपाळावरची केसांची पट्टी किंवा ठेवण. २ (*ला*) खूप बारीक/विरळ रेषा : *a ~-line crack, अगदी अरुंद आणि पुसट दिसणारी चीर.* **'hairpin** *ना* [*गण*] केसांना लावायची वाकडी पिन. **,hairpin 'bend** *ना* [*गण*] रस्त्यावरचे एकदम वळणारे (धोक्याचे) वळण. **'hair-raising** *वि* काटा आणणारा, भीतिदायक. **'hair-style** *ना* [*गण*] केसांची ठेवण किंवा केस नीट करण्याची तऱ्हा किंवा केस कापण्याची पद्धत, केशभूषा. **hairy** *वि* (**-ier, -iest**) १ केसांचा, केसांसारखा, केसाळ. २ (*व्रात्य*) उत्सुकता वाढवणारा पण भीतीदायक, श्वास रोखून धरायला लावणारा. **hairiness** *ना* [*अगण*] केसाळपणा.

hale /हेइल्/ *वि* (*वाक्प्र*) **hale and 'hearty** धष्टपुष्ट, धडधाकट.

half^1 /हाफ्; *अमे* हॅफ्/ *ना* [*गण*] (*ब.व* **halves** /हाव्झ्; *अमे* हॅव्झ्/) १ दोन समान भागांतला एक, अर्धा, $\frac{१}{२}$. २ तिकिटाची किंवा पेयाची नेहमीपेक्षा अर्धी किंमत किंवा अर्धे प्रमाण, अर्धे तिकिट, अर्धी किंमत, अर्धे पेय वगैरे : *Two halves to the station, please, स्टेशनपर्यंतची दोन अर्धी तिकिटे द्या.* ३ खेळ, मैफल यांचा पूर्वार्ध किंवा उत्तरार्ध. ४ (*वाक्प्र*) **go 'halves (with sb)** अर्धे पैसे किंवा अर्धी किंमत देणे, अर्धेअर्धे भावाचे पैसे देणे.

half^2 /हाफ्; *अमे* हॅफ्/ *वि* १ अर्धा : *~ an hour, अर्धा तास.* २ (*वाक्प्र*) **half past 'one, 'two, etc** (*अमे*) **half after 'one, 'two, etc** -वाजून तीस मिनिटे, साडे-. **half** *सना* निम्मा, अर्ध : *H~ of the money is hers, निम्मे पैसे तिचे आहेत.* **,half-and-'half** *वि* एका गोष्टीचा अर्धा भाग आणि दुसरीचा अर्धा भाग. **,half 'board** *ना* [*अगण*] सकाळचा नाश्ता आणि रात्रीचे जेवण यांचा समावेश असलेले हॉटेलमधील राहणे. **'half-caste** (तसेच **'half-breed**) *ना* [*गण*], *वि* भिन्न वंशीय आई-बापांचे (मूल). **,half-'mast** *ना* (*वाक्प्र*) **at half-mast** (ध्वजाबाबत) एखाद्या मृत व्यक्तीला श्रद्धांजली वाहण्यासाठी अर्धा उतरवलेला, अर्ध्यावर उतरवलेला. **,half-'term** *ना* [*गण*] शाळेच्या टर्मच्या मधल्या काळातील छोटीशी सुट्टी. **,half-'time** *ना* [*अगण*] खेळाच्या मॅचच्या दोन भागांतील मध्यान्तर. **,half-'way** *वि*, *क्रिवि* दोन ठिकाणांच्या मध्यावर, मधोमध. **'half-wit** *ना* [*गण*] मूर्ख माणूस, अर्धवट माणूस. **,half-'witted** *वि* अर्धवट, वेडपट, नादान.

half^3 /हाफ्; *अमे* हॅफ्/ *क्रिवि* १ अर्ध्याएवढा, निम्माशिम्मा : *~ full, निम्माशिम्मा भरलेला.* २ अंशतः, थोडासा, अर्धवट : *~ cooked, अर्धवट शिजलेला.* ३ (*अनौप*) जवळजवळ : *They felt ~ dead, जवळजवळ मेल्यासारखेच त्यांना वाटले म्हणजेच ते फार दमून गेले होते म्हणजेच ते मरणाचे थकले होते.* ४ (*वाक्प्र*) **not 'half** (*व्रात्य*) खूप, फार : *'Do you like ice-cream?' 'Not ~', 'तुला आईस्क्रीम आवडते?' 'भयानक'.* **,half-'baked** *वि* (*अनौप*) मूर्ख, अर्धकच्चा. **,half-'hearted** *वि* निरुत्साही, मनापासून नसलेला.

hall /हॉऽल्/ *ना* [*गण*] १ घराच्या दर्शनीभागातील मोकळी जागा, दिवाणखाना. २ बैठक, संगीत मैफल, जेवणावळ वगैरे साठी वापरायची इमारत किंवा मोठी खोली, हॉल, कार्यालय. ३ विद्यापीठातील विद्यार्थ्यांचे वसतिगृह : *a ~ of residence, विद्यार्थ्यांचे निवासगृह.*

hallelujah = ALLELUIA.

hallmark /'हॉऽल्माक्/ *ना* [*गण*] १ सोन्याचांदीच्या वस्तूंवर धातूचा कस दाखविण्यासाठी मारलेला शिक्का. २ (*ला*) गुणविशेष. **hallmark** *क्रि* [*सक*] प्रतीचा शिक्का उमटवणे.

hallo (तसेच **hello, hullo**) /ह'लउ/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s**) (स्वागत करताना एखाद्याचे लक्ष वेधण्यासाठी किंवा आश्चर्य व्यक्त करताना वापरायचा शब्द).

Hallowe'en /,हॅलउ'ईन्/ *ना* [*अगण*] (पाश्चात्य देशांतली) मुले भुतांचा किंवा चेटकिणींचा पोषाख करतात तो ३१ ऑक्टोबरचा दिवस.

hallucination /ह,लूसि'नेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] एखाद्या गोष्टीचा भास होणे, आभास, भ्रान्ती.

halo /'हेइलउ/ *ना* [*गण*] (*ब.व* **~es**) १ तेजोवलय, चित्रातील थोर पुरुषाच्या डोक्यामागचे प्रभामंडल. २ सूर्य किंवा चंद्र यांच्या भोवतालचे खळे, प्रकाशाचे वळे.

halt /हॉऽल्ट्/ *क्रि* [*अक, सक*] थांबणे किंवा थांबवणे, रोखणे. **halt** *ना* [*अे.व, गण*] थांबणे, विश्राम : *The train came to a ~ outside the station, स्टेशनच्या बाहेरच गाडी थांबली.*

halter /'हॉऽल्ट(र्)/ *ना* [*गण*] घोडा नीट चालवण्यास त्याच्या डोक्याभोवती घातलेली दोरी किंवा चामड्याची पट्टी, काढणी, बागदोर.

halting /'हॉऽल्टिङ्/ *वि* मंद आणि कांकू करणारा, ढकलत जाणारा, चाचरणारा. **haltingly** *क्रिवि* चाचरत.

halve /हाव्ह्; *अमे* हॅव्ह्/ *क्रि* [*सक*] १ दोन समान भाग करणे, दोन शकले करणे. २ निम्म्याने कमी करणे : *~ the cost, किंमत निम्मी करणे/अर्धी करणे.*

halves HALF¹ चे *ब.व.*

ham /हॅम्/ *ना* १ (**क**) [*गण*] डुकराच्या तंगडीचा वाळवलेला किंवा खारावलेला वरचा भाग. (**ख**) [*अगण*] डुकराच्या तंगडीचे मांस. २ [*गण*] (*व्रात्य*) रद्दड नट, टुकार नट. ३ [*गण*] (*अनौप*) हौस म्हणून रेडिओ संदेशनाची साधने वापरणारा. **ham** *क्रि* **(-mm-)** [*अक, सक*] (*व्रात्य*) भडकपणे अभिनय करणे, जादा अभिनय करणे. **,ham-'fisted** *वि* (*अधिक्षेपी*) गबाळेपणाने हातवारे करणारा, हाताच्या वापरात बेढब.

hamburger /'हॅम्बऽग(र्)/ *ना* [*गण*] बारिक मांसाचा चपटा गोलाकार केक – बहुधा तळलेला आणि पावात गुंडाळून खाण्याचा.

hamlet /'हॅम्लिट्/ *ना* [*गण*] लहान खेडे, ग्राम.

hammer /'हॅम(र्)/ *ना* १ [*गण*] खिळे ठोकणे वगैरेसाठी वापरायचा हातोडा. २ [*गण*] (पियानोमधे) तारांवर आघात करणारा भाग. **hammer** *क्रि* १ [*अक, सक*] हातोड्याने ठोकणे. २ [*सक*] (*अनौप*) एखाद्याचा पूर्ण पाडाव/पराभव करणे, धुव्वा उडवणे. ३ (*क्रिब*) **hammer away at sth** खूप परिश्रम घेणे, कष्ट करणे. **hammer sth out** दीर्घकाळ चर्चा करून एखाद्या गोष्टीवर तोडगा काढणे.

hammock /'हॅमक्/ *ना* [*गण*] दोन खांबांत टांगलेला कापडी किंवा जाळीचा बिछाना, झुलता बिछाना, झुला.

hamper¹ /'हॅम्प(र्)/ *क्रि* [*सक*] एखाद्याच्या मुक्त हालचालीवर किंवा कार्यावर बंधन घालणे, अडवणे, आडकाठी करणे, खुंटवणे, अडथळा आणणे.

hamper² /'हॅम्प(र्)/ *ना* [*गण*] अन्नपदार्थ नेण्याची झाकणाची मोठी टोपली.

hamster /'हॅम्स्ट(र्)/ *ना* [*गण*] उंदरासारखा दिसणारा एक छोटा पाळीव प्राणी.

hand¹ /हॅन्ड्/ *ना* १ [*गण*] मनगटाखालचा हाताचा भाग, पंजा, हात. २ **a hand** [*अे.व*] मदत, हातभार : *Can you give me a ~ with the washing-up? धुणे धुवायला तू जरा मदत करशील?* ३ [*गण*] घड्याळ वगैरेचा काटा : *hour-~, तासकाटा.* ४ [*गण*] कामगार, मजूर : *a 'farm-~, शेतमजूर.* ५ [*गण*] पत्त्याच्या डावात वाटलेली पाने. ६ [*अे.व*] हस्ताक्षर. ७ [*अे.व*] टाळ्या वाजवून कौतुक करणे : *Give her a big ~, जोरात टाळ्या वाजवून तिचे अभिनंदन करा.* ८ (*वाक्प्र*) **at first/second 'hand** मूळ व्यक्तीकडून, मुळातून किंवा दुसऱ्याकडून, परहस्ते. **at 'hand** जवळ, नजीक. **by 'hand** (**क**) हाताने (म्हणजे यंत्राने नाही). (**ख**) माणूस पाठवून (पोस्टाने नव्हे), समक्ष किंवा कोणाहाती. **,hand in 'hand** (**क**) हातात हात घालून. (**ख**) (*ला*) घनिष्ट संबंधाचा, अगदी जवळचा. **have/take a hand in sth** कशासाठी तरी थोड्या प्रमाणात जबाबदार असणे, एखाद्या गोष्टीत हात असणे. **have one's hands full** खूप उद्योगात असणे, व्यग्र असणे, फुरसत नसणे. **in 'hand** (**क**) जवळ (असणे), शिल्लक (असणे), हातात (असणे). (**ख**) ताब्यात : *The situation is well in ~. परिस्थिती पूर्ण नियंत्रणाखाली आहे.* (**ग**) चालू असलेला : *the job in ~, हातातले/चालू असलेले काम.* **in/out of sb's 'hands** एखाद्याच्या हातात/नियंत्रणाखाली/अखत्यारीत किंवा हाताबाहेर/नियंत्रणाबाहेर/मर्यादेबाहेर

असणे. **off/on one's 'hands** जबाबदारीतून मुक्त/जबाबदारी असणे. **on 'hand** उपलब्ध. **on the 'one hand . . . on the 'other (hand)** (दोन विरुद्ध मते दाखविण्यासाठी वापर) एकीकडे/एका बाजूला . . . (उलट) दुसरीकडे/दुसऱ्या बाजूला. **out of 'hand** (क) हाताबाहेर, ताब्यात नसलेला. (ख) अधिक विचार न करता, तडकाफडकी. **'handbag** *ना* [*गण*] पैसे, किल्ल्या वगैरे ठेवायची बायकांची पिशवी. **'handbook** *ना* [*गण*] माहितीवजा पुस्तक, निदेश ग्रंथ. **'handbrake** *ना* [*गण*] गाडी, ट्रक वगैरेचा हाताने लावायचा ब्रेक. **'handcuff** *क्रि* [*सक*] हातबेड्या घालणे. **'handcuffs** *ना* [*ब.व*] कैद्याच्या हातात घालायच्या बेड्या. **handful** *ना* १ [*गण*] एका हातात धरता येईल एवढे, मूठभर, पसाभर. २ [*अ.व*] अल्प, कमी, मूठभर. ३ [*अ.व*] (*अनौप*) सांभाळण्यास कठीण असा प्राणी किंवा व्यक्ती, दांडगा, आडदांड. **,hand-'picked** *वि* निवडक. **'handshake** *ना* [*गण*] हस्तांदोलन. **'handstand** *ना* [*गण*] हातांवर उभे राहणे, हातांवर शरीर तोलणे. **'handwriting** *ना* [*अगण*] हस्ताक्षर (घाटणी).

hand^2 /हॅन्ड्/ *क्रि* १ [*सक*] हाताने देणे: *Please ~ me that book, कृपया मला ते पुस्तक द्या.* २ (*वाक्प्र*) **hand sb sth on a plate** ➪ PLATE. ३ (*क्रिव*) **hand sth down (to sb)** पुढच्या पिढीला (ज्ञान, रीतिरिवाज वगैरे) देणे, वारसा देणे. **hand sth in (to sb)** एखाद्याला एखादी गोष्ट देणे, हाती सुपूर्द करणे: *~ in homework, गृहपाठ देणे.* **hand sth on (to sb)** दुसऱ्याला देणे. **hand sth out (to sb)** (क) एखाद्या गटातील प्रत्येकाला देणे, वाटणे. (ख) फुकट/मोफत देणे. **hand sb/sth over (to sb)** एखाद्यावर एखाद्या गोष्टीची जबाबदारी टाकणे, एखाद्यावर एखादे काम सोपवणे: *~ a prisoner over to the authorities, कैद्याला अधिकाऱ्यांच्या ताब्यात देणे.* **'hand-out** *ना* [*गण*] १ अन्न, पैसे वगैरेचे दिलेले दान. २ शिक्षकांनी वगैरे लिहून दिलेला मजकूर, प्रसिद्धिका.

handicap /'हॅन्डिकॅप्/ *ना* [*गण*] १ माणसाच्या शरीरातील किंवा मनातील व्यंग. २ अडथळा, अडसर. ३ खेळात एखाद्या तरबेज स्पर्धकाला न दिलेली संधी किंवा मुद्दाम केलेला अडथळा. **handicap** *क्रि* (**-pp-**) [*सक*] संधी नाकारणे, अडथळा आणणे. **handicapped** *वि* अपंग.

handicraft /'हॅन्डिक्राफ्ट्; *अमे* -क्रॅफ्ट्/ *ना* [*गण*] मडकी वगैरे तयार करण्यासाठी हाताच्या कौशल्याने करायचे काम, हस्तव्यवसाय.

handiwork /'हॅन्डिवऽक्/ *ना* [*अगण*] १ हाताने केलेले काम, हातकाम, हस्तकौशल्य. २ एखाद्या विशिष्ट व्यक्तीने केलेले काहीतरी.

handkerchief /'हॅङ्कचिफ्/ *ना* [*गण*] हातरुमाल.

handle /'हॅन्ड्ल्/ *ना* [*गण*] (कपाचा) कान, (हत्यार, दार वगैरेची) मूठ. **handle** *क्रि* १ [*सक*] हात लावणे, हातात घेणे. २ [*सक*] हाताळणे: *~ a situation, परिस्थिती हाताळणे.* ३ [*अक, सक*] (खास करून वाहनाबाबत) व्यवस्थित कार्यान्वित होणे किंवा चालणे: *This car ~s well, ही गाडी छान चालते.* **'handlebars** *ना* [*ब.व*] सायकल वगैरेचे हँडल. **handler** *ना* [*गण*] पोलिसांचे कुत्रे वगैरे प्राण्यांना शिकवणारा माणूस.

handsome /'हॅन्सम्/ *वि* १ (विशेषतः पुरुषांबाबत) सुंदर, देखणा. २ (भेटवस्तू, वागणूक वगैरेबाबत) सढळ, घसघशीत. **handsomely** *क्रिवि* सढळ हाताने, भरपूर.

handy /'हॅन्डि/ *वि* (**-ier, -iest**) १ हाताळण्यास किंवा वापरण्यास सोपा, सुटसुटीत, सोयीचा, आटोपशीर. २ सहज जाता येण्यासारखा; अगदी जवळ. ३ हाताचा कुशल. ४ (*वाक्प्र*) **,come in 'handy** उपयोगी पडणे. **handily** *क्रिवि* सुटसुटीतपणे. **'handyman** *ना* [*गण*] (*ब.व* **-men**) लहानसहान दुरुस्त्या करण्यात तरबेज असणारा माणूस, हरकाम्या.

hang^1 /हॅड्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **hung** /'हैड्/ क्र. २ चा अर्थ असताना **~ed**) १ [*अक, सक*] टांगणे. २ [*सक*] गळफास देऊन मारणे, फासावर लटकावणे. ३ [*सक*] भिंतीला (वॉलपेपर) चिकटवणे. ४ [*अक, सक*]

(मांसाबाबत) (चविष्ट होण्यासाठी) टांगलेले असणे, टांगून ठेवणे. ५ (*क्रिब*) **hang a'bout/a'round** काही न करता नुसते उभे राहणे, रेंगाळणे, गमणे. **hang back** एखादी गोष्ट करण्यास राजी नसणे, नाखूष असणे. **hang on** (क) आधारासाठी घट्ट पकडणे. (ख) (*अनौप*) थोडावेळ वाट पाहणे, थांबणे. **hang on to sth** (क) एखादी गोष्ट गच्च धरून ठेवणे, घट्ट पकडणे. (ख) (*अनौप*) चिकटून किंवा धरून राहणे. **hang up** फोन खाली ठेवणे. **be/get hung 'up** (*व्रात्य*) काळजीत पडणे, चिंताग्रस्त होणे. **'hang-gliding** *ना* [*अगण*] मोठा उडता पतंग धरून आकाशात उडण्याचा खेळ. **hanging** *ना* १ [*अगण, गण*] फाशी. २ **hangings** [*ब.व*] भिंतीवर सोडलेले पडदे वगैरे. **'hangman** *ना* [*गण*] (*ब.व* **-men**) फासावर चढवणारा माणूस. **'hang-up** *ना* [*गण*] (*व्रात्य*) चिंता, काळजी; भीती, धाक.

hang^{2} /हॅङ्/ *ना* (*वाक्प्र*) **get the hang of sth** एखादी गोष्ट समजणे किंवा ती कशी करावी ते समजणे.

hangar /'हॅङ(र्)/ *ना* [*गण*] विमाने ठेवायची इमारत, विमानघर.

hanger /'हॅङ(र्)/ *ना* [*गण*] कपडे टांगायची काठी, हुक वगैरे; अडकवण्याचा आलंब : *a 'coat-~, कोट टांगायचा हॅंगर.* **,hanger-'on** *ना* [*गण*] (*ब.व* **~s-on**) (*अधिक्षेपी*) मतलबासाठी गोड बोलणारा माणूस, खुषमस्कऱ्या, तोंडपुज्या.

hangover /'हॅङ्अउव्ह(र्)/ *ना* [*गण*] १ आदले रात्री खूप दारू प्यायल्याने आलेला घेरलेपणा. २ पूर्वीच्या काळाचा अवशेष.

hanker /'हॅङ्क(र्)/ *क्रि* [*अक*] *after/for//* एखाद्या गोष्टीची तीव्र लालसा असणे. **hankering** *ना* [*गण*] सोस, लालसा, अभिलाषा.

hanky /'हॅङ्कि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) (*अनौप*) हातरुमाल.

haphazard /हॅप्'हॅझड/ *वि* निष्काळजी, गलथान, काही शिस्त नसलेला. **haphazardly** *क्रिवि* अव्यवस्थितपणे, गबाळेपणाने.

happen /'हॅपन/ *क्रि* [*अक*] १ (एखाद्या प्रसंगाबाबत) घडणे – बहुधा योगायोगाने. २ आकस्मिक/योगायोगाने होणे किंवा करणे : *I ~ed to be out when he called, तो आला तेव्हा मी घरी नव्हतो.* ३ (*क्रिब*) **happen on sb/sth** (*औप*) योगायोगाने भेटणे किंवा आढळणे. **happening** *ना* [*गण*] घटना.

happy /'हॅपि/ *वि* (**-ier, -iest**) १ आनंदी, खुष, सुखी. २ (*औप*) आनंदित : *I shall be ~ to accept your invitation, तुझे निमंत्रण स्वीकारण्यात मला आनंद वाटेल.* ३ (शब्द, वागणूक वगैरेबाबत) प्रसंगानुरूप, साजेसा. ४ (शुभेच्छा देताना वापर) : *H~ birthday! जन्मदिवस आनंदाचा जावो!* ५ (*वाक्प्र*) **a happy 'medium** दोन टोके टाळून काढलेला सुवर्णमध्य. **happily** *क्रिवि* आनंदाने. **happiness** *ना* [*अगण*] आनंद, सुख. **,happy-go-'lucky** *वि* भविष्याची चिंता न करणारा, खुशालचेंडू, स्वच्छंदी.

harangue /ह'रॅङ्/ *ना* [*गण*] मोठ्यामोठ्याने लांबलचकपणे केलेले तिखट भाषण, शिरा ताणून केलेले भाषण, आवेशयुक्त भाषण. **harangue** *क्रि* [*सक*] आवेशयुक्त भाषण करणे, त्वेषाने बोलणे.

harass /'हॅरस; *अमे* ह'रॅस/ *क्रि* [*सक*] सतत छळ करणे. **harassment** *ना* [*अगण*] छळ, छळवणूक.

harbour (*अमे* **-or**) /'हाब(र्)/ *ना* [*गण*] जहाजांची सुरक्षिततेची जागा, (जहाजांचे) बंदर. **harbour** *क्रि* [*सक*] १ आश्रय/आसरा देणे. २ मनात ठेवणे : *~ secret fears, मनात भीती दडणे/बाळगणे.*

hard^{1} /हाड/ *वि* १ घट्ट आणि कठीण; सहज वाकवता, कापता न येण्यासारखा, टणक : *as ~ as rock, खडकासारखा टणक.* २ अवघड : *a ~ exam, अवघड परीक्षा.* ३ कष्टप्रद, परिश्रम असणारा : *~ work, कष्टाचे काम* ○ *a ~ worker, खूप परिश्रम घेणारा.* ४ दुःखदायक, क्लेशकारक : *I had a ~ childhood, माझे बालपण खूप हलाखीचे होते.* ५ (हवामानाबाबत) कडक, तीव्र : *a ~ winter, कडक हिवाळा.* ६ (एखाद्या व्यक्तीबाबत) दया न दाखवणारा; कठोर. ७ (*वाक्प्र*) **,hard and 'fast** (नियम वगैरेबाबत) कडक, काटेकोर. **hard 'at it** खूप काम करणारा. **hard 'facts** बरोबर माहिती, अचूक माहिती. **,hard 'luck**

(एखाद्याच्या दुर्दैवाबद्दल सहानुभूती दाखवताना वापर). **,hard of 'hearing** कमी ऐकायला येणारा, बहिरट. **'hardback** *ना* [*गण*] कडक पुठ्ठ्याचे वेष्टण असलेले पुस्तक. **'hardboard** *ना* [*अगण*] लाकडाचे छोटे तुकडे एकत्र घट्ट दाबून तयार केलेली पातळ फळी. **,hard 'cash** *ना* [*अगण*] नगद/रोख, रक्कम, रोकड. **,hard 'copy** *ना* [*अगण*] संगणकातून कागदावर छापून आलेल्या मजकुराचा कागद. **'hard core** *ना* [*अ.व*] एखाद्या गटातील मुख्य सभासद, महत्त्वाचे सभासद. **,hard 'currency** *ना* [*अगण, गण*] किंमत कमी होण्याची फारशी शक्यता नसलेले चलन, दुर्लभ चलन. **,hard 'drug** *ना* [*गण*] व्यसन लागेल असा कडक धोकादायक अमली पदार्थ. **,hard-'headed** *वि* व्यवहारी; भावनेत वाहवून न जाणारा, शांत डोक्याचा. **,hard-'hearted** *वि* निष्ठूर, कठोर. **,hard 'labour** *ना* [*अगण*] शारीरिक कष्टाचे काम (करण्याची शिक्षा), सक्तमजुरी. **,hard-'line** *वि* श्रद्धा वगैरेच्या बाबतीत पक्का असणारा, कट्टर. **,hard 'shoulder** *ना* [*गण*] आणीबाणीच्या वेळी गाडीपथावरून गाडी बाजूला घेण्याचे कठीण पृष्ठभागाचे स्थान. **'hardware** *ना* [*अगण*] १ घरी वापरायला लागणारी खिळे, पिन्स वगैरेसारखी साधन सामग्री, लोखंडी जड सामान. २ संगणकातील यंत्रसामग्री. **,hard 'water** *ना* [*अगण*] ज्या पाण्यात खनिजे असल्यामुळे साबणाचा फेस सहज होत नाही असे पाणी, जड पाणी. **'hardwood** ओक, बीचसारख्या झाडांचे टणक, जड लाकूड.

hard^2 /हाड्/ *क्रिवि* १ जोराने, पराकाष्ठा करून: *try/push ~, जोराने प्रयत्न करणे/ढकलणे.* २ खूप, जोरदार, तुफान: *raining ~, तुफान पाऊस पडतोय्.* ३ कष्टाने: *my '~-earned money, कष्टाने मिळवलेले माझे पैसे.* ४ (*वाक्प्र*) **be hard 'put (to it) (to do sth)** एखादी गोष्ट करणे कठीण वाटणे. **be hard to 'say** अंदाज करणे/मोजदाद करणे कठीण असणे. **be hard 'up** पैसे नसणे, पैशाची चणचण असणे. **hard 'done by** वाईट वागणूक दिलेला, अपमानित. **hard on sb/sth** (*औप*) एखाद्याच्या पाठोपाठ/लगोलग. **take sth hard** एखाद्या गोष्टीने अस्वस्थ होणे. **,hard-'boiled** *वि* (अंड्यांबाबत) आतला पिवळा बलक घट्ट होईपर्यंत उकडलेले. **hard-'pressed** *वि* वेळ किंवा पैसा यांच्या अभावाने अडचणीत. **,hard-'wearing** *वि* (कापडाबाबत) टिकाऊ.

harden /'हाड्न्/ *क्रि* १ [*अक, सक*] कडक होणे किंवा करणे, बळकट करणे, दांडरणे. २ [*सक*] (*to*)// (एखाद्याला) एखाद्या गोष्टीबाबत निबर/बेपर्वा करणे, निरढावणे.

hardly /'हाड्लि/ *क्रिवि* १ जेमतेम, कसाबसा, क्वचित्: *I ~ know him, मला तो जेमतेम (म्हणजेच अगदी वरवर) माहीत आहे.* २ मुळीच नाही: *You can ~ expect me to lend you money again, तुला पुन्हा पैसे देण्याची माझ्याकडून अजिबात अपेक्षा करू नकोस.* ३ जवळजवळ नाहीच: *~ ever, जवळजवळ एकदाही नाही.*

hardship /'हाड्शिप्/ *ना* [*गण, अगण*] हलाखी (तिचे कारण), हाल.

hardy /'हाडि/ *वि* (**-ier, -iest**) थंडीवारा, कठीण परिस्थिती वगैरे सहन करू शकणारा, काटक, दणकट, मजबूत. **hardiness** *ना* [*अगण*] काटकपणा, कणखरपणा.

hare /हेअ(र्)/ *ना* [*गण*] लांब कानाचा मोठ्या आकाराचा (रान)ससा. **hare** *क्रि* [*अक*] जोराने पळणे, धावणे. **'hare-brained** *वि* मूर्ख.

harem /'हारीम्; *अमे* 'हॅरम्/ *ना* [*गण*] मुस्लीम घरातील स्त्रियांनी राहण्याची वेगळी जागा (किंवा त्यातील स्त्रिया), जनानखाना किंवा जनाना.

hark /हाक्/ *क्रि* १ [*अक*] (*पुरा*) ऐकणे. २ (*क्रिब*) **hark back (to sth)** मागचा प्रसंग किंवा विषय पुन्हापुन्हा सांगणे, उकरून काढणे.

harm /हाम्/ *ना* [*अगण*] १ नुकसान, इजा, जखम. २ (*वाक्प्र*) **out of harm's way** सुरक्षित, निर्धोक. **harm** *क्रि* [*सक*] नुकसान पोहोचविणे; इजा करणे. **harmful** *वि* नुकसानकारक; अपायकारक, इजाकारक. **harmless** *वि* १ निर्धोक. २ न दुखावणारा: *~less fun, इतरांना त्रास न देणारी/अनुपद्रवी मजा.*

harmonica /हा'मॉनिक/ *ना* [*गण*] = MOUTH-ORGAN (MOUTH^{1}).

harmonize /'हामनाइझ्/ *क्रि* [*अक, सक*] १ सुसंवाद साधणे, मेळ घालणे : *colours that ~ well, सुसंवादी रंग.* २ (*संगीत*) सूर जमवणे, एकसुरात गाणे.

harmony /'हामनि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] भावना, हितसंबंध वगैरे यात एकता, सुसंवादित्व, एकतानता : *live together in perfect ~, पूर्ण एकतानतेने/एकदिलाने राहणे.* २ [*गण, अगण*] एकमेकांशी संबंध असणाऱ्या गोष्टींची सुंदर गुंफण : *the ~ of colours, रंगांचे सुसंवादित्व.* ३ [*गण, अगण*] सुरांची सुसंवादी गुंफण, स्वरमेळ. **harmonious** /हा'मउनिअस्/ *वि* सुसंवादी.

harness /'हानिस्/ *ना* [*गण, अगण*] १ घोड्याला गाडीला जुंपण्यासाठी असलेला चामडी पट्ट्यांचा सरंजाम. २ एखाद्याला जागी घट्ट ठेवण्यासाठी असलेली सामग्री : *a parachute ~, पॅराशूटची सामग्री/पट्टे वगैरे.* **harness** *क्रि* [*सक*] १ घोड्यावर खोगीर चढवणे, घोडा गाडीला जुंपणे. २ (नदी, सूर्यकिरण वगैरेचा) ऊर्जेसाठी वापर करणे.

harp /हाप्/ *ना* [*गण*] उभ्या तारांचे, बोटांनी छेडायचे, मोठे आणि उभ्या आकाराचे एक तंतुवाद्य. **harp** *क्रि* (*क्रिब*) **harp on (about) sth** एखाद्या गोष्टीबाबत तेच तेच पुन्हा पुन्हा बोलणे, तुणतुणे लावणे. **harpist** *ना* [*गण*] हार्प वाजवणारा.

harpoon /हा'पून्/ *ना* [*गण*] देवमासे पकडण्यासाठी दोरीला बांधलेला भाला, बरची. **harpoon** *क्रि* [*सक*] असा भाला मारणे.

harpsichord /'हाप्सिकॉऽड्/ *ना* [*गण*] पियानोसारखे असणारे पण यांत्रिकपणे तारा छेडल्या जाणारे एक वाद्य.

harrowing /'हॅरउ·इङ्/ *वि* फार वाईट, कटू.

harsh /हाश्/ *वि* १ कठोर, तिखट, झोंबणारा. २ निष्ठूर; कडक : *a ~ punishment, कटोर शिक्षा.* **harshly** *क्रिवि* कडकपणे, दयामाया न दाखवता. **harshness** *ना* [*अगण*] निष्ठूरपणा, कडकपणा.

harvest /'हाव्हिस्ट्/ *ना* [*गण*] १ (क) धान्य कापून साठविण्याचा हंगाम, सुगी. (ख) आलेले पीक : *a good wheat ~, गव्हाचे चांगले पीक.* २ (*ला*) कामाचे फळ : *reap the ~ of one's work, केलेल्या कामाचे फळ मिळणे.* **harvest** *क्रि* [*सक*] पीक घेणे, धान्य काढणे.

has ➪ HAVE.

hash /हॅश्/ *ना* १ [*अगण*] चिरून शिजवलेले मांस. २ (*वाक्प्र*) **make a hash of sth** (*अनौप*) एखादी गोष्ट नीट न करणे, बट्ट्याबोळ करणे.

hashish /'हॅशीश्, 'हॅशिश्/ *ना* [*अगण*] अंबाडीच्या पानांपासून बनवलेले मादक द्रव्य, भांग.

hasn't /'हॅझ्न्ट्/ has not ➪ HAVE.

hassle /'हॅस्ल्/ *ना* [*गण, अगण*] (*अनौप*) कटकट, अडचण; संकट. **hassle** *क्रि* [*सक*] (*अनौप*) एखाद्याच्या मागे एखादी गोष्ट करण्याची भुणभुण लावणे, टुमणे लावणे, किटकिट करणे.

haste /हेइस्ट्/ *ना* [*अगण*] घाई, गडबड, धांदल.

hasten /'हेइस्न्/ *क्रि* १ [*अक*] घाईने करणे किंवा बोलणे : *I ~ to add that your child is safe, तुझं मूल सुरक्षित आहे असं मला मधेच (घाईने) सांगायचे आहे.* २ [*सक*] एखादी गोष्ट लवकर घडविणे, घाईघाईने करणे.

hasty /'हेइस्टि/ *वि* १ घाईगडबडीने केलेला : *a ~ meal, घाईघाईने केलेले जेवण.* २ (माणसाबाबत) घाईने वागणारा : *too ~ in deciding to get married, लग्न करण्याचा निर्णय घेण्यात केलेली घाई.* **hastily** *क्रिवि* घाईगर्दीने.

hat /हॅट्/ *ना* [*गण*] १ टोपी. २ (*वाक्प्र*) **take one's hat off to sb** एखाद्याविषयी कौतुक वाटणे. **'hat trick** *ना* [*गण*] एखाद्याने लागोपाठ तीन वेळा मिळवलेले यश.

hatch^{1} /हॅच्/ *क्रि* १ [*अक, सक*] अंडे उबणे/ उबवणे : *The chicks have ~ed (out), पिले उबवलेल्या अंड्यांतून बाहेर आलीत्.* २ [*सक*] (योजना वगैरे) आखणे, बेत करणे, (कट) शिजवणे.

hatch^{2} /हॅच्/ *ना* [*गण*] (क) जमिनीतील किंवा भिंतीतील मार्ग. (ख) अशा मार्गावरील सरकते दार.

hatchback /'हॅच्बॅक्/ *ना* [*गण*] मागील बाजूला वर उघडणारे तिरपे दार असलेली गाडी.

hatchet /'हॅचिट्/ *ना* [*गण*] छोटीशी कुऱ्हाड.

hatchway /'हॅच्वेइ/ *ना* [*गण*] = HATCH^2 (**क**).

hate /हेइट्/ *क्रि* [*सक*] १ द्वेष करणे, तिरस्कार करणे. २ (*अनौप*) खेद वाटणे, दिलगीर असणे : *I ~ to trouble you, तुला त्रास देतोय् याचं वाईट वाटतं.* ३ (*वाक्प्र*) **,hate sb's 'guts** (*अनौप*) एखाद्याचा तिटकारा वाटणे, घृणा येणे. **hate** *ना* [*अगण*] द्वेष, तिटकारा, तिरस्कार, घृणा. **hateful** तिरस्करणीय, घृणास्पद. **hatefully** *क्रिवि* तिरस्काराने.

hatred /'हेइट्रिड्/ *ना* [*अगण*] (*for/of*)// द्वेष, चीड.

haughty /'हॉऽटि/ *वि* (**-ier, -iest**) शिष्ठ, गर्विष्ठ, ताठ; उद्धट, मग्रूर. **haughtily** *क्रिवि* गर्विष्ठपणे; उद्धटपणे. **haughtiness** *ना* [*अगण*] गर्विष्ठपणा, मग्रूरी.

haul /हॉऽल्/ *क्रि* [*अक, सक*] ताकद लावून ओढणे. **haul** *ना* [*गण*] १ ओढणे. २ कापायचे अंतर. ३ मिळवलेली रक्कम किंवा राशी. **haulage** *ना* [*अगण*] मालाची ने-आण.

haunch /हॉऽन्च्/ *ना* [*गण, बहुधा ब.व*] कमर आणि मांड्या यांच्यामधला शरीराचा भाग, मांड, खवाटा.

haunt /हॉऽन्ट्/ *क्रि* [*सक*] १ (भुते, पिशाच्च यांबाबत) (एखाद्या ठिकाणी) येणे, झपाटणे : *a ~ed house, झपाटलेले घर.* २ पुन्हापुन्हा येणे. ३ मनात पुन्हापुन्हा येणे : *The memory still ~s me, ती स्मृती माझ्या मनात पुन्हापुन्हा जागी होते.* **haunt** *ना* [*गण*] नेहमी ऊठबस असणारी जागा.

have^1 /हव्ह्, अव्ह्, व्ह्; अधिक बलयुक्त रूप हॅव्ह्/ *सहा क्रि* (वर्तमानकाळी तृतीय पुरुषी एकवचन **has** /हज़्, अज़्, स्, ज़्; अधिक बलयुक्त रूप हॅज़्/, *भूत* **had** /हड्, अड्, ड्; अधिक बलयुक्त रूप हॅड्/, *भूत वि* **had** /हॅड्/) १ (पूर्ण काळ दाखविण्यास वापर) : *I~/I've finished, माझं झालंय्* ○ *She has/She's gone, ती गेलीय्.* २ (*वाक्प्र*) **had I, he, she, etc** जर मी, तो, ती वगैरे : *Had I known . . ., जर मला माहीत असते . . . .*

have^2 (*ब्रि* **have got**) /हॅव्ह्/ *क्रि* [*सक*] १ जवळ असणे, मालकीचे असणे, असणे : *He has/has got a house in London, त्याचे लंडनमधे एक घर आहे* ○ *Has she (got)/Does she ~ blue eyes? तिचे डोळे निळे आहेत का?* २ अनुभवणे; मनात ठेवणे : *I ~ no doubt* (ie I am sure) *that you are right, तुझं बरोबर आहे याविषयी मला शंका नाही (म्हणजे माझी खात्री आहे)* ○ *H~ you (got) any idea where he lives? तो कुठे राहतो याची तुला काही कल्पना आहे?* ३ एखाद्या गोष्टीचा त्रास होणे : *~ a headache, डोकेदुखी असणे, डोके दुखणे.* ४ (*वाक्प्र*) **have it 'in for sb** (*अनौप*) एखाद्याबाबत निर्दय होणे पसंत करणे. **have (got) to (do sth)** (कर्तव्यदर्शक) (एखादी गोष्ट करणे) भाग असणे : *I've got to go now, मला आता जायला हवं.* ५ (*क्रिब*) **have sth on** एखादी गोष्ट अंगावर असणे. **have sth on sb** (*अनौप*) एखाद्याने अपराध केला असल्याची माहिती/पुरावा असणे.

have^3 /हॅव्ह्/ *क्रि* [*सक*] (नकारार्थी किंवा प्रश्नार्थी वाक्यात नेहमी *do* या क्रियापदासह वापर) १ करणे; घेणे : *~ a swim/walk, पोहणे किंवा चालून/फिरून येणे.* २ खाणे, पिणे, ओढणे वगैरे : *~ breakfast/a cigarette, नाश्ता घेणे/सिग्रेट ओढणे.* ३ मिळणे, येणे; भोगणे, अनुभवणे : *I've had a letter from my aunt, माझ्या मावशीचं/आत्याचं मला पत्र आलंय्* ○ *~ a good holiday, सुट्टी मजेत घालवणे.* ४ जन्म देणे; निर्माण करणे : *to ~ a baby, मूल होणे* ○ *(ला) ~ a good effect, चांगला परिणाम होणे.* ५ करून घेणे : *You should ~ your hair cut, तू जरा केस कापून घे.* ६ दुष्परिणाम भोगणे : *They had their house burgled, घरफोडीचे संकट त्यांच्यावर कोसळले किंवा त्यांचे घर चोरट्यांनी फोडले.* ७ परवानगी देणे, चालणे, खपवून घेणे : *I won't ~ such behaviour here! मी असली वागणूक खपवून घेणार नाही!* ८ पाहुणे म्हणून बोलावणे : *We're having friends round for dinner, आमच्याकडे रात्री जेवायला मित्रमंडळी आहेत/बोलावलीयेत्.* ९ (*अनौप*) फसवणे, गंडवणे :

You've been had! तुला गंडवलंय्! १० (*वाक्प्र*) **have 'had it** (*अनौप*) एखादी गोष्ट करण्याचे चालू ठेवणे अशक्य होणे. **'have it (that)** असं म्हणतात : *Rumour has it that . . ., अशी वदंता आहे की . . . .* ११ (*क्रिब*) **have sb 'on** (*अनौप*) एखाद्याला गंडवणे, फसवणे. **have sth 'out** काढणे : ~ *a tooth out, दात काढणे.* **have sth 'out (with sb)** एखाद्याशी चर्चा करून मतभेद मिटवणे. **have sb 'up (for sth)** (*अनौप*) (खास करून कर्मणिप्रयोगात वापर) एखाद्याला कोर्टात खेचणे : *He was had up for robbery, दरोड्याबद्दल त्याला कोर्टात खेचले गेले.*

haven /'हेइव्ह्न्/ *ना* [*गण*] आराम करण्याची किंवा सुरक्षित जागा, आश्रयस्थान, निवारा.

haven't /'हॅव्ह्न्ट्/ have not ➪ HAVE.

haversack /'हॅव्हसॅक्/ *ना* [*गण*] बहुधा खांद्यावर घेतली जाणारी कॅनव्हसची बॅग.

havoc /'हॅव्हक्/ *ना* [*अगण*] मोठ्या प्रमाणातली हानी, धूळदाण, अनर्थ.

hawk /हॉऽक्/ *ना* [*गण*] १ लहान पक्षी, प्राणी पकडून खाणारा बहिरी ससाणा, शिकरा, पावशा. २ (*ला*) सैन्याच्या वापराचा पक्ष धरणारी व्यक्ती.

hay /हेइ/ *ना* [*अगण*] जनावरांसाठी कापून वाळवलेले गवत, वैरण, कडबा. **'hay fever** *ना* [*अगण*] परागकण किंवा धुळीने होणारा नाक-घशाचा एक रोग, धुळीने होणारे पडसे, तृणपरागजन्य ताप. **'haystack** *ना* गवताची गंजी. **'haywire** *वि* (*वाक्प्र*) **go haywire** उधळणे, चुकणे, घोळ होणे.

hazard /'हॅझ़ड्/ *ना* [*गण*] (*to*)// धोका. **hazard** *क्रि* [*सक*] १ धोक्यात घालणे, धोका पत्करणे. २ अंदाज करणे, अनुमान बांधणे. **hazardous** *वि* धोकादायक.

haze /हेइझ़्/ *ना* [*अगण*] १ विरळ धुके, कल्माष. २ (*ला*) मनातील गोंधळ, धूसरता.

hazel /'हेइझ़्ल्/ *ना* [*गण*] लहान लहान खाण्याच्या शेंगा येणारे एक झुडूप. **hazel** *वि* (खास करून डोळ्यांबाबत) फिकट पिवळसर तपकिरी. –

hazy /'हेइझ़ि/ *वि* **(-ier, -iest)** १ धूसर, धुक्याचा. २ धूसर, अस्पष्ट, संदिग्ध : ~ *memories, अंधुक/पुसटपुसट स्मृती.* **hazily** *क्रिवि* अस्पष्टपणे, संदिग्धपणे. **haziness** *ना* [*अगण*] अस्पष्टता, संदिग्धता.

H-bomb /'अेइच् बॉम्/ *ना* [*गण*] हायड्रोजन बॉम्ब.

he /ही/ *सना* (क्रियापदाचा कर्ता म्हणून वापर) १ पूर्वनिर्दिष्ट/पूर्वी उल्लेख केलेला नर प्राणी किंवा पुरुष, तो : *I spoke to John before he left, जॉन जाण्यापूर्वी मी त्याच्याशी बोललो.* २ (स्त्री किंवा पुरुष) व्यक्ती : *Anyone can learn a foreign language, if he wants to, ज्याला इच्छा आहे तो कुणीही परभाषा शिकू शकतो.*

head^1 /हेड्/ *ना* १ [*गण*] डोके, शिर, माथा, मस्तक. २ [*गण*] विचार करण्याची क्षमता, अक्कल, डोके; मन, लक्ष : *The thought never entered my ~, असा विचार माझ्या कधी मनातच आला नाही.* ३ [*अे.व*] उपजत बुद्धी : *a good ~ for figures, आकडे लक्षात ठेवण्याची उपजत बुद्धी.* ४ **heads** (अे.व क्रियापदासह) माणसाचे तोंड छापलेली नाण्याची बाजू, छाप. ५ **a head** [*अे.व*] दरडोई, प्रत्येकी : *dinner at £15 a ~, माणशी १५ पौंड जेवणाचे.* ६ [*गण*] शिरासारखे काहीतरी : *the ~ of a pin/hammer, पिनेचा शेंडा/हातोड्याची वरची बाजू.* ७ [*गण, बहुधा अे.व*] शिरोभाग, वरचा भाग : *at the ~ of the page, पानाच्या वरचा बाजूला.* ८ [*गण*] महत्त्वाची बाजू, अधिक महत्त्वाचे टोक : *at the ~ of the table, टेबलाच्या मुख्य टोकाला* ○ *the ~ of a bed, बिछान्याच्या उशागत* – म्हणजे जिकडे डोके करायचे ती बाजू. ९ [*गण*] नेता, प्रमुख; शासक : *~s of government, सरकारी प्रमुख.* १० [*अे.व*] पुढचा भाग, दर्शनी भाग, आघाडी, तोंड : *at the ~ of the queue, रांगेच्या तोंडाला.* ११ [*अे.व*] पाण्याचा किंवा वाफेचा दाब. १२ (*वाक्प्र*) **above/over one's 'head** समजायला अवघड, डोक्यावरून जाणारे. **bang/hit one's head against a brick wall** यश येत नसताना प्रयत्न करत राहणे, भिंतीवर डोके आपटणे. **bring sth/come to a 'head** काहीतरी करणे भाग आहे अशा थराला गोष्टी नेणे/येणे. **go to one's head** (क) डोक्यात

(दारू) चढणे, तर्र होणे. (**ख**) (यशाबाबत) फाजील आत्मविश्वास वाटणे, शेफारून जाणे, डोक्यात वारे शिरणे. **have one's 'head screwed on** शहाण्यासारखे वागणे. **head 'first** (**क**) डोके पुढे करून, डोक्यावर : *fall ~ first down the stairs, जिन्यातून डोक्यावर घसरत खाली पडणे.* (**ख**) खूप वेगाने, भरकन. **head over 'heels** (**क**) कोलांट्या खात. (**ख**) (*ला*) पूर्णपणे, नखशिखान्त : *~ over heels in love, पूर्णपणे प्रेमात बुडालेला.* **keep/lose one's 'head** डोके ताळ्यावर ठेवणे/डोके फिरणे. **laugh, scream, etc one's 'head off** (*अनौप*) खदाखदा हसणे, पोट धरून हसणे. **put our/your/their 'heads together** इतरांबरोबर एखाद्या गोष्टीवर चर्चा, विचार करणे. **'headache** *ना* [*गण*] १ डोकेदुखी, मस्तकशूल. २ (*ला*) कटकट, प्रश्न. **'headland** *ना* [*गण*] समुद्रात शिरलेले जमिनीचे उंच टोक, भूशिर. **'headlight** (तसेच **'headlamp**) *ना* [*गण*] गाडीचा पुढचा प्रखर दिवा. **'headline** *ना* १ [*गण*] बातमीचे शीर्षक, मथळा. २ **the headlines** [*ब.व*] रेडिओ किंवा दूरदर्शनवरील ठळक बातम्या. **head'master** (*स्त्री* **head'mistress**) *ना* [*गण*] शाळेचे मुख्याध्यापक (किंवा शाळेची मुख्याध्यापिका). **,head-'on** *वि, क्रिवि* पुढच्या भागांची ठोकर किंवा समोरासमोर टक्कर होऊन (झालेला). **'headphones** *ना* [*ब.व*] ध्वनिफीत वगैरे ऐकण्यासाठी कानावर घालायचे उपकरण. **,head'quarters** *ना* (अे.व किंवा ब.वचनी क्रियापदासह) मुख्य कार्यालय. **'head-rest** *ना* [*गण*] डोके टेकवायचे उसे, शिराधार. **'headroom** *ना* [*अगण*] वाहनावरची मोकळी जागा. **'headstone** *ना* [*गण*] थडग्याच्या तोंडावरचा मोठा दगड, थडग्यावरचा खुणेचा दगड. **'headway** *ना* (*वाक्प्र*) **make headway** प्रगती करणे.

head^2 /हेड्/ *क्रि* १ [*सक*] (**क**) अग्रभागी किंवा पुढे असणे, आघाडीला असणे : *~ a procession/list, मिरवणुकीच्या पुढे असणे/यादीत अग्रक्रमाने असणे.* (**ख**) ताब्यात असणे, धुरा सांभाळणे : *~ the government, शासनाची धुरा सांभाळणे.* २ [*अक*] विशिष्ट दिशेने जाणे/सरकणे : *~ south/for home, दक्षिणेकडे/घराच्या दिशेने जाणे.* ३ [*सक*] फुटबॉलमध्ये डोक्याने चेंडू मारणे. ४ (*क्रिब*) **head sb off** एखाद्याला आडवे येऊन मार्ग/दिशा बदलायला लावणे, मधे येऊन दुसऱ्याची दिशा बदलणे. **head sth off** एखाद्या गोष्टीला प्रतिबंध करणे, थांबवणे.

heading /'हेडिङ्/ *ना* [*गण*] पानाच्या वरचे शीर्षक, मथळा.

headlong /'हेडलॉङ्; *अमे* -लॉऽङ्/ *क्रिवि, वि* १ डोक्यावर, अधोमुख. २ चटकन् आणि मूर्खपणे, विचार न करता, आततायीपणे : *rush ~ into a decision, उतावळेपणाने निर्णय घेणे.*

headstrong /'हेड्स्ट्रॉङ्; *अमे* -स्ट्रॉऽङ्/ *वि* नियंत्रण ठेवण्यास अवघड, भडक डोक्याचा; कुणाचे न ऐकणारा, हेकट.

heady /'हेडि/ *वि* (**-ier, -iest**) १ (नशा येणाऱ्या पेयाबाबत) नशा आणणारा, झिंग आणणारा, उत्तेजक. २ (*ला*) उत्कंठा वाढवणारा.

heal /हील्/ *क्रि* [*अक, सक*] बरे होणे/करणे, सुधारणे.

health /हेल्थ्/ *ना* [*अगण*] १ मनाची किंवा शरीराची स्थिती, आरोग्य, तब्बेत : *be in good/poor ~,तब्बेत चांगली/वाईट असणे.* २ निरोगीपणा. **healthy** *वि* (**-ier, -iest**) १ उत्तम तब्बेतीचा, सुदृढ. २ आरोग्यकारक : *a ~y climate, आरोग्यदायक हवा.* ३ आरोग्यदर्शक : *a ~y appetite, आरोग्यदर्शक भूक* ○ (*ला*) *~y profits, चांगले फायदे.* **healthily** *क्रिवि* निरोगीपणे.

heap /हीप्/ *ना* [*गण*] १ ढीग, रास : *a ~ of books/sand, पुस्तकांचा/वाळूचा ढीग.* २ **heaps** [*ब.व*] (*अनौप*) मोठी राशी : *~s of time, चिकार वेळ.* **heap** *क्रि* [*सक*] ढीग करणे : *~ food on one's plate, ताटात अन्नाची रास वाढणे.*

hear /हिअ(र्)/ *क्रि* (*भूत, भूत वि* **~d** /हऽड्/) १ [*अक, सक*] ऐकणे, श्रवण करणे. २ [*सक*] लक्ष देऊन ऐकणे : *You're not to go, do you ~ me? तू जायचं नाहीयेस्, ऐकतोयस् ना?* ३ [*सक*] कानावर येणे, सांगितले जाणे : *I ~ she's leaving, ती जाणार आहे असं मी ऐकतोय्.* ४ [*सक*] (खटला) कोर्टापुढे

सुनावणीसाठी येणे. ५ (*वाक्प्र*) **'hear! hear!** (बैठकीत मतैक्य दर्शविण्यासाठी वापरायचे शब्द). ६ (*क्रिब*) **hear from sb** एखाद्याचे पत्र, बातमी वगैरे मिळणे, कुशल समजणे. **hear of sb/sth** ठाऊक असणे, माहीत असणे : *I've never ~d of the place, या ठिकाणाबाबत मी पूर्वी कधी काही ऐकलेले नाही.* **not 'hear of sth** ऐकून घ्यायलाही तयार नसणे, परवानगी न देणे : *He wouldn't ~ of my walking home alone, मी एकट्याने घरी चालत जाण्याचे तो ऐकूनही घेइना.* **hear sb out** एखाद्याचे संपूर्ण म्हणणे ऐकून घेणे.

hearing /'हिअरिङ्/ *ना* १ [*अगण*] श्रवणशक्ती. २ [*अगण*] ऐकू येण्याचा टप्पा : *He's out of ~, तो ऐकायला येण्याच्या टप्प्याबाहेर आहे/अंतरावर नाही.* ३ [*गण*] स्वतःचे मत मांडण्याची संधी : *get a fair ~, नीटपणे ऐकून घेतले जाणे.* ४ [*गण*] (*कायदा*) सुनावणी. **'hearing-aid** *ना* [*गण*] श्रवणशक्ती सुधारण्याकरता वापरायचे छोटे यंत्र, श्रवणयंत्र.

hearsay /'हिअसेइ/ *ना* [*अगण*] वदंता, अफवा.

hearse /हऽस्/ *ना* [*गण*] अंत्ययात्रेसाठी प्रेताला वाहून नेण्याकरता वापरली जाणारी गाडी, प्रेतवाहक गाडी.

heart /हाट्/ *ना* [*गण*] १ शरीरात रक्ताभिसरण करणारा अवयव, हृदय. २ प्रेमासारख्या भावनेचे लक्ष्य, काळीज, अंतःकरण. ३ एखाद्या गोष्टीचे प्रमुख केंद्र. ४ हृदयाच्या आकाराचे काही. ५ खेळायच्या पत्त्यांमधले बदामाचे पान, बदाम. ६ (*वाक्प्र*) **break sb's/one's 'heart** एखाद्याला दुःख देणे, मन दुखावणे. **by 'heart** पाठान्तर करून : *learn/know a poem by ~, कविता पाठ करणे.* **from the (bottom of one's) 'heart** मनापासून, प्रामाणिकपणे. **not have the 'heart to do sth** एखादी गोष्ट करण्याइतके निष्ठुर न होणे, मन न घेणे, मनाने न धजणे. **take/lose 'heart** मनाने उभारी घेणे/मनाने खचणे. **take sth to 'heart** एखाद्या गोष्टीची फार हळहळ वाटणे, मनाला लावून घेणे. **'heartache** *ना* [*अगण, गण*] तीव्र दुःख. **'heart attack** *ना* [*गण*] हृदयविकाराचा झटका. **'heartbeat** *ना* [*गण*] हृदयाचे स्पंदन, काळजाचा ठोका. **'heart-breaking** *वि* दुःखकारक, मन पिळवटून टाकणारे. **'heart-broken** *वि* दुःखी, काळीज फाटलेला. **heartburn** *ना* [*अगण*] अपचनाने छातीत होणारी जळजळ. **'heartfelt** *वि* मनःपूर्वक. **heartless** *वि* निष्ठुर, काळीज नसलेला. **heartlessly** *क्रिवि* निष्ठुरपणे, निर्दय मनाने. **'heart-rending** *वि* अंतःकरण पिळवटून टाकणारा, हृदयभेदक. **'heart-to-'heart** *ना* [*गण*] व्यक्तिगत बाबींची मनमोकळी चर्चा.

hearten /हाट्न्/ *क्रि* [*सक*] उत्तेजन देणे, धीर देणे.

hearth /हाथ्/ *ना* [*गण*] चुलीपुढची जागा.

hearty /'हाटि/ *वि* **(-ier, -iest)** १ मनापासून केलेला, मनःपूर्वक : *a ~ welcome, मनःपूर्वक स्वागत.* २ हृदयंगम, हृद्य. ३ (भूक किंवा जेवणाबाबत) खूप मोठी, प्रचंड. ४ निरोगी आणि ताकदवान. **heartily** *क्रिवि* १ मनःपूर्वक. २ फार : *I'm heartily sick of this wet weather, या दमट हवेचा मला फार उबग आलाय्.*

heat^{1} /हीट्/ *ना* १ [*अगण*] उष्णता. २ गरम हवा, उकाडा, उष्मा. ३ [*अगण*] (*ला*) संताप किंवा औत्सुक्य. ४ [*गण*] स्पर्धेतील प्रारंभीची अवस्था. ५ (*वाक्प्र*) **be on heat,** (*अमे*) **be in heat** (कुत्र्यांबाबत) लैंगिक ओढीची अवस्था प्राप्त होणे. **'heatwave** *ना* [*गण*] प्रचंड गरम हवामानाचा काळ, उष्णतेची लाट.

heat^{2} /हीट्/ *क्रि* [*अक, सक*] उष्णता देणे, तापणे, तापवणे. **heated** *वि* रागीट; उत्साहाचा : *a ~ed argument, गरमागरम चर्चा.* **heater** *ना* [*गण*] खोलीतली हवा किंवा पाणी गरम करण्याचे साधन, तापक. **heating** *ना* [*अगण*] इमारतीतील हवा उबदार करण्याची यंत्रणा.

heath /हीथ्/ *ना* [*गण*] लहान लहान झुडुपे वाढलेले रान, ओसाड जमीन.

heathen /'हीद्न्/ *ना* [*गण*] १ (*जुना, अप्रचलित*) जगातील मोठ्या धर्मांवर विश्वास न ठेवणारा माणूस, काफर, म्लेंछ. २ (*अनौप*) रानटी माणूस.

heather /'हेद(र्)/ *ना* [*अगण*] गुलाबी, जांभुळकी किंवा पांढरी फुले येणारे एक बुटके फुलझाड.

heave /हीव्ह्/ *क्रि* (*भूत, भूत वि* ~**d**; क्र. ६ च्या अर्थाने **hove** /हउव्ह्/) १ [*अक, सक*] मोठ्या कष्टाने (एखादी जड गोष्ट) उचलणे किंवा ओढणे. २ [*सक*] (जड वस्तू) फेकणे. ३ [*सक*] उच्चारणे : ~ *a sigh of relief, सुटकेचा निश्वास सोडणे, उसासा टाकणे.* ४ [*अक*] वर-खाली होणे, उचंबळणे. ५ [*अक*] कसेतरी होणे, मळमळणे; ओकारी येणे. ६ (*वाक्प्र*) ,**heave 'to** (जहाजाबाबत) थांबणे. **heave** *ना* [*गण*] उचंबळ; उचलणे; फेक.

heaven /'हेव्ह्न्/ *ना* १ [*अे.व*] देवांचा आणि मृत्यूनंतर पुण्यवान लोकांचा निवास समजली जाणारी जागा, स्वर्ग. २ **Heaven** [*अे.व*] देव. ३ [*अगण, गण*] आनंदावस्था, आनंदधाम. ४ **the heavens** [*ब.व*] आकाश, नभ. ५ (*वाक्प्र*) **(Good) 'Heavens!** (आश्चर्य व्यक्त करताना वापर) अरे देवा! **heavenly** *वि* १ स्वर्गीय. २ (*अनौप*) सुखकारक. ,**heavenly 'body** *ना* [*गण*] सूर्य, चन्द्र, ग्रह वगैरे, आकाशगोल.

heavy /'हेव्हि/ *वि* (**-ier, -iest**) १ खूप वजन असलेला, जड, वजनदार. २ नेहमीपेक्षा जास्त : ~ *rain, जोरदार/मुसळधार पाऊस* ○ *a ~ smoker, सतत धूम्रपान करणारा.* ३ कामाचा, गडबडीचा : *a very ~ day/schedule, कामाचा दिवस/भरगच्च कार्यक्रम.* ४ (कामाबाबत) कष्टाचे. ५ (अन्नाबाबत) जड, पचवण्यास कठीण. ६ (लेखन, गायन वगैरेबाबत) क्लिष्ट आणि रटाळ. ७ दुःखी : *a ~ heart, जड अंतःकरण.* ८ (*वाक्प्र*) ,**heavy 'going** अवघड किंवा कंटाळवाणा, जड. **make heavy weather of sth** एखादी गोष्ट अधिक अवघड करणे. **heavily** *क्रिवि* जोराने; भरपूर : *drink/sleep heavily, खूप पिणे/झोपणे.* **heaviness** *ना* [*अगण*] जडपणा. **heavy** *ना* [*गण*] [*ब.व* **-ies**] (*अनौप*) रक्षक म्हणून नेमलेला आडदांड माणूस. ,**heavy-'duty** *वि* कसेही वापरले तरी चालेल असे (यंत्र वगैरे), दणकट. ,**heavy 'industry** *ना* [*गण*] अवजड यंत्रे वगैरे करणारा धंदा, अवजड उद्योग. '**heavyweight** *ना* [*गण*] १ ७९.३ किलो किंवा १७५ पौंड किंवा त्यापेक्षा जास्त वजनाचा मुष्टियोद्धा. २ महत्त्वाची व्यक्ती, धेंड.

heckle /'हेक्ल्/ *क्रि* [*अक, सक*] आरडाओरडा करून वक्त्याला सभेत अडथळा आणणे, बोलताना छेडणे. **heckler** /'हेक्ल(र्)/ *ना* [*गण*] छेडणारा.

hectare /'हेक्टेअ(र्)/ *ना* [*गण*] मोजण्याचे एक मेट्रिक परिमाण; १०,००० चौरस मीटर.

hectic /'हेक्टिक्/ *वि* धामधुमीचा : *lead a ~life, धामधुमीचे/धावपळीचे जीवन जगणे.*

he'd /हीड्/ १ he had ➪ HAVE. २ he would ➪ WILL^1, WOULD^1.

hedge /हेज्/ *ना* [*गण*] १ शेते, बागा वगैरे यांच्यामधील कुंपणाची झाडे, बांधावरची झाडे. २ (*ला*) संरक्षण : *a ~ against inflation, चलनवाढीविरुद्धचे संरक्षण.* **hedge** *क्रि* १ [*सक*] झाडांचे कुंपण घालणे, काटी लावणे. २ प्रश्नाला सरळ उत्तर देण्याचे टाळणे. ३ (*वाक्प्र*) ,**hedge one's 'bets** अनेक मार्गांनी नुकसानीबाबतची संरक्षक उपाययोजना करणे. '**hedgerow** *ना* [*गण*] कुंपणावरच्या झुडपांची रांग.

hedgehog /'हेज्हॉग्; *अमे* -हॉऽग्/ *ना* [*गण*] अंगावर काटे असणारा चेंडूसारखा आकार करू शकणारा एक मुंगीखाऊ प्राणी, साळू.

heed /हीड्/ *क्रि* [*सक*] (*औप*) लक्ष देणे, दखल घेणे, काळजी घेणे. **heed** *ना* [*अगण*] (*औप*) लक्ष : *take ~ of her advice, तिच्या उपदेशाची दखल घे.* **heedless** *वि* (*of*)// लक्ष न देणारा, निष्काळजी.

heel^1 /हील्/ *ना* [*गण*] १ (क) माणसाच्या पावलाचा मागचा भाग, टाच. (ख) चपलेची, बुटाची किंवा मोज्याची टाच. २ बुटाची उंच टाच. ३ (*वाक्प्र*) **at/on sb's 'heels** एखाद्याचा पाठलाग करणे, मागावर राहणे. **come to 'heel** (क) आज्ञा पाळणे, ऐकणे. (ख) (कुत्र्याबाबत) मालकाच्या मागेमागे येणे. ,**down at 'heel** गबाळ वेषात. **heel** *क्रि* [*सक*] (बुटाची) टाच दुरुस्त करणे.

heel^2 /हील्/ *क्रि* [*अक*] (*over*)// (जहाजाबाबत) एका बाजूला कलणे.

hefty /'हेफ्टि/ *वि* **(-ier, -iest)** (*अनौप*) हाडापेराने मोठा, अंगापिंडाने जाड, ताकदवान.

heifer /'हेफ(र्)/ *ना* [*गण*] कालवड, पाडी.

height /हाइट्/ *ना* १ (क) [*अगण, गण*] वरपासून खालपर्यंतचे माप, उंची. (ख) [*अगण*] उंच असण्याचा गुण, उंची. २ [*गण, अगण*] जमिनीपासूनची किंवा समुद्रसपाटीपासूनची उंची : *gain/lose ~, उंची वाढणे/कमी होणे म्हणजे उंचावरून खाली येणे.* ३ [*गण, विशेषतः ब.व*] उंचावरची जागा, शिखर. ४ [*अे.व*] कमाल, उच्चांक, मुख्य मुद्दा : *the ~ of folly/summer, मूर्खपणाचा कळस/उन्हाळ्याचा उच्चांक.*

heighten /'हाइट्न्/ *क्रि* [*अक, सक*] वाढणे, वाढवणे, तीव्र होणे/करणे.

heir /अेअ(र्)/ *ना* [*गण*] एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याच्या मालमत्ता वगैरेचा कायदेशीर हक्कदार, वारस. **heiress** /'अेअरिस्, अेअ'रिस्/ *ना* [*गण*] स्त्री वारसदार. **heirloom** /'अेअलूम्/ *ना* [*गण*] एखाद्या कुटुंबातील पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेली मूल्यवान वस्तू.

held HOLD^{1} चा *भूत, भूत वि.*

helicopter /'हेलिकॉप्ट(र्)/ *ना* [*गण*] माथ्यावर गोल फिरणारे आडवे पंखे असलेले वायुवाहन.

helium /'हीलिअम्/ *ना* [*अगण*] फुगे, तरंगते उड्डाण फुगे यात भरायचा हलका, रंगहीन वायू, सौरवायू.

hell /हेल्/ *ना* १ [*अे.व*] पापी माणसाला मरणानंतर जावे लागते अशी काल्पनिक जागा, नरक. २ [*अगण, गण*] दुःखमय स्थिती किंवा स्थळ, पापकर्माची जागा. ३ [*अगण*] (*व्रात्य*) (राग किंवा जोर दाखविण्यासाठी वापर) : *Who the ~ is he? तो कोण असा लागून गेलाय्?* ४ (*वाक्प्र*) **for the 'hell of it** (*अनौप*) केवळ गमतीखातर. **give sb 'hell** (*अनौप*) एखाद्याला कडकपणे वागवणे. **like 'hell** (क) (*अनौप*) (जोर देण्यासाठी वापर) : *drive like ~, सुसाट गाडी चालवणे.* (ख) (*व्रात्य उपहासदर्शक*) मुळीच/अजिबात नाही. **hellish** *वि* (*अनौप*) फार त्रासाची, असुखकारक, वाईट.

he'll /हील्/ he will ➪ WILL^{1}.

hello = HALLO.

helm /हेल्म्/ *ना* [*गण*] १ बोटीचे सुकाणू फिरवण्याचे चक्र किंवा दांडा. २ (*वाक्प्र*) **at the helm** सूत्रे फिरवण्याच्या जागी, नियंत्रकाच्या जागी.

helmet /'हेल्मिट्/ *ना* [*गण*] डोक्यासाठी संरक्षक आच्छादन, शिरस्त्राण.

help^{1} /हेल्प्/ *क्रि* १ [*अक, सक*] एखाद्याच्या कामात वाटेकरी, होणे, कामात साहाय्य करणे; मदत करणे : *They ~ed me (to) lift the boxes, पेट्या उचलायला त्यांनी मला मदत केली ○ H~! I'm stuck! वाचवा! मी अडकलोय्.* २ [*सक*] **~ oneself/sb (to)** स्वतःला किंवा दुसऱ्याला अन्न वाढणे, पेय वगैरे देणे. ३ (*वाक्प्र*) **can/could not help (doing) sth** एखादी गोष्ट टाळू न शकणे किंवा थांबवू न शकणे. ४ (*क्रिब*) **help (sb) 'out** एखाद्याला त्याच्या अडचणीत मदत करणे, वेळेला धावून जाणे. **helper** *ना* [*गण*] मदतनीस, हाताखालचा काम करणारा माणूस. **helping** *ना* [*गण*] (एका वेळेला) वाढलेले अन्न.

help^{2} /हेल्प्/ *ना* १ [*अगण*] मदतकार्य, साहाय्य. २ [*गण*] साहाय्य करणारी व्यक्ती किंवा वस्तू, साहाय्यक : *She's a great ~ to me, तिचे मला फार मोलाचे साहाय्य आहे.* ३ [*गण*] घरकामाचा नोकर. **helpful** *वि* उपयोगी, उपयुक्त. **helpfully** *क्रिवि* मदत म्हणून, मदत करण्याच्या उद्देशाने. **helpfulness** *ना* [*अगण*] मदत करण्याची वृत्ती. **helpless** *वि* दुसऱ्यांच्या मदतीची गरज असलेला, असहाय, निराधार; दुर्बल, दुबळा. **helplessly** *क्रिवि* असहायतेने, दुबळेपणाने. **helplessness** *ना* [*अगण*] असहायता; दुबळेपणा.

hem /हेम्/ *ना* [*गण*] कपड्याच्या कडेची शिवलेली दुमड, गोट, मुरड. **hem** *क्रि* **(-mm-)** १ [*सक*] कपड्याला मुरड घालणे. २ (*क्रिब*) **hem sb in** एखाद्याला तो हालू शकणार नाही असे वेढणे, घेरणे. **'hem-line** *ना* [*गण*] स्कर्ट किंवा इतर कपड्यांची खालच्या बाजूची मुरड.

hemisphere /'हेमिस्फिअ(र्)/ *ना* [*गण*] १

गोलार्ध, अर्धगोल. २ पृथ्वीचा अर्धगोल : *the Northern ~, उत्तर गोलार्ध.*

hemo- = HAEMO.

hemp /हेम्प्/ *ना* [*अगण*] १ दोरखंड किंवा कापड बनविण्यासाठी वापरायचे अंबाडीचे झाड, तागाचे झाड. २ यापासून बनणारे मादक द्रव्य, उदा भांग, गांजा.

hen /हेन्/ *ना* [*गण*] १ कोंबडी. २ कोणत्याही पक्ष्याची मादी. **'henpecked** *वि* (*अनौप*) (पुरुषाबाबत) बायकोच्या मुठीतला, बाईलबुद्धीचा, बाईलबुद्ध्या.

hence /हेन्स्/ *क्रिवि* (*औप*) १ इथून पुढे, इतःपर. २ या कारणाने, यासाठी, म्हणून, तदर्थ. **henceforth** /'हेन्स्'फॉऽथ् (तसेच **henceforward**) *क्रिवि* (*औप*) इथून पुढे, इतःपर, याउप्पर.

henchman /'हेन्च्मन्/ *ना* [*गण*] (*ब.व* **-men**) नेत्याची आज्ञा तंतोतंत पाळणारा एकनिष्ठ अनुयायी, स्वामिनिष्ठ सेवक.

henna /'हेन/ *ना* [*अगण*] तांबूस रंग (निर्माण करणारी वनस्पती).

her /हऽ(र्)/ *सना* (क्रियापद किंवा शब्दयोगीचे कर्म म्हणून वापर) निर्दिष्ट किंवा पूर्वी उल्लेख केलेली स्त्री किंवा प्राण्यातील मादी, तिला : *I love ~, माझं तिच्यावर प्रेम आहे ○ Give it to ~, ते तिला दे.* **her** *वि* तिचा : *That's ~ book, not yours, ते तिचे पुस्तक आहे, तुझे नाही.* **hers** /हऽझ्/ *सना* तिचा : *Is that ~? ते तिचंय्?*

herald /'हेरल्ड्/ *ना* [*गण*] (पूर्वीच्या काळी) महत्त्वाचे निरोप पोचवणारी व्यक्ती, दूत. **herald** *क्रि* [*सक*] एखाद्याच्या आगमनाची वार्ता देणे, वर्दी देणे. **heraldry** /'हेरल्ड्रि/ *ना* [*अगण*] कुलचिन्हांचा अभ्यास, कुलचिन्हविद्या.

herb /हऽब्; *अमे* अऽर्ब्/ *ना* [*गण*] ज्या वनस्पतीची पाने किंवा तिच्या बिया यांचा वापर औषध म्हणून किंवा अन्नाची रुची वाढवण्यासाठी होतो अशी वनस्पती, औषधी वनस्पती, वनौषधी. **herbal** *वि* वनौषधीचा. **herbalist** *ना* [*गण*] वनौषधी वाढवणारा किंवा विकणारा, काष्ठौषधीविक्रेता.

herbaceous /हऽ'बेइशस्; *अमे* अऽर्-/ *वि* (वनस्पतीबाबत) मऊ खोडाची. **her,baceous 'border** *ना* [*गण*] दरसाल फुले येणाऱ्या फुलझाडांचा वाफा.

herd /हऽड्/ *ना* [*गण*] प्राण्यांचा, विशेषतः गुराढोरांचा कळप. **herd** *क्रि* [*सक*] कळपाकळपाने सरकवणे, नेणे, झुंडीने नेणे, सरकवणे : *prisoners ~ed onto a train, गाडीत झुंडीने नेलेले कैदी.* **herdsman** /-मन्/ *ना* [*गण*] (*ब.व* **-men**) कळपाची देखभाल करणारा माणूस, गुराखी, धनगर.

here /हिअ(र्)/ *क्रिवि* १ इथे, येथे : *I live ~, मी इथं राहतो ○ Come ~,* इकडे *ये.* २ या ठिकाणी : *H~ the speaker paused, या ठिकाणी (या मुद्द्यावर) वक्ता थोडा थांबला.* ३ (*वाक्प्र*) **,here and 'there** इकडेतिकडे, इतस्ततः, विविध ठिकाणी. **here's to sb/sth** (एखाद्याला यश मिळण्यासाठी किंवा तो क्षेम राहण्यासाठी अभिष्टचिंतन करताना वापर). **neither ,here nor 'there** जे काय बोलतोय त्याच्याशी असंबद्ध, विषयाला सोडून. **,herea'bouts** *क्रिवि* (*औप*) इथून जवळ, जवळपास. **,here'in** *क्रिवि* (*औप*) ह्या जागी, ह्या दस्तऐवजात/लेखनात. **,here'with** *क्रि* (*औप*) ह्या बरोबर, सोबत, यासह.

hereafter /,हिअर्'आफ्ट(र्); *अमे* -ॲफ्-/ *क्रिवि* (*औप*) इथून पुढे, यापुढे, भविष्यात. **the hereafter** *ना* [*अे.व*] मरणोत्तर जीवन, पुढचा जन्म, परलोक.

hereditary /हि'रेडिट्रि; *अमे* -टेरि/ *वि* आनुवंशिक, घराण्यात चालत आलेला, आईवडलांकडून आलेला, वंशपरंपरेचा.

heredity /हि'रेडटि/ *ना* [*अगण*] आईवडलांकडून मुलांना वैशिष्ट्ये पुढे दिली जाणे, आनुवंशिकता.

heresy /'हेरसि/ *ना* [*अगण, गण*] (*ब.व* **-ies**) साधारणपणे सर्वमान्य असलेल्या मतापेक्षा अतिशय वेगळे मत (बाळगणे), पाखंड मत. **heretic** /'हेरटिक्/ *ना* [*गण*] पाखंडी माणूस. **heretical** /हि'रेटिक्ल्/ *वि* पाखंडी.

heritage /'हेरिटिज्/ *ना* [*गण, बहुधा अे.व*] राष्ट्राच्या संस्कृतीचा वारसा, ठेवा, वतन.

hermit /'हऽमिट्/ *ना* [*गण*] (खास करून धार्मिक कारणांकरता) एकटा आणि साधेपणाने राहणारा, संन्यासी, तपस्वी, योगी.

hernia /'हऽनिअ/ *ना* [*गण, अगण*] उदराच्या बाजूंवर आतड्यांचा भार पडून आलेली सूज.

hero /'हिअरउ/ *ना* [*गण*] (*ब.व* **~es**) १ शौर्य किंवा इतर गुणांच्या कौतुकास पात्र झालेली व्यक्ती, वीर. २ कथा, नाट्क वगैरेतील प्रमुख पात्र, नायक. **heroic** /हि'रउ·इक्/ *वि* वीरांचा; शौर्यपूर्ण. **heroically** /-क्लि/ *क्रिवि* वीरासारखा, शौर्याने. **heroics** *ना* [*ब.व*] राणा भीमदेवी थाटाचे बोलणे किंवा वागणे. **heroine** /'हेरउइन्/ *ना* [*गण*] वीरांगना; नायिका. **heroism** /'हेरउ·इझ़म्/ *ना* [*अगण*] शौर्य, पराक्रम, वीरता.

heroin /'हेरउइन्/ *ना* [*अगण*] अफूच्या अर्कापासून बनवलेले एक मादक द्रव्य.

herpes /'हऽपीझ़्/ *ना* [*अगण*] अंगावर पुरळ येणारा रोग, कातीण.

herring /'हेरिङ्/ *ना* [*गण*] अन्न म्हणून वापरायचा समुद्रातील मासा. **'herring-bone** *ना* [*अगण*] v आकाराचे डिझाईन.

hers ➪ HER.

herself /हऽ'सेल्फ़्/ *सना* १ (कर्तीवर क्रियेचा परिणाम झाला असता आणि ती क्रियेचे कारणही असता आत्मवाचक सर्वनाम म्हणून वापर) तिने/तिला स्वतःला: *She 'hurt ~, तिने स्वतःला इजा करून घेतली* ○ *She ,bought ~ a new 'dress, तिने स्वतःला नवीन कपडे घेतले.* २ (जोर देण्यासाठी वापर): *She told me the news ~, तिने स्वतःच मला ती बातमी सांगितली.* ३ (*वाक्प्र*) **(all) by her'self** (क) एकटीने. (ख) कुणाचीही मदत न घेता.

he's /हीझ़्/ १ he is ➪ BE. २ he has ➪ HAVE.

hesitant /'हेझ़िटन्ट्/ *वि* काकू करणारा, दोलायमान, अनिश्चित. **hesitancy** *ना* [*अगण*] दोलायमानता, अनिश्चितता.

hesitate /'हेझ़िटेइट्/ *क्रि* [*अक*] मनाचा निश्चय न झाल्याने किंवा राजी नसल्याने काही करण्यात किंवा बोलण्यात फार धीमेपणा असणे, काकू करणे, दहीखाऊ महीखाऊ करणे, करू का नको करणे. **hesitation** /,हेझ़ि'टेइश्न्/ *ना* [*अगण, गण*] काचकूच.

heterogeneous /,हेटर'जीनिअस्/ *वि* अनेक प्रकारांचा बनलेला, बहुजातीय, बहुजिनसी, विविध प्रकारचा, अनेकविध.

heterosexual /,हेटर'सेक्शुअल्/ *वि* भिन्नलिंगी व्यक्तीकडे आकर्षित होणारा, विषमलिंगी आकर्षण असणारा, भिन्नकाम.

het up /,हेट् 'अप्/ *वि* (*अनौप*) निराश, विमनस्क, सचिन्त.

hexagon /'हेक्सगन्; *अमे* -गॉन्/ *ना* [*गण*] सहा बाजू असलेली आकृती, षट्कोण, षट्भुज.

heyday /'हेइडेइ/ *ना* [*ए.व*] मोठ्या यशाचा काळ, भरभराटीचा काळ, सुवर्णकाल.

hiatus /हाइ'एइटस्/ *ना* [बहुधा *ए.व*] एखादी गोष्ट नसल्याने निर्माण झालेली पोकळी किंवा अवसर, एखाद्या मालिकेतील फट, अंतर, खंड.

hibernate /'हाइबनेइट्/ *क्रि* [*अक*] (प्राण्यांबाबत) हिवाळ्यात झोपून राहणे. **hibernation** /,हाइब'नेइश्न्/ *ना* [*अगण*] शीतनिष्क्रीयता, शीतकालसमाधी.

hiccup (तसेच **hiccough**) /'हिकप्/ *ना* [*गण*] १ उचकी, हिक्का. २ (*अनौप*) लहानशी अडचण. **hiccup** *क्रि* [*अक*] उचकी देणे/लागणे.

hide^{1} /हाइड्/ *क्रि* (*भूत* **hid** /हिड्,/ *भूत वि* **hidden** /'हिड्न्/) १ [*सक*] लपवणे, झाकून ठेवणे, दृष्टिआड नेणे. २ [*अक*] दृष्टिआड होणे, नजरेबाहेर जाणे. **'hide-out** (*अमे* तसेच **'hideaway**) *ना* [*गण*] लपण्याची जागा, गुप्त स्थळ: *a terrorist ~-out, अतिरेक्यांची दडून बसायची जागा.* **'hiding** *ना* [*अगण*] (*वाक्प्र*) **,go into/,come out of 'hiding** लपून बसणे/प्रकट होणे. **in 'hiding** लपलेला, दडलेला. **'hiding-place** *ना* [*गण*] लपून बसायची जागा, दडवून ठेवायची जागा, गुप्तस्थळ.

hide^{2} /हाइड्/ *ना* [*गण*] जनावराचे कातडे.

hideous /'हिडिअस्/ *वि* फारच कुरूप, विद्रूप; भयानक. **hideously** *क्रिवि* भयानकपणे.

hiding^{1} ➪ HIDE^{1}.

hiding^{2} /'हाइडिङ्/ *ना* [*गण*] बदडणे, मारणे, ठोक, चोप.

hierarchy /'हाइअराकि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) अधिकाराने नीच ते उच्च अशी श्रेणीरचना, श्रेणीबंध.

hi-fi /'हाइफाइ/ *वि, ना* [*गण*] (*अनौप*) HIGH FIDELITY (HIGH^1) चे संक्षिप्त रूप.

high^1 /हाइ/ *वि* १ (क) खूप वरपर्यंत पोचणारा, उंच : *a ~ fence, उंच कुंपण.* (ख) तळापासून वरपर्यंतच्या उंचीचा, उंच : *The wall is six feet ~, भिंत सहा फूट उंच आहे.* २ नेहमीपेक्षा जादा, चढा : *a ~ price, चढा भाव.* ३ मोठा, श्रेष्ठ, उच्चतम : *a ~ degree of accuracy, उच्च कोटीचा बिनचुकपणा.* ४ नीतिमान : *have ~ ideals, उदात्त ध्येय असणे.* ५ चांगले, अनुकूल : *We have a ~ opinion of her, आमचे तिच्याविषयी फार चांगले मत आहे.* ६ वरिष्ठ, महत्त्वाचा : *a ~ official, वरिष्ठ अधिकारी.* ७ (आवाजाबाबत) उंच, खडा, पहाडी. ८ ऐन, भर : *~ summer, भर उन्हाळ्यात* (म्हणजे उन्हाळ्याच्या मध्यभागी). ९ (अन्नाबाबत) खराब व्हायला लागलेलं, आंबलेलं, नासकट. १० (*on*)// (*अनौप*) मादक द्रव्याच्या प्रभावाखाली किंवा अमली पदार्थाच्या तारेत. ११ (दंतुरचक्र किंवा गिअरबाबत) जास्त वेग देणारा. १२ (*वाक्प्र*) **be/get on one's ,high 'horse** (*अनौप*) गर्वाने वागणे, घोड्यावरून येणे, हवेत तरंगणे. **,high and 'dry** मदतीविना. **'high time** खूप दिवस लांबलेली गोष्ट करायची निकडीची वेळ : *It's ~ time you cleaned the car, गाडी धुवायची आता मात्र वेळ आलीय्.* **'highbrow** *ना* [*गण*] *वि* (कधीकधी *अधिक्षेपी*) उच्चभ्रू. **,high-'class** *वि* उच्च प्रतीचा. **,High Com'missioner** *ना* [*गण*] एका कॉमनवेल्थ देशाचा दुसऱ्या कॉमनवेल्थ देशातील प्रतिनिधी, उच्च आयुक्त. **,High 'Court** *ना* [*गण*] (*ब्रि*) दिवाणी दाव्यांचे सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय. **,higher edu'cation** *ना* [*अगण*] उच्च शिक्षण, विद्यापीठ पातळीवरचे शिक्षण, महाविद्यालयीन शिक्षण. **,high fi'delity** *वि, ना* [*गण*] ध्वनिमुद्रित आवाज जवळजवळ पूर्णतः त्याच रूपात पुन्हा निर्माण करू शकणारी सामग्री (किंवा अशा सामग्रीचा). **,high-'flier** *ना* [*गण*] प्रचंड यश मिळवण्याची ताकद आणि आकांक्षा असणारा, महत्त्वाकांक्षी. **,high-'grade** *वि* उच्च श्रेणीचा. **,high-'handed** *वि* इतरांचा विचार न करता सत्ता वापरणारा, अरेरावी करणारा. **the 'high jump** *ना* [*अ.व*] उंच दांडीवरून उडी मारण्याचा खेळ, उंच उडी. **'highlands** /-लन्ड्झ/ *ना* [*ब.व*] डोंगराळ भाग, पहाडी मुलूख. **,high-'level** *वि* (बैठक वगैरेबाबत) महत्त्वाच्या व्यक्तींची, वरिष्ठांची, श्रेष्ठींची. **the 'high life** *ना* [*अ.व*] आरामाचे आणि फॅशनेबल असे जीवन, श्रीमंती राहणी. **,high-'minded** *वि* ध्येयवादी. **,high-'powered** *वि* महाशक्तिमान, सामर्थ्यवान, शक्तिशाली (यंत्र वगैरे). **,high 'profile** ⇨ PROFILE. **'high-rise** *वि* (इमारतीबाबत) खूप उंच, गगनचुंबी. **'high school** *ना* [*गण*] (खास करून *अमे*) १५ ते १८ वयोगटातील मुलांची माध्यमिक शाळा; माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा. **the ,high 'seas** *ना* [*ब.व*] कुठल्याही देशाची मालकी नसलेला समुद्राचा भाग, मुक्त सागर. **,high 'season** *ना* [*अगण*] (पर्यटनकेन्द्रातील) हॉटेल, निवासस्थाने यामधे गर्दी असण्याचा काळ, मोसम, हंगाम. **,high-'spirited** *वि* जिवंत, रसरसता; साहसी, उत्साही, तडफदार. **'high spot** *ना* [*गण*] एखाद्या कार्यक्रमाचा मुख्य आकर्षक भाग, प्रमुख आकर्षण. **'high street** *ना* [*गण*] नगराचा मुख्य रस्ता. **,high 'tea** *ना* [*अगण*] (*ब्रि*) रात्रीचे लवकरचे किंवा संध्याकाळचे खाणे किंवा जेवण. **,high tech'nology** *ना* [*अगण*] अत्याधुनिक साधनसामग्रीचा वापर. **,high-'tech** *वि* (*अनौप*) अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा. **'highway** *ना* [*गण*] हमरस्ता, महामार्ग. **'highwayman** *ना* [*गण*] (*ब.व* **-men**) (पूर्वी) वाटसरूंना लुबाडणारा चोर, वाटमारी करणारा माणूस.

high^2 /हाइ/ *ना* [*गण*] १ उच्चांक, उंच पातळी : *Profits reached a new ~, नफ्याचा नवीनच उच्चांक फायद्याने गाठला.* २ (*अनौप*) अतिशय आनंदाची भावना : *on a ~, अत्यानंदाने, भावना उचंबळून.*

high^3 /हाइ/ *क्रिवि* उंचावर, उंच जागी, उंच.

highlight /'हाइलाइट्/ *ना* [*गण*] १ एखाद्या

गोष्टीचा महत्त्वाचा भाग, मुख्य भाग. २ [बहुधा *ब.व*] (क) छायाचित्रातील प्रकाशित भाग. (ख) केसातील फिक्या रंगाचे पट्टे. **highlight** *क्रि* [*सक*] विशेष लक्ष देणे.

highly /'हाइलि/ *क्रिवि* १ मोठ्या प्रमाणात, खूप : *a ~ amusing film, फारच मजेशीर चित्रपट.* २ फार चांगला : *think ~ of sb, एखाद्याबाबत खूप आदर असणे* किंवा *एखाद्याला खूप मानणे.* **,highly-'strung** *वि* हळवा.

Highness /'हाइनिस्/ *ना* [*गण*] राज घराण्यातील व्यक्तीचा किताब : *His/Her (Royal) ~, महाराज/महाराणी.*

hijack /'हाइजॅक्/ *क्रि* [*सक*] (खास करून विमानाचे) बळजबरीने नियंत्रण घेणे, (विमान) पळवणे, (विमानाचे) अपहरण करणे, हवाई चाचेगिरी करणे. **hijacker** *ना* [*गण*] हवाईचाचा, अपहरणकर्ता.

hike /हाइक्/ *ना* [*गण*], *क्रि* [*अक*] गावाबाहेर दूरवर फिरायला जाणे, वनभ्रमण/वनविहार (करणे). **hiker** *ना* [*गण*] वनविहार करणारा, भटकंती करणारा.

hilarious /हि'लेरिअस्/ *वि* खूप मौजेचा, थट्टामस्करीचा. **hilariously** *क्रिवि* मौजेने, थट्टामस्करीत. **hilarity** /हि'लॅरटि/ *ना* [*अगण*] हास्याचा गडगडाट, हास्यविनोद, खिदळणे.

hill /हिल्/ *ना* [*गण*] १ टेकडी. २ रस्त्यावरचा वगैरे उतार, ढाळ. **'hillside** *ना* [*गण*] टेकडीची बाजू, टेकडीचा उतार. **'hilltop** *ना* [*गण*] डोंगराचे शिखर, टेकडीचे टोक. **hilly** *वि* डोंगराळ.

hilt /हिल्ट्/ *ना* [*गण*] १ तलवारीची मूठ. २ (*वाक्प्र*) **(up) to the 'hilt** पूर्णपणे : *We support you to the ~, आमचा तुम्हाला पूर्ण पाठिंबा आहे.*

him /हिम्/ *सना* (क्रियापदाचे किंवा शब्दयोगीचे कर्म म्हणून वापर) पूर्वनिर्दिष्ट किंवा पूर्वी उल्लेख केलेला पुरुष किंवा प्राण्यातील नर, त्याला : *I love ~, माझं त्याच्यावर प्रेम आहे* ○ *Give it to ~, ते त्याला दे.*

himself /हिम्'सेल्फ्/ *सना* १ (कर्त्यावर क्रियेचा परिणाम झाला असता आणि तो क्रियेचे कारणही असता आत्मवाचक सर्वनाम म्हणून वापर) त्याला/त्याने स्वतःला : *He 'cut ~, त्याने स्वतःलाच कापले.* २ (जोर देण्यासाठी वापर) : *He told me the news ~, त्याने स्वतःच मला ती बातमी दिली.* ३ (*वाक्प्र*) **(all) by him'self** (क) एकट्याने. (ख) कुणाचीही मदत न घेता.

hind^{1} /हाइन्ड्/ *वि* मागचा, पश्च : *the ~ legs of a horse, घोड्याचे मागचे पाय.* **,hind'quarters** *ना* [*ब.व*] चतुष्पादाचा मागचा भाग.

hind^{2} /हाइन्ड्/ *ना* [*गण*] हरिणी, मृगी.

hinder /'हिन्ड(र्)/ *क्रि* [*सक*] कामात अडथळा आणणे : *~ sb from working, एखाद्याच्या कामात अडथळा आणणे.* **hindrance** /'हिन्ड्रन्स्/ *ना* [*गण*] अडथळा आणणारी, अटकाव करणारी व्यक्ती किंवा वस्तू.

hindsight /'हाइन्ड्साइट्/ *ना* [*अगण*] एखादी गोष्ट घडून गेल्यावर ती समजणे, पश्चात्बुद्धी.

Hindu /,हिन्'दू; *अमे* 'हिन्दू/ *ना* [*गण*] हिंदू धर्माचा, हिंदू. **Hindu** *वि* हिंदूंचा, हिंदवी. **Hinduism** /'हिन्दूइझम्/ *ना* [*अगण*] पुनर्जन्मावर विश्वास असणारा आणि (पूर्वी) चातुर्वर्ण व्यवस्था असलेला एक भारतीय धर्म; विभिन्न देवदेवतांची पूजा, परमेश्वर प्राप्तीचे विभिन्न मार्ग, अनेक पंथ-संप्रदाय सामावून घेणारा, समावेशक वृत्तीचा, वेद-उपनिषद-गीता यातील तत्त्वज्ञान मानणारा, रामायण-महाभारत हे धर्मग्रंथ असणारा सर्वात जुना भारतीय धर्म.

hinge /हिन्ज्/ *ना* [*गण*] बिजागरी. **hinge** *क्रि* १ [*सक*] बिजागरी लावणे. २ (*क्रिब*) **hinge on sth** एखाद्या गोष्टीवर अवलंबून असणे, विसंबून असणे : *Everything ~s on the result of these talks, बोलण्यांच्या निकालावर सर्व गोष्टी अवलंबून आहेत.*

hint /हिन्ट्/ *ना* [*गण*] १ अप्रत्यक्षपणे केलेली सूचना. २ अंधूक झलक, पुसट चिन्ह : *a ~ of sadness in his voice, त्याच्या आवाजाला असलेली सूक्ष्म दुःखाची झालर.* ३ उपयुक्त सूचना, उपदेश : *helpful ~s, उपयुक्त व्यावहारिक सल्ला.* **hint** *क्रि* [*अक, सक*] *at//* (एखादी गोष्ट) सूचित करणे, ध्वनित करणे.

hip /हिप्/ *ना* [*गण*] कमरेखालचा आणि पायांवरचा शरीराचा भाग, ढुंगण, नितंब. **'hip-flask** *ना* [*गण*] खिशात बसणारी ब्रॅन्डी वगैरेची छोटी बाटली किंवा कुपी.

hippie (तसेच **hippy**) /'हिपि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) सामाजिक संकेत न मानणारा, बेछूटपणे वागणारा माणूस.

hippo /'हिपउ/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s**) (*अनौप*) HIPPOPOTAMUS चे संक्षिप्त रूप.

hippopotamus /,हिप'पॉटमस्/ *ना* [*गण*] (*ब.व* **-muses** किंवा **-mi** /-माइ/) जाड कातडीचा, नदीत राहणारा एक मोठा आफ्रिकन प्राणी.

hire /'हाइअ(र्)/ *क्रि* [*सक*] १ भाड्याने घेणे : *~ a car for a week, गाडी एका आठवड्यासाठी भाड्याने घेणे.* २ मोले घेणे, मजुरीवर घेणे. ३ (**क्रिब**) **hire sth out** भाड्याने देणे. **hire** *ना* [*अगण*] भाड्याने देणे: *bicycles for ~, सायकली भाड्याने देणे.* **,hire-'purchase** *ना* [*अगण*] (*ब्रि*) एखादी गोष्ट लगेच वापरायला मिळून त्याची रक्कम हप्त्याने भरण्याचा करार.

his /हिझ्/ *वि* त्याचा: *That's ~ book, ते पुस्तक त्याचे आहे.* **his** *सना* त्याचा : *Is that ~? ते त्याचंय् का?*

hiss /हिस्/ *क्रि* [*अक, सक*] नापसंती दाखविण्यासाठी 'शूऽ' असा आवाज करणे, फुत्कारणे, फिस्कारणे. **hiss** *ना* [*गण*] शूऽशूऽ करणे, फुत्कार.

historian /हि'स्टॉऽरिअन्/ *ना* [*गण*] इतिहासाचा अभ्यास करणारा, इतिहासकार.

historic /हि'स्टॉरिक्; *अमे* -स्टॉऽरिक्/ *वि* ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचा : *a(n) ~ event, ऐतिहासिक प्रसंग/घटना.*

historical /हि'स्टॉरिक्ल्; *अमे* -'स्टॉऽर्-/ *वि* इतिहासविषयक, ऐतिहासिक : *~ studies/novels, ऐतिहासिक अभ्यास/कादंबऱ्या.* **historically** /-क्लि/ *क्रिवि* ऐतिहासिकदृष्ट्या.

history /'हिस्ट्रि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] भूतकालीन घटनांचा अभ्यास, इतिहास. २ [*गण*] भूतकालीन घटनांचे वर्णन, इतिवृत्त, इतिहास. ३ एखाद्याच्या आयुष्यातील मागील काळातील घटना किंवा त्याचे अनुभव, एखाद्या गोष्टीचा पूर्वेतिहास: *his medical ~, त्याचा वैद्यकीय पूर्वेतिहास.* ४ (*वाक्प्र*) **make/go down in 'history** इतिहासात नोंद राहील असे काही करणे, इतिहासात अजरामर होणे.

hit^{1} /हिट्/ *क्रि* (**-tt-**, *भूत, भूत वि* **hit**) [*सक*] १ (**क**) एखाद्या वस्तूने प्रहार करणे, मारणे, ठोकणे : *He ~ me with a stick, त्याने मला काठी मारली.* (**ख**) धडक देणे, टक्कर देणे : *The car ~ a tree, गाडीने झाडाला धडक दिली.* २ दुष्परिणाम होणे : *The new law will ~ the poor, नवीन कायद्याचा गरिबांवर विपरीत परिणाम होईल.* ३ पोहोचणे; सापडणे : *~ the right road, बरोबर रस्ता सापडणे.* ४ (*वाक्प्र*) **hit it 'off** (*अनौप*) मैत्री होणे. **hit one's head against a brick wall** ⇨ HEAD^{1}. **hit the nail on the 'head** सत्य बोलणे, अगदी बरोबर बोलणे. **hit the 'roof** (*अनौप*) एकदम रागावणे, तडकणे. **hit the 'sack** (*अनौप*) झोपी जाणे, निजणे. ५ (**क्रिब**) **hit back (at sb)** टीकेला प्रत्युत्तर देणे, चोख उत्तर देणे. **hit on/upon sth** अचानकपणे (एखादी योजना, उत्तर) सुचणे, अनपेक्षितपणे/एकाएकी प्रश्न सुटणे. **hit out (at sb)** कडाडून टीका करणे, घणाघाती टीका करणे, जोरदार हल्ला करणे. **,hit-and-'run** *वि* (रस्त्यावरील अपघाताबाबत) अपघात करून पळालेला.

hit^{2} /हिट्/ *ना* [*गण*] १ मारणे, ठोक. २ लोकप्रिय व्यक्ती किंवा वस्तू; यश : *Her new play is a great ~, तिचं नवीन नाटक चांगलं यशस्वी ठरलं.* **'hit list** *ना* [*गण*] (*अनौप*) ज्यांच्यावर कारवाई करायची किंवा ज्यांना मारायचे त्या लोकांची यादी. **'hit man** *ना* [*गण*] (*अनौप विशेषतः अमे*) मारेकरी. **'hit parade** *ना* [*गण*] लोकप्रिय आणि खूप खपाच्या ध्वनिमुद्रिकांची यादी.

hitch /हिच्/ *क्रि* १ [*अक, सक*] दुसऱ्याच्या गाडीतून (फुकट) प्रवास करणे : *~ round Europe, युरोपभर दुसऱ्याच्या वाहनातून (फुकट) भटकणे.* २ [*सक*] हुकने किंवा दोरीच्या आढ्याने एकमेकांत अडकवणे, हुक लावणे, दोरीने बांधणे. ३ (*क्रिब*) **hitch sth up** (पॅन्ट, स्कर्ट यासारखे कपडे) वर करणे/धरणे, (कमरेला) वर खोचणे. **hitch** *ना* [*गण*] १ लहानशी समस्या, अडचण. २ हिसका, धक्का.

३ एक प्रकारची गाठ, सुरगाठ. **'hitch-hike** *क्रि* [*अक*] इतरांच्या वाहनातून फुकट प्रवास करणे. **'hitch-hiker** *ना* [*गण*] फुकट्या प्रवासी.

hitherto /,हिद'टू/ *क्रिवि* (*औप*) आजवर, येथवर, आजपावेतो, अद्यापी.

HIV /,एइच् आइ 'व्ही/ *संरू* एडस् रोगाच्या विषाणूंचे नाव, Human Immuno-deficiency Virus चे संक्षिप्त रूप.

hive /हाइव्ह/ *ना* [*गण*] १ मधमाश्यांना राहण्याकरता केलेली पेटी, मधुमक्षिकापेटी. २ (*ला*) कामात गुंतलेल्या माणसांनी गजबजलेला भाग : *a ~ of activity, सतत कार्यरत असणारे केन्द्र.* **hive** *क्रि* (*क्रिब*) **hive sth off** (एखाद्या संस्थेचा एखादा विभाग) स्वतंत्र करणे.

HMS /,एइच् एम् 'एस्/ *संरू* (ब्रिटिश युद्धनौकांच्या नावांपूर्वी वापर) Her/His Majesty's Ship.

hoard /हॉऽड्/ *ना* [*गण*] (द्रव्याचा) साठा, संचय, निधी. **hoard** *क्रि* [*सक*] साचवून ठेवणे, साठा करणे, संचय करणे.

hoarding /'हॉऽडिङ्/ *ना* [*गण*] (*ब्रि*) (रस्त्याकडेचा) जाहिराती लावण्याचा मोठा फलक.

hoarse /हॉऽस्/ *वि* (**~r, ~st**) (आवाजाबाबत) घोगरा, फुटलेला. **hoarsely** *क्रिवि* घोगऱ्या आवाजात. **hoarseness** *ना* [*अगण*] घोगरेपणा.

hoax /हउक्स्/ *ना* [*गण*] गंमत म्हणून केलेली युक्ती, चेष्टा, थट्टा, मस्करी. **hoax** *क्रि* [*सक*] गंमत करणे, मजा म्हणून फसवणे.

hob /हॉब्/ *ना* [*गण*] कुकरचा किंवा चुलीचा भांडे गरम करणारा सपाट असा पृष्ठभाग.

hobble /'हॉब्ल्/ *क्रि* [*अक*] पायाला दुखापत वगैरे झाल्याने बेडौलपणे चालणे, लंगडणे.

hobby /'हॉबि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) रिकाम्या वेळात मौजेकरता केलेले काहीतरी, छंद.

hobnail boot /'हॉब्नेइल् बूट्/ *ना* [*गण*] पायाला छोटे छोटे खिळे ठोकलेला जाड बूट.

hockey /'हॉकि/ *ना* [*अगण*] वाकडी यष्टी आणि छोटा चेंडू घेऊन गोल करायचा, प्रत्येकी अकरा खेळाडू असलेला दोन संघांतील खेळ.

hod /हॉड्/ *ना* [*गण*] विटा वाहून नेण्याचे लांब मूठ असलेले मोठे खोके, लाकडी कोळंबे.

hoe /हउ/ *ना* [*गण*] जमीन खणण्याची कुदळ, फावडे. **hoe** *क्रि* [*अक, सक*] फावड्याने खणणे, कुदळणे.

hog /हॉग्; *अमे* हॉऽग्/ *ना* [*गण*] १ खच्ची केलेला डुक्कर. २ (*अनौप*) आप्पलपोट्या हावरा माणूस, डुक्कर. **hog** *क्रि* (**-gg-**) [*सक*] (*ला*) जास्त भाग घेणे, हडप करणे, लाटणे.

Hogmanay /'हॉग्मनेइ/ *ना* [*अगण*] (स्कॉट) नूतन वर्ष रजनी, नववर्षसंध्या.

hoist /हॉइस्ट्/ *क्रि* [*सक*] (दोरीने) वर ओढणे, चढवणे, उभारणे, उंचावणे. **hoist** *ना* १ [*गण*] दोर आणि कप्पी यांच्या साहाय्याने वजन उंच उचलण्याचे यंत्र. २ [*अ.व*] उंचावणे, उभारणी.

hold^{1} /हउल्ड्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **held** /हेल्ड्/) १ [*सक*] हातात धरणे. २ [*सक*] (जागी) धरणे : *H~ your head up, डोके ताठ ठेव* किंवा *मान ताठ कर.* ३ [*सक*] आधार देणे/राहणे, पेलणे : *That branch won't ~ you, त्या फांदीला तुझा भार सहन होणार नाही.* ४ [*सक*] धरून ठेवणे, पकडून ठेवणे : *H~ the thief until the police come, पोलीस येईपर्यंत चोराला पकडून ठेव म्हणजे जाऊ देऊ नको.* ५ [*अक*] टिकणे, राहणे : *How long will this fine weather ~? अशी छान हवा किती काळ टिकेल?* ६ [*सक*] (गाडी वगैरे बाबत) रस्त्याला घट्ट धरून चालणे, रस्ता न सुटणे. ७ [*सक*] मावणे; बसणे : *This barrel ~s 25 litres, ह्या पिंपात २५ लिटर मावतात* किंवा *हे पिंप २५ लिटरचे आहे.* ८ [*सक*] हल्ल्यात ठाव न सोडणें, टिकाव धरणे. ९ [*सक*] जवळ असणे, मालकीचे असणे : *~ shares, शेअर्स असणे.* १० [*सक*] एखादे पद स्वीकारणे, धारण करणे : *~ the post of Prime Minister, पंतप्रधानपद सांभाळणे.* ११ [*सक*] (एखाद्याचे लक्ष) वेधून घेणे, खिळवून ठेवणे. १२ [*सक*] (मत वगैरे) असणे, बाळगणे. १३ [*सक*] (बैठक) भरवणे, घेणे. १४ [*सक*] समजणे, धरणे : *I ~ you responsi-*

ble for the accident, अपघाताबाबत मी तुला जबाबदार धरतो. १५ (*वाक्प्र*) **hold sb/sth at bay** ➪ BAY^3. **hold one's 'breath** श्वास रोखून धरणे. **hold the 'fort** इतर कुणी नसताना एखाद्या गोष्टीची काळजी घेणे, किल्ला लढवणे. **hold good** बरोबर असणे, खरे असणे. **hold one's ground** ➪ GROUND^1. **'hold it** (*अनौप*) (एखाद्याला थांबण्यासाठी किंवा न हालण्यासाठी विनंती करताना वापर) जरा थांब. **hold the 'line** फोन चालू ठेवणे. **hold one's 'own (against sb)** (एखाद्याकडून) पराभूत न होणे, एखाद्याला तोंड देणे. **ˌhold one's 'tongue** तोंडाला कुलूप घालणे, गप्प राहणे. **there's no 'holding sb** एखाद्याला थांबवणे किंवा आवर घालणे अशक्य असणे. १६ (*क्रिब*) **hold sth against sb** एखाद्या वाईट गोष्टीवरून एखाद्या माणसाविषयी आकस धरणे. **hold 'back** काही करण्यास नाराज असणे. **hold sb/sth back** **(क)** नियंत्रण ठेवणे, कह्यात ठेवणे : *~ back the crowd, जमावावर नियंत्रण ठेवणे.* **(ख)** लपवून ठेवणे, गुलदस्त्यात ठेवणे. **hold sb 'down** एखाद्याच्या स्वातंत्र्यावर मर्यादा घालणे, नियंत्रणात ठेवणे. **hold sth 'down** **(क)** एखादी गोष्ट खाली आणणे/ठेवणे : *~ down prices, किंमती खाली राखणे* म्हणजेच *किंमत वाढू न देणे.* **(ख)** (एखादी नोकरी) काही काळ टिकवून धरणे. **hold 'forth (on sth)** (एखाद्या गोष्टीविषयी) दीर्घकाळ बोलणे. **hold 'off** (पाऊस वगैरे बाबत) उशीर होणे, विलंब होणे, लांबणे. **hold sb/sth off** (हल्ला) परतविणे. **hold off (doing) sth** विलंब लावणे, लांबणीवर टाकणे. **hold 'on** **(क)** थांबणे, वाट पाहणे. **(ख)** प्रतिकूल परिस्थितीतही चालू ठेवणे. **hold sth on** एखादी गोष्ट आहे तिथे धरून ठेवणे. **hold on to sth** ठेवणे, राखणे. **hold 'out** **(क)** टिकणे. **(ख)** हल्ला परतविणे. **hold sth out** एखादी गोष्ट देऊ करणे. **hold out for sth** देऊ केलेले न स्वीकारता जास्तीची मागणी करणे. **hold sth over** पुढे ढकलणे, लांबणीवर टाकणे. **hold sb to sth** एखाद्याला (वचन) पाळायला लावणे. **hold sb/sth up** **(क)** एखादी व्यक्ती/वस्तू आदर्श म्हणून ठेवणे, नमुना म्हणून पुढे ठेवणे. **(ख)** उशीर करणे, खोळंबणे : *Our flight was held up by fog, धुक्यामुळे आमच्या उड्डाणास उशीर झाला.* **hold up sth** (बँक वगैरे) लुटणे. **'hold-up** *ना* [*गण*] १ रहदारीस वगैरे झालेला अडथळा, वाहतुकीची कोंडी, ट्रॅफिक जॅम. २ सशस्त्र दरोडा.

hold^2 /हउल्ड्/ *ना* १ [*अ.व*] धरण्याची कृती. २ [*गण*] कुस्तीतील वगैरे पकड. ३ [*गण*] उंच चढताना वगैरे धरायची गोष्ट. ४ [*अ.व*] सत्ता, प्रभाव, पकड. ५ (*वाक्प्र*) **catch, take, etc hold of sb/sth** एखादी व्यक्ती/वस्तू स्वतःच्या हातात धरणे. **get hold of sb/sth** (*अनौप*) **(क)** गवसणे आणि वापरणे, हाताला येणे. **(ख)** एखाद्याला शोधून काढणे, त्याच्याशी संपर्क साधणे.

hold^3 /हउल्ड्/ *ना* [*गण*] विमान किंवा जहाजातील सामान ठेवायची जागा.

holdall /'हउल्डॉऽल्/ *ना* [*गण*] प्रवासात वापरायची मोठी, मऊ, सामान भरायची पिशवी, वळकटी.

holder /'हउल्ड(र्)/ *ना* [*गण*] १ धारक : *ticket-~, प्रवेशिका धारक, तिकिट असणारा.* २ एखाद्या गोष्टीचा आधार, -दाणी, बैठक.

holding /'हउल्डिङ्/ *ना* [*गण*] मालकीचे काहीतरी, उदा जमीन.

hole /हउल्/ *ना* १ [*गण*] खळगा, भोक, विवर : *a ~ in the road/wall, रस्त्यातला खळगा/भिंतीतले भोक.* २ [*गण*] **(क)** छोट्या प्राण्याचे बीळ. **(ख)** (*ला अनौप*) छोटी कोंदट जागा, खड्डा. ३ [*अ.व*] (*व्रात्य*) संकट, अवघड परिस्थिती : *be in a ~, खड्ड्यात पडणे/संकटात सापडणे.* ४ [*गण*] गोल्फच्या खेळात चेंडू ज्यात घालायचे ते विवर किंवा भोक. ५ (*वाक्प्र*) **make a hole in sth** (*अनौप*) खूप पैसे खर्च होणे, खिशाला भोक पडणे, खिशाला गळती लागणे. **hole** *क्रि* १ [*सक*] भोक/छिद्र पाडणे, खळगा करणे. २ [*अक, सक*] (*out*)// (गोल्फमधे वगैरे) चेंडू भोकात मारणे. ३ (*क्रिब*) **hole up** (*व्रात्य*) बिळात जाणे, लपणे.

holiday /'हॉलडेइ/ *ना* १ [*गण*] (कामाला) सुट्टी, विश्रांतीचा दिवस. २ (*वाक्प्र*) **on**

'holiday सुट्टीवर. **holiday** *क्रि* [*अक*] सुट्टी घालवणे. **'holiday-maker** *ना* [*गण*] सुट्टीवर आलेला माणूस.

holiness /'हउलिनिस्/ *ना* [*अगण*] १ पावित्र्य. २ **His/Your Holiness** (पोपला वापरायचे नामाभिधान).

hollow /'हॉलउ/ *वि* १ पोकळी असलेला. २ आतल्या बाजूला वळलेला; खोल गेलेला, खप्पड, सुकलेला, ओढलेला : *~ cheeks, फुसके/खप्पड गाल.* ३ (ध्वनीबाबत) खोल विहिरीतून येणाऱ्या प्रतिध्वनिसारखा, पोकळ. ४ (*ला*) खोटा; प्रत्यक्षात नसलेला : *~ words/pleasures, पोकळ शब्द किंवा आश्वासने/खोटा आनंद.* **hollow** *ना* [*गण*] रुंद उथळ विवर, खळगा, खाच. **hollow** *क्रि* [*सक*] *(out)//* खळगा करणे, खोलगट आकार देणे : *~ out a tree trunk to make a boat, होडी करण्यासाठी झाडाच्या बुंध्यात खळगा करणे.*

holly /'हॉलि/ *ना* [*गण, अगण*] तांबडी फळे येणारे आणि अणकुचीदार पानांचे नेहमी हिरवे असणारे एक छोटे झाड.

holocaust /'हॉलकॉऽस्ट्/ *ना* [*गण*] मोठ्या प्रमाणावर मनुष्यहानी, नरसंहार, प्राणाहुती.

holster /'हउल्स्ट(र्)/ *ना* [*गण*] पिस्तुल ठेवण्याची कातडी पिशवी.

holy /'हउलि/ *वि* **(-ier, -iest)** १ देवविषयक, धर्मविषयक, ईश्वरी, धार्मिक. २ शुद्ध आणि चांगला, पवित्र : *live a ~ life, पवित्र जीवन जगणे.* **the Holy 'Spirit** (तसेच **the Holy 'Ghost**) *ना* [*अ.व*] (ख्रिस्ती धर्मामधे) पिता, पुत्र आणि आत्मा या देवाच्या तीन अंगांपैकी तिसरे अंग, पवित्र आत्मा.

homage /'हॉमिज्/ *ना* [*अगण*] (*औप*) भावपूर्ण किंवा आदरयुक्त वंदन, आदरांजली.

home^1 /हउम्/ *ना* १ [*गण, अगण*] घर, स्वगृह. २ [*गण*] वृद्धाश्रम किंवा बालकाश्रम. ३ [*गण*] प्राण्याचा निवारा, प्राणी किंवा वनस्पती यांचे वसतिस्थान. ४ [*अ.व*] एखाद्या गोष्टीचे उगम/मूळ स्थान, माहेर : *Greece is the ~ of democracy, ग्रीस ही लोकशाहीची जन्मभूमी आहे.* ५ [*अगण*] (स्पर्धा किंवा खेळामधे) भोज्या, शेवटचा बिंदू. ६ (*वाक्प्र*) **at home** (क) घरात, घरी. (ख) आरामशीर : *Make yourself at ~! आराम कर!* किंवा *घरी असल्यासारखा रहा!* **a ,home 'truth** एखाद्याबाबतची कटू पण सत्य गोष्ट. **the 'Home 'Counties** *ना* [*ब.व*] लंडनच्या भोवतालचे केन्ट, सरी यांसारखे परगणे. **,home eco'nomics** *ना* (अ.व क्रियापदासह) घरातील अन्न, आर्थिक तरतूद वगैरेचा विचार करणारे शास्त्र, गृह-अर्थशास्त्र. **,home-'grown** *वि* (अन्न वगैरे बाबत) देशी, गावरान. **,home 'help** *ना* [*गण*] घरकामात मदत करणारा माणूस. **'homeland** *ना* [*गण*] १ जन्मभूमी, मातृभूमी. २ [बहुधा *ब.व*] दक्षिण आफ्रिकेत कृष्णवर्णीयांसाठी राखून ठेवलेले निवासस्थान. **homeless** *वि* घर नसलेला, गृहहीन, बेघर. **,home-'made** *वि* घरी केलेला, घरगुती. **the 'Home Office** *ना* [*अ.व*] पोलीस, स्थलान्तरण वगैरे गोष्टी सांभाळणारे ब्रिटिश सरकारचे एक खाते, गृहखाते. **'homesick** *वि* घरापासून दूर असल्याने खिन्न झालेला, गृहविरहार्त. **'homesickness** *ना* [*अगण*] घरच्या आठवणीने येणारी उदासी. **homeward** *वि* घराकडे जाणारा. **homewards** *क्रिवि* घराकडे. **'homework** *ना* [*अगण*] १ (विद्यार्थ्याचा) गृहपाठ, घरचा अभ्यास. २ (*ला*) बैठक, चर्चा वगैरेसाठी केलेली तयारी.

home^2 /हउम्/ *वि* १ स्वतःच्या घराचा किंवा घराशी संबंधित, स्वगृह-. २ स्वदेशी, स्वजनी; परदेशी नाही असा : *~ news, स्वदेशविषयक बातम्या.* ३ (खेळ) आपल्या नेहमीच्या मैदानावर खेळलेला : *a ~ match, नेहमीच्या मैदानावरील मॅच.*

home^3 /हउम्/ *क्रिवि* १ घरी, घराकडे : *on her way ~, तिच्या घराकडे जाताना.* २ उद्देशित जागी : *drive a nail ~, हवा त्या ठिकाणी खिळा ठोकणे.* ३ (*वाक्प्र*) **bring sth/come 'home to sb** एखादी गोष्ट पूर्णपणे समजवून देणे/समजणे, पटवणे/पटणे. **home and 'dry** सुरक्षित आणि यशस्वी. **'homecoming** *ना* [*गण, अगण*] एखाद्याचे बराच काळ लांब राहिल्यानंतर घरी परतणे.

home^4 /हउम्/ *क्रि* (*क्रिब*) **home in (on**

sth) लक्ष्याच्या दिशेने बरोबर जाणे.

homely /'हउम्लि/ *वि* (-ier, -iest) १ (*पसंतीदर्शक* विशेषतः *ब्रि*) साधा, घरेलू, घरगुती. २ (*अमे अधिक्षेपी*) (एखाद्या व्यक्तीबाबत) दिसायला बेताचा, छाप. **homeliness** *ना* [*अगण*] साधेपणा, घरगुतीपणा.

homeopathy /,हउमि'ऑपथि/ *ना* [*अगण*] ज्या औषधाचा मोठा डोस दिल्यावर एखादा रोग होईल त्याच औषधाचा अगदी अल्प डोस देऊन तो रोग बरा करण्याची उपचार-पद्धती, समचिकित्सा पद्धती. **homeopathic** /,हउमिअ'पॅथिक्/ *वि* समचिकित्सा पद्धतीचा.

homicide /'हॉमिसाइड्/ *ना* [*अगण*] एका माणसाचा दुसऱ्या माणसाने केलेला खून, मनुष्यवध. **homicidal** /,हॉमि'साइड्ल्/ *वि* मनुष्यवधाची चटक लागलेला, रक्तपिपासू.

homing /'हउमिङ्/ *वि* १ (कबुतराबाबत) घराकडे परत येऊ शकणारे. २ (शस्त्राबाबत) लक्ष्याकडे नेणारी क्लृप्ती असलेले, लक्ष्यवेधी यंत्रणा असणारे.

homogeneous /,हॉम'जीनिअस्/ *वि* एकाच प्रकारच्या भागांनी बनलेला, एकजातीय, एकजिनसी, सजातीय, एकविध.

homogenized /ह'मॉजनाइझ्ड्/ *वि* (दुधाबाबत) मलई आणि दूध समप्रमाणात मिसळलेले.

homonym /'हॉमनिम्/ *ना* [*गण*] दुसऱ्या एखाद्या शब्दाप्रमाणे लेखन आणि उच्चारण असलेला पण अर्थामधे भिन्न असलेला शब्द, समरूप शब्द, भिन्नार्थदर्शक समोच्चारित शब्द – उदा *bank*^{1} आणि *bank*^{2}.

homosexual /,हॉम'सेक्शुअल्/ *ना* [*गण*], *वि* समलिंगी व्यक्तीचे आकर्षण असणारा (माणूस), समकाम, समलिंगी संभोगाची आवड असणारा (माणूस). **homosexuality** /,हॉमसेक्शु'ॲलटि/ *ना* [*अगण*] समलिंगी कामुकता, समलिंगरती.

honest /'ऑनिस्ट्/ *वि* १ (एखाद्या व्यक्तीबाबत) प्रामाणिक, नेक; स्वच्छ (मनाचा). २ स्पष्ट आणि खरा : *give an ~ opinion, स्पष्ट आणि खरे मत देणे.* **honestly** *क्रिवि* १ प्रामाणिकपणे, सचोटीने. २ (जोर देण्यासाठी वापर) खरोखर, देवाशपथ. **honesty** *ना* [*अगण*] प्रामाणिकपणा, सचोटी.

honey /'हनि/ *ना* १ [*अगण*] मधमाश्यांनी तयार कलेला गोड पदार्थ, मध. २ [*गण*] (*अनौप* विशेषतः *अमे*) (ज्याच्यावर खूप प्रेम आहे किंवा जो खूप आवडतो त्याच्याशी बोलताना वापर) राजा, राणी. **honeycomb** /-कउम्/ *ना* [*गण, अगण*] मधमाश्यांचे पोळे, मधुकोश. **honeysuckle** /-सक्ल्/ *ना* [*अगण*] गोड वासाची फुले येणारी एक वेल.

honeymoon /'हनिमून्/ *ना* [*गण*] १ नवविवाहित दांपत्याचा मौजमजेचा काळ, मधुचन्द्र. २ (*ला*) नवीन नोकरी वगैरेचा सुरुवातीचा सुखाचा काळ. **honeymoon** *क्रि* [*अक*] मधुचन्द्राला जाणे.

honk /हॉङ्क्/ *क्रि* [*अक*] *ना* [*गण*] मोटारचा पोंगा (वाजवणे), हॉर्न (देणे).

honorary /'ऑनररि; *अमे* -रेरि/ *वि* १ (पदवी किंवा श्रेणीबाबत) सन्मानार्थ दिलेली, बहुमानदर्शक. २ (नोकरीबाबत) बिनपगारी, मानद, सन्माननीय, मानसेवी : *~ president, मानसेवी अध्यक्ष.*

honour (*अमे* **-or**) /'ऑन(र्)/ *ना* १ [*अगण, अे.व*] मान, सन्मान : *a great ~ to be invited, आमंत्रित केल्याचा बहुमान.* २ [*अगण*] सत्त्व, लाज, प्रतिष्ठा : *a man of ~, प्रतिष्ठीत माणूस.* ३ [*अगण*] लोकमान्यता, सार्वजनिक आदर. ४ [*अे.व*] मान वाढविणारी व्यक्ती किंवा वस्तू : *You are an ~ to your school, तू तुझ्या शाळेचा मान वाढविलास.* ५ **honours** [*ब.व*] विद्यापीठीय विशेष पदवी अभ्यासक्रम; यात मिळालेली वरची श्रेणी. ६ **your/his/her Honour** [*अे.व*] (न्यायमूर्तींना लावायचे बिरूद). **honour** *क्रि* [*सक*] १ मानसन्मान करणे, आदर करणे. २ (शब्द) पाळणे.

honourable (*अमे* **-nor-**) /'ऑनरब्ल्/ *वि* १ माननीय किंवा सन्मानदर्शक. २ **the Honourable** (काही वरीष्ठ अधिकाऱ्यांसाठी वापरायचे नामाभिधान). **honourably** *क्रिवि* सन्मानाने, आदराने.

hood /हुड्/ *ना* [*गण*] १ कोटाला असलेली (अंगची) डोक्याची टोपी, टोपडे. २ बाबागाडी, मोटार वगैरेवरचे घडीचे छप्पर. ३ (*अमे*)

गाडीच्या इंजिनवरचे आवरण, बॉनेट. **hooded** *वि* (अंगची) टोपी असलेला.

hoodwink /'हुड्विङ्क्/ *क्रि* [*सक*] फसवणे, टोपी घालणे, बनवणे.

hoof /हूफ्/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s** किंवा **hooves** /हूव्ह्झ्/) (प्राण्याच्या पायाचा) खूर.

hook /हुक्/ *ना* [*गण*] १ धातू किंवा प्लॅस्टिक वगैरेची काही पकडण्याकरता किंवा टांगण्याकरता वापरायची वक्राकार वस्तू, आकडा, अंकुश. २ (मुष्टियुद्धात) कोपर वाकवून दिलेला लहानसा ठोसा. ३ (*वाक्प्र*) **off the 'hook** (**क**) (टेलिफोन रिसीव्हरबाबत) टेलिफोनवर न ठेवलेला, काढून ठेवलेला. (**ख**) (*अनौप*) संकटातून किंवा कचाट्यातून सुटलेला : *let/get sb off the ~, एखाद्याला कचाट्यातून सुटू देणे/सोडवणे.* **hook** *क्रि* [*सक*] १ आकडी लावून पकडणे किंवा आकडीला अडकवणे. २ आकड्यासारखा आकार करणे : *~ one's foot round sth, एखादी वस्तू पाऊल वाकवून पकडणे.* **hooked** *वि* १ आकडीच्या आकाराचा. २ (*वाक्प्र*) **be hooked on sth** (मादक पदार्थ वगैरेच्या) आधीन जाणे/होणे, आहारी जाणे.

hooligan /'हूलिगन्/ *ना* [*गण*] दंगामस्ती करणारा तरुण, मवाली, गुंड. **hooliganism** *ना* [*अगण*] दंगामस्ती, मोडतोड, पुंडाई.

hoop /हूप्/ *ना* [*गण*] धातूचे किंवा लाकडाचे कडे, चक्र.

hooray = HURRAH.

hoot /हूट्/ *ना* [*गण*] १ घुबडाचे ओरडणे, घुघू करणे. २ मोटारीच्या कर्ण्याचा आवाज, पॉम्पॉम्. ३ निषेधाची घोषणा, आरडाओरडा. ४ (*वाक्प्र*) **not care/give a hoot/two hoots** (*अनौप*) पत्रास न ठेवणे, फिकीर न करणे. **hoot** *क्रि* १ [*अक*] घुघू करणे. २ [*सक*] मोटारचा हॉर्न वाजवणे. **hooter** *ना* [*गण*] (खास करून *ब्रि*) शिंग, भोंगा वगैरे.

Hoover /'हूव्ह(र्)/ *ना* [*गण*] (*मालक*) व्हॅक्यूम क्लीनर, केर काढायचे यंत्र. **hoover** *क्रि* [*अक, सक*] व्हॅक्यूम क्लीनरने केर काढणे.

hooves HOOF चे *ब.व.*

hop^{1} /हॉप्/ *क्रि* (**-pp-**) [*अक*] १ (**क**) (माणसांबाबत) एका पायावर उडी मारणे, लंगडी घालणे. (**ख**) (जनावर किंवा पक्ष्याबाबत) सर्व पाय एकदम उचलून उडी मारणे, दुडक्या मारणे. २ (*अनौप*) भरभर किंवा सहजपणे हालचाल करणे, चटकन् जाणे, टुणकन् जाणे : *~ on a bus, बसमधे टुणकन् चढणे.* ३ (*वाक्प्र*) **hop it** (*ग्राम्य*) दूर जाणे, पळणे. **hop** *ना* [*गण*] १ लंगडी, छोटी उडी. २ (*अनौप*) विमानाच्या मोठ्या उड्डाणातील एक टप्पा.

hop^{2} /हॉप्/ *ना* [*गण*] बीअरला सुवास देण्यासाठी वापरायची एक वेल-वनस्पती.

hope /हउप्/ *ना* १ [*गण, अगण*] आशा, आकांक्षा. २ [*गण*] आशास्थान. ३ (*वाक्प्र*) **be beyond hope** आशेपलीकडचा असणे, आशा करणे व्यर्थ असणे. **hope** *क्रि* [*अक, सक*] आशा करणे, इच्छा धरणे, अपेक्षा बाळगणे : *I ~ (that) you win, तू जिंकावस अशी आशा करतो.* **'hopeful** *वि* आशा असलेला किंवा आशादायक. **hopefully** *क्रिवि* १ आशायुक्तपणे, आशेने. २ (एखादी गोष्ट घडावी अशी इच्छा व्यक्त करण्यास वापर) : *H~fully she'll be here soon, ती इथे लवकरच यावी अशी आशा आहे/असं वाटतंय्.* **hopeless** *वि* १ आशा नसलेला, आशा न करण्याजोगा, निराश. २ (*at*)// (*अनौप*) काही न येणारा, ढम्म् : *~less at maths, गणितात ढम्म्.* **hopelessly** *क्रिवि* निराशेने. **hopelessness** *ना* [*अगण*] निराशा.

horde /हॉऽड्/ *ना* [*गण*] जथा, झुंड : *~s of football fans, फुटबॉल चाहत्यांच्या झुंडी.*

horizon /ह'राइझ्न्/ *ना* १ **the horizon** [*अे.व*] भूमी आणि आकाश जिथे मिळतात असे वाटते ती रेषा, क्षितिज. २ [*गण*] (*ला*) ज्ञान, अनुभव वगैरेची मर्यादा किंवा सीमा : *Travel broadens one's ~s, प्रवासाने ज्ञानाची क्षितिजे विस्तारतात.*

horizontal /ˌहॉरि'झ़ॉन्ट्ल्; *अमे* ˌहॉऽर्-/ *वि* सपाट, समतल, क्षितिजसमांतर. **horizontal** *ना* [*अे.व*] आडवी रेषा किंवा आडवी स्थिती. **horizontally** /-टलि/ *क्रिवि* आडवा.

hormone /'हॉऽमउन्/ *ना* [*गण*] शरीरात निर्माण होणारे आणि शरीराची वाढ करणारे

द्रव्य, प्रवर्तक, संप्रेरक.

horn /हॉऽन्/ *ना* १ (**क**) [*गण*] प्राण्याच्या डोक्यावरचे शिंग, शृंग. (**ख**) [*अगण*] शिंग ज्या पासून बनते ते द्रव्य. २ [*गण*] वाजवायचे शिंग: *a French* '~, *फ्रेंच शिंग.* ३ [*गण*] गाडीचे वाजवायचे शिंग, भोंगा. **horny** *वि* (**-ier, -iest**) १ शिंगासारखा किंवा शिंगाचा. २ (*व्रात्य*) लैंगिक दृष्ट्या उद्दीपित, सरकलेला, उठलेला.

hornet /'हॉऽनिट्/ *ना* [*गण*] मोठी गांधीलमाशी.

horoscope /'हॉरस्कउप्; *अमे* 'हॉऽर्-/ *ना* [*गण*] एखाद्या व्यक्तीच्या जन्माच्या वेळी ग्रहताऱ्यांच्या स्थितीवर आधारित केलेले भविष्य, जन्मकुंडली.

horrendous /हॉ'रेन्डस्/ *वि* विचित्र आणि धक्कादायक: ~ *colours/clothes, चित्रविचित्र रंग/कपडे.*

horrible /'हॉरब्ल्; *अमे* 'हॉऽर्-/ *वि* १ भयानक, भयाण: *a ~ crime, भीषण गुन्हा.* २ (*अनौप*) फार वाईट: ~ *weather, फार वाईट हवा.* **horribly** *क्रिवि* भीषणपणे; वाईट.

horrid /'हॉरिड्; *अमे* 'हॉऽरिड्/ *वि* (*अनौप*) फार वाईट; खद्रूड.

horrific /ह'रिफिक्/ *वि* भयानक, अंगावर काटा आणणारा. **horrifically** *क्रिवि* भयानकपणे.

horrify /'हॉरिफाइ; *अमे* 'हॉऽर्-/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] भेदरवून टाकणे, धडकी भरवणे: *horrified by his death, त्याच्या मृत्यूने भेदरलेला.*

horror /'हॉर(र्); *अमे* 'हॉऽर्-/ *ना* १ [*गण, अगण*] भीती, भय (किंवा ते निर्माण करणारे काहीतरी). २ [*गण*] (*अनौप*) खोडकर, खट्याळ मुलगा, द्वाड पोर. **horror** *वि* भयप्रद, भयपूर्ण: *a ~ story/film, भयकथा/भयपट.* **'horror-stricken** (तसेच **-struck**) *वि* भेदरलेला, भीतीने गाळण उडालेला, भयग्रस्त.

hors-d'oeuvre /,ऑऽ'डऽव्ह्र; *अमे* -'डऽव्ह्/ *ना* [*गण*] जेवणाच्या आरंभी दिलेले पदार्थ, भोजनपूर्व खाद्य.

horse /हॉऽस्/ *ना* [*गण*] १ घोडा, अश्व. २ = VAULTING HORSE (VAULT^{2}). ३ (*वाक्प्र*) **(straight) from the horse's 'mouth** (माहितीबाबत) थेट संबंधित व्यक्तीकडून. **horse** *क्रि* (*क्रिब*) **horse about/around** (*अनौप*) गडबड करत किंवा धांदलीने वागणे, धांदरटपणा करणे. **'horseplay** *ना* [*अगण*] धमाल करणारी मौज किंवा तसा खेळ, आरडाओरडीचा किंवा धुडगुस घालणारा खेळ. **'horsepower** *ना* [*अगण*] इंजिनाची शक्ती मोजण्याचे एक परिमाण, अश्वशक्ती. **'horseshoe** *ना* [*गण*] घोड्याच्या पायाला ठोकायचा U आकाराचा नाल.

horseback /'हॉऽस्बॅक्/ *ना* (*वाक्प्र*) **on 'horseback** घोड्यावर, अश्वारूढ. **horseback** *क्रिवि, वि* (खास करून *अमे*) घोड्यावरून: ~ *riding, अश्वारोहण.*

horticulture /'हॉऽटिकल्च(र्)/ *ना* [*अगण*] भाजीपाला, फुलझाडे वाढविण्याचे शास्त्र, उद्यानविज्ञान. **horticultural** /,हॉऽटि'कल्चरल/ *वि* उद्यानविज्ञानविषयक.

hose^{1} ./हउझ्/ (तसेच **'hose-pipe**) *ना* [*गण, अगण*] बागेत किंवा आगीवर पाणी मारण्याची मोठी लवचिक नळी. **hose** *क्रि* [*सक*] (*down*)// लवचिक नळीने पाणी घालणे किंवा पाणी मारून धुणे.

hose^{2} /हउझ्/ *ना* [*ब.व*] पायमोजे, स्टॉकिंग्ज वगैरे.

hosiery /'हउझिअरि; *अमे* 'हउझ़रि/ *ना* [*अगण*] पायमोजे, स्टॉकिंग्ज वगैरे.

hospice /'हॉस्पिस्/ *ना* [*गण*] मरायला टेकलेल्या लोकांसाठीचे हॉस्पिटल.

hospitable /हॉ'स्पिटब्ल्, तसेच 'हॉस्पिटब्ल्/ *वि* १ (*to/towards*)// आतिथ्यशील, पाहुण्यांना या-बसा करणारा. २ (स्थानांबाबत) सुखकारक, मानवणारा. **hospitably** *क्रिवि* अगत्यपूर्वक, आतिथ्याने.

hospital /'हॉस्पिट्ल्/ *ना* [*गण*] रुग्णालय, इस्पितळ. **hospitalize** *क्रि* [*सक*] इस्पितळात दाखल करणे.

hospitality /,हॉस्पि'टॅलटि/ *ना* [*अगण*] आतिथ्य, अगत्य, पाहुणचार.

host^{1} /हउस्ट्/ *ना* [*गण*] १ यजमान, **घरधनी. २ आकाशवाणी किंवा दूरदर्शनवर कार्यक्रमात**

भाग घेणाऱ्यांची ओळख करून देणारी व्यक्ती, संचलन करणारा. **host** *क्रि* [*सक*] यजमानपद स्वीकारणे, आतिथ्य करणे; कार्यक्रमाचे संचलन करणे.

host^{2} /हउस्ट्/ *ना* [*गण*] मोठी संख्या, समुदाय : *a ~ of different reasons, वेगवेगळी चिकार कारणे.*

hostage /'हॉस्टिज्/ *ना* [*गण*] आपल्या मागण्या पूर्ण न केल्यास इजा करण्याची अथवा ठार मारण्याची धमकी देऊन एखाद्याने कैद केलेली व्यक्ती, ओलीस (ठेवलेली व्यक्ती).

hostel /'हॉस्ट्ल्/ *ना* [*गण*] विद्यार्थ्यांचे किंवा निवासहीन लोकांचे वसतिगृह.

hostess /'हउस्टिस्/ *ना* [*गण*] १ यजमानीण, घरधनीण, कारभारीण. २ नाईट-क्लबमधे येणाऱ्यांचे स्वागत आणि त्यांची देखभाल करणारी सेविका.

hostile /'हॉस्टाइल्; *अमे* -ट्ल्/ *वि* (*to/ towards*)// १ प्रतिकूल, शत्रुत्व भावाचा. २ शत्रूचा : *~ aircraft, शत्रूचे वायुवाहन/विमान.*

hostility /हॉ'स्टिलटि/ *ना* १ [*अगण*] शत्रुत्व, वाकडेपणा. २ **hostilities** [*ब.व*] युद्ध, युद्धप्रसंग.

hot /हॉट्/ *वि* (**~ter, ~test**) १ गरम, उष्ण, तप्त, कढत. २ तिखट, जहाल, झणझणीत : *~ spices/curry, तिखट मसाला/कढी किंवा रस्सा.* ३ तापट, रागिट : *He has a ~ temper, त्याचा स्वभाव तापट आहे.* ४ (बातमीबाबत) ताजी, अगदी अलिकडची. ५ (*वाक्प्र*) **be in/get into hot 'water** (*अनौप*) संकटात सापडणे, अडचणीत येणे, गोत्यात येणे. **hot 'air** (*अनौप*) शुष्क बडबड, तोंडची वाफ (सोडणे). **(be) hot on sb's 'heels/'tracks/'trail** एखाद्याच्या मागावर/ पाळतीवर असणे. **not so 'hot** (*अनौप*) तितकेसे चांगले नसणे. **hot** (*क्रि*) (**-tt-**) (*क्रिब*) **hot up** (*अनौप*) अधिक तीव्र किंवा उत्कंठित होणे, रंगात येणे. **,hot-'blooded** *वि* भडकू, चटकन् रागावणारा, तापट, जमदग्नी; उसळत्या रक्ताचा, उत्साही. **,hot 'dog** *ना* [*गण*] पावात गुंडाळलेले डुकराचे किंवा गाईचे मांस. **,hot'foot** *क्रिवि* धावत, तात्काळ, लगबगीने. **'hothead** *ना* [*गण*] विचार न करता घाईने वागणारा माणूस, उतावीळ माणूस, भडक डोक्याचा माणूस. **,hot-'headed** *वि* उतावीळ, भडक डोक्याचा. **'hothouse** *ना* [*गण*] झाडे वाढविण्यासाठीचे उबदार हवेचे काचगृह. **'hot line** *ना* [*गण*] दोन शासनप्रमुखांतील प्रत्यक्ष/ थेट दूरध्वनियंत्रणा. **hotly** *क्रिवि* १ जोरदारपणे, ठामपणे, भावनावेगाने. २ पाठोपाठ : *~ly pursued, पाठोपाठ मागावर आलेला.* **,hot-'tempered** *वि* चटकन् रागावणारा, तापट, तिरसट.

hotel /हउ'टेल्/ *ना* [*गण*] प्रवाशांची निवास-भोजनाची सुविधा असलेली इमारत, भोजनवसतिगृह. **hotelier** /-लिअ(र्), -लिअेइ; *अमे* ,हउटेल्'येइ/ *ना* [*गण*] हॉटेल मालक किंवा हॉटेल व्यवस्थापक.

hound /हाउन्ड्/ *ना* [*गण*] पाठलाग करणारा शिकारी कुत्रा. **hound** *क्रि* [*सक*] पाठीमागे लागणे, त्रास देणे, पिच्छा करणे : *~ed by newspaper reporters, वर्तमानपत्रांचे बातमीदार पाठीमागे लागलेला.*

hour /'आउ(र्)/ *ना* १ [*गण*] ६० मिनिटांचा काळ, तास. २ [*गण*] घड्याळात वाजलेला पूर्ण तास – १, २, ३ असा : *Trains leave on the ~, पूर्ण तासाला गाड्या सुटतात.* ३ **hours** [*ब.व*] कामाचे वगैरे ठरलेले तास, ठरलेला वेळ : *Office ~s are from 9 am to 5 pm, सकाळी ९ ते संध्याकाळी ५ अशी कचेरीची वेळ आहे.* ४ [*गण, बहुधा अे.व*] तासभरा इतका अवधी : *a long lunch ~, जेवणाची मोठी तासभराची सुट्टी.* ५ [*गण*] एका तासात काटले जाणारे अंतर : *London is only two ~s away, लंडन फक्त दोन तासांच्या अंतरावर आहे.* ६ (*वाक्प्र*) **at the e,leventh 'hour** अगदी आयत्या वेळी, ऐनवेळी.

hourly /'आउअलि/ *क्रिवि* १ दर तासाला, तासागणिक. २ [*गण*] तासावर, तासानुसार : *be paid ~, तासानुसार मजुरी मिळणे.* **hourly** *वि* १ दर तासाला असणारा : *an ~ bus service, दर तासाला गाडी असणे.* २ तासाने मोजलेला.

house^{1} /हाउस्/ *ना* [*गण*] (*ब.व* ~s /'हाउझ़िज़्/) १ **(क)** राहण्याचे घर, निवासस्थल. **(ख)** [बहुधा *अे.व*] घरातली

माणसं : *Be quiet or you'll wake the whole ~! आवाज नको करू नाहीतर घरातली सर्व माणसं उठतील!* २ विशिष्ट कारणासाठी बांधलेली इमारत : *an 'opera ~, समूहनृत्यगृह* ○ *a 'hen-~,* कोंबडीचे घर/खुराडे. ३ स्पर्धांसाठी केलेले शाळेतील मुलांचे विभाग किंवा गट, पथक. ४ (बहुधा **House**) कायदे-कानून करणारे लोक (किंवा ती जागा), गृह : *the 'H~s of 'Parliament,* संसदेची (दोन्ही) गृहे ○ *the 'H~ of ,Repre'senta-tives, प्रतिनिधीगृह, लोकसभा.* ५ उद्योगगृह : *a publishing ~, प्रकाशनगृह.* ६ (बहुधा **House**) महत्त्वाचे, विशेषतः राज घराणे. ७ [बहुधा *अे.व*] थिएटर वगैरेमधले प्रेक्षक : *a full ~, भरलेले सभागृह म्हणजे एकही खुर्ची रिकामी नसलेले थिएटर.* ८ (*वाक्प्र*) **bring the 'house down** (*अनौप*) प्रेक्षागृह दणाणून सोडणे, प्रेक्षकांना हसायला किंवा जोरात टाळ्या वाजवायला लावणे. **on the 'house** हॉटेल मालक, कंपनी वगैरेच्या तर्फे म्हणजे त्यांनी पदार्थाचे पैसे भरलेले. **'house-bound** *वि* घराबाहेर पडू न शकणारा. **'housebreaking** *ना* [*अगण*] घरफोडी, घरात बळेच घुसणे. **'housekeeper** *ना* [*गण*] घरकाम करणारी, घर सांभाळणारी व्यक्ती (विशेषतः स्त्री). **'housekeeping** *ना* [*अगण*] १ घरकाम, घराची देखरेख. २ घरखर्च. **'housemaster** (*स्त्री* **'housemistress**) *ना* [*गण*] शाळेतील विद्यार्थ्यांच्या एका पथकाचे शिक्षक किंवा शिक्षिका. **the House of Lords** (*ब्रि*) संसदेचा निवडून न आलेल्या म्हणजेच नियुक्त केलेल्या प्रतिनिधींचा विभाग, उमरावगृह, उमरावसभा. **'house-proud** *वि* स्वतःचे घर छान दिसावे याकडे खूप लक्ष देणारा. **'housewife** *ना* [*गण*] (*ब.व* **wives** /-वाइव्ह्ज़्/ गृहिणी. **'housework** *ना* [*अगण*] स्वयंपाकपाणी यासारखे घरकाम.

house^{2} /हाउझ़्/ *क्रि* [*सक*] घर किंवा जागा देणे, निवासाची सोय करणे.

household /'हाउस्हउल्ड्/ *ना* १ [*गण*] घरातील सर्व माणसं, कुटुंब. २ (*वाक्प्र*) **a ,household 'name/'word** सुपरिचित नाव, नेहमी वापरले जाणारे नाव.

housing /'हाउझ़िङ्/ *ना* १ [*अगण*] घरकुलांचा समूह, निवास. २ [*गण*] यंत्रावरचे सुरक्षिततेचे आवरण.

hove ➪ HEAVE.

hovel /'हॉव्ह्ल्; *अमे* 'हव्हल्/ *ना* [*गण*] (*अधिक्षेपी*) छोटे भिकार घर, झोपडे.

hover /'हॉव्ह(र्); *अमे* 'हव्हर्/ *क्रि* [*अक*] १ (पक्षी वगैरेबाबत) हवेत तरंगत राहणे, घिरट्या घालणे. २ (माणसाबाबत) वाट पाहत बसणे, ताटकळणे, घुटमळणे. **'hovercraft** *ना* [*गण*] (*ब.व* **hovercraft**) खालून सुटणाऱ्या हवेच्या दाबावर तरंगणारे जमिनीवरचे किंवा पाण्यावरचे वाहन.

how /हाउ/ *क्रिवि* १ (प्रश्नार्थ वाक्यात वापर) (क) कसा, कशाप्रकारे : *H~ is this word spelt? हा शब्द कसा लिहितात?* (ख) तब्बेतीने कसा : *H~ are you? कसा आहेस?* (ग) (वि किंवा क्रिवि यासह वापर) किती, केवढा : *H~ old is he? तो केवढा म्हणजे काय वयाचा आहे?* २ (उद्‌गारवाचक वाक्यात व्याप्ती दाखवण्यास वापर) : *H~ hot it is! किती गरम आहे हे!* **how** उ. *अव्यय* कशाप्रकारे, कसे : *He told me ~ to get to the station, स्टेशनला कसे जायचे ते त्याने मला सांगितले.*

however /हाउ'अेव्ह(र्)/ *क्रिवि* १ कितीही : *He'll never succeed, ~ hard he tries, कितीही प्रयत्न केले तरी त्याला कधीच यश मिळणार नाही.* २ (पूर्वनिर्दिष्ट किंवा पूर्वीच सांगितलेल्या गोष्टीचा टिप्पणी करताना वापर) असं असलं तरी, असं असूनही, तरीपण : *She felt ill; she went to work, ~, तिला बरं नव्हतं तरीपण ती कामावर गेली.* ३ (आश्चर्य व्यक्त करण्यासाठी प्रश्नार्थक वाक्यात वापर) कसा : *H~ did you get here without a car? गाडीशिवाय तू इथं कसा काय आलास बुवा?* **however** उ. *अव्यय* कसाही : *H~ I thought about the problem, I couldn't work out an answer, मी कसाही विचार केला तरी मला त्या प्रश्नाचे उत्तर सापडेना.*

howl /हाउल्/ *क्रि* [*अक*] *ना* [*गण*] बोंब (मारणे), आकांत (करणे).

HQ /,अेइच् 'क्यू/ *संरू* HEADQUARTERS.

hr *संरू* (*ब.व* **hrs**) HOUR.

HRH /,अेइच् आ(र्) 'अेइच्/ *संरू* His/Her

Royal Highness राजपुत्र/राजा किंवा राजकन्या/राणी यांच्या नावापूर्वी वापरायचे बिरुद.

hub /हॅब्/ *ना* [*गण*] १ चाकाचा तुंबा, मध्य. २ (*ला*) एखाद्या कार्याचा केन्द्रबिंदू. **'hub-cap** *ना* [*गण*] गाडीच्या चाकाच्या तुंबावरचे गोल धातूचे आवरण.

hubbub /'हॅबॅब्/ *ना* [*अे.व*] कोलाहल, कालवा, गलबला, गलका.

huddle /'हॅड्ल्/ *क्रि* १ [*अक, सक*] दाटी करणे, दाटीवाटीने जमणे. २ (*क्रिब*) **huddle up** अंगाचे मुटकुळे करणे – उदा थंडीमुळे. **huddle** *ना* [*गण*] एकगठ्ठा माणसं किंवा वस्तू.

hue¹ /ह्यू/ *ना* [*गण*] (*औप*) रंग(छटा), वर्ण.

hue² /ह्यू/ *ना* (*वाक्प्र*) **ˌhue and 'cry** लोकांचा आरडाओरडा, निषेध.

huff /हॅफ्/ *ना* [*अे.व*] घुस्सा, चीड, खप्पा मर्जी : *be in a ~, घुश्शात असणे.*

hug /हॅग्/ *क्रि* (**-gg-**) [*सक*] १ प्रेमाने मिठी मारणे, कवेत घेणे, आलिंगन देणे. २ खेटून जाणे : *The boat ~ged the shore, नौका किनाऱ्याला खेटून चालली होती.* **hug** *ना* [*गण*] मिठी, बाहुपाश, आलिंगन : *give sb a ~, एखाद्याला मिठीत घेणे.*

huge /ह्यूज्/ *वि* खूप मोठा, प्रचंड, अगडबंब, अवाढव्य. **hugely** *क्रिवि* खूप, प्रचंड प्रमाणात.

hulk /हॅल्क्/ *ना* [*गण*] १ जुने मोडके जहाज. २ अवाढव्य बेढब माणूस किंवा वस्तू. **hulking** *वि* अवाढव्य आणि बेढब, अजस्त्र आणि बोजड.

hull /हॅल्/ *ना* [*गण*] गलबताचा सांगाडा किंवा मुख्य भाग.

hullo = HALLO.

hum /हॅम्/ *क्रि* (**-mm-**) १ [*अक*] मधमाशीसारखे गूं गूं करणे, गुंजन करणे, घोंगावणे. २ [*अक, सक*] तोंड मिटून गुणगुणणे : *~ a tune, चाल गुणगुणणे.* ३ [*अक*] फार गडबड असणे, गजबजणे, धामधूम असणे. **hum** *ना* [*गण*] गुंजारव, घोघो आवाज.

human /'ह्यूमन्/ *वि* १ मानवी. २ माणुसकी/माणूसपणा असलेला; दयाळू, कनवाळू. **human** (तसेच **ˌhuman 'being**) *ना* [*गण*] माणूस, मानव, मनुष्य. **humanly** *क्रिवि* माणसाला शक्य तेवढे, मानवी मर्यादेत : *do all that is ~ly possible, माणसाला शक्य तेवढे सारे करणे.* **ˌhuman 'rights** *ना* [*ब.व*] स्वातंत्र्य, समता, न्याय हे माणसाचे मूलभूत हक्क, मानवी हक्क.

humane /ह्यू'मेइन्/ *वि* १ दयाळू, सदय, माणुसकीचा. २ कमीत कमी वेदनेचा : *~ killing of animals, प्राण्यांची विनावेदना हत्या.* **humanely** *क्रिवि* विनावेदना.

humanity /ह्यू'मॅनटि/ *ना* [*अगण*] १ मानवजात. २ मानवता.

humble /'हॅम्ब्ल्/ *वि* (**~r, ~st**) १ निरहंकारी, नम्र, लीन, विनयशील. २ कनिष्ठ श्रेणीचा, खालचा; क्षुल्लक, कमी महत्त्वाचा. ३ (वस्तूंबाबत) दिसायला साधारण, साधा : *my ~ home, माझे साधे घर.* **humble** *क्रि* [*सक*] जिरवणे, नक्षा उतरवणे. **humbly** *क्रिवि* नम्रपणे.

humdrum /'हॅम्ड्रॅम्/ *वि* नित्याचे म्हणून बेचव, कंटाळवाणा.

humid /'ह्यूमिड्/ *वि* (विशेषतः हवेबाबत) दमट, आर्द्र. **humidity** /ह्यू'मिडटि/ *ना* [*अगण*] हवेतील दमटपणा किंवा आर्द्रता (याचे प्रमाण).

humiliate /ह्यू'मिलि·अेइट्/ *क्रि* [*सक*] एखाद्याचा पाणउतारा करणे, मानभंग करणे. **humiliating** *वि* अपमानास्पद, शरमेचा : *a humiliating defeat, अपमानकारक किंवा मान खाली घालायला लावणारा पराभव.* **humiliation** /ह्यूˌमिलि'अेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] अपमान, मानभंग, मानहानी.

humility /ह्यू'मिलटि/ *ना* [*अगण*] नम्रता, विनम्रपणा, विनयशीलता.

humorist /'ह्यूमरिस्ट्/ *ना* [*गण*] विनोदकार, विनोदबुद्धीचा माणूस, विनोदी लेखक.

humorous /'ह्यूमरस्/ *वि* विनोदी; मौजेचा, गंमतीदार, थट्टेखोर. **humorously** *क्रिवि* विनोदाने; गमतीने, थट्टेखोरपणे.

humour (*अमे* **-or**) /'ह्यूम(र्)/ *ना* [*अगण*] विनोद (करण्याची किंवा समजण्याची क्षमता), विनोदवृत्ती, विनोद : *a sense of ~, विनोदबुद्धी.*

humour *क्रि* [*सक*] एखाद्याचे रंजन करणे, मन सांभाळणे, एखाद्याला खूष ठेवण्याकरता त्याच्या मनासारखे वागणे.

hump /हैम्प्/ *ना* [*गण*] प्राण्याच्या – विशेषतः उंटाच्या – पाठीवरचा पोक, वशिंड, मदार. **hump** *क्रि* [*सक*] (*अनौप*) कष्टाने (ओझे) वाहणे.

hunch /हैन्च्/ *ना* [*गण*] (*अनौप*) मनाने बांधलेली (विचारांवर आधारित नसलेली) अटकळ. **hunch** *क्रि* [*सक*] कुबड काढणे, पोक काढणे. **'hunchback** *ना* [*गण*] कुबड्या माणूस. **'hunchbacked** *वि* पाठीला कुबड असलेला.

hundred /'हैन्ड्रड्/ *सना, वि, ना* [*गण*] १००, शंभर, शत, शेकडा : *one, two, etc ~, शंभर, दोनशे वगैरे* ○ *~s of people, शेकडो लोक.* **hundredth** /-ड्थ्/ *सना, वि* शंभरावा, १०० वा. **hundredth** *सना, ना* [*गण*] $\frac{१}{१००}$, एक शतांश.

hundredweight /'हैन्ड्रड्वेइट्/ *ना* [*गण*] (*ब.व* **hundredweight**) वजनाचे एक परिमाण, एक टनाचा २० वा भाग (म्हणजे ५०.८ किलोग्रॅम).

hung HANG¹ चा *भूत, भूत वि.*

hunger /'हैङ्ग(र्)/ *ना* १ [*अगण*] भूक, क्षुधा. २ [*अे.व*] *for//* (*ला*) प्रबळ इच्छा. **hunger** *क्रि* (*क्रिब*) **hunger for/after sth** एखाद्या गोष्टीची भूक लागणे, तीव्र इच्छा होणे. **'hunger strike** *ना* [*गण*] निषेध व्यक्त करण्याकरता अन्न घेण्यास नकार देणे, उपोषण.

hungry /'हैङ्ग्रि/ *वि* (**-ier, -iest**) भुकेला. **hungrily** *क्रिवि* भुकेने व्याकूळ होऊन.

hunk /हैङ्क्/ *ना* [*गण*] मोठा कापलेला तुकडा : *a ~ of bread, पावाचा मोठा तुकडा.*

hunt /हैन्ट्/ *क्रि* [*अक, सक*] १ जंगली प्राण्यांची अन्नासाठी किंवा खेळ म्हणून शिकार करणे. २ (*for*)*//* एखाद्या गोष्टीचा कसून शोध घेणे. ३ (*क्रिब*) **hunt sb down** एखाद्याला शोधून काढणे. **hunt** *ना* १ [*अे.व*] शिकार, मृगया. २ [*गण*] कोल्ह्यांची शिकार करणाऱ्या लोकांचा गट. **hunter** *ना* [*गण*] शिकारी.

hurdle /'हऽड्ल्/ *ना* [*गण*] १ शर्यतीत पार करायचा अडथळा. २ (*ला*) मात करायची अडचण, अडथळा, धोंड.

hurl /हऽल्/ *क्रि* [*सक*] जोराने फेकणे : (*ला*) *~ insults at sb, टोमणे मारणे* किंवा *उपमर्द करणे.*

hurly-burly /'हऽलिबऽलि/ *ना* [*अे.व*] धामधूम, धडाका, गोंधळ.

hurrah /हु'रा/ (तसेच **hurray, hooray** /हु'रेइ/) *उद्वा, ना* [*गण*] (आनंद, पसंती वगैरे व्यक्त करण्यासाठी वापर) हय्ऽ.

hurricane /'हैरिकन्; *अमे* -केइन्/ *ना* [*गण*] वादळ, तुफान, झंझावात.

hurry /'हरि/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) १ [*अक, सक*] एखाद्याला एखाद्या गोष्टीची घाई करणे. २ (*क्रिब*) **hurry (sb) up** एखाद्याच्या पाठीमागे घाई करणे, एखाद्याला जल्दी करायला लावणे : *H~ up! It's late, आटप लवकर! उशीर झालाय्.* **hurried** *वि* घाईने केलेला. **hurriedly** *क्रिवि* घाईघाईने, त्वरेने. **hurry** *ना* १ [*अगण*] त्वरा, घाई. २ (*वाक्प्र*) **in a 'hurry** (क) घाईघाईने, भरभर. (ख) उत्सुक.

hurt /हऽट्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **hurt**) १ [*अक, सक*] दुखापत करणे, इजा होणे/करणे : *He ~ himself, त्याने स्वतःलाच दुखापत केली* ○ *I ~ my hand, माझ्या हाताला इजा झाली.* २ [*सक*] मन दुखावणे. ३ [*सक*] (एखाद्याचे) नुकसान होणे/करणे : *It wouldn't ~ (you) to say sorry, चुकलो म्हटल्याने तुझं काही नुकसान होणार नाही.* **hurtful** *वि* दुखावणारा. **hurtfully** *क्रिवि* दुखावण्यासारखा.

hurtle /'हऽट्ल्/ *क्रि* [*अक*] धोकादायक रीतीने जोराने जाणे, बेफाम जाणे.

husband /'हैझ्बन्ड्/ *ना* [*गण*] नवरा, पती.

hush /हैश्/ *क्रि* १ [*अक, सक*] गप्प होणे/बसवणे, चूप बसवणे. २ (*क्रिब*) **hush sth up** एखादी गोष्ट गुप्त ठेवणे, दडपणे, दाबून टाकणे. **hush** *ना* [*अगण, अे.व*] शांतता, स्तब्धता.

husk /हैस्क्/ *ना* [*गण*] धान्यावरचे टरफल, फोलकट. **husk** *क्रि* [*सक*] टरफल काढणे, साफ करणे.

husky¹ /'हैस्कि/ *वि* (**-ier, -iest**) (आवाजाबाबत) कोरडा आणि जाड, घोगरा, कर्कश.

huskily *क्रिवि* कर्कशपणे, घोगऱ्या आवाजात.

husky^{2} /'हस्कि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) बर्फावर घसरगाडी ओढणारा कुत्रा.

hustle /'हस्ल्/ *क्रि* [*सक*] १ ढकलणे, ओढून काढणे, धक्काबुक्की करणे, गचांडी देणे. २ (*into*)// एखाद्याला घाई करायला लावणे : ~ *sb into a decision,* *एखाद्याला घाईने निर्णय घ्यायला लावणे.* **hustle** *ना* [*अगण*] गडबड, गजबजलेपण. **hustler** /'हस्ल(र्)/ *ना* [*गण*] (*अमे व्रात्य*) वेश्या, बाजारबसवी.

hut /हट्/ *ना* [*गण*] झोपडी, खोपटे.

hutch /हच्/ *ना* [*गण*] सशांचा पिंजरा.

hyacinth /'हाइअसिन्थ्/ *ना* [*गण*] कंदापासून वाढणारे गोड वासाच्या फुलांचे एक झाड, गोमेद.

hyaena = HYENA.

hybrid /'हाइब्रिड्/ *ना* [*गण*] दोन जातींच्या संकरातून निर्माण झालेला प्राणी किंवा तशी वनस्पती, संकरित पैदास.

hydrant /'हाइड्रन्ट्/ *ना* [*गण*] पाण्याच्या मुख्य पाइपाला जोडलेला रस्त्यावरील पाईप.

hydraulic /हाइ'ड्रॉऽलिक्/ *वि* द्रवाच्या – विशेषतः पाण्याच्या – दाबावर चालणारा, द्रवचलित, जलचलित.

hydroelectric /,हाइड्रउ·इ'लेक्ट्रिक्/ *वि* जलशक्तीचा वीजनिर्मितीसाठी वापर करणारा, जलविद्युत्-.

hydrofoil /'हाइड्रफॉइल्/ *ना* [*गण*] दोन पंखांवर मुख्य भाग पाण्यावर तोलून धरणारी नौका.

hydrogen /'हाइड्रजन्/ *ना* [*अगण*] प्राणवायूशी संयोग होऊन पाणी निर्माण करणारा एक रंगहीन, हवेपेक्षा हलका असणारा वायू, उज्जनक वायू. **'hydrogen bomb** *ना* [*गण*] हायड्रोजनच्या अणूंतील केंद्रवर्ती भाग (= अणुगर्भ/केंद्रक) यांचा संयोग होताच मोठा स्फोट होणारा बॉम्ब.

hyena (तसेच **hyaena**) /हाइ'ईन/ *ना* [*गण*] खिंकाळी देणारा एक प्राणी, तरस.

hygiene /'हाइजीन्/ *ना* [*अगण*] निरोगी राहण्याकरता स्वतःला, आजूबाजूच्या परिसराला वगैरे स्वच्छ ठेवणे, आरोग्य, आरोग्यशास्त्र. **hygienic** /हाइ'जीनिक्; *अमे* -जि'अेन्-/ *वि* आरोग्यकारक; शुद्ध, स्वच्छ. **hygienically** *क्रिवि* आरोग्यदृष्ट्या.

hymn /हिम्/ *ना* [*गण*] देवाची प्रार्थना, स्तोत्र.

hyperactive /,हाइप(र्)'ॲक्टिव्ह्/ *वि* स्वस्थ न बसणारा, चुळबुळ्या; जिवाला विश्रांती नसलेला.

hypermarket /'हाइपमाकिट्/ *ना* [*गण*] (*ब्रि*) खूप मोठा बाजार.

hyphen /'हाइफ्न्/ *ना* [*गण*] शब्दाचे दोन अवयव किंवा दोन शब्द जोडताना वापरायचे (-) असे चिन्ह, जोडरेघ. **hyphenate** /'हाइफनेइट्/ *क्रि* [*सक*] जोडरेघेने जोडणे.

hypnosis /हिप्'नउसिस्/ *ना* [*अगण*] संमोहन अवस्था. **hypnotic** /हिप्'नॉटिक्/ *वि* संमोहक, निद्रावह, शायक. **hypnotism** /'हिप्नटिझ़म/ *ना* [*अगण*] संमोहन विद्या. **hypnotist** /'हिप्नटिस्ट्/ *ना* [*गण*] संमोहन करणारा माणूस. **hypnotize** /'हिप्नटाइझ़्/ *क्रि* [*सक*] एखाद्याला संमोहन अवस्थेत नेणे, संमोहित करणे.

hypochondriac /,हाइप'कॉन्ड्रिॲक्/ *ना* [*गण*] स्वतःच्या तब्बेतीची फाजील काळजी घेणारा, रोगभ्रमी, तब्बेतीला फार जपणारा.

hypocrisy /हि'पॉक्रसि/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) आपण आहोत त्याच्यापेक्षा जास्त चांगले असल्याचा आव आणणे, बतावणी, दंभ, ढोंग. **hypocrite** /'हिपक्रिट/ *ना* [*गण*] आव आणणारा माणूस, दांभिक किंवा ढोंगी माणूस. **hypocritical** /,हिप'क्रिटिक्ल्/ *वि* दांभिक, ढोंगी.

hypodermic /,हाइप'डऽमिक्/ *वि, ना* [*गण*] औषध टोचायची सुई (किंवा त्या सुईबाबतचा).

hypotenuse /हाइ'पॉटन्यूझ़्; *अमे* -टनूस्/ *ना* [*गण*] काटकोन त्रिकोणाची सर्वात मोठी बाजू, काटकोन त्रिकोणाचा कर्ण, अभिभुज.

hypothesis /हाइ'पॉथसिस्/ *ना* [*गण*] (*ब.व* **-theses** /-सीझ़्/ वास्तविकांची संभाव्य कारणमीमांसा करणारी कल्पना, गृहीतक, अभ्युपगम, अनुमानिक प्रतिज्ञा, प्रमेय, (अभ्युपगम) सिद्धान्त. **hypothetical** /,हाइप'थेटिक्ल्/ *वि* प्रतिज्ञात्मक, अनुमानिक,

गृहीत, सिद्ध न झालेले प्रमेय.

hysteria /हि'स्टिअरिअ/ *ना* [*अगण*] १ बेमान क्षोभ किंवा आवेश, उन्माद. २ भावनिक उद्रेकाचे मानसिक असंतुलन. **hysterical** /हि'स्टेरिक्ल्/ *वि* उन्माद आलेला, बेमान; (वेडाचे) झटके येणारा. **hysterics** /हि'स्टेरिक्स्/ *ना* [*ब.व*] उन्मादाचे झटके.

I i

I, i^{1} /आइ/ *ना* [*गण*] (*ब.व* **I's, i's** /आइझ्/) १ इंग्रजी वर्णमालेतील नववे अक्षर. २ एक या अंकासाठी रोमन अंक.

I^{2} /आइ/ *सना* (क्रियापदाचा कर्ता म्हणून वापर) बोलणारा किंवा लिहिणारा माणूस, मी.

ice^{1} /आइस्/ *ना* १ [*अगण*] गोठलेले पाणी, बर्फ, हिम. २ [*गण*] आइस्क्रीमचा भाग. ३ (*वाक्प्र*) **put sth on ice** (एखाद्या योजनेची वगैरे) कार्यवाही पुढे ढकलणे. **iceberg** /'आइस्बऽग्/ *ना* [*गण*] समुद्रात तरंगणारा बर्फाचा गड्डा, समुद्रातील हिमनग, हिमशैल. **'icebox** *ना* [*गण*] १ अन्न थंड ठेवण्यासाठीची बर्फाची पेटी. २ (विशेषतः *अमे*) फ्रीज्. **,ice-'cream** /विशेषतः *अमे* 'आइस्क्रीम्/ *ना* [*गण, अगण*] गोठवलेले रुचकर मलईदार मिश्रण. **'ice hockey** *ना* [*अगण*] रबरी जाड तबकडी आणि स्टिक्स् यांनी बर्फावर खेळायचा एक सांघिक खेळ. **,ice 'lolly** *ना* [*गण*] आइसफ्रूट. **'ice-skate** *ना* [*गण*] बर्फावरून घसरायचा पायाला धातूची पातळ पट्टी लावलेला बूट. **'ice-skate** *क्रि* [*अक*] असे बूट घालून बर्फावर घसरणे.

ice^{2} /आइस्/ *क्रि* १ [*सक*] खूप थंड करणे. २ पदार्थावर साखरेची पेस्ट घालणे. ३ (*क्रिब*) **ice (sth) over/up** बर्फ साचणे, बर्फ होणे किंवा साखरेची पेस्ट घालणे.

icicle /'आइसिक्ल्/ *ना* [*गण*] छपरावरून गळणारे पाणी जेव्हा वरच्यावर गोठते तेव्हा त्यापासून होणारा शंकूचा आकार, हिमकण, हिमलंब.

icing /'आइसिङ्/ *ना* [*गण*] पिठी साखर, वासाचे पदार्थ वगैरेचे केकवर घालायचे मिश्रण.

icy /'आइसि/ *वि* (**-ier, -iest**) १ अतिशीत, खूप थंड, बर्फासारखा. २ बर्फाच्छादित. ३ (*ला*) तुटक, कोरडा, थंड : *an ~ stare, थंड नजर.* **icily** *क्रिवि* बर्फासारखा, हिमवत्.

I'd /आइड्/ १ I had ⇨ HAVE. २ I would ⇨ WILL^{1}, WOULD^{1}.

idea /आइ'डिअ/ *ना* १ [*गण*] कल्पना, योजना, विचार : *That's a good ~! छान कल्पना आहे!* २ [*अगण, अे.व*] मनात रेखाटलेले चित्र, कल्पिलेले चित्र, कल्पना, प्रतिभास. ३ [*गण*] मत किंवा श्रद्धा, जे वाटते ते. ४ [*अगण, अे.व*] एखादी गोष्ट घडेल असे वाटणे किंवा एखाद्या गोष्टीची शक्यता वाटणे, संभाव्य गोष्टीची कल्पना : *I've an ~ it will rain, पाऊस पडेल असे मला वाटते* किंवा *पावसाची शक्यता मला दिसते.* ५ **the idea** [*अे.व*] ध्येय, हेतू. ६ (*वाक्प्र*) **get the i'dea** लक्षात येणे, समजणे. **have no i'dea** न कळणे, न उमगणे : *He has no ~ how to manage people, लोकांना कसं वागवायचं हे त्याला कळत नाही.* **not have the first idea about sth** एखाद्या गोष्टीची काहीही कल्पना नसणे, मुळीच कल्पना नसणे.

ideal /आइ'डिअल्/ *वि* १ निर्दोष, आदर्श : *~ weather, फार छान हवा.* २ कल्पनेतच आढळणारा, काल्पनिक, प्रतिभासित : *in an ~ world, काल्पनिक जगात.* **ideal** *ना* [*गण*] १ [बहुधा *अे.व*] आदर्श व्यक्ती किंवा वस्तू. २ [बहुधा *ब.व*] आदर्श वागणूक. **ideally** *क्रिवि* १ फार चांगल्या प्रकारे, आदर्श रीतीने : *~ly suited to the job, या नोकरीसाठी अगदी शंभर टक्के योग्य.* २ खरे पाहता, आदर्श परिस्थितीत.

idealist /आइ'डिअलिस्ट्/ *ना* [*गण*] (बहुधा असाध्य) ध्येय बाळगणारा आणि ती साध्य करण्याच्या प्रयत्नांत असणारा माणूस, ध्येयवादी माणूस. **idealism** *ना* [*अगण*] ध्येयवाद, आदर्शवाद, ध्येयासक्ती. **idealistic** /,आइडिअ'लिस्टिक्/ *वि* ध्येयवादी, आदर्शवादी.

idealize /आइ'डिअलाइझ्/ *क्रि* [*सक*] एखाद्याला आदर्श मानणे. **idealization** /आइ,डिअलाइ'झेइश्न्/ *ना* [*अगण, गण*] आदर्शीकरण.

identical /आइ'डेन्टिक्ल/ *वि* १ हुबेहुब, एकसारखा, अभिन्न, सरूप. २ (*to/with*)// अगदी एकसारखा दिसणारा : ~ *twins, एकसारखी दिसणारी जुळी मुले.* **identically** *क्रिवि* एकसारखेपणाने, सारख्याच पद्धतीने.

identify /आइ'डेन्टिफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) १ [*सक*] एखादी व्यक्ती किंवा वस्तू ओळखणे : *Can you ~ the man who attacked you? तुझ्यावर हल्ला करणाऱ्याला तू ओळखू शकशील?* २ (*क्रिब*) **identify (oneself) with sb/sth** संबंधित असणे. **identify with sb** दुसऱ्याला समजून घेणे, दुसऱ्याच्या भावनांशी एकरूप होणे. **identification** /आइ,डेन्टिफि'केइशन्/ *ना* [*अगण*] १ ओळखणे. २ ओळख पटविणारा पुरावा – उदा वाहनचालनाचा परवाना, पासपोर्ट वगैरे.

identity /आइ'डेन्टटि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*गण, अगण*] खरे रूप, ओळख : *the ~ of the thief, चोराची ओळख.* २ [*अगण*] सारखेपणा, समानता. ३ अस्मिता, स्वत्व.

ideology /,आइडि'ऑलजि/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) (राजकीय) मतप्रणाली, तत्त्वप्रणाली. **ideological** /,आइडिअ'लॉजिक्ल/ *वि* तत्त्वप्रणालीचा, तात्त्विक.

idiocy /'इडिअसि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] पराकोटीचा मूर्खपणा. २ [*गण*] मूर्खपणाने केलेले विधान, कृत्य वगैरे, गाढवपणा.

idiom /'इडिअम्/ *ना* [*गण*] सुट्यासुट्या शब्दांच्या अर्थापेक्षा भिन्न अर्थ असणारा शब्दबंध, वाक्प्रचार : *'Pull your socks up' is an ~ meaning 'improve your behaviour', 'Pull your socks up'* (म्हणजे वाच्यार्थाने मोजे वर ओढ) *हा वाक्प्रचार असून त्याचा अर्थ 'वागणुकीत सुधारणा कर' असा आहे.* **idiomatic** /,इडिअ'मॅटिक्/ *वि* सहज आणि योग्य (अशी भाषा), सहजसोपी (भाषा).

idiosyncrasy /,इडिअ'सिङ्क्रसि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) व्यक्तीची खास स्वतःची अशी वागणूक, चमत्कारिकपणा, विक्षिप्त वर्तन. **idiosyncratic** /,इडिअसिङ्'क्रॅटिक्/ *वि* विक्षिप्त, चमत्कारिक, विचित्र.

idiot /'इडिअट्/ *ना* [*गण*] १ (*अनौप*) मूर्ख, वेडा, खुळा. २ (*जुना, अप्रचलित*) मनाने पंगू असणारा माणूस, मनोरुग्ण. **idiotic** /इडि'ऑटिक्/ *वि* वेडपट, खुळचट.

idle /'आइड्ल/ *वि* (**~r, ~st**) १ (क) रिकामा, काम न करणारा, रिकामटेकडा. (ख) वापरात नसलेला : *The machines are lying ~, यंत्रे वापरात नसल्याने पडून आहेत.* २ आळशी. ३ व्यर्थ, निष्फळ, फुकटचा : *~ gossip/promises, व्यर्थ बडबड/आश्वासने.* **idle** *क्रि* १ [*अक*] वेळ घालवणे, दवडणे. २ [*अक*] (इंजिनाबाबत) न्यूट्रल गिअरमधे हळूहळू जाणे. ३ (*क्रिब*) **idle sth away** (वेळ) वाया घालवणे. **idleness** *ना* [*अगण*] रिकामपण; आळशीपणा. **idly** *क्रिवि* आळशीपणाने.

idol /'आइड्ल/ *ना* [*गण*] १ देवाची दगडी, लाकडी वगैरे प्रतिमा, मूर्ती. २ खूप आदरणीय आणि प्रिय अशी व्यक्ती किंवा वस्तू, दैवत, कंठमणी. **idolize** /'आइडलाइझ्/ *क्रि* [*सक*] एखाद्याची दैवतासारखी पूजा करणे, देवपण देणे.

idyllic /इ'डिलिक्; *अमे* आइ'ड्-/ *वि* साधेसुंदर, सुखकर, निरागस, आनंदी.

ie /,आइ'ई/ *संरू* that is, म्हणजे : *They arrived on the next day, ie Monday, ते दुसरे दिवशी म्हणजे सोमवारी आले.*

if /इफ्/ *उ. अव्यय* १ जर : *She will help you if you ask her, जर तू विचारलंस तर ती तुला मदत करेल.* २ की : *Do you know if he's working today? तुला ठाऊक आहे का की तो आज काम करतोय् की नाही?* ३ जेव्हा : *If you mix yellow and blue, you get green, जेव्हा तुम्ही पिवळा आणि निळा मिसळता तेव्हा तुम्हाला हिरवा मिळतो.* ४ (भावदर्शक क्रियापद किंवा विशेषणानंतर वापर) : *I'm sorry if I'm disturbing you, तुला त्रास होत असेल तर मी दिलगीर आहे.* ५ जरी, असे असले तरी : *The hotel was good value, if a little expensive, जरा महागडे असले तरी हॉटेल चांगले होते.* ६ (*वाक्प्र*) **if ,I were 'you** (उपदेश करताना वापर) : *If I were you, I'd look for a new job, मी जर तुझ्या जागी असतो तर मी नवीन नोकरी शोधली असती.* **if 'only** (प्रबळ इच्छा व्यक्त करताना वापर) : *If only I were rich! मी श्रीमंत असायला हवं होतं.* **if** *ना*

[*गण*] १ अनिश्चितता : *if he wins, but it's a big if, जर तो जिंकता – पण हा जरच खूप मोठा आहे.* २ (*वाक्प्र*) **,ifs and 'buts** विलंबाची कारणे; अनिश्चितता.

igloo /'इग्लू/ *ना* [*गण*] (*ब.व* ~s) अेस्किमोचे बर्फाचे घर.

ignite /इग्'नाइट्/ *क्रि* [*अक, सक*] पेटणे/पेटवणे, प्रज्वलित होणे/करणे. **ignition** /इग्'निश्न्/ *ना* १ [*गण*] गाडी वगैरेचे इंजिन चालू करण्याचे विद्युत उपकरण. २ [*अगण*] प्रज्वलन, ज्वलन.

ignorant /'इग्नरन्ट्/ *वि* अज्ञानी, अडाणी. **ignorance** /-रन्स्/ *ना* [*अगण*] अज्ञान, अडाणीपणा. **ignorantly** *क्रिवि* अज्ञानाने, अडाणीपणाने, अजाणतेपणी.

ignore /इग्'नॉऽ(र्)/ *क्रि* [*सक*] दुर्लक्ष करणे, काणाडोळा करणे, लक्ष न देणे.

ill /इल्/ *वि* १ आजारी. २ वाईट, कु-, दुर्- : ~ *health/luck, वाईट तब्बेत/दुर्भाग्य.* ३ (*वाक्प्र*) **be taken ill** आजारी पडणे. **ill** *ना* (*औप*) १ [*अगण*] इजा, धोका; पाप, कुकर्म. २ [*गण, बहुधा ब.व*] अडचण, संकट, भोग. **ill** *क्रिवि* १ वाईट रीतीने : *an ,~-written 'book, वाईट रीतीने लिहिलेले पुस्तक.* २ अहितकारक रीतीने, बुरेपणाने : *think ~ of sb, एखाद्याचे वाईट चिंतणे.* ३ क्वचित् : *We can ~ afford the time, एवढा वेळ मिळणे आम्हाला कठीणच.* ४ (*वाक्प्र*) **,ill at 'ease** अस्वस्थ असलेला, सुखात नसलेला; भांबावलेला, गोंधळलेला. **,ill-ad'vised** *वि* वेडेपणाचा, अविचारी. **,ill-'bred** *वि* वळण नसलेला, अकुलीन. **,ill-'natured** *वि* वाईट स्वभावाचा, दुष्ट, चिडखोर. **,ill-'treat** *क्रि* [*सक*] वाईट वागवणे, छळ करणे. **,ill-'treatment** *ना* [*अगण*] वाईट वागणूक, छळ. **,ill 'will** *ना* [*अगण*] दुष्ट इच्छा, दुरेच्छा.

I'll /आइल्/ I will ➪ WILL^{1}.

illegal /इ'लीग्ल्/ *वि* बेकायदेशीर; अवैध. **illegality** /,इलि'गॅलटि/ *ना* [*अगण, गण*] बेकायदेशीरपणा; अवैधता. **illegally** /-गलि/ *क्रिवि* बेकायदेशीरपणे.

illegible /इ'लेजबल्/ *वि* वाचता न येण्यासारखा, दुर्वाच्य.

illegitimate /,इलि'जिटिमट्/ *वि* १ अनौरस, विवाहबाह्य संबंधातून जन्मलेला. २ बेकायदेशीर. **illegitimately** *क्रिवि* अनौरसपणे; बेकायदेशीरपणे.

illicit /इ'लिसिट्/ *वि* बेकायदेशीर, निषिद्ध. **illicitly** *क्रिवि* बेकायदेशीरपणे.

illiterate /इ'लिटरट्/ *ना* [*गण*], *वि* लिहिता, वाचता न येणारा, निरक्षर (माणूस), अक्षरशत्रू. **illiteracy** /-रसि/ *ना* [*अगण*] निरक्षरता.

illness /'इल्निस्/ *ना* १ [*अगण*] आजारपण, रुग्णावस्था. २ [*गण*] एखादा विशिष्ट आजार किंवा रोग, दुखणे, व्याधी.

illogical /इ'लॉजिक्ल्/ *वि* तर्कदुष्ट; न पटणारा. **illogicality** /इ,लॉजि'कॅलटि/ *ना* [*गण, अगण*] अतार्किकता, तर्कदुष्टता. **illogically** *क्रिवि* तर्कदुष्टपणे.

illuminate /इ'लूमिनेइट्/ *क्रि* [*सक*] १ प्रकाशमान करणे, प्रकाशित करणे. २ विद्युत्रोषणाई करणे, दिव्यांची आरास करणे. ३ (विशेषतः पूर्वीच्या काळी) (पुस्तकावर) सोनेरी आणि भडक रंगाचे नक्षीकाम करणे. **illuminating** *वि* एखादी गोष्ट स्पष्ट करणारा, प्रकाश टाकणारा : *an illuminating lecture, सुस्पष्ट विवेचन करणारे व्याख्यान.* **illumination** /इ,लूमि'नेइश्न्/ *ना* १ [*अगण*] प्रकाशित करण्याची कृती, प्रकाशव्यवस्था. २ **illuminations** [*ब.व*] (*ब्रि*) शहराला सजवायला केलेली विद्युत्रोषणाई.

illusion /इ'लूझ्न्/ *ना* [*गण*] १ खोटी कल्पना, खोटा विश्वास. २ भ्रम, आभास, भास : *an optical ~, दृष्टिभ्रम.* **illusory** /इ'लूसरि/ *वि* भ्रमावर आधारलेला, भ्रामक, भासमय.

illustrate /'इलस्ट्रेइट्/ *क्रि* [*सक*] १ चित्रांनी सुशोभित करणे, चित्रे घालणे : ~ *a book, पुस्तकात चित्रे घालणे.* २ आकृत्या, उदाहरणे वगैरे देऊन स्पष्ट करणे. **illustration** /,इल'स्ट्रेइश्न्/ *ना* १ [*गण*] चित्र किंवा आकृती. २ [*गण*] उदाहरण. ३ [*अगण*] उदाहरण देणे. **illustrative** /'इलस्ट्रटिव्ह्; *अमे* इ'लस्-/ *वि* उदाहरणार्थी. **illustrator** *ना* [*गण*] पुस्तकातील वगैरे चित्रे काढणारा चित्रकार.

illustrious /इ'लस्ट्रिअस्/ *वि* प्रसिद्ध, ख्यातनाम, विख्यात. **illustriously** *क्रिवि* विख्यात रीतीने.

I'm /आइम्/ I am ➪ BE.

image /'इमिज्/ *ना* [*गण*] १ मनःचक्षूंपुढील चित्र, प्रतिमा. २ व्यक्ती, संस्था वगैरेचे लोकांच्या मनावर बिंबलेले चित्र. ३ कॅमेऱ्यातून दिसणारी किंवा आरशात दिसणारी प्रतिमा, छबी. ४ लाकूड, दगड वगैरेची मूर्ता. ५ (*वाक्प्र*) **be the (living/spitting) image of sb** (*अनौप*) एखाद्यासारखे हुबेहुब दिसणे, एखाद्याची सहीसही नक्कल. **imagery** *ना* [*अगण*] मनापुढे चित्र उभे राहील असा लाक्षणिक भाषेचा वापर, प्रतिमांचा वापर

imaginary /इ'मॅजिनरि; *अमे* -अनेरि/ *वि* काल्पनिक, कल्पित.

imagine /इ'मॅजिन्/ *क्रि* [*सक*] १ मनापुढे रेखाटणे, कल्पना करणे : *Can you ~ life without electricity? विजेशिवाय राहायची तू कल्पना करू शकतोस?* २ समजणे, अंदाज करणे, धरून चालणे : *I ~ he'll be there, तो तिथं असेल असा माझा अंदाज आहे.* **imaginable** *वि* कल्पनीय, कल्पना करण्याजोगा. **imagination** /इ,मॅजि'नेइश्न्/ *ना* १ [*अगण, गण*] कल्पनाशक्ती. २ [*अगण*] मनाचा खेळ. **imaginative** /इ'मॅजिनटिव्ह्; *अमे* -अनेइटिव्ह्/ *वि* कल्पनाप्रचूर, कल्पक.

imbalance /,इम्'बॅलन्स्/ *ना* [*गण*] समानता किंवा तोल असण्याचा अभाव, असमतोल.

imbecile /'इम्बसील्; *अमे* -स्ल्/ *ना* [*गण*] १ (*अनौप*) मूर्ख, निर्बुद्ध. २ (*जुना, अप्रचलित*) मनाने दुबळा असणारा माणूस. **imbecile** *वि* वेडसर; मूर्ख.

imbue /इम्'ब्यू/ *क्रि* [*सक*] *with*// (*औप*) एखाद्याला भारावून टाकणे, भावनेने व्याप्त करणे.

imitate /'इमिटेइद/ *क्रि* [*सक*] १ एखाद्याच्या वर्तनाचे अनुकरण करणे, नक्कल करणे. २ कृती, बोलणे वगैरेची नक्कल करणे. **imitative** /'इमिटटिव्ह्; *अमे* -टेइटिव्ह्/ *वि* अनुकरण करणारा. **imitator** *ना* [*गण*] नक्कल करणारा.

imitation /,इमि'टेइश्न्/ *ना* १ [*गण*] नक्कल, नकली वस्तू. २ [*अगण*] अनुकरण, नक्कल. **imitation** *वि* खरा नसलेला, नकली; कृत्रिम : ~ *jewels, नकली रत्ने.*

immaculate /इ'मॅक्युलट्/ *वि* स्वच्छ, निर्मळ, निष्कलंक; निर्दोष, परिपूर्ण **immaculately** *क्रिवि* निर्दोषपणे, नावे ठेवण्यास जागा नाही अशा रीतीने.

immaterial /,इम'टिअरिअल्/ *वि* (*to*)// १ क्षुल्लक, किरकोळ. २ अपार्थिव, अशरीरी.

immature /,इम'चुअ(र्); *अमे* -टुअर/ *वि* १ वागणुकीत अपरिपक्व, बालिश. २ अपक्व, कोवळा, पूर्ण वाढ न झालेला. **immaturity** *ना* [*अगण*] बालिशपणा, अपरिपक्वता; अपक्वता, कच्चेपणा.

immeasurable /इ'मेझरबल्/ *वि* मोजता न येण्याइतका मोठा, अपरिमित.

immediate /इ'मीडिअट्/ *वि* १ ताबडतोब/तात्काळ होणारा, त्वरित : *take ~ action, ताबडतोब कारवाई करणे.* २ जवळचा, नजिकचा : *in the ~ future, नजिकच्या भविष्यकाळात.*

immediately /इ'मीडिअट्लि/ *क्रिवि* १ ताबडतोब, तात्काळ, त्वरित, वेळ न घालवता. २ लगोलगचा, पाठोपाटचा; लगेच नंतरचा : *the years ~ after the war, युद्धानंतरची लगोलगची वर्षे.* **immediately** उ. *अव्यय* (विशेषतः *ब्रि*) -ताच; -तोच, लगेच, तत्क्षणी : *I recognized her ~ I saw her, तिला पाहताच मी तिला ओळखले.*

immense /इ'मेन्स्/ *वि* प्रचंड, मोठा, भरमसाट. **immensely** *क्रिवि* प्रचंड प्रमाणात, खूप, अतिशय : *I enjoyed the film ~ly, मला तो चित्रपट अतिशय आवडला.* **immensity** *ना* [*अगण*] अवाढव्यपणा, मोठा आकार.

immerse /इ'मऽस्/ *क्रि* [*सक*] १ (*in*)// (एखादी गोष्ट) द्रवात बुडवणे, तळाला सोडणे. २ **~ oneself (in)** एखाद्या गोष्टीत स्वतःला बुडवून टाकणे : *~ oneself in one's work, स्वतःला कामात बुडवून टाकणे* ○ *~d in thought, विचारात गढून गेलेला.* **immersion** /इ'मऽश्न्; *अमे* -झ्न्/ *ना* [*अगण*]

बुडवणे, पाण्यात वगैरे केलेले विसर्जन. **im'mersion heater** *ना* [*गण*] पाण्याच्या टाकीतला विद्युत्-तापक.

immigrant /'इमिग्रन्ट्/ *ना* [*गण*] स्थायिक होण्यासाठी दुसऱ्या देशात प्रवेश करणारा माणूस, आप्रवासी. **immigration** /,इमि'ग्रेइश्न्/ *ना* [*अगण*] एका देशातून दुसऱ्या देशात स्थायिक होण्याकरता केलेले स्थलान्तरण, आप्रवास, देशान्तर.

imminent /'इमिनन्ट्/ *वि* नजिकच्या काळात घडण्याची शक्यता असलेला, जवळ येऊन ठेपलेला, तोंडाशी आलेला, आसन्न. **imminently** *क्रिवि* तोंडाशी आला असा.

immobile /इ'मउबाइल्; *अमे* -ब्ल्/ *वि* अचल, जड; स्थिर. **immobility** /,इम'बिलटि/ *ना* [*अगण*] अचलपणा, जडता; स्थिरता. **immobilize** /इ'मउबलाइझ्/ *क्रि* [*सक*] हालचाल बंद करणे.

immoral /इ'मॉरल्; *अमे* इ'मॉऽरल्/ *वि* १ अनैतिक, दुराचारी; अयोग्य. २ चारित्र्यहीन, अनैतिक, व्यभिचारी. **immorality** /,इम'रॅलटि/ *ना* [*अगण*] अनैतिकता, दुराचार; व्यभिचार.

immortal /इ'मॉऽट्ल्/ *वि* १ अमर, चिरंजीव, अविनाशी. २ अविस्मरणीय, चिरंतन, चिरस्थायी. **immortal** *ना* [*गण*] अमर व्यक्ती/जीव, चिरस्थायी असे काही. **immortality** /,इमॉऽ'टॅलटि/ *ना* [*अगण*] अमरत्व; चिरस्थायीपणा. **immortalize** /-टलाइझ्/ *क्रि* [*सक*] अजरामर करणे; चिरस्थायी करणे : *~ized in a novel, कादंबरीत अजरामर केलेले.*

immune /इ'म्यून्/ *वि* १ (*to/against*)// प्रतिकारिक, प्रतिरोधक, रोगाला प्रतिकार करणारा : *~ to smallpox, देवीच्या रोगाची प्रतिकारशक्ती असणारा.* २ (*to*)// परिणाम न होणारा : *~ to criticism, टीकेचा परिणाम न होणारा.* ३ (*from*)// सूट मिळालेला, माफी मिळालेला, सुरक्षित : *~ from tax, करापासून बचावलेला.* **immunity** *ना* [*अगण*] रोगप्रतिकारशक्ती; अबाधितपणा; सूट, माफी. **immunize** /'इम्युनाइझ्/ *क्रि* [*सक*] (*against*)// उन्मुक्त करणे, प्रतिक्षम करणे, रोगापासून संरक्षित करणे, लस टोचणे. **immunization** /,इम्युनाइ'झेइश्न्; *अमे* -नि'झ्-/ *ना* [*अगण, गण*] लसीकरण, लस टोचणी.

imp /इम्प्/ *ना* [*गण*] १ लहान सैतान. २ गुंड/बदमाष/खट्याळ मूल.

impact /'इम्पॅक्ट्/ *ना* १ [*अगण*] एका वस्तूचे दुसऱ्या वस्तूवर आदळणे (किंवा त्याचा जोर), आघात, टक्कर : *The bomb exploded on ~, आपटताच बॉम्ब फुटला.* २ [*गण,* बहुधा *ए.व*] (*on*)// (एखाद्या गोष्टीचा) जोरदार परिणाम : *the ~ of computers on industry, संगणकांचा उद्योगधंद्यांवरील परिणाम.* **impact** /इम्'पॅक्ट्/ *क्रि* [*सक*] जोराने दाबून आत घालणे, गच्च बसवणे, घट्ट चेपणे.

impair /इम्'पेअ(र्)/ *क्रि* [*सक*] हानी पोहोचवणे, अपाय करणे; क्षीण करणे : *Loud noise can ~ your hearing, गोंगाटाने श्रवणशक्ती क्षीण होऊ शकते.*

impale /इम्'पेइल्/ *क्रि* [*सक*] (*on*)// टोकेरी वस्तूने टोचणे, खुपसणे : *~d on a spear, भाल्याच्या टोकावर घेतलेला.*

impart /इम्'पाट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) (माहिती वगैरे) देणे.

impartial /इम्'पाश्ल्/ *वि* न्याय्य; निःपक्षपाती, समदृष्टी : *A judge must be ~, न्यायाधीश निःपक्षपाती हवा.* **impartiality** /,इम्,पाशि'ॲलटि/ *ना* [*अगण*] न्यायनिष्ठुरता; निःपक्षपातीपणा.

impassable /इम्'पासब्ल्; *अमे* -पॅस्-/ *वि* (रस्ता वगैरेबाबत) प्रवास करणे अशक्य असा, दुर्गम, दुस्तर.

impassioned /इम्'पॅशन्ड्/ *वि* भावपूर्ण, भावनांनी ओथंबलेला : *an ~ appeal, भावपूर्ण आवाहन.*

impassive /इम्'पॅसिव्ह्/ *वि* भावनांचा लवलेशही नसलेला, निर्विकार, थंड. **impassively** *क्रिवि* थंडपणे, निर्विकारपणे.

impatient /इम्'पेइश्न्ट्/ *वि* १ अजिबात धीर नसलेला, अधीर, दम नसलेला. २ उतावीळ, उत्सुक : *~ to leave school, शाळा सोडायला कमालीचा उत्सुक.* **impatience** /इम्'पेइश्न्स्/ *ना* [*अगण*] अधीरपणा, असोशिकपणा, उतावळेपणा, उत्सुकता. **im-**

patiently *क्रिवि* अधीरतेने; उतावीळपणे, कमालीच्या उत्कंठेने.

impeccable /इम्'पेकब्ल्/ *वि* निर्दोष, दोषरहित. **impeccably** *क्रिवि* निर्दोषपणे, बोट ठेवायला जागा नाही अशा रीतीने.

impede /इम्'पीड्/ *क्रि* [*सक*] मार्गात आडवे येणे, अडथळा करणे, खोडा घालणे.

impediment /इम्'पेडिमन्ट्/ *ना* [*गण*] १ अडसर, अडथळा, मार्गातील धोंड. २ शारीरिक – विशेषतः बोलण्यातील – व्यंग.

impending /इम्'पेन्डिङ्/ *वि* जवळ येऊन ठेपलेले : ~ *disaster, तोंडाशी आलेले संकट.*

impenetrable /इम्'पेनिट्रब्ल्/ *वि* १ पार न करता येण्यासारखा, अभेद्य. २ समजण्यास अशक्य, अनाकलनीय.

imperative /इम्'पेरटिव्ह्/ *वि* अत्यावश्यक, अतिशय महत्त्वाचा किंवा निकडीचा. **imperative** *ना* [*गण*] (*व्याकरण*) आज्ञार्थ – उदा *Go! जा!* **imperatively** *क्रिवि* निकडीने.

imperfect /इम्'पऽफिक्ट्/ *वि* अपूर्ण, अपुरा. **imperfect** *ना* **the imperfect** [*अे.व*] (*व्याकरण*) भूतकाळातील क्रियेचे अपूर्णत्व दाखविणारा – उदा *was speaking, बोलत होता.* **imperfection** /,इम्प'फेक्श्न्/ *ना* १ [*अगण*] अपूर्णत्व, अपुरेपणा. २ [*गण*] दोष, न्यून. **imperfectly** *क्रिवि* अपुरेपणाने, अर्धेउणे.

imperial /इम्'पिअरिअल्/ *वि* साम्राज्याचा किंवा सम्राटाचा, बादशाही. **imperialism** *ना* [*अगण*] इतर राष्ट्रांवर राजकीय आणि आर्थिक वर्चस्व स्थापन करणारी राजकीय व्यवस्था, साम्राज्यवाद. **imperialist** *ना* [*गण*], *वि* साम्राज्यवादी. **imperially** *क्रिवि* साम्राज्यवादी पद्धतीने.

impersonal /इम्'पऽसन्ल्/ *वि* १ मानवी भावनांचा परिणाम न होणारा, यांत्रिक : *a large ~ organization, यंत्रवत् अशी मोठी संघटना.* २ व्यक्तिनिरपेक्ष, विशिष्ट व्यक्तीचा निर्देश न करणारा. **impersonally** *क्रिवि* व्यक्तिनिरपेक्षपणे.

impersonate /इम्'पऽसनेइट्/ *क्रि* [*सक*] आपण दुसरीच व्यक्ती आहोत असे भासवणे, एखाद्याचा तोतया होणे. **impersonation** /इम्,पऽस'नेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] तोतयेगिरी.

impertinent /इम्'पऽटिनन्ट्/ *वि* उद्धट, उद्दाम. **impertinence** /-नन्स्/ *ना* [*अगण, अे.व*] उद्धटपणा, बेअदबी, धिटाई. **impertinently** *क्रिवि* उद्धटपणे, असभ्यपणे.

impervious /इम्'पऽव्हिअस्/ *वि* (*to*)// १ पाणी वगैरे न जाऊ देणारा, अच्छेद्य, अभेद्य, अच्छिद्र. २ (*ला*) निर्विकार, कशाचाही परिणाम न होणारा : ~ *to criticism, टीकेचा परिणाम न होणारा.*

impetuous /इम्'पचुअस्/ *वि* विचार न करता घाईने वागणारा, उतावळा, आततायी.

impetus /'इम्पिटस्/ *ना* १ [*अगण, अे.व*] एखादी प्रक्रिया जलद घडविणारे असे काही, चालना, गती : *give a fresh ~ to trade, व्यापाराला नवीन चालना देणे.* २ [*अगण*] एखादी वस्तू गतिमान करणारी शक्ती, झपाटा, जोर.

impinge /इम्'पिन्ज्/ *क्रि* [*अक*] *on*// (*औप*) (एखाद्या गोष्टीवर) बंधनकारक असा परिणाम होणे.

implacable /इम्'प्लॅकब्ल्/ *वि* अशमनीय, शांत न होणारा, कट्टा, खंदा.

implant /इम्'प्लान्ट्; *अमे* -'प्लॅन्ट्/ *क्रि* [*सक*] (*in/into*)// एखाद्या गोष्टीत पक्के रुतवणे, रोपण करणे : ~ *ideas in sb's mind, एखाद्याच्या मनात कल्पना भरवणे/रोवणे.*

implement^1 /'इम्प्लिमेन्ट्/ *क्रि* [*सक*] (एखादी योजना, कल्पना वगैरे) प्रत्यक्षात आणणे, कार्यान्वित करणे. **implementation** /,इम्प्लिमेन्'टेइश्न्/ *ना* [*अगण*] कार्यान्वयन, कार्यवाही.

implement^2 /'इम्प्लिमन्ट्/ *ना* [*गण*] अवजार, हत्यार किंवा उपकरण.

implicate /'इम्प्लिकेइट्/ *क्रि* [*सक*] (*in*)// एखाद्याला एखाद्या गुन्ह्यात वगैरे गुंतवणे, गोवणे.

implication /,इम्प्लि'केइश्न्/ *ना* १ [*गण, अगण*] सूचितार्थ, गर्भितार्थ. २ [*अगण*] (गुन्ह्यात) गोवणे.

implicit /इम्'प्लिसिट्/ *वि* १ सुचवलेला पण

स्पष्ट न केलेला, सूचित, गर्भित, प्रच्छन्न. २ निःसंशय, निर्विवाद; पूर्ण : ~ *trust, पूर्ण विश्वास.* **implicitly** *क्रिवि* निर्विवादपणे, पूर्णतः.

implore /इम्'प्लॉऽ(र्)/ *क्रि* [*सक*] विनवणी करणे, हातापाया पडणे, मामापूता करणे : *They ~d her to stay, तिने राहावे म्हणून त्यांनी तिला कळकळीची विनंती केली.* **imploringly** *क्रिवि* विनवण्या करून, काकुळतीने.

imply /इम्'प्लाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] १ सूचित करणे, एखादी गोष्ट खरी आहे असे सुचवणे, ध्वनित करणे : *Are you ~ing that I stole your watch? मी तुझं घड्याळ चोरलं असं सुचवतोयस् का, तू?* २ एखादी गोष्ट परिणामी घडणार म्हणून सुचवणे.

impolite /,इम्प'लाइट्/ *वि* असभ्य; उद्धट. **impolitely** *क्रिवि* असभ्यपणे; उद्धटपणे, आगाऊपणे. **impoliteness** *ना* [*अगण*] असभ्यपणा, अशिष्टता; औद्धत्य, आगाऊपणा.

import /इम्'पॉऽट्/ *क्रि* [*सक*] परदेशातून (माल) आयात करणे. **import** /'इम्पॉऽट्/ *ना* १ [*अगण*] आयात (करण्याचा व्यवसाय), आगम. २ [*गण*] आयात केलेला माल. ३ [*अगण*] (*औप*) महत्त्व, प्रभाव. **importation** /,इम्पॉऽ'टेइशन्/ *ना* [*अगण, गण*] आयातीकरण, आयातन. **importer** *ना* [*गण*] आयात करणारी व्यक्ती, कंपनी वगैरे, आयातक.

important /इम्'पॉऽट्न्ट्/ *वि* १ महत्त्वाचा, महत्त्वपूर्ण, मोलाचा : *an ~ decision, महत्त्वपूर्ण निर्णय.* २ (व्यक्तीबाबत) अधिकार आणि वजन असलेला, महत्त्वाचा, बडा, महान. **importance** /-ट्न्स्/ *ना* [*अगण*] महत्त्व. महानता. **importantly** *क्रिवि* महत्त्वपूर्ण रीतीने.

impose /इम्'पउझ़्/ *क्रि* १ [*सक*] (*on*)// (कर, दंड वगैरे) लादणे, बसवणे. २ [*सक*] (*on*)// (मताचा वगैरे) आग्रह धरणे, गळी उतरवण्याचा प्रयत्न करणे, माथी मारणे. ३ (*क्रिब*) **impose on sb** एखाद्याचा गैरफायदा घेणे, हवे ते करवून घेणे, गळ्यात पडणे. **imposing** *वि* भव्य. **imposition** /,इम्प'झ़िशन्/ *ना* [*अगण, गण*] लादणे, सक्ती.

impossible /इम्'पॉसबल्/ *वि* १ अशक्य. २ सहन न होणारा, फारच वाईट/कठीण : *an ~ situation, फारच वाईट परिस्थिती.* **impossibility** /इम्,पॉस'बिलटि/ *ना* [*अगण, गण*] अशक्यता. **impossibly** *क्रिवि* अशक्यप्राय असा, फारच कठीण रीतीने.

impostor /इम्'पॉस्ट(र्)/ *ना* [*गण*] इतरांना फसवण्यासाठी आपण दुसरीच व्यक्ती असल्याचा बहाणा करणारा माणूस, तोतया, लफंगा, भामटा.

impotent /'इम्पटन्ट्/ *वि* १ दुबळा, शक्तिहीन किंवा असहाय, कमजोर, अशक्त. २ नपुंसक, बुळा. **impotence** /-अन्स्/ *ना* [*अगण*] दुर्बलता, दुबळेपणा; वंध्यत्व, नपुंसकत्व.

impound /इम्'पाउन्ड्/ *क्रि* [*सक*] कायद्याने ताब्यात घेणे, जप्त करणे.

impoverish /इम्'पॉव्हरिश्/ *क्रि* [*सक*] दरिद्री करणे, भिकेला लावणे.

impracticable /इम'प्रॅक्टिकबल्/ *वि* प्रत्यक्षात आणण्यास अशक्य, अव्यावहार्य.

impractical /इम्'प्रॅक्टिकल्/ *वि* व्यवहारशून्य, कुचकामी.

imprecise /,इम्प्रि'साइस्/ *वि* अचूक नसलेला, ढोबळ.

impregnable /इम्'प्रेग्नबल्/ *वि* अजिंक्य, दुर्धर, अभेद्य, बेलाग : *an ~ fort, अभेद्य किल्ला.*

impregnate /'इम्प्रेग्नेइट्; *अमे* इम्'प्रेग्-/ *क्रि* [*सक*] एका वस्तूचे गुणधर्म दुसऱ्या वस्तूत घालणे, -युक्त करणे : *cloth ~d with perfume, सुगंधयुक्त कापड.*

impresario /,इम्प्रि'सारिअउ/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s**) थिएटरचा किंवा संगीतमंडळाचा व्यवस्थापक.

impress /इम्'प्रेस्/ *क्रि* [*सक*] १ छाप पाडणे, कौतुक वाटायला लावणे : *Her honesty ~ed me, माझ्यावर तिच्या प्रामाणिकपणाची छाप पडली.* २ *on*// मनावर ठसवणे : *~ed on him the importance of hard work, कष्ट करण्याचे महत्त्व त्याच्या मनावर बिंबवले.* ३ ठसा उमटविणे.

impression /इम्'प्रेशन्/ *ना* [*गण*] १ मनावर उमटलेला ठसा, छाप : *create a good ~, चांगली छाप पाडणे.* २ सर्वसाधारण किंवा ढोबळ मत : *My general ~ was that she seemed a nice woman, ती एक चांगली स्त्री आहे असं माझं सर्वसाधारण मत बनलं/असं मला वरवर पाहता वाटलं.* ३ एखाद्याच्या वागण्याची किंवा बोलण्याची विनोदी नक्कल, चेष्टा. ४ दाबून उठवलेला ठसा. ५ (*वाक्प्र*) **be under the impression that ...** (बहुधा चुकीचा) समज असणे. **impressionable** /-शनब्ल्/ *वि* सहज परिणाम होईल असा, संस्कारक्षम, संस्करणीय. **impressionism** /-शनिझम्/ *ना* [*अगण*] रंग आणि प्रकाश यांच्या साहाय्याने एखाद्या गोष्टीची सर्वसाधारण कल्पना देणारी चित्ररेखनाची पद्धती.

impressive /इम्'प्रेसिव्ह्/ *वि* कौतुक वाटावे असा, छाप पाडणारा : *an ~ building, कौतुकास्पद इमारत.* **impressively** *क्रिवि* कौतुकास्पद रीतीने.

imprint /इम्'प्रिन्ट्/ *क्रि* [*सक*] एखाद्या पृष्ठभागावर एखादी गोष्ट उमटविणे, ठसा पाडणे, छाप काढणे : (*ला*) *details ~ed on his memory, त्याच्या स्मृतीवर उमटलेले तपशील.* **imprint** /'इम्प्रिन्ट्/ *ना* [*गण*] १ ठसा, छाप. २ (*ला*) दीर्घकाळ टिकणारा परिणाम.

imprison /इम्'प्रिझ्न्/ *क्रि* [*सक*] तुरुंगात टाकणे, बंदिवासात टाकणे. **imprisonment** *ना* [*अगण*] तुरुंगवास, बंदिवास, कारावास.

mprobable /इम्'प्रॉबब्ल्/ *वि* खरे असण्याचा किंवा घडण्याचा संभव कमी असलेला, असंभाव्य, असंभवनीय. **improbability** /इम्,प्रॉब'बिलटि/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) असंभवनीयता. **improbably** *क्रिवि* असंभवनीयपणे.

mpromptu /इम्'प्रॉम्प्ट्यू; *अमे* -टू/ *वि, क्रिवि* आयत्यावेळचा, पूर्वतयारीविना : *an ~ speech, आयत्यावेळचे भाषण.*

mproper /इम्'प्रॉप(र्)/ *वि* १ अयोग्य, चुकीचा, गैर : *~ use of a word/drug, शब्दाचा/औषधाचा चुकीचा वापर.* २ प्रसंगाला अनुरूप नसणारा, अनुचित, न शोभणारा : *~ behaviour/dress, अनुचित वर्तन/पोषाख.* ३ घाणेरडा, असभ्य, फाजील : *make ~ suggestions, चावटपणाच्या सूचना करणे.* **improperly** *क्रिवि* अयोग्य रीतीने, अनुचितपणे.

improve /इम्'प्रूव्ह्/ *क्रि* [*अक, सक*] सुधारणे. **improvement** *ना* १ [*गण, अगण*] सुधारणा. २ [*गण*] सुधारणेसाठी केलेला बदल : *home ~ments, गृहसुधारणा.*

improvise /'इम्प्रव्हाइझ्/ *क्रि* [*अक, सक*] १ विशेष तयारी न करता आहे त्या गोष्टीत भागवणे, पूर्वतयारी नसताना एकाएकी काही करणे. २ पूर्वतयारी न करता गाणे, बोलणे किंवा अभिनय करणे. **improvisation** /,इम्प्रव्हाइ'झेइश्न्/ *ना* [*अगण, गण*] शीघ्रकविता, शीघ्रभाषण, शीघ्राभिनय वगैरे.

impudent /'इम्प्युडन्ट्/ *वि* उद्धट आणि अपमानकारक, उपमर्दकारक, मगरूर, निर्लज्ज. **impudence** /-अन्स्/ *ना* [*अगण*] उद्धटपणा, बेशरमपणा, मगरूरी. **impudently** *क्रिवि* उद्धटपणे, मगरूरीने.

impulse /'इम्पल्स्/ *ना* १ [*गण, अगण*] अचानक एखादी गोष्ट करण्याची उर्मी, आवेग. २ [*गण*] जोराचा वेग, आवेग, संवेग : *an electrical ~, विजेचा झटका.* ३ (*वाक्प्र*) **on impulse** एकाएकी, विचार न करता, झटक्याने, लहरीने.

impulsive /इम्'पल्सिव्ह्/ *वि* लहरी, नीट विचार न करता एकाएकी मनाच्या उर्मीने वागणारा. **impulsively** *क्रिवि* लहरीने, एकाएकी झटका आल्यासारखा. **impulsiveness** *ना* [*अगण*] लहरीपणा.

impunity /इम्'प्यूनटि/ *ना* (*वाक्प्र*) **with impunity** निर्भयतेने, बेदरकारपणे, शिक्षेची भीती न बाळगता.

impure /इम्'प्युअ(र्)/ *वि* १ भेसळयुक्त; अस्वच्छ, निर्मळ नाही असा, अशुद्ध. २ (*जुना, अप्रचलित*) अपवित्र, कलंकित. **impurity** *ना* [*अगण, गण*] (*ब.व* **-ies**) अशुद्धता; कलंकितता.

in^{1} /इन्/ *क्रिवि* १ आत : *He opened the bedroom door and went in, त्याने बेडरूमचे दार उघडले आणि तो आत गेला.* २

घरी किंवा कामाच्या जागी : *Nobody was in when we called, आम्ही त्यांच्याकडे गेलो तेव्हा कुणीच घरी नव्हते.* ३ (आगगाडी, बस वगैरेबाबत) स्थानकावर. ४ (भरती-ओहोटी-बाबत) जमिनीवरच्या सर्वोच्च बिंदूला किंवा बिंदूकडे. ५ (पत्रांबाबत) पोहोचलेले, मिळालेले : *Competition entries should be in by 31 May, ३१ मे पर्यंत स्पर्धेचे प्रवेशअर्ज पोहोचायला हवेत/पोहोचणे आवश्यक आहे.* ६ फॅशनेबल; लोकप्रिय : *Miniskirts are in again, लांड्या फ्रॉकची पुन्हा टूम आली आहे.* ७ निर्वाचित, निवडून आलेला : *Labour came in after the war, युद्धानंतर मजूरपक्ष निवडून आला.* ८ (खेळ) (क) फलंदाजी करणारा. (ख) (चेंडूबाबत) लाईनच्या/रेषेच्या आत. ९ (*वाक्प्र*) **be in for sth** (*अनौप*) लवकरच भोगावे लागणार असणे, लवकरच वाट्याला येणार असणे. **be/get in on sth** (*अनौप*) भाग घेणे. **be (well) 'in with sb** (*अनौप*) एखाद्याशी गट्टी असणे, एखाद्याशी सूत जमवणे. **have (got) it 'in for sb** (*अनौप*) एखाद्याला त्रास देणे, एखाद्याच्या राशीला लागणे, एखाद्याला दुखावण्याची इच्छा असणे.

in- *वि* १ (*अनौप*) लोकप्रिय आणि आकर्षक : *the in-thing, लोकप्रिय गोष्ट* ○ *the in-place, फॅशनेबल ठिकाण.* २ लहान गटासाठी सीमित : *an in-joke, गोटातला विनोद.*

in^2 /इन्/ *शब्दयो* १ (स्थलदर्शक) -त, मधे, आत; आतमधे : *Rome is in Italy, रोम इटलीमधे आहे* ○ *play in the street, रस्त्यात खेळणे* ○ *lying in bed, अंथरूणात पडून राहिलेला* ○ *a pen in his pocket, त्याच्या खिशातील पेन.* २ (हालचालदर्शक) : *Throw it in the fire, आगीत टाक.* ३ (या) काळात, (या) काळामधे : *in June, जूनमधे.* ४ (दिलेल्या वेळेच्या) नंतर, मधे : *Lunch will be ready in an hour, एका तासात/तासाभरात जेवण तयार होईल.* ५ एखादी गोष्ट पूर्ण करणारा किंवा तिचा घटक असणारा : *seven days in a week, सात दिवसांचा आठवडा.* ६ (प्रमाणदर्शक) : *a slope of 1 in 5, ie 20%, एकास पाच या प्रमाणातला उतार, म्हणजे २० टक्के.* ७ वेषातील : *a woman in white, शुभ्र पोषाखातील स्त्री.* ८ (परिसरदर्शक) : *go out in the cold, थंडीमधे बाहेर जाणे.* ९ (स्थितीदर्शक) : *in a mess, गोंधळात* ○ *in love, प्रेमात (पडलेला).* १० (रचना किंवा योजनादर्शक) : *a story in three parts, तीन भागांतील कथा.* ११ (माध्यम, साधन वगैरे दाखविताना) : *speak in English, इंग्रजीत बोलणे* ○ *write in ink, शाईने लिहिणे.* १२ -बाबत : *lacking in courage, धैर्याबाबत कफल्लक म्हणजेच धैर्यहीन* ○ *3 metres in length, तीन मीटर लांब.* १३ (व्यवसायदर्शक) : *a career in journalism, वृत्तपत्रव्यवसाय.* १४ (*वाक्प्र*) **in that** कारण : *The chemical is dangerous in that it can kill, हे रसायन धोकादायक आहे कारण त्याने मृत्यू येऊ शकतो.*

in^3 /इन्/ *ना* (*वाक्प्र*) **the ins and outs (of sth)** (एखाद्या कृतीची, प्रश्नाची वगैरे) इत्थंभूत माहिती, खडान्खडा माहिती.

inability /ˌइन'बिलटि/ *ना* [*अगण*] (*to*)// कौशल्य किंवा सामर्थ्याचा अभाव, असमर्थता.

inaccessible /ˌइनॅक्'सेसब्ल्/ *वि* जाण्यास अवघड, पोहोचण्यास कठीण, दुर्गम.

inaccurate /इन्'ॲक्यरट्/ *वि* अचूक नसलेला, चुकीचा. **inaccuracy** /-यरसि/ *ना* [*अगण, गण*] (*ब.व* **-ies**) चूक. **inaccurately** *क्रिवि* चुकीने, सदोषपणे.

inadequate /इन्'ॲडिक्वट्/ *वि* अपुरा, तोकडा, अपर्याप्त. **inadequately** *क्रिवि* अपुरेपणाने, नीटपणे नाही अशा रीतीने.

inadmissible /ˌइनड्'मिसब्ल्/ *वि* कोर्टात दाखल न करता येण्यासारखा, अस्वीकार्य, अग्राह्य : *~ evidence, अस्वीकार्य पुरावा.*

inadvertent /ˌइनड्'व्हऽटन्ट्/ *वि* अविचाराने केलेला, चुकून केलेला, अनवधानाने केलेला. **inadvertently** *क्रिवि* अनवधानाने, असावध असताना, नजरचुकीने, नकळत.

inalienable /इन्'एइलिअनब्ल्/ *वि* (*औप*) (अधिकार वगैरेबाबत) हिरावता न येण्याजोगा, अनन्यसंक्राम्य.

inane /इ'नेइन्/ *वि* वेडपट, खुळा, अक्कलशून्य. **inanely** *क्रिवि* खुळचटासारखा, वेड्यासारखा.

inanimate /इन्'ॲनिमट्/ *वि* अचेतन, निर्जीव, जड : *A rock is an ~ object,*

खडक ही निर्जीव गोष्ट आहे.

inapplicable /इन्'ॲप्लिकब्ल्, तसेच ,इन'प्लिकब्ल्/ *वि* (*to*)// एखाद्या गोष्टीस लागू न होणारा, अप्रयोज्य.

inappropriate /,इन'प्रउप्रिअट्/ *वि* (*to/ for*)// अयोग्य, अनुचित. **inappropriately** *क्रिवि* अयोग्य रीतीने.

inapt /इन्'ॲप्ट्/ *वि* असंयुक्तिक किंवा अप्रस्तुत : ~ *remarks, अप्रस्तुत शेरे किंवा असमर्पक टिपण्णी.*

inarticulate /,इना'टिक्युलट्/ *वि* १ स्वतःचे म्हणणे नीटपणे सांगू न शकणारा, अव्यक्त, अस्फुट. २ (बोलण्याबाबत) अस्पष्ट.

inasmuch as /,इनझ्'मच् अझ्/ *उ. अव्यय* (*औप*) या मर्यादेपर्यंत, इतका; ज्याअर्थी.

inaudible /इन्'ऑऽडब्ल्/ *वि* ऐकू न येण्यासारखा, अश्राव्य.

inaugural /इ'नॉऽग्युरल्/ *वि* उद्घाटनाचा : *an ~ speech, उद्घाटनाचे भाषण.*

inaugurate /इ'नॉऽग्युरेइट्/ *क्रि* [*सक*] १ (एखाद्या अधिकाऱ्याची वगैरे) खास समारंभात ओळख करून देणे. २ (एखाद्या संस्थेचे, प्रदर्शनाचे वगैरे) समारंभपूर्वक उद्घाटन करणे. ३ सुरू करणे, प्रारंभ होणे. **inauguration** /इ,नॉऽग्यु'रेइशन्/ *ना* [*गण, अगण*] उद्घाटन; ओळख करून देणे.

inborn /,इन्'बॉऽन्/ *वि* (गुणाबाबत) जन्मजात, उपजत.

inbred /,इन्'ब्रेड्/ *वि* १ उपजत, जन्मजात, अंतर्गत. २ परस्पर नात्याचे पूर्वज असणारा, अंतःप्रजनित. **inbreeding** /'इन्ब्रीडिङ्/ *ना* [*अगण*] नात्यातल्या नात्यात विवाह करून प्रजा वाढवणे, (माणसांचे किंवा प्राण्यांचे) अंतःप्रजनन.

in-built /,इन्'बिल्ट्/ *वि* ➪ BUILT-IN (BUILD).

Inc /इङ्क्/ *संरू* (*अमे*) Incorporated संस्था(पित), निगमित.

incalculable /इन्'कॅल्क्युलब्ल्/ *वि* अगणित, अपरिमित, मोजमाप न होणारा.

incapable /इन्'केइपब्ल्/ *वि of*// असमर्थ : *~ of telling a lie, असत्य बोलण्यास असमर्थ.*

incapacitate /,इन्क'पॅसिटेइट्/ *क्रि* [*सक*] एखाद्याला एखादी गोष्ट करण्यास असमर्थ करणे, अक्षम करणे, (शरीराचे) नुकसान/ खोबरे करणे. **incapacity** /-सटि/ *ना* [*अगण*] अक्षमता.

incarcerate /इन्'कासरेइट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) तुरुंगात टाकणे, बंदिवासास पाठवणे, कैदेत टाकणे. **incarceration** /इन्,कास'रेइशन्/ *ना* [*अगण*] कैद.

incarnation /,इन्का'नेइशन्/ *ना* १ [*गण*] एखाद्या गुणाची साक्षात् मूर्ती, मानवी स्वरूपात प्रकट होण्याची घटना, मूर्तिमंत आविष्कार. २ [*गण, अगण*] मानवी रूपात असणे, अवतार, देहधारणी.

incendiary /इन्'सेन्डिअरि; *अमे* -डिएरि/ *वि* १ आगी लावणारा, आगलाव्या : *an ~ bomb, आगलाव्या बॉम्ब.* २ प्रक्षोभक : *an ~ speech, प्रक्षोभक भाषण.* **incendiary** *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) आगलाव्या बॉम्ब.

incense¹ /'इन्सेन्स्/ *ना* [*अगण*] धूप, ऊद यासारखे, जाळल्यावर सुगंधी धूर होणारे द्रव्य.

incense² /इन्'सेन्स्/ *क्रि* [*सक*] एखाद्याला रागवायला लावणे, कोपविणे, संतापविणे, पेटवणे.

incentive /इन्'सेन्टिव्ह्/ *ना* [*गण, अगण*] (*to*)// एखादी गोष्ट करण्यास प्रोत्साहन देणारी गोष्ट, प्रलोभन, उत्तेजक गोष्ट.

incessant /इन्'सेस्न्ट्/ *वि* अविरत, अखंड, निरंतर; एकसारखा, सतत : *his ~ complaints, त्याच्या कायमच्या तक्रारी.* **incessantly** *क्रिवि* अविरतपणे; एकसारखा.

incest /'इन्सेस्ट्/ *ना* [*अगण*] जवळच्या नात्यातील व्यक्तींचा संभोग, अगम्यगमन, गोत्रगमन. **incestuous** /इन्'सेस्ट्युअस्; *अमे* -चुअस्/ *वि* अगम्यगमनी, गोत्रगामी.

inch /इन्च्/ *ना* [*गण*] १ लांबीचे एक परिमाण; फुटाचा बारावा भाग (२.५४ सेन्टिमिटर्स). २ तसुभर : *He escaped death by an ~, तो थोडक्यात मरणातून वाचला.* ३ (*वाक्प्र*) **every inch** सर्वत्र, सर्व; पूर्णपणे. **within an inch of sth** एखाद्या गोष्टीच्या अगदी जवळ किंवा निकट. **inch** *क्रि* (*क्रिब*) **inch (sth) forward, past, etc** इंचइंच सरकवणे,

हळूहळू पुढे नेणे.

incidence /'इन्सिडन्स/ *ना* [*अे.व*] एखादी गोष्ट घडण्याचे प्रमाण किंवा पद्धत : *a high ~ of crime, गुन्हेगारीचे वाढते प्रमाण.*

incident /'इन्सिडन्ट्/ *ना* [*गण*] १ घटना – बहुधा क्षुल्लक, प्रसंग. २ हिंसा घडवून आणणारी घटना, गंभीर प्रसंग, प्रक्षोभक घटना : *border ~s, सरहद्दीवरील प्रक्षोभक घटना.*

incidental /,इन्सि'डेन्ट्ल/ *वि* १ किरकोळ : *~ expenses, किरकोळ खर्च, वरखर्च.* २ आनुषंगिक पण कमी महत्त्वाचा : *~ music for a film, चित्रपटातले प्रासंगिक संगीत.* **incidentally** /-ट्लि/ *क्रिवि* (वक्त्याला आयत्यावेळी सुचलेले काही सांगताना वापर) जाताजाता सांगायचं तर, प्रसंगवशात्.

incinerate /इन्'सिनरेइट्/ *क्रि* [*सक*] पूर्णपणे जाळून टाकणे, भस्म करणे. **incineration** /इन्,सिन'रेइश्न्/ *ना* [*अगण*] भस्मीकरण. **incinerator** *ना* [*गण*] कचरा जाळायची भट्टी.

incipient /इन्'सिपिअन्ट्/ *वि* (*औप*) प्राथमिक अवस्थेतील, सुरुवातीचा.

incision /इन्'सिझ्न्/ *ना* १ [*गण*] शल्यविशारदाने घेतलेला छेद. २ [*अगण*] विच्छेदन, फाडणे.

incisive /इन्'साइसिव्ह्/ *वि* स्पष्ट आणि नेमका; सरळ : *~ questions, नेमके आणि थेट प्रश्न.* **incisively** *क्रिवि* सडेतोडपणे, स्पष्टपणे.

incisor /इन्'साइझ़(र्)/ *ना* [*गण*] पुढचा दात.

incite /इन्'साइट्/ *क्रि* [*सक*] १ प्रोत्साहन देणे, फूस देणे, उत्तेजन देणे, चिथवणे : *~ workers to riots, कामगारांना दंगल करण्यास चिथावणी देणे.* २ घडवून आणणे, निर्माण करणे : *~ violence, हिंसाचार घडवून आणणे.* **incitement** *ना* [*अगण, गण*] प्रोत्साहन, फूस.

inclination /,इङ्क्लि'नेइश्न्/ *ना* १ [*गण, अगण*] एखाद्याला काहीतरी करावसं वाटण्याची भावना, ओढा, कल, इच्छा : *I have no ~ to leave, निघून जायची माझी मुळीच इच्छा नाही.* २ [*गण*] प्रवृत्ती. ३ [*अगण*] उताराचा कोन, तिर्यककोन.

incline^1 /इन्'क्लाइन्/ *क्रि* १ [*अक*] *towards//* एखाद्या गोष्टीकडे कलणे, झुकणे. २ [*सक*] (डोके वगैरे) पुढे वाकवणे, नतमस्तक होणे. ३ [*सक*] *towards//* (*औप*) -कडे वळवणे; परिणाम करणे. ४ [*अक*] *to/towards//* (*औप*) एखाद्या गोष्टीकडे प्रवृत्ती असणे : *He ~s to laziness, आळसाकडे त्याची प्रवृत्ती आहे.* **inclined** *वि* (*to*)// १ एखाद्या पद्धतीने वागण्याचे किंवा एखादी गोष्ट करण्याचे मनात असलेला. २ प्रवृत्ती असलेला, कल असलेला : *She's ~d to be depressed, मनाने खचण्याकडे तिची प्रवृत्ती आहे.*

incline^2 /'इङ्क्लाइन्/ *ना* [*गण*] उतार, ढाळ, बाक, झुकाव.

include /इन्'क्लूड्/ *क्रि* [*सक*] १ एखाद्या गोष्टीत अंतर्भूत करणे, समाविष्ट करणे : *Prices ~ delivery, घरपोच पाठविण्याचा दर किमतीतच अंतर्भूत आहे.* २ अंतर्भाव करणे, -मध्ये घालणे किंवा घेणे : *I~ Chris in the team, ख्रिसला संघात घ्या.* **inclusion** /इन्'क्लूझ्न्/ *ना* [*अगण*] समावेश, अंतर्भाव. **inclusive** /इन्'क्लूसिव्ह्/ *वि* समाविष्ट, समावेशक.

incognito /,इङ्कॉग्'नीटउ; *अमे* इङ्'कॉग्नटउ/ *वि, क्रिवि* स्वतःचे नाव न वापरता (वावरणारा), नाव गुप्त ठेवून (राहणारा); गुप्तवेषात, अज्ञातरूपात : *travel ~, गुप्तवेषात प्रवास करणे.*

incoherent /,इङ्कउ'हिअरन्ट्/ *वि* संदिग्ध, अस्पष्ट; स्पष्टपणे व्यक्त न केलेला; असंबद्ध, तुटक, असंगत. **incoherence** /-अन्स्/ *ना* [*अगण*] अस्पष्टपणा, संदिग्धपणा; अस्फुटता; असंबद्धता, असंगती, तुटकपणा. **incoherently** *क्रिवि* अस्पष्टपणे; अस्फुटपणे; असंबद्ध रीतीने.

income /'इङ्कम्/ *ना* [*गण, अगण*] दरमहा, दरसाल वगैरे मिळणारा पैसा, प्राप्ती, उत्पन्न, आय, मिळकत, आवक. **income tax** *ना* [*अगण*] प्राप्तीकर, आयकर.

incoming /'इन्कमिङ्/ *वि* १ येणारा : ~

mail, येणारे टपाल, आवक टपाल. २ नवनिर्वाचित, नवीन नेमणूक झालेला : *the ~ president, नवनिर्वाचित अध्यक्ष.*

incomparable /इन्'कॉम्प्रब्ल्/ *वि* अतुलनीय, अनुपम.

incompatible /,इङ्कम्'पॅटब्ल्/ *वि* एकत्र राहू न शकणारा, विरुद्ध धर्मी, असंयोज्य, विजोड : *Smoking is ~ with good health, चांगली तब्येत आणि धूम्रपान एकत्र राहूच शकत नाही.* **incompatibility** /,इङ्कम्,पॅट'बिलटि/ *ना* [*अगण*] विरुद्ध धर्मीयता, असंयोज्यता.

incompetent /इन्'कॉम्पिटन्ट्/ *वि* एखादी गोष्ट करण्यास पुरेशी क्षमता नसणारा, अक्षम, असमर्थ. **incompetence** /-अन्स्/ *ना* [*अगण*] अक्षमता.

incomplete /,इङ्कम्'प्लीट्/ *वि* अपूर्ण, अर्धवट. **incompletely** *क्रिवि* अपूर्णतेने, अर्धवटपणे.

incomprehensible /इन्,कॉम्प्रि'हेन्सब्ल्/ *वि* अनाकलनीय, दुर्बोध. **incomprehension** /-'हेन्शन्/ *ना* [*अगण*] अनाकलनीयता, दुर्बोधपणा.

inconceivable /,इङ्कन्'सीव्हब्ल्/ *वि* १ (*अनौप*) विश्वास न बसेल असे, अचिन्त्य, गूढ. २ अकल्पनीय.

inconclusive /,इङ्कन्'क्लूसिव्ह्/ *वि* निश्चित निर्णयाकडे किंवा परिणामाकडे न नेणारा, अनिर्णायक : *~ evidence, अनिर्णायक पुरावा.*

incongruous /इन्'कॉङ्ग्रुअस्/ *वि* अस्थानी, विजोड, विशोभित, असंगत : *Modern buildings look ~ in an old village, जुन्या खेडेगावात अत्याधुनिक इमारती शोभत नाहीत किंवा विशोभित दिसतात.* **incongruity** /,इङ्कॉङ्'ग्रूअटि/ *ना* [*अगण, गण*] (*ब.व* **-ies**) विशोभितपणा, बेजोडपणा, असंगती.

inconsiderate /,इङ्कन्'सिडरट्/ *वि* इतरांचा विचार न करणारा, इतरांबाबत बेपर्वा. **inconsiderately** *क्रिवि* इतरांची पर्वा न करता.

inconsistent /,इन्कन्'सिस्टन्ट्/ *वि* (*with*)// विसंगत, न जुळणारा; अस्थिर, बदलण्याची शक्यता असलेला, सातत्यहीन. **inconsistency** /-अन्सि/ *ना* [*अगण, गण*] (*ब.व* **-ies**) विसंगती; सातत्याचा अभाव. **inconsistently** *क्रिवि* विसंगतपणे; सातत्याविना.

inconspicuous /,इङ्कन्'स्पिक्युअस्/ *वि* डोळ्यात न भरणारा, सहजपणे न दिसणारा, किरकोळ, नगण्य. **inconspicuously** *क्रिवि* कुणाचे लक्ष जाणार नाही अशा रीतीने.

incontinent /इन्'कॉन्टिनन्ट्/ *वि* मलमूत्रविसर्जनावर ताबा नसलेला, अनावर मलमूत्र होणारा. **incontinence** /-अन्स्/ *ना* [*अगण*] मलमूत्रविसर्जनाची अनावरता, मुक्तमलमूत्रविसर्जन.

incontrovertible /,इङ्कॉन्ट्र'व्हऽटब्ल्/ *वि* नाकारता न येण्याइतके स्पष्ट, निर्विवाद, अखंडनीय, बिनतोड.

inconvenience /,इङ्कन्'व्हीनिअन्स्/ *ना* [*गण, अगण*] अडचण, क्लेश, गैरसोय (यांचे कारण). **inconvenience** *क्रि* [*सक*] गैरसोय करणे, अडचणीत आणणे, ताप देणे. **inconvenient** /-अन्ट्/ *वि* गैरसोयीचा, तापदायक, अडचणीचा. **inconveniently** *क्रिवि* गैरसोयीने.

incorporate /इन्'कॉऽपरेइट्/ *क्रि* [*सक*] (एखाद्या गोष्टीत दुसरी गोष्ट) समाविष्ट करणे; अंतर्भूत करणे, -मधे घालणे : *I~ your ideas in the new plan, नवीन योजनेत तुझ्या कल्पना घाल.* **incorporated** *वि* (*अमे*) कायदेशीरपणे संस्थापित, निगमित. **incorporation** /इन्,कॉऽप'रेइशन्/ *ना* [*अगण*] समावेश, अंतर्भाव; कायदेशीर संस्थापन, निगमन.

incorrect /,इङ्क'रेक्ट्/ *वि* सदोष; चूक. **incorrectly** *क्रिवि* चुकीच्या पद्धतीने. **incorrectness** *ना* [*अगण*] सदोषपणा; चूक.

incorrigible /इन्'कॉरिजब्ल्; *अमे* -'कॉऽर्-/ *वि* (व्यक्ती किंवा वाईट वर्तनाबाबत) सुधारता न येण्याजोगा, सुधारणेच्या पलीकडचा, निगरगट्ट, कोडगा.

increase^1 /इन्'क्रीस्/ *क्रि* [*अक, सक*] वाढणे, वाढवणे, वृद्धिंगत होणे/करणे. **increasingly** *क्रिवि* अधिकाधिक, चढत्या

श्रेणीने: *increasingly difficult, अधिकच अवघड.*

increase² /'इङ्क्रीस्/ *ना* [*गण, अगण*] वाढ.

incredible /इन्'क्रेडब्ल्/ *वि* १ अविश्वसनीय, विश्वास बसणार नाही असा. २ (*अनौप*) आश्चर्यकारक; चकित करणारा. **incredibly** *क्रिवि* विश्वास बसू नये अशा रीतीने; आश्चर्यकारकरीत्या.

incredulous /इन्'क्रेड्युलस्; *अमे* -जूल्-/ *वि* विश्वास न ठेवणारा, शंकेखोर; अश्रद्ध. **incredulity** /,इङ्क्रि'ड्यूलटि; *अमे* -डू-/ *ना* [*अगण*] शंकेखोरपणा; अश्रद्धा. **incredulously** *क्रिवि* शंकेखोरपणे, अविश्वासाने; अश्रद्धेने.

increment /'इङ्क्रमन्ट्/ *ना* [*गण*] किमतीतील किंवा पैशातील वाढ.

incriminate /इन्'क्रिमिनेइट्/ *क्रि* [*सक*] एखाद्याला दोषी ठरवणे, दोषारोप ठेवणे.

incubate /'इङ्क्युबेइट्/ *क्रि* [*अक, सक*] अंडी उबवणे. **incubation** /,इन्क्यु'बेइश्न्/ *ना* १ [*अगण*] (अंडी) उबवणी, उबवण. २ [*गण*] (तसेच **incu'bation period**) रोगजंतूंचा प्रवेश आणि आजारी पडणे यामधला काळ, रोगबीजपोषणकाल. **incubator** *ना* [*गण*] १ कृत्रिम रीतीने ऊब देऊन अंडी उबवण्याचे साधन. २ आधीच निपजलेल्या, दुर्बल मुलांना वाचविण्यासाठी वापरायचे उपकरण.

incumbent /इन्'कम्बन्ट्/ *वि on*// (*औप*) कर्तव्य म्हणून आवश्यक. **incumbent** *ना* [*गण*] अधिकारी पदावर असलेली व्यक्ती, पदधारक.

incur /इन्'कऽ(र्)/ *क्रि* (**-rr-**) [*सक*] एखादी वाईट गोष्ट सहन करणे, अंगावर ओढवून घेणे, पत्करणे: ~ *large debts, मोठी कर्जे अंगावर घेणे.*

incurable /इन्'क्युअरब्ल्/ *वि* बरा न होऊ शकणारा, असाध्य. **incurable** *ना* [*गण*] असाध्य रोगाचा रोगी, दुर्धर रोगाने ग्रस्त अशी व्यक्ती. **incurably** *क्रिवि* बरा न होईल असा.

incursion /इन्'कऽश्न्; *अमे* -झ्न्/ *ना* [*गण*] (*औप*) हल्ला; आक्रमण.

indebted /इन्'डेटिड्/ *वि* कृतज्ञ, आभारी, ऋणी: ~ *to him for his help, त्याच्या मदतीसाठी कृतज्ञ.*

indecent /इन्'डीसन्ट्/ *वि* १ लोकांना हादरा बसेल असा, धक्कादायक; अश्लील, ओंगळ. २ अनुचित, अशोभनीय; अयोग्य. **indecency** /-न्सि/ *ना* [*अगण*] अश्लीलपणा; न शोभणारे वर्तन. **indecently** *क्रिवि* ओंगळपणे, न साजेलसे.

indecision /,इन्डि'सिझ्न्/ *ना* [*अगण*] अनिर्णितपणा, दहीखाऊ-महीखाऊपणा, डळमळीतपणा.

indecisive /,इन्डि'साइसिव्ह्/ *वि* १ अनिर्णित, डळमळीत, न ठरलेला. २ अपेक्षित, निश्चित असा परिणाम न साधणारा. **indecisively** *क्रिवि* अनिर्णयात्मक रीतीने, डळमळीतपणे, गुळमुळीतपणे.

indeed /इन्'डीड्/ *क्रिवि* १ खरोखर; निश्चितपणे: *'Did he complain?' 'I~ he did', 'त्याने कुरकुर केली?' 'निश्चितच केली'.* २ (वाक्य जोरदार करण्यासाठी *very* या शब्दासह वापर): *Thank you very much ~, खरोखरच फार उपकार झाले तुमचे.* ३ (आश्चर्य, आस्था वगैरे दाखविण्यास वापर): *'She thinks she got the job.' 'Does she ~!', 'तिला असं वाटतंय् की तिला ती नोकरी* (जणू) *मिळालीच.' 'खरं की काय!'*

indefensible /'इन्डिफेन्स्ब्ल्/ *वि* असमर्थनीय, बचाव करता न येणारा: ~ *rudeness, असमर्थनीय उद्धटपणा.*

indefinable /,इन्डि'फाइनब्ल्/ *वि* व्याख्या करता येणार नाही असा किंवा शब्दात न गवसणारा.

indefinite /इन्'डेफिनट्/ *वि* १ अस्पष्ट, अनिश्चित; संदिग्ध. २ अमर्याद, अनंत: *an ~ period of time, अमर्याद काळ.* **in,definite 'article** *ना* [*गण*] अनिश्चयात्मक विशेषण उदा *a* किंवा *an*. **indefinitely** *क्रिवि* अनिश्चित/अमर्याद काळापर्यंत: *The meeting was postponed ~ly, बैठक अनिश्चित काळापर्यंत पुढे ढकलण्यात आली.*

indelible /इन्'डेलब्ल्/ *वि* खोडून टाकण्यास अशक्य. **indelibly** *क्रिवि* क्षालन होणार नाही अशा तऱ्हेने.

indelicate /इन्'डेलिकट्/ *वि* (*औप* अनेकदा *पर्या*) हळुवार नाही असा, उद्धट किंवा अडचणीत आणणारा, घिसडघाईचा.

indemnify /इन्'डेम्निफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* -ied) [*सक*] नुकसान भरपाई देणे (असे करण्याचे एखाद्याला वचन देणे).

indemnity /इन्'डेम्नटि/ *ना* (*ब.व* -ies) १ [*अगण*] नुकसान किंवा हरवणे यापासून संरक्षण, हानिभरण, निस्तारण. २ [*गण*] नुकसान भरपाईपोटी दिलेली रक्कम, खंडणी.

indent /इन्'डेन्ट्/ *क्रि* [*अक, सक*] लिहिताना ओळ इतर ओळींपेक्षा आत घेणे. **indentation** /,इन्डेन्'टेइश्न्/ *ना* १ [*गण, अगण*] ओळ आत घेणे. २ [*गण*] एखाद्या गोष्टीच्या कडेवर किंवा काठावर कोरलेली खूण, पाडलेला दाता : *the ~ations of the coastline, समुद्राची करवती काठासारखी किनारपट्टी.*

independent /,इन्डि'पेन्डन्ट्/ *वि* १ स्वतंत्र : *an ~ nation, स्वतंत्र राष्ट्र.* २ (*of*)// जगण्यासाठी दुसऱ्यावर पैसा वगैरेकरता अवलंबून नसणारा, स्वावलंबी. ३ स्वतंत्रपणे काम करू शकणारा; आत्मविश्वासपूर्ण. **independent** *ना* [*गण*] कोणत्याही पक्षात नसणारा असा स्वतंत्र राजकारणी. **independence** /-अन्स्/ *ना* [*अगण*] स्वातंत्र्य : *independence from one's parents, आईवडलांवर अवलंबून नसणे.* **independently** *क्रिवि* स्वतंत्रपणे, एकट्याने.

indescribable /,इन्डि'स्क्राइबब्ल्/ *वि* अवर्णनीय, शब्दांत सांगता न येण्यासारखा. **indescribably** *क्रिवि* शब्दांत न सांगता येण्यासारख्या रीतीने.

indestructible /,इन्डि'स्ट्रक्टब्ल्/ *वि* अविनाशी, अवध्य.

index /'इन्डेक्स्/ *ना* [*गण*] (*ब.व* ~**es**; अर्थ क्र २ प्रमाणे ~**es** किंवा **indices** /'इन्डिसीझ्/) १ (क) पुस्तकाच्या शेवटी दिलेली विषय, वगैरेची वर्णानुक्रमी सूची, प्रदेशिनी. (ख) (ग्रंथालयातील वगैरे) वर्णानुक्रमाने लावलेली माहितीपूर्ण कार्डस्, निर्देशांक : *a card ~, पत्रकनिर्देशांक.* २ पूर्वीच्या किमतीशी आताच्या किमतीची तुलना दाखविणारा निर्देशांक : *the cost-of-living ~, राहणीमानाचा निर्देशांक.* **index** *क्रि* [*सक*] सूची करणे, सूचीमधे घालणे. **'index finger** *ना* [*गण*] आंगठ्याजवळचे बोट, तर्जनी.

indicate /'इन्डिकेइट्/ *क्रि* १ [*सक*] निर्देश करणे, दाखवणे; चिन्ह असणे. २ [*अक, सक*] गाडी वळत असण्याचा इशारा देणे. **indication** /,इन्डि'केइश्न्/ *ना* १ [*अगण*] निर्देश. २ [*गण, अगण*] दाखविणारे चिन्ह, शब्द वगैरे, लक्षण. **indicative** /इन्'डिकटिव्ह्/ *वि of*// दर्शक, सूचक, निर्देशक. **indicator** *ना* [*गण*] १ माहिती देणारे काहीतरी, उदा यंत्रावरील काटा, दर्शककाटा. २ वाहन वळणार असल्याची सूचना देणारा वाहनावरचा दिवा, निर्देशदिवा.

indict /इन्'डाइट्/ *क्रि* [*सक*] (*for*)// (*कायदा*) एखाद्यावर रीतसर आरोप ठेवणे, दोषी ठरवणे : *~ed for murder, खुनाचा आरोप ठेवलेला.* **indictable** *वि* आरोप ठेवण्याजोगा : *an ~able offence, आरोप ठेवण्याजोगता गुन्हा.* **indictment** *ना* [*गण, अगण*] आरोपपत्र.

indifferent /इन्'डिफ्रन्ट्/ *वि* १ (*to*)// एखाद्या गोष्टीत रस नसलेला, आस्था नसलेला, उदासीन. २ फारसा चांगला नसलेला, बेताचा : *an ~ meal, बेताचं जेवण.* **indifference** /-फ्रन्स्/ *ना* [*अगण*] उदासीनता, काणाडोळा, बेपर्वाई. **indifferently** *क्रिवि* काणाडोळा करून, बेपर्वाईने.

indigenous /इन्'डिजिनस्/ *वि* (*to*)// स्थानिक, देशी, देशीय; मूळचा, एतद्देशीय : *Kangaroos are ~ to Australia, कांगारू हे मूळचे आस्ट्रेलियातलेच.*

indigestion /,इन्डि'जेस्चन्/ *ना* [*अगण*] अपचन (व्याधी).

indignant /इन्'डिग्नन्ट्/ *वि* अन्यायाविरूद्ध रागावलेला, चिडलेला, संतप्त. **indignantly** *क्रिवि* संतापाने, संतप्तपणे. **indignation** /,इन्डिग्'नेइश्न्/ *ना* [*अगण*] संताप, चीड.

indignity /इन्'डिग्नटि/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* -**ies**) अपमानकारक वागणूक, बेअदबी, उपमर्द, अवहेलना.

indirect /,इन्डि'रेक्ट्; -डाइ'र्-/ *वि* १ सरळ रेषेत न जाणारा, आडवळणाचा, वाकडातिकडा :

an ~ route, आडवळणाचा मार्ग. २ अप्रत्यक्ष, उघड उल्लेख न झालेला : *an ~ answer, अप्रत्यक्ष उत्तर.* ३ दूरचा, पर्यायाचा; दुय्यम : *an ~ cause, दुय्यम कारण.* **indirectly** *क्रिवि* अप्रत्यक्षपणे; पर्यायाने. **,indirect 'object** *ना* [*गण*] (*व्याकरण*) अप्रत्यक्ष किंवा गौण कर्म, ज्याच्यावर क्रियेचा परिणाम होतो ती गोष्ट : *In 'Give him the book', 'him' is the ~ object, 'Give him the book' या वाक्यात him हे अप्रत्यक्ष कर्म आहे.* **,indirect 'speech** *ना* [*अगण*] (*व्याकरण*) बोलणाऱ्याचे शब्द न वापरता तो काय म्हणाला याचा दिलेला वृत्तांत, संभाषणवृत्त : *In ~ speech, 'He said, "I will come".' becomes 'He said he would come'. He said, "I will come" चे संभाषणवृत्त He said he would come असे होते.* **'indirect tax** *ना* [*गण*] मालाच्या किमतीतच समाविष्ट केलेला कर, अप्रत्यक्ष कर.

indiscreet /,इन्डि'स्क्रीट्/ *वि* सारासार विचार नसलेला, विवेकशून्य. **indiscreetly** *क्रिवि* विवेकशून्यतेने. **indiscretion** /,इन्डि'स्क्रेश्न्/ *ना* १ [*अगण*] अविवेकी वर्तन. २ [*गण*] विवेकशून्यतेने केलेली कृती किंवा बोललेला शब्द.

indiscriminate /,इन्डि'स्क्रिमिनट्/ *वि* अविचाराने केलेला, बेछूट, वाट्टेल तसा केलेला, अफाट, बेफाम : *~ praise, धरबंद न ठेवता केलेली स्तुती* किंवा *अफाट स्तुती.* **indiscriminately** *क्रिवि* बेछूटपणे, बेफामपणे, तारतम्य न ठेवता.

indispensable /,इन्डि'स्पेन्सब्ल्/ *वि* अत्यावश्यक, अनिवार्य.

indisposed /,इन्डि'स्पउझ्ड्/ *वि* (*औप*) १ आजारी. २ नाखूष, नाराज : *~ to help, मदत करण्याची इच्छा नसलेला.*

indisputable /,इन्डि'स्प्यूटब्ल्/ *वि* निर्विवाद, वादातीत, अविवाद्य. **indisputably** *क्रिवि* निर्विवादपणे.

indistinguishable /,इन्डि'स्टिङ्ग्विशब्ल्/ *वि* (*from*)// वेगळा ओळखू न येणारा, अभिन्न : *She is ~ from her sister, तिच्या बहिणीहून वेगळी अशी ती ओळखू येत नाही.*

individual /,इन्डि'व्हिजुअल्/ *वि* १ व्यक्तिगत, वैयक्तिक, एका व्यक्तीचा; वेगळा, प्रत्येक, सुटासुटा. २ एकेका व्यक्तीचा, वैयक्तिक. **individual** *ना* [*गण*] व्यक्ती, इसम, माणूस. **individuality** /,इन्डि,व्हिजु'ॲलटि/ *ना* [*अगण*] व्यक्तीचे इतरांपासून वेगळेपण दाखविणारी वैशिष्ट्ये, वैयक्तिकता, व्यक्तिगतता, व्यक्तित्व. **individually** *क्रिवि* वेगवेगळा; व्यक्तिशः.

indoctrinate /इन्'डॉक्ट्रिनेइट्/ *क्रि* [*सक*] (*with*)// (बहुधा *अधिक्षेपी*) एखाद्या व्यक्तीच्या मनात काही श्रद्धा किंवा कल्पना अबाधित म्हणून भरवणे, मनात काही कल्पना कायमच्या म्हणून कालविणे, मतरोपण. **indoctrination** /इन्,डॉक्ट्रि'नेइश्न्/ *ना* [*अगण*] मनात भरवणे.

indolent /'इन्डलन्ट्/ *वि* (*औप*) आळशी. **indolence** /-लन्स्/ *ना* [*अगण*] मांद्य, आळस.

indoor /'इन्डॉऽ(र्)/ *वि* इमारतीत केला जाणारा किंवा असणारा, (मैदानावर नसलेला म्हणून) आतला, अंतर्गेही. **indoors** /,इन्'डॉऽझ्/ *क्रिवि* इमारतीमधे.

induce /इन्'ड्यूस्; *अमे* -डूस्/ *क्रि* [*सक*] १ मन वळवणे किंवा प्रभाव पाडणे. २ घडवून आणणे. ३ औषधे देऊन (स्त्रीला) बाळंत होण्यास तयार करणे. **inducement** *ना* [*गण, अगण*] एखाद्याला एखादी गोष्ट करण्यास प्रवृत्त करण्याचे पैशासारखे साधन, प्रलोभन : *a pay rise as an ~ment to work harder, अधिक काम व्हावे म्हणून पगार-वाढीचे प्रलोभन.*

induction /इन्'डक्श्न्/ *ना* १ [*अगण, गण*] एखाद्याला नवीन कामाची ओळख करून देणे. २ [*अगण*] विशिष्ट वास्तविकांपासून सर्वसामान्य नियम शोधण्याची पद्धती, विगमन पद्धती. ३ [*अगण*] गर्भारशीला औषधे देऊन मोकळी करणे.

indulge /इन्'डल्ज्/ *क्रि* १ [*अक*] (*in*)// एखाद्या गोष्टीचा आनंद लुटणे, मौज लुटणे. २ [*सक*] (वासना) तृप्त करणे. ३ [*सक*] (एखाद्याला) एखादी गोष्ट हवी तशी मिळू देणे, लाड करणे. **indulgence** *ना* १ [*गण*]

आनंद लुटता येईल अशी एखादी सुखकर गोष्ट, षौक. २ [*अगण*] मौजमजा. **indulgent** *वि* लाड करणारा.

industrial /इन्'डॅस्ट्रिअल्/ *वि* औद्योगिक, उद्योगासंबंधी. **in,dustrial 'action** *ना* [*अगण*] नेहमीसारखे काम करणे नाकारणे; संप. **industrialism** *ना* [*अगण*] बड्या उद्योगधंद्यांचा महत्त्वाचा सहभाग असणारी व्यवस्था. **industrialist** *ना* [*गण*] मोठ्या औद्योगिक कंपनीचा मालक, उद्योगपती. **industrialize** *क्रि* [*अक, सक*] (एखाद्या देशाचा) औद्योगिक विकास करणे, औद्योगिकरण करणे. **industrially** *क्रिवि* औद्योगिकदृष्ट्या.

industrious /इन्'डॅस्ट्रिअस्/ *वि* कष्टाळू, मेहनती; व्यासंगी, उद्योगी.

industry /'इन्डस्ट्रि/ *ना* (*ब.व* -ies) १ [*गण, अगण*] (उत्पादन करणारा) उद्योग : *the steel ~, पोलाद उद्योग.* २ [*अगण*] (*औप*) उद्योगीपणा, कष्टाळूपणा.

inebriated /इ'नीब्रिअेइटिड्/ *वि* (*औप* किंवा *गंमत*) नशा किंवा कैफ चढलेला, धुंद, तर्र झालेला.

inedible /इन्'अेडब्ल्/ *वि* (*औप*) अखाद्य, खाण्यास अयोग्य, न खाण्याचा.

ineffective /,इनि'फेक्टिव्ह्/ *वि* हवे ते परिणाम न घडवणारा, परिणामशून्य, कुचकामी, व्यर्थ. **ineffectively** *क्रिवि* व्यर्थ. **ineffectiveness** *ना* [*अगण*] व्यर्थता, परिणामशून्यता.

ineffectual /इनि'फेक्चुअल्/ *वि* विफल, निष्फळ : *an ~ attempt, विफल प्रयत्न.* **ineffectually** *क्रिवि* विफलतेने.

inefficient /,इनि'फिश्न्ट्/ *वि* १ (माणसाबाबत) वेळ, शक्ती वगैरे वाया घालवणारा, गबाळा, अकार्यक्षम. २ (यंत्र किंवा माणसाबाबत) चांगली निष्पत्ती न करणारा, अपरिणामकारक. **inefficiency** /-न्सि/ *ना* [*अगण*] अकार्यक्षमता, परिणामशून्यता. **inefficiently** *क्रिवि* वेंधळेपणाने, अकार्यक्षम रीतीने; काहीही काम किंवा परिणाम न होता.

ineligible /इन्'अेलिजब्ल्/ *वि* (*for*)// आवश्यक किंवा अपेक्षित गुणवत्ता नसलेला, अपात्र, अर्हता नसलेला : *~ for the job, कामाला अपात्र.*

inept /इ'नेप्ट्/ *वि* १ (*at*)// पूर्णपणे अकुशल, गलथान, हेंगाडा. २ चुकीच्या वेळी केलेला किंवा म्हटलेला, अप्रस्तुत, अयोग्य. **ineptitude** /इ'नेप्टिट्यूड्; *अमे* -टूड्/ *ना* [*अगण*] गलथानपणा, भोंगळपणा; अयोग्य कृती किंवा भाषा.

inequality /,इनि'क्वॉलटि/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* -ies) समानतेचा अभाव, विषमता, उच्चनीचपणा; भेदभाव.

inert /इ'नऽट्/ *वि* १ हालचाल करण्याची शक्ती नसलेला, जड, अचल, अचेतन, गतिहीन. २ (डोक्याने किंवा शरीराने) मंद, सुस्त.

inertia /इ'नऽश/ *ना* [*अगण*] १ आळसावलेपणा, सुस्तपणा. २ (*वास्तवशास्त्र* किंवा *पदार्थविज्ञान*) दुसऱ्या प्रेरकाचा परिणाम होत नाही तोवर स्थिर राहण्याचा किंवा आहे त्या गतीने जाण्याचा पदार्थाचा गुणधर्म, निरूढी, स्थिरशीलता, जडता, जडत्व.

inescapable /,इनि'स्केइपब्ल्/ *वि* अटळ, अवश्यभावी, सुटका नाही असा.

inevitable /इन्'अेव्हिटब्ल्/ *वि* १ अटळ. २ (*अनौप*) परिचित आणि अपेक्षित, नेहमीचा, पाचवीला पुजलेला : *a tourist with his ~ camera, नेहमीच कॅमेऱ्यासह येणारा प्रवासी.* **inevitability** /इन्,अेव्हिट'बिलटि/ *ना* [*अगण*] अटळपणा; अपेक्षितपणा. **inevitably** *क्रिवि* अटळपणे; नेहमीच्या सवयीप्रमाणे.

inexact /,इनिग्'झॅक्ट्/ *वि* अचूक किंवा तंतोतंत नसलेला.

inexcusable /,इनिक्'स्क्यूझब्ल्/ *वि* अक्षम्य; सुटका न देण्यासारखा; असमर्थनीय : *~ rudeness, अक्षम्य किंवा असमर्थनीय उद्धटपणा.*

inexpensive /,इनिक्'स्पेन्सिव्ह्/ *वि* स्वस्त, फार किमती नसलेला.

inexperience /,इनिक्'स्पिअरिअन्स्/ *ना* [*अगण*] (*in*)// अजाणपणा, अननुभव. **inexperienced** *वि* अननुभवी.

inexplicable /,इनिक्'स्प्लिकब्ल्/ *वि* समजावून सांगण्यास अशक्य असा, न उलगडणारा. **inexplicably** *क्रिवि* समजवता

येणार नाही अशा रीतीने.

inextricable /,इनिक्'स्ट्रिकब्ल्, इन्'अेक्स्ट्रिकब्ल्/ *वि* न सुटण्यासारखा, गुंतागुंतीचा.

infallible /इन्'फॅलब्ल्/ *वि* १ कधीही चुकीचा नसणारा, दोषातीत, अस्खलित, अमोघ, अप्रमादशील : *Nobody is ~, कधीही न चुकणारा असा कुणीच नसतो.* २ बिनचूक, कधीही अयशस्वी न होणारा : *an ~ method, परिपूर्ण पद्धती.* **infallibility** /इन्,फॅल'बिलटि/ *ना* [*अगण*] दोषातीतता, अमोघपणा; अचूकता.

infamous /'इन्फमस/ *वि* कुप्रसिद्ध, कुविख्यात, निंद्य. **infamy** /'इन्फमि/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) निंद्य कृत्य, अपकीर्ती.

infancy /'इन्फन्सि/ *ना* [*अगण*] १ बाल्यावस्था, शैशव. २ (*ला*) वाढीची प्राथमिक अवस्था : *The project is still in its ~, तो प्रकल्प अद्याप बाल्यावस्थेत आहे.*

infant /'इन्फन्ट्/ *ना* [*गण*] बालक, बाळ, अर्भक, तान्हे मूल.

infantile /'इन्फन्टाइल्/ *वि* अर्भकाचा, बाल-; लहान मुलासारखा, बालबुद्धीचा, बालिश : *~ behaviour, बालिश वर्तन.*

infantry /'इन्फन्ट्रि/ *ना* [*अगण*] (अे.व किंवा ब.व क्रियापदासह) पायदळ.

infatuated /इन्'फॅचुअेइटिड्/ *वि* (*with*)// एखाद्याच्या प्रेमाने वेडा झालेला, प्रेमाने खुळा झालेला, नादावलेला, कामार्त. **infatuation** /इन्,फॅचु'अेइश्न्/ *ना* [*अगण, गण*] प्रेमवेड, कामार्तता.

infect /इन्'फेक्ट्/ *क्रि* [*सक*] (*with*)// १ रोगप्रसार करणे, रोगाची लागण करणे, दुसऱ्याला आजारी पाडणे, रोगसंक्रमण करणे. २ (*ला*) भावना, विचार यांवर परिणाम घडविणे, प्रभाव पाडणे. **infection** /इन्'फेक्श्न्/ *ना* १ [*गण*] संसर्गजन्य रोग. २ [*अगण*] रोगसंसर्ग, फैलाव, लागण : *danger of ~ion, रोगसंसर्गाचा धोका* किंवा *रोग फैलावण्याचा धोका.* **infectious** /इन्'फेक्शस्/ *वि* १ (रोगाबाबत) एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे रोगजंतू गेल्यामुळे होणारा, संसर्गजन्य. २ (*ला*) फैलावणारा, इतरांवर चटकन् परिणाम घडवणारा : *~ious laughter, हास्याची लागण.*

infer /इन्'फऽ(र्)/ *क्रि* (**-rr-**) [*सक*] (*from*)// वास्तविकांवरून मत बनवणे, अनुमान करणे : *What can be ~red from the election results? निवडणुकींच्या निकालांवरून काय निष्कर्ष निघतो?* **inference** /'इन्फरन्स्/ *ना* [*गण, अगण*] अनुमान, निष्कर्ष.

inferior /इन्'फिअरिअ(र्)/ *वि* (*to*)// कमी प्रतीचा, कनिष्ठ प्रतीचा, हलका, निकृष्ट, दुय्यम. **inferior** *ना* [*गण*] कनिष्ठ व्यक्ती, खालच्या पायरीवरचा माणूस. **inferiority** /इन्,फिअरि'ऑरटि; *अमे* -'ऑऽर्-/ *ना* [*अगण*] कमी प्रत, उतरता दर्जा, खालची प्रत; कनिष्ठता. **inferiority complex** *ना* [*गण*] आपण इतरांपेक्षा गौण आहोत अशी भावना, न्यूनगंड.

infernal /इन्'फऽन्ल्/ *वि* १ नरकाचा. २ (*अनौप*) हैराण करणारा.

inferno /इन्'फऽनउ/ *ना* [*गण*] (*ब.व* ~s) १ भस्मसात् करणारी आग (असणारी जागा), अग्निकुंड, भडका, आगीचा डोंब. २ नरकवत्.

infertile /इन्'फऽटाइल्; *अमे* -ट्ल्/ *वि* ओसाड, नापिक, निकस : *~ land, नापिक किंवा पडीक जमीन.*

infest /इन्'फेस्ट्/ *क्रि* [*सक*] (*with*)// (उंदीर, किडे इत्यादींचा) सुळसुळाट होणे, बुजबुजाट होणे : *a dog ~ed with fleas, अंगावर गोमाश्यांचा बुजबुजाट असलेला कुत्रा/गोमाश्यांनी लडबडलेला कुत्रा.*

infidelity /,इन्फि'डेलटि/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) (*औप*) नवऱ्याशी किंवा बायकोशी केलेली प्रतारणा, बेइमानी, हरामी, एकनिष्ठ नसणे.

infighting /'इन्फाइटिङ्/ *ना* [*अगण*] संघटनेतील लाथाळी, अंतर्गत कुरबुर, अंतर्कलह.

infiltrate /'इन्फिल्ट्रेइट्/ *क्रि* [*सक*] उपद्रव करण्यासाठी किंवा हेरगिरीसाठी लपतछपत प्रवेश करणे, घुसखोरी करणे. **infiltration** /,इन्फिल्'ट्रेइश्न्/ *ना* [*अगण*] घुसखोरी. **infiltrator** *ना* [*गण*] घुसखोर.

infinite /'इन्फिनट्/ *वि* अपार, अमर्याद;

अनंत, अमित. **infinitely** *क्रिवि* अमर्याद; शेवट न होता, अनंत असा.

infinitive /इन्'फिनटिव्ह्/ *ना* [*गण*] (*व्याकरण*) विकारप्रत्यय नसलेले असे क्रियापदाचे मूळ रूप, धातुरूप (इंग्रजीत to सह किंवा to विना वापर – उदा 'let him *go*', 'allow him *to go*'), मराठीत नामकारी – उदा त्याचे *बोलणे*.

infinity /इन्'फिनटि/ *ना* [*अगण*] अनंत अंतर, अवकाश किंवा संख्या, अनंतता.

infirm /इन्'फऽम्/ *वि* अशक्त – विशेषतः वार्धक्याने किंवा आजारपणाने, कमजोर, विकलांग. **infirmity** *ना* [*गण, अगण*] (*ब.व* -ies) कमजोरी, अशक्तपणा.

infirmary /इन्'फऽमरि/ *ना* [*गण*] (*ब.व* -ies) इस्पितळ, रुग्णालय, अपंगालय.

inflame /इन्'फ्लेइम्/ *क्रि* [*सक*] एखाद्याला तापवणे, संतप्त करणे, भडकावणे, पेटवणे. **inflamed** *वि* (शरीराच्या भागाबाबत) सुजून लाल झालेला आणि आगआग होणारा, जळजळणारा.

inflammable /इन्'फ्लॅमबल्/ *वि* चटकन् पेटणारा, ज्वालाग्रही, पेट घेणारा; लवकर जळणारा, धडधड पेटणारा.

inflammation /,इन्फ्ल'मेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] शरीराचा भाग सुजून लाल आणि आगआग होण्याची स्थिती, अंगाचा दाह, प्रदाह.

inflammatory /इन्'फ्लॅमट्रि; *अमे* -टॉऽरि/ *वि* लोकांना भडकविणारा, भावना पेटवणारा, प्रक्षोभक : ~ *remarks, भडकवणारे शब्द.*

inflate /इन्'फ्लेइट्/ *क्रि* १ [*अक, सक*] (टायर, फुगा वगैरेबाबत) हवा भरणे, फुगणे. २ [*सक*] (*ला*) (एखाद्याची प्रतिमा) फुगवणे, फुगवून सांगणे, चढवून ठेवणे : *an ~d ego, फुगलेला अहंभाव.* ३ [*अक, सक*] चलनवाढ होणे/करणे. **inflation** /इन्'फ्लेइश्न्/ *ना* [*अगण*] १ फुगवटा, फुगवण्याची कृती. २ चलनवाढीने वस्तूच्या किमतीत होणारी सर्वसाधारण वाढ, चलनफुगवटा. **inflationary** /इन्'फ्लेइश्नरि; *अमे* -नेरि/ *वि* फुगवणारा; चलनवाढीचा.

inflection (तसेच **inflexion**) /इन्'फ्लेक्श्न्/ *ना* [*गण, अगण*] १ (*व्याकरण*) शब्दाच्या रूपात काळ, वचन वगैरेनी होणारा बदल, विकार. २ बोलताना आवाजात होणारा चढउतार, स्वरभेद.

inflexible /इन्'फ्लेक्सबल्/ *वि* १ वाकवता किंवा वळवता येत नाही असा, न वाकणारा, कडक, ताठ. २ (*ला*) न वाकणारा, न बदलणारा, ताठर. **inflexibility** /इन्,फ्लेक्स'बिलटि/ *ना* [*अगण*] कडकपणा, ताठरपणा; ताठा. **inflexibly** *क्रिवि* न वाकता, ताठपणे.

inflict /इन्'फ्लिक्ट्/ *क्रि* [*सक*] (*on*)// शिक्षा, त्रास वगैरे लादणे, लावणे, देणे : ~ *a defeat on the enemy, शत्रूला हार खायला लावणे.* **infliction** /इन्'फ्लिक्श्न्/ *ना* [*अगण, गण*] (पीडा) देणे.

influence /'इन्फ्लुअन्स्/ *ना* १ [*अगण*] परिणाम घडविण्याची शक्ती, प्रभाव. २ [*गण*] प्रभावी व्यक्ती/वस्तू : *She's a bad ~ on me, तिचा माझ्यावर फार वाईट प्रभाव पडतो.* ३ [*अगण*] वजन : *Can you use your ~ to get me a job? मला नोकरी मिळायला तुझं वजन वापरशील?* ४ (*वाक्प्र*) **under the 'influence** (*औप* किंवा *गंमत*) धुंद, नशा चढलेला, तर्र. **influence** *क्रि* [*सक*] प्रभाव पाडणे; वजन पाडणे.

influential /,इन्फ्लु'अेन्श्ल्/ *वि* वशिला लावू शकणारा, वजन असलेला, वट असलेला.

influenza /,इन्फ्लु'अेन्झ/ *ना* [*अगण*] (*औप*) थंडी, ताप आणि अंगदुखीचा त्रास देणारा एक संसर्गजन्य रोग, फ्लू, शीतज्वर, प्रतिश्यायज्वर.

influx /'इन्फ्लक्स्/ *ना* [*गण*] मोठ्या प्रमाणात किंवा संख्येने येणे, लोट, लोंढा : *an ~ of tourists, पर्यटकांचा लोंढा.*

inform /इन्'फॉऽम्/ *क्रि* १ [*सक*] माहिती किंवा ज्ञान देणे. २ [*अक*] *against/on*// (*कायदा*) (पोलिसांना) एखाद्याची खबर देणे, माहिती देणे. **informant** /-अन्ट्/ *ना* [*गण*] माहिती देणारा. **informed** *वि* ज्ञान असलेला, माहिती असलेला, माहितगार. **informer** *ना* [*गण*] पोलिसांना माहिती देणारा, खबऱ्या.

informal /इन्'फॉऽम्ल/ *वि* १ अनौपचारिक : ~ *clothes, नेहमीचा साधा/अनौपचारिक पोषाख.* २ (शब्दांबाबत) अनौपचारिक (भाषण), शिळोप्याच्या (गप्पा). **informality** /,इन्फॉऽ'मॅलटि/ *ना* [*अगण*] अनौपचारिकता, घरगुतीपणा. **informally** *क्रिवि* अनौपचारिकपणे.

information /,इन्फ'मेइश्न्/ *ना* [*अगण*] (*on/about*)// सत्य परिस्थिती, ज्ञान, माहिती.

informative /इन्'फॉऽमटिव्ह्/ *वि* माहितीपूर्ण, अभ्यासपूर्ण.

infra-red /,इन्फ्र'रेड्/ *वि* वर्णालेखातील लाल रंगाखाली असणाऱ्या उष्णतादायक पण अदृश्य किरणांचा.

infrequent /इन्'फ्रीक्वन्ट्/ *वि* वारंवार न येणारा, विरळ; कधीमधी येणारा, क्वचित् असा. **infrequency** /-क्वन्सि/ *ना* [*अगण*] विरळपणा, अपौनःपुन्य. **infrequently** *क्रिवि* अधूनमधून; क्वचित्.

infringe /इन्'फ्रिन्ज्/ *क्रि* १ [*सक*] (नियम वगैरे) मोडणे, उल्लंघणे. २ [*अक*] *on*// अनधिकृतपणे अतिक्रमण करणे : ~ *on the rights of other people, इतरांच्या अधिकारांवर अतिक्रमण करणे.* **infringement** *ना* [*गण, अगण*] उल्लंघन, मर्यादाभंग, अतिक्रमण.

infuriate /इन्'फ्युअरिअेइट्/ *क्रि* [*सक*] एखाद्याला संतप्त करणे, क्रुद्ध करणे, एखाद्याचा राग ओढवून घेणे.

infuse /इन्'फ्यूझ्/ *क्रि* १ [*सक*] (*औप*) एखादा गुण घालणे, अंगामध्ये आणणे : ~ *the workers with energy* किंवा ~ *energy into the workers, कामगारांत जोम आणणे.* २ [*अक, सक*] (चहा किंवा औषधी मुळ्यांबाबत) गरम पाण्यात बुडवून पेय करणे. **infusion** /इन्'फ्यूझ्न्/ *ना* [*गण, अगण*] काढा (करणे).

ingenious /इन्'जीनिअस्/ *वि* १ (माणसाबाबत) अक्कलहुशारीचा, हिकमती, हरहुन्नरी, कल्पक. २ (वस्तूबाबत) कल्पकतेची, योजकतापूर्ण. **ingeniously** *क्रिवि* कल्पकतेने, हिकमतीने. **ingenuity** /,इन्जि'न्यूअटि; *अमे* -'नू-/ *ना* [*अगण*] कल्पकता, चतुराई.

ingot /'इङ्गट्/ *ना* [*गण*] धातूची वीट, चीप.

ingrained /इन्'ग्रेइन्ड्/ *वि* (सवयींच्या वगैरेबाबत) पूर्णपणे बिंबलेल्या, रक्तात भिनलेल्या.

ingratiate /इन्'ग्रेइशिअेइट्/ *क्रि* [*सक*] (*औप अधिक्षेपी*) ~ **oneself (with)** मर्जी संपादन करणे, पोटात शिरणे, लाळघोटेपणा करणे. **ingratiating** *वि* लाळघोट्या, पुढेपुढे करणारा.

ingratitude /इन्'ग्रॅटिट्यूड्; *अमे* -टूड्/ *ना* [*अगण*] कृतघ्नपणा, नमकहरामी.

ingredient /इन्'ग्रीडिअन्ट्/ *ना* [*गण*] मिश्रणातील एक घटक, घटकद्रव्य : *the ~s of a cake, केकमधले जिन्नस.*

inhabit /इन्'हॅबिट्/ *क्रि* [*सक*] राहणे, वास करणे, नांदणे. **inhabitant** /-अन्ट्/ *ना* [*गण*] रहिवासी, राहणारा माणूस.

inhale /इन्'हेइल्/ *क्रि* [*अक, सक*] श्वास घेणे, हुंगणे. **inhaler** *ना* [*गण*] श्वास घेणे सोपे करण्यासाठी वाफारा देणारे एक साधन.

inherent /इन्'हिअरन्ट्, -'हेर्-/ *वि* (*in*)// अंगभूत, अंगचा, स्वाभाविक : ~ *weaknesses in a design, आराखड्यातील अंगभूत/मूळच्या उणिवा.*

inherit /इन्'हेरिट्/ *क्रि* [*सक*] १ पैसा, इस्टेट वगैरे एखाद्याच्या मृत्यूनंतर वारसाने मिळणे. २ गुणांचा वारसा येणे, वंशपरंपरेने (गुण, कला वगैरे) चालत येणे. **inheritance** *ना* १ [*अगण*] वारसा; अनुवंशिकता. २ [*गण*] मिळालेला वारसा, वारसाप्राप्त संपत्ती, वतन, बापरोटी. **inheritor** *ना* [*गण*] वारस, वारसदार, उत्तराधिकारी.

inhibit /इन्'हिबिट्/ *क्रि* [*सक*] (*from*)// बंदी करणे, मना करणे, अटकावणे. **inhibited** *वि* भावनाभिव्यक्ती दडपलेला, मनावर दडपण असलेला. **inhibition** /,इन्हि'बिश्न्/ *ना* [*गण, अगण*] दडपलेपण, अवरोधन, दडपण.

inhospitable /,इन्हॉ'स्पिटब्ल्/ *वि* आगतस्वागत न करणारा, आतिथ्यविमुख, अहोजाहो नसलेला; असुखकारक, प्रतिकूल : *an ~ climate, खराब किंवा प्रतिकूल हवामान.*

inhuman /इन्'ह्यूमन्/ *वि* दयामाया नसलेला, निष्ठुर, क्रूर, अमानुष, पाशवी.

inhumanity /,इन्ह्यू'मॅनटि/ *ना* [*अगण, गण*] (*ब.व* -ies) निर्दयता, अमानुषता, पाशवीपणा.

inhumane /,इन्ह्यू'मेइन/ *वि* दयाहीन, भूतदया नसलेला; कठोर, क्रूर. **inhumanely** *क्रिवि* भूतदयेविना, क्रूरपणे.

inimitable /इ'निमिटब्ल्/ *वि* अनुकरण करण्यास अशक्य, अद्वितीय.

initial /इ'निश्ल्/ *वि* प्रारंभीचा, पहिला, आद्य, पूर्व. **initial** *ना* [*गण, बहुधा ब.व*] नावातील आद्याक्षर. **initial** *क्रि* (**-ll-**; *अमे* बहुधा **-l-**) [*अक, सक*] आद्याक्षरे काढून सही करणे, आद्याक्षरित करणे. **initially** /-शलि/ *क्रिवि* सुरुवातीला, प्रारंभी.

initiate /इ'निशिअेइट्/ *क्रि* [*सक*] १ (*औप*) एखाद्या गोष्टीस सुरुवात करणे, प्रारंभ करणे. २ (*into*)// मंडळ, गट वगैरेमधे एखाद्याची ओळख करून देणे, परिचय करून देणे, दीक्षा देणे. **initiate** /इ'निशिअट्/ *ना* [*गण*] नवपरिचित, दीक्षा दिलेला. **initiation** /इ,निशि'अेइशन्/ *ना* [*अगण*] सुरुवात, दीक्षा.

initiative /इ'निशटिव्ह्/ *ना* १ [*गण*] अडचण सोडविण्यासाठी केलेली युक्ती, उपक्रमशीलता. २ **the initiative** [*अे.व*] कृती करण्याची ताकद किंवा त्याचा हक्क, पुढाकार. ३ [*अगण*] मदतीशिवाय काही करण्याची क्षमता, स्वतःची ताकद, स्वसामर्थ्य : *do something on one's own ~, एखादी गोष्ट स्वबळावर करणे.* ४ (*वाक्प्र*) **take the initiative** एखाद्या कामात पुढाकार घेणे, अग्रेसर राहणे, मनावर घेणे.

inject /इन्'जेक्ट्/ *क्रि* [*सक*] १ सुईने शरीरात टोचणे : *~ a drug into sb, ~ sb with a drug, एखाद्याला औषध टोचणे.* २ (*into*)// (*ला*) चैतन्य निर्माण करणे, भारावून टाकणे : *~ new life into the team, संघात नवचैतन्य आणणे.* **injection** /इन्'जेक्शन्/ *ना* [*गण, अगण*] सुईने अंगात औषध टोचणे, सुईटोचणी.

injunction /इन्'जेङ्क्शन्/ *ना* [*गण*] (*औप*) न्यायालयाचा हुकूम, ताकीदपत्र, निषेधाज्ञा.

injure /'इन्ज(र्)/ *क्रि* [*सक*] इजा करणे, जखम करणे; नुकसान करणे, हानी पोहोचविणे. **injured** *वि* जखमी, घायाळ. **the injured** *ना* [*ब.व*] जखमी लोक.

injury /'इन्जरि/ *ना* (*ब.व* -ies) १ [*अगण*] इजा, जखम; नुकसान, हानी. २ [*गण*] (क) शारीरिक अपाय किंवा इजा, दुखापत. (ख) भावनिक नुकसान.

injustice /इन्'जस्टिस्/ *ना* १ [*अगण*] अन्याय, अधर्म. २ [*गण*] अन्यायकारक कृत्य. ३ (*वाक्प्र*) **do sb an in'justice** एखाद्यावर अन्याय करणे.

ink /इङ्क्/ *ना* [*अगण, गण*] लिखाण, छपाई वगैरे करता वापरायचे रंगीत द्रव, शाई. **inky** *वि* काळा.

inkling /'इङ्क्लिङ्/ *ना* [*अे.व*] अस्पष्ट कल्पना, पुसटशी कल्पना.

inland /'इन्लन्ड्/ *वि* देशान्तर्गत, देशातील, अंतर्देशीय : *~ lakes, देशाच्या आतमधील सरोवरे.* **inland** /,इन्'लॅन्ड्/ *क्रिवि* देशाच्या मध्यप्रदेशाकडे. **the ,Inland 'Revenue** *ना* [*अे.व*] (ब्रिटनमधे) शासकीय करवसुली खाते.

in-laws /'इन्लॉऽझ्/ *ना* [*ब.व*] (*अनौप*) लग्नसंबंधामुळे होणारे नातेवाईक, सासरचे लोक किंवा सासुरवाडीचे लोक.

inlet /'इन्लेट्/ *ना* [*गण*] भूप्रदेशात शिरलेली पाण्याची पट्टी.

inmate /'इन्मेइट्/ *ना* [*गण*] तुरुंग, इस्पितळ वगैरेत असणारा माणूस, सहवासी.

inmost /'इन्मउस्ट्/ *वि* १ अगदी आतल्या भागाचा, अंतर्भागाचा, गाभ्यातला. २ (*ला*) अगदी गुप्त : *~ thoughts, मनात खोल दडलेले विचार.*

inn /इन्/ *ना* [*गण*] ग्रामीण भागातील छोटेसे जुने हॉटेल, वाटेवरची खानावळ. **'innkeeper** *ना* [*गण*] खानावळ-चालक.

innards /'इनड्झ्/ *ना* [*ब.व*] १ पोट आणि/ किंवा आतडी, कोथळा. २ कोणतेही आतले भाग, अंतर्भाग.

innate /इ'नेइट्/ *वि* (गुण वगैरेबाबत) निसर्गदत्त, जन्मजात, स्वभावसिद्ध, उपजत. **innately** *क्रिवि* निसर्गतः, जन्मापासून.

inner /'इन(र्)/ *वि* १ आतील; मध्याजवळचा. २ (भावनांबाबत) अव्यक्त, अंतस्थ. **innermost** /-मउस्ट्/ *वि* अगदी आतील: *her ~most feelings, तिच्या अगदी अंतस्थ भावना.*

innings /'इनिङ्झ्/ *ना* [*गण*] (*ब.व* **innings**) १ (क्रिकेटमधे) खेळाडू किंवा संघाचा फलंदाजीचा काल, बारी. २ (*वाक्प्र*) **have had a good 'innings** (*ब्रि अनौप*) सुखासमाधानाचे दीर्घायुष्य लाभणे. **inning** *ना* [*गण*] (बेसबॉलमधे) दोन्ही संघांना मारती मिळते असा एक भाग किंवा अशी पाळी.

innocent /'इनस्न्ट्/ *वि* १ निरपराध. २ निरुपद्रवी: ~ *fun, निरुपद्रवी गंमत.* ३ निरागस, निष्पाप. ४ काही न कळणारा, अजाण, अज्ञानी, अडाणी, भोळाभाबडा. **innocence** /-स्न्स्/ *ना* [*अगण*] निरपराधित्व; निरागसता; अज्ञान, अजाणतेपणा. **innocently** *क्रिवि* निरागसपणे; अजाणतेपणाने.

innocuous /इ'नॉक्युअस्/ *वि* अनुपद्रवी, न लागणारा: *an ~ remark, न बोचेल असा शेरा.*

innovate /'इनव्हेइट्/ *क्रि* [*अक*] बदल करणे; नवीन गोष्टी आणणे. **innovation** /,इन'व्हेइश्न्/ *ना* १ [*अगण*] बदल; नाविन्य, नवीन क्लुप्ती. २ [*गण*] नवीन मार्ग, पद्धती, पायंडा. **innovative** /'इनव्हटिव्ह्/ (तसेच **innovatory** /,इन्'व्हेइटरि/) *वि* नाविन्यपूर्ण, बदलानुकारी. **innovator** *ना* [*गण*] बदल घडवणारा, नवीन पायंडे पाडणारा, नवसंप्रदायप्रवर्तक.

innuendo /,इन्यू'अेन्डउ/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **~es** /-झ्/) व्यंगोक्ती, व्याजनिंदा, प्रच्छन्न संदर्भ, नाव न घेता केलेला उल्लेख, छुपी टीका.

innumerable /इ'न्यूमरब्ल्; *अमे* इ'नू-/ *वि* अगणित, असंख्य.

inoculate /इ'नॉक्युलेइट्/ *क्रि* [*सक*] रोगप्रतिबंधक लस टोचणे: ~ *sb against cholera, कॉलऱ्याची लस टोचणे.* **inoculation** /इ,नॉक्यु'लेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] लस-टोचणी.

inoffensive /,इन'फेन्सिव्ह्/ *वि* अपमान न करणारा, अपमानकारक नसलेला; उद्धट नसलेला.

inopportune /,इन्'ऑपट्यून्; *अमे* -टून्/ *वि* (*औप*) अयोग्य, अवेळीचा, भलता: *an ~ remark/time, अयोग्य शब्द/वेळ.* **inopportunely** *क्रिवि* अवेळी, भलताच, अयोग्यपणे.

inordinate /इन्'ऑऽडिनट्/ *वि* (*औप*) अमर्याद, बेसुमार; भरमसाट. **inordinately** *क्रिवि* बेसुमारपणे; भरमसाट, फाजील.

inorganic /,इनॉऽ'गॅनिक्/ *वि* निर्जीव पदार्थांचा बनलेला, अचेतन, अजैव, असेन्द्रिय, अकार्बनी: *Rocks and minerals are ~, खडक आणि खनिजे असेन्द्रिय असतात.*

input /'इन्पुट्/ *ना* १ [*अगण*] एखादी गोष्ट आत घालणे, भरवणे, आदान. २ [*गण*] आत घातलेली गोष्ट, निविष्टी – उदा संगणकामधे भरायची माहिती. **input** *क्रि* (**-tt-**, *भूत भूत वि* **input** किंवा **~ted**) [*सक*] संगणकामधे (माहिती) भरणे.

inquest /'इङ्क्वेस्ट्/ *ना* [*गण*] अनपेक्षित झालेल्या मृत्यूची अधिकृत चौकशी, अनपेक्षित मृत्यूचा (पोलीस) तपास.

inquire (तसेच **enquire**) /इन्'क्वाइअ(र्)/ *क्रि* १ [*सक*] एखाद्या गोष्टीची चौकशी करणे, पृच्छा करणे, विचारणे. २ [*अक*] (*about*)// एखाद्या गोष्टीविषयी माहिती घेणे: ~ *about trains to Oxford, ऑक्सफर्डला जाणाऱ्या गाड्यांची चौकशी करणे.* ३ (*क्रिब*) **inquire after sb** एखाद्याच्या प्रकृतीची चौकशी करणे, कुशल विचारणे. **inquire into sth** एखाद्या गोष्टीविषयी माहिती मिळवणे. **inquiring** *वि* शिकण्याची हौस असलेला, चौकस: *an inquiring mind, चौकस मन.*

inquiry (तसेच **enquiry**) /इन्'क्वाइअरि; *अमे* 'इन्क्वरि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*गण*] प्रश्न; शोध, तपास. २ [*अगण*] विचारणा, पृच्छा, चौकशी.

inquisition /,इन्क्वि'झ़िश्न्/ *ना* [*गण*] (*औप*) कसून केलेली चौकशी, कडक तपासणी, अन्वेषण.

inquisitive /इन्'क्विझ़टिव्ह्/ *वि* इतरांच्या व्यवहारात (अति)रस घेणारा, चौकस, विचक्षणाखोर. **inquisitively** *क्रिवि* चौकसपणे.

inroads /'इन्‌रउड्झ्/ *ना* [*ब.व*] १ (एखाद्या प्रदेशावरील) अचानक हल्ला, धाड. २ (*वाक्प्र*) **make inroads into/on sth** हळूहळू अधिकाधिक कुरतडणे, खाणे, वापरणे वगैरे : *make ~ into one's savings, केलेली बचत हळूहळू संपवणे/वापरणे.*

insane /इन्'सेइन्/ *वि* वेडा, भ्रमिष्ट. **insanely** *क्रिवि* वेड्यासारखे, मूर्खासारखे. **insanity** /इन्'सॅनटि/ *ना* [*अगण*] वेड, भ्रम.

insatiable /इन्'सेइशब्‌ल्/ *वि* ज्याचे समाधान होत नाही असा, असमाधानी, अतृप्त, असोशी, अधाशी, वखवखलेला.

inscribe /इन्'स्क्राइब्/ *क्रि* [*सक*] लिहिणे, कोरणे : *~ words on a tombstone, थडग्यावर शब्द कोरणे* ○ *~ a book with one's name, पुस्तकावर स्वतःचे नाव लिहिणे.* **inscription** /इन्'स्क्रिप्श्‌न्/ *ना* [*गण*] शिलालेख, कोरीव लेख.

inscrutable /इन्'स्क्रूटब्‌ल्/ *वि* समजता येणार नाही असा, अतर्क्य, गहन, गूढ.

insect /'इन्सेक्ट्/ *ना* [*गण*] कीटक, किडा. **insecticide** /इन्'सेक्टिसाइड्/ *ना* [*गण, अगण*] कीटक मारण्याकरता वापरायचे रसायन, कीटकनाशक.

insecure /,इन्सि'क्युअ(र्)/ *वि* १ असुरक्षित. २ आत्मविश्वास नसलेला. **insecurely** *क्रिवि* असुरक्षितपणाच्या भावनेने, आत्मविश्वास नाही अशा रीतीने. **insecurity** *ना* [*अगण*] असुरक्षितपणा; असुरक्षिततेची भावना, स्वतःवरचा अविश्वास.

insensible /इन्'सेन्सब्‌ल्/ *वि* (*औप*) १ बेशुद्ध, बेसावध, बधीर. २ (*of*)// जाणीव नसलेला. ३ (*to*)// संवेदनाहीन : *~ to pain, दुःखाची संवेदना हरवलेला.* **insensibility** /इन्,सेन्स'बिलटि/ *ना* [*अगण*] बेशुद्धी, बधीरता; संवेदनशून्यता.

insensitive /इन्'सेन्सटिव्ह्/ *वि* भावनाहीन, रुक्ष; मद्दड, कशाचाही (मनावर) परिणाम न होणारा, मख्ख. **insensitively** *क्रिवि* रुक्षपणे, कोरडेपणाने, भावहीनतेने; मख्खपणे **insensitivity** /इन्,सेन्सि'टिव्हटि/ भावनाशून्यता, मख्खपणा.

inseparable /इन्'सेप्रब्‌ल्/ *वि* वेगळा न करता येण्यासारखा, अविभाज्य, अतूट : *~ friends, अलग न होणारे/नेहमी बरोबर असणारे मित्र, जोडगोळी.*

insert /इन्'सऽट्/ *क्रि* [*सक*] आत घालणे : *~ a key in a lock, कुलुपात किल्ली घालणे.* **insert** /'इन्सऽट्/ *ना* [*गण*] आत घातलेले असे काही – उदा वृत्तपत्रांच्या पानांत मधेच जाहिरातीचा घातलेला कागद. **insertion** /इन्'सऽश्‌न्/ *ना* [*गण, अगण*] आत घालणे, निवेशन.

inset /'इन्सेट्/ *ना* [*गण*] मोठ्या चित्रात किंवा छायाचित्रात घातलेले छोटे चित्र किंवा छोटा फोटो, मोठ्या नकाशात घातलेला छोटा नकाशा, अंतर्न्यास.

inshore /,इन्'शॉऽ(र्)/ *वि, क्रिवि* (समुद्रावरील वस्तूबाबत) किनाऱ्यावर(ची), किनाऱ्यालगत(ची), समुद्रकाठची/समुद्रकाठी.

inside^{1} /इन्'साइड्/ *ना* १ [*गण, बहुधा अे.व*] केन्द्राजवळचा भाग, अंतर्भाग, आतील बाजू. २ [*अे.व*] (तसेच **insides** [*ब.व*] (*अनौप*) पोट आणि आतडी. ३ (*वाक्प्र*) **,inside 'out** (क) आतली बाजू बाहेर असलेला, उलटा (शर्ट, गंजिफ्रॉक वगैरे). (ख) पूर्णांशाने, पूर्णपणे, खडान्‌खडा : *know sth ~ out, एखादी गोष्ट पूर्णतः समजणे.* **on the in'side** एखाद्या संघटनेतील आतल्या गोटातला. **inside** *वि* १ आतला. २ आतल्या माणसाचा : *The robbery was an ~ job, दरोडा आतल्या माणसानीच घातला होता.* **insider** *ना* [*गण*] एखाद्या संघटनेतील खास माहिती काढू शकणारा असा आतल्या गोटातील विश्वासू माणूस. **in,sider 'dealing** (तसेच **in,sider 'trading**) *ना* [*अगण*] माहितगाराच्या मदतीने केलेली खरेदी-विक्री – विशेषतः शेअर्सची.

inside^{2} /इन्'साइड्/ (विशेषतः *अमे* **inside of**) *शब्दयो* १ आतमधे, आत : *come ~ the house, घरात येणे.* २ (कालाबाबत) आत, कमी वेळात : *~ a year, एका वर्षाच्या आत.* **inside** *क्रिवि* १ आतमधे – खास करून घरात : *go ~, घरात/आतमधे जाणे.* २ (*व्रात्य*) तुरुंगात.

insidious /इन्'सिडिअस्/ *वि* कुणाच्या नकळत हानी पोचवणारा, कपटी, कावेबाज.

insidiously *क्रिवि* कपटाने, छद्मीपणे.

insight /'इन्साइट्/ *ना* [*गण, अगण*] समज, मर्मदृष्टी, सूक्ष्मदृष्टी : *~s into his character, त्याच्या स्वभावाबाबतची सूक्ष्मदृष्टी.*

insignia /इन्'सिग्निअ/ *ना* [*ब.व*] अधिकाराची किंवा मानाची चिन्हे, सन्मानचिन्हे, पदचिन्हे, अधिकारचिन्हे, अधिचिन्हे.

insignificant /,इन्सिग्'निफिकन्ट्/ *वि* कमी महत्त्वाचा, क्षुल्लक, गौण, किरकोळ. **insignificance** /-कन्स्/ *ना* [*अगण*] क्षुल्लकपणा, गौणत्व, कमीपणा. **insignificantly** *क्रिवि* महत्त्व न देण्याइतका.

insincere /,इन्सिन्'सिअ(र्)/ *वि* खोटा; लबाड, ढोंगी. **insincerely** *क्रिवि* खोटेपणाने; लबाडीने. **insincerity** /-'सेरटि/ *ना* [*अगण*] खोटेपणा; लबाडी.

insinuate /इन्'सिन्युअेइट्/ *क्रि* [*सक*] १ एखादी गोष्ट कडवटपणे आणि अप्रत्यक्षपणे सूचित करणे. २ *into*// (*औप*) इतरांच्या नकळत, शिरकाव करून घेणे, हळूहळू घुसणे. **insinuation** /इन्,सिन्यु'अेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] सूचन.

insipid /इन्'सिपिड्/ *वि* (*अधिक्षेपी*) १ बेचव, पाणचट, अळणी. २ (*ला*) उत्साह नसलेला, मरगळलेला. **insipidly** *क्रिवि* बेचवपणे; रटाळपणे, मरगळून.

insist /इन्'सिस्ट्/ *क्रि* [*अक, सक*] (*on*)// १ जोरदार मागणी करणे, आग्रह धरणे : *~ on going with sb, एखाद्याबरोबर जायचा हट्ट धरणे ○ I ~ that she (should) stop, तिने थांबावं म्हणून मी आग्रह धरतो किंवा असा माझा आग्रह आहे.* २ ठामपणे सांगणे : *He ~s that he is innocent, तो निर्दोष आहे असे तो ठामपणे म्हणतो.* **insistent** *वि* आग्रही, ठाम. **insistence** *ना* [*अगण*] आग्रह, ठाम मागणी.

insofar as /,इन्स'फार् अझ्/ = AS FAR AS (FAR^1).

insolent /'इन्सलन्ट्/ *वि* (*to*)// फार उद्धट, उर्मट. **insolence** /-अन्स्/ *ना* [*अगण*] उर्मटपणा.

insoluble /इन्'सॉल्युब्ल्/ *वि* १ (द्रव्यांबाबत) न विरघळणारा, अविद्राव्य, अविलेय. २ (*ला*) (समस्या वगैरेबाबत) न सुटणारा.

insolvent /इन्'सॉल्व्हन्ट्/ *ना* [*गण*], *वि* कर्ज फेडू न शकणारा, निर्धन, नादार, दिवाळखोर. **insolvency** /-अन्सि/ *ना* [*अगण*] नादारी, दिवाळखोरी.

insomnia /इन्'सॉम्निअ/ *ना* [*अगण*] निद्रानाश. **insomniac** /-निॲक्/ *ना* [*गण*] निद्रानाश झालेला माणूस.

inspect /इन्'स्पेक्ट्/ *क्रि* [*सक*] काळजीपूर्वक तपासणे, परीक्षा करणे. **inspection** /इन्'स्पेक्श्न्/ *ना* [*गण, अगण*] तपासणी. **inspector** *ना* [*गण*] १ शाळेची वगैरे तपासणी करणारा अधिकारी, निरीक्षक. २ (*ब्रि*) सार्जंटच्यां वरचा पण सुपरिन्टेन्डन्टच्या खालचा पोलीस अधिकारी.

inspire /इन्'स्पाइअ(र्)/ *क्रि* [*सक*] १ स्फूर्ती देणे, उद्युक्त करणे, प्रेरणा देणे. २ एखाद्याच्या मनात भावना जागविणे, चेतविणे : *~ sb with confidence ○ ~ confidence in sb, एखाद्याचा आत्मविश्वास जागृत करणे.* **inspiration** /,इन्स्प'रेइश्न्/ *ना* १ [*अगण*] स्फूर्ती, प्रेरकशक्ती, प्रेरणा; स्फूर्ती घेतलेली/प्रेरित झालेली अवस्था, भारलेपणा. २ [*गण*] स्फूर्ती देणारा माणूस, प्रेरक. ३ [*गण*] (*अनौप*) अचानक सुचलेली चांगली कल्पना. **inspired** *वि* स्फूर्ती मिळालेला, प्रेरित. **inspiring** *वि* स्फूर्तिदायक, प्रेरणा देणारा, प्रोत्साहित करणारा.

instability /,इन्स्ट'बिलटि/ *ना* [*अगण*] अस्थैर्य, चंचलता.

install (*अमे* तसेच **instal**) /इन्'स्टॉऽल्/ *क्रि* [*सक*] १ (यंत्रे, फर्निचर वगैरे) बसविणे, स्थापना करणे, मांडणी करणे. २ (*औप*) (एखाद्याला) नवीन काम देणे, नव्या जागी बसविणे. ३ (*औप*) एखाद्या जागी स्थिर होणे, स्थायिक होणे, स्थानापन्न होणे. **installation** /,इन्स्ट'लेइश्न्/ *ना* [*अगण, गण*] प्रतिष्ठापना, मांडणी, बसविणे, अधिकारग्रहण, नवीन जागेवर रुजू होणे.

instalment (*अमे* बहुधा -ll-) /इन्'स्टॉऽल्मन्ट्/ *ना* [*गण*] १ कथेचा प्रसारित होणारा एकेक भाग : *a television series in* *six ~s, सहा भागांची दूरदर्शन मालिका.* २ टप्प्याटप्प्याने द्यायचा पैशाचा हप्ता.

instance /'इन्स्टन्स्/ *ना* [*गण*] १ उदाहरण, सत्य पटविणारी बाब, घटना, नमुना. २ (*वाक्प्र*) **for instance** उदाहरणार्थ.

instant /'इन्स्टन्ट्/ *ना* [*गण, बहुधा अे.व*] १ कालबिंदू, निमिष, क्षण. २ क्षण, पळ : *I'll be there in an ~, मी क्षणात तिकडे येतो* किंवा *मी आलोच तिकडे.* **instant** *वि* १ तात्काळ/ताबडतोब मिळणारा/होणारा : ~ *success, तात्काळ यश.* २ (अन्नाबाबत) सहज आणि लगेच होणारे : ~ *coffee, लगेच होणारी कॉफी.* **instantly** *क्रिवि* ताबडतोब, तात्काळ.

instantaneous /,इन्स्टन्'टेइनिअस्/ *वि* क्षणार्धात होणारा किंवा केलेला, निमिषमात्रात घडणारा, तत्क्षणिक. **instantaneously** *क्रिवि* क्षणार्धात, निमिषमात्रात, डोळ्याचे पाते लवते न लवते तोच.

instead /इन्'स्टेड्/ *क्रिवि* -च्या ऐवजी : *Bill was ill so I went ~, बिल आजारी होता म्हणून त्याच्या ऐवजी मी गेलो.* **instead of** *शब्दयो* -च्या ऐवजी; -च्या बदली, -च्या जागी : *drink tea ~ of coffee, कॉफीऐवजी चहा पिणे.*

instep /'इन्स्टेप्/ *ना* [*गण*] पावलाचा वरचा भाग, पदपृष्ठ, पायाची धूर/धुरी.

instigate /'इन्स्टिगेइट्/ *क्रि* [*सक*] एखादी गोष्ट घडवून आणणे, चिथावणी देणे, उत्तेजन देणे, फूस देणे : ~ *a strike/riot, संपाला/दंग्याला चिथावणी देणे.* **instigation** /,इन्स्टि'गेइश्न्/ *ना* [*अगण*] चिथावणी, फूस. **instigator** *ना* [*गण*] चिथावणीखोर, फूसलाव्या.

instil (*अमे* **instill**) /इन्'स्टिल्/ *क्रि* (-ll-) [*सक*] (*in/into*)// एखाद्याच्या मनात (कल्पना वगैरे) भरविणे, निर्माण करणे.

instinct /'इन्स्टिङ्क्ट्/ *ना* [*गण, अगण*] ठराविक पद्धतीने वागायची नैसर्गिक प्रवृत्ती, सहजप्रवृत्ती, सहजप्रेरणा. **instinctive** /इन्'स्टिङ्क्टिव्ह्/ *वि* नैसर्गिक, सहज, स्वाभाविक : *an ~ive fear of fire, आगीची नैसर्गिक भीती.* **instinctively** *क्रिवि* स्वभावधर्मनि, स्वभावतः, उपजत प्रेरणेने.

institute /'इन्स्टिट्यूट्; *अमे* -टूट्/ *ना* [*गण*] एखाद्या खास ध्येयाकरता स्थापिलेली संस्था (किंवा तिची इमारत). **institute** *क्रि* [*सक*] (*औप*) (चौकशी, नियम वगैरे) सुरू करणे किंवा प्रस्थापित करणे, चालू करणे.

institution /,इन्स्टि'ट्यूश्न्; *अमे* -टूश्न्/ *ना* १ [*अगण*] (नियम वगैरेची) प्रस्थापना, प्रघात, चालू करणे. २ [*गण*] सेवाभावी संस्था (किंवा तिची इमारत) – उदा शाळा किंवा हॉस्पिटल. ३ [*गण*] प्रघात, चालीरीती, पद्धती, समाजव्यवस्था. **institutional** /-शन्ल्/ *वि* संस्थानिक, संस्थेचा; समाजविशिष्ट. **institutionalize** /-शनलाइझ्/ *क्रि* [*सक*] १ समाजव्यवस्थेचा भाग करणे, समाजव्यवस्थेत सामावून घेणे. २ एखाद्याला एखाद्या सेवाभावी संस्थेत आश्रित म्हणून ठेवणे.

instruct /इन्'स्ट्रक्ट्/ *क्रि* [*सक*] १ शिकवणे, अध्यापन करणे. २ आज्ञा करणे, सूचना देणे : *~ the child not to go out, बाहेर न जाण्याची सूचना मुलास देणे* किंवा *मुलाला बाहेर न जाण्यास सांगणे.* ३ (खास करून *कायदा*) अनुदेश देणे, माहिती देणे. **instructive** *वि* माहितीपूर्ण, बोधपर. **instructor** *ना* [*गण*] शिक्षक, निदेशक.

instruction /इन्'स्ट्रक्श्न्/ *ना* १ [*अगण*] सूचन, अनुदेश; शिक्षण. २ [*गण*] आज्ञा, आदेश. ३ **instructions** [*ब.व*] एखादी गोष्ट कशी करायची याविषयीच्या सूचना : *follow the ~s on a tin of paint, रंगाच्या डब्यावरील सूचना पाळणे.*

instrument /'इन्स्ट्रुमन्ट्/ *ना* [*गण*] १ एखाद्या वैज्ञानिक प्रयोगात वगैरे वापरायचे उपकरण, साधन. २ संगीत वाद्य – उदा व्हायोलिन, पियानो. **instrumental** /,इन्स्ट्रु'मेन्ट्ल्/ *वि* १ *in*// एखाद्या गोष्टीस जबाबदार; कारणीभूत, निमित्तभूत : *You were ~al in her promotion, तू तिच्या बढतीस कारणीभूत होतास.* २ वाद्यविषयक, वाद्याचा. **instrumentalist** /,इन्स्ट्रु'मेन्टलिस्ट्/ *ना* [*गण*] संगीत वाद्य वाजवणारा, वादक.

insubordinate /,इन्स'बॉऽडिनट्/ *वि* आज्ञा न पाळणारा, शिरजोर. **insubordination** /,इन्स,बॉऽडि'नेइश्न्/ *ना* [*अगण, गण*] आज्ञा-उल्लंघन, शिरजोरी.

insufferable /इन्'सफ्रब्ल्/ *वि* सहन न होण्यासारखा, दुःसह : ~ *behaviour, दुःसह वर्तन.*

insufficient /,इन्स'फिश्न्ट्/ *वि* अपुरा, तोकडा. **insufficiency** /-श्न्सि/ *ना* [*अगण*] अपुरेपणा, तोकडेपणा. **insufficiently** *क्रिवि* अपुरेपणाने, पुरेसे नाही अशा रीतीने.

insular /'इन्स्युल(र्); *अमे* -सलर्/ *वि* १ (*अधिक्षेपी*) संकुचित मनाचा, कोता. २ द्वीपाचा, बेटाचा. **insularity** /,इन्स्यु'लॅरटि; *अमे* -स'ल्-/ *ना* [*अगण*] कोतेपणा, संकुचितपणा.

insulate /'इन्स्युलेइट्; *अमे* -सल्-/ *क्रि* [*सक*] १ उष्णता किंवा वीज बाहेर जाणार नाही असे आवरण घालणे, विसंहवन करणे, निरोधन करणे : *~d wire, निरोधित तार, विजेचा धक्का बसणार नाही अशी तार.* २ (*ला*) एखाद्याचे वाईट परिणामांपासून संरक्षण करणे. **insulation** /,इन्स्यु'लेइश्न्; *अमे* -स'ल्-/ *ना* [*अगण*] निरोधन (करण्याचे साहित्य).

insult /इन्'सल्ट्/ *क्रि* [*सक*] एखाद्याचा अपमान करणे, उपमर्द करणे. **insult** /'इन्सल्ट्/ *ना* [*गण*] अपमानकारक शब्द, उपमर्दकारक वागणूक, उद्धट वर्तन. **insulting** *वि* अपमानकारक, उपमर्दकारक.

insurance /इन्'शॉऽरन्स्; *अमे* -शुअर्-/ *ना* १ [*अगण*] (क) मृत्यू, आजार, नुकसान वगैरे झाल्यास एखादी कंपनी किंवा राज्य यांजकडून नियमित हप्त्यांच्या बदल्यात भरपाई मिळण्याचा करारनामा, विमा. (ख) विम्याची रक्कम. २ [*गण*] (*ला*) अपयश वगैरे विरुद्ध संरक्षण.

insure /इन्'शॉऽ(र्); *अमे* इन्'शुअर्/ *क्रि* [*सक*] १ विमा उतरविणे : ~ *a car against fire/theft, गाडीचा आगीचा/चोरीचा विमा उतरविणे.* २ (*अमे*) = ENSURE.

insurgent /इन्'सऽजन्ट्/ *वि* बंडखोर. **insurgent** *ना* [*गण*] बंडखोर सैनिक.

insurmountable /,इन्स'माउन्टब्ल्/ *वि* (*औप*) (समस्या, अडचणी यांबाबत) दुर्लंघ्य, न सुटणारी, मार्ग नसलेली, पार करणे अशक्य अशी.

insurrection /,इन्स'रेक्श्न्/ *ना* [*गण, अगण*] बंड, उठाव.

intact /इन्'टॅक्ट्/ *वि* काहीही हानी न पोहोचलेला, सुरक्षित, जसाच्या तसा, अखंड, संपूर्ण, अविच्छिन्न.

intake /'इन्टेइक्/ *ना* १ (क) [*अगण*] यंत्रामधे पेट्रोल, इतर द्रव वगैरे आत घेण्याची पद्धती, अंतर्ग्रहण, चय. (ख) [*गण*] द्रव आत जाण्याची जागा. २ [*गण, अगण*] प्रवेश दिलेली संख्या : *last year's ~ of students, गेल्या वर्षी प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या.*

intangible /इन्'टॅन्जब्ल्/ *वि* १ स्पष्टपणे समजण्यास अशक्य, अस्पष्ट : *an ~ air of sadness, अनाकलनीय शोककळा.* २ (*वाणिज्य* किंवा *व्यापार*) अमूर्त : *the ~ value of a good reputation, नावलौकिकाची अमूर्त किंमत किंवा मोजता न येण्यासारखे महत्त्व.*

integer /'इन्टिज(र्)/ *ना* [*गण*] (*गणित*) पूर्णांक – उदा १, ३, ११.

integral /'इन्टिग्रल्/ *वि* पूर्णत्वास नेण्यास आवश्यक, अविभाज्य : *an ~ part of the plan, योजनेचा अविभाज्य भाग.* **integrally** *क्रिवि* अविभाज्यपणे.

integrate /'इन्टिग्रेइट्/ *क्रि* १ [*सक*] (*into/with*)// एकत्र करणे, एकात्म करणे, एखाद्या गोष्टीत सामावून टाकणे. २ [*अक, सक*] (लोकांबाबत) मिसळून जाऊन एकसंध होणे, मुख्य प्रवाहात सामील होणे, समाजाशी एकरूप होणे. **integration** /,इन्टि'ग्रेइश्न्/ *ना* [*अगण*] एकात्मता, एकता; एकत्रीकरण, साकल्य.

integrity /इन्'टेग्रटि/ *ना* [*अगण*] १ सौजन्य आणि प्रामाणिकपणा, सचोटी, नेकी. २ अखंडता; एकात्मता.

intellect /'इन्टलेक्ट्/ *ना* [*अगण*] मनाची विचारशक्ती, बुद्धी, प्रज्ञा. **intellectual** /,इन्टि'लेक्चुअल्/ *वि* १ बौद्धिक. २ व्यावहारिक गोष्टींपेक्षा बौद्धिक गोष्टीत रस असणारा, बुद्धिजीवी. **intellectual** *ना* [*गण*] बुद्धिजीवी मनुष्य. **intellectually** *क्रिवि* बौद्धिकदृष्ट्या.

intelligence /इन्'टेलिजन्स्/ *ना* १ [*अगण*] शिकण्याची, समजण्याची आणि विचार करण्याची शक्ती, बुद्धी, मती. २ (क) [*अगण*]

शत्रूविषयीची माहिती, गुप्तवार्ता. (ख) [*अे.व*] (अे.व किंवा ब.व क्रियापदासह) गुप्तहेर. **intelligent** /-जन्ट्/ *वि* हुषार, बुद्धिमान. **intelligently** *क्रिवि* हुषारीने, बुद्धी वापरून.

intelligible /इन्'टेलिजब्ल्/ *वि* समजण्यासारखा, सुगम, सुबोध. **intelligibility** *ना* [*अगण*] सुगमता, बुद्धिगम्यता. **intelligibly** *क्रिवि* कळेल असा, समजण्याजोगा.

intend /इन्'टेन्ड्/ *क्रि* [*सक*] उद्देश असणे, हेतू असणे; अर्थ असणे : *I ~ to leave soon, माझा लवकरच जाण्याचा बेत आहे.*

intense /इन्'टेन्स्/ *वि* १ कमालीचा, तीव्र; शक्तिमान, प्रबळ, जोरदार : *~ heat/anger, कमालीची उष्णता/प्रखर राग.* २ (माणसाबाबत) गंभीर आणि भावनिक, अभिनिवेशयुक्त. **intensely** *क्रिवि* तीव्रतेने. **intensify** /-सिफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*अक, सक*] तीव्र करणे, प्रखर करणे, उग्र रूप धारण करणे. **intensification** /इन्,टेन्सिफि'केइशन्/ *ना* [*अगण*] तीव्र करणे. **intensity** *ना* [*अगण*] तीव्रता; (भावना वगैरेची) तीव्रता.

intensive /इन्'टेन्सिव्ह्/ *वि* कामावर, प्रयत्नावर वगैरे सर्व लक्ष केन्द्रित केलेला, सघन; बारकाईचा, कसून केलेला : *an ~ search, कसून केलेला तपास.* **intensively** *क्रिवि* सर्वशक्तीनिशी.

intent^{1} /इन्'टेन्ट्/ *वि* १ लक्षपूर्वक, खिळलेला, टकमक : *an ~ look/gaze, न ढळणारी दृष्टी.* २ *on*// ठाम निश्चय झालेला : *~ on becoming manager, व्यवस्थापक होण्याचा दृढनिश्चय केलेला.* **intently** *क्रिवि* एकाग्रतेने.

intent^{2} /इन्'टेन्ट्/ *ना* १ [*अगण*] (खास करून *कायदा*) हेतू, इरादा : *shoot with ~ to kill, ठार मारण्याच्या उद्देशाने गोळीबार करणे.* २ (*वाक्प्र*) **to all intents (and purposes)** महत्त्वाच्या बाबींबाबत, एकंदरीने; जवळजवळ.

intention /इन्'टेन्शन्/ *ना* [*गण, अगण*] लक्ष्य, रोख; हेतू, उद्देश. **intentional** /-शन्ल्/ *वि* हेतुतः केलेला, मुद्दाम केलेला. **intentionally** *क्रिवि* इराद्याने, मुद्दाम, हेतुतः.

inter /इन्'टऽ(र्)/ *क्रि* **(-rr-)** [*सक*] (*औप*) पुरणे, गाडणे.

interact /,इन्टर्'ॲक्ट्/ *क्रि* [*अक*] (*with*)// १ परस्परांवर परिणाम करणे. २ (लोकांबाबत) एकत्र काम करणे, ऊठबस असणे, परस्परांशी संबंध येणे/संपर्कात येणे, देवाण-घेवाण करणे. **interaction** /-'ॲक्शन्/ *ना* [*अगण, गण*] परस्परांवरील परिणाम; संपर्क, देवाण-घेवाण. **interactive** *वि* १ परस्परांवर परिणामकारी; देवाण-घेवाणीचा. २ (*संगणन*) संगणक आणि त्याचा वापर करणारी व्यक्ती यात सतत माहितीची देवाण-घेवाण चालू ठेवणारा.

intercept /,इन्ट'सेप्ट्/ *क्रि* [*सक*] (एकीकडून दुसरीकडे जाणाऱ्या एखाद्या व्यक्तीला किंवा गोष्टीला) मधेच थांबवणे, अडवणे. **interception** /-'सेप्शन्/ *ना* [*अगण*] मधे अडवणे.

interchange /,इन्ट'चेइन्ज्/ *क्रि* [*अक, सक*] परस्परांच्या जागा बदलणे, अदलाबदल करणे. **interchange** *ना* १ [*गण, अगण*] अदलाबदल, विनिमय. २ [*गण*] साधे रस्ते मोटारीच्या मार्गाला जोडले जातात ती जागा. **interchangeable** *वि* अदलाबदल करण्याजोगा, एकमेकांना देण्यासारखा.

inter-city /,इन्ट'सिटि/ *वि* (जलद वाहतुकीबाबत) दोन शहरांच्या दरम्यान जाणारी.

intercom /'इन्टकॉम्/ *ना* [*गण*] मायक्रोफोन आणि ध्वनिक्षेपक वापरून एखाद्या इमारतीत वगैरे केलेली संदेशनव्यवस्था किंवा संपर्कव्यवस्था.

intercontinental /,इन्ट,कॉन्टि'नेन्ट्ल्/ *वि* दोन खंडांतील, आंतरखंडीय : *~ flights, आंतरखंडीय उड्डाणे.*

intercourse /'इन्टकॉऽस्/ *ना* [*अगण*] (*औप*) १ ➪ SEXUAL INTERCOURSE (SEXUAL). २ राष्ट्राराष्ट्रांतील, लोकालोकांतील वगैरे व्यवहार.

interest /'इन्ट्रस्ट्/ *ना* १ [*अगण, अे.व*] (*in*)// उत्सुकता, जिज्ञासा, ममत्व : *lose ~, जिज्ञासा संपणे* ○ *take ~ in art, कलेमधे रस घेणे.* २ [*अगण*] उत्सुकता वाढवणारा गुण, वेधकता : *an idea of ~ to us, आमचे लक्ष*

वेधणारी कल्पना. ३ [*गण*] शिकण्याची किंवा करण्याची आवड असलेली गोष्ट : *His great ~ is football, फुटबॉल ही त्याच्या आवडीची गोष्ट.* ४ [*गण,* बहुधा *ब.व*] फायदा : *It is in your ~(s) to work hard, कष्ट घेणं हे तुझ्याच फायद्याचं आहे.* ५ [*अगण*] व्याज : *borrow money at a high rate of ~, चढ्या व्याजाने पैसे उसने घेणे.* ६ [*गण,* बहुधा *ब.व*] उद्योगधंद्यातील वाटा, भाग. ७ [*गण,* बहुधा *ब.व*] एकाच व्यवसाय वगैरेतील लोकांचा गट, हितसंबंधी. ८ (*वाक्प्र*) **in the interests of sth** एखाद्या गोष्टीसाठी. **interest** *क्रि* [*सक*] एखाद्याला रस घ्यायला लावणे, त्याची जिज्ञासा वाढवणे. **interested** *वि* १ (*in*)// रस/आवड असलेला : *be ~ed in history, इतिहासाची आवड असणे.* २ व्यक्तिशः गुंतलेला. **interesting** *वि* एखाद्याचे लक्ष वेधणारा.

interfere /,इन्ट'फिअ(र्)/ *क्रि* [*अक*] १ (*in*)// दुसऱ्याच्या कामात लक्ष घालणे, नाक खुपसणे. २ *with*// (क) परवानगीशिवाय हात लावणे, हानिकारक रीतीने वापरणे वगैरे, ढवळाढवळ करणे, हस्तक्षेप करणे. (ख) एखाद्या गोष्टीत व्यत्यय आणणे, लुडबुड करणे, अडथळा आणणे. ३ *with*// (क) एखाद्याचे लक्ष उडवणे, अडथळा आणणे. (ख) (*ब्रि पर्या*) कामवासनेने स्पर्श करणे किंवा चालून जाणे. **interference** *ना* [*अगण*] १ मधे येणे; हस्तक्षेप, लुडबूड; अडथळा, व्यत्यय. २ (*रेडिओ*) आवाज झाकून टाकणारा गोंगाट, व्यतिकरण.

interim /'इन्टरिम्/ *वि* तात्पुरता, हंगामी, मधल्या काळातला, अंतरिम : *~ arrangements, हंगामी व्यवस्था.* **interim** *ना* (*वाक्प्र*) **in the interim** दोन घटनांच्या मधल्या काळात, अंतरिम काळात.

interior /इन्'टिअरिअ(र्)/ *ना* १ [*गण*] आतला भाग, अभ्यन्तर, अंतर्भाग; आतली बाजू. २ **the interior** [*अ.व*] देशाचा अंतर्भाग, अंतःप्रदेश. **interior** *वि* १ आतील, अंतर्-. २ (*राज्यशास्त्र*) देशान्तर्गत.

interjection /,इन्ट'जेक्श्न्/ *ना* [*गण*] (*व्याकरण*) उद्गारवाचक किंवा केवलप्रयोगी – उदा *Oh! Good heavens! अरेच्या!* वगैरे.

interlock /,इन्ट'लॉक्/ *क्रि* [*अक, सक*] जोडणे, एकमेकात अडकणे, अडकवणे किंवा गुंतणे.

interlude /'इन्टलूड्/ *ना* [*गण*] नाटकाच्या दोन अंकांतील किंवा दोन प्रसंगांतील मध्यान्तर.

intermarry /,इन्ट'मॅरि/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*अक*] आंतरवंशीय, आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह करणे. **intermarriage** /-मॅरिज्/ *ना* [*अगण*] आंतरजातीय वगैरे असा विवाह.

intermediary /,इन्ट्'मीडिअरि; *अमे* -डिअरि/ *ना* [*गण*] (**-ies**) दोन गटांमधे समझोता करणारा मध्यस्थ.

intermediate /,इन्ट'मीडिअद्/ *वि* १ दोन बिंदू किंवा पायऱ्या यांच्या मधला मध्य. २ प्राथमिक आणि उच्च यांमधला, माध्यमिक, मध्यम : *an ~ course, मध्यम अभ्यासक्रम.*

interminable /इन्'टऽमिनब्ल्/ *वि* (बहुधा *अधिक्षेपी*) न संपणारा म्हणून कंटाळवाणा, अतच नसलेला. **interminably** *क्रिवि* न संपता, अंत नसल्यासारखा.

intermission /,इन्ट'मिश्न्/ *ना* [*गण, अगण*] नाटकातील वगैरे मध्यान्तर, विश्रांती.

intermittent /,इन्ट'मिटन्ट्/ *वि* थांबून थांबून येणारा किंवा चालणारा, असंतत : *~ rain, मधूनमधून येणारा पाऊस.* **intermittently** *क्रिवि* मधेमधे थांबत, अधूनमधून येत.

intern^{1} /इन्'टऽन्/ *क्रि* [*सक*] विशेषतः युद्धकाळात, तुरुंगात डांबणे, बंदिस्त करणे. **internment** *ना* [*अगण*] बंदिवास, कैद.

intern^{2} /'इन्टऽन्/ *ना* [*गण*] (*अमे*) इस्पितळातील कनिष्ठ डॉक्टर.

internal /इन्'टऽन्ल्/ *वि* १ आंतर, अंतर्गत : *~ injuries, (शरीराच्या) आतमधे झालेल्या जखमा.* २ अपरकीय, बाहेरचा नसलेला, आतला; घरचा, देशान्तर्गत : *~ trade, देशान्तर्गत व्यापार.* **internally** *क्रिवि* आतून, अंतर्गत पद्धतीने.

international /,इन्ट'नॅश्नल्/ *वि* देशादेशातील, आंतरराष्ट्रीय. **international** *ना* [*गण*] (क) आंतरराष्ट्रीय संघांमधे खेळलेली स्पर्धा. (ख) (अशा स्पर्धांमधे खेळणारा) आंतरराष्ट्रीय स्तरावरचा खेळाडू. **interna-**

tionally *क्रिवि* आंतरराष्ट्रीय असा.

interplay /'इन्टप्लेइ/ *ना* [*अगण*] दोन किंवा अधिक गोष्टींचा एकमेकांवर होणारा परिणाम.

interpose /इन्ट'पउझ़्/ *क्रि* (*औप*) १ [*सक*] दोन गोष्टींमधे ठेवणे, दोघांच्या मधे उभे ठाकणे. २ [*अक*] मधेच थांबवणे, अडथळा आणणे.

interpret /इन्'टऽप्रिट्/ *क्रि* १ [*सक*] (अवघड गोष्ट) समजावून सांगणे, अर्थनिष्पत्ती/अर्थान्तरण करणे, अर्थ सांगणे. २ [*सक*] *as*// एखादी गोष्ट विशिष्ट पद्धतीने समजणे, अर्थ लावणे : *We ~ his silence as an expression of guilt, त्याचे गप्प राहणे म्हणजे गुन्ह्याची कबुली देणे असा आम्ही अर्थ करतो.* ३ [*अक, सक*] दुसऱ्या भाषेत ताबडतोब भाषान्तर करणे. **interpretation** /इन्,टऽप्रि'टेइश्न्/ *ना* [*अगण, गण*] अर्थ सांगणे, अर्थान्तरण; विवेचन, भाष्य. **interpreter** *ना* [*गण*] दुभाषा.

interrogate /इन्'टेरगेइट्/ *क्रि* [*सक*] एखाद्याला खूप प्रश्न विचारून दीर्घ काळ त्याची तपासणी घेणे, चौकशी करणे, पूसतास करणे. **interrogation** /इन्,टेर'गेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] चौकशी, प्रश्नांची सरबत्ती. **interrogator** *ना* [*गण*] प्रश्न विचारणारा, प्राश्निक.

interrogative /,इन्ट'रॉगटिव्ह्/ *वि* (*व्याकरण*) प्रश्नार्थक : *~ pronouns/adverbs (eg who, why), प्रश्नार्थक सर्वनामे/क्रियाविशेषणे (उदा who, why).* **interrogative** *ना* [*गण*] प्रश्नार्थक शब्द.

interrupt /,इन्ट'रैप्ट्/ *क्रि* १ [*अक, सक*] मधेच बोलून दुसऱ्याचे बोलणे थांबवणे, बोलताना अडवणे. २ [*सक*] खंड पाडणे : *~ a journey, प्रवासात खंड पाडणे.* **interruption** /-'रैप्श्न्/ *ना* [*गण, अगण*] बोलण्यात अडथळा, व्यत्यय, खंड, भंग.

intersect /,इन्ट'सेक्ट्/ *क्रि* १ [*अक, सक*] (रेषा, रस्ते वगैरेबाबत) एकमेकाला छेदणे. २ [*सक*] दुभागणे. **intersection** /-'सेक्श्न्/ *ना* १ [*अगण*] छेदन. २ [*गण*] रस्ते एकमेकाला छेदतात ती जागा; चवाठा, तिवाठा.

intersperse /,इन्ट'स्पऽस्/ *क्रि* [*सक*] एखादी गोष्ट इतर गोष्टीत ठेवणे, इतस्ततः पसरणे, विखुरणे.

interval /'इन्टव्ह्ल्/ *ना* [*गण*] १ (क) दोन घटनांतील मधला काळ, मध्यान्तर, अवधी. (ख) दोन गोष्टींतील जागा, मध्यावसर. २ (*ब्रि*) नाटकातील वगैरे मध्यान्तर, विश्रांती.

intervene /,इन्ट'व्हीन्/ *क्रि* [*अक*] (*औप*) १ (*in*)// हस्तक्षेप करून थांबवणे, मधे पडणे. २ (कालाबाबत) मधे जाणे. ३ (घटनांबाबत) एखाद्या गोष्टीला खीळ बसेल असे घडणे. **intervening** *वि* मधे येणारा : *in the intervening years, मधल्या/मध्यन्तरीच्या वर्षांत.* **intervention** /-'व्हेन्श्न्/ *ना* [*गण, अगण*] हस्तक्षेप.

interview /'इन्टव्ह्यू/ *ना* [*गण*] (*with*)// (नोकरी वगैरेसाठी घेतलेली) मुलाखत. **interview** *क्रि* [*सक*] मुलाखतीत प्रश्न विचारणे. **interviewer** *ना* [*गण*] मुलाखत घेणारा.

intestate /इन्'टेस्टेइट्/ *वि* (*कायदा*) मृत्युपत्र न केलेला, विनामृत्युपत्र : *die ~, मृत्युपत्र न करता मरणे.*

intestine /इन्'टेस्टिन्/ *ना* [*गण*, खास करून *ब.व*] जठरापासून गुदद्वारापर्यंत जाणारी शरीरातील लांब नलिका, आंत्र, आतडे. **intestinal** *वि* आतड्याचा.

intimacy /'इन्टिमसि/ *ना* १ [*अगण*] जवळीक, सख्य, सलगी. २ **intimacies** [*ब.व*] चुंबने, कुरवाळणे वगैरे.

intimate^1 /'इन्टिमट्/ *वि* १ घनिष्ट, जिगरी, घट्ट संबंध असलेला : *They are ~ friends, ते जिगरी दोस्त आहेत.* २ खाजगी आणि वैयक्तिक : *~ details of her life, तिच्या आयुष्याचे खाजगी असे तपशील.* ३ गाढ, दांडगा : *an ~ knowledge of Greek, ग्रीकचे गाढ ज्ञान.* **intimately** *क्रिवि* दाट, दृढ; हितगूजाचे, खाजगी असे; बारीकसारीकपणे.

intimate^2 /'इन्टिमेइट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) जाहीर करणे, कळवणे; सूचित करणे. **intimation** /,इन्टि'मेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] वार्ता, बातमी; सूचना.

intimidate /इन्'टिमिडेइट्/ *क्रि* [*सक*] एखाद्याला दम देणे, धमकी देणे. **intimidation** /इन्,टिमि'डेइश्न्/ *ना* [*अगण*]

धमकावणे, धाकदपटशा.

into /'इन्ट, स्वरापूर्वी 'इन्टु/ *शब्दयो* १ आतपर्यंत, आतमधे, आत : *Come ~ the house, घरात ये.* २ धडक देण्याच्या बिंदूपर्यंत, -त, आत : *A lorry drove ~ a line of cars, ओळीत उभ्या असलेल्या मोटारींना ट्रकने धडक दिली किंवा ट्रक मोटारींच्या रांगेत घुसला.* ३ पर्यंत : *work long ~ the night, रात्री खूप उशिरापर्यंत काम करणे.* ४ (रूपबदल दाखवताना) : *Cut the paper ~ strips, कागदाच्या पट्ट्या कर किंवा झिरमिळ्या काप.* ५ (स्थिती किंवा कृतीमधे बदल झालेला दाखवताना) : *frighten sb ~ submission, अधीन होईल इतके एखाद्याला घाबरवणे.* ६ (गणितातील भागाकार दाखविण्यास वापर) भागिले : *5 ~ 25 = 5, २५ भागिले ५ = ५.* ७ (*वाक्प्र*) **be into sth** (*अनौप*) एखाद्या गोष्टीत खूप रस असणे.

intolerable /इन्'टॉलरब्ल्/ *वि* सहन न होणारा, सहनशक्तीच्या पलीकडचा. **intolerably** *क्रिवि* सहन न होईल अशा रीतीने

intolerant /इन्'टॉलरन्ट्/ *वि* सहनशील नसणारा, भडक माथ्याचा, असहिष्णू. **intolerance** /-अन्स्/ *ना* [*अगण*] असहिष्णुता, असोशिकपणा.

intonation /,इन्ट'नेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] बोलताना होणारा आवाजातील चढउतार, सुरयोजन, स्वरशैली.

intoxicate /इन्'टॉक्सिकेइट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) १ (मद्याबाबत) धुंद करणे, नशा चढणे, झिंगवणे, कैफ आणणे. २ (*ला*) एखाद्याला खूप चढविणे, मस्ती आणणे : *~d with success, यशाने धुंद झालेला.* **intoxication** /इन्,टॉक्सि'केइश्न्/ *ना* [*अगण*] कैफ, धुंदी, मस्ती, झिंग.

intransitive /इन्'ट्रॅन्सटिव्ह्/ *वि* (*व्याकरण*) (क्रियापदाबाबत) कर्म नसलेले, कर्मनिरपेक्षी, अकर्मक – उदा 'smoke rises' मधील *rise* किंवा मराठीत 'पक्षी उडतो' मधले उडणे ही क्रियापदे.

in-tray /'इन्ट्रेइ/ *ना* [*गण*] वाचायच्या किंवा उत्तरे द्यायच्या पत्रांचा ट्रे.

intrepid /इन्'ट्रेपिड्/ *वि* (विशेषतः *अलं*) (शूर) वीर : *~ explorers, वीर अन्वेषक/शोधक.* **intrepidly** *क्रिवि* धाडसाने.

intricate /'इन्ट्रिकट्/ *वि* गुंतागुंतीचा, न उकलणारा, अनेक पदरी. **intricacy** /-कसि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] गुंतागुंत. २ [*गण, बहुधा ब.व*] गुंतागुंतीची गोष्ट. **intricately** *क्रिवि* सूक्ष्मतेने, अनेक पदरांनी.

intrigue /इन्'ट्रीग्/ *क्रि* १ [*सक*] आकर्षित करणे, कुतूहल निर्माण करणे : *~ sb with a story, एखादी गोष्ट सांगून एखाद्याला आकर्षित करणे.* २ [*अक*] कपट करणे, कारस्थान करणे. **intrigue** /'इन्ट्रीग्, इन्'ट्रीग्/ *ना* १ [*अगण*] कपटकारस्थान करणे, कुलंगडे रचणे. २ [*गण*] कपटकारस्थान, कुलंगडे. **intriguing** *वि* कोड्यात पाडणारा, अपूर्व म्हणून अधिक आकर्षक.

intrinsic /इन्'ट्रिन्सिक्, -झिक्/ *वि* (गुण किंवा महत्त्व याबाबत) स्वाभाविक, आंतरिक, मूळचा, अंगभूत. **intrinsically** /-क्लि/ *क्रिवि* स्वभावतः, मूळचा.

introduce /,इन्ट्र'ड्यूस्; *अमे* -'डूस्/ *क्रि* [*सक*] १ (*to*)// ओळख करून देणे, परिचय करून देणे : *I ~d Paul to Sarah, मी सॅराला पॉलची ओळख करून दिली.* २ वापरू लागणे, आणणे : *~ computers into schools, शाळांत संगणक वापरू लागणे/आणणे.* ३ तपशील देऊन जाहीर करणे.

introduction /,इन्ट्र'डक्श्न्/ *ना* १ [*गण, अगण*] परिचय, ओळख करून देणे. २ [*गण*] (क) पुस्तकाच्या किंवा भाषणाच्या सुरुवातीला केलेले निवेदन, प्रस्तावना, प्रास्ताविक. (ख) एखाद्या विषयावरचे विद्यार्थ्यांसाठीचे प्राथमिक पाठ्यपुस्तक, विषयप्रवेशाचे पाठ्यपुस्तक. ३ [*अगण*] प्रथम किंवा नवीन वापर.

introductory /,इन्ट्र'डक्टरि/ *वि* प्रस्तावना करणारा, प्राथमिक.

introspection /,इन्ट्र'स्पेक्श्न्/ *ना* [*अगण*] स्वतःच्या विचारांची, भावनांची केलेली चिकित्सा, आत्मपरीक्षण, अंतर्मुख होऊन केलेली परीक्षा, आत्मनिरीक्षण. **introspective** /-स्पेक्टिव्ह्/ *वि* अंतर्मुख असा, आत्मचिकित्सक.

introvert /'इन्ट्रव्हऽट्/ *ना* [*गण*] लाजाळू,

शांत आणि स्वतःच्या विचारात मग्न असणारा माणूस, अंतराभिमुख व्यक्ती, अंतर्मुख व्यक्ती. **introverted** *वि* अंतर्मुख.

intrude /इन्'ट्रूड्/ *क्रि* [*अक*] *on//* अनाहुतपणे येणे, आगंतुकपणे येणे, घुसणे, अनधिकृत प्रवेश करणे. **intruder** *ना* [*गण*] चोरीसाठी घरात वगैरे घुसणारा, अनधिप्रवेशी. **intrusion** /इन्'ट्रूझ्न्/ *ना* [*गण, अगण*] अनधिकृत प्रवेश, घुसणे, अतिक्रम. **intrusive** /इन्'ट्रूसिव्ह्/ *वि* आगंतुक, अनाहूत, घुसणारा.

intuition /,इन्ट्यू'इश्न्; *अमे* -टू-/ *ना* (क) [*अगण*] बुद्ध्या विचार न करता समजण्याची शक्ती, अंतर्ज्ञान, अंतःप्रेरणा. (ख) [*गण*] अंतःप्रेरणेने मिळणारे ज्ञान, अंतर्ज्ञान. **intuitive** /इन्'ट्यूइटिव्ह्; *अमे* -'टू/ *वि* अंतःप्रेरणेचा, अंतःस्फुरित. **intuitively** *क्रिवि* अंतःप्रेरणेने; अंतर्ज्ञानाने.

inundate /'इनेन्डेइट्/ *क्रि* [*सक*] १ पाण्याने व्यापणे, जलमय करणे. २ (*ला*) बुडणे, पूर येणे: *~d with replies, उत्तरांमधे बुडालेला* किंवा *उत्तरांचा मारा झालेला.*

invade /इन्'व्हेइड्/ *क्रि* [*सक*] १ एखाद्या देशावर सशस्त्र हल्ला करणे, आक्रमण करणे, चाल करणे, पादाक्रांत करण्यासाठी शिरणे. २ (*ला*) गर्दी करणे: *Fans ~d the football pitch, फुटबॉलच्या खेळपट्टीवर फुटबॉलच्या चाहत्यांनी एकच गर्दी केली.* **invader** *ना* [*गण*] आक्रमक. **invasion** /इन्'व्हेइझ्न्/ *ना* [*गण, अगण*] आक्रमण, हल्ला, चढाई.

invalid^{1} /इन्'व्हॅलिड्/ *वि* अप्रमाण, अयुक्त, अग्राह्य; अवैध: *an ~ argument/passport, अग्राह्य युक्तिवाद/अवैध पासपोर्ट.* **invalidate** *क्रि* [*सक*] खोडून काढणे, फोल ठरवणे, अवैध ठरवणे. **invalidation** /इन्,व्हॅलि'डेइश्न्/ *ना* [*अगण*] अग्राह्यता; विधिबाह्यता, विधिअग्राह्यता.

invalid^{2} /इन्'व्हलिड्; -लीड्/ *ना* [*गण*] आजार किंवा जखमांमुळे अशक्त किंवा अपंग झालेला, निःशक्त, रुग्ण. **invalid** *क्रि* (*क्रिब*) **invalid sb out (of sth)** अशक्तपणामुळे किंवा आजारपणामुळे एखाद्याला सैन्यातून, नौदलातून वगैरे काढून टाकणे.

invaluable /इन्'व्हॅल्युअबल्/ *वि* अमोल, अमूल्य, भारी मोलाचा.

invariable /इन्'व्हेअरिअब्ल्/ *वि* न बदलणारा, निरपवाद, अविकारी. **invariably** *क्रिवि* न चुकता, नेहमी: *He's invariably late, तो नेहमीच उशिरा येतो.*

invasion ⇨ INVADE.

invective /इन्'व्हेक्टिव्ह्/ *ना* [*अगण*] (*औप*) शाब्दिक हल्ला, निर्भत्सना, विषारी निंदानालस्ती.

invent /इन्'व्हेन्ट्/ *क्रि* [*सक*] १ नवीन तयार करणे, शोध लावणे: *Who ~ed television? दूरदर्शनचा शोध कुणी लावला?* २ (असत्य किंवा कपोलकल्पित गोष्ट) सांगणे, मनात बाळगणे: *~ an excuse, सबब शोधणे.* **invention** /इन्'व्हेन्श्न्/ *ना* १ [*अगण*] नवा शोध लावणे. २ [*गण*] नवीन शोधलेले काही, नवा शोध. **inventive** *वि* शोधक वृत्तीचा, कल्पक. **inventor** *ना* [*गण*] शोधक, शोधाचा जनक.

inventory /'इन्व्हन्ट्रि; *अमे* -टॉऽरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) संपूर्ण यादी – उदा मालाची किंवा फर्निचरची, वस्तुसूची.

inverse /,इन्'व्हऽस्/ *वि* स्थान किंवा संबंधाच्या बाबतीत उलटा असणारा, व्यस्त, उलटा, पर्यस्त, व्युत्क्रान्त. **inverse** /'इन्व्हऽस्/ *ना* **the inverse** [*अे.व*] बरोबर उलट स्थिती, व्यस्तपणा.

invert /इन्'व्हऽट्/ *क्रि* [*सक*] उलटा करणे, उरफाटा करणे, उलट्या क्रमाने लावणे, खालची बाजू वर करणे. **inversion** /इन्'व्हऽश्न्; *अमे* /इन्'व्हऽर्झ्न्/ *ना* [*अगण, गण*] उलटापालटा करणे, व्युत्क्रम, पर्यसन, प्रतिचरण. **inverted commas** *ना* [*ब.व*] (*ब्रि*) = QUOTATION MARKS (QUOTATION).

invest /इन्'व्हेस्ट्/ *क्रि* १ [*अक, सक*] (*in*)*//* शेअर्स खरेदी, मालमत्ता वगैरेमधे नफ्यासाठी पैसा गुंतवणे: *~ (money) in shares, शेअर्समधे पैसा गुंतवणे.* २ [*सक*] *in//* विशिष्ट कामासाठी कष्ट, वेळ वगैरे देणे: *~ one's time in learning French, फ्रेंच शिकण्यास वेळ देणे.* ३ [*अक*] *in//* (*अनौप*) मौल्यवान पण उपयुक्त अशी वस्तू विकत घेणे: *~ in a new car, नवी गाडी खरीदण्यात पैसे अडकवणे.*

४ [*सक*] (*with*)// (*औप*) एखाद्याला अधिकार, श्रेणी वगैरे देणे. **investment** *ना* १ [*अगण*] पैशाची गुंतवणूक, विनियोग. २ [*गण*] गुंतवलेला पैसा. ३ [*गण*] पैसे गुंतवलेला व्यवसाय. **investor** *ना* [*गण*] गुंतवणूकदार, विनिधाता.

investigate /इन्'व्हेस्टिगेइद्/ *क्रि* [*अक, सक*] एखादे सत्य हुडकून काढण्यासाठी शोध घेणे, बारकाईने तपासणे : ~ *a murder, खुनाचा तपास लावणे.* **investigation** /इन्,व्हेस्टि'गेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] तपास, शोध, अन्वेषण. **investigative** /-गेइटिव्ह्/ *वि* तपासाचा, तपासणीचा. **investigator** *ना* [*गण*] शोध घेणारा, तपासणी करणारा, अनुसंधक.

investiture /इन्'व्हेस्टिच(र्); *अमे* -चुअर्/ *ना* [*गण*] अधिकारप्रदान समारंभ, पदवी समारंभ.

inveterate /इन्'व्हेटरद्/ *वि* (*अधिक्षेपी*) व्यसनात पुरता गढलेला, पक्का, मुरलेला : *an ~ liar/smoker, पक्का खोटारडा/सिग्रेटबहाद्दर.*

invigilate /इन्'व्हिजिलेइद्/ *क्रि* [*अक, सक*] (*ब्रि*) (परीक्षेत) विद्यार्थ्यांवर लक्ष ठेवणे, समवेक्षण करणे. **invigilation** /इन्,व्हिजि'लेइश्न्/ *ना* [*अगण*] समवेक्षण, लक्ष ठेवणे. **invigilator** *ना* [*गण*] समवेक्षक, लक्ष ठेवणारा, देखरेख करणारा.

invigorate /इन्'व्हिगरेइद्/ *क्रि* [*सक*] जोम किंवा ताकद देणे, ताजेतवाने करणे, उत्साह वाढवणे. **invigorating** *वि* जोम आणणारा : *an invigorating walk, ताजेतवाने करणारे हिंडणे.*

invincible /इन्'व्हिन्सब्ल्/ *वि* अजिंक्य, दुर्जय.

inviolable /इन्'व्हाइअलब्ल्/ *वि* (*औप*) उल्लंघन न करता येण्यासारखे, अनुल्लंघनीय : *~ rights, उल्लंघन न करता येण्यासारखे हक्क.*

inviolate /इन्'व्हाइअलद्/ *वि* (*from*)// (*औप*) इजा न होणारा, अबाधित.

invisible /इन्'व्हिझब्ल्/ *वि* (*to*)// दिसू शकणार नाही असा, अदृश्य. **invisibility** /इन्,व्हिझ'बिलटि/ *ना* [*अगण*] अदृश्यपणा. **invisibly** *क्रिवि* न दिसता, अदृश्यपणे.

invite /इन्'व्हाइद्/ *क्रि* [*सक*] १ (*to/for*)// काही करण्यास किंवा एखाद्या ठिकाणी येण्याचे आमंत्रण देणे, बोलावणे : ~ *sb to/for dinner, एखाद्याला भोजनाचे निमंत्रण देणे.* २ (प्रश्न, सूचना वगैरे) विचारायला सांगणे. ३ (वाईट गोष्टीला) उत्तेजन देणे : ~ *criticism, टीकेला उत्तेजन देणे.* **invitation** /,इन्व्हि'टेइश्न्/ *ना* १ [*अगण*] निमंत्रण : *Admission is by invitation only, फक्त निमंत्रितांनाच प्रवेश.* २ [*गण*] येण्याबाबतची विनंती, विज्ञापना : *an invitation to a party, पार्टीला येण्याची विनंती.* **inviting** *वि* आकर्षक, लक्ष वेधून घेणारा. **invitingly** *क्रिवि* आकर्षकपणे.

invoice /'इन्व्हॉइस्/ *ना* [*गण*] विकलेल्या मालाची किमतीसकट केलेली यादी, बीजक. **invoice** *क्रि* [*सक*] पैसे देण्याविषयी बीजक पाठवणे किंवा बीजक पाठवून पैसे मागवणे.

invoke /इन्'व्हउक्/ *क्रि* [*सक*] (*औप*) १ स्वतःच्या कृतीचे कारण म्हणून वापरणे, समर्थनार्थ वापर करणे. २ (देवाला, शास्त्राला वगैरे) मदतीसाठी आवाहन करणे, धावा करणे. ३ मंत्रतंत्राने, जादूने बोलावणे. **invocation** /,इन्व्ह'केइश्न्/ *ना* [*गण, अगण*] आवाहन, प्रार्थना, धावा.

involuntary /इन्'व्हॉलन्ट्रि; *अमे* -टेरि/ *वि* अहेतुकपणे केलेला, अनैच्छिक, अस्वाधीन : *an ~ movement, अनैच्छिक हालचाल किंवा क्रिया.* **involuntarily** /-ट्रलि, *अमे* इन्,व्हॉलन्'टेरलि/ *क्रिवि* अनिच्छेने, अहेतुकपणे, यदृच्छेने.

involve /इन्'व्हॉल्व्ह्/ *क्रि* [*सक*] १ आवश्यक करणे, भाग पाडणे : *The job ~d me/my living in London, त्या नोकरीमुळे लंडनमधे माझे राहणे आवश्यक झाले म्हणजेच नोकरी निमित्ताने लंडनला राहणे भाग पडले.* २ समाविष्ट करणे, समावेश असणे किंवा परिणाम करणे. ३ *in*// एखाद्याला एखाद्या गोष्टीत भाग घ्यायला लावणे, गुरफटणे. **involved** *वि* १ गुंतागुंतीचा, सरळ नाही असा. २ (क) (*in*)// गुंतलेला, अडकलेला. (ख) (*with*)// एखाद्या व्यक्तीत गुंतलेला, भावपाशात अडकलेला. **involvement** *ना* [*अगण, गण*] सहभाग, भावनिक गुंतवणूक.

invulnerable /इन्'व्हल्नरब्ल्/ *वि* इजा न पोहोचणारा, अभेद्य.

inward /'इन्वड्/ *वि* १ आतील, आंतर- : *~ thoughts, आंतस्थ विचार* किंवा *मनाच्या आतल्या कप्प्यातील विचार.* २ अंतर्मुख, आतल्या बाजूकडे तोंड वळवलेला. **inward** (तसेच **inwards**) *क्रिवि* १ आतला, आतमधे. २ मनामधे, आत्म्याकडे. **inwardly** *क्रिवि* मनामधे.

iodine /'आइअडीन्; *अमे* -डाइन्/ *ना* [*अगण*] औषधे आणि छायाचित्रणात वापरला जाणारा गडद जांभळ्या रंगाचा एक द्रव, अद.

ion /'आइअन्; *अमे* तसेच 'आइऑन्/ *ना* [*गण*] विद्युत्संचित कण, विद्युदयन, वैयुदणू, आयन, विदल. **ionize** *क्रि* [*अक, सक*] विद्युदयनांत रूपान्तर करणे.

iota /आइ'अउट/ *ना* [*अे.व*] अत्यल्प राशी, बिंदुमात्र, अणुमात्र, लवलेश, तिळमात्र.

IOU /,आइ अउ 'यू/ *ना* [*गण*] (*अनौप*) 'I owe you' म्हणजे 'मी तुझे देणे आहे', आपण देणे आहोत अशा मजकुराचा सहीशिक्का असणारा कागद.

IQ /,आइ 'क्यू/ *ना* [*गण*] एखाद्याच्या बुद्धीचे मोजमाप, बुद्ध्यांक : *have a high/low IQ, उच्च/नीच बुद्ध्यांक असणे.*

irate /आइ'रेइट्/ *वि* (*औप*) संतप्त, कृद्ध, रागावलेला. **irately** *क्रिवि* रागाने, संतापाने.

iridescent /,इरि'डेस्न्ट्/ *वि* (*औप*) विभिन्न बाजूंनी प्रकाश पडल्यावर रंग बदलणारा, विविधवर्णी, व्यक्तवर्ण, रंगदीप्त.

iris /'आइअरिस्/ *ना* [*गण*] १ डोळ्यातील बाहुलीभोवतालचा काळा, तपकिरी वगैरे रंगाचा पडदा, कनीनिका, नेत्रपटल, परितारिका, डोळ्याचे बुबूळ. २ गडद रंगाची फुले येणारे एक उंच फुलझाड.

irk /अऽक्/ *क्रि* [*सक*] ताप देणे, त्रास देणे. **irksome** /'अऽक्सम्/ *वि* त्रासदायक.

iron^{1} /'आइअन्; *अमे* 'आइअर्न्/ *ना* १ [*अगण*] उत्पादन आणि बांधकामात वापरला जाणारा एक कठीण धातू, लोह, लोखंड, पोलाद : *an ~ bridge/gate, लोखंडी पूल/दार.* २ [*गण*] इस्त्री. ३ **irons** [*ब.व*] कैद्याच्या बेड्या, शृंखला. ४ [*अगण*] दृढ निश्चय (दाखविणारा) : *have a will of ~/an ~ will, वज्रासारखी इच्छा/पोलादी इच्छा असणे.* ५ (*वाक्प्र*) **have many, etc irons in the fire** एकाच वेळी अनेक गोष्टींत भाग घेणे, सतरा टवळ्यांत तेल घालणे. **the ,Iron 'Curtain** *ना* [*अे.व*] (पूर्वी) पूर्व युरोपातील कम्युनिस्ट राष्ट्रांना पाश्चात्य राष्ट्रांपासून अलग ठेवणारी सीमारेषा, पोलादी पडदा. **ironmonger** /'आइअन्मङ्ग(र्)/ *ना* [*गण*] (*ब्रि*) घरगुती कामाची लोखंडी हत्यारे आणि उपयुक्त माल विकणारा.

iron^{2} /'आइअन्; *अमे* 'आइअर्न्/ *क्रि* १ [*अक, सक*] इस्त्री करणे. २ (*क्रिब*) **iron sth out** (अडचणी वगैरे) दूर करणे, सुरळीत करणे. **ironing** *ना* [*अगण*] १ इस्त्री करणे. २ इस्त्री करायचे कपडे : *She took up the pile of ironing, तिने इस्त्री करायचे कपडे घेतले.* **'ironing-board** *ना* [*गण*] इस्त्री करायचे टेबल.

ironic /आइ'रॉनिक्/ (तसेच **ironical** /-क्ल्/) *वि* परिहास किंवा उपरोध युक्त, उपरोधिक, उपहासपूर्ण. **ironically** /-क्लि/ *क्रिवि* उपरोधाने, उपहासाने.

irony /'आइअरनि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] करमणुकीसाठी किंवा भर देण्यासाठी मुद्दाम उलट बोलणे, उपरोधिक भाषण. २ [*अगण, गण*] अनपेक्षित घटना किंवा परिस्थिती.

irrational /इ'रॅशन्ल्/ *वि* तर्कदुष्ट, तर्कहीन, तर्कविसंगत : *an ~ fear of water, पाण्याची विवेकशून्य किंवा विनाकारण भीती.* **irrationally** /-नलि/ *क्रिवि* तर्कदुष्टपणे, विवेक सोडून.

irreconcilable /इ,रेकन्'साइलब्ल्/ *वि* (*औप*) मेळ न बसणारा, असंधेय, परस्पर विरोधी, विसंवादी.

irregular /इ'रेग्युल(र्)/ *वि* १ उंचसखल, असम : *an ~ surface, उंचसखल/सपाट नसलेला पृष्ठभाग.* २ अनियमित, नेम नसलेला. ३ (*व्याकरण*) अपवादक, निपामित, अनियमित : *~ verbs, अपवादक क्रियापदे.* **irregularity** /इ,रेग्यु'लॅरटि/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) उंचसखलपणा; नियमबाह्यता. **irregularly** *क्रिवि* अनियमितपणे, नेमाने नाही असा.

irrelevant /इ'रेलव्हन्ट्/ *वि* असंबद्ध,

अप्रस्तुत, अप्रासंगिक, विषयाला सोडून. **irrelevance** /-अन्स्/ *ना* [*अगण*] अप्रस्तुतता, असंबद्धपणा.

irreparable /इ'रेपरब्ल्/ *वि* (हानी, नुकसान वगैरेबाबत) दुरुस्त न होणारी, भरून न येणारी.

irreplaceable /,इरि'प्लेइसबल्/ *वि* हरवले किंवा नुकसान झाले असता बदली न करता येण्यासारखा.

irrepressible /,इरि'प्रेसबल्/ *वि* थोपवता न येण्याजोगा, दडपतां न येणारा, आवरता न येणारा, अदमनीय.

irrespective /,इरि'स्पेक्टिव्ह्/ **irrespective of** *शब्दयो* एखादी वस्तू किंवा व्यक्ती लक्षात न घेता, निरपेक्ष, काहीही असले/झाले तरी : *Buy it now, ~ of the cost, किमतीचा विचार न करता आताच हे विकत घे.*

irresponsible /,इरि'स्पॉन्सबल्/ *वि* (व्यक्ती किंवा कृतीबाबत) बेजबाबदार, धरबंद नसलेला. **irresponsibility** /,इरि,स्पॉन्स'बिलटि/ *ना* [*अगण*] बेजबाबदारपणा. **irresponsibly** *क्रिवि* बेजबाबदारपणे.

irreverent /इ'रेव्हरन्द्/ *वि* विशेषतः पवित्र गोष्टींचा आदर न करणारा, अनादराचा, अवज्ञाकारी. **irreverence** /-अन्स्/ *ना* [*अगण*] अनादर, अवज्ञा, पूज्यबुद्धीचा अभाव. **irreverently** *क्रिवि* अनादराने.

irrevocable /इ'रेव्हकबल्/ *वि* (*औप*) कधीही बदलता न येणारा, रद्द न करता येण्याजोगा; अंतिम, शेवटचा : *an ~ decision, अंतिम निर्णय.*

irrigate /'इरिगेइट्/ *क्रि* [*सक*] जमिनीला पाणीपुरवठा करणे, जमीन जलसिंचित करणे/भिजवणे, पाटबंधाऱ्याखाली आणणे. **irrigation** /,इरि'गेइशन्/ *ना* [*अगण*] पाटबंधारे, जलसिंचन.

irritable /'इरिटब्ल्/ *वि* चटकन् रागावणारा, चिडका. **irritability** /,इरिट'बिलटि/ *ना* [*अगण*] चिडकेपणा. **irritably** *क्रिवि* चिडकेपणाने, तडकून.

irritate /'इरिटेइट्/ *क्रि* [*सक*] १ चीड आणणे, वैताग देणे. २ खाज सुटणे, हुळहुळा करणे. **irritation** /,इरि'टेइशन्/ *ना* [*अगण*, *गण*] चीड, क्षोभ; दाह, आग, खाज.

is ⇨ BE.

Islam /इझ्'लाम्; *अमे* 'इस्लाम्/ *ना* १ [*अगण*] महंमदाच्या शिकवणुकीवर आधारित असा मुसलमान धर्म. २ [*अ.व*] सर्व मुसलमान. **Islamic** /इझ्'लॅमिक्; *अमे* इस्'लामिक्/ *वि* मुसलमानी.

island /'आइलन्ड्/ *ना* [*गण*] १ बेट, द्वीप. २ = TRAFFIC ISLAND (TRAFFIC). **islander** *ना* [*गण*] बेटावर राहणारा माणूस, द्वीपवासी.

isle /आइल्/ *ना* [*गण*] (खास करून काव्य आणि विशेषनामांत वापर) बेट, द्वीप.

isn't /'इझ्न्ट्/ is not ⇨ BE.

isolate /'आइसलेइट्/ *क्रि* [*सक*] इतरांपासून वेगळे ठेवणे, विलग करणे, एकटे पाडणे. **isolated** *वि* इतरांपासून दूर, वेगळा, अलग : *an ~d cottage, एकटी एक झोपडी.* **isolation** /,आइस'लेइशन्/ *ना* [*अगण*] वेगळेपणा, तुटकपणा.

issue /'इशू, 'इस्यू/ *ना* १ [*गण*] चर्चेचा विषय, वादाचा मुद्दा. २ [*गण*] मासिकाचा वगैरे एक अंक. ३ [*अगण*] पुरवठा आणि वाटप, वितरण. ४ [*अ.व*] (*औप*) निकाल. ५ [*अगण*] (*कायदा*) मुलंबाळं, संतती, अपत्य. ६ (*वाक्प्र*) **(the matter, point, etc) at issue** चर्चेचा (विषय, मुद्दा वगैरे). **issue** *क्रि* (*औप*) १ [*सक*] जाहीर किंवा प्रकट करणे, बाहेर देणे : *~ a statement, निवेदन देणे.* २ [*सक*] पुरवठा करणे : *~ weapons, शस्त्रास्त्रे पुरवणे.* ३ [*अक*] बाहेर येणे/पडणे.

it /इट्/ *सना* (क्रियापदाचा कर्ता किंवा कर्म किंवा शब्दयोगीनंतर वापर) १ (**क**) पूर्वनिर्दिष्ट/पूर्वी उल्लेख केलेला प्राणी किंवा वस्तू : *Where's my book? Have you seen it? माझं पुस्तक कुठंय्? तू पाहिलंय का ते?* (**ख**) (विशेषतः ज्याचे लिंग माहित नाही असे) मूल, बालक. २ (व्यक्तीची ओळख देण्यास वापर) : *'Who's that?' 'It's the postman', 'कोण आहे?' 'पोस्टमन'.* ३ (कर्ता किंवा कर्म वाक्याच्या शेवटी असताना वापर) : *It's nice to see you, तुला पाहिलं हे छान झालं.* ४ (काळ, अंतर किंवा हवामान याबाबत बोलताना वापर) : *It's 12 o'clock, बारा वाजलेत्* ○ *It's* *raining, पाऊस पडतोय्.* ५ (वाक्याच्या विशिष्ट भागावर जोर देताना वापर) : *It was 'work that exhausted him, कामामुळे थकला तो.* ६ (*वाक्प्र*) **this/that is 'it** (क) हे/ते हवे आहे. (ख) हे/ते कारण आहे त्याचं. (ग) हे/ते शेवटचे : *That's it, then – we've lost the match, शेवटी हे खरं – आपण मॅच हरलो.* **its** /इट्स्/ *वि* प्राणी, वस्तू किंवा मूल यांपैकी एखाद्याचा : *its tail, त्याची शेपटी.*

italic /इ'टॅलिक्/ *वि* (छापलेल्या अक्षरांबाबत) पुढच्या बाजूला कललेला, तिरकस : *This is ~ type, हा तिर्यक छाप आहे.* **italics** *ना* [*ब.व*] तिरकस छापलेली अक्षरे, वक्राक्षर.

itch /इच्/ *ना* १ [*गण, बहुधा अे.व*] त्वचेला सुटणारी खाज, कंड. २ [*अे.व*] प्रबळ इच्छा, खाज : *have an ~ to travel, प्रवासाची खाज.* **itch** *क्रि* १ [*अक*] खाज सुटणे, कंड सुटणे. २ [*अक*] *for/to//* (*अनौप*) प्रबळ इच्छा होणे, आसुसणे, आतुर होणे : *pupils ~ing for the lesson to end, धडा संपायची आतुरता असणारे विद्यार्थी* ○ *~ing to tell her the news, तिला बातमी सांगायला आतुर झालेला.* **itchy** *वि* १ कंड सुटलेला, खाज पडलेला : *an ~y shirt, त्वचेला खाज पाडणारा शर्ट.* २ (*वाक्प्र*) **(get/have) itchy feet** (*अनौप*) प्रवासासाठी अधीर (होणे), हिंडायला आतुर असणे/एका पायावर तयार असणे.

it'd /'इटड्/ १ it had ➪ HAVE. २ it would ➪ WILL^1, WOULD^1.

item /'आइटम्/ *ना* [*गण*] १ यादी वगैरेतील एक गोष्ट, एक भाग, बाब. २ एक बातमी, एक वार्ता. **itemize** *क्रि* [*सक*] प्रत्येक बाब लिहिणे किंवा देणे.

itinerant /आइ'टिनरन्ट्/ *वि* (*औप*) भटक्या, फिरस्ता : *an ~ preacher, फिरता उपदेशक.*

itinerary /आइ'टिनररि; *अमे* -रेरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) प्रवासाचा बेत, प्रवासकार्यक्रम, प्रवासक्रम, परिक्रमा.

it'll /'इटल्/ it will ➪ WILL^1.

its ➪ IT.

it's /इट्स्/ १ it is ➪ BE. २ it has ➪ HAVE.

itself /इट्'सेल्फ्/ *सना* १ (प्राणी किंवा वस्तू अशा कर्त्यावर क्रियेचा परिणाम झाला असता आणि ती क्रियेचे कारणही असता आत्मवाचक सर्वनाम म्हणून वापर) : *My dog hurt ~, माझ्या कुत्र्याने स्वतःलाच इजा करून घेतली.* २ (जोर देण्यासाठी वापर) : *The name ~ sounds foreign, हे नावच परकीय वाटतं.* ३ (*वाक्प्र*) **(all) by it'self** (क) आपोआप. (ख) एकट्याने, फक्त त्यानेच.

ITV /,आइ टी 'व्ही/ *संरू* Independent Television.

I've /आइव्ह्/ I have ➪ HAVE.

ivory /'आइव्हरि/ *ना* [*अगण*] १ हस्तिदंत. २ हस्तिदंताचा रंग. ३ (*वाक्प्र*) **an ,ivory 'tower** वास्तवातील अप्रिय गोष्टींपासून दूर राहण्याचे ठिकाण, हस्तिदंती मनोरा.

ivy /'आइव्हि/ *ना* [*अगण*] गडद हिरव्या रंगाची चकाकणारी पाने असलेली एक सदाहरित वेली, तापमारी वेलीच्या जातीची वेल.

J j

J, j /जेइ/ *ना* [*गण*] (*ब.व* **J's, j's** /जेइझ़्/) इंग्रजी वर्णमालेतील दहावे अक्षर.

jab /जॅब्/ *क्रि* (**-bb-**) [*अक, सक*] (अणकुचीदार हत्याराने) खुपसणे. **jab** *ना* [*गण*] १ खुपसा. २ (*अनौप*) इंजेक्शन, सुई मारणे.

jabber /'जॅब(र्)/ *क्रि* [*अक, सक*] बडबड करणे, वटवट करणे. **jabber** *ना* [*अगण*] वटवट.

jack^1 /जॅक्/ *ना* [*गण*] १ मोटारीसारखी जड वस्तू वर उचलण्याचे उपकरण, उत्थापक, उच्चालक, दुमकळस. २ पत्त्यातला गुलाम, गोट्र.

jack^2 /जॅक्/ *क्रि* (*क्रिब*) **jack sth in** (*ग्रात्य*) (काम वगैरे) थांबवणे, बंद करणे, (कामाला) गोळी मारणे. **jack sth up** दुमकळसाने एखादी गोष्ट वर उचलणे, वर करणे, जॅक लावणे.

jacket /'जॅकिट्/ *ना* [*गण*] १ लांब बाह्यांचा आणि पुढून गुंड्या असलेला छोटासा कोट,

जाकिट. २ रणगाड्यावरचे, पाईपवरचे वगैरे बाह्य आवरण. ३ उकडलेल्या बटाट्याची साल. ४ पुस्तकावरचे कागदाचे सैल वेष्टण, कव्हर.

jack-knife /'जॅक्नाइफ्/ *ना* [*गण*] (*ब.व* **-knives**) घडीचे पाते असलेला खिशातला चाकू. **jack-knife** *क्रि* [*अक*] (विशेषतः इंजिनामागे वेगळ्या जोडलेल्या लॉरीबाबत) मध्यभागी खूप वाकणे, बाक येणे.

jackpot /'जॅक्पॉट्/ *ना* [*गण*] खेळात जिंकायचे सर्वात मोठ्या रकमेचे बक्षीस.

Jacuzzi /ज'कूझि/ *ना* [*गण*] (*मालक*) खालून जोराने पाणी येऊन घुसळले जाते असे गोलाकार स्नानपात्र किंवा असा आंघोळीचा टब.

jade /जेइड्/ *ना* [*अगण*] हिरव्या रंगाचा एक कठीण, मौल्यवान खडा, मर्गझ (यापासून दागिने वगैरे बनवतात).

jaded /'जेइडिड्/ *वि* एखाद्या गोष्टीने खूप दमलेला, श्रमलेला.

jagged /'जॅगिड्/ *वि* दाते पडलेला, खडबडीत काठाचा.

jaguar /'जॅग्युअ(र्)/ *ना* [*गण*] मध्य अमेरिकेत आढळणारा अंगावर ठिपके असलेला मार्जार जातीचा एक प्राणी, बिबळ्या, चित्ता.

jail = GAOL.

jam^{1} /जॅम्/ *ना* [*अगण*] उकडलेल्या फळांचा रस आणि साखर यापासून केलेला पावाबरोबर वगैरे खायचा एक गोड पाक, मुरंबा.

jam^{2} /जॅम्/ *क्रि* (**-mm-**) १ [*सक*] कोंबणे : *~ clothes into a suitcase, बॅगेत कपडे कोंबणे.* २ [*अक, सक*] (मशीन वगैरेच्या भागांबाबत) घट्ट होणे/व्हायला लावणे; चिकटून बसणे. ३ [*सक*] (रस्ता किंवा एखादी जागा येथे) खच्चून गर्दी होणे/करणे, दाटी होणे/करणे. ४ [*सक*] दुसऱ्या आवाजाने रेडिओ संदेशनात अडथळा आणणे. ५ (*क्रिब*) **jam sth on** (वाहनाचे ब्रेक) एकदम लावणे, कचकन ब्रेक मारणे. **jam** *ना* [*गण*] १ खोळंबा करणारी गर्दी : *a traffic ~, रहदारीचा गर्दीने झालेला खोळंबा.* २ (*अनौप*) अडचणीची परिस्थिती, गोची : *be in a ~, अडचणीत असणे.*

jangle /'जॅङ्ग्ल्/ *क्रि* [*अक, सक*] धातूच्या पट्ट्यांचा खणखणाटासारखा आवाज होणे/करणे. **jangle** *ना* [*ए.व*] खणखणाट.

janitor /'जॅनिट(र्)/ *ना* [*गण*] (*अमे*) देखभाल करणारा, काळजी घेणारा, पालक, रक्षक.

January /'जॅन्युअरि; *अमे* -न्युएरि/ *ना* [*अगण, गण*] इंग्रजी वर्षातील पहिला महिना (*April* खालची उदाहरणे पाहा).

jar^{1} /जा(र्)/ *ना* [*गण*] (**क**) मोठ्या तोंडाचे बहुधा काचेचे उभट पात्र, घट, कुंभ, बरणी. (**ख**) कुंभातील पदार्थ : *a ~ of honey, मधुघट.*

jar^{2} /जा(र्)/ *क्रि* (**-rr-**) १ [*अक*] (*on*)// कर्कश वाटणे, नकोसा वाटणे, एखाद्यावर तापदायक परिणाम होणे : *Her singing really ~s on my nerves, तिचं गाणं अगदी ऐकवेनासं होतं मला.* २ [*अक*] (*with*)// न जुळणे, एखाद्याबरोबर मतभेद होणे; योग्य किंवा सोईचा नसणे. ३ [*सक*] धक्का देणे. **jarring** *वि* कर्कश, कर्णकटू; धक्कादायक, विचलित करणारा.

jargon /'जागन्/ *ना* [*अगण*] विशिष्ट गटात वापरले जाणारे पारिभाषिक किंवा खास शब्द, वर्गभाषा; तंत्रजड भाषा : *medical ~, वैद्यकीय तांत्रिक भाषा.*

jaundice /'जॉऽन्डिस्/ *ना* [*अगण*] त्वचा आणि डोळे पिवळे करणारा रोग, कामला, कावीळ. **jaundiced** *वि* शंकेखोर; कटू, कडवट : *a ~d opinion, कटू मत, दूषित ग्रह.*

jaunt /जॉऽन्ट्/ *ना* [*गण*] मजेसाठी केलेली छोटीशी सहल, फेरी : *go on a ~, सहलीला जाणे.* **jaunty** *वि* (**-ier, -iest**) उत्साही, दमदार आणि आत्मविश्वासाचा, आनंदी. **jauntily** *क्रिवि* उत्साहाने, फुलून येऊन, खुषीत, मजेत.

javelin /'जॅव्हलिन्/ *ना* [*गण*] फेकून मारण्याचा हलका भाला; बरची.

jaw /जॉऽ/ *ना* १ [*गण*] जबडा, दाभाड, जंभ : *the lower/upper ~, खालचा जबडा किंवा हनू/वरचा जबडा किंवा जंभ.* २ [*ए.व*] चेहऱ्याचा खालचा भाग. ३ **jaws** [*ब.व*] जबड्याची हाडे आणि दात : (*ला*) *escape from the ~s of death, मृत्यूच्या जबड्यातून/दाढेतून सुटका.* ४ **jaws** [*ब.व*] वस्तू घट्ट पकडून ठेवतो तो हत्याराचा किंवा यंत्राचा भाग.

'jaw-bone *ना* [*गण*] हनुवटीचे डावीकडचे किंवा उजवीकडचे हाड, हन्वस्थी.

jazz /जॅझ़्/ *ना* [*अगण*] अमेरिकन नीग्रोंच्या ढंगाचे किंवा त्या तालबद्धतेचे संगीत. **jazz** *क्रि* १ [*सक*] जॅझ पद्धतीचे संगीत वाजवणे. २ (*क्रिव*) **jazz sth up** एखादी गोष्ट अधिक जिवंत किंवा रसरशीत करणे, आकर्षक करणे. **jazzy** *वि* **(-ier, -iest)** (*अनौप*) १ जॅझचा किंवा जॅझसारखा. २ भव्य, डामडौलाचा, भडक : *a ~y tie, भडक रंगाचा टाय.*

jealous /'जेलस्/ *वि* १ प्रेमातील मत्सर, संशयीपणा : *a ~ husband, संशयी नवरा.* २ (*of*)// एखाद्याची संपत्ती, त्याचे यश वगैरेविषयीचा मत्सर, हेवा. ३ सावध असलेला, विशेष काळजी घेणारा : *~ of one's rights, स्वतःच्या हक्कांविषयी सावध/जागरूक.* **jealously** *क्रिवि* मत्सराने; सावधगिरीने. **jealousy** *ना* [*अगण, गण*] (*ब.व* **-ies**) संशय; मत्सर, हेवा.

jeans /जीन्झ़्/ *ना* [*ब.व*] जाड सुती कापडाची पॅन्ट.

Jeep /जीप्/ *ना* [*गण*] (*मालक*) खडबडीत रस्त्यावरून चालवायची छोटी मोटरगाडी.

jeer /जिअ(र्)/ *क्रि* [*अक, सक*] (*at*)// उपहासाने हसणे, टवाळी करणे; थट्टा करणे. **jeer** *ना* [*गण*] उपहासपूर्ण शेरा, टवाळीचे बोलणे; थट्टेखोर भाषण, कुचेष्टा.

jelly /'जेलि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण, गण*] पारदर्शक, मऊ, गोड असे फळांच्या चवीचे अन्न. २ [*अगण*] एक पारदर्शक जॅम : *blackcurrant ~, काळ्या मनुकांचा जॅम.* **'jellyfish** *ना* [*गण*] (*ब.व* **jellyfish** किंवा **~es**) पारदर्शक, मऊ शरीराचा आणि डंख करणाऱ्या नांगीचा एक जलचर, पाकमत्स्य.

jeopardize /'जेपडाइझ़्/ *क्रि* [*सक*] धोक्यात आणणे, संकटात पाडणे. **jeopardy** /-पडि/ *ना* (*वाक्प्र*) **in jeopardy** तोटा, अपयश वगैरेच्या छायेत, धोक्यामधे : *The success of our plan has been put in jeopardy, आमच्या योजनेचे यश धोक्यात आले आहे.*

jerk /जऽक्/ *ना* [*गण*] १ हिसका, हासडा, झटका. २ (*अनौप अधिक्षेपी*) मूर्ख माणूस. **jerk** *क्रि* [*अक, सक*] हिसका देणे, हिसडणे, असडणे. **jerky** *वि* **(-ier, -iest)** हिसके बसणारा, गचके देत जाणारा.

jersey /'जऽझ़ि/ *ना* [*गण*] अंगाबरोबर बसणारा (खास करून लोकरीचा) शर्ट किंवा झंपर.

jest /जेस्ट्/ *ना* १ [*गण*] विनोद. २ (*वाक्प्र*) **in jest** गमतीने, थट्टेत. **jest** *क्रि* [*अक*] (*औप*) गंमत करणे, मस्करी करणे.

jet^{1} /जेट्/ *ना* [*गण*] १ जेट इंजिनवर चालणारे विमान. २ (क) द्रव, वायू, वाफ वगैरेचा बारीक तोंडातून जोराने बाहेर येणारा फवारा किंवा चिरकांडी. (ख) चिरकांडी जेथून उडते ते तोंड. **jet** *क्रि* **(-tt-)** [*अक*] जेट विमानातून प्रवास करणे. **'jet engine** *ना* [*गण*] मागच्या बाजूने गरम वायूचे फवारे सोडणारे असे विमानात बसवायचे एक इंजिन. **'jet lag** *ना* [*अगण*] खूप वेळ विमानात बसल्यावर आणि मूळच्या देशातील वेळेपेक्षा वेगळी वेळ असणाऱ्या देशात उतरल्यावर येणारा थकवा, विमानप्रवासाचा शीण. **the 'jet set** *ना* [*अे.व*] जगभर प्रवास करणारे श्रीमंत फॅशनेबल लोक.

jet^{2} /जेट्/ *ना* [*अगण*] टणक, चकचकीत काळे खनिज, कार दगड. **,jet-'black** *वि* काळाशार, कंचकाळा, काळा कुळकुळीत.

jettison /'जेटिस्न्/ *क्रि* [*सक*] (नको असलेल्या गोष्टी) फेकून देणे, टाकून देणे.

jetty /'जेटि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) बोट काठाला लावण्यासाठी बांधलेला दगडी किंवा लाकडी धक्का.

Jew /जू/ *ना* [*गण*] हिब्रू किंवा यहुदी धर्माचा माणूस. **Jewish** *वि* हिब्रू, यहुदी.

jewel /'जूअल्/ *ना* [*गण*] १ मौल्यवान खडा, रत्न, हिरा, जवाहीर. २ घड्याळात वापरायचा मौल्यवान खडा. ३ (*ला*) मौल्यवान वस्तू किंवा व्यक्ती, हिरा, रत्न. **jeweller** (*अमे* **-l-**) *ना* [*गण*] दागिने विकणारा, घडविणारा किंवा दुरुस्त करणारा, जवाहिऱ्या, जव्हेरी. **jewellery** (तसेच **jewelry**) /-रि/ *ना* [*अगण*] सोन्या-चांदीचे अंगठी, माळ यांसारखे दागिने, दागदागिने, जडजवाहीर.

jibe = GIBE.

jiffy /'जिफ़ि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) (*अनौप*) क्षण.

jig /जिग्/ *ना* [*गण*] वेगवान नृत्य (किंवा त्याचे संगीत), जलद गत. **jig** *क्रि* (**-gg-**) १ [*अक*] जलद गतीचे नृत्य करणे. २ [*अक, सक*] जलद गतीने पावले उचलत वरखाली सरणे.

jiggle /'जिग्ल्/ *क्रि* [*अक, सक*] (*अनौप*) द्रुतगतीचा सफाईदारपणे वरखाली किंवा पुढेमागे असा पदन्यास करणे.

jigsaw /'जिग्सॉऽ/ *ना* [*गण*] (तसेच **'jigsaw puzzle**) विविध आकाराचे पुठ्ठ्याचे किंवा लाकडाचे ठोकळे जुळवून करायचे चित्र, जुळणी-कोडे.

jilt /जिल्ट्/ *क्रि* [*सक*] जवळच्या माणसाला एकाएकी सोडून देणे, प्रतारणा करणे.

jingle /'जिङ्ग्ल्/ *ना* १ [*अ.व*] लहान घंटांचा, किल्ल्यांचा वगैरे छणछणाट, किणकिणाट, झंकार. २ [*गण*] जाहिरातीत वगैरे वापरलेले छोटे सोपे गाणे किंवा गीत. **jingle** *क्रि* [*अक, सक*] झंकार करणे, किणकिण आवाज करणे, किणकिणणे.

jinx /जिङ्क्स्/ *ना* [*गण,* बहुधा *अ.व*] दुर्दैव किंवा दुर्भाग्य (ओढवून आणणारी वस्तू किंवा व्यक्ती).

jive /जाइव्ह्/ *ना* (बहुधा **the jive**) [*अ.व*] जोरदार ठेक्याचे द्रुतलयीचे जोषपूर्ण संगीत (किंवा त्यावरील नृत्य). **jive** *क्रि* [*अक*] अशा संगीताच्या तालावर नृत्य करणे.

job /जॉब्/ *ना* [*गण*] १ नियमित पगार मिळणारी नोकरी; सेवा, नोकरी. २ (केलेले) काम. ३ अवघड कामगिरी : *Finding a flat to rent was quite a ~, भाड्याने घ्यायचा फ्लॅट शोधणे/मिळवणे कठीण काम होते.* ४ [बहुधा *अ.व*] काम, कर्तव्य, कार्य : *It's not my ~ to do this, हे करणं माझं काम नाही.* ५ (*अनौप*) गुन्हा – विशेषतः चोरी किंवा घरफोडी. ६ (*वाक्प्र*) **just the 'job** (*अनौप*) हवे असलेलेच. **make a bad, good, etc job of sth** एखादी गोष्ट वाईट/चांगल्या रीतीने करणे. **jobless** *वि* बेकार, नोकरी नसलेला. **job sharing** *ना* [*अगण*] एक पूर्णवेळ नोकरी दोघांनी अर्धवेळ करणे, सेवा वाटणी.

jockey^1 /'जॉकि/ *ना* [*गण*] घोड्याच्या शर्यतीतला घोडेस्वार, अश्वारोहक.

jockey^2 /'जॉकि/ *क्रि* (*क्रिज*) **jockey for sth** (फायदा, मर्जी वगैरे) मिळविण्यास धडपड करणे, खूप कष्ट घेणे : *~ for position, दर्जा मिळवण्यास धडपड करणे.*

jog /जॉग्/ *क्रि* (**-gg-**) १ [*सक*] हलकेच धक्का देणे. २ [*अक*] व्यायाम म्हणून सावकाश धावणे, पळायला जाणे. ३ (*वाक्प्र*) **jog sb's memory** एखादी गोष्ट आठवायला एखाद्याला मदत करणे, आठवण करून देणे. ४ (*क्रिब*) **jog along/on** खळबळ न करता शांतपणे करीत राहणे. **jog** *ना* [*अ.व*] १ हलकासा धक्का. २ (खास करून व्यायामाकरता) हळू धावणे. **jogger** *ना* [*गण*] धावणारा (माणूस), पळण्याचा व्यायाम करणारा.

join /जॉइन्/ *क्रि* १ [*सक*] एक गोष्ट दुसऱ्या गोष्टीस जोडणे; सांधणे, संलग्न करणे. २ [*अक, सक*] एकत्र येणे, मिळणे : *The two roads ~ here, ते दोन रस्ते येथे मिळतात* ○ *Please ~ us for a drink, पेयपानासाठी कृपया आमच्यात ये.* ३ [*सक*] सभासद होणे : *~ a club, मंडळाचा सभासद होणे.* ४ (*वाक्प्र*) **join 'forces (with sb)** समान उद्दिष्टांसाठी एखाद्याशी हातमिळवणी करणे, एकत्र येणे. ५ (*क्रिब*) **join in (sth)** (एखाद्या कार्यात) भाग घेणे, सहभागी होणे. **join** *ना* [*गण*] सांधा, जोडणीची जागा.

joiner /'जॉइन(र्)/ इमारतीच्या दारेखिडक्यांच्या लाकडी चौकटी वगैरे करणारा कुशल कारागीर, सुतार. **joinery** *ना* [*अगण*] सुताराचे जोडकाम.

joint^1 /जॉइन्ट्/ *ना* [*गण*] १ दोन हाडे जिथे जोडलेली असतात ती जागा, हाडाचा सांधा, संधी. २ दोन किंवा अधिक गोष्टी जेथे जोडल्या जातात ती जागा, जोड, सांध : *the ~s of a pipe, नळीचे सांध.* ३ मांसाचा मोठा तुकडा. ४ (*व्रात्य, अधिक्षेपी*) दारू पिण्याची, जुगार खेळण्याची सार्वजनिक जागा. ५ (*व्रात्य*) गांजाची सिग्रेट.

joint^2 /जॉइन्ट्/ *वि* दोघे किंवा अधिकांचा मिळून असलेला किंवा केलेला, संयुक्त : ~

responsibility, संयुक्त जबाबदारी ○ *a ~ account, (बँकेतले) संयुक्त किंवा दोघांचे खाते.* **jointly** *क्रिवि* संयुक्तपणे, एकत्रित येऊन.

joist /जॉइस्ट्/ *ना* [*गण*] मजला किंवा छत यांना आधार देणारी पोलादी किंवा लाकडी तुळई, कडी, बडोद.

joke /जउक्/ *ना* [*गण*] करमणुकीकरता किंवा हशा निर्माण करण्याकरता बोललेले किंवा केलेले काहीतरी, विनोद. **joke** *क्रि* [*अक*] विनोद सांगणे, चुटका सांगणे. **joker** *ना* [*गण*] १ विनोद करणारा, विदूषक. २ पत्त्यांच्या खेळातील वापरायचे एक जादा पान. **jokingly** *क्रिवि* विनोदाने, थट्टेने.

jolly /'जॉलि/ *वि* (**-ier, -iest**) आनंदी आणि उत्साही, हसरा आणि खेळकर. **jolly** *क्रिवि* (*ब्रि अनौप*) खूप, फार : *a ~ good teacher, फार चांगले शिक्षक.*

jolt /जउल्ट्/ *क्रि* [*अक, सक*] हिसके देत जाणे, गचके देणे. **jolt** *ना* [*गण,* बहुधा *अे.व*] हिसका, गचका.

jostle /'जॉस्ल्/ *क्रि* [*अक, सक*] गर्दीत धक्काबुक्की करणे, ढकलाढकली करणे, खेचाखेची करणे.

jot /जॉट्/ *क्रि* (**-tt-**) (*क्रिब*) **jot sth down** एखाद्या गोष्टीचे टाचण करणे. **jotter** *ना* [*गण*] टिपणवही, वही.

journal /'जऽनल्/ *ना* [*गण*] १ मासिक किंवा वार्तापत्र. २ घटनांची रोज केलेली नोंद, रोजनिशी, रोजकीर्द. **journalism** /-नलिझम्/ *ना* [*अगण*] वृत्तपत्रे, रेडिओ, दूरदर्शन यासाठी करायचे लेखनाचे काम, वृत्तपत्रव्यवसाय. **journalist** *ना* [*गण*] वृत्तपत्रव्यावसायिक, पत्रकार.

journey /'जऽनि/ *ना* [*गण*] जमिनीवरचा प्रवास (किंवा त्यात कापलेले अंतर). **journey** *क्रि* [*अक*] (*औप*) प्रवास करणे (बहुधा जमिनीवरचा).

jovial /'जउव्हिअल्/ *वि* आनंदी आणि स्नेहपूर्ण, मिळून मिसळून वागणारा, रंगेल.

joy /जॉइ/ *ना* १ [*अगण*] आनंद, हर्ष. २ [*गण*] आनंददायी गोष्ट. **joyful** *वि* आनंदी, आनंददायी, संतोष देणारा. **joyfully** *क्रिवि* आनंदाने, हर्षभराने, मोदभरे. **joyous** *वि* (*अलं*) आनंदी, उल्हसित. **joyously** *क्रिवि* आनंदाने, उल्हासयुक्त रीतीने.

jubilant /'जूबिलन्ट्/ *वि* (*औप*) विजयाने उल्हसित झालेला, विजयोन्मादक, विजयाने धुंदफुंद झालेला. **jubilation** /,जूबि'लेइश्न्/ *ना* [*अगण*] विजयोत्सव, विजयोन्माद.

jubilee /'जूबिली/ *ना* [*गण*] विशेष वार्षिक उत्सव, महोत्सव.

Judaism /'जूडेइ·झम्; *अमे* -डि·इझम्/ *ना* [*अगण*] ज्यू लोकांचा धर्म, यहुदी धर्म; यहुदी संस्कृती.

judge /जेज्/ *ना* [*गण*] १ न्यायालयात निर्णय देणारे न्यायमूर्ती, न्यायाधीश. २ स्पर्धेत कोण विजेता आहे हे ठरवणारी व्यक्ती, परीक्षक. ३ एखाद्या गोष्टीच्या महत्त्वाबाबत बरोबर अंदाज करणारा, जाणकार, मर्मज्ञ : *She's a good ~ of character, तिला स्वभावाची चांगली पारख आहे.* **judge** *क्रि* [*अक, सक*] १ न्याय देणे, परीक्षा करणे. २ जाणणे, मत बनवणे.

judgement (विशेषतः *कायदा* **judgment**) /'जेज्मन्ट्/ *ना* १ [*गण*] मत : *She made a fair ~ of his character, त्याच्या स्वभावाचा योग्य अंदाज तिने केला.* २ [*गण, अगण*] न्यायमूर्ती किंवा न्यायालयाचा निर्णय, कोर्टाचा निकाल, निवाडा, निकालपत्र : *The court has still to pass ~, न्यायालयाने अद्याप निकाल द्यायचा आहे.* ३ [*अगण*] योग्य निर्णय घेण्याची क्षमता, निर्णयक्षमता, निर्णयबुद्धी, पारख.

judicial /जू'डिश्ल्/ *वि* न्यायालयाचा, न्यायिक; न्यायमूर्तीबाबत, न्यायविषयक.

judiciary /जू'डिशरि; *अमे* -शिअेरि/ *ना* (*गण,* ब.व क्रियापदासह अे.व) (*ब.व* **-ies**) एखाद्या राष्ट्रातील सर्व न्यायमूर्ती, न्यायसंस्था.

judicious /जू'डिशस्/ *वि* (*औप*) सूज्ञ, विवेकी, विवेकशील. **judiciously** *क्रिवि* विवेकपूर्ण रीतीने.

judo /'जूडउ/ *ना* [*अगण*] स्वसंरक्षणार्थ कुस्ती करण्याची जपानी कला.

jug /जेग्/ *ना* [*गण*] (*ब्रि*) (क) कान आणि तोंड असलेले पाणी वगैरे ठेवायचे एक उभट -खोल पात्र, कावळा, सुरई, खुजा. (ख) अशा पात्रातल्या द्रवाचे प्रमाण : *a ~ of milk,*

सुरईभर दूध.

juggernaut /'जेगनॉऽट्/ *ना* [*गण*] (*ब्रि*) खूप मोठी लॉरी.

juggle /'जेग्ल्/ *क्रि* [*अक, सक*] १ हवेत एकसारख्या वस्तू फेकून उडवत ठेवणे, हातचलाखीचे गारुड करणे. २ (*with*)// चकविण्यासाठी उलटसुलट करणे : *juggling (with) the figures, आकड्यांची चलाखी करणे.* **juggler** *ना* [*गण*] गारुड करणारा.

juice /जूस्/ *ना* [*अगण, गण*] फळे, भाज्या, मांस वगैरेचा रस. **juicy** *वि* **(-ier, -iest)** १ रसाळ, रसभरीत, रसयुक्त. २ (*अनौप*) रसभरीत, चवदार – विशेषतः भानगडीचे असे काही म्हणून.

juke-box /'जूकबॉक्स्/ *ना* [*गण*] नाणे टाकल्यावर ध्वनिमुद्रिका वाजवणारे यंत्र.

July /जू'लाइ/ *ना* [*अगण, गण*] इंग्रजी वर्षातला सातवा महिना (*April* खालची उदाहरणे पाहा).

jumble /'जेम्ब्ल्/ *क्रि* [*सक*] (*up*)// वस्तू गडबड करून एकत्र करणे, गोंधळ करणे, सरमिसळ करणे. **jumble** *ना* १ [*अे.व*] वस्तूंचा गोंधळाने केलेला गट, सरमिसळ. २ [*अगण*] (*ब्रि*) विविध वस्तूंची एकत्र विक्री. **'jumble sale** *ना* [*गण*] (*ब्रि*) नको असलेल्या वस्तूंची मदतकार्यासाठी केलेली विक्री.

jumbo /'जेम्बउ/ *वि* (*अनौप*) खूप मोठा, अजस्त्र, अगडबंब. **jumbo** *ना* [*गण*] (*ब.व* **~s**) (तसेच **,jumbo 'jet**) प्रवासीवाहू मोठे विमान; बोईंग ७४७.

jump^1 /जेम्प्/ *क्रि* १ [*अक*] उडी मारणे : *~ up in the air, हवेत उंच उडी मारणे.* २ [*सक*] वरून उडी मारणे : *~ a wall, भिंतीवरून उडी मारणे.* ३ [*सक*] चटकन् दूर होणे, उडी मारून दूर होणे : *The loud bang made me ~, मोठ्या आवाजाने मी दचकून उडी मारली.* ४ [*अक*] मोठ्या रकमेने अचानक वर चढणे, वर जाणे : *Prices ~ed by 60% last year, गेल्या वर्षी भाव ६० टक्क्यांनी वर गेले.* ५ [*सक*] (*अनौप*) अचानक हल्ला करणे. ६ (*वाक्प्र*) **jump on the bandwagon** ➪ BAND. **jump the gun** घाईने/आधीच काही करणे. **jump the queue** रांग सोडून मधेच घुसणे. **jump to con'clusions** घाईघाईने निर्णयाला येणे, एकदम निष्कर्ष काढणे. ७ (*क्रिब*) **jump at sth** (संधी वगैरे) अधीरतेने स्वीकारणे, उतावळेपणाने घेणे. **jumper** *ना* [*गण*] उडी मारणारी व्यक्ती किंवा प्राणी.

jump^2 /जेम्प्/ *ना* [*गण*] १ उडी. २ ज्यावरून उडी मारायची ती गोष्ट. ३ (*in*)// एकाएकी झालेली भरमसाट वाढ : *a huge ~ in profits, नफ्यामधे भरमसाट वाढ.* **jumpy** *वि* **(-ier, -iest)** (*अनौप*) अधीर, घाबरलेला; उत्सुक, उत्कंठित.

jumper /'जेम्प(र्)/ *ना* [*गण*] (*ब्रि*) = JERSEY.

junction /'जेङ्क्शन्/ *ना* [*गण*] रेल्वे मार्ग किंवा रस्ते एकत्र होण्याचे ठिकाण, मार्गसंयोग, संगमस्थानक, प्रस्थानक.

juncture /'जेङ्क्च(र्)/ *ना* (*वाक्प्र*) **at this juncture** (*औप*) यावेळी.

June /जून्/ *ना* [*अगण, गण*] इंग्रजी वर्षातील सहावा महिना (*April* खालची उदाहरणे पाहा).

jungle /'जेङ्ग्ल्/ *ना* [*गण, अगण*] उष्णकटिबंधातील प्रदेशातील घनदाट झाडीचा भाग, अरण्य, वन.

junior /'जूनिअ(र्)/ *वि* १ (*to*)// कनिष्ठ श्रेणीचा. २ **Junior** (खास करून *अमे*) (वडलांचेच नाव असलेल्या मुलाच्या बाबतीत वापर) धाकटा किंवा दुसरा. ३ (*ब्रि*) ७ ते ११ वयातील मुलांसाठीचा, शिशु : *a ~ school, शिशुशाळा.* **junior** *ना* १ [*गण*] कनिष्ठ श्रेणीचा माणूस. २ [*अे.व*] दुसऱ्यापेक्षा वयाने लहान : *He is three years her ~, तो तिच्यापेक्षा तीन वर्षांनी लहान आहे.*

junk /जेङ्क्/ *ना* [*अगण*] जुन्या, नको असलेल्या वस्तू, अडगळ. **'junk food** *ना* [*अगण*] (*अनौप अधिक्षेपी*) एखाद्याच्या प्रकृतीला अपायकारक अन्न, कुपथ्याचा आहार.

jurisdiction /,जुअरिस्'डिक्शन्/ *ना* [*अगण*] कायदेशीर अधिकार, अधिकारिता.

juror /'जुअर(र्)/ *ना* [*गण*] ज्यूरीचा सभासद, ज्यूरी सदस्य.

jury /'जुअरि/ ना [*गण*, तसेच ब.व क्रियापदासह अ.व] (*ब.व* **-ies**) १ न्यायालयातील न्याय देणारी मंडळी, पंच. २ स्पर्धेतील पंच.

just^{1} /'जेस्ट्/ *वि* बरोबर, योग्य असेल त्याप्रमाणे; निःपक्ष, न्याय्य : *a ~ decision, रास्त/न्याय्य निर्णय.* **justly** *क्रिवि* न्याय्य रीतीने; योग्य रीतीने.

just^{2} /जेस्ट्/ *क्रिवि* १ नुकताच, थोड्याच वेळापूर्वी, आत्ताच : *I've ~ had dinner, आत्ताच जेवण झालं माझं.* २ बरोब्बर : *It's ~ 2 o'clock, बरोब्बर दोन वाजलेत* ○ *Put it ~ here, बरोब्बर इथेच ठेव.* ३ **just as** (**क**) अगदी तसाच : *Leave everything ~ as you find it, तुला सापडेल त्याच अवस्थेत प्रत्येक वस्तू राहू दे.* (**ख**) अगदी त्याच क्षणी, त्याच वेळी : *She arrived ~ as I did, मी आलो त्याच वेळी ती आली.* ४ कसाबसा; क्वचित् : *I can only ~ reach the shelf, मी कसाबसाच शेल्फपर्यंत पोहोचू शकतो.* ५ त्या/ह्या क्षणी, तात्काळ : *We're ~ leaving, आम्ही अगदी आत्ताच निघालो.* ६ *about/going to do sth*// (नजीकचा भविष्यकाळ दाखविण्यासाठी वापर) : *The clock is ~ going to strike 12, घड्याळात इतक्यातच बाराचे ठोके पडणारेत.* ७ फक्त : *Why not ~ wait and see, जरा फक्त वाट पाहिली तर?* ८ केवळ : *There is ~ one way of saving him, त्याला वाचवण्याचा केवळ/फक्त एकच मार्ग आहे.* ९ (लक्ष वेधण्यासाठी वापर) : *J~ listen to me! जरा ऐक ना माझं!* १० (*वाक्प्र*) **just about** जवळजवळ. **ˌjust 'now** (**क**) या क्षणी, आत्ता : *I can't do it ~ now, मला आत्ताच नाही करता येणार ते.* (**ख**) थोड्याच वेळापूर्वी : *I saw him ~ now, मी त्याला थोड्याच वेळापूर्वी पाहिले.*

justice /'जेस्टिस्/ *ना* १ [*अगण*] न्याय, न्यायबुद्धी. २ [*अगण*] कायदा आणि त्याची अंमलबजावणी, न्यायदान : *a court of ~, न्यायदान करणारे कोर्ट, न्यायालय.* ३ [*गण*] न्यायमूर्ती, जज्ज : *the Lord Chief J~, मुख्य न्यायमूर्ती.* **ˌJustice of the 'Peace** *ना* [*गण*] मॅजिस्ट्रेट, दंडाधिकारी.

justify /जेस्टिफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] १ एखादी गोष्ट बरोबर किंवा योग्य आहे असे दाखवणे, समर्थन करणे. २ एखाद्या गोष्टीला चांगले/योग्य कारण असणे, समर्थन असणे. **justifiable** /ˌजेस्टि'फाइअब्ल्/ *वि* समर्थन करण्याजोगा. **justifiably** *क्रिवि* योग्य कारणाने. **justification** /ˌजेस्टिफि'केइशन्/ *ना* [*अगण, गण*] (*for*)// समर्थन, पटण्यासारखे कारण.

jut /जेट्/ *क्रि* (**-tt-**) (*क्रिब*) **jut out** (भोवतालच्या पृष्ठभागाहून) पुढे येणे, वर येणे, बाहेर येणे.

juvenile /'जूव्हनाइल्/ *ना* [*गण*] (*औप* किंवा *कायदा*) बाल, पोर. **juvenile** *वि* १ (*औप* किंवा *कायदा*) बाल वयातील मुलांचा, त्यांना योग्य असा. २ (*अधिक्षेपी*) बालिश किंवा मूर्ख. **juvenile de'linquent** *ना* [*गण*] बालगुन्हेगार.

juxtapose /ˌजेक्स्ट'पउझ्/ *क्रि* [*सक*] (*औप*) जवळजवळ ठेवणे, एकमेकाजवळ ठेवणे. **juxtaposition** /ˌजेक्स्टप'झिशन्/ *ना* [*अगण*] निकटता, सान्निध्य, निकटस्थिती.

K k

K, k /केइ/ *ना* [*गण*] (*ब.व* **K's, k's** /केइझ्/) इंग्रजी वर्णमालेतील अकरावे अक्षर.

K /केइ/ *संरू* (*संगणन*) किलोबाइट.

kaleidoscope /क'लाइडस्कउप्/ *ना* १ [*गण*] आरसे आणि रंगीत काचांचे छोटे तुकडे असलेली, फिरवल्यावर आकृती बदलणारी नळी, शोभादर्शक, बहुरूपदर्शक, चारूदर्शक, चित्ररूपदर्शक. २ [*अ.व*] सतत आणि झटकन् बदलणारी आकृती.

kangaroo /ˌकॅङ्ग'रू/ *ना* [*गण*] (*ब.व* ~s) उड्या मारत जाणारा आणि पोटाखालच्या पिशवीत पिल्लू ठेवणारा एक ऑस्ट्रेलियन प्राणी.

karate /क'राटि/ *ना* [*अगण*] हातापायाचा वापर करून द्वंद्व करण्याची जपानी पद्धत, कराटे.

kebab /कि'बॅब्/ *ना* [*गण*] धातूच्या सळईवर भाजलेले मांसाचे तुकडे, कबाब.

keel /कील्/ *ना* [*गण*] जहाजाच्या

तळभागातील, बोट स्थिर ठेवण्यासाठी केलेला लोखंडी किंवा लाकडी सांगाडा, नावेचा कणा, अडे. **keel** *क्रि* (*क्रिब*) **keel over** १ (जहाजाबाबत) उलटे होणे, उलटणे, कलंडणे. २ बाजूला पडणे.

keen /कीन्/ *वि* १ (क) *on*// एखाद्या गोष्टीत विशेष रस असलेला; उत्साही किंवा उत्कंठा असणारा : *He's very ~ on tennis, त्याला टेनिसची फार हौस आहे.* (ख) (ज्ञानेंन्द्रिये, मन, भावना यांबाबत) तीव्र; शीघ्र. ३ (वाऱ्याबाबत) शीत, खूप थंड. **keenly** *क्रिवि* उत्कंठेने.

keep^1 /कीप्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **kept** /केप्ट्/) १ [*अक, सक*] एखाद्या स्थितीत किंवा जागेवर राहणे किंवा ठेवणे, बसवणे : *K~ (them) quiet! त्यांना गप्प बसव!* ○ *K~ off the grass! हिरवळीवरून बाजूला हो!* २ [*अक*] *(on) doing*// एखादी गोष्ट करीत राहणे; एखादी गोष्ट पुन्हापुन्हा करणे : *He ~s (on) interrupting me, तो सतत मला अडथळा आणून थांबवत असतो.* ३ [*सक*] (जवळ) ठेवणे, राहणे : *Here's £5 – you can ~ the change, हे ५ पाउंड (घे) – सुटे ठेव तुझ्याकडे.* ४ [*सक*] *from*// एखाद्याला एखादी गोष्ट करण्यास प्रतिबंध करणे, अडवणे, थांबवणे : *K~ him from leaving, त्याला जायचा थांबव म्हणजेच त्याला जाऊ देऊ नको.* ५ [*सक*] उशीर/विलंब करणे किंवा अडकवून ठेवणे, खोळंबवून ठेवणे : *You're very late – what kept you? फार उशीर झाला तुला – कशामुळे खोळंबलास?* ६ [*सक*] स्वतःचे असणे किंवा स्वतःच्या देखरेखीखाली असणे : *~ a shop, स्वतःचे दुकान असणे.* ७ [*सक*] (गुपित) राखणे, न सांगणे. ८ [*अक*] (अन्नाबाबत) टिकणे, चांगले राहणे : *Milk doesn't ~ in hot weather, उकाड्यात दूध टिकत नाही.* ९ [*अक*] तब्बेत असणे : *Is she ~ing well? तिची तब्बेत चांगली आहे का?* १० [*सक*] (क) लिखित नोंद करणे : *~ a diary, रोजनिशी ठेवणे.* (ख) नोंद लिहिणे : *~ an account, जमाखर्च लिहिणे.* ११ [*सक*] एखाद्याला पैशाची वगैरे मदत करणे. १२ [*सक*] पूर्ण करणे, पाळणे : *~ a promise, वचन पाळणे.* १३ (*वाक्प्र*) **keep abreast of sth** ➪ ABREAST. **keep sb at arm's length** एखाद्याला दूर ठेवणे, सलगी करू न देणे. **keep the ball rolling** ➪ BALL^1. **keep sb/sth at bay** ➪ BAY^3. **keep sb company** एखाद्याला साथ देणे, एखाद्याच्या सोबत किंवा बरोबर राहणे. **keep count of sth** ➪ COUNT^2. **keep one's 'distance (from sb/sth)** (क) एखाद्या गोष्टीच्या फार जवळ न जाणे, दोन हात दूर राहणे. (ख) एखाद्याच्या फंदात न पडणे, त्याच्याशी सलगी न करणे. **keep an 'eye on sb/sth** एखाद्या गोष्टीवर लक्ष ठेवणे, तिच्याकडे बघणे. **keep one's fingers crossed** एखाद्याला सुयश चिंतणे, यशाची आशा करणे : *Good luck with your exam – we're ~ing our fingers crossed for you, परीक्षेत तुला चांगले यश मिळो – आम्हाला खूप आशा आहे.* **keep one's ground** ➪ GROUND^1. **keep one's 'hair/'shirt on** (*अनौप*) न रागावणे, न वैतागणे. **keep one's head** ➪ HEAD^1. **keep one's head above water** कर्जभार किंवा इतर अडचणीपासून दूर राहणे. **keep sth in mind**. ➪ MIND^1. **keep sb in the dark** ➪ DARK^2. **,keep it 'up** चांगले काम/कार्य चालू ठेवणे. **keep one's 'mouth shut** गुप्त गोष्ट न फोडणे, तोंड बंद ठेवणे. **keep an open mind** ➪ OPEN^1. **keep pace (with sb/sth)** एखाद्याच्या बरोबरीने प्रगती करणे/पुढे जाणे/धावणे. **,keep the 'peace** (क) लोकांची मारामारी थांबवणे, शांतता प्रस्थापित करणे. (ख) लोकांना त्रास न देणे, सार्वजनिक शांतता राखणे. **keep quiet about sth, keep sth quiet** एखाद्या गोष्टीविषयी मौन पाळणे, काहीही न बोलणे. **keep a straight 'face** न हसणे, चेहरा गंभीर ठेवणे. **keep a tight 'reign on sb/sth** एखाद्यावर कडक नियंत्रण ठेवणे, एखाद्याला लगाम घालणे. **keep one's wits about one** ➪ WIT. १४ (*क्रिब*) **keep at sth** एखादी गोष्ट करत राहणे. **keep (sb/sth) away from (sb/sth)** एखाद्याला एखाद्या गोष्टीपासून दूर ठेवणे, जवळ जाऊ न देणे. **keep sth back (from sb)** (एखाद्याला) (माहिती वगैरे) न सांगणे, दडवणे, हातचे राखणे. **keep sb 'down** (एखादे राष्ट्र वगैरे) दडपणे, मोडून काढणे. **keep sth**

'down एखादी गोष्ट वाढू न देणे. **keep sth from sb** एखाद्याला एखादी गोष्ट न सांगणे, एखादी गोष्ट लपवून ठेवणे. **keep in with sb** एखाद्याशी चांगले संबंध ठेवणे, मित्रत्वाने राहणे. **keep on about sth** ➪ ON^{1}. **keep 'on (at sb) (about sth)** एखाद्याशी एखाद्या गोष्टीविषयी कंटाळा किंवा चीड येईल असे बोलत राहणे. **keep 'out (of sth)** (एखाद्या ठिकाणी) न जाणे, दूर राहणे. **keep out of sth** एखादी गोष्ट टाळणे. **keep to sth** (क) न सोडणे, न भरकटणे : *~ to the path, मार्ग न सोडणे* ○ (*ला*) *~ to the point, मुद्द्याला धरून बोलणे/राहणे, मुद्देशीर बोलणे.* (ख) (योजना, वेळापत्रक, वचन वगैरे बरहुकूम) चालणे, वागणे, काम करणे. **keep one,self to one'self** लोकांना भेटण्याचे टाळणे, आपल्याआपल्यात असणे. **keep sth to one'self** एखादी गोष्ट इतरांना न सांगणे, एखादी गोष्ट आपल्याशीच ठेवणे. **keep sth up** (क) पडू न देणे. (ख) एखाद्या गोष्टीची वरची पातळी राखणे : *~ the prices up, किंमती वरच्या पातळीवर राखणे, किंमती पडू न देणे* ○ (*ला*) *~ one's spirits up, उत्साह टिकवून धरणे, हिंमत राखणे.* (ग) एखादी गोष्ट चालू ठेवणे : *Do you still ~ up your French? तू अजूनही तुझं फ्रेंच चालू ठेवलंयस्?* (घ) (घर, बाग वगैरे) चांगल्या स्थितीत ठेवणे, निगा बाळगणे. **keep 'up (with sb/sth)** एखाद्याच्या बरोबरीने राहणे, मागे न पडणे.

keep^{2} /कीप्/ *ना* १ [*अगण*] अन्न आणि इतर आवश्यक गोष्टी (किंवा त्यासाठी लागणारा पैसा), उदरनिर्वाह : *earn one's ~, स्वतःचा उदरनिर्वाह चालवणे, स्वतःच्या पोटापाण्याची व्यवस्था करणे.* २ (*वाक्प्र*) **for 'keeps** (*अनौप*) सतत, कायमचा.

keeper /'कीप(र्)/ *ना* [*गण*] १ प्राणिसंग्रहालयातील प्राण्यांची काळजी घेणारा माणूस, प्राणिरक्षक. २ (खास करून सामासिक शब्दांत) अधिकार असणारा, सांभाळणारा : *a 'shop ~, दुकानदार.*

keeping /'कीपिङ्/ *ना* (*वाक्प्र*) **in sb's keeping** एखाद्याच्या देखरेखीखाली, ताब्यात : *The keys are in his ~, किल्ल्या त्याच्या ताब्यात आहेत.* **in/out of keeping with sth** एखाद्या गोष्टीशी सुसंगत/विसंगत.

keepsake /'कीप्सेइक्/ *ना* [*गण*] देणाऱ्याची आठवण राहील अशी छोटी भेटवस्तू.

kennel /केन्ल्/ *ना* १ [*गण*] कुत्र्याचे छोटे घर. २ **kennels** (अे.व किंवा ब.व क्रियापदासह) श्वानशाळा, कुत्र्यांची जोपासना करण्याची जागा.

kept KEEP^{1} चा '*भूत, भूत वि.*

kerb (विशेषतः *अमे* **curb**) /कऽब्/ *ना* [*गण*] पादचारीमार्गाची दगडी कड.

kernel /'कऽन्ल्/ *ना* [*गण*] १ बीच्या किंवा दृढफळाच्या आतील गाभा, गर. २ (*ला*) एखाद्या विषयाचा महत्त्वाचा भाग, गाभा.

kestrel /'केस्ट्रल्/ *ना* [*गण*] लहान ससाण्याची जात.

ketchup /'केचप्/ *ना* [*अगण*] टॉमेटो, विनेगर वगैरेपासून केलेला घट्ट रस.

kettle /'केट्ल्/ *ना* [*गण*] पाणी उकळविण्यासाठी वापरायचे नळी असलेले भांडे, किटली.

key^{1} /की/ *ना* [*गण*] १ किल्ली, चावी. २ [बहुधा *अे.व*] (*to*)// (*ला*) प्रश्नाचे उत्तर देणारे काही : *Diet and exercise are the ~ to good health, चांगल्या तब्बेतीची गुरूकिल्ली म्हणजे (योग्य) आहार आणि व्यायाम.* ३ स्वाध्यायाची उत्तरे. ४ टाइपरायटर, पियानो वगैरेची दाबायची गुंडी किंवा बटण. ५ (*संगीत*) संवादी स्वरांचा संच : *in the ~ of G, G चे स्वरमंडल.* **key** *वि* खूप महत्त्वाचा; अत्यावश्यक : *a ~ position, महत्त्वाचे स्थान.* **'keyboard** *ना* [*गण*] दाबायच्या बटणांचा संच – टाइपरायटर, संगणक वगैरेवरचा, कळफलक. **'keyboard** *क्रि* [*सक*] कळफलक वापरून संगणकात (माहिती) भरणे. **'keyhole** *ना* [*गण*] किल्ली घालायचे भोक. **'keynote** *ना* [*गण*] (भाषणातील वगैरे) सर्वात महत्त्वाची कल्पना, बीजभाषण, सूत्रपात (करणारे भाषण). **'key-ring** *ना* [*गण*] किल्ल्या अडकवायची गोल कडी.

key^{2} /की/ *क्रि* [*सक*] (*in*)// (*संगणन*) कळफलक वापरून माहिती टंकलिखित करून भरणे. **keyed up** *वि* मनाची उभारी

नसलेला, मनाने अस्वस्थ, मनाने खचलेला.

kg संरू kilogram(s), किलोग्रॅम.

khaki /'काकि/ *वि* पिवळट तपकिरी रंग, खाकी रंग.

kibbutz /कि'बुट्स्/ *ना* [*गण*] (*ब.व* ~im /किबु'ट्सीम्/) इझ्राईलमधील सामूहिक शेत किंवा वसती.

kick^{1} /किक्/ *क्रि* १ [*सक*] लाथ मारणे, लत्ताप्रहार करणे, पायाने मारणे. २ [*अक*] जोराने पाय झाडणे. ३ [*अक*] (बंदुकीबाबत) गोळ्या झाडल्यावर एकदम हालणे. ४ (*वाक्प्र*) **,kick the 'bucket** (*व्रात्य*) मरणे, उलथणे. **kick the habit** (*अनौप*) सिग्रेट ओढणे, दारू पिणे यांसारख्या सवयी सोडून देणे, वाईट नाद सोडणे. ५ (*क्रिब*) **kick against sth** (अधिकारी, नियम वगैरेबाबत) तक्रार करणे, निषेध करणे. **kick 'off** सुरुवात करणे. **kick sb out (of sth)** (*अनौप*) एखाद्याला लाथ घालून बाहेर काढणे/हाकलणे. **'kick-off** *ना* [*गण*] फुटबॉल सामन्याची सुरुवात.

kick^{2} /किक्/ *ना* १ [*गण*] लाथ, पाय मारणे : *give sb a ~, एखाद्याला लाथ देणे/घालणे.* २ [*गण*] (*अनौप*) आनंदाची ऊर्मी, आनंदभाव : *She gets her ~s from skiing, स्किईंग केल्यावरच तिला खरा आनंद होतो.* ३ [*अगण, अ.व*] (*अनौप*) ताकद, शक्ती.

kid^{1} /किड्/ *ना* १ [*गण*] (*अनौप*) लहान मूल, बच्चा, छोकरा, बाळ. २ (क) [*गण*] बकरीचे पिलू, बकरू, करडू, मेंढरू. (ख) [*अगण*] करडूचे चामडे.

kid^{2} /किड्/ *क्रि* **(-dd-)** [*अक, सक*] (*अनौप*) बनवाबनवी करणे, फसवणे; ढोंग करणे, सोंग करणे.

kidnap /'किड्नॅप्/ *क्रि* **(-pp-;** *अमे* **-p-)** [*सक*] पैसे उकळण्यासाठी एखाद्याला पळवून नेणे, अपहरण करणे. **kidnapper** *ना* [*गण*] अपहरणकर्ता.

kidney /'किड्नि/ *ना* १ [*गण*] रक्तातील टाकाऊ पदार्थ काढून टाकणारे आणि मूत्र तयार करणारे शरीरातील इंद्रिय, मूत्रपिंड, गुडदा, वृक्क. २ [*अगण, गण*] अन्न म्हणून वापरायची काही प्राण्यांची मूत्रपिंडे.

kill /किल्/ *क्रि* १ (क) [*अक*] ठार मारणे, मारक असणे. (ख) [*सक*] एखाद्याला मारणे, जीव घेणे : (*ला अनौप*) *He'll ~ me if he finds me here, मी जर त्याला इथे दिसलो तर तो मारील मला/तो जीव घेईल माझा* (म्हणजे तो माझ्यावर खूप रागावेल). २ [*सक*] (*अनौप*) वेदना देणे, दुःख देणे : *My feet are ~ing me, माझ्या पायांनी फार हैराण केलंय मला.* ३ [*सक*] शेवट करणे, संपवणे : *~ sb's love, एखाद्याचे प्रेम संपुष्टात आणणे.* ४ (*वाक्प्र*) **kill ,two ,birds with ,one 'stone** एका कृतीने दोन हेतू साधणे, एका दगडात दोन पक्षी मारणे. **kill** *ना* १ [*गण*] हत्या. २ [बहुधा *अ.व*] मारलेला प्राणी. **killer** *ना* [*गण*] हत्या करणारा, मारेकरी. **killing** *ना* १ [*गण*] मारणे, हत्या. २ (*वाक्प्र*) **,make a 'killing** (*अनौप*) चटकन् खूप मोठा फायदा मिळवणे, घबाड मिळणे. **'killjoy** *ना* [*गण*] (*अधिक्षेपी*) इतरांच्या आनंदावर बिब्बा घालणारा, विघ्नसंतोषी.

kiln /'किल्न्/ *ना* [*गण*] मातीची भांडी, विटा भाजण्याची भट्टी, आवा.

kilo /'कीलउ/ *ना* [*गण*] (*ब.व* ~s) किलोग्रॅम, किलो.

kilobyte /'किलबाइट्/ *ना* [*गण*] संगणकातील माहितीचे १०२४ बाइट्स्.

kilogram (तसेच **-gramme**) /'किलग्रॅम्/ *ना* [*गण*] वजनाचे एक मेट्रिक परिमाण; १००० ग्रॅम.

kilometre (*अमे* **-meter**) /'किलमीट(र्), कि'लॉमिट(र्)/ *ना* [*गण*] लांबीचे मेट्रिक परिमाण; १००० मीटर्स.

kilowatt /'किलवॉट्/ *ना* [*गण*] विद्युत शक्तीचे परिमाण; १००० वॉट्स्.

kilt /किल्ट्/ *ना* [*गण*] स्कॉटिश पुरुष कधीकधी वापरतात तो रंगीत चट्टेपट्टे असलेल्या लोकरीच्या कापडाचा स्कर्ट.

kind^{1} /काइन्ड्/ *ना* १ [*गण*] समान गुणविशेष असलेला गट, जाती; प्रकार; तऱ्हा, छाप : *two ~s of fruit, दोन प्रकारची फळे.* २ (*वाक्प्र*) **in kind** (क) (मोबदल्याबाबत) मालाच्या रूपात, पैशाच्या नाही. (ख) (*ला*) त्याच रीतीने, तसेच. **a kind of** (*अनौप*) (अनिश्चितता दर्शविण्यास वापर) : *I had a ~ of feeling* *this might happen, असं काही घडेल याची मला पुसट कल्पना होती किंवा असं मला वाटत होतं.*

kind² /काइन्ड्/ *वि* दयाळू, कनवाळू. **,kind-'hearted** *वि* दयाशील, सज्जन, कृपाळू. **kindly** *वि* **(-ier, -iest)** (*अनौप*) दयाळू, ममतेचा. **kindly** *क्रिवि* १ दयाळूपणे. २ (सभ्यपणे विनंती करताना आणि उद्वेग दाखवताना वापर) : *K~ly leave me alone! कृपया मला एकट्याला राहू दे!* ३ (*वाक्प्र*) **not take kindly to sb/sth** एखादी व्यक्ती/गोष्ट न आवडणे, फारसं चांगलं मत नसणे. **kindness** *ना* १ [*अगण*] दयाळूपणा, दयार्द्रता. २ [*गण*] दयाळूपणाचे कृत्य.

kindergarten /'किन्डगाट्न्/ *ना* [*गण*] अगदी लहान मुलांची शाळा, शिशुशाळा, बालोद्यान.

kindle /'किन्ड्ल्/ *क्रि* १ [*अक, सक*] जळणे, पेटणे/पेटवणे. २ [*सक*] (*ला*) (भाव) जागवणे, चेतवणे.

kindred /'किन्ड्रिड्/ *वि* (*वाक्प्र*) **a kindred 'spirit** आपल्यासारखीच मते, श्रद्धा वगैरे असणारा दुसरा माणूस, समानशील व्यक्ती.

king /किङ्/ *ना* [*गण*] १ देशाचा पुरुष राज्यकर्ता (किंवा त्याचा किताब), राजा, नृपती. २ एखाद्या गटातील सर्वात महत्त्वाचा/मोठा माणूस, राजा. ३ (बुद्धिबळात) सर्वात महत्त्वाची सोंगटी, राजा. ४ पत्त्यातला राजा. **'king-size** (तसेच **-sized**) *वि* नेहमीपेक्षा मोठा आकार : *a ~-size bed, मोठा पलंग.*

kingdom /'किङ्डम्/ *ना* [*गण*] १ राजा किंवा राणीचे राज्य असलेला देश, राज्य. २ निसर्गाच्या तीन प्रमुख सृष्टींतील एक सृष्टी : *The animal, plant and mineral ~s, प्राणिसृष्टी, वनस्पती सृष्टी आणि खनिज सृष्टी.*

kink /किङ्क्/ *ना* [*गण*] १ दोरी, तार, केस, नळी वगैरेना आपोआप पडलेली गाठ. २ (बहुधा *अधिक्षेपी*) एखाद्याच्या स्वभावातील विक्षिप्तपणा, चमत्कारिकपणा. **kink** *क्रि* [*अक, सक*] गाठी होणे/करणे. **kinky** *वि* **(-ier, -iest)** (*अनौप*) लैंगिक वर्तनात विकृत.

kiosk /'कीऑस्क्/ *ना* [*गण*] वर्तमानपत्रे, मिठाई वगैरे विकण्याचे दर्शनी भाग उघडा असणारे लहान दुकान, टपरी.

kipper /'किप(र्)/ *ना* [*गण*] शेकून खारावलेला समुद्रातील मासा.

kiss /किस्/ *क्रि* [*अक, सक*] प्रेमाने किंवा स्वागतार्थ (एखाद्याला) ओठाने स्पर्श करणे, चुंबन घेणे, मुका घेणे. **kiss** *ना* [*गण*] चुंबन, मुका, पापा. **the kiss of 'life** *ना* [*अ.व*] तोंडावर तोंड ठेवून एखाद्याचा श्वास पुन्हा सुरू करणे.

kit /किट्/ *ना* १ [*गण*] हत्यारे किंवा आयुधांची पेटी/संच/संग्रह : *a first-'aid ~, प्रथमोपचाराची पेटी.* २ [*गण, अगण*] कपडे आणि इतर गोष्टी ठेवलेली पिशवी वगैरे – विशेषतः सैनिक किंवा खिलाडू यांची. ३ [*गण*] एखादी वस्तू तयार करण्याचे जुळवणीचे भाग. **kit** *क्रि* **(-tt-)** (*क्रिब*) **kit sb out/up (with sth)** एखाद्याला जरूर त्या सर्व गोष्टी पुरवणे, गोष्टींची तरतूद करणे.

kitchen /'किचिन्/ *ना* [*गण*] स्वयंपाक करायची खोली, स्वयंपाकघर.

kite /काइट्/ *ना* [*गण*] पतंग.

kith /किथ्/ *ना* (*वाक्प्र*) **,kith and 'kin** /किन्/ आप्तेष्ट, सगेसोयरे, गणगोत.

kitten /'किट्न्/ *ना* [*गण*] मांजरीचे पिल्लू.

kitty /'किटि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) सामाईक वापरासाठी अनेकांनी जमवलेला निधी, फंड.

kiwi /कीवी/ *ना* [*गण*] १ उडू न शकणारा एक न्यूझीलंडमधला पक्षी. २ **Kiwi** (*अनौप*) न्यूझीलंडचा रहिवासी.

km *संरू* (*ब.व* **km** किंवा **~s**) kilometre(s), किलोमीटर.

knack /नॅक्/ *ना* [*अ.व*] एखाद्या कामातले कौशल्य, कसब.

knackered /'नॅकड्/ *वि* (*ब्रि व्रात्य*) खूप दमलेला.

knead /नीड्/ *क्रि* [*सक*] १ हाताने कणीक मळणे, तिंबणे. २ अंग मर्दन करणे, चोळणे, रगडणे.

knee /नी/ *ना* [*गण*] १ (क) गुडघा, जानू. (ख) गुडघ्यावर येणारा कपड्याचा भाग. २ (*वाक्प्र*) **bring sb to his/her 'knees**

एखाद्याला शरण आणणे, गुडघे टेकायला लावणे. **'kneecap** *ना* [*गण*] गुडघ्यापुढचे लहान सपाट हाड, गुडघ्याची वाटी. **,knee-'deep** *वि* गुडघाभर, गुडघ्याएवढे.

kneel /नील्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **knelt** /नेल्ट्/ किंवा विशेषतः *अमे* ~**ed**) [*अक*] गुडघ्यावर बसणे, गुडघे टेकणे.

knew KNOW चा *भूत.*

knickers /'निकझ्/ *ना* [*ब.व*] स्त्रीची किंवा मुलीची आतली चड्डी.

knick-knack /'निक्नॅक्/ *ना* [*गण,* विशेषतः *ब.व*] लहान दागिना, शोभेच्या लहान-सहान वस्तू.

knife /नाइफ्/ *ना* [*गण*] (*ब.व* **knives** /नाइव्ह्झ्/) चाकू, सुरी, सुरा. **knife** *क्रि* [*सक*] एखाद्याला चाकू मारणे, भोसकणे. **'knife-edge** *ना* (*वाक्प्र*) **on a knife-edge** (एखादी महत्त्वाची परिस्थिती किंवा महत्त्वाचा निकाल याबाबत) अनिश्चित, अटीतटीचा.

knight /नाइट्/ *ना* [*गण*] १ 'सर' हा किताब मिळालेला माणूस, सरदार. २ (पूर्वीच्या काळी) उच्चकुलीन शूर शिपाई, शिलेदार. ३ बुद्धिबळातील एक सोंगटी, घोडा. **knight** *क्रि* [*सक*] 'सर' हा किताब बहाल करणे. **knighthood** /-हुड्/ *ना* [*गण, अगण*] सरदाराची श्रेणी, शिलेदारी.

knit /निट्/ *क्रि* (**-tt-** *भूत, भूत वि* ~**ted**; *क्र* २ च्या अर्थाने बहुधा **knit**) [*अक, सक*] १ विणणे. २ घट्ट संबंध असणे, जोडले जाणे : *a closely-~ family, घट्ट संबंध असलेले कुटुंब, अविस्कळित कुटुंब.* **knitting** *ना* [*अगण*] विणकाम. **'knitting-needle** *ना* [*गण*] विणायची सुई.

knives KNIFE चे *ब.व.*

knob /नॉब्/ *ना* [*गण*] १ (क) दार, खण वगैरेची मूठ. (ख) गोलाकार नियंत्रक बटण. २ छोटा गोलाकार भाग, गोळा : *a ~ of butter, लोण्याचा गोळा.* **knobbly** /-ब्लि/ *वि* (**-ier, -iest**) गाठीगाठीचा, गाठाळ : *~bly knees, गाठी असलेले गुडघे.*

knock^{1} /नॉक्/ *क्रि* १ (क) [*सक*] जोराने मारणे, ठोकणे, धडकणे. (ख) [*अक*] ठोठावणे, टकटक करणे : *~ on the door, दार ठोठावणे.* २ [*सक*] (*अनौप*) टीका करणे, ठोकणे. ३ (*क्रिव*) **knock about with sb** (*अनौप*) एखाद्याच्या संगतीत सतत असणे, सतत बरोबर असणे. **knock sb/sth about** एखाद्याला वाकडेतिकडे मारणे, झोडपणे. **knock sth back** (*अनौप*) पटकन् पिणे, घटाघटा घेणे. **knock sb down** ठोसा मारून खाली पाडणे, आडवे पाडणे : *She was ~ed down by a bus, तिला बसने धडक दिली.* **knock sth down** (इमारत) पाडणे, जमीनदोस्त करणे. **knock sth/sb down** (एखाद्याला बळजबरीने किंमत) कमी करायला लावणे, (भाव) पाडून मागणे. **knock off (sth)** (*अनौप*) (काम) थांबवणे : *When do you ~ off? तुझे काम केव्हा थांबते?* **knock sth off** (**क**) किमतीत कमी करणे, सूट देणे : *~ £20 off the price, २० पौंडानी किंमत कमी करणे.* (**ख**) (*व्रात्य*) चोरणे, उठवणे. **knock sb out** (**क**) ठोसा मारून बेशुद्ध पाडणे. (**ख**) एखाद्याची/स्वतःची दमणूक करणे, दमवणे. **knock sb out (of sth)** एखाद्याला (स्पर्धेतून) वगळणे, बाद करणे, काढून टाकणे. **knock sth up** पटकन् तयार करणे : *~ up a meal, पटकन् जेवण बनवणे.* **knocker** *ना* [*गण*] दार ठोठावण्याची दारावरची धातूची पट्टी. **,knock-'kneed** *वि* चालताना गुडघे चिकटणारा, गुडघेघाशा, संहतजानू. **,knock-'on effect** *ना* [*गण*] एखाद्या कृतीचा अप्रत्यक्ष परिणाम. **'knock-out** *ना* [*गण*] १ मुष्टियोद्ध्याला पराभूत करणारा ठोसा. २ पराभव होणारे गळत जातील अशी स्पर्धा. ३ (*अनौप*) छाप पाडणारी व्यक्ती/वस्तू, घायाळ करणारी व्यक्ती.

knock^{2} /नॉक्/ *ना* [*गण*] १ ठोठावण्याचा आवाज, टकटक. २ (*अनौप*) वाईट किंवा दुर्दैवी अनुभव.

knot^{1} /नॉट्/ *ना* [*गण*] १ गाठ. २ बसलेली गाठ; गुंता. ३ लाकडाची गाठ. ४ माणसांचा लहान गट. **knot** *क्रि* (**-tt-**) १ [*अक, सक*] गाठी होणे/करणे. २ [*सक*] गाठ मारून घट्ट करणे. **knotty** *वि* (**-ier, -iest**) १ गाठाळ (लाकूड). २ गुंतागुंतीचा, न सुटणारा : *a ~ty problem, न सुटणारा प्रश्न.*

knot^{2} /नॉट्/ *ना* [*गण, बहुधा ब.व*] जहाजांच्या वेगाचे परिमाण; ताशी एक नॉटिकल मैल (१.८५२ किलोमीटर्स).

know /नउ/ *क्रि* (*भूत* **knew** /न्यू; *अमे* नू/, *भूत वि* **~n** /नउन्/) १ [*अक, सक*] माहीत असणे. २ [*सक*] (एखाद्याची) ओळख असणे, (एखाद्याला) ओळखणे. ३ [*सक*] (एखाद्या ठिकाणाची) माहिती असणे. ४ [*सक*] ओळखणे : *I'll ~ her when I see her, तिला पाहिल्यावर मी तिला ओळखेन.* ५ [*सक*] (एखादी भाषा, एखादे कौशल्य वगैरे) समजणे आणि वापरता येणे. ६ [*सक*] स्वतःला वैयक्तिक अनुभव असणे : *a man who has ~n poverty, गरिबी म्हणजे काय याचा अनुभव असलेला माणूस.* ७ (*वाक्प्र*) **be known as sb/sth** अमुक म्हणून समजला जाणे/मानला जाणे. **know sb by sight** व्यक्तिशः भेट झाली नसता एखाद्याला ओळखणे. **know one's own 'mind** आपल्याला काय हवं ते माहीत असणं/कळणं. ८ (*क्रिब*) **know about sth** एखाद्या गोष्टीविषयी माहिती असणे. **know of sb/sth** एखाद्या विषयी (फार थोडी) माहिती असणे : *I ~ of the book but I've not read it, मला त्या पुस्तकाविषयी थोडी माहिती आहे पण मी ते वाचलेलं नाही.* **'know-how** *ना* [*अगण*] (*अनौप*) व्यावहारिक ज्ञान किंवा क्षमता.

knowing /'नउइङ्/ *वि* आपल्याला गुप्तगोष्ट माहित आहे असे सुचवणारा/दाखवणारा, अर्थपूर्ण : *a ~ look, अर्थपूर्ण कटाक्ष.* **knowingly** *क्रिवि* १ हेतुतः, मुद्दाम, जाणूनबुजून. २ माहीत आहे अशा रीतीने, अर्थपूर्ण रीतीने.

knowledge /'नॉलिज्/ *ना* १ [*अगण*] ज्ञान, समज. २ [*अगण, अे.व*] स्वतःला असलेले पूर्ण ज्ञान : *a ~ of French, फ्रेंचचे ज्ञान.* ३ [*अगण*] संपूर्ण माहिती. **knowledgeable** /-अब्ल्/ *वि* माहितगार, तज्ज्ञ, जाणता.

known KNOW चे *भूत वि.*

knuckle /'नकल्/ *ना* [*गण*] हाताच्या बोटाच्या सांध्याचे हाड, अंगुलीमूल. **knuckle** *क्रि* (*क्रिब*) **knuckle under** (*अनौप*) एखाद्याचे ऐकायला लागणे, एखाद्याच्या हुकमतीखाली राहावे लागणे.

koala /कउ'आल/ *ना* [*गण*] छोट्या अस्वलासारखा, झाडावर चढणारा एक ऑस्ट्रेलियन प्राणी.

Koran /क'रान्; *अमे* -रॅन्/ *ना* **the Koran** [*अे.व*] मुसलमानांचा धर्मग्रंथ, कुराण.

kosher /'कउश(र्)/ *वि* (अन्नाबाबत) ज्यूंच्या धर्मनियमांनुसार असणारे.

kowtow /,काउ'टाउ/ *क्रि* [*अक*] (*to*)// एखाद्याची (अति) विनम्रपणे आज्ञा पाळणे, हांजीहांजी करणे.

kph /,केइ पी 'अेइच्/ *संरू* kilometres per hour, ताशी किलोमीटर्स.

L l

L, l /अेल्/ *ना* [*गण*] (*ब.व* **L's, l's** /अेलझ्/) १ इंग्रजी वर्णमालेतील बारावे अक्षर. २ ५० या अंकासाठीचा रोमन अंक.

L *संरू* १ Lake, सरोवर. २ (विद्युत प्लगबाबत) चालू, विद्युत्प्रवाह असलेला.

l *संरू* १ line, रेषा. २ litre(s), लिटर.

Lab /लॅब्/ *संरू* (*ब्रि राजकारण*) Labour (Party), लेबर (पार्टी).

lab /लॅब्/ *ना* [*गण*] (*अनौप*) प्रयोगशाळा.

label /'लेइब्ल्/ *ना* [*गण*] १ वस्तूची माहिती, मालकी वगैरे देणारी तीवर चिकटवलेली कागद, कापड वगैरेची पट्टी, खूणपट्टी. २ (*ला*) एखाद्याचे वर्णन करणारा शब्द, उपाधी. **label** *क्रि* (**-ll-**; *अमे* **-l-**) [*सक*] १ लेबल चिकटवणे. २ (*ला*) वर्णन करणे, नाव ठेवणे : *They ~led her (as) a liar, त्यांनी तिला खोटारडी असे नाव दिले.*

labor (*अमे*) = LABOUR. **labor union** (*अमे*) = TRADE UNION (TRADE^{1}).

laboratory /ल'बॉरट्रि; *अमे* 'लॅब्रटॉऽरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) विज्ञानाची प्रयोगशाळा.

laborious /ल'बॉऽरिअस/ *वि* कष्टाचा, परिश्रमाचा. **laboriously** *क्रिवि* कष्टाने, मेहनतीने, परिश्रमपूर्वक.

labour^{1} (*अमे* **-or**) /'लेइब(र्)/ *ना* १

[*अगण*] (विशेषतः कष्टाचे) काम. २ [*गण, बहुधा ब.व*] करायचे काम. ३ [*अगण*] मजूर, कामगार. ४ [*अगण, अे.व*] प्रसुती, बाळंतपण : *a woman in ~, बाळंत होणारी स्त्री.* ५ **Labour** [*अे.व*] (*ब्रि राजकारण*) (अे.व किंवा ब.व क्रियापदासह) the Labour Party, मजूर पक्ष. **the 'Labour Party** *ना* [*अे.व*] (*ब्रि राजकारण*) खास करून कामगारांचे हितसंबंध जपणारा एक प्रमुख राजकीय पक्ष.

labour^2 (*अमे* **-or**) /'लेइब(र्)/ *क्रि* १ [*अक*] खूप काम करणे, कष्ट/परिश्रम घेणे. २ [*अक*] अवघड काम करणे, राबणे. ३ (*वाक्प्र*) **'labour the point** आधीच समजलेली गोष्ट/मुद्दा पुन्हा सांगत बसणे, तेचतेच सांगणे, पिळणे. ४ (*क्रिब*) **labour under sth** (खोट्या कल्पनेला) बळी पडणे, फसणे. **labourer** (*अमे* **-bor-**) *ना* [*गण*] मजूर, अकुशल कामगार, बिगारी.

labyrinth /'लॅबरिन्थ्/ *ना* [*गण*] वाट सापडायला कठिण जाते असे नागमोडी वळणांचे जाळे, चक्रव्यूह, सर्पकुहर.

lace /लेइस्/ *ना* १ [*अगण*] नक्षीची झालर, कपड्याच्या काठाला वगैरे लावायची विणलेली नक्षी. २ [*गण*] बुट वगैरे बांधायची नाडी. **lace** *क्रि* १ [*अक, सक*] नाडी बांधून घट्ट करणे. २ [*सक*] (*with*)// एखाद्या पेयात मद्य मिसळून त्याला चवदार, कडक करणे.

lacerate /'लॅसरेइट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) (मांस) कापणे किंवा फाडणे, चिरणे, ओरखडणे. **laceration** /,लॅस'रेइशन्/ *ना* [*गण, अगण*] ओरखडा.

lack /लॅक्/ *क्रि* १ [*सक*] एखादी व्यक्ती/गोष्ट नसणे; तुटवडा असणे, कमी असणे, कमतरता असणे. २ (*वाक्प्र*) **be 'lacking** गरज असताना न मिळणे, न्यून असणे. **be 'lacking in sth** एखादी गोष्ट पुरेशी नसणे. **lack** *ना* [*अगण, अे.व*] (गरज असलेल्याचा) तुटवडा, कमतरता, उणीव : *a ~ of money, आर्थिक टंचाई.*

lackadaisical /,लॅक'डेइझिकल्/ *वि* उदासीन; निरुत्साही.

laconic /ल'कॉनिक्/ *वि* (*औप*) मितभाषी. **laconically** /-कलि/ *क्रिवि* कमी शब्दांत, थोडक्यात.

lacquer /'लॅक(र्)/ *ना* [*अगण*] १ धातूच्या किंवा लाकडी पृष्ठभागाला चकचकीतपणा आणण्यासाठी वापरायचे एक पारदर्शी द्रव्य, लाखरोगण. २ (*जुना, अप्रचलित*) केस बसविण्यासाठीचा द्रवाचा फवारा. **lacquer** *क्रि* [*सक*] लाखेचे रोगण करणे.

lacy /'लेइसि/ *वि* (**-ier, -iest**) दोऱ्याची नक्षीदार झालर असलेला.

lad /लॅड्/ *ना* [*गण*] १ मुलगा, पोरगा; तरुण. २ (*अनौप*) उसळत्या रक्ताचा बेदरकार तरुण : *He's a bit of a ~, तो थोडासा स्वच्छंदी माणूस आहे.* **the lads** [*ब.व*] (*अनौप*) पोरांचे टोळके, मित्रांचा कंपू : *He's gone out with the ~s, तो मित्रांच्या कंपूबरोबर बाहेर गेलाय.*

ladder /'लॅड(र्)/ *ना* [*गण*] १ शिडी. २ स्त्रियांच्या लांब पायमोज्यामधला वगैरे दोष, विरलेला भाग. ३ (*ला*) एखाद्या संघटनेतील, एखाद्याच्या जीविकेमधील (करिअरमधील) वगैरे टप्पे : *climb up the social ~, सामाजिक प्रतिष्ठेचा सोपान चढणे.* **ladder** *क्रि* [*अक, सक*] (पायमोजा वगैरे बाबत) विरणे, फिसकणे.

laden /'लेइड्न्/ *वि* (*with*)// मालाने खच्चून भरलेला, माल चढवलेला.

ladle /'लेइड्ल्/ *ना* [*गण*] पातळ पदार्थ वाढण्याचा खोलगट मोठा डाव, ओगराळे. **ladle** *क्रि* [*सक*] डावाने वाढणे.

lady /'लेइडि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) १ (खास करून विनम्र असा वापर) स्त्री, बाईसाहेब. २ घरंदाज स्त्री, चांगली रीतभात असणारी स्त्री. ३ (खास करून पूर्वीच्या काळी) कुलीन स्त्री, मोठी बाई. ४ **Lady** कुलीन स्त्री (तिची उपाधी), देवी. ५ **the Ladies** [*ब.व*] (बहुधा अे.व क्रियापदासह) (*ब्रि अनौप*) स्त्रियांसाठी सार्वजनिक मुतारी, महिला प्रसाधनगृह. **'ladylike** *वि* चांगल्या स्त्रीला साजेलसा, शालीन. **'ladyship** *ना* (विशेषतः **Ladyship**) [*गण*] (एखाद्या बाईसाहेबांशी किंवा त्यांच्याविषयी बोलताना) : *her L~ship, राणीसरकार, बाईसाहेब.*

lag^1 /लॅग्/ *क्रि* (**-gg-**) [*अक*] (*behind*)//

हळूहळू जाणे, रेंगाळणे; इतरांच्या मागे पडणे.

lag^{2} /लॅग्/ *क्रि* **(-gg-)** [*सक*] (नळ्या, पाईप वगैरेना) उष्णता बाहेर जाऊ नये म्हणून लेप देणे. **lagging** *ना* [*अगण*] असा लेप देण्याचे द्रव्य.

lager /'लाग(र्)/ *ना* [*गण, अगण*] फिकट रंगाची बियर (किंवा तिची बाटली, ग्लास).

lagoon /ल'गून्/ *ना* [*गण*] प्रवाळ खडकांनी किंवा वाळूच्या बांधांनी समुद्रापासून विलग झालेल्या खाऱ्या पाण्याचे सरोवर, खाजण.

laid LAY^{1} चा *भूत, भूत वि.*

lain LIE^{2} चे *भूत वि.*

lair /लेअ(र्)/ *ना* [*गण*] जंगली श्वापदाची गुहा, जाळी.

laity /'लेइअटि/ *ना* **the laity** [*अे.व*] (अे.व किंवा ब.व क्रियापदासह) अभिक्षुक वर्ग, गृहस्थी लोक; व्यावसायिक नसणारी सामान्य माणसे.

lake /लेइक्/ *ना* [*गण*] तळे, तलाव, सरोवर, जलाशय.

lamb /लॅम्/ *ना* १ (क) [*गण*] कोकरू. (ख) [*अगण*] कोकराचे मांस. २ [*गण*] (*अनौप*) निरुपद्रवी सज्जन माणूस, बिच्चारा.

lame /लेइम्/ *वि* १ नीटपणे चालू न शकणारा, लंगडा. २ लंगडी (सबब वगैरे), न पटणारी. ३ (*वाक्प्र*) **a ˌlame 'duck** (क) अडचणीत असलेली आणि मदतीची गरज असलेली व्यक्ती किंवा संस्था. (ख) (विशेषतः *अमे*) कारकीर्द संपत आलेला निवडून दिलेला अधिकारी. **lame** *क्रि* [*सक*] लंगडा करणे, पंगू करणे. **lameness** *ना* [*अगण*] पंगुत्व, लंगडेपणा.

lament /ल'मेन्ट्/ *क्रि* [*अक, सक*] (एखाद्याकरता) शोक करणे, दुःख करणे, आक्रंदणे. **lament** *ना* [*गण*] शोक व्यक्त करणारे गाणे किंवा कविता, विलापिका, शोकगीत. **lamentable** /'लॅमन्टब्ल्/ *वि* असमाधानकारक; खेदजनक. **lamentably** *क्रिवि* असमाधानकारकरीत्या; खेदपूर्ण रीतीने.

laminated /'लॅमिनेइटिड्/ *वि* अनेक पातळ थर एकत्र जोडून केलेला, थराथरांचा.

lamp /लॅम्प्/ *ना* [*गण*] दिवा, दीप. **'lamppost** *ना* [*गण*] रस्त्यावरील दिव्याचा खांब. **'lampshade** *ना* [*गण*] दिव्याभोवती किंवा दिव्यावर ठेवायचे झाकण, दिव्याची शेड.

lance^{1} /लान्स्; *अमे* लॅन्स्/ *ना* [*गण*] पूर्वी वापरले जाणारे घोडेस्वार सैनिकाचे लांब भाल्यासारखे शस्त्र, बरची.

lance^{2} /लान्स्; *अमे* लॅन्स्/ *क्रि* [*सक*] (गळू वगैरे) सुरीने कापणे, फोडणे.

land^{1} /लॅन्ड्/ *ना* १ [*अगण*] जमीन, भूमी. २ [*अगण*] शेतज़मीन: *work on the '~, शेतजमिनीवर काम करणे* म्हणजेच *शेतात काम करणे.* ३ (कधीकधी **lands**) [*अगण ब.व*] स्थावर मिळकत, जमीनजुमला. ४ [*गण*] (*अलं*) देश किंवा राष्ट्र. ५ (*वाक्प्र*) **see, etc how the 'land lies** प्राप्त परिस्थितीचा अभ्यास करणे, आजच्या स्थितीकडे लक्ष देणे. **landed** *वि* खूप जमीन असलेला, जमीन मालकी असलेला. **'landlocked** *वि* (देशाबाबत) इतर देशांनी/भूप्रदेशांनी वेढलेला, भोवती समुद्र नसून फक्त जमीनच असणारा, भूवेष्टित. **'landmark** *ना* [*गण*] १ दुरून सहज दिसणारी आणि ओळखू येणारी खूण, सीमाचिन्ह. २ (*ला*) महत्त्वाची घटना, महत्त्वाचा शोध वगैरे. **'landowner** *ना* [*गण*] जमीनमालक, जमीनदार. **'landslide** *ना* [*गण*] १ डोंगरावरून दरड कोसळणे, भूमिपात, भूमिसर्पण. २ (*ला*) निवडणुकीतील प्रचंड विजय.

land^{2} /लॅन्ड्/ *क्रि* १ [*अक, सक*] बोटीतून जमिनीवर येणे/उतरणे/उतरवणे. २ [*अक, सक*] (वायुवाहनाबाबत) जमिनीवर उतरणे/उतरवणे. ३ [*सक*] (*अनौप*) मिळवणे: *~ a job, नोकरी मिळवणे.* ४ (*वाक्प्र*) **land on one's feet** ➪ FOOT. ५ (*क्रिब*) **land sb/oneself in sth** (*अनौप*) दुसऱ्याला/स्वतःला अडचणीत आणणे, संकटात टाकणे. **land up** (*अनौप*) शेवट होणे, शेवटी पोहोचणे: *~ up in gaol, शेवटी तुरुंगात जाणे.* **land sb with sth** (*अनौप*) एखाद्याला (नको असलेले काम, वगैरे) देणे, गळ्यात बांधणे.

landing /'लॅन्डिङ्/ *ना* [*गण*] १ जमिनीवर उतरणे: *a ˌcrash-'landing, संकटकालीन विमानाचे उतरणे.* २ जिना चढून गेल्यावरची सपाट जागा, तबकडी, रमणा. ३ (तसेच

'landing-place) जहाजातून प्रवासी किंवा माल उतरवण्याची जागा. **'landing-craft** *ना* [*गण*] सपाट तळ असलेली आणि सैनिक, वाहने वगैरे जमिनीकडे नेणारी नौका. **'landing-gear** *ना* [*अगण*] = UNDERCARRIAGE. **'landing-stage** *ना* [*गण*] बोटीवरून माणसे किंवा माल उतरवण्याचा फलक.

landlady /'लॅन्ड्लेइडि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) १ खोली वगैरे भाड्याने देणारी स्त्री, घरमालकीण. २ भोजन, निवास या सुविधा भाड्याने देणारी स्त्री, खाणावळवाली.

landscape /'लॅन्ड्स्केइप्/ *ना* [*गण*] १ नयनगोचर प्रदेशाचे चित्र, निसर्गदृश्य. २ निसर्गचित्र. **landscape** *क्रि* [*सक*] नैसर्गिक देखाव्याची प्रतिकृती वाटेल अशा तऱ्हेने भूभागांची योजना आखणे, निसर्गरम्य करणे.

lane /लेइन्/ *ना* [*गण*] १ गल्ली, बोळ. २ (स्थलनामांत) आळी, गल्ली: *Mill Lane, मिल (गिरण) आळी.* ३ एकाच दिशेने एका ओळीत वाहने चालवण्याचा मोठ्या रस्त्यावरील पट्टा, पदर: *a four-lane motorway, चौपदरी मोटार रस्ता.* ४ नियमीतपणे वापरला जाणारा बोटींचा जलमार्ग किंवा विमानांचा वायुमार्ग. ५ धावण्याच्या किंवा पोहण्याच्या शर्यतीतील प्रत्येक स्पर्धकाचा आखून दिलेला मार्ग.

language /'लॅङ्ग्विज्/ *ना* १ [*अगण*] विचार आणि भावना व्यक्त करणारी भाषा, वाणी. २ [*गण*] विशिष्ट प्रदेशाची किंवा लोकांची भाषा: *the English ~, इंग्रजी भाषा.* ३ [*अगण*] अभिव्यक्तीची पद्धत, भाषा. ४ [*अगण*] विशिष्ट गटाची भाषा, परिभाषा: *medical ~, वैद्यकीय (परि)भाषा.* ५ [*गण, अगण*] चिन्हव्यवस्था: *a computer ~, संगणकाची एक चिन्हव्यवस्था* ○ *body ~, अंगविक्षेपाची भाषा.* **'language laboratory** *ना* [*गण*] ध्वनिफिती वगैरे वापरून परभाषा शिकण्याची सोय असलेली जागा, फीतमुद्रक शाळा, भाषा प्रयोगशाळा.

languid /'लॅङ्ग्विड्/ *वि* (*औप*) (माणसाबाबत) अंगात जोम नसलेला, खंगलेला; सुस्त, क्लान्त. **languidly** *क्रिवि* निर्जीवपणे, सुस्तपणे.

languish /'लॅङ्ग्विश्/ *क्रि* [*अक*] (*औप*) १ खंगणे, झुरणे. २ *in*// खितपत पडणे: *~ in poverty, दारिद्र्यात खितपत पडणे.*

lank /लॅङ्क्/ *वि* १ (केसांबाबत) सरळ, पातळ आणि अनाकर्षक. २ (माणसाबाबत) लुकडा, काटकुळा आणि उंच.

lanky /'लॅङ्कि/ *वि* (**-ier, -iest**) काटकुळा आणि अनाकर्षक, हडकुळा.

lantern /'लॅन्टन्/ *ना* [*गण*] इकडे तिकडे नेता येईल असा आणि ज्योत किंवा मेणबत्तीकरता पारदर्शक आवरण असलेला दिवा, हातातला दिवा, कंदील.

lap^1 /लॅप्/ *ना* [*गण*] बसलेल्या व्यक्तीचा कमरेपासून गुडघ्यापर्यंतचा पुढचा भाग, मांडी: *a baby on his ~, त्याच्या मांडीवरचे मूल.*

lap^2 /लॅप्/ *ना* [*गण*] शर्यतीच्या मैदानाला घातलेला एक पूर्ण फेरा, पूर्ण वळसा. **lap** *क्रि* (**-pp-**) [*सक*] शर्यतीत एक पूर्ण फेऱ्याने पुढे जाणे.

lap^3 /लॅप्/ *क्रि* (**-pp-**) १ [*सक*] (खास करून प्राण्यांबाबत) जिभेनी लपलप करत पिणे. २ [*अक*] (पाण्याबाबत) सपसप आवाज करणे. ३ (*क्रिब*) **lap sth up** (*अनौप*) (स्तुती, बातम्या वगैरे) उत्सुकतेने स्वीकारणे, आनंदाने घेणे.

lapel /ल'पेल्/ *ना* [*गण*] कोटाच्या कॉलरचा पुढचा घडी घातलेला भाग.

lapse /लॅप्स्/ *ना* [*गण*] १ वागणुकीतील, आठवणीतील वगैरे लहानशी चूक, कसर. २ कालावधी. **lapse** *क्रि* [*अक*] १ (*from, into*)// चांगल्या सवयीतून वाईट सवयीकडे वळणे, ढळणे, मार्गभ्रष्ट होणे: *a ~d Catholic, मार्गातून ढळलेला कॅथलिक.* २ *into*// एखाद्या स्थितीत हळूहळू जाणे: *~ into sleep, झोपेच्या आधीन होणे.* ३ (काळाबाबत) जाणे, सरणे. ४ (*कायदा*) (अधिकारांबाबत) न वापरल्यामुळे किंवा चालू न ठेवल्यामुळे रद्दबातल होणे, व्यपगत होणे.

larch /लाच्/ *ना* [*गण*] छोटे शंकू असणारा एक देवदार जातीचा वृक्ष.

lard /लाड्/ *ना* [*अगण*] स्वयंपाकात वापरायची डुकराची चरबी.

larder /'लाड(र्)/ *ना* [*गण*] अन्न

साठवण्याकरता वापरायची खोली किंवा कपाट, दूधदुपत्याचे कपाट.

large /लाज्/ *वि* (~r, ~st) १ नेहमीपेक्षा आकाराने मोठा. २ (*वाक्प्र*) **(as) large as 'life** (*गंमत*) साक्षात्, प्रत्यक्षच. **by and 'large** एकंदरीत; बहुधा, अनेकदा. **large** *ना* (*वाक्प्र*) **at 'large** (क) मोकळा. (ख) सर्वसाधारणपणे : *the country at ~, सामान्यतः सर्व देश.* **largely** *क्रिवि* मोठ्या प्रमाणात; प्रामुख्याने, मुख्यतः. **'large-scale** *वि* १ मोठ्या प्रमाणावरचा : *a ~-scale search, विस्तृत प्रमाणातील शोध.* २ मोठ्या प्रमाणात केलेला, विस्तृत स्वरूपाचा.

lark^{1} /लाक्/ *ना* [*गण*] एक छोटासा गाणारा पक्षी, चंडोल.

lark^{2} /लाक्/ *ना* [*गण*, बहुधा *अे.व*] (*अनौप*) थोडीशी गंमत, मस्करी. **lark** *क्रि* [*अक*] *about/around*// (*अनौप*) खट्याळपणे वागणे, वेडेचार करणे.

larva /'लाव्ह/ *ना* [*गण*] (*ब.व* **~ae** /-व्ही/) कीटकाची पहिली अवस्था, अळी, पिलव, डिंभ, कोशस्थ किडा.

larynx /'लॅरिङ्क्स्/ *ना* [*गण*] (*ब.व* **larynges** /लॅ'रिन्जीझ्/ श्वासनलिकेच्या वरच्या टोकाची पोकळी की जीमधे ध्वनी निर्माण करणारे स्वरतंतू बसविलेले असतात, कंठ, स्वरयंत्र, घोषवलिकापेटी. **laryngitis** /,लॅरिन'जाइटिस्/ *ना* [*अगण*] स्वरयंत्राला आलेली सूज, कृकदाह.

lascivious /ल'सिव्हिअस्/ *वि* (*औप*) कामातूर, हपापलेला, खाजाळू, कामांध, लंपट.

laser /'लेइझ(र्)/ *ना* [*गण*] प्रखर पण पूर्ण नियंत्रित प्रकाश शलाका सोडणारी यंत्रणा.

lash^{1} /लॅश्/ *ना* [*गण*] १ चाबकाचा लवचिक भाग (किंवा त्याने मारलेला फटकारा), सपका. २ = EYELASH (EYE).

lash^{2} /लॅश्/ *क्रि* १ [*अक, सक*] चाबकाने फोडणे किंवा चाबकाने फोडल्यासारखे मारणे. २ [*अक, सक*] (प्राण्याच्या शेपटीबाबत) जोराने हालणे/हालवणे, वळवळ करणे. ३ [*सक*] (दोरीने वगैरे) गच्च बांधणे, आवळणे. ४ (*क्रिब*) **lash out** (क) (*against/at*)// शारीरिक/शाब्दिक मारा करणे, झोडपणे, ठोकून काढणे. (ख) (*on*)// (*अनौप*) पैसे उडवणे.

lashings /'लॅशिङ्झ्/ *ना* [*ब.व*] (*ब्रि अनौप*) चिकार, भरपूर : *~s of cream, उदंड साय.*

lass /लॅस्/ *ना* [*गण*] (विशेषतः *स्कॉटिश उत्तर ब्रि अनौप*) मुलगी, पोरगी.

lasso /लॅ'सू/ *ना* [*गण*] (*ब.व* ~s किंवा **~es**) घोडा किंवा गुरेढोरे पकडण्यासाठी वापरायचा दोरीचा फासा, पाश. **lasso** *क्रि* [*सक*] फास टाकून पकडणे.

last^{1} /लास्ट्; *अमे* लॅस्ट्/ *वि* १ सर्वांच्या नंतर येणारा, शेवटचा, अंत्य : *Saturday is the ~ day of the week, आठवड्याचा शेवटचा वार शनिवार.* २ अगदी अलिकडचा; ताजा, आत्ताचा : *~ night, काल रात्री.* ३ शेवटचा शिल्लक; अखेरचा : *This is our ~ bottle of milk, ही आमची शेवटची दुधाची बाटली आहे.* ४ कमी शक्यतेचा, जवळजवळ अशक्य कोटीतला : *She's the ~ person to trust with a secret, एखादी गुप्त गोष्ट सांगून तिच्यावर भरवसा ठेवण्यासारखी ती अजिबात नाही.* ५ (*वाक्प्र*) **be on one's/its last 'legs** अत्यंत वाईट परिस्थितीत असणे. **have the last 'laugh** शेवटी, प्रतिस्पर्धी, टीकाकार वगैरेवर मात करणे. **have, etc the last 'word** एखाद्या वादात शेवटचा शब्द असणे/सांगणे. **in the/as a last re'sort** शेवटचा उपाय म्हणून. **the ,last 'ditch** अपयश टाळण्याकरता केलेला निकराचा/अखेरचा प्रयत्न : *a ,~-'ditch attempt, अखेरचा प्रयत्न/निर्वाणीचा प्रयत्न.* **the last straw** ➪ STRAW. **the last 'word (in sth)** अत्याधुनिक गोष्ट : *This car is the ~ word in luxury, आरामशीरपणात ही गाडी म्हणजे शेवटचा शब्द.* **last** *ना* १ **the last** शेवटची गोष्ट/व्यक्ती किंवा उल्लेख केलेल्यातली शेवटची गोष्ट/व्यक्ती. २ (*वाक्प्र*) **at (long) 'last** सरतेशेवटी, अखेरीस, खूप विलंबानंतर शेवटी. **lastly** *क्रिवि* सर्वात शेवटी; शेवटी.

last^{2} /लास्ट्; *अमे* लॅस्ट्/ *क्रिवि* १ सर्वांनंतर, शेवटी. २ अगदी अलीकडे.

last^{3} /लास्ट्; *अमे* लॅस्ट्/ *क्रि* १ [*अक*] काही

काळ चालू राहणे, टिकणे. २ [*अक, सक*] पुरेसे असणे, पुरणे : *enough food to ~ two days, दोन दिवस पुरेल एवढे अन्न.* **lasting** *वि* दीर्घकाळ टिकणारा.

latch /लॅच्/ *ना* [*गण*] १ दाराला लावायची कडी, अडसर. २ बाहेरच्या बाजूने किल्लीने उघडायला लागणारे आणि आपोआप बंद होणारे/लागणारे दाराचे अंगचे कुलूप, पोटकुलूप. **latch** *क्रि* १ [*अक, सक*] कडी लागणे/लावणे; कुलूप लागणे/लावणे. २ (*क्रिब*) **latch on to sb** (*अनौप*) एखाद्याला चिकटणे.

late /लेइट्/ *वि* (**~r, ~st**) १ योग्य किंवा नेहमीच्या वेळेनंतरचा, उशिरा, विलंब झालेला : *The train is ~, गाडी उशिरा येणार.* २ उशिराने : *in the ~ afternoon, दुपारी उशिराने.* ३ अगदी अलिकडची, ताजी : *the ~st news, ताजी बातमी.* ४ कैलासवासी : *her ~ husband, तिचा कैलासवासी पती.* ५ (*वाक्प्र*) **at the 'latest** उशिरात उशीर, जास्तीत जास्त उशिरा म्हणजे. **late** *क्रिवि* १ उशिरा : *get up ~, उशिरा उठणे.* २ मागे : *as ~ as the 1970's, १९७० च्या दशकापर्यंत मागे.* **lately** *क्रिवि* अलीकडे.

latent /'लेइट्न्ट्/ *वि* अस्तित्वात आहे असा पण क्रियाशील किंवा प्रगत नसलेला, सुप्त, अप्रकट : *~ talent, सुप्त बुद्धिमत्ता.*

lateral /'लॅटरल्/ *वि* बाजूंचा, कडांचा, पार्श्विक.

lathe /लेइथ्/ *ना* [*गण*] लाकूड किंवा धातूच्या पत्र्यातून आकार कापणारे यंत्र, कातकामाचा चरक.

lather /'लाद(र्); *अमे* 'लॅद्-/ *ना* [*अगण*] साबणाचा सफेद फेस. **lather** *क्रि* १ [*अक*] फेस येणे. २ [*सक*] फेसाने माखणे.

Latin /'लॅटिन्; *अमे* 'लॅट्न्/ *वि, ना* [*अगण*] प्राचीन रोमची भाषा (किंवा त्या भाषेचा). **,Latin A'merica** *ना* मध्य आणि दक्षिण अमेरिकेतील पोर्तुगीज किंवा स्पॅनिश भाषेचे प्रांत. **,Latin A'merican** *ना* [*गण*], *वि* लॅटिन अमेरिकेचा.

latitude /'लॅटिट्यूड्; *अमे* -टूड्/ *ना* १ [*अगण*] विषुववृत्तापासूनचे उत्तरेकडे किंवा दक्षिणेकडे अंशात मोजलेले अंतर, अक्षवृत्त, अक्षांश. २ [*अगण*] आचार-विचाराचे स्वातंत्र्य.

latter /'लॅट(र्)/ *वि* अखेरअखेरचा, उत्तरार्ध : *the ~ part of her life, तिच्या आयुष्याचा उत्तरार्ध.* **the latter** *सना* दुसरा, दोहोतील नंतरचा. **,latter-'day** *वि* आधुनिक. **latterly** *क्रिवि* अलीकडे, नुकतेच, हल्ली.

lattice /'लॅटिस्/ *ना* [*गण, अगण*] (बहुधा लाकडी) जाळी.

laugh /लाफ्; *अमे* लॅफ्/ *क्रि* १ [*अक*] हसणे. २ (*वाक्प्र*) **be no laughing matter** गंभीर असणे. **laugh one's head off** ➪ HEAD^1. ३ (*क्रिब*) **laugh at sb/sth** एखाद्याची चेष्टा करणे. **laugh** *ना* [*गण*] १ हास्य. २ (*अनौप*) हसू येईल अशी व्यक्ती/परिस्थिती, विनोदी व्यक्ती. **laughable** *वि* हास्यास्पद. **laughably** *क्रिवि* हास्यास्पद रीतीने. **'laughing-stock** *ना* [*गण, बहुधा अे.व*] विनोदाचा विषय, हास्यविषय. **laughter** *ना* [*अगण*] हास्य.

launch^1 /लॉऽन्च्/ *क्रिवि* [*सक*] १ (नवीन बांधलेले जहाज) पाण्यात सोडणे, नाव लोटणे. २ (रॉकेट वगैरे) उंच आकाशात सोडणे. ३ (एखादे कार्य) सुरू करणे : *~ a new business, नवीन व्यवसाय सुरू करणे.* ४ (*क्रिब*) **launch (out) into sth** एखादी गोष्ट धडाक्याने/दणकेबाजपणाने सुरू करणे : *~ out into a new career, नवीन आयुष्यक्रम धडाक्यात सुरू करणे.* **launch** *ना* [*गण*] सुरुवात. **'launching pad** *ना* [*गण*] अंतराळयान वगैरे सोडण्याचा तळ.

launch^2 /लॉऽन्च्/ *ना* [*गण*] मोठी मोटरबोट.

launder /'लॉऽन्ड(र्)/ *क्रि* [*सक*] (*औप*) धुऊन इस्त्री करणे, धुलाई करणे.

launderette /लॉऽन्'ड्रेट्, ,लॉऽन्ड'रेट्/ *ना* [*गण*] नाणे टाकून धुलाई यंत्र चालू करून कपडे धुण्याची व वाळवण्याची सार्वजनिक जागा, सार्वजनिक धुलाई केन्द्र.

laundromat /'लॉन्ड्रमॅट्/ *ना* [*गण*] (*मालक विशेषतः अमे*) सार्वजनिक धुलाई केन्द्र.

laundry /'लॉऽन्ड्रि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*गण*] धुलाई केन्द्र. २ [*अगण*] धुलाईला

देण्याचे कपडे.

laurel /'लॉरल; *अमे* 'लॉऽरल/ *ना* [*गण*] मऊ चकचकीत पानांचे एक सदाहरित झुडूप, लारसचे झाड.

lava /'लाव्ह/ *ना* [*अगण*] ज्वालामुखीतून येणारा गरम, द्रवरूप खडक, लाव्हारस.

lavatory /'लॅव्हट्रि; *अमे* -टॉऽरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) प्रसाधनगृह, शौचालय, संडास.

lavender /'लॅव्हन्ड(र्)/ *ना* [*अगण*] १ फिकट जांभळी सुवासिक फुले येणारे एक फुलझाड. २ फिकट जांभळा रंग.

lavish /'लॅव्हिश/ *वि* १ सढळ, उदार. २ भरपूर, चंगळ असणारा : *a ~ meal, चंगळपूर्ण जेवण.* **lavish** *क्रि* (*क्रिब*) **lavish sth on sb** एखाद्याला काहीतरी उदारहस्ते देणे, भरभरून देणे, मुक्त हस्ते देणे. **lavishly** *क्रिवि* चैनीत, चंगळीत, उदारपणे, मुक्त हस्ते, सढळपणे; चैनीत, चंगळीने.

law /लॉऽ/ *ना* १ (क) [*गण*] शासनाने केलेला कायदा, विधी. (ख) (तसेच **the law**) [*अगण*] कायदेशीर व्यवस्था, कायदेकानून : *Murder is against the ~, खून हा बेकायदेशीर आहे.* २ [*गण*] नियम, सिद्धान्त : *the ~s of physics, पदार्थविज्ञानाचे सिद्धान्त.* ३ **the law** [*अ.व*] (*अनौप*) पोलीस, पोलीस यंत्रणा. ४ (*वाक्प्र*) **be a law unto one'self** नेहमीचे नियम आणि संकेत याकडे दुर्लक्ष करणे, कायद्याकडे दुर्लक्ष करणे, हम करे सो कायदा. **law and 'order** कायदा आणि सुव्यवस्था; कायदापालन, कायद्याचा आदर. **'law-abiding** *वि* कायदा पाळणारा. **'lawcourt** *ना* [*गण*] न्यायालय. **lawful** *वि* १ कायदेशीर. २ कायदामान्य, विधिवत्. **lawfully** *क्रिवि* कायदेशीरपणे. **lawless** *वि* विधिशून्य, कायदा नसलेला, बेबंद. **lawlessness** *ना* [*अगण*] कायदा अस्तित्वात नसलेली अवस्था, अंदाधुंदी, बेबंदशाही. **'lawsuit** *ना* [*गण*] दिवाणी दावा, दिवाणी खटला.

lawn /लॉऽन/ *ना* [*गण, अगण*] हिरवळीची जागा. **'lawn-mower** *ना* [*गण*] गवत कापायचे यंत्र. **,lawn-'tennis** (*औप*) = TENNIS.

lawyer /'लॉऽय(र्)/ *ना* [*गण*] कायद्याचे प्रशिक्षण घेतलेला, विधिज्ञ – खास करून सॉलिसिटर, वकील.

lax /लॅक्स/ *वि* कडक शिस्त नसलेला, ढिला; निष्काळजी. **laxity** *ना* [*अगण*] ढिलेपणा; निष्काळजीपणा.

laxative /'लॅक्सटिव्ह/ *ना* [*गण*], *वि* (अन्न, पेय किंवा औषध) ढाळक, रेचक.

lay^{1} /लेइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **laid** /लेइड्/) १ [*सक*] ठेवणे : *~ a book on the table, टेबलावर पुस्तक ठेवणे.* २ [*सक*] काही हेतूने व्यवस्थित ठेवणे/मांडणे : *~ the table, टेबल मांडणे म्हणजे जेवणासाठी चमचे, सुऱ्या, ताटल्या वगैरे मांडणे.* ३ [*सक*] (*औप*) तीव्रता कमी करणे, शमवणे : *~ sb's fears, एखाद्याची भीती कमी करणे.* ४ [*अक, सक*] (पक्षी, कीटक वगैरेबाबत) (अंडी) घालणे. ५ [*सक*] (⚠ *व्रात्य*) (खास करून कर्मणी प्रयोगात) (पुरूषाबाबत) (स्त्रीशी) संभोग करणे, भोगणे. ६ (*वाक्प्र*) **lay sth 'bare** झाकलेले काही किंवा गुपित उघड करणे, दाखवणे : *~ bare one's feelings, (मनातले) भाव उघड करणे.* **lay the 'blame on sb** एखाद्याला एखाद्या चुकीसाठी वगैरे जबाबदार धरणे, एखाद्याला दोष देणे. **lay claim to sth** एखाद्या गोष्टीवर हक्क सांगणे. **lay down the 'law** नियम घालून देणे. **lay down one's life** (*ला*) प्राणार्पण करणे, प्राण वेचणे, प्राणांची आहुती देणे. **lay a 'finger on sb** एखाद्याला नुकसान पोहोचवणे, हानी करणे. **lay it 'on ('thick)** (*अनौप*) स्वतःच्या भावना, स्वतःचे अनुभव वगैरे फुगवून सांगणे. **lay sb 'low** एखाद्याला क्षीण करणे, आजारी पाडणे. **lay oneself 'open to sth** (टीकेला वगैरे) पात्र होईल असे वागणे. **lay sth 'waste** (*औप*) एखादी गोष्ट पूर्णपणे नष्ट करणे. ७ (*क्रिब*) **lay into sb/sth** (*अनौप*) एखाद्याला गुद्ध्यानी किंवा शब्दांनी मार देणे, एखाद्यावर शाब्दिक/शारीरिक हल्ला करणे. **lay 'off (sth)** (*अनौप*) एखादी अपायकारक/वाईट गोष्ट करायचे थांबवणे, तिचा उपयोग बंद करणे. **lay sb 'off** एखाद्याला कामावरून काढून टाकणे. **lay sth 'on** (क) (गॅस, पाणी वगैरे) एखाद्या घराला पुरवणे, पुरवठा करणे. (ख) (*अनौप*) एखादी

गोष्ट देणे : ~ *on a party, मेजवानी पुरवणे.* **lay sb 'out** एखाद्याला ठोसा मारून बेशुद्ध पाडणे. **lay sth 'out** (क) नीट दिसावे म्हणून मांडणे, पसरून ठेवणे. (ख) योजनापूर्वक आखणी करणे : *a well laid out garden, व्यवस्थित आखलेली बाग.* **lay sb 'up** एखाद्याला अंथरूण धरायला लावणे, अंथरूणाला खिळणे : *be laid up with flu, फ्लूने अंथरूणाला खिळणे.* **,laid-'back** *वि* (*व्रात्य*) मनावरचे ओझे दूर होऊन आनंदी झालेला. **'lay-off** *ना* [*गण*] कामगाराला कामावरून काढणे, हकालपट्टी. **'layout** *ना* [*गण*] एखाद्या गोष्टीचे वेगवेगळे भाग कसे जोडायचे याचा नकाशा, पट वगैरे.

lay^{2} LIE^{2} चा *भूत.*

lay^{3} /लेइ/ *वि* १ अभिक्षुक/अदीक्षित वर्गाचा, सामान्य(जनाचा). २ व्यावसायिक नसलेला, सराईत नसलेला. **'layman** /-मन्/ *ना* [*गण*] सामान्य माणूस.

layabout /'लेइअबाउट्/ *ना* [*गण*] (*ब्रि अनौप*) कामचुकार माणूस.

lay-by /'लेइ बाइ/ *ना* [*गण*] (*ब्रि*) रस्त्याच्या कडेची वाहने थांबवण्याची जागा.

layer /'लेइअ(र्)/ *ना* [*गण*] एखाद्या द्रव्याचा एखाद्या पृष्ठभागावरील अनेक पापुद्र्यांपैकी एक पापुद्रा, थर : *a ~ of dust, धुळीचा थर* ○ *~s of clothing, कपड्याचे थर/कपड्यांची थप्पी.*

layman ⇨ LAY^{3}.

laze /लेइझ्/ *क्रि* [*अक*] आळशी होणे, आळस करणे, काही काम न करणे, आराम करणे.

lazy /'लेइझि/ *वि* (**-ier, -iest**) १ आळशी, काम करण्याची इच्छा नसलेला. २ सुस्त, थंड. **lazily** *क्रिवि* थंडपणे, हळूहळू. **laziness** *ना* [*अगण*] आळस, आळशीपणा.

lb *संरू* (*ब.व* **lb, lbs**) pound, पाउंड (वजन).

lead^{1} /लीड्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **led** /लेड्/) १ [*सक*] (क) पुढे होऊन (एखाद्याला) मार्ग दाखवणे, नेतृत्व करणे. (ख) (एखाद्याला) हात धरून नेणे : ~ *a blind person, आंधळ्याला हात धरून नेणे.* २ [*सक*] करायला किंवा मत बनण्यास कारण होणे : *What led you to this conclusion? तू कशामुळे या निष्कर्षाप्रत आलास?* ३ [*अक*] (रस्ता वगैरे बाबत) विशिष्ट दिशेने/बाजूला जाणे. ४ [*अक*] *to//* एखाद्या गोष्टीत परिणती होणे, परिणामी होणे : *a mistake that led to his death, त्याच्या मृत्यूला कारणीभूत झालेली चूक.* ५ [*सक*] (विशिष्ट प्रकारचे जीवन) व्यतीत करणे, कंठणे : ~ *a miserable existence, हलाखीच्या परिस्थितीत राहणे.* ६ [*अक, सक*] अग्रेसर होणे, अग्रभागी असणे, पुढे असणे. ७ [*अक, सक*] नेतृत्व करणे, मार्गदर्शन करणे, देखरेखीखाली नेणे : ~ *a team of scientists, वैज्ञानिकांच्या गटाचे नेतृत्व करणे.* ८ (*वाक्प्र*) **lead sb astray** एखाद्याची चुकीची कल्पना करून देणे, चुकीच्या मार्गाने नेणे. **lead the 'way** प्रथम जाणे, सर्वात आधी जाणे, मार्ग दाखवणे, पायंडा पाडणे. ९ (*क्रिब*) **lead sb on** खोटी वचने देऊन एखाद्याला काही करायला लावणे, खोट्या वचनांनी विश्वास संपादणे. **lead up to sth** हळूहळू विशिष्ट दिशेने नेणे, विशिष्ट विषयाकडे नेणे. **leader** *ना* [*गण*] नेता, पुढारी. **leadership** *ना* [*अगण*] नेतृत्व; नेतृत्वगुण. **leading** *वि* अतिमहत्त्वाचा, अग्रेसर. **,leading 'article** *ना* [*गण*] संपादकीय, प्रमुख लेख, अग्रलेख. **,leading 'question** *ना* [*गण*] अपेक्षित उत्तर सुचवणारा प्रश्न, पोटात उत्तर असणारा प्रश्न, गर्भित प्रश्न.

lead^{2} /लीड्/ *ना* १ [*अगण, अे.व*] पुढे जाणाऱ्याचे मार्गदर्शन : *follow sb's ~, एखाद्याचा मार्ग अनुसरणे.* २ [*अे.व*] स्पर्धक जेवढ्या अंतराने पुढे आहे ते अंतर, तो फरक, आघाडी : *a ~ of ten metres, दहा मीटरची आघाडी.* ३ **the lead** [*अे.व*] अग्रक्रम, आघाडी : *take the ~, आघाडी घेणे.* ४ [*गण*] नाटकातील प्रमुख भूमिका (करणारा कलाकार). ५ [*गण*] कुत्र्याला नेण्यासाठी त्याच्या गळ्यात बांधलेली दोरी किंवा पट्टा, काढणी. ६ [*गण*] विद्युत्वाहक तार. ७ [*गण*] गुन्हा किंवा कूट प्रश्न यांची उकल करण्यास उपयुक्त अशी माहिती, धागादोरा.

lead^{3} /लेड्/ *ना* १ पाण्याचे पाइप, शाकारणीसाठी वगैर वापरला जाणारा जड, मऊ करड्या रंगाचा धातू, शिसे. २ [*गण, अगण*] पेन्सिलचे शिसे. **leaden** *वि* १ रटाळ,

मंद आणि जड. २ फिकट करडा.

leaf /लीफ्/ *ना* (*ब.व* **leaves** /लीव्ह्झ्/) १ [*गण*] वनस्पतीच्या देठापासून वाढणाऱ्या (बहुधा हिरव्या आणि सपाट) भागांपैकी एक भाग, पान, पर्ण. २ [*गण*] कागदाचे पान. ३ [*अगण*] चांदी, सोने यांसारख्या धातूचा अगदी पातळ पत्रा. ४ [*गण*] टेबलाचा घडी घालण्याचा वरचा भाग, मेजाचे पान, पाख. ५ (*वाक्प्र*) **take a leaf out of sb's 'book** एखाद्याची नक्कल करणे; एखाद्याच्या वर्तनाचे अनुकरण करणे. **leaf** *क्रि* (*क्रिब*) **leaf through sth** पुस्तकाची वगैरे पाने चाळणे. **leafy** *वि* (**-ier, -iest**) पानांचा, पर्णमय.

leaflet /'लीफ्लिट्/ *ना* [*गण*] छापील पत्रक.

league /लीग्/ *ना* [*गण*] १ विशिष्ट हेतूने एकत्र आलेले लोक किंवा एकत्र आलेली राष्ट्रे, कुल. २ खेळाच्या स्पर्धांत भाग घेणाऱ्या मंडळांचा गट. ३ (*अनौप*) विविध गुणवत्तेच्या लोकांचा किंवा वस्तूंचा वर्ग/मंडळ : *They're not in the same ~, ते एकाच मंडळात नाहीयेत्.* ४ (*वाक्प्र*) **in league (with sb)** गुप्तपणे वाईट कृत्यासाठी एकत्र येणे, हातमिळवणी करणे.

leak /लीक्/ *ना* [*गण*] १ (**क**) द्रव किंवा वायूची गळती होणारे भोक, छिद्र. (**ख**) गळणारे द्रव वगैरे. २ (*ला*) गळती, फुटी : *a security ~, सुरक्षा व्यवस्थेतील फुटलेली माहिती.* **leak** *क्रि* १ [*अक*] (**क**) (भांड्याबाबत) गळती लागणे, झिरपणे, भोक पडणे. (**ख**) (वायू किंवा द्रवाबाबत) भोकातून गळणे. २ [*सक*] (गुप्त माहितीची) वाच्यता करणे, गुप्तवार्ता फोडणे. **leakage** /'लीकिज्/ *ना* [*गण, अगण*] गळती; गळलेल्या पदार्थाचे प्रमाण. **leaky** *वि* (**-ier, -iest**) गळका, छिद्र पडलेला.

lean^1 /लीन्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **~t** /लेन्ट्/ किंवा विशेषतः *अमे* **~ed** /लीन्ड्/) १ [*अक*] कलणे, झुकणे, वाकणे. २ [*अक, सक*] *against/on*// टेकून ठेवणे/राहणे, कलता करणे : *~ a ladder against a wall, शिडी भिंतीला टेकून ठेवणे.* ३ (*क्रिब*) **lean on sb** (*अनौप* विशेषतः *अमे*) धमक्या देऊन वळवण्याचा प्रयत्न करणे, भीती घालून प्रभाव पाडू पाहणे, धमकवायला बघणे. **lean (up)on sb** एखाद्यावर अवलंबून राहणे. **lean towards sth** एखाद्या गोष्टीकडे कल असणे. **leaning** *ना* [*गण*] प्रवृत्ती; कल : *political ~ings, राजकीय ओढा/कल.*

lean^2 /लीन्/ *वि* १ (प्राणी किंवा माणसाबाबत) सडपातळ, सडसडीत, कृश. २ (मांसाबाबत) चरबी कमी असलेले. ३ निष्फळ, फुकट : ~ *years, काहीही काम न झालेली वर्षे.*

leap /लीप्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **~t** /लेप्ट्/ किंवा विशेषतः *अमे*, **~ed** /लीप्ट्/) [*अक*] १ उडी मारणे. २ झेप घेणे : *~ into the car, गाडीत झेप घेणे.* ३ (*क्रिब*) **leap at sth** एखादी गोष्ट लगेच स्वीकारणे, तातडीने घेणे : *She ~t at the chance, तिने तात्काळ ती संधी घेतली.* **leap** *ना* [*गण*] १ झेप, उडी. २ अचानक झालेली वाढ, आकस्मिक बदल. ३ (*वाक्प्र*) **by ,leaps and 'bounds** भराभर, वेगाने. **'leap-frog** *ना* [*अगण*] दुसऱ्यांच्या वाकलेल्या पाठीवरून उड्या मारण्याचा खेळ, कुदाकुदी. **'leap-frog** *क्रि* (**-gg-**) [*अक, सक*] एखाद्याच्या पाठीवरून टुणकन् उडी मारणे. **'leap year** *ना* [*गण*] फेब्रुवारीत २९ दिवस असलेले दर चार वर्षांनी येणारे वर्ष, अधिदिन वर्ष.

learn /लऽन्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **~t** /लऽन्ट्/ किंवा विशेषतः *अमे* **~ed** /लऽन्ड्/) १ [*अक, सक*] एखादी विद्या किंवा कृती शिकणे किंवा त्याची कला अवगत करणे : *~ Dutch , डच भाषा शिकणे* ○ *~ (how) to swim* पोहायला शिकणे. २ [*सक*] पाठ करणे, लक्षात ठेवणे : *~ a poem, कविता पाठ करणे.* ३ [*अक, सक*] *(of/about)*// माहीत होणे, कळणे : *I ~t of his death very late, मला त्याच्या मृत्यूविषयी खूप उशीरा कळले.* **learned** /लऽनिड्/ *वि* विद्वान. **learner** *ना* [*गण*] शिकणारा, अध्ययन करणारा, विद्यार्थी. **learning** *ना* [*अगण*] विद्वत्ता, अभ्यासाने मिळालेले ज्ञान.

lease /लीस्/ *ना* [*गण*] जमीन, इमारत वगैरेचा भाडेपट्टा (करार). **lease** *क्रि* [*सक*] भाडेपट्ट्याने देणे किंवा घेणे. **'leasehold** *ना* [*अगण*], *वि* भाडेपट्ट्याने घेतलेली (जमीन वगैरे).

leash /लीश्/ *ना* [*गण*] = LEAD^2 ५.

least /लीस्ट्/ *वि, सना* आकारात, प्रमाणात

वगैरे सर्वात लहान, कमीत कमी, लहानात लहान, लघुतम : *She gave (the) ~ of all towards the present, भेटवस्तूसाठी तिने सर्वात कमी (पैसे) दिले.* **least** *क्रिवि* १ कमीतकमी, सर्वात कमी : *the ~ expensive hotel, कमीतकमी खर्चाचे हॉटेल.* २ (*वाक्प्र*) **at least** (क) किमान, कमीतकमी : *at ~ three months, किमान तीन महिने.* (ख) काही नाही तर, निदान : *at ~ she's reliable, निदान तिच्यावर विसंबून राहता येईल.* **ˌnot in the 'least** साफ नाही, मुळीच नाही. **not least** खास करून, विशेषतः.

leather /'लेद(र्)/ *ना* [*अगण*] जोडे वगैरे बनवायला जनावरांच्या कातड्यापासून केलेले चामडे. **leathery** *वि* चामड्यासारखे चिवट, टिकाऊ.

leave^1 /लीव्ह्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **left** /लेफ्ट्/) १ [*अक, सक*] (एखाद्यापासून दूर जाणे, (एखादे ठिकाण) सोडून जाणे. २ [*सक*] विशिष्ट स्थितीत ठेवणे, राहू देणे : *~ the window open, खिडकी उघडी ठेवणे.* ३ [*सक*] विसरणे, घ्यायचा राहणे : *I left my umbrella at home, मी छत्री घरीच विसरलो.* ४ [*सक*] मागे ठेवणे, पडणे : *Blood ~s a stain, रक्ताचा डाग पडतो.* ५ [*सक*] मृत्युपत्रातून देणे. ६ [*सक*] एखाद्यावर एखादी जबाबदारी टाकणे, काम सोपवणे : *We left him to do the cooking, स्वयंपाकाचे काम आम्ही त्याच्यावर सोपवले.* ७ [*सक*] (*गणित*) बाकी/खाली उरणे/राहणे : *7 from 10 ~s 3, १० तून ७ गेल्यावर खाली उरले ३.* ८ (*वाक्प्र*) **leave/let sb/sth a'lone/'be** एखाद्याला त्रास न देणे, त्याच्या कामात लुडबुड न करणे. **leave 'go/'hold (of sth)** एखादी गोष्ट सोडून देणे. **leave it at 'that** (*अनौप*) अधिक काही न बोलणे/करणे. **leave sb in the lurch** एखाद्याला संकटात सोडणे. **leave well alone** ➪ WELL^3. ९ (*क्रिब*) **leave sb/sth behind** एखादी गोष्ट घेण्याचे विसरणे, मागे सोडून येणे. **leave off (doing) sth** (*अनौप*) एखादी गोष्ट (करायचे) बंद करणे. **leave sb/sth out** एखाद्या गोष्टीचा समावेश न करणे, एखाद्याला वगळणे, गाळून टाकणे.

leave^2 /लीव्ह्/ *ना* [*अगण*] १ रजा : *a few days ~, काही दिवसांची रजा.* २ (*औप*) परवानगी. ३ (*वाक्प्र*) **take ˌleave of one's 'senses** (*अलं किंवा गंमत*) डोके फिरणे, अक्कल गहाण ठेवणे.

leaves LEAF चे *ब.व.*

lecherous /'लेचरस्/ *वि* (*अधिक्षेपी*) लंपट, कामासक्त, कामातूर, स्त्रैण.

lectern /'लेक्टन्/ *ना* [*गण*] व्याख्यात्याचे कागद, पुस्तके वगैरे ठेवण्याचे उंच उतरते डेस्क, उंच पीठ.

lecture /'लेक्च(र्)/ *ना* [*गण*] व्याख्यान, शिकवण देणारे भाषण. **lecture** *क्रि* १ [*अक*] व्याख्यान देणे. २ [*सक*] कानउघाडणी करणे, फैलावर घेणे, सुनावणे. **lecturer** *ना* [*गण*] महाविद्यालय किंवा विद्यापीठातील व्याख्याता, प्राध्यापक. **lectureship** *ना* [*गण*] व्याख्यात्याचे पद.

led LEAD^1 चा *भूत, भूत वि.*

ledge /लेज्/ *ना* [*गण*] भिंतीचा कंगोरा किंवा अरुंद फळी, कड्यातून बाहेर येणारा सपाट भाग, तक्ता.

ledger /'लेज(र्)/ *ना* [*गण*] एखाद्या कंपनीची खातेवही, खतावणी.

lee /ली/ *ना* [*अे.व*] (*औप*) वाऱ्याच्या झोतापासून दूर ठेवणारा निवारा, थारा.

leech /लीच्/ *ना* [*गण*] १ छोटा रक्त शोषणारा किडा, जळू. २ (*ला अधिक्षेपी*) इतरांचे रक्त पिणारा म्हणजे त्यांना पिळून स्वतःची पोतडी भरणारा माणूस.

leek /लीक्/ *ना* [*गण*] पांढरा देठ आणि लांब हिरवी पाने असलेली भाजी, पलांडू.

leer /लिअ(र्)/ *ना* [*गण, बहुधा अे.व*] वाकडा डोळा, वाईट नजर. **leer** *क्रि* [*अक*] (*at*)// वाईट नजरेने पाहणे, डोळा मारणे.

left^1 LEAVE^1 चा *भूत, भूत वि.* **left-'luggage office** *ना* [*गण*] (*ब्रि*) थोड्या वेळासाठी सामान ठेवून बाहेर जायचे असेल तर तशी सोय असलेली रेल्वे स्टेशनवरची जागा, क्लोकरूम. **'left-overs** *ना* [*ब.व*] जेवणे झाल्यावर उरलेले अन्न, उच्छिष्ट.

left^2 /लेफ्ट्/ *वि, क्रिवि* उत्तरेकडे तोंड केले

असता त्या व्यक्तीच्या पश्चिमेकडचा, डावा, डावीकडे, वाम. **left** *ना* १ [*अगण*] वामांग, डावी बाजू, डावीकडची दिशा. २ **the Left** [*अे.व*] (अे.व किंवा ब.व क्रियापदासह) (**क**) राजकीय पक्षाची डावी फळी. (**ख**) डावे, साम्यवादी लोक. **'left-hand** *वि* डावीकडचा, डाव्या बाजूचा. **,left-'handed** *वि* (माणसाबाबत) उजव्यापेक्षा डाव्या हाताचा उपयोग सहज आणि नेहमी करणारा, डावखुरा, डावरा. **leftist** *ना* [*गण*], *वि* डाव्या विचारसरणीचा, समाजवादी, साम्यवादी. **the ,left 'wing** *ना* [*अे.व*] (अे.व किंवा ब.व क्रियापदासह) पक्षातील डावे, कट्टर साम्यवादी, डावा गट. **left-wing** *वि* डाव्या गटाचा : *~-wing politics, डाव्या गटाचे राजकारण.*

leg /लेग्/ *ना* [*गण*] १ (**क**) उभं राहण्याकरता आणि चालण्याकरता वापरला जाणारा प्राण्याच्या किंवा माणसाच्या शरीराचा भाग, पाय, तंगडी. (**ख**) जनावराची खाण्याची तंगडी. (**ग**) कपड्याचा पाय : *a trouser ~, पॅन्टचा पाय.* २ खुर्चीचा, टेबलाचा वगैरे पाय, खूर. ३ प्रवासाचा एक भाग. ४ (*वाक्प्र*) **not have a ,leg to 'stand on** (*अनौप*) स्वतःच्या मतासाठी किंवा वर्तनासाठी काही कारण किंवा आधार नसणे, बूड नसणे.

legacy /'लेगसि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) १ मृत्युपत्रात दिलेला संपत्तीचा हिस्सा, मृत्युपत्रातील वाटा. २ (*ला*) एखाद्या गोष्टीचा परिणाम, वारसा : *Famine was the ~ of the war, दुष्काळ हा युद्धाचा वारसा होता.*

legal /'लीग्ल्/ *वि* १ कायदेविषयक, कायद्यावर आधारित, विधि- : *my ~ adviser, माझा विधि-सल्लागार.* २ कायदेशीर. **legality** /ली'गॅलटि/ *ना* [*अगण*] कायदेशीरपणा, वैधता. **legally** /'लीगलि/ *क्रिवि* कायद्याच्या दृष्टीने, कायदेशीरपणे.

legalistic /लीग'लिस्टिक्/ *वि* (बहुधा *अधिक्षेपी*) कायद्याचा किंवा नियमाचा कीस काढणारा.

legalize /'लीगलाइझ्/ *क्रि* [*सक*] कायदेशीर करणे, वैध करणे.

legend /'लेजन्ड्/ *ना* १ (**क**) [*गण*] दंतकथा, आख्यायिका. (**ख**) [*अगण*] (अनेक) आख्यायिका. २ [*गण*] (*अनौप*) प्रसिद्ध व्यक्ती किंवा घटना : *He has become a ~ in his own lifetime, स्वतःच्या हयातीतच तो एक अलौकिक व्यक्तिमत्व झाला आहे.* ३ [*गण*] चित्र, नकाशा वगैरेच्या जवळचा (खुलासा करणारा) मजकूर. **legendary** /'लेजन्ड्रि; *अमे* -डेरि/ *वि* सुप्रसिद्ध, अलौकिक; दंतकथातूनच आढळणारा.

legible /'लेजब्ल्/ *वि* सहज वाचता येइल इतका स्पष्ट, सुवाच्य. **legibly** *क्रिवि* सुवाच्यपणे.

legion /'लीजन्/ *ना* [*गण*] १ सैन्याची तुकडी – विशेषतः प्राचीन रोमन सैनिकांची, फलटण. २ लोकांची झुंड. **legion** *वि* (*अलं*) असंख्य, अगणित. **legionary** /'लीजनरि; *अमे* -नेरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) *वि* तुकडीतला सैनिक.

legislate /'लेजिस्लेइट्/ *क्रि* [*अक*] विधि किंवा कायदा करणे. **legislation** /,लेजिस्'लेइश्न्/ *ना* [*अगण*] १ (विधि)विधान, विधिस्थापना. २ केलेले कायदे. **legislator** *ना* [*गण*] विधिकार.

legislative /'लेजिस्लटिव्ह्; *अमे* -लेइटिव्ह्/ *वि* विधिविषयक; कायदे करण्याची जबाबदारी असणारा : *a ~ assembly, विधान सभा/विधिमंडळ* ○ *a ~ council, विधान परिषद.*

legislature /'लेजिस्लच(र्)/ *ना* [*गण*, तसेच ब.व क्रियापदासह अे.व] (*औप*) कायदे करण्याचा आणि बदलण्याचा अधिकार असलेल्या लोकांचा गट, विधानमंडळ.

legitimate /लि'जिटिमट्/ *वि* १ कायदेशीर, विधिवत्. २ एकमेकांशी विवाहित असलेल्या आईवडिलांच्या पोटी जन्मलेला, औरस. ३ रास्त, योग्य : *a ~ excuse, रास्त कारण/सबब.* **legitimacy** /-मसि/ *ना* [*अगण*] कायदेशीरपणा.

legless /'लेग्लिस्/ *वि* (*व्रात्य*) दारुड्या, तर्र झालेला.

leisure /'लेझ(र्); *अमे* 'लीझर्/ *ना* [*अगण*] १ मोकळा वेळ, फुरसत. २ (*वाक्प्र*) **at one's 'leisure** मोकळा वेळ असताना, आरामाच्या वेळी. **leisured** *वि* भरपूर मोकळा वेळ असलेला. **leisurely** *वि, क्रिवि* आरामात, घाई न करता : *a ~ly walk, आरामात फिरणे.*

lemon /'लेमन्/ *ना* १ (क) [*गण, अगण*] आंबट रस असलेलं गोल, पिवळं फळ, लिंबू. (ख) [*गण*] लिंबाचे झाड. २ [*अगण*] लिंबूरंग, फिकट पिवळा रंग.

lemonade /,लेम'नेइड्/ *ना* [*गण, अगण*] फसफस आवाज करणारे आणि बुडबुडे येणारे एक गोड पेय, लिंबाचे सरबत.

lend /लेन्ड्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **lent** /लेन्ट्/) [*सक*] १ (*to*)// काही काळ वापरण्यासाठी देणे, उसने देणे : *He lent him the money, त्याने त्याला पैसे उसने दिले* ○ *He lent it to him, ते त्याने त्याला उसने दिले.* २ (*to*)// (*औप*) भर घालणे, वाढवणे : *Her presence lent dignity to the occasion, तिच्या उपस्थितीने समारंभाची प्रतिष्ठा वाढली.* ३ **lend itself to** योग्य असणे, साज़ेसा असणे. ४ (*वाक्प्र*) **lend (sb) a hand** एखाद्याला मदतीचा हात पुढे करणे.

length /लेङ्थ् किंवा लेङ्क्थ्/ *ना* १ [*अगण*] लांबी. २ [*अगण, गण*] एखाद्या गोष्टीला लागणारा कालावधी, वेळ. ३ [*गण*] मोजलेले अंतर : *swim two ~s of the pool, तळ्याचे अंतर दोनदा पोहून कापणे.* ४ [*गण*] (कशाचातरी) तुकडा : *a ~ of wire, तारेचा तुकडा.* ५ (*वाक्प्र*) **at length** (क) (*औप*) सरतेशेवटी. (ख) सविस्तरपणे, विस्ताराने. **go to any, some, great etc 'lengths (to do sth)** एखादी गोष्ट मिळवण्यासाठी काहीही करणे, कोणतीही गोष्ट/खूप गोष्टी करणे. **'lengthen** *क्रि* [*अक, सक*] लांब होणे/करणे, लांबणे/लांबवणे. **'lengthways** (तसेच **'lengthwise**) *क्रिवि* लांबीच्या बाजूने. **lengthy** *वि* (**-ier, -iest**) खूप लांब, दीर्घ, लांबलचक.

lenient /'लीनिअन्ट्/ *वि* (शिक्षा करण्यात) सौम्य, दयाळू. **leniency** /-अन्सि/ *ना* [*अगण*] नरमाई, कोमलपणा, दया. **leniently** *क्रिवि* सौम्यपणे, दयाळूपणे.

lens /लेन्ज़्/ *ना* [*गण*] १ चष्मा, कॅमेरा वगैरेत वापरले जाणारे भिंग, बहिर्वक्र काच. २ प्रकाशकिरण एकवटणारा डोळ्याचा भाग, नेत्रस्फटिक.

Lent /लेन्ट्/ *ना* [*अगण*] (ख्रिस्ती धर्मातील) ईस्टर (ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाचा दिवस) सणापूर्वीच्या ४० दिवसांचा काळ.

lent LEND चा *भूत, भूत वि.*

lentil /'लेन्ट्ल्/ *ना* [*गण*] एक कडधान्य, मसूर.

leopard /'लेपड्/ *ना* [*गण*] मार्जार कुटुंबातील पिवळ्यावर गडद ठिपके असलेल्या कातडीचा मोठा प्राणी, चित्ता, दिवट्या/डाहाण्यावाघ. **leopardess** /,लेप'डेस्/ *ना* [*गण*] चित्त्याची मादी.

leotard /'लीअटाड्/ *ना* [*गण*] कसरतीचे खेळ करणारा, नर्तक वगैरेनी वापरायचा अखंड तंग पोषाख.

leper /'लेप(र्)/ *ना* [*गण*] १ महारोगी, रक्तपितीचा रोगी. २ (*ला*) नको असलेला, टाळला जाणारा मनुष्य, बहिष्कृत माणूस.

leprosy /'लेप्रसि/ *ना* [*अगण*] बधिरता आणणारा आणि हातापायाची बोटे झडण्यात परिणती होणारा एक त्वचारोग, महारोग, कुष्ठरोग.

lesbian /'लेझ्बिअन्/ *ना* [*गण*] समलिंगी आकर्षण असणारी स्त्री. **lesbian** *वि* समलिंगी आकर्षण असणाऱ्या स्त्रियांचा.

less /लेस्/ *वि, सना* इतके नाही; कमी (प्रमाण) : *~ to do than I thought, मला वाटलं त्यापेक्षा करायला कमी.* **less** *क्रिवि* १ अल्प प्रमाणात, कमी; इतके/एवढे नाही : *It rains ~ here, येथे पाऊस कमी पडतो.* २ (*वाक्प्र*) **even/much/still less** आणि नक्कीच नाही. **less and less** कमीकमी. **no less (than)** तितकेच, (-पेक्षा) कमी नाही इतके. **less** *शब्दयो* -ने कमी; वजा, उणे : *£1000 a month ~ tax, दरमहा १००० पौंड वजा कर.*

lessen /'लेसन्/ *क्रि* [*अक, सक*] कमी होणे/करणे.

lesser /'लेस(र्)/ *वि* १ अधिक लहान/कमी, अल्पतर. २ (*वाक्प्र*) **the ,lesser of two 'evils** दोन वाईट गोष्टींतील त्यातल्या त्यात बरी, दगडापेक्षा वीट मऊ.

lesson /'लेसन्/ *ना* [*गण*] १ अध्यापनाचा किंवा अध्ययनाचा नेमून दिलेला काळ, घडा : *piano ~s, पियानोचे धडे.* २ ज्यापासून बोध

घ्यावा असा अनुभव, धडा : *Let this be a ~ to you! तुला यातून चांगला धडा मिळावा!*

lest /लेस्ट्/ *उ.अव्यय* (*औप*) (एखादी वाईट गोष्ट) घडू नये म्हणून, न व्हावे म्हणून.

let /लेट्/ *क्रि* (**-tt-**, *भूत, भूत वि* **let**) [*सक*] १ एखादी गोष्ट होऊ देणे : *We ~ him leave, आम्ही त्याला जाऊ दिले.* २ आत येऊ/जाऊ देणे : *~ sb into the house, एखाद्याला घरात येऊ देणे.* ३ (आज्ञार्थी वाक्यात वापर) : *L~'s go! चला जाऊ या!* ४ घर, खोली वगैरे भाड्याने देणे. ५ (*वाक्प्र*) **let alone** आणि नक्कीच नाही : *We cannot even pay our bills, ~ alone make a profit, फायदा सोडाच पण आम्हाला साधी बिलंही भरणं शक्य होत नाही.* **let sb/sth alone/be** ➪ LEAVE^{1}. **let the 'cat out of the bag** अनवधानाने किंवा चुकून गुपित फोडणे, तोंडातून जाणे. **let sth 'drop** एखाद्या गोष्टीविषयी अधिक काही न बोलणे क़िंवा करणे, विषय सोडून देणे. **let fly (at sb/sth)** एखाद्यावर प्रत्यक्ष/शाब्दिक हल्ला करणे. **let sb/sth go, let 'go of sb/sth** एखादी गोष्ट सोडून देणे, हातातून जाऊ देणे. **,let oneself 'go** (क) भावना अनावर होणे, बांध फुटणे. (ख) स्वतःची काळजी न घेणे, स्वतःकडे दुर्लक्ष करणे. **let one's 'hair down** (*अनौप*) औपचारिकता बाजूला ठेऊन मोकळेपणाने वागणे/बोलणे वगैरे, सैल होणे. **let sb 'have it** (*व्रात्य*) एखाद्यावर खूप चिडणे, त्याला अद्दल घडवणे. **let sb know (about sth)** एखाद्याला एखादी गोष्ट कळू देणे किंवा सांगणे. **let off 'steam** (*अनौप*) जोर किंवा राग ओसरू देणे, वाफ जाऊ देणे. **let the 'side down** आपल्याच गटातील इतर लोकांना अपेक्षित असलेली मदत न करणे. **let sleeping dogs 'lie** एखादी गोष्ट आहे तशीच राहू देणे, मोहळ न उठवणे, वारूळात हात न घालणे. **let sth 'slide** दुर्लक्ष करून एखादी गोष्ट अधिक बिघडू देणे, उपेक्षेने मारणे. **let sth slip** (क) (संधी वगैरे) घालवणे/न घेणे. (ख) चुकून (गुपित) सांगणे/बोलणे, तोंडातून चुकून बाहेर पडणे. **let us 'say** उदाहरणार्थ, उदाहरण द्यायचे झाले तर. **let well alone** ➪ WELL^{3}. ६ (*क्रिब*) **let sb down** एखाद्याची निराशा करणे, पचका करणे. **let sth down** (क) (कपडा वगैरे) उंचीत वाढवणे, मोठा करणे. (ख) (टायर वगैरे मधली) हवा जाऊ देणे. **let sb/oneself in for sth** एखाद्याला/स्वतःला संकटात पाडणे, पायावर धोंडा पाडून घेणे. **let sb in on/into sth** (*अनौप*) एखाद्याला विश्वासात घेऊन (गुपित) सांगणे, (रहस्यात) सामील करणे. **let sb off (with sth)** एखाद्याला फार कडक शिक्षा न करणे, एखाद्याला जाऊ देणे. **let sb off (sth)** एखाद्याला एखाद्या कामाची सूट देणे. **let sth off** एखाद्या गोष्टीचा स्फोट घडवणे. **let 'on** (*अनौप*) गुपित सांगणे : *Don't ~ on that you know, तुला माहीत आहे हे कुणाला सांगू नकोस.* **let sth out** (क) (कपडा) वाढवणे किंवा सैल करणे. (ख) ओरडणे, किंकाळी फोडणे, आरोळी ठोकणे. **let 'up** कमी होणे, निवळणे; थांबणे : *The rain began to ~ up, पाऊस कमी होऊ लागला.* **'let-down** *ना* [*गण*] निराशा. **'let-up** *ना* [*गण, अगण*] कमी होणे, मंदावणे.

lethal /'लीथ्ल्/ *वि* प्राणघातक, मारक.

lethargy /'लेथजि/ *ना* [*अगण*] अनुत्साह, सुस्तपणा, मांद्य. **lethargic** /ल'थाजिक्/ *वि* सुस्त, निरुत्साही, ढिला.

let's let us ➪ LET^{3}.

letter /'लेट(र्)/ *ना* १ [*गण*] एखाद्याला पाठवलेला लिखित संदेश, पत्र. २ [*गण*] ध्वनीचे प्रातिनिधिक असे लेखन किंवा छपाईत वापरले जाणारे चिन्ह, अक्षर. **'letter-bomb** *ना* [*गण*] पाकिटातून पाठविलेला छोटा बॉम्ब. **'letter-box** *ना* [*गण*] १ (*ब्रि*) दाराला पत्र टाकण्यासाठी केलेली फट. २ पोस्ट ऑफिसातील किंवा रस्त्यावरील पत्र टाकायची पेटी, पत्रपेटी. **lettering** *ना* [*अगण*] अक्षरे किंवा शब्द यांचा आकार, अक्षरवळण, रेखनपद्धती, अक्षरण.

lettuce /'लेटिस्/ *ना* [*गण, अगण*] दुधासारखा रस असणारी कुरकुरीत हिरव्या पानांची कोशिंबिरीत वापरली जाणारी एक परसातली वनस्पती, सॅलड.

leukaemia (*अमे* **-kem-**) /लू'कीमिअ/ *ना* [*अगण*] पांढऱ्या पेशींचे रक्तातील प्रमाण

वाढवणारा रोग, पंडुरोग.

level^{1} /'लेव्ह्ल्/ *वि* १ आडवा पृष्ठभाग असलेला, आडवा; सपाट. २ (*with*)// तेवढ्याच उंचीवर, स्थानावर वगैरे; तितकाच : *Wales drew ~ early in the game, वेल्सने लवकरच तितकेच गुण मिळवले म्हणजेच गुणांची बरोबरी केली.* ३ (*वाक्प्र*) **do one's level 'best** आपल्याला जमेल ते सर्व करणे, सर्वशक्तिनिशी काम करणे. **,level-'crossing** *ना* [*गण*] रेल्वे लाईनला रस्ता जिथे छेदतो ती जागा, रेल्वे ओलांडणी. **,level-'headed** *वि* योग्य, समजदार; शांत.

level^{2} /'लेव्ह्ल्/ *ना* १ [*गण*] क्षितिजाला समांतर रेषा किंवा पृष्ठभाग. २ [*गण*] साठा, शक्ती, किंमत वगैरे मोजण्याच्या मापनावरील स्थान, पातळी : *a high ~ of output, उत्पादनाची उच्च पातळी.* ३ [*अगण*] अधिकाराची किंवा श्रेणीची पातळी, स्तर : *talks at management ~, व्यवस्थापनाच्या स्तरावरची/पातळीवरील बोलणी.*

level^{3} /'लेव्ह्ल्/ *क्रि* (**-ll-**; *अमे* **-l-**) [*सक*] १ समपातळीचे किंवा सपाट करणे. २ (इमारत वगैरे) पाडणे, जमीनदोस्त करणे. ३ (*at*)// (शस्त्र किंवा टीका) एखाद्याच्या दिशेने रोखणे, अनुरोधाने (टीका, नेम) करणे. ४ (*क्रिब*) **level off/out** (क) (विमानाबाबत) आडवे होणे, क्षितिजसमांतर होणे. (ख) (*ला*) चढउतार होऊन समपातळीवर येणे, स्थिर होणे : *Prices ~led off, किंमती स्थिरावल्या.* **level with sb** (*अनौप*) एखाद्याशी प्रामाणिकपणे किंवा मनमोकळे बोलणे.

lever /'लीव्ह(र्)/ *ना* [*गण*] १ स्थिर बिंदूवर फिरणारा आणि वस्तू उचलण्याकरता वापरला जाणारा दांडा, तरफ. २ मशीन चालविण्याची मूठ किंवा दांडी, तरफ. ३ (*ला*) एखाद्यावर प्रभाव पांडण्याचे साधन, दबावाचे साधन. **lever** *क्रि* [*सक*] तरफेने उचलणे : *L~ it into position, तरफेने ते सरळ कर.* **leverage** /-अरिज्/ *ना* [*अगण*] १ तरफेची शक्ती, तरफबल. २ (*ला*) शक्ती, जोर.

levity /'लेव्हटि/ *ना* [*अगण*] (*औप*) थिल्लरपणा.

levy /'लेव्हि/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] वसूल करणे : ~ *a tax, कर वसूल करणे/पट्टी बसवणे.* **levy** *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) वसुली, पट्टी.

lewd /ल्यूड्; *अमे* लूड्/ *वि* स्वैराचारी, चावट : ~ *jokes, चावट विनोद.*

liability /,लाइअ'बिलटि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] दायित्व, जोखीम. २ **liabilities** [*ब.व*] कर्ज, भार, बोजा. ३ [*गण*] (*अनौप*) नेहमी अडचणीत टाकणारा माणूस, भारभूत वस्तू : *An old car is a ~, जुनी गाडी ही एक डोक्यावरचे ओझे.*

liable /'लाइअब्ल्/ *वि* १ *to*// पात्र, शील : ~ *to make mistakes, प्रमादशील.* २ *to*// एखादी वाईट गोष्ट होणारा, क्षम, आधीन : *be ~ to flu in winter, हिवाळ्यात फ्लूच्या आधीन होणे.* ३ कायद्याने जबाबदार : ~ *for debts, कर्जाला जबाबदार/जोखीम.*

liaise /लि'अेइझ्/ *क्रि* [*अक*] एकत्र काम करणे; परस्परांशी सतत संपर्क ठेवणे, परस्परांना सतत माहिती देणे.

liaison /लि'अेइझ्न्; *अमे* 'लिअझॉन्/ *ना* १ [*अगण*] विविध गटांचा परस्परांशी असलेला संपर्क, स्नेहभाव. २ [*गण*] दोन व्यक्तींमधील विवाहबाह्य शरीरसंबंध, व्यभिचार, जारकर्म.

liar /'लाइअ(र्)/ *ना* [*गण*] खोटारडा, मिथ्याभाषी.

libel /'लाइब्ल्/ *ना* [*अगण, गण*] एखाद्याच्या प्रतिष्ठेला हानिकारक असे लेखन, त्याचे प्रकाशन, लेखी बदनामी. **libel** *क्रि* (**-ll-**; *अमे* **-l-**) [*सक*]बदनामीकारक मजकूर छापणे. **libellous** (*अमे* **libelous**) /-बलस्/ *वि* अब्रूनुकसानकारक, बदनामीकारक.

liberal /'लिबरल्/ *वि* १ सहिष्णू. २ सढळ, उदारपणे दिलेला : *a ~ supply, सढळ/विपुल पुरवठा.* ३ (शिक्षणाबाबत) विस्तृतपणे सामान्यज्ञान देणारे, उदार. **liberalism** *ना* [*अगण*] उदारमतवाद, मुक्त मतस्वातंत्र्य. **liberalize** /'लिब्रलाइझ्/ *क्रि* [*सक*] निर्बंध काढून टाकणे, मुक्त करणे : ~ *shop opening hours, दुकानाच्या वेळेवरील निर्बंध काढणे.* **liberally** *क्रिवि* उदारहस्ते, मुक्तपणे, सढळपणे. **the 'Liberal Party** *ना* [*अे.व*] (*ब्रि राजकारण*) आताच्या सोशल आणि

लिबरल डेमोक्रॅट्स् पक्षांचा भाग असलेला पूर्वीचा उदारमतवादी पक्ष.

liberate /'लिबरेइट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) मुक्त करणे. **liberated** *वि* सामाजिक आणि लैंगिक व्यवहारात मुक्त, स्वच्छंदी, स्वैर, उच्छृंखल. **liberation** /,लिब'रेइशन्/ *ना* [*अगण*] मुक्ती.

liberty /'लिबटि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] (*औप*) मुक्ती, स्वातंत्र्य. २ [*गण, अगण*] (*औप*) आचार स्वातंत्र्य. ३ (*वाक्प्र*) **at liberty** मुक्त, मोकळा, स्वतंत्र. **take the liberty of doing sth** परवानगी न घेता एखादी गोष्ट करणे, विनापरवाना करणे.

library /'लाइब्ररि; *अमे* -ब्रेरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) पुस्तके, कागदपत्रे वगैरेचा संग्रह असणारी खोली किंवा इमारत, ग्रंथालय. **librarian** /लाइ'ब्रेअरिअन्/ *ना* [*गण*] ग्रंथपाल.

lice LOUSE चे *ब.व.*

licence (*अमे* **license**) /'लाइसन्स्/ *ना* [*गण, अगण*] काही करण्याची, मालकीची वगैरे परवानगी (देणारे अधिकृत पत्रक), (अधिकृत) परवाना.

license (तसेच **licence**) /'लाइसन्स्/ *क्रि* [*सक*] परवाना देणे. **licensee** /,लाइसन्'सी/ *ना* [*गण*] परवाना-धारक – खास करून मद्य विक्रीसाठी.

lick /लिक्/ *क्रि* [*सक*] १ चाटणे: *The dog ~ed its paw, कुत्र्याने स्वतःचा पंजा चाटला.* २ (*अनौप*) पराभव करणे, मात करणे. ३ (लाटा किंवा ज्वाळांबाबत) हळूच स्पर्श करणे, भिडू लागणे. ४ (*वाक्प्र*) **lick one's lips** ⇨ LIP. **lick** *ना* १ [*गण*] चाटणे. २ [*अे.व*] (रंग वगैरेचा) अल्प भाग, झलक, थोडासा भाग.

licorice (*अमे*) = LIQUORICE.

lid /लिड्/ *ना* [*गण*] १ झाकण. २ = EYELID (EYE).

lie^{1} /लाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* ~**d**, *वर्त वि* **lying**) [*अक*] खोटे बोलणे, असत्य गोष्ट सांगणे. **lie** *ना* [*गण*] असत्य गोष्ट, खोटे.

lie^{2} /लाइ/ *क्रि* (*भूत* **lay** /लेइ/, *भूत वि* **lain** /लेइन्/, *वर्त वि* **lying**) [*अक*] १ (खाली) पडणे, झोपणे, आडवे होणे. २ पहुडणे, खाली निजणे. ३ पडून राहणे: *machines lying idle, पडून राहिलेली यंत्रे.* ४ (एखाद्या ठिकाणी) असणे: *The town ~s on the coast, ते शहर किनाऱ्यावर आहे.* ५ समोर दिसणे, पसरलेला दिसणे; पसरणे: *The valley lay before us, आमच्या समोर दरी पसरली होती.* ६ (अमूर्त गोष्टींबाबत) असणे: *It does not ~ within my power to help you, तुला मदत करणे माझ्या अधिकारात येत नाही.* ७ (*वाक्प्र*) **lie in 'wait (for sb)** एखाद्याला आश्चर्यचकित करण्यासाठी लपून राहणे, दबा धरून बसणे. **lie 'low** (*अनौप*) गप्प राहणे, नजरेआड राहणे. **not take sth lying 'down** अपमान, उपमर्द वगैरेबाबत गप्प न बसणे, मुकाट न बसणे, स्वस्थ न राहणे. ८ (*क्रिब*) **lie behind sth** एखाद्या गोष्टीचे कारण असणे. **lie down** अंथरूणावर वगैरे झोपायला किंवा विश्रांती घ्यायला आडवे होणे, पहुडणे. **lie with sb** (*औप*) एखाद्याचे कर्तव्य किंवा त्याची जबाबदारी असण: *The final decision ~s with the director, अंतिम निर्णय घेण्याची जबाबदारी संचालकांची आहे.* **lie** *ना* [*अे.व*] १ एखाद्या गोष्टीचे पसरणे, पसारा. २ (*वाक्प्र*) **the ,lie of the 'land** (क) एखाद्या प्रदेशाचे नैसर्गिक विशेष. (ख) (*ला*) परिस्थिती, सद्यस्थिती. **'lie-down** *ना* [*अे.व*] (*अनौप*) छोटीशी विश्रांती, घटकाभर पडणे. **'lie-in** *ना* [*अे.व*] (*अनौप*) उठायची वेळ झाली तरी अंथरूणात पडून राहणे.

lieutenant /लेफ्'टेनन्ट्; *अमे* लू'ट्-/ *ना* [*गण*] सैन्य किंवा नौदलातील कनिष्ठ अधिकारी.

life /लाइफ्/ *ना* (*ब.व* **lives** /लाइव्हझ्/) १ [*अगण*] प्राणी आणि वनस्पतींची कार्य करण्याची आणि वाढण्याची क्षमता जी धातू, खडक वगैरेमधे नसते, जीव. २ [*अगण*] जिवंत गोष्टी, जीवन, जीवसृष्टी: *Is there ~ on Mars? मंगळावर जीवसृष्टी आहे का?* ३ [*अगण*] मानवी जीवन. *He expects a lot from ~, जीवनाकडून तो खूप अपेक्षा करतो.* ४ [*गण*] मनुष्यप्राणी, माणूस: *Many lives were lost, खूप माणसं गेली किंवा मोठी प्राणहानी झाली.* ५ [*गण*] जन्म आणि मृत्यू

यांच्यामधला काळ, आयुष्य, जीवनमान, हयात : *She spent her whole ~ in Canada, तिने सर्व आयुष्य कॅनडात घालविले.* ६ [*अगण*] (तसेच **life sentence**) (*अनौप*) जन्मठेपेची शिक्षा. ७ [*अगण*] प्रत्यक्ष जीवन, जगाचा व्यवहार, त्यातील माणसं आणि त्यातील आनंद, जग : *Join the navy and see ~, नौदलात भरती व्हा आणि जग पाहा!* ८ [*अगण*] जिवंतपणा, उत्साह, जोम : *full of ~, जिवंतपणाने भरलेला.* ९ [*गण, अगण*] जीवनक्रम : *city ~, शहरी जीवनक्रम.* १० [*गण*] चरित्र : *a ~ of Dante, दान्तेचे चरित्र.* ११ [*अगण*] कलेमधे वापरायचा जिवंत प्राणिमात्र : *a portrait drawn from ~, जिवंत/खरा प्राणिमात्र (माणूस, जनावर वगैरे) पाहून काढलेले चित्र.* १२ [*गण*] एखाद्या गोष्टीचे आयुष्य : *a battery with a ~ of three years, तीन वर्षाचे आयुष्य असणारी/तीन वर्षे टिकणारी विजेरी.* १३ (*वाक्प्र*) **come to 'life** जिवंत होणे. **for the 'life of one** (*अनौप*) कितीही कष्ट केले/धडपडले तरी. **the life and soul of the party** (*अनौप*) मेजवानीतली सर्वांचे लक्ष वेधणारी किंवा सर्वात उत्साही अशी व्यक्ती, मेजवानीचा प्राण. **not on your 'life** (*अनौप*) निश्चितच नाही, नक्कीच नाही. **take one's life in one's hands** जिवाला धोका पत्करणे, जीव मुठीत घेणे. **take sb's 'life** एखाद्याचा जीव घेणे, जिवे मारणे. **'lifebelt** (तसेच **'lifebuoy**) *ना* [*गण*] पाण्यात पडलेल्या माणसाला तरंगून राहण्यास उपयुक्त असा जीवसंरक्षक पट्टा किंवा जीवरक्षक रिंग. **'lifeboat** *ना* [*गण*] समुद्रात सापडलेल्या माणसांना वाचविणारी नौका, जीवरक्षक नौका. **'life cycle** *ना* [*गण*] (*प्राणिशास्त्र*) प्राण्याचे किंवा वनस्पतींचे जीवनचक्र : *the ~ cycle of a frog, बेडकाचे जीवनचक्र.* **'life-guard** *ना* [*गण*] पोहण्याच्या तलावावरील वगैरे धोक्यात असलेल्या पोहणाऱ्यांना वाचवण्याकरता नेमलेला पोहण्यात तरबेज असलेला प्राणरक्षक किंवा जीवरक्षक. **'life-jacket** *ना* [*गण*] पाण्यात तरंगत राहण्यासाठी वापरायचे जीवरक्षक जाकीट. **lifeless** *वि* १ जीव गेलेला, मृत. २ निर्जीव, जीव नसलेला; कंटाळवाणा. **'lifelike** *वि* खऱ्या माणसासारखे किंवा खऱ्या वस्तूसारखे दिसण्यात व आकारात हुबेहुब : *a ~like painting, हुबेहुब चित्र.* **'lifeline** *ना* [*गण*] १ जीव वाचविण्यासाठी वापरायचा दोर, जीवरक्षक दोर. २ (*ला*) एखाद्याचे जीवन ज्याच्यावर अवलंबून आहे ते, जीवनाधार, मर्मपथ. **'lifelong** *वि* तहहयात, आजीव. **'life-size(d)** *वि* पूर्णाकृती, प्रत्यक्ष आहे त्या आकारात. **'life-span** *ना* [*गण*] एखादे काही जगण्याचा किंवा चालू राहण्याचा काळ, आयुर्मर्यादा, आयुर्मान. **'life-style** *ना* [*गण*] जीवनपद्धती, जीवनशैली. **'lifetime** *ना* [*गण*] आयुष्य, हयात.

lift /लिफ्ट्/ *क्रि* १ [*सक*] वर/उंच उचलणे. २ [*सक*] अधिक उत्साह आणणे, चैतन्य आणणे : *The news ~ed her spirits, त्या बातमीने तिच्यात चैतन्य आले.* ३ [*अक*] (ढग, धुके वगैरे बाबत) कमी होणे, विरळ होणे, विरणे. ४ [*सक*] (बंदी किंवा निर्बंध) उठवणे. ५ [*सक*] (*अनौप*) उठवणे, उचलणे, चोरणे. ६ (*वाक्प्र*) **not lift a finger** (*अनौप*) काहीही मदत न करणे, हातही न लावणे. ७ (*क्रिव*) **lift off** (वायुवाहनाबाबत) उड्डाण करणे, सोडणे, प्रक्षेपण करणे. **lift** *ना* १ [*अ.व*] उचलणे. २ [*गण*] इमारतीच्या एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर माणसे किंवा सामान वर-खाली करण्याचे यंत्र, उद्वाहक. ३ [*गण*] वाहनातून फुकट प्रवास : *a ~ to the station, स्टेशनपर्यंत दुसऱ्याच्या वाहनातून फुकट प्रवास.* ४ [*अ.व*] अत्यानंद, आनंदी वातावरण. **'lift-off** *ना* [*गण, अगण*] अंतराळयानाचे प्रक्षेपण.

ligament /'लिगमन्ट्/ *ना* [*गण*] हाडांना एकत्र धरून ठेवणारा पेशीबंध, अस्थिबंधन, अस्थिरज्जू.

light^1 /लाइट्/ *ना* १ [*अगण*] प्रकाश, उजेड : *the ~ of the sun, सूर्यप्रकाश.* २ [*गण*] दिवा – विशेषतः विजेचा दिवा. ३ [*गण*] अग्नी/ज्योत (निर्माण करणारे साधन), पेटवायचा अग्नी. ४ [*अगण*] ज्ञान(प्रकाश). ५ [*अ.व*] दृष्टिकोन : *see things in a good ~, चांगल्या दृष्टिकोनात गोष्टी पाहणे.* ६ (*वाक्प्र*) **bring sth/come to 'light** एखादी गोष्ट उजेडात आणणे/येणे. **cast/shed/throw light on sth** उजेड पाडणे, एखादी गोष्ट

स्पष्ट करणे. **in the light of sth** एखाद्या गोष्टीचा विचार करता, एखादी गोष्ट विचारात घेता: *in the ~ of this news, ही बातमी विचारात घेता.* **light at the end of the tunnel** खूप संकटांनंतर दिसणारे सुखाचे/यशाचे किरण, अंधारातून प्रकाशाकडे. **'light bulb** = BULB १. **'lighthouse** *ना* [*गण*] रात्रीच्या अंधारात बोटींना मार्गदर्शन करणारा दीपस्तंभ, दीपगृह. **'light-year** *ना* १ [*गण*] प्रकाशाने एका वर्षात कापलेले अंतर, प्रकाशवर्ष. २ [बहुधा *ब.व*] (*अनौप*) दीर्घकाळ.

light² /लाइट्/ *वि* १ (स्थानाबाबत) उजेडाचे; अंधार नसलेले: *a ~ room, उजेडाची खोली.* २ फिका: *~-blue eyes, फिकट निळे डोळे.*

light³ /लाइट्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **lit** /लिट्/ किंवा **lighted**) १ [*अक, सक*] पेटणे, पेटवणे. २ [*सक*] (दिवा) लावणे, (विजेचा दिवा) चालू करणे. ३ [*सक*] प्रकाशमान करणे, उजेड करणे: *a castle lit by coloured lights, विविध रंगी प्रकाशांनी उजळलेला किल्ला.* ४ (*क्रिव*) **light up** (*अनौप*) (विडी वगैरे) शिलगावणे, पेटवून फुंकणे. **light (sth) up** (एखाद्याचा चेहरा वगैरे) उजळणे. **light sth up** प्रकाश टाकणे, प्रकाशात आणणे: *The fire lit up the whole sky, आगीच्या प्रकाशात सर्व आकाश उजळले.* **lighting** *ना* [*अगण*] इमारत, रस्ता वगैरे ठिकाणची प्रकाश व्यवस्था किंवा प्रकाशाची सोय; (विद्युत) रोषणाई, दीपन.

light⁴ /लाइट्/ *वि* १ सहज उचलण्याजोगा किंवा नेता येण्याजोगा; हलका. २ कमी जोराचा, प्रमाणातला वगैरे, थोडासा: *~ rain, हलकासा पाऊस.* ३ हलका, सौम्य, मृदू: *a ~ touch, मृदू स्पर्श.* ४ कष्टमय नसलेला, हलका: *~ work, हलके काम/किरकोळ काम.* ५ गंभीर किंवा अवघड नसलेले: *~ reading, हलकंफुलकं वाचन.* ६ सौम्य: *a ~ attack of flu, फ्लूचे सौम्य अवधाण.* ७ (अन्नाबाबत) पचायला सोपे, हलके. ८ (झोपेबाबत) गाढ नाही अशी. ९ (पेयांबाबत) मद्यार्क कमी असलेले, कडक नाही असे. १० (*वाक्प्र*) **make light of sth** एखादी गोष्ट गंभीरपणे न घेणे, हसण्यावारी नेणे, फारसे लक्ष न देणे. **,light-'fingered** *वि* (*अनौप*) हातसफाई करणारा, चोरटा, हाताळू. **,light-'headed** *वि* किंचित् चक्कर आल्यासारखा झालेला, भोवळ आलेला. **,light-'hearted** *वि* खेळकर, आनंदी. **,light 'industry** *ना* [*गण*] किरकोळ माल किंवा भाग बनविण्याचा उद्योग, छोटा उद्योग. **lightly** *क्रिवि* १ सौम्यपणे, मृदुपणे. २ गंभीरतेने नाही असा, हसतखेळत. ३ (*वाक्प्र*) **get off 'lightly** (*अनौप*) कडक शिक्षेतून सुटणे, थोडक्यावर भागून निसटणे. **lightness** *ना* [*अगण*] हलकेपणा; सौम्यपणा. **'lightweight** *ना* [*गण*] १ ५९ ते ६१ किलो वजन गटातील मुष्टियोद्धा. २ (*अनौप*) कमी महत्त्वाचा माणूस, किरकोळ/फालतू माणूस.

light⁵ /लाइट्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **lit** /लिट्/ किंवा **lighted**) (*औप*) (*क्रिव*) **light on/upon sb/sth** एखादी व्यक्ती/वस्तू अचानक भेटणे किंवा मिळणे.

lighten¹ /'लाइट्न्/ *क्रि* [*अक, सक*] (एखादी गोष्ट) वजनात हलकी होणे/करणे.

lighten² /'लाइट्न्/ *क्रि* [*अक, सक*] (एखादी गोष्ट) अधिक प्रकाशमान होणे, तेजाळणे.

lighter /'लाइट(र्)/ *ना* [*गण*] सिग्रेट वगैरे पेटविण्याचे साधन, चकमक, ज्वालक.

lightning /'लाइट्निङ्/ *ना* [*अगण*] आकाशात चमकणारी वीज, तडित्, सौदामिनी. **lightning** *वि* विजेसारखा झटकन्, वेगवान किंवा त्वरित: *at ~ speed, विजेच्या वेगाने.* **'lightning conductor** (*अमे* **lightning rod**) *ना* [*गण*] विजेपासून बचाव करण्यासाठी इमारतीच्या टोकापासून जमिनीत पुरलेली धातूची तार, तडित्संवाहक.

like¹ /लाइक्/ *क्रि* [*सक*] १ एखादी गोष्ट आवडणे, मनाला येणे; आवड असणे, प्रिय असणे, लोभ असणे. २ (नकारात्मक वाक्यात) नाराज असणे, नाखूष असणे: *I didn't ~ to stop you, तुला थांबवायला मी नाखूष होतो म्हणजे माझी इच्छा नव्हती.* ३ (इच्छा किंवा निवड व्यक्त करण्यासाठी *should* किंवा *would* सह वापर): *Would you ~ a cup of tea? चहा घ्यायला आवडेल? म्हणजेच चहा घेणार?* ○ *I'd ~ to think about it, या गोष्टीचा विचार करायला मला आवडेल म्हणजेच*

मला जरा विचार करावा लागेल. ४ (*वाक्प्र*) **if you like** (सभ्यपणे संमती दाखवताना किंवा सूचना करताना वापर) हवं तर. **not like the look/sound of sth** जे पाहिले/ऐकले ते न आवडणे, त्याविषयी वाईट मत असणे. **likeable** (तसेच **likable**) *वि* आवडण्यासारखा. **likes** *ना* [*ब.व*] (*वाक्प्र*) **,likes and 'dislikes** आवडीनिवडी.

like^{2} /लाइक्/ *शब्दयो* १ सारखा, समान, सम : *a hat ~ mine, माझ्या हॅटसारखी हॅट.* २ एखाद्याचा खास असा, गुणविशिष्ट : *It's just ~ him to be rude, उर्मटपणाने वागणे त्याचे खास वैशिष्ट्यच आहे.* ३ रीतीने, प्रमाणे, सारखे : *behave ~ children, लहान मुलांसारखे वागणे* ○ *drink ~ a fish,* खूप पिणे. ४ उदाहरणार्थ : *sports, ~ football and hockey, फुटबॉल आणि हॉकी यांसारखे खेळ.* ५ (*वाक्प्र*) **like 'anything** (*अनौप*) खूपच जलदीने, भरभर, खूप वगैरे. **like** *उ. अव्यय* (*अनौप*) १ त्याच रीतीने, तसेच : *No one sings ~ she did, तिच्यासारखे कुणीच गात नाही.* २ (खास करून *अमे*) जणू काही.

like^{3} /लाइक्/ *वि* सारखा, समान. **like** *ना* [*अे.व*] सारखी गोष्ट : *Music, painting and the ~, संगीत, चित्रकला आणि यांसारख्या इतर कला.* **,like-'minded** *वि* समवृत्ती, समविचारी.

likelihood /'लाइक्लिहुड्/ *ना* [*अगण*] संभाव्यता, संभव.

likely /'लाइक्लि/ *वि* (**-ier, -iest**) १ अपेक्षित; संभाव्य : *It is ~ to rain, पाऊस पडण्याचा संभव किंवा पाऊस पडण्याची शक्यता आहे.* २ (*वाक्प्र*) **a 'likely story** (*उपरोधाने*) (एखाद्याच्या बोलण्यावर अविश्वास दाखवताना वापर). **likely** *क्रिवि* १ (*वाक्प्र*) **as ,likely as 'not, most/very 'likely** बहुतकरून, संभाव्यपणे. **not 'likely** (*अनौप*) निश्चितपणे नाही, नक्कीच नाही.

liken /'लाइकन्/ *क्रि* [*सक*] *to//* (*औप*) एखाद्या व्यक्तीची किंवा वस्तूची दुसऱ्याशी तुलना करणे.

likeness /'लाइक्निस्/ *ना* [*गण, अगण*] दिसण्यातील साम्य, रूपसाधर्म्य, सारखेपणा : *a family ~, कुटुंबात दिसणारा एकसारखेपणा.*

likewise /'लाइक्वाइझ्/ *क्रिवि* तसेच, त्याप्रमाणे; तसेच, शिवाय, सुद्धा.

liking /'लाइकिङ्/ *ना* (*वाक्प्र*) **have a liking for sth** एखाद्या गोष्टीची आवड असणे. **to sb's liking** (*औप*) एखाद्याला समाधान देणारे, एखाद्याच्या आवडीनुसार.

lilac /'लाइलक्/ *ना* १ [*गण*] फिकट जांभळ्या किंवा पांढऱ्या रंगाची गोड वासाची फुले येणारे एक फुलझाड. २ [*अगण*] फिकट जांभळा रंग, जांभुळका रंग.

lilt /लिल्ट्/ *ना* [*अे.व*] आवाजातील गोड चढउतार, लय, झोक. **lilting** *वि* लयबद्ध, झोकदार.

lily /'लिलि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) मोठी, बहुधा पांढरी फुले येणारे आणि खाली कंद असलेले एक फुलझाड.

limb /लिम्/ *ना* [*गण*] १ पाय, हात किंवा पंख, अवयव. २ झाडाची मुख्य फांदी किंवा शाखा. ३ (*वाक्प्र*) **out on a 'limb** (*अनौप*) एकटा, एकाकी.

limber /'लिम्ब(र्)/ *क्रि* (*क्रिब*) **,limber 'up** स्पर्धेपूर्वी वगैरे स्नायूंना व्यायाम देणे, अंग मोकळे करणे.

limbo /'लिम्बउ/ *ना* (*वाक्प्र*) **in limbo** अनिश्चित परिस्थितीत, डळमळीत : *The company is in ~, कंपनीचे बूड स्थिर नाही.*

lime^{1} /लाइम्/ *ना* [*अगण*] सिमेंट करण्यासाठी वापरायची चुनखडी. **'limestone** *ना* [*अगण*] चुनखडीचा खडक, चुनखडी.

lime^{2} /लाइम्/ *ना* [*गण*] गोड वासाची, पिवळ्या रंगाची फुले येणारे एक फुलझाड.

lime^{3} /लाइम्/ *ना* [*गण*] लिंबापेक्षा जास्त आम्लधर्मी असलेले लिंबू – कागदी लिंबू (किंवा त्याचे झाड).

limelight /'लाइम्लाइट्/ *ना* **the limelight** [*अे.व*] लोकांच्या नजरेसमोर राहील अशी जागा, सार्वजनिक महत्त्वाचे स्थान.

limerick /'लिमरिक्/ *ना* [*गण*] पाच ओळींची वात्रटिका.

limit /'लिमिट्/ *ना* [*गण*] १ मर्यादारेषा, सीमा, हद्द. २ परवानगी असलेली किंवा शक्य

असलेली जास्तीत जास्त रक्कम, कमाल राशी. ३ (*वाक्प्र*) **(be) the limit** (*व्रात्य*) स्वतःला झेपेल इतकेच, एवढेच – यापेक्षा जास्त नाही, हद्द होणे. **,off 'limits** (*अमे*) = OUT OF BOUNDS (BOUNDS). **within 'limits** योग्य मर्यादेत: *You are free to spend money, within ~s, काही एक मर्यादेपर्यंत खर्च करायला तू मोकळा आहेस.* **limit** *क्रि* [*सक*] मर्यादा घालणे. **limitation** /,लिमि'टेइश्न्/ *ना* १ [*अगण*] मर्यादा घालणे. २ [*गण*] मर्यादा घालणारी गोष्ट; कमजोरी, कमकुवतपणा. **limited** *वि* १ मर्यादित; थोडे, अल्प किंवा लहान. २ (कंपनीबाबत) दिलेल्या पैशाएवढेच संस्थेच्या कर्जाचे उत्तरदायित्व असणारे सभासद असलेली, मर्यादित. **limitless** *वि* असीम, अमर्याद.

limousine /'लिमझ़ीन्/ *ना* [*गण*] ड्रायव्हरची सीट वेगळी किंवा अलग असलेली आराम गाडी.

limp^{1} /लिम्प्/ *क्रि* [*अक*] खुरडत चालणे, लंगडणे. **limp** *ना* [*अे.व*] लंगडी चाल.

limp^{2} /लिम्प्/ *वि* मलूल, लेचापेचा. **limply** *क्रिवि* मलूलपणे. **limpness** *ना* [*अगण*] मलूलपणा, विशविशीतपणा.

linchpin /'लिन्च्पिन्/ *ना* [*गण*] १ चाक जागी राहण्यासाठी आसाच्या टोकातून घातलेली दांडी, आसाची खीळ, कानखीळ. २ (*ला*) एखाद्या संघटनेतील, योजनेतील वगैरे अत्यावश्यक असा माणूस, कणा.

line^{1} /लाइन्/ *ना* १ [*गण*] (क) रेषा, रेघ. (ख) [बहुधा *ब.व*] त्वचेवरील घड्या, सुरकुत्या: *the ~s on his face, त्याच्या चेहऱ्यावरच्या रेषा.* २ [*गण*] मर्यादा; सीमारेषा, हद्द: *~s marking a tennis court, टेनिस कोर्ट आखणीच्या रेषा.* ३ [*गण*] संरक्षण फळी. ४ [*गण*] व्यक्तींची किंवा वस्तूंची रांग: *customers standing in (a) ~, रांगेत उभी राहिलेली गिऱ्हाइकं.* ५ [*गण*, बहुधा *अे.व*] वंशावळ. ६ [*गण*] (क) पानावर लिहिलेली ओळ. (ख) **lines** [*ब.व*] नटाने बोललेले शब्द. ७ [*गण*] (*अनौप*) चिठ्ठी, चार ओळीचे पत्र. ८ [*गण*] दोरा, दोर किंवा तारेचा तुकडा. ९ [*गण*] टेलिफोन कनेक्शन: *Our firm has 20 ~s, आमच्या कंपनीत टेलिफोनची २० कनेक्शन्स आहेत.* १० [*गण*] रेल्वेमार्ग. ११ **lines** [*ब.व*] सर्वसाधारण आकार; रूपरेखा. १२ [*गण*] कृती, विचार किंवा वर्तन यांची सरणी, पंथ: *a new ~ of research, संशोधनाची नवीन सरणी.* १३ [*अे.व*] मार्ग किंवा दिशा: *the ~ of gun'fire, गोळीबाराची दिशा.* १४ [*गण*] वाहतूक व्यवस्था: *a 'shipping ~, जहाज वाहतूक मार्ग.* १५ [*अे.व*] (क) काम करण्याचा विभाग; उद्योगाचा प्रकार: *a job in the banking ~, बँक उद्योगातील नोकरी.* (ख) उत्पादनाचा प्रकार: *a new ~ in coats, कोटातील नवीन उत्पादन/फॅशन.* १६ (*वाक्प्र*) **in line for sth** एखादी गोष्ट मिळण्याचा संभव, रांगेत असणे. **in line with sth** एखाद्या गोष्टीनुसार. **(put sth) on the 'line** (*अनौप*) एखादी गोष्ट धोक्यात घालणे. **on the right 'lines** योग्य मार्गावर/मार्गाने. **out of 'line (with sb/sth)** (क) रेषेबाहेर, एखाद्या गोष्टीच्या रांगेत न येणारे. (ख) न रुचेल अशा रीतीने वेगळा, एखाद्या रीतीला न शोभेल असा. **'line-drawing** *ना* [*गण*] पेन किंवा पेन्सिलने काढलेले रेखाचित्र. **'line-printer** *ना* [*गण*] (*संगणन*) एका वेळी संपूर्ण ओळ छापणारे वेगवान छपाईयंत्र.

line^{2} /लाइन्/ *क्रि* [*सक*] १ रेघा काढणे: *~d paper, रेघा मारलेला कागद.* २ रांग करणे/असणे: *a road ~d with trees, कडेने झाडे असलेला रस्ता.* ३ (*क्रिब*) **line (sb) up** रांग करायला लावणे, रांगेत उभे करणे/राहणे. **line sth up** (*अनौप*) एखाद्या गोष्टीचे आयोजन करणे, व्यवस्था करणे. **'line-up** *ना* [*गण*] १ तपासणी वगैरे साठी उभी केलेली माणसांची रांग. २ विशिष्ट कारणाने रांगेत ठेवलेल्या वस्तू किंवा माणसे.

line^{3} /लाइन्/ *क्रि* [*सक*] १ एखादी गोष्ट आतील बाजूने लावणे: *fur-~d gloves, आतून फर लावलेले हातमोजे किंवा मऊ केसांच्या अस्तराचे हातमोजे.* २ (*वाक्प्र*) **line one's (own) pocket(s)** लबाडीने चिकार पैसे कमावणे.

linear /'लिनिअ(र्)/ *वि* १ रेषांचे किंवा रेषांतील. २ लांबीचा: *~ measurement, लांबीचे परिमाण.*

linen /'लिनिन्/ *ना* [*अगण*] अभ्रे, उशा, चादरी वगैरे (त्यांचे कापड).

liner^1 /'लाइन(र्)/ *ना* [*गण*] मोठी मालवाहू किंवा प्रवासी बोट.

liner^2 /'लाइन(र्)/ *ना* [*गण*] (सामासिक शब्दांत) आत घालायचे आवरण, आतून लावायचे अस्तर: *bin ~s, कचराकुंडीचे अस्तर.*

linesman /'लाइन्झ्मन्/ *ना* [*गण*] (*ब.व* **-men**) (*खेळ*) खेळताना चेंडू सीमेच्या बाहेर गेला की नाही हे सांगणारा अधिकारी.

linger /'लिङ्ग(र्)/ *क्रि* [*अक*] रेंगाळणे; घुटमळणे. **lingering** *वि* दीर्घ, रेंगाळलेला; चेंगट, राहणारा: *a ~ illness, चेंगट आजार.*

lingerie /'लॅन्झरी; *अमे* ,लान्ज'रेइ/ *ना* [*अगण*] (*औप*) स्त्रियांचे अंतर्वस्त्र/आतला कपडा.

linguist /'लिङ्ग्विस्ट्/ *ना* [*गण*] १ अनेक परकीय भाषा उत्तम प्रकारे येणारा माणूस, बहुभाषाभिज्ञ. २ भाषेचा अभ्यास करणारा, भाषावैज्ञानिक. **linguistic** /लिङ्'ग्विस्टिक्/ *वि* भाषाविषयक, भाषिक किंवा भाषावैज्ञानिक. **linguistics** *ना* (अे.व क्रियापदासह) भाषेचा अभ्यास, भाषाविज्ञान.

liniment /'लिनिमन्ट्/ *ना* [*गण, अगण*] अंगाच्या दुखऱ्या भागांवर चोळायचे पातळ औषध.

lining /'लाइनिङ्/ *ना* [*गण, अगण*] एखाद्या गोष्टीच्या आतल्या पृष्ठभागावर आवरण घालण्याकरता वापरलेली गोष्ट, अस्तर: *a fur ~, मऊ केसांचे अस्तर.*

link /लिङ्क्/ *ना* [*गण*] १ दुवा. २ साखळीची कडी. **link** *क्रि* १ [*सक*] जोडणे; एकास एक लावणे. २ (*क्रिब*) **link (sth) up (with sth)** (एखादी गोष्ट) दुसऱ्या गोष्टीस जोडणे.

lino /'लाइनउ/ *ना* [*अगण*] (*अनौप*) LINOLEUM चे *संरू.*

linoleum /लि'नउलिअम्/ *ना* [*अगण*] जमिनीवर अंथरायचे टिकाऊ, चकचकीत, गुळगुळीत असे जाजम किंवा कापड.

lint /लिन्ट्/ *ना* [*अगण*] जखमांवर बांधायचे मऊ सुती कापड.

lion /'लाइअन्/ *ना* [*गण*] १ सिंह. २ (*वाक्प्र*) **the 'lion's share (of sth)** एखाद्या गोष्टीतील सिंहाचा वाटा. **lioness** *ना* [*गण*] सिंहीण.

lip /लिप्/ *ना* १ [*गण*] ओठ. २ [*गण*] कपाचा, जगचा वगैरे काठ. ३ [*अगण*] (*व्रात्य*) अर्वाच्य बडबड, भंकस. ४ (*वाक्प्र*) **lick/smack one's lips** (*अनौप*) चांगल्या गोष्टीची वाट पाहणे, जिभल्या चाटणे. **one's lips are sealed** गुपित न फोडणे, ओठ शिवणे. **'lip-read** *क्रि* (*भूत, भूत वि* **'lip-read** /-रेड्/) [*अक, सक*] ओठाची हालचाल पाहून एखाद्याचे बोलणे समजणे. **'lip-reading** *ना* [*अगण*] ओठांच्या हालचालीवरून भाषा समजणे. **'lip-service** *ना* (*वाक्प्र*) **give/pay 'lip-service to sth** तोंडदेखला पाठिंबा देणे. **'lipstick** *ना* [*गण, अगण*] ओठ रंगवायची कांडी.

liqueur /लि'क्युअ(र्); *अमे* लि'कऽर्/ *ना* [*गण, अगण*] कडक (बहुधा गोडसर) मद्य.

liquid /'लिक्विड्/ *ना* [*गण, अगण*] पाणी, तेल यासारखा द्रव, पातळ पदार्थ. **liquid** *वि* १ द्रवरूप. २ स्वच्छ आणि पाणीदार, नितळ: *~ blue eyes, नितळ निळे डोळे.* ३ (ध्वनीबाबत) स्वच्छ आणि ओघवान, कोमल, प्रवाही. ४ (*अर्थ*) रोख रकमेत सहजपणे रूपान्तरित होणारा: *~ assets, रोख पैशात परिवर्तनीय मालमत्ता.*

liquidate /'लिक्विडेइट्/ *क्रि* [*सक*] १ (*अनौप*) एखाद्याला ठार करून त्याला दूर करणे, काटा काढणे. २ (*अर्थ*) (तोट्यात जाणारा धंदा) बंद करणे, (तोटा होणाऱ्या कंपनीचा) गाशा गुंडाळणे, परिसमापन करणे. **liquidation** /,लिक्वि'डेइश्न्/ *ना* [*अगण*] उच्छेद, नाश; दिवाळे, परिसमापन.

liquidize /'लिक्विडाइझ्/ *क्रि* [*सक*] (फळे, भाज्या वगैरेचा) रस करणे. **liquidizer** (खास करून *अमे* **blender**) *ना* [*गण*] अन्नातला रस काढण्याचे विद्युत्-उपकरण.

liquor /'लिक(र्)/ *ना* [*अगण*] (खास करून *अमे*) कडक मद्य, दारू.

liquorice /'लिकरिस; -इश्/ *ना* [*अगण*] गोळी म्हणून किंवा औषधात वापरला जाणारा काळा पदार्थ, ज्येष्ठमध.

lisp /लिस्प्/ *क्रि* [*अक, सक*] /स्/ चा उच्चार /थ्/ करणे; बोबडे बोलणे, चोचरे बोलणे. **lisp** *ना* [*अे.व*] बोबडे बोलणे.

list^1 /लिस्ट्/ *ना* [*गण*] नावांची, वस्तूंची वगैरे यादी, सूची. **list** *क्रि* [*सक*] यादी करणे, सूची करणे; यादीत घालणे.

list^2 /लिस्ट्/ *क्रि* [*अक*] (जहाजाबाबत) एका बाजूला कलणे. **list** *ना* [*अे.व*] कललेली अवस्था.

listen /'लिस्न्/ *क्रि* [*अक*] १ (*to*)// एखाद्याचे बोलणे किंवा एखादी गोष्ट ऐकण्याचा प्रयत्न करणे; लक्ष देणे : *L~ carefully to what I am saying, मी काय म्हणतोय् ते नीट ऐक.* २ (*to*)// एखाद्याचा सल्ला मानणे, एखाद्याचे ऐकणे; एखाद्यावर विश्वास बसणे : *I warned you, but you wouldn't ~, मी तुला सावध केलं होतं, पण तू ऐकलं नाहीस किंवा तुला ऐकायचं नव्हतं.* ३ (*क्रिब*) **listen 'in (to sth)** (क) आकाशवाणीवरचा कार्यक्रम ऐकणे, रेडिओ ऐकणे. (ख) चोरून ऐकणे. **listener** *ना* [*गण*] ऐकणारा, श्रोता.

listless /'लिस्ट्लिस्/ *वि* निरुत्साही, नाउमेद, थकल्याने उत्साह संपलेला, उदासीन. **listlessly** *क्रिवि* नाउमेदीने. **listlessness** *ना* [*अगण*] निरुत्साह, नाउमेदी, कंटाळलेपणा.

lit LIGHT^3, ५ चा *भूत, भूत वि.*

liter (*अमे*) = LITRE.

literacy /'लिटरसि/ *ना* [*अगण*] लिहिता-वाचता येणे, साक्षरता.

literal /'लिटरल्/ *वि* १ शब्दाच्या मुख्यार्थाचा, शब्दशः अर्थाचा. २ शब्दशः म्हणजे शब्दाला शब्द देणारा : *a ~ translation, शब्दशः भाषान्तर.* **literally** *क्रिवि* १ (*अनौप*) (अर्थघनतेसाठी सैलपणे वापर) अक्षरशः : *I was ~ly bored to tears, अक्षरशः डोळ्यातून पाणी येईल इतका मला कंटाळा आला.* २ शब्दशः : *translate ~ly, शब्दशः भाषान्तर करणे.*

literary /'लिटररि; *अमे* 'लिटरेरि/ *वि* वाङ्मयीन किंवा लेखकांचा.

literate /'लिटरट्/ *वि* १ लिहिता-वाचता येणारा, साक्षर. २ सुशिक्षित; सुसंस्कृत.

literature /'लिट्रच(र्); *अमे* -चुअर्/ *ना* [*अगण*] १ कलामूल्य असलेले लेखन, साहित्य. २ विशिष्ट विषयावरचे वाङ्मय. ३ (*अनौप*) माहिती देणारे छापील वाङ्मय; पत्रके.

lithe /लाइथ्/ *वि* (*औप*) (व्यक्तीबाबत किंवा तिच्या शरीराबाबत) लवचिक, नरम.

litigation /,लिटि'गेइश्न्/ *ना* [*अगण*] दिवाणी खटला, मुकदमा.

litre /'लिट(र्)/ *ना* [*गण*] द्रवपदार्थ मोजण्याचे एक मेट्रिक परिमाण.

litter /'लिट(र्)/ *ना* १ [*अगण*] कागदाचे, बाटल्यांच्या काचांचे वगैरे विखुरलेले तुकडे. २ [*गण*] एखाद्या प्राण्याची पिलावळ, वीण. **litter** *क्रि* [*सक*] तुकडे तुकडे विखुरणे, पसारा घालणे. **'litter-bin** *ना* [*गण*] कचराकुंडी, केराची टोपली.

little^1 /'लिट्ल्/ *वि* १ लहान, छोटा : *~ cups, लहान कप.* २ (काल किंवा अंतराबाबत) अल्प, कमी, थोडा : *wait a ~ while, थोडा वेळ थांबणे.* ३ कमी महत्त्वाचा, क्षुल्लक : *a ~ mistake, क्षुल्लक चूक.* ४ लहान, चिमणा.

little^2 /'लिट्ल्/ *वि* (**less, least**) थोडी किंवा अल्प (राशी), किंचित्; पुरेसा नसलेला, अल्प : *I have very ~ time to spare, माझ्याकडे मोकळा वेळ फार थोडा आहे.* **little** *सना, ना* [*अगण*] अल्प किंवा थोडा अंश, संख्या : *I understood ~ of what she said, ती काय म्हणाली हे मला फार कमी कळलं.* **little** *क्रिवि* १ कमी, अल्प, थोडासा; किंचित् : *I slept very ~ last night, काल रात्री मी खूप कमी झोपलो* ○ *Little does he know what trouble he's in, आपण कोणत्या संकटात आहोत याची त्याला किंचितही किंवा सुतराम कल्पना नाही.* २ (*वाक्प्र*) **,little by 'little** हळूहळू. **little wonder** ➪ WONDER.

little^3 /'लिट्ल्/ *सना, वि* (एखाद्या गोष्टीचा) अल्पसा भाग; थोडासा : *a ~ sugar, थोडीशी साखर.* **a little** *क्रिवि* अल्प प्रमाणात, किंचित् : *a ~ afraid, किंचित् घाबरलेला.*

live^1 /लिव्ह्/ *क्रि* १ [*अक*] जिवंत असणे. २ [*अक*] जिवंत राहणे, जगणे : *The doctors don't think he'll ~, तो जगेल असं डॉक्टरांना वाटत नाही.* ३ [*अक*] स्वतःचे घर असणे, राहणे : *~ in Leeds, लीडस्‌ला राहणे.* ४ [*अक,*

सक] जीवन कंठणे, राहणे : ~ *happily, आनंदात जीवन व्यतीत करणे किंवा दिवस काढणे.* ५ [*अक*] आयुष्याचा पूर्ण उपभोग घेणे, जीवनाचा आनंद घेणे. ६ (*वाक्प्र*) **live be,yond/with,in one's 'means** अंथरूण पाहून हातपाय न पसरणे/पसरणे. **live from ,hand to 'mouth** कसेबसे दिवस काढणे, हातातोंडाशी गाठ असणे. **live it 'up** (*अनौप*) चैनीत किंवा ऐषारामात राहणे. ७ (*क्रिब*) **live sth 'down** (मागची वाईट गोष्ट) विसरून जगणे. **live for sth** एखादी गोष्ट ध्येय मानून त्यासाठी जगणे. **live in/out** (विद्यार्थी किंवा कामगाराबाबत) शिकण्याच्या किंवा कामाच्या जागी/जागेपासून दूर राहणे. **live off sb** दुसऱ्याच्या जिवावर जगणे किंवा राहणे. **live on** जिवंत राहणे. **live on sth** (**क**) एखाद्या गोष्टीचा प्रमुख अन्न म्हणून वापर करून जगणे, एखाद्या गोष्टीवर जगणे. (**ख**) (एखाद्या पैशाच्या रकमेवर) जगण्यासाठी अवलंबून राहणे. **live through sth** एखाद्या अनुभवातून जाणे, पाहणे : *He ~d through two wars, त्याने दोन युद्धे पाहिली/अनुभवली.* **live together** नवराबायकोसारखे एकत्र राहणे. **live up to sth** (विशिष्ट उच्च पातळी) गाठण्याइतके चांगले असणे, परीक्षेला उतरणे : *He ~d up to my expectations, तो माझ्या अपेक्षांना उतरला.* **live with sb** एखाद्या बरोबर लग्न झाल्याप्रमाणे राहणे. **live with sth** (एखादी वाईट गोष्ट) सोसून राहणे, स्वीकारून राहणे.

live^{2} /लाइव्ह्/ *वि* १ जिवंत. २ पेटलेला : ~ *coals, पेटलेले कोळसे किंवा निखारे.* ३ न फुटलेला, जिवंत : *a ~ bomb, जिवंत बॉम्ब.* ४ (तारेबाबत) वीज खेळवणारी, भारित. ५ (आकाशवाणी, दूरदर्शन प्रक्षेपणाबाबत) दिसत किंवा ऐकू येत असताना प्रत्यक्ष घडणारा. ६ महत्त्वाचा, औत्सुक्याचा : *a ~ issue, महत्त्वाचा किंवा न संपलेला प्रश्न.*

liveable /'लिव्हबल्/ *वि* राहण्याजोगा, राहण्यास योग्य; सुसह्य.

livelihood /'लाइव्हलिहुड्/ *ना* [*गण,* बहुधा *अे.व*] उपजीविकेचे साधन, चरितार्थाचे साधन, वृत्ती.

lively /'लाइव्ह्लि/ *वि* (-ier, -iest) १ जिवंत, जोमदार. २ (रंगांबाबत) गडद. **liveliness** *ना* [*अगण*] जिवंतपणा, चैतन्य.

liven /'लाइव्ह्न्/ *क्रि* (*क्रिब*) **'liven (sb/sth) 'up** एखाद्याला जिवंत करणे, जिवंत होणे, चेतना आणणे/येणे.

liver /'लिव्ह(र्)/ *ना* १ [*गण*] रक्त शुद्ध करणारे शरीरातील मोठे इंद्रिय, यकृत. २ [*अगण*] अन्न म्हणून खायचे असे प्राण्याचे यकृत.

lives LIFE चे *ब.व.*

livestock /'लाइव्ह्स्टॉक्/ *ना* [*अगण*] शेतीला उपयुक्त अशी जनावरे, गुरंढोरं, पशुधन.

livid /'लिव्हिड्/ *वि* १ (*अनौप*) संतप्त, खूप रागावलेला. २ निळसर राखाडी रंगाचा.

living^{1} /'लिव्हिङ्/ *वि* १ जिवंत, सजीव. २ चालू, वापरला जाणारा : *a ~ language, जिवंत भाषा.* ३ (*वाक्प्र*) **be the living image of sb** ➪ IMAGE. **within/in ,living 'memory** लोकांच्या स्मरणात राहिलेला. **the living** *ना* [*ब.व*] जिवंत असणारी माणसं.

living^{2} /'लिव्हिङ्/ *ना* १ [*अे.व*] चरितार्थ साधन, पोट भरण्याचा मार्ग. २ [*अगण*] जीवनमान : *a low standard of ~, निःकृष्ट जीवनमान.* **'living-room** *ना* [*गण*] सर्वसामान्य वापराची घरातील खोली, मुख्य दालन, बाहेरची खोली/हॉल.

lizard /'लिझड्/ *ना* [*गण*] छोटा, चार पायांचा आणि लांब शेपटी असलेला सरिसृप प्राणी, सरडा.

load /लउड्/ *ना* १ [*गण*] वाहून नेलेली गोष्ट, भार, ओझे. २ [*गण*] (खास करून सामासिक शब्दांत) वाहून नेता येणारी राशी वगैरे, भरलेला माल वगैरे : *coach-~s of tourists, पर्यटकांनी भरलेल्या गाड्या.* ३ [*गण*] इंजिनाने वगैरे करायचे काम, कार्यभार. ४ [*गण*] (*ला*) जबाबदारी, काळजी वगैरेचे ओझे, बोजा. ५ **loads (of)** [*ब.व*] (*अनौप*) एखाद्या गोष्टीची विपुलता : *~s of money, चिकार/बक्कळ पैसा.* **load** *क्रि* १ [*अक, सक*] (ओझे) चढवणे. २ [*सक*] (**क**) बंदुकीत गोळ्या भरणे. (**ख**) (कॅमेऱ्यात फिल्म) घालणे. **loaded** *वि* १

भार वाहून नेणारा, भरलेला. २ (*व्रात्य*) चिकार श्रीमंत. ३ (*वाक्प्र*) **a ,loaded 'question** अडचणीत आणणारा किंवा खोड्यात घालणारा प्रश्न.

loaf^{1} /*लउफ्*/ *ना* (*ब.व* **loaves** /*लउव्ह्झ्*/) [*गण*] मोठ्या आकाराचा भाजलेला पाव.

loaf^{2} /*लउफ्*/ *क्रि* [*अक*] (*about/around*)// (*अनौप*) आळसात वेळ घालवणे, रिकामटेकडेपणाने वेळ घालवणे.

loan /*लउन्*/ *ना* १ [*गण*] दुसऱ्याला उसने दिलेले काहीतरी, विशेषतः पैसे, कर्ज. २ [*अगण*] उधारी, उसनवारी. ३ (*वाक्प्र*) **on loan** उसनवारीने, कर्जाऊ. **loan** *क्रि* [*सक*] (विशेषतः *अमे* किंवा *ब्रि औप*) उसने देणे.

loath (तसेच **loth**) /*लउथ्*/ *वि to*// (*औप*) (एखादी गोष्ट करण्यास) नाखूष, राजी नसलेला.

loathe /*लउद्*/ *क्रि* [*सक*] तीव्रतेने न आवडणे, तिटकारा येणे, वीट येणे. **loathing** *ना* [*अगण*] तिटकारा, वीट. **loathsome** /*-सम्*/ *वि* वीट आणणारा, कंटाळवाणा, उबग आणणारा, किळसवाणा, ओंगळ.

loaves LOAF^{1} चे *ब.व.*

lob /*लॉब्*/ *क्रि* (**-bb-**) [*अक , सक*] (चेंडू) उंच मारणे. **lob** *ना* [*गण*] उंच फटकावलेला चेंडू.

lobby /*'लॉबि*/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*गण*] हॉटेल, नाट्यगृह वगैरेचे स्वागतकक्ष. २ [*गण*, तसेच ब.व क्रियापदासह अे.व] राजकारणी लोकांवर दबाव आणणारा गट, दबावगट: *the anti-nuclear ~, अण्वस्त्रविरोधी (दबाव)गट.* **lobby** *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*अक, सक*] विधेयकाच्या बाजूने किंवा विरोधात मत देण्यासाठी (लोकप्रतिनिधीचे) मन वळवण्याचा प्रयत्न करणे, आपल्या बाजूला वळवणे.

lobe /*लउब्*/ *ना* [*गण*] कानाची पाळी, कानाचे चाप.

lobster /*'लॉब्स्ट(र्)*/ *ना* १ [*गण*] आठ पाय आणि दोन नांग्या असलेला मृदुकायकवची जलचर, कालव, झिंगा, शेवंड. २ [*अगण*] कालवाचे खाण्याचे मांस.

local /*'लउक्ल्*/ *वि* १ स्थानीय, स्थानिक: *~ news, स्थानिक बातम्या.* २ संपूर्ण शरीरावर परिणाम न करता फक्त एकाच भागावर परिणाम करणारा: *a ,~ anaes'thetic, विशिष्ट जागेपुरतीचा शुद्धिहारक.* ३ (गाड्यांच्या बाबत) उपनगरीय. **local** *ना* [*गण*] १ [बहुधा *ब.व*] स्थानिक मनुष्य, रहिवासी. २ (*ब्रि अनौप*) स्थानीय सार्वजनिक गृह. **locally** *क्रिवि* स्थानिक पातळीवर.

locality /*लउ'कॅलटि*/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) जिल्हा; स्थान, ठिकाण, वस्ती.

localize /*'लउकलाइझ्*/ *क्रि* [*सक*] बाहेर पसरू न देणे, स्थानावरच नियंत्रित करणे: *~ a disease, रोग पसरू न देणे.*

locate /*लउ'केइट्; अमे 'लउकेइट्*/ *क्रि* [*सक*] १ ठिकाण शोधून काढणे, जागा हुडकणे. २ (बहुधा कर्मणी) विशिष्ट स्थळी/जागी प्रस्थापणे, असणे: *Our offices are ~d in Paris, आमची कार्यालये पॅरिसमधेच ठेवली आहेत.* **location** /*लउ'केइश्न्*/ *ना* १ [*गण*] स्थान, स्थळ. २ (*वाक्प्र*) **on location** (चित्रपटाबाबत) निसर्गचित्रण केलेला, स्टुडिओबाहेरचे चित्रीकरण असलेला.

loch /*लॉक्*/ *ना* [*गण*] (*स्कॉट*) सरोवर, तळे: *L~ Ness, नेस तलाव.*

lock^{1} /*लॉक्*/ *ना* १ [*गण*] दाराचे वगैरे कुलूप. २ [*गण*] अडवलेल्या पाण्याची पातळी कमी-जास्त करण्यासाठीची दरवाजांची भिंत. ३ (*वाक्प्र*) **,lock, stock and 'barrel** सर्व धरून, सर्व गोष्टींसकट. **'locksmith** *ना* [*गण*] कुलुपे करणारा, करजकर.

lock^{2} /*लॉक्*/ *क्रि* [*अक, सक*] १ कुलूप लावणे/घालणे. २ घट्ट बसणे/करणे, जाम होणे/करणे. ३ (*क्रिब*) **lock sth away** एखादी गोष्ट कुलुपात टाकणे, कुलूप लावून ठेवणे. **lock sb in/out** (कैद्याला वगैरे) कुलूप घालून बंद करून ठेवणे, कुलूप लावून कोंडणे किंवा बाहेर ठेवणे. **lock (sth) up** (घराला वगैरे) कुलूप लावून सुरक्षित करणे. **lock sb up** एखाद्याला तुरुंगात किंवा वेड्याच्या इस्पितळात टाकणे, गजाआड करणे.

lock^{3} /*लॉक्*/ *ना* [*गण*] केसांची बट.

locker /*'लॉक(र्)*/ *ना* [*गण*] कपडे, सामान वगैरे ठेवण्याचे लहान कपाट, कप्पा.

locket /*'लॉकिट्*/ *ना* [*गण*] गळ्यातील

साखळीत अडकवलेली प्रतिमा वगैरे असलेली छोटी पेटी, ताईत.

locomotive /'लउकमउटिव्ह्/ *ना* [*गण*] (*औप*) रेल्वेचे इंजिन.

locust /'लउकस्ट्/ मोठ्या झुंडींमधे उडणारा आणि शेतीचा नाश करणारा पंख असलेला कीटक, टोळ.

lodge^1 /लॉज्/ *ना* [*गण*] १ मोठ्या घराच्या प्रवेश दाराजवळील छोटेसे घर, गडीमाणसांचे घर. २ खेड्यातील घर किंवा खोली: *a hunting ~, शिकारीची* (म्हणजे शिकाऱ्यासाठीची) *खोली.*

lodge^2 /लॉज्/ *क्रि* १ [*अक*] एखाद्याच्या घरात पैसे देऊन राहणे. २ [*सक*] पैसे घेऊन एखाद्याची राहण्याची सोय करणे. ३ [*अक, सक*] *in//* घुसून बसणे/घुसवून बसवणे, रुतणे: *The bullet (was) ~d in his arm, त्याच्या हातात गोळी घुसली (होती).* ४ [*सक*] अधिकृतपणे (निवेदन वगैरे) करणे, नोंदवणे: *~ a complaint, तक्रार नोंदवणे.* **lodger** *ना* [*गण*] पैसे देऊन एखाद्याच्या घरात राहणारा माणूस.

lodging /'लॉजिङ्/ *ना* १ [*अगण*] निवासस्थान, तात्पुरते राहण्याची जागा. २ **lodgings** [*ब.व*] भाड्याने राहण्याची खोली/खोल्या.

loft /लॉफ्ट्; *अमे* 'लॉऽफ्ट्/ *ना* [*गण*] छपराखालची साठवणीची जागा, माळा.

lofty /'लॉफ्टि; *अमे* 'लॉऽफ्टि/ *वि* (**-ier, -iest**) १ (विचार वगैरेबाबत) उच्च, उदात्त. २ (*अलं*) अतिशय उंच. ३ (*अधिक्षेपी*) शिष्ट, अहंमन्य.

log^1 /लॉग्; *अमे* लॉऽग्/ *ना* [*गण*] झाडाचे कापलेले खोड, मोठे लाकूड, ओंडका.

log^2 /लॉग्; *अमे* लॉऽग्/ *ना* [*गण*] १ जहाज किंवा विमान यांच्या प्रवासाची अधिकृत नोंद. २ मोटारच्या नोंदणीची कागदपत्रे. **log** *क्रि* (**-gg-**) [*सक*] १ नोंदवहीत तपशील भरणे. २ (*वाक्प्र*) **log in/on** विशिष्ट शब्द किंवा अंक देऊन संगणक यंत्रणा वापरायला लागणे. **log out/off** विशिष्ट शब्द किंवा अंक देऊन संगणक यंत्रणा वापरणे पूर्ण करणे किंवा संपवणे.

loggerheads /'लॉगहेड्झ्/ *ना* (*वाक्प्र*) **at loggerheads (with sb)** एखाद्याशी भांडण असणे, न पटणे.

logic /'लॉजिक्/ *ना* [*अगण*] १ तर्कशास्त्र. २ तर्कशुद्ध विचार: *There is no ~ in what he says, तो काय म्हणतोय् त्यात काही (तर्क)संगती नाही.* **logical** /'लॉजिक्ल्/ *वि* तर्क सुसंगत. **logically** /-क्लि/ *क्रिवि* तर्कदृष्ट्या.

loins /लॉइन्झ्/ *ना* [*ब.व*] पाय आणि कमर यांच्या मधला भाग, कंबर.

loiter /'लॉइट(र्)/ *क्रि* [*अक*] रमणे, रमतगमत जाणे, रेंगाळणे.

loll /लॉल्/ *क्रि* [*अक*] १ लोळणे. २ (*क्रिब*) **loll out** (जिभेबाबत) बाहेर काढणे, लोंबत ठेवणे.

lollipop /'लॉलिपॉप्/ *ना* [*गण*] फळांच्या गोठलेल्या रसाचा किंवा साखरेच्या गोळीचा काडीवरील तुकडा, झंबो.

lolly /'लॉलि/ *ना* (*ब.व* **-ies**) (*ब्रि*) १ [*गण*] (*अनौप*) लॉलिपॉप. २ [*अगण*] (*व्रात्य*) पैसा.

lone /लउन्/ *वि* (बहुधा *अलं*) जवळ कुणीही नसलेला, एकटा.

lonely /'लउन्लि/ *वि* (**-ier, -iest**) १ मित्र नसलेला, विजनवासी, उदास. २ (स्थलांविषयी) फार कुणी जात नाही असे, निर्जन, आडवळणी. **loneliness** *ना* [*अगण*] एकांतवास, एकटेपणा.

lonesome /'लउन्सम्/ *वि* (विशेषतः *अमे*) एकांतवासी, एकटा; निर्जन.

long^1 /लॉङ्; *अमे* लॉऽङ्/ *वि* (**~er** /-ङ्ग(र्)/, **~est** /-ङ्गिस्ट्/) १ लांबचा, दीर्घ लांबीचा: *a ~ journey, लांबचा प्रवास* ○ *800 metres ~, ८०० मीटर्स लांब.* २ (*वाक्प्र*) **go a long way** ⇨ FAR^1. **in the 'long run** सरतेशेवटी; अखेरीस. **,long in the 'tooth** (*गंमत*) (माणसाबाबत) म्हातारा, वयस्कर. **not by a 'long chalk/shot** मुळीच नाही. **,long-'distance** *वि, क्रिवि* दूर अंतरावरचा धावणारा, दूरच्या प्रवासाचा. **'long drink** *ना* [*गण*] मद्यार्क नसलेले आणि उंच पेल्यात दिलेले पेय. **'long-range** *वि* दीर्घकाळचा, दीर्घ पल्ल्याचा, दीर्घ कक्षेचा: *a ~-range weather forecast,* दीर्घ पल्ल्याचा हवामान

अंदाज. **,long-'sighted** *वि* फक्त दूरचे स्पष्ट दिसणारा, दीर्घदृष्टी असणारा. **,long-'term** *वि* दीर्घ काळासाठीचा, दीर्घकालीन. **'long wave** *ना* [*अगण*] १००० मीटर्स पेक्षा जास्त लांबीची रेडिओ लहरी. **,long-'winded** *वि* (भाषण किंवा लेखन याबाबत) लांबलचक, लंबेचवडे; कंटाळवाणे, रटाळ.

long^{2} /लॉङ्; *अमे* लॉऽङ्/ *ना* १ [*अगण*] फार वेळ, दीर्घ काळ : *This won't take ~, याला फार वेळ लागणार नाही* ○ *I hope to see you before ~, लवकरच मी तुला भेटेन अशी आशा करतो.* २ (*वाक्प्र*) **the ,long and (the) 'short of it** एकंदरीने किंवा थोडक्यात सांगायचे तर.

long^{3} /लॉङ्; *अमे* लॉऽङ्/ *क्रिवि* (**~er** /-ङ्ग(र्)/, **~est** /-ङ्गिस्ट्/) १ खूप वेळ, दीर्घकाळ : *Were you in Rome ~? तू खूप दिवस रोमला होतास का?* ○ *I shan't be ~, मला फार वेळ लागणार नाही* म्हणजेच मी लवकर येतो. २ खूप पूर्वी : ~ *ago, खूप वर्षांपूर्वी.* ३ (अवधीबाबत) संपूर्ण वेळ, -भर : *all day ~, दिवसभर.* ४ (*वाक्प्र*) **as/so long as** या अटीवर की; असे पर्यंत. **no/any/much 'longer** विशिष्ट काळानंतर. **,long-playing 'record** *ना* [*गण*] प्रत्येक बाजू २० ते ३० मिनिटे चालणारी ध्वनिमुद्रिका. **,long-'standing** *वि* दीर्घकाळचा, खूप दिवसांचा : *a ,~-standing ar'rangement, दीर्घकालीन व्यवस्था.* **,long-'suffering** *वि* अडचणींना दीर्घकाळापर्यंत धैर्याने तोंड देणारा, दीर्घकाळ खितपत पडलेला.

long^{4} /लॉङ्; *अमे* लॉऽङ्/ *क्रि* [*अक*] *for; to//* फार इच्छा असणे, आस असणे, आसुसणे : ~ *for the holidays, सुट्टीची आस लागणे.* **longing** *वि, ना* [*गण, अगण*] आस, आसक्ती, अभिलाषा (असलेला). **longingly** *क्रिवि* अभिलाषेने, मोठ्या आशेने.

longitude /'लॉन्जिट्यूड्; *अमे* -टूड्/ *ना* [*अगण*] ब्रिटनमधील ग्रीनिचच्या पूर्व किंवा पश्चिमेला अंशामधे मोजलेले अंतर, रेखांश, रेखावृत्त.

loo /लू/ *ना* [*गण*] (*ब.व* ~s) (*ब्रि अनौप*) प्रसाधनगृह, स्वच्छतागृह.

look^{1} /लुक्/ *क्रि* १ [*अक*] (*at*)*//* एखादी व्यक्ती/गोष्ट डोळ्यांनी पाहणे, दृष्टी टाकणे. २ (बहुधा विशेषणासह वापर) दिसणे : ~ *sad, दुःखीकष्टी दिसणे.* ३ [*अक*] विशिष्ट दिशेला तोंड असणे : *The house ~s east, घराचे तोंड पूर्वेला आहे.* ४ [*अक, सक*] (एखाद्या गोष्टीकडे) लक्ष देणे, ध्यान देणे : *L~ where you're going! तू कुठे चाललायस् बघ!* ५ (*वाक्प्र*) **look one's 'best** शक्य तेवढे सुंदर किंवा आकर्षक दिसणे. **look daggers at sb** एखाद्याकडे खूप रागाने पाहणे. **look down one's 'nose at sb/sth** एखाद्याला तुच्छ लेखणे. **,look 'here** (निषेध नोंदवण्यासाठी किंवा एखाद्याला लक्ष दे असे सांगण्यासाठी वापर) इकडे बघ. **look like sb/sth, look as if** एखाद्यासारखे दिसणे, संभवनीय किंवा शक्य वाटणे : *She ~ed as if she was asleep, ती झोपेत असल्यासारखी दिसत होती* ○ *It ~s like rain, पाऊस पडेलसे वाटतं.* **look 'sharp** जलदी करणे, आवरणे, घाई करणे. **never/not look 'back** (*अनौप*) सतत यश मिळत जाणे, यशाकडे घोडदौड करणे, मागे न पाहणे. **not be much to 'look at** (*अनौप*) आकर्षक व्यक्तिमत्व नसणे. **not look one'self** नेहमीच्या खेळकरपणा नसणे, नेहमीचा उत्साहीपणा नसणे. ६ (*क्रिब*) **look 'after sb/sth** एखाद्याची काळजी घेणे. **look a'head** पुढे काय होणार याचा विचार करणे, भविष्याकडे डोळे लावणे. **look at sth** एखाद्या गोष्टीवर विचार करणे, ती तपासणे : *I'll ~ at your proposal tomorrow, मी तुझ्या प्रस्तावावर उद्या विचार करीन.* **look 'back (on sth)** होऊन गेलेल्या किंवा भूतकाळातल्या गोष्टींचा विचार करणे. **look down on sb/sth** (*अनौप*) दुसऱ्याला कमी लेखणे; तिरस्कार करणे, अवहेलना करणे. **look for sb/sth** एखाद्या व्यक्तीला किंवा एखादी वस्तू शोधणे, एखाद्याच्या शोधात असणे. **look forward to sth** पुढे होणाऱ्या घटनेचा आनंदाने विचार करणे, अपेक्षा करणे, आनंदाने प्रतीक्षा करणे, डोळे लावून बसणे. **look 'in (on sb)** एखाद्याच्या घरी उभ्याउभ्या जाणे, धावती भेट देणे, चक्कर मारणे. **look into sth** तपास घेणे किंवा

तपासणे. **look 'on** लक्ष ठेवणे, निरखणे. **look on sth as sth** समजणे. **look 'out** काळजी घेणे, सावध राहणे. **look out for sb/sth** एखाद्याकरता लक्ष ठेवून असणे. **look out onto sth** (खोली वगैरेबाबत) एखाद्या गोष्टीकडे तोंड असणे, एखादी गोष्ट तेथून दिसणे. **look over sth** पहाणी करणे, नीट बघणे, तपासणे. **look round sth** (प्रेक्षणीय स्थळ) पाहणे, (शहर, इमारत वगैरे) पाहणे. **look through sth** एखादी गोष्ट पटकन् नजरेखालून घालणे, भरभर वाचणे किंवा चाळणे. **look to sb for sth/to do sth** एखाद्या गोष्टीसाठी एखाद्यावर अवलंबून राहणे, भिस्त ठेवणे, मदार असणे, आशेने पाहणे. **look 'up** (*अनौप*) चांगला होणे, सुधारणे. **look sb up** (*अनौप*) एखाद्याचे घर शोधून त्याला भेटणे, एखाद्याच्या घरी जाणे. **look sth up** संदर्भ ग्रंथात एखादी गोष्ट शोधणे. **look up to sb** एखाद्याचा आदर करणे, त्याचे कौतुक वाटणे. **look** *उद्गा* (आपल्या बोलण्याकडे दुसऱ्याने लक्ष द्यावे या उद्देशाने वापर) हे बघ. **'look-in** *ना* (*वाक्प्र*) **(not) give sb/get a look-in** (*अनौप*) एखाद्या गोष्टीत भाग घेण्याची संधी (न) देणे/मिळणे. **'look-out** *ना* [*गण*] १ टेहळणी करण्याची जागा, देखरेखीची जागा. २ देखरेख करणारा, टेहळणीवरचा माणूस. ३ (*वाक्प्र*) **be 'sb's look-out** (*अनौप*) एखाद्याची जबाबदारी असणे, एखाद्याच्या अखत्यारीतील गोष्ट असणे : *If you want to waste your money, that's your ~-out, तुला जर पैसे वाया घालवायचेत तर ती तुझी जबाबदारी म्हणजेच तू खुशाल पैसे वाया घालव तुझ्या जबाबदारीवर (पण माझ्या डोक्याला त्याची कटकट नको).*

look^{2} /लुक्/ *ना* १ [*गण*, बहुधा *ए.व*] पाहण्याची कृती : *Take a ~ at this, याच्याकडे जरा बघ.* २ [*गण*] चेहरा, हावभाव, अवतार : *I don't like the ~ of him, मला त्याचा अवतार अजिबात आवडत नाही.* ३ **looks** [*ब.व*] माणसाचे (आकर्षक) व्यक्तिमत्व, रुबाब : *She's got her father's good ~s, तिच्यात तिच्या वडलांचा रुबाब आहे.*

loom^{1} /लूम्/ *ना* [*गण*] कापड विणायचे यंत्र, हातमाग, माग.

loom^{2} /लूम्/ *क्रि* [*अक*] अस्पष्ट (बहुधा काहीतरी संकटसूचक) दिसू लागणे : *The outline of a ship ~ed through the fog, धुक्यातून जहाजाचा आकार अस्पष्टपणे दिसू लागला* ○ (*ला*) *Her problems ~ed large in her mind, स्वतःच्या कठीण प्रश्नांनी तिच्या मनात गर्दी केली.*

loop /लूप्/ *ना* [*गण*] १ वळसा, वेढा, आढा, नेढे. २ दोरी, वायर वगैरेचा वेढा. **loop** *क्रि* १ [*अक, सक*] वेढा घालणे, आढा घेणे. २ आढा घालून घट्ट करणे.

loophole /'लूप्हउल्/ *ना* [*गण*] कायद्याच्या चौकटीतून किंवा कचाट्यातून पळवाट, फट : *tighten up ~s in the law, कायद्यातील पळवाटा बंद करणे.*

loose /लूस्/ *वि* (**~r, ~st**) १ मोकळा, नियंत्रणातून मुक्त; अबद्ध : *The dog is too dangerous to be set ~, तो कुत्रा इतका धोकेबाज आहे की मोकळा सोडून उपयोग नाही.* २ हालणारा, घट्ट नसलेला : *a ~ tooth, हालणारा दात.* ३ एकत्र न बांधलेला, सुटा : *~ sheets of paper, सुटे कागद.* ४ (कपड्यांबाबत) घट्ट नसलेले, सैल. ५ शब्दशः नसलेला, स्वैर : *a ~ translation, स्वैर अनुवाद.* ६ (*जुना, अप्रचलित*) अनैतिक, स्त्रैण. ७ (*वाक्प्र*) **at a loose 'end**, (तसेच *अमे*) **at loose ends** रिकामा, मोकळा. **come/work 'loose** (बंद केलेले) सोडणे, सुटणे, मोकळे करणे, ढिले होणे. **loosely** *क्रिवि* सैलपणे. **loosen** /'लूस्न्/ *क्रि* [*अक, सक*] सैल करणे, सुटा करणे.

loot /लूट्/ *ना* [*अगण*] युद्धात शत्रूकडून घेतलेला किंवा चोरांनी पळवलेला माल, लूट, लुटलेला माल. **loot** *क्रि* [*अक, सक*] लुटणे, लूट करणे.

lop /लॉप्/ *क्रि* (**-pp-**) [*सक*] (झाडाच्या फांद्या वगैरे) कापणे, छाटणे.

lop-sided /,लॉप् 'साइडिड्/ *वि* एक बाजू दुसरीपेक्षा खाली असलेला किंवा दुर्लक्षिलेला, एकांगी.

lord /लॉऽड्/ *ना* १ [*गण*] पुरुष राज्यकर्ता, धनी, स्वामी. २ **(the) Lord** [*ए.व*]

परमेश्वर; येशू. ३ (क) [*गण*] उमराव, सरदार, मानकरी. (ख) **the Lords** [*अे.व*] (अे.व किंवा ब.व क्रियापदासह) HOUSE OF LORDS ➪ HOUSE^{1}. ४ **Lord** [*गण*] (*ब्रि*) (काही वरिष्ठ अधिकाऱ्यांची पदवी) : *L~ Mayor, माननीय महापौर.* ५ [*गण*] (आश्चर्यदर्शक वगैरे उद्गारात वापर) : *Good L~! अरे देवा!* **lordly** *वि* अभिमानी; उद्धट. **lordship** *ना* [*गण*] उमराव (किंवा त्याची पदवी/किताब).

lorry /'लॉरि; *अमे* 'लॉऽरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) मोठी दणकट मालवाहू मोटरगाडी.

lose /लूझ्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **lost** /लॉस्ट्; *अमे* लॉऽस्ट्/) १ [*सक*] हरवणे : *~ one's keys, किल्ल्या हरवणे.* २ [*सक*] अपघात, मृत्यू वगैरे कारणांनी हातातून जाणे, गमावणे : *~ one's job, नोकरी गमावणे/जाणे.* ३ [*सक*] जाणे, कमी होणे, घटणे, न उरणे, विरणे : *~ interest in sth, एखाद्या गोष्टीबाबतचे ममत्व कमी होणे* ○ *~ weight, वजन घटणे.* ४ [*अक, सक*] हरणे : *~ a game, खेळ हरणे.* ५ [*अक, सक*] (घड्याळाबाबत) (ठराविक वेळेनी) मागे पडणे. ६ **~ oneself in** एखाद्या गोष्टीत हरवून जाणे. ७ [*सक*] (*अनौप*) न समजणे, डोक्यात न शिरणे : *I'm afraid you've lost me, मला तुझं म्हणणं समजलं नाही.* ८ [*सक*] (संधी किंवा वेळ) वाया घालविणे. ९ (*वाक्प्र*) **lose count of sth** ➪ COUNT. **lose 'face** स्वतःचे नाव जाणे, तोंड दाखवायला जागा न उरणे. **lose ground** ➪ GROUND^{1}. **lose one's head** ➪ HEAD^{1}. **lose heart** ➪ HEART. **lose one's heart to sb** एखाद्याच्या प्रेमात पडणे. **lose sight of sb/sth** (क) एखादी गोष्ट/व्यक्ती पाहू न शकणे, दृष्टीआड होणे. (ख) एखादी गोष्ट विसरणे, ती लक्षात घ्यायचे राहून जाणे, काणाडोळा होणे, दुर्लक्ष होणे. **lose touch (with sb)** एखाद्याशी संपर्क तुटणे, संबंध न राहणे. **lose one's 'way** वाट चुकणे, रस्ता हरवणे. **lose weight** ➪ WEIGHT. १० (*क्रिब*) **lose 'out** अपयशी होणे, अयशस्वी होणे. **loser** *ना* [*गण*] हरणारा, नुकसान होणारा.

loss /लॉस; *अमे* लॉऽस/ *ना* १ [*अगण*] हरवणे; न राहणे, जाणे : *~ of blood, रक्त जाणे.* २ [*गण*] (क) हरवलेली वस्तू/व्यक्ती, हानी : *heavy ~ of life, जीवित हानी.* (ख) व्यवसायात बसलेली खोट. ३ (*वाक्प्र*) **at a 'loss** काय करावे किंवा बोलावे हे न कळणे, भांबावणे.

lost^{1} LOSE चा *भूत, भूत वि.*

lost^{2} /लॉस्ट्; *अमे* लॉऽस्ट्/ *वि* १ रस्ता हरवलेला. २ गमावलेला, हरवलेला. ३ (*वाक्प्र*) **a lost 'cause** निश्चितपणे अपयशी होईल अशी योजना, प्रकल्प वगैरे.

lot^{1} /लॉट्/ *सना* **a lot, lots** (*अनौप*) चिकार, रग्गड. **a lot of** (तसेच (*अनौप*) **lots of**) *वि* खूप संख्येने, प्रचंड प्रमाणात : *a ~ of people, खूप लोक.* **the 'lot** *ना* [*अे.व*] (अे.व किंवा ब.व क्रियापदासह) (*अनौप*) संपूर्ण, सर्व, आख्खा.

lot^{2} /लॉट्/ *क्रिवि* **a lot** (*अनौप*) १ (विशेषण किंवा क्रियाविशेषणासह वापर) भरपूर, मोठ्या प्रमाणात, खूप : *I feel a ~ better, मला आता खूप बरं वाटतंय्.* २ (क्रियापदासह वापर) (क) खूप, चिकार. (ख) खूपदा.

lot^{3} /लॉट्/ *ना* १ [*गण,* तसेच ब.व क्रियापदासह अे.व] माणसांचा किंवा वस्तूंचा गट, समूह, समुदाय : *the next ~ of students, नंतरचा विद्यार्थी वर्ग.* २ [*गण*] लिलावात विकायची वस्तू. ३ [*गण*] जमिनीचा तुकडा. ४ [*अे.व*] माणसाचं नशीब, भाग्य. ५ (*वाक्प्र*) **cast/draw 'lots** चिठ्ठ्या टाकून/फासे टाकून निवड करणे, सोडत करणे.

loth = LOATH.

lotion /'लउशन्/ *ना* [*गण, अगण*] त्वचा किंवा केस यांची निगा राखणारे द्रव.

lottery /'लॉटरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) विकलेल्या तिकिटांतील, चिठ्ठ्या वगैरे टाकून, नशिबाने निवडल्या गेलेल्या क्रमांकांच्या तिकिटांना बक्षिस देण्याची पद्धती.

loud /लाउड्/ *वि* १ आवाजाने मोठा, उंच, भारी. २ (रंगांबाबत) भगभगीत, फार गडद. **loud** *क्रिवि* मोठ्या आवाजात. **loudly** *क्रिवि* मोठ्याने. **loudness** *ना* [*अगण*] (आवाजाचा) मोठेपणा. **ˌloud'speaker** *ना* [*गण*] विद्युत संदेश ध्वनीमधे रूपान्तरित करण्याचा रेडिओ वगैरेतील भाग.

lounge /लाउन्ज्/ *क्रि* [*अक*] आरामात बसणे

किंवा उभे राहणे, रिकामटेकडे बसणे, टेकणे. **lounge** *ना* [*गण*] १ (*ब्रि*) आरामशीर बसायची खोली, विश्रामकक्ष. २ विमानतळावरील मोठे प्रतीक्षागृह. **'lounge bar** *ना* [*गण*] (*ब्रि*) सार्वजनिक मद्यपानगृह किंवा हॉटेलमधील झकपकीत आणि महागडा दारू विकण्याचा कट्टा.

louse /लाउस्/ *ना* [*गण*] (*ब.व* **lice** /लाइस्/) प्राणी आणि माणसांच्या शरीरावर जगणारा एका छोटा कीटक, ऊ.

lousy /'लाउझ़ि/ *वि* (**-ier, -iest**) १ (*अनौप*) फार वाईट, भिकार: *a ~ holiday, भिकार सुट्टी.* २ उवांनी भरलेला.

lout /लाउट्/ *ना* [*गण*] रीतभात नसलेला माणूस, धश्चोट, धटिंगण, आडमुठा. **loutish** *वि* धटिंगणासारखा.

lovable /'लैव्हब्ल्/ *वि* प्रेम वाटावा असा, लोभस, प्रेमास पात्र.

love /लैव्ह्/ *ना* १ [*अगण*] प्रेम, प्रीती. २ [*अगण*] लैंगिक आकर्षण, विषयासक्ती, प्रेम, इष्क, रती: *He's in ~, तो प्रेमात पडलाय्.* ३ [*अगण, अे.व*] आवड, प्रेम: *a ~ of books, ग्रंथप्रेम.* ४ [*गण*] प्रेमाचं किंवा आवडतं माणूस किंवा तशी गोष्ट. ५ [*अगण*] (टेनिसमधे) शून्य. ६ (*वाक्प्र*) **,give/,send sb one's 'love** हार्दिक शुभेच्छा देणे/पाठवणे. **make love (to sb)** एखाद्याशी संभोग करणे, रत होणे, प्रणय करणे. **there's little/no 'love lost between A and B** अ आणि ब एकमेकांना आवडत नाहीत. **love** *क्रि* [*सक*] १ प्रेम असणे: *~ one's wife, पत्नीवर प्रेम असणे.* २ खूप आवडणे: *I ~ cakes, मला केक खूप आवडतात.* **'love-affair** *ना* [*गण*] प्रेम (बहुधा लैंगिक) संबंध, लफडं.

lovely /'लैव्ह्लि/ *वि* (**-ier, -iest**) १ सुंदर, रमणीय: *a ~ woman, सुंदर स्त्री.* २ सुखकर, मजेचा: *a ~ holiday, सुट्टीचा मस्त दिवस.* **loveliness** *ना* [*अगण*] सौंदर्य, लोभसपणा; मस्तपणा.

lover /लैव्ह्(र्)/ *ना* [*गण*] १ विवाहबाह्य संबंधातला साथीदार, जार/जारिणी, यार. २ (आता कमी वापर) प्रेमिक, प्रियकर. ३ भोक्ता, प्रेमी: *a ~ of music, संगीतप्रेमी.*

loving /'लैव्हिङ्/ *वि* प्रिय, प्रेम करणारा. **lovingly** *क्रिवि* प्रेमपूर्वक, प्रेमळपणाने.

low^{1} /लउ/ *वि* १ ठेंगणा, उंच नसलेला, बुटका: *a ~ wall, ठेंगणी भिंत.* २ नेहमीच्या पातळीखाली, कमी, उतरलेला: *~ prices, कमी किंमती.* ३ महत्त्व किंवा दर्जाच्या बाबतीत कनिष्ठ, खालच्या प्रतीचा. ४ गावंढळ; अप्रामाणिक: *keep ~ company, कुसंगती असणे.* ५ (आवाजाबाबत) खालचा, खोल. ६ मोठा नाही असा, क्षीण, खालचा. ७ क्षीण, अशक्त; दुर्बल किंवा दुःखी: *feel ~, दुःखी असणे.* ८ प्रतिकूल, वाईट: *I have a ~ opinion of him, माझं त्याच्याविषयीचं मत चांगलं नाही.* ९ (गिअरबाबत) कमी वेगाचा. १० (*वाक्प्र*) **at a low 'ebb** वाईट किंवा हलाखीच्या परिस्थितीत. **be/run 'low (on sth)** (पुरवठ्याबाबत) संपत येणे, खलास होणे. **'low-down** *ना* (*वाक्प्र*) **give sb/get the low-down on sb/sth** (*अनौप*) एखाद्याविषयी इत्थंभूत माहिती देणे/मिळणे, अंदरकी बात कळणे. **'low-down** *वि* (*अनौप*) अप्रामाणिक, खोटारडा. **,low-'key** (तसेच **,low-'keyed**) *वि* सौम्य, तीव्र नसलेला; नियंत्रित. **lowlands** /'लउलन्ड्झ़्/ *ना* [*ब.व*] सखल प्रदेश, तळजमीन. **lowness** *ना* [*अगण*] बुटकेपणा; नीचता; कमीपणा, सखलता. **,low 'profile** ➪ PROFILE. **,low-'spirited** *वि* निराश, विमनस्क.

low^{2} /लउ/ *क्रिवि* खाली: *aim/shoot ~, खालच्या बाजूला रोखणे/मारणे.*

low^{3} /लउ/ *ना* [*गण*] नीच किंवा सर्वात नीच पातळी: *Shares reached a new ~ yesterday, काल रोख्यांनी नवीनच नीच पातळी गाठली.*

lower /'लउअ(र्)/ *वि* खालचा, अध: *the ~ lip, खालचा ओठ/अधर.* **lower** *क्रि* १ [*सक*] खाली आणणे/करणे, उतरवणे: *~ a flag, ध्वज उतरवणे.* २ [*अक, सक*] प्रमाणात कमी होणे/करणे: *~ the price, किंमत कमी करणे.* ३ **~ oneself** स्वतःची किंमत कमी करून घेणे, पत घालवणे. **,lower 'class** *ना* [*गण*] मध्यम वर्गाच्या खालचा वर्ग, कनिष्ठ वर्ग. **the ,lower-'class** *वि* खालच्या वर्गाचा.

lowly /'लउलि/ *वि* (**-ier, -iest**) (*जुना, अप्रचलित*) विनम्र.

loyal /'लॉइ॰अल्/ *वि* (*to*)// एखाद्याशी एकनिष्ठ, इमानदार : ~ *supporters, एकनिष्ठ पाठीराखे* ○ ~ *to one's country, स्वतःच्या देशाशी एकनिष्ठ.* **loyally** *क्रिवि* एकनिष्ठपणे, इमानदारीने. **loyalty** *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] एकनिष्ठपणा, इमानदारी. २ [*गण,* बहुधा *ब.व*] एखाद्या व्यक्तीशी किंवा वस्तूशी इमान राखण्यास लावणारे नाते, निष्ठा.

lozenge /'लॉझ़िन्ज्/ *ना* [*गण*] १ औषधीयुक्त चोखायची गोड गोळी. २ हिऱ्याच्या आकाराची आकृती, समान्तर समभुज चौकोन.

LP /,अेल् 'पी/ *संरू* **long-playing (record)** ➪ LONG^{3}, दीर्घ काळ चालणारी ध्वनिमुद्रिका.

Ltd *संरू* limited = LIMITED^{2} (LIMIT), मर्यादित.

lubricate /'लूब्रिकेइट्/ *क्रि* [*सक*] यंत्राच्या भागांची हालचाल सहज व्हावी म्हणून यंत्राला वंगण घालणे. **lubrication** /,लूब्रि'केइश्न्/ *ना* [*अगण*] बुळबुळीत करणे, वंगवणी.

lucid /'लूसिड्/ *वि* (*औप*) १ समजायला सोपा, सुगम, सुबोध; स्वच्छ, स्पष्ट. २ सुस्पष्ट विचार मांडणारा. **lucidity** /लू'सिडटि/ *ना* [*अगण*] स्पष्टपणा, सुबोधता. **lucidly** *क्रिवि* सुबोध रीतीने, सुस्पष्ट पद्धतीने.

luck /लक्/ *ना* [*अगण*] १ नशीब, योगायोग. २ भाग्य. ३ (*वाक्प्र*) **be 'down on one's 'luck** (*अनौप*) दुर्भाग्य असणे, कमनशिबी असणे. **be in/out of 'luck** (*अनौप*) नशीबवान/कमनशिबी असणे. **lucky** *वि* **(-ier, -iest)** नशीबवान, भाग्यवान. **luckily** *क्रिवि* योगायोगाने; नशीबाने, भाग्यामुळे.

lucrative /'लूक्रटिव्ह्/ *वि* फायदेशीर, किफायतशीर.

ludicrous /'लूडिक्रस्/ *वि* हास्यास्पद; अतिशय मूर्खपणाचा. **ludicrously** हास्यास्पद रीतीने; वेड्यासारखे, मूर्खासारखे.

lug /लेग्/ *क्रि* **(-gg-)** [*सक*] जोराने ओढत नेणे, खेचणे, फरफटत नेणे.

luggage /'लेगिज्/ *ना* [*अगण*] प्रवासाचे सामान, बोजा.

lukewarm /,लूक्'वॉऽम्/ *वि* १ (द्रवाबाबत) कोमट, काटामोड झालेला. २ (*ला*) फारसा उत्साही नसलेला, अनास्थेचा, उदासीन.

lull /लेल्/ *क्रि* [*सक*] शांत करणे : ~ *a baby to sleep, मुलाला जोजो करून निजवणे.* **lull** *ना* [*गण,* बहुधा *अे.व*] निवान्तपणा, शांतता.

lullaby /'लेलबाइ/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) लहान मुलाला झोपवण्याकरता म्हणायचं गाणं, अंगाईगीत, पाळणा.

lumbago /लम्'बेइगउ/ *ना* [*अगण*] कमरेतील उसण किंवा शिवक, पाठनळ.

lumber^{1} /'लम्ब(र्)/ *ना* [*अगण*] १ (विशेषतः *ब्रि*) नको असलेले जुने फर्निचर, अडगळ. २ (खास करून *अमे*) = TIMBER १. **lumber** *क्रि* [*सक*] (*with*)// (*अनौप*) नको असलेले दुसऱ्याला देणे, गळ्यात घालणे, माथी मारणे : *They've ~ed me with the washing-up again, धुण्याचं काम पुन्हा त्यांनी माझ्या गळ्यात घातलंय्.* **'lumberjack** *ना* [*गण*] झाडे तोडून लाकूड करण्याचे काम करणारा माणूस, लाकूडतोड्या, रानतोड्या.

lumber^{2} /'लम्ब(र्)/ *क्रि* [*अक*] रडतखडत चालणे, पाय ओढत चालणे.

luminous /'लूमिनस्/ *वि* चमकणारा, दैदीप्यमान, तेजस्वी; अंधारात लकाकणारा.

lump^{1} /लेम्प्/ *ना* [*गण*] १ गोळा, गड्डा, पिंड, गठळी : *a ~ of coal, कोळशाचा मोठा तुकडा.* २ गाठ, टेंगूळ. ३ (*वाक्प्र*) **have a lump in one's throat** भावनावेगाने घशात आवंढा येणे. **lump** *क्रि* [*सक*] (*together*)// (वेगळ्या गोष्टी किंवा वेगळी माणसं) एकाच पद्धतीने हाताळणे. **'lump-sum** *ना* [*गण*] छोट्या हप्त्यात न देता एकगठ्ठा दिलेली मोठी रक्कम, एकगठ्ठा दिलेले पैसे. **lumpy** *वि* **(-ier, -iest)** गाठीगाठीचा, गुठळ्यांचा.

lump^{2} /लेम्प्/ *क्रि* (*वाक्प्र*) **'lump it** (*अनौप*) नको असलेले किंवा नावडते काहीतरी स्वीकारावे लागणे, घ्यायला लागणे.

lunacy /'लूनसि/ *ना* [*अगण*] वेड.

lunar /'लून(र्)/ *वि* चन्द्राचा, चान्द्र.

lunatic /'लूनटिक्/ *ना* [*गण*] १ (*अनौप*) वेडा, वेडपट माणूस. २ (*जुना, अप्रचलित*) डोके फिरलेला माणूस, वेड लागलेला माणूस. **lunatic** *वि* (*अनौप*) वेडा. **'lunatic asylum** *ना*

[*गण*] (*जुना, अप्रचलित*) वेड्याचे इस्पितळ.

lunch /लैन्च्/ *ना* [*गण, अगण*] मध्यान्हीचे जेवण, दुपारचे भोजन. **lunch** *क्रि* [*अक*] (*औप*) जेवणे.

luncheon /'लैन्चन्/ *ना* [*गण, अगण*] (*औप*) = LUNCH.

lung /लैङ्/ *ना* [*गण*] छातीतल्या श्वसन करणाऱ्या दोन इंद्रियांपैकी कोणतेही एक, फफ्फुस.

lunge /लैन्ज्/ *ना* [*गण*], *क्रि* [*अक*] अचानक पुढे चाल (करणे), घुसणे, मुसंडी (मारणे), एकदम धक्का मारणे.

lurch /लऽच्/ *ना* [*गण, बहुधा अे.व*] एका बाजूला एकदम कलणे, झोकांडी. **lurch** *क्रि* [*अक*] झोकांड्या देत जाणे, लवंडणे.

lure /लुअ(र्)/ *ना* [*गण, बहुधा अे.व*] आकर्षण, मोह, लालूच : *the ~ of adventure, शौर्याचा मोह.* **lure** *क्रि* [*सक*] आकर्षित करणे; भुलवणे, मोह पाडणे, लालूच दाखवणे : *~ sb into a trap, मोहपाशात अडकवणे.*

lurid /'लुअरिड्/ *वि* १ भडक रंगाचा, झगझगीत. २ (*ला*) सुन्न करणारा, दिङ्मूढ करणारा : *~ details of the murder, खुनाचे थक्क करणारे तपशील.*

lurk /लऽक्/ *क्रि* [*अक*] हल्ला करण्यासाठी दडून बसणे, लपून बसणे.

luscious /'लैशस्/ *वि* गोड, रुचकर, मिठास.

lush /लैश्/ *वि* (झाडे, झुडपे वगैरेबाबत) कसदार, घनदाट, पोसलेली, फोफावलेली.

lust /लैस्ट्/ *ना* [*गण*] १ तीव्र कामवासना, कामतृष्णा. २ (*for*)// अभिलाषा, हाव. **lust** *क्रि* [*अक*] *after/for*// अभिलाषा धरणे, हाव सुटणे; कामेच्छा होणे, पापवासना धरणे. **lustful** *वि* कामासक्त, खाजाळू.

lustre (*अमे* **luster**) /'लस्ट(र्)/ *ना* [*अगण*] १ चकाकी, कान्ती. २ (*ला*) कीर्ती, लौकिक.

lusty /'लैस्टि/ *वि* धट्टाकट्टा, जोमदार, दांडगा.

luxuriant /लैग्'झुअरिअन्ट्/ *वि* भरभर/जोमाने वाढणारा, उफाड्याचा. **luxuriance** /-अन्स्/ *ना* [*अगण*] उफाड्याची वाढ, जोमदार वाढ. **luxuriantly** *क्रिवि* उफाड्याने, जोमाने.

luxurious /लैग्'झुअरिअस्/ *वि* ऐषारामी, विलासी, चैनीचा. **luxuriously** *क्रिवि* ऐषारामात, चैनीत.

luxury /'लैक्शरि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] विलास, चैन, ऐषाराम : *a life of ~, विलासी जीवन.* २ चैनीची वस्तू.

lying ⇨ LIE^{1}, २.

lynch /लिन्च्/ *क्रि* [*सक*] कायदेशीर चौकशी न करता एखाद्याला फाशी देणे, जुलूम जबरदस्तीने फासावर लटकावणे.

lyric /'लिरिक्/ *वि* (काव्याबाबत) भावपूर्ण. **lyric** *ना* १ भावकविता, भावगीत. २ **lyrics** [*ब.व*] भावगीताचे शब्द, बोल. **lyrical** /-कल्/ *वि* १ = LYRIC. २ उत्साही. **lyrically** /-कलि/ *क्रिवि* उत्साहाने.

M m

M, m /अेम्/ *ना* [*गण*] (*ब.व* **M's, m's** /अेम्झ्/) १ इंग्रजी वर्णमालेतील तेरावे अक्षर. २ १००० या अंकासाठी रोमन अंक. ३ मोटाररस्ता : *take the M1 to London, लंडनला जाण्यासाठी M१ घेणे.*

m *संरू* १ metre(s), मीटर्स. २ mile(s), मैल. ३ million, दशलक्ष.

ma /मा/ *ना* [*गण*] (*अनौप*) आई.

ma'am /मॅम् किंवा क्वचित् माम्/ *ना* [*अे.व*] (सभ्यपणे उल्लेख करताना वापर) madam, बाईसाहेब.

mac /मॅक्/ *ना* [*गण*] (*ब्रि अनौप*) mackintosh चा संक्षेप.

macabre /म'काब्र/ *वि* मृत्यूशी संबंधित आणि म्हणून भयंकर, भेसूर.

macaroni /,मॅक'रउनि/ *ना* [*अगण*] नळीच्या शेवयांसारखे उकडून खाण्याचे पीठ, अंडी वगैरे पासून केलेले एक अन्न.

mace^{1} /मेइस्/ *ना* [*गण*] अधिकार दंड.

mace^{2} /मेइस्/ *ना* [*अगण*] जायफळाच्या वाळवलेल्या सालीपासून केलेला मसाला, जायपत्री.

Mach /माक्, मॅक्/ *ना* [*अगण*] ध्वनि-

लहरीच्या वेगाशी असलेले विमानाच्या वेगाचे प्रमाण, वेग मोजण्याचे एकक : *M~ 2, मॅक २* म्हणजे ध्वनिलहरीच्या वेगाची दुप्पट.

machete /म'चेइटि, -'शेटि/ *ना* [*गण*] रुंद, जड सुरा.

machine /म'शीन्/ *ना* [*गण*] १ शक्तीचा उपयोग करून एखादे काम करणारे यंत्र. २ एखादी संस्था नियंत्रित करणारी माणसांची यंत्रणा : *the party ~, पक्षयंत्रणा.* **machine** *क्रि* [*सक*] यंत्राने करणे. **ma'chine-gun** *ना* [*गण*] चाप ओढताच गोळ्यांच्या सतत फैरी झाडणारी बंदूक, यांत्रिक तोफ. **ma,chine-'readable** *वि* (माहितीबाबत) संगणकाला समजेल अशा स्वरूपात. **machinery** *ना* [*अगण*] १ यंत्रे. २ यंत्रसामग्री, कळसूत्रे. ३ यंत्रणा : *the ~ of government, शासनयंत्रणा.* **ma'chine tool** *ना* [*गण*] यंत्रहत्यारं. **machinist** *ना* [*गण*] यंत्रचालक, यंत्रकारागीर.

macho /'मॅचउ/ *वि* (*अनौप* खास करून *अधिक्षेपी*) (माणूस किंवा त्याच्या वर्तनाबाबत) पुरुषी ताकद, अहंकार वगैरेमधे रस असणारा, नरश्रेष्ठत्व मानणारा.

mackerel /'मॅक्रल्/ *ना* [*गण*] (*ब.व* **mackerel**) अंगावर पट्टे असलेला समुद्रातील खायचा मासा, बांगडा.

mackintosh /'मॅकिन्टॉश्/ *ना* [*गण*] (*ब्रि*) रेनकोट, मेणकापडाचा पावसाळी कोट.

mad /मॅड्/ *वि* (**~der, ~dest**) १ मनोरुग्ण, वेडा. २ (*अनौप*) अतिशय मूर्ख; वेडपट, बिनडोक. ३ *about*// एखाद्या गोष्टीचे वेड लागलेला, अतिउत्साही : *He's ~ about football, त्याला फुटबॉलचे वेड आहे.* ४ *(at)*// (*अनौप*) एखाद्यावर रागावलेला : *You're driving me ~! तू माझं डोकं फिरवतोयस्!* ५ (*अनौप*) उत्तेजित, उत्कंठित : *in a ~ rush, वेड्यासारखी धावपळ.* ६ (*वाक्प्र*) **like 'mad** (*अनौप*) खूप, भरभर, वगैरे. **mad 'keen (on sb/sth)** (*अनौप*) एखाद्या गोष्टीचा फार उत्साह असणारा. **madly** *क्रिवि* १ वेड्यासारखा : *rush about ~ly, वेड्यासारखी धावपळ करणे.* २ (*अनौप*) फार, अतोनात : *~ly in love, आत्यन्तिक प्रेमात.* **'madman, 'madwoman** *ना* [*गण*] वेडा माणूस, वेडी बाई. **madness** *ना* [*अगण*] वेडेपणा, वेड; मूर्खपणा.

madam /'मॅडम्/ *ना* **Madam** [*अे.व*] (*औप*) (स्त्रीशी बोलताना वापरायचा शिष्ट शब्द) बाईसाहेब.

madden /'मॅड्न्/ *क्रि* [*सक*] एखाद्याचा राग वाढवणे, त्याला संताप आणणे.

made MAKE^{1} चा *भूत, भूत वि.*

Madonna /म'डॉन/ *ना* १ **the Madonna** [*अे.व*] मेरी, ख्रिस्ताची आई. २ **madonna** [*गण*] मेरीचे चित्र किंवा तिचा पुतळा.

madrigal /'मॅड्रिगल्/ *ना* [*गण*] कोणतेही वाद्य न वापरता म्हणायचे समूहगान.

maestro /'माइस्ट्रउ/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s** किंवा **-stri** /स्ट्रि/) मोठा संगीतकार किंवा संगीताचा गुरू.

magazine /,मॅग'झीन्; *अमे* 'मॅगझीन्/ *ना* [*गण*] १ साप्ताहिक किंवा मासिक. २ बंदुकीतली गोळ्या भरायची जागा.

magenta /म'जेन्ट/ *वि, ना* [*अगण*] गडद जांभळसर लाल (रंग), अमसुली (रंग).

maggot /'मॅगट्/ *ना* [*गण*] कीटक किंवा माश्यांची पिलावळ, अळी, कृमी, कीट, अपाद डिंबक.

magic /'मॅजिक्/ *ना* [*अगण*] १ अलौकिक शक्तीचा उपयोग करून घटना किंवा वस्तू नियंत्रित करण्याची किंवा बदलण्याची कला, चेटुक, जादूटोणा. २ जादू. ३ (*ला*) गूढ मोहिनी : *the ~ of the circus, सर्कसची जादूई मोहिनी.* **magic** *वि* १ जादूटोण्याचा, जादूचा. २ (*व्रात्य*) आश्चर्यकारक, चमत्कृतिजन्य. **magical** /-कल्/ *वि* गूढरम्य. **magically** /-कलि/ *क्रिवि* गूढपणे, जादूने. **magician** /म'जिश्न्/ *ना* [*गण*] जादूगार, जादूचे प्रयोग करणारा.

magistrate /'मॅजिस्ट्रेइट्/ *ना* [*गण*] कनिष्ठ कोर्टातील न्यायाधीश म्हणून काम करणारा अधिकारी, दंडाधिकारी.

magnanimous /मॅग्'नॅनिमस्/ *वि* (*औप*) उदार, दिलदार, मोठ्या मनाचा. **magnanimity** /,मॅग्न'निमटि/ *ना* [*अगण*] उदारता,

मोठे मन. **magnanimously** *क्रिवि* मनाच्या मोठेपणाने, उदारतेने.

magnate /'मॅग्नेइट्/ *ना* [*गण*] उद्योगधंद्यातील बडी असामी, बडा उद्योगपती.

magnesium /मॅग्'नीझिअम्; *अमे* मॅग्'नीझम्/ *ना* [*अगण*] रूपेरी रंगाचा धातू, धौत.

magnet /'मॅग्निट्/ *ना* [*गण*] १ लोखंड किंवा पोलादाचा इतर धातूच्या वस्तूंना आकर्षित करणारा तुकडा, लोहचुंबक, लोहाकर्षक, कर्षुक. २ (*ला*) प्रचंड प्रभाव असणारी व्यक्ती. **magnetic** /मॅग्'नेटिक्/ *वि* १ चुंबकीय, कर्षुकीय. २ (*ला*) आकर्षित करणारा, प्रभावी. **magnetically** /-क्लि/ *क्रिवि* चुंबकीय रीतीने; आकर्षकपणे. **magnetic 'north** *ना* [*अगण*] होकायंत्राने दाखवलेली दिशा, चुंबकीय उत्तर दिशा. **magnetic 'tape** *ना* [*अगण, गण*] ध्वनिफीत किंवा चित्रफीत, आवाज किंवा चित्र मुद्रित करण्याची चुंबकीय पट्टी. **magnetism** /'मॅग्निटिझ्म/ *ना* १ कर्षुकत्व; चुंबकत्व. २ (*ला*) व्यक्तिमत्वाचा आकर्षक भाग. **magnetize** *क्रि* [*सक*] चुंबकीकरण करणे, चुंबकीय शक्ती आणणे.

magnificent /मॅग्'निफिस्न्ट्/ *वि* अत्युत्तम, अतिशय सुंदर, भव्य, दिमाखदार. **magnificence** /-स्न्स्/ *ना* [*अगण*] सौंदर्य; दिमाखदारपणा, भव्यता. **magnificently** *क्रिवि* फार चांगल्या पद्धतीने, सुंदर; भव्यपणे, थाटामाटाने.

magnify /'मॅग्निफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* -ied) [*सक*] १ (आकाराने) मोठे दिसेल असे करणे. २ (*औप*) फुगवून सांगणे, वाढवून सांगणे : ~ *the dangers, धोक्यांचा बाऊ करणे.* **magnification** /,मॅग्निफि'केइश्न्/ *ना* [*अगण*] मोठे करण्याची शक्ती किंवा कृती, वर्धन. **'magnifying glass** *ना* [*गण*] वस्तू मोठ्या करून पाहण्याचे भिंग.

magnitude /'मॅग्निट्यूड्; *अमे* -टूड्/ *ना* [*अगण*] १ (*औप*) आकार, परिमिती, मान. २ महत्त्व (किंवा त्याचे प्रमाण).

magpie /'मॅग्पाइ/ *ना* [*गण*] चकचकीत वस्तू गोळा करणारा आणि खूप आवाज करणारा कावळ्याच्या जातीचा एक काळा-पांढरा पक्षी.

mahogany /म'हॉगनि/ *ना* [*अगण*] फर्निचरसाठी वापरायचे एक गडद तपकिरी लाकूड.

maid /मेइड्/ *ना* [*गण*] मोलकरीण, कामवाली.

maiden /'मेइड्न्/ *ना* [*गण*] (*पुरा*) कुमारिका. **maiden** *वि* १ पहिला, प्रथम : *a ship's ~ voyage, जहाजाचा पहिलाच प्रवास.* २ (वयस्कर स्त्रीबाबत) लग्न न झालेली. **'maiden name** *ना* [*गण*] लग्नापूर्वीचे स्त्रीचे आडनाव, माहेरचे आडनाव.

mail /मेइल्/ *ना* [*अगण*] १ पत्रे व पार्सल घेण्याची, नेण्याची आणि पोचवण्याची यंत्रणा, टपाल, पोस्ट. २ पोस्टाने पाठवलेली पत्रे, पार्सल वगैरे, टपाल, डाक. **mail** *क्रि* [*सक*] (विशेषतः *अमे*) पोस्टाने पाठवणे. **'mailbox** *ना* [*गण*] (*अमे*) = LETTER-BOX^2 (LETTER). **'mailman** /-मॅन्/ *ना* [*गण*] (*अमे*) = POSTMAN (POST^1). **'mail order** *ना* [*अगण*] पोस्टाद्वारे माल विकण्याची किंवा विकत घेण्याची पद्धती. **'mailshot** *ना* [*गण*] (क) संभाव्य गिऱ्हाइकांना पोस्टाने पाठवलेली जाहिरात. (ख) पोस्टाने जाहिरात पाठवणे.

maim /मेइम्/ *क्रि* [*सक*] इजा करून निकामी करणे, लुळापांगळा करणे.

main^1 /मेइन्/ *वि* १ सर्वात महत्त्वाचा; प्रमुख, मुख्य : *the ~ purpose of the meeting, बैठकीचा मुख्य उद्देश.* २ (*वाक्प्र*) **in the main** सर्वसाधारणपणे, मुख्यत्वे, एकंदरीत. **'mainframe** *ना* [*गण*] खूप लोक एकाच वेळी वापरू शकतील असा महासंगणक. **'mainland** *ना* [*अे.व*] मुख्य भूप्रदेश – बेटे वगैरे सोडून. **mainly** *क्रिवि* मुख्यत्वे, प्रामुख्याने. **'mainspring** *ना* [*गण*] १ घड्याळातली मुख्य स्प्रिंग. २ (*औप ला*) मुख्य उद्देश, प्रमुख कारण/हेतू. **'mainstay** *ना* [*गण*] प्रमुख आधार, पाया. **'mainstream** *ना* [*अे.व*] एखाद्या विषयावरची सर्वमान्य मते, मुख्य प्रवाह, सर्वसामान्य विचारधारा.

main^2 /मेइन्/ *ना* १ [*गण*] पाणी किंवा गॅस पुरवणारी मुख्य नलिका किंवा मुख्य **विद्युत्वाहक** तार. २ **the mains** इमारतीला

पाणी, गॅस किंवा वीज पुरवण्याचा प्रमुख मार्ग.

maintain /मेइन्'टेइन्/ *क्रि* [*सक*] १ चालू ठेवणे; जिवंत किंवा अस्तित्वात ठेवणे, टिकवून धरणे, राखणे : ~ *peaceful relations, सलोख्याचे संबंध ठेवणे.* २ (एखाद्याचा) खर्च/निर्वाह चालवणे, (एखाद्याला) सांभाळणे, पोसणे. ३ सुस्थितीत ठेवणे : ~ *a car, गाडी सुस्थितीत ठेवणे.* ४ ठामपणे सांगणे : ~ *one's innocence, आपण निरपराध आहोत असे ठामपणे सांगणे.* **maintenance** /'मेइन्टनन्स्/ *ना* [*अगण*] १ राखणे; सांभाळ, पालन; परवरिश. २ (*ब्रि*) पोटगी.

maisonette /,मेइझ़'नेट्/ *ना* [*गण*] मोठ्या इमारतीमधील दुमजली फ्लॅट.

maize /मेइझ़्/ *ना* [*अगण*] मका.

majesty /'मॅजस्टि/ *ना* (*ब.व* -ies) १ **Majesty** [*गण*] (राजा किंवा राणी यांच्याशी किंवा यांच्याविषयी बोलताना वापर) महाराज, राणीसाहेब : *Good morning, Your M~, प्रणाम राणीसरकार/नमस्कार महाराज* ○ *His M~, राजेसाहेब.* २ [*अगण*] वैभव; प्रतिष्ठा. **majestic** /म'जेस्टिक्/ *वि* वैभवसंपन्न, ऐश्वर्यपूर्ण, दिमाखदार, तेजोमय. **majestically** /-क्लि/ *क्रिवि* दिमाखाने.

major^{1} /'मेइज(र्)/ *वि* (अधिक) महत्त्वाचा, मोठा, मुख्य : *a ~ road, मुख्य रस्ता.* **major** *क्रि* [*अक*] *in*// महाविद्यालय किंवा विद्यापीठ यामधे मुख्य विषय घेणे : ~ *in French, फ्रेंच (मुख्य) घेणे.*

major^{2} /'मेइज(र्)/ *ना* [*गण*] कॅप्टन आणि कर्नल यांच्या मधल्या श्रेणीचा सेनाधिकारी.

majority /म'जॉरटि; *अमे* -'जॉऽर्/ *ना* (*ब.व* -ies) १ [*अे.व*] (अे.व किंवा ब.व क्रियापदासह) मोठी संख्या; बहुसंख्य, जास्तीत जास्त, सर्वाधिक. २ [*गण*] एका बाजूला दुसरीपेक्षा जास्त असणारी मतांची संख्या, आधिक्य – मताधिक्य : *win by a ~ of 9 votes, नऊ मतांच्या आधिक्याने जिंकणे.* ३ [*अे.व*] कायदेशीर सज्ञानावस्था, प्राप्तवयता.

make^{1} /मेइक्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **made** /मेइड्/) १ [*सक*] बांधणे, उत्पन्न करणे किंवा तयार करणे, अस्तित्वात आणणे, करणे : ~ *bread, पाव तयार करणे* ○ ~ *a lot of noise, गोंगाट करणे.* २ [*सक*] करणे, निर्माण करणे : ~ *trouble, गडबड किंवा उपद्रव करणे.* ३ [*सक*] बनवणे, करणे : *The news made her happy, त्या बातमीने तिला आनंदित केले म्हणजेच तिला आनंद झाला.* ४ [*सक*] (क) एखादी गोष्ट घडवणे, करणे : *Can you ~ this door shut? तू हे दार बंद करू शकशील का?* (ख) एखाद्याला एखादी गोष्ट करायला लावणे : ~ *sb jump, एखाद्याला उडी मारायला लावणे.* ५ [*सक*] निवडणे; नेमणे : *They made me the manager, त्यांनी माझी मॅनेजर म्हणून नेमणूक केली.* ६ [*सक*] होणे, आहे असे सिद्ध करणे किंवा दाखवणे : *She will ~ a brilliant doctor, ती एक निष्णात डॉक्टर होईल.* ७ [*सक*] मिळवणे; संपादन करणे : ~ *a profit, फायदा मिळवणे/काढणे.* ८ [*सक*] दाखवणे, मोजणे : *What do you ~ the time? तुझ्या घड्याळात किती वाजले?* ९ [*सक*] मिळून होणे; बरोबर होणे : *Two and two ~ four, दोन अधिक दोन चार होतात.* १० [*सक*] (जागी किंवा वेगाने) पोहोचणे : ~ *the station on time, स्टेशनवर वेळेवर पोहोचणे.* ११ [*अक*] एखादी गोष्ट जवळजवळ करणे : *She made (as if) to hit him, तिने जवळजवळ त्याला मारलेच.* १२ (*वाक्प्र*) **make (sth) 'do, make do with sth** कसेबसे भागवणे, निभावून नेणे. **'make ,it** (*अनौप*) यशस्वी होणे; उद्दिष्ट गाठणे. **make up ground** ➪ GROUND^{1}. १३ (*क्रिब*) **make after sb/sth** एखाद्याचा पाठलाग करणे, पाठीस लागणे. **make for sb/sth** (क) एखाद्याच्या दिशेने जाणे. (ख) घडवणे : *Does exercise ~ for good health? व्यायामाने तब्बेत सुधारते?* **make A into B** अ बमधे बदलणे : ~ *water into wine, पाण्याचा दारूत बदल करणे.* **make sth of sb/sth** समजणे : *What do you ~ of this sentence? तुला या वाक्यातले/वाक्यातून काय कळते?* **make 'off** (*अनौप*) निसटण्यासाठी घाईने जाणे. **make off with sth** एखादी गोष्ट चोरून/घेऊन पळणे, एखादी गोष्ट उडवणे. **make 'out** (*अनौप*) चालणे, सांभाळणे : *How are you ~ing out in your new job? नव्या नोकरीत तुझं कसं काय चाललंय्?* **make sth out** (क) लिहून देणे :

~ out a cheque, चेक लिहून देणे. (**ख**) वाचता येणे किंवा बघता येणे, लागणे : *I can't ~ out his writing, मला त्याचे अक्षर लागत नाही.* **make sb/sth out** (नकारार्थी आणि प्रश्नार्थक वाक्यात) समजणे : *I just can't ~ her out, मी तिला समजूच शकत नाही.* **make out that, make oneself/sb/sth out to be** दावा करणे, समज असणे : *He ~s himself out to be cleverer than he is, आहे त्यापेक्षा आपण जास्त हुशार आहोत असा त्याचा समज आहे.* **make (sb/oneself) up** चेहेरा रंगवणे, नट्टापट्टा करणे. **make sth up** (**क**) पूर्ण करणे : *We need £5 to ~ up the sum, रक्कम पूर्ण करायला आम्हाला अजून ५ पौंड हवेत.* (**ख**) फसवण्यासाठी तयार करणे, बनवणे, रचणे : *a made-up story, रचलेली गोष्ट.* (**ग**) तयार करणे/होणे, बनणे : *Bodies are made up of cells, शरीर पेशींचे बनलेले असते.* (**घ**) कपडे शिवणे/करणे. (**च**) (निजण्यासाठी गादी) घालणे, (बिछाना) टाकणे/तयार करणे. **make up (for sth)** भरपाई करणे. **make up to sb** काही मिळवण्यासाठी एखाद्याशी गोडीगुलाबीने वागणे, मतलबाने चांगले वागणे. **make it up to sb** एखाद्याचे नुकसान वगैरे भरून देणे, त्याची भरपाई करणे. **make (it) 'up (with sb)** वाद संपुष्टात आणणे, तंटा मिटवणे, गोडी करणे. **make-believe** *ना* [*अगण*] काल्पनिक, खोटेखोटे : *a world of make-believe, काल्पनिक जग.* **make-up** *ना* १ [*अगण*] सौंदर्यप्रसाधने. २ [*अे.व*] (**क**) व्यक्तिमत्व, स्वभाव : *There is no jealousy in his ~-up, त्याच्या स्वभावात मत्सरीपणा नाही.* (**ख**) घटक : *the ~-up of the new committee, नवीन समितीचे घटक.*

make^{2} /मेइक्/ *ना* [*गण*] १ उत्पादनप्रकाराचे नाव, घडण, बनावट, बांधा : *a ~ of car, मोटारीची बनावट.* २ (*वाक्प्र*) **on the 'make** (*अनौप*) हव्या त्या मार्गाने/येनकेन प्रकारेण हवे ते मिळवणारा, स्वतःची पोतडी भरणारा.

maker /'मेइक(र्)/ *ना* १ [*गण*] करणारा, निर्माता : *a film-~, चित्रपट-निर्माता.* २ **the/our Maker** [*अे.व*] परमेश्वर, विश्वनिर्माता, विधाता.

makeshift /'मेइक्शिफ्ट्/ *वि* तात्पुरता, सध्यापुरते काम भागवणारा.

making /'मेइकिङ्/ *ना* (*वाक्प्र*) **be the making of sb** एखाद्याच्या यशाला किंवा विकासाला कारण होणे. **have the makings of sth** एखादी गोष्ट होण्याचे गुण असणे.

maladjusted /,मॅल'जॅस्टिड्/ *वि* इतरांशी जुळवून न घेता येणारा, इतरांशी नीट वागता न येणारा, दुःसमायोजित. **maladjustment** /-मन्ट्/ *ना* [*अगण*] दुःसमायोजन.

malaria /म'लेअरिअ/ *ना* [*अगण*] हिवताप, थंडीताप.

male /मेइल्/ *वि* १ पुरुष जातीचा, पुंजातीय, नर-. २ (वनस्पतीबाबत) पुंकेसरयुक्त फुले येणारी, पुं-पुष्प. ३ (साधनाच्या भागाबाबत) बाहेर येऊन भोकामधे घालता येण्याजोगा. **male** *ना* [*गण*] पुरुष, नर. **male 'chauvinist** *ना* [*गण*] (*अधिक्षेपी*) पुरुषश्रेष्ठत्व मानणारा, पुरुषी अहंकारयुक्त.

malevolent /म'लेव्हलन्ट्/ *वि* (*औप*) अनिष्टचिंतक, दुष्टभावाचा, दुष्टात्मा. **malevolence** /-लन्स्/ *ना* [*अगण*] दुष्टभाव, दुष्टावा. **malevolently** *क्रिवि* दुष्टभावाने.

malformation /,मॅल्फॉऽ'मेइश्न्/ *ना* [*अगण, गण*] शरीराच्या भागाची सदोष घडण, बेढबपणा, कुरचना. **malformed** /-'फॉऽम्ड्/ *वि* बेढब, सदोष घडणीचा.

malfunction /,मॅल्'फङ्क्·श्न्/ *क्रि* [*अक*] (*औप*) (यंत्राबाबत) नीट न चालणे. **malfunction** *ना* [*गण, अगण*] सदोष कार्य.

malice /'मॅलिस्/ *ना* [*अगण*] द्वेषभाव, परपीडा बुद्धी, विद्वेष. **malicious** /म'लिशस्/ *वि* विद्वेषपूर्ण, द्वेषभावनेचा. **maliciously** *क्रिवि* द्वेषभावनेने, वैरबुद्धीने.

malignant /म'लिग्नन्ट्/ *वि* १ परपीडेच्या किंवा द्वेषाच्या भावनेने पछाडलेला, अतिदुष्ट. २ (रोगाबाबत) जिवावरचा, प्राणघातक. **malignantly** *क्रिवि* दुष्टपणे, द्वेषभावनेने.

mall /मॅल्; मॉऽल्/ *ना* [*गण*] (विशेषतः *अमे*) वाहनांना बंदी असणारी दुकानांची गल्ली, बाजार.

malleable /'मॅलिअब्ल्/ *वि* १ (धातूंबाबत) ठोकून किंवा दाबून आकार देण्यासारखा, घनवर्धनीय. २ (*ला*) (एखादा माणूस, त्याचा स्वभाव वगैरेबाबत) परिवर्तनीय, वळवण्यासारखा.

mallet /'मॅलिट्/ *ना* [*गण*] लाकडी हातोडा किंवा मोगरा.

malnutrition /,मॅल्न्यू'ट्रिश्न्; *अमे* -नू-/ *ना* [*अगण*] (बरोबर अन्न) न घेतल्याने निर्माण झालेली अवस्था, कुपोषण.

malt /मॉऽल्ट्/ *ना* [*अगण*] बियर, व्हिस्की वगैरे तयार करण्यासाठी वापरायचे धान्य – विशेषतः बार्ली, सातूचे उंबले.

maltreat /,मॅल्'ट्रीट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) वाईट वागवणे, छळणे. **maltreatment** *ना* [*अगण*] छळ, वाईट वागणूक.

mamba /'मॅम्ब/ *ना* [*गण*] हिरव्या किंवा काळ्या रंगाचा विषारी साप.

mamma /'माम/ *ना* [*गण*] (*अमे अनौप*) आई.

mammal /'मॅम्ल्/ *ना* [*गण*] ज्याची मादी आपल्या पिलाला अंगावरचे दूध पाजते असा कोणत्याही जातीचा प्राणी, सस्तन प्राणी.

mammoth /'मॅमथ्/ *ना* [*गण*] हत्तीसारखा प्रचंड, केसाळ पण आता अस्तंगत झालेला प्राणी. **mammoth** *वि* (*अनौप*) प्रचंड, विराट.

man^{1} /मॅन्/ *ना* (*ब.व* **men** /मेन्/) १ [*गण*] पुरुषमाणूस, गडी. २ [*गण*] माणूस, मनुष्य : *All men must die, माणसाला मरण अटळ आहे.* ३ [*अगण*] मानवी जमात, मानववंश : *the origins of ~, मानवाचा उगम.* ४ [*गण, बहुधा ब.व*] हाताखालचा माणूस : *officers and men, अधिकारी आणि हाताखालची माणसं.* ५ [*गण*] नवरा, जार, वगैरे : *~ and wife, नवरा आणि बायको.* ६ [*गण*] ताकद, धैर्य वगैरे पुरुषी गुण असलेला माणूस, मर्द : *Don't give up -- be a ~! निराश होऊ नकोस किंवा माघार घेऊ नकोस – मर्दासारखा वाग!* ७ [*गण*] बुद्धिबळातील वगैरे सोंगटी, मोहरा. ८ (*वाक्प्र*) **be one's own 'man** स्वतःचे निर्णय स्वतः घेणे, स्वतःचा धनी असणे. **the ,man in the 'street** सामान्य माणूस. **,man to 'man** स्पष्टपणे, तोंडावर; आडपडदा न ठेवता, मोकळेपणाने. **to a 'man** सर्व, निरपवादपणे. **'manhole** *ना* [*गण*] सांडपाण्याच्या भुयारी मार्गात उतरण्यासाठीचे रस्त्यावरील मोठे विवर, गटाराचे तोंड, तपासकुंडी. **manhood** *ना* [*अगण*] पौरुष, मर्दानीपणा. **,man-'made** *वि* मानवनिर्मित; कृत्रिम. **'manpower** *ना* [*अगण*] कामासाठी उपलब्ध असलेले मनुष्यबळ. **'manslaughter** *ना* [*अगण*] निष्कारण मानवहत्या करण्याचा गुन्हा, मनुष्यवध.

man^{2} /मॅन्/ *क्रि* (**-nn-**) [*सक*] कामासाठी किंवा सेवेसाठी माणसे पुरवणे : *~ a boat, बोटीवर माणसांची भरती करणे.*

manacle /'मॅनकल्/ *ना* [*गण, बहुधा ब.व*] कैद्याच्या हातापायाला बांधायची साखळी, बेडी. **manacle** *क्रि* [*सक*] हातकड्या घालणे, बेड्या घालणे, बेड्या ठोकणे.

manage /'मॅनिज्/ *क्रि* १ [*सक*] देखरेखीसाठी असणे; चालवणे किंवा नियंत्रित करणे. २ [*अक, सक*] (क) एखादी गोष्ट करण्यात यशस्वी होणे, शिताफीने करणे : *How did the prisoners ~ to escape? कैदी पळून जाण्यात यशस्वी कसे झाले?* (ख) [*अक*] फार थोड्या पैशात भागवणे : *I can only just ~ on my wages, माझ्या वेतनात मी कसेबसे भागवतो.* **manageable** *वि* आटोक्यातला, हातातला.

management /'मॅनिजमन्ट्/ *ना* १ [*अगण*] एखाद्या उद्योगाचे वगैरे व्यवस्थापन, कारभार : *problems caused by bad ~, वाईट व्यवस्थापनाने निर्माण होणारे प्रश्न.* २ [*गण, तसेच ब.व क्रियापदासह अे.व*] व्यवस्थापनातले लोक, कारभारी, व्यवस्थापन : *workers and ~, कामगार आणि व्यवस्थापन.* ३ [*अगण*] (*औप*) कुशल हाताळणी.

manager /'मॅनिज(र्)/ *ना* [*गण*] कारभारी, व्यवस्थापक. **manageress** /,मॅनिज'रेस्/ *ना* [*गण*] उपहारगृह किंवा दुकानातली व्यवस्था पाहणारी स्त्री, व्यवस्थापिका. **managerial** /,मॅन'जिअरिअल्/ *वि* व्यवस्थापकीय.

mandate /'मॅन्डेइट्/ *ना* [*गण, बहुधा अे.व*] शासन, कामगार संघटना वगैरेना लोकांनी

दिलेली सत्ता, जनतादेश, जनादेश. **mandatory** /'मॅन्डटरि; *अमे* -टॉऽरि/ *वि* (*औप*) कायद्याने बंधनकारक, अनिवार्य.

mandolin /'मॅन्डलिन, ,मॅन्ड'लिन/ *ना* [*गण*] आठ तारांचे एक तंतुवाद्य.

mane /मेइन्/ *ना* [*गण*] घोड्याची किंवा सिंहाची आयाळ.

maneuver = MANOEUVRE.

manful /'मॅन्फ़ुल्/ *वि* शूर मर्दानी; दृढनिश्चयी. **manfully** *क्रिवि* शूरपणे; निश्चयाने.

manger /'मेइन्ज(र्)/ *ना* [*गण*] घोडे किंवा गुरांना दाणापाणी देण्याची मोठी पेटी, कोठिंबा, दोण, गव्हाण.

mangle /'मॅङ्‌ग्ल्/ *क्रि* [*सक*] (बहुधा कर्मणी) छिन्नविच्छिन्न करणे, तुकडे-तुकडे करणे.

mango /'मॅन्गउ/ *ना* [*गण*] (*ब.व* **~es** किंवा **~s**) आंबा, आम्रफल.

mangy /'मेइन्जि/ *वि* (**-ier, -iest**) (आजाराने) केस गळलेला; फाटकातुटका.

manhandle /'मॅन्हॅन्ड्ल्/ *क्रि* [*सक*] १ धक्काबुक्की करणे, ढकलणे. २ वाईट रीतीने वागविणे.

mania /'मेइनिअ/ *ना* १ [*गण, अगण*] (*for*)// एखाद्या गोष्टीचे वेड : *a ~ for motor bikes, मोटरसायकलचे वेड.* २ [*अगण*] मानसिक आजार, वेड. **maniac** /-निॲक्/ *ना* [*गण*] १ वेडा, माथेफिरू. २ अति उत्साही. **maniacal** /म'नाइअक्ल्/ *वि* वेड्यासारखा.

manicure /'मॅनिक्युअ(र्)/ *ना* [*गण, अगण*] हाताच्या त्वचेची आणि नखांची घेतलेली काळजी, हस्तचिकित्सा. **manicure** *क्रि* [*सक*] हाताच्या त्वचेची, नखांची काळजी घेणे. **manicurist** *ना* [*गण*] हस्तचिकित्सक.

manifest /'मॅनिफेस्ट्/ *वि* (*औप*) स्पष्ट, उघड. **manifest** *क्रि* [*सक*] (*औप*) स्पष्ट दाखवणे/दिसणे/होणे : *The disease ~ed itself, रोग प्रकट झाला म्हणजे रोग दिसू लागला.* **manifestation** /,मॅनिफे'स्टेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] प्रकटीकरण, आविष्करण. **manifestly** *क्रिवि* उघडपणे.

manifesto /,मॅनि'फेस्टउ/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s** किंवा **~es**) राजकीय पक्षाचा जाहीरनामा.

manifold /'मॅनिफउल्ड्/ *वि* (*औप*) विविध प्रकारचा, अनेकविध प्रकारचा. **manifold** *ना* [*गण*] इतर भागांना जोडलेली अनेक तोंडे असलेली नळी.

manipulate /म'निप्युलेइट्/ *क्रि* [*सक*] १ कुशलतेने हाताळणे. २ लबाडीने फेरफार करणे, स्वतःच्या फायद्यासाठी घडवून आणणे, चलाखी करणे. **manipulation** /म,निप्यु'लेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] हस्तकौशल्य; चलाखी. **manipulative** /-लटिव्ह्; *अमे* -लेइटिव्ह्/ *वि* हाताचे कौशल्य असणारा, चलाखी करून हवे तसे घडवून आणणारा.

mankind /,मॅन्'काइन्ड्/ *ना* [*अगण*] मानवजाती.

manly /'मॅन्लि/ *वि* (**-ier, -iest**) (*पसंतीदर्शक*) (माणसाबाबत) पौरुषयुक्त, मर्दानी. **manliness** *ना* [*अगण*] पौरुष, मर्दपणा.

manner /'मॅन(र्)/ *ना* १ [*अे.व*] (*औप*) रीत, मार्ग : *in a friendly ~, मैत्रीपूर्ण रीतीने.* २ [*अे.व*] एखाद्याची चालरीत, इतरांशी वागण्याची पद्धत : *I don't like your ~, मला तुझी वागणूक पसंत नाही.* ३ **manners** [*ब.व*] (सभ्य) रीतभात, चालीरीती, शिष्टाचार : *good ~s, चांगल्या चालीरीती.* ४ (*वाक्प्र*) **all manner of sb/sth** (*औप*) विविध किंवा वेगवेगळ्या प्रकारचा. **in a manner of speaking** काही अंशाने, काही एक मर्यादेपर्यंत, थोडेसे. **-mannered** (सामासिक विशेषणांत) चालीचा : *,well-'~ed, चांगल्या चालीचा/रीतीभातीचा.*

mannerism /'मॅनरिझ़म्/ *ना* [*गण*] वागण्याची किंवा बोलण्याची विशिष्ट लकब, विचित्र सवय.

manoeuvre (*अमे* **maneuver**) /म'नूव्ह(र्)/ *ना* १ [*गण*] (**क**) कौशल्यपूर्ण हालचाल. (**ख**) (*ला*) स्वतःचा हेतू साध्य करण्याची चतुर योजना, डावपेच, खेळी. २ **manoeuvres** [*ब.व*] कवाईत, लष्करी हालचाली, संचलन. **manoeuvrable** (*अमे* **maneuverable**) *वि* सहज हालवता

येण्यासारखा. **manoeuvre** (*अमे* **maneuver**) *क्रि* १ [*अक, सक*] हालवणे, कौशल्याने वळवणे. २ [*सक*] कुशलतेने मार्ग दाखवणे.

manor (तसेच **manor house**) /'मॅन(र्)/ *ना* [*गण*] जहागिरदाराचा वाडा, खेडेगावातील भोवती मोठा जमीनजुमला असणारा वाडा.

mansion /'मॅन्शन्/ *ना* [*गण*] मोठा वाडा, हवेली.

mantelpiece /'मॅन्टल्पीस्/ *ना* [*गण*] घरातील शेकोटीजवळची मांडणी, दर्शनी चूलफळी.

mantle /'मॅन्ट्ल्/ *ना* १ [*गण*] (क) बिनबाह्याचा सैल झगा. (ख) (*ला*) आच्छादन, पांघरूण, प्रावरण : *a ~ of snow, हिमाचे पांघरूण, हिमप्रावरण.* २ [*अे.व*] *of//* (*अलं*) महत्त्वाच्या कामाची मोठी जबाबदारी : *take on the ~ of supreme power, सर्वश्रेष्ठ सत्तेची जबाबदारी अंगावर घेणे.*

manual /'मॅन्युअल्/ *वि* हातांनी केलेला किंवा हातांनी नियंत्रित, हाताचा. **manual** *ना* [*गण*] उपयुक्त माहिती आणि सूचना देणारे पुस्तक, हस्तपुस्तक, नियमपुस्तिका. **manually** *क्रिवि* हातांनी.

manufacture /ˌमॅन्यु'फॅक्च(र्)/ *क्रि* [*सक*] यंत्रांच्या साहाय्याने मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणे. **manufacture** *ना* [*अगण*] उत्पादन, निर्मिती. **manufacturer** *ना* [*गण*] उत्पादक.

manure /म'न्युअ(र्)/ *ना* [*अगण*] वनस्पतींच्या वाढीला म्हणून मातीवर पसरलेले जनावरांचे शेण, शेणखत.

manuscript /'मॅन्युस्क्रिप्ट्/ *ना* [*गण*] १ लेखकाची मूळ प्रत, हस्तलिखित. २ जुने हस्तलिखित पुस्तक.

many /'मेनि/ *वि, सना* १ खूप, पुष्कळ : *~ people, खूप लोक* ○ *~ of the students, बरेचसे विद्यार्थी.* २ **many a** (अे.वचनी नामासह वापर) खूप, मोठ्या प्रमाणात : *~ a mother, पुष्कळ आया.* ३ (*वाक्प्र*) **a good/great many** खूप, चिकार. **have had ˌone too 'many** (*अनौप*) थोडासा तर्र झालेला किंवा झिंगलेला.

map /मॅप्/ *ना* [*गण*] १ भूभागाचा कागद वगैरेवर काढलेला नकाशा. २ (*वाक्प्र*) **put sth on the 'map** एखाद्या गोष्टीला महत्त्व प्राप्त करून देणे. **map** *क्रि* (-pp-) [*सक*] नकाशा काढणे.

mar /मा(र्)/ *क्रि* (-rr-) [*सक*] (*औप*) खराब करणे, बिघडवणे, गालबोट लावणे : *a mistake that ~red his career, त्याची आयुष्यक्रम नासवणारी चूक.*

marathon /'मॅरथन्; *अमे* -थॉन्/ *ना* [*गण*] लांब अंतर (सुमारे ४२ किलोमीटर्स किंवा २६ मैल) पळण्याची शर्यत. **marathon** *वि* (*ला*) दीर्घकाळ चालणारा आणि खूप कष्टाचा, मोठा : *a ~ speech lasting five hours, पाच तासाचे मोठे भाषण.*

marauding /म'रॉऽडिङ्/ *वि* चोरटा, दरोडेखोर, लुटारू. **marauder** /-ड(र्)/ *ना* [*गण*] लुटारू, वाटमारी करणारा माणूस, पेंढारी.

marble /'माब्ल्/ *ना* १ [*अगण*] बांधकाम आणि शिल्पकलेत वापरला जाणारा एक प्रकारचा कठीण दगड, संगमरवर. २ (क) [*गण*] काचेची गोटी. (ख) **marbles** [*ब.व*] गोट्यांचा खेळ.

March /माच्/ *ना* [*अगण, गण*] इंग्रजी वर्षातील तिसरा महिना (April खालची उदाहरणे पाहा).

march /माच्/ *क्रि* १ [*अक*] सैनिकासारखे शिस्तीने चालणे, कवाइतीसारखे चालणे. २ [*सक*] एखाद्याला रपेट करायला लावणे : *They ~ed the prisoner away, त्यांनी कैद्याला पुढे घालून चालवत नेले.* **march** *ना* १ [*गण*] कवाइतीत चालणे, शिस्तीची चाल. २ [*गण*] शिस्तबद्ध चालीच्या वेळी वाजवायचे संगीत. ३ [*गण*] निषेध करण्यासाठी लोकांनी काढलेला मोर्चा, पदयात्रा. ४ [*अे.व*] *of//* (*ला*) एखाद्या गोष्टीचे संथपणे पुढे येणे : *the ~ of time, काळाची चाल.*

marchioness /ˌमाश'नेस्/ *ना* [*गण*] १ मार्किसची (ड्यूकच्या खालचा पण अर्लच्या वरचा उमराव) बायको. २ मार्किसच्या हुद्द्याची स्त्री.

mare /मेअ(र्)/ *ना* [*गण*] घोडी किंवा गाढवीण.

margarine /,माज'रीन्; *अमे* 'मार्जरिन्/ *ना* [*अगण*] प्राणी किंवा वनस्पतीच्या चरबीपासून तयार केलेला लोण्यासारखा एक अन्नपदार्थ.

margin /'माजिन्/ *ना* [*गण*] १ लिखित किंवा छापील मजकुराभोवताली पानावर सोडलेली जागा, समास. २ माया, सीमा, कड. ३ (क) जिंकण्यासाठी मिळालेली जादा मते, जादा वेळ, अवसर. (ख) यश किंवा सुरक्षिततेसाठी सोडलेला वेळ, जागा वगैरे. **marginal** /-नल्/ *वि* कमी, अत्यल्प : *a ~al increase, अत्यल्प वाढ.* **marginally** /-नलि/ *क्रिवि* थोडेसे.

marijuana /,मॅरियु'आन, ,मॅरि'वॅन/ *ना* [*अगण*] भांगेची धूम्रपानात वापरली जाणारी वाळकी पाने आणि फुले.

marina /म'रीन/ *ना* [*गण*] खेळासाठी किंवा मौजेसाठी वापरायच्या मोठ्या नौका लावण्याचा किनारा, नौकाविहाराचे छोटे बंदर.

marinade /,मॅरि'नेइड्/ *ना* [*गण, अगण*] मासे किंवा मांस शिजवण्यापूर्वी ज्यात भिजवतात ते मद्य, कंदमुळे वगैरेचे मिश्रण. **marinade** (तसेच **marinate** /'मॅरिनेइट्/) *क्रि* [*सक*] मॅरिनेडमधे (अन्नपदार्थ) भिजवणे.

marine /म'रीन्/ *वि* १ समुद्राचा, समुद्रातील : *~ life, समुद्र-जीवन.* २ बोटी, समुद्रव्यापार वगैरे संबंधीचा. **marine** *ना* [*गण*] सागर किंवा जमीन या दोहोंवर लढणारा सैनिक.

mariner /'मॅरिन(र्)/ *ना* [*गण*] (*जुना किंवा औप*) खलाशी, तांडेल.

marionette /,मॅरिअ'नेट्/ *ना* [*गण*] कळसूत्री बाहुली.

marital /'मॅरिट्ल्/ *वि* वैवाहिक.

maritime /'मॅरिटाइम्/ *वि* १ समुद्र किंवा बोट याबाबतचा. २ समुद्रकाठी.

mark^1 /माक्/ *ना* [*गण*] १ (क) डाग : *dirty ~s on my new shirt, माझ्या नव्या शर्टावरचे घाणेरडे डाग.* (ख) अंगावरची खूण : *a birth~, जन्मखूण.* २ छापलेले किंवा लिहिलेले चिन्ह : *,punctu'ation ~s, विरामचिन्हे.* ३ दिसणारे चिन्ह, खूण : *~s of old age, वार्धक्याच्या खुणा ○ a ~ of respect, आदर दाखवणारे काहीतरी.* ४ गुण : *top ~s, सर्वाधिक गुण.* ५ **Mark** यंत्राचा वगैरे नमुना किंवा प्रकार : *a M~ 2 Ford Escort, फोर्ड अेस्कॉर्टची क्रमांक २ ची गाडी.* ६ (*वाक्प्र*) **be ,quick/slow off the 'mark** एखादी गोष्ट तत्परतेने किंवा हळूहळू करणे किंवा समजणे. **,make one's 'mark (in sth)** एखाद्या गोष्टीत ख्यातनाम होणे, एखाद्या गोष्टीवर ठसा उमटवणे. **'up to the 'mark** अपेक्षित गुणवत्तेला पोहोचणारा, अपेक्षेप्रमाणे असलेला.

mark^2 /माक्/ *क्रि* १ [*अक, सक*] डाग पडणे/पाडणे : *You've ~ed the table, तू टेबलावर डाग पाडलेस ○ The carpet ~s easily, या गालिचावर लगेच डाग पडतात.* २ [*सक*] खूण असणे, निशाणी असणे : *This cross ~s the place where she died, ती जेथे मेली त्या जागेची खूण म्हणून ही फुली आहे ○ His death ~ed the end of an era, त्याचा मृत्यू एक युग संपल्याची निशाणी होती.* ३ [*सक*] गुण देणे. ४ [*सक*] खूण करणे, लिहिणे : *documents ~ed 'secret', 'गोपनीय' असा शेरा असलेली कागदपत्रे.* ५ [*सक*] (*औप*) लक्ष देणे : *M~ my words, माझ्या बोलण्याकडे लक्ष दे किंवा लक्षात ठेव माझे शब्द म्हणजेच तुला मी काय म्हणतो ते खरे आहे याची प्रचीती येईल.* ६ [*सक*] वैशिष्ट्य असणे : *qualities that ~ a leader, नेत्याचे विशेष असे गुण किंवा नेतृत्वदर्शक गुण.* ७ [*सक*] (*खेळ*) (विरुद्ध बाजूच्या भिडूच्या) अगदी जवळ राहणे. ८ (*वाक्प्र*) **mark 'time** काहीतरी करून वेळ काढणे, वेळ काटणे. ९ (*क्रिव*) **mark sth down/up** एखाद्या गोष्टीची किंमत कमी/जास्त करणे. **mark sth off/out** एखाद्या गोष्टीभोवती रेषा काढून ती वेगळी करणे, खूण करून वेगळी करणे. **mark sb out for sth** एखाद्याला एखादी विशेष गोष्ट देण्यासाठी निवडणे. **marked** *वि* सहज दिसणारा; स्पष्ट : *a ~ed improvement, स्पष्टपणे दिसणारी सुधारणा.* **markedly** /'माकिड्लि/ *क्रिवि* स्पष्टपणे. **marker** *ना* [*गण*] १ खुणा करणारा माणूस किंवा साधन. २ उत्तरपत्रिका तपासणारा माणूस, परीक्षक. ३ एखाद्या स्थळाचा निर्देश करणारा खांब, निशाण वगैरे. **marking** *ना* [*गण, बहुधा ब.व*] चट्टेपट्टे – उदा जनावरांच्या कातडीवरचे. **'mark-up** *ना*

[*गण, बहुधा अे.व*] विक्रेत्याने किमतीत वाढवलेली रक्कम.

market /'माकिट्/ *ना* १ [*गण*] बाजार. २ [*गण, बहुधा अे.व*] बाजार स्थिती : *The coffee-~ was steady, कॉफीचा बाजार(भाव) स्थिर होता.* ३ [*अे.व, अगण*] (*for*)// मागणी : *a good ~ for cars, मोटारींना चांगली मागणी.* ४ [*गण*] मालविक्रीची जागा, बाजारपेठ : *foreign ~, परदेशी बाजारपेठ.* ५ **the market** [*अे.व*] विक्रेते आणि गिऱ्हाईक. ६ (*वाक्प्र*) **in the market for sth** (*अनौप*) काहीतरी खरेदी करण्यास उत्सुक. **on/onto the 'market** विक्रीस उपलब्ध : *a product not yet on the ~, बाजारात न आलेले उत्पादन* ○ *new goods coming onto the ~, नवीन माल बाजारात आणणे, विक्रीस आणणे.* **marketable** *वि* बाजारात खपण्यासारखा, विक्रेय. **,market 'garden** *ना* [*गण*] (*ब्रि*) विक्रीसाठी पिकवल्या जाणाऱ्या भाज्या, फळे यांचा मळा. **marketing** *ना* [*अगण*] मालाची जाहिरात, विक्री, वितरण वगैरे गोष्टी करणारा उद्योगाचा एक भाग, पणन. **'market-place** *ना* १ [*गण*] जिथे बाजार भरतो ती शहरातली मोकळी जागा. २ **the market-place** [*अे.व*] खरेदीविक्री. **,market re'search** *ना* [*अगण*] लोकांच्या खरेदीविक्रीचा अभ्यास, बाजार संशोधन.

marksman /'माक्स्मन्/ *ना* [*गण*] (*ब.व* **-men** /-मन्/) नेमबाज, निशाणी लावणारा.

marmalade /'मामलेइड्/ *ना* [*अगण*] संत्र्यांपासून केलेला एक प्रकारचा मुरंबा.

maroon^{1} /म'रून्/ *वि, ना* [*गण*] तपकिरीसर तांबडा, गडद अंजिरी.

maroon^{2} /म'रून्/ *क्रि* [*सक*] अडकवणे, अडकणे.

marquee /मा'की/ *ना* [*गण*] खूप मोठा तंबू.

marquis (तसेच **marquess** /'माक्विस्/ *ना* [*गण*] (इंग्लंडमधे) अर्लच्या वरचा पण ड्यूकच्या खालच्या दर्जाचा उमराव.

marriage /'मॅरिज्/ *ना* [*अगण, गण*] लग्न, विवाह. **marriageable** *वि* विवाहयोग्य, लग्नाला आलेला/आलेली, उपवर.

marrow^{1} /'मॅरउ/ *ना* [*गण, अगण*] हिरव्या पट्ट्या असलेली आणि आत पांढरी असलेली भोपळ्यासारखी एक भाजी.

marrow^{2} /'मॅरउ/ *ना* [*अगण*] हाडाच्या आतील मऊ चरबीयुक्त पदार्थ, अस्थिमज्जा.

marry /'मॅरि/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) १ [*अक, सक*] एखाद्याशी विवाह करणे, लग्न करणे. २ [*सक*] दोघांचे लग्न लावणे : *Which priest is going to ~ them? त्यांचे लग्न कोणता पुरोहित लावणार आहे?* ३ [*सक*] (*off*)// एखाद्याचे लग्न करून देणे : *They married (off) their daughter to a rich banker, त्यांनी आपल्या मुलीचे लग्न एका श्रीमंत पेढीवाल्याशी/सावकाराशी करून दिले.* **married** *वि* १ (*to*)// विवाहित, लग्न झालेला. २ वैवाहिक : *married life, वैवाहिक जीवन.*

marsh /माश्/ *ना* [*गण, अगण*] दलदल, सखल पाणथळ (प्रदेश). **marshy** *वि* **(-ier, -iest)** दलदलीचा, चिबड.

marshal^{1} /'माश्ल्/ *ना* [*गण*] १ वायुदल किंवा सेनादलातील खूप वरच्या दर्जाचा अधिकारी. २ मोटारींच्या शर्यतीसारखे सार्वजनिक उपक्रमांचे आयोजन करणारा अधिकारी. ३ (*अमे*) शेरीफसारखी कामे असणारा अधिकारी.

marshal^{2} /'माश्ल्/ *क्रि* (**-ll-**; *अमे* **-l-**) [*सक*] १ व्यवस्थित मांडणे, रचणे. २ (लोकांना) काळजीपूर्वक घेऊन जाणे, मार्ग दाखवणे.

marsupial /मा'सूपिअल्/ *वि, ना* [*गण*] ओटीजवळ पोरे ठेवण्याची पिशवी असणारा कांगारूसारखा प्राणी (किंवा अशा प्राण्याचा), शिशुधान.

martial /'माश्ल्/ *वि* (*औप*) युद्धाचा, लष्करी वगैरे. **martial 'arts** *ना* [*ब.व*] ज्यूडो, कराटे यांसारखे मारामारीचे खेळ, वीरश्रीपूर्ण खेळ. **,martial 'law** *ना* [*अगण*] लष्करशाही, लष्करी कायदा.

martin /'माटिन्; *अमे* -टन्/ *ना* [*गण*] पाकोळी कुळातील पक्षी.

martyr /'माट(र्)/ *ना* [*गण*] स्वतःच्या (खास करून धार्मिक) श्रद्धांसाठी मरण पत्करणारा हुतात्मा, धर्मवीर. **martyr** *क्रि* [*सक*] हौतात्म्य देणे. **martyrdom** /'माटडम्/ *ना*

[*अगण, गण*] हौतात्म्य.

marvel /'माव्ह्ल्/ *ना* [*गण*] आश्चर्य, नवल: *the ~s of modern science, आधुनिक विज्ञानातील चमत्कार.* **marvel** *क्रि* (**-ll-**; *अमे* **-l-**) [*सक*] *at*// (*औप*) आश्चर्य वाटणे, नवल करणे. **marvellous** (*अमे* **-velous**) /'माव्हलस्/ *वि* सुंदर, छान, उत्कृष्ट; आश्चर्यकारक, मस्त. **marvellously** (*अमे* **-velously**) *क्रिवि* उत्कृष्टपणे, छान रीतीने, मस्त.

Marxism /'माक्सिझ़म्/ *ना* [*अगण*] साम्यवादाचा पाया असलेला कार्ल मार्क्सचा आर्थिक-राजकीय सिद्धान्त. **Marxist** /-सिस्ट्/ *ना* [*गण*], *वि* साम्यवादी, मार्क्सवादी.

marzipan /'माझ़िपॅन्/ *ना* [*अगण*] बदाम, साखर वगैरे वाटून केलेला घट्ट गोळा.

mascara /मॅ'स्कार; *अमे* -'स्कॅर/ *ना* [*अगण*] पापण्या गडद करण्याचा रंग.

mascot /'मॅस्कट्; -स्कॉट्/ *ना* [*गण*] भाग्य आणणारी किंवा शुभप्रद वस्तू, व्यक्ती किंवा प्राणी, लाभदायक गोष्ट, चांगल्या पायगुणाची किंवा शकुनाची गोष्ट.

masculine /'मॅस्क्युलिन्/ *वि* १ पुरुषी, मर्दानी. २ (*व्याकरण*) पुल्लिंगी. **masculinity** /,मॅस्क्यु'लिनटि/ *ना* [*अगण*] पुरुषीपणा, मर्दानीपणा, पुरुषत्व.

mash /मॅश्/ *क्रि* [*सक*] (उकडलेले बटाटे वगैरे) ठेचून किंवा कुस्करून पीठ करणे, रगडणे. **mash** *ना* [*अगण*] (*अनौप*) रगडलेले बटाटे.

mask /मास्क्; *अमे* मॅस्क्/ *ना* [*गण*] चेहरा लपविण्यासाठी घालायचा मुखवटा: (*ला*) *His behaviour is really a ~ for his shyness, त्याची वागणूक म्हणजे स्वतःच्या लाजाळूपणावर घालायचा एक मुखवटाच आहे.* **mask** *क्रि* [*सक*] मुखवटा घालणे, लपवणे. **masked** *वि* मुखवटा घातलेला: *~ed robbers, मुखवटा घातलेले दरोडेखोर.*

masochism /'मॅसकिझ़म्/ *ना* [*अगण*] स्वपीडनातून सुख (विशेषतः लैंगिक सुख) मिळवण्याची मानसिक विकृती, आत्मपीडन विकृती. **masochist** /-किस्ट्/ *ना* [*गण*] स्वपीडनात आनंद मानणारा. **masochistic** /,मॅस'किस्टिक्/ *वि* स्वपीडनसुखाय.

mason /'मेइस्न्/ *ना* [*गण*] दगडांनी किंवा विटांनी बांधकाम करणारा, गवंडी. **masonry** /-सन्रि/ *ना* [*अगण*] बांधकामात वापरायच्या दगडविटा.

masquerade /,मास्क'रेइड्; *अमे* 'मॅस्क्-/ *क्रि* [*अक*] (*as*)// बहाणा करणे, आव आणणे: *~ as a police officer, पोलीस अधिकारी असल्याचा बहाणा करणे.* **masquerade** *ना* [*गण*] बहाणा, खोटे रूप.

Mass (तसेच **mass**) /मॅस्/ *ना* [*अगण, गण*] (खास करून रोमन कॅथलिक चर्चमधे) येशू ख्रिस्ताच्या अखेरच्या भोजनावर आधारित विधी की ज्यात पाव आणि कधीकधी मद्य वाटले जाते.

mass /मॅस्/ *ना* १ [*गण*] विशिष्ट आकार नसलेली द्रव्याची राशी, गोळा: *a ~ of earth, मातीचे ढेकूळ.* २ [*गण*] मोठी संख्या: *a ~ of tourists, पर्यटकांचा घोळका, समुदाय.* ३ [*अगण*] (*भौतिकशास्त्र* किंवा *पदार्थविज्ञान*) वस्तुमान, द्रव्यमान. ४ **the masses** [*ब.व*] सामान्य माणसे, जनता, लोक. **mass** *क्रि* [*अक, सक*] एकत्र करणे, जमवणे: *The general ~ed his troops for the attack, सेनापतीने हल्ला करण्याकरता सैन्य एकत्र जमा केले.* **the ,mass 'media** *ना* [*ब.व*] दूरदर्शन, रेडिओ, वर्तमानपत्रे वगैरे, जनसंपर्क माध्यमे. **,mass-pro'duce** *क्रि* [*सक*] (मालाचे) मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणे. **,mass pro'duction** *ना* [*अगण*] मोठ्या प्रमाणावरील उत्पादन.

massacre /'मॅसक(र्)/ *ना* [*गण*] अनेक लोकांची निर्घृण हत्या, कत्तल. **massacre** *क्रि* [*सक*] अनेक लोकांची निर्घृण हत्या करणे.

massage /'मॅसाझ़; *अमे* म'साझ़/ *ना* [*गण, अगण*] अंगाला तेल चोळणे, मालिश. **massage** *क्रि* [*सक*] मालिश करणे.

masseur /मॅ'सऽ(र्)/ *ना* [*गण*] (*स्त्री* **masseuse** /मॅ'सउझ़्/) मालिश करणारा, संवाहक.

massive /'मॅसिव्ह्/ *वि* प्रचंड, खूप मोठा, विराट. **massively** *क्रिवि* फार मोठ्या प्रमाणात.

mast /मास्ट्; *अमे* मॅस्ट्/ *ना* [*गण*] १ जहाजाची शीडकाठी, डोलकाठी. २ एरिअलचे उंच खांब.

master^1 /'मास्ट(र्); *अमे* 'मॅस्-/ *ना* [*गण*] १ मालक, धनी. २ पुरुष कुटुंबप्रमुख, यजमान, कारभारी. ३ बोटीचा कप्तान. ४ कुत्रा, घोडा वगैरेचा मालक. ५ (खास करून *ब्रि*) शिक्षक, मास्तर. ६ **Master** विद्यापीठाची द्वितीय (स्कॉटलंडमधे पहिली) पदवी धारण करणारा : *a ,M~ of 'Arts/'Sciences, एम्.ए. किंवा एम्.एस्सी.* ७ थोर कलावंत, गुरू. ८ *of//* (*औप*) एखाद्या क्षेत्रात खूप निपुण असलेला, दादा, पंडित, वस्ताद. ९ चित्रपट, चित्रफीत यांची मूळ प्रत की ज्यापासून इतर प्रती करता येतात : *the ~ copy, मूळ प्रत.* **master** *वि* १ कसबी, दर्दी, श्रेष्ठ, प्रवीण : *a ~ carpenter, कसबी सुतार.* २ बृहत्, मोठा, सर्वसमावेशक : *a ~ plan, बृहत् योजना.* **'mastermind** *क्रि* [*सक*] (एखादी योजना) आखणे, कटाची सूत्रे हालवणे. **'mastermind** *ना* [*गण*] अतिशय हुशार/चलाख माणूस, सूत्रधार. **,Master of 'Ceremonies** *ना* [*गण*] महत्त्वाच्या सर्वजनिक समारंभाचा सूत्रधार – जो पाहुण्यांची ओळख वगैरे करून देतो, यजमान. **'masterpiece** *ना* [*गण*] सर्वोत्कृष्ट कलाकृती, कारागिरीयुक्त कृती.

master^2 /'मास्ट(र्); *अमे* 'मॅस्-/ *क्रि* [*सक*] १ ताबा मिळवणे, अधिपत्य किंवा प्रभुत्व मिळवणे. २ आत्मसात करणे : *~ a foreign language, परकीय भाषा आत्मसात करणे.*

masterful /'मास्टफ्ल्; *अमे* 'मॅस्-/ *वि* अधिकारपूर्ण, अधिकार गाजवणारा. **masterfully** /-फ्लि/ *क्रिवि* अधिकाराने, चातुर्याने.

masterly /'मास्टलि; *अमे* मॅस्-/ *वि* अतिशय कुशल, चतुर.

mastery /'मास्टरि/ *ना* [*अगण*] १ चातुर्य, कौशल्य, तरबेजपणा, विद्वत्ता, व्यासंग. २ पूर्ण नियंत्रण.

masturbate /'मॅस्टबेइट्/ *क्रि* [*अक*] स्वतःचे लिंग कुरवाळून किंवा घासून लैंगिक सुख मिळवणे, हस्तमैथुन करणे. **masturbation** /,मॅस्ट'बेइश्न्/ *ना* [*अगण*] हस्तमैथुन.

mat^1 /मॅट्/ *ना* [*गण*] १ जमिनीवर अंथरायची चटई, हातरी. २ गरम भांडे, काचपात्र वगैरे टेबलावर ठेवताना टेबल खराब होऊ नये म्हणून खाली घालायचा तुकडा, ताटली वगैरे. **mat** *क्रि* (**-tt-**) [*अक, सक*] गुंता होणे/करणे, गाठी होणे/करणे : *~ted hair, गुंता झालेले केस.*

mat^2 = MATT.

matador /'मॅटडॉऽ(र्)/ *ना* [*गण*] बैलाशी झुंज करून त्याला ठार मारण्याची कामगिरी असणारा वीर.

match^1 /मॅच्/ *ना* [*गण*] गुलाची काडी, आगकाडी. **'matchbox** *ना* [*गण*] काडेपेटी, आगपेटी.

match^2 /मॅच्/ *ना* १ [*गण*] स्पर्धा : *a football ~, फुटबॉलची स्पर्धा.* २ [*ए.व*] एखाद्याशी बरोबरी करू शकणारा माणूस, तोड, जोड : *He's no ~ for her in tennis, टेनिसमधे तो तिच्या तोडीचा नाही.* ३ [*गण*] लग्न, जोडा : *They made a good ~, त्यांचा जोडा छान जमलाय्.* ४ [*ए.व*] एकमेकास शोभणारा : *The carpets and curtains are a perfect ~, गालिचे आणि पडदे एकमेकाला अगदी जुळणारे आहेत.* **match** *क्रि* १ [*अक, सक*] एकमेकांशी नीट जुळणे, मिळून येणे : *The carpets and the curtains ~ perfectly, गालिचे आणि पडदे एकमेकांना छान जुळतात.* २ [*सक*] (क) तोडीस तोड असणे, बरोबरीचा असणे. (ख) तोडीस तोड मिळणे/सापडणे. **matchless** *वि* (*औप*) बिनतोड, तोड नसलेला, अद्वितीय, एकमेव. **'matchmaker** *ना* [*गण*] लग्न जमविणारा, मध्यस्थ.

mate /मेइट्/ *ना* [*गण*] १ मित्र, सहकारी, सहचर, सवंगडी : *He's gone out with his ~s, तो मित्रांबरोबर बाहेर गेलाय्* ○ *a flat-~. फ्लॅटमधे बरोबर राहणारा मित्र, सहवासी.* २ (*ब्रि व्रात्य*) (पुरुषाला उद्देशून बोलायचे असेल तेव्हा वापर) यार. ३ (व्यापारी नौकेवर) कप्तानाच्या खालचा अधिकारी. ४ प्राण्यांतील नर किंवा मादी, जोडीदार. ५ कामगाराचा मदतनीस, हाताखालचा माणूस : *a plumber's ~, नळकाम करणाऱ्याचा मदतनीस.* **mate** *क्रि* [*अक, सक*] (*with*)// (पशुपक्ष्यांबाबत) जुगणे, फळणे/फळवणे.

material /म'टिअरिअल्/ *ना* १ [*गण, अगण*] द्रव्य, ज्यापासून काही बनवायचे ते साहित्य, जिन्नस. २ [*अगण, गण*] कापड. ३ [*अगण*] पुस्तक वगैरे लिहिण्यास जमवलेली सामग्री : ~ *for a newspaper article, वृत्तपत्रीय लेखनात वापरायचा मालमसाला.* **material** *वि* १ जड, भौतिक, प्राकृत; अनात्म, अध्यात्मिक नसलेला. २ दैहिक; ऐहिक : ~ *comforts, ऐहिक सुखे.* ३ (विशेषतः *कायदा*) महत्त्वाचा : ~ *evidence, महत्त्वपूर्ण पुरावा.*

materialism /म'टिअरिअलिझ़म्/ *ना* [*अगण*] (बहुधा *अधिक्षेपी*) फक्त पैसा, इस्टेट वगैरेना महत्त्व आहे अशी श्रद्धा, जडवाद, इहवाद, जडासक्ती. **materialist** /-लिस्ट्/ *ना* [*गण*] जडवादी/इहवादी माणूस. **materialistic** /म,टिअरिअ'लिस्टिक्/ *वि* इहवादी, जडवादी.

materialize /म'टिअरिअलाइझ़्/ *क्रि* [*अक*] १ प्रत्यक्षात येणे/उतरणे; घडणे. २ मूर्त होणे; साकार होणे, प्रत्यक्षात उतरणे.

maternal /म'टऽन्ल्/ *वि* १ आईचा, मातृवत्, आईसारखा. २ आईकडचा, आईच्या घराण्याचा, मातृक : *a ~ grandfather, आईकडूनचे आजोबा म्हणजेच मातामह.*

maternity /म'टऽनटि/ *ना* [*अगण*] मातृत्व, आईपणा. **maternity** *वि* बाळंतपणाचा, प्रसुतिविषयक : *a ~ hospital, प्रसुतिगृह* ○ ~ *leave, बाळंतपणाची रजा.*

math /मॅथ्/ *ना* (*अमे*) (अ.व क्रियापदासह) MATHEMATICS (गणित) चे संक्षिप्त रूप.

mathematics /,मॅथ'मॅटिक्स्/ *ना* (अ.व क्रियापदासह) गणित. **mathematical** /-इक्ल्/ *वि* गणिताचा. **mathematically** /-क्लि/ *क्रिवि* गणिताच्या दृष्टीने. **mathematician** /,मॅथम'टिश्न्/ *ना* [*गण*] गणितज्ञ, गणिती.

maths /मॅथ्स्/ *ना* (*ब्रि*) (अ.व क्रियापदासह) MATHEMATICS (गणित) चे संक्षिप्त रूप.

matinée (*अमे* तसेच **matinee**) /'मॅट्नेइ, 'मॅटिनेइ; *अमे* ,मॅट्न्'अेइ/ *ना* [*गण*] नाटक किंवा चित्रपट यांचा दुपारचा प्रयोग.

matriarch /'मेइट्रिआक्/ *ना* [*गण*] कुटुंबस्वामिनी, कुल किंवा गटाची प्रमुख अशी स्त्री. **matriarchal** /,मेइट्रि'आक्ल्/ *वि* मातृसत्ताक, स्त्रीप्रधान.

matriculate /म'ट्रिक्युलेइट्/ *क्रि* [*अक*] विद्यापीठात विद्यार्थी म्हणून प्रवेश मिळणे, शालान्त परीक्षा पास होणे. **matriculation** /म,ट्रिक्यु'लेइश्न्/ विद्यापीठ प्रवेश; शालान्त परीक्षा उत्तीर्णता.

matrimony /'मॅट्रिमनि; *अमे* -मउनि/ *ना* [*अगण*] (*औप*) विवाहित स्थिती, पाणिग्रहण. **matrimonial** /,मॅट्रि'मउनिअल्/ *वि* विवाहविषयक.

matron /'मेइट्रन्/ *ना* [*गण*] १ (पूर्वी) रुग्णालयातील नर्सेसवर लक्ष ठेवणारी बाई, मुख्य परिचारिका, अधिसेविका. २ शाळेतील घरगुती कामे करणारी स्त्री, अधीक्षिका. ३ गंभीर चेहऱ्याची मध्यमवयीन विवाहित स्त्री, प्रौढा, काकूबाई. **matronly** *वि* प्रौढ अनुभवी स्त्रीसारखी.

matt (तसेच **mat**, *अमे* तसेच **matte**) /मॅट्/ *वि* (पृष्ठभागांबाबत) न चकाकणारे.

matter^{1} /'मॅट(र्)/ *ना* १ [*गण*] काम, भानगड किंवा विषय : *an important business ~, धंद्यातील महत्त्वाची बाब/गोष्ट.* २ [*अगण*] द्रव्य, वस्तू : *The universe is composed of ~, हे विश्व वस्तुपूर्ण आहे म्हणजेच प्रकृतिद्रव्याने बनलेले आहे.* ३ [*अगण*] उल्लेखित गोष्ट, सामग्री, द्रव्य : *reading ~, वाचन सामग्री म्हणजे पुस्तके, वृत्तपत्रे वगैरे.* ४ (*वाक्प्र*) **as a matter of fact** (जोर देण्यासाठी वापर) प्रत्यक्षात, वस्तुतः, खरे पाहता. **for 'that matter** (एखादी गोष्ट दुसऱ्या संदर्भातही खरी आहे असे दाखविण्यास वापर) त्यासाठी, त्याकारणाने. **(as) a matter of 'course** नेहमीच्या पद्धतीने किंवा सवयीने, निसर्गनियमानुसार, सहाजिकपणे. **(be) the matter (with sb/sth)** (*अनौप*) उदास, खट्टू, दुःखी वगैरे होण्याचे कारण : *What's the ~ with her? तिला काय झालंय्?* ○ *Is anything the ~? काही झालंय् का?* किंवा *काय झालं?* **a matter of 'hours, 'minutes, etc** काही तासांचा/मिनिटांचाच वगैरे प्रश्न. **a matter of o'pinion** मतभेदाचा मुद्दा, मतभेद होऊ शकणारी बाब. **(be) a matter of (doing) sth** दुसऱ्या काही

बाबींवर अवलंबून असणारा प्रश्न, प्रसंग: *Teaching isn't just a ~ of good communication, चांगल्या तऱ्हेचा संवाद साधणं म्हणजेच काही फक्त अध्यापन नाही – म्हणजेच अध्यापन इतर काही गोष्टींवरही अवलंबून असते.* **no matter who, what, etc** कोण, काय वगैरेला महत्त्व नाही: *Don't believe him, no ~ what he says, तो काहीही म्हणाला तरी त्यावर विश्वास ठेवू नकोस.* **,matter-of-'fact** *वि* रूक्ष, कोरडा, भावरहित.

matter^{2} /'मॅट(र्)/ *क्रि* [*अक*] महत्त्व असणे: *It doesn't ~, ते महत्त्वाचे नाही.*

matting /'मॅटिङ्/ *ना* [*अगण*] जमिनीवर अंथरायचे काथ्याचे जाडेभरडे तरट.

mattress /'मॅट्रिस्/ *ना* [*गण*] झोपायची गादी.

mature /म'च्युअ(र्); *अमे* -'टुअर्/ *वि* १ पूर्ण वाढ झालेला, पूर्ण विकसित. २ (एखाद्या माणसाबाबत किंवा त्याच्या वर्तनाबाबत) वयाने आणि अनुभवाने शहाणा झालेला, परिपक्व, प्रगल्भ. ३ (मद्य किंवा चीजबाबत) पक्व, पूर्णपणे चवदार झालेले. **mature** *क्रि* [*अक, सक*] परिपक्व होणे, विकसित करणे. **maturity** *ना* [*अगण*] पूर्ण वाढ; प्रगल्भता, परिपक्वता.

maul /मॉऽल्/ *क्रि* [*सक*] चोळवटणे, जखमी करणे: *~ed by a lion, सिंहाने जखमी केलेला.*

mausoleum /,मॉऽस'लीअम्/ *ना* [*गण*] कबर असलेली मोठी दगडी इमारत, समाधी, छत्री.

mauve /मउव्ह्/ *वि, ना* [*अगण*] फिकट जांभळा (रंग).

maxim /'मॅक्सिम्/ *ना* [*गण*] आचाराबाबतचे किंवा सत्याबाबतचे वचन.

maximize /'मॅक्सिमाइझ्/ *क्रि* [*सक*] जास्तीत जास्त मोठे करणे, कमाल मर्यादा गाठणे.

maximum /'मॅक्सिमम्/ *ना* [*गण, बहुधा ए.व*] (*ब.व* **maxima** /-म/) जास्तीत जास्त रक्कम, कमाल: *the ~ a lorry can carry, लॉरी नेऊ शकणारे कमाल वजन.* **maximum** *वि* कमाल, जास्तीत जास्त, महत्तम: *make ~ use of the room,* खोलीचा जास्तीत जास्त *वापर करणे.*

May /मेइ/ *ना* [*अगण, गण*] इंग्रजी वर्षातील पाचवा महिना (April खालची उदाहरणे पहा).

may /मेइ/ *अभिद क्रि* (*नकार* **may not**, *क्वचित् वापरले जाणारे संक्षिप्त रूप* **mayn't** /मेइन्ट्/, *भूत* **might** /माइट्/, *नकार* **might not**, *क्वचित् वापरले जाणारे संक्षिप्त रूप* **mightn't** /'माइट्न्ट्/) १ (शक्यता दाखविताना वापर): *This coat ~ be Sarah's, हा कोट सेराचा असावा ○ He ~ have forgotten to come, तो यायला विसरला असावा.* २ (*औप*) (परवानगी विचारताना वापर): *M~ I sit down? मी बसू का?* ३ (एखादी इच्छा व्यक्त करताना वापर): *M~ you both be very happy! तुम्ही दोघे खूप सुखी व्हा/होवोत!*

maybe /'मेइबी/ *क्रिवि* कदाचित्.

mayonnaise /,मेइअ'नेइझ्; *अमे* 'मेइअनेइझ्/ *ना* [*अगण*] अंडी, तेल आणि सिरका (व्हिनिगर) यापासून केलेला आणि कच्च्या भाजांच्या कोशिंबिरीवर घालून खायचा मलईसारखा घट्ट रस.

mayor /मेअ(र्); *अमे* 'मेइअर्/ *ना* [*गण*] महापौर, नगराध्यक्ष. **mayoress** /मेअ'रेस्; *अमे* 'मेइअरस्/ *ना* [*गण*] १ महिला महापौर. २ महापौराची पत्नी.

maze /मेइझ्/ *ना* [*गण*] नागमोडी वाटांचे जाळे, चक्रव्यूह.

MC /,एम् 'सी/ *संरू* १ Master of Ceremonies समारंभातील निवेदक. २ (*अमे*) Member of Congress अमेरिकन काँग्रेसचा सभासद.

MD /,एम् 'डी/ *संरू* Doctor of Medicine या पदवीचे संक्षिप्त रूप.

me /मी/ *सना* (क्रियापद किंवा शब्दयोगी यांचे कर्म म्हणून वापर) मला: *Don't hit me, मला मारू नकोस ○ Give it to me, ते मला दे.*

meadow /'मेडउ/ *ना* [*गण, अगण*] कुरण.

meagre (*अमे* **meager**) /'मीग(र्)/ *वि* अत्यल्प प्रमाणातला, अपुरा, तोकडा: *a ~ income,* अपुरे उत्पन्न. **meagrely** *क्रिवि* अपुरे, तोकड्या पद्धतीने. **meagreness** *ना*

[*अगण*] अपुरेपणा, अत्यल्पता.

meal^1 /'मील्/ *ना* [*गण*] **(क)** भोजन, जेवण. **(ख)** जेवायचे अन्न, भोजनपदार्थ.

meal^2 /मील्/ *ना* [*अगण*] रवाळ पीठ, भरड, रवा : *'oat ~, ओटचा रवा.*

mean^1 /मीन्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **~t** /मेन्ट्/) [*सक*] **१** (शब्द, वाक्ये वगैरेबाबत) अर्थ असणे : *What does this word ~? या शब्दाचा अर्थ काय?* **२** (चिन्ह किंवा प्रतिमा याबाबत) दाखवणे, प्रतिनिधित्व करणे : *A green light ~s 'go', हिरवा दिवा 'जा' असे दर्शवतो.* **३** परिणाम होणे, अर्थ होणे : *This will ~ more work, यातून आणखी काम वाढणार असा अर्थ निघतो म्हणजेच हे म्हणजे आणखी काम.* **४** हेतू असणे; इरादा असणे : *What do you ~ by coming so late? तुझ्या इतक्या उशिरा येण्याचा अर्थ काय?* ○ *Sorry, I ~t to tell you earlier, माफ कर, मला हे तुला याआधीच सांगायचं होतं* ○ *Don't laugh! I ~ it! हसू नकोस! मी खरंच म्हणतोय् म्हणजेच मी गंभीरपणे तुला सांगतोय्.* **५** *to//* एखाद्याला महत्त्वाचे असणे, किंमत असणे, ठेवा असणे : *Your friendship ~s a lot to me, तुझी मैत्री हा एक माझा अमोल ठेवा आहे.* **६** (*वाक्प्र*) **be meant to** अपेक्षित असणे : *You're ~t to pay before you come in, आत येण्यापूर्वी पैसे देणं अपेक्षित आहे.* **mean 'business** स्वतःच्या उद्दिष्टांविषयी काळजी असणे, एखादी गोष्ट करण्याचा निश्चय असणे. **'mean well** (एखादी गोष्ट करण्याची क्षमता नसली तरी) चांगला उद्देश असणे, चांगला इरादा असणे. **meaning** *ना* **१** [*अगण, गण*] शब्द, वाक्य, वगैरेचा अर्थ. **२** [*अगण*] हेतू, प्रयोजन : *My life has lost all ~ing, माझ्या जीवनाचा हेतूच गेला आहे.* **meaningful** *वि* अर्थपूर्ण; महत्त्वाचा. **meaningless** *वि* अर्थहीन.

mean^2 /मीन्/ *वि* **१** कद्रू, कोत्या वृत्तीचा; स्वार्थी, आप्पलपोटा. **२** निर्दय, कठोर. **३** (विशेषतः *अमे*) लहरी; दुष्ट, वाईट. **४** (*वाक्प्र*) **no mean** (*पसंतीदर्शक*) फार चांगला (खेळाडू, कामगिरी वगैरे) : *He's no mean tennis player, तो काही साधासुधा टेनिस खेळाडू नाही.* **meanness** *ना* [*अगण*] कद्रूपणा; आप्पलपोटेपणा; निर्दयीपणा; नीचपणा.

mean^3 /मीन्/ *ना* [*गण*] (*गणित*) मध्यम; सर्वसाधारण, मध्यममान. **mean** *वि* मध्य, मध्यम.

meander /मि'अ‍ॅन्ड(र्)/ *क्रि* [*अक*] **१** (नदी वगैरेबाबत) नागमोडी वळणाने जाणे. **२** भटकणे.

means^1 /मीन्झ़्/ *ना* (अे.व किंवा ब.व क्रियापदासह) **१** पद्धती : *find a ~ of improving the standard of education, शिक्षणाचा दर्जा सुधारण्याची पद्धत शोधणे.* **२** (*वाक्प्र*) **by 'all means** (*औप*) हो, नक्कीच, हो, अगदी निश्चितपणे. **by means of sth** (*औप*) एखाद्या गोष्टीचा वापर करून, एखाद्या गोष्टीच्या आधारे. **by 'no means** (*औप*) अजिबात नाही, मुळीच नाही.

means^2 /मीन्झ़्/ *ना* [*ब.व*] पैसा; साधनसंपत्ती : *a man of ~, श्रीमंत माणूस किंवा पैसेवाला.* **'means test** *ना* [*गण*] शासनाने एखाद्याला आर्थिक मदत करण्यापूर्वी त्याच्या सांपत्तिक स्थितीची केलेली अधिकृत चौकशी.

meant MEAN^1 चा *भूत, भूत वि.*

meantime /'मीन्टाइम्/ *ना* (*वाक्प्र*) **in the 'meantime** मध्यंतर, मधला काळ. **meantime** *क्रिवि* मध्यंतरात, मधल्या काळात.

meanwhile /'मीन्वाइल्; *अमे* -ह्वाइल्/ *क्रिवि* दरम्यान, मधल्या काळात; त्याच वेळी.

measles /'मीझ़्ल्झ़्/ *ना* (अे.व क्रियापदासह) त्वचेवर लाल ठिपके उठवणारा एक संसर्गजन्य रोग, गोवर.

measure^1 /'मेझ(र्)/ *क्रि* [*सक*] **१** लांबीरुंदी मोजणे, माप घेणे : *~ a piece of wood, लाकडाच्या फळीचे माप घेणे.* **२** दिलेल्या आकाराचे किंवा मापाचे असणे : *The room ~s 5 metres across, खोली आडवी पाच मीटर लांबीची आहे.* **३** (*क्रिब*) **measure sth out** एखादी गोष्ट मापून देणे. **measure up (to sth)** अपेक्षित दर्जा गाठणे, पात्रतेस पोहोचणे. **measured** *वि* काळजीपूर्वक, सावधानपूर्वक, काटेकोर. **measurement** *ना* **१** [*अगण*] मोजमाप घेणे, मापन. **२** [*गण*] मोजलेली लांबीरुंदी वगैरे, माप.

measure^{2} /'मेझ(र्)/ *ना* १ (क) [*अगण, गण*] मापन पद्धती. (ख) [*गण*] मापनाचे परिमाण, मापन-पद्धतीतील एक माप : *The metre is a ~ of length, मीटर हे लांबी मोजण्याचे एक परिमाण आहे.* २ [*गण*] लांबी मोजण्याची पट्टी, टेप वगैरे, मोजपट्टी : *a 'tape-~, मोजण्याची टेप.* ३ [*अे.व*] *of//* परिमिती : *a ~ of his anger, त्याच्या रागाची परिमिती.* ४ [*अे.व*] *of//* (*औप*) अंश; थोडा : *a ~ of success, थोडेसे यश.* ५ [*गण*, बहुधा *ब.व*] काही उद्दिष्ट साध्य करण्यासाठी टाकलेली पावले, उपाय : *The government is taking ~s to reduce crime, गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी शासन उपाय योजत आहे.* ६ (*वाक्प्र*) **,made-to-'measure** (कपड्यांबाबत) एखाद्याकरता खास माप घेऊन शिवलेला. **get/take the measure of sb** एखाद्याची क्षमता, स्वभाव मोजणे, अदमास येणे.

meat /मीट्/ *ना* १ [*अगण, गण*] मांस. २ [*अगण*] (*ला*) अर्थ, तथ्य : *There's not much ~ in his argument, त्याच्या युक्तिवादात फारसा दम नाही किंवा फारसे तथ्य नाही.* **meaty** *वि* (**-ier, -iest**) मांसयुक्त; मांसल.

mechanic /मि'कॅनिक्/ *ना* [*गण*] यंत्रे चालवणारा किंवा दुरुस्त करणारा, यांत्रिक. **mechanical** *वि* १ यंत्रविषयक, यंत्रनिर्मित, यांत्रिक. २ विचार न करता केलेला; आपोआप झालेला, यंत्राप्रमाणे झालेला. **mechanically** /-क्लि/ *क्रिवि* यांत्रिकपणे.

mechanics /मि'कॅनिक्स्/ *ना* १ (अे.व क्रियापदासह) गतिशक्ति शास्त्र, यंत्रशास्त्र. २ **the mechanics** [*ब.व*] (क) (एखाद्या गोष्टीचे) चालू भाग, यंत्राचे भाग. (ख) (*ला*) एखादी गोष्ट करण्याच्या पद्धती.

mechanism /'मेकनिझम्/ *ना* [*गण*] १ एखाद्या गोष्टीचे कार्य करणारे भाग. २ (*ला*) एखादी गोष्ट साध्य करण्याचा मार्ग.

mechanize /'मेकनाइझ्/ *क्रि* [*सक*] माणसांऐवजी यंत्रे वापरून एखादा कारखाना, पद्धत वगैरे चालवणे, यांत्रिकीकरण करणे. **mechanization** /,मेकनाइ'झ़ेइश्न्; *अमे* -नि'झ़्-/ *ना* [*अगण*] यांत्रिकीकरण.

medal /'मेड्ल्/ *ना* [*गण*] शौर्याचा सन्मान करायला किंवा बक्षीस म्हणून दिले जाणारे पदक. **medallist** (*अमे* **medalist**) /'मेडलिस्ट्/ *ना* [*गण*] पदकविजेता – खास करून खेळात.

medallion /मि'डॅलिअन्/ *ना* [*गण*] मोठे पदक किंवा त्यासारखा दागिना, उठावाचे पदक.

meddle /'मेड्ल्/ *क्रि* [*अक*] (*अधिक्षेपी*) नको त्या गोष्टीत लुडबुड करणे, नाक खुपसणे. **meddler** *ना* [*गण*] लुडबुड्या, लुबरा, नस्ती उठाठेव करणारा.

media /'मीडिअ/ *ना* **the media** [*ब.व*] वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन यांसारखी प्रसारमाध्यमे.

mediaeval = MEDIEVAL.

mediate /'मीडिअेइट्/ *क्रि* [*अक*] (*between*)// दोन संघर्ष करणाऱ्या पक्षांत मध्यस्थी करणे, शिष्टाई करणे. **mediation** /,मीडि'अेइश्न्/ *ना* [*अगण*] मध्यस्थी, शिष्टाई. **mediator** *ना* [*गण*] मध्यस्थ.

medic /'मेडिक्/ *ना* [*गण*] (*अनौप*) वैद्यकीय शाखेचा विद्यार्थी किंवा डॉक्टर.

medical /'मेडिक्ल्/ *वि* १ वैद्यकशास्त्राचा, वैद्यकीयशाखेचा. २ वैद्यकीय उपचारविषयक. **medical** *ना* [*गण*] आरोग्य तपासणी, प्रकृतीचिकित्सा. **medically** /-क्लि/ वैद्यकीदृष्ट्या.

Medicare /'मेडिकेअ(र्)/ *ना* [*अगण*] लोकांना – विशेषतः वृद्ध माणसांना – आरोग्यसेवा उपलब्ध करून देणारी अमेरिकन शासनाची योजना.

medication /,मेडि'केइश्न्/ *ना* [*गण, अगण*] रोगावरील औषधोपचार.

medicinal /म'डिसिन्ल्/ *वि* औषधी.

medicine /'मेड्‌स्न्; *अमे* 'मेडिस्न्/ *ना* १ [*अगण*] रोगप्रतिबंध किंवा रोगनिवारण यांचे शास्त्र, वैद्यकशास्त्र. २ [*गण, अगण*] आजार बरा करण्यासाठी द्रवरूपातले किंवा गोळ्यांचे औषध, दवा. ३ (*वाक्प्र*) **a dose/taste of one's own medicine** आपण दुसऱ्याला दिलेल्या वागणुकीसारखीच त्याच्याकडून आपल्याला वागणूक मिळणे. **'medicine-man** *ना* [*गण*] = WITCH-DOCTOR (WITCH).

medieval (तसेच **mediaeval**) /,मेडि'ईव्ह्ल्; *अमे* ,मीड्-/ *वि* मध्ययुगीन म्हणजे सुमारे इ.स. ६०० ते १४०० च्या काळातील.

mediocre /,मीडि'अउक(र्)/ *वि* फार चांगला नसलेला, सामान्य. **mediocrity** /,मीडि'ऑक्रटि/ *ना* [*अगण, गण*] (*ब.व* **-ies**) सामान्यत्व, सामान्यपणा.

meditate /'मेडिटेइट्/ *क्रि* [*अक*] (*on*)// चिंतन करणे, ध्यान करणे, मनन करणे. **meditation** /,मेडि'टेइश्न्/ *ना* [*अगण, गण*] ध्यान, मनन, चिंतन.

medium /'मीडिअम्/ *ना* [*गण*] (*ब.व* **media** /'मीडिअ/ किंवा **~s**; अर्थ ४ असताना **~s**) १ काही व्यक्त करण्याचे माध्यम : *an effective advertising ~, प्रभावी असे जाहिरातीचे माध्यम.* २ दोन टोकांच्या मधला भाग. ३ साधन, द्रव्य, माध्यम. ४ मृत माणसांशी बोलू शकण्याचा दावा करणारा. **medium** *वि* दोन टोकांच्या मधला. **'medium wave** *ना* [*अगण*] रेडिओची मध्यमलहरी – १०० ते १००० मीटर्स लांबीची.

meek /मीक्/ *वि* हळुवार आणि शांत, नम्र, लीन. **meekly** *क्रिवि* लीनपणे, नम्रतेने. **meekness** *ना* [*अगण*] नम्रता, लीनता.

meet^{1} /मीट्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **met** /मेट्/) १ [*अक, सक*] एखाद्याला भेटणे, गाठ पडणे/होणे : *Let's ~ again soon, आपण लवकरच परत भेटूया.* २ [*अक, सक*] (एखाद्याशी) ओळख होणे. ३ [*सक*] (*ला*) (वाईट गोष्ट) वाट्याला येणे, मिळणे, भोगणे : *~ one's death, मृत्यू पावणे* किंवा *मरण येणे.* ४ [*सक*] स्वागतास येणे, भेटण्यास जाणे. ५ [*अक, सक*] एखाद्या गोष्टीशी संपर्क होणे, स्पर्श होणे, मिळणे : *Their hands met, त्यांनी (हातात) हात मिळवले.* ६ [*सक*] (मागणी) पूर्ण करणे; समाधान करणे : *~ sb's wishes, एखाद्याच्या इच्छा पूर्ण करणे.* ७ [*सक*] पैसे देणे : *~ all expenses, संपूर्ण खर्च करणे.* ८ (*वाक्प्र*) **meet sb half-'way** एखाद्याशी तडजोड करणे. **there is more to sb/sth than meets the eye** एखादी गोष्ट/व्यक्ती वाटते तितकी सोपी/सरळ/फालतू नसणे. ९ (*क्रिब*) **meet with sb** (*अमे*) चर्चेसाठी एखाद्याची गाठ घेणे. **meet with sth** अनुभव घेणे : *~ with difficulties/an accident, अडचणी येणे/अपघात होणे.*

meet^{2} /मीट्/ *ना* [*गण*] १ (विशेषतः *ब्रि*) कोल्ह्याच्या शिकारीसाठी जमलेले घोडेस्वार आणि शिकारी कुत्री. २ (विशेषतः *अमे*) क्रीडास्पर्धेसाठी जमलेले स्पर्धक, क्रीडास्पर्धा.

meeting /'मीटिङ्/ *ना* [*गण*] चर्चेसाठी बोलावलेली बैठक.

megaphone /'मेगफउन्/ *ना* [*गण*] मोठ्याने बोलण्यासाठी वापरायचा कर्णा.

melancholy /'मेलङ्कॉलि/ *ना* [*अगण*] खूप वेळ टिकणारी/राहणारी उदासी, खिन्नता, विषण्णता, विषाद. **melancholic** /,मेलङ्'कॉलिक्/ *वि* दुःखीकष्टी, विषण्ण, विमनस्क. **melancholy** *वि* दुःखी, खिन्न.

mellow /'मेलउ/ *वि* १ स्वादात किंवा चवीने पक्व, पिकलेला. २ सौम्य आणि नितळ रंगाचा. ३ वयाने परिपक्व आणि दयाळू झालेला, शहाणासुदा. **mellow** *क्रि* [*अक, सक*] सौम्य होणे/करणे, (वयामुळे) निवळणे. **mellowness** *ना* [*अगण*] सौम्यपणा; परिपक्वता.

melodrama /'मेलड्राम/ *ना* [*गण, अगण*] (क) भावना चेतवणारी कथा, नाटक वगैरे, भावक्षोभक नाट्य, अतिरंजित नाट्य, क्षोभनाट्य, अतिनाट्य. (ख) भावक्षोभक अशी वागणूक, प्रसंग वगैरे. **melodramatic** /,मेलड्'मॅटिक्/ *वि* भावक्षोभ करणारा, अतिरंजित. **melodramatically** /-क्लि/ *क्रिवि* अतिरंजितपणे.

melody /'मेलडि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) गीत/धुन किंवा स्वरमेळ, स्वरमाधुर्य, आलापी. **melodic** /मि'लॉडिक्/ *वि* स्वरमेळयुक्त. **melodious** /मि'लउडिअस्/ *वि* स्वरमधुर.

melon /'मेलन्/ *ना* [*गण*] कलिंगड, खरबूज.

melt /मेल्ट्/ *क्रि* १ [*अक, सक*] वितळणे, वितळवणे : *The sun ~ed the snow, उन्हाने हिम वितळले.* २ [*अक*] (*away*)// लहान होणे, कमीकमी होणे; नाहीसा होणे. ३ [*अक, सक*] (मन, भावना वगैरे) द्रवणे, पाझरणे. ४ (*क्रिब*) **melt sth down** पुन्हा वापरण्यासाठी धातू वितळवणे. **'meltdown** *ना* [*गण*] अण्विक भट्टीचा मध्यभाग अति-उष्णतेने वितळून

किरणोत्सर्जन होणे. **'melting-pot** *ना* [*गण*] १ वेगवेगळ्या देशांतून आलेल्या मोठ्या संख्येतील लोकांचे राहण्याचे ठिकाण. २ (*वाक्प्र*) **in the melting-pot** बदलू शकणारा.

member /'मेम्ब(र्)/ *ना* [*गण*] १ एखाद्या गटाचा, मंडळाचा वगैरे सभासद, सदस्य. २ (*औप*) शरीराचा भाग; अवयव. **ˌMember of 'Parliament** *ना* [*गण*] इंग्लंडातील हाउस ऑफ कॉमन्सचा निवडून आलेला सभासद, भारतातील संसदेचा सदस्य. **membership** *ना* १ [*अगण*] सभासदत्व. २ [*अे.व*] (अे.व किंवा ब.व क्रियापदासह) सभासद(संख्या).

membrane /'मेम्ब्रेइन्/ *ना* [*गण, अगण*] मऊ, पातळ आवरणत्वचा, अंतस्त्वचा, पटल.

memento /मि'मेन्टउ/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s** किंवा **~es**) एखाद्या प्रसंगाची किंवा व्यक्तीची आठवण राहावी म्हणून ठेवलेली छोटीशी वस्तू, स्मरणवस्तू, स्मरणचिन्ह.

memo /'मेमउ/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s**) (*अनौप*) MEMORANDUM चे संक्षिप्त रूप.

memoir /'मेम्वा(र्)/ *ना* **memoirs** [*ब.व*] स्वतःच्या आयुष्याच्या लिहिलेल्या आठवणी, संस्मरणिका.

memorable /'मेमरब्ल्/ *वि* संस्मरणीय; लक्षात राहण्यासारखा. **memorably** *क्रिवि* लक्षात राहील अशा पद्धतीने.

memorandum /ˌमेम'रॅन्डम्/ *ना* [*गण*] (*ब.व* **-da** /-ड/ किंवा **~s**) (कामधंद्यात दिलेली) अनौपचारिक चिठ्ठी, टाचण.

memorial /मे'मॉऽरिअल्/ *ना* [*गण*] एखाद्या प्रसंगाचे किंवा व्यक्तीचे स्मरण करून देणारे स्मारक.

memorize /'मेमराइझ़्/ *क्रि* [*सक*] पाठ करणे, घोकणे.

memory /'मेमरि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*गण, अगण*] स्मृती, स्मरणशक्ती: *He's got a good ~, त्याची स्मरणशक्ती फार तल्लख आहे.* २ [*गण*] स्मृती, आठवण: *memories of childhood, लहानपणाच्या/बालपणाच्या आठवणी.* ३ [*अगण*] आठवतो तो काळ. ४ [*अगण*] एखाद्याच्या मृत्यूनंतर त्याची उरलेली आठवण. ५ [*गण*] संगणकातील माहिती साठविण्याचा भाग. ६ (*वाक्प्र*) **in memory of sb** एखाद्याच्या स्मृत्यर्थ.

men MAN^1 चे *ब.व.*

menace /'मेनस्/ *ना* १ [*गण, अगण*] धोका; धमकी. २ [*अे.व*] (*अनौप*) उपद्रवकारक व्यक्ती किंवा वस्तू, संकट. **menace** *क्रि* [*सक*] धमकी देणे, दहशत घालणे. **menacingly** *क्रिवि* धमकावत, धमकावणीने.

menagerie /मि'नॅजरि/ *ना* [*गण*] जंगली प्राण्यांचा संग्रह, शिकारखाना, प्राणिसंग्रहालय.

mend /मेन्ड्/ *क्रि* १ [*सक*] (फुटकी, मोडकी वस्तू) दुरुस्त करणे. २ [*अक*] तब्येत सुधारणे, बरे होणे. ३ (*वाक्प्र*) **mend one's 'ways** वर्तन सुधारणे, नीट वागायला शिकणे. **mend** *ना* १ [*गण*] दुरुस्त केलेला भाग. २ (*वाक्प्र*) **on the 'mend** (*अनौप*) तब्येत सुधारण्याच्या मार्गावर.

menial /'मीनिअल्/ *वि* (बहुधा *अधिक्षेपी*) (कामाबाबत) कंटाळवाणे, हलके, किरकोळ.

meningitis /ˌमेनिन्'जाइटिस्/ *ना* [*अगण*] पृष्ठमज्जारज्जू आणि मेंदूच्या बाह्यावरणाला सूज येऊन होणारा रोग, मस्तिष्कदाह, परिमस्तिष्क ज्वर.

menopause /'मेनपॉऽझ़्/ *ना* **the menopause** [*अे.व*] वयाच्या पन्नाशीच्या सुमारास स्त्रीचा विटाळ बंद होण्याचा काळ, रजोनिवृत्ती.

menstruate /'मेन्स्ट्रुअेइट्/ *क्रि* [*अक*] (*औप*) (स्त्रीबाबत) दर महिन्याला गर्भाशयातून रक्तस्राव होणे, विटाळशी बसणे, मासिकपाळी येणे. **menstrual** /-स्ट्रुअल्/ *वि* मासिकपाळीचा, विटाळशीपणाबाबतचा. **menstruation** /ˌमेन्स्ट्रु'अेइश्न्/ *ना* [*अगण*] विटाळशीपण, ऋतुकाल, रजस्राव.

mental /'मेन्ट्ल्/ *वि* १ मानसिक, मनाचा: *a ~ illness, मानसिक आजार* ○ *make a ~ note of sth, एखाद्या गोष्टीची मनात नोंद घेणे म्हणजेच ती गोष्ट लक्षात ठेवणे.* २ मानसिक आजाराचा किंवा त्याच्याशी संबंधित, मनाबाबतचा: *a ~ patient/hospital, मनोरुग्ण/मानसोपचार* केन्द्र किंवा *वेड्याचे इस्पितळ.* ३ (*अनौप अधिक्षेपी*) वेडा. **men-**

tally /-टलि/ *क्रिवि* मनाने, मनामधे : *~ly ill, मनाने आजारी.*

mentality /मेन्'टॅलटि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*गण*] विचारसरणी, वृत्ती. २ [*अगण*] (*औप*) मनाची शक्ती, मानसिकता.

menthol /'मेन्थॉल/ *ना* [*अगण*] पेपरमिंटपासून काढलेले आणि औषधात किंवा चवीसाठी वापरायचे एक पांढरे घट्ट द्रव्य.

mention /'मेन्श्न्/ *क्रि* १ [*सक*] एखाद्याचा लिहिताना किंवा बोलताना उल्लेख करणे, ओझरता उल्लेख करणे. २ (*वाक्प्र*) **don't 'mention it** (आभार मानायची गरज नाही असे दाखवताना वापर). **not to mention** (जोर देण्यासाठी वापर) तसेच, याखेरीज. **mention** *ना* [*गण, अगण*] ओझरता उल्लेख.

menu /'मेन्यू/ *ना* [*गण*] उपाहारगृहात मागवता येणाऱ्या पदार्थांची यादी.

MEP /,एम् ई 'पी/ Member of the European Parliament (युरोपीयन संसदेचा सभासद) चे संक्षिप्त रूप.

mercantile /'मऽकन्टाइल; *अमे* -टील, -टिल/ *वि* (*औप*) व्यापारी, वाणिज्य किंवा व्यापाऱ्यांचा.

mercenary /'मऽसिनरि; *अमे* -नेरी/ *वि* फक्त पैसे कमावण्यात रस असलेला, पोटार्थी. **mercenary** *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) पैसे घेऊन विदेशी सैन्यात लढणारा, भाडोत्री सैनिक.

merchandise /'मऽचन्डाइझ/ *ना* [*अगण*] (*औप*) खरेदी-विक्रीचा माल, व्यापारी माल.

merchant /'मऽचन्ट/ *ना* [*गण*] व्यापारी, विक्रेता. **merchant** *वि* व्यापारी म्हणजे लष्करी नाही असा : *the ~ navy, व्यापारी नौदल.* **,merchant 'bank** *ना* [*गण*] उद्योगधंद्याला कर्ज पुरवठा करणारी बँक, व्यापारी बँक.

mercury /'मऽक्युरि/ *ना* [*अगण*] रुपेरी रंगाचा बहुधा द्रवरूपातील जड धातू, पारा. **mercurial** /मऽ'क्युरिअल/ *वि* (*औप*) (व्यक्ती किंवा तिच्या लहरींबाबत) जिवंत/ रसरशीत आणि बदलणारा, चंचल, अस्थिर स्वभावाचा.

mercy /'मऽसि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] शिक्षा द्यायचा अधिकार असलेल्याने दाखवलेली दया, कणव, करुणा, क्षमाशीलता. २ [*गण*] सद्भाग्य (असलेली घटना), नशीब. ३ (*वाक्प्र*) **at the mercy of sb/sth** एखाद्यापुढे हतबल, दयेवर असणारा, निर्बल असलेला. **merciful** *वि* दयाळू, करुणाकर. **mercifully** *क्रिवि* सुदैवाने; दया दाखवून. **merciless** *वि* निर्दय, कठोर. **mercilessly** *क्रिवि* निर्दयपणे, निष्ठुरतेने.

mere /मिअ(र्)/ *वि* पेक्षा जास्त नाही असा; फक्त, केवळ : *She's a ~ child, ती तर केवळ एक छोटीशी मुलगी आहे.* **merely** *क्रिवि* फक्त, केवळ.

merge /मऽज्/ *क्रि* १ [*अक, सक*] मिळवणे, विलीन करणे, मिसळणे, जाऊन मिळणे : *The two companies ~d, त्या दोन कंपन्या एकमेकीत विलीन झाल्या.* २ [*अक*] (*into*)// हळूहळू बदल होणे, रूपान्तर होणे, विरणे : *Day ~d into night, दिवस रात्रीमधे विरला.* **merger** *ना* [*गण*] दोन कंपन्यांचे वगैरे एकत्र विलीनीकरण.

meridian /म'रिडिअन्/ *ना* [*गण*] उत्तर आणि दक्षिण ध्रुवातून जाणारे पृथ्वीभोवतालचे एक काल्पनिक वलय, दक्षिणोत्तरवृत्त.

meringue /म'रॅङ्/ *ना* (क) [*अगण*] अंड्यातला पांढरा भाग आणि साखर याचे भाजलेले मिश्रण. (ख) [*गण*]. यापासून केलेला केक.

merit /'मेरिट्/ *ना* १ [*अगण*] गुणवत्ता; किंमत, योग्यता. २ [*गण, बहुधा ब.व*] गुण; जमेची बाजू. **merit** *क्रि* [*सक*] (*औप*) योग्यता असणे, लायकी असणे.

mermaid /'मऽमेइड्/ *ना* [*गण*] (कथांमधे) पायांऐवजी माशाचे शेपूट असलेली स्त्री, जलपरी.

merry /'मेरि/ *वि* १ (**-ier, -iest**) १ (*जुना, अप्रचलित*) आनंदी, मोदयुक्त. २ (*अनौप*) पिऊन किंचित् तर्र झालेला. **merrily** *क्रिवि* मोदभरे, आनंदाने. **merriment** *ना* [*अगण*] आनंदीआनंद. **'merry-go-round** *ना* [*गण*] = ROUNDABOUT २.

mesh /मेश्/ *ना* [*गण, अगण*] वायर, दोऱ्या

वगैरे वापरून भोकाभोकांचे विणलेले असे काही, जाळे. **mesh** *क्रि* [*अक*] (दाते असणाऱ्या चक्रांबाबत) एकमेकात बसणे, अडकणे : (*ला*) *Their opinions don't really ~, त्यांची मते जुळत नाहीत.*

mesmerize /'मेझ़्मराइझ़्/ *क्रि* [*सक*] एखाद्याचे लक्ष वेधून घेणे, भुरळ टाकणे.

mess^{1} /मेस्/ *ना* १ [*गण*, बहुधा *अे.व*] गोंधळ. २ [*अे.व*] गोंधळाची, कठीण परिस्थिती : *My life is in a ~, माझ्या जीवनाला काही शिस्तच राहिलेली नाही.* **mess** *क्रि* (*अनौप*) (*क्रिब*) **mess about/around** (**क**) मूर्खासारखे वागणे, वायफळपणा करणे, भंपकपणा करणे. (**ख**) निश्चित योजनेविना गोष्टी करणे, गबाळेपणाने करणे. **mess sb about/around** एखाद्याला नीट न वागवणे. **mess sth up** (**क**) एखादी गोष्ट अव्यवस्थितपणे पसरणे/करणे, गडबड करणे. (**ख**) एखादी गोष्ट नीट न करणे, गबाळेपणाने करणे; एखादी गोष्ट बिघडवून टाकणे, तिचा विचका करणे. **messy** *वि* (**-ier, -iest**) गोंधळाचा, अव्यवस्थित; घाणेरडा.

mess^{2} /मेस्/ *ना* [*गण*] सैनिकांचे भोजनगृह.

message /'मेसिज्/ *ना* १ [*गण*] एखाद्याला पाठवलेली माहिती, संदेश, निरोप. २ [*अे.व*] मध्यवर्ती कल्पना, संदेश (पुस्तकाचा, पुढाऱ्याचा, लेखकाचा वगैरे). ३ (*वाक्प्र*) **get the 'message** (*अनौप*) मतितार्थ समजणे/ कळणे. **messenger** /'मेसिन्ज(र्)/ *ना* [*गण*] निरोप घेऊन येणारा माणूस, दूत, संदेशक.

messiah /मि'साइअ/ *ना* १ [*गण*] जगाच्या उद्धारासाठी अवतरलेला नवा धर्मनेता, प्रेषित. २ **the Messiah** [*अे.व*] येशू ख्रिस्त.

met MEET^{1} चा *भूत, भूत वि.*

metabolism /म'टॅबलिझ़म्/ *ना* [*अगण*] अन्नाचे ऊर्जेमधे रूपान्तर करणारी शरीरातील प्रक्रिया, चयन, चयापचय. **metabolic** /,मेट'बॉलिक्/ *वि* चयापचयाचा.

metal /'मेट्ल्/ *ना* [*गण, अगण*] लोह, सोने यांसारखे खनिज धातू. **metallic** /मि'टॅलिक्/ *वि* धातूचा.

metaphor /'मेट्फ(र्)/ *ना* [*गण, अगण*] शब्दांच्या वाच्यार्थापेक्षा वेगळा अर्थ (असलेला वापर) – उदा 'तिचे पाषाण-हृदय', लक्षणा, रूपक. **metaphorical** /,मेट'फॉरिक्ल्; *अमे* -'फॉऽर्-/ *वि* लाक्षणिक. **metaphorically** /-क्लि/ *क्रिवि* लक्षणेने, रूपकात्मकतेने.

mete /मीट्/ *क्रि* (*क्रिब*) **mete sth out (to sb)** (*औप*) एखाद्याला (शिक्षा वगैरे) देणे.

meteor /'मीटिऑऽ(र्)/ *ना* [*गण*] अवकाशातून पृथ्वीच्या वातावरणात येऊन जळताना प्रकाशमान होणारा द्रव्याचा तुकडा, उल्का. **meteoric** /,मीटि'ऑरिक्; *अमे* -'ऑऽर्-/ *वि* १ उल्कासंबंधी. २ (*ला*) वेगवान् : *a ~ic rise to fame, वेगाने मिळालेली प्रसिद्धी.* **meteorite** /'मीटिअराइट्/ *ना* [*गण*] जमिनीवर पडलेली उल्का, उल्कापाषाण.

meteorology /,मीटिअ'रॉलजि/ *ना* [*अगण*] हवा आणि पृथ्वीच्या वातावरणाचा अभ्यास करणारे शास्त्र, हवामानशास्त्र. **meteorological** /-र'लॉजिक्ल्/ *वि* हवामानशास्त्रीय. **meteorologist** *ना* [*गण*] हवामानशास्त्रज्ञ.

meter^{1} /'मीट(र्)/ *ना* [*गण*] मोजणारे यंत्र, मापक : *a gas ~, इंधनगॅसमापक.*

meter^{2} (*अमे*) = METRE.

method /'मेथड्/ *ना* १ [*गण*] एखादी गोष्ट करण्याचा मार्ग, रीत. २ [*अगण*] शिस्तवार पद्धती. **methodical** /मि'थॉडिक्ल्/ *वि* पद्धतशीर; काळजीपूर्वक. **methodically** /-क्लि/ *क्रिवि* पद्धतशीरपणे, शिस्तीत.

methodology /,मेथ'डॉलजि/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) पद्धती, पद्धतिशास्त्र.

meticulous /मि'टिक्युलस्/ *वि* बारीकसारीक तपशिलाकडे लक्ष देणारा, काटेकोर. **meticulously** *क्रिवि* काटेकोरपणे.

metre^{1} /'मीट(र्)/ *ना* [*गण*] लांबीचे मेट्रिक परिमाण (३९.३७ इंच). **metric** /'मेट्रिक्/ *वि* मेट्रिक पद्धतीचा, मानीय. **metrication** /,मेट्रि'केइशन्/ *ना* [*अगण*] मेट्रिक पद्धतीचा अवलंब. **the 'metric system** *ना* [*अे.व*] मीटर, किलोग्रॅम वगैरेवर आधारलेली दशमान पद्धती.

metre^{2} /'मीट(र्)/ *ना* [*गण, अगण*] आघातयुक्त अवयवांची काव्यातील रचना,

आघात-वृत्त.

metropolis /म'ट्रॉपलिस्/ *ना* [*गण*] एखाद्या प्रदेशाची किंवा देशाची राजधानी किंवा महानगर. **metropolitan** /,मेट्र'पॉलिटन्/ *वि* महानगरीय, राजधानीचा.

mettle /'मेट्ल्/ *ना* [*अगण*] १ बेधडपणा, धमक. २ (*वाक्प्र*) **put sb on his/her mettle** एखाद्याला जास्तीत जास्त यश मिळवण्यासाठी प्रोत्साहन देणे.

mews /म्यूझ्/ *ना* [*गण*] (*ब.व* **mews**) घोड्याच्या पागांचे निवासी गाळ्यात रूपान्तर केलेली घरे असलेला रस्ता.

miaow /मी'अउ/ *ना* [*गण*] मांजराचा आवाज, म्याव. **miaow** *क्रि* [*अक*] म्यावम्याव करणे.

mice MOUSE चे *ब.व.*

mickey /'मिकि/ *ना* (*वाक्प्र*) **take the mickey (out of sb)** (*अनौप*) एखाद्याला चिडवणे.

micro /'माइक्रउ/ *ना* [*गण*] (*ब.व* ~s) (*अनौप*) MICROCOMPUTER चे संक्षिप्त रूप.

microbe /'माइक्रउब्/ *ना* [*गण*] रोगजंतू, सूक्ष्म जीव.

microchip /'माइक्रउचिप्/ *ना* [*गण*] गुंतागुंतीचे इलेक्ट्रॉनिक जाळे असणारा लहान तुकडा.

microcomputer /,माइक्रउकम्'प्यूट(र्)/ *ना* [*गण*] घरी किंवा कामाच्या जागी वापरायचा छोटासा संगणक.

microcosm /'माइक्रउकॉझम्/ *ना* [*गण*] मोठ्या योजनेचे लघू रूप, पिंड.

microfilm /'माइक्रउफिल्म्/ *ना* [*गण, अगण*] अगदी सूक्ष्म रूपात छायाचित्र असणारी किंवा घ्यायची चित्रफीत. **microfilm** *क्रि* [*सक*] अशा चित्रफितीवर छायाचित्र घेणे.

microphone /'माइक्रफउन्/ *ना* [*गण*] आवाज मोठा करणारे किंवा प्रक्षेपित करणारे साधन, ध्वनिग्राहक.

microscope /'माइक्रस्कउप्/ *ना* [*गण*] अतिसूक्ष्म वस्तू मोठ्या करून दाखविणारे साधन, सूक्ष्मदर्शक. **microscopic** /,माइक्र'स्कॉपिक्/ *वि* १ अतिसूक्ष्म. २ सूक्ष्मदर्शकाचा.

microwave (तसेच **,microwave 'oven**) /'माइक्रवेइव्ह्/ *ना* [*गण*] लघू विद्युत्‌लहरी वापरून झटकन् अन्नपदार्थ शिजविण्याची भट्टी.

mid- /मिड्/ *पूर्वप्रत्यय* मध्यावधी, मधे : *~-morning, सकाळच्या मधल्या वेळात.*

midday /,मिड्'डेइ/ *ना* [*अगण*] भर दुपारी १२ वाजता; मध्यान्ह.

middle /'मिड्ल्/ *ना* **the middle** [*अे.व*] मध्यभाग, मध्य. **middle** *वि* मध्यभागीचा, मधला. **middle 'age** *ना* [*अगण*] मध्यमवय. **,middle-'aged** *वि* मध्यमवयीन. **the ,Middle 'Ages** *ना* [*ब.व*] (युरोपच्या इतिहासात) इ.स. ६०० ते १४०० हा काळ, मध्ययुग. **the ,middle 'class** *ना* [*गण*] मध्यमवर्ग; व्यावसायिकांचा वर्ग. **,middle-'class** *वि* मध्यमवर्गीय. **the ,Middle 'East** *ना* [*अे.व*] इजिप्त ते इराण यामधले देश, मध्यपूर्वेतले देश. **'middleman** *ना* [*गण*] (*ब.व* **-men** /-मेन्/) उत्पादकाकडून माल खरेदी करून विकणारा, अडत्या, दलाल, सटोडिया. **,middle-of-the-'road** *वि* मध्यममार्गी, नेमस्त; टोकाला न जाणारा.

middling /'मिड्लिङ्/ *वि* फार चांगला नाही आणि फार वाईट नाही असा, मध्यम, सामान्य दर्जाचा.

midge /मिज्/ *ना* [*गण*] छोटा, पंख असलेला कीटक, चिलट, धुंगरटे.

midget /'मिजिट्/ *ना* [*गण*] ठेंगू मनुष्य, खूप बुटका माणूस. **midget** *वि* अतिशय लहान.

Midlands /'मिड्लन्ड्झ्/ *ना* **the Midlands** (अे.व किंवा ब.व क्रियापदासह) इंग्लंडच्या मध्यभागातील प्रदेश.

midnight /'मिड्नाइट्/ *ना* [*अगण*] रात्रीचे १२ (वाजता), मध्यरात्र.

midriff /'मिड्रिफ्/ *ना* [*गण*] कमर ते छाती यामधला शरीराचा भाग.

midst /मिड्स्ट्/ *ना* (*वाक्प्र*) **in the midst of sth** एखाद्या गोष्टीच्या मधे, दरम्यान्, चालू असताना मधेच.

midway /,मिड्'वेइ/ *वि*, *क्रिवि* निम्म्या

वाटेवर, अर्ध्या वाटेवर : ~ *between Paris and Rome, पॅरिस आणि रोमच्या मधे अर्ध्या वाटेवर.*

midwife /'मिड्वाइफ्/ *ना* [*गण*] (*ब.व* **-wives** /-वाइव्ह्झ्/) बाळंतपण करणारी सुईण, दाई. **midwifery** /'मिडविफरि; *अमे* -वाइफ-/ *ना* [*अगण*] सुईणिचा धंदा आणि काम.

might^1 /माइट्/ *अभिद क्रि* (*नकार* **might not**, *संक्षेप* **mightn't** /'माइट्न्ट्/) १ (थोडीशी शक्यता आहे असे दाखविताना वापर) : *He ~ be at home, but I doubt it, तो असेलही घरी, पण मला शंकाय.* २ (परवानगी विचारताना वापर) : *M~ I make a suggestion? मी एक सूचना करू?* ३ (सभ्यपणे विनंती किंवा आवाहन करताना वापर) : *You ~ at least offer to help! तू निदान मदतीचा हात पुढे करावास!*

might^2 MAY चा *भूत.*

might^3 /माइट्/ *ना* [*अगण*] ताकद किंवा शक्ती. **mighty** *वि* (**-ier, -iest**) (खास करून *औप*) १ बलाढ्य, शक्तिमान. २ थोर, महान : *the ~y oceans, महासागर.* **mightily** *क्रिवि* जोरदारपणे; खूप. **mighty** *क्रिवि* (*अनौप* विशेषतः *अमे*) फार : *~y good, फार छान, मस्त.*

migraine /'मीग्रेइन्, 'माइग्रेइन्/ *ना* [*अगण, गण*] डोकेदुखी, तीव्र मस्तकशूल.

migrate /माइ'ग्रेइट्; *अमे* 'माइग्रेइट्/ *क्रि* [*अक*] (*from, to*)// १ स्थलान्तर करणे. २ (पक्षी वगैरेबाबत) जगाच्या एका भागातून दरवर्षी नेमाने दुसऱ्या भागात जाणे. **migrant** /'माइग्रन्ट्/ *ना* [*गण*] स्थलान्तरित व्यक्ती, पक्षी वगैरे. **migration** /माइ'ग्रेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] स्थलान्तरण, स्थानान्तरण, देशान्तरण. **migratory** /'माइग्रट्रि, माइ'ग्रेइटरि; *अमे* 'माइग्रटॉऽरि/ *वि* स्थलान्तर करणारा.

mike /माइक्/ *ना* [*गण*] (*अनौप*) MICROPHONE चे संक्षिप्त रूप.

mild /माइल्ड्/ *वि* १ सौम्य, मृदु; कडक नसलेला : *a ~ punishment/climate, सौम्य शिक्षा/हवा.* २ चवीमधे सौम्य, फिका. **mildly** *क्रिवि* सौम्यपणे, किंचित्. **mildness** *ना* [*अगण*] सौम्यता.

mildew /'मिल्ड्यू; *अमे* -डू/ *ना* [*अगण*] उकाड्याच्या आणि दमट हवेत पाने, चामडे, अन्न वगैरेवर येणारी पांढरी बुरशी, भेरड, ताका.

mile /माइल्/ *ना* [*गण*] अंतर मोजण्याचे परिमाण, १७६० यार्डस् (१.६ किलोमीटर). **mileage** /-इज्/ *ना* १ [*गण, अगण*] मैलात काटलेले अंतर. २ [*अगण*] (*ला अनौप*) फायदा : *The unions are getting a lot of ~ out of the manager's mistakes, कामगारसंघटना मॅनेजरच्या चुकांचा चांगलाच फायदा उठवत आहेत.* **'milestone** *ना* [*गण*] १ रस्त्यावरचा मैलाचा दगड. २ (*ला*) महत्त्वाची ऐतिहासिक घटना, महत्त्वाचा टप्पा. **milometer** (तसेच **mileometer**) /माइ'लॉमिट(र्)/ *ना* [*गण*] गाडीतले वगैरे कापलेले अंतर मैलात मोजण्याचे यंत्र.

militant /'मिलिटन्ट्/ *ना* [*गण*], *वि* लढाऊ वृत्तीचा, कडवा, युयुत्सू. **militancy** /-टन्सि/ *ना* [*अगण*] लढाऊपणा, संघर्षवाद.

military /'मिलिट्रि; *अमे* -टेरि/ *वि* सैनिकी, लष्करी किंवा युद्धाचा. **the military** *ना* (अे.व किंवा ब.व क्रियापदासह) सैनिक, लष्कर.

militate /'मिलिटेइट्/ *क्रि* [*अक*] *against*// (*औप*) प्रतिकूल असणे, विरुद्ध/आड येणे.

militia /मि'लिश/ *ना* [*गण*, तसेच ब.व क्रियापदासह अे.व] आणीबाणीच्या काळात उभारलेले सैन्य, लोकसेना, नागरी शिबंदी.

milk /मिल्क्/ *ना* [*अगण*] १ दूध. २ झाडाचा चीक, पाणी : *coconut ~, नारळाचे पाणी.* **milk** *क्रि* १ [*अक, सक*] (गायीचे वगैरे) दूध काढणे, धारा काढणे. २ [*सक*] (*ला*) लबाडीने पैसे, माहिती वगैरे मिळवणे, पिळणे. **'milkman** /-मन्/ *ना* [*गण*] दूधवाला, गवळी, दूध घालणारा. **milk shake** *ना* [*गण*] सुवासिक द्रव्य मिसळलेले दुधाचे पेय. **milky** *वि* (**-ier, -iest**) १ दुधाचा, दुधासारखा. २ (चहा, कॉफी वगैरेबाबत) दुधाळ. **the ,Milky 'Way** *ना* [*अे.व*] = GALAXY २, आकाशगंगा.

mill^1 /मिल्/ *ना* [*गण*] १ पिठाची गिरणी. २ दळण्याची गिरणी : *a 'pepper-~, मिरपूड*

करण्याची गिरणी. ३ कारखाना : *a 'paper-~, कागद-कारखाना.* ४ (*वाक्प्र*) **put sb/go through the 'mill** अडचणीतून, कष्टातून जायला लावणे किंवा जाणे, एखाद्याच्या शिस्तीखाली राहणे, तालमीतून जाणे. **miller** *ना* [*गण*] गिरणी-चालक, गिरणीवाला. **'millstone** *ना* [*गण*] १ जात्याची तळी किंवा वरचे जाते. २ (*ला*) कठीण प्रश्न किंवा जबाबदारी, धोंड : *His debts are a ~stone round his neck, त्याची कर्जे ही त्याच्या गळ्यातली धोंड आहे.*

mill^2 /मिल्/ *क्रि* १ [*सक*] दळणे, पीठ करणे. २ (*क्रिब*) **mill about/around** कळपाने भटकणे.

millennium /मि'लेनिअम्/ *ना* (*ब.व* -nia /-निअ/ किंवा ~s) १ [*गण*] १००० वर्षांचा काळ. २ **the millennium** [*ए.व*] उज्वल भविष्यकाळ, पुढे येणारे आनंदपर्व.

millepede (तसेच **millipede**) /'मिलिपीड्/ *ना* [*गण*] अनेक पायांचा एक किडा, सहस्रपाद कीटक, पैसा किडा.

millet /'मिलिट्/ *ना* [*अगण*] (**क**) राळ्यासारखे किंवा बाजरीसारखे एक धान्य येणारे झाड. (**ख**) राळ्यासारखे किंवा बाजरीसारखे अन्नधान्य.

milli- /'मिलि/ *पूर्वप्रत्यय* (मेट्रिक किंवा दशमान पद्धतीत) $\frac{१}{१०००}$ भाग : *'~metre, मिलिमीटर,* $\frac{१}{१०००}$ *मीटर.*

milliner /'मिलिन(र्)/ *ना* [*गण*] स्त्रियांच्या टोप्या (हॅट्) करणारा किंवा विकणारा. **millinery** *ना* [*अगण*] बायकांच्या टोप्या (हॅट्स्) (विक्रीचा धंदा).

million /'मिल्यन्/ *सना, वि, ना* [*गण*] १ एक सहस्र सहस्र (१०००,०००), दहा लाख. २ (*अनौप*) खूप, चिकार : *~s of things to do, करायच्या असंख्य गोष्टी.* **millionaire** /,मिल्य'नेअ(र्)/ *ना* [*गण*] (*स्त्री* **millionairess** /,मिल्य'नेअरेस्/) लक्षाधीश, खूप श्रीमंत. **millionth** *सना, वि* दहा लाखावा. **millionth** *सना, ना* [*गण*] $\frac{१}{१०००,०००}$, दशलक्षांश.

millipede = MILLEPEDE.

milometer ➪ MILE.

mime /माइम्/ *ना* (**क**) [*अगण*] (रंगभूमीवर वगैरे) मुद्राभिनय आणि हावभाव यांच्या साहाय्याने कथाकथन, मूकाभिनय. (**ख**) [*गण*] मूकाभिनय करणारा कलाकार. **mime** *क्रि* [*अक, सक*] मूकाभिनय करणे, फक्त हावभाव करून कथा सांगणे.

mimic /'मिमिक्/ *क्रि* (*भूत, भूत वि* ~ked) [*सक*] १ एखाद्याची (करमणूक म्हणून) नक्कल करणे, एखाद्याचे सोंग आणणे. २ (वस्तूंबाबत) एखाद्या गोष्टीसारखे हुबेहुब दिसणे, आभास निर्माण करणे. **mimic** *ना* [*गण*] नकलाकार, सोंग आणणारा, सोंगाड्या. **mimicry** *ना* [*अगण*] नक्कल करणे, सोंग.

minaret /,मिन'रेट्/ *ना* [*गण*] मशिदीचा वगैरे मनोरा, मिनार.

mince /'मिन्स्/ *क्रि* १ [*सक*] (मांसाचे वगैरे) तुकडे तुकडे करणे. २ (*वाक्प्र*) **not mince one's 'words** एखाद्यावर टीका करताना स्पष्ट बोलणे, आडपडदा न ठेवता बोलणे. **mince** *ना* [*अगण*] तुकडे केलेले किंवा चिरलेले मांस. **'mincemeat** *ना* [*अगण*] १ मनुका, बेदाणा वगैरेचे पेस्ट्रीमधे भरायचे सारण. २ (*वाक्प्र*) **make mincemeat of sb** वादात किंवा मारामारीत एखाद्याचा धुव्वा उडवणे, पार झोडपून काढणे.

mind^1 /माइन्ड्/ *ना* १ [*अगण*] मन, बुद्धी : *The idea never entered my ~, ती कल्पना माझ्या मनाला कधी शिवली नाही* ○ *She has a brilliant ~, ती तल्लख बुद्धीची आहे* म्हणजेच *ती खूप हुशार आहे.* २ [*अगण*] स्मृती, स्मरणशक्ती : *My ~ has gone blank! माझी स्मृती पार साफ झालीये* किंवा *माझी आठवण पार धुऊन गेलीये.* ३ [*गण*] विचारवंत : *one of the greatest ~s this century, या शतकातील एक थोर विचारवंत.* ४ (*वाक्प्र*) **be in two 'minds about sth** एखाद्या गोष्टीबाबत द्विधा मनःस्थिती असणे. **be/take a load/weight off sb's mind** एखाद्याच्या मनावरचे ओझे/ दडपण हलके करणे. **be on one's mind, have sth on one's mind** एखाद्या गोष्टीची काळजी/चिंता असणे. **be ,out of one's 'mind** (*अनौप*) वेडा होणे, वेड लागणे. **bear/keep sth in 'mind** मनाशी खूणगाठ बांधणे, नीट लक्षात

ठेवणे. **bring/call sth to mind** आठवणे, आठवण करणे. **have a (good) mind to do sth** (*अनौप*) एखादी गोष्ट करण्याची (प्रबळ) इच्छा असणे, मनात खूप असणे. **in one's mind's 'eye** मनःचक्षूपुढे, कल्पनेत. **make up one's 'mind** निश्चय करणे, मनात ठरवणे. **put/set/turn one's mind to sth** एखाद्या गोष्टीवर लक्ष केन्द्रित करणे, एखाद्या गोष्टीत मन घालणे. **take one's mind off sth** एखाद्याचे मन दुसरीकडे वळवणे/फिरवणे/गुंतवणे. **to 'my mind** माझ्या मते.

mind² /माइन्ड्/ *क्रि* १ [*अक, सक*] त्रास होणे : *Do you ~ if I* (ie May I please) *open the windows? मी खिडक्या उघडल्या तर* (म्हणजे मी खिडक्या उघडू?) *तुझी काही हरकत आहे* किंवा *तुला त्रास होईल का* किंवा *तुला चालेल ना?* २ [*सक*] काळजी घेणे, लक्ष देणे : *~ the baby, बाळाची काळजी घेणे.* ३ [*अक, सक*] (एखाद्या गोष्टीकडे) नीट लक्ष देणे : *M~ you don't fall! पडणार नाहीस याची काळजी घे!* ४ (*वाक्प्र*) **,mind one's ,own 'business** इतरांच्या भानगडीत नाक न खुपसणे. **mind one's step** ➪ STEP¹. **,mind 'you, mind** कृपया लक्षात ठेवा/घ्या : *She's still ill, mind you, but at least she's getting better, एक लक्षात ठेव की ती अजून आजारीच आहे पण निदान ती जरा बरी व्हायला लागलीये.* **,never 'mind** काळजी करू नकोस. ५ (*क्रिब*) **,mind 'out** (*अनौप*) दक्ष असणे, सावधान असणे. **minder** *ना* [*गण*] एखाद्याची काळजी घेणारा : *a child-~er, मुलांची काळजी घेणारा.*

mindful /'माइन्ड्फ़ल्/ *वि of//* (*औप*) विचारपूर्वक, विचार करणारा.

mindless /'माइन्ड्लिस्/ *वि* १ बिनडोक, डोक्याचा वापर आवश्यक नसलेला. २ (*अधिक्षेपी*) उद्देशहीन; मूर्ख, वेडपट.

mine¹ /माइन्/ *सना* म.ज्ञा : *Is this book yours or ~? हे पुस्तक तुझंय् की माझं?*

mine² /माइन्/ *ना* [*गण*] १ कोळशाची वगैरे खाण. २ समुद्राच्या पाण्याखाली किंवा जमिनीखाली पुरलेला बॉम्ब, सुरूंग. ३ (*वाक्प्र*) **a mine of information** ज्ञानाचा खजिना. **mine** *क्रि* १ [*अक, सक*] (*for*)// (कोळसा वगैरे) खाणीतून काढणे. २ [*सक*] सुरूंग पेरणे. **'mine-detector** *ना* [*गण*] सुरूंग शोधून काढण्याचे साधन. **'minefield** *ना* [*गण*] १ सुरूंग पेरलेले सागरी क्षेत्र किंवा भूभाग. २ स्फोटक परिस्थिती. **miner** *ना* [*गण*] खाण कामगार. **'minesweeper** *ना* [*गण*] समुद्रात पेरलेले सुरूंग काढून टाकणारे जहाज.

mineral /'मिनरल्/ *ना* [*गण, अगण*] कोळसा, सोने यांसारखे खनिज पदार्थ, खनिज द्रव्य. **mineral** *वि* खनिजद्रव्ययुक्त. **'mineral water** *ना* [*अगण*] आरोग्याला पोषक असे नैसर्गिकपणे खनिज मिसळलेले पाणी.

mineralogy /,मिन'रॅलजि/ *ना* [*अगण*] खनिजशास्त्र, खनिजविज्ञान. **mineralogist** *ना* [*गण*] खनिजशास्त्राचा अभ्यासक किंवा खनिजशास्त्रज्ञ.

mingle /'मिङ्ग्ल्/ *क्रि* [*अक, सक*] *with//* मिसळणे.

mini- /'मिनि/ *पूर्वप्रत्यय* लांबी, आकार वगैरेत लहान, छोटा : *a '~bus, छोटी बस.*

miniature /'मिनच(र्); *अमे* 'मिनिअचुअर्/ *वि* (प्रत किंवा नमुन्याबाबत) नेहमीच्या आकारापेक्षा खूप छोटा, लहान. **miniature** *ना* [*गण*] एखाद्याचे अगदी छोटे चित्र. **miniaturize** *क्रि* [*सक*] आकारात लहान करणे.

minimal /'मिनिमल्/ *वि* किमान, अत्यल्प.

minimize /'मिनिमाइझ्/ *क्रि* [*सक*] कमीत कमी करणे, शक्य तेवढी काटछाट करणे.

minimum /'मिनिमम्/ *ना* [*गण, बहुधा अ.व*] (*ब.व* **minima** /-म/) अल्पांश, कमीत कमी रक्कम. **minimum** *वि* शक्य तेवढे कमी, किमान, लघुत्तम : *the ~ age, किमान वय.*

mining /'माइनिङ्/ *ना* [*अगण*] जमिनीतून कोळसा, धातू वगैरे काढण्याची प्रक्रिया, खाणकाम.

minion /'मिनिअन्/ *ना* [*गण*] (*अधिक्षेपी*) आज्ञाधारक नोकर, बगलबच्चा.

minister /'मिनिस्ट(र्)/ *ना* [*गण*] १ शासकीय खात्याचा मंत्री. २ ख्रिस्ती पुरोहित. **minister** *क्रि* [*अक*] *to//* (*औप*) सेवा/

शुश्रुषा करणे, परिचर्या करणे. **ministerial** /ˌमिनि'स्टिअरिअल्/ *वि* मंत्रीपदाचा; धर्मगुरूचा.

ministry /'मिनिस्ट्रि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*गण*] शासकीय खाते. २ [*गण*] ख्रिस्ती पुरोहिताचे काम, पौरोहित्य. ३ **the ministry** [*अे.व*] पौरोहित्य, धर्मगुरूचे काम : *enter the ~, ख्रिस्ती पुरोहित होणे.*

mink /मिङ्क्/ *ना* (क) [*गण*] मऊ केस असलेला एक छोटा तापट प्राणी. (ख) [*अगण*] या प्राण्याची मौल्यवान लोकर.

minor /'माइन(र्)/ *वि* कमी महत्त्वाचा; लहान, किरकोळ : *~ problems, क्षुल्लक प्रश्न* ○ *a ~ illness, किरकोळ आजार.* **minor** *ना* [*गण*] (*कायदा*) कायदेशीररीत्या अज्ञान.

minority /ˌमाइ'नॉरटि; *अमे* -'नॉऽर्-/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*गण*] (क) (तसेच ब.व क्रियापदासह अे.व) अल्प भाग किंवा संख्या – विशेषतः मतांच्या बाबतीत, अल्पमत. (ख) भिन्न वंशीय, भिन्न धर्मीय वगैरे लोकांचा लहान गट, अल्पसंख्य/अल्पसंख्यांक. २ [*अगण*] (*कायदा*) अज्ञान असण्याचा काळ किंवा वय.

minster /'मिन्स्ट(र्)/ *ना* [*गण*] मोठे किंवा महत्त्वाचे चर्च.

minstrel /'मिन्स्ट्रल्/ *ना* [*गण*] (मध्य युगात) हिंडणारा गायक, शाहीर, भाट.

mint^1 /मिन्ट्/ *ना* १ [*अगण*] जिची पाने स्वादाकरता वापरली जातात अशी एक वनस्पती, पुदिना. २ [*अगण, गण*] PEPPERMINT चे संक्षिप्त रूप.

mint^2 /मिन्ट्/ *ना* १ [*गण*] नाणी बनवली जातात ती जागा, टांकसाळ. २ [*अे.व*] (*अनौप*) खूप पैसा, घबाड : *make/earn a ~, घबाड मिळवणे.* ३ (*वाक्प्र*) **in mint condition** (जणू) नवीन. **mint** *क्रि* [*सक*] टांकसाळीत नाणे करणे, धातूचे नाणे पाडणे.

minuet /ˌमिन्यु'अेट्/ *ना* [*गण*] संथ आकर्षक नृत्य (किंवा त्याचे संगीत).

minus /'माइनस्/ *शब्दयो* १ वजा, उणे : *15 ~ 6 equals 9, १५ वजा ६ बरोबर ९.* २ शून्याखाली : *~ 3 degrees celsius, वजा ३ अंश सेल्सिअस.* ३ (*अनौप*) विना, शिवाय. **minus** *वि* वजा. **minus** (तसेच **minus sign**) *ना* [*गण*] उणे चिन्ह (–).

minute^1 /'मिनिट्/ *ना* १ (क) [*गण*] तासाचा $\frac{१}{६०}$ भाग. (ख) [*अे.व*] अगदी थोडा वेळ : *I'll be with you in a ~, मी तुझ्यापाशी थोड्या वेळातच येतो किंवा हा आलोच तुझ्याकडे.* २ [*गण*] कोनाच्या एका अंशाचा साठावा भाग. ३ **minutes** [*ब.व*] बैठकीत बोलले गेल्याचे किंवा घेतलेल्या निर्णयांचे वृत्त, कार्यवृत्त. ४ (*वाक्प्र*) **the minute/moment (that)** लगेच, त्या क्षणी. **minute** *क्रि* [*सक*] कार्यवृत्त लिहिणे.

minute^2 /माइ'न्यूट्; *अमे* -'नूट्/ *वि* (**-r, -st**) सूक्ष्म, अगदी लहानसहान. **minutely** *क्रिवि* सूक्ष्मतेने.

minutiae /माइ'न्यूशिई; *अमे* मि'नू-/ *ना* [*ब.व*] बारीकसारीक तपशील.

miracle /'मिरकल्/ *ना* १ (क) [*गण*] चमत्कार. (ख) [*अे.व*] (*अनौप ला*) अविस्मरणीय लक्षणीय घटना : *It's a ~ we weren't all killed, आम्ही सर्व ठार झालो नाहीत ही अद्‌भुत घटनाच होती.* २ [*गण*] *of*// आश्चर्य : *a ~ of modern science, आधुनिक विज्ञानाचे एक आश्चर्य.* **miraculous** /मि'रॅक्युलस्/ *वि* आश्चर्यकारक, विस्मयकारक; विश्वास बसणार नाही असा, अद्‌भुत.

mirage /'मिराझ्, मि'राझ्/ *ना* [*गण*] अस्तित्वात नसलेल्याचा भास, खास करून वाळवंटात होणारा लहान तळ्याचा भास, मृगजळ.

mire /'माइअ(र्)/ *ना* [*अगण*] रबरबीत चिखल, रेंद, रेवण.

mirror /'मिर(र्)/ *ना* [*गण*] आरसा, दर्पण. **mirror** *क्रि* [*सक*] आरशासारखे दाखवणे, प्रतिबिंबित करणे/होणे.

misadventure /ˌमिसड्'व्हेन्च(र्)/ *ना* [*गण, अगण*] (*औप*) कमनशीब, दुर्दैव.

misappropriate /ˌमिस'प्रउप्रिअेइट्/ *क्रि* [*सक*] घेऊन गैरवापर करणे, (पैशाची) अफरातफर करणे, दुर्विनियोग करणे : *~ sb's money, एखाद्याच्या पैशाची अफरातफर करणे.*

misbehave /ˌमिस्‌बि'हेइव्/ *क्रि* [*अक*] वाईट वागणे, गैरवर्तन करणे. **misbehaviour** (*अमे* **-ior**) *ना* [*अगण*] गैरवर्तन, बेशिस्त.

miscalculate /ˌमिस्'कॅल्क्युलेइट्/ *क्रि* [*अक, सक*] (रक्कम वगैरे) चुकीचे मोजणे, अंदाज चुकणे. **miscalculation** /ˌमिस्कॅल्क्यु'लेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] चुकीचा अंदाज.

miscarriage /ˌमिस्'कॅरिज्; 'मिस्कॅरिज/ *ना* [*गण, अगण*] गर्भपात, अपुऱ्या दिवसांची बाळंतीण होणे. **miscarriage of 'justice** *ना* [*गण*] न्यायालयाचा चुकीचा निकाल, अन्यायकारक निवाडा.

miscarry /ˌमिस्'कॅरि/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*अक*] १ (स्त्रीबाबत) गर्भपात होणे. २ (योजना वगैरेबाबत) फसणे.

miscellaneous /ˌमिस'लेइनिअस्/ *वि* विविध प्रकारचा, अनेकविध, मिश्र, संकीर्ण.

miscellany /मि'सेलनि; *अमे* 'मिसलेइनि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) अनेकसंग्रह, अनेकविषयसंग्रह, प्रकीर्णक, संकीर्ण संग्रह.

mischance /ˌमिस्'चान्स्; *अमे* -चॅन्स्/ *ना* [*गण, अगण*] (*औप*) दुर्भाग्य, दुर्दैव.

mischief /'मिस्चिफ्/ *ना* [*अगण*] १ खोडी. २ (*वाक्प्र*) **ˌdo sb/oneself a 'mischief** (*अनौप गंमत*) एखाद्याची/स्वतःची हानी करणे. **mischievous** /-चिव्हस्/ *वि* १ खोडकर, खट्याळ. २ हानीकारक, उपद्रवकारक. **mischievously** *क्रिवि* खोडकरपणे, खट्याळपणे.

misconceive /ˌमिस्कन्'सीव्ह्/ *क्रि* [*सक*] (*औप*) (विशेषतः कर्मणी) चुकीचा समज असणे, गैरसमज असणे. **misconception** /-'सेप्श्न्/ *ना* [*अगण, गण*] गैरसमज, भ्रान्त कल्पना.

misconduct /ˌमिस्'कॉन्डक्ट्/ *ना* [*अगण*] (*औप*) गैरवर्तन, दुराचरण, बदचाल.

misdeed /ˌमिस्'डीड्/ *ना* [*गण, बहुधा ब.व*] (*औप*) दुष्कृत्य, दुराचार; गुन्हा, अपराध.

miser /'माइझ़(र्)/ *ना* [*गण*] कंजूष, चिक्कू, कवडीचुंबक. **miserly** *वि* कंजूष.

miserable /'मिझ़्रब्ल्/ *वि* १ दुःखीकष्टी. २ तापदायक : ~ *weather, तापदायक हवा.* ३ हलका, दरिद्री, भिकार : *earn a ~ wage, अगदी कमी वेतन मिळणे.* **miserably** *क्रिवि.*

misery /'मिझ़रि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण, गण*] दुःख, क्लेश, हाल, दुर्दशा. २ [*गण*] (*ब्रि अनौप*) नेहमी कुरकुर करणारा माणूस, तक्रारखोर.

misfire /ˌमिस्'फाइअ(र्)/ *क्रि* [*अक*] १ (बंदूक वगैरेबाबत) नीट न चालणे. २ (*ला अनौप*) (योजना वगैरेबाबत) फसणे, अपयशी होणे.

misfit /'मिस्फिट्/ *ना* [*गण*] एखाद्या वातावरणात न रुळणारा माणूस, विशोभित मनुष्य.

misfortune /ˌमिस्'फॉऽचून्/ *ना* [*गण, अगण*] दुर्भाग्य, दुर्दैव.

misgiving /ˌमिस्'गिव्हिङ्/ *ना* [*अगण, गण खास करून ब.व*] (*औप*) आशंका, कुशंका, संशय.

misguided /ˌमिस्'गाइडिड्/ *वि* आचार किंवा विचार यामधे भरकटलेला, दिशाभूल झालेला, वाट चुकलेला.

mishap /'मिस्हॅप्/ *ना* [*गण, अगण*] (बहुधा गंभीर नसलेली) दुर्घटना.

misjudge /ˌमिस्'जैज्/ *क्रि* [*सक*] चुकीचा समज करणे, अंदाज चुकणे : ~ *sb/sb's character, एखाद्याबाबत/एखाद्याच्या स्वभावाबाबत चुकीची कल्पना करून घेणे.*

mislay /मिस्'लेइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **mislaid** /-'लेइड्/) [*सक*] एखादी वस्तू कुठेतरी ठेवणे आणि मग कुठे ते विसरणे.

mislead /ˌमिस्'लीड्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **misled** /-लेड्/) [*सक*] एखाद्याची चुकीची कल्पना करून देणे, गैरसमज करणे, फसवणूक करणे.

mismanage /ˌमिस्'मॅनिज्/ *क्रि* [*सक*] अव्यवस्था ठेवणे/करणे, गलथानपणा करणे. **mismanagement** *ना* [*अगण*] अव्यवस्था, गैरप्रकार, गलथानपणा.

misprint /'मिस्प्रिन्ट्/ *ना* [*गण*] मुद्रणदोष.

misrepresent /ˌमिस्ˌरेप्रि'झ़ेन्ट्/ *क्रि* [*सक*] खोटी वार्ता देणे, खोटे चित्र उभे करणे, विपर्यास करणे. **misrepresentation** /-झ़ेन्'टेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] विपर्यास, खोटे वृत्त, मिथ्यावर्णन.

Miss /मिस्/ *ना* [*गण*] (अविवाहित स्त्रीची

उपाधी) कुमारी : *M~ Smith, कु. स्मिथ.*

miss /मिस्/ *क्रि* १ [*अक, सक*] हुकणे, सटकणे, सुटणे, चुकणे : *~ the ball/the train, चेंडू/गाडी चुकणे.* २ [*सक*] पाहण्याचे, ऐकण्याचे विसरणे, चुकणे, न होणे. ३ [*सक*] अनुपस्थिती जाणवणे, अनुपस्थितीने वाईट वाटणे : *I'll ~ you when you go, तू गेल्यावर मला फार जाणवेल.* ४ (*क्रिब*) **miss sb/sth out** एखादी गोष्ट सुटणे, तिचा अंतर्भाव न होणे/करणे. **miss 'out (on sth)** एखाद्या गोष्टीचा फायदा करून घेण्याची चांगली संधी गमावणे. **miss** *ना* [*गण*] १ मारण्यातील, झेलण्यातील वगैरे अपयश. २ (*वाक्प्र*) **give sth a 'miss** एखादी गोष्ट न करणे, हुकवणे, चुकवणे; एखाद्या ठिकाणी न जाणे, चकवणे, बुडवणे. **missing** *वि* न सापडणारा; हरवलेला.

missile /'मिसाइल्; *अमे* 'मिसल्/ *ना* [*गण*] १ हवेतून पाठवायचे स्फोटक अस्त्र, क्षेपणास्त्र : *nuclear ~s, अण्विक क्षेपणास्त्रे.* २ फेकलेले किंवा उडवलेले अस्त्र किंवा वस्तू.

mission /'मिश्न्/ *ना* [*गण*] १ परदेशी पाठवलेले शिष्टमंडळ (किंवा त्याचे काम) : *a trade ~ to China, चीनला पाठवायचे व्यापारी शिष्टमंडळ.* २ खास कार्य किंवा कर्तव्य : *her ~ in life, तिचे आयुष्यभरचे कार्य.* ३ (ख्रिस्ती) धर्मप्रचारक काम करतात ते स्थान. **missionary** /'मिशन्रि; *अमे* -नेरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) धर्मप्रसारासाठी परदेशी पाठवायचा धर्मप्रचारक.

misspell /,मिस्'स्पेल्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **~t** /-'स्पेल्ट्/ किंवा विशेषतः *अमे* **~ed**) [*सक*] चुकीचे वर्णलेखन (स्पेलिंग) करणे. **misspelling** *ना* [*अगण, गण*] चुकीचे वर्णलेखन (स्पेलिंग).

misspent /मिस्'स्पेन्ट्/ *वि* चुकीचा किंवा मूर्खपणाने वापरलेला, फुकट घालवलेला, वाया दवडलेला : *his ~ youth, त्याचे वाया घालवलेले तारुण्य.*

mist /मिस्ट्/ *ना* [*अगण, गण*] (क) धूम्रमेघ, तुषारयुक्त मेघ, झाकळ, विरळ धुके : *hills covered in ~, अभ्राच्छादित डोंगर.* (ख) (*ला*) गोंधळात टाकणारे काही, धूसर पडदा : *lost in the ~s of time, काळाच्या अभ्राआड हरवलेला.* **mist** *क्रि* (*क्रिब*) **,mist 'over** अभ्राने आच्छादणे, झाकळणे : *His glasses ~ed over, त्याच्या चष्म्यावर वाफेचा थर आला.* **misty** *वि* (**-ier, -iest**) (क) धुके असलेला, धूसर, झाकळलेला : *a ~y morning, धुक्याची किंवा अभ्रयुक्त सकाळ.* (ख) (*ला*) अस्पष्ट, अंधुक : *a ~y old photograph, अंधुक जुने छायाचित्र.*

mistake /मि'स्टेइक्/ *ना* [*गण*] १ कृती, मत किंवा कल्पना यातील चूक, प्रमाद. २ (*वाक्प्र*) **by mi'stake** चुकीने, निष्काळजीपणाने. **mistake** *क्रि* (*भूत* **mistook** /मि'स्टुक्/, *भूत वि* **~n** /मिस्'टेइकन्/) [*सक*] १ चुकीचा समज किंवा ग्रह होणे. २ *for//* एखादी व्यक्ती/वस्तू दुसरीच आहे असे समजणे : *People often ~ Jill for her twin sister, लोक जिलला अनेकदा तिची जुळी बहीणच समजतात.* **mistaken** *वि* चुकीचा, गैर; बरोबर नसलेला : *~n beliefs, चुकीच्या श्रद्धा.* **mistakenly** *क्रिवि* चुकून, चुकीने.

mistletoe /'मिस्ल्टउ/ *ना* [*अगण*] ख्रिसमसमधे आरास करताना वापरायची पांढऱ्या फळांची एक सदाहरित वनस्पती, हाडमोड.

mistress /'मिस्ट्रिस्/ *ना* [*गण*] १ अधिकार पदावर असणारी स्त्री, बाईसाहेब. २ कुत्रा, घोडा वगैरेची मालकीण. ३ (विशेषतः *ब्रि*) शालेय शिक्षिका, बाई. ४ विवाहित परपुरुषाशी संबंध ठेवणारी स्त्री, रखेल, अंगवस्त्र.

mistrust /,मिस्'ट्रस्ट्/ *क्रि* [*सक*] विश्वास न ठेवणे. **mistrust** *ना* [*अगण*] अविश्वास. **mistrustful** *वि* विश्वास न ठेवणारा.

misty ➪ MIST.

misunderstand /,मिस्,अन्ड'स्टॅन्ड्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-stood** /-'स्टुड्/) [*सक*] गैरसमज होणे/करणे, न समजणे : *He ~stood the instructions and got lost, त्याला सूचना नीट समजल्या नाहीत म्हणून तो हरवला.* **misunderstanding** *ना* [*गण, अगण*] गैरसमज.

misuse /,मिस्'यूझ्/ *क्रि* [*सक*] १ गैरवापर करणे : *~ one's time, स्वतःच्या वेळेचा*

दुरुपयोग करणे. २ (एखाद्याला) वाईट वागवणे : *He felt ~d by the company, कंपनीनी त्याला नीट वागवले नाही असे त्याला वाटले.* **misuse** /ˌमिस्'यूस्/ *ना* [*गण, अगण*] गैरवापर, दुरुपयोग.

mitigate /'मिटिगेइट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) दुःख हलके करणे, कमी करणे, उतार पाडणे. **mitigating** *वि* गंभीरपणा कमी करणारा : *There were ~ing circumstances to explain her bad behaviour, तिच्या वाईट वागणुकीची गंभीरता कमी करणारी अशी काही परिस्थितिजन्य कारणे होती.* **mitigation** /ˌमिटि'गेइश्न्/ *ना* [*अगण*] शमवणे, उपशमन.

mitre (*अमे* **miter**) /'माइट(र्)/ *ना* [*गण*] बिशपने घालायची टोकदार टोपी.

mitten /'मिट्न्/ (तसेच **mitt** /मिट्/) *ना* [*गण*] अंगठा वेगळा आणि बाकीची चारही बोटे एकत्र आच्छादणारा हातमोजा.

mix /मिक्स्/ *क्रि* १ [*अक, सक*] वेगवेगळे पदार्थ एकत्र करणे, मिसळणे, मिश्रण करणे : *~ flour and water to make paste, पिठात पाणी मिसळून पातळ मिश्रण करणे* ○ *oil and water don't ~, पाण्यात तेल मिसळत नाही.* २ [*अक*] (माणसांबाबत) मिसळणे, मिळूनमिसळून वागणे, सामाजिक अभिसरण होणे : *He finds it hard to ~, इतरांच्यात मिसळायला त्याला जड जाते.* ३ (*वाक्प्र*) **be/get mixed 'up in sth** (*अनौप*) भानगडीत पडणे, फंदात पडणे. ४ (*क्रिब*) **mix sb/sth up** दोघांत घोटाळा करणे : *I got her ~ed up with her sister, माझा तिच्यात आणि तिच्या बहिणीत घोटाळा झाला.* **mix** *ना* [*गण, अगण*] मिसळायच्या गोष्टी, मिश्रणाचे जिन्नस : *a 'cake mix, केक तयार करण्याचे मिश्रण.* **mixed** *वि* १ विविध प्रकारचा, मिश्रित, व्यामिश्र. २ मुलामुलींसाठीचा, मिश्र : *a ~ed school, मिश्र शाळा.* **mixer** *ना* [*गण*] मिश्रण करणारी व्यक्ती किंवा वस्तू, मिश्रक. **'mix-up** *ना* [*गण*] (*अनौप*) गोंधळाची परिस्थिती.

mixture /'मिक्स्च(र्)/ *ना* [*गण*] मिश्रण : *a ~ of fear and sadness, दुःख आणि भीती यांचे मिश्रण.*

mm संरू (*ब.व* **mm** किंवा ~s) **millimetre(s)** मिलिमीटर.

moan /मउन्/ *क्रि* [*अक*] १ कण्हणे, कुंथणे. २ (*about*)// (*अनौप*) तक्रार करणे, कुरकुरणे, विव्हळणे : *He's always ~ing about having no money, पैसे नाहीत म्हणून तो नेहमी कुरकुरत असतो.* **moan** *ना* [*गण*] कण्हणे, विव्हळणे, विलाप.

moat /मउट्/ *ना* [*गण*] किल्ल्याभोवतीचा पाणी भरलेला खंदक.

mob /मॉब्/ *ना* [*गण*] १ जमाव, झुंड. २ (*व्रात्य*) गुंडांची झुंड. **mob** *क्रि* **(-bb-)** [*सक*] जमाव करणे, घेरणे : *a film star ~bed by his fans, चाहत्यांचे भोवती कडे पडलेला चित्रपट कलावंत.*

mobile /'मउबाइल्; *अमे* -ब्ल्/ *वि* फिरता, हालताचालता, चल किंवा चलित. **mobile** *ना* [*गण*] वाऱ्याने हालणारी कलाकुसरीची रचना. **mobility** /मउ'बिलटि/ *ना* [*अगण*] हालचाल, चलनशीलता, गतिशीलता.

mobilize /'मउबिलाइझ्/ *क्रि* [*अक, सक*] सेवेसाठी – उदाहरणार्थ युद्धातील – तयार होणे/करणे, सज्ज होणे/करणे.

moccasin /'मॉकसिन्/ *ना* [*गण*] मऊ चामड्याचा बूट.

mock^{1} /मॉक्/ *क्रि* [*अक, सक*] उपहासाने हसणे, कुत्सित हसणे; एखाद्याची टिंगल/टवाळी करणे, खिल्ली उडवणे : *a ~ing smile, कुत्सित हसू.* **mockery** *ना* १ [*अगण*] उपहास, थट्टा; टिंगल-टवाळी, कुचेष्टा. २ [*अे.व*] वाईट उदाहरण, थट्टा : *a ~ of justice, न्यायाची थट्टा.* ३ (*वाक्प्र*) **make a mockery of sth** एखाद्या गोष्टीची थट्टा करणे, टर उडवणे.

mock^{2} /मॉक्/ *वि* खरा नसलेला, खोटाखोटा, अभिरूप, प्रतिरूप : *a ~ battle, अभिरूप (म्हणजे लुटुपुटूची) लढाई.*

modal (तसेच **modal au'xiliary**) /'मउड्ल्/ *ना* [*गण*] (*व्याकरण*) साहाय्यकारी क्रियापद – उदाहरणार्थ can, may किंवा should, अभिवृत्तिदर्शक क्रियापद.

mode /मउड्/ *ना* [*गण*] (*औप*) एखादी गोष्ट करण्याची रीत, तऱ्हा, मार्ग.

model^{1} /मॉड्ल्/ *ना* [*गण*] १ लहान प्रतिकृती : *a ~ of the new airport, नव्या*

विमानतळाची प्रतिकृती. २ उत्पादनाचा प्रकार : *This car is our latest ~, ही गाडी आमचे अगदी अलिकडचे उत्पादन आहे.* ३ आदर्श व्यक्ती/वस्तू : *a ~ wife, आदर्श पत्नी.* ४ कलाकार किंवा छायाचित्रकार यांच्यासाठी विशिष्ट ढंगाने उभा राहणारा किंवा विशिष्ट अवस्था धारण करणारा माणूस. ५ संभाव्य गिऱ्हाइकांसाठी नवीन कपडे घालून दाखविणारी व्यक्ती : *a 'fashion ~, नव्या फॅशनचे मॉडेल.*

model^{2} /'मॉड्ल्/ *क्रि* (**-ll-**; *अमे* **-l-**) १ [*अक, सक*] एखाद्या गोष्टीची प्रतिकृती करणे. २ [*अक, सक*] संभाव्य गिऱ्हाइकांना कपडे घालून दाखविणे. ३ [*सक*] *on//* स्वतःच्या वर्तनासाठी आदर्श ठेवणे : *He ~s himself on his uncle, त्याच्यापुढे त्याच्या काकांचा आदर्श आहे.*

moderate^{1} /'मॉडरट्/ *वि* मध्यम (प्रतीचा वगैरे); माफक, मर्यादित. **moderate** *ना* [*गण*] राजकारणातला मवाळ (मते असणारा माणूस), नेमस्त. **moderately** *क्रिवि* सर्वसामान्यतः, फार नाही अशा रीतीने, माफक प्रमाणात : *only ~ly successful, थोडासाच यशस्वी.*

moderate^{2} /'मॉडरेइट्/ *क्रि* [*अक, सक*] लगाम घालणे, जरा कमी होणे/करणे, मवाळ होणे/करणे, अतिरेक टाळणे, धरबंध घालणे.

moderation /,मॉड'रेइश्न्/ *ना* [*अगण*] १ अतिरेक टाळणे, मध्यम करणे, नेमस्तपणा. २ (*वाक्प्र*) **in moderation** कमी प्रमाणात, मर्यादित प्रमाणात : *drink whisky in ~, व्हिस्की मर्यादित प्रमाणात घेणे.*

modern /'मॉड्न्/ *वि* १ आधुनिक. २ नवीन, अभिनव; अत्याधुनिक. **modernize** /'मॉडनाइझ्/ *क्रि* [*अक, सक*] अत्याधुनिक करणे. **modernization** /,मॉडनाइ'झेइश्न्; *अमे* -नि'झ्-/ *ना* [*अगण*] अत्याधुनिकीकरण.

modest /'मॉडिस्ट्/ *वि* १ स्वतःबद्दल भलभलत्या कल्पना नसणारा, विनम्र. २ मध्यम; फार मोठा नाही असा, बऱ्यापैकी : *a ~ salary, मध्यम/बऱ्यापैकी वेतन.* ३ लैंगिकदृष्ट्या योग्य, सभ्य; लाजाळू, नम्र : *~ behaviour, नम्र किंवा सभ्य वर्तन.* **modestly** *क्रिवि* नम्रपणे. **modesty** *ना* [*अगण*] नम्रता.

modify /'मॉडिफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] १ थोडासा बदल करणे. २ कमी कडक करणे, सैल करणे : *~ one's demands, स्वतःच्या मागण्या कमी करणे.* ३ (*व्याकरण*) (विशेषण किंवा क्रियाविशेषणाबाबत खास वापर) शब्दाच्या अर्थाची मर्यादा सुचवणे, शब्दाचा अर्थ अधिक काटेकोर किंवा सीमित करणे : *In the phrase 'the red car', 'red' ~ies 'car', 'The red car' ('लाल रंगाची गाडी') या पदबंधात 'red' (लाल रंग) हा शब्द 'car' (गाडी) या शब्दाची अभिव्याप्ती मर्यादित करतो.* **modification** /,मॉडिफि'केइश्न्/ *ना* [*गण, अगण*] केलेला बदल; सौम्य करणे, दिलेली सूट; अर्थमर्यादासूचन.

module /'मॉड्यूल्; *अमे* -जूल/ *ना* [*गण*] १ बांधकामात वापरायचे लांबीरुंदीचे प्रमाण. २ अंतराळयानाला जोडलेला पण स्वतंत्र असणारा भाग. ३ अभ्यासक्रमातील स्वतंत्र विभाग : *the biology ~ in the science course, विज्ञानाच्या अभ्यासातील जीवविज्ञानाचा भाग.* **modular** /-युल(र्); *अमे* -जु-/ *वि* प्रमाण मापकावर आधारित; जोडलेल्या पण स्वतंत्र भागाचा; स्वतंत्र विभागाचा.

mohair /'मउहेअ(र्)/ *ना* [*अगण*] एका विशिष्ट बकरीची मऊ लोकर (किंवा त्या लोकरीचे कापड).

Mohammedan = MUHAMMADAN (MUHAMMAD).

moist /मॉइस्ट्/ *वि* दमट, किंचित् ओलसर. **moisten** /'मॉइस्न्/ *क्रि* [*अक, सक*] दमट किंवा ओलसर होणे/करणे. **moisture** /'मॉइस्च(र्)/ *ना* [*अगण*] आर्द्रता, ओलावा, सांद्रता.

molar /'मउल(र्)/ *ना* [*गण*] अन्न चावायला आणि त्याचे पीठ करायला वापरण्यात येणारा मोठा मागचा दात, दाढ.

mold (*अमे*) = MOULD.

molder (*अमे*) = MOULDER.

mole^{1} /मउल्/ *ना* [*गण*] अंगावरचा तीळ; मस.

mole^{2} /मउल्/ *ना* [*गण*] १ बिळात राहणारा उंदरासारखा पण अंगावर मऊ केस असलेला राखाडी रंगाचा एक छोटा प्राणी, छछुंदर,

चिचुंद्री. २ (*अनौप*) दुसऱ्या संघटनेला चोरून माहिती पुरवणारा नोकर, फितुर माणूस. **'molehill** *ना* [*गण*] चिचुंद्रीने उकरलेली माती.

molecule /'मॉलिक्यूल/ *ना* [*गण*] एखाद्या पदार्थातील अणूंचा सर्वात लहान गट, रेणू. **molecular** /म'लेक्युल(र्)/ *वि* रैणव, रैणवीय.

molest /म'लेस्ट्/ *क्रि* [*सक*] १ त्रास देणे, हैराण करणे. २ स्त्रीवर किंवा मुलावर कामवासनेने हल्ला करणे, छेड काढणे, विनयभंग करणे.

mollusc (*अमे* तसेच **mollusk**) /'मॉलस्क्/ *ना* [*गण*] गोगलगाय, कालव यांसारखे मृदुकाय-कवची प्राणी, शिंपल्यातील प्राणी.

molt (*अमे*) = MOULT.

molten /'मउल्टन्/ *वि* वितळवलेला : ~ *rock/steel, द्रवरूप खडक/ओतीव पोलाद.*

moment /'मउमन्ट्/ *ना* १ [*गण*] क्षण, निमिष. २ [*अे.व*] कालबिंदू. ३ [*अगण*] (*औप*) महत्त्व : *a matter of great ~, महत्त्वाची बाब.* ४ (*वाक्प्र*) **the moment (that)** ➪ MINUTE¹. **momentary** /-मन्ट्रि/ *वि* क्षणैक, क्षणभंगुर. **momentarily** /*अमे* ,मउमन्'टेरलि/ *क्रिवि* १ अल्प काळासाठी, क्षणापुरता. २ (विशेषतः *अमे*) लवकरच.

momentous /म'मेन्टस्, मउ'म्-/ *वि* फार महत्त्वाचा.

momentum /म'मेन्टम्, मउ'म्-/ *ना* [*अगण*] १ (*पदार्थविज्ञान*) गतिमान वस्तूच्या गतीची राशी, संवेग. २ (*ला*) एखाद्या प्रक्रियेची गती वाढवणारी शक्ती, जोर : *The demands for reform are slowly gathering ~, सुधारणा करण्याच्या मागण्या हळूहळू जोर धरीत आहेत.*

monarch /'मॉनक्/ *ना* [*गण*] राजा, राणी, सम्राट, सम्राज्ञी, अधिपती, अधिराणी. **monarchy** *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] राजसत्ता, एकसत्ताकराज्यपद्धती. २ [*गण*] राज्य, राजाचा मुलुख.

monastery /'मॉनस्ट्रि; *अमे* -टेरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) भिक्षुक राहतात ते स्थळ, (बौद्ध) विहार, मठ.

monastic /म'नॅस्टिक्/ *वि* भिक्षुसंबंधीचा, विहारांबाबतचा.

Monday /'मन्डि/ *ना* [*अगण, गण*] रविवार नंतरचा आठवड्याचा दुसरा दिवस, सोमवार : *They're coming on ~, ते सोमवारी येणार आहेत* ○ *The museum is closed on ~s, संग्रहालय दर सोमवारी बंद असते.*

monetary /'मनिट्रि; *अमे* -टेरि/ *वि* आर्थिक, पैशाचा.

money /'मनि/ *ना* [*अगण*] १ नाणी आणि नोटा, पैसे. २ संपत्ती, पैसा. ३ (*वाक्प्र*) **get one's money's worth** खर्च केलेल्या पैशाचा पुरेपुर मोबदला मिळणे, पैसा वसूल होणे. **'money-box** *ना* [*गण*] नाणी साठविण्याची पेटी, पैशाची पेटी.

mongrel /'मन्ग्रल/ *ना* [*गण*] दोन विभिन्न जातीच्या कुत्र्यांपासून झालेला कुत्रा.

monitor /'मॉनिट(र्)/ *ना* [*गण*] १ लक्ष ठेवणारे किंवा परीक्षा करणारे साधन : *a heart ~, हृदयाच्या हालचालीचे मोजयंत्र.* २ अधिक माहिती मिळण्यासाठी परदेशी रेडिओ केन्द्रे ऐकणारा माणूस. ३ कार्यक्रम निवडण्यासाठी किंवा तपासण्यासाठी वापरायचा दूरदर्शन-पटल. ४ संगणकाचे काम तपासण्यासाठी वापरायचा पटल किंवा दुसरे एखादे साधन. ५ काही खास कामे नेमून दिलेला विद्यार्थी, वर्गनायक. **monitor** *क्रि* [*सक*] प्रगती, कार्य वगैरे तपासणे किंवा त्यांचे निरीक्षण करणे.

monk /मङ्क्/ *ना* [*गण*] विहारात राहणारा संन्यासी किंवा भिक्षू.

monkey /'मङ्कि/ *ना* [*गण*] १ माकड, वानर. २ (*अनौप*) माकडचेष्टा करणारे खट्याळ मूल. **monkey** *क्रि* (*क्रिब*) **monkey about/around** (*अनौप*) खोड्या करणे.

mono /'मॉनउ/ *वि, ना* [*अगण*] एकच ध्वनिवर्धक लागणारा (आवाज) : *a recording in ~, एकच ध्वनिवर्धक वापरलेल्या आवाजाचे ध्वनिमुद्रण.*

monochrome /'मॉनक्रउम्/ *वि* एकरंगी किंवा कृष्णधवल.

monocle /'मॉनक्ल्/ *ना* [*गण*] एक भिंगाचा चष्मा, एकाच डोळ्याचा चष्मा.

monogamy /म'नॉगमि/ *ना* [*अगण*] एकपत्निकत्वाची किंवा एकपतिकत्वाची चाल, एकाशीच विवाह लावण्याची पद्धती. **monogamous** /-मस्/ एकपतिक, एकपत्निक.

monogram /'मॉनग्रॅम्/ *ना* [*गण*] दोन किंवा अधिक अक्षरांचा (विशेषतः माणसाच्या नावातील आद्याक्षरांचा) एक बंध, आद्याक्षरमुद्रा.

monologue (*अमे* तसेच **monolog**) /'मॉनलॉग्; *अमे* -लॉऽग्/ *ना* [*गण*] नाटकातील स्वगत.

monopoly /म'नॉपलि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) मक्तेदारी : (*ला*) *A good education should not be the ~ of the rich, चांगले शिक्षण ही श्रीमंतांची मक्तेदारी होऊ नये.* **monopolize** *क्रि* [*सक*] मक्तेदारी होणे/करणे, संपूर्ण ताब्यात ठेवणे.

monorail /'मॉनउरेइल्/ *ना* [*अगण*] एकेरी लोहमार्ग असणारी रेल्वे.

monosyllable /'मॉनसिलब्ल्/ *ना* [*गण*] एकावयवी शब्द. **monosyllabic** /,मॉनसि'लॅबिक्/ *वि* एकावयवी.

monotonous /म'नॉटनस्/ *वि* एकसुरी म्हणून कंटाळवाणा, रटाळ : *a ~ voice, एकसुरी आवाज.* **monotonously** *क्रिवि* रटाळपणे, कंटाळवाणेपणे. **monotony** /-टनि/ *ना* [*अगण*] एकसुरीपणा, कंटाळवाणेपणा.

monsoon /,मॉन्'सून्/ *ना* [*गण*] जोरदार पाऊस आणणारे हिंदी महासागरावरील मोसमी वारे.

monster /'मॉन्स्ट(र्)/ *ना* [*गण*] १ भीतीदायक असा अक्राळविक्राळ कुरूप (विशेषतः काल्पनिक) प्राणी, राक्षस. २ दुष्ट माणूस. ३ प्रचंड, अवाढव्य वस्तू : *The new house is a real ~, नवे घर राक्षसासारखेच अवाढव्य आहे.*

monstrous /'मॉन्स्ट्रस्/ *वि* १ अवाढव्य आणि हिडीस आकाराचा, अक्राळविक्राळ. २ धक्कादायक किंवा चुकीचा. **monstrosity** /मॉन्'स्ट्रॉसटि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) अवाढव्य पण कुरूप अशा इमारती वगैरे. **monstrously** *क्रिवि* अवाढव्यपणे; धक्कादायकपणे.

month /मन्थ्/ *ना* [*गण*] वर्षाच्या बारा भागांपैकी एक भाग, सुमारे चार आठवड्यांचा काळ, महिना, मास. **monthly** *वि, क्रिवि* १ मासिक, दरमहा. २ एक महिनाच चालणारा. **monthly** *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) महिन्यातनं एकदा छापलं जाणारं प्रकाशन, मासिक (प्रकाशन).

monument /'मॉन्युमन्ट्/ *ना* [*गण*] १ एखाद्या व्यक्तीची किंवा प्रसंगाची आठवण म्हणून उभारलेले स्मारक – पुतळा, इमारत वगैरे स्वरूपात. २ जुन्या काळातील महत्त्वाची इमारत. **monumental** /,मॉन्यु'मेन्ट्ल्/ *वि* १ स्मारकाचा; जुन्या वास्तूचा. २ भव्य. ३ खूप मोठा : *a ~ failure, मोठे अपयश.*

moo /मू/ *ना* [*गण*] गायीचे हंबरणे. **moo** *क्रि* [*अक*] हंबरणे.

mood^{1} /मूड्/ *ना* [*गण*] १ मानसिक अवस्था, भावावस्था : *in a good ~, चांगल्या भावावस्थेत* म्हणजे *आनंदी.* २ रागावलेली किंवा अधीर अवस्था. **moody** *वि* (**-ier, -iest**) मानसिक अवस्था सतत बदलणारा, लहरी; तापट. **moodily** *क्रिवि* लहरीपणाने.

mood^{2} /मूड्/ *ना* [*गण*] (*व्याकरण*) क्रियापदाने दाखवलेल्या क्रियेबाबत निश्चितता, शक्यता, साशंकता वगैरे गोष्टी दाखविणारी अभिवृत्ती : *the subjunctive ~, संकेताभिवृत्ती* किंवा *संशयार्थ अभिवृत्ती.*

moon^{1} /मून्/ *ना* १ **the moon** [*अे.व*] चंद्र. २ [*गण*] इतर ग्रहांचा उपग्रह. ३ (*वाक्प्र*) **over the 'moon** (*अनौप*) अत्यंत आनंदी, प्रसन्न. **'moonbeam** *ना* [*गण*] चंद्रकिरण. **'moonlight** *ना* [*अगण*] चंद्रप्रकाश, चांदणे. **'moonlight** *क्रि* (*भूत, भूत वि* **-lighted**) [*अक*] दिवसाची नोकरी असताना चोरून संध्याकाळची आणखी एक नोकरी असणे.

moon^{2} /मून्/ *क्रि* [*अक*] (*about/around*)// निरुद्देशपणे फिरणे, भरकटणे.

moor^{1} /मॉऽ(र्); *अमे* मुअर्/ *ना* [*गण,* खास करून *ब.व*] गवताळ-ओसाड जमीन, चिबडरान, जीर्णक भू : *walk on the ~s, चिबडरानात हिंडणे.* **'moorland** /-लन्ड्/ *ना*

[*अगण, गण*] माळरान जमीन.

moor² /मॉऽर्; *अमे* मुअर्/ *क्रि* [*अक, सक*] जहाज वगैरे बंदरात नांगरणे. **mooring** *ना* १ **moorings** [*ब.व*] बोट नांगरायला वापरायचे दोर, नांगर वगैरे, नौबंध. २ जहाज नांगरायची जागा.

moose /मूस्/ *ना* [*गण*] (*ब.व* **moose**) (*अमे*) खूप मोठ्या आकाराचा एक मृग.

mop /मॉप्/ *ना* [*गण*] १ लाकडी दांडूला फडके वगैरे बांधून फरशी साफ करण्यासाठी केलेली झटकणी, झटकणे. २ दाट विस्कटलेल्या केसांचा पुंजका, गुंताडा. **mop** *क्रि* (-pp-) १ [*सक*] झटकण्याने साफ करणे. २ (*क्रिब*) **mop sth up** (सांडलेला द्रवपदार्थ) फडक्याने पुसणे, बोळा फिरवणे.

mope /मउप्/ *क्रि* [*अक*] उदास/खिन्न वाटणे, खट्टू होणे.

moped /'मउपेड्/ *ना* [*गण*] लहान इंजिनाची मोटरसायकल.

moral¹ /'मॉरल्; *अमे* 'मॉऽर्-/ *वि* १ न्याय-अन्याय याबाबतचा विवेक असलेला, नैतिक : *a drop in ~ standard, नैतिक मूल्यांचा ऱ्हास किंवा नैतिक मूल्ये खालावणे.* २ वर्तनात स्वच्छ, चारित्र्यसंपन्न, नीतिमान. **morally** *क्रिवि* नैतिकदृष्ट्या. **,moral 'support** *ना* [*अगण*] नैतिक पाठिंबा, प्रोत्साहन.

moral² /'मॉरल्; *अमे* 'मॉऽर्-/ *ना* [*गण*] १ गोष्टीचे किंवा अनुभवाचे तात्पर्य. २ **morals** [*ब.व*] वागणुकीची तत्त्वे किंवा नीतिनियम.

morale /म'राल्; *अमे* -'रॅल्/ *ना* [*अगण*] एखाद्या व्यक्ती किंवा गटाचा आत्मविश्वास, उत्साह वगैरे, नीतिधैर्य, आत्मविश्वास.

morality /म'रॅलटि/ *ना* (*ब.व* -ies) १ [*अगण*] नीतिमत्ता, नैतिक आचरणाची तत्त्वे, सदाचाराचे नियम. २ [*गण*] विशिष्ट नीतिमत्ता किंवा नीतिपद्धती.

moralize /'मॉरलाइझ्; *अमे* 'मॉऽर्-/ *क्रि* [*अक*] (*about/on*)// (विशेषतः *अधिक्षेपी*) सदाचार-दुराचार याविषयी विवेचक बोलणे किंवा लिहिणे, नीती-अनीतीची चर्चा करणे.

morbid /'मॉऽबिड्/ *वि* मृत्यूविषयी विकृत आकर्षण असणारा, विकृत. **morbidly** *क्रिवि* विकृतपणे.

more /मॉऽ(र्)/ *वि, सना* जास्त संख्या किंवा प्रमाण, आणखी, अधिक : *I need ~ time, मला जादा वेळ हवा* ○ *~ people, जास्त लोक* ○ *Please tell me ~, मला आणखी सांग.* **more** *क्रिवि* १ (इंग्रजी विशेषण आणि क्रियाविशेषण यांचा तरभाव दाखविण्यासाठी वापर) अधिक : *~ expensive, अधिक महाग* ○ *talk ~ quietly, अधिक शांतपणे बोलणे.* २ अधिक प्रमाणात, यापेक्षा जास्त : *You need to sleep ~, तुला यापेक्षा जास्त झोपायला हवे.* ३ पुन्हा, फिरून : *I'll go there once ~, मी पुन्हा एकदा तिथे जाईन.* ४ (*वाक्प्र*) **,more and 'more** अधिकाधिक. **,more or 'less** (क) जवळजवळ. (ख) साधारणपणे, अंदाजे : *£20, ~ or less, साधारणपणे २० पौंड.*

moreover /मॉऽ'रउव्ह(र्)/ *क्रिवि* (*औप*) आणखी म्हणजे, भरीला; याखेरीज, याशिवाय.

morgue /मॉऽग्/ *ना* [*गण*] (विशेषतः *अमे*) अन्त्यसंस्कारापूर्वी प्रेते ठेवण्याची जागा, शवागार.

morning /'मॉऽनिङ्/ *ना* [*गण, अगण*] १ सूर्योदयापासून मध्यान्हापर्यंतचा किंवा दुपारच्या भोजनापूर्वीचा काळ, सकाळे. २ (*वाक्प्र*) **in the 'morning** दुसरे दिवशी सकाळी : *See him in the ~, उद्या सकाळी त्याला भेट.* **'morning dress** *ना* [*अगण*] लग्नसमारंभासारख्या प्रसंगी घालायचे पुरुषाचे कपडे, समारंभाचा पोषाख.

moron /'मॉऽरॉन्/ *ना* [*गण*] (*अनौप*) अगदी मूर्ख माणूस, येडबंबू, मद्दड. **moronic** /म'रॉनिक्/ *वि* वेडपट, मूर्ख.

morose /म'रउस्/ *वि* खिन्न, चिडचिडा आणि गप्प, फुगून बसलेला, रुसलेला. **morosely** *क्रिवि* रुसून, चिडून.

morphine /'मॉऽफीन्/. *ना* [*अगण*] अफूपासून बनवलेले वेदनाशामक औषध.

Morse (तसेच **,Morse 'code**) /मॉऽस्/ *ना* [*अगण*] अक्षरांसाठी ऱ्हस्व आणि दीर्घ ध्वनी वापरून निरोप पाठवण्याची पद्धती.

morsel /'मॉऽसल्/ *ना* [*गण*] (*of*)// तुकडा – विशेषतः अन्नाचा.

mortal /'मॉऽटल्/ *वि* १ मर्त्य. २ मृत्यू घडविणारा, गंभीर : *a ~ wound, गंभीर*

जखम. ३ कमालीचा : *in ~ fear, कमाल भीतीने.* **mortal** *ना* [*गण*] मर्त्य मानव. **mortality** /मॉऽ'टॅलटि/ *ना* [*अगण*] १ मर्त्यपणा. २ मृत्यूचे प्रमाण. **mortally** /-टलि/ *क्रिवि* १ प्राणघातकपणे, जीव जाईल असा : *~ly wounded, जिवाला धोका आहे इतका जखमी.* २ खूप, अतिशय : *~ly offended, फारच अपमानित.*

mortar^{1} /'मॉऽट(र्)/ *ना* [*अगण*] बांधकामातील विटा लिंपण्यासाठी वापरले जाणारे चुना, वाळू आणि पाणी यांचे मिश्रण, (बांधकामासाठीचा) कमावलेला चुना.

mortar^{2} /'मॉऽट(र्)/ *ना* [*गण*] १ उखळी तोफ, दारूचा गोळा उंच आणि दूर उडवणारी तोफ. २ कांडण करण्याचे उखळ, कुटण्याचा खल.

mortgage /'मॉऽगिज्/ *ना* [*गण*] (क) घर वगैरे घेण्यासाठी पैसा उभा करण्यास वापरलेली गहाण टाकण्याची पद्धती. (ख) गहाण टाकून मिळालेला पैसा. **mortgage** *क्रि* [*सक*] बँकेकडे वगैरे पैशासाठी मालमत्ता गहाण टाकणे.

mortify /'मॉऽटिफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] (बहुधा कर्मणी) एखाद्याला खाली पाहायला लावणे, फजीत करणे, शरमिंदा करणे. **mortification** /,मॉऽटिफि'केइश्न्/ *ना* [*अगण*] लाज, फजिती, वरमणे.

mortuary /'मॉऽचरि; *अमे* 'मॉऽचुअरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) अन्त्यसंस्कारापूर्वी प्रेते ठेवण्याची जागा, शवागार.

mosaic /मउ'झ़ेइ·क्/ *ना* [*गण, अगण*] रंगीत काचा किंवा खडे यांनी तयार केलेले चित्र किंवा आकृती, कच्चीकारी.

Moslem = MUSLIM.

mosque /मॉस्क्/ *ना* [*गण*] मुसलमान लोकांची प्रार्थना करायची इमारत, मशीद.

mosquito /मस्'कीटउ/ *ना* [*गण*] (*ब.व* **~es**) डास, मच्छर.

moss /मॉस्; *अमे* मॉऽस्/ *ना* [*गण*] दमट पृष्ठभागावर वाढणारी छोटी पिवळी किंवा हिरवी वनस्पती (किंवा तिचा पुंजका), शेवाळे, हरिता. **mossy** *वि* (**-ier, -iest**) शेवाळे आलेला/ साचलेला.

most /मउस्ट्/ *वि, सना* १ संख्या, प्रमाण किंवा व्याप्तीत सर्वाधिक, सर्वात जास्त : *Who will get the ~ votes, सर्वाधिक मते कुणाला मिळतील? ○ He ate the ~, सर्वात त्याने जास्त खाल्ले.* २ अर्ध्याहून अधिक, बहुसंख्य, मोठा भाग : *M~ people must pay the new tax, बहुसंख्य लोकांना नवा कर भरावा लागेल.* ३ (*वाक्प्र*) **'at (the) most** जास्तीत जास्त, (याहून) अधिक नाही. **most** *क्रिवि* १ (इंग्रजी विशेषण आणि क्रियाविशेषण यांचा तमभाव दाखवताना वापर) : *the ~ expensive car, सर्वात जास्त किमतीची गाडी.* २ सर्वाधिक प्रमाणात, सर्वात जास्त : *Children need ~ sleep, मुलांना सर्वात जास्त झोप लागते.* ३ खूप, फार : *a ~ interesting talk, अतिशय रंजक व्याख्यान.* ४ (*वाक्प्र*) **most likely** ➪ LIKELY. **mostly** *क्रिवि* प्रामुख्याने; मुख्यतः, सर्वसाधारणपणे.

motel /मउ'टेल्/ *ना* [*गण*] मोटारने प्रवास करणाऱ्यांचे हॉटेल.

moth /मॉथ्; *अमे* मॉऽथ्/ *ना* [*गण*] बहुधा रात्री उडणारा फुलपाखरासारखा एक किडा, पाकोळी, पतंग, कसर. **'mothball** *ना* [*गण*] कपड्याला कसर लागू नये म्हणून तीव्र वासाची एक गोळी, डांबराची गोळी. **'moth-eaten** *वि* १ कसरीने खाल्लेला, कसर लागलेला. २ (*ला*) जुनाट; जीर्ण.

mother /'मद(र्)/ *ना* [*गण*] १ आई, माता. २ महिलांच्या धार्मिक गटाची प्रमुख, माताजी. **mother** *क्रि* [*सक*] १ आईसारखी काळजी घेणे, आईच्या प्रेमाने वाढवणे. २ लाड करणे, पदराखाली घेणे. **'mother country** *ना* [*गण*] मातृभूमी, जन्मभूमी. **motherhood** *ना* [*अगण*] मातृत्व, आईपण. **'mother-in-law** *ना* [*गण*] (*ब.व* **~s-in-law**) सासूबाई. **motherly** *क्रिवि* मातृवत्, आईसारखे. **mother 'tongue** *ना* [*गण*] लहानपणी आत्मसात केलेली पहिली भाषा, मातृभाषा.

motif /मउ'टीफ़्/ *ना* [*गण*] कला किंवा संगीत यातील प्रमुख विषय किंवा विशिष्ट घाट, प्रतिमान.

motion /'मउश्न्/ *ना* १ [*अगण*] हालचाल, गतिमानता. २ [*गण*] विशिष्ट गती, हालचाल : *signal with a ~ of the hand, हाताच्या*

हालचालीने खूण करणे. ३ [*गण*] बैठकीत चर्चा करून मतास टाकण्याचा प्रस्ताव, ठराव. ४ (*वाक्प्र*) **go through the motions** (*अनौप*) करायचे म्हणून करणे, वरवर करणे – म्हणजे मनापासून न करणे. **put/set sth in 'motion** एखादी गोष्ट चालू करणे. **motion** *क्रि* [*अक, सक*] *to//* हाताने खूण करणे. **motionless** *वि* न हालणारा, निश्चल, थिजलेला.

motivate /'मउटिव्हेइट्/ *क्रि* [*सक*] १ (एखाद्याच्या कृतीची) प्रेरणा असणे, कारण असणे. २ एखाद्याला एखादी गोष्ट करण्यास उद्युक्त करणे, प्रवृत्त करणे, प्रेरणा देणे. **motivation** /,मउटि'व्हेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] प्रेरणा.

motive /'मउटिव्ह्/ *ना* [*गण*] एखाद्याच्या कृतीचे कारण, हेतू.

motor /'मउट(र्)/ *ना* [*गण*] १ शक्तीचे गतीत रूपान्तर करणारे साधन, चलित्र : *an electric ~, विद्युत चलित्र, विजेवर चालणारी मोटार.* २ (*ब्रि जुना, अप्रचलित* किंवा *गंमत*) मोटारगाडी. **motor** *वि* १ चलित्रयुक्त : *~ vehicles, मोटार असणारी वाहने.* २ वाहनांचा : *~ racing, वाहनस्पर्धा* किंवा *वाहनशर्यत.* **motor** *क्रि* [*अक*] (*जुना, अप्रचलित ब्रि*) गाडीने प्रवास करणे. **'motor bike** *ना* [*गण*] (*अनौप*) = MOTORCYCLE. **motorcade** /'मउटकेइड्/ *ना* [*गण*] मोटारींचा ताफा. **'motor car** *ना* [*गण*] (*ब्रि औप*) = CAR. **'motor cycle** *ना* [*गण*] इंजिनावर चालणारी मोठी जड सायकल, फटफटी. **motorist** *ना* [*गण*] गाडी चालवणारा, गाडीचा चालक. **motorize** *क्रि* [*सक*] (बहुधा कर्मणी) मोटर किंवा इंजिन बसविणे. **'motor-scooter** *ना* [*गण*] = SCOOTER. **'motorway** *ना* [*गण*] जलद वाहतुकीसाठीचा मोठा रस्ता.

motto /'मॉटउ/ *ना* [*गण*] (*ब.व* ~es) ब्रीदवाक्य, बोधवाक्य – उदा 'Live each day as it comes' किंवा 'सत्यमेव जयते'.

mould^1 /मउल्ड्/ *ना* [*गण*] मऊ किंवा पातळ पदार्थ ओतून आकार देण्याचा साचा, मूस, ओतणी. **mould** *क्रि* [*सक*] १ मुशीत घालून आकार देणे. २ (*ला*) परिणाम किंवा संस्कार करणे, घडवणे : *~ sb's character, एखाद्याचा स्वभाव घडविणे.*

mould^2 /मउल्ड्/ *ना* [*अगण*] शिळे अन्नपदार्थ वगैरेवर येणारी मऊ बुरशी. **mouldy** *वि* (-ier, -iest) बुरशी आलेला.

moulder /'मउल्ड(र्)/ *क्रि* [*अक*] भुगा होणे, माती होणे; हळूहळू नष्ट होणे.

moult /मउल्ट्/ *क्रि* [*अक*] १ (पक्ष्याबाबत) पिसे झडणे किंवा गळणे. २ (कुत्रा किंवा मांजराबाबत) केस गळणे.

mound /माउन्ड्/ *ना* [*गण*] १ टेकाड. २ ढीग, ढिगारा.

mount^1 /माउन्ट्/ *क्रि* १ [*अक, सक*] वर जाणे, वर चढणे : *slowly ~ the stairs, पायऱ्या सावकाश चढणे.* २ [*अक, सक*] (घोड्यावर) चढणे; (एखाद्याला) घोडा देणे. ३ [*अक*] वाढणे : *~ing costs, वाढत्या किंमती.* ४ [*सक*] चिकटवणे, जागी लावणे : *~ pictures* (eg in an album), *चित्रे लावणे* (उदा अल्बममध्ये). ५ [*सक*] आयोजन करणे; सुरू करणे : *~ an exhibition, प्रदर्शन मांडणे.* **mount** *ना* [*गण*] आरोहण करण्याचा अश्व, बसायचा घोडा.

mount^2 /माउन्ट्/ *ना* [*गण*] (स्थलवाचक नामांत वापर) पर्वत, गिरी.

mountain /'माउन्टिन्; *अमे* -न्ट्न्/ *ना* १ [*गण*] पर्वत, गिरी. २ [*अे.व*] पर्वताएवढी मोठी रक्कम, रास, भाग वगैरे : *a ~ of work, कामाचा डोंगर.* ३ (*वाक्प्र*) **make a ,mountain out of a 'molehill** किरकोळ गोष्टीला फार महत्त्व देणे, राईचा पर्वत करणे. **mountaineer** /,माउन्टि'निउ(र्); *अमे* -न्ट्न्-/ *ना* [*गण*] पर्वत चढण्यात तरबेज असणारी व्यक्ती, गिर्यारोहक. **mountaineering** *ना* [*अगण*] गिर्यारोहण. **mountainous** *वि* १ डोंगराळ, पहाडी, पर्वतमय. २ प्रचंड : *~ous waves, डोंगराएवढ्या लाटा.*

mourn /मॉऽन्/ *क्रि* [*अक, सक*] (*for*)// दुःख किंवा शोक करणे – विशेषतः एखाद्याच्या मृत्यूबाबत. **mourner** *ना* [*गण*] शोक करणारा. **mournful** *वि* दुःखकारक, शोकाकुल. **mourning** *ना* [*अगण*] १

(मृत्यूबाबत) शोक. २ ख्रिश्चन लोकांत मृत्यूबाबत शोक व्यक्त करण्यासाठी वापरायचा काळा पोषाख.

mouse /माउस्/ *ना* [*गण*] (*ब.व* **mice** /माइस्/) १ उंदीर. २ भित्रा, लाजाळू माणूस. ३ (*संगणन*) संगणकाची विशिष्ट कृती निवडण्यासाठी वापरायचे छोटे हातात धरायचे एक उपकरण किंवा साधन. **mousy** /'माउसि/ *वि* (**-ier, -iest**) (*अधिक्षेपी*) १ (विशेषतः केसांबाबत) फिकट तपकिरी, तांबूस. २ (लोकांबाबत) भित्रा; लाजाळू.

mousse /मूस्/ *ना* [*अगण, गण*] साय आणि अंडी यांपासून केलेला आणि फळांची किंवा चॉकलेटची चव असणारा एक पदार्थ.

moustache /म'स्टाश्/ (*अमे* **mustache** /'मस्टॅश्/) *ना* [*गण*] मिशी.

mouth^1 /माउथ्/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s** /'माउद्झ्/) १ तोंड, मुख. २ प्रवेशद्वार, तोंड : *the ~ of the cave, गुहेचे तोंड.* **mouthful** *ना* १ [*गण*] घास, कवळ. २ [*अे.व*] (*अनौप गंमत*) तोंडाने म्हणायला अवघड असा शब्द किंवा पदबंध. **'mouth-organ** *ना* [*गण*] तोंडाने वाजवायचा बाजा. **'mouthpiece** *ना* [*गण*] १ टेलिफोन, संगीत वाद्य वगैरेचा तोंडाशी ठेवायचा किंवा तोंडात धरायचा भाग. २ दुसऱ्यांची मते मांडणारे वृत्तपत्र किंवा असा माणूस, मुखपत्र, मुखत्यार. **'mouthwatering** *वि* (*पसंती*) (अन्नाबाबत) चवदार, तोंडाला पाणी सुटेल असे.

mouth^2 /माउद्/ *क्रि* [*अक, सक*] आवाज न काढता तोंड हालवणे, बोलल्यासारखे तोंड हालवणे.

movable /'मूव्हब्ल्/ *वि* हालता, हालवता येण्यासारखा, चल.

move^1 /मूव्ह्/ *क्रि* १ [*अक, सक*] हालणे, हालवणे, सरणे, सरकवणे : *Don't ~, while I'm taking the photo, मी फोटो काढताना हालू नकोस.* २ [*अक*] (*from, to*)// एक जागा सोडून दुसऱ्या जागी राहायला जाणे : *They are moving (house) soon, ते लवकरच घर/जागा बदलताहेत.* ३ [*अक*] प्रगती करणे : *The company has ~d ahead of the competition, इतर कंपनींच्या पुढे या कंपनीने प्रगती केली आहे.* ४ [*सक*] एखाद्याला भावनेने विशेषतः दयेने हालवणे, हालवून सोडणे, हेलावणे : *~d by a sad film, दुःखी चित्रपटाने भावना हेलावलेला.* ५ [*सक*] बैठकीमधे अधिकृतपणे सुचवणे. ६ (*वाक्प्र*) **move 'house** जागा/घर बदलणे. ७ (*क्रिब*) **move in/out** नवीन जागेत जाणे/जुने घर सोडणे. **move off** (विशेषतः वाहनाबाबत) सुरू करणे.

move^2 /मूव्ह्/ *ना* [*गण*] १ पटावरील सोंगटी हालवण्याची खेळी, चाल : *It's your ~! तुझी खेळी आहे!* २ एखाद्या विशिष्ट हेतूने केलेली कृती, हालचाल : *~s to end the strike, संप मिटवण्यासाठी केलेल्या हालचाली.* ३ (*वाक्प्र*) **get a 'move on** (*अनौप*) घाई करणे. **make a 'move** (क) प्रवास सुरू करणे, प्रस्थान करणे. (ख) कारवाई करणे. **on the 'move** हालणारा, हालता-चालता, सतत फिरणारा.

movement /'मूव्हमन्ट्/ *ना* १ [*गण, अगण*] हालचाल, हालवणे. २ [*गण,* तसेच ब.व क्रियापदासह अे.व] समान तत्त्व आणि ध्येय असणाऱ्या लोकांचा गट, चळवळ, आंदोलन : *the peace ~, शांततेसाठी चळवळ.* ३ [*गण*] संगीतरचनेचा एक मुख्य भाग.

movie /'मूव्हि/ *ना* (खास करून *अमे*) १ [*गण*] चित्रपट. २ **the movies** [*ब.व*] चित्रपटगृह.

mow /मउ/ *क्रि* (*भूत* **~ed**, *भूत वि* **~n** /मउन/ किंवा **~ed**) [*सक*] १ गवत कापण्याच्या यंत्राने गवत कापणे. २ (*क्रिब*) **mow sb down** मोठ्या संख्येने हत्या करणे, कत्तल करणे. **mower** *ना* [*गण*] = LAWNMOWER (LAWN).

MP /,अेम् 'पी/ *संरू, ना* [*गण*] (विशेषतः *ब्रि* व *भारतीय*) Member of Parliament पार्लमेंट किंवा संसद सभासद, खासदार.

mpg /,अेम् पी 'जी/ *संरू* miles per gallon दर गॅलनला मैलाचे प्रमाण.

mph /,अेम् पी 'अेइच्/ *संरू* miles per hour दर तासाला मैलाचे प्रमाण.

Mr /'मिस्ट(र्)/ *संरू* (पुरुषाची उपाधी) श्रीयुत.

Mrs /'मिसिझ्/ *संरू* (विवाहित स्त्रीची उपाधी) सौ(भाग्यवती).

Ms /मिझ्/ संरू (विवाहित किंवा अविवाहित स्त्रीची उपाधी) श्रीमती.

Mt संरू mount २ पर्वत: *Mt Everest, एव्हरेस्ट पर्वत.*

much^1 /मच्/ *वि, सना* १ खूप, भरपूर: *I haven't got ~ money, माझ्याकडे फारसे पैसे नाहीत* ○ *There's too ~ salt in this vegetable, या भाजीत खूप मीठ आहे म्हणजेच ही भाजी खारट आहे* ○ *How ~ is it? याची किंमत काय?* २ (*वाक्प्र*) **not much of a** फार चांगली नाही अशी गोष्ट: *It isn't ~ of a car, ही काही फार चांगल्यातली अशी गाडी नाहीये.*

much^2 /मिच्/ *वि* १ मोठ्या प्रमाणात, खूप: *work ~ harder, अधिक कष्ट घेउन काम करणे* ○ *He isn't in the office ~, तो ऑफिसात फारसा नसतोच* ○ *I would very ~ like to come, मला यायला खूप आवडेल.* २ (*वाक्प्र*) **much as** जरी: *M~ as I want to stay, I must go now, थांबायची माझी खूप इच्छा असली तरी मला आता गेलंच पाहिजे.* **,much the 'same** त्यासारखाच, तसाच.

muck /मिक्/ *ना* [*अगण*] १ (शेण) खत; शेण. २ (*अनौप*) घाण. **muck** *क्रि* (*क्रिब*) **muck about/around** (*ब्रि अनौप*) दिशाहीनपणे वागणे, फालतू वेळ घालवणे. **muck in** (*ब्रि अनौप*) इतरांबरोबर काम वाटून घेणे: *If we all muck in we'll soon get the job done, आपण सर्वांनी वाटून घेतले तर लवकरच आपण हे काम पूर्ण करू शकू.* **muck sth up** (*अनौप विशेषतः ब्रि*) (क) एखादी गोष्ट घाण किंवा खराब करणे. (ख) एखादी गोष्ट नीट न करणे, बिघडवणे. **mucky** *वि* (-ier, -iest) घाणेरडा, किळसवाणा.

mucous /'म्यूकस्/ *वि* शेंबडट, शेंबडा. **,mucous 'membrane** *ना* [*गण*] नाक, तोंड वगैरेतील ओलसर त्वचा, श्लेष्मल पटल.

mucus /'म्यूकस्/ *ना* [*अगण*] शेंबूड, श्लेष्मा.

mud /मड्/ *ना* [*अगण*] चिखल. **muddy** *वि* (-ier, -iest) गढूळ. **'mudguard** *ना* [*गण*] सायकलच्या वगैरे चाकावरील चिखल उडू नये म्हणून लावलेला पत्रा.

muddle /'मिड्ल्/ *ना* [*गण, बहुधा अे.व*] गोंधळ, घोळ, अव्यवस्थितपणा. **muddle** *क्रि* १ [*सक*] घोळ करणे, गोंधळ करणे. २ (*क्रिब*) **muddle along** (*अधिक्षेपी*) कशाही बाबतीत ठाम नसणे, आगापिछा नसलेल्या स्थितीत असणे. **muddle through** (खास करून *गंमत*) काही येत नसताना यशस्वी होणे, शेवटी एकदाचे मिळवणे.

muesli /'म्यूझ्लि/ *ना* [*अगण*] फुटाणे, हुरडा, दाणे, सुकामेवा वगैरेची न्याहारी.

muffle /'मिफ्ल्/ *क्रि* [*सक*] १ (आवाज) बारीक करणे, क्षीण करणे. २ उबेसाठी गुंडाळणे. **muffler** *ना* [*गण*] १ (*जुना, अप्रचलित*) गळ्याभोवती उबेसाठी गुंडाळायचा स्कार्फ. २ (*अमे*) गाडीचा सायलेन्सर किंवा ध्वनिशामक.

mug^1 /मिग्/ *ना* [*गण*] १ (क) चहा वगैरे पिण्याचा, कानाचा उंच उभट कप. (ख) मगमधील पेय. २ (*व्रात्य*) चेहरा, तोंड.

mug^2 /मिग्/ *ना* [*गण*] (*व्रात्य*) सहज फसेल असा, भोळा माणूस, भाबडा माणूस.

mug^3 /मिग्/ *क्रि* (-gg-) [*सक*] (*अनौप*) हल्ला करून लुबाडणे. **mugger** *ना* [*गण*] लुटारू, दरोडेखोर. **mugging** *ना* [*गण*] दरोडेखोरी, लुटारूपणा.

muggy /'मिगि/ *वि* (-ier, -iest) (हवामानाबाबत) दमट आणि गरम, घाम आणणाऱ्या उकाड्याची, गदगदीची.

Muhammad /म'हॅमिड्/ *ना* इस्लाम धर्माचा संस्थापक आणि प्रेषित मोहमद. **Muhammadan** (तसेच **Muhammedan, Mohammedan**) /-अन्/ *वि, ना* [*गण*] मुस्लीम, मुसलमानी, मुसलमान.

mulberry /'मिल्ब्रि; *अमे* -बेरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) रुंद हिरवी पाने असलेले एक झाड (किंवा त्याची जांभुळकी किंवा पांढरी फळे), तुती.

mule /म्यूल्/ *ना* [*गण*] खेचर. **mulish** *वि* हटवादी, हट्टी, हेकट, अडाणतट्टू.

mull^1 /मिल्/ *क्रि* [*सक*] साखर, मसाला वगैरे टाकून मद्यापासून तिखट पेय करणे.

mull^2 /मिल्/ (*क्रिब*) **mull sth over** एखाद्या गोष्टीचा काळजीपूर्वक विचार करणे: *Give me time to ~ my decision over,*

माझ्या निर्णयावर नीट विचार करण्यास मला जरा वेळ दे ○ ~ over what to do, काय करायचे यावर काळजीपूर्वक विचार करणे.

multilateral /ˌमैल्टि'लॅटरल्/ *वि* दोन किंवा अधिक राष्ट्र, लोकांचे गट वगैरेचा समावेश असलेला, बहुपक्षीय.

multinational /ˌमैल्टि'नॅश्नल्/ *वि* बहुराष्ट्रीय. **multinational** *ना* [*गण*] बऱ्याच देशांत कार्यालये असणारी खूप मोठी कंपनी, बहुराष्ट्रीय कंपनी.

multiple /'मैल्टिप्ल्/ *वि* बहुशाखीय, बहुविध. **multiple** *ना* [*गण*] (*गणित*) विभाज्य, पट, गुणित : *28 is a ~ of 7, २८ हा ७ चा विभाज्य आहे.* **multiple choice** *वि* (परीक्षेतील प्रश्नांबाबत) दिलेल्या अनेक उत्तरांतील बरोबर उत्तर शोधण्याचा, बहुविध निवड. **ˌmultiple scle'rosis** /स्क्ल'रउसिस्/ *ना* [*अगण*] शरीराच्या हालचालींवरचे नियंत्रण नष्ट करणारा मज्जासंस्थेचा रोग.

multiply /'मैल्टिप्लाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*अक, सक*] १ गुणणे, गुणाकार करणे : *6 multiplied by 5 is 30, ६ गुणिले ५ बरोबर ३०.* २ संख्येने किंवा राशीने वाढणे/वाढवणे. ३ वाढणे/वाढवणे : *Rabbits ~ quickly, सशांची पैदास भरकन् होते.* **multiplication** /ˌमैल्टिप्लि'केइश्न्/ *ना* [*अगण, गण*] गुणाकार; वाढ, वृद्धी.

multitude /'मैल्टिट्यूड्; *अमे* -टूड्/ *ना* [*गण*] (*औप*) लोकांचा मोठा जमाव किंवा वस्तूंचा मोठा ढीग, बहुत्व, समुदाय.

mum^{1} /मैम्/ *ना* [*गण*] (*अनौप*) आई.

mum^{2} /मैम्/ *वि* १ गप्प, मुका. २ (*वाक्प्र*) **ˌmum's the 'word** (*ब्रि अनौप*) अवाक्षरही न काढणे.

mumble /'मैम्ब्ल्/ *क्रि* [*अक, सक*] पुटपुटणे.

mummify /'मैमिफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] विविध तेले लावून कापडात गुंडाळून मृत शरीर राखणे, ममी करणे.

mummy^{1} /'मैमि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) (मुलांनी केलेला वापर) आई.

mummy^{2} /'मैमि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) पेटीत बंदिस्त करून विविध तेले वगैरे वापरून राखलेले मृत शरीर : *an Egyptian ~, इजिप्तमधली ममी.*

mumps /मैम्प्स्/ *ना* (अे.व क्रियापदासह) मानेला वेदनाकारक सूज आणणारा एक सांसर्गिक रोग, गालगुंड.

munch /मैन्च्/ *क्रि* [*अक, सक*] (जबड्याची खूप हालचाल करून) चघळणे.

mundane /मैन्'डेइन्/ *वि* सामान्य, नेहमीचा, प्रापंचिक.

municipal /म्यू'निसिप्ल्/ *वि* स्थानिक स्वराज्य संस्थेचा, नगरपालिकेचा. **municipality** /म्यूˌनिसि'पॅलटि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) स्थानिक स्वराज्य संस्था, नगरपालिका.

munitions /म्यू'निश्न्झ्/ *ना* [*ब.व*] लष्करी पुरवठा, रसद – विशेषतः दारूगोळ्याची.

mural /'म्युअरल्/ *ना* [*गण*] भित्तीचित्र, भित्ती.

murder /'मऽड(र्)/ *ना* १ [*गण, अगण*] खून, हत्या. २ [*अगण*] (*ला अनौप*) वाईट अनुभव, भयानक अनुभव : *Climbing that hill was ~, ती टेकडी चढणे म्हणजे एक दिव्यच होते.* **murder** *क्रि* [*सक*] खून करणे, जीव घेणे, हत्या करणे. **murderer** *ना* [*गण*] खुनी. **murderess** *ना* [*गण*] खुनी स्त्री. **murderous** *वि* खुनी : *a ~ous attack, खुनी हल्ला.*

murky /'मऽकि/ *वि* (**-ier, -iest**) अंधाराचा, काळोखी : *~ streets, अंधाराचे रस्ते.*

murmur /'मऽम(र्)/ *ना* [*गण*] १ गुणगुण, अस्फुट आवाज. २ कुजबुज, हलक्या आवाजातले संभाषण. ३ कुरकुर, थोडीशी तक्रार. **murmur** *क्रि* १ [*अक*] गुणगुणणे. २ [*सक*] कुजबुजणे.

muscle /'मैस्ल्/ *ना* १ [*गण, अगण*] हालचाल करण्यासाठी ताणता येईल अशी शरीरात असणारी लवचिक पेशीरज्जू, स्नायू. २ [*अगण*] (*ला*) ताकद, शक्ती. **muscle** *क्रि* (*क्रिब*) **muscle in (on sth)** (*अनौप अधिक्षेपी*) फायदा उठवण्यासाठी एखाद्या गोष्टीत काहीही हक्क नसताना भाग घेणे.

muscular /'मैस्क्युल(र्)/ *वि* १ स्नायूंचा. २

गोटीबंद, पिळदार स्नायूंचा.

museum /म्यू'झ़िअम्/ *ना* [*गण*] कला, विज्ञान, इतिहास यांबाबतच्या वस्तू पाहण्यासाठी मांडायची इमारत, वस्तूसंग्रहालय.

mushroom /'मिश्रुम्; *अमे* -रूम्/ *ना* [*गण*] जिचे काही प्रकार खाण्यास योग्य आहेत असे एक प्रकारचे कवक, छत्रकवक, भूछत्र, अळंबे. **mushroom** *क्रि* [*अक*] भराभर वाढणे, कुत्र्याच्या छत्रीसारखे वाढणे.

music /'म्यूझ़िक्/ *ना* [*अगण*] **(क)** कंठस्वर किंवा वाद्यस्वर यांची विशिष्ट मांडणी करून आनंद निर्माण करणारी कला, संगीत. **(ख)** संगीतरचना : *a piece of ~, संगीतरचना.* **(ग)** स्वरलेखन, बोल, स्वरमाला. **musical** /-क्ल्/ *वि* १ संगीताचा. २ संगीतभोक्ता, संगीतप्रेमी किंवा संगीतकार असलेला. **musical** *ना* [*गण*] संगीतनृत्यनाटक. **musically** /-क्लि/ *क्रिवि* संगीतमयतेने, नादमयतेने.

musician /म्यू'झ़िश्न्/ *ना* [*गण*] संगीत वाजवणारा; संगीतरचनाकार.

Muslim /'मॉझ़्लिम्; *अमे* 'मिझ़्लम्/ (तसेच **Moslem** /'मॉझ़्लम्/) *ना* [*गण*] मुसलमान, इस्लामी धर्माचा. **Muslim** (तसेच **Moslem**) *वि* मुसलमानी, इस्लामी.

muslin /'मिझ़्लिन्/ *ना* [*अगण*] पातळ, तलम सुती कापड, मलमल.

mussel /'मिस्ल्/ *ना* [*गण*] काळ्या शिंपल्यातला खाण्याचा प्राणी, कालव.

must /मस्ट्; अधिक बलयुक्त रूप मिस्ट्/ *अभिद क्रि* (नकार **must not,** *संक्षेप* **mustn't** /'मिस्न्ट्/) १ (कर्तव्य किंवा आवश्यकता दाखविण्यास वापर) : *You ~ finish your work before you go, जाण्यापूर्वी तू काम पूर्ण करायला हवंस* ○ *Visitors ~ not feed the birds, बाहेरच्या लोकांनी पक्ष्यांना खायला घालू नये.* २ (दाट शक्यता दाखविण्यास वापर) : *You ~ be tired after your journey, प्रवासामुळे तू नक्कीच दमला असणार.* **must** *ना* [*गण*] (*अनौप*) अत्यावश्यक गोष्ट : *If you like her acting then her new film is a ~, तुला तिचा अभिनय आवडत असेल तर तिचा नवीन चित्रपट तू बघच.*

mustache (*अमे*) = MOUSTACHE.

mustard /'मिस्टड्/ *ना* [*अगण*] अन्न रुचकर करण्यासाठी विशिष्ट झाडाच्या बियांपासून बनवलेला एक पिवळा पदार्थ, मोहरी.

muster /'मिस्ट(र्)/ *क्रि* [*अक, सक*] गोळा करणे, एकवटणे, जमवाजमव करणे.

musty /'मिस्टि/ *वि* **(-ier, -iest)** शिळा, कुबट, कुजका.

mutation /म्यू'टेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] नवीन सजीव प्राणी निर्माण होईल असा एका सजीवातील बदल, गुणविस्तार, उत्परिवर्तन.

mute /म्यूट्/ *वि* शांत, निःशब्द, मुका. **mute** *ना* [*गण*] १ (*जुना, अप्रचलित*) मुका माणूस, मूक २ संगीतवाद्याची नादमयता कमी करण्यासाठी वापरायची गोष्ट. **muted** *वि* शांत; हळुवार; मंद : *~d colours, शांत, सौम्य रंग.*

mutilate /'म्यूटिलेइट्/ *क्रि* [*सक*] आवश्यक भाग फोडून, फाडून किंवा कापून हानी करणे किंवा खराब करणे, छिन्नविच्छिन्न करणे, मोडतोड करणे, भंग करणे. **mutilation** /,म्यूटि'लेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] (शारीरिक) हानी, मोडतोड.

mutiny /'म्यूटिनि/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) बंड, खास करून नावाड्यांचे. **mutineer** /,म्यूटि'निअ(र्)/ *ना* [*गण*] बंडखोर. **mutinous** /-नस्/ *वि* बंडखोर; आज्ञाभंग करणारा. **mutiny** *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*अक*] बंडात भाग घेणे, उठाव करणे.

mutter /'मिट(र्)/ *क्रि* [*अक, सक*] हळू, अस्पष्ट आवाजात बोलणे, पुटपुटणे; कुरकुरणे, भुणभुणणे. **mutter** *ना* [*गण, बहुधा अे.व*] पुटपुटणे, पुटपूट; कुरकुर.

mutton /'मिट्न्/ *ना* [*अगण*] बकरीचे मांस, सागुती.

mutual /'म्यूचुअल्/ *वि* १ परस्पर, अन्योन्य : *~ affection, परस्परांवरील प्रेम.* २ एकमेकांचा, परस्परांतील : *our ~ friend/interests, आपले दोघांचे किंवा एकमेकांचे मित्र/हितसंबंध.* **mutually** /-उअलि/ *क्रिवि* एकमेकांस, परस्परांना.

muzzle /'मिझ़्ल्/ *ना* [*गण*] १ **(क)** प्राण्याचे तोंड व नाक, मुसकट. **(ख)** प्राण्याला चावता येऊ नये म्हणून नाकातोंडावर बांधायचे मुस्के. २ बंदुकीचे मोकळे टोक, तोंड. **muzzle** *क्रि*

[*सक*] १ (कुत्र्याच्या वगैरे तोंडावर) मुस्के बांधणे. २ (*ला*) बोलण्यावर बंदी घालणे, मुसकटदाबी करणे.

my /माइ/ *वि* १ माझा : *Where's my hat? माझी हॅट कुठाय्?* २ (संबोधनात वापर) : *Yes, my dear, हो, माझ्या राजा.* ३ (उद्गारवाचकात वापर) : *My goodness! अरे बापरे!/अरे माझ्या कर्मा!*

myopia /माइ'अउपिअ/ *ना* [*अगण*] दूरच्या गोष्टी नीट पाहाण्याची असमर्थता, ऱ्हस्वदृष्टी, निकटदृष्टिता. **myopic** /-ऑपिक्/ *वि* ऱ्हस्वदृष्टीचा.

myriad /'मिरिअड्/ *ना* अनंत/अगणित/अपरिमित संख्या : *a ~ of stars, ताऱ्यांची अगणित संख्या.*

myrrh /मऽ(र्)/ *ना* [*अगण*] सुवासिक द्रव्ये करण्यासाठी वापरायचा कडवट चवीचा पण गोड वासाचा असा एक पदार्थ, हिराबोळ, बाळंतबोळ.

myself /माइ'सेल्फ्/ *सना* १ (बोलणारा किंवा लिहिणारा याच्यावर क्रियेचा परिणाम झाला असता आणि तो क्रियेचे कारणही असता आत्मवाचक सर्वनाम म्हणून वापर) मला स्वतःला : *I've cut ~, मी मलाच कापले.* २ (जोर देण्यासाठी वापर) : *I said so ~, मी स्वतःच तसं म्हटलं.* ३ (*वाक्प्र*) **(all) by my'self** (क) एकटा, एकट्याने. (ख) कुणाच्याही मदतीशिवाय.

mysterious /मि'स्टिअरिअस्/ *वि* १ गूढ, बुचकळ्यात पाडणारा : *her ~ disappearance, तिचे गूढ रीतीने नाहीसे होणे.* २ गुप्तता राखणारा, रहस्यमय : *He's been very ~ and not told anyone his plans, आपल्या योजनांची त्याने कुणालाही माहिती न सांगता खूप गुप्तता राखलीय्.* **mysteriously** *क्रिवि* गूढपणे; रहस्यमयपणे.

mystery /'मिस्टरि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*गण*] गूढ, कोडे : *Her disappearance is a real ~, तिचे नाहीसे होणे हे एक गूढच आहे.* २ [*अगण*] रहस्यमयता.

mystic /'मिस्टिक्/ (तसेच **mystical** /'मिस्टिकल्/) *वि* अध्यात्मिक शक्तीचा, गूढ, अतर्क्य. **mystic** *ना* [*गण*] गूढवादी. **mysticism** /'मिस्टिसिझम्/ *ना* [*अगण*] ध्यानधारणा आणि उपासना याद्वारे गूढ आध्यात्मिक ज्ञान प्राप्त करून घेण्याचा मार्ग, गूढवाद.

mystify /'मिस्टिफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] न समजल्याने गोंधळात टाकणे, गोंधळवणे; कोड्यात टाकणे.

mystique /मि'स्टीक्/ *ना* [*गण, बहुधा अे.व*] व्यक्ती किंवा वस्तुभोवतीचे गूढतेचे वलय : *Computers are surrounded by a certain ~, संगणकाभोवती एक गूढतेचे वलय असते.*

myth /मिथ्/ *ना* १ (क) [*गण*] जुन्या काळापासून चालत आलेली देवदेवतांची कथा, पौराणिक कथा : *one of many ~s about the creation of the world, विश्वनिर्मितीबाबतच्या अनेक पौराणिक कथांपैकी एक.* (ख) [*अगण*] पौराणिक कथांचा संग्रह, पुराण. २ [*गण*] काल्पनिक किंवा रचलेली कथा, दंतकथा, मिथ्यकथा. **mythical** /-इकल्/ *वि* १ पौराणिक. २ खोटी; काल्पनिक, कपोलकल्पित.

mythology /मि'थॉलजि/ *ना* [*अगण*] १ पौराणिक कथांचा संग्रह : *Greek ~, ग्रीक पुराणकथा.* २ पुराणकथांचा अभ्यास, पौराणिक कथाशास्त्र, मिथ्यकथाविद्या. **mythological** /,मिथ'लॉजिकल्/ *वि* पौराणिक.

N n

N, n /अेन्/ *ना* [*गण*] (*ब.व* **N's, n's** /अेन्झ्/) इंग्रजी वर्णमालेतील चौदावे अक्षर.

N *संरू* १ north(ern) उत्तर (दिशेचा), उ : *N Yorkshire, उत्तर यॉर्कशायर.* २ (खास करून विद्युत प्लग किंवा खुंटीवर) neutral (connection) उदासीन किंवा तटस्थ (जोड).

nab /नॅब्/ *क्रि* (**-bb-**) [*सक*] (*ब्रि अनौप*) (एखाद्याला) गुन्हा करताना पकडणे.

nag^{1} /नॅग्/ *क्रि* (**-gg-**) [*अक, सक*] (*at*)// (एखाद्याचे) दोष शोधणे, चूक काढणे, टोमणा मारणे; सतत टीका करणे, टाकून बोलणे, टोचणे.

nag^{2} /नॅग्/ *ना* [*गण*] (*अनौप*) म्हातारा घोडा.

nail /नेइल्/ *ना* [*गण*] १ लाकूड वगैरे

जोडण्यासाठी हातोडीने ठोकायची धातूची लहान टोकदार काडी, खिळा, चूक. २ हातापायाच्या बोटाच्या टोकाला असणारा टणक भाग, नख. **nail** *क्रि* [*सक*] १ खिळा ठोकणे/मारणे. २ (*अनौप*) (एखाद्याला) पकडणे. ३ (*क्रिब*) **nail sb down** एखाद्याच्या तोंडातून त्याच्या योजना वदवणे.

naive (तसेच **naïve**) /नाइ'ईव्ह्/ *वि* अनुभव नसल्यामुळे भोळसर, भाबडा. **naively** *क्रिवि* भाबडेपणाने. **naivety** *ना* [*अगण*] भाबडेपणा.

naked /'नेइकिड्/ *वि* १ विवस्त्र, नागडा, नग्न. २ नेहमीचे आच्छादन नसलेला, अनावृत्त : *a ~ light, नागडा प्रकाश.* ३ (*वाक्प्र*) **with the naked 'eye** दुर्बीण वगैरे न वापरता, फक्त डोळ्यांनी. **nakedly** *क्रिवि* नागडेपणाने; उघडपणे. **nakedness** *ना* [*अगण*] नागडेपणा.

name /नेइम्/ *ना* १ [*गण*] व्यक्तीचे किंवा वस्तूचे नाव : *My ~ is Tim, माझे नाव टिम.* २ [*अे.व*] लोकांचे एखाद्याविषयीचे सर्वसाधारण मत; ख्याती : *a ~ for being lazy, आळशीपणाची ख्याती.* ३ [*गण*] प्रसिद्ध व्यक्ती : *the big ~s in show business, पडद्यावरील मोठी नावे म्हणजेच नाट्यचित्रपट क्षेत्रातले बडे कलाकार.* ४ (*वाक्प्र*) **in the name of sb/sth** (क) एखाद्यासाठी, प्रीत्यर्थ. (ख) एखाद्या गोष्टीच्या अधिकाराने : *I arrest you in the ~ of the law, मी तुला कायद्याच्या अधिकारात अटक करतोयू.* **make a 'name for oneself** नाव होणे, प्रसिद्धी मिळणे. **take sb's name in vain** एखाद्याविषयी अनादराने बोलणे. **name** *क्रि* [*सक*] १ (*after*; *अमे for*)// नाव देणे, नाव ठेवणे : *The child was ~d after his father, त्या मुलाला वडलांचेच नाव ठेवले.* २ नाव/नावे सांगणे/देणे. ३ सांगणे; निवडणे : *~ the day for the party, पार्टीला दिवस निवडणे/सांगणे.* **'name-dropping** *ना* [*अगण*] मोठ्या लोकांची उगाच नावे घेणे. **nameless** *वि* १ निनावी. २ अवर्णनीय, शब्दांत सांगता येणार नाही असा : *~less horrors, अवर्णनीय अशा भीषण घटना.* **'namesake** *ना* [*गण*] नावबंधू, त्याच नावाचा माणूस.

namely /'नेइम्लि/ *क्रिवि* ते म्हणजे : *Only one child was missing, ~ John, एकच मूल सापडत नव्हते आणि ते म्हणजे जॉन.*

nanny /'नॅनि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) लहान मुलांना सांभाळणारी दाई.

nanny-goat /'नॅनि गउट्/ *ना* [*गण*] बकरी, शेळी.

nap^1 /नॅप्/ *ना* [*गण*] डुलकी. **nap** *क्रि* (**-pp-**) [*अक*] डुलकी घेणे.

nap^2 /नॅप्/ *ना* [*अगण*] साधारणपणे एका दिशेला विंचरायची लव असलेला कापडाचा पृष्ठभाग.

napalm /'नेइपाम्/ *ना* [*अगण*] बॉम्बमधे वापरायची पेट्रोल जेली.

nape /नेइप्/ *ना* [*गण, बहुधा अे.व*] मानेचा मागचा भाग, मानेचा काटा.

napkin /'नॅप्किन्/ *ना* [*गण*] जेवताना अंगावर अन्न सांडू नये म्हणून वापरायचा आणि हात, तोंड पुसायचा सुती किंवा कागदी रुमाल.

nappy /'नॅपि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) लहान बाळाचा लंगोट.

narcissus /ना'सिसस्/ *ना* [*गण*] (*ब.व* **~es** /ना'सिससिझ्/ किंवा **narcissi** /ना'सिसाइ/) वसंतात येणाऱ्या अनेक फुलांपैकी एक प्रकारचे फूल (उदा डॅफोडिल).

narcotic /ना'कॉटिक्/ *ना* [*गण*], *वि* (एक प्रकारचा) अमली पदार्थ, गुंगीकारी पदार्थ.

narrate /न'रेइट्; *अमे* 'नॅरेइट्/ *क्रि* [*सक*] (गोष्ट) सांगणे, कथन करणे, निवेदणे. **narration** /न'रेइशन्/ *ना* [*गण, अगण*] कथन, निवेदन. **narrator** *ना* [*गण*] निवेदक, कथन करणारा.

narrative /'नॅरटिव्ह्/ *ना* १ [*गण*] कथा. २ [*अगण*] कथाकथन.

narrow /'नॅरउ/ *वि* १ अरुंद : *a ~ road, अरुंद रस्ता.* २ लहान; मर्यादित : *a ~ circle of friends, मर्यादित मित्रमंडळ.* ३ अगदी लहान किंवा थोडा अवसर असलेला : *a ~ escape, थोडक्यात वाचणे.* ४ संकुचित दृष्टीचा : *a ~ mind, संकुचित मनोवृत्ती.* **narrow** *क्रि* [*अक, सक*] लहान करणे, संकुचित करणे; मर्यादित करणे. **narrowly** *क्रिवि* कसाबसा : *~ly* *escape, कसाबसा वाचणे.* **,narrow-'minded** *वि* इतरांच्या मतांचा विचार करण्यास तयार नसलेला, संकुचित दृष्टीचा, कोत्या मनाचा. **narrowness** *ना* [*अगण*] अरुंदी, मर्यादितपणा; संकुचितपणा, कोतेपणा.

nasal /'नेइझ़्ल्/ *वि* नाकाचा, नासीय.

nasturtium /न'स्टऽशम्; *अमे* नॅ-/ *ना* [*गण*] तांबडी, केशरी, पिवळी फुले येणारे एक फुलझाड.

nasty /'नास्टि; *अमे* 'नॅ-/ *वि* (-ier, -iest) १ वाईट; घाणेरडा, किळसवाणा : *a ~ smell, दुर्गंध* किंवा *घाण वास.* २ निर्दय, कठोर; द्वेषयुक्त : *a ~ person, दुष्ट माणूस.* ३ दुःखकारक, पीडा देणारा; गंभीर : *a ~ injury, गंभीर दुखापत.* **nastily** *क्रिवि* वाईट. **nastiness** *ना* [*अगण*] वाईटपणा; दुष्टपणा.

nation /'नेइश्न्/ *ना* [*गण*] एकाच शासनाखाली असणारा, विशिष्ट प्रदेशात राहणारा माणसांचा मोठा समुदाय, राष्ट्र. **,nation-'wide** *वि, क्रिवि* राष्ट्रव्यापी, देशव्यापी.

national /'नॅश्नल्/ *वि* १ (सर्व) राष्ट्राचा, राष्ट्रीय : *local and ~ news, स्थानिक आणि राष्ट्रीय बातम्या.* २ राष्ट्राच्या मालकीचा, राष्ट्राच्या अखत्यारीतला, राष्ट्राच्या पाठिंब्याचा, राष्ट्रीय. **national** *ना* [*गण*] एखाद्या राष्ट्राचा नागरीक. **,national 'anthem** *ना* [*गण*] राष्ट्रगीत. **,National 'Health Service** *ना* [*अ.व*] (ब्रिटनमधे) आरोग्य-कराच्या योजनेतून लोकांना मिळणारी आरोग्य-सेवा, राष्ट्रीय आरोग्य सेवा. **nationalism** *ना* [*अगण*] १ राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती. २ राष्ट्रीयत्व, राष्ट्रीय भावना. **nationalist** *वि, ना* [*गण*] राष्ट्रीयत्वाला पाठिंबा देणारा (माणूस). **,national 'service** *ना* [*अगण*] सक्तीच्या सैनिकीसेवेचा काळ.

nationality /,नॅश'नॅलटि/ *ना* [*अगण, गण*] (*ब.व* -ies) विशिष्ट देशाचे सभासदत्व, राष्ट्रीयत्व : *a person with French ~, फ्रेंच राष्ट्रीयत्व असणारा माणूस.*

nationalize /'नॅश्नलाइझ़्/ *क्रि* [*सक*] खाजगी कंपनीचे वगैरे राष्ट्रीयीकरण करणे. **nationalization** /,नॅश्नलाइ'झ़ेइश्न्; *अमे* -लि'झ़्-/ *ना* [*अगण*] राष्ट्रीय मालकीचे करणे, राष्ट्रीयीकरण.

native /'नेइटिव्ह्/ *ना* [*गण*] १ मूळचा राहणारा, एतद्देशीय. २ (विशेषतः अपमानकारक) स्थानिक किंवा मूळचा रहिवासी, परप्रांतातून न आलेला. ३ एखाद्या ठिकाणी नैसर्गिकपणे असणारा प्राणी किंवा तशी वनस्पती. **native** *वि* १ जन्मस्थानाचा : *my ~ city, माझे जन्माचे शहर.* २ (प्राण्याबाबत किंवा वनस्पतीबाबत) नैसर्गिकपणे एखाद्या ठिकाणी आढळणारा, देशी, प्राकृतिक.

nativity /न'टिव्हटि/ *ना* **the Nativity** [*अ.व*] येशू ख्रिस्ताचा जन्म.

NATO /'नेइटउ/ *ना* [*अ.व*] **North Atlantic Treaty Organization** उत्तर अटलांटिक कराराची संघटना; अनेक राष्ट्रांचे लष्करी मंडळ.

natural /'नॅच्रल्/ *वि* १ नैसर्गिक, प्राकृतिक : *the earth's ~ resources, पृथ्वीवरची नैसर्गिक साधनसंपत्ती* – उदा कोळसा, खनिज तेल वगैरे. २ स्वाभाविक : *It's ~ for a bird to fly, उडणे हे पक्ष्याचे स्वाभाविक वर्तन आहे.* ३ जन्मजात कौशल्य असणारा, हाडाचा : *a ~ artist, जन्मजात कलावंत.* ४ अपेक्षेप्रमाणे, अपेक्षित; सहाजिक : *It's only ~ you're upset, तुला निराशा येणं अगदी सहाजिक आहे.* ५ अतिशयोक्ती नसलेला, जाणूनबुजून नसलेला. **natural** *ना* [*गण*] स्वभावतःच किंवा जन्मजात कौशल्य असणारा माणूस : *That dancer is a ~, तो माणूस अगदी स्वभावतःच नर्तक आहे.* **,natural 'history** *ना* [*अगण*] प्राणी आणि वनस्पती यांचे शास्त्र, सृष्टिविज्ञान, जीवविज्ञान, प्रकृतिविज्ञान.

naturalist /'नॅच्रलिस्ट्/ *ना* [*गण*] प्राणी आणि वनस्पती यांचा अभ्यासक, सृष्टिवैज्ञानिक, प्रकृतिवैज्ञानिक.

naturalize /'नॅच्रलाइझ़्/ *क्रि* [*सक*] परकीय माणसाला नागरिकत्व देणे. **naturalization** ,नॅच्रलाइ'झ़ेइश्न्; *अमे* -लि'झ़्-/ *ना* [*अगण*] परदेशात नागरिकत्व मिळणे, देशीयभवन.

naturally /'नॅच्रलि/ *क्रिवि* १ उपजत (कौशल्ययुक्त) : *She's ~ musical, तिला उपजतच गायनाचे अंग आहे.* २ अर्थात् : *N~,* *I'll help you, अर्थातच मी तुला मदत करेन.* ३ नेहमीसारखा : *behave ~, नेहमीसारखे वागणे.* ४ कृत्रिम मदतीविना, स्वाभाविकपणे.

nature /'नेइच(र्)/ *ना* १ [*अगण*] संपूर्ण जग आणि त्यातील सर्व वस्तुमात्र, सृष्टी, निसर्ग : *Animals and plants are all part of ~, प्राणी आणि वनस्पती सृष्टीचेच भाग आहेत.* २ [*अगण*] नैसर्गिक साधी राहणी : *go back to ~, निसर्गनियमाप्रमाणे जगायचा प्रयत्न करणे.* ३ [*गण, अगण*] एखाद्याचा स्वभावधर्म, गुणधर्म : *It's her ~ to be kind, दयाळूपणा हा तिचा स्वभावधर्म आहे* ○ *the ~ of language, भाषेचे गुणधर्म.* ४ [*अे.व*] प्रकार; तऱ्हा : *changes of that ~, त्या प्रकारचे बदल.*

naught /नॉऽट्/ *ना* (*पुरा*) १ काही नाही. २ (*वाक्प्र*) **,come to 'naught** अपयशी होणे : *All his plans came to ~, त्याच्या सर्व योजना पूर्ण फसल्या.*

naughty /'नॉऽटि/ *वि* (**-ier, -iest**) १ (विशेषतः लहान मुलाबाबत) खोडकर, गुंड; व्रात्य. २ अश्लाघ्य, पाचकळ; धक्कादायक. **naughtily** *क्रिवि* खोडकरपणे, व्रात्यपणे. **naughtiness** *ना* [*गण*] खोडकरपणा, गुंडगिरी; पाचकळपणा.

nausea /'नॉऽसिअ; *अमे* 'नॉऽझ/ *ना* [*अगण*] उबग, शिसारी, वीट, मळमळ. **nauseate** /'नॉऽसिअेइट्; *अमे* 'नॉऽझ्-/ *क्रि* [*सक*] मळमळायला होणे, शिसारी आणणे, वीट आणणे. **nauseous** *वि* शिसारी आणणारा.

nautical /'नॉऽटिक्ल्/ *वि* नौकाविषयक, सामुद्रिक, सागरी, नाविक. **,nautical 'mile** *ना* [*गण*] सागरी मैल – अंदाजे ६०८० फूट किंवा १८५२ मीटर्स.

naval /'नेइव्ह्ल्/ *वि* नौदलाचा.

nave /नेइव्ह्/ *ना* [*गण*] चर्चमधील लंबुळका मध्य भाग, गाभारा.

navel /'नेइव्ह्ल्/ *ना* [*गण*] नाभी, बेंबी.

navigable /'नॅव्हिगब्ल्/ *वि* (नदी वगैरेच्या बाबत) नौका जातील एवढी खोल आणि रुंद, नौकानयनास अनुरूप.

navigate /'नॅव्हिगेइट्/ *क्रि* [*अक, सक*] (नौका, विमान, गाडी वगैरे) चालवणे, सुकाणू धरणे. **navigation** /,नॅव्हि'गेइश्न्/ *ना* [*अगण*] नौकानयन, (विमान, गाडी वगैरेचे) मार्गदर्शन. **navigator** *ना* [*गण*] मार्गनिर्देशक, नावाडी.

navy /'नेइव्हि/ *ना* [*गण*] नौदल, नौसेना, आरमार. **,navy 'blue** *वि* गडद निळा.

NB /,अेन् 'बी/ *संरू* note carefully, विशेष सूचना (वि. सू.).

near[1] /निअ(र्)/ *वि* १ जवळचा, नजिकचा, निकटचा; दूरचा नाही असा : *The house is ~ (to) the station, स्टेशनच्या जवळच ते घर आहे.* २ जवळच्या नात्याचा : *~ relations, जवळचे नातेवाईक.* ३ (*वाक्प्र*) **a near 'thing** जवळजवळ अपयश, निसटता (विजय वगैरे). **near** *क्रि* [*अक, सक*] (एखाद्याच्या) जवळ येणे, नजिक येणे : *The ship is ~ing land, जहाज किनाऱ्याजवळ येते आहे.* **nearness** *ना* [*अगण*] जवळीक, सान्निध्य. **'nearside** *वि, ना* [*अे.व*] पादचारी मार्गाच्या (दगडी) कडेच्या जवळच्या बाजूला. **,near-'sighted** = SHORT-SIGHTED (क) (SHORT[1]).

near[2] /निअ(र्)/ *शब्दयो* काळ किंवा अवकाशात नजिक, जवळ, नजिक : *Bradford is ~ Leeds, ब्रॅडफोर्ड लीड्स्च्या जवळ आहे* ○ *He stood ~ the door, तो दाराजवळ उभा राहिला.* **near** *क्रिवि* १ जवळच, लागून. २ (*वाक्प्र*) **nowhere 'near** अगदी दूर. **near 'by** *क्रिवि* एखाद्याच्या जवळ : *They live ~ by, ते जवळच राहतात.* **'nearby** *वि* जवळचा. **nearly** *क्रिवि* १ जवळजवळ; एखाद्या सारखाच किंवा इतकाच, जवळजवळ तसाच. २ (*वाक्प्र*) **not nearly** खूप दूर : *not ~ly enough money, पुरेशा पैशाहून खूपच दूर म्हणजे कमी किंवा पुरेशी रक्कम असण्याच्या खूपच मागे.*

necessary /'नेससरि; *अमे* -सेरि/ *वि* गरजेचा; जरूरीचा, केलाच पाहिजे असा; आवश्यक : *Have you made the ~ arrangements? तू आवश्यक ती व्यवस्था केलीयेस का?* **necessarily** /,नेस'सेरलि/ *क्रिवि* आवश्यक परिणाम म्हणून, परिणामतः : *Tall men aren't necessarily strong, उंच पुरुष सशक्त असतातच असे नाही.*

necessitate /नि'सेसिटेइट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) एखादी गोष्ट आवश्यक करणे, गरज पाडणे.

necessity /नि'सेसटि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] जरूरी, गरज; आवश्यकता. २ [*गण*] गरजेची गोष्ट : *Food is a ~ of life, अन्न ही जीवनाची गरज आहे.*

neck /नेक्/ *ना* [*गण*] १ (क) मान. (ख) मानेभोवतीचा कपड्याचा भाग, कपड्याचा गळा, एखाद्या गोष्टीचा मानेसारखा अरुंद भाग, गळा, तोंड : *the ~ of a bottle, बाटलीचा गळा.* ३ (*वाक्प्र*) **,neck and 'neck** बरोबरीने स्पर्धा, अटीतटीची झुंज. **risk/save one's 'neck** जीव धोक्यात घालणे/जीव वाचवणे. **up to one's neck in sth** एखाद्या गोष्टीत पूर्ण अडकणे, हात अडकणे. **neck** *क्रि* [*अक*] (*अनौप*) (जोडप्यांबाबत) गळ्यात गळे घालणे. **necklace** /'नेक्लिस्/ *ना* [*गण*] गळ्यात घालायचा सोन्याचा, रत्नांचा वगैरे हार. **'necktie** *ना* [*गण*] (*जुना, अप्रचलित* किंवा *अमे*) = TIE^2 १.

nectar /'नेक्ट(र्)/ *ना* [*अगण*] मधमाश्यांनी फुलातून गोळा केलेला मधुरस, मकरंद.

née /नेइ/ वि (विवाहित स्त्रीच्या नावानंतर तिचे माहेरचे नाव दाखविण्यासाठी वापर) पूर्वाश्रमीची : *Mrs Jane Smith, ~ Brown, सौ जेन स्मिथ, पूर्वाश्रमीच्या ब्राउन.*

need^1 /नीड्/ *अभिद क्रि* (सर्व पुरुषी वर्तमानकालीन रूप **need**, नकार **need not** किंवा **needn't** /'नीड्न्ट्/) (काय करायला हवे ते सांगण्यास वापर) : *You ~n't finish that work today, ते काम तू आजच संपवायला हवेस असे नाही.*

need^2 /नीड्/ *क्रि* [*सक*] १ गरज असणे; पाहिजे असणे, हवे असणे : *That dog ~s a bath, त्या कुत्र्याला आंघोळ घालायला हवी.* २ (काय करायला पाहिजे ते सांगण्यास वापर) : *You ~ to work harder, तुला आणखी कष्ट करायला हवेत.*

need^3 /नीड्/ *ना* १ [*अे.व, अगण*] एखाद्या गोष्टीची गरज असणारी परिस्थिती : *There's a ~ for more engineers, जास्त इंजिनिअर्सची गरज आहे* ○ *There's no ~ to start yet, एवढ्यात निघायची/सुरुवात करायची जरूरी नाही.* २ **needs** [*ब.व*] गरजा, गरजेच्या वस्तू : *My ~s are few, माझ्या गरजा मर्यादित आहेत.* ३ [*अगण*] दारिद्र्य; दुर्दैवी घटना, संकट : *in ~, दारिद्र्यात.* ४ (*वाक्प्र*) **if need be** गरज पडली तर, आवश्यक वाटल्यास. **needless** *वि* १ अनावश्यक. २ (*वाक्प्र*) **,needless to 'say** सांगण्याची गरज नाही. **needlessly** *क्रिवि* उगाचच, कारण नसताना. **needy** *वि* (**-ier, -iest**) अति गरीब, गरजू.

needle /'नीड्ल्/ *ना* [*गण*] १ सुई. २ = KNITTING-NEEDLE (KNIT). ३ इंजेक्शनची सुई. ४ ध्वनिमुद्रिका वाजवण्याची सुई. **needle** *क्रि* [*सक*] (*अनौप*) त्रास देणे, टोचणे. **'needlework** *ना* [*अगण*] शिवणकाम, विणकाम.

negation /नि'गेइश्न्/ *ना* [*अगण*] (*औप*) नकार.

negative /'नेगटिव्ह्/ *वि* १ नकारार्थी, नकारात्मक (उत्तर, शब्द वगैरे). २ अनुपयुक्त किंवा नाउमेद करणारा : *~ criticism, नकारात्मक टीका.* ३ (*गणित*) शून्यापेक्षा कमी, ऋण. ४ (विद्युत्भार) ऋण. **negative** *ना* [*गण*] १ नकार, 'नाही' अर्थाचा शब्द किंवा वाक्य. २ काळी पांढरी बाजू उलट असलेली फिल्म, ऋणचित्र, व्यस्तचित्र. ३ (*वाक्प्र*) **in the 'negative** (उत्तराबाबत) नकारात्मक. **negatively** *क्रिवि* नकारात्मक.

neglect /नि'ग्लेक्ट्/ *क्रि* [*सक*] १ हवी तेवढी काळजी न घेणे किंवा लक्ष न देणे, दुर्लक्ष करणे, उपेक्षा करणे : *~ one's work, स्वतःच्या कामाकडे दुर्लक्ष करणे.* २ एखादी गोष्ट करण्याचे राहून जाणे किंवा विसरणे : *He ~ed to write, पत्र लिहायचे तो विसरला.* **neglect** *ना* [*अगण*] हेळसांड, उपेक्षा, दुर्लक्ष. **neglectful** *वि* (*औप*) दुर्लक्ष करणारा, आबाळ करणारा, बेपर्वा.

négligé (तसेच **negligee**) /'नेग्लिझेइ; *अमे* ,नेग्लि'झेइ/ *ना* [*गण*] स्त्रियांचा पातळ हलका झगा (गाउन).

negligent /'नेग्लिजन्ट्/ *वि* एखाद्या गोष्टीची योग्य काळजी न घेणारा, निष्काळजी, बेपर्वा. **negligence** /-जन्स्/ *ना* [*अगण*]

निष्काळजीपणा, बेफिकिरी, बेपर्वाई, हेळसांड. **negligently** *क्रिवि* निष्काळजीपणे, बेपर्वाईने.

negligible /'नेग्लिजब्ल्/ *वि* दुर्लक्ष करण्याजोगा, क्षुल्लक.

negotiable /नि'गउशिअब्ल्/ *वि* १ चर्चा करून सुटण्यासारखा. २ (चेक वगैरेबाबत) रोख पैसे मिळण्याचा, रोकड विनियोगाचा. ३ (रस्ते, नद्या वगैरेबाबत) पार करून जाण्यासारखा, परिक्राम्य.

negotiate /नि'गउशिअेइट्/ *क्रि* १ [*अक, सक*] चर्चा करून मार्ग काढणे, वाटाघाटी करणे. २ [*सक*] यशस्वीपणे (अडथळा वगैरे) पार करणे. **negotiation** /नि,गउशि'अेइशन्/ *ना* [*गण, अगण*] वाटाघाटी. **negotiator** *ना* [*गण*] वाटाघाटी करणारा, मध्यस्थी.

Negress /'नीग्रेस्/ *ना* [*गण*] (कधीकधी अपमानकारक) नीग्रो स्त्री किंवा मुलगी.

Negro /'नीग्रउ/ *ना* [*गण*] (*ब.व* ~**es**) (कधीकधी अपमानकारक) आफ्रिकेतील कृष्णवर्णीय वंशाचा माणूस, कृष्णवर्णीय व्यक्ती.

neigh /नेइ/ *क्रि* [*अक*] *ना* [*गण*] (घोडा) खिंकाळणे, खिंकाळी.

neighbour (*अमे* **-or**) /'नेइब(र्)/ *ना* [*गण*] १ जवळच्या घरात वगैरे राहणारा, शेजारी. २ शेजारील माणूस, वस्तू, राष्ट्र. **neighbourhood** *ना* [*गण*] १ जिल्हा; जवळचा किंवा लगतचा प्रदेश. २ (*वाक्प्र*) **in the neighbourhood of** सुमारे, जवळजवळ. **neighbouring** *वि* जवळचा, लगतचा: *~ing towns, जवळची नगरे.* **neighbourliness** *ना* [*अगण*] मित्रत्व, शेजारधर्म, सख्य, घरोबा. **neighbourly** *वि* सौहार्दपूर्ण, मैत्रीपूर्ण.

neither /'नाइद(र्); 'नीद(र्)/ *वि, सना* दोहोपैकी कुणीही नाही (असा): *N~ boy is to blame, दोहोपैकी कोणत्याच मुलाचा दोष नाही* ○ *I chose ~ of them, मी दोघांतल्या कुणाचीच निवड केली नाही.* **neither** *क्रिवि, उ. अव्यय* १ हाही नाही आणि तोही नाही, दोघांतील कुणीच नाही; सुद्धा नाही: *She doesn't like Mumbai and ~ do I, तिला मुंबई आवडत नाही आणि मलाही* ○ *I've never been to Paris and ~ has she, मी कधीच पॅरिसला गेलो नाहीये आणि ती सुद्धा (गेली नाहीये).* २ (*वाक्प्र*) **neither . . . nor** नाही . . . आणि नाही: *N~ his sister nor his brother was invited, त्याच्या बहिणीला निमंत्रण नव्हते आणि त्याच्या भावालाही नव्हते.*

neon /'नीऑन्/ *ना* [*अगण*] विजेच्या दिव्यात वापरायचा रंगहीन वायू.

nephew /'नेव्ह्यू; 'नेफ्यू/ *ना* [*गण*] भावाचा, बहिणीचा, मेव्हण्याचा किंवा मेव्हणीचा मुलगा, पुतण्या, भाचा.

nepotism /'नेपटिझ्म्/ *ना* [*अगण*] नातेवाईकासाठीची वशिलेबाजी, आप्तेष्टांबाबतचा पक्षपातीपणा.

nerve /नऽव्ह्/ *ना* १ [*गण*] मेंदूकडून शरीराच्या इतर भागांत संदेश किंवा भावना संक्रमित करणारा तंतूमय भाग, मज्जातंतू. २ **nerves** [*ब.व*] (*अनौप*) भावनातिरेकाने उत्तेजित, चिंताग्रस्त असण्याची स्थिती: *He has ~s of steel, तो मोठ्या धीराचा पुरुष आहे.* ३ [*अगण*] धीटपणा; हिंमत, धाडस: *lose one's ~, धीर सुटणे.* ४ [*ए.व*] अनादर आणि उद्धटपणा; मगरूरी: *She had the ~ to say I was cheating! मी फसवाफसवी करतो असे म्हणण्याचा उद्धटपणा/आगाऊपणा तिच्यात होता.* ५ (*वाक्प्र*) **get on sb's 'nerves** (*अनौप*) एखाद्याला त्रास देणे, वैताग आणणे. **'nerve-racking** *वि* काळजीत टाकणारा, जिवाला घोर लावणारा.

nervous /'नऽव्हस्/ *वि* १ मज्जेचा. २ काळजीयुक्त, चिंतातूर; तणावपूर्ण. **,nervous 'breakdown** *ना* [*गण*] निराशा, थकवा आणि दुबळेपणा आणणारा मनोविकार, मनोदौर्बल्य, मनाने खचणे. **nervously** *क्रिवि* क्षीणपणे, खिन्नपणे, मन खचल्याप्रमाणे. **nervousness** *ना* [*अगण*] भित्रेपणा, विमनस्कता; अस्वस्थता, चलबिचल. **'nervous system** *ना* [*गण*] प्राण्याच्या किंवा माणसाच्या शरीरातले सर्व मज्जातंतू, मज्जासंस्था.

nervy /'नऽव्हि/ *वि* (*अनौप ब्रि*) काळजीत पडलेला, सचिंत; तणावपूर्ण.

nest /नेस्ट्/ *ना* [*गण*] १ पक्ष्याचे घरटे, खोपा. २ एकमेकात बसणाऱ्या वस्तूंचा (विशेषतः टेबलांचा) संच. **nest** *क्रि* [*अक*] घरटे बांधणे, घरट्यात राहणे. **'nest-egg** *ना* [*गण*] भविष्यात वापरण्यासाठी साचवलेले पैसे, भविष्यनिधी.

nestle /'नेसल्/ *क्रि* १ [*अक*] उबदार जागी बसणे, घरट्यात बसल्यासारखे सुखाने बसणे : ~ *(down) among the cushions, गाद्या-गिरद्यात किंवा उशांमधे आरामात विसावणे.* २ [*सक*] प्रेमाने डोके विसावणे किंवा टेकवणे : *She ~d her head on his shoulder, तिने त्याच्या खांद्यावर डोके टेकवले.*

nestling /'नेस्ट्लिङ्/ *ना* [*गण*] बाहेर पडण्याइतके मोठे नसलेले घरट्यातले पक्ष्याचे पिलू.

net^{1} /नेट्/ *ना* [*गण, अगण*] दोरीचे, वायरचे वगैरे जाळे : *'fishing-~s, मासे पकडायचे जाळे.* **net** *क्रि* (**-tt-**) [*सक*] जाळ्यात पकडणे, जाळे टाकणे. **'netball** *ना* [*अगण*] दोन टोकांच्या दोन खांबांवर असलेल्या जाळीमधे चेंडू टाकून गुण मिळवण्याचा (सात-सात खेळाडूंच्या) दोन संघात खेळायचा खेळ, झेला-चेंडू. **'network** *ना* [*गण*] १ एकमेकांना छेदणाऱ्या अनेक रस्त्यांचे जाळे. २ आतून एकमेकाला सामील असलेली माणसे; एकमेकांना बांधलेली माणसे. ३ आकाशवाणी केन्द्रे किंवा दूरदर्शन केन्द्रांचे जाळे.

net^{2} (तसेच **nett**) /नेट्/ *वि* (खर्च वगैरे वजा जाता राहिलेला) निव्वळ : ~ *profit, निव्वळ नफा.* **net** *क्रि* (**-tt-**) [*सक*] निव्वळ नफा होणे.

netting /'नेटिङ्/ *ना* [*अगण*] जाळी विणलेली दोरी, वायर वगैरे.

nettle /'नेटल्/ *ना* [*गण*] चावऱ्या पानांचे एक जंगली झाड, खाजकुयली.

network ⇨ NET^{1}.

neurology /न्युअ'रॉलजि; *अमे* नु-/ *ना* [*अगण*] मज्जासंस्था आणि तिचे विकार यांचा अभ्यास करणारे शास्त्र, मज्जातंतुविज्ञान. **neurologist** *ना* [*गण*] मज्जातंतुविशारद.

neurosis /न्युअ'रउसिस्; *अमे* नु-/ *ना* [*गण*] (*ब.व* **-oses** /-अउसीझ्/) निराशा आणणारा किंवा विकृत वर्तन घडविणारा एक मज्जासंस्थेचा रोग.

neurotic /न्युअ'रॉटिक्; *अमे* नु-/ *वि* फाजील संवेदनाक्षम किंवा उत्कंठा असलेला. **neurotic** *ना* [*गण*] अतिसंवेदनाक्षम माणूस.

neuter /'न्यूट(र्); *अमे* 'नू-/ *वि* (*व्याकरण*) नपुंसकलिंगी. **neuter** *क्रि* [*सक*] (प्राण्याचे) जननेंद्रिय काढणे.

neutral /'न्यूट्रल्; *अमे* 'नू-/ *वि* १ वादात किंवा युद्धात वगैरे कुणाचीच बाजू न घेणारा, तटस्थ. २ फिका, निस्तेज : *a dull ~ colour, मंद फिका रंग.* ३ (गिअरबाबत) इंजिनाचा चाकांशी संबंध नाही असा, अचक्रण. **neutral** *ना* १ [*गण*] तटस्थ व्यक्ती, राष्ट्र वगैरे. २ [*अगण*] इंजिनाचा चाकांशी संबंध नाही असा गिअर, अचक्रणता. **neutrality** /न्यू'ट्रॅलटि; *अमे* नू-/ *ना* [*अगण*] तटस्थता. **neutralize** *क्रि* [*सक*] परिणाम होणार नाही असे करणे : *~ize a poison, विष निष्क्रीय करणे.*

neutron /'न्यूट्रॉन्; *अमे* 'नू-/ *ना* [*गण*] विद्युत्भार नसलेला अणूमधील कण, अविद्युत्कण.

never /'नेव्ह(र्)/ *क्रिवि* कधीही नाही : *I've ~ been to Wales, मी वेल्सला कधीच गेलो नाही.*

nevertheless /,नेव्हद'लेस्/ *क्रिवि, उ.अव्यय* (*औप*) तथापी, असे असूनही : *He was old and poor, but ~ he was happy, तो गरीब आणि वयोवृद्ध होता, पण तरीही तो आनंदी होता.*

new /न्यू; *अमे* नू/ *वि* १ आधी अस्तित्वात नसलेला, नवीन, नूतन; अगदी अलिकडचा : *a ~ film, नवीन चित्रपट.* २ अगदी अलिकडे माहीत झालेला पण आधीपासून अस्तित्वात असलेला : *learn ~ words, नवीन शब्द शिकणे.* ३ (*to*)// अपरिचित : *I'm ~ to this town, हे नगर माझ्या ओळखीचे नाही.* ४ बदलून आलेला म्हणून नवीन : *get a ~ job, नवीन नोकरी मिळणे.* ५ पुन्हा सुरू केलेला : *start a ~ life, नवीन आयुष्य सुरू करणे म्हणजे नव्याने आयुष्य सुरू करणे.* ६ (*वाक्प्र*) **new blood** ⇨ BLOOD. **a ,new lease of 'life** जगण्याची नवीन उमेद, नवजीवन. **new-** *पूर्वप्रत्यय* (विशेषण म्हणून समासात वापर) आत्ताचा, नुकताच : *~-born, नवजात.*

'newcomer *ना* [*गण*] नवीन आलेला माणूस, नवागत. **newly** *क्रिवि* नव्याने : *a ~ly married couple, नव्याने लग्न झालेले जोडपे.* **'newly-weds** *ना* [*ब.व*] नवविवाहित दांपत्य. **,new 'moon** *ना* [*गण*] शुक्ल पक्षातील चन्द्रकोर. **newness** *ना* [*अगण*] नवेपणा, अभिनवता. **new 'year** *ना* [*अगण, गण*] जानेवारीचे प्रारंभीचे काही दिवस.

news /न्यूझ्; *अमे* नूझ्/ *ना* १ [*अगण*] बातमी, खबर, वार्ता : *Here's some good ~! काही चांगली बातमी आलीय्!* २ **the news** [*अे.व*] आकाशवाणी किंवा दूरदर्शनच्या बातम्यांचा कार्यक्रम. **'newsagent** (*अमे* **'newsdealer**) *ना* [*गण*] वर्तमानपत्रे वगैरे विकणारा दुकानदार. **'newsflash** *ना* [*गण*] रेडिओ किंवा दूरदर्शनवरील छोटी महत्त्वाची बातमी. **newspaper** /'न्यूस्पेइप(र्); *अमे* 'नूझ्-/ *ना* [*गण*] वर्तमानपत्र, वृत्तपत्र, दैनिक किंवा साप्ताहिक.

newt /न्यूद्; *अमे* नूद्/ *ना* [*गण*] पाण्यात किंवा जमिनीवर राहू शकणारा छोट्या सरड्यासारखा एक प्राणी.

next /नेक्स्द्/ *वि* १ क्रमवारी, अवकाश आणि काल यामधे लगोलग येणारा, नंतरचा : *the ~ name on the list, यादीतील त्यापुढचे नाव.* २ लगेच येणारा, पुढचा : *~ Thursday, पुढचा गुरुवार.* **next** *क्रिवि* यानंतर : *What are you going to do ~? यापुढे तू काय करणारेस?* **,next 'door** *क्रिवि* शेजारच्या – पुढच्या घरात, पुढच्या दारी. **,next of 'kin** /'किन्/ *ना* (अे.व किंवा ब.व क्रियापदासह) जवळचे नातेवाईक, सगेसोयरे. **next to** *शब्दयो* १ जवळ, बाजूला : *Come and sit ~ to me, ये आणि माझ्याजवळ बैस.* २ जवळजवळ : *say ~ to nothing, जवळजवळ काहीच नाही बोलणे* ○ *in ~ to no time, जवळजवळ काहीही वेळ न घालवता.*

NHS /,अेन् अेइच् 'अेस्/ *संरू* (*ब्रि*) **National Health Service** राष्ट्रीय आरोग्य सेवा.

nib /निब्/ *ना* [*गण*] लेखणीचे (पेनचे) धातूचे टोक, निफ/निब.

nibble /'निब्ल्/ *क्रि* [*अक, सक*] कुरतडणे. **nibble** *ना* [*गण*] कुरतडण्याची क्रिया.

nice /नाइस/ *वि* (**~r, ~st**) १ आल्हादकारक, छान : *a ~ day, चांगला दिवस.* २ दयाळू; मैत्रीयुक्त. ३ (*उपरोधाने*) वाईट : *You've got us into a ~ mess! आम्हाला तू फार छान गोंधळात टाकलेस!* ४ काळजी आवश्यक असलेला; हलकासा, नर्म : *a ~ distinction, अगदी सूक्ष्म फरक.* ५ (*वाक्प्र*) **nice and ...** (*अनौप*) (विशेषणापूर्वी वापर) छान : *It's ~ and quiet here, इथे कसं छानपैकी शांत आहे.* **nicely** *क्रिवि* १ चांगल्या मार्गाने. २ (*अनौप*) फार चांगला : *The patient is doing ~ly, रोग्याचं बरं/चांगलं आहे म्हणजे त्याच्यात प्रगती आहे.* **niceness** *ना* [*अगण*] छानसरपणा, भलेपणा.

nicety /'नाइसटि/ *ना* [*गण, बहुधा ब.व*] (*ब.व* **-ies**) सूक्ष्म फरक, बारकावे : *niceties of meaning, अर्थाचे बारकावे.*

niche /नीश्, निच्/ *ना* [*गण*] १ पुतळा, मूर्ती वगैरे ठेवण्याचा भिंतीतला कोनाडा. २ (*ला*) खूप सोयीची जागा, नोकरी वगैरे.

nick^{1} /निक्/ *ना* [*गण*] १ खाच, चीर. २ (*वाक्प्र*) **in good, bad, etc 'nick** (*ब्रि ब्रात्य*) चांगल्या, वाईट वगैरे स्थितीत. **in the ,nick of 'time** त्याच वेळी नेमका. **nick** *क्रि* [*सक*] चीर पाडणे, खाच करणे.

nick^{2} /निक्/ *ना* **the nick** [*अे.व*] (*ब्रि ब्रात्य*) तुरुंग किंवा पोलीस चौकी/कोठडी. **nick** *क्रि* [*सक*] (*ब्रि*) १ (*ब्रात्य*) अटक करणे. २ (*अमे*) चोरणे.

nickel /'निक्ल्/ *ना* १ [*अगण*] कठीण रुपेरी धातू. २ [*गण*] पाच सेंटचे अमेरिका किंवा कॅनडातील नाणे.

nickname /'निक्नेइम्/ *ना* [*गण*] एखाद्याच्या नावाऐवजी अनौपचारिकपणे वापरले जाणारे नाव, टोपणनाव. **nickname** *क्रि* [*सक*] टोपणनाव देणे/ठेवणे.

nicotine /'निकटीन्/ *ना* [*अगण*] तंबाखूमधला विषारी तेलासारखा पदार्थ, तमाखूवीर्य.

niece /नीस्/ *ना* [*गण*] भावाची, बहिणीची, मेव्हण्याची किंवा मेव्हणीची मुलगी, पुतणी, भाची.

night /नाइद्/ *ना* १ [*गण, अगण*]

सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंतचा मधला अंधाराचा काळ, रात्र, निशा. २ (*वाक्प्र*) **at/by night** रात्री. **have a good/bad 'night** चांगली/वाईट झोप येणे. **,night and 'day, ,day and 'night** रात्रंदिवस, दिवसरात्र, सतत. **'night-club** *ना* [*गण*] नृत्य, करमणूक, नशापाणी वगैरेसाठी रात्री उशिरापर्यंत उघडा असणारा क्लब, निशामंडळ. **'night-dress** (तसेच (*अनौप*) **nightie** /'नाइटि/) *ना* [*गण*] झोपताना घालायचा स्त्रियांचा किंवा मुलींचा एक कपडा. **'nightfall** *ना* [*अगण*] अंधार पडायची वेळ, तिन्हीसांजा, दिवेलागण. **'night-life** *ना* [*अगण*] दारूचा गुत्ता, डिस्को नाच यांसारखी रात्रीची करमणूक. **nightly** *वि, क्रिवि* रात्रीचा. **'nightmare** *ना* [*गण*] १ भयानक स्वप्न, दुःस्वप्न. २ (*अनौप*) भयानक अनुभव. **,night-'watchman** *ना* [*गण*] (*ब.व* **-men**) रात्रीचा पहारेकरी, गुरखा.

nightingale /'नाइटिङ्गेइल; *अमे* -टन्·ग्-/ *ना* [*गण*] गोड गाणारा एक छोटासा पक्षी, बुलबुल.

nil /निल्/ *ना* [*अगण*] काहीही नाही, शून्य.

nimble /'निम्ब्ल्/ *वि* (~r, ~st) १ चपळ, चलाख; चळवळ्या. २ (*ला*) (मनाबाबत) चपळ बुद्धीचा; तीक्ष्ण बुद्धीचा. **nimbly** *क्रिवि* चपळतेने, चपळाई करून.

nine /नाइन्/ *सना, वि, ना* [*गण*] ९, नऊ. **ninth** /नाइन्थ्/ *सना, वि* ९ वा, नववा. **ninth** *सना, ना* [*गण*] $\frac{१}{९}$, एक नवमांश.

nineteen /,नाइन्'टीन्/ *सना, वि, ना* [*गण*] १९, एकोणीस. **nineteenth** /,नाइन्'टीन्थ्/ *सना, वि* १९ वा, एकोणिसावा. **nineteenth** *सना, ना* [*गण*] $\frac{१}{१९}$, एक एकोणिसांश.

ninety /'नाइन्टि/ *सना, वि, ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) ९०, नव्वद. **ninetieth** /'नाइन्टिअथ्/ *सना, वि* ९० वा, नव्वदावा. **ninetieth** *सना, ना* [*गण*] $\frac{१}{९०}$, एक नव्वदांश.

nip /निप्/ *क्रि* (**-pp-**) १ [*सक*] (विशेषतः चिमटीत किंवा दातात) घट्ट पकडणे, जखडणे, आवळणे. २ [*अक*] (*अनौप*) पटकन् जाणे; झरझर, घाईने जाणे : *I'll just ~ along to the shops, मी पटकन् दुकानात जातोय्.* ३ (*वाक्प्र*) **nip sth in the bud** मुळातूनच काढून टाकणे. **nip** *ना* [*गण*] १ [बहुधा *ए.व*] चिमटा किंवा चावा. २ (खास करून कडक दारूचा) घोट, घुटका. ३ (*वाक्प्र*) **a 'nip in the air** बोचरी थंडी.

nipple /'निप्ल्/ *ना* [*गण*] १ स्तनाग्र, बोंड. २ लहान मुलाच्या दुधाच्या बाटलीला लावायचे बोंडाच्या आकाराचे बूच.

nippy /'निपि/ *वि* (**-ier, -iest**) (*अनौप*) १ थंड. २ चपळ, जलद : *a ~ little car, जलद जाणारी छोटी गाडी.*

nit /निट्/ *ना* [*गण*] १ उवेसारख्या किड्याचे अंडे, लीख. २ (*अनौप* विशेषतः *ब्रि*) = NITWIT.

nitrogen /'नाइट्रजन्/ *ना* [*अगण*] पृथ्वीच्या वातावरणातील $\frac{४}{५}$ भाग व्यापणारा वायू, नत्रवायू.

nitro-glycerine (तसेच विशेषतः *अमे* **-glycerin**) /,नाइट्रउ 'ग्लिसरन्; *अमे* -रीन्/ *ना* [*अगण*] एक शक्तिशाली स्फोटक.

nitwit /'निट्विट्/ *ना* [*गण*] (*अनौप*) मूर्ख माणूस.

No (तसेच **no**) *संरू* (*ब.व* ~s) number अंक, आकडा.

no /नउ/ *वि* १ काहीही/कुणीही नाही; एकही नाही : *She had no money, तिच्याकडे काहीही पैसे नव्हते.* २ (एखाद्या गोष्टीची परवानगी नाही असे दाखविण्यासाठी वापर) : *No smoking, धूम्रपान करू नका* किंवा *धूम्रपानास मनाई.* ३ (विरुद्धार्थ दाखविण्यासाठी वापर) : *He's no fool, तो मूर्ख नाहीये म्हणजेच तो हुशार आहे.* **no** *उद्‌गा* (नकार देताना, मतभेद दाखवताना, नाकारताना वगैरे वापर) : *'Would you like a drink?' 'No thanks', 'तू काही पेय घेणार?' 'नको, आभारी आहे'.* **no** *क्रिवि* नाही : *He's feeling no better, त्याला अजून बरं नाही वाटत.* **no** *ना* [*गण*] (*ब.व* ~es) १ नकारात्मक मत देणारा माणूस. २ 'नाही' उत्तर किंवा शब्द. **,no-claims 'bonus** *ना* [*गण*] दावा न केल्याने विम्याच्या फीमधे केलेली कपात, ना दावा अधिलाभांश. **,no-'go area** *ना* [*गण*] काही लोकांना जाण्यास परवानगी नसलेली जागा. **'no man's land** *ना* [*अगण*] (युद्धामधे) दोन लढणाऱ्या सैन्यांमधील

प्रदेश, अस्वामिक भूमी. **no one** = NOBODY.

nobility /नउ'बिलटि/ *ना* १ [*अगण*] कुलीनता; खानदानीपणा. २ **the nobility** [*अे.व*] (अे.व किंवा ब.व क्रियापदासह) उमराव, खानदानी लोक, कुलीन माणसे.

noble /'नउब्‌ल्/ *वि* (~r, ~st) १ उच्च कुळातला, कुलीन, खानदानी. २ उच्च नीतिमत्तेचा, उमदा, प्रगल्भ : *a ~ leader, थोर मनाचा नेता.* ३ भारदस्त, छाप पाडणारा. **noble** *ना* [*गण*] उमराव, खानदानी व्यक्ती. **'nobleman** (*स्त्री* **'noblewoman**) *ना* [*गण*] उमराव, घरंदाज किंवा कुलीन पुरुष (*स्त्री* कुलीन स्त्री). **nobly** *क्रिवि* खानदानी पद्धतीने, उमदेपणाने.

nobody /'नउबडि/ (तसेच **no one** /'नउवॅन्/) *सना* कुणीही नाही : *N~ came to see me, मला भेटायला कुणीच आले नाही.* **nobody** *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) कमी महत्त्वाचा माणूस, क्षुल्लक माणूस.

nocturnal /,नॉक्'टऽन्ल्/ *वि* रात्रीचा, रात्री काम करणारा म्हणजे रात्रिंचर : *Owls are ~, घुबडे रात्री हिंडतात.*

nod /नॉड्/ *क्रि* (-dd-) १ [*अक, सक*] सहमती दर्शविण्यासाठी किंवा स्वागतासाठी डोके वरखाली (म्हणजेच पुढेमागे) हालवणे, मान डोलावणे. २ (*क्रिब*) **nod off** (*अनौप*) डुलकी घेणे, पेंगणे, झोपणे. **nod** *ना* [*गण,* बहुधा *अे.व*] मान डोलावणे.

noise /नॉइझ्/ *ना* [*गण, अगण*] गोंगाट, कर्कश आवाज, कालव. **noisy** *वि* (-ier, -iest) गोंगाटाचा. **noisily** *क्रिवि* गोंगाटाने.

nomad /'नउमॅड्/ *ना* [*गण*] सतत स्थलांतर करणाऱ्या जमातीचा माणूस, भटक्या (जातीचा). **nomadic** /नउ'मॅडिक्/ *वि* भटक्या जातीचा.

nominal /'नॉमिन्ल्/ *वि* १ नावापुरता; प्रत्यक्षात नसलेला : *the ~ ruler of the country, देशाचा नावापुरता किंवा नावाचा सत्ताधीश.* २ अगदी अल्प, किरकोळ : *a ~ rent, अल्प किंवा किरकोळ भाडे.* ३ (*व्याकरण*) नामाचा, नामसाधित. **nominally** /-नलि/ *क्रिवि* नावापुरता, नावाला.

nominate /'नॉमिनेइट्/ *क्रि* [*सक*] अधिकृतपणे एखाद्या जागेकरता नाव सुचवणे, नामनिर्देशित करणे. **nomination** /,नॉमि'नेइश्‌न्/ *ना* [*गण, अगण*] नामनिर्देशन.

nominee /,नॉमि'नी/ *ना* [*गण*] नामनिर्देशित व्यक्ती.

non- /नॉन्/ *पूर्वप्रत्यय* नाही, न-, अ-, बिन-. **,non-com'missioned** *वि* (सैन्यातील) अराजादिष्ट, बिनसनदी. **,non-com'mittal** /क'मिट्‌ल्/ *वि* मत किंवा निर्णय न देणारा, गुंतवून किंवा बांधून न घेणारा. **,noncon'formist** *ना* [*गण*], *वि* इतरांप्रमाणे न वागणारा (माणूस), न जुमानणारा (माणूस). **,non-'fiction** *ना* [*अगण*] खरेखुरे लोक व घटना यांविषयीचे लेखन, वास्तव लेखन. **,non-'stick** *वि* (तवा, कढई वगैरे भांड्यांबाबत) शिजवताना अन्न चिकटू नये म्हणून विशिष्ट आवरण असलेले. **,non-'stop** *वि, क्रिवि* न थांबणारा, थेट, न थांबता : *a ~-stop train, (वाटेत) न थांबणारी गाडी, थेट गाडी.*

nonchalant /'नॉन्शलन्ट्/ *वि* उदासीन, आस्था नसलेला, थंड. **nonchalance** /-लन्स्/ *ना* [*अगण*] थंडपणा, उदासीनता. **nonchalantly** *क्रिवि* थंडपणे, उदासीनपणे.

nondescript /'नॉन्डिस्क्रिप्ट्/ *वि* सामान्य; रटाळ.

none /नन्/ *सना* एकही नाही; कुणीही नाही : *N~ of them has/have come back yet, त्यांपैकी अद्याप कुणीही परत आलेले नाही.* **none** *क्रिवि* १ **none the** मुळीच नाही : *~ the worse for this experience, या अनुभवामुळे मुळीच वाईट नाही.* २ **none too** फार नाही : *~ too happy, फार आनंदित नाही असा.* **,none the 'less** *क्रिवि* असे असूनही : *She may be ill but she got the work done ~ the less, ती आजारी असूनही तिने ते काम करून घेतले.*

nonentity /नॉ'नेन्टटि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) महत्त्व नसलेला माणूस, क्षुल्लक व्यक्ती, कुचकामी माणूस.

nonplussed /,नॉन्'प्लस्ट्/ *वि* आश्चर्यचकित झालेला, गोंधळलेला, भांबवलेला.

nonsense /'नॉन्‌सन्स्; *अमे* -सेन्स्/ *ना* १

[*अगण*] निरर्थक शब्द. २ [*अगण, अे.व*] मूर्खासारखी बडबड, मूर्ख कल्पना वगैरे. **nonsensical** /नॉन्'सेन्सिक्ल्/ *वि* निरर्थक, बालिश, वेडेपणाचा.

noodle /'नूड्ल्/ *ना* [*गण,* बहुधा *ब.व*] पीठ पाण्यात किंवा अंड्यात भिजवून शेवयांसारखा केलेला सॉस वगैरेबरोबर खाण्याचा एक पदार्थ.

nook /नुक्/ *ना* [*गण*] १ सावलीची शांत जागा, सांदी. २ (*वाक्प्र*) **every ,nook and 'cranny** सर्वत्र, कानाकोपऱ्यात.

noon /नून्/ *ना* [*अगण*] दुपारचे बारा, मध्यान्ह.

no-one, no one = NOBODY.

noose /नूस्/ *ना* [*गण*] दोरीचा फास.

nor /नॉऽ(र्)/ *उ.अव्यय, क्रिवि* (*neither* किंवा *not* नंतर वापर) आणि नाही : *Neither Chris ~ his sister wanted to come, क्रिसला यायचं नव्हतं आणि त्याच्या बहिणीलाही यायचं नव्हतं* ○ *He can't see, ~ can he hear, त्याला दिसत नाही आणि ऐकूही येत नाही.*

norm /नॉऽम्/ *ना* [*गण*] वागणुकीची नेहमीची अपेक्षित रीत, रिवाज.

normal /'नॉऽम्ल्/ *वि* नेहमीचा, सर्वसाधारण, नियमितपणे येणारा. **normal** *ना* [*अगण*] नेहमीची स्थिती किंवा पातळी. **normality** /नॉऽ'मॅलटि/ (तसेच विशेषतः *अमे* **normalcy** /'नॉऽम्ल्सि/ *ना* [*अगण*] सामान्य परिस्थिती, मूळ पदावर आलेली परिस्थिती. **normally** /-मलि/ *क्रिवि* सामान्यतः, सर्वसाधारण परिस्थितीमधे.

north /नॉऽथ्/ *ना* [*अे.व*] १ **the north** उत्तर दिशा. २ **the North** एखाद्या देशाचा उत्तरेकडचा भाग. **north** *वि* १ उत्तरेकडचा. २ (वाऱ्यांबाबत) उत्तरेकडचे. **north** *क्रिवि* उत्तर दिशेला. **,north-'east** *ना* [*अे.व*], *वि, क्रिवि* उत्तर आणि पूर्व यांच्या मध्यभागी असलेला (प्रदेश, दिशा वगैरे), ईशान्य. **,north-'eastern** *वि* ईशान्येचा. **northerly** /'नॉऽदलि/ *वि, क्रिवि* १ उत्तरेकडील, उत्तरेचा. २ (वाऱ्यांबाबत) उत्तरेकडून. **northern** /'नॉऽदन्/ *वि* एखाद्या देशाच्या किंवा जगाच्या उत्तरेकडचा. **northerner** *ना* [*गण*] देशाच्या उत्तरेकडे राहणारा माणूस. **northward** /'नॉऽथ्वड्/ *वि* उत्तरेकडे. **northward(s)** *क्रिवि* उत्तरेला. **,north-'west** *ना* [*अे.व*], *वि, क्रिवि* उत्तर आणि पश्चिम यांच्या मध्यभागी असलेला (प्रदेश, दिशा वगैरे), वायव्य. **,north-'western** *वि* वायव्येकडचा.

Nos *संरू* numbers आकडे, अंक.

nose^1 /नउझ़्/ *ना* १ [*गण*] नाक. २ [*गण*] विमानाचे वगैरे नाक, पुढचा भाग. ३ [*अे.व*] (**क**) घ्राणेन्द्रिय. (**ख**) *for//* (*अनौप*) काहीतरी शोधण्याचे कसब : *a ~ for a good story, चांगली कथा हुडकून काढण्याचे कसब.* ४ (*वाक्प्र*) **get up sb's 'nose** (*व्रात्य*) एखाद्याला खिजवणे. **poke/stick one's nose into sth** (*अनौप*) नसत्या गोष्टीत नाक खुपसणे. **under sb's nose** (*अनौप*) एखाद्याच्या नाकासमोर, नाकावर टिच्चून. **'nosebleed** *ना* [*गण*] घोळणा फुटणे, नाकातून रक्त येणे. **'nosedive** *ना* [*गण*], *क्रि* [*अक*] विमानाचे एकदम सरळ खाली येणे : (*ला*) *Prices have taken a ~dive, किंमती एकदम झपाट्याने खाली आल्या आहेत.*

nose^2 /नउझ़्/ *क्रि* १ [*अक, सक*] हळूहळू विशिष्ट दिशेने पुढे जाणे. २ (*क्रिव*) **nose about/around** दुसऱ्याच्या गोष्टीत नाक खुपसणे : *He's been nosing around in my desk, तो माझ्या डेस्कमधे नाक खुपसत आलेला आहे.*

nosey (तसेच **nosy**) /'नउझ़ि/ *वि* (**-ier, -iest**) (*अनौप अधिक्षेपी*) दुसऱ्याच्या भानगडीत सतत नाक खुपसणारा, चोंबडा. **,Nosey 'Parker** *ना* [*गण*] (*ब्रि अनौप अधिक्षेपी*) नाक खुपसणारा माणूस, चोंबडा माणूस.

nostalgia /नॉ'स्टॅल्ज/ *ना* [*अगण*] भूतकाळातील गोष्टींबद्दल ओढ, माहेरओढ. **nostalgic** /-जिक्/ *वि* माहेरओढीचा.

nostril /'नॉस्ट्रल्/ *ना* [*गण*] नाकपुडी.

not /नॉट्/ (तसाच संक्षेप **-n't** /न्ट्/) *क्रिवि* १ (नकार बनविण्यास वापर) नाही, नको : *She did ~ see him, तिने त्याला पाहिले नाही* ○ *He warned ~ to be late, उशीर करू नको म्हणून त्याने मला ताकीद दिली* ○ *Don't be late!*

उशीर नको करू! २ (*वाक्प्र*) **not only ... (but) also** (एखाद्याची भर आहे असे ठासून सांगण्यासाठी वापर) : *She's ~ only my sister but also my best friend, ती केवळ माझी बहीणच नाही तर उत्तम मैत्रीणाही आहे.* **'not that** म्हणजे असं नाही : *I asked him to visit me – ~ that I like him, you understand, मी त्याला मला भेटायला बोलावलं – म्हणजे तो मला आवडतो असं नाही – तुला माहितीये.*

notable /'नउटब्ल्/ *वि* लक्षात घेण्यासारखा, उल्लेखनीय, लक्षणीय. **notable** *ना* [*गण*] महत्त्वाची व्यक्ती, मान्यवर. **notably** *क्रिवि* विशेषतः.

notary /'नउटरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) **,notary 'public** कागदपत्रे प्रमाणित करणारा अधिकारी, लेख प्रमाणक.

notation /नउ'टेइशन्/ *ना* [*गण, अगण*] अंक, संगीताचे स्वर वगैरे दर्शविण्यासाठी वापरायची चिन्ह-पद्धती, स्वरलिपी.

notch /नॉच्/ *ना* [*गण*] V आकाराची खाच. **notch** *क्रि* [*सक*] १ V आकाराची खाच करणे. २ (*क्रिब*) **notch sth up** मिळवणे; जिंकणे : *~ up a victory, विजय मिळवणे.*

note /नउट्/ *ना* १ [*गण*] टीप, टिप्पणी : *take ~s at a lecture, व्याख्यानाच्या टिपा घेणे.* २ [*गण*] छोटे पत्र, चिट्ठी : *Leave a ~ about it on his desk, त्याच्या डेस्कवर याबाबत चिट्ठी ठेव.* ३ [*गण*] पुस्तकातील टीप. ४ [*गण*] पैशाची नोट : *a five-rupee ~, पाच रुपयाची नोट.* ५ [*गण*] (**क**) संगीतातला स्वर, सूर. (**ख**) स्वरचिन्ह, मातृका ६ [*ए.व*] आवाजाचा स्वर, सूर : *a ~ of bitterness in his voice, त्याच्या आवाजातील कडवट सूर.* ७ [*अगण*] महत्त्व : *a family of ~, महत्त्वाचे घराणे.* ८ (*वाक्प्र*) **take note of sth** एखाद्याची दखल घेणे, एखाद्याकडे लक्ष देणे. **note** *क्रि* [*सक*] १ लक्षात घेणे, नोट करणे. २ (*down*)// लिहून ठेवणे, नोंद घेणे/करणे. **'note-book** *ना* [*गण*] टिपण्णी-वही, वही. **noted** *वि* प्रसिद्ध, विख्यात. **'note paper** *ना* [*गण*] पत्र लिहायचा कागद. **'noteworthy** *वि* लक्षात घेण्यासारखा, लक्षणीय.

nothing /'नथिङ्/ *सना* १ काहीही नाही : *I've had ~ to eat since lunch, दुपारच्या जेवणानंतर मला काहीही खायला मिळालेले नाहीये* ○ *'You've hurt your arm.' 'It's ~', 'तुझ्या हाताला लागलंय्.' 'फारसं काही नाही'.* २ (*वाक्प्र*) **for 'nothing** (**क**) फुकट, मोफत : *He did that job for ~, त्याने काहीही न घेता ते काम केले.* (**ख**) चांगल्या परिणामाशिवाय, व्यर्थ; उद्देशाविना, उगाच. **have nothing to 'do with sb/sth** एखाद्या गोष्टीशी किंवा व्यक्तीशी काहीही संबंध नसणे. **'nothing but** फक्त, केवळ : *~ but the best, फक्त उत्तम.* **nothing (else) 'for it (but)** दुसरं काहीही करण्यासारखं नसणे : *There's ~ for it but to work late tonight, आज रात्री उशिरापर्यंत काम करण्यावाचून दुसरं काहीही करण्यासारखं नाही.* **nothing like** (*अनौप*) (**क**) तसा मुळीच नाही : *She's ~ like her sister, ती तिच्या बहिणीसारखी मुळीच नाही.* (**ख**) अजिबात नाही, पूर्णपणे नाही : *This is ~ like as good, हे अजिबात चांगलं नाही.*

notice /'नउटिस्/ *ना* १ [*गण*] (लिखित किंवा छापलेली) बातमी किंवा माहिती, पत्रक. २ [*अगण*] काय करणार याची पूर्वसूचना : *Give her a month's ~ to leave, सोडून जाण्यासंबंधी तिला एक महिन्याची पूर्वसूचना दे* ○ *at short ~, थोड्याशा पूर्वसूचनेने म्हणजेच पुरेशी पूर्वसूचना न देता.* ३ (*वाक्प्र*) **bring sth/come to sb's notice** एखाद्याच्या दृष्टोत्पत्तीस एखादी गोष्ट आणणे/येणे, लक्षात आणणे/येणे. **take no notice of sb/sth** एखाद्याकडे दुर्लक्ष करणे, ढुंकून न पाहणे. **notice** *क्रि* [*अक, सक*] एखादी गोष्ट पाहणे, अवलोकन करणे, लक्षात येणे, नजरेस येणे. **noticeable** *वि* सहज दिसणारा, डोळ्यात भरणारा. **noticeably** *क्रिवि* सहज दिसेल अशा रीतीने.

notify /'नउटिफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] (*of*)// एखाद्याला एखाद्या गोष्टीविषयी सांगणे, सूचना देणे; माहिती देणे, वर्दी देणे : *~ the police of the accident, पोलिसांना अपघाताची माहिती/बातमी देणे.* **notification** /,नउटिफि'केइशन्/ *ना* [*अगण, गण*] अधिसूचना, वर्दी.

notion /'नउशन्/ *ना* [*गण*] संकल्पना; समज, मत.

notorious /नउ'टॉऽरिअस्/ *वि* कुप्रसिद्ध : *a ~ murderer, कुविख्यात खुनी.* **notoriety** /,नउट'राइअटि/ *ना* [*अगण*] कुप्रसिद्धी. **notoriously** *क्रिवि* कुविख्यातपणे.

nougat /'नूगा, 'नेगद्; *अमे* 'नूगद्/ *ना* [*अगण*] साखर आणि बदाम, काजू वगैरेची चिक्की.

nought /नॉऽद्/ *ना* [*गण*] शून्य, ०.

noun /नाउन्/ *ना* [*गण*] (*व्याकरण*) वस्तू, गुण, व्यक्ती वगैरेना नाव देणारा आणि क्रियापदाचा कर्ता किंवा कर्म होऊ शकणारा शब्द, नाम.

nourish /'नेरिश्/ *क्रि* [*सक*] १ अन्नावर जोपासणे, पोषण करणे. २ (*औप ला*) पोसणे, वाढवणे, संवर्धन करणे. **nourishment** *ना* [*अगण*] अन्न.

novel^{1} /'नॉव्ह्ल्/ *ना* [*गण*] कादंबरी. **novelist** /'नॉव्हलिस्ट्/ *ना* [*गण*] कादंबरीकार.

novel^{2} /'नॉव्ह्ल्/ *वि* नवीन, नव : *a ~ idea, नवकल्पना.*

novelty /'नॉव्ह्ल्टि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] नाविन्य, नवेपण. २ [*गण*] नाविन्यपूर्ण असे काही, अपूर्वाई, नवलाई. ३ [*गण*] स्वस्त खेळणे किंवा नटवण्याची वस्तू.

November /नउ'व्हेम्ब(र्)/ *ना* [*अगण, गण*] इंग्रजी वर्षातील अकरावा महिना (*April* खालची उदाहरणे पहा).

novice /'नॉव्हिस्/ *ना* [*गण*] १ नवशिका, नवखा, अननुभवी. २ संन्यासी किंवा संन्यासिनीचे शिक्षण घेणारा/घेणारी.

now /नाउ/ *क्रिवि* १ (क) वर्तमान काली, सध्या, हल्ली, आजकाल : *Where are you living ~? तू सध्या कुठे राहतोस?* (ख) लगेच, आत्ताच : *Start writing ~, लगेच लिहायला सुरुवात कर.* २ (लक्ष वेधण्यासाठी वगैरे वापर) आता : *N~ stop quarrelling and listen! आता भांडण बंद करा आणि जरा ऐका!* ३ (*वाक्प्र*) **(every) now and then/again** मधूनमधून : *He visits me every ~ and then, तो मला मधूनमधून भेटतो.* **now** *उ.अव्यय* (*that*)// म्हणून, या कारणास्तव : *N~ (that) you're here, let's begin, तू आता इथे आलाच आहेस तर सुरुवात करूया.*

nowadays /'नाउअडेइझ्/ *क्रिवि* हल्ली, आजकाल : *She doesn't go out much ~, हल्ली ती फारशी बाहेर जात नाही.*

nowhere /'नउवेअ(र्); *अमे* -ह्वेअर/ *क्रिवि* १ कुठेही नाही : *There is ~ interesting to visit in this town, या गावात कोठेही भेट देण्यासारखे असे नाही.* २ (*वाक्प्र*) **get nowhere** ⇨ GET.

noxious /'नॉक्शस्/ *वि* (*औप*) इजाकारक, अपायकारक; विषारी.

nozzle /'नॉझ्ल्/ *ना* [*गण*] नळीचे तोंड, तोटी.

nuance /'न्यूआन्स्; *अमे* 'नू-/ *ना* [*गण*] अर्थ, मत, रंग वगैरेतील सूक्ष्म फरक दाखविणारी छटा, सूक्ष्म भेद.

nuclear /'न्यूक्लिअ(र्); *अमे* 'नू-/ *वि* मूळ भागाचा, केंद्रस्थ, गाभ्याचा, मुख्य; आण्विक, अणुशक्तीचा वापर केलेला. **,nuclear 'energy** *ना* [*अगण*] अणूंच्या केंद्रकांचे विभाजन करून त्यापासून मिळणारी प्रचंड अणु-ऊर्जा. **,nuclear re'actor** *ना* [*गण*] अणु-ऊर्जा निर्मितीचे साधन, अणुभट्टी.

nucleus /'न्यूक्लिअस्; *अमे* 'नू-/ *ना* [*गण*] (*ब.व* **nuclei** /-क्लिआइ/) १ (क) (*पदार्थविज्ञान*) अणूचे केंद्रक. (ख) (*जीवशास्त्र*) पेशीचे केंद्रस्थान, केंद्रक, प्रकल. २ केंद्रभाग, गाभा : *These books form the ~ of the library, ही पुस्तके ग्रंथालयाचा गाभा आहेत.*

nude /न्यूड्; *अमे* नूड्/ *वि* नग्न, नागडा, विवस्त्र. **nude** *ना* १ [*गण*] खास करून चित्रातील वगैरे नग्न व्यक्ती. २ (*वाक्प्र*) **in the nude** कपडे न घातलेला, विवस्त्र. **nudism** /-इझम्/ *ना* [*अगण*] नग्नतेची रीत, विवस्त्रता. **nudist** *ना* [*गण*] नग्नावस्थेत राहणारा माणूस. **nudity** *ना* [*अगण*] विवस्त्रपणा, नग्नता.

nudge /नेज्/ *क्रि* [*सक*] कोपराने हळूच ढोसणे, कोपरखळी मारणे. **nudge** *ना* [*गण*] कोपरखळी, हलका धक्का.

nugget /'नेगिट्/ *ना* [*गण*] १ धातूचा – खास करून सोन्याचा – गोळा, लगड. २ (*ला*)

आकर्षक, चविष्ट माहिती.

nuisance /'न्यूस्न्स्; *अमे* 'नू-/ *ना* [*गण*, बहुधा *अे.व*] कटकटीची गोष्ट किंवा व्यक्ती, उपद्रवकारक गोष्ट.

null /नैल्/ *वि* (*वाक्प्र*) **null and void** कायदेशीरदृष्ट्या परिणामशून्य. **nullify** /'नलिफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] परिणामशून्य करणे, रद्द करणे.

numb /नैम्/ *वि* संवेदनाशून्य, बधिर : ~ *with cold/shock, थंडीने/धक्क्याने बधिर झालेला.* **numb** *क्रि* [*सक*] बधिर करणे, संवेदनाशून्य करणे. **numbness** *ना* [*अगण*] संवेदनहीनता, बधिरपणा.

number /'नैम्ब(र्)/ *ना* [*गण*] १ संख्या सांगणारा शब्द किंवा चिन्ह, संख्या, अंक, आकडा, क्रमांक : *3, 13 and 103 are ~s, ३, १३, १०३ या संख्या आहेत.* २ परिमाण किंवा राशी : *a large ~ of people, खूप लोक* ○ *A ~ of books are missing, खूप/असंख्य पुस्तके जागेवर नाहीत.* ३ मासिकाचा अंक. ४ नृत्य, गायन, चाल वगैरे. **number** *क्रि* [*सक*] १ क्रमांक देणे, आकडे टाकणे : ~ *the pages, पृष्ठक्रमांक देणे.* २ संख्येला पोहोचणे, विशिष्ट आकडा गाठणे : *The crowd ~ed over 3000, जमाव ३००० च्या वर झाला.* ३ *among//* समावेश करणे, गणना करणे : *I ~ her among my friends, मी तिची गणना माझ्या मित्रांत करतो.*

numeral /'न्यूमरल्; *अमे* 'नू-/ *ना* [*गण*] संख्यावाचक चिन्ह किंवा अंक, संख्यादर्शक, संख्यांक.

numerate /'न्यूमरट्; *अमे* 'नू-/ *वि* गणिती क्षमता असणारा, गणितात गती असणारा.

numerical /न्यू'मेरिक्ल्; *अमे* नू-/ *वि* अंकाचा किंवा अंकात व्यक्त झालेला, संख्यात्मक. **numerically** /-क्लि/ *क्रिवि* संख्यात्मकदृष्ट्या.

numerous /'न्यूमर(स्); *अमे* 'नू-/ *वि* (*औप*) पुष्कळ, असंख्य, अगणित : *on ~ occasions, अनेक प्रसंगी.*

nun /नैन्/ *ना* [*गण*] मठात राहणारी जोगीण, संन्यासिनी. **nunnery** *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) जोगिणींचा मठ, विहार.

nurse /नऽस्/ *ना* [*गण*] रुग्णांची शुश्रृषा करणारी व्यक्ती, परिचारिका, दाई. **nurse** *क्रि* [*सक*] १ रुग्णांची वगैरे शुश्रृषा करणे. २ मुलाला अंगावर पाजणे. ३ काळजीपूर्वक वाढवणे, संवर्धन करणे : ~ *young plants, रोपे वाढवणे.* ४ मनात बाळगणे : ~ *feelings of revenge, सूडभावना बाळगणे.* **nursing** *ना* [*अगण*] रुग्णसेवा, आजाऱ्याची शुश्रृषा. **'nursing-home** *ना* [*गण*] लहान, बहुधा खाजगी रुग्णालय.

nursery /'नऽसरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) १ आईवडील कामावर गेले असताना मुलांची काळजी घेतली जाते ते ठिकाण, पाळणाघर. २ रोपे वाढवण्याची जागा, पऱ्हेरी. **'nursery rhyme** *ना* [*गण*] शिशुगीत, बालगीत, बडबडगीत. **'nursery school** *ना* [*गण*] २ ते ५ वर्षांतील मुलांसाठीची शाळा, शिशुशाळा.

nurture /'नऽच(र्)/ *क्रि* [*सक*] (*औप*) १ मूल वाढवणे, मुलाचे संगोपन करणे. २ वाढीला प्रोत्साहन देणे.

nut /नैट्/ *ना* [*गण*] १ कठीण कवचाचे फळ, खायची बी. २ बोल्टवर लावायची आटे असलेली धातूची रिंग किंवा चकती. ३ (*व्रात्य अधिक्षेपी*) वेडा. ४ (*वाक्प्र*) **,off one's 'nut** (*व्रात्य*) वेडा. **'nut-case** *ना* [*गण*] (*व्रात्य*) वेडा माणूस. **'nutcrackers** *ना* [*ब.व*] कवच फोडण्याचे साधन, अडकित्ता. **'nutshell** *ना* (*वाक्प्र*) **(put sth) in a nutshell** (एखादी गोष्ट) थोडक्यात सांगणे. **nutty** *वि* **(-ier, -iest)** १ कठीण कवचाची फळे असलेला (पदार्थ). २ (*व्रात्य*) वेडा.

nutmeg /'नैट्मेग्/ *ना* [*अगण, गण*] मधुर वासाचे आणि स्वादिष्ट असे पूर्व भारतातील एका झाडाचे फळ किंवा त्याची पूड, जायफळ.

nutrient /'न्यूट्रिअन्ट्; *अमे* 'नू-/ *ना* [*गण*] प्राणी आणि वनस्पती यांच्या वाढीस आवश्यक असे पोषण द्रव्य, पोषक.

nutrition /न्यू'ट्रिश्न्; *अमे* 'नू-/ *ना* [*अगण*] पोषण, पौष्टिक आहार. **nutritional** /-शन्ल्/ *वि* पोषणाचा. **nutritious** /-शस्/ पोषक, पौष्टिक.

nuts /नैट्स्/ *वि* (*व्रात्य*) चक्रम; वेडा.

nuzzle /'नैझ्ल्/ *क्रि* [*अक, सक*] प्रेम व्यक्त

करण्यासाठी नाकाने हळूवार घासणे किंवा दाबणे.

nylon /'नाइलॉन्/ *ना* [*अगण*] कपडे, दोरी वगैरे करताना वापरायचा कृत्रिम धागा.

nymph /निम्फ्/ *ना* [*गण*] (ग्रीक आणि रोमन कथांमधे) नद्या, राने येथे राहणारी देवी, जलदेवी, वनदेवी.

O o

O, o /अउ/ *ना* [*गण*] (*ब.व* **O's, o's** /अउझ़्/) १ इंग्रजी वर्णमालेतील पंधरावे अक्षर. २ (उदा दूरध्वनी क्रमांक सांगताना) शून्य.

oaf /अउफ्/ *ना* [*गण*] हेंगाडा माणूस, ढ.

oak /अउक्/ *ना* (क) [*गण*] टणक लाकूड असलेले एक मोठे झाड. (ख) [*अगण*] या झाडाचे लाकूड.

OAP /,अउ अेइ 'पी/ *संरू* (*ब्रि अनौप*) old-age pensioner सेवानिवृत्त.

oar /ऑऽ(र्)/ *ना* १ [*गण*] नावेचे वल्हे. २ (*वाक्प्र*) **put/stick one's 'oar in** (*अनौप*) नाक खुपसणे, ढवळाढवळ करणे.

oasis /अउ'अेइसिस्/ *ना* [*गण*] (*ब.व* **oases** /सीझ़्/) वाळवंटातील पाणथळ जागा, मरूवन, ओलवण.

oath /अउथ्/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s** /अउद्झ़्/) १ गंभीरपणे दिलेले वचन किंवा केलेली प्रतिज्ञा. २ शिवी, अभद्र बोल. ३ (*वाक्प्र*) **be on/under 'oath** (न्यायालयात) खरे बोलण्याची शपथ घेतलेली असणे.

oats /अउट्स्/ *ना* [*ब.व*] एक प्रकारचे धान्य (किंवा त्याचे गवत). **'oatmeal** *ना* [*अगण*] ओटचे पीठ.

obedient /अ'बीडिअन्ट्/ *वि* आज्ञाधारक, सांगितलेले करणारा. **obedience** /-अन्स्/ *ना* [*अगण*] आज्ञाधारकपणा. **obediently** *क्रिवि* आज्ञाधारकपणे, निमूटपणे.

obelisk /'ऑबलिस्क्/ *ना* [*गण*] उंच टोकदार दगडी खांब, शंकुस्तंभ.

obese /अउ'बीस्/ *वि* (*औप*) (लोकांबाबत) जाड, लठ्ठ, स्थूल. **obesity** *ना* [*अगण*] जाडपणा, लठ्ठपणा, मेदवृद्धी, अतिस्थूलता.

obey /अ'बेइ/ *क्रि* [*अक, सक*] आज्ञा पाळणे, ऐकणे.

obituary /अ'बिचुअरि; *अमे* -चुअेरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) वर्तमानपत्र वगैरेत दिलेली मृत्युवार्ता, श्रद्धांजली.

object¹ /'ऑब्जिक्ट्/ *ना* [*गण*] १ दृश्य किंवा स्पर्श्य अशी वस्तू. २ *of//* कृती किंवा भावनेचे लक्ष्य, विषय, गोष्ट : *an ~ of pity, दयेचा विषय.* ३ हेतू, उद्देश : *Our ~ is to win, जिंकणे हे आमचे उद्दिष्ट आहे.* ४ (*व्याकरण*) कर्मस्थानीचे नाम किंवा नामपदबंध – उदा *him* आणि *the money* हे शब्द *Give him the money* या वाक्यात. ५ (*वाक्प्र*) **money, etc is no object** पैसा वगैरेचा प्रश्न नाही.

object² /अब्'जेक्ट्/ *क्रि* [*अक*] (*to*)// आक्षेप घेणे, हरकत घेणे, निषेध करणे.

objection /अब्'जेक्शन्/ *ना* १ [*गण, अगण*] नावड किंवा विरोध व्यक्त करणारे विधान किंवा भावना, आक्षेप, हरकत. २ [*गण*] नावडीचे कारण. **objectionable** /-शनब्ल्/ *वि* आक्षेपार्ह, निषेधार्ह, अप्रिय. **objectionably** *क्रिवि* आक्षेपार्ह रीतीने.

objective /अब्'जेक्टिव्ह्/ *वि* १ वस्तुनिष्ठ, व्यक्तिनिरपेक्ष : *an ~ report, वस्तुनिष्ठ वृत्तान्त.* २ (*तत्त्वज्ञान*) मनाबाहेर अस्तित्व असलेला; वस्तुनिष्ठ. **objective** *ना* [*गण*] साध्य; उद्दिष्ट. **objectively** *क्रिवि* व्यक्तिनिरपेक्षतेने, वस्तुनिष्ठपणे. **objectivity** /,ऑब्जेक्'टिव्हटि/ *ना* [*अगण*] वस्तुनिष्ठता, व्यक्तिनिरपेक्षता; प्रत्यक्षता.

obligation /,ऑब्लि'गेइशन्/ *ना* [*गण, अगण*] १ करायलाच हवी अशी गोष्ट, दायित्व, बंधन; कर्तव्य. २ (*वाक्प्र*) **be under no obligation to do sth** एखादी गोष्ट करण्याचे बंधनकारक नसणे, बांधलेला नसणे.

obligatory /अ'ब्लिगट्रि; *अमे* -टॉऽरि/ *वि* कायदा किंवा रिवाज यानुसार आवश्यक, अनिवार्य.

oblige /अ'ब्लाइज्/ *क्रि* १ [*सक*] *to//* (बहुधा कर्मणी) एखाद्याला एखादी गोष्ट करणे अगत्याचे असणे, जरूर पडणे, भाग पडणे : *They were ~d to sell the house, त्यांना घर*

विकणे भाग पडले. २ [*अक, सक*] एखाद्यावर कृपा करणे, मेहेरबानी करणे : *Could you ~ me by closing the door? दार बंद करण्याची मेहेरबानी/कृपा करशील?* ३ (*वाक्प्र*) **much obliged, I'm much obliged to you** (*जुना, अप्रचलित*) आभारी आहे. **obliging** *वि* मदत करण्यास उत्सुक, मदत करणारा, परोपकारी. **obligingly** *क्रिवि* परोपकारी वृत्तीने, उपकारबुद्धीने.

oblique /अ'ब्लीक्/ *वि* १ उतरता, कलता, तिरपा, तिर्यक्. २ (*ला*) अप्रत्यक्ष : *an ~ reference, अप्रत्यक्ष उल्लेख किंवा संदर्भ.* **obliquely** *क्रिवि* तिरपेपणाने, तिरका; अप्रत्यक्षपणे.

obliterate /अ'ब्लिटरेइट्/ *क्रि* [*सक*] सर्व खाणाखुणा पुसून टाकणे; नष्ट करणे. **obliteration** /अ,ब्लिट'रेइशन्/ *ना* [*अगण*] पुसून टाकणे; विनाश.

oblivion /अ'ब्लिव्हिअन्/ *ना* [*अगण*] विस्मृती, विसर.

oblivious /अ'ब्लिव्हिअस्/ *वि of/to//* माहीत नसलेला, एखाद्या गोष्टीचा पत्ता नसलेला : *~ of the news, बातमीचा पत्ता नसलेला* ○ *He's ~ to his problems, स्वतःच्या प्रश्नांविषयी त्याला माहिती नाही किंवा जाणीव नाही.*

oblong /'ऑब्लॉङ्; *अमे* 'ऑब्लॉऽङ्/ *ना* [*गण*], *वि* ९० अंशाचे चार कोन असणारी, रुंदीपेक्षा लांबी जास्त असणारी आकृती, आयताकृती.

obnoxious /अब्'नॉक्शस्/ *वि* वाईट, घाण, दुर्-, घृणास्पद.

oboe /'अउबउ/ *ना* [*गण*] फुंकून वाजवायचे एक लाकडी वाद्य. **oboist** *ना* [*गण*] अशा वाद्याचा वादक.

obscene /अब्'सीन्/ *वि* विशेषतः लैंगिक दृष्ट्या धक्कादायक आणि बीभत्स, अश्लील. **obscenely** *क्रिवि* अश्लीलपणे, लाजलज्जा गुंडाळून. **obscenity** *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) अश्लील वर्तन किंवा भाषा, अश्लीलता, बीभत्सपणा.

obscure /अब्'स्क्युअ(र्)/ *वि* १ सहजपणे न दिसणारा किंवा समजणारा, अस्पष्ट. २ अप्रसिद्ध, कोपऱ्यातला : *an ~ poet, प्रसिद्ध नसलेला कवी.* **obscure** *क्रि* [*सक*] अस्पष्ट/धूसर करणे : *hill ~d by fog, धुक्याने धूसर दिसणारी टेकडी.* **obscurely** *क्रिवि* अस्पष्टपणे, धूसरपणे. **obscurity** *ना* [*अगण*] अस्पष्टता, धूसरता; अप्रसिद्धी.

observance /अब्'झऽव्हन्स्/ *ना* १ [*अगण*] कायदा, रिवाज, सण वगैरेचे पालन. २ [*गण*] धार्मिक विधीचा भाग.

observant /अब्'झऽव्हन्ट्/ *वि* गोष्टींची झटकन् पारख करणारा, चाणाक्ष.

observation /,ऑब्झ'व्हेइशन्/ *ना* १ [*अगण*] निरीक्षण : *a doctor's ~ of a patient, डॉक्टरांनी केलेले रुग्णाचे निरीक्षण.* २ [*अगण*] निरीक्षण शक्ती, चाणाक्षपणा : *keen powers of ~, तीक्ष्ण निरीक्षणशक्ती किंवा कुशाग्रता.* ३ [*गण*] शेरा. ४ (*वाक्प्र*) **under obser'vation** (रुग्णालयात किंवा पोलिसांच्या) निरीक्षणाखाली, देखरेखीखाली.

observatory /अब्'झऽव्हट्रि; *अमे* -टॉऽरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) तारे, ग्रह वगैरेचे निरीक्षण करण्यासाठीची वैज्ञानिकांची इमारत, वेधशाळा.

observe /अब्'झऽव्ह्/ *क्रि* [*सक*] १ निरीक्षण करणे, अवलोकन करणे. २ (*औप*) पाळणे (कायदा, नियम वगैरे). ३ (*औप*) साजरा करणे (सण, वाढदिवस वगैरे). ४ (*औप*) मत मांडणे, म्हणणे. **observer** *ना* [*गण*] १ निरीक्षक. २ प्रत्यक्ष भाग न घेणारा मूक निरीक्षक, त्रयस्थपणे पाहणारा.

obsess /अब्'सेस्/ *क्रि* [*सक*] (बहुधा कर्मणी) झपाटणे, पछाडणे : *be ~ed by the fear of death, मृत्यूच्या भीतीने पछाडणे.* **obsession** /अब्'सेशन्/ *ना* १ [*अगण*] पछाडलेपणा, झपाटलेपणा. २ [*गण*] मनात अयोग्य असे भरलेले काही, वेड. **obsessive** *वि* वेड्यासारखा, छंदीपणाचा.

obsolescent /,ऑब्स'लेसन्ट्/ *वि* प्रचारात नसलेला, अप्रचलित. **obsolescence** /-लेसन्स्/ *ना* [*अगण*] अप्रचलितता.

obsolete /'ऑब्सलीट्/ *वि* वापरात नसलेला, अप्रचलित; जुना, पुराणा.

obstacle /'ऑब्स्टकल्/ *ना* [*गण*] (बहुधा

ला) प्रगतीच्या मार्गातील धोंड, अडथळा : *an ~ to world peace, जागतिक शांततेतील अडथळा.*

obstetrics /अब'स्टेट्रिक्स/ *ना* (अे.व क्रियापदासह) प्रसूतिशास्त्र. **obstetrician** /,ऑब्स्ट'ट्रिश्न्/ *ना* [*गण*] प्रसूतिशास्त्रज्ञ, प्रसूतितज्ज्ञ.

obstinate /'ऑब्स्टनट्/ *वि* १ स्वतःची मते किंवा वागणूक बदलण्यास तयार नसलेला, हटवादी, ताठर, अडेलतट्टू. २ काढता न येणारा, नष्ट न होणारा : *~ stains, न निघणारे डाग.* **obstinacy** /-नसि/ *ना* [*अगण*] ताठरपणा, हट्टीपणा. **obstinately** *क्रिवि* हट्टीपणाने, ताठरपणाने; न जाईल अशा रीतीने.

obstreperous /अब्'स्ट्रेपरस्/ *वि* न आवरणाऱ्या गोंगाटाचा, कलकलाटाचा : *a class full of ~ children, गोंगाट करणाऱ्या मुलांनी भरलेला वर्ग.*

obstruct /अब्'स्ट्रक्ट्/ *क्रि* [*सक*] १ अडवणे, अडथळा करणे : *~ a road, रस्ता अडवणे/रोकणे.* २ प्रगतीला खीळ घालणे, प्रतिबंध करणे; मार्गात अडथळे आणणे, अडचणी निर्माण करणे : *~ justice, न्यायदानात अडथळा आणणे.* **obstruction** /-क्श्न्/ *ना* १ [*अगण*] अडथळा आणणे, प्रतिबंध, अटकाव, अडवणूक. २ [*गण*] अडथळा, अडचण. **obstructive** *वि* अडथळा आणणारा, प्रतिबंध करणारा.

obtain /अब्'टेइन्/ *क्रि* [*सक*] (*औप*) मिळवणे, संपादणे : *Where could I ~ the book? मला ते पुस्तक कुठे मिळेल?* **obtainable** *वि* मिळवण्याजोगा.

obtrusive /अब्'ट्रूसिव्ह्/ *वि* बटबटीतपणाने डोळ्यात भरणारा : *a modern house which is ~ in an old village, जुन्या खेड्यात वेगळेपणाने डोळ्यात भरणारे नवे घर.* **obtrusively** *क्रिवि* बटबटीतपणे पुढे येऊन.

obtuse /अब्'ट्यूस्/ *वि* १ (*औप अधिक्षेपी*) मठ्ठ, मद्दड; ढ, मूर्ख. २ (कोनाबाबत) ९० ते १८० अंशामधला, विशाल. **obtusely** *क्रिवि* मंदपणे, मठ्ठपणे; मूर्खासारखे. **obtuseness** *ना* [*अगण*] मंदपणा, मठ्ठपणा, मंदमती, जाड्य; मूर्खपणा, बिनडोकपणा.

obverse /'ऑब्व्हऽस्/ *ना* [बहुधा *अे.व*] (*औप*) १ नाण्याची वगैरे मुख्य किंवा पुढची बाजू, छाप, दर्शनी बाजू. २ विरुद्ध, उलट, विपर्यय.

obvious /'ऑब्व्हिअस्/ *वि* उघडपणे दिसणारा किंवा कळणारा; स्वच्छ, स्पष्ट. **obviously** *क्रिवि* उघडपणे, स्पष्टपणे.

occasion /अ'केइझ्न्/ *ना* १ [*गण*] ठराविक वेळ किंवा प्रसंग, (घटना घडण्याची) वेळ, मुहूर्त. २ [*गण*] खास प्रसंग किंवा समारंभ. ३ [*अगण, अे.व*] (*औप*) एखाद्या गोष्टीला कारण होणारा प्रसंग, वेळ : *I have had no ~ to visit them recently, अलीकडे त्यांना भेटायची वेळच माझ्यावर आली नाही.* ४ (*वाक्प्र*) **on oc'casion** कधीकधी, प्रसंगोपात्त, वेळप्रसंगी. **occasion** *क्रि* [*सक*] (*औप*) घडवून आणणे, घडवणे.

occasional /अ'केइझन्ल्/ *वि* कधीकधी घडणारा, कधीमधी होणारा : *an ~ drink/visit, कधीमधीचे पिणे/भेट देणे.* **occasionally** /-नलि/ *क्रिवि* कधीमधी, कधीतरी.

occidental /,ऑक्सि'डेन्ट्ल्/ *वि* (*औप*) पाश्चिमात्य राष्ट्रांचे – म्हणजे युरोप, अमेरिकेचे, पाश्चात्य.

occult /ऑ'कल्ट्; *अमे* अ'-/ *ना* **the occult** [*अे.व*] आधिभौतिक शक्ती, गूढ शक्ती. **occult** *वि* गूढ, अमानवी.

occupant /'ऑक्युपन्ट्/ *ना* [*गण*] घरात किंवा खोलीत राहणारा किंवा काम करणारा माणूस, अधिवासी. **occupancy** /-पन्सि/ *ना* [*अगण*] ताबा, वहिवाट.

occupation /,ऑक्यु'पेइश्न्/ *ना* १ [*गण*] व्यवसाय, कामधंदा. २ [*गण*] ज्यात एखादी व्यक्ती वेळ खर्च करते तो उद्योग. ३ [*अगण*] एखादा देश ताब्यात घेणे, आक्रमण, वर्चस्व. **occupational** /-शन्ल्/ *वि* व्यवसायविषयक, कामधंद्याचा.

occupy /'ऑक्युपाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] १ (घरात वगैरे) राहणे, वास्तव्य करणे; आत असणे. २ (एखादा देश, गाव वगैरे) ताब्यात घेणे, आक्रमण करणे. ३ (वेळ, जागा, मन वगैरे) भरून जाणे, व्यापणे. ४ (एखादे पद) घेणे, पदावर येणे. ५ **occupy oneself** उद्योगात व्यग्र असणे, गढून जाणे.

occupier *ना* [*गण*] घरात किंवा खोलीत राहत असणारा, राहणारा, ताबेदार, वहिवाटदार.

occur /अ'कऽ(र्)/ *क्रि* (**-rr-**) [*अक*] १ घडणे : *The accident ~red in the rain, तो अपघात पावसात घडला.* २ आढळणे; असणे : *Poverty ~s in every country, प्रत्येक देशात दारिद्र्य आढळते.* ३ *to*// (कल्पना वगैरे बाबत) (मनात) येणे, चमकणे, सुचणे : *It never ~red to me that I should tell you, तुला सांगावं हे मला कधी सुचलंच नाही.* **occurrence** /अ'करन्स्/ *ना* १ [*गण*] घटना. २ [*अगण*] (*औप*) एखादी गोष्ट प्रत्यक्ष घडणे.

ocean /'अउशन्/ *ना* **Ocean** [*गण*] पृथ्वीवरील महासागर, समुद्र : *the Pacific O~, पॅसिफिक/प्रशांत महासागर.* **oceanic** /,अउशि'ॲनिक्/ *वि* समुद्राचा, सागरी, सामुद्र.

o'clock /अ'क्लॉक्/ *क्रिवि* (घड्याळातली वेळ सांगताना आकड्यानंतर वापर) वाजता, वाजले : *It's 5 ~, पाच वाजले.*

octagon /'ऑक्टगन्; *अमे* -गॉन्/ *ना* [*गण*] आठ बाजू आणि आठ कोन असलेली सपाट आकृती, अष्टकोन. **octagonal** /ऑक्'टॅगन्ल्/ *वि* अष्टकोनी.

octane /'ऑक्टेइन्/ *ना* [*अगण*] पेट्रोलची गुणवत्ता सांगणारा त्याच्यातील एक पदार्थ.

octave /'ऑक्टिव्ह्/ *ना* [*गण*] (*संगीत*) दोन समस्वरातील (उदा सा-सा) अंतर, स्वरसप्तक.

October /ऑक्'टउब(र्)/ *ना* [*अगण, गण*] इंग्रजी वर्षातील दहावा महिना (*April* खालची उदाहरणे पहा).

octopus /'ऑक्टपस्/ *ना* [*गण*] आठ पायांचा मृदुकाय समुद्र प्राणी, अष्टपाद (= TENTACLES).

odd /ऑड्/ *वि* १ विचित्र, चमत्कारिक; असाधारण, विलक्षण, नेहमीचा नाही असा. २ (अंकांबाबत) २ ने भाग न जाणारा, विषम : *1 and 5 are ~ numbers, १ आणि ५ हे विषम अंक आहेत.* ३ जोडी हरवलेला : *an ~ sock/shoe, एकच (म्हणजे दुसरा हरवलेला) मोजा/बूट.* ४ (उल्लेखित अंकापेक्षा) थोडा जास्त : *30-~ years, तिसाहून जरा जास्तच वर्षे.* ५ (*वाक्प्र*) **odd man/one 'out** एखाद्या गटातील वेगळी उठून दिसणारी व्यक्ती किंवा वस्तू. **oddity** *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] विचित्रपणा, चमत्कारिकपणा; विलक्षणपणा. २ [*गण*] विचित्र माणूस किंवा गोष्ट. **,odd 'jobs** *ना* [*ब.व*] वेगवेगळी बारीकसारीक कामे, फुटकळ कामे. **odd 'job man** *ना* [*गण*] फुटकळ कामे करणारा नोकर, हरकाम्या. **oddly** *क्रिवि* चमत्कारिकपणे, गंमत म्हणजे.

oddment /'ऑड्मन्ट्/ *ना* [*गण*] बाकी, शिल्लक, राहिलेले काही.

odds /ऑड्झ्/ *ना* [*ब.व*] १ एखादी गोष्ट घडण्याची किंवा न घडण्याची शक्याशक्यता, संभाव्यता : *The ~ are she'll win, ती जिंकण्याची शक्यता आहे.* २ (*वाक्प्र*) **be at odds** विसंवाद असणे, मतभेद असणे. **it makes no 'odds** ते महत्त्वाचे नाही. **,odds and 'ends** *ना* [*ब.व*] (*ब्रि अनौप*) छोट्याछोट्या वस्तू, सटरफटर.

ode /अउड्/ *ना* [*गण*] उदात्त भाव व्यक्त करणारी (दीर्घ) कविता, उद्देशिका.

odious /'अउडिअस्/ *वि* (*औप*) अतिशय वाईट, किळसवाणा.

odour (*अमे* **odor**) /'अउड(र्)/ *ना* [*गण*] (*औप*) वास, गंध.

oesophagus /इ'सॉफगस्/ *ना* [*गण*] (*वैद्यक*) तोंडापासून जठरापर्यंत अन्न नेणारी नलिका, अन्ननलिका, गासन.

of /अव्ह्; अधिक बलयुक्त रूप ऑव्ह्/ *शब्दयो* १ -चा/ची/चे, एखाद्याची मालकी : *a friend ~ mine, माझा एक मित्र* ○ *the lid of the box, खोक्याचे झाकण.* २ -च्या ठिकाणचा, एखाद्या जागी राहणारा : *the miners of Wales, वेल्सचे खाण कामगार.* ३ निर्मित : *the works of Shakespeare, शेक्सपिअरच्या साहित्यकृती.* ४ विषयीचा, बाबतचा : *a picture of sb, एखाद्याचे चित्र.* ५ (एखादी वस्तू कशाची बनली आहे ते दाखविण्यासाठी वापर) : *a dress of silk, रेशमी पोषाख.* ६ (संबंधदर्शक) *a lover of music, संगीताचा चाहता/प्रेमी* ○ *the support of the voters, मतदारांचा पाठिंबा.* ७ (प्रमाणदर्शक किंवा

आतील पदार्थदर्शक) : *40 litres of petrol, ४० लिटर पेट्रोल* ○ *a bottle of lemonade, लिंबाच्या रसाची बाटली.* ८ (भागदर्शक) : *amember of the team, संघाचा सभासद/खेळाडू.* ९ (काल किंवा अवकाश यातील अंतर दाखवताना वापर) : *20 kilometres south of Paris, पॅरिसच्या दक्षिणेस २० किलोमीटर.* १० (दिनांक सांगताना वापर) : *the first of May, एक मे.* ११ (कारणदर्शक) -ने : *die of cancer, कॅन्सरने मृत्यू.* १२ (वियोग, सुटका वगैरे दाखविताना वापर) : *rob sb of sth, एखाद्याची एखादी गोष्ट लुबाडणे.* १३ (जुना, अप्रचलित) जसं पुढील रचनेत : *go for a walk of an evening, संध्याकाळी फिरायला जाणे.*

off^{1} /ऑफ्; *अमे* ऑऽफ्/ *क्रिवि* १ काल किंवा अवकाश यात एका विशिष्ट बिंदूपर्यंत दूर : *The town is still 5 miles ~, नगर अजून ५ मैल दूर आहे.* २ (काढणे किंवा दूर करणे दाखविताना वापर) : *take one's hat ~, हॅट काढणे.* ३ प्रवासाची सुरुवात दाखविताना : *He's ~ to France today, तो आज फ्रान्सला निघतोय्.* ४ (*अनौप*) रद्द : *The wedding is ~, विवाह (समारंभ) रद्द झाला आहे.* ५ गेलेला, जोड सुटलेला : *The electricity is ~, वीज गेली आहे.* ६ वापरात नसलेला, बंद : *The radio is ~, रेडिओ बंद आहे.* ७ (उपहारगृहातील अन्नपदार्थांबाबत) संपलेले, शिल्लक नसलेले : *The soup is ~, सूप संपले.* ८ कामावर गैरहजर : *take the day ~, दिवसाची रजा काढणे.* ९ (*वाक्प्र*) **,off and 'on, ,on and 'off** कधीकधी.

off^{2} /ऑफ्; *अमे* ऑऽफ्/ *वि* १ (*अनौप*) तुसडा, तुटक, फटकळ : *He can be a bit ~ sometimes, कधीकधी तो तुटकपणानेही वागतो.* २ (अन्नाबाबत) शिळे : *The milk is ~, दूध शिळे आहे.* ३ (*अनौप*) नेहमी इतका चांगला नसलेला : *an 'off-day, नेहमीइतका चांगला नसलेला दिवस.* ४ फारशी गर्दी, गजबज नसलेला : *the '~-season, हंगाम नसलेला काळ.* ५ (*वाक्प्र*) **on the 'off-chance** फारशी शक्यता/आशा नसताना : *I went to his house on the ~-chance (that he'd be at home), (तो घरी भेटण्याची) फारशी शक्यता नसतानाही मी त्याच्या घरी गेलो.*

off^{3} /ऑफ्; *अमे* ऑऽफ्/ *शब्दयो* १ खाली किंवा पासून दूर : *fall ~ a ladder, शिडीवरून खाली पडणे* ○ *take a packet ~ the shelf, फळीवरून पुडा खाली घेणे किंवा काढून घेणे* ○ (*ला*) *We're getting ~ the subject, आपण विषयापासून दूर चाललोय्.* २ (खास करून रस्त्याबाबत) पासून फुटलेला : *a lane ~ the main road, मुख्य रस्त्याला फुटलेली गल्ली.* ३ काही अंतरावर : *a house ~ the high street, हमरस्त्यापासून थोड्या अंतरावर असणारे घर.* ४ (*अनौप*) गरज नसलेला, नको असलेला : *~ one's food, अन्न नको असणे* ○ *He's ~ drugs now, तो आता मादक पदार्थ घेत नाही.*

offal /'ऑफ्ल्; *अमे* 'ऑऽफ्ल्/ *ना* [*अगण*] अन्न म्हणून खाण्याचे प्राण्याचे आतले अवयव – हृदय, यकृत यांसारखे.

offence (*अमे* -ense) /अ'फेन्स्/ *ना* १ [*गण*] कायद्याचे किंवा नियमाचे उल्लंघन, कायदा मोडणे; गुन्हा. २ [*अगण*] अपमान, उपमर्द : *I didn't mean to give ~, मला तुझा अपमान करायचा नव्हता* ○ *He's quick to take ~, त्याला पटकन् राग येतो.*

offend /अ'फेन्ड्/ *क्रि* १ [*सक*] अपमान करणे, उपमर्द करणे, दुखावणे; निराश करणे, मन क्षुब्ध करणे. २ [*सक*] नाखूष करणे, त्रास देणे : *ugly buildings that ~ the eye, डोळ्यांना ताप देणाऱ्या विद्रूप इमारती.* ३ [*अक*] *against*// (*औप*) एखाद्या गोष्टीला धक्का पोहोचेल असे वागणे, विरुद्ध वागणे. **offender** *ना* [*गण*] कायदा मोडणारा, कायदा भंग करणारा, गुन्हेगार. **offending** *वि* अडचण किंवा प्रश्न निर्माण करणारा.

offensive /अ'फेन्सिव्ह्/ *वि* १ फार क्षोभक किंवा तापदायक, क्लेशदायक; अपमानकारक : *~ language,* पाणउतारा करणारी भाषा. २ (*औप*) आक्रमक : *~ weapons, आक्रमण करण्याची शस्त्रास्त्रे.* **offensive** *ना* [*गण*] १ जोरदार लष्करी आक्रमण. २ (*वाक्प्र*) **go on/take the of'fensive** आक्रमण करणे, हल्ला चढवणे. **offensively** *क्रिवि* तापदायकपणे; आक्रमक वृत्तीने. **offensiveness** *ना* [*अगण*] तापदायकपणा; अपमानकारकता; आक्रमकपणा.

offer /'ऑफ(र्); *अमे* 'ऑऽफ्-/ *क्रि* १ [*सक*]

देणे, भेट देणे : *They ~ed him a good job, त्यांनी त्याला चांगली नोकरी देऊ केली.* २ [*अक, सक*] देण्याची किंवा करण्याची इच्छा व्यक्त करणे : *I ~ed to go first, मी प्रथम जायला तयार होतो.* ३ [*सक*] (*औप*) देणे, पुरवणे : *The job ~s good chances of promotion, या नोकरीत बढती मिळण्याची चांगली संधी आहे.* **offer** *ना* [*गण*] १ देऊ करणे. २ प्रस्ताव. **offering** *ना* [*गण*] खास करून देवाला दिलेला नैवेद्य, वाहिलेली वस्तू वगैरे.

offhand /ˌऑफ्'हॅन्ड्; *अमे* ˌऑऽफ्-/ *वि* (वर्तन वगैरेबाबत) निष्काळजी, बेफिकीर; अशिष्ट, असभ्य. **offhand** *क्रिवि* अविचाराने, काहीही विचार न करता : *I can't give you an answer ~, काही विचार न करता तुला उत्तर देणे मला शक्य नाही.*

office /'ऑफिस्; *अमे* 'ऑऽफिस्/ *ना* १ [*गण*] कचेरी, कार्यालय. २ [*गण*] विशिष्ट हेतूसाठी वापरायची जागा : *a 'ticket ~, तिकिट मिळण्याचे ठिकाण/केंद्र.* ३ **Office** [*अे.व*] सरकारी कचेरी, कार्यालय : *The Foreign O~, परराष्ट्र कचेरी.* ४ [*गण, अगण*] उच्च सत्तास्थान (किंवा त्याचे कार्य), अधिकार-पद : *the ~ of president, अध्यक्षाचे पद.*

officer /'ऑफिस(र्); *अमे* 'ऑऽफ्-/ *ना* [*गण*] १ सैन्यातील अधिकारी : *an ~ in the navy, नौदल अधिकारी.* २ अधिकार असणारा माणूस : *a customs ~, सीमाशुल्क अधिकारी.* ३ पोलीस अधिकारी.

official /अ'फिश्ल्/ *वि* १ सत्ता किंवा विश्वस्तपणा यांच्या पदाचा, अधिकृत. २ अधिकृतपणे केलेला, बोललेला वगैरे : *an ~ statement, अधिकृत निवेदन.* **official** *ना* [*गण*] अधिकारपदावरील व्यक्ती. **officialdom** /-डम्/ *ना* [*अगण*] (अे.व किंवा ब.व क्रियापदासह) (*औप अनेकदा अधिक्षेपी*) अधिकारी वर्ग, वरिष्ठवर्ग. **officially** /-शलि/ *क्रिवि* अधिकृतपणे; रीतसर.

fficiate /अ'फिशिअेइट्/ *क्रि* [*अक*] (*at*)// समारंभाचे ठिकाणी अधिकाराचे काम करणे.

fficious /अ'फिशस्/ *वि* (*अधिक्षेपी*) हुकूम सोडण्यास उतावीळ, अधिकार गाजवणारा. **officiously** *क्रिवि* अधिकारवाणीने, हुकूम सोडत. **officiousness** *ना* [*अगण*] हुकूम सोडण्यातील तत्परता, हुकुमबाजी.

offing /'ऑफिङ्; *अमे* 'ऑऽफ्-/ *ना* (*वाक्प्र*) **in the offing** (*अनौप*) येऊ घातलेला, लवकरच घडणारा.

off-licence /'ऑफ् लाइस्·न्स्/ *ना* [*गण*] (*ब्रि*) दारूचे दुकान, मद्यविक्रीचे दुकान.

off-peak /ˌऑफ् 'पीक्; *अमे* ˌऑऽफ्/ *वि* गर्दी किंवा मोसम नसलेल्या (वेळी) : *~ travel, मोसम नसतानाचा प्रवास.*

off-putting /ˌऑफ् 'पुटिङ्; *अमे* ˌऑऽफ्/ *वि* (खास करून *ब्रि अनौप*) नावड उत्पन्न करणारा; न रुचणारा : *His manner is very ~, त्याची तऱ्हा न रुचणारी आहे.*

offset /'ऑफ्सेट्; *अमे* 'ऑऽफ्/ *क्रि* (**-tt-** *भूत, भूत वि* **offset**) [*सक*] समतोल राखणे : *increase prices to ~ higher costs, मोठ्या खर्चाचं संतुलन करण्यासाठी किंमती वाढवणे.*

offshoot /'ऑफ्शूट्; *अमे* 'ऑऽफ्-/ *ना* [*गण*] मुख्य बुंध्यातून फुटलेली शाखा, फांदी, पाती : (*ला*) *the ~ of a large organization, मोठ्या संघटनेची शाखा.*

offshore /'ऑफ्शॉऽ(र्); *अमे* 'ऑऽफ्-/ *वि, क्रिवि* १ किनाऱ्यापासून दूर (समुद्रात) : *~ breezes, अपतट मंद वारे.* २ समुद्रात : *an '~ oil rig, जमिनीपासून दूरवर असलेला समुद्रातील तेल-खोदाईचा माचवा.*

offside /ˌऑफ्'साइड्; *अमे* ˌऑऽफ्-/ *वि, क्रिवि* (*क्रीडा*) (खेळाडूबाबत) (नियमबाह्य पद्धतीने) चेंडूच्या पुढे असलेला, बादबाजूचा. **offside** *वि, ना* [*अे.व*] फूटपाथच्या दगडी कडेपासून दूर, कडेपासूनचे विमध्य टोक (किंवा त्या टोकाचे).

offspring /'ऑफ्स्प्रिङ्; *अमे* 'ऑऽफ्-/ *ना* [*गण*] (*ब.व* **offspring**) (*औप*) एखाद्याची मुलंबाळं, प्राण्यांची पिल्ले.

off-white /ˌऑफ् 'वाइट्; *अमे* ˌऑऽफ् 'ह्वाइट्/ *वि* पांढराशुभ्र नाही पण किंचित् पिवळसर किंवा करडा पांढरा.

often /'ऑफ्न्, तसेच 'ऑफ्टन्; *अमे* 'ऑऽफ्न्/ *क्रिवि* १ अनेकदा, खूप वेळा; पुन्हापुन्हा, वारंवार : *We ~ go there, आम्ही तेथे खूपदा जातो.* २ अनेक बाबतीत, अनेक

उदाहरणांत : *Old houses are ~ damp, जुनी घरे बव्हंशी ओलीची असतात.* ३ (*वाक्प्र*) **as ,often as 'not, more ,often than 'not** वारंवार, जवळजवळ नेहमी. **,every so 'often** कधीकधी.

ogle /'अउग्ल्/ *क्रि* [*अक, सक*] (*at*)// (*अधिक्षेपी*) एखाद्याकडे अभिलाषेने/कामवासनेने पाहणे, डोळा मारणे, डोळा घालणे.

ogre /'अउग(र्)/ *ना* १ (कथांमधे) नरभक्षक दुष्ट राक्षस. २ (*ला*) भीतिदायक, उग्र व्यक्ती : *Our teacher is a real ~, आमचे शिक्षक म्हणजे राक्षसासारखे भितिदायक आहेत.* **ogress** /'अउग्रेस्/ राक्षसीण.

oh /अउ/ *उद्गा* (आश्चर्य, भीती वगैरे भाव व्यक्त करण्यासाठी वापर) : *Oh dear! बापरे! अरेच्चा!*

oil /ऑइल्/ *ना* १ [*अगण*] तेल. २ **oils** [*ब.व*] तैलरंग. **oil** *क्रि* [*सक*] तेल घालणे, तेल लावणे. **'oil-colour** *ना* [*गण, अगण*] तैलरंग, ऑइलपेन्ट. **'oilfield** *ना* [*गण*] तेलक्षेत्र, तेलाची खाण. **'oil-painting** *ना* [*गण*] तैलरंगांनी काढलेलं चित्रं, तैलचित्र. **'oil rig** *ना* [*गण*] तेल खोदाईचा माचवा. **'oil-skin** *ना* [*गण, अगण*] पाणी आत जाऊ नये म्हणून तेलाचे आवरण चढवलेले कापड, तेलकट कापड (किंवा त्यापासून बनवलेला कोट वगैरे), मेणकापड. **'oil-slick** *ना* [*गण*] समुद्राच्या पाण्यावरचा वगैरे तेलाचा थर. **'oil well** *ना* [*गण*] समुद्रात किंवा जमिनीवर (तेलासाठी) खणलेली विहीर. **oily** *वि* (**-ier, -iest**) १ तेलाचा, तेलासारखा; तेलाने माखलेला. २ (*अधिक्षेपी*) तेल लावून खुशामत करणारा, मस्का लावणारा.

ointment /'ऑइन्ट्मन्ट्/ *ना* [*गण, अगण*] त्वचेवर चोळायचे मलम, विलेपन.

OK (तसेच **okay**) /,अउ'केइ/ *वि, क्रिवि* (*अनौप*) ठीक, समाधानकारक : *Was your holiday OK? तुझी सुट्टी ठीक गेली ना?* **OK** *उद्गा* (*अनौप*) (सहमती दाखवताना वापर) ठीकेय्, बरं : *OK, I'll do it, ठीकेय्, मी ते करीन.* **OK** *क्रि* [*सक*] (*अनौप*) संमती देणे, मान्य करणे; पसंती दर्शविणे : *I'll OK the plan if you make a few changes, काही बदल केलेस तर तुझी योजना मान्य करीन.* **OK** *ना* [*गण*] (*अनौप*) संमती, करार; परवानगी : *give a plan the OK, योजनेला संमती देणे किंवा योजनेला हिरवा कंदील दाखवणे.*

old /अउल्ड्/ *वि* १ एका विशिष्ट वयाचा : *He's 40 years ~, तो ४० वर्षांचा आहे* ○ *How ~ are you? तुझं वय काय?* २ खूप काळ जगलेला, वृद्ध, म्हातारा : *an ~ man, वृद्ध मनुष्य.* ३ दीर्घकाळचा, जुना : *~ shoes, जुने बूट.* ४ पुरातन, जुना : *~ habits, जुन्या सवयी.* ५ दीर्घ परिचयाचा, जुन्या ओळखीचा : *an ~ friend, जुना पूर्वीपासूनचा मित्र.* ६ आधीचा, पूर्वीचा, माजी : *~ boys/girls, माजी विद्यार्थी/विद्यार्थिनी.* ७ (*वाक्प्र*) **(be) an old hand (at sth)** मुरब्बी, अनुभवी, दर्दी (असणे). **old 'hat** जुनाट, जुन्या पद्धतीचा. **an old 'wives' tale** पारंपरिक (बहुधा मूर्खपणाचा) समज, वेडगळ रूढ कल्पना. **the old** *ना* [*ब.व*] वृद्ध माणसे, म्हातारीकोतारी. **,old age 'pension** *ना* [*गण*] एका ठराविक वयाच्या वर असलेल्या लोकांना शासनाने नियमितपणे दिलेले पैसे, वार्धक्य वेतन. **,old-age 'pensioner** *ना* [*गण*] वार्धक्य वेतन मिळणारा वृद्ध. **,old-'fashioned** *वि* १ जुना, अप्रचलित, पुराणा. २ जुन्या पद्धती वगैरेवर विश्वास ठेवणारा, जुन्या वळणाचा. **old 'maid** *ना* [*गण*] (*अनौप अधिक्षेपी*) प्रौढ कुमारिका. **old 'master** *ना* [*गण*] जुन्या काळातील महान चित्रकार (किंवा त्याची चित्रकृती).

olden /'अउल्डन्/ *वि* (*पुरा*) जुन्या काळातला, गतकालीन : *in the ~ days, पूर्वीच्या काळी.*

olive /'ऑलिव्ह्/ *ना* १ [*गण*] दक्षिण युरोपातील एक झाड किंवा त्याचे छोटे फळ जे कच्चे खातात किंवा खाद्यतेल करण्यासाठी वापरतात. २ [*अगण*] पिवळसर हिरवा रंग. **'olive-branch** *ना* [*गण*] शांतीचे चिन्ह.

ombudsman /'ऑम्बुड्झ्मन्, तसेच -मॅन्/ *ना* [*गण*] (*ब.व* **-men** /-मन्/) सार्वजनिक संस्थांबाबतच्या तक्रारी ऐकण्यासाठी शासनाने नेमलेला अधिकारी.

omelette /'ऑम्लिट्/ *ना* [*गण*] अंड्यां धिरडे.

men /'अउमेन्/ *ना* [*गण*] शुभशकुन किंवा अपशकुन.

minous /'ऑमिनस्/ *वि* अमंगळाची पूर्वसूचना देणारे, दुश्चिन्हदर्शक, अभद्र. **ominously** *क्रिवि* संकटाची सूचना देणाऱ्या रीतीने, अभद्रपणे.

mission /अ'मिश्न्/ *ना* १ [*अगण*] गाळणे, लोपन. २ [*गण*] गाळलेले असे काही.

mit /अ'मिट्/ *क्रि* (-tt-) [*सक*] १ समावेश न करणे; गाळणे, वगळणे. २ *to//* (*औप*) एखादी गोष्ट करण्याचे विसरणे, राहून जाणे : *I ~ted to mention his age, त्याच्या वयाचा उल्लेख करण्याचे माझे राहूनच गेले.*

mnibus /'ऑम्निबस्/ *ना* [*गण*] १ एकाच लेखकाच्या अनेक कथांचा संग्रह, समग्र साहित्य. २ पूर्वी वेगवेगळे प्रक्षेपित केलेले कार्यक्रम एकत्र करून तयार केलेला आकाशवाणी किंवा दूरदर्शनवरचा कार्यक्रम. ३ (*जुना, अप्रचलित औप*) बस.

omnipotent /ऑम्'निपटन्ट्/ *वि* (*औप*) सर्वशक्तिमान, सर्वसत्ताधीश. **omnipotence** /-टन्स्/ *ना* [*अगण*] सर्वशक्तिमानपणा.

mniscient /ऑम्'निसिअन्ट्/ *वि* (*औप*) सर्वज्ञानी. **omniscience** /-अन्स्/ *ना* [*अगण*] सर्वज्ञान.

mnivorous /ऑम्'निव्हरस्/ *वि* (*औप*) (प्राण्यांबाबत) वनस्पती आणि मांस खाणारा, सर्वभक्षक.

n^1 /ऑन्/ *क्रिवि* १ (प्रगती किंवा क्रियेचे सातत्य दाखविण्यासाठी वापर) : *They wanted the band to play on, त्यांना बॅन्डने वाजवत राहायला हवे होते.* २ (हालचालीची पुढची दिशा दाखविण्यासाठी वापर) : *Walk on to the bus-stop, बसस्टॉपकडे चालत जा* ○ *from that day on, त्या दिवसापासून (आजतागायत).* ३ (कपड्यांबाबत) अंगात, अंगावर : *Put your coat on, अंगात कोट घाल* ○ *He had nothing on, त्याच्या अंगावर काहीही नव्हते.* ४ जोडलेला, चालू : *The electricity is ~, वीज चालू आहे.* ५ वापरात, चालू : *The radio is ~, रेडिओ चालू आहे.* ६ योजलेला : *Is the strike still ~, अजूनही संप होणार आहे का?* ○ *What's on at the cinema? थिएटरला कोणता चित्रपट लागलाय्?* ○ *Have you got anything on for this evening? आज संध्याकाळी तुझा काय बेत आहे?* ७ मोठ्या वाहनामधे : *get on the bus, बसमधे चढणे.* ८ विशिष्ट भागावर : *crash head-on, समोरासमोर आपटणे.* ९ (*वाक्प्र*) **be 'on** (*अनौप*) चालण्यासारखा, मान्य होण्यासारखा : *Such bad behaviour isn't on, अशी वाईट वागणूक चालणार नाही.* **be/go/keep on about sth** (*अनौप*) एखाद्या गोष्टीविषयी कंटाळवाणेपणाने बोलणे, रटाळपणे बोलणे. **on and off** ⇨ OFF^1. **,on and 'on** न थांबता, एकसारखा.

on^2 /ऑन्/ *शब्दयो* १ (विशिष्ट जागी) (पृष्ठभागा)वर : *a picture on the wall, भिंतीवरील चित्र.* २ आधार असलेला; वर घातलेला : *a roof on the house, घरावरील छप्पर.* ३ (मोठ्या वाहना)मधे : *on the train, आगगाडीमधे.* ४ बरोबर (असलेला), जवळ; -पाशी, -कडे : *Have you got any money on you? तुझ्याकडे काही पैसे आहेत का?* ५ (वेळ दाखविण्यासाठी वापर) : *on Sunday, रविवारी* ○ *on 1 May, एक मेला.* ६ विशिष्ट कालानंतर, लगेच : *on arriving home, घरी आल्याआल्या किंवा आल्यावर लगेच.* ७ विषयी, -वर : *a lecture on Bach, बाखवरचे व्याख्यान.* ८ (एखाद्या गटाचे सभासद असल्याचे दाखविताना वापर) : *He's on the committee, तो त्या कमिटीवर आहे.* ९ मार्गाने, साधनाने; वापरून : *Most cars run on petrol, बहुतेक गाड्या पेट्रोलवर चालतात* ○ *speak on the telephone, टेलिफोनवर बोलणे.* १० (दिशा दाखविण्यासाठी वापर) -च्या दिशेने, -कडे : *to march on Rome, रोमकडे आगेकूच करणे.* ११ अगदी जवळ, नजिक : *a town on the coast, किनाऱ्यालगतचे नगर.* १२ (कारण दाखविण्यासाठी वापर) : *He was arrested on a charge of theft,* चोरीच्या आरोपाखाली *त्याला अटक करण्यात आली.* १३ आर्थिक मदतीवर किंवा साहाय्याने : *live on a student grant, विद्यार्थ्यांसाठीच्या अनुदानावर राहणे म्हणजेच शिष्यवृत्तीवर राहणे.* १४ (पैशाबाबत) : *a tax on beer, बियरवरचा कर.* १५ (कृती किंवा स्थिती दाखविण्यासाठी वापर) :

go to Paris on business, धंद्यासाठी पॅरिसला जाणे ○ *on fire, आग लागलेला* म्हणजेच *पेटलेला.*

once /वॅन्स्/ *क्रिवि* १ फक्त एकदा; एक वेळ : *I've only been there ~, मी तिथे फक्त एकदाच गेलो आहे.* २ पूर्वी/मागे कधी; यापूर्वी, याआधी : *She ~ lived in Zambia, ती मागे कधी झांबियाला होती.* ३ (*वाक्प्र*) **at 'once** (**क**) तावडतोब, लगेच; क्षणाचा विलंब न करता. (**ख**) एकाच वेळी : *Don't all speak at ~! सर्व एकाच वेळी बोलू नका!* **,once and for 'all** शेवटचे, अखेरचे. **,once in a blue 'moon** (*अनौप*) अगदी क्वचित्, सटी सहामासी. **(every) ,once in a 'while** कधीकधी. **once 'more** पुन्हा एकदा. **,one or 'two** एकदोन, थोडेसे. **,once upon a 'time** (परीकथेच्या सुरुवातीला) फार फार वर्षांपूर्वी. **once** *उ.अव्यय* एखादी गोष्ट होताच, तत्क्षणी, लगेच; जेव्हा : *O~ you know how, it's easy, एकदा तुला कसे ते कळले की मग सोपे आहे.*

oncoming /'ऑन्कमिङ्/ *वि* येणारा, आगामी : *~ traffic, येणारी वाहतूक.*

one^1 /वॅन्/ *सना, वि* १ १, एक. २ निश्चित असा एक, कोणी एक : *~ day, एक दिवस* ○ *The winner is one Mrs. West from London, लंडनमधल्या कोणी एक सौ. वेस्ट विजेत्या आहेत.* ३ (*the other* किंवा *another* शी विरोध दाखविताना वापर) : *I can't tell ~ car from another, एका गाडीहून दुसरी गाडी वेगळी कशी हे मला नाही सांगता येत.* ४ तसाच, तोच : *They all went off in ~ direction, ते सर्व एकाच दिशेला गेले.* ५ (*वाक्प्र*) **be at 'one** (*औप*) एकमत असणे, एक असणे. **I, he/ she, etc for one** मला, त्याला/तिला वगैरेला नक्कीच, निश्चितपणे मी, तो/ती वगैरे : *I for ~ don't like it, मला नक्कीच ते आवडत नाही.* **,one or 'two** काही, थोडे. **one 'up on sb** (*अनौप*) एखाद्यावर वरचढ असणे, एखाद्यापेक्षा जास्त फायदा असणे. **one** *ना* [*गण*] अंक १. **,one-'off** *ना* [*गण*], *वि* एकेकदाच केली जाणारी किंवा होणारी गोष्ट. **,one-'sided** *वि* १ (खास करून कल्पनांबाबत) एकांगी, अन्याय्य : *a ,~-'sided 'argument, एकांगी युक्तिवाद.* २ (खा करून खेळांबाबत) असमान ताकदीच प्रतिस्पर्धी असणारा, एकतर्फी. **,one-paren 'family** *ना* [*गण*] आई किंवा वडील यांपैक एकच घटक असलेले कुटुंब. **'one-time** एकेकाळचा. **,one-to-'one** *वि, क्रिवि* फक् दोघांतील, परस्परांचा, एकमेकांचा : *a ~-to- relationship, एकमेकांतील संबंध.* **,one 'way** *वि, क्रिवि* एकेरी (वाहतूक वगैरे) : *a ~ way street, एकेरी वाहतुकीचा रस्ता.*

one^2 /वॅन्/ *सना* १ (नामाऐवजी वापर) एखादा एक : *I forgot to bring a pen. Can you lend me ~? मी पेन आणायचे विसरलो. देशील का एखादं?* ○ *The blue hat is the I like best, मला सर्वात जास्त आवडणारी हॅ म्हणजे निळी (हॅट)* ○ *The small car is jus as fast as the big ~, मोठ्या गाडी एवढी बारकी (गाडी)ही वेगवान आहे.* २ *of//* (गटाती समावेश दाखविण्यासाठी वापर) -पैकी एक *He is not ~ of my customers, तो माझ्य गिऱ्हाईकांपैकी (एक) नाही.* ३ (*औप*) कोणीह (माणूस), एखादा : *O~ cannot always fin the time for reading, एखाद्याला वाचना नेहमीच वेळ मिळेल असे नाही.* **,on a'nother** एकमेक, एकमेकांना : *They don' like ~ another, ते एकमेकांना आवडत नाहीत*

onerous /'ऑनरस्, 'अउन्-/ *वि* (*औप* कष्टाचा; कठीण.

oneself /वन्'सेल्फ्/ *सना* १ (सर्वसामान् माणसांवर क्रियेचा परिणाम झाला असता आ ते क्रियेचे कारणही असता आत्मवाचक सर्वना म्हणून वापर) : *'wash ~, स्वतः स्वतःला धु स्वच्छ करणे.* २ (जोर देण्यासाठी वापर) : *On could arrange it all ~, एखाद्याला स्वतःला त्याचं सर्व आयोजन करता येईल.* ३ (*वाक्प्र* **(all) by oneself** (**क**) एकटा. (**ख** कुणाच्याही मदतीवाचून.

ongoing /'ऑन्गउइङ्/ *वि* चालू असणार *~ research, चालू संशोधन.*

onion /'अॅनिअन्/ *ना* [*गण, अगण* स्वयंपाकात वापरायची आणि तीव्र गंध व च असलेली भाजी, कांदा.

onlooker /'ऑन्लुक(र्)/ *ना* [*गण*] एखा

गोष्ट घडत असताना पाहणारा, बघ्या.

nly^{1} /'अउन्लि/ *वि* १ एकमेव: *Jane was the ~ person to do it, ते करू शकणारी अशी जेन ही एकमेव व्यक्ती होती.* २ (*अनौप*) सर्वोत्कृष्ट: *He's the ~ person for the job, त्या कामाला तोच सर्वात चांगला माणूस आहे.*

nly^{2} /'अउन्लि/ *क्रिवि* १ आणि कुणीही/काहीही नाही, फक्त: *I ~ saw 'Mary, मी फक्त मेरीलाच पाहिलं.* २ (*वाक्प्र*) **only 'just** कसाबसा, जवळजवळ नाहीच: *We ~ just caught the train, आम्ही कशीबशी गाडी पकडली.* **only too** ➪ TOO.

nly^{3} /'अउन्लि/ *उ.अव्यय* (*अनौप*) याचा अपवाद करता, हे नसते तर; पण, परंतू: *I'd love to come, ~ I have to work, मला यायला फार आवडेल, पण मला काम करायचे आहे.*

nrush /'ऑन्रॅश्/. *ना* [*अे.व*] (*औप*) एकदम होणारी जोराची हालचाल, (अश्रूंचा वगैरे) पूर, लोंढा.

nset /'ऑन्सेट्/ *ना* [*अे.व*] (खास करून वाईट गोष्ट) सुरू करणे, धडाका लावणे.

nshore /'ऑन्शॉऽ(र्)/ *वि, क्रिवि* किनाऱ्याकडे: *~ winds, किनाऱ्याकडे वाहणारे वारे.*

nslaught /'ऑन्स्लॉऽट्/ *ना* [*गण*] (*on*)// हल्ला, चढाई.

nto (तसेच **on to**) /'ऑन्ट/ *शब्दयो* १ वर: *climb ~ a horse, घोड्यावर स्वार होणे.* २ (*वाक्प्र*) **be onto sb** बेकायदा वागणाऱ्याच्या मागे लागणे, पाठलाग करणे. **be onto sth** एखाद्या महत्त्वाच्या गोष्टीचा शोध लागेल अशी माहिती असणे.

nus /'अउनस्/ *ना* [*अे.व*] (*औप*) जबाबदारी, जोखीम, कर्तव्य: *The ~ is on you, त्याची जबाबदारी तुझ्यावर आहे.*

nward /'ऑन्वड्/ *वि* पुढचा: *an ~ movement, पुढची चाल म्हणजेच पुढे जाणे.* **onward** (तसेच **onwards**) *क्रिवि* : *move ~s, पुढे सरकणे किंवा पुढे जाणे.*

ze /ऊझ़्/ *क्रि* १ [*अक*] (घट्ट द्रवांबाबत) हळूहळू बाहेर येणे, पाझरणे, वाहणे. २ [*अक, सक*] हळूहळू पसरू देणे, ओथंबणे: (*ला*) *She ~d charm, मोहकता तिच्यातून ओथंबत होती.* **ooze** *ना* [*अगण*] पातळ चिखल.

opacity /अउ'पॅसटि/ *ना* [*अगण*] (*औप*) अपारदर्शकता.

opal /'अंउपल्/ *ना* [*गण*] दुधाळी किंवा निळसर पांढऱ्या रंगाचा एक मौल्यवान खडा, उपल, पुलक.

opaque /अउ'पेइक्/ *वि* १ अपारदर्शक, प्रकाश पलीकडे जाऊ न देणारा. २ (भाषा, लेखन वगैरेबाबत) सहज न समजणारे.

open^{1} /'अउपन्/ *वि* १ बंद नसलेला, खुला, उघडा: *leave the door ~, दार उघडे राहू देणे.* २ कुंपण नसलेला, मोकळा: *~ fields, मोकळी शेते.* ३ कामकाजासाठी उघडा: *Are the shops ~ yet? दुकाने उघडलीत का?* ४ उलगडणे; उमलणे: *The flowers were all ~, सर्व फुले उमलली होती.* ५ बंद नसलेला, बटणे न लावलेला: *an ~ shirt, उघडा शर्ट.* ६ न झाकलेला, छप्पर नसलेला: *an ~ car, उघडी गाडी.* ७ सार्वजनिक, सर्वांसाठी खुला. ८ सर्वांना माहीत असलेला, सर्वज्ञात: *an ~ secret, उघड रहस्य.* ९ बोलण्यास राजी, मनमोकळा; प्रामाणिक. १० अनिर्णित, खुला: *leave the matter ~, एखादा प्रश्न खुला ठेवणे.* ११ *to*// (**क**) स्वागत करणारा: *~ to new ideas, नवकल्पनांचे स्वागत करणारा.* (**ख**) खुला: *~ to criticism, टीकेसाठी खुला.* १२ (*वाक्प्र*) **have/keep an open 'mind** नवीन कल्पनांना सामोरे जाणे, त्यांचे स्वागत करणे. **in the open air** इमारत वगैरेच्या बाहेर, बाहेरच्या बाजूला. **with open 'arms** मोठ्या उत्साहाने किंवा प्रेमाने, खुल्या दिलाने. **the open** *ना* [*अे.व*] १ मोकळी हवा. २ (*वाक्प्र*) **bring sth/be/come (out) in(to) the open** (गुप्तगोष्ट) जाहीर करणे, उजेडात आणणे: *bring the truth out into the ~, सत्य उजेडात आणणे* ○ *a problem which is out in the ~, जगजाहीर असलेला प्रश्न.* **,open-'air** *वि* बाहेर होणारा, खुला, मोकळ्या जागेतला. **,open-and-'shut** *वि* सहजपणे निर्णय घेण्यासारखा. **,open 'cheque** *ना* [*गण*] क्रॉस न केलेला (दोन रेषा न काढलेला) आणि तात्काळ पैसे मिळणारा असा धनादेश, रोखीचा धनादेश.

,open-'ended *वि* खुला, आधीच मर्यादा न घातलेला. **,open'-handed** *वि* उदार, सढळ हाताचा. **openly** *क्रिवि* उघडउघड, उघडपणे. **,open-'minded** *वि* नवीन कल्पनांचा विचार करणारा, खुल्या मनाचा. **openness** *ना* [*अगण*] प्रामाणिकपणा, प्रांजळपणा. **,open-'plan** *वि* आतमधे विभागणाऱ्या भिंती नसलेला (हॉल, इमारत वगैरे). **'openwork** *ना* [*अगण*] जाळीची नक्षी, धाग्यातील अंतराने केलेले डिझाइन.

open^2 /'अउपन्/ *क्रि* १ [*अक, सक*] उघडणे: *The door ~ed, दार उघडले* ○ *Please ~ a window, कृपया एक खिडकी उघड.* २ [*सक*] रस्ता/मार्ग काढणे, वाट करणे: *~ a new road through the forest, जंगलातून नवीन रस्ता काढणे.* ३ [*अक, सक*] उघडणे; उलगडणे: *~ a book, पुस्तक उघडणे.* ४ [*सक*] सुरू करणे, उघडणे: *~ a bank account, बँकेत खाते उघडणे.* ५ [*अक, सक*] कामकाजासाठी उघडणे: *When does the bank ~? बँक कधी उघडते?* ६ (*वाक्प्र*) **open one's/sb's eyes** डोळे उघडणे, खरा प्रकार लक्षात येणे. **open 'fire** बंदूकीच्या फैरी झाडणे. ७ (*क्रिब*) **open up** (*अनौप*) मोकळेपणाने बोलणे, दिलखुलास बोलणे. **open (sth) up** विकासासाठी खुला होणे किंवा करणे: *~ up possibilities, नवीन शक्यता/संधी उपलब्ध होणे/करणे.* **opener** /'अउप्न(र्)/ *ना* [*गण*] (बहुधा सामासिक शब्दांत वापर) उघडायचे साधन: *'tin-~er, डबा उघडायचे साधन.*

opening /'अउप्निङ्/ *ना* [*गण*] १ आत जायचा किंवा बाहेर यायचा मार्ग; मोकळी जागा. २ [बहुधा *अ.व*] प्रारंभ, सुरुवात. ३ [*अ.व*] उद्‌घाटन, उघडणे: *the ~ of the new library, नवीन ग्रंथालयाचे उद्‌घाटन.* ४ औद्योगिक कंपनीतील वगैरे न भरलेली किंवा रिकामी जागा. **opening** *वि* पहिला, सुरुवातीचा: *her ~ words, तिचे सुरुवातीचे शब्द.*

opera /'ऑप्र/ *ना* [*गण*] संगीत नाटक, संगीतिका. **operatic** /,ऑप'रॅटिक्/ *वि* संगीत नाटकाचा, संगीतिकेचा.

operate /'ऑपरेइट्/ *क्रि* १ [*अक, सक*] चालणे किंवा चालवणे, चालू करणे, कार्यर होणे किंवा करणे: ~ *a machine,* यं *चालवणे.* २ [*अक*] परिणाम होणे/घडवणे. [*अक, सक*] धंदा करणे, व्यवसाय करणे; दिश देणे, चालवणे. ४ [*अक*] शस्त्रक्रिया करणे **operable** /'ऑपरब्ल्/ *वि* शस्त्रक्रियेने ब होण्यासारखा. **'operating-theatre** [*गण*] शस्त्रक्रियागृह, इस्पितळातील शस्त्रक्रियेची खोली.

operation /,ऑप'रेइश्न्/ *ना* १ [*अगण* चालवणे: *the ~ of the controls, यंत्रनियंत्र चालवणे.* २ [*गण*] कार्य: *a rescue ~, मद कार्य.* ३ [*गण*] (*वैद्यकीय*) रोगग्रस्त किंवा इज झालेला भाग काढण्याकरता केलेली शस्त्रक्रिया ४ [*गण*] औद्योगिक कंपनी. ५ [*गण,* बहुध *ब.व*] लष्करी कारवाई. ६ (*वाक्प्र*) **in(to operation** कार्यान्वित, कार्यरत: *We pu our plans into ~, आम्ही आमच्या योजन कार्यान्वित केल्या.* **operational** /-शन्ल्/ (*औप*) १ कार्याबाबतचा, कार्यात वापरल जाणारा. २ वापरास योग्य.

operative /'ऑपरटिव्ह्; *अमे* -रेइट्-/ (*औप*) कार्यरत, चालू; वापरातला: *The la becomes ~ in July, जुलैमधे हा काय अंमलात येईल.* **operative** *ना* [*गण*] (*औप* कामगार.

operator /'ऑपरेइट(र्)/ *ना* [*गण*] खा करून टेलिफोनच्या स्विचबोर्डवर का करणारा माणूस, चालक.

operetta /,ऑप'रेट/ *ना* [*गण*] छोटी गीतम सुखान्तिका.

opinion /अ'पिनिअन्/ *ना* १ [*गण*] एखा व्यक्ती किंवा गोष्टीबाबतचे मत – खास करू वस्तुस्थिती किंवा ज्ञान यावर न आधारलेले: *I my ~, the price is too high, माझ्या म किंमत फार आहे* ○ *his ~ of the ne manager, त्याचे नवीन व्यवस्थापकाविषयी मत.* २ [*अगण*] अनेक लोकांचे म दृष्टिकोन: *public ~, लोकमत.* ३ [*गण* व्यावसायिक सल्ला, अनुभवपूर्ण मत, निवाड *a doctor's ~, डॉक्टरांचा सल्ला.* **opinion ated** /-अेइटिड्/ *वि* स्वतःचे मत बदलणारा, मताग्रही, ठाम मते बनलेला.

opium /'अउपिअम्/ *ना* [*अगण*] अफू.

opponent /अ'पउनन्ट्/ *ना* [*गण*] लढाई, स्पर्धा किंवा युक्तिवादातील प्रतिस्पर्धी, विरुद्ध बाजूचा भिडू, विरोधक.

opportune /'ऑपट्यून्; *अमे* -टून्/ *वि* (*औप*) १ (वेळेबाबत) योग्य, उचित. २ (कृतीबाबत) योग्य वेळी होणारी, समयोचित, प्रसंगानुरूप.

opportunism /,ऑप'ट्यूनिझम्; *अमे* -'टून्-/ *ना* [*अगण*] (*औप, अगण*) चांगल्या संधीचा फायदा घेणे – कधीकधी दुसऱ्याचे हित लक्षात न घेता, संधीसाधूपणा. **opportunist** /-इस्ट्/ *ना* [*गण*] संधीसाधू.

opportunity /,ऑप'ट्यूनटि; *अमे* -'टून्-/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) एखादी गोष्ट करण्याची संधी, योग्य वेळ.

oppose /अ'पउझ्/ *क्रि* [*सक*] विरोध करणे, मुकाबला करणे. **opposed** *वि* १ *to//* विरुद्ध, विरोधातला: *He is ~ed to our plans, आपल्या योजनेच्या तो विरुद्ध आहे.* २ (*वाक्प्र*) **as opposed to** या विरुद्ध, याच्या उलट.

opposite /'ऑपझिट्/ *वि* १ समोरचा, संमुख: *the house ~ (to) mine, माझ्या घरासमोरचे घर.* २ अगदी भिन्न, उलट, विरुद्ध: *In the ~ direction, विरुद्ध दिशेला.* **opposite** *शब्दयो, क्रिवि* दुसऱ्या बाजूला, पलीकडे; समोर: *~ the station, स्टेशनच्या दुसऱ्या बाजूला* ○ *the person sitting ~, समोर बसलेला गृहस्थ.* **opposite** *ना* [*गण*] अगदी उलट शब्द किंवा वस्तू. **one's ,opposite 'number** *ना* [*गण*] त्याच श्रेणीची पण दुसऱ्या गटातील व्यक्ती: *the President's ~ number from France, राष्ट्रपतींच्या तोलाचा फ्रान्समधला माणूस.*

opposition /,ऑप'झिशन्/ *ना* १ [*अगण*] विरोध: *strong ~ to the new law, नवीन कायद्याला प्रखर विरोध.* २ [*अे.व,* तसेच ब.व क्रियापदासह अे.व] (क) विरोधक. (ख) **the Opposition** (खास करून *ब्रि*) सरकारच्या विरोधातील राजकीय पक्ष, विरोधी पक्ष.

oppress /अ'प्रेस्/ *क्रि* [*सक*] १ अन्यायाने किंवा निष्ठुरपणे वागवणे किंवा सत्ता गाजवणे, दडपशाही करणे, जुलूमजबरदस्ती करणे. २ (एखाद्याला) त्रस्त करणे, हैराण करणे: *~ed by the heat, उकाड्याने हैराण झालेला.* **oppression** /अ'प्रेश्न्/ *ना* [*अगण, गण*] दडपशाही, जुलूमजबरदस्ती. **oppressive** *वि* १ अन्याय्य; क्रूर. २ सहन न होईल असा; तापदायक: *~ive heat, भयानक उकाडा.* **oppressor** *ना* [*गण*] जुलुमी नेता किंवा राज्यकर्ता.

opt /ऑप्ट्/ *क्रि* १. [*सक*] *to//* एखादी गोष्ट करण्याचे निवडणे, पसंत करणे: *He ~ed to go to Paris, त्याने पॅरिसला जाणे पसंत केले.* २ (*क्रिब*) **opt for sth** एखादी गोष्ट करण्याचे निवडणे/ठरवणे: *He ~ed for that plan, त्याने ती योजना निवडली.* **opt out (of sth)** (एखाद्या गोष्टीत) भाग न घेण्याचे ठरवणे.

optic /'ऑप्टिक्/ *वि* (*औप*) डोळ्यांचा: *the ~ nerve, दृष्टी चेतनी.* **optical** /-क्ल्/ *वि* दृष्टीविषयक. **,optical il'lusion** *ना* [*गण*] दृष्टिभ्रम. **optician** /ऑप्'टिश्न्/ *ना* [*गण*] चष्मा किंवा कॉन्टॅक्ट लेन्स करणारा किंवा विकणारा.

optimism /'ऑप्टिमिझ्म्/ *ना* [*अगण*] चांगल्या गोष्टी घडतील असा विश्वास, आशावाद. **optimist** /-मिस्ट्/ *ना* [*गण*] आशावादी. **optimistic** /,ऑप्टि'मिस्टिक्/ *वि* आशावादी.

optimize /'ऑप्टिमाइझ्/ *क्रि* [*सक*] जास्तीत जास्त परिणामकारक किंवा अनुकूल करणे.

optimum /'ऑप्टिमम्/ *वि* (*औप*) जास्तीत जास्त अनुकूल, इष्टतम, पर्याप्त; सर्वोत्तम: *the ~ price, किफायतशीर अशी जास्तीत जास्त किंमत* किंवा *आदर्श किंमत.*

option /'ऑप्श्न्/ *ना* १ [*अगण*] निवडीचे स्वातंत्र्य, निवडीचा हक्क. २ [*गण*] निवडता येईल असे काहीतरी, विकल्प. **optional** /-शन्ल्/ *वि* वैकल्पिक.

opulent /'ऑप्युलन्ट्/ *वि* (*औप*) धनाढ्यतेचे निदर्शक असणारा, संपन्न, श्रीमंत. **opulence** /-लन्स्/ *ना* [*अगण*] श्रीमंती, संपन्नता.

or /ऑऽ(र्)/ *उ.अव्यय* १ (पर्यायदर्शक) की, किंवा: *Is it green or blue? हे हिरवे आहे की*

निळे? ○ *Do you want tea, coffee or milk? तुला काय हवे? चहा, कॉफी की दूध?* २ नाही तर; अन्यथा, अथवा : *Turn the heat down or the cake will burn, धग कमी कर, नाही तर केक जळेल किंवा करपेल.* ३ दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, म्हणजे : *It weighs one pound, or about 450 grams, याचे वजन एक पौंड म्हणजे/किंवा सुमारे ४५० ग्रॅम आहे.* ४ (*वाक्प्र*) **or 'else** (*अनौप*) (धमकी देण्यासाठी वापर) नाहीतर : *Do it, or else I'll hit you! हे कर नाहीतर माझ्या हातचा मार खाशील!* **or so** सुमारे : *We stayed there an hour or so, आम्ही तेथे सुमारे तासभर थांबलो.*

oral /'ऑऽरल्/ *वि* १ तोंडी, लेखी नाही : *an ~ test, तोंडी चाचणी.* २ तोंडातून घेण्याचा, तोंडाचा, तोंडासाठीचा, मुखीय : *~ medicine, तोंडातून घेण्याचे म्हणजेच पिण्याचे औषध किंवा पोटात घेण्याचे औषध.* **oral** *ना* [*गण*] तोंडी परीक्षा. **orally** *क्रिवि* तोंडाने, तोंडी.

orange /'ऑरिन्ज्; *अमे* 'ऑऽर्-/ *ना* [*गण*] संत्रे, नारिंग, मोसंबे. **orange** *वि* नारिंगी, केशरी रंगाचा.

orang-utan (तसेच **orang-outan**) /ऑऽ,रॅङ्ऊ'टॅन्; *अमे* अ,रॅङ'टॅन्/ (तसेच **orang-outang** /-ऊ'टॅङ्/) *ना* [*गण*] लांब हातांचा मोठा वानर.

oration /ऑऽ'रेइश्न्/ *ना* [*गण*] (*औप*) सार्वजनिक भाषण.

orator /'ऑरट(र्); *अमे* 'ऑऽर्-/ *ना* [*गण*] (*औप*) सार्वजनिक भाषण करणारा, वक्ता, भाषणपटू. **oratory** /'ऑरट्रि; *अमे* 'ऑऽरटॉऽरि/ *ना* [*अगण*] वक्तृत्व, भाषणशैली.

orbit /'ऑऽबिट्/ *ना* [*गण*] १ सूर्याभोवती ग्रहांची किंवा पृथ्वीभोवती चंद्र, अंतराळयान यांची फिरण्याची कक्षा, भ्रमणकक्षा. २ (*ला*) प्रभावक्षेत्र. **orbit** *क्रि* [*अक, सक*] भोवती कक्षेत फिरणे, अंतराळात भ्रमण करण्यास सोडणे. **orbital** /-ट्ल्/ *वि* कक्षीय, भोवती फिरण्याचा.

orchard /'ऑऽचड्/ *ना* [*गण*] फळांची झाडं जिथं वाढवली जातात ती जागा, फलोद्यान, फळबाग.

orchestra /'ऑऽकिस्ट्र/ *ना* [*गण,* तसेच ब.व क्रियापदासह अे.व] विविध संगीत-वाद्ये वाजविणाऱ्या लोकांचा संघ, संगीत वाद्यवृंद. **orchestral** /ऑऽ'केस्ट्रल्/ *वि* वाद्यवृंदाचा. **orchestrate** /-स्ट्रेइट्/ *क्रि* [*सक*] १ वाद्यवृंदाला वाजवता येण्यासारखे संगीत रचणे, वृंदगान करणे. २ एखादी गोष्ट घडवून आणणे, एखादी गोष्ट काळजीपूर्वक पदरात पाडणे. **orchestration** /,ऑऽकि'स्ट्रेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] वाद्यवृंदाने वापरायची संगीत रचना.

orchid /'ऑऽकिड्/ *ना* [*गण*] गडद रंगाची आणि विचित्र आकाराची फुले येणारे एक झाड, आमर किंवा अमरी.

ordain /ऑऽडेइन्/ *क्रि* [*सक*] १ ख्रिस्ती धर्मगुरूची दीक्षा देणे. २ (*औप*) (देव, कायदा वगैरेबाबत) आज्ञा असणे, नेमून देणे.

ordeal /ऑऽ'डील्, 'ऑऽडील्/ *ना* [*गण*] वाईट अनुभव, दिव्य.

order^{1} /'ऑऽड(र्)/ *ना* १ [*अगण*] परस्पर संबंधित अशा गोष्टींची विशिष्ट मांडणी, रीत, क्रम, पद्धती : *names in alphabetical ~, वर्णानुक्रमाने दिलेली नावे* ○ *arranged in ~ of size, आकारानुसार लावलेला क्रम.* २ [*अगण*] व्यवस्थितपणा. ३ [*अगण*] सुस्थिती, चांगली अवस्था : *The machine is out of ~, यंत्र सुस्थितीत किंवा चालू अवस्थेत नाही.* ४ [*अगण*] कायदेपालन. ५ [*गण*] आज्ञा, हुकूम. ६ [*गण*] (क) माल पुरविण्याची विनंती, मागणी : *Send the shop your ~ for books, पुस्तकांसाठी दुकानात मागणी नोंदवा.* (ख) पुरवलेला माल : *Your ~ will arrive tomorrow, तुमच्या मागणीचा माल उद्या येईल.* ७ [*गण*] पैसे देण्याबाबतची (बँकेला किंवा पोस्टाला दिलेली) लेखी सूचना, डाकप्रेषा. ८ [*अगण*] सार्वजनिक सभेसाठीची नियमावली : *a ,point of '~, कोनय-प्रश्न, हरकतीचा मुद्दा.* ९ [*गण*] (*औप*) प्रकार; जाती : *skills of the highest ~, अत्युच्च प्रकारची कौशल्ये.* १० [*गण*] (खास मानसन्मानाचा) बिल्ला : *~s and medals, बिरुदे आणि पदके.* ११ (*वाक्प्र*) **in 'order** व्यवस्थित, चांगल्या स्थितीत : *Your passport is in ~, तुझा पासपोर्ट व्यवस्थित आहे.* **in the order of** (*औप*) सुमारे, जवळजवळ : *It will cost in the ~ of £60,* साधारणपणे

त्याला ६० पौंड पडतील. **in order that** (*औप*) करिता, म्हणून. **in order to do sth** एखादी गोष्ट करण्याच्या उद्देशाने. **on 'order** मागणी केलेला पण अद्याप न मिळालेला. **take (holy) orders** ख्रिस्ती पाद्रीसमाजाचे सभासद होणे.

order^2 /'ऑऽड(र्)/ *क्रि* १ [*सक*] आज्ञा करणे, हुकूम देणे : *He ~ed the soldiers to attack, त्याने सैनिकांना हल्ला करण्याचा हुकूम दिला.* २ [*अक, सक*] मागणी करणे, देण्यास सांगणे : *to ~ a new carpet, नवीन गालिचा मागवणे.* ३ [*सक*] (*औप*) आखणे, ठरवणे, बसवणे. ४ (*क्रिब*) **order sb about** एखाद्यावर हुकमत गाजवणे, दादागिरी करणे.

orderly /'ऑऽडलि/ *वि* १ नीटनेटका; व्यवस्थित आखलेला. २ नीट वागणारा, वळण असलेला; शांत : *an ~ crowd, शिस्तीत असणारा जमाव.* **orderliness** *ना* [*अगण*] व्यवस्थितपणा; नीटनेटकेपणा. **orderly** *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) इस्पितळातील सेवक.

ordinal /'ऑऽडिन्ल्; *अमे* -डन्ल्/ (तसेच **ˌordinal 'number**) *ना* [*गण*] पहिला, दुसरा, तिसरा असा क्रमांक, क्रमवाचक अंक.

ordinary /'ऑऽडन्रि; *अमे* 'ऑऽर्डनेरि/ *वि* १ सर्वसाधारण; नेहमीचा. २ (*वाक्प्र*) **out of the 'ordinary** असामान्य. **ordinarily** /-रलि; *अमे* ˌऑर्डन्'अेरलि/ *क्रिवि* सर्वसाधारणपणे, सामान्यतः.

ordination /ˌऑडि'नेइश्न्; *अमे* ˌऑऽडन्-'अेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] धर्माचार्याची दीक्षा देण्याचा ख्रिस्ती समारंभ.

ore /ऑऽ(र्)/ *ना* [*अगण, गण*] धातू काढता येईल अशी माती किंवा दगड, धातुक, धातुपाषाण, कच्चे तांबे, कच्चे लोखंड वगैरे.

organ^1 /'ऑऽगन्/ *ना* [*गण*] १ विशिष्ट कार्य करणारा प्राण्याचा अथवा वनस्पतीचा भाग, इंद्रिय : *The eye is the ~ of sight, डोळे हे पाहण्याचे इंद्रिय आहे.* २ विशिष्ट कार्य करणारी संस्था : *Parliament is an organ of government, संसद हा सरकारचा खास कार्य असणारा भाग आहे.* ३ (*औप*) माहिती, बातमी पुरवणारे वृत्तपत्र वगैरे, मुखपत्र.

organ^2 /'ऑऽगन्/ *ना* [*गण*] नळ्यांतून हवा फुंकून वाजवायचे एक मोठे वाद्य. **organist** *ना* [*गण*] ऑर्गन वाजवणारा.

organic /ऑऽ'गॅनिक/ *वि* १ ऐन्द्रिय, सेन्द्रिय, जैव. २ (अन्नपदार्थ वगैरेबाबत) रसायनांचा वापर न करता केलेला, जैविक, देहोद्भव. ३ (*औप*) विविध अवयवांचा बनलेला, सांग, एकात्म. **organically** /-क्लि/ *क्रिवि* रासायनिक खते न वापरता, नैसर्गिकपणे.

organism /'ऑऽगनिझम्/ *ना* [*गण*] १ (बहुधा सूक्ष्म) जीव. २ (*औप*) एकमेकांवर अवलंबून असणाऱ्या भागांची यंत्रणा.

organization /ˌऑऽगनाइ'झेइश्न्; *अमे* -नि'झ्-/ *ना* १ [*गण*] विशिष्ट हेतूने एकत्र आलेला व्यावसायिकांचा किंवा मंडळींचा गट, संघटना, मंडळ. २ [*अगण*] संघटनकार्य.

organize /'ऑऽगनाइझ्/ *क्रि* [*सक*] १ तयारी करणे : *~ a party, मेजवानीची तयारी करणे.* २ योजनाबद्ध करणे, नियोजन करणे, संघटन करणे : *~ one's time, वेळेचे नियोजन करणे.*

orgasm /'ऑऽगॅझम्/ *ना* [*गण*] लैंगिक सुखाचा उच्चबिंदू, परमरतिसुख, आवेश.

orgy /'ऑऽजि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) मद्यप्राशन आणि संभोग यांची चंगळ, स्वैर पार्टी, हैदोस, उच्छृंखल उत्सव.

orient /'ऑऽरिअन्ट्/ *ना* **the Orient** [*अे.व*] (*औप* किंवा *अलं*) चीन, जपान यांसारखे अतिपूर्वेकडचे देश. **oriental** /ˌऑऽरि'अेन्ट्ल्/ *वि* पौर्वात्य, प्राच्य.

orientate /'ऑऽरिअन्टेइट्/ (खास करून *अमे* **orient** /'ऑऽरिअेन्ट्/) *क्रि* १ [*सक*] (*towards*)// (बहुधा कर्मणी) विशिष्ट ध्येयाकडे वळवणे, दिशा देणे : *Our company is ~d towards exports, आमची कंपनी निर्यातीकडे मुख्यत्वे लक्ष देते.* २ **orientate oneself** आसपासच्या परिस्थितीची जाणीव करून घेणे, परिसराची ओळख करून घेणे. **orientation** /ˌऑऽरिअन्'टेइश्न्/ *ना* [*अगण, गण*] प्राङ्मुखीकरण, दिशा देणे; परिसर-परिचितता.

orifice /'ऑरिफिस्/ *ना* [*गण*] (*औप*) (खास करून शरीराचे) बाह्यमुख, द्वार, रंध्र, तोंड.

origin /'ऑरिजिन्/ *ना* १ [*गण, अगण*]

प्रारंभबिंदू, उगम. २ [*गण, खास करून ब.व*] माणसाची जातकुळी : *of Polish ~, पोलिश जातकुळीचा किंवा उत्पत्तीचा.*

original /अ'रिजन्‌ल्/ *वि* १ आद्य, मूळ. २ (**क**) (बहुधा *पसंतीदर्शक*) नवनिर्मित; नवीन, ताजा : *~ designs, नवीन नक्षी/आकृतिबंध.* (**ख**) नवीन कल्पना देण्याची क्षमता असणारा : *an ~ thinker, नवीन विचार मांडणारा विचारवंत.* ३ नक्कल नसलेला, मूळचा. **original** *ना* **the original** [*गण*] एखाद्याचे अगदी सुरुवातीचे रूप, मूळ प्रत, वस्तू वगैरे. **originality** /अ,रिज'नॅलटि/ *ना* [*अगण*] नवनिर्मितीक्षमता, सृजनशीलता. **originally** /-नलि/ *क्रिवि* १ नव्या रीतीने, नव्याने. २ प्रारंभी, सुरुवातीला : *His shirt was ~ly white, त्याचा शर्ट मुळात पांढरा होता.*

originate /अ'रिजिनेइट्/ *क्रि* [*अक, सक*] (*औप*) सुरुवात होणे/करणे, प्रारंभ होणे. **originator** *ना* [*गण*] सुरुवात करणारा, नवा पायंडा पाडणारा, आद्यप्रवर्तक.

ornament /'ऑऽनमन्ट्/ *ना* १ [*गण*] (उपयुक्ततेपेक्षा) शोभेची वस्तू, सुंदर अशी वस्तू, अलंकार. २ [*अगण*] (*औप*) अलंकरण. **ornament** /-मेन्ट्/ *क्रि* [*सक*] अलंकृत करणे, सुशोभित करणे. **ornamental** /,ऑऽन'मेन्ट्ल्/ *वि* शोभेचा.

ornate /ऑऽ'नेइट्/ *वि* अलंकारिक, अलंकारयुक्त. **ornately** *क्रिवि* अलंकारप्रचुरतेने.

ornithology /,ऑऽनि'थॉलेजि/ *ना* [*अगण*] पक्षिविज्ञान. **ornithologist** *ना* [*गण*] पक्षिवैज्ञानिक.

orphan /'ऑऽफ्न्/ *ना* [*गण*] आईबाप जिवंत नसलेले मूल, पोरके पोर, अनाथ बालक. **orphan** *क्रि* [*सक*] अनाथ करणे, पोरके करणे. **orphanage** /'ऑऽफनिज्/ *ना* [*गण*] अनाथ मुलांची राहायची जागा, अनाथाश्रम, अनाथालय.

orthodox /'ऑऽथडॉक्स्/ *वि* सर्वसामान्यतः मान्य (अशी मते असणारा), सनातन. **orthodoxy** *ना* [*अगण, गण*] (*ब.व* **-ies**) सनातनीपणा; सनातन श्रद्धा, मते वगैरे.

orthography /ऑऽ'थॉग्रफि/ *ना* [*अगण*] (*औप*) शुद्धलेखन, लेखन (पद्धती किंवा त्याचा अभ्यास).

orthopaedics (तसेच **-pedics**) /,ऑऽथ'पीडिक्स्/ *ना* (अे.व क्रियापदासह) हाडाच्या रोगांची चिकित्सा करणारी वैद्यकीय शाखा, अस्थिरोगशास्त्र, विकलांग चिकित्सा, अस्थिव्यंगोपचार शास्त्र. **orthopaedic** (तसेच **-pedic**) *वि* अस्थिरोगविषयक, हाडाचा.

oscillate /'ऑसिलेइट्/ *क्रि* [*अक*] (*औप*) १ पुढेमागे झोका घेणे, आंदोलन होणे, हेलकावे खाणे. २ (*ला*) भावना किंवा मते यांच्या एका टोकाहून दुसऱ्या टोकाला जाणे, भावना वगैरे हेलावणे. **oscillation** /,ऑसि'लेइश्न्/ *ना* [*अगण, गण*] (*औप*) झोका, आंदोलन, हेलावणे, (भावनांचा) हिंदोळा, दोलायमान अवस्था.

ostensible /ऑ'स्टेन्सब्ल्/ *वि* (*औप*) (खरे नसलेले पण) वरकरणी (कारण म्हणून) दिलेले, बाह्यात्कारी. **ostensibly** *क्रिवि* वरवर पाहता, बाह्यतः.

ostentation /,ऑस्टेन्'टेइश्न्/ *ना* [*अगण*] (*अधिक्षेपी*) डामडौल, मिजास. **ostentatious** /-शस्/ *वि* डामडौलाचा, मिजासी दाखवणारा.

ostracize /'ऑस्ट्रसाइझ्/ *क्रि* [*सक*] (*औप*) एखाद्याला वाळीत टाकणे, बहिष्कृत करणे.

ostrich /'ऑस्ट्रिच्/ *ना* [*गण*] लांब मान आणि लांब पाय असलेला आणि उडू न शकणारा एक अति मोठा आफ्रिकी प्राणी, शहामृग.

other /'अैद(र्)/ *वि* १ आणखी : *Tim, John and two ~ students were there, टिम, जॉन आणि आणखी दोन विद्यार्थी तेथे होते.* २ दोघातील दुसरा : *Pull the cork out with your ~ hand, दुसऱ्या हाताने बूच बाहेर ओढ.* ३ उरलेला, बाकी, अन्य : *The ~ teachers are from Brunei, अन्य शिक्षक ब्रुनायचे आहेत.* **others** *सना* १ इतर (लोक, वस्तू). २ गटातील बाकीचे (लोक, वस्तू) : *I went swimming while the ~s played tennis, बाकीचे टेनिस खेळत असताना मी पोहायला गेलो.* **other than** *शब्दयो* -च्या खेरीज : *She* *never spoke to me ~ than to ask for something, काहीतरी मागण्याखेरीज ती माझ्याशी कधी बोलली नाही.*

otherwise /'अैदवाइझ्/ *क्रिवि* १ (औप) अन्य प्रकारे, दुसऱ्या रीतीने. २ इतर बाबतीत; ते सोडल्यास : *The rent is high but ~ the room is satisfactory, भाडं जास्त आहे पण बाकी खोली चांगली आहे.* **otherwise** *उ.अव्यय* अन्यथा, नाहीतर : *We must run, ~ we'll be late, आपल्याला पळत जायला हवं नाहीतर उशीर होईल.*

otter /'ऑट(र्)/ *ना* [*गण*] नदीत राहणारा आणि मासे खाणारा एक केसाळ प्राणी, ऊदमांजर.

ouch /आउच्/ *उद्‌वा* (अचानक झालेली वेदना दर्शविताना वापर) ओऽ! : *Ouch! That hurt! ओऽय्, दुखलं ना!*

ought /ऑऽट्/ *अभिद. क्रि* (नकार **ought not** किंवा **oughtn't** /'ऑऽट्न्ट्/) *to//* १ (कर्तव्यदर्शक) -आयला हवे/पाहिजे : *You ~ to say you're sorry, आपली चूक झाली असं म्हणणं तुझं कर्तव्य आहे.* २ (उपदेशदर्शक) -णे बरे : *You ~ to see a doctor about that cough, या खोकल्यासाठी तू डॉक्टरांकडे जाणं बरं.* ३ (संभवनीयतादर्शक) -आयला हवे/पाहिजे : *She started early, so she ~ to be here by now, ती लवकर निघाली म्हणून ती खरी आता इथं पोहोचायला/असायला हवी.*

ounce /आउन्स्/ *ना* १ [*गण*] वजनाचे परिमाण; पौंडाचा सोळावा भाग (२८.३५ ग्रॅम). २ [*अ.व*] (*अनौप*) अल्प भाग किंवा रक्कम.

our /आ(र्), 'आ·उअ(र्)/ *वि* आमचा : *~ house, आमचे घर.* **ours** /आझ़्, 'आ·उअझ़्/ *सना* आमचा : *That's ~s, ते आमचे आहे.*

ourselves /आ'सेल्व्ह्झ़्, आ·उअ'सेल्व्ह्झ़्/ *सना* १ (बोलणारा मी आणि इतर म्हणजेच आम्ही यांच्यावर क्रियेचा परिणाम झाला असता आणि आम्ही क्रियेचे कारणही असता आत्मवाचक सर्वनाम म्हणून वापर) आम्ही/आम्हाला स्वतःला : *We dried ~, आम्ही आम्हाला स्वतःला वाळवले किंवा कोरडे केले.* २ (जोर देण्यासाठी वापर) आम्ही स्वतः : *We saw the crash ~, आम्ही स्वतः ते कोसळताना पाहिले.* ३ (*वाक्प्र*) **(all) by our'selves** (क) आम्ही एकट्याने. (ख) दुसऱ्यांची मदत न घेता.

oust /आउस्ट्/ *क्रि* [*सक*] (*from*)*//* (औप) एखाद्याला नोकरीवरून वगैरे काढून टाकणे, हकालपट्टी करणे, डच्चू देणे.

out /आउट्/ *क्रिवि* १ विशिष्ट ठिकाणापासून दूर किंवा बाहेर : *go ~ for some fresh air, ताज्या हवेसाठी बाहेर जाणे.* २ घरी नाही किंवा कामाच्या जागी नाही : *I phoned her but she was ~, मी तिला फोन केला पण ती जागेवर नव्हती.* ३ (जमिनीपासून किंवा गावापासून वगैरे दूर असे दाखवताना वापर) : *The boats were all ~ at sea, सगळ्या नावा दूर समुद्रात गेल्या होत्या.* ४ न लपलेला, गुप्त नसलेला : *The secret is ~, गुपित बाहेर आले म्हणजेच फुटले.* ५ वापरात किंवा फॅशनमधे नसलेला, बाद : *Short skirts are ~, लांडे स्कर्ट्स् आता वापरात नाहीत.* ६ (भरती-ओहोटीबाबत) किनाऱ्यापासून दूर. ७ संपावर : *The teachers are ~ again, शिक्षक पुन्हा संपावर गेलेत.* ८ (आग, दिवे वगैरेबाबत) विझलेला. ९ पुरता, पूर्णपणे : *I'm tired ~, मी पूर्णपणे दमलोय्.* १० स्पष्टपणे आणि मोठ्याने : *shout ~, मोठ्याने ओरडणे.* ११ (चूक दाखवताना वापर) : *I'm ~ in my calculations, माझ्या मोजण्यात चूक झालीये.* १२ (क्रीडा) (क) फलंदाजीत बाद. (ख) (चेंडूबाबत) रेषेच्या बाहेर. १३ (*वाक्प्र*) **be out to do sth** एखादी गोष्ट करायला निघणे : *I'm not ~ to change the world! मी जग बदलायला निघालो नाहीये.* **ˌout-and-'out** *वि* संपूर्ण, अंतर्बाह्य. **out of** *शब्दयो* १ बाहेर, दूर : *Fish cannot live ~ of water, मासे पाण्याबाहेर (म्हणजेच पाण्यावाचून) राहू शकत नाहीत.* २ बाहेर : *walk ~ of the room, खोलीतून बाहेर येणे.* ३ (कारण किंवा हेतू दाखविताना वापर) -मुळे, प्रीत्यर्थ, -पोटी : *They helped us ~ of kindness, त्यांनी दयेपोटी आम्हाला मदत केली.* ४ -मधून, -पैकी : *in nine cases ~ of ten, दहापैकी नऊ प्रकरणांमधे.* ५ वापरून, -पासून : *made ~ of wood, लाकडापासून केलेला.* ६ -रहित, -विना, -शिवाय : *~ of breath, श्वासाविना.* ७ दिलेल्या स्थितीत नसलेला : *~ of order, सुस्थितीत*

नसलेला म्हणजेच *नादुरुस्त.* ८ -पासून घेतलेला किंवा निघालेला : *a story ~ of a book, एका पुस्तकातील कथा.* ९ -पासून अंतरावरचा : *a mile ~ of Hull, हलपासून मैलावर.*

outboard /'आउट्‌बॉऽड्/ *वि* बोटीच्या बाहेरच्या भागावर बसवलेला : *an ,~ 'motor, बोटीच्या बाहेरच्या भागी बसवलेली मोटर.*

outbreak /'आउट्‌ब्रेइक्/ *ना* [*गण*] उद्रेक, अचानक उसळणे : *the ~ of war, युद्धाचा उद्रेक.*

outbuilding /'आउट्‌बिल्डिङ्/ *ना* [*गण*] मुख्य इमारतीला न जोडलेली किंवा मुख्य इमारतीपासून वेगळी अशी उपइमारत.

outburst /'आउट्‌बऽस्ट्/ *ना* [*गण*] खास करून रागाचा विस्फोट, भडका.

outcast /'आउट्‌कास्ट्; *अमे* -कॅस्ट्/ *ना* [*गण*] घरातून किंवा समाजातून उठलेला माणूस, वाळीत टाकलेला माणूस.

outcome /'आउट्‌कम्/ *ना* [*गण, बहुधा अे.व*] परिणाम किंवा फलित.

outcrop /'आउट्‌क्रॉप्/ *ना* [*गण*] (*भूविज्ञान*) जमिनीतून बाहेर आलेला खडकाचा स्तर, दृश्यांश.

outcry /'आउट्‌क्राइ/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) लोकक्षोभ, जनतेचा तीव्र निषेध, लोकांचा आरडाओरडा.

outdated /,आउट्'डेइटिड्/ *वि* जुना, अप्रचलित, कालबाह्य.

outdo /,आउट्'डू/ *क्रि* (तृतीय पुरुषी अेकवचनी वर्तमानकाळ **-does** /-डैझ्/, *भूत* **-did** /-डिड्/, *भूत वि* **-done** /-डैन्/) [*सक*] अधिक चांगले करणे, वरताण करणे : *She tries to ~ her friends at games, खेळामधे ती मैत्रिणींच्या वरचढ होऊ पाहते.*

outdoor /'आउट्‌डॉऽ(र्)/ *वि* इमारतीबाहेर असलेला किंवा केलेला. **outdoors** /,आउट्'डॉऽझ्/ *क्रिवि* इमारतीबाहेर, उघड्यावर.

outer /'आउट(र्)/ *वि* १ बाहेरचा, बाह्य : *~ walls, बाहेरच्या भिंती* किंवा *तटभिंती.* २ मध्यवर्ती भागापासून जास्त दूर असलेला, भोवतालचा : *the ~ suburbs, भोवतालची उपनगरे.* **outermost** *वि* सर्वात बाहेरचा. **,outer 'space** = SPACE⁵.

outfit /'आउट्‌फिट्/ *ना* [*गण*] १ विशिष्ट कामासाठी लागणारे कपडे किंवा लागणारी साधने. २ (*अनौप*) संघटना. **outfitter** *ना* [*गण*] कपड्याचे दुकान किंवा दुकानदार.

outflank /,आउट्'फ्लॅङ्क्/ *क्रि* [*सक*] हल्ला करण्यासाठी घेरणे, वेढणे.

outgoing /'आउट्‌गउइङ्/ *वि* मावळता : *the ~ president, मावळते अध्यक्ष.* २ मनमिळाऊ. **outgoings** *ना* [*ब.व*] खर्च केलेला पैसा.

outgrow /,आउट्'ग्रउ/ *क्रि* (*भूत* **-grew**) /-'ग्रू/; *भूत वि* **-grown** /-'ग्रउन्/) [*सक*] १ (कपडे अपरे होतील असे) अंगाने वाढणे. २ वयाबरोबर (वाईट सवयी वगैरे) मागे पडणे, (त्यातून) बाहेर येणे.

outhouse /'आउट्‌हाउस्/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s** /-हाउजिझ्/) मुख्य इमारतीजवळची छोटी इमारत, उपगृह.

outing /'आउटिङ्/ *ना* [*गण*] मौजेखातर केलेला छोटासा प्रवास, सहल.

outlandish /आउट्'लॅन्डिश्/ *वि* (विशेषतः *अधिक्षेपी*) विक्षिप्त, विचित्र; धक्कादायक : *~ clothes, विचित्र पोषाख.* **outlandishly** *क्रिवि* विचित्रपणे; धक्कादायकरीत्या.

outlaw /'आउट्‌लॉऽ/ *ना* [*गण*] (खास करून पूर्वीच्या काळी) पकडला जाऊ नये म्हणून लपणारा गुन्हेगार, फरारी. **outlaw** *क्रि* [*सक*] बेकायदेशीर ठरवणे, विधिबहिष्कृत करणे : *~ the sale of guns, बंदुकीची विक्री बेकायदेशीर ठरवणे.*

outlay /'आउटलेइ/ *ना* [*गण*] एखाद्या गोष्टीवर खर्च केलेली रक्कम, व्यय.

outlet /'आउट्‌लेट्/ *ना* [*गण*] १ पाणी वगैरे बाहेर पडण्याचे द्वार, वाट. २ (*ला*) स्वतःच्या भावना, स्वतःची ताकद वगैरे व्यक्त करण्याचा मार्ग : *sport is an ~ for energy, अंगातल्या ताकदीला व्यक्त करण्यासाठी खेळ हा मार्ग आहे.*

outline /'आउट्‌लाइन्/ *ना* [*गण*] १ (एखाद्या वस्तूचा) आकार दाखवणारी रेषा, आकृतिरेषा, रूपरेखा. २ ठळक मुद्दे, स्थूल वर्णन : *an ~ of the plan, योजनेची रूपरेषा.* **outline** *क्रि*

[*सक*] स्थूलरेषा देणे, स्थूलरूपाने सांगणे.

outlive /,आउद्'लिव्ह्/ *क्रि* [*सक*] जास्त दिवस जगणे, पाठीमागे राहणे : ~ *one's children, मुलांमागे शिल्लक राहणे.*

outlook /'आउद्लुक्/ *ना* [*गण*] १ जीवनविषयक दृष्टिकोन; वृत्ती. २ पुढे येऊ शकणारी स्थिती, पुढची चिन्हे.

outlying /'आउद्लाइङ्/ *वि* केंद्रापासून किंवा शहरापासून दूर : ~ *villages, शहरापासून दूर अंतरावर असणारी खेडी.*

outmoded /,आउद्'मउडिड्/ *वि* जुनापुराणा, वापरात नसलेला, जुन्या फॅशनचा.

outnumber /,आउद्'नम्ब(र्)/ *क्रि* [*सक*] संख्येने अधिक असणे.

out of date ➪ DATE¹.

outpatient /'आउद्पेइश्न्द्/ *ना* [*गण*] उपचारासाठी इस्पितळात जाणारा पण तिथे न राहणारा रुग्ण, बाह्यरुग्ण.

outpost /'आउद्पउस्द्/ *ना* [*गण*] १ मुख्य सैन्यापासून खूप दूरवरचे टेहळणी केन्द्र (किंवा या ठिकाणचे सैनिक), दूर अंतरावरची चौकी. २ दूरची वसाहत.

output /'आउद्पुद्/ *ना* [*अे.व*] १ उत्पादित माल वगैरे, उत्पादन, पैदास. २ मिळवलेले काहीतरी, उदाहरणार्थ संगणकातील माहिती.

outrage /'आउद्रेइज्/ *ना* १ [*गण, अगण*] हिंसा, अत्याचार. २ [*गण*] लोकांना धक्का देणारे कृत्य. ३ [*अगण*] संताप, क्रोध. **outrage** *क्रि* [*सक*] मोठा धक्का देणे, दिङ्मूढ करणे. **outrageous** /आउद्'रेइजस्/ *वि* १ धक्कादायक. २ अगदी अपरिचित, विचित्र. **outrageously** *क्रिवि* विश्वास बसणार नाही अशा रीतीने; धक्कादायकपणे.

outright /'आउद्राइद्/ *क्रिवि* १ स्पष्टपणे आणि प्रामाणिकपणे, रोखठोक, स्वच्छ : *I told him ~ what I thought, मला काय वाटतं ते मी त्याला स्पष्टपणे सांगितले.* २ हळूहळू नाही, तात्काळ : *be killed ~, जागच्या जागी ठार होणे.* ३ स्पष्टपणे आणि पूर्णतः : *He won ~, त्याचा पुरता जय झाला.* **outright** *वि* निःसंशय, निःशंक; स्पष्ट : *the ~ winner, सरळ किंवा उघड विजेता.*

outset /'आउद्सेद्/ *ना* (*वाक्प्र*) **at/from the outset** सुरुवातीलाच, सुरुवातीपासूनच.

outshine /,आउद्'शाइन्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **outshone** /-'शॉन्/) [*सक*] (*ला*) वरचढ असणे, इतर फिके पडणे : *She ~s all her friends at games, खेळात तिच्या पुढे सर्व मैत्रिणी फिक्या पडतात.*

outside /,आउद्'साइड्/ *ना* [*गण, बहुधा अे.व*] बाहेरची बाजू : *the ~ of the house, घराची बाहेरची बाजू.* **outside** /'आउद्साइड्/ *वि* १ बाहेरच्या भागाचा, बाह्यबाजूचा, बहिर्भागातला, दर्शनी. २ बाहेरचा – कोणत्याही गटाशी वगैरे संबंध नसलेला : ~ *help, बाहेरची मदत.* ३ अल्प : *an ~ chance, अत्यल्प शक्यता.* **outside** *क्रिवि* बाहेर; मोकळ्या जागी : *Please wait ~, कृपया बाहेर थांबा.* **outside** (तसेच विशेषतः *अमे* **outside of**) *शब्दयो* १ बाहेरच्या बाजूला : ~ *the bank, बँकेच्या बाहेरच्या बाजूला.* २ कक्षेबाहेर : ~ *my areas of responsibility, माझ्या जबाबदारीच्या कक्षेबाहेर किंवा माझ्या अखत्यारीबाहेर.* ३ -शिवाय, -व्यतिरिक्त, -विना : *He has no interests ~ his work, त्याला स्वतःच्या कामाव्यतिरिक्त इतर कशात रस नाही.*

outsider /,आउद्'साइड(र्)/ *ना* [*गण*] १ एखाद्या गटात नसलेला किंवा एखाद्या गटाने अस्वीकार केलेला, बाहेरचा माणूस, परका, त्रयस्थ. २ स्पर्धेत विजय मिळवेल असे ज्याविषयी वाटत नाही तो घोडा, संघ वगैरे.

outsize /'आउद्साइझ्/ *वि* (खास करून कपड्यांबाबत) मोठा, ढगळ.

outskirts /'आउद्स्कऽद्स्/ *ना* [*ब.व*] शहराबाहेरचा भाग, हद्दीबाहेरचा भाग.

outsmart /,आउद्'स्माद्/ *क्रि* [*सक*] एखाद्याला अधिक हुशारी करून हरवणे, अक्कलहुशारीने मात करणे.

outspoken /,आउद्'स्पउकन्/ *वि* स्पष्टवक्ता, भीड न ठेवता बोलणारा.

outstanding /,आउद्'स्टॅन्डिङ्/ *वि* १ वरचढ, विशेष, इतरांपेक्षा श्रेष्ठ; उत्तम. २ सहज नजरेत भरणारा, लक्षणीय, ठळक. ३ पैसे न दिलेला, अदत्त, शिल्लक (काम).

outstandingly *क्रिवि* विशेषत्वाने.

outstay /ˌआउद्'स्टेइ/ *क्रि* (*वाक्प्र*) **outstay one's welcome** पाहुणा म्हणून जास्त काळ राहणे.

outstrip /ˌआउद्'स्ट्रिप्/ *क्रि* (-pp-) [*सक*] अधिक चांगले करणे; अधिक असणे, वाढणे : *Demand is ~ping production, मागणी उत्पादनापेक्षा वाढते आहे.*

outward /'आउद्वड्/ *वि* १ (प्रवासाबाबत) बाहेरगावी जाणारा/नेणारा : *the ~ flight, बाहेरगावी जाणारे उड्डाण.* २ बाहेरचा, वरवर दाखवायचा, बाह्य : *an ~ appearance, बाह्य देखावा.* **outward** (तसेच **outwards**) *क्रिवि* बाहेर, बाहेरच्या दिशेने; घरापासून दूर. **outwardly** *क्रिवि* वरवर पाहता.

outweigh /ˌआउद्'वेइ/ *क्रि* [*सक*] अधिक महत्त्वाचे असणे.

outwit /ˌआउद्'विट्/ *क्रि* (-tt-) [*सक*] एखाद्यावर जास्त हुशारी दाखवून मात करणे, कुरघोडी करणे.

outworn /ˌआउद्'वॉऽन्/ *वि* अनुपयुक्त, वापरून टाकलेला; जुन्या जमान्यातला.

oval /'अउव्हल्/ *ना* [*गण*], *वि* (आकार) अंडाकृती, अंडाकार, अत्यायतवृत्त.

ovary /'अउव्हरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) (*शरीररचनाशास्त्र*) मादीमधे अंडी निर्माण करणाऱ्या दोन इंद्रियांपैकी एक, अंडाशय, बीजांडकोश, बीजकाशय, किंजपुट, अंदुकी.

ovation /अउ'व्हेइश्न्/ *ना* [*गण*] टाळ्या वाजवून प्रोत्साहन देत दाखविलेली पसंती, जयजयकार.

oven /'अव्ह्न्/ *ना* [*गण*] अन्न शिजवण्याची किंवा गरम करण्याची पेटी, भट्टी.

over^1 /'अउव्ह(र्)/ *शब्दयो* १ (एखाद्या गोष्टीचे) वर आणि (ती) व्यापणारे, वर : *spill oil ~ one's clothes, स्वतःच्या कपड्यांवर तेल सांडणे.* २ न टेकता वरच्या बाजूला : *They held an umbrella ~ her, त्यांनी तिच्यावर छत्री धरली.* ३ (क) एखाद्याच्या एका बाजूकडून दुसऱ्या बाजूकडे : *a bridge ~ the river, नदीवरचा पूल.* (ख) दूर एका बाजूला. (ग) ओलांडण्यासाठी : *jump ~ the wall, भिंतीवरून (ती ओलांडण्यासाठी) उडी मारणे.* ४ सर्व भागात, सर्वत्र : *travel all ~ Africa, आफ्रिकेभर प्रवास करणे.* ५ अधिक, जास्त : *wait for ~ an hour, एका तासापेक्षा जास्त वेळ थांबणे.* ६ (हुकमत, अंमल, नियंत्रण वगैरे दाखविण्यास वापर) वर : *rule ~ an empire, साम्राज्यावर राज्य करणे.* ७ एखादी गोष्ट करताना, जेवताना वगैरे : *discuss it ~ lunch, जेवताना चर्चा करणे.* ८ कारणाने, -च्या बाबत : *an argument ~ money, पैशावरून वाद.* ९ -च्या द्वारे : *He heard it ~ the radio/telephone, त्याने रेडिओवर/फोनवर ते ऐकले.* १० (*वाक्प्र*) **ˌover and a'bove** (या)खेरीज, शिवाय. **over one's 'head** ➪ HEAD^1.

over^2 /'अउव्ह(र्)/ *क्रिवि* १ खाली : *knock a vase ~, काचपात्र खाली पाडणे.* २ एका बाजूकडून दुसऱ्या बाजूकडे : *turn a page ~, पान उलटणे.* ३ (रस्त्याच्या, जागेच्या वगैरे) पलीकडे : *Take this letter ~ to the post office, हे पत्र पलीकडे पोस्टात ने.* ४ (विशेषतः *अमे*) पुन्हा : *Do it '~, ते पुन्हा कर.* ५ उरलेला, बाकी : *the food left ~, उरलेले अन्न.* ६ शिवाय; अधिक, जास्त : *children of 14 and ~, १४ किंवा त्याहून जास्त वयाची मुले.* ७ संपलेला : *The meeting is ~, बैठक संपली.* ८ झाकण्यासाठी : *paint sth ~, एखाद्या गोष्टीवर रंग लावणे.* ९ (*वाक्प्र*) **(all) over a'gain** पुन्हा एकदा. **ˌover and ˌover a'gain** खूपदा, अनेकदा, पुन्हापुन्हा.

over^3 /'अउव्ह(र्)/ *ना* [*गण*] (क्रिकेटमधे) एकाच गोलंदाजाने लागोपाठ सहा चेंडू टाकण्याची एक पाळी.

over- *पूर्वप्रत्यय* १ पलिकडे; वर : *~land, जमिनीवरचा* ○ *~head, डोक्यावर.* २ अति : *~eat, जास्त/अति खाणे* ○ *~work, अतिश्रम घेणे.*

overall^1 /ˌअउव्हर्'ऑऽल्/ *वि, क्रिवि* एकंदर : *the ~ cost, एकंदर किंमत.*

overall^2 /'अउव्हरॉऽल्/ *ना* १ [*गण*] (*ब्रि*) कपडे नीट ठेवण्यासाठी त्यावर घालायचा सैलसर कोट. २ **overalls** [*ब.व*] (*ब्रि*) पायापर्यंत येणारा इतर कपडे मळू नयेत म्हणून घालायचा अखंड कापडाचा एक कपडा.

overawe /,अउव्हर्'ऑऽ/ *क्रि* [*सक*] (बहुधा कर्मणी) भीती किंवा अत्यादर वाटायला लावणे, दडपण आणणे, धाक वाटायला लावणे.

overbalance /,अउव्ह'बॅलन्स्/ *क्रि* [*अक*] तोल जाणे, पडणे.

overbearing /,अउव्ह'बेअरिङ्/ *वि* (*अधिक्षेपी*) इतरांवर सक्ती व दंडेली करणारा, कजाग.

overboard /'अउव्हबॉऽड्/ *क्रिवि* बोटीच्या काठावरून पाण्यात.

overcast /,अउव्ह'कास्ट्; *अमे* -कॅस्ट्/ *वि* (आकाशाबाबत) ढगांनी व्यापलेले, झाकोळून आलेले, ढगाळ.

overcharge /,अउव्ह'चाज्/ *क्रि* [*अक, सक*] जास्त किंमत लावणे, जास्त भाव लावणे.

overcoat /'अउव्हकउट्/ *ना* [*गण*] जाड उबदार कोट.

overcome /,अउव्ह'कैम्/ *क्रि* (*भूत* **-came** /-केइम्/, *भूत वि* **-come**) [*सक*] १ पराभव करणे, हरवणे, मात करणे. २ क्षीण करणे, अशक्त करणे : ~ *by/with sadness, दुःखाने खचलेला.*

overcrowded /,अउव्ह्'क्राउडिड्/ *वि* गर्दीचा, दाटीवाटीचा, माणसांनी खच्चून भरलेला. **overcrowding** /-डिङ्/ *ना* [*अगण*] गर्दी, दाटीवाटी.

overdo /,अउव्ह्'डू/ *क्रि* (*तृतीय पुरुष अ.व वर्तमान काळ* **-does** /-डैझ़्, *भूत* **-did** /-डिड्/, *भूत वि* **-done** /-डैन्/) १ [*सक*] अतिरेक करणे, जादा करणे; अतिशयोक्ती करणे. २ (*वाक्प्र*) **over'do it** फार काम वगैरे करणे.

overdose /'अउव्हडउस्/ *ना* [*गण, बहुधा अ.व*] औषधाचे जादा प्रमाण, अतिमात्रा.

overdraft /'अउव्हड्राफ्ट; *अमे* -ड्रॅफ्ट्/ *ना* [*गण*] खात्यावर असलेल्या पैशापेक्षा जास्त काढलेले पैसे, अतिकाढ, अधिकर्ष.

overdrawn /,अउव्ह'ड्रॉऽन्/ *वि* १ (माणसाबाबत) खात्यावर असलेल्या रकमेपेक्षा जास्त रक्कम घेतलेला. २ (खात्याबाबत) शिलकीपेक्षा जास्त रक्कम उचललेले, अधिकर्ष असलेले खाते.

overdrive /'अउव्हड्राइव्ह्/ *ना* [*गण, अगण*] नेहमीच्या सर्वात वरच्या चक्रणाखेरीज किंवा टॉप गिअरखेरीज गाडीला आणखी एक गिअर (चक्रण) देणारी यंत्रणा, अतिचालनी, वेगप्रवृद्धी.

overdue /,अउव्ह'ड्यू; *अमे* -'डू/ *वि* अपेक्षित किंवा योग्य वेळी न दिलेला, न परत केलेला वगैरे, देय.

overflow /,अउव्ह'फ्लउ/ *क्रि* [*अक, सक*] १ भरून काठावरून वाहणे : *The river has ~ed its banks, नदी दुथडी भरून वाहतीये.* २ (खोली वगैरेच्या) सीमेपलीकडे जाणे. **overflow** /'अउव्हफ्लउ/ *ना* [*गण*] १ [बहुधा *अ.व*] भरून वाहणारा पदार्थ, उत्प्रवाह, उत्प्लाव. २ जादा पाणी वगैरे बाहेर टाकणारी नळी.

overgrown /,अउव्ह'ग्रउन्/ *वि* दाटपणे आणि कशाही वाढणाऱ्या झाडाझुडपांनी आच्छादित, झाडेझुडपे माजलेला.

overhang /,अउव्ह'हॅङ्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-hung** /-हैङ्/) [*अक, सक*] बाजूने उभे राहणे, वर टांगणे. **overhang** /'अउव्हहॅङ्/ *ना* [*गण,* बहुधा *अ.व*] वरून वाकलेला भाग, ओठंगलेले काही.

overhaul /,अउव्ह'हॉऽल्/ *क्रि* [*सक*] नीट तपासणी करून दोष दूर करून दुरुस्त करणे, खोलून दुरुस्त करणे : ~ *the engine, इंजिन खोलून दुरुस्त करणे.* **overhaul** /'अउव्हहॉऽल्/ *ना* [*गण,* बहुधा *अ.व*] कसून केलेली तपासणी व आशोधन.

overhead /'अउव्हहेड्/ *वि* जमिनीपासून वरच्या बाजूस असलेला : ~ *wires, वर असणाऱ्या वायर्स.* **overhead** /,अउव्ह'हेड्/ *क्रिवि* डोक्यावर : *aircraft flying ~,* डोक्यावर *उडणारे वायुवाहन.*

overheads /'अउव्हहेड्झ़्/ *ना* [*ब.व*] भाडे, पगार, विमा वगैरेवर उद्योगात खर्च होणारा वरकड खर्च.

overhear /,अउव्ह'हिअ(र्)/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-heard** /-'हऽड्/) [*सक*] एखाद्याचे बोलणे त्याच्या नकळत ऐकणे, चोरून ऐकणे.

overjoyed /,अउव्ह'जॉइड्/ *वि* अत्यानंद झालेला, प्रमुदित, हर्षोत्फुल्ल.

overland /'अउव्हलॅन्ड्/ *वि, क्रिवि*

जमिनीवरचा; (आकाश किंवा समुद्रमार्गे नाही असा) भूमार्गे, खुष्कीने.

overlap /,अउव्ह'लॅप्/ *क्रि* (**-pp-**) [*अक, सक*] दुसऱ्या गोष्टीच्या सीमा ओलांडणे, अतिक्रम होणे, अतिव्याप्ती होणे : (*ला*) *These two subjects ~, हे दोन विषय एकमेकात मिसळतात.* **overlap** /'अउव्हलॅप्/ *ना* [*गण, अगण*] अतिव्याप्ती करणारा भाग, अतिव्याप्ती.

overleaf /,अउव्ह'लीफ्/ *क्रिवि* पानाच्या मागच्या बाजूला.

overload /,अउव्ह'लउड्/ *क्रि* [*सक*] १ खूप भार टाकणे, चिकार वजन वाढवणे. २ जादा विद्युत्प्रवाह देणे, अतिभार करणे.

overlook /,अउव्ह'लुक्/ *क्रि* [*सक*] १ (एखाद्या जागेचे) वरच्या बाजूने दृश्य दिसणे, विहंगम दृश्य मिळणे, उंचावरून पाहणे. २ नजरेतून सुटणे, लक्षात न येणे, चुकणे. ३ शिक्षा न करता सोडणे, दुर्लक्ष करणे : *~ a fault, दोषाकडे दुर्लक्ष करणे.*

overmanned /,अउव्ह'मॅन्ड्/ *वि* गरजेपेक्षा जास्त कामगार असलेला. **overmanning** /-निङ्/ *ना* [*अगण*] गरजेपेक्षा अधिक कामगार भरणे.

overnight /,अउव्ह'नाइद्/ *क्रिवि* १ रात्रीचा, रात्रभर : *stay ~, रात्री राहणे.* २ (*अनौप*) चटकन्; एकाएकी : *become a success ~, एकाएकी यशस्वी होणे.* **overnight** /'अउव्हनाइद्/ *वि* एका रात्रीचा : *an ~ bag, एका दिवसाच्या प्रवासाची बॅग.*

overpass /'अउव्हपास्; *अमे* -पॅस्/ *ना* [*गण*] (विशेषतः *अमे*) एका रस्त्याला दुसऱ्या रस्त्याच्या वरून नेणारा पूल, रस्त्यावरून जाणारा रस्ता.

overpower /,अउव्ह'पाउअ(र्)/ *क्रि* [*सक*] अधिक शक्तीने नमवणे, शरण आणणे. **overpowering** *वि* शक्तिमान, शक्तिशाली, बलाढ्य; फार जोरदार, उग्र : *an ~ing smell, उग्र वास किंवा दर्प.*

overrate /,अउव्ह'रेइद्/ *क्रि* [*सक*] फार चांगले मत असणे, जादा महत्त्व देणे.

overreach /,अउव्ह'रीच्/ *क्रि* **~ oneself** आपल्या आवाक्याबाहेरचे काही मिळवण्याच्या प्रयत्नात अपयशी होणे, आपल्या शक्तीपलीकडचे काम किंवा कुवतीबाहेरचा प्रयत्न करण्यात फसणे.

over-react /,अउव्हरि'अॅक्ट्/ *क्रि* [*अक*] अतितीव्र प्रतिक्रिया होणे किंवा व्यक्त करणे, फाजील धडपड करणे.

override /,अउव्ह'राइड्/ *क्रि* (*भूत* **-rode** /'रउड्/, *भूत वि* **-ridden** /-रिड्न्/) [*सक*] १ (एखाद्याच्या मताकडे वगैरे) दुर्लक्ष करणे, बाजूला ठेवणे, अधिभावी ठरणे. २ जास्त महत्त्वाचा असणे. **overriding** *वि* सर्वाधिक महत्त्वाचा, प्राधान्य असलेला.

overrule /,अउव्ह्'रूल्/ *क्रि* [*सक*] स्वतःच्या अधिकारात पूर्वीचा निर्णय बदलणे किंवा फिरवणे, पूर्वीचा निर्णय अमान्य व अधिशून्य करणे.

overrun /,अउव्ह'रॅन्/ *क्रि* (*भूत* **-ran** /-'रॅन्/, *भूत वि* **-run**) १ [*सक*] व्यापणे, ग्रासणे : *a house ~ by insects, किड्यांनी ग्रासलेले घर.* २ [*अक, सक*] (ठराविक वेळेपेक्षा) जास्त चालणे, लांबणे : *The meeting might ~, बैठक कदाचित लांबेल.*

overseas /,अउव्ह'सीझ्/ *वि, क्रिवि* समुद्रापलिकडचा (देश वगैरे), समुद्रपार.

oversee /,अउव्ह'सी/ *क्रि* (*भूत* **-saw** /-सॉऽ/, *भूत वि* **-seen** /-सीन्/) [*सक*] (कामावर) देखरेख ठेवणे. **overseer** /'अउव्हसिअ(र्)/ *ना* [*गण*] देखरेख ठेवणारा, मुकादम, अवेक्षक.

overshadow /,अउव्ह'शॅडउ/ *क्रि* [*सक*] १ एखाद्या गोष्टीवर छाया टाकणे, छायेखाली आणणे, झाकाळून टाकणे. २ (*ला*) एखाद्याचे महत्त्व किंवा आनंद कमी करणे, (कीर्ती वगैरे) झाकाळणे.

overshoot /,अउव्ह'शूद्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-shot** /-शॉद्/) [*सक*] विवक्षित उद्दिष्टापलीकडे जाणे, हद्दीपलीकडे जाणे.

oversight /'अउव्हसाइद्/ *ना* [*गण, अगण*] नजरचूक, निष्काळजीपणाने नजरेतून सुटलेली गोष्ट.

oversleep /,अउव्ह'स्लीप्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-slept** /-स्लेप्द्/) [*अक*] जास्त काळ झोपणे.

overspill /'अउव्हस्पिल्/ *ना* [*अगण*] (विशेषतः *ब्रि*) शहरातील गर्दीच्या भागातून

दुसरीकडे चांगल्या ठिकाणी राहायला नेलेले लोक.

overstep /ˌअउव्ह'स्टेप्/ *क्रि* (**-pp-**) [*सक*] नेहमीच्या स्वीकृत मयदिचे उल्लंघन करणे, अतिक्रांत करणे.

overt /'अउव्हऽट्; *अमे* अउ'व्हऽर्ट्/ *वि* (*औप*) उघडउघड केलेला किंवा दाखवलेला : ~ *hostility, उघड शत्रुत्व.* **overtly** *क्रिवि* उघडपणे, काही न लपवता.

overtake /ˌअउव्ह'टेइक्/ *क्रि* (*भूत* **-took** /-'टुक्/, *भूत वि* **-taken** /-'टेइकन्/) १ [*अक, सक*] (वाहनाच्या किंवा माणसाच्या) पाठीमागून येऊन पुढे जाणे. २ [*सक*] (वाईट प्रसंगाबाबत) अचानक उद्भवणे, अनपेक्षितपणे गुजरणे, ध्यानीमनी नसताना घडणे.

overthrow /ˌअउव्ह'थ्रउ/ *क्रि* (*भूत* **-threw** /-'थ्रू/, *भूत वि* **-thrown** /-'थ्रउन्/) [*सक*] (एखादे शासन, एखादा सत्ताधारी) उलथवून टाकणे, पदच्युत/पदभ्रष्ट करणे. **overthrow** /'अउव्हथ्रउ/ *ना* [*गण*] पदच्युती, उचलबांगडी.

overtime /'अउव्हटाइम्/ *ना* [*अगण*], *क्रिवि* नेहमीच्या किंवा नेमून दिलेल्या वेळेपेक्षा कामासाठी खर्च केलेला जादा वेळ.

overtone /'अउव्हटउन्/ *ना* [*गण, बहुधा ब.व*] सूचित पण उघडउघड व्यक्त न केलेले काहीतरी, सूचित गोष्ट, ध्वनित गोष्ट किंवा ध्वनी.

overture /'अउव्हट्युअ(र्)/ *ना* १ [*गण*] संगीतिकेची वगैरे संगीतमय प्रस्तावना, पूर्वरंग. २ (*वाक्प्र*) **make overtures to sb** एखाद्याशी सख्य जोडणे, मैत्री जोडू पाहणे.

overturn /ˌअउव्ह'टऽन्/ *क्रि* १ [*अक, सक*] उलटणे, पालथा होणे. २ [*सक*] स्वतःच्या अधिकारात आधी घेतलेल्या निर्णयाविरुद्ध निर्णय घेणे, निर्णय फिरवणे. ३ [*सक*] सरकार बडतर्फ करणे.

overview /'अउव्हव्ह्यू/ *ना* [*गण*] थोडक्यात सर्वसाधारण वर्णन, संक्षिप्त आढावा, सभ्यक् कल्पना.

overweight /ˌअउव्ह'वेइट्/ *वि* (माणसांबाबत) जास्त वजनाचा, लडद्; ढब्बू, लठ्ठ.

overwhelm /ˌअउव्ह'वेल्म्; *अमे* -ह्वेल्म्/ *क्रि* [*सक*] १ (बहुधा कर्मणी) हतबल होणे/करणे, दडपणे : *~ed by sorrow, दुःखाने हतबल/व्याकुळ झालेला.* २ मात करणे किंवा पराभव करणे – विशेषतः संख्याधिक्याने.

overwork /ˌअउव्ह'वऽक्/ *क्रि* १ [*अक, सक*] अतिश्रम करणे, फार काम करणे/करायला लावणे. २ [*सक*] (शब्द) फार वेळा वापरणे, वापरून गुळगुळीत करणे.

overwrought /ˌअउव्ह'रॉऽट्/ *वि* खिन्न, उदास, खट्टू.

ovulate /'ऑव्ह्युलेइट्/ *क्रि* [*अक*] (*वैद्यक*) अंडाशयातून अंड बाहेर येणे, अंडोत्सर्ग होणे. **ovulation** /ˌऑव्ह्यु'लेइश्न्/ *ना* [*अगण*] अंडोत्सर्ग, अंडनिर्मिती.

ovum /'अउव्हम्/ *ना* [*गण*] (*ब.व* **ova** /'अउव्ह/) (*जीवशास्त्र*) जीवात रूपांतरित होऊ शकणारे स्त्रीबीज, स्त्रीपिंड, रजोगोल.

ow /आउ/ *उद्गा* (दुःख व्यक्त करण्यास वापर) ओय् : *Ow! That hurt! ओय्! दुखलं/दुखतंय् ना!*

owe /अउ/ *क्रि* [*सक*] १ (पैशाचे) देणे असणे : *I ~ him £10, मी त्याचे १० पौंड देणे लागतो.* २ *to//* कारण असणे/देणे, एखाद्या गोष्टीमुळे काही घडले असे म्हणणे, एखाद्या गोष्टीला श्रेय देणे : *She ~s her success to hard work, ती आपल्या यशाचे श्रेय कष्टाळुपणाला देते.* ३ कृतज्ञता वाटणे, कृतज्ञ असणे, उपकार मानणे.

owing /'अउइङ्/ *वि* देय असलेली (रक्कम वगैरे), देण्याची. **owing to** *शब्दयो* -च्या मुळे, -च्या कारणाने.

owl /आउल्/ *ना* [*गण*] रात्री उडणारा आणि छोटे प्राणी खाणारा पक्षी, घुबड.

own^{1} /अउन्/ *वि, सना* १ मालकीचा, स्वतःचा : *his ~ room, त्याची स्वतःची खोली* ○ *a room of his ~, त्याची स्वतःची खोली.* २ (*वाक्प्र*) **get one's 'own back (on sb)** (*अनौप*) सूड घेणे, वट्ट काढणे. **(all) on one's 'own** (क) एकटा. (ख) साहाय्याविना, कोणाच्याही आधाराशिवाय.

own^{2} /अउन्/ *क्रि* [*सक*] १ मालकीचे असणे, स्वतःचे असणे : *~ a house, घर मालकीचे असणे किंवा स्वतःचे घर असणे.* २ (*क्रिब*) **own up (to sth)** (*अनौप*) दोष मान्य

करणे, दोष स्वीकारणे. **owner** *ना* [*गण*] मालक. **ownership** *ना* [*अगण*] मालकी.

ox /ऑक्स्/ *ना* [*गण*] (*ब.व* **~en** /'ऑक्स्न्/) खच्ची केलेला बैल, भाद्याबैल.

oxygen /'ऑक्सिजन्/ *ना* [*अगण*] रंगहीन, चवहीन, वासहीन जीवनावश्यक असा हवेचा एक घटक वायू, प्राणवायू.

oyster /'ऑइस्ट(र्)/ *ना* [*गण*] एक मृदुकायकवची समुद्रातला प्राणी, शिंपल्यातला प्राणी, कालव. **'oyster-catcher** *ना* [*गण*] लांब पायाचा, पाण्यात उभा राहणारा, काळ्या किंवा पांढऱ्या रंगाचा आणि तांबडी चोच असणारा एक समुद्र-पक्षी.

oz *संरू* (*ब.व* **oz** किंवा **ozs**) ounce(s), औंस.

ozone /'अउझ़उन्/ *ना* [*अगण*] १ प्राणवायूचे एक रूप, परोवी. ओषोण. २ (*अनौप*) समुद्रकिनाऱ्याकडची स्वच्छ हवा.

P p

P, p /पी/ *ना* [*गण*] (*ब.व* **P's, p's** /पीझ़्/) इंग्रजी वर्णमालेतील सोळावे अक्षर.

P *संरू* (*ब्रि*) १ (*अनौप*) penny पेनि; pence पेन्स. २ (*ब.व* **pp**) page पृ(ष्ठ).

pa /पा/ *ना* [*गण*] (*अनौप*) वडील.

pace /पेइस्/ *ना* १ [*गण*] चालण्यातील किंवा पळण्यातील एक पाऊल (अंतर). २ [*अे.व*] चालण्याची किंवा धावण्याची गती, वेग. ३ [*अगण*] प्रगतीचा वेग, प्रगतीचे प्रमाण. **pace** *क्रि* १ [*अक, सक*] पावले टाकणे, चालणे. २ [*सक*] (धावपटूचा) (शर्यतीत वगैरे) वेग नियंत्रित करणे, वेग राखणे. ३ (*क्रिब*) **pace sth off/out** पावलांनी (म्हणजे पावले टाकून) मोजणे. **'pacemaker** *ना* [*गण*] हृदयाची क्षीण, अनियमित स्पंदने नीट करण्यासाठी हृदयावर ठेवायचे एक साधन, गतिकारक.

pacifism /'पॅसिफिझ़म्/ *ना* [*अगण*] युद्धविरोधी तत्त्व, शांतिवाद. **pacifist** /-इस्ट्/ *ना* [*गण*] शांतिवादी.

pacify /'पॅसिफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] (चिडलेल्या माणसाला) शांत करणे. **pacification** /,पॅसिफि'केइश्न्/ *ना* [*अगण*] शांत करणे, मनधरणी.

pack^1 /पॅक्/ *ना* [*गण*] १ एकत्र बांधलेल्या वस्तू, गाठोडे. २ (विशेषतः *अमे*) छोटा करंडा, खोके वगैरे, डबी. ३ जंगली प्राण्यांचा कळप, झुंड : *a ~ of wolves, लांडग्यांचा कळप.* ४ व्यक्तींचा किंवा वस्तूंचा गट, समूह : *a ~ of fools/lies, मूर्खांचा कंपू/खोट्यांची माळका.* ५ पत्त्यांचा कॅट.

pack^2 /पॅक्/ *क्रि* १ [*अक, सक*] खोक्यात वगैरे भरणे : *~ clothes in a bag, बॅगेत कपडे भरणे.* २ [*सक*] नीटपणे गुंडाळणे, वेष्टन घालणे : *glass ~ed in paper, कागदात गुंडाळलेली काच.* ३ [*अक, सक*] (*into*)// खच्चून भरणे, कोंबणे : *Crowds ~ed (into) the theatre, चित्रपटगृहात लोकांनी गर्दी केली.* ४ (*क्रिब*) **pack sth in** (*अनौप*) एखादी गोष्ट करण्याचे बंद करणे. **pack sb off** (*अनौप*) एखाद्याला पाठवणे, रवानगी करणे. **pack up** (*अनौप*) (**क**) काम संपवणे, आटोपणे. (**ख**) (यंत्राबाबत) नीट काम करणे बंद होणे. **pack (sth) up** चंबूगबाळा आवरणे, मुक्काम हालवणे. **packed** *वि* माणसांनी खच्चून भरलेला.

package /'पॅकिज्/ *ना* [*गण*] १ एकत्र बांधलेल्या गोष्टी, पुडा, पुडके. २ (*अमे*) छोटा करंडा, खोके वगैरे, डबी. ३ (तसेच **'package deal**) एकत्रितपणे केलेल्या सूचना. **package** *क्रि* [*सक*] विकण्यासाठी वगैरे पुडा करणे. **'package holiday/tour** *ना* [*गण*] एजंटने प्रवास, निवास वगैरे व्यवस्था केलेली यात्रा किंवा सुट्टीतील भ्रमंती.

packet /'पॅकिट्/ *ना* १ [*गण*] छोटे खोके, छोटा करंडा वगैरे : *a ~ of cigarettes, सिग्रेट्सची डबी.* २ [*अे.व*] (*अनौप*) मोठी रक्कम, घबाड, नोटांचे पुडके.

packing /'पॅकिङ्/ *ना* [*अगण*] १ सामान भरणे, सामानाची बांधाबांधी. २ माल नीट राहण्यासाठी तो भरताना वापरायचे बारदान.

pact /पॅक्ट्/ *ना* [*गण*] करार.

pad^1 /पॅड्/ *ना* [*गण*] १ एखाद्या गोष्टीला आकार देण्याकरता किंवा ती नीट राहावी म्हणून वापरायचा मऊ पदार्थाचा तुकडा, आधारासाठी

वापरायची गादीसारखी गोष्ट, पुष्टिपत्र, पुठ्ठा, भरण. २ (एकेक कागद काढता येण्यासारखी) कागदांची उभी वही. ३ वायुवाहन उड्डाणाची किंवा हेलिकॉप्टर उड्डाणाची सपाट जागा. ४ (*व्रात्य*) घर. ५ कुत्रा, कोल्हा वगैरेच्या पावलाखालचा मांसल भाग, मांसल तळवा.

pad^2 /पॅड्/ *क्रि* (**-dd-**) १ [*सक*] पॅडिंग देऊन सुरक्षित करणे. २ (*क्रिब*) **pad sth out** असंबंधित, अनावश्यक भाग घालून (पुस्तक वगैरे) मोठे करणे, फुगवणे. **padding** *ना* [*अगण*] १ आधारासाठी वापरायची मऊ (कागद, कापूस वगैरेसारखी) गोष्ट. २ पुस्तकातील वगैरे अनावश्यक भाग.

pad^3 /पॅड्/ *क्रि* (**-dd-**) (*क्रिब*) **pad about, along, etc** हळूहळू, आवाज न करता एखाद्या दिशेने जाणे.

paddle^1 /'पॅड्ल/ *ना* [*गण*] छोटी नौका वगैरे वल्हवण्याचे एका किंवा दोन्ही बाजूला पाते असलेले वल्हे, नौदंड, क्षेपणी. **paddle** *क्रि* [*अक, सक*] वल्हवणे.

paddle^2 /'पॅड्ल/ *क्रि* [*अक*] उथळ पाण्यातून अनवाणी चालत जाणे. **paddle** *ना* [*अे.व*] पाण्यातून चालणे.

paddock /'पॅडक्/ *ना* [*गण*] घोडे ठेवण्याचे छोटे मैदान, घोडामैदान.

paddy (तसेच **'paddy-field**) /'पॅडि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) भाताचे शेत.

padlock /'पॅड्लॉक्/ *ना* [*गण*] कडीत अडकवायचे कुलूप. **padlock** *क्रि* [*सक*] कुलूप घालणे.

paediatrics /,पीडि'ॲट्रिक्स्/ *ना* (अे.व क्रियापदासह) मुलांशी संबंधित वैद्यकीय शाखा, बालरोगचिकित्सा. **paediatrician** /,पीडिअ'ट्रिश्न्/ *ना* [*गण*] बालरोगतज्ज्ञ.

pagan /'पेइगन्/ *ना* [*गण*] खास करून ख्रिस्ती, इस्लाम आणि ज्यू यांपैकी किंवा कोणत्याही धर्मावर विश्वास न ठेवणारा माणूस, अधर्मी; मूर्तिपूजक. **pagan** *वि* अधर्मी. **paganism** *ना* [*अगण*] अधर्मीपणा.

page^1 /पेइज्/ *ना* [*गण*] **(क)** पुस्तकातले वगैरे पृष्ठ, पान. **(ख)** पुस्तकातले वगैरे पाटपोट पान.

page^2 (तसेच **'page-boy**) /पेइज्/ *ना* [*गण*] **(क)** गड्याचे काम करणारा मुलगा. **(ख)** लग्नात सेवकाचे काम करणारा मुलगा.

pageant /'पॅजन्ट्/ *ना* [*गण*] १ ऐतिहासिक प्रसंग सादर करण्याचा सार्वजनिक कार्यक्रम, चलनाट्य. २ भव्य प्रदर्शन. **pageantry** *ना* [*अगण*] भव्य प्रदर्शन, भव्य सोहळा, थाटमाट.

pagoda /प'गउड/ *ना* [*गण*] पूर्व आशियात आढळणारे कळस असलेले मंदीर, अनेक मजल्यांची धार्मिक इमारत, भव्य मंदीर.

paid PAY^1 चा *भूत, भूत वि*.

pail /पेइल्/ *ना* [*गण*] बादली.

pain /पेइन्/ *ना* १ [*अगण*] शारीरिक किंवा मानसिक दुःख, वेदना : *cry with ~, वेदनेने विव्हळणे*. २ [*गण*] शरीरातल्या ठराविक भागातला ठणका, कळ, दुःख : *a ~ in her leg, तिच्या पायाचा ठणका*. ३ [*गण*] (*अनौप*) नकोशी वाटणारी किंवा कंटाळा आणणारी व्यक्ती किंवा वस्तू, ब्याद. ४ (*वाक्प्र*) **a pain in the neck** (*अनौप*) वैताग आणणारी किंवा त्रासदायक व्यक्ती किंवा वस्तू, कटकट. **pain** *क्रि* [*सक*] दुःख देणे, वेदना निर्माण करणे. **pained** *वि* दुखावलेला, दुःखी : *a ~ed look, दुःखीकष्टी नजर*. **painful** *वि* दुःखदायक, क्लेशकारक. **painless** *वि* वेदनाहीन, दुःखरहित.

pains /पेइन्झ्/ *ना* [*ब.व*] (*वाक्प्र*) **take (great)/be at pains to do sth** एखादी गोष्ट करण्यासाठी खूप प्रयत्न करणे, पराकाष्ठा करणे. **'painstaking** *वि* अत्यंत काळजीपूर्वक, कसून केलेला; संपूर्ण, काहीही न सोडता केलेला.

paint /पेइन्ट्/ *ना* १ [*अगण*] (लावण्याचा) रंग, रंगलेप. २ **paints** [*ब.व*] रंगकुप्या. **paint** *क्रि* १ [*अक, सक*] रंगीत चित्र काढणे, चितारणे : *~ flowers, फुलांचे रंगीत चित्र काढणे*. २ [*सक*] रंग देणे, रंग लावणे : *~ the door, दाराला रंग लावणे*. ३ [*सक*] (*ला*) प्रासादिक वर्णन करणे, रंगवणे. ४ (*वाक्प्र*) **paint the 'town red** (*अनौप*) बाहेर जाऊन मौजमजा करणे. **painting** *ना* १ [*अगण*] चित्र काढणे किंवा रंगचित्रकला. २ [*गण*] रंगीत चित्र. **'paintwork** *ना* [*अगण*] रंगवलेला भाग, रंगकाम.

painter /'पेइन्ट(र्)/ *ना* [*गण*] १ रंगीत चित्रे

काढणारा चित्रकार, रंगचित्रकार, चितारी. २ इमारतीला रंग देणारा, रंगारी.

pair /पेअ(र्)/ *ना* १ [*गण*] एकाच प्रकारच्या दोन गोष्टी, जोडी, जोड : *a ~ of shoes, बुटाचा जोड.* २ [*गण*] दोन भाग असलेली एक चीज : *a ~ of trousers/scissors, लेंगा/कात्री.* ३ [*गण*, तसेच ब.व क्रियापदासह अे.व] जवळचे संबंध असलेल्या दोन माणसांची जोडी, गट्टी – उदा नवरा-बायको. **pair** *क्रि* [*अक, सक*] *(off)*// जोड करणे, जोडी लावणे : *~ (off) a pile of socks, पायमोजांच्या ढिगाऱ्यातून जोड्या लावणे.*

pajamas (*अमे*) = PYJAMAS.

pal /पॅल्/ *ना* [*गण*] (*अनौप*) मित्र.

palace /'पॅलिस्/ *ना* [*गण*] राजा-राणीचा, अध्यक्षांचा वगैरे राजवाडा, राजमहल.

palaeontology /,पॅलिऑन्'टॉलजि/ (तसेच विशेषतः *अमे* **paleon-** /'पेलि-/) *ना* [*अगण*] जीवाश्मशास्त्र. **palaeontologist** (तसेच विशेषतः *अमे* **paleon-**) /-जिस्ट्/ *ना* [*गण*] जीवाश्मशास्त्रज्ञ.

palatable /'पॅलटब्ल्/ *वि* १ रुचकर, स्वादिष्ट. २ (*ला*) स्वीकार्य : *The truth is not always very ~, सत्य हे नेहमीच गोड असते असे नाही.*

palate /'पॅलट्/ *ना* [*गण*] १ तोंडातला वरचा भाग, तालू, टाळू. २ (बहुधा *अे.व*) चव, रुची.

palatial /प'लेइश्ल्/ *वि* राजवाड्यासारखा भव्य : *a ~ hotel, शाही हॉटेल.*

palaver /प'लाव्ह(र्); *अमे* -'लॅव्ह्-/ *ना* [*अगण, अे.व*] (*अनौप*) व्यर्थ धामधूम, अनावश्यक धावपळ; फुकटचा आरडाओरडा.

pale^{1} /पेइल्/ *वि* (**-r, -st**) १ (व्यक्ती किंवा तिच्या चेहेऱ्याबाबत) निस्तेज; पांढुरका, पिकुटलेला. २ (रंगाबाबत) फिका : *~ blue eyes, फिकट निळे किंवा निळसर डोळे.* **pale** *क्रि* [*अक*] १ निस्तेज होणे, पांढरा पडणे; फिक्का होणे. २ एखाद्याच्या तुलनेत कमी महत्त्वाचा होणे : *Compared to your problems mine ~ into insignificance, तुझ्या अडचणींच्या तुलनेत माझ्या प्रश्नांना काही महत्त्वच उरत नाही.* **paleness** *ना* [*अगण*] पांढुरकेपणा, पिकुटपणा; फिकेपणा.

pale^{2} /पेइल्/ *ना* (*वाक्प्र*) **be'yond the 'pale** स्वीकार्य न वाटणारा, मर्यादेबाहेर जाणारा : *Your remarks are beyond the ~, तुझे बोलणे मार्यादा ओलांडणारे आहे.*

paleo- = PALAEO-.

palette /'पॅलट्/ *ना* [*गण*] चित्रकार ज्यावर रंग मिसळतो ती फळी, चित्रकाराची रंगपट्टी, रंगपाटी.

paling /'पेइलिङ्/ *ना* [*गण*] टोकदार लाकडी फळ्यांचे केलेले कुंपण.

pall^{1} /पॉऽल्/ *क्रि* [*अक*] अतिपरिचयाने नीरस होणे, वीट येणे.

pall^{2} /पॉऽल्/ *ना* [*गण*] १ शवपेटिकेवर घालायचे वस्त्र. २ [बहुधा *अे.व*] (*ला*) गडद किंवा जाड पडदा : *a ~ of smoke, धुराचा पडदा.* **'pallbearer** *ना* [*गण*] शवपेटिकेच्या बाजूने चालणारा किंवा ती उचलायला मदत करणारा, शवपेटिकावाहक, खांदेकरी.

pallet /'पॅलिट्/ *ना* [*गण*] यारी असलेल्या ट्रकने उचलायची अवजड माल ठेवण्यासाठीची मोठी, सपाट लाकडी चौकट.

pallid /'पॅलिड्/ *वि* निस्तेज, फिका; आजारी दिसणारा, रोगवलेला. **pallor** /'पॅल(र्)/ *ना* [*अगण*] पांढुरकेपणा, निरक्तता.

palm^{1} /पाम्/ *ना* [*गण*] तळहात. **palm** *क्रि* (*क्रिब*) **palm sth off (on sb)** (*अनौप*) नको असलेली गोष्ट दुसऱ्याच्या गळ्यात मारणे : *She always ~s off her old clothes on me, ती नेहमी तिचे जुने कपडे माझ्या गळ्यात मारते.*

palm^{2} (तसेच **'palm-tree**) /पाम्/ *ना* [*गण*] फांद्या नसलेले पण शेंड्याला मोठ्या पानांचे झुबके असलेले उष्ण हवेत वाढणारे एक झाड, ताड, तालवृक्ष.

palmist /'पामिस्ट्/ *ना* [*गण*] हातावरून भविष्य सांगणारा माणूस, हस्तसामुद्रिक. **palmistry** *ना* [*अगण*] हस्तसामुद्रिक.

palpable /'पॅल्पब्ल्/ *वि* (*औप*) उघड, धडधडीत; स्पष्टपणे दिसणारा. **palpably** /-अब्लि/ *क्रिवि* उघडपणे; स्पष्टपणे, सरळसरळ.

palpitate /'पॅल्पिटेइट्/ *क्रि* [*अक*] १

(ह्रदयाबाबत) जोराने आणि अनियमितपणे स्पंदन होणे, धडधडणे. २ भीतीने कापणे. **palpitation** /ˌपॅल्पि'टेइश्न्/ *ना* [*अगण, गण* बहुधा *ब.व*] (काळजाची) धडधड, धगधग; धडकी.

paltry /'पॉऽल्ट्रि/ *वि* (**-ier, -iest**) लहान, क्षुल्लक; किरकोळ, नगण्य (किमतीचा).

pamper /'पॅम्प(र्)/ *क्रि* [*सक*] लाड करणे, फाजील कौतुक करणे, लाडावून ठेवणे.

pamphlet /'पॅम्फ्लिट्/ *ना* [*गण*] छोटी पुस्तिका, पत्रिका, पत्रक.

pan^{1} /पॅन्/ *ना* [*गण*] १ दांडी असलेले अन्न शिजवायचे धातूचे भांडे, दांड्याचा तवा : *a frying ~, तळणीचे दांड्याचे भांडे.* २ खोलगट पात्र : *a toilet-~, बेडपॅन.* **pan** *क्रि* (**-nn-**) १ [*अक*] (*for*)*//* सोने मिळवण्यासाठी बारीक खडी थाळीमधे धुणे. २ [*सक*] (*अनौप*) खरमरीत टीका करणे. ३ (*क्रिब*) **pan out** (*ला*) (घटनांबाबत) घडणे, घडत जाणे : *How did things ~ out? गोष्टी कशा घडत गेल्या?*

pan^{2} /पॅन्/ *क्रि* (**-nn-**) [*अक, सक*] (*चित्रपट*) हालणाऱ्या गोष्टीच्या मागेमागे कॅमेरा जाणे, फिरवणे.

panacea /ˌपॅन'सिअ/ *ना* [*गण*] सर्व व्याधींवर एकच उपाय, सर्वौषध.

panache /पॅ'नॅश्; *अमे* प-/ *ना* [*अगण*] आत्मविश्वासपूर्ण अशी सुडौल रीती.

pancake /'पॅङ्केइक्/ *ना* [*गण*] अंडी, पीठ, साखर मिसळून केलेला दोन्ही बाजूंनी परतून भाजलेला पातळ केक.

pancreas /'पॅङ्क्रिअस्/ *ना* [*गण*] अन्नपचनासाठी उपयुक्त असे रस निर्माण करणारा एक पचनेन्द्रिय, स्वादुपिंड.

panda /'पॅन्ड/ *ना* [*गण*] अस्वलासारखा दिसणारा चीनमधील एक काळ्या-पांढऱ्या रंगाचा प्राणी.

pandemonium /ˌपॅन्डि'मउनिअम्/ *ना* [*अगण*] हलकल्लोळ, गहजब, गोंधळ आणि आरडाओरडा, हुल्लड.

pander /'पॅन्ड(र्)/ *क्रि* (*क्रिब*) **pander to sb/sth** (एखाद्याची) वाईट इच्छा भागवणे, हीन अभिरुची पोसणे : *newspapers that ~ to the public's interest in violence, लोकांच्या हिंसाचारी वृत्तीला खतपाणी घालणारी वर्तमानपत्रे.*

pane /पेइन्/ *ना* [*गण*] खिडकीची काच, तावदान.

panel /'पॅन्ल्/ *ना* [*गण*] १ दारांचे वगैरे तावदान, चकला, दाराच्या कडेच्या पट्ट्यांमधे बसवलेला (लाकडी फळ्यांचा वगैरे) भाग. २ नियंत्रण पट्टा, साधने ठेवायचा बोर्ड. ३ खास करून आकाशवाणी किंवा दूरदर्शनवरील कार्यक्रमात विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देणारे तज्ज्ञमंडळ. **panel** *क्रि* (**-ll-**; *अमे* **-l-**) [*सक*] दाराची वगैरे तावदाने बसविणे. **panelling** (*अमे* **-l-**) *ना* [*अगण*] भिंती आतून सुशोभित करण्यासाठी ठोकलेली तावदाने.

pang /पॅङ्/ *ना* [*गण*] वेदनेची, अपराधी भावनेची वगैरे सणक, तिडिक, कळ.

panic /'पॅनिक्/ *ना* [*अगण, गण*] घबराट, घाबरगुंडी, धास्ती. **panic** *क्रि* (**-ck-**) [*अक*] धास्तावणे, घबराट निर्माण होणे. **panicky** *वि* (*अनौप*) धास्तावलेला, घाबरलेला. **'panic-stricken** *वि* घबराट पसरलेला, हवालदिल.

pannier /'पॅनिअ(र्)/ *ना* [*गण*] सायकलच्या मागच्या चाकाला लावलेल्या छोट्या पिशव्यांच्या जोडीतील एक पिशवी.

panorama /ˌपॅन'राम; *अमे* -'रॅम/ *ना* [*गण*] भोवतालच्या विस्तीर्ण प्रदेशाचा देखावा, परिपूर्ण दृश्य, विशाल दर्शन. **panoramic** /-'रॅमिक्/ *वि* विशाल दृश्याचा.

pansy /'पॅन्झ़ि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) १ निळ्या, पिवळ्या गोल पाकळ्यांचे बागेतील एक फुलझाड. २ (*अनौप अधिक्षेपी*) बायकी पुरुष; समकाम, समलिंगी आकर्षण असणारा.

pant /पॅन्ट्/ *क्रि* [*अक*] धापा टाकणे. **pant** *ना* [*गण*] धाप.

panther /'पॅन्थ(र्)/ *ना* [*गण*] बिबळ्या वाघ, विशेषतः काळ्या रंगाचा.

panties /'पॅन्टिझ़्/ *ना* [*ब.व*] (*अनौप*) स्त्रिया किंवा मुली यांनी घालायच्या आतल्या तंग चड्ड्या.

pantomime /'पॅन्टमाइम्/ *ना* [*गण, अगण*] १ विशेषतः नाताळात करायचे लहान मुलांसाठीचे परिकथेवर आधारित संगीतनृत्यमय

गमतीचे नाटक. २ मूकनाट्य.

pantry /'पॅन्ट्रि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) अन्न ठेवण्याची घरातली छोटी खोली, फराळाची खोली.

pants /पॅन्ट्स/ *ना* [*ब.व*] १ (*ब्रि*) पुरुषांच्या किंवा स्त्रियांच्या आतल्या चड्ड्या. २ (विशेषतः *अमे*) पॅन्ट, विजार, पाटलोण.

papa /प'पा; *अमे* 'पाप/ *ना* [*गण*] (*जुना अप्रचलित अनौप*) (मुलांच्या वापरात) वडील, बाबा.

papacy /'पेइपसि/ *ना* **the papacy** [*अे.व*] पोपचे स्थान किंवा पोपचा अधिकार. **papal** /'पेइप्ल्/ *वि* पोपचा.

paper /'पेइप(र्)/ *ना* १ [*अगण*] कागद. २ [*गण*] वर्तमानपत्र. ३ **papers** [*ब.व*] कागदपत्रे. ४ [*गण*] परीक्षेची प्रश्नपत्रिका. ५ [*गण*] शैक्षणिक निबंध. **paper** *क्रि* [*सक*] भिंतीवर भित्तिकागद लावणे. **'paperback** *ना* [*गण*] पातळ पुठ्ठ्याचे वेष्टन असलेले पुस्तक. **'paper-boy, 'paper-girl** *ना* [*गण*] वर्तमानपत्र टाकणारा मुलगा/मुलगी. **'paper-clip** *ना* [*गण*] कागद एकत्र लावायचा वायरचा एक हुक. **'paper-weight** *ना* [*गण*] कागद उडू नये म्हणून त्यावर ठेवायची जड वस्तू. **'paperwork** *ना* [*अगण*] पत्रे, अहवाल वगैरे लिहिण्याचे काम.

paprika /'पॅप्रिक; *अमे* प'प्रीक/ *ना* [*अगण*] अन्नपदार्थात वापरायची गोड्या मिऱ्याची तांबडी भुकटी.

par /पा(र्)/ *ना* १ [*अे.व*] (गोल्फमधे) चेंडू मारण्याची सर्वसाधारण संख्या. २ (*वाक्प्र*) **below 'par** (*अनौप*) नेहमीपेक्षा कमी चांगला, कमी तरबेज वगैरे. **on a par with sb/sth** एखाद्याच्या मोठेपणाशी, गुणाशी वगैरे तुल्यबळ असा.

parable /'पॅरब्ल्/ *ना* [*गण*] (विशेषतः बायबलमधे) तात्पर्यकथा, दृष्टान्तकथा.

parachute /'पॅरशूट्/ *ना* [*गण*] विमानातून जमिनीवर अलगद उडी मारण्यासाठी वापरायची हवाई-छत्री. **parachute** *क्रि* [*अक, सक*] हवाई-छत्रीच्या साहाय्याने विमानातून उडी मारणे. **parachutist** *ना* [*गण*] हवाई-छत्री वापरून उडी मारणारा.

parade /प'रेइड्/ *ना* [*गण*] १ सैनिकांची कवाईत, संचलन. २ मिरवणूक. **parade** *क्रि* १ [*अक, सक*] कवाइतीसाठी (सैनिक) एकत्र येणे किंवा कवाईत करणे. २ [*अक*] मिरवणुकीने किंवा मिरवत चालणे. ३ [*सक*] लक्ष वेधण्याकरता प्रदर्शन करणे : *~ one's wealth, संपत्तीचे किंवा श्रीमंतीचे प्रदर्शन करणे.*

paradise /'पॅरडाइस्/ *ना* १ [*अगण*] स्वर्ग, नंदनवन. २ [*गण, बहुधा अे.व, अगण*] निर्भेळ आनंदाचे ठिकाण किंवा स्वर्गसुख मिळण्याची स्थिती, स्वर्गसुख.

paradox /'पॅरडॉक्स्/ *ना* [*गण*] वरवर विरोधी वाटणारे पण सत्य सांगणारे विधान, विरोधाभास. **paradoxical** /,पॅर'डॉक्सिक्ल्/ *वि* विरोधाभासयुक्त, आपाततः विरोधी. **paradoxically** /-क्लि/ *क्रिवि* विरोधाभासयुक्त रीतीने.

paraffin /'पॅरफिन्/ *ना* [*अगण*] पेट्रोलपासून बनविलेले, इंधन म्हणून वापरायचे एक तेल, मेणतेल.

paragon /'पॅरगन्; *अमे* -गॉन्/ *ना* [*गण*] (*of*)// एखाद्या गुणाचे निर्दोष असे उदाहरण असणारा माणूस, मूर्तिमंत पुतळा : *She is a ~ of virtue, ती सद्गुणाचा पुतळाच आहे.*

paragraph /'पॅरग्राफ्; *अमे* -ग्रॅफ्/ *ना* [*गण*] नवीन ओळीवर सुरू केलेला लिखाणाचा भाग, परिच्छेद.

parakeet /'पॅरकीट्/ *ना* [*गण*] लांब शेपटीचा छोटासा पोपट, शुक.

parallel /'पॅरलेल्/ *वि* १ (रेषांबाबत) एकमेकांपासून नेहमी तेवढ्याच अंतरावर असलेल्या, समांतर. २ (*ला*) समान, तसाच. **parallel** *ना* १ [*गण, अगण*] अगदी तशीच असणारी व्यक्ती किंवा वस्तू, एकसारखी वस्तू किंवा व्यक्ती. २ [*गण*] तुलना, सारखेपणा : *draw a ~ between A and B, अ आणि ब मधे तुलना करणे.* **parallel** *क्रि* [*सक*] समान किंवा सारखा असणे, समांतर असणे.

parallelogram /,पॅर'लेलग्रॅम्/ *ना* [*गण*] (*भूमिती*) समोरच्या बाजू एकमेकांना समांतर असलेली चार बाजूंची आकृती, समांतरभुज चौकोन.

paralyse (*अमे* **-lyze**) /'पॅरलाइझ्/ *क्रि*

[*सक*] १ अर्धांगवायू होणे. २ (*ला*) काम किंवा दळणवळण बंद होणे, ठप्प होणे, विस्कळित होणे : *The city was ~d by the railway strike, रेल्वेच्या संपामुळे शहराचे जनजीवन ठप्प झाले किंवा विस्कळित झाले.*

paralysis /प'रॅलसिस्/ *ना* [*अगण*] १ शरीराच्या भागावरील ताबा सुटणे किंवा तो भाग संवेदनाहीन होणे, अर्धांगवायू, पक्षाघात. २ (*ला*) सामान्यपणे हालचाल किंवा काम करण्याची असमर्थता, विकलांगता, विस्कळितपणा. **paralytic** /पॅर'लिटिक्/ *वि* १ अर्धांगवायू झालेला, विकलांग. २ (*ब्रि व्रात्य*) चिकार प्यालेला. **paralytic** *ना* [*गण*] अर्धांगवायू झालेला माणूस.

parameter /प'रॅमिट(र्)/ *ना* [*गण,* बहुधा *ब.व*] एखाद्या गोष्टीच्या कार्यावरील सीमा, कार्यक्षेत्रसीमा, प्रचल.

paramilitary /,पॅर'मिलिट्रि; *अमे* -टेरि/ *वि* (लष्करी दलाबाबत) लष्कराप्रमाणे लष्कराचा भाग नसलेले, निमलष्करी.

paramount /'पॅरमाउन्ट्/ *वि* (*औप*) सर्वाधिक महत्त्वाचा, प्रधान, परमोच्च, सर्वश्रेष्ठ.

paranoia /,पॅर'नॉइअ/ *ना* [*अगण*] इतर लोक आपल्याविरुद्ध आहेत किंवा त्यांच्यापासून आपल्याला धोका आहे अशी भावना निर्माण करणारी एक मानसिक व्याधी, प्रणालित संभ्रमविकृती. **paranoid** /'पॅरनॉइड्/ *ना* [*गण*], *वि* अशा व्याधीने ग्रस्त असणारा माणूस.

parapet /'पॅरपिट्; -पेट्/ *ना* [*गण*] छपरावरची किंवा पुलावरची कडेची कमी उंचीची संरक्षक भिंत, मुंडोल, पडदी, पाळ.

paraphernalia /,पॅरफ'नेइलिअ/ *ना* [*अगण*] विविध छोट्या छोट्या वस्तू, लवाजमा.

paraphrase /'पॅरफ्रेइझ्/ *क्रि* [*सक*] *ना* [*गण*] (एखादे भाषित किंवा लेखन) दुसऱ्या शब्दांत पुन्हा सांगणे, अर्थानुवाद (करणे), एकभाषिक अनुवाद (करणे).

parasite /'पॅरसाइट्/ *ना* [*गण*] १ परोपजीवी प्राणी किंवा वनस्पती, बांडगूळ. २ (*ला*) इतरांच्या आधारावर राहणारा आणि बदल्यात स्वतः काहीही न करणारा माणूस, ऐतखाऊ किंवा ऐदी माणूस. **parasitic** /,पॅर'सिटिक्/ *वि* बांडगुळासारखा, परोपजीवी; ऐतखाऊ, परजीवी.

parasol /'पॅरसॉल्; *अमे* -सॉऽल्/ *ना* [*गण*] उन्हात वापरायची छत्री.

paratroops /'पॅरट्रूप्स्/ *ना* [*ब.व*] हवाईछत्री वापरून हवाईजहाजातून उडी मारण्याचे प्रशिक्षण घेतलेले सैनिक, हवाईछत्रीधारक. **paratrooper** /-प(र्)/ *ना* [*गण*] हवाईछत्रीच्या साहाय्याने विमानातून उतरणारा सैनिक, हवाईछत्रीधारी सैनिक.

parcel /'पास्ल्/ *ना* [*गण*] पोस्टाने पाठवायची वेष्टनात गुंडाळलेली गोष्ट, पुडके. **parcel** *क्रि* (-ll-; *अमे* -l-) (*क्रिब*) **parcel sth out** एखाद्या गोष्टीचे लहान भाग करणे, विभाजन किंवा विभागणी करणे, खंड करणे. **parcel sth up** एखादी गोष्ट बाहेर पाठविण्यासाठी वेष्टनात गुंडाळणे.

parched /पाच्ट्/ *वि* १ पाण्याविना वाळून कोरडा झालेला, शुष्क. २ (*अनौप*) तहानेला, घशाला कोरड पडलेला, शुष्ककंठ.

parchment /'पाच्मन्ट्/ *ना* [*अगण*] (क) जनावरांच्या कातडीपासून केलेले लिहिण्यासाठी वापरायचे पत्र, चर्मपत्र. (ख) अशा तऱ्हेचा एक जाड पिवळसर कागद.

pardon /'पाड्न्/ *ना* [*गण, अगण*] १ क्षमा. २ गुन्ह्याच्या शिक्षेतून सूट, दंडमुक्ती, माफी. **pardon** *क्रि* [*सक*] क्षमा करणे. **pardon** *उद्वा* (नीट ऐकू न आल्यामुळे एखाद्याला ते पुन्हा म्हणण्याची विनंती करताना वापरायचा शब्द) काय (म्हणालात)? **pardonable** *वि* क्षम्य.

pare /पेअ(र्)/ *क्रि* [*सक*] १ बाहेरचा भाग काढणे, साल वगैरे काढणे, सोलणे. २ (*क्रिब*) **pare sth down** एखादी गोष्ट कमी करणे, काटछाट करणे.

parent /'पेअरन्ट्/ *ना* [*गण*] आई किंवा वडील, जनक, पालक. **parental** /प'रेन्ट्ल्/ *वि* आईवडलांचा, पालनविषयक.

parenthesis /प'रेन्थसिस्/ *ना* [*गण*] (*ब.व* **-eses** /-असीझ्/) (क) एका वाक्यात स्वल्पविराम, कंस किंवा जोडरेघ करून दुसरे घातलेले वाक्य किंवा पदबंध, कंसगतविधान.

(ख) [बहुधा *ब.व*] अशा वाक्यासाठी वापरलेला गोलाकार कंस.

parish /'पॅरिश्/ *ना* [*गण*] स्वतःचे चर्च आणि धर्मगुरू असणारे क्षेत्र, परगणा, पांढरी. **parishoner** /प'रिशन(र्)/ *ना* [*गण*] पांढरीतला माणूस.

parity /'पॅरटि/ *ना* [*अगण*] (*औप*) समता, समतोल, तुल्य.

park /पाक्/ *ना* [*गण*] सार्वजनिक उद्यान, बाग. **park** [*अक, सक*] वाहन उभे करणे, वाहन लावणे. **'parking-meter** *ना* [*गण*] पैसे टाकून त्याच्याजवळ काही काळ गाडी रस्त्याला उभी करण्याचे उपकरण. **'parkland** *ना* [*अगण*] हिरवळ आणि झाडे असलेली मोकळी जागा.

parliament /'पालमन्ट्/ *ना* [*गण,* तसेच ब.व क्रियापदासह अे.व] एखाद्या देशाचे कायदेकानू करणाऱ्या लोकांचा गट, संसद, विधिमंडळ. **parliamentary** /,पाल'मेन्ट्रि/ *वि* संसदीय.

parlour (*अमे* **-lor**) /'पाल(र्)/ *ना* [*गण*] १ (पूर्वी) बैठकीची खोली. २ (विशेषतः *अमे*) दुकान : *an ice-cream ~, आइस्क्रीमचे दुकान.*

parochial /प'रउकिअल्/ *वि* १ (*औप*) परागणांचा. २ (*ला अधिक्षेपी*) संकुचित; मर्यादित : *a ~ attitude, संकुचित* दृष्टी. **parochially** *क्रिवि* संकुचित दृष्टीने.

parody /'पॅरडि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*गण, अगण*] दुसऱ्याच्या शैलीची नक्कल करून करमणुकीकरता केलेले लिखाण, विडंबन. २ [*गण*] वाईट नक्कल, चेष्टा : *a ~ of justice, न्यायाची चेष्टा.* **parody** *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] विडंबन करणे.

parole /प'रउल्/ *ना* [*अगण*] चांगल्या वर्तनाचे वचन दिल्यावर कैद्याला शिक्षा संपण्यापूर्वी मुक्त करणे. **parole** *क्रि* [*सक*] चांगल्या वर्तनाच्या हमीवर कैद्याला सोडणे.

paroxysm /'पॅरक्सिझम्/ *ना* [*गण*] (*औप*) रागाची तिडीक, दुःखाचा झटका, आवेग.

parquet /'पाकेइ; *अमे* पार्'केइ/ *ना* [*अगण*] निरनिराळ्या तुकड्यांची लाकडी तक्तपोशी, लाकडी फरसबंदी.

parrot /'पॅरट्/ *ना* [*गण*] पोपट. **parrot** *क्रि* [*सक*] (एखाद्याच्या बोलण्या-चालण्याची) पोपटासारखी नक्कल करणे, पोपटपंची करणे.

parry /'पॅरि/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] (प्रश्न, ठोसा वगैरे) टाळणे, हुकवणे, हुलकावणी देणे, चुकवणे. **parry** *ना* [*गण*] टाळाटाळ, हुलकावणी.

parsimonious /,पासि'मउनिअस्/ *वि* (*औप अधिक्षेपी*) फार काटकसरी, कद्रू.

parsley /'पास्लि/ *ना* [*अगण*] अन्न रुचकर करण्यासाठी किंवा नटवण्यासाठी जिची हिरवी पाने वापरतात अशी वनस्पती, अजमोदा.

parsnip /'पास्निप्/ *ना* [*गण, अगण*] लांब पिवळे मूळ असलेली, भाजी म्हणून खाल्ली जाणारी वनस्पती, एक प्रकारचे रानटी गाजर.

parson /'पास्न्/ *ना* [*गण*] पांढरीतला ख्रिस्ती धर्मगुरू, पाद्री. **parsonage** /-इज्/ *ना* [*गण*] अशा पाद्र्याचे घर.

part^1 /पाट्/ *ना* [*गण*] १ (*of*)// काही भाग, अंश : *We spent ~ of our holiday in Paris, आम्ही सुट्टीचे काही दिवस पॅरिसमधे घालवले.* २ यंत्राचा भाग : *spare ~s, सुटे भाग.* ३ देशाचा, शहराचा वगैरे भाग. ४ अनेक (सम) भागांपैकी एक भाग. ५ [बहुधा *अे.व*] व्यक्तीचा एखाद्या कार्यातील हिस्सा, वाटा; नाटक, सिनेमा वगैरेतील नटाची भूमिका. ६ (*संगीत*) कंठाचा किंवा विशिष्ट वाद्याचा संगीतरचनेतील सुसंवाद. ७ (*वाक्प्र*) **for the 'most part** प्रामुख्याने; बहुधा, सर्वसाधारणपणे. **for 'my, 'his/'her, etc part** माझ्या, त्याच्या/तिच्या वगैरे बाबत बोलायचे झाले तर किंवा म्हणाल तर. **in 'part** काही मर्यादेपर्यंत, काहीसा. **on sb's part** एखाद्याने केलेला किंवा त्याकडून झालेला. **take part (in sth)** एखाद्या गोष्टीत भाग घेणे. **take sb's part** एखाद्याची वादविवादात वगैरे बाजू घेणे, कड घेणे. **part** *क्रिवि* थोडासा, काही. **partly** *क्रिवि* थोडासा, काही मर्यादित किंवा प्रमाणात; संपूर्णतया नाही. **,part of 'speech** *ना* [*गण*] (*व्याकरण*) नाम, क्रियापद यांसारख्या शब्दाच्या जाती, शब्दवर्ग. **,part-'time** *वि, क्रिवि* अर्धवेळ, थोड्या वेळेचा, दिवसात किंवा आठवड्यात काही काळ काम करणारा.

part^{2} /पाट्/ *क्रि* १ [*अक, सक*] विलग होणे, विभक्त होणे, वेगळे होणे : *The clouds ~ ed, ढग विखुरले* ○ *~ two people, दोन राष्ट्रे विभक्त करणे.* २ [*सक*] भांग पाडणे. ३ (*वाक्प्र*) **part 'company (with sb/sth)** (क) भिन्न मार्गांनी जाणे, मार्ग वेगळे होणे; पूर्वी एकत्र असलेल्यांनी विलग होणे. (ख) एखाद्याशी सहमत न होणे. ४ (*क्रिब*) **part with sth** देऊन टाकणे : *She'll never ~ with the family jewels, वंशपरंपरेने मिळालेली रत्ने ती कधीच देणार नाही.* **parting** *ना* १ [*अगण, गण*] निरोप, सोडून जाणे. २ [*गण*] केसाचा भांग.

partake /पा'टेइक्/ *क्रि* (*भूत* **-took** /-'टुक्/, *भूत वि* **-taken** /-'टेइकन्/) [*अक*] *of/in*// (*औप*) (काही) खाणे किंवा पिणे, काही घेणे, भक्षण करणे; एखाद्या गोष्टीत भाग असणे.

partial /'पाश्‌ल्/ *वि* १ अंशतः, पूर्ण नाही असा : *only a ~ success, फक्त अंशतः यश.* २ (*towards*)// पक्षपाती. ३ *to*// जास्त आवडीचा असणारा : *He's (rather) ~ to cakes, केक त्याला जास्तच प्रिय आहेत किंवा आवडतात.* **partiality** /,पाशि'ॲलटि/ *ना* १ [*अगण*] पक्षपातीपणा. २ [*गण, बहुधा अे.व*] आवड. **partially** /'पाशलि/ *क्रिवि* अंशतः, पूर्ण नाही असा; थोडासा.

participate /पा'टिसिपेइट्/ *क्रि* [*अक*] (*in*)// एखाद्या कार्यात भाग घेणे, सहभागी होणे. **participant** /-पन्ट्/ *ना* [*गण*] सहभागी व्यक्ती, भाग घेणारा. **participation** /पा,टिसि'पेइश्‌न्/ *ना* [*अगण*] सहभाग.

participle /'पाटिसिप्‌ल्/ *ना* [*गण*] (*व्याकरण*) क्रियापदाचे एक आख्यातेतर रूप, धातुविशेषण : *'Hurrying' and 'hurried' are the present and past ~s of 'hurry', 'Hurrying' आणि 'hurried' ही (अनुक्रमे) 'hurry' या क्रियापदाची वर्तमानकालवाचक धातुविशेषण आणि भूतकालवाचक धातुविशेषण रूपे आहेत.*

particle /'पाटिक्‌ल्/ *ना* [*गण*] १ कण. २ (*व्याकरण*) शब्दाची एक जाती किंवा एक शब्दवर्ग – उदा उपपद, क्रियाविशेषण, निपात.

particular /प'टिक्युल(र्)/ *वि* १ विशिष्ट : *in this ~ case, या विशिष्ट बाबतीत किंवा गोष्टीमधे.* २ खास, विशेष : *of ~ interest, विशेष आवडीचा.* ३ (*about*)// बारीकसारीक गोष्टीत लक्ष घालणारा, काटेकोर; लवकर समाधान न होणारा, चौकस, चिकित्सक. ४ (*वाक्प्र*) **in par'ticular** विशेष, सर्वात जास्त, सर्वाधिक : *I like these flowers in ~, मला ही फुले विशेष आवडतात.* **particular** *ना* [*गण, बहुधा 'ब.व*] माहिती, बात; तपशील. **particularly** *क्रिवि* विशेषत्वाने, खास करून.

partisan /,पाटि'झॅन्; *अमे* 'पार्टिझ्‌न्/ *ना* [*गण*] १ एखाद्या माणसाचा, तत्त्वाचा वगैरे समर्थक, कट्टर अभिमानी, पक्षाभिमानी. २ शत्रूने ताब्यात घेतलेल्या प्रदेशातील अनधिकृत किंवा स्वयंघोषित लष्करी संघटनेचा सभासद. **partisan** *वि* पक्षपाती, उगीच कैवार घेणारा, पक्षांध.

partition /पा'टिश्‌न्/ *ना* [*गण*] १ घर, कचेरी यांतील खोल्यांमधील पातळ भिंत, आडभिंत, विभाजक पडदा वगैरे. २ देशाची फाळणी, विभाजन. **partition** *क्रि* १ [*सक*] विभाजन करणे, फाळणी करणे, हिस्से पाडणे. २ (*क्रिब*) **partition sth off** विभाजक पडदा वगैरे घालून वेगळे करणे.

partner /'पाट्‌न(र्)/ *ना* [*गण*] १ एखाद्या कामात दुसऱ्यांबरोबर भाग घेणारा, खास करून धंद्यातील भागीदार. २ नृत्य, टेनिसचा खेळ वगैरेतील जोडीदार, साथीदार. ३ लग्नाचा/लग्नाची जोडीदार, साथी, सहचर, जन्माचा सोबती, ज्याच्याशी लैंगिक संबंध आहेत अशी व्यक्ती. **partner** *क्रि* [*सक*] साथीदार असणे/होणे. **partnership** *ना* १ [*अगण*] भागी, भागीदारी; जोडीदारी, संगत. २ [*गण*] भागीदारीतील व्यवसाय.

partook PARTAKE चा *भूत.*

partridge /'पाट्रिज्/ *ना* [*गण*] तपकिरी पिसांचा, लठ्ठ, आखूड शेपटीचा तित्तर पक्षी, कवडा.

party /'पाटि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) १ मेजवानी, समारंभ : *a birthday ~, वाढदिवसाची मेजवानी.* २ समान राजकीय ध्येय

असणाऱ्या लोकांचा गट, राजकीय पक्ष. ३ एकत्र काहीतरी करत असलेल्या लोकांचा गट, पथक : *a ~ of tourists, पर्यटकांचे पथक.* ४ (*कायदा*) करारातील एका बाजूकडील व्यक्ती किंवा लोक, पक्षकार. ५ (*वाक्प्र*) **be (a) party to sth** भाग घेणे, सहभागी होणे किंवा समर्थन करणे. **the ,party 'line** *ना* [*अे.व*] राजकीय पक्षाचे अधिकृत मत, पक्षीय धोरण.

pass^{1} /पास्; *अमे* पॅस्/ *क्रि* १ [*अक, सक*] एखाद्या गोष्टीवरून किंवा माणसावरून पुढे जाणे : *~ the house, घरावरून जाणे.* २ [*अक, सक*] मधून जाणे, -च्या दिशेने जाणे : *He ~ed through Oxford on his way to London, लंडनला जाताना तो ऑक्सफर्डमधून किंवा ऑक्सफर्डवरून गेला.* ३ [*सक*] एखाद्याला काही देणे : *Please ~ me the butter, कृपया मला जरा लोणी दे.* ४ [*अक, सक*] (*क्रीडा*) आपल्या संघातील खेळाडूकडे चेंडू वगैरे टोलावणे, देणे किंवा पाठवणे. ५ [*अक*] एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत जाणे. ६ (क) [*अक*] (वेळेबाबत) जाणे; खर्च होणे. (ख) [*सक*] (वेळ) खर्च करणे, घालवणे. ७ [*अक*] संपणे, थांबणे : *wait for the storm to ~, वादळ संपण्याची वाट पाहणे.* ८ (क) [*अक, सक*] (परीक्षेत) उत्तीर्ण होणे, कसोटीस उतरणे. (ख) [*सक*] परीक्षा घेऊन उत्तीर्ण करणे. ९ [*सक*] मतदानाने (नवा कायदा) संमत करणे. १० [*सक*] जाऊ देणे : *I don't like it but I'll let it ~, मला ते आवडत नाही पण मी ते जाऊ देईन.* ११ [*सक*] (अधिकृत मत, निकाल) देणे : *~ (a) sentence on a prisoner, कैद्याला शिक्षा देणे.* १२ (*वाक्प्र*) **pass the time of 'day (with sb)** एखाद्याला भेटून त्याच्याशी बातचीत करणे. **pass 'water** (*औप*) मुतणे, लघवी होणे. १३ (*क्रिब*) **pass a'way** (*पर्या*) मरणे, (इहलोक सोडून) जाणे. **pass by sb/sth** एखाद्या गोष्टी किंवा व्यक्तीवरून पुढे जाणे. **pass sb/sth by** एखाद्याकडे लक्ष न देणे. **pass for sb/sth** एखादी गोष्ट/व्यक्ती म्हणून स्वीकार होणे, चालणे : *He could ~ for a Frenchman, फ्रेंच म्हणून तो चालू शकला.* **pass 'off** (प्रसंगाबाबत) घडणे. **pass sb/sth off as sb/sth** एखाद्या ऐवजी दुसरी गोष्ट खोटेपणाने पुढे करणे, भलतीच गोष्ट/व्यक्ती देऊन फसवणे. **pass 'on** = PASS AWAY. **pass sth on (to sb)** दुसऱ्याला एखादी गोष्ट देऊन टाकणे. **pass 'out** बेशुद्ध होणे, चक्कर येणे. **pass sb over** एखाद्याला एखाद्या नोकरीसाठी न निवडणे. **pass over sth** एखाद्या गोष्टीकडे दुर्लक्ष करणे. **pass sth up** एखाद्या गोष्टीचा फायदा न घेणे. **,passer-'by** *ना* [*गण*] (*ब.व* **passers-by**) बाजूने जाणारा, एखाद्या गोष्टीवरून पुढे जाणारा.

pass^{2} /पास्; *अमे* पॅस्/ *ना* [*गण*] १ परीक्षेतील यश. २ प्रवासाचा, प्रवेशाचा वगैरे परवाना. ३ (*क्रीडा*) स्वतःच्या गड्याकडे चेंडू देणे किंवा पाठवणे. ४ पर्वतांतील खिंड. ५ (*वाक्प्र*) **make a pass at sb** (*अनौप*) एखाद्याला मोहात पाडणे, लाईन मारणे. **'password** *ना* [*गण*] इमारतीत प्रवेश मिळणे, संगणक वापरायला मिळणे वगैरेच्या परवानगीसाठी माहिती असायला हवा असा गुप्त शब्द, परवलीचा शब्द.

passable /'पासब्ल्; *अमे* 'पॅस्-/ *वि* १ (रस्ता वगैरेबाबत) वाहतुकीस खुला, सुगम. २ फार चांगला नाही पण ठीक, चालण्यासारखा. **passably** /-अब्लि/ *क्रिवि* चालेल अशा रीतीने.

passage /'पॅसिज्/ *ना* १ [*गण*] अरुंद मार्ग, बोळ; वीथी, छन्नमार्ग. २ [*गण, बहुधा अे.व*] वाट : *clear a ~ through the crowd, गर्दीतून वाट काढणे.* ३ [*अगण*] ओघ : *the ~ of time, कालाच्या ओघात.* ४ [*गण*] बोटीचा प्रवास (किंवा त्याचा खर्च). ५ [*गण*] पुस्तकातील, भाषणातील वगैरे उतारा.

passenger /'पॅसिन्ज(र्)/ *ना* [*गण*] बस, रेल्वे, विमान वगैरेतून प्रवास करणारा प्रवासी.

passing /'पासिङ्; *अमे* 'पॅसिङ्/ *वि* क्षणिक, अल्पकाळचा : *a ~ thought, निसटता विचार.* **passing** *ना* [*अगण*] १ जाणे. २ (क) (*औप*) शेवट, अंत. (ख) (*पर्या*) मृत्यू. ३ (*वाक्प्र*) **in passing** थोडक्यात, इतर कशाबद्दल बोलताना किंवा लिहिताना, जाताजाता.

passion /'पॅश्न्/ *ना* १ [*अगण, गण*] प्रेम, द्वेष किंवा क्रोध यांची तीव्र भावना. २ [*अगण*] वासना, तीव्र कामेच्छा. ३ [*अे.व*] *for//* आवड,

वेड : *a ~ for books, पुस्तकांचे वेड.* **passionate** /'पॅशनट्/ *वि* विकारवश; उत्कट. **passionately** *क्रिवि* विकारवश होऊन; उत्कटतेने.

passive /'पॅसिव्ह्/ *वि* १ स्वतःच्या भावना न दाखविणारा – उदाहरणार्थ इतरांनी काही केले तरी प्रतिकार न करणारा, निष्क्रीय. २ (*व्याकरण*) कर्त्यावर क्रियेचा परिणाम झाला असता वापरायच्या विशिष्ट क्रियापदरूपाचा – उदा 'She *was bitten* by a dog', कर्मणी. **the passive** *ना* [*अे.व*] क्रियापदाचे कर्मणी रूप. **passively** *क्रिवि* निष्क्रियतेने, विरोध न करता; कर्मणी रीतीने. **passiveness** *ना* [*अगण*] निष्क्रीयता.

Passover /'पासउव्ह(र्); *अमे* 'पॅस्-/ *ना* [*अगण*] ज्यूंचा धार्मिक सण, वल्हांडण सण.

passport /'पास्पॉऽट्; *अमे* 'पॅस्-/ *ना* [*गण*] १ परदेशात प्रवास करताना वापरायचे अधिकृत पत्र, पारपत्र. २ (*ला*) एखादी गोष्ट शक्य करण्याचा हमखास उपाय, गुरूकिल्ली : *a ~ to success, यशाची गुरूकिल्ली.*

past^{1} /पास्ट्; *अमे* पॅस्ट्/ *वि* १ वर्तमानाच्या आधीचा काळ, भूत; काळाच्या पडद्यामागे गेलेला, पूर्वीचा : *in ~ years, गत वर्षांमधे.* २ (*व्याकरण*) (क्रियापदाच्या रूपाबाबत) भूत, भूतकालीन स्थिती किंवा कृती दाखवणारे : *the ~ tense, भूतकाळ* ○ *a ~ participle, भूतकालवाचक धातुविशेषण.* **past** *ना* [*अे.व*] १ **the past** भूतकाळ (किंवा भूतकाळात झालेल्या घटना). २ व्यक्तीचा (खास करून वाईट) भूतकाळ, पूर्वायुष्य.

past^{2} /पास्ट्; *अमे* पॅस्ट्/ *शब्दयो* १ (काळाबाबत) उलटल्यावर, उत्तर; नंतर : *~ midnight, मध्यरात्रीनंतर.* २ एका टोकाला; एका बाजूकडून दुसऱ्या बाजूकडे, पलीकडे : *She walked ~ the church, ती चर्चवरून पलीकडे गेली.* ३ आवाक्याबाहेर, आवडीपलीकडे : *I'm ~ caring what happens, काय घडतंय् हे माझ्या आवाक्यापलीकडचं आहे म्हणजेच त्यात मला रस नाही.* ४ (*वाक्प्र*) **'past it** (*अनौप*) वयामुळे पूर्वीप्रमाणे करू न शकणारा. **past** *क्रिवि* या टोकापासून त्या टोकापर्यंत.

pasta /'पॅस्ट; *अमे* 'पास्ट/ *ना* [*अगण*] अंडी, पीठ आणि पाणी यांपासून केलेल्या घट्ट पिठाचे लहान-मोठे कापलेले आकार.

paste /पेइस्ट्/ *ना* १ [*अगण, गण*] पातळ द्रवरूप पीठ, लुकण. २ [*अगण*] चिकटवण्याकरता वापरले जाणारे पीठ आणि पाण्याचे मिश्रण, खळ. ३ [*अगण*] (विशेषतः सामासिक शब्दांत) पावावर लावायचे मांस किंवा मासे यांचे मिश्रण, चटणी : *fish ~, माशाची चटणी.* **paste** *क्रि* [*सक*] खळीने चिकटवणे.

pastel /'पॅस्ट्ल्; *अमे* पॅ'स्टेल्/ *वि* रंगाने फिका आणि न खुपणारा. **pastel** *ना* [*गण*] (क) रंगीत खडूची कांडी, रंगशलाका. (ख) रंगीत खडूने काढलेले चित्र.

pasteurize /'पास्चराइझ्; *अमे* 'पॅस्-/ *क्रि* [*सक*] जंतुरहित करण्यासाठी (दूध वगैरे) तापवणे.

pastille /'पॅस्टिल्; *अमे* पॅ'स्टील्/ *ना* [*गण*] खास करून आलेल्या घशावर उपाय म्हणून चोखायची औषधी गोड गोळी.

pastime /'पास्टाइम्; *अमे* 'पॅस्-/ *ना* [*गण*] वेळ घालवण्यासाठी केलेली करमणूक, विरंगुळा, टाइमपास.

pastor /'पास्ट(र्); *अमे* 'पॅस्-/ *ना* [*गण*] चर्चची देखरेख करणारा ख्रिस्ती धर्मगुरू, पांढरीचा पालक.

pastoral /'पास्टरल्; *अमे* 'पॅस्-/ *वि* १ ख्रिस्ती पालक-धर्मगुरूच्या कामाचा. २ अनागरी / खेड्यापाड्यातील / ग्रामीण (शांत) जीवनाचा.

pastry /'पेइस्ट्रि/ *ना* (*ब.व* **-ies**) (क) [*अगण*] पीठ, चरबी, मांस यांचे पायसारखे भाजून करावयाच्या पदार्थांसाठीचे मिश्रण. (ख) [*गण*] असे मिश्रण वापरून केलेला एक गोड पदार्थ.

pasture /'पास्च(र्); *अमे* 'पॅस्-/ *ना* [*गण, अगण*] गुरे चारण्याचे कुरण, गायरान.

pasty^{1} /'पेइस्टि/ *वि* (**-ier, -iest**) निस्तेज, फिकट; आजाऱ्यासारखा दिसणारा, रोगट : *a ~ white skin, रोगट पांढुरकी कातडी.*

pasty^{2} /'पॅस्टि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) मांसाचे वगैरे सारण भरलेली पेस्ट्री.

pat^{1} /पॅट्/ *क्रि* (-tt-) [*सक*] (पाठीवर वगैरे) थाप मारणे, थोपटणे. **pat** *ना* [*गण*] १ थाप, चापट. २ लोण्याचा गोळा.

pat^{2} /पॅट्/ *वि* पटकन् आणि सहज दिलेला, तात्काळ दिलेले : *a ~ answer, तात्काळ दिलेले* उत्तर.

patch /पॅच्/ *ना* [*गण*] १ छिद्रावर किंवा खराब झालेल्या जागी बसवायचा तुकडा, ठिगळ. २ एखाद्या पृष्ठभागाचा वेगळा असा दिसणारा भाग, छोटा भाग, कोपरा वगैरे. ३ डोळ्याला दुखापत झाली असता डोळ्यावर बांधायची पट्टी. ४ जमिनीचा तुकडा, ठिके : *a 'cabbage ~, कोबी पिकाचा जमिनीचा तुकडा.* ५ (*वाक्प्र*) **not be a patch on sb/sth** (*अनौप*) दुसऱ्या इतके चांगले नसणे. **patch** *क्रि* [*सक*] १ ठिगळ किंवा जोड लावणे. २ (*क्रिब*) **patch sth up** (क) पटकन् दुरुस्त करणे, डागडुजी करणे. (ख) (भांडण) मिटवणे. **'patchwork** *ना* १ [*अगण*] तुकडे जोडून तयार केलेले कापड. २ [*गण, बहुधा अ.व*] विविध गोष्टी एकत्र करून केलेली नक्षी. **patchy** *वि* (-ier, -iest) गुणवत्तेत असमान, मधूनमधून बरे असणारा.

pâté /'पॅटेइ; *अमे* पा'टेइ/ *ना* [*अगण*] मांस किंवा मासे यांची रबडी.

patent^{1} /'पेइट्न्ट्, तसेच 'पॅटन्ट्; *अमे* 'पॅट्न्ट्/ *वि* स्पष्ट; उघड. **patently** *क्रिवि* स्पष्टपणे, उघडउघड.

patent^{2} /'पॅट्न्ट्, तसेच 'पेइट्न्ट्; *अमे* 'पॅट्न्ट्/ *ना* [*गण*] एखादा नवीन शोध बनवण्याची किंवा विकण्याची अधिकृत विशेषाधिकारपत्रिका, एकस्व. **patent** *वि* एकस्व घेतलेला, एकस्व सुरक्षित. **patent** *क्रि* [*सक*] एखाद्या गोष्टीचे पेटंट किंवा विशेषाधिकारपत्र घेणे. **patent 'leather** *ना* [*अगण*] चकचकीत आणि कडक असे चामडे.

paternal /प'टऽन्ल्/ *वि* १ पित्याचा, पितृवत्. २ वडलांकडून नाते असलेला, पैतृक : *my ~ grandfather, माझे आजोबा – म्हणजे वडलांचे वडील, पितामह.* **paternally** *क्रिवि* पितृवत्.

paternity /प'टऽनटि/ *ना* [*अगण*] पितृत्व.

path /पाथ्; *अमे* पॅथ्/ *ना* [*गण*] (*ब.व* ~s /पाद्झ्; *अमे* पॅद्झ्/) १ (तसेच **'pathway**) पदपथ, पाऊलवाट. २ जाण्याचा मार्ग.

pathetic /प'थेटिक्/ *वि* १ दयनीय, कीव करण्यासारखा : *a ~ sight, करुण दृश्य.* २ (*अनौप*) अपुरा, तुटपुंजा : *a ~ attempt, कसाबसा केलेला प्रयत्न.* **pathetically** /-क्लि/ *क्रिवि* केविलवाणेपणाने, दयनीय.

pathology /प'थॉलजि/ *ना* [*अगण*] रोगचिकित्सा, विकारविज्ञान, रोगनिदानशास्त्र. **pathological** /,पॅथ'लॉजिक्ल्/ *वि* १ विकारवैज्ञानिक. २ मनोविकृतिजन्य, मनोविकृतीचा. ३ (*अनौप*) धरबंध नसलेला. **pathologist** *ना* [*गण*] विकृतिशास्त्रज्ञ.

pathos /'पेइथॉस्/ *ना* [*अगण*] (*औप*) दया किंवा दुःख निर्माण करणारा गुण, कारुण्य, करुण रस.

patience /'पेइश्न्स्/ *ना* [*अगण*] १ तक्रार न करता उशीर, त्रास वगैरे सहन करण्याची क्षमता, सहनशक्ती, सहनशीलता, सोशिकपणा. २ शांतपणे वाट बघण्याची क्षमता, धीर, सबुरी. ३ एकट्याने खेळायचा पत्त्याचा एक डाव.

patient^{1} /'पेइश्न्ट्/ *वि* सहनशील; धीराचा. **patiently** *क्रिवि* सोशिकपणे, तक्रार न करता; सबुरीने.

patient^{2} /'पेइश्न्ट्/ *ना* [*गण*] रोगी, रुग्ण, दुखणेकरी.

patio /'पॅटिअउ/ *ना* [*गण*] (*ब.व* ~s) घराबाहेर बसून खाण्यापिण्याचे अंगण, बाहेरची मोकळी जागा, फरसबंदी.

patriarch /'पेइट्रिआक्; *अमे* 'पॅट्-/ *ना* [*गण*] १ टोळीचा किंवा कुटुंबाचा प्रमुख पुरुष, कुलपिता. २ **Patriarch** (पौर्वात्य चर्चमधे) उच्चश्रेणीचा बिशप. **patriarchal** /,पेइट्रि'आक्ल्; *अमे* ,पॅट्-/ *वि* पितृसत्ताक.

patriot /'पॅट्रिअट्; *अमे* 'पेइट्-/ *ना* [*गण*] राष्ट्राभिमानी व्यक्ती, देशभक्त. **patriotic** /,पॅट्रि'ऑटिक्; *अमे* 'पेइट्-/ *वि* देशभक्तीचा, राष्ट्राभिमानी. **patriotically** /-क्लि/ *क्रिवि* देशभक्तीने. **patriotism** *ना* [*अगण*] राष्ट्राभिमान, देशभक्ती.

patrol /प'ट्रउल्/ *क्रि* (-ll-) [*अक, सक*] गस्त घालणे, पहारा करणे. **patrol** *ना* १ [*अगण*] गस्त : *soldiers on ~, गस्तीवरचे सैनिक.* २

[*गण*] गस्त घालणारा माणूस किंवा गट.

patron /'पेइट्रन्/ *ना* [*गण*] १ एखाद्याला किंवा एखाद्या कार्याला पैशाची किंवा इतर मदत करणारी व्यक्ती, आश्रयदाता, पोशिंदा : *a wealthy ~ of the arts, कलांचा श्रीमंत आश्रयदाता.* २ (*औप*) दुकानाचे वगैरे नेहमीचे आश्रयदाते गिऱ्हाईक. **patronage** /'पॅट्रनिज्; *अमे* 'पेइट्-/ *ना* [*अगण*] १ आश्रय, छत्र : *her ~age of the arts, कलांना तिचा असलेला आश्रय* ○ *his ~age of the shop, त्याचा दुकानाला असलेला आश्रय.* २ एखाद्या महत्त्वाच्या नोकरीवर माणूस नेमण्याचा अधिकार, हातातली नेमणूक. **,patron 'saint** *ना* [*गण*] विशिष्ट लोकांचे किंवा क्षेत्राचे रक्षण करणारा संत.

patronize /'पॅट्रनाइझ्; *अमे* 'पेइट्र-/ *क्रि* [*सक*] १ एखाद्याला तो दुय्यम आहे असे वागवणे. २ (*औप*) नियमित गिऱ्हाईक असणे. **patronizing** *वि* आश्रय देणारा, आधार देणारा असा.

patter^1 /'पॅट(र्)/ *क्रि* [*अक*] *ना* [*ए.व*] झपझप पावले टाकणे, फडफडणे, झडझडणे.

patter^2 /'पॅट(र्)/ *ना* [*अगण*] विक्रेत्यांची किंवा करमणूक करणाऱ्यांची वगैरे बडबड, वटवट.

pattern /'पॅटन्/ *ना* [*गण*] १ नक्षीसाठी विविध रेषा किंवा आकार यांची नियमितपणे केलेली रचना, आकृतिबंध, संरचना. २ साचा, एखादी गोष्ट घडण्याची किंवा एखादी गोष्ट ठेवल्याची तऱ्हा : *the usual ~ of events, घटनांचा नेहमीचा साचा.* ३ एखादी गोष्ट करण्याचा नमुना, आराखडा किंवा सूचना : *a knitting ~, नमुना विणकाम.* **pattern** *क्रि* [*सक*] *on*// (बहुधा कर्मणी) एखाद्याचा नमुना म्हणून वापर करणे, बेतणे : *The tax system is ~ed on the one used in Sweden, स्वीडनमधल्या करपद्धतीवर ही करपद्धती बेतलेली आहे.* **patterned** *वि* नक्षीदार, डिझाइनचा.

paucity /'पॉऽसटि/ *ना* [*ए.व*] (*औप*) अल्पत्व; चणचण, टंचाई.

paunch /पॉऽन्च्/ *ना* [*गण*] ढेरी.

pauper /'पॉप(र्)/ *ना* [*गण*] दरिद्री माणूस, कफल्लक माणूस, कंगाल, भिकारी.

pause /पॉऽझ्/ *ना* [*गण*] कृती किंवा बोलण्यातला मधला विराम, खंड : *a ~ in the conversation, संभाषणातला खंड.* **pause** *क्रि* [*अक*] थांबणे, विराम घेणे : *He ~ed a minute before finishing his speech, भाषण संपविण्यापूर्वी तो मिनिटभर थांबला.*

pave /पेइव्ह्/ *क्रि* १ [*सक*] खडी किंवा विटा टाकून वाट करणे, फरसबंदी करणे. २ (*वाक्प्र*) **,pave the 'way (for sth)** एखादी गोष्ट घडण्यासारखी परिस्थिती निर्माण करणे. **'paving stone** *ना* [*गण*] फरशीचा दगड.

pavement /'पेइव्ह्मन्ट्/ *ना* [*गण*] रस्त्याच्या कडेने पायी चालणाऱ्यांसाठी केलेला फरसबंदी रस्ता, पट्टकीय.

pavilion /प'व्हिलिअन्/ *ना* [*गण*] १ (*ब्रि*) खेळाच्या मैदानावरील खेळाडू आणि प्रेक्षकांसाठी असलेली इमारत, प्रकक्ष. २ प्रदर्शनासाठी उभारलेला तात्पुरता मोठा तंबू, शामियाना.

paw /पॉऽ/ *ना* [*गण*] प्राण्याचा नख्या असलेला पंजा. **paw** *क्रि* १ [*अक, सक*] (*at*)// (प्राण्यांबाबत) पंजाने चाचपणे किंवा ओरखडा काढणे. २ [*सक*] (माणसांबाबत) कसेही हाताळणे, झटापटीने हाताळणे.

pawn^1 /पॉऽन्/ *ना* [*गण*] १ बुद्धिबळातले प्यादे. २ (*ला*) कामासाठी वापर करायचा माणूस, खेळणे.

pawn^2 /पॉऽन्/ *क्रि* [*सक*] गहाण टाकणे. **'pawn-broker** *ना* [*गण*] चीजवस्तू स्वतःजवळ ठेवून त्याबद्दल पैसे देणारा आणि पैसे परत न केल्यास ठेवलेल्या चीजवस्तू विकून टाकणारा माणूस.

pay^1 /पेइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **paid** /पेइड्/) १ [*अक, सक*] पगार देणे, कामाच्या बदल्यात पैसे देणे, दाम देणे : *I paid him for the bread, मी त्याला ब्रेडचे पैसे दिले.* २ [*सक*] पैसे देणे, देय रक्कम देणे : *~ the rent, भाडे देणे.* ३ [*अक, सक*] चांगला परिणाम होणे; फायद्याचे असणे, फायदा होणे : *It ~s to be honest, प्रामाणिक असण्याचा फायदा होतो.* ४ [*सक*] देणे : *~ attention to sth, एखाद्या गोष्टीकडे लक्ष देणे* ○ *~ a visit, भेट देणे.* ५

(*वाक्प्र*) **pay lip-service to sth** ➪ LIP. **pay through the 'nose (for sth)** एखाद्या गोष्टीसाठी जादा पैसे द्यावे लागणे, महागात घेणे. **pay one's way** स्वतःचा खर्च स्वतः करणे. **put 'paid to sth** एखादी गोष्ट नष्ट करणे, नाश करणे. ६ (*क्रिब*) **pay sb back (sth)** एखाद्याचे उसने घेतलेले पैसे त्याला परत करणे, उसने फेडणे. **pay sb back (for sth)** एखाद्याला अद्दल घडवणे, जशास तसे करणे. **pay for sth** एखाद्या गोष्टीबाबत शिक्षा होणे, भरपाई करावी लागणे, एखाद्या गोष्टीबाबत भोगायला लागणे. **pay off** (*अनौप*) यशस्वी होणे. **pay sb off** (क) पैसे चुकते करून कामावरून काढून टाकणे. (ख) (*अनौप*) एखादी गोष्ट करू नये यासाठी त्याला पैसे देणे. **pay sth off** (देय असलेले) सर्व पैसे देऊन टाकणे, किंमत चुकती करणे. **pay sth out** (क) पैशाची मोठी रक्कम देणे, मोठा खर्च करणे. (ख) (दोरी) हळूहळू हातातून सोडणे, उलगडणे. **pay up** देणे असलेले सर्व पैसे देणे. **,paid-'up** *वि* क्लब, राजकीय पक्ष वगैरेची वर्गणी दिलेला/भरलेला. **payable** *वि* देय. **payee** /पेइ'ई/ *ना* [*गण*] ज्याला पैसे द्यायचे तो, आदाता. **payer** *ना* [*गण*] जो पैसे देतो तो. **payment** *ना* १ [*अगण*] देणे. २ [*गण*] देय रक्कम, दिलेली रक्कम. **'pay-off** *ना* [*गण*] (*अनौप*) १ एखाद्याने एखादी गोष्ट न करण्यासाठी वगैरे त्याला पैसे देण्याची कृती. २ परिणाम किंवा बक्षीस.

pay^2 /पेइ/ *ना* [*अगण*] नियमित कामाकरता दिलेले पैसे, पगार, वेतन. **'payload** *ना* [*गण*] वाहनातून न्यावयाचे एकंदर वजन. **'pay-packet** *ना* [*गण*] पगाराचे पाकीट. **'pay phone** *ना* [*गण*] नाणे टाकून चालू करायचा फोन. **'payroll** *ना* [*गण*] कंपनीच्या पगारदारांची यादी, वेतन-पट.

PE /,पी 'ई/ *संरू* physical education शारीरिक शिक्षण : *a PE lesson at school, शाळेतील शारीरिक शिक्षणाचा तास.*

pea /पी/ *ना* [*गण*] मटार, वाटाणा.

peace /पीस्/ *ना* १ [*अगण*] संघर्षहीनता, युद्धमुक्ती, शांती. २ **the peace** [*अे.व*] हिंसा आणि बेदिली यांचा अभाव, शांतता : *break/ disturb the ~, शांतता भंग करणे.* ३ [*अगण*] कलहसमाप्ती; सौहार्द, मित्रत्व. ४ [*अगण*] मनःशांती; चिंतामुक्ती : *be at ~ with oneself, शांत चित्त असणे.* ५ (*वाक्प्र*) **make one's peace with sb** एखाद्याशी असलेले वितुष्ट संपविणे – विशेषतः क्षमा मागून, शत्रुत्व सोडणे, समेट करणे. **peaceable** *वि* संघर्ष टाळणारा, शांतताप्रिय. **peaceful** *वि* १ युद्धाचा किंवा हिंसेचा नसलेला, शांततापूर्ण. २ शांत; थंड, स्वस्थ. **peacefully** *क्रिवि* शांततेने. **peacefulness** *ना* [*अगण*] शांती. **'peacetime** *ना* [*अगण*] राष्ट्राचा (युद्ध नसल्याचा) शांतीचा काळ.

peach /पीच्/ *ना* [*गण*] पिवळसर लाल रंगाचे मऊ रसाळ असे एक गोल फळ, सत्पाळूचे फळ. **peach** *वि* पिवळसर तांबुस रंग.

peacock /'पीकॉक्/ *ना* [*गण*] निळी आणि हिरवी शेपटीची पिसे असणारा मोठा नर पक्षी, मोर, मयूर.

peahen /'पीहेन्/ *ना* [*गण*] मयूरी, लांडोर.

peak /पीक्/ *ना* [*गण*] १ पर्वतशिखर, शृंग. २ उच्च बिंदू, उच्च स्तर : *Sales reached a new ~ in May, मेमधे विक्रीने नवीन उच्चांक गाठला.* ३ टोपीचे पुढचे निमुळते टोक. **peak** *वि* उच्चांक असणारा; ऐन धामधुमीचा : *~ hours, ऐन धामधुमीच्या वेळी.* **peak** *क्रि* [*अक*] शिखर गाठणे. **peaked** *वि* टोकदार (टोपी वगैरे).

peal /पील्/ *ना* [*गण*] १ मोठ्याने होणारा घंटानाद. २ आवाजाचा कल्लोळ, मोठा घोण, गडगडाट : *~s of laughter/thunder, हास्यकल्लोळ/विजांचा गडगडाट.* **peal** *क्रि* [*अक*] (घंटांबाबत) मोठ्याने वाजणे.

peanut /'पीनट्/ *ना* १ [*गण*] जमिनीखाली वाढणारे पातळ कवचाचे दृढफळ, भुईमूग, शेंग. २ **peanuts** [*ब.व*] (*व्रात्य*) अत्यल्प पैसे, टिकल्या.

pear /पेअ(र्)/ *ना* [*गण*] देठाकडे अरुंद असणारे एक गोड रसाळ फळ, नासपती.

pearl /पऽल्/ *ना* [*गण*] कालवात वाढणारा छोटा, गोल, टणक, रुपेरी खडा, मोती.

peasant /'पेजन्ट्/ *ना* [*गण*] १ (काही देशांत) शेतकरी, किसान. २ (*अनौप अधिक्षेपी*) खेडवळ, गावंढळ माणूस, अडाणी. **peasant-**

ry *ना* [*अ.व*] (अ.व किंवा ब.व क्रियापदासह) शेतकरी वर्ग, रयत.

peat /पीट्/ *ना* [*अगण*] बागकामात किंवा इंधन म्हणून वापरला जाणारा असा कुजलेला पालापाचोळा, जीर्णक. **peaty** *वि* कुजलेल्या पालापाचोळ्याने युक्त.

pebble /'पेब्ल्/ *ना* [*गण*] पाण्यानी गोल आणि गुळगुळीत झालेला छोटा दगड, गोटी, कंकर. **pebbly** *वि* दगडगोट्यांचा, लहान लहान गोटे असलेला.

peck /पेक्/ *क्रि* १ [*अक, सक*] (पक्ष्याबाबत) चोच मारणे, चोचीने टिपणे, टोची मारणे. २ [*सक*] (*अनौप*) पटकन् हलकेसे चुंबन घेणे, पापा घेणे. **peck** *ना* [*गण*] १ मारलेली टोच. २ (*अनौप*) पटकन् घेतलेले हलकेसे चुंबन, पापा.

peckish /'पेकिश्/ *वि* (*अनौप*) थोडीशी भूक लागलेला.

peculiar /पि'क्यूलिअ(र्)/ *वि* १ विचित्र, विलक्षण. २ (*अनौप*) बरे नसलेला. ३ (*to*)// व्यक्ती, काळ, देश वगैरेचा विशिष्ट असा : *an accent ~ to the West of the country, देशाच्या पश्चिम भागातील लोकांचा विशिष्ट असा आघात.* **peculiarity** /पि,क्यूलि'ॲरटि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*गण*] विचित्र किंवा असाधारण असा गुण, सवय वगैरे, वैशिष्ट्य, विशेष. २ [*गण*] देशकालव्यक्तिविशेष असे काही, खासियत. ३ [*अगण*] विशेषत्व, विलक्षणपणा. **peculiarly** *क्रिवि* १ विचित्रपणे. २ खास करून, विशेषत्वे.

pedagogue (*अमे* **-gog**) /'पेडगॉग्/ *ना* [*गण*] १ (*पुरा* किंवा *औप*) शिक्षक, गुरुजी. २ (*अधिक्षेपी*) पंतोजी. **pedagogy** /'पेडगॉजि/ *ना* [*अगण*] (*औप*) अध्यापनशास्त्र. **pedagogic** /,पेड'गॉजिक्/ (तसेच **pedagogical** /-इक्ल्/) *वि* अध्यापनशास्त्राचा. **pedagogically** /-क्लि/ *क्रिवि* अध्यापनशास्त्रदृष्ट्या.

pedal /'पेड्ल्/ *ना* [*गण*] पाय मारून सायकलसारखे यंत्र चालवायची तरफ, पायटा, पायपट्टी. **pedal** *क्रि* (**-ll-**; *अमे* तसेच **-l-**) [*अक, सक*] पायटा वापरणे; पायटा मारून चालवणे.

pedant /'पेड्न्ट्/ *ना* [*गण*] (*अधिक्षेपी*) बारीकसारीक तपशिलावर आणि नियमांवर फाजील भर देणारा, पांडित्य मिरवणारा. **pedantic** /पि'डॅन्टिक्/ *वि* पांडित्यपूर्ण, पांडित्यप्रदर्शनयुक्त. **pedantically** /-क्लि/ *क्रिवि* पांडित्यपूर्ण रीतीने, पांडित्याचे प्रदर्शन करत.

peddle /'पेड्ल्/ *क्रि* [*अक, सक*] दारोदार जाऊन विकणे, फेरीवाल्याचा धंदा करणे. **peddler** *ना* [*गण*] १ (*अमे*) = PEDLAR. २ कायद्याने बंदी असलेले अमली पदार्थ विकणारा माणूस.

pedestal /'पेडिस्ट्ल्/ *ना* [*गण*] १ खांबाचा उथळा किंवा बैठक, पुतळ्याची बैठक, पादपीठ. २ (*वाक्प्र*) **put sb on a 'pedestal** एखाद्याची वारेमाप स्तुती करणे, एखाद्याचे दोष न पाहता त्याची पूजा करणे.

pedestrian /पि'डेस्ट्रिअन्/ *ना* [*गण*] पादचारी. **pedestrian** *वि* १ अनाकर्षक; सामान्य, भिकार. २ पादचाऱ्यांसाठीचा. **pe,destrian 'crossing** *ना* [*गण*] पायी चालणाऱ्यांसाठी रस्ता ओलांडायची पट्टी, पादचारी-ओलांडणी.

pediatrics (*अमे*) = PAEDIATRICS.

pedigree /'पेडिग्री/ *ना* (**क**) [*गण*] वंशावळ, कुळी – माणसाची किंवा प्राण्याची. (**ख**) [*अगण*] वंशावळ किंवा कुळ असण्याचा गुण, जातकुळवाला. **pedigree** *वि* (प्राण्याबाबत) विशिष्ट जातकुळीचा.

pedlar /'पेड्ल(र्)/ *ना* [*गण*] दारोदारी जाऊन माल विकणारा, फेरीवाला.

pee /पी/ *क्रि* [*अक*] (*व्रात्य*) शू करणे, लघवी करणे. **pee** *ना* (*व्रात्य*) १ [*अगण*] लघवी, शू. २ [*अ.व*] शू करणे.

peek /पीक्/ *क्रि* [*अक*] *ना* [*गण*] (*at*)// चोरटी नजर (टाकणे).

peel /पील्/ *क्रि* १ [*सक*] (फळांची किंवा भाज्यांची) साले काढणे : *~ the potatoes, बटाट्यांची साले काढणे.* २ [*अक*] छिलके उडणे, पोपडे निघणे : *The paint is ~ing, रंगाच्या खपल्या निघतायत्.* ३ (*क्रिव*) **peel (sth) off** (*अनौप*) (अंगातून कपडा) काढणे. **peel** *ना* [*अगण*] फळांची वगैरे साले : *lemon ~, लिंबाची साले.*

peep^1 /पीप्/ *क्रि* [*अक*] *ना* [*अे.व*] (*at*)// पटकन् – बऱ्याचदा लपून – पाहणे, डोकावणे, हळूच पाहणे.

peep^2 /पीप्/ *ना* १ [*गण*] छोटासा पण कर्कश आवाज, पिप्. २ [*अे.व*] (*अनौप*) एखाद्याने केलेला, विशेषतः बडबडीचा, आवाज.

peer^1 /पिअ(र्)/ *ना* [*गण*] १ (ब्रिटनमधे) उमराव, अमीर : *Dukes and Earls are ~s, ड्यूक आणि अर्ल हे उमराव होत.* २ [बहुधा *ब.व*] समवयस्क आणि समविचारी व्यक्ती, बरोबरीचा माणूस. **peerage** *ना* १ **the peerage** [*अे.व*] उमराव, सरदार मंडळी. २ [*गण*] उमराव श्रेणी. **peeress** *ना* [*गण*] १ सरदारीण, उमरावीण. २ उमरावाची बायको. **'peer group** *ना* [*गण*] बरोबरीच्या लोकांचा गट, समवयस्क आणि समविचारी गट.

peer^2 /पिअ(र्)/ *क्रि* [*अक*] (*at*)// निरखून पाहणे, न्याहाळणे.

peeved /पीव्ह्ड्/ *वि* (*अनौप*) चिडलेला, वैतागलेला, त्रासलेला. **peevish** /'पीव्हिश्/ *वि* चिडखोर, चिडचिड्या स्वभावाचा. **peevishly** *क्रिवि* चिडचिडीने, चिडखोरपणे.

peg /पेग्/ *ना* [*गण*] १ खुंटी, मेख. २ = CLOTHES-PEG (CLOTHES). **peg** *क्रि* (**-gg-**) १ [*सक*] खुंट्या मारून घट्ट करणे. २ [*सक*] (बहुधा कर्मणी) विशिष्ट पातळीवर ठेवणे, स्थिर करणे : *Pay increases have been ~ged at five per cent, पाच टक्क्यावर पगार वाढ पक्की केली आहे.* ३ (*क्रिब*) **peg out** (*अनौप*) मरणे.

pejorative /पि'जॉरटिव्ह्; *अमे* -'जॉऽर्-/ *वि* (*औप*) टीकात्मक, निंदात्मक, निंदानालस्ती करणारा.

Pekinese /ˌपीकि'नीझ्/ *ना* [*गण*] आखूड पायांचे, लांब रेशमी केसांचे एक छोटे कुत्रे.

pelican /'पेलिकन्/ *ना* [*गण*] लांब चोचीत मासे पकडून ठेवणारा एक पाणपक्षी, पाणकोळी. **ˌpelican 'crossing** *ना* [*गण*] (ब्रिटनमधे) रस्ता ओलांडण्यासाठी बटण दाबून वाहतुकीच्या दिव्यांच्या साहाय्याने वाहतूक थांबवण्याची सोय असलेली पादचाऱ्यांसाठीची जागा.

pellet /'पेलिट्/ *ना* [*गण*] १ कागद, मेण यांसारख्या मऊ पदार्थांची घट्ट गोळी, गुलिका. २ बंदुकीची गोळी.

pelmet /'पेल्मिट्/ *ना* [*गण*] खिडकी, दारे यांच्या पडद्यांची दांडी झाकण्यासाठी त्यापुढे बसवलेली लाकडाची किंवा कापडाची पट्टी.

pelt^1 /पेल्ट्/ *क्रि* १ [*सक*] (*with*)// वस्तू फेकून मारणे. २ [*अक*] (*down*)// (पावसाबाबत) जोराने पडणे, बरसणे, सडकून पडणे. (*वाक्प्र*) **(at) full pelt** ➪ FULL.

pelt^2 /पेल्ट्/ *ना* [*गण*] लोकर असलेले चामडे.

pelvis /'पेल्व्हिस्/ *ना* [*गण*] (*शरीरशास्त्र*) कमरेखालचा, हाडांनी आलेला शरीराचा खोलगट आकार, कटिर, श्रेणी, ओटीपोट. **pelvic** /-व्हिक्/ *वि* ओटीपोटाचा.

pen^1 /पेन्/ *ना* [*गण*] लेखणी, कलम, टाक. **pen** *क्रि* (**-nn-**) [*सक*] (*औप*) (पत्र वगैरे) लिहिणे, लेखन करणे, लेखणीतून उतरविणे. **'pen-friend** *ना* [*गण*] प्रत्यक्ष भेट नसतानाही केवळ पत्रव्यवहाराद्वारे परदेशात झालेला मित्र, पत्रमित्र. **'penknife** *ना* [*गण*] (*ब.व* **-knives**) पाती बंद करण्याचा छोटासा चाकू. **'pen-name** *ना* [*गण*] एखाद्या लेखकाने आपल्या खऱ्या नावाऐवजी वापरलेले नाव, टोपण नाव.

pen^2 /पेन्/ *ना* [*गण*] शेतीची गुरेढोरे ठेवण्याचा गोठा, मेंढवाडा वगैरे. **pen** *क्रि* (**-nn-**) [*सक*] (*up/in*)// गोठ्यात बांधणे किंवा असे बांधल्यासारखे ठेवणे, कोंडवाड्यात ठेवणे.

penal /'पीन्ल्/ *वि* गुन्हेगाराच्या दंडविषयक, शिक्षेबाबतचा : *reform of the ~ system, दंडपद्धतीतील सुधारणा.*

penalize /'पीनलाइझ्/ *क्रि* [*सक*] (बहुधा कर्मणी) १ कायदा मोडल्याबद्दल दंड करणे, शिक्षा करणे. २ एखाद्याला शिक्षा करणे. एखाद्याचा तोटा करणे.

penalty /'पेन्ल्टि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) १ गैरकृत्याची शिक्षा, दंड : *the death ~, मृत्युदंड.* २ (*क्रीडा*) नियम मोडल्याबद्दल खेळाडू किंवा संघाला दिलेली अल्प-शिक्षा, तोटा. ३ एखाद्या कृतीबाबतची किंवा परिस्थितीबाबतची शिक्षा किंवा त्याचा परिणामतः होणारा तोटा. **'penalty kick** *ना* [*गण*] (फुटबॉलबाबत) विरुद्ध संघाला गोलाकडे विनाप्रतिबंध चेंडू मारण्याची मिळालेली संधी.

penance /'पेनन्स्/ *ना* [*अगण, गण*] स्वतःच्या दुष्कृत्याबाबत स्वतःला करून घेतलेली शिक्षा, प्रायश्चित्त.

pence PENNY चे *ब.व.*

penchant /'पॉन्शॉन्; *अमे* 'पेन्चन्ट्/ *ना* [*अे.व*] *for*// (*औप*) एखाद्या गोष्टीची आवड, गोडी, अभिरुची.

pencil /'पेन्स्ल्/ *ना* [*गण*] लिहायला किंवा चित्र काढायला वापरायचे आत ग्रॅफाइटची पातळ काडी असलेले साधन, शिसपेन, पेन्सिल. **pencil** *क्रि* (-**ll**-; *अमे* -**l**-) १ [*सक*] शिसपेनने लिहिणे किंवा काढणे. २ (*क्रिब*) **pencil sth in** आत्तापुरता/तात्पुरता समावेश करणे – मागून काढता येईल असा, पेन्सिलीने कच्चे लिहून ठेवणे.

pendant /'पेन्डन्ट्/ *ना* [*गण*] साखळीतले पदक, दागिन्यातला लोंबणारा झुबका.

pending /'पेन्डिङ्/ *वि* (*औप*) १ अजून निर्णय न घेतलेला, भिजत राहिलेला, लोंबकळत राहिलेला. २ येणारा, होऊ घातलेला. **pending** *शब्दयो* (*औप*) तोपर्यंत, तिथवर.

pendulum /'पेन्ड्युलम्; *अमे* -जुलम्/ *ना* [*गण*] विशेषतः घड्याळात झोके घेऊ शकणारे टांगलेले वजन, घड्याळाचा लंबक.

penetrate /'पेनिट्रेइट्/ *क्रि* १ [*अक, सक*] एखाद्या गोष्टीतून आरपार जाणे, भेदून बाहेर येणे : *The snow ~d the hole in his shoe, त्याच्या बुटाच्या भोकातून हिम घुसून आत आले.* २ [*सक*] (*ला*) भेदून खरे रूप ओळखणे किंवा पाहणे : ~ *the disguise, वेषांतरातून बरोबर हेरणे किंवा ओळखणे.* **penetrating** *वि* १ (आवाजाबाबत) मोठा आणि स्पष्ट, तीक्ष्ण, घुसणारा. २ मर्मभेदी. **penetration** /,पेनि'ट्रेइश्न्/ *ना* [*अगण*] भेद, घुसणे; मर्मभेदक दृष्टी.

penguin /'पेङ्ग्विन्/ *ना* [*गण*] अंटार्टिका समुद्रातला काळ्या-पांढऱ्या रंगाचा आणि पोहण्यासाठी पंखासारखे अवयव असणारा सागरी पक्षी.

penicillin /,पेनि'सिलिन्/ *ना* [*अगण*] एक प्रतिजैविक औषध.

peninsula /प'निन्स्युल; *अमे* -न्सल/ *ना* [*गण*] पाण्याने जवळजवळ वेढलेला भूभाग, द्वीपकल्प. **peninsular** *वि* द्वीपकल्पीय.

penis /'पीनिस्/ *ना* [*गण*] पुरुषाचे लिंग, शिश्न.

penitent /'पेनिटन्ट्/ *वि* केलेल्या अपराधाबाबत दुःख होणारा, पश्चात्तापी, अनुतापयुक्त. **penitence** /-टन्स्/ *ना* [*अगण*] पश्चात्ताप, अनुताप.

penitentiary /पेनि'टेन्शरि/ *ना* [*गण*] (*ब.व* -**ies**) (*अमे*) तुरुंग, कैदखाना.

pennant /'पेनन्ट्/ *ना* [*गण*] जहाजावर संदेश देण्यासाठी वगैरे वापरायचे लांब टोकदार निशाण.

penniless /'पेनिलिस्/ *वि* निर्धन, कंगाल, दमडी नसलेला.

penny /'पेनि/ *ना* [*गण*] (*ब.व* **pence** /पेन्स्/ किंवा **pennies**) १ (१९७१ पासून) एक पाउंडाचा शंभरावा भाग असणारे ब्रिटिश नाणे. २ (१९७१ पूर्वी) शिलिंगचा बारावा भाग असणारे ब्रिटिश नाणे. ३ (*वाक्प्र*) **the penny (has) dropped** (विशेषतः *ब्रि अनौप*) शेवटी एकदाचा अर्थ समजणे : *I had to explain the problem to him several times, before the ~ dropped, त्याला हजारदा प्रश्न समजवून सांगितल्यावर अखेर एकदाचा उजेड पडला.*

pension^1 /'पेन्श्न्/ *ना* [*गण, अगण*] विशिष्ट वयानंतर एखाद्याला नियमितपणे दिलेले पैसे, निवृत्तिवेतन, वार्धक्य वेतन वगैरे. **pension** *क्रि* (*क्रिब*) **pension sb off** एखाद्याला नोकरीवरून काढून टाकून त्याला निवृत्तिवेतन देणे, निवृत्तिवेतन देऊन घरी बसवणे. **pensionable** *वि* निवृत्ती-वेतन मिळण्याचा हक्क असलेला, निवृत्ती-वेतनार्ह. **pensioner** *ना* [*गण*] निवृत्ती-वेतन घेणारा, निवृत्ती-वेतनधारी.

pension^2 /'पॉन्सिऑन्/ *ना* [*गण*] विशेषतः फ्रान्समधले छोटे खाजगी हॉटेल.

pensive /'पेन्सिव्ह्/ *वि* गहन चिंतन करणारा, विचारमग्न, सचिंत. **pensively** *क्रिवि* चिंतामग्नपणे, सचिंतपणे.

pentagon /'पेन्टगन्; *अमे* -गॉन्/ *ना* १ [*गण*] पाच बाजू आणि पाच कोनांची सपाट आकृती, पंचकोन. २ **the Pentagon**

[*अे.व*] (अे.व किंवा ब.व क्रियापदासह) अमेरिकन संरक्षण खात्याची मुख्य कचेरी. **pentagonal** /पेन्'टॅगन्ल्/ *वि* पंचकोनी.

pentathlon /पेन्'टॅथ्लन्/ *ना* [*गण*] प्रत्येक स्पर्धकाने पाच खेळात भाग घ्यायची मैदानी स्पर्धा, पाचशर्यती क्रीडा.

penthouse /'पेन्ट्हाउस्/ *ना* [*गण*] उंच इमारतीच्या टोकावर बांधलेली सदनिका किंवा घर.

pent up /ˌपेन्ट् 'अप्/ *वि* (भावनांबाबत) व्यक्त न केलेल्या, कोंडलेल्या : *~ anger, कोंडलेला राग.*

penultimate /पेन्'अल्टिमट्/ *वि* शेवटून दुसरा, उपान्त्य.

penury /'पेन्युरि/ *ना* [*अगण*] (*औप*) कमालीचे दारिद्र्य, विपन्नावस्था. **penurious** /पि'न्युरिअस्; *अमे* -'नुर्/ *वि* विपन्नावस्थेतील.

people /'पीप्ल्/ *ना* १ [*ब.व*] लोक, जन : *How many ~ were at the party? पार्टीला किती लोक होते?* २ [*गण*] राष्ट्र; वंश : *the ~s of Asia, आशिया खंडातील राष्ट्रे.* ३ [*ब.व*] एखाद्या ठिकाणी राहणारे लोक, रहिवासी : *the ~ of London, लंडनचे रहिवासी.* ४ **the people** [*ब.व*] सर्वसामान्य लोक, जनता. **people** *क्रि* [*सक*] लोकांनी भरणे, गजबजणे, माणसांनी फुलणे.

pep /पेप्/ *ना* [*अगण*] (*अनौप*) शक्ती, उत्साह; जिवंतपणा. **pep** *क्रि* (**-pp-**) (*क्रिब*) **pep sb/sth up** (*अनौप*) एखाद्याला उत्तेजन देणे, तकवा आणणे, जिवंतपणा आणणे. **'pep pill** *ना* [*गण*] अंगात जोम आणणारी गोळी, उत्साहवर्धक गोळी. **'pep talk** *ना* [*गण*] अधिक काम करावेसे वाटायला लावणारे किंवा जिंकण्याची उर्मी जागवणारे भाषण, उत्साह आणणारे भाषण.

pepper /'पेप(र्)/ *ना* १ [*अगण*] काही झाडांच्या लहान फळांना वाळवून त्यापासून केलेली आणि स्वादाकरता वापरायची तिखट पूड, मिरे किंवा मिरपूड. २ [*गण*] एक गोल पोकळ भाजी : *green ~s, हिरवी गोलाकार पोकळ वनस्पती.* **pepper** *क्रि* [*सक*] १ अन्नात मिरपूड घालणे. २ (*with*)*//* छोट्या छोट्या गोष्टी मारून भडिमार करणे. **,peppercorn 'rent** *ना* [*गण*] अगदी कमी भाडे, नाममात्र भाडे.

peppermint /'पेपमिन्ट्/ *ना* (**क**) [*अगण*] तीक्ष्ण चवीचे तेल काढण्याचा पुदिना. (**ख**) [*गण*] अशा चवीचा गोड पदार्थ.

per /प(र्); अधिक बलयुक्त रूप पऽ(र्)/ *शब्दयो* दर, प्रत्येक : *£60 ~ day, दर दिवसाला ६० पौंड.* **,per 'annum** /'ॲनम्/ *क्रिवि* दर वर्षी, प्रतिवर्षी, दरसाल. **,per 'cent** *क्रिवि* दर शंभरास, दरशेकडा, टक्के : *a five ~ cent wage increase, मजुरीत पाच टक्के वाढ.* **,per 'se** /ˌपऽ 'सेइ/ *क्रिवि* स्वतः एव, स्वयम्.

perambulator /प'रॅम्ब्युलेइट(र्)/ *ना* [*गण*] (*ब्रि औप*) बाबागाडी.

perceive /प'सीव्ह्/ *क्रि* [*सक*] (*औप*) एखाद्या गोष्टीचे ज्ञान होणे; पाहणे, समजणे, लक्षात येणे.

percentage /प'सेन्टिज्/ *ना* १ [*गण*] दरशेकडा, टक्के. २ (तसेच ब.व क्रियापदासह अे.व) प्रमाण : *pay a ~ of one's earnings in tax, स्वतःच्या कमाईपैकी काही टक्के कर म्हणून देणे.*

perceptible /प'सेप्टबल्/ *वि* (*औप*) दिसेल असा, लक्षात येईल असा, लक्षणीय, दृश्य : *a ~ change in colour, रंगात झालेला दृश्य बदल.* **perceptibly** *क्रिवि* दिसेल अशा रीतीने.

perception /प'सेप्श्न्/ *ना* (*औप*) १ [*अगण*] पाहणे, संवेदना, पाहण्याची क्षमता किंवा संवेदनक्षमता. २ [*गण*] समजण्याची रीत, जाणण्याची पद्धती, ग्रहणक्षमता.

perceptive /प'सेप्टिव्ह्/ *वि* (*औप*) चाणाक्ष, चटकन् समजणारा. **perceptively** *क्रिवि* चाणाक्षपणे.

perch^{1} /पऽच्/ *ना* [*गण*] १ पक्षी बसतो ती जागा – उदाहरणार्थ फांदी, दांडी. २ (*अनौप*) उच्च स्थान, अधिष्ठान, उंच बैठक. **perch** *क्रि* १ [*अक*] (पक्ष्याबाबत) बसणे, विसावणे. २ [*अक*] बसणे – खास करून उंचावर किंवा अरुंद जागी. ३ [*अक, सक*] उच्च किंवा धोक्याच्या जागी असणे किंवा ठेवणे.

perch^{2} /पऽच्/ *ना* [*गण*] (*ब.व* **perch**) गोड्या पाण्यातील खाण्याचा एक मासा.

percolate /'पऽकलेइट्/ *क्रि* १ [*अक, सक*] (पाण्याबाबत) (कॉफीमधून) हळूहळू जाऊ देणे, झरवणे, निचरवणे, गाळणे. २ [*अक*] *through*// (उदा बातम्यांबाबत) हळूहळू पसरणे, कानोकानी होणे. **per'colator** *ना* [*गण*] कुटलेल्या कॉफीच्या बियांतून उकळते पाणी गाळण्याचे पात्र.

percussion /प'कॅश्न्/ *ना* [*अगण*] ढोल वगैरे सारखी वाजवण्याची वाद्ये.

peremptory /प'रेम्प्टरि; *अमे* 'पेरम्प्टॉऽरि/ *वि* (*औप*) हुकमत गाजवणारा, अलंघनीय, अप्रतिवाद्य. **peremptorily** /-ट्रलि; *अमे* -टॉऽरलि/ *क्रिवि* हुकमीपणाने.

perennial /प'रेनिअल्/ *वि* १ खूप काळ चालणारा किंवा सतत असणारा, नित्य, निरंतर. २ पुन्हापुन्हा होणारा, निरंतरचा, कायमचा : *a ~ problem, कायमचा प्रश्न.* ३ (एखाद्या रोपाबाबत) दोन वर्षांहून अधिक काळ टिकलेले, बहुवर्षजीवी. **perennial** *ना* [*गण*] बहुवर्षायू किंवा बारमाही झाड. **perennially** *क्रिवि* सतत.

perfect^{1} /'पऽफिक्ट्/ *वि* १ निर्दोष, बिनचूक; उत्कृष्ट, फार छान : *~ weather, छान हवा.* २ सर्वोत्कृष्ट : *the ~ example, सर्वोत्तम उदाहरण.* ३ सर्व गोष्टी जिथल्या तिथे असलेला; संपूर्ण : *a ~ set of teeth, संपूर्ण दंतपंक्ती.* ४ अचूक, बरोबर : *The dress is a ~ fit, हा पोषाख अगदी (अंगा)बरोबर आहे.* ५ (*अनौप*) पूर्णतया : *a ~ stranger, पूर्णतया अनोळखी व्यक्ती.* ६ (*व्याकरण*) *have* आणि भूतकालवाचक धातुविशेषण असणारे कोणत्याही काळातील क्रियापद रूप उदा *I have eaten, मी खाल्लंय्,* पूर्ण. **perfectly** *क्रिवि* बरोबर किंवा अचूक मार्गाने; पूर्णपणे.

perfect^{2} /प'फेक्ट्/ *क्रि* [*सक*] निर्दोष करणे; परिपूर्ण करणे. **perfectible** *वि* निर्दोष करण्यासारखा, परिपूर्ण होण्यासारखा.

perfection /प'फेक्श्न्/ *ना* [*अगण*] १ निर्दोष करणे. २ बिनचूकपणा, पूर्णत्व : *The part of 'Macbeth' suited him to ~, मॅकबेथची भूमिका त्याला पूर्णपणे साजेशी होती.* **perfectionist** /-शनिस्ट्/ *ना* [*गण*] बिनचुकपणावर, पूर्णत्वावर भर देणारा माणूस, पूर्णतावादी; प्राविण्यवादी.

perfidious /प'फिडिअस्/ *वि* (*औप*) विश्वासघातकी, दगलबाज, बेइमान; कपटी.

perforate /'पऽफरेइट्/ *क्रि* [*सक*] १ भोक पाडणे, छिद्र पाडणे. २ कागद सहजपणे फाडता यावा म्हणून बाजूने छोटी भोकेभोके पाडणे, वेजणे. **perforation** /,पऽफ'रेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] वेजण, छिद्रांची रांग.

perform /प'फॉऽम्/ *क्रि* १ [*सक*] (काम) करणे : *~ a task, एखादी कामगिरी करणे.* २ [*अक, सक*] नाटक करणे, संगीताचा/गाण्याचा कार्यक्रम करणे. ३ [*अक*] दिल्यानुसार चालणे किंवा काम करणे : *This new car ~s well, ही नवी गाडी छान चालते.* **performance** *ना* १ [*अगण*] कृती. २ [*गण*] नाटकाचा, गाण्याचा वगैरे प्रयोग, कार्यक्रम. **performer** *ना* [*गण*] प्रेक्षकांसमोर अभिनय, गायन वगैरे करणारा, कलाकार, प्रयोग करणारा.

perfume /'पऽफ्यूम्; *अमे* पर्'फ्यूम्/ *ना* [*गण, अगण*] सुवासिक अत्तर, तेल वगैरे. **perfume** /प'फ्यूम्/ *क्रि* [*सक*] गंध दरवळणे, सुवास येणे.

perfunctory /प'फङ्क्टरि/ *वि* (*औप*) काळजी न घेता किंवा लक्ष न देता, घाईघाईने केलेला, कसाबसा उरकलेला, वरवरचा, तोंडदेखला. **perfunctorily** /-ट्रलि; *अमे* -टॉऽरलि/ *क्रिवि* वरवर, उपचारापुरते.

perhaps /प'हॅप्स्, तसेच प्रॅप्स्/ *क्रिवि* कदाचित्, असंही असू शकेल की; एखादेवेळेस : *P~ the weather will improve tomorrow, उद्या कदाचित् हवामान सुधारेल.*

peril /'पेरल्/ *ना* (*औप*) १ [*अगण*] मोठा धोका, संकट. २ [*गण*] जोखीम. **perilous** *वि* धोकादायक. **perilously** *क्रिवि* धोकादायक रीतीने.

perimeter /प'रिमिट(र्)/ *ना* [*गण*] एखाद्या आकाराची किंवा विमानतळासारख्या बंदिस्त जागेची बाहेरची कड (किंवा त्याची लांबी), परिमिती.

period /'पिअरिअड्/ *ना* [*गण*] १ कालखंड. २ शाळेतील तास. ३ (स्त्रीची मासिक) पाळी, विटाळ. ४ (विशेषतः *अमे*) पूर्णविरामचिन्ह.

periodic /,पिअरि'ऑडिक्/ *वि* ठराविक काळाने येणारा, आवर्ती. **periodical** /-क्ल्/ *ना* [*गण*] नियतकालिक. **periodically** /-क्लि/ *क्रिवि* ठराविक काळाने, नियतकालाने; मधूनमधून.

peripatetic /,पेरिप'टेटिक्/ *वि* (*औप*) विशेषतः कामासाठी भटकंती करणारा, फिरता, परिगामी.

periphery /प'रिफरि/ *ना* [*गण*] (*ब.व* -ies) (*औप*) परिसर, घेर. **peripheral** /-अल्/ *वि* (*औप*) काठावरचा : (*ला*) ~ *topics, काठावरचे म्हणजे मुख्य नसलेले विषय.*

periscope /'पेरिस्कउप्/ *ना* [*गण*] खास करून पाणबुडीत वापरायचे उंचावरचे पाहण्यासाठीचे आरसे लावून केलेले एक उपकरण, परिदर्शक.

perish /'पेरिश्/ *क्रि* [*अक*] १ (*औप*) नष्ट होणे; मरणे. २ कुजणे, सडणे. **perishable** *वि* (अन्नाबाबत) नाशवंत, लवकर खराब होणारे. **perishables** *ना* [*ब.व*] फार काळ न टिकणारे अन्नपदार्थ, खराब होणारे अन्न. **perishing** *वि* (*अनौप* विशेषतः *ब्रि*) कडक थंडीचा, कडाक्याचा.

perjure /'पऽज(र्)/ *क्रि* ~ **oneself** न्यायालयात खोटे बोलणे, खोटी साक्ष देणे. **perjury** *ना* [*अगण*] खोटी साक्ष.

perk^{1} /पऽक्/ *क्रि* (*क्रिब*) **perk (sb/sth) up** एखाद्याला उल्हसित करणे, आनंदित करणे. **perky** *वि* (-ier, -iest) जिवंत, खेळकर; आत्मविश्वासपूर्ण.

perk^{2} /पऽक्/ *ना* [*गण, बहुधा ब.व*] (*अनौप*) पगाराखेरीज मालकाने दिलेली बक्षिसी (पैसे, वस्तू वगैरे).

perm /पऽम्/ *ना* [*गण*] (*अनौप*) कृत्रिमरीत्या केस कुरळे करणे. **perm** *क्रि* [*सक*] केस कुरळे करणे.

permanent /'पऽमनन्ट्/ *वि* खूप काळ चालणारा, कायम, टिकाऊ, नित्य. **permanence** /-नन्स्/ *ना* [*अगण*] नित्यता, टिकाऊपणा, शाश्वतता. **permanently** *क्रिवि* कायम, नित्य.

permeate /'पऽमिअेइट्/ *क्रि* [*अक, सक*] (*through*) (*औप*) भिनणे, एखाद्या गोष्टीत शिरून सर्वत्र पसरणे. **permeable** /'पऽमिअब्ल्/ *वि* (*औप*) पसरणारा, भिनणारा.

permissible /प'मिसब्ल्/ *वि* (*औप*) परवानगी असलेला, अनुज्ञेय. **permissibly** /-अब्लि/ *क्रिवि* परवानगीने, परवानगी आहे अशा रीतीने.

permission /प'मिश्न्/ *ना* [*अगण*] परवानगी, अनुज्ञा.

permissive /प'मिसिव्ह्/ *वि* वर्तनामधे – विशेषतः लैंगिक संबंधात – मोकळेपणा असलेला, लैंगिक बाबतीत मुक्त असा, मुक्ताचारी : *the ~ society, स्त्री-पुरुष संबंधात मुक्तपणा असणारा समाज.* **permissiveness** *ना* [*अगण*] लैंगिक मुक्तपणा.

permit /प'मिट्/ *क्रि* (-tt-) [*सक*] परवानगी देणे. **permit** /'पऽमिट्/ *ना* [*गण*] एखाद्याला एखादी गोष्ट करायला अधिकृत परवानगी देणारे कागदपत्र, परवाना.

permutation /,पऽम्यू'टेइश्न्/ *ना* [*गण*] (*औप*) वस्तू मांडण्याची रीत, क्रमचय.

pernicious /प'निशस्/ *वि* (*औप*) अपायकारक, घातक.

pernickety /प'निकटि/ *वि* (*अनौप* अनेकदा *अधिक्षेपी*) बॉरीकसारीक गोष्टींची फाजील चिंता करणारा.

perpendicular /,पऽपन्'डिक्युल(र्)/ *वि* १ उभा, सरळ. २ (दुसऱ्या रेषेला किंवा पृष्ठभागाला) ९० अंश कोनात असलेला, काटकोनी. **perpendicular** *ना* [*गण, अगण*] काटकोन करणारी रेषा, लंब, स्तंभ.

perpetrate /'पऽपिट्रेइट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) गुन्हा करणे, अपराध करणे, दुष्कर्म करणे, (पापाचा वगैरे) धनी असणे. **perpetrator** *ना* [*गण*] दुष्कर्म करणारा.

perpetual /प'पेचुअल्/ *वि* १ सततचा, निरंतर. २ पुन्हापुन्हा होणारा, सदोदित होणारा : *their ~ complaints, त्यांच्या सततच्या तक्रारी.* **perpetually** /-चुअलि/ *क्रिवि* कायम; पुन्हापुन्हा.

perpetuate /प'पेचुअेइट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) चालू ठेवणे, चिरायू करणे. **perpetuation** /प,पेचु'अेइश्न्/ *ना* [*अगण*] चिरस्थायीत्व.

perplex /प'प्लेक्स्/ *क्रि* [*सक*] एखाद्याला एखादी गोष्ट समजली नाही म्हणून गोंधळवून टाकणे, पेचात टाकणे : *They were all ~ed by her behaviour, तिच्या वागण्याने ते सर्वच चक्रावून गेले* ○ *a ~ing problem, चक्रावून टाकणारा प्रश्न.*

per se ➪ PER.

persecute /'पऽसिक्यूट्/ *क्रि* [*सक*] एखाद्याच्या राजकीय किंवा धार्मिक तत्त्वांसाठी त्याचा छळ करणे, हालहाल करणे. **persecution** /,पऽसि'क्यूशन्/ *ना* [*गण, अगण*] छळ. **persecutor** *ना* [*गण*] छळ करणारा माणूस, छळवादी.

persevere /,पऽसि'व्हिअ(र्)/ *क्रि* [*अक*] (*in/with*)// अडचणी असताना देखील नेटाने प्रयत्न करणे, चिकाटीने काम करणे : *You need to ~ with your studies if you want to pass your exams, तुला परीक्षेत पास व्हायचे असेल तर तुला नेटाने अभ्यास करायला पाहिजे.* **perseverance** *ना* [*अगण*] चिकाटी, अथक परिश्रम, दीर्घोद्योग.

persist /प'सिस्ट्/ *क्रि* [*अक*] १ (*in/with*)// एखादी गोष्ट निष्ठेने करीत राहणे, चालू ठेवणे : *He will ~ in thinking I don't like him, मला तो आवडत नाही हेच तो मनात वागवीत राहील.* २ टिकून असणे/राहणे : *Fog will ~ in most areas, बऱ्याच प्रदेशात धुके टिकून राहील.* **persistence** *ना* [*अगण*] टिकून राहणे; चिकाटी, हट्ट. **persistent** *वि* सतत चालू असणारा; पुन्हापुन्हा घडणारा : *~ent warnings/attacks, पुन्हापुन्हा दिलेल्या धमक्या/केलेले हल्ले.* **persistently** *क्रिवि* पुन्हापुन्हा; चिकाटीने.

person /'पऽसन्/ *ना* [*गण*] (*ब.व* **people** /'पीप्ल्/ किंवा औपचारिक वापरात **persons**) १ माणूस किंवा बाई, व्यक्ती : *You're just the ~ we need, तुझ्यासारखाच माणूस आम्हाला हवा आहे.* २ (*व्याकरण*) सर्वनामांच्या तीन वर्गांपैकी कोणताही एक वर्ग, पुरुष : *the first ~, प्रथम पुरुष* – म्हणजे मी, आम्ही ○ *the second ~, द्वितीय पुरुष* – म्हणजे तू, तुम्ही ○ *the third ~, तृतीय पुरुष* – म्हणजे तो, ती, ते, ते, त्या, ती. ३ (*वाक्प्र*) **in 'person** प्रत्यक्षात हजर, व्यक्तिशः, एखादा स्वतः : *The actress will be there in ~, ती नटी स्वतः तेथे असणार आहे.*

personable /'पऽसनब्ल्/ *वि* देखणा, गोंडस, रुबाबदार : *a ~ young woman, देखणी तरुण स्त्री.*

personage /'पऽसनिज्/ *ना* [*गण*] (*औप*) महत्त्वाची किंवा प्रसिद्ध व्यक्ती.

personal /'पऽसनल्/ *वि* १ व्यक्तिगत, स्वीय : *~ belongings, व्यक्तिगत मालमत्ता.* २ खाजगी, धंद्यातला असा नव्हे तर स्वतःचा : *receive a ~ phone call at work, कामावर खाजगी फोन येणे.* ३ वैयक्तिक : *~ remarks, वैयक्तिक टीकाटिपणी.* ४ शरीराचा : *~ cleanliness, शारीरिक स्वच्छता.* **personally** /'पऽसनलि/ *क्रिवि* १ व्यक्तिशः : *P~ly, I think you're crazy! तू वेडा आहेस असं मला व्यक्तिशः वाटतं.* २ स्वतः, खुद्द, जातीने, समक्ष. ३ खाजगीरीत्या. **,personal 'pronoun** *ना* [*गण*] (*व्याकरण*) (व्यक्तिवाचक) सर्वनाम – उदा *I, she, you मी, ती, तू* वगैरे.

personality /,पऽस'नॅलटि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*गण, अगण*] व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व : *a strong ~, भारदस्त व्यक्तिमत्त्व.* २ [*गण*] क्रीडा, कला वगैरे क्षेत्रातील ख्यातनाम व्यक्ती : *a television ~, दूरदर्शनवरील प्रसिद्ध कलाकार.*

personify /प'सॉनिफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] १ एखाद्या गोष्टीवर मनुष्यत्वाचा आरोप करणे. २ (गुणाचे) उत्तम उदाहरण असणे, मूर्तिमंत उदाहरण असणे : *She ~ies kindness, ती दयाळूपणाचे मूर्तिमंत उदाहरण आहे.* **personification** /प,सॉनिफि'केइशन्/ *ना* [*अगण, गण*] मानवीकरण; चेतनागुणोक्ती (अलंकार).

personnel /,पऽस'नेल्/ *ना* १ [*ब.व*] संस्थेतील सर्व सेवक, कर्मचारीवर्ग, नोकर मंडळी. २ [*अगण*] सेवकवर्गाचे प्रश्न हाताळणारे संस्था वगैरेतील खाते : *a ~ manager, कर्मचारीखात्याचा व्यवस्थापक किंवा आस्थापना व्यवस्थापक.*

perspective /प'स्पेक्टिव्ह्/ *ना* १ [*अगण*] आकार, अंतर वगैरे यांची जाणीव करून देणारे रेखाटण, यथादर्शनचित्र, त्रिमितिचित्रकला. २

[*गण*] (*ला*) एखाद्या गोष्टीविषयीचा दृष्टीकोन. ३ (*वाक्प्र*) **in perspective** इतर गोष्टींच्या संदर्भात एखाद्या गोष्टीचे महत्त्व समजण्याच्या मार्गाने, योग्य दृष्टिप्रांतात : *get/see one's problems in ~, स्वतःच्या प्रश्नांचा योग्य दृष्टिप्रांतात/संदर्भात विचार करणे.*

Perspex /'पऽस्पेक्स्/ *ना* [*अगण*] (*मालक*) काचेच्या ऐवजी वापरले जाणारे दणकट टिकाऊ प्लॅस्टिक.

perspire /प'स्पाइअ(र्)/ *क्रि* [*अक*] (*औप*) घाम येणे, घाम गाळणे. **perspiration** /,पऽस्प'रेइशन्/ *ना* [*अगण*] घाम, घाम येणे.

persuade /प'स्वेइड्/ *क्रि* [*सक*] १ एखाद्याचे एखाद्या गोष्टीसाठी मन वळवणे, एखाद्याला पटवणे : *They ~d him to try again, त्याने पुन्हा प्रयत्न करण्यासाठी त्यांनी त्याचे मन वळवले.* २ (*औप*) एखाद्याचा एखाद्या गोष्टीवर विश्वास बसवणे; खात्री करून देणे.

persuasion /प'स्वेइझ्न्/ *ना* १ [*अगण*] मन वळवणे. २ [*गण*] धार्मिक किंवा राजकीय श्रद्धा.

persuasive /प'स्वेइसिव्ह्/ *वि* मन वळवू शकणारा, लाघवी : *She can be ~ when she wants, हवं तेव्हा ती खूप लाघवी होऊ शकते.* **persuasively** *क्रिवि* लाघवीपणाने.

pert /पऽट्/ *वि* धिटाईचा, दाणगट; अनादराचा, उद्धट : *a ~ reply, उद्धट उत्तर.* **pertly** *क्रिवि* आगाऊपणे, उद्धटपणे. **pertness** *ना* [*अगण*] दांडगेपणा, धिटाई; उद्धटपणा.

pertain /प'टेइन्/ *क्रि* [*अक*] *to//* (*औप*) एखाद्याचे किंवा एखाद्याशी संबंधित असणे.

pertinent /'पऽटिनन्ट्; *अमे* 'पऽटनन्ट्/ *वि* (*औप*) संबंधित, संबद्ध.

perturb /प'टऽब्/ *क्रि* [*सक*] (*औप*) एखाद्याला अस्वस्थ करणे.

peruse /प'रूझ्/ *क्रि* [*सक*] (*औप*) काळजीपूर्वक वाचणे, परिशीलन करणे. **perusal** *ना* [*गण, अगण*] काळजीपूर्वक वाचन, परिशीलन.

pervade /प'व्हेइड्/ *क्रि* [*सक*] (*औप*) सर्वत्र व्यापणे, पसरणे, ग्रासणे.

pervasive /प'व्हेइसिव्ह्/ *वि* सर्वत्र असणारा किंवा जाणवणारा, सर्वव्यापी, व्यापक.

perverse /प'व्हऽस्/ *वि* १ (माणसाबाबत) मुद्दाम काहीतरी चुकीचे किंवा गैरवाजवी करत राहणारा, हेकेखोर, दुराग्रही. २ (वर्तनाबाबत) विकृत, आडमुठा. **perversely** *क्रिवि* हटवादीपणाने, हेकटपणे, विकृत पद्धतीने. **perversity** *ना* [*अगण*] हेकेखोरपणा, हटवादीपणा, विकृती.

perversion /प'व्हऽश्न्; *अमे* -झ्न्/ *ना* १ [*अगण*] अपलाप, विपर्यास : *the ~ of truth, सत्यापलाप.* २ [*गण, अगण*] लैंगिक विकृती, विकृत भावना.

pervert^1 /प'व्हऽट्/ *क्रि* [*सक*] १ एखाद्या गोष्टीचा योग्य वापर करणे सोडून देणे, वाईटाकडे वळवणे, भलतीकडे नेणे : *~ the course of justice, न्यायाचा मार्ग फिरवणे.* २ एखाद्याला योग्य किंवा नैसर्गिक मार्गापासून – विशेषतः लैंगिक वर्तनात – भलतीकडे नेणे, विकृत वर्तन करायला लावणे.

pervert^2 /'पऽव्हऽट्/ *ना* [*गण*] (विशेषतः लैंगिकदृष्ट्या) विकृत मनुष्य.

pessimism /'पेसिमिझ़म्/ *ना* [*अगण*] काहीतरी वाईट होईल असा विश्वास, निराशावाद. **pessimist** /-मिस्ट्/ *ना* [*गण*] निराशावादी मनुष्य, सदादुःखी. **pessimistic** /,पेसि'मिस्टिक्/ *वि* निराशावादी.

pest /पेस्ट्/ *ना* [*गण*] १ धान्य, झाडे वगैरे यांचा नाश करणारा प्राणी किंवा कीटक, पीडक. २ (*अनौप*) त्रासदायक व्यक्ती – विशेषतः व्रात्य मूल.

pester /'पेस्ट(र्)/ *क्रि* [*सक*] सतत त्रास देणे, पिडणे.

pesticide /'पेस्टिसाइड्/ *ना* [*गण, अगण*] उपद्रवी कीटकांना मारण्याकरता वापरला जाणारा एक रासायनिक पदार्थ, कीटकनाशक औषध.

pestle /'पेस्ल्/ *ना* [*गण*] एखाद्या वाडग्यात काहीतरी कुसकरायला किंवा त्याचे पीठ करायला वापरायचे मुसळ; बत्ता (= MORTAR^2 (२)).

pet /पेट्/ *ना* [*गण*] १ मांजर, कुत्रे यांसारखा सोबती म्हणून पाळलेला प्राणी. २ आवडता माणूस, लाडकी व्यक्ती. **pet** *क्रि* (**-tt-**) १

[*सक*] प्रेमाने कुरवाळणे, थोपटणे. २ [*अक*] एकमेकाला चुंबन देऊन आलिंगन देणे, पापा घेणे. **'pet name** मित्रांनी किंवा कुटुंबाने ठेवलेले लाडके नाव.

petal /'पेटल्/ *ना* [*गण*] फुलाचा पानासारखा एक रंगीत भाग, पाकळी.

peter /'पीट(र्)/ *क्रि* (*क्रिब*) **peter out** हळूहळू संपणे, संपुष्टात येणे.

petition /प'टिश्न्/ *ना* [*गण*] १ शासनाला वगैरे सह्या गोळा करून दिलेला विनंतीअर्ज. २ (*कायदा*) काही कायदेशीर कारवाई केली जावी म्हणून कोर्टाला सादर केलेला विनंतीअर्ज. **petition** *क्रि* [*अक, सक*] (*औप*) रीतसर विनंती करणे.

petrify /'पेट्रिफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* -ied) [*सक*] १ (बहुधा कर्मणी) एखाद्याला भीती घालणे, गर्भगळित करणे. २ [*अक, सक*] दगड बनणे/बनवणे, पाषाणासारखा होणे/करणे.

petrol /'पेट्रल्/ *ना* [*अगण*] पेट्रोलियमपासून बनवलेले द्रव, पेट्रोल – मोटारगाड्यांचे इंधन. **'petrol station** *ना* [*गण*] पेट्रोल आणि गाड्यांचे तेल विकणारे रस्त्यावरील पेट्रोलपंप.

petroleum /प'ट्रउलिअम्/ *ना* [*अगण*] खाणीत सापडणारे अशुद्ध तेल.

petticoat /'पेटिकउट्/ *ना* [*गण*] आतमधे घालायचा स्त्रियांचा एक पातळ झग्यासारखा कपडा.

petty /'पेटि/ *वि* (-ier, -iest) १ क्षुल्लक, फालतू : ~ *details, क्षुल्लक तपशील.* २ क्षुद्र, कमी महत्त्वाचा; कद्रू : ~ *jealousies, क्षुद्र रागद्वेष.* **pettiness** *ना* [*अगण*] क्षुल्लकपणा; क्षुद्रपणा, हलकेपणा. **,petty 'cash** *ना* [*अगण*] बारीकसारीक खर्चासाठी वापरायची कचेरीतील रक्कम, किरकोळ रोकड. **,petty 'officer** *ना* [*गण*] नौदलातील अराजादिष्ट अधिकारी.

petulant /'पेट्युलन्ट्; *अमे* -चु-/ *वि* लहान मुलासारखा चिडखोर, भांडखोर. **petulance** /-लन्स्/ *ना* [*अगण*] चिडखोरपणा. **petulantly** *क्रिवि* चिडखोरपणे.

pew /प्यू/ *ना* [*गण*] चर्चमधील पाठ असलेला लंबुळका बाक.

pewter /'प्यूट(र्)/ *ना* [*अगण*] कथील व शिसे यांचा करड्या रंगाचा मिश्रधातू, कासे.

phallus /'फॅलस्/ *ना* [*गण*] लिंगाची प्रतिमा, लिंग. **phallic** /'फॅलिक्/ *वि* लिंगाचा.

phantom /'फॅन्टम्/ *ना* [*गण*] १ भूत, पिशाच्च. २ काल्पनिक गोष्ट.

pharaoh /'फेअरउ/ *ना* [*गण*] प्राचीन इजिप्तचा राजा.

pharmaceutical /,फाम'स्यूटिक्ल्; *अमे* -'सू/ *वि* औषधे करण्याबाबतचा, औषधनिर्माण-(विद्या)विषयक.

pharmacist /'फामसिस्ट्/ *ना* [*गण*] औषधे बनवून विकण्याचे प्रशिक्षण घेतलेला, औषधव्यापारी, औषधे करून विकणारा.

pharmacy /'फामसि/ *ना* (*ब.व* -ies) १ [*अगण*] औषधनिर्माण(विद्या). २ [*गण*] औषधाचे दुकान (किंवा त्याचा भाग).

phase /फेइझ्/ *ना* [*गण*] १ प्रगतीचा टप्पा, अवस्था. २ विशिष्ट वेळेला चंद्राचा दिसणारा आकार, चंद्राची कला. **phase** *क्रि* १ [*सक*] टप्प्याटप्प्याने प्रगती करणे किंवा योजणे. २ (*क्रिब*) **phase sth in/out** हळूहळू वापर सुरू करणे/बंद करणे.

PhD /,पी एइच् 'डी/ *संरू* Doctor of Philosophy, विद्यावाचस्पती.

pheasant /'फेझ्न्ट्/ *ना* १ [*गण*] लांब शेपटीचा आणि अन्न म्हणून खाल्ला जाणारा एक पक्षी, कुकणपक्षी. २ [*अगण*] त्याचे मांस.

phenomenal /फ'नॉमिन्ल्/ *वि* प्रचंड, मोठा; असामान्य, विलक्षण : ~ *success, विलक्षण यश.* **phenomenally** /-नलि/ *क्रिवि* प्रचंड प्रमाणात; असामान्यपणे : ~*ly successful, विलक्षणपणे यशस्वी.*

phenomenon /फ'नॉमिनन्; *अमे* -नॉन्/ *ना* [*गण*] (*ब.व* -mena /-मिन/) १ अनुभवगम्य किंवा इंद्रियगम्य गोष्ट, दृश्यघटना, निसर्गघटना. २ लक्षणीय किंवा विलक्षण अशी गोष्ट, व्यक्ती वगैरे.

philanthropy /फि'लॅन्थ्रपि/ *ना* [*अगण*] गरजू लोकांना पैशाची किंवा इतर मदत करणे, परोपकार, दुसऱ्याला मदत करणे. **philanthropic** /,फिलन्'थ्रॉपिक्/ *वि* लोकोपकारी. **philanthropist** /फि'लॅन्थ्रपिस्ट्/ *ना* [*गण*]

लोकहितकर्ता, परोपकारी मनुष्य.

philately /फि'लॅटलि/ *ना* [*अगण*] पोस्टाची तिकिटे जमवायचा छंद.

philistine /'फिलिस्टाइन्; *अमे* -स्टीन्/ *ना* [*गण*] अभिजात कला, संगीत यांचा द्वेष करणारा, रसिकत्व नसलेला माणूस, अरसिक.

philosopher /फि'लॉसफ(र्)/ *ना* [*गण*] १ तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणारा किंवा तत्त्वज्ञान शिकवणारा, तत्त्वज्ञानी, तत्त्वचिंतक. २ (*अनौप*) चिंतनशील मनुष्य, पंडित.

philosophy /फि'लॉसफि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] मानवी अस्तित्व, मानवी जीवनाचा आदर्श वगैरेचा वेध घेणारे शास्त्र, तत्त्वज्ञान. २ [*गण*] तत्त्वप्रणाली. **philosophical** /,फिल'सॉफिक्ल्/ *वि* १ तत्त्वज्ञानविषयक, तात्त्विक. २ अपयश, निराशा वगैरेकडे तटस्थपणे पाहणारा, स्थितप्रज्ञ. **philosophically** /-क्लि/ *क्रिवि* तत्त्वज्ञानदृष्ट्या, तात्त्विकदृष्ट्या. **philosophize** /-फाइझ्/ *क्रि* [*अक*] तत्त्वज्ञानी माणसासारखे बोलणे, तत्त्वचिंतन करणे.

phlegm /फ्लेम्/ *ना* [*अगण*] १ नाकात आणि घशात तयार होणारा दाट, अंशतः द्रवरूप पदार्थ, कफ, श्लेष्मा. २ (*जुना अप्रचलित औप*) थंडपणा. **phlegmatic** /फ्लेग्'मॅटिक्/ *वि* (भावनांबाबत) भावना व्यक्त करण्यात थंड; शांत. **phlegmatically** /-क्लि/ *क्रिवि* थंडपणे; शांतपणे.

phobia /'फउबिअ/ *ना* [*गण*] कमालीची भीती किंवा नावड, भयगंड.

phone /फउन्/ *ना* [*गण*], *क्रि* [*अक, सक*] TELEPHONE चा संक्षेप. **'phone book** *ना* [*गण*] ➪ TELEPHONE DIRECTORY (TELEPHONE). **'phone-box** (तसेच **'phone booth**) *ना* [*गण*] = TELEPHONE-BOX (TELEPHONE). **'phone-in** *ना* [*गण*] लोकांनी फोनवरून विचारलेले प्रश्न किंवा दिलेला अभिप्राय प्रसारित करणारा आकाशवाणी किंवा दूरदर्शनवरील कार्यक्रम. **'phone number** = TELEPHONE NUMBER (TELEPHONE).

phonetic /फ'नेटिक्/ *वि* (*भाषाविज्ञान*) मानवी भाषेच्या ध्वनींविषयक, ध्वनिविज्ञानविषयक. **phonetically** /-क्लि/ *क्रिवि* ध्वनिविज्ञानदृष्ट्या. **phonetician** /,फउनि'टिश्न्/ *ना* [*गण*] ध्वनिवैज्ञानिक. **phonetics** *ना* (अे.व क्रियापदासह) ध्वनिविज्ञान, ध्वनिविचार, मानवी भाषेच्या ध्वनींचा अभ्यास करणारे शास्त्र.

phoney (तसेच **phony**) /'फउनि/ *वि* (**-ier, -iest**) (*अनौप अधिक्षेपी*) असत्य, खोटा, बनावट; ढोंगी, दिखाऊ. **phoney** (तसेच **phony**) *ना* [*गण*] खोटे बोलणारा किंवा खोटे बोलणे, बनावट वस्तू किंवा व्यक्ती.

phonology /फ'नॉलजि/ *ना* [*अगण*] (*भाषाविज्ञान*) विशिष्ट भाषेचा ध्वनिविन्यास किंवा ध्वनिव्यवस्था (याचा अभ्यास) : *English ~, इंग्रजीची ध्वनिव्यवस्था.* **phonological** /,फउन'लॉजिक्ल्/ *वि* ध्वनिव्यवस्थेचा.

phosphorescence /,फॉस्फ'रेसन्स्/ *ना* [*अगण*] अंधारात उष्णता निर्माण न करता उजेड पाडणे, अंधारात चकाकणे. **phosphorescent** /-'रेसन्ट्/ *वि* अंधारात चकाकणारा.

phosphorus /'फॉस्फरस्/ *ना* [*अगण*] फिकट पिवळ्या रंगाचे मेणासारखे मऊ अंधारात प्रकाशणारे एक विषारी द्रव्य.

photo /'फउटउ/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s**) (*अनौप*) PHOTOGRAPH चा संक्षेप. **,photo 'finish** *ना* [*गण*] दोन स्पर्धक इतके जवळ असतात की छायाचित्रावरूनच कोण जिंकले हे ठरवावे लागते असा शर्यतीचा शेवट.

photocopy /'फउटकॉपि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) छायाचित्रप्रत. **photocopy** *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) छायाचित्रप्रत काढणे. **photocopier** /-पिअ(र्)/ *ना* [*गण*] कागदपत्रांच्या वगैरे छायाचित्रप्रत काढण्याचे यंत्र.

photogenic /,फउटउ'जेनिक्/ *वि* छायाचित्रात सुरेख दिसणारा.

photograph /'फउटग्राफ्; *अमे* -ग्रॅफ्/ *ना* [*गण*] कॅमेऱ्यातील फिल्मवर प्रकाशाच्या चलनवलनाने उमटलेले चित्र, कॅमेऱ्यातील चित्रफितीवर उमटणारी प्रतिमा, छायाचित्र. **photograph** *क्रि* [*सक*] छायाचित्र घेणे, फोटो काढणे. **photographer** /फ'टॉग्रफ(र्)/ *ना* [*गण*] छायाचित्रकार. **photographic** /,फउट'ग्रॅफिक्/ *वि* छायाचित्रणाचा. **photography** /फ'टॉग्रफि/ *वि* छायाचित्रण

किंवा छायाचित्रणाची कला.

phrasal /'फ्रेइझ्ल्/ *वि* पदबंधात्मक. **,phrasal 'verb** *ना* [*गण*] क्रियापद आणि क्रियाविशेषण किंवा शब्दयोगी मिळून अर्थदृष्ट्या एकच घटक होणारा दोन किंवा अधिक शब्दांचा बंध, क्रियापदबंध: *'Blow up' and 'look forward to' are ~ verbs, 'Blow up' आणि 'look forward to' हे क्रियापदबंध आहेत.*

phrase /फ्रेइझ्/ *ना* [*गण*] १ पदबंध, शब्दसमूह. २ (*व्याकरण*) क्रियापद नसलेला वाक्यांश. **phrase** *क्रि* [*सक*] विशिष्ट रीतीने किंवा शब्दांमधे व्यक्त करणे: *a badly ~d example, नीटपणे शब्दांकित न झालेले उदाहरण.* **'phrase-book** *ना* [*गण*] परभाषेतील सर्वसामान्य उक्ती त्यांच्या भाषांतरासह लिहिलेली वही किंवा पुस्तक.

phraseology /,फ्रेइझि'ऑलजि/ *ना* [*अगण*] शब्दांची निवड, योजना किंवा शैली, शब्दकला.

physical /'फिझिक्ल्/ *वि* १ शारीरिक: *~ exercise, शारीरिक कवायत किंवा व्यायाम* ○ *~ education, शारीरिक शिक्षण – उदा कसरतीचे व्यायाम, मैदानी खेळ वगैरे.* २ स्थूल, भौतिक, इंद्रियगोचर: *the ~ world, भौतिक जग.* ३ निसर्गनियमाचा: *a ~ impossibility, प्राकृतिकदृष्ट्या अशक्य किंवा निसर्गनियमाविरुद्ध असे काही.* ४ सृष्टीच्या स्वाभाविक विशेषांचा, प्राकृतिक: *~ geography, प्राकृतिक भूगोल.* **physically** /-क्लि/ *क्रिवि* शारीरिक सामर्थ्याने, अंगबळाने; शारीरिकदृष्ट्या.

physician /फि'झिश्न्/ *ना* [*गण*] औषध देणारा (विशेषतः शस्त्रक्रिया न करणारा) डॉक्टर.

physicist /'फिझिसिस्ट्/ *ना* [*गण*] भौतिकशास्त्राचा अभ्यासक किंवा तज्ज्ञ, भौतिकीविज्ञ, भौतिकशास्त्रज्ञ.

physics /'फिझिक्स्/ *ना* [*अगण*] द्रव्य आणि ऊर्जा यांचा शास्त्रोक्त अभ्यास, पदार्थविज्ञान, भौतिकी, भौतिकशास्त्र.

physiology /,फिझि'ऑलजि/ *ना* [*अगण*] प्राणी, वनस्पती यांच्या कार्याचा अभ्यास करणारे शास्त्र, शरीरक्रियाविज्ञान. **physiological** /,फिझिअ'लॉजिक्ल्/ *वि* शरीरक्रियाविज्ञानविषयक. **physiologist** *ना* [*गण*] शरीरक्रियाविज्ञानाचा अभ्यासक किंवा शरीरक्रियावैज्ञानिक.

physiotherapy /,फिझिअउ'थेरपि/ *ना* [*अगण*] व्यायाम, मर्दन, शेक वगैरे आरोग्यासाठीचे उपाय, भौतिकचिकित्सा. **physiotherapist** *ना* [*गण*] भौतिकोपचारतज्ज्ञ.

physique /फि'झीक्/ *ना* [*गण*] माणसाची शरीरयष्टी, बांधा.

piano /पि'ॲनउ/ *ना* [*गण*] (*ब.व* ~s) काळ्या-पांढऱ्या खिट्ट्या दाबून धातूच्या तारांतून संगीत निर्माण करण्याचे एक मोठे वाद्य, पेटीसारखे मोठे वाद्य. **pianist** /'पिअनिस्ट्/ *ना* [*गण*] असे वाद्य वाजवणारा, पिआनोवादक.

piccolo /'पिकलउ/ *ना* [*गण*] (*ब.व* ~s) लहान बासरी.

pick^1 /पिक्/ *क्रि* [*सक*] १ निवडणे. २ फुले, भाजी वगैरे खुडणे आणि गोळा करणे: *~ strawberries, स्ट्रॉबेरी वेचणे.* ३ उचलणे, खास करून बोटांनी. ४ कोरणे, घाण बाजूला करून स्वच्छ करणे: *~ one's teeth, दात कोरणे.* ५ (भांडण, मारामारी) मुद्दाम घडवणे, करणे. ६ किल्लीशिवाय (कुलूप) उघडणे. ७ ओढून भोक पाडणे, बीळ पाडणे. ८ (पक्ष्यांबाबत) चोचीने दाणे टिपणे. ९ (*वाक्प्र*) **pick and 'choose** सावकाश, काळजीपूर्वक निवडणे. **pick sb's brains** प्रश्न विचारून हवी ती माहिती काढून घेणे. **pick holes in sth** एखाद्या गोष्टीत दोष काढणे. **pick sb's 'pocket** एखाद्याचा खिसा कापणे. १० (*क्रिब*) **pick at sth** हळूहळू खाणे, थोडेथोडे खाणे. **pick on sb** एखाद्याला उगाचच शिक्षा करण्यास वगैरे निवडणे: *He's always ~ing on me, तो नेहमी मलाच शिक्षा करतो.* **pick sb/sth out** (क) एखादी गोष्ट/व्यक्ती काळजीपूर्वक निवडणे. (ख) मोठ्या गर्दीतून एखादा नीट दिसणे. **pick up** (क) सुधारणे. (ख) पुन्हा सुरू करणे. **pick sb up** (क) एखाद्याला घेण्यासाठी गाडी थांबवणे. (ख) (*अनौप अधिक्षेपी*) अपरिचित माणसाशी विशेषतः कामवासनेने बोलायला सुरुवात करणे, घोळात घेणे, गटवणे. (ग) एखाद्याला पकडणे, अटक करणे. **pick sth up** (क) धरून उचलणे. (ख) (कौशल्य, परभाषा वगैरे)

शिकणे. (ग) (आजार) जडणे, होणे. (घ) गोळा करणे. (च) (रेडिओ संदेश) मिळणे, येणे. **picker** *ना* [*गण*] फळे वगैरे वेचणारा. **pickings** *ना* [*ब.व*] (सहजपणे) मिळू शकणारा फायदा किंवा पैसा. **'pickpocket** *ना* [*गण*] पाकिटमार. **'pick-up** *ना* [*गण*] १ ध्वनिमुद्रिका वाजवण्याच्या साधनातील पिन लावायची जागा. २ बाजू उघडणारी छोटी मालमोटार किंवा व्हॅन. ३ (*अनौप अधिक्षेपी*) गटवलेला माणूस, गाठलेली व्यक्ती.

pick^2 /पिक्/ *ना* [*ए.व*] १ निवड : *take your ~, तुला हवे ते निवड.* २ **the pick of sth** एखाद्या गोष्टीचा सर्वोत्कृष्ट भाग.

pick^3 /पिक्/ (तसेच **pickaxe** (*अमे* **pickax**) /'पिकॅक्स्/) *ना* [*गण*] लोखंडी दांडीला दोन धारदार टोकं असलेले खडक, रस्ता वगैरे फोडण्याचे हत्यार, पिकाव

picket /'पिकिट्/ *ना* [*गण*] इतर कामगारांनी कामावर जाऊ नये अशी विनंती करणारा कामाच्या जागेबाहेर असलेला संपावरील कामगार किंवा कामगारांचा गट. **picket** *क्रि* [*अक, सक*] संपप्रचार करणाऱ्या कामगारांचा गट उभा करणे, निरोधन करणे : *~ a factory, कारखान्यावर निरोधन करणे.*

pickle /'पिकल्/ *ना* १ (क) [*अगण*] मांस वगैरे साठवणीचे मिठाचे पाणी किंवा व्हिनिगर, खार. (ख) [*गण, अगण*] लोणचे. २ [*ए.व*] (*अनौप*) अडचणीची किंवा अप्रिय परिस्थिती : *in a ~, अडचणीत.* **pickle** *क्रि* [*सक*] लोणचे घालणे. **pickled** *वि* (*अनौप*) दारू चढलेला, नशेतला.

picnic /'पिक्निक्/ *ना* [*गण*] बाहेर जाऊन डबे खाणे, सहल. **picnic** *क्रि* (-ck-) [*अक*] सहलीला जाणे, वनभोजन करणे. **picnicker** *ना* [*गण*] सहलीला गेलेला, वनभोजन करणारा.

pictorial /पिक्'टॉऽरिअल्/ *वि* चित्रमय, चित्रपूर्ण, सचित्र.

picture /'पिक्च(र्)/ *ना* १ [*गण*] (क) (खास करून कलापूर्ण असे) चित्र, रेखाचित्र किंवा छायाचित्र. (ख) छायाचित्र, छबी, फोटो. (ग) दूरदर्शन पडद्यावरील प्रतिमा. २ (*ब्रि जुना अप्रचलित*) (क) [*गण*] चित्रपटफीत. (ख) **the pictures** [*ब.व*] चित्रपट; सिनेमा : *go to the ~s, सिनेमाला जाणे.* ३ [*गण*] मनःपटलावरील चित्र. ४ [*गण*] यथार्थ चित्रण. ५ (*वाक्प्र*) **be/put sb in the 'picture** एखादी परिस्थिती पूर्णपणे उमगणे किंवा दुसऱ्याला समजेल असे करणे, परिस्थिती माहीत असणे किंवा माहीत करून देणे. **be the picture of health, happiness, etc** तब्बेतीने खूप चांगला, आनंदी वगैरे दिसणे. **get the 'picture** (*अनौप*) परिस्थितीची कल्पना येणे, चित्र स्पष्ट होणे. **picture** *क्रि* [*सक*] १ कल्पना करणे : *He ~d himself as a rich man, आपण खूप श्रीमंत आहोत अशी त्याने कल्पना केली.* २ चित्र काढणे, चित्रित करणे.

picturesque /,पिक्च'रेस्क्/ *वि* १ दिसायला आकर्षक, चित्रातल्यासारखा सुंदर; मनोहर : *a ~ fishing village, चित्रातल्यासारखे सुंदर असे मासेमारीचे एक गाव.* २ (भाषेबाबत) हुबेहुब वर्णन करणारी म्हणून आकर्षक, चित्रवत्.

pidgin /'पिजिन्/ *ना* [*गण*] खास करून व्यापारउदीमासाठी दोन भाषा मिसळून वापरायची भाषा, मिश्रभाषा.

pie /पाइ/ *ना* [*गण, अगण*] पीठ, चरबी, पाणी यांच्या मिश्रणामधे किंवा पेस्ट्रिमधे भिजवून ताटलीत भाजलेले मांस किंवा फळ.

piebald /'पाइबॉऽल्ड्/ *वि* (घोड्याबाबत) काळे-पांढरे चट्टे असलेला.

piece^1 /पीस्/ *ना* [*गण*] १ तुकडा, भाग. २ एखाद्या पूर्ण गोष्टीचा एक भाग. ३ संचातील एक चीज, एक वस्तू, एक नग किंवा कशाचे तरी उदाहरण : *a ~ of furniture, फर्निचरची एक वस्तू* ○ (*ला*) *a ~ of news/advice, एक बातमी किंवा एक सल्ला.* ४ कला, संगीत वगैरेची एक रचना, कलाकृती. ५ सोंगटी : *a chess ~, बुद्धिबळातील सोंगटी.* ६ नाणे : *a ten-paisa ~, दहा पैशाचं नाणं.* ७ (*वाक्प्र*) **give sb a piece of one's 'mind** (*अनौप*) एखाद्याच्या गैरवर्तनाबद्दल आपल्याला काय वाटतं ते त्याला सुनावणे, हजेरी घेणे. **go to 'pieces** स्वतःवरचा ताबा सुटणे, कोसळणे. **in one 'piece** बचावलेला – विशेषतः भयानक प्रसंगातून, धडका, न

फुटलेला वगैरे. **a ,piece of 'cake** (*अनौप*) अगदी सोपा. **'piece-work** *ना* [*अगण*] पूर्ण केल्यावर पैसे द्यायचे काम, मोले दिलेले काम, उक्ते काम, कामाच्या तासानुसार पैसे मिळणारे/केलेल्या कामाप्रमाणे पैसे मिळणारे काम.

piece^2 /पीस्/ *क्रि* (*क्रिब*) **piece sth together** एखाद्या गोष्टीचे भाग एकत्र करून ती बनवणे, भाग जुळवून पूर्ण करणे.

piecemeal /'पीस्मील्/ *क्रिवि* एकावेळी एक (भाग): *work done ~, टप्प्याटप्प्याने केलेले काम.* **piecemeal** *वि* भागशः करायचे, टप्प्याटप्प्याने करायचे (काम वगैरे).

pier /पिअ(र्)/ *ना* [*गण*] १ लोखंडी गज आणि लाकडी फळ्यांनी समुद्रात – विशेषतः करमणुकीच्या कार्यक्रमांसाठी – केलेले बांधकाम, धक्का. २ पुलाचा वगैरे खांब.

pierce /पिअस्/ *क्रि* १ [*अक, सक*] (टोकदार हत्यारांबाबत) भोक पाडणे, भोसकणे. २ [*सक*] (*ला*) (ध्वनी किंवा प्रकाशाबाबत) भेदणे, आरपार जाणे. **piercing** *वि* १ (ध्वनीबाबत) कर्कश. २ (डोळ्यांबाबत) भेदक. ३ (वाऱ्याबाबत) थंड आणि जोरदार, हाडात शिरणारा, कडाक्याचा गार. **piercingly** *क्रिवि* कर्कशपणे, भेदकपणे.

piety /'पाइ·अटि/ *ना* [*अगण*] धार्मिक श्रद्धा आणि धर्मानुसारी वर्तन, धर्माचरण, ईश्वरनिष्ठा.

pig /पिग्/ *ना* [*गण*] १ डुक्कर. २ (*अनौप अधिक्षेपी*) (डुकरासारखा) हावरट आणि घाणेरडा माणूस, उर्मट माणूस. ३ (*वाक्प्र*) **make a 'pig of oneself** (*अनौप*) (डुकरासारखे) अति खाणे, चरणे, हादडणे. **piggy** *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) (*अनौप*) (मुलांच्या बोलण्यात वापर) डुकराचे पिल्लू. **'piggy bank** *ना* [*गण*] लहान मुलांची डुकराच्या आकाराची सुटे पैसे टाकून जमवायची पेटी. **,pig'headed** *वि* स्वतःची मते किंवा कृती बदलण्यास तयार नसलेला, नाठाळ; हटवादी, अडेलतट्टू. **'pigsty** *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) १ डुकरे ठेवायचे खुराडे. २ (*अनौप*) घाणेरडी, पसरलेली खोली किंवा पसारा असलेले घर. **'pigtail** *ना* [*गण*] केसांची घातलेली वेणी.

pigeon /'पिजिन्/ *ना* [*गण*] १ कपोत जातीतला करड्या रंगाचा एक पक्षी, कबुतर. २ (*अनौप*) जबाबदारी: *That's not my ~, ती माझी जबाबदारी नाही.* **'pigeon-hole** *ना* [*गण*] पत्रे वगैरे ठेवण्याचा अनेक छोट्याछोट्या कप्प्यांतील एक कप्पा. **'pigeon-hole** *क्रि* [*सक*] १ काटेकोर वर्गीकरण करणे. २ बाजूला टाकणे; टाळणे. **'pigeon-toed** *वि* आत वळणारी पायाची बोटे असलेला.

piglet /'पिग्लिट्/ *ना* [*गण*] डुकराचे पिल्लू.

pigment /'पिग्मन्ट्/ *ना* १ [*गण, अगण*] रंग आणि रंगद्रव्यांकरताचे रंजक द्रव्य, रंगद्रव्य. २ [*अगण*] त्वचा, केस यांतील नैसर्गिक वर्णद्रव्य, वर्णक. **pigmentation** /,पिग्मेन्'टेइश्न्/ *ना* [*अगण*] नैसर्गिक वर्ण.

pigmy = PYGMY.

pike^1 /पाइक्/ *ना* [*गण*] (*ब.व* **pike**) गोड्या पाण्यातला एक मोठा मासा.

pike^2 /पाइक्/ *ना* [*गण*] पूर्वी सैनिक वापरत तो लांबलचक लाकडी भाला, बर्ची, शूल.

pilchard /'पिल्चड्/ *ना* [*गण*] समुद्रातला एक छोटा खाण्याचा मासा.

pile^1 /पाइल्/ *ना* [*गण*] १ एकावर एक ठेवलेल्या वस्तूंची रास, ढीग, चवड: *a ~ of papers, कागदांचा गठ्ठा.* २ [बहुधा *ब.व*] (*अनौप*) खूप, ढीगभर: *~s of work, कामाचा ढीग.* ३ (*वाक्प्र*) **make a 'pile** (*अनौप*) ढिगाने पैसे मिळवणे. **pile** *क्रि* १ [*सक*] ढीग रचणे: *~ the books on the table, टेबलावर पुस्तकांचा ढीग रचणे.* २ [*सक*] एखाद्या गोष्टीवर दुसऱ्या गोष्टींचा भार करणे, ढीग रचणे: *The table was ~d high with boxes, टेबलावर खोक्यांचा वरपर्यंत ढीग रचला होता.* ३ [*अक*] *into/out of* // (गाडीमधे वगैरे) अस्ताव्यस्तपणे चढणे किंवा उतरणे. ४ (*क्रिब*) **pile up** (क) वाढणे, साचत जाणे, थप्पी लागणे: *The work is ~ing up, काम साचत चाललंय.* (ख) (वाहनांबाबत) एकमेकांवर आदळणे. **'pile-up** *ना* [*गण*] अनेक वाहनांना एकाचवेळी झालेला रस्त्यावरील अपघात, वाहनांची टक्कर.

pile^2 /पाइल्/ *ना* [*गण*] इमारत वगैरेचा पाया म्हणून लाकूड, लोखंड किंवा सीमेन्ट यांचा

जमिनीत उभारलेला खांब, मेढ.

pile^{3} /पाइल्/ *ना* [*अगण*] गालिचा किंवा कापड यांवरील सुताचा वगैरे मऊमऊ भाग.

piles /पाइल्झ्/ *ना* [*ब.व*] = HAEMORRHOIDS.

pilfer /'पिल्फ(र्)/ *क्रि* [*अक, सक*] भुरटी चोरी करणे, किरकोळ वस्तू उचलणे.

pilgrim /'पिल्ग्रिम्/ *ना* [*गण*] तीर्थक्षेत्राला जाणारा, यात्रेकरू. **pilgrimage** /-इज्/ *ना* [*गण, अगण*] तीर्थयात्रा.

pill /पिल्/ *ना* १ [*गण*] औषधाची गोळी. २ **the pill** [*अे.व*] संततिप्रतिबंधक किंवा संततिनियमनाची गोळी.

pillage /'पिलिज्/ *क्रि* [*अक, सक*] (*औप*) युद्धात वगैरे जोर जबरीने घेतल्यासारखे हिरावून घेणे, लूट करणे.

pillar /'पिल(र्)/ *ना* [*गण*] १ इमारतीचा दगडी वगैरे आधारस्तंभ, खांब. २ आधारस्तंभासारखा असणारा सभासद. **'pillar-box** *ना* [*गण*] रस्त्यावरील पोस्टाची पेटी, उंच गोलाकार पत्रपेटी.

pillion /'पिलिअन्/ *ना* [*गण*] मोटर-सायकलस्वाराच्या मागची दुसऱ्याला बसायची जागा.

pillory /'पिलरि/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] (*औप*) एखाद्यावर जाहीरपणे टीका करणे, शब्दांनी हल्ला करणे, वाग्बाण सोडणे.

pillow /'पिलउ/ *ना* [*गण*] उशी. **pillow** *क्रि* [*सक*] उशीवर (डोके) टेकणे, (डोक्याला) उसे घेणे. **'pillowcase** (तसेच **'pillowslip**) *ना* [*गण*] उशीचा अभ्रा.

pilot /'पाइलट्/ *ना* [*गण*] १ विमानाचे नियंत्रण करण्याचे प्रशिक्षण घेतलेला, विमान-चालक, वैमानिक. २ नाविक, बंदरातून आत-बाहेर करणारा, जहाज चालवणारा. **pilot** *वि* एखाद्याची चाचणी घेण्याकरता वापरायचा, चाचणीचा : *a '~ scheme, चाचणी करण्याची योजना, चाचणीप्रयोग.* **pilot** *क्रि* [*सक*] वैमानिक किंवा नौचालक म्हणून काम करणे; मार्गदर्शन करणे. **'pilot-light** *ना* [*गण*] गॅस शेगडी वगैरेवरची मोठी शेगडी लावायची सतत तेवणारी अशी ज्योत.

pimp /पिम्प्/ *ना* [*गण*] वेश्यांकरता गिऱ्हाईक आणून त्यापासून फायदा करून घेणारा, वेश्यादलाल, भडवा.

pimple /'पिम्प्ल्/ *ना* [*गण*] त्वचेवरील पुटकुळी, मुरुमाचा फोड. **pimply** *वि* पुटकुळीचा.

pin^{1} /पिन्/ *ना* [*गण*] टोकदार अग्र असणारी वर गोल डोके असणारी (कागद वगैरे) एकत्र ठेवायची टाचणी. **'pincushion** *ना* [*गण*] टाचण्या टोचून ठेवायची गुंडी, टाचणीघर, पिनदाणी. **'pinpoint** *क्रि* [*सक*] बरोबर हेरणे, अचूक वर्णन करणे, वर्मावर बोट ठेवणे. **,pins and 'needles** *ना* [*ब.व*] अवयवात बोचणारी भावना, लसलसणारी भावना. **'pin-stripe** *वि* (कापडाबाबत) बारीक रेघांचे, रेघारेघांचे.

pin^{2} /पिन्/ *क्रि* (-nn-) [*सक*] १ टाचणी टोचणे/लावणे, अडकवणे. २ (एखादी वस्तू किंवा व्यक्ती) हालू शकणार नाही असे घट्ट पकडून ठेवणे, अडकवून ठेवणे. ३ *on//* एखाद्या व्यक्तीवर किंवा गोष्टीवर (सर्व आशा) केंद्रित करणे किंवा (सर्व दोषांचे) खापर फोडणे, सगळा भार टाकणे. ४ (*क्रिब*) **pin sb down** एखाद्याला तो टाळत असलेली गोष्ट करायला लावणे, भाग पाडणे : *Try and ~ him down to (giving you) an answer, त्याला उत्तर द्यायला भाग पाड.* **pin sth down** एखाद्या गोष्टीचे बरोबर किंवा अचूक वर्णन करणे : *The nature of beauty is difficult to ~ down, सौंदर्याचे नेमके वर्णन करणे अवघड आहे.* **'pin-up** *ना* [*गण*] भिंतीवर चिकटवण्याचे विशेषतः सिनेनट-नटीचे चित्र.

pinafore /'पिनफॉऽ(र्)/ *ना* [*गण*] पोषाख मळू नये म्हणून त्यावर घालायचा बिन-बाह्यांचा सैल कपडा.

pincer /'पिन्स(र्)/ *ना* १ **pincers** [*ब.व*] खिळे उपटण्याचा चिमटा, अंबूर. २ [*गण*] शिंपल्यातील प्राण्याचे आकडीसारखे नख, (खेकड्याची वगैरे) नांगी.

pinch /पिन्च्/ *क्रि* १ [*सक*] चिमटा घेणे, चिमटीत पकडणे. २ [*अक*] फार घट्ट होणे, लागणे : *These shoes ~, हे बूट चावतात.* ३

[*सक*] (*अनौप*) चोरणे, ढापणे. **pinch** *ना* १ [*गण*] चिमटा काढणे, चिमटा. २ [*गण*] चिमूटभर : *a ~ of salt, चिमूटभर मीठ.* ३ **the pinch** [*अे.व*] पुरेसा पैसा नसल्यामुळे पडणारे कष्ट, दारिद्र्याचा चटका : *feel the ~, दारिद्र्याचा चटका जाणवणे.* ४ (*वाक्प्र*) **at a 'pinch** गरज असल्यास, जरूर तर, वेळ पडल्यास. **take sth with a pinch of salt** ⇨ SALT.

pine^{1} /पाइन्/ *ना* १ [*गण*] (तसेच '**pine tree**) अणकुचिदार पानांचा सदाहरित वृक्ष, देवदारासारखा एक वृक्ष. २ [*अगण*] पाईन झाडाचे मऊ, फिके लाकूड.

pine^{2} /पाइन्/ *क्रि* [*अक*] (*for, to*)// १ एखादी व्यक्ती निघून गेल्यामुळे किंवा मेल्यामुळे खूप दुःखी असणे, झुरणे, खंतावणे : *~ for one's lover, जारासाठी झुरणे.* २ अशक्य गोष्टीची आशा करणे, व्यर्थ कुढणे.

pineapple /'पाइनॅप्ल्/ *ना* [*गण, अगण*] गोड पिवळा गर असलेले मोठे रसाळ फळ, अननस.

ping /पिङ्/ *क्रि* [*अक*] *ना* [*गण*] अल्पकाळ टिकणारा पण तीव्र असा निनादणारा आवाज (करणे), टिंग किंवा पिंग असा आवाज (करणे).

ping-pong /'पिङ्पॉङ्/ *ना* [*अगण*] = TABLE TENNIS (TABLE).

pinion^{1} /'पिनिअन्/ *क्रि* [*सक*] एखाद्याचे हात पकडून किंवा बांधून त्याला हालचाल करू न देणे, हात बांधणे, मुसक्या बांधणे.

pinion^{2} /'पिनिअन्/ *ना* [*गण*] दाते असलेले छोटे चाक.

pink /पिङ्क्/ *वि* गुलाबी, फिका तांबूस. **pink** *ना* १ [*अगण*] गुलाबी रंग. २ [*गण*] गोड वासाची फुले येणारे एक फुलझाड. ३ (*वाक्प्र*) **in the pink** छान तब्येत असलेला.

pinnacle /'पिनकल्/ *ना* [*गण*] १ छपरावरचे टोकदार दगडी बांधकाम, कळस, प्रासाद, शिखर. २ उंच टोकदार खडक, सुळका. ३ [बहुधा *अे.व*] (*ला*) उंच टोक, शिखर, शीग : *the ~ of her career, तिच्या प्रगतिपटाचा कळस.*

pinpoint ⇨ PIN^{1}.

pin-stripe ⇨ PIN^{1}.

pint /पाइन्ट्/ *ना* [*गण*] १ द्रवपदार्थांचे एक परिमाण, १/८ गॅलन (०.५६८ लीटर) किंवा गॅलनचा आठवा भाग. २ एवढ्या मापाचे दूध किंवा एवढी बिअर.

pioneer /,पाइअ'निअ(र्)/ *ना* [*गण*] १ नवीन क्षेत्रात प्रथम पदार्पण करणारा माणूस, अग्रेसर, उद्गाता, प्रणेता. २ एखाद्या नवीन ज्ञानक्षेत्राचा पहिला अभ्यासक, आघाडीचा अभ्यासक. **pioneer** *क्रि* [*सक*] प्रणेता होणे/असणे.

pious /'पाइअस्/ *वि* धर्मावर आणि देवावर गाढ विश्वास असणारा, धार्मिक, भाविक, श्रद्धाळू. **piously** *क्रि* भाविकपणे, भक्तिभावाने.

pip^{1} /पिप्/ *ना* [*गण*] सफरचंद, संत्रे, द्राक्ष वगैरेतली बी.

pip^{2} /पिप्/ *ना* **the pips** [*ब.व*] रेडिओवर दिली जाणारी बरोबर वेळ सांगण्यासाठी उच्च स्वरातील कंपने.

pip^{3} /पिप्/ *क्रि* (-pp-) १ (*वाक्प्र*) **pip sb at the post** स्पर्धेत वगैरे एखाद्यावर फार कमी फरकाने मात करणे, हरवणे.

pipe^{1} /पाइप्/ *ना* १ [*गण*] द्रवपदार्थ किंवा वायू वाहू शकतील अशी नळी, वाहिनी. २ [*गण*] तंबाखू ओढायचा पाईप. ३ [*गण*] नळीला भोके असणारे एक वाद्य, पावा, वेणू. ४ **pipes** [*ब.व*] = BAGPIPES. **'pipe-dream** *ना* अशक्य अशी कल्पना किंवा योजना, स्वप्न. **'pipeline** *ना* १ [*गण*] तेल, गॅस, पाणी वगैरे वाहून नेणाऱ्या जमिनीखालून टाकलेल्या वाहिन्यांचे जाळे. २ (*वाक्प्र*) **in the 'pipeline** तयार होणारा, होत असलेला; लवकरच घडणारा, होऊ घातलेला.

pipe^{2} /पाइप्/ *क्रि* १ [*सक*] (पाणी, गॅस वगैरे) वाहिन्यांतून नेणे. २ [*अक, सक*] पावा वाजवणे. ३ (*क्रिव*) **pipe down** (*अनौप*) गडबड कमी करणे; बडबड बंद करणे. **pipe up** (*अनौप*) एकदम बोलू लागणे. **piped music** *ना* [*अगण*] मोठी दुकाने, रेल्वे स्थानके वगैरे ठिकाणी सतत वाजविले जाणारे ध्वनिमुद्रित संगीत.

piper /'पाइप(र्)/ *ना* [*गण*] पावा किंवा बॅगपाइप्स वाजवणारा माणूस.

piping /'पाइपिङ्/ *ना* [*अगण*] नळी, वाहिनी; वाहिन्यांचे जाळे. **piping** *वि* (माणसाच्या आवाजाबाबत) वरच्या पट्टीचा, उंच. **piping 'hot** *वि* (अन्न वगैरेबाबत) गरमागरम.

piquant /'पीकन्ट्/ *वि* १ तिखट, झणझणीत. २ मनाला चेतविणारा, आनंददायक असा. **piquancy** /-अन्सि/ *ना* [*अगण*] तिखटपणा, झणझणीतपणा; चेतना. **piquantly** *क्रिवि* तिखटपणे, तीक्ष्णपणे; उत्साहाने.

pique /पीक्/ *ना* [*अगण*] स्वाभिमान दुखावल्याने होणारे दुःख, कडवटपणा. **pique** *क्रि* [*सक*] (बहुधा कर्मणी) स्वाभिमान दुखावणे.

piracy /'पाइअरसि/ *ना* [*अगण*] १ चाचेगिरी, लूट. २ पुस्तके वगैरे यांची चोरून नक्कल करणे किंवा वापरणे.

piranha /पि'रान/ *ना* [*गण*] मांसखाऊ असा अमेरिकेतील उष्णकटिबंधातला गोड्या पाण्यातला लहान मासा.

pirate /'पाइअरट्/ *ना* [*गण*] १ (विशेषतः पूर्वीच्या काळी) समुद्रावरील चाचे. २ दुसऱ्याचे पुस्तक, व्हिडिओ-फिल्म चोरून (अवैधपणे) वापरणारा. **pirate** *क्रि* [*सक*] (दुसऱ्याचे पुस्तक, व्हिडिओ फिल्म वगैरे यांची) अवैध नक्कल करणे, चोरून वापरणे.

pirouette /,पिरु'अेट्/ *ना* [*गण*] टाचेवर किंवा चवड्यावर बॅलेमधील नर्तकाने घेतलेली गिरकी. **pirouette** *क्रि* [*अक*] (बॅलेमधे) अशी गिरकी घेणे.

piss /पिस्/ *क्रि* (⚠ *व्रात्य*) १ [*अक*] मुतणे. २ (*क्रिब*) **piss off** (विशेषतः *ब्रि*) दूर जाणे, कटणे. **piss** *ना* (⚠ *व्रात्य*) १ मुती. २ (*वाक्प्र*) **take the piss (out of sb)** (एखाद्याची) थट्टा करणे. **pissed** (*ब्रि* ⚠ *व्रात्य*) दारू चढलेला, तर्र.

pistol /'पिस्ट्ल्/ *ना* [*गण*] एका हातात धरायची छोटी बंदूक.

piston /'पिस्टन्/ *ना* [*गण*] इंजिन, पंप वगैरेतील नळीमधे वरखाली होणारी चकती किंवा छोटी गोलाकार पट्टी, दट्ट्या.

pit /पिट्/ *ना* १ [*गण*] जमिनीतला मोठा, बहुधा खोल खड्डा. २ [*गण*] खनिजे काढण्यासाठीचा खड्डा, खाण : *a 'gravel-~, खडीचा किंवा गारेचा खड्डा.* ३ [*गण*] कोळशाची खाण. ४ [*गण*] प्राण्याच्या शरीरातला नैसर्गिक खळगा : *the ~ of the stomach, पोटातला खड्डा.* ५ [*गण*] देवी येऊन गेल्यावर त्वचेवर पडणारा व्रण. ६ [*गण*] रंगमंचापुढची वादकांसाठीची किंवा साथीदारांसाठीची असलेली खोलगट जागा. ७ **the pits** [*ब.व*] (मोटारींच्या शर्यतीत) शर्यतीमधे असताना पेट्रोल भरण्यासाठी वगैरे असलेली कडेची जागा. ८ (*वाक्प्र*) **be the pits** (*अनौप*) एखाद्या गोष्टीचे सर्वात वाईट उदाहरण असणे. **pit** *क्रि* **(-tt-)** १ [*सक*] देवीचे व्रण उठणे, खळगे पडणे. २ (*क्रिब*) **pit sb/sth against sb** एखाद्याची दुसऱ्या गोष्टीशी किंवा व्यक्तीशी टक्कर लावून परीक्षा घेणे, झुंज करणे.

pitch^1 /पिच्/ *ना* १ [*गण*] फुटबॉल, क्रिकेट वगैरे खेळांचे आखलेले मैदान, खेळपट्टी, धावपट्टी. २ [*अगण*] आवाजाचा चढ-उतार, स्वराची उच्चनीचता, स्वरपट्टी, रोट. ३ [*अे.व*] मात्रा, परिमाण किंवा स्तर : *The excitement reached a high ~, उत्सुकता शिगेला पोहोचली.* ४ [*गण*] (विशेषतः *ब्रि*) रस्त्यावरच्या विक्रेत्याची जागा. ५ [*गण*] विक्रेत्याने माल विकण्यासाठी केलेला हाकारा : *a clever sales ~, विक्रीसाठी हिकमती आरोळी.*

pitch^2 /पिच्/ *क्रि* १ [*सक*] विशिष्ट दिशेने फेकणे, सोडणे. २ [*अक, सक*] पुढे किंवा बाहेरच्या अंगाला जोराने पडणे/पाडणे. ३ [*अक*] (जहाज किंवा विमानाबाबत) पाण्यावर किंवा हवेवर हिंदकळणे, वरखाली होणे, हेलावणे. ४ [*सक*] (तंबू) उभारणे/टाकणे, (राहुटी) ठोकणे. ५ [*सक*] (संगीतात) विशिष्ट स्वरपट्टीवर आधारणे, विशिष्ट सप्तकात रचणे. ६ [*सक*] विशिष्ट स्तरावर सांगणे. ७ (*क्रिब*) **pitch in (क)** उत्साहाने काम सुरू करणे. **(ख)** मदत देणे, पाठिंबा देणे. **pitch into sb** (*अनौप*) एखाद्यावर कठोर हल्ला करणे, जहरी टीका करणे, आगपाखड करणे. **pitched 'battle** *ना* [*गण*] घनघोर युद्ध, शर्थीची लढाई, तुंबळ युद्ध. **'pitchfork** *ना* [*गण*] गवत वगैरे उचलण्याचा लांब दांडीचा काटा.

pitch^3 /पिच्/ *ना* [*अगण*] तापवल्यावर चिकट होणारे आणि थंड झाल्यावर कडक होणारे घराची छपरे वगैरे जलविरोधक करण्यासाठी

वापरले जाणारे एक काळे द्रव्य, डांबर. **,pitch-'black** *वि* काळाठिक्कर, काळाकुट्ट.

pitcher^1 /'पिच(र्)/ *ना* [*गण*] १ (खास करून *ब्रि*) दोन कानांचे उभट आकाराचे मोठे भांडे (जग), दोन कानांची मोठी सुरई. २ (*अमे*) सुरई, जग.

pitcher^2 /'पिच(र्)/ *ना* [*गण*] (बेसबॉलमधे) बॅटवाल्याकडे चेंडू टाकणारा.

piteous /'पिटिअस्/ *वि* (*औप*) दयनीय, करुण : *a ~ cry, करुण टाहो.* **piteously** *क्रिवि* करुणपणे, हृदयद्रावक रीतीने, केविलवाणेपणाने.

pitfall /'पिट्फॉऽल्/ *ना* [*गण*] दडलेला धोका, अनपेक्षित अडचण, खाचखळगा.

pith /पिथ्/ *ना* [*अगण*] संत्र वगैरेच्या सालीखालचा किंवा काही वनस्पतींच्या देठांत आढळणारा मऊ पांढरा पदार्थ, गाभा. **pithy** *वि* **(-ier, -iest)** १ त्रोटक पण अर्थपूर्ण : *~ remarks, अल्पाक्षरी अर्थगर्भ टिपण्णी.* २ मऊ पांढऱ्या दशांनी युक्त. **pithily** *क्रिवि* त्रोटक पण अर्थगर्भपणे.

pitiable /'पिटिअब्ल्/ *वि* १ दयनीय, कीव करण्याजोगा, केविलवाणा. २ अनादरणीय, घृणास्पद; दरिद्री, कवडीमोलाचा. **pitiably** *क्रिवि* केविलवाणेपणाने, शोचनीय रीतीने.

pitiful /'पिटिफ्ल्/ *वि* १ दया यावी असा. २ अनादरणीय, घृणास्पद; दरिद्री, कवडीमोलाचा : *a ~ attempt, दरिद्री प्रयत्न.* **pitifully** *क्रिवि* दयनीयपणे.

pitiless /'पिटिलिस्/ *वि* निर्दय, निष्ठुर, दयामाया नसलेला; क्रूर, कठोर. **pitilessly** *क्रिवि* दयामाया न दाखवता; कठोरपणे.

pittance /'पिट्न्स्/ *ना* [बहुधा *अे.व*] अगदी कमी पैसे.

pity /'पिटि/ *ना* १ [*अगण*] इतरांना होणारा त्रास आणि यातना बघून झालेले दुःख, दया, करुणा, कणव. २ [*अे.व*] दुःखाची किंवा दुर्भाग्याची गोष्ट : *It's a ~ (that) the weather isn't better, हवा चांगली नाही हे दुर्दैवच.* ३ (*वाक्प्र*) **,more's the 'pity** (*अनौप*) दुर्दैवाने. **take 'pity on sb** एखाद्यावर दया करणे, दया दाखवणे. **pity** *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] दया येणे.

pivot /'पिव्हट्/ *ना* १ ज्याच्या आधारावर एखादी गोष्ट फिरते तो टेकू, आस, कीलक. २ (*ला*) मुख्य सूत्रधार, एखाद्या गोष्टीचा कणा असणारा माणूस. **pivot** *क्रि* [*अक*] टेकूवर (किंवा टेकूवर फिरल्यासारखे) फिरणे. **pivotal** *वि* टेकूचा; प्रमुख.

pixie (तसेच **pixy**) /'पिक्सि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) छोटी परी.

pizza /'पीट्स/ *ना* [*गण, अगण*] ओव्हनमधे भाजलेला आणि, वर चीज, टॉमेटो वगैरे घातलेला कणकेचा गोलाकार पदार्थ, पिझ्झा.

placard /'प्लॅकाड्/ *ना* [*गण*] जाहीरपणे लावलेली मोठी नोटीस, घोषणाफलक.

placate /प्ल'केइट्; *अमे* 'प्लेइकेइट्/ *क्रि* [*सक*] एखाद्याचा राग घालवणे, सान्त्वन करणे.

place^1 /प्लेइस्/ *ना* १ [*गण*] शहर, नगर, गाव वगैरे, ठिकाण किंवा स्थान : *Canada is a big ~, कॅनडा हा मोठा देश आहे.* २ [*गण*] विशिष्ट हेतूकरता वापरलेली इमारत किंवा जागा, विशिष्ट जागा, ठिकाण, स्थान : *a 'meeting-~, भेटीचे स्थळ.* ३ [*गण*] एखाद्याची जागा, स्थान. ४ [*गण*] एखाद्या व्यक्तीने ग्रहण केलेले किंवा तिच्याकरता राखलेले स्थान, श्रेणी. ५ [*अे.व*] सामाजिक श्रेणी, स्थान किंवा अधिकार. ६ [*गण*] नोकरीतले स्थान; शिकण्याची संधी : *get a ~ at university, विद्यापीठात शिकण्याची संधी मिळणे किंवा प्रवेश मिळणे.* ७ [*गण*] नेहमीची किंवा बरोबर जागा, स्थान : *Put everything away in the right ~, प्रत्येक गोष्ट नीट जागच्याजागी ठेव.* ८ [*गण*, बहुधा *अे.व*] (शर्यत किंवा स्पर्धेत) विजयी क्रमांकांवरचे स्थान. ९ [*अे.व*] चर्चेतील मुद्द्याचा क्रमांक, पायरी : *in the first ~, प्रथमतः* किंवा *पहिले (म्हणणे) असे की.* १० [*गण*, बहुधा *अे.व*] (*अनौप*) घर : *Come to my ~, माझ्या घरी ये.* ११ **Place** [*अे.व*] (*ब्रि*) (लहान रस्ता किंवा चौक यांच्या नावात वापर). १२ [*गण*] एका व्यक्तीसाठी चमचे, काटे वगैरे टेबलावर मांडणे : *lay/set a ~, पान घेणे.* १३ **all 'over the place** (*अनौप*) (क) सगळीकडे. (ख) इतस्ततः, जिकडेतिकडे. **in/out of place** (क) जागी/जागेवर नाही. (ख) योग्य, यथास्थित, उचित,

अनुरूप/अयोग्य, अनुचित, अस्थानी : *His remarks were out of ~, त्याचे शेरे अस्थानी होते.* **in place of sb/sth** एखाद्या ऐवजी, एखाद्याच्या बदली : *Machines can do this job in ~ of people, माणसांच्या ऐवजी यंत्रे हे काम करू शकतील.* **put sb in his/her 'place** एखाद्याला त्याची जागा दाखवणे. **take 'place** घडणे. **take the place of sb/sth** एखाद्याचे काम करणे, त्याची जागा घेणे; एखाद्याच्या ऐवजी वापरले जाणे; एखाद्याच्या जागी येणे.

place^{2} /प्लेइस्/ *क्रि* [*सक*] १ एखाद्या विशिष्ट ठिकाणी ठेवणे. २ एखाद्याची नेमणूक करणे, नेमणे; एखाद्यावर (जबाबदारी वगैरे) सोपवणे, अंगावर काम टाकणे. ३ (मालाची वगैरे) मागणी नोंदवणे. ४ बरोबर आठवणे : *I know her face, but I can't ~ her, मला तिचा चेहरा ओळखीचा वाटतो पण ती कोण आहे हे नीट आठवत नाही.* **placement** *ना* [*अगण*] ठेवणे.

placenta /प्ल'सेन्ट/ *ना* [*गण*] (*ब.व* **-tae** /-टी/ किंवा **~s**) (*शरीरशास्त्र*) गर्भारपणात गर्भाचे पोषण करणारा गर्भातील अवयव, वार.

placid /'प्लॅसिड्/ *वि* शांत; लवकर न रागावणारा. **placidly** *क्रिवि* शांतपणे; न रागावता.

plagiarize /'प्लेइजराइझ्/ *क्रि* [*सक*] दुसऱ्याचे (विचार, कल्पना वगैरे) चोरणे आणि स्वतःचे असल्यासारखे वापरणे. **plagiarism** /-रिझ्म्/ *ना* [*गण, अगण*] कल्पनाचौर्य, वाङ्मयचौर्य.

plague /प्लेइग्/ *ना* १ [*गण, अगण*] चटकन् पसरणारा आणि मोठ्या प्रमाणावर माणसे मारणारा एक रोग, महामारी. २ [*गण*] (*ला*) संकटाचे, अनर्थाचे वगैरे कारण : *a ~ of locusts, टोळधाडीचे संकट.* **plague** *क्रि* [*सक*] (*with*)// सतत त्रास देणे, सतावणे, भंडावणे : *I ~d him with questions, प्रश्न विचारून त्याला मी भंडावून सोडले.*

plaice /प्लेइस्/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **plaice**) खाण्याचा चपटा मासा.

plaid /प्लॅड्/ *ना* [*गण, अगण*] रंगीत रेघारेघांचे किंवा चौकटीचे लोकरीचे कापड (किंवा त्याचा मोठा तुकडा).

plain^{1} /प्लेइन्/ *वि* १ साधा, न सजवलेला; सामान्य आणि सोपा. २ पाहायला, ऐकायला, समजायला सोपा. ३ (लोक, त्यांचे शब्द किंवा त्यांच्या कृती याबाबत) प्रामाणिक आणि उघड. ४ फार सुंदर किंवा देखणा नाही असा, बेताचा, चारचौघांसारखा : *a ~ girl, दिसायला साधी अशी मुलगी.* ५ (*वाक्प्र*) **,plain 'sailing** सहज जमण्यासारखी कृती. **plain** *क्रिवि* अगदी; स्पष्टपणे. **'plain-clothes** *वि* (विशेषतः पोलीस अधिकाऱ्याबाबत) साध्या वेषातला, गणवेषात नसलेला. **plainly** *क्रिवि* स्पष्टपणे, सहजपणे; सहज समजेल अशा रीतीने. **plainness** *ना* [*अगण*] साधेपणा; थेटपणा, स्पष्टपणा. **'plain-,spoken** *वि* स्पष्टवक्ता, सरळ बोलणारा, रोखठोक बोलणारा.

plain^{2} /प्लेइन्/ *ना* [*गण*] सपाट जमीन, सखल भूप्रदेश, सपाटीचा मोठा प्रदेश.

plaintiff /'प्लेइन्टिफ्/ *ना* [*गण*] (*कायदा*) एखाद्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करणारा, वादी, फिर्यादी.

plaintive /'प्लेइन्टिव्ह्/ *वि* व्यथित, दुःखीकष्टी वाटणारा, खिन्न. **plaintively** *क्रिवि* खिन्नपणे, विव्हलतेने.

plait /प्लॅट्/ *क्रि* [*सक*] (केसांची) वेणी घालणे. **plait** *ना* [*गण*] केसांची वेणी.

plan /प्लॅन्/ *ना* [*गण*] १ एखाद्या गोष्टीची योजना, आखणी, बेत : *make ~s for the holidays, सुट्टीचा कार्यक्रम आखणे.* २ यंत्र, रचना वगैरेचा विविध भाग दाखविणारा नकाशा. ३ इमारत, नगर, बाग वगैरेचे सर्वसाधारण कल्पना देणारे रेखाटन, नकाशा, परिलेख. **plan** *क्रि* (**-nn-**) [*अक, सक*] योजना करणे, कार्यक्रम आखणे, बेत असणे. **planner** *ना* [*गण*] खास करून नगरातील जागा कशी वापरायची याची योजना करणारा माणूस.

plane^{1} /प्लेइन्/ *ना* [*गण*] १ = AEROPLANE. २ (*भूमिती*) सपाट पृष्ठभाग, समतल, प्रतल. ३ (*ला*) विचाराचा, अस्तित्वाचा वगैरे स्तर. **plane** *वि* पूर्णतः सपाट.

plane^{2} /प्लेइन्/ *ना* [*गण*] धारदार पात्याचे,

सपाट तळाचे लाकडाचा पृष्ठभाग मऊ, गुळगुळीत करण्याचे हत्यार, रंधा. **plane** *क्रि* [*सक*] रंधा मारणे.

plane^3 /प्लेइन्/ (तसेच **'plane-tree**) *ना* [*गण*] रुंद पानांचे आणि पातळ खोडाचे एक झाड.

planet /'प्लॅनिट्/ *ना* [*गण*] पृथ्वी, मंगळ यांसारखा सूर्यासारख्या ताऱ्याभोवती फिरणारा ग्रह. **planetary** /-ट्रि/ *वि* ग्रहाचा.

plank /प्लॅङ्क्/ *ना* [*गण*] लाकडाची फळी. **planking** *ना* [*अगण*] लाकडी फळ्यांची जमीन.

plankton /'प्लॅङ्क्टन/ *ना* [*अगण*] समुद्राच्या पृष्ठभागाजवळ राहणारे अगदी लहान प्राणी आणि वनस्पती.

plant^1 /प्लान्ट्; *अमे* प्लॅन्ट्/ *ना* १ [*गण*] खोड, मुळे आणि पाने असणारी वनस्पती, झाड, रोपटे. २ [*अगण*] औद्योगिकरणाच्या प्रक्रियेत वापरली जाणारी यंत्रसामुग्री. ३ [*गण*] कारखाना.

plant^2 /प्लान्ट्; *अमे* प्लॅन्ट्/ *क्रि* [*सक*] १ झाडे किंवा रोपे लावून वृक्षारोपण करणे, बी पेरणे. २ एखादी गोष्ट जागेवर पक्की करणे, पेरणे. ३ (*on*)// (*अनौप*) स्वतः चोरलेला माल दुसऱ्यावर आळ येण्यासाठी त्याच्याकडे लपवून ठेवणे. ४ (*अनौप*) हेर म्हणून एखाद्या गटात माणूस पेरणे. **planter** *ना* [*गण*] बाग किंवा मळ्यात काम करणारा माणूस.

plantation /प्लॅन्'टेइश्न्/ *ना* [*गण*] झाडे, धान्य – ऊस, चहा वगैरेची लागवड केलेली जमीन, मळा.

plaque^1 /प्लाक्; *अमे* प्लॅक्/ *ना* [*गण*] भिंतीत बसविलेली दगडाची किंवा धातूची कोनशिला किंवा स्मृतिशीला.

plaque^2 /प्लाक्; *अमे* प्लॅक्/ *ना* [*अगण*] (*वैद्यकीय*) दातांवर चढणारी अपायकारक पुटे.

plasma /'प्लॅझ्म/ *ना* [*अगण*] पेशी वाहणारा रक्तातील स्वच्छ द्रव, रक्तद्रव, प्लाविका, पिलस.

plaster /'प्लास्ट(र्); *अमे* 'प्लॅस्-/ *ना* १ [*अगण*] चुना, वाळू, पाणी वगैरे यांच्या मिश्रणाचा, वाळल्यावर कडक होणारा भिंतीला द्यायचा गिलावा. २ [*अगण*] (तसेच **,plaster of 'Paris**) मोडके हाड सांधण्यासाठी हाडावर घालायचा, वाळल्यावर कडक होणारा एक पांढरा पदार्थ: *Her leg is still in ~, तिचा पाय अद्याप प्लास्टरमधे आहे.* ३ [*गण, अगण*] छोट्या जखमेवर लावायची कापडी पट्टी, चिकट पट्टी. **plaster** *क्रि* [*सक*] १ भिंतीला वगैरे गिलावा करणे. २ दाटपणे लावणे, चोपडणे: *hair ~ed with oil, तेल चोपडलेले केस.* **'plaster cast** *ना* [*गण*] १ मोडलेले हाड सांधण्यासाठी केलेला प्लॅस्टर ऑफ पॅरिसचा साचा. २ लहान पुतळ्याची प्लॅस्टर ऑफ पॅरिसमधे केलेली प्रतिकृती. **plastered** *वि* (*व्रात्य*) दारूची नशा चढलेला, पिऊन तर्र झालेला. **plasterer** *ना* [*गण*] गिलावा करणारा गवंडी.

plastic /'प्लॅस्टिक्/ *ना* [*अगण, गण*] रासायनिक प्रक्रियेने तयार केलेले हलक्या वजनाचे आणि वेगवेगळ्या आकारात घडवता येणारे एक द्रव्य. **plastic** *वि* १ (विविध वस्तूंबाबत) प्लॅस्टिकच्या. २ (पदार्थांबाबत) सहज आकार देण्यासारखा, आकार्य. **plasticity** /प्लॅ'स्टिसटि/ *ना* [*अगण*] लवचिकपणा, आकार्यता. **,plastic 'surgery** *ना* [*अगण*] शरीरावरची खराब झालेली कातडी दुरुस्त करण्याची किंवा त्याजागी दुसरी कातडी बसविण्याची शस्त्रक्रिया, त्वचारोपण शस्त्रक्रिया.

plasticine (तसेच **Plasticine**) /'प्लॅस्टिसीन्/ *ना* [*अगण*] (*मालक*) लहान मुलांना चित्रे, प्रतिकृती वगैरे करण्यासाठी द्यायची रंगीत कृत्रिम माती.

plate /प्लेइट्/ *ना* १ [*गण*] (क) जेवणाचे ताट, ताटली, थाळी. (ख) ताटात वाढलेला पदार्थ, जिन्नस. २ [*अगण*] सोन्या-चांदीचे चमचे, ताटल्या वगैरे. ३ [*गण*] धातूचा पातळ पत्रा, काचेचा ताव. ४ [*गण*] (क) पुस्तकाच्या पानांची छपाई करण्यासाठी वापरायचा धातूचा पातळ पत्रा, पाटा. (ख) पुस्तकात वेगळे पान म्हणून घातलेले चित्र. ५ (*वाक्प्र*) **hand/give sb sth on a 'plate** एखाद्याला एखादी गोष्ट आयती देणे, आयते ताट वाढून देणे. **on one's 'plate** (*अनौप*) काम असणे, करायला गोष्टी असणे: *I've got a lot on my ~ at the moment, याक्षणी मला करायच्या अशा भरपूर गोष्टी आहेत.* **plate** *क्रि*

[*सक*] (दुसऱ्या धातूला) सोन्या-चांदीचा मुलामा देणे, पाणी देणे. **,plate 'glass** *ना* [*अगण*] स्वच्छ काचेचे मोठे ताव.

plateau /'प्लॅटउ; *अमे* प्लॅ'टउ/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s** किंवा **-eaux** /-टउझ़/) १ उंच सपाट जमिनीचा मोठा प्रदेश, पठार. २ बदल किंवा वाढ न होणारी स्थिती : *prices have reached a ~, किंमतींनी स्थिर पातळी गाठली आहे.*

platform /'प्लॅट्फॉऽम्/ *ना* [*गण*] १ रेल्वेचा फलाट. २ वक्ता किंवा कलाकारांसाठीचे स्टेज किंवा मंच, व्यासपीठ. ३ निवडणुकीपूर्वी राजकीय पक्षाने जाहीर केलेल्या योजना, दिलेली आश्वासने वगैरे.

plating /'प्लेटिङ्/ *ना* [*अगण*] (विशेषतः पातळ असा) सोन्या-चांदीचा मुलामा, दिलेलं पाणी.

platinum /'प्लॅटिनम्/ *ना* [*अगण*] जडजवाहीर वगैरे करण्यात वापरला जाणारा एक मौल्यवान दुधी रंगाचा धातू.

platitude /'प्लॅटिट्यूड्; *अमे* -टूड्/ *ना* [*गण*] (*औप*) अगदी उघडपणे खरे असणारे पण नवीन किंवा आकर्षक न वाटणारे असे विधान, उघड सत्य.

platonic /प्ल'टॉनिक्/ *वि* (दोन व्यक्तींमधील प्रेम किंवा मैत्री याबाबत) वासनाहीन असे पवित्र आणि गाढ, अशारीर.

platoon /प्ल'टून्/ *ना* [*गण*] एका लेफ्टनंटच्या अधिपत्याखालील छोटी तुकडी, फलटण.

platter /'प्लॅट(र्)/ *ना* [*गण*] १ अन्न वाढायचे मोठे उथळ ताट, थाळी. २ (*पुरा ब्रि*) सपाट लाकडी ताटली.

platypus /'प्लॅटिपस्/ *ना* [*गण*] **,duck-billed 'platypus** बदकासारखी चोच असणारा, अंडी घालणारा, पिलांना दूध पाजणारा एक छोटासा ऑस्ट्रेलियन प्राणी.

plausible /'प्लॉऽझबल्/ *वि* बरोबर किंवा योग्य वाटणारा. **plausibly** *क्रिवि* बरोबर वाटते अशा रीतीने.

play^1 /प्लेइ/ *ना* १ [*अगण*] मनोरंजनाकरता, विशेषतः मुलांनी केलेले काहीतरी, खेळ, करमणुकीचा खेळ. २ [*अगण*] खेळ खेळणे (किंवा तो खेळायची पद्धत). ३ [*गण*] लिहिलेले नाटक. ४ [*अगण*] भराभर होणारी हलकी हालचाल : *the ~ of sunlight on water, उन्हाचा पाण्यावरील खेळ.* ५ [*अगण*] हालचालीसाठी असलेली माया, अंतर, फट, ढील : *a lot of ~ in the rope, दोरखंडातील मोठी फट.* ६ (*वाक्प्र*) **bring sth/come into 'play** परिणाम घडवणे/घडणे, प्रभाव पाडणे/पडणे. **a play on 'words** = PUN. **'play-act** *क्रि* [*अक*] भावनांचे प्रदर्शन करणे, आव आणणे, नाटक करणे. **'playboy** *ना* [*गण*] खुशालचेंडू तरुण श्रीमंत पोरगा, गुलछबू तरुण. **'playground** *ना* [*गण*] खेळाचे मैदान, क्रीडांगण. **'playgroup** *ना* [*गण*] शाळेत जाण्याइतके मोठे नसणाऱ्या मुलांची अनौपचारिक शाळा, बालकमंदीर, शिशुशाळा. **'playhouse** *ना* [*गण*] = THEATRE. **'playmate** *ना* [*गण*] सवंगडी. **'play-pen** *ना* [*गण*] लहान बालकाला खेळण्यासाठी केलेला बंदिस्त असा एकीकडून दुसरीकडे हालवता येण्यासारखा पिंजरा. **'plaything** *ना* [*गण*] १ खेळणे, खेळ. २ (*ला*) फक्त करमणुकीसाठी वापरलेला माणूस, खेळणे. **playwright** /'प्लेइराइट्/ *ना* [*गण*] नाटककार.

play^2 /प्लेइ/ *क्रि* १ [*अक*] क्रीडा करणे, मौजेखातर खेळणे. २ [*अक, सक*] (*at*)// एखाद्या गोष्टीचा आव आणणे, खेळ करणे, नाटक करणे. ३ [*अक, सक*] खेळात भाग घेणे, स्पर्धेत उतरणे; एखाद्याविरुद्ध खेळणे, झुंज देणे. ४ [*सक*] (क्रिकेट, फुटबॉल वगैरे खेळात) (चेंडू) मारणे, टोलवणे. ५ [*अक, सक*] (क) बुद्धिबळात खेळी करणे, सोंगटी सरकवणे. (ख) (पत्ता) खेळणे, टाकणे. ६ [*अक, सक*] (वाद्य) वाजवणे, वादन करणे. ७ [*सक*] (ध्वनिमुद्रिका, टेप वगैरे) लावणे. ८ [*सक*] (नाटकाचा) प्रयोग करणे; नाटकात काम करणे, भूमिका करणे. ९ [*सक*] (*अनौप*) म्हटल्याप्रमाणे वागणे, -सारखे वागणे : *~ the fool, वेड्यासारखे वागणे* ○ *~ (it) safe, जपून वागणे.* १० [*सक*] (*on*)// दुसऱ्याला लोक हसतील असे काही करणे : *~ a joke/trick on, एखाद्याचे हसे करणे, टिंगल करणे.* ११ [*सक*] सोडणे, मारणे : *~ water on a burning building, आग लागलेल्या इमारतीवर पाणी*

मारणे. १२ [*अक*] हळूच आणि चटकन् सरकणे: *sunlight ~ing on the lake, तळ्यावर खेळणारे ऊन.* १३ (*वाक्प्र*) **play 'ball** (*अनौप*) सहकार्य करणे. **play sth by 'ear** आधी काही न ठरवता परिस्थितीनुसार निर्णय घेणे: *We'll ~ it by ear depending on the weather, हवामान पाहूनच त्यात्यावेळी आम्ही पुढची योजना करू.* **play one's 'cards right** हवी असलेली गोष्ट मिळवण्यास परिणामकारक कृती करणे, योग्य पावले टाकणे, पत्ते नीट खेळणे. **play it 'cool** (*अनौप*) थंड डोक्याने किंवा डोके शांत ठेवून काम करणे, डोके ठिकाणावर ठेवून वागणे. **play for 'time** उशीर करून वेळ काढणे. **play the 'game** प्रामाणिकपणे, स्वच्छ वागणे, खिलाडूपणे वागणे. **play gooseberry** (*अनौप*) दोन प्रेमिकांमधे टपकणे. **play hell with sth** (*अनौप*) एखाद्या गोष्टीवर वाईट परिणाम करणे, हानी करणे, बट्ट्याबोळ करणे. **play into sb's 'hands** प्रतिपक्षाला फायदा होईल असे वागणे. **play a part (in sth)** एखाद्या गोष्टीत भाग घेणे, हात असणे. **play second 'fiddle (to sb)** एखाद्या कामात एखाद्यापेक्षा खालची जागा स्वीकारणे, कमी महत्त्वाचा असणे. १४ (*क्रिब*) **play a'long (with sb/sth)** एखाद्याशी सहमत असल्याचे वरवर दाखवणे, वरवर सहकार्य करणे. **'play at sth** (क) फारसा विचार न करता किंवा रस न घेता एखादी गोष्ट करणे, एखाद्या गोष्टीचा खेळ करणे. (ख) **what sb is playing at** (क्रोधदर्शक) एखादा काय करतोय ते, एखाद्याचं काय चाललंय् ते. **play sth 'back** ध्वनिमुद्रित केलेले (पुन्हा) ऐकणे, चित्रमुद्रित केलेले (पुन्हा) पाहणे. **play sth 'down** एखाद्याला महत्त्व न देणे, दुर्लक्ष करणे. **play sb off against sb else** स्वतःच्या फायद्यासाठी दोघांत भांडण लावणे, दोघांची जुंपवून देणे, दोघांना झुंजवणे. **play on sth** स्वतःच्या फायद्यासाठी दुसऱ्याच्या भावनांचा किंवा दुबळेपणाचा वापर करणे. **play (sb) up** दुसऱ्याला दुःख देणे, अडचणीत टाकणे. **play sth up** एखादी गोष्ट आहे त्यापेक्षा जास्त महत्त्वाची आहे असे भासवणे, एखाद्या गोष्टीला अवास्तव महत्त्व देणे. **play up to sb** एखाद्याची मर्जी संपादन करण्यासाठी काही करणे, एखाद्याची खुषमस्करी करणे, मस्का लावणे/मारणे. **play with sth** (एखाद्या कल्पनेचा वगैरे) फारसा गंभीरपणे विचार न करणे, खेळ करणे. **'playback** *ना* [*अगण*] ध्वनिमुद्रित किंवा चित्रमुद्रित फितीचे (पुन्हा) ऐकणे किंवा पाहणे. **'playing-card** *ना* [*गण*] ५२ पत्त्यांतील कोणताही पत्ता. **'playing-field** *ना* [*गण*] खेळाची हिरवळ. **'play-off** *ना* [*गण*] दोन समान गुण मिळवणाऱ्या खेळाडूंना क्रमांक काढण्यासाठी आणखी एका सामन्याची दिलेली संधी.

player /'प्लेइअ(र्)/ *ना* [*गण*] १ खेळाडू. २ संगीत वाद्य वाजवणारा, वादक: *a trumpet ~, तुतारी वाजवणारा.* ३ नट, कलाकार.

playful /'प्लेइफ्ल्/ *वि* १ खेळकर, खेळ आवडणारा. २ गंभीर नसणारा, हसरा, खेळकर. **playfully** *क्रिवि* खेळकरपणे. **playfulness** *ना* [*अगण*] खेळकरपणा.

plaza /'प्लाझ़्; *अमे* 'प्लॅझ़्/ *ना* [*गण*] खुला बाजार किंवा चौक.

PLC (तसेच plc) /,पी अेल् 'सी/ *संरू* (*ब्रि*) Public Limited Company सार्वजनिक मर्यादित संस्था.

plea /प्ली/ *ना* [*गण*] १ (*औप*) विनंती, कळकळीचे आवाहन: *~s for mercy, दयेसाठी केलेल्या विनंत्या.* २ (*कायदा*) स्वतःवरील आरोपाबाबत न्यायालयात केलेले विधान, प्रतिकथन.

plead /प्लीड्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **~ed**; *अमे* **pled** /प्लेड्/) १ [*अक*] (*with*)// पुन्हापुन्हा विनंत्या करणे, नाकदुऱ्या काढणे. २ [*सक*] (*कायदा*) एखादा दोषी आहे की नाही हे त्याने न्यायालयात अधिकृतपणे सांगणे. ३ [*अक*] *for*// (*कायदा*) (वकीलाबाबत) खटला चालवणे, एखाद्याची बाजू मांडणे, युक्तिवाद करणे. ४ [*सक*] सबब म्हणून सांगणे.

pleasant /'प्लेझ़न्ट्/ *वि* १ प्रसन्न, आनंददायक. २ मैत्रीपूर्ण, सौहार्दपूर्ण. **pleasantly** *क्रिवि* प्रसन्नपणे; मित्रत्वाने. **pleasantness** *ना* [*अगण*] प्रसन्नपणा, आनंद; सौहार्द.

pleasantry /'प्लेझ़न्ट्रि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) (*औप*) लाघवी शब्द, सौजन्यपूर्ण भाषा.

please /प्लीझ़्/ *उद्वा* (विनयपूर्ण विनंती

करताना वापर) कृपया : *Come in, ~, कृपया आत या/या ना या.* **please** *क्रि* १ [*अक, सक*] एखाद्याला आनंदी करणे, एखाद्याचे समाधान करणे, संतोष पावणे/देणे. २ [*अक*] निवडणे किंवा हवे असणे, पाहिजे असणे, मनात असणे : *He does as he ~s, त्याला हवं ते तो करतो.* **pleased** *वि* आनंदी, प्रसन्न, संतोषित : *She was very ~ with her exam results, परीक्षेच्या निकालाने तिला खूप समाधान झाले.* **pleasing** *वि* (*to*)// आनंददायक, प्रसन्न.

pleasure /'प्लेझ(र्)/ *ना* १ [*अगण*] सुखसमाधान, मजा. २ [*गण*] आनंददायक बाब, संतुष्ट करणारी गोष्ट : *It's a ~ helping you, तुला मदत करण्यात मोठा आनंद वाटतो.* **pleasurable** /-अरब्ल्/ *वि* (*औप*) सुखकारक, मौजमजा देणारा. **pleasurably** *क्रिवि* आनंदाने, सुखकारक रीतीने. **'pleasure-boat** *ना* [*गण*] मौजेखातर वापरायची/चालवायची नौका.

pleat /प्लीट्/ *ना* [*गण*] कापडात शिवलेली दुमड, चूण. **pleat** *क्रि* [*सक*] दुमड घालणे, चुण्या घालणे.

plebeian /प्लि'बीअन्/ *ना* [*गण*], *वि* (*अधिक्षेपी*) खालच्या जातीचा (माणूस), हीन कोटीतला माणूस.

plectrum /'प्लेक्ट्रम्/ *ना* [*गण*] (*ब.व* ~s किंवा **-tra** /-ट्र/) गिटार वगैरे तंतूवाद्याच्या तारा छेडण्यासाठी वापरायचा धातूचा किंवा प्लॅस्टिकचा तुकडा, उत्पाटक, छेडपट्टी.

pled (*अमे*) **plead** चा *भूत, भूत वि.*

pledge /प्लेज्/ *ना* [*गण*] १ वचन. २ ठरल्याप्रमाणे काम करेपर्यंत एखाद्याकडे ठेवलेली मौल्यवान वस्तू, तारण, गहाण. ३ प्रेमभेट. **pledge** *क्रि* [*सक*] १ काहीतरी करायचे किंवा द्यायचे वचन देणे. २ एखादी गोष्ट करण्याचा निश्चय करणे : *The government has ~d itself to fight poverty, दारिद्र्याविरुद्ध लढा देण्यास सरकार कटिबद्ध आहे.*

plenary /'प्लीनरि/ *वि* (सभेबाबत) पूर्ण उपस्थिती असलेली, खुली : *a ~ session, खुले अधिवेशन.*

plentiful /'प्लेन्टिफ्ल्/ *वि* विपुल, बक्कळ : *a ~ supply, चिक्कार पुरवठा.* **plentifully** *क्रिवि* विपुलतेने.

plenty /'प्लेन्टि/ *सना* (*of*)// हवेतेवढे किंवा हवे त्यापेक्षा जास्त : *There's ~ of time before the train goes, गाडी सुटायला भरपूर वेळ आहे.*

pleurisy /'प्लुअरसि/ *ना* [*अगण*] छाती आणि फुप्फुसांना सूज येणारा एक रोग, फुप्फुसावरणदाह.

pliable /'प्लाइअब्ल्/ *वि* १ लवचिक, सहज वाकणारा किंवा वळणारा, नम्य. २ (*ला*) सहज परिणाम होणारा, नमणारा, नम्र, ऐकणारा. **pliability** /प्लाइअ'बिलटि/ *ना* [*अगण*] लवचिकपणा; नम्रता.

pliant /'प्लाइअन्ट्/ *वि* १ सहज वाकणारा, लवचिक. २ (*ला*) सहज परिणाम होणारा, सहज वळणारा.

pliers /'प्लाइअझ्/ *ना* [*ब.व*] छोट्या वस्तू पकडायला किंवा वायर वाकवायला किंवा कापायला वापरले जाणारे हत्यार, पकड, ग्रावी.

plight /प्लाइट्/ *ना* [*अे.व*] (*औप*) कठीण अवस्था, वाईट दशा.

plimsoll /'प्लिम्सल्/ *ना* [*गण*] रबरी तळवा असलेले कॅनव्हसचे हलके बूट.

Plimsoll line /'प्लिम्सल्/ *ना* [*गण*] कायद्यानुसार जहाज पाण्याखाली जास्तीत जास्त किती जाऊ द्यायचे हे दाखविणारी जहाजाच्या बाजूवर असणारी रेषा.

plinth /प्लिन्थ्/ *ना* [*गण*] खांब किंवा पुतळा यांच्या खालचा चौथरा; जोते.

plod /प्लॉड्/ *क्रि* (**-dd-**) १ रडतखडत चालणे, फतक्फतक् चालणे. २ धिमेपणाने काम करणे. **plodder** *ना* [*गण*] धिमेपणाने काम करणारा माणूस, कष्टकरी मनुष्य.

plonk^{1} /प्लॉङ्क्/ *क्रि* [*सक*] (*down*)// (*अनौप*) धाडकन् टाकणे, कसेतरी ठेवणे : *P~ it (down) on the chair, खुर्चीत टाक.*

plonk^{2} /प्लॉङ्क्/ *ना* [*अगण*] (*अनौप विशेषतः ब्रि*) स्वस्तातली हलकी दारू.

plop /प्लॉप्/ *ना* [*गण*] पाण्यात हलकेच पडणाऱ्या वस्तूचा आवाज, डब्ब्. **plop** *क्रि* (**-pp-**) [*अक*] डबकन् पाण्यात पडणे.

plot^1 /प्लॉट्/ *ना* [*गण*] जमिनीचा लहानसा तुकडा. **plot** *क्रि* **(-tt-)** [*सक*] १ नकाशावर (जहाज किंवा विमान यांचे) स्थान किंवा मार्ग दाखवणे. २ आलेखावरील बिंदू जोडून रेषा काढणे.

plot^2 /प्लॉट्/ *ना* [*गण*] १ अनेक लोकांनी गुप्तपणे आखलेली योजना – विशेषतः वाईट कृत्यासाठी, कपटकारस्थान, कुटिल डाव, व्यूह. २ कादंबरी, चित्रपट वगैरेच्या कथेतील घटना. **plot** *क्रि* **(-tt-)** [*अक, सक*] कारस्थान करणे, डाव रचणे.

plough (*अमे* **plow**) /प्लाउ/ *ना* [*गण*] जमीन फोडायला आणि माती वर-खाली करायला वापरायचे मोठे हत्यार, नांगर, हल. **plough** (*अमे* **plow**) *क्रि* १ [*अक, सक*] नांगरणे. २ (*क्रिब*) **plough sth back** उद्योगात मिळालेला नफा पुन्हा त्यातच गुंतवणे. **plough into sth** एखाद्या गोष्टीत मुसंडी मारून शिरणे, घुसणे. **plough (one's way) through sth** धीमेपणाने अडचणीतून वाट काढणे.

ploy /प्लॉइ/ *ना* [*गण*] फायद्यावर डोळा ठेवून केलेली कृती किंवा बोललेले शब्द.

pluck /प्लैक्/ *क्रि* [*सक*] १ खुडणे, तोडणे; वेचणे : *~ flowers/fruit, फुले/फळे खुडणे.* २ (कोंबडीची वगैरे) पिसे उपटणे. ३ *(at)*// घट्ट पकडून/धरून ओढणे, हिसकणे. ४ (तंतूवाद्याच्या तारा) छेडणे. ५ (*वाक्प्र*) **pluck up 'courage** अवसान आणणे. **pluck** *ना* [*अगण*] धीर, अवसान. **plucky** *वि* **(-ier, -iest)** शूर, धीराचा.

plug /प्लैग्/ *ना* [*गण*] १ वॉश बेसिन किंवा आंघोळीचा मोठा टब यांच्या भोकाला लावायचे रबराचे किंवा प्लॅस्टिकचे घट्ट बूच. २ विद्युत्प्रवाह जोडणारे धातूच्या पट्ट्या असलेले एक साधन, निग, गट्टा, गुडदी, कील. ३ (*अनौप*) आकाशवाणी किंवा दूरदर्शनवरची मालाची जाहिरात. **plug** *क्रि* **(-gg-)** [*सक*] १ (बूच किंवा बोळा लावून भोक) बंद करणे, अडवणे. २ (*अनौप*) मालाची आकर्षक जाहिरात किंवा प्रसिद्धी करणे. ३ (*क्रिब*) **plug away (at sth)** एखाद्या गोष्टीवर कष्ट घेणे. **plug sth in** निग घालून विद्युत्प्रवाह जोडणे. **'plug-hole** *ना* [*गण*] बूच लावायचे बेसिनचे वगैरे तोंड किंवा भोक.

plum /प्लैम्/ *ना* [*गण*] मधे बी असणारे पातळ सालीचे गोल आकाराचे अलुबुखार सारखे एक गोड फळ. **plum** *वि* (*अनौप*) छान आणि हवासा वाटणारा : *a ~ job, मस्त नोकरी.*

plumage /'प्लूमिज्/ *ना* [*अगण*] पक्ष्यांच्या अंगावरची पिसं, पिसारा.

plumb /प्लैम्/ *क्रि* [*सक*] १ नीट समजून घेणे (किंवा प्रयत्न करणे). २ (*वाक्प्र*) **plumb the depths of sth** एखाद्या गोष्टीचा अगदी नीचतम बिंदू गाठणे. **plumb** *क्रिवि* बरोबर, नेमका : *~ in the middle, अगदी बरोबर मधे.* **'plumb-line** *ना* [*गण*] खास करून भिंत क्षितिजलंब आहे की नाही हे तपासायला वापरण्यात येणारी एका टोकाला वजन बांधलेली दोरी, ओळंबा, लंबक, अवलंब.

plumber /'प्लैम(र्)/ *ना* [*गण*] नळ दुरुस्ती करणारा किंवा नळ बसवणारा.

plumbing /'प्लैमिङ्/ *ना* [*अगण*] १ इमारतीतील नळ, टाक्या वगैरेची योजना. २ नळदुरुस्ती करणाऱ्याचे किंवा नळ बसवणाऱ्याचे काम.

plume /प्लूम्/ *ना* [*गण*] १ पीस – विशेषतः मोठे आणि रंगीत. २ पिसाच्या आकाराचे हवेत उठणारे काही : *a ~ of smoke, धुराची रेषा.*

plummet /'प्लैमिट्/ *क्रि* [*अक*] एकदम खाली येणे, कोसळणे : *House prices have ~ed, घराच्या किंमती अचानक कोसळल्या/एकदम घसरल्या आहेत.*

plump^1 /प्लैम्प्/ *वि* गलेलठ्ठ, गबदूल. **plump** *क्रि* (*क्रिब*) **plump up** फुगवणे : *~ up the cushions, उशा फुगवणे.* **plumpness** *ना* [*गण*] लठ्ठपणा, थुलथुलीतपणा.

plump^2 /प्लैम्प्/ *क्रि* (*क्रिब*) **plump (oneself/sb/sth) down** धप्कन खाली पडणे/पाडणे, बद्दिशी पडणे. **plump for sb/sth** एखाद्याला निवडणे, मत देणे. **plump** *ना* [*गण, बहुधा अे.व*] धप् (असा आवाज).

plunder /'प्लैन्ड(र्)/ *क्रि* [*अक, सक*] खास करून लढाईत लुटणे. **plunder** *ना* [*अगण*] १ लूट करणे. २ लुटीचा माल, लूट.

plunge /प्लैन्ज्/ *क्रि* [*अक, सक*] अचानक

आणि जोरात पुढे आणि/किंवा खाली सरकणे, घुसणे : *The car ~d into the river, गाडी नदीत घुसली* ○ *He ~d his hands into his pockets, त्याने आपले हात खिशात कोंबले.* **plunge** *ना* १ [*गण,* बहुधा *अे.व*] घुसण्याची क्रिया. २ (*वाक्प्र*) **take the 'plunge** शेवटी धीटपणे काही करण्याचे ठरवणे, धाडस करण्याचा निर्णय. **plunger** *ना* [*गण*] यंत्रातील वर-खाली होणारा भाग, मुसळी.

pluperfect /,प्लू'पऽफिक्ट्/ *ना* **the pluperfect** [*अे.व*] (*व्याकरण*) भूतकाळातील एखाद्या विशिष्ट कालापूर्वी क्रिया पूर्ण झाल्याचे दाखविणारे क्रियापदाचे रूप – इंग्रजीत *had* आणि क्रियापदाचे भूतकाळवाचक धातुविशेषण यांनी होणारे.

plural /'प्लुअरल्/ *ना* [बहुधा *अे.व*], *वि* (*व्याकरण*) बहुवचन किंवा अनेकवचन (दाखवणारे शब्दाचे रूप) : *The ~ of 'child' is 'children', 'child' या शब्दाचे बहुवचन 'children' असे आहे.*

plus /प्लस्/ *शब्दयो* १ अधिक : *One ~ two equals three, एक अधिक दोन बरोबर/म्हणजे तीन.* २ शून्यावर. ३ (*अनौप*) तसेच; सह, बरोबर. **plus** *वि* शून्याहून जास्त; अधिक होकारात्मक. **plus** (तसेच **plus sign**) *ना* [*गण*] १ अधिक चिन्ह (+), धन. २ (*अनौप*) चांगली भर.

plush /प्लश्/ *वि* रुबाबदार, किमती आणि सुखकारक.

plutonium /प्लू'टउनिअम्/ *ना* [*अगण*] (*रसायनशास्त्र*) आण्विक अस्त्रे आणि विक्रिया संच यात वापरले जाणारे किरणोत्सर्गी मूलद्रव्य.

ply^1 /प्लाइ/ *ना* [*अगण*] १ लोकर, दोरी यांना धाग्यांच्या संख्येमुळे येणारी जाडी. २ थरांवरून ठरणारी प्लायवुडची जाडी. **'plywood** *ना* [*अगण*] लाकडाचे पातळ थर एकमेकांवर चिकटवून तयार केलेली फळी, स्तरकाष्ठ.

ply^2 /प्लाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **plied**) १ [*अक, सक*] (जहाजांबाबत वगैरे) (मार्गाने) नियमितपणे जाणे : *ferries that ~ between the islands, बेटांकडे नियमितपणे खेपा घालणाऱ्या नौका.* २ (*वाक्प्र*) **ply one's 'trade** एखादे (कसब असणारे) काम करणे. ३ (*क्रिब*) **ply sb with sth** (क) एखाद्याला (खायला प्यायला) देत राहणे, वाढत राहणे. (ख) एखाद्याला (प्रश्न) विचारत राहणे.

PM /,पी 'अेम्/ *संरू* (*अनौप* विशेषतः *ब्रि*) Prime Minister, पंतप्रधान.

pm /,पी 'अेम्/ *संरू* दुपार.

pneumatic /न्यू'मॅटिक्/ *वि* १ दाबलेल्या हवेवर चालणारे, वातशक्तिचलित, वायवीय : *a ~ drill, वायवीय गिरमिट.* २ हवेने भरलेला : *a ~ tyre, हवा भरलेले टायर.* **pneumatically** /-क्लि/ *क्रिवि* वायुशक्तीने, हवेच्या दाबावर.

pneumonia /न्यू'मउनिअ/ *ना* [*अगण*] फुफ्फुसांना सूज येणारा रोग, फुफ्फुसदाह.

PO /,पी 'अउ/ *संरू* १ Post Office डाकघर. २ postal order पोस्टाचा धनादेश.

poach^1 /पउच्/ *क्रि* १ [*अक, सक*] दुसऱ्याच्या हद्दीत जाऊन विनापरवाना (जनावरे) पकडणे. २ [*सक*] (*ला*) फसवून घेणे, लुबाडणे; चोरणे. **poacher** *ना* [*गण*] विनापरवाना दुसऱ्याच्या क्षेत्रात फासेपारध करणारा.

poach^2 /पउच्/ *क्रि* [*सक*] मंदाग्निवर उकळणाऱ्या पाण्यात (अंड्याचा बलक किंवा मासा) शिजवणे.

pock /पॉक्/ *ना* [*गण*] **'pock-mark** अंगावरील देवीचा व्रण. **'pock-marked** *वि* अंगावर देवीचे व्रण असलेला.

pocket /'पॉकिट्/ *ना* [*गण*] १ (क) खिसा. (ख) मोटारीच्या दारावरील किंवा सूटकेसमधील कप्पा. २ लहान वेगळा गट किंवा भाग : *~s of resistance, प्रतिकाराचे गोट.* ३ [बहुधा *अे.व*] खर्चाकरता असलेले पैसे : *Within reach of everyone's ~, प्रत्येकाच्या खिशाला परवडणारे.* ४ (*वाक्प्र*) **,out of 'pocket** स्वतःच्या पैशातील काही रक्कम खर्च केलेला. **pocket** *क्रि* [*सक*] १ खिशात घालणे. २ चोरणे, ढापणे. **pocket** *वि* खिशात मावेल इतका छोटा : *a ~ calculator, खिशात मावेल इतके लहान गणनयंत्र.* **'pocket-book** *ना* [*गण*] छोटीशी वही. **'pocket-money** *ना* [*अगण*] लहान मुलाला दर आठवड्याला आईवडील खर्चायला देतात ते पैसे.

pod /पॉड्/ *ना* [*गण*] आत दाणे असतात ती झाडावरची लांब हिरवी शेंग, शिंबा. **pod** *क्रि* (**-dd-**) [*सक*] शेंगा सोलणे.

podgy /'पॉजि/ *वि* (**-ier, -iest**) (माणसाबाबत) जाडा आणि बुटका, गिड्डा.

poem /'पउ·इम्/ *ना* [*गण*] कविता.

poet /'पउइट्/ *ना* [*गण*] कविता लिहिणारा, कवी. ,**Poet 'Laureate** /'लॉरिअट्; *अमे* 'लॉऽर्-/ *ना* [*गण*] ब्रिटनच्या राजघराण्यात विशेष प्रसंगी काव्यरचना करण्यासाठी नेमलेला कवी, राजकवी.

poetic /पउ'एटिक्/ (तसेच **poetical** /-इक्ल्/) *वि* १ काव्यमय, सुडौल आणि सुखकर. २ काव्यविषयक, कवितेचा. **poetically** /-क्लि/ *क्रिवि* काव्यमय रीतीने.

poetry /'पउइट्रि/ *ना* [*अगण*] १ कविता, काव्य. २ लालित्य, सफाईदारपणा : *the ~ of dance, नाचाचे लालित्य.*

poignant /'पॉइन्यन्ट्/ *वि* दुःखकारक, वेदनाकारक : *~ memories, वेदना देणाऱ्या आठवणी.* **poignancy** /-यन्सि/ *ना* [*अगण*] वेदनाकारकता, दुःखाची तीव्रता. **poignantly** *क्रिवि* वेदनाकारक रीतीने.

point^{1} /पॉइन्ट्/ *ना* १ [*गण*] टोक : *the ~ of a pin/pencil, टाचणी/पेन्सिलचे टोक.* २ [*गण*] समुद्रात गेलेला चिंचोळा भूखंड, भूशिर. ३ [*गण*] लेखनातला किंवा मुद्रणातला पूर्णविराम; दशमान पद्धतीतले पूर्णांकदर्शक चिन्ह. ४ [*गण*] काल किंवा अवकाश यावरील विशिष्ट बिंदू. ५ [*गण*] प्रगतीचा किंवा उष्णता बिंदू : *boiling ~, उत्कलन बिंदू.* ६ [*गण*] होकायंत्रातील ३२ खुणांपैकी एक खूण किंवा एक बिंदू. ७ [*गण*] मोजण्याचा एकक, गुण : *We won the game by six ~s, आम्ही सहा गुणांनी डाव जिंकला.* ८ [*गण*] सर्वसाधारण कल्पना : *the main ~s of a story, गोष्टीची सर्वसाधारण कल्पना.* ९ **the point** [*अ.व*] मुख्य कल्पना, मुख्य मुद्दा : *come to/get to the ~, मुख्य मुद्द्यावर येणे* ○ *see/miss the ~ of a joke, विनोदाची मुख्य कल्पना समजणे/न समजणे.* १० [*अगण*] हेतू, उद्देश; कारण : *There's no ~ in going now, आता जाण्यात काही मतलब नाही.* ११ [*गण*] विशिष्ट गुण, विशेष : *Tidiness is not his strong ~, व्यवस्थितपणा हा त्याचा विशेष गुण नाही.* १२ [*गण*] विद्युत खोबणी. १३ **points** [*ब.व*] (*ब्रि*) रेल्वे गाडीचा मार्ग बदलण्याचे सरकते रूळ. १४ (*वाक्प्र*) **beside the 'point** असंबद्ध, मुद्दा सोडून. **make a point of doing sth** एखादी गोष्ट करण्यासाठी खास परिश्रम घेणे. **on the point of doing sth** एखादी गोष्ट करण्याच्या बेतास, त्याच क्षणी. **a point of 'view** एखाद्या गोष्टीबाबतचे मत, दृष्टिकोन. **take sb's 'point** एखाद्याचे म्हणणे समजून मान्य करणे. **to the 'point** सुसंबद्ध, सुसंगत.

point^{2} /पॉइन्ट्/ *क्रि* १ [*अक*] (*at/to*)// एखाद्या गोष्टीकडे लक्ष वेधणे; बोट दाखवून निर्देश करणे, अंगुलीनिर्देश करणे. २ [*सक*] *at*// एखाद्याच्या दिशेने रोखणे : *~ a gun at sb, एखाद्यावर बंदूक रोखणे.* ३ [*सक*] (विटांमधे वगैरे) सीमेन्ट भरणे, दरजा भरणे. ४ (*क्रिब*) **point sth out** एखाद्या गोष्टीकडे लक्ष वेधणे, दाखवून देणे, नजरेस आणणे. **pointed** *वि* १ टोकदार. २ (*ला*) विशिष्ट व्यक्तीच्या विरुद्ध केलेले : *~ remarks, एखाद्याच्या विरुद्ध केलेले विधान.* **pointedly** *क्रिवि* धारदारपणे.

point-blank /,पॉइन्ट् 'ब्लॅङ्क्/ *वि, क्रिवि* १ (धरलेल्या किंवा मारलेल्या नेमाबाबत) अगदी जवळून. २ (*ला*) स्पष्टपणे किंवा परखडपणे (कशाची पर्वा न करता) : *He refused ~, त्याने स्पष्ट नकार दिला.*

pointer /'पॉइन्ट(र्)/ *ना* [*गण*] १ वस्तूचा निर्देश करण्यासाठी वापरायची छडी. २ वजन काट्यावर, चिन्हित फलकावर वगैरे वापरलेली धातूची किंवा प्लॅस्टिकची दर्शककाडी, काटा. ३ उपदेश. ४ आखूड केसांचा एक शिकारी कुत्रा.

pointless /'पॉइन्ट्लिस्/ *वि* अर्थहीन, निरर्थक किंवा निरुद्देश; विफल, कुचकामी. **pointlessly** *क्रिवि* निरर्थकपणे किंवा विना हेतू; फुकट.

poise /पॉइझ्/ *ना* [*अगण*] १ हालचालीवरचे संयमित नियंत्रण, तोल. २ (*ला*) आत्मविश्वासपूर्ण असा स्वतःवरचा ताबा, स्वतःचा तोल. **poise** *क्रि* [*अक, सक*] समतोल राहणे, तोल राखणे. **poised** *वि* १

(to; for)// कृती करण्यास तयार. २ (*ला*) स्वतःवर ताबा असलेला, आत्मसंयमी.

poison /'पॉइझ़न्/ *ना* [*गण*] घेतल्यास मृत्यू किंवा गंभीर आजार आणणारा पदार्थ, विष. **poison** *क्रि* [*सक*] १ विष देणे; विषप्रयोग करणे. २ (*ला*) खराब करणे, सत्यानाश करणे. **poisonous** *वि* विषारी.

poke /पउक्/ *क्रि* [*अक, सक*] १ काठीने वगैरे ढोसणे. २ बाहेर काढणे, खुपसणे : *P~ your head out of the window, तू खिडकीबाहेर डोके काढ.* ३ (*वाक्प्र*) **poke 'fun at sb** एखाद्याची टिंगल करणे, एखाद्याचे माप काढणे. **poke one's nose into sth** ➪ NOSE^1. **poke** *ना* [*गण*] ढोसणी.

poker^1 /'पउक(र्)/ *ना* [*गण*] आगीत निखारे हालवण्याची, कोळसे ढोसण्याची धातूची दांडी, कालथा, खोरणे.

poker^2 /'पउक(र्)/ *ना* [*अगण*] पैशासाठी खेळला जाणारा पत्त्याचा एक डाव.

poky /'पउकि/ *वि* (**-ier, -iest**) (*अनौप अधिक्षेपी*) फारच लहान, टिचभर.

polar /'पउल(र्)/ *वि* १ उत्तर किंवा दक्षिण ध्रुवाचा किंवा ध्रुवाजवळचा, ध्रुवीय. २ (*औप*) परस्परविरोधी, दोन टोकांचा, दोन ध्रुवांचा. **'polar bear** *ना* [*गण*] उत्तर ध्रुवावरील पांढरे अस्वल. **polarity** /प'लॅरटि/ *ना* [*अगण*] (*औप*) दोन विरोधी गुण किंवा वृत्ती असण्याची स्थिती, ध्रुवता, ध्रुवत्व, पक्षता.

polarize /'पउलराइझ़्/ *क्रि* [*अक, सक*] दोन परस्परविरोधी गटांत लोक किंवा मते विभागणे, ध्रुवीकरण होणे/करणे : *an issue that ~d opinions, मतांचे ध्रुवीकरण झालेला वाद.* **polarization** /,पउलराइ'झ़ेइशन् *अमे* -रि'झ़-/ *ना* [*अगण*] ध्रुवीकरण.

pole^1 /पउल/ *ना* [*गण*] १ पृथ्वीच्या अक्षाच्या दोन टोकांपैकी एक ध्रुव : *the North/South P~, उत्तर/दक्षिण ध्रुव.* २ चुंबकाचे किंवा विद्युत्घटाचे टोक – चुंबकीय ध्रुव किंवा विद्युत्ध्रुव. ३ (*वाक्प्र*) **be 'poles apart** परस्परविरोधी मते असणे, जमीन-अस्मानाचा फरक असणे.

pole^2 /पउल/ *ना* [*गण*] धातूची किंवा लाकडाची उंच काठी, खांब. **'pole-vault** *ना* [*गण*] उंच काठी वापरून उंचावर ठेवलेल्या दांड्यावरून मारलेली उडी.

polecat /'पउल्कॅट्/ *ना* [*गण*] उग्र वास येणारा एक छोटा केसाळ प्राणी, मार्जारिका.

police /प'लीस्/ *ना* **(the) police** [*ब.व*] सार्वजनिक सुव्यवस्था राखणे, गुन्हेगारीला आळा घालणे वगैरे कामे करणारी अधिकृत संघटना किंवा त्या संघटनेतील व्यक्ती. **police** *क्रि* [*सक*] पोलिसांसारखी सुव्यवस्था ठेवणे. **po'lice force** *ना* [*गण*] एखाद्या राज्याचे पोलीस दल. **po'liceman, po'lice-officer, po'licewoman** *ना* [*गण*] पोलीस, पोलीस अधिकारी, महिला पोलीस. **po'lice station** *ना* [*गण*] पोलीस चौकी.

policy /'पॉलसि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) १ कृतियोजना, धोरण; ध्येयधोरण : *the Government's foreign ~, सरकारचे परराष्ट्र-धोरण.* २ विमा करार.

polio /'पउलिअउ/ *ना* [*अगण*] बहुधा विकलांग करणारा मज्जारज्जूचा एक संसर्गजन्य रोग, वारे जाणे.

polish /'पॉलिश्/ *क्रि* [*सक*] १ घासून चकचकीत करणे, लख्ख करणे, उजळा देणे. २ *(up)//* (*ला*) सुधारणे. ३ (*क्रिव*) **polish sth off** पटकन् संपवून टाकणे, फडशा पाडणे. **polish** *ना* १ [*अगण*] पॉलिश करण्यासाठी वापरायचा पदार्थ. २ [*अे.व*] पॉलिश करणे. ३ [*अगण*] (*ला*) सफाई. **polished** *वि* कुशल आणि टापटिपीचा; छान, सफाईदार.

polite /प'लाइट्/ *वि* सुशील, सभ्य. **politely** *क्रिवि* सभ्यपणे. **politeness** सभ्यपणा, सुशीलता.

politic /'पॉलटिक्/ *वि* (*औप*) (कृतीबाबत) समजदार, चतुर; शहाणा.

political /प'लिटिक्ल्/ *वि* १ राज्याचा, राजकाजाचा; शासकीय, राज्यकारभारविषयक. २ राजकारणाचा, राजकारणी; राजकीय पक्षांबाबतचा. ३ (लोकांबाबत) राजकारण करणारा, राजकारणी. **politically** /-क्लि/ *क्रिवि* राजकीयदृष्ट्या.

politician /,पॉलि'टिश्न्/ *ना* [*गण*] राजकारणात भाग घेणारा, राजकारणी,

राजकीय व्यक्ती.

politics /'पॉलटिक्स्/ *ना* १ (तसेच ब.व क्रियापदासह अे.व) राजनीती; राजकारण, राजकीय बाबी. २ [*ब.व*] राजकीय मते. ३ (अे.व क्रियापदासह) राज्यशास्त्र.

polka /'पॉल्क; *अमे* 'पउल्क/ *ना* [*गण*] एक जोशपूर्ण नृत्य (आणि त्याचे संगीत).

poll /पउल्/ *ना* १ [*गण*] लोकमताचे सर्वेक्षण, लोकमत अजमावणे. २ [*गण*] निवडणूक. ३ [*अे.व*] मतदान, मिळालेली मते. **poll** *क्रि* [*सक*] १ (ठराविक मते) मिळणे. २ लोकमत अजमावताना एखाद्याचे मत विचारणे. **'polling-booth** (तसेच **'polling-station**) *ना* [*गण*] मतदार जिथे मते टाकायला जातात ती जागा, मतदान केंद्र. **poll tax** *ना* [*अे.व*] (*अनौप*) = COMMUNITY CHARGE (COMMUNITY).

pollen /'पॉलन्/ *ना* [*अगण*] एक द्रव्य की ज्यामुळे इतर फुलांमधे फळधारणा होते, पुष्पपराग, पराग.

pollinate /'पॉलनेइट्/ *क्रि* [*सक*] परागण करणे. **pollination** /,पॉल'नेइश्न्/ *ना* [*अगण*] परागण.

pollute /प'लूट्/ *क्रि* [*सक*] खराब करणे, दूषित करणे : *~d water, दूषित पाणी.* **pollution** /प'लूश्न्/ *ना* [*अगण*] प्रदूषण.

polo /'पउलउ/ *ना* [*अगण*] घोड्यावरून लांब दांडीच्या लाकडी हातोडीने चेंडू खेळायचा एक खेळ. **'polo neck** *ना* [*गण*] गोल जाड गळपट्टी किंवा उलटी केलेली कॉलर.

polyester /,पॉलि'अेस्ट(र्); *अमे* 'पॉलीअेस्टर्/ *ना* [*अगण*] कापड करण्याचा एक कृत्रिम धागा.

polygamy /प'लिगमि/ *ना* [*अगण*] अेकाच वेळी अेकापेक्षा अधिक लग्नाच्या बायका असण्याची पद्धत, बहुपत्निकत्व.

polygon /'पॉलिगन्; *अमे* -गॉन्/ *ना* [*गण*] पाच किंवा त्याहून जास्त सरळ बाजू असलेली आकृती, बहुभुजाकृती, बहुकोणाकृती.

polystyrene /,पॉलि'स्टाइरीन्/ *ना* [*अगण*] भांडी, डबे वगैरे करण्यासाठी वापरले जाणारे प्लॅस्टिकचे हलके द्रव्य.

polytechnic /,पॉलि'टेक्निक्/ *ना* [*गण*] खास करून तांत्रिक किंवा वैज्ञानिक प्रगत शिक्षणाचे महाविद्यालय.

polythene /'पॉलिथीन्/ *ना* [*अगण*] जलरोधक आवेष्टन वगैरेसाठी वापरायचे प्लॅस्टिकपासून केलेले ताव.

polyunsaturated /,पॉलिअन्'सॅचरेइटिड्/ *वि* (विशेषतः वनस्पती तुपाबाबत) रक्तातील कोलेस्टेरॉल वाढणार नाही अशा तऱ्हेची रासायनिक घटना असलेले.

pomegranate /'पॉमिग्रॅनिट्/ *ना* [*गण*] जाड सालीचे आणि बी असलेल्या लाल दाण्यांनी भरलेले एक गोल फळ, डाळिंब.

pomp /पॉम्प्/ *ना* [*अगण*] सार्वजनिक समारंभातला थाटमाट, दिमाख, डामडौल.

pompous /'पॉम्पस्/ *वि* बडेजाव करणारा, आढ्यतेखोर. **pomposity** /पॉम्'पॉसटि/ *ना* [*अगण*] आढ्यता, अहंपणा. **pompously** *क्रिवि* फुशारकीने, तोऱ्याने.

poncho /'पॉन्चउ/ *ना* [*गण*] (*ब.व ~s*) लांब अंगरख्यासारखा दिसणारा वर फक्त गळा असलेला एक कपडा.

pond /पॉन्ड्/ *ना* [*गण*] डबके.

ponder /'पॉन्ड(र्)/ *क्रि* [*अक, सक*] एखाद्या गोष्टीचा काळजीपूर्वक किंवा नीट विचार करणे, चिंतन करणे.

ponderous /'पॉन्डरस्/ *वि* (*औप*) १ मंद आणि बेडोल, जड. २ (लेखन किंवा भाषणाबाबत) गंभीर आणि कंटाळवाणे, जडजंबाळ. **ponderously** *क्रिवि* जडपणे, बेडोलपणे.

pong /पॉङ्/ *क्रि* [*अक*] *ना* [*गण*] (*ब्रि अनौप*) दुर्गंध (सोडणे), वास मारणे.

pontoon^{1} /पॉन्'टून्/ *ना* [*गण*] सपाट तळाची नौका किंवा खास करून पुलाला आधार देणारी सपाट तळाची रचना.

pontoon^{2} /पॉन्'टून्/ *ना* [*अगण*] (*ब्रि*) पत्त्याचा एक खेळ.

pony /'पउनि/ *ना* [*गण*] (*ब.व* -ies) लहान घोडा, तट्टू. **'pony-tail** *ना* [*गण*] शेपटीसारखे लोंबणारे मागे बांधलेले केस.

poodle /'पूड्ल्/ *ना* [*गण*] दाट कुरळ्या

केसांचा एक लहान कुत्रा.

pool^1 /पूल्/ *ना* [*गण*] १ डबके. २ एखाद्या पृष्ठभागावर पसरलेला द्रवपदार्थ, थारोळे : *a ~ of blood, रक्ताचे थारोळे.* ३ = SWIMMING-POOL (SWIM).

pool^2 /पूल्/ *ना* १ सर्वांच्या मालकीचा असा मालाचा साठा, सुविधा किंवा सर्वांना उपयुक्त पडेल असा माणसांचा गट, संचय : *a 'typing~, टंकलेखन-संचय.* २ [*अगण*] (विशेषतः *अमे*) स्नूकरसारखा एक खेळ. ३ **the pools** [*ब.व*] = FOOTBALL POOLS (FOOT). **pool** *क्रि* [*सक*] संचय करणे, सर्वांसाठी एकत्र करून ठेवणे; सहभागी होणे.

poor /पॉऽ(र्); *अमे* पुअर्/ *वि* १ गरीब, निर्धन, दरिद्री. २ अल्प, कमी : *a ~ crop, कमी पीक.* ३ निकृष्ट : *~ soil, निकृष्ट जमीन.* ४ दयनीय, बिचारा : *P~ Lisa is ill, बिचारी लिसा आजारी आहे.* **poorness** *ना* [*अगण*] दरिद्रीपणा; अल्पता; निकृष्टपणा.

poorly /'पॉऽलि; *अमे* 'पुअर्लि/ *वि* (*अनौप*) तब्येत चांगली नाही असा, आजारी. **poorly** *क्रिवि* दरिद्रीपणाने, वाईट.

pop^1 /पॉप्/ *ना* १ [*गण*] फट् असा आवाज. २ [*अगण*] (*अनौप*) एक फसासणारे पेय. **pop** *क्रिवि* फट् आवाज करत, फट्दिशी.

pop^2 /पॉप्/ *ना* [*गण*] (*अनौप*) वडील.

pop^3 /पॉप्/ *ना* [*अगण*] (*अनौप*) जोरदार ठेका असलेले आधुनिक लोकप्रिय संगीत : *a ~ singer/group, पॉप गायक/गानवृंद.*

pop^4 /पॉप्/ *क्रि* (**-pp-**) १ [*अक, सक*] फट् आवाज करणे/काढणे. २ [*अक*] एखाद्या दिशेने झपझप जाणे : *She's just ~ped out to the shops, ती आत्ताच दुकानांकडे झपझप गेली.* ३ (*क्रिव*) **pop up** अचानक येणे, उपटणे. **'popcorn** *ना* [*अगण*] भाजल्यावर उमलणाऱ्या मक्याच्या लाह्या. **'pop-eyed** *वि* आश्चर्याने डोळे विस्फारलेला.

pope /पउप्/ *ना* [*गण*] रोमन कॅथलिक चर्चचा प्रमुख धर्मगुरू.

poplar /'पॉप्ल(र्)/ *ना* [*गण*] सरळसोट वाढणारे पण बुंधा पातळ असणारे एक उंच झाड, बहान.

poppy /'पॉपि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) मोठी तांबडी फुले येणारे एक झाड. **poppy seed** *ना* [*गण*] खसखस.

populace /'पॉप्युलस्/ *ना* **the populace** [*अ.व*] (*औप*) देशातील सर्वसामान्य लोक, जनता, रयत.

popular /'पॉप्युल(र्)/ *वि* १ लोकप्रिय. २ (श्रद्धेबाबत) खूप लोकांत असणारी. ३ सर्वसामान्य लोकांचा किंवा लोकांसाठी असलेला – तज्ज्ञांसाठी नसलेला, गर्दीला आवडणारा. **popularity** /,पॉप्यु'लॅरटि/ *ना* [*अगण*] लोकप्रियता. **popularize** *क्रि* [*सक*] लोकप्रिय करणे. **popularly** *क्रिवि* लोकांत प्रचलित अशा रीतीने, लोकप्रियतेनुसार.

populate /'पॉप्युलेइट्/ *क्रि* [*सक*] (बहुधा कर्मणी) (एखाद्या ठिकाणी) वस्ती करून राहणे, वस्तीला येणे, वस्ती होणे.

population /,पॉप्यु'लेइश्न्/ *ना* [*गण*] एखाद्या देशाची, शहराची लोकसंख्या.

porcelain /'पॉऽसलिन्/ *ना* [*अगण*] चिनी माती (आणि तिच्या वस्तू).

porch /पॉऽच्/ *ना* [*गण*] इमारतीच्या प्रवेशद्वाराजवळचा छप्पर असणारा भाग, द्वारमंडप, ढेलज, देवडी.

porcupine /'पॉऽक्युपाइन्/ *ना* [*गण*] अंगावर टोकदार काटे असणारा एक प्राणी, सायाळ, साळ, साळिंदर.

pore^1 /पॉऽ(र्)/ *ना* [*गण*] त्वचेतील घाम ज्यावाटे बाहेर पडतो ते रंध्र, छिद्र.

pore^2 /पॉऽ(र्)/ *क्रि* (*क्रिव*) **pore over sth** एखाद्याचा काळजीपूर्वक अभ्यास करणे, काटेकोरपणे तपासणे.

pork /पॉऽक्/ *ना* [*अगण*] डुकराचे मांस.

porn /पॉऽन्/ *ना* [*अगण*] (*अनौप*) PORNOGRAPHY चा संक्षेप.

pornography /पॉऽ'नॉग्रफि/ *ना* [*अगण*] कामवासना चेतावणारे चित्रपट, पुस्तके वगैरे, लैंगिक वासना चाळवणारे अश्लील वाङ्मय, संभोगवर्णन. **pornographic** /,पॉऽन'ग्रफिक्/ *वि* लैंगिक, संभोगवर्णनात्मक.

porous /'पॉऽरस्/ *वि* हवा, पाणी जाऊ देणारा, सच्छिद्र.

porpoise /'पॉऽपस्/ *ना* [*गण*]

डॉल्फिनसारखा एक जलचर, शिंशुक, गाधा मासा, घड्याळ मासा.

porridge /'पॉरिज्; *अमे* 'पॉऽर्-/ *ना* [*अगण*] भरडलेले जव (ओट्स्) पाण्यात किंवा दुधात शिजवून केलेला लापशीसारखा मऊ पदार्थ.

port^{1} /पॉऽट्/ *ना* [*गण*] १ बंदर. २ बंदर असलेले गाव किंवा शहर, बंदरगाव.

port^{2} /पॉऽट्/ *ना* [*अगण*] विमानाच्या किंवा जहाजाच्या मुखाकडे तोंड करून बसल्यास डाव्या हाताकडची विमानाची किंवा जहाजाची बाजू.

port^{3} /पॉऽट्/ *ना* [*अगण*] पोर्तुगालमधली गडद लाल रंगाची गोड पण कडक दारू.

portable /'पॉऽटब्ल्/ *वि* वाहून नेण्यासारखा, सुटसुटीत.

porter /'पॉऽट(र्)/ *ना* [*गण*] १ रेल्वेतला सामान वगैरे वाहून नेण्याचे काम करणारा हमाल. २ हॉटेलच्या दारावर उभा असणारा सेवक, द्वारसेवक.

portfolio /पॉऽट्'फउलिअउ/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s**) १ कागदपत्रे, रेखाटने वगैरे ठेवण्याची (बहुधा चामड्याची) चपटी बॅग. २ मालकीचे शेअर्स. ३ मंत्र्याचे पद आणि कामाचे खाते.

porthole /'पॉऽट्हउल्/ *ना* [*गण*] जहाज किंवा विमान यातील बाजूची (काचेची) खिडकी, जहाजाची जंगी.

portion /'पॉऽश्न्/ *ना* [*गण*] १ भाग. २ एका माणसाचे अन्न. **portion** *क्रि* (*क्रिब*) **portion sth out** एखाद्या गोष्टीचे भाग करणे, वाटे करणे.

portly /'पॉऽट्लि/ *वि* (**-ier, -iest**) दणकट; जाड, लठ्ठ.

portmanteau /पॉऽट्'मॅन्टउ/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s** किंवा **~x** /-टउझ़्/) कपडे ठेवायची चामड्याची लंबुळकी चौकोनी मोठी बॅग.

portrait /'पॉऽट्रेइट्; तसेच -ट्रिट्/ *ना* [*गण*] १ एखाद्या माणसाचे काढलेले चित्र. २ शब्दवर्णन, शब्दचित्र.

portray /पॉऽ'ट्रेइ/ *क्रि* [*सक*] १ चित्र रेखाटणे. २ शब्दचित्र रेखाटणे. ३ नाटकात भूमिका करणे. **portrayal** *ना* [*गण, अगण*] चित्र; शब्दचित्र.

pose /पउझ़्/ *क्रि* १ [*अक*] (*for*)// फोटोसाठी, चित्रासाठी वगैरे विशिष्ट तऱ्हेने बसणे किंवा उभे राहणे. २ [*अक*] *as*// ढोंग करणे, सोंग आणणे, एखाद्याचा आव आणणे. ३ [*सक*] (प्रश्न किंवा समस्या) निर्माण करणे. ४ [*सक*] (*औप*) (प्रश्न) विचारणे. **pose** *ना* [*गण*] १ चित्रातली, फोटोतली वगैरे बसण्याची किंवा उभे राहण्याची ढब. २ खोटे वर्तन, विचित्र तऱ्हा. **poser** *ना* [*गण*] जटिल समस्या, अवघड प्रश्न.

posh /पॉश्/ *वि* (*अनौप*) झकपक, देखणा, तरतरीत; किमती.

position /प'झ़िश्न्/ *ना* १ [*गण, अगण*] एखाद्या गोष्टीची/व्यक्तीची जागा, स्थान. २ [*गण*] एखाद्या गोष्टीची ठेवण, अंगस्थिती; अवस्था : *lie in a comfortable ~, आरामात पहुडणे.* ३ [*गण*] मत किंवा दृष्टिकोन. ४ [*गण*] परिस्थिती; अवस्था : *I am not in a ~ to help you, तुला मदत करण्याच्या अवस्थेत मी नाहीये म्हणजेच मी तुला मदत करू शकत नाही.* ५ [*गण*] (*औप*) नोकरी. ६ [*गण*] इतरांच्या संदर्भातील एखाद्याचे स्थान किंवा एखाद्याची श्रेणी. ७ (*वाक्प्र*) **in position** योग्य किंवा उचित जागी. **position** *क्रि* [*सक*] ठेवणे.

positive /'पॉझ़टिव्ह्/ *वि* १ स्पष्ट आणि सबळ : ~ *proof, निश्चित पुरावा.* २ (व्यक्तीबाबत) ठाम आणि आत्मविश्वासयुक्त : *I'm ~ he's here, तो येथेच आहे याची मला खात्री आहे.* ३ उपयुक्त; पोषक. ४ (*गणित*) (संख्येबाबत) शून्यापेक्षा जास्त, धन. ५ प्रोटॉनमधून जाणाऱ्या अशा एक प्रकारच्या विद्युत्भाराचा, धन. ६ (*अनौप*) संपूर्ण; खरा, वास्तविक, प्रत्यक्ष : *a ~ pleasure, खरा आनंद.* **positively** *क्रिवि* निश्चितपणे, नक्की; खरेच, प्रत्यक्षपणे.

possess /प'झ़ेस्/ *क्रि* [*सक*] १ जवळ/-पाशी असणे; मालकीचे असणे. २ (विशेषतः कर्मणी) (खास करून भावनेबाबत) (मन) झपाटणे, ग्रासणे : *~ed by jealousy, मत्सरग्रस्त.* **possessor** *ना* [*गण*] (*औप*) मालक.

possession /प'झ़ेश्न्/ *ना* १ [*अगण*]

स्वतःजवळ असण्याची स्थिती, ताबा; मालकी. २ [*गण* विशेषतः *ब.व*] मालकीची वस्तू.

possessive /प'झ़ेसिव्ह्/ *वि* १ दुसऱ्याला काहीही न देणारा, स्वामित्व गाजवणारा. २ (*व्याकरण*) आधारवाचक संबंधी, (मराठीत) षष्ठी विभक्तीचा : *'Yours' is a ~ pronoun, 'yours' हे आधारवाचक संबंधी सर्वनाम आहे.* **possessively** *क्रिवि* स्वामित्व गाजवत. **possessiveness** *ना* [*अगण*] मालकी गाजवण्याची वृत्ती.

possibility /,पॉस'बिलटि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] शक्यता; संभवनीयता. २ [*गण*] संभाव्य गोष्ट.

possible /'पॉसबल्/ *वि* १ करता येण्यासारखा, शक्य; असू शकणारा. २ ठीक, शक्य तितका; स्वीकार्य. **possible** *ना* [*गण*] निवड होण्यासारखी वस्तू किंवा व्यक्ती. **possibly** *क्रिवि* १ कदाचित. २ शक्य तेवढा : *I'll come as soon as I ~ can, शक्य तेवढ्या लवकर मी येतो.*

post^1 /पउस्ट्/ *ना* १ [*अगण*] पत्रे आणि पार्सले गोळा करून इच्छित स्थळी नेऊन वाटप करणारी अधिकृत यंत्रणा, टपाल यंत्रणा. २ [*गण, अगण*] (एकावेळची) डाक, टपाल. **post** *क्रि* [*सक*] टपालाने पाठवणे. **'postbox** *ना* [*गण*] पत्रपेटी. **'postcard** *ना* [*गण*] पोस्टाचे कार्ड. **'post-code** *ना* [*गण*] पत्रांचे गट करणे व बटवडा सुलभ होण्यासाठी अक्षर आणि अंक यांनी तयार केलेला पत्त्याचा एक भाग, पोस्टाचा क्रमांक, पिनकोड. **,post-'haste** *क्रिवि* (*औप*) त्वरेने, झटपट. **'postman** /-मन्/ (*ब.व* **-men**) *ना* [*गण*] टपाल गोळा करणारा आणि वाटणारा. **'postmark** *ना* [*गण*] पाठवल्याचा दिनांक आणि स्थळ दाखविणारा पत्रावरील पोस्टाचा अधिकृत शिक्का. **'post-office** *ना* [*गण*] पोस्टाची कचेरी. **'post-office box** (*संरू* **P'O box**) *ना* [*गण*] पोस्ट ऑफिसातली विशिष्ट क्रमांक असलेली जागा – जेथून संबंधित व्यक्ती पत्रे घेऊन जाते.

post^2 /पउस्ट्/ *ना* १ [*गण*] आधाराचा किंवा खुणेचा धातूचा किंवा लाकडी खांब. २ [*अे.व*] शर्यत संपते ती जागा. **post** *क्रि* [*सक*] १ सार्वजनिक ठिकाणी (नोटीस वगैरे) लावणे. २ पोस्टाने नोटीस पाठवून जाहीर करणे.

post^3 /पउस्ट्/ *ना* [*गण*] १ नोकरी, जागा. २ सैनिक वगैरे कामावर हजर असण्याची जागा, चौकी, ठाणे. **post** *क्रि* [*सक*] १ (एखाद्याला) नोकरीवर पाठविणे – विशेषतः परदेशांत. २ (सैनिक, रक्षक वगैरेना) कामावर घेणे, नेमणे.

postage /'पउस्टिज्/ *ना* [*अगण*] पोस्टाने पाठवायच्या पत्रासाठी द्यावयाची रक्कम, टपालखर्च. **'postage stamp** *ना* [*गण*] = STAMP^1 १.

postal /'पउस्ट्ल्/ *वि* पोस्टाचा, टपालाचा. **'postal order** *ना* [*गण*] पोस्टात वठवून पैसे मिळण्याचा लिखित कागद, डाकप्रेष.

post-date /,पउस्ट्'डेइट्/ *क्रि* [*सक*] (खास करून धनादेशावर) पुढची तारीख टाकणे, पुढच्या तारखेचा धनादेश देणे.

poster /'पउस्ट(र्)/ *ना* [*गण*] मोठे छापील पत्रक किंवा चित्र.

posterior /पॉ'स्टिअरिअ(र्)/ *वि* (*औप*) पाठीमागचा, पार्श्व.

posterity /पॉ'स्टेरटि/ *ना* [*अगण*] (*औप*) भावी पिढी.

postgraduate /,पउस्ट्'ग्रॅजुअट्/ *वि* (शिक्षण वगैरे बाबत) पहिल्या पदवीनंतरचा, पदव्युत्तर. **postgraduate** *ना* [*गण*] पदव्युत्तर अभ्यासक्रमाचा विद्यार्थी.

posthumous /'पॉस्ट्युमस्; *अमे* 'पॉस्चमस्/ *वि* मरणोत्तर. **posthumously** *क्रिवि* मरणोत्तर.

post-mortem /,पउस्ट्'मॉटम्/ *ना* [*गण*] १ मरणाचे कारण शोधण्यासाठी केलेली वैद्यकीय तपासणी, शवपरीक्षा. २ (*अनौप*) एखाद्या घटनेची ती घडून गेल्यानंतरची चिकित्सा, विश्लेषण.

postpone /प'स्पउन्/ *क्रि* [*सक*] पुढे ढकलणे, लांबणीवर टाकणे : *The match was ~d because of the rain, पावसामुळे सामना पुढे ढकलण्यात आला.* **postponement** *ना* [*गण, अगण*] पुढे ढकलणे, तहकुबी.

postscript /'पउसस्क्रिप्ट्/ *ना* [*गण*] पत्राच्या शेवटी दिलेली जादा माहिती, ताजा कलम.

posture /'पॉस्च(र्)/ *ना* १ [*अगण*] उभे राहण्याची, बसण्याची लकब, पद्धत, ढब. २ [*गण*] मनाची वृत्ती.

posy /'पउझ़ि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) फुलांचा लहान गुच्छ.

pot^1 /पॉट्/ *ना* १ [*गण*] (**क**) स्वयंपाकाचे वगैरे गोल भांडे, पातेले. २ [*अगण*] (*व्रात्य*) भांग. ३ **pots** [*ब.व*] (*अनौप*) खूप, प्रचंड : *~s of money, प्रचंड पैसा.* ४ (*वाक्प्र*) **go to 'pot** (*अनौप*) बिघडून जाणे, वाट लागणे. **take ,pot 'luck** मिळेल ते मुकाट्याने घेणे. **,pot-'bellied** *वि* (*अनौप*) ढेरपोट्या. **'pot-hole** *ना* [*गण*] १ पाण्याने खडकात केलेले खोल भोक, कुंड, खळगा. २ पावसाने आणि वाहतुकीने रस्त्यात पडलेला खड्डा. **'pot-shot** *ना* [*गण*] वाकडातिकडा धरलेला नेम.

pot^2 /पॉट्/ *क्रि* (**-tt-**) [*सक*] कुंडीत रोप लावणे. **potted** *वि* १ (शिजवलेले मांस, मासे याबाबत) टिकवायला बरणीत घातलेला. २ (पुस्तक वगैरेबाबत) सोप्या भाषेतला, बाळबोध रूपातला.

potassium /प'टॅसिअम्/ *ना* [*अगण*] मऊ रुपेरी धातू, पाळाश.

potato /प'टेइटउ/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **~es**) बटाटा.

potent /'पउटन्ट्/ *वि* ताकदवान, जोरदार, कडक : ~ *arguments/drugs, जोरदार युक्तिवाद/कडक औषधे.* **potency** /-टन्सि/ *ना* [*अगण*] बळ, ताकद. **potently** *क्रिवि* जोरदारपणे, ताकदीने.

potential /प'टेन्श्ल्/ *वि* अस्तित्वात येऊ शकेल असा, कृतीत करता येईल किंवा वापरता येईल असा, संभाव्य. **potential** *ना* [*अगण*] सुप्त गुण, बीजरूप गुण. **potentiality** /प,टेन्शि'ॲलटि/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) (*औप*) वाढवता येईल असा गुण किंवा शक्ती, बीजरूप शक्ती, अंतःसामर्थ्य. **potentially** /-शलि/ *क्रिवि* संभाव्यपणे.

otion /'पउश्न्/ *ना* [*गण*] औषध, विष किंवा अद्भुत द्रवाचा घोट, घुटका.

otter^1 /'पॉट(र्)/ *क्रि* (*क्रिब*) **potter about/around** फुटकळ कामे करत आरामात वेळ काढणे.

potter^2 /'पॉट(र्)/ *ना* [*गण*] कुंभार. **pottery** *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] मातीची भांडीकुंडी, मृत्पात्री. २ [*गण*] मातीची भांडी करण्याची जागा, कुंभनिर्माणी.

potty^1 /'पॉटि/ *वि* (**-ier, -iest**) (*ब्रि अनौप*) मूर्ख किंवा वेडा.

potty^2 /'पॉटि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) लहान मुलांचे परसाकडचे भांडे.

pouch /पाउच्/ *ना* [*गण*] १ खिशात ठेवायचे किंवा कमरेला अडकवायचे पाकीट, बटवा. २ कांगारूच्या पोटावर असलेल्या पिशवीसारखी त्वचेची पिशवी, कोष्ठ.

poultry /'पउल्ट्रि/ *ना* १ [*ब.व*] कोंबड्या, बदके वगैरे. २ [*अगण*] त्यांचे मांस.

pounce /पाउन्स्/ *क्रि* [*अक*] (*on*)// १ एखाद्यावर झेप घालून हल्ला करणे, झडप घालणे. २ (*ला*) झडप घालून घेणे, उडी घालणे : *She ~d on the chance to go abroad, परदेशी जाण्याच्या संधीवर तिने झडप घातली.*

pound^1 /पाउन्ड्/ *ना* [*गण*] १ ब्रिटनमधील पैशाचे एक परिमाण; १०० पेन्स. २ आयर्लंड सारख्या अन्य देशातील पैशाचे एक परिमाण. ३ वजनाचे एक परिमाण; १६ औंस (०.४५४ किलोग्रॅम), रत्तल.

pound^2 /पाउन्ड्/ *ना* [*गण*] हरवलेली कुत्री, मांजरे मालक येईपर्यंत ठेवण्याची जागा.

pound^3 /पाउन्ड्/ *क्रि* १ [*अक, सक*] जोरजोराने बडवणे, आपटून वाजवणे, ठोकणे. २ [*सक*] भुगा करणे, कुटणे; चेचणे, तुकडे करणे, फोडणे. ३ [*अक*] (एखाद्याच्या हृदयाबाबत) धडधडणे, धापावणे.

pour /पॉऽर्/ *क्रि* १ [*अक, सक*] ओतणे. २ [*अक*] (पावसाबाबत) ओतणे, धोधो पडणे, धुंवाधार पडणे, कोसळणे. ३ [*अक*] गर्दी करणे, खूप मोठ्या संख्येने येणे/जमणे : *In summer tourists ~ into London, उन्हाळ्यात पर्यटक लंडनमधे मोठ्या प्रमाणावर येतात.* ४ (*वाक्प्र*) **pour cold water on sth** ⇨ COLD^1. ५ (*क्रिब*) **pour sth out** एखादी गोष्ट धडाधडा सांगून टाकणे : ~ *out one's troubles, स्वतःच्या अडचणींचा पाढा वाचणे.*

pout /पाउट्/ *क्रि* [*अक*] त्रासून ओठ पुढे काढणे. **pout** *ना* [*गण, बहुधा अे.व*] ओठ पुढे काढण्याची क्रिया.

poverty /'पॉव्हटि/ *ना* [*अगण*] दारिद्र्य, गरिबी. **'poverty-stricken** गरिबीने गांजलेले, अति दरिद्री, भुकेकंगाल.

powder /'पाउड(र्)/ *ना* [*गण, अगण*] पीठ, भुकटी. **powder** *क्रि* [*सक*] (विशेषतः सुवासिक) पावडर लावणे. **powdered** *वि* पावडरीच्या स्वरूपात, भुकटी रूपात. **'powder-room** *ना* [*गण*] हॉटेलमधील वगैरे स्त्रियांचे प्रसाधन-कक्ष. **powdery** *वि* पावडरीसारखा, पावडरीचा.

power /'पाउअ(र्)/ *ना* १ [*अगण*] (लोकांमधील) काही करण्याची शक्ती, ताकद. २ [*अगण*] (तसेच **powers**) [*ब.व*] शरीराची किंवा मनाची विशिष्ट क्षमता : *the ~ of speech, बोलण्याची क्षमता.* ३ [*अगण*] जोर, शक्ती. ४ [*अगण*] (क) दुसऱ्यांवरील प्रभाव, सत्ता. (ख) राजकीय सत्ता किंवा हुकमत : *The Conservative Party came to ~ in 1979, १९७९ मधे कॉन्झर्व्हेटिव्ह (हुजूर) पक्ष सत्तेवर आला.* ५ [*गण, अगण*] कायदेशीर हक्क; अधिकार. ६ [*गण*] मोठा अधिकार असणारा माणूस, देश वगैरे : *a world ~, जगातील बलाढ्य देश.* ७ [*अगण*] कार्यासाठी वापरायची ऊर्जा, शक्ती : *nuclear ~, आण्विक शक्ती.* **power** *क्रि* [*सक*] ऊर्जारूपी शक्ती देणे : *~ed by electricity, विद्युत्-शक्ती पुरवठा असलेला.* **'power-station** *ना* [*गण*] विद्युत्-निर्मितीचे केंद्र.

powerful /'पाउअफ्ल्/ *वि* खूप शक्ती असलेला किंवा निर्माण करणारा, शक्तिमान, शक्तिशाली. **powerfully** *क्रिवि* शक्तिशाली रीतीने, मोठ्या सामर्थ्याने.

powerless /'पाउअलिस्/ *वि* बलहीन, दुर्बल, दुबळा; असमर्थ : *~ to act, कार्य करण्यास असमर्थ.* **powerlessness** *ना* [*अगण*] दुबळेपणा, दौर्बल्य; असमर्थता.

pp *संरू* pages, पृष्ठे, पाने.

PR /,पी 'आ(र्)/ *संरू* public relations, सार्वजनिक संबंध, जनसंपर्क.

practicable /'प्रॅक्टिकब्ल्/ *वि* प्रत्यक्षात आणण्याजोगा किंवा वापरण्याजोगा, व्यवहार्य : *~ ideas, व्यवहार्य कल्पना.* **practicability** /,प्रॅक्टिक'बिलटि/ *ना* [*अगण*] व्यवहार्यता.

practical /'प्रॅक्टिक्ल्/ *वि* १ केवळ सिद्धान्तापेक्षा प्रत्यक्षपणे करून दाखवणारा, प्रत्यक्ष. २ ज्या हेतुकरता केला होता त्याला योग्य, सुयोग्य, अनुरूप : *~ clothing for wearing in bad weather, खराब हवामानात वापरायला योग्य असे कपडे.* ३ (व्यक्तीबाबत) एखादी गोष्ट करण्यात तरबेज, सराईत. ४ (व्यक्तीबाबत) शहाणा, समजदार. **practicality** /,प्रॅक्टि'कॅलटि/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) व्यावहारिक बाब. **'practical 'joke** *ना* [*गण*] मस्करी, खोडी. **practically** /-क्लि/ *क्रिवि* १ जवळजवळ : *~ no time left, जवळजवळ काहीही वेळ उरलेला नाही.* २ व्यावहारिकदृष्ट्या, प्रत्यक्ष कामावर.

practice /'प्रॅक्टिस्/ *ना* १ [*अगण*] एखाद्या गोष्टीची प्रत्यक्ष कारवाई, आचार, प्रत्यक्ष अंमल : *put a plan into ~, योजना प्रत्यक्षात आणणे.* २ [*गण, अगण*] कौशल्य वाढविण्यासाठीचा सराव, रियाज, परिपाठ. ३ [*गण, अगण*] नित्याची वहिवाट, नित्यक्रम; पद्धती किंवा रीत : *standard ~, सर्वसामान्य रीत.* ४ (क) [*अगण*] वकील किंवा डॉक्टर यांचे काम. (ख) [*गण*] वैद्यकीय किंवा वकीलीचा व्यवसाय (करण्याची जागा). ५ (*वाक्प्र*) **,in/,out of 'practice** प्रत्यक्ष अनुभव असलेला/नसलेला, प्रत्यक्ष काम केलेला/न केलेला.

practise (*अमे* **-ice**) /'प्रॅक्टिस्/ *क्रि* १ [*अक, सक*] कौशल्य वाढविण्यासाठी पुन्हापुन्हा करणे, सराव करणे, रियाज करणे : *~ the piano, पियानोचा रियाज करणे.* २ [*सक*] अंगवळणी पाडणे, सवय लावणे. ३ [*अक, सक*] (*as*)// डॉक्टर किंवा वकील म्हणून काम करणे. ४ [*सक*] आचरणात आणणे : *~ one's religion, स्वधर्माचरण करणे.* ५ (*वाक्प्र*) **,practise what one 'preaches** बोलल्याप्रमाणे करणे, बोले तैसा चाले असे असणे. **practised** *वि* अनुभवी; कुशल.

practitioner /प्रॅक्'टिशन(र्)/ *ना* [*गण*] १ एखाद्या कलेचा उपासक. २ वैद्यकासारखा धंदा करणारा.

pragmatic /प्रॅग्'मॅटिक्/ *ना* प्रत्यक्ष

परिणामांशी संबंधित असा, फळवादी; शहाणा आणि वास्तवाचे भान असणारा, व्यवहारचतुर.

prairie /'प्रेअरि/ *ना* [*गण*] उत्तर अमेरिकेतील सपाट गवताळ भूप्रदेश.

praise /प्रेइझ्/ *क्रि* [*सक*] १ स्तुती करणे, कौतुक करणे. २ (देवाची) पूजा करणे, स्तवन करणे. **praise** *ना* [*अगण*] स्तुती, कौतुक. **'praiseworthy** *वि* कौतुकास पात्र, स्तुत्य.

pram /प्रॅम्/ *ना* [*गण*] लहान मुलाची हाताने ढकलायची चारचाकी बाबागाडी.

prance /प्रान्स्; *अमे* प्रॅन्स्/ *क्रि* [*अक*] १ (घोड्याबाबत) मागच्या पायावर उड्या मारणे. २ मिरवणे, मुरडणे.

prank /प्रॅङ्क्/ *ना* [*गण*] खोडी, चेष्टा.

prattle /'प्रॅट्ल्/ *क्रि* [*अक*] फालतू गोष्टींविषयी खूप वेळ बडबड करत बसणे, चऱ्हाट लावणे, वटवट करणे. **prattle** *ना* [*अगण*] वटवट, भंकस (बडबड).

prawn /प्रॉऽन्/ *ना* [*गण*] कोळंबे, झिंगा.

pray /प्रेइ/ *क्रि* [*अक*] १ देवाची प्रार्थना करणे, करुणा भाकणे. २ (*अनौप*) मनापासून इच्छिणे : *I just ~ he won't get hurt, त्याला काही इजा होऊ नये अशी मी मनःपूर्वक इच्छा करतो.*

prayer /प्रेअ(र्)/ *ना* १ [*अगण*] प्रार्थना, विनवणी. २ [*गण*] प्रार्थना करण्यासाठी वापरलेले शब्द, प्रार्थित. ३ [*गण*] धार्मिक उपासनेचा एक प्रकार, प्रार्थना.

preach /प्रीच्/ *क्रि* १ [*अक, सक*] चर्चमधील कार्यक्रमात (धार्मिक प्रवचन) देणे, धर्मोपदेश करणे. २ [*सक*] एखादी गोष्ट स्वीकारण्यासाठी लोकांचे मन वळवण्याचा प्रयत्न करणे. ३ [*अक*] नीतिमत्तेबाबत अनाहूतपणे उपदेश करणे. **preacher** *ना* [*गण*] धर्मोपदेशक.

preamble /प्री'ॲम्ब्ल्/ *ना* [*गण, अगण*] खास करून एखाद्या औपचारिक कागदपत्राची भूमिका.

precarious /प्रि'केअरिअस्/ *वि* डळमळीत, अस्थिर आणि असुरक्षित; अनिश्चित. **precariously** *क्रिवि* अस्थिरपणे; अनिश्चितपणे.

precaution /प्रि'कॉऽश्न्/ *ना* [*गण*] संकट किंवा धोका यापासूनची खबरदारी, पूर्वदक्षता : *take ~s against illness, आजारपण येऊ नये म्हणून खबरदारी घेणे.* **precautionary** *वि* खबरदारीचा.

precede /प्रि'सीड्/ *क्रि* [*सक*] स्थळ, काळ किंवा क्रम यामधे आधी येणे, अगोदर येणे, पूर्वी येणे. **preceding** *वि* पूर्व, अगोदरचा, मागील, पूर्वगामी.

precedence /'प्रेसिडन्स्/ *ना* [*अगण*] (*औप*) श्रेष्ठतेबाबत एखाद्या गोष्टीच्या किंवा व्यक्तीच्या आधी येण्याचा हक्क, अग्रक्रम : *take ~ over all others, इतर सर्वांवर अग्रक्रमाने येणे.*

precedent /'प्रेसिडन्ट्/ *ना* [*गण, अगण*] (*औप*) उदाहरण किंवा नियम म्हणून वापरली जाणारी आधीची घटना किंवा निर्णय, पूर्वोदाहरण, शिरस्ता : *set a ~, शिरस्ता पाडणे.*

precinct /'प्रीसिङ्क्ट्/ *ना* १ [*गण*] (*ब्रि*) शहरातील काही खास कामासाठी वापरली जाणारी जागा : *a 'shopping ~, दुकानांचे क्षेत्र.* २ [*गण*] शहर, देश वगैरेचा विभाग. ३ **precincts** [*ब.व*] विद्यापीठ, चर्च वगैरे संस्थांचे बाहेरच्या कुंपणाने वेढलेले क्षेत्र, प्रसीमा.

precious /'प्रेशस्/ *वि* १ मोलाचा, मौल्यवान. २ (*अधिक्षेपी*) (भाषा, शैली वगैरेबाबत) कृत्रिमपणे सभ्य किंवा नटवलेली. **precious** *क्रिवि* (*अनौप*) फार : *~ little time, फार कमी वेळ.*

precipice /'प्रेसिपिस्/ *ना* [*गण*] (तुटलेला) खोल कडा.

precipitate /प्रि'सिपिटेइट्/ *क्रि* [*सक*] १ (*औप*) एखादी गोष्ट लवकर घडवून आणणे, लवकर ओढवून घेणे : *Illness ~d her death, आजारपणाने तिचा मृत्यू लवकरच ओढवला.* २ (*रसायनशास्त्र*) द्रवातून घनपदार्थ वेगळा करणे, तळाशी बसणे, साका पडणे, निक्षेप करणे. **precipitate** *ना* [*गण, अगण*] (*रसायनशास्त्र*) निक्षेपण, साका. **precipitate** /प्रि'सिपिटट्/ *वि* खूप घाईघाईचा. **precipitation** /प्रि,सिपि'टेइश्न्/ *ना* [*अगण*] १ लवकर घडवून आणणे. २ घाईत असणे. ३ पाऊस, बर्फ वगैरे पडणे.

precipitous /प्रि'सिपिटस्/ *वि* (*औप*)

धोकादायकपणे खूप उंच किंवा खूप खोल.

précis /'प्रेइसि; *अमे* प्रेइ'सी/ *ना* [*गण*] (*ब.व* **précis** /-ईझ़्/) भाषणाचे किंवा एखाद्या लेखनाचे सार, संक्षिप्त विधान, सारांश, संक्षेपिका.

precise /प्रि'साइस्/ *वि* १ अचूक आणि स्पष्ट शब्दांत व्यक्त केलेला. २ काटेकोर, अगदी मापून केलेला. ३ लहानसहान तपशिलासह, कुठेही गल्लत नसलेला. **precisely** *क्रिवि* १ काटेकोरपणे. २ (सहमती दाखविण्यास वापर) बरोब्बर!

precision /प्रि'सिझ्न्/ *ना* [*अगण*] काटेकोरपणा, अचूकपणा.

preclude /प्रि'क्लूड्/ *क्रि* [*सक*] (*from*)// (*औप*) एखादी गोष्ट घडू न देणे, पायबंद घालणे.

precocious /प्रि'कउशस्/ *वि* (लहान मुलाबाबत) बुद्धीची वाढ लवकर झालेला, पूर्वपरिणत, बालप्रौढ. **precociously** *क्रिवि* अकालप्रौढतेने. **precociousness** *ना* [*अगण*] अकालप्रौढत्व.

preconceived /,प्रीकन्'सीव्ह्ड्/ *वि* (मताबाबत) आधीच बनविलेले, पुरेशी माहिती न मिळवता केलेले, पूर्वयोजित, पूर्वकल्पित. **preconception** /-'सेप्शन्/ *ना* [*गण*] मनात आधीच असलेली कल्पना.

precursor /,प्री'कऽस(र्)/ *ना* [*गण*] (*औप*) एखादी आधी येणारी आणि पुढे महत्त्वपूर्ण ठरणारी अशी गोष्ट, अग्रदूत, अग्रेसर, अग्रगामी.

predatory /'प्रेडट्रि; *अमे* -टॉऽरि/ *वि* (प्राण्यांबाबत) परजीवभक्षी, परभक्षी, जीवोपजीवी. **predator** /-ट(र्)/ *ना* [*गण*] परजीवभक्षी प्राणी, हिंस्र पशू.

predecessor /'प्रीडिसेस(र्); *अमे* 'प्रेड-/ *ना* [*गण*] विशिष्ट जागेवर आधी काम करणारा माणूस, पूर्वसूरी.

predestined /,प्री'डेस्टिन्ड्/ *वि* (देवाने किंवा नशिबाने) पूर्वीच ठरविलेला, दैवयोजित, प्राक्तनात असलेला.

predicament /प्रि'डिकमन्ट्/ *ना* [*गण*] अडचणीची स्थिती, गोता, आपत्ती, वाईट दशा, गत.

predicate /'प्रेडिकट्/ *ना* [*गण*] (*व्याकरण*) कर्त्याविषयी काही सांगणारा वाक्यांश, विधेय, उदा 'Life is short' या वाक्यातील 'is short' हा वाक्यांश.

predicative /प्रि'डिकटिव्ह्; *अमे* 'प्रेडिकेइटिव्ह्/ *वि* (*व्याकरण*) क्रियापदानंतर येणारा, विधेयदर्शी.

predict /प्रि'डिक्ट्/ *क्रि* [*सक*] भाकित करणे, भविष्य करणे. **predictable** *वि* भविष्य वर्तवण्याजोगा, भाकित करण्याजोगा. **prediction** /-'डिक्श्न्/ *ना* १ [*अगण*] भाकित वर्तवणे, भविष्य वर्तवणे, प्राक्कथन. २ [*गण*] केलेले भाकित, वर्तविलेले भविष्य.

predispose /,प्रीडि'स्पउझ़्/ *क्रि* [*सक*] (*औप*) आधी ठरवल्याप्रमाणे एखाद्या गोष्टीवर प्रभाव पाडणे, पूर्वीच मन वळवणे. **predisposition** /-डिस्प'झ़िश्न्/ *ना* [*गण*] पूर्वकल.

predominant /प्रि'डॉमिनन्ट्/ *वि* (*औप*) अधिक बलवान, महत्त्वाचा किंवा लक्षणीय, प्राधान्याने येणारा. **predominance** /-नन्स्/ *ना* [*अगण*] प्राधान्य, वर्चस्व. **predominantly** *क्रिवि* प्रामुख्याने.

predominate /प्रि'डॉमिनेइट्/ *क्रि* [*अक*] (*औप*) १ एखाद्यावर सत्ता असणे, एखादी गोष्ट कह्यात असणे. २ संख्येने, ताकदीने वरचढ असणे.

pre-eminent /,प्री'अेमिनन्ट्/ *वि* (*औप*) सर्वश्रेष्ठ, सर्वोत्तम. **pre-eminence** /-नन्स्/ *ना* [*अगण*] सर्वश्रेष्ठता, सर्वोत्कृष्टता. **pre-eminently** *क्रिवि* सर्वोत्तम रीतीने, अत्युत्कृष्ट असे.

preen /प्रीन्/ *क्रि* १ [*अक, सक*] (पक्ष्याबाबत) चोचीने (पंख) साफ करणे. २ (*ला*) ~ **oneself** (माणसाबाबत) नीटनेटके होणे, आवरणे.

prefabricated /,प्री'फॅब्रिकेइटिड्/ *वि* (इमारतीबाबत) कारखान्यात विविध भाग बनवून नंतर ते फक्त जोडायचे अशा स्वरूपातली.

preface /'प्रेफिस्/ *ना* [*गण*] पुस्तकाचा उपोद्घात. **preface** *क्रि* [*सक*] (*with*)// (*औप*) शब्दांत किंवा कृतीने प्रस्तावना करून सुरुवात करणे.

prefect /'प्रीफेक्ट्/ *ना* [*गण*] १ कनिष्ठ विद्यार्थ्यांवर अधिकार असणारा ज्येष्ठ विद्यार्थी. २ (फ्रान्समधे) एखाद्या भागाचा प्रमुख व्यवस्थापकीय अधिकारी.

prefer /प्रि'फऽ(र्)/ *क्रि* (-rr-) [*सक*] १ अधिक आवडणे, पसंत करणे : *I ~ tea to coffee, मी कॉफीपेक्षा चहा पसंत करतो* म्हणजेच *मला कॉफीपेक्षा चहा आवडतो.* २ (*वाक्प्र*) **prefer 'charges** (*कायदा*) आरोप करणे. **preferable** /'प्रेफ्रब्ल्/ *वि* अधिक पसंत पडण्याजोगा, अधिक संयुक्तिक. **preferably** *क्रिवि* अधिक योग्य/चांगले म्हणजे पसंत पडेल अशा रीतीने.

preference /'प्रेफ्रेन्स्/ *ना* १ [*अगण, अे.व*] (*for*)// पसंती, अधिक आवड, अधिमान्यता. २ [*गण*] पसंतीस उतरलेली गोष्ट, जास्त आवडलेली गोष्ट. ३ [*अगण*] एखादी व्यक्ती, एखादा गट वगैरेवरची खास मर्जी, लोभ.

preferential /,प्रेफ'रेन्श्ल्/ *वि* पसंतीदर्शक, खास पसंतीची निवड दाखविणारा, लोभातला, अधिमन्य : *get ~ 'treatment, खास वागणूक मिळणे.*

prefix /'प्रीफिक्स्/ *ना* [*गण*] pre-, un- यासारखा शब्दाच्या पुढे येणारा आणि त्याचा अर्थ बदलणारा अवयव, पूर्वप्रत्यय, उपसर्ग. **prefix** *क्रि* [*सक*] पूर्वप्रत्यय लावणे.

pregnant /'प्रेग्नन्ट्/ *वि* १ गर्भारशी. २ (*ला*) (अपेक्षित नसलेल्या) अर्थाने परिपूर्ण, अर्थगर्भ : *a ~ 'pause, अर्थगर्भ विराम.* **'pregnancy** /-नन्सि/ *ना* [*अगण, गण*] (*ब.व* **-ies**) गर्भारपण.

prehistoric /,प्रीहि'स्टॉरिक्; *अमे* -टॉऽरिक्/ *वि* ज्ञात इतिहासाच्या आधीच्या काळातील, इतिहासपूर्वकालीन, प्रागैतिहासिक. **prehistory** /,प्री'हिस्ट्रि/ *ना* [*अगण*] प्रागितिहास.

prejudge /,प्री'जैज्/ *क्रि* [*सक*] (*औप*) पूर्ण माहिती कळण्याआधीच मत बनवून टाकणे, पुरोनिर्णय करणे.

prejudice /'प्रेजुडिस्/ *ना* १ [*गण, अगण*] एखाद्याबाबतची अकारण नावड, पूर्वग्रह. २ [*अगण*] (*कायदा*) बाध. **prejudice** *क्रि* [*सक*] १ पूर्वग्रह निर्माण करणे, एखाद्याचे मन कलुषित करणे. २ बाध आणणे; दुर्बल करणे.

prejudicial /,प्रेजु'डिश्ल्/ *वि* बाध आणणारा.

prelate /'प्रेलट्/ *ना* [*गण*] वरिष्ठ ख्रिस्ती धर्माधिकारी.

preliminary /प्रि'लिमिनरि; *अमे* -नेरि/ *वि* सुरुवातीचा, पूर्वीचा : *a ~ study/report, पूर्व अभ्यास/वृत्तांत.* **preliminary** *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) (बहुधा *ब.व*) प्रारंभिक कृती वगैरे.

prelude /'प्रेल्यूड्/ *ना* [*गण*] १ पुढे होणाऱ्या घटनेची नांदी. २ संगीतातील प्रास्ताविक भाग, नांदी.

premarital /,प्री'मॅरिट्ल्/ *वि* विवाहपूर्व : *~ sex, विवाहपूर्व संभोग.*

premature /'प्रेमचुअ(र्); *अमे* ,प्रीम'टुअर्/ *वि* योग्य किंवा अपेक्षित वेळेपूर्वी होणारा, अकाली : *~ birth, पूर्ण दिवस भरण्याआधीच झालेला जन्म.* **prematurely** *क्रिवि* अकाली.

premeditated /,प्री'मेडिटेइटिड्/ *वि* पूर्वनियोजित : *~ murder, पूर्वनियोजित खून.*

premier /'प्रेमिअ(र्); *अमे* 'प्रीमिअ(र्)/ *ना* [*गण*] शासनप्रमुख, प्रधान मंत्री. **premier** *वि* प्रधान स्थानावरचा, महत्त्वाचा वगैरे. **premiership** प्रधान मंत्रीपद.

premiére /'प्रेमिअेअ(र्); *अमे* प्रि'मिअर्/ *ना* [*गण*] नाटकाचा किंवा चित्रपटाचा शुभारंभाचा प्रयोग.

premise /'प्रेमिस्/ *ना* [*गण*] (*औप*) युक्तिवादाचा पाया, आधारविधान.

premises /'प्रेमिसिझ्/ *ना* [*ब.व*] मालमत्ता म्हणून धरली जाणारी जमिनीसकट इमारत, जागा : *The company is looking for larger ~, कंपनी अधिक मोठ्या जागेच्या शोधात आहे.*

premium /'प्रीमिअम्/ *ना* [*गण*] १ विम्याचा हप्ता, प्रादेय. २ भरायला लागणारे जादा पैसे, अधिमूल्य. **'Premium Bond** *ना* [*गण*] (*ब्रि*) रोख बक्षीस मिळण्याची शक्यता असलेला सरकारी बचतरोखा.

premonition /,प्रेम'निश्न्, ,प्री-/ *ना* [*गण*] अशुभाची पूर्वसूचना.

preoccupation /,प्रीऑक्यु'पेइश्न्/ *ना* १ [*अगण*] व्यग्रता. २ [*गण*] एखाद्याच्या मनात

सतत घोळणारा विषय, चिंतनाचा विषय.

preoccupy /प्री'ऑक्युपाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* -ied) [*सक*] व्यग्र ठेवणे, एखाद्याचे सर्व व्यवधान घ्यायला लागणे.

preparation /ˌप्रेप'रेइश्न्/ *ना* १ [*अगण*] तयारी : *work done without ~, तयारीवाचून केलेले काम.* २ [*गण, बहुधा ब.व*] भविष्यकालीन प्रसंगाची तरतूद, पुढे येणाऱ्या प्रसंगासाठी केलेली तयारी. ३ [*गण*] औषध, अन्न वगैरेसाठी तयार केलेले मिश्रण.

preparatory /प्रि'पॅरट्रि; *अमे* -टॉऽरि/ *वि* कशाच्यातरी पूर्वतयारीचा. **pre'paratory school** *ना* [*गण*] १ (ब्रिटनमधे) १३ वर्षांपर्यंतच्या मुलांकरता असलेली खाजगी शाळा. २ (अमेरिकेमधे) महाविद्यालयीन प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची तयारी करून घेणारी (बहुधा खाजगी) शाळा.

prepare /प्रि'पेअ(र्)/ *क्रि* १ [*अक, सक*] तयार होणे, एखाद्याला किंवा एखादी गोष्ट तयार करणे. २ (*वाक्प्र*) **be prepared to do sth** एखादी गोष्ट करण्यास राजी असणे, तयार असणे.

preposition /ˌप्रेप'झ़िश्न्/ *ना* [*गण*] (*व्याकरण*) *in, from, to* या सारखे नाम किंवा सर्वनाम यांच्या आधी येणारे आणि स्थळ, दिशा वगैरे दाखविणारे शब्द, पूर्वयोगी, शब्दयोगी (अव्यय). **prepositional** /-शन्ल्/ *वि* पूर्वयोगी किंवा शब्दयोगीचा.

preposterous /प्रि'पॉस्टरस/ *वि* पूर्णतः अविचारीपणाचा, विवेकशून्य; अर्थहीन, वेडेपणाचा. **preposterously** *क्रिवि* विवेकशून्यपणे; मूर्खपणाने.

prerogative /प्रि'रॉगटिव्ह्/ *ना* [*गण*] एखाद्या व्यक्तीचा किंवा गटाचा खास अधिकार, विशेष हक्क.

Presbyterian /ˌप्रेझ़्बि'टिअरिअन्/ *ना* [*गण*], *वि* समान श्रेणीच्या अधिकाऱ्यांचे व्यवस्थापन असलेले चर्च (किंवा त्याचा सभासद).

prescribe /प्रि'स्क्राइब्/ *क्रि* [*सक*] १ नेमणे, लागू करणे, नियत करणे : ~ *medicine, औषध सांगणे.* २ (*औप*) (काय करायचे ते) अधिकारवाणीने सांगणे, विहित करणे.

prescription /प्रि'स्क्रिप्श्न्/ *ना* १ [*गण*] (क) डॉक्टरांनी लिहून दिलेल्या सूचना आणि औषधे, औषधपत्र. (ख) असे औषध. २ [*अगण*] औषध आणि ते घेण्याच्या सूचना लिहिणे.

prescriptive /प्रि'स्क्रिप्टिव्ह्/ *वि* (*औप*) नियम देणारा, आज्ञा करणारा, आज्ञावाचक, नियमात्मक.

presence /'प्रेझ़्न्स्/ *ना* [*अगण*] १ उपस्थिती, विद्यमानपणा. २ व्यक्तिमत्व, चर्या.

present^1 /'प्रेझ़्न्ट्/ *वि* १ ह्या/त्या जागी हजर, उपस्थित, तेथे असणे : *Were you ~ at the meeting when the news was announced? ती बातमी जाहीर झाली त्यावेळी तू सभेत होतास का?* २ आत्ता अस्तित्वात असलेला किंवा घडणारा, आत्ताचा, विद्यमान : *the ~ government, सध्याचे/सद्य सरकार.* ३ (*व्याकरण*) (क्रियापदाच्या रूपाबाबत) वर्तमानकाळातील, आत्ता घडणारी क्रिया किंवा असणारी स्थिती दाखविणारे : *the ~ tense, वर्तमानकाळ* ○ *a ~ participle, वर्तमानकाळवाचक धातुविशेषण.* **present** *ना* १ **the present** [*अे.व*] आत्ता, सांप्रत. २ (*वाक्प्र*) **at 'present** आत्ता, यावेळी.

present^2 /'प्रेझ़्न्ट्/ *ना* [*गण*] भेट वस्तू; देणगी, उपहार.

present^3 /प्रि'झ़ेन्ट्/ *क्रि* [*सक*] १ (*with, to*)// एखाद्याला एखादी गोष्ट प्रदान करणे, विशेषतः अधिकृतपणे : *I ~ed her with a book, मी तिला एक ग्रंथ प्रदान केला* ○ *I ~ed it to her, मी तिला ते प्रदान केले.* २ (*to*)// खास करून वरच्या श्रेणीच्या माणसाशी एखाद्याची ओळख करून देणे. ३ विचारार्थ पुढे ठेवणे. ४ ~ **oneself** (क) हजर राहणे, येणे. (ख) (संधीबाबत) येणे : *The opportunity may not ~ itself again, अशी संधी कदाचित परत येणारही नाही.* ५ दाखवणे. ६ (नाटक) सादर करणे. ७ आकाशवाणी किंवा दूरदर्शनवर (कार्यक्रम) सादर करणे. **presenter** *ना* [*गण*] आकाशवाणी किंवा दूरदर्शनचा (एखाद्या कार्यक्रमांचा) सादरकर्ता.

presentable /प्रि'झ़ेन्टब्ल्/ *वि* लोकांसमोर मांडण्यासारखा, दाखवण्याजोगा, प्रदर्शनीय.

presentably *क्रिवि* दाखवता येईल अशा रीतीने.

presentation /ˌप्रेझ़्न्'टेइश्न्; *अमे* ˌप्रीझ़ेन्-/ *ना* १ [*अगण*] सादरीकरण; प्रदान करणे. २ [*अगण*] सादरीकरणाची रीत, प्रदान करण्याची पद्धती; आगमन, पुनश्च येणे. ३ [*गण*] सादर केलेले काही; प्रदान केलेले काही.

presently /'प्रेझ़्न्ट्लि/ *क्रिवि* १ लवकर : *I'll see you ~, मी लवकरच तुला भेटेन.* २ (विशेषतः *अमे*) आत्ता, सांप्रत.

preservative /प्रि'झ़ऽव्हटिव्ह्/ *ना* [*गण*], *वि* अन्न वगैरे टिकवण्यासाठी वापरायचे (द्रव्य).

preserve /प्रि'झ़ऽव्ह्/ *क्रि* [*सक*] १ आहे तसे राखणे. २ हानी, धोका यापासून सांभाळणे. ३ (अन्नपदार्थ) टिकवणे – उदा वाळवून किंवा गोठवून. **preservation** /ˌप्रेझ़'व्हेइश्न्/ *ना* [*अगण*] पालन, संरक्षण; राखणे. **preserve** *ना* [*गण, बहुधा ब.व, अगण*] टिकवलेली फळे, मुरंबा.

preside /प्रि'झ़ाइड्/ *क्रि* [*अक*] (*over/at*)// सभेचा अध्यक्ष असणे.

presidency /'प्रेझ़िडन्सि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ **the presidency** [*ए.व*] अध्यक्षपद. २ [*गण*] अध्यक्षीय कारकीर्द.

president /'प्रेझ़िडन्ट्/ *ना* [*गण*] १ अमेरिका वगैरे राष्ट्रात निवडून आलेला राष्ट्रप्रमुख असा अध्यक्ष. २ शासकीय खाते, कंपनी वगैरेचा प्रमुख, अध्यक्ष. **presidential** /ˌप्रेझ़ि'डेन्श्ल्/ *वि* अध्यक्षीय.

press^{1} /प्रेस्/ *क्रि* १ दाबणे, चेपणे. २ [*सक*] इस्त्री करणे. ३ [*सक*] फळ पिळून रस काढणे. ४ एखाद्याचे मन वळवण्याची खटपट करणे; गळ घालणे. ५ [*अक*] (विशेषतः गर्दीबाबत) ढकलणे, रेटणे : *The crowd ~ed forward, गर्दी पुढच्या बाजूला रेटत होती.* ६ (*वाक्प्र*) **be pressed for sth** एखादी गोष्ट तुटपुंजी असणे : *be ~ed for time, वेळ तुटपुंजा असणे.* ७ (*क्रिब*) **press for sth** एखाद्या गोष्टीकरता पुन्हापुन्हा आणि कळकळीच्या मागण्या करणे, मागण्या वगैरे लावून धरणे, मागण्यांचे वगैरे दडपण आणणे. **press on (with sth)** एखादी गोष्ट अटीतटीने करणे, न चुकता निश्चयाने करीत राहणे. **pressing** *वि* तातडीचा : *~ing business, तातडीचे काम.*

press^{2} /प्रेस्/ *ना* १ [*गण, बहुधा ए.व*] दाबणे. २ [*गण*] दाबण्याचे यंत्र. ३ **the press** [*ए.व*] (*ए.व* किंवा *ब.व*) वृत्तपत्रे (किंवा पत्रकार, वृत्तपत्र प्रतिनिधी). ४ [*ए.व*] वृत्तपत्रातील चांगला पाठिंबा, वृत्तपत्रांनी केलेली हाताळणी वगैरे : *The film got a good ~, त्या चित्रपटाला वृत्तपत्रात चांगली प्रसिद्धी मिळाली.* **'press conference** *ना* [*गण*] वार्ताहरांच्या प्रश्नांना राजकीय पुढारी वगैरेनी उत्तरे देण्यासाठी बोलावलेली सभा, वार्तापरिषद, पत्रकार परिषद.

pressure /'प्रेश(र्)/ *ना* १ [*गण, अगण*] दाबणे (किंवा त्याच्यामुळे निर्माण झालेला जोर), दाब : *the ~ of her hand on his head, त्याच्या डोक्यावरचा तिच्या हाताचा दाब.* २ [*गण, अगण*] वायूचे वजन (किंवा त्याचा दाब) : *air ~, वायुदाब.* ३ [*अगण*] दबाव. ४ [*अगण*] एखाद्याच्या जीवनात किंवा कामात आलेल्या अडचणींमुळे वाटणारी काळजी, संकटांचे दडपण : *The ~ of work is making her ill, कामाच्या दडपणाने तिला आजारपण आले आहे.* **'pressure-cooker** *ना* [*गण*] वाफ कोंडून वाफेच्या उष्णतेवर अन्न शिजवायचे भांडे. **'pressure group** *ना* [*गण*] सरकारवर वगैरे दडपण आणून ठराविक पद्धतीने गोष्टी करायला लावणारा संघटित गट, दबाव गट.

pressurize /'प्रेशराइझ़्/ *क्रि* [*सक*] १ (*into*)// दडपण आणून एखाद्याला काहीतरी करायला लावणे. २ (विमानातील वगैरे एक खोली) विशिष्ट वायुदाबाची ठेवणे.

prestige /प्रे'स्टीज्/ *ना* [*अगण*] एखाद्याचे स्थान, यश वगैरेमुळे निर्माण होणारी आदराची किंवा कौतुकाची भावना, प्रतिष्ठा, नावलौकिक, इभ्रत. **prestigious** /-'स्टिजस्/ *वि* प्रतिष्ठेचा, इभ्रतीचा.

presumably /प्रि'झ़्यूमब्लि; *अमे* -'झ़ू-/ *क्रिवि* माझ्या अंदाजाप्रमाणे, धारणेनुसार.

presume /प्रि'झ़्यूम्; *अमे* -'झ़ूम्/ *क्रि* १ [*सक*] वाटणे, सत्यवत् मानणे, खरे धरून चालणे. २ [*अक*] (*औप*) काहीतरी करायचे धाष्टर्य करणे; धाडस होणे : *I wouldn't ~ to advise you, तुला उपदेश करण्याचे धाडस मी करणार नाही.*

presumption /प्रि'झ़म्पश्न्/ *ना* १ [*गण*] धारणा, समजूत, गृहीतक. २ [*अगण*] (*औप*) धाष्टर्य, दांडगाई.

presumptuous /प्रि'झ़म्प्चुअस्/ *वि* अधिकार नसताना गाजविणारा, अति धाष्टर्याचा.

presuppose /,प्रीस'पउझ़्/ *क्रि* [*सक*] (*औप*) १ खरे आहे असे धरून चालणे, गृहीत धरणे. २ आधीची अट म्हणून असणे, पूर्वअट असणे. **presupposition** /-सीप'झ़िश्न्/ *ना* [*गण, अगण*] पूर्वधारणा; पूर्वकल्पना.

pretence (*अमे* **-tense**) /प्रि'टेन्स्/ *ना* [*गण, अगण*] सोंग, बहाणा : *a ~ of grief, दुःखाचा आव.*

pretend /प्रि'टेन्ड्/ *क्रि* [*अक, सक*] एखादी गोष्ट तशी नसताना लोकांना ती तशी आहे असे वाटेल असे वागणे, सोंग करणे, बहाणा करणे.

pretension /प्रि'टेन्श्न्/ *ना* [*अगण, गण, विशेषतः ब.व*] स्वतः मोठे आहोत असा किंवा स्वतःकडे कौशल्य असल्याचा दावा, प्रौढी, बढाई.

pretentious /प्रि'टेन्शस्/ *वि* बढाईखोर, अहंमन्य. **pretentiously** *क्रिवि* बढाईखोरपणे, अहंमन्यतेने. **pretentiousness** *ना* [*अगण*] बढाईखोरपणा, अहंमन्यता.

pretext /'प्रीटेक्स्ट्/ *ना* [*गण*] खोटे कारण, सबब, बहाणा.

pretty /'प्रिटि/ *वि* (**-ier, -iest**) आकर्षक, सुरेख : *a ~ girl, गोंडस मुलगी.* **prettily** *क्रिवि* सुरेखपणे. **prettiness** *ना* [*अगण*] सुरेखपणा, गोंडसपणा. **pretty** *क्रिवि* १ अगदी; पुष्कळ, बराच : *I'm ~ sure he came back, तो परत आला याची मला अगदी खात्री आहे.* २ (*वाक्प्र*) **pretty well** जवळजवळ.

prevail /प्रि'व्हेइल्/ *क्रि* [*अक*] (*औप*) १ सर्वसामान्यपणे अस्तित्वात असणे किंवा घडणे. २ जिंकणे, प्रबल असणे. ३ (*क्रिब*) **prevail on/upon sb to do sth** एखाद्याचे मन एखादी गोष्ट करण्यास वळवणे, राजी करणे. **prevailing** *वि* १ प्रबल, चालू. २ (वाऱ्याबाबत) सतत वाहणारा.

prevalent /'प्रेव्हलन्ट्/ *वि* (*औप*) चालू, प्रघात असणारा, सर्वसामान्य. **prevalence** /-लन्स्/ *ना* [*अगण*] प्रघात, प्रचार, प्राबल्य.

prevent /प्रि'व्हेन्ट्/ *क्रि* [*सक*] एखाद्याला प्रतिबंध करणे, थांबवणे; एखादी गोष्ट होण्यास प्रतिबंध करणे, बंदी करणे, निवारणे. **prevention** /-व्हेन्श्न् /*ना* [*अगण*] प्रतिबंध, बंदी, निवारण. **preventive** *वि* प्रतिबंधात्मक, प्रतिबंधक, निवारक : *~ive medicine, प्रतिबंधक किंवा (रोग) निवारक औषध.*

preview /'प्रीव्ह्यू/ *ना* [*गण*] चित्रपट, नाटक यांचा खुला प्रयोग होण्यापूर्वीचा खाजगी प्रयोग. **preview** *क्रि* [*सक*] पूर्वप्रयोग करणे.

previous /'प्रीव्हिअस्/ *वि* आदला, आधीचा : *the ~ day, आदला दिवस.* **previously** *क्रिवि* आधी, पूर्वी.

prey /प्रेइ/ *ना* [*अगण*] भक्ष्य, शिकार, पारध, सावज. **prey** *क्रि* १ (*वाक्प्र*) **prey on sb's 'mind** एखाद्याला खूप त्रास देणे. **prey on sth** शिकार करणे, पारध करणे.

price /प्राइस्/ *ना* १ [*गण*] एखाद्या वस्तूच्या खरेदीसाठी दिलेली किंवा विक्रीसाठी घेतलेली रक्कम, किंमत, मूल्य, दाम. २ [*ए.व*] एखादी गोष्ट मिळवण्यासाठी करावी लागणारी गोष्ट : *a small ~ to pay for freedom, स्वातंत्र्यासाठी द्यायला लागणारी छोटीशी किंमत.* **price** *क्रि* [*सक*] किंमत ठरवणे/लावणे. **priceless** *वि* १ मौल्यवान, किमती. २ (*अनौप*) गमतीशीर.

prick^{1} /प्रिक्/ *क्रि* १ [*सक*] टोकदार असे काही वापरून बारीक भोक पाडणे, टोचणे. २ [*अक, सक*] बोचणे, अंगाला टोचणे. ३ (*वाक्प्र*) **prick up one's ears** (क) (घोडा, कुत्रा वगैरेच्या बाबतीत) कान टवकारणे. (ख) (माणसाबाबत) एकदम सावध होऊन काळजीपूर्वक ऐकणे.

prick^{2} /प्रिक्/ *ना* [*गण*] १ टोचून पाडलेले भोक. २ बोच, टोचणी. ३ (⚠ *व्रात्य*) (क) शिस्न. (ख) (*अधिक्षेपी*) मूर्ख माणूस.

prickle /'प्रिकल्/ *ना* [*गण*] १ झाडाचा किंवा प्राण्याच्या अंगावर वाढणारा काटा, तीक्ष्णवर्ध. २ अंगाला लागणारी बोचणी, टोच. **prickle** *क्रि* [*अक, सक*] टोचणे, बोचणे, मुंग्या येणे. **prickly** *वि* (**-ier, -iest**) १ काटेरी. २ (*अनौप*) तापट, शीघ्रकोपी.

pride /प्राइड/ *ना* १ [*अगण*] (क) एखादी गोष्ट नीट केल्यामुळे मिळणारे समाधान, अभिमान. (ख) [*गण*] अभिमान वाटावा अशी गोष्ट : *Their daughter was their ~ and joy, त्यांची मुलगी त्यांच्या अभिमानाचा आणि आनंदाचा विषय होती.* २ [*अगण*] स्वाभिमान. ३ [*अगण*] गर्व, घमेंड, आढ्यता. ४ [*गण*] (विशेषतः) सिंहांचा कळप. **pride** *क्रि* (*क्रिब*) **pride oneself on sth** एखाद्या गोष्टीचा अभिमान बाळगणे, तोरा दाखवणे.

priest /प्रीस्ट्/ *ना* [*गण*] ख्रिस्ती चर्चचा – विशेषतः रोमन कॅथलिक चर्चचा – धर्मगुरू. **the priesthood** *ना* [*अे.व*] ख्रिस्ती धर्मगुरूपद.

prig /प्रिग्/ *ना* [*गण*] (*अधिक्षेपी*) दुसऱ्यांना सतत नीती-उपदेश करणारा माणूस, कर्मठ. **priggish** *वि* कर्मठ, इतरांच्या वागणुकीतील चुका काढून त्यांना अक्कल शिकवणारा.

prim /प्रिम्/ *वि* (**~mer, ~mest**) चोखंदळ : *~ and proper, चोखंदळ आणि टापटिपीचा.*

primary /'प्राइमरि; *अमे* -मेरि/ *वि* १ विकासाचा क्रम किंवा काळ यात प्रथम असा, प्राथमिक, आद्य. २ सर्वाधिक महत्त्वाचा. **primarily** /'प्राइमेरलि; *अमे* प्राइ'मेरलि/ *क्रिवि* प्रामुख्याने, मुख्यतः. **primary** *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) (अमेरिकेत) आगामी निवडणुकांसाठी उमेदवार ठरविण्यासाठी मतदारांनी करावयाची निवड. **primary 'colour** *ना* [*गण*] तांबडा, पिवळा किंवा निळा, आद्य वर्ण. **'primary school** *ना* [*गण*] १ (ब्रिटनमधे) ५ ते ११ वयोगटातील मुलांची शाळा, प्राथमिक शाळा. २ (अमेरिकेत) ६ ते ९ वयोगटातील मुलांना प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळेचा एक भाग, बालवर्ग.

primate^{1} /'प्राइमेइट्/ *ना* [*गण*] मानव, वानर यांचा अंतर्भाव असलेल्या सर्वात अधिक विकसित अशा सस्तन प्राण्यांच्या गटातील प्राणी.

primate^{2} /'प्राइमेइट्/ *ना* [*गण*] मुख्य बिशप, आर्चबिशप.

prime^{1} /प्राइम्/ *वि* १ सर्वाधिक श्रेष्ठतेचा, महा, प्रधान. २ सर्वोत्कृष्ट, उच्च गुणाचा. **ˌprime 'minister** *ना* [*गण*] महामंत्री, पंतप्रधान, प्रधानमंत्री.

prime^{2} /प्राइम्/ *ना* [*अे.व*] ऐन बहर, सर्वोत्कृष्ट काळ : *in the ~ of life, आयुष्याच्या ऐन बहरात.*

prime^{3} /प्राइम्/ *क्रि* [*सक*] १ (लाकडाला) रंगाचा पहिला हात देणे. २ एखाद्याला आधीच माहिती पुरवणे, पूर्वसूचना देणे.

primer /'प्राइम(र्)/ *ना* [*गण*] मुख्य रंग लावण्यापूर्वीचा खास रंग.

primeval (तसेच **-aeval**) /प्राइ'मीव्ह्ल्/ *वि* प्राचीन, पुरातन.

primitive /'प्रिमिटिव्ह्/ *वि* १ सामाजिक विकासाच्या आदिकाळातील, आदिकालाचा : *~ tribe, आदिम जमाती.* २ साधा; जुन्या पद्धतीचा. **primitively** *क्रिवि* साधेपणाने; जुन्या पद्धतीने.

primrose /'प्रिम्रउझ्/ *ना* [*गण*] वसंतात फिकट पिवळी फुले येणारे एक रानटी झाड.

prince /प्रिन्स्/ *ना* [*गण*] १ राजघराण्यातील पुरुष, विशेषतः राजाचा किंवा राणीचा पुत्र, राजपुत्र, युवराज. २ एखाद्या लहान राज्याचा राजा, भूपाल. **princely** *वि* १ राजपुत्राचा, राजाचा, राज-. २ उदार.

princess /प्रिन्'सेस्/ *ना* [*गण*] १ राजघराण्यातील स्त्री, विशेषतः राजाची किंवा राणीची कन्या, राजकन्या, युवराज्ञी. २ राजपुत्राची बायको.

principal /'प्रिन्सप्ल्/ *वि* सर्वात महत्त्वाचा; प्रमुख. **principal** *ना* [*गण*] १ महाविद्यालयाचा किंवा शाळेचा प्रमुख, प्राचार्य, शाळाप्रमुख. २ [*बहुधा अे.व*] व्याजी दिलेले पैसे, मुद्दल. **principally** /-प्लि/ *क्रिवि* प्रामुख्याने.

principality /ˌप्रिन्सि'पॅलटि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) राजपुत्राचे राज्य.

principle /'प्रिन्सप्ल्/ *ना* १ [*गण*] तत्त्व, मूलतत्त्व : *the ~ of justice, न्यायाचे तत्त्व.* २ [*गण, अगण*] व्यक्तिगत वर्तनाचा नियम, नीतिनियम. ३ (*वाक्प्र*) **in principle** मूलभूत तत्त्वाबाबतचा पण तपशील सोडून, तत्त्वतः. **on principle** तत्त्वासाठी, स्वतःच्या श्रद्धांसाठी.

print^1 /प्रिन्ट्/ *क्रि* १ [*सक*] (**क**) छापणे, मुद्रित करणे. (**ख**) पुस्तके वगैरे छापणे, काढणे. २ [*अक, सक*] सुट्यासुट्या अक्षरात म्हणजे अक्षरे एकमेकांस न जोडता लिहिणे, सुट्या अक्षरलिपीत लिहिणे. ३ [*सक*] निगेटिव्ह फिल्मपासून किंवा ऋणचित्रापासून छायाचित्र तयार करणे, प्रिन्ट काढणे. **printer** *ना* [*गण*] १ पुस्तक वगैरे छापणारी व्यक्ती किंवा कंपनी, मुद्रक. २ संगणकाला वगैरे जोडलेले छपाई-यंत्र. **'printout** *ना* [*गण, अगण*] संगणकातून वगैरे काढलेला छपाई केलेला कागद.

print^2 /प्रिन्ट्/ *ना* १ [*अगण*] छापलेली अक्षरे, शब्द वगैरे. २ [*गण*] पृष्ठभागावर उमटलेला ठसा : *'finger ~s, बोटाचे ठसे.* ३ [*गण*] शाई लावलेल्या ठशाने उमटवलेले चित्र, ठशाचे चित्र. ४ [*गण*] निगेटिव्ह फिल्म किंवा ऋणचित्रापासून केलेले छायाचित्र. ५ (*वाक्प्र*) **in/out of print** (पुस्तकाबाबत) उपलब्ध/अनुपलब्ध.

prior /'प्राइअ(र्)/ *वि* काल, क्रम, महत्त्व यात अलिकडचा, आधीचा, पूर्व : *a ~ engagement, पूर्वनियोजित भेट.* **'prior to** *शब्दयो* पूर्वी, आधी.

priority /प्राइ'ऑरटि; *अमे* -'ऑऽर्-/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] प्राधान्यत्वाचा हक्क, अग्रक्रम. २ [*गण*] प्राधान्य दिलेली गोष्ट.

prise (तसेच विशेषतः *अमे* **prize**) /प्राइझ्/ *क्रि* [*सक*] बळे उघडणे, खोलणे.

prism /'प्रिझम्/ *ना* [*गण*] प्रकाशकिरणाचे सात रंगात विभाजन करणारा काचेचा लोलक.

prison /'प्रिझ्न्/ *ना* [*गण, अगण*] गुन्हेगारांना शिक्षा म्हणून ठेवतात ती इमारत, तुरुंग, कैदखाना. **prisoner** *ना* [*गण*] कैदी, बंदिवान. **,prisoner of 'war** युद्धात शत्रूनी पकडलेला सैनिक, युद्धकैदी.

privacy /'प्रिव्हसि, 'प्राइव्ह्-/ *ना* [*अगण*] एकटे आणि अनुद्विग्न असल्याची स्थिती, एकांत.

private /'प्राइव्हिट्/ *वि* १ खाजगी, सार्वजनिक नसलेला. २ इतरांना न सांगण्यासारखा किंवा न दाखवण्यासारखा; गुपित. ३ नेहमीच्या कामाशी संबंध नसलेला; व्यक्तिगत. ४ सरकारी नसलेला, खाजगी; स्वतंत्र : *a ~ school, खाजगी शाळा म्हणजे सरकारी पैशातून न चालणारी शाळा.* ५ (स्थळाबाबत) शांत; लोकांपासून दूर, विजन. **private** *ना* १ [*गण*] सर्वात खालच्या श्रेणीचा सैनिक. २ (*वाक्प्र*) **in private** दुसरे कोणीही नसताना. **privately** *क्रिवि* खाजगीत, दुसरे कोणी नसताना.

privatize /'प्राइव्हिटाइझ्/ *क्रि* [*सक*] सरकारी मालकी काढून खाजगीकरण करणे, खाजगी मालकीत देणे. **privatization** /,प्राइव्हिटाइ'झेइशन्; *अमे* -टि'झ्-/ *ना* [*अगण*] खाजगीकरण.

privet /'प्रिव्हिट्/ *ना* [*अगण*] बागांच्या कुंपणाला लावण्यात येणारी एक सदाहरित वनस्पती, कुंगीण.

privilege /'प्रिव्हलिज्/ *ना* १ [*गण, अगण*] एका विशिष्ट व्यक्तीला किंवा गटाला असलेला खास हक्क किंवा फायदा, विशेषाधिकार. २ [*गण*] आनंददायक संधी/योग : *It's a ~ to hear him sing, त्याचं गाणं ऐकणं हा एक विशेष आनंदाचा योग आहे.* **privileged** *वि* खास अधिकार असलेला.

prize^1 /प्राइझ्/ *ना* [*गण*] स्पर्धा जिंकल्याबद्दल, चांगले काम केल्याबद्दल वगैरे दिलेले काहीतरी, बक्षीस, पारितोषिक. **prize** *वि* बक्षिसाचा, पारितोषिक मिळवू शकणारा : *~ cattle, बक्षीस मिळवणारी गुरंढोरं.* **prize** *क्रि* [*सक*] खूप महत्त्व देणे, खूप किंमत करणे.

prize^2 (विशेषतः *अमे*) = PRISE.

pro^1 /प्रउ/ *ना* (*वाक्प्र*) **the ,pros and 'cons** /'कॉन्झ्/ बाजूची आणि विरुद्धची कारणे, साधकबाधक मते, अनुकूल आणि प्रतिकूल कारणे.

pro^2 /प्रउ/ *ना* [*गण*] (*ब.व* ~s) (*अनौप*) PROFESSIONAL व्यावसायिक या शब्दाचा संक्षेप.

pro- /प्रउ/ *पूर्वप्रत्यय* बाजूचा, धार्जिणा : *pro-American, अमेरिका धार्जिणा.*

probability /,प्रॉब'बिलटि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण, ए.व*] संभाव्यता, संभवनीयता : *There is little ~ that you will win, तू जिंकण्याचा फारच कमी संभव आहे.* २ [*गण*]

(सर्वात) संभाव्य घटना किंवा परिणाम. ३ (*वाक्प्र*) **in ,all proba'bility** संभाव्यपणे, बहुतकरून.

probable /'प्रॉबब्ल्/ *वि* घडण्याची किंवा खरा असण्याची शक्यता असलेला, संभवनीय. **probably** *क्रिवि* बहुतकरून.

probation /प्र'बेइश्न्; *अमे* प्रउ-/ *ना* [*अगण*] १ गुन्हेगाराला तुरुंगात पाठविण्याऐवजी त्याच्या वागणुकीवर अधिकृतपणे नजर ठेवण्याची पद्धती: *a ~ officer, अशा गुन्हेगारांवर नजर ठेवणारा आणि त्यांना मार्गदर्शन करणारा अधिकारी.* २ एखादा कामास योग्य आहे की नाही हे पाहण्यासाठी त्याच्या अंगच्या गुणांची घेतलेली परीक्षा, परिवीक्षा.

probe /प्रउब्/ *क्रि* [*अक, सक*] १ कसून तपासणी करणे, बारकाईने शोध घेणे. २ शोधनीच्या साहाय्याने तपासणी करणे. **probe** *ना* [*गण*] १ जखमा वगैरे तपासण्याचे लांब तारेचे साधन, शोधनी. २ (*into*)// एखाद्या गोष्टीचा कसून केलेला शोध, काटेकोर तपासणी. ३ शोध घेण्यासाठी वापरायचे अवकाशयान.

problem /'प्रॉब्लम्/ *ना* [*गण*] समजायला किंवा सोडवायला अवघड अशी गोष्ट, प्रश्न; समस्या. **problematic** /,प्रॉब्ल'मॅटिक्/ *वि* समस्यापूर्ण, प्रश्नच असलेला.

procedure /प्र'सीज(र्)/ *ना* [*गण, अगण*] एखादी गोष्ट करण्याचा नेहमीचा किंवा योग्य मार्ग, कार्यपद्धती, रीत. **procedural** *वि* कार्यपद्धतीचा.

proceed /प्र'सीड्; *अमे* प्रउ-/ *क्रि* [*अक*] १ (*to*)// चालू ठेवणे; पुढे जाणे. २ (*औप*) विशिष्ट दिशेने जाणे, रोखाने जाणे.

proceedings /प्र'सीडिङ्झ्/ *ना* [*ब.व*] (*औप*) १ एखाद्याविरुद्धची कायदेशीर कार्यवाही. २ सभेचे वगैरे कामकाज.

proceeds /'प्रउसीड्झ्/ *ना* [*ब.व*] उत्पन्न; नफा.

process /'प्रउसेस्; *अमे* 'प्रॉसेस्/ *ना* १ [*गण*] एखादी गोष्ट साध्य करण्यासाठी केलेल्या क्रिया, प्रक्रिया, प्रक्रम. २ [*गण*] एखादी गोष्ट करण्यासाठी खास करून उद्योगात वापरलेली पद्धती, रीती. ३ (*वाक्प्र*) **in the process of doing sth** एखादी गोष्ट प्रत्यक्षात करत असताना, तीमधून जात असताना. **process** *क्रि* [*सक*] १ अन्नपदार्थ टिकवण्यासाठी त्यावर प्रक्रिया करणे. २ फोटोफिल्मवर संस्करण करणे. ३ छाननी करणे, विचार करणे: *~ an application, अर्जाची छाननी करणे.* ४ संगणकाच्या आधारे (माहितीचे) विश्लेषण करणे.

procession /प्र'सेश्न्/ *ना* [*गण*] खास करून समारंभपूर्वक जाणारी वाहनांची, माणसांची वगैरे रांग, मिरवणूक.

proclaim /प्र'क्लेइम्/ *क्रि* [*सक*] (*औप*) अधिकृतपणे जाहीर करणे, घोषित करणे. **proclamation** /,प्रॉक्ल'मेइश्न्/ *ना* १ [*गण*] घोषित केलेले काही. २ [*अगण*] घोषणा, दवंडी, उद्घोषणा.

procure /प्र'क्युअ(र्)/ *क्रि* [*सक*] (*औप*) मिळवणे, संपादणे.

prod /प्रॉड्/ *क्रि* (-dd-) १ [*अक, सक*] बोटाने किंवा टोकदार वस्तूने ढोसणे. २ [*सक*] (*ला*) एखाद्याला एखादी गोष्ट करण्याची कळकळीची विनंती करणे. **prod** *ना* [*गण*] ढोसणी; कळकळीची विनंती.

prodigal /'प्रॉडिग्ल्/ *वि* (*औप अधिक्षेपी*) पैसे उडवणारा, उधळ्या.

prodigious /प्र'डिजस्/ *वि* प्रचंड, अफाट, अचाट; आश्चर्यकारक, विस्मयजनक. **prodigiously** *क्रिवि* अचाटपणे, आश्चर्यकारकपणे.

prodigy /'प्रॉडिजि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) अलौकिक प्रतिभाशाली व्यक्ती.

produce /प्र'ड्यूस्; *अमे* -'डूस्/ *क्रि* [*सक*] १ घडवणे. २ बनवणे, तयार करणे; उत्पादित करणे. ३ दाखवायला बाहेर काढणे, दाखवणे. ४ (नाटक, चित्रपट वगैरेची) निर्मिती करणे. **produce** /'प्रॉड्यूस्; *अमे* -डूस्/ *ना* [*अगण*] शेतीचे उत्पन्न, पीक, पैदास.

producer /प्र'ड्यूस(र्); *अमे* -'डू-/ *ना* [*गण*] १ चित्रपट, नाटक वगैरेचा निर्माता. २ उत्पादक (व्यक्ती, कंपनी वगैरे).

product /'प्रॉडक्ट्/ *ना* [*गण*] १ उत्पादित वस्तू, उत्पाद. २ परिणाम. ३ (*गणित*) गुणाकार, घात.

production /प्र'डक्श्न्/ *ना* १ [*अगण*]

उत्पादन-प्रक्रिया. २ [*अगण*] उत्पादन, उत्पादित माल. ३ [*गण*] चित्रपट, नाटक वगैरेची निर्मिती.

productive /प्र'डॅक्टिव्ह्/ *वि* १ मोठ्या प्रमाणावर मालाचे किंवा पिकाचे उत्पादन करणारा. २ फलदायी; उपयुक्त : *a ~ meeting, फलदायी म्हणजे यशस्वी बैठक.* **productively** *क्रिवि* फलदायी रीतीने, उपयुक्तपणे.

productivity /,प्रॉडक्'टिव्हटि/ *ना* [*अगण*] उत्पादन क्षमता : *P~ has fallen sharply, उत्पादन-क्षमता खूप कमी झाली आहे.*

profane /प्र'फेइन्; *अमे* प्रउ-/ *वि* (*औप*) १ पवित्र गोष्टींचा अनादर करणारा, अपवित्र, अधार्मिक. २ धक्कादायक, अभद्र : *~ language, अभद्र भाषा.* ३ अध्यात्मिक नसलेला; धर्महीन किंवा धर्मनिरपेक्ष, लौकिक. **profane** *क्रि* [*सक*] (*औप*) धर्मनिंदा करणे, धर्माबाबत अनादर दाखवणे, बट्टा लावणे. **profanely** *क्रिवि* अधार्मिकपणे, धर्माबाबत अनादर दाखवून. **profanity** /प्र'फॅनटि; *अमे* प्रउ-/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) धर्मभ्रष्ट वर्तन, धर्मनिंदात्मक भाषा.

profess /प्र'फेस्/ *क्रि* [*सक*] (*औप*) १ खोटा दावा करणे, बहाणा करणे, उगाच ऐट मिरवणे : *I don't ~ to be an expert, मी कुणी तज्ज्ञ असल्याची शेखी मिरवत नाही.* २ उघडपणे सांगणे. ३ एखादा धर्म मानणे, एखाद्या धर्माचा असणे. **professed** *वि* १ शेखी मिरवलेला, (खोटा) दावा करणारा. २ स्वयंघोषित.

profession /प्र'फेश्न्/ *ना* [*गण*] १ विशेषतः खास ज्ञान आणि कौशल्य लागणारा व्यवसाय – उदा वैद्यकीय, कायदा वगैरे. २ जाहीर विधान, उघड कबुली.

professional /प्र'फेशन्ल्/ *वि* १ व्यावसायिक. २ उच्चश्रेणीय, धंदेवाईक गुणवत्तेचा. ३ हौस म्हणून न करता वृत्ती किंवा व्यवसाय म्हणून करणारा : *a ~ actor, व्यावसायिक नट.* **professional** *ना* [*गण*] व्यावसायिक किंवा धंदेवाईक व्यक्ती. **professionalism** *ना* [*अगण*] व्यावसायिकाचे कौशल्य किंवा गुण. **professionally** /-शनलि/ *क्रिवि* व्यावसायिकदृष्ट्या, धंदा किंवा व्यवसाय म्हणून (म्हणजेच हौस म्हणून नव्हे).

professor /प्र'फेसर्/ *ना* [*गण*] विद्यापीठातील सर्वोच्च श्रेणीतला प्राध्यापक. **professorial** /,प्रॉफि'सॉऽरिअल्/ *वि* अशा प्राध्यापकाचा. **professorship** *ना* [*गण*] प्रोफेसरची श्रेणी, त्याचे पद.

proffer /'प्रॉफ(र्)/ *क्रि* [*सक*] (*औप*) देऊ करणे.

proficient /प्र'फिश्न्ट्/ *वि* वाकबगार, निष्णात, निपुण. **proficiency** /-न्सि/ *ना* [*अगण*] नैपुण्य, वाकबगारी, कार्यनिपुणता. **proficiently** *क्रिवि* निपुणतेने.

profile /'प्रउफाइल्/ *ना* [*गण*] १ चेहऱ्याचे एका बाजूने दिसणारे रूप. २ संक्षिप्त चरित्र. ३ (*वाक्प्र*) **a ,high/,low 'profile** लक्ष वेधणारी/न वेधणारी वागणूक.

profit /'प्रॉफिट्/ *ना* १ [*गण, अगण*] धंद्यात वगैरे मिळालेला पैसा, नफा. २ [*अगण*] (*औप*) एखाद्या गोष्टीपासून मिळणारा फायदा. **profit** *क्रि* [*अक*] *from/by//* एखाद्या गोष्टीचा फायदा होणे. **profitable** *वि* १ फायदेशीर, किफायतशीर. २ (*ला*) उपयोगी : *a ~ discussion, उपयुक्त चर्चा.* **profitably** *क्रिवि* किफायतशीरपणे, फायदा होईल अशा रीतीने.

profound /प्र'फाउन्ड्/ *वि* (*औप*) १ गहन, गाढ; फार मोठा : *a ~ effect, मोठा परिणाम.* २ सखोल ज्ञान असलेला, सखोल विचार करणारा, प्रकांड पांडित्याचा. **profoundly** *क्रिवि* गाढ, गहन रीतीने.

profuse /प्र'फ्यूस्/ *वि* (*औप*) चिकार, भरपूर, मुबलक, विपुल. **profusely** *क्रिवि* विपुलतेने, सढळपणे. **profusion** /-'फ्यूझ्न्/ *ना* [*ए.व, अगण*] (*औप*) वैपुल्य, चंगळ : *a ~ of flowers, फुलांची विपुलता* ○ *flowers growing in ~, विपुलतेने वाढणारी फुले.*

program /'प्रउग्रॅम्; *अमे* -ग्रम्/ *ना* [*गण*] १ संगणकाला द्यायच्या सूचनांचा संच, आज्ञावली. २ (*अमे*) = PROGRAMME. **program** *क्रि* (**-mm-**; *अमे* तसेच **-m-**) [*सक*] १ (संगणकाला) सूचना देणे. २ (*अमे*) = PROGRAMME. **programmer** (*अमे* तसेच **programer**) *ना* [*गण*] संगणकाचे प्रतिआयोजन लिहिणारा माणूस, आज्ञावलीकार.

programme /'प्रउग्रॅम्/ *ना* [*गण*] १

आकाशवाणी किंवा दूरदर्शनवरील कार्यक्रम. २ कार्यवाहीत आणण्याची योजना, कार्यक्रम : *a ~ of modernization, आधुनिकीकरणाचा योजनाबद्ध कार्यक्रम.* ३ संगीतसभा किंवा अभ्यासक्रम यातील कार्यक्रमांची यादी, कार्यक्रमपत्रिका. **programme** *क्रि* [*सक*] योजना करणे किंवा नियंत्रण करणे.

progress /'प्रउग्रेस्; *अमे* 'प्रॉग्-/ *ना* [*अगण*] १ प्रगती, पुढे जाणे. २ सुधारणा; विकास. ३ (*वाक्प्र*) **in progress** घडणारा; चालू. **progress** /प्र'ग्रेस/ *क्रि* [*अक*] प्रगती करणे, पुढे जाणे, सुधारणे; विकास होणे.

progression /प्र'ग्रेश्न्/ *ना* १ [*अगण*] विकास किंवा प्रगतीची प्रक्रिया, पुढे जाण्याची प्रक्रिया. २ [*गण*] संच किंवा श्रेणी.

progressive /प्र'ग्रेसिव्ह्/ *वि* १ प्रगत, प्रागतिक, पुरोगामी : *~ policies, पुरोगामी धोरणे.* २ हळूहळू बदलत जाणारा, वर्धमान. **progressive** *ना* [*गण*] पुरोगामी विचारांचा माणूस. **progressively** *क्रिवि* अधिकाधिक.

prohibit /प्र'हिबिट्; *अमे* प्रउ-/ *क्रि* [*सक*] (*औप*) १ एखादी गोष्ट करण्यास मज्जाव करणे, बंदी घालणे. २ थांबवणे, प्रतिबंध करणे.

prohibition /,प्रउहि'बिश्न्; *अमे* ,प्रउअ-'बिश्न्/ *ना* १ [*अगण*] मज्जाव, बंदी, प्रतिबंध. २ [*गण*] प्रतिबंधात्मक आदेश, बंदी हुकूम.

prohibitive /प्र'हिबटिव्ह्; *अमे* प्रउ-/ *वि* १ (किंमतींबाबत) परवडणार नाही इतकी जास्त, भयानक वाढलेली, आवाक्याबाहेरची. २ बंदी घालणारा, प्रतिबंधात्मक. **prohibitively** *क्रिवि* आवाक्याबाहेर जाईल अशा रीतीने, फार महागड्या पद्धतीने.

project¹ /'प्रॉजेक्ट्/ *ना* [*गण*] प्रकल्प, उपक्रम (किंवा त्याची योजना).

project² /प्र'जेक्ट्/ *क्रि* १ [*सक*] योजना करणे. २ [*सक*] वास्तविक लक्षात घेऊन अंदाज करणे : *~ the population growth, लोकसंख्या वाढीचा अंदाज करणे.* ३ [*सक*] *on(to)//* पडद्यावर चित्रफीत, प्रकाश दाखविणे; प्रक्षेपण करणे. ४ [*सक*] लोकांवर चांगला प्रभाव पडेल अशा रीतीने एखादी वस्तू वा व्यक्ती किंवा स्वतःला लोकांसमोर आणणे, एखादी गोष्ट जाहीर करणे, सर्वज्ञात करणे. ५ [*अक*] पृष्ठभागापासून बाहेर येणे, पुढे येणे.

projectile /प्र'जेक्टाइल्/ *ना* [*गण*] तोफेतून डागलेले किंवा फेकलेले अस्त्र.

projection /प्र'जेक्श्न्/ *ना* १ [*अगण*] प्रक्षेपण. २ [*गण*] पुढे आलेला भाग. ३ [*गण*] वास्तविके लक्षात घेऊन केलेला अंदाज.

projector /प्र'जेक्ट(र्)/ *ना* [*गण*] पडद्यावर चित्र प्रक्षेपित करण्याचे साधन, चित्रदर्शक, प्रदर्श.

proletariat /,प्रउलि'टेअरिअट्/ *ना* **the proletariat** [*अे.व*] (अे.व किंवा ब.व क्रियापदासह) श्रमजीवी वर्ग, कामगार वर्ग, श्रमिक.

proliferate /प्र'लिफरेइट्; *अमे* प्रउ-/ *क्रि* [*अक*] भराभर संख्येने वाढणे, प्रसार होणे. **proliferation** /प्र,लिफ'रेइश्न्; *अमे* प्रउ-/ *ना* [*अगण*] प्रसार.

prolific /प्र'लिफिक्/ *वि* (लेखक, कलाकार वगैरेबाबत) बहुप्रसव.

prologue (*अमे* तसेच -log) /'प्रउलॉग्; *अमे* -लॉऽग्/ *ना* [*गण*] १ नाटक, कादंबरी वगैरेची प्रस्तावना, आमुख. २ एखाद्या गोष्टीची सुरुवात, आरंभ.

prolong /प्र'लॉङ्; *अमे* -'लॉऽङ्/ *क्रि* [*सक*] एखादी गोष्ट जास्त काळ टिकेल असे करणे, वाढविणे, दीर्घ करणे. **prolonged** *वि* दीर्घकाळचा, जुना.

promenade /,प्रॉम'नाड्; *अमे* -'नइड्/ *ना* [*गण*] समुद्रकाठच्या शहरातील समुद्रकिनाऱ्या-जवळची तयार केलेली पायवाट, विहारपथ.

prominent /'प्रॉमिनन्ट्/ *वि* १ (व्यक्तीबाबत) ख्यातनाम, प्रमुख. २ लक्षणीय, ठळक. ३ बाहेर आलेला, समुन्नत. **prominence** *ना* १ [*अगण*] प्रामुख्य, महत्त्व; ठळकपणा; उभरेपणा, समुन्नतपणा. २ [*गण*] (*औप*) बाहेर आलेला भाग. **prominently** *क्रिवि* प्रामुख्याने; ठळकपणे, समुन्नतपणे.

promiscuous /प्र'मिस्क्युअस्/ *वि* (*अधिक्षेपी*) अनेक लोकांशी लैंगिक संबंध असणारा, बारा बोड्याचा, बेवडीचा. **promiscuity** /,प्रॉमि'स्क्यूअटि/ *ना* [*अगण*] अनेकांशी लैंगिक संबंध. **promiscuously** *क्रिवि* अनेकांशी लैंगिक संबंध ठेवून.

promise /'प्रॉमिस्/ *ना* १ [*गण*] एखादी गोष्ट करण्याचे दिलेले लेखी किंवा तोंडी वचन, अभिवचन. २ [*अगण*] पुढे चांगले होण्याचे चिन्ह, यशाचे चिन्ह: *His work shows great ~, त्याचे काम मोठ्या भवितव्याचे सुचिन्ह आहे.* **promise** *क्रि* १ [*अक, सक*] वचन देणे. २ [*सक*] एखादी गोष्ट संभवनीय आहे असे दाखवणे: *It ~s to be a hot day, उकाड्याचा दिवस आहे असा संभव दिसतो.* **promising** *वि* यशस्वी होण्याजोगा, आशादायक.

promontory /'प्रॉमन्ट्रि; *अमे* -टॉऽरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) समुद्रकिनाऱ्याचा उंच व समुद्रात गेलेला भाग, भूशिर.

promote /प्र'मउट्/ *क्रि* [*सक*] १ पदोन्नति देणे, वरचा दर्जा देणे, बढती देणे. २ प्रगतीला हातभार लावणे; प्रोत्साहन देणे किंवा पाठिंबा देणे, उचलून धरणे. ३ जाहिरात करणे, बोलबाला करणे. **promoter** *ना* [*गण*] एखाद्या गोष्टीचा संघटक किंवा आधारस्तंभ, प्रवर्तक.

promotion /प्र'मउश्न्/ *ना* [*गण, अगण*] १ बढती, पदोन्नती; उचलून धरणे. २ मालाची विक्री वाढवण्यास केलेली जाहिरात वगैरे. बोलबाला.

prompt^{1} /प्रॉम्प्ट्/ *वि* तात्काळ केलेला, तत्पर, ताबडतोब दिलेला: *a ~ reply, तत्परतेने दिलेले उत्तर.* **promptly** *क्रिवि* तत्परतेने, ताबडतोब. **promptness** *ना* [*अगण*] तत्परता.

prompt^{2} /प्रॉम्प्ट्/ *क्रि* १ [*सक*] एखाद्याला एखादी गोष्ट करावयास लावणे, कारण होणे. २ [*सक*] (नटाला) विसरलेले संवाद सांगणे, सुचवणे. **prompt** *ना* [*गण*] (नटाला) विसरलेले संवाद सुचवणे, पडद्यामागून संवाद सांगणे. **prompter** *ना* [*गण*] नटांना संवाद सांगणारा माणूस, पार्श्वसूचक.

prone /प्रउन्/ *वि* १ *to*// प्रादुर्भाव होण्यासारखा, लागण होण्यासारखा, प्रवण: *~ to infection, रोगाची लागण होण्याजोगा* ○ *'accident ~, अपघात होण्यासारखा.* २ पालथा, अधोमुख, आडवा.

prong /प्रॉङ्; *अमे* प्रॉऽङ्/ *ना* [*गण*] काट्याचा दाता.

pronoun /'प्रउनाउन्/ *ना* [*गण*] (*व्याकरण*) *It, hers* यासारखे नामाऐवजी वापरले जाणारे शब्द, सर्वनाम.

pronounce /प्र'नाउन्स्/ *क्रि* [*सक*] १ (शब्दाचा किंवा अक्षराचा) उच्चार करणे. २ (*औप*) अधिकृतपणे सांगणे. **pronounced** *वि* लक्षात येईल असा, स्पष्ट. **pronouncement** *ना* [*गण*] अधिकृत घोषणा.

pronunciation /प्र,नन्सि'अेइश्न्/ *ना* १ [*अगण*] एखादी भाषा बोलली जाते त्याची पद्धती. २ [*गण*] शब्दाचा उच्चार.

proof^{1} /प्रूफ्/ *ना* १ [*गण, अगण*] एखादी गोष्ट सत्य आहे किंवा प्रत्यक्षात आहे हे दाखविणारी गोष्ट, पुरावा. २ [*अगण*] परीक्षा, कस. ३ [*गण, विशेषतः ब.व*] छपाईची दुरुस्त करण्यासाठी दिलेली प्रत, मुद्रित. ४ [*अगण*] मद्याची तीव्रता.

proof^{2} /प्रूफ्/ *वि* (सामासिक शब्दांत) रोधणारा, संरक्षण करणारा, संरक्षक, रोधक: *,bullet-~ 'glass, बंदुकीच्या गोळीपासून सुरक्षित काच* ○ *'water~, जलरोधक.*

prop^{1} /प्रॉप्/ *ना* [*गण*] १ एखादी गोष्ट उभी राहण्यासाठी दिलेला आधार, टेकू, टेकण. २ (*ला*) आधार देणारा माणूस. **prop** *क्रि* (**-pp-**) [*सक*] आधार देणे, टेकू देणे.

prop^{2} /प्रॉप्/ *ना* [*गण, बहुधा ब.व*] फर्निचरसारख्या रंगभूमीवर वापरायच्या वस्तू.

propaganda /,प्रॉप'गॅन्ड/ *ना* [*अगण*] लोकमतावर प्रभाव पाडण्याकरिता पसरवलेली माहिती, प्रचार.

propagate /'प्रॉपगेइट्/ *क्रि* १ [*अक, सक*] (वनस्पतींबाबत) संख्या वाढणे किंवा वाढवणे. २ [*सक*] (*औप*) प्रसार करणे, पसरविणे: *~ ideas, कल्पनांचा प्रसार करणे.* **propagation** /,प्रॉप'गेइश्न्/ *ना* [*अगण*] वाढ; प्रसार.

propel /प्र'पेल्/ *क्रि* (**-ll-**) [*सक*] लोटणे, सोडणे, उडवणे; चाळवणे. **propeller** *ना* [*गण*] जहाज, हेलिकॉप्टर वगैरेना गती देणारी पंख्यांची पाती, चालनपंखा.

propensity /प्र'पेन्सटि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) (*for/to*)// (*औप*) स्वाभाविक प्रवृत्ती, कल.

proper /'प्रॉप(र्)/ *वि* १ योग्य, उचित,

बरोबर. २ सामाजिकदृष्ट्या योग्य, यथायोग्य, जनमान्य. ३ खरा; सत्य : *We've not had a ~ holiday in years, कित्येक वर्षांत आम्हाला खरी सुट्टी अशी मिळालीच नाहीये.* ४ खुद्द, प्रत्यक्ष : *There is a small hall and the concert hall ~, मैफलीचा खुद्द हॉल याशिवाय आणखी एक लहान हॉल आहे.* **properly** *क्रिवि* बरोबर रीतीने, योग्य तऱ्हेने. **'proper name** (तसेच **'proper noun**) *ना* [*गण*] (*व्याकरण*) व्यक्ती, स्थळ वगैरेचे नाव, विशेषनाम (इंग्रजीत विशेषनाम लिहिताना पहिले अक्षर मोठ्या लिपीतले असते).

property /'प्रॉपटि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] मालमत्ता; संपत्ती. २ [*गण, अगण*] जमीन, इमारत यासारखी स्थावर मिळकत, स्थावर इस्टेट. ३ [*गण,* विशेषतः *ब.व*] खास गुण, विशेष गुणधर्म : *the chemical properties of the metal, या धातूचे रासायनिक गुणधर्म.*

prophecy /'प्रॉफसि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] भविष्यात काय घडेल ते सांगण्याची शक्ती, भविष्यदृष्टी. २ [*गण*] केलेले भाकीत, भविष्यवाणी.

prophesy /'प्रॉफसाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*अक, सक*] भविष्यवाणी करणे, भविष्य वर्तवणे, भाकीत करणे.

prophet /'प्रॉफिट्/ *ना* [*गण*] १ भविष्यात काय घडेल हे सांगणारी व्यक्ती, द्रष्टा, भविष्यवेत्ता. २ धर्माचा उपदेश करणारा आणि आपला उपदेश प्रत्यक्ष देवाची शिकवण आहे असा दावा करणारा माणूस, प्रेषित. **prophetic** /प्र'फेटिक्/ *वि* भविष्यसूचक, द्रष्टेपणाचा.

propitious /प्र'पिशस्/ *वि* (*औप*) अनुकूल.

proportion /प्र'पॉऽशन्/ *ना* १ [*गण*] भाग, वाटा. २ [*अगण*] एका गोष्टीचे दुसऱ्या गोष्टीशी असलेले आकार, राशी वगैरे यांचे प्रमाण. ३ **proportions** [*ब.व*] आकार : *trade of substantial ~s, मोठ्या प्रमाणावरचा व्यापार.* ४ (*वाक्प्र*) **in proportion to sth** एखाद्या गोष्टीच्या प्रमाणात : *paid in ~ to the work done, केलेल्या कामाच्या प्रमाणात दाम.* **proportional** *वि* प्रमाणबद्ध, प्रमाणशीर.

proposal /प्र'पउझ़ल्/ *ना* [*गण*] १ योजना. २ विवाहाचा प्रस्ताव.

propose /प्र'पउझ़्/ *क्रि* १ [*सक*] सुचवणे, सूचना करणे. २ [*सक*] हेतू असणे, योजलेले असणे. ३ [*अक, सक*] (*to*)// (लग्नाचा) प्रस्ताव मांडणे, एखाद्याशी विवाह करण्याची इच्छा व्यक्त करणे.

proposition /,प्रॉप'ज़िशन्/ *ना* [*गण*] १ मत किंवा निर्णय व्यक्त करणारे वाक्य, विधान, प्रतिज्ञा. २ विशेषतः व्यापारात पुढे केलेला प्रस्ताव. ३ (*अनौप*) पुढे असलेले काम. **proposition** *क्रि* [*सक*] संभोगाची इच्छा व्यक्त करणे.

proprietary /प्र'प्राइअट्रि; *अमे* -टेरि/ *वि* विशिष्ट कंपनीने तयार करून विशिष्ट नावाखाली विकायला ठेवलेला, मालकीचा.

proprietor /प्र'प्राइअट(र्)/ *ना* [*गण*] (*स्त्री* **-tress** /-ट्रिस्/) एखाद्या व्यापाराचा मालक.

propriety /प्र'प्राइअटि/ *ना* [*अगण*] (*औप*) सामाजिक किंवा नैतिकदृष्ट्या उचित वर्तन असणे, औचित्य.

propulsion /प्र'पल्शन्/ *ना* [*अगण*] लोटण्याची शक्ती, परिचालन, प्रचालन.

pro rata /,प्रउ 'राट/ *क्रिवि, वि* (*औप*) प्रत्येकाच्या वाट्यानुसार, प्रमाणानुसार.

prosaic /प्र'ज़ेइ·इक्/ *वि* कंटाळवाणा; रुक्ष.

proscribe /प्र'स्क्राइब्; *अमे* प्रउ-/ *क्रि* [*सक*] (*औप*) कायद्याने बंदी करणे.

prose /प्रउझ़्/ *ना* [*अगण*] दैनंदिन जीवनातील बोललेली किंवा लिहिलेली भाषा, गद्यभाषा.

prosecute /'प्रॉसिक्यूट्/ *क्रि* [*अक, सक*] एखाद्यावर कोर्टात फौजदारी खटला भरणे, फौजदारी करणे. **prosecution** /,प्रॉसि'क्यूशन्/ *ना* १ [*गण, अगण*] खटला, अभियोग. २ **the prosecution** [*अे.व*] (अे.व किंवा ब.व क्रियापदासह) कोर्टात खटला चालवणारा/वकील. **prosecutor** *ना* [*गण*] (विशेषतः *अमे*) खटला चालवणारा वकील, अभियोक्ता.

prospect^1 /'प्रॉस्पेक्ट्/ *ना* १ [*अगण*] (*of*)// एखादी गोष्ट घडण्याची आशा. २ [*गण, अगण*] लवकरच घडणारी घटना, भावी घटना.

३ **prospects** [*ब.व*] यशाची आशा किंवा शक्यता.

prospect^{2} /प्र'स्पेक्ट्; *अमे* 'प्रॉस्-/ *क्रि* [*अक*] (*for*)// तेलसाठा, सोने वगैरेचा शोध घेणे. **prospector** *ना* [*गण*] सोने वगैरेचा शोध घेणारा माणूस, खाणी शोधून काढणारा माणूस.

prospective /प्र'स्पेक्टिव्ह्/ *वि* होऊ घातलेला, होऊ इच्छिणारा, भावी.

prospectus /प्र'स्पेक्टस्/ *ना* [*गण*] एखाद्या उद्योगाची, महाविद्यालयाची वगैरे ओळख करून देणारे छापील परिपत्रक, निर्देशपुस्तिका.

prosper /'प्रॉस्प(र्)/ *क्रि* [*अक*] आर्थिक भरभराट होणे, सुस्थितीत येणे. **prosperity** /प्रॉ'स्पेरटि/ *ना* [*अगण*] यश, सुबत्ता, भरभराट. **prosperous** /'प्रॉस्परस्/ *वि* यशस्वी; श्रीमंत, तालेवार.

prostitute /'प्रॉस्टिट्यूद्; *अमे* -टूट्/ *ना* [*गण*] पैशासाठी संभोग करू देणारी व्यक्ती, वेश्या, शरीरविक्रय करणारी व्यक्ती. **prostitute** *क्रि* [*सक*] स्वतःच्या देहाची किंवा बुद्धीची पैशासाठी विक्री करणे. **prostitution** /,प्रॉस्टि'ट्यूश्न्; *अमे* 'टूश्न्/ *ना* [*अगण*] वेश्याव्यवसाय, देहविक्रय.

prostrate /'प्रॉस्ट्रेइट्/ *वि* साष्टांग नमस्कार घातलेला, आडवा, पालथा. **prostrate** /प्रॉ'स्ट्रेइट्; *अमे* 'प्रॉस्ट्रेइट्/ *क्रि* ~ **oneself** साष्टांग नमस्कार घालणे, लोळण घेणे, लोटांगण घालणे.

protagonist /प्र'टॅगनिस्ट्/ *ना* [*गण*] १ (*औप*) नाटकातील किंवा एखाद्या सत्य घटनेतील मुख्य पात्र, नायक. २ एखाद्या चळवळीचा वगैरे अध्वर्यू, कैवारी.

protect /प्र'टेक्ट्/ *क्रि* [*सक*] संरक्षण करणे, सुरक्षित ठेवणे. **protection** /प्र'टेक्श्न्/ *ना* १ [*अगण*] संरक्षण, सुरक्षा. २ [*गण*] संरक्षण करणारे काही, कवच. **protective** *वि* १ संरक्षण करणारा, सुरक्षिततेसाठीचा. २ (*towards*)// (लोकांबाबत) एखाद्याला आश्रय देणारे, सुरक्षितता देणारे, बचाव करणारे. **protector** *ना* [*गण*] संरक्षण करणारा, रक्षणकर्ता.

protectorate /प्र'टेक्टरट्/ *ना* [*गण*] जास्त बलाढ्य राष्ट्राच्या नियंत्रणाखाली आणि रक्षणाखाली असलेला देश, रक्षित राज्य.

protégé /'प्रॉटिझेइ; *अमे* ,प्रउटि'झेइ/ *ना* [*गण*] एखाद्या बड्या आसामीच्या आधाराने किंवा सल्ल्याने चालणारा माणूस, पाल्य, पित्त्या, दुसऱ्याच्या मदतीने, सल्ल्याने चालणारा माणूस, बगलबच्चा.

protein /'प्रउटीन्/ *ना* [*गण, अगण*] आरोग्याला आवश्यक असे शरीराची वाढ करणारे द्रव्य, नत्रयुक्त द्रव्य, प्रथिन.

protest^{1} /'प्रउटेस्ट्/ *ना* [*गण, अगण*] कडक शब्दांत नापसंती किंवा असहमती व्यक्त करणारे निवेदन किंवा कृती, निषेध, विरुद्ध ओरड.

protest^{2} /प्र'टेस्ट्/ *क्रि* १ [*अक, सक*] (*about/against/at*)// निषेध करणे, नापसंती दाखवणे, विरुद्ध ओरड करणे. २ [*सक*] विरोध न जुमानता ठामपणे सांगणे : *He ~ed his innocence, तो निष्पाप आहे असे त्याने आवर्जून सांगितले.* **protester** *ना* [*गण*] निषेध करणारा, निदर्शक.

Protestant /'प्रॉटिस्टन्ट्/ *ना* [*गण*], *वि* १६ व्या शतकात रोमन कॅथलिक चर्चपासून वेगळ्या निघालेल्या कोणत्याही ख्रिस्ती पक्षांचा सभासद.

protocol /'प्रउटकॉल्; *अमे* -कॉऽल्/ *ना* [*अगण*] समारंभप्रसंगीच्या वागणुकीचे नियम, शिष्टाचाराचे नियम.

proton /'प्रउटॉन्/ *ना* [*अगण*] धन विद्युत्भार असणारा अणूच्या पोटातील एक कण, धानक.

prototype /'प्रउटटाइप्/ *ना* [*गण*] विमानाचा वगैरे पहिला नमुना की ज्यापासून आणखी समान गोष्टी करता येतात, मूळ प्रतिमा, आदिरूप, मूलकृती.

protracted /प्र'ट्रॅक्टिड्; *अमे* प्रउ-/ *वि* दीर्घकाळचा, लांबलेला, लांबण लागलेला.

protractor /प्र'ट्रॅक्ट(र्); *अमे* प्रउ-/ *ना* [*गण*] कोन काढण्याचे आणि मोजण्याचे एक साधन, कोनमापक.

protrude /प्र'ट्रूड्; *अमे* प्रउ-/ *क्रि* [*अक, सक*] पुढे येणे, बाहेर दिसणे. **protrusion** /-ट्रूझ्न्/ *ना* [*गण, अगण*] पुढे आलेले काहीतरी.

protuberance /प्र'ट्यूबरन्स्; *अमे* प्रउ'टू-/ *ना* [*गण*] (*औप*) सूज, टेंगूळ; उंचवटा, फुगवटा, फुगा.

proud /प्राउड्/ *वि* १ एखादी गोष्ट केली किंवा एखादी गोष्ट स्वतःकडे आहे याबाबत समाधान व्यक्त करणारी भावना असलेला, अभिमान वाटेल असा, अभिमानी. २ स्वाभिमानी. ३ गर्विष्ठ, अहंकारी. **proudly** *क्रिवि* अभिमानाने, गर्वानि.

prove /प्रूव्ह्/ *क्रि* (*भूत वि* ~**d**; *अमे* ~**n** /'प्रूव्हन्/) १ [*सक*] सिद्ध करणे, शाबित करणे. २ [*अक*] दिसून येणे, दाखवून देणे, आढळून येणे: *The attempts ~d to be useless, सर्व प्रयत्न निष्फळ आहेत असे दिसून आले आहे.*

proverb /'प्रॉव्हऽब्/ *ना* [*गण*] सत्य सांगणारे किंवा उपदेश करणारे प्रसिद्ध पण सुटसुटीत असे वचन, म्हण, नीतिवचन – उदा *It takes two to make a quarrel* म्हणजे मराठीत *टाळी कधी एका हाताने वाजत नाही.* **proverbial** /प्र'व्हऽबिअल्/ *वि* १ म्हणीचा. २ प्रसिद्ध, सर्वज्ञात, जगजाहीर.

provide /प्र'व्हाइड्/ *क्रि* १ [*सक*] (*for*)// एखाद्याला काही देणे; पुरवठा करणे. २ (*क्रिब*) **provide for sb** एखाद्याची गरज भागविणे. **provide for sth** एखाद्या प्रसंगाला तोंड देण्यासाठी तजवीज करणे, तयारी करून ठेवणे.

provided /प्र'व्हाइडिड्/ (तसेच **providing** /प्र'व्हाइडिङ्/) उ. *अव्यय* (*that*)// या अटीवर, मात्र.

providence /'प्रॉव्हिडन्स्/ *ना* [*अगण*] देवाची दया, ईशकृपा, भाग्य, सुदैव. **providential** /,प्रॉव्हि'डेन्श्ल्/ *वि* (*औप*) भाग्यवान, सुदैवाचा.

province /'प्रॉव्हिन्स्/ *ना* १ [*गण*] एखाद्या राज्याच्या प्रशासनाचा एक मुख्य विभाग, प्रांत. २ **the provinces** [*ब.व*] राजधानी सोडून राज्याचे इतर भाग. ३ [*अे.व*] (*औप*) जबाबदारीचे किंवा ज्ञानाचे क्षेत्र. **provincial** *वि* १ प्रांतिक किंवा राज्याच्या राजधानी सोडून इतर भागांचा. २ संकुचित वृत्तीचा किंवा पुरातन, प्रांतीयवादी. **provincial** *ना* [*गण*] खेडेगावातला किंवा राजधानीबाहेरच्या भागातला माणूस.

provision /प्र'व्हिझन्/ *ना* १ [*अगण*] पुरवठा करणे. २ [*अगण*] (*for*)// भविष्याची तरतूद. ३ **provisions** [*ब.व*] अन्नधान्य, अन्नसामग्री. ४ [*गण*] कायदेशीर कागदपत्रातील अटी, उपबंध.

provisional /प्र'व्हिझन्ल्/ *वि* तात्पुरता, कामचलाऊ. **provisionally** /-नलि/ *क्रिवि* तात्पुरत्या स्वरूपात.

provocation /,प्रॉव्ह'केइश्न्/ *ना* १ [*अगण*] प्रक्षोभ करणे, चिथावणी. २ [*गण*] प्रक्षोभक असे काही, चिथावणी देणारी गोष्ट.

provocative /प्र'व्हॉकटिव्ह्/ *वि* १ प्रक्षोभक, भडकवणारा, चिथावणी देणारा. २ कामवासना जागृत करणारा, लैंगिक वासना उद्दीपित करणारा. **provocatively** *क्रिवि* प्रक्षोभकपणे; वासना चाळविणाऱ्या रीतीने.

provoke /प्र'व्हउक्/ *क्रि* [*सक*] १ चीड आणणे, भडकवणे. २ (भावना, प्रतिक्रिया) उत्पन्न करणे, निर्माण करणे.

prow /प्राउ/ *ना* [*गण*] बोटीचा पुढचा निमुळता भाग, गलबताची नाळ.

prowess /'प्राउइस्/ *ना* [*अगण*] (*औप*) पराक्रम.

prowl /प्राउल्/ *क्रि* [*अक, सक*] (*about/around*)// चोरीसाठी, अन्नासाठी वगैरे घिरट्या घालणे, पाळत ठेवणे, चोरपावलांनी फिरणे. **prowl** *ना* (*वाक्प्र*) **be on the prowl** पाळतीवर राहणे.

proximity /प्रॉक्'सिमिटि/ *ना* [*अगण*] (*औप*) जवळीक, सान्निध्य.

proxy /'प्रॉक्सि/ *ना* (*ब.व* -ies) १ [*अगण*] एखाद्याचे खास करून मत देण्यासाठी असलेला प्रतिनिधित्वाचा अधिकार, मुखत्यारी, प्रतिपत्र. २ [*गण*] प्रतिनिधी, मुखत्यार, प्रतिपत्री.

prude /प्रूड्/ *ना* [*गण*] (*अधिक्षेपी*) लैंगिक गोष्टींबाबत लाजाळू असणारा मनुष्य. **prudish** *वि* लाजाळू, फार सोवळा.

prudent /'प्रूडन्ट्/ *वि* सुजाण, समंजस. **prudence** /-ड्न्स्/ *ना* [*अगण*] सुजाणपणा, समंजसपणा. **prudently** *क्रिवि* सुजाणपणे, समंजसपणे.

prune^{1} /प्रून्/ *ना* [*गण*] मनुका.

prune^{2} /प्रून्/ *क्रि* [*सक*] १ वाढ होण्यासाठी झाड छाटणे. २ (*ला*) अनावश्यक भागांची काटछाट करणे, काटणे.

pry /प्राइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **pried** /प्राइड्/) [*अक*] (*into*)// दुसऱ्याच्या खाजगी आयुष्यात नाक खुपसणे.

PS /,पी 'एस्/ *संरू* (पत्राच्या शेवटी लिहिण्यासाठी) postscript ताजा कलम (ता.क.).

psalm /साम्/ *ना* [*गण*] धार्मिक प्रार्थनागीत – विशेषतः बायबलमधील, प्रार्थना, स्तवन.

pseudonym /'स्यूडनिम्; *अमे* 'सूडनिम्/ *ना* [*गण*] विशेषतः लेखकाने घेतलेले टोपणनाव.

psyche /'साइकि/ *ना* [*गण*] मानवी आत्मा किंवा मन.

psychedelic /,साइकि'डेलिक्/ *वि* १ (अमली पदार्थांबाबत) आभास निर्माण करणारा, भ्रमकारक. २ भडक रंगाचा आणि विचित्र नक्षी असणारा.

psychiatry /साइ'काइअट्रि; *अमे* सि-/ *ना* [*अगण*] मनोदोषचिकित्सा, मनोविकृतिचिकित्साशास्त्र. **psychiatric** /,साइकि'ॲट्रिक्/ *वि* मनोविकृतिचिकित्सेचा. **psychiatrist** *ना* [*गण*] मानसोपचारतज्ज्ञ.

psychic /'साइकिक्/ *वि* १ अतीन्द्रियशक्ती असणारा, उदाहरणार्थ भविष्यात काय घडेल हे बघू शकणारा. २ (तसेच **psychical** /-किक्ल्/) (क) मनोविषयक, शरीरविषयक नसलेले, सूक्ष्ममानसिक, अतीन्द्रिय. (ख) भौतिक नियमांच्या पलीकडच्या गोष्टींचा, अभौतिक स्वरूपाचा.

psychoanalysis /,साइकउअ'नॅलसिस्/ *ना* [*अगण*] रुग्णाच्या मनावर उपचार करताना त्याच्या आयुष्यातील भूतकाळातील घटनांची चर्चा करून त्यांचा संबंध सद्यस्थितीशी जोडण्याची पद्धती, मनोविश्लेषण. **psychoanalyse** /,साइकउ'ॲनलाइझ्/ *क्रि* [*सक*] मनोविश्लेषण करणे. **psychoanalyst** /,साइकउ'ॲनलिस्ट्/ *ना* [*गण*] मनोविश्लेषण करणारा.

psychology /साइ'कॉलजि/ *ना* [*अगण*] मन आणि त्याचे कार्य यांचा अभ्यास, मानसशास्त्र, मनोविज्ञान. **psychological** /,साइक'लॉजिक्ल्/ *वि* मानसशास्त्रीय, मनोवैज्ञानिक. **psychologist** *ना* [*गण*] मानसशास्त्रज्ञ, मनोवैज्ञानिक.

psychopath /'साइकउपॅथ्/ *ना* [*गण*] गंभीर मानसिक विकृतीने पछाडलेला आणि हिंसक बनू शकणारा माणूस. **psychopathic** /,साइकउ'पॅथिक्/ *वि* मनोविकृतीने ग्रासलेला, वेडा.

pt *संरू* १ part भाग. २ pint पाइन्ट्. ३ point बिंदू. ४ port बंदर.

PTO /,पी टी 'अउ/ *संरू* (पानाच्या वगैरे खालच्या बाजूस) please turn over कृपया पुढे पहा.

pub /पब्/ *ना* [*गण*] मद्यार्कयुक्त पेये विकली आणि प्यायली जातात ती इमारत, मद्यपानगृह.

puberty /'प्यूबटि/ *ना* [*अगण*] प्रजोत्पादनक्षमता प्राप्त होण्याची माणसाच्या आयुष्यातील पायरी, तारुण्यागम, पौगंडावस्था, यौवन.

pubic /'प्यूबिक्/ *वि* लिंग किंवा योनीजवळचा, रोमांगाचा, जघनस्थानीय.

public /'पब्लिक्/ *वि* १ सर्वसाधारण लोकांचा किंवा लोकांकरता, सार्वजनिक. २ शासनाचा किंवा शासनाने दिलेला असा, शासकीय, सरकारी : *~ money, सरकारी किंवा सार्वजनिक पैसा* ○ *a ~ library, सार्वजनिक वाचनालय.* ३ जगजाहीर; गुप्त नसलेला, उघड. ४ (*वाक्प्र*) **in the public 'eye** वृत्तपत्रे, दूरदर्शन यावर सतत येणारा, प्रसिद्धीच्या झोतात असणारा. **public** *ना* १ **the public** [*अे.व*] (अे.व किंवा ब.व क्रियापदासह) (क) लोक, जनता. (ख) समाजातला विशिष्ट वर्ग : *the reading ~, वाचकवर्ग.* २ (*वाक्प्र*) **in public** खाजगीरीत्या नाही असे, उघडपणे, खुल्लम्खुल्ला. **,public 'bar** *ना* [*गण*] (*ब्रि*) हॉटेल किंवा सार्वजनिक मद्यपानगृहातील विश्रामकक्षातील कट्ट्यापेक्षा स्वस्त दरात दारू मिळण्याचा कट्टा. **,public 'company, ,public 'limited company** *ना* [*गण*] लोकांना शेअर्स विकणारे उद्योगमंडळ, सार्वजनिक उद्योगमंडळ. **,public**

con'venience *ना* [*गण*] (*ब्रि*) सार्वजनिक प्रसाधनगृह. **,public 'house** *ना* [*गण*] (*औप*) = PUB. **publicly** *क्रिवि* जाहीरपणे. **,public re'lations** *ना* १ [*अगण*] एखाद्या संस्थेकरता चांगले जनमत मिळवण्याचे काम, जनसंपर्क. २ [*ब.व*] एखाद्या संस्थेचे लोकांशी असलेले नाते, सार्वजनिक संबंध. **,public 'school** *ना* [*गण*] (ब्रिटनमधे) फी देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीची खाजगी माध्यमिक शाळा.

publication /,पब्लि'केइश्न्/ *ना* १ [*अगण*] प्रकाशित करणे, प्रकाशन. २ [*गण*] प्रकाशित पुस्तक, मासिक वगैरे, प्रकाशन.

publicity /पब्'लिसटि/ *ना* [*अगण*] १ लोकांचे लक्ष वेधून घेणारी वार्ता; जाहिरात. २ लोकांना माहीत असण्याची स्थिती, प्रसिद्धी.

publicize /'पब्लिसाइझ्/ *क्रि* [*सक*] लोकांना माहीत होईलसे करणे, प्रसिद्धी देणे.

publish /'पब्लिश्/ *क्रि* [*सक*] १ (पुस्तक वगैरे) छापून उपलब्ध करणे, प्रकाशित करणे. २ लोकांना माहीत करून देणे, प्रसिद्धीस देणे. **publisher** *ना* [*गण*] प्रकाशक किंवा प्रकाशन संस्था.

pucker /'प̂क(र्)/ *क्रि* [*अक, सक*] घड्या/चुण्या पडणे/पाडणे.

pudding /'पुडिङ्/ *ना* [*गण, अगण*] १ जेवणाच्या शेवटी खायचा एक गोड पदार्थ. २ भाजून, उकडून किंवा वाफलवून केलेला पिठाचा एक गोड सुग्रास पदार्थ.

puddle /'प̂ड्ल्/ *ना* [*गण*] पावसाळ्यातले डबके.

puff^1 /प̂फ्/ *क्रि* १ [*अक, सक*] (धूर, वाफ वगैरेबाबत) भपकारे मारणे, भक्‌भक् करीत बाहेर पडणे. २ [*अक, सक*] धुराचे भपकारे सोडत (सिग्रेट, चिरुट वगैरे) ओढणे. ३ [*अक*] धापा टाकणे, जोरजोरात श्वास टाकणे. ४ (*क्रिब*) **puff (sth) out/up** फुगणे. **puffed** *वि* (*अनौप*) धापा टाकणारा, धाप लागलेला.

puff^2 /प̂फ्/ *ना* हवेची हळूवार फुंकर, धुराचा हलकासा भपकारा. **,puff 'pastry** *ना* [*अगण*] कुरकुरीत, हलकी पेस्ट्री. **puffy** *वि* **(-ier, -iest)** फुगलेला, फुगीर.

puffin /'प̂फिन्/ *ना* [*गण*] मोठी रंगीत चोच असलेला उत्तर अटलांटिक समुद्रावरचा एक पक्षी.

pull^1 /पुल्/ *क्रि* १ [*अक, सक*] ओढणे, खेचणे : ~ *the cart up the hill, गाडी टेकडीवर ओढत नेणे* ○ ~ *the plug out, गुडदी बाहेर काढणे.* २ [*सक*] ओढून काढणे, बळे काढणे : ~ *(out) a tooth, दात (ओढून) काढणे.* ३ [*सक*] ओढाताण करून हानी पोहोचवणे : ~ *a muscle, ओढाताणीने/ताणल्यामुळे स्नायू दुखावणे.* ४ (*वाक्प्र*) **pull faces/a face** ➪ FACE. **pull a 'fast one (on sb)** (*अनौप*) युक्ती करून एखाद्यावर मात करणे, शिताफीने कुरघोडी करणे. **pull one's finger out** ➪ FINGER. **pull sb's 'leg** (*अनौप*) एखाद्याला भलता विश्वास टाकायला लावून त्याची फजिती करणे, थट्टा करणे. **pull one's 'socks up** (*अनौप*) स्वतःचे काम किंवा वर्तन सुधारण्याचा प्रयत्न करणे. **pull sth to 'pieces** कडक टीका करणे, वाभाडे काढणे. **pull one's weight** स्वतःच्या कामाचा वाटा उचलणे. ५ (*क्रिब*) **pull away** (वाहनाबाबत) पुढे सरकणे/जाणे. **pull sth down** (जुनी इमारत वगैरे) पाडणे. **pull in** (क) (आगगाडी) स्टेशनात येणे. (ख) (वाहनाबाबत) एखाद्या दिशेने जाऊन थांबणे. **pull sth off** (*अनौप*) एखाद्या गोष्टीत यश येणे, सरशी होणे. **pull out** (वाहनाबाबत) बाहेर पडणे किंवा बाजूला होणे/जाणे. **pull (sb/sth) out (of sth)** एखाद्या गोष्टीतून बाहेर पडणे/पडायला लावणे किंवा माघार घेणे, सोडून देणे किंवा सोडायला लावणे, अंग काढून घेणे : ~ *out of a race, शर्यतीतून माघार घेणे.* **pull over** (वाहनाबाबत) बाजूला घेणे (आणि थांबणे). **pull (sb) through** आजारातून उठणे किंवा उठण्यास मदत करणे. **pull together** एकत्र येऊन काम करणे. **pull oneself together** भावनांना आवर घालणे. **pull up** (वाहनाबाबत) थांबणे. **pull sb up** (*अनौप*) एखाद्याच्या हातनं चूक झाल्यामुळे त्याचे कान उपटणे, त्याला तंबी देणे.

pull^2 /पुल्/ *ना* १ [*गण*] ओढणे. २ [*अे.व*] ओढ किंवा आकर्षण : *the ~ of the river current, नदीच्या पाण्याची ओढ.* ३ [*अगण*]

(*अनौप*) वजन, प्रभाव. ४ [*अे.व*] दीर्घ कष्ट : *a hard ~ to the top of the hill, टेकडीच्या माथ्यावर जायचा अवघड आणि जिकीरीचा प्रयत्न.*

pullet /'पुलिट्/ *ना* [*गण*] तरणी कोंबडी.

pulley /'पुलि/ *ना* [*गण*] वजन खेचण्याचे चाक आणि दोर, कप्पी.

pullover /'पुलउव्ह(र्)/ *ना* [*गण*] डोक्यातून घालायचा लोकरीचा स्वेटर.

pulp /पल्प्/ *ना* [*अगण*] १ फळाचा गर. २ कागद करण्यासाठी वापरायचा इतर गोष्टींचा – विशेषतः लाकडाचा – रांधा, गादा. **pulp** *क्रि* [*सक*] रांधा करणे, गादा करणे.

pulpit /'पुल्पिट्/ *ना* [*गण*] चर्चमधील धर्मगुरूचे उपदेश करण्याचे उंचावरचे बंदिस्त व्यासपीठ.

pulsate /पल्'सेइट्; *अमे* 'पल्सेइट्/ *क्रि* [*अक*] स्पंदन होणे, नियमित ठोके पडणे. **pulsation** /-'सेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] स्पंदन, ठोके.

pulse /पल्स्/ *ना* १ [*गण, बहुधा अे.व*] रक्ताभिसरण होत असतानाचे रक्तवाहिन्यांचे स्पंदन, नाडीचे ठोके, नाडी. २ [*अे.व*] संगीतातील ठेका, ताल. **pulse** *क्रि* [*अक*] तालबद्ध हालचाल करणे, ठेका धरणे.

pulverize /'पल्व्हराइझ्/ *क्रि* [*सक*] १ पीठ करणे, चूर्ण करणे. २ पूर्ण नाश करणे, धुळीला मिळवणे.

puma /'प्यूम/ *ना* [*गण*] मांजराच्या जातीचा तपकिरी रंगाचा एक मोठा अमेरिकन प्राणी.

pump /पम्प्/ *ना* [*गण*] द्रव, वायू, हवा वगैरे उपसण्याचे साधन. **pump** *क्रि* १ [*सक*] वायू, द्रव वगैरे विशिष्ट दिशेला ओढणे, खेळवणे : *The heart ~s blood around the body, हृदय शरीरामधे रक्त खेळवते.* २ [*अक*] पंपासारखे चालणे; स्पंदणे. ३ [*सक*] (*अनौप*) प्रश्नांचा भडीमार करून एखाद्याकडून माहिती काढून घेणे, खोदून विचारून माहिती काढणे.

pumpkin /'पम्प्किन्/ *ना* [*गण, अगण*] भाजी म्हणून वापरले जाणारे मोठे, गोल फळ, तांबडा भोपळा.

pun /पन्/ *ना* [*गण*] दोन समान उच्चारणाच्या किंवा दोन अर्थ असणाऱ्या शब्दांचा विनोदी वापर, कोटी, श्लेष – उदा 'The soldier laid down his *arms*' म्हणजे सैनिकाने शस्त्रे/हात खाली ठेवली/ठेवले यात arms चे दोन अर्थ. **pun** *क्रि* (**-nn-**) [*अक*] कोटी करणे, श्लेष करणे.

punch^{1} /पन्च्/ *क्रि* [*सक*] बुक्का मारणे, हाताने ठोसा देणे. **punch** *ना* १ [*गण*] मारलेला ठोसा, बुक्का, गुद्दा. २ [*अगण*] (*अनौप ला*) ताकद, जोश. **'punch-up** *ना* [*गण*] बुक्काबुक्की, ठोसाठोसी, गुद्दागुद्दी.

punch^{2} /पन्च्/ *ना* [*गण*] भोक पाडायचे यंत्र, छिद्रणी, पोगर. **punch** *क्रि* [*सक*] छिद्रणीने भोक पाडणे.

punch^{3} /पन्च्/ *ना* [*अगण*] मद्यामधे लिंबू, साखर, मसाला वगैरे टाकून केलेले एक पेय.

punctual /'पङ्क्चुअल्/ *वि* अगदी बरोबर वेळेवर घडणारा किंवा केला जाणारा, वक्तशीर. **punctuality** /,पङ्क्चु'अॅलटि/ *ना* [*अगण*] वक्तशीरपणा. **punctually** *क्रिवि* वक्तशीरपणे, वेळेवर.

punctuate /'पङ्क्चुअइट्/ *क्रि* १ [*अक, सक*] पूर्णविराम, स्वल्पविराम यासारखी विरामचिन्हे लेखनात देणे/वापरणे. २ [*सक*] (*with/by*)// (बहुधा कर्मणी) मधूनमधून थांबवणे, मधेमधे तोडणे. **punctuation** /,पङ्क्चु'अेइश्न्/ *ना* [*अगण*] विरामचिन्हे वापरणे.

puncture /'पङ्क्च(र्)/ *ना* [*गण*] अणकुचिदार वस्तूने टायरला पडलेले छोटे भोक. **puncture** *क्रि* [*अक, सक*] टायरला बारीक भोक पडणे/पाडणे.

pungent /'पन्जन्ट्/ *वि* तिखट, झणझणीत, उग्र अशा चवीचा किंवा वासाचा.

punish /'पनिश्/ *क्रि* [*सक*] १ चूक केल्याबद्दल शिक्षा करणे. २ (*अनौप*) वाईट वागवणे, छळणे. **punishing** *वि* दमवणारा, क्षीण करणारा, अद्दल घडवणारा. **punishment** *ना* १ [*अगण*] शिक्षा, पारिपत्य. २ शिक्षेची पद्धती.

punitive /'प्यूनिटिव्ह्/ *वि* (*औप*) शिक्षा म्हणून केलेला, कडक किंवा कठोर.

punk /पङ्क्/ *ना* १ [*अगण*] (तसेच **punk 'rock**) पारंपारिक वृत्तीचा धिक्कार करणारे

१९७० च्या दशकाच्या उत्तरार्धाच्या सुमारासचे मोठ्या आवाजातले आक्रमक रॉक संगीत. २ [*गण*] (तसेच **punk 'rocker**) पंक रॉक संगीत आवडणारा, विचित्र कपडे आणि धातूच्या माळा घालणारा, भडकपणे केस रंगवणारा तरुण.

punnet /'पँनिट्/ *ना* [*गण*] फळे ठेवायची चौकोनी आकाराची छोटी टोपली.

punt /पँन्ट्/ *ना* [*गण*] लांब काठीने वल्हवायची, लंबुळकी उथळ चपट्या तळाची नौका. **punt** *क्रि* [*अक*] अशा नौकेतून जाणे.

punter /'पँन्ट(र्)/ *ना* [*गण*] (*ब्रि अनौप*) १ घोड्याच्या शर्यतीवर पैसे लावणारा माणूस. २ गिऱ्हाईक.

puny /'प्यूनि/ *वि* (**-ier, -iest**) लहानखुरा आणि दुबळा, क्षुद्र, किरकोळ.

pup /पँप्/ *ना* [*गण*] १ = PUPPY. २ प्राण्याचे पिल्लू, पोर.

pupil¹ /'प्यूप्ल्/ *ना* [*गण*] विद्यार्थी, शिष्य, छात्र.

pupil² /'प्यूप्ल्/ *ना* [*गण*] डोळ्याच्या मध्यभागी असणारे प्रकाश जाऊ देणारे गोलाकार भोक, डोळ्यातली बाहुली, तारिका.

puppet /'पँपिट्/ *ना* [*गण*] १ बोटे हालवून किंवा दोऱ्या ओढून हालचाल करवता येणारी बाहुली, कळसूत्री बाहुली, कठपुतळी. २ दुसऱ्याच्या हातातले बाहुले बनलेला माणूस किंवा गट.

puppy /'पँपि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) कुत्र्याचे पिल्लू.

purchase /'पऽचस्/ *क्रि* [*सक*] (*औप*) विकत घेणे, खरेदी करणे. **purchase** *ना* (*औप*) १ [*अगण*] खरेदी, क्रय. २ [*गण*] विकत घेतलेली वस्तू. **purchaser** *ना* [*गण*] खरेदी करणारा, खरीददार, क्रेता.

pure /प्युअ(र्)/ *वि* (**~r, ~st**) १ भेसळ नसलेला, शुद्ध. २ अपायकारक पदार्थ न मिसळलेला; स्वच्छ. ३ निष्पाप, शुचिर्भूत. ४ (ध्वनींबाबत) स्पष्ट, नितळ. ५ पूर्ण, निव्वळ : *They met by ~ chance, ते निव्वळ योगायोगाने भेटले.* ६ प्रत्यक्ष वापराचा विचार न करता केवळ सैद्धान्तिक असा, केवळ : *~ science, केवळ विज्ञान.* **purely** *क्रिवि* पूर्णपणे, पूर्णतः; फक्त, केवळ.

purée /'प्युअरेइ; *अमे* प्युअ'रेइ/ *ना* [*अगण, गण*] भाज्या, फळे यांचा घट्ट रस.

purgatory /'पऽगट्रि; *अमे* -टॉऽरि/ *ना* [*अगण*] १ (रोमन कॅथलिक शिकवणीमधे) मृत्यूनंतर यातना भोगून आत्मा शुद्ध करण्याची जागा, नरक, प्रायश्चित्तस्थान. २ (*ला*) नरकयातना.

purge /पऽज्/ *क्रि* [*सक*] १ (*of/from*)// राजकीय पक्षाचे वगैरे शुद्धीकरण करणे : *~ a party of extremists, कडव्या लोकांना काढून पक्ष शुद्ध करणे ○ ~ extremists from the party, कडव्या लोकांपासून पक्षाची साफसफाई करणे.* २ (*of/from*)// एखाद्याला शुद्ध करणे. **purge** *ना* [*गण*] (पक्षाचे) शुद्धीकरण.

purify /'प्युअरिफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] शुद्ध करणे. **purification** /ˌप्युअरिफि'केइश्न्/ *ना* [*अगण*] शुद्धीकरण.

purist /'प्युअरिस्ट्/ *ना* [*गण*] निर्दोषपणावर भर देणारा माणूस, शुद्धिवादी.

puritan /'पुअरिटन्/ *वि, ना* [*गण*] १ (बहुधा *अधिक्षेपी*) नीतिनियमांबाबत फार आग्रही (अशी व्यक्ती), सोवळा. २ **Puritan** चर्चमधील विधी अगदी साधे असावेत असा आग्रह धरणाऱ्या पूर्वीच्या एका प्रॉटेस्टंट पंथाचा अनुयायी किंवा अशा अनुयायाचा. **puritanical** /ˌप्युअरि'टॅनिक्ल्/ *वि* (बहुधा *अधिक्षेपी*) सोवळा.

purity /'प्युअरटि / *ना* [*अगण*] शुद्धता, शुचिर्भूतपणा.

purl /पऽल्/ *ना* [*अगण*] टाक्याच्या मागे विणून घातलेला टाका, उलटा टाका. **purl** *क्रि* [*अक, सक*] असे टाके घालून विणणे.

purple /'पऽप्ल्/ *वि* लाल आणि निळा मिसळल्यावर मिळणारा रंग, जांभळा.

purpose /'पऽपस्/ *ना* १ [*गण*] एखाद्या कृतीचा, गोष्टीचा हेतू, प्रयोजन. २ [*अगण*] (*औप*) योजना आखून ती राबवण्याची क्षमता, संकल्प. ३ (*वाक्प्र*) **on purpose** हेतुतः, मुद्दाम. **purposeful** *वि* संकल्पयुक्त, सहेतुक.

purr /पऽ(र्)/ [*अक*] (मांजराबाबत) आनंदाने गुरगुरणे, म्याव म्याव करणे. **purr** *ना* [*गण*]

गुरगुर, म्यावम्याव.

purse^{1} /पऽस्/ *ना* [*गण*] १ पैशाचे पाकीट, छोटी थैली. २ बक्षीस म्हणून दिलेली पैशाची रक्कम. ३ (*अमे*) हातातील लहान पिशवी, छोटी पिशवी.

purse^{2} /पऽस्/ *क्रि* [*सक*] ओठांचा चंबू करणे.

purser /'पऽस(र्)/ *ना* [*गण*] जहाजावरचे हिशेब, पुरवठा वगैरेची जबाबदारी घेणारा अधिकारी, पोतनीस.

pursue /प'स्यू; *अमे* -'सू/ *क्रि* [*सक*] (*औप*) १ एखाद्याचा पाठलाग करणे, पिच्छा करणे. २ धीमेपणाने करत राहणे, सुरू ठेवणे, पाठपुरावा करणे : ~ *one's studies, अभ्यास चालू ठेवणे.* **pursuer** *ना* [*गण*] पाठलाग करणारा माणूस.

pursuit /प'स्यूट्; *अमे* -'सूट्/ *ना* (*औप*) १ [*अगण*] पाठलाग. २ [*गण, बहुधा ब.व*] व्यवसाय, धंदा; छंद.

purvey /प'व्हेइ/ *क्रि* [*सक*] (*औप*) (दाणागोटा) पुरवणे, पुरवठा करणे. **purveyor** *ना* [*गण*] पुरवठा करणारा, (माल) पुरवणारा माणूस.

pus /पस्/ *ना* [*अगण*] रोगजंतूंनी दूषित जखमेत तयार झालेले दाट पिवळसर द्रव, जखमेतील पू.

push^{1} /पुश्/ *क्रि* १ [*अक, सक*] पुढे, बाजूला किंवा दुसरीकडे सरकवायला ढकलणे : ~ *a bike up the hill, टेकडीवर सायकल ढकलत नेणे* ○ ~ *the plug in, गुडदी आत ढकलणे/खोचणे.* २ [*सक*] (*अनौप*) एखाद्याला एखादी गोष्ट बळे करायला लावणे, त्यात त्याला ढकलणे. ३ [*अक, सक*] (*for*)// बळजबरीने घेण्याचा प्रयत्न करणे : ~ *sb for payment, एखाद्याकडून दाम बळकावण्याचा खटाटोप करणे.* ४ [*सक*] (*अनौप*) (बेकायदेशीर मादक पदार्थ) विकणे. ५ (*वाक्प्र*) **be pushed for sth** (*अनौप*) एखादी गोष्ट पुरेशी नसणे : *be ~ed for time, वेळ पुरेसा नसणे.* ६ (*क्रिब*) **push sb around** (*अनौप*) एखाद्यावर हुकूम गाजवून काम करून घेणे, दादागिरी करणे. **push off** (*अनौप*) दूर जाणे. **'push-bike** *ना* [*गण*] (*अनौप*) पॅडल किंवा पायटा मारून चालवायची सायकल. **'push-button** *वि* बटण दाबून चालणारे (यंत्र वगैरे). **'push-chair** *ना* [*गण*] लहान मुलाची चाकाची खुर्ची. **pusher** *ना* [*गण*] (*अनौप*) बेकायदेशीर मादक पदार्थांचा विक्रेता.

push^{2} /पुश्/ *ना* [*गण, बहुधा अे.व*] १ ढकलण्याची कृती, लोट. २ मोठा यत्न किंवा मोठा हल्ला. ३ (*वाक्प्र*) **give sb/get the push** (*अनौप*) नोकरीवरून हकालपट्टी करणे/होणे.

pussy /'पुसि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) (तसेच **pussy-cat**) (लहान मुलांच्या बोलण्यात वापर) मांजर, माऊ.

put /पुट्/ *क्रि* (*भूत, भूत वि* ~, *वर्त वि* **~ting**) [*सक*] १ ठराविक जागी किंवा स्थितीत ठेवणे : *She ~ the book on the table, तिने टेबलावर पुस्तक ठेवले* ○ (*ला*) *They ~ the blame on me, त्यांनी सर्व दोष माझ्यावर ठेवला.* २ लिहिणे, दाखवणे : *He ~ his name on the form, त्याने अर्जावर त्याचे नाव घातले.* ३ विशिष्ट स्थितीत ठेवणे/आणणे : ~ *sth right, एखादी गोष्ट योग्य जागेवर आणणे म्हणजेच ती बरोबर करणे.* ४ (क) (*to*)// देऊ करणे, मांडणे : ~ *a proposal to a client, गिऱ्हाइकापुढे प्रस्ताव मांडणे.* (ख) व्यक्त करणे : ~ *sth politely, एखादी गोष्ट सभ्य शब्दांत मांडणे/सांगणे.* ५ (*वाक्प्र*) **put one's cards on the table** ⇨ CARD. **put the clock back** ⇨ CLOCK. **put one's 'oar in** ⇨ OAR. **put sth right** ⇨ RIGHT^{1}. **put sb/sth to 'rights** ⇨ RIGHT^{3}. ६ (*क्रिब*) **put sth a'bout** (अफवा वगैरे) पसरविणे. **put sth a'cross (to sb)** नीटपणे सांगणे, योग्य शब्दांत मांडणे. **put sth a'side** (क) खाली ठेवणे : ~ *aside a book, पुस्तक खाली ठेवणे.* (ख) (विशेषतः पैसे) बाजूला टाकणे, बचत करणे, वाचवणे. (ग) लक्ष न देणे; दुर्लक्ष करणे : ~ *one's disagreements aside, स्वतःचे मतभेद बाजूला ठेवणे.* **put sth at sth** अंदाजे किंमत करणे : *I ~ the possible cost at £500, मी ५०० पौंड एवढी किंमत धरली.* **put sth a'way** एखादी गोष्ट नेहमीच्या जागी ठेवणे : ~ *the cup away in the cupboard, कप कपाटात जागेवर ठेवणे.* **put sth 'back** (क) पुन्हा जागेवर ठेवणे : ~ *the book back* *on the shelf, पुस्तक पुन्हा शेल्फवर जागेवर ठेवणे.* (ख) घड्याळाचे काटे मागे फिरवून घड्याळ बरोबर लावणे. (ग) उशीर करणे, उशिराने घेणे : *~ the meeting back by one hour, एका तासाने बैठक उशिरा घेणे.* **put sth 'by** भविष्यकाळासाठी वाचवणे. **put sb down** (क) एखाद्याला (बसमधून वगैरे) उतरू देणे. (ख) (*अनौप*) एखाद्याला वेड्यात काढणे. **put sth down** (क) मांडणे, ठेवणे, पृष्ठभागावर घालणे. (ख) (विमान) उतरविणे. (ग) बळाचा वापर करून बंद करणे, दडपणे : *~ down a rebellion, बंड मोडून काढणे.* (घ) लिहिणे. (च) (आजारी प्राणी) मारणे. **put sth down to sth** एखादी गोष्ट कशाचे तरी कारण मानणे : *I ~ his failure down to laziness, त्याच्या अपयशाला आळस कारणीभूत आहे असे मला वाटते.* **put sth forward** (क) सुचवणे; पुढे मांडणे, प्रस्ताव करणे : *~ forward a new idea, नवीन कल्पना सुचविणे.* (ख) बरोबर वेळ लावण्यासाठी घड्याळाचे काटे पुढे करणे. **put sth in** (क) करणे : *~ in an hour's work, तासाभराचे काम करणे.* (ख) उभा करणे, बसवणे : *~ a new bath in, आंघोळीचा नवीन टब बसवणे.* **put (sb/sth) in for sth** स्पर्धा जिंकण्याचा, नोकरी मिळवण्याचा वगैरे प्रयत्न करणे : *~ a painting in for the competition, स्पर्धेसाठी चित्र पाठवणे.* **put sb off** एखाद्याबरोबर ठरलेली भेट वगैरे लांबणीवर टाकणे. **put sb off (sth/sb)** (क) एखाद्याचे एखाद्या गोष्टीवरून लक्ष उडवणे, लक्ष विचलित करणे : *Don't ~ me off when I'm trying to concentrate, मी मन एकाग्र करत असताना माझे मन दुसरीकडे गुंतवू नकोस म्हणजेच मला विचलित करू नकोस.* (ख) एखाद्या गोष्टीबाबत किंवा व्यक्तीबाबत एखाद्याच्या मनात नावड किंवा बेफिकिरी निर्माण करणे. **put sth off** (क) बंद करणे : *~ the television off, टी. व्ही. बंद करणे.* (ख) पुढे ढकलणे. **put sth 'on** (क) नेसणे, (कपडे) घालणे : *~ a coat on, अंगात कोट घालणे.* (ख) (रंग, पावडर वगैरे) लावणे. (ग) चालू करणे, लावणे : *~ on the television, टी.व्ही. लावणे.* (घ) व्यवस्था किंवा तरतूद करणे; पुरवणे : *~ on extra trains, जादा आगगाड्यांची तरतूद करणे.* (च) (प्रयोग वगैरे) करणे : *~ on a play, नाटकाचा प्रयोग करणे.* (छ) वजन वाढणे : *~ on 14 pounds (in weight), चौदा पौंड वजन वाढणे.* **put sb out** (क) एखाद्याला अपमानित करणे, वाईट वाटायला लावणे. (ख) एखाद्याची गैरसोय करणे : *I hope my visit won't ~ you out, माझ्या येण्याने तुझी गैरसोय होणार नाही अशी आशा आहे.* **put sth out** (क) विझवणे, मालवणे : *~ out the lights, दिवे घालवणे.* (ख) देणे; प्रसृत करणे : *~ out a warning, (धोक्याचा) इशारा देणे, सावधानतेची सूचना प्रसृत करणे.* **put sth over** = PUT STH ACROSS. **put sb through** टेलिफोनवरून संपर्क साधणे, एखाद्याला फोन लावून देणे. **put up sth** (प्रतिकार वगैरे) करणे : *~ up a fight, कडवा प्रतिकार करणे.* **put sb up** एखाद्याची भोजन-निवासाची सोय करणे. **put sth up** (क) उंच करणे, वर करणे : *~ one's hand up, हात वर करणे.* (ख) बांधणे उभारणे : *~ a tent up, तंबू ठोकणे.* (ग. वाढवणे, वाढ करणे : *~ up the rent, भाडे वाढवणे.* (घ) (पैसे) पुरवणे. **put 'up (at . . .)** (एखाद्या ठिकाणी) जेवण्या-राहण्याची सोय होणे, राहणे : *~ up at a hotel, हॉटेलमधे राहणे.* **put sb up to sth** एखाद्याला एखादी गैर गोष्ट करण्याची गळ घालणे. **put up with sb/sth** सहन करणे, असू किंवा राहू देणे : *~ up with bad behaviour, गैरवर्तन सहन करणे.* **'put-down** *ना* अपमानास्पद शब्द, वेड्यात काढणारे बोलणे.

putrefy /'प्यूट्रिफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*अक*] कुजणे, सडणे. **putrefaction** /,प्यूट्रि'फॅक्शन्/ *ना* [*अगण*] कुजणे.

putrid /'प्यूट्रिड्/ *वि* कुजलेल्या वासाचा, कुजकट वासाचा, दुर्गंधीयुक्त.

putt /पट्/ *क्रि* [*अक, सक*] (गोल्फमधे) चेंडू हळूच टोलावणे.

putty /'पटि/ *ना* [*अगण*] खिडक्यांना काचेची तावदाने बसवताना वापरायची लांबी, लुकण.

puzzle /'पझ़्ल्/ *ना* [*गण*] १ कूटप्रश्न, कोडे. २ ज्ञान किंवा कसब जोखण्यासाठी घातलेले कोडे किंवा तसे खेळणे : *a 'crossword ~, शब्दकोडे.* **puzzle** *क्रि* १ [*सक*] एखाद्याला कोड्यात टाकणे : *I'm ~ed by his not* *replying to my letter, त्याचे माझ्या पत्राला उत्तर न देणे याने मी कोड्यात पडलो आहे.* २ [*अक*] *over*// एखादी गोष्ट समजावी म्हणून त्याचा खूप विचार करणे. ३ (*क्रिब*) **puzzle sth out** खूप विचार करून उत्तर शोधणे, कोडे सोडवणे.

PVC /,पी व्ही 'सी/ *ना* [*अगण*] एक प्रकारचे प्लॅस्टिक.

pygmy (तसेच **pigmy** /'पिग्मि/) *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) १ **Pigmy** आफ्रिकन वंशाच्या बुटक्या लोकांच्या एका जमातीतला माणूस. २ ठेंगू माणूस किंवा प्राणी, बुटबेंगण.

pyjamas /प'जामझ्; *अमे* -जॅम्-/ *ना* [*ब.व*] झोपताना वापरायचा पघळ लेंगा आणि कुर्ता.

pylon /'पाइलन्; *अमे* -लॉन्/ *ना* [*गण*] विजेच्या तारांचा उंच मोठा खांब.

pyramid /'पिरमिड्/ *ना* [*गण*] १ खाली रुंद असून वर अरुंद होत गेलेला खास करून इजिप्तमधील शंकूच्या आकाराचा मनोरा, सूची. २ शंकूच्या आकाराचा वस्तूंचा ढीग.

pyre /'पाइ·अ(र्)/ *ना* [*गण*] प्रेत जाळण्यासाठी रचलेला लाकडांचा ढीग, चिता, सरण.

python /'पाइथ्न्; *अमे* -थॉन्/ *ना* [*गण*] प्राण्यांना विळखा घालून ठार मारणारा एक मोठा साप.

Q q

Q, q /क्यू/ *ना* [*गण*] (*ब.व* **Q's, q's** /क्यूझ्/) इंग्रजी वर्णमालेतील सतरावे अक्षर.

quack^1 /क्वॅक्/ *क्रि* [*अक*] *ना* [*गण*] बदकाचा आवाज (करणे), कॉ कॉ किंवा क्वॅक् क्वॅक् करणे, कलकल करणे.

quack^2 /क्वॅक्/ *ना* [*गण*] (*अनौप*) तोतया किंवा भोंदू डॉक्टर, वैदू.

quad /क्वॉड्/ *ना* [*गण*] (*अनौप*) १ QUADRANGLE चा संक्षेप. २ QUADRUPLET चा संक्षेप.

quadrangle /'क्वॉड्रॅङ्ग्ल्/ *ना* [*गण*] १ चार बाजूंची सपाट आकृती, चौरस, चौकोन, चतुष्कोण. २ चारही बाजूंनी इमारती असलेली मधली चौकोनी मोकळी जागा, चौक.

quadruped /'क्वॉड्रुपेड्/ *ना* [*गण*] चतुष्पाद, चार पायांचा प्राणी.

quadruple /'क्वॉड्रुप्ल्; *अमे* क्वॉ'ड्रुप्ल्/ *वि* चार भागांचा, चौरंगी. **quadruple** *ना* [*गण*] चौपट. **quadruple** *क्रि* [*अक, सक*] चौपट करणे, चारने गुणणे.

quadruplet /'क्वॉड्रूप्लेट्; *अमे* क्वॉ'ड्रूप्-/ *ना* [*गण*] एकाच वेळी झालेल्या चार मुलांतील एक.

quagmire /'क्वॅग्माइअ(र्); तसेच 'क्वॉग्-/ *ना* [*अगण*] दलदल, ओली भुसभुशीत जमीन.

quail^1 /क्वेइल्/ *ना* [*गण*] छोटा शिकारीचा पक्षी, लावा पक्षी, लाहूर.

quail^2 /क्वेइल्/ *क्रि* [*अक*] (*औप*) भेदरणे, भीतीने कापणे.

quaint /क्वेइन्ट्/ *वि* जुन्या पद्धतीचा, विचित्र म्हणून मौजेचा, विक्षिप्त. **quaintly** *क्रिवि* विचित्रपणे.

quake /क्वेइक्/ *क्रि* [*अक*] हालणे, हादरणे; कंप पावणे.

qualification /,क्वॉलिफि'केइशन्/ *ना* १ [*गण*] पात्रता प्राप्त करून देणारी परीक्षा, प्रशिक्षण, पदविका वगैरे, अर्हता, पात्रता. २ [*अगण, गण*] एखाद्या गोष्टीला मर्यादा घालणारे किंवा तीत सुधारणा करणारे विधान, शर्त, अट : *accept an offer with ~s, काही अटींवर प्रस्ताव स्वीकारणे.* ३ [*अगण*] अर्हताप्राप्ती.

qualify /'क्वॉलिफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) १ [*अक, सक*] एखाद्या गोष्टीला आवश्यक असणारे गुण, प्रशिक्षण वगैरे असणे किंवा देणे, अर्हता प्राप्त करणे, पात्रता येणे : *She'll ~ as a doctor next year, पुढच्या वर्षी तिला डॉक्टरकीची अर्हता प्राप्त होईल म्हणजेच पुढच्या वर्षी ती डॉक्टर होईल.* २ [*सक*] स्वतःच्या विधानास मुरड घालणे, विधान मर्यादित करणे. **qualified** *वि* १ पात्रता किंवा अर्हता असलेला, पात्र. २ मर्यादित : *qualified approval, मर्यादित संमती.*

qualitative /'क्वॉलिटटिव्ह्; *अमे* -टेइट्-/ *वि* गुणवत्तेचा किंवा गुणवत्तेशी संबंधित असलेला, गुणात्मक.

quality /'क्वॉलेटि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण, गण*] उच्च प्रत. २ [*गण*] स्वभावगुण : *Kindness is not one of her qualities, दयाळूपणा तिचा अंगभूत गुण नाही.*

qualm /क्वाम्/ *ना* [*गण*] आपण जे करतोय ते बरोबर आहे की नाही याची येणारी शंका, खाणारे मन, टोचणी.

quandary /'क्वॉन्डरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) काय करावे याची पडलेली विवंचना, पंचाईत.

quantitative /'क्वॉन्टिटटिव्ह्; *अमे* -टेइट्-/ *वि* संख्येचा किंवा संख्येशी संबंधित असा, परिमाणात्मक, संख्यात्मक.

quantity /'क्वॉन्टटि/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) (विशेषतः मोठी) संख्या किंवा (मोठे) परिमाण.

quarantine /'क्वॉरन्टीन्; *अमे* 'क्वॉऽर्-/ *ना* [*अगण*] इतरांना लागण होऊ नये म्हणून रोगी मनुष्य किंवा प्राण्याला वेगळे ठेवण्याचा काळ, बहिष्करण, दूरस्थापन. **quarantine** *क्रि* [*सक*] दूरस्थापन करणे, संसर्गरोधशाळेत ठेवणे, रोग्याला बाजूला ठेवणे.

quarrel /'क्वॉरल्; *अमे* 'क्वॉऽरल्/ *ना* [*गण*] १ भांडण, तंटा, वाद. २ मतभेद (किंवा त्याचे कारण), भांडणाचा मुद्दा. **quarrel** *क्रि* (**-ll-**; *अमे* **-l-**) [*अक*] १ भांडण करणे, भांडणे, वाद घालणे, तंडणे. २ *with//* मतभेद होणे. **quarrelsome** /-सम्/ *वि* भांडखोर.

quarry^{1} /'क्वॉरि; *अमे* 'क्वॉऽरि/ *ना* [*गण*] दगडाची खाण. **quarry** *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] खाणीतून दगड वगैरे काढणे.

quarry^{2} /'क्वॉरि; *अमे* क्वॉऽरि/ *ना* [*गण*, बहुधा *ए.व*] (*ब.व* **-ies**) केलेली शिकार.

quart /क्वॉऽट्/ *ना* [*गण*] द्रवाचे एक परिमाण; दोन पाइन्ट्स् किंवा १.१४ लिटर्स.

quarter /'क्वॉऽट(र्)/ *ना* १ [*गण*] एखाद्या गोष्टीचा चौथा हिस्सा, $\frac{१}{४}$. २ [*गण*] १५ मिनिटे : *a ~ to four,* (*अमे*) *a ~ of four, चारला १५ मिनिटे कमी, पावणे चार* ○ *a ~ past six,* (*अमे*) *a ~ after six, सहा वाजून १५ मिनिटे, सव्वासहा.* ३ [*गण*] तीन महिने, पाव वर्ष. ४ [*गण*] शहराचा भाग : *the business ~, व्यापाराचा भाग* किंवा *व्यापारी पेठ.* ५ [*गण*] माहिती किंवा मदत पुरविणारे केंद्र (व्यक्तीचे किंवा गटाचे), गोट. ६ **quarters** [*ब.व*] निवासस्थान – विशेषतः सैनिकांसाठी : *married ~s, विवाहितांसाठीचे निवासस्थान.* **quarter** *क्रि* [*सक*] १ चार भाग करणे. २ (एखाद्याला) राहण्याची जागा देणे. **,quarter 'final** *ना* [*गण*] उपान्त्य सामन्यापूर्वीच्या चार सामन्यांपैकीचा एक सामना. **'quartermaster** *ना* [*गण*] भांडार आणि निवासस्थान यांचा कार्यभार सांभाळणारा सैनिकी अधिकारी, सामग्री प्रबंधक.

quarterly /'क्वाऽटलि/ *वि, क्रिवि* दर तीन महिन्यांनी (येणारा किंवा तयार केला जाणारा), तिमाही, त्रैमासिक. **quarterly** *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) तीन महिन्यांनी निघणारा अंक, त्रैमासिक.

quartet /क्वॉऽ'टेट्/ *ना* [*गण*] चार गायक किंवा वादक (यांच्यासाठीचे संगीत).

quartz /क्वॉऽट्स्/ *ना* [*अगण*] अगदी बिनचूक घड्याळे करण्यासाठी वगैरे वापरायचा कठीण स्फटिक, काचमणी, गारगोटी.

quash /क्वॉश्/ *क्रि* [*सक*] दाबून टाकणे, चेपून टाकणे; रद्दबातल करणे, फेटाळून लावणे : *~ a revolt/an appeal, बंड मोडून काढणे/याचिका फेटाळणे.*

quaver /'क्वेइव्ह(र्)/ *क्रि* १ [*अक*] (आवाज किंवा ध्वनीबाबत) कापणे, कंप पावणे, थरथरणे. २ [*सक*] कापऱ्या आवाजात बोलणे किंवा गाणे. **quaver** *ना* [*गण*, बहुधा *ए.व*] कापणारा आवाज.

quay /की/ *ना* [*गण*] गलबतांवर सामानाची चढ-उतार करण्याची जागा, धक्का.

queasy /'क्वीझि/ *वि* (**-ier, -iest**) आजारपण किंवा ओकारी येणार असल्याची भावना असणारा, बरे न वाटणारा.

queen /क्वीन्/ *ना* [*गण*] १ राज्य करणारी राणी, राज्ञी. २ राजाची बायको. ३ सर्वश्रेष्ठ स्त्री, राणीसाहेब. ४ (बुद्धिबळात) सर्वात बलाढ्य सोंगटी, वजीर. ५ पत्त्यातील राणी. ६ मधमाश्या, मुंग्या यातील अंडी घालणारी मादी, राणीमाशी, राणीमुंगी. **queen 'mother** *ना* [*गण*] राजाची किंवा राज्य करणाऱ्या राणीची आई, राजमाता.

queer /क्विअ(र्)/ *वि* १ विचित्र; असाधारण. २ (*व्रात्य अधिक्षेपी*) समलिंगी संभोगाचे आकर्षण असणारा, समकाम. ३ (*जुना, अप्रचलित अनौप*) आजारी. **queer** *ना* [*गण*] (*व्रात्य अधिक्षेपी*) समलिंगी संभोगाची आवड असणारा माणूस.

quell /क्वेल्/ *क्रि* [*सक*] मोडून काढणे, चिरडणे; पराभव करणे.

quench /क्वेन्च्/ *क्रि* [*सक*] १ पाणी पिऊन (तहान) भागवणे, तृष्णा शमवणे. २ (आग) विझवणे.

query /'क्विअरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) प्रश्न, शंका. **query** *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] १ शंका विचारणे, शंका व्यक्त करणे. २ विचारणे, चौकशी करणे.

quest /क्वेस्ट्/ *ना* [*गण*] दीर्घ शोध.

question^{1} /'क्वेस्चन्/ *ना* १ [*गण*] प्रश्न. २ [*गण*] चर्चा करण्यासारखी गोष्ट, समस्या. ३ [*अगण*] शंका, संशय: *His honesty is beyond ~, त्याचा प्रामाणिकपणा संशयातीत आहे.* ४ (*वाक्प्र*) **in 'question** वादग्रस्त, बोलले जात असलेला. **out of the 'question** अशक्य. **'question mark** *ना* [*गण*] प्रश्नार्थक चिन्ह (?).

question^{2} /'क्वेस्चन्/ *क्रि* [*सक*] १ प्रश्न विचारणे/करणे. २ शंका घेणे. **questionable** *वि* संशयास्पद.

questionnaire /,क्वेस्च'नेअ(र्)/ *ना* [*गण*] माहिती मिळवण्यासाठी विचारायच्या प्रश्नांची यादी, प्रश्नावली.

queue /क्यू/ *ना* [*गण*] कशाची तरी वाट पाहत असलेल्या माणसांची, वाहनांची वगैरे रांग. **queue** *क्रि* [*अक*] रांगेत प्रतिक्षा करणे.

quibble /'क्विब्ल्/ *क्रि* [*अक*] बारीकसारीक गोष्टींबाबत वाद घालणे, हुज्जत घालणे, कीस काढणे. **quibble** *ना* [*गण*] क्षुल्लक गोष्टीबाबतची वादावादी, शब्दच्छल.

quiche /कीश्/ *ना* [*गण*] अंडी, चीज वगैरेचे रुचकर सारण असलेली पेस्ट्री.

quick /क्विक्/ *वि* १ जलद, द्रुतगती; भरभर किंवा पटकन् करायचा. २ चटकन् उद्दीपित होणारा, लगेच चिडणारा: *a ~ temper, शीघ्रकोपी.* ३ उत्साही आणि बुद्धिमान, तल्लख: *He's ~ at (learning) languages, तो भाषा शिकण्यात फार तल्लख आहे.* ४ (*वाक्प्र*) **be quick off the mark** ➪ MARK^{1}. **quick on the uptake** ➪ UPTAKE. **quick** *क्रिवि* चटकन्, भराभर, वेगाने. **quick** *ना* [*अे.व*] हाताच्या बोटांच्या नखाखालचा मऊ मांसल भाग, जिव्हाळी. **quickly** *क्रिवि* भराभर, पटापट, वेगाने. **quickness** *ना* [*अगण*] जलदपणा, वेगवानपणा, चपलता; तल्लखपणा. **,quick-'witted** *वि* तल्लख बुद्धीचा; हुशार.

quicken /'क्विकन्/ *क्रि* [*अक, सक*] जलद होणे/करणे, गती वाढणे/वाढवणे.

quicksand /'क्विक्सॅन्ड्/ *ना* [*अगण, गण*] माणूस रुतून बसेल अशी ओली भुसभुशीत वाळू, रेवण, रुतण, होर.

quid /क्विड्/ *ना* [*गण*] (*ब.व* **quid**) (*ब्रि अनौप*) पैशाचा पौंड.

quiet /'क्वाइअट्/ *वि* १ गडबड नसलेला, शांत, निरव. २ अडचणीविरहित, धकाधकी नसलेला: *a ~ life, शांत जीवन.* ३ हळुवार, चांगल्या वागणुकीचा. ४ (रंगांबाबत) सौम्य, भडक नसलेला. **quiet** *ना* १ [*अगण*] शांतता. २ (*वाक्प्र*) **on the quiet** हळूच, चोरून. **quieten** /-टन्/ *क्रि* [*अक, सक*] शांत होणे/करणे. **quietly** *क्रिवि* शांतपणे; हळूच. **quietness** *ना* [*अगण*] शांतपणा.

quill /क्विल्/ *ना* [*गण*] १ (क) मोठे पीस. (ख) लेखन करण्याचे पीस. २ साळीचा अणकुचिदार काटा, साळशिंदर.

quilt /क्विल्ट्/ *ना* [*गण*] मऊ पिसे, कापूस वगैरेनी भरलेली दुलई, रजई. **quilted** *वि* दोन पदरात मऊ कापूस वगैरे घातलेला.

quin /क्विन्/ (*अमे* **quint** /क्विन्ट्/) *ना* [*गण*] (*अनौप*) QUINTUPLET चा संक्षेप.

quinine /क्वि'नीन्; *अमे* 'क्वाइनाइन्/ *ना* [*अगण*] मलेरियासारख्या रोगावरचे कडू पातळ औषध.

quintet /क्विन्'टेट्/ *ना* [*गण*] पाच गायक किंवा वादक (यांचे संगीत).

quintuplet /'क्विन्ट्यूप्लेट्; *अमे* क्विन्'टूप्लिट्/ *ना* [*गण*] एकाचवेळी जन्मलेल्या पाच मुलांतील एक मूल.

quip /क्विप्/ *ना* [*गण*] टोमणा. **quip** *क्रि*

(-pp-) [*अक*] टोमणा मारणे.

quirk /क्वऽक्/ *ना* [*गण*] १ व्यक्तीची विक्षिप्त सवय किंवा विक्षिप्त कृती, चमत्कारिकपणा. २ विचित्र घटना; योगायोग.

quit /क्विट्/ *क्रि* (**-tt-**, *भूत, भूत वि* **quit** किंवा ब्रिटिश इंग्रजीत **~ted**) १ [*सक*] (*अनौप*) (एखादी गोष्ट करायचे) थांबणे, त्याग करणे, सोडून देणे. २ [*अक, सक*] (नोकरी, जागा) सोडणे.

quite /क्वाइट्/ *क्रिवि* १ काहीसा; बराच, अगदी : *~ hot, खूपच गरम.* २ पूर्णतया, पूर्णपणे : *She played ~ brilliantly! ती पूर्णपणे तडफेने खेळली!* ३ (एकमत दाखवण्यासाठी वापर) : *Q~ (so), अगदी बरोबर.* ४ (*वाक्प्र*) **quite a/an** अनोखा, वेगळाच : *There's ~ a story about how they met, ते कसे भेटले ही एक अद्भुत कथाच आहे.*

quiver¹ /'क्विव्ह(र्)/ *क्रि* [*अक, सक*] थरथरणे, थरथरायला लावणे, कंप पावणे. **quiver** *ना* [*गण*] कंप, थरथराट.

quiver² /'क्विव्ह(र्)/ *ना* [*गण*] बाण ठेवायचा भाता.

quiz /क्विझ्/ *ना* [*गण*] (*ब.व* ~zes) प्रश्न विचारून बुद्धी अजमावण्याचा खेळ, प्रश्नमंजुषा. **quiz** *क्रि* (**-zz-**) [*सक*] प्रश्न विचारणे.

quizzical /'क्विझिकल्/ *वि* प्रश्नार्थक दृष्टीने – विशेषतः गमतीदारपणे. **quizzically** /-कलि/ *क्रिवि* प्रश्नार्थक रीतीने.

quoit /कॉइट; *अमे* क्वॉइट/ *ना* १ [*गण*] छोट्या खांबावर फेकून अडकवायची खेळातली रबरी रिंग. २ **quoits** (अ.व क्रियापदासह) रिंगचा असा खेळ.

quota /'क्वउट/ *ना* [*गण*] अधिकृतपणे सीमित केलेली संख्या किंवा परिमाण, वाटा, हिस्सा.

quotation /क्वउ'टेइशन्/ *ना* १ [*गण*] उद्धृत केलेले शब्द, अवतरण. २ [*अगण*] उद्धृत करणे. ३ [*गण*] करायच्या कामाचा भाव किंवा किंमत, दरपत्रक. **quo'tation-marks** *ना* [*ब.व*] अवतरण चिन्हे (' ' किंवा " ").

quote /क्वउट्/ *क्रि* १ [*अक, सक*] (दुसऱ्याचे) बोल/शब्द उद्धृत करणे. २ [*सक*] पुरावा म्हणून देणे, पुष्ट्यर्थ उद्धृत करणे. ३ [*सक*] भाव सांगणे. **quote** *ना* (*अनौप*) १ [*गण*] QUOTATION १ (अवतरण) चा संक्षेप; QUOTATION ३ (दरपत्रक) चा संक्षेप. २ **quotes** [*ब.व*] QUOTATION MARKS (अवतरणचिन्हे) (QUOTATION) चा संक्षेप.

quotient /'क्वउश्न्ट्/ *ना* [*गण*] (*गणित*) एका संख्येला दुसऱ्या संख्येने भागून आलेला भागाकार.

R r

R, r /आ(र्)/ *ना* [*गण*] (*ब.व* **R's, r's** /आझ्/) इंग्रजी वर्णमालेतील अठरावे अक्षर.

rabbi /'रॅबाइ/ *ना* [*गण*] यहुदी धर्मगुरू, यहुदी धर्मशास्त्र शिकविणारा गुरू.

rabbit /'रॅबिट्/ *ना* [*गण*] बिळात राहणारा लांब कानांचा छोटा प्राणी, ससा. **rabbit** *क्रि* [*अक*] *on*// (*अनौप*) निष्फळ बडबड करणे, वटवट करणे.

rabble /'रॅब्ल्/ *ना* [*गण*] गलका, आरडाओरडा करणारा जमाव. **'rabble-rousing** *वि* जमावाला भडकवणारा.

rabid /'रॅबिड्/ *वि* १ रॅबिज रोग झालेला, पिसाळलेला. २ (*ला*) (भावना, मते यांबाबत) हिंसक, टोकाचा : *a ~ Conservative, कट्टर पुराणमतवादी (पक्षाचा).*

rabies /'रेइबीझ्/ *ना* [*अगण*] प्राण्यांना, विशेषतः कुत्र्यांना आणि माणसांना पिसाळायला लावणारा प्राणघातक रोग, आलर्क, जलभी.

race¹ /रेइस्/ *ना* [*गण*] १ स्पर्धा, शर्यत – उदा धावण्याची. २ शत्रुत्वाची चढाओढ, स्पर्धा : *the arms ~, शस्त्रस्पर्धा.* **race** *क्रि* [*अक, सक*] १ (*against*)// एखाद्याविरुद्ध स्पर्धेत उतरणे. २ वेगाने जाणे किंवा जायला लावणे. ३ (घोड्याला वगैरे) शर्यतीसाठी तयार करणे. **'race-course** *ना* [*गण*] घोड्याच्या शर्यतीचे मैदान. **'racehorse** *ना* [*गण*] शर्यतीत लावायचा घोडा. **'race-track** *ना* [*गण*] १ शर्यतीची धावपट्टी. २ (*अमे*) शर्यतीचे मैदान.

race^{2} /रेइस्/ *ना* १ [*गण, अगण*] वर्ण वगैरे विशेषांनी माणसांचा ओळखला जाणारा वर्ग, वंश. २ [*गण*] प्राण्यांचा किंवा वनस्पतींचा वर्ग, वंश, प्रजाती : *the human ~, मानवी वंश* म्हणजे *माणसे.* ३ [*गण*] समान इतिहास, भाषा वगैरे असणाऱ्या लोकांचा वर्ग. **'race relations** *ना* [*ब.व*] एखाद्या समाजातील विविध वंशाच्या लोकांचे परस्परांशी असलेले संबंध, वांशिक संबंध.

racial /'रेइश्ल्/ *वि* वंशाचा, वांशिक. **racialism** (तसेच **racism** /'रेइसिझम्/) *ना* [*अगण*] स्वतःचा वंश सर्वश्रेष्ठ असल्याचे मत, वंशश्रेष्ठत्व; इतर वंशांना देण्यात येणारी अनुचित/वाईट वागणूक, वंशद्वेष. **racialist** (तसेच **racist** /'रेइसिस्ट्/) *वि, ना* [*गण*] वंशवादी. **racially** *क्रिवि* वंशदृष्ट्या.

rack^{1} /रॅक्/ *ना* [*गण*] १ कपडे टांगायची खुंट्या किंवा दांड्या असणारी मांडणी किंवा घोडी. २ विमान किंवा आगगाडीत बैठकीच्या वरच्या बाजूस असलेली हलके सामान ठेवायची जागा, फळी.

rack^{2} /रॅक्/ *क्रि* १ [*सक*] यातना देणे, दुखवणे. २ (*वाक्प्र*) **rack one's 'brains** एखाद्या गोष्टीचा विचार करण्याचा खूप प्रयत्न करणे.

rack^{3} /रॅक्/ *ना* (*वाक्प्र*) **go to ˌrack and 'ruin** दुर्लक्ष केल्यामुळे भुगा होणे, कोसळणे, धूळदाण होणे.

racket^{1} (तसेच **racquet**) /'रॅकिट्/ *ना* [*गण*] १ गोल किंवा लंबगोल आकाराची, चेंडू मारायची जाळीची बॅट, टेनिसची बॅट. २ **rackets** (तसेच **racquets**) (अे.व क्रियापदासह) चार भिंतींच्या आवारात खेळायचा दोघांचा किंवा चौघांचा एक चेंडूचा खेळ.

racket^{2} /'रॅकिट्/ *ना* (*अनौप*) १ [*अे.व*] मोठा आवाज, गलका. २ [*गण*] पैसा मिळवण्याचा गैरमार्ग, लबाडी, लुच्चेगिरी. **racketeer** /ˌरॅक'टिअ(र्)/ *ना* [*गण*] लबाडीने पैसा मिळवणाऱ्या टोळीतील व्यक्ती, लुच्चा.

racy /'रेइसि/ *वि* **(-ier, -iest)** रसरशीत, करमणूक करणारा आणि कदाचित शृंगारिक. **racily** *क्रिवि* रसरशीतपणे, ढंगदारपणे. **raciness** *ना* [*अगण*] जिवंतपणा, जोम.

radar /'रेइडा(र्)/ *ना* [*अगण*] रेडिओ-लहरींच्या आधारे (दूरच्या किंवा आकाशातल्या) वस्तूंचे पटलावर स्थान दाखविणारी यंत्रणा, संवह यंत्रणा, संयंत्र.

radiant /'रेडिअन्ट्/ *वि* १ उष्णताकिरण-विसर्जक, विकिरक, दैदिप्यमान, प्रकाशमान. २ (माणसाबाबत) आनंदित, प्रफुल्ल; तेजस्वी, पाणीदार : *~ beauty, दिपवून टाकणारे सौंदर्य, लावण्य.* **radiance** /-अन्स्/ *ना* [*अगण*] दीप्ती, पाणीदारपणा. **radiantly** *क्रिवि* तेजस्वीपणे; प्रफुल्लपणे.

radiate /'रेइडिअेइट्/ *क्रि* [*अक, सक*] १ उष्णता आणि प्रकाश बाहेर टाकणे, विकिरण करणे, तळपणे. २ (*ला*) तळपणे, पसरवणे : *She ~s confidence, तिच्यापासून आत्मविश्वास सर्वत्र पसरतो.*

radiation /ˌरेइडि'अेइश्न्/ *ना* [*अगण*] १ किरणांच्या रूपात उष्णता, प्रकाश वगैरे बाहेर टाकणे, विकिरण. २ किरणोत्सर्ग.

radiator /'रेइडिअेइट(र्)/ *ना* [*गण*] १ खोली उबदार करण्याचे विशेषतः नळ्यांच्या संचाचे बनलेले साधन, विकिरक. २ वाहनाचे इंजिन थंड करण्याचे साधन.

radical /'रॅडिक्ल्/ *वि* १ मूलभूत, मूलगामी. २ आमूलाग्र (बदल). ३ आमूलाग्र राजकीय बदल करणारा, जहाल. **radical** *ना* [*गण*] जहालमतवादी. **radically** /-क्लि/ *क्रिवि* आमूलाग्र; जहालपणे.

radii RADIUS चे *ब.व.*

radio /'रेइडिअउ/ *ना* (*ब.व* **~s**) १ [*अगण*] **(क)** विद्युत्-लहरींच्या योगे संदेशन करण्याची प्रक्रिया, बिनतारी संदेश पाठवणे/मिळणे. **(ख)** अशा रीतीने आकाशवाणीवरून प्रसारित करणे. २ [*गण*] आकाशवाणी, रेडिओसंच. **radio** *क्रि* [*अक, सक*] बिनतारी संदेश पाठवणे.

radioactive /ˌरेइडिअउ'ॲक्टिव्ह्/ *वि* अपायकारक ठरू शकणाऱ्या किरणांच्या रूपात ऊर्जा बाहेर टाकणारा, किरणोत्सर्गी. **radioactivity** /-ॲक्'टिव्हटि/ *ना* [*अगण*] किरणोत्सर्ग.

radiography /ˌरेइडि'ऑग्रफि/ *ना* [*अगण*] क्ष-किरण लेखन. **radiographer** /-फ(र्)/

ना [*गण*] क्ष-किरण चित्रकार.

radiology /,रेइडि'ऑलजि/ *ना* [*अगण*] क्ष-किरणशास्त्र, खास करून वैद्यक शास्त्रातला वापर लक्षात घेणारे, क्ष-किरणोपयोजनशास्त्र. **radiologist** *ना* [*गण*] किरणोपचार करणारा डॉक्टर, क्ष-किरणचित्रविद्या विशारद.

radish /'रॅडिश/ *ना* [*गण*] तिखट चवीचा, कच्चा खाल्ला जाणारा तांबडा किंवा पांढरा मुळा.

radium /'रेइडिअम्/ *ना* [*अगण*] काही रोगांवरील उपचारात वापरले जाणारे किरणोत्सर्गी रासायनिक द्रव्य.

radius /'रेइडिअस्/ *ना* [*गण*] (*ब.व* **radii** /-डिआइ/) १ वर्तुळमध्यापासून वर्तुळाला स्पर्श करणारी रेषा, त्रिज्या. २ एका बिंदूपासून वर्तुळाकार असे क्षेत्र किंवा परिसर, गोलाकार क्षेत्र : *Within a two-mile ~ of the factory, कारखान्याच्या दोन मैलाच्या परिसरात.*

raffia /'रॅफिअ/ *ना* [*अगण*] एक प्रकारच्या ताडाच्या झाडाच्या पानांपासून चटया वगैरे विणण्यासाठी तयार केलेल्या मऊ दोऱ्या.

raffle /'रॅफ्ल/ *ना* [*गण*] बक्षीस काढण्यासाठी क्रमांक दिलेल्या तिकिटांची विक्री करून धर्मादाय कार्यासाठी पैसे गोळा करण्याचा मार्ग. **raffle** *क्रि* [*सक*] अशा साठी बक्षीस देणे/लावणे.

raft /राफ्ट्; *अमे* रॅफ्ट/ *ना* [*गण*] लाकडाचे ओंडके बांधून केलेला तराफा.

rafter /'राफ्ट(र्); *अमे* 'रॅफ्-/ *ना* [*गण*] छपराला आधार देणारा मोठा उतरता वासा.

rag^1 /रॅग्/ *ना* १ [*गण*] जुन्या कापडाची चिंधी, लक्तर. २ **rags** [*ब.व*] लक्तरे झालेला कपडा. ३ [*गण*] (*अनौप अधिक्षेपी*) वर्तमानपत्र, लंगोटीपत्र.

rag^2 /रॅग्/ *ना* [*गण*] धर्मादाय कार्यासाठी निधी गोळा करण्यासाठी विद्यार्थ्यांनी आयोजित केलेला गमतीचा सार्वजनिक कार्यक्रम. **rag** *क्रि* (**-gg-**) [*सक*] (*अनौप*) एखाद्याची चेष्टा करणे, सतावणे.

rage /रेइज्/ *ना* १ [*अगण, गण*] क्रोधाचा विस्फोट, त्वेष, क्षोभ. २ (*वाक्प्र*) **(be) all the 'rage** (*अनौप*) खूप फॅशनेबल (असणे). **rage** *क्रि* [*अक*] १ कोपिष्ट होणे, कोपणे, संतापणे. २ (वादळ वगैरे) झंझावती किंवा सुसाट्याचे असणे.

ragged /'रॅगिड्/ *वि* १ (क) (कपड्यांबाबत) जुने फाटके, चिंध्या झालेले. (ख) (माणसांबाबत) चिंध्या नेसणारे, फाटकेतुटके कपडे घातलेले. २ खडबडीत; उंचसखल. **raggedly** *क्रिवि* फाटक्यातुटक्या अवस्थेत; कसेबसे.

ragtime /',रॅग्टाइम्/ *ना* [*अगण*] १९२०-३० च्या दरम्यानतले लोकप्रिय संगीत.

raid /रेइड्/ *ना* [*गण*] १ शत्रूवर अचानक केलेला हल्ला. २ पोलिसांनी लोकांना अटक करायला वगैरे घातलेला छापा. **raid** *क्रि* [*सक*] हल्ला करणे; छापा घालणे. **raider** *ना* [*गण*] हल्लेखोर; छापा घालणारा.

rail /रेइल/ *ना* १ [*गण*] लाकडाची किंवा धातूची दांडी – उदा कुंपणाला वापरतात तशी, कुंपणाचा, गॅलरीचा वगैरे कठडा. २ [*गण*] वस्तू अडकविण्याची दांडी, काठी : *a towel ~, टॉवेल ठेवायची दांडी.* ३ [*गण,* विशेषतः *ब.व*] आगगाडीचे रूळ. ४ [*अगण*] आगगाडी, रेल्वे : *travel by ~, रेल्वेने प्रवास करणे.* **rail** *क्रि* (*क्रिब*) **rail sth in/off** भोवती कठड्याचे कुंपण घालणे, कुंपण घालून बंदिस्त किंवा अलग करणे. **railing** *ना* [*गण,* विशेषतः *ब.व*] कठड्याचे कुंपण. **'railroad** *ना* [*गण*] (*अमे*) रेल्वे. **'railway** *ना* [*गण*] १ रेल्वेचे रूळ, लोहमार्ग. २ आगगाड्यांचे जाळे.

rain /रेइन/ *ना* [*अगण*] पाऊस. **rain** *क्रि* १ [*अक*] (*it* या कर्त्यासह वापर) पाऊस पडणे : *It ~ed all day, दिवसभर पाऊस पडला.* २ (*क्रिब*) **rain (sth) down** वर्षाव होणे, करणे, बरसणे. **rain sth off** (बहुधा कर्मणी) पावसामुळे (एखादा कार्यक्रम) न होणे. **rainbow** /'रेइन्बउ/ *ना* [*गण*] इन्द्रधनुष्य. **'raincoat** *ना* [*गण*] हलका, पावसाळी कोट. **'rainfall** *ना* [*अगण*] एखाद्या ठिकाणचे विशिष्ट काळातील पर्जन्यमान. **'rain forest** *ना* [*गण*] विषुववृत्ताजवळील बारमाही पावसाच्या प्रदेशातील घनदाट जंगल, पर्जन्यवन.

rainy /'रेइनि/ *वि* (**-ier, -iest**) १ खूप पाऊस असलेला, पावसाळी. २ (*वाक्प्र*) **for a**

,rainy 'day (पैशाबाबत) गरज पडेल तेव्हा किंवा अडीअडचणीच्या वेळी.

raise /रेइझ़/ *क्रि* [*सक*] १ उंचावणे, उंच करणे; उचलणे. २ (क) वाढवणे : ~ *sb's hopes, एखाद्याच्या आशा वाढवणे.* (ख) मोठा करणे, चढवणे : ~ *one's voice, आवाज चढवणे, मोठ्याने बोलणे.* ३ निर्माण करणे : ~ *doubts, शंका निर्माण करणे.* ४ ऐकू येईलसे करणे. ५ लक्षात आणून देणे, चर्चेसाठी पुढे करणे : ~ *a new point, नवीन मुद्दा उपस्थित करणे.* ६ जमवणे, जमवाजमव करणे : ~ *an army/money, सैन्याची/पैशाची जमवाजमव करणे.* ७ (क) (पिके) घेणे, वाढवणे; (मेंढ्यांची वगैरे) पैदास करणे. (ख) सज्ञान होईपर्यंत मुलाची काळजी घेणे, संगोपन करणे. ८ (*वाक्प्र*) **raise 'hell/the 'roof** (*अनौप*) चिकार संतापाने, रागाने आकाश-पाताळ एक करणे. **raise** *ना* [*गण*] (*अमे*) रोजंदारीतील वाढ, पगारातील वाढ.

raisin /'रेइझ़न्/ *ना* [*गण*] बेदाणा.

rake /रेइक्/ *ना* [*गण*] टोकाला दाते असणारे लांब दांडीचे एक बागकामाचे हत्यार, झुकाव, दाताळे. **rake** *क्रि* १ [*अक, सक*] झुकावाने एकसारखे करणे. २ [*सक*] झुकावाने गोळा करणे किंवा ढकलणे. (*क्रिब*) **rake sth in** (*अनौप*) चिकार पैसे मिळवणे : *She's really raking it in! ती खरंच खोऱ्याने पैसे ओढतेय्.* **'rake sth up** (भूतकाळातील एखाद्या कटू गोष्टीची) आठवण करून देणे. **'rake-off** *ना* [*गण*] (*अनौप*) (बहुधा अप्रामाणिकपणे मिळवलेल्या) नफ्यातील वाटा.

rally /'रॅलि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) १ (विशेषतः राजकीय) मेळावा. २ रस्त्यावरची वाहन-स्पर्धा. ३ टेनिसमधील वगैरे सलग व दीर्घकाळ चाललेली फटकेबाजी. **rally** *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*अक, सक*] १ एखाद्या कार्यासाठी नव्याने प्रयत्न करायला एकत्र येणे. २ ताकद, तब्येत वगैरे सुधारणे, ताकद गोळा करणे, उचल खाणे. ३ (*क्रिब*) **rally round** एखाद्याला संकटकाळी मदत करण्यास एकत्र येणे.

ram /रॅम्/ *ना* [*गण*] १ मेंढा, मेष. २ = BATTERING-RAM (BATTER^{1}). **ram** (**-mm-**) [*सक*] १ एखाद्यावर जोरात येऊन आदळणे, टक्कर देणे. २ जोराने ढकलणे.

ramble /'रॅम्ब्ल्/ *ना* [*गण*] गावाबाहेर मारलेला लांबवरचा फेरफटका. **ramble** *क्रि* [*अक*] १ दूर फिरायला जाणे. २ (*ला*) फापटपसारा करून बोलणे/लिहिणे, पाल्हाळणे, भरकटणे. ३ (झाडाबाबत) खूप वाढणे, माजणे. **rambler** *ना* [*गण*] भटकंती करणारा, भटक्या. **rambling** *वि* १ (विशेषतः इमारतींबाबत) वाटेल तशा पसरलेल्या. २ (लेखन किंवा भाषण याबाबत) भरकटलेले, बेशिस्त.

ramification /,रॅमिफि'केइश्न्/ *ना* [*गण, बहुधा ब.व*] (*औप*) गुंतागुंत वाढवणारे परिणाम : *the ~s of the new system, नवीन पद्धतीतून वाढणाऱ्या कटकटी.* २ गुंतागुंतीच्या रचनेचा एक भाग.

ramp /रॅम्प्/ *ना* [*गण*] दोन असमान पातळ्या जोडणारा उतरता रस्ता.

rampage /रॅम्'पेइज्/ *क्रि* [*अक*] दंगा करणे, धुडगूस घालणे. **rampage** *ना* (*वाक्प्र*) **be/go on the 'rampage** धुडगूस घालणे, मोडतोड करणे.

rampant /'रॅम्पन्ट्/ *वि* (उदा रोग, गुन्हेगारी याबाबत) अनिर्बंधपणे वाढणारा, बेसुमार फैलावणारा, उदंड.

rampart /'रॅम्पाट्/ *ना* [*गण*] किल्ल्याभोवतीची वगैरे तटबंदी.

ramshackle /'रॅम्शॅक्ल्/ *वि* (घर किंवा वाहन याबाबत) मोडकळीस आलेले.

ran RUN^{1} चा *भूत.*

ranch /रान्च्; *अमे* रॅन्च्/ *ना* [*गण*] खास करून अमेरिकेतील गुरेढोरे पोसण्याचे मोठे रान, पशुसंगोपनमळा. **rancher** *ना* [*गण*] पशुसंगोपन मालक किंवा तिथला देखभाल करणारा.

rancid /'रॅन्सिड्/ *वि* (चरबीयुक्त अन्नाबाबत) शिळे झाल्याने वास येणारे किंवा खराब झालेले, आंबलेले.

rancour (*अमे* **-cor**) /'रॅङ्क(र्)/ *ना* [*अगण*] (*औप*) दीर्घद्वेष, दीर्घकाळची कटुता, वैमनस्य. **rancorous** /-करस्/ *वि* दीर्घद्वेषी, वैमनस्याचा.

random /'रॅन्डम्/ *वि* कसेही केलेले किंवा निवडलेले, अहेतुपूर्वक निवडलेले, मनाला येईल तसे केलेले, यादृच्छिक. **random** *ना* (*वाक्प्र*) **at 'random** कसेही, न ठरवता. **randomly** *क्रिवि* न ठरवता, हवे तसे आणि हवे तेव्हा, यदृच्छेने.

randy /'रॅन्डि/ *वि* **(-ier, -iest)** (*अनौप* विशेषतः *ब्रि*) कामोत्तेजित, तापलेला.

rang RING^1 चा *भूत.*

range^1 /रेइन्ज्/ *ना* १ [*गण*] टेकड्या, पर्वत वगैरेची जोडलेली रांग, पर्वतरांग. २ [*गण*] एकाच प्रकारच्या गोष्टींचा संच किंवा मालिका; विविधता, वैविध्य : *sell a wide ~ of books, खूप विविधता असणारी म्हणजेच विविध विषयांवरची पुस्तके विकणे.* ३ [*गण*] एखाद्या गोष्टीतील बदलांची मर्यादा, कक्षा, परिसीमा. ४ (क) [*अगण*] पाहण्याचा किंवा ऐकण्याचा पल्ला. (ख) [*अगण, अे.व*] बंदूक वगैरे झाडण्याचे अंतर, पल्ला : *shot him at close ~, त्याच्यावर अगदी जवळून गोळी झाडली.* ५ [*गण*] नेमबाजीसाठी लक्ष्ये ठेवलेले मैदान, चांदमारीचे मैदान.

range^2 /रेइन्ज्/ *क्रि* १ [*अक*] विशिष्ट मर्यादित बदलणे : *Prices ~ from £70 to £100, ७० ते १०० पौंडाच्या दरम्यान किंमती आहेत.* २ [*अक*] (*over*)// (*ला*) समावेश करणे, व्याप्ती असणे : *a talk ranging over many subjects, अनेक विषयांना स्पर्श करणारे किंवा अनेक विषयांचा समावेश करणारे भाषण.* ३ [*सक*] (*औप*) ओळीने ठेवणे, रांग करणे.

ranger /'रेइन्ज(र्)/ *ना* [*गण*] वनरक्षक किंवा मोठ्या बागेवर देखरेख ठेवणारा माणूस, जंगलखात्याचा अधिकारी.

rank^1 /रॅङ्क्/ *ना* १ [*गण, अगण*] लष्कर, नौदल वगैरेतील श्रेणी. २ [*गण, अगण*] संघटनेतील किंवा समाजातील स्थान. ३ [*गण*] रांग : *a 'taxi rank, टॅक्सींची रांग.* ४ **the ranks** [*ब.व*] अधिकारी नाहीत असे (सामान्य) सैनिक, जवान. **rank** *क्रि* [*अक, सक*] विशिष्ट स्थानावर असणे, विशिष्ट वर्गात घालणे, श्रेणी देणे : *~ among the world's best, जगातील सर्वोत्कृष्ट (कृतींमधे वगैरे) स्थान असणे.* **the ,rank and 'file** *ना* [*अे.व*] (अे.व किंवा ब.व क्रियापदासह) संघटनेतील (नेते सोडून) इतर सभासद, सामान्य कार्यकर्ते.

rank^2 /रॅङ्क्/ *वि* १ (वनस्पतींबाबत) दाटीवाटीने वाढणारी, माजणारी. २ घाण वासाचा किंवा उग्र दर्पाचा, खवट, वाशेळा. ३ (एखाद्या वाईट गोष्टीबाबत) शुद्ध, निखालस.

rankle /'रॅङ्कल्/ *क्रि* [*अक*] कायमचे वितुष्ट किंवा कायमचा राग निर्माण करणे, खुपणे, सलणे, राग आणणे.

ransack /'रॅम्सॅक्; *अमे* रॅन्'सॅक्/ *क्रि* [*सक*] एखाद्या जागेची कसून तपासणी करताना सर्व गोष्टी विखरून टाकणे, शोधण्यासाठी अस्ताव्यस्त फेकणे, उचकापाचक करणे.

ransom /'रॅन्सम्/ *ना* [*गण*] कैद्याला मुक्त करण्यासाठी दिलेली रक्कम, खंडणी, सोडणावळ. **ransom** *क्रि* [*सक*] खंडणी देऊन एखाद्याची सुटका करणे.

rant /रॅन्ट्/ *क्रि* [*अक*] शिरा ताणून बोलणे, भीमदेवी थाटात ओरडणे, भकणे.

rap /रॅप्/ *ना* [*गण*] १ तडाखा, थाप, चापट, चटकाणी (किंवा त्याचा आवाज). २ (*वाक्प्र*) **take the rap for sth** (*अनौप*) उगाचच शिक्षा घडणे. **rap** *क्रि* **(-pp-)** [*अक, सक*] थाप मारणे, चापटी देणे, चटकाणी देणे.

rape /रेइप्/ *क्रि* [*सक*] स्त्रीशी तिच्या इच्छेविरुद्ध संभोग करण्याचा गुन्हा करणे, बलात्कार करणे, नासवणे. **rape** *ना* [*गण, अगण*] १ जबरी संभोग, बलात्कार. २ (*ला*) नाश, बिघडवणे. **rapist** *ना* [*गण*] बलात्कार करणारा.

rapid /'रॅपिड/ *वि* वेगवान; जलद. **rapidity** /र'पिडटि/ *ना* [*अगण*] चपळाई, वेग, जलदी. **rapidly** *क्रिवि* वेगाने; जलदीने. **rapids** *ना* [*ब.व*] नदीचे पाणी कड्यावरून कोसळते ती जागा, पात्रातील खडकाळ भागातील खळाळ.

rapport /रॅ'पॉऽ(र्); *अमे* -'पॉऽर्ट्/ *ना* [*अगण, अे.व*] सुसंवाद, जवळीक.

rapt /रॅप्ट्/ *वि* विचारमग्न, चिंतनात इतका मशगूल की इतर गोष्टींचं भान नसलेला.

rapture /'रॅप्च(र्)/ *ना* १ [*अगण*] (*औप*) अत्यानंद, हर्ष. २ (*वाक्प्र*) **go into raptures about/over sth** एखाद्या गोष्टीविषयी खूप उत्साह/आनंद दाखवणे.

rapturous *वि* उत्साहवर्धक, आनंददायी : *rapturous applause, आनंदकारक पसंती.*

rare^{1} /रेअ(र्)/ *वि* (**~r, ~st**) सर्वसामान्य नाही असा, असाधारण. **rarely** *क्रिवि* क्वचित, विरळा. **rareness** *ना* [*अगण*] असाधारणपणा.

rare^{2} /रेअ(र्)/ *वि* (मांसाबाबत) मंद जाळावर किंचित कमी शिजवलेले.

rarefied /'रेअरिफाइड्/ *वि* १ (हवेबाबत) नेहमीपेक्षा कमी ऑक्सिजन (प्राणवायू) असलेली आणि विरळ. २ (*ला*) मोठा दिमाखदार; खास, विशेष, अप्रतिम.

raring /'रेअरिङ्/ *वि to//* एखादी गोष्ट करण्यास फार उत्साही, उतावीळ.

rarity /'रेअरटि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] असाधारणपणा. २ [*गण*] असाधारण वस्तू, दुर्मिळ गोष्ट.

rascal /'रास्कल्; *अमे* 'रॅस्कल्/ *ना* [*गण*] १ खोडकर मुलगा, गुलाम. २ लबाड माणूस, बदमाष.

rash^{1} /रॅश्/ *वि* अविचाराने केलेला/झालेला. **rashly** *क्रिवि* अविचारीपणाने. **rashness** *ना* [*अगण*] अविचारीपणा, घाई.

rash^{2} /रॅश्/ *ना* १ [*गण*] आजाराने अंगावर येणारे पुरळ, अंगावर उठलेले पित्त. [*ए.व*] (*ला*) अनपेक्षित अशी मोठी संख्या, सुळसुळाट : *a ~ of strikes, संपांचा सुळसुळाट.*

rasher /'रॅश(र्)/ *ना* [*गण*] डुकराच्या सुक्या मांसाचा पातळ तुकडा किंवा काप.

rasp /रास्प्; *अमे* रॅस्प्/ *ना* १ [*ए.व*] जाडाभरडा आवाज. २ [*गण*] लाकूड किंवा पत्रा गुळगुळीत करण्यासाठी वापरायचे कानशीसारखे एक हत्यार, मार्फा. **rasp** *क्रि* [*अक, सक*] खरखरीत आवाजात बोलणे. **rasping** *वि* खडबडीत आवाजातला.

raspberry /'राझ्ब्रि; *अमे* 'रॅझ्बेरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) १ लाल गोड बेरी (किंवा तिचे झाड), काळा आंजू. २ (*अनौप*) जीभ बाहेर काढून 'हॅऽऽ' करून वेडावणे, फुरक्या मारणे.

rat /रॅट्/ *ना* [*गण*] १ उंदरासारखा दिसणारा पण त्याहून मोठा असणारा प्राणी, घूस. २ (*अनौप*) बेइमान किंवा दुष्ट माणूस. ३ (*वाक्प्र*) **the 'rat race** यशासाठी न संपणारी अशी स्पर्धा. **rat** *क्रि* (**-tt-**) [*अक*] (*on*)// (*अनौप*) एखाद्याचे गुपित फोडणे, गौप्यस्फोट करणे; विश्वासघात करणे, फुटीरपणा करणे. **ratty** *वि* (**-ier, -iest**) (*ब्रि अनौप*) चिडचिडा.

rate^{1} /रेइट्/ *ना* [*गण*] १ एखाद्या राशीचे दुसऱ्या राशीशी असलेले प्रमाण : *a ~ of 3 miles per hour, एका तासाला तीन मैल या प्रमाणात ○ the 'birth ~, जन्माचे प्रमाण.* २ किंमत किंवा गुणवत्ता यांचे परिमाण, दर, प्रत : *postage ~, पोस्टाचा दर ○ a first-~ job, पहिल्या प्रतीची नोकरी.* ३ वेग. ४ **rates** [*ब.व*] (पूर्वी ब्रिटनमध्ये वापर) इमारतीवरचा स्थानिक कर, घरपट्टी. ५ (*वाक्प्र*) **at 'any rate** काहीही झालं तरी, कुठलीही किंमत देऊन. **at 'this/'that rate** या गतीने, असेच चालू राहिले तर. **'ratepayer** *ना* [*गण*] (पूर्वी ब्रिटनमधे) घरपट्टी भरणारा.

rate^{2} /रेइट्/ *क्रि* [*सक*] १ गणना करणे, क्रमांकाचा समजणे : *He is generally ~d as one of the best players, तो एक उत्कृष्ट खेळाडू म्हणून गणला जातो.* २ समजणे, मानणे : *~ sb as a friend, एखाद्याला मित्र मानणे.* ३ (विशेषतः *अमे अनौप*) योग्यता असणे, लायकी असणे.

rather /'राद(र्); *अमे* 'रॅ-/ *क्रिवि* १ किंचित, थोडासा, एका मर्यादेपर्यंत : *They were ~ surprised, ते थोडेसे आश्चर्यचकित झाले.* २ (*वाक्प्र*) **or rather** किंवा खरं सांगायचं तर : *last night, or ~ early this morning, काल रात्री किंवा खरं म्हणजे आज पहाटे.* **would rather . . . (than)** अधिक पसंत करणे, परवडणे : *I'd ~ walk than go by bus, बसपेक्षा मला चालत जायलाच जास्त आवडेल.*

ratify /'रॅटिफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] (एखाद्या कराराला) औपचारिकपणे स्वतःची संमती देणे, अनुसंमती देणे. **ratification** /,रॅटिफि'केइश्न्/ *ना* [*अगण*] अधिकृत संमती, अनुसंमती.

rating /'रेइटिङ्/ *ना* १ [*गण, अगण*] गुणवत्ताश्रेणी, गुणवत्तास्थान. २ [*ब.व*]

दूरदर्शनवरील कार्यक्रमांची लोकप्रियता दाखविणारी संख्या, लोकप्रियतानिर्देशांक. ३ (विशेषतः *ब्रि*) (नौदलात) राजादिष्ट नसलेला नाविक.

ratio /'रेइशिअउ/ [*अक*] [*गण*] (*ब.व* ~s) दोन राशींमधील संबंध म्हणजेच त्यांचे गुणोत्तर प्रमाण : *The ~ of men to women was 3 to 1, पुरुषांचे स्त्रियांशी प्रमाण ३:१ असे होते.*

ration /'रॅश्न्/ *ना* १ [*गण*] एका व्यक्तीला दिलेला विशेषतः ठराविक धान्याचा वाटा, शिधावाटा, मितवाटप. २ **rations** [*ब.व*] अन्नधान्य पुरवठा. **ration** *क्रि* [*सक*] १ एखाद्याला ठराविक शिधा देणे. २ अन्नधान्य पुरवठा सीमित करणे.

rational /'रॅश्नल्/ *वि* १ तर्कनिष्ठपणे मांडू शकणारा, तर्कशुद्ध, बुद्धिनिष्ठ. २ पटणारा, समंजस, अर्थ असणारा, सुसंगत. **rationally** /-श्नलि/ *क्रिवि* तर्कशुद्धपद्धतीने, संयुक्तिकपणे.

rationale /ˌरॅश'नाल्; *अमे* -'नॅल्/ *ना* [*अ.व*] एखादी कृती, श्रद्धा, मत, व्यवहार यामागची तर्कमीमांसा किंवा तार्किकता.

rationalize /'रॅश्नलाइझ्/ *क्रि* १ [*अक, सक*] (बुद्धीपलीकडच्या) एखाद्या गोष्टीची बुद्धिनिष्ठ कारणमीमांसा करणे, तर्कसंगती लावणे. २ [*सक*] (एखादी पद्धती किंवा उद्योग यांच्यातील) वाया जाणाऱ्या गोष्टी कमी करण्यासाठी त्यांची पुनर्मांडणी करणे, दोष काढून कार्यक्षमता वाढवणे, पुनःसंधान करणे. **rationalization** /ˌरॅश्नलाइ'झेइश्न्; *अमे* -लि'झ्-/ *ना* [*गण, अगण*] बुद्धिनिष्ठ कारणमीमांसा; पुनःसंघटन.

rattle /'रॅट्ल्/ *क्रि* १ [*अक, सक*] खडखड आवाज करणे/काढणे. २ [*सक*] (*अनौप*) (एखाद्याला) बेचैन करणे, चिंतीत करणे, नाउमेद करणे. ३ (*क्रिब*) **rattle along, off, etc** खडखड आवाज करत चालणे/जाणे. **rattle sth off** फारसा विचार न करता भरभर एखादी गोष्ट पुन्हापुन्हा करणे. **rattle** *ना* [*गण*] १ खडखड आवाज. २ खुळखुळ आवाज करणारे लहान मुलांचे एक खेळणे, खुळखुळा. **'rattlesnake** *ना* [*गण*] शेपटीतून खणखण आवाज करणारा अमेरिकेतील एक विषारी साप, खडखड्या नाग.

ratty ⇨ RAT.

raucous /'रॉऽकस्/ *वि* भसाडा, दणाणणारा. **raucously** *क्रिवि* दणाणून सोडत.

ravage /'रॅव्हिज्/ नासधूस करणे, वाटोळे करणे; उद्ध्वस्त करणे, धूळधाण करणे. **the ravages** *ना* [*ब.व*] दुष्परिणाम, नुकसानकारक परिणाम : *the ~s of time, काळाचे दुष्परिणाम.*

rave /रेइव्ह्/ *क्रि* [*अक*] १ पिसाटासारखे बोलणे, पिसाळल्यासारखी बडबड करणे. २ *about//* (*अनौप*) तोंड फाटेपर्यंत स्तुती करणे, वारेमाप कौतुक करणे. **rave** *वि* (*अनौप*) स्तुती करणारा, प्रशंसा करणारा : *a ~ review, स्तुती करणारे परीक्षण.* **raving** *क्रिवि, वि* पिसाट, पिसाळलेला.

raven /'रेइव्ह्न्/ *ना* [*गण*] कावळ्यासारखा मोठा काळा पक्षी, डोंबकावळा. **raven** *वि* (केसांबाबत) कंचकाळे, काळेभोर.

ravenous /'रॅव्हनस्/ *वि* भुकेला, वखवखलेला. **ravenously** *क्रिवि* वखवखलेपणाने, अधाशीपणाने.

ravine /र'व्हीन्/ *ना* [*गण*] अरुंद खोल दरी.

ravish /'रॅव्हिश्/ *क्रि* [*सक*] (*औप*) (विशेषतः कर्मणी) संतोष देणे, संतुष्ट करणे. **ravishing** *वि* मनोहर, अतिरम्य.

raw /रॉऽ/ *वि* १ कच्चा, न शिजलेला. २ नैसर्गिक अवस्थेतील : *~ materials, कच्चा माल.* ३ (लोकांबाबत) अननुभवी, बिनकसबी, अशिक्षित. ४ (त्वचेबाबत) हुळहुळणारी, दुखरी. ५ (हवेबाबत) थंड ओलसर, गारठ्याची, ओल्या गारव्याची.

ray /रेइ/ *ना* [*गण*] १ प्रकाशाचा किरण. २ (*ला*) अल्पसे चिन्ह : *a ~ of hope, आशेचा किरण म्हणजेच आशादायक चिन्ह.*

rayon /'रेइऑन्/ *ना* [*अगण*] रेशमासारखा मऊ पदार्थ.

raze (तसेच **rase**) /रेइझ्/ *क्रि* [*सक*] (एखादी इमारत, शहर वगैरे) पूर्ण उद्ध्वस्त करणे, उखडणे, जमीनदोस्त करणे.

razor /'रेइझ(र)/ *ना* [*गण*] धारदार पाते लावलेले दाढी करण्याचे हत्यार, वस्तरा.

Rd संरू road, रस्ता.

re- /री/ *पूर्वप्रत्यय* पुन्हा, पुनर्- : *refill, पुन्हा भरणे* ○ *re-examine, पुन्हा तपासणे* ○ *rebuild, पुनर्बांधणी करणे.*

reach /रीच्/ *क्रि* १ [*सक*] पोहोचणे, येणे : ~ *London, लंडनला पोहोचणे* ○ (*ला*) ~ *an agreement, समझोता होणे.* २ [*अक, सक*] (एखादी गोष्ट) घेण्यासाठी हात पुढे करणे : *He ~ed for his gun, त्याचा हात पिस्तुलाकडे गेला* ○ *Can you ~ the book on the top shelf? अगदी वरच्या शेल्फच्या पुस्तकापर्यंत तुझा हात पोहोचेल का?* ३ [*अक, सक*] -पर्यंत पसरणे : *Their land ~es (down to) the river, नदीपर्यंत त्यांची जमीन गेलीय्/पसरलीय्.* ४ [*सक*] एखाद्याशी, विशेषतः फोनवरून, संपर्क साधणे. **reach** *ना* १ [*अगण*] आटोका, पाहोचण्याचे अंतर : *Medicines should be kept out of ~ of children, मुलांच्या हाती लागणार नाहीत अशा रीतीने औषधे ठेवायला हवीत.* २ [*गण, बहुधा ब.व*] नदीचा भाग, नदीचा प्रदेश.

react /रि'ॲक्ट्/ *क्रि* [*अक*] १ (*to*)// एखाद्या गोष्टीचा परिणाम म्हणून होणे, प्रतिक्रिया असणे. २ *against*// विरोध म्हणून असणे, विरुद्ध जाणे. ३ (*with*)// (*रसायनशास्त्र*) (दुसऱ्या द्रव्यावर) परिणाम घडणे, विक्रिया होणे.

reaction /रि'ॲक्श्न्/ *ना* १ [*गण, अगण*] आधीच्या कृतीला किंवा कार्याला मिळालेला प्रतिसाद, प्रतिक्रिया. २ [*अगण*] बदलाला किंवा परिवर्तनाला (विशेषतः राजकीय) विरोध, प्रतिगामीपणा. ३ [*गण*] (*रसायनशास्त्र*) एका द्रव्यात दुसऱ्या द्रव्याने होणारा बदल, विक्रिया. **reactionary** /-शन्रि; *अमे* -शनेरि/ *ना* [*गण*], *वि* (*ब.व* **-ies**) प्रतिगामी (माणूस).

reactor /रि'ॲक्ट(र्)/ *ना* [*गण*] = NUCLEAR REACTOR (NUCLEAR).

read /रीड्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **read** /रेड्/) १ [*अक, सक*] (क) वाचणे : ~ *a book, पुस्तक वाचणे.* (ख) (पुस्तक वगैरे) मोठ्याने वाचणे. २ [*अक*] शब्द असणे, अर्थ असणे : *The sign ~s 'No Entry', या खुणेचा अर्थ 'प्रवेश बंद' असा आहे* ○ *Her reports always ~ well, तिचे वृत्तांत नेहमीच अर्थपूर्ण असतात.* ३ [*सक*] कळणे, समजणे : ~ *sb's thoughts, एखाद्याचे विचार समजणे.* ४ [*सक*] (मापनाच्या साधनांबाबत) प्रमाण वगैरे दाखवणे. ५ [*सक*] विद्यापीठात (एखाद्या विषयाचा) अभ्यास करणे. ६ (*वाक्प्र*) **,read between the 'lines** व्यक्त न झालेला अर्थ शोधणे. **readable** *वि* वाचायला सोपा किंवा चांगला असा, वाचनीय.

reader /'रीड(र्)/ *ना* [*गण*] १ वाचक. २ विद्यार्थ्यांना वाचन सराव करायला मदत करणारे पुस्तक. ३ (ब्रिटनमधे) विद्यापीठातील ज्येष्ठ प्राध्यापक, प्रपाठक. **readership** *ना* [*अ.व*] एखाद्या वृत्तपत्राचा वगैरे वाचकवर्ग.

reading /'रीडिङ्/ *ना* १ [*अगण*] (क) वाचन. (ख) वाचायचे पुस्तक वगैरे : *light reading, हलकेफुलके असे काही वाचायचे (पुस्तक वगैरे).* २ [*गण*] मोजमाप करणाऱ्या साधनाने दाखवलेला आकडा, परिमाण, राशी वगैरे. ३ [*गण*] आकलन, केलेला अंदाज, समज : *My ~ of the situation is perfect, परिस्थितीचा माझा अंदाज अचूक आहे.* ४ [*गण*] (*ब्रि*) (संसदेमधे) एखाद्या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होण्यापूर्वी ज्या तीन अवस्थांतून ते जावे लागते त्यांतील एक अवस्था, एक वाचन.

ready /'रेडि/ *वि* (**-ier, -iest**) १ *for/to*// तयार, सज्ज : ~ *for action, कृती करण्यास सज्ज* ○ ~ *to act, काही करण्यास तयार.* २ राजी, तयार. ३ *to*// एखाद्या गोष्टीच्या अगदी जवळ आलेला, बेतास आलेला : *She looked ~ to collapse, ती कोसळण्याच्या बेतास आल्यासारखी दिसली.* ४ तत्पर, सत्वर : *a ~ answer, तत्पर उत्तर.* ५ सहज मिळणारा, सहजप्राप्य. **readily** *क्रिवि* १ न घुटमळता, आढेवेढे न घेता, तत्परतेने. २ सहजपणे. **readiness** *ना* [*अगण*] तयारी, सज्जता; इच्छा. **ready** *क्रिवि* आधीच : ~ *cooked, आधीच शिजलेले.* **ready** *ना* (*वाक्प्र*) **at the 'ready** वापरासाठी किंवा कृतीसाठी सिद्ध. **,ready-'made** *वि* लगेच वापरायला किंवा नेसायला तयार असा.

real /रिअल्/ *वि* १ खरा, वास्तव. २ सत्य, प्रत्यक्ष. **'real estate** *ना* [*अगण*] (विशेषतः *अमे कायदा*) स्थावर मालमत्ता.

realism /'रिअलिझ्म्/ *ना* [*अगण*] १ वास्तव

परिस्थितीचा स्वीकार. २ (कला आणि साहित्य यामधे) वास्तववाद. **realist** *ना* [*गण*] वास्तववादी, वास्तवाचे भान असणारा माणूस. **realistic** /,रिअ'लिस्टिक्/ *वि* वास्तववादी, वस्तुस्थिती लक्षात घेणारा.

reality /रि'ॲलटि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] वास्तव. २ [*गण*] प्रत्यक्ष अनुभव, साक्षात् दर्शन : *the realities of war, युद्धाचा प्रत्यक्ष अनुभव.* ३ (*वाक्प्र*) **in re'ality** वास्तवात, प्रत्यक्षात, वस्तुतः.

realize /'रिअलाइझ़्/ *क्रि* [*सक*] १ पूर्ण भान असणे; समजून येणे, कळणे. २ (*औप*) (योजना, शंका) प्रत्यक्षात आणणे, साकार होणे. ३ (*औप*) (विशेषतः किमतीला) विकला जाणे. **realization** /,रिअलाइ'झ़ेइशन् *अमे* -लि'झ़्-/ *ना* [*अगण*] जाणीव; मूर्तता.

really /'रिअलि/ *क्रिवि* १ प्रत्यक्षात; खरोखर. २ खूप, फार. ३ (एखाद्या गोष्टीत रस आहे असे दाखवण्यासाठी किंवा आश्चर्य व्यक्त करण्यासाठी वापर) खरंच.

realm /रेल्म्/ *ना* [*गण*] १ (*औप*) राज्य. २ (*ला*) कार्यक्षेत्र, आवडीचा प्रांत.

reap /रीप्/ *क्रि* १ [*अक, सक*] पीक काढणे, कापणी करणे. २ [*सक*] (*ला*) कष्ट करून मिळवणे.

rear^1 /रिअ(र्)/ *ना* १ **the rear** [*अे.व*] मागची बाजू, पिछाड. २ (*वाक्प्र*) **,bring up the 'rear** पिछाडीला असणे, मागून येणे. **rear** *वि* पार्श्व, मागचा. **the 'rearguard** *ना* [*गण*] सैनिकांची पिछाडीची फळी, पिछाडी संरक्षक दल.

rear^2 /रिअ(र्)/ *क्रि* १ [*सक*] (क) लहान मूल वाढवणे, मोठे करणे. (ख) (मेंढ्या वगैरे) पाळणे, जातिवंत गुरे तयार करणे. २ [*अक*] (*up*)// (घोड्याबाबत) मागच्या पायांवर उभे राहणे. ३ [*सक*] (डोके) वर करणे.

reason^1 /'रीझ़न्/ *ना* १ [*गण, अगण*] एखाद्या गोष्टीचे स्पष्टीकरण; कारण. २ [*अगण*] तर्कशक्ती, बुद्धी. ३ [*अे.व*] समजूतदारपणा : *lose one's ~, मनाचा तोल सुटणे म्हणजेच बेभान होणे.* ४ (*वाक्प्र*) **within reason** योग्य आणि न्याय्य.

reason^2 /'रीझ़न्/ *क्रि* १ [*अक*] तर्क चालवणे, बुद्धी वापरणे. २ [*सक*] नीट विचार करून सांगणे. ३ (*क्रिब*) **reason with sb** एखाद्याचे मन वळविण्यासाठी त्याच्याशी चर्चा करणे, पटवून देणे, युक्तिवाद करणे. **reasoning** *ना* [*अगण*] तर्क वापरून एखाद्या निष्कर्षाप्रत येणे, युक्तिवाद.

reasonable /'रीझ़्नबल्/ *वि* १ योग्य, संयुक्तिक; समजूतदार. २ वाजवी किमतीचा, माफक दराचा. **reasonably** *क्रिवि* १ अगदी, पुरेसे. २ योग्यपणे, संयुक्तिकपणे.

reassure /,रिअ'शॉऽ(र्); *अमे* -'शुअर्/ *क्रि* [*सक*] एखाद्याची चिंता दूर करणे, आश्वासन देणे, दिलासा देणे. **reassurance** *ना* [*अगण, गण*] दिलासा, आश्वासन.

rebate /'रीबेइट्/ *ना* [*गण*] परत केलेला भाडे, कर वगैरे यातील भाग, वटाव, सूट.

rebel /'रेब्ल्/ *ना* [*गण*] १ शासनाविरुद्ध लढा देणारा माणूस, बंडखोर. २ हुकमतीविरुद्ध आवाज उठवणारा, विरोधक. **rebel** /रि'बेल्/ *क्रि* (**-ll-**) [*अक*] १ (*against*)// शासनाविरुद्ध बंड करणे. २ सत्तेला आव्हान देणे, विरोध करणे. **rebellion** /रि'बेलिअन्/ *ना* [*गण, अगण*] बंड, उठाव, विद्रोह. **rebellious** *वि* बंडखोर, विरोधी.

rebound /रि'बाउन्ड्/ *क्रि* [*अक*] १ आपटून मागे येणे. २ (*on*)// (करणाऱ्यावर) उलटणे, अनपेक्षित आणि वाईट परिणाम होणे. **rebound** /'रीबाउन्ड्/ *ना* (*वाक्प्र*) **on the 'rebound** तुटलेल्या नात्याचे सल मनात वागवीत.

rebuff /रि'बफ्/ *ना* [*गण*] कठोरपणे दिलेला नकार. **rebuff** *क्रि* [*सक*] नकार देणे, झिडकारणे.

rebuke /रि'ब्यूक्/ *क्रि* [*सक*] (*औप*) कानउघडणी करणे, फैलावर घेणे : *He was ~d for being late, उशिरा येण्याबद्दल त्याची हजेरी घेतली गेली किंवा त्याला कानपिचक्या मिळाल्या.* **rebuke** *ना* [*गण, अगण*] कानउघाडणी, दम.

recall /रि'कॉऽल्/ *क्रि* [*सक*] १ आठवणे, आठवण येणे. २ माघारी बोलावणे. **recall** /तसेच 'रीकॉऽल्/ *ना* १ [*अे.व*] परत येण्याची आज्ञा. २ [*अगण*] आठवण्याची शक्ती, स्मरणशक्ती.

recap /'रीकॅप्/ *क्रि* (**-pp-**) [*अक, सक*] (*अनौप*) RECAPITULATE चा संक्षेप.

recapitulate /,रीक'पिचुलेइट्/ *क्रि* [*अक, सक*] मुख्य मुद्दे पुन्हा सांगणे, पुनरावृत्ती करणे. **recapitulation** /,रीकपिचु'लेइशन्/ *ना* [*गण, अगण*] पुनरावृत्ती.

recede /रि'सीड्/ *क्रि* [*अक*] १ मागे हटणे, मागे सरणे. २ मागच्या बाजूला उतार असणे, मागे कलणे.

receipt /रि'सीट्/ *ना* १ [*गण*] माल किंवा पैसे मिळाल्याची पावती. २ **receipts** [*ब.व*] उद्योगाला मिळालेला पैसा. ३ [*अगण*] (*औप*) पोच, स्वीकार.

receive /रि'सीव्ह्/ *क्रि* [*सक*] १ (पाठवलेले किंवा दिलेले काही) मिळणे, पावणे, स्वीकारणे. २ अनुभवणे; (दुःख) होणे : *He ~d severe injuries in the crash, त्या अपघातात त्याला गंभीर दुखापती झाल्या.* ३ सभासद किंवा पाहुणा म्हणून स्वीकारणे. ४ (प्रसारित लहरींचे) ध्वनी किंवा चित्र यामधे रूपांतर करणे. **receiver** *ना* [*गण*] १ टेलिफोनमधील ऐकण्याचा भाग, ग्रहणी, ध्वनिग्राहक. २ रेडिओ किंवा दूरदर्शन संच. ३ माल – विशेषतः चोरटा – स्वीकारणारा, घेणारा. ४ **Receiver** दिवाळे निघालेल्या कंपनीचे कामकाज पाहण्यासाठी नियुक्त केलेला अधिकारी, धारक.

recent /'रीसन्ट्/ *वि* नुकताच झालेला, सुरू केलेला, वगैरे, अलिकडच्या काळातील. **recently** *क्रिवि* फार पूर्वी नाही, अलिकडे.

receptacle /रि'सेप्टक्ल्/ *ना* [*गण*] (*औप*) पात्र.

reception /रि'सेप्शन्/ *ना* १ [*गण*] औपचारिक समारंभ. २ [*गण*] स्वागत : *be given a warm ~, हृद्य स्वागत मिळणे.* ३ [*अगण*] हॉटेल, कचेरी वगैरे ठिकाणचा पाहुण्यांना बसायला केलेला स्वागतकक्ष. ४ [*अगण*] आकाशवाणीच्या ध्वनिग्रहणाची किंवा दूरदर्शनच्या चित्रग्रहणाची गुणवत्ता. **receptionist** /-शनिस्ट्/ *ना* [*गण*] हॉटेल वगैरेतील स्वागतकार.

receptive /रि'सेप्टिव्ह्/ *वि* नवीन कल्पनांचे स्वागत करणारा, स्वागतशील.

recess /रि'सेस्; *अमे* 'रीसेस्/ *ना* १ [*गण, अगण*] कामाच्या मधला विश्रांतीचा काळ, मधली सुट्टी. २ [*गण*] भिंतीतील कप्पा. ३ [*गण, बहुधा ब.व*] (*ला*) गुप्त भाग, कोपरा.

recession /रि'सेशन्/ *ना* १ [*गण, अगण*] आर्थिक मंदी. २ [*अगण*] मागे हटणे, पीछेहाट.

recipe /'रेसपि/ *ना* [*गण*] १ एखादा अन्नपदार्थ तयार कसा करायचा याबाबतच्या सूचना, पाककृती. २ (*ला*) एखादी गोष्ट प्राप्त करण्याचा मार्ग : *a ~ for disaster, अनर्थाचा मार्ग.*

recipient /रि'सिपिअन्ट्/ *ना* [*गण*] (*औप*) ज्याला काही मिळते तो माणूस, ग्रहिता, भोक्ता.

reciprocal /रि'सिप्रक्ल्/ *वि* देवाणघेवाणीचा, अन्योन्य, उभयतांतील : *~ trade agreements, देवाणघेवाणीचा किंवा परस्परांतील व्यापार करार.* **reciprocally** /-क्लि/ *क्रिवि* अन्योन्यपणे, उभय पक्षांसाठी.

reciprocate /रि'सिप्रकेइट्/ *क्रि* [*अक, सक*] (*औप*) देवाणघेवाण करणे, आदानप्रदान करणे.

recital /रि'साइट्ल्/ *ना* [*गण*] संगीताचा किंवा काव्यवाचनाचा प्रयोग, जलसा.

recite /रि'साइट्/ *क्रि* [*सक*] १ मोठ्याने कविता वगैरे म्हणणे, तोंडपाठ म्हणणे. २ (नावे, प्रत्यक्ष घटना वगैरेची) यादी देणे, क्रमवार सांगणे. **recitation** /,रेसि'टेइशन्/ *ना* [*गण, अगण*] पठण; क्रमवार सांगणे.

reckless /'रेक्लिस्/ *वि* निष्काळजी, बेफिकीर, बेपर्वा. **recklessly** *क्रिवि* बेफिकिरीने, बिनधास्तपणे. **recklessness** *ना* [*अगण*] बेपर्वाई, बेफिकिरी.

reckon /'रेकन्/ *क्रि* [*सक*] १ (*अनौप*) वाटणे; मानणे : *I ~ we ought to go now, आपण आता जायला हवं असं मला वाटतं.* २ साधारणपणे मोजणे; अंदाज करणे. ३ मिळवणे, हिशेबात धरणे. ४ (*क्रिब*) **reckon on sth** एखादी गोष्ट घडेल यावर अवलंबून राहणे, होईल असे धरून चालणे, भिस्त ठेवणे. **reckon with sb/sth** (**क**) एखाद्याशी गाठ असणे. (**ख**) दखल घेण्याइतका एखादा महत्त्वाचा वाटणे : *a force to be ~ed with, दखल घ्यायला लागेल अशी शक्ती.* **reckoning** *ना* [*अगण*] १ गणती, मोजदाद. २

शेवटची शिक्षा: *the day of '~ing, झाडा देण्याचा दिवस.*

reclaim /रि'क्लेइम्/ *क्रि* [*सक*] १ परत देण्याची मागणी करणे. २ जमीन लागवडीस किंवा वापरास योग्य अशी करणे. **reclamation** /,रेक्ल'मेइशन्/ *ना* [*अगण*] जमीन सुधारणा, पुनःप्रापण करणे.

recline /रि'क्लाइन्/ *क्रि* [*अक*] (*औप*) मागे टेकून बसणे, आडवे होणे.

recluse /रि'क्लूस्/ *ना* [*गण*] एकटा राहणारा आणि इतरांशी संपर्क टाळणारा माणूस, एकांतवासी, विविक्तसेवी, संन्यासी.

recognize /'रेकग्नाइझ्/ *क्रि* [*सक*] १ ओळखणे. २ मान्यता देणे: *refuse to ~ a new government, नवीन सरकारला मानण्यास नकार देणे.* ३ कबूल करण्यास तयार असणे: *~ one's faults, स्वतःचे दोष कबूल/मान्य करणे.* ४ एखाद्याचा सन्मान करून कृतज्ञता व्यक्त करणे. **recognition** /,रेकग्'निशन्/ *ना* [*अगण*] जाणीव; मान्यता. **recognizable** *वि* ओळखण्याजोगा.

recoil /रि'कॉइल्/ *क्रि* [*अक*] भीतीने, घृणेने वगैरे अचानक मागे सरणे. २ (बंदुकीबाबत) गोळी झाडल्यानंतर मागे येणे, हिसका बसणे. **recoil** /'रिकॉइल्/ *ना* [*अगण, अ.व*] भीतीने घेतलेली माघार; हिसका.

recollect /,रेक'लेक्ट्/ *क्रि* [*अक, सक*] आठवण येणे, आठवणे, स्मरण होणे. **recollection** /-'लेक्शन्/ *ना* १ [*गण*] एखाद्या गोष्टीची आठवण, आठव. २ [*अगण*] स्मरणशक्ती.

recommend /,रेक'मेन्ड्/ *क्रि* [*सक*] १ एखाद्याची प्रशंसा करणे, शिफारस करणे. २ सल्ला देणे, सुचवणे: *I ~ leaving/you leave early, (तू) लवकर जाण्याचा मी सल्ला* देईन म्हणजेच *माझ्या दृष्टीनं (तू) लवकर जाणं बरं.* **recommendation** /-मेन्'डेइशन्/ *ना* [*गण, अगण*] शिफारस; सूचना, उपदेश.

recompense /'रेकम्पेन्स्/ *क्रि* [*सक*] (*औप*) कामाचे बक्षीस देणे, मोबदला देणे; नुकसानीची भरपाई देणे. **recompense** *ना* [*अ.व, अगण*] (*औप*) मोबदला; भरपाई.

reconcile /'रेकन्साइल्/ *क्रि* [*सक*] १ खास करून भांडणानंतर सख्य घडवणे, समेट घडवून आणणे. २ दोन परस्परविरोधी वाटणाऱ्या गोष्टींचा मेळ घालणे. ३ **~ oneself to** अप्रिय गोष्ट मुकाट्याने स्वीकारणे. **reconciliation** /,रेकन्,सिलि'अेइशन्/ *ना* [*अगण, गण*] समेट, सलोखा; मेळ.

reconnaissance /रि'कॉनिस्न्स्/ *ना* [*गण, अगण*] टेहळणी.

reconnoitre (*अमे* **-ter**) /,रेक'नॉइट(र्)/ *क्रि* [*अक, सक*] एखाद्या प्रदेशाची किंवा शत्रूच्या ठाण्यांची टेहेळणी करणे, प्रादेशिक विशेष, शत्रूच्या तळाची ताकद वगैरे सारखे विशेष यांची माहिती मिळणे/मिळवणे.

record^1 /'रेकॉऽड्; *अमे* 'रेकर्ड्/ *ना* [*गण*] १ घटना, प्रत्यक्ष परिस्थिती वगैरेची लेखी नोंद. २ एखाद्याच्या भूतकाळाविषयीची किंवा चारित्र्याविषयीची ज्ञात वस्तुस्थिती. ३ आजपर्यंतची सर्वोत्कृष्ट कामगिरी, विक्रम: *a new world ~ in the 100 metres, १०० मीटर शर्यतीतला नवा विक्रम* ○ *~ profits, विक्रमी फायदा.* ४ ध्वनिमुद्रण केलेली प्लॅस्टिकची सपाट गोल तबकडी, ध्वनिमुद्रिका. ५ (*वाक्प्र*) **,off the 'record** अनधिकृत – जाहीर करायचे नाही असे. **on 'record** अधिकृतपणे नोंद केलेले, लेखबद्ध. **'record-player** *ना* [*गण*] ध्वनिमुद्रिका लावण्याचे उपकरण, ग्रामोफोन.

record^2 /रि'कॉऽड्/ *क्रि* १ [*सक*] नंतर वापरण्याकरता किंवा संदर्भाकरता नोंद करून ठेवणे, नोंदणे. २ [*अक, सक*] ध्वनिमुद्रित होणे/करणे, चित्रित होणे/करणे. ३ [*सक*] (मोजमाप करणाऱ्या उपकरणाबाबत) नोंद होणे, मोजमाप दाखवणे.

recorder /रि'कॉऽड(र्)/ *ना* [*गण*] १ ध्वनिमुद्रक, चित्रमुद्रक, लेखित्र. २ एक फुंकून वाजवायचे वाद्य. ३ (*ब्रि*) काही विशिष्ट न्यायालयांतील न्यायाधीश.

recording /रि'कॉऽडिङ्/ *ना* [*गण*] फितीवर किंवा तबकडीवर ध्वनी किंवा छायाचित्र यांचे झालेले मुद्रण.

recount /रि'काउन्ट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) वर्णन करणे, सांगणे.

re-count /,री'काउन्ट्/ *क्रि* [*सक*] पुन्हा

मोजणे, विशेषतः पुन्हा मतमोजणी करणे. **re-count** /'रीकाउन्ट्/ *ना* [*गण*] पुनर्मोजणी.

recoup /रि'कूप्/ *क्रि* [*सक*] (पैसे) परत मिळवणे.

recourse /रि'कॉऽस्/ *ना* (*वाक्प्र*) **have recourse to sth** (*औप*) मदतीसाठी आश्रय घेणे, अवलंब करणे.

recover /रि'कव्ह(र्)/ *क्रि* १ [*अक*] (*from*)// आजारपण वगैरेतून उठणे, सुधारणे. २ [*सक*] (हरवलेले किंवा चोरीस गेलेले काही) परत मिळणे/मिळवणे. ३ [*सक*] (स्वतःवर, स्वतःच्या भावनांवर वगैरे) परत ताबा मिळवणे, आवर घालणे. **recovery** *ना* [*अगण, अे.व*] तब्येतीची सुधारणा; पुनःप्राप्ती.

recreation /,रेक्रि'अेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] खेळ, रंजन किंवा मोकळा वेळ घालवण्याचा मार्ग, करमणूक, मनोरंजन.

recrimination /रि,क्रिमि'नेइश्न्/ *ना* [*गण,* बहुधा *ब.व, अगण*] एकमेकांवर दोषारोप करणे, आरोप-प्रत्यारोप.

recruit /रि'क्रूट्/ *ना* [*गण*] विशेषतः लष्करातील नवीन भरती, नवप्रविष्ट. **recruit** *क्रि* [*अक, सक*] भरती होणे/करणे. **recruitment** *ना* [*अगण*] भरती, सेनाप्रवेश.

rectangle /'रेक्टॅङ्ग्ल्/ *ना* [*गण*] आयत, काटकोन चौकोन. **rectangular** /रेक्'टॅङ्ग्युल(र्)/ *वि* आयताकृती.

rectify /'रेक्टिफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] दुरुस्त करणे : ~ *an error, चूक दुरुस्त करणे.*

rector /'रेक्ट(र्)/ *ना* [*गण*] परगण्याची देखरेख करणारा ख्रिस्ती धर्मगुरू. **rectory** /'रेक्टरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) अशा धर्मगुरूचे निवासस्थान.

rectum /'रेक्टम्/ *ना* [*गण*] (*शरीरशास्त्र*) मोठ्या आतड्याचा खालच्या टोकाकडचा भाग, गुदांच, मलाशय.

recuperate /रि'कूपरेइट्/ *क्रि* [*अक*] (*from*)// (*औप*) आजारानंतर वगैरे पुन्हा तब्येत सुधारणे, तकवा येणे, सावरणे. **recuperation** /रि,कूप'रेइश्न्/ *ना* [*अगण*] प्रकृतीतील सुधारणा.

recur /रि'कऽ(र्)/ *क्रि* (**-rr-**) [*अक*] पुन्हा घडणे, पुनरावृत्ती होणे. **recurrence** /रि'करन्स्/ *ना* [*गण, अगण*] पुनरावृत्ती, आवर्तन. **recurrent** /रि'करन्ट्/ *वि* पुनरावृत्त, पुन्हापुन्हा येणारा.

recycle /,री'साइक्ल्/ *क्रि* [*सक*] एकदा वापरलेल्यावर प्रक्रिया करून पुन्हा वापर करण्यासाठी तयार करणे, दुसऱ्यांदा वापरण्यासाठी प्रक्रिया करणे.

red /रेड्/ *वि* (**~der, ~dest**) १ लाल, तांबडा, रक्त. २ (चेहेऱ्याबाबत) रागाने किंवा गोंधळल्याने लाल झालेला, आरक्त. ३ (केसांबाबत) तपकिरी, तांबूस. ४ **Red** (*अनौप*) साम्यवादी. ५ (*वाक्प्र*) **red 'herring** मुख्य मुद्द्यापासून दुसरीकडे लक्ष उडवणारी असंगत गोष्ट. **,red 'tape** विलंब लावणारे अनावश्यक नियम वगैरे, दप्तरदिरंगाई, लालफीत. **red** *ना* १ [*गण, अगण*] लाल रंग. २ [*अगण*] लाल रंगाचा वेष : *dressed in ~, लाल पोषाख केलेला.* ३ **Red** [*गण*] (*अनौप*) कम्युनिस्ट, लालभाई. ४ (*वाक्प्र*) **in the 'red** कर्जबाजारी. **'redhead** *ना* [*गण*] डोक्यावर तांबूस केस असणारी व्यक्ती. **,red-'hot** *वि* तापून लाल झालेला, जळजळीत.

redden /'रेड्न्/ *क्रि* [*अक, सक*] लाल होणे/करणे.

redeem /रि'डीम्/ *क्रि* [*सक*] १ पैसे देऊन परत घेणे किंवा सोडवून आणणे, विमोचन करणे. २ वाईटपणा कमी करणे : *a film with no ~ing features, भिकारपणा कमी करणारी काहीही अंगे नसणारा चित्रपट.* **redemption** /रि'डेम्प्श्न्/ *ना* [*अगण*] सुटका, सोडवणूक, विमोचन.

redouble /,री'डब्ल्/ *क्रि* [*सक*] पुष्कळ वाढवणे, दामदुप्पट करणे : ~ *one's efforts, प्रयत्न वाढवणे.*

redress /रि'ड्रेस्/ १ *क्रि* [*सक*] (*औप*) अन्याय दूर करणे. २ (*वाक्प्र*) **redress the 'balance** पुन्हा समान करणे, तफावत दूर करणे. **redress** *ना* [*अगण*] (*औप*) अन्याय दूर करण्यास वापरलेला पैसा वगैरे, केलेली भरपाई.

reduce /रि'ड्यूस्; *अमे* -'डूस्/ *क्रि* [*सक*] १ कमी करणे, घटवणे. २ (*to*)// (बहुधा कर्मणी) एखाद्याला एखाद्या अवस्थेला आणून ठेवणे, एखाद्याची दशा करणे : *He was ~d to tears, त्याला टिपं गाळायला लावली.* **reduction** /रि'डैक्शन्/ *ना* [*गण, अगण*] घट, कमी करणे : *~s in price, किमतीतील घट.* २ [*गण*] चित्र, नकाशा वगैरेची संक्षिप्त आवृत्ती, आकारान्त.

redundant /रि'डैन्डन्ट्/ *वि* १ अनावश्यक म्हणून नोकरीवरून काढून टाकलेला. २ अनावश्यक. **redundancy** /-डन्सि/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) अनावश्यकता.

reed /रीड्/ *ना* [*गण*] १ पाण्याजवळ वाढणारी गवतासारखी एक वनस्पती, लव्हाळे. २ (काही वायुवाद्यातील) कंप पावून वाजणारी धातूची किंवा लाकडाची चकती.

reef /रीफ्/ *ना* [*गण*] समुद्राच्या पृष्ठभागावरची किंवा पृष्ठभागाखालची खडकांची किंवा वाळूच्या पदरांची ओळ, प्रस्तर, खराबा, प्रवाळी.

reek /रीक्/ *ना* [*अे.व*] घाणेरडा वास, दर्प, भपकारा. **reek** *क्रि* [*अक*] (*of*)// दर्प येणे.

reel^{1} /रील्/ *ना* [*गण*] १ दोरा, फीत, तार वगैरे गुंडाळण्याचे रीळ. २ रीळावरील दोरा, वायर, फीत वगैरे. **reel** *क्रि* १ [*सक*] *in/ out*// रिळावर गुंडाळणे किंवा रिळातून काढणे. २ (*क्रिब*) **reel sth off** एखादी गोष्ट एका दमात भरकन् सांगणे, भडाभडा म्हणणे.

reel^{2} /रील्/ *क्रि* [*अक*] १ भेलकंडणे, झोकांड्या जाणे; डोलणे. २ (*ला*) (मनाबाबत) गोंधळ उडणे.

refectory /रि'फेक्ट्रि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) महाविद्यालयातील वगैरे भोजनगृह, उपाहारशाला.

refer /रि'फऽ(र्)/ *क्रि* (**-rr-**) १ [*अक*] *to*// **(क)** एखाद्याविषयी बोलणे; उल्लेख करणे. **(ख)** एखाद्याबाबत असणे, एखाद्याविषयी असणे; संबंधित असणे, संदर्भात असणे. २ [*अक*] *to*// (पुस्तकाचा वगैरे) माहितीसाठी आधार घेणे. ३ [*सक*] *to*// एखाद्याला एखाद्याकडे मदतीसाठी, सल्ल्यासाठी वगैरे पाठवणे.

referee /,रेफ'री/ *ना* [*गण*] १ (*क्रीडा*) क्रीडांगणावर खेळाचे नियंत्रण करणारा माणूस, पंच, परीक्षक. २ वर्तणूक, कार्यकुशलता किंवा स्वभावाबाबतचे प्रशस्तिपत्र देणारा माणूस.

reference /'रेफरन्स्/ *ना* १ [*गण, अगण*] उल्लेख. २ [*गण*] माहितीचा उगम सांगणारी टीप वगैरे, संदर्भ. ३ [*गण*] वर्तणूक, कार्यकुशलता किंवा स्वभावाबाबतचे प्रशस्तिपत्र. ४ (*वाक्प्र*) **in/with reference to sth** (विशेषतः *वाणिज्य*) एखाद्या गोष्टीविषयी, एखाद्या गोष्टीच्या संदर्भात. **'reference book** *ना* [*गण*] विश्वकोष, शब्दकोश यासारखा विशिष्ट माहितीसाठी बघावयाचा ग्रंथ, संदर्भग्रंथ.

referendum /,रेफ'रेन्डम्/ (*ब.व* **-da** /-ड/ किंवा **-dums**) *ना* [*गण*] एखाद्या विशिष्ट राजकीय मुद्द्यावर सर्व लोकांनी व्यक्त केलेले मत, सार्वमत, जननिर्देश.

refine /रि'फाइन्/ *क्रि* [*सक*] १ शुद्ध करणे. २ चुका काढून सुधारणा करणे. **refined** *वि* १ सुशिक्षित आणि सभ्य, सुसंस्कृत. २ शुद्ध केलेला. **refinement** *ना* १ [*अगण*] शुद्धीकरण, परिष्करण. २ [*अगण*] सुसंस्कृतपणा. ३ [*गण*] सुधारणा, चांगला बदल, चांगली भर. **refinery** *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) तेल, साखर वगैरे शुद्ध करण्याची जागा, परिष्करणी.

reflate /,री'फ्लेइट्/ *क्रि* [*अक, सक*] (अर्थव्यवस्थेत) पैशाचा साठा वाढवणे, चलनवाढ करणे. **reflation** /री'फ्लेइश्न्/ *ना* [*अगण*] सौम्य चलनवाढ.

reflect /रि'फ्लेक्ट्/ *क्रि* १ [*सक*] (प्रतिमा, ध्वनी, उष्णता वगैरे) परावर्तित करणे. २ [*सक*] (*ला*) स्वरूप दाखवणे; व्यक्त करणे, दाखवणे : *The book faithfully ~s his ideas, पुस्तकातून त्याच्या कल्पना स्पष्टपणे प्रतिबिंबित होतात.* ३ [*अक*] (*on*)// एखाद्या गोष्टीवर खूप विचार करणे, चिंतन करणे, मनन करणे. ४ (*क्रिब*) **reflect on sb/sth** एखाद्या गोष्टीबाबत विशिष्ट मत होणे. **reflector** *ना* [*गण*] उष्णता, प्रकाश, ध्वनी परावर्तित करणारी वस्तू, परावर्तक.

reflection /रि'फ्लेक्श्न्/ *ना* १ [*गण*] आरशातील वगैरे प्रतिबिंब. २ [*अगण*]

प्रकाशाचे वगैरे परावर्तन. ३ [*गण, अगण*] गाढ विचार : *on ~, खूप विचारांती.*

reflex /'रीफ्लेक्स्/ [*गण*] (तसेच **'reflex action**) एकाएकी अहेतुकपणे एखाद्या गोष्टीला प्रतिसाद म्हणून होणारी क्रिया – उदा शिंक, प्रतिक्षिप्त क्रिया, प्रतिक्षेप.

reflexive /रि'फ्लेक्सिव्ह/ *ना* [*गण*], *वि* (*व्याकरण*) क्रियेचा परिणाम कर्त्यावर झाला आहे असे दाखवणारा (शब्द), कर्तृवाचक, निजवाचक : *a ~ verb, निजवाचक किंवा आत्मवाचक क्रियापद* ○ *In 'I cut myself', 'myself' is a ~ pronoun, 'I cut myself' या वाक्यात myself हे निजवाचक सर्वनाम आहे.*

reform /रि'फॉऽम्/ *क्रि* [*अक, सक*] वर्तन सुधारणे; सुधारणा करणे. **reform** *ना* [*गण, अगण*] कायदा, समाज व्यवस्था यातील सुधारणा. **reformer** *ना* [*गण*] सुधारक.

re-form /,री'फॉऽम्/ *क्रि* [*अक, सक*] पुन्हा करणे, पुन्हा बनवणे : *The army ~ed and attacked, सैन्य पुन्हा एकत्र झाले आणि त्याने हल्ला केला.*

reformation /,रेफ'मेइशन्/ *ना* १ [*गण, अगण*] सुधारणा – विशेषतः वर्तनातील. २ **the Reformation** [*अे.व*] १६ व्या शतकातील युरोपातील धर्मसुधारणेची चळवळ – प्रोटेस्टन्ट चर्चची स्थापना यातूनच झाली.

refract /रि'फ्रॅक्ट्/ *क्रि* [*सक*] प्रकाशकिरण पाणी, काच वगैरेतून जाताना त्याचे वक्रीभवन होणे. **refraction** /-क्शन्/ *ना* [*अगण*] (प्रकाशकिरणांचे) वक्रीभवन, प्रणमन.

refrain^1 /रि'फ्रेइन्/ *क्रि* [*अक*] (*from*)// (*औप*) एखादी गोष्ट न करणे.

refrain^2 /रि'फ्रेइन्/ *ना* [*गण*] गाण्याचे ध्रुपद.

refresh /रि'फ्रेश्/ *क्रि* [*सक*] १ जोम आणणे, नवीन शक्ती आणणे, ताजेतवाने करणे. २ (*वाक्प्र*) **refresh one's memory** टीपा वगैरे पाहून प्रमुख मुद्द्यांची आठवण करून घेणे, स्मरण उजळणे. **re'fresher course** *ना* [*गण*] नवीन प्रगतीची वगैरे माहिती देणारा अभ्यासक्रम, उजळणी पाठ्यक्रम. **refreshing** *वि* १ ताजेतवाने करणारा, टवटवी आणणारा. २ (*ला*) वेगळा म्हणून स्वागतार्ह आणि कुतुहल वाढवणारा. **refreshment** *ना* १ (*औप*) ताजेतवानेपणा. २ **refreshments** [*ब.व*] खाणेपिणे, अल्पोपहार, रसपान.

refrigerate /रि'फ्रिजरेइट्/ *क्रि* [*सक*] अन्नपदार्थ टिकवण्यासाठी किंवा गोठवण्यासाठी थंड करणे. **refrigeration** /रि,फ्रिज'रेइशन्/ *ना* [*अगण*] थंड करणे, प्रशीतन. **refrigerator** *ना* [*गण*] अन्न ठेवण्याची शीतपेटी, प्रशीतक.

refuel /,री'फ्यू.अल्/ *क्रि* (**-ll-**; *अमे* **-l-**) [*अक, सक*] अधिक इंधन पुरवणे, इंधन भरणे.

refuge /'रेफ्यूज्/ *ना* [*गण, अगण*] धोक्यापासून संरक्षण (देणारी जागा), आसरा, आश्रय.

refugee /,रेफ्यु'जी/ *ना* [*गण*] राजकीय किंवा धार्मिक कारणांसाठी देश सोडायला लागलेला माणूस, निर्वासित.

refund /'रीफन्ड्/ *ना* [*गण*] पैसे परत करणे, परतावा. **refund** /रि'फन्ड्/ *क्रि* [*सक*] (पैसे) परत करणे.

refusal /रि'फ्यूझ्ल्/ *ना* [*गण, अगण*] नकार.

refuse^1 /रि'फ्यूझ्/ *क्रि* [*अक, सक*] न देणे, नकार देणे, अस्वीकार करणे, न करणे : *~ permission, परवानगी नाकारणे* ○ *~ to help, मदत करायला नाकारणे.*

refuse^2 /'रेफ्यूस्/ *ना* [*अगण*] वाया गेलेले द्रव्य; टाकाऊ पदार्थ, कचरा.

regain /रि'गेइन्/ *क्रि* [*सक*] परत मिळणे; परत मिळवणे : *~ one's strength, ताकद परत मिळवणे.*

regal /'रीग्ल्/ *वि* राजाचा किंवा राणीचा, राजाला किंवा राणीला योग्य असा, राज-; भव्य.

regalia /रि'गेइलिअ/ *ना* [*अगण*] राजाराणीचा वगैरे पारंपरिक आणि समारंभाचा पोषाख, राजवेष.

regard^1 /रि'गाड्/ *क्रि* [*सक*] *as*// मानणे, समजणे : *She is ~ed as the best teacher, ती सर्वात चांगली शिक्षिका मानली जाते.* **regarding** (तसेच **as regards**) *शब्दयो* -बाबत; -संबंधी.

regard^2 /रि'गाड्/ *ना* १ [*अगण*] लक्ष; काळजी : *with no ~ for safety, सुरक्षिततेची*

काहीही काळजी न करता. २ [*अगण*] आदर : *have a high ~ for sb, एखाद्याविषयी खूप आदर असणे.* ३ **regards** [*ब.व*] स्नेहभाव, प्रेमभाव. ४ (*वाक्प्र*) **in/with regard to sth** एखाद्या गोष्टीबाबत; -संबंधी. **regardless** (*of*) *क्रिवि* (एखाद्या गोष्टीकडे) अजिबात लक्ष न देता.

regatta /रि'गॅट/ *ना* [*गण*] बोटींची शर्यत, नौका स्पर्धा.

regency /'रीजन्सि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*गण*] राजाच्या नावाने चाललेला कारभार (किंवा त्याचा काळ), राजमुखत्याराचा अवधी. २ **the Regency** [*अे.व*] ब्रिटनमधील १८१०-२० हा कालखंड.

regenerate /रि'जेनरेइट्/ *क्रि* [*अक, सक*] एखाद्याला पुनर्जीवन देणे, नव्याने उत्साह, शक्ती वगैरे आणणे. **regeneration** /रि,जेन'रेइश्न्/ *ना* [*अगण*] पुनर्जीवन, नवजीवन.

regent /'रीजन्ट्/ *ना* [*गण*] राजा किंवा राणी (वयाने लहान असल्याने किंवा आजारी असल्याने वगैरे) यांच्या वतीने कारभार पाहणारी व्यक्ती, राजमुखत्यार.

reggae /'रेगेइ/ *ना* [*अगण*] वेस्ट इंडीज् बेटांतील लोकप्रिय संगीत आणि नृत्य.

regime /रेइ'जीम्/ *ना* [*गण*] शासन(पद्धती), राज्य(पद्धती), राजवट.

regiment /'रेजिमन्ट्/ *ना* [*गण*] कर्नलच्या हाताखालची सैन्याची तुकडी. **regiment** *क्रि* [*सक*] काटेकोरपणे संघटन करणे, लष्करी खाक्या वापरणे. **regimental** /,रेजि'मेन्ट्ल्/ *वि* सैन्य-तुकडीसंबंधीचा.

region /'रीजन्/ *ना* १ [*गण*] मोठा भाग, भूप्रदेश. २ [*गण*] देशाचा विभाग. ३ (*वाक्प्र*) **in the region of** -च्या दरम्यान, मयदित; साधारणपणे, अंदाजे. **regional** *वि* प्रादेशिक.

register /'रेजिस्ट(र्)/ *ना* [*गण*] १ यादीवही, नोंदवही. २ आवाजाचा किंवा वाद्याचा पल्ला. **register** *क्रि* १ [*अक*] यादीत नाव घालणे, नाव नोंदवणे. २ [*सक*] अधिकृत यादीत (एखाद्याची) रीतसर नोंदणी करणे. ३ [*अक, सक*] (मापनाच्या साधनांबाबत) नोंद होणे, संख्या दाखवणे. ४ [*सक*] चेहऱ्यावर भाव दाखवणे. ५ [*सक*] खास डाकेने पाठवायचे आणि गहाळ झाल्यास पोस्टाकडून भरपाई मिळणारे पत्र धाडणे.

registrar /,रेजि'स्ट्रा(र्)/ *ना* [*गण*] **(क)** अधिकृत कागदपत्रे सांभाळणारा, निबंधक. **(ख)** (भारतात) (विद्यापीठाचा) कुलसचिव.

registration /,रजि'स्ट्रेइश्न्/ *ना* [*अगण*] नाव नोंदणी; नोंद करणे. **regi'stration number** *ना* [*गण*] वाहनावरील ओळख पटविण्याचा क्रमांक, नोंदणी क्रमांक.

registry office /'रेजिस्ट्रि/ *ना* [*गण*] नोंदणी पद्धतीने विवाह करण्याची जागा, जन्म, मृत्यू, विवाह नोंदणी कार्यालय.

regret^1 /रि'ग्रेट्/ *क्रि* (**-tt-**) [*सक*] खेद वाटणे, वाईट वाटणे, दिलगिरी वाटणे : *Later, I ~ted my decision to leave, निघून जाण्याच्या माझ्या निर्णयाचा नंतर मला खेद वाटला किंवा पश्चात्ताप झाला.* **regrettable** *वि* खेदकारक, दुःखद. **regrettably** *क्रिवि* खेदाने.

regret^2 /रि'ग्रेट्/ *ना* [*अगण, गण*] काही गमावल्याचे किंवा अपराध घडल्याचे दुःख, खंत, खेद. **regretful** *वि* दुःखी, दुःखदायक; दिलगीर.

regular /'रेग्युल(र्)/ *वि* १ स्थलदृष्ट्या किंवा कालदृष्ट्या समान अंतरावर पुन्हापुन्हा घडणारे किंवा येणारे असे, नियमित : *~ breathing, नियमित श्वसन.* २ समतोलपणे मांडलेला, प्रमाणबद्ध, रेखीव. ३ नेहमीचा, सर्वसामान्य, नित्य. ४ (*व्याकरण*) (क्रियापदे, नामे वगैरेबाबत) नियमित, नियमानुसारी, नेहमीचे विभक्तीप्रत्यय घेणारी. ५ कायमच्या सैन्यात असणारा : *a ~ soldier, कायम-सैन्यातला शिपाई.* **regular** *ना* [*गण*] १ कायम-सैन्यातील सैनिक. २ (*अनौप*) नेहमीचे गिऱ्हाईक. **regularity** /,रेग्यु'लॅरटि/ *ना* [*अगण*] नियमितपणा. **regularly** *क्रिवि* नियमितपणे.

regulate /'रेग्युलेइट्/ *क्रि* [*सक*] १ नियमित करणे, नियमांनी नियंत्रित करणे. २ (यंत्र) नीट चालवणे, व्यवस्थित करणे, हवा तसा परिणाम घडेल अशा रीतीने लावणे.

regulation /,रेग्यु'लेइश्न्/ *ना* १ [*गण,*

बहुधा *ब.व*] नियम किंवा हुकूम. २ [*अगण*] नियमबद्धता. **regulation** *वि* नियमानुसार : ~ *clothes, नियमानुसार पोषाख.*

rehabilitate /,री·अ'बिलिटेइट्/ *क्रि* [*सक*] (कैद्याला, रोग्याला किंवा विस्थापिताला) पुन्हा सामान्य जीवन जगायला मदत करणे, त्याचे पुनर्वसन करणे, पुनर्स्थापना करणे. **rehabilitation** /,री·अ,बिलि'टेइश्न्/ *ना* [*अगण*] पुनर्वसन.

rehearse /रि'हऽस्/ *क्रि* [*अक, सक*] (नाटक, गाणे वगैरे यांची) तालीम करणे. **rehearsal** *ना* [*गण, अगण*] तालीम.

reign /रेइन्/ *ना* [*गण*] राजाचा किंवा राणीचा सत्तेचा काळ, राजवट, अमदानी, राज्य. **reign** *क्रि* [*अक*] १ राज्य करणे. २ (*ला*) सत्ता असणे, प्रभाव असणे : *Silence ~ed, शांतीचे साम्राज्य होते.*

reimburse /,रीइम्'बऽस्/ *क्रि* [*सक*] (खर्च केलेले किंवा हरवलेले पैसे) परत करणे, मागाहून देणे. **reimbursement** *ना* [*गण, अगण*] परत देणे, प्रतिपूर्ती.

rein /रेइन्/ *ना* [*गण,* बहुधा *ब.व*] घोड्याला नियंत्रणाखाली ठेवण्याकरता वापरायचा लांब, अरुंद पट्टा, घोड्याचा लगाम.

reincarnate /,री'इन्काऽनेइट्/ *क्रि* [*सक*] (बहुधा कर्मणी) (मृत्यूनंतर आत्म्याला) दुसऱ्या शरीरात आणणे, पुनर्जन्म देणे. **reincarnation** /,रीइन्काऽ'नेइश्न्/ *ना* [*अगण, गण*] पुन्हा जन्म घेणे, नवा अवतार.

reindeer /'रेइन्डिअ(र्)/ *ना* [*गण*] (*ब.व* **reindeer**) उत्तरेकडील प्रदेशांमधे आढळणारे शिंगाचे मोठे काळवीट.

reinforce /,रीइन्'फॉऽस्/ *क्रि* [*सक*] भर घालून भरभक्कम करणे, नवीन बळकटी आणणे. **reinforcement** *ना* १ [*अगण*] अधिक बळकटी. २ **reinforcements** [*ब.व*] सैन्याला पाठविलेले जादा सैनिक, कुमक.

reinstate /,रीइन्'स्टेइट्/ *क्रि* [*सक*] एखाद्याला मूळ पदावर किंवा मूळ स्थानावर पुन्हा बसवणे, पुनर्स्थापना करणे. **reinstatement** *ना* [*अगण*] पुनर्स्थापना, पुनःप्रतिष्ठा.

reiterate /री'इटरेइट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) पुन्हापुन्हा म्हणणे, पुनरुच्चार करणे. **reiteration** /री,इट'रेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] पुनरुच्चार.

reject /रि'जेक्ट्/ *क्रि* [*सक*] १ स्वीकारण्यास नकार देणे, अस्वीकार करणे. २ समाधानकारक नाही म्हणून परत पाठवणे किंवा बाजूला फेकणे/टाकणे, नापसंत करणे. **reject** /'रीजेक्ट्/ *ना* [*गण*] अस्वीकार केलेले काही, नापसंत केलेले काही. **rejection** /रि'जेक्श्न्/ *ना* [*अगण, गण*] अस्वीकार; बाजूला टाकणे.

rejoice /रि'जॉइस्/ *क्रि* [*अक*] (*औप*) खूप आनंद करणे किंवा वाटणे. **rejoicing** *ना* [*अगण*] आनंद, हर्ष, मजा.

rejuvenate /रि'जूव्हनेइट्/ *क्रि* [*सक*] पुन्हा सशक्त किंवा तरुण करणे, कायाकल्प घडवणे. **rejuvenation** /रि,जूव्ह'नेइश्न्/ *ना* [*अगण*] पुनर्युवीकरण, कायाकल्प.

relapse /रि'लॅप्स्/ *क्रि* [*अक*] पुन्हा प्रकृती ढासळणे, पुन्हा कुमार्गी लागणे, तब्येत उलटणे, मूळ पदावर येणे. **relapse** *ना* [*गण*] उलटणे, उलट.

relate /रि'लेइट्/ *क्रि* १ [*अक, सक*] (*to*)// एखाद्या गोष्टीशी संबंधित असणे किंवा संबंध जोडणे. २ [*अक*] (*to*)// एखाद्याला समजून त्याच्याशी सहज बोलता येणे. ३ [*सक*] (*औप*) (गोष्ट) सांगणे. **related** *वि* संबंधी, एकाच जातीचा किंवा प्रकारचा.

relation /रि'लेइश्न्/ *ना* १ [*गण*] नातेवाईक, घरचा माणूस. २ [*अगण*] संबंध, नाते. ३ **relations** [*ब.व*] लोकांचे, राष्ट्रांचे वगैरे परस्परांशी असलेले संबंध. ४ (*वाक्प्र*) **in relation to sth** (*औप*) एखाद्या गोष्टीच्या संदर्भात. **relationship** *ना* [*गण*] १ संबंध, नाते. २ दोन माणसांतील किंवा गटांतील भावनिक संबंध, मैत्री. ३ जवळचे संबंध, शारीरिक संबंध.

relative /'रेलटिव्ह्/ *वि* १ दुसऱ्या एखाद्या गोष्टीशी तुलना करता दिसणारा, सापेक्ष. २ *to*// (*औप*) एखाद्या गोष्टीच्या मानाने. **relative** *ना* [*गण*] नातेवाईक. **,relative 'clause** *ना* [*गण*] (*व्याकरण*) संबंधदर्शक किंवा संबंधी सर्वनाम किंवा क्रियापद यांनी जोडले जाणारे उपवाक्य, संबंधी उपवाक्य.

relatively *क्रिवि* बेताचे; अगदी : ~ *cheap food, अगदी स्वस्त अन्न.* ˌ**relative 'pronoun** *ना* [*गण*] (*व्याकरण*) गौणवाक्य प्रधानवाक्याला जोडणारे सर्वनाम, संबंधदर्शक किंवा संबंधी सर्वनाम – उदा *the woman who came* मधील *who.*

relax /रि'लॅक्स्/ *क्रि* १ [*अक, सक*] काळजी दूर करणे, चिंतामुक्त होऊन/करून शांत होणे/करणे, आराम पडणे/पाडणे, विरंगुळा वाटणे. २ [*सक*] (नियम वगैरे) शिथिल करणे. **relaxation** /ˌरीलॅक्'सेइशन्/ *ना* १ [*अगण, गण*] (एक प्रकारचे) मनोरंजन, करमणूक. २ [*अगण*] विरंगुळा; शिथिलता. **relaxed** *वि* मनावर दडपण नसलेला, चिंतामुक्त; शांत.

relay /'रीलेइ/ *ना* १ (क) [*गण, अगण*] एखादी गोष्ट सतत चालू ठेवण्यासाठी अदलाबदली होणारा माणसांचा गट, बदलीचा गट. (ख) **'relay race** [*गण*] संघातील एकेक खेळाडू आळीपाळीने काही ठराविक अंतर कापतो अशी धावण्याची, पोहण्याची वगैरे शर्यत, गटशर्यत. २ [*गण*] संदेश मिळवून तो पुढे पाठवणारी विद्युत संदेश यंत्रणा, अभिचालित्र. **relay** /तसेच रि'लेइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* ~**ed**) [*सक*] (संदेश किंवा ध्वनिक्षेपण) मिळणे किंवा पुढे पाठवणे, सहक्षेपित करणे.

release /रि'लीस्/ *क्रि* [*सक*] १ मुक्त करणे. २ (बातम्या वगैरे) प्रसारित करणे, देणे, जाहीर करणे; उपलब्ध करून देणे, प्रकाशन करणे. ३ सोडणे : ~ *the brake, ब्रेक सोडणे.* **release** *ना* १ [*अगण, गण*] मोचन, मुक्त करणे, सुटका. २ [*गण*] नव्या चित्रपटाचे, ध्वनिमुद्रिकेचे वगैरे प्रकाशन.

relegate /'रेलिगेइट्/ *क्रि* [*सक*] खालच्या जागेवर किंवा कमी महत्त्वाच्या जागेवर पाठवणे, अपक्षेप करणे. **relegation** /ˌरेलि'गेइशन्/ *ना* [*अगण*] खालच्या जागेवर पाठवणी, अपक्षेप.

relent /रि'लेन्ट्/ *क्रि* [*अक*] कळवळा येणे, पाघळणे, मऊ होणे. **relentless** *वि* न थांबणारा, सततचा, अखंड; कठोर, निर्दय.

relevant /'रेलव्हन्ट्/ *वि* चर्चेच्या विषयाशी संबंधित, संबद्ध, प्रस्तुत. **relevance** /-व्हन्स्/ *ना* [*अगण*] प्रस्तुतता, सुसंबद्धपणा. **relevantly** *क्रिवि* सुसंबद्धपणे, मुद्द्याला धरून.

reliable /रि'लाइअब्ल्/ *वि* अवलंबून राहण्याजोगा, विश्वसनीय, खात्रीलायक. **reliability** /रिˌलाइअ'बिलटि/ *ना* [*अगण*] खात्री, विश्वसनीयता, भरवसा. **reliably** *क्रिवि* विश्वसनीय रीतीने, खात्रीलायकपणे.

reliant /रि'लाइअन्ट्/ *वि on//* एखाद्यावर अवलंबून असा. **reliance** /-अन्स्/ *ना* [*अगण*] अवलंबून असणे.

relic /'रेलिक्/ *ना* [*गण*] १ पूर्वीच्या काळातले मागे राहिलेले काहीतरी, अवशेष. २ जनमानसात पूजनीय अशा महान व्यक्तीच्या शरीराचा भाग किंवा त्याची एखादी वस्तू, प्रेषित, संत वगैरेचा पवित्र देहावशेष.

relief^1 /रि'लीफ्/ *ना* १ [*अगण, अे.व*] दुःख, चिंता वगैरेपासून सुटका, परिहार : ~ *of suffering, दुःखपरिहार.* २ [*अगण*] संकटात सापडलेल्या लोकांना मदत. ३ [*गण*] दुसऱ्याच्या कामाची जबाबदारी घेणारा माणूस.

relief^2 /रि'लीफ्/ *ना* [*अगण, गण*] उठावाचे खोदीव काम. **re'lief map** *ना* [*गण*] रंगाने किंवा शेडिंगने वगैरे डोंगराची उंची वगैरे दाखविणारा नकाशा, उठावाचा नकाशा.

relieve /रि'लीव्ह्/ *क्रि* [*सक*] १ (दुःख, वेदना) कमी करणे, शमवणे, उतार पाडणे : *medicine to ~ pain, वेदनाशामक औषध.* २ एखाद्याच्या कामाचा बोजा स्वतःवर घेणे. ३ विविधता आणणे, सरसता आणणे. ४ (*क्रिब*) **relieve sb of sth** (*औप*) एखाद्याला सेवेतून किंवा नोकरीतून मुक्त करणे, काढून टाकणे : *He was ~ed of his duties, त्याला त्याच्या जबाबदारीतून किंवा कामातून मुक्त करण्यात आले.* **relieved** *वि* चिंता दूर झालेला, मनावरचा ताण गेलेला.

religion /रि'लिजन्/ *ना* १ [*अगण*] देवावरील श्रद्धा आणि त्याचे पूजन. २ [*गण*] विशिष्ट श्रद्धा आणि पूजाविधी, धर्म.

religious /रि'लिजस्/ *वि* १ धर्मविषयक, धर्माचा. २ धर्मावर श्रद्धा ठेवून त्याप्रमाणे आचरण करणारा, धार्मिक, श्रद्धाळू. **religiously** *क्रिवि* नित्यनेमाने.

relinquish /रि'लिङ्क्विश्/ *क्रि* [*सक*]

(*औप*) सोडून देणे; देऊन टाकणे, त्याग करणे : ~ *one's duties, स्वकर्तव्ये सोडून देणे.*

relish /'रेलिश्/ *क्रि* [*सक*] आस्वाद घेणे, रुचणे, आनंद घेणे : *I don't ~ the idea of getting up so early, इतक्या लवकर सकाळी उठण्याची कल्पना मला फारशी रुचत नाही.* **relish** *ना* १ [*अगण*] खूप मजा, रुची, आवड. २ [*गण*] अन्नाची रुची वाढवणारा सॉससारखा पदार्थ.

reluctant /रि'लक्टन्ट्/ *वि* नाखूष, राजी नसलेला. **reluctance** /-टन्स्/ *ना* [*अगण*] नाखुषी, नाराजी. **reluctantly** *क्रिवि* नाखुषीने.

rely /रि'लाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*अक*] *on*// एखाद्यावर अवलंबून राहणे, विसंबणे; विश्वास टाकणे.

remain /रि'मेइन्/ *क्रि* १ (बहुधा विशेषणासह वापर) राहणे : ~ *silent, गप्प राहणे.* २ [*अक*] मागे उरणे, शिल्लक राहणे : *Not much ~ed of the house after the fire, आगीनंतर त्या घराचे फारसे काही शिल्लक राहिले नाही* ○ *She ~ed in the house after her friends had left, मैत्रिणी निघून गेल्यावर घरात ती मागे राहिली.* ३ [*अक*] करायचे बाकी राहणे : *There are only a couple of jobs ~ing now, आता एकदोनच कामे करायची बाकी उरलीयेत.* **remainder** /-ड(र्)/ *ना* [*अे.व,* तसेच ब.व क्रियापदासह अे.व] बाकी, शेष, राहिलेला भाग. **remains** *ना* [*ब.व*] १ मागे उरलेले किंवा शिल्लक राहिलेले भाग, अवशेष. २ (*औप*) प्रेत, शव, पार्थिव देह.

remand /रि'मान्ड्; *अमे* -'मॅन्ड्/ *क्रि* [*सक*] आरोपीला कोर्टातून पुढच्या तारखेपर्यंत परत तुरुंगात नेणे, तुरुंगात परत पाठवणे. **remand** *ना* (*वाक्प्र*) **on remand** सुनावणीसाठी कोर्टात दाखल केलेला.

remark /रि'माक्/ *क्रि* [*अक, सक*] (*on*)// शेरा मारणे/लिहिणे, टिप्पणी करणे : *They all ~ed on his youth, ते सर्व त्याच्या तारुण्याबाबत बोलले.* **remark** *ना* [*गण*] बोललेले काही; शेरा, टिप्पणी. **remarkable** *वि* उल्लेखनीय, लक्षणीय; विलक्षण. **remarkably** *क्रिवि* लक्षात येईल अशा रीतीने, उल्लेखनीय पद्धतीने.

remedial /रि'मीडिअल्/ *वि* उपायकारक, इलाजाचा.

remedy /'रेमडि/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) १ वठणीवर आणण्याचा मार्ग, उपाय, इलाज. २ उपाययोजना, बरे करण्याचा मार्ग, इलाज. **remedy** *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] चूक दुरुस्त करणे, सुधारणे.

remember /रि'मेम्ब(र्)/ *क्रि* १ [*अक, सक*] लक्षात ठेवणे, स्मरण येणे; आठवणे, आठवण होणे. २ [*सक*] चिरीमिरी देणे, बक्षिसी देणे. ३ (*क्रिब*) **remember sb to sb** एखाद्याला एखाद्यामार्फत सदिच्छा पाठवणे. **remembrance** /-ब्रन्स्/ *ना* (*औप*) १ [*अगण*] आठवण. २ [*गण*] एखाद्याची आठवण म्हणून दिलेली किंवा जपलेली वस्तू.

remind /रि'माइन्ड्/ *क्रि* [*सक*] १ (एखाद्याला) आठवण करून देणे, स्मरण देणे : *R~ me to buy some more milk, will you? मला थोडं जास्त दूध घेण्याची आठवण कर, करशील ना?* २ *of*// एखाद्या गोष्टीने दुसऱ्या एखाद्या गोष्टीची आठवण करून देणे : *He ~s me of his brother, त्याला पाहिलं की त्याच्या भावाची मला आठवण होते.* **reminder** *ना* [*गण*] स्मरण करून देणारी गोष्ट – उदा स्मरणपत्र.

reminisce /,रेमि'निस्/ *क्रि* [*अक*] (*about*)// पूर्वस्मृतींना उजळा देणे, जुन्या आठवणीत रमणे. **reminiscences** *ना* [*ब.व*] जुन्या आठवणी, पूर्वस्मृती. **reminiscent** *वि of*// आठवण करून देणारे, स्मृती देणारे.

remission /रि'मिशन्/ *ना* १ [*अगण, गण*] चांगल्या वर्तणुकीबद्दल तुरुंगवासात मिळालेली सूट, शिक्षेतील माफी. २ [*अगण*] क्षमा, माफी.

remit /रि'मिट्/ *क्रि* (**-tt-**) [*सक*] (*औप*) १ पोस्टाने (पैसे) पाठवणे. २ (देणे किंवा शिक्षा) रद्द करणे, माफ करणे. **remittance** *ना* [*गण*] पाठवलेले पैसे, वित्तप्रेषण.

remnant /'रेम्नन्ट्/ *ना* [*गण*] राहिलेला लहान भाग, अवशेष, अल्प बाकी.

remonstrate /'रेमन्स्ट्रेइट्; *अमे* रि'मॉन्स्ट्रेइट्/ *क्रि* [*अक*] (*with*)// (*औप*)

एखाद्याजवळ एखाद्या गोष्टीबाबत तीव्र निषेध नोंदवणे, जोराची तक्रार करणे : *She ~d with him about being late again,* पुन्हा उशिरा येण्याबद्दल तिने त्याच्याकडे कडक शब्दांत निषेध नोंदविला.

remorse /रि'मॉऽस/ *ना* [*अगण*] हातून घडलेल्या प्रमादाबद्दल वाटणारे अतीव दुःख, पश्चात्ताप. **remorseful** *वि* पश्चात्तापदग्ध. **remorseless** *वि* १ निर्दय, कठोर. २ न थांबणारा आणि तापदायक.

remote /रि'मउट्/ *वि* **(~r, ~st)** १ (*from*)// वस्तीपासून खूप दूर, लांबचा. २ लांब ठिकाणचा, प्राचीन काळातला. ३ (*from*)// एखाद्या गोष्टीशी न जोडलेला, विलग, असंलग्न. ४ (व्यक्तीबाबत) तुटक, कोरडा; इतरांत न मिसळणारा. ५ अत्यल्प : *a ~ possibility, अत्यल्प शक्यता.* **re,mote con'trol** *ना* [*अगण*] दूर अंतरावरून रेडिओ किंवा विद्युत संदेशनांनी एखाद्या उपकरणावर ठेवलेले नियंत्रण, दूरवर्ती नियंत्रण. **remotely** *क्रिवि* अल्पांशाने. **remoteness** *ना* [*अगण*] दूरता; प्राचीनत्व; विलगपणा.

remove /रि'मूव्ह्/ *क्रि* [*सक*] १ दूर करणे. २ काढून टाकणे, बाजूला करणे : *~ stains/doubts, डाग काढणे/शंका दूर करणे.* ३ कामावरून कमी करणे. **removal** *ना* १ [*अगण*] दूर करणे. २ नव्या जागेत सामान हालवणे. **removed** *वि from*// अगदी भिन्न/वेगळा. **remover** *ना* [*गण, अगण*] काढणारा, दूर करणारा : *a 'stain ~r, डाग काढणारा.*

remunerate /रि'म्यूनरेइट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) (एखाद्याला) कामाचा मोबदला देणे. **remuneration** /रि,म्यून'रेइशन्/ *ना* [*गण, अगण*] मोबदला, पारिश्रमिक. **remunerative** /-अरटिव्ह्; *अमे* -अरेइटिव्ह्/ *वि* किफायतशीर, फायदेशीर.

renaissance /रि'नेइसन्स्; *अमे* 'रेनसान्स्/ *ना* १ **the Renaissance** [*अे.व*] १४ व्या-१६ व्या शतकातील साहित्य आणि कला याबाबत युरोपात नव्याने जागृत झालेले कुतुहल, प्रबोधन. २ [*गण*] अशा तऱ्हेचे नव्याने जागे झालेले कुतुहल, नवजिज्ञासा.

renal /'रीन्ल्/ *वि* (*शरीररचनाशास्त्र*) किडनीचा किंवा वृक्काचा.

render /'रेन्ड(र्)/ *क्रि* [*सक*] (*औप*) १ करणे : *The shock ~ed him speechless, त्या धक्क्याने त्याची वाचा गेली म्हणजे त्याला बोलता येईनासे केले.* २ देणे : *a reward for services ~ed, दिलेल्या सेवेबद्दलचे बक्षीस.* ३ प्रयोग करणे, सादर करणे. ४ भाषांतर करणे. **rendering** *ना* [*गण*] प्रयोग.

rendezvous /'रॉन्डिव्हू/ *ना* [*गण*] (*ब.व* **rendezvous** /-व्हूझ्/) १ भेट (किंवा तिची जागा), संकेतस्थळ. २ लोक अनेकदा भेटतात ती जागा, भेटण्याचे स्थळ. **rendezvous** *क्रि* [*अक*] गुप्तस्थळी भेटणे, संकेतस्थळी भेटणे.

rendition /रेन्'डिशन्/ *ना* [*गण*] (*औप*) प्रयोग.

renegade /'रेनिगेइड्/ *ना* [*गण*] स्वतःची राजकीय मते किंवा धर्मश्रद्धा यांना सोडचिठ्ठी देऊन दुसऱ्या राजकीय किंवा धार्मिक प्रणालीचा अंगिकार करणारा माणूस, पक्षबदलू, धर्मबदलू, तत्त्वभ्रष्ट, पक्षद्रोही.

renew /रि'न्यू; *अमे* -'नू/ *क्रि* [*सक*] १ पुन्हा सुरू करणे : *~ a friendship, मैत्री पुन्हा सुरू करणे.* २ जुन्याच्या जागी तसाच नवा करणे/आणणे. ३ नवीन जोम आणणे. ४ नूतनीकरण करणे; आणखी काळ चालेल असे करणे : *~ a passport, पारपत्राचे किंवा पासपोर्टचे नूतनीकरण करणे.* **renewal** *ना* [*गण, अगण*] नूतनीकरण, नव्याने पुनरुज्जीवन; नव्याने करणे, नवीकरण.

renounce /रि'नाउन्स्/ *क्रि* [*सक*] (*औप*) १ सोडून देणे, टाकणे, त्याग करणे : *~ one's faith, स्वतःचा धर्म/श्रद्धा टाकणे.* २ (हक्क, पद वगैरेचा) अधिकृतपणे त्याग करणे.

renovate /'रेनव्हेइट्/ *क्रि* [*सक*] (जुन्या इमारतीची वगैरे) डागडुजी करून ती नव्यासारखी करणे, (इमारतीचे वगैरे) नूतनीकरण करणे. **renovation** /,रेन'व्हेइशन्/ *ना* [*गण, अगण*] इमारतीचे नूतनीकरण.

renown /रि'नाउन्/ *ना* [*अगण*] (*औप*) प्रसिद्धी, कीर्ती. **renowned** *वि* प्रसिद्ध, प्रख्यात.

rent^1 /रेन्ट्/ *ना* [*गण, अगण*] इमारत वगैरेच्या वापराकरता नियमितपणे दिलेले पैसे, भाडे. **rent** *क्रि* [*सक*] १ भाडे देणे. २ (*out*)// भाड्याने देणे. **rental** *ना* [*गण*] दिलेले भाडे.

rent^2 /रेन्ट्/ *ना* [*गण*] फाटलेला कपडा, कपड्याची फाड.

renunciation /रि,नन्सि'अेइश्न्/ *ना* [*अगण*] (*औप*) एखाद्या गोष्टीचा केलेला त्याग.

reorganize /,री'ऑऽगनाइझ़्/ *क्रि* [*अक, सक*] पुनर्संघटन करणे. **reorganization** /,री,ऑऽगनाइ'झ़ेइश्न्; *अमे* -नि'झ़्-/ *ना* [*अगण, गण*] पुनर्संघटन, पुनर्बांधणी.

Rep *संरू* (*अमे*) Republican प्रजासत्ताकवादी.

rep^1 /रेप्/ *ना* [*गण*] (*अनौप*) REPRESENTATIVE २, कंपनी एजंटचा संक्षेप.

rep^2 /रेप्/ *ना* [*अगण*] (*अनौप*) REPERTORY, नाटकसंच याचा संक्षेप.

repair /रि'पेअ(र्)/ *क्रि* [*सक*] (मोडलेली किंवा कुचकामी झालेली वस्तू) पुन्हा चांगल्या स्थितीला आणणे, नीट करणे, बिघाड काढणे; दुरुस्त करणे. **repair** *ना* १ [*गण, अगण*] दुरुस्ती : *His car is under ~ at the moment, याक्षणी त्याच्या गाडीची दुरुस्ती चालली आहे.* २ (*वाक्प्र*) **in good/bad re'pair** चांगल्या/वाईट अवस्थेत.

reparation /,रेप'रेइश्न्/ *ना* [*गण*] (*औप*) नुकसान भरपाई करण्यासाठी दिलेली रक्कम किंवा केलेले काम, हानिपूर्ती.

repatriate /री'पॅट्रिअेइट्; *अमे* -'पेइट्-/ *क्रि* [*सक*] एखाद्याला त्याच्या देशात परत पाठवणे. **repatriation** /,रीपॅट्रि'अेइश्न्; *अमे* -'पेइट्-/ *ना* [*अगण*] स्वदेशी परत पाठवणे.

repay /रि'पेइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **repaid** /रि'पेइड्/) [*सक*] १ (पैसे) परत करणे. २ परतफेड करणे : *How can I ~ your kindness? मी तुझ्या उपकाराची परतफेड कशी करू शकतो?* **repayment** *ना* [*गण, अगण*] पैसे परत करणे, परतफेड.

repeal /रि'पील्/ *क्रि* [*सक*] (*कायदा*) अधिकृतपणे रद्द करणे, मागे घेणे. **repeal** *ना* [*अगण*] कायदा रद्द करणे, कायद्याचे निरसन.

repeat /रि'पीट्/ *क्रि* १ [*सक*] पुन्हा करणे किंवा म्हणणे. २ **~ oneself** पूर्वी केलेलेच/म्हटलेलेच पुन्हा करणे/म्हणणे. **repeat** *ना* [*गण*] पुनरुक्ती, पुन्हा करणे, पुन्हा केलेले/बोललेले काहीतरी. **repeated** *वि* पुन्हा पुन्हा केलेले/म्हटलेले. **repeatedly** *क्रिवि* पुन्हा पुन्हा.

repel /रि'पेल्/ *क्रि* (**-ll-**) [*सक*] १ परतविणे, मागे हटवणे. २ उबग आणणे, तिटकारा उत्पन्न करणे. **repellent** *वि* तिटकारा आणणारा, तिरस्करणीय. **repellent** *ना* [*गण, अगण*] कीटकांना दूर पिटाळणारे द्रव्य, जंतुप्रतिसारक.

repent /रि'पेन्ट्/ *क्रि* [*अक, सक*] (*of*)// (*औप*) (केलेल्या चुकीबाबत) दुःख व पश्चात्ताप वाटणे. **repentance** *ना* [*अगण*] पश्चात्ताप. **repentant** *वि* पश्चात्तापदग्ध, पस्तावलेला.

repercussion /,रीप'कश्न्/ *ना* [*गण, बहुधा ब.व*] दूरगामी अप्रत्यक्ष परिणाम.

repertoire /'रेपत्वा(र्)/ *ना* [*गण*] एखादा नट करू शकणारी सर्व नाटके किंवा एखादा गायक गाऊ शकणारी सर्व गीते.

repertory /'रेपट्रि; *अमे* -टॉऽरि-/ *ना* [*अगण*] तेच नट वापरून थोडक्या वेळात केलेली बरीच नाटके, नाटकसंच : *a ~ company, कमी नटांत अनेक नाटके करणारी नाटक मंडळी.*

repetition /,रेपि'टिश्न्/ *ना* [*गण, अगण*] पुनरावृत्ती. **repetitive** /रि'पेटटिव्ह्/ *वि* त्याच त्याच गोष्टी परत येणारा, पुनरावृत्ती असलेला.

rephrase /,री'फ्रेइझ़्/ *क्रि* [*सक*] निराळ्या शब्दांत तेच सांगणे.

replace /रि'प्लेइस्/ *क्रि* [*सक*] १ पुन्हा जागेवर ठेवणे. २ जागा घेणे, जागी येणे. ३ (जुन्या, मोडक्या वगैरे वस्तूच्या) जागी नवीन वस्तू ठेवणे, जुनी वस्तू काढून नवीन ठेवणे. **replacement** *ना* १ [*अगण*] बदली करणे/देणे. २ [*गण*] बदली आणलेली वस्तू किंवा व्यक्ती.

replay /,री'प्लेइ/ *क्रि* [*सक*] १ (अनिर्णित सामना) पुन्हा खेळणे. २ टेप-रेकॉर्डरवर ध्वनिफीत पुन्हा वाजवणे. **replay** /'रीप्लेइ/ *ना* [*गण*] पुन्हा खेळलेला सामना.

replenish /रि'प्लेनिश्/ *क्रि* [*सक*] (*औप*)

आणखी पुरवठा करणे, नवीन गोष्टी आणणे; पुन्हा भरणे.

replica /'रेप्लिक/ *ना* [*गण*] हुबेहूब प्रतिकृती, जशीच्या तशी नक्कल.

reply /रि'प्लाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*अक, सक*] उत्तर देणे. **reply** *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) उत्तर देणे; उत्तर.

report^{1} /रि'पॉऽट्/ *ना* १ [*गण*] काही पाहिलेल्याचे, ऐकलेल्यांचे, केलेल्याचे वृत्त, अहवाल. २ [*गण*] (*ब्रि*) विद्यार्थ्याचा वर्तणुकीबाबतचा आणि कामाबाबतचा लेखी अहवाल. ३ [*गण, अगण*] ऐकू आलेली बातमी/वार्ता, सिद्ध न झालेली वार्ता; अफवा. ४ [*गण*] (*औप*) स्फोटाचा आवाज.

report^{2} /रि'पॉऽट्/ *क्रि* १ [*अक, सक*] खास करून वर्तमानपत्राला बातमी/वार्ता देणे. २ [*सक*] (*to*)// वरिष्ठांकडे एखाद्याविरुद्ध तक्रार करणे/नोंदवणे. ३ [*अक*] *to/for*// एखाद्याकडे जाऊन आपण आल्याचे किंवा आपण काम करायला तयार असल्याचे सांगणे, रुजू झाल्याची वार्ता देणे. **reported speech** *ना* [*अगण*] = INDIRECT SPEECH (INDIRECT). **reporter** *ना* [*गण*] वर्तमानपत्र, आकाशवाणी किंवा दूरदर्शनचा बातमीदार, वार्ताहर.

repose /रि'पउझ्/ *क्रि* [*अक*] (*औप*) विश्रांती घेणे, टेकून पडणे. **repose** *ना* [*अगण*] (*औप*) विश्राम, विश्रांती.

reprehensible /,रेप्रि'हेन्सबल्/ *वि* (*औप*) दूषणीय, निंद्य, गर्हणीय; फार वाईट.

represent /,रेप्रि'झेन्ट्/ *क्रि* [*सक*] १ एखाद्याच्या वतीने अधिकृतपणे बोलणे किंवा काम करणे, प्रतिनिधित्व करणे, एखाद्याची वकिली करणे : ~ *the Queen, राणीच्या वतीने बोलणे.* २ कशाचे तरी चित्र असणे, मूर्त स्वरूप असणे; दाखवणे. ३ एखाद्याचे चिन्ह किंवा उदाहरण असणे. ४ [*सक*] विशिष्ट रीतीने वर्णन करणे : *This figure ~s an increase of 10%, हा आकडा म्हणजे १० टक्के वाढीचा परिणाम आहे.* **representation** /,रेप्रिझेन्'टेइशन्/ *ना* [*अगण, गण*] प्रतिनिधित्व; दर्शन वर्णन; दाखविलेले काही.

representative /,रेप्रि'झेन्टटिव्ह्/ *ना* [*गण*] १ एखाद्या व्यक्तीच्या किंवा गटाच्या वतीने बोलणारा किंवा कार्य करणारा, प्रतिनिधी, प्रतिपत्री. २ कंपनीचा माल वेगवेगळ्या दुकानांत वगैरे जाऊन विक्रीसाठी देणारा माणूस, कंपनी एजंट. **representative** *वि* १ प्रातिनिधिक, विशिष्ट असा. २ प्रातिनिधिक सरकारचा.

repress /रि'प्रेस्/ *क्रि* [*सक*] मागे ठेवणे, दडपणे; नियंत्रित करणे. दाबून ठेवणे : ~ *one's emotions/a nation, स्वतःच्या भावनांना आवर घालणे/देश दडपणे.* **repression** /रि'प्रेशन्/ *ना* [*अगण*] दडपशाही; निग्रह. **repressive** *वि* क्रूर, दडपशाहीचा, कडक.

reprieve /रि'प्रीव्ह्/ *क्रि* [*सक*] शिक्षा तहकूब किंवा रद्द करणे – विशेषतः फाशी. **reprieve** *ना* [*गण*] १ फाशीच्या शिक्षेवर दिलेली तहकुबी. २ (*ला*) संकट लांबणीवर पडणे.

reprimand /'रेप्रिमान्ड्; *अमे* -मॅन्ड्/ *क्रि* [*सक*] ताकीद देणे, ताशेरे झाडणे. **reprimand** *ना* [*गण*] ताकीद.

reprisal /रि'प्राइझ्ल्/ *ना* [*गण, अगण*] स्वतःवर अन्याय केलेल्या व्यक्तीला किंवा गटाला हानिकारक असे काही करणे किंवा असे काही केलेले, सूड, वचपा.

reproach /रि'प्रउच्/ *क्रि* [*सक*] (*for*)// एखाद्याला एखाद्या अयोग्य गोष्टीबाबत दोष देणे, ठपका ठेवणे. **reproach** *ना* १ [*अगण*] ठपका ठेवणे, दूषण. २ [*गण*] दोष देणारा बोल, लावलेला बोल. ३ (*वाक्प्र*) **above/beyond reproach** काहीही ठपका न ठेवता येण्यासारखा, निर्दोष.

reproduce /रीप्र'ड्यूस्; *अमे* -'डूस्/ *क्रि* १ [*सक*] (चित्राची) नक्कल करणे, प्रतिरूप करणे. २ [*अक, सक*] प्रजोत्पादन करणे. **reproduction** /-'डक्शन्/ *ना* [*गण, अगण*] प्रतिरूप; प्रजोत्पादन, जनन. **reproductive** /-'डक्टिव्ह्/ *वि* प्रजोत्पादक.

reproof /रि'प्रूफ्/ *ना* [*गण, अगण*] (*औप*) ठपका, बोल, हजेरी. **reprove** /रि'प्रूव्ह्/ *क्रि* [*सक*] (*औप*) नापसंती दाखवणे, बोल लावणे, हजेरी घेणे.

reptile /'रेप्टाइल्; *अमे* -ट्ल्/ *ना* [*गण*] थंड रक्ताचा अंडी घालणारा सरडा, साप या जातीचा प्राणी, सरपटणारा प्राणी, सरीसृप. **reptilian** /रेप्'टिलिअन्/ *वि* उरोगामी,

सरपटणाऱ्या प्राण्याचा.

republic /रि'पब्लिक्/ *ना* [*गण*] राजा किंवा राणीऐवजी निवडून आलेले लोकप्रतिनिधी आणि अध्यक्ष यांचे शासन असणारा देश, प्रजासत्ताक राज्य, गणराज्य. **republican** *वि* गणराज्याचा, प्रजासत्ताकवादी. **republican** *ना* [*गण*] १ प्रजासत्ताकवादी व्यक्ती. २ **Republican** (*अमे*) रिपब्लिकन म्हणजे प्रजासत्ताकवादी पक्षाचा सभासद.

repudiate /रि'प्यूडिअेइट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) अस्वीकार करणे, संबंध तोडणे. **repudiation** /रि,प्यूडि'अेइशन्/ *ना* [*अगण*] अस्वीकार, नकार; संबंध तोडणे.

repugnant /रि'पग्नन्ट्/ *वि* (*औप*) तिटकारा आणणारा, तिरस्करणीय. **repugnance** /-नन्स्/ *ना* [*अगण*] तिटकारा, उबग, वीट.

repulse /रि'पल्स्/ *क्रि* [*सक*] १ (*औप*) (शत्रूला) पळवून लावणे, हटवणे. २ (*ला*) स्वीकार करण्यास नकार देणे, अव्हेरणे. **repulsion** /रि'पल्शन्/ *ना* [*अगण*] १ तिटकारा, तिरस्कार. २ (*पदार्थविज्ञान*) पदार्थांचा एकमेकांपासून दूर जाण्याचा गुणधर्म, प्रतिसारण, प्रतिकर्षण. **repulsive** *वि* तिटकारा आणणारा, किळसवाणा.

reputable /'रेप्युटब्ल्/ *वि* सुप्रसिद्ध.

reputation /,रेप्यु'टेइशन्/ *ना* [*गण, अगण*] एखाद्याची ख्याती, प्रसिद्धी.

repute /रि'प्यूट्/ *ना* [*अगण*] (*औप*) १ ख्याती, प्रसिद्धी. २ सुप्रसिद्धी : *a doctor of ~, सुविख्यात डॉक्टर.* **reputed** *वि* बाहेर माहीत असलेले (पण संशयास्पद), गाजावाजा झालेला असा. **reputedly** *क्रिवि* समज आहे अशा रीतीने.

request /रि'क्वेस्ट्/ *ना* १ [*गण, अगण*] विनम्रपणे केलेली मागणी, विनंती : *make a ~ for more money, अधिक पैसे देण्याची विनंती करणे.* २ [*गण*] विनंती करून मागितलेले काही. **request** *क्रि* [*सक*] (*औप*) विनंती करणे, नम्रपणे मागणे.

require /रि'क्वाइअ(र्)/ *क्रि* [*सक*] १ हवे असणे, जरूरी असणे : *My car ~s some attention, माझ्या गाडीकडे जरा बघायला हवं.* २ (*औप*) (बहुधा कर्मणी) आज्ञा/हुकूम असणे; करायला सांगणे : *You are ~d to pay the fine, तुला दंड भरावा लागेल/भरायला हवा.* **requirement** *ना* [*गण*] जरूरी, गरज, हवी असणारी गोष्ट.

requisite /'रेक्विझिट्/ *ना* [*गण*], *वि* (*औप*) विशिष्ट उद्दिष्टासाठी हवी असणारी (गोष्ट), आवश्यक (गोष्ट).

rescue /'रेस्क्यू/ *क्रि* [*सक*] धोक्यापासून वाचवणे, संकटातून सोडवणे, तारणे, बचाव करणे. **rescue** *ना* [*गण, अगण*] धोक्यातून सुटका.

research /रि'सऽच्; *अमे* 'रीसऽच्/ *ना* [*अगण, गण*] नवीन गोष्टी शोधून काढण्यासाठी केलेला चिकित्सक अभ्यास, संशोधन. **research** /रि'सऽच्/ *क्रि* [*अक, सक*] एखाद्या गोष्टीवर संशोधन करणे. **researcher** *ना* [*गण*] संशोधक.

resemble /रि'झ़ेम्ब्ल्/ *क्रि* [*सक*] सारखे असणे; सादृश्य असणे. **resemblance** *ना* [*गण, अगण*] सारखेपणा, सादृश्य.

resent /रि'झ़ेन्ट्/ *क्रि* [*सक*] संताप येणे, चीड येणे : *I ~ his success, मला त्याच्या यशाची चीड येते.* **resentful** *वि* चिडलेला, संतप्त. **resentment** *ना* [*अगण, गण*] संताप, चीड.

reservation /,रेझ़'व्हेइशन्/ *ना* १ [*गण, अगण*] मर्यादा घालणारी गोष्ट; शंका : *I have a few ~s about the plan, या योजनेबाबत माझ्या मनात काही शंका आहेत.* २ [*गण*] रेल्वेतील जागेचे वगैरे आरक्षण. ३ [*गण*] विशिष्ट लोकांच्या गटाला निवासासाठी राखून ठेवलेली जागा, नियंत्रित जागा.

reserve /रि'झऽव्ह्/ *क्रि* [*सक*] १ खास वापरासाठी किंवा खास प्रसंगासाठी राखून ठेवणे. २ वापराकरता आरक्षण करणे : *~ a seat on a train, आगगाडीतील आसनाचे आरक्षण करणे.* **reserve** *ना* १ [*गण*] गरज पडेल तेव्हा वापरण्यासाठी राखून ठेवलेला माल, राखीव निधी वगैरे. २ **reserves** [*ब.व*] गरजेला कामास येईल असे राखीव सैन्य, शिलकी फौज. ३ [*गण*] विशिष्ट कारणासाठी राखलेली जमीन : *a 'nature ~, आरक्षित निसर्ग भूभाग.* ४ [*गण*] एखादा गडी खेळू

शकला नाही तर त्याच्या बदल्यात खेळणारा, राखीव गडी. ५ [*अगण*] आरक्षण. ६ (*वाक्प्र*) **in re'serve** आयत्या वेळी वापरता येईल म्हणून राखून ठेवलेला, हवा तेव्हा काढता येण्यासारखा. **reserved** *वि* संकोची, मनमोकळा नाही असा; लाजाळू.

reservoir /'रेझ़व्हवा(र्)/ *ना* [*गण*] पाण्याचा बांधलेला जलाशय, टाके, तलाव.

reside /रि'झ़ाइड्/ *क्रि* [*अक*] (*औप*) १ घर करणे, राहणे. २ *in*// (विद्यमान) असणे.

residence /'रेझ़िडन्स्/ *ना* (*औप*) १ [*गण*] निवासस्थान – विशेषतः आलिशान असे. २ [*अगण*] मुक्काम. ३ (*वाक्प्र*) **in 'residence** विशिष्ट ठिकाणी असणे किंवा राहणे.

resident /'रेझ़िडन्ट्/ *ना* [*गण*], *वि* एखाद्या ठिकाणचा (रहिवासी). **residential** /,रेझ़ि'डेन्श्ल्/ *वि* १ निवासी, राहण्याची घरे असलेला – म्हणजे कचेऱ्या, कारखाने नसलेला. २ काम करणाऱ्याने किंवा अभ्यास करणाऱ्याने तेथेच राहायचे असा, निवासी.

residue /'रेझ़िड्यू; *अमे* -डू/ *ना* [*गण*] बराचसा वापरून झाल्यावर किंवा घेतल्यावर शिल्लक उरलेला लहान भाग, अवशेष, बाकी. **residual** /रि'झ़िड्युअल्; *अमे* -जु-/ *वि* शेष, अवशिष्ट, उरलेला.

resign /रि'झ़ाइन्/ *क्रि* १ [*अक, सक*] (नोकरीचा वगैरे) राजीनामा देणे, त्यागपत्र देणे. २ (*क्रिब*) **resign oneself to sth** एखादी अप्रिय गोष्ट नाइलाजाने स्वीकारणे, न कुरकुरता स्वीकारणे. **resigned** *वि* नशिबावर हवाला ठेवलेला, कटू गोष्ट स्वीकारलेला.

resignation /,रेझ़िग्'नेइश्न्/ *ना* १ [*गण, अगण*] राजीनामापत्र, त्यागपत्र किंवा राजीनामा देण्याची कृती. २ [*अगण*] कटू गोष्टी शांतपणे स्वीकारण्याची मानसिक अवस्था, स्थितप्रज्ञता.

resilient /रि'झ़िलिअन्ट्/ *वि* १ मूळच्या आकारात झटकन् पुन्हा येऊ शकणारा, स्थितिस्थापक. २ (*ला*) आजार, पराभव वगैरेतून लवकर सावरणारा. **resilience** /-अन्स्/ *ना* [*अगण*] स्थितिस्थापकत्व; काटकपणा.

resin /'रेझ़िन्; *अमे* 'रेझ़्न्/ *ना* [*गण, अगण*] १ काही झाडांतून निघणारा एक चिकट पदार्थ, राळ. २ कृत्रिमरीत्या केलेले अशा प्रकारचे द्रव्य.

resist /रि'झ़िस्ट्/ *क्रि* [*सक*] १ विरोध करणे; प्रतिकार करणे. २ टिकून राहणे, तग धरणे. ३ बळी न पडणे, नाही म्हणण्यात यशस्वी होणे : *~ temptation, मोह टाळणे.* **resistance** *ना* १ [*अगण, अे.व*] (क) प्रतिकार; विरोध. (ख) अवरोधक शक्ती : *wind ~ance, वाऱ्याचा रोध.* २ **the resistance** [*अे.व*] (अे.व किंवा ब.व क्रियापदासह) शत्रूच्या राज्यात जाऊन शत्रूविरुद्ध कार्य करणारी गुप्त संघटना. **resistant** *वि* विरोध करणारा, प्रतिकारक.

resistor /रि'झ़िस्ट(र्)/ *ना* [*गण*] विद्युत्मंडलाची शक्ती कमी करणारे उपकरण, रोधनी, रोधक.

resolute /'रेझ़लूट्/ *वि* (*औप*) निश्चय झालेला, दृढनिश्चयी; पक्का, अविचल. **resolutely** *क्रिवि* ठामपणे, न कचरता.

resolution /,रेझ़्'लूश्न्/ *ना* १ [*गण*] सभेतला ठराव. २ [*गण*] निश्चय, निर्धार : *a New Year ~ to give up smoking, सिग्रेट ओढणे बंद करण्याचा नवीन वर्षाचा संकल्प.* ३ [*अगण*] निश्चयीपणा. ४ [*अगण*] (*औप*) संकल्प सोडणे.

resolve /रि'झ़ॉल्व्ह्/ *क्रि* [*सक*] (*औप*) १ पक्के ठरवणे, निश्चय करणे, ठरवणे. २ (प्रश्नाला वगैरे) उत्तर शोधणे, मिटवणे. **resolve** *ना* [*गण, अगण*] निर्धार, संकल्प; निश्चयीपणा.

resonant /'रेझ़नन्ट्/ *वि* (ध्वनीबाबत) नादक, घुमणारा, दुमदुमणारा; भरदार. **resonance** /-नन्स्/ *ना* [*अगण*] संवादन, निनाद, नादकता.

resort /रि'झ़ॉऽट्/ *क्रि* [*अक*] *to*// दुसरे काही उपलब्ध नसल्यास एखाद्या गोष्टीचा आश्रय घेणे, अवलंब करणे. **resort** *ना* [*गण*] सुटीचे लोकप्रिय निवासस्थान, आरामगृह : *a 'seaside ~, समुद्रकिनाऱ्यावरचे विश्रामधाम किंवा पर्यटननिवास.*

resound /रि'झ़ाउन्ड्/ *क्रि* [*अक*] १ (ध्वनीबाबत) मोठ्याने आणि स्पष्टपणे ऐकू येणे, दुमदुमणे; प्रतिध्वनी येणे, निनादणे. २ (*with*)// (स्थळाबाबत) आवाजाने भरून जाणे. **resounding** *वि* १ मोठा आणि स्पष्ट, दुमदुमणारा : *~ing cheers,* कौतुकाचा

कल्लोळ. २ खूप मोठा : *a ~ing success, खूप मोठे यश.*

resource /रि'सॉऽस्, -'झ़ॉस्; *अमे* 'रीसॉऽर्स्/ *ना* [*गण,* बहुधा *ब.व*] १ ज्याचा वापर करून संपत्ती मिळवता येते असा कच्चा माल वगैरेचा साठा किंवा पुरवठा, नैसर्गिक वगैरे संपत्ती, साधनसंपत्ती. २ गरज पडेल तेव्हा वापरता येईल अशी वस्तू, तजवीज म्हणून केलेली वस्तू. **resourceful** *वि* अडचणींवर मात करण्यात तरबेज, हिकमती. **resourcefully** *क्रिवि* हिकमतीने.

respect /रि'स्पेक्ट्/ *ना* १ [*अगण*] आदर, कौतुक. २ [*अगण*] मान : *Show ~ for her wishes, तिच्या इच्छेला मान दे.* ३ [*गण*] बाब, तपशील : *In some ~s, I agree with you, काही बाबतीत मला तुझं पटतं.* ४ **respects** [*ब.व*] (*औप*) शिष्टाचार म्हणून दिलेल्या शुभेच्छा वगैरे. ५ (*वाक्प्र*) **with respect to sth** (*औप*) एखाद्या गोष्टीविषयी, तिच्याशी संबंधित; -बाबत. **respect** *क्रि* [*सक*] आदर दाखविणे; मान देणे.

respectable /रि'स्पेक्टब्ल्/ *वि* १ प्रतिष्ठित, आदरणीय. २ चांगला, मोठा, प्रशस्त : *a ~ income, चांगले उत्पन्न/चांगली प्राप्ती.* **respectability** /रि,स्पेक्ट'बिलटि/ *ना* [*अगण*] प्रतिष्ठितपणा. **respectably** *क्रिवि* प्रतिष्ठितपणे, अब्रूदारपणे.

respectful /रि'स्पेक्ट्फ़ल्/ *वि* आदर दर्शविणारा, मान दाखविणारा, आदरयुक्त. **respectfully** *क्रिवि* आदरयुक्तपणे.

respective /रि'स्पेक्टिव्ह्/ *वि* त्या त्या गोष्टीचा, आपापल्या. **respectively** *क्रिवि* सांगितलेल्या क्रमाने, यथाक्रम, अनुक्रमे.

respiration /,रेस्प'रेइशन्/ *ना* [*अगण*] (*औप*) श्वासोच्छ्वास, श्वसन. **respiratory** /'रेस्पिरट्रि, रि'स्पाइअरट्रि; *अमे* -टॉऽरि/ *वि* श्वसनाचा.

respite /'रेस्पाइट्, -पिट्/ *ना* [*अगण, अे.व*] अडचणीतून मिळालेली थोडीशी उसंत, विसावा.

resplendent /रि'स्प्लेन्डन्ट्/ *वि* (*औप*) तेजस्वी, चकाकणारा, चमकदार, भव्य.

respond /रि'स्पॉन्ड्/ *क्रि* [*अक*] (*to*)// १ उत्तर देणे. २ प्रतिसाद देणे. ३ अनुकूल प्रतिसाद देणे : ~ *to treatment, उपचाराला अनुकूल प्रतिसाद देणे.*

response /रि'स्पॉन्स्/ *ना* १ [*गण*] उत्तर. २ [*गण, अगण*] प्रतिसाद.

responsibility /रि,स्पॉन्स'बिलटि/ *ना* (*ब.व* -ies) १ [*अगण*] जबाबदारी. २ [*गण*] एखाद्या गोष्टीची जबाबदारी, जोखीम; कर्तव्य.

responsible /रि'स्पॉन्सब्ल्/ *वि* १ (*for*)// एखाद्या गोष्टीकडे लक्ष देणे किंवा एखादी गोष्ट करणे यांची जबाबदारी असलेला, जबाबदार : *~ for cleaning the car, गाडी धुण्याची जबाबदारी असणारा.* २ (*to*)// एखाद्याला स्वतःच्या कृतीचे समर्थन आणि निवेदन करण्यास जबाबदार. ३ (*for*)// एखाद्या वाईट गोष्टीचे कारण असणारा, वाईटाला जबाबदार : *Who's ~ for this mess? या गोंधळाला जबाबदार कोण?* ४ विश्वसनीय, भरवशाचा. ५ (कामाबाबत) जबाबदारीचे, महत्त्वाचे. **responsibly** *क्रिवि* जबाबदारीने.

responsive /रि'स्पॉन्सिव्ह्/ *वि* लगेच प्रतिसाद देणारा – उदा भावना व्यक्त करून, दाद देणारा.

rest^{1} /रेस्ट्/ *ना* १ [*गण, अगण*] विश्रांती, विश्राम (किंवा त्याचा काळ). २ [*गण*] एखाद्या वस्तूला दिलेले टेकण, आधार, लाग : *an 'arm-~, हातासाठी आधार* किंवा *हात ठेवायची वस्तू.* ३ [*गण*] (*संगीत*) थांबणे (किंवा विश्रामाची खूण). ४ (*वाक्प्र*) **at 'rest** (क) स्थिर, अचल. (ख) शांत, निश्चिंत. **restful** *वि* आराम देणारा, शांत करणारा; शांततापूर्ण, स्वस्थ. **restless** *वि* अस्थिर; अस्वस्थ, चुळबुळ करणारा. **restlessly** *क्रिवि* अस्वस्थपणे.

rest^{2} /रेस्ट्/ *क्रि* १ [*अक, सक*] विश्रांती घेणे/देणे, विसावा घेणे. २ [*अक, सक*] *on/against*// एखाद्या गोष्टीवर टेकणे. ३ [*अक*] *on*// (नजरेबाबत) पडणे, स्थिरावणे. ४ (*वाक्प्र*) **rest assured** (*औप*) खात्री असणे. **rest on one's laurels** स्वतःच्या यशावर संतुष्ट होऊन स्वस्थ राहणे. ५ (*क्रिब*) **rest on sth** एखाद्यावर विसंबून राहणे. **rest with sb** एखाद्याची जबाबदारी असणे.

rest^{3} /रेस्ट्/ *ना* **the rest** १ [*अे.व*] उरलेला

भाग, उर्वरित भाग. २ [*ब.व*] इतर.

restaurant /'रेस्ट्रॉन्ट्; *अमे* -टरन्ट्/ *ना* [*गण*] उपाहारगृह.

restitution /,रेस्टि'ट्यूश्न्; *अमे* -'टू-/ *ना* [*अगण*] (*औप*) चोरलेली वस्तू परत देणे किंवा तिचा मोबदला देणे, भरपाई.

restive /'रेस्टिव्ह्/ *वि* (*औप*) नियंत्रण न करता येण्याजोगा; अस्वस्थ, अशांत.

restoration /,रेस्ट'रेइश्न्/ *ना* १ [*अगण*] परत करणे, प्रत्यर्पण; पुनर्स्थापना. २ **the Restoration** [*अे.व*] ब्रिटनच्या इतिहासातील १६६० नंतरचा काळ – ज्यात राजाविरहित अशा दीर्घकाळानंतर दुसरा चार्लस् पुन्हा गादीवर आला, राजसत्तेचा पुनर्स्थापनाकाल.

restorative /रि'स्टॉऽरटिव्ह्/ *वि* नवा जोम आणणारा, बलवर्धक. **restorative** *ना* [*गण*] बलवर्धक औषध, अन्न वगैरे.

restore /रि'स्टॉऽ(र्)/ *क्रि* [*सक*] १ (*औप*) परत देणे. २ पुन्हा पूर्वीच्या स्थितीत आणणे, पुनर्स्थापन करणे. ३ पुन्हा वापरात आणणे. ४ (जुनी इमारत, चित्र वगैरे) डागडुजी करून पूर्ववत करणे, पूर्वस्थितीवर आणणे, जीर्णोद्धार करणे. **restorer** *ना* [*गण*] डागडुजी करून पूर्ववत करणारा, जीर्णोद्धारक.

restrain /रि'स्ट्रेइन्/ *क्रि* [*सक*] कार्याला किंवा गतीला आवर घालणे, लगाम घालणे; ताब्यात ठेवणे. **restrained** *वि* संयत; शांत. **restraint** /रि'स्ट्रेइन्ट्/ *ना* १ [*गण, अगण*] नियंत्रण, धरबंध. २ [*अगण*] संयतपणा.

restrict /रि'स्ट्रिक्ट्/ *क्रि* [*सक*] मर्यादा घालणे, सीमित करणे, निर्बंध घालणे. **restriction** /रि'स्ट्रिक्श्न्/ *ना* [*गण, अगण*] मर्यादा, आळा, निर्बंध. **restrictive** *वि* मर्यादा घालणारा, निर्बंधक.

result /रि'झ़ल्ट्/ *ना* १ [*गण, अगण*] एखाद्या कृतीमुळे किंवा घटनेमुळे होणारी गोष्ट, परिणाम, निष्पत्ती. २ [*गण*] खेळातील अंतिम गुणसंख्या; परीक्षेतील गुण. ३ [*गण*] गणितातील उत्तर. **result** *क्रि* १ [*अक*] (*from*)// परिणामतः घडणे, परिणाम म्हणून होणे. २ (*क्रिब*) **result in sth** एखाद्या गोष्टीत परिणत होणे; घडवून आणणे, परिणाम म्हणून होणे. **resultant** *वि* (*औप*) परिणामतः होणारा, परिणामस्वरूप.

resume /रि'झ़्यूम्; *अमे* 'झ़ूम्/ *क्रि* १ [*अक, सक*] थांबलेली गोष्ट पुन्हा सुरू होणे/करणे. २ [*सक*] (*औप*) पुन्हा घेणे : ~ *one's seat, पुन्हा स्थानापन्न होणे.*

résumé /'रेझ़्यूमेइ; *अमे* ,रेझ़ु'मेइ/ *ना* [*गण*] सारांश.

resumption /रि'झ़म्पश्न्/ *ना* [*अगण, अे.व*] (*औप*) पुन्हा करणे, पुनरारंभ.

resurrect /,रेझ़'रेक्ट्/ *क्रि* [*सक*] पुन्हा वापरात आणणे. **resurrection** /,रेझ़'रेक्श्न्/ *ना* १ [*अगण*] पुनरुत्थान. २ **the Resurrection** [*अे.व*] (क) (ख्रिस्ती धर्मात) येशूचे मृत्यूनंतरचे पुनरागमन किंवा पुनरुत्थान. (ख) जगाच्या अंती होणारे सर्व मृतांचे पुनरुत्थान.

resuscitate /रि'सीसिटेइट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) फिरून शुद्धीवर आणणे. **resuscitation** /रि,सीसि'टेइश्न्/ *ना* [*अगण*] पुन्हा शुद्धीवर आणणे; नवचैतन्य आणणे.

retail /'रीटेइल्/ *ना* [*अगण*] मालाची सार्वजनिक किंवा फुटकळ विक्री. **retail** *क्रिवि* फुटकळ विक्रीने. **retail** *क्रि* [*अक, सक*] फुटकळ विक्री होणे/करणे, सार्वजनिक वितरण करणे. **retailer** *ना* [*गण*] विक्रेता, दुकानदार.

retain /रि'टेइन्/ *क्रि* [*सक*] (*औप*) १ ठेवणे, राखणे; धरून ठेवणे. २ पैसे देऊन एखाद्याची – विशेषतः वकिलाची – सेवा घेणे. **retainer** *ना* [*गण*] १ वकिलाला वगैरे दिलेला मोबदला. २ राहण्याची जागा वगैरे अडवून ठेवण्यासाठी दिलेले अल्पसे भाडे. ३ (*पुरा*) नोकर, घरगडी.

retaliate /रि'टॅलिअेइट्/ *क्रि* [*अक*] परतफेड करणे, उट्टे काढणे, जशास तसे वागणे. **retaliation** /रि,टॅलि'अेइश्न्/ *ना* [*अगण*] प्रत्याघात, प्रत्युत्तर, सूड, वचपा.

retard /रि'टाड्/ *क्रि* [*सक*] (*औप*) मंदगती करणे, लांबणीवर टाकणे. **retarded** *वि* मतिमंद.

retch /रेच्/ *क्रि* [*अक*] बाहेर काहीही न पाडता ओकारी काढण्याचा प्रयत्न करणे, कोरडी ओकारी काढणे.

retention /रि'टेन्श्न्/ *ना* [*अगण*] (*औप*)

टिकवून ठेवणे, ठेवून घेणे.

retentive /रि'टेन्‌टिव्ह्/ *वि* (स्मरणशक्तीबाबत) तल्लख.

reticent /'रेटिस्न्ट्/ *वि* मितभाषी, घुम्या, अबोल, माहीत असलेलं सगळं न बोलणारा. **reticence** /-स्न्स्/ *ना* [*अगण*] अबोलपणा.

retina /'रेटिन; *अमे* 'रेटन/ *ना* [*गण*] (*ब.व* ~**s** किंवा -**ae** /नी/) नेत्रगोलामागचा प्रकाशाने संवेदित होणारा भाग, दृक्‌-पटल.

retinue /'रेटिन्यू; *अमे* 'रेटनू/ *ना* [*गण*, तसेच ब.व क्रियापदासह अे.व] महत्त्वाच्या व्यक्तीचा लवाजमा.

retire /रि'टाइअ(र्)/ *क्रि* १ (क) [*अक*] (*from*)// सेवानिवृत्त होणे – विशेषतः वयामुळे. (ख) [*सक*] सेवानिवृत्त करणे. २ [*अक*] (*औप*) दूर शांत स्थळी जाणे, आराम करण्यास जाणे. ३ [*अक*] (*औप*) निजावयास जाणे. **retired** *वि* सेवानिवृत्त. **retirement** *ना* [*अगण*] सेवानिवृत्ती. **retiring** *वि* लोकांपासून दूर राहणारा, एकलकोंडा.

retort /रि'टॉऽट्/ *क्रि* [*सक*] प्रत्युत्तर देणे, चिडून उलट उत्तर देणे, उलट टोला मारणे. **retort** *ना* [*गण, अगण*] प्रत्युत्तर, उलट उत्तर, टोला.

retrace /री'ट्रेइस्/ *क्रि* [*सक*] मागे जाणे, परत जाणे : ~ *one's steps, मागे चालत जाणे.*

retract /रि'ट्रॅक्ट्/ *क्रि* [*अक, सक*] १ (विधान, प्रस्ताव वगैरे) मागे घेणे. २ आत किंवा मागे ओढणे/घेणे : *A cat can ~ its claws, मांजराला नख्या आत ओढून घेता येतात.* **retractable** *वि* मागे घेता येणारा. **retraction** /रि'ट्रॅक्‌शन्/ *ना* [*गण, अगण*] मागे घेणे, आखडणे.

retread /'रीट्रेड्/ *ना* [*गण*] नवीन बाह्यावरण दिलेले टायर.

retreat /रि'ट्रीट्/ *क्रि* [*अक*] (विशेषतः सैन्याबाबत) मागे जाणे. **retreat** *ना* [*गण, अगण*] १ (सैन्याची) माघार. २ विश्रांतीचा काळ (किंवा स्थळ), एकांतवास (स्थळ).

retribution /,रेट्रि'ब्यूशन्/ *ना* [*अगण*] (*औप*) योग्य शिक्षा.

retrieve /रि'ट्रीव्ह्/ *क्रि* [*सक*] (*औप*) १ शोधून परत आणणे, हुडकून काढणे. २ नीट करणे, सुधारणे. **retrieval** *ना* [*अगण*] परत मिळवणे. **retriever** *ना* [*गण*] मारलेले पक्षी वगैरे हुडकून आणण्यास शिकवलेला कुत्रा.

retrograde /'रेट्रग्रेइड्/ *वि* (*औप*) पूर्वीच्या वाईट दशेत जाणारा, अपकर्णी, पुच्छगामी.

retrogression /,रेट्र'ग्रेइशन्/ *ना* [*अगण*] (*औप*) अपकर्ष, पुच्छगमन. **retrogressive** /-'ग्रेसिव्ह्/ *वि* पुच्छगामी.

retrospect /'रेट्रस्पेक्ट्/ *ना* (*वाक्प्र*) **in retrospect** भूतकाळाचा विचार करता, सिंहावलोकन करता. **retrospective** *वि* १ पूर्वपक्षी. २ (कायदा किंवा पैसा देणे याबाबत) मागपासूनचा.

return^{1} /रि'टऽन्/ *क्रि* १ [*अक*] (क) परत येणे/जाणे, परतणे : ~ *home, घरी परतणे.* (ख) पूर्व स्थितीवर येणे. २ [*सक*] परत देणे, ठेवणे किंवा पाठवणे : ~ *damaged goods to the shop, खराब माल दुकानात परत करणे.* ३ [*सक*] संसदेवर निवडून पाठवणे. ४ [*सक*] अधिकृतपणे जाहीर करणे/देणे, अधिमत देणे : *The jury ~ed a verdict of guilty, ज्यूरीनी दोषी म्हणून अधिमत दिले.*

return^{2} /रि'टऽन्/ *ना* १ [*गण, अगण*] परतणे, परत येणे, पुनरागमन. २ [*गण*, विशेषतः *ब.व*] गुंतवणुकीवरील नफा, फायदा. ३ [*गण*] अधिकृत वृत्त, विवरण : *fill in one's tax ~, आय विवरण भरणे.* ४ [*गण*] (तसेच **return 'ticket**) परतीचे तिकीट. ५ (*वाक्प्र*) **in return (for sth)** एखाद्या गोष्टीच्या बदल्यात किंवा मोबदल्यात.

reunion /,री'यूनिअन्/ *ना* १ [*गण*] खूप वर्षे न भेटलेल्या जुन्या मित्रांची, सहकाऱ्यांची वगैरे पुनर्भेट. २ [*गण, अगण*] वियोगानंतरचे पुनर्मीलन.

Rev /रेव्ह्/ (तसेच **Revd**) संरू Reverend (परम)पूज्य, प.पू.

rev /रेव्ह्/ *क्रि* (**-vv-**) [*अक, सक*] (*up*)// (इंजिनाचा) वेग वाढवणे : ~ *the car (up), गाडीचा वेग वाढवणे.*

reveal /रि'व्हील्/ *क्रि* [*सक*] १ उघड करणे, प्रकट करणे : ~ *a secret, गुपित फोडणे.* २ दाखवणे.

revel /'रेव्ह्ल्/ *क्रि* (-ll-; *अमे* -l-) (*क्रिव*) **revel in sth** एखाद्या गोष्टीचा खूप आनंद लुटणे, चंगळ करणे.

revelation /ˌरेव्ह'लेइश्न्/ *ना* १ [*अगण*] गुपित गोष्ट उघड करणे, प्रकटीकरण, गौप्यस्फोट. २ [*गण*] उघड केलेली (आश्चर्यकारक) गोष्ट.

revenge /रि'व्हेन्ज्/ *ना* [*अगण*] स्वतःला झालेल्या अपायाच्या बदल्यात दुसऱ्याला केलेली शिक्षा किंवा इजा, घेतलेला सूड, बदला. **revenge** *क्रि* [*सक*] **~ oneself (on)** स्वतःला झालेल्या अपायाच्या बदल्यात दुसऱ्याला शिक्षा किंवा इजा करणे, सूड/बदला घेणे.

revenue /'रेव्हन्यू; *अमे* -अनू/ *ना* [*अगण, गण*] उत्पन्न, विशेषतः सरकारचे महसूल.

reverberate /रि'व्हऽबरेइट्/ *क्रि* [*अक*] (ध्वनिबाबत) पुन्हा पुन्हा प्रतिध्वनी येणे, नाद दुमदुमणे. **reverberation** /रिˌव्हऽब'रेइश्न्/ *ना* १ [*गण, अगण*] दुमदुमणारा आवाज. २ [*गण,* बहुधा *ब.व*] (*ला*) मोठा परिणाम, दीर्घकालीन जोरदार परिणाम.

revere /रि'व्हिअ(र्)/ *क्रि* [*सक*] (*औप*) आदर करणे, खूप मानणे.

reverence /'रेव्हरन्स्/ *ना* [*अगण*] आदर, पूज्यभाव.

Reverend /'रेव्हरन्ड्/ *ना* [*गण*] ख्रिस्ती धर्मगुरूची उपाधी.

reverent /'रेव्हरन्ट्/ *वि* आदरणीय, पूजनीय. **reverently** *क्रिवि* आदरयुक्तपणे.

reversal /रि'व्हऽसल्/ *ना* [*गण, अगण*] उलटवणे, पलटी.

reverse /रि'व्हऽस्/ *वि* स्थितीत किंवा क्रमात उलट. **reverse** *ना* १ **the reverse** [*अे.व*] अगदी उलट, विरुद्ध असलेली गोष्ट. २ [*अगण*] वाहन मागे घेण्याची कळ, प्रतिचक्रण : *Put the car into ~ (gear), मागे घ्यायच्या गिअरमधे गाडी टाकणे.* ३ [*गण*] नाण्याची मागची बाजू, काटा. **reverse** *क्रि* १ [*सक*] एखादी गोष्ट उलटी करणे, पालथी करणे. २ [*सक*] फिरवणे, उलट करणे : *~ a decision, निर्णय फिरवणे.* ३ [*अक, सक*] (वाहन) मागे घेणे, मागे जाणे. ४ (*वाक्प्र*) **reverse the 'charges** (*ब्रि*) फोन घेणाऱ्याने पैसे द्यायचे असा फोन करणे.

revert /रि'व्हऽट्/ *क्रि* [*अक*] *to*// मूळ मालकाकडे, स्थितीकडे किंवा वर्तनाकडे परत जाणे, पूर्वस्थितीवर येणे.

review /रि'व्ह्यू/ *क्रि* १ [*सक*] पुनर्विचार करणे, फेरविचार करणे, पुन्हा तपासून पाहणे : *~ the past/a decision, भूतकाळाचा आढावा घेणे/निर्णयाचा फेरविचार करणे.* २ [*अक, सक*] (नवीन पुस्तक, चित्रपट वगैरेचे) परीक्षण करणे. ३ [*सक*] (सैन्याची वगैरे) अधिकृतपणे पाहणी करणे. **review** *ना* १ [*गण, अगण*] आढावा, पुनरावलोकन, पुनर्विचार, पुनर्तपासणी. २ [*गण*] नवीन पुस्तक, चित्रपट वगैरेचे वृत्तपत्र वगैरेतील परीक्षण. ३ [*गण*] सैन्य-तपासणी. **reviewer** *ना* [*गण*] परीक्षण लिहिणारा.

revise /रि'व्हाइझ्/ *क्रि* १ [*सक*] एखादी गोष्ट पुन्हा तपासून तीत सुधारणा करणे किंवा दुरुस्त्या करणे. २ [*अक, सक*] (*for*)// परीक्षेसाठी अभ्यासाची उजळणी करणे. **revision** /रि'व्हिज्न्/ *ना* १ [*गण, अगण*] सुधारणा किंवा दुरुस्त्या करणे, उजळणी. २ [*गण*] सुधारित आवृत्ती.

revitalize /री'व्हाइटलाइझ्/ *क्रि* [*सक*] नवीन ताकद/जोम देणे, संजीवनी देणे.

revive /रि'व्हाइव्ह्/ *क्रि* [*अक, सक*] १ पुन्हा शुद्धीवर येणे किंवा आणणे. २ पुनरुज्जीवित करणे, पुन्हा प्रचारात आणणे : *~ old customs, जुन्या चालीरीती पुनरुज्जीवित करणे किंवा त्यांना पुन्हा चालना देणे.* **revival** *ना* [*गण, अगण*] पुनरुज्जीवन.

revoke /रि'व्हउक्/ *क्रि* [*सक*] (*औप*) (कायदा, परवानगी वगैरे) मागे घेणे, रद्द करणे.

revolt /रि'व्हउल्ट्/ *क्रि* १ [*अक*] (*against*)// शासन किंवा सत्ता याविरुद्ध लढणे; बंड करणे. २ [*सक*] उद्वेग आणणे. **revolt** *ना* [*गण, अगण*] बंड, उठाव, विद्रोह. **revolting** *वि* उद्वेगजनक, चीड आणणारा.

revolution /ˌरेव्ह'लूश्न्/ *ना* १ [*गण, अगण*] शासनाविरुद्ध केलेले बंड, उठाव, शासनात केलेली उलथापालथ, सशस्त्र क्रांती. २ [*गण*] (*ला*) परिस्थितीचा किंवा काम करण्याच्या पद्धतीचा संपूर्ण कायापालट, क्रांती :

the computer ~, संगणक क्रांती. ३ [*गण*] एक पूर्ण चक्कर, परिक्रमण, प्रदक्षिणा. **revolutionary** *वि* १ बंडखोर, क्रांतिकारक. २ संपूर्णतः वेगळा : *a ~ary idea, क्रांतिकारक कल्पना.* **revolutionary** *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) बंडखोर व्यक्ती, क्रांतिकारक. **revolutionize** /-शनाइझ़्/ *क्रि* [*सक*] क्रांतिकारक बदल घडवून आणणे.

revolve /रि'व्हॉल्व्ह्/ *क्रि* १ [*अक*] (*around*)// प्रदक्षिणा घालणे, परिभ्रमण करणे. २ (*क्रिब*) **revolve around sb/sth** एखाद्या गोष्टीभोवती फिरणे म्हणजेच त्या गोष्टीला महत्त्व देणे : *The story ~s around the old man, त्या वृद्ध माणसाभोवती कथा गुंफलेली आहे किंवा फिरत राहते.*

revolver /रि'व्हॉल्व्ह(र्)/ *ना* [*गण*] गोळ्यांची फिरती तबकडी असणारे पिस्तूल, अनेकवारी पिस्तूल.

revue /रि'व्ह्यू/ *ना* [*गण*] संगीत, नृत्य, विनोद यांचा मिलाफ असलेला करमणुकीचा कार्यक्रम.

revulsion /रि'व्हॅल्श्न्/ *ना* [*अगण, ए.व*] वीट आल्याची किंवा भयकंपाची भावना, उद्वेग.

reward /रि'वॉऽड्/ *ना* [*गण, अगण*] विशिष्ट कामगिरीबाबतचे बक्षीस. **reward** *क्रि* [*सक*] बक्षीस देणे, इनाम देणे. **rewarding** *वि* समाधानकारक, संतोष देणारा, फलदायी.

rewind /,री'वाइन्ड्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **rewound** /,री'वाउ-/ [*अक, सक*] ध्वनिफीत, चित्रफीत वगैरे पुन्हा उलटी गुंडाळणे.

rhapsody /'रॅप्सडि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) १ अनियमित आकृतिबंध असणारे पण भावपूर्ण आणि प्रवाही असे संगीत. २ मोठ्या आनंदाचा उद्गार, हर्षोत्फुल्ल प्रतिसाद.

rhetoric /'रेटरिक्/ *ना* [*अगण*] १ लेखनात किंवा भाषणात शब्दांची प्रभावी योजना (करणे), वक्तृत्वकला. २ (*अधिक्षेपी*) अर्थहीन, अप्रामाणिक असा भाषेचा फुलोरा, शब्दावडंबर. **rhetorical** /रि'टॉरिक्ल्; *अमे* -'टॉऽर्-/ *वि* १ (प्रश्नाबाबत) उत्तराची अपेक्षा नसलेला, फक्त परिणाम साधण्यासाठी केलेला वक्तृत्वपूर्ण प्रश्न. २ प्रभाव पाडण्यासाठी किंवा मन वळवण्यासाठी केलेले.

rheumatism /'रूमटिझ़म्/ *ना* [*अगण*] सांध्यांमधे आणि स्नायूंमधे वेदना आणि ताठरपणा निर्माण करणारा रोग, संधिवात. **rheumatic** /रू'मॅटिक्/ *वि, ना* [*गण*] संधिवाताचा (रोगी), संधिवात झालेला (माणूस).

rhino /'राइनउ/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s**) (*अनौप*) RHINOCEROS चा संक्षेप.

rhinoceros /राइ'नॉसरस्/ *ना* [*गण*] नाकावर एक किंवा दोन शिंगे असणारा जाड कातडीचा एक महाकाय प्राणी, गेंडा.

rhododendron /,रउड'डेन्ड्रन्/ *ना* [*गण*] मोठ्या फुलांची एक सदाहरित वनस्पती, कण्हेर, पाडळी.

rhubarb /'रूबाब्/ *ना* [*अगण*] जाड तांबूस देठांची एक भाजी, रेवाचिनी.

rhyme /राइम्/ *क्रि* [*अक*] (शब्द किंवा कवितेच्या ओळींबाबत) यमक साधणे : *'Fall' ~s with 'Wall', 'फॉल' या शब्दाचे 'वॉल' या शब्दाशी यमक साधते.* **rhyme** *ना* १ [*अगण*] शेवटी समान ध्वनी असणे, यमक. २ [*गण*] यमक साधणारा शब्द. ३ [*गण*] यमक असणारी छोटी कविता.

rhythm /'रिदम्/ *ना* १ [*गण, अगण*] ताल, लय. २ [*गण*] (*ला*) एखाद्या गोष्टीची लय : *the ~ of the tides, भरतीची लय.* **rhythmic(al)** /'रिदमिक्(ल्)/ *वि* लयबद्ध.

rib /रिब्/ *ना* [*गण*] १ पाठीच्या कण्यापासून छातीकडे जाणाऱ्या बाकदार हाडांपैकी एक, बरगडी. २ विणकामातील वर आलेली रेषा, सळई. **ribbed** *वि* सळयासळयांचा.

ribbon /'रिबन्/ *ना* [*गण, अगण*] कापडाची लांब चिंधी.

rice /राइस्/ *ना* [*अगण*] तांदूळ, शिजवलेला भात किंवा भाताचे रोप.

rich /रिच्/ *वि* १ खूप पैसा किंवा मालमत्ता असलेला, श्रीमंत, धनिक. २ किमती आणि भारी : *~ clothes, भारीचे कपडे.* ३ *in*// विपुल असलेला, भरलेला : *soil ~ in minerals, खनिजयुक्त किंवा खनिजसंपन्न माती.* ४ (अन्नाबाबत) तूप, चरबी, अंडी वगैरे स्निग्धपदार्थ भरपूर असलेले, पौष्टिक. ५ (रंगांबाबत) गडद उठावदार, (आवाजाबाबत) भरदार. **rich** *ना* १ **the rich** [*ब.व*] श्रीमंत

लोक. २ **riches** [*ब.व*] धनदौलत, संपत्ती. **richly** *क्रिवि* भरघोसपणे; विपुलतेने; उठावदारपणे. **richness** *ना* [*अगण*] श्रीमंती, भरदारपणा; कसदारपणा; बाहुल्य.

rickety /'रिकटि/ *वि* डळमळीत, खिळखिळा, लटपटीत.

rickshaw /'रिक्शॉऽ/ *ना* [*गण*] (क) माणसाने ओढायचे एक दोन चाकी वाहन, सायकल रिक्षा. (ख) (भारतीय) तीन चाकी प्रवासी वाहन, ऑटोरिक्षा.

ricochet /'रिकशेइ; *अमे* ,रिक'शेइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-t-** किंवा **-tt-**) [*अक*] (गोळी) लागून बाजूला एखाद्या दिशेने उडणे. **ricochet** *ना* [*गण, अगण*] आपटून बाजूला उडणे.

rid /रिड्/ *क्रि* (**-dd-**, *भूत, भूत वि* **rid**) १ [*सक*] *of//* (*औप*) नको असलेल्या गोष्टीपासून सुटका करून घेणे, झेंगटातून सोडवणूक करणे. २ (*वाक्प्र*) **get rid of sb/sth** एखाद्यापासून सुटकारा मिळवणे; हालवणे किंवा फेकून देणे.

riddance /'रिड्न्स्/ *ना* (*वाक्प्र*) **good riddance** (एखादा माणूस निघून गेल्याचा आनंद व्यक्त करण्यासाठी वापर) : *He's finally gone and good riddance to him! गेला बुवा तो एकदाचा! सुटलो!*

ridden RIDE^1 चे *भूत वि.*

riddle^1 /'रिड्ल्/ *ना* [*गण*] १ अवघड किंवा गमतीचा प्रश्न, कोडे. २ गूढ व्यक्ती, परिस्थिती किंवा वस्तू, कोड्यात पाडणारी गोष्ट.

riddle^2 /'रिड्ल्/ *क्रि* [*सक*] *with//* (विशेषतः कर्मणी) खूप भोके पाडणे, चाळण करणे : *a body ~d with bullets, गोळ्यांनी चाळण झालेले शरीर.*

ride^1 /राइड्/ *क्रि* (*भूत* **rode** /रउड्/, *भूत वि* **ridden** /'रिड्न्/) १ [*अक, सक*] (घोड्यावर, सायकलवर वगैरे) चढणे, बसणे, स्वार होणे. २ [*अक*] बस किंवा अन्य वाहनाने प्रवास करणे. ३ [*सक*] तरंगणे : *a ship riding the waves, लाटांवर तरंगणारी बोट.* ४ (*क्रिब*) **ride up** (कपड्याविषयी) वर जाणे. **rider** *ना* [*गण*] १ स्वार. २ विधानाला केलेली पुस्ती.

ride^2 /राइड्/ *ना* [*गण*] १ घोडा, सायकल वगैरेवरून किंवा मोटारीतून केलेला प्रवास, रपेट. २ (*वाक्प्र*) **take sb for a 'ride** (*अनौप*) एखाद्याला फसवणे, मामा बनवणे.

ridge /रिज्/ *ना* [*गण*] १ लंबुळका पण टोकदार असा उंचावरचा भूभाग, सुळका, कटक. २ दोन उतरते पृष्ठभाग मिळणारी उंच रेषा, कडा, कंगोरा.

ridicule /'रिडिक्यूल्/ *ना* [*अगण*] एखाद्याची केलेली टवाळी, टर, उपहास. **ridicule** *क्रि* [*सक*] एखाद्याची टर उडवणे, टवाळी/थट्टा करणे.

ridiculous /रि'डिक्युलस्/ *वि* वेडपटपणाचा, मूर्खपणाचा; असंगत, काहीच्या बाही. **ridiculously** *क्रिवि* वेड्यासारखे.

rife /राइफ्/ *वि* (विशेषतः एखाद्या वाईट गोष्टीबाबत) सर्वत्र पसरलेला, बुजबुजाट झालेला; सर्वसामान्य, नेहमीचा.

rifle^1 /'राइफ्ल्/ *ना* [*गण*] खांद्यावरून उडवायची लांब नळीची बंदूक.

rifle^2 /'राइफ्ल्/ *क्रि* [*सक*] चोरण्यासाठी चाचपणे, बारकाईने तपासणे.

rift /रिफ्ट्/ *ना* [*गण*] १ भेग, फट, चीर, तडा. २ (*ला*) तफावत, मतभेद.

rig^1 /रिग्/ *क्रि* (**-gg-**) [*सक*] १ जहाजाला शिडे, डोलकाठी वगैरे बसविणे. २ (*क्रिब*) **rig sb out** एखाद्याला विशिष्ट पोषाख देणे, पेहराव देणे. **rig sth up** उपलब्ध सामग्रीतून एखादी गोष्ट चटकन् तयार करणे. **rig** *ना* [*गण*] १ जहाजाची शिडे, डोलकाठी वगैरे लावण्याची पद्धती. २ विशिष्ट हेतूसाठी वापरायची साधने : *an 'oil ~, तेल काढण्याची सामग्री.* **rigging** *ना* [*अगण*] जहाजाच्या शिडांना, डोलकाठीला वगैरे आधार देणारे दोर.

rig^2 /रिग्/ *क्रि* (**-gg-**) [*सक*] स्वतःच्या फायद्यासाठी लबाडी करणे, लुच्चेगिरी करणे : *~ an election, निवडणुकीत लुच्चेगिरी करणे.*

right^1 /राइद्/ *वि* १ (वर्तनाबाबत) योग्य, न्याय्य; नैतिकदृष्ट्या चांगला. २ बरोबर : *the ~ answer, बरोबर उत्तर.* ३ सुयोग्य, अनुरूप : *the ~ person for the job, या कामाला योग्य माणूस.* ४ बरे : *Do you feel all ~? तुला बरे वाटते ना?* ○ *in one's ~ mind, मनाच्या ठीक अवस्थेत* म्हणजेच *मानसिकदृष्ट्या ठाकठीक.* ५

(*वाक्प्र*) **on the right 'track** ➪ TRACK. **put/set sth right** एखादी गोष्ट नीट करणे, दुरुस्त करणे, ताळ्यावर आणणे. **'right angle** *ना* [*गण*] ९०° चा कोन, काटकोन. **'right-angled** *वि* काटकोनातला. **rightly** *क्रिवि* न्याय्य रीतीने; बरोबर. **rightness** *ना* [*अगण*] न्याय्यपणा, चांगलेपणा, भलेपणा; बरोबरपणा.

right^2 /राइट्/ *क्रिवि* १ बरोब्बर, अगदी : *Put it ~ in the middle, ते अगदी मध्यभागी ठेव.* २ पूर्णपणे : *Go ~ to the end of the road, रस्त्याच्या अगदी टोकापर्यंत जा.* ३ बरोबर. ४ (*वाक्प्र*) **'right away** क्षणाचाही विलंब न लावता, लगेच. **right 'now** आत्ता, या क्षणी.

right^3 /राइट्/ *ना* १ [*अगण*] चांगले, योग्य, सत्य असे जे ते. २ [*गण, अगण*] नैतिक किंवा कायदेशीर अधिकार; कायदेशीर हक्क : *You have no ~ to be here, तुला इथं असण्याचा नैतिक अधिकार नाही* ○ *basic political ~s, मूलभूत राजकीय हक्क.* ३ (*वाक्प्र*) **be in the 'right** योग्य असेच वागणे. **by 'rights** खरं पाहता, न्याय्यदृष्ट्या. **in one's own 'right** स्वतःच्या गुणवत्तेवर, स्वतःच्या हक्काने. **put/set sb/sth to 'rights** दुरुस्त करणे, व्यवस्थित करणे. **,right of 'way** *ना* १ [*अगण*] (रस्त्यावरील वाहतुकीबाबत) प्रथम जाण्याचा हक्क. २ [*गण*] खाजगी जागेतून जाणारा रस्ता (किंवा त्याचा हक्क).

right^4 /राइट्/ *क्रि* [*सक*] नीट किंवा सरळ करणे : *~ a wrong, अन्याय दूर करणे* ○ *The ship ~ed herself, बोट पुन्हा सरळ झाली.*

right^5 /राइट्/ *वि, क्रिवि* उत्तरेला तोंड केले असता पूर्वेकडे शरीराचा जो भाग येईल त्या भागाकडचा, उजवा, उजवीकडे. **right** *ना* १ [*अगण*] उजवी बाजू किंवा दिशा. २ **the Right** [*अे.व*] (अे.व किंवा ब.व क्रियापदासह) राजकीय पक्षातील उजवा गट. **'right-hand** *वि* उजवा. **,right-'handed** *वि* (व्यक्तीबाबत) डाव्या हातापेक्षा उजव्या हाताचा जास्त वापर करणारा, डावखुरा नसणारा. **,right-hand 'man** *ना* [*गण*] मुख्य मदतनीस किंवा साथीदार, उजवा हात. **the ,right 'wing** *ना* [*अे.व*] (अे.व किंवा ब.व क्रियापदासह वापर) पुराणमतवादी राजकीय पक्ष किंवा गट. **,right-'wing** *वि* पुराणमतवादी, उजवा.

righteous /'राइचस्/ *वि* नैतिकदृष्ट्या योग्य (असे वागणारा), सज्जन, सन्मार्गी. **righteously** *क्रिवि* नीतीने, सन्मार्गाने. **righteousness** *ना* [*अगण*] सज्जनपणा, सन्मार्गीपणा.

rightful /'राइट्फुल्/ *वि* कायदा किंवा नीती याला अनुसरून, कायदेशीर : *the ~ owner, कायदेशीर मालक.* **rightfully** *क्रिवि* कायदेशीरपणे.

rigid /'रिजिड्/ *वि* १ कडक, ताठ; वाकवू शकता येणार नाही असा. २ काटेकोर, करडा; न बदलणारा. **rigidity** /रि'जिडटि/ *ना* [*अगण*] ताठपणा, कडकपणा; करडेपणा. **rigidly** *क्रिवि* घट्टपणे; काटेकोरपणे, कडकपणे.

rigorous /'रिगरस्/ *वि* १ कसून केलेला, काळजीपूर्वक. २ कडक; काटेकोर. **rigorously** *क्रिवि* काटेकोरपणे; कडकपणे; कसून.

rigour (*अमे* **-or**) /'रिग(र्)/ *ना* (*औप*) १ [*अगण*] कडकपणा; काटेकोरपणा, खरमरीतपणा. २ **rigours** [*ब.व*] कडक अटी.

rim /'रिम्/ *ना* [*गण*] गोलाकार काठ : *the ~ of a cup, कपाचा काठ.* **rim** *क्रि* **(-mm-)** [*सक*] काठ होणे/असणे.

rind /राइन्ड्/ *ना* [*गण, अगण*] काही फळांचे, चीजचे, डुकराच्या वाळक्या मांसाचे जाड साल.

ring^1 /रिङ्/ *क्रि* (*भूत* **rang** /रॅङ्/, *भूत वि* **rung** /रैङ्/) १ [*अक, सक*] (घंटेबाबत) वाजणे, वाजवणे. २ [*अक, सक*] फोन करणे. ३ [*अक*] (*for*)// कुणाला तरी हाक मारण्यासाठी घंटा वाजवणे. ४ [*अक*] (*with*)// निनादणे, घणाणणे. ५ (विशेषणासह वापर) ठराविक परिणाम करणे, विशिष्ट असे वाटणे : *His words rang true, त्याचे शब्द खरे वाटत होते.* ६ (*वाक्प्र*) **ring a 'bell** (*अनौप*) एखाद्या गोष्टीची आठवण करणे. ७ (*क्रिब*) **ring off** (*ब्रि*) फोन खाली ठेवणे/बंद करणे. **ring out** मोठ्याने स्पष्ट वाजणे, खणखणणे. **ring sb up** एखाद्याला फोन करणे. **ring** *ना* १ [*गण*] घंटेचा आवाज, घंटानाद. २ [*अे.व*] विशिष्ट

गुण : *a ~ of truth, सत्याचा वास/भाव.* ३ [*गण*] (*ब्रि अनौप*) (आलेला) फोन.

ring² /रिङ्/ *ना* [*गण*] १ बोटात घालायची अंगठी. २ कशाचेही गोलाकार कडे. ३ गोल, वर्तुळ : *The children stood in a ~, मुले गोल करून उभी राहिली.* ४ एकत्र काम करणाऱ्यांचा गट, कोंडाळे : *a 'spy ~, हेरांची टोळी.* ५ सर्कशीचा गोल : *a 'circus ~, सर्कशीचे खेळ करण्याचा गोल.* ६ मुष्टियुद्ध खेळण्याची दोरखंडांनी वेढलेली जागा. **ring** *क्रि* (*भूत, भूत वि* **~ed**) [*सक*] १ वेढणे. २ गोलाचे चिन्ह म्हणजेच एखाद्या गोष्टीभोवती गोल करणे. **'ringleader** *ना* [*गण*] वाईट गोष्ट करण्यात इतरांना मार्गदर्शन करणारा, म्होरक्या, सूत्रधार. **'ring road** *ना* [*गण*] शहराभोवतालचा रस्ता, गावाभोवतालचा गावाबाहेरचा रस्ता.

ringlet /'रिङ्लिट्/ *ना* [*गण, विशेषतः ब.व*] केसाची बट, झुलूप.

rink /रिङ्क्/ *ना* [*गण*] बर्फावरून घसरण्याचा खेळ खेळण्यासाठी (स्केटिंगसाठी) तयार केलेले हिममैदान.

rinse /रिन्स्/ *क्रि* [*सक*] स्वच्छ पाण्याने धुणे. **rinse** *ना* १ [*गण*] धुणे. २ [*गण, अगण*] केस रंगवायचा द्रव.

riot /'राइअट्/ *ना* १ [*गण*] जमावाचे हिंसक, तोडफोडीचे वर्तन, दंगा. २ [*अे.व*] उधळण, आतषबाजी : *a ~ of colour, रंगांची आतषबाजी.* ३ (*वाक्प्र*) **run 'riot** ⇨ RUN¹. **riot** *क्रि* [*अक*] दंग्यात भाग घेणे, दंगा करणे. **rioter** *ना* [*गण*] दंगेखोर. **riotous** *वि* अव्यवस्थित, गलथान; बेबंद.

rip /रिप्/ *क्रि* (**-pp-**) १ [*अक, सक*] सर्रकन् फाटणे/फाडणे, टरकावणे, खसकन् ओढणे. २ (*क्रिब*) **rip sb off** (*व्रात्य*) एखाद्याला जादा भाव लावणे, नाडणे. **rip** *ना* [*गण*] मोठी चीर; फाडलेली जागा. **'rip-cord** *ना* [*गण*] पॅराशूट म्हणजेच हवाई छत्री उघडण्याची दोरी. **'rip-off** *ना* [*गण*] (*व्रात्य*) एखाद्याला भरमसाट भाव लावणे, नाड.

ripe /राइप्/ *वि* (**~r, ~st**) १ पिकलेला, पक्व : *~ apples/cheese, पिकलेली सफरचंदे/खाण्यास तयार असे चीज.* २ पूर्ण वाढ झालेला. ३ *for//* एखाद्या गोष्टीस अनुरूप, योग्य. **ripeness** *ना* [*अगण*] पक्वता.

ripen /'राइपन्/ *क्रि* [*अक, सक*] पक्व होणे, पिकणे/पिकवणे.

ripple /'रिपल्/ *ना* [*गण*] १ पाण्याच्या पृष्ठभागावरची मंद लाट, लहर. २ हास्याची वगैरे लकेर. **ripple** *क्रि* [*अक, सक*] लाटा येणे/आणणे, लाटालाटांचे करणे, लाटा पसरणे/पसरवणे.

rise¹ /राइझ्/ *क्रि* (*भूत* **rose** /रउझ्/, *भूत वि* **~n** /'रिझ्न्/) [*अक*] १ वर येणे/जाणे, चढणे. २ (*औप*) (क) उभे राहणे. (ख) अंथरुणातून किंवा झोपून उठणे. ३ (सूर्य, चंद्र वगैरेबाबत) उगवणे, उदयास येणे. ४ वाढणे : *Prices have continued to ~, किंमती वाढत राहिल्या आहेत.* ५ चढ असणे : *rising ground, चढाची जमीन.* ६ अधिक बलवान होणे, जोर वाढणे : *The wind is rising, वाऱ्याचा जोर वाढतोय्.* ७ वरच्या स्थानावर जाणे. ८ (*औप*) बंड करणे, उठाव करणे. ९ (नदीबाबत) सुरू होणे. १० (*वाक्प्र*) **rise to the oc'casion** आल्या प्रसंगाला धैर्याने तोंड देणे. **rising** *ना* [*गण*] लष्करी उठाव, बंड.

rise² /राइझ्/ *ना* १ [*अे.व*] उदय, भरभराट, उत्कर्ष : *his ~ to power, त्याचे सत्तेवर येणे म्हणजेच त्याचा उदय.* २ [*गण*] वाढ. ३ [*गण*] (*ब्रि*) पगारवाढ. ४ [*गण*] टेकाड. ५ (*वाक्प्र*) **give rise to sth** एखाद्या गोष्टीला कारण होणे.

risk /रिस्क्/ *ना* १ [*गण, अगण*] धोका पोहोचणे, नुकसान होणे वगैरेची शक्यता, धोका, जोखीम. २ [*गण*] जोखमीची वस्तू किंवा व्यक्ती, धोका उत्पन्न करू शकणारी व्यक्ती किंवा वस्तू. ३ (*वाक्प्र*) **at one's own risk** स्वतःच्या जोखमीवर, धोका पत्करून. **at 'risk** धोक्यात. **run the risk of sth, take a 'risk** एखादी गोष्ट करण्यातला धोका पत्करणे. **risk** *क्रि* [*सक*] १ धोक्यात घालणे. २ वाईट गोष्ट होण्याचा धोका स्वीकारणे : *~ getting wet, भिजण्याचा धोका स्वीकारणे.* ३ (*वाक्प्र*) **risk one's neck** ⇨ NECK. **risky** *वि* (**-ier, -iest**) धोक्याचा, जोखमीचा.

risotto /रि'झ़ॉटउ/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **~s**) भातात मांस, चीज, कांदा असलेला एक इटालियन पदार्थ.

rissole /'रिसउल्/ *ना* [*गण*] मांस, मासे यांच्या बारीक बारीक तुकड्यांपासून बनविलेला चपटा लहान केक.

rite /राइट्/ *ना* [*गण*] पारंपरिक – विशेषतः धार्मिक – विधी.

ritual /'रिचुअल्/ *ना* [*गण, अगण*] १ विधिपद्धती, विधिशास्त्र. २ नेमाने करावयाच्या गोष्टी, कर्मकांड. **ritual** *वि* नित्यविधीचे, विधिपूर्ण; नित्याचा, कर्मकांडाचा.

rival /'राइव्ह्ल्/ *ना* [*गण*] प्रतिस्पर्धी. **rival** *क्रि* (**-ll-**; *अमे* तसेच **-l-**) [*सक*] प्रतिस्पर्धी असणे. **rivalry** *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) स्पर्धा, चुरस.

river /'रिव्ह(र्)/ *ना* [*गण*] नदी.

rivet /'रिव्हिट्/ *ना* [*गण*] धातूचे पत्रे किंवा पट्ट्या जोडण्यासाठी वापरायच्या धातूच्या पिना, कीलक, रिबिट. **rivet** *क्रि* [*सक*] १ रिबिट करणे. २ (*ला*) लक्ष खेचून घेणे. **riveting** *वि* अतिशय लक्षवेधक.

road /रउड्/ *ना* १ [*गण*] तयार केलेला रस्ता, सडक, मार्ग. २ (*वाक्प्र*) **the road to sth** एखाद्या गोष्टीपर्यंत पोहोचण्याचा मार्ग, पथ: *on the ~ to success, प्रगती पथावर.* **'roadblock** *ना* [*गण*] खास करून पोलिसांनी उभा केलेला रस्त्यावरील अडथळा. **'road-hog** *ना* [*गण*] निष्काळजी चालक. **'road-works** *ना* [*ब.व*] रस्तादुरुस्ती. **'roadworthy** *वि* (वाहनाबाबत) रस्त्यावर चालवण्याजोगे.

roam /रउम्/ *क्रि* [*अक, सक*] भटकणे.

roar /रॉऽ(र्)/ *ना* [*गण*] सिंहगर्जना, (सिंहाने केल्यासारखी) डरकाळी. **roar** *क्रि* १ (**क**) [*अक*] डरकाळी फोडणे, गर्जना करणे. (**ख**) [*सक*] मोठ्याने हसणे, हसण्याचा गडगडाट होणे. **roaring** *वि* (*अनौप*) १ गडबडाटाचा. २ खूप छान: *do a ~ing trade, चांगला धंदा करणे.* **roaring** *क्रिवि* खूप: *~ing drunk, खूप प्यालेला.*

roast /रउस्ट्/ *क्रि* [*अक, सक*] (मांस) विस्तवावर किंवा अव्हनमधे (भट्टीत) भाजणे. **roast** *वि* भाजलेले, भाजके. **roast** *ना* [*गण*] भाजक्या मांसाचा मोठा तुकडा.

rob /रॉब्/ *क्रि* (**-bb-**) [*सक*] चोरणे, लुटणे, अपहरण करणे. **robber** *ना* [*गण*] लुटारू, दरोडेखोर. **robbery** *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) दरोडा, चोरी, अपहरण.

robe /रउब्/ *ना* [*गण*] पायघोळ अंगरखा, झगा.

robin /'रॉबिन्/ *ना* [*गण*] छातीवर लाल रंग असलेला एक छोटा तपकिरी पक्षी, दह्याळ, चीरक.

robot /'रउबॉट्/ *ना* [*गण*] काही मानवी कामे आपोआप करू शकणारे यंत्र, यंत्रमानव.

robust /रउ'बस्ट्/ *वि* दणकट; धट्टाकट्टा, सुदृढ. **robustly** *क्रिवि* दणकटपणे; धट्टेकट्टेपणाने. **robustness** *ना* [*अगण*] दणकटपणा; धट्टेकट्टेपणा, सुदृढपणा.

rock^1 /रॉक्/ *ना* १ (**क**) [*अगण*] खडक, प्रस्तर. (**ख**) [*गण, अगण*] अश्म, पाषाण, दगड. २ [*गण*] मोठा दगड, धोंडा, शिला. ३ [*गण*] (*ब्रि*) काडीच्या आकाराचा एक कडक गोड पदार्थ. ४ (*वाक्प्र*) **on the 'rocks** (**क**) (विवाहाबाबत) लवकरच असफल होऊ शकणारा, मोडणारा, न टिकणारा. (**ख**) (पेयाबाबत) बर्फ घालून. **,rock-'bottom** *ना* [*अगण*] अगदी खालचा बिंदू, तळ. **rockery** *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) छोटे दगड आणि रोपे असलेला बागेचा एक भाग.

rock^2 /रॉक्/ *क्रि* १ [*अक, सक*] पुढेमागे किंवा डावीकडून उजवीकडे डोलणे, झुलणे. २ [*सक*] (*ला*) प्रचंड धक्का देणे, थक्क करणे. ३ (*वाक्प्र*) **rock the 'boat** शांतता भंग करणे, घडी विस्कटणे. **rocker** *ना* १ [*गण*] डोलखुर्चीचा अर्धवर्तुळाकार पाय. २ = ROCKING-CHAIR. ३ (*वाक्प्र*) **off one's rocker** (*व्रात्य*) वेडा. **'rocking-chair** *ना* [*गण*] डोलखुर्ची.

rock^3 (तसेच **'rock music**) /रॉक्/ *ना* [*अगण*] इलेक्ट्रिक गिटारवर वगैरे वाजवायचे जोषपूर्ण आधुनिक पाश्चात्य लोकप्रिय संगीत. **,rock and 'roll** (तसेच **,rock 'n' 'roll**) *ना* [*अगण*] रॉक संगीताचे पूर्वीचे (आणि जरा सोपे असे) रूप.

rocket /'रॉकिट्/ *ना* [*गण*] १ उपग्रह किंवा

क्षेपणास्त्र सोडण्यासाठी वापरायचा अग्निबाण. २ हवेत उंच उडणारा दारूचा बाण. **rocket** *क्रि* [*अक*] एकदम वाढणे, भडकणे: *Prices are ~ing, किंमती भडकत आहेत.*

rocky /'रॉकि/ (**-ier, -iest**) *वि* १ खडकाचा; खडकाळ. २ (*अनौप*) हालणारा, स्थिर न राहणारा: *The table is ~, टेबल डगमगतंय.*

rod /रॉड्/ *ना* [*गण*] धातूची सळई, लाकडाची दांडी, काठी वगैरे: *a 'fishing-~, मासे मारायची काठी.*

rode RIDE^1 चा *भूत.*

rodent /'रउडन्ट्/ *ना* [*गण*] खार, उंदीर यासारखा तीक्ष्णदंत प्राणी, कुरतडणारा प्राणी.

rodeo /रउ'डेइअउ; *अमे* 'रउडिअउ/ *ना* [*गण*] (*ब.व* ~s) (अमेरिकेत) भरधाव धावणाऱ्या घोड्यावर बसून जनावराच्या गळ्यात दोरीचा फास टाकण्याच्या कौशल्याची स्पर्धा.

roe^1 /रउ/ *ना* [*अगण*] अन्न म्हणून खायची माशाच्या अंड्यांची पुंजकी.

roe^2 /रउ/ *ना* [*गण*] लहान हरीण. **'roebuck** *ना* [*गण*] (नर) हरीण.

rogue /रउग्/ *ना* [*गण*] डांबरट माणूस, डँबिस, मवाली. **roguish** *वि* डांबरट, खोडकर; खेळकर.

role (तसेच **rôle**) /रउल्/ *ना* [*गण*] १ नाटकातील भूमिका. २ एखाद्याचे कार्य किंवा महत्त्व.

roll^1 /रउल्/ *क्रि* १ [*अक, सक*] घरंगळत जाणे, गरगरत जाणे. २ [*अक*] गडगडत जाणे: *The clouds ~ed away, ढग गडगडत गेले.* ३ [*अक, सक*] डुलणे, हेलकावणे, हेलकावे देणे: *The ship was ~ing heavily, जहाज जोरजोरात हेलकावत होते.* ४ [*सक*] (*up*)// गुंडाळणे: *~ up a carpet, गालिचा गुंडाळणे.* ५ [*सक*] रूळ वगैरेसारखी गोलाकार वस्तू फिरवून सपाट करणे: *~ a lawn, हिरवळ सपाट करणे.* ६ [*अक*] गडगडाट करणे: *The thunder ~ed in the distance, दूरवर विजेचा गडगडाट ऐकू येत होता.* ७ (*क्रिब*) **roll in** (*अनौप*) मोठ्या प्रमाणात येणे, ओतणे. **roll up** (*अनौप*) येणे, पोहोचणे.

roll^2 /रउल्/ *ना* [*गण*] १ गुंडाळी, गुंडा, वळकटी: *a ~ of film, फिल्मची गुंडाळी.* २ घरंगळ. ३ एका माणसाचा छोटा गोलाकार पाव. ४ नावांची अधिकृत यादी. ५ मोठा घुमणारा आवाज: *the ~ of drums, ढोलांचा ढमढम् आवाज.*

roller /'रउल(र्)/ *ना* [*गण*] (खडी वगैरे) दाबायचा रूळ. **'roller-skate** *ना* [*गण*] चाकाचे बूट. **'roller-skate** *क्रि* [*अक*] चाकाचे बूट घालून हालचाल करणे.

rolling /'रउलिङ्/ *वि* १ वर येऊन अलगद खाली जाणारा: *~ hills/waves, वर-खाली असणारे डोंगर/होणाऱ्या लाटा.* २ (*वाक्प्र*) **be 'rolling in it** (*अनौप*) पैशात लोळणे. **'rolling-pin** *ना* [*गण*] लाटणे.

Roman /'रउमन्/ *ना* [*गण*], *वि* रोमचा (नागरिक) – विशेषतः प्राचीन रोमचा. **,Roman 'Catholic** *ना* [*गण*], *वि* पोपचे धार्मिक नेतृत्व मानणाऱ्या ख्रिस्ती चर्चचा सभासद. **,Roman 'Catholicism** *ना* [*अगण*] पोपचे धर्मनेतृत्व मानणारी ख्रिस्ती परंपरा. **,Roman 'numeral** *ना* [*गण*] अंक दाखविण्यासाठी V, L, M यासारखी वापरलेली अक्षरे किंवा त्यांचा IV सारखा संच.

romance /रउ'मॅन्स्/ *ना* १ [*गण, अगण*] प्रेम प्रकरण. २ [*गण*] प्रेम, धाडस वगैरे यांची कथा. ३ [*अगण*] प्रेम, धाडस, उत्कंठा दाखविणारा गुण.

romantic /रउ'मॅन्टिक्/ *वि* १ व्यवहाराशी फारकत असणारा; खूप काल्पनिक. २ प्रेममय, प्रणयरम्य. ३ प्रेम, धाडस, उत्कंठा दाखविणारा, स्वच्छंदी: *a ~ journey, अद्‌भुतरम्य प्रवास.* **romantic** *ना* [*गण*] अद्‌भुतरम्य, प्रेमभावी व्यक्ती, स्वच्छंदी माणूस. **romantically** /-कलि/ *क्रिवि* प्रणयभावनेने, अद्‌भुतरम्यपणे. **romanticism** /रउ'मॅन्टिसिझम्/ *ना* [*अगण*] प्रणयी किंवा अद्‌भुतरम्यभाव, स्वच्छंदीपणा. **romanticize** /रउ'मॅन्टिसाइझ्/ *क्रि* [*अक, सक*] एखादी गोष्ट अधिक अद्‌भुतरम्य किंवा प्रणययुक्त करणे.

romp /रॉम्प्/ *क्रि* [*अक*] (विशेषतः मुलांबाबत) दंगा करणे. **romp** *ना* [*गण*] दंगामस्ती.

roof /रूफ्/ *ना* [*गण*] १ छप्पर. २ वरचा भाग: *the ~ of the mouth, तालुच्छद.* **roof**

क्रि [*अक*] छप्पर घालणे. **roofing** *ना* [*अगण*] छप्पर घालण्याचे सामान. **'roof-rack** *ना* [*गण*] मोटारीच्या छपरावरची मोठे सामान ठेवण्याची धातूची चौकट.

rook^{1} /रुक्/ *ना* [*गण*] कावळ्यासारखा एक मोठा काळा पक्षी, डोंबकावळा. **rookery** *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) अशा पक्ष्यांची घरटी असणारी झाडे.

rook^{2} /रुक्/ *क्रि* [*सक*] (*व्रात्य*) फसवणे.

rook^{3} /रुक्/ *ना* [*गण*] = CASTLE २.

room /रूम्, रुम्/ *ना* १ [*गण*] खोली. २ [*अगण*] मोकळी जागा, अवसर; पुरेशी जागा : *Is there ~ for me in the car? गाडीत मला जागा आहे का?* ३ [*अगण*] (*ला*) संधी किंवा वाव : *~ for improvement, सुधारणेस वाव.* **roomy** *वि* (**-ier, -iest**) प्रशस्त, ऐसपैस.

roost /रूस्ट्/ *ना* [*गण*] पक्ष्याची बसायची जागा, धारा, अड्डा. **roost** *क्रि* [*अक*] (पक्ष्याबाबत) फांदीवर वगैरे विसावणे.

rooster /'रूस्ट(र्)/ *ना* [*गण*] (विशेषतः *अमे*) कोंबडा.

root^{1} /रूट्/ *ना* १ [*गण*] मातीत असणारा आणि मातीतून अन्न व पाणी शोषून घेणारा झाडाचा भाग, झाडाचे मूळ. २ **roots** [*ब.व*] आपण जिथे वाढलो त्या ठिकाणी असणारे अनुबंध, मुळे. ३ [*गण*] केस, दात वगैरेचे मूळ. ४ [*गण*] (*ला*) उगम; पाया : *Is money the ~ of all evil? सर्व पापाचे मूळ पैसा आहे का?* ५ [*गण*] (*व्याकरण*) शब्दाचे मूळरूप. ६ (*वाक्प्र*) **take root** मूळ धरणे, स्थिरस्थावर होणे.

root^{2} /रूट्/ *क्रि* १ [*अक, सक*] मुळे धरणे/येणे, रुजणे. २ [*सक*] जागच्या जागी स्तब्ध होणे : *He stood ~ed to the spot by fear, तो भीतीने जागी खिळून राहिला.* ३ [*सक*] (बहुधा कर्मणी) (कल्पना वगैरे बाबत) पक्क्या बसणे, खोलवर रुजणे : *deeply ~ed feelings, खोलवर रुजलेल्या भावना.* ४ (*क्रिव*) **root sth out** एखादी गोष्ट समूळ नष्ट करणे.

rope /रउप्/ *ना* १ [*गण, अगण*] दोर, दोरखंड. २ [*ब.व*] एखादी गोष्ट करण्याची नेहमीची पद्धती : *show sb the ~s, एखाद्याला मार्ग सांगणे/दाखवणे.* **rope** *क्रि* [*सक*] १ दोरीने घट्ट बांधणे. २ (*क्रिव*) **rope sb in to do sth** एखाद्याला एखाद्या कामात ओढणे, सामील करून घेणे. **rope sth off** दोर बांधून वेगळे करणे, भोवती दोर बांधणे. **ropy** (तसेच **ropey**) *वि* (**-ier, -iest**) (*ब्रि अनौप*) (गुणवत्ता, तब्येत, प्रयोग वगैरे) बेताचा, सामान्य, यथातथा.

rosary /'रउझ़रि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) १ जपमाळ. २ जप, मोजलेल्या प्रार्थना.

rose^{1} RISE^{1} चा *भूत.*

rose^{2} /रउझ़्/ *ना* १ [*गण*] काटेरी गुलाबाचे झाड, गुलाब. २ [*अगण*] तांबुस गुलाबी रंग.

rosé /'रउझ़ेइ; *अमे* रउ'झ़ेइ/ *ना* [*अगण*] गुलाबी दारू.

rosette /रउ'झ़ेट्/ *ना* [*गण*] रिबिनी वापरून केलेला गुलाबाच्या आकाराचा बिल्ला.

roster /'रॉस्ट(र्)/ *ना* [*गण*] (विशेषतः *अमे*) लोकांच्या नावांची आणि त्यांच्या कामांची यादी, नामावली.

rostrum /'रॉस्ट्रम्/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s** किंवा **-tra** /-ट्र/) वक्त्यासाठीचे व्यासपीठ.

rosy /'रउझ़ि/ *वि* (**-ier, -iest**) १ गुलाबी. २ (*ला*) आशा असणारा, आशादायक; उत्साहवर्धक, आनंदी : *a ~ future, रम्य भविष्यकाळ.*

rot /रॉट्/ *क्रि* (**-tt-**) [*अक, सक*] सडणे, सडवणे, कुजणे, कुजवणे, किडणे, कीड लागणे. **rot** *ना* [*अगण*] १ कीड. २ (*ला*) ढासळणारी परिस्थिती, वाईट अवस्था. ३ (*जुना, अप्रचलित*) निरर्थकपणा, भंकसपणा.

rota /'रउट/ *ना* [*गण*] (*ब्रि*) नामावली, लोक आणि त्यांची कामे यांची यादी.

rotary /'रउटरि/ *वि* मध्यबिंदूभोवती फिरणारा, परिभ्रमण करणारा.

rotate /रउ'टेइट्; *अमे* 'रउटेइट्/ *क्रि* [*अक, सक*] १ मध्यबिंदूभोवती फिरणे/फिरवणे, चक्राकार फिरणे, परिभ्रमण करणे. २ पाळीपाळीने घेणे/होणे किंवा करायला लावणे : *~ crops, पिके आलटून पालटून घेणे.* **rotation** /-टेइश्न्/ *ना* १ [*अगण*] चक्राकार भ्रमण, परिभ्रमण : *the rotation of the*

Earth, पृथ्वीचे परिभ्रमण. २ [*गण*] एक पूर्ण फेरा, आवर्तन.

rotor /'रउट(र्)/ *ना* [*गण*] मशीनमधील फिरता भाग – विशेषतः हेलिकॉप्टरवरील फिरता पंखा.

rotten /'रॉट्न्/ *वि* १ कुजका, कीड लागलेला, सडका. २ (*अनौप*) वाईट, नासका; घाणेरडा.

rouge /रूझ्/ *ना* [*अगण*] गालावर लावायची लाल पावडर, लाली.

rough^{1} /रफ्/ *वि* १ (एखाद्या पृष्ठभागाबाबत) सपाट आणि गुळगुळीत नसलेला, खडबडीत. २ नाजुकपणा नसणारा, घिसाडा, धसमुसळा; वागण्यात दाणगट, आडमुठा, असंस्कृत. ३ खवळलेला, वादळी : *a ~ sea, खवळलेला समुद्र.* ४ अचूक नाही असा, साधारण; सर्व तपशील नसलेला, गोळाबेरीज : *a ~ guess/sketch, साधारण अंदाज/कच्चे रेखाचित्र.* ५ (*वाक्प्र*) **'rough and ,ready** घाईघाईत आणि नीट न केलेला, कामचलाऊ. **rough** *क्रिवि* घराबाहेर, थंडीगारठ्यात, उघड्यावर : *live/sleep ~, (घराबाहेर) उघड्यावर राहणे/झोपणे.* **rough** *ना* १ [*अगण*] खडबडीत जागा किंवा पृष्ठभाग. २ (*वाक्प्र*) **in 'rough** अपूर्ण; कच्चा, तात्पुरता. **roughly** *क्रिवि* १ धसमुसळेपणाने, असंस्कृतपणे. २ सर्वसाधारणपणे, ढोबळमानाने : *It will cost ~ly £100, साधारणपणे त्याला १०० पौंड पडतील.* **roughness** *ना* [*अगण*] खडबडीतपणा; धसमुसळेपणा, असंस्कृतपणा.

rough^{2} /रफ्/ *क्रि* १ (*वाक्प्र*) **'rough it** (*अनौप*) नेहमीच्या सुखसोयीविना राहणे. २ (*क्रिव*) **rough sb up** (*अनौप*) एखाद्यावर हल्ला करणे, धक्काबुक्की करणे.

roughen /'रफ्न्/ *क्रि* [*अक, सक*] खरबरीत किंवा खरखरीत होणे किंवा करणे.

roulette /रू'लेट्/ *ना* [*अगण*] फिरत्या चाकावर चेंडू टाकून खेळायचा एक जुगार.

round^{1} /राउन्ड्/ *वि* १ गोलाकार किंवा वर्तुळाकार. २ जाऊन पुन्हा त्याच जागी (बहुधा वेगळ्या मार्गाने) येणारा : *a ~ trip, जाऊन वेगळ्या मार्गाने परत येण्याची सहल.* ३ (अंकाबाबत) दशकप्रमाणात पूर्ण केलेला – १०, १०० वगैरे. **roundly** *क्रिवि* जोरदारपणे, सर्वांगाने, सर्व बाजूंनी. **roundness** *ना* [*अगण*] गोलाई. **,round-'shouldered** *वि* खांद्यात वाकलेला, पोक काढणारा.

round^{2} /राउन्ड्/ *क्रिवि* १ विरुद्ध बाजूला, उलट : *Turn your chair ~, तुझी खुर्ची उलट फिरव.* २ चक्राकार, गोल फिरत पुन्हा जागेवर येतो अशा रीतीने : *The hands of a clock go ~, घड्याळाचे काटे चक्राकार फिरतात.* ३ गोलात, वर्तुळामधे : *A crowd gathered ~, भोवताली गर्दी जमली* ○ *spin ~, गरगर फिरणे/फिरवणे.* ४ एका माणसाकडून दुसऱ्याकडे, एका ठिकाणाहून दुसरीकडे, सगळ्यांना, सगळीकडे : *Please pass these papers ~, कृपया हे कागद सगळ्यांना दे.* ५ आडवळणाचा, फेऱ्याचा, वळसा असणारा : *a long way ~, लांब फेऱ्याचा रस्ता.* ६ एखाद्याच्या घरी : *Come ~ and see me, घरी येऊन भेट.*

round^{3} /राउन्ड्/ *ना* [*गण*] १ फेरी : *the next ~ of talks, बोलण्यांची पुढची फेरी.* २ कामे करत मारायची चक्कर : *a postman's ~, पोस्टमनची (डाक वाटपाची) चक्कर.* ३ (क) स्पर्धेतील फेरी. (ख) (गोल्फमधे) एक डाव. (ग) (बॉक्सिंगमधे) एक फेरी. ४ बरोबरच्या सर्व मंडळींना स्वतःच्या पैशात दिलेले मद्य. ५ पावाच्या दोन संपूर्ण तुकड्यांचे केलेले सँडविच. ६ बंदुकीची गोळी.

round^{4} /राउन्ड्/ *शब्दयो* १ भोवती : *The earth moves ~ the sun, पृथ्वी सूर्याभोवती फिरते.* २ सभोवार : *a wall ~ the house, घराभोवतालची भिंत.* ३ दुसऱ्या बाजूकडे : *~ the corner, कोपऱ्याच्या दुसऱ्या टोकाला.* ४ भर, विविध ठिकाणी : *look ~ the shop, दुकानभर पाहणे.* ५ जवळ, -ला, -कडे : *I've never seen him ~ here, ह्या बाजूला मी त्याला कधी पाहिलेलं नाही.*

round^{5} /राउन्ड्/ *क्रि* [*सक*] १ चक्कर मारणे, वळसा घालून जाणे : *~ a corner कोपऱ्याला वळसा घालून जाणे.* २ गोल करणे. ३ (*क्रिव*) **round sth off** समाधानकारक रीतीने पूर्ण करणे. **round sth up** (क) गोळा करणे : *~ up cattle, गुरेढोरे एकत्र आणणे.* (ख) पूर्णांक करणे.

roundabout /'राउन्डबाउट्/ *ना* [*गण*] १ वाहनांनी वर्तुळाकार चक्कर घ्यायची अशी रस्ते

मिळण्याची जागा. २ (जत्रेत वगैरे) गोलगोल फिरणारे मुलांसाठीचे लाकडी घोड्यांचे वगैरे चक्र. **roundabout** *वि* लांबचा, आडवळणाचा : *a ~ road, आडवळणी मार्ग.*

rounders /'राउन्डझ़्/ *ना* (अे.व क्रियापदासह) बॅट आणि चेंडू वापरून खेळायचा एक सांघिक खेळ.

rouse /राउझ़्/ *क्रि* १ [*अक, सक*] (*औप*) उठणे/उठवणे, जागे होणे/करणे. २ [*सक*] स्फुरण देणे, एखाद्याचे चित्त जागे करणे : *a rousing speech, चेतवणारे भाषण.*

rout /राउट्/ *क्रि* [*सक*] दारूण पराभव करणे, धूळ चारणे. **rout** *ना* [*गण*] दणदणीत पराभव.

route /रूट्; *अमे* राउट्/ *ना* [*गण*] मार्ग, रस्ता. **route** *क्रि* [*सक*] ठराविक मार्गाने पाठवणे.

routine /रू'टीन्/ *ना* [*गण, अगण*] नेहमीचा कार्यक्रम, शिरस्ता, परिपाठ. **routine** *वि* १ नित्याचा, नेहमीचा. २ कंटाळवाणा, तोचतोचपणाचा.

row^{1} /रउ/ *ना* [*गण*] १ लोकांची किंवा वस्तूंची रांग, पंक्ती. २ (*वाक्प्र*) **in a row** एकापाठोपाठ एक, सलग, लागोपाठ : *She's been to the cinema two evenings in a ~, लागोपाठ दोन संध्याकाळ ती सिनेमाला गेली आहे.*

row^{2} /रउ/ *क्रि* [*अक, सक*] नाव वल्हवणे. **row** *ना* [*गण*] वल्हवायच्या होडीतून केलेला प्रवास. **'rowing-boat** *ना* [*गण*] वल्हवण्याची नाव.

row^{3} /राउ/ *ना* १ [*गण*] भांडण, वादावादी. २ [*अगण, अे.व*] आरडाओरडा, कालवा. **row** *क्रि* [*अक*] मोठमोठ्याने भांडणे, तंटा करणे.

rowdy /'राउडि/ *वि* (**-ier, -iest**) तंटेखोर, दंगेखोर, हुल्लडबाज. **rowdy** *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) (*जुना, अप्रचलित, अधिक्षेपी*) दंगेखोर माणूस, हुल्लडखोर.

royal /'रॉइअल्/ *वि* राजाचा किंवा राजास योग्य असा, राज-. **royal** *ना* [*गण, बहुधा ब.व*] (*अनौप*) राजघराण्यातील व्यक्ती. **,royal 'blue** *वि* गडद निळा, निळाभोर. **royalist** *ना* [*गण*] राजा, राणी किंवा त्यांचा अंमल मानणारा माणूस, राजनिष्ठ. **royally** *क्रिवि* शाही थाटाने, बादशाही.

royalty /'रॉइअल्टि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] राजघराण्यातील व्यक्ती, राजकुटुंबीय. २ [*गण*] लेखकाचे वगैरे पुस्तक-विक्रीवरील वगैरे मानधन, स्वामित्वधन.

RSVP /,आर् अेस् व्ही 'पी/ *संरू* (निमंत्रण-पत्रिकेवर) फ्रेंच répondez s'il vous plaît म्हणजे इंग्रजीत please reply कृपया कळवा.

rub /रॅब्/ *क्रि* (**-bb-**) १ [*अक, सक*] घासणे, चोळणे. २ [*सक*] घासून साफ/मऊ/स्वच्छ वगैरे करणे : *~ the surface dry, पृष्ठभाग घासून कोरडा करणे.* ३ (*वाक्प्र*) **rub it in** (*अनौप*) अप्रिय गोष्टीची एखाद्याला आठवण करून देणे. **rub sb up the wrong way** (*अनौप*) एखाद्याला त्रास देणे, चिडवणे. ४ (*क्रिब*) **rub sb/sth down** पंचाने स्वच्छ पुसणे किंवा कोरडे करणे. **rub sth down** घासून गुळगुळीत करणे. **rub sth in** (मलम, तेल वगैरे) अंगाला चोळणे, तेलाने वगैरे रगडणे. **rub sth off** विशेषतः हाताने पुसून काढणे, स्वच्छ करणे : *R~ the dirt off your trousers, तुझ्या पँटला लागलेली घाण/धूळ पूस.* **rub sth out** खोडरबराने खोडणे. **rub** *ना* [*गण*] घासणे, चोळणे.

rubber^{1} /'रॅब(र्)/ *ना* १ [*अगण*] टायर वगैरे बनवण्यास वापरायचे चिवट, लवचिक, टिकाऊ द्रव्य, रबर. २ [*गण*] खोडरबर. **,rubber 'band** *ना* [*गण*] कागद वगैरे एकत्र ठेवण्यासाठी बांधायचे रबर.

rubber^{2} /'रॅब(र्)/ *ना* [*गण*] ब्रिज, क्रिकेट सारख्या खेळातील दोन समान संघातील तीन सामन्यांतून सर्वोत्कृष्ट ठरवणारी स्पर्धा.

rubbish /'रॅबिश्/ *ना* [*अगण*] १ कचरा. २ वेडगळपणा, निरर्थकपणा. **rubbishy** *वि* (*अनौप*) क्षुद्र, कुचकामी.

rubble /'रॅब्ल्/ *ना* [*अगण*] दगडविटांचे फुटके तुकडे.

ruby /'रूबि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) गडद लाल मौल्यवान खडा, माणिक.

rucksack /'रॅक्सॅक्/ *ना* [*गण*] पायी प्रवास करणाऱ्या किंवा गिर्यारोहण करणाऱ्या माणसाच्या पाठीवरची मोठी पिशवी.

rudder /'रॅड(र्)/ *ना* [*गण*] विमानाचे किंवा

जहाजाचे मागे लावलेले चपट्या आकाराचे बिजागिरीने बसवलेले सुकाणू.

ruddy^{1} /'रैडि/ *वि* (**-ier, -iest**) १ (चेहऱ्याबाबत) आरोग्यदायक असा गुलाबी किंवा लालीमा असलेला. २ लाल.

ruddy^{2} /'रैडि/ *वि, क्रिवि* (*ब्रि व्रात्य*) (जोर देण्यासाठी वापर): *You're a ~ fool, तू अगदी/चक्क वेडा आहेस.*

rude /रूड्/ *वि* (**~r, ~st**) १ उद्धट, उर्मट, मग्रूर. २ असभ्य, अशिष्ट; रांगडा, रानटी. ३ अनपेक्षित आणि धक्कादायक : *a ~ reminder, उद्दाम स्मरणपत्र.* ४ (*जुना अप्रचलित*) ओबडधोबड, अघड. **rudely** *क्रिवि* उर्मटपणे; असभ्यपणे; रानटीपणाने. **rudeness** *ना* [*अगण*] उद्धटपणा; अशिष्टपणा; रानटीपणा; धक्कादायकपणा.

rudiments /'रूडिमन्ट्स/ *ना* [*ब.व*] एखाद्या विषयाच्या प्रारंभीच्या पायऱ्या, मूलतत्त्वे, प्राथमिक तत्त्वे. **rudimentary** /रूडि'मेन्ट्रि/ *वि* १ सोपा, प्राथमिक; पायाभूत. २ अविकसित.

ruffian /'रैफिअन्/ *ना* [*गण*] (*जुना अप्रचलित*) दांडगा माणूस, चांडाळ.

ruffle /'रैफ्ल्/ *क्रि* [*सक*] १ चोळवटणे, पिंजारणे. २ (*ला*) निराश करणे, उद्विग्न करणे.

rug /रैग्/ *ना* [*गण*] १ लहान गालिचा. २ लहान उबदार पांघरूण.

rugby /'रैग्बि/ *ना* [*अगण*] अंडाकृती चेंडू पायाने किंवा हाताने पळवत खेळायचा एक फुटबॉलसारखा खेळ.

rugged /'रैगिड्/ *वि* १ असखल; दगडधोंड्यांचा, खडकाळ. २ दणकट दिसणारा; कणखर : *a ~ face, कष्ट केल्याच्या खुणा असलेला म्हणजेच कणखर चेहेरा.*

rugger /'रैग(र्)/ *ना* [*अगण*] (*अनौप विशेषतः ब्रि*) Rugby, रगबी खेळ.

ruin /'रूइन्/ *क्रि* [*सक*] १ नष्ट करणे, बिघडवून टाकणे. २ एखाद्याचे दिवाळे वाजवणे/काढणे, कंगाल करणे. **ruin** *ना* १ [*अगण*] नाश. २ [*गण*] भग्नावशेष, पडझड झालेली इमारत वगैरे : *The house is in ~s, घराची खूप पडझड झालीय्.* ३ [*अगण*] आर्थिक अवनतीचे कारण, भिकेला लागण्याचे कारण : *Drink was his ~, मद्यप्राशनाने तो भिकेला लागला.* **ruined** *वि* पडझड झालेला, मोडकळीस आलेला, अंशतः नष्ट झालेला. **ruinous** *वि* नष्ट करणारा, बिघडवून टाकणारा.

rule /रूल्/ *ना* १ [*गण*] वागण्याचा नियम. २ [*गण*] एखादी गोष्ट घडण्याचा नेहमीचा मार्ग, नियम. ३ [*अगण*] अंमल, शासन : *under foreign ~, परकीय अंमलाखाली.* ४ (*वाक्प्र*) **as a 'rule** ˌसर्वसामान्यपणे. **rule of thumb** मोजमापाची किंवा निवाड्याची ढोबळ पद्धती, व्यावहारिक मार्ग. **rule** *क्रि* १ [*अक, सक*] एखाद्यावर अधिकार असणे; राज्य करणे, अंमल असणे, सत्ता असणे. २ [*अक, सक*] निकाल देणे, निवाडा करणे : *She ~d that the evidence could not be accepted, तो पुरावा ग्राह्य धरता येणार नाही असा निकाल तिने दिला* ○ *The judge ~d in his favour, न्यायमूर्तींनी त्याच्या बाजूने निकाल दिला.* ३ [*सक*] पट्टीने रेघ मारणे. ४ (*वाक्प्र*) **rule the 'roost** एखाद्या गोष्टीवर पूर्ण सत्ता असणे, स्वामित्व असणे. ५ (*क्रिब*) **rule sth out** एखादी गोष्ट शक्य नाही म्हणून सांगणे, शक्यता फेटाळणे. **ruler** *ना* [*गण*] १ सत्ताधारी, शासक, राज्यकर्ता. २ आखायची किंवा मोजायची पट्टी. **ruling** *ना* [*गण*] अधिकृत निर्णय, अधिनिर्णय.

rum /रैम्/ *ना* [*अगण*] उसापासून बनविलेली दारू.

rumble /'रैम्ब्ल्/ *क्रि* [*सक*] *ना* [*गण*] गरजणे, गडगडाट (करणे).

rummage /'रैमिज्/ *क्रि* [*अक*] एखादी वस्तू शोधताना उसकाउसकी करणे, धुंडाळणे, हुडकणे.

rumour (*अमे* **-or**) /'रूम(र्)/ *ना* [*गण, अगण*] कानोकानी होणारी पण निश्चितपणे खरी नसणारी बातमी, अफवा, आवई, कंडी, भुमका. **rumoured** (*अमे* **-ored**) *वि* अफवा म्हणून उठलेली.

rump /रैम्प्/ *ना* १ [*गण*] जनावराचे ढुंगण किंवा नितंब. २ **ˌrump 'steak** [*गण, अगण*] बैलाच्या किंवा गाईच्या नितंबाचे मांस.

rumple /'रैम्प्ल्/ *क्रि* [*सक*] चुरगळणे,

चोळामोळा करणे.

rumpus /'रैम्पस्/ *ना* [*अ.व*] आरडाओरडा, गदारोळ.

run^1 /रैन्/ *क्रि* (**-nn-**, *भूत* **ran** /रॅन्/, *भूत वि* **run**) १ [*अक*] (माणसे किंवा जनावरांबाबत) पळणे, धावणे. २ [*सक*] पळत जाणे, पळून अंतर कापणे. ३ (क) [*अक*] धावण्याचा सराव करणे. (ख) [*अक, सक*] (धावण्याच्या शर्यतीत) भाग घेणे. ४ [*अक, सक*] एखाद्या दिशेने जोराने जाणे, वेगाने येणे : *The car ran down the hill, टेकडीवरून गाडी वेगाने खाली आली.* ५ [*अक*] न थांबता पुढे जाणे : *The train ran past the signal, सिग्नल ओलांडून गाडी पुढे गेली.* ६ [*अक*] (बस वगैरेबाबत) विशिष्ट मार्गावरून धावणे. ७ [*अक*] विशिष्ट दिशेने पसरणे : *The road ~s east, रस्ता पूर्वेला पसरतो.* ८ [*सक*] चालवणे : *~ a hotel, हॉटेल चालवणे.* ९ [*अक*] चालू राहणे, चालणे : *The play ran for six months, नाटक सहा महिने चालले.* १० [*अक, सक*] (यंत्र वगैरे) चालणे/चालवणे : *The heater ~s on electricity, हा हीटर/जलतापक विजेवर चालतो.* ११ [*सक*] जाणे, नेणे, फिरवणे, मधून घालणे : *~ a comb through one's hair, केसातून कंगवा फिरवणे.* १२ [*सक*] वाहून नेणे : *I'll ~ you home, मी तुला घरी नेतो/सोडतो.* १३ [*अक*] *for*// (विशेषतः *अमे*) निवडणुकीला उभे राहणे : *~ for president, अध्यक्षपदासाठी उभे राहणे.* १४ [*अक, सक*] द्रवपदार्थ वाहणे, प्रवाही करणे : *a river that ~s into the sea, समुद्राला मिळणारी नदी.* १५ [*अक*] (रंग) पसरणे, वाहणे. १६ (बहुधा विशेषणासह वापर) होणे : *Supplies are ~ning low, पुरवठा कमी पडत/होत आहे.* १७ [*सक*] वर्तमानपत्र वगैरेमधून प्रसिद्ध करणे. १८ [*सक*] चोरटी आयात करणे : *~ **drugs**, मादक पदार्थांची चोरटी आयात करणे.* १९ [*अक*] विशेष असणे, नियमितपणे विशिष्ट गुण येणे : *Red hair ~s in the family, त्या घराण्यात तांबुस केस वंशपरंपरेने चालत आले आहेत.* २० (*वाक्प्र*) **run amok** उधळणे, बिथरून सैरावैरा पळणे, तुडवत जाणे. **run its course** ⇨ COURSE^1. **'run for it** एखाद्या गोष्टीपासून किंवा व्यक्तीपासून स्वतःला वाचवण्यासाठी दूर पळणे, टाळण्यासाठी दूर जाणे. **run 'high** (भावनांबाबत) शिगेला पोहोचणे, परिसीमा गाठणे. **run 'riot/'wild** बेबंद वागणे, दंगा करणे, धुडगुस घालणे. **run the risk of** ⇨ RISK. **run to seed** ⇨ SEED. **run short (of sth)** स्वतःजवळचा जवळजवळ सर्व साठा संपणे/संपवणे. **run to waste** ⇨ WASTE^2. २१ (*क्रिव*) **run across sb** एखादा माणूस अचानक भेटणे, अनपेक्षितपणे गाठ पडणे. **run after sb** (क) एखाद्याचा पाठलाग करणे. (ख) एखाद्याचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करणे, एखाद्याच्या मागे लागणे : *She's always ~ning after men, ती नेहमी पुरुषांच्या मागेमागे असते.* **run a'long** दूर जाणे. **run a'way (from sb/sth)** एखाद्यापासून पळून जाणे; सटकणे. **run a'way with one** (भावनेबाबत) कब्जा मिळवणे, ताबा घेणे. **run away/off with sb** (प्रियकर/प्रेयसीबरोबर) पळून जाणे. **run (sth) down** (क) क्षीण होऊन थांबणे/थांबवणे, शक्ती कमी होऊन बंद पडणे/पाडणे. (ख) बंद होणे/करणे : *The company is being ~ down, कंपनी बंद करत आणली आहे.* **run sb/sth down** (क) एखाद्याला वाहनाने धडक देऊन जखमी करणे. (ख) एखाद्यावर विनाकारण टीका करणे. **run into sb/sth** (क) एखाद्याची अचानक गाठ पडणे. (ख) अचानक संकटाशी गाठ पडणे, एकाएकी अडचणीत येणे. **run sth off** (प्रती) काढणे. **run out** रद्दबातल होणे, अवैध होणे. **run out (of sth)** (क) एखादी गोष्ट संपणे. (ख) (पुरवठ्यांबाबत) तुटवडा पडणे. **run sb over** (वाहनाबाबत) धडक देऊन अंगावरून जाणे. **run through sth** (क) एखाद्या गोष्टीचा सराव करणे, उजळणी करणे. (ख) चटकन् डोळ्याखालून घालणे, चाळणे, भरकन् नजर फिरवणे. **run to sth** (क) (क्रमांक, राशी वगैरेपर्यंत) पोहोचणे, जाणे. (ख) (पैशाबाबत) कशाकरतातरी पुरेसा असणे. **run sth up** (क) (निशाण) फडकावणे. (ख) (बिल वगैरे) वाढू देणे : *~ up big debts, मोठी कर्जे वाढू देणे.* **run up against sth** अचानकपणे संकटे उद्भवणे, अडचणींना तोंड द्यावे लागणे. **'runaway** *वि* १ पळून गेलेला, फरारी. २ हातातून निसटलेला, नियंत्रणाबाहेर

गेलेला. **'runaway** *ना* [*गण*] पळून गेलेले मूल. **,run-'down** *वि* १ श्रमाने दमलेला. २ वाईट अवस्थेतला. **'run-up** *ना* [*अे.व*] एखाद्या घटनेपूर्वीचा काळ, आधीचा काळ.

run^2 /रैन्/ *ना* १ [*गण*] पायी पळणे. २ [*गण*] मोटार, आगगाडी वगैरेचा प्रवास. ३ [*गण*] प्रयोग-मालिका. ४ [*गण*] कालावधी; मालिका, क्रम : *a ~ of bad luck, दुर्दैवाची मालिका.* ५ [*अे.व*] अचानक वाढलेली मागणी. ६ [*गण*] पाळीव जनावरांचा गोठा. ७ [*गण*] बेसबॉल किंवा क्रिकेटमधली धाव. ८ (*वाक्प्र*) **on the 'run** पळून जायच्या प्रयत्नात. **,run-of-the-'mill** *वि* सामान्य, नेहमीचा.

rung^1 RING^1 चे *भूत वि.*

rung^2 /रैङ्/ *ना* [*गण*] शिडीची पायरी.

runner /'रैन(र्)/ *ना* [*गण*] १ धावणारा माणूस किंवा प्राणी. २ चोरटा व्यापार करणारा, तस्कर : *a 'gun-~, चोरून बंदुकी विकणारा.* ३ ज्याच्यावर एखादी गोष्ट सरकते ती पट्टी : *the ~s of a sledge, बर्फावरून घसरणाऱ्या गाडीच्या सरकपट्ट्या.* **,runner 'bean** *ना* [*गण*] लांब चपट्या शेंगा येणारा एक भाजीची वेल. **,runner-'up** (*ब.व* **,runners-'up**) *ना* [*गण*] शर्यतीतला दुसऱ्या क्रमांकावरचा विजेता, उपविजेता.

running /'रैनिङ्/ *ना* [*अगण*] १ धावण्याचा खेळ, पळणे. २ व्यवस्था राबवणे किंवा चालवणे. ३ (*वाक्प्र*) **make the 'running** जोरदार कृती करून आदर्श घालणे, नवा पायंडा पाडणे. **running** *वि* १ सततचा, अखंड : *a ~ battle, अखंड युद्ध.* २ लागोपाठचा : *win three times ~, लगोलग तीन वेळा जिंकणे.* ३ (पाण्याबाबत) वाहते.

runny /'रैनि/ *वि* (-ier, -iest) (*अनौप*) १ फार पातळ, पातळ बुळूक. २ (डोळे, नाक याबाबत) वाहणारे, गळणारे.

runway /'रैन्वेइ/ *ना* [*गण*] विमानाची धावपट्टी.

rupture /'रैप्च(र्)/ *ना* [*गण*] १ (*औप*) मैत्रीतील फाटाफूट, वाकडेपणा, स्नेहभंग. २ शरीराच्या भागाचे फुटणे, फाटणे किंवा मोडणे; हर्निया, अंतर्गळ. **rupture** *क्रि* [*अक, सक*] १ (*औप*) (मैत्री) संपणे/संपवणे, तुटणे/तोडणे. २ (शरीराचा भाग) फुटणे किंवा फुटेल असे करणे; अंतर्गळ होणे.

rural /'रुअरल्/ *वि* गावाकडचा, ग्रामीण.

ruse /रूझ्/ *ना* [*गण*] युक्ती, डावपेच.

rush^1 /रैश्/ *क्रि* १ [*अक, सक*] घाईघाईने जाणे, येणे किंवा करणे/करवणे. २ [*सक*] एखाद्याला घाईने काहीतरी करायला लावणे. ३ [*सक*] एखाद्यावर सर्व ताकदीने चालून जाणे. ४ (*वाक्प्र*) **be rushed off one's feet** खूप व्यग्र असणे, उसंत नसणे. **rush** *ना* १ [*गण, अगण*] जलद हालचाल; जलद प्रगती. २ [*अे.व*] अचानक वाढलेली मागणी. ३ [*अे.व, अगण*] धांदल, धावपळ, धामधूम : *the Christmas ~, नाताळची धांदल.* **'rush-hour** *ना* [*गण*] कामावर जाण्याची किंवा कामावरून परत येण्याची गर्दीची वेळ, धामधुमीची वेळ.

rush^2 /रैश्/ *ना* [*गण*] पाणथळ जागी वाढणारे लांब बारीक देठाचे लव्हाळे.

rusk /रैस्क्/ *ना* [*गण*] लहान बालकाला द्यायचे कडक कोरडे बिस्किट.

rust /रैस्ट्/ *ना* [*अगण*] हवेने आणि पाण्याने धातूवर चढणारा गंज. **rust** *क्रि* [*अक, सक*] गंजणे, गंज चढणे. **rusty** *वि* (-ier, -iest) १ गंजलेला, गंज चढलेला. २ सध्या सराव नसलेला : *His piano-playing is a bit ~y, त्याचे पियानो-वादन जरा मागे पडलंय.*

rustle /'रैस्ल्/ *क्रि* १ [*अक, सक*] (पानांचा) सळसळ आवाज येणे/करणे, (वाळक्या पानांचे) खसखसणे. २ [*सक*] (*अमे*) (गुरेढोरे) चोरणे. ३ (*क्रिब*) **rustle sth up** पटकन् देणे : *~ up a meal, पटकन् जेवण तयार करणे, भरकन् जेवायला वाढणे.* **rustle** *ना* [*गण, अगण*] सळसळ, खसखस.

rut /रैट्/ *ना* [*गण*] १ चाकाने वाटेवर उठलेली चाकोरी, गराडी. २ जीवनाची चाकोरी : *be in a ~, कंटाळवाणे चाकोरीचे जीवन असणे.* **rutted** *वि* चाकोऱ्या उठलेला (रस्ता वगैरे).

ruthless /'रूथ्लिस्/ *वि* निर्दय; क्रूर, कठोर. **ruthlessly** *क्रिवि* निर्दयपणे, दयामाया न दाखवता; कठोरपणे.

rye /राइ/ *ना* [*अगण*] व्हिस्की किंवा खायचे पीठ बनवायचे एक धान्य.

S s

S, s /एस्/ *ना* [*गण*] (*ब.व* **S's, s's** /एसिझ्/) इंग्रजी वर्णमालेतील एकोणीसावे अक्षर.

S *संरू* South(ern), द(क्षिण) : *S Yorkshire, द. यॉर्कशायर.*

Sabbath /'सॅबथ्/ *ना* **the Sabbath** [*अे.व*] विश्रांतीचा किंवा सुट्टीचा दिवस – ख्रिस्ती लोकांचा रविवार, ज्यूंचा शनिवार.

sabotage /'सॅबटाज्/ *ना* [*अगण*] शत्रूच्या किंवा प्रतिस्पर्ध्याच्या योजना, सामग्री वगैरेत मुद्दाम केलेला घातपात. **sabotage** *क्रि* [*सक*] (मशीन, गाडी, योजना वगैरेत) चोरून घातपात करणे, घातपाती कारवाया करणे. **saboteur** /,सॅब'टऽ(र्)/ *ना* [*गण*] घातपाती कारवाया करणारा माणूस.

sabre (*अमे* **saber**) /'सेइब(र्)/ *ना* [*गण*] वाकडे पाते असलेली जड तलवार, तेगा.

saccharin /'सॅकरिन्/ *ना* [*अगण*] साखरेऐवजी वापरायचा एक गोड पदार्थ.

sachet /'सॅशेइ; *अमे* सॅ'शेइ/ *ना* [*गण*] साखर, शाम्पू वगैरेची कागदाची किंवा प्लॅस्टिकची छोटी पुडी.

sack^{1} /सॅक्/ *ना* [*गण*] कोळसे, बटाटे वगैरे भरून न्यायची मोठी दणकट पिशवी, पोते, गोण (किंवा त्यातले काही). **'sackcloth** (तसेच **sacking**) *ना* [*अगण*] गोणपाट, तरट. **'sackful** *ना* [*गण*] पोतंभर.

sack^{2} /सॅक्/ *क्रि* [*सक*] (*अनौप* विशेषतः *ब्रि*) एखाद्याला कामावरून कमी करणे, डच्चू देणे. **the sack** *ना* [*अे.व*] कामावरून हकालपट्टी किंवा डच्चू : *give sb/get the ~, डच्चू देणे/मिळणे.*

sack^{3} /सॅक्/ *क्रि* [*सक*] (जिंकलेल्या नगरात वगैरे) लूट करणे किंवा नासधूस करणे.

sacrament /'सॅक्रमन्ट्/ *ना* [*गण*] बाप्तिश्मा किंवा चर्चचे सभासदत्व देणे यासारखा ख्रिस्ती विधी, ख्रिस्ती संस्कार. **sacramental** /,सॅक्र'मेन्टल्/ *वि* ख्रिस्ती विधीचा.

sacred /'सेइक्रिड्/ *वि* १ धर्माशी किंवा देवाशी संबंधित, धार्मिकदृष्ट्या पवित्र, पूज्य : *a ~ shrine, पवित्र स्थान* किंवा मंदिर, तीर्थक्षेत्र. २ (*to*)// पूजनीय, पवित्र : *In India the cow is a ~ animal, भारतात गाय पवित्र मानली जाते.* ३ फार महत्त्वाचा; गंभीर : *a ~ promise/duty, गंभीर वचन/पवित्र कर्तव्य.*

sacrifice /'सॅक्रिफाइस्/ *ना* १ [*अगण, गण*] (*to*)// देवाला अर्पण केलेले मौल्यवान असे काही, समर्पित वस्तू, बळी. २ (क) [*अगण*] चांगल्या हेतूने मौल्यवान गोष्टीचा केलेला त्याग, समर्पण, बलिदान. (ख) [*गण*] अशा प्रकारे समर्पित केलेली वस्तू : *make ~s, त्याग करणे/बलिदान करणे.* **sacrifice** *क्रि* (*to*)// १ [*अक, सक*] त्याग करणे, बलिदान करणे. २ [*सक*] एखाद्या गोष्टीचा त्याग करणे, समर्पित करणे : *~ a career to have a family, कुटुंबासाठी करिअरचा त्याग करणे.* **sacrificial** /सॅक्रि'फिश्ल्/ *वि* बलीचा.

sacrilege /'सॅक्रिलिज्/ *ना* [*गण*, बहुधा *अे.व*, *अगण*] पावित्र्यभंग, पवित्र गोष्टीची विटंबना. **sacrilegious** /,सॅक्रि'लिजस्/ *वि* भ्रष्ट, विटंबना करणारा.

sad /सॅड्/ *वि* (**~der, ~dest**) दुःखी : *a ~ person/song, दुःखी माणूस/गाणे.* **sadden** *क्रि* [*अक, सक*] दुःखी होणे/करणे, वाईट वाटणे : *She was ~dened by his death, ती त्याच्या मृत्यूने खिन्न झाली.* **sadly** *क्रिवि* १ दुःखाने, खिन्नपणे : *Smile ~ly, उदासवाणे हसणे.* २ दुर्दैवाने : *S~ly, we have no more money, दुर्दैवाने आमच्याकडे ह्यापेक्षा जास्त पैसे नाहीत.* **sadness** *ना* [*अगण, गण*] दुःख, खिन्नता.

saddle /'सॅड्ल्/ *ना* [*गण*] १ घोड्यावर, सायकलवर बसण्याचे आसन, (घोड्यावरचे) खोगीर किंवा जीन, (सायकलची) सीट. २ दोन शिखरांमधील किंवा उंचवट्यांतील कडा. ३ (*वाक्प्र*) **in the 'saddle** (क) घोड्यावर. (ख) (*ला*) ताब्यात, नियंत्रणात. **saddle** *क्रि* [*सक*] १ घोड्यावर खोगीर घालणे. २ (*क्रिब*) **saddle sb with sth** एखाद्याला अप्रिय काम करायला देणे, काम लादणे, गळ्यात घालणे : *He is ~d with cleaning the car, गाडी धुण्याचे काम त्याच्या गळ्यात घातलंय्.* **'saddle-bag** *ना* [*गण*] खोगीराला लावलेली पिशवी.

sadism /'सेइडिझम्/ *ना* [*अगण*] इतरांवर अत्याचार (करून लैंगिक सुख मिळवणे), परपीडन-विकृती. **'sadist** *ना* [*गण*] दुसऱ्याशी क्रूरपणे वागून लैंगिक सुख घेणारा, विकृत माणूस. **sadistic** /स'डिस्टिक्/ *वि* क्रौर्यात आनंद घेणारा, परपीडनभोगी.

sae /,एस् एइ 'ई/ *संरू* stamped addressed envelope, उत्तरासाठी पाठवलेले पत्ता लिहिलेले, तिकीट लावलेले पाकीट.

safari /स'फारि/ *ना* [*गण, अगण*] प्राणी पाहण्यासाठी किंवा प्राण्यांची शिकार करण्यासाठी विशेषतः आफ्रिकेत केलेला प्रवास, अरण्यवास, वनयात्रा : *on ~ in Kenya, केनियातील वनयात्रेत.*

safe^1 /सेइफ्/ *वि* (~r, ~st) १ (*from*)// संकटातून मुक्त, सुरक्षित : *~ from attack, हल्ल्यापासून सुरक्षित.* २ हानी पोहोचण्याची शक्यता नसलेला, निर्धोक : *a ~ speed, धोका नसलेला वेग.* ३ शाबूत : *The plane crashed but the pilot is ~, विमान कोसळले पण वैमानिक बचावला.* ४ (स्थल वगैरे बाबत) संकट, धोका वगैरेपासून सुरक्षित ठेवणारे, बिनधोक. ५ काळजीपूर्वक काम करणारा, धोका न स्वीकारणारा : *a ~ driver, काळजीपूर्वक चालक.* ६ (*वाक्प्र*) **(as) safe as 'houses** घराइतके सुरक्षित, खूप सुरक्षित. **for/in safe 'keeping** सुरक्षित ठेवायचा/ठेवलेला. **,safe and 'sound** काहीही इजा न झालेला, सुखरूप. **safely** *क्रिवि* सुरक्षितपणे, निर्धोकपणे. **safeness** *ना* [*अगण*] सुरक्षितता, शाबूतपणा, निर्धोकपणा.

safe^2 /सेइफ्/ *ना* [*गण*] मौल्यवान जिनसा ठेवायची कुलूपबंद दणकट तिजोरी.

safeguard /'सेइफ्गाड्/ *ना* [*गण*] (*against*)// संरक्षक गोष्ट. **safeguard** *क्रि* [*सक*] (*against*)// संरक्षण करणे, दक्षता घेणे.

safety /'सेइफ्टि/ *ना* [*अगण*] सुरक्षितता; बिनधोकपणा. **'safety-belt** *ना* [*गण*] = SEAT-BELT (SEAT). **'safety-pin** *ना* [*गण*] वस्तू अडकवून ठेवायची आणि टोक टोचू नये म्हणून झाकण असलेली एक पिन. **'safety-valve** *ना* [*गण*] १ फार दाब वाढला तर वायू, द्रव वगैरे बाहेर जाऊ देणारी झडप, सुरक्षा-झडप. २ (*ला*) राग व्यक्त करण्याचा अहिंसक मार्ग, वाफ जाऊ देण्याचा मार्ग.

sag /सॅग्/ *क्रि* (-gg-) [*अक*] १ वजनाने किंवा दाबाने बुडणे किंवा बाक येणे. २ वाकडेतिकडे लोंबणे.

saga /'साग/ *ना* [*गण*] १ पूर्वीच्या काळच्या थोर पुरुषांच्या धाडसी कथा, वीरकथा. २ दीर्घकथा – विशेषतः कुटुंबाची, घराण्याची मोठी कथा.

sage^1 /सेइज्/ *ना* [*गण*] (*औप*) शहाणा माणूस, विवेकी माणूस. **sage** *वि* शहाणा, सूज्ञ.

sage^2 /सेइज्/ *ना* [*अगण*] अन्न चवदार करण्यासाठी वापरायची एक वनस्पती.

said SAY चा *भूत, भूत वि.*

sail^1 /सेइल्/ *ना* १ [*गण, अगण*] वाऱ्याचा उपयोग करून बोट हालवू शकणारे दणकट कापड, गलबताचे शीड. २ [*अ.व*] नावेतून प्रवास किंवा फेरी : *go for a ~, जलपर्यटनास जाणे.* ३ [*गण*] पवनचक्कीचा दांडा किंवा तिचे पाते. ४ (*वाक्प्र*) **set sail (from/to/for)** नौकाप्रवास सुरू करणे, जलपर्यटन करणे.

sail^2 /सेइल्/ *क्रि* १ [*अक*] पाण्यावर नौकेने प्रवास करणे, नौकानयन करणे. २ [*अक*] जलप्रवास करणे, जलमार्गे जाणे. ३ [*सक*] बोटीने समुद्र ओलांडणे. ४ [*अक, सक*] नाव किंवा बोट चालवणे : *Can you ~ (a yacht)? तू नाव चालवू शकतोस?* ५ (*क्रिब*) **sail through (sth)** (परीक्षा वगैरे) पास होणे, सहीसलामत सुटणे. **sailing** *ना* [*अगण*] शिडाच्या नौकांचा खेळ : *go ~ing, नौकानयनास जाणे.* **'sailing-boat** (तसेच **'sailing-ship**) *ना* [*गण*] शिडाची नौका. **sailor** *ना* [*गण*] नौका चालविणाऱ्या लोकांतील एक; नावाडी, खलाशी.

saint /सेइन्ट् किंवा नावापूर्वी सन्ट्/ *ना* [*गण*] चमत्कार केल्यामुळे ख्रिस्ती चर्चकडून पवित्र मानली गेलेली व्यक्ती, संत. **saintly** *वि* (-ier, -iest) संतासारखा; पवित्र, पूज्य.

sake /सेइक्/ *ना* (*वाक्प्र*) **for goodness', Heaven's, etc sake** (आज्ञा किंवा विनंती यांच्या प्रारंभी किंवा शेवटी राग वगैरे व्यक्त करण्यासाठी वापर) : *For goodness' ~ hur-*

ry up! आता कृपा करून पटकन् आवर! **for the sake of** १ -च्या फायद्यासाठी, -च्या प्रीत्यर्थ : *for the ~ of her children, तिच्या मुलांच्या फायद्यासाठी.* २ एखादी गोष्ट मिळवण्यासाठी किंवा राखण्यासाठी : *for the ~ of peace, शांततेसाठी.*

salad /'सॅलड्/ *ना* [*गण, अगण*] (**क**) काकडी, टॉमेटो, कोबी वगैरेचे कच्चे काप. (**ख**) सॅलड बरोबर असलेला अन्नपदार्थ : *a cheese ~, चीज-सॅलड.* **'salad dressing** *ना* [*अगण*] व्हिनिगर, तेल वगैरेचा सॅलडवर घालायचा सॉस.

salami /स'लामि/ *ना* [*अगण*] खारावलेले स्वादिष्ट कबाब.

salary /'सॅलरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) (आठवड्याचा किंवा महिन्याच्या कामाचा) पगार, वेतन. **salaried** *वि* पगारी, पगारदार.

sale /सेइल्/ *ना* १ [*अगण, गण*] विक्री किंवा विक्रय. २ [*गण*] नेहमीपेक्षा स्वस्त दरात माल विकण्याचा काळ : *buy a dress in the ~s, सेलमधे पोषाख विकत घेणे.* ३ (*वाक्प्र*) **for sale** विक्रीसाठी ठेवलेला. **on sale** (दुकान वगैरेतील मालाबाबत) लोकांना खरेदीसाठी उपलब्ध. **'salesman** *ना* [*गण*] (*ब.व* **-men**) **'salesperson** (*ब.व* **-people**) **'saleswoman** (*ब.व* **-women**) माल विकणारी व्यक्ती, विक्रेता, विक्रेती. **'salesmanship** *ना* [*अगण*] विक्रयकला.

saline /'सेइलाइन्; *अमे* -लीन्/ *वि* मीठयुक्त, क्षारयुक्त.

saliva /स'लाइव्ह/ *ना* [*अगण*] चावताना तोंडात तयार होणारे द्रव, लाळ, थुंकी.

sallow /'सॅलउ/ *वि* (एखाद्याच्या त्वचेबाबत किंवा चेहेऱ्याबाबत) रोगट पिवळसर रंग, पिकुटलेला, निस्तेज, पांडू.

salmon /'सॅमन्/ *ना* (*ब.व* **salmon**) १ (**क**) [*गण*] क्रीडा म्हणून पकडला जाणारा एक मोठा मासा, सामन मासा. (**ख**) [*अगण*] अशा माशाचे खाण्याचे मांस. २ [*अगण*] त्याच्या मांसाचा भगवा-गुलाबी रंग.

salmonella /,सॅल्म'नेल/ *ना* [*अगण*] अन्नातून विषबाधा करणारे एक प्रकारचे शाकाणू.

salon /'सॅलॉन्; *अमे* स'लॉन्/ *ना* [*गण*] केशकर्तन आणि चेहेऱ्याची रंगरंगोटी करण्याचे दुकान.

saloon /स'लून्/ *ना* [*गण*] १ जहाज, हॉटेल यामधील सार्वजनिक जागा. २ (*अमे*) मद्यापानगृह. ३ (तसेच **saloon-car**) मागे मोठे दार नसलेली चारपाच लोकांसाठीची मोटारगाडी. **sa'loon bar** = LOUNGE BAR (LOUNGE).

salt /सॉऽल्ट्/ *ना* १ [*अगण*] समुद्राच्या पाण्यापासून बनविलेले किंवा खाणीतून काढलेले खायचे मीठ, लवण. २ [*गण*] धातू आणि आम्ल यांचे एक रासयनिक मिश्रण, आम्लिक लवण. ३ (*वाक्प्र*) **the salt of the 'earth** प्रामाणिक सभ्य गृहस्थ. **take sth with a grain/ pinch of salt** एखाद्यावर पूर्ण विश्वास न टाकणे, सर्वच खरे म्हणून न स्वीकारणे. **salt** *क्रि* [*सक*] (अन्नात) मीठ घालणे. **'salt-cellar** *ना* [*गण*] मिठाचे छोटे पात्र. **salty** *वि* (**-ier, -iest**) खारट, क्षारयुक्त.

salute /स'लूट्/ *ना* [*गण*] नमस्कार, वंदन, उदा लष्करात कपाळावर सलाम करून केलेली वंदना. **salute** *क्रि* [*अक, सक*] १ सलाम करणे. २ आदरसत्कार करणे किंवा स्तुती करणे.

salvage /'सॅल्व्हिज्/ *ना* [*अगण*] १ माल किंवा मालमत्ता वाचवणे. २ बुडणाऱ्या बोटीतून वगैरे वाचवलेला माल. ३ पुन्हा वापरता येईल असे फुकट जाणारे साहित्य (वाचवणे). **salvage** *क्रि* [*सक*] नष्ट होण्यापासून वगैरे वाचवणे.

salvation /सॅल्'व्हेइश्न्/ *ना* [*अगण*] १ पापमुक्ती. २ संकटातून, विनाशातून वाचविणारी व्यक्ती किंवा वस्तू, तारक.

same /सेइम्/ *वि* १ **the same** विभिन्न नाही असा, समान; सरूप, एकसारखा : *He's the ~ age as his wife, तो त्याच्या बायकोच्याच वयाचा आहे.* २ हुबेहूब तसाच : *My car is the ~ as yours, अगदी तुझ्या सारखीच माझी गाडी आहे.* **the same** *सना* १ तशीच गोष्ट : *I bought a red dress and then she bought the ~, मी तांबडा पोषाख विकत घेतला आणि मग तिनेही तसाच पोषाख विकत घेतला.* २

(*वाक्प्र*) **all/just the same** तथापी; असे असूनही : *She's quite old, but very lively all the ~, ती खूप वयस्क आहे, पण तरीही खूप उत्साही आहे.* **be all the same to** ➪ ALL^{3}. **same here** मलाही तसंच वाटतं; मला मान्य आहे : *'I feel hot.' 'S~ here', 'मला खूप उकडतंय्.' 'मलाही.'* **the same** *क्रिवि* सारखे, त्याचप्रमाणे, त्याच पद्धतीने : *The two words are pronounced the ~, ते दोन्ही शब्द सारखेच उच्चारले जातात.* **sameness** *ना* [*अगण*] सारखेपणा; तोचतोचपणा, विविधतेचा अभाव.

sample /'साम्प्ल्; *अमे* 'सॅम्प्ल्/ *ना* [*गण*] नमुना : *wallpaper ~s, भिंतीला लावण्याच्या शोभिवंत कागदाचे नमुने.* **sample** *क्रि* [*सक*] नमुना पाहणे : *S~ our new wine, आमच्या नवीन मद्याचा नमुना घेऊन पाहा.*

sanatorium /,सॅन'टॉऽरिअम्/ *ना* (*ब.व* ~s किंवा **-ria** /-रिअ/) रोग्यांवर उपचार करणारे आरोग्यधाम.

sanctimonious /,सॅङ्क्टि'मउनिअस्/ *वि* (*अधिक्षेपी*) साधुपणाचा आव आणणारा, भक्तिभावाचे अवडंबर करणारा. **sanctimoniously** *क्रिवि* साधुत्वाचा आव आणून, संतपणाच्या थाटात.

sanction /'सॅङ्क्श्न्/ *ना* १ [*अगण*] परवानगी; मंजुरी. २ [*गण*] कायदापालनासाठी घातलेला निर्बंध किंवा केलेली कृती, अनुशास्ती : *economic ~s, आर्थिक निर्बंध.* **sanction** *क्रि* [*सक*] परवानगी देणे; मंजुरी देणे.

sanctity /'सॅङ्क्टटि/ *ना* [*अगण*] पावित्र्य.

sanctuary /'सॅङ्क्चुअरि; *अमे* -उएरि/ *ना* (*ब.व* -ies) १ [*गण*] पवित्र स्थान – उदा चर्च, देवालय वगैरे. २ [*गण, अगण*] अटक, हल्ला, यापासून संरक्षण (देणारे स्थान), अभयस्थान : *be offered ~, अभयदान मिळणे.* ३ [*गण*] पशुपक्ष्यांची हत्या करण्यास बंदी असलेला भाग, अभयारण्य.

sand /सॅन्ड्/ *ना* १ [*अगण*] समुद्रकिनारी, वाळवंटात वगैरे सापडणारे दगडांचे सूक्ष्म कण, वाळू, रेती. २ [*गण, बहुधा ब.व*] वालुकामय प्रदेश. **sand** *क्रि* [*सक*] १ खरकागदाने मऊ करणे किंवा घासणे : *~ (down) the wood, खरकागदाने लाकूड घासून गुळगुळीत करणे.* २ वाळूने झाकणे. **'sandbag** *ना* [*गण*] बंदुकीच्या गोळ्या, पाणी वगैरे अडवण्यासाठी वापरायचे वाळूचे पोते. **'sand-castle** लहान मुले समुद्रकिनाऱ्यावर करतात तो वाळूचा किल्ला. **'sand-dune** = DUNE. **'sandpaper** *ना* [*अगण*] वाळू चिकटवलेला आणि घासण्यासाठी वापरायचा कागद, खरकागद. **'sandstone** *ना* [*अगण*] वाळूपासून बनलेला खडक, वालुकाश्म, कुरुंदाचा दगड. **sandy** *वि* (**-ier, -iest**) १ वालुकामय. २ (केसांबाबत) पिवळसर-लाल, भुरे.

sandal /'सॅन्ड्ल्/ *ना* [*गण*] पट्टा असलेला आणि पुढून पूर्णपणे बंद नसलेला बूट.

sandwich /'सॅन्विज्; *अमे* -विच्/ *ना* [*गण*] मधे मांस, सॅलड वगैरे घातलेले पावाचे दोन काप : *a cheese ~, चीज घातलेले पावाचे काप.* **sandwich** *क्रि* [*सक*] एखाद्याला दोन माणसात किंवा दोन वस्तूंमधे कोंबणे किंवा घालणे, चेंगरणे.

sane /सेइन्/ *वि* (**~r, ~st**) १ उमद्या मनाचा, हुशार. २ समजूतदार, शहाणा : *a ~ policy, शहाणपणाचे धोरण.* **sanely** *क्रिवि* हुशारीने; समजूतदारपणे.

sang SING चा *भूत.*

sanitary /'सॅनिट्रि; *अमे* -टेरि/ *वि* १ रोग पसरवणारी घाण नसणारा, आरोग्यरक्षक; स्वच्छ : *~ conditions, स्वच्छतेची स्थिती.* २ आरोग्यविषयक : *~ measures, आरोग्यविषयक उपाययोजना.* **'sanitary towel** *ना* [*गण*] मासिक पाळीच्या वेळी स्त्रियांनी वापरायची कापडी घडी.

sanitation /,सॅनि'टेइश्न्/ *ना* [*अगण*] घाण पाणी विसर्जन करण्याची आरोग्यरक्षक व्यवस्था, सफाई यंत्रणा.

sanity /'सॅनटि/ *ना* [*अगण*] शहाणपण, समजूतदारपणा; हुशारी.

sank SINK^{2} चा *भूत.*

sap^{1} /सॅप्/ *क्रि* (**-pp-**) [*सक*] (एखाद्याची शक्ती, आत्मविश्वास वगैरे) खच्ची करणे; ढासळवणे, डळमळवणे, कमकुवत करणे.

sap^{2} /सॅप्/ *ना* [*अगण*] वनस्पतीच्या सर्व

भागांना अन्नपुरवठा करणारा वनस्पतीमधला रस, पिंडरस. **'sapling** *ना* [*गण*] रोपटे.

sapphire /'सॅफाइअ(र्)/ *ना* [*गण*] मौल्यवान नीलमणी, इन्द्रनील, नीलोत्पाद. **sapphire** *वि* गर्द निळा, निळाभोर.

sarcasm /'साकॅझम्/ *ना* [*अगण*] (एखाद्याच्या भावना दुखवायला केलेला) उपरोध, छद्मीपणाचे बोलणे, व्याजनिंदा. **sarcastic** /सा'कॅस्टिक्/ *वि* उपरोधिक. **sarcastically** /-क्लि/ *क्रिवि* उपरोधिकपणे.

sardine /सा'डीन्/ *ना* [*गण*] १ बंद डब्यात तेलात किंवा टोमॅटो-सॉसमधे घालून विकला जाणारा खाण्याचा एक छोटा मासा. २ (*वाक्प्र*) **like sardines** कोंबलेला.

sari /'सारि/ *ना* [*गण*] साडी.

sarong /स'रॉङ्; *अमे* -'रॉऽङ्/ *ना* [*गण*] इंडोनेशिया वगैरे देशात स्त्रिया वापरतात ते कमरेभोवती स्कर्टसारखे गुंडाळायचे कापड.

sash /सॅश्/ *ना* [*गण*] कमरेभोवती बांधायचे किंवा खांद्यावर टाकण्याचे वस्त्र, पट्टा.

sash-window /,सॅश् 'विन्डउ/ *ना* [*गण*] वर-खाली सरकणाऱ्या दोन तावदानांची खिडकी.

sat SIT चा *भूत, भूत वि.*

Satan /'सेइट्न्/ *ना* सैतान, कली. **Satanic** /स'टॅनिक्/ *वि* सैतानी.

satchel /'सॅशल्/ *ना* [*गण*] मोठ्या पट्ट्याची शाळेची पिशवी, दप्तर.

satellite /'सॅटलाइट्/ *ना* [*गण*] १ (क) ग्रहाभोवती फिरणारे उपग्रह – उदा चंद्र. (ख) अंतराळात सोडलेला आणि ग्रहाभोवती फिरणारा कृत्रिम उपग्रह. २ [*गण*] बलाढ्य देशाचा मांडलिक असणारा देश, बगलबच्चा देश. **satellite television** *ना* [*अगण*] उपग्रहाद्वारे प्रक्षेपित होणारे आणि मोठ्या डिशच्या आकाराच्या अँटिनाद्वारे दूरदर्शनवर पाहता येणारे कार्यक्रम.

satin /'सॅटिन्; *अमे* 'सॅट्न्/ *ना* [*अगण*] एका बाजूने चकाकणारे रेशमी कापड.

satire /'सॅटाइअ(र्)/ *ना* १ [*अगण*] उपहास, उपहासात्मक लिखाण – कादंबरी, नाटक वगैरे. खिल्ली, व्याजोक्ती. २ [*गण*] उपहासगर्भ पुस्तक: *a ~ on snobbery, शिष्टपणावर उपहासगर्भ लेखन.* **satirical** /स'टिरिक्ल्/ *वि* उपहासपूर्ण. **satirize** /'सॅटराइझ्/ *क्रि* [*सक*] एखाद्याची उपहासपूर्ण टिंगल करणे.

satisfaction /,सॅटिस्'फॅक्श्न्/ *ना* १ [*अगण*] समाधान: *get ~ from one's work, कामातून समाधान मिळणे.* २ [*गण*] समाधानकारक गोष्ट. ३ [*अगण*] भरपाई किंवा दिलगिरी.

satisfactory /,सॅटिस्'फॅक्टरि/ *वि* (फार चांगला नाही पण) बरा, समाधानकारक: ~ *progress, ठीक प्रगती.* **satisfactorily** /-टरलि/ *क्रिवि* समाधानकारकरीत्या, ठीकपणे.

satisfy /'सॅटिस्फाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] १ एखाद्याला हवे असलेले देणे, त्याची इच्छा पुरवणे; एखाद्याचे समाधान करणे: *enough food to ~ us, आमचे समाधान करण्याइतके पुरेसे अन्न.* २ (इच्छा, गरज, वासना वगैरे) पूर्ण करणे. ३ पुरावा देणे; खात्री पटवणे: *I can't ~ the police of my innocence, माझ्या निरपराधित्वाची खात्री मला पोलिसांना पटवून देता येत नाही.* **satisfied** *वि* समाधानी, तोष पावलेला.

saturate /'सॅचरेइट्/ *क्रि* [*सक*] १ पूर्ण भिजवणे, पूर्ण ओला करणे, थबथबणे. २ (बहुधा कर्मणी) पूर्ण भरणे, संपृक्त करणे. **saturated** *वि* १ ओलाचिंब. २ (लोणी, तेल वगैरेबाबत) आरोग्यास अपायकारक द्रव्ये तयार झालेले. **saturation** /सॅच'रेइश्न्/ *ना* [*अगण*] पूर्ण भरणे, संपृक्तता.

Saturday /'सॅटडि/ *ना* [*अगण, गण*] शनिवार. (*Monday* खालची उदाहरणे पहा.)

sauce /सॉऽस्/ *ना* १ [*गण, अगण*] अन्नाला चव आणण्यासाठी वापरायचा एक पातळ पदार्थ, तिखटमिठाचे पातळ मिश्रण. २ [*अगण*] (*अनौप*) अनादर करणारे बोल, उपमर्दकारक भाषा. **saucy** *वि* (**-ier, -iest**) उर्मट. **saucily** *क्रिवि* उर्मटपणे.

saucepan /'सॉऽस्पन्; *अमे* -पॅन्/ *ना* [*गण*] झाकण आणि दांडा असलेले एक अन्न शिजवण्याचे भांडे, झाकणाचे दांड्याचे पातेले.

saucer /'सॉऽस(र्)/ *ना* [*गण*] कप ठेवायची छोटी बशी.

sauna /'सॉऽन, तसेच 'साउन/ *ना* [*गण*] वाफ कोंडलेली गरम खोली (किंवा तीत बसण्याचा काळ).

saunter /'सॉऽन्ट(र्)/ *क्रि* [*अक*] भटकणे; फिरायला जाणे, फिरणे. **saunter** *ना* [*अे.व*] भटकंती, फिरणे.

sausage /'सॉसिज्; *अमे* 'सॉऽस्-/ *ना* [*गण, अगण*] स्वादिष्ट मांसाच्या तुकड्यांनी केलेले पातळ त्वचेच्या गुंडाळीतले मिश्रण, तिखटमीठ लावलेला कबाब.

savage /'सॅव्हिज्/ *वि* १ रानटी, भयंकर आणि जंगली : *a ~ animal, रानटी पशू.* २ क्रूर आणि दुष्ट : *~ criticism, क्रूर टीका.* ३ (*अपमानकारक*) रानटी; असंस्कृत. **savage** *ना* [*गण*] (*अपमानकारक*) रानटी टोळीतील माणूस. **savage** *क्रि* [*सक*] तुटून पडणे, त्वेषाने हल्ला करणे : *~d by a dog, कुत्र्याने हल्ला केलेला.* **savagely** *क्रिवि* रानटीपणाने, असंस्कृतपणे; निर्दयपणे. **savagery** *ना* [*अगण*] रानटी वागणूक; दुष्ट वर्तन.

save /सेइव्ह/ *क्रि* १ [*सक*] (*from*)// हानी, इजा वगैरेपासून सुरक्षित ठेवणे, वाचवणे : *~ sb's life, एखाद्याचा जीव वाचवणे.* २ [*अक, सक*] (*up; for*)// भविष्यकाळासाठी (विशेषतः पैसे) वाचवणे, बचत करणे, शिल्लक टाकणे, राखणे : *~ (up) for a new car, नवीन गाडीसाठी पैसे वाचवणे ○ S~ some cake for me! माझ्यासाठी थोडा केक शिल्लक ठेव!* ३ [*सक*] अनावश्यक करणे : *That will ~ you a lot of trouble, त्यामुळे तुझा खूप त्रास वाचेल.* ४ [*सक*] (फुटबॉल वगैरे खेळात) जाळ्यात जाणारा चेंडू अडवणे, गोल अडवणे. ५ (*वाक्प्र*) **save (one's) face** स्वतःची नाचक्की वाचवणे. **save one's neck** ⇨ NECK. **save** *ना* [*गण*] (फुटबॉल वगैरे खेळात) गोल अडवणे. **saving** *ना* १ [*गण*] बचत, शिल्लक : *a saving of £5, ५ पौंडाची बचत.* २ **savings** [*ब.व*] वाचवलेले पैसे. **'savings account** *ना* [*अगण*] ठेवलेल्या पैशावर व्याज मिळणारे बँकेतले खाते, बचत खाते.

saviour (*अमे* **-or**) /'सेइव्हिअ(र्)/ *ना* [*गण*] १ एखाद्याला धोक्यापासून वाचवणारी व्यक्ती, वाचवणारा, रक्षणकर्ता. २ **the Saviour** येशू ख्रिस्त.

savour (*अमे* **-or**) /'सेइव्ह(र्)/ *ना* [*गण, अगण*] चव, रुची, स्वाद. **savour** *क्रि* [*सक*] चव घेणे, चाखणे : *~ the wine, मदिरा चाखणे ○ (ला) ~ one's freedom, स्वातंत्र्याचा उपभोग घेणे.*

savoury (*अमे* **-ory**) /'सेइव्हरि/ *वि* तिखटमिठाचा, खारा; गोड नाही असा. **savoury** *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) तिखटमिठाचा पदार्थ.

saw^1 SEE चा *भूत.*

saw^2 /सॉऽ/ *ना* [*गण*] लाकूड, धातू वगैरे कापण्याकरता वापरायचे तीक्ष्ण दात असलेल्या लांब पात्याचे अवजार, करवत. **saw** *क्रि* (*भूत* **~ed**, *भूत वि* **~n** /सॉऽन्/; *अमे* **~ed**) १ [*अक, सक*] करवतीने कापणे. २ [*अक*] करवतीने कापले जाईल असे असणे : *Wood ~s easily, लाकूड सहजपणे करवतीने कापले जाते.* ३ (*क्रिब*) **saw sth up** करवतीने तुकडे करणे. **'sawdust** *ना* [*अगण*] लाकूड कापले जात असताना त्याचा पडणारा भुसा. **'sawmill** *ना* [*गण*] लाकडे कापायचा कारखाना.

saxophone /'सॅक्सफउन्/ *ना* [*गण*] जॅझ संगीत वाजवण्यास वापरायचे धातूचे एक वक्राकार वाद्य.

say /सेइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **said** /सेड्/) [*सक*] १ (शब्द वगैरे) म्हणणे; एखाद्याला काहीतरी शब्दांत सांगणे. २ (छापील मजकुराबाबत) माहिती देणे, म्हणणे : *It ~s here that she was killed, इथं असं म्हटलंय् की तिला मारण्यात आलं.* ३ शब्द, हावभाव वगैरेतून व्यक्त करणे : *What does this poem ~ to you? ही कविता तुला काय सांगते?* ४ मत देणे. ५ समजणे, वाटणे किंवा सुचवणे : *I'd ~ this can't be done, मला वाटतं हे करता येणार नाही.* ६ (*वाक्प्र*) **go without saying** अगदी स्पष्ट असणे. **you can say that again** (*अनौप*) मला मान्य आहे, बरोबर आहे. **that is to say** ⇨ THAT^1. **say** *ना* १ [*अगण, अे.व*] ठरवण्याचा अधिकार : *a ~ in what happens, काय घडेल ते ठरवण्याचा अधिकार.* २ (*वाक्प्र*) **have one's say** स्वतःचे मत सांगणे, आपले म्हणणे मांडणे. **saying** *ना* [*गण*] म्हटलं जातं असं काही, नेहमी म्हणण्यात येतं

ते; प्रसिद्ध वचन, म्हण.

scab /स्कॅब्/ *ना* [*गण*] १ जखमेवरची खपली. २ (*अनौप अधिक्षेपी*) संपात भाग न घेणारा कामगार, खवडा.

scaffold /'स्कॅफउल्ड्/ *ना* [*गण*] १ इमारतीच्या कामासाठी बांबूचा बांधलेला पहाड. २ फाशी देण्याचे तक्त. **scaffolding** /'स्कॅफल्डिङ्/ *ना* [*अगण*] पहाड बांधण्यासाठी लागणारे सामान – बांबू, फळ्या वगैरे.

scald /स्कॉऽल्ड्/ *क्रि* [*सक*] गरम द्रवाने (पाणी वगैरेने) किंवा वाफेने पोळणे किंवा भाजणे. **scald** *ना* [*गण*] गरम द्रवाने किंवा वाफेने अंगाला भाजणे, भाजून झालेली इजा. **scalding** *वि* खूप गरम, चटका देणारा, आधणाचे (पाणी वगैरे).

scale^{1} /स्केइल्/ *ना* १ [*गण*] मासा, सर्प वगैरेच्या अंगावरील कडक पातळ आवरणाचा तुकडा, खवला, शल्क. २ [*अगण*] (*ब्रि*) किटली, पाण्याची नळी वगैरेच्या आतील बाजूस असणारा पांढरट थर. **scale** *क्रि* [*सक*] (माशाचे) खवले काढणे. **scaly** *वि* (**-ier, -iest**) खवल्याखवल्यांचा.

scale^{2} /स्केइल्/ *ना* १ [*गण*] मोजमापाची पट्टी, प्रमाणपट्टी, फूटपट्टी. २ [*गण*] मान, श्रेणीपद्धती : *a salary ~, वेतनश्रेणी.* ३ [*गण*] नकाशा, आलेख वगैरेत वापरलेले प्रमाण, मूळ वस्तूची मापे आणि नकाशातील मापे यांचे प्रमाण. ४ [*गण, अगण*] सापेक्ष प्रमाण, आकारमान वगैरे : *riots on a large ~, मोठ्या प्रमाणावरील दंगली.* ५ [*गण*] (*संगीत*) स्वरपद्धती, चढत्या क्रमाने लावलेली स्वरमाला. **scale** *क्रि* (*क्रिब*) **scale sth up/down** एखादी गोष्ट वाढवणे/कमी करणे.

scale^{3} /स्केइल्/ *क्रि* [*सक*] (कडा, भिंत वगैरेवर) चढणे.

scales /स्केइल्झ्/ *ना* [*ब.व*] तराजू, वजनकाटा : *weigh oneself on the bathroom ~, न्हाणीघरातील वजनकाट्यावर स्वतःचे वजन घेणे.*

scallop /'स्कॉलप्/ *ना* [*गण*] दोन पंखाकृती शिंपले असणारा मृदुकायकवची प्राणी.

scalp /स्कॅल्प्/ *ना* [*गण*] डोक्यावरचे कातडे आणि केस, टाळके. **scalp** *क्रि* [*सक*] एखाद्याच्या डोक्याचे साल काढणे.

scalpel /'स्कॅल्पल्/ *ना* [*गण*] शल्यचिकित्सकाची (सर्जनची) धारदार लहान हलकी सुरी.

scamper /'स्कॅम्प(र्)/ *क्रि* [*अक*] लहान मुलासारखे किंवा प्राण्यासारखे जोराने धावणे, उड्या मारत पळणे, दुडदुड धावणे.

scampi /स्कॅम्पि/ *ना* [*ब.व*] मोठी कोळंबी.

scan /स्कॅन्/ *क्रि* (**-nn-**) १ [*सक*] बारकाईने तपासणे : *~ the horizon, क्षितिज बारकाईने न्याहाळणे.* २ [*सक*] चाळणे, पटकन् पाहणे : *~ the newspapers, वर्तमानपत्रे चाळणे.* ३ [*सक*] (*वैद्यक*) स्कॅनरच्या साहाय्याने (एखाद्याचे शरीर) तपासणे. ४ [*अक*] (काव्याबाबत) नियमित ताल असणे, छंदबद्ध असणे. ५ [*सक*] (*संगणन*) आधारसामग्रीतून विशिष्ट गोष्ट शोधणे. **scan** *ना* [*गण*] बारकाईचा तपास; चाळणे; स्कॅनरने केलेली शारीरिक तपासणी; छंदाच्या मात्रा मोजणे; आधारसामग्रीतून घेतलेला शोध. **scanner** *ना* [*गण*] क्ष-किरणांच्या साहाय्याने शरीराच्या आतील भागाचे चित्र काढणारे एक यंत्र.

scandal /'स्कॅन्ड्ल्/ *ना* १ [*गण, अगण*] लोकांना संताप आणणारी किंवा सुन्न करणारी कृती, प्रकरण. २ [*अगण*] व्यक्तीची प्रतिष्ठा धुळीला मिळवणारी निंदा, लोकापवाद. **scandalize** /-डलाइझ्/ *क्रि* [*सक*] नीतिनियमांना धक्का बसणे, शरम वाटणे. **scandalous** *वि* शरमेचा, लाजिरवाणा; लोकापवादकारक, निंदास्पद.

scant /स्कॅन्ट्/ *वि* (*औप*) अपुरा, तुटपुंजा. **scantily** *क्रिवि* अपुरेपणाने, तुटपुंज्या रीतीने. **scanty** *वि* (**-ier, -iest**) अत्यल्प, फार थोडा.

scapegoat /'स्केइप्गउट्/ *ना* इतरांच्या चुकांचे खापर ज्याच्या डोक्यावर फोडले जाते तो माणूस, बळीचा बकरा.

scar /स्का(र्)/ *ना* [*गण*] १ भरलेल्या जखमेची त्वचेवर राहिलेली खूण, वण, व्रण. २ (*ला*) वाईट अनुभवानंतर मनाला वाटणारे दुःख, सल. **scar** *क्रि* (**-rr-**) [*सक*] वण पाडणे; दुःखाचा डाग देणे.

scarce /'स्केअस्/ *वि* (**~r, ~st**) गरजेपेक्षा

कमी; मिळवण्यास कठीण, दुर्मिळ, दुष्प्राप्य. **scarcely** *क्रिवि* जवळजवळ नाहीच; कसेबसे : *~ enough food, कसेबसे पुरेसे अन्न.* **scarcity** *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) तुटवडा, चणचण, टंचाई.

scare /स्केअ(र्)/ *क्रि* १ [*सक*] घाबरवणे, भिववणे. २ [*अक*] घाबरणे : *He ~s easily, तो चटकन् घाबरतो.* **scare** *ना* [*गण*] भीती. **'scarecrow** *ना* [*गण*] पिकांपासून पक्ष्यांना दूर ठेवायला उभे केलेले बाहुले, शेतातले बुजगावणे. **scary** /स्केअरि/ *वि* (**-ier, -iest**) (*अनौप*) घाबरवून टाकणारा.

scarf /स्काफ्/ *ना* [*गण*] (*ब.व* **scarves** /स्काव्ह्झ्/ किंवा **~s**) गळ्याभोवती गुंडाळायचा किंवा डोक्यावर बांधायचा रुमाल.

scarlet /'स्कालट्/ *ना* [*अगण*], *वि* लालजर्द, शेंदरी. **,scarlet 'fever** *ना* [*गण*] अंगावर तांबडे चट्टे उमटविणारा एक गंभीर आजार.

scathing /'स्केइदिङ्/ *वि* कडक; जहरी, रेवडी उडवणारी. **scathingly** *क्रिवि* कडकपणे; जहरीपणाने.

scatter /'स्कॅट(र्)/ *क्रि* १ [*अक, सक*] सर्वत्र पसरणे/पसरवणे, विखुरणे, पांगणे. २ [*सक*] सर्वत्र फेकणे, टाकणे : *~ seed, बी टाकणे.* **'scatter-brain** *ना* [*गण*] फार काळ लक्ष एकवटू न शकणारा किंवा चटकन् विसरणारा माणूस, विसरभोळा माणूस. **'scatter-brained** *वि* विसरभोळा. **scattered** *वि* विखुरलेला, जवळ नसलेला, पांगलेला, विकीर्ण.

scavenge /'स्कॅव्हिन्ज्/ *क्रि* [*अक, सक*] १ (मृत मांस) शोधणे किंवा खाणे. २ कचऱ्यात अन्न वगैरे शोधणे, उकिरड्यावर पोट भरणे. **scavenger** *ना* [*गण*] कुजलेले मांस खाणारा पक्षी, प्राणी किंवा माणूस.

scenario /सि'नारिअउ; *अमे* -नॅर्-/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s**) १ चित्रपट, नाटक यांची लिहिलेली रूपरेखा. २ भविष्यकाळातील काल्पनिक घटनांची साखळी.

scene /सीन्/ *ना* [*गण*] १ घटनास्थळ : *the ~ of the crime, गुन्ह्याची जागा.* २ प्रत्यक्ष घडलेली घटना, प्रसंग : *~s of horror during the fire, आगीच्या वेळी घडलेले भयानक प्रसंग.* ३ भावनिक उद्रेक, तमाशा : *make a ~, तमाशा करणे.* ४ दृश्य. ५ नाटकाच्या अंकातील प्रवेश. ६ रंगमंचावर मांडलेला देखावा. ७ (*वाक्प्र*) **behind the scenes** (**क**) रंगमंचामागे, पडद्यामागे. (**ख**) गुप्तपणे. **on the scene** वर्तमानात. **scenery** *ना* [*अगण*] १ एखाद्या ठिकाणचा नैसर्गिक परिसर – उदा डोंगर, सृष्टिसौंदर्य. २ रंगभूमीवरील चितारलेला पडदा. **scenic** /'सीनिक्/ *वि* सृष्टिसौंदर्याचा.

scent /सेन्ट्/ *ना* १ [*गण, अगण*] वास, गंध – विशेषतः सुगंध. २ [*अगण*] (विशेषतः *ब्रि*) अत्तर, सुवासिक द्रव. ३ [*गण*] प्राण्याचा वास. ४ [*अगण*] घ्राणेंद्रिय – विशेषतः कुत्र्यांचे. ५ (*वाक्प्र*) **on the scent of sb/sth** एखाद्याच्या शोधात किंवा वासावर, एखादी व्यक्ती/वस्तू सापडण्याची शक्यता. **scent** *क्रि* [*सक*] १ (**क**) वासावरून ओळखणे, वास घेणे. (**ख**) (*ला*) एखादी गोष्ट आहे अशी शंका येणे : *~ danger, धोक्याचा वास येणे/धोक्याची चाहूल लागणे.* २ वास देणे : *~ed paper, सुगंधी कागद.*

sceptic (*अमे* **sk-**) /'स्केप्टिक्/ *ना* [*गण*] सिद्धान्त, तत्त्व वगैरेची शंका घेणारा, संशयात्मा. **sceptical** *वि* संशयी. **scepticism** /'स्केप्टिसिझ़म्/ *ना* [*अगण*] संशयी वृत्ती, शंकेखोरपणा.

sceptre (*अमे* **-er**) /'सेप्ट(र्)/ *ना* [*गण*] राजदंड.

schedule /'शेड्यूल्; *अमे* 'स्केजुल्/ *ना* [*गण, अगण*] १ ठरवलेल्या गोष्टींची यादी, अनुसूची, वेळापत्रक : *production ~, उत्पादनाचे वेळापत्रक* ○ *on/behind ~, ठरल्या वेळेनुसार/ठरल्या वेळेनंतर.* २ (*अमे*) = TIMETABLE (TIME^{1}). **schedule** *क्रि* [*सक*] कार्यक्रमपत्रिकेत घालणे.

scheme /स्कीम्/ *ना* [*गण*] १ व्यवस्थित आखलेली योजना : *a 'colour ~, रंगयोजना.* २ कामाची आखणी, योजना : *a ~ for raising money, पैसे उभे करण्यासाठीची योजना.* ३ गुप्त योजना, कारस्थान, डाव. **scheme** *क्रि* [*सक*] डाव रचणे, कारस्थान करणे. **schemer** *ना* [*गण*] डाव रचणारा माणूस.

schizophrenia /,स्किट्सउ'फ्रिनिअ/ *ना*

[*अगण*] मन आणि कृती यांच्यात भेद आणणारा रोग, छिन्नमनस्कता. **schizophrenic** /-'फ्रेनिक्/ *वि, ना* छिन्नमनस्क व्यक्ती.

scholar /'स्कॉल(र्)/ *ना* [*गण*] १ विद्वान, पंडित. २ शिष्यवृत्ती मिळालेला विद्यार्थी. **scholarly** *वि* पांडित्यपूर्ण, विद्वत्ताप्रचुर. **scholarship** *ना* (क) [*अगण*] एखाद्या विषयाचा व्यासंग, विद्वत्ता. (ख) [*गण*] शिष्यवृत्ती.

school¹ /स्कूल्/ *ना* १ [*गण*] शाळा : *All children should go to ~, सर्व मुलांनी शाळेत जायला हवे म्हणजे शाळा शिकायला हवी* ○ *primary/secondary ~, प्राथमिक/माध्यमिक शाळा* ○ *a driving ~, वाहनचालनाची शाळा.* २ [*गण*] (*अमे*) महाविद्यालय किंवा विद्यापीठ. ३ [*अगण*] (क) शाळेत जाणे, शालेय शिक्षण घेणे : *Is she old enough for ~? शाळेत जाण्याइतकी ती मोठी आहे का?* (ख) शाळेची वेळ : *S~ starts at 9 am, शाळा सकाळी ९ वाजता सुरू होते म्हणजेच शाळा सकाळी ९ ची आहे.* ४ **the school** [*अ.व*] शाळेतील सर्व विद्यार्थी. ५ [*गण*] विद्यापीठाचा विभाग : *medical ~, वैद्यक विभाग.* ६ [*गण*] कलाकार, विचारवंत वगैरेंचा पंथ, संप्रदाय : *the Dutch ~ of painting, डच चित्रकला पंथ.* **school** *क्रि* [*सक*] तालीम देणे, तयार करणे; नियंत्रण करणे. **schooling** *ना* [*अगण*] शिक्षण. **school-leaver** *ना* [*गण*] नुकतीच शाळा सोडलेला माणूस. **'schoolmaster, 'schoolmistress** *ना* [*गण*] शाळेतील शिक्षक, शिक्षिका.

school² /स्कूल्/ *ना* [*गण*] एकत्र पोहणाऱ्या माशांचा थवा.

schooner /'स्कून(र्)/ *ना* [*गण*] १ दोन किंवा जास्त डोलकाठ्या असणारे जहाज, दुकाठी तारू. २ उंच मद्य-प्याला.

science /'साइअन्स्/ *ना* (क) [*अगण*] निरीक्षण आणि पडताळा यातून प्राप्त होणारे ज्ञान, विज्ञान, शास्त्र. (ख) [*गण, अगण*] विज्ञानशाखा – उदा पदार्थ विज्ञान. **,science 'fiction** भविष्यकाळात लागणारे वैज्ञानिक शोध, काल्पनिक सृष्टी वगैरेविषयीचे कथावाङ्मय, विज्ञानकथा. **scientific** /,साइअन्'टिफिक्/ *वि* वैज्ञानिक, शास्त्रीय. **scientifically** /-क्लि/ *क्रिवि* वैज्ञानिकदृष्ट्या, शास्त्रीयदृष्ट्या. **scientist** /'साइअन्टिस्ट्/ *ना* [*गण*] वैज्ञानिक, शास्त्रज्ञ.

scintillating /'सिन्टिलेइटिङ्; *अमे* -टल्-/ *वि* चमकदार, रसरशीत.

scissors /'सिझ़झ्/ *ना* [*ब.व*] कागद, कापड वगैरे कापायला वापरले जाणारे दोन पात्यांचे साधन, कात्री : *a pair of ~, कात्री.*

scoff /स्कॉफ्/ *क्रि* [*अक*] (*at*)// टवाळी करणे, थट्टा करणे.

scold /स्कउल्ड्/ *क्रि* [*अक, सक*] रागावणे; झाडणे, फैलावर घेणे, दोष देणे : *~ a child for being naughty, खोडकरपणाबद्दल मुलाला रागे भरणे.*

scone /स्कॉन्; *अमे* स्कउन्/ *ना* [*गण*] चरबी आणि पीठ यापासून केलेला आणि लोण्याबरोबर खायचा एक लहान केक.

scoop /स्कूप्/ *ना* [*गण*] १ धान्य, पीठ वगैरे उचलण्यासाठीचे सपाट पात्याचे आणि लहान दांड्याचे एक साधन, अन्न वाढायची पळी, सरळ दांड्याचा डाव, खोऱ्यासारखा मोठा चमचा. २ इतर वर्तमानपत्रांच्या आधी एखाद्या वर्तमानपत्राला मिळालेली खास बातमी. **scoop** *क्रि* [*सक*] १ खळगा करणे. २ (*क्रिब*) **scoop sth out/up** मोठ्या चमच्याने किंवा चमच्याने काढल्यासारखे काढणे, उपसणे.

scooter /'स्कूट(र्)/ *ना* [*गण*] १ (तसेच **'motor-scooter**) लहान इंजिनाची आणि पुढे पायापाशी आडोसा असणारी मोटार-सायकल. २ लहान मुलांची एका पायाने जोर देऊन चालवायची खेळातली स्कूटर.

scope /स्कउप्/ *ना* १ [*अगण*] संधी, वाव : *~ for improvement, सुधारणेला वाव.* २ [*अ.व*] विषयाची वगैरे व्याप्ती.

scorch /स्कॉऽच्/ *क्रि* १ (क) [*सक*] कडक उन्हाने होरपळणे, भाजून काढणे. (ख) [*अक*] अशा रीतीने भाजणे, होरपळणे. २ [*सक*] (झाड) वाळवणे, शुष्क करून मारणे. **scorch** *ना* [*गण*] धगीने – विशेषतः कपड्याला – पडलेला जळका डाग.

score¹ /स्कॉऽ(र्)/ *ना* [*गण*] १ खेळातील गुण, गोल वगैरेची संख्या. २ पृष्ठभागावरच

चरा, चीर. ३ संगीताची लिखित स्वरावली. ४ (*जुना अप्रचलित*) वीस. ५ (*वाक्प्र*) **on that score** त्याबाबत. **pay/settle an old score** सूड घेणे, वचपा काढणे.

score^{2} /स्कॉऽ(र्)/ *क्रि* १ [*अक, सक*] (क) खेळातील गुण, गोल वगैरे मोजणे. (ख) खेळात गुण, गोल वगैरे मिळवणे. २ [*सक*] (पृष्ठभागावर) चीर पाडणे, चरा ओढणे. ३ [*अक, सक*] (यश वगैरे) मिळवणे. ४ [*सक*] (संगीताची) स्वरावली लिहिणे : *I ~d for the piano, मी पियानोसाठी स्वरावली लिहिली.* **scorer** *ना* १ खेळातील गुणसंख्या लिहिणारा माणूस. २ गुण, गोल वगैरे मिळवणारा खेळाडू.

scorn /स्कॉऽन्/ *ना* [*अगण*] एखाद्या व्यक्ती किंवा वस्तूविषयीची अतीव अनादराची भावना, एखाद्याविषयीचा तिरस्कार, तिटकारा. **scorn** *क्रि* [*सक*] १ तिटकारा दाखवणे, तिरस्कार करणे, तुच्छ समजणे. २ गर्वाने धुडकावून लावणे, न जुमानणे : *~ sb's advice, एखाद्याचा सल्ला न मानणे.* **scornful** *वि* तिरस्कारयुक्त, हेटाळणीयुक्त. **scornfully** *क्रिवि* तिरस्काराने.

scorpion /'स्कॉऽपिअन्/ *ना* [*गण*] नख्या आणि शेपटीत विषारी डंख असलेला छोटा प्राणी, विंचू, वृश्चिक.

Scot /स्कॉट्/ *ना* [*गण*] स्कॉटलंडचा रहिवासी.

Scotch /स्कॉच्/ *ना* [*गण, अगण*] (ग्लासभर) स्कॉटिश व्हिस्की (किंवा तिचा प्रकार).

scot-free /,स्कॉट्'फ्री/ *वि* सहीसलामत, शिक्षा न होता: *escape ~, सहीसलामत निसटणे/सुटणे.*

Scots /स्कॉट्स्/ स्कॉटलंडचा, स्कॉटिश पद्धतीचा.

Scottish /'स्कॉटिश्/ *वि* स्कॉटलंडचा, स्कॉटलंडच्या लोकांचा.

scoundrel /'स्काउन्ड्रल्/ *ना* [*गण*] नीतिनियमांची चाड नसणारा माणूस, पाजी.

scour^{1} /'स्काउअ(र्)/ *क्रि* [*सक*] खरखरीत कागद किंवा फडक्याने घासून स्वच्छ करणे, उजळा देणे. **scour** *ना* [*अ.व*] उजळा देणे, चकचकीत करणे. **scourer** *ना* [*गण*] भांडी घासायचा नायलॉन किंवा वायरचा बोळा, घासणी.

scour^{2} /'स्काउअ(र्)/ *क्रि* [*सक*] तपास घेणे, कसून शोध घेणे : *~ the area for the thief, चोरासाठी भाग पिंजून काढणे.*

scourge /स्कऽज्/ *ना* [*गण*] मोठ्या हालअपेष्टांचे कारण, पीडा, अरिष्ट : *the ~ of war, युद्धाचे संकट.*

scout /स्काउट्/ *ना* [*गण*] १ शत्रूची खबर काढण्यास पाठवलेला माणूस, जहाज किंवा विमान, हेर. २ **Scout** दुसऱ्याला मदत करणे आणि उपयोगी गोष्टी शिकणे ही ध्येये असणाऱ्या मुलांच्या संघटनेचा सभासद, बालवीर. ३ (*क्रिब*) **scout about/around** एखाद्याचा ठिकठिकाणी शोध घेणे, शोधत हिंडणे.

scowl /स्काउल्/ *ना* [*गण*] कपाळावरील आठ्या, रागीट नजर, रागीट मुद्रा. **scowl** *क्रि* [*अक*] (*at*)// एखाद्याकडे जळजळीत नजरेने पाहणे, एखाद्याला पाहून आठ्या घालणे.

scrabble /'स्क्रॅबल्/ *क्रि* (*क्रिब*) **scrabble about (for sth)** चाचपणे. **Scrabble** (*मालक*) *ना* [*गण*] अक्षरे जुळवून शब्द करण्याचा एक खेळ.

scraggy /'स्क्रॅगि/ *वि* (-ier, -iest) (*अधिक्षेपी*) रोड, काटकुळा.

scram /स्क्रॅम्/ *क्रि* (-mm-) [*अक*] (*व्रात्य*) पटकन् निघून जाणे, फुटणे, कटणे.

scramble /'स्क्रॅम्ब्ल्/ *क्रि* १ [*अक*] सरपटत जाणे/चढणे – बहुधा कष्टाने, हात टेकीत टेकीत वर जाणे. २ [*सक*] (अंडी फोडून) फेसवणे आणि शिजवणे. ३ [*सक*] (टेलिफोनवरील संभाषण) विस्कळित करून किंवा त्यात इतर आवाज मिसळून समजणार नाही असे करणे. ४ (*क्रिब*) **scramble for sth** एखादी गोष्ट मिळवण्यास झोंबाझोंबी करणे, झुंबड उडवणे : *~ for the best seats, चांगली जागा मिळवण्यास झोंबाझोंबी करणे.* **scramble** *ना* १ [*अ.व*] खडबडीत जागेवर चालणे किंवा चढणे. २ [*अ.व*] झोंबाझोंबी : *a ~ for seats, जागेसाठी झोंबाझोंबी.* ३ [*गण*] खडबडीत जागेवरची मोटारसायकलींची स्पर्धा.

scrap^{1} /स्क्रॅप्/ *ना* १ [*गण*] तुकडा, चिटोरा : *a ~ of paper, कागदाचा तुकडा* ○ (*ला*) *~s of information, माहितीचे तुकडे.* २ [*अगण*]

नको असलेल्या वस्तू, भंगार : ~ *metal, भंगार पत्रे (वगैरे).* **scrap** *क्रि* **(-pp-)** [*सक*] (निरुपयोगी वस्तू) टाकून देणे, बाद करणे. **'scrap-book** *ना* [*गण*] वृत्तपत्रातील कात्रणे, चित्रे वगैरे चिकटवायची वही. **'scrap-heap** *ना* [*गण*] १ भंगार मालाचा ढीग. २ (*वाक्प्र*) **on the scrap-heap** जरूर नसलेला, नको असलेला, भंगारात, बाराच्या भावात. **scrappy** *वि* **(-ier, -iest)** विस्कळित, अव्यवस्थित.

scrap² /स्क्रॅप्/ *ना* [*गण*] (*अनौप*) मारामारी – विशेषतः लहान मुलांची. **scrap** *क्रि* **(-pp-)** [*अक*] मारामारी करणे, भांडणे.

scrape /स्क्रेइप्/ *क्रि* १ [*सक*] **(क)** घासण्याच्या साधनाने एखादा पृष्ठभाग गुळगुळीत किंवा स्वच्छ करणे, तासणे, घासणे. **(ख)** (*from/off/away*)// (चिखलाचे, रंगाचे डाग वगैरे) खरवडून काढणे. २ [*सक*] घासून इजा होणे किंवा खराब होणे : ~ *one's arm on the wall, भिंतीवर हात घासणे.* ३ [*अक, सक*] एखाद्या गोष्टीला घासणे : *The branch ~d against the side of the car, मोटारीच्या बाजूला फांदी घासली गेली.* ४ [*सक*] घासून करणे : ~ *(out) a hole, घासून भोक पाडणे.* ५ (*वाक्प्र*) **scrape (the bottom of) the 'barrel** पर्याय नसल्याने अगदी गाळ माणसे किंवा रद्दड गोष्टी वापरणे. ६ (*क्रिब*) **scrape sth together/up** कष्टाने मिळवणे – विशेषतः पैसा : ~ *up enough to pay the gas bill, गॅसचे बिल देण्यास पैसे खरडून काढणे.* **scrape** *ना* [*गण*] १ तासणे, घासणे (किंवा त्याचा आवाज). २ घासून पडलेला चट्टा, जखम वगैरे. ३ (*अनौप*) संकट, लचांड.

scratch¹ /स्क्रॅच्/ *क्रि* १ **(क)** [*अक, सक*] नखासारख्या टोकदार गोष्टीने (पृष्ठभागावर) ओरखडे काढणे. **(ख)** [*सक*] ओरखडा काढणे, खोदून रेषा काढणे, चरा पाडणे. २ [*अक, सक*] नखाने खाजवणे. ३ (*वाक्प्र*) **scratch the surface** वरवर स्पर्श करणे, खोलात न जाणे. ४ (*क्रिब*) **scratch sth away, off, etc** एखादी गोष्ट ओरबाडून काढणे.

scratch² /स्क्रॅच्/ *ना* १ [*गण*] चरा, ओरखडा किंवा ओरखड्याचा आवाज. २ [*अे.व*] खाजवणे. ३ (*वाक्प्र*) **(start sth) from 'scratch** पहिल्यापासून सुरुवात करणे. **up to scratch** समाधानकारक. **scratchy** *वि* १ खाज पाडणारा. २ (ध्वनिमुद्रिकेबाबत) खरखरणारी.

scrawl /स्क्रॉऽल्/ *क्रि* [*अक, सक*] १ घाईघाईने लिहिणे, खरडणे. २ रेघोट्या मारणे. **scrawl** *ना* [*गण, अे.व*] घाणेरडे अक्षर.

scream /स्क्रीम्/ *क्रि* १ **(क)** [*अक*] भीतीने, रागाने, वेदनेने वगैरे किंकाळी फोडणे, किंचाळणे. **(ख)** [*सक*] किंचाळून सांगणे. २ [*अक*] (वारा, मशीन वगैरेबाबत) घोगावणे, घू घू करणे. ३ (*वाक्प्र*) **scream one's head off** ➪ HEAD¹. **scream** *ना* [*गण*] किंकाळी.

screech /स्क्रीच्/ *क्रि* १ [*अक*] कर्कश आवाज करणे, कानाला नकोसा वाटणारा खरखर किंवा खर्र आवाज काढणे. २ [*सक*] कर्कश आवाजात बोलणे. ३ [*अक*] भीतीने किंवा वेदनेने (काही झाल्यासारखे) किंचाळणे. **screech** *ना* [*अे.व*] कर्र आवाज : *a ~ of brakes, ब्रेकचा कर्र आवाज.*

screen /स्क्रीन्/ *ना* १ [*गण*] खोलीचे दोन भाग करण्यास, प्रकाश, उष्णता यांना प्रतिबंध करण्यास वगैरे वापरली जाणारी चौकट, आडोशाची चौकट. २ [*गण*] एखादी गोष्ट लपवणारे किंवा ती सुरक्षित ठेवणारे असे काही, पटल : *a ~ of trees around the house, घराभोवतीचा झाडांचा पटल म्हणजेच झाडांआड लपलेले घर.* ३ [*गण*] चित्रपट वगैरे दाखविण्याचा रुपेरी पडदा. ४ [*गण*] दूरदर्शनचा पडदा. ५ [*अे.व*] चित्रपट व्यवसाय. ६ [*गण*] बारीक वायरची विणलेली जाळी बसविलेली चौकट. **screen** *क्रि* [*सक*] १ आडोसा उभारून लपवणे किंवा सुरक्षित ठेवणे. २ एखाद्याची रोगासाठी किंवा दोष शोधण्यासाठी तपासणी करणे. ३ पडद्यावर चित्रपट वगैरे दाखवणे. **'screenplay** *ना* [*गण*] चित्रपटकथा, चित्रकथा.

screw /स्क्रू/ *ना* [*गण*] १ गोलाकार खाचे असलेला आणि वस्तू घट्टपणे एकत्र जोडण्यास वापरला जाणारा लोखंडी वगैरे खिळा, मळसूत्र, पेच, सूत्रक. २ पिळणे; पिळा. ३ बोटीचा चालनपंखा. ४ (*ब्रि* ⚠ *ग्राम्य*) संभोग. ५ (*वाक्प्र*) **have a screw loose** (*ब्रि ग्राम्य*) वेडा किंवा चक्रम असणे, डोक्याचा स्क्रू ढिला असणे. **screw** *क्रि* १ [*सक*] स्क्रू पिळून घट्ट

करणे. २ [*सक*] पिळणे; पिळून घट्ट करणे : ~ *the lid on, झाकण घट्ट पिळणे.* ३ [*अक, सक*] (*ब्रि* ⚠ *व्रात्य*) एखाद्याशी संभोग करणे. ४ (*क्रिब*) **screw sth up** (क) (डोळे, चेहरा वगैरे) बारीक करणे, आकसणे, आखडणे : *She ~ed up her eyes in bright sunshine, प्रखर उजेडामुळे तिने डोळे बारीक केले.* (ख) (कागदाचा) बोळा करणे. (ग) (*व्रात्य*) एखादी गोष्ट वाईट रीतीने करणे. **'screwdriver** *ना* [*गण*] स्क्रू पिळण्याचे हत्यार, पेचकस. **,screwed-'up** *वि* (*व्रात्य*) निराश, विमनस्क, गोंधळलेला.

scribble /'स्क्रिब्ल्/ *क्रि* [*अक, सक*] १ घाईघाईने लिहिणे, खरडणे : ~ *(a note) on an envelope, पाकीटावर (मजकूर) खरडणे.* २ कागदावर वगैरे फराटे मारणे. **scribble** *ना* १ [*अगण, ऐ.व*] वाईट हस्ताक्षर. २ [*गण*] खरडलेला मजकूर.

scribe /स्क्राइब/ *ना* [*गण*] छपाईची कला ज्यावेळी नव्हती त्यावेळी लिखित प्रतीची नकल करणारा, उतरवून घेणारा माणूस.

script /स्क्रिप्ट/ *ना* १ [*गण*] नाटक, चित्रपट, भाषण वगैरेचा लिखित मजकूर, पटकथा, लिखित संवाद, संहिता, पाठ्य. २ [*अगण*] हस्ताक्षर. ३ [*अगण*] लिपी. **script** *क्रि* [*सक*] (चित्रपटाची वगैरे) पटकथा लिहिणे, संहिता तयार करणे. **'script-writer** *ना* [*गण*] चित्रपट, आकाशवाणी वगैरेसाठी लेखन करणारा, पटकथालेखक.

scripture /'स्क्रिप्च(र्)/ *ना* १ **Scripture** [*अगण*] (तसेच **the Scriptures**) [*ब.व*] बायबल. २ **scriptures** [*ब.व*] धर्मग्रंथ. **scriptural** *वि* बायबलचा; धर्मग्रंथाचा.

scroll /स्क्रउल्/ *ना* [*गण*] १ (क) लिहिण्यासाठी वापरायच्या कागदाचे भेंडोळे, लेखपट. (ख) अशा पटावर लिहिलेले जुन्या काळातले पुस्तक, पोथी वगैरे. २ दगडात कोरलेला लेखपट. **scroll** *क्रि* [*अक, सक*] (संगणकाच्या पटलावरील साधनसामग्रीबाबत) हळूहळू वर किंवा खाली सरकणे; संगणकावर मजकूर वर-खाली फिरवणे.

scrounge /स्क्राउन्ज्/ *क्रि* [*अक, सक*] (*अनौप* अनेकदा *अधिक्षेपी*) काम न करता विनवण्या करून अजिजीने काही मिळवणे, (पैसे, अन्न वगैरेची) याचना करणे, भीक मागणे : ~ *(£10) off a friend, मित्राकडून (१० पौंड) फुकट लाटणे.* **scrounger** *ना* [*गण*] फुकट्या, लाट्या.

scrub^1 /स्क्रैब्/ *क्रि* (**-bb-**) १ [*अक, सक*] ब्रशने भांडी वगैरे घासून साफ करणे, घासणे, अशा प्रकारे (घाण) काढणे. २ [*सक*] (*अनौप*) रद्द करणे. **scrub** *ना* [*ऐ.व*] घासणे. **'scrubbing-brush** *ना* [*गण*] फरशी वगैरे घासायचा ब्रश.

scrub^2 /स्क्रैब्/ *ना* [*अगण*] झुडपांचे रान, खुरट्या झाडांचे वन.

scruff /स्क्रैफ्/ *ना* (*वाक्प्र*) **the scruff of the neck** मानगुट.

scruffy /'स्क्रैफि/ *वि* (**-ier, -iest**) (*अनौप*) मळकट आणि गबाळा. **scruff** *ना* [*गण*] (*अनौप*) गबाळा कळकट माणूस.

scruple /'स्क्रूप्ल्/ *ना* [*गण, अगण*] पापभीरूता, मनाची लाज, सद्सद्विवेकबुद्धी, स्वतःच्या न्याय्यतेबाबतची शंका : *have no ~s about doing sth, एखादी गोष्ट करण्याचा विधिनिषेध नसणे.*

scrupulous /'स्क्रूप्युलस्/ *वि* १ बारीकसारीक गोष्टीतही काळजी घेणारा, खूप काटेकोर. २ खूप प्रामाणिक, नीतीची चाड असणारा. **scrupulously** *क्रिवि* बारीकसारीक लक्ष देऊन, प्रामाणिकपणे, इमानेइतबारे.

scrutinize /'स्क्रूटिनाइझ्/ *क्रि* [*सक*] काळजीपूर्वक व्यवस्थित तपासणी करणे, निरखणे, छाननी करणे.

scrutiny /'स्क्रूटिनि/ *ना* (*ब.व* **-ies**) [*गण, अगण*] कडक तपासणी, छाननी.

scuff /स्कैफ्/ *क्रि* १ [*अक, सक*] पाय फरपटत चालणे, पाय घासत चालणे. २ [*सक*] (बूट वगैरे) घासणे, झिजवणे.

scuffle /'स्कैफ्ल्/ *क्रि* [*अक*] धक्काबुक्की करणे, झोंबाझोंबी करणे. **scuffle** *ना* [*गण*] धक्काबुक्की, झोंबाझोंबी.

sculpt = SCULPTURE.

sculptor /'स्कैल्प्ट(र्)/ (*स्त्री* **sculptress**)

ना [गण] शिल्पकार, मूर्तिकार, खोदकाम करणारा, शिल्पी.

sculpture /'स्कैल्प्च(र्)/ *ना* १ [*अगण*] लाकडाच्या किंवा दगडाच्या मूर्ती वगैरे बनवण्याची कला, मूर्तिकला, शिल्पकला. २ [*गण, अगण*] मूर्तिकलेचा नमुना, शिल्प. **sculpture** (तसेच **sculpt** /स्कैल्प्ट्/) *क्रि* [*अक, सक*] मूर्ती किंवा पुतळा बनवणे, शिल्प खोदणे.

scum /स्कैम्/ *ना* १ [*अगण*] काही द्रवांच्या पृष्ठभागावर येणारा तवंग; पाण्यावर साचलेली घाण, तवंग. २ [*ब.व*] (*ला अधिक्षेपी*) तिरस्करणीय लोक, गाळ.

scurry /'स्कैरि/ *क्रि* (*भूत, भूत वि* -ied) [*अक*] तुरूतुरू पळणे, घाईघाईने जाणे. **scurry** *ना* [*अगण, अे.व*] तुरूतुरू पळणे.

scythe /साइद्/ *ना* [*अगण*] लांब दांड्याचे आणि वक्राकार पात्याचे गवत वगैरे कापायचे साधन, विळा, कोयता. **scythe** *क्रि* [*अक, सक*] कोयत्याने (किंवा कोयत्याने कापल्यासारखे) कापणे.

sea /सी/ *ना* १ **the sea** [*अगण*] पृथ्वीचा बराच पृष्ठभाग ज्याने व्यापला आहे ते खारे पाणी, समुद्र, सागर. २ [*गण*] (विशेषनामांत) ज्या भूभागापाशी समुद्र असेल त्याचे नाव असलेला समुद्र. ३ [*अे.व*] समुद्राचे उसळते पाणी : *a heavy/calm ~, खवळलेला/शांत समुद्र.* ४ [*अे.व*] मोठी राशी, पुष्कळ जागा व्यापणारी मोठी राशी : *a ~ of corn, धान्य समुद्र.* ५ (*वाक्प्र*) **at sea** (क) समुद्रावरील जहाजात. (ख) संभ्रमित, गोंधळलेला, न समजणारा. **by sea** बोटीने. **go to sea** खलाशी बनणे. **put to sea** जहाजातून बंदर सोडणे. **'seaboard** *ना* [*गण*] किनारपट्टीचा प्रदेश. **'seafaring** /-फेअरिङ्/ *वि, ना* [*अगण*] समुद्र-प्रवास (किंवा त्याबाबतचा), जहाजावरचे काम (किंवा त्याबाबतचे). **'seafood** *ना* [*अगण*] खाण्यासाठी वापरायचे समुद्रातील मासे, खेकडे वगैरे. **'sea front** *ना* [*गण, अगण*] शहराचा समुद्राजवळचा किंवा समुद्राभिमुखी भाग. **'seagoing** *वि* (जहाजांबाबत) समुद्रप्रवासासाठी बांधलेली, नौप्रवासी. **'seagull** *ना* [*गण*] = GULL. **'sea-horse** *ना* [*गण*] घोड्यासारखे डोके असणारा एक लहान मासा, समुद्रघोडा. **sea-legs** *ना* [*ब.व*] कुठलाही त्रास न होता जहाजातून प्रवास करण्याची क्षमता. **'sea-level** *ना* [*अे.व*] जमिनीची उंची जेथपासून मोजतात ती समुद्र-सपाटी. **'sea-lion** *ना* [*गण*] मोठा सील मासा, समुद्रसिंह. **'seaman** *ना* [*गण*] दर्यावर्दी, खलाशी. **'seamanship** *ना* [*अगण*] जहाज चालवण्याचे कसब, नाविकविद्या. **'sea-shore** *ना* [*अगण*] समुद्रकिनारा. **'seasick** *वि* जहाजाच्या हेलकाव्याने मळमळ होणारा, जहाज लागणारा. **'seaside** *ना* [*अगण*] समुद्राच्या काठावरची जागा – विशेषतः पर्यटक-निवास. **'seaward** *वि, क्रिवि* समुद्राकडे. **'seaweed** *ना* [*अगण*] समुद्राच्या कडेच्या खडकांवर वाढणारे शेवाळे. **'seaworthy** *वि* (जहाजाबाबत) समुद्रप्रवासास योग्य, समुद्रात लोटण्याजोगे.

seal^1 /सील्/ *ना* [*गण*] पर असणारा एक समुद्रप्राणी. **'sealskin** कपड्यांसाठी वापरले जाणारे सीलचे कातडे.

seal^2 /सील्/ *ना* [*गण*] १ (क) एखादे कागदपत्र अस्सल आहे हे दाखवण्याकरता लावायची किंवा पत्र वगैरे बंद करण्यासाठी लाख वगैरेची केलेली मुद्रा, मोहोर. (ख) मुद्रा उमटविण्याचे धातू वगैरेचे साधन, मोहोर. २ वायु, द्रव वगैरे यांची गळती थांबविण्यासाठी भोक वगैरे लिंपण्यास वापरलेले द्रव्य. ३ (*वाक्प्र*) **seal of approval** अधिकृत मान्यता. **seal** *क्रि* [*सक*] १ मुद्रा उमटविणे, मोहोरबंद करणे. २ गच्च बंद करणे, पक्के बंद करणे. ३ (*औप*) संपुष्टात आणणे, मिटवणे; निर्णय घेणे, ठरवणे : *~ a bargain, वायदा ठरवणे* ○ *~ sb's fate, एखाद्याचे नशीब ठरवणे म्हणजेच त्याचे काय करायचे ते पक्के करणे.* ४ (*क्रिब*) **seal sth off** (एखादा परिसर) पक्का बंद करणे, येण्याजाण्यास प्रतिबंध करणे : *Police ~ed off the building, पोलिसांनी इमारतीला वेढा घालून ती बंद केली.*

seam /सीम्/ *ना* [*गण*] १ कापडाच्या वगैरे दोन कडा जेथे शिवून जोडतात ती दूण, जोड, दंड. २ खाणीतील कोळशाचा वगैरे थर.

seance /'सेइआन्स्/ *ना* [*गण*] मृत व्यक्तींच्या आत्म्यांशी बोलण्याचा प्रयत्न करण्यासाठी जमलेली सभा.

search /सऽच्/ *क्रि* [*अक, सक*] शोधणे, तपास घेणे: *She ~ed her pockets for money, तिने पैशासाठी खिसे चाचपले.* **search** *ना* [*गण*] १ शोध, तपास. २ (*वाक्प्र*) **in search of** शोधात. **searching** *वि* **(क)** (नजरेबाबत) शोधक, सर्व गोष्टी तपासून पाहणारी. **(ख)** (तपासणीबाबत) परिपूर्ण, कसून केलेली. **'searchlight** *ना* [*गण*] हव्या त्या बाजूला फिरवता येणारा शोध घेणारा प्रकाशझोत, शोधदीप. **'search-party** *ना* [*गण*] एखाद्याला शोधण्याकरता जमवलेला लोकांचा गट, तपासणी पथक, शोधपथक. **'search-warrant** *ना* [*गण*] इमारत वगैरेची झडती घेण्याची परवानगी देणारे अधिकृत कागदपत्र, झडतीचे वॉरंट.

season /'सीझ़न्/ *ना* [*गण*] १ वसंत, वैशाख, वर्षा यासारख्या ऋतूमधे हवामानानुसार वर्षाची केलेली विभागणी. २ काही विशिष्ट घटना घडणारा काल, मोसम, हंगाम: *the rainy ~, पावसाचा मोसम* किंवा *पावसाळा.* ३ (*वाक्प्र*) **in/out of season** (फळे वगैरे बाबत) उपलब्ध/अनुपलब्ध, दिवस असलेले/दिवस नसलेले. **season** *क्रि* [*सक*] १ वापरास योग्य करणे: *~ed wood, रापवलेले किंवा पक्के केलेले लाकूड* ○ (*ला*) *a ~ed politician, तयार राजकारणी* किंवा *ज्येष्ठ राजकारणी.* २ मीठ, मिरे वगैरेने अन्न चवदार करणे, खमंग करणे. **seasonable** /-अब्ल्/ *वि* **(क)** (हवामानाबाबत) ऋतुमानानुसार. **(ख)** (मदत वगैरेबाबत) योग्यवेळी पोहोचलेली, यथाकाल. **seasonal** *वि* ठराविक मोसमात घडणारा, मोसमी, हंगामी: *~ trade, मोसमी व्यापार.* **seasonally** *क्रिवि* मोसमानुसार, ऋतुकालानुसार. **seasoning** *ना* [*अगण*] अन्न स्वादिष्ट करण्यासाठी वापरायचा मसाला, मुळ्या वगैरे. **'season-ticket** *ना* [*गण*] विशिष्ट काळात सर्व वेळी वापरायचे तिकीट, मुदती तिकीट.

seat /सीट्/ *ना* [*गण*] १ आसन, बैठक – उदा खुर्ची. २ खुर्चीचा वगैरे बसायचा भाग. ३ वाहनात, हॉलमधे वगैरे पैसे देऊन घेतलेली बसायची जागा: *There are no ~s left for the concert, संगीत-मैफलीची एकही जागा शिल्लक नाही.* ४ कुल्ले; कुल्ले झाकणारा कपड्याचा भाग: *The ~ of his trousers, ढुंगणावरचा पँटचा भाग.* ५ एखाद्या कार्याचे स्थान, अधिष्ठान: *the ~ of government, शासनाचे अधिष्ठान.* ६ संसद, विधिमंडळ वगैरेतील प्रतिनिधीची जागा. ७ (*वाक्प्र*) **have/take a ~** (खाली) बसणे, स्थानापन्न होणे. **seat** *क्रि* [*सक*] १ (*औप*) एखाद्याला आसन देणे, आसनस्थ करणे: *Please be seated, कृपया बसा न.* २ आसने किंवा जागा असणे: *The cinema ~s 200, या चित्रपटगृहात २०० माणसे बसू शकतात.* **'seat-belt** *ना* [*गण*] गाडी किंवा विमानात बसलेल्या माणसाला बांधायचा पट्टा, आसनपट्टा. **seating** *ना* [*अगण*] आसने, खुर्च्या.

secateurs /'सेकटऽझ़्/ *ना* [*ब.व*] बागेतील झाडे कापायची दणकट धारदार कात्री.

secede /सि'सीड्/ *क्रि* [*अक*] *from//* (गटाबाबत) (एखाद्या संघटनेतून) फुटणे, वेगळे होणे. **secession** /सि'सेश्न्/ *ना* [*गण, अगण*] फुटून निघणे.

secluded /सि'क्लूडिड/ *वि* फार लोक येणार नाहीत असा, निवांत; एकटा, एकांतातला. **seclusion** /सि'क्लूझ़न्/ *ना* [*अगण*] निवांतपणा; एकांतवास, एकटेपणा.

second^{1} /'सेकन्ड्/ *वि* १ दुसरा: *the ~ person to come, येणारा दुसरा माणूस.* २ जादा; अन्य: *a ~ pair of shoes, बुटाची दुसरी/आणखी जोडी.* ३ (*वाक्प्र*) **second to none** तितकाच उत्तम: *As a writer she's ~ to none, लेखिका म्हणून ती कुणाही इतकीच उत्तम आहे.* **second** *क्रिवि* दुसऱ्या स्थानावर: *come (in) ~ in a race, शर्यतीत दुसऱ्या क्रमांकावर येणे.* **,second-'best** *ना, वि* सर्वोत्तमच्या नंतरचा/खालचा, दुसऱ्या नंबरचा, उत्कृष्ट दुसरा. **,second-'class** *वि, क्रिवि* द्वितीय श्रेणीचा, द्वितीय श्रेणीने. **,second-'hand** *वि* **(क)** पूर्वी दुसऱ्याच्या मालकीचा असलेला, आडगिऱ्हाइकी. **(ख)** (बातम्या वगैरे बाबत) अप्रत्यक्षपणे मिळवलेली, परहस्ते मिळालेली. **secondly** *क्रिवि* (यादी देताना) दुसरे म्हणजे; याखेरीज. **,second 'nature** *ना* [*अगण*] स्वभावधर्म, झालेली सवय. **,second-'rate** *वि* दुय्यम प्रतीचा. **,second 'thoughts** *ना* [*ब.व*] अधिक विचार

केल्यावर बनलेला वेगळा निश्चय, निर्णय.

second^{2} /'सेकन्ड्/ *ना* १ **the second** [*अे.व*] पहिल्या नंतर येणारा माणूस किंवा वस्तू : *the ~ to leave, जाणारा दुसरा माणूस.* २ [*गण*, बहुधा *ब.व*] दुय्यम प्रतीचा आणि म्हणून स्वस्तात विकायचा माल. ३ **seconds** [*ब.व*] अन्न वाढायची दुसरी फेरी. ४ [*गण*] (*ब्रि*) अगदी वरच्या वर्गाच्या लगेच नंतरच्या वर्गाचा विद्यापीठ परीक्षेचा निकाल.

second^{3} /'सेकन्ड्/ *ना* [*गण*] १ मिनिटाचा किंवा अंशाचा साठावा भाग. २ (*अनौप*) अल्प वेळ; क्षणभर : *Wait a ~! घटकाभर थांब!* **'second hand** *ना* [*गण*] घड्याळाचा सेकंद काटा.

second^{4} /'सेकन्ड्/ *क्रि* [*सक*] (वादविवादात) (प्रस्तावाला) अनुमोदन देणे. **seconder** *ना* अनुमोदक.

second^{5} /सि'कॉन्ड्/ *क्रि* [*सक*] एखाद्याला नेहमीच्या कामाऐवजी विशिष्ट कामगिरीवर नेमणे/पाठवणे. **secondment** *ना* [*अगण*] खास कामासाठी तात्पुरती नेमणूक.

secondary /'सेकन्ड्रि/ *वि* १ (शाळा किंवा शिक्षणाबाबत) अकरा वर्षांवरील मुलांसाठीचे, माध्यमिक. २ कमी महत्त्वाचा, दुय्यम : *of ~ interest, दुय्यम महत्त्वाचा.* ३ दुसऱ्या कशातून तरी उद्भवणारा : *a ~ infection, दुसरा संसर्ग* किंवा *अनुषंगिक संसर्ग.*

secrecy /'सीक्रसि/ *ना* [*अगण*] गुप्तता, गुप्तता पाळण्याची कृती; गुप्ततेची स्थिती, गोपनीयत्व.

secret /'सीक्रिट्/ *वि* १ इतरांच्या दृष्टीपासून किंवा इतरांना कळण्यापासून दूर ठेवलेला, गुप्त, गोपनीय : *~ information, गुप्त माहिती.* २ उघड नसणारा, चोरटा : *a ~ admirer,* छुपा *किंवा अज्ञात चाहता.* ३ (स्थळांबाबत) शांत आणि अपरिचित; एकांतातील. **secret** *ना* [*गण*] १ गुपित. २ अज्ञात कारण, रहस्य, गुरूकिल्ली : *the ~ of her success, तिच्या यशाचे रहस्य.* ३ गूढ : *the ~s of nature, निसर्गाची गूढे.* ४ (*वाक्प्र*) **in secret** गुप्तपणे. **,secret 'agent** गुप्ततपासखात्याचा सभासद; गुप्तहेर. **secretly** गुप्तपणे; चोरून, लपून. **,secret 'service** *ना* [*गण*] शासकीय गुप्तहेर खाते.

secretariat /,सेक्र'टेअरिअट्/ *ना* [*गण*] मोठा कारभार पाहणारा विभाग, सचिवालय.

secretary /'सेक्रट्रि; *अमे* -रटेरि/ *ना* [*गण*] १ पत्रे लिहिणे, व्यवस्था करणे, गाठीभेठी ठरवणे वगैरे कामे करणारी व्यक्ती, सचिव, चिटणीस. २ पत्रव्यवहार, दप्तर सांभाळणारा सोसायटी, क्लब वगैरेचा कार्यवाह. **secretarial** /,सेक्र'टेअरिअल्/ *वि* सचिवीय, कार्यवाहाचा. **Secretary of State** *ना* (क) [*गण*] (*ब्रि*) शासकीय विभागाचा प्रमुख. (ख) [*अे.व*] (*अमे*) परराष्ट्र खात्याचा प्रमुख.

secrete /सि'क्रीट्/ *क्रि* [*सक*] १ (शरीराबाबत) (लाळ वगैरे द्रव) तयार करणे, स्राव करणे. २ लपवणे, दडवणे : *~ money in a drawer, टेबलाच्या/कपाटाच्या खणात पैसे दडवून ठेवणे.* **secretion** /सि'क्रीश्न्/ *ना* १ [*अगण*] स्राव. २ [*गण*] स्राव होणारा शरीरातील द्रव.

secretive /'सीक्रटिव्ह्/ *वि* स्वतःचे विचार वगैरे गुप्त ठेवणारा, गोपनवृत्तीचा, आतल्या गाठीचा, मौन पाळणारा. **secretively** *क्रिवि* गोपनीयवृत्तीने, मनात ठेवून.

sect /सेक्ट्/ *ना* [*गण*] समान श्रद्धांचा (विशेषतः धार्मिक) गट, पंथ. **sectarian** /सेक्'टेअरिअन्/ *वि* पंथाचा, पांथिक.

section /'सेक्श्न्/ *ना* [*गण*] १ एखाद्या गोष्टीचा केलेला भाग, विभाग. २ एखाद्या संस्थेचा वगैरे विभाग. ३ उभा छेद केल्यावर दिसेल असे दृश्य किंवा चित्र. **sectional** *वि* (क) विभागवार. (ख) एखाद्या समाजाच्या वगैरे भागाचा, विभागीय.

sector /'सेक्ट(र्)/ *ना* [*गण*] १ (उद्योगाची वगैरे) शाखा, क्षेत्र : *the private/public ~, खाजगी/सार्वजनिक क्षेत्र.* २ विशेषतः सैन्याच्या हालचालींसाठी केलेला एखाद्या क्षेत्राचा भाग, लष्करी क्षेत्र.

secular /'सेक्युल(र्)/ धर्मनिरपेक्ष, आध्यात्मनिरपेक्ष, लौकिक : *~ education,* धर्मनिरपेक्ष *शिक्षण.*

secure /सि'क्युअ(र्)/ *वि* १ चिंतामुक्त, काळजीमुक्त, निर्धास्त. २ निश्चित : *a ~ job, हमीची/खात्रीची नोकरी.* ३ (*from/against*)//

सुरक्षित. ४ फुटण्याची, पडण्याची वगैरे शक्यता नसलेला; घट्ट केलेला : *a ~ grip, घट्ट पकड.* **secure** *क्रि* [*सक*] १ घट्ट बसवणे, गच्च बंद करणे : *~ all the doors, सर्व दारे गच्च बंद करणे.* २ (*from/against*)// सुरक्षित करणे, निर्धोक करणे. ३ (*औप*) मिळवण्यात यशस्वी होणे : *~ a job, नोकरी मिळवणे.* **securely** *क्रिवि* निश्चितपणे; घट्ट; सुरक्षितपणे.

security /सि'क्युअरटि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] सुरक्षितपणा, निर्धास्तपणा, निर्धोकपणा. २ [*अगण*] सुरक्षा काळजी, सुरक्षा व्यवस्था : *tight ~ at the airport, विमानतळावरील कडक सुरक्षा व्यवस्था.* ३ [*गण, अगण*] कर्जफिड वगैरेची खात्री देण्यासाठी दिलेले मौल्यवान असे काही, तारण, जामीन. ४ [*गण, बहुधा ब.व*] मालमत्तेची मालकी दाखविणारे कागदपत्र, मालकी दाखविणारे दस्तऐवज.

sedan /सि'डॅन्/ *ना* (*अमे*) = SALOON ३.

sedate /सि'डेइट्/ *वि* शांत आणि गंभीर. **sedately** *क्रिवि* शांतपणे आणि गंभीरपणे.

sedation /सि'डेइश्न्/ *ना* [*अगण*] उपशामक औषधोपचार, औषधाने शांत करणे.

sedative /'सेडटिव्ह्/ *ना* [*गण*], *वि* उपशामक किंवा झोप आणणारे (औषध).

sedentary /'सेड्न्ट्रि; *अमे* -टेरि/ *वि* १ (कामाबाबत) बैठे, बसून करायचे. २ (लोकांबाबत) बसून काम करणारे, बसकामे, जास्त वेळ बसून घालवणारे.

sediment /'सेडिमन्ट्/ *ना* [*अगण*] पाणी किंवा अन्य द्रवाच्या तळाशी बसणारा गाळ, पाण्याच्या तळाचा वाळूचा थर, साखा, अवसाद. **sedimentary** /-मेन्ट्रि/ *वि* अवसादी, गाळाचा, जलजन्य.

seduce /सि'ड्यूस्/ *क्रि* [*सक*] १ एखाद्याला संभोगासाठी राजी करणे, वश करणे, नादी लावणे, बधवणे. २ कुमार्गाला लावणे, वाकडे पाऊल टाकायला प्रवृत्त करणे. **seduction** /सि'डेक्श्न्/ *ना* [*गण, अगण*] बधवून घेतलेला उपभोग, भ्रष्ट करणे; कुमार्गाला लावणे. **seductive** /सि'डेक्टिव्ह्/ *वि* भूल पाडणारा, मोह पाडणारा.

see^{1} /सी/ (*भूत* **saw** /सॉऽ/, *भूत वि* **~n** /सीन्/) १ [*अक*] (अनेकदा *can, could* सह वापर) पाहणे, बघणे : *If you shut your eyes you can't ~, तू डोळे बंद केलेस तर पाहू शकणार नाहीस.* २ [*सक*] (अनेकदा *can, could* सह वापर) दृष्टीस पडणे, दिसणे : *He couldn't ~ her in the crowd, त्याला ती गर्दीत दिसू शकली नाही.* ३ [*सक*] (चित्रपट, दूरदर्शनवरील कार्यक्रम वगैरे) पाहणे : *What did you ~ at the theatre last night? काल रात्री तू थिएटरमधे काय पाहिलंस्?* ४ [*सक*] (*आज्ञार्थी*) एखाद्याकडे पाहणे, नजर टाकणे : *S~ page 4, पृष्ठ ४ पहा.* ५ [*सक*] समजणे, कळणे : *He didn't ~ the joke, त्याला विनोद कळला नाही.* ६ [*सक*] शोधणे; समजणे, लक्षात येणे : *I'll go and ~ if she's there, ती तेथे आहे का हे मी जाऊन पाहीन.* ७ [*सक*] सल्ला घेणे; भेट घेणे : *~ a doctor, डॉक्टरला भेटणे म्हणजेच डॉक्टरकडे जाणे.* ८ [*सक*] भेटणे, गाठ पडणे : *I don't ~ her often now, हल्ली मी तिला फारसा भेटत नाही.* ९ [*सक*] नक्की करणे; तपासणे, खात्री करणे : *S~ that the windows are shut, खिडक्या बंद केल्याची नीट खात्री करून घे.* १० [*सक*] एखाद्याला सोबत करणे, एखाद्याबरोबर जाणे : *Will you ~ him home? तू त्याला घरी जाताना सोबत करशील?* ११ (*वाक्प्र*) **let me see** मी आठवण्याचा/शोधण्याचा प्रयत्न करतोय. **(you) see** (तुला) समजलं, कळलं : *She couldn't come, (you) see, because she was ill, ती आजारी होती म्हणून ती आली नाही, कळलं?* **(not) see eye to 'eye with sb** एखाद्याशी सहमत (न) होणे. **,see for one'self** खात्री करून घेणे. **see how the 'land lies** परिस्थिती पाहणे. **,seeing is 'believing** प्रत्यक्ष पाहिल्यावरच खात्री पटणे. **see the 'light** (क) समजून येणे, लक्षात येऊ लागणे. (ख) (धर्म) तत्त्वावर विश्वास बसणे. **see 'red** संतापणे, रागाने लाल होणे. **see 'sense** शहाणपणा सुचणे. **be 'seeing things** कल्पनेत पाहणे, भास होणे. १२ (*क्रिब*) **see about sth** एखाद्या गोष्टीकडे पाहणे म्हणजे तीत लक्ष घालणे. **see sb about sth** सल्ला घेणे. **see sth in sb/sth** एखाद्यात काहीतरी चांगले किंवा आकर्षक आढळणे. **see sb off** एखाद्याला

स्टेशनवर वगैरे पोहोचवायला जाणे, एखाद्याला निरोप द्यायला त्याच्याबरोबर स्टेशनवर वगैरे जाणे. **see through sb/sth** न फसणे, खरा हेतू वगैरे ओळखणे. **see sth through** एखादी गोष्ट शेवटपर्यंत करणे. **see to sth** एखाद्या गोष्टीकडे लक्ष देणे.

see^{2} /सी/ *ना* [*गण*] (*औप*) बिशपच्या अखत्यारीतील जिल्हा; बिशपचे स्थान.

seed /सीड्/ *ना* १ [*गण*] झाडाचे बी, बीज. २ [*अगण*] बियाणे. ३ [*गण, बहुधा ब.व*] एखाद्या गोष्टीची सुरुवात, उगम : *the ~s of doubt, शंकेचा उगम.* ४ [*गण*] (विशेषतः टेनिसमधे) मानांकित खेळाडू. ५ (*वाक्प्र*) **go/run to seed** (क) (वनस्पतीबाबत) बी धरल्यावर फुले येण्याची क्रिया बंद होणे. (ख) (माणसाबाबत) गबाळा, वृद्ध, रया गेलेला असा दिसू लागणे. **seed** *क्रि* १ [*अक*] (पिकाबाबत) बी धरणे/देणे. २ [*सक*] बी पेरणे. ३ [*सक*] (विशेषतः टेनिसमधे) स्पर्धकांची संभाव्य यशानुसार यादी करणे, मानांकन करणे. **seedless** *वि* बी नसलेला. **seedling** *ना* [*गण*] बीपासून तयार केलेले रोप.

seedy /सीडि/ *वि* (-ier, -iest) १ दमलेला, विस्कटलेला, उपेक्षित वगैरे दिसणारा. २ (*अनौप*) आजारी : *feel ~, बरे न वाटणे.* **seediness** *ना* [*अगण*] अव्यवस्थितपणा; आजारपण.

seek /सीक्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **sought** /सॉऽट्/) (*औप*) १ [*अक, सक*] शोधणे, शोधात असणे. २ [*सक*] विचारणे : *~ advice, सल्ला घेणे.* ३ [*सक*] (*औप*) प्रयत्न करणे : *~ to end the conflict, संघर्ष मिटवण्याचा प्रयत्न करणे.*

seem /सीम्/ *क्रि* वरवर दिसणे, आहे असे वाटणे : *This book ~s interesting, हे पुस्तक लक्षवेधक दिसते.* **seeming** *वि* वरवरचा, देखाव्याचा म्हणजे खरा नसलेला, तोंडदेखला : *her ~ing friendliness, तिचा देखाव्याचा मित्रभाव.* **seemingly** *क्रिवि* वरवर पाहता, डोळ्याला दिसेल अशा रीतीने.

seemly /'सीम्लि/ *वि* (-ier, -iest) (वागणुकीबाबत) योग्य, उचित.

seen SEE^{1} चे *भूत वि*.

seep /सीप्/ *क्रि* [*अक*] (द्रवांबाबत) पाझरणे, झिरपणे : *water ~ing through the cracks, भेगांतून झिरपणारे पाणी.* **seepage** /-इज्/ *ना* [*अगण*] झिरपणी, पाझर; झिरपणारा द्रवपदार्थ.

seesaw /'सीसॉऽ/ *ना* १ [*गण*] मधोमध आधार असलेली, दोन्ही टोकांना बसलेल्या व्यक्ती वर-खाली करण्याची लांब फळी. २ [*अ.व*] वर-खाली किंवा पुढे-मागे होणारी हालचाल. **seesaw** *क्रि* [*अक*] वर-खाली होणे.

seethe /सीद्/ *क्रि* [*अक*] १ रागाने खदखदणे : *She was ~ing (with rage) at his behaviour, त्याच्या वागणुकीने ती जळफळत होती.* २ (द्रवाबाबत) उकळी आल्यासारखे वर येणे किंवा बुडबुडे येणे, आधण येणे.

segment /'सेग्मन्ट्/ *ना* [*गण*] १ वर्तुळाचा वगैरे खंड, तुकडा. २ संत्रे, लिंबू वगैरेचा तुकडा, फोड.

segregate /'सेग्रिगेइट्/ *क्रि* [*सक*] (भिन्न वंशाच्या लोकांना) इतर समाजापासून वेगळे ठेवणे. **segregation** /सेग्रि'गेइश्न्/ *ना* [*अगण*] वेगळे ठेवणे, विलग्नीकरण.

seismic /'साइझ्मिक्/ *वि* भूकंपविषयक, भूकंपाचा.

seize /सीझ्/ *क्रि* १ [*सक*] एकदम जबरदस्तीने पकडणे, घट्ट पकडणे. २ [*अक, सक*] (संधी वगैरे) पाहून साधणे : *He ~d (on) a chance to get revenge, त्याने सूड घेण्याची संधी साधली.* ३ (*क्रिव*) **seize up** (यंत्रसामग्रीबाबत) अडकून बंद पडणे.

seizure /'सीझ(र्)/ *ना* १ [*गण, अगण*] पकडणे, पकड. २ [*गण*] (आजाराचा) झटका.

seldom /'सेल्डम्/ *क्रिवि* कधीमधी, अनेकदा नाही; क्वचित्, अभावाने.

select /सि'लेक्ट्/ *क्रि* [*सक*] निवडणे, निवड करणे. **select** *वि* १ काळजीपूर्वक निवडलेला, निवडक. २ (बैठक वगैरेबाबत) खास लोकांसाठीची : *a ~ audience, निवडक श्रोतृवर्ग.* **selection** /-क्श्न्/ *ना* १ [*अगण*] निवड. २ [*गण*] निवडक गोष्टी; ज्यातून निवड करायची त्या गोष्टी. **selective** *वि* (क) काही ठराविक गोष्टींबाबतचा. (ख) काळजीपूर्वक

निवड करण्याची प्रवृत्ती असलेला, चोखंदळ, चिकित्सक.

self /सेल्फ्/ (*ब.व* **selves** /सेल्व्झ्/) *ना* [*गण, अगण*] स्वत्व, नेहमीचा स्वभाव; व्यक्तित्व.

self- /सेल्फ्-/ *पूर्वप्रत्यय* स्व-, आत्म-. **,self-as'sured** *वि* आत्मविश्वास असलेला. **,self-'catering** *वि* (सुटीतील निवासाबाबत) स्वतः स्वयंपाक करून राहण्याचा. **,self-'centred** *वि* आत्मकेंद्री, आप्पलपोटा. **,self-'confident** *वि* स्वतःवर भरवसा असणारा, आत्मविश्वासपूर्ण. **,self-'confidence** *ना* [*अगण*] आत्मविश्वास. **,self-'conscious** *वि* इतर लोक आपल्याकडे पाहताहेत या जाणीवेने बुजलेला, भांबावलेला, नर्व्हस. **,self-'consciousness** *ना* [*अगण*] बुजरेपणा, भांबावलेपणा. **,self-con'tained** *वि* (क) (माणसाबाबत) दुसऱ्यावर अवलंबून नसणारा, स्वावलंबी; स्वतःच्या भावना कळू न देणारा, घुम्या. (ख) (राहण्याच्या फ्लॅटबाबत) सार्वजनिक सुविधा नसलेला, सर्व सुविधा फ्लॅटमधेच असणारा. **,self-con'trol** *ना* [*अगण*] आत्मसंयम. **,self-de'fence** *ना* [*अगण*] स्वतःच्या शरीराचे, मालमत्तेचे वगैरे संरक्षण, स्वसंरक्षण, आत्मसंरक्षण. **,self-em'ployed** *वि* स्वतंत्रपणे काम करणारा, नोकरी न करणारा. **,self-es'teem** *ना* [*अगण*] स्वप्रतिष्ठा, आत्मगौरव. **,self-'evident** *वि* उघड, स्पष्ट; पुराव्याची गरज नसलेला, स्वयंसिद्ध, निर्विवाद. **,self-'help** *ना* [*अगण*] इतरांवर अवलंबून न राहता स्वतः स्वतःसाठी धडपड करणे, आत्मसाहाय्य. **,self-im'portant** *वि* (*अधिक्षेपी*) स्वतःबद्दल फाजील कल्पना असणारा, आत्मप्रौढी मिरवणारा. **,self-im'portance** *ना* [*अगण*] (*अधिक्षेपी*) आत्मप्रौढी. **,self-in'dulgent** *वि* (*अधिक्षेपी*) स्वसुखलोलुप, भोगासक्त. **,self-in'dulgence** *ना* [*अगण*] स्वसुखलोलुपता, भोगासक्ती. **,self-'interest** *ना* [*अगण*] स्वहित(दक्षता), स्वार्थ. **,self-'pity** *ना* [*अगण*] (बहुधा *अधिक्षेपी*) स्वतःची कीव. **,self-re'liant** *वि* इतरांवर अवलंबून नसणारा, स्वावलंबी. **,self-re'liance** *ना* [*अगण*] स्वावलंबन, आत्मनिर्भरता. **,self-re'spect** *ना* [*अगण*] स्वतःचे चारित्र्य, कर्तृत्व वगैरेची लाज न वाटावी अशी भावना, स्वाभिमान. **,self-'righteous** *वि* इतरांपेक्षा स्वतःच्या नीतिमत्तेवर विश्वास असणारा. **,self-'sacrifice** *ना* [*अगण*] इतरांसाठी केलेला स्वार्थत्याग, आत्मसमर्पण. **'selfsame** *वि* सरूप, अगदी सारखा. **,self-'satisfied** *वि* (*अधिक्षेपी*) स्वतःच्या कर्तबगारीवर आणि स्वतःवर अत्यंत खूष असणारा, आत्मसंतुष्ट, आत्मसमाधानी. **,self-'service** *ना* [*अगण*] गिऱ्हाइकांनी स्वतःच हाताने माल घेऊन विशिष्ट जागी त्याचे पैसे द्यायचे अशी व्यवस्था, स्वसेवापद्धती. **,self-suf'ficient** *वि* स्वतःच्या गरजा स्वतः पूर्ण करण्यास समर्थ असणारा, स्वयंपूर्ण. **,self-'willed** *वि* स्वेच्छाचारी, आपल्याला हवे तेच करणारा; हटवादी.

selfish /'सेल्फिश्/ *वि* (*अधिक्षेपी*) इतरांचा विचार न करता स्वतःचा आणि स्वतःच्या गरजांपुरतं बघणारा, स्वार्थी, आपमतलबी. **selfishly** *क्रिवि* स्वार्थाने. **selfishness** *ना* [*अगण*] स्वार्थीपणा.

sell /सेल्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **sold** /सउल्ड्/) १ [*अक, सक*] विकणे, विकत देणे. २ [*सक*] विकायला ठेवणे : *Do you ~ needles? तुम्ही सुया विकायला ठेवता का?* ३ [*अक*] विक्री होणे; उठाव असणे : *Does this book ~ well? या पुस्तकाची विक्री चांगली आहे का?* म्हणजेच *कसं काय जातंय् हे पुस्तक?* ४ [*सक*] विक्रीस कारणीभूत होणे : *Scandals ~ newspapers, कुटाळक्यांनी वर्तमानपत्रे विकली जातात म्हणजे त्यांची विक्री होते/वाढते.* ५ [*सक*] एखादी गोष्ट एखाद्याच्या गळ्यात मारणे, गळी उतरवणे : *~ sb an idea, एखाद्याच्या गळी कल्पना उतरवणे.* ६ [*सक*] ~ **oneself** (क) आकर्षक पद्धतीने स्वतःला मांडणे, स्वतःचे विचार मांडणे वगैरे. (ख) एखादी वाईट गोष्ट करण्यास पैसे घेतल्याने प्रवृत्त होणे, विकले जाणे. ७ (*वाक्प्र*) **sell sb/sth short** एखाद्याची खरी किंमत न कळणे, किंमत कमी करणे. **sell one's soul (to the devil)** पैशासाठी कुकर्म करणे, सैतानाला आत्मा विकणे. ८ (*क्रिब*) **sell sth off** स्वस्तात विकणे. **sell out** (क) सर्व (उदा तिकिटे) विकली जाणे, पूर्ण विक्री होणे.

(ख) बेइमान होणे, विकला जाणे. **sell up** सेवानिवृत्त होताना वगैरे घर, धंदा वगैरे विकून टाकणे.

Sellotape /'सेलउटेइप्/ *ना* [*अगण*] (*ब्रि मालक*) चिकटवण्यासाठी वापरायची प्लॅस्टिकची पारदर्शक पातळ चिकटपट्टी : *mend a torn map with S~, फाटलेला नकाशा सेलोटेपने चिकटवणे.*

selves SELF चे *ब.व.*

semantics /सि'मॅन्टिक्स्/ *ना* [*अगण*] शब्दार्थाचा विचार करणारे शास्त्र, अर्थविन्यास.

semaphore /'सेमफॉऽ(र्)/ *ना* [*अगण*] दोन हातांतील दोन निशाणांच्या आधारे संदेश देण्याची पद्धती. **semaphore** *क्रि* [*अक, सक*] निशाणे फडकवून संदेश देणे.

semblance /'सेम्ब्लन्स्/ *ना* [*ए.व, अगण*] देखावा : *Create a/some ~ of order, व्यवस्थितपणाचा देखावा करणे.*

semen /'सीमन्/ *ना* [*अगण*] नर निर्माण करणारा शुक्रजंतू असणारा पांढरा चीक, वीर्य, रेत.

semi- /सेमि-/ *पूर्वप्रत्यय* अर्ध; भागशः, अंशतः : *~-literate, अर्ध शिक्षित.* **'semicircle** *ना* [*गण*] अर्धवर्तुळ. **'semicolon** *ना* [*गण*] अर्धविरामाचे (;) चिन्ह. **'semiconductor** *ना* [*गण*] काही विशिष्ट परिस्थितीत विद्युत्वाहनाचे काम करणारे द्रव्य, पक्षवाही. **,semi-de'tached** *वि* (घराबाबत) दुसऱ्या घराला एका सामाईक भिंतीने जोडलेले. **,semi'final** *ना* [*गण*] उपांत्य सामना.

seminar /'सेमिना(र्)/ *ना* [*गण*] अभ्यासासाठी जमलेला विद्यार्थ्यांचा छोटा गट, चर्चासत्र.

senate /'सेनिट्/ *ना* [*गण*, तसेच ब.व क्रियापदासह ए.व] १ अमेरिका, फ्रान्स वगैरे देशात विधिमंडळाचे वरिष्ठ गृह, अधिसभा. २ काही विद्यापीठांची विधिसभा. **senator** (तसेच **Senator**) *ना* [*गण*] विधिमंडळाच्या वरिष्ठ गृहाचा सभासद.

send /सेन्ड्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **sent** /सेन्ट्/) [*सक*] १ पाठवणे, धाडणे : *~ a letter, पत्र पाठवणे.* २ जलद गती देणे, पळवणे : *The explosion sent them running, स्फोटाने त्यांना पळायला लावले.* ३ एखाद्याला एखाद्या विशिष्ट स्थितीला आणणे : *~ sb to sleep, एखाद्याला झोप आणणे.* ४ (*वाक्प्र*) **send sb one's love** ➪ LOVE. ५ (*क्रिब*) **send away for sth** पोस्टाने पाठवायला सांगणे. **send sb away** एखाद्याला निघून जाण्यास सांगणे, हाकलणे, कटवणे. **send for sb/sth** एखाद्याला येण्याची आज्ञा करणे, एखाद्याला बोलावून घेणे, एखादी गोष्ट मागवणे. **send off for sth** = SEND AWAY FOR STH. **send sth out** (क) देणे, बाहेर टाकणे : *The sun ~s out light, सूर्य प्रकाश देतो.* (ख) निर्माण करणे, तयार करणे : *plants that ~ out shoots, धुमारे फुटणारी झाडे.* **send sb/sth up** (*अनौप*) एखाद्याची नक्कल करून टिंगल करणे. **'send-off** *ना* [*गण*] निरोपसमारंभ, निरोप देणे.

senile /'सीनाइल्/ *वि* वृद्धत्वामुळे शरीराने किंवा मनाने क्षीण झालेला, जराजीर्ण. **senility** /सि'निलटि/ *ना* [*अगण*] जराजीर्णत्व, म्हातारपणातील शक्तिहीनता.

senior /'सीनिअ(र्)/ *वि* १ (*to*)// वरिष्ठ, वरच्या श्रेणीचा, वयाने मोठा, ज्येष्ठ. २ **Senior** (आई किंवा वडलांबाबत) मुलाचेच नाव असणारा, थोरला. **senior** *ना* १ [*ए.व*] एखाद्यापेक्षा काही वर्षांनी मोठा असणारा माणूस : *He is three years her ~, तो तिच्यापेक्षा तीन वर्षांनी मोठा आहे.* २ [*गण, बहुधा ब.व*] वरच्या वर्गातला विद्यार्थी. **,senior 'citizen** *ना* [*गण*] सेवानिवृत्तीच्या वयापेक्षा जास्त वय असणारा माणूस; वृद्ध पेन्शनर. **seniority** /,सीनि'ऑरटि; *अमे* -'ऑऽर-/ *ना* [*अगण*] ज्येष्ठता.

sensation /सेन्'सेइश्न्/ *ना* १ [*गण, अगण*] संवेदन शक्ती; संवेदना. २ [*गण, अगण*] खळबळ, सनसनाटी वगैरे (किंवा त्याचे कारण). **sensational** *वि* (क) खळबळजनक, सनसनाटीपूर्ण. (ख) (*अनौप*) आश्चर्यकारक; फार चांगला.

sense /सेन्स्/ *ना* १ [*गण*] (दृष्टी, श्रुती, गंध, रस, स्पर्श अशी) इन्द्रिय-शक्ती, गोचरता. २ [*ब.व*] विचारशक्ती, विवेक : *take leave of one's ~s, विवेक सोडून जाणे किंवा अकलेशी फारकत घेणे म्हणजेच मूर्ख बनणे.* ३ [*ए.व*]

एखाद्या गोष्टीची समज, बुद्धी : *a ~ of humour, विनोदबुद्धी.* ४ [*गण*] अस्पष्ट भाव : *a ~ of dread, भीतीची भावना.* ५ [*अगण*] अर्थ, उपयुक्तता, शहाणपण : *There's no ~ in doing that, ते करण्यात काही अर्थ नाही.* ६ [*गण*] शब्दार्थ, वाक्यार्थ वगैरे. ७ (*वाक्प्र*) **make sense** (क) समजता येईल असा अर्थ असणे. (ख) समजूतदार असणे. **make sense of sth** एखाद्या गोष्टीचा अर्थ लागणे, ती समजणे. **sense** *क्रि* [*सक*] जाणीव होणे; वाटणे : *~ danger, धोक्याची जाणीव होणे.*

senseless /'सेन्स्‌लिस्/ *वि* १ मूर्खपणाचा, अर्थहीन, निरर्थक. २ बेशुद्ध, निश्चल. **senselessly** *क्रिवि* बेछूटपणे, मूर्खपणे. **senselessness** *ना* [*अगण*] निरर्थकता; बेशुद्धी.

sensibility /सेन्स'बिलटि/ *ना* [*गण,* बहुधा *ब.व*] तरल भाव समजण्याची शक्ती, संवेदनशीलता.

sensible /'सेन्सब्‌ल्/ *वि* १ शहाणा, समजूतदार; व्यवहारी : *a ~ person/idea, व्यवहारी माणूस/व्यवहार्य कल्पना.* २ *~ of sth*// (*औप*) कल्पना असलेला, जाणीव असलेला. **sensibly** *क्रिवि* शहाणपणाने.

sensitive /'सेन्सटिव्ह्/ *वि* १ (*to*)// हुळहुळा, अति कोवळा, सहज दुखावला जाणारा : *~ skin, हुळहुळे कातडे* ○ *~ to light, प्रकाशाने इजा होणारा.* २ हळवा, मनाला लावून घेणारा : *He is ~ about his baldness, तो स्वतःच्या टकलाबाबत फार हळवा आहे.* ३ (*पसंती*) संवेदनशील, संवेदनाक्षम, तरल भाव कळणारा : *a ~ friend, संवेदनशील किंवा मन जाणणारा मित्र.* ४ (उपकरणांबाबत) बारीकसारीक बदलांची नोंद करणारे, सूक्ष्मभेदग्राही. ५ खूप काळजी घेणे आवश्यक असलेला, काळजीपूर्वक रीतीने सोडवायचा, जिव्हाळ्याचा, भावनिक तीव्रतेचा : *a ~ issue, जिव्हाळ्याचा विषय.* **sensitivity** *ना* [*अगण*] संवेदनशीलता, भावनाप्रधानता, हळुवारपणा; हळवेपणा; कोवळेपणा; सूक्ष्मभेदग्रहणशक्ती; नाजुक भावना किंवा तीव्र भावना.

sensitize /'सेन्सिटाइझ्/ *क्रि* [*सक*] (*to*)// संवेदीकरण करणे, सचेतन करणे.

sensual /'सेन्शुअल्/ *वि* १ इन्द्रियभोग्य. २ इन्द्रियसुख – विशेषतः लैंगिक – घेणारा, विषयसुखाचा. **sensuality** /'-ॲलटि/ *ना* [*अगण*] इन्द्रियभोग, इन्द्रियसुख; विषयसुख.

sensuous /'सेन्शुअस्/ *वि* इन्द्रियसुखकारी, इन्द्रियग्राह्य, इंद्रियगोचर, रिझवणारा. **sensuously** *क्रिवि* इन्द्रियग्राह्य रीतीने. **sensuousness** *ना* [*अगण*] इन्द्रियसौख्य, (शरीराला) रिझवणे.

sent SEND चा *भूत, भूत वि.*

sentence /'सेन्टन्स्/ *ना* १ [*गण*] (*व्याकरण*) वाक्य. २ [*गण, अगण*] कोर्टाने सुनावलेली शिक्षा (किंवा तिचे लिखित निवेदन). **sentence** *क्रि* [*सक*] शिक्षा ठोठावणे/देणे : *~ sb to death, एखाद्याला मृत्युदंडाची शिक्षा देणे.*

sentiment /'सेन्टिमन्ट्/ *ना* १ [*अगण, गण,* बहुधा *ब.व*] मत किंवा भावना(व्यक्ती), स्थिरभाव. २ [*अगण*] (बहुधा *अधिक्षेपी*) नाजुक हळव्या भावना (किंवा त्यांचे प्रदर्शन). ३ **sentiments** [*ब.व*] मत.

sentimental /,सेन्टि'मेन्ट्‌ल्/ *वि* १ भावनिक. २ (बहुधा *अधिक्षेपी*) भावविवश, भडक भावनांचा. **sentimentality** /-'टॅलटि/ *ना* [*अगण*] भावविवशता. **sentimentally** *क्रिवि* भावनिकतेने; भडक भावप्रवणतेने.

sentry /'सेन्ट्रि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) पहारेकरी, पहाऱ्यावरचा सैनिक.

separate^{1} /'सेप्रट्/ *वि* १ विभक्त, विभाजित; न जोडलेला, वेगळा, अलग, विलग : *~ rooms, वेगळ्या खोल्या.* २ वेगळा, विभिन्न : *on three ~ occasions, तीन वेगवेगळ्या प्रसंगी.* **separately** *क्रिवि* विभक्तपणे; अलगपणे; वेगळे.

separate^{2} /'सेपरेइट्/ *क्रि* १ [*अक, सक*] वेगळे होणे/करणे/काढणे, तुटून निघणे, फुटणे/फोडणे, विभक्त करणे. २ [*अक*] पतिपत्नी म्हणून विभक्त होणे. **separation** /-'रेइश्न्/ *ना* १ [*अगण*] विभक्त करणे, विलगीकरण, ताटातूट. २ [*गण*] एखाद्यापासून दूर राहण्याचा काळ, विरहकाळ, ताटातुटीचा काळ. ३ [*अगण, अे.व*] (*कायदा*) जोडप्याचा विभक्त होण्याचा करार.

September /सेप्'टेम्ब(र्)/ *ना* [*अगण, गण*] इंग्रजी वर्षाचा नववा महिना (*April* खाली दिलेली उदाहरणे पहा.)

septic /'सेप्टिक्/ *वि* पू झालेला : *a ~ wound, पू झालेली जखम.*

sepulchre (*अमे* **sepulcher**) /'सेप्ल्क(र्)/ *ना* [*गण*] (*पुरा*) दगडी थडगे, समाधीस्थान.

sequel /'सीक्वल्/ *ना* [*गण*] १ परिणामतः घडणारी गोष्ट, परिपाक. २ मागच्या चित्रपटाची वगैरे गोष्ट पुढे सांगणारा चित्रपट वगैरे, पुढचा भाग, उत्तरार्ध.

sequence /'सीक्वन्स्/ *ना* [*गण, अगण*] घटना, कृती वगैरेचा क्रम, माला, साखळी.

sequin /'सीक्विन्/ *ना* [*गण*] शोभेसाठी कपड्यावर शिवलेली (चांदीची वगैरे) छोटी चमकणारी चकती, टिकली किंवा चांदणी.

serene /सि'रीन्/ *वि* शांत, धीरगंभीर. **serenely** *क्रिवि* शांतपणे, धीरगंभीरपणे. **serenity** /सि'रेनटि/ *ना* [*अगण*] शांती, धीरगंभीरपणा.

sergeant /'साजन्ट्/ *ना* [*गण*] १ राजादिष्ट नसलेला मध्यम श्रेणीचा लष्करी अधिकारी. २ इन्स्पेक्टरच्या खालचा पोलीस अधिकारी.

serial /'सिअरिअल्/ *ना* [*गण*] भागशः प्रसिद्ध किंवा प्रक्षेपित होणारी कथा वगैरे, मालिका. **serial** *वि* मालिकेचा. **serialize** /-आइझ़्/ *क्रि* [*सक*] मासिक, दूरदर्शन वगैरेमधे भागशः कथा सादर करणे. **'serial number** *ना* [*गण*] अनुक्रमांक, चेकवरचा वगैरे ओळीने येणारा क्रमांक.

series /'सिअरीझ़्/ *ना* [*गण*] (*ब.व* **series**) एकामागून एक घडणाऱ्या घटनांचा, येणाऱ्या गोष्टींचा गट, मालिका, माला.

serious /'सिअरिअस्/ *वि* १ गंभीर, गंमत म्हणून नसलेला; विचारपूर्वक : *a ~ face, गंभीर चेहेरा.* २ (पुस्तके, संगीत वगैरेबाबत) विचारप्रवर्तक, विचार करायला लावणारे. ३ महत्त्वाचा कारण गंभीर स्वरूपाचा : *a ~ illness, गंभीर स्वरूपाचे दुखणे.* ४ (*about*)// प्रामाणिक, मनापासूनचा : *Are you ~ about this plan? ही योजना तुझी मनापासूनची आहे?* **seriously** *क्रिवि* गंभीरपणे; विचारपूर्वक; मनापासून. **seriousness** *ना* [*अगण*] गांभीर्य; विचारपूर्वकता, वैचारिकता; प्रामाणिकपणा.

sermon /'सऽमन्/ *ना* [*गण*] प्रवचन, चर्चमधले धार्मिक किंवा नैतिक वर्तनावरचे उपदेशपर भाषण.

serpent /'सऽपन्ट्/ *ना* [*गण*] (*जुना अप्रचलित* किंवा *काव्य*) साप, सर्प.

serrated /से'रेइटिड्/ *वि* कडेवर दाते किंवा दंतुर असलेला, सरीदार, प्रखाचित.

serum /'सिअरम्/ (*ब.व* **~s** किंवा **sera** /'सिअर/) *ना* [*गण, अगण*] माणसाच्या रक्तात सोडल्यावर रोगाचा प्रतिकार करणारे द्रव (किंवा त्याची मात्रा), लस.

servant /'सऽव्हन्ट्/ *ना* [*गण*] मजूरीवर एखाद्याकडे घरकामे करणारा, नोकर, घरगडी.

serve /सऽव्ह्/ *क्रि* १ [*अक, सक*] कोणाच्या तरी घरी (विशेषतः नोकर म्हणून) काम करणे, सेवा करणे. २ [*अक, सक*] दिलेले काम/ कर्तव्य करणे : *~ on a committee, समितीवर काम करणे.* ३ [*अक, सक*] (**क**) अन्न वाढणे. (**ख**) दुकानात गिऱ्हाइकांना माल देणे. ४ [*सक*] एखाद्याला हवे ते देणे, एखाद्याची गरज़ भागवणे : *This bus ~s our area, ही बस आमच्या भागाची निकड भागवते.* ५ [*अक*] (*for/as sth*)// विशिष्ट हेतूसाठी उपयोगी पडणे, कामाला येणे : *This room ~s as a study, ही खोली लेखन, वाचन वगैरे करता उपयोगी पडते.* ६ [*सक*] तुरुंगात दिवस काढणे, सजा भोगणे : *~ a life sentence, जन्मठेपेची शिक्षा भोगणे.* ७ [*सक*] (*कायदा*) (नोटीस वगैरे) बजावणे. ८ [*अक, सक*] (टेनिस वगैरे खेळात) प्रतिस्पर्ध्याकडे चेंडू मारून डाव सुरू करणे. ९ (*वाक्प्र*) **serve sb right** (दुर्दैवाबाबत) एखाद्याला योग्य बक्षीस मिळणे. **serve** *ना* [*गण*] चेंडू मारून डाव सुरू करणे. **server** *ना* [*गण*] चेंडू मारून डाव सुरू करणारा. **serving** *ना* [*गण*] एका माणसाचे अन्न, एकाचे जेवण.

service /'सऽव्हिस्/ *ना* १ [*अगण*] सेवा, नोकरी : *ten years' ~ in the army, लष्करातील दहा वर्षांची सेवा.* २ [*अगण*] वाहनाने दिलेले काम : *This car has given* *good ~, या गाडीने चांगली सेवा दिली म्हणजे ही गाडी भरवशाची आहे.* ३ [*अगण*] हॉटेल, उपहारगृहात गिऱ्हाइकांची केलेली सेवा. ४ [*गण*] सार्वजनिक गरजा भागवणारी व्यवस्था किंवा धंदा, सार्वजनिक सेवा : *a bus ~, बसची सेवा.* ५ [*गण, बहुधा ब.व*] इतरांना केलेली मदत. ६ [*गण*] शासनाचा विभाग. ७ [*गण*] सशस्त्र बलाची शाखा. ८ [*गण*] धार्मिक पूजेचा किंवा प्रार्थनेचा प्रकार. ९ [*गण*] ताटं, चमचे वगैरेचा पूर्ण संच. १० [*गण, अगण*] विक्रीनंतर गाडी, मशीन वगैरेच्या देखरेखीची किंवा दुरुस्तीची सेवा. ११ [*गण*] (टेनिसमधे) चेंडू मारून खेळ सुरू करण्याची कृती किंवा असा चेंडू विशिष्ट तऱ्हेने मारण्याची पद्धती. १२ (*वाक्प्र*) **at your service** तुमच्या सेवेला हजर. **of service** उपयुक्त, मदतीचा. **service** *क्रि* [*सक*] (गाडी, यंत्र वगैरेची) विक्रीनंतर देखभाल करणे. **serviceable** *वि* वापरण्यास योग्य. **'service charge** *ना* [*गण*] उपहारगृहातील वगैरे बिलात आकारलेले सेवाशुल्क. **'serviceman** /-मन्/ *ना* [*गण*] (*ब.व* **-men** /-मन्/, *स्त्री* **'servicewoman** /-वुमन्/, *ब.व* **-women** /-विमिन्/) सशस्त्र बलाच्या सेवेतील व्यक्ती, सशस्त्र बलातील माणूस. **'service station** *ना* [*गण*] = PETROL STATION (PETROL).

serviette /,सऽव्हि'अेट्/ *ना* = NAPKIN.

session /'सेशन्/ *ना* [*गण*] १ कोर्ट, संसद वगैरेची बैठक किंवा बैठकांची फेरी, अधिवेशन, सत्र. २ शाळा-कॉलेजचे वर्ष किंवा सत्र. ३ एक कृती करण्यास लागलेला काळ, एका बैठकीचा काळ : *a re'cording ~, ध्वनिमुद्रणाची बैठक.*

set^{1} /सेट्/ *ना* १ [*गण*] एकाच प्रकारच्या वस्तूंचा संच किंवा संघ. २ [*गण*] दूरदर्शन किंवा आकाशवाणीचा संच. ३ [*गण, तसेच* ब.व क्रियापदासह अ.व] खूप काळ एकत्र राहणाऱ्या किंवा समानधर्मी लोकांचा गट, टोळके. ४ [*गण*] चित्रपट, नाटक यात मांडलेला देखावा, स्थळ. ५ [*गण*] टेनिसच्या मॅचमधील एक भाग, डाव. ६ [*गण*] केशरचना, केस वळवणे.

set^{2} /सेट्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **set, -tt-**) १ [*सक*] रचणे, लावणे, ठेवणे : *~ a tray down on the table, टेबलावर ट्रे ठेवणे.* २ [*सक*] एखाद्याला विशिष्ट अवस्थेत नेणे : *~ a prisoner free, कैद्याला मुक्त करणे.* ३ [*सक*] एखाद्याला सुरुवात करायला लावणे : *~ sb thinking, एखाद्याला विचार करायला लावणे.* ४ [*सक*] (काम वगैरे) नेमणे, ठेवणे : *~ an examination, परीक्षा ठेवणे.* ५ [*सक*] वापरण्यासाठी लावणे, वापरासाठी तयार किंवा जुळवून ठेवणे : *~ the controls, (यंत्राच्या) नियंत्रण कळा नीट लावणे.* ६ [*सक*] जेवणाच्या टेबलवर 'डिशेस, चमचे, काटे वगैरे लावणे/मांडणे. ७ [*सक*] निश्चित करणे, पक्का करणे, ठरवणे : *~ a date for the wedding, लग्नाची तारीख ठरवणे.* ८ [*सक*] एक गोष्ट दुसऱ्या गोष्टीत बसवणे. ९ [*अक, सक*] घट्ट बनणे/बसवणे : *The cement has ~, सिमेंट वाळून घट्ट बसले आहे.* १० [*सक*] नीट बसवणे, जागेवर बसवणे : *~ a broken bone, मोडलेले हाड बसवणे.* ११ [*सक*] (*to*)// (शब्दांना, गीताला वगैरे) चाल देणे. १२ [*अक*] (चंद्र किंवा सूर्याबाबत) मावळणे, अस्ताला जाणे. १३ (*वाक्प्र*) **set an 'example** उदाहरण घालून देणे. **set 'eyes on** पाहणे. **set 'foot in** प्रवेश करणे. **set 'light/'fire to sth, set sth on 'fire** आग लावणे. **set one's 'heart on sth** एखादी गोष्ट हवी असणे, अभिलाषा धरणे, एखाद्या गोष्टीवर मन बसणे. **set one's mind to sth** ⇨ MIND^{1}. **set sth right** ⇨ RIGHT^{1}. **set sb/sth to rights** ⇨ RIGHT^{3}. **set sail** जलप्रवास सुरू करणे. **set the 'scene** पुढे घडणाऱ्या गोष्टीची पार्श्वभूमी विशद करणे. **set sb's 'teeth on edge** (विशेषतः तिखट चव किंवा तीक्ष्ण आवाजाबाबत) नको वाटणे, अंगावर शहारे आणणे. १४ (*क्रिब*) **set about sb** एखाद्यावर हल्ला करणे. **set about sth** एखादी गोष्ट सुरू करणे. **set sb back** (*अनौप*) एखाद्याला किंमत पडणे. **set sb/sth back** एखाद्याच्या प्रगतीत विलंब करणे. **set sth back (from)** थोडेसे बाजूला घेणे, उदा रस्त्यापासून. **set in** सुरू होऊन चालू राहण्याची शक्यता वाटणे. **set off** प्रवासाला निघणे, प्रस्थान करणे. **set sth off** (क) (बॉम्ब वगैरे) उडवणे. (ख) एखाद्या गोष्टीची सुरुवात करून देणे. (ग) एखादी गोष्ट

आकर्षक करणे: *This colour ~s off her eyes, या रंगाने तिचे डोळे खुलून दिसतात.* **set on sb** हल्ला करणे. **set out** प्रवासाला वगैरे सुरुवात करणे, प्रवासाला निघणे. **set out to do sth** एखाद्या गोष्टीवर लक्ष केन्द्रित करणे, एखाद्या गोष्टीच्या दिशेने प्रयत्न करणे. **set sth out** (**क**) व्यवस्था करणे, योजणे. (**ख**) व्यवस्थित मांडणे किंवा व्यक्त करणे : *~ out one's ideas in an essay, निबंधातून स्वतःचे विचार मांडणे.* **set 'to** एखादी गोष्ट करायला सुरुवात करणे. **set sth up** (**क**) एखादी गोष्ट जागी ठेवणे, उभी करणे. (**ख**) (उद्योग वगैरे) स्थापणे, उभा करणे. **set (oneself) up as** (**क**) एखाद्या व्यवसायात कोणी एक म्हणून उतरणे. (**ख**) आपण कुणी एक आहोत असा दावा करणे. **'set-back** *ना* [*गण*] विकासातील किंवा प्रगतीमधील पीछेहाट करणारी गोष्ट. **'set-up** *ना* [*गण*] (*अनौप*) एखाद्या संघटनेची रचना.

set^3 /सेट्/ *वि* १ (*अनौप*) तयार : *~ to go, जायला तयार.* २ (*on*)// निग्रह झालेला : *She's ~ on winning, जिंकायचा तिने निश्चय केलाय्.* ३ अचल, पक्का; न बदलणारा, ठाम; घट्टपणे बसलेला : *a ~ grin, स्थिर/न ढळणारे स्मित* ○ *~ ideas about sth, एखाद्या गोष्टीविषयीच्या ठाम कल्पना.* ४ (*वाक्प्र*) **set in one's ways** स्वतःच्या सवयी बदलण्यास नाखूष असलेला, न बदलणारा. **set book** *ना* [*गण*] शाळा-कॉलेजातील क्रमित पुस्तक, पाठ्यपुस्तक, नेमलेले पुस्तक.

set-square /'सेट् स्क्वेअ(र्)/ *ना* [*गण*] कोनरेषा काढण्याचे त्रिकोणी साधन, समकोनमापक, तिकोनी गुण्या.

settee /से'टी/ *ना* [*गण*] = SOFA.

setter /'सेट(र्)/ *ना* [*गण*] लांब केसांच्या कुत्र्याची एक पैदास.

setting /'सेटिङ्/ *ना* १ [*गण*] एखादी गोष्ट पक्की बसवण्याची बैठक, जडण, कोंदण. २ [*गण*] परिसर, वातावरण : *a rural ~, ग्रामीण वातावरण.* ३ [*गण*] एखाद्या यंत्राची वगैरे विशिष्ट उंची, गती वगैरेसाठी केलेली मांडणी. ४ [*ए.व*] (सूर्याचा वगैरे) अस्त.

settle /'सेट्ल्/ *क्रि* १ [*अक, सक*] (एखाद्या ठिकाणी) कायमचे वास्तव्य करणे, घर करणे. २ [*अक*] विसावणे : *The bird ~d on a branch, तो पक्षी एका फांदीवर विसावला.* ३ [*अक, सक*] एखाद्याला किंवा स्वतःला आरामात ठेवणे, आरामशीर करणे : *He ~d back in the chair, तो खुर्चीत आरामात रेलून बसला.* ४ [*अक, सक*] (कर्ज) फेडणे, मिटवून टाकणे. ५ [*अक, सक*] शांत होणे/करणे : *~ sb's nerves, एखाद्याच्या मनाचा प्रक्षोभ शांत करणे.* ६ [*सक*] तडजोड करणे : *~ an argument, वादात तडजोड करणे म्हणजेच वाद मिटवणे.* ७ [*अक, सक*] खाली बसणे/बसवणे, खाली येऊन स्थिरावणे : *dust settling on the floor, जमिनीवर बसणारी धूळ* ○ *The rain ~d the dust, पावसाने धूळ खाली बसली.* ८ (*क्रिब*) **settle down** आरामात बसणे, पहुडणे. **settle (down to sth)** एखाद्या गोष्टीत लक्ष घालण्यास सुरुवात करणे. **settle for sth** शेवटी (नको असलेली गोष्ट) स्वीकारणे, मिळेल त्यावर समाधान मानणे. **settle (sb) in** एखाद्याला नव्या घरात, नव्या नोकरीत वगैरे स्थिरस्थावर होण्यास मदत करणे. **settle on sb/sth** एखादी व्यक्ती/गोष्ट घेण्याचे ठरवणे. **settled** *वि* न बदलणारा : *~d weather, न बदलणारी हवा.* **settler** *ना* [*गण*] एखाद्या ठिकाणी कायमचा स्थायिक होणारा माणूस.

settlement /'सेट्ल्मन्ट्/ *ना* १ [*गण, अगण*] वाद, कर्ज वगैरे मिटवणे, तोडगा, समझोता. २ [*गण*] एखाद्याला दिलेली मालमत्ता किंवा तिचे देणगीपत्र. ३ [*अगण, गण*] एखाद्या ठिकाणी लोकांना बसवण्याची प्रक्रिया; वस्ती.

seven /'सेव्ह्न्/ *सना, वि, ना* [*गण*] ७, सात. **seventh** /'सेव्ह्न्थ्/ *सना, वि* ७ वा, सातवा. **seventh** *सना, ना* [*गण*] $\frac{१}{७}$, एक सप्तमांश.

seventeen /,सेव्ह्न्'टीन्/ *सना, वि, ना* [*गण*] १७, सतरा. **seventeenth** /,सेव्ह्न्'टीन्थ्/ *सना, वि* १७ वा, सतरावा. **seventeenth** *सना, ना* [*गण*] $\frac{१}{१७}$, एक सत्रांश.

seventy /'सेव्ह्न्टि/ *सना, वि, ना* [*गण*] ७०, सत्तर. **seventieth** /'सेव्ह्न्टिअथ्/ *सना, वि* ७० वा, सत्तरावा. **seventieth** *सना, ना* [*गण*] $\frac{१}{७०}$, एक सत्तरांश.

sever /'सेव्ह(र्)/ *क्रि* १ [*सक*] (इतर भागांपासून एक भाग) तोडणे, छाटणे : ~ *a limb from the body, शरीराचा अवयव तोडणे.* २ [*सक*] (*ला*) संपुष्टात आणणे : ~ *relations with sb, एखाद्याशी संबंध तोडणे.*

several /'सेव्ह्रल्/ *वि, सना* तीन किंवा त्याहून जास्त; काही, पण खूप नाही, बरेच.

severe /सि'व्हिअ(र्)/ *वि* १ कठोर; कडक : ~ *discipline, कडक शिस्त.* २ फार वाईट, अवघड, कठीण, कमालीचा वगैरे : *a ~ storm, भयंकर/भयानक वादळ.* **severely** *क्रिवि* कठोरपणे, कडकपणे, वाईटपणे. **severity** /सि'व्हेरटि/ *ना* १ [*अगण*] कठोरपणा, कडकपणा; वाईटपणा. २ **severities** [*ब.व*] वाईट वागणूक किंवा वाईट अनुभव.

sew /सउ/ *क्रि* (*भूत* ~**ed**, *भूत वि* ~**n** /सउन्/) [*अक, सक*] १ सुईदोऱ्याने टाके घालणे; कापड शिवणे. २ (*क्रिब*) **sew sth up** (क) दोन तुकडे वगैरे शिवून जोडणे. (ख) (*अनौप*) एखादी गोष्ट मिटवणे.

sewage /'सूइज्/ *ना* [*अगण*] घरे, कारखाने वगैरेतला मैला.

sewer /'सूअ(र्)/ *ना* [*गण*] मैला, पावसाचे पाणी वगैरे वाहून नेणारी जमिनीखालची नलिका, जमिनीखालचे गटार, मलप्रणाल.

sewn SEW चा *भूत.*

sex /सेक्स्/ *ना* १ [*अगण*] प्राण्याचे (स्त्री किंवा पुरुष असे) लिंग. २ [*गण*] सर्व नर-जातीचा किंवा मादी-जातीचा गट. ३ [*अगण*] (कामचेष्टा आणि) संभोग. **sexy** *वि* (**-ier, -iest**) लैंगिकदृष्ट्या आकर्षक किंवा उन्मादक. **sexily** *क्रिवि* लैंगिकदृष्ट्या उन्मादक रीतीने. **sexiness** *ना* [*अगण*] लैंगिक आकर्षकपणा, उन्मादकता.

sexism /'सेक्सिझम्/ *ना* [*अगण*] लोकांबाबत, विशेषतः स्त्रियांबाबत, त्यांच्या लिंगवैधर्म्यामुळे असणारा पूर्वग्रह. **sexist** *वि, ना* [*गण*] स्त्रियांबाबत त्या स्त्रिया आहेत म्हणून पूर्वग्रह असलेला (माणूस).

sextant /'सेक्स्टन्ट्/ *ना* [*गण*] सूर्याची वगैरे उंची मोजण्याचे साधन, कोणादर्श, कोनमानित्र, षष्ठांशयंत्र.

sexton /'सेक्स्टन्/ *ना* [*गण*] चर्च किंवा चर्चभोवतीच्या दफनभूमीची देखभाल करणारा माणूस, पाद्र्याच्या हाताखालचा माणूस.

sexual /'सेक्शुअल्/ *वि* लैंगिक, लिंगविषयक. **sexual intercourse** *ना* [*अगण*] नर-मादीचे बऱ्याचदा प्रजोत्पादनाकडे जाणारे शारीरिक मीलन, संभोग. **sexuality** /-'ॲलटि/ *ना* [*अगण*] लैंगिक विशेष; कामक्रीडा. **sexually** *क्रिवि* लैंगिकदृष्ट्या.

shabby /'शॅबि/ *वि* (**-ier, -iest**) १ दुरवस्थेतला; गबाळा, कळकट. २ (वागणुकीबाबत) अन्याय्य, चुकीची; कद्रू, हलकट. **shabbily** *क्रिवि* गलथानपणे; हलकटपणे.

shack /शॅक्/ *ना* [*गण*] कसेबसे उभे केलेले लहानसे घर किंवा छपरी, टपरी.

shackle /'शॅक्ल्/ *ना* [*गण, बहुधा ब.व*] १ कैद्याला बांधायचे साखळदंड, पाश, शृंखला, बेड्या. २ (*ला*) स्वातंत्र्यावरचे कोणतेही बंधन, मुक्त संचारातील आडकाठी. **shackle** *क्रि* [*सक*] १ एखाद्याला बेड्या घालणे. २ (*ला*) मुक्त संचारास प्रतिबंध करणे, अडवणे.

shade /शेइड्/ *ना* १ [*अगण*] किंचित अंधार (असलेली जागा); सावली, छाया : *sit in the ~, सावलीत बसणे.* २ [*गण*] प्रकाश कमी करणारी गोष्ट : *a 'lamp-~, दीपछायक.* ३ **shades** [*ब.व*] (*अनौप*) उन्हात घालायचा काळा चष्मा, गॉगल. ४ [*गण*] रंगछटा, रंगाचा गडदपणा : *four ~s of blue, निळ्या रंगाच्या चार छटा.* ५ [*गण*] अल्प फरक : *~s of meaning, अर्थच्छटा.* ६ **a shade** [*अे.व*] थोडासा : *a ~ warmer, थोडासा गरम.* **shade** *क्रि* १ [*सक*] प्रकाश अडवणे : ~ *one's eyes, डोळ्यावर येणारा प्रकाश अडवणे.* २ [*सक*] (दिव्याला) छायक लावून उजेड कमी करणे. ३ [*सक*] (चित्राला वगैरे) काळसरपणा आणणे, काळसर करणे. ४ [*अक*] हळूहळू बदलणे : *green shading into blue, निळ्या रंगात हळूहळू बदलत जाणारा हिरवा रंग.*

shadow /'शॅडउ/ *ना* १ [*गण, अगण*] सावली, छाया : *the ~ of the tree on the grass, गवतावर पडलेली झाडाची सावली.* २ [*गण*] काळा भाग : *~s under the eyes, डोळ्याखालची काळी वर्तुळे.* ३ [*अगण*] चित्राचा

काळसर केलेला भाग. ४ **shadows** [*ब.व*] फिका अंधकार, पुसट अंधार. ५ [*अे.व*] (एखाद्या गोष्टीचा) पुसट मागमूस : *not a ~ of doubt, शंकेचा मागमूसही नाही.* **shadow** *क्रि* [*सक*] एखाद्याचा पाठलाग करून त्यावर पाळत ठेवणे. **shadowy** *वि* १ अंधारलेला. २ अस्पष्ट; गूढ.

shady /'शेइडि/ *वि* **(-ier, -iest)** १ सूर्यप्रकाशापासून सावली देणारा; सावलीतला. २ (*अनौप*) संशयास्पद, फसवेगिरीचा, प्रामाणिक नसलेला : *a ~ character, संशयास्पद इसम.*

shaft /शाफ्ट्; *अमे* शॅफ्ट्/ *ना* [*गण*] १ बाणाचा किंवा भाल्याचा वगैरे दांडा. २ कुऱ्हाडीचा वगैरे दांडा. ३ घोडा गाडीला जोडण्याच्या दोन दांड्यांपैकी एक दांडा. ४ लांब, खाली जाणारा मार्ग – उदा कोळशाच्या खाणीत उतरण्याचा. ५ यंत्राचे वेगवेगळे भाग जोडणारा दांडा. ६ (प्रकाश)किरण.

shaggy /'शॅगि/ *वि* **(-ier, -iest)** १ (केसांबाबत) राठ आणि विस्कटलेले. २ राठ जाड केसांचा.

shake^{1} /शेइक्/ *क्रि* (*भूत* **shook** /शुक्/, *भूत वि* **~n** /'शेइकन्/) १ [*अक, सक*] गदागदा हालणे/हालवणे. २ [*अक*] (आवाजाबाबत) कापणे, थरथरणे. ३ [*सक*] चिंतित करणे; हादरणे : *We were ~n by his death, त्याच्या मृत्यूने आम्ही हादरलो.* ४ (*वाक्प्र*) **shake hands (with sb), shake sb's hands** एखाद्याचा हात हातात घेऊन स्वागतासाठी हालवणे, हस्तांदोलन करणे. **shake one's head** शंका किंवा नकार वगैरे व्यक्त करण्यास डोके (एका बाजूकडून दुसऱ्या बाजूकडे) हालवणे, मान हालवणे. ५ (*क्रिब*) **shake sb/sth off** एखाद्यापासून स्वतःची सुटका करून घेणे. **shake sth up** घुसळणे, हालवून एकजीव करणे. **'shake-up** *ना* [*गण*] एखाद्या कंपनीतील वगैरे मोठा खांदेपालट. **shakily** /-अलि/ *क्रिवि* थरथरत, कापत. **shaky** *वि* **(-ier, -iest)** (क) (व्यक्तीबाबत) अशक्त आणि कापणारा. (ख) डळमळीत.

shake^{2} /शेइक्/ *ना* [*गण, बहुधा अे.व*] हालवणे, थरथरणे, हादरा, कापरे.

shale /शेइल्/ *ना* [*अगण*] ढिसूळ खडक.

shall /शल्; अधिक बलयुक्त रूप शॅल्/ *अभिद क्रि* (*नकार* **shall not**, *संक्षेप* **shan't** /शान्ट्/, *भूत* **should** /शुड्/, *नकार* **should not**, *संक्षेप* **shouldn't** /'शुड्न्ट्/) १ (भविष्यकाळ दर्शविण्यास वापर) : *We ~/We'll arrive tomorrow, आम्ही उद्या येऊ.* २ (*औप*) (बंधन किंवा निश्चय व्यक्त करण्यास वापर) : *You ~ have a new bike for your birthday, I promise, मी तुला वचन देतो की तुझ्या वाढदिवसाला तुला नवी सायकल मिळेल* ○ *You shan't beat me so easily next time, पुढल्या वेळी इतक्या सहजपणे तू माझा पराभव नक्कीच करू शकणार नाहीस.* ३ (सूचना किंवा प्रस्ताव मांडण्यास वापर) : *S~ I open the window? मी खिडकी उघडू?* ४ (आज्ञा फर्मावण्यास वापर) : *You '~ go with her, तू (मुकाट्यानं) तिच्याबरोबर जा* किंवा *तुला तिच्याबरोबर जावं लागेल.*

shallot /श'लॉट्/ *ना* [*गण*] एक प्रकारचा लहान कांदा.

shallow /'शॅलउ/ *वि* १ उथळ : *a ~ river, उथळ नदी.* २ (*अधिक्षेपी*) गंभीर नसणारा, वरवरचा : *a ~ thinker, उथळ विचारवंत.* **shallowness** *ना* [*अगण*] उथळपणा. **shallows** *ना* [*ब.व*] नदीतील वगैरे उथळ जागा.

sham /शॅम्/ *क्रि* **(-mm-)** [*अक, सक*] (कोणी किंवा काही असल्याचे) सोंग करणे, ढोंग करणे : *~ illness, आजाराचे सोंग घेणे.* **sham** *ना* १ [*गण*] ढोंग करणारा, सोंग घेणारा; फसवण्यासाठी केलेले काही, बहाणा. २ [*अगण*] बतावणी. **sham** *वि* खोटा, खरा नाही असा; लटका, लुटुपुटीचा : *a ~ fight, लटकी मारामारी.*

shamble /'शॅम्ब्ल्/ *क्रि* [*अक*] पाय खरडत चालणे, पाय ओढत चालणे. **shamble** *ना* [*अे.व*] पाय ओढत केलेली चाल.

shambles /'शॅम्ब्ल्झ्/ *ना* [*अे.व*] गोंधळ.

shame /शेइम्/ *ना* १ [*अगण*] अपराध केल्यावर, अपयशी ठरल्यामुळे किंवा वाईट वागणुकीमुळे येणारी दुःखाची भावना, लाज, लज्जा : *feel ~ at having told a lie, खोटे*

बोलल्याची लाज वाटणे. २ [*अगण*] लाज वाटण्याची क्षमता, शरम : *He has no ~, त्याला काही लाज नाही.* ३ [*अगण*] काळिमा : *bring ~ on one's family, घराण्याला काळिमा आणणे.* ४ [*अे.व*] वाईट वाटावे असे काही, खेदजनक गोष्ट : *It is/What a ~ you can't come, तू येऊ शकत नाहीस हे किती खेदकारक आहे.* ५ (*वाक्प्र*) **put sb/sth to shame** एखाद्याच्या वरताण करणे, एखाद्याला लाजविणे. **shame** *क्रि* [*सक*] १ एखाद्याला स्वतःची लाज वाटायला लावणे, शरमिंदे करणे. २ एखाद्याला शरम आणणे, एखाद्याला मान खाली घालायला लागेल असे करणे. ३ (*क्रिब*) **shame sb into/out of doing sth** एखाद्याला लज्जित करून काम करायला/थांबवायला लावणे. **shamefaced** /,शेइम्'फेइस्ट्/ *वि* लज्जास्पद दिसणारा; फार वाईट. **shameful** *वि* लाज आणणारा, लज्जास्पद; फार वाईट. **shamefully** /-अलि/ *क्रिवि* लज्जास्पद रीतीने; वाईट रीतीने. **shameless** *वि* निर्लज्ज.

shampoo /शॅम्'पू/ *ना* (क) [*अगण, गण*] केस धुण्याचे द्रव. (ख) [*गण*] केस स्वच्छ करणे, केस धुणे. **shampoo** *क्रि* [*सक*] शांपूने केस धुणे.

shamrock /'शॅम्रॉक्/ *ना* [*गण, अगण*] प्रत्येक देठावर त्रिदल येणारे एक छोटे झाड – हे आयर्लंडचे राष्ट्रीय चिन्ह आहे.

shandy /'शॅन्डि/ *ना* [*गण, अगण*] बियर आणि लिंबाचा रस मिसळून केलेले एक पेय.

shan't shall not. ➪ SHALL.

shanty town /'शॅन्टि टाउन्/ *ना* [*गण*] गरीब वस्तीचा शहरातील भाग किंवा अत्यंत वाईट अवस्थेत राहणाऱ्या गरीब लोकांचे छोटे शहर.

shape /शेइप्/ *ना* १ [*गण, अगण*] बाहेरची रूपरेखा, आकृती, आकार : *a round ~, गोलाकार.* २ [*अगण*] (*अनौप*) स्थिती; अवस्था : *She's in good ~, ती चांगल्या स्थितीत आहे.* ३ (*वाक्प्र*) **get/put sth into shape** एखादी गोष्ट व्यवस्थित ठेवणे, नीट लावणे. **take shape** ठराविक आकार येणे. **shape** *क्रि* १ [*सक*] आकार देणे : (*ला*) *~ sb's character, एखाद्याच्या स्वभावाला आकार देणे म्हणजे एखाद्याला घडवणे.* २ [*अक*] (*up*)// आकारास येणे, विकास पावणे : *Our plans are shaping up well, आमच्या योजना नीट साकार होताहेत.* **shapeless** *वि* निश्चित आकार नसणारा, आकारहीन. **shapely** *वि* (**-ier, -iest**) (विशेषतः माणसाबाबत) आकारबद्ध, सौष्ठवपूर्ण.

share /शेअ(र्)/ *ना* १ [*गण*] बऱ्याच लोकांमधे वाटल्या गेलेल्या कशाचातरी अंश, वाटा, भाग. २ [*अगण, अे.व*] बऱ्याच लोकांना मिळालेल्यातला किंवा त्यांनी केल्यातला एका व्यक्तीच्या वाट्याला आलेला भाग : *Your ~ of the blame, दोषातील तुझा वाटा.* ३ [*गण*] एखाद्या कंपनीने विक्रीसाठी काढलेल्या आणि लोक गुंतवणुकीसाठी विकत घेत असणाऱ्या भाग-भांडवलाचा एक भाग. **share** *क्रि* १ [*सक*] (*out*)// इतरांना वाटा देणे, हिस्सा देणे. २ [*अक, सक*] (*with*)// इतरांबरोबर वापरणे : *~ a house with sb, एखाद्याबरोबर भागीने घर घेणे.* ३ [*अक, सक*] सहभागी होणे; भाग घेणे : *~ (in) sb's joy, एखाद्याच्या आनंदात सहभागी होणे.* **'shareholder** *ना* [*गण*] भागधारक. **'share-out** *ना* [*अे.व*] वाटा देणे, हिस्सा देणे; वाटप.

shark /शाक्/ *ना* [*गण*] १ एक मोठा धोकादायक मासा, मुशी. २ (*अनौप अधिक्षेपी*) पैशासाठी इतरांना फसवणारा माणूस, लफंगा.

sharp /शाप्/ *वि* १ धारदार, तीक्ष्ण, अणकुचीदार : *a ~ knife, धारदार चाकू.* २ व्यवस्थित व्याख्या केलेला, रेखीव, सुस्पष्ट : *a ~ outline, सुस्पष्ट मसुदा.* ३ (वळण वगैरेबाबत) एकदम दिशा बदलणारे, तीव्र. ४ एकाएकी, अचानक : *a ~ rise/fall, अचानक वाढ/घट.* ५ (आवाजाबाबत) कर्कश, तीव्र. ६ (चवीबाबत) आंबट आणि जरा तिखट, झणझणीत. ७ बोचणारा, कापणारा, झोंबणारा : *a ~ wind/pain, झोंबणारा वारा/तीव्र वेदना.* ८ पटकन् वेध घेणारा; सावध : *~ eyes, तीक्ष्ण/चलाख डोळे.* ९ कठोर, कडक : *~ words, कठोर शब्द.* १० (*संगीत*) (क) मागच्या स्वरापेक्षा अर्धस्वराने उंच. (ख) किंचित् वरचा स्वर. ११ (*अनौप*) फॅशनेबल; चलाख, चुणचुणीत : *a ~ dresser, झकपक पोषाख*

करणारा. **sharp** *ना* [*गण*] (*संगीत*) अर्ध्यानि वरचा स्वर. **sharp** *क्रिवि* १ वेळेवर, बरोब्बर : *at seven (o'clock) ~, बरोब्बर सात वाजता.* २ एकदम, लगेच : *turn ~ left, एकदम डावीकडे वळणे.* ३ (*संगीत*) चढ्या स्वरात, थोड्याशा वरच्या स्वरात. **sharpen** *क्रि* [*अक, सक*] टोक करणे, तीक्ष्ण होणे/करणे, धार लावणे. **sharpener** *ना* टोक करायचे साधन. **sharply** *क्रिवि* टोकदारपणे; स्पष्टपणे; एकदम दाणकन्; कर्कशपणे; तीव्रतेने; कठोरपणे; चाणाक्षपणे. **sharpness** *ना* [*अगण*] टोकदारपणा, धारदारपणा, स्पष्टपणा, उठावदारपणा; एकदम आलेली वक्रता; कर्कशपणा; तिखटपणा; तीव्रता; वेधकपणा; कठोरपणा; चटचटीतपणा.

shatter /'शॅट(र्)/ *क्रि* १ [*अक, सक*] अचानक छोटे तुकडे होणे, तोडणे, भुगा करणे, भंग पावणे/करणे. २ [*सक*] थक्क करणे, अवाक् करणे : *~ed by the bad news, वाईट बातमीने सुन्न झालेला.* ३ [*सक*] (*अनौप*) (बहुधा कर्मणी) दमवणे.

shave /शेइव्ह्/ *क्रि* १ [*अक, सक*] दाढी करणे, हजामत करणे. २ [*सक*] (*अनौप*) (एखाद्या गोष्टीला) चाटून जाणे. ३ (*क्रिब*) **shave sth off (sth)** पृष्ठभागावरचा (पातळ थर) काढणे, तासणे. **shave** *ना* [*गण*] दाढी करणे. **shaven** /'शेइव्ह्न्/ *वि* दाढी केलेला. **shaver** *ना* [*गण*] दाढी करायचा विद्युत वस्तरा. **shavings** *ना* [*ब.व*] लाकडाच्या तासून काढलेल्या ढलप्या, तास, सालपा.

shawl /शॉऽल्/ *ना* [*गण*] डोक्यावरून, खांद्याभोवती किंवा गुंडाळायला घ्यायची शाल.

she /शी/ *सना* (क्रियापदाचा कर्ता म्हणून वापर) पूर्वनिर्देशित किंवा पूर्वी उल्लेख केलेली स्त्री किंवा प्राण्यातील मादी, ती : *My sister says ~ is going, माझी बहीण म्हणते की ती निघालीय्.*

sheaf /शीफ्/ *ना* [*गण*] (*ब.व* **sheaves** /शीव्ह्झ्/) १ कापलेल्या धान्याची पेंढी, जुडी. २ कागदांचा जुडगा.

shear /शिअ(र्)/ *क्रि* (*भूत* **~ed**, *भूत वि* **shorn** /शॉऽन्/ किंवा **~ed**) [*सक*] मेंढीची लोकर कात्रीने कापणे. **shears** /शिअझ्/ *ना* [*ब.व*] मोठी कात्री : *a pair of ~, मोठी कात्री, भादरणी.*

sheath /शीथ्/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s** /शीद्झ्/) १ पाते ठेवायचे घर, तलवारीचे म्यान. २ = CONDOM.

sheathe /शीद्/ *क्रि* [*सक*] म्यानात ठेवणे.

sheaves SHEAF चे *ब.व.*

shed^1 /शेड्/ *ना* [*गण*] कोठी म्हणून वापरली जाणारी बहुधा लाकडाची छोटी इमारत, पडळ.

shed^2 /शेड्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **shed, -dd-**) [*सक*] १ (पाने वगैरे) गळणे, ढळणे : *Flowers ~ their petals, फुले पाकळ्या गाळतात.* २ (*औप*) वाहू देणे, वाट मोकळी करून देणे : *~ tears, अश्रू ढाळणे* किंवा *अश्रू वाहू देणे* म्हणजेच *रडणे.* ३ काढणे, फेकून देणे, काढून टाकणे : *~ one's clothes, कपडे काढून टाकणे.* ४ टाकणे, देणे, बाहेर पाठवणे : *~ light, प्रकाश देणे.*

she'd /शीड्/ १ she had चा संक्षेप. ➪ HAVE. २ she would चा संक्षेप. ➪ WILL^1, WOULD^1.

sheep /शीप्/ *ना* [*गण*] (*ब.व* **sheep**) मेंढी, बकरी, मेष. **'sheepdog** *ना* [*गण*] मेंढ्यांवर लक्ष ठेवणारा कुत्रा. **'sheepskin** *ना* [*गण, अगण*] लोकरीसकट असलेले मेंढीचे कातडे (किंवा त्याचा कोट, रग वगैरे). **sheepish** *वि* चूक घडल्याने गोंधळलेला किंवा मूर्ख ठरलेला, ओशाळ, नेभळट.

sheer /शिअ(र्)/ *वि* १ पूर्ण, शुद्ध, निखालस : *~ nonsense, पूर्ण वेडेपणा.* २ (कापड वगैरेबाबत) पातळ आणि हलके, तलम. ३ खूप खोल, उभा : *a ~ drop, सरळ खाली खोल जाईल असा/उभा कडा वगैरे.* **sheer** *क्रिवि* सरळ खोल, नव्वद अंशात.

sheet /शीट्/ *ना* [*गण*] १ अंथरुणावर घालायची चादर, शेजवस्त्र. २ एखाद्या गोष्टीचा पातळ सपाट ताव किंवा तुकडा : *a ~ of glass/paper, काचेचा/कागदाचा ताव.* ३ मोठे पसरलेले पाणी, हिम वगैरे. **'sheet music** *ना* [*अगण*] सुट्या कागदांवर लिहिलेली संगीत-रचना.

sheikh (तसेच **sheik**) /शेइक्/ *ना* [*गण*] अरबी राजा किंवा प्रमुख.

shelf /शेल्फ़्/ *ना* [*गण*] १ वस्तू ठेवण्यासाठी भिंतीला वगैरे ठोकलेली लाकडाची फळी, मांडणी. २ कड्याला असलेली किंवा पाण्यात असलेली खडकाची कपार.

shell /शेल्/ *ना* [*गण*] १ शेंगा, गोगलगाय, अंडी वगैरेचे वरचे कडक आवरण, कवच, टरफल, शिंपला. २ पूर्ण न बांधलेल्या बोटीच्या किंवा इमारतीच्या बाह्य भिंती. ३ तोफेचा गोळा. ४ (*वाक्प्र*) **come out of one's shell** लाजरेपणा, अबोलपणा वगैरे सोडणे. **shell** *क्रि* [*सक*] १ शेंगेचे टरफल काढणे, अंड्याचे कवच फोडणे. २ तोफा डागणे, गोळे उडवणे. ३ (*क्रिब*) **shell out** (*अनौप*) पैसे देणे/भरणे. **'shellfish** *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **shellfish**) खेकडा, शेवंड वगैरेसारखा मृदुकायकवची जलचर.

she'll /शील्/ she will चा संक्षेप. ➪ WILL^1.

shelter /'शेल्ट(र्)/ *ना* १ [*अगण*] पाऊसवारा, धोका वगैरेपासूनचा आश्रय, आसरा, निवारा. २ [*गण*] निवाऱ्याची जागा, इमारत. **shelter** *क्रि* १ [*सक*] आसरा देणे; संरक्षण करणे. २ [*अक*] निवारा शोधणे : ~ *from the rain under a tree, पावसात झाडाखाली निवारा शोधणे.*

shelve^1 /शेल्व्ह्/ *क्रि* [*सक*] १ (पुस्तके वगैरे) मांडणीवर (शेल्फवर) ठेवणे. २ (*ला*) (एखादा प्रश्न, योजना वगैरे) लांबणीवर टाकणे, बासनात गुंडाळून ठेवणे.

shelve^2 /शेल्व्ह्/ *क्रि* [*अक*] (जमिनीला) हळूहळू उतार असणे.

shelves SHELF चे *ब.व.*

shepherd /'शेपड्/ (*स्त्री* **shepherdess** /,शेप'डेस्; *अमे* 'सेपर्डिस्/) *ना* [*गण*] मेंढ्यांची देखभाल करणारा, मेंढपाळ, गुराखी. **shepherd** *क्रि* [*सक*] (लोकांना) मेंढ्यांसारखे मार्गदर्शन करणे. **shepherd's pie** *ना* [*गण, अगण*] वरून कुसकरलेला बटाटा घातलेला बारीक कापलेल्या मांसाचा एक पदार्थ.

sheriff /'शेरिफ्/ *ना* [*गण*] (*अमे*) एखाद्या खेड्यातील प्रमुख न्यायाधिकारी.

sherry /'शेरि/ *ना* [*अगण*] स्पेन, सायप्रस वगैरे देशातील पिवळसर किंवा तपकिरी रंगाचे एक मद्य.

shied SHY^2 चा *भूत, भूत वि.*

shield /शील्ड्/ *ना* [*गण*] १ युद्धात शरीराच्या संरक्षणाकरता वापरायचे धातू वगैरेचे कवच, ढाल. २ मानचिन्हे वगैरे दाखविणारे ढालीच्या आकाराचे प्रतीक किंवा चित्र. ३ यंत्र चालविताना संरक्षण करणारे कवच. **shield** *क्रि* [*सक*] संरक्षण करणे.

shift^1 /शिफ्ट्/ *ना* [*गण*] १ स्थल, पात्र वगैरेतील बदल, जागापालट. २ कामगारांची कामाची पाळी.

shift^2 /शिफ्ट्/ *क्रि* १ [*अक, सक*] दिशा किंवा स्थिती बदलणे. २ [*सक*] (*अनौप*) काढणे, दूर करणे : ~ *a stain, डाग काढणे.*

shifty /शिफ़्टि/ *वि* (**-ier, -iest**) विश्वास न टाकता येण्यासारखा, बेभरवशाचा. **shiftiness** *ना* [*अगण*] अविश्वसनीयता.

shilling /'शिलिङ्/ *ना* [*गण*] (१९७१ पूर्वी) पौंडाच्या विसाव्या भागाइतकी किंमत असलेले एक ब्रिटिश नाणे.

shimmer /'शिम(र्)/ *क्रि* [*अक*] कमीजास्त होणाऱ्या मंद प्रकाशात चमकणे, चमचमणे.

shin /शिन्/ *ना* [*गण*] गुडघ्याखालचा पायाचा पुढचा भाग, नडगी. **shin** *क्रि* (**-nn-**) (*क्रिब*) **shin up (sth)** त्वरेने चढणे, हातापायांची पकड करून सरसर चढणे.

shine /शाइन्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **shone** /शॉन्/ किंवा अर्थ ३ असताना **~d**) १ [*अक*] प्रकाशाने तळपणे, चमकणे. २ [*अक*] (*in/at*)// स्वतःच्या कौशल्याने चमकणे : *She ~s in English, ती इंग्रजी विषयात चमकते.* ३ [*सक*] (*अनौप*) पॉलिश करणे, घासून चकचकीत करणे : ~ *shoes, बुटांना पॉलिश करणे.* **shine** *ना* [*ए.व, अगण*] तेज; चकचकीतपणा, उजाळा, चकाकी : *Give your shoes a ~, तुझ्या बुटांना जरा चकाकी दे.* **shiny** *वि* (**-ier, -iest**) तळपता, चमकणारा; तेजस्वी.

shingle /'शिङ्ग्ल्/ *ना* [*अगण*] वाटोळ्या गोट्यांचा समुद्र-किनाऱ्याचा भाग. **shingly** /-ग्लि/ *वि* गोटे असणारा.

ship^1 /शिप्/ *ना* [*गण*] १ मोठी मालवाहू किंवा

प्रवासी बोट, जहाज. २ (*अनौप*) विमान किंवा अवकाशयान. **'shipmate** *ना* [*गण*] सहखलाशी. **'shipshape** *वि* व्यवस्थित; सुस्थितीत असलेला. **'shipwreck** *ना* [*गण, अगण*] समुद्रावरचे जहाज फुटणे किंवा नाहीसे होणे. **'shipwreck** *क्रि* [*सक*] (बहुधा कर्मणी) जहाज बुडवणे. **'shipyard** *ना* [*गण*] जहाज बांधायची जागा, नौनिर्मितिस्थान.

ship^2 /शिप्/ *क्रि* (**-pp-**) [*सक*] जहाजातून पाठवणे, वाहणे. **shipment** *ना* १ [*गण*] जहाजातून पाठवलेला माल. २ [*अगण*] जहाजातून माल पाठवणे. **shipper** *ना* [*गण*] जहाजातून माल पाठविण्याची व्यवस्था करणारा माणूस. **shipping** *ना* [*अगण*] एखाद्या देशातील किंवा बंदरातील वगैरे सर्व बोटी, जहाजे, नौकासमूह.

shirk /शऽक्/ *क्रि* [*अक, सक*] विशेषतः आळसामुळे (कामाची, कर्तव्याची वगैरे) चालढकल करणे, अळम्टळम् करणे, चुकवणे. **shirker** *ना* [*गण*] कामचुकार, अंगचोर.

shirt /शऽट्/ *ना* [*गण*] सदरा, बंडी.

shirty /'शऽटि/ *वि* (**-ier, -iest**) (*अनौप*) वैतागलेला; रागावलेला.

shit /शिट्/ *ना* (⚠ *व्रात्य*) १ [*अगण*] शी, गू, विष्टा. २ [*अे.व*] हगणे. ३ [*गण*] (*अधिक्षेपी*) नको असलेला माणूस. ४ (*वाक्प्र*) **not give a shit (about sb/sth)** किंमत न देणे. **shit** *क्रि* (**-tt-**, *भूत, भूत वि* **shitted** किंवा **shat** /शॅट्/) (⚠ *व्रात्य*) हगणे. **shit** *उद्वा* (राग किंवा त्रास व्यक्त करताना वापर) शी . **shitty** *वि* (**-ier, -iest**) (⚠ *व्रात्य*) आगाऊ, हलकट; चीड आणणारा, हरामखोर.

shiver /शिव्ह(र्)/ *क्रि* [*अक*] कापणे, थंडीने किंवा भीतीने थरकाप होणे. **shiver** *ना* [*गण*] थरकाप, कंप. **shivery** *वि* थरकाप करणारा, कापणारा.

shoal^1 /शउल्/ *ना* [*गण*] एकगठ्ठा पोहणारे मासे, माशांचा थवा.

shoal^2 /शउल्/ *ना* [*गण*] समुद्रातील उथळ जागा, भाट, खांडवा.

shock /शॉक्/ *ना* १ [*गण*] स्फोटाने, आदळण्याने वगैरे बसणारा धक्का. २ [*गण*] विजेचा धक्का, झटका. ३ [*अगण, गण*] आश्चर्याचा धक्का, भीतीचा धसका, दिड्मूढपणा. **shock** *क्रि* [*सक*] दिड्मूढ करणे, थक्क करणे, भीतीने गळाठणे. **shocking** *वि* (क) धक्कादायक, थक्क करणारा, दिड्मूढ करणारा : *~ing behaviour, धक्कादायक वर्तन.* (ख) (*अनौप*) फार वाईट.

shod SHOE चा *भूत, भूत वि.*

shoddy /'शॉडि/ *वि* (**-ier, -iest**) भिकार, टुकार : *~ work, भिकार काम.*

shoe /शू/ *ना* [*गण*] १ बूट, जोडा. २ (*वाक्प्र*) **in sb's shoes** एखाद्याच्या जागी/स्थानावर. **shoe** *क्रि* (*भूत, भूत वि* **shod** /शॉड्/) घोड्याला नाल ठोकणे. **'shoelace** *ना* [*गण*] बुटाची वादी/नाडी. **'shoe-string** *ना* [*गण*] (*वाक्प्र*) **on a shoe-string** अगदी कमी पैसे असताना, कमी पैशात.

shone SHINE चा *भूत, भूत वि.*

shoo /शू/ *उद्वा* जनावरे आणि विशेषतः लहान मुले यांना दूर पिटाळण्यास काढायचा आवाज, शूऽक्! **shoo** *क्रि* [*सक*] (प्राणी वगैरेना हकलवायला) शूऽक् असा आवाज करणे.

shook SHAKE^1 चा *भूत.*

shoot^1 /शूट्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **shot** /शॉट्/) १ (क) [*अक, सक*] नेम धरून बंदुकीने गोळी मारणे किंवा बाण सोडणे. (ख) [*सक*] एखाद्याला अशा पद्धतीने ठार मारणे किंवा जखमी करणे. २ [*अक, सक*] एकाएकी हालणे/हालवणे किंवा चढणे/चढवणे : *Pain shot up his arm, त्याच्या दंडातून वेदना उसळली.* ३ [*अक, सक*] (वस्तूचे किंवा दृश्याचे) छायाचित्र घेणे, चित्रित करणे. ४ [*अक*] (फुटबॉलमधे) गोल मारायचा/लावायचा प्रयत्न करणे, गोलाकडे (चेंडू) मारणे. ५ (वनस्पतीबाबत) नवीन पानेफुले येणे, फूट येणे, धुमारणे. ६ (*वाक्प्र*) **shoot one's mouth off** (*अनौप*) तोंडाला येईल ते बडबडणे, तोंड सोडणे. **'shooting-star** *ना* [*गण*] उल्का.

shoot^2 /शूट्/ *ना* [*गण*] १ झाडाला आलेली फूट, धुमारा. २ पशुपक्ष्यांची मौजेखातर शिकार करणाऱ्या लोकांचा गट.

shop /शॉप्/ *ना* [*गण*] १ (विशेषतः *ब्रि*) जिथे मालाची विक्री होते ती इमारत (किंवा तिचा

भाग), दुकान. २ कर्मशाळा, कार्यशाळा, यंत्रावर काम करण्याची जागा. ३ (*वाक्प्र*) **talk shop** स्वतःच्या कामाविषयी बोलणे. **shop** *क्रि* **(-pp-)** १ [*अक*] खरेदी करणे, माल घेण्यास दुकानात जाणे : ~ *for presents, भेटवस्तू विकत घेण्यास दुकानात जाणे.* २ [*सक*] (*ब्रि व्रात्य*) विशेषतः पोलिसांना एखाद्याविषयी माहिती देणे, (पोलिसांना) खबर देणे. ३ (*क्रिब*) **shop around** किफायतशीर भावात खरेदी करण्यासाठी दुकानांत काळजीपूर्वक चौकशी करणे, दुकाने धुंडाळणे. **'shop assistant** *ना* [*गण*] दुकानात काम करणारा नोकर. **,shop-'floor** *ना* [*अे.व*] कारखान्यातील माल बनवण्याची जागा, उत्पादन-कक्ष. **'shopkeeper** *ना* [*गण*] (लहान) दुकानाचा मालक, दुकानदार, किरकोळ दुकानदार. **'shoplifter** *ना* [*गण*] दुकानातला माल चोरणारा माणूस, उचलेगिरी करणारा. **'shoplifting** *ना* [*अगण*] दुकानातला माल चोरणे. **,shop-'steward** *ना* [*गण*] कामगारांनी निवडून दिलेला औद्योगिक कामगार संघटनेच्या एखाद्या शाखेचा पदाधिकारी. **shopper** *ना* [*गण*] दुकानात जाणारा, गिऱ्हाईक. **shopping** *ना* [*अगण*] १ खरेदी करणे : *go ~ing, खरेदी करण्यास जाणे.* २ दुकानात खरेदी केलेल्या वस्तू, खरेदी.

shore^{1} /शॉऽ(र्)/ *ना* [*गण*] समुद्रकाठ किंवा तळ्याचा काठ.

shore^{2} /शॉऽ(र्)/ *क्रि* (*क्रिब*) **shore sth up** लाकडी तुळई वगैरे घालून आधार देणे.

shorn SHEAR चा *भूत.*

short^{1} /शॉऽट्/ *वि* १ अल्प, लहान, थोडा : *a ~ journey, छोटासा प्रवास.* २ ठेंगू, बुटका. ३ हव्या असलेल्या प्रमाणापेक्षा कमी, तूट असलेला : *get ~ change, परत पैसे कमी येणे.* ४ (*of*)// **(क)** तूट, कमतरता असलेला, अपुरा : ~ *of money, अपुरे/कमी पैसे असलेला.* **(ख)** पासून दूर/अंतरावर : *five miles ~ of our destination, आपण जायच्या ठिकाणापासून पाच मैलावर.* ५ *on*// (*अनौप*) विशिष्ट गुण नसलेला : ~ *on tact, कसब नसलेला.* ६ (*with*)// एखाद्याशी कडक शब्दांत बोलणारा, कठोर बोलणारा : *I was a little ~ with her, मी जरा तिच्याशी कडक शब्दांत बोललो.* ७ (*वाक्प्र*) **for short** संक्षिप्त रूपात. **in short** थोडक्यात. **in the short term** ➪ TERM. **little/nothing short of** जवळजवळ, -च्या पेक्षा कमी नाही असा. **short cut (क)** प्रवास वगैरे कमी करायला घेतलेला मार्ग, जवळचा रस्ता. **(ख)** एखादी गोष्ट चटकन्, जास्त कार्यक्षमतेने वगैरे करण्याचा मार्ग, सोपा मार्ग/उपाय. **'shortbread** *ना* [*अगण*] खूप लोणी घालून केलेले कुरकुरीत बिस्किट. **,short-'change** *क्रि* [*सक*] उरलेले पैसे कमी देऊन फसवणे. **,short-'circuit** *ना* [*गण*] विद्युत्प्रवाह चुकीच्या दिशेने नेणारा दोष, लघुपरिपथ. **,short-'circuit** *क्रि* [*अक, सक*] लघुपरिपथ होणे/करणे. **'shortcoming** *ना* [*गण*] (बहुधा *ब.व*) अपेक्षित उंची गाठण्यातील अपयश, कमी पडणे; दोष, वैगुण्य, न्यून. **'shortfall** *ना* [*गण*] गरजेपेक्षा कमी रक्कम, तूट, कमतरता. **'shorthand** *ना* [*अगण*] विशेष चिन्हे वापरून जलद लिहिण्याची पद्धती, लघुलेखन. **,short-'handed** *वि* पुरेसे कामगार नसलेला, अपुरी माणसे असलेला. **'short-list** *ना* [*गण*] अनेक अर्जांतून उमेदवार निवडीसाठी केलेली अंतिम यादी. **'short-list** *क्रि* [*सक*] अशी अंतिम यादी तयार करणे. **short-lived** *वि* अल्पजीवी. **shortness** *ना* [*अगण*] बुटकेपणा; छोटेपणा; कमतरता. **short sight** *ना* [*अगण*] लांबचे स्पष्ट न दिसणे, ऱ्हस्व दृष्टी. **,short-'sighted** *वि* **(क)** ऱ्हस्व दृष्टी असणारा, लांबचे स्पष्ट न दिसणारा. **(ख)** (*ला*) दूरचा/भविष्याचा विचार न करणारा, पायापुरते पाहणारा, दीर्घदृष्टी नसणारा. **,short-'tempered** *वि* चटकन् रागावणारा, शीघ्रकोपी, तापट, उतावळा. **,short-'term** *वि* अल्पकालीन, छोट्या कालावधीचा. **,short 'wave** *ना* [*अगण*] १०० मीटरपेक्षाही कमी लांबीची रेडिओ लहर.

short^{2} /शॉऽट्/ *क्रिवि* १ एकदम, मधेच : *stop ~, मधेच थांबणे.* २ (*वाक्प्र*) **go short (of)** एखादी गोष्ट कमी असणे. **short of** शिवाय : *do anything ~ of murder, खुनाखेरीज सर्वकाही करणे.*

short^{3} /शॉऽट्/ *ना* [*गण*] १ कडक मद्याचे एक

छोटेसे पेय. २ लघुचित्रपट.

shortage /'शॉऽटिज्/ *ना* [*गण, अगण*] एखाद्या गोष्टीचा तुटवडा, चणचण; चणचणीची परिस्थिती, कमतरतेची स्थिती.

shorten /'शॉऽट्न्/ *क्रि* [*अक, सक*] लहान/लांडा होणे/करणे : *~ a dress, कपडा लहान करणे.*

shortly /'शॉऽट्लि/ *क्रिवि* १ लवकरच, थोड्याच वेळात: *We leave ~, आपण लगेच निघतोय्.* २ चिडून; फटकळपणे: *speak ~ to sb, एखाद्याशी फटकळपणे बोलणे.*

shot /शॉट्/ *ना* [*गण*] १ गोळी मारणे किंवा तिचा आवाज; बंदुकीचा बार. २ काही खेळांतील फटका, टोला, नेम, पायाने मारलेला टोला, फेक: *a ~ at goal, गोलकडे मारलेला फटका.* ३ प्रयत्न: *a ~ at solving the problem, प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न.* ४ नेमबाज: *a poor ~, बेताचा नेमबाज.* ५ छायाचित्र; चित्रपटातले एक प्रसंगचित्र, दृश्यचित्र. ६ (*अनौप*) औषधाचे वगैरे इंजेक्शन. ७ (*वाक्प्र*) **like a 'shot** वेगाने, भरभर, तातडीने. **a shot in the 'arm** उत्तेजन मिळावे असे काही, अधिक उत्साह देणारे काही. **a shot in the 'dark** अंदाजपंचे दिलेले उत्तर वगैरे, ठोकलेले उत्तर वगैरे. **not by a long shot** ➪ LONG^1. **'shotgun** *ना* [*गण*] शिकारीची बंदूक, छर्रे उडवायची बंदूक. **'shot-put** *ना* [*अे.व*] खेळाडू धातूचा एक जड गोळा शक्य तितक्या दूर फेकतात अशी स्पर्धा, गोळाफेक.

should^1 /शड्; अधिक बलयुक्त रूप /शुड्/ *अभिद क्रि* (*नकार* **should not**, *संक्षेप* **shouldn't** /'शुड्न्ट्/) १ (कर्तव्य दाखविण्यास वापर): *You ~ leave now, तू आता जावंस/निघावंस.* २ (अनिश्चित असा निष्कर्ष व्यक्त करण्यास वापर): *We ~ arrive before dark, अंधार होण्यापूर्वी आपण पोहोचू असं वाटतं.* ३ (काही विशिष्ट विशेषणांनंतर *that* युक्त उपवाक्यांत वापर): *We're sorry that you ~ have been given so much trouble, तुला एवढा त्रास दिला जावा याबद्दल आम्हाला खेद वाटतो.* ४ (एखाद्या घटनेचा परिणाम सूचित करण्यास वापर): *If she ~ come back, please tell me, ती परत आलीच तर कृपया मला कळव.* ५ (औप) (हेतू व्यक्त करण्यास वापर): *He put flowers in the room so that it ~ look nice, चांगली दिसावी म्हणून त्याने खोलीत फुले ठेवली.* ६ (मत व्यक्त करण्यास किंवा उपदेश करताना वापर): *You ~ stop smoking, तू धूम्रपान बंद करावंस.* ७ (नम्र विनंती करण्यास वापर): *I ~ like to make a phone call, please, कृपया मला एक फोन करू दे.* ८ (निरुत्साह, अविश्वास वगैरे व्यक्त करण्यास प्रश्नार्थक शब्दांसह वापर): *How ~ I know? मला कसं कळावं/कळणार?*

should^2 SHALL चा *भूत.*

shoulder /'शउल्ड(र्)/ *ना* १ [*गण*] (क) माणसाचा खांदा किंवा स्कंध, जनावराचे पुढचे पाय जेथून निघतात तो शरीराचा भाग किंवा फरा. (ख) कपड्याचा खांदा झाकणारा भाग, आढे. २ **shoulders** [*ब.व*] पाठीचा वरचा भाग, वरची पाठ. ३ [*गण*] मानवी खांद्यासारखी किंवा वरच्या पाठीसारखी दिसणारी कोणतीही गोष्ट. ४ (*वाक्प्र*) **,shoulder to 'shoulder** (क) एकमेकाजवळ, एकमेकाला चिकटून, लागून. (ख) बरोबरीने/खांद्याला खांदा लावून काम करणारा, लढणारा वगैरे. **shoulder** *क्रि* [*सक*] १ खांद्यावर घेणे: (*ला*) *~ the responsibility, जबाबदारी (डोक्यावर) घेणे.* २ एखाद्याला खांद्याने ढकलणे: *~ed sb aside, एखाद्याला खांद्याने रेटून बाजूला ढकलणे.* **'shoulder-blade** *ना* [*गण*] पाठीमागच्या खांद्याच्या दोन सपाट हाडातील एक हाड, खवाट्याचे हाड.

shouldn't /'शुड्न्ट्/ should not चा संक्षेप. ➪ SHOULD^1.

shout /शाउट्/ *ना* [*गण*] आरोळी, हाक. **shout** *क्रि* १ [*अक, सक*] मोठ्याने हाक मारणे किंवा बोलणे किंवा ओरडणे, कोकलणे, बोंबलणे: *Don't ~ at me! माझ्यावर ओरडू नकोस!* ○ *~ out orders, मोठ्याने हुकूम देणे/सोडणे.* २ (*क्रिब*) **shout sb down** एखाद्याचे बोलणे ऐकू जाऊ नये म्हणून आरडाओरडा करणे, एखाद्याला आरडाओरडा करून गप्प करणे. **shouting** *ना* [*अगण*] हाका, आरोळ्या.

shove /शव्ह्/ *क्रि* १ [*अक, सक*] ढकलणे, रेटणे. २ (*क्रिब*) **shove over/up** (*अनौप*) जागा देण्यासाठी सरकणे: *S~ over so I can sit down, जरा सरक म्हणजे मला बसता येईल.* **shove** *ना* [*गण*] रेटा, धक्का.

shovel /'शव्ह्ल्/ *ना* [*गण*] कोळसा, वाळू वगैरे उचलण्याचे एक खोऱ्यासारखे अवजार. **shovel** *क्रि* (**-ll-**; *अमे* **-l-**) [*सक*] खोऱ्याने उचलणे किंवा सारणे.

show^1 /शउ/ *ना* १ [*गण*] थिएटरमधील, दूरदर्शनवरील वगैरे करमणुकीचा प्रयोग, खेळ. २ [*गण*] सार्वजनिक प्रदर्शनासाठी केलेला वस्तूंचा संचय, प्रदर्शन. ३ [*गण, अगण*] बाह्य रूप, बहाणा, देखावा, बाह्य प्रदर्शन: *Her grief is all ~, तिचे दुःख एक देखावा आहे म्हणजे दुःखाचा नुसता आव आहे.* ४ [*अगण*] भव्य किंवा प्रेक्षणीय प्रदर्शन, थाट: *all the ~ of the circus, सर्कसचा भव्य थाट.* ५ [*गण,* बहुधा *अे.व*] (*अनौप*) प्रयत्न: *put up a good ~, कसून प्रयत्न करणे.* ६ (*वाक्प्र*) **for 'show** इतरांवर फक्त छाप पाडण्यासाठी केलेला, भाव मारण्यासाठी केलेला: *She does it for ~, ती भाव मारण्यासाठी ते करतीये.* **on 'show** प्रदर्शनात मांडलेला, प्रदर्शित केलेला. **a show of 'hands** हात वर करून मत देणे. **'show business** *ना* [*अगण*] लोकांची करमणूक करण्याचा धंदा, लोकरंजन व्यवसाय. **'show-down** *ना* [*गण*] भांडण वगैरेवरील अखेरचे पर्व, शेवटची लढाई, बलप्रदर्शन. **'show-jumping** *ना* [*अगण*] घोड्यावर बसून अडथळ्यांवरून उड्या मारण्याची स्पर्धा. **showroom** *ना* [*गण*] मालाचे प्रदर्शन करण्याची जागा, प्रदर्शन कक्ष. **showy** *वि* (**-ier, -iest**) लक्ष वेधण्यासाठी केलेला, केवळ प्रदर्शनार्थी, देखाव्याचा, दिखाऊ, भपकेबाज.

show^2 /शउ/ *क्रि* (*भूत* **~ed**, *भूत वि* **~n** /शउन्/) १ [*सक*] दाखवणे: *S~ your tickets at the gate, दारावर तुमची तिकिटे दाखवा.* २ [*अक, सक*] दिसणे; दिसू देणे: *Black doesn't ~ the dirt, काळा रंग मळ दिसू देत नाही* म्हणजेच *काळा रंग मळखाऊ असतो.* ३ [*सक*] दाखवणे, निर्देश करणे: *S~ me which one you want, तुला कोणते हवे ते मला दाखव.* ४ [*सक*] वाट दाखवणे, मार्गदर्शन करणे: *S~ her in, तिला रस्ता दाखवून आत आण* म्हणजेच *तिला आत घेऊन ये.* ५ [*सक*] व्यक्त करणे: *He ~ed me great-kindness, त्यांनी मला खूप दया दाखवली.* ६ [*सक*] काही असल्याचे सिद्ध करणे: *She ~ed great courage, तिने खूप धैर्य दाखवले.* ७ [*सक*] स्पष्ट करणे; स्पष्टीकरण करणे: *She ~ed me how to do it, ते कसं करायचं हे तिनं मला दाखवलं.* ८ (*वाक्प्र*) **go to 'show** दाखवून देणे, सिद्ध करणे. **show one's 'face** लोकांसमोर येणे, तोंड दाखवणे. **show one's 'hand** खरा उद्देश/हेतू काय आहे हे दाखवणे. ९ (*क्रिब*) **show off** स्वतःच्या श्रीमंतीचे, ताकदीचे प्रदर्शन करून लोकांवर भाव मारणे. **show up** (**क**) दिसणे: *The lines ~ed up in the light, प्रकाशात रेषा दिसू लागल्या.* (**ख**) येणे: *All the guests ~ed up, सर्व पाहुणे आले.* **showing** *ना* १ [*गण*] दाखवणे, प्रदर्शन करणे. २ [*अे.व*] प्रगती: *the company's poor ~ing, कंपनीची भिकार प्रगती.* **'show-off** *ना* [*गण*] डामडौलाचे प्रदर्शन करणारी व्यक्ती.

shower /'शाउअ(र्)/ *ना* [*गण*] १ पावसाची छोटीशी सर. २ (**क**) आंघोळीसाठी अंगावर पाण्याचे तुषार उडविण्याचे साधन (असलेले स्नानगृह). (**ख**) (जल)तुषार स्नान: *have a ~, शॉवरखाली आंघोळ करणे.* ३ खूप गोष्टींचा वर्षाव, मारा: *a ~ of stones, दगडांचा वर्षाव.* **shower** *क्रि* १ [*अक*] वर्षाव होणे, वृष्टी होणे, मारा होणे. २ [*सक*] (*with, on, upon*)// (**क**) एखाद्यावर एखाद्या गोष्टीचा वर्षाव/मारा/भडिमार करणे. (**ख**) एखाद्याला एखादी गोष्ट भरभरून देणे: *~ sb with praise, एखाद्यावर स्तुतिसुमने उधळणे.* **showery** *वि* (हवेबाबत) मधून मधून पाऊस पडणारी, पावसाळी.

shown SHOW^2 चा *भूत, भूत वि.*

shrank SHRINK चा *भूत.*

shrapnel /'श्रॅप्नल्/ *ना* [*अगण*] उडलेल्या बॉम्बचे तुकडे.

shred /श्रेड्/ *ना* [*गण*] १ [विशेषतः *ब.व*] एखाद्यापासून फाटलेला किंवा तुटलेला तुकडा, चिंधी, चिंधोटी, चिरफळी, तुकडा. २ (*ला*) अत्यल्प, तसूभर, लवलेश: *not one ~ of* *truth, सत्याचा लवलेशही नाही.* **shred** *क्रि* (-dd-) [*सक*] चिंध्या करणे.

shrewd /श्रूड्/ *वि* चतुर, हुशार, धूर्त : *a ~ guess, चतुर अंदाज.* **shrewdly** *क्रिवि* चतुरपणाने, चतुराईने, हिकमतीने.

shriek /श्रीक्/ *क्रि* १ [*अक*] किंकाळी मारणे, किंचाळणे. २ [*सक*] किंचाळून सांगणे/बोलणे, ठो ठो करणे. **shriek** *ना* [*गण*] किंकाळी, कर्कश आवाज.

shrill /श्रिल्/ *वि* (आवाज वगैरेबाबत) वरच्या पट्टीचा, तार स्वरातला; कर्कश, कानाला सहन न होणारा. **shrillness** *ना* [*अगण*] तार स्वर; कर्कशपणा.

shrimp /श्रिम्प्/ *ना* [*गण*] लहान आकाराचा आणि पाण्यात उकळल्यावर गुलाबी दिसणारा एक मृदुकायकवची पाण्यातला प्राणी, कोळंबी, झिंगा, चिंगारी.

shrine /श्राइन्/ *ना* [*गण*] १ पवित्र अवशेष ठेवलेले थडगे वगैरे, पवित्र स्थळ, समाधी, दर्गा वगैरे. २ अत्यादराने किंवा भक्तिभावाने पाहिल्या जाणाऱ्या व्यक्तीचे किंवा कार्याचे स्थळ, पवित्र स्थान.

shrink /श्रिङ्क्/ *क्रि* (*भूत* **shrank** /श्रॅङ्क्/ किंवा **shrunk** /श्रङ्क्/, *भूत वि* **shrunk**) १ [*अक, सक*] आकसणे, आखडणे, घटणे/घटवणे : *My shorts shrank in the wash, धुण्यामधे माझी चड्डी आटली.* २ (*क्रिब*) **shrink (back/away) from sth/sb** भीतीने, घृणेने वगैरे मागे हटणे/सरणे. **shrink from sth** एखादी गोष्ट करण्यास कचरणे, मन न धजावणे. **shrinkage** /-इज्/ *ना* [*अगण*] झालेली घट किंवा आखडण्याची क्रिया, आकुंचन. **shrunken** /'श्रीङ्कन्/ *वि* घटलेला, आटलेला, आकसलेला.

shrivel /'श्रिव्ह्ल्/ *क्रि* (-ll-; *अमे* -l-) [*अक, सक*] (*up*)// उष्णता, दव किंवा वार्धक्य यामुळे सुरकुतणे, आकसणे, उन्हाळणे.

shroud /श्राउड्/ *ना* [*गण*] १ मृत शरीराभोवती गुंडाळायचे कापड, प्रेतवस्त्र, कफन. २ (*ला*) झाकणारे आणि लपवणारे काहीतरी, पडदा : *a ~ of mist, धुक्याचा पडदा.* **shroud** *क्रि* [*सक*] (बहुधा कर्मणी) झाकून दडवणे : *~ed in mystery, गूढतेने झाकलेला.*

shrub /श्रीब्/ *ना* [*गण*] झाडाहून बुटके पण बुंधा असणारे असे झुडुप. **shrubbery** *ना* [*गण, अगण*] (*ब.व* -ies) झुडुपांची जागा.

shrug /श्रीग्/ *क्रि* (-gg-) १ [*अक, सक*] शंका वगैरे व्यक्त करण्यास खांदे उडवणे. २ (*क्रिब*) **shrug sth off** एखादी गोष्ट कमी लेखणे. **shrug** *ना* [*गण*] खांदे उडवणे.

shrunk SHRINK चा *भूत, भूत वि.*

shrunken ⇨ SHRINK.

shudder /'शीड(र्)/ *क्रि* [*अक*] भीतीने, थंडीने वगैरे कापणे, कापरे भरणे. **shudder** *ना* [*गण*] कापरे.

shuffle /'शीफ्ल्/ *क्रि* १ [*अक*] पाय व्यवस्थित न उचलता चालणे, पाय ओढीत/घासत चालणे, लटपटत चालणे. २ [*अक, सक*] अस्वस्थपणाने किंवा कंटाळा आल्याने चलबिचल होणे/करणे, चुळबुळ करणे. ३ [*सक*] पत्ते पिचणे/पिसणे, वर-खाली करणे. **shuffle** *ना* १ [*अे.व*] पिची, पिसणे. २ [*गण*] जागेची अदलाबदल, वर-खाली करणे.

shun /शीन्/ *क्रि* [*सक*] (-nn-) टाळणे, चुकवणे.

shunt /शीन्ट्/ *क्रि* १ [*अक, सक*] (गाड्या वगैरे) एका रूळावरून दुसऱ्या रूळावर नेणे, गाडीचे रूळ बदलणे. २ [*सक*] एखादी व्यक्ती किंवा वस्तू वेगळ्या जागी नेऊन ठेवणे.

shush /शुश्/ *उद्‌गा* गप्प बस, शू!

shut /शीट्/ *क्रि* (*भूत, भूत वि* ~, -tt-) १ (क) [*सक*] (दार) बंद करणे, मिटणे, लावणे. (ख) [*अक*] (दार वगैरे बाबत) बंद होणे : *The window won't ~, ही खिडकी बंद होत नाही.* २ [*अक, सक*] (दुकाने वगैरे) तात्पुरती बंद होणे/करणे : *When does the baker's shut? बेकरीवाला कधी बंद होतो?* ३ [*सक*] मिटवणे : *~ a book, पुस्तक बंद करणे.* ४ (*वाक्प्र*) **shut one's eyes to** मुद्दाम डोळेझाक करणे, जाणूनबुजून दुर्लक्ष करणे, काणाडोळा करणे. **shut up 'shop** धंदा बंद करणे; व्यवसाय गुंडाळणे, गाशा गुंडाळणे वगैरे. ५ (*क्रिब*) **shut (sth) down** (कारखाना वगैरे) बंद करणे/पाडणे. **shut sth off** (गॅस, पाणी वगैरेचा) पुरवठा बंद करणे. **shut sb/sth off** एखाद्याला वेगळे ठेवणे. **shut**

(sth) up (क) (घराची वगैरे) दारं-खिडक्या घट्ट बंद करणे/लावणे. (ख) सुरक्षिततेसाठी दूर ठेवणे, बाजूला काढणे. **shut (sb) up** (*अनौप*) तोंड बंद ठेवणे, गप्प बसणे/करणे. **'shut-down** *ना* [*गण*] (कारखाना वगैरे) बंद करणे.

shutter /'शॅट(र्)/ *ना* [*गण*] १ खिडकीवरचे सरकते आवरण/दार, सरकढापणी, खेचपडदा. २ कॅमेऱ्यातील भिंगातून प्रकाशकिरण आत येऊ देण्यासाठी उघडण्याची झडप. **shuttered** *वि* शटर्स बंद केलेला.

shuttle /'शॅट्ल्/ *ना* [*गण*] १ दोन स्थळांमधे नियमितपणे ये-जा करणारी बस, विमान वगैरे. २ शिवणयंत्रात वगैरे धागा घालणारे साधन. **shuttle** *क्रि* [*अक, सक*] मागे-पुढे करणे/पाठवणे, ये-जा करणे/करायला लावणे. **'shuttlecock** *ना* [*गण*] बॅडमिंटन खेळायचे पिसांचे बनलेले फूल, पीसचेंडू.

shy^{1} /शाइ/ *वि* १ (लोकांबाबत) लाजाळू, बुजरा. २ (प्राण्यांबाबत) भित्रा. **shyly** *क्रिवि* लाजाळूपणे; भित्रेपणाने. **shyness** *ना* [*अगण*] लाजाळूपणा; भित्रेपणा.

shy^{2} /शाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **shied** /शाइड्/) १ [*अक*] (घोडा) भीतीने बाजूला होणे, बुजणे, बिथरणे. २ (*क्रिब*) **shy away from sth** एखादी गोष्ट तिच्या भीतीने टाळणे, घाबरून दूर राहणे.

Siamese twins /ˌसाइ·अमीझ़ 'ट्विन्झ़/ *ना* [*ब.व*] शरीरे एकमेकाला जोडलेली असताना जन्मलेले जुळे.

sibilant /'सिबिलन्ट्/ *वि, ना* फुस् असा आवाज करत काढलेला किंवा तसा आवाज येणारा (ध्वनी), सकारयुक्त (ध्वनी), ऊष्मवर्ण, सीत्कार स्वर.

sibling /'सिब्लिङ्/ *ना* [*गण*] (*औप*) भाऊ किंवा बहीण, भावंडं.

sick /सिक्/ *वि* १ आजारी: *care for ~ people in hospital, इस्पितळात आजाऱ्यांची काळजी घेणे.* २ ओकारी होईल असा: *feel ~, ओकारी होईलसे वाटणे/पोटात ढवळणे/मळमळणे.* ३ *of*// (*अनौप*) एखाद्या गोष्टीला किंवा व्यक्तीला कंटाळलेला, दम नसलेला, विटलेला; वैतागलेला: ***I'm ~ of his lies**, मला त्याच्या खोटारडेपणाचा वीट आलाय्.* ४ (*at/about*)// (*अनौप*) खूप वैतागलेला, अस्वस्थ, निराश किंवा चिंताक्रांत: *We're ~ about losing, अपयशाने आम्ही अगदी हबकलोय.* ५ (*अनौप*) निर्दय, क्रूर किंवा अशिष्ट, असभ्य, चावट: *~ jokes, पांचट/फाजील विनोद.* ६ (*वाक्प्र*) **worried sick** जाम काळजीत पडलेला, चिंताक्रांत, काळजीने पोखरलेला. **the sick** *ना* [*ब.व*] रुग्ण, आजारी माणूस. **'sick-leave** *ना* [*अगण*] आजारपणाची रजा.

sicken /'सिकन्/ *क्रि* १ [*सक*] उबग आणणे, वीट आणणे, शिसारी येणे: *Violence ~s him, हिंसाचाराची त्याला शिसारी येते.* २ [*अक*] (*for*)// आजारपण येऊ लागणे, दुखणे येणे. **sickening** *वि* शिसारी आणणारा; उबग आणणारा.

sickle /'सिक्ल्/ *ना* [*गण*] गवत कापायचे वक्राकार पात्याचे साधन, खुरपे, नारगद, विळा, कोयता.

sickly /'सिक्लि/ *वि* (**-ier, -iest**) १ नेहमी आजारी असणारा, रोगट. २ आजारी दिसणारा, रोगट: *a ~ complexion, रोगट चर्या.* ३ आजारपण आणणारा, रोगकारक, अरुची निर्माण करणारा: *a ~ atmosphere, रोगट किंवा कडवट वातावरण.*

sickness /'सिक्निस्/ *ना* १ [*गण, अगण*] (एक प्रकारचा) आजार, रोग. २ [*अगण*] मळमळ, ओकारीची भावना.

side^{1} /साइड्/ *ना* [*गण*] १ एखाद्या वस्तूची सपाट बाजू. २ वरचा, खालचा, पुढचा किंवा मागचा नसलेला असा पृष्ठभाग, बाजूचा पृष्ठभाग. ३ कागदाच्या वगैरे दोन बाजूंपैकी कोणतीही एक बाजू. ४ कड, सीमा: *the ~ of the bed, बिछान्याची कड.* ५ शरीराचा उजवा किंवा डावा भाग: *a pain in one's ~, डावीकडचे/उजवीकडचे दुखणे.* ६ एखाद्या गोष्टीच्या मध्यापासून दूरचा भाग, बाजू: *the sunny ~ of the street, रस्त्याची उन्हाची बाजू.* ७ (क) (खेळ, राजकारण वगैरेतील) परस्परविरुद्ध असणारा पक्ष, गट, बाजू. (ख) अशा पक्षाचे/गटाचे मत. ८ अंग, पैलू: *study all ~s of a question, प्रश्नाचा सर्वांगीण विचार करणे.* ९ (*वाक्प्र*) **get on the right/wrong side of sb** एखाद्याला खूष/नाखूष

करणे. **on/from all 'sides** सर्व बाजूंनी. **on the 'big, 'small, etc side** जरासा जास्त, मोठा, लहान वगैरे. **put sth on to one 'side** एखादी गोष्ट बाजूला टाकणे, तिचा विचार करणे पुढे ढकलणे. **,side by 'side** जवळ जवळ, लागून, एकमेका शेजारी. **take 'sides (with sb)** एखाद्याची वादात वगैरे बाजू घेणे, कड घेणे. **'sideboard** *ना* [*गण*] ताटल्या वगैरे ठेवण्याकरता ओढखण असणारे कपाट. **'sideburns, 'sideboards** *ना* [*ब.व*] कल्ले. **'side-effect** *ना* [*गण*] औषध वगैरेचा अप्रत्यक्ष परिणाम. **'sidelight** *ना* [*गण*] मोटारीच्या पुढच्या बाजूच्या दोन लहान दिव्यांतील एक दिवा. **'sideline** *ना* [*गण*] (क) फुटबॉल वगैरे खेळासाठीच्या आखीव मैदानातील कडेची रेषा. (ख) जोडधंदा, उपव्यवसाय. **'sidelong** *वि* बाजूकडचा, कोपऱ्यातला : *a ~ glance, चोरटा कटाक्ष.* **'side-road** *ना* [*गण*] उपरस्ता, बोळ. **'side-step** *क्रि* (-pp-) [*अक, सक*] (क) एका बाजूला होऊन (ठोसा वगैरे) चुकवणे. (ख) (*ला*) (प्रश्नाचे) उत्तर टाळणे. **'side-track** *क्रि* [*सक*] एखाद्याचे लक्ष महत्त्वाच्या गोष्टींपासून अन्यत्र वळवणे, मुख्य मुद्द्याला बगल देणे. **'sidewalk** *ना* (*अमे*) ➪ PAVEMENT. **'sideways** *क्रिवि* बाजूला, बाजूने, आडवा.

side^{2} /साइड्/ *क्रि* (*क्रिब*) **side with** युक्तिवादात वगैरे एखाद्याची बाजू घेणे, एखाद्याला पाठिंबा देणे.

siding /'साइडिङ्/ *ना* [*गण*] मुख्य लोहमार्गापासून बाजूला असलेला लहान लोहमार्ग.

siege /सीज्/ *ना* [*गण, अगण*] १ काबीज करण्यासाठी लष्कराने नगराला वगैरे घातलेला वेढा. २ (*वाक्प्र*) **lay siege to** अशा प्रकारे वेढा घालणे/देणे.

sieve /सिव्ह्/ *ना* [*गण*] धान्य, पीठ वगैरे चाळायची चाळणी. **sieve** *क्रि* [*सक*] चाळणीने चाळणे.

sift /सिफ्ट्/ *क्रि* १ [*सक*] चाळणे. २ [*अक, सक*] (*ला*) नीट तपासणे, छाननी करणे, पारखणे : *~ (through) the evidence, पुराव्याची छाननी करणे.*

sigh /साइ/ *क्रि* १ [*अक*] दुःखाचा, सुटकेचा, दमलेपणाचा वगैरे सुस्कारा टाकणे, निःश्वास सोडणे. २ [*सक*] सुस्कारा सोडून निराशा, सुटका वगैरे व्यक्त करणे. **sigh** *ना* [*गण*] सुस्कारा, निःश्वास.

sight /साइद्/ *ना* १ [*अगण*] दृष्टी, डोळ्याची शक्ती. २ [*अगण*] पाहणे, दर्शन : *our first ~ of land, भूप्रदेशाचे आमचे प्रथम दर्शन.* ३ [*अगण*] दृष्टिपथ, नजरेचा टप्पा : *out of ~, दृष्टि(पथा) बाहेर.* ४ (क) [*गण*] दर्शनीय/प्रेक्षणीय गोष्ट किंवा दृष्टीस पडलेली गोष्ट. (ख) **sights** [*ब.व*] एखाद्या ठिकाणची प्रेक्षणीय स्थळे : *the ~s of London, लंडनमधली प्रेक्षणीय स्थळे.* ५ [*गण*] बंदुकीचा वगैरे नेम धरण्यास उपयुक्त असे साधन, बंदुकीची माशी. ६ **a sight** [*ए.व*] (*अनौप*) गचाळ, भिकार वगैरे दिसणारी गोष्ट, ध्यान. ७ (*वाक्प्र*) **at/on 'sight** एखादी गोष्ट दिसताच, दिसताक्षणी. **in 'sight** (क) दिसण्यासारखा, दिसेल असा. (ख) जवळ : *The end of the war is in ~, युद्धाची समाप्ती दृष्टिपथात आहे.* **,sight for sore 'eyes** नयनरम्य, डोळ्यांना आनंद देणारा. **sight** *क्रि* [*सक*] जवळ आल्याने दिसणे, दृष्टीस पडणे. **sighted** *वि* पाहू शकणारा, दृष्टी असणारा. **sighting** *ना* [*गण*] एखादी गोष्ट पाहू शकणे. **'sightseeing** *ना* [*अगण*] प्रेक्षणीय स्थळे पाहणे, स्थलदर्शन.

sign /साइन्/ *ना* [*गण*] १ एखाद्या गोष्टीची खूण, चिन्ह. २ सूचना, जाहिराती वगैरे लावलेला फलक. ३ एखाद्या गोष्टीच्या अस्तित्वाची खूण : *the ~s of suffering on her face, तिच्या चेहऱ्यावरील वेदनेच्या खुणा.* ४ हात, डोके वगैरे हालवून केलेली खूण. ५ (*वाक्प्र*) **a ,sign of the 'times** एखाद्या कालखंडातील प्रातिनिधिक घटना. **sign** *क्रि* १ [*अक, सक*] सही करणे, स्वाक्षरी करणे. २ (*क्रिब*) **sign sth away** कागदपत्रावर सही करून मालमत्ता वगैरे देऊन टाकणे. **sign off** (क) (पत्राच्या वगैरे) शेवटी सही करून संपवणे. (ख) प्रक्षेपण संपवणे. **sign on** बेकार म्हणून अधिकृतपणे नोंद करणे. **sign (sb) on/up** एखाद्याशी कामाबाबत करार करणे, काम करण्यास वचनबद्ध होणे/करणे.

'signpost *ना* [*गण*] रस्ते मिळतात त्या ठिकाणी दिशा दाखविणारा फलक.

signal /'सिग्नल/ *ना* [*गण*] १ सूचना किंवा संदेश देणारी खूण, प्रकाश वगैरे: *A red light is a danger ~, तांबडा दिवा ही धोक्याची खूण आहे.* २ एखाद्या गोष्टीचे कारण, उगमस्थान: *His speech was the ~ for applause, त्या पसंतीचे कारण त्याचे भाषण हे होते.* ३ आगगाडीच्या चालकाला सूचना देणारा बावटा. ४ रेडिओ-लहरींमार्फत पाठवलेला किंवा मिळालेला संदेश. **signal** *क्रि* (**-ll-**; *अमे* **-l-**) [*अक, सक*] खुणा करणे, खुणा करून संदेश पाठवणे. **'signal-box** *ना* [*गण*] रेल्वे लाईनवरची बावटा दाखवण्याची व्यवस्था असणारी इमारत.

signatory /'सिग्नट्रि; *अमे* -टॉऽरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) करारावर सह्या करणारी व्यक्ती, देश वगैरे, स्वाक्षरीकर्ता.

signature /'सिग्नच(र्)/ *ना* [*गण*] सही, स्वाक्षरी. **'signature tune** *ना* [*गण*] कलावंताची किंवा रेडिओ-कार्यक्रमाची ओळख करून देणारी छोटीशी धुन.

significance /सिग्'निफिकन्स्/ *ना* [*अगण*] अर्थ; महत्त्व. **significant** *वि* १ खास अर्थ असलेला, विशेष; महत्त्वाचा. २ अर्थगर्भ, अर्थपूर्ण: *a ~ look, अर्थपूर्ण दृष्टी.* **significantly** *क्रिवि* अर्थपूर्णतेने; महत्त्वपूर्ण रीतीने.

signify /'सिग्निफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) १ [*सक*] (क) चिन्ह असणे, खूण असणे. (ख) (स्वतःचे हेतू, दृष्टिकोन वगैरे) व्यक्त करणे, दर्शविणे. २ [*अक*] (*औप*) महत्त्वाचे असणे; किंमत असणे.

silence /'साइलन्स्/ *ना* [*अगण, गण*] १ शांतता, शांती. २ निःशब्दता, स्तब्धता, निरवता. ३ (*वाक्प्र*) **in silence** शांततेने, शांतपणे. **silence** *क्रि* [*सक*] एखाद्याला गप्प करणे/बसवणे. **silencer** *ना* [*गण*] इंजिन, बंदूक वगैरेचा आवाज कमी करण्याचे साधन, निःस्वनक, ध्वनिशामक.

silent /'साइलन्ट्/ *वि* १ अजिबात आवाज न करणारा किंवा फार कमी आवाज करणारा, शांत. २ फार थोडे बोलणारा किंवा काहीच न बोलणारा, निःशब्द किंवा अबोल. ३ (अक्षर किंवा वर्णाबाबत) अनुच्चारित. **silently** *क्रिवि* शांतपणे; आवाज न करता.

silhouette /,सिलू'एट्/ *ना* [*गण*] एखाद्या गोष्टीची फिकट पार्श्वभूमीवरील ठळक बाह्याकृती, तिमिरचित्र. **silhouette** *क्रि* [*सक*] (बहुधा कर्मणी) छायाकृती दाखवणे/दिसणे: *trees ~d against the sky, आकाशाच्या पार्श्वभूमीवर झाडांच्या दिसणाऱ्या छायाकृती.*

silicon /'सिलिकन्/ *ना* [*अगण*] गारेत वगैरे सापडणारे प्राणवायूशी मिसळलेले एक अधातुरूप मूलद्रव्य. **silicon chip** *ना* [*गण*] 'सिक' धातूचा इलेक्ट्रॉनिकचे जाळे असणारा लहान तुकडा.

silk /सिल्क्/ *ना* [*अगण*] रेशीम. **silken** *वि* रेशमासारखे मऊ आणि झुळझुळीत. **'silk-worm** *ना* [*गण*] रेशमाचा किडा. **silky** *वि* (**-ier, -iest**) रेशमासारखे मऊ आणि झुळझुळीत.

sill /सिल्/ *ना* [*गण*] खिडकीचा सपाट कट्टा किंवा पट्टी.

silly /'सिलि/ *वि* (**-ier, -iest**) अविचारी; मूर्खपणाचा, वेडेपणाचा. **silliness** *ना* [*अगण*] अविचारीपणा; वेडेपणा, मूर्खपणा.

silt /'सिल्ट्/ *ना* [*अगण*] वाहत्या पाण्याचा मागे साचलेला गाळ, रेंदा. **silt** *क्रि* (*क्रिब*) **silt (sth) up** गाळाने तुंबणे.

silver /'सिल्व्ह(र्)/ *ना* [*अगण*] १ पांढरा चकचकीत मौल्यवान धातू, चांदी, रुपे. २ चांदीची नाणी, भांडी वगैरे. ३ रुपेरी रंग. **silver** *वि* चांदीचा, रुपेरी. **,silver 'jubilee** *ना* [*गण*] एखाद्या घटनेचा पंचविसावा वर्षदिन किंवा वाढदिवस, रौप्य महोत्सव, रजत महोत्सव/जयंती. **,silver 'medal** *ना* [*गण*] स्पर्धेत दुसऱ्या क्रमांकावर येणाऱ्याला दिले जाणारे रौप्यपदक. **,silver-'plated** *वि* (चमचे, ताटं वगैरेबाबत) रुपेरी किंवा चांदीचा मुलामा असलेले. **'silversmith** *ना* [*गण*] चांदीच्या वस्तू करणारा किंवा विकणारा, रौप्यकार. **,silver 'wedding** *ना* [*गण*] लग्नाचा २५ वा वाढदिवस. **silvery** *वि* चांदीसारखा.

similar /'सिमिल(र्)/ *वि* एखाद्यासारखा दिसणारा; समान, सम. **similarly** *क्रिवि* प्रमाणे, सारखे.

similarity /,सिमि'लॅरटि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] साधर्म्य, सारखेपणा, समानता. २ [*गण*] समान गुणविशेष.

simile /'सिमिलि/ *ना* [*अगण, गण*] उपमा (देणे) उदा *as brave as a lion, सिंहासारखा शूर.*

simmer /'सिम(र्)/ *क्रि* १ [*अक, सक*] मंद उकळणे, सणसणणे. २ [*अक*] *with//* (भावना) आवरता येणे अवघड होणे, खदखदणे : *~ing with anger, रागाने खदखदणे.* ३ (*क्रिव*) **simmer down** (राग) शांत होणे, निवणे.

simple /'सिम्पल/ *वि* १ सहज समजण्यासारखा, सुगम; अवघड नसलेला, सोपा : *~ problem, सोपा प्रश्न.* २ साधा, बेताचा : *~ food, साधे अन्न.* ३ फार विकास न झालेला, गुंतागुंतीचा नसलेला : *~ forms of life, साधे जीव.* ४ खूप भाग किंवा पोटभाग नसलेला. ५ निष्कपट, ऋजू, साधासरळ : *as ~ as a child, एखाद्या बालकाप्रमाणे साधा आणि सरळ.* ६ भोळाभाबडा. ७ (*अनौप*) अल्पमती, बालबुद्धीचा. **simply** *क्रिवि* १ सहजपणे, सोप्या पद्धतीने, साधेपणाने. २ निखालस, शुद्ध. ३ फक्त : *She's simply here to help, ती फक्त मदतीसाठी इथे आलीये.*

simplicity /सिम्'प्लिसटि/ *ना* [*अगण*] १ साधेपणा, सहजता, सरळता, सोपेपणा, ऋजुता. २ (*वाक्प्र*) **be sim,plicity it'self** अगदी सोपे असणे.

simplify /'सिम्प्लिफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] सोपे करणे, सुलभ करणे. **simplification** /-फि'केइश्‌न्/ *ना* [*गण, अगण*] सुलभीकरण.

simulate /'सिम्युलेइट्/ *क्रि* [*सक*] असण्याचे किंवा वाटण्याचे सोंग आणणे, नाटक करणे : *~ interest,* (आपल्याला एखाद्या गोष्टीत) *गम्य आहे अशी बतावणी करणे.* **simulation** *ना* [*गण, अगण*] बतावणी, सोंग, नाटक.

simultaneous /,सिम्ल्'टेइनिअस; *अमे* ,साइम्-/ *वि* एकाचवेळी घडणारे किंवा केले जाणारे, एकसमयावच्छेदी. **simultaneously** *क्रिवि* एकसमयावच्छेदेकरून, त्याच वेळी.

sin /सिन्/ *ना* १ [*अगण*] देवाच्या आज्ञेचे उल्लंघन, अधर्म. २ [*गण*] पाप, अधर्माचरण, पातक. **sin** *क्रि* (**-nn-**) [*अक*] पाप करणे, अधर्माचरण करणे; वाईट गोष्ट करणे, चूक करणे. **sinful** /-फ़ुल/ *वि* धर्मनिषिद्ध, वाईट; पापी, पाताळी. **sinfulness** *ना* [*अगण*] दुराचरण, पातकीपणा. **sinner** /'सिन(र्)/ *ना* [*गण*] पापी मनुष्य.

since /सिन्स्/ *शब्दयो* (पूर्णतावाचक काळांबरोबर वापर) भूत काळातील विशिष्ट काळानंतर, तेव्हापासून : *I haven't seen him ~ Tuesday, मंगळवारपासून मी त्याला पाहिलेल नाही.* **since** *उ.अव्यय* १ -च्या काळापासून : *How long is it ~ you were here? किती काळापूर्वी तू इथं आला होतास?* २ कारण, -मुळे : *S~ I have no money, I can't buy it, माझ्याकडे पैसे नाहीत म्हणून मला ते विकत घेता येत नाही.* **since** *क्रिवि* (पूर्णतावाचक काळांबरोबर वापर) त्यानंतर आजपावेतो, त्यानंतर आजपर्यंत : *I met her last summer and haven't seen her ~, ती मला गेल्या उन्हाळ्यात भेटली होती पण त्यानंतर आजपर्यंत ती मला भेटली नाही म्हणजेच गेल्या उन्हाळ्यानंतर ती मला भेटली नाही.*

sincere /सिन्'सिअ(र्)/ *वि* १ (भावना वगैरेबाबत) खरी, अस्सल : *~ friendship, अस्सल मैत्री.* २ (माणसांबाबत) इतरांना न फसवणारा, सरळ; प्रामाणिक. **sincerely** *क्रिवि* खरोखर, मनःपूर्वक; प्रामाणिकपणे. **sincerity** /सिन्'सेरटि/ *ना* [*अगण*] खरेपणा, अस्सलपणा, मनःपूर्वकता; प्रामाणिकपणा, सरळपणा.

sinew /'सिन्यू/ *ना* [*गण, अगण*] स्नायूचे अग्र, अस्थिबंधन. **sinewy** *वि* स्नायूंनी मजबूत बांधलेला; बळकट, चिवट.

sing /सिङ्/ *क्रि* (*भूत* **sang** /सॅङ्/, *भूत वि* **sung** /सङ्/) १ [*अक, सक*] गायन करणे, गाणे; गाणे म्हणणे, गाऊन म्हणणे. २ [*अक*] गुणगुणणे. **singer** *ना* [*गण*] गायक. **singing** *ना* [*अगण*] गायन.

singe /सिन्ज्/ *क्रि* [*अक, सक*] भाजून काळे होणे/करणे, होरपळणे, धगीने काळपट होणे. **singe** *ना* [*गण*] कपड्यावरचा वगैरे जळकट डाग.

single /'सिङ्ग्ल्/ *वि* १ फक्त एक : *a ~ apple, फक्त एक सफरचंद.* २ अविवाहित, कारा. ३ एका माणसासाठीचा : *a ~ bed, एका माणसासाठी असलेला बिछाना.* ४ (*ब्रि*) (तिकिटाबाबत) एकवेळच्या प्रवासाचे, परतीचे नाही. **single** *ना* १ **singles** [*अगण*] प्रत्येक बाजूला एकेक खेळाडू असणारा खेळ, एकेरी स्पर्धा. २ [*गण*] एकवेळच्या प्रवासाचे तिकीट. ३ [*गण*] प्रत्येक बाजूला एकच छोटे संगीत असणारी ध्वनिमुद्रिका. **single** *क्रि* (*क्रिब*) **single sb/sth out** एखाद्या गटातील एकाच व्यक्तीची खास लक्ष देण्यासाठी निवड करणे. **,single 'file** *ना* [*अगण*] माणसांची, वाहनांची वगैरे एकेरी रांग. **,single-'handed** *वि, क्रिवि* एकट्याने मदतीशिवाय (केलेला), एकट्याचा. **,single-'minded** *वि* एका ध्येयावर सर्व लक्ष केंद्रित केलेला, एकाग्रचित्त. **,single 'parent** *ना* [*गण*] मुलाची काळजी घेणारी एकटी आई किंवा एकटे वडील. **singly** /'सिङ्ग्लि/ *क्रिवि* एकेक; सुटा सुटा, गटाने नाही.

singsong /'सिङ्सॉङ्/ *ना* १ [*गण*] एकत्र गाणे म्हणण्याचा सामूहिक गायन समारंभ. २ [*अे.व*] हेल काढून बोलणे.

singular /'सिङ्ग्युल(र्)/ *वि* १ (*व्याकरण*) अेकवचनी : *a ~ verb, अेकवचनी क्रियापद.* २ (*औप*) (क) लक्षणीय, अपूर्व. (ख) तऱ्हेवाईक, विक्षिप्त; विचित्र. **singular** *ना* [बहुधा *अे.व*] (शब्दाचे) अेकवचनी रूप. **singularly** *क्रिवि* (*औप*) खूप, फार, अतिशय, लक्षात राहील अशा रीतीने.

sinister /'सिनिस्ट(र्)/ *वि* अभद्र, अशुभ : *a ~ place, अशुभ स्थळ.*

sink^1 /सिङ्क्/ *ना* [*गण*] बहुधा स्वयंपाकघरात असणारे नळ असलेले आणि पाणी वाहून जाण्याची सोय असलेले भांडे, कुंडी.

sink^2 /सिङ्क्/ *क्रि* (*भूत* **sank** /सॅङ्क्/, *भूत वि* **sunk** /सङ्क्/) १ [*अक, सक*] बुडणे/बुडवणे, रुतणे/रुतवणे. २ [*अक*] (सूर्य वगैरेबाबत) क्षितिजाखाली जाणे, बुडणे. ३ [*अक, सक*] खाली बसणे, खचणे : *She sank to the ground, ती जमिनीवर (मटकन्) खाली बसली.* ४ [*अक*] किंमत, ताकद वगैरे कमी होणे, क्षीण होणे. ५ [*सक*] खणून तयार करणे : *~ a well, विहीर खोदणे.* ६ (*क्रिब*) **sink in/into** (क) (द्रवांबाबत) दुसऱ्या कशात खोल झिरपत जाणे, भिनणे, मुरणे. (ख) (शब्दांबाबत वगैरे) डोक्यात शिरणे, समजणे. **sink sth into sth** (पैसे) भांडवल म्हणून घालणे.

sinuous /'सिन्युअस्/ *वि* नागमोडी, बाकाबाकाचा.

sinus /'साइनस्/ *ना* [*गण*] नाकाच्या मागची कवटीतील खवणी, अस्थिविवर, कोटर.

sip /सिप्/ *क्रि* (**-pp-**) [*अक, सक*] घुटके घेणे. **sip** *ना* [*गण*] घुटके घेणे; घुटका, घोट.

siphon /'साइफन्/ *ना* [*गण*] १ अशा प्रकारे वाकवलेली नलिका की त्यातून द्रव आधी वर जाऊ शकते आणि मग खाली, वक्रनलिका, निनाल. २ हवेच्या दाबाने सोडावॉटर बाहेर काढण्याची बाटली. **siphon** *क्रि* (*क्रिब*) **siphon sth off/out** वक्रनलिकेने (द्रव) बाहेर काढणे. **siphon sth off** बहुधा बेकायदेशीरपणे एखादी गोष्ट दुसरीकडे पाठवणे.

sir /सऽ(र्)/ *ना* (तसेच **Sir**) १ (*औप*) (पुरुषाशी बोलताना त्याला उद्देशून वापरायचा सभ्य शब्द). २ (सरदार किंवा बॅरोनेट यासारख्या वरच्या अधिकाऱ्याच्या नावापुढे वापर).

sire /'साइअ(र्)/ *ना* [*गण*] प्राण्याचा पिता. **sire** *क्रि* [*सक*] (विशेषतः घोड्यांबाबत) -चा जनक असणे.

siren /'साइअरन्/ *ना* [*गण*] (धोक्याची सूचना वगैरे देणारा) भोंगा.

sirloin /सऽलॉइन्/ *ना* [*गण, अगण*] गाईच्या कमरेच्या मांसाचा उत्कृष्ट भाग.

sister /'सिस्ट(र्)/ *ना* [*गण*] १ बहीण, भगिनी. २ (*ब्रि*) हॉस्पिटलमधील ज्येष्ठ परिचारिका, परिसेविका. ३ धार्मिक संस्थेची स्त्री-सभासद, धर्म भगिनी. ४ (विशेषतः स्त्रीवादी

बायकांकडून वापर) स्त्री-सखी. **sisterhood** *ना* १ [*गण*] धार्मिक संघटनेत वगैरे एकत्र राहणाऱ्या भगिनींचा गट. २ [*अगण*] भगिनीभाव. **sisterly** *वि* बहिणीसारखा किंवा बहिणीचा.

sit /सिट्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **sat** /सॅट्/, **-tt-**) १ (**क**) [*अक*] (ढुंगण टेकवून) बसणे, बूड टेकवणे. (**ख**) [*अक, सक*] (एखाद्या ठिकाणी) बसणे/बसवणे : *~ (down) on the chair, खुर्चीत बसणे.* २ [*अक*] (संसद, न्यायालय वगैरेबाबत) बैठक/अधिवेशन होणे. ३ [*अक, सक*] (*for*)// (परीक्षेला) बसणे. ४ [*अक*] (*for*)// चित्रासाठी वगैरे बसणे किंवा पोझ देणे. ५ (*वाक्प्र*) **sit on the 'fence** (निर्णय न घेता) कुंपणावर बसणे. **,sit 'tight** (**क**) जागेवर बसणे, जागेवरून न हालणे. (**ख**) कोणतीही कार्यवाही न करणे, थंड असणे. ६ (*क्रिब*) **sit around** (काही न करता) स्वस्थ बसणे, गप्प बसून राहणे. **sit back** आराम करणे, विश्रांती घेणे : *~ back and watch television, आरामात बसून दूरदर्शनचा कार्यक्रम बघणे.* **sit in** निषेध म्हणून एखाद्या इमारतीचा वगैरे ताबा घेणे, ठाण मांडून बसणे. **sit in on sth** निरीक्षक म्हणून (चर्चेला वगैरे) हजर राहणे. **sit on** (**क**) (समितीचे वगैरे) सभासद असणे. (**ख**) एखाद्या गोष्टीबाबत काहीही न करणे. **sit up** उशिरापर्यंत न झोपणे/जागे राहणे. **sit (sb) up** बसून राहणे, (एखाद्याला) बसवणे. **'sit-in** *ना* [*गण*] निषेधार्थ इमारतीचा वगैरे घेतलेला ताबा, बैठा सत्याग्रह.

site /साइट्/ *ना* [*गण*] एखाद्या घटनेचे किंवा कृतीचे स्थल, जागा. **site** *क्रि* [*सक*] स्थानापन्न करणे; ठेवणे.

sitting /'सिटिङ्/ *ना* [*गण*] १ संसद, न्यायालय वगैरेच्या बैठकीचा काल. २ चित्र किंवा छायाचित्रासाठी बसणे. ३ जेवणाची पंगत. ४ (*वाक्प्र*) **,sitting 'duck** सोपे लक्ष्य/भक्ष्य. **'sitting-room** *ना* [*गण*] घरातील बैठकीची खोली.

situate /'सिट्युअेइट्; *अमे* 'सिचुअेइट्/ *क्रि* [*सक*] (बहुधा कर्मणी) ठिकाणी असणे, बसणे : *a house ~d near the church, चर्चजवळ असलेले घर.* **situated** *वि* (माणसाबाबत) विशिष्ट परिस्थितीत : *I'm badly ~d at the moment, सध्याची माझी परिस्थिती बरी नाही.*

situation /,सिचु'अेइश्न्/ *ना* [*गण*] १ विशिष्ट कालातील परिस्थिती. २ शहर, इमारत वगैरेचा परिसर. ३ (*औप*) सवेतन, नोकरी.

six /सिक्स्/ *सना, वि, ना* [*गण*] १ ६, सहा. २ (*वाक्प्र*) **at sixes and sevens** (*अनौप*) गोंधळात, अस्ताव्यस्त. **sixth** /सिक्स्थ्/ *सना, वि* ६ वा, सहावा. **sixth** *सना, ना* [*गण*] $\frac{१}{६}$, एक षष्ठांश.

sixteen /सिक्'स्टीन्/ *सना, वि, ना* [*गण*] १६, सोळा. **sixteenth** /सिक्'स्टीन्थ्/ *सना, वि* १६ वा, सोळावा. **sixteenth** *सना, ना* [*गण*] $\frac{१}{१६}$, एक सोळांश.

sixty /'सिक्स्टि/ *सना, वि, ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) ६०, साठ. **sixtieth** /'सिक्स्टिअथ्/ *सना, वि* ६० वा, साठावा. **sixtieth** *सना, ना* [*गण*] $\frac{१}{६०}$, एक साठांश.

size /साइझ्/ *ना* १ [*अगण, गण*] आकार, आकारमान. २ [*गण*] कापडाचे मोजण्याचे प्रमाण, कपड्याचे माप : *~ five shoes, पाच नंबरचे/आकाराचे बूट.* **size** *क्रि* १ [*सक*] आकारानुसार लावणे. २ (*क्रिब*) **size sb/sth up** (*अनौप*) एखाद्या गोष्टीबाबत/व्यक्तीबाबत मत बनवणे. **sizeable** /-अब्ल्/ *वि* बराच मोठा.

sizzle /सिझ्ल्/ *क्रि* [*अक*] *ना* [*गण*] (*अनौप*) तेलावर परतताना चरचरणे.

skate /स्केइट्/ *ना* [*गण*] १ बर्फावरून घसरण्यासाठी तळाला स्टीलची पट्टी लावलेला बूट. २ चाकाचा बूट. ३ (*वाक्प्र*) **get/put one's 'skates on** (*अनौप*) घाई करणे, पायाला भिंगरी लावणे. **skate** *क्रि* १ [*अक*] स्केटने घसरणे/सरकणे. २ (*वाक्प्र*) **be skating on thin 'ice** एखादी धोकादायक गोष्ट करणे. ३ (*क्रिब*) **skate over/round sth** एखाद्या गोष्टीचा प्रत्यक्ष समाचार न घेणे, टाळणे. **'skateboard** *ना* [*गण*] गमतीकरता उभे राहण्यासाठी किंवा चालविण्यासाठी केलेली चाकं असलेंली छोटी अरुंद फळी. **skater** *ना* [*गण*] स्केटिंग करणारा – विशेषतः स्पर्धेमधे.

skeleton /'स्केलिट्न्/ *ना* [*गण*] १ हाडांचा

सापळा, अस्थिपंजर, सांगाडा. २ इमारतीचा वगैरे सांगाडा. ३ योजनेचा वगैरे आराखडा. ४ एखाद्या कामासाठी वगैरे लागणारा अगदी कमीत कमी सेवकवर्ग, किमान सेवकवर्ग : *a ~ staff, किमान सेवकवर्ग.* ५ (*वाक्प्र*) **skeleton in the 'cupboard** लाज वाटावी अशी गुप्त गोष्ट. **'skeleton key** *ना* [*गण*] वेगवेगळी कुलुपे उघडणारी किल्ली, मास्टर की.

sketch /स्केच्/ *ना* [*गण*] १ घाईने केलेले कच्चे आरेखन. २ छोटे वर्णन, स्थूलवर्णन. ३ लहान विनोदी नाटक, प्रहसन. **sketch** *क्रि* १ [*अक, सक*] कच्चे रेखाटन करणे. २ (*क्रिब*) **sketch sth out** एखाद्या गोष्टीचा कच्चा आराखडा/मसुदा देणे. **sketchy** *वि* **(-ier, -iest)** संपूर्ण बारकाव्यानिशी न केलेला, अर्धवट; ढोबळ.

skewer /'स्क्यूअ(र्)/ *ना* [*गण*] मांस शिजवताना वापरायची अणकुचीदार अडकणी किंवा सळई. **skewer** *क्रि* [*सक*] अडकणीने टोचणे.

ski /स्की/ *ना* [*गण*] बर्फावरून सरकण्यासाठी खास बुटांना लावलेली लाकडाची वगैरे अरुंद फळी, घसरजोडा. **ski** *क्रि* (*भूत, भूत वि* **skied**, *वर्त वि* **~ing**) [*अक*] अशा बुटांवरून सरकणे : *go ~ing, बर्फावरून घसरत जाणे.* **skier** *ना* [*गण*] पट्टीचे बूट घालून बर्फावरून घसरणारा माणूस.

skid /स्किड्/ *ना* [*गण*] बर्फावरून गाडी वगैरे बाजूला घसरणे किंवा लडबडणे. **skid** *क्रि* **(-dd-)** [*अक*] (गाडी वगैरे) बाजूला घसरणे.

skies SKY चे *ब.व.*

skilful (*अमे* **skillful**) /'स्किलफ्ल/ *वि* कुशल, कसबी : *a ~ player, कुशल खेळाडू.* **skilfully** *क्रिवि* कुशलतेने, शिताफीने, हिकमतीने.

skill /स्किल्/ *ना* [*गण, अगण*] एखादी गोष्ट चांगली करण्याची क्षमता, कौशल्य, कसब, सफाई. **skilled** *वि* १ कुशल किंवा कुशलतेने करण्याचा : *a ~ed job, कौशल्याने करण्याचे काम.* २ अनुभवी; प्रशिक्षित : *~ed workers, अनुभवी कामगार.*

skim /स्किम्/ *क्रि* **(-mm-)** १ [*सक*] (द्रवाच्या) पृष्ठभागावर साचलेले काही काढणे, (तवंग वगैरे) बाजूला करणे. २ [*अक, सक*] (पृष्ठभागावरून) अलगदपणे जाणे, स्पर्श न करता जाणे. ३ [*अक, सक*] (*through*)// एखादी गोष्ट पटकन् वाचणे, वरवर चाळणे.

skin /स्किन्/ *ना* १ [*अगण*] माणसाच्या किंवा प्राण्याच्या शरीराची त्वचा, कातडे. २ [*गण, अगण*] प्राण्याच्या शरीराचे सोललेले चामडे. ३ [*गण, अगण*] फळाचे साल. ४ [*गण, अगण*] काही द्रवांच्या पृष्ठभागावरचा थर, जशी उकळलेल्या दुधावरची साय. ५ (*वाक्प्र*) **by the ,skin of one's 'teeth** थोडक्यात, कसाबसा. **get under sb's 'skin** (*अनौप*) (क) एखाद्याला त्रास देणे. (ख) एखाद्याला आकर्षित करणे. **be no skin off sb's nose** (*अनौप*) एखाद्याला काही किंमत नसणे. **be skin and 'bone(s)** (*अनौप*) अगदी काटकुळे असणे, हाडे आणि कातडी उरणे. **skin** *क्रि* [*सक*] **(-nn-)** साल काढणे, चामडी काढणे. **,skin-'deep** *वि* (सौंदर्य, भावना वगैरेबाबत) फार खोलवर नसलेला, वरवरचा. **'skinflint** *ना* [*गण*] चिक्कू माणूस. **'skinhead** *ना* [*गण*] बारीक केस कापलेला तापट तरुण माणूस. **,skin-'tight** *वि* (कपड्यांबाबत) तंग, अंगाला घट्ट बसणारे. **skinny** *वि* **(-ier, -iest)** लुकडा, रोड.

skint /स्किन्ट्/ *वि* (*ब्रि अनौप*) काहीच पैसे नसलेला, कफल्लक.

skip^1 /स्किप्/ *क्रि* **(-pp-)** १ [*अक*] हळूच आणि पटकन् उडी मारणे. २ [*अक*] दोरीवरच्या उड्या मारणे. ३ [*अक, सक*] हळूच निसटणे/सटकणे : *~ the country, देशातून हळूच सटकणे.* ४ [*अक*] चटचट हालचाल करणे, बागडणे, हुंदडणे. ५ [*सक*] वगळणे, गाळणे : *~ part of the book, पुस्तकाचा काही भाग गाळणे.* ६ [*सक*] (सभेला वगैरे) हजर न राहणे, बुट्टी मारणे, दांडी मारणे. **skip** *ना* [*गण*] बागडणे.

skip^2 /स्किप्/ *ना* [*गण*] कचरा वगैरे टाकायचा मोठा धातूचा डबा.

skipper /'स्किप(र्)/ *ना* [*गण*] बोटीचा किंवा संघाचा कप्तान. **skipper** *क्रि* [*अक, सक*] कप्तानाचे कार्य करणे.

skirt /स्कऽट्/ *ना* [*गण*] कमरेखाली नेसायचे

स्त्रियांचे एक बाह्य वस्त्र. **skirt** *क्रि* १ [*सक*] कडेने असणे किंवा जाणे : *a wood ~ing the field, शेताभोवती असणारे जंगल.* २ [*सक*] (विषय वगैरे) टाळणे, बगल देणे. **'skirting-board** *ना* [*अगण*] जमिनीपासून वर भिंतीला ठोकलेली पट्टी.

skittles /'स्किट्ल्झ्/ *ना* [*अगण*] बाटलीच्या आकाराच्या लाकडी ठोकळ्यांकडे चेंडू मारून खेळायचा एक खेळ.

skulk /स्कल्क्/ *क्रि* [*अक*] लपणे किंवा कोणाला दिसणार नाही अशी हालचाल करणे, लपतछपत जाणे.

skull /स्कल्/ *ना* [*गण*] कवटी.

skunk /स्कङ्क्/ *ना* [*गण*] हल्ला केला असता तीव्र वास सोडणारा उत्तर अमेरिकेतील एक छोटा प्राणी.

sky /स्काइ/ *ना* [*अगण, गण,* बहुधा *अ.व*] (*ब.व* **skies** /स्काइझ्/) आकाश. **,sky-'high** *वि* (*अनौप*) खूप उंच, गगनचुंबी. **'skylark** *ना* [*गण*] आकाशात उंच उडताना गाणारा पक्षी, चंडोल, भारद्वाज. **'skylight** *ना* [*गण*] उतरत्या छपरातील खिडकी, साणे, झारे. **'skyline** *ना* [*गण,* बहुधा *अ.व*] इमारती, टेकड्या वगैरेची आकाशाच्या पार्श्वभूमीवर दिसणारी आकृती, क्षितिजरेषा. **'skyscraper** *ना* [*गण*] गगनचुंबी इमारत.

slab /स्लॅब्/ *ना* [*गण*] आडवी जाड दगड वगैरेची पट्टी, लादी.

slack^{1} /स्लॅक्/ *वि* १ सैल, ढिला : *a ~ rope, सैल दोर.* २ कामाकडे दुर्लक्ष करणारा, कामात शिथिल. ३ मंद : *Trade is ~, धंदा मंदीत आहे.* **slack** *क्रि* [*अक*] १ कामात ढिले असणे, आळसावणे. २ (*क्रिब*) **slack off/up** काम किंवा वेग मंद होणे/करणे. **slackness** *ना* [*अगण*] ढिलेपणा; शैथिल्य, मंदपणा.

slack^{2} /स्लॅक्/ **the slack** *ना* [*अगण*] १ दोरीचा ढिला भाग. २ (*वाक्प्र*) **take up the slack** दोर वगैरे घट्ट करणे, आवळणे.

slacken /'स्लॅकन्/ *क्रि* [*अक, सक*] १ सैल होणे/करणे/सोडणे. २ (*off/up*)// मंदावणे, कमी होणे/करणे.

slag /स्लॅग्/ *ना* १ [*अगण*] खाणीतील कच्चा धातूमधून धातू काढल्यानंतर उरणारा गाळ, मळी, खंगर. २ [*गण*] (*ब्रि अधिक्षेपी व्रात्य*) छचोर स्त्री. **slag** *क्रि* (**-gg-**) (*क्रिब*) **slag sb off** (*ब्रि व्रात्य*) एखाद्याविषयी वाईट बोलणे, एखाद्याला शिव्या घालणे. **'slag-heap** *ना* [*गण*] मळीचा ढीग.

slam /स्लॅम्/ *क्रि* (**-mm-**) १ [*अक, सक*] जोराने बंद करणे, धाडकन् बंद करणे. २ [*गण*] भिरकावणे; आदळणे, आपटणे : *~ a book against the wall, भिंतीवर पुस्तक भिरकावणे.* ३ [*सक*] (*अनौप*) टीका करणे. **slam** *ना* [*गण*] धाड् असा आवाज, आपटल्याचा आवाज.

slander /'स्लान्ड(र्)/ *ना* [*अगण, गण*] एखाद्याची निंदानालस्ती, कुटाळकी, खोटा आरोप (किंवा तसे करण्याचा अपराध). **slander** *क्रि* [*सक*] एखाद्याची निंदानालस्ती करणे, एखाद्यावर चिखलफेक करणे. **slanderous** *वि* निंदानालस्तीयुक्त, कुटाळकीचा.

slang /स्लॅङ्/ *ना* [*अगण*] फक्त अनौपचारिक बोलण्यात वापरायचे असे काही शब्द, व्रात्य प्रयोग. **slang** *क्रि* [*सक*] रागाचे किंवा अरेरावीचे शब्द वापरून एखाद्यावर टीका करणे.

slant /स्लान्ट्/ *क्रि* १ [*अक, सक*] एखाद्या दिशेला कलणे/कलता करणे; उतरता किंवा ढळता असणे/करणे. २ [*सक*] (अनेकदा *अधिक्षेपी*) विशिष्ट दृष्टिकोनातून (एखादी माहिती) देणे, डूब देणे, तिरकसपणे सांगणे. **slant** *ना* [*गण*] १ ढाळ, उतार. २ (*अनौप*) दृष्टिकोन.

slap /स्लॅप्/ *क्रि* (**-pp-**) [*सक*] १ चपराक मारणे, धपाटा घालणे, मुस्काडीत वगैरे मारणे, चटकाणी देणे. २ सप्प् आवाज करून देणे/ठेवणे : *~ paint onto the wall, भिंतीला सप्पकन् रंग फासणे.* **slap** *ना* [*गण*] १ चपराक, धपाटा, चटकाणी. २ (*वाक्प्र*) **a slap in the 'face** अपमान; दटावणी. **slap** (तसेच **,slap-'bang**) *क्रिवि* (*अनौप*) सरळ : *The car ran ~ into the wall, मोटार सरळ भिंतीवर गेली.*

slapdash /'स्लॅप्डॅश्/ *वि, क्रिवि* निष्काळजीपणे (केलेले काम किंवा काम करणारा).

slapstick /'स्लॅप्स्टिक्/ *ना* [*अगण*] ज्या नाटकात पात्रे धडपडतात, एकमेकांवर आदळतात वगैरे अशी सुखात्मिका.

slap-up /'स्लॅपप्/ *वि* (*ब्रि अनौप*) (जेवणाबाबत) उत्कृष्ट.

slash /स्लॅश्/ *क्रि* [*सक*] १ सपासप कापणे, कचाकच वार करणे. २ (*अनौप*) खूप कमी करणे, मोठी कपात करणे, कात्री लावणे : ~ *prices, किंमतीत कपात करणे.* **slash** *ना* [*गण*] १ सपासप कापणे. २ मोठा वार, घाव.

slat /स्लॅट्/ *ना* [*गण*] धातूची, लाकडाची वगैरे पातळ पट्टी.

slate /स्लेइट्/ *ना* १ [*अगण*] पातळ स्तरांमधे सहज मोडता येणारा निळसर करडा दगड, पाटीचा दगड. २ [*गण*] छपरासाठी वापरायचा अशा दगडाचा तुकडा. ३ [*गण*] लिहायची पाटी. **slate** *क्रि* [*सक*] (*अनौप*) कडक टीका करणे.

slaughter /'स्लॉऽट(र्)/ *ना* [*अगण*] १ विशेषतः खाण्यासाठी म्हणून केलेली जनावरांची कत्तल, कापाकापी. २ अनेक माणसांची एकावेळी केलेली हत्त्या, संहार. **slaughter** *क्रि* [*सक*] १ पशुहत्त्या करणे, माणसे कापणे. २ (*अनौप*) पूर्ण पाडाव करणे, पुरे चीत करणे. **'slaughterhouse** *ना* [*गण*] कत्तलखाना, खाटिकखाना.

slave /स्लेइव्ह्/ *ना* [*गण*] १ दुसऱ्याच्या मालकीचा, त्याच्यांकरता काम करायला लागणारा माणूस, गुलाम, दास. २ व्यसनासक्त माणूस : *a ~ to drink, मद्यपानकच्छपी.* **slave** *क्रि* [*अक*] कष्ट करणे : ~ *away in the kitchen, स्वयंपाकघरात कष्ट करणे.* **slavery** *ना* [*अगण*] १ गुलामगिरी, दास्य. २ गुलामगिरीची पद्धत.

slaver /'स्लॅव्ह(र्)/ *क्रि* [*अक*] (*over*)// १ तोंडातून लाळ गळणे. २ (बहुधा *अधिक्षेपी*) हाव धरणे.

slavish /'स्लेइव्हिश्/ *वि* (*अधिक्षेपी*) स्वतंत्रपणाचा किंवा नाविन्याचा अभाव असलेला, परावलंबी, लाचार : *a ~ copy, आंधळे अनुकरण* किंवा *निव्वळ नक्कल.* **slavishly** *क्रिवि* परावलंबित्वाने, नाविन्यशून्यतेने, केवळ नक्कल म्हणून.

slay /स्लेइ/ *क्रि* (*भूत* **slew** /स्लू/, *भूत वि* **slain** /स्लेइन्/) [*सक*] (*औप* किंवा *अमे*) जिवे मारणे, ठार मारणे.

sledge /स्लेज् (तसेच **sled** /स्लेड्/) *ना* [*गण*] बर्फावरून ओढायचे खाली धातूच्या किंवा लाकडी पट्ट्या असलेले वाहन, घसरगाडी, हिमशकट.

sledge hammer /'स्लेज् हॅम(र्)/ *ना* [*गण*] लांब दांड्याचा जड हातोडा, घण.

sleek /स्लीक्/ *वि* १ मऊ आणि चमकणारे किंवा तुकतुकीत : ~ *hair, मुलायम तुकतुकीत केस.* २ (अनेकदा *अधिक्षेपी*) तुस्त, थुलथुलीत, गबदुल.

sleep^{1} /स्लीप्/ *ना* १ [*अगण*] निद्रा, झोप. २ [*अ.व*] निद्राकाल. २ (*वाक्प्र*) **,go to 'sleep** झोप येणे, झोपी जाणे. **put to 'sleep** (क) भूल देणारे औषध वापरून एखाद्याला झोपवणे, झोप आणणे. (ख) आजारी असल्यामुळे वगैरे (जनावराला) मारणे. **sleepless** *वि* झोपेविना, निद्राहीन.

sleep^{2} /स्लीप्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **slept** /स्लेप्ट्/) १ [*अक*] झोपणे, निद्रा घेणे. २ [*सक*] झोपण्याची पुरेशी जागा असणे, शयनसुविधा असणे : *a flat that ~s six, सहा माणसं झोपू शकतील असा फ्लॅट.* ३ (*वाक्प्र*) **sleep like a 'log/'top** (*अनौप*) छान झोप येणे, शांत झोप होणे. **sleep 'tight** (*अनौप*) (एखाद्याला 'गुड नाईट' करताना वापरायचे शब्द). ४ (*क्रिव*) **sleep around** अनेक व्यक्तींशी लैंगिक संबंध असणे, अनेकांबरोबर झोपणे. **sleep in** बऱ्याच उशिरापर्यंत झोपून राहणे म्हणजेच उशिरा उठणे. **sleep sth off** झोपल्याने (नशेतून वगैरे) बाहेर येणे. **sleep on sth** प्रश्न वगैरे पुढच्या दिवसावर ढकलणे, निर्णय उद्यावर ढकलणे. **sleep through sth** (आवाजाने) जागे न होणे. **sleep with sb** एखाद्याशी संभोग करणे. **sleeper** *ना* [*गण*] १ झोपणारा माणूस. २ रेल्वे रुळाखालची आधाराची लाकडी वगैरे पट्टी, तळपाट. ३ शयनयान (किंवा त्यातील शायिका). **'sleeping-bag** *ना* [*गण*] शरीर आत घालून झोपायची उबदार पिशवी. **'sleeping-car** *ना* [*गण*] आगगाडीचे शयनयान. **'sleeping-pill** *ना* [*गण*] झोपेची गोळी.

sleepy *वि* **(-ier, -iest)** १ झोपेला आलेला. २ (जागा वगैरेबाबत) फारसे काही न घडणारी, निद्रिस्त : *a ~ little town, थंडे नगर.* **sleepily** *क्रिवि* झोपाळूपणे.

sleet /स्लीट्/ *ना* [*अगण*] बर्फयुक्त पाऊस. **sleet** *क्रि* (*it* सह वापर) बर्फयुक्त पाऊस पडणे : *It's ~ing outside, बाहेर बर्फयुक्त पाऊस पडतोय.*

sleeve /स्लीव्ह्/ *ना* [*गण*] १ कपड्याची बाही. २ ध्वनिमुद्रिकेचे कडक आवरण किंवा घर. ३ (*वाक्प्र*) **have sth up one's sleeve** गुप्त योजना, बेत वगैरे असणे.

sleigh /स्लेइ/ *ना* [*गण*] खास करून घोड्याने ओढायची बर्फावरील घसरगाडी.

sleight /स्लाइट्/ *ना* (*वाक्प्र*) **,sleight of 'hand** हातचलाखी.

slender /'स्लेन्ड(र्)/ *वि* १ लांब पण अरुंद, शेकाट्यासारखा. २ (माणसाबाबत) शेलाटा, कृश. ३ अल्प, बेताचा : *have a ~ chance, कमी शक्यता असणे.* **slenderness** *ना* [*अगण*] लांब आणि अरुंदपणा, शेलाटे; अल्पता.

slept SLEEP^{2} चा *भूत, भूत वि.*

slice /स्लाइस्/ *ना* [*गण*] १ खास करून पाव किंवा मांस यांचा एक पातळ सपाट तुकडा, काप. २ (*अनौप*) भाग किंवा वाटा : *a ~ of the credit, श्रेयाचा वाटा.* ३ शिजवलेला मासा वगैरेचा काप करून उचलायचे एक रुंद पाते असलेले साधन. ४ (*वाक्प्र*) **a ,slice of 'life** कादंबरीतील वगैरे जीवनाचे वास्तव चित्रण. **slice** *क्रि* १ [*सक*] (*up*)// तुकडे किंवा काप करणे. २ [*अक*] *into/through*// कापणे : *a knife slicing through butter, लोणी कापणारी सुरी.*

slick /स्लिक्/ *वि* १ गुळगुळीत आणि घसरडा. २ (फार) सफाईदारपणे केलेला. ३ (बहुधा *अधिक्षेपी*) (माणसांबाबत) सफाईदारपणे करणारा.

slide^{1} /स्लाइड्/ *ना* १ [*अ.व*] सरकणे, सरकवणे, घसरण. २ [*गण*] घसरण, घसरगुंडी. ३ [*गण*] पडद्यावर दाखवायचे छायाचित्रणाच्या फितीवरील छायाचित्र, पारदर्शिका, सरकचित्र. ४ [*गण*] सूक्ष्मदर्शक यंत्रातून पाहण्यासाठी वस्तू ठेवायची काचेची पट्टी.

slide^{2} /स्लाइड्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **slid** /स्लिड्/) [*अक, सक*] १ गुळगुळीत पृष्ठभागावरून अलगद सरकणे किंवा सरकवणे, घसरणे, घरंगळणे. २ हळूच किंवा कोणाच्या लक्षात येणार नाही अशी हालचाल करणे. ३ (*वाक्प्र*) **let sth 'slide** एखाद्या गोष्टीकडे दुर्लक्ष करणे. **'slide-rule** *ना* [*गण*] खाचेतील पट्टी सरकवून मोजमाप करण्याचे साधन, विसर्पीगणक, सरकपट्टी.

slight^{1} /स्लाइट्/ *वि* १ गंभीर किंवा महत्त्वाचा नाही असा, किरकोळ : *a ~ headache, किरकोळ डोकेदुखी.* २ बारीक; सडपातळ. ३ (*वाक्प्र*) **not in the 'slightest** मुळीच नाही, अजिबात नाही. **slightly** *क्रिवि* १ किंचित्, अल्पप्रमाणात, थोडासा : *feel ~ly better, थोडेसे बरे वाटणे.* २ बारीक : *a ~ly built boy, लहान चणीचा मुलगा.* **slightness** *ना* [*अगण*] क्षुल्लकपणा; शेलाटेपणा, कृशता.

slight^{2} /स्लाइट्/ *क्रि* [*सक*] अवमान करणे, अवहेलना करणे, तुच्छ लेखणे. **slight** *ना* [*गण*] अवहेलना, अवमान, उपमर्द. **slightingly** *क्रिवि* अवहेलना करून, तुच्छतेने.

slim /स्लिम्/ *वि* **(-mer, -mest)** १ (*पसंती*) जाड नसलेला, सडपातळ; शिडशिडीत बांध्याचा, शेलाटा. २ कमी, अल्प : *a ~ chance of success, यशाची अत्यल्प शक्यता.* **slim** *क्रि* **(-mm-)** [*अक*] वजन कमी करण्यास कमी खाणे, वगैरे. **slimmer** *ना* [*गण*] वजन कमी करण्यास मित आहार घेणारा. **slimness** *ना* [*अगण*] सडपातळपणा, शेलाटेपणा.

slime /स्लाइम्/ *ना* [*अगण*] १ मऊ चिकट दाट पदार्थ. २ गोगलगाय वगैरे प्राण्यांच्या अंगातून स्रवणारा एक चिकट पदार्थ, श्लेष्मा. **slimy** *वि* **(-ier, -iest)** १ मऊ चिकट चिकासारखा, गिळगिळीत. २ (*अनौप*) आपलेपणाचा आव आणणारा, वरपांगी प्रेमळ वगैरे : *a ~ young man, मैत्रीचा आव आणणारा तरुण.*

sling /स्लिङ्/ *ना* [*गण*] मोडलेल्या हाताला

वगैरे आधारासाठी बांधलेली झोळी. **sling** *क्रि* (*भूत, भूत वि* **slung** /स्लैङ्/) [*सक*] (*अनौप*) जोराने फेकणे, भिरकावणे: *We slung him out of the bar, आम्ही त्याला पानगृहाच्या बाहेर उचलून फेकले.*

slink /स्लिङ्क्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **slunk** /स्लैङ्क्/) [*अक*] चोरटेपणाने वावरणे, नजर चुकवून जाणे.

slip¹ /स्लिप्/ *ना* १ [*गण*] घसरण, घसरगुंडी; चुकीची चाल. २ [*गण*] किरकोळ चूक. ३ [*गण*] आतून घालायचा स्त्रियांचा एक बिनबाह्यांचा कपडा. ४ = PILLOWCASE (☞ PILLOW). ५ [*गण*] कागदाचा चिटोरा. ७ (*वाक्प्र*) **give sb the 'slip** (*अनौप*) एखाद्याच्या तावडीतून सुटणे, हातावर तुरी देणे. **a 'slip of a boy, girl etc** लहान चणीचा मुलगा, मुलगी वगैरे.

slip² /स्लिप्/ *क्रि* **(-pp-)** १ [*अक*] अचानकपणे घसरून (जवळजवळ) पडणे, आपटी खाणे: *He ~ped (over) in the mud, तो चिखलात घसरून पडला.* २ [*अक, सक*] हळूच आणि पटकन् कोणाला दिसणार नाही असे सरकणे/सरकवणे: *He ~ped the coin into his pocket, त्याने खिशात ते नाणे हळूच सरकवले.* ३ [*अक*] हातातून निसटणे, पडणे वगैरे: *The plate ~ped from my hand, माझ्या हातातून डिश निसटली.* ४ [*अक, सक*] पटकन् अंगात घालणे: *~ on a coat, पटकन् कोट चढवणे.* ५ (*वाक्प्र*) **let sth slip** (क) (संधी वगैरे) न वापरणे, हातची जाऊ देणे. (ख) (रहस्य वगैरे) अनवधानाने उघड करणे, तोंडातून जाणे. **slip one's 'memory/'mind** (एखाद्याचे नाव वगैरे) विसरणे, न आठवणे. ६ (*क्रिब*) **slip up** (*अनौप*) चूक करणे. **'slip-road** *ना* [*गण*] मोटाररस्ता सोडण्याचा किंवा त्याला मिळण्याचा मार्ग. **'slip-stream** *ना* [*गण*] विमानाच्या इंजिनातून बाहेर पडणाऱ्या हवेचा पट्टा. **'slip-up** *ना* [*गण*] (*अनौप*) चूक.

slipper /'स्लिप(र्)/ *ना* [*गण*] घरात वापरायचा सैलसर मऊ बूट.

slippery /'स्लिपरि/ *वि* **(-ier, -iest)** १ (पृष्ठभागाबाबत) गुळगुळीत, ओला, धरायला कठीण किंवा न घसरता चालता येणार नाही असा, घसरडा. २ (*अनौप*) (माणसांबाबत) न विसंबण्यासारखा, बिनभरवशाचा. ३ (*अनौप*) (प्रश्न वगैरेबाबत) अवघड, जटिल. ४ (*वाक्प्र*) **the slippery 'slope** (*अनौप*) सरळ संकटाकडे नेणारा मार्ग.

slipshod /'स्लिप्शॉड्/ *वि* नीट न केलेला किंवा काळजीपूर्वक काम न करणारा, गबाळा, गचाळ; निष्काळजी.

slit /स्लिट्/ *ना* [*गण*] लांब, अरुंद चीर, भेग. **slit** *क्रि* (**-tt-** *भूत, भूत वि* ~) [*सक*] चीर पडणे/पाडणे, भेग पडणे/पाडणे, कापणे.

slither /'स्लिद(र्)/ *क्रि* [*अक*] लटपटत चालणे.

sliver /'स्लिव्ह(र्)/ *ना* [*गण*] एखाद्या वस्तूचा लांब, पातळ तुकडा, ताव, फाळा: *a ~ of glass, काचेचा ताव.*

slob /स्लॉब्/ *ना* [*गण*] (*अनौप अधिक्षेपी*) घाणेरडा, गबाळ्या, आळशी माणूस.

slog /स्लॉग्/ *क्रि* **(-gg-)** [*अक*] (*अनौप*) १ कष्ट करणे, मेहनत घेणे: *~ (away) at sth, एखाद्या गोष्टीवर मेहनत घेणे.* २ कसेबसे चालणे, कष्टाने पावले टाकणे: *~ up the hill, टेकडीवर कष्टाने चढणे.* **slog** *ना* [*ए.व, अगण*] (*अनौप*) कष्टाचा काळ; कष्टाचे काम.

slogan /'स्लउगन्/ *ना* [*गण*] जाहिरातीत वापरायची लक्षात राहील अशी उक्ती, घोषवाक्य.

slop /स्लॉप्/ *क्रि* **(-pp-)** १ [*अक*] (द्रवांबाबत) भांडे भरून वाहणे, बाहेर सांडणे. २ [*सक*] सांडणे: *Don't ~ the water all over the floor! जमिनीवर सगळीकडे पाणी सांडू नकोस.* ३ (*क्रिब*) **slop about/around** (द्रवांबाबत) उडवणे, डुचमळवणे – विशेषतः भांड्यामधे. **slop** *ना* **slops** मैलापाणी.

slope /स्लउप्/ *ना* १ [*गण, अगण*] उतरती रेषा. २ [*गण*] जमिनीचा चढ किंवा उतार. **slope** *क्रि* १ [*अक*] उतार/चढ असणे. २ (*क्रिब*) **slope off** (*ब्रि व्रात्य*) (खास करून काम टाळण्यास) दूर जाणे.

sloppy /'स्लॉपि/ *वि* **(-ier, -iest)** १ निष्काळजीपणे केलेले किंवा केले जाणारे, गचाळ: *~ work, गचाळ काम.* २ (*अनौप*)

फार भावुक किंवा भावविवश : *a ~ love story, अति भावुक प्रेमकथा.* ३ (कपड्यांबाबत) नीट न बसणारे, ढगळ. ४ ओला आणि घाणेरडा, भिजून खराब झालेला. **sloppiness** *ना* [*अगण*] गचाळपणा; गबाळेपणा; ढगळपणा. **sloppily** *क्रिवि* गचाळपणे; ढगळपणे.

slosh /स्लॉश्/ *क्रि* १ [*अक, सक*] सांडणे, उडवणे : *~ water all over the floor, जमिनीवर सगळीकडे पाणी सांडून ठेवणे.* २ [*सक*] (*व्रात्य*) मारणे. **sloshed** *वि* (*व्रात्य*) प्यालेला.

slot /स्लॉट्/ *ना* [*गण*] १ अरुंद फट, भोक : *put a coin in the ~, फटीत नाणे टाकणे.* २ खाच, खोबण. ३ (*अनौप*) एखादी योजना, वेळापत्रक वगैरेतील योग्य किंवा अनुरूप जागा : *~s for advertisements on television, दूरदर्शनच्या कार्यक्रमांतील जाहिरातींची जागा.* **slot** *क्रि* **(-tt-)** [*सक*] जागा ठेवणे किंवा जागा देणे; भोकातून आत घालणे/टाकणे.

sloth /स्लउथ्/ *ना* १ [*अगण*] आळस, सुस्ती. २ [*गण*] झाडात राहणारा आणि अत्यंत धिमेपणाने हालचाल करणारा दक्षिण अमेरिकेतील एक प्राणी. **slothful** *वि* आळशी, सुस्त.

slouch /स्लाउच्/ *क्रि* [*अक*] आळसटल्याप्रमाणे उभे राहणे, बसणे किंवा हालचाल करणे, खांदे पाडून किंवा वाकून चालणे/बसणे. **slouch** *ना* १ [*ए.व*] पुढे वाकलेली अवस्था. २ (*वाक्प्र*) **be no slouch at sth** एखाद्या गोष्टीत पटाईत असणे.

slovenly /'स्लैव्ह्न्लि/ *वि* गबाळा; गलथान. **slovenliness** *ना* [*अगण*] गबाळेपणा, अव्यवस्थितपणा, भोंगळपणा; गलथानपणा.

slow^{1} /स्लउ/ *वि* १ वेळ खाणारा; मंद, हळू : *a ~ vehicle, सावकाश जाणारे वाहन.* २ मंद बुद्धीचा, मद्दड : *a ~ child, मंदबुद्धीचे मूल.* ३ तात्काळ कृती न करणारा, ढिला. ४ मनोरंजक नसलेला किंवा रसरशीत नसलेला, कंटाळवाणा : *a very ~ film, खूप रटाळ चित्रपट.* ५ (घड्याळाबाबत) मागे पडलेले/असलेले. ६ (*वाक्प्र*) **be slow off the mark** ⇨ MARK^{1}. **slow on the uptake** ⇨ UPTAKE. **'slowcoach** *ना* [*गण*] (*अनौप*) हळूहळू काम करणारा माणूस, मेंगळट माणूस. **slowly** *क्रिवि* हळूहळू, सावकाश, मंद गतीने. **slowness** *ना* [*अगण*] मंदपणा, संथपणा, ढिलेपणा; रटाळपणा.

slow^{2} /स्लउ/ *क्रिवि* १ सावकाश, हळूहळू : *~-moving, सावकाश सरकणारा.* २ (*वाक्प्र*) **go 'slow** (कामगारांबाबत) निषेधार्थ संथपणे काम करणे.

slow^{3} /स्लउ/ *क्रि* [*अक, सक*] (*down/up*)// कामाचा, चालण्याचा वगैरे वेग कमी करणे, सावकाश जाणे. **'slow-down** *ना* [*गण*] वेग, काम वगैरेतील कपात, मंदावणे.

sludge /स्लैज्/ *ना* [*अगण*] चिकणमाती (किंवा त्यासारखे काही).

slug^{1} /स्लैग्/ *ना* [*गण*] गोगलगाईसारखा पण शिंपला नसलेला एक प्राणी.

slug^{2} /स्लैग्/ *क्रि* **(-gg-)** [*सक*] (*अमे अनौप*) गुद्दा घालणे, तडाखा मारणे.

slug^{3} /स्लैग्/ *ना* [*गण*] (विशेषतः *अमे*) बंदुकीची गोळी.

sluggish /स्लैगिश्/ *वि* हळूहळू काम करणारा, सुस्त, थंड. **s'uggishly** *क्रिवि* सुस्तपणे, मंदपणे.

sluice /स्लूस्/ *ना* [*गण*] (तसेच **'sluice-gate**) पाटाच्या पाण्याचा दाब कमी-जास्त करण्याचे साधन, सांडवा, पाचर, झडप. **sluice** *क्रि* [*सक*] पाण्याने धुणे, विसळणे.

slum /स्लैम्/ *ना* [*गण*] झोपडपट्टी, गलिच्छ वस्ती (किंवा अशा वस्तीतले घर). **slum** *क्रि* **(-mm-)** [*अक*] (तसेच **slum it**) झोपडपट्टीत राहणे/राहायला भाग पडणे, वाईट अवस्थेत राहणे. **slummy** *वि* झोपडपट्टीचा.

slumber /स्लैम्बर/ *क्रि* [*अक*] (*औप*) शांतपणे झोपणे. **slumber** *ना* [*अगण*] **slumbers** [*ब.व*] झोप, निद्रा.

slump /स्लैम्प्/ *क्रि* [*अक*] १ जोराने आदळणे किंवा पडणे. २ (किंमती, धंदा वगैरेबाबत) कोसळणे. **slump** *ना* [*गण*] किंमती उतरणे, धंद्यातील घसरण वगैरे.

slung SLING चा *भूत, भूत वि.*

slur /स्लऽ(र्)/ *क्रि* **(-rr-)** [*सक*] १ बरळणे, शब्द अडखळत, मिसळत बोलणे, तोंडातल्या

तोंडात बोलणे. २ एखाद्याच्या इभ्रतीला कलंक लावणे. **slur** *ना* [*गण*] काळिमा लावणारा आरोप, दूषण : *a ~ on her name, तिच्या नावाला लागलेला बट्टा.*

slush /स्लैश्/ *ना* [*अगण*] १ वितळणारे घाणेरडे हिम. २ (*अनौप बहुधा अधिक्षेपी*) अति भावुकतेचे वेडगळ भाषण किंवा लेखन. **'slush fund** *ना* [*गण*] लाच देण्यासाठी वापरायचा पैसा. **slushy** *वि* **(-ier, -iest)** मळकट वितळलेल्या बर्फाचा; अतिभावुक, रडवा, प्रेमविषयक.

slut /स्लैट्/ *ना* [*गण*] (*अधिक्षेपी अपमानकारक*) छिनाल स्त्री, चवचाल बाई. **sluttish** *वि* छिनाल, चवचाल.

sly /स्लाइ/ *वि* गुपचुप गोष्टी करणारा; कावेबाज. **sly** *ना* (*वाक्प्र*) **on the 'sly** लपूनछपून, चोरून. **slyly** *क्रिवि* गुपचुपपणे; कावेबाजपणे, धूर्तपणे. **slyness** *ना* [*अगण*] चोरी, लपवाछपवी.

smack^{1} /स्मॅक्/ *ना* [*गण*] १ चपराक, धपाटा (किंवा त्याचा आवाज). २ (*अनौप*) मोठा आवाज करून घेतलेले चुंबन, मिटकी. **smack** *क्रि* [*सक*] १ चपराक देणे, फटका मारणे. २ (*वाक्प्र*) **smack one's lips** ➪ LIP. **smack** *क्रिवि* एकदम जोराने, धूम : *run ~ into a wall, सुसाट पळत भिंतीवर आपटणे.*

smack^{2} /स्मॅक्/ *क्रि* (*क्रिब*) **smack of sth** मासला मिळणे, थोडीशी कल्पना येणे.

small /स्मॉऽल्/ *वि* १ नेहमीपेक्षा आकाराने लहान; छोटा : *a ~ house, छोटेसे घर.* २ वयाने लहान : *~ children, लहान मुले.* ३ अल्प/छोट्या प्रमाणातला, लघु : *~ business, लघु-उद्योग.* ४ क्षुल्लक; किरकोळ : *a ~ problem, किरकोळ अडचण/समस्या.* ५ (*वाक्प्र*) **feel 'small** लाज वाटणे, हास्यास्पद दिसणे वगैरे. **a small 'fortune** गडगंज पैसा, मोठी रक्कम. **the 'small hours** मध्यरात्रीनंतरचे तीन-चार तास. **small wonder** ➪ WONDER. **small** *ना* [*अे.व*] एखाद्या गोष्टीचा निमुळता किंवा अरुंद भाग : *the ~ of the back, पाठीचा बारीक भाग, मागची कड.* **small 'arms** *ना* [*ब.व*] हातात बाळगायची शस्त्रे. **'smallholding** *ना* [*गण*] (*ब्रि*) पन्नास एकरपेक्षा कमी असलेली शेतजमीन. **small-'minded** *वि* हलक्या मनाचा आणि आप्पलपोटा, कोत्या मनाचा. **smallness** *ना* [*अगण*] लहान आकार, छोटेपणा; क्षुल्लकपणा; कोतेपणा. **'smallpox** *ना* [*अगण*] त्वचेवर कायमचे डाग मागे सोडणारा सांसर्गिक रोग, देवी (रोग). **'small talk** *ना* [*अगण*] शिळोप्याच्या गप्पा, गप्पाटप्पा.

smart^{1} /स्माट्/ *वि* १ तरतरीत, ठाकठीक, चांगल्या कपड्यातला, फाकडा, चुणचुणीत : *a ~ appearance/person, चुणचुणीत पेहेराव/माणूस.* २ फॅशनयुक्त : *a ~ restaurant, नव्या फॅशनचे उपहारगृह.* ३ (विशेषतः *अमे*) चलाख, हुशार : *a ~ answer, हुशारीचे उत्तर.* ४ जलद किंवा जोराचा : *a ~ pace, जलद गती* ○ *a ~ slap, जोराची चपराक.* **smarten** /'स्माट्न्/ *क्रि* (*क्रिब*) **smarten (oneself/sb/sth) up** (स्वतःला/एखाद्याला) तरतरीत/चुणचुणीत/फॅशनेबल करणे. **smartly** *क्रिवि* तरतरीतपणे; फॅशनेबल रीतीने; हुशारीने. **smartness** *ना* [*अगण*] तरतरीतपणा; फॅशनेबलपणा; हुशारी, चलाखपणा.

smart^{2} /स्माट्/ *क्रि* [*अक*] *ना* [*अगण*] ठणका (लागणे) : *The smoke made my eyes ~, धुराने माझे डोळे चुरचुरू लागले.*

smash /स्मॅश्/ *क्रि* १ [*अक, सक*] तुकडे करणे, फोडणे, ठिकऱ्या करणे : *~ a cup on the floor, जमिनीवर पाडून कप फोडणे.* २ [*अक*] *into, through, etc//* जोराने जाणे, आपटणे : *They ~ed into the wall, ते जोराने भिंतीवर आदळले.* ३ [*सक*] एखाद्याला जोराने मारणे, बडवणे. ४ [*सक*] (*अनौप*) पराभव करणे किंवा धुव्वा उडवणे. **smash** *ना* १ [*अे.व*] फोडणे किंवा फुटण्याचा आवाज. २ [*गण*] (टेनिसमधे वगैरे) खाली मारलेला जोराचा फटका. ३ [*गण*] (तसेच **smash 'hit** (*अनौप*) एकदम प्रसिद्धीस आलेले नाटक, गाणे वगैरे. ४ = SMASH-UP. **smash** *क्रिवि* जोराने आदळून : *drive ~ into the wall, चालवताना गाडी भिंतीवर आपटणे.* **smashing** *वि* (*ब्रि अनौप*) फार छान. **'smash-up** *ना* [*गण*] गाडीची टक्कर.

smattering /'स्मॅटरिङ्/ *ना* [*अे.व*] *of//*

विशेषतः भाषेचे थातुरमातुर ज्ञान : *a ~ of French, फ्रेंचचे वरवरचे/अर्धवट ज्ञान.*

smear /'स्मिअ(र्)/ *क्रि* [*सक*] १ तेलकट किंवा चिकट काहीतरी (पृष्ठभागावर) चोपडणे, फासणे : *~ mud on the wall, भिंतीला चिखल फासणे.* २ (*ला*) (एखाद्याच्या इभ्रतीला) काळिमा लावणे, बट्टा लावणे. **smear** *ना* [*गण*] १ डाग. २ (*ला*) काळिमा फासणारे बोल. ३ रोगनिदान करण्यासाठी शरीरातील द्रव्याचा घेतलेला नमुना.

smell^1 /स्मेल/ *ना* १ [*अगण*] वास, गंध-संवेदना. २ [*गण, अगण*] वास घेतलेली गोष्ट. ३ [*गण*] दुर्गंधी : *What a ~! काय घाण वास येतोय्!* ४ [*गण*, बहुधा *ए.व*] वास घेणे, हुंगणे : *Have a ~ of this, याचा वास घे.* **smelly** *वि* (**-ier, -iest**) (*अनौप*) दुर्गंधीयुक्त.

smell^2 /स्मेल्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **smelt** /स्मेल्ट्/ किंवा **smelled**) १ [*सक*] (अनेकदा *can, could* सह वापर) वासानी एखादी गोष्ट लक्षात येणे, वास येणे : *Can you ~ gas? गॅसचा तुला वास येतोय्?* २ [*अक, सक*] वास घेणे, हुंगणे : *~ the flowers, फुलांचा वास घेणे.* ३ [*अक*] वास घेता येणे, गंध-संवेदना असणे : *Can birds ~? पक्ष्यांना वास येतो?* ४ [*अक*] (**क**) (*of*)// वास येणे, गंध पसरवणे : *~ good/of soap, छान/साबणाचा वास येणे.* (**ख**) घाण वास येणे : *Your feet ~, तुझ्या पायांना घाण वास येतोय्.* ५ (*वाक्प्र*) **smell a 'rat** (*अनौप*) वाईट गोष्ट लक्षात येणे, सुगावा लागणे, वास येणे.

smile /स्माइल/ *ना* [*गण*] आनंद, गंमत वगैरे व्यक्त करणारा, तोंडाच्या कडा किंचित वर उचलून होणारा चेहऱ्यावरील अविर्भाव, स्मित, गालात हसणे. **smile** *क्रि* [*अक*] स्मितहास्य करणे, मंद हसणे. **smilingly** *क्रिवि* स्मितवदनाने, गालात हसून.

smirk /स्मऽक्/ *क्रि* [*अक*] *ना* [*गण*] आत्मसंतुष्टता दाखवणारे चेहऱ्यावरील मूर्खपणाचे हास्य (दाखवणे), वेड्यासारखे हसणे; कपटाचे हसणे, छद्मी स्मित (करणे).

smithereens /,स्मिद'रीन्झ्/ *ना* [*ब.व*] (*वाक्प्र*) **smash, break, etc sth (in)to smithereens** ठिकऱ्या करणे, चक्काचूर करणे.

smitten /'स्मिटन्/ *वि* (*with*)// १ मारावलेला. २ अचानक अतिशय मोहित झालेला, लुब्ध, आसक्त : *I'm rather ~ with her, मी तिच्यावर लुब्ध झालो आहे.*

smock /स्मॉक्/ ढिल्या शर्टासारखा एक कपडा.

smog /स्मॉग्/ *ना* [*अगण*] धूर आणि धुके यांचे मिश्रण.

smoke^1 /स्मउक्/ *ना* १ [*अगण*] काहीतरी जळल्यावर वर येणारा पांढरा, करडा किंवा काळा धूर. २ [*गण*] सिग्रेट वगैरे ओढणे, शिलगावणे, फुंकणे. ३ (*वाक्प्र*) **go up in 'smoke** (**क**) जळून भस्मसात होणे. (**ख**) निरर्थक होणे, व्यर्थ जाणे. **'smoke-screen** *ना* [*गण*] (**क**) घडणारी गोष्ट लपविण्यासाठी केलेला धुराचा पडदा. (**ख**) (*ला*) खरे हेतू दडवून ठेवणारे फसवे स्पष्टीकरण, धूळफेक करणारे स्पष्टीकरण. **smoky** *वि* (**-ier, -iest**) धुरकट, धुराने भरलेला.

smoke^2 /स्मउक्/ *क्रि* १ [*अक*] धूर सोडणे. २ [*अक, सक*] सिग्रेटचा वगैरे धूर सोडणे, धूम्रपान करणे. ३ [*सक*] (मांस, मासे वगैरे) धुरी देऊन टिकवणे. ४ (*क्रिब*) **smoke sb/sth out** एखाद्या जागी धूर कोंडून एखाद्याला हुसकणे. **smoker** *ना* [*गण*] धूम्रपान करणारा माणूस. **smoking** *ना* [*अगण*] धूम्रपान.

smooth /स्मूद्/ *वि* १ सपाट पृष्ठभाग असलेला, मऊसूद, नितळ : *~ skin, मऊ त्वचा.* २ (हालचालीबाबत) सुरळीत, हिसके न बसणारी, अलगद : *a ~ ride,* (मोटारचा वगैरे) *सुरळीत प्रवास/फेरी.* ३ (द्रवाबाबत) एकसारखा, गाठी नसणारा, डिखळ्या नसणारा, एकतारी. ४ विनासंकट, अडचणी नसलेला, सरळ. ५ कर्कश (आवाज) नसणारा, मऊ, (चवीत) फिका. ६ (बहुधा *अधिक्षेपी*) (माणसाबाबत) पुढेपुढे करणारा, अति लाघवी. **smooth** *क्रि* १ [*सक*] मऊ, गुळगुळीत करणे. २ (*क्रिब*) **smooth sth over** प्रश्नांची तीव्रता कमी करणे, प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करणे, मार्ग काढणे. **smoothly** *क्रिवि* मऊसूदपणे; हिसकाहिसकी न करता,

कटकटीविना; लाघवीपणे. **smoothness** *ना* [*अगण*] मऊसूदपणा; अलगदपणा, सुरळीतपणा; एकतारीपणा; सहजसोपेपणा, लाडीगोडी.

smother /'स्मद(र्)/ *क्रि* १ [*अक, सक*] दम कोंडून मरणे/मारणे, गुदमरणे/गुदमरून टाकणे. २ [*सक*] (*in/with*)// लावणे, बुडवणे : *cake ~ed in cream, खूप क्रीम लावलेला केक.* ३ [*सक*] काहीतरी वरून टाकून/झाकून आग विझवणे, आग घुसमटवणे : (*ला*) ~ *a yawn, जांभई दाबणे.*

smoulder (*अमे* **smol-**) /'स्मउल्ड(र्)/ *क्रि* [*अक*] (जाळ न धरता) मंद जळणे, धुमसणे : ~ *ing ashes, धुमसते निखारे* ○ (*ला*) *Hate ~ed within her, तिच्यात द्वेष धुमसत होता* किंवा *ती द्वेषाने धुमसत होती.*

smudge /स्मज्/ *ना* [*गण*] डाग, फराटा. **smudge** *क्रि* १ [*सक*] डाग पाडणे. २ [*अक*] (शाई वगैरे) फरपटणे, पुसटणे.

smug /स्मग्/ *वि* (**-ger, -gest**) स्वतःवर खूप खूष असलेला, आत्मसंतुष्ट. **smugly** *क्रिवि* स्वतःवरच खूष होऊन. **smugness** *ना* [*अगण*] आत्मसंतुष्टता.

smuggle /'स्मग्ल्/ *क्रि* [*सक*] (माल, लोक वगैरे) बेकायदेशीरपणे किंवा लपूनछपून देशाच्या आत-बाहेर करणे, चोरटा व्यापार करणे, तस्करी करणे : ~ *drugs into the country, देशात चोरून अमली पदार्थ आणणे* ○ ~ *a letter into prison, तुरुंगात चोरून पत्र पाठवणे.* **smuggler** /'स्मग्ल(र्)/ *ना* [*गण*] तस्कर, चोरटा व्यापार करणारा. **smuggling** *ना* [*अगण*] तस्करी, चोरटा व्यापार.

smut /स्मट्/ *ना* १ [*गण*] धूळ, काजळी वगैरे(चा डाग). २ [*अगण*] अश्लील किंवा फाजील कथा वगैरे. **smutty** *वि* डागाळलेला.

snack /स्नॅक्/ *ना* [*गण*] जेवणाऐवजी किंवा दोन जेवणांच्यामधे खायचा अल्पोपहार.

snag /स्नॅग्/ *ना* [*गण*] १ लपून राहिलेली, अचानक उद्भवलेली अडचण. २ बाहेर येणारा टोकदार किंवा ओबडधोबड तुकडा, सुळका, खुंट. **snag** *क्रि* (**-gg-**) [*सक*] खुंटी पकडणे.

snail /स्नेइल्/ *ना* [*गण*] गोगलगाय.

snake /स्नेइक्/ *ना* [*गण*] १ लांब, बारीक, बिनापायाचा सरिसृप प्राणी, सर्प, साप. २ (*ला*) इतरांना फसवू शकेल असा माणूस, निमकहराम माणूस. ३ (*वाक्प्र*) **a ˌsnake in the 'grass** मैत्रीचे ढोंग करणारा शत्रू. **snake** *क्रि* [*अक*] नागमोडी जाणे.

snap /स्नॅप्/ *क्रि* (**-pp-**) १ [*अक, सक*] काडकन् मोडणे. २ [*अक, सक*] फटकन् बंद होणे/करणे किंवा खाडकन् उघडणे : ~ *shut, फटकन् बंद करणे.* ३ [*अक, सक*] खेकसणे : ~ *orders, फाडफाड हुकूम सोडणे.* ४ [*अक*] (कुत्री वगैरेबाबत) चावा घ्यायचा प्रयत्न करणे : *The dog ~ped at her ankles, कुत्र्याने तिच्या घोट्याचा चावा घ्यायचा प्रयत्न केला.* ५ [*सक*] फोटो घेणे. ६ (*वाक्प्र*) **snap one's 'fingers** लक्ष वेधण्याकरता चुटकी वाजवणे. **ˌsnap 'out of it** (*अनौप*) (वाईट, दुःखी) मनस्थितीतून बाहेर येणे. ७ (*क्रिब*) **snap at sb** एखाद्यावर खेकसणे. **snap at sth** एखादी गोष्ट दातात पकडण्याचा प्रयत्न करणे : (*ला*) ~ *at the chance to go on holiday, सुट्टीच्या संधीवर झडप घेणे.* **snap sth up** मोठ्या उत्साहाने एखादी गोष्ट विकत घेणे, एखाद्या गोष्टीवर झडप घालणे. **snap** *ना* [*गण*] १ काडकन् मोडणे किंवा मोडल्याचा आवाज. २ अल्पकाळासाठी एकदम पडलेली (बहुधा थंड) हवा. ३ (तसेच **'snapshot**) (घाईने घेतलेले) छायाचित्र. **snap** *वि* अचानक केलेला, पूर्वसूचनेविना केलेला : *a ~ decision, तडकाफडकी घेतलेला निर्णय.* **snappy** *वि* (**-ier, -iest**) (**क**) चिडका, तडकू. (**ख**) फॅशनेबल, झकपक. (**ग**) जिवंत, रसरशीत.

snare /स्नेअ(र्)/ *ना* [*गण*] १ पक्ष्यांना आणि छोट्या प्राण्यांना पकडायचे जाळे, फास. २ जाळ्यात पकडणारी परिस्थिती. **snare** *क्रि* [*सक*] फाशात पकडणे/अडकवणे.

snarl^{1} /स्नाल्/ *क्रि* १ [*अक*] (कुत्री वगैरेबाबत) दात विचकून भुंकणे, गुरगुरणे. २ [*अक, सक*] रागाने बोलणे, गुरकणे. **snarl** *ना* [*गण*] गुरगुरणे किंवा गुर्र असा आवाज.

snarl^{2} /स्नाल्/ *क्रि* (*अनौप*) (*क्रिब*) **snarl (sth) up** गुंतागुंत किंवा गोंधळ होईल असे होणे किंवा करणे, गुंताडा होणे/करणे : *The traffic was ~ed up, रहदारीचा पार गुंताडा झाला होता.* **'snarl-up** *ना* [*गण*] (*अनौप*) गुंताडा, गुंतागुंत – विशेषतः रहदारीची.

snatch /स्नॅच्/ *क्रि* १ [*अक, सक*] हिसकावणे, हिसडणे (किंवा तसा प्रयत्न करणे) : *They ~ed the child from her father, त्यांनी मुलीला तिच्या वडलांपासून हिसकावून घेतले.* २ [*सक*] पटकन् घेणे : *~ a kiss, पटकन् मुका घेणे.* **snatch** *ना* १ [*अे.व*] हिसकावणे. २ [*गण, बहुधा ब.व*] तुकडा : *~es of conversation, संभाषणाचे तुकडे.*

sneak /स्नीक्/ *क्रि* १ [*अक*] गुपचुप आणि हळूच निघून जाणे : *~ past sb, एखाद्याजवळून हळूच सटकणे.* २ [*सक*] गुपचुप घेणे : *~ money from the box, पेटीतले पैसे हळूच लंपास करणे.* ३ [*अक*] एखाद्याने केलेल्या चुकीची वरिष्ठाकडे चहाडी करणे, चुगली करणे. **sneak** *ना* [*गण*] चहाडखोर, चुगलखोर. **sneakers** *ना* [*ब.व*] (*अमे*) रबरी तळव्याचे हलके कॅनव्हसचे बूट. **sneaking** *वि* (**क**) गुप्त : *a ~ing respect for sb, एखाद्याविषयीचा चोरटा/गुप्त आदर.* (**ख**) अस्पष्ट : *a ~ing suspicion, गुप्त किंवा मनात हळूच डोकावणारी शंका.* **sneaky** *वि* (*अनौप अधिक्षेपी*) चोरून केलेला/करणारा.

sneer /स्निअ(र्)/ *क्रि* [*अक*] (*at*)// नजरेने किंवा शब्दांनी तुच्छता दाखवणे, टोमणा मारणे, नाक मुरडणे. **sneer** *ना* [*गण*] तुच्छक्षेप.

sneeze /स्नीझ्/ *ना* [*गण*] शिंक. **sneeze** *क्रि* [*अक*] १ शिंक येणे, शिंकणे. २ (*वाक्प्र*) **not to be 'sneezed at** (*अनौप*) उपेक्षा न करण्यासारखा, टाकाऊ नसलेला.

sniff /स्निफ्/ *क्रि* १ (**क**) [*अक*] सूसू करणे. (**ख**) [*अक, सक*] (*at*)// नाकाने आवाज करत हुंगणे, सूसू करत वास घेणे : *~ (at) the roses, गुलाबाचा वास घेणे.* २ (*क्रिब*) **sniff at sth** (बहुधा कर्मणी) एखाद्या गोष्टीविषयी तुच्छता दाखवणे : *Her offer is not to be ~ed at, तिचा प्रस्ताव धुडकावून लावण्यासारखा किंवा तुच्छतेने फेटाळण्यासारखा नाही.* **sniff sb out** एखाद्याचा शोध लागणे, शोधून काढणे. **sniff** *ना* [*गण*] सूसू करणे, सूसू आवाज.

snigger /'स्निग(र्)/ *ना* [*गण*] दाबलेले हसू, दबक्या आवाजातील हसणे. **snigger** *क्रि* [*अक*] (*at*)// दबक्या आवाजात हसणे.

snip /स्निप्/ *क्रि* (**-pp-**) [*अक, सक*] (कात्रीने) कातरणे. **snip** *ना* [*गण*] १ कातरणे. २ (*ब्रि अनौप*) (स्वस्तातला) सौदा : *It's a ~ at only £10, फक्त दहा पौंडाला तो अगदी स्वस्तातला सौदा आहे.*

snipe /स्नाइप्/ *क्रि* [*अक*] १ आडून गोळीबार करणे. २ (*ला*) टीका करणे. **sniper** *ना* [*गण*] लपून गोळीबार करणारा सैनिक.

snippet /'स्निपिट्/ *ना* [*गण*] चुटका, छोटासा किस्सा : *~s of gossip, छोट्या कुटाळक्या.*

snivel /'स्निव्ह्ल्/ *क्रि* (**-ll-**; *अमे* **-l-**) [*अक*] धुसमुसणे, मुसमुसून रडणे.

snob /स्नॉब्/ *ना* [*गण*] सामाजिक प्रतिष्ठा किंवा संपत्ती यांना फाजील महत्त्व देणारा माणूस, स्वयंशिष्ट. **snobbery** *ना* [*अगण*] स्वयंशिष्टपणा, अहंमन्यपणा. **snobbish** *वि* शिष्टमन्य, अहंमन्य.

snog /स्नॉग्/ *क्रि* (**-gg-**) [*अक*] (*ब्रि अनौप*) चुंबन घेऊन कुरवाळणे.

snooker /'स्नूक(र्)/ *ना* [*अगण*] बिलिअर्ड टेबलावर १५ लाल चेंडू आणि सात इतर रंगांचे चेंडू घेऊन खेळायचा एक खेळ. **snooker** *क्रि* [*सक*] एखाद्याला अडचणीत आणणे.

snoop /स्नूप्/ *क्रि* [*अक*] (*about/around*)// दुसऱ्याच्या व्यवहारात त्यांच्या माहितीशिवाय किंवा परवानगीशिवाय नाक खुपसणे – बहुधा दोष काढायला.

snooze /स्नूझ्/ *क्रि* [*अक*] *ना* [*गण*] (*अनौप*) दिवसाची डुलकी घेणे, झोपेचा चुटका घेणे.

snore /स्नॉऽर्/ *क्रि* [*अक*] घोरणे. **snore** *ना* [*गण*] घोरण्याचा आवाज.

snorkel /'स्नॉऽकल्/ *ना* [*गण*] पाण्याखालून पोहताना श्वासोच्छ्वासासाठी पोहणाऱ्याने वापरायची नळी. **snorkel** *क्रि* (**-ll-**; *अमे* **-l-**) [*अक*] अशी नळी वापरून पोहणे.

snort /स्नॉऽट्/ *क्रि* १ [*अक*] नाकातून जोराने हवा सोडणे, फुरफुरणे. २ [*अक*] (*at*)// (राग वगैरे व्यक्त करण्याकरता) नाकातून फुरफुर आवाज काढणे. **snort** *ना* [*गण*] फुरफुरणे किंवा फुरफुर असा आवाज.

snout /स्नाउद्/ *ना* [*गण*] प्राण्याचे – विशेषतः डुकराचे – नाक, मुस्कट.

snow^1 /स्नउ/ *ना* [*अगण*] आकाशातून जमिनीवर भुरूभुरू पडणारे गोठलेले पाणी, हिम, बर्फ. **'snowball** *ना* [*गण*] हिमगोळा. **'snowball** *क्रि* [*अक*] महत्त्व, आकार वगैरे एकदम वाढणे. **'snow-drift** *ना* [*गण*] वाऱ्याने झालेला हिमाचा ढिग. **'snowdrop** *ना* [*गण*] कंदातून उगवणारे वसंत ऋतूतले एक छोटे पांढरे फूल. **'snowman** *ना* [*गण*] हिमापासून बनविलेली मानवी आकृती. **'snow-plough** (*अमे* **-plow**) *ना* [*गण*] रस्त्यावरून वगैरे बर्फ दूर करण्याचे साधन. **'snowstorm** *ना* [*गण*] हिमवादळ.

snow^2 /स्नउ/ *क्रि* १ [*अक*] (*it* सह वापर) हिम पडणे : *It ~ed all day, दिवसभर बर्फ पडत होते.* २ (*क्रिब*) **snow sb in/up** (बहुधा कर्मणी) जोराच्या हिमवृष्टीने एखाद्याला बाहेर पडणे शक्य न होणे. **snow sb under** (बहुधा कर्मणी) खूप किंवा फार असणे : *He is ~ed under with work, त्याला फार काम आहे.* **snowy** *वि* (**-ier, -iest**) हिमाच्छादित, हिममय.

snub /स्नैब्/ *क्रि* (**-bb-**) [*सक*] एखाद्याला तुच्छतेने वागवणे, अवहेलणे, चापणे. **snub** *ना* [*गण*] चापणारे शब्द किंवा दबावणारे वर्तन.

snub nose /'स्नैब् नउझ़्/ *ना* [*गण*] नकटे नाक. **'snub nosed** *वि* नकट्या नाकाचा, अपऱ्या नाकाचा.

snuff^1 /स्नैफ्/ *ना* [*अगण*] नाकाने ओढायची तंबाखूची भुकटी, तपकीर.

snuff^2 /स्नैफ्/ *क्रि* १ [*सक*] (*out*)// ज्योत दाबून (मेणबत्ती) विझवणे. २ (*वाक्प्र*) **'snuff it** (*ब्रि अनौप*) मरणे. ३ (*क्रिब*) **snuff sth out** एखादी गोष्ट कायमची संपवणे, मिटवणे.

snug /स्नैग्/ *वि* (**~ger, ~gest**) १ उबदार आणि सुखकर. २ घट्ट बसणारा, तंग : *a ~ jacket, तंग जाकीट.* **snugly** *क्रिवि* उबदारपणे; घट्ट.

snuggle /'स्नैगल्/ *क्रि* [*अक*] (*up/down*)// प्रेमाने किंवा उबेसाठी एखाद्याला चिकटून झोपणे, लगटून बसणे, बिलगणे.

so^1 /सउ/ *क्रिवि* १ इतका, एवढा : *not so big as I thought, मला वाटला तेवढा मोठा नाही.* २ खूप, फार : *I'm so glad to see you, तुला भेटल्याने खूप आनंद झालाय् मला.* ३ (*वाक्प्र*) **so much for 'sb/sth** याबाबत झाले/बोललो तेवढे पुरे. **,so much 'so that** एवढ्या प्रमाणात की.

so^2 /सउ/ *क्रिवि* १ असा किंवा तसा : *Kick the ball so, चेंडू असा मार किंवा तसा.* २ (पदबंधाच्या ऐवजी वापर) : *'Is he coming?' 'I think so!', 'तो येतोय्?' 'असं वाटतं मला!'* ३ (सहमती दर्शविण्यास वापर) : *'It's Friday today, not Thursday.' 'So it is.' 'आज शुक्रवार आहे, गुरुवार नाही.' 'हो, बरोबर आहे.'* ४ सुद्धा, देखील : *You are young and so am I, तू तरुण आहेस आणि मी सुद्धा.* ५ (*वाक्प्र*) **and 'so on** आणि अशाप्रकारे आणखी काही, आणि असेच काही, वगैरे वगैरे. **so as to** -च्या हेतूने, म्हणून : *He drove fast so as not to be late, उशीर होऊ नये म्हणून त्याने गाडी भरधाव सोडली.* **so that** (क) -च्या साठी/करता, म्हणजे : *Hurry up and finish so that we can go home early, लवकर आटप म्हणजे आपल्याला लवकर घरी जाता येईल.* (ख) परिणामतः, त्यामुळे : *Nothing was heard from her, so that people thought she was dead, तिच्याकडून काहीच खबर आली नाही, त्यामुळे लोकांना वाटलं ती मेली.* **so-and-so** /'सउ न् सउ/ *ना* [*गण*] (*अनौप*) १ अमुक अमुक. २ तो कोण एक (मूर्ख, बावळट वगैरे) तिरस्करणीय व्यक्ती : *That so-and-so lied to me, तो कोण होता तो – त्याने थाप मारली मला.* **'so-called** *वि* तथाकथित, चुकीने म्हटलेला : *Her so-called friends refused to help her, तिच्या तथाकथित मित्रमैत्रिणींनी तिला मदत करण्यास नकार दिला.*

so^3 /सउ/ *उ.अव्यय* १ या कारणाने, म्हणून : *He was hurt so I helped him, त्याला लागलं होतं म्हणून मी त्याला मदत केली.* २ (*अनौप*) (उद्देश दाखविताना वापर) म्हणून : *I gave you a map so you wouldn't get lost, तू रस्ता चुकू नये याकरिता मी तुला नकाशा दिलाय्.* ३ (हकीगतीचा पुढचा भाग सांगण्यासाठी वापर) तसा, तशी : *So she went and told* *the police, तशी ती गेली आणि तिने पोलिसांना सांगितले.* ४ (*वाक्प्र*) **so what?** (*अनौप*) म्हणून काय झालं? : *'She's lying about it.' 'So what?', 'ती खोटं बोलतीये.' 'म्हणून काय झालं?'*

soak /सउक्/ *क्रि* १ **(क)** [*अक*] पाण्याने वगैरे चिंब भिजणे. **(ख)** [*सक*] पूर्ण बुडवणे : *~ the bread in milk, दुधात पाव पूर्ण भिजवणे.* २ [*सक*] (द्रवाबाबत) चिंब भिजवणे : *The rain ~ed (through) his coat, पावसाने त्याचा कोट चिंब भिजवला.* ३ (*क्रिब*) **soak sth up** (द्रव) घेणे, पिणे, शोषणे : *Paper ~s up water, कागद पाणी शोषून घेतो.* **soak** *ना* [*गण*] चिंब भिजणे; शोषणक्रिया. **soaked, soaking** *वि* खूप भिजलेला, थबथबलेला.

soap /सउप्/ *ना* १ [*अगण*] धुण्याकरता वापरला जाणारा, चरबी किंवा तेल वगैरे पासून बनवलेला पदार्थ, साबण. २ [*गण*] (*अनौप*) = SOAP OPERA. **soap** *क्रि* [*सक*] साबण लावणे. **'soap opera** *ना* [*गण, अगण*] रोजच्या जीवनावरचे रेडिओ किंवा दूरदर्शनचे नाटक. **soapy** *वि* **(-ier, -iest)** साबणाचा.

soar /सॉऽ(र्)/ *क्रि* [*अक*] १ (पक्षी वगैरेबाबत) आकाशात भरारी घेणे, उंच उडणे. २ (*ला*) भराभर चढणे, वाढणे : *~ing prices, भराभर वाढणाऱ्या किंमती.*

sob /सॉब्/ *क्रि* **(-bb-)** १ [*अक*] हुंदका देणे, रडताना स्फुंदणे. २ (*क्रिब*) **sob sth out** स्फुंदून सांगणे. **sob** *ना* [*गण*] स्फुंदणे किंवा स्फुंदण्याचा आवाज, हुंदका. **'sob-story** *ना* [*गण*] (बहुधा *अधिक्षेपी*) सहानुभूती मिळवण्यासाठी सांगितलेली रडकथा, रडी गोष्ट.

sober /'सउब(र्)/ *वि* १ दारू न प्यालेला, तर्र न झालेला. २ जबाबदार आणि गंभीर प्रकृतीचा : *a ~ person, सौम्य वृत्तीचा विचारी माणूस.* **sober** *क्रि* १ [*अक, सक*] शांतवृत्तीचा होणे/करणे, विचारशील होणे/करणे. २ (*क्रिब*) **sober sb up** एखाद्याची नशा उतरवणे. **soberly** *क्रिवि* सावधपणे; शांतपणे, सौम्य रीतीने.

soccer /'सॉक(र्)/ *ना* [*गण*] प्रत्येक संघात अकरा गडी असलेला आणि दोन संघांनी खेळायचा एक प्रकारचा फुटबॉल, ॲसोसिएशन फुटबॉल.

sociable /सउशबल्/ *वि* मैत्री करणारा, माणसात मिसळणारा. **sociably** *क्रिवि* मिळूनमिसळून.

social /'सउश्ल्/ *वि* १ लोक आणि समाजाच्या संबंधांबाबत, सामाजिक : *~ customs, सामाजिक चालीरीती.* २ समाजाचा किंवा समाजातला : *one's ~ equals, एखाद्याचे समाजातले बरोबरचे लोक.* ३ सहवासासाठीचा किंवा करमणुकीचा : *a '~ club, विरंगुळा संघ, मंडळी.* ४ (प्राण्यांबाबत वगैरे) गटागटात राहणारे, कळपात राहणारे. ५ (*अनौप*) मिळूनमिसळून वागणारा. **,Social and Liberal 'Democrats** *ना* [*ब.व*] ब्रिटनमधील सोशल डेमॉक्रेटिक पार्टी आणि लिबरल पार्टी यांची एकत्र मिळून १९८८ मधे झालेली पार्टी (राजकीय पक्ष). **,social 'science** *ना* [*गण, अगण*] समाजशास्त्र, अर्थशास्त्र यांसारखी सामाजिक शास्त्रे, समाजविज्ञान, सामाजिक विज्ञान. **,social se'curity** *ना* [*अगण*] बेकार, अपंग वगैरेंना मिळणारी सरकारी मदत, सामाजिक सुरक्षा. **'social worker** *ना* [*गण*] आरोग्य, निवारा, सरकारी मदत वगैरे बाबतीत लोकांना मदत करण्यासाठी नेमलेला पगारी सेवक, सामाजिक कार्यकर्ता. **socially** *क्रिवि* सामाजिक दृष्टीने/रीतीने.

socialism /'सउशलिझ़म्/ *ना* [*अगण*] जमीन, कारखानदारी वगैरे राष्ट्राच्या मालकीची असावी असे सांगणारी एक राजकीय-सामाजिक मतप्रणाली, समाजवाद. **socialist** *वि ना* [*गण*] समाजवादी.

socialize /'सउशलाइझ़्/ *क्रि* [*अक*] इतरांच्यात मिसळणे, सामाजिकीकरण होणे.

society /स'साइअटि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] सुसंघटितपणे माणसे राहतात अशी पद्धती. २ [*गण, अगण*] समाज. ३ [*अगण*] (*औप*) मंडळी, सहवास, परिवार : *in the ~ of her friends, तिच्या मित्रमैत्रिणींच्या सहवासात.* ४ [*अगण*] एखाद्या देशातला वगैरे छानछोकीत राहणाऱ्या धनिकांचा वर्ग. ५ [*गण*] संस्था : *a drama ~, नाट्यसंस्था.*

sociology /,सउसि'ऑलजि/ *ना* [*अगण*] समाजरचना, समाजाची वाढ आणि सामाजिक वर्तन यांचा अभ्यास करणारे शास्त्र, समाजशास्त्र, समाजविज्ञान. **sociologist** *ना*

[*गण*] समाजशास्त्रज्ञ. **sociological** /-'लॉजिकल्/ *वि* समाजशास्त्रीय.

sock^{1} /सॉक्/ *ना* [*गण*] पायात घालायचा मोजा.

sock^{2} /सॉक्/ *ना* [*गण*] (*अनौप*) ठोसा. **sock** *क्रि* [*सक*] ठोसा देणे.

socket /'सॉकिट्/ *ना* [*गण*] खाच, खोबणी.

sod /सॉड्/ *ना* [*गण*] (*ब्रि* ⚠ *व्रात्य*) १ (अपशब्द म्हणून वापर) इसम : *You rotten ~! पाजी माणसा!* २ संकटात टाकणारी गोष्ट.

soda /'सउड/ *ना* [*अगण*] १ साबण, काच वगैरे बनवण्यासाठी वापरायचे द्रव्य, सज्जीखार. २ बुडबुडे आणणारा वायू असणारे पाणी, सोडा वॉटर. **'soda-water** *ना* [*अगण*] फेस आणणारा वायू असणारे पाणी.

sodden /'सॉड्न्/ *वि* ओला गच्च.

sodium /'सउडिअम्/ *ना* [*अगण*] रुपेरी रंगाचे एक रासायनिक मूलद्रव्य, सैंधव.

sofa /'सउफ/ *ना* [*गण*] कोच.

soft /सॉफ्ट्/ *वि* १ कडक नसलेला, मऊ : *a ~ pillow, मऊ उशी.* २ (पृष्ठभागाबाबत) मऊ आणि नाजूक : *~ skin, मुलायम त्वचा.* ३ (प्रकाश किंवा रंगाबाबत) भडक नसलेला, सौम्य. ४ (आवाजाबाबत) जाड नसलेला, मृदू, हलका, मंजुळ. ५ (रूपरेखेबाबत) अस्पष्ट; अंधुक, उठून न दिसणारी. ६ (उत्तर, शब्द वगैरेबाबत) रागाचा नसलेला, गोड; शांत. ७ सोपा : *a ~ job, सोपं काम.* ८ (*on*)// (फार) दयाळू किंवा मऊ, गरीब : *Don't be too ~ on the class, वर्गावर फार मऊ राहू नकोस.* ९ (*अनौप अधिक्षेपी*) नेभळट. १० (*अनौप*) वेडपट, मूर्ख. ११ (*वाक्प्र*) **have a soft 'spot for** एखादा फार आवडणे, फार प्रिय असणे. **,soft-'boiled** *वि* (अंड्याबाबत) पिवळा बलक मऊ राहील इतके कमी उकडलेले. **'soft drink** *ना* [*गण*] मद्यार्क नसणारे पेय. **'soft drug** *ना* [*गण*] व्यसनाधीनता येणार नाही असे मादक द्रव्य. **,soft-'hearted** *वि* फार दयाळू, मनाने मऊ. **softly** *क्रिवि* मऊपणे, हळूवारपणे, शांतपणे, मंदपणे. **softness** *ना* [*अगण*] मऊपणा; सौम्यता; मृदुपणा; अंधुकपणा; दयाळूपणा. **,soft-'pedal** *क्रि* (**-ll-**; *अमे* **-l-**) [*अक, सक*] (*अनौप*) (मुद्दा वगैरे) कमी महत्त्वाचा वाटायला लावणे. **,soft-'soap** *क्रि* [*सक*] (*अनौप*) मस्का लावणे, खुषमस्करी करून राजी करणे. **'software** *ना* [*अगण*] संगणकात वापरायची आधारसामग्री, कार्यक्रम वगैरे.

soften /'सॉफ्न्/ *क्रि* १ [*अक, सक*] मऊ होणे/करणे. २ [*सक*] सहज स्वीकारण्यासारखे करणे, तीव्रता कमी करणे, सौम्य करणे : *try to ~ the shock, धक्क्याची तीव्रता कमी करण्याचा' प्रयत्न करणे.* ३ (*क्रिब*) **soften (sb) up** (*अनौप*) एखाद्याच्या विरोधाची धार कमी करणे.

soggy /'सॉगि/ *वि* (**-ier, -iest**) खूप भिजलेला किंवा पाण्याने भिजून जड झालेला. **sogginess** *ना* [*अगण*] गच्च ओलेपणा.

soil /सॉइल्/ *ना* [*गण, अगण*] वनस्पती वाढतात तो मातीचा वरचा स्तर, भूमी, जमीन. **soil** *क्रि* [*अक, सक*] मळणे/मळवणे.

sojourn /'सउजन्; *अमे* सउ'जऽर्न्/ *ना* [*गण*] (*औप*) एखाद्या जागी तात्पुरता मुक्काम.

solace /'सॉलिस्/ *ना* [*गण, अगण*] (*औप*) सान्त्वन करणारी गोष्ट.

solar /'सउल(र्)/ *वि* सूर्याचा, सौर : *~ power, सौर ऊर्जा.* **the 'solar system** *ना* [बहुधा *ए.व*] सूर्य आणि त्याचे ग्रह, सूर्यमाला.

sold SELL चा *भूत, भूत वि.*

solder /'सउल्ड(र्)/ *ना* [*अगण*] कठीण धातू वगैरे जोडण्यासाठी वापरायचा एक लवकर वितळणारा धातू, डाख, कस्तर. **solder** *क्रि* [*सक*] डाख लावून जोडणे, डागणे. **'soldering-iron** *ना* [*गण*] डाग देण्यास वापरायचे हत्यार.

soldier /'सउल्ज(र्)/ *ना* [*गण*] सैनिक, जवान. **soldier** *क्रि* (*क्रिब*) **,soldier 'on** अडचणी असूनही चालू ठेवणे.

sole^{1} /सउल्/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **sole** किंवा **~s**) खाण्यासाठी वापरायचा समुद्रातील एक चपटा मासा, लेफ.

sole^{2} /सउल्/ *ना* [*गण*] पायाचा, बुटाचा वगैरे तळ, तळवा.

sole^{3} /सउल्/ *वि* १ एकमेव : *the ~ owner, एकमेव मालक.* २ विभागलेला नाही असा, पूर्ण :

have ~ responsibility, संपूर्ण जबाबदारी असणे. **solely** /'सउलि/ *क्रिवि* एकटा; फक्त.

solemn /'सॉलम्/ *वि* १ गंभीरपणे दिलेले, केलेले : *a ~ promise, गंभीरपणे दिलेले वचन.* २ गंभीर दिसणारा : *a ~ face, गंभीर मुद्रा.* **solemnly** *क्रिवि* गंभीरपणे. **solemnness** *ना* [*अगण*] गांभीर्य, गंभीरपणा.

solemnity /स'लेम्नटि/ *ना* (*ब.व* -ies) (*औप*) १ [*अगण*] गांभीर्य. २ [*गण, बहुधा ब.व*] यथासांग विधी, समारंभ.

solicit /स'लिसिट्/ *वि* १ [*अक, सक*] (*for*)// (*औप*) विनवणी करणे, याचना करणे. २ [*अक, सक*] (वेश्येबाबत) पैशासाठी शरीर देणे, धंदा करणे.

solicitor /स'लिसिट(र्)/ *ना* [*गण*] (*ब्रि*) कागदपत्रे करणारा, सल्ला देणारा वगैरे वकील.

solid /'सॉलिड्/ *वि* १ द्रव किंवा वायुरूपात नसलेला, घन : *Water becomes ~ when it freezes, गोठल्याने पाणी घनरूप बनते.* २ पोकळ नाही असा, भरीव. ३ दणकट, शाबूत. ४ अवलंबून राहण्याजोगा, भरभक्कम, सप्रमाण : *~ arguments, भरभक्कम किंवा सप्रमाण युक्तिवाद.* ५ एकजिनसी, भेसळ नसलेला : *~ gold, एकजिनसी सोने.* ६ पूर्ण सुसंवादी, पूर्ण सहमत : *The workers were ~ on this issue, या मुद्द्यावर कामगारांचे मतैक्य होते.* ७ सतत, अखंड : *sleep ten hours ~, सलग दहा तास झोपणे.* ८ लांबी, रुंदी आणि जाडी असलेला, घन. **solid** *ना* [*गण*] १ घनपदार्थ, जड वस्तू. २ लांबी, रुंदी आणि जाडी असलेली आकृती, घनाकृती. **solidly** *क्रिवि* भक्कमपणे; खंबीरपणे. **solidity** /स'लिडटि/ *ना* [*अगण*] घनता.

solidarity /सॉलि'डॅरटि/ *ना* [*अगण*] समान हितसंबंध असल्यामुळे होणारी एकजूट, एकी.

solidify /स'लिडिफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* -ied) [*अक, सक*] घनरूप होणे/करणे, घट्ट होणे/करणे.

solitary /'सॉलिट्रि; *अमे* -टेरि/ *वि* १ एकाकी (राहणारा); एकटा. २ एकमेव, फक्त एक : *a ~ visitor, भेट देणारा फक्त एक.* ३ दूरचा.

solitude /'सॉलिट्यूड्; *अमे* -टूड्/ *ना* [*अगण*] एकांत.

solo /'सउलउ/ *ना* [*गण*] (*ब.व* ~s) एकाने करायचा संगीत, नृत्य वगैरेचा कार्यक्रम : *a clarinet ~, क्लेरिनेटचे एकट्याने केलेले वादन.* **solo** *वि, क्रिवि* १ एकट्याचे : *a ~ flight, एकट्याचे उड्डाण.* २ एकट्याने करायचा : *music for ~ flute, एकट्याच्या बासरीवादनाचे संगीत.* **soloist** *ना* एकटा कार्यक्रम करणारा माणूस.

solstice /'सॉल्स्टिस/ *ना* [*गण*] सूर्य विषुववृत्तापासून दक्षिणेच्या किंवा उत्तरेच्या अगदी टोकाला असण्याचा काल, अयन.

soluble /'सॉल्युबल्/ *वि* १ द्रवात विरघळणारा, विद्राव्य. २ सुटण्यासारखा. **solubility** *ना* [*अगण*] विद्राव्यता.

solution /स'लूशन्/ *ना* १ (क) [*गण*] प्रश्नाचे, समस्येचे वगैरे उत्तर, तोडगा. (ख) [*अगण*] (प्रश्नाची) सोडवणूक, उकल. २ (क) [*अगण*] द्राव करण्याची पद्धती, विद्रवीकरण. (ख) [*गण, अगण*] अशा प्रकारे तयार झालेले द्रव, विद्रव, द्रावण.

solve /सॉल्व्ह्/ *क्रि* [*सक*] (प्रश्नाचे वगैरे) उत्तर शोधणे, कोडे सोडवणे, उकल करणे. **solvable** *वि* सुटण्यासारखा.

solvent /'सॉल्व्हन्ट्/ *वि* कर्ज फेडण्याची ऐपत असणारा. **solvent** *ना* [*गण, अगण*] दुसरा पदार्थ विरघळवू शकणारे द्रव, विद्रावक. **solvency** *ना* [*अगण*] विद्रावकता, कर्जफेडीची क्षमता.

sombre (*अमे* **somber**) /'सॉम्ब(र्)/ *वि* १ काळपट रंगाचा, उदास : *~ colours, उदास रंग.* २ गंभीर आणि दुःखी, खिन्न : *a ~ mood, खिन्न वृत्ती/मन.* **sombrely** *क्रिवि* खिन्नपणे, उदासपणे. **sombreness** *ना* [*अगण*] काळपटपणा; उदासपणा; खिन्नता.

some^{1} /सम् क्षीण रूप सम्/ *वि* निश्चित राशी किंवा संख्या नसलेला, थोडा : *Have ~ milk, थोडं दूध घे* ○ *~ children, काही मुलं.* २ माहीत नसलेला किंवा नाव नसलेला, कुणीतरी, कोणीएक : *She's living at ~ place in Surrey, ती सरीमधे कुठेतरी राहते.* ३ साधारणपणे, सुमारे : *~ twenty years ago, सुमारे वीस वर्षांपूर्वी.* ४ बराच, खूप : *for ~ time, बराच वेळ.*

some^2 /सैम्/ *सना* १ काही : *S~ of these books are quite useful, यांतील काही पुस्तके* खूप उपयुक्त आहेत. २ पैकी काही, पैकी थोडे : *S~ of the guests didn't stay for long, but most did, काही पाहुणे फार वेळ राहिले नाहीत, पण बरेच राहिले* ○ *S~ people have very bad manners, काही लोकांच्या वागणुकीच्या तऱ्हा फार वाईट असतात.*

somebody /'सैम्बडि/ (तसेच **someone** /'सैम्विन्/) *सना* १ कुणीतरी : *There's ~ at the door, कुणीतरी दाराशी आलंय्.* २ महत्त्वाची व्यक्ती : *She really thinks she's ~, आपण कुणी मोठे आहोत असं तिला खरंच वाटतं.*

somehow /'सैम्हाउ/ *क्रिवि* १ या ना त्या मार्गाने, कसातरी; कशातरी प्रकारे : *We'll get there ~, आपण कसेही करून जाऊ तेथे.* २ काही कारणाने : *S~ I just don't think she'll come back, का कोण जाणे पण ती परत येईल असे मला मुळीच वाटत नाही.*

someone = SOMEBODY.

somersault /'सैमसॉऽल्ट्/ *ना* [*गण*] कोलांटी. **somersault** *क्रि* [*अक*] कोलांटी उडी मारणे, कोलांटी खाणे.

something /'सैम्थिङ्/ *सना* १ काहीतरी : *I want ~ to eat, मला काहीतरी खायला हवंय्.* २ महत्त्वाची गोष्ट : *I'm sure she knows ~ about this, याविषयी तिला काहीतरी ठाऊक आहे याची मला खात्री आहे.* ३ (*वाक्प्र*) **or something** (*अनौप*) किंवा असंच काहीतरी : *She caught flu or something, तिला फ्लू का असंच काहीतरी झालं.* **,something like a 'sb/sth** (क) अशासारखंच काही. (ख) जवळजवळ असंच काही.

sometime /'सैम्टाइम्/ *क्रिवि* केव्हातरी : *~ in May, मेमधे केव्हातरी.*

sometimes /'सैम्टाइम्झ्/ *क्रिवि* कधीकधी : *I ~ receive letters from him, मला कधीमधी त्याची पत्रे येतात.*

somewhat /'सम्वॉट्; *अमे* -ह्वॉट्/ *क्रिवि* अगदी, पार; काहीसा : *I was ~ surprised, मला काहीसं आश्चर्य वाटलं.*

somewhere /'सैम्वेअ(र्); *अमे* -ह्वेअर/ (*अमे* **someplace**) *क्रिवि* १ कुठेतरी : *It must be ~ near here, ते इथेच कुठेतरी जवळपास असलं पाहिजे.* २ (*वाक्प्र*) **get somewhere** ➪ GET.

son /सैन्/ *ना* १ [*गण*] मुलगा, चिरंजीव. २ (मोठ्या माणसाने लहान मुलाशी किंवा वयाने कमी असलेल्या पुरुषाशी बोलताना वापर) बाळ : *What's your name, ~? तुझं नाव काय बाळ?* **'son-in-law** *ना* (*ब.व* **'sons-in-law**) मुलीचा नवरा, जावई.

sonata /स'नाट/ *ना* [*गण*] बहुधा तीन-चार भागांचे एक किंवा दोन वाद्यांसाठीचे संगीत.

song /सॉङ्/ *ना* १ [*गण*] गीत, गाणे. २ [*अगण*] गायन. ३ (*वाक्प्र*) **for a 'song** (*अनौप*) फार स्वस्त, कमी किमतीत. **a song and 'dance** अनावश्यक धांदल किंवा गडबड.

sonic /'सॉनिक्/ *वि* आवाज किंवा आवाजाच्या वेगाबाबतचा, ध्वनीचा.

sonnet /'सॉनिट्/ *ना* [*गण*] प्रत्येकी १० मात्रा असलेल्या १४ ओळींची एक कविता, सुनीत.

soon /सून्/ *क्रिवि* १ लवकरच : *We shall ~ be home, आपण लवकरच घरी पोहोचू.* २ आधी, लवकर : *How ~ can you be ready? किती लवकर तू तयार होऊ शकशील?* ३ (*वाक्प्र*) **as 'soon as** त्याक्षणी : *He left as ~ as he heard the news, बातमी ऐकताच तो निघाला.* **no sooner . . . than** त्यापाठोपाठ, लगेच : *No ~er had she arrived than she had to leave again, आल्याआल्या लगेच तिला परत जावे लागले.* **the ,sooner the 'better** शक्य तेवढ्या लवकर. **sooner . . . than** त्यापेक्षा : *I would ~er die than marry you, तुझ्याशी लग्न करण्यापेक्षा मी मरण पत्करीन.*

soot /सुट्/ *ना* [*अगण*] धुरामुळे पृष्ठभागावर जमणारी काळी पावडर, काजळी. **sooty** *वि* **(-ier, -iest)** काजळी धरलेला किंवा काजळीने काळा झालेला.

soothe /सूद्/ *क्रि* [*सक*] १ एखाद्याला शांत करणे, समजूत करणे. २ वेदना वगैरे कमी करणे. **soothing** *वि* शांत करणारा; वेदनाशामक.

sop /सॉप्/ *ना* [*गण*] चिडलेल्या निराश वगैरे झालेल्या माणसाला खुष करण्यासाठी दिलेली गोष्ट, आमिष.

sophisticated /स'फिस्टिकेइटिड्/ *वि* १ जगाचा अनुभव असलेला, सुसंस्कृत. २ अनेक गोष्टी एकत्र असलेला आणि उच्च दर्जाचा, अत्याधुनिक : ~ *weapons, अत्याधुनिक शस्त्रे.* **sophistication** /स,फिस्टि'केइशन्/ *ना* [*अगण*] सुसंस्कृतपणा; अत्याधुनिकता.

soppy /'सॉपि/ *वि* (**-ier, -iest**) (*अनौप*) भडक भावनांचा, भावविवश.

soprano /स'प्रानउ/ *ना* [*गण*] (*ब.व* ~**s**) *वि* बायकांच्या सर्वोच्च स्वरातला (गायक किंवा संगीत).

sorcerer /'सॉऽसर(र्)/ (*स्त्री* **sorceress** /-इस्/) *ना* [*गण*] चेटूक करणारा, चेटकीण. **sorcery** *ना* [*अगण*] चेटूक, जादूटोणा.

sordid /'सॉऽडिड्/ *वि* १ (स्थळांबाबत वगैरे) दरिद्री, गलिच्छ. २ (माणसांबाबत, वर्तनाबाबत वगैरे) स्वार्थी, हलकट, पाजी. **sordidly** *क्रिवि* गलिच्छपणे; हलकटपणे. **sordidness** *ना* [*अगण*] गलिच्छपणा; नीचपणा.

sore /सॉऽ(र्)/ *वि* १ (शरीराच्या भागाबाबत) दुखरा. २ (*औप*) गंभीर : *in ~ need, गंभीर स्वरूपाची गरज, निकड.* ३ (विशेषतः *अमे अनौप*) संतप्त, चिडलेला : *feel ~, राग येणे.* ४ (*वाक्प्र*) **a ,sore 'point** चीड आणणारा किंवा लाज आणणारा विषय, वर्म. **stand/stick out like a sore 'thumb** लक्षात येईल असे असणे. **sore** *ना* [*गण*] त्वचेवरची दुखरी जखम. **sorely** *क्रिवि* मोठ्या प्रमाणात : *~ needed, नितान्तपणे आवश्यक.* **soreness** *ना* [*अगण*] दुखरेपणा, चिडकेपणा.

sorrow /'सॉरउ/ *ना* [*गण, अगण*] दुःख (किंवा त्याचे कारण); खेद. **sorrow** *क्रि* [*अक*] (*at/over*)// दुःख होणे, खेद वाटणे. **sorrowful** *वि* दुःखी, दिलगीर.

sorry /'सॉरि/ *वि* १ दुःखी, खिन्न : *She was ~ for her past crimes, गतकाळातल्या स्वतःच्या गुन्ह्यांबाबत तिला खेद होता.* २ एखाद्याविषयी दया, कीव, कणव असणारा : *I do feel ~ for him, मला त्याची दया येते.* ३ (खंत वगैरे व्यक्त करण्यास वापर) : *I'm ~, but I don't agree, माझा नाईलाज आहे, पण मला हे मान्य नाही.* ४ (**-ier, -iest**) वाईट, दीनवाणा : *in a ~ state, वाईट अवस्थेत.* **sorry** *उद्‌गा* १ (दिलगिरी वगैरे व्यक्त करण्यास वापर) : *Sorry! Did I hurt you? सॉरी हं, तुला लागलं?* २ (एखादी गोष्ट ऐकू न आल्यास ती पुन्हा म्हणण्याची विनंती करण्यास वापर) काय म्हणालास? पुन्हा सांगतोस?

sort^1 /सॉऽट्/ *ना* १ [*गण*] काही बाबतीत समान असणाऱ्या लोकांचा किंवा वस्तूंचा गट, प्रकार. २ (*वाक्प्र*) **out of 'sorts** बरे न वाटणारा, राग आलेला. **sort of** काहीसा : *~ of pleased that it happened, ते घडले म्हणून काहीसा खुष.*

sort^2 /सॉऽट्/ *क्रि* १ [*सक*] (*out*)// वेगळे करणे, निवडणे, लावणे : *~ (out) the good and bad apples, चांगली आणि वाईट सफरचंदे वेगळी काढणे.* २ (*क्रिब*) **sort sth out** (**क**) नीट लावणे, व्यवस्थित करणे. (**ख**) सोडवणे, हातात घेणे : *~ out a problem, प्रश्न सोडवणे.*

SOS /,अेस् अउ 'अेस्/ *ना* [*अे.व*] बिनतारी यंत्राने वगैरे मदतीसाठी पाठविलेला निकडीचा संदेश, महत्त्वाचा निरोप.

so-so /,सउ'सउ/ *वि, क्रिवि* (*अनौप*) सर्वसामान्य; फार चांगले नाही अन् फार वाईट नाही अशा रीतीने, यथातथा : *'How are you feeling?' 'So-so', 'कसं वाटतंय् आता तुला?' 'असंतसं'.*

soufflé /'सूफ्लेइ; *अमे* सू'फ्लेइ/ *ना* [*गण, अगण*] अंडी, दूध, चीज वगैरे एकत्र कालवून भाजून केलेला एक पदार्थ.

soul /सउल्/ *ना* १ [*गण*] मृत्यूनंतरही राहतो असा समज असलेला माणसाचा एक पारमार्थिक अंश, आत्मा. २ [*गण, अगण*] सर्व शक्ती, जीव : *put ~ into one's work, स्वतःच्या कामात जीव ओतणे.* ३ [*अे.व*] आदर्श नमुना : *the ~ of discretion, तारतम्याचा आदर्श.* ४ [*गण*] मनुष्य, माणूस : *not a ~ to be seen, चिटपाखरूही दिसत नाही.* ५ = SOUL MUSIC (SOUL). **'soul-destroying** *वि* (कामाबाबत) रटाळ. **soulful** *वि* गहरा भाव असणारा, भावपूर्ण. **soulfully** *क्रिवि* भावपूर्णतेने. **soulless** *क्रिवि* हळुवार, कोमल

भाव नसलेला, क्षुद्र. **'soul music** *ना* [*अगण*] अमेरिकेतील कृष्णवर्णीय (आफ्रिकी) लोकांतील लोकप्रिय आधुनिक संगीत. **soul-searching** *ना* [*अगण*] सद्सद्विवेक बुद्धीची परीक्षा, आत्मपरीक्षा.

sound^{1} /साउन्ड्/ *वि* १ सुस्थितीतील; सुदृढ : *a ~ body, सुदृढ शरीर.* २ काळजीपूर्वक आणि बिनचूक, तरबेज : *a ~ worker, तरबेज कामगार.* ३ अर्थपूर्ण : *a ~ policy, अर्थपूर्ण धोरण.* ४ परिपूर्ण; सखोल, पट्टीचा : *be a ~ sleeper, पट्टीचा झोपाळू असणे.* **sound** *क्रिवि* गाढ : *~ asleep, गाढ झोपलेला.* **soundly** *क्रिवि* पूर्णपणे, गाढ रीतीने. **soundness** *ना* [*अगण*] सुदृढपणा; अचूकपणा; गाढपणा.

sound^{2} /साउन्ड्/ *ना* १ [*गण, अगण*] ऐकू येतं ते, आवाज, नाद, ध्वनी : *the ~ of drums, ढोलांचा आवाज.* २ [*गण*] एखाद्या गोष्टीविषयीचे मत, कल्पना : *I don't like the ~ of him, त्याच्याबाबतचं माझं मत फारसं चांगलं नाही.* **'sound barrier** *ना* [*गण*] विमानाचा वेग जेव्हा ध्वनीच्या वेगाएवढा होतो ती पातळी. **'sound effects** *ना* [*ब.व*] चित्रपटातील वगैरे बोलणे किंवा संगीत याशिवायचे आवाज, ध्वनिपरिणाम. **'soundproof** *वि* ज्याच्यातून आवाज जाऊ शकत नाही असा, ध्वनिरोधक. **'soundproof** *क्रि* [*सक*] (खोली वगैरेचे) ध्वनिरोधन करणे. **'sound-track** *ना* [*गण*] चित्रपटातील संगीत वगैरे.

sound^{3} /साउन्ड्/ *क्रि* १ [*अक*] वाटणे, विशिष्ट रीतीने मनात भरणे : *His story ~s genuine, त्याची गोष्ट खरी अशी वाटते.* २ [*अक, सक*] ध्वनी निर्माण करणे, नाद येणे. ३ [*सक*] सूचना देण्यास वाजवणे : *~ the alarm, गजर करणे* किंवा *धोक्याची घंटा वगैरे वाजवणे.* ४ [*सक*] उच्चार करणे : *Don't sound the 'b' in 'dumb', 'Dumb' या शब्दातला b/ब चा उच्चार करू नकोस.* ५ (*क्रिब*) **sound off** (*अनौप*) तावातावाने बोलणे किंवा बढाया मारणे.

sound^{4} /साउन्ड्/ *क्रि* १ [*अक, सक*] (समुद्राचा वगैरे) जड दोरीने थांग काढणे, खोली मोजणे. २ (*क्रिब*) **sound sb out (about/on sth)** एखाद्याची मते, दृष्टिकोन वगैरे अजमावणे, अंदाज घेणे.

soup /सूप्/ *ना* [*अगण*] १ मांस, भाज्या वगैरे पाण्यात एकत्र शिजवून केलेला पातळ पदार्थ, पातळ रस्सा. २ (*वाक्प्र*) **in the 'soup** (*अनौप*) अडचणीत, संकटात.

sour /'साउअ(र्)/ *वि* १ आंबट. २ शिळा, आंबलेला : *~ milk, आंबलेले दूध.* ३ तापट. ४ (*वाक्प्र*) **go / turn 'sour** कटुता येणे, बिघडणे. **sour** *क्रि* [*अक, सक*] आंबणे, आंबवणे. **sourly** *क्रिवि* चक्रमपणे. **sourness** *ना* [*अगण*] आंबटपणा; आंबलेपणा; तापटपणा.

source /सॉऽस्/ *ना* [*गण*] उगम, मूळ : *the ~ of a river/belief, नदीचा/समजाचा उगम.*

south /साउथ्/ *ना* [*अे.व*] १ **the south** दक्षिण दिशा. २ **the South** देशाचा दक्षिणेकडचा भाग. **south** *वि* १ दक्षिणेचा, दाक्षिणात्य. २ (वाऱ्यांबाबत) दक्षिणेकडचा. **south** *क्रिवि* दक्षिणेस. **,south-'east** *ना* [*अे.व*] *वि, क्रिवि* (प्रदेश, दिशा वगैरे) दक्षिण आणि पूर्वेच्यां मधोमध, आग्नेय, दक्षिण-पूर्व. **,south-'eastern** *वि* आग्नेयेचा. **southerly** /'सैदलि/ *वि, क्रिवि* १ दक्षिणेकडचा किंवा दक्षिणेस. २ (वाऱ्याबाबत) दक्षिणेकडचा. **southern** /'सैदन्/ *वि* एखाद्या देशाच्या किंवा जगाच्या दक्षिणेकडच्या भागाचा, दाक्षिणात्य. **southerner** *ना* [*गण*] दक्षिण भागात जन्मलेला किंवा राहणारा, दक्षिणी. **southward** /'साउद्वड्/ *वि* दक्षिणेकडचा. **southward(s)** *क्रिवि* दक्षिणेकडे. **,south-'west** *ना* [*अे.व*] *वि, क्रिवि* (प्रदेश, दिशा वगैरे) दक्षिण आणि पश्चिमेच्या मधोमध, नैऋत्य, दक्षिण-पश्चिम. **,south-'western** *वि* नैऋत्येचा.

souvenir /,सूव्ह'निअ(र्)/ *ना* [*गण*] व्यक्ती, स्थळ किंवा घटनेची आठवण म्हणून ठेवलेली वस्तू, स्मरणिका, स्मृतिचिन्ह.

sovereign /'सॉव्ह्रिन्/ *ना* [*गण*] राजा किंवा राणी. **sovereign** *वि* १ (सत्तेबाबत) अनिर्बंध, अमर्याद. २ (राष्ट्र किंवा शासकाबाबत) स्वतंत्र आणि स्वयंशासित, सार्वभौम. **sovereignty** /'सॉव्ह्रन्टि/ *ना* [*अगण*] सार्वभौमत्व.

Soviet /'सउव्हिअट्/ *वि* पूर्वीच्या यू. एस्. एस्. आर्. चा किंवा त्यातील लोकांचा.

sow^{1} /साउ/ *ना* [*गण*] डुकराची मादी, डुकरीण.

sow^{2} /सउ/ *क्रि* (*भूत* **~ed**, *भूत वि* **~n** /सउन्/ किंवा **~ed**) [*सक*] १ (बी) पेरणे; लागवड करणे. २ (भावना वगैरे) निर्माण करणे किंवा पसरविणे : *~ discontent, असंतोष पसरविणे.*

soya bean /'सॉइअ बीन्/ *ना* [*गण*] खाण्यासाठी आणि तेलासाठी लागवड करून काढलेले एक बी.

spa /स्पा/ *ना* [*गण*] खनिज पाण्याचा झरा (असलेले स्थळ).

space /स्पेइस्/ *ना* १ [*गण, अगण*] दोन वस्तूंमधील अंतर : *a narrow ~ between the chairs, खुर्च्यांतील अपुरे अंतर.* २ [*गण, अगण*] भूक्षेत्र : *the wide open ~s, प्रशस्त मोकळी जागा.* ३ [*अगण*] जागा : *There's not enough ~ here, येथे पुरेशी जागा नाहीये.* ४ [*अगण*] अवकाश, आकाश : *stare into ~, अवकाशात/आकाशात टक लावून पाहणे.* ५ [*अगण*] (तसेच **,outer 'space**) अंतराळ, अंतरीक्ष. ६ [*गण*] काल, अवधी : *within the ~ of a day, एका दिवसाच्या अवधीत.* **space** *क्रि* [*सक*] (*out*)// मधे ठराविक जागा सोडणे. **'space-age** *वि* अत्याधुनिक. **'spacecraft, 'spaceship** *ना* [*गण*] अवकाशयान, अंतराळयान. **'space station** *ना* [*गण*] अंतराळातील कामासाठी मुख्य स्थान म्हणून वापरायचा मोठा उपग्रह.

spacious /'स्पेइशस्/ *वि* ऐसपैस. **spaciousness** *ना* [*अगण*] ऐसपैसपणा.

spade /स्पेइड्/ *ना* [*गण*] १ लांब दांड्याचे, सपाट पात्याचे आणि धारदार कड असलेले खणायला वापरायचे हत्यार, कुदळ, फावडे. २ इस्पिकचा पत्ता. **'spadework** *ना* [*अगण*] पूर्वतयारी म्हणून उपसलेले कष्ट.

spaghetti /स्प'गेटि/ *ना* [*अगण*] कणिक आणि अंडी यांच्या मिश्रणापासून बनविलेला एक शेवयासारखा पदार्थ.

span /स्पॅन्/ *ना* [*गण*] १ कमानीच्या खांबांतले अंतर, कमानीची गर्भी. २ सुरुवातीपासून ते शेवटपर्यंतचा काल : *the ~ of a person's life, माणसाच्या आयुष्याचा कालावधी.* **span** *क्रि* (**-nn-**) [*सक*] १ पूल बांधणे. २ (विशेषतः कालावधी) टिकणे : *a life ~ning fifty years, पन्नास वर्षांचे आयुष्य.*

spaniel /'स्पॅनिअल्/ *ना* [*गण*] लांब पडक्या कानाच्या कुत्र्याची एक जात.

spank /स्पॅङ्क्/ *क्रि* [*सक*] शिक्षा म्हणून (विशेषतः मुलाच्या) ढुंगणावर फटका मारणे. **spank** *ना* [*गण*] असा मारलेला फटका.

spanner /'स्पॅन(र्)/ (*अमे* **wrench**) *ना* [*गण*] नट पकडून पिळण्याचे एक साधन, पाना.

spar /स्पा(र्)/ *क्रि* (**-rr-**) [*अक*] (*with*)// १ मुष्टियुद्धाचा सराव करणे. २ बहुधा खेळीमेळीने वादविवाद करणे.

spare^{1} /स्पेअ(र्)/ *वि* १ (क) जादा, अतिरिक्त : *two ~ chairs, जास्तीच्या दोन खुर्च्या.* (ख) (वेळेबाबत) मोकळा, फुरसदीचा. २ (लोकांबाबत) हडकुळा, लुकडा. **spare** (तसेच **,spare 'part**) *ना* [*गण*] यंत्राचा वगैरे बदली करण्याकरता वापरायचा सुटा भाग. **spare tyre** *ना* [*गण*] गाडीचे एखादे चाक पंक्चर झाले तर त्याजागी बसविण्यासाठी नेलेले जादा टायर, स्टेपनी.

spare^{2} /स्पेअ(र्)/ *क्रि* [*सक*] १ (पैसा, वेळ वगैरे) एखाद्या प्रयोजनाकरता देऊ शकणे, द्यायला होणे : *Can you ~ me a few minutes? माझ्यासाठी काही मिनिटे देऊ शकशील?* २ वापर न करणे, न देणे, खर्च न करणे वगैरे : *No expense was ~d, खर्चात कोणतीही काटकसर केली नाही* म्हणजेच *खूप पैसे खर्च केले.* ३ इजा न करणे (किंवा तसे ठरवणे), नाश न करणे, हात न लावणे : *~ a prisoner, कैद्याला इजा न करणे.* ४ (*वाक्प्र*) **spare a 'thought for** निर्णय घेताना एखाद्या गोष्टीचा विचार करणे. **sparing** *वि* काटकसरी. **sparingly** *क्रिवि* काटकसरीने, हात राखून.

spark /स्पाक्/ *ना* [*गण*] १ एखादी गोष्ट जळत असताना किंवा विद्युत्प्रवाह खंडित झाल्याने होणारा छोटा प्रकाशमान थेंब, ठिणगी, स्फुल्लिंग. २ [बहुधा *अ.व*] (*ला*)

अंश, लवलेश : *There isn't a ~ of decency in him, त्याच्यात सभ्यपणाचा लवलेशही नाही.* **spark** *क्रि* १ [*अक*] ठिणग्या पडणे/उडणे. २ (*क्रिब*) **spark sth off** एखाद्या गोष्टीचे कारण होणे. **'spark-plug** (तसेच **'sparking-plug**) *ना* [*गण*] इंजिनमधील इंधन प्रज्वलित करण्याचे साधन, स्फुल्लिंग निग, ठिणगी गुडदी.

sparkle /'स्पाक्ल्/ *क्रि* [*अक*] चमचमणे : (*ला*) *Her conversation ~d, तिचे संभाषण चमकदार होते.* **sparkle** *ना* [*गण, अगण*] चमचम : (*ला*) *a performance lacking in ~, चमकदारपणाचा अभाव असलेला प्रयोग.* **sparkling** /'स्पाक्लिङ्/ *वि* चमचमणारा.

sparrow /'स्पॅरउ/ *ना* [*अगण*] चिमणी.

sparse /स्पास्/ *वि* गर्दी नसलेला किंवा दाट नसलेला, विरळ : *~ population, विरळ लोकसंख्या.* **sparsely** *क्रिवि* विरळपणे. **sparseness** *ना* [*अगण*] विरळपणा.

spasm /'स्पॅझ़म्/ *ना* १ [*गण, अगण*] स्नायूचे अचानक आणि अनियंत्रित असे आकसणे, पेटका, वांब. २ [*गण*] (ऊर्जेचा वगैरे होणारा) आकस्मिक स्फोट, झटका. **spasmodic** /स्पॅझ़्'मॉडिक्/ *वि* १ मधूनमधून घडणारा किंवा केला जाणारा, अनियमित. २ झटक्यांनी निर्माण होणारा किंवा प्रभावित. **spasmodically** *क्रिवि* मधूनमधून; झटक्याने.

spastic /'स्पॅस्टिक्/ *ना* [*गण*], *वि* मज्जासंस्थेला इजा पोहोचल्याने अपंगत्व आलेला (माणूस), अंगग्रही.

spat SPIT^{2} चा *भूत, भूत वि.*

spate /स्पेइट्/ *ना* [*अ.व*] एकदम येणारी मोठी संख्या, झुंड : *a ~ of robberies, लुटींचे सत्र.*

spatial /'स्पेइश्ल्/ *वि* जागेसंबंधी, अंतराळासंबंधी, अवकाशिक. **spatially** *क्रिवि* अवकाशाबाबत.

spatter /'स्पॅट(र्)/ *क्रि* [*अक, सक*] उडणे/उडवणे, शिंपडणे, डाग पडणे, सडा पडणे. **spatter** *ना* [*अ.व*] शिडकाव, शिंपण.

spatula /'स्पॅचुल/ *ना* [*गण*] पसरविण्यासाठी किंवा एकत्र करण्यासाठी पसरट आणि लवचिक पाते असणारे एक हत्यार, कलथा.

spawn /स्पॉऽन्/ *ना* [*अगण*] माशांची किंवा बेडकांची अंडी. **spawn** *क्रि* [*अक, सक*] १ अंडी घालणे. २ (*ला*) पिलावळ घालणे, खूप निर्माण करणे.

speak /स्पीक्/ *क्रि* (*भूत* **spoke** /स्पउक्/, *भूत वि* **spoken** /'स्पउकन्/) १ [*अक*] सांगणे; बोलणे : *I was ~ing to her about my plans, माझ्या आखलेल्या बेतांबाबत मी तिच्याशी बोलत होतो.* २ [*सक*] (भाषा) येणे : *~ French, फ्रेंच येणे.* ३ [*सक*] भाषण करणे. ४ [*सक*] जाहीर करणे; व्यक्त करणे : *~ the truth, सत्य सांगणे.* ५ [*अक*] भावना, कल्पना वगैरे शब्दांवाचून व्यक्त करणे : *Actions ~ louder than words, शब्दांपेक्षा कृती जास्त सांगतात.* ६ (*वाक्प्र*) **on 'speaking terms** एखाद्याशी गप्पा मारण्याइतकी चांगली ओळख असणे. **speak one's mind** स्वतःची मते आडपडदा न ठेवता मांडणे, सडेतोड बोलणे. ७ (*क्रिब*) **speak for sb** (**क**) एखाद्याची मते/बाजू वगैरे मांडणे. (**ख**) एखाद्याच्या बाजूने पुरावा देणे. **speak out** धीटपणे (मत वगैरे) मांडणे, निर्भीडपणे सांगणे. **speak up** (**क**) अधिक मोठ्याने बोलणे. (**ख**) निर्भीडपणे सांगणे. **speaker** *ना* [*गण*] १ वक्ता. २ एखादी विशिष्ट भाषा येणारा, भाषक : *a French ~, फ्रेंच भाषक.* ३ LOUDSPEAKER चा संक्षेप.

spear /स्पिअ(र्)/ *ना* [*गण*] मोठ्या दांड्याला धातूचे टोक असलेले हत्यार, भाला, बरची. **'spearhead** *ना* [*गण*] हल्ला करणाऱ्यांचा म्होरक्या, आघाडीचा वीर. **'spearhead** *क्रि* [*सक*] (हल्ला, चढाईचे वगैरे) नेतृत्व करणे.

spearmint /'स्पिअमिन्ट्/ *ना* [*अगण*] चवीसाठी किंवा पदार्थाला वास देण्यासाठी वापरायची एक प्रकारची सुवासिक पाने.

special /'स्पेश्ल्/ *वि* १ खास; विशेष, असाधारण. २ विशिष्ट माणसाचा/माणसासाठी असलेला किंवा विशिष्ट कारणाचा/कारणासाठी असलेला. ३ खास प्रतीचा किंवा खास प्रमाणातला वगैरे : *~ treatment, खास आदरातिथ्य/वागणूक.* **special** *ना* [*गण*] १ वेगळा असा, नेहमीचा नसलेला : *a television ~ about the elections, निवडणुकांबाबत दूरदर्शनचा विशेष कार्यक्रम.* २ (*अमे अनौप*) खास कमी केलेली किंमत. **specialist** *ना*

[*गण*] विषय, व्यवसाय वगैरेतील विशेषज्ञ. **specially** *क्रिवि* विशेषतः.

speciality /,स्पेशि'ॲलटि/ (विशेषतः *अमे* **specialty** /'स्पेशल्टि/) *ना* [*गण*] १ एखाद्याचा खास विषय, आवड, कसब वगैरे, खासियत, वैशिष्ट्य. २ ज्या गोष्टीबाबत एखादी व्यक्ती, कंपनी वगैरे प्रसिद्ध असेल ती गोष्ट, वैशिष्ट्य.

specialize /'स्पेशलाइझ्/ *क्रि* [*अक*] (*in*)// विशिष्ट विषय, व्यवसाय वगैरेतच विशेष लक्ष देऊन काम करणे : ~ *in modern history, अर्वाचीन इतिहासाचा विशेष अभ्यास करणे.* **specialization** /-'झेइश्न्; *अमे* -लि'झ्-/ *ना* [*अगण*] विशेष अभ्यास, कसब वगैरे.

species /'स्पीशीझ्/ *ना* [*गण*] (*ब.व* **species**) विशिष्ट गुणधर्म असलेला आणि परस्परांत प्रजोत्पादन करू शकणारा प्राण्यांचा वर्ग, प्राण्यांची जाती.

specific /स्प'सिफिक्/ *वि* १ तपशीलवार आणि अचूक, नेमका : ~ *instructions, नेमक्या सूचना.* २ विशिष्ट गोष्टीबाबतचा वगैरे : *for a ~ purpose, विशिष्ट उद्दिष्टासाठी.* **specifically** /-क्लि/ *क्रिवि* नेमकेपणाने; विशिष्ट उद्देशाने.

specification /,स्पेसिफि'केइश्न्/ *ना* [*गण, बहुधा ब.व*] एखाद्या संकल्पचित्राचे किंवा डिझाइनचे तपशील आणि एखाद्या गोष्टीसाठी आवश्यक असणारी सामग्री, खुलासेवार वर्णन.

specify /'स्पेसिफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] (तपशील, आवश्यक सामग्री वगैरे) स्पष्टपणे आणि नेमकेपणाने मांडणे, तपशील देणे, खुलासेवार वर्णन करणे.

specimen /'स्पेसिमिन्/ *ना* [*गण*] १ एखाद्या गोष्टीचा, वर्गाचा वगैरे नमुना, मासला, प्रादर्श : *a ~ of her work, तिच्या कामाचा नमुना.* २ रोगनिदानासाठीचा वगैरे नमुना, परीक्ष्य.

speck /स्पेक्/ *ना* [*गण*] लहान डाग, ठिपका; (धुळीचा वगैरे) कण.

speckle /'स्पेक्ल्/ *ना* [*गण*] पीस वगैरेवरील ठिपका. **speckled** *वि* ठिपक्याचा.

spectacle /'स्पेक्टक्ल्/ *ना* १ [*गण*] सार्वजनिक भव्य प्रदर्शन. २ [*गण*] भव्य दर्शन, दिमाखदार दर्शन. ३ [*ब.व*] (*औप*) चष्मा.

spectacular /स्पेक्'टॅक्युल(र्)/ *वि* भव्य, दिमाखदार. **spectacularly** *क्रिवि* भव्य प्रमाणात, दिमाखदारपणे.

spectactor /स्पेक्'टेइट(र्)/ *ना* [*गण*] नाटक, खेळ वगैरेचा प्रेक्षक.

spectrum /'स्पेक्ट्रम्/ *ना* [बहुधा *अे.व*] (*ब.व* **-tra** /-ट्र/) १ इंद्रधनुष्यात दिसतो तसा रंगांचा पट्टा, वर्णपट. २ (*ला*) मोठी कक्षा, व्यापक मर्यादा : *a ~ of opinions, अनेक प्रकारची मते.*

speculate /'स्पेक्युलेइट्/ *क्रि* १ [*अक, सक*] पूर्ण माहिती न घेताच मत बनवणे, आधाराविना मत बनणे. २ [*अक*] धोका पत्करून नफ्यासाठी शेअर्स, माल वगैरेची खरेदी-विक्री करणे, सट्टा करणे. **speculation** /-'लेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] परिकल्पन; सट्टेगिरी, सट्टेबाजी. **speculative** *वि* काल्पनिक मताचा; सट्टेगिरीचा.

sped SPEED चा *भूत, भूत वि.*

speech /स्पीच्/ *ना* १ [*अगण*] बोलण्याची कृती, शक्ती किंवा पद्धती, बोलणे, भाषा. २ [*गण*] व्याख्यान : *make a ~, व्याख्यान* देणे. **speechless** *वि* अवाक् – उदाहरणार्थ भावनावेगाने.

speed /स्पीड्/ *ना* १ [*अगण*] हालचालीचा जलदपणा : *move with great ~, जलद हालचाल करणे.* २ [*गण, अगण*] वेग : *a ~ of 10 kilometres an hour, ताशी* दहा *किलोमीटर वेगाने.* (*वाक्प्र*) **(at) full speed** ⇨ FULL. **speed** *क्रि* (*भूत, भूत वि* **sped** /स्पेड्/ वेगाने जाणे या अर्थाने **~ed**) १ [*अक*] जलद जाणे. २ नियमाचे उल्लंघन करून वेगाने वाहन चालवणे, भरधाव जाणे. ३ (*क्रिब*) **speed (sth) up** वेग वाढणे/वाढवणे : *~ up production, उत्पादनाचा वेग वाढवणे.* **speedometer** /स्पी'डॉमिट(र्)/ *ना* [*गण*] वाहनावरील वेगमापक, वेगमापी. **'speedway** *ना* [*गण, अगण*] मोटरसायकलींची शर्यत (किंवा त्यांची धावपट्टी). **speedy** *वि* **(-ier, -iest)** जलद, वेगवान.

spell¹ /स्पेल्/ *ना* [*गण*] मंत्र (मुग्धता), भुरळ : *under the ~ of a fascinating man, आकर्षक व्यक्तिमत्त्वाच्या माणसाच्या भुरळीखाली.*

'spellbound *वि* मंत्रमुग्ध, भुरळ पडलेला.

spell^2 /स्पेल्/ *ना* [*गण*] १ काळ: *a ~ in prison, तुरुंगवासाचा काळ.* २ एखाद्या कामात खर्च केलेला वेळ: *a ~ at the wheel, चक्रावरचा (म्हणजे वाहनचालनाचा) वेळ.*

spell^3 /स्पेल्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **spelt** /स्पेल्ट्/ किंवा **spelled** /स्पेल्ड्/) १ [*अक, सक*] (शब्दाची) अक्षरे लिहिणे किंवा सांगणे, वर्ण लिहिणे. २ [*सक*] (अक्षरांबाबत) वर्णानुक्रमाने शब्द तयार करणे: *C-A-T ~s cat, C-A-T अक्षरांनी cat शब्द तयार होतो.* ३ [*सक*] पर्यवसान होणे: *Does laziness always ~ failure? आळसाचे पर्यवसान नेहमीच अपयशात होते?* ४ (*क्रिब*) **spell sth out** सोपे करून सांगणे, विशद करणे. **spelling** *ना* १ [*अगण*] (क) शब्दाचे लेखन करण्याची कला. (ख) शब्दलेखन. २ [*गण*] शब्दातील वर्णानुक्रम.

spend /स्पेन्ड्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **spent** /स्पेन्ट्/) १ [*अक, सक*] (*on*)// सामान, काम वगैरेवर पैसे खर्च करणे. २ [*सक*] (वेळ) घालवणे, दवडणे: *~ a week in hospital, हॉस्पिटलमधे एक आठवडा काढणे.* ३ [*सक*] विशिष्ट कारणासाठी (वेळ वगैरे) वापरणे: *~ one's energy cleaning the house, घर स्वच्छ करण्यात श्रम वेचणे.* ४ (*वाक्प्र*) **spend a 'penny** (*अनौप पर्या*) संडासला जाणे. **'spendthrift** *ना* [*गण*] खर्चिक, पैसे फुकट घालवणारा माणूस, उधळपट्टी करणारा माणूस. **spent** *वि* थकलेला, हवा गेलेला.

sperm /स्पऽम्/ *ना* [*अगण*] स्त्रीबीज फळवणारी पुल्लिंगी पेशी, शुक्रजंतू.

spew /स्प्यू/ *क्रि* [*अक, सक*] ओकणे (किंवा ओकायला लावणे).

sphere /स्फिअ(र्)/ *ना* [*गण*] १ पूर्ण गोलाकार भरीव वस्तू. २ आवडी, कार्ये, परिणाम वगैरेची कक्षा. **spherical** /'स्फेरिकल्/ *वि* गोलाकार.

spice /स्पाइस्/ *ना* १ [*गण, अगण*] जायफळासारखा पदार्थाला रुची आणणारा पदार्थ, मसाला. २ [*अगण*] (*ला*) उत्कंठा किंवा रस: *add ~ to a story, गोष्टीला तिखटमीठ लावणे.* **spice** *क्रि* [*सक*] मसाला लावणे/ घालणे. **spicy** *वि* **(-ier, -iest)** १ मसालेदार, चमचमीत. २ (*ला*) किंचित ग्राम्य म्हणून चेतवणारा, मालमसाला असलेला.

spick /स्पिक्/ *वि* (*वाक्प्र*) **,spick and 'span** तेजस्वी, नितळ आणि ठाकठीक, नीटनेटका.

spider /'स्पाइड(र्)/ *ना* [*गण*] कीटकांना पकडायला जाळे विणणारा आठ पायांचा जीव, कोळी. **spidery** *वि* (हस्ताक्षराबाबत) लांब आणि काटकुळे फराटे असणारे, कोळ्याच्या पायांसारखे.

spied SPY चा *भूत, भूत वि.*

spike /स्पाइक्/ *ना* [*गण*] १ टोक, अणकुची. २ पळायच्या बुटाच्या तळव्याचा टोकदार खिळा. ३ एका देठाला आलेली फुले किंवा बिया, मंजिरी. **spike** *क्रि* [*सक*] टोकदार खिळ्याने टोचणे. **spiky (-ier, -iest)** अणकुचीदार, टोकदार.

spill /स्पिल्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **spilt** /स्पिल्ट्/ किंवा **~ed**) [*अक, सक*] १ उतू जाणे, बाहेर सांडणे, भरून वाहणे. २ (*वाक्प्र*) **spill the 'beans** (*अनौप*) गुपित फोडणे, रहस्य प्रकट करणे.

spin /स्पिन्/ *क्रि* (*भूत* **spun** /स्पॅन्/ किंवा **span** /स्पॅन्/, *भूत वि* **spun, -nn-**) १ [*अक, सक*] गरगर फिरणे/फिरवणे. २ [*अक, सक*] सूत कातणे. ३ [*सक*] विणणे: *Spiders ~ webs, कोळी जाळी विणतात.* ४ [*सक*] (*अनौप*) (कथा) रचणे. ५ (*क्रिब*) **spin sth out** लांबवणे, चालवणे. **spin** *ना* १ [*गण, अगण*] गरगर फिरणे. २ [*गण*] मोटारचा छोटा प्रवास, चक्कर; (क्रिकेटमधे) चेंडूला दिलेली फिरकी. ३ (*वाक्प्र*) **in a (flat) 'spin** गोंधळलेल्या किंवा घाबरलेल्या स्थितीत. **,spin-'drier** *ना* [*गण*] गरगर फिरवून कपडे वाळवणारे साधन. **'spin-off** *ना* [*गण*] एखाद्या प्रक्रियेचा अप्रत्यक्ष परिणाम म्हणून होणारे उत्पादन वगैरे.

spinach /'स्पिनिज्/ *ना* [*अगण*] मोठ्या हिरव्या पानांची एक भाजी.

spinal /'स्पाइन्ल्/ *वि* (शरीरशास्त्र) पाठीच्या कण्याचा, पृष्ठवंश-.

spindle /'स्पिन्ड्ल्/ *ना* [*गण*] १ कातलेले

सूत गुंडाळण्याची पट्टी, चात्ती. २ ज्याभोवती यंत्र फिरते तो दांडा, आस. **spindly** /'स्पिन्ड्लि/ *वि* **(-ier, -iest)** लांब आणि पातळ.

spine /स्पाइन्/ *ना* [*गण*] १ = BACKBONE (BACK^1). २ काही प्राण्यांवरचा किंवा झाडांवरचा काटा, शूक, कंटक. ३ पुस्तकाची पाने जोडलेली बाजू. **'spine-chilling** *वि* रक्त गोठवणारे, भयानक. **spineless** *वि* (*अधिक्षेपी*) भेदरट, कणाहीन, पुळचट. **spiny** *वि* **(-ier, -iest)** काटे असणारा.

spinster /'स्पिन्स्ट(र्)/ *ना* [*गण*] (*कधीकधी अधिक्षेपी*) कुमारी स्त्री, प्रौढ कुमारिका.

spiral /'स्पाइअरल्/ *ना* [*गण*] १ मळसूत्राकार रचना, नागमोड: *A snail's shell is a ~, गोगलगाईचा शिंपला मळसूत्राकार असतो.* २ [बहुधा *अे.व*] सततची वाढ किंवा घट. **spiral** *वि* मळसूत्राकार, नागमोडी. **spiral** *क्रि* **(-ll-**; *अमे* **-l-)** [*अक*] १ मळसूत्राकार फिरणे किंवा जाणे. २ वाढणे किंवा घटणे.

spire /स्पाइअ(र्)/ *ना* [*गण*] विशेषतः चर्चचे सुळक्यासारखे शिखर किंवा मनोरा.

spirit /'स्पिरिद्/ *ना* १ [*गण, अगण*] माणसाचे विचार, भावना किंवा आत्मा. २ [*गण*] देहहीन जीव; भूत. ३ [*गण*] व्यक्ती: *What a generous ~! केवढा उदार आत्मा!* ४ [*अगण*] धैर्य, धाडस किंवा चैतन्य, जिवंतपणा: *act with ~, तडफेने काम करणे.* ५ [*अे.व*] मानसिक वृत्ती; मनःस्थिती: *It depends on the ~ in which it was done, ते ज्या मनोवृत्तीतून केलं होतं त्यावर ते अवलंबून आहे.* ६ [*अक*] खरा अर्थ: *obey the ~, not the letter, of the law, कायद्याचा शब्द नव्हे तर मतितार्थ पाळणे.* ७ **spirits** [*ब.व*] मनःस्थिती: *in high ~s, चांगल्या मनःस्थितीत म्हणजेच आनंदी.* ८ [*गण,* बहुधा *ब.व*] व्हिस्कीसारखे कडक मद्य. ९ (*वाक्प्र*) **in spirit** मनाने. **spirit** *क्रि* (*क्रिब*) **spirit sth/sb away/off** एखाद्याला पटकन् नेणे किंवा हालवणे, गुप्तपणे दूर नेणे. **spirited** *वि* १ जिवंत, धडाडीचा, सळसळत्या रक्ताचा वगैरे. २ विशिष्ट मनःस्थितीतला: *high-/low-spirited, उत्साही/अनुत्साही.*

spiritual /'स्पिरिचुअल्/ *वि* १ आध्यात्मिक, आत्मविषयक. २ धार्मिक. **spiritual** *ना* [*गण*] अमेरिकेत पूर्वी कृष्णवर्णीय गुलाम म्हणत ते धार्मिक गाणे. **spiritually** *क्रिवि* आध्यात्मिकदृष्ट्या; धार्मिकदृष्ट्या.

spit^1 /स्पिद्/ *ना* [*गण*] १ मांस भाजताना वापरायची सळई. २ समुद्रात वगैरे घुसलेला जमिनीचा सुळका, संलग्न दंड.

spit^2 /स्पिद्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **spat** /स्पॅद्/, **-tt-**) १ [*अक*] थुंकणे. २ [*सक*] (*out*)// **(क)** तोंडातून थुंकून टाकणे. **(ख)** रागाने ओरडणे, कोकलणे: *~(out) a command, जोरात हुकूम सोडणे.* ३ [*अक*] (*it* सह वापर) भुरभुर पाऊस पडणे, रिमझिमणे. ४ (*वाक्प्र*) **be the spitting image of sb** ⇨ IMAGE. **spit** *ना* [*अगण*] थुंकी.

spite /स्पाइद्/ *ना* [*अगण*] १ दुष्टबुद्धी, वैरभाव, द्वेष: *do sth out of ~, एखादी गोष्ट द्वेषबुद्धीने करणे.* २ (*वाक्प्र*) **in spite of** असे असूनही, तरीही: *They went out in ~ of the rain, पाऊस होता तरीही ते बाहेर गेले.* **spite** *क्रि* [*सक*] द्वेषबुद्धीने त्रास देणे, छळ करणे. **spiteful** *वि* द्वेषयुक्त, दुष्ट.

splash /स्प्लॅश्/ *क्रि* १ **(क)** [*अक*] (पातळ पदार्थाबाबत) शिंतोडे उडणे. **(ख)** [*सक*] शिंपडणे, शिंपणे, सडा घालणे: *~ water on the floor, जमिनीवर पाणी शिंपडणे.* २ [*सक*] प्रदर्शन करणे: *He ~ed his name all over the newspapers, त्याने सर्व वर्तमानपत्रांतून स्वतःचे नाव झळकावले.* ३ (*क्रिब*) **splash out (on sth)** (*अनौप*) एखाद्या गोष्टीवर खूप पैसे उडवणे. **splash** *ना* [*गण*] शिंपडणे, उडालेले शिंतोडे, शिंपण्याचा सप् असा आवाज.

spleen /स्प्लीन्/ *ना* [*गण*] शरीरातील रक्ताची शुद्धी ठेवणारे इंद्रिय, प्लीहा, पाणथरी.

splendid /'स्प्लेन्डिड्/ *वि* १ भव्य: *a ~ view, भव्य देखावा.* २ (*अनौप*) उत्कृष्ट, देखणा, छान: *a ~ performance, उत्कृष्ट प्रयोग.* **splendidly** *क्रिवि* उत्कृष्टपणे.

splendour (*अमे* **-dor**) /'स्प्लेन्ड(र्)/ *ना* [*अगण*] भव्यता, थाटमाट.

splice /स्प्लाइस्/ *क्रि* [*सक*] (दोरीचे, लाकडाचे वगैरे तुकडे) जोडणे.

splint /स्प्लिन्ट्/ *ना* [*गण*] मोडलेल्या हाडाला आधारासाठी बांधलेली लाकडाची वगैरे पट्टी, बंधफलक.

splinter /'स्प्लिन्ट(र्)/ *ना* [*गण*] लाकडाची, काचेची वगैरे उडालेली कपची, ढलपी. **splinter** *क्रि* [*अक, सक*] तुकडे किंवा ठिकऱ्या होणे/करणे. **splinter group** *ना* [*गण*] (विशेषतः राजकारणात) मोठ्या गटापासून फुटलेला गट.

split /स्प्लिट्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **split; -tt-**) १ [*अक, सक*] विभागणे, उभा चिरणे, भंगणे. २ [*सक*] विभिन्न किंवा विरोधी भागांत विभागणे, विभागून देणे, वाटणे : *Arguments ~ the group, वादाने गट फुटतो/विभागला जातो.* ३ [*अक, सक*] (*open*)// एकदम उघडणे, खाडकन् उघडणे : *The box ~ (open), पेटी खाडकन् उघडली.* ४ [*सक*] वाटून घेणे, वाटा घेणे : *~ the profits, नफा वाटून घेणे.* ५ [*अक*] (विशेषतः *अमे व्रात्य*) जाणे : *Let's ~! जाऊ या!* ६ (*वाक्प्र*) **split 'hairs** एखाद्या गोष्टीला विनाकारण फाटे फोडणे, मुद्द्याचा कीस काढणे. **split one's 'sides** तोंड फाटेपर्यंत/पोट दुखेपर्यंत हसणे. ७ (*क्रिब*) **split up** विवाहसंबंध किंवा इतर संबंध तोडणे, काडीमोड घेणे, विभक्त होणे. **split** *ना* १ [*गण*] चीर, फाड. २ [*गण*] चिरणे. ३ [*गण*] वेगळे होणे, विभक्तीकरण. ४ **the splits** [*ब.व*] पाय फाकवून बसणे. **,split perso'nality** *ना* [*गण*] दुभंग व्यक्तिमत्त्व. **split 'second** *ना* [*गण*] फार छोटा क्षण, निमिषमात्र.

splutter /'स्प्लटर(र्)/ *क्रि* १ [*अक, सक*] धांदलीने बोलणे, गोंधळल्यामुळे गडबडगुंडा करून सांगणे. २ [*अक*] कडकड आवाज करणे : *The fire ~ed, आगीचा कडकड आवाज येत होता.* **splutter** *ना* [*गण*] धांदलीचे बोलणे; कडकड आवाज.

spoil /स्पॉऽल्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **~t** किंवा **~ed**) १ [*सक*] आनंद किंवा महत्त्व बिघडवणे, खराब करणे : *Rain ~ed our holiday, पावसाने आमची सुट्टी खराब केली.* २ [*सक*] लाडाने (विशेषतः मुलाला) बिघडवणे. ३ [*अक*] (अन्न वगैरेबाबत) खराब होणे, आंबणे, नासणे. **spoils** *ना* [*ब.व*] (*औप*) चोरीचा माल वगैरे, लूट. **'spoilsport** *ना* [*गण*] इतराच्या आनंदावर बिब्बा घालणारा माणूस, विघ्नसंतोषी.

spoke^1 /स्पउक्/ *ना* [*गण*] चाकाचे केंद्र त्याच्या कडेला जोडणारा दांडा, चाकाचा आरा.

spoke^2 SPEAK चा *भूत.*

spoken SPEAK चे *भूत वि.*

spokesman /'स्पउक्स्मन्/ (*ब.व* **-men** /-मन्/) **spokesperson** (*ब.व* **-people**) **spokeswoman** (*ब.व* **-women**) *ना* [*गण*] एखाद्या गटाचा वगैरे प्रतिनिधी म्हणून बोलणारी व्यक्ती, प्रवक्ता, प्रवक्ती.

sponge /'स्पन्ज्/ *ना* १ [*गण*] अंगावरील छिद्रातून पाणी शोषून घेणारा समुद्रातील एक प्राणी, छिद्रप्राणी, वादळी. २ [*गण, अगण*] पुसण्यासाठी किंवा स्वच्छ करण्यासाठी वापरायचा अशा प्राण्याचा किंवा अशा तऱ्हेचा तुकडा. ३ [*गण, अगण*] हलका मऊ केक. **sponge** *क्रि* १ [*सक*] स्पंजने पुसणे. २ [*अक*] (*अनौप*) बदल्यात काहीही न देता पैसे वगैरे घेणे, पैसे उकळणे : *~ money off/from one's friends, मित्रांकडून पैसे उकळणे.* **'sponge-cake** *ना* [*गण, अगण*] मऊ, हलका केक. **spongy** *वि* (**-ier, -iest**) स्पंजसारखा मऊ.

sponsor /'स्पॉन्स(र्)/ *ना* [*गण*] १ एखाद्या कार्यक्रमाकरता पैसा देणारी व्यक्ती, कंपनी वगैरे, प्रायोजक. २ दुसऱ्याची जबाबदारी/हमी घेणारा माणूस, पुरस्कर्ता. **sponsor** *क्रि* [*सक*] १ प्रायोजक होणे; जबाबदारी घेणे. २ धर्मादाय काम करणाऱ्याला मदत देणे किंवा पैसे देणे. **sponsorship** *ना* [*अगण*] प्रायोजकता, पुरस्कारिता.

spontaneous /स्पॉन्'टेइनिअस्/ *वि* स्वाभाविकपणे आणि न ठरवता केलेला, घडणारा वगैरे, स्वाभाविक, सहज, उत्स्फूर्त : *a ~ offer of help, मदतीचा उत्स्फूर्त प्रस्ताव.* **spontaneity** /,स्पॉन्ट'नेइअटि/ *ना* [*अगण*] उत्स्फूर्तपणा, नैसर्गिकता, स्वाभाविकता. **spontaneously** *क्रिवि* उत्स्फूर्तपणे, स्वाभाविकपणे, सहजतेने.

spoof /स्पूफ्/ *ना* [*गण*] (*अनौप*) विडंबन.

spooky /स्पूकि/ *वि* (**-ier, -iest**) (*अनौप*) भेदरवणारा, भयाण.

spool /स्पूल्/ *ना* [*गण*] दोरा, चित्रफीत, ध्वनिफीत वगैरेचे रीळ, गुंडा.

spoon /स्पून्/ *ना* [*गण*] चमचा. **spoon** *क्रि* [*सक*] चमच्याने घेणे. **'spoon-feed** *क्रि* [*सक*] एखाद्याला खूप मदत, शिकवण वगैरे देणे, आयते देणे.

sporadic /,स्प'रॅडिक्/ *वि* अधूनमधून येणारा, तुरळक. **sporadically** /-क्लि/ *क्रिवि* तुरळकपणे, अधूनमधून.

spore /स्पॉऽ(र्)/ *ना* [*गण*] अळंब्यासारख्या काही अपुष्प वनस्पतींचे बीज, बी, रेणुंजननपेशी.

sport /स्पॉऽट्/ *ना* १ [*गण, अगण*] मनोरंजन किंवा व्यायामाकरता, बहुधा नियमांप्रमाणे, केलेले काहीतरी, खेळ, क्रीडा. २ **sports** [*ब.व*] मैदानी खेळांच्या स्पर्धा: *school ~s, शालेय क्रीडास्पर्धा.* ३ [*गण*] (*अनौप*) निःस्वार्थी, दयाळू माणूस, उमदा माणूस. **sport** *क्रि* [*सक*] अभिमानाने किंवा दिमाखाने घालणे किंवा ठेवणे/राखणे: *~ a new beard, नवी दाढी राखणे.* **sporting** *वि* १ क्रीडेचा, क्रीडाप्रेमी. २ खेळकर, उमदा. ३ (*वाक्प्र*) **a sporting 'chance** यशाची बऱ्यापैकी शक्यता. **'sports car** *ना* [*गण*] वेगाने जाण्यासाठी खास केलेली गाडी. **'sportsman, 'sportswoman** *ना* [*गण*] खेळाडू. **'sportsmanship** *ना* [*अगण*] विशेषतः खेळात न्यायी आणि उदार असण्याचा गुण, खिलाडू वृत्ती. **sporty** *वि* (**-ier, -iest**) खेळण्यात पटाईत किंवा क्रीडाप्रेमी.

spot /स्पॉट्/ *ना* [*गण*] १ पृष्ठभागाहून वेगळ्या रंगाची त्यावरील लहान गोलाकार खूण, ठिपका. २ घाणेरडा डाग. ३ त्वचेवरचा छोटा तांबडा रोगट डाग. ४ जागा, स्थळ: *the ~ where she died, ती मेली ती जागा.* ५ (*अनौप*) अल्प प्रमाण, थोडा भाग: *a ~ of tea, थोडासा चहा.* ६ (*वाक्प्र*) **in a (tight) 'spot** (*अनौप*) कठीण परिस्थितीत, संकटात, गोत्यात. **on the 'spot** (क) जिथे एखाद्याची गरज आहे तिथे, जागच्या जागी. (ख) ताबडतोब, तात्काळ: *He was killed on the ~, तो तात्काळ मेला.* **spot** *क्रि* (**-tt-**) [*सक*] १ (बहुधा कर्मणी) ठिपके देणे. २ (एखाद्याला) पाहणे, हेरणे, टिपणे. **spotted** *वि* ठिपके असलेला. **spotless** *वि* स्वच्छ, निष्कलंक. **spotty** *वि* (**-ier, -iest**) विशेषतः त्वचेवर ठिपके/डाग असणारा, मुरूमाचे फोड असलेला.

spotlight /'स्पॉट्लाइट्/ *ना* [*गण*] विशिष्ट स्थानावर टाकलेला प्रखर प्रकाश (किंवा तो टाकणारा दिवा), प्रकाशझोत. **spotlight** *क्रि* [*सक*] १ प्रकाशझोत टाकणे. २ (*ला*) एखाद्याकडे लक्ष वळवणे: *~ a problem, प्रश्नाकडे लक्ष वळवणे.*

spouse /स्पाउस्/ *ना* [*गण*] (*औप* किंवा *कायदा*) नवरा किंवा बायको.

spout /स्पाउट्/ *ना* [*गण*] १ द्रव ओतण्याची नळी: *a ~ on a teapot, चहाच्या किटलीची नळी.* २ (*वाक्प्र*) **up the 'spout** (*अनौप*) वाया गेलेला. **spout** *क्रि* १ [*अक, सक*] (द्रवपदार्थ) वेगाने बाहेर येणे (किंवा ढकलणे), चिळकांडी उडणे, धार उडणे. २ [*सक*] (*अनौप*) (उदाहरणार्थ कविता) मोठ्याने आणि खूप वेळ म्हणणे, आवेशात म्हणणे.

sprain /स्प्रेइन्/ *क्रि* [*सक*] मुरगळणे: *~ an ankle, पाय मुरगळणे.* **sprain** *ना* [*गण*] मुरगळा.

sprang SPRING^{2} चा *भूत*.

sprawl /स्प्रॉऽल्/ *क्रि* [*अक*] १ हातपाय पसरून अस्ताव्यस्त बसणे किंवा पडणे. २ (वनस्पती, शहरे यांबाबत) पसरणे. **sprawl** *ना* [*गण, अगण*] पसरलेली अवस्था किंवा पसरलेले क्षेत्र: *urban ~, शहरी पसारा.*

spray^{1} /स्प्रेइ/ *ना* [*गण*] खास करून सुशोभित करण्यासाठी वापरायची झाडाची छोटी फांदी, डहाळा.

spray^{2} /स्प्रेइ/ *ना* १ [*अगण*] फवारा, तुषार. २ [*गण, अगण*] अत्तराचा वगैरे फवारा. ३ [*गण*] फवारा उडवण्याचे साधन. **spray** *क्रि* १ [*सक*] फवारा मारणे, तुषारकण उडवणे. २ [*अक*] फवारा उडणे.

spread /स्प्रेड्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **spread**) १ [*सक*] उलगडून पसरणे: *The bird ~ its wings, पक्ष्याने पंख पसरले.* २ [*सक*] लावणे, पसरवणे: *~ butter on bread, पावाला लोणी लावणे.* ३ [*अक, सक*] प्रादुर्भाव होणे/करणे, पसरणे, फैलावणे: *~ disease, रोग पसरणे.* ४ [*अक*] क्षेत्रापर्यंत किंवा काळापर्यंत वाढणे किंवा

पसरणे, विस्तार असणे. **spread** *ना* १ [बहुधा *ए.व*] विस्तार, पसारा. २ [*अगण*] वाढ, फैलाव : *the rapid ~ of the disease, रोगाचा झपाट्याने होणारा फैलाव.* ३ [*गण*] (*अनौप*) टेबलावर ठेवलेले विपुल अन्न. ४ [*अगण, गण*] पावावर वगैरे पसरायचा मऊ पदार्थ. **'spread-eagle** *क्रि* [*सक*] हातपाय एकमेकांवर आडवे करून एखाद्याला ठेवणे. **'spreadsheet** *ना* [*गण*] आकड्यांच्या रांगा दाखवायला आणि त्या बदलायला वापरायचा संगणकाचा कार्यक्रम.

sprightly /'स्प्राइट्लि/ *वि* (**-ier, -iest**) उल्हासी, आनंदी, जोमाचा. **sprightliness** *ना* [*अगण*] उल्हास, आनंद.

spring^{1} /स्प्रिङ्/ *ना* १ [*गण*] पाण्याचा झरा (किंवा असा झरा असलेली जागा), निर्झर. २ [*गण*] तारेची स्प्रिंग. ३ [*गण*] उडी, उसळी. ४ [*अगण*] लवचिकता, स्थितिस्थापकत्व. **springy** *वि* (**-ier, -iest**) स्प्रिंगसारखा स्थितिस्थापक.

spring^{2} /स्प्रिङ्/ *क्रि* (*भूत* **sprang** /स्प्रॅङ्/, *भूत वि* **sprung** /स्प्रङ्/) १ [*अक*] उडी मारणे, उसळी मारणे : *~ (up) from one's chair, खुर्चीतून ताडकन् उठणे* ○ *The door sprang open, दार फटकन् उघडले.* २ (*वाक्प्र*) **spring a 'leak** (नावेबाबत वगैरे) फट पडून पाणी शिरू लागणे, पाणी शिरणे. ३ (*क्रिब*) **spring from sth** एखाद्या गोष्टीतून उगम होणे. **spring sth on sb** आश्चर्यचकित करणारे असे काही देणे : *She sprang the news on me, तिने मला आश्चर्यचकित करणारी बातमी दिली.* **spring up** एकदम वाढणे किंवा वर येणे, अचानक पुढे येणे.

spring^{3} /स्प्रिङ्/ *ना* [*गण, अगण*] हिवाळा आणि उन्हाळा यांच्यामधला ऋतू, वसंतऋतू, मधुमास, झाडांना पालवी फुटण्याचा काळ. **,spring-'clean** *क्रि* [*सक*] (घर वगैरे) अगदी स्वच्छ करणे, झकपक करणे. **,spring-'cleaning** *ना* [*अगण*] साफसूफ करणे, झकपक करणे.

sprinkle /'स्प्रिङ्क्ल्/ *क्रि* [*सक*] (द्रव, धूळ वगैरे) (पृष्ठभागावर) शिंपडणे, छिडकणे, सडा घालणे, सिंचन करणे. **sprinkler** /-क्ल(र्)/ *ना* [*गण*] गवतावर वगैरे पाण्याचा शिडकाव करण्याचे साधन, सिंचक.

sprint /स्प्रिन्ट्/ *क्रि* [*अक*] जोराने धावणे, पळणे. **sprint** *ना* [*गण*] जोराने धावणे. **sprinter** *ना* [*गण*] धावणारा गडी, धावपटू.

sprout /स्प्राउट्/ *क्रि* [*अक, सक*] अंकुरणे, पालवी फुटणे, कोंब येणे : (*ला*) *houses sprouting (up) on the edge of town, शहराच्या बाहेरच्या भागात उगवणारी घरे.* **sprout** *ना* [*गण*] १ झाडाचा कोंब, अंकुर. २ = BRUSSELS SPROUT.

sprung SPRING^{2} चे *भूत वि.*

spun SPIN चे *भूत वि.*

spur /स्पऽ(र्)/ *ना* [*गण*] १ घोड्याला टोचून जलद पळवण्यासाठी घोडेस्वाराच्या बुटाला लावलेली दात्याची चकती, टाचखिळा. २ (*ला*) एखाद्याला अधिक काम करण्यास प्रवृत्त करणारी गोष्ट, टोचणी. ३ (*वाक्प्र*) **on the spur of the moment** क्षणाचाही विचार न करता तात्काळ, तत्क्षणी. **spur** *क्रि* (**-rr-**) [*सक*] (*on*)// अधिक प्रयत्न करण्यास प्रोत्साहन देणे.

spurn /स्पऽन्/ *क्रि* [*सक*] (प्रस्ताव वगैरे) फेटाळणे, धुडकावणे, झिडकारणे, लाथाडणे.

spurt /स्पऽट्/ *क्रि* १ [*अक, सक*] (द्रवपदार्थाची वगैरे) चिरकांडी उडणे, पिचकारी मारणे. २ [*अक*] स्पर्धेत, शर्यतीत अचानक उचल खाणे, निकराचा प्रयत्न करणे, जोर करणे. **spurt** *ना* [*गण*] १ अचानक आलेला उत्साह, वेग वगैरे. २ चिरकांडी.

sputter /'स्पट(र्)/ *क्रि* [*अक*] थूथू करणे, फुस् फुस् करणे.

spy /स्पाइ/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) १ राज्यकर्त्यांचा गुप्तहेर. २ गुप्त बातमी पुरवणारा, हेर. **spy** *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) १ [*अक, सक*] (*on*)// (एखाद्यावर) चोरून नजर ठेवणे. २ [*सक*] (*औप* किंवा *गंमत*) दिसणे.

squabble /'स्क्वॉब्ल्/ *क्रि* [*अक*] *ना* [*गण*] बहुधा क्षुल्लक कारणावरून केलेले भांडण, तंटा.

squad /स्क्वॉड्/ *ना* [*गण*, तसेच ब.व क्रियापदासह ए.व] खेळाडूंची वगैरे तुकडी : *a football ~, फुटबॉल खेळाडूंची तुकडी.*

squadron /'स्क्वॉड्रन्/ *ना* [*गण*, तसेच ब.व क्रियापदासह अ.व] सैनिकांची, लढाऊ जहाजांची वगैरे तुकडी, दल.

squalid /'स्क्वॉलिड्/ *वि* १ घाणेरडा, ओंगळ. २ हिडीस, नैतिकदृष्ट्या ओंगळ. **squalidly** *क्रिवि* ओंगळपणाने.

squall /स्क्वॉऽल्/ *ना* [*गण*] १ वाऱ्याचा झपाटा, वावटळ. २ खास करून लहान मुलाचा टाहो. **squall** *क्रि* [*अक*] टाहो फोडणे.

squalor /'स्क्वॉल(र्)/ *ना* [*अगण*] घाणेरडेपणा, ओंगळपणा.

squander /'स्क्वॉन्ड(र्)/ *क्रि* [*सक*] (*on*)// (वेळ, पैसा वगैरे) वाया घालवणे, दवडणे, उधळणे.

square^{1} /स्क्वेअ(र्)/ *वि* १ चौकोनी, चौरस. २ काटकोनी : ~ *corners, काटकोनी कोपरे.* ३ दिलेल्या मापाचा चौरस : *six metres ~, सहा मीटर्सचा चौरस/सहा मीटर्स लांबरुंद.* ४ प्रामाणिक; योग्य : ~ *dealings, न्याय्य/स्वच्छ व्यवहार.* ५ सर्व बिले वगैरे चुकता केलेला. ६ (*वाक्प्र*) **a square meal** चौरस जेवण, छान जेवण. **be (all) square (with sb)** (क) समान गुण असणे. (ख) कुणाचेही देणे नसलेला. **square** *क्रिवि* चौरस करून; तडक, थेट; प्रामाणिकपणे. **squarely** *क्रिवि* १ चौरस करून, काटकोन होईल असा. २ थेट, सरळ : *I looked her ~ly in the eye, मी थेट तिच्या डोळ्यात रोखून पाहिले म्हणजेच मी तिच्या डोळ्याला डोळा दिला.* ३ प्रामाणिकपणे. **squareness** *ना* [*अगण*] चौरसाकार; प्रामाणिकपणा, न्याय्यता. **square root** *ना* [*गण*] वर्गमूळ : *The ~ root of 4 is 2, ४ चे वर्गमूळ २ आहे.*

square^{2} /स्क्वेअ(र्)/ *ना* [*गण*] १ चौरस, समभुज काटकोन चौकोन, समायत. २ चौरसाकृती वस्तू. ३ शहरातील वगैरे चौक. ४ संख्येचा वर्ग. ५ (*वाक्प्र*) **back to square one** पुन्हा पहिल्या पदावर, पुन्हा पहिले पाढे पंचावन.

square^{3} /स्क्वेअ(र्)/ *क्रि* १ [*सक*] चौरस करणे. २ [*सक*] सरळ किंवा समान करणे. ३ [*सक*] संख्येचा वर्ग करणे. ४ [*अक, सक*] *with*// (*अनौप*) सुसंगत असणे/करणे : ~ *the theory with the facts, वास्तविकांशी सिद्धान्त सुसंगत करणे.* ५ [*सक*] (*अनौप*) लाच देणे. ६ (*क्रिब*) **square sth off** चौरस/चौकटी आखणे. **square up (with sb)** एखाद्याला देणे असलेले सर्व पैसे देऊन टाकणे – विशेषतः उपहारगृह सोडण्यापूर्वी.

squash^{1} /स्क्वॉश्/ *क्रि* १ [*सक*] दाबून टाकणे; चिरडणे. २ [*अक, सक*] कोंबणे, रेटणे : ~ *ten people into a car, गाडीत दहा माणसं कोंबणे.* ३ [*सक*] (बंड वगैरे) दडपून टाकणे, चिरडणे. ४ [*सक*] (प्रस्ताव वगैरे) फेटाळणे, नाकारणे. **squash** *ना* १ [*अ.व*] कोंबलेली माणसे, चेंदाचेंदी. २ [*अगण, गण*] फळाच्या रसापासून केलेले पेय.

squash^{2} /स्क्वॉश्/ *ना* [*अगण*] भिंतींनी बंद केलेल्या कोर्टमधे लांब रॅकेट्स् आणि रबरी चेंडू यांच्या साहाय्याने खेळायचा एक खेळ.

squat /स्क्वॉट्/ *क्रि* (-tt-) [*अक*] १ उकिडवे बसणे, पाय मुडपून बसणे, मांडी घालणे. २ विना परवाना मोकळ्या जागेचा, इमारतींचा ताबा घेणे. **squat** *वि* बसकट, जाड चपटा. **squat** *ना* [*गण*] ठाण मांडून बसलेल्या लोकांनी व्यापलेली जागा. **squatter** *ना* [*गण*] विना परवाना घुसणारा माणूस.

squaw /स्क्वॉऽ/ *ना* [*गण*] उत्तर अमेरिकेतील रेड-इंडियन स्त्री.

squawk /स्क्वॉऽक्/ *क्रि* [*अक*] १ (विशेषतः पक्ष्यांबाबत) मोठ्याने ओरडणे, कलकलाट करणे. २ (*अनौप*) जोराने तक्रार करणे. **squawk** *ना* [*गण*] कर्कश आवाज; तक्रार, कुरकूर.

squeak /स्क्वीक्/ *क्रि* [*अक, सक*] *ना* [*गण*] किंचाळणे. **squeaky** *वि* **(-ier, -iest)** किंचाळल्यासारखा.

squeal /स्क्वील्/ *ना* [*गण*] मोठी किंकाळी. **squeal** *क्रि* [*अक*] १ किंकाळी फोडणे. २ (*व्रात्य*) पोलिसांना गुन्ह्यातील साथीदाराची गुप्त माहिती देणे.

squeamish /'स्क्वीमिश्/ *वि* १ मळमळ सुटलेला. २ पटकन् रागावणारा, धक्का बसणारा वगैरे, हळवा. **squeamishly** *क्रिवि* हळवेपणाने. **squeamishness** *ना* [*अगण*] मळमळ; हळवेपणा.

squeeze /स्क्वीझ़्/ *क्रि* १ [*सक*] दाबून पिळणे : ~ *a sponge, स्पंज दाबून पिळणे.* २ [*सक*] (*from/out of*)// पिळून पाणी, रस वगैरे काढणे. ३ [*अक, सक*] कसेबसे बसवणे, चेंबटणे, चेपून बसवणे : ~ *into the back seat, मागच्या सीटवर चेंगरून बसणे.* ४ (*क्रिब*) **squeeze sth out of sb** एखाद्याकडून बळजबरीने (माहिती वगैरे) काढणे. **squeeze** *ना* १ [*गण*] पिळणे. २ [*अे.व*] चेंगरून बसण्याची अवस्था, चेंदामेंदा. ३ [*गण*] (*अनौप*) आर्थिक अडचण.

squelch /स्क्वेल्च्/ *क्रि* [*अक*] चिखलातून चालताना होतो तसा चपचप आवाज करणे, चपक्चपक् करणे. **squelch** *ना* [*गण*] चपचप आवाज.

squid /स्क्विड्/ *ना* [*गण, अगण*] चेहऱ्याभोवती दहा लांब भुज असणारा समुद्रातील एक प्राणी.

squint /स्क्विन्ट्/ *क्रि* [*अक*] १ तिरळे पाहणे. २ अर्धवट डोळे उघडून पाहणे. **squint** *ना* [*अे.व*] तिरळेपणा.

squirm /स्क्वऽम्/ *क्रि* [*अक*] १ अंगाला अळेपिळे देत जाणे. २ लाज वाटणे, गोंधळणे. **squirm** *ना* [*गण*] अळेपिळे.

squirrel /'स्क्विरल्/ *ना* [*गण*] खार.

squirt /स्क्वऽट्/ *क्रि* (क) [*सक*] (द्रव, पूड वगैरेची) चिरकांडी उडवणे, पिचकारी मारणे. (ख) [*अक*] (द्रवाची, पुडीची वगैरे) चिरकांडी उडणे. **squirt** *ना* [*गण*] चिरकांडी, उडालेली पिचकारी.

St *संरू* १ Saint संत. २ street रस्ता.

stab /स्टॅब्/ *क्रि* (**-bb-**) १ [*अक, सक*] टोकदार हत्याराने भोसकणे. २ (*वाक्प्र*) **stab sb in the 'back** विश्वासघात करणे, पाठीत खंजीर खुपसणे. **stab** *ना* [*गण*] १ वार, घाव. २ कळ. ३ प्रयत्न : *have a ~ at sth, एखाद्या गोष्टीचा प्रयत्न करणे.* **stabbing** *वि* (वेदनेबाबत) अचानक निर्माण झालेली आणि तीव्र.

stable^1 /स्टेइब्ल्/ *वि* (**~r, ~st**) हालण्याची किंवा बदलण्याची शक्यता नसलेला, स्थिर, अचल. **stability** /स्ट'बिलटि/ *ना* [*अगण*] स्थैर्य. **stabilize** /'स्टेइबलाइझ़्/ *क्रि* [*अक, सक*] स्थिर होणे/करणे. **stabilizer** *ना* [*गण*] स्थिरता देणारे साधन, स्थायित्वकारी, स्थिरकारी.

stable^2 /स्टेइब्ल्/ *ना* [*गण*] घोड्याची पागा, तबेला. **stable** *क्रि* [*सक*] (घोडा) तबेल्यात ठेवणे.

stack /स्टॅक्/ *ना* [*गण*] १ (बहुधा व्यवस्थित ठेवलेला) ढीग, चवड : *a ~ of books, पुस्तकांची चवड.* २ गवताची गंज, उडवे. ३ उंच धुराडे किंवा धुराड्यांचा गट. **stacks of sth** [*ब.व*] (*अनौप*) मोठ्या प्रमाणातील साठा, राशी. **stack** *क्रि* [*सक*] चवड रचणे, गंज करणे.

stadium /'स्टेइडिअम्/ (*ब.व* **~s** किंवा **-dia** /-डिअ/) *ना* [*गण*] प्रेक्षकांसाठी बसण्याची सोय असलेले बंदिस्त क्रीडांगण.

staff /स्टाफ्/ *ना* १ [*गण*] चालताना आधाराकरता वापरायची दणकट काठी. २ [*गण*] व्यवस्थापकाच्या देखरेखीखाली काम करणारा सेवकवर्ग. ३ [*अगण*] एखाद्या संस्थेतील अधिकारावरील व्यक्ती – उदा शाळेतील शिक्षक. ४ [*गण*] ज्येष्ठ लष्करी अधिकाऱ्यांचा वर्ग. **staff** *क्रि* [*सक*] सेवकवर्ग नेमणे, अधिकारी व्यक्ती नेमणे.

stag /स्टॅग्/ *ना* [*गण*] काळवीट.

stage /स्टेइज्/ *ना* १ [*गण*] रंगमंच. २ **the stage** [*अे.व*] अभिनयकला, नटाचा पेशा. ३ [*बहुधा अे.व*] (*ला*) घटनांचे स्थळ. ४ विकासातील, वाढीतील वगैरे काळ, टप्पा, अवस्था : *at an early ~ in her life, तिच्या आयुष्यातील सुरुवातीच्या काळात.* ५ प्रवासाचा टप्पा. ६ (*वाक्प्र*) **be/go on the 'stage** नट होणे, नाटकात काम करणे. **stage** *क्रि* [*सक*] (नाटकाचा वगैरे) प्रयोग करणे, रंगभूमीवर आणणे. **'stage-coach** *ना* [*गण*] प्रवाशांना नेणारी घोडा-गाडी. **,stage-'manager** *ना* [*गण*] रंगमंच-व्यवस्थापक.

stagger /'स्टॅग(र)/ *क्रि* १ [*अक*] लटपटत चालणे. २ [*सक*] (बातम्या वगैरेबाबत) जबरदस्त धक्का देणे. ३ [*सक*] सर्व गोष्टी एकदम/एकत्र येणार नाहीत अशा रीतीने गोष्टींची आखणी/योजना करणे, वेगवेगळ्या वेळी ठेवणे. **stagger** *ना* [*अे.व*] लटपट.

stagnant /'स्टॅग्नन्ट्/ *वि* १ (पाण्याबाबत)

साचलेले, शिळे आणि बहुधा दुर्गंधीयुक्त. २ (*ला*) न वाढणारा, खुरटलेला.

stagnate /स्टॅग्'नेइट्/ *क्रि* [*अक*] १ निष्क्रीयतेमुळे मंद होणे, मागे पडणे. २ प्रगती खुंटणे. **stagnation** /-श्न्/ *ना* [*अगण*] निष्क्रीयतेने येणारा मंदपणा, साचलेपणा.

staid /स्टेइड्/ *वि* (वर्तन, पेहेराव वगैरेबाबत) धिमा, शांत आणि गंभीर. **staidly** *क्रिवि* धिमेपणाने. **staidness** *ना* [*अगण*] धिमेपणा.

stain /स्टेइन्/ *क्रि* १ (**क**) [*सक*] डाग पाडणे, चिताडणे. (**ख**) [*अक*] डाग पडणे. २ [*सक*] (लाकूड, कापड वगैरेला) रंग देणे. **stain** *ना* १ [*अगण*] लाकडाला वगैरे द्यायचा द्रवरूप रंग. २ [*गण*] डाग पडलेली जागा, डाग. ३ [*गण*] कलंक, किटाळ. **stained 'glass** *ना* [*अगण*] बहुधा खिडकीत नक्षी करण्याकरता वापरली जाणारी रंगीत काच. **stainless** *वि* (विशेषतः स्टीलबाबत) न गंजणारे.

stair /स्टेअ(र्)/ *ना* १ **stairs** [*ब.व*] एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जायचा जिना : *a flight of ~s, जिना.* २ [*गण*] जिन्याची पायरी : *sitting on the bottom ~, तळपायरीवर बसलेला.* **'staircase, 'stairway** *ना* [*गण*] इमारतीतील जिना.

stake /स्टेइक्/ *ना* १ [*गण*] जमिनीत रोवलेली मजबूत लाकडी मेख, खुंटा. २ [*गण, बहुधा ब.व*] पणाला लावलेला पैसा. ३ [*गण*] कंपनीत अंशतः भागी किंवा आर्थिक हितसंबंध : *I have a ~ in the company, कंपनीत माझी भागी आहे.* ४ (*वाक्प्र*) **at stake** धोक्यात असलेला, धोका पत्करलेला. **stake** *क्रि* [*सक*] १ खुंटी ठोकून आधार देणे. २ (पैसा वगैरे) पणाला लावणे. ३ (*वाक्प्र*) **stake a claim** हक्क सांगणे. ४ (*क्रिब*) **stake sth out** (विशेषतः *अमे अनौप*) (खास करून पोलिसांबाबत) एखाद्या स्थानावर सतत पाळत ठेवणे.

stale /स्टेइल्/ *वि* १ (अन्नाबाबत वगैरे) शिळे. २ फार परिचित असल्याने नाविन्य नसलेला. ३ (व्यायामपटू, गायक वगैरेबाबत) फार वेळा केल्याने चांगले न करू शकणारा, दम नसलेला. **staleness** *ना* [*अगण*] शिळेपणा.

stalemate /'स्टेइल्मेइट्/ *ना* [*गण, अगण*] १ बुद्धिबळाचा अडलेला डाव. २ चर्चेत झालेली कोंडी.

stalk^{1} /स्टॉऽक्/ *ना* [*गण*] वनस्पतीचा फुलाला, पानांना किंवा फळाला आधार देणारा भाग, देठ.

stalk^{2} /स्टॉऽक्/ *क्रि* १ [*अक*] ऐटीत चालणे, गर्वाने ठमकत जाणे. २ [*सक*] लपतछपत जाऊन (प्राण्याची वगैरे) शिकार करणे, प्राण्याला बेसावध मारणे : *~ deer, दबा धरून हरणाची शिकार करणे.* **stalker** *ना* [*गण*] लपतछपत जाऊन प्राण्यांची शिकार करणारा माणूस.

stall /स्टॉऽल्/ *ना* [*गण*] १ तबेल्यातील प्रत्येक प्राण्याचे ठाण. २ रस्त्यावर माल विकण्यासाठी टाकलेले टेबल किंवा छोटे दुकान. ३ **stalls** [*ब.व*] चित्रपटगृहातील अगदी पुढच्या रांगा. **stall** *क्रि* १ [*अक, सक*] शक्ती नसल्याने (इंजिन वगैरे) बंद पडणे/पाडणे. २ [*अक, सक*] वेग कमी होऊन (विमान वगैरेवरचा) ताबा सुटणे (किंवा सोडायला लावणे). ३ [*अक*] उशीर करणे, विलंब लावणे.

stallion /'स्टॅलिअन्/ *ना* [*गण*] पैदास वाढवण्यासाठी पाळलेला घोडा, वळू.

stamina /'स्टॅमिन/ *ना* [*अगण*] कष्ट करण्याची, लांब अंतरावर पळण्याची वगैरे ताकद, कुवत, दम.

stammer /'स्टॅम(र्)/ *क्रि* १ [*अक*] बोलण्यातील दोष, भीती वगैरेमुळे बोलताना काही ध्वनी जलद गतीने पुन्हापुन्हा म्हणणे, अडखळत बोलणे, तोतरे बोलणे. २ [*सक*] (*out*)// चाचरत म्हणणे : *~ (out) an apology, चाचरत माफी मागणे.* **stammer** *ना* [*अे.व*] तोतरेपणा, जिभेचा जडपणा.

stamp^{1} /स्टॅम्प्/ *ना* [*गण*] १ पाकिटे, कागदपत्रे यांचे डाकसेवामूल्य दिले आहे असे दाखविण्यासाठी त्यावर चिकटवायचा कागदाचा छापील तुकडा, पोस्टाचे तिकीट, टपाल तिकीट. २ शिक्का उठवायचा छाप. ३ शिक्क्याची आकृती, शब्द वगैरे, उमटवलेला ठसा. ४ पाय आपटणे. **'stamp album** *ना* [*गण*] छंद म्हणून गोळा केलेली पोस्टाची तिकीटे चिकटवायची वही.

stamp^{2} /स्टॅम्प्/ *क्रि* १ [*अक, सक*] पाय

आपटणे, दाणदाण पाय टाकणे. २ [*सक*] *A on B; B with A//* (आकृती, दिनांक वगैरेचा) शिक्का मारणे. ३ [*सक*] (पत्राला वगैरे) तिकीट लावणे. ४ (*on*) [*सक*] ठसा उमटविणे : *~ one's personality on sth, एखाद्या गोष्टीवर स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटविणे.* ५ (*क्रिब*) **stamp sth out** (बंड वगैरे) उखडून टाकणे, चिरडणे.

stampede /स्टॅम्'पीड्/ *ना* [*गण*] भीतीने वगैरे लोकांनी किंवा प्राण्यांनी केलेली धावाधाव, तुडवातुडवी. **stampede** *क्रि* [*अक, सक*] सैरावैरा धावणे (किंवा धावायला लावणे).

stance /स्टॅन्स्/ *ना* [*गण*] १ गोल्फ, क्रिकेट वगैरे खेळात चेंडू मारण्याच्या वेळची उभे राहण्याची पद्धत. २ दृष्टिकोन, मत : *her ~ on nuclear arms, अण्वस्त्रांबाबतची तिची भूमिका.*

stand^{1} /स्टॅन्ड्/ *ना* १ [*अ.व*] स्थिर अवस्था, थांबणे : *come to a ~, थांबणे किंवा ठप्प होणे.* २ [*गण*] वस्तू ठेवायची मांडणी : *a music ~, संगीताचे नोटेशन लिहिलेले किंवा सूरलेखन केलेले कागद वाद्य वाजवताना समोर धरण्याचे साधन.* ३ [*गण*] विक्रीच्या वस्तू मांडण्याचे टेबल, घडवंची, बाक वगैरे. ४ [*गण*] खेळ वगैरे पाहण्यासाठी प्रेक्षकांची बसायची किंवा उभं राहायची जागा, प्रेक्षागृह. ५ [*गण*] हल्ला परतवणे, कडवा विरोध किंवा त्याचा काळ : *make a ~, कडवा प्रतिकार करणे.* ६ (*अमे*) = WITNESS-BOX (WITNESS). **standpoint** *ना* [*गण*] दृष्टिकोंन.

stand^{2} /स्टॅन्ड्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **stood** /स्टुड्/) १ [*अक*] ताठ राहणे, उभे राहणे. २ [*अक*] उंची असणे : *She ~s five foot six, ती पाच फूट सहा इंच उंच आहे.* ३ [*सक*] उभा करणे/ठेवणे : *S~ the ladder against the wall, भिंतीला टेकून शिडी उभी ठेव.* ४ [*अक*] विशिष्ट ठिकाणी असणे : *The house ~s on the corner, ते घर कोपऱ्यावर आहे.* ५ [*अक*] बदल न होणे, आहे तसाच राहणे : *My decision ~s, माझा निर्णय बदलणार नाही.* ६ [*सक*] पैसे देणे : *~ sb a meal, एखाद्याच्या जेवणाचे पैसे देणे.* ७ [*अक*] (*for*)// निवडणुकीला उभे राहणे : *~ for parliament, संसदेच्या निवडणुकीला उभे राहणे.* ८ (*वाक्प्र*) **stand a chance** यशाची वगैरे शक्यता असणे. **stand firm/fast** स्वतःची मते वगैरे न बदलणे, मताला घट्ट चिकटून असणे. **stand one's ground** ➪ GROUND^{1}. **stand on one's own (two) feet** स्वतःच्या पायावर उभे राहणे, स्वावलंबी असणे. **stand out like a sore thumb** ➪ SORE. **stand to reason** कुणालाही स्पष्ट असणे किंवा पटणे. ९ (*क्रिब*) **stand by** (क) बघ्यासारखे उभे राहणे. (ख) कृती करण्यासाठी सज्ज असणे. **stand by sb** एखाद्याच्या बाजूने उभे राहणे, एखाद्याला पाठिंबा देणे. **stand by sth** (दिलेल्या वचनाशी वगैरे) एकनिष्ठ राहणे, शब्द पाळणे. **stand down** नोकरीचा वगैरे राजीनामा देणे; माघार घेणे. **stand for sth** (क) -साठी असणे, प्रतिनिधित्व करणे : *PO ~s for Post Office, PO म्हणजे Post Office.* (ख) (*अनौप*) सहन करणे : *She doesn't ~ for disobedience, तिला अवज्ञा सहन होत नाही.* **stand in (for sb)** एखाद्याची जागा घेणे. **stand out** (क) डोळ्यात भरणे, सहज दिसणे. (ख) प्रतिकार करत राहणे : *~ out against the enemy, शत्रूचा मुकाबला करत राहणे.* **stand sb up** (*अनौप*) ठरलेली भेट न घेणे/पाळणे. **stand up for sb/sth** एखाद्याला पाठिंबा देणे. **stand up to sb** एखाद्याचा प्रतिकार करणे, स्वतःचा बचाव करणे. **stand up to sth** (कसेही वापरले वगैरे तरी) सुस्थितीत राहणे, टिकून राहणे. **stand-by** *ना* (क) [*अगण*] जय्यत तयारी असण्याची स्थिती, सतर्कता. (ख) [*गण*] राखीव गडी किंवा वस्तू, बदलीचा माणूस. **stand-in** *ना* [*गण*] एखाद्या ऐवजी येणारा माणूस. **stand-offish** *वि* (माणसांबाबत) आतल्या गाठीचा, अबोल आणि तुटक.

standard /'स्टॅन्डड्/ *ना* [*गण*] १ प्रमाणभूत गोष्ट, मानक. २ (अपेक्षित किंवा सर्वसाधारण) गुणवत्तेची पातळी : *the ~ of her school work, तिच्या शाळेतील कामाची गुणवत्ता.* ३ विशेष निशाण, ध्वज. **standard** *वि* सर्वसाधारण प्रमाणातला, प्रमाणभूत : *~ sizes of paper, कागदाचे सर्वसाधारण आकार.* **standardize** /*अमे* -डाइझ्/ *क्रि* [*सक*] विशिष्ट आकार, गुणवत्ता वगैरे निश्चित करणे, प्रमाणीकरण करणे. **'standard lamp** *ना*

[*गण*] जमिनीवर उभा करायचा शेडचा उंच दिवा, उभ्याचा दिवा. **standard of 'living** *ना* [*गण*] एखाद्याचे राहणीमान.

standing /स्टॅन्डिङ्/ *ना* [*अगण*] १ श्रेणी किंवा लौकिक. २ मुदत : *loans of long ~, दीर्घ मुदतीची कर्जे.* **standing** *वि* कायमचा : *a ~ army, कायमचे सैन्य.*

stank STINK चा *भूत.*

stanza /'स्टॅन्झ/ *ना* [*गण*] कवितेतील विशिष्ट ओळींचा गट, कडवे.

staple^{1} /'स्टेइप्(अ)ल्/ *ना* [*गण*] कागद टाचण्याची वायरची पिन किंवा आकडी. **staple** *क्रि* [*सक*] पिन मारणे. **stapler** *ना* [*गण*] पिन मारण्याचे साधन, बिछवा.

staple^{2} /'स्टेइप्(अ)ल्/ *ना* [*गण*] मुख्य वस्तू किंवा उत्पादन. **staple** *वि* प्रमुख, मुख्य : *Their ~ diet is rice, तांदूळ हे त्यांचे प्रमुख अन्न आहे.*

star /स्टा(र्)/ *ना* [*गण*] १ तारा. २ चांदणीचे चिन्ह, बहुधा गुणवत्ता दाखविणारे ताऱ्याचे किंवा ताऱ्यासारखे चिन्ह. ३ चित्रपट, संगीत वगैरेतील तारा. ४ आपल्या भविष्यावर परिणाम करतो असा समज असलेला ग्रह/तारा : *born under a lucky ~, शुभ नक्षत्र/ग्रह असताना जन्मलेला.* **star** *वि* (**-rr-**) (**क**) [*अक*] चित्रपटातील वगैरे प्रमुख कलाकार असणे, प्रमुख भूमिकेत असणे. **'stardom** /'स्टाडम्/ *ना* [*अगण*] चित्रपट, गायन वगैरेतील तारा असण्याची स्थिती. **'starfish** *ना* [*गण*] चांदणीसारखा आकार असणारा समुद्रातील एक प्राणी. **starry** *वि* तारांकित.

starboard /'स्टाबड्/ *ना* [*अगण*] विमान किंवा बोट ज्या दिशेला जाते तिकडे तोंड केल्यावर येणारी त्यांची उजवी बाजू.

starch /स्टाच्/ *ना* [*अगण*] १ बटाटे, तांदूळ वगैरेमधला चव नसणारा पांढरा पदार्थ, पिष्ठसत्त्व. २ सुती कपडे कडक करण्यासाठी यापासून बनवलेली खळ. **starch** *क्रि* [*सक*] खळ वापरून कडक करणे. **starchy** *वि* (**-ier, -iest**) पिष्ठसत्त्वयुक्त.

stare /'स्टेअ(र्)/ *क्रि* [*अक*] (*at*)// टक लावून खूप वेळ पाहणे. **stare** *ना* [*गण*] टक.

stark /स्टाक्/ *वि* १ उजाड, निर्जन : *a ~ landscape, उजाड भूप्रदेश.* २ स्पष्ट; उघड : *in ~ contrast, उघड विरोधी.* **stark** *क्रिवि* पूर्णपणे : *~ naked, पूर्ण नागडा.*

starling /'स्टालिङ्/ *ना* [*गण*] चमकणाऱ्या गडद पिसांची मैना, साळुंकी.

starry ➪ STAR.

start^{1} /स्टाट्/ *ना* १ [*गण, बहुधा अ.व*] प्रवासाची, कामाची वगैरे सुरुवात, प्रारंभ. २ **the start** [*अ.व*] जेथून शर्यत सुरू होते ती जागा. ३ [*अगण, गण*] इतर स्पर्धकांच्या पुढचे अंतर किंवा आधी सुरू करण्याचा काळ.

start^{2} /स्टाट्/ *क्रि* १ [*अक*] (*out*) प्रवास सुरू होणे/करणे. २ [*अक, सक*] (काहीतरी करायला) सुरुवात करणे, प्रारंभ करणे. ३ [*अक, सक*] (*up*)// (इंजिन वगैरे) सुरू होणे, चालू करणे : *The car won't ~, गाडी सुरू होणार नाही/होईना.* ४ [*सक*] अस्तित्वात आणणे, सुरू करणे : *~ a business, धंदा सुरू करणे.* ५ (*वाक्प्र*) **start the ball rolling** ➪ BALL^{1}. (*क्रिब*) **start off** चालू/हालू लागणे. **start (sb) off (on sth)** एखाद्याला एखादी गोष्ट म्हणायला, करायला वगैरे लावणे. **start out (to do sth)** (*अनौप*) सुरू करणे. **starter** *ना* [*गण*] १ इंजिन सुरू करण्याचे साधन. २ जेवणातील पहिले वाढणे. ३ शर्यत सुरू करणारा माणूस. ४ (*वाक्प्र*) **for 'starters** प्रथमतः.

startle /'स्टाट्ल्/ *क्रि* [*सक*] आश्चर्यचकित करणे, धक्का देणे.

starve /स्टाव्ह्/ *क्रि* १ [*अक, सक*] उपासमार होणे, उपासमारीने मरणे/मारणे. २ [*अक*] (*अनौप*) भूक लागणे, भुकेला होणे/असणे : *I'm starving, मला भूक लागलीय्/मी उपाशी आहे.* ३ [*सक*] (बहुधा कर्मणी) एखाद्याला गरज असलेली एखादी गोष्ट न देणे, वंचित करणे, आचावणे : *Children ~d of love, प्रेमाला वंचित झालेली मुले.* **starvation** /-'व्हेइश्न्/ *ना* [*अगण*] उपासमार, भूक.

state^{1} /स्टेइट्/ *ना* १ [*गण*] व्यक्तीची किंवा वस्तूची स्थिती, अवस्था : *a poor ~ of health, आरोग्याची दैन्यावस्था.* २ (तसेच **State**) [*गण*] देश, राज्य. ३ (तसेच **State**) एखाद्या देशाचा राजकीयदृष्ट्या संघटित असलेला भाग,

राज्य : *Ohio is a ~ in America, ओहाय्ओ हे अमेरिकेतील एक राज्य आहे.* ४ (विशेषतः **the State**) [*अगण*] शासन, सरकार, राज्यसत्ता. ५ [*अगण*] शास्त्रशुद्ध विधी, शासकीय इतमान वगैरे : *buried in ~, इतमानाने/समारंभपूर्वक दफन केलेला.* **state** *वि* १ राज्यसत्तेचा, शासकीय. २ समारंभपूर्वक. **stately** *वि* (**-ier, -iest**) प्रतिष्ठितपणाचा, दिमाखदार.

state^{2} /स्टेइट्/ *क्रि* [*सक*] शब्दांत स्पष्ट करणे, निवेदन करणे. **statement** *ना* [*गण*] १ घटना, मते वगैरेचे निवेदन. २ आर्थिक वृत्तांत : *a bank ~, बँकेचा आर्थिक वृत्तांत.*

statesman /'स्टेइट्स्मन्/ *ना* [*गण*] (*ब.व* **-men**) शासनाच्या कार्यात महत्त्वाचा भाग घेणारा माणूस, मुत्सद्दी. **'statesmanship** *ना* [*अगण*] मुत्सद्देगिरी, राजकीय चातुर्य.

static /'स्टॅटिक्/ *वि* स्थिर, स्थितिशील. **static** *ना* [*अगण*] १ आकाशवाणी प्रक्षेपणात वातावरणातील गोष्टीमुळे येणारा व्यत्यय. २ (तसेच **,static elec'tricity**) वस्तूंच्या पृष्ठभागावर जमा होणारी विद्युत्‌शक्ती, स्थिर-विद्युत.

station /'स्टेइश्न्/ *ना* [*गण*] १ विशिष्ट सेवा मिळण्याची तरतूद जेथे आहे अशी इमारत वगैरे, स्थानक : *a 'bus ~, बस स्थानक.* २ रेल्वे स्थानक. ३ प्रक्षेपण करणारी कंपनी, प्रक्षेपणकेन्द्र. **station** *क्रि* [*सक*] (सैन्य वगैरे) खडे करणे, नेमणे, तळ देणे. **'station-wagon** *ना* [*गण*] (*अमे*) = ESTATE CAR (ESTATE).

stationary /'स्टेइशन्रि/ *वि* स्थित, न हालणारा : *~ traffic, न सरकणारी वाहतूक.*

stationer /'स्टेइश्न(र्)/ *ना* [*गण*] लेखनसाहित्य विकणारा माणूस. **stationery** /'स्टेइशन्रि; *अमे* -नेरि/ *ना* [*अगण*] लेखनासाठी वापरायचा कागद, पाकिटे वगैरे माल, लेखनसाहित्य, लेखनसामग्री.

statistics /स्ट'टिस्टिक्स्/ *ना* १ [*ब.व*] आकड्यांमधे दाखवलेली माहिती, आकडेवारी. २ [*अगण*] संख्याशास्त्र. **statistical** /-क्ल्/ *वि* आकडेवारीचा; संख्याशास्त्रीय. **statistically** /-क्लि/ *क्रिवि* संख्याशास्त्रीय रीतीने. **statistician** /,स्टॅटि'स्टिश्न्/ *ना* [*गण*] संख्याशास्त्रज्ञ.

statue /'स्टॅच्यू/ *ना* [*गण*] व्यक्ती, प्राणी वगैरेचा लाकडाचा, दगडाचा वगैरे पुतळा. **statuette** /,स्टॅचु'अेट्/ *ना* [*गण*] छोटासा पुतळा.

stature /'स्टॅच(र्)/ *ना* [*अगण*] १ (व्यक्तीची) अंगकाठी, बांधा. २ (*ला*) कामगिरी किंवा क्षमतेमुळे मिळणारी कीर्ती, स्थान.

status /'स्टेईटस्/ *ना* [*अगण*] माणसाचे सामाजिक, कायदेशीर किंवा व्यावसायिक स्थान, प्रतिष्ठा. **'status symbol** *ना* [*गण*] एखाद्याच्या प्रतिष्ठेचे चिन्ह – उदाहरणार्थ मोठी गाडी वगैरे.

status quo /'स्टेइटस् क्वउ/ *ना* [*गण*] जैसे थे परिस्थिती.

statute /'स्टॅचूट्/ *ना* [*गण*] संसदेने केलेला कायदा, संविधी. **statutory** /-ट्रि; *अमे* -टॉऽरि/ *वि* कायदेशीर, संविधिक, कायद्याने.

staunch /स्टॉऽन्च्/ *वि* (समर्थक वगैरबाबत) एकनिष्ठ, कट्टर, कडवा. **staunchly** *क्रिवि* कट्टरपणे, खंदेपणाने.

stave /स्टेइव्ह्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **~d** किंवा **stove** /स्टउव्ह्/) (*क्रिब*) **stave sth in** एखाद्या गोष्टीला बीळ/भोक पाडणे. **stave sth off** (*भूत, भूत वि* **~d**) (धोका वगैरे) लांबणीवर टाकणे, थोपविणे.

stay /स्टेइ/ *क्रि* १ [*अक*] (आहे तसे किंवा आहे तिथे) राहणे : *~ at home, घरी राहणे* ○ *~ sober, (दारू न पिता) भानावर राहणे.* २ [*अक*] तात्पुरते राहणे, उतरणे, मुक्काम करणे : *~ at a hotel, हॉटेलमधे राहणे.* ३ [*सक*] रोखणे, थांबवणे किंवा खीळ घालणे, उशीर करणे : *~ the progress of the disease, आजाराची वाढ रोखणे.* ४ (*वाक्प्र*) **stay clear of sb/sth** ➪ CLEAR^{1}. **stay put** आहे तिथेच राहणे. ५ (*क्रिब*) **stay up** जागे राहणे, न झोपणे. **stay** *ना* [*गण*] १ वास्तव्य, राहणे : *a long ~ in hospital, हॉस्पिटलमधील दीर्घ मुक्काम.* २ (*कायदा*) स्थगिती किंवा लांबणीवर टाकणे : *a ~ of execution, कार्यवाही लांबणीवर टाकणे.* **'staying-power** *ना* [*अगण*] = STAMINA.

steadfast /'स्टेड्फास्ट्; *अमे* -फॅस्ट्/ *वि* पक्का आणि न बदलणारा, अढळ. **steadfastly** *क्रिवि* अढळपणे.

steady /'स्टेडि/ *वि* (**-ier, -iest**) १ पक्का रुतलेला, घट्ट, न डगमगणारा, आधार असलेला; अचल : *Hold the ladder ~, शिडी घट्ट धर.* २ एकसारखा आणि नियमित : *a ~ speed, कायम वेग.* ३ अवलंबून राहण्यासारखा, भरवशाचा : *a ~ purpose, अढळ हेतू.* **steady** *क्रिवि* नियमितपणे. **steady** *क्रि* (**-ied**) [*अक, सक*] स्थिर होणे/करणे, आधार देणे. **steadily** *क्रिवि* नियमितपणे.

steak /स्टेइक्/ *ना* [*गण, अगण*] मांस किंवा मासा (यांचा मोठा तुकडा).

steal /स्टील्/ *क्रि* (*भूत* **stole** /स्टउल्/, *भूत वि* **stolen** /स्टउलन्/) १ [*अक, सक*] (*from*)// (एखाद्याची मालमत्ता) परवानगीशिवाय घेणे, चोरणे. २ [*सक*] अनपेक्षितपणे किंवा युक्तीने मिळवणे/घेणे : *~ a kiss, एकाएकी चुंबन घेणे.* ३ [*अक*] चोरपावलांनी वावरणे. ४ (*वाक्प्र*) **steal the show** सर्वाधिक लक्ष वेधून घेणे.

stealth /स्टेल्थ्/ *ना* [*अगण*] चोरटेपणा. **stealthy** *वि* (**-ier, -iest**) चोरटेपणाचा.

steam /स्टीम्/ *ना* [*अगण*] १ वाफ. २ वाफेची शक्ती. ३ (*वाक्प्र*) **run out of steam** वाफ जाणे, शक्ती संपणे. **steam** *क्रि* १ [*अक*] वाफ येणे. २ [*अक*] वाफेवर चालणे. ३ [*सक*] वाफेवर शिजवणे. ४ (*क्रिब*) **steam (sth) up** वाफेने धूसर होणे/करणे, वाफाळणे. **'steam-engine** *ना* [*गण*] वाफेवर चालणारे इंजिन. **steamer** *ना* [*गण*] १ वाफेवर चालणारी नौका, आगबोट. २ वाफेवर अन्न शिजवण्याचे भांडे. **'steamroller** *ना* [*गण*] नवीन रस्त्याची खडी दाबण्याचे साधन. **steamy** *वि* १ वाफेसारखा, वाफेचा. २ (*अनौप*) लैंगिक वासनेचा, शृंगारिक.

steel /स्टील्/ *ना* [*अगण*] लोह आणि कार्बन यांपासून बनवलेला आणि सुरी, यंत्रे वगैरे बनवताना वापरला जाणारा एक कठीण धातू, पोलाद. **steel** *क्रि* [*सक*] एखाद्याची दया येऊ न देणे, न पाघळणे : *~ oneself (against a cry for help), (कुणी मदतीसाठी याचना केली तरी) पुळका येऊ न देणे.*

steep^1 /स्टीप्/ *वि* १ (उताराबाबत) एकदम उतरता, खोल, (चढाबाबत) सरळ उभा. २ (*अनौप*) अति उंच : *~ prices,* चढ्या किंमती म्हणजेच *भडकलेले भाव.* **steeply** *क्रिवि* एकदम खोल असा. **steepness** *ना* [*अगण*] खोलपणा, सरळ खोल उतार.

steep^2 /स्टीप्/ *क्रि* १ [*अक, सक*] द्रवात बुडवणे. २ (*क्रिब*) **steep (sb/oneself) in sth** एखाद्या गोष्टीचे (एखाद्याला/स्वतःला) पूर्ण ज्ञान करून देणे.

steeple /'स्टीप्ल्/ *ना* [*गण*] चर्चचे शिखर, कळस. **'steeplechase** *ना* [*गण*] घोडे किंवा माणसांसाठीची अडथळ्याची शर्यत. **'steeplejack** *ना* [*गण*] शिखरे, धुराडी वगैरे साफ करणारा माणूस.

steer /स्टिअ(र्)/ *क्रि* [*अक, सक*] १ (नौका, गाडी वगैरे) चालवणे, हाकणे. २ (*वाक्प्र*) **steer clear of sb/sth** ➪ CLEAR^1. **'steering-wheel** *ना* [*गण*] गाडी चालवण्याचे चाक.

stem^1 /स्टेम्/ *ना* [*गण*] (**क**) वनस्पतीचा मुळापासून वर येणारा भाग, देठ, खोड. (**ख**) देठासारखा भाग – उदाहरणार्थ मद्याच्या प्याल्याचा. **stem** *क्रि* (**-mm-**) (*क्रिब*) **stem from sth** एखाद्या गोष्टीचा उगम असणे, मूळ असणे.

stem^2 /स्टेम्/ *क्रि* [*सक*] (**-mm-**) (द्रवाचा वगैरे प्रवाह) थांबवणे, अडवणे.

stench /स्टेन्च्/ *ना* [*गण*] घाण किंवा उग्र वास, दर्प.

stencil /'स्टेन्स्ल्/ *ना* [*गण*] १ अक्षरे किंवा आकृत्या ज्यावर कापून काढलेत असा धातूचा वगैरे पातळ पत्रा. २ स्टेन्सिलने उमटवलेली अक्षरे वगैरे, निकृत. **stencil** *क्रि* (**-ll-**; *अमे* **-l-**) [*अक, सक*] स्टेन्सिलने अक्षरे वगैरे काढणे.

step^1 /स्टेप्/ *ना* [*गण*] १ (**क**) पाऊल टाकणे. (**ख**) एका पावलाचे अंतर. २ चालण्याचा आवाज किंवा पद्धत : *I heard her ~ on the stair, मला जिन्याच्या पायरीवर तिच्या पावलांची चाहूल आली.* ३ कृतीचे पाऊल : *We took ~s* *to help her, तिला मदत करण्यासाठी आम्ही पावले उचलली.* ४ पायरी. ५ **steps** [*ब.व*] पायऱ्यांचा घोडा. ६ (*वाक्प्र*) **in/out of step (with)** (**क**) इतरांबरोबरीने पाऊल टाकणारा/न टाकणारा. (**ख**) सहमत/असहमत. **mind/watch one's 'step** काळजीपूर्वक वागणे, जपून पावले टाकणे. **,step by 'step** पायरीपायरीने, सावकाश. **'step-ladder** *ना* [*गण*] घडीची शिडी, घोडा.

step^2 /स्टेप्/ *क्रि* (**-pp-**) [*अक*] १ पाऊल टाकणे. २ *in, out, up, etc*// एखाद्या दिशेने पाऊल टाकणे. ३ (*वाक्प्र*) **'step on it** (*अनौप*) अधिक वेगाने जाणे, जल्दी करणे. **,step out of 'line** अपेक्षेपेक्षा वेगळे करणे, भलतेच काही करणे. ४ (*क्रिब*) **step aside, step down** विशेषतः दुसऱ्याला जागा करून देण्यासाठी राजीनामा देणे, सोडून देणे. **step in** मदत करण्यास उतरणे. **step sth up** एखादी गोष्ट वाढवणे. **'stepping-stone** *ना* [*गण*] १ झरा वगैरे ओलांडण्याच्या दगडांच्या रांगेतील एक दगड, पायाखालचा दगड. २ (*ला*) मिळवायच्या गोष्टीची पायरी.

step- /स्टेप्-/ *पूर्वप्रत्यय* सावत्र : *'~daughter, सावत्र मुलगी.*

stereo /'स्टेरिअउ/ *वि* दोन ध्वनिक्षेपक (लाउडस्पीकर) वापरून नैसर्गिकपणाचा आभास निर्माण करणारे ध्वनियोजन. **stereo** *ना* १ [*अगण*] असा ध्वनी : *in ~, स्टिरिओमधे.* २ [*गण*] स्टिरिओ रेकॉर्ड प्लेअर, रेडिओ वगैरे.

stereotype /'स्टेरिअटाइप्/ *ना* [*गण*] एखाद्या गोष्टीविषयीची कायमची कल्पना, ठरीव कल्पना, चाकोरीबद्ध प्रतिमा, साचेबंद कल्पना.

sterile /'स्टेराइल्; *अमे* 'स्टेरल्/ *वि* १ वांझ, खुडुक. २ (जमिनीबाबत) नापीक, वरड. ३ (*ला*) निष्फळ : *a ~ argument, व्यर्थ/वांझ युक्तिवाद.* ४ निर्जन्तुक. **sterility** /स्ट'रिलटि/ *ना* [*अगण*] वांझपणा, वंध्यत्व; नापीकपणा; निष्फळता; निर्जन्तुकपणा. **sterilize** /'स्टेरलाइझ्/ *क्रि* [*सक*] निर्जन्तुक करणे.

sterling /'स्टऽलिङ्/ *ना* [*अगण*] ब्रिटिश चलन. **sterling** *वि* (*औप*) चांगल्या गुणवत्तेचा, सुस्वभावी, शुद्ध चारित्र्याचा.

stern^1 /स्टऽन्/ *वि* कडक, कठोर, करारी. **sternly** *क्रिवि* कडकपणे, कठोरपणे.

stern^2 /स्टऽन्/ *ना* [*गण*] बोटीचा मागचा भाग, वरा.

steroid /'स्टेरॉइड्, 'स्टिअरॉइड्/ *ना* [*गण*] शरीरात निर्माण होणारा एक तीव्र रासायनिक पदार्थ किंवा घ्यायचे औषध.

stethoscope /'स्टेथस्कउप्/ *ना* [*गण*] हृदयाची स्पंदने वगैरे ऐकण्याचे एक साधन, श्रवणनलिका.

stew /स्ट्यू/ *क्रि* [*सक*] मंद आगीवर पाण्यात किंवा रसात झाकण ठेवून शिजवणे. **stew** *ना* १ [*गण, अगण*] मंदाग्नीवर शिजवलेले मांस वगैरे. २ (*वाक्प्र*) **in a stew** (*अनौप*) खिन्न किंवा अस्वस्थ.

steward /'स्ट्युअड्; *अमे* 'स्टूअड्/ *ना* [*गण*] १ (तसेच **stewardess** /,स्ट्युअ'डेस्; *अमे* ,स्टूअ'डेस्/) विमानातील किंवा बोटीवरील प्रवाशांची देखभाल करणारा सेवक. २ स्पर्धा, नृत्य किंवा कोणताही सार्वजनिक सोहळा आयोजित करणारा माणूस, उपस्थापक, धुरा वाहणारा.

stick^1 /स्टिक्/ *ना* [*गण*] १ लहान बारीक काठी. २ जाड काठी : *a 'walking-~, चालायची काठी.* ३ (खडूची वगैरे) कांडी. ४ (*वाक्प्र*) **give sb 'stick** (*अनौप*) एखाद्याला शिक्षा करणे किंवा त्यावर टीका करणे, झोडपणे.

stick^2 /स्टिक्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **stuck** /स्टक्/) १ [*अक, सक*] *in, into, through, etc*// काहीतरी टोकदार कशाततरी खुपसणे : *~ the knife into the cheese, चीजमधे सुरी खुपसणे.* २ [*अक, सक*] विशेषतः डिंकाने चिकटणे/चिकटवणे, डकवणे. ३ [*सक*] (*अनौप*) घाईघाईने ठेवणे, कोंबणे : *S~ it in the bag, ते बॅगेत कोंब.* ४ [*अक*] एखाद्या जागी चिकटून बसणे, अडकून पडणे : *The key stuck in the lock, किल्ली कुलुपात अडकून बसली.* ५ [*सक*] (*अनौप*) सहन करणे : *I can't ~ it, मला हे सहन होत नाही.* ६ (*वाक्प्र*) **stick one's neck out** धोका पत्करणे, मान अडकवणे. **stick one's nose into sth** ➪ NOSE^1. **stick one's oar in**

➪ OAR. **stick out like a sore thumb** ➪ SORE. **stick to one's guns** (*अनौप*) स्वतःची मते, वागणूक वगैरे न बदलणे, ठाम राहणे. **stuck in a groove** ➪ GROOVE. ७ (*क्रिब*) **stick around** (*अनौप*) दूर न जाणे, रेंगाळणे. **stick at sth** एखाद्या गोष्टीला चिकटून राहणे, एखादी गोष्ट करीत राहणे. **stick by sb** एखाद्याला पाठिंबा देत राहणे, एखाद्याला चिकटून राहणे. **stick sth out** बाहेर येणे/काढणे : ~ *one's tongue out, जीभ बाहेर काढणे, जीभ दाखवणे.* **stick it/sth out** (*अनौप*) शेवटपर्यंत करीत राहणे. चिकाटीने करणे. **stick to sb/sth** (स्वतःच्या मित्राला, मतांना वगैरे) चिकटून राहणे, एकनिष्ठ राहणे. **stick up** वर उभे राहणे. **stick up for sb/sth** एखाद्याचे समर्थन करणे, बाजूने उभे राहणे. **sticker** *ना* [*गण*] चिकटवायचा (चित्र, घोषणा वगैरे असलेला) कागद. **'sticking-plaster** *ना* [*गण, अगण*] = PLASTER ३. **'stick-in-the-mud** *ना* [*गण*] (*अनौप*) बदलाला विरोध करणारा माणूस. **sticky** *वि* (**-ier, -iest**) १ चिकट, डिंकासारखा. २ (*अनौप*) अवघड : *a ~ situation, कठीण परिस्थिती.*

stiff /स्टिफ़्/ *वि* १ सहज न वाकणारा, दुमडणारा वगैरे, कडक, तांठ : ~ *cardboard, कडक पुठ्ठा.* २ घट्ट : *a ~ paste, घट्ट पेस्ट.* ३ अवघड : *a ~ climb, अवघड चढण.* ४ (रीतिरिवाज वगैरेबाबत) औपचारिक; वरवरचा, तुसडा, तुटक. ५ जोराचा : *a ~ breeze, जोराचा वारा.* ६ (*वाक्प्र*) **a stiff upper lip** कठीण परिस्थितीत वगैरे शांत राहण्याची क्षमता. **stiff** *क्रिवि* (*अनौप*) चिकार, कमालीचा : *bored ~, कमालीचा कंटाळलेला.* **stiffly** *क्रिवि* कडकपणे; ताठरपणे, तुसडेपणाने. **stiffness** *ना* [*अगण*] कडकपणा; तुटकपणा, ताठा.

stiffen /'स्टिफ़्न/ *क्रि* [*अक, सक*] कडक होणे, दांडरणे, ताठणे.

stifle /'स्टाइफ़्ल्/ *क्रि* १ [*अक, सक*] गुदमरणे, गुदमरवणे, श्वास कोंडणे. २ [*सक*] दाबणे : ~ *a yawn, जांभई दाबणे.*

stigma /'स्टिग्म/ *ना* [*गण, अगण*] कलंक, बट्टा, लांछन, काळिमा.

stile /स्टाइल्/ *ना* [*गण*] कुंपण वगैरे ओलांडण्याकरता असलेली पायरी.

still^{1} /स्टिल्/ *वि* १ स्तब्ध, निश्चल, निःशब्द, निरव. २ (पेयाबाबत) बुडबुडे न येणारे, फेसविरहित. **still** *क्रि* [*सक*] शांत करणे. **'stillborn** *वि* १ (मुलाबाबत) जन्मतःच मेलेले, मृतजात. २ (*ला*) (कल्पना वगैरेबाबत) निष्फळ, परिणामशून्य.

still^{2} /स्टिल्/ *क्रिवि* १ अद्याप, अजून : *She is ~ busy, ती अजूनही कामात व्यग्र आहे.* २ आणखी, अधिक : *Tom is tall but Mary is ~ taller, टॉम उंच आहे पण मेरी त्याहून अधिक उंच आहे.* ३ तथापी : *It's raining. Still, we must go shopping,* पाऊस पडतोय पण *तरीही आपण खरेदीला गेलं पाहिजे.*

still^{3} /स्टिल्/ *ना* [*गण*] व्हिस्की, ब्रॅन्डी वगैरे गाळण्याचे साधन, दारू गाळण्याचे यंत्र.

stilt /स्टिल्ट्/ *ना* [*गण*] घोडेकाठी, वर लावलेल्या फळीवर उभे राहून चालायची काठी.

stilted /'स्टिल्टिड्/ *वि* (बोलणे-चालणे, वागणे वगैरेबाबत) आढ्यतापूर्ण आणि कृत्रिम, अवडंबराचा.

stimulant /'स्टिम्युलन्ट्/ *ना* [*गण*] उत्तेजित करणारे पेय, औषध वगैरे, उद्दीपक.

stimulate /'स्टिम्युलेइट्/ *क्रि* [*सक*] १ उत्तेजित करणे, जागृत करणे : ~ *interest, गोडी निर्माण करणे.* २ वाढ होण्यासाठी किंवा प्रगतीसाठी एखाद्याला उत्तेजन देणे. **stimulating** *वि* उत्तेजक, उत्तेजन देणारा. **stimulation** /स्टिम्यु'लेइश्न्/ *ना* [*अगण*] उत्तेजना, उद्दीपन.

stimulus /'स्टिम्युलस्/ *ना* [*गण*] (*ब.व* **-li** /-लाइ/) उत्तेजन देणारे काहीतरी, चेतक, उद्दीपक, प्रेरणा, उत्तेजक : *a ~ to hard work, कष्ट करण्याची प्रेरणा.*

sting^{1} /स्टिङ्/ *ना* [*गण*] १ मधमाशीसारख्या काही कीटकांचा टोक असलेला, बहुधा विषारी अवयव, नांगी. २ दंश. ३ ठणका.

sting^{2} /स्टिङ्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **stung** /स्टङ्/) [*अक, सक*] १ नांगी मारून दंश करणे. २ ठणका मारणे, झोंबणे : (*ला*) *a stinging attack, झोंबणारी टीका.*

stingy /'स्टिन्जि/ *वि* (**-ier, -iest**) (*अनौप*)

पैसे देण्यास, खर्च करण्यास वगैरे नाखूष असणारा, चिक्कू, चिकट. **stingily** /-अलि/ *क्रिवि* चिकटपणे, कंजूषपणे. **stinginess** *ना* [*अगण*] चिक्कूपणा, कंजूषपणा.

stink /स्टिङ्क्/ *क्रि* (*भूत* **stank** /स्टॅङ्क्/ किंवा **stunk** /स्टङ्क्/, *भूत वि* **stunk**) [*अक*] १ घाण वास येणे, दुर्गंधी येणे. २ (*अनौप*) फार वाईट असणे, अप्रामाणिक असणे. ३ (*क्रिब*) **stink sth out** (एखादी जागा) दुर्गंधाने भरणे. **stink** *ना* १ [*गण*] दुर्गंध, घाण वास. २ [*अे.व*] (*व्रात्य*) संकट; आरडाओरडा.

stint /स्टिन्ट्/ *क्रि* [*अक, सक*] *~ on sth; ~ sb (of sth)*// (एखाद्याला/स्वतःला) एखाद्या गोष्टीचा अगदी अल्प भाग देणे. **stint** *ना* [*गण*] ठराविक किंवा नेमून दिलेले काम वगैरे.

stipulate /'स्टिप्युलेइट्/ *क्रि* [*सक*] अट घालणे. **stipulation** /-लेइश्न्/ *ना* [*अगण*] अट.

stir /स्टऽ(र्)/ *क्रि* (-rr-) १ [*सक*] चमच्याने वगैरे (द्रवपदार्थ) ढवळणे. २ [*अक, सक*] हालणे, हालवणे. ३ [*सक*] (*up*)// क्षुब्ध करणे, चेतावणे : *speakers ~ring up the crowd, जमावाला चिथावणी देणारे वक्ते.* ४ [*अक*] (*व्रात्य*) लोकांमधे अस्वस्थता निर्माण करणे किंवा लोकांना फितवणे. **stir** *ना* [*अे.व*] खळबळ किंवा गोंधळ. **stirring** *वि* खळबळकारक.

stirrup /'स्टिरप्/ *ना* [*गण*] घोड्यावरील खोगीराला घोडेस्वाराच्या पायाला आधार देण्यासाठी बांधलेल्या दोन लोखंडी कड्यांपैकीचे एक कडे, रिकिब.

stitch /स्टिच्/ *ना* १ [*गण*] (क) शिवणकामातील किंवा जखमेला घातलेला टाका. (ख) विणकामातील टाका. २ [*गण*] टाक्याचा धागा. ३ [*अे.व*] पळण्याने पोटात दुखणे. ४ (*वाक्प्र*) **not have a 'stitch on/not be wearing a 'stitch** नागडे असणे, विवस्त्र असणे. **in 'stitches** (*अनौप*) हसू आवरता न येणे. **stitch** *क्रि* [*अक, सक*] टाके घालणे, टीप घालणे.

stoat /स्टउट्/ *ना* [*गण*] घुशीपेक्षा मोठा, तपकिरी रंगाचा केसाळ प्राणी.

stock¹ /स्टॉक्/ *ना* १ [*गण, अगण*] विक्रीकरता किंवा वापराकरता उपलब्ध असलेला मालाचा साठा. २ [*गण, अगण*] पुरवठा. ३ [*अगण*] = LIVESTOCK. ४ [*गण,* बहुधा *ब.व, अगण*] भांडवल गुंतवणुकीसाठी कंपनीचा घेतलेला रोखा. ५ [*अगण*] हाडे वगैरे उकळलेला आणि रस्सा वगैरे करताना वापरायचा पातळ पदार्थ. ६ (*वाक्प्र*) **in/out of stock** उपलब्ध/अनुपलब्ध किंवा शिल्लक/शिल्लक नाही. **take stock of sth** (परिस्थितीची) पाहणी करणे, मागोवा घेणे. **stock** *वि* वापरून गुळगुळीत झालेला, चावून चोथा झालेला : *a ~ phrase, वापरून गुळगुळीत झालेले शब्द.* **'stockbroker** *ना* [*गण*] रोख्यांची खरेदी-विक्री करणारा, रोखेविक्रेता. **'stock exchange** *ना* [*गण*] रोखे बाजार, शेअरबाजार. **'stock-market** *ना* [*गण*] शेअरबाजार (किंवा तेथील उलाढाल). **'stockpile** *क्रि* [*सक*] भविष्य काळात वापरण्यासाठी साठा करून ठेवणे. **'stockpile** *ना* [*गण*] भविष्यकाळासाठी केलेला साठा. **,stock-'still** *क्रिवि* ठप्प, थंड. **'stock-taking** *ना* [*अगण*] दुकानातील वगैरे मालाची मोजदाद, संग्रह पडताळणी.

stock² *क्रि* [*सक*] १ साठा करणे, साठा पुरवणे. २ (*क्रिब*) **stock up (on sth)** एखाद्या गोष्टीचा पुरवठा होणे, माल मिळणे.

stockade /स्टॉकेइड्/ *ना* [*गण*] उंच, दणकट संरक्षक कुंपण.

stockings /'स्टॉकिङ्झ्/ *ना* [*ब.व*] पायांवर घट्ट बसणारी स्त्रियांची मोज्यासारखी वस्त्रे.

stocky /'स्टॉकि/ *वि* (-ier, -iest) (लोकांबाबत) बुटका, दणकट आणि भारदस्त दिसणारा, गिड्डा. **stockily** *क्रिवि* गिड्डेपणाने.

stodge /स्टॉज्/ *ना* [*अगण*] (*व्रात्य*) जड अन्न. **stodgy** *वि* (-ier, -iest) १ जड. २ रटाळ.

stoic /'स्टउइक्/ *ना* [*गण*] शांत वृत्तीने तक्रार न करता सहन करणारा, सोशिक, स्थितप्रज्ञ, तितिक्षू. **stoically** /-क्लि/ *क्रिवि* स्थितप्रज्ञतेने. **stoicism** /'स्टउइसिझ्म्/ *ना* [*अगण*] स्थितप्रज्ञता, सोशिकता, स्थिरबुद्धी, तितिक्षावाद.

stoke /स्टउक्/ *क्रि* (*क्रिब*) **stoke (sth) up** (इंजिनच्या वगैरे) विस्तवात कोळसे घालणे. **stoker** *ना* [*गण*] इंजिनात कोळसे घालणारा.

stole¹ /स्टउल्/ *ना* [*गण*] खांद्यावर घालायचे वस्त्र, शेला.

stole² STEAL चा *भूत.*

stolen STEAL चे *भूत वि.*

stomach /'स्टॅमक्/ *ना* १ [*गण*] अन्नपचन होणारा शरीरातील पिशवीसारखा एक अवयव, उदर, पोट. २ [*गण*] शरीराचा पुढचा भाग, पूर्वांग. ३ [*अगण*] इच्छा : *have no ~ for an argument, वाद करण्याची इच्छा नसणे.* **stomach** *क्रि* [*सक*] सहन करणे.

stone /स्टउन्/ *ना* १ [*अगण*] धातुमय खडक नसलेले असे कठीण खनिज द्रव्य, पाषाण, अश्म, शिला. २ [*गण*] दगड. ३ [*गण*] रत्न. ४ [*गण*] चेरी वगैरेसारख्या फळांची बी. ५ [*गण*] (*ब.व* **stone**) १४ पौंडाचे (६.३५ किलोग्रॅमचे) एक परिमाण. ६ [*गण*] शरीरातील अवयवात निर्माण झालेला खडा – उदाहरणार्थ मुतखडा. ७ (*वाक्प्र*) **a stone's throw** हाकेच्या अंतरावर, खूप जवळ. **stone** *क्रि* [*सक*] १ दगड मारणे. २ (फळातून) बी काढणे. **the 'Stone Age** *ना* [*अे.व*] ज्या काळात हत्यारे वगैरे दगडापासून बनवली जात तो काळ, पाषाण युग. **stoned** *वि* (*अनौप*) १ प्यालेला, तर्र. २ अमली पदार्थाच्या आधीन झालेला. **,stone-'deaf** *वि* ठार बहिरा.

stony /'स्टउनि/ *वि* (**-ier, -iest**) १ दगडाचा, खडकाळ : *a ~ path, दगडांचा रस्ता.* २ निर्दय आणि कडक, पाषाणहृदयी. **stonily** /-अलि/ *क्रिवि* निर्दयपणे, निष्ठुरपणे.

stood STAND² चा *भूत, भूत वि.*

stool /स्टूल्/ *ना* [*गण*] पाठ नसलेली बसायची खुर्ची, स्टूल.

stoop /स्टूप्/ *क्रि* १ [*अक*] पुढे वाकणे. २ (*क्रिब*) **stoop to sth** (वाईट गोष्ट करण्यास) स्वतःची पातळी सोडणे, खाली येणे. **stoop** *ना* [*अे.व*] वाकलेली अवस्था, बाक, पोक.

stop¹ /स्टॉप्/ *ना* [*गण*] १ थांबणे : *come to a ~ थांबणे किंवा ठप्प होणे.* २ बसचा वगैरे थांबा. ३ = FULLSTOP. ४ (*वाक्प्र*) **put a stop to sth** एखादी होऊ घातलेली गोष्ट थांबवणे, प्रतिबंध करणे.

stop² /स्टॉप्/ *क्रि* (**-pp-**) १ [*सक*] (हालचाल, प्रगती वगैरे) थांबवणे. २ [*सक*] रोखणे, अडवणे : *We ~ped her from leaving, आम्ही तिला जाण्यापासून रोखले.* ३ [*अक*] बंद पडणे : *The engine ~ped, इंजिन बंद पडले.* ४ [*अक*] थांबणे : *Where does the bus ~? बस कुठे थांबते?* ५ [*सक*] (एरवी आपण जी गोष्ट सहजपणे देतो ती) देण्यास नकार देणे : *~ a cheque, चेक अडवून ठेवणे.* ६ [*अक*] (*अनौप*) राहणे, मुक्काम करणे. ७ (*क्रिब*) **stop off** प्रवासात मधेच थोडा विसावा घेणे, थांबणे. **stop over** थांबून रात्रीचा मुक्काम करणे. **'stopcock** *ना* [*गण*] नळीतील किंवा पाईपातील पाणी नियंत्रितपणे वाहण्यासाठी असलेली झडप. **'stopgap** *ना* [*गण*] तात्पुरती बदली. **'stopover** *ना* [*गण*] लहानसा मुक्काम, विसावा. **stoppage** /-पिज्/ *ना* [*गण*] काम बंद ठेवण्याचा काळ. **stopper** *ना* [*गण*] बोळा, तोंड बंद करायची वस्तू. **'stop-press** *ना* [*गण*] वर्तमानपत्रात छापलेली उशिराची बातमी.

storage /'स्टॉऽरिज्/ *ना* [*अगण*] माल साठवण (किंवा त्याची जागा), कोठार.

store /स्टॉऽर्/ *ना* [*गण*] १ गरजेला उपयोगी पडेल असा साठा, भांडार. २ माल साठवण्याची जागा, कोठी, भांडार. ३ (विशेषतः मोठे) दुकान. ४ (*वाक्प्र*) **in store** (क) वापरासाठी साठवून (तयार) ठेवलेला. (ख) घडू शकणारा, संभाव्य : *What's in ~ for us today? आज आपल्या नशिबात काय वाढून ठेवलय्?* **set great/not much store by** एखादी गोष्ट खूप महत्त्वाची/कमी महत्त्वाची मानणे. **store** *क्रि* [*सक*] १ (*up*)// पुढे वापरण्याकरता साठवून ठेवणे, संचय करून ठेवणे. २ (फर्निचर वगैरे) सामानाच्या खोलीत किंवा वखारीत सुरक्षिततेसाठी ठेवून देणे.

storey /'स्टॉऽरि/ *ना* [*गण*] इमारतीच मजला.

stork /स्टॉऽक्/ *ना* [*गण*] मोठा, लांब पायाच पाण्यात चालणारा पक्षी, करकोचा.

storm /स्टॉऽम्/ *ना* [*गण*] १ वादळ.

भावनेचा उद्रेक : *a ~ of anger, रागाचा उद्रेक.* ३ (*वाक्प्र*) **take by storm** एकदम हल्ला करून कबजात घेणे. **storm** *क्रि* १ [*सक*] एकदम हल्ला करून ताब्यात घेणे. २ [*अक*] रागाने बोलणे, वावरणे वगैरे. **stormy** *वि* **(-ier, -iest)** वादळी, झंझावाती.

story^1 /स्टॉऽरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) १ भूतकाळातील किंवा कल्पनेतील घटनांची कहाणी, कथा, गोष्ट. २ वृत्त. ३ (*अनौप*) खोटे काही, बतावणी.

story^2 (*अमे*) = STOREY.

stout /स्टाउद्/ *वि* १ दणकट, जाडजूड. २ (माणसाबाबत) किंचित जाड. ३ (*औप*) शूर आणि करारी, कणखर. **stout** *ना* [*अगण*] गडद कडक बियर. **stoutly** *क्रिवि* कणखरपणे, निश्चयाने.

stove /स्टउव्ह्/ *ना* [*गण*] कोळसा, लाकूड वगैरेची चूल.

stow /स्टउ/ *क्रि* [*सक*] (*away*)// व्यवस्थित भरून ठेवणे, नजरेआड लावून ठेवणे. **'stowaway** *ना* [*गण*] विमानात किंवा जहाजात फुकटात प्रवास करण्यासाठी लपून बसलेला माणूस.

straddle /'स्ट्रॅड्ल्/ *क्रि* [*सक*] पाय फाकून उभे राहणे किंवा बसणे, दोन्ही बाजूला पाय टाकून बसणे किंवा उभे राहणे.

straight^1 /स्ट्रेइद्/ *वि* १ बाक नसलेला किंवा वाकडा नाही असा : *a ~ line, सरळ रेषा.* २ समतल, सपाट. ३ नीटनेटका, व्यवस्थित. ४ (माणसाबाबत) प्रामाणिक आणि मनमोकळा, सरळ. ५ (मद्यांबाबत) पाण्याविना, कडक. ६ (*व्रात्य*) भिन्नलिंगी संभोग करणारा किंवा आकर्षण असणारा. ७ (*वाक्प्र*) **keep a straight face** चेहऱ्यावरची सुरकुतीही हालू न देणे, न हसणे. **straightness** *ना* [*अगण*] सरळपणा, सपाटी; व्यवस्थितपणा.

straight^2 /स्ट्रेइद्/ *क्रिवि* १ वक्र नाही असा, सरळ रेषेत : *walk ~, सरळ (रेषेत) चालणे.* २ विलंब न करता सरळ, थेट, तडक : *Come ~ home, सरळ घरी ये.* ३ प्रामाणिकपणे; स्पष्टपणे : *Tell her ~ what you think, तुला काय वाटतं ते तिला स्वच्छ/स्पष्टपणे सांग.* ४ (*वाक्प्र*) **go 'straight** गुन्हेगारीचे जीवन सोडून देणे, सरळ मार्गाने जाणे. **straight a'way** *क्रिवि* तात्काळ, ताबडतोब.

straight^3 /स्ट्रेइद्/ *ना* [*गण*] खास करून रेसकोर्सचा वगैरे सरळ भाग.

straighten /'स्ट्रेइद्न्/ *क्रि* [*अक, सक*] सरळ, समान वगैरे होणे/करणे, नीट करणे.

straightforward /स्ट्रेइद्'फॉऽवड्/ *वि* १ प्रामाणिक, सरळ. २ सहजसाध्य, सोपा. **straightforwardly** *क्रिवि* सरळपणे; सोप्या रीतीने.

strain^1 /स्ट्रेइन्/ *ना* १ [*गण, अगण*] ताण : *put ~ on a rope, दोरावर ताण देणे.* २ (क) [*गण, अगण*] एखाद्याच्या सहनशीलतेची, संयमाची वगैरे कडक परीक्षा : *a ~ on our relations, आमच्या संबंधातील ताण.* (ख) [*अगण*] तणावजन्य काळजी, चिंता वगैरे. ३ [*गण, अगण*] स्नायू अति ताणला गेल्याने झालेली इजा, लचक.

strain^2 /स्ट्रेइन्/ *क्रि* १ [*अक, सक*] निकराचा प्रयत्न करणे, शर्थ करणे : *You must ~ (every muscle) to move it, ते हालवायला तुला शर्थीचे प्रयत्न करायला हवेत.* २ [*सक*] लचकवणे, ताण दिल्याने (स्नायू वगैरे) दुखावणे. ३ [*सक*] (द्रवपदार्थ) गाळण्यातून गाळणे. ४ [*सक*] नेहमीच्या योग्य अशा मर्यादेपलीकडे ताणणे : *~ one's authority, स्वतःच्या अधिकाराचा वापर मर्यादेबाहेर करणे.* **strained** *वि* ओढूनताणून आणलेला, कृत्रिम. **strainer** *ना* [*गण*] गाळणे, चाळणी.

strain^3 /स्ट्रेइन्/ *ना* [*गण*] (जीवाणू, कीटक वगैरेची) जात, कुळ, प्रकार.

strait /स्ट्रेइद्/ *ना* १ [*गण*] दोन समुद्रांना जोडणारा पाण्याचा अरुंद पट्टा, सामुद्रधुनी. २ **straits** [*ब.व*] अडचण, संकट : *in terrible ~s, भयानक अडचणीत.*

strait-jacket /'स्ट्रेइद् जॅकिद्/ *ना* [*गण*] वेडाने बेभान झालेल्या माणसाला जखडून ठेवण्यासाठी वापरायचे लांब हाताचे एक जाकीट.

strait-laced /,स्ट्रेइद् 'लेइस्ट्/ *वि* नैतिकतेबाबत कडक, सोवळा, कर्मठ.

strand /स्ट्रॅन्ड्/ *ना* [*गण*] १ दोरीचा, कापडाचा वगैरे धागा, पेड, बट. २ (*ला*)

कथेचा वगैरे धागा, पदर.

stranded /स्ट्रॅन्डिड्/ *वि* अडकून पडलेला, निराधार, असहाय.

strange /स्ट्रेइन्ज्/ *वि* १ अपरिचित, माहीत नसलेला. २ विचित्र, विलक्षण; विक्षिप्त, तऱ्हेवाईक : *What ~ ideas you have! काय विक्षिप्त कल्पना आहेत तुझ्या!* **strangely** *क्रिवि* विलक्षण रीतीने, विचित्रपणे. **strangeness** *ना* [*अगण*] विचित्रपणा, चमत्कारिकपणा. **stranger** *ना* [*गण*] १ अपरिचित माणूस, अनोळखी व्यक्ती. २ परक्या ठिकाणी किंवा अनोळखी जागी असलेला, परका.

strangle /'स्ट्रॅङ्ग्ल्/ *क्रि* [*सक*] गळा दाबून मारणे, नरडे आवळून मारणे. **'stranglehold** *ना* [*गण, बहुधा अे.व*] गळफास, घट्ट पकड : *They have a ~hold on the economy, त्यांची अर्थव्यवस्थेवर घट्ट पकड आहे.* **strangler** *ना* [*गण*] गळे दाबून मारणारा खुनी.

strap /स्ट्रॅप्/ *ना* [*गण*] चामड्याची, प्लॅस्टिकची वगैरे आधाराची किंवा बांधण्याकरता वापरायची पट्टी, वादी. **strap** *क्रि* (**-pp-**) [*सक*] वादी, नाडी किंवा पट्टी बांधून घट्ट करणे. **strapping** *वि* (माणसांबाबत) उंचापुरा आणि दणकट, दांडगा.

strata STRATUM चे *ब.व.*

strategic /स्ट्रॅ'टीजिक्/ *वि* १ डावपेचाचा. २ विशिष्ट हेतूसाठी योग्य, मोक्याचा. **stategically** /-क्लि/ *क्रिवि* डावपेचाच्या दृष्टीने; मोका साधण्याच्या दृष्टीने.

strategy /'स्ट्रॅटजि/ *ना* १ [*गण*] डावपेच, कृतियोजना. २ [*अगण*] युद्धात सैन्याची व्यूहरचना. **strategist** *ना* [*गण*] व्यूहरचनेत वाकबगार असणारा माणूस, व्यूहतंत्रज्ञ.

stratosphere /'स्ट्रॅटस्फिअ(र्)/ *ना* [*अे.व*] पृथ्वीभोवतालचा साधारणपणे १० ते ६० किलोमीटर उंचीवरचा वातावरणाचा पट्टा.

stratum /'स्ट्राटम्/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ta** /-ट/) १ भूस्तर, पृथ्वीच्या पोटातील खडकांचा वगैरे आडवा थर. २ सामाजिक स्तर किंवा वर्ग.

straw /स्ट्रॉऽ/ *ना* १ [*अगण*] गहू, सातू वगैरेंची पेंढी, कडबा. २ [*गण*] गवताची वाळकी काडी, कडब्याची काड. ३ [*गण*] पेय पिण्याची पोकळ काडी. ४ (*वाक्प्र*) **the last/final straw** सहनशक्तीचा अंत पाहणारी भरीची घटना.

strawberry /'स्ट्रॉऽब्रि; *अमे* -बेरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) छोटे, तांबडे, पृष्ठभागावर अतिशय लहान बिया असणारे रसाळ फळ (येणारे झाड).

stray /स्ट्रेइ/ *क्रि* [*अक*] (योग्य मार्गापासून वगैरे) ढळणे, भरकटणे, वाट चुकणे. **stray** *ना* [*गण*] वाट चुकलेला किंवा भरकटलेला माणूस किंवा प्राणी. **stray** *वि* १ बहकलेला, मोकाट : *a ~ dog, मोकाट कुत्रे.* २ तुरळक; एखाददुसरा.

streak /स्ट्रीक्/ *ना* [*गण*] १ रेघोटी, लकीर, लेखा. २ स्वभावातील दोष, वाईट छटा : *a ~ of cruelty, निर्दयीपणाची छटा.* ३ अल्पकाळ : *a ~ of good luck, सुदैवाचा छोटासा काळ.* **streak** *क्रि* १ [*सक*] रेघा मारणे. २ [*अक*] भर्रकन् जाणे. **streaky** *वि* (**-ier, -iest**) रेघा मारलेला, रेषांकित.

stream /स्ट्रीम्/ *ना* [*गण*] १ निर्झर, ओहळ, प्रवाह. २ (माणसे, द्रवपदार्थ, वस्तू वगैरेचा) ओघ : *a ~ of abuse, शिव्यांची धार.* ३ समक्षमतेच्या विद्यार्थ्यांचा गट. ४ (*वाक्प्र*) **with/against the stream** प्रवाहाबरोबर/विरुद्ध म्हणजेच बहुसंख्य लोकांबरोबर/विरुद्ध. **stream** *क्रि* [*अक*] १ प्रवाहासारखे वाहणे, पाट वाहणे. २ वाऱ्यावर तरंगणे : *with her long hair ~ing, वाऱ्यावर तरंगणारे तिचे लांब केस.* **streamer** *ना* [*गण*] रंगीत कागदाची हवेत उडवायची पट्टी. **'streamline** *क्रि* [*सक*] १ (गाडीला वगैरे) हवेला किंवा वाऱ्याला कमीत कमी विरोध करून वेग वाढायला मदत होईल असा आकार देणे. २ अधिक कार्यक्षम, सोपे वगैरे करणे. **streamlined** *वि* हवेला किंवा पाण्याला कमीत कमी विरोध करून सहज जाईल असा दिलेला; सुटसुटीत केलेला.

street /स्ट्रीट्/ *ना* [*गण*] १ दोन्ही किंवा एका बाजूनी घरे असलेला रस्ता. २ (*वाक्प्र*) **'streets ahead of** (*अनौप*) फार पुढे गेलेला, पुढारलेला. **up one's street** (*अनौप*) आपल्या आवडीचा, जिव्हाळ्याच्या क्षेत्रातला. **'streetcar** *ना* [*गण*] (*अमे*) = TRAM.

strength /स्ट्रेङ्थ्/ *ना* १ [*अगण*] ताकद, शक्ती, बल. २ [*गण*] एखाद्याचे बलस्थान: *Her intelligence is one of her ~s, तिची बुद्धी हे तिचे एक बलस्थान आहे.* ३ [*अगण*] मनुष्यबळ: *The army is below ~, मनुष्यबळाच्या दृष्टीने सैन्य खालच्या पातळीवरचे आहे.* ४ (*वाक्प्र*) **on the strength of** कारणामुळे, करिता: *Buy it on the ~ of his advice, त्याने सल्ला दिलाय् म्हणून तू ते विकत घे.* **strengthen** *क्रि* [*अक, सक*] बळकट करणे, मजबूत करणे, बलवान होणे/करणे.

strenuous /'स्ट्रेन्युअस्/ *वि* कष्टाचा, परिश्रमाचा, खडतर. **strenuously** *क्रिवि* परिश्रमपूर्वक. **strenuousness** *ना* [*अगण*] खडतरपणा, परिश्रमपूर्वकता.

stress /स्ट्रेस्/ *ना* १ (क) [*अगण*] काळजी, अतिश्रम वगैरेनी मनावर येणारा ताण, दबाव. (ख) [*गण*] मनावर ताण आणणारी गोष्ट. २ [*अगण*] भर, जोर: *put ~ on the need to improve, सुधारणा करण्याच्या गरजेवर जोर देणे.* ३ [*गण, अगण*] शब्दोच्चार करताना शब्दावर किंवा शब्दाच्या अवयवावर दिलेला जोर, आघात. **stress** *क्रि* [*सक*] जोर देणे, भर देणे; आघात देणे.

stretch /स्ट्रेच्/ *क्रि* १ [*सक*] ताणणे, ओढून घट्ट किंवा लांब करणे. २ [*अक*] ताण देण्यासारखे असणे, ताणण्याजोगे असणे, ताणले जाणे. ३ [*अक, सक*] (हातपाय वगैरे) ताणणे, आळोखेपिळोखे देणे. ४ [*अक*] पसरणे, विस्तारित होणे: *fields ~ing for miles, मैलोमैली पसरलेली शेते.* ५ [*सक*] (शक्तीचा) पूर्ण वापर करणे, एकवटून काम करणे. ६ (*वाक्प्र*) **stretch one's legs** पाय मोकळे करायला जाणे, फिरायला जाणे. ७ (*क्रिब*) **stretch (onesef) out** हातपाय ताणून पसरणे. **stretch** *ना* १ [*गण*] ताणणे, लांब करणे. २ [*अगण*] दोरीची वगैरे ताण घेण्याची क्षमता. ३ [*गण*] जमिनीचा, काळाचा विस्तीर्ण पसारा, सलग विस्तार: *ten hours at a ~, सलगपणे दहा तास.* **stretchy** *वि* **(-ier, -iest)** ताणला जाणारा.

stretcher /'स्ट्रेइच(र्)/ *ना* [*गण*] रुग्णाला नेण्याची कॅनव्हासची दोन दांड्यावर बसवलेली झोळी, रुग्णपट.

stricken /'स्ट्रिकन्/ *वि* (*by/with*)// पिडलेला, ग्रासलेला: *~ with terror, दहशतग्रस्त.*

strict /स्ट्रिक्ट्/ *वि* १ नियमांच्या अमलबजावणीत कडक, काटेकोर. २ (क) बिनचूकपणे व्याख्या केलेला, काटेकोर: *the ~ sense of a word, शब्दाचा काटेकोर अर्थ.* (ख) पूर्ण: *in ~ secrecy, अगदी पूर्ण गुप्ततेने.* **strictly** *क्रिवि* कडकपणे; काटेकोरपणे. **strictness**, *ना* [*अगण*] कडकपणा, (शिस्तीचा) कडकपणा; काटेकोरपणा.

stride /स्ट्राइड्/ *क्रि* (*भूत* **strode** /स्ट्रउड्/, *भूत वि* क्वचित् **stridden** /'स्ट्रिड्न्/) १ [*अक*] ढांगा टाकत चालणे, टांगा टाकणे. २ (*क्रिब*) **stride over/across sth** टांग टाकून ओलांडणे, एका ढांगेत पलीकडे जाणे. **stride** *ना* [*गण*] १ ढांग, टांग. २ (*वाक्प्र*) **take sth in one's stride** कुरकुर न करता किंवा सहजपणे एखादी गोष्ट स्वीकारणे किंवा करणे, शांतपणे सामोरे जाणे.

strident /'स्ट्राइडन्ट्/ *वि* (विशेषतः आवाजाबाबत) मोठा आणि कर्कश: *~ protests, मोठ्या आवाजातला निषेध.*

strife /स्ट्राइफ्/ *ना* [*अगण*] संघर्ष, भांडण.

strike^{1} /स्ट्राइक्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **struck** /स्ट्रक्/) १ [*सक*] मारणे, ठोकणे. २ [*सक*] हल्ला करणे. ३ [*सक*] (काडी वगैरे) ओढून (जाळ) तयार करणे: *~ a match, काडी ओढणे.* ४ [*सक*] खणून वगैरे (सोने वगैरे) सापडणे. ५ [*अक, सक*] वाजणे, ठोके पडणे: *The clock struck (four), घड्याळात चार वाजले.* ६ [*अक*] (कामगारांबाबत) निषेध वगैरे व्यक्त करण्यास संपावर जाणे, काम बंद ठेवणे. ७ [*सक*] मनात भरणे, ठसा उमटणे: *She ~s me as a clever girl, ती एक हुशार मुलगी म्हणून माझ्या मनात भरली आहे.* ८ [*सक*] पोहोचणे, ठरणे, ठेपणे: *~ a bargain, सौदा पटणे/ठरणे.* ९ [*सक*] शिक्का मारून तयार करणे: *~ a medal, बिल्ला तयार करणे.* १० [*सक*] एकाएकी (आजारी वगैरे) होणे, पडणे: *struck dumb, अवाक् झालेला.* ११ (*वाक्प्र*) **strike camp** तंबू वगैरे हालवणे. **strike a 'chord with sb** एखाद्याला आपल्याविषयी सहानुभूतीयुक्त करणे. **strike it rich**

एकाएकी श्रीमंत बनणे. १२ (*क्रिब*) **strike sth off (sth)** यादीतून वगैरे एखादी गोष्ट काढून टाकणे, काट मारणे. **strike out** (क) ठोसा मारणे, गुद्दा मारणे. (ख) नवीन मार्ग चोखाळणे. **strike up** सुरू करणे.

strike^2 /स्ट्राइक्/ *ना* [*गण*] १ संप. २ (जमिनीत तेलाचे वगैरे साठे) सापडणे, आढळ. ३ (*वाक्प्र*) **be (out) on 'strike** संपावर असणे.

striking /'स्ट्राइकिङ्/ *वि* लक्षवेधक, सुंदर, मनोहर.

string^1 /स्ट्रिङ्/ *ना* १ [*गण, अगण*] बांधायची वगैरे दोरी, सुतळी. २ [*गण*] ताणलेली वायर किंवा तार – उदाहरणार्थ व्हायोलिनची. ३ **the strings** [*ब.व*] वाद्यवृंदातील तंतूवाद्ये वाजविणाऱ्यांचा ताफा. ४ [*गण*] ओवलेली माळ : *a ~ of beads, मण्यांची माळ.* ५ [*गण*] वस्तूंची मालिका : *a ~ of accidents, अपघातांची मालिका.* ६ (*वाक्प्र*) **with no 'strings (attached)** (*अनौप*) अटीविना दिलेली (मदत वगैरे), विनाशर्त. **stringy** *वि* **(-ier, -iest)** दोराळ.

string^2 /स्ट्रिङ्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **strung** /स्ट्रङ्/) [*सक*] १ (व्हायोलिन, टेनिस रॅकेट वगैरेना) तारा लावणे. २ (मोती वगैरे) माळेत ओवणे. ३ (*up*)// दोरीवर टांगणे किंवा लटकावणे. ४ (*क्रिब*) **string along (with sb)** एखाद्याला थोडावेळ सोबत करणे, थोडावेळ बरोबर जाणे. **string sb along** एखाद्याला मुद्दाम चकवणे, फसवणे, फसगत करणे. **string (sb/sth) out** ओळीने पसरणे, रांगेत मधून मधून विखुरणे. **strung up** *वि* (माणसाबाबत) तणावाच्या अवस्थेत, मनाने ताणलेला आणि खिन्न.

stringent /'स्ट्रिन्जन्ट्/ *वि* (नियम वगैरे बाबत) कडक, करडा. **stringently** *क्रिवि* कडकपणे, सक्त.

strip /स्ट्रिप्/ *क्रि* **(-pp-)** १ [*अक, सक*] (कपडे वगैरे) काढणे, दूर करणे. २ [*सक*] *of*// एखाद्यापासून एखादी गोष्ट हिरावून घेणे : *~ sb of his liberty, एखाद्यापासून त्याचे स्वातंत्र्य हिरावून घेणे.* ३ [*सक*] (*down*)// दुरुस्तीसाठी वगैरे इंजिन किंवा इतर भाग खोलणे. **strip** *ना* (जमिनीचा वगैरे) तुकडा. **'strip cartoon** = COMIC STRIP (COMIC). **stripper** *ना* [*गण*] कपडे काढत नृत्य करणारी व्यक्ती. **'striptease** *ना* [*गण, अगण*] प्रेक्षकांसमोर कपडे काढत केलेली करमणूक.

stripe /स्ट्राइप्/ *ना* [*गण*] १ वेगळ्या रंगाचा किंवा द्रव्याचा एखाद्या पृष्ठभागावरील लांब, अरुंद असा पट्टा, पट्टी, फीत. २ गणवेषावर घालायचा श्रेणीदर्शक (बहुधा V आकाराचा) बिल्ला. **striped** *वि* पट्टेपट्टे असलेला. **stripy** *वि* खूप पट्टेपट्टे असलेला.

strive /स्ट्राइव्ह्/ *क्रि* (*भूत* **strove** /स्ट्रउव्ह्/, *भूत वि* **striven** /'स्ट्रिव्ह्न्/) [*अक*] (*औप*) १ खूप कष्ट घेणे, पराकाष्ठा करणे : *~ to succeed, यश मिळण्यासाठी धडपडणे.* २ झुंजणे, संघर्ष करणे.

strode STRIDE चा *भूत.*

stroke^1 /स्ट्रउक्/ *ना* [*गण*] १ गुद्दा (मारणे), ठोसा. २ (पोहताना वगैरे) हात मारणे. ३ चेंडूला फटका मारणे – उदा टेनिस, क्रिकेटमधे. ४ पेनचा किंवा कुंचल्याचा एक फटकारा. ५ घंटेचा टोल. ६ मेंदूतील रक्तवाहिनीचे अचानक फुटणे, मेंदूतील रक्तस्राव. ७ *of*// (नशीब, दुर्दैव वगैरेचा) फेरा, फटका. ८ (*वाक्प्र*) **at a 'stroke** एका दमात, एका फटकाऱ्यात.

stroke^2 /स्ट्रउक्/ *क्रि* [*सक*] (पृष्ठभागावरून) हळूच हात फिरवणे, कुरवाळणे, थोपटणे. **stroke** *ना* [बहुधा *ए.व*] थोपटणे.

stroll /स्ट्रउल्/ *ना* [*गण*] रमतगमत फिरणे. **stroll** *क्रि* [*अक*] मजा म्हणून आरामात फिरायला जाणे. **stroller** *ना* [*गण*] १ फिरायला जाणारा माणूस. २ (*अमे*) लहान मुलाची चाकाची खुर्ची.

strong /स्ट्रॉङ्; *अमे* स्ट्रॉऽङ्/ *वि* (**~er** /-ङ्ग(र्)/, **~est** /-ङ्गिस्ट्/) १ (क) बलवान, ताकदीचा, शक्तिमान. (ख) मजबूत, सशक्त, पक्का. २ कशाचाही परिणाम न होणारा, अविचल : *a ~ will, अविचल इच्छा.* ३ (क) पंचेन्द्रियांवर परिणाम करणारा, घमघमीत, उग्र वगैरे : *a ~ smell, उग्र दर्प.* (ख) चवीला कडक : *~ coffee, कडक कॉफी.* ४ (पेयाबाबत) मद्यार्कप्रमाण जास्त असलेले, कडक. ५ विशिष्ट संख्या असलेला : *an army 2000 ~, २०००*

चे सैन्य. ६ (*वाक्प्र*) **going 'strong** जोमदार, जोरकस, धडधाकट. **strong on sth** एखाद्या गोष्टीत तरबेज असणे, बलस्थान असणे. **'stronghold** *ना* [*गण*] १ किल्ला. २ (*ला*) एखाद्या गोष्टीला खंबीर पाठिंबा देणारी जागा, बालेकिल्ला. **strongly** *क्रिवि* ताकदीने, सर्वशक्तीनिशी, मजबूतपणे; अविचलपणे; उग्रपणे; कडकपणे.

strove STRIVE चा *भूत.*

struck STRIKE^1 चा *भूत, भूत वि.*

structural /'स्ट्रॅक्चरल्/ *वि* संरचनेचा – विशेषतः आखीव चौकटीचा. **structurally** *क्रिवि* संरचनादृष्ट्या.

structure /'स्ट्रॅक्च(र्)/ *ना* १ [*गण, अगण*] रचना, संरचना, घडण, बांधा. २ [*गण*] खास करून इमारतीची बांधणी, सांगाडा. **structure** *क्रि* [*सक*] योजना करणे, संघटित करणे, रचणे.

struggle /'स्ट्रॅग्ल्/ *क्रि* [*अक*] १ (**क**) लढणे. (**ख**) धडपड करणे : ~ *to get free, स्वतंत्र होण्याची धडपड करणे.* २ खूप प्रयत्न करणे : ~ *to earn a living, पोटापाण्यासाठी जंगजंग पछाडणे.* **struggle** *ना* १ [*गण*] संघर्ष, झगडा. २ [बहुधा *अे.व*] प्रयास, आटाआट.

strum /'स्ट्रॅम्/ *क्रि* [*अक, सक*] (*on*)// गिटार वगैरे वाटेल तशी वाजवणे, अकुशलतेने वाजवणे.

strung STRING^2 चा *भूत भूत वि.*

strut^1 /स्ट्रॅट्/ *ना* [*गण*] एखाद्या बांधणीला बळकटी आणण्यासाठी वापरलेली लाकडाची किंवा धातूची पट्टी, तीर.

strut^2 /स्ट्रॅट्/ *क्रि* (**-tt-**) [*अक*] गर्वाने चालणे, ठुमकत जाणे, तरातरा जाणे.

stub /स्टॅब्/ *ना* [*गण*] १ सिग्रेट, पेन्सिल वगैरे यांचा उरलेला बुडखा, थोटूक. २ चेक फाडल्यावर चेकबुकात राहिलेला भाग. **stub** *क्रि* (**-bb-**) १ [*सक*] ठेच लागणे. २ (*क्रिब*) **stub sth out** (सिग्रेट वगैरे) चुरून किंवा दाबून विझवणे.

stubble /'स्टॅब्ल्/ *ना* [*अगण*] १ धान्याच्या ताटाचा बुडखा, खुंट. २ दाढीचे वाढलेले खुंट. **stubbly** /'स्टॅब्लि/ *वि* बुडखाबुडखांचा.

stubborn /'स्टॅबन्/ *वि* १ आपले म्हणणे मागे न घेणारा, आग्रही; हट्टी. २ न हटणारा, बरा न होणारा, चिवट : *a ~ cough, जुनाट खोकला.* **stubbornly** *क्रिवि* दुराग्रहाने, हट्टीपणाने, हटवादीपणाने. **stubbornness** *ना* [*अगण*] हटवादीपणा; दुराग्रह.

stubby /'स्टॅबि/ *वि* (**-ier, -iest**) आखूड आणि जाड.

stuck^1 STICK^2 चा *भूत, भूत वि.*

stuck^2 /स्टॅक्/ *वि* १ न हालणारा, अडलेला. २ *with*// (*अनौप*) नको असलेली व्यक्ती/वस्तू वाट्याला आलेला किंवा गळ्यात पडलेला, लचांड आलेला : ~ *with sb all day, एखाद्याचे लचांड दिवसभर असलेला.* ३ (*वाक्प्र*) **get stuck in (to sth)** (*अनौप*) एखाद्या गोष्टीची सुरुवात उत्साहाने करणे.

stud^1 /स्टॅड्/ *ना* [*गण*] १ कॉलरचे वगैरे बटण. २ बुटाच्या वगैरे तळव्यावरील खिळा, गुलमेख, जडावाचा खिळा. **stud** *क्रि* (**-dd-**) [*सक*] (बहुधा कर्मणी) (रत्ने वगैरे) जडवणे.

stud^2 /स्टॅड्/ *ना* [*गण*] १ घोड्यांचे पैदासघर. २ (*अनौप* ⚠) प्रजोत्पत्तीसाठी चांगला समजला जाणारा तगडा तरुण.

student /'स्ट्यूडेन्ट्; *अमे* 'स्टू-/ *ना* [*गण*] १ (*ब्रि*) कॉलेज किंवा विद्यापीठात शिकणारा विद्यार्थी. २ अभ्यासक, विद्यार्थी.

studio /'स्ट्यूडिअउ; *अमे* 'स्टू-/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s**) १ चित्रकार, छायाचित्रकार वगैरेची काम करण्याची खोली, कलागार. २ चित्रपट, दूरदर्शन, रेडिओ वगैरेचे कार्यक्रम निर्माण करण्याची जागा, निर्मितीस्थळ, चित्रीकरणस्थळ.

studious /'स्ट्यूडिअस्; *अमे* 'स्टू-/ *वि* १ अभ्यासाची आवड असणारा, व्यासंगी. २ काळजीपूर्वक. **studiously** *क्रिवि* अभ्यासूवृत्तीने; काळजीपूर्वक रीतीने.

study^1 /स्टॅडि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] (तसेच **studies**) [*ब.व*] अभ्यास, अध्ययन. २ [*गण*] शोध घेणे, संशोधन वृत्तीने केलेला अभ्यास : *a ~ of the country's problems, देशाच्या अडचणींचा अभ्यास.* ३ [*गण*] संशोधन (फलित), काम. ४ [*गण*] वाचन, लेखन वगैरेकरीता वापरायची खोली, अभ्यासाची खोली, अभ्यासिका. ५ [*गण*] (**क**) सरावासाठी

काढलेले रेखाचित्र वगैरे. (ख) संगीताचा रियाज.

study^{2} /स्टिडि/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) १ अभ्यास करणे. २ [*सक*] काळजीपूर्वक तपासणे.

stuff^{1} /स्टिफ्/ *ना* [*अगण*] १ ज्यापासून किंवा ज्याचे काही बनवले जाते असे काहीतरी, द्रव्य. २ सामान, जवळच्या गोष्टी : *Put your ~ in your room, तुझे सामान तुझ्या खोलीत ठेव.* ३ (*वाक्प्र*) **do one's 'stuff** आपण काय करू शकतो ते दाखवणे, कसब दाखवणे.

stuff^{2} /स्टिफ्/ *क्रि* १ [*सक*] एखादी गोष्ट गच्च भरणे, ठासून भरणे. २ [*अक*] (पक्षी वगैरे) शिजवण्यापूर्वी (त्यात) मसाला/सारण भरणे. ३ [*सक*] मेलेल्या प्राण्यात तो मुळात होता त्या आकारात ठेवण्यासाठी भुसा भरणे. ४ [*अक, सक*] (*अनौप*) पोट भरणे, अन्न पोटात घालणे. ५ (*वाक्प्र*) **get 'stuffed** (*ब्रि अनौप*) (राग, तिरस्कार वगैरे व्यक्त करताना वापर) थोबाड बंद कर! **stuffing** *ना* [*अगण*] १ उशीत वगैरे भरायचे साहित्य. २ सारण.

stuffy /स्टिफि/ *वि* (**-ier, -iest**) १ (खोलीबाबत) पुरेशी ताजी/स्वच्छ हवा नसलेली, कोंदट. २ (*अनौप*) (माणसांबाबत) जुन्या विचारांचा, बुरसटलेला. **stuffiness** *ना* [*अगण*] कोंदटपणा; जुनाटपणा.

stumble /'स्टिम्ब्‌ल्/ *क्रि* [*अक*] १ अडखळून (जवळजवळ) पडणे, धडपडणे, ठेचकाळणे. २ बोलताना अडखळणे, चुका करणे. ३ (*क्रिब*) **stumble across/on/upon sth** एखादी गोष्ट अचानक/अनपेक्षितपणे सापडणे. **stumble** *ना* [*गण*] अडखळणे. **'stumbling-block** *ना* [*गण*] प्रगतीमधला अडथळा, धोंड.

stump /स्टिम्प्/ *ना* [*गण*] १ झाड तोडल्यावर राहिलेला बुडखा, खुंट, बुंधा. २ मुख्य भाग काढल्यावर कोणत्याही गोष्टीचे उरलेले बुडुख, धोंटण. ३ (क्रिकेटमधे) यष्टी. **stump** *क्रि* १ [*अक*] पाय आपटत चालणे, दणदण चालणे. २ [*सक*] (*अनौप*) कोड्यात टाकणे, बुचकळ्यात टाकणे. **stumpy** *वि* (**-ier, -iest**) आखुड आणि जाड, गिड्डा.

stun /स्टिन्/ *क्रि* (**-nn-**) [*सक*] १ तडाखा किंवा ठोसा देऊन बेशुद्ध पाडणे. २ (क) धक्का देणे, सुन्न करणे. (ख) मनात ठसणे. **stunning** *वि* आश्चर्यकारक, आकर्षक.

stung STING^{1} चा *भूत, भूत वि.*

stunk STINK चा *भूत.*

stunt^{1} /स्टिन्ट्/ *ना* [*गण*] १ लक्ष वेधण्यासाठी केलेला खटाटोप. २ करमणुकीसाठी केलेले अचाट साहस. **'stunt man, 'stunt woman** *ना* [*गण*] चित्रपटात वगैरे साहसी कामे करणारा कलाकार.

stunt^{2} /स्टिन्ट्/ *क्रि* [*सक*] खुरटवणे, वाढ थांबवणे.

stupendous /स्ट्यू'पेन्डस्; *अमे* स्टू-/ *वि* कमालीचा छान, मोठा वगैरे, विस्मयकारक. **stupendously** *क्रिवि* विस्मयकारक रीतीने, अचाटपणे.

stupid /'स्ट्यूपिड्; *अमे* 'स्टू-/ *वि* मंद बुद्धीचा, बिनडोक, मठ्ठ; मूर्ख, वेडपट. **stupidity** /-'पिडटि/ *ना* [*गण, अगण*] मठ्ठपणा, निर्बुद्धपणा; मूर्खपणा. **stupidly** *क्रिवि* बिऩडोकपणे; वेडेपणाने.

stupor /'स्ट्यूप(र्); *अमे* 'स्टू-/ *ना* [*गण, अगण*] मद्याने, धक्क्याने वगैरे येणारी अर्धवट बेहोषी, धुंदी.

sturdy /'स्टऽडि/ *वि* (**-ier, -iest**) दणकट, कणखर. **sturdily** /-अलि/ *क्रिवि* कणखरपणे, दणकटपणे.

stutter /'स्टिट(र्)/ *क्रि* [*अक, सक*] *ना* = STAMMER.

sty^{1} /स्टाइ/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) = PIGSTY (PIG).

sty^{2} (तसेच **stye**) /स्टाइ/ *ना* [*गण*] (*ब.व* **sties** किंवा **styes**) डोळ्याला होणारी रांजणवाडी.

style /स्टाइल्/ *ना* १ [*गण, अगण*] लेखनाची, भाषणाची, काम करण्याची वगैरे शैली, ढंग, रीती. २ [*अगण*] उच्च प्रत, श्रेष्ठ गुणवत्ता. ३ [*गण, अगण*] पोषाखाची फॅशन. ४ [*गण*] प्रकार, नक्षी. ५ (*वाक्प्र*) **(not/more) sb's style** एखाद्याला (न) आवडणारा : *Big cars are not my ~, मोठ्या गाड्या मला नाही आवडत.* **style** *क्रि* [*सक*] (केस वगैरे)

विशिष्ट पद्धतीने बसवणे किंवा वळवणे. **stylish** *वि* फॅशनेबल. **stylist** *ना* [*गण*] कपडे किंवा केस यांची ठेवण करणारा माणूस. **stylistic** /-लिस्टिक्/ *वि* साहित्यशैलीचा. **stylize** *क्रि* [*सक*] ठराविक शैलीच्या ठाचात बसवणे.

stylus /'स्टाइलस्/ *ना* [*गण*] ध्वनिमुद्रिका वाजवण्याची सुई किंवा पिन.

suave /स्वाव्ह्/ *वि* (कधीकधी *अधिक्षेपी*) सभ्य शिष्टाचाराचा, गोडबोल्या.

sub /सिब्/ *ना* [*गण*] (*अनौप*) १ SUBMARINE चा संक्षेप. २ खास करून क्रिकेट किंवा फुटबॉलमधील बदलीचा गडी.

subconscious /ˌसिब्'कॉन्शस/ *वि* स्वतःला जाणीव नसलेला पण स्वतःच्या वागण्यावर परिणाम घडवणारा मानसिक विचार, भीती वगैरेचा, अंतर्मानसिक, अर्धजागृत. **the subconscious** *ना* [*ए.व*] अंतर्मनातील विचार. **subconsciously** *क्रिवि* अंतर्मानसिकदृष्ट्या.

subcontinent /ˌसिब्'कॉन्टिनन्ट्/ *ना* [*गण*] उपखंड.

subdivide /ˌसिब्डि'व्हाइड्/ *क्रि* [*अक, सक*] अधिक लहान भागात पुनर्विभागणी करणे, पोटविभागणी करणे. **subdivision** /-डि'व्हिझ्न्/ *ना* [*गण, अगण*] उपविभागणी.

subdue /सब्'ड्यू; अमे -'डू/ *क्रि* [*सक*] १ नमवणे, ताब्यात आणणे. २ फिका, शांत करणे : *~d lighting, फिका उजेड.*

subject¹ /'सिब्जिक्ट्/ *ना* [*गण*] १ बोलायचा, लिहायचा वगैरे विषय : *The ~ of the book, पुस्तकाचा विषय.* २ विद्याशाखा, विषय. ३ (*व्याकरण*) इंग्रजी वाक्यातील क्रियापदापूर्वी येणारे आणि क्रियेचा कर्ता दर्शविणारे किंवा क्रियापदाने वर्णन केलेले नाम किंवा असा नामपदबंध, कर्ता – उदा *The book is green* मधील *book* हे नाम. ४ नागरिक, प्रजाजन.

subject² /सब्'जेक्ट्/ *क्रि* [*सक*] १ (एखादे राज्य, माणूस वगैरे) आपल्या वर्चस्वाखाली आणणे, हुकमत चालवणे. २ *to*// भोगायला लावणे, सोसायला लावणे : *~ sb to criticism, एखाद्याला टीका सहन करायला लावणे.* **subjection** /-श्न्/ *ना* [*अगण*] हुकमतीखाली आणणे, पराधीनता, पारतंत्र्य; भोगायला लावणे.

subject³ /'सिब्जिक्ट्/ *वि* (*to*)// १ पाळायला लागणारा, बांधलेला : *~ to the law, नियमाधीन.* २ अवलंबून असलेला, प्रवण, पात्र : *~ to confirmation, कायम होण्यावर अवलंबून.* ३ ग्रस्त, एखादी गोष्ट वारंवार होणारा : *~ to frequent colds, सर्दीचा वारंवार त्रास होणारा.*

subjective /सब्'जेक्टिव्ह्/ *वि* १ वैयक्तिक, आत्मनिष्ठ, व्यक्तिनिष्ठ. २ (*तत्त्वज्ञान*) काल्पनिक, अ-वास्तव, अन्तःसृष्टीविषयक. **subjectively** *क्रिवि* व्यक्तिगत रीतीने. **subjectivity** /ˌसब्जेक्'टिव्हटि/ *ना* [*अगण*] व्यक्तिनिष्ठता, व्यक्तिसापेक्षता, विषयीभाव.

sublet /ˌसिब्'लेट्/ *क्रि* (**-tt-**, *भूत, भूत वि* **sublet**) [*अक, सक*] पोटभाड्याने जागा देणे, पोटभाडेकरू ठेवणे.

sublime /स'ब्लाइम्/ *वि* अत्युच्च प्रतीचा, सर्वश्रेष्ठ, उदात्त. **sublimely** *क्रिवि* सर्वश्रेष्ठतेने, उदात्ततेने.

submarine /ˌसिब्म'रीन्; *अमे* 'सिब्मरीन्/ *ना* [*गण*] पाण्याखालून चालणारी नौका, पाणबुडी.

submerge /सब्'मऽज्/ *क्रि* १ [*अक, सक*] बुडणे, बुडवणे. २ [*सक*] पूर्णपणे व्यापणे, वेढणे. **submersion** /सब्'मऽश्न्/ *ना* [*अगण*] बुडणे, बुडत जाणे, पाण्यात केलेले विसर्जन.

submission /सब्'मिशन्/ *ना* १ [*अगण*] आधीन होणे किंवा आधीनता, एखाद्याची हुकमत स्वीकारणे, शरणागती. २ [*अगण, गण*] एखादी गोष्ट विचारार्थ पुढे ठेवणे, प्रस्तुती, विज्ञापना, सादर निवेदन.

submissive /सब्'मिसिव्ह्/ *वि* शरणागत झालेला, आधीन झालेला; आज्ञाधारक. **submissively** *क्रिवि* आधीनतेने; आज्ञाधारकपणे. **submissiveness** *ना* [*अगण*] आधीनता; आज्ञाधारकपणा.

submit /सब्'मिट्/ *क्रि* (**-tt-**) १ [*अक*] (*to*)// एखाद्याला शरण जाणे, दास्यत्व

स्वीकारणे. २ [*सक*] (कल्पना वगैरे) विचारार्थ पुढे मांडणे/ठेवणे.

subordinate /स'बॉऽडिनट्; *अमे* -डनट्/ *वि* १ कनिष्ठ श्रेणीचा, गौण, उप-. २ कमी महत्त्वाचा, दुय्यम. **subordinate** *ना* [*गण*] दुय्यम/कनिष्ठ व्यक्ती, हाताखालचा माणूस. **subordinate** /स'बॉऽडिनेइट्/ *क्रि* [*सक*] (*to*)// कमी महत्त्वाचा म्हणून वागवणे, कमी लेखणे.

subscribe /सब्'स्क्राइब्/ *क्रि* १ [*अक, सक*] (एखाद्या गोष्टीसाठी) पैसे देणे, वर्गणीदार होणे. २ [*अक*] *to*// (वर्तमानपत्राचे वगैरे) वर्गणीदार होणे, सभासद होणे. ३ (*क्रिब*) **subscribe to sth** (मताशी वगैरे) सहमत असणे, तेच मत असणे. **subscriber** *ना* [*गण*] वर्गणीदार; आश्रयदाता. **subscription** /सब्'स्क्रिप्श्न्/ *ना* १ [*अगण*] पाठिंबा व्यक्त करण्यास पाठवलेला पैसा. २ [*गण*] मासिकाची वगैरे वर्गणी, सभासद शुल्क.

subsequent /'सब्सिक्वन्ट्/ *वि* (*to*)// नंतर येणारा, पाठीमागचा. **subsequently** *क्रिवि* नंतर, पाठोपाठ, मागाहून.

subservient /सब्'सऽव्हिअन्ट्/ *क्रिवि* फार मानणारा, लीन. **subservience** /-अन्स्/ *ना* [*अगण*] लीनता, लोटांगणवादी वृत्ती. **subserviently** *क्रिवि* लीनतेने, अति नम्रपणे.

subside /सब्'साइड्/ *क्रि* [*अक*] १ (पाणी वगैरे) ओसरणे आणि नेहमीच्या पातळीला येणे, ओसरणे, पूर कमी होणे. २ (जमीन किंवा इमारत याबाबत) खचणे. ३ जोर, उत्साह, बटबटीतपणा, तीव्रता वगैरे कमी होणे. **subsidence** /सब्'साइड्न्स्, 'सैब्सिड्न्स्/ *ना* [*गण, अगण*] खचणे (२) (किंवा त्याचे उदाहरण).

subsidiary /सब्'सिडिअरि; *अमे* -ड्यरि/ *वि* कमी महत्त्वाचा, गौण: *a ~ role, दुय्यम भूमिका.* **subsidiary** *ना* [*गण*] (*ब.व* -ies) दुसऱ्या कंपनीच्या नियंत्रणाखाली असणारी कंपनी.

subsidy /'सैब्सडि/ *ना* [*गण*] (*ब.व* -ies) एखादा व्यवसाय, चित्रपटगृह वगैरेला मदतीसाठी शासनाने दिलेली आर्थिक मदत, शासनाचे अर्थसाहाय्य. **subsidize** /'सब्सिडाइझ्/ *क्रि* [*सक*] मदत म्हणून शासनाने पैसे देणे किंवा अर्थसाहाय्य करणे.

subsist /सब्'सिस्ट्/ *क्रि* [*अक*] कसेबसे तगणे, जीव धरून राहणे, निर्वाह करणे, दिवस गुजरणे. **subsistence** *ना* [*अगण*] पोटापाण्याचे साधन.

substance /'सैब्स्टन्स्/ *ना* १ [*गण, अगण*] (विशिष्ट) द्रव्य. २ [*अगण*] एखाद्या गोष्टीचा सर्वात महत्त्वाचा भाग, खरा अर्थ. ३ [*अगण*] महत्त्व: *a speech with little ~, काहीही विशेष नसलेलं भाषण.*

substantial /सब्'स्टॅन्श्ल्/ *वि* १ मोठा, प्रचंड: *a ~ amount, मोठी रक्कम.* २ भव्य, भक्कम बांधकामाचा. **substantially** *क्रिवि* १ मोठ्या प्रमाणात, लक्षणीय रीतीने. २ वस्तुतः, खरोखरचा.

substantiate /सब्'स्टॅन्शिएइट्/ *क्रि* [*सक*] (दावा वगैरे) पुराव्यानिशी सिद्ध करणे, आपल्या मताला पुष्टी देणे.

substitute /'सैब्स्टिट्यूट्/ *ना* [*गण*] बदली येणारी व्यक्ती किंवा वस्तू, प्रतिवस्तू. **substitute** *क्रि* [*अक, सक*] (*for*)// एखाद्या गोष्टीच्या बदली/ऐवजी वापरणे/असणे. **substitution** /,सब्स्टि'ट्यूश्न्/ *ना* [*गण, अगण*] बदली.

subsume /सब्'स्यूम्; *अमे* -सूम्/ *क्रि* [*सक*] (*औप*) समावेश करणे, समाविष्ट करणे.

subterfuge /'सैब्टफ्यूज्/ *ना* [*गण, अगण*] कावा, बहाणा, सोंग.

subterranean /,सब्ट'रेइनिअन्/ *वि* = UNDERGROUND १.

subtitle /'सैब्टाइट्ल्/ *ना* [*गण*] १ पुस्तकाचे वगैरे उपशीर्षक. २ [बहुधा *ब.व*] चित्रफितीवर लिखित स्वरूपात संभाषणाचे भाषांतरित शब्द, दुसऱ्या भाषेतील उपशीर्षके.

subtle /'सैट्ल्/ *वि* १ चटकन् न दिसणारा किंवा वर्णन न करता येणारा, तरल, सूक्ष्म: *a ~ difference, सूक्ष्म फरक.* २ हुशार: *a ~ plan, हुशारीची योजना.* ३ सूक्ष्मवेधी, बारीकसारीक गोष्टी पकडणारा. **subtlety** *ना* [*अगण, गण*] (*ब.व* -ies) तरलता, बारकावा, सूक्ष्मता; हुशारी. **subtly** /'सैट्लि/ *क्रिवि* सूक्ष्मतेने, तरलतेने; हुशारीने.

subtract /सब्'ट्रॅक्ट्/ *क्रि* [*सक*] (*from*)//

वजाबाकी करणे, वजा करणे. **subtraction** /-श्न्/ *ना* [*गण, अगण*] वजाबाकी.

suburb /'सॅबऽब्/ *ना* [*गण*] शहराच्या मध्यवर्ती भागापासून दूर असलेली वस्ती, उपनगर, शाखानगर. **suburban** /स'बऽबन्/ *वि* उपनगरीय. **suburbia** /स'बऽबिअ/ *ना* [*अगण*] उपनगरीय जीवन, सर्व उपनगरे.

subvert /सब्'व्हऽट्/ *क्रि* [*सक*] (शासनाची वगैरे) सत्ता उलथून टाकणे, घातपात करणे. सत्तेला सुरुंग लावणे. **subversion** /-श्न्/ *ना* [*अगण*] सत्ता उलथण्याचा प्रयत्न, घातपात. **subversive** *वि* घातपाती.

subway /'सॅब्वेइ/ *ना* [*गण*] १ पादचाऱ्यांसाठीचा भुयारी मार्ग. २ (*अमे*) भुयारी रेल्वे.

succeed /सक्'सीड्/ *क्रि* १ [*अक*] (*in*)// आपण जे करतोय किंवा जे करण्याचा प्रयत्न करतोय ते चांगले करणे, यश येणे : *~ in winning the race, शर्यत जिंकण्यात यश येणे.* २ [*सक*] नंतर किंवा पाठोपाठ येणे : *~ sb as president, एखाद्यानंतर अध्यक्ष होणे.* ३ [*अक*] (*to*)// एखाद्याच्या मृत्यूनंतर वारसाहक्क मिळणे.

success /सक्'सेस्/ *ना* १ [*अगण*] यशसंपादन, यश. २ [*गण*] यशस्वी होणारी गोष्ट किंवा व्यक्ती. **successful** *वि* यशस्वी. **successfully** *क्रिवि* यशस्वीरीत्या.

succession /सक्'सेश्न्/ *ना* १ [*अगण*] एकामागोमाग एक येणे; माळका, मालिका. २ [*गण*] एकामागून एक येणाऱ्या गोष्टींची मालिका, घटनांची साखळी. ३ (*वाक्प्र*) **in suc'cession** एकापाठोपाठ एक. **successive** *वि* एकामागोमाग येणारा, लागोपाठचा. **successor** *ना* [*गण*] पाठोपाठ येणारी व्यक्ती किंवा गोष्ट, वारस.

succinct /सक्'सिङ्क्ट्/ *वि* थोडक्यात पण स्पष्टपणे सांगितलेला, सूत्ररूप. **succinctly** *क्रिवि* थोडक्यात आणि स्पष्टपणे, सूत्ररूपाने. **succinctness** *ना* [*अगण*] अल्पाक्षरी स्पष्टता, सूत्ररूपता.

succulent /'सॅक्युलन्ट्/ *वि* १ (मांस आणि फळाबाबत) मधुर आणि रसाळ. २ (वनस्पतीबाबत) दाट आणि दळदार.

succumb /स'कॅम्/ *क्रि* [*अक*] (*to*)// (*औप*) (मोह, आजार वगैरेला) बळी पडणे.

such /सॅच्/ *वि* १ सारखा, तद्वत् : *~ countries as France, फ्रान्ससारखे देश.* २ (क) एवढा, इतका मोठा : *Don't be in ~ a hurry, इतकी घाई करू नकोस.* (ख) बऱ्यावाईटाच्या विशिष्ट मर्यादेपर्यंत, इतका : *~ a boring speech, इतकं कंटाळवाणं भाषण.* **such** *सना* १ अशा तऱ्हेची व्यक्ती किंवा गोष्ट : *S~ were her words, असे तिचे शब्द होते ○ His behaviour was ~ that everyone disliked him, त्याची वागणूक अशी काही होती की प्रत्येकालाच तो नकोसा झाला.* २ (*वाक्प्र*) **as such** शब्दाच्या या अर्थाने, म्हणून, शब्दशः, विशिष्ट शब्दाला/कल्पनेला असा. **such as** उदाहरणार्थ, असा. **'such-and-such** *सना, वि* अमुक अमुक, अशा अशा तऱ्हेचा. **suchlike** /'सच्लाइक्/ *सना, वि* (वस्तूंबाबत) एकाच तऱ्हेच्या, त्याच प्रकारच्या.

suck /सॅक्/ *क्रि* १ [*अक, सक*] चोखणे, ओठाने ओढून पिणे. २ [*सक*] (गोळी वगैरे) चोखणे. ३ [*सक*] जोराने खेचणे : *The current ~ed her under the water, धारेने तिला पाण्याखाली खेचले.* ४ [*सक*] (पंप वगैरेबाबत) (पाणी, हवा वगैरे) खेचणे, ओढणे. **suck** *ना* [*गण*] पिणे; चोखणे; ओढणे. **sucker** *ना* [*गण*] १ पृष्ठभागाला चिकटून राहण्यासाठी असलेला किड्यांचा किंवा प्राण्यांचा शरीराचा अवयव, चूषक. २ एखाद्या वस्तूला जोडण्यासाठी वापरायची हवेच्या दाबाने चिकटून बसणारी रबरी चकती, चूषक. ३ (*अनौप*) सहजपणे गंडणारा माणूस, तात्या. ४ *for*// एखाद्या गोष्टीचा चाहता : *a ~er for old films, जुन्या चित्रपटांचा भोक्ता.*

suckle /'सॅकल्/ *क्रि* [*सक*] स्तनपान देणे, अंगावर पाजणे.

suction /'सॅक्श्न्/ *ना* [*अगण*] दोन पृष्ठभागात निर्वात पोकळी करून ते चिकटवण्याची पद्धती, शोषण, चूषण.

sudden /'सॅड्न्/ *वि* एकाएकी घडणारा, अचानक होणारा. **suddenly** *क्रिवि* एकाएकी,

अचानकपणे, अकस्मात्. **suddenness** *ना* [*अगण*] अकस्मातपणा, अचानकपणा, झटका.

suds /सिड्स/ *ना* [*ब.व*] साबणाचे फेसाळ पाणी, बुडबुडे येणारे पाणी.

sue /स्यू; *अमे* सू/ *क्रि* [*अक, सक*] एखाद्यावर खटला भरणे, केस करणे, दावा लावणे.

suede /स्वेइड्/ *ना* [*अगण*] एक बाजू खरबरित असलेले मऊ चामडे.

suet /'सूइट् (*ब्रि* तसेच 'स्यूइट्)/ *ना* [*अगण*] स्वयंपाकात वापरायची प्राण्याची घट्ट चरबी.

suffer /'सिफ(र्)/ *क्रि* १ [*अक*] (*from/ with*)// दुखणे, आ:जारी असणे, दुःखी असणे. २ [*सक*] (*कटू*) अनुभव घेणे, भोगणे. ३ [*सक*] सहन करणे : *~ fools, मूर्ख लोक सहन करणे.* ४ [*अक*] अधिक बिघडणे, वाईट होणे : *Her work ~ed when she was ill, तिच्या आजारपणात तिच्या कामाची आणखीनच वाट लागली.* **suffering** *ना* [*अगण*] (तसेच **sufferings**) [*ब.व*] शरीराच्या किंवा मनाच्या वेदना, भोग, दुःख.

suffice /स'फाइस्/ *क्रि* [*अक*] (*औप*) पुरेसे असणे, पुरणे.

sufficient /स'फिश्न्ट्/ *वि* आवश्यक तितका, पुरेसा, ठीक. **sufficiency** /-न्सि/ *ना* [*अे.व*] पुरेसे प्रमाण. **sufficiently** *क्रिवि* पुरता, पुरेसा.

suffix /'सफिक्स्/ *ना* [*गण*] शब्दाचा अर्थ बदलण्यासाठी त्याच्या अंती लावायचा प्रत्यय – उदा *readable* मधला *-able*, उत्तरप्रत्यय.

suffocate /'सफकेइट्/ *क्रि* [*अक, सक*] १ गुदमरणे, श्वास कोंदटणे. २ श्वास घेता न आल्याने मरणे, गुदमरवून मारणे. **suffocation** /,सफ'केइश्न्/ *ना* [*अगण*] गुदमरणे किंवा गुदमरवणे, घुसमट.

sugar /'शुग(र्)/ *ना* [*अगण*] साखर, शर्करा. **sugar** *क्रि* [*सक*] साखर घालणे, गोड करणे. **'sugar-cane** *ना* [*अगण*] ऊस. **sugary** *वि* १ साखरेचा; गोड. २ फार भावनाप्रधान, अति भावविवश.

suggest /स'जेस्ट्; *अमे* सग्'ज-/ *क्रि* [*सक*] १ विचारार्थ मांडणे, सूचना करणे. २ (कल्पना) सुचवणे. **suggestion** /-च्न्/ *ना* १ [*अगण*] केलेली सूचना, विचारार्थ मांडणे; सुचवणे. २ [*गण*] सुचवलेली कल्पना, योजना वगैरे, सूचित गोष्ट. **suggestive** *वि* एखाद्याला काहीतरी सुचविणारा, सूचक, विशेषतः अश्लील सूचना देणारा. **suggestively** *क्रिवि* सूचकपणे.

suicide /'सूइसाइड् (तसेच *ब्रि* 'स्यूइ-/) *ना* १ [*गण, अगण*] आत्महत्त्या : *commit ~, आत्महत्त्या करणे.* २ [*गण*] आत्महत्त्या करणारा. ३ [*अगण*] (*ला*) स्वतःचे हित धोक्यात आणणारी कृती, आत्मघातकी कृती. **suicidal** *वि* १ आत्मघाताकडे नेणारा, मोठ्या संकटाकडे नेणारा, आत्मघातकी, दुर्दैवी. २ आत्महत्त्या करण्यास उत्सुक किंवा प्रवृत्त.

suit^{1} /सूट् (तसेच *ब्रि*) स्यूट्/ *ना* [*गण*] १ एकाच कापडाचे जाकीट आणि पॅन्ट (किंवा स्कर्ट) असणारा पोषाख. २ खास कारणाकरता घालायचे कपडे. ३ पत्त्यातील चार रंगांपैकी (चौकट, बदाम, इस्पिक, किलवर) कोणत्याही एका रंगाच्या पानांचा संच, एका रंगाची पाने. **'suitcase** *ना* [*गण*] प्रवासी बॅग/कपड्याची पेटी.

suit^{2} /सूट् (तसेच *ब्रि*) स्यूट्/ *क्रि* १ [*अक, सक*] सोयीचे असणे. २ [*सक*] (विशेषतः कपड्यांबाबत) साजेसा असणे, शोभणे : *That hat ~s you, ती टोपी तुला शोभते.* ३ (*अनौप*) **~ oneself** स्वतःला हवं ते करणे, मनाला वाटेल ते करणे. **suitable** /-अब्ल्/ *वि* योग्य, शोभेलसा, अनुरूप. **suitably** *क्रिवि* योग्य रीतीने, शोभेलशा पद्धतीने. **suitability** *ना* [*अगण*] अनुरूपता, उचितता, साजेलसेपणा, योग्यता. **suited** *वि* साजेलसा, शोभेलसा, योग्य, अनुरूप.

suite /स्वीट्/ *ना* [*गण*] १ एकमेकाला शोभणाऱ्या फर्निचरचा संच. २ होटेलमधील दोन-तीन खोल्यांचा एकत्र भाग. ३ तीन किंवा अधिक भागांनी बनलेली संगीत रचना.

sulk /सल्क्/ *क्रि* [*अक*] फुगून बसणे, खट्टू होणे, रागाने अबोल होणे. **sulky** *वि* (**-ier, -iest**) फुगलेला, खट्टू झालेला, फुरंगटलेला.

sullen /'सलन्/ *वि* चिडून गप्प बसलेला, घुम्या, दुर्मुखलेला. **sullenly** *क्रिवि* घुमेपणाने. **sullenness** *ना* [*अगण*] घुमेपणा.

sulphur (*अमे* **sulfur**) /'सल्फ(र्)/ *ना*

[*अगण*] तेजाने जळणारे एक पिवळे मूलद्रव्य, गंधक, गुल. **sulphuric** /सील्'फ्युअरिक्/ *वि* गंधकाचा.

sultan /'सील्टन्/ *ना* [*गण*] काही मुस्लीम देशांतील राज्यकर्ता, सुलतान.

sultana /सील्'टान/ *ना* [*गण*] एक प्रकारचा बिनबियाचा बेदाणा.

sultry /'सील्ट्रि/ *वि* **(-ier, -iest)** १ (हवेबाबत) बाष्पयुक्त आणि गरम, दमट. २ (स्त्रीबाबत) आकर्षक आणि कामुक, मादक.

sum /सीम्/ *ना* [*गण*] १ अंकगणितातील बेरीज करण्याची क्रिया. २ रक्कम. ३ अंक किंवा राशी यांची केलेली बेरीज. **sum** *क्रि* **(-mm-)** (*क्रिब*) **sum (sth) up** गोषवारा देणे, सार सांगणे. **sum sb/sth up** एखाद्याबाबत मत बनवणे, जोखणे.

summary /'सीमरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) सारांश, थोडक्यात सांगणे. **summary** *वि* १ झटकन् केलेला, तातडीचा : *a ~ execution, तातडीची अंमलबजावणी.* २ मुख्य मुद्दे देणारा; संक्षिप्त. **summarize** /-राइझ्/ *क्रि* [*सक*] सारांश देणे/सांगणे.

summer /'सीम(र्)/ *ना* [*गण, अगण*] उन्हाळा. **summery** *वि* उन्हाळ्यासारखा, उन्हाळ्याचा.

summit /'सीमिट्/ *ना* [*गण*] १ शिखर. २ दोन किंवा अधिक राष्ट्रांच्या प्रमुखांची परिषद, शिखर-परिषद.

summon /'सीमन्/ *क्रि* [*सक*] १ (एखाद्याला) बोलावून घेणे, येण्याचा हुकूम सोडणे. २ *(up)//* (एखादा गुण) स्वतःमधे आढळणे, गोळा करणे : *~ (up) all one's courage, स्वतःचा धीर गोळा करणे.*

summons /'सीमन्स्/ *ना* [*गण*] कोर्टात हजर राहण्याचा हुकूम, कोर्टाचे फर्मान. **summons** *क्रि* [*सक*] कोर्टात हजर राहण्याचे फर्मान काढणे.

sun /सीन्/ *ना* १ **the sun** [*अे.व*] सूर्य. २ (तसेच **the sun**) [*अे.व, अगण*] सूर्यप्रकाश, ऊन. ३ [*गण*] कोणताही (स्वयंप्रकाशित) तारा – विशेषतः ग्रहमाला असणारा. ४ (*वाक्प्र*) **under the 'sun** जगात (कुठेही). **sun** *क्रि* **(-nn-) ~ oneself** (बहुधा कोवळ्या) उन्हात पहुडणे, ऊन खाणे. **'sunbathe** *क्रि* [*अक*] अंगावर ऊन घेणे. **'sunbeam** *ना* [*गण*] सूर्यकिरण. **'sunburn** *ना* [*अगण*] उन्हाने त्वचेवर आलेला फोड किंवा पडलेला लालसर डाग़. **sunburnt** *वि* उन्हाने अंगावर फोड आलेला. **'sun-glasses** *ना* [*ब.व*] सूर्यापासून डोळ्यांना संरक्षण म्हणून वापरायचा उन्हाचा काळा चष्मा, गॉगल. **'sunlight** *ना* [*अगण*] सूर्यप्रकाश, ऊन. **sunny** *वि* **(-ier, -iest)** १ सूर्यप्रकाशाने लख्ख, उजेडाचा. २ आनंदी. **'sunrise** *ना* [*अगण*] पहाट, सूर्योदयाचा काळ. **'sunshade** *ना* [*गण*] उन्हात सावली मिळण्यासाठी छत्रीसारखे केलेले छत्र, निवारा. **'sunshine** *ना* [*अगण*] सूर्यप्रकाश, ऊन. **'sunstroke** *ना* [*अगण*] उन्हाची झळ लागल्यामुळे होणारा त्रास, उष्माघात. **'suntan** *ना* [*गण*] उन्हामधे त्वचा काळसर/तपकिरी करणे.

Sunday /'सीन्डि/ *ना* [*अगण, गण*] रविवार. (Monday खालची उदाहरणे पहा).

sundry /'सीन्ड्रि/ *वि* वेगवेगळे, विविध. **sundries** *ना* [*ब.व*] वेगवेगळ्या गोष्टी, लहानसहान वस्तू, फुटकळ गोष्टी.

sung SING चे *भूत वि.*

sunk SINK^{2} चा *भूत, भूत वि.*

sunken /'सीङ्कन्/ *वि* १ समुद्राच्या तळाशी बुडालेला. २ (गालांबाबत) ओढलेले, आत बसलेले. ३ खोलगट.

super /'सूप(र्); 'स्यू-/ *वि* (*अनौप*) उत्कृष्ट, अत्युत्तम.

superb /सू'पऽब्, 'स्यू-/ *वि* अत्युत्तम, उत्कृष्ट. **superbly** *क्रिवि* उत्कृष्टपणे.

superficial /,सूप'फिश्ल्, ,स्यू-/ *वि* १ वरवरचा, बाह्यतः असणारा. २ सखोल, गाढ नसलेला, वरवरचा, उथळ : *a ~ knowledge, थातुरमातुर ज्ञान.* **superficiality** /,सूप,फिशि'ॲलटि/ *ना* [*अगण*] उथळपणा; वरकरणीपणा. **superficially** *क्रिवि* वरवर, आपाततः.

superfluous /सू'पऽफ्लुअेस्, स्यू-/ *वि* गरजेपेक्षा जास्त असलेला, जादा, फाजील, अनावश्यक. **superfluously** *क्रिवि* जादा होईल अशा रीतीने.

superhuman /ˌसूप'ह्यूमन्, ˌस्यू-/ *वि* समान्य माणसापेक्षा शक्तीने, आकाराने वगैरे श्रेष्ठ असलेला, अतिमानवी.

superimpose /ˌसूपरिम्'पउझ़्, ˌस्यू-/ *क्रि* [*सक*] (*on*)// एखाद्या गोष्टीवर दुसरी गोष्ट ठेवणे.

superintend /ˌसूपरिन्'टेन्ड्, स्यू-/ *क्रि* [*अक, सक*] (कामावर वगैरे) देखरेख करणे. **superintendent** *ना* [*गण*] १ देखरेख करणारा माणूस, पर्यवेक्षक, अधीक्षक. २ ज्येष्ठ पोलीस अधिकारी.

superior /सू'पिअरिअ(र्), स्यू-/ *वि* १ श्रेणी, महत्त्व, दर्जा वगैरेत (जास्त) उच्च, श्रेष्ठ, वरचा. २ (*अधिक्षेपी*) आगाऊ, वरचढपणा करणारा, शिष्ट. **superior** *ना* [*गण*] उच्च अधिकारी, वरिष्ठ. **superiority** /सूˌपिअरि'ऑरटि; *अमे* -'ऑऽर्-/ *ना* [*अगण*] श्रेष्ठत्त्व, वरचढपणा, वर्चस्व.

superlative /सू'पऽलटिव्ह्, स्यू-/ *वि* १ सर्वोच्च श्रेणीचा किंवा गुणवत्तेचा. २ (*व्याकरण*) तमभावदर्शक विशेषणे किंवा क्रियाविशेषणे – उदा *best, worst, most*. **superlative** *ना* [*गण*] तमभाववाचक विशेषण किंवा क्रियाविशेषण.

supermarket /'सूपमाकिट्, 'स्यू-/ *ना* [*गण*] खाद्यपदार्थ, घरगुती सामान वगैरे विकण्याचे स्वयंसेवा असलेले मोठे दुकान.

supernatural /ˌसूप'नॅच्रल्, 'स्यू-/ *वि* वैज्ञानिक नियमांनी उकल न होणारा, अतीन्द्रिय, गूढ, अलौकिक, दैवी.

superpower /'सूपपाउअ(र्), 'स्यू-/ *ना* [*गण*] जगातील सर्वात बलाढ्य राष्ट्रांपैकी एक, महासत्ता.

supersede /ˌसूप'सीड्/ *क्रि* [*सक*] -ची जागा घेणे, -च्या जागी येणे, एखाद्याला बाजूला सारून त्याच्या जागी येणे.

supersonic /ˌसूप'सॉनिक्, ˌस्यू-/ *वि* ध्वनिलहरींच्या वेगाहून अधिक वेगवान (प्रवास करू शकणारा), स्वनातीत.

superstar /'सूपस्टा(र्)/ *ना* [*गण*] अत्यंत लोकप्रिय कलाकार, बडा कलाकार.

superstition /ˌसूप'स्टिशन्, ˌस्यू-/ *ना* [*गण, अगण*] गूढगोष्टींवर वगैरे असलेली श्रद्धा, अंधश्रद्धा. **superstitious** *वि* श्रद्धाळू, भोळाभाबडा.

supervise /'सूपव्हाइझ़्, 'स्यू-/ *क्रि* [*अक, सक*] (कामगारांवर वगैरे) लक्ष ठेवणे. **supervision** /ˌसूप'व्हिझ़न्/ *ना* [*अगण*] देखरेख, पर्यवेक्षण. **supervisor** *ना* [*गण*] मुकादम, देखरेख ठेवणारा, पर्यवेक्षक.

supper /'सेप(र्)/ *ना* [*गण, अगण*] दिवसाचे अखेरचे जेवण, रात्रीचे जेवण.

supple /'सेप्ल्/ *वि* सहज वाकणारा, लवचीक; कडक नसलेला, ताठर नसलेला. **suppleness** *ना* [*अगण*] लवचीकपणा.

supplement /'सप्लिमन्ट्/ *ना* [*गण*] १ पुरवणी, पूर्ण करण्यास किंवा सुधारण्यास जोडलेले काही. २ पुस्तकाची, वृत्तपत्राची वगैरे पुरवणी. **supplement** *क्रि* [*सक*] (*with*)// भर घालणे. **supplementary** /-'मेन्ट्रि; *अमे* -टेरि/ *वि* जादा, पुरवणीचा.

supply /स'प्लाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] १ पुरवणे, पुरवठा करणे : ~ *gas to a house, घराला गॅस पुरवणे/देणे* ○ ~ *sb with food, एखाद्याला अन्न पुरवणे.* २ (गरज) भागवणे, पूर्ण करणे. **supply** *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] पुरवणे, पुरवठा. २ [*गण,* विशेषतः *ब.व*] पुरवलेला माल, उपलब्ध माल : *food supplies, उपलब्ध अन्नधान्य* किंवा *अन्नधान्याचा पुरवठा.* **supplier** *ना* [*गण*] मालाचा पुरवठा करणारी व्यक्ती किंवा कंपनी, पुरवठाकार.

support /स'पॉऽट्/ *क्रि* [*सक*] १ आधार देणे, टेकू देणे, उचलून धरणे. २ (एखाद्याच्या) पोटापाण्याचा खर्च करणे : ~ *a family, कुटुंबाला आधार देणे.* ३ पाठिंबा देणे : ~ *a political party, राजकीय पक्षाला पाठिंबा देणे.* ४ (संघाचा, पक्षाचा वगैरे) चाहता असणे. ५ (सिद्धान्त वगैरे) सिद्ध करण्यास मदत करणे, सिद्धान्तास पुष्टी देणे. **support** *ना* १ [*अगण*] आधार देणे. २ [*गण*] आधार देणारी वस्तू किंवा व्यक्ती. ३ [*अगण*] पक्ष, संघ वगैरेचे पाठीराखे. **supporter** *ना* [*गण*] पाठिंबा देणारा, पाठीराखा. **supportive** *वि* प्रोत्साहन, मदत वगैरे देणारा, आधारभूत.

suppose /स'पउझ़्/ *क्रि* [*सक*] १

वस्तुस्थिती किंवा सत्य म्हणून स्वीकारणे, समजणे: *Let us ~ (that) the news is true, बातमी खरी आहे असं समजू या.* २ अंदाज करणे, वाटणे: *Do you ~ he's gone? तो गेला असं तुला वाटतं?* ३ (*वाक्प्र*) **be supposed to** (क) (कायद्याने वगैरे) एखादी गोष्ट करावी अशी अपेक्षा असणे. (ख) (*अनौप*) (नकारार्थी वाक्यांत वापर) परवानगी असणे: *You're not ~d to leave early, तुला लवकर नाही जाता येणार.* **supposedly** /-इड्लि/ *क्रिवि* समज असलेल्या रीतीने. **supposing** *उ.अव्यय* जर.

supposition /,सैप'ज़िशन्/ *ना* १ [*अगण*] समजणे. २ [*गण*] समजलेली गोष्ट, समज; अंदाज.

suppress /स'प्रेस्/ *क्रि* [*सक*] १ दाबून टाकणे, संपवणे: *~ a revolt, बंड दाबून टाकणे.* २ दडपून ठेवणे, इतरांना कळू न देण्यासाठी दडवणे: *~ the truth, सत्य दडवून ठेवणे.* **suppression** /-श्न्/ *ना* [*अगण*] दाबून टाकणे, बीमोड, दडपादडपी.

supreme /सू'प्रीम्, स्यू-, स-/ *वि* १ सर्वोच्च अधिकाराचा, परम, सर्वश्रेष्ठ. २ महान. **supremacy** /सू'प्रेमसि/ *ना* [*अगण*] सर्वश्रेष्ठत्व; महानता. **supremely** *क्रिवि* सर्वश्रेष्ठ रीतीने; अगदी महान अशा रीतीने.

surcharge /'सऽचाज्/ *ना* [*गण*] नेहमीच्या दरापेक्षा जास्त असा दर, अधिभार.

sure /शॉऽ(र्); *अमे* शुअर/ *वि* १ नक्की, निश्चित, खात्रीपूर्ण: *I think he's coming but I'm not quite ~, तो येणारे असं वाटतंय् पण खात्री नाही देता येत.* २ खात्रीशीर, विश्वासार्ह: *a ~ cure for colds, सर्दीवरील खात्रीशीर उपाय.* ३ *to//* निश्चितपणे एखादी गोष्ट करणारा, हमखास: *He's ~ to be late, तो हमखास उशिरा येईल.* ४ (*वाक्प्र*) **be sure to** न चुकता. **make sure (of sth/ that . . .)** (क) एखादी गोष्ट खरंच तशी आहे की नाही याची खात्री करून घेणे. (ख) एखादी गोष्ट निश्चितपणे होईल याची तजवीज करणे. **sure** *क्रिवि* १ (*अनौप विशेषतः अमे*) नक्की: *It ~ is cold! ते नक्कीच गार आहे!* किंवा *हवा नक्कीच गार आहे!* २ (*वाक्प्र*) **,sure e'nough** त्याप्रमाणे, वाटलं होतं तसा, अपेक्षेप्रमाणे: *I said he would be late and ~ enough, he was, मी म्हटलं होतं की तो उशिरा येईल आणि मी म्हटल्याप्रमाणे तो उशिराच आला.* **surely** *क्रिवि* १ निश्चितपणे, नक्की. २ (आशा, निश्चितपणा वगैरे व्यक्त करण्यास वापर): *Surely not! नक्कीच नाही!*

surety /'शुअरटि/ *ना* (*ब.व* **-ies**) [*गण, अगण*] १ कर्जाला हमी (म्हणून दिलेली रक्कम वगैरे), जामीन. २ कर्ज घेणाऱ्याचा जामीनदार.

surf /सऽफ्/ *ना* [*अगण*] किनाऱ्यावर आदळणाऱ्या लाटा (किंवा त्यांचा फेस), फुटणाऱ्या लाटा, लाटांची खळाळी. **'surfboard** *ना* [*गण*] लाटांवर स्वार होण्यासाठी वापरायची लांब अरुंद फळी. **surfing** *ना* [*अगण*] फळीच्या साहाय्याने लाटांवर आरूढ होण्याचा खेळ.

surface /सऽफिस्/ *ना* १ [*गण*] वस्तू वगैरेचे बाह्यांग, पृष्ठभाग, पृष्ठस्तर. २ [*ए.व*] द्रवाचा वरचा थर, पृष्ठभाग. ३ [*ए.व*] (*ला*) बाहेरचा देखावा: *She was angry, in spite of her calm ~, वरवर ती शांत दिसत होती तरी (मनातून) ती चिडलेली होती.* **surface** *वि* पृष्ठस्तरीय. **surface** *क्रि* १ [*सक*] वरचा थर देणे, पृष्ठभाग बनवणे: *~ the roads, रस्त्यांचा वरचा भाग/वरचा रस्ता तयार करणे.* २ [*अक*] (पाणबुडीबाबत वगैरे) वर येणे, पृष्ठभागावर येणे: (*ला*) *not ~ until noon, दुपारपर्यंत न उठणे* (म्हणजे झोपून राहणे). **'surface mail** *ना* [*अगण*] भूमार्गे किंवा जलमार्गे पाठविलेले टपाल.

surfeit /'सऽफिट्/ *ना* [*ए.व*] अतिरेक – विशेषतः अन्नाचा, पेयांचा.

surge /सऽज्/ *क्रि* [*अक*] १ लाटांप्रमाणे पुढे किंवा वर येणे, हेलावणे, उचंबळणे. २ (भावनांबाबत) उचंबळून येणे. **surge** *ना* [*गण*] १ हेलकावणे, हेलावणे, उचंबळ. २ अचानक वाढ.

surgeon /'सऽजन्/ *ना* [*गण*] शल्यविशारद, शल्यचिकित्सक, शस्त्रक्रिया करणारा डॉक्टर.

surgery /'सऽजरि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] शस्त्रक्रिया, शल्यचिकित्सा. २ [*गण*] शल्यचिकित्सकाचा दवाखाना.

surgical /'सऽजिकल्/ *वि* शस्त्रक्रियेचा,

शस्त्रक्रियेने, शल्य-. **surgically** /-क्लि/ *क्रिवि* शस्त्रक्रियेच्या दृष्टीने.

surly /'सऽलि/ *वि* **(-ier, -iest)** चिडका आणि तुटक राहणारा, खाष्ट. **surliness** *ना* [*अगण*] तापटपणा आणि तुटकपणा, भांडखोरपणा.

surmount /स'माउन्ट्/ *क्रि* १ [*सक*] (अडचणीवर वगैरे) मात करणे. २ (*वाक्प्र*) **be surmounted by** (*औप*) डोक्यावर असणे : *a church ~ed by a tower, वर मनोरा असलेले चर्च.*

surname /'सऽनेइम्/ *ना* [*गण*] आडनाव, कुलनाम, कुटुंबातील सर्वजण लावतात ते नाव.

surpass /स'पास्/ *क्रि* [*सक*] (*औप*) अधिक चांगले करणे/असणे, सरस असणे.

surplus /'सऽप्लस्/ *ना* [*गण*] गरजेपेक्षा जास्त असलेला पैसा वगैरे, जादा, फाजील रक्कम/राशी.

surprise /स'प्राइझ्/ *ना* [*अगण, गण*] १ अनपेक्षित आणि अचानक घडलेले (बहुधा आनंददायक) असे काही, धक्का, आश्चर्य. २ (*वाक्प्र*) **take sb by surprise** एखाद्याला अनपेक्षित घटनेने आश्चर्याचा धक्का देणे, आश्चर्यचकित करणे. **surprise** *क्रि* [*सक*] १ एखाद्याला आश्चर्यचकित करणे, थक्क करणे. २ अचानक सापडणे/पकडणे वगैरे : *~ a burglar, चोराला अचानक पकडणे.* **surprised** *वि* आश्चर्यचकित झालेला, अचंबित झालेला. **surprising** *वि* आश्चर्यकारक, अनपेक्षितपणे धक्का देणारा. **surprisingly** *क्रिवि* आश्चर्यकारक रीतीने.

surrender /स'रेन्ड(र्)/ *क्रि* १ [*अक, सक*] (*oneself*) (*to*)*//* (शत्रूला वगैरे) शरण जाणे, शरणागती पत्करणे. २ [*सक*] ऐहिक संपत्ती सोडून देणे, परित्याग करणे. ३ (*क्रिब*) **surrender (oneself) to** (एखाद्या सवयीच्या) आधीन होणे, आहारी जाणे. **surrender** *ना* [*अगण, गण*] शरणागती, आधीनता.

surround /स'राउन्ड्/ *क्रि* [*सक*] चहूबाजूनी असणे, वेढणे. **surround** *ना* [*गण*] (बहुधा सुशोभित) कडा, काठ. **surrounding** *वि* भोवतालचा, आजूबाजूचा. **surroundings** *ना* [*ब.व*] सभोवार, परिसर.

surveillance /सऽ'व्हेइलन्स्/ *ना* [*अगण*] एखाद्या गुन्हेगार वगैरेवर ठेवलेली नजर, टेहेळणी : *under ~, टेहेळणीखाली.*

survey /स'व्हेइ/ *क्रि* [*सक*] १ संपूर्ण निरीक्षण करणे, संपूर्ण आढावा घेणे, सर्वेक्षण करणे. २ (प्रदेशाची वगैरे) मोजणी करून नकाशा काढणे, भूमापन करणे. ३ (इमारतीची वगैरे) पाहणी/तपासणी करणे. **survey** /'सऽव्हेइ/ *ना* [*गण*] १ सर्वसाधारण अभ्यास किंवा दृष्टिकोन, सर्वेक्षण. २ भूभागाची मोजणी (किंवा त्याची नोंद किंवा नकाशा). ३ (इमारतीची वगैरे) तपासणी. **surveyor** /स'व्हेइअ(र्)/ *ना* [*गण*] मोजणी करणारा; तपासनीस किंवा तपासणी अधिकारी.

survival /स'व्हाइव्हल्/ *ना* १ [*अगण*] (नंतर किंवा दीर्घ काळ) जिवंत राहणे. २ [*गण*] पूर्वीच्या काळातील आजपर्यंत टिकून राहिलेली गोष्ट.

survive /स'व्हाइव्ह्/ *क्रि* [*अक, सक*] (नंतर किंवा दीर्घ काळ) जिवंत राहणे, अस्तित्वात राहणे, वाचणे, टिकून राहणे : *~ an accident, अपघातातून बचावणे* ○ *She ~d her husband, नवऱ्याच्या मागे ती राहिली.* **survivor** *ना* [*गण*] मागे जिवंत राहणारा, वाचलेला माणूस.

susceptible /स'सेप्टब्ल्/ *वि* १ *to//* सहज बळी पडणारा, सहज लागण होणारा, ग्रहणक्षम : *~ to cold, चटकन् सर्दी होणारा.* २ सहज प्रभावित होणारा. **susceptibility** /स,सेप्ट'बिलटि/ *ना* [*अगण*] रोगप्रवृत्ती, प्रकृतीचा नाजुकपणा; कोमलमनोवृत्ती, विवशता.

suspect /स'स्पेक्ट्/ *क्रि* [*सक*] १ एखादी गोष्ट शक्य आहे असे वाटणे, शक्यता वाटणे : *We ~ that he's dead, तो मेलाय् असं आम्हाला वाटतं.* २ शंका वाटणे/येणे : *We ~ the truth of her statement, तिच्या बोलण्यातील खरेपणाची आम्हाला शंका वाटते.* ३ *of//* एखादा अपराधी आहे असे वाटणे, एखाद्याचा संशय येणे : *~ sb of lying, एखादा खोटं बोलतोय् अशी शंका येणे.* **suspect** /'सस्पेक्ट्/ *ना* [*गण*] संशयित (व्यक्ती). **suspect** /'सस्पेक्ट्/ *वि* संशय घेण्याजोगा, अविश्वसनीय, संशयास्पद.

suspend /स'स्पेन्ड्/ *क्रि* [*सक*] १ (*from*)// टांगणे : *~ a lamp from the ceiling, छताला दिवा टांगणे.* २ उशीर करणे, तात्पुरते थांबवणे : *~ judgement, न्यायनिवाड्यास विलंब करणे.* ३ (*from*)// एखाद्याला कामावरून निलंबित करणे : *They ~ed the two boys from school, त्या दोन मुलांना त्यांनी शाळेतून निलंबित केले.*

suspenders /स'स्पन्डझ़्/ *ना* [*ब.व*] १ (*ब्रि*) स्टॉकिंग्ज किंवा मोजे खाली घसरू नये यासाठी वापरायच्या ताणाच्या छोट्या पट्ट्या, खांद्यावरच्या ताणपट्ट्या. २ (*अमे*) = BRACE ३.

suspense /स'स्पेन्स्/ *ना* [*अगण*] काय होईल याची उत्कंठा किंवा काळजी, अस्वस्थकारी अनिश्चितता.

suspension /स'स्पेन्शन्/ *ना* [*अगण*] १ टांगणे; निलंबन; विलंब. २ गाडीचे धक्के शोषणाऱ्या स्प्रिंग्ज वगैरे. **su'spension bridge** *ना* [*गण*] दोन मनोऱ्यांना जोडलेल्या लोखंडी दोरांवर बांधलेला पूल, टांगता किंवा झुलता पूल.

suspicion /स'स्पिशन्/ *ना* १ (**क**) [*अगण*] संशय, शंका, वहीम : *arrested on ~ of murder, खुनाच्या वहिमावरून अटक केलेला.* (**ख**) [*गण*] एखाद्याचा संशय, एखाद्या गोष्टीच्या बरोबर असण्याविषयीची शंका, संदेह, किन्तू. २ [*अे.व*] अल्प सूचना, भावना : *a ~ of sadness, दुःखाची किंचित भावना.* **suspicious** *वि* शंकास्पद, संशयकारी; संदेहकारक; साशंक. **suspiciously** *क्रिवि* आशंकेने, संशयी वृत्तीने, मनात किन्तू बाळगून.

sustain /स'स्टेइन्/ *क्रि* [*सक*] १ (*औप*) (भाराला) आधार देणे. २ जिवंत ठेवणे, चालू ठेवणे, राखणे. ३ सोसणे : *~ an injury, जखम/इजा सोसणे/होणे.*

sustenance /'सॅस्टिनन्स्/ *ना* [*अगण*] (*औप*) अन्न किंवा पेय (किंवा त्यांचा पौष्टिकपणा), पोषणद्रव्य.

swab /स्वॉब्/ *ना* [*गण*] जखम धुण्यासाठी किंवा तपासणीचा नमुना घेण्यासाठी वगैरे वापरायचा कापसाचा बोळा. **swab** *क्रि* (**-bb-**) [*सक*] कापसाच्या बोळ्याने (जखम वगैरे) साफ करणे.

swagger /'स्वॅग(र्)/ *क्रि* [*अक*] तोऱ्यात वागणे किंवा चालणे, ऐट दाखवणे, शिष्टपणा करणे. **swagger** *ना* [*अे.व*] चालीतली किंवा वागणुकीतली ऐट, शिष्टपणा, तोरा, ठमका.

swallow^{1} /'स्वॉलउ/ *ना* [*गण*] दुभागलेली शेपटी असलेला एक छोटा पक्षी, पाकोळी.

swallow^{2} /'स्वॉलउ/ *क्रि* १ [*अक, सक*] (अन्नाचा घास वगैरे) गिळणे, घशाखाली उतरणे. २ [*सक*] (*up*)// पूर्णपणे संपवणे, गिळंकृत करणे : *earnings ~ed up by bills, बिलांनी सर्व कमाई खाल्लेली/गिळलेली.* ३ [*सक*] (*अनौप*) (अपमान वगैरे) मुकाट्याने गिळणे, मूग गिळून गप्प बसणे. ४ [*सक*] (*अनौप*) सहजपणे विश्वास टाकणे : *I'm not ~ing that story! माझा त्या गोष्टीवर विश्वास नाही बसत!* ५ [*सक*] (भावना) व्यक्त न करणे. **swallow** *ना* [*गण*] गिळंकृत करणे किंवा गिळंकृत केलेली रक्कम, घशात घातलेली रक्कम, स्वाहाकार.

swam SWIM चा *भूत.*

swamp /स्वॉम्प्/ *ना* [*गण, अगण*] दलदलीचा प्रदेश, पाणथळ भाग. **swamp** *क्रि* [*सक*] १ पाण्याचा पूर येणे, पुराने व्यापणे. २ (*ला*) अशक्य करून सोडणे, खूप प्रमाणात येणे, हतबल करणे : *~ed with requests, विनंत्यांचा आलेला पूर.* **swampy** *वि* (**-ier, -iest**) दलदलीचा, पाणथळ.

swan /स्वॉन्/ *ना* [*गण*] मोठा, पांढरा, लांब मानेचा एक पाण्यातला पक्षी, हंस. **swan** *क्रि* (**-nn-**) [*अक*] *around/off*// निरुद्योगीपणे वेळ घालवणे. **'swan-song** *ना* [*गण*] संगीतकार, कवी वगैरेची अखेरची रचना, शेवटची कलाकृती.

swank /स्वॅङ्क्/ *क्रि* [*अक*] बढाया मारणे, आढ्यतेने बोलणे किंवा वागणे. **swank** *ना* (*अनौप अधिक्षेपी*) १ [*अगण*] प्रौढी, बढाईचे बोलणे, वागण्यातली आढ्यता. २ [*गण*] आढ्यतेखोर माणूस, बढाया मारणारा, प्रौढी मिरवणारा. **swanky** *वि* (**-ier, -iest**) फॅशनेबल किंवा महागडा.

swap (तसेच **swop**) /स्वॉप्/ *क्रि* (**-pp-**) [*अक, सक*] (*with*)// (*अनौप*) देवाणघेवाण करणे, अदलाबदल करणे : *~ seats with sb,*

बसायच्या जागांची/आसनांची एखाद्याशी अदलाबदली करणे. **swap** *ना* [*गण*] देवाणघेवाण, अदलाबदली किंवा अदलाबदलीची वस्तू.

swarm /स्वॉऽम्/ *ना* [*गण*] किड्यांचा वगैरे थवा, मोहोळ, घोळका. **swarm** *क्रि* [*अक*] १ थव्याने किंवा झुंडीने जाणे : *a crowd ~ing through the gate, दारातून झुंडीने जाणारी गर्दी.* २ (*क्रिब*) **swarm with sb/sth** एखाद्या गोष्टीची प्रचंड गर्दी होणे, भाऊगर्दी होणे, झुंबड उडणे : *beaches ~ing with people, लोकांची झुंबड उडालेल्या चौपाट्या.*

swat /स्वॉट्/ *क्रि* (**-tt-**) [*सक*] हाताने (डास वगैरे) मारणे, कुंच्याने वगैरे (उडणारा किडा वगैरे) मारणे, चपट्या वस्तूने मारणे.

sway /स्वेइ/ *क्रि* १ [*अक, सक*] डोलणे, डोलवणे. २ [*सक*] परिणाम करणे, हालवणे. **sway** *ना* [*अगण*] १ डोलणे. २ (*औप*) नियंत्रण, परिणाम.

swear /स्वेअ(र्)/ *क्रि* (*भूत* **swore** /स्वॉऽ(र्)/, *भूत वि* **sworn** /स्वॉऽन्/) १ [*अक*] (*at*)// अपमानकारक किंवा उद्धटपणाचे शब्द वापरणे. २ [*सक*] वचन देणे, शपथेवर सांगणे : *~ to tell the truth, खरं बोलण्याची शपथ घेणे.* ३ [*अक, सक*] शपथ घेणे, आण घेणे. ४ (*क्रिब*) **swear by sth** एखाद्या गोष्टीवर पूर्ण विश्वास असणे, पूर्ण विसंबून राहणे. **swear sb in** नव्या पदाची शपथ देणे, नव्या पदाचा शपथविधी होणे. **'swear-word** *ना* [*गण*] अपमानकारक शब्द, वाईट शब्द, शिवी.

sweat /स्वेट्/ *ना* १ [*अगण*] घाम. २ **a sweat** [*अे.व*] (आजारपणात, भीतीने वगैरे) घाम येणे, घाम फुटणे, घाम सुटणे. ३ [*अगण*] (*अनौप*) कष्ट, परिश्रम. **sweat** *क्रि* [*अक*] १ घाम येणे/सुटणे. २ चिंता वाटणे, धीर खचणे, घाम फुटणे. ३ (*वाक्प्र*) **sweat 'blood** (*अनौप*) (क) खूप कष्ट करणे, घाम गाळणे. (ख) फार चिंतेत पडणे. **'sweat-shirt** *ना* [*गण*] लांब बाह्यांचा सुती स्वेटर. **sweaty** *वि* (**-ier, -iest**) घामाने थबथबलेला.

sweater /'स्वेट(र्)/ *ना* [*गण*] लोकरीचा विणलेला गरम कपडा.

swede /स्वीड्/ *ना* [*गण, अगण*] पिवळ्या रंगाचे एक सलगम किंवा कंद.

sweep^{1} /स्वीप्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **swept** /स्वेप्ट्/) १ [*अक, सक*] झाडणीने, ब्रशाने वगैरे झाडून काढणे, झाडणे, धूळ काढणे. २ [*सक*] झपाट्याने वाहून नेणे : *The sea swept him along, समुद्राने त्याला झटक्यात वाहून नेले* म्हणजेच *समुद्राच्या पाण्याने त्याला झटक्यात ओढले.* ३ [*अक, सक*] झटक्यात वरून जाणे, थडकणे : *A huge wave swept (over) the deck, एक प्रचंड लाट डेकवर येऊन गेली.* ४ [*अक*] डौलाने चालणे, ऐटीत मिरवणे. ५ [*अक*] वाकड्या रेषेत जाणे, नागमोडी वळण असणे : *The coast ~s northwards, किनारा उत्तरेला नागमोडी वळतो.* ६ (*वाक्प्र*) **sweep sb off his/her feet** एखाद्याच्या तात्काळ प्रेमात पडणे, लगेच मन बसणे, एखाद्याने झपाटून टाकणे. **sweep sth under the carpet** एखादी बदनामकारक गोष्ट लपवून ठेवणे, भानगड गुप्त ठेवणे. **sweeper** *ना* [*गण*] झाडूवाला, झाडणारा माणूस. **sweeping** *वि* १ दूरगामी परिणाम घडवणारा : *~ changes, दूरगामी परिणाम घडवणारे बदल.* २ फार सर्वसाधारण असा, अतिशयोक्त : *a ~ statement, अति सर्वसाधारण म्हणजेच अतिशयोक्त विधान.*

sweep^{2} /स्वीप्/ *ना* १ [*गण*] झाडणे, झाडझूड, साफसफाई. २ [*गण*] झटका, फटकारा. ३ [*अे.व, अगण*] (*ला*) कक्षा, आवाका : *the broad ~ of a novel, कादंबरीचा मोठा आवाका.* ४ [*गण*] रस्त्याचे, नदीचे वगैरे मोठे वळण. ५ = CHIMNEY-SWEEP (CHIMNEY).

sweet /स्वीट्/ *वि* १ गोड, मधुर. २ आनंददायी किंवा आकर्षक : *a ~ face, गोड चेहेरा.* ३ आवडावा असा : *a ~ little boy, गोड पोरगं.* ४ ताजा आणि शुद्ध : *the ~ smell of the countryside, खेड्याचा ताजा, शुद्ध वास.* ५ गोड वासाचा, सुगंधयुक्त : *Don't the roses smell ~! काय गोड वासाचे गुलाब आहेत नाही!* ६ (*वाक्प्र*) **a sweet 'tooth** गोडघाशा, गोडाची आवड. **sweet** *ना* [*गण*] १ गोड गोळी, चॉकलेट वगैरे. २ पक्वान्न, गोडधोड. **'sweet corn** *ना* [*अगण*] गोड मका. **sweeten** *क्रि* [*अक, सक*] गोड होणे/

करणे. **sweetener** *ना* [*गण*] गोडी आणण्यासाठी वापरायचे द्रव्य. **'sweetheart** *ना* [*गण*] (*जुना अप्रचलित*) प्रियकर किंवा प्रेयसी. **sweetly** *क्रिवि* गोडपणे, गोड. **sweetness** *ना* [*अगण*] गोडी, माधुर्य. **'sweet-talk** *क्रि* [*सक*] (*into*)// एखाद्याशी लाडीगोडी करणे, मस्का लावणे.

swell /स्वेल्/ *क्रि* (*भूत* **swelled** /स्वेल्ड्/, *भूत वि* **swollen** /'स्वउलन्/ किंवा **swelled**) [*अक, सक*] १ सुजणे किंवा सूज आणणे, फुगणे : *a swollen ankle, पायाचा सुजलेला घोटा.* २ फुगवटा येणे/आणणे. **swell** *ना* [*अगण, अे.व*] समुद्राच्या पृष्ठभागाचे/पाण्याचे शांतपणे वर-खाली होणे, शांत उचंबळ. **swelling** *ना* [*गण*] शरीरावर येणारी सूज, टेंगूळ.

swelter /'स्वेल्ट(र्)/ *क्रि* [*अक*] उकडणे, घामाघूम होणे.

swept SWEEP^1 चा *भूत, भूत वि.*

swerve /स्वऽव्ह्/ *क्रि* [*अक*] एकदम दिशा बदलणे, एकदम वळणे : *The car ~ed to avoid her, तिला चुकवण्यासाठी गाडी एकदम वळली.* **swerve** *ना* [*गण*] एकदम वळणे, रस्ता सोडणे.

swift^1 /स्विफ्ट्/ *वि* जलद, चपळ, ताबडतोब दिलेला वगैरे : *a ~ reply, तात्काळ दिलेले उत्तर.* **swiftly** *क्रिवि* तात्काळ, त्वरेने, लगेच. **swiftness** *ना* [*अगण*] त्वरा, चपळपणा.

swift^2 /स्विफ्ट्/ *ना* [*गण*] पाकोळीसारखा एक छोटा पक्षी.

swig /स्विग्/ *क्रि* (**-gg-**) [*सक*] (*अनौप*) ढोसणे, चिकार पिणे.

swill /स्विल्/ *क्रि* [*सक*] १ चिकार पाणी ओतून धुणे. २ (*अनौप*) ढोसणे, गटागटा पिणे : *~ tea, चहा ढोसणे.* **swill** *ना* [*अगण*] डुकरांना खायला घालायच्या साली, बिया वगैरे अन्न.

swim /स्विम्/ *क्रि* (*भूत* **swam** /स्वॅम्/, *भूत वि* **swum** /स्वम्/, **-mm-**) १ [*अक*] पोहणे, तरणे. २ [*सक*] पोहून पार करणे : *~ the English Channel, इंग्लिश खाडी पोहून जाणे.* ३ [*अक*] (*in/with*)// सर्व बाजूने (द्रव) असणे, द्रवात तरंगणे. ४ [*अक*] गोलगोल फिरणे, गरगरणे : *His head swam, त्याचे डोके गरगरू लागले.* **swim** *ना* [*गण*] १ पोहणे, जलतरण : *go for a ~, पोहायला जाणे.* २ (*वाक्प्र*) **in/out of the swim** काय घडतंय् याची जाणीव असणे/नसणे. **swimmer** *ना* [*गण*] पोहणारा, जलतरणपटू. **'swimming-bath, 'swimming-pool** *ना* [*गण*] पोहण्याचा तलाव. **'swimming-costume, 'swim-suit** *ना* [*गण*] बायकांनी आणि मुलींनी घालायचे पोहण्याचे कपडे. **'swimming-trunks** *ना* [*ब.व*] मुलांची आणि पुरुषांची पोहण्याची चड्डी.

swindle /'स्विन्ड्ल्/ *क्रि* [*सक*] एखाद्याला फसवून पैसे उकळणे, आर्थिक अपहार करणे. **swindle** *ना* [*गण*] (पैशाची) फसवणूक, आर्थिक अपहार. **swindler** *ना* [*गण*] फसवून पैसे काढणारा माणूस, भामटा.

swing /स्विङ्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **swung** /स्वङ्/) [*अक, सक*] १ झोका देणे/घेणे, पुढे-मागे हालणे : *~ one's arms, हाताला झोके देणे.* २ फिरणे/फिरवणे, वळणे/वळवणे : *~ round the corner, कोपऱ्यावर वळणे.* ३ मत/दृष्टिकोन वगैरे बदलणे : *a speech that ~s the voters, मतदारांचे मत बदलणारे भाषण.* ४ (*वाक्प्र*) **swing into a'ction** लगेच कार्यरत होणे, ताबडतोब कामाला लागणे. **swing** *ना* १ [*गण*] (एखाद्या गोष्टीला बसणारा) झोका. २ [*अगण, अे.व*] जोषपूर्ण संगीत किंवा ताल. ३ [*गण*] दृष्टिकोनातील वगैरे बदल. ४ [*गण*] झोपाळा, झोका, झुला. ५ (*वाक्प्र*) **go with a 'swing** आनंदाची, मजेची होणे, मस्त/भन्नाट होणे. **ˌswings and 'roundabouts** (*अनौप* विशेषतः *ब्रि*) फायदे आणि तोटे असणारी परिस्थिती.

swingeing /'स्विन्जिङ्/ *वि* (विशेषतः *ब्रि*) प्रचंड मोठा, मोठ्या प्रमाणातला वगैरे, कडक, भयानक वाढलेला.

swipe /स्वाइप्/ *क्रि* [*सक*] (*व्रात्य*) १ फटकावणे. २ चोरणे. **swipe** *ना* [*गण*] फटकारा.

swirl /स्वऽल्/ *क्रि* [*अक, सक*] (वारा, पाणी वगैरे) गरगर फिरणे/फिरवणे, भोवरा होणे : *dust ~ing about the room, खोलीत चक्राकार उडणारी धूळ.* **swirl** *ना* [*गण*]

चक्राकार गती, भोवरा.

swish /स्विश्/ *क्रि* [*अक, सक*] हवेत फुसफुस आवाज करून हालणे. **swish** *ना* [*अ.व*] हवेत फडफडणे, फडफड. **swish** *वि* (*अनौप*) फॅशनेबल किंवा मौल्यवान.

switch /स्विच्/ *ना* [*गण*] १ विजेचे बटण : *a 'light-~, दिव्याचे बटण.* २ बदल : *a ~ from gas to electricity, गॅसकडून विद्युत्‌शक्तीकडे असा बदल.* **switch** *क्रि* १ [*अक, सक*] बदलणे, बदल होणे/करणे : *~ to using gas, गॅस वापरण्याचा बदल होणे.* २ [*अक, सक*] जागेची अदलाबदल करणे : *S~ the two batteries (round), दोन बॅटऱ्यांची अदलाबदल कर.* ३ (*क्रिव*) **switch sth on/off** बटण दाबून चालू/बंद करणे. **'switchboard** *ना* [*गण*] टेलिफोन जोडून देण्याचा बोर्ड, स्विच्फलक.

swivel /'स्विव्हल्/ *क्रि* (-ll-; *अमे* -l-) [*अक, सक*] मध्यवर्ती बिंदूभोवती गोल फिरणे किंवा फिरवणे, गरकन् फिरणे/फिरवणे : *~ (round) in one's chair, खुर्चीतून गरकन् फिरणे.*

swollen SWELL चे *भूत वि.*

swoop /स्वूप्/ *क्रि* [*अक*] झेप घेणे, झडप घालणे : (*ला*) *Police ~ed (on the house) at dawn, पहाटे पोलिसांनी (घरावर) छापा घातला किंवा धाड घातली.* **swoop** *ना* [*गण*] १ झडप, झेप. २ अचानक केलेला हल्ला.

swop = SWAP.

sword /सॉऽड्/ *ना* [*गण*] मुठीत लांब पाते लावलेले हत्यार, तलवार, समशेर. **'swordfish** *ना* [*गण*] वरचा जबडा लांब असणारा एक समुद्रातला मासा.

swore SWEAR चा *भूत.*

sworn^{1} SWEAR चे *भूत वि.*

sworn^{2} /स्वॉऽन्/ *वि* पक्का, कट्टर (जिगरी, जिवलग) : *~ friends/enemies, कट्टर मित्र/शत्रू.*

swum SWIM चे *भूत वि.*

swung SWING चा *भूत, भूत वि.*

syllable /'सिलब्ल्/ *ना* [*गण*] बहुधा स्वरयुक्त असा शब्दाचा एक भाग, शब्दावयव : *Table has two ~s, Table या शब्दात दोन अवयव आहेत (टेइ आणि ब्ल्).* **syllabic** /सि'लॅबिक्/ *वि* शब्दावयवाचा.

syllabus /'सिलबस्/ *ना* [*गण*] एखाद्या अभ्यासक्रमातील विषयांची यादी, अभ्यासक्रम.

syllogism /'सिलजिझम्/ *ना* [*गण*] दोन विधानातून काढलेले अनुमान असलेला तर्कशास्त्रीय युक्तिवाद, अनुमान.

symbol /'सिम्ब्ल्/ *ना* [*गण*] एखाद्या गोष्टीच्या ऐवजी त्याची प्रातिनिधिक अशी खूण, वस्तू वगैरे, प्रतीक : *The dove is a ~ of peace, कबुतर शांततेचे प्रतीक आहे.* **symbolic** /सिम्'बॉलिक्/ *वि* प्रतिकात्मक, प्रतिकयुक्त. **symbolically** *क्रिवि* प्रतिकात्मक पद्धतीने. **symbolism** /'सिम्बलिझम्/ *ना* [*अगण*] प्रतिकात्मकता, प्रतीके (किंवा त्यांचा वापर). **symbolize** /'सिम्बलाइझ्/ *क्रि* [*सक*] एखाद्याचे प्रतीक असणे.

symmetry /'सिमट्रि/ *ना* [*अगण*] १ दोन्ही बाजू अगदी एकसारख्या आकाराच्या असणे, समप्रमाण असणे. २ समतोल. **symmetric** /सि'मेट्रिक्/ (तसेच **symmetrical** /-इक्ल्/) *वि* समप्रमाणातील, बांधेसूद.

sympathetic /,सिम्प'थेटिक्/ *वि* १ सहानुभूती असणारा, सहानुभूतिपूर्वक : *~ looks, सहानुभूतिपूर्वक नजरा.* २ (माणसाबाबत) आवडेल असा, छान. **sympathetically** /-क्लि/ *क्रिवि* सहानुभूतिपूर्वक रीतीने.

sympathize /'सिम्पथाइझ्/ *क्रि* [*अक*] (*with*)// सहानुभूती वाटणे/दाखवणे. **sympathizer** *ना* [*गण*] एखाद्या तत्त्वाचा, पक्षाचा वगैरे कैवारी, पक्षपाती, अभिमानी.

sympathy /'सिम्पथि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] सहानुभूती, इतरांच्या सुखदुःखात सहभागी होणे (किंवा तशी क्षमता). २ **sympathies** [*ब.व*] समभावना.

symphony /'सिम्फनि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) वाद्यवृंदासाठी केलेली बहुधा तीन-चार भागांची मोठी संगीतरचना, स्वरमेळ.

symptom /'सिम्प्टम्/ *ना* [*गण*] १ रोगाचे लक्षण असणारा शरीरातील बदल. २ अशुभ चिन्ह : *~s of discontent, असंतोषाची चिन्हे.* **symptomatic** /-'मॅटिक्/ *वि* लक्षण असलेला; चिन्ह असलेला.

synagogue /'सिनगॉग्/ *ना* [*गण*] ज्यूंचे धार्मिक शिक्षण देणारे प्रार्थनामंदीर.

synchronize /'सिङ्क्रनाइझ्/ *क्रि* [*अक, सक*] एकाच वेळी एकाच गतीने घडणे/घडवणे किंवा चालणे/चालवणे, सर्वांची वेळ आणि गती सारखी असणे/ठेवणे : ~ *watches, घड्याळांची गती समान ठेवून ती लावणे.*

syndicate /'सिन्डकट्/ *ना* [*गण*] धंद्यासाठी एकत्र आलेल्या माणसांचा किंवा कंपन्यांचा गट, व्यापारी बंधू. **syndicate** /'सिन्डिकेइट्/ *क्रि* [*सक*] मध्यवर्ती एजन्सीमार्फत विविध वर्तमानपत्रांत वगैरे (लेख वगैरे) प्रसिद्ध करणे.

syndrome /'सिन्ड्रउम्/ *ना* [*गण*] (*वैद्यक*) विशिष्ट आजाराची वगैरे लक्षणे.

synonym /'सिननिम्/ *ना* समानार्थी शब्द, समशब्द. **synonymous** /सि'नॉनिमस्/ *वि* त्याच अर्थाचा, समानार्थी.

synopsis /सि'नॉप्सिस्/ *ना* [*गण*] (*ब.व* **-opses** /-सीझ्/) एखाद्या पुस्तकाचा, नाटकाचा वगैरे सारांश, रूपरेखा, रूपरेषा.

syntax /'सिन्टॅक्स्/ *ना* [*अगण*] (*भाषाविज्ञान*) पद (किंवा शब्द) आणि पदबंध यापासून वाक्ये बनविणे (किंवा त्याचे नियम), वाक्यरचना (नियम), वाक्यविचार आणि वाक्यव्यवस्था, वाक्यविन्यास. **syntactic** /सिन्'टॅक्टिक्/ *वि* वाक्यविचाराचा, वाक्यव्यवस्थाविषयक.

synthesis /'सिन्थसिस्/ *ना* [*अगण, गण*] (*ब.व* **-theses** /-सीझ्/) विविध भाग एकत्र करून किंवा जोडून एक पूर्ण गोष्ट बनवणे, समन्वय, सस्थिती. **synthetic** /सिन्'थेटिक्/ *वि* कृत्रिम, निसर्गजन्य नसलेला : ~ *fabric, कृत्रिम वस्त्र.* **synthesize** /'सिन्थसाइझ्/ *क्रि* [*सक*] एकत्र करणे, जोडणे. **synthetically** /-क्लि/ *क्रिवि* कृत्रिम रीतीने.

syphilis /'सिफिलिस्/ *ना* [*अगण*] प्रथम लिंगावर आणि नंतर सर्व शरीरावर गळवे आणणारा एक गंभीर स्वरूपाचा गुप्तरोग, उपदंश.

syphon = SIPHON.

syringe /सि'रिन्ज्/ *ना* [*गण*] इंजेक्शन देण्याची सुई. **syringe** *क्रि* [*सक*] इंजेक्शन देणे, इंजेक्शनच्या सुईने पू वगैरे ओढून साफ करणे.

syrup /'सिरप्/ *ना* [*अगण*] साखरांब्यासारखा घट्ट पाक, साखरपाक.

system /'सिस्टम्/ *ना* १ [*गण*] अनेक भाग एकत्रितपणे काम करतात अशी यंत्रणा. २ [*गण*] व्यवस्थित मांडणी केलेली कल्पना वगैरेचा संच, संकल्पना वगैरेची व्यवस्था किंवा मांडणी : *a ~ of government, शासनव्यवस्था.* ३ [*अगण*] एखादी गोष्ट करण्याची सुरचित पद्धती. **systematic** /-मॅटिक्/ *वि* व्यवस्थित, पद्धतशीर. **systematically** /-क्लि/ *क्रिवि* व्यवस्थितपणे, पद्धतशीरपणे.

T t

T, t /टी/ (*ब.व* **T's, t's** /टीझ्/) इंग्रजी वर्णमालेतील विसावे अक्षर. **'T-shirt** *ना* [*गण*] बाह्याच्या गंजिफ्रॉकसारखा एक आखूड बाह्यांचा शर्ट.

ta /टा/ *उद्गा* (*ब्रि अनौप*) आभारी आहे किंवा 'थँक्यू'.

tab /टॅब्/ *ना* [*गण*] चिकटवण्यासाठी, ओढण्यासाठी वगैरे एखाद्या वस्तूला लावलेला कापडाचा, कागदाचा वगैरे तुकडा.

tabby /'टॅबि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) (तसेच **'tabby-cat**) तपकिरी किंवा राखाडी रंगाचे आणि गडद रंगाचे पट्टे असणारे मांजर, चट्ट्यापट्ट्याचे मांजर.

table /'टेइब्ल्/ *ना* [*गण*] १ मेज, चौपाई. २ उभ्या ओळीत मांडलेले आकडे किंवा लिहिलेल्या गोष्टी, तक्ता, तालिका, कोष्टक, सारणी. **table** *क्रि* [*सक*] चर्चेसाठी अधिकृतपणे मांडणे, पटावर ठेवणे. **'tablecloth** *ना* [*गण*] विशेषतः जेवताना टेबलावर घालायचे किंवा अंथरायचे कापड. **'tablespoon** *ना* [*गण*] अन्न वाढायचा मोठा चमचा. **'tablespoonful** *ना* [*गण*] मोठा चमचाभर. **'table tennis** *ना* [*अगण*] टेबलाला छोटे जाळे लावून हलक्या चेंडूने हॉलमधे वगैरे खेळायचा खेळ, पिंगपाँगचा खेळ.

tablet /'टॅब्लिट्/ *ना* [*गण*] १ औषधाची लहान कडक गोळी किंवा चपटी वडी. २ साबणाची वडी. ३ शब्द खोदलेली दगडाची

वगैरे फरशी, पाषाणलेख, इष्टिका लेख.

tabloid /'टॅब्लॉइड्/ *ना* [*गण*] छोटे बातमीवजा असणारे लेख आणि चिकार छायाचित्रे असणारे लहान आकाराचे वृत्तपत्र.

taboo /ट'बू; *अमे* टॅ'बू/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* ~**s**) मजबूत सामाजिक किंवा धार्मिक रीतिरिवाजामुळे निषिद्ध मानली गेलेली गोष्ट, अब्रह्मण्य गोष्ट. **taboo** *वि* धार्मिक किंवा सामाजिक कारणांनी निषिद्ध असा.

tabulate /'टॅब्युलेइट्/ *क्रि* [*सक*] (आकडे किंवा शब्द) तालिकेत किंवा कोष्टकात लिहिणे. **tabulation** /,टॅब्यु'लेइश्न्/ *ना* [*अगण*] तालिकेमधे मांडणे, तालिकाकरण.

tacit /'टॅसिट्/ *वि* शब्दांत न मांडलेला पण स्वीकारलेला किंवा समजलेला, ध्वनित, मूक: *~ agreement, मूक संमती.* **tacitly** *क्रिवि* मूकपणे.

tack /टॅक्/ *ना* १ [*गण*] चपट्या मोठ्या टोपीचा आखूड खिळा. २ [*अगण, अे.व*] (*ला*) कार्याची योजना, कार्यक्रम, कृतीचा मार्ग: *change ~, कृतीचा मार्ग बदलणे.* ३ [*गण*] मोठा ढिला टाका. **tack** *क्रि* [*सक*] मोठे टाके टाकून बंद करणे.

tackle /'टॅक्ल्/ *क्रि* १ [*सक*] (एखाद्या समस्येला, कामाला वगैरे) हात घालणे, सोडवण्यास घेणे. २ [*सक*] (*about*)// एखाद्याशी एखाद्या विषयावर मुक्त चर्चा करणे, स्पष्टपणे बोलणे. ३ [*अक, सक*] (फुटबॉल वगैरे खेळात) एखाद्याला हुकवून चेंडू काढून घेणे/नेणे. ४ [*सक*] (चोराला वगैरे) पकडणे, झुंजणे, तोंड देणे. **tackle** *ना* १ [*गण*] हुकवून चेंडू काढणे. २ [*अगण*] विशिष्ट खेळाला आवश्यक असणारी सामग्री. ३ [*अगण*] अवजड माल वगैरे उचलण्यासाठी वापरायचा दोर आणि कप्प्या यांचा संच.

tacky /'टॅकि/ *वि* (*अनौप*) हलका, भिकार, अगदी सामान्य: *~ jewellery, हलके दागिने.*

tact /टॅक्ट्/ *ना* [*अगण*] इतरांना न दुखावता बोलण्याचे किंवा काम करण्याचे कसब, हातोटी. **tactful** *वि* कसब असणारा, वाकबगार, पटाईत. **tactfully** *क्रिवि* कौशल्याने, हुशारीने. **tactless** *वि* अंगात कसब नसलेला, आडदांड, धसमुसळा. **tactlessly** *क्रिवि* आडदांडपणाने, धश्चोटपणे.

tactic /'टॅक्टिक्/ *ना* १ [*गण, बहुधा ब.व*] हेतू साध्य करण्याचा मार्ग, हिकमत, डावपेच. २ **tactics** [तसेच ब.व क्रियापदासह अे.व] युद्धातील सैन्याची हलवाहलव करण्याची कला, व्यूहरचना, रणनीती, लष्करी हालचाली/डावपेच. **tactical** *वि* डावपेचाचा: *a ~ move, डावपेचाची खेळी* किंवा *हुशारीची चाल.* **tactician** /टॅक्'टिश्न्/ *ना* [*गण*] डावपेच आखण्यात तरबेज असणारा माणूस, रणनीतिज्ज्ञ, समरतंत्रज्ञ.

tadpole /'टॅड्पउल्/ *ना* [*गण*] बेडूक होण्यापूर्वीची अवस्था, मंडुक डिंबक.

tag /टॅग्/ *ना* १ [*गण*] वस्तूवर किमतीचे किंवा मालकाच्या नावाचे वगैरे लावलेले कापडाचे, कागदाचे वगैरे लेबल. २ [*अगण*] लहान मुलांचा शिवाशिवीचा खेळ. **tag** *क्रि* (**-gg-**) १ [*सक*] लेबल लावणे. २ (*क्रिब*) **tag along/after/behind** एखाद्याचा पाठलाग करणे, एखाद्याच्या मागेमागे जाणे.

tail /टेइल्/ *ना* [*गण*] १ प्राण्याचे, पक्ष्याचे शेपूट, पुच्छ. २ शेपटीसारखे असणारे काही: *the ~ of an aircraft, विमानाचे शेपूट.* ३ (*अनौप*) एखाद्याच्या मागेमागे जाण्यासाठी नेमलेला माणूस, पाळत्या. ४ **tails** [*ब.व*] नाण्याची छापाच्या विरुद्धची बाजू, काटा. **tail** *क्रि* १ [*सक*] एखाद्याच्या मागेमागे जाणे. २ (*क्रिब*) **tail off/away** हळूहळू कमी होणे किंवा शांत होणे, मंदावणे. **'tailback** *ना* [*गण*] रस्त्यावरील वाहतुकीची लांब रांग, अडलेल्या वाहनांची रांग. **tailless** *वि* बिनशेपटीचा. **'tail-light** *ना* [*गण*] मोटार वगैरेचा मागचा तांबडा दिवा. **'tail wind** *ना* [*गण*] मागच्या बाजूने वाहणारे वारे.

tailor /'टेइल(र्)/ *ना* [*गण*] शिंपी. **tailor** *क्रि* [*सक*] १ कापड बेतणे आणि शिवणे: *a well-~ed suit, मापात शिवलेला सूट.* २ विशिष्ट हेतूसाठी करणे, विशेष उद्दिष्टास योग्य असे करणे. **,tailor-'made** *वि* १ विशिष्ट व्यक्तीला व्यवस्थित बसेल असा तयार केलेला, मुद्दाम बेतलेला. २ (*ला*) अगदी योग्य/अनुरूप: *She is ~-made for the job, त्या कामाला ती अगदी फिट्ट आहे.*

aint /टेइन्ट्/ *क्रि* [*सक*] बट्टा लावणे, बिघडवणे, डागाळणे, गालबोट लावणे. **taint** *ना* [अे.व] डाग, बट्टा.

ake^{1} /टेइक्/ *क्रि* (*भूत* **took** /टुक्/, *भूत वि* **~n** /'टेइकन्/) १ [*सक*] मिळणे, घेणे, धरणे : *T~ her hand, तिचा हात धर* ○ *She took him in her arms, तिने त्याला बाहुपाशात घेतले.* २ [*सक*] बरोबर नेणे/घेणे, (एखादी व्यक्ती/गोष्ट) एकीकडून दुसरीकडे जायला लावणे : *T~ an umbrella with you, बरोबर छत्री ने* ○ *She took a friend home, तिने मित्राला घरी नेले.* ३ [*सक*] चुकून किंवा विना परवानगी घेऊन वापरणे; चोरणे, ढापणे : *Who has ~n my bicycle? माझी सायकल कुणी नेली/ढापली?* ४ [*सक*] एखाद्या गोष्टीतून घेणे : *This line is ~n from a poem by Keats, कीटस्च्या एका कवितेतली ही एक ओळ घेतली आहे.* ५ [*सक*] जिंकून घेणे, ताब्यात घेणे : *~ a town (in war), (युद्धात) एखादे शहर घेणे* ○ *He took first prize, त्याने पहिले बक्षीस जिंकले/पटकावले.* ६ [*सक*] स्वीकारणे; मिळणे : *~ advice, सल्ला घेणे* ○ *~ the blame, बोल/दोष मिळणे किंवा दोष स्वीकारणे* ○ *Will you ~ £450 for the car? तू त्या गाडीचे ४५० पौंड घेशील?* ७ [*सक*] (विशेषतः वर्तमानपत्र) नियमितपणे घेणे : *He ~s The Times, तो 'टाइम्स' घेतो.* ८ [*सक*] खाणे किंवा पिणे, ग्रहण करणे : *Do you ~ sugar in your tea? तू चहात साखर घेतोस? म्हणजेच तुला चहात साखर चालते?* ९ [*सक*] जागा असणे, बसणे : *The car ~s five people, गाडी पाच माणसं घेते म्हणजेच गाडीत पाच माणसं बसतात/मावतात.* १० [*सक*] एखादी गोष्ट सहन करण्याची शक्ती असणे; सहन करणे : *He can't ~ being criticized, टीका झालेली त्याला नाही सहन होत/चालत.* ११ [*सक*] प्रतिक्रिया असणे/होणे, परिणाम होणे : *She took her mother's death very badly, आईच्या मृत्यूचा तिच्यावर फार परिणाम झाला म्हणजेच तिला फार लागला.* १२ [*सक*] (भावना वगैरे) अनुभवणे, वाटणे : *~ pleasure in being cruel, क्रूरपणे वागण्यात आनंद घेणे/मानणे.* १३ [*सक*] अर्थ करणे, मानणे : *What do you ~ this to be? याचा तू काय अर्थ करतोस?* १४ [*सक*] पाहिजे असणे, लागणे : *The work took four hours, त्या कामाला चार तास लागले.* १५ [*सक*] (विशिष्ट आकाराचे कपडे किंवा बूट) घालणे, नेसणे : *What size shoes do you ~? तू कोणत्या आकाराचे बूट घालतोस?* १६ [*सक*] (परीक्षा वगैरे) घेणे, देणे : *~ a driving test, वाहन चालवायची परीक्षा देणे.* १७ [*सक*] लिहून घेणे/ठेवणे : *~ notes, टिपणे घेणे* ○ *~ the names of the volunteers, स्वयंसेवकांची नावे लिहून घेणे.* १८ [*सक*] ('छायाचित्र) घेणे. १९ [*सक*] तपासणे; मोजणे : *The doctor took my temperature, डॉक्टरांनी माझे टेंपरेचर घेतले म्हणजेच डॉक्टरांनी माझा ताप पाहिला/तपासला/मोजला.* २० [*सक*] देखरेखीखाली घेणे : *~ a class, course, etc, वर्ग वगैरे घेणे.* २१ [*अक*] अपेक्षित परिणाम घडणे : *The smallpox injection did not ~ देवीच्या लशीचा परिणाम झाला नाही.* २२ [*सक*] (वाहनाने, रस्त्याने वगैरे) जाणे, त्यांचा वापर करणे : *~ a bus into town, शहरात बसने जाणे* ○ *T~ the first road on the left, डावीकडचा पहिला रस्ता घे म्हणजे तेथे वळ.* २३ [*सक*] (नामाशी संबंधित क्रिया करणे असे दाखविण्यासाठी वापर) : *~ a bath/walk/holiday, स्नान करणे/चक्कर मारणे/सुट्टी घेणे.* २४ (*वाक्प्र*) **take its course** ⇨ COURSE^{1}. **take heart** ⇨ HEART. २५ (*क्रिब*) **take sb aback** एखाद्याला आश्चर्याचा धक्का देणे. **take after sb** एखाद्यासारखे (आई किंवा वडील) दिसायला किंवा स्वभावाने असणे. **take sth apart** (यंत्र वगैरे) खोलणे, भाग सुटे करणे. **take sth away** (क) वजा करणे : *T~ 5 from 10, and that leaves 5, १० तून ५ वजा कर म्हणजे ५ उरतात.* (ख) उपाहारगृहातून विकत घेऊन दुसरीकडे खायला नेणे. (ग) नाहीसे करणे, दूर करणे : *a pill to ~ the pain away, वेदना नाहीशी करणारी गोळी.* **take sb/sth away** दूर करणे/नेणे. **take sb/sth back** (क) आपण काही बोललेले गैर आहे हे मान्य करणे, शब्द मागे घेणे. (ख) एखादी गोष्ट परत घेणे : *This shop only ~s goods back if you have your receipt, तुमच्याकडे पावती असेल तरच या दुकानात माल परत घेतला जातो.* **take sb back (to sth)**

एखाद्याला एखाद्या गोष्टीची आठवण करून देणे. **take sth down** (**क**) एखादी गोष्ट लिहून काढणे, लेखी नोंद करणे. (**ख**) (बांधकाम) पाडणे, उतरवणे. **take sb in** फसवणे : *Don't be ~n in by him, त्याला फसू नकोस.* **take sth in** (**क**) पैसे घेऊन (काम) घरी करून देणे : *~ in washing, मोलाने कपडे धुऊन देणे.* (**ख**) शिवणी उसवून (कपडा) घट्ट करणे. (**ग**) समावेश करणे, अंतर्भाव असणे : *The trip took in several cities, त्या दौऱ्यात अनेक शहरांचा समावेश होता.* (**घ**) पाहणे, ऐकणे आणि समजणे; लक्ष देणे : *I couldn't ~ in everything she said, ती म्हणाली ते सर्वच मला समजले नाही.* **take 'off** (**क**) (विमानाबाबत) उड्डाण करणे. (**ख**) (योजना वगैरेबाबत) लवकर यशस्वी होणे. **take sb off** (*अनौप*) नक्कल करणे : *She's good at taking off her teachers, शिक्षकांची नक्कल करण्यात ती तरबेज आहे.* **take sth off (sth)** (**क**) (कपडे वगैरे) काढून टाकणे : *~ off one's hat, डोक्यावरची हॅट काढणे.* (**ख**) (आगगाडी वगैरे) वापरातून काढून टाकणे/घेणे, न वापरणे. (**ग**) कमी करणे : *~ 50 p off (the price), ५० पेन्स (किंमत) कमी करणे.* (**घ**) कामातून विश्रांतीसाठी (वेळ) घेणे, सुट्टी घेणे : *~ a week off to go on holiday, एक आठवड्याची सुट्टी घेणे.* **take on sth** (एखादा गुण, आकार वगैरे) प्राप्त होऊ लागणे, येऊ लागणे. **take sth on** (काम वगैरे) करण्याचे ठरवणे. **take sb on** (**क**) एखाद्याचे आव्हान स्वीकारणे, एखाद्याशी स्पर्धेत उतरणे. (**ख**) एखाद्याला नोकरीवर घेणे. **take sb/sth on** (विमान, वाहन वगैरेबाबत) (प्रवासी, माल, इंधन वगैरे) घेणे, भरणे. **take sb out** एखाद्या प्रसंगी/कार्यक्रमाला एखाद्याबरोबर जाणे : *He took her out to dinner, तो तिला बाहेर जेवायला घेऊन गेला.* **take sth out** (**क**) (शरीराचा भाग) काढून टाकणे : *~ out a tooth, दात काढून टाकणे.* (**ख**) पैसे देऊन (कागदपत्र) घेणे : *~ out a licence, पैसे भरून परवाना काढणे.* **take it out of sb** (*अनौप*) दमवणे, दमछाक करणे : *That run really took it out of me, त्या पळण्याने माझी पुरती दमछाक झाली.* **take it/sth out on sb** (*अनौप*) एखाद्यावर राग काढणे. **take over (from sb)** (एखाद्याची) कामे, जबाबदाऱ्या स्वीकारणे. **take sth 'over** ताब्यात घेणे : *~ over another business, दुसरा धंदा ताब्यात घेणे.* **take to sth** (**क**) एखादी गोष्ट सुरू करणे : *He took to cycling ten miles a day, दररोज दहा मैल सायकल चालविण्यास त्याने सुरुवात केली.* (**ख**) चुकवण्यासाठी आसरा घेणे किंवा वापरणे : *~ to the woods to avoid capture, पकडले जाऊ नये म्हणून जंगलाचा आसरा घेणे.* **take to sb/sth** आवडू लागणे. **take sth up** (**क**) चढवणे; उचलणे : *He took up a knife, त्याने चाकू उचलला.* (**ख**) (स्कर्ट वगैरे) लांडा करणे. (**ग**) (व्यवसाय, उद्योग) चालू करणे; सुरुवात करणे : *He took up cycling, chess, त्याने सायकल चालवणे, बुद्धिबळ खेळणे सुरू केले.* (**घ**) (पुरे न झालेले काम) चालू ठेवणे. (**च**) (वेळ किंवा जागा) व्यापणे : *This table ~s up half the room, हे टेबल अर्धी खोली व्यापते.* (**छ**) (प्रस्ताव) स्वीकारणे. **take up with sb** एखाद्याच्या सहवासात वेळ घालवण्यास सुरुवात करणे; एखाद्याशी मैत्री करणे. **take sth up with sb** एखाद्याशी एखाद्या गोष्टीबाबत बोलणे किंवा पत्रव्यवहार करणे. **take sth upon oneself** एखाद्या गोष्टीची जबाबदारी घेणे. **be taken with sb/sth** एखाद्याकडे आकर्षित होणे, ओढले जाणे. **'take-away** *ना* [*गण*] (**क**) अन्न विकत घेऊन जाण्याचे उपाहारगृह. (**ख**) अशा उपाहारगृहातून आणलेले अन्न : *go for a ~-away, आयते/तयार अन्न आणणे पसंत करणे.* **'take-off** *ना* [*गण*] विमानाचे धावपट्टी सोडणे, उड्डाण घेण्याचा क्षण. **'take-over** *न* (धंदा वगैरे) ताब्यात घेणे.

take^{2} /टेइक्/ *ना* [*गण*] न थांबता/सलग चित्रीकरणाचा काळ.

taker /'टेइक(र्)/ *ना* [*गण*] प्रस्ताव स्वीकारणारा माणूस, घेणारा माणूस.

takings /'टेइकिङ्झ्/ *ना* [*ब.व*] दुकान थिएटर वगैरेची आवक, गल्ला.

talcum powder /'टॅल्कम्/ *ना* [*अगण*] अंगाला लावायची सुगंधी पावडर, वासाची पावडर.

tale /टेइल्/ *ना* [*गण*] १ कहाणी, कथा : *~s o* *adventure, शौर्यकथा किंवा धाडसी गोष्टी.* २ वृत्तांत, निवेदन. ३ खोटी गोष्ट.

talent /'टॅलन्ट्/ *ना* [*गण, अगण*] अंगची कला, नैसर्गिक देणगी, प्रतिभा, प्रज्ञा : *have a ~ for music, संगीताची उपजत कला असणे.* **talented** *वि* उपजत कला असणारा, प्रतिभावान; कुशल.

talk¹ /टॉऽक्/ *क्रि* १ [*अक*] बोलणे; सांगणे : *He was ~ing to a friend, तो मित्राशी बोलत होता.* २ [*अक*] बोलता येणे : *Can the baby ~ yet? मुलाला आता बोलता येऊ लागलं?* ३ [*सक*] चर्चा करणे : *We ~ed politics all evening, आम्ही संध्याकाळी सर्व वेळ राजकारणाविषयी बोललो.* ४ [*अक*] चकाट्या पिटणे. ५ [*अक*] गुप्त माहिती देणे – विशेषतः अनिच्छेने : *Has the prisoner ~ed yet? कैद्याने काही गुप्तगोष्ट सांगितली?* ६ (*क्रिब*) **talk down to sb** दुसऱ्यापेक्षा आपण जरा वरचे, हुशार वगैरे आहोत अशा थाटात बोलणे, एखाद्याला बोलून कमी लेखणे. **talk sb into/out of sth** एखाद्याला एखादी गोष्ट करण्यास राजी करणे/त्यापासून परावृत्त करणे. **talk sth over** एखाद्या गोष्टीची चर्चा करणे. **talkative** /'टॉऽकटिव्ह्/ *वि* बडबड्या, बोलका. **talker** *ना* [*गण*] बोलणारा माणूस. **'talking-point** *ना* [*गण*] चर्चेचा विषय, विवाद्य मुद्दा. **'talking-to** *ना* [*ए.व*] एखाद्यावर केलेली कडक टीका, कडवट भाषा.

talk² /टॉऽक्/ *ना* १ [*गण, अगण*] संभाषण. २ [*अगण*] गुणगुण, अफवा, वदंता. ३ [*अगण*] शिळोप्याच्या गप्पा. ४ **talks** [*ब.व*] औपचारिक चर्चा, बोलणी.

tall /टॉऽल्/ *वि* १ जास्त उंचीचा. २ दिलेली उंची असणारा, उंच : *Tim is six feet ~, टिम ६ फूट उंच आहे.* ३ (*वाक्प्र*) **a tall 'order** अवघड काम. **a tall 'story** विश्वास बसणार नाही अशी गोष्ट, फुगवून सांगितलेली गोष्ट.

tally /'टॅलि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) पैशाच्या खर्चाचा हिशेब, खेळात मिळवलेल्या गुणांचा हिशेब वगैरे. **tally** *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*अक*] (हिशेब) बरोबर असणे; (हिशेब) जुळणे.

talon /'टॅलन्/ *ना* [*गण*] पक्ष्याचे बाकदार नख उदा गरुडाचे.

tambourine /,टॅम्ब'रीन्/ *ना* [*गण*] कडेला वाजणाऱ्या धातूच्या चकत्या लावलेले हाताने वाजवायचे एक हलगीसारखे वाद्य, टिमकी, खंजिरी.

tame /टेइम्/ *वि* (**~r, ~st**) १ (प्राण्यांबाबत) माणसाळलेला; रानटी किंवा हिंस्र नसलेला : *a ~ monkey, पाळलेले माकड.* २ (माणसांबाबत) सहज ताब्यात राहणारा : *Her husband is a ~ little man, तिचा नवरा बिचारा मुठीत राहणारा आहे.* ३ रटाळ, कंटाळवाणा : *The film has a rather ~ ending, चित्रपटाचा शेवट जरा कंटाळवाणा आहे.* **tame** *क्रि* [*सक*] माणसाळवणे : *~ a lion, सिंहाला माणसाळवणे.* **tamely** *क्रिवि* नरमपणाने, मऊपणाने. **tameness** *ना* [*अगण*] माणसाळलेपणा. **tamer** *ना* [*गण*] हिंस्र जनावरांना माणसाळवणारा किंवा वठणीवर आणणारा माणूस : *a lion ~r, सिंहाला माणसाळवणारा माणूस.*

tamper /'टॅम्प(र्)/ *क्रि* [*अक*] *with//* नसती लुडबूड करणे, अनधिकृत बदल करणे.

tampon /'टॅम्पॉन्/ *ना* [*गण*] विटाळात होणाऱ्या रक्तस्रावातील रक्त शोषून घेण्यासाठी स्त्रीच्या योनीमधे ठेवायची कापसाची लांब पट्टी.

tan /टॅन्/ *ना* १ [*गण*] उन्हाने त्वचेला आलेला तपकिरी किंवा काळसर रंग. २ [*अगण*] पिवळट तपकिरी रंग. **tan** *क्रि* (**-nn-**) १ [*सक*] (प्राण्यांच्या कातडीचे) चामडे बनवणे. २ [*अक, सक*] उन्हाने काळवंडणे. ३ (*वाक्प्र*) **tan sb's hide** (*अनौप*) एखाद्याला धोपटणे किंवा धुऊन काढणे.

tandem /'टॅन्डम्/ *ना* १ [*गण*] दोन माणसांची दुचाकी. २ (*वाक्प्र*) **in 'tandem** एकत्र काम करणारा, जोडीने काम करणारा.

tandoori /टॅन्'दुअरि/ *ना* [*गण, अगण*] भारतीय पद्धतीचा मातीच्या भट्टीत भाजलेला पदार्थ (उदा मांस), तंदुरी.

tang /टॅङ्/ *ना* [*गण, बहुधा ए.व*] कडक किवा उग्र चव, स्वाद किंवा वास.

tangent /'टॅन्जन्ट्/ *ना* १ [*गण*] वर्तुळाला न छेदता स्पर्शून जाणारी सरळ रेषा, वर्तुळाची स्पशरिषा, स्पर्शिका. २ (*वाक्प्र*) **go off at a**

'tangent विचारात, कृतीत एकदम बदल होणे, भलतीकडे भरकटणे.

tangerine /,टॅन्ज'रीन्; *अमे* 'टॅन्जरीन्/ *ना* [*गण*] एक प्रकारचे छोटे गोड संत्रे.

tangible /'टॅन्जब्ल्/ *वि* १ (*औप*) स्पर्शाने समजणारा, स्पर्शविद्य, स्पर्शज्ञेय. २ स्पष्ट आणि निश्चित : ~ *proof, स्पष्ट आणि निश्चित पुरावा.* **tangibly** *क्रिवि* स्पर्शाने जाणवेल अशा रीतीने; स्पष्टपणे, ठळकपणे.

tangle /'टॅङ्ग्ल्/ *ना* १ [*गण*] दोऱ्याचा, केसांचा वगैरे गुंता, गुंताडा. २ [*ए.व*] गोंधळाची स्थिती, गुंतागुंत : *in a ~, गुंतागुंतीच्या स्थितीत.* **tangle** *क्रि* १ [*अक, सक*] गुंता होणे/करणे : *~d hair, गुंता झालेले केस.* २ [*अक*] *with//* एखाद्याशी झगडा होणे, एखाद्याशी भांडण्यात गुंतणे, एखाद्याशी झंझट करणे.

tango /'टॅङ्गउ/ *ना* [*गण*] (*ब.व* ~s) दक्षिण अमेरिकेतील एक नृत्य (किंवा त्याचे संगीत).

tank /टॅङ्क्/ *ना* [*गण*] १ पाण्याचा किंवा वायूचा मोठा साठा ठेवायचे पात्र, पाण्याचा मोठा हौद. २ रणगाडा.

tankard /'टॅङ्कड्/ *ना* [*गण*] बियर प्यायचा धातूचा मोठा कानाचा कप.

tanker /'टॅङ्क(र्)/ *ना* [*गण*] द्रवपदार्थ किंवा वायू वाहून नेणारा ट्रक, बोट वगैरे.

tantalize /'टॅन्टलाइझ्/ *क्रि* [*सक*] आशेला लावणे, देईन न देईन असे करून एखाद्याला खिजवणे, झुलवणे:.

tantamount /'टॅन्टमाउन्ट्/ *वि to//* दुसऱ्या एखाद्या गोष्टीसारखाच परिणाम घडणे, जवळजवळ (एखाद्या गोष्टीसारखे) असणे.

tantrum /'टॅन्ट्रम्/ *ना* [*गण*] खास करून लहान मुलाचे चिडीस येणे, कहर.

tap^{1} /टॅप्/ *ना* १ [*गण*] नळ. २ (*वाक्प्र*) **on tap** हवे तेव्हा मिळणारे. **tap** *क्रि* (**-pp-**) [*सक*] १ (एखाद्या गोष्टीतून द्रवपदार्थ) काढणे. २ (एखाद्याकडून) एखादी गोष्ट मिळवणे : ~ *a country's resources, देशाच्या नैसर्गिक साधनांचा वापर करून (उत्पन्न, ऊर्जा वगैरे) मिळवणे.* ३ (टेलिफोन) चोरून ऐकणे.

tap^{2} /टॅप्/ *क्रि* [*अक, सक*] *ना* [*गण*] चापट किंवा चापट्या (मारणे). **'tap-dancing** *ना* [*अगण*] खास तयार केलेले बूट घालून टपटप आवाज करत पावले टाकण्याचे नृत्य.

tape /टेइप्/ *ना* १ (क) [*गण, अगण*] फीत, पट्टी. (ख) [*गण*] शर्यतीत धावपट्टीच्या टोकाला (शेवटी) बांधलेली रिबन. २ [*अगण, गण*] = MAGNETIC TAPE (MAGNET). **tape** *क्रि* [*सक*] १ फीत बांधणे. २ ध्वनिमुद्रित करणे. ३ (*वाक्प्र*) **have sb/sth taped** (*अनौप* विशेषतः *ब्रि*) एखादी व्यक्ती/गोष्ट पूर्णपणे समजणे, चांगली ओळखणे. **'tape-measure** *ना* [*गण*] माप घेण्याची कापडी किंवा धातूची पट्टी, मोजपट्टी. **'tape-recorder** *ना* [*गण*] ध्वनिफीत वाजवायचे किंवा तीवर ध्वनिमुद्रण करण्याचे साधन, फीत मुद्रक.

taper^{1} /'टेइप(र्)/ *क्रि* १ [*अक, सक*] एका टोकाला निमुळते होणे/करणे. २ *off//* कमी होत जाणे, घटणे, विरणे.

taper^{2} /'टेइप(र्)/ *ना* [*गण*] लांब पण बारीक मेणबत्ती.

tapestry /'टॅपस्ट्रि/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) भिंती सजवायचे चित्रे किंवा नक्षी असणारे जाड कापड (किंवा त्याचा पडदा).

tar /टा(र्)/ *ना* [*अगण*] रस्ते करताना किंवा लाकूड टिकवण्यासाठी वापरायचा आणि थंड झाल्यावर टणक होणारा एक चिकट काळा घट्ट पदार्थ, डांबर. **tar** *क्रि* (**-rr-**) १ [*सक*] डांबरी करणे. २ (*वाक्प्र*) **tarred with the same 'brush** तेच दोष असणे.

tarantula /ट'रॅन्ट्युल; *अमे* -चल/ *ना* [*गण*] एक मोठा केसाळ विषारी कोळी.

target /'टागिट्/ *ना* १ [*गण*] नेमबाजीचे लक्ष्य, निशाण. २ [*गण*] टीकेचे लक्ष्य. ३ [*गण, अगण*] साध्य, लक्ष्य : *achieve a sales ~, विक्रीचे लक्ष्य गाठणे.* **target** *क्रि* [*सक*] वेध घेणे, नेम धरणे.

tariff /'टॅरिफ्/ *ना* [*गण*] १ देशात येणाऱ्य मालावर लावलेला कर, जकात (कर), प्रशुल्क २ हॉटेलातील खोलीचे भाडे, अन्नपदार्थांचे द वगैरे दाखविणारे पत्रक.

Tarmac /'टामॅक्/ *ना* [*अगण*] १ (*मालक* रस्ते बनवण्यासाठी वापरली जाणारी डांबरा कालवलेली खडी. २ **tarmac** खास करू

विमानतळावर अशी खडी पसरून तयार केलेली जागा.

tarnish /'टानिश्/ *क्रि* १ [*अक, सक*] (विशेषतः धातूच्या पत्र्यांबाबत) फिके होणे/करणे, मळकट होणे, काळे पडणे : *Brass ~es easily, पितळ लवकर काळे पडते.* २ [*सक*] (एखाद्याच्या प्रतिष्ठेला किंवा इभ्रतीला) धक्का लावणे, काळिमा फासणे.

tarpaulin /टा'पॉऽलिन्/ *ना* [*गण, अगण*] जलरोधक जड कापड किंवा त्याचे आवरण.

tart^1 /टाट्/ *ना* [*गण*] जॅम किंवा फळे घातलेला कणकेपासून बनवलेला तोंड उघडे असणारा आकाराने लहान असा गोड जिन्नस.

tart^2 /टाट्/ *वि* १ आंबटढोण. २ (*ला*) कडू, मर्मभेदक : *a ~ reply,* झोंबणारे उत्तर किंवा *सणसणीत* उत्तर. **tartly** *क्रिवि* सणसणीतपणे, कडवटपणे. **tartness** *ना* [*अगण*] सणसणीतपणा, कडवटपणा.

tart^3 /टाट्/ *ना* [*गण*] (*व्रात्य अधिक्षेपी*) बाहेरख्याली स्त्री, मुरळी. **tart** *क्रि* (*क्रिब*) **tart sb/sth up** (*अनौप अधिक्षेपी*) नटवेपणा करणे, नटणे-मुरडणे.

tartan /'टाट्न्/ *ना* [*अगण, गण*] विशेषतः स्कॉटिश कुलातील (लोकरीच्या कापडावरील) रंगीत चौकटीची नक्षी.

tartar /'टाट(र्)/ *ना* [*अगण*] दातावर साचणारे कीटण, दंतकीटण.

task /टास्क्; *अमे* टॅस्क्/ *ना* १ [*गण*] (विशेषतः नको असलेले, कठीण किंवा अंगावर पडलेले) काम. २ (*वाक्प्र*) **take sb to task** एखाद्याला फैलावर घेणे. **'task force** *ना* [*गण*] (विशेषतः लष्करी) हेतूने जमा केलेले लोक, जमवलेली सेना, खास दल. **'taskmaster** (*स्त्री* **'taskmistress**) *ना* [*गण*] इतरांना कामाला लावणारा माणूस, काम करून घेणारा माणूस.

tassel /'टॅसल्/ *ना* [*गण*] शोभेकरता वापरायचा गोंडा, दोऱ्यांचा झुबका.

taste^1 /टेइस्ट्/ *ना* १ [*अगण*] रस संवेदना, चव घेण्याची इंद्रियक्षमता, रुची. २ [*अे.व*] एखाद्या गोष्टीची गोड, खारट वगैरे प्रकारची चव, स्वाद : *Sugar has a sweet ~, साखरेची चव गोड असते.* ३ [*अे.व*] चवीपुरते घेतलेले थोडे (अन्न). ४ [*अगण*] चांगल्या, सुंदर गोष्टी निवडण्याची क्षमता, आवड : *Your choice of colours shows good ~, तुझी रंगांची निवड तुझ्या चांगल्या आवडीचे गमक आहे.* ५ [*गण, अगण*] वैयक्तिक आवड. ६ (*वाक्प्र*) **in good/bad taste** सदभिरुचीला धरून/हीन अभिरुचीचा. **a taste of one's own medicine** ➪ MEDICINE. **tasteful** *वि* चांगली आवड दाखविणारा, सदभिरुचिदर्शक. **tastefully** *क्रिवि* चांगल्या आवडी-निवडीने. **tasteless** *वि* १ (अन्नाबाबत) बेचव. २ अभिरुचिहीन. **tastelessly** *क्रिवि* अभिरुचिहीनतेने. **tasty** *वि* **(-ier, -iest)** चवदार, स्वादिष्ट.

taste^2 /टेइस्ट्/ *क्रि* १ [*सक*] चव घेणे, चवीचा आनंद उपभोगणे. २ [*अक*] (*of*)// चव असणे, चव लागणे : *~ bitter/sweet ~, कडू/गोड असणे.* ३ [*सक*] चव घेणे, चव घेऊन पाहणे : *She ~d the soup, तिने रश्श्याची चव घेऊन पाहिली.* ४ [*सक*] (*ला*) अनुभवणे : *~ freedom/success, स्वातंत्र्य/यश अनुभवणे.*

tatters /'टॅटझ्/ *ना* [*ब.व*] (*वाक्प्र*) **in tatters** **(क)** (कपड्यांबाबत) जीर्ण, फाटकेतुटके, चिंध्या झालेले, लक्तरे. **(ख)** (*ला*) ढासळलेला, संपलेला. **tattered** *वि* लक्तरे झालेला.

tattoo^1 /ट'टू; *अमे* टॅ'टू/ *क्रि* [*सक*] (कातडीवर) (चित्र किंवा नक्षी) गोंदणे. **tattoo** *ना* [*गण*] (*ब.व* ~s) गोंदलेले चित्र किंवा खूण.

tattoo^2 /ट'टू; *अमे* टॅ'टू/ *ना* [*गण*] (*ब.व* ~s) लष्कराने केलेला कवायत, संगीत वगैरेचा सार्वजनिक कार्यक्रम.

taught TEACH चा *भूत, भूत वि.*

taunt /टॉऽन्ट्/ *क्रि* [*सक*] टोमणे मारणे, घालूनपाडून बोलणे, कुजके बोलणे. **taunt** *ना* [*गण*] टोमणा, (शब्दांत मारलेला) जोडा.

taut /टॉऽट्/ *वि* घट्ट ताणलेला. **tautly** *क्रिवि* घट्ट ताणून. **tautness** *ना* [*अगण*] घट्ट ताण.

tautology /टॉऽ'टॉलजि/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) वेगवेगळ्या पद्धतीने केलेली अनावश्यक पुनरुक्ती. **tautological** /,टॉऽट'लॉजिकल्/ *वि* पुनरुक्तीयुक्त.

tavern /'टॅव्हन्/ *ना* [*गण*] (*पुरा*) सार्वजनिक

मद्यपानगृह; ग्रामीण भागातले सार्वजनिक मद्यपानगृह, दारूकेन्द्र.

tawny /'टॉऽनि/ *वि* पिवळसर तपकिरी, चहाच्या रंगाचा.

tax /टॅक्स्/ *ना* [*गण, अगण*] सरकारला सार्वजनिक कामासाठी द्यायचा पैसा, (आर्थिक) कर. **tax** *क्रि* [*सक*] १ कर आकारणे, कर बसवणे. २ एखाद्यावर कर लादणे, एखाद्याकडून कर घेणे. ३ अंत पाहणे : *~ sb's patience, एखाद्याच्या सहनशीलतेचा अंत पाहणे.* **taxable** *वि* कर बसवण्यास योग्य, करपात्र : *~able income, करपात्र प्राप्ती किंवा उत्पन्न.* **taxation** /टॅक्'सेइशन्/ *ना* [*अगण*] कर-आकारणी (पद्धती). **,tax-'free** *वि* करमुक्त. **'taxpayer** *ना* [*गण*] करदाता – विशेषतः प्राप्तिकर भरणारा.

taxi /'टॅक्सि/ *ना* [*गण*] (तसेच **'taxi-cab**) भाड्याने घ्यायची किंवा भाड्याने येणारी वाहनचालक असलेली मोटार. **taxi** *क्रि* [*अक*] (विमानाबाबत) उड्डाणापूर्वी किंवा खाली येताना जमिनीला समांतर जाणे. **'taxi rank** *ना* [*गण*] टॅक्सी स्टॅण्ड, टॅक्सी स्थानक.

tea /टी/ *ना* १ **(क)** [*अगण*] चहाची पत्ती किंवा चहाचे झाड. **(ख)** [*गण, अगण*] प्यायचा चहा. २ [*गण, अगण*] इतर वनस्पतींपासून केलेला चहा (उदा गवती चहा) किंवा काढा : *mint ~, पुदिन्याचा काढा.* ३ [*गण, अगण*] **(क)** मधल्यावेळचे खाणे. **(ख)** संध्याकाळचे लवकरचे जेवण. **'tea-bag** *ना* [*गण*] कपात घालून चहा करायची चहाची पत्ती असलेली छोटी पिशवी. **'tea-caddy** /-कॅडि/ (*ब.व* **-dies**) *ना* [*गण*] चहाचा छोटा डबा. **'tea-chest** *ना* [*गण*] फळकुट्यांचे चहाचे मोठे खोके. **'teacup** *ना* [*गण*] चहा पिण्याचा कप. **'teapot** *ना* [*गण*] चहा करून तो ठेवायचे भांडे – उदा किटली. **'tea-service** (तसेच **'tea-set**) *ना* [*गण*] चहाची भांडी, कपबशा वगैरे. **'teaspoon** *ना* [*गण*] चहा ढवळायचा चमचा, छोटा चमचा. **'teaspoonful** *ना* [*गण*] छोटा चमचाभर. **'tea-strainer** *ना* [*गण*] चहाचे गाळणे. **'tea-time** *ना* [*अगण*] चहाची वेळ. **'tea-towel** (तसेच **'tea-cloth**) *ना* [*गण*] कपबशा पुसण्याचा कपडा.

teach /टीच्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **taught** /टॉऽट्/) [*अक, सक*] (एखाद्याला) सूचना देणे, कसे करायचे ते सांगणे, शिकवणे; (ज्ञान वगैरे) देणे, अध्यापन करणे, शिकवणे : *He taught them art, त्याने त्यांना कला शिकवली* ○ *~ a child (how) to swim, लहान मुलाला पोहायला शिकवणे.* **teacher** *ना* [*गण*] विशेषतः शाळेतील शिक्षक, अध्यापक. **teaching** *ना* १ [*अगण*] शिक्षकाचे काम, शिक्षण देणे, अध्यापन : *earn a living by ~ing, अध्यापनावर चरितार्थ चालवणे.* २ [*गण, बहुधा ब.व*] शिकवण : *the ~ings of Jesus, येशूची शिकवण.*

teak /टीक्/ *ना* [*अगण*] आशियातील एका साग वृक्षाचे कडक, दणकट लाकूड.

team /टीम्/ *ना* [*गण*, तसेच ब.व क्रियापदासह अे.व] १ खेळाडूंचा संघ : *a football ~, फुटबॉलचा संघ.* २ एकत्र काम करणाऱ्यांचा गट, ताफा : *a ~ of surgeons, शल्यचिकित्सकांचा ताफा.* **team** *क्रि* [*अक*] *up (with)*// (एखाद्याबरोबर) एकत्र काम करणे. **,team 'spirit** *ना* [*अगण*] यशासाठी पूर्ण सहकार्य करणाऱ्या खेळाडूंमधील संघाबाबतची निष्ठा, सांघिक भावना. **'team-work** *ना* [*अगण*] सांघिक काम/कामगिरी.

tear^1 /टिअ(र्)/ *ना* १ [*गण,* बहुधा *ब.व*] अश्रू, आसू, टिपं. २ (*वाक्प्र*) **in 'tears** रडत, पाणावलेल्या डोळ्यांनी. **'tear-drop** *ना* [*गण*] अश्रू. **tearful** *वि* रडत किंवा रडायला आलेला, डोळ्यात पाणी आलेला, अश्रुपूर्ण डोळ्यांचा. **tearfully** *क्रिवि* अश्रुपूर्ण नेत्रांनी, डोळ्यात पाणी आणून. **'tear-gas** *ना* [*अगण*] अश्रुधूर. **tear-jerker** *ना* [*गण*] (*अनौप*) रडकी गोष्ट, रडका सिनेमा वगैरे.

tear^2 /टेअ(र्)/ *क्रि* (*भूत* **tore** /टॉऽ(र्)/, *भूत वि* **torn** /टॉऽन्/) १ [*सक*] फाडणे, तुकडे करणे : *~ a sheet of paper, कागद फाडून टाकणे.* २ [*सक*] फाडून काढून टाकणे : *~ a page out of a book, पुस्तकातून पान फाडून काढून टाकणे.* ३ [*अक*] फाटणे : *This cloth ~s easily, हे कापड लगेच फाटतं.* ४ [*अक*] धावणे; घाईने जाणे/पळणे : *We tore home, आम्ही घराकडे धावलो.* ५ [*सक*] शांतता नष्ट करणे : *a country torn by civil war, यादवी युद्धाने खिळखिळा झालेला किंवा स्थैर्य*

गमावलेला देश. ६ (*वाक्प्र*) **be torn between A and B** दोन वस्तूंतील किंवा दोन व्यक्तींतील निवड करता न येणे, इकडे आड आणि तिकडे विहीर असे होणे, संभ्रमात पडणे. ७ (*क्रिब*) **tear sth down** (इमारत) जमीनदोस्त करणे. **tear sth up** (कागदाचे) तुकडे तुकडे करणे. **tear** *ना* [*गण*] फाटून पडलेले भोक, छिद्र. **'tearaway** *ना* [*गण*] माथेफिरू किंवा भडक डोक्याचा तरुण.

tease /टीझ्/ *क्रि* [*अक, सक*] एखाद्याची थट्टा करणे, मस्करी करणे, एखाद्याला चिडवणे, गमतीने किंवा क्रूरपणे छळणे. **tease** *ना* [*गण*] थट्टेखोर माणूस, खोड्या काढणारा माणूस, छळवादी. **teaser** *ना* [*गण*] (*अनौप*) अवघड प्रश्न.

teat /टीट्/ *ना* [*गण*] १ प्राण्याचे सड. २ लहान मुलाच्या दुधाच्या बाटलीचे रबरी बूच.

tech /टेक्/ *ना* [*गण*] (*अनौप*) TECHNICAL COLLEGE (TECHNICAL) चा संक्षेप.

technical /'टेक्निक्ल्/ *वि* १ एखाद्या औद्योगिक किंवा वैज्ञानिक विषयाच्या तपशिलवार व्यावहारिक ज्ञानासंबंधीचा, तंत्रज्ञानविषयक. २ विशिष्ट विषयाचा : *the ~ terms of physics, वास्तवशास्त्र संज्ञा* म्हणजेच *वास्तवशास्त्र पारिभाषिक शब्द.* ३ तंत्रविषयक किंवा तांत्रिक. ४ कायद्याच्या काटेकोर अर्थाने, अगदी कायदेशीर अर्थाने. **'technical college** *ना* [*गण*] (ब्रिटनमधे) तांत्रिक किंवा व्यावहारिक शिक्षणाचे महाविद्यालय. **technicality** /,टेक्नि'कॅलटि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) तांत्रिक बाब किंवा मुद्दा – कधीकधी फारसा महत्त्वाचा नसलेला. **technically** /-क्लि/ *क्रिवि* तांत्रिकदृष्ट्या; कायदेशीरपणे.

technician /टेक्'निश्न्/ *ना* [*गण*] व्यावहारिक, यांत्रिक किंवा औद्योगिक कौशल्य असणारी व्यक्ती, तंत्रज्ञ, तांत्रिक.

technique /टेक्'नीक्/ *ना* १ [*गण*] एखादी गोष्ट करण्याचे तंत्र. २ [*अगण*] कला, संगीत वगैरेतील कौशल्य.

technocrat /'टेक्नक्रॅट्/ *ना* [*गण*] (बहुधा *अधिक्षेपी*) कंपनी किंवा देशाच्या साधनसामुग्रीची व्यवस्था पाहणारा तंत्रज्ञ किंवा वैज्ञानिक, तंत्रज्ञ.

technology /टेक्'नॉलजि/ *ना* [*अगण*] व्यवहारोपयोगी गोष्टींसाठी केलेला विज्ञानाचा अभ्यास आणि वापर, तंत्रविज्ञान. **technological** /,टेक्न'लॉजिक्ल्/ *वि* तंत्रवैज्ञानिक किंवा तंत्रविज्ञानविषयक. **technologist** *ना* [*गण*] तंत्रवैज्ञानिक.

teddy bear /'टेडि बेअ(र्)/ *ना* [*गण*] मऊ सुताचे किंवा मखमली असे अस्वलाचे खेळणे किंवा खेळातले अस्वल.

tedious /'टीडिअस्/ *वि* कंटाळवाणे, पाल्हाळिक आणि रटाळ : *a ~ lecture, कंटाळवाणे लंबेचवडे व्याख्यान* ○ *~ work, रटाळ काम.* **tediously** *क्रिवि* कंटाळवाणेपणाने, रटाळपणे, रँ रँ करत.

tee /टी/ *ना* [*गण*] १ (गोल्फमधे) गलीची सुरुवात करायची सपाट जागा. २ गोल्फच्या मारायच्या चेंडूखाली ठेवलेली लाकडी किंवा प्लॅस्टिकची पट्टी. **tee** *क्रि* (*क्रिब*) **tee off** टी वरून चेंडू मारणे. **tee (sth) up** (गोल्फचा चेंडू) पट्टीवर/चिपेवर ठेवणे.

teem^{1} /टीम्/ *क्रि* [*अक*] *with//* गजबजणे, विपुल प्रमाणात असणे, उधाण येणे : *The river was ~ing with fish, नदीत माशांचा सुकाळ झाला होता.*

teem^{2} /टीम्/ *क्रि* [*अक*] (*it* सह वापर) (पावसाबाबत) कोसळणे, बरसणे.

teenage /'टीनेइज्/ *वि* (इंग्रजी thirteen ते nineteen यावरून) १३ ते १९ या वयोगटातील मुलांचा : *~ fashions, पोरांच्या फॅशन्स.*

teenager /'टीनेइज(र्)/ *ना* [*गण*] १३ ते १९ वयोगटातील मुलगा किंवा मुलगी, पोरसवदा मुलगा/मुलगी.

teens /टीन्स्/ *ना* [*ब.व*] १३ ते १९ वय : *girls in their ~s, १३ ते १९ वयातल्या मुली* किंवा *पोरसवदा मुली.*

teeter /'टीट(र्)/ *क्रि* १ [*अक*] लटपटणे, लटपटत चालणे, लडबडणे.

teeth TOOTH चे *ब.व.*

teethe /टीद्/ *क्रि* [*अक*] (लहान बाळाबाबत) दुधाचे दात येणे. **'teething troubles** *ना* [*ब.व*] नवीन गोष्ट/योजना स्वीकारताना येणाऱ्या अडचणी, सुरुवातीच्या अडचणी.

teetotal /टी'टउट्ल्; *अमे* 'टीटउट्ल्/ *वि* कधीही दारू न पिणारा. **teetotaller** *ना* [*गण*] दारू न घेणारा माणूस.

telecommunications /,टेलिक,म्यूनि'केइश्न्झ्/ *ना* [*ब.व*] रेडिओ, टेलिफोन, उपग्रह वगैरेंच्या साहाय्याने दूर अंतरावर साधलेला संपर्क, दूरसंचरण.

telegram /'टेलिग्रॅम्/ *ना* [*गण*] बिनतारी यंत्रामार्फत पाठविलेला संदेश, तार.

telegraph /'टेलिग्राफ्; *अमे* -ग्रॅफ्/ *ना* [*अगण*] विद्युत्संदेश किंवा रेडिओसंदेश यांच्या आधारे दूर ठिकाणी संदेश पाठवण्याची यंत्रणा, तारायंत्र. **telegraph** *क्रि* [*अक, सक*] तारायंत्राने संदेश पाठवणे. **telegraphic** /,टेलि'ग्रॅफिक्/ *वि* बिनतारी संदेशाचा.

telepathy /टि'लेपथि/ *ना* [*अगण*] शब्दाविना एकमेकांच्या मनातले समजणे, समभावन, परचित्तज्ञान. **telepathic** /,टेलि'पॅथिक्/ *वि* परचित्तज्ञानाचा.

telephone /'टेलिफउन्/ *ना* [*गण, अगण*] वायर वापरून आणि रेडिओ लहरीमार्फत ध्वनी पाठविण्याची आणि ऐकण्याची सोय असलेली यंत्रणा (किंवा तिचे साधन), दूरध्वनी, दूरभाष. **telephone** *क्रि* [*अक, सक*] फोन करणे. **'telephone-box** (तसेच **'telephone booth**) *ना* [*गण*] सार्वजनिक टेलिफोन वापरायचे खोके. **'telephone directory** *ना* [*गण*] टेलिफोन ग्राहकांची त्यांच्या पत्त्यासह अकारविल्हे वापरून केलेली यादी, दूरध्वनी निर्देशिका. **'telephone exchange** *ना* [*गण*] दूरध्वनी केन्द्र. **'telephone number** *ना* [*गण*] दूरध्वनी क्रमांक.

telephonist /टि'लेफनिस्ट्/ *ना* [*गण*] कचेरी किंवा दूरध्वनी केन्द्र येथील टेलिफोन जोडून देण्याचे काम करणारा कर्मचारी.

telephoto lens /,टेलि'फउटउ लेन्झ्/ *ना* [*गण*] दूरवरच्या वस्तूचे छायाचित्र घेताना ते छायाचित्र मोठे आणि स्पष्ट करणारे भिंग.

telescope /'टेलिस्कउप्/ *ना* [*गण*] दूरवरच्या वस्तू मोठ्या आणि जवळ दाखविणारी भिंगे असलेले लांब नळीच्या आकाराचे एक साधन, दुर्बिण. **telescope** *क्रि* [*अक, सक*] एकमेकात घुसून/घुसवून लहान होणे/करणे: *When the trains collided, the first two carriages (were) ~d, दोन आगगाड्यांची टक्कर झाली तेव्हा पहिले दोन डबे एकमेकात घुसले.* **telescopic** /,टेलि'स्कॉपिक्/ *वि* आकार मोठा आणि स्पष्ट करणारा; एकमेकात/आत जाणारा.

teletext /'टेलिटेक्स्ट्/ *ना* [*अगण*] टेलिव्हिजनच्या पडद्यावर माहिती देणारी संगणक व्यवस्था.

television /'टेलिव्हिझ्न्/ *ना* १ [*अगण*] रेडिओलहरींच्या आधारे ध्वनी आणि प्रतिमा दूर अंतरावर पाठवण्याची किंवा पकडण्याची पद्धती, दूरदर्शन. २ [*गण*] (तसेच **television set**) दूरदर्शन (संच). **televise** /'टेलिव्हाइझ्/ *क्रि* [*सक*] दूरदर्शनवर दाखविणे.

telex /'टेलेक्स्/ *ना* १ [*अगण*] टेलिफोन लाइन्सच्या साहाय्याने जगात कुठेही टंकलिखित संदेश पाठवण्याची यंत्रणा. २ [*गण*] टेलेक्सने पाठवलेला संदेश. **telex** *क्रि* [*सक*] टेलेक्सने संदेश पाठवणे, टेलेक्स करणे.

tell /टेल्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **told** /टउल्ड्/) १ [*सक*] शब्दांत सांगणे: *I told her my name, मी तिला माझे नाव सांगितले.* २ [*सक*] आज्ञा करणे; सल्ला देणे: *I told them to go, मी त्यांना जायला सांगितलं.* ३ [*अक, सक*] (एखादी गोष्ट) पक्की माहित असणे, निश्चितपणे सांगणे: *How can you ~ which key to use? कोणती किल्ली लागते ते तुला कसं माहीत?* ४ [*सक*] माहिती देणे. ५ [*अक*] (*on*)// एखाद्यावर विपरीत परिणाम होणे: *All this hard work is ~ing on him, या सर्व कष्टाचा त्याच्यावर वाईट परिणाम दिसू लागलाय्.* ६ [*अक*] (*अनौप*) गुपित सांगणे, गुप्त गोष्ट फोडणे/सांगून टाकणे: *You promised not to ~, कुणाला सांगणार नाही असं वचन दिलं होतंस तू.* ७ (*वाक्प्र*) **all told** सर्व गोष्टी किंवा व्यक्ती लक्षात घेता. **I 'told you so** (*अनौप*) हे होईल असं मी तुला सांगितलं होतं. **tell 'tales (about sb)** (एखाद्याच्या) चुका जगजाहीर करणे, चहाड्या करणे. **tell the 'time** वेळ सांगणे, किती वाजले ते सांगणे. ८ (*क्रिब*) **tell A and B apart** दोन गोष्टीतला फरक कळणे किंवा सांगता येणे. **tell sb off** एखाद्याला चुकीबद्दल रागावणे

किंवा ओरडणे, बोलणे. **tell on sb** (*अनौप*) एखाद्या विरुद्ध एखाद्याला काही सांगणे, (चुकीबद्दल) एखाद्याचे नाव सांगणे : *John told on his sister, जॉनने बहिणीचे नाव सांगितले.* **teller** *ना* [*गण*] १ बँकेतला पैसे घेणारा आणि देणारा कर्मचारी. २ मतमोजणी करणारा. **telling** *वि* परिणामकारक, प्रभावी : *a ~ing argument, प्रभावी युक्तिवाद.*

tell-tale /'टेल्टेइल/ *ना* [*गण*] गुपित वगैरे फोडणारा माणूस. **tell-tale** *वि* उघड करणारा, सांगणारा : *a ~ blush, खूप काही सांगून जाणारे लाजणे.*

telly /'टेलि/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) (*अनौप*) TELEVISION चा संक्षेप.

temerity /टि'मेरटि/ *ना* [*अगण*] (*औप*) धिटाई, धाडस : *He had the ~ to call me a liar, मला खोटारडा म्हणण्याचं त्याचं धाडस झालं.*

temp /टेम्प्/ *ना* [*गण*] (*अनौप*) थोड्या काळासाठी नेमलेला माणूस – वि[illegible]त सचिव.

temper /'टेम्प(र्)/ *ना* १ [*गण*] मानसिक स्थिती, मनोवस्था : *in a good/bad ~, आनंदात/रागावलेले असताना.* २ [*अे.व, अगण*] चिडकेपणा, चिडचिडावस्था : *in a ~, चिडलेला.* ३ (*वाक्प्र*) **keep/lose one's temper** राग आवरणे/अनावर होणे. **temper** *क्रि* [*सक*] तीव्रता कमी करणे, पातळ करणे : *justice ~ed with mercy, दयेने पातळ झालेला न्याय.* **-tempered** /-टेम्पड्/ (विशेषण असणारा समास करताना वापर) विशिष्ट मनस्थिती असणारा : *a ˌbad'tempered man, तापट माणूस.*

temperament /'टेम्प्रमन्ट्/ *ना* [*अगण, गण*] एखाद्याच्या आचार-विचार करण्याच्या पद्धतीवरून दिसणारा त्याचा स्वभाव. **temperamental** /टेम्प्र'मेन्ट्ल्/ *वि* १ लहरी, चंचल स्वभावाचा : *Children are often ~, मुले अनेकदा लहरी असतात.* २ स्वभावजन्य. **temperamentally** /-टेलि/ *क्रिवि* स्वभावाने, स्वभावतः.

temperate /'टेम्परट्/ *वि* १ वागणुकीत सौम्य, मवाळ, शांत, दारू घेण्यातही बेताचा किंवा संयमी. २ (हवामानाबाबत) सम, फार थंड नाही की फार उष्ण नाही असे.

temperature /'टेम्प्रच(र्); *अमे* 'टेम्पर्चुअर/ *ना* १ [*गण, अगण*] तपमान. २ (*वाक्प्र*) **have a 'temperature** अंगात ताप असणे.

tempest /'टेम्पिस्ट्/ *ना* [*गण*] (*औप*) वादळ. **tempestuous** /टेम्'पेस्चुअस्/ *वि* वादळी, झंझावाती, सोसाट्याचा; तीव्रतेचा, जोराचा : (*ला*) *a tempestuous love-affair, वादळी प्रेमप्रकरण.*

temple¹ /'टेम्·प्ल्/ *ना* [*गण*] देऊळ, मंदिर, देवालय.

temple² /'टेम्·प्ल्/ *ना* [*गण*] कपाळाच्या बाजूचा भाग, कपोल.

tempo /'टेम्पउ/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s**; अर्थ २ मधे **tempi** /'टेम्पी/) १ गती, कार्याची उचल : *the ~ of city life, शहरी जीवनाची गती.* २ संगीताचा वेग, गती.

temporal /'टेम्परल्/ *वि* (*औप*) १ कालिक. २ ऐहिक जीवनाबद्दलचा, इहाचा.

temporary /'टेम्प्ररि; *अमे* -परि/ *वि* अल्पकालीन, तात्पुरता, तात्कालिक. **temporarily** /'टेम्प्ररलि; *अमे* ˌटेम्प'रेरलि/ *क्रिवि* तात्पुरते.

tempt /टेम्प्ट्/ *क्रि* [*सक*] १ एखाद्या वाईट गोष्टीकडे वळवणे, मोहात टाकणे : *Nothing could ~ her to tell lies, तिला खोटं बोलण्याचा मोह कशानेच पडू शकला नाही.* २ भुरळ पाडणे, एखादी गोष्ट करण्याकडे चित्त आकर्षणे. **temptation** /टेम्प्'टेइश्न्/ *ना* १ [*अगण*] मोह पाडणे. २ [*गण*] भुरळ पाडणारे काही. **tempting** *वि* मोहात पाडणारा, चित्ताकर्षक : *a ~ing offer, आकर्षक प्रस्ताव.*

ten /टेन्/ *सना, वि, ना* [*गण*] १०, दहा. **tenth** *सना, वि* १० वा, दहावा. **tenth** *सना, ना* [*गण*] $\frac{१}{१०}$, एक दशांश.

tenable /'टेनब्ल्/ *वि* १ (विकल्पाबाबत) समर्थनीय. २ (पद किंवा अधिकार याबाबत) विशिष्ट काळापुरता असणारा, मुदतीचा.

tenacious /टि'नेइशस्/ *वि* चिवट, चिकाटी असलेला. **tenacity** /टि'नॅसटि/ *ना* [*अगण*] चिकाटी, टिकून राहण्याची क्षमता, चिवटपणा.

tenant /'टेनन्ट्/ *ना* [*गण*] भाडेकरू, (जमिनीबाबत) कूळ. **tenancy** /-अन्सि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] जमिनीचा वगैरे भाडेपट्ट्यावर वापर. २ [*गण*] भाड्याने वापरायचा काळ.

tend^1 /टेन्ड्/ *क्रि* [*अक*] *to*// शक्यता असणे, संभवनीय असणे: *He ~s to make too many mistakes, खूप चुका करण्याकडे त्याची प्रवृत्ती आहे.*

tend^2 /टेन्ड्/ *क्रि* [*सक*] (*औप*) काळजी घेणे, राखण करणे: *Shepherds ~ing their flocks, कळपांचे राखण करणारे मेंढपाळ.*

tendency /'टेन्डन्सि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) १ एखादी गोष्ट होण्याचा संभव, प्रवृत्ती, कल: *a ~ to get fat, जाड होण्याकडे कल.* २ विशिष्ट बदल किंवा घटना घडतात ती दिशा, प्रवृत्ती: *an increasing ~ for parents to help at school, मुलाला अभ्यासात मदत करण्याची पालकांची वाढणारी प्रवृत्ती.*

tender^1 /'टेन्ड(र्)/ *वि* १ कोमल; दयाळू. २ दुखरा, हुळहुळा; संवेदनाशील. ३ नाजुक. ४ (मांसाबाबत) सहज कापता किंवा चावता येणारे, मऊ; कडक नसलेले. **tenderly** *क्रिवि* कोमलपणे; दयाळूपणे, संवेदनक्षमतेने, नाजुकपणे. **tenderness** *ना* [*अगण*] कोमलता; दयाळूपणा; हुळहुळेपणा; संवेदनशीलता; नाजुकपणा; मऊपणा.

tender^2 /'टेन्ड(र्)/ *क्रि* १ [*सक*] (*औप*) सादर करणे, देऊ करणे: *He ~ed his resignation, त्याने आपला राजीनामा देऊ केला.* २ [*अक*] (*for*)// विशिष्ट दरात एखादे काम करून देण्याचा प्रस्ताव करणे: *~ for the construction of the new motorway, नवीन मोटरमार्ग बांधण्याचे दरपत्रक/टेंडर भरणे.* **tender** *ना* [*गण*] दरपत्रक, निविदा.

tendon /'टेन्डॉन्/ *ना* [*गण*] स्नायू आणि हाड यांना बांधणारा बंध, स्नायुपुच्छ, स्नाव, कंडरा.

tenement /'टेनमन्ट्/ *ना* [*गण*] विशेषतः शहराच्या गरीब भागात खूप सदनिका (फ्लॅटस्) एकत्र असणारी मोठी इमारत, चाळ.

tenet /'टेनिट्/ *ना* [*गण*] (*औप*) तत्त्व; श्रद्धा, धर्मतत्त्व, मत.

tenner /'टेन(र्)/ *ना* [*गण*] (*ब्रि अनौप*) १० पौंड (नोट).

tennis /'टेनिस्/ *ना* [*अगण*] बांधलेल्या जाळ्यावरून रॅकेटच्या साहाय्याने चेंडू मारून खेळायचा दोघांचा किंवा चौघांचा एक खेळ. **'tennis court** *ना* [*गण*] टेनिस खेळायचे आखलेले मैदान.

tenor /'टेन(र्)/ *ना* [*गण*] १ (क) पुरुषाचा सर्वसाधारण असा उंच किंवा खडा आवाज (असलेला गायक किंवा गायन). (ख) (वाद्यांबाबत) पुरुषाच्या उंच आवाजाची पट्टी असलेला: *a ~ saxophone, पुरुषाच्या उंच आवाजाची पट्टी असणारा सॅक्सफोन.* २ (*औप*) सर्वसाधारण अर्थ.

tenpin bowling /ˌटेन्पिन् 'बउलिङ्/ *ना* [*अगण*] दहा बाटलीच्या आकाराचे ठोकळे चेंडू सरपटत टाकून पाडायचा खेळ.

tense^1 /टेन्स्/ *वि* (**~r, ~st**) १ ताणलेला. २ काळजीत किंवा चिंताग्रस्त असलेला, तणावपूर्ण. **tense** *क्रि* [*अक, सक*] आवळणे, ताणणे: *He ~d his muscles, त्याने स्नायू आवळले.* **tensely** *क्रिवि* काळजीने, मानसिक तणावाच्या अवस्थेत.

tense^2 /टेन्स्/ *ना* [*गण*] (*व्याकरण*) क्रियेचा काळ दाखविणारे क्रियापद रूप, काळ: *the present/past/future ~, वर्तमान/भूत/भविष्य काळ.*

tension /'टेन्·श्न्/ *ना* १ [*अगण*] ताण: *the ~ of the rope, दोराचा ताण.* २ [*अगण*] मानसिक किंवा भावनिक ताण. ३ [*अगण, गण, बहुधा ब.व*] तणावाची परिस्थिती: *political ~s, राजकीय तणावाची परिस्थिती.* ४ [*अगण*] विद्युत दाब: *high ~ cables, मोठ्या विद्युत दाबाच्या तारा.*

tent /टेन्ट्/ *ना* [*गण*] तंबू, राहुटी.

tentacle /'टेन्टक्ल्/ *ना* [*गण*] (ऑक्टोपस किंवा अष्टपादसारख्या) प्राण्याचे संवेदना घेणे, पकडणे वगैरेसाठी वापरले जाणारे दोऱ्यांसारखे अवयव, स्पर्शक, सोंड.

tentative /'टेन्टटिव्ह्/ *वि* एखादी गोष्ट तपासण्यासाठी केलेला, चाचपणीचा; अनिश्चित, पक्का न झालेला, अस्थायी, तात्पुरता: *make a ~ offer, तात्पुरत्या स्वरूपाचा प्रस्ताव करणे.* **tentatively** *क्रिवि* तेवढ्यापुरते, ढोबळमानाने, तात्पुरते.

tenterhooks /'टेन्टहुक्स्/ *ना* (*वाक्प्र*) **(be) on 'tenterhooks** आतुरतेने वाट पाहण्याच्या अवस्थेत असणे, मन सैरभैर होणे.

tenth ➪ TEN.

tenuous /'टेन्युअस्/ *वि* तकलादू, जुजबी, वरवरचा; क्षीण : *a ~ relationship, क्षीण संबंध.*

tepid /'टेपिड्/ *वि* किंचित गरम, कोमट.

term /टऽम्/ *ना* १ [*गण*] पाळी, सत्र, ठराविक काळ, मुदत : *the president's ~ of office, अध्यक्षपदाची मुदत.* २ [*गण*] शालेय किंवा विद्यापीठीय वर्षाचा भाग – सहामाही वगैरे : *end-of-~ exams, सहामाही वगैरे परीक्षा.* ३ [*गण*] पारिभाषिक शब्द, विशेष संज्ञा : *technical ~, तांत्रिक परिभाषेतला शब्द.* ४ **terms** [*ब.व*] (क) कराराच्या अटी, कलमे. (ख) विक्रीच्या किंवा पैसे भरायच्या अटी. ५ **terms** [*ब.व*] व्यक्त करण्याची पद्धती, सांगण्याचा मार्ग : *I'll explain this in general ~s first, प्रथम मी नेहमीच्या सामान्य भाषेत हे स्पष्ट करीन.* ६ (*वाक्प्र*) **be on good, friendly, bad 'terms with** एखाद्याशी चांगले, मित्रत्वाचे, वाईट संबंध असणे. **come to terms with sth** (अप्रिय किंवा कठीण गोष्टीशी) मिळवून घेण्याचे शिकणे, जुळवून घेणे. **in the 'long/'short term** दीर्घ/अल्प काळामध्ये. **in terms of sth** एखाद्या गोष्टीबाबत किंवा एखाद्या गोष्टीच्या संदर्भात : *in ~s of economics, अर्थकारणाबाबत.* **term** *क्रि* [*सक*] नाव देणे, म्हणणे.

terminal /'टऽमिन्ल्/ *वि* असाध्य रोगाचा. **terminal** *ना* [*गण*] १ माल किंवा उतारू यांसाठी असणारी खास करून विमानतळ किंवा बंदरावरील इमारत. २ संगणकात माहिती घालण्याचे किंवा संगणकातून माहिती घेण्याचे साधन. **terminally** /-नलि/ *क्रिवि* कायमचा, असाध्य रोगाच्या अवस्थेत.

terminate /'टऽमिनेइट्/ *क्रि* [*अक, सक*] संपुष्टात येणे/आणणे, संपविणे, समाप्त करणे. **termination** /,टऽमि'नेइश्न्/ *ना* [*अगण, गण*] संपविणे, अंत, समाप्ती : *the termination of a contract, कराराची समाप्ती.*

terminology /,टऽमि'नॉलजि/ *ना* [*अगण, गण*] (*ब.व* **-ies**) विशिष्ट विषयाची परिभाषा.

terminus /'टऽमिनस्/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ni** /-नाइ/ किंवा **~es**) रेल्वेचा किंवा बसचा अखेरचा थांबा.

termite /'टऽमाइट्/ *ना* [*गण*] लाकूड खाणारा मुंगीसारखा कीटक, वाळवी.

terrace /'टेरस्/ *ना* [*गण*] १ एकमेकांना लागून बांधलेल्या घरांची रांग. २ घराजवळची सपाट, मोकळी जागा. ३ टेकडीवरची सपाटीची पायरी, मजगी. ४ फुटबॉल वगैरेच्या मैदानावर प्रेक्षकांसाठी उभे राहण्याच्या प्रशस्त पायऱ्या. **terrace** *क्रि* [*सक*] घरांची रांग करणे : *~d houses, एका ओळीत चिकटून असणारी घरे.*

terrain /ट'रेइन्, 'टेरेइन्/ *ना* [*गण, अगण*] भूभाग : *hilly ~, डोंगराळ भाग.*

terrestrial /ट'रेस्ट्रिअल्/ *वि* १ भूचर, जमिनीवर राहणारा. २ पृथ्वीवरचा.

terrible /'टेरब्ल्/ *वि* १ भयानक, भयंकर, रौद्र, भीषण : *a ~ war/accident, भीषण युद्ध/अपघात.* २ असह्य; कमालीचा : *~ toothache, भयानक दातदुखी.* ३ (*अनौप*) फार वाईट, भिकार : *What ~ food! काय भयानक अन्न!* **terribly** *क्रिवि* (*अनौप*) फार, अतिशय : *terribly busy, भयानक कामात (गर्क) असलेला.*

terrier /'टेरिअ(र्)/ *ना* [*गण*] आकाराने लहान पण चपळ अशा जातीचा कुत्रा.

terrific /ट'रिफिक्/ *वि* (*अनौप*) १ प्रचंड : *a ~ storm, प्रचंड वादळ.* २ आश्चर्यकारक. **terrifically** *क्रिवि* खूप; आश्चर्यकारकपणे.

terrify /'टेरिफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] घाबरवून सोडणे, भिववणे : *I'm terrified of dogs, मला कुत्र्यांची फार भीती वाटते.*

territorial /,टेर'टॉऽरिअल्/ *वि* प्रादेशिक.

territory /'टेरट्रि; *अमे* -टॉऽरि/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) १ एखाद्या देशाचा, शासनकर्त्याचा वगैरे प्रदेश, टापू : *Spanish ~, स्पॅनिश टापू.* २ एखाद्या माणसाच्या किंवा प्राण्याच्या सत्तेचा आणि त्याने राखलेला भाग, टापू, हद्द. ३ एखाद्याच्या जबाबदारीचा प्रांत.

terror /'टेर(र्)/ *ना* (क) [*अगण*] दहशत. (ख) [*गण*] दहशत बसवणारी गोष्ट. **terror-**

ism /-रिझम्/ *ना* [*अगण*] राजकीय हेतूंसाठी अवलंबिलेला हिंसाचारी मार्ग, दहशतवाद, हिंसाचार. **terrorist** *वि, ना* [*गण*] दहशतवादी. **terrorize** *क्रि* [*सक*] दहशत घालणे.

terse /टऽस्/ *वि* कमी आणि बहुधा तुटक भाषेतला, सक्त. **tersely** *क्रिवि* सक्तपणे. **terseness** *ना* [*अगण*] सक्तपणा, रोखठोकपणा.

test /टेस्ट्/ *ना* [*गण*] १ वस्तूच्या किंवा व्यक्तीच्या गुणवत्तेची परीक्षा, चाचणी, कसोटी : *a 'driving ~, वाहन चालवायची परीक्षा* ○ *a 'blood ~, रक्ततपासणी.* २ एखाद्या व्यक्तीच्या बुद्धिमत्तेची किंवा क्षमतेची परीक्षा. **test** *क्रि* [*सक*] एखाद्याची एखाद्या गोष्टीबाबत परीक्षा घेणे, चाचणी घेणे. **'test match** *ना* [*गण*] आंतरराष्ट्रीय क्रिकेट किंवा रगबी मॅच, कसोटी सामना. **'test-tube** *ना* [*गण*] रसायनांच्या प्रयोगांत वापरायची, एक तोंड बंद असलेली काचेची नळी, परीक्षानलिका.

testament /'टेस्टमन्ट्/ *ना* [*गण*] (*औप*) १ (*to*)// एखादी गोष्ट सिद्ध करणारी वस्तू, एखादी गोष्ट दाखवून देणारी बाब, निशाणी. २ **Testament** बायबलच्या जुन्या आणि नव्या अशा दोन भागांतील एक भाग : *the New T~, बायबलचा नवा भाग* किंवा *ख्रिस्ताचे जीवन आणि धर्म सांगणारा भाग.*

testicle /'टेस्टिक्ल्/ *ना* [*गण*] पुरुषाच्या अंडातील/लंडातील शुक्रजंतू निर्माण करणाऱ्या दोन ग्रंथींपैकी एक ग्रंथी, वृषण, अंड.

testify /'टेस्टिफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*अक, सक*] १ विशेषतः न्यायालयात शपथेवर साक्ष देणे. २ (*to*)// (*औप*) सत्यता पटवणे.

testimonial /,टेस्टि'मउनिअल्/ *ना* [*गण*] १ एखाद्याचे चारित्र्य, त्याची क्षमता, गुणवत्ता वगैरे विषयीचे अधिकृत पत्र, प्रशस्तिपत्र. २ सन्मान किंवा आभार व्यक्त करण्यासाठी एखाद्याला अर्पण केलेली वस्तू, मानपत्र.

testimony /'टेस्टिमनि; *अमे* -मउनि/ *ना* [*अगण, गण*] (*ब.व* **-ies**) कोर्टातील शपथेवर दिलेली साक्ष, जबानी.

tetanus /'टेटनस्/ *ना* [*अगण*] कापून झालेल्या जखमेतून लागण होऊन स्नायू आखडणारा एक गंभीर रोग, धनुर्वात.

tête-à-tête /,टेइट् आ 'टेइट्/ *ना* [*गण*] दोन व्यक्तींमधील खाजगी संभाषण, हितगुज.

tether /'टेद(र्)/ *ना* [*गण*] जनावराला बांधायची दोरी किंवा साखळी, दावे. **tether** *क्रि* [*सक*] दाव्याला बांधणे.

text /टेक्स्ट्/ *ना* १ [*अगण*] पुस्तकातला मुख्य छापील मजकूर. २ [*गण*] वक्त्याचे, लेखकाचे वगैरे मूळ शब्द. ३ [*गण*] पाठ्यपुस्तक, अभ्यासाला लावलेले नाटकाचे वगैरे पुस्तक. ४ [*गण*] प्रवचनाचा विषय म्हणून वापरलेला बायबलमधील वगैरे उतारा. **'textbook** *ना* [*गण*] एखाद्या विषयाची माहिती देणारे पुस्तक, पाठ्यपुस्तक. **textual** /'टेक्स्चुअल्/ *वि* (*औप*) पाठ्यपुस्तकातील, पाठ्यपुस्तका-संबंधीचा.

textile /'टेक्स्टाइल्/ *ना* [*गण, विशेषतः ब.व*] विणलेले कापड.

texture /'टेक्स्च(र्)/ *ना* [*गण, अगण*] कापडाचा पोत, वीण.

than /दन् क्वचित अधिक बलयुक्त रूप दॅन्/ *उ.अव्यय, शब्दयो* १ (तुलनेचा दुसरा भाग सांगताना वापर) -हून, -ऊन, -पेक्षा : *Sylvia is taller ~ me, सिल्व्हिया माझ्याहून जास्त उंच आहे.* २ -ऊन, -हून, -पेक्षा (*more* आणि *less* नंतर आणि काळ, अंतर वगैरे दाखविणाऱ्या शब्दांपूर्वी वापर) : *It cost more ~ £100, १०० पौंडापेक्षा त्याला जास्त पडले* ○ *It's less ~ a mile to the station, स्टेशन येथून मैलापेक्षा कमी अंतरावर आहे.*

thank /थॅङ्क्/ *क्रि* १ [*सक*] कृतज्ञता व्यक्त करणे. २ (*वाक्प्र*) **,no, 'thank you** (देऊ केलेले विनम्रपणे नाकारताना). **'thank you** (कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी किंवा देऊ केलेले स्वीकारताना वापर) आभारी आहे. **thankful** *वि* कृतज्ञ. **thankfully** *क्रिवि* कृतज्ञतेने. **thankless** *वि* काही शाबासकी वगैरे न मिळणारा, फुकटचा : *a ~ task, फुकटचे राबणे.* **thanks** *ना* [*ब.व*] १ कृतज्ञतेचे शब्द, आभार. २ (*वाक्प्र*) **thanks to sb/sth** एखाद्यामुळे, एखाद्याच्या कृपेने. **thanks** *उद्गा* (*अनौप*) आभारी आहे. **'thanksgiving** *ना* [*गण, अगण*] १ विशेषतः देवाचे मानलेले

आभार. २ **Thanksgiving (Day)** अमेरिका आणि कॅनडातला सुट्टीचा दिवस.

that^1 /दॅद्/ *वि, सना* (*ब.व* **those** /दउझ़्/) १ निर्देश केलेली, माहित असलेली किंवा समजलेली वस्तू किंवा व्यक्ती – विशेषतः एखाद्या गोष्टीहून अधिक दूर असलेली, तो/ती/ते : *Look at ~ man standing there, त्या तिकडे उभ्या असलेल्या त्या माणसाकडे पाहा* ○ *Those are nice hats, त्या टोप्या छान आहेत.* २ (*वाक्प्र*) **that is (to say)** (एखाद्या गोष्टीचे लहानसहान तपशील देताना वापर) म्हणजे. **that** *क्रिवि* इतका; एवढा : *The film wasn't ~ bad, सिनेमा इतका काही वाईट नव्हता.*

that^2 /दद्; क्वचित् अधिक बलयुक्त रूप दॅद्/ *उ.अव्यय* (विविध गौणवाक्यांच्या सुरुवातीला वापर) असे : *She said ~ she would come, ती येईन असं म्हणाली.*

that^3 /दद्; क्वचित् अधिक बलयुक्त रूप दॅद्/ *संबंधी सर्वनाम* १ (क्रियापदाचा कर्ता) : *You're the only person ~ can help me, मला मदत करू शकणारा असा तूच एक माणूस आहेस.* २ (क्रियापदाचे कर्म – बहुधा लुप्त असलेले) : *The pen ~ you gave me is a nice one, तू मला दिलेले पेन फार छान आहे.*

thatch /थॅच्/ *ना* [*गण, अगण*] वाळवलेल्या गवताचे छप्पर. **thatch** *क्रि* [*सक*] गवताने शाकारणे.

thaw /थॉऽ/ *क्रि* १ [*अक, सक*] (बर्फ किंवा हिमाबाबत) वितळणे, पाघळणे किंवा वितळवणे. २ [*सक*] वितळवून मऊ किंवा पातळ करणे : *~ frozen food, गोठवलेले अन्न पातळ करणे.* ३ [*अक*] (*ला*) अधिक मित्रत्वाच्या नात्याने वागणे, पाघळणे. **thaw** *ना* [*गण, बहुधा अे.व*] हिमाचे पाणी करणारी कोमट हवा.

the /द, दि; अधिक बलयुक्त रूप दी/ *निश्चिततादर्शी उपपद* १ (विशिष्ट गोष्टीचा निर्देश करताना वापर) : *T~ sky was blue, आकाश निळं होतं* ○ *Please close ~ window, जरा (ती) खिडकी लाव.* २ उल्लेखित जातीचे सर्व – लोक, वस्तू वगैरे, अखिल : *T~ dog is a popular pet, कुत्रा* (म्हणजेच सर्व कुत्री) *हा लोकप्रिय म्हणजे सर्वांना आवडणारा प्राणी आहे.* ३ (विशिष्ट वर्ग किंवा विशिष्ट राष्ट्रीयत्वाच्या माणसांचा गट यांचा उल्लेख करताना वापर) : *~ rich, श्रीमंत वर्ग* ○ *~ French, फ्रेंच लोक.* ४ (विशिष्ट भौगोलिक स्थलांच्या वगैरे नावांपूर्वी वापर) : *~ Mediterranean, भूमध्य समुद्र* ○ *~ Atlantic (Ocean), अटलांटिक समुद्र* ○ *the Ganges, गंगा नदी.* ५ (वाद्यांच्या नावांबरोबर वापर) : *play ~ piano, पियानो वाजवणे.* ६ (मोजण्याच्या परिमाणाबरोबर वापर) प्रत्येक, दर : *paid by ~ hour,* दर *तासाप्रमाणे* पैसे म्हणजेच *तासावर मजुरी.* ७ (उच्चतमभावदर्शकासह वापर) : *~ best day of your life, तुझ्या आयुष्यातील सर्वोत्तम दिवस.* **the** *क्रिवि* (तुलनेत संबंध दाखविण्यासाठी वापर) : *T~ more I read, ~ less I understand, मी जेवढं जास्त वाचतो/वाचते तेवढं कमी मला समजतं.*

theatre (*अमे* **theater**) /'थिअट(र्)/ *ना* १ [*गण*] नाट्यगृह, रंगमंदीर. २ **the theatre** [*अे.व*] नाट्याभिनय, नाट्यनिर्मिती वगैरे कामे, नाट्य व्यवसाय. ३ [*गण*] व्याख्यानासाठीचे सभागृह. ४ [*गण*] = OPERATING-THEATRE (OPERATE). **'theatre-goer** *ना* [*गण*] नाट्यवेडा, नाटकांना जाणारा माणूस, नाट्यप्रेमी. **theatrical** /थि'ॲट्रिक्ल्/ *वि* १ नाट्यगृहाचा. २ नैसर्गिक नाही असा, कृत्रिम, देखाव्यापुरता, नाटकीपणाचा.

theft /थेफ्ट्/ *ना* [*गण, अगण*] चोरी, चोरी करणे.

their /देअ(र्)/ *वि* त्यांचा : *They have lost ~ dog, त्यांचा कुत्रा हरवलाय्.* **theirs** /देअझ़्/ *सना* त्यांचा : *That dog is ~, not ours, तो कुत्रा त्यांचाय्, आमचा नाहीये.*

them /दम्; अधिक बलयुक्त रूप देम्/ *सना* १ (क्रियापद किंवा शब्दयोगी यांचे कर्म म्हणून वापर) पूर्वी निर्देश केलेली माणसे, प्राणी किंवा वस्तू : *If you have brought her books, give ~ to me, तू तिची पुस्तके आणली असलीस तर ती मला दे* ○ *We had bought twenty cakes. Did you eat all of ~? आम्ही वीस केक आणले होते. तू ते सर्व खाल्लेस?* २ (*अनौप*) त्याला किंवा तिला, त्यांना : *If someone comes in, ask ~ to wait, कुणी आलं तर त्यांना थांबायला सांग.*

theme /थीम्/ *ना* [*गण*] १ पुस्तकाचा, भाषणाचा वगैरे विषय. २ संगीतरचनेतील पुन्हापुन्हा वापरलेली स्वररचना किंवा चाल. **'theme park** *ना* [*गण*] एकाच कल्पनेवर आधारित असे बसविलेले पाळणे, चक्रे वगैरे असणारी बाग. **'theme song** *ना* [*गण*] नाटक, चित्रपट वगैरेमधे पुन्हापुन्हा येणारे गाणे.

themselves /दम्'सेल्व्ह्झ/ *सना* १ (माणसे किंवा प्राणी करत असलेल्या कृतीचा परिणाम त्यांच्यावरच होत असेल तेव्हा आत्मवाचक म्हणून वापर) त्यांनी स्वतःला : *They 'hurt ~, त्यांनी स्वतःलाच अपाय करून घेतला.* २ (भर/जोर देण्यासाठी वापर) : *They ~ have often made that mistake, त्यांनी स्वतःच ती चूक अनेकदा केलीये.* ३ (*वाक्प्र*) **(all) by them'selves** (क) एकट्यानीच. (ख) दुसऱ्याच्या मदतीशिवाय.

then /देन्/ *क्रिवि* १ त्यावेळी : *I was still unmarried ~, मी त्यावेळी अविवाहित होतो.* २ नंतर; त्या पाठोपाठ : *We stayed in Rome and ~ in Naples, आम्ही रोममधे राहिलो आणि नंतर नेपल्समधे.* ३ तर मग; म्हणून : *'It isn't here.' 'T~ it must be in the car.' 'ते इथं नाहीये.' 'तर मग ते गाडीतच असलं पाहिजे.'* ४ आणि शिवाय, तसेच : *There's the soup to heat, ~ there's the bread to butter, रस्सा गरम करायचाय् आणि शिवाय पावाला लोणी लावायचंय्.*

thence /देन्स्/ *क्रिवि* (*पुरा* किंवा *औप*) तेथून.

theology /थि'ऑलजि/ *ना* [*अगण*] धर्म आणि परमेश्वर यांचा अभ्यास, धर्मशास्त्र, ईश्वरविद्या. **theologian** /,थिअ'लउजन्/ *ना* [*गण*] धर्मशास्त्रवेत्ता. **theological** /,थिअ'लॉजिक्ल्/ *वि* धर्मशास्त्रविषयक.

theorem /'थिअरम्/ *ना* [*गण*] युक्तिवादाने सिद्ध करता येईल असे गणिती विधान, प्रमेय, सिद्धान्त.

theory /'थिअरि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*गण*] वास्तविके किंवा घटना विशद करून सांगणाऱ्या तर्कसंगत कल्पनांचा संच, सिद्धान्त, उपपत्ती : *Darwin's ~ of evolution, डार्विनचा उत्क्रान्तिवादाचा सिद्धान्त.* २ [*अगण*] एखाद्या गोष्टीची तत्त्वे – प्रत्यक्ष व्यवहार नाही. **theoretical** /,थिअ'रेटिक्ल्/ *वि* सैद्धान्तिक; केवळ तात्त्विक.

therapeutic /,थेर'प्यूटिक्/ *वि* रोगोपचारविषयक, रोगचिकित्सेचा.

therapy /'थेरपि/ *ना* [*अगण*] रोगोपचार, रोगचिकित्सा. **therapist** *ना* [*गण*] रोगोपचारतज्ज्ञ.

there^1 /देअ(र्)/ *क्रिवि* १ तेथे, त्या ठिकाणी, त्या जागी : *We'll soon be ~, आपण लवकरच तेथे पोहोचू.* २ कथेतील वगैरे त्या स्थळी, त्या टप्प्यावर : *Don't stop ~! मधे थांबू नकोस (पुढे सांग)!* ३ (एखाद्या गोष्टीकडे लक्ष वेधण्यासाठी वापर) : *T~'s the bell for lunch, जेवायची घंटा झाली पाहा.* ४ (*वाक्प्र*) **,there and 'then** त्या जागी आणि त्या वेळी, जागच्या जागी. **there** *उद्गा* १ (विजयाचा हर्ष, खेद, प्रोत्साहन वगैरे व्यक्त करण्यास वापर) : *T~! you've woken the baby! छान्!/झालं! उठवून ठेवलंस बाळाला!* २ (लहान मुलाला समजवताना वापर) : *T~, ~! You'll soon feel better, उगी! उगी! तुला लवकर बरं वाटेल हं!*

there^2 /द(र्); अधिक बलयुक्त रूप देअ(र्)/ *क्रिवि* (क्रियापदाचा – विशेषतः *be* या क्रियापदाचा – कर्ता म्हणून वापर) : *T~'s a man at the door, दारावर कुणी मनुष्य आलाय्.*

thereabouts /'देअरबाउट्स्/ *क्रिवि* -च्या आसपास.

thereafter /,देअर्'आफ्टट(र्); *अमे* -ॲफ्-/ *क्रिवि* (*औप*) त्यानंतर, तदनंतर, तत्पश्चात्.

thereby /,देअ'बाइ/ *क्रिवि* (*औप*) त्यायोगे, त्यामुळे.

therefore /'देअफॉऽ(र्)/ *क्रिवि* त्या कारणाने, म्हणून, त्यामुळे.

thereupon /,देअर'पॉन्/ *क्रिवि* (*औप*) तात्काळ, ताबडतोब; अतएव, परिणामतः.

thermal /'थऽम्ल्/ *वि* १ उष्णतेचा, उष्णताजन्य, औष्णिक. २ (कपड्यांबाबत) उबदार.

thermometer /थ'मॉमिट(र्)/ *ना* [*गण*] तपमापक, तापमापक.

Thermos (तसेच **Thermos flask**

/'थऽमस्/ *ना* [*गण*] (*मालक*) निर्वात पोकळीत बसवलेली एक प्रकारची बाटली.

thermostat /'थऽमस्टॅट्/ *ना* [*गण*] एखादी इमारत, इंजिन वगैरे विशिष्ट तपमानात ठेवणारे साधन, तपमान नियंत्रक, तापनियंत्रक.

thesaurus /थि'सॉऽरस/ *ना* [*गण*] (*ब.व* **~es** किंवा **-ri** /-राइ/) अर्थक्षेत्रानुसार रचलेला शब्दकोश.

these ➪ THIS.

thesis /'थीसिस्/ *ना* [*गण*] (*ब.व* **theses** /'थीसीझ्/) १ कारणमीमांसा देणारा किंवा समर्थन देणारा सिद्धान्त, पक्ष. २ विद्यापीठाच्या पदवीसाठी एखाद्या विषयावर लिहिलेला प्रबंध.

they /देइ/ *सना* (क्रियापदाचा कर्ता म्हणून वापर) १ आधी उल्लेख केलेले लोक, प्राणी किंवा वस्तू, ते, त्या, ती. २ सर्वसाधारण लोक, माणसे : *T~ say we're going to have a hot summer, लोक म्हणतात की यंदा उन्हाळा कडक असणार.* ३ (*अनौप*) (*he* किंवा *she* ऐवजी वापर) : *If anyone comes late, ~'ll have to wait, कुणी उशिरा आलं तर त्यांना थांबायला लागेल.*

they'd /देइड्/ १ they had ➪ HAVE. २ they would ➪ WILL^1, WOULD^1.

they'll /देइल्/ they will ➪ WILL^1.

they're /'देअ(र्)/ they are ➪ BE.

they've /देइव्ह्/ they have ➪ HAVE.

thick /थिक्/ *वि* १ जाड, मोठा : *a ~ slice of bread, पावाचा जाड तुकडा* ○ *a wall 2 feet ~, दोन फूट जाडीची भिंत.* २ दाट, घनदाट : *~ hair, दाट केस* ○ *a ~ forest, दाट जंगल.* ३ (द्रवाबाबत) घट्ट; सहज न वाहणारा. ४ पलीकडे पाहता येणार नाही असा, दाट : *a ~ fog, दाट धुके.* ५ (*अनौप*) मूर्ख, वेडा. **thick** *क्रिवि* १ जाड थर देऊन, भरपूर : *spread the butter too ~, लोण्याचा जाड थर लावणे.* २ (*वाक्प्र*) **,thick and 'fast** चटकन् आणि मोठ्या प्रमाणावर, भरभर आणि खूप. **thick** *ना* (*वाक्प्र*) **in the thick of sth** एखाद्या गोष्टीच्या धामधुमीत, ऐन. **through ,thick and 'thin** बऱ्यावाईट परिस्थितीत, सुखदुःखात. **thicken** *क्रि* [*अक, सक*] घट्ट होणे/करणे, साकळणे : *~en the soup, रस्सा आहळणे.* **thickly** *क्रिवि* जाडपणे; दाटपणे; घट्ट असा. **thickness** *ना* १ [*अगण*] जाडी : *4 centimetres in ~ness, चार सेंटीमीटर जाडीचा.* २ [*गण*] थर. **,thick'set** *वि* आडमाप शरीराचा, मोठ्या हाडापेराचा. **,thick-'skinned** *वि* टीकेचा काहीही परिणाम न होणारा, गेंड्याच्या कातडीचा.

thicket /'थिकिट्/ *ना* [*गण*] झाडाझुडपांचे माजलेले रान, जाळी.

thief /थीफ्/ *ना* [*गण*] (*ब.व* **thieves** /थीव्ह्झ्/) चोर. **thieve** /थीव्ह्/ *क्रि* [*अक, सक*] चोरी करणे, चोरणे.

thigh /थाइ/ *ना* [*गण*] मांडी, जांघ.

thimble /'थिम्ब्ल्/ *ना* [*गण*] शिवणकाम करताना बोटाच्या सुरक्षिततेसाठी त्यावर घालायची प्लॅस्टिक किंवा धातूची टोपी.

thin /थिन्/ *वि* (**~ner, ~nest**) १ पातळ. २ जाड नसलेला, बारीक, लुकडा. ३ (द्रवाबाबत) पाणी घालून पातळ झालेला : *~ soup, पातळ (बुळुक) रस्सा.* ४ संख्येने कमी आणि लांबलांब, विरळ : *~ hair, पातळ/विरळ केस* ○ *The audience is rather ~ tonight, आजच्या रात्रीला प्रेक्षक जरा विरळ/कमी आहेत.* ५ मधून सहजपणे पाहता येईल असा : *a ~ mist, विरळ धुके.* ६ अशक्त, क्षीण, न पटणारा, कमकुवत : *a ~ excuse, थातुरमातुर सबब.* ७ (*वाक्प्र*) **the thin end of the 'wedge** वरून क्षुल्लक पण अंती महत्त्वाचे आणि बहुधा घातक ठरणारे असे काही. **thin** *क्रिवि* पातळपणे, अगदी बारीक असा : *cut the bread too ~, पाव फारच पातळ कापणे.* **thin** *क्रि* (**-nn-**) [*अक, सक*] पातळ होणे/करणे; विरळ होणे/करणे. **thinly** *क्रिवि* पातळ असा; विरळपणे. **thinness** *ना* [*अगण*] पातळपणा; लुकडेपणा; विरळपणा; क्षीणपणा, कमकुवतपणा.

thing /थिङ्/ *ना* १ [*गण*] कोणतीही अनामिक वस्तू, बाब, चीज, गोष्ट : *What is that ~ on the table? टेबलावर ते काय (चीज) आहे?* २ **things** [*ब.व*] (क) स्वतःच्या/वैयक्तिक गोष्टी, कपडे वगैरे : *Bring your swimming ~s, तुझे पोहायचे कपडे वगैरे/सामान आण.* (ख) एकंदर आयुष्य, जिणं, जीवन :

How are ~s? तुझं कसं काय चाललंय्? ३ [*गण*] काम, कार्य. ४ [*गण*] विषय, गोष्ट: *There's another ~ I want to ask you about, दुसऱ्या एका विषयावर/गोष्टीबाबत मला तुला विचारायचं आहे.* ५ [*गण*] (माणूस किंवा प्राण्याबाबत वापर): *She's a sweet little ~, ती एक गोड मुलगी आहे.* ६ **the thing** [*अे.व*] (क) सर्वात जास्त सोयीचा, चांगला: *A holiday will be just the ~ for you, एक सुट्टी तुला फार चांगली ठरेल म्हणजे त्याची तुला गरज आहे.* (ख) फॅशनेबल किंवा लोकप्रिय असे काही. ७ (*वाक्प्र*) **for 'one thing** (कारण सांगताना वापर). **have a thing about sb/sth** (*अनौप*) एखाद्या व्यक्ती किंवा वस्तूबाबत तीव्र भावना असणे – विशेषतः नावड असणे, तिटकारा असणे. **the ,thing 'is** प्रश्न असा आहे.

think /थिङ्क्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **thought** /थॉऽट्/) १ [*अक*] विचार करणे. २ [*सक*] वाटणे, मत असणे; समजणे: *Do you ~ it's going to rain? पाऊस पडेल असं तुला वाटतं?* ३ [*सक*] कल्पना करणे: *I can't ~ why he came, तो का आला याची कल्पना करता येत नाही.* ४ [*सक*] योजना/बेत असणे: *I ~ I'll go for a swim, पोहायला जाण्याचा माझा विचार/बेत आहे.* ५ (*वाक्प्र*) **think a'loud** मोठ्याने बोलत विचार करणे, बोलत असताना विचार करणे, मनात येणारे विचार सांगत राहणे. **think better of (doing) sth** एखादी गोष्ट विचार करून न करण्याचे ठरवणे. **think highly, a lot, a litile, etc of sb/sth** एखाद्या विषयी चांगले, वाईट वगैरे मत असणे: *I don't ~ much of our new teacher, आपल्या नवीन शिक्षकांविषयी माझं फारसं चांगलं मत नाही म्हणजेच माझं वाईट मत आहे.* **think nothing of sth** एखादी गोष्ट खूप सोपी किंवा सामान्य समजणे, एखाद्या गोष्टीचं नवल न वाटणे. ६ (*क्रिब*) **think about sth** एखाद्या गोष्टीचा नीट विचार करणे. **think of sth** (क) विचार करणे. (ख) एखादा बेत आखणे: *We're ~ing of going to Venice, व्हेनिसला जाण्याचा आमचा बेत/विचार चाललाय्.* (ग) एखाद्या गोष्टीची कल्पना करणे: *Just ~ of the cost! किमतीची नुसती कल्पनाच कर!* (घ) एखादी गोष्ट आठवणे: *I can't ~ of her name, मला नाही आठवत तिचं नाव.* **think sth out/through** एखाद्या गोष्टीचा सर्व बाजूंनी पूर्ण विचार करणे. **think sth over** निर्णय घेण्यापूर्वी एखाद्या गोष्टीचा नीट विचार करणे. **think sth up** (नवीन युक्ती, योजना वगैरे) शोधून काढणे. **think** *ना* [*अे.व*] (*अनौप*) विचार करणे.

thinker /'थिङ्क(र्)/ *ना* [*गण*] विचारवंत: *a great ~, मोठा विचारवंत.*

thinking /'थिङ्किङ्/ *ना* [*अगण*] विचार; मत. **thinking** *वि* हुशार आणि विचारी.

third /थऽड्/ *सना, वि* ३ रा, तिसरा. **third** *सना, ना* [*गण*] $\frac{१}{३}$, एक तृतियांश. **the ,third de'gree** *ना* [*अे.व*] कडक आणि दीर्घ उलट तपासणी, चौकशी; हालहाल करणे. **thirdly** *क्रिवि* तिसरे म्हणजे, तिसरी गोष्ट, तीन. **,third 'party** *ना* [*गण*] दोन मुख्य संबंधितांखेरीज तिसरा माणूस/पक्ष, त्रयस्थ: *,~ 'party in'surance, दुसऱ्या माणसाच्या जीवित, मालमत्तेची हानी भरून देण्याची हमी देणारा विमा.* **the ,third 'person** *ना* [*अे.व*] (*व्याकरण*) बोलणाऱ्याने ज्या व्यक्ती किंवा वस्तूंबाबत बोलायचे त्यांचा निर्देश करताना वापरायची *he, she, it, they* ही इंग्रजीतील सर्वनामे आणि *is* सारखी क्रियापदे, (नामाचे किंवा क्रियापदाचे) तृतीय पुरुष (मधील रूप). **,third-'rate** *वि* भिकार गुणवत्तेचे, फालतू. **the ,Third 'World** *ना* [*अे.व*] आफ्रिका, आशिया आणि दक्षिण अमेरिका येथील विकसनशील देश, तिसरे जग.

thirst /थऽस्ट्/ *ना* १ [*अगण, अे.व*] तहान, तृष्णा, तृषा. २ [*अे.व*] (*ला*) लालसा, वासना: *a ~ for knowledge, ज्ञानलालसा.* **thirst** *क्रि* (*क्रिब*) **thirst for sth** एखाद्या गोष्टीची तहान लागणे, उत्कंठा लागणे: *~ for revenge, सूडाची तहान म्हणजेच सूड घेण्यास आसुसणे.* **thirsty** *वि* **(-ier, -iest)** तहानेलेला, तृषित.

thirteen /,थऽ'टीन्/ *सना, वि, ना* [*गण*] १३, तेरा. **thirteenth** /थऽ'टीन्थ्/ *सना, वि* १३ वा, तेरावा. **thirteenth** *सना, ना* [*गण*] $\frac{१}{१३}$, एक तेरांश.

thirty /'थऽटि/ *सना, वि, ना [गण]* (*ब.व* **-ies**) ३०, तीस. **thirtieth** /'थऽटिअथ्/ *सना, वि* ३० वा, तिसावा. **thirtieth** *सना, ना [गण]* $\frac{१}{३०}$, एक तिसांश.

this /दिस्/ *वि, सना* (*ब.व* **these** /दीझ्/) १ जवळ असलेली व्यक्ती किंवा वस्तू तिच्या नामासह किंवा नामाविना : *Look at ~ box, या पेटीकडे पहा.* २ (*अनौप*) विशिष्ट : *Then ~ man came in, नंतर हा माणूस आत आला.* **this** *क्रिवि* या श्रेणीपर्यंत, इतका : *It was about ~ high, ह्या एवढे ते उंच होते.*

thistle /'थिस्ल्/ *ना [गण]* काटेरी पानांचे आणि विशेषतः जांभुळक्या फुलांचे एक रानटी झुडूप, उंटकटारा, काटेधोतरा.

thong /थॉङ्; *अमे* थॉऽङ्/ *ना [गण]* चामड्याचा, खास करून बांधण्याकरता वापरायचा पट्टा.

thorn /थॉऽन्/ *ना* १ (क) *[गण]* झाडाच्या खोडावरचा काटा, शूल. (ख) *[गण, अगण]* काटेरी झाड. २ (*वाक्प्र*) **a thorn in one's flesh/side** सतत खुपणारी व्यक्ती किंवा वस्तू. **thorny** *वि* (**-ier, -iest**) १ काटेरी. २ (*ला*) अवघड : *a ~y problem, कठीण समस्या.*

thorough /'थैर; *अमे* 'थैरउ/ *वि* १ पूर्णपणे आणि काळजीपूर्वक केलेला, कसून केलेला. २ (माणसाबाबत) काळजीपूर्वक आणि बारीकसारीक गोष्टीतही लक्ष देऊन काम करणारा, कसलेला. **'thoroughgoing** *वि* संपूर्ण : *a ,~going re'vision, संपूर्ण उजळणी.* **thoroughly** *क्रिवि* पूर्णपणे आणि लक्ष देऊन. **thoroughness** *ना [अगण]* लक्षपूर्वकता आणि पूर्णपणा, पुरतेपणा.

thoroughbred /'थैरब्रेड्/ *ना [गण], वि* निर्भेळ पैदासीचा (प्राणी, विशेषतः घोडा), जातिवंत, खऱ्या अवलादीचा.

thoroughfare /'थैरफेअ(र्)/ *ना [गण]* (*औप*) सार्वजनिक रस्ता, हमरस्ता.

those THAT^{1} चे *ब.व.*

though /दउ/ *उ.अव्यय* १ असं असूनही, जरी : *They bought the car, even ~ they couldn't really afford it, त्यांना परवडत नसूनही त्यांनी गाडी विकत घेतली.* २ आणि तरी, तथापी; परंतु, पण : *It's possible, ~ unlikely, हे शक्य आहे, पण असंभवनीय/होणे कठीण.* **though** *क्रिवि* तथापी, पण तरी : *I expect you're right – I'll ask him, ~, तुझं बरोबर असेल असं वाटतं मला – पण तरी मी त्याला विचारीन.*

thought^{1} THINK चा *भूत, भूत वि.*

thought^{2} /थॉऽद्/ *ना* १ *[गण]* विचार. २ *[अगण]* विचारशक्ती किंवा विचारधारा. ३ *[अगण]* विशिष्ट विचारपद्धती : *modern scientific ~', आधुनिक वैज्ञानिक विचारपद्धती.* ४ *[अगण, गण]* काळजी, पर्वा. ५ (*वाक्प्र*) **second 'thoughts** अधिक विचार केल्यावर बदललेले मत. **thoughtful** *वि* १ विचारपूर्वक, विचारी. २ इतरांची पर्वा करणारा, दयाळू. **thoughtfully** *क्रिवि* विचारपूर्वक; इतरांचा विचार करून. **thoughtless** *वि* इतरांची पर्वा न करणारा; आप्पलपोट्या, आपल्या पुरतं पाहणारा. **thoughtlessly** *क्रिवि* बेपर्वाईने; स्वार्थीपणाने.

thousand /'थाउझ्न्ड्/ *सना, वि, ना [गण]* १ १०००, हजार. २ (तसेच **thousands** [*ब.व*]) (*अनौप*) हजारो, खूपखूप : *A ~ thanks, खूपखूप आभार.* **thousandth** /'थाउझ्न्थ्/ *सना, वि* १००० वा, हजारावा. **thousandth** *सना, नां [गण]* $\frac{१}{१०००}$, एक हजारांश.

thrash /थ्रॅश्/ *क्रि* १ *[सक]* काठीने, चाबकाने वगैरे मारणे, फोडणे, ठोकणे, बडवणे, चोप देणे. २ *[सक]* खेळात वगैरे दणदणीत पराभव करणे, चोपणे. ३ *[अक]* धडपड करणे, फाडफाड आवाज करत हालचाल करणे, मस्ती करणे : *He ~ed about in the water, पाण्यात तो मस्ती करत होता.* ४ (*क्रिब*) **thrash sth out** (एखाद्या प्रश्नाची) सर्वंकष चर्चा करून उत्तर शोधणे, प्रश्न वगैरे सोडवणे. **thrashing** *ना [गण]* १ मार, बदडणे, बुकल. २ पराभव, मार खाणे.

thread /थ्रेड्/ *ना* १ *[गण, अगण]* शिवणाचा सुती, रेशमी, लोकरीचा वगैरे दोरा, धागा. २ *[गण]* (*ला*) कथेचा धागा, कथेचे सूत्र. ३ *[गण]* (*ला*) स्क्रूचे गोलगोल किंवा सर्पिल कंगोरे. **thread** *क्रि [सक]* १ (सुईत) दोरा ओवणे. २ (मणी वगैरे) दोऱ्यात ओवणे. ३

(ध्वनिफीत, चित्रफीत वगैरे) यंत्रात जागेवर घालणे. ४ (*वाक्प्र*) **thread one's way through (sth)** (एखाद्या गोष्टीतून) काळजीपूर्वक जाणे, वाट काढत जाणे. **'threadbare** /-बेअ(र्)/ *वि* वापरून जुने झालेले (कापड), जीर्ण.

threat /थ्रेट्/ *ना* १ [*गण, अगण*] धमकी. २ [*गण*] संकट, संभाव्य धोका : *He is a ~ to society, तो समाजाला असलेला एक धोका आहे.* ३ [*गण, बहुधा अे.व*] येणाऱ्या संकटाची चाहूल, आपत्तीचे चिन्ह.

threaten /थ्रेट्न्/ *क्रि* १ [*सक*] (एखाद्याला) धमकी देणे, धमकावणे; एखाद्या गोष्टीचा धमकी देण्यास वापर करणे : *They ~ed to kill all the passengers, सर्व प्रवाशांना ठार मारण्याची धमकी त्यांनी दिली.* २ [*अक, सक*] (धोक्याची) पूर्वसूचना देणे : *Black clouds ~ rain, काळे ढग पावसाची सूचना देतात.* ३ [*अक*] (वाईट गोष्टीबाबत) येऊ घालणे : *Danger ~ed, धोका येऊ घातला होता.* ४ [*सक*] (एखाद्या गोष्टीला) धोकादायक असणे/होणे. **threatening** *वि* धमकावणारा. **threateningly** *क्रिवि* धमकावत.

three /थ्री/ *सना, वि, ना* [*गण*] ३, तीन. **,three-di'mensional** *वि* लांबी, रुंदी आणि खोली असलेला, त्रिमितियुक्त.

thresh /थ्रेश्/ *क्रि* [*सक*] दाणे वेगळे करण्यासाठी कणसे झोडपणे, झोडपणी करणे.

threshold /'थ्रेश्हउल्ड्/ *ना* [*गण*] (*औप*) १ दाराचा लाकडी किंवा दगडी उंबरा. २ (*ला*) प्रारंभ : *on the ~ of a new career, नवीन जीवनपद्धतीचा/जीविकेचा प्रारंभ.*

threw THROW चा *भूत.*

thrift /थ्रिफ्ट्/ *ना* [*अगण*] पैशाचा काटकसरीने वापर, मितव्यय. **thrifty** *वि* **(-ier, -iest)** काटकसरी, मितव्ययी.

thrill /थ्रिल्/ *ना* [*गण*] (क) अचानक उद्भवलेली भीतीची, खळबळीची वगैरे भावना. (ख) खळबळ घडवणारी गोष्ट. **thrill** *क्रि* [*सक*] खळबळ माजवणे, भीती, उत्सुकता वगैरेची लाट पसरवणे. **thriller** *ना* [*गण*] खळबळ उडवून देणारे – विशेषतः गुन्ह्याबाबत – पुस्तक, नाटक किंवा चित्रपट.

thrive /थ्राइव्ह्/ *क्रि* (*भूत* **thrived** किंवा **throve** थ्रउव्ह्/; *भूत वि* **thrived** किंवा **thriven** /'थ्रिव्ह्न्/) [*अक*] चांगले पोसणे, पुष्ट होणे; भरभराट होणे, गबर होणे : *a thriving business, भरभराटीचा धंदा.*

throat /थ्रउट्/ *ना* [*गण*] १ अन्न आणि हवा आत जाण्याचा मानेच्या पुढच्या बाजूचा मार्ग, घसा, नरडे. २ मानेचा विरुद्ध भाग, गळा.

throb /थ्रॉब्/ *क्रि* **(-bb-)** [*अक*] (हृदय, नाडी वगैरेबाबत) स्पंदन पावणे – विशेषतः नेहमीपेक्षा जास्त जोराने – धडधडणे. **throb** *ना* [*गण*] धडधड.

throes /थ्रउझ्/ *ना* (*वाक्प्र*) **in the throes of sth** एखाद्या गोष्टीत पूर्ण अडकलेला.

thrombosis /थ्रॉम्'बउसिस्/ (*ब.व* **-ses** /-सीझ्/) *ना* [*गण, अगण*] रक्तवाहिनीत किंवा हृदयात होणारी रक्ताची गाठ.

throne /थ्रउन्/ *ना* १ [*गण*] दरबार किंवा समारंभात राजा किंवा राणी यांच्यासाठी ठेवलेले खास आसन, सिंहासन, तख्त. २ **the throne** [*अे.व*] राजपद किंवा राणीपद.

throng /थ्रॉङ्; *अमे* थ्रॉऽङ्/ *ना* [*गण*] (*औप*) मोठा जमाव, गर्दी. **throng** *क्रि* [*अक, सक*] गर्दी होणे/करणे, जमाव होणे/करणे.

throttle /'थ्रॉट्ल्/ *क्रि* [*सक*] गळा दाबणे, गळा घोटणे. **throttle** *ना* [*गण*] इंजिनातील पेट्रोल वगैरेसारखे इंधन पुरवण्यावर नियंत्रण ठेवणारी झडप, नियामक झडप.

through /थ्रू/ *शब्दयो* १ आरपार, मधून : *The train went ~ the tunnel, गाडी बोगद्यातून गेली* ○ *The River Thames flows ~ London, थेम्स नदी लंडनमधून वाहते.* २ सुरुवातीपासून शेवटपर्यंत, -भर : *She won't live ~ the night, ती रात्रभर राहणार नाही म्हणजेच ती आजची रात्र काढणार नाही.* ३ (*अमे*) ते, -धरून पर्यंत; -तोवर, -तोपत्तर : *Monday ~ Thursday, सोमवार ते गुरुवार.* ४ द्वारा, साहाय्याने; कारणाने, -मुळे : *arrange insurance ~ a bank, बँकेतून विमा भरणे* ○ *The accident happened ~ lack of care, काळजी न घेतल्यामुळे अपघात घडला.* ५ (अडथळा) ओलांडून, चुकवून : *smuggle drugs ~ customs, सीमाशुल्क चुकवून*

चोरट्या मार्गाने मादक पदार्थ आणणे/नेणे. **through** *क्रिवि* १ एका बाजूकडून दुसऱ्या बाजूला, मधून पलीकडे : *It's very crowded in here – can you get ~? इथे फार गर्दी झालीये – तुला पलीकडे जाता येईल?* २ सुरुवातीपासून शेवटपर्यंत, एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत. ३ अडथळा ओलांडून : *The ambulance drove straight ~, रुग्णवाहिका सर्व अडथळे पार करत सरळ गेली.* ४ (*ब्रि*) दूरध्वनीने जोडलेला : *I tried to ring you but I couldn't get ~, मी तुला फोन करायचा प्रयत्न केला पण लाईनच मिळाली नाही.* ५ (*वाक्प्र*) **,through and 'through** पूर्णपणे. ६ (*क्रिब*) **be through (with sb/sth)** एखाद्याशी संबंध वगैरे संपवणे : *Keith and I are ~, माझे आणि कीथचे संबंध संपलेत.* **through** *वि* थेट प्रवासाचा : *a ~ train, थेट गाडी.*

throughout /थ्रू'आउट/ *शब्दयो, क्रिवि* १ सर्वत्र, सगळीकडे, -भर : *They're sold ~ the world, जगभर ते विकले जातात.* २ सर्ववेळ, -भर : *I watched the film and cried ~, मी सिनेमा पाहताना सिनेमाभर रडलो.*

throw /थ्रउ/ *क्रि* (*भूत* **threw** /थ्रू/, *भूत वि* **~n** /थ्रउन/) १ [*अक, सक*] (विशेषतः हाताने) फेकणे. २ [*सक*] (शरीराचा भाग) अचानक जोरात हालवणे : *~ up one's hands in horror, भीतीने हात वर करणे.* ३ [*सक*] *on/off//* घाईने, कसेबसे (कपडे) घालणे/काढणे. ४ [*सक*] खाली पाडणे : *The horse threw him, घोड्याने त्याला खाली पाडले.* ५ [*सक*] (*ला*) -च्या दिशेने टाकणे, फेकणे : *She threw me an angry look, तिने माझ्याकडे एक जळजळीत कटाक्ष टाकला ○ The trees threw long shadows on the grass, गवतावर झाडांच्या लांब सावल्या पडल्या/पसरल्या होत्या.* ६ [*सक*] (कुंभाराच्या) चाकावर मडक्याला आकार देणे. ७ [*सक*] (*अनौप*) गोंधळात टाकणे : *The interruptions threw him, सततच्या व्यत्ययांमुळे तो गोंधळून गेला.* ८ [*सक*] विशिष्ट अवस्थेला नेणे, विशिष्ट परिस्थितीत फेकले जाणे : *Hundreds were ~n out of work, शेकडो लोक कामावरून बाहेर फेकले गेले.* ९ [*सक*] बटण दाबणे. १० [*सक*] (पार्टी) देणे. ११ (*वाक्प्र*) **throw cold water on sth** ⇨ COLD¹. **throw a fit** ⇨ FIT³. **throw sb in at the deep end** (*अनौप*) एखाद्याला त्याची पुरेशी तयारी नसताना अवघड, नवीन गोष्ट करायला सांगणे, अंगावर टाकणे. **throw in the sponge/towel** पराभव मान्य करणे. **throw light on sth** ⇨ LIGHT¹. **throw one's weight about** स्वतः कोणी मोठे आहोत असे समजून इतरांना स्वतःच्या म्हणण्याप्रमाणे वागायला लावणे. १२ (*क्रिब*) **throw sth away** (क) नको असलेली गोष्ट टाकून देणे, फेकून देणे. (ख) (संधी वगैरे) दवडणे, वाया घालवणे. **throw sth in** किंमत न वाढवता एखाद्या जादा गोष्टीचा समावेश करणे. **throw oneself into sth** (एखाद्या गोष्टीत) स्वतःला पूर्ण झोकून देणे. **throw sb/sth off** एखाद्या गोष्टीतून अंग काढून घेणे, एखादी गोष्ट त्याज्य करणे. **throw oneself on sb/sth** (*औप*) एखाद्यावर मदतीसाठी वगैरे पूर्ण विसंबून राहणे, एखाद्यावर पूर्ण भार टाकणे : *~ oneself on the mercy of others, इतरांच्या दयेवर विसंबून राहणे.* **throw sb out** (एखाद्या त्रास देणाऱ्या माणसाला) हाकलणे. **throw sth out** (योजना वगैरे) नाकारणे, न स्वीकारणे. **throw sth together** एखादी गोष्ट घाईने करणे, भरभर तयार करणे. **throw up** ओकणे. **throw sth up** (क) (नोकरी) सोडणे. (ख) (एखादी गोष्ट) दृष्टीपुढे आणणे, दृष्टोत्पत्तीस आणणे. **throw** *ना* [*गण*] १ फेकणे. २ फेकल्यावर गेलेले अंतर, फेक. **thrower** *ना* [*गण*] फेकणारा.

thru (*अमे*) = THROUGH.

thrush /थ्रश/ *ना* [*गण*] तपकिरी पाठीचा आणि छातीवर ठिपके असणारा एक गाणारा पक्षी, कस्तूर.

thrust /थ्रस्ट/ *क्रि* (*भूत, भूत वि* **thrust**) [*अक, सक*] एखाद्या व्यक्तीला किंवा वस्तूला अचानक जोराने ढकलणे, खुपसणे. **thrust** *ना* १ [*गण*] ढकलणे, खुपसणे, रेटा. २ [*अगण*] इंजिनाची पुढे जाण्याची शक्ती, चलशक्ती. ३ [*अगण*] (*ला*) मुख्य अर्थ किंवा मुद्दा, मतितार्थ.

thud /थड/ *ना* [*गण*] एखादी जड वस्तू

हलक्या वस्तूवर आपटल्याचा बद्द असा आवाज, धप्प असा आवाज. **thud** *क्रि* (**-dd-**) [*अक*] धपकन् पडणे किंवा आदळणे.

thug /थँग्/ *ना* [*गण*] हिंसाचारी आणि धोकादायक माणूस, ठक.

thumb /थँम्/ *ना* [*गण*] १ (हाताचा) आंगठा. २ (*वाक्प्र*) **thumbs 'up/'down** पसंतीचा/नापसंतीचा आविष्कार. **under sb's 'thumb** एखाद्याच्या नियंत्रणाखाली, एखाद्याच्या मुठीत. **thumb** *क्रि* १ [*अक, सक*] (*through*)// (पुस्तकाची वगैरे) पाने भरभर चाळणे. २ (*वाक्प्र*) **thumb a 'lift** जाणाऱ्या गाडीला आंगठा दाखवून नेण्याची विनंती करणे. **'thumb-nail** *ना* [*गण*] आंगठ्याचे नख. **'thumb-nail** *वि* थोडक्यात लिहिलेला : *a ~-nail sketch, थोडक्यात रूपरेषा.* **'thumb-tack** *ना* [*गण*] (*अमे*) कागद लावायचा/टोचायचा बुटका लहान खिळा.

thump /थँम्प्/ *क्रि* १ [*अक, सक*] मूठ आपटणे, बुक्का मारणे; जोराने मारणे. २ [*अक*] जोराने धडधडणे : *His heart ~ed with excitement, उत्कंठेने त्याचे हृदय जोरजोरात धडधडू लागले.* **thump** *ना* [*गण*] ठोसा (मारण्याचा आवाज), धपका, बुक्का.

thunder /'थँन्ड(र्)/ *ना* [*अगण*] (क) वीज चमकून होणारा कडकडाट, गडगडाट. (ख) विजेच्या कडकडाटासारखा प्रचंड आवाज : *the ~ of guns, तोफांचा गडगडाट.* **thunder** *क्रि* १ [*अक*] (*it* सह वापर) विजा कडाडणे : *It's been ~ing all night, रात्रभर विजांचा कडकडाट चाललाय्.* २ [*अक*] विजेसारखे कडकडणे, कडाडणे. ३ [*सक*] रागाने कडाडणे. **'thunderbolt** *ना* [*गण*] १ विजेचा लोळ, वीजेचे कडाडून पडणे. २ (*ला*) अनपेक्षितपणे घडलेली धक्कादायक घटना. **'thunderclap** *ना* [*गण*] वीज पडणे. **thunderous** *वि* गरजणारा, मोठा : *~ous applause, टाळ्यांचा कडकडाट.* **'thunderstorm** *ना* [*गण*] झंझावात, विजांच्या कडकडाटासह पडणारा पाऊस, वादळी पाऊस.

Thursday /'थऽस्डि/ *ना* [*अगण, गण*] बुधवार नंतरचा आठवड्याचा पाचवा दिवस, गुरुवार. (*Monday* खालची उदाहरणे पहा.)

thus /दँस्/ *क्रिवि* (*औप*) १ अशा रीतीने. २ याचा परिणाम म्हणून.

thwart /थ्वॉऽट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) एखाद्याची योजना उलथवणे किंवा अयशस्वी करणे, बेत उधळून लावणे.

thyme /टाइम्/ *ना* [*अगण*] अन्नात वापरली जाणारी एक औषधी वनस्पती.

thyroid /'थाइरॉइड्/ **thyroid 'gland** *ना* [*गण*] शरीराच्या वाढीवर परिणाम करणारी घशातील ग्रंथी, अवटु.

tiara /टि'आर/ *ना* [*गण*] स्त्रियांसाठीचा छोटा मुकुट.

tic /टिक्/ *ना* [*गण*] खास करून चेहऱ्याच्या स्नायूची अचानक आणि नकळत होणारी हालचाल, चेहऱ्यावरचा झटका.

tick^1 /टिक्/ *ना* [*गण*] १ घड्याळाची टकटक किंवा टिकटिक. २ (*अनौप*) क्षण : *I'll be with you in a ~, सेकंदात तुझ्याकडे मी येतो.* ३ बरोबरची किंवा पाहून झाल्याची खूण. **tick** *क्रि* १ [*अक*] (घड्याळ वगैरे बाबत) टिकटिक करणे. २ [*सक*] (*off*)// बरोबरची खूण करणे. ३ (*वाक्प्र*) **what makes sb 'tick** (*अनौप*) एखाद्याच्या वागण्याचे कारण. ४ (*क्रिब*) **tick sb off** (*अनौप*) एखाद्याला चुकीबद्दल रागावणे, बोलणे. **tick over** धीमेपणाने काम करणे किंवा चालवणे, हळूहळू चालणे, रुटुखुटू चालणे.

tick^2 /टिक्/ *ना* [*गण*] रक्त पिणारा लहान किडा, गोचीड.

ticket /'टिकिट्/ *ना* [*गण*] १ तिकीट. २ वस्तूंची किंमत किंवा आकार लिहिलेली चिठ्ठी. ३ वाहतुकीचे नियम मोडल्याबद्दलची अधिकृत ताकीद.

tickle /'टिक्ल्/ *क्रि* १ [*सक*] गुदगुल्या करणे. २ [*अक, सक*] हळुवारपणे टोचणे. ३ [*सक*] मजा आणणे, आनंद देणे. **tickle** *ना* [*गण*] गुदगुल्या. **ticklish** *वि* १ (माणसाबाबत) फार गुदगुल्या होणारा. २ (*अनौप*) (प्रश्नाबाबत) हळुवारपणे किंवा खूप काळजीपूर्वक सोडवण्याचा, नाजुक.

tidal /'टाइड्ल्/ *वि* भरती-ओहोटीचा. **tidal 'wave** *ना* [*गण*] समुद्राची खूप मोठी लाट.

tide /टाइड्/ *ना* १ (क) [*गण, अगण*] समुद्राची

भरती-ओहोटी. (ख) [*गण*] भरतीचे किंवा ओहोटीचे पाणी : *Beware of strong ~, भरतीच्या पाण्याची काळजी घे किंवा समुद्राला भरती आहे, जपून.* २ [*गण*, बहुधा *अे.व*] घटना, लोकमत वगैरे ज्या दिशेने जात आहे ती दिशा, लाट. **tide** *क्रि* (*क्रिब*) **tide sb over (sth)** एखाद्याला (अडचणीत) मदत करणे, हात देणे. **'tide-mark** *ना* [*गण*] भरतीची कमाल मर्यादा दाखविणारी किनाऱ्यावरील खूण.

tidings /'टाइडिङ्झ/ *ना* [*ब.व*] (*पुरा किंवा गंमत*) बातमी, वार्ता : *glad ~, आनंदाची वार्ता.*

tidy /'टाइडि/ *वि* (**-ier, -iest**) १ नीट; व्यवस्थित : *a ~ room/girl, व्यवस्थित लावलेली खोली/टापटिपीची मुलगी.* २ (*अनौप*) ऐसपैस, घसघशीत : *a ~ sum of money, पैशाचा मोठा निधी.* **tidily** *क्रिवि* नीटपणे, व्यवस्थितपणे, व्यवस्थिशीर. **tidiness** *ना* [*अगण*] व्यवस्थिशीरपणा, नीटनेटकेपणा, टापटीप. **tidy** *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*अक, सक*] नीट लावणे, आवरणे : *~ (up) the room, खोली आवरणे.*

tie^1 /टाइ/ (*वर्त वि* **tying** /टाइ·इङ्/) १ [*सक*] दोरीने वगैरे बांधणे : *A label was ~d to the handle, हॅन्डलला लेबल बांधले होते* ○ *~ (up) a parcel, पार्सल बांधणे.* २ [*सक*] गाठ मारणे : *~ one's shoe-laces, बुटाच्या नाड्या बांधणे.* ३ [*अक*] लावणे, बंद करणे : *Does this dress ~ in front? हा पोषाख पुढच्या बाजूने बांधता/लावता येतो का?* ४ [*अक, सक*] सारखे गुण मिळवणे : *The two teams ~d, दोन्ही संघांना समान गुण मिळाले.* ५ (*क्रिब*) **tie sb down** एखाद्याच्या स्वातंत्र्यावर मर्यादा घालणे, अडकवून ठेवणे. **tie in (with sth)** (एखाद्या गोष्टीशी) मिळते-जुळते असणे, सुसंगत असणे. **tie sb up** (क) एखाद्याला त्याला हालता किंवा निसटता येणार नाही असे दोरीने बांधून ठेवणे. (ख) (*अनौप*) (बहुधा कर्मणी) व्यग्र असणे : *I'm ~d up now; can you come back later? मी आता कामात आहे; जरा वेळाने येशील का?* **tie sth up** (पैसे वगैरे) अडकवणे, गुंतवणे.

tie^2 /टाइ/ *ना* [*गण*] १ कॉलरमधून मानेभोवती घालून पुढच्या बाजूला गाठ मारून खाली सोडायची एक पट्टी, नेक्टाय. २ बांधण्यासाठी वापरायची कापडाची पट्टी किंवा वायर. ३ (*ला*) (भाव)बंध : *family ~s, कौटुंबिक बंध.* ४ स्वातंत्र्यावर येणारे बंधन. ५ खेळात मिळालेले समान गुण. **'tie-breaker** *ना* [*गण*] स्पर्धकांना समान गुण मिळाले असता विजेता ठरविण्यासाठी दिलेली आणखी एक संधी.

tier /टिअ(र्)/ *ना* [*गण*] मागे-पुढे किंवा वर-खाली असणाऱ्या (आसनांच्या वगैरे) रांगांतील एक रांग.

tiff /टिफ्/ *ना* '[*गण*] लहानसे भांडण, कुरबुर.

tiger /'टाइग(र्)/ *ना* [*गण*] वाघ, व्याघ्र. **tigress** /'टाइग्रिस्/ *ना* [*गण*] वाघीण.

tight /टाइट्/ *वि* १ घट्ट, गच्च : *a ~ knot, घट्ट गाठ.* २ (क) घट्ट बसणारा, आवळ : *These shoes are too ~, हे बूट फार घट्ट होतायत्.* (ख) काही आत-बाहेर येऊ शकणार नाही असा केलेला, बंद : *'air~, हवाबंद* ○ *'water~, पाणीबंद* म्हणजे *पाणी आत येऊ न शकेल असा.* ३ ताणून बांधलेला, तंग : *a ~ belt, गच्च आवळून बांधलेला पट्टा.* ४ एकामागोमाग एक असे कार्यक्रम, भेटी वगैरे लावलेला, भरगच्च : (*ला*) *a ~ schedule, भरगच्च वेळापत्रक/कार्यक्रम.* ५ (*अनौप*) (पैशाबाबत) मिळायला कठीण, कडकी. ६ (*व्रात्य*) दारूने झिंगलेला, तर्र. ७ (*अनौप*) पैसे खर्च करण्यास तयार नसलेला, चिक्कू, कद्रू. ८ (*वाक्प्र*) **in a tight corner/spot** अडचणीत. **tight** *क्रिवि* घट्ट, ताणून, दाटीवाटीने, बिलगून : *The bags are packed ~, पिशव्या गच्च भरल्यात्.* **tighten** *क्रि* [*अक, सक*] घट्ट करणे, आवळणे, पिळणे : *~ (up) the screws, स्क्रू घट्ट पिळणे.* **,tight-'fisted** *वि* (*अनौप*) हात आखडता घेणारा, पैसे कमी खर्च करणारा. **tightly** *क्रिवि* घट्ट, ताणून, दाटीवाटीने, बिलगून. **tightness** *ना* [*अगण*] घट्टपणा, गच्चपणा. **'tightrope** *ना* [*गण*] कसरत करायचा ताणलेला दोर. **tights** *ना* [*ब.व*] कमरेखाली घालायचा पायांना आवळ बसणारा कपडा.

tile /टाइल्/ *ना* [*गण*] १ घराची जमीन, छप्पर किंवा भिंत यावर घालायची भाजलेल्या मातीची किंवा इतर द्रव्यापासून भाजून तयार केलेली चपटी फरशी, कौल. २ (*वाक्प्र*) **on the 'tiles** (*अनौप*) घरापासून दूर मजा मारणारा. **tiled** *वि* टाईल घातलेला, कौले घातलेला.

till^{1} = UNTIL.

till^{2} /टिल्/ *ना* [*गण*] दुकान, बँक वगैरेतील पैशाचा गल्ला ठेवायची पेटी, गल्ला, खण.

till^{3} /टिल्/ *क्रि* [*सक*] जमीन कसणे, जमिनीची मशागत करणे.

tiller /'टिल(र्)/ *ना* [*गण*] बोटीचे सुकाणू फिरवायचा दांडा, बावा.

tilt /टिल्ट्/ *क्रि* [*अक, सक*] कलणे/कलवणे, एका बाजूला झुकणे/झुकवणे. **tilt** *ना* [*गण*] १ ढल, कलतेपणा, झोका. २ (*वाक्प्र*) **(at) full tilt** ⇨ FULL.

timber /'टिम्ब(र्)/ *ना* १ [*अगण*] (क) इमारत वगैरेसाठी वापरायला खास तयार केलेले लाकूड. (ख) इमारती लाकडाची झाडे. २ [*गण*] जहाज किंवा इमारत बांधताना वापरायची लाकडाची मोठी फळी.

time^{1} /टाइम्/ *ना* १ [*अगण*] काल/काळ : *The world exists in space and ~, अवकाश आणि काळ या दोहोत या जगाचे अस्तित्व आहे.* २ [*अगण*] काळाचा भाग, वेळ : *Is there ~ for another cup of tea? आणखी चहा घ्यायला वेळ आहे का?* ३ [*अगण*] विशिष्ट वेळ : *The ~ is 2 o'clock, दोन वाजलेत्.* ४ [*अगण, गण*] एखादी गोष्ट करायला लागलेला वेळ : *The winner's ~ was 11 seconds, विजेत्याला ११ सेकंद लागले.* ५ [*अगण*] वेळ : *It's 'lunch-~, जेवायची वेळ झाली* ○ *It's ~ for us to go now, आपली जायची वेळ झाली.* ६ [*गण*] प्रसंग : *He failed the exam three ~s, तो तीन वेळा/प्रसंगी परीक्षेत नापास झाला.* ७ [*गण*] अनेकदा [*ब.व*] कालखंड; युग : *in prehistoric ~s, इतिहासपूर्व कालखंडात.* ८ [*अगण*] (*संगीत*) संगीताची लय किंवा एका बारमधील ठेक्याची संख्या : *beat ~, ठेक्याची लय.* ९ (*वाक्प्र*) **ahead of one's 'time** काळाच्या पुढे जाणारा विचार, कल्पना असलेला. **all the 'time** सर्व वेळ, संपूर्ण काळ. **at 'all times** नेहमी. **at 'one time** भूत काळात, एके काळी. **at a 'time** एका वेळी एक, वेगवेगळा. **at 'times** कधीकधी. **behind the 'times** जुन्या काळचा, कालबाह्य. **do 'time** (*व्रात्य*) तुरुंगात जाणे. **for the time 'being** थोडा वेळ, तात्पुरता, दुसरी काही सोय होईपर्यंत, आत्तापुरता. **from ˌtime to 'time** वेळोवेळी, प्रसंग येईल तसा. **have no time for sb/sth** एखादी व्यक्ती/वस्तू न आवडणे. **have the ˌtime of one's 'life** (*अनौप*) अत्यानंद होणे, आनंद उफाळून येणे. **in 'time** यथाकाल. **on 'time** योग्य वेळेस; वेळेवर, वक्तशीर(पणे). **take one's 'time** गडबड न करणे. **ˌtime after 'time, ˌtime and (time) a'gain** पुन्हापुन्हा. **'time bomb** *ना* [*गण*] ठराविक वेळी उडेल असा लावलेला बॉम्ब. **'time-limit** *ना* [*गण*] काही करण्य:करता दिलेली वेळेची मर्यादा, कालमर्यादा. **'times** *शब्दयो* गुणिले : *5 ~s 2 is 10, पाच दुणे दहा.* **times** *ना* [*ब.व*] (गुणाकार किंवा पट दाखविताना वापर) पट : *This book is three ~s as long as that one, हे पुस्तक त्या पुस्तकापेक्षा तिपटीने मोठे आहे.* **'time-scale** *ना* [*गण*] घटनाकाल. **'time-sharing** *ना* [*अगण*] १ दोन किंवा जास्त माणसांनी वेगवेगळ्या कामांसाठी एकाच वेळी एकाच संगणकाचा केलेला वापर. २ सुट्टीच्या निवासस्थानाचा अनेक जणांनी वर्षभरात थोडाथोडा वेळ केलेला वापर. **'time-signal** *ना* [*गण*] विशिष्ट आवाज वापरून आकाशवाणीवर सांगितली जाणारी वेळ, रेडिओ-टाइम. **'time-switch** *ना* [*गण*] विशिष्ट वेळी चालू होईल अशी व्यवस्था करता येणारे बटण. **'timetable** *ना* [*गण*] १ बसेस वगैरेचे येण्या-जाण्याचे वेळापत्रक. २ शाळेतील तासांचे वेळापत्रक.

time^{2} /टाइम्/ *क्रि* [*सक*] १ वेळ आखणे, वेळ ठरवणे : *She ~d her journey so that she arrived early, तिने प्रवासाची वेळ नीट आखल्यामुळे ती लवकर आली.* २ एखाद्या गोष्टीने घेतलेला किंवा तिला लागलेला वेळ मोजणे. **timer** *ना* [*गण*] एखादी गोष्ट दिलेल्या वेळी सुरू करणारी/वेळ राखणारी व्यक्ती किंवा तसे साधन, कालनियंत्रक. **timing** *ना* [*अगण*] एखादी गोष्ट करण्यास सर्वात उत्तम क्षण पकडणे (किंवा त्याचे कौशल्य), वेळेची निवड.

timely /'टाइम्लि/ *वि* (-ier, -iest) योग्य वेळी घडणारा.

timid /'टिमिड्/ *वि* लाजाळू आणि भित्रा, बुजरा. **timidity** /टि'मिडटि/ *ना* [*अगण*] लाजाळूपणा आणि भित्रेपणा, बुजरेपणा. **timidly** *क्रिवि* भित्रेपणाने, बुजरेपणाने.

tin /टिन्/ *ना* १ [*अगण*] एक मऊ पांढरा धातू, कथील. २ [*गण*] (*ब्रि*) अन्न ठेवायचा धातूचा डबा : *a ~ of beans, मटार वगैरेसारख्या दाण्यांचा डबा.* **tin** *क्रि* **(-nn-)** [*सक*] अन्नपदार्थ धातूच्या डब्यात भरणे : *~ed peaches, डब्यातली पीचेस.* **tin 'foil** *ना* [*अगण*] अन्नपदार्थ गुंडाळण्यासाठी वापरला जाणारा पातळ पत्रा. **tinny** *वि* **(-ier, -iest)** १ पातळ पत्र्याचा किंवा पत्र्यासारखा. २ (आवाजाबाबत) हलका पण कानाला सहन न होईल असा उंच आणि तीव्र. **'tin-opener** *ना* [*गण*] (*ब्रि*) अन्नाचा बंद डबा उघडण्याचे हत्यार.

tinge /टिन्ज्/ *क्रि* [*सक*] (*with*)// १ रंगछटा मिसळणे. २ (*ला*) किंचित् गालबोट लागणे : *admiration ~d with envy, मत्सराचे किंचित् गालबोट लागलेले* कौतुक किंवा *मत्सराचा किंचित् वास असणारे कौतुक.* **tinge** *ना* [*गण,* बहुधा *अे.व*] अल्पांश : *a ~ of sadness in her voice, तिच्या आवाजातील किंचित् दुःखाचा सूर.*

tingle /'टिङ्ग्ल्/ *क्रि* [*अक*] त्वचेला खाज सुटणे, कंड सुटणे, चुणचुणणे, मुंग्या येणे, फुरफुरणे : (*ला*) *~ with excitement, उत्कंठेने आतल्या आत फुलणे/भरून येणे.* **tingle** *ना* [*गण,* बहुधा *अे.व*] खाज, बोच.

tinker /'टिङ्क(र्)/ *क्रि* [*अक*] (*with*)// अंगात कौशल्य नसताना एखादी गोष्ट दुरुस्त करण्याचा वरवरचा प्रयत्न करणे, नसता उद्योग करणे.

tinkle /'टिङ्‌·क्ल्/ *क्रि* [*अक*] किणकिणणे, बारीक वाजणे, रुणझुणणे. **tinkle** *ना* [*गण*] १ किणकिण, रुणझुण. २ (*ब्रि अनौप*) आलेला फोन.

tinsel /'टिन्स्ल्/ *ना* [*अगण*] नाताळच्या सणात सजावटीसाठी वापरायच्या चमकणाऱ्या गोष्टीची पट्टी, कलाबूत.

tint /टिन्ट्/ *ना* [*गण*] (विशेषतः फिकी) रंगछटा. **tint** *क्रि* [*सक*] छटा देणे.

tiny /'टाइनि/ *वि* **(-ier, -iest)** अतिशय लहान, छोटासा.

tip^1 /टिप्/ *ना* [*गण*] १ एखाद्या गोष्टीचे टोक, शेंडा : *the ~s of one's fingers, हाताच्या बोटांची टोके.* २ टोकाला (टोपणासारखी) लावलेली गोष्ट : *a stick with a rubber ~, टोकाला रबर असलेली काठी.* ३ (*वाक्प्र*) **on the tip of one's 'tongue** जिभेच्या टोकावर म्हणजेच तोंडावर असलेले, माहीत असून न आठवणारे. **the tip of the 'iceberg** मोठ्या प्रश्नाचा एक लहानसा भाग, चुणुक. **tip** *क्रि* **(-pp-)** [*सक*] टोकाला टोपण वगैरे लावणे : *~ped cigarettes, टोकाला फिल्टर असलेल्या सिग्रेट्स.* **'tiptoe** *ना* (*वाक्प्र*) **on 'tiptoe** पायाच्या बोटांवर : *stand on ~toe to see over sb's head, एखाद्याच्या डोक्यावरून पाहण्यासाठी चवडे उंच करून उभे राहणे* ○ *walk on ~toe so as not to be heard, आवाज न करता चवड्यावर चालणे.* **'tiptoe** *क्रि* [*अक*] चोरपावलाने चालणे : *She ~toed out, ती चोरपावलांनी बाहेर पडली.* **,tip'top** *वि* (*अनौप*) उत्कृष्ट.

tip^2 /टिप्/ *क्रि* **(-pp-)** १ [*अक, सक*] **(क)** एका बाजूला कलणे/कलवणे, रेलणे. **(ख)** (*over*)// कलंडणे. २ [*सक*] (विशेषतः *ब्रि*) पटकन् ओतणे. **tip** *ना* [*गण*] १ कचरा टाकण्याची सार्वजनिक जागा. २ (*अनौप*) पसारा असलेली जागा.

tip^3 /टिप्/ *ना* [*गण*] १ कामाची छोटी बक्षिसी. २ उपयुक्त सूचना, सल्ला. **tip** *क्रि* **(-pp-)** १ [*अक, सक*] एखाद्याला बक्षिसी देणे : *~ the waiter, वेटरला बक्षिसी देणे.* २ (*क्रिब*) **tip sb off** (*अनौप*) एखाद्याला आतून जागे करणे. **'tip-off** *ना* [*गण*] गुप्त माहिती.

tipple /'टिप्ल्/ *ना* [*गण*] (*अनौप*) मद्यार्कयुक्त पेय.

tipsy /'टिप्सि/ *वि* **(-ier, -iest)** (*अनौप*) किंचित् झिंगलेला.

tire^1 /'टाइ·अ(र्)/ *क्रि* [*अक, सक*] दमणे/दमवणे : *The long walk ~d them (out), खूप चालल्याने ते दमले.* **tired** *वि* १ दमणूक झालेला, दमलेला. २ एखाद्या गोष्टीला कंटाळलेला : *I'm ~d of watching televi-*

sion, मला टीव्ही पाहण्याचा कंटाळा आलाय्. **tiredness** *ना* [*अगण*] दमणूक; कंटाळलेपण, कंटाळा. **tireless** *वि* लवकर न दमणारा, अथक. **tiresome** *वि* कंटाळवाणा, वैताग आणणारा.

tire^2 (*अमे*) = TYRE.

tissue /'टिशू/ *ना* १ [*अगण, गण*] प्राण्याच्या शरीरातील पेशी-समूह, ऊती : *nerve ~, मज्जा ऊती.* २ [*अगण*] (तसेच **'tissue-paper**) खास करून गुंडाळण्यासाठी वापरायचा मऊ पातळ कागद, वेष्टणाचा कागद. ३ [*गण*] हातरुमाल म्हणून वापरायचा मऊ कागद. ४ [*गण*] (*ला*) साखळी, माळ : *a ~ of lies, खोटेपणाची मालिका.*

tit^1 /टिट्/ *ना* [*गण*] एक छोटा पक्षी.

tit^2 /टिट्/ *ना* (*वाक्प्र*) **,tit for 'tat** /टॅट्/ जशास तसे, ठकास महाठक.

tit^3 /टिट्/ *ना* [*गण*] (⚠ *व्रात्य*) स्तन.

titbit /'टिट्बिट्/ *ना* [*गण*] १ चवदार अन्नाचा घास, खाऊ, चटकमटक. २ वदंता वगैरे.

titillate /'टिटिलेइट्/ *क्रि* [*सक*] एखाद्याची कामवासना चाळवणे, एखाद्याला उद्दीपित करणे.

title /'टाइट्ल्/ *ना* १ [*गण*] पुस्तक, नाटक, चित्रपट वगैरेचे नाव, शीर्षक. २ [*गण*] एखाद्याची श्रेणी किंवा व्यवसाय वगैरे दाखविणारा शब्द – उदा *Lord* महाराज, *Mrs* सौ किंवा *Professor* प्राध्यापक, किताब, पदवी, पद. ३ [*गण*] (*क्रीडा*) विजेतेपद. ४ [*अगण, गण*] (*कायदा*) मालकी हक्क. **titled** *वि* सरदाराचा किताब असणारा, खानदानी : *a ~d lady, खानदानी स्त्री.* **'title-deed** *ना* [*गण*] मालकी हक्क सिद्ध करणारा दस्तऐवज, हक्कलेख. **'title-role** *ना* [*गण*] नाटक किंवा चित्रपटाच्या शीर्षकात असलेली प्रमुख भूमिका.

titter /'टिट(र्)/ *क्रि* [*अक*] गालातल्या गालात हसणे. **titter** *ना* [*गण*] अवसान गळून आलेले हसू.

TNT /,टी अेन् 'टी/ *ना* [*अगण*] शक्तिशाली स्फोटक.

to^1 /ट, टु किंवा टू; अधिक बलयुक्त रूप टू/ *शब्दयो* १ -कडे, -ला : *walk to the shops, दुकानांकडे जाणे म्हणजेच दुकानात जाणे.* २ विशिष्ट स्थितीला येणे; -कडे : *rise to power, सत्तेकडे वाटचाल म्हणजेच सत्तेवर येणे.* ३ पर्यंत : *The dress reaches to her ankles, पोषाख तिच्या घोट्यांपर्यंत येतो.* ४ पर्यंत आणि धरून : *from Monday to Friday,* सोमवार *पासून शुक्रवार पर्यंत.* ५ (काळाबाबत) आधी, पूर्वी : *It's ten to three, तीनला दहा कमी.* ६ (प्रत्यक्ष कर्म देताना) : *I gave it to Peter, मी ते पीटरला दिले.* ७ -चा : *the key to the door, दाराची किल्ली.* ८ (तुलना किंवा प्रमाण दाखवताना) : *I prefer walking to climbing, टेकडी वगैरे चढण्यापेक्षा मला चालायला आवडते* ○ *We won by 6 goals to 3, ६ विरुद्ध ३ असा सामना आम्ही जिंकला.*

to^2 /ट, टु किंवा टू; अधिक बलयुक्त रूप टू/ (क्रियापदाच्या मूळ रूपापुढे लावून नामकारी रूप करताना वापर) -णे. १ (कर्म म्हणून वापर) : *He wants to go, त्याला जायचे आहे.* २ (कारण किंवा हेतू दाखवताना वापर) : *They came (in order) to help me, ते मला मदत करण्यासाठी आले.* ३ (संपूर्ण नामकारी रूपाऐवजी वापर) : *'Will you come?' 'I hope to', 'तू येशील?' 'असं वाटतंय्.'*

to^3 /टू/ *क्रिवि* १ (दाराबाबत) बंद : *Push the door to,* दार *लावून घे.* २ (*वाक्प्र*) **,to and 'fro** मागे आणि पुढे.

toad /टउड्/ *ना* [*गण*] बेडकासारखा एक प्राणी, भेक.

toadstool /'टउड्स्टूल्/ *ना* [*गण*] एक प्रकारची विषारी बुरशी, छत्रक, कुत्र्याचे छत्र.

toast^1 /टउस्ट्/ *ना* [*अगण*] पावाचा भाजलेला तुकडा. **toast** *क्रि* १ [*अक, सक*] (पाव) भाजणे. २ [*सक*] शेकोटीजवळ बसून अंग शेकणे. **toaster** *ना* [*गण*] पाव भाजायचे विद्युत उपकरण.

toast^2 /टउस्ट्/ *क्रि* [*सक*] मद्य घेऊन एखाद्याला शुभेच्छा वगैरे देणे : *~ the bride and bridegroom, नवरानवरीला मद्य घेऊन शुभेच्छा देणे.* **toast** *ना* [*गण*] मद्य घेऊन शुभेच्छा देणे; अशा शुभेच्छा दिलेला माणूस : *propose/drink a ~, शुभेच्छा देणे किंवा त्या प्रीत्यर्थ मद्य घेणे.*

tobacco /ट'बॅकउ/ *ना* [*अगण*] तंबाखूची

पाने. **tobacconist** /ट'बॅकनिस्ट्/ *ना* [*गण*] तंबाखू विक्रीचे दुकान किंवा असा विक्रेता.

toboggan /ट'बॉगन्/ *ना* [*गण*] लांब, अरुंद फळीची हिमघसरगाडी. **toboggan** *क्रि* [*अक*] हिमावरची घसरगाडी वापरणे.

today /ट'डेइ/ *क्रिवि, ना* [*अगण*] १ आज. २ हल्ली, आजकाल : *the young people of ~, आजकालची तरुण मंडळी.*

toddle /'टॉड्ल्/ *क्रि* [*अक*] (विशेषतः बालकाबाबत) लुटुलुटु चालणे. **toddler** *ना* [*गण*] लुटुलुटु चालणारे मूल.

to-do /ट'डू/ *ना* [*गण, बहुधा अ.व*] (*ब.व* ~**s**) (*अनौप*) धांदल, धावपळ, गडबड.

toe /टउ/ *ना* [*गण*] १ (क) पायाचे बोट. (ख) मोजा, बूट वगैरेचा पुढचा भाग. २ (*वाक्प्र*) **on one's 'toes** तैय्यार, सावध. **toe** *क्रि* (*वाक्प्र*) **toe the 'line** आज्ञा पाळणे, ऐकणे. **'toe-nail** *ना* [*गण*] पायाच्या बोटाचे नख.

toffee /'टॉफि; *अमे* 'टॉऽफि/ *ना* [*गण, अगण*] साखर, लोणी वगैरेचा गरम पाक करून केलेला एक टणक, चिकट गोड पदार्थ, चिक्की.

together /ट'गेद(र्)/ *क्रिवि* १ एकत्र, बरोबर, सह : *They went for a walk ~, ते बरोबर फिरायला गेले.* २ एकवटून, एकत्र : *Tie the ends ~, दोन्ही टोके एकत्र बांध.* ३ एकाच वेळी, एकदम : *All his troubles happened ~, त्याच्या सर्व अडचणी एकदमच आल्या.* ४ सहमतीने, एकदिलाने. ५ (*वाक्प्र*) **get it to'gether** (*व्रात्य*) सर्व गोष्टी/सूत्रे ताब्यात घेणे, घडी बसवणे. **together with** शिवाय, आणखी. **togetherness** *ना* [*अगण*] मैत्री, प्रेम, बंधुभाव.

toil /टॉइल्/ *क्रि* [*अक*] (*away*)// (*औप*) काबाडकष्ट करणे. **toil** *ना* [*अगण*] (*औप*) काबाडकष्ट, यातायात, कुटाणा.

toilet /'टॉइलिट्/ *ना* [*गण*] संडास किंवा मुतारी, स्वच्छतागृह. **'toilet-paper** *ना* [*अगण*] संडासात वापरण्याचा कागद. **toiletries** *ना* [*ब.व*] स्वच्छतागृहातील साबण, पेस्ट यासारख्या गोष्टी. **'toilet-roll** *ना* [*गण*] संडासात वापरायच्या कागदाचा बिंडा.

token /'टउकन्/ *ना* [*गण*] १ चिन्ह, खूण, लक्षण : *a ~ of my affection, माझ्या प्रेमाचे प्रतीक.* २ नाण्याऐवजी वापरायची धातूची गोलाकार चकती, बिल्ला. ३ मालाच्या बदल्यात देण्याचे कार्ड, माल घेण्यासाठी व्हाउचर असलेले कार्ड : *a book ~, पुस्तक घेण्याचे टोकन.* **token** *वि* लहान; गंभीर नाही असा, लाक्षणिक : *~ one-day strikes, एक दिवसाचे लाक्षणिक संप.*

told TELL चा *भूत, भूत वि.*

tolerate /'टॉलरेइट्/ *क्रि* [*सक*] १ (न पटणारी, नावडती किंवा नको असणारी गोष्ट) सहन करणे : *I won't ~ such behaviour, मला नाही खपायची अशी वागणूक.* २ अप्रिय असे काही मुकाट्याने सहन करणे, सोसणे : *~ heat/noise, ऊन/गोंगाट सोसणे.* **tolerable** /-रब्ल्/ *वि* सहन करण्याजोगा; ठीक. **tolerably** *क्रिवि* ठीक. **tolerance** /-रन्स्/ *ना* [*अगण*] सहनशीलता, सोशिकपणा, सहिष्णुता : *religious/racial tolerance, धार्मिक/वांशिक सहिष्णुता.* **tolerant** /-रन्ट्/ *वि* सहिष्णु, सोशिक. **toleration** /,टॉल'रेइशन्/ *ना* [*अगण*] सोशिकतेचे वर्तन, सहिष्णुतेची परंपरा.

toll^{1} /टउल्/ *ना* [*गण*] १ रस्ता, पूल वगैरेचा वापर करण्यासाठी द्यावयाचे पैसे. २ हानी : *the death-~ in the earthquake, भूकंपातील मनुष्य हानी (म्हणजेच बळी पडलेल्या लोकांची संख्या).*

toll^{2} /टउल्/ *क्रि* [*अक, सक*] (घंटेबाबत) सावकाश पण सतत वाजणे. **toll** *ना* [*अ.व*] घंटानाद.

tomato /ट'माटउ; *अमे* -मेइ-/ *ना* [*गण*] (*ब.व* ~**es**) टॉमेटो (किंवा त्याचे झाड).

tomb /टूम्/ *ना* [*गण*] थडगे, कबर. **'tombstone** *ना* [*गण*] थडग्यावरचा दगड.

tomboy /'टॉम्बॉइ/ *ना* [*गण*] दांडगाईचे खेळ आवडणारी तरुण खेळकर मुलगी.

tom-cat /'टॉम् कॅट्/ *ना* [*गण*] बोका.

tomorrow /ट'मॉरउ/ *क्रिवि, ना* [*अगण*] १ उद्या. २ भविष्यात, पुढचा काळ, नजीकचा काळ.

ton /टैन्/ *ना* १ [*गण*] वजनाचे एक परिमाण; २२४० पौंड (१.०१६ टन) ब्रिटनमधे तर २००० पौंड (०.९०७ टन) अमेरिकेत. २ **tons**

[*ब.व*] (*अनौप*) चिकार, बक्कळ: *~s of money, बक्कळ पैसा.*

tone^1 /टउन्/ *ना* १ [*गण*] स्वर, नाद: *the sweet ~(s) of a piano, पियानोचे मधुर स्वर.* २ [*गण*] दूरध्वनीवरचा सूचना देणारा आवाज. *the engaged ~, दूरध्वनी मोकळा नसल्याचा आवाज.* ३ [*अे.व*] एकंदर सूर: *the serious ~ of the article, लेखाचा गंभीर सूर.* ४ [*गण*] रंगछटा. ५ [*गण*] (*संगीत*) दोन स्वरातील पाच उच्चतेच्या फरकांतला एक फरक. **,tone-'deaf** *वि* सुरातील फरक न कळणारा.

tone^2 /टउन्/ *क्रि* १ [*सक*] विशिष्ट स्वर किंवा रंगछटा देणे. २ (*क्रिब*) **tone (sth) down** तीव्रता कमी करणे/होणे, मऊ करणे. **tone in (with sth)** (रंग वगैरेबाबत) चपखल बसणे, सुसंगत असणे, शोभणे. **tone (sth) up** अधिक जोमदार किंवा तीव्र करणे: *Exercise ~s up the body, व्यायामाने शरीरात जोम येतो.*

tongs /टॉङ्झ्/ *ना* [*ब.व*] एका टोकाला पक्क्या केलेल्या दोन हालणाऱ्या दांड्यांचे वस्तू पकडण्यासाठी केलेले एक साधन, चिमटा, सांडशी.

tongue /टङ्/ *ना* १ [*गण*] (क) जीभ, जिव्हा. (ख) (*ला*) बोलण्याची ढब: *He has a sharp ~, तो जिभेचा तिखट आहे म्हणजेच तो फटकन्/टाकून बोलतो.* २ [*गण*] (*औप*) भाषा, वाणी. ३ [*गण, अगण*] बैलाची वगैरे खाद्यपदार्थ म्हणून वापरायची जीभ. ४ [*गण*] जिभेच्या आकाराचे काही – उदा बुटातील जीभ. ५ (*वाक्प्र*) **with one's tongue in one's 'cheek** गंभीरपणे घ्यायचा हेतू नसलेले असे बोलणे, वरवर किंवा तोंडदेखले बोलणे. **'tongue-tied** *वि* लाजरेपणाने किंवा नाउमेदीने गप्प बसणारा, अळीमिळी झालेला. **'tongue-twister** *ना* [*गण*] म्हणायला अवघड असलेला शब्दबंध.

tonic /'टॉनिक्/ *ना* १ [*गण, अगण*] शक्तिवर्धक औषध. २ [*गण*] आनंद किंवा आरोग्य वाढवणारे असे काही. ३ [*गण, अगण*] बलवर्धक जल. **'tonic water** *ना* [*गण, अगण*] कोयनेलचा स्वाद असणारे खनिजद्रव्यगुण असलेले पाणी, बलवर्धक जल.

tonight /ट'नाइट्/ *क्रिवि, ना* [*अगण*] आज संध्याकाळी किंवा रात्री.

tonnage /'टनिज्/ *ना* [*अगण, गण*] बोटीत बसू शकणारा माल.

tonne /टन्/ *ना* [*गण*] वजनाचे एक मेट्रिक परिमाण; १००० किलोग्रॅम.

tonsil /'टॉन्सिल्/ *ना* [*गण*] घशातील दोन लहान गाठींपैकी एक, गिलायु. **tonsillitis** /,टॉन्सि'लाइटिस्/ *ना* [*अगण*] घशातील गाठींना येणारी सूज.

too /टू/ *क्रिवि* १ शिवाय, अधिक; सुद्धा: *She plays the guitar and sings ~, ती गिटार वाजवते आणि गाते देखील.* २ वाजवीपेक्षा जादा, फाजील: *You're driving ~ fast! तू फारच जोरात वाहन चालवतोयस!* ३ (*वाक्प्र*) **all/only too** फार, खूप: *He's only ~ pleased to help, मदत करायला त्याला खूप आनंद झालाय.*

took TAKE^1 चा *भूत.*

tool /टूल्/ *ना* [*गण*] हातात धरून काम करायचे हत्यार.

toot /टूट्/ *ना* [*गण*] हॉर्नचा/पोंग्याचा लहान आवाज. **toot** *क्रि* [*अक, सक*] पिप् असा आवाज काढणे.

tooth /टूथ्/ *ना* (*ब.व* **teeth** /टीथ्/) १ [*गण*] दात, दन्त. २ [*गण*] करवत, कंगवा वगैरेचा दाता. ३ **teeth** [*ब.व*] (*अनौप*) मोकळीक, वापरायची पूर्ण मुभा: *The present law must be given more ~, सध्याच्या कायद्याला वापर करण्याची पूर्ण मुभा द्यायला हवी.* ४ (*वाक्प्र*) **get one's teeth into sth** (*अनौप*) एखाद्या गोष्टीत सर्व शक्तीनिशी उतरणे, सर्वार्थाने लक्ष देऊन उतरणे. **in the teeth of sth** एखादी गोष्ट असूनही. **'toothache** *ना* [*अगण*] दातदुखी. **'toothbrush** *ना* [*गण*] दात घासायचा ब्रश. **toothed** /टूथ्ट्/ *वि* दात असलेला, दंतुर. **toothless** *वि* दंतहीन, दात पडका. **'toothpaste** *ना* [*अगण*] दात घासायची पेस्ट. **'toothpick** *ना* [*गण*] दात कोरणे.

top^1 /टॉप्/ *ना* १ [*गण*] शेंडा, माथा, शिखर: *at the ~ of the hill, टेकडीच्या माथ्यावर.* २ [*गण*] वरचा पृष्ठभाग: *the ~ of the table,*

टेबलाचा वरचा पृष्ठभाग. ३ [*अ.व*] सर्वात वरची श्रेणी, सर्वोच्च स्थान. ४ [*गण*] टोपण: *a pen ~, पेनचे टोपण.* ५ [*गण*] (स्त्रियांचा) वर घालायचा कपडा. ६ (*वाक्प्र*) **at the top of one's 'voice** मोठ्याने, मोठ्या आवाजात, घसा फोडून, बेंबीच्या देठापासून. **from ,top to 'bottom** पूर्णपणे, नखशिखान्त, आपदमस्तक. **get on top of sb** (*अनौप*) (कामाबाबत) एखाद्याला काळजीत पाडणे. **on top of sth** (**क**) एखादी गोष्ट पूर्ण ताब्यात असणे, एखाद्या गोष्टीचे लगाम हाती असणे. (**ख**) एखाद्या गोष्टीच्या भरीला. **on ,top of the 'world** खूप आनंदी: *He feels on ~ of the world today, आज तो खूप आनंदात आहे.* **,over the 'top** (विशेषतः *ब्रि अनौप*) न पटेल असा अवास्तव किंवा अतिशयोक्तीपूर्ण. **top 'brass** (*व्रात्य*) वरिष्ठ अधिकारी. **top 'dog** (*व्रात्य*) सर्वोच्च स्थानावरचा माणूस, ज्येष्ठ व्यक्ती. **top** *वि* सर्वोच्च, अगदी वरचा: *a room on the ~ floor, सर्वात वरच्या मजल्यावरची खोली ○ at ~ speed, भरधाव वेगाने.* **,top 'hat** *ना* [*गण*] पुरुषांनी घालायची करडी किंवा काळी उंच टोपी. **,top-'heavy** *वि* वर खूप जड झालेला. **topless** *वि* (स्त्रीबाबत) छाती उघडी टाकलेली, अनावृत्त स्तनाची. **'topmost** *वि* सर्वोच्च, अग्रभागाचा. **,top 'secret** *वि* इतरांना न सांगायचे असे गुपित, महत्त्वाचे गुपित. **'top-soil** *ना* [*अगण*] अगदी वरचा मातीचा थर.

top^2 /'टॉप्/ *क्रि* (**-pp-**) [*सक*] वर आवरण घालणे: *a cake ~ped with icing, स्वादिष्ट पिठीसाखर पेरलेला केक.* २ शिखर गाठणे, वर जाणे: *Exports have ~ped £100 million, दहा कोटी पौंडाच्या वर निर्यात गेली आहे.* ३ पहिला क्रमांक येणे. ४ (*क्रिब*) **top (sth) up** (अंशतः रिकामा झालेला पेला वगैरे) भरणे: *~ up with petrol, पेट्रोल पूर्ण भरणे ○ ~ up a drink, पेय भरून देणे.*

top^3 /'टॉप्/ *ना* [*गण*] भोवरा.

topic /'टॉपिक्/ *ना* [*गण*] चर्चेचा किंवा अभ्यासाचा विषय. **topical** *वि* सध्याच्या काळात मनोरंजक वाटणारा, प्रासंगिक महत्त्वाचा: *~al issues, प्रासंगिक महत्त्वाचा प्रश्न.*

topple /'टॉप्ल्/ *क्रि* [*अक, सक*] पडणे किंवा पाडणे, कोसळणे: (*ला*) *the crisis ~d the government, त्या गंभीर प्रकरणामुळे सरकार कोसळले.*

torch /टॉऽच्/ *ना* [*गण*] १ (*ब्रि*) हातातील विजेरी. २ उजेडासाठी तेलात वगैरे बुडवून पेटवलेला लाकडाचा दांडा, मशाल, दिवटी. **'torchlight** *ना* [*अगण*] विजेरी किंवा मशालीचा उजेड: *a ~light procession, मशाल-मोर्चा.*

tore TEAR^2 चा *भूत.*

torment /'टॉऽमेन्ट्/ *ना* (**क**) [*अगण*] कमालीचे दुःख, यातना, छळ. (**ख**) [*गण*] यातनाकारक गोष्ट. **torment** /टॉऽ'मेन्ट्/ *क्रि* [*सक*] १ यातना देणे, दुःख देणे. २ त्रास देणे. **tormentor** /टॉऽ'मेन्ट(र्)/ *ना* [*गण*] पीडा देणारा, छळणारा.

torn TEAR^2 चे *भूत वि.*

tornado /टॉऽ'नेइडउ/ *ना* [*गण*] (*ब.व* ~**es**) झंझावात.

torpedo /टॉऽ'पीडउ/ *ना* [*गण*] (*ब.व* ~**es**) पाण्याखालून जाणारा, जहाजे बुडवण्यासाठी वापरला जाणारा नळीच्या आकाराचा बॉम्ब, पाणसुरुंग, पाणतीर. **torpedo** *क्रि* [*सक*] पाणतीर सोडून (जहाजे वगैरे) नष्ट करणे, सुरुंग लावणे, जणू सुरुंग लावणे.

torrent /'टॉरन्ट्; *अमे* 'टॉऽर-/ *ना* [*गण*] १ पाण्याचा जोरदार स्रोत, लोंढा, लोट. २ (*ला*) स्फोट: *a ~ of abuse, शिव्यांची लाखोली.* **torrential** /ट'रेन्श्ल्/ *वि* मुसळधार, धुंवाधार: *~ial rain, मुसळधार पाऊस.*

torso /'टॉऽसउ/ *ना* [*गण*] (*ब.व* ~**s**) डोके, हात, पाय वगळून शरीराचा मुख्य भाग, धड.

tortoise /'टॉऽटस्/ *ना* [*गण*] कासव. **'tortoiseshell** *ना* [*अगण*] दागिने करण्यास वापरले जाणारे काही प्रकारच्या कासवांचे कवच.

tortuous /'टॉऽचुअस्/ *वि* १ वळणावळणाचा, नागमोडी; गोलगोल वळणारा. २ अप्रत्यक्ष, आडवळणी; क्लिष्ट.

torture /'टॉऽच(र्)/ *क्रि* [*सक*] एखाद्याला शिक्षा म्हणून यातना देणे, एखाद्याचे हालहाल करणे किंवा एखाद्याला जबरदस्तीने काही

बोलायला लावणे. **torture** *ना* १ [*अगण*] (कबुली वगैरे मिळण्यासाठी केलेले) हालहाल. २ [*गण, अगण*] कमालीचे दुःख, तीव्र वेदना, नरकयातना. **torturer** *ना* [*गण*] हालहाल करणारा माणूस, छळवादी.

Tory /'टॉऽरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) *वि* ब्रिटिश कॉन्झरव्हेटिव्ह किंवा पुराणमतवादी पक्षाचा (सभासद).

toss /टॉस्; *अमे* 'टॉऽस्/ *क्रि* १ [*सक*] फेकून/टाकून देणे, भिरकावणे. २ [*सक*] मान उडवणे, मान वेळावणे. ३ [*अक, सक*] या कुशीवरून त्या कुशीवर होणे, तळमळणे : *I kept ~ing and turning all night, रात्रभर मी नुसता तडफडत होतो.* ४ [*सक*] हलक्या हाताने मिसळणे : *~ a salad, सॅलड हलक्या हाताने मिसळणे.* ५ [*अक, सक*] नाणे फेकून निर्णय घेणे : *Let's ~ to see who goes first, पहिलं कोण जाणार हे नाणे उडवून ठरवू या.* **toss** *ना* [*गण*] मानेला दिलेला झटका, मान उडवणे : *With a ~ of her head she showed her consent, मानेला झटका देत तिने आपली संमती दाखवली.* **'toss-up** *ना* [*अे.व*] समान शक्यता/संधी.

tot^{1} /टॉट्/ *ना* [*गण*] १ अगदी लहान मूल, बालक, बच्चा. २ मद्याचा छोटासा घोट.

tot^{2} /टॉट्/ *क्रि* (**-tt-**) (*क्रिब*) **tot sth up** (*अनौप*) (आकड्यांची) बेरीज करणे, मोजणे.

total /'टउट्ल्/ *ना* १ [*गण*] एकूण संख्या किंवा एकंदर राशी. २ (*वाक्प्र*) **in 'total** एकंदर, एकूण. **total** *क्रि* (**-ll-**; *अमे* तसेच **-l-**) [*सक*] १ बेरीज करणे, एकंदर मोजणे. २ बेरीज होणे, संख्या गाठणे : *The number of visitors ~led 15,000, येणाऱ्या लोकांची संख्या १५००० पर्यंत पोहोचली.* **totality** /टउ'टॅलेटि/ *ना* [*अगण*] (*औप*) संपूर्ण रक्कम, पूर्णत्व, साकल्य. **totally** *क्रिवि* पूर्णपणे, संपूर्णतया : *~ly blind, ठार आंधळा.*

totalitarian /,टउटॅलि'टेअरिअन्/ *वि* एकपक्षीय राजवटीचा, एकछत्री राज्यसत्तेचा, अधिकेन्द्रित.

totter /'टॉट(र्)/ *क्रि* [*अक*] १ लटपटत चालणे. २ डगमगणे, डळमळणे.

touch^{1} /टेच्/ *क्रि* १ [*अक, सक*] स्पर्श करणे, हात लावणे : *The dish is hot – don't ~ (it)! ताटली तापलीये – हात नको लावू तिला!* २ [*अक, सक*] एकमेकांना भिडणे, लागणे, चिकटणे : *The two wires ~ed, दोन तारा एकमेकीला लागल्या.* ३ [*सक*] खाणे किंवा पिणे, घेणे : *He hasn't ~ed any food for two days, गेल्या दोन दिवसात त्याने अन्नपाण्याला स्पर्शही केला नाही.* ४ [*सक*] (बहुधा कर्मणी) सहानुभूती वाटणे किंवा वाटायला लावणे, वाईट वाटणे : *We were greatly ~ed by your thoughtfulness, तुझ्या विचारीपणाने आम्ही अगदी भारावून गेलो होतो.* ५ [*सक*] गुणवत्तेत जवळपास येणे, बरोबरी करणे : *No one can ~ him as an actor, नट म्हणून कुणीही त्याच्या जवळपासही फिरकू शकत नाही.* ६ (*वाक्प्र*) **touch wood** काही आपत्ती किंवा दुर्भाग्य येऊ नये म्हणून लाकडाला स्पर्श करणे. ७ (*क्रिब*) **touch down** (विमानाबाबत) उतरणे. **touch sth off** एखादी (विशेषतः भयानक) गोष्ट सुरू करणे. **touch on/upon sth** एखाद्या गोष्टीचा फक्त ओझरता उल्लेख करणे, एखाद्या गोष्टीला फक्त स्पर्श करणे. **touch sth up** लहानसहान बदल करून सुधारणे, नीटनेटके करणे, हात फिरवणे. **'touchdown** *ना* [*गण*] विमानाचे उतरणे. **touched** *वि* १ भारावून गेलेला. २ किंचित् वेडसर. **touching** *वि* हालवून सोडणारा, हेलावून सोडणारा.

touch^{2} /टेच्/ *ना* १ [*गण, बहुधा अे.व*] स्पर्श. २ [*अगण*] स्पर्शज्ञान. ३ [*अे.व*] हाताला लागणारा किंवा जाणवणारा असा स्पर्श : *The material has a velvety ~, या चीजेचा स्पर्श मखमली आहे.* ४ [*गण*] बारीक तपशील : *put the finishing ~es to the project, योजनेचे शेवटचे तपशील भरणे.* ५ [*अे.व*] अल्पांश : *a ~ of frost in the air, हवेतील किंचितसा हिमाचा अंश.* ६ [*अे.व*] एखादी गोष्ट करण्याची रीत : *Her work shows that professional ~, तिच्या कामात व्यावसायिक सफाई दिसते.* ७ [*अगण*] (फुटबॉलमधे) आखलेल्या मैदानाच्या सीमारेषांच्या बाहेरचा भाग : *The ball is in ~, चेंडू मैदानाबाहेर आहे.* ८ (*वाक्प्र*) **in/out of 'touch (with sb)** एखाद्याशी संपर्क असलेला/नसलेला. **,touch-and-'go** *वि* अनिश्चित; धोकादायक, जोखमीचा.

touchy /'टैचि/ *वि* (**-ier, -iest**) एखाद्या गोष्टीबाबत तीव्र भावना असलेला, पटकन् चिडणारा.

tough /टफ्/ *वि* १ चिवट, सहजपणे न मोडणारा किंवा कापला न जाणारा. २ (मांसाबाबत) कापायला किंवा चावायला कठीण, चामट, वातड. ३ कष्ट/हाल पचवणारा, धट्टाकट्टा. ४ अवघड, कठीण : *a ~ problem, कठीण प्रश्न.* ५ दृढ; कडक : *~ laws to deal with terrorism,* दहशतवादास तोंड देण्यास *केलेले कडक कायदे.* ६ दुर्भाग्यपूर्ण, दुर्दैवी : *~ luck, दुर्भाग्य.* **toughen** /'टफ्न्/ *क्रि* [*अक, सक*] ताठर होणे, कडक होणे/करणे. **toughness** *ना* [*अगण*] ताठरपणा, कडकपणा.

toupee /'टूपेइ; *अमे* टू'पेइ/ *ना* [*गण*] पुरुषाचे टक्कल झाकण्यासाठी डोक्यावर घालायचा केसाचा लहान टोप.

tour /टुअ(र्)/ *ना* [*गण*] १ अनेक ठिकाणी जाण्यासाठी केलेला प्रवास, स्थळयात्रा : *a round-the-world ~, जगातील विभिन्न स्थळांना भेटी देण्याची सहल.* २ धावती भेट : *a ~ of the palace, राजवाड्याला दिलेली धावती भेट.* **tour** *क्रि* [*अक, सक*] एखाद्या स्थळाला भेट देणे, यात्रा करणे, पर्यटन करणे. **tourism** /'टुअरिझम्/ *ना* [*अगण*] यात्रा, सहली आयोजित करण्याचा व्यवसाय, पर्यटन व्यवसाय. **tourist** *ना* [*गण*] मौज म्हणून विविध स्थळांना भेटी देणारा माणूस, यात्रेकरू, पर्यटक.

tournament /'टॉऽनमन्ट्; *अमे* 'टऽर्न-/ *ना* [*गण*] साखळी स्पर्धा : *a 'chess ~, बुद्धिबळ-स्पर्धा.*

tourniquet /'टुअनिकेइ; *अमे* 'टऽर्निकट्/ *ना* [*गण*] पाय किंवा हातावरील जखमेवर रक्त थांबवण्यासाठी बांधलेले घट्ट बँडेज.

tout /टाउट्/ *क्रि* १ [*अक, सक*] लोकांशी थेट संपर्क साधून माल किंवा सेवा विकणे – विशेषतः सतत मागे लागून, माल गळ्यात मारायचा प्रयत्न करणे. २ [*सक*] (*ब्रि*) चढ्या भावाने (काळ्या बाजाराने) खेळाच्या सामन्याची वगैरे तिकिटे विकणे. **tout** *ना* [*गण*] तिकिटांचा काळा बाजार करणारी व्यक्ती.

tow /टउ/ *क्रि* [*सक*] दोर, साखळी वगैरे बांधून (वाहन वगैरे) ओढणे. **tow** *ना* १ [*गण*] दोरीने, साखळीने वगैरे ओढणे. २ (*वाक्प्र*) **in tow** (*अनौप*) मागेमागे येणे. **on tow** दोरीने वगैरे ओढला जाणारा. **'tow-path** *ना* [*गण*] नदीकाठचा किंवा पाटाच्या काठचा रस्ता.

towards /ट'वॉऽड्झ; *अमे* टॉऽर्ड्झ/ (तसेच **toward** /ट'वॉऽड्; *अमे* टॉऽर्ड्/) *शब्दयो* १ -कडे, -च्या दिशेने : *walk ~ the door, दाराकडे चालत जाणे.* २ (एखादी गोष्ट मिळवण्याच्या) दिशेने, अनुरोधाने : *steps ~ unity, एकीच्या दिशेने टाकलेली पावले.* ३ च्या बाबत, -च्या संबंधात : *friendly ~ tourists, पर्यटकांबाबत मित्रत्वाचा.* ४ अगदी थोडे आधी, थोडे पूर्वी : *~ the end of the 19th century, १९ व्या शतकाच्या अगदी शेवटी शेवटी म्हणजेच १९ वे शतक संपता संपता.* ५ साठी, -करता, -च्या हेतूने : *The money will go ~ a new car, नवीन गाडीसाठी हे पैसे वापरले जातील.*

towel /'टाउअल्/ *ना* [*गण*] अंग किंवा हात पुसायचा रुमाल, पंचा. **towelling** ((*अमे*) **-l-**) *ना* [*अगण*] रुमाल किंवा पंचा करण्यासाठी वापरले जाणारे जाड पण मऊ कापड.

tower /'टाउअ(र्)/ *ना* [*गण*] १ उंच, अरुंद इमारत किंवा इमारतीचा तसा भाग, मनोरा. २ (*वाक्प्र*) **a ,tower of 'strength** मदत किंवा आधाराकरता जिच्यावर अवलंबून राहता येईल अशी व्यक्ती, आधारस्तंभ असणारा माणूस. **tower** *क्रि* [*अक*] *above/over//* एखाद्या व्यक्तीपेक्षा किंवा गोष्टीपेक्षा खूप उंच असणे, उंच जाणे. **'tower block** *ना* [*गण*] (*ब्रि*) घरे किंवा कचेऱ्या असणारी गगनचुंबी इमारत. **towering** *वि* खूप उंच, गगनचुंबी; थोर, महान.

town /टाउन्/ *ना* १ (क) [*गण*] नगर, लहान शहर. (ख) [*गण,* तसेच ब.व क्रियापदासह ए.व] शहरात राहणारे लोक, सर्व शहरवासी. २ [*अगण*] शहरातील प्रमुख बाजारपेठेचा भाग. ३ [*अगण*] एखाद्या भागातील मुख्य शहर. ४ [*अगण*] सर्वसाधारण शहरे किंवा नगरे : *~ life, शहरी जीवन.* ५ (*वाक्प्र*) **go to 'town** (*अनौप*) एखादी गोष्ट उत्साहाने आणि थाटामाटात करणे. **(out) on the 'town**

खास करून रात्रीच्या वेळी शहरात हिंडून मौजमजा करणे. **,town 'clerk** *ना* [*गण*] शहराच्या नोंदी वगैरे ठेवणारा अधिकारी, नगर-अभिलेखपाल. **,town 'council** *ना* [*गण*] नगराचा कारभार चालवणाऱ्या अधिकाऱ्यांचा गट, नगर-परिषद. **,town 'hall** *ना* [*गण*] नगर-शासनाची कार्यालये असणारी इमारत, नगरभवन. **township** /'टाउन्शिप्/ *ना* [*गण*] (दक्षिण आफ्रिकेमधे) कृष्णवर्णीय लोकवस्तीचे नगर किंवा उपनगर.

toxic /'टॉक्सिक्/ *वि* (*औप*) विषारी.

toy /टॉइ/ *ना* [*गण*] खेळणे. **toy** *क्रि* (*क्रिब*) **toy with sth** (**क**) (एखादी कल्पना वगैरे) मनात बाळगणे, सहज मनात येणे. (**ख**) हाताने चाळा करणे : ~ *with a pencil, पेन्सिलीशी चाळा करणे.*

trace /ट्रेइस्/ *क्रि* [*सक*] १ कष्टाने शोधून काढणे, छडा लावणे : *I cannot ~ the letter, मला त्या पत्राचा तपास लागत नाहीये.* २ एखाद्या गोष्टीचा इतिहास सांगणे, विशद करणे, मूळ शोधणे. ३ (एखाद्या चित्रावर वगैरे) पारदर्शक कागद ठेवून नक्कल काढणे, गिरवणे. **trace** *ना* १ [*गण, अगण*] येऊन गेल्याची खूण, मागमूस : *~s of an ancient civilization, प्रावीन संस्कृतीच्या खाणाखुणा* ○ *disappear without ~, मागे काही खूण न ठेवता नाहीसे होणे* किंवा *मागमूस न ठेवता नाहीसे होणे.* २ [*गण*] अल्पांश : *~s of poison in his blood, त्याच्या रक्तातील विषाचे अंश.* **tracing** *ना* [*गण*] पारदर्शक कागद ठेवून (चित्राची वगैरे) काढलेली नक्कल. **'tracing-paper** *ना* [*अगण*] नकला काढण्यासाठी वापरायचा पारदर्शक कागद.

trachea /ट्र'किअ; *अमे* 'ट्रेइकिअ/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s** किंवा वैज्ञानिक संदर्भात **~e** /-कि·अी/)(*शरीर*) श्वासनलिका, नरडे.

track /ट्रॅक्/ *ना* [*गण*] १ मार्ग, कच्चा रस्ता. २ माणूस, जनावर, वाहन वगैरे गेल्यावर मागे राहणारा मार्ग, त्यांच्या खूणा. ३ लोहमार्ग. ४ शर्यतीसाठी आखलेला मार्ग. ५ ध्वनिमुद्रिका किंवा ध्वनिफीत यावरील गाणे किंवा संगीत. ६ (*वाक्प्र*) **hot on sb's track** ➪ HOT. **in one's 'tracks** (*अनौप*) जागच्याजागी; एकाएकी, अचानक : *Stop him in his ~s, त्याला जागच्याजागी थांबव.* **keep/lose track of sb/sth** एखाद्या गोष्टीची माहिती घेत राहणे/न घेणे. **make 'tracks** ठिकाण सोडणे. **on the right/wrong 'track** योग्य/अयोग्य दिशेने विचार करणे. **track** *क्रि* १ [*सक*] माग घेणे, मागावर असणे. २ (*क्रिब*) **track sb/sth down** एखाद्याला शोधून/हुडकून काढणे. **tracker** *ना* [*गण*] माग काढणारा. **'track record** *ना* [*गण*] एखाद्या माणसाच्या किंवा संस्थेच्या पूर्वीच्या यशस्वी कामगिऱ्या. **'track suit** *ना* [*गण*] प्रशिक्षणाच्या वेळी व्यायामपटूंनी वापरायचा सैल, उबदार पोषाख.

tract^{1} /ट्रॅक्ट्/ *ना* [*गण*] १ मोठा भूखंड, मोठी जमीन, भूभाग. २ प्राण्याच्या शरीरातील विविध भाग जोडून झालेली यंत्रणा : *the re'spiratory ~, श्वासोच्छ्वासाची यंत्रणा* किंवा *श्वसन मार्ग.*

tract^{2} /ट्रॅक्ट्/ *ना* [*गण*] एखाद्या धार्मिक, राजकीय किंवा नैतिक विषयावरील छोटासा लेख.

traction-engine /'ट्रॅक्शन् 'एन्जिन्/ *ना* [*गण*] वाफेवर चालणारे मोठे वाहन – पूर्वी जड सामान ओढण्यासाठी वापरत.

tractor /'ट्रॅक्ट(र्)/ *ना* [*गण*] शेतीची अवजारे ओढण्याचे एक वाहन, कर्षित्र.

trade^{1} /ट्रेइड्/ *ना* १ (**क**) [*अगण*] माल किंवा सेवा यांची खरेदी, विक्री किंवा विनिमय करण्याचा व्यवसाय, व्यापार. (**ख**) [*गण*] विशिष्ट व्यवसाय, धंदा : *She's in the book ~, ती पुस्तकाच्या धंद्यात आहे* किंवा *ती ग्रंथ-व्यवसाय करते.* २ [*अगण, गण*] हाताचे कसब वगैरे आवश्यक असणारा पेशा : *He's a carpenter by ~, तो पेशाने सुतार आहे.* **'trade mark** *ना* [*गण*] उत्पादकाने उत्पादनासाठी वापरलेले विशिष्ट नाव किंवा चिन्ह, व्यापार-चिन्ह. **'trade name** *ना* [*गण*] उत्पादकाने उत्पादनाला दिलेले नाव, व्यापारनाम. **'tradesman** *ना* [*गण*] मालविक्रेता, दुकानदार, व्यापारी. **,trade 'union** *ना* [*गण*] कामगार संघटना, श्रमिकसंघ. **,trade-'unionist** *ना* [*गण*] कामगार संघटनेचा सभासद किंवा कार्यकर्ता.

trade^{2} /ट्रेइड्/ *क्रि* १ [*अक*] व्यापार करणे. २ [*सक*] (*for*)// बदल्यात देणे. ३ (*क्रिब*)

trade sth in वापरलेली वस्तू परत करून तिची किंमत वजा करून नवीन वस्तू खरेदी करणे. **trade on sth** एखाद्या गोष्टीचा गैरफायदा घेणे, एखाद्याच्या कमजोरीचा फायदा उठवणे. **trader** *ना* [*गण*] व्यापारी.

tradition /ट्र'डिश्न्/ *ना* (क) [*गण*] एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे आलेली रूढी, रिवाज. (ख) [*अगण*] पूर्वापार चालत आलेली परंपरा. **traditional** /-शन्ल्/ *वि* रूढीचा; पारंपरिक, परंपरागत. **traditionally** *क्रिवि* परंपरेने.

traffic /'ट्रॅफिक्/ *ना* [*अगण*] १ रस्त्यावरची वाहतूक, रहदारी. २ जहाजे किंवा विमाने यांची ये-जा. ३ माल किंवा माणसे यांच्या वाहतुकीचा व्यवसाय. ४ अवैध किंवा बेकायदेशीर धंदा किंवा ने-आण. **traffic** *क्रि* (-ck-) [*अक*] (*in*)// विशेषतः अमली पदार्थांसारख्या अवैध मालाची चोरटी ने-आण करणे. **trafficker** *ना* [*गण*] बेकायदेशीरपणे अमली पदार्थ विकणारी व्यक्ती. **'traffic island** *ना* [*गण*] रहदारीच्या रस्त्यात मध्यभागी पादचाऱ्यांना उभे राहण्यासाठी बांधलेला कट्टा. **'traffic jam** *ना* [*गण*] रहदारीची कोंडी. **'traffic-light** *ना* [*गण,* बहुधा *ब.व*] वाहतुकीचे नियंत्रण करणारे रस्त्यावरील मार्गदर्शक दिवे. **'traffic warden** *ना* [*गण*] शहरातील मोटारी उभ्या करण्याच्या जागेवर लक्ष ठेवणारा अधिकारी, वाहतूक अधीक्षक.

tragedy /'ट्रॅजडि/ *ना* (*ब.व* -ies) १ [*गण, अगण*] दुःखदायक भयानक घटना, दुर्दैवी घटना, शोकान्तिका. २ (क) [*गण*] शोकात्म नाटक, शोकान्तिका. (ख) [*अगण*] शोकान्तिका नाट्यप्रकार.

tragic /'ट्रॅजिक्/ *वि* १ भयानक, शोकात्म, करूण : *a ~ accident, भयानक अपघात.* २ शोकात्म, शोकान्तिकेसारखा. **tragically** /-क्लि/ *क्रिवि* भयानकपणे.

trail /ट्रेइल्/ *ना* [*गण*] १ एखाद्या गोष्टीचा उमटलेला माग. २ खडबडीत भूभागातला रस्ता, पाऊलवाट. **trail** *क्रि* १ [*अक, सक*] एखाद्या गोष्टीमागे फरफटत जाणे/नेणे. २ [*अक*] इतरांच्या मागोमाग हळूहळू जाणे, संथपणे सरकणे. ३ [*अक*] स्पर्धेत वगैरे मागे पडणे, पीछेहाट होणे. ४ [*अक*] (वनस्पतींबाबत) जमिनीवर पसरणे किंवा सरपटत वाढणे, लोंबकळत राहणे. ५ [*सक*] माग काढणे. ६ (*वाक्प्र*) **hot on sb's trail** ➪ HOT. **trailer** *ना* [*गण*] १ दुसऱ्या वाहनाने ओढून नेले जाणारे वाहन, अनुयान. २ आगामी चित्रपटाचे जाहिरातीसाठी दाखविले जाणारे भाग, परिचयपट.

train^{1} /ट्रेइन्/ *ना* [*गण*] १ आगगाडी. २ साखळी, मालिका : *a ~ of thought, विचाराची साखळी.* ३ मोठ्या पोषाखाचा जमिनीवर येणारा भाग. ४ रांगेत सरकणारी माणसं किंवा जनावरं.

train^{2} /ट्रेइन्/ *क्रि* १ [*अक, सक*] शिक्षण घेणे/देणे, तालीम देणे, वळण लावणे : *~ a football team, फुटबॉलच्या संघाला प्रशिक्षण देणे.* २ [*सक*] नेम धरणे; रोखणे : *~ a gun on the enemy, शत्रूच्या दिशेने बंदूक रोखणे.* ३ [*सक*] विशिष्ट दिशेने वाढवणे : *~ roses up a wall, भिंतीवर गुलाबाची झाडे वाढवणे.* **trainee** /ट्रेइ'नी/ *ना* [*गण*] प्रशिक्षार्थी. **trainer** *ना* [*गण*] १ प्रशिक्षक. २ [बहुधा *ब.व*] खेळाचे दणकट बूट. **training** *ना* [*अगण*] तयारी, प्रशिक्षण, सराव.

traipse /ट्रेइप्स्/ *क्रि* [*अक*] (*अनौप*) रखडत चालणे, पायपीट करणे.

trait /ट्रेइट्; ट्रेइ/ *ना* [*गण*] विशिष्ट गुणधर्म, विशेष लक्षण.

traitor /'ट्रेइट(र्)/ *ना* [*गण*] देशद्रोही, मित्रद्रोही वगैरे, गद्दार.

tram /ट्रॅम्/ *ना* [*गण*] रस्त्यावर टाकलेल्या रुळांवरून जाणारे आणि विजेवर चालणारे एक प्रवाशांचे वाहन.

tramp /ट्रॅम्प्/ *क्रि* १ [*अक*] रखडत चालणे, आवाज करत किंवा जड पावलांनी चालणे, पाय ओढीत चालणे. २ [*अक, सक*] लांब तांबडत जाणे/नेणे : *~ over the hills, डोंगरावरून तांबडत जाणे.* **tramp** *ना* [*गण*] १ घर किंवा कामधंदा नसणारा भटक्या. २ दूरवर चालणे.

trample /'ट्रॅम्·प्ल्/ *क्रि* १ [*अक, सक*] (*on*)// नष्ट करण्यासाठी एखादी गोष्ट पायाखाली तुडवणे. २ [*अक*] *on*// एखाद्याला वाईट वागवणे, भावना पायदळी तुडवणे.

trampoline /'ट्रॅम्पलीन्/ *ना* [*गण*]

कसरतपटू उड्या मारतात ती स्प्रिंग असलेल्या चौकटीवर बसवलेली दणकट कापडाची लवचिक जाळी.

trance /ट्रान्स्; *अमे* ट्रॅन्स्/ *ना* [*गण*] मनाची झोपेसारखी अवस्था, समाधी, तन्द्री.

tranquil /'ट्रॅङ्क्विल्/ *वि* (*औप*) शांत; निःशब्द. **tranquillity** (*अमे* तसेच **-l-**) /ट्रॅङ्'क्विलटि/ *ना* [*अगण*] शांती; निःशब्दता. **tranquillize** (*अमे* तसेच **-l-**) *क्रि* [*सक*] शांत करणे – विशेषतः औषधाने, उपशम करणे. **tranquillizer** *ना* [*गण*] (*अमे* तसेच **-l-**) मनावरचा ताण दूर करणारे औषध, चिंताहारक औषध. **tranquilly** *क्रिवि* शांतपणे, शांतीने.

transact /ट्रॅन्'झॅक्ट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) व्यवहार करणे, धंदा करणे. **transaction** /-'झॅक्·श्न्/ *ना* १ [*अगण*] व्यवहार करणे. २ [*गण*] केलेला व्यवहार किंवा धंदा. ३ **transactions** [*ब.व*] संस्थेच्या सभांच्या लेखी नोंदी, अहवाल.

transatlantic /,ट्रॅन्झ़ट्'लॅन्टिक्/ *वि* ॲटलांटिक महासागरावरील प्रवास किंवा दळणवळण.

transcend /ट्रॅन्'सेन्ड्/ *क्रि* [*सक*] (*औप*) पलीकडे जाणे, ओलांडणे, पार करणे : *~ human knowledge, मानवी ज्ञानाच्या पलीकडे जाणे.*

transcontinental /,ट्रॅन्झ्कॉन्टि'नेन्ट्ल्/ *वि* खंड ओलांडणारा, खंडपार.

transcribe /ट्रॅन्'स्क्राइब्/ *क्रि* [*सक*] १ लेखी नक्कल करणे, आहे तसे उतरवणे. २ विशेष रूपात किंवा खास लिपीत लिहिणे, प्रतिलेखन करणे : *~d in phonetic symbols, ध्वनिविज्ञानाच्या चिन्हांत लिहिलेला.* ३ दुसऱ्या वाद्याने वाजविता येईल अशा रीतीने संगीत रचनेचे पुनर्लेखन करणे. **transcript** /'ट्रॅन्स्क्रिप्ट्/ *ना* [*गण*] लिखित प्रत, प्रतिलेख. **transcription** /-'स्क्रिप्श्न्/ *ना* [*अगण*, *गण*] प्रतिलेखन.

transfer^1 /ट्रॅन्स्'फऽ(र्)/ *क्रि* (**-rr-**) १ [*अक*, *सक*] बदली होणे/करणे : *He was ~red to the sales department, विक्री-विभागाकडे त्याची बदली करण्यात आली.* २ [*सक*] एखाद्या गोष्टीची मालकी दुसऱ्याकडे देणे, हस्तान्तरण करणे, (मालमत्ता वगैरे) दुसऱ्याच्या नावावर करणे. **transferable** *वि* हस्तान्तरणीय : *This ticket is not ~able, हे तिकीट हस्तान्तरणीय नाही म्हणजेच दुसऱ्याला चालणार नाही.* **transference** /'ट्रॅन्स्फरन्स्; *अमे* ट्रॅन्स्'फऽरन्स्/ *ना* [*अगण*] हस्तान्तरण.

transfer^2 /'ट्रॅन्सफऽ(र्)/ *ना* १ [*गण*, *अगण*] बदली; हस्तान्तरण. २ [*गण*] एखाद्या पृष्ठभागावर उठवायची नक्षी वगैरे.

transfix /ट्रॅन्स्'फिक्स्/ *क्रि* [*सक*] (*औप*) (बहुधा कर्मणी) भीती, आश्चर्य वगैरेने एखाद्याला अवाक् करणे, गारठून जाणे.

transform /ट्रॅन्स्'फॉऽम्/ *क्रि* [*सक*] चेहरामोहरा बदलून टाकणे, एखाद्या गोष्टीचे रूप बदलून टाकणे, रूपान्तरण करणे. **transformation** /,ट्रॅन्स्फ'मेइश्न्/ *ना* [*गण*, *अगण*] रूपान्तरण. **transformer** *ना* [*गण*] विद्युत्प्रवाहाचा दाब बदलणारे साधन, रोहित्र, परिवर्तित्र.

transfusion /ट्रॅन्स्'फ्यूझ्न्/ *ना* [*गण*, *अगण*] एका माणसाचे रक्त दुसऱ्या माणसास देणे, रक्ताधानप्रयोग, संचरण.

transgress /ट्रॅन्झ्'ग्रेस्/ *क्रि* [*अक*, *सक*] (*औप*) (नैतिक मर्यादा) ओलांडणे, उत्क्रमण करणे; गैर वागणे. **transgression** /-'ग्रेश्न्/ *ना* [*गण*, *अगण*] उत्क्रमण, मर्यादा-उल्लंघन; गैरकृत्य.

transient /'ट्रॅन्झिअन्ट्; *अमे* 'ट्रॅन्·श्न्ट्/ *वि* क्षणभंगुर, क्षणिक, अल्पजीवी.

transistor /ट्रॅन्'झ़िस्ट(र्), -'सिस्ट्-/ *ना* [*गण*] १ रेडिओ वगैरेमधे वापरायचे एक छोटेसे इलेक्ट्रॉनिक साधन. २ अशी साधने असलेला छोटा रेडिओ. . **transistorized** /-टराइझ़्ड्/ *वि* ट्रॅन्झिस्टर्स असलेला.

transit /'ट्रॅन्झ़िट्; -सिट्/ *ना* [*अगण*] माणसांचा किंवा मालाचा प्रवास : *goods damaged in ~, ने-आण करण्यात खराब झालेला माल.*

transition /ट्रॅन्'झ़िश्न्/ *ना* [*गण*, *अगण*] एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत होणारा बदल, संक्रमण. **transitional** /-शन्ल्/ *वि* संक्रमण अवस्थेतील.

transitive /'ट्रॅन्सटिव्ह्/ *वि* (*व्याकरण*) (क्रियापदाबाबत) सकर्मक – उदा 'He washed the cup' (त्याने कप विसळला) मधील *washed* (*विसळला*).

transitory /'ट्रॅन्सिट्रि; *अमे* -टॉऽरि/ *वि* अल्पकालीन, क्षणभंगुर.

translate /ट्रॅन्झ़'लेइट्/ *क्रि* १ [*अक, सक*] भाषान्तर करणे, अनुवाद करणे : ~ *(the book) from French into Russian, (पुस्तकाचे) फ्रेंचमधून रशियन भाषेत भाषान्तर करणे.* २ [*सक*] (*into*)// अधिक सुस्पष्ट करणे, प्रत्यक्षात आणणे : ~ *ideas into practice, कल्पना प्रत्यक्षात उतरवणे.* **translation** /-'लेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] भाषान्तर. **translator** *ना* [*गण*] भाषान्तरकार.

translucent /ट्रॅन्झ़'लूसन्ट्/ *वि* पारदर्शक नसून प्रकाशभेद्य, अर्धपारदर्शक, पारभासी.

transmission /ट्रॅन्झ़'मिश्न्/ *ना* १ [*अगण*] रेडिओ लहरींद्वारे इलेक्ट्रॉनिक संकेत पाठवणे, पारेषण, प्रेषण. २ [*गण*] दूरदर्शन किंवा आकाशवाणीचे प्रक्षेपण. ३ [*गण*] चाकांकडे शक्ती पाठविणारे वाहनाचे भाग, शक्ति-वाहक.

transmit /ट्रॅन्झ़'मिट्/ *क्रि* (**-tt-**) [*सक*] १ रेडिओ लहरींद्वारे इलेक्ट्रॉनिक संकेत पाठवणे, पारेषित करणे. २ एका माणसाकडून दुसऱ्या माणसाकडे पाठवणे. **transmitter** *ना* [*गण*] रेडिओ किंवा टी.व्ही. संकेत प्रेक्षण करणारे साधन, पारेषक, प्रक्षेपक.

transparent /ट्रॅन्स्'पॅरन्ट्/ *वि* १ पारदर्शक : *Glass is ~, काच पारदर्शक असते.* २ सहज समजणारे, सहजगम्य; उघड, अगदी स्पष्ट. **transparency** /-रन्सि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] पारदर्शकता. २ [*गण*] पारदर्शक फिल्मवरचे छायाचित्र, पारदर्शिका. **transparently** *क्रिवि* सहजपणे, स्वच्छपणे.

transplant /,ट्रॅन्स्'प्लान्ट्; *अमे* -'प्लॅन्ट्/ *क्रि* १ [*सक*] रोप उपटून दुसरीकडे लावणे, लावणी करणे. २ [*सक*] शरीराचा अवयव, त्वचा किंवा केस एका व्यक्तीचे दुसऱ्या व्यक्तीला किंवा एका जागेहून दुसऱ्या जागी बसवणे, रोपण करणे. ३ [*अक, सक*] (*ला*) दुसऱ्या जागी जाणे, जागा बदलणे. **transplant** /'ट्रॅन्स्प्लान्ट्; *अमे* -प्लॅन्ट्/ *ना* [*गण*] रोपण (शस्त्रक्रिया), प्रतिरोपण : *a heart ~, हृद्रोपण.*

transport /ट्रॅन्'स्पॉऽट्/ *क्रि* [*सक*] (माणसे किंवा माल यांची) वाहतूक करणे, वाहून नेणे. **transport** /'ट्रॅन्स्पॉऽट्/ *ना* [*अगण*] १ (तसेच विशेषतः *अमे* **transportation** /,ट्रॅन्स्पॉउ'टेइश्न्/ वाहतूक (यंत्रणा), परिवहन. २ वाहन व्यवस्था, वाहतुकीची साधने, वाहन. **transporter** *ना* [*गण*] मोटारी वाहून नेणारे मोठे वाहन.

transpose /ट्रॅन्'स्पउझ़/ *क्रि* [*सक*] १ दोन किंवा अधिक वस्तूंची जागा बदलणे, आलटापालट करणे, स्थानान्तर करणे. २ (*संगीत*) स्वरमंडल/स्वरावली बदलणे, पट्टी बदलणे. **transposition** /,ट्रॅन्स्प'झ़िश्न्/ *ना* [*गण, अगण*] स्थानान्तर.

transverse /'ट्रॅन्झ़्व्हऽस्/ *वि* (*औप*) तिरपा असलेला किंवा ठेवलेला, आडवा, तिर्यक्. **transversely** *क्रिवि* तिरपे.

transvestite /ट्रॅन्झ़'व्हेस्टाइट्/ *ना* [*गण*] पुरुषांचे कपडे घालण्याची हौस असलेली स्त्री किंवा स्त्रियांचे कपडे घालण्याची हौस असलेला पुरुष.

trap /ट्रॅप्/ *ना* [*गण*] १ जनावरे पकडण्याचा सापळा, चाप. २ (*ला*) एखाद्याला अडकवण्याचा किंवा फसवण्याचा आखलेला बेत, सापळा. ३ दोन चाकाची हलकी घोडागाडी. ४ (*व्रात्य*) तोंड. **trap** *क्रि* (**-pp-**) [*सक*] १ एखाद्याला कचाट्यात पकडणे/टाकणे, एखाद्याला चाप लावणे. २ (जनावराला) सापळ्यात पकडणे. ३ फसवणे, गंडवणे. **,trap'door** *ना* [*गण*] जमिनीतील किंवा छपरातील चोरदरवाजा. **trapper** *ना* [*गण*] फासेपारधी.

trapeze /ट्र'पीझ़; *अमे* ट्रॅ-/ *ना* [*गण*] दोराला टांगलेला कसरतीचा दांडीचा झोका, झुलती काठी.

trash /ट्रॅश्/ *ना* [*अगण*] १ (*अनौप*) भिकार सामान, लेखन वगैरे, कचरा. २ (*अमे*) कचरा. **'trashcan** *ना* [*गण*] (*अमे*) कचराटोपली. **trashy** *वि* (**-ier, -iest**) (*अनौप*) भिकार, गुणाने दरिद्री.

trauma /'ट्रॉऽम; 'ट्राउम/ *ना* १ [*अगण*]

भावनात्मक आघात, धक्का. २ [*गण*] (*अनौप*) फार वाईट अनुभव. **traumatic** /ट्रॉऽ'मॅटिक्; *अमे* ट्राउ-/ *वि* आघाताचा; कटू अनुभवाचा.

travel /'ट्रॅव्ह्ल्/ *क्रि* (**-ll-**; *अमे* **-l-**) १ [*अक, सक*] प्रवास करणे. २ [*सक*] अंतर कापणे. ३ [*अक*] जाणे : *Light ~s faster than sound, ध्वनीपेक्षा प्रकाश अधिक वेगाने जातो म्हणजेच प्रकाशाचा वेग अधिक असतो.* **travel** *ना* १ [*अगण*] प्रवास : *space ~, अंतराळ प्रवास.* २ **travels** [*ब.व*] विशेषतः परदेश प्रवास, परदेशच्या वाऱ्या. **'travel agent** *ना* [*गण*] प्रवासाची व्यवस्था करणारा माणूस, प्रवास अभिकर्ता. **travelled** (*अमे* **-l-**) *वि* खूप प्रवास केलेला : *a well-~ writer, खूप प्रवास केलेला लेखक.* **traveller** (*अमे* **-l-**) *ना* [*गण*] १ प्रवासी. २ फिरता विक्रेता. **'traveller's cheque** *ना* [*गण*] स्वतःच्या देशात खात्यावर असलेल्या पैशाच्या विनिमयासाठी परदेशात चालू शकणारा धनादेश, प्रवासी धनादेश.

traverse /ट्र'व्हऽस/ *क्रि* [*सक*] (*औप*) वरून जाणे, पलीकडे जाणे, पार करणे.

travesty /'ट्रॅव्हस्टि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) भ्रष्ट नक्कल, थट्टा : *a ~ of justice, न्यायाची थट्टा.*

trawl /ट्रॉऽल्/ *क्रि* [*अक, सक*] समुद्रात तळाशी मोठे जाळे खेचत नेऊन मासे पकडणे. **trawler** *ना* [*गण*] अशा प्रकारे मोठे मासे पकडताना वापरायचे जहाज.

tray /ट्रेइ/ *ना* [*गण*] अन्न वगैरे नेण्याचे प्लॅस्टिक किंवा लाकडाचे तबक.

treacherous /'ट्रेचरस्/ *वि* १ दगाबाज, धोकेबाज. २ धोकादायक : *~ tides, धोकादायक लाटा.* **treacherously** *क्रिवि* दगलबाजीने, फितुरीने. **treachery** /-चरि/ *ना* [*अगण, गण*] (*ब.व* **-ies**) दगाबाजी.

treacle /'ट्रीकल्/ *ना* [*अगण*] साखरेपासून बनवलेला घट्ट, चिकट द्रवपदार्थ, काकवी. **treacly** *वि* घट्ट आणि चिकट.

tread /ट्रेड्/ *क्रि* (*भूत* **trod** /ट्रॉड्/, *भूत वि* **trodden** /'ट्रॉड्न्/) १ [*अक*] पाय ठेवणे/टाकणे; पाऊल टाकणे. २ [*सक*] पायाने चिरडणे, पायाने दाबणे. ३ [*सक*] चालून पायवाट करणे. ४ (*वाक्प्र*) **,tread on sb's 'toes** (*अनौप*) एखाद्याचा अपमान करणे. **,tread 'water** पाय वर-खाली मारत पाण्यात उभे राहणे. **tread** *ना* १ [*अे.व*] चालण्याची पद्धत, चाल, पावलांचा आवाज. २ [*गण, अगण*] टायरवरील फुगीर रेघांची नक्षी. ३ [*गण*] पायरीचा पृष्ठभाग.

treason /'ट्रीझ्न्/ *ना* [*अगण*] शत्रूला मदत करून वगैरे स्वतःच्या देशाचा केलेला विश्वासघात, देशद्रोह. **treasonable** /-झ़नब्ल्/ *वि* देशद्रोहाचा.

treasure /'ट्रेझ(र्)/ *ना* १ [*अगण*] सोने, चांदी, रत्ने वगैरेचा खजिना, ठेवा. २ [*गण*] फार महत्त्वाचा माणूस, मौल्यवान वस्तू. **treasure** *क्रि* [*सक*] मौल्यवान मानणे, खूप महत्त्व देणे. **treasurer** *ना* [*गण*] एखाद्या संस्थेचा खजिनदार, कोषाध्यक्ष. **'treasure trove** /ट्रउव्ह्/ *ना* [*अगण*] सापडलेले गुप्तधन, डबोले.

treasury /'ट्रेझरि/ *ना* **the Treasury** [*अे.व*] (अे.व किंवा ब.व क्रियापदासह वापर) सार्वजनिक पैशावर नियंत्रण ठेवणारे सरकारी खाते, कोषागार, राजकोष.

treat /ट्रीट्/ *क्रि* [*सक*] १ वागवणे : *They ~ their children badly, ते त्यांच्या मुलांना वाईट वागवतात.* २ समजणे, मानणे; हाताळणे : *T~ it as a joke, तो विनोद आहे असं समज.* ३ वैद्यकीय उपचार करणे : *~ a patient, रोग्यावर उपचार करणे.* ४ फवारणे, एखादे खास द्रव्य वरून मारणे : *~ crops with insecticide, पिकांवर कीटकनाशक मारणे.* ५ एखाद्याला स्वखर्चाने जेऊ घालणे, सिनेमाला वगैरे नेणे, एखाद्याचा बडेजाव करणे. **treat** *ना* [*गण*] १ आनंददायक असे काही विशेष, खास बेत. २ एखाद्याचा राखलेला बडेजाव, मेजवानी, करमणूक वगैरेची व्यवस्था.

treatise /'ट्रीटिझ़, -टिस्/ *ना* [*गण*] एखाद्या विषयावरचा प्रबंध.

treatment /'ट्रीट्मन्ट्/ *ना* [*गण, अगण*] वागणूक, वागवण्याची पद्धती : *medical ~, वैद्यकीय उपचार पद्धती.*

treaty /'ट्रीटि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) देशांमधील करार : *a 'peace ~, शांतता करार.*

treble^{1} /'ट्रेब्ल्/ *वि, ना* [*गण*] तिप्पट : *He* *earns ~ my salary, माझ्या पगाराच्या तिप्पट तो कमावतो.* **treble** *क्रि* [*अक, सक*] तिप्पट होणे, तिपटीने करणे.

treble^{2} /'ट्रेब्ल्/ *ना* [*गण*] उंच आवाज, तार स्वर असणारे संगीत किंवा असा स्वर असणारा मुलगा. **treble** *वि* उंच आवाजातील : *a ~ recorder, उंच आवाजाचा ध्वनिमुद्रक.*

tree /ट्री/ *ना* [*गण*] झाड, वृक्ष. **treeless** *वि* झाडे नसलेला, ओसाड, वैराण.

trek /ट्रेक्/ *क्रि* (**-kk-**) [*अक*] *ना* [*गण*] विशेषतः पायी दूरचा खडतर प्रवास करणे.

trellis /'ट्रेलिस्/ *ना* [*गण*] वेल चढवायचा मंडप किंवा मंडपी, ताटी, मांडव.

tremble /'ट्रेम्ब्ल्/ *क्रि* [*अक*] १ (भीतीने किंवा थंडीने) कापणे, हुडहुडी भरणे, थरथर कापणे. २ कंप पावणे : *The leaves ~d in the breeze, झुळकीने पाने थोडीशी हलली.* ३ काळजीने लटपटणे, थरकाप उडणे : *She ~d at having to make a decision, निर्णय घ्यायच्या कल्पनेने तिचा थरकाप उडाला.* **tremble** *ना* [*गण*] कंप, थरकाप् : *a ~ in her voice, तिच्या आवाजातील कंप.*

tremendous /ट्रि'मेन्डस्/ *वि* १ प्रचंड; खूप मोठा : *a ~ explosion, भयानक स्फोट.* २ (*अनौप*) फार चांगला. **tremendously** *क्रिवि* प्रचंडपणे, फार छान.

tremor /'ट्रेम(र्)/ *ना* [*गण*] कापरे, कंपन, थरथर : *'earth's ~s, जमिनीची थरथर.*

trench /ट्रेन्च्/ *ना* [*गण*] निचरण्याकरता, सैनिकांचे संरक्षण करण्याकरता वगैरे केलेला खंदक, चर.

trend /ट्रेन्ड्/ *ना* [*गण*] एकंदर बदल किंवा वाढ, कल : *the ~ towards smaller families, छोटे कुटुंब असण्याकडे कल.* **'trend-setter** *ना* [*गण*] नवा पायंडा पाडणारा माणूस, उद्गाता. **trendy** *वि* (**-ier, -iest**) (*अनौप*) खूप फॅशनेबल.

trespass /'ट्रेस्पस्/ *क्रि* [*अक*] (*on*)// परवानगीशिवाय दुसऱ्याच्या खाजगी जागेत जाणे, अतिक्रमण करणे. **trespass** *ना* [*अगण, गण*] अतिक्रमण, अनधिकृत प्रवेश. **trespasser** *ना* [*गण*] अतिक्रमण करणारा माणूस, अतिचारी.

trestle /'ट्रेस्ल्/ *ना* [*गण*] टेबलाच्या वगैरे सपाट पृष्ठभागाला आधार देण्यासाठी वापरली जाणारी लाकडी पायांची मांडणी किंवा घडण. **,trestle-'table** *ना* [*गण*] अशा घडणीवर उभे असलेले टेबल.

trial /'ट्राइअल्/ *ना* १ [*गण, अगण*] न्यायाधीशापुढे आणि ज्यूरीसमोर होणारी सुनावणी, खटला. २ [*गण, अगण*] एखाद्या गोष्टीची परीक्षा, कसोटी. ३ [*गण*] चिंतेचे किंवा काळजीचे कारण. ४ (*वाक्प्र*) **on 'trial** (क) कोर्टात खटला चाललेला. (ख) कसोटीला लावलेला, परीक्षा घेण्यात येत असलेला. **,trial and 'error** वेगवेगळ्या मार्गांचा अवलंब करून स्वानुभवावर शिकणे, प्रयोग व प्रमाद (पद्धती). **,trial 'run** *ना* [*गण*] पहिली चाचणी.

triangle /'ट्राइॲङ्ग्ल्/ *ना* [*गण*] तीन सरळ बाजू आणि तीन कोन असलेली आकृती, त्रिकोण. **triangular** /ट्राइ'ॲङ्ग्युल(र्)/ *वि* त्रिकोणी.

tribe /ट्राइब्/ *ना* [*गण*] समान वंश, परंपरा, भाषा वगैरे असणारा आणि एका प्रमुखाच्या अधिपत्याखाली राहणारा माणसांचा गट, जमात, जनजाती. **tribal** *वि* जनजातीचा, जमातीचा. **'tribesman** *ना* [*गण*] जमातीतील पुरुषमाणूस.

tribunal /ट्राइ'ब्यून्ल्/ *ना* [*गण*] काही प्रकारचे तंटे सोडविण्यासाठी नेमलेला लवाद, न्यायाधिकरण.

tributary /'ट्रिब्युट्रि; *अमे* -टेरि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) जास्त मोठ्या नदीला जाऊन मिळणारी नदी, उपनदी.

tribute /'ट्रिब्यूट्/ *ना* [*गण, अगण*] आदरभावना किंवा कौतुक व्यक्त करण्यासाठी केलेली कृती, वापरलेले शब्द किंवा दिलेली भेट, प्रशंसा, आदरांजली : *They paid ~ to her courage, त्यांनी तिच्या धैर्याची प्रशंसा केली.*

trick /ट्रिक्/ *ना* [*गण*] लोकांची करमणूक करण्याची युक्ती, चलाखी : *conjuring ~s, जादूच्या चलाखी.* २ एखाद्याला फसवण्यासाठी वापरलेली युक्ती, गंडा : *play a ~ on sb, एखाद्याला गंडवणे.* ३ एखादी गोष्ट करण्याची हिकमत. ४ पत्त्याचा हात. ५ (*वाक्प्र*) **do the**

'trick (*अनौप*) हवे ते साध्य करणे. **trick** *क्रि* [*सक*] फसवणे, गंडा घालणे : *He was ~ed into giving away all his money, त्याचे सर्व पैसे लुबाडले गेले किंवा सर्व पैसे देऊन तो फसला.* **trickery** *ना* [*अगण*] फसवणूक. **tricky** *वि* **(-ier, -iest)** १ अवघड, फसवा : *a ~y position, अवघड परिस्थिती.* २ (माणसाबाबत) लफंगा, लबाड.

trickle /'ट्रिक्ल्/ *क्रि* [*अक*] वाहणे, धार लागणे : *Tears ~d down her cheek, तिच्या गालावर अश्रू ओघळले.* **trickle** *ना* [*गण*] ओघळ, ओघ : *a ~ of blood, रक्ताचा ओघळ.*

tricycle /'ट्राइसिक्ल्/ *ना* [*गण*] तीनचाकी सायकल, तिचाकी.

tried TRY^1 चा *भूत, भूत वि.*

trifle /'ट्राइफ्ल्/ *ना* १ [*गण*] क्षुल्लक गोष्ट, किरकोळ बाब. २ [*गण, अगण*] साय, केक, जेली वगैरेपासून केलेला एक गोड पदार्थ. ३ (*वाक्प्र*) **a trifle** (*औप*) थोडेसे, किंचित् : *They felt a ~ sad, त्यांना थोडं वाईट वाटलं.* **trifle** *क्रि* [*अक*] *with*// अनादराने वागणे, खेळ करणे. **trifling** *वि* किरकोळ, क्षुल्लक.

trigger /'ट्रिग(र्)/ *ना* [*गण*] १ बंदुकीचा घोडा, चाप, कळ, खटका. **trigger** *क्रि* [*सक*] (*off*)// (अचानक प्रतिक्रिया) निर्माण करणे, एकाएकी उद्‌भवणे.

trill /ट्रिल्/ *ना* [*गण*] १ आवाजाचे कंपन किंवा पक्ष्याचे कूजन. २ (*संगीत*) दोन भिन्न सुरांचे पुन्हापुन्हा होणारे वादन. **trill** *क्रि* [*अक, सक*] कंपन होणे, कूजन करणे.

trilogy /'ट्रिलजि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) परस्परांशी संबंधित अशा तीन पुस्तकांचा, नाटकांचा वगैरे संच, तीन सलग नाटके वगैरे.

trim /ट्रिम्/ *वि* **(-mer, -mest)** (*पसंती*) १ नेटका, टापटिपीचा, ठाकठीक. २ सडपातळ, सडसडीत. **trim** *क्रि* **(-mm-)** [*सक*] १ कापून ठाकठीक करणे. २ कडा सजवणे. **trim** *ना* १ [*गण, बहुधा अ.व*] कातरणे, कापणे. २ (*वाक्प्र*) **in (good) trim** सुस्थितीत. **trimming** *ना* [*गण, बहुधा ब.व*] (क) सजावट, सुशोभीकरण. (ख) नेहमीचे बरोबरचे जिन्नस : *roast beef with all the trimmings, मांस सर्व थाटमाट करून किंवा साग्रसंगीत भाजणे* म्हणजे भाज्या, सॉस वगैरे घालून.

Trinity /'ट्रिनटि/ *ना* **the Trinity** [*अ.व*] (ख्रिस्ती धर्मात) पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा यांचा मिलाफ असलेला परमेश्वर, व्यक्तित्रयात्मक देव.

trinket /'ट्रिङ्किट्/ *ना* [*गण*] किडुकमिडुक, किरकोळ दागिना.

trio /'ट्रीअउ/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s**) १ त्रिकूट. २ तीन गायक किंवा वादक (यांसाठीचे संगीत).

trip /ट्रिप्/ *क्रि* **(-pp-)** १ [*अक*] (*over/up*)// एखाद्या गोष्टीत पाय अडखळून पडणे, ठेच लागून पडणे. २ [*सक*] (क) (*up*)// एखाद्याला चाट घालून पाडणे. (ख) एखाद्याला चुकायला लावणे. ३ [*अक*] ठमकत चालणे. **trip** *ना* [*गण*] १ मजेसाठी केलेली (बहुधा छोटीशी) सफर, सहल. २ (*व्रात्य*) आभास निर्माण करणारा अमली पदार्थ घेतल्यावर येणारा अनुभव, नशा. ३ पडणे, आपटी. **tripper** *ना* [*गण*] सहलीला जाणारा माणूस.

tripartite /,ट्राइ'पाटाइट्/ *वि* (*औप*) तीन भाग किंवा गट असणारा, त्रिखंडात्मक.

tripe /'ट्राइप्/ *ना* [*अगण*] १ अन्न म्हणून वापरायचा बैलाचा किंवा गाईचा कोठा. २ (*व्रात्य*) वात्रटपणा, बाष्कळपणा.

triple /'ट्रिप्ल्/ *वि* तीन भाग असलेला, तिहेरी; तीन गटांचा सहभाग असलेला. **triple** *क्रि* [*अक, सक*] तिपटीने वाढणे/वाढवणे, तिप्पट करणे.

triplet /'ट्रिप्लिट्/ *ना* [*गण*] तिळ्यातील एक मूल.

triplicate /'ट्रिप्लिकेइट्/ *ना* (*वाक्प्र*) **in 'triplicate** तीन प्रतींमधे, ज्यातली एक मूळ असते.

tripod /'ट्राइपॉड्/ *ना* [*गण*] कॅमेऱ्यासाठी वगैरे असणारा तीन पायांचा स्टॅण्ड, तिवई, तिपाई.

trite /ट्राइट्/ *वि* अनाकर्षक आणि नाविन्य नसलेला, रटाळ.

triumph /'ट्राइ·ऐम्फ्/ *ना* (क) [*गण*] मोठे यश, भव्य विजय. (ख) [*अगण*] विजयाचा आनंद. **triumph** *क्रि* [*अक*] (*over*)//

एखाद्यावर विजय मिळवणे. **triumphal** /ट्राइ'अम्फ्ल्/ *वि* विजयाचा, जयोत्सवाचा. **triumphant** /ट्राइ'अम्फ्न्ट्/ *वि* विजयाने आनंदित, विजयाने हर्षभरित. **triumphantly** *क्रिवि* विजयोन्मादाने, जयोत्सवाने.

trivia /'ट्रिव्हिअ/ *ना* [*ब.व*] क्षुल्लक गोष्टी.

trivial /'ट्रिव्हिअल्/ *वि* किरकोळ, क्षुल्लक. **triviality** /,ट्रिव्हि'ॲलटि/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) क्षुल्लकपणा, फालतूपणा. **trivialize** *क्रि* [*सक*] एखादी गोष्ट क्षुल्लक करणे, हवा काढून घेणे.

trod TREAD चा *भूत.*

trodden TREAD चे *भूत वि.*

trolley /'ट्रॉलि/ *ना* [*गण*] १ हातानी ढकलायची चाकाची छोटी गाडी. २ अन्न वाढण्यासाठी वापरायचे चाकाचे छोटे टेबल.

trombone /ट्रॉम्'बउन्/ *ना* [*गण*] सरकवायची नळी असलेले पितळ्याचे एक वाद्य. **trombonist** *ना* [*गण*] ट्रॉम्बोन वादक.

troop /ट्रूप्/ *ना* १ **troops** [*ब.व*] सैनिक, सैन्यदल. २ [*गण*] माणसांचा किंवा जनावरांचा गट, (माणसांचे) मंडळ, (जनावरांचा) कळप. **troop** *क्रि* [*अक*] कळपाकळपाने किंवा घोळक्याने जाणे. **trooper** *ना* [*गण*] चिलखती फौज किंवा घोडदळातला सैनिक.

trophy /'ट्रउफि/ *ना* [*गण*] (*ब.व* -ies) १ स्पर्धा जिंकल्याबद्दल दिलेली बक्षिसाची ढाल, चषक वगैरे, करंडक. २ विजय किंवा यश यांची आठवण म्हणून ठेवलेली गोष्ट, विजयचिन्ह.

tropic /'ट्रॉपिक्/ *ना* १ (क) [*गण, बहुधा अे.व*] विषुववृत्ताच्या उत्तर आणि दक्षिणेकडील रेखावृत्त, अयनवृत्त, दक्षिणोत्तरायणसीमा. (ख) **the tropics** [*ब.व*] दोन अयनवृत्तातील पृथ्वीचा उष्ण हवामानाचा प्रदेश, उष्णकटिबंध. २ (*वाक्प्र*) **tropic of Cancer** /'कॅन्स(र्)/ उत्तरेकडे २३ अंश २७ कला अक्षांश, कर्कवृत्त. **tropic of Capricorn** /'कॅप्रिकॉऽन्/ दक्षिणेस २३ अंश २७ कला अक्षांश, मकरवृत्त. **tropical** *वि* उष्णकटिबंधाचा.

trot /ट्रॉट्/ *क्रि* (-tt-) १ [*अक*] (विशेषतः घोड्याबाबत) दुडक्या चालीने चालणे. २ [*अक*] दुडदुड धावणे. ३ (*क्रिब*) **trot sth out** (*अनौप अधिक्षेपी*) कंटाळा येईल इतके तेच तेच पुन्हा सांगणे किंवा करणे : ~ *out the same excuses, त्याच त्याच सबबी बकणे.* **trot** *ना* १ [*अे.व*] दुडक्या चालीचा वेग. २ (*वाक्प्र*) **on the 'trot** (*अनौप*) एका मागोमाग एक.

trouble /'ट्रब्ल्/ *ना* १ [*गण, अगण*] संकट, पीडा, दुःख : *You shouldn't have any ~ finding the house, घर शोधायला तुला फार यातायात पडू नये.* २ [*अगण*] गैरसोय; त्रास, कटकट : *I don't want to be any ~ to you, माझ्यामुळे तुझी गैरसोय होऊ नये असे मला वाटते.* ३ [*गण, अगण*] अशांतता; मारामारी वगैरे : *the ~s in Northern Ireland, उत्तर आयर्लंडमधील कटकटी.* ४ [*अगण*] आजारपण, दुखणे : *have back ~, पाठीचे दुखणे असणे.* ५ [*अगण*] यंत्रातील बिघाड : *engine ~, इंजिनातील बिघाड.* ६ (*वाक्प्र*) **,get into 'trouble** (क) अड्चणीत येणे, संकटात सापडणे. (ख) शिक्षेस पात्र होण्यासारखे काही करणे. **get sb into 'trouble** (*अनौप*) (अविवाहित मुलीला) गर्भारशी करणे. **take the 'trouble to do sth** एखादी अवघड गोष्ट करणे, प्रयास घेणे. **trouble** *क्रि* १ [*सक*] त्रास देणे. २ [*सक*] (*औप*) (विनंती करताना वापर) गैरसोय करणे : *I'm sorry to ~ you, but could you tell me the way to the station? तुम्हाला त्रास देतोय् याबद्दल दिलगीर आहे, पण स्टेशनला कसे जायचे सांगाल का?* ३ [*अक*] (*औप*) प्रयत्न करणे; त्रास घेणे. **troubled** *वि* त्रस्त, चिंताक्रान्त. **'trouble-maker** *ना* [*गण*] गडबड करणारा, उपद्रवी. **troublesome** *वि* तापदायक.

trough /ट्रॉफ्; *अमे* ट्रॉऽफ्/ *ना* [*गण*] १ गुरांना चारापाणी घालण्याचे पन्हळीसारखे भांडे, दोण, कोठिंबा. २ दोन लाटांमधली खोलगट जागा. ३ हवेचे कमी दाबाचे क्षेत्र.

troupe /ट्रूप्/ *ना* [*गण,* तसेच ब.व क्रियापदासह अे.व] नटमंडळी, नर्तकपथक वगैरे.

trousers /'ट्राउझ़झ़्/ *ना* [*ब.व*] पायघोळ विजार, पॅन्ट : *a pair of ~, पॅन्ट.*

trout /ट्राउट्/ *ना* [*गण*] (*ब.व* **trout**) गोड्या पाण्यातील एक मासा.

trowel /'ट्राउ·अल्/ *ना* [*गण*] १ बाकदार पात्याचे बागकामाचे एक हत्यार, नारकत, खुरपे. २ सिमेंट वगैरे पसरण्यास गवंडी वापरतो ते सपाट पात्याचे एक हत्यार, करणी, थापी.

truant /'ट्रूअन्ट्/ *ना* [*गण*] परवानगीशिवाय शाळा बुडवणारा मुलगा, उनाड मुलगा : *play ~, उनाडक्या करणे.* **truancy** /-अन्सि/ *ना* [*अगण*] उनाडपणा, बुट्ट्या मारणे.

truce /ट्रूस्/ *ना* [*गण*] काही काळ लढाई थांबविण्याचा करार, तात्पुरता तह, विरामसंधी.

truck^{1} /ट्रक्/ *ना* [*गण*] १ (*ब्रि*) माल वाहणारी रेल्वेची उघड्या तोंडाची वाघीण. २ (विशेषतः *अमे*) लॉरी, मालवाहू गाडी.

truck^{2} /ट्रक्/ *ना* (*वाक्प्र*) **have no truck with sb** (*औप*) एखाद्याशी काहीही संबंध न ठेवणे.

trudge /ट्रज्/ *क्रि* [*अक*] मंद चालणे किंवा रखडत चालणे. **trudge** *ना* [*गण, बहुधा अे.व*] कंटाळवाणी पायपीट.

true /ट्रू/ *वि* (**~r, ~st**) १ सत्य, वास्तव, यथातथ्य. २ खरा : *my ~ feelings for you, तुझ्याविषयीच्या माझ्या खऱ्या भावना.* ३ एकनिष्ठ; इमानदार, सच्चा : *a ~ friend, सच्चा मित्र.* ४ तंतोतंत, हुबेहुब, अस्सल : *a ~ copy, अस्सल किंवा खरी प्रत.* ५ (*वाक्प्र*) **come 'true** (आशा, स्वप्न याबाबत) प्रत्यक्षात येणे, साकार होणे. **true to sth** एखाद्या गोष्टीकडून अपेक्षा असावी तशी ती असलेला किंवा कार्यरत झालेला; एखाद्याशी इमान राखून असा : *~ to life, जीवनाशी इमान राखून म्हणजेच (जीवनाचे) यथार्थ.* **true** *ना* (*वाक्प्र*) **out of 'true** योग्य जागेवर नसलेला, सरकलेला : *The door is out of ~, दार सरकलेले आहे.*

truly /'ट्रूलि/ *क्रिवि* १ खरोखर : *a ~ brave action, खरोखरचा पराक्रम.* २ प्रामाणिकपणे, मनापासून : *feel ~ grateful, मनापासून कृतज्ञता वाटणे.* ३ सच्चेपणाने, सत्याने.

trump /ट्रम्प्/ *ना* १ [*गण*] हुकमाचा पत्ता, हुकमाचे पान, हुकूम. २ (*वाक्प्र*) **ˌturn/ˌcome up 'trumps** (*अनौप*) अनपेक्षितपणे उदार होणे किंवा मदतीला येणे. **trump** *क्रि* [*सक*] १ हुकमाने मारणे. २ (*क्रिब*) **trump sth up** (बहुधा कर्मणी) खोटा आरोप करणे, बनावट आरोप करणे : *~ed-up charges, बनावट/कल्पित आरोप.* **'trump-card** *ना* [*गण*] (*ला*) इतरांवर कुरघोडी करण्याचा सर्वात प्रभावी मार्ग, हुकमी एक्का.

trumpet /'ट्रम्पिट्/ *ना* [*गण*] टोकाला घंटेसारखा आकार असणारे लांब नळीचे एक पितळ्याचे वाद्य, तुतारी. **trumpet** *क्रि* १ [*अक, सक*] (एखादी गोष्ट) जगजाहीर करणे, मोठ्याने सांगणे. २ [*अक*] (हत्तीबाबत) गर्जना करणे. **trumpeter** *ना* [*गण*] तुतारी फुंकणारा.

truncate /ट्रङ्'केइट्; *अमे* 'ट्रङ्केइट्/ *क्रि* [*सक*] शेंडा किंवा टोक कापून लहान करणे, अग्र छाटणे.

truncheon /'ट्रन्चन्/ *ना* [*गण*] पोलिसांकडे असते तशी लाठी, बडगा, दंडुका, सोटा.

trundle /'ट्रन्ड्ल्/ *क्रि* [*अक, सक*] घरंगळणे.

trunk /ट्रङ्क्/ *ना* १ [*गण*] झाडाचा बुंधा, खोड. २ [*गण*] कपड्यांची वगैरे मोठी पेटी, ट्रंक. ३ [*गण*] हत्तीची सोंड. ४ [*गण, बहुधा अे.व*] धड. ५ **trunks** [*ब.व*] पुरुषांची पोहण्याची अर्धी चड्डी. ६ [*गण*] (*अमे*) मोटारीचा सामान ठेवायचा मागचा भाग. **'trunk-call** *ना* [*गण*] (*ब्रि जुना अप्रचलित*) दूरचा फोन, दूरच्या अंतरावर दूरध्वनीने साधलेला संपर्क, नगरांतर दूरध्वनी. **'trunk-road** *ना* [*गण*] महत्त्वाचा मुख्य रस्ता.

truss /ट्रस्/ *क्रि* [*सक*] १ घट्ट बांधणे. २ (कोंबडीच्या पिलाचे वगैरे) शिजवण्यापूर्वी पाय व पंख बांधणे. **truss** *ना* [*गण*] १ हर्नियाचा (अंतर्गळाचा) त्रास होणाऱ्या माणसाने बांधायचा जाड पट्टा. २ छपराला, पुलाला वगैरे आधार देणारी कैची.

trust^{1} /ट्रस्ट्/ *ना* १ [*अगण*] एखाद्याचा चांगुलपणा, प्रामाणिकपणा, ताकद यावरचा विश्वास, भरवसा. २ [*अगण*] जबाबदारी, हवाला. ३ [*गण*] इतरांसाठी पैसे ताब्यात घेऊन त्याचा वापर करणे (किंवा त्याची व्यवस्था), विश्वस्तनिधी, विश्वस्तव्यवस्था :

money kept in a ~, विश्वस्ताकडे ठेवलेले पैसे. ४ (*वाक्प्र*) **take sth on trust** पुराव्याविना विश्वास टाकणे. **trusting** *वि* विश्वास टाकणारा. **trustingly** *क्रिवि* विश्वास टाकून. **trustworthy** *वि* विश्वासार्ह. **trusty** *वि* **(-ier, -iest)** (*पुरा* किंवा *गंमत*) विश्वासार्ह, विश्वासू, एकनिष्ठ.

trust^2 /ट्रस्ट्/ *क्रि* [*सक*] १. विश्वास टाकणे, भरवसा ठेवणे : *You can ~ me, माझ्यावर विश्वास ठेव.* २ एखादी गोष्ट एखादा माणूस नीट करेल किंवा वापरेल असे समजणे : *You can't ~ young children with matches, काडेपेटीतील काड्या मुलांच्या हातात देऊन भरवसा ठेवणे शक्य नाही.* ३ (*औप*) आशा करणे : *I ~ you are well, तू ठीक आहेस अशी आशा करतो.*

trustee /ट्र'स्टी/ *ना* [*गण*] इतरांसाठी ठेवलेल्या पैशाची योग्य व्यवस्था करणारी व्यक्ती, विश्वस्त.

truth /ट्रूथ्/ *ना* (*ब.व* ~s /ट्रूद्झ्/) १ [*अगण*] सत्य, खरेपणा : *There's no ~ in what he says, त्याच्या बोलण्यात काडीचेही सत्य नाही.* २ [*अगण*] खरे आहे ते, सत्य : *tell the ~, खरं काय ते सांग.* ३ [*गण*] स्वीकारलेले सत्य, सिद्ध झालेले सत्य : *scientific ~, वैज्ञानिक सत्य.* **truthful** *वि* १ (माणसाबाबत) खरे बोलणारा, सत्यवक्ता. २ (विधानांबाबत) खरी, सत्य. **truthfully** *क्रिवि* खरेपणाने, सत्य मार्गाने. **truthfulness** *ना* [*अगण*] सत्यता, खरेपणा.

try^1 /ट्राइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **tried**) १ [*अक*] प्रयत्न करणे : *He tried to escape, निसटण्याचा त्याने प्रयत्न केला.* २ [*सक*] एखादी गोष्ट समाधानकारक, चांगली वगैरे आहे का नाही हे पाहण्यासाठी करून किंवा वापरून पाहणे, प्रयोग करणे : *Have you tried this new soap? तू हा नवा साबण वापरून पाहिलास?* ३ [*सक*] न्यायालयीन चौकशी करणे आणि निर्णय देणे, खटला चालवणे : *He was tried for murder, त्याच्यावर खुनाचा खटला भरला गेला.* ४ [*सक*] सहनशक्तीचा अंत पाहणे : *You're ~ing my patience! तू माझ्या सहनशीलतेचा अगदी अंत पाहतोयस्!* ५ (*वाक्प्र*) **try one's hand at sth** एखादी गोष्ट करण्याचा प्रयत्न करणे. ६ (*क्रिब*) **try sth on** (क) (कपडा) अंगावर घालून पाहणे. (ख) (*अनौप*) वाईट किंवा लबाडीने वागून चालते का ते पाहणे : *Stop ~ing it on! खोटं वागणं बस् झालं!* **try sth out** एखादी गोष्ट बरोबर किंवा उपयोगी आहे की नाही त्याची परीक्षा करणे. **tried** *वि* चांगले असल्याचे सिद्ध झालेला. **trying** *वि* अवघड, तापदायक.

try^2 /ट्राइ/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) १ प्रयत्न. २ (रगबी फुटबॉलमधे) प्रतिस्पर्ध्याच्या गोलाच्या सीमारेषेपलीकडे चेंडू नेऊन मिळवलेले गुण.

tsar /झा(र्)/ *ना* [*गण*] (१९१७ पूर्वी) रशियाचा सम्राट. **tsarina** /झा'रीन/ *ना* [*गण*] (१९१७ पूर्वी) झारची बायको किंवा रशियाची सम्राज्ञी.

tsetse fly /'ट्सेट्सि फ्लाइ/ *ना* [*गण*] जी चावल्यावर गंभीर आजार होऊ शकतो अशी आफ्रिकेच्या उष्णकटिबंध प्रदेशातील माशी.

T-shirt ⇨ T, t.

tub /टब्/ *ना* [*गण*] १ गोल तोंडाचे मोठे उघडे पात्र. २ स्नानकुंड.

tuba /'ट्यूब; *अमे* 'टूब/ *ना* [*गण*] घोगऱ्या आवाजाचे तुतारीसारखे पितळ्याचे एक मोठे वायुवाद्य.

tubby /'टबि/ *वि* (**-ier, -iest**) (*अनौप*) बुटका आणि जाड.

tube /ट्यूब्; *अमे* टूब्/ *ना* १ [*गण*] रबराची, प्लॅस्टिकची वगैरे लांब, पोकळ, विशेषतः द्रवपदार्थ वाहण्याकरता वापरायची नळी, नलिका. २ [*गण*] रंग, पेस्ट वगैरे असलेले नळीच्या आकाराचे मऊ धातूचे आवरण. ३ **the tube** [*अगण, अे.व*] (*ब्रि*) (लंडनमधे) भुयारी रेल्वे. ४ [*गण*] नळीच्या आकाराचा, पोकळ असा शरीरातील एक अवयव. **tubing** *ना* [*अगण*] नळ्या. **tubular** /'ट्यूब्युल(र्); *अमे* 'टू-/ *वि* नळीच्या आकाराचा.

tuber /'ट्यूब(र्); *अमे* 'टू-/ *ना* [*गण*] जमिनीतील अन्नसंचयी खोडावरचा – उदा बटाट्यावरचा – डोळा, ग्रंथिकोष्ठ.

tuberculosis /ट्यू,बऽक्यु'लउसिस्; *अमे* टू-/ *ना* [*अगण*] विशेषतः फुप्फुसांवर परिणाम करणारा एक गंभीर संक्रामक रोग, क्षयरोग.

TUC /,टी यू 'सी/ *ना* **the TUC** [*अे.व*]

Trades Union Congress म्हणजे ब्रिटनमधील कामगार संघटनांचा महासंघ.

tuck /टेक्/ *क्रि* १ [*सक*] एखाद्या गोष्टीचे मोकळे टोक नीटनेटकेपणासाठी दुसऱ्या गोष्टीत खोचणे, लोंबता कपडा खोचणे : *He ~ed his shirt into his trousers, त्याने पॅन्टमधे शर्ट खोचला.* २ [*सक*] एखादी गोष्ट जागेवर नीट ठेवणे किंवा लपवून ठेवणे. ३ (*क्रिब*) **tuck in** (*अनौप*) चरणे, चापणे. **tuck sb up** (खास करून लहान मुलाला) नीट गुंडाळून किंवा चापूनचोपून झोपवणे. **tuck** *ना* १ [*गण*] चुणी, मुरड. २ [*अगण*] (*ब्रि अनौप*) लहान मुलांचा खाऊ : *a school ~-shop, शाळेतील मुलांच्या खाऊचे दुकान.*

Tuesday /'ट्यूझ्डि; *अमे* 'टू-/ *ना* [*अगण, गण*] सोमवार नंतरचा आठवड्यातला तिसरा वार, मंगळवार (*Monday* खालची उदाहरणे पहा.)

tuft /टेफ्ट्/ *ना* [*गण*] केसांचा, गवताचा वगैरे पुंजका.

tug /टेग्/ *क्रि* (**-gg-**) [*अक, सक*] (*at*)// जोरात खेचणे, ओढणे. **tug** *ना* [*गण*] १ हिसका. २ (तसेच **'tugboat**) जहाजे बंदराकडे ओढून नेणारी शक्तिशाली लहान नौका.

tuition /ट्यू'इश्न्; *अमे* टू-/ *ना* [*अगण*] (*औप*) शिकवणी, शिकवणे किंवा अध्यापनशुल्क : *have private ~, खाजगी शिकवणी असणे.*

tulip /'ट्यूलिप्; *अमे* 'टू-/ *ना* [*गण*] पेल्याच्या आकाराची गर्द रंगाची मोठी फुले येणारे उंच वाढणारे एक फुलझाड.

tumble /'टेम्ब्ल्/ *क्रि* १ [*अक, सक*] खाली पडणे/पाडणे, धडपडणे, गडगडणे. २ [*अक*] धडपडत येणे, अस्ताव्यस्तपणे शिरणे. ३ (*क्रिब*) **tumble down** भुगा होणे; कोसळणे. **tumble to sth** (*अनौप*) एखादी गोष्ट समजणे, डोक्यात शिरणे. **tumble** *ना* [*गण*, बहुधा *अे.व*] पडणे, कोलांटी. **'tumbledown** *वि* पडका, मोडकळीस आलेला. **'tumble-drier** *ना* [*गण*] धुतलेले कपडे सुकवण्याचे यंत्र.

tumbler /'टेम्ब्ल(र्)/ *ना* [*गण*] उभट पेला.

tummy /'टेमि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) (*अनौप*) ढेरी.

tumour (*अमे* **-or**) /'ट्यूम(र्); *अमे* 'टू-/ *ना* [*गण*] शरीरात वाढणारा रोगट पेशींचा गोळा, आवाळू, अर्बुद.

tumult /'ट्यूमल्ट्; *अमे* 'टू-/ *ना* [*अगण, अे.व*] (*औप*) १ लोकांचा गिल्ला, कोलाहल. २ गोंधळ, गडबड, धांदल. **tumultuous** /ट्यू'मेल्चुअस्; *अमे* टू-/ *वि* (*औप*) गिल्लायुक्त, कोलाहलाचा; गोंधळाचा, गडबडीचा.

tuna /'ट्यून/ *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **tuna** किंवा **~s**) समुद्रातील खाण्याचा एक मोठा मासा.

tune /ट्यून्; *अमे* टून्/ *ना* १ [*गण*] (विशेषतः आनंददायक) स्वरावली, चाल. २ (*वाक्प्र*) **,in/,out of 'tune** (क) सुरात/बेसूर. (ख) (*ला*) सहमत/असहमत. **to the 'tune of sth** (*अनौप*) रकमे एवढा : *fined to the ~ of £1000, १००० पाउंड एवढा दंड झालेला.* **tune** *क्रि* [*सक*] १ (वाद्य) सुरात लावणे. २ चांगले काम मिळावे म्हणून इंजिन नीट लावणे. ३ (*क्रिब*) **tune in (to sth)** विशिष्ट केन्द्र लागावे म्हणून रेडिओचा काटा फिरवणे. **tuneful** *वि* सुरेल, सुस्वर. **tunefully** *क्रिवि* सुरेलपणे. **tuner** *ना* [*गण*] पियानो वगैरे वाद्ये लावणारा माणूस, मेलक. **'tuning-fork** *ना* [*गण*] आपटल्यावर विशिष्ट स्वर काढणारा स्टीलचा एका छोटा काटा.

tunic /'ट्यूनिक्; *अमे* 'टू-/ *ना* [*गण*] १ पोलीस अधिकारी, सैनिक वगैरे घालतात तसे घट्ट जाकीट. २ गुडघ्यापर्यंत येणारा कमरेपाशी पट्टा असणारा एक सैल ढगळ अंगरखा.

tunnel /'टेन्ल्/ *ना* [*गण*] वाहनांसाठीचा किंवा रेल्वेचा बोगदा, भुयार, सुरंग. **tunnel** *क्रि* (**-ll-**; *अमे* **-l-**) [*अक, सक*] बोगदा काढणे.

turban /'टऽबन्/ *ना* [*गण*] शीख किंवा मुसलमान माणूस किंवा भारतात खेड्यातील माणूस डोक्याला गुंडाळतो ते लांब कापड, फेटा, मुंडासे.

turbine /'टऽबाइन्/ *ना* [*गण*] पाणी, वाफ, हवा यांच्या जोरावर फिरणाऱ्या चाकाने चालवले जाणारे इंजिन, चक्की.

turbulent /'टब्युलन्ट्/ *वि* गोंधळलेला; खवळलेला, वादळी : ~ *passions/waves, क्षुब्ध वासना/खवळलेल्या लाटा.* **turbulence** /-लन्स्/ *ना* [*अगण*] खळबळ, गोंधळ, क्षोभ.

tureen /ट'रीन्, ट्यु'रीन्/ *ना* [*गण*] सूप किंवा भाजी ठेवायचे मोठे खोलगट भांडे.

turf /टऽफ्/ *ना* (*ब.व* **~s** किंवा **turves**) १ (क) [*अगण*] जमिनीवरील अगदी थोडे वाढलेले गवत आणि त्याखालची माती, हिरवळ. (ख) [*गण*] हिरवळीचा तुकडा, गवताचा झुबका. २ **the turf** [*अे.व*] घोड्यांची शर्यत/रेस लावणे. **turf** *क्रि* [*सक*] १ हिरवळ लावणे. २ (*क्रिब*) **turf sb/sth out** (*ब्रि अनौप*) एखाद्याला जाण्यास भाग पाडणे, हाकलणे, पिटाळून लावणे.

turkey /'टऽकि/ *ना* (क) [*गण*] खाद्य पदार्थ म्हणून वापरायचा एक मोठा पक्षी. (ख) [*अगण*] त्याचे मांस.

turmoil /'टऽमॉइल्/ *ना* [*गण, बहुधा अे.व, अगण*] धामधूम, धांदल, गडबड, बजबजपुरी.

turn^{1} /टऽन्/ *क्रि* १ [*अक, सक*] एखाद्या बिंदूभोवती फिरणे/फिरवणे, प्रदक्षिणा घालणे : *The earth ~s round the sun, पृथ्वी सूर्याभोवती फिरते* ○ ~ *a key in a lock, कुलपात किल्ली फिरवणे.* २ [*अक, सक*] बाजू वगैरे फिरणे/फिरवणे, वळणे/वळवणे : *She ~ed to look at me, मला पाहण्यासाठी ती वळली.* ३ [*अक, सक*] दिशेला वळणे/वळवणे : *T~ left by the church, चर्चजवळ डावीकडे वळ.* ४ [*अक, सक*] गर्रकन् फिरणे, वळण घेणे, वळणे : *The car ~ed the corner, गाडी कोपऱ्यावर वळली.* ५ (बहुधा विशेषणासह वापर) बनणे, होणे किंवा करणे : *The milk has ~ed sour, दूध आंबले/नासले* ○ *She's just ~ed 50, ती आताशी पन्नाशीला आलीय्.* ६ [*अक, सक*] (*from*) *to/into//* स्थिती बदलणे, स्थित्यन्तर होणे : *Caterpillars ~ into butterflies, सुरवंटांची फुलपाखरे होतात.* ७ [*सक*] वळवणे : ~ *one's attention to the question of money, आर्थिक प्रश्नाकडे लक्ष वळवणे.* ८ (*वाक्प्र*) **not turn a 'hair** संकटात वगैरे न भिणे, न डगमगणे. **turn one's back on sb/sth** एखाद्या व्यक्तीकडे/गोष्टीकडे पाठ फिरवणे, मदत न करणे; दुर्लक्ष करणे. **turn a blind 'eye to sth** एखादी गोष्ट न पाहिल्यासारखे करणे, काणाडोळा करणे. **turn the clock back** ➪ CLOCK. **turn a deaf 'ear to sth** ऐकण्यास तयार नसणे. **turned 'out** विशिष्ट पोषाख केलेला : *be elegantly ~ed out, छान कपडे घातलेला.* **turn one's hand to sth** एखादे व्यावहारिक कौशल्य शिकण्यास सुरुवात करणे, एखाद्या गोष्टीला हात घालणे. **turn over a new 'leaf** नव्याने आयुष्याला सुरुवात करणे, स्वतःचे वर्तन सुधारणे. **turn the 'tables on sb** एखाद्यावर बाजू उलटवणे. **turn 'tail** वळणे आणि पळून जाणे. **turn up one's 'nose at sb/sth** (*अनौप*) एखाद्या व्यक्तीला/गोष्टीला नाक मुरडणे. **turn up trumps** ➪ TRUMP. ९ (*क्रिब*) **turn (sb) against sb** एखाद्याशी वाकडे धरणे किंवा इतरांना वाकडे धरायला लावणे, एखाद्यावर उलटणे/उलटवणे. **turn sb away** एखाद्याला आत न घेणे; एखाद्याला मदत न करणे, विन्मुख पाठवणे. **turn (sb) back** परत जाणे, एखाद्याला परत पाठवणे. **turn sb/sth down** (प्रस्ताव वगैरे) फेटाळून लावणे. **turn sth down** (कुकरची उष्णता, रेडिओचा आवाज वगैरे) कमी करणे, बारीक करणे. **turn 'in** (*अनौप*) झोपणे. **turn sb in** (*अनौप*) एखाद्याला पोलिसांच्या हवाली करणे, चौकीवर नेणे. **turn sb off** (*अनौप*) एखाद्याला कंटाळा आणणे किंवा लैंगिकदृष्ट्या थंड करणे. **turn sth off** थांबवणे, बंद करणे : ~ *off the tap, नळ बंद करणे.* **turn on sb** एखाद्यावर अचानक हल्ला करणे, एखाद्यावर उलटणे. **turn sb 'on** (*अनौप*) एखाद्याची उत्सुकता चाळवणे किंवा त्याला कामोत्तेजित करणे. **turn sth on** चालू करणे : ~ *on the radio, रेडिओ चालू करणे.* **turn 'out** (क) दिल्याप्रमाणे घडणे/होणे; ठरणे : *Everything ~ed out well, प्रत्येक गोष्ट ठरल्याप्रमाणे चांगली झाली.* (ख) उपस्थित असणे, हजर राहणे, जमणे. **turn sth out** (क) (दिवा, गॅस) बंद करणे. (ख) रिकामे करणे : ~ *out the cupboards, कपाटे खाली करणे.* (ग) तयार करणे, उत्पादित करणे. **turn sb out (of sth)** एखाद्याला एखाद्या ठिकाणाहून बाहेर काढणे. **turn sth over**

(क) एखाद्या गोष्टीचा नीट विचार करणे. (ख) (विशिष्ट रकमेएवढा) धंदा करणे. **turn sth/ sb over to sb** एखाद्याला एखाद्या गोष्टीचा/ व्यक्तीचा ताबा देणे, एखादी गोष्ट/व्यक्ती एखाद्याच्या हवाली करणे: *The thief was ~ed over to the police, चोराला पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.* **turn to sb** मदतीसाठी, सल्ल्यासाठी वगैरे एखाद्याकडे जाणे. **turn up** येणे. **turn (sth) up** सापडणे/सापडवणे: *The book you've lost will probably ~ up somewhere, तू हरवलेले पुस्तक कुठेतरी सापडेल.* **turn sth up** (कुकरची धग किंवा रेडिओचा आवाज वगैरे) वाढवणे, मोठा करणे. **'turn-off** *ना* [*गण*] मुख्य ऱस्त्याचा फाटा, उपमार्ग. **'turn-out** *ना* [*गण,* बहुधा *अे.व*] एखाद्या प्रसंगीची उपस्थितांची संख्या. **'turnover** *ना* [*अे.व*] उलाढाल: *Their annual ~over is £10 million, त्यांची वार्षिक उलाढाल एक कोटी पाउंडाची आहे.* **'turn-up** *ना* [*गण*] १ [बहुधा *ब.व*] पॅन्टच्या पायाच्या टोकाचा दुमडलेला भाग. २ (*अनौप*) आश्चर्यकारक घटना, अनपेक्षित घटना: *a ~-up for the book, चाट पाडणारी गोष्ट.*

turn^2 /टऽन्/ *ना* [*गण*] १ वळणे, वळवणे. २ दिशा बदल. ३ स्थितीमधे झालेला बदल: *Business has taken a ~ for the worse, धंद्याची स्थिती आणखीनच बिघडली आहे.* ४ काही करण्याची पाळी: *It's your ~ to choose, निवडायची तुझी पाळी आहे.* ५ नवीन वर्ष किंवा शतक किंवा पर्व सुरू होण्याचा क्षण. ६ थिएटरमधला छोटासा प्रयोग. ७ आजाराची बाधा. ८ धक्का: *You gave me a ~ coming in so suddenly! इतक्या अचानक येऊन तू मला धक्काच दिलास.* ९ (*वाक्प्र*) **at every 'turn** सगळीकडे, सर्वत्र, सदा सर्वकाळ. **done to a 'turn** (अन्नाबाबत) बरोबर किंवा हवे तेवढेच शिजवलेले. **in 'turn** पाळीपाळीने, एकानंतर एक. **,out of 'turn** अयोग्य वेळी, मधेच, पाळी नसताना. **take (it in) 'turns to do sth** एखादी गोष्ट आळीपाळीने करणे: *The children took it in ~s to play on the swing, मुले झोक्यावर आळीपाळीने खेळली/बसली.*

turning /'टऽनिङ्/ *ना* [*गण*] रस्त्याचा फाटा, वळण. **'turning-point** *ना* [*गण*] कलाटणी देणारा महत्त्वाचा क्षण, परिवर्तन बिंदू.

turnip /'टऽनिप्/ *ना* [*गण, अगण*] मोठे गोल मूळ येणारी भाजी, सलगम.

turnpike /'टऽन्पाइक्/ *ना* [*गण*] (*अमे*) पैसे देऊन वाहन हाकण्याचा भरधाव जाता येईल असा रस्ता.

turnstile /'टऽन्स्टाइल्/ *ना* [*गण*] एकावेळी एकच माणूस जाऊ शकेल असे चक्राकार फिरते दार, चक्रद्वार.

turntable /'टऽन्टेइब्ल्/ *ना* [*गण*] ध्वनिमुद्रिका ठेवून लावायची फिरती चकती, चक्र.

turpentine /'टऽपन्टाइन्/ *ना* [*अगण*] रंग काढण्यासाठी किंवा रंग पातळ करण्यासाठी वापरला जाणारा उग्र वासाचा रंगहीन द्रव.

turquoise /'टऽक्वॉइझ्/ *वि* हिरवट-निळा. **turquoise** *ना* [*गण, अगण*] हिरवट-निळ्या रंगाचे एक रत्न, फिरोजा, वैडूर्य.

turret /'टॅरिट्/ *ना* [*गण*] १ इमारतीवरील मनोरा. २ (रणगाडा, जहाज यावरील) तोफा डागण्याचा फिरता सांगाडा.

turtle /'टऽट्ल्/ *ना* [*गण*] समुद्रकूर्म, समुद्रातील कासव.

tusk /टॅस्क्/ *ना* [*गण*] हत्ती, वॉलरस, रानटी डुक्कर वगैरे प्राण्यांचा लांब टोकदार दात, सुळा.

tussle /'टॅस्ल्/ *क्रि* [*अक*] *ना* [*गण*] वादावादी किंवा बाचाबाची होणे, खटका (उडणे), झटापट होणे.

tut /टॅट्/ (तसेच **,tut-'tut**) *उद्गा* (नापसंती किंवा त्रस्तपणा दाखवण्यास वापर) च्च्.

tutor /'ट्यूट(र्); *अमे* 'टू-/ *ना* [*गण*] १ खाजगी शिकवणी – विशेषतः एका विद्यार्थ्याची – घेणारे शिक्षक. २ (*ब्रि*) विद्यापीठातील मार्गदर्शक शिक्षक, पाठनिर्देशक. **tutor** *क्रि* [*अक, सक*] शिकवणे, शिकवणी घेणे. **tutorial** /ट्यू'टॉऽरिअल्; *अमे* टू-/ *ना* [*गण*] विद्यार्थ्यांच्या लहान गटाचा तास. **tutorial** *वि* पाठनिर्देशकाचा.

tuxedo /टॅक्'सीडउ/ *ना* [*गण*] (*ब.व* ~s) (*अमे*) रात्रीच्या भोजन समारंभाचेवेळी घालायचे (विशेषतः काळ्या रंगाचे) जाकीट.

TV /ˌटी 'व्ही/ *ना* [*गण, अगण*] दूरदर्शन.

twaddle /'ट्वॉड्ल्/ *ना* [*अगण*] (*अनौप*) निरर्थक बडबड, भाकडकथा, भंकस.

twang /ट्वॅङ्/ *ना* [*गण*] १ ताणलेल्या तारेचा टणत्कार. २ माणसाचा नाकातून बोलल्यासारखा आवाज, गेंगाणा आवाज. **twang** *क्रि* [*अक, सक*] टणत्कार करणे.

tweak /ट्वीक्/ *क्रि* [*सक*] चिमटा काढणे : ~ *a child's nose, लहान मुलाच्या नाकाला चिमटा काढणे.* **tweak** *ना* [*अे.व*] चिमटा.

tweed /ट्वीड्/ *ना* १ [*अगण*] लोकरीचे विणलेले जाड कापड. २ **tweeds** [*ब.व*] ट्वीडचे कपडे – विशेषतः सूट.

tweet /ट्वीट्/ *क्रि* [*अक*] *ना* [*गण*] (*अनौप*) (पक्ष्याबाबत) किलबिल (करणे).

tweezers /'ट्वीझ़झ़्/ *ना* [*ब.व*] केस, कुसळ यासारख्या बारीक गोष्टी उपटण्याचा किंवा उचलण्याचा चिमटा.

twelve /ट्वेल्व्ह्/ *सना, वि, ना* [*गण*] १२, बारा. **twelfth** /ट्वेल्थ्/ *सना, वि* १२ वा, बारावा. **twelfth** *सना, ना* [*गण*] $\frac{१}{१२}$, एक बारांश.

twenty /'ट्वेन्टि/ *सना, वि, ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) २०, वीस. **twentieth** /'ट्वेन्टिअथ्/ *सना, वि* २० वा, विसावा. **twentieth** *सना, ना* [*गण*] $\frac{१}{२०}$, एक विसांश.

twice /ट्वाइस्/ *क्रिवि* दोन वेळा, दुप्पट, दुबार, दोनदा : *I've read this book ~, मी हे पुस्तक दोनदा वाचलंय्* ○ *Your room is twice as big as mine, तुझी खोली माझ्या खोलीपेक्षा दुपटीने मोठी आहे.*

twiddle /'ट्विड्ल्/ *क्रि* [*अक, सक*] हाताने चाळा करणे, खेळणे.

twig^1 /ट्विग्/ *ना* [*गण*] झाडाची लहान फांदी, डहाळी.

twig^2 /ट्विग्/ *क्रि* (**-gg-**) [*अक, सक*] (*ब्रि अनौप*) (एखादी गोष्ट) समजणे, लक्षात येणे.

twilight /'ट्वाइलाइट्/ *ना* [*अगण*] सूर्यास्तानंतर पसरणाऱ्या संधिप्रकाशाचा काळ, तिन्हिसांजा.

twill /ट्विल्/ *ना* [*अगण*] घट्ट विणीचे एक कापड.

twin /ट्विन्/ *ना* [*गण*] जुळे भावंड. **twin** *वि* सारखा, सम, जुळणारा : ~ *beds, जोडपलंग.*

twine /ट्वाइन्/ *ना* [*अगण*] दोरी, सुतळी. **twine** *क्रि* [*अक, सक*] गुंडाळणे, वेटाळणे किंवा पिरगळणे.

twinge /ट्विन्ज्/ *ना* [*गण*] शिळक, चमक : (*ला*) *a ~ of guilt, अपराधी भावनेची टोचणी.*

twinkle /'ट्विङ्क्ल्/ *क्रि* [*अक*] १ चमकणे, लुकलुकणे : *stars twinkling in the sky, आकाशात चमचमणाऱ्या चांदण्या.* २ (एखाद्याच्या डोळ्यांबाबत) आनंदाने किंवा खट्याळपणे चमकणे. **twinkle** *ना* [*अे.व*] : *a ~ in her eyes, तिच्या डोळ्यातील चमक.*

twirl /ट्वऽल्/ *क्रि* १ [*अक, सक*] गोलगोल फिरणे/फिरवणे, गरगर फिरणे; घिरटी घालणे. २ [*सक*] वेटोळे घालणे. **twirl** *ना* [*गण*] गिरकी.

twist /ट्विस्ट्/ *क्रि* १ [*सक*] गुंडाळणे : ~ *string round one's fingers, बोटांभोवती दोरी गुंडाळणे.* २ [*अक, सक*] फिरणे/फिरवणे : *She ~ed (her head) round, तिने (मान) फिरवली.* ३ [*अक, सक*] वाकवून किंवा फिरवून एखाद्या गोष्टीचा आकार बदलणे, चोळामोळा होणे/करणे : *The car was a pile of ~ed metal, गाडीला वेडावाकडा चेपलेल्या पत्र्याचा आकार आला होता.* ४ [*सक*] (पाय वगैरे) मुरगळणे. ५ [*सक*] फिरवणे : ~ *the lid off the jar, बाटलीचे झाकण फिरवणे.* ६ [*अक*] (रस्ता किंवा नदी यांबाबत) वळणावळणाने जाणे, नागमोडी जाणे. ७ [*सक*] अर्थ बदलणे, अर्थाचा विपर्यास करणे : ~ *sb's words, एखाद्याच्या शब्दांचा विपर्यास करणे.* ८ (*वाक्प्र*) **ˌtwist sb's 'arm** (*अनौप*) एखाद्याला एखादी गोष्ट करावयास लावणे किंवा त्यासाठी राजी करणे, कान पिळून करून घेणे. **twist sb round one's little 'finger** (*अनौप*) एखाद्याला करंगळीच्या तालावर नाचवणे. **twist** *ना* [*गण*] १ पिरगळणे, फिरवणे, गुंडाळणे. २ चोळामोळा किंवा चेंदामेंदा केलेला आकार. ३ अचानक मिळालेली कलाटणी, पलटी : *by a strange ~ of fate, नशिबाच्या अचानक पलटीने.*

twit /ट्विट्/ *ना* [*गण*] (*ब्रि अनौप*) मूर्ख माणूस.

twitch /ट्विच्/ *ना* [*गण*] स्नायूंचे अचानक आखडणे, वाताचा झटका. **twitch** *क्रि* १ [*अक*] आखडणे, आचके येणे, झटका येणे. २ [*अक, सक*] हिसकणे.

twitter /'ट्विट(र्)/ *क्रि* [*अक*] १ (पक्ष्याबाबत) चिवचिव करणे. २ अस्वस्थपणे किंवा उत्साहाने भरभर बोलणे, पिटपिट करणे. **twitter** *ना* [*अे.व*] चिवचिवाट; पिटपिट.

two /टू/ *सना, वि, ना* [*गण*] (*ब.व* **~s**) १ २, दोन. २ (*वाक्प्र*) **put ,two and ,two to'gether** जे पाहिले, ऐकले त्यावरून सत्यस्थितीचा अंदाज करणे, सत्य ओळखणे. **,two-'faced** *वि* दुतोंडी, लबाड, अप्रामाणिक. **'twofold** *वि, क्रिवि* (**क**) दुपदरी, दोन भागाचा, दुहेरी. (**ख**) दुप्पट. **,two-'way** *वि* दोन्ही बाजूंनी चालू असलेला (उदा रस्ता), दुहेरी वाहतुकीचा.

tycoon /टाइ'कून्/ *ना* [*गण*] (*अनौप*) बडा व्यावसायिक, मोठा उद्योगपती, मोठी उद्योजिका.

tying ➪ TIE¹.

type /टाइप्/ *ना* १ [*गण*] समान गुणधर्म असलेल्या वस्तूंचा किंवा माणसांचा वर्ग (किंवा त्यातील एक वस्तू, माणूस); प्रकार : *many different ~s of computers, संगणकांचे विविध प्रकार.* २ [*अगण*] छपाईची शैली किंवा आकार, खिळा, ठसा : *italic ~, वक्राक्षर.* **type** *क्रि* [*अक, सक*] टंकलेखन करणे. **type-cast** /'टाइप्कास्ट्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **type-cast**) [*सक*] (विशेषतः कर्मणी) (नट किंवा नटीला) त्याच त्याच प्रकारची भूमिका देणे, साचेबंद भूमिका देणे. **'typescript** *ना* [*गण*] एखाद्या गोष्टीची टंकलिखित प्रत. **'typewriter** *ना* [*गण*] टंकलेखन यंत्र. **typing** *ना* [*अगण*] टंकलेखन करणे. **typist** *ना* [*गण*] टंकलेखक, टाइपरायटरने ऑफिसात वगैरे लिहिण्याचे काम करणारा माणूस.

typhoid /'टाइफॉइड्/ *ना* [*अगण*] अन्न किंवा पाणी यातून प्रादुर्भाव होणारा ताप येणारा गंभीर संसर्गजन्य आजार, मुदतीचा ताप, तापसरी.

typhoon /टाइ'फून्/ *ना* [*गण*] उष्णकटिबंधातील मोठे वादळ.

typhus /'टाइफस्/ *ना* [*अगण*] ताप येणारा आणि अंगावर निळसर चट्टे आणणारा एक संसर्गजन्य रोग.

typical /'टिपिक्ल्/ *वि* विशिष्ट गुणधर्माचा, विशिष्ट प्रकारचा, नमुनेदार : *a ~ British home, ब्रिटिश पद्धतीचे नमुनेदार घर.* **typically** /-क्लि/ *क्रिवि* विशिष्ट प्रकारे.

typify /'टिपिफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] नमुना असणे.

typist ➪ TYPE.

tyrannical /टि'रॅनिक्ल्/ *वि* जुलमी.

tyrannize /'टिरनाइझ्/ *क्रि* [*अक, सक*] (*over*)// जुलमाने राज्य करणे.

tyranny /'टिरनि/ *ना* [*अगण*] जुलूमशाही, जबरदस्ती.

tyrant /'टाइअरन्ट्/ *ना* [*गण*] जुलूमशहा.

tyre /'टाइ·अ(र्)/ *ना* [*गण*] सायकल, मोटार वगैरेच्या चाकाभोवतीचे हवा भरलेले जाड रबरी चक्र.

U u

U, u /यू/ *ना* [*गण*] (*ब.व* **U's, u's** /यूझ्/) इंग्रजी वर्णमालेतील एकविसावे अक्षर. **U-turn** *ना* [*गण*] १ १८० अंशाचे वळणे, गाडीचे संपूर्ण मागे वळणे. २ (*अनौप*) संपूर्ण मतपरिवर्तन, कोलांटी उडी, घूमजाव.

ubiquitous /यू'बिक्विटस्/ *वि* (*औप*) सर्वत्र असणारा (किंवा आहे असे भासणारा), सर्वव्यापी.

udder /'अेड(र्)/ *ना* [*गण*] जनावराची कास.

UFO /,यू अेफ् 'अउ किंवा 'यूफऊ/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s**) unidentified flying object चा संक्षेप, परग्रहावरून येणारी उडती तबकडी किंवा परग्रहावरून येणारे अंतराळयान.

ugh /अऽ सारखा ध्वनी दाखविण्यास वापर/ *उद्वा* हूऽ (तिटकारा व्यक्त करण्यास वापर) : *Ugh! what a horrible smell! हूऽ! काय घाणेरडा वास आहे!*

ugly /'अग्लि/ *वि* (**-ier, -iest**) १ कुरूप, वाईट दिसणारा. २ हिंसक बनू शकणारी, गंभीर : *an ~ situation, तणावाची परिस्थिती.*

ugliness *ना* [*अगण*] कुरूपता.

UK /यू 'केइ/ *संरू* **the UK** the United Kingdom.

ulcer /'अल्स(र्)/ *ना* [*गण*] अंगावरील किंवा शरीरातील व्रण, क्षत. **ulcerate** *क्रि* [*अक, सक*] क्षतं पडणे. **ulcerous** *वि* व्रणयुक्त.

ulterior /अल्'टिअ·रिअ(र्)/ *वि* गुप्त, लपवलेला, अंतस्थ : *an ~ motive, अंतस्थ हेतू.*

ultimate /'अल्टिमट्/ *वि* अखेरचा, शेवटचा, अंतिम. **ultimately** *क्रिवि* शेवटी, सरतेशेवटी, अंतिमतः.

ultimatum /,अल्टि'मेइटम्/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s** किंवा **-ta** /-ट/) विनाचर्चा मान्य करायचे अटींचे निवेदन, निर्वाणीचा इशारा, अखेरचा शब्द.

ultraviolet /,अल्ट्र'व्हाइअलट्/ *वि* (अदृश्य प्रकाश-किरणांबाबत) रंगपटलाच्या जांभळ्या रंगाच्या पट्ट्या पलीकडचा, जंबुपार.

umbilical cord /अम्'बिलिक्ल्/ *ना* [*गण*] गर्भाशयातील मूल आईशी जोडणारी नलिका.

umbrella /अम्'ब्रेल/ *ना* [*गण*] १ छत्री. २ (*ला*) मध्यवर्ती अशी एकच संघटना वगैरे.

umpire /'अम्पाइ(र्)/ *ना* [*गण*] (टेनिस, क्रिकेट वगैरे खेळात) पंच. **umpire** *क्रि* [*अक, सक*] (खेळात) पंच म्हणून काम करणे.

umpteen /'अम्प्टीन्/ *सना* (*अनौप*) मोठी संख्या, चिकार : *read ~ books on the subject, त्या विषयावर चिकार पुस्तके वाचणे.* **umpteenth** /'अम्प्टीन्थ्/ *सना* : *for the ~th time, पुष्कळ वेळा.*

UN /,यू 'एन्/ *संरू* **the UN** the United Nations.

unable /अन्'एइब्ल्/ *वि* असमर्थ.

unaccountable /,अन'काउन्टब्ल्/ *वि* (*औप*) स्पष्ट न करता येण्याजोगा, असमर्थनीय. **unaccountably** *क्रिवि* समर्थनीय नसलेल्या रीतीने.

unaccustomed /,अन'कस्टम्ड्/ *वि* १ *to*// एखादी गोष्ट करायची सवय नसलेला : *~ to speaking in public, सार्वजनिक भाषण करण्याची सवय नसलेला.* २ असाधारण.

unanimous /यू'नॅनिमस्/ *वि* एकमुखी, सर्वानुमताचा : *a ~ decision, एकमुखी निर्णय.* **unanimity** /,यून'निमटि/ *ना* [*अगण*] सर्वसंमती, एकमुखीपणा.

unanswerable /अन्'आन्सरब्ल्; *अमे* ,अन्'ॲन्-/ *वि* ज्याला उत्तर देता येणार नाही असा, अविवाद्य, बिनतोड, वादातीत.

unarmed /,अन्'आम्ड्/ *वि* निःशस्त्र.

unassuming /,अन'स्यूमिङ्; *अमे* -'सू-/ *वि* स्वतःकडे लक्ष खेचून न घेणारा, निगर्वी, आढ्यता नसलेला, साधा.

unattached /,अन'टॅच्ट्/ *वि* १ न जोडलेला. २ अविवाहित, बॉय्-फ्रेन्ड नसलेली, गर्ल-फ्रेन्ड नसलेला.

unattended /,अन'टेन्डिड्/ *वि* कोणाचे लक्ष नसलेला, दुर्लक्षित; एकटा : *Never leave a baby ~, मूल कधीही एकटं ठेवू नकोस.*

unavoidable /,अन'व्हॉइडब्ल्/ *वि* टाळता न येणारा, अटळ.

unaware /,अन'वेअ(र्)/ *वि* (*of*)// माहिती नसलेला, अनभिज्ञ; जाणीव नसलेला, बेसावध. **unawares** /-'वेअझ़्/ *क्रिवि* अवचित, अचानक, एकाएकी : *catch/take sb ~s, एखाद्याला आश्चर्यचकित करणे.*

unbalanced /,अन्'बॅलन्स्ट्/ *वि* किंचित् वेडसर, तोल गेलेला.

unbearable /अन्'बेअरब्ल्/ *वि* सहन न होण्यासारखा, असह्य. **unbearably** *क्रिवि* असह्यपणे.

unbeatable /,अन्'बीटब्ल्/ *वि* हरवता न येणारा, मागे न टाकता येण्यासारखा : *~ value for money, पैशाने कमी न लेखता येण्यासारखे महत्त्व किंवा पैशापुढे कमी न होणारी किंमत.*

unbelievable /,अन्बि'लीव्हब्ल्/ *वि* अविश्वसनीय; आश्चर्यकारक. **unbelievably** *क्रिवि* आश्चर्यचकित व्हावे असे, आश्चर्यकारकरीत्या.

unborn /,अन्'बॉऽन्/ *वि* न जन्मलेला, अजात.

unbroken /,अन्'ब्रउक्न्/ *वि* न मोडलेला, अखंड : *ten hours of ~ sleep, दहा तासांची*

अखंड झोप.

unbutton /,ॲन्'बट्न्/ *क्रि* [*सक*] बटण काढणे.

uncalled-for /ॲन्'कॉल्ड् फॉऽ(र्)/ *वि* अनाहूत, न विचारता दिलेला/केलेला, अनावश्यक आणि कठोर असा, आगंतुक, अयोग्य.

uncanny /ॲन्'कॅनि/ *वि* (**-ier, -iest**) अस्वाभाविक; विचित्र किंवा गूढ.

unceremonious /,ॲन्,सेरि'मउनिअस्/ *वि* १ अनौपचारिक, साधा, घरगुती. २ आश्चर्य वाटावे इतका झटपट, घाईघाईचा. **unceremoniously** *क्रिवि* कुठलाही थाटमाट न करता, साधेपणाने; घाईघाईने.

uncertain /ॲन्'सऽट्न्/ *वि* १ अनिश्चित; शंकास्पद : *be ~ about what to do, काय करावे याबाबत संभ्रमात असणे.* २ बदलेल असा, अस्थिर; बिन भरवशाचा : *~ weather, अस्थिर हवामान.* **uncertainly** *क्रिवि* अनिश्चयाने; ठाम नाही अशा रीतीने. **uncertainty** *ना* [*गण, अगण*] (*ब.व* **-ies**) अनिश्चितता, दौलायमानता.

uncharitable /,ॲन्'चॅरिटब्ल्/ *वि* निर्दय, अन्यायी, अनुदार, कठोर.

unchecked /,ॲन्'चेक्ट्/ *वि* अनिर्बंध.

uncivilized /,ॲन्'सिव्हलाइझ्ड्/ *वि* (वर्तनाबाबत) उद्धट, रानटी, असंस्कृत.

uncle /'ॲङ्·क्ल्/ *ना* [*गण*] काका किंवा मामा, आत्याचा किंवा मावशीचा नवरा.

uncomfortable /ॲन्'कम्फ्टब्ल्; *अमे* -फर्ट-/ *वि* १ असुखकारक. २ गोंधळलेला, भांबावलेला; अस्वस्थ. **uncomfortably** *क्रिवि* असुखकारकपणे; भांबावून; अस्वस्थपणे.

uncommon /ॲन्'कॉमन्/ *वि* असाधारण. **uncommonly** *क्रिवि* (*औप*) असाधारणपणे; फार, खूप.

uncompromising /ॲन्'कॉम्प्रमाइझिङ्/ *वि* तडजोड न करणारा, ताठर.

unconcerned /,ॲन्कन्'सऽन्ड्/ *वि* मन नसलेला, अनुत्साही आणि काळजी नसलेला, बेफिकीर.

unconditional /,ॲन्कन्'डिशन्ल्/ *वि* बिनशर्त, अटीविना; पूर्ण : *~ surrender, पूर्ण शरणागती.*

unconscious /ॲन्'कॉन्शस्/ *वि* बेशुद्ध; बेसावध : *knocked ~, बेशुद्ध पाडलेला* ○ *~ of danger, धोक्याची कल्पना नसलेला.* **unconsciously** *क्रिवि* बेसावधपणे.

uncountable /ॲन्'काउन्टब्ल्/ *वि* न मोजता येण्यासारखा, अगणनीय : *'Butter' is an ~ noun, 'लोणी' हे अगणनीय नाम आहे.*

uncouth /ॲन्'कूथ्/ *वि* (एखादी व्यक्ती किंवा तिच्या वर्तनाविषयी) रासवट, अडाणी, वेडाविद्रा.

uncover /ॲन्'कव्ह(र्)/ *क्रि* [*सक*] १ झाकण काढणे, आवरण दूर करणे. २ (गुप्त गोष्ट) शोधून काढणे, उजेडात आणणे.

undaunted /,ॲन्'डॉऽन्टिड्/ *वि* (*औप*) निराश न झालेला, निर्भय, निडर, निधडा.

undecided /,ॲन्डि'साइडिड्/ *वि* एखाद्या गोष्टीबाबत निर्णय न झालेला, अनिर्णित, अनिश्चित.

undeniable /,अन्डि'नाइअब्ल्/ *वि* निश्चितपणे सत्य, न नाकारता येणारा. **undeniably** *क्रिवि* नाकारता येणार नाही अशा रीतीने.

under /'ॲन्ड(र्)/ *शब्दयो* १ खाली : *Have you looked ~ the bed? तू पलंगाखाली पाहिलंस का?* २ व्याप्त, खाली : *Most of the iceberg is ~ the water, हिमनगाचा मोठा भाग पाण्याखाली असतो.* ३ -पेक्षा कमी : *~ £50, ५० पौंडापेक्षा कमी.* ४ स्थितीत, अवस्थेमधे; परिणामाखाली : *~ construction, बांधकाम चालू असण्याच्या अवस्थेत* ○ *~ these circumstances, या परिस्थितीमधे.* ५ शासनाखाली : *Britain ~ Thatcher, थॅचरच्या राजवटीतील ब्रिटन.* ६ प्रमाणे, अनुसार : *~ the terms of the contract, कराराच्या कलमांनुसार.* ७ (नाव) वापरून, (नावा)खाली : *She wrote ~ the name of George Eliot, जॉर्ज एलियटच्या नावाखाली/नावाने तिने लेखन केले.* **under** *क्रिवि* खालच्या बाजूने, विशेषतः पाण्याखालून.

under- *पूर्वप्रत्यय* १ खालचा : *~current, खालचा प्रवाह.* २ अपुरा, अर्धवट : *~ripe,*

पुरता न पिकलेला.

underarm /'अन्डराम्/ *वि, क्रिवि* (*क्रीडा*) खांद्याच्या खाली हात ठेवून (केलेला).

undercarriage /'अन्डकॅरिज्/ *ना* [*गण*] वायुवाहनाची उतरायची चाके आणि त्यांचे आधार, गाडा.

undercharge /ˌअन्ड'चाज्/ *क्रि* [*अक, सक*] एखाद्याला खूप कमी किमतीत देणे, कमी दर लावणे, कमी भावात विकणे.

underclothes /'अन्डक्लउद्झ्/ *ना* [*ब.व*] = UNDERWEAR.

undercover /ˌअन्ड'कव्ह(र्)/ *वि* गुप्तपणे काम करणारा – विशेषतः हेर म्हणून.

undercurrent /'अन्डकरन्ट्/ *ना* [*गण*] १ पृष्ठभागाखालचा पाण्याचा प्रवाह, अंतःप्रवाह. २ (*ला*) सुप्त विचार, सुप्त भावना : *an ~ of bitterness, कटुपणाची लपलेली भावना.*

undercut /ˌअन्ड'कट्/ *क्रि* (**-tt-**, *भूत, भूत वि* **~cut**) [*सक*] (स्पर्धकापेक्षा) कमी भावाने विकणे, उतरत्या भावात विकणे.

underdeveloped /ˌअन्डडि'व्हेलप्ट्/ *वि* (देशाबाबत) आधुनिक उद्योगधंदे नसलेला आणि कमी दर्जाचे राहणीमान असलेला, अर्धविकसित.

underdog /'अन्डडॉग्; *अमे* -डॉऽग्/ *ना* [*गण*] कमी दर्जाचा असल्याने स्पर्धेत न टिकणारा माणूस, पददलित, तळागाळातला माणूस, कमकुवत स्थानी असल्यामुळे स्पर्धेत टिकणे असंभवनीय असलेला.

underdone /ˌअन्ड'डन्/ *वि* (खास करून मांसाबाबत) पूर्ण न शिजलेले.

underestimate /ˌअन्डर्'एस्टिमेइट्/ *क्रि* [*सक*] फारच कमी लेखणे, कमी मानणे : *Don't ~ the enemy's strength, शत्रूची ताकद कमी लेखू नका.*

underfed /ˌअन्ड'फेड्/ *वि* कुपोषित, कुपोषण असलेला.

underfoot /ˌअन्ड'फुट्/ *क्रिवि* पायाखाली : *The grass was wet ~, पायाखालचे गवत ओले होते.*

undergo /ˌअन्ड'गउ/ *क्रि* (*भूत* **-went** /-'वेन्ट्/, *भूत वि* **-gone** /-'गॉन्; *अमे* -'गॉऽन्/) [*सक*] (विशेषतः वाईटाचा) अनुभव घेणे.

undergraduate /ˌअन्ड'ग्रॅजुअट्/ *ना* [*गण*] प्रथम पदवीसाठी शिकणारा महाविद्यालयीन किंवा विद्यापीठातील विद्यार्थी, स्नातकपूर्व विद्यार्थी.

underground /'अन्डग्राउन्ड्/ *वि* १ भूमिगत, जमिनीखालचा. २ (*ला*) गुप्त, विशेषतः शासनविरोधी बेकायदेशीर राजकीय संघटनेचा, भूमिगत. **the underground** *ना* [*अ.व*] १ भुयारी रेल्वेमार्ग. २ भूमिगत किंवा गुप्त राजकीय संघटना. **underground** /ˌअन्ड'ग्राउन्ड्/ *क्रिवि* जमिनीखाली, भूपृष्ठाखाली.

undergrowth /'अन्डग्रउथ्/ *ना* [*अगण*] मोठ्या झाडांखाली वाढणारी झाडझुडपे.

underhand /ˌअन्ड'हॅन्ड्/ *वि* गुप्ततेने आणि लबाडीने केलेला, काळा.

underlie /ˌअन्ड'लाइ/ *क्रि* (*भूत* **-lay** /-लेइ/, *भूत वि* **-lain** /-लेइन्/, *वर्त वि* **-lying**) [*सक*] (गुप्त) कारण असणे, मुळाशी/पायाशी असणे.

underline /ˌअन्ड'लाइन्/ *क्रि* [*सक*] १ खाली रेघ मारणे, अधोरेखित करणे. २ (*ला*) भर देणे, जोर देणे.

undermanned /ˌअन्ड'मॅन्ड्/ *वि* जरूरीपेक्षा कमी कामगार असलेला.

undermine /ˌअन्ड'माइन्/ *क्रि* [*सक*] १ हळूहळू क्षीण करणे, खचवणे : *Repeated failure ~d his confidence, पुन्हापुन्हा आलेल्या अपयशाने त्याचा विश्वास ढासळवला.* २ बोगदा किंवा बीळ करणे.

underneath /ˌअन्ड'नीथ्/ *शब्दयो, क्रिवि* खाली; खालच्या बाजूला.

underpants /'अन्डपॅन्ट्स्/ *ना* [*ब.व*] पुरुषांची आतली चड्डी.

underpass /'अन्डपास्; *अमे* -पॅस्/ *ना* [*गण*] रेल्वे लाइनच्या किंवा मोठ्या रस्त्याच्या खालून जाणारा मार्ग.

underprivileged /ˌअन्ड'प्रिव्हलिज्ड्/ *वि* समाजातील उपेक्षित वर्ग, कमकुवत वर्ग.

underrate /ˌअन्ड'रेइट्/ *क्रि* [*सक*] फार

वाईट मत असणे, खूप कमी लेखणे.

underside /'अन्डसाइड्/ *ना* [*गण*] खालची बाजू किंवा पृष्ठभाग.

undersigned /,अन्ड'साइन्ड्/ *ना* **the undersigned** [*गण*] (*ब.व* **the undersigned**) (*औप*) खाली सही/सह्या करणारे: *We, the ~ . . . , आम्ही, खाली सह्या करणारे . . . .*

understand /,अन्ड'स्टॅन्ड्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-stood** /-'स्टुड्/) १ [*अक, सक*] (एखाद्याच्या बोलण्याचा वगैरे) अर्थ कळणे, समजणे: *She can ~ French perfectly, तिला फ्रेंच चांगलं समजतं/कळतं* ○ *I don't ~ what the problem is, अडचण/प्रश्न काय आहे मला कळत नाही.* २ [*अक, सक*] (एखाद्याचा) स्वभाव माहीत असणे, मन ओळखणे: *No one ~s me, मला कोणी समजून घेत नाही.* ३ [*सक*] (*औप*) सांगितले जाणे, कळवले जाणे: *I ~ that you wish to leave, तुला (इथून) जायचंय् असं मला कळतंय्.* ४ (*वाक्प्र*) **,make oneself under'stood** आपल्याला काय म्हणायचंय् ते स्पष्ट करणे, आपला अर्थ सांगणे. **understandable** *वि* समजण्यासारखा; सहाजिक, स्वाभाविक. **understandably** *क्रिवि* सहाजिकपणे; स्वाभाविकपणे. **understanding** *ना* १ [*अगण*] ज्ञान, समज. २ [*अगण*] सहानुभूती, अनुकंपा. ३ [*गण*] अनौपचारिक करार, समझोता. **understanding** *वि* सहानुभूतीयुक्त.

understate /,अन्ड'स्टेइट्/ *क्रि* [*सक*] नीटपणे किंवा पूर्णपणे न मांडणे/सांगणे. **understatement** /'अन्डस्टेइट्मन्ट्/ *ना* [*गण, अगण*] कमी करून सांगणे.

understudy /'अन्डस्टडि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) आजारी नट/नटीच्या ऐवजी काम करू शकणारी व्यक्ती, राखीव कलाकार.

undertake /,अन्ड'टेइक्/ *क्रि* (*भूत* **-took** /-'टुक्/, *भूत वि* **~n** /-'टेइकन्/) [*सक*] (*औप*) १ जबाबदारी घेणे/स्वीकारणे. २ *to//* एखादी गोष्ट करण्याची हमी देणे, वचन देणे. **undertaking** *ना* [*गण*] १ हाती घेतलेले काम; स्वीकारलेले कार्य. २ (*औप*) वचन.

undertaker /'अन्डटेइक(र्)/ *ना* [*गण*] अंतिम संस्कार करणारा माणूस.

undertone /'अन्डटउन्/ *ना* [*गण*] १ खालचा आवाज: *speak in ~s, खालच्या आवाजात बोलणे.* २ लपलेला भाव, लपलेला अर्थ.

undervalue /,अन्ड'व्हॅल्यू/ *क्रि* [*सक*] किंमत फार कमी करणे.

underwater /,अन्ड'वॉऽट(र्)/ *वि, क्रिवि* पाण्याखाली असलेला, वापरला किंवा केला जाणारा.

underwear /'अन्डवेअ(र्)/ *ना* [*अगण*] आतले कपडे.

underworld /,अन्ड'वऽल्ड्/ *ना* **the underworld** [*अे.व*] १ गुन्हेगार टोळी किंवा त्यांचे गुन्हे, संघटित गुन्हेगार. २ (*पुराणात*) नरक, पाताळ.

underwrite /,अन्ड'राइट्/ *क्रि* (*भूत* **-wrote** /-'रउट्/, *भूत वि* **-written** /-'रिट्न्/) [*सक*] आर्थिक नुकसान भरपाईचे वचन देणे, हमी देणे.

undesirable /,अन्डि'ज़ाइअरब्ल्/ *वि* हानिकारक असू शकेल असा; नको असलेला. **undesirable** *ना* [*गण*] उपद्रवकारक माणूस; नको ती ब्याद.

undeveloped /,अन्डि'व्हेलप्ट्/ *वि* (स्थळ, भूमी वगैरेबाबत) शेतीखाली न आलेली किंवा व्यवसाय, निवास वगैरे यासाठी वापरात न आलेली.

undies /'अन्डिझ्/ *ना* [*ब.व*] (*अनौप*) स्त्रियांचे आतले कपडे.

undo /अन्'डू/ *क्रि* (*भूत* **-did** /-'डिड्/, *भूत वि* **-done** /'डन्/) [*सक*] १ (काहीतरी बांधलेले) सोडणे, मोकळे करणे. २ परिणाम नष्ट करणे, घालवणे, बोळा फिरवणे: *He undid all my good work, त्याने माझ्या सर्व चांगल्या कामावर बोळा फिरवला.* **undoing** *ना* [*अे.व*] (*औप*) एखाद्याच्या अपयशाचे कारण.

undoubted /अन्'डाउटिड्/ *वि* निश्चित, ठाम; निःशंकपणे स्वीकारलेला, खरा. **undoubtedly** *क्रिवि* निश्चितपणे; खरोखरच.

undress /,अन्'ड्रेस/ *क्रि* [*अक*] १ स्वतःचे

कपडे काढणे, पोषाख उतरवणे. २ [*सक*] एखाद्याचे कपडे काढणे, एखाद्याला नागवे करणे. **undressed** *वि* उघडा, नागवा.

undue /,ॲन्'ड्यू; *अमे* -'डू/ *वि* (*औप*) फाजील, भलता : *with ,~ 'haste, भलत्या घाईने.* **unduly** *क्रिवि* भलता, जास्त असा.

undulate /'ॲन्ड्युलेइट्/ *क्रि* [*अक*] लाटेप्रमाणे खालीवर होणे, हेलकावणे : *The road ~s through the hills, डोंगरातून रस्ता खालीवर होत जातो.*

undying /,ॲन्'डाइ·इङ्/ *वि* (*औप*) अमर : *~ love, अमर प्रेम.*

unearth /ॲन्'अऽथ्/ *क्रि* [*सक*] १ खणून किंवा उकरून वर काढणे. २ शोधून काढणे, हुडकून काढणे : *~ the truth, सत्य शोधून काढणे.*

unearthly /ॲन्'अऽथ्लि/ *वि* १ अस्वाभाविक किंवा गूढ. २ (*अनौप*) भलता, अयोग्य : *at this ~ hour, या भलत्या वेळी.*

uneasy /ॲन्'ईझि/ *वि* (**-ier, -iest**) काळजीत पडलेला, अस्वस्थ. **uneasily** *क्रिवि* अस्वस्थपणे. **uneasiness** *ना* [*अगण*] अस्वस्थता.

uneconomic /,ॲन्,ईक'नॉमिक्, ,ॲन्-,अेक्-/ *वि* फायदेशीर नसलेला, खर्चाचा.

unemployed /,ॲन्इम्'प्लॉइड्/ *वि* बेकार, नोकरी नसलेला. **the unemployed** *ना* [*ब.व*] बेकार (लोक). **unemployment** /-'प्लॉइमन्ट्/ *ना* [*अगण*] बेकारी, बेरोजगारी.

unequal /,ॲन्'ईक्वल्/ *वि* १ (आकार, राशी वगैरेमधे) असमान, वेगळा. २ (उदा वेतन कराराबाबत) विषम. ३ *to//* (*औप*) सामर्थ्यात किंवा हुशारीत बरोबरीचा नसलेला. **unequally** *क्रिवि* असमानतेने; विषम पद्धतीने.

unequivocal /,ॲनि'क्विव्हक्ल्/ *वि* (*औप*) निःसंदिग्ध अर्थ असलेला, सुस्पष्ट. **unequivocally** *क्रिवि* निःसंदिग्धपणे, स्पष्टपणे.

uneven /,ॲन्'ईव्ह्न्/ *वि* १ असखल, सपाट नसलेला. २ बदलत्या गुणवत्तेचा, एकसंध नसलेला.

unexpected /,अनिक्'स्पेक्टिड्/ *वि* अनपेक्षित म्हणून आश्चर्यकारक. **unexpectedly** *क्रिवि* अनपेक्षितपणे.

unfailing /ॲन्'फेइलिङ्/ *वि* (*पसंती*) अथक, सतत, सलग.

unfair /,ॲन्'फेअ(र्)/ *वि* अन्याय्य, अयोग्य : *~ remarks/competition, अन्यायकारक टिप्पणी किंवा शेरे/स्पर्धा.* **unfairly** *क्रिवि* अन्यायकारकपणे.

unfaithful /,ॲन्'फेइथ्फ्ल्/ *वि* स्वतःचा नवरा, बायको, प्रेमिक याखेरीज इतरांशी लैंगिक संबंध असणारा, बदफैली.

unfamiliar /,ॲन्फ'मिलिअ(र्)/ *वि* १ अप्रसिद्ध. २ *with//* माहिती नसलेला, अपरिचित : *I'm ~ with this type of computer, या प्रकारच्या संगणकाची मला माहिती नाही.*

unfasten /ॲन्'फास्न्; *अमे* ॲन्'फॅस्न्/ *क्रि* [*सक*] बटणे, नाडी वगैरे सोडणे.

unfinished /ॲन्'फिनिश्ट्/ *वि* पूर्ण न झालेला, अपुरा : *~ business, अपूर्ण काम.*

unfit /,अन्'फिट्/ *वि* अयोग्य, अक्षम, अपात्र.

unfold /ॲन्'फउल्ड्/ *क्रि* १ [*सक*] घडी मोडणे, उलगडणे. २ [*अक, सक*] (*ला*) उलगडणे, स्पष्ट होणे/करणे : *My reaction to his story as it ~ed was one of amazement, त्याने सांगितलेली गोष्ट जसजशी उलगडत गेली तसतसा मी थक्क होत गेलो.*

unforeseen /,अन्फॉऽ'सीन्/ *वि* अनपेक्षित, आकस्मिक.

unforgettable /,ॲन्फ'गेटब्ल्/ *वि* सहज विसरता येणार नाही असा, अविस्मरणीय.

unfortunate /,ॲन्'फॉऽचनट्/ *वि* १ दुर्दैवी, अभागी. २ वाईट वाटायला लावणारा : *an ~ remark, अयोग्य शेरा.* **unfortunately** *क्रिवि* दुर्दैवाने.

unfounded /,ॲन्'फाउन्डिड्/ *वि* सत्याला धरून नसणारा, बिनबुडाचा.

unfriendly /,ॲन्'फ्रेन्ड्लि/ *वि* (**-ier, -iest**) मित्रभावाचा नाही असा, शत्रुभावाचा.

unfurl /,ॲन्'फऽल्/ *क्रि* [*अक, सक*] (निशाण वगैरे) फडकवणे.

unfurnished /ॲन्'फऽनिश्ट्/ *वि*

(भाड्याच्या खोली वगैरेबाबत) फर्निचर नसलेली, मोकळी.

ungainly /अैन्'गेइन्लि/ *वि* बेढब, गबाळा.

ungodly /,अैन्'गॉडलि/ *वि* १ अधार्मिक. २ (*अनौप*) भलता : *at this ~ hour, या भलत्या वेळी.*

ungrateful /अैन्'ग्रेइट्फ़ल/ *क्रिवि* कृतघ्न, निमकहराम.

unguarded /,अैन्'गाडिड्/ *क्रिवि* निष्काळजी – विशेषतः बोलण्यात, अघळपघळ.

unhappy /अैन्'हॅपि/ *वि* (**-ier, -iest**) आनंदी नसणारा, दुःखी. **unhappily** *क्रिवि* दुःखाने. **unhappiness** *ना* [*अगण*] दुःख, कष्टीपणा.

unhealthy /अैन्'हेल्थि/ *वि* (**-ier, -iest**) १ चांगली तब्येत नसणारा, रोगट, आजारी. २ अनारोग्यकारक.

unheard-of /अैन्'हऽड् ऑव्ह्/ *वि* पूर्वी माहित नसलेला, न ऐकलेला; धक्कादायक.

unicorn /'यूनिकॉऽन्/ *ना* [*गण*] डोक्यावर एक उंच शिंग असणारा घोड्यासारखा एक काल्पनिक प्राणी, एकशृंग..

unidentified /,अैन्आइ'डेन्टिफाइड्/ *वि* ओळखू न येणारा, अज्ञात.

uniform /'यूनिफॉऽम्/ *ना* [*गण, अगण*] शाळेत, सैन्यात वगैरे घालायचे खास कपडे, गणवेष. **uniform** *वि* न बदलणारा, साचेबंद; नियमित. **uniformed** *वि*: *~ed police officers, गणवेषातील पोलीस अधिकारी.* **uniformity** /यूनि'फॉऽमटि/ *ना* [*अगण*] साचेबंदपणा, एकसारखेपणा.

unify /'यूनिफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] एकत्र होणे, एकी करणे. **unification** /,यूनिफि'केइश्न्/ *ना* [*अगण*] एकत्रीकरण.

unilateral /,यूनि'लॅट्रल/ *वि* एकाच गटाने, राष्ट्राने वगैरे केलेला, एकतर्फी : ~ *disarmament, एकतर्फी निःशस्त्रीकरण.*

union /'यूनिअन्/ *ना* १ [*गण*] (**क**) = TRADE UNION (TRADE[1]). (**ख**) संघ. २ [*गण*] राष्ट्रांचा किंवा राज्यांचा संघ, संघराज्य. ३ [*अगण*] (*औप*) युती. **the ,Union 'Jack** *ना* [*अे.व*] युनायटेड किंगडमचा राष्ट्रध्वज.

unique /यू'नीक्/ *वि* १ एकमेव. २ *to//* एका व्यक्ती, गट किंवा वस्तूबाबतचा, विशिष्ट, एकट्याचा : *problems ~ to blind people, आंधळ्या लोकांचे असे खास/विशिष्ट प्रश्न.* ३ (*अनौप*) असाधारण किंवा विशेष : *a ~ singing voice, गायनाचा अनन्यसाधारण/अलौकिक कंठ/आवाज.* **uniquely** *क्रिवि* एकमेव रीतीने; विशिष्ट पद्धतीने.

unisex /'यूनिसेक्स्/ *वि* स्त्री-पुरुष दोघांनाही वापरता येईल असा, उभयलिंगी.

unison /'यूनिस्न्, -झ़न्/ *ना* (*वाक्प्र*) **in unison** (**क**) एका सुरात. (**ख**) (*ला*) अगदी बरोबरीने, मिळून.

unit /'यूनिट्/ *ना* [*गण*] १ एक नग, एक व्यक्ती वगैरे, एकक. २ विशिष्ट काम करणाऱ्यांचा गट, पथक : *the university reasearch ~, विद्यापीठ संशोधन शाखा/विभाग.* ३ विशिष्ट कार्य करणारे यंत्र किंवा यंत्रसामग्री : *the central processing ~ of a computer, संगणकाचा मध्यवर्ती संस्करण भाग.* ४ मोजण्याचे एक परिमाण : *The metre is a ~ of length, मीटर हे लांबीचे एक परिमाण आहे.*

unite /यू'नाइट्/ *क्रि* [*अक, सक*] एक होणे/करणे; जोडणे. **the U,nited 'Kingdom** *ना* [*अे.व*] ग्रेट ब्रिटन आणि उत्तर आयर्लंड. **the U,nited 'Nations** *ना* [*अे.व*] शांतता, बंधुभाव वगैरेसाठी काम करणारी आंतरराष्ट्रीय संघटना, यूनो.

unity /'यूनटि/ *ना* [*अगण*] एकी; सहमती.

universal /,यूनि'व्हऽसल्/ *वि* विशिष्ट वर्गातील किंवा जगातील सर्व प्राणिमात्रांना लागू होणारा, सार्वत्रिक, वैश्विक. **universally** *क्रिवि* सार्वत्रिकपणे.

universe /'यूनिव्हऽस्/ *ना* **the universe** [*अे.व*] सर्व तारे, ग्रह मिळून असणारे अवकाश, विश्व.

university /,यूनि'व्हऽसटि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) (**क**) विद्यापीठ. (**ख**) विद्यापीठातील लोक.

unkempt /,अैन्'केम्प्ट्/ *वि* अस्ताव्यस्त, विस्कटलेला : *~ hair, न विंचरलेले केस.*

unkind /,अैन्'काइन्ड्/ *वि* निर्दय; क्रूर किंवा कठोर.

unknown /ˌअन्'नउन्/ *वि* अज्ञात किंवा माहीत नसलेला.

unleash /अन्'लीश्/ *क्रि* [*सक*] (*औप*) (शक्ती) मोकळी करणे, सोडणे.

unless /अन्'लेस्/ *उ.अव्यय* जर नाही तर, नसेल तर : *You will fail ~ you work harder, तू कष्ट केले नाहीस तर नापास होशील.*

unlike /अन्'लाइक्/ *वि, शब्दयो* प्रमाणे नाही; वेगळा.

unlikely /अन्'लाइक्लि/ *वि* (क) असंभाव्य, अशक्य कोटीतील किंवा खरे असण्याची शक्यता नसलेला : *He's ~ to get better, तो सुधारण्याची शक्यता कमी.* (ख) अपेक्षित नाही असा, असंभाव्य : *an ~ candidate for the job, या कामाला अगदीच अशक्य कोटीतला असा उमेदवार.*

unload /ˌअन्'लउड्/ *क्रि* १ [*अक, सक*] (सामान, जड माल वगैरे) उतरवणे, ओझे खाली घेणे. २ [*सक*] (*on/onto*)// (नको असलेले काही) दुसऱ्याच्या गळ्यात घालणे.

unlock /ˌअन्'लॉक्/ *क्रि* [*सक*] किल्लीने (दरवाजा वगैरे) उघडणे, ताला खोलणे.

unlucky /अन्'लकि/ *वि* कमनशिबी, अभागी, भाग्य न आणणारा, न लाभणारा.

unmanned /ˌअन्'मॅन्ड्/ *वि* (विशेषतः वायुवाहनाविषयी) सेवकवर्ग/कर्मचारी नसलेला, मनुष्यबळविरहित.

unmask /ˌअन्'मास्क्; *अमे* -'मॅस्क्/ *क्रि* [*सक*] खरे स्वरूप उघडे करणे, बुरखा फाडणे.

unmentionable /अन्'मेन्शनबल्/ *वि* उल्लेखही करू नये इतका वाईट किंवा धक्कादायक, काही सांगू नये असा.

unmistakable /ˌअन्मि'स्टेइकबल्/ *वि* चूक होणारच नाही इतका स्पष्ट किंवा स्वच्छ. **unmistakably** *क्रिवि* न चुकता.

unmitigated /अन्'मिटिगेइटिड्/ *वि* (*औप*) अत्यंत वाईट, साफ खोटा किंवा असह्य : *an ~ disaster, असह्य संकट किंवा घोर प्रसंग.*

unmoved /ˌअन्'मूव्ह्ड्/ *वि* परिणाम न झालेला, अविचल : *~ by her tears, तिच्या रडण्याचा काहीही परिणाम न झालेला.*

unnatural /अन्'नॅच्रल्/ *वि* १ अनैसर्गिक, अस्वाभाविक : *~ silence, अस्वाभाविक शांतता.* २ अपेक्षित नसलेला किंवा स्वीकारता येणार नाही असा : *~ behaviour, विचित्र किंवा अनपेक्षित वर्तन.*

unnecessary /अन्'नेसस्रि; *अमे* -ससेरि/ *वि* अनावश्यक. **unnecessarily** *क्रिवि* अनावश्यकपणे, उगाचच.

unnerve /ˌअन्'नऽव्ह्/ *क्रि* [*सक*] आत्मविश्वास नष्ट करणे, धीर खचवणे.

unnoticed /ˌअन्'नउटिस्ट्/ *वि* अलक्षित, न पाहिलेला, दृष्टीस न पडलेला.

unobtrusive /ˌअनब्'ट्रूसिव्ह्/ *वि* (*औप*) सहजपणे न दिसणारा किंवा लक्षात न येणारा, डोळ्यात न भरणारा.

unofficial /ˌअन'फिश्ल्/ *वि* अनधिकृत.

unpalatable /अन्'पॅलटबल्/ *वि* (*औप*) १ चवीला खराब. २ (*ला*) स्वीकारण्यास अवघड, मान्य न होणारा : *his ~ views, त्याची सहजासहजी न पटणारी मते.*

unpleasant /अन्'प्लेझ्न्ट्/ *वि* १ असुखकारक, वाईट : *an ~ smell, दुर्गंध.* २ फार शत्रुत्वाचा, तुसडा. **unpleasantness** *ना* [*अगण*] तुसडेपणा, भांडण.

unprecedented /अन्'प्रेसिडेन्टिड्/ *वि* पूर्वी कधीही न घडलेला किंवा न केलेला, अपूर्व, अभूतपूर्व.

unpredictable /ˌअन्प्रि'डिक्टबल्/ *वि* (माणूस, वागणूक वगैरेबाबत) अंदाज न करता येण्याजोगा : *I never know how she will react, she's so ~, ती कसं वागेल काही सांगता नाही येणार मला, तिचा काही भरवसा नाही देता येत.*

unprintable /अन्'प्रिन्टबल्/ *वि* (शब्द वगैरे बाबत) न छापण्याजोगे (असे वाईट किंवा आक्षेपार्ह).

unqualified /अन्'क्वॉलिफाइड्/ *वि* १ एखादे काम करायची अर्हता नसलेला, अनर्ह : *~ to teach, शिकवण्याची अर्हता नसलेला.* २ अमर्याद; संपूर्ण : *an ~ disaster, पूर्ण वाताहत.*

unquestionable /अन्'क्वेस्चनबल्/ *वि* निर्विवाद, संशयातीत; निश्चित. **unques-**

tionably *क्रिवि* निःशंकपणे, निश्चितपणे.

unravel /अन्'रॅव्ह्ल्/ *क्रि* (**-ll-**; *अमे* **-l-**) १ [*अक, सक*] काही विणलेले उसवणे किंवा बांधलेले सोडवणे. २ [*सक*] (*ला*) सोडवणे, उकलणे : ~ *a mystery, गूढाची उकल करणे.*

unreal /,अन्'रिअल्/ *वि* खरे न वाटणारा, अवास्तव; काल्पनिक. **unreality** /,अन्रि'ॲलटि/ *ना* [*अगण*] अवास्तवता; काल्पनिकता.

unreasonable /अन्'रीझ़नब्ल्/ *वि* अवाजवी किंवा अयोग्य, भलता, अयुक्तिक.

unremitting /,अन्रि'मिटिङ्/ *वि* अखंड, न विसावता, एकसारखा.

unrest /,अन्'रेस्ट/ *ना* [*अगण*] सामाजिक अशांतता, असंतोष : *political ~, राजकीय असंतोष.*

unrivalled (*अमे* **-l-**) /अन्'राइव्ह्ल्ड्/ *वि* इतरांपेक्षा वरचढ, अप्रतिम, अतुल.

unroll /,अन्'रउल्/ *क्रि* [*अक, सक*] गुंडाळी उलगडणे.

unruffled /,अन्'रफ़्ल्ड्/ *वि* विरस न झालेला, तोल न गेलेला; शांत, धीमा.

unruly /,अन्'रूलि/ *वि* अनावर, बेफाम.

unsavoury (*अमे* **-vory**) /,अन्'सेइव्हरि/ *वि* न रुचणारा, नापसंत, अस्वीकार्य.

unscathed /,अन्'स्केइदड्/ *वि* दुखापत न झालेला, सुखरूप.

unscrupulous /अन्'स्क्रूप्युलस/ *वि* बिनदिक्कत, तत्त्वशून्य, चाड नसणारा; अन्यायी, उलट्या काळजाचा.

unseat /,अन्'सीट्/ *क्रि* [*सक*] १ एखाद्याला घोड्यावरून वगैरे खाली पाडणे. २ पदच्युत करणे, सत्ताभ्रष्ट करणे.

unseemly /अन्'सीम्लि/ *वि* (*औप*) अयोग्य, न शोभणारा, अनुचित : ~ *behaviour, अशोभनीय वर्तन.*

unsettle /,अन्'सेट्ल्/ *क्रि* [*सक*] काळजीत पाडणे, असमाधानी किंवा दोलायमान अवस्था करणे : *~d weather, अनिश्चित (म्हणजे बदलणारे) हवामान.*

unsightly /अन्'साइट्लि/ *वि* विशोभित, बेढब.

unsound /,अन्'साउन्ड्/ *वि* १ वाईट अवस्थेतील, दैन्यावस्थेतील; क्षीण, मोडकळीस आलेला. २ (*वाक्प्र*) **of ,unsound 'mind** (*कायदा*) मनोरुग्ण.

unspeakable /अन्'स्पीकब्ल्/ *वि* पराकोटीचा, टोकाचा; अत्यंत वाईट, शब्दातीत : ~ *sadness, शब्दातीत दुःख.*

unstuck /,अन्'स्टक्/ *वि* १ न चिकटलेला, सुटलेला. २ (*वाक्प्र*) **,come un'stuck** (*अनौप*) अपयश येणे; फसणे.

unswerving /अन्'स्वऽव्हिङ्/ *वि* अचल; पक्का, ठाम : ~ *loyalty, अचल निष्ठा.*

unthinkable /,अन्'थिङ्कब्ल्/ *वि* विचारही न करण्याइतका वाईट, कल्पनातीत वाईट.

untidy /अन्'टाइडि/ *वि* (**-ier, -iest**) गबाळा, पसारा घातलेला, अव्यवस्थित.

untie /अन्'टाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **~d**, *वर्त वि* **untying**) [*सक*] बांधलेली दोरी सोडणे; मोकळे करणे.

until /अन्'टिल्/ (तसेच **till** /टिल्/) *शब्दयो, उ.अव्यय* पर्यंत : *Wait ~ the rain stops, पाऊस थांबेपर्यंत थांब.*

untold /,अन्'टउल्ड्/ *वि* (*औप*) अपार, पारावार नसलेला.

untoward /,अन्ट'वऽड्; *अमे* अन्'टॉऽड्/ *वि* (*औप*) अनपेक्षित किंवा दुर्दैवी, वाईट, अनुचित.

unused^{1} /,अन्'यूझ्ड्/ *वि* कधीच न वापरलेला.

unused^{2} /,अन्'यूस्ट्/ *वि to//* एखादी गोष्ट करण्याची सवय नसलेला; अपरिचित.

unusual /,अन्'यूझ्ल्/ *वि* असाधारण, असामान्य; वेगळा म्हणून आकर्षक, विलक्षण, अफलातून. **unusually** *क्रिवि* असामान्यपणे; विलक्षण रीतीने, आश्चर्यकारकपणे.

unveil /,अन्'व्हेइल्/ *क्रि* [*सक*] १ अनावरण करणे. २ उघड करणे, जाहीर करणे.

unwarranted /अन्'वॉरन्टिड्/ *वि* (*औप*) अयोग्य, असमर्थनीय.

unwieldy /अन्'वील्डि/ *वि* हालवण्यास किंवा नियंत्रण करण्यास अवघड, आवाक्या

बाहेरचा, अवजड, बोजड.

unwind /,अन्'वाइन्ड्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-wound** /-'वाउन्ड्/) १ [*अक, सक*] गुंडाळी सोडणे. २ [*अक*] (*अनौप*) आराम करणे, विश्रांती घेणे.

unwitting /अन्'विटिङ्/ *वि* (*औप*) अहेतुक, नकळत, अभावित. **unwittingly** *क्रिवि* अभावितपणे, नकळत.

unwrap /अन्'रॅप्/ *क्रि* (**-pp-**) [*सक*] आवरण काढणे.

up /अप्/ *क्रिवि* १ वर : *Lift your head up, तुझं डोकं वर कर.* २ सरळ, ताठ, उभा : *stand up, उभे राहणे.* ३ बिछान्यातून बाहेर : *Is Anne up yet? ॲन उठली का?* ४ महत्त्वाच्या जागी; उत्तरेकडे : *go up to London, वर लंडनला जाणे.* ५ (*to*)// जवळ, -कडे : *He came up (to me) and asked the time, तो माझ्यापाशी आला आणि किती वाजले म्हणाला.* ६ (वाढ दाखविताना) : *Profits are up again, नफा पुन्हा वाढला.* ७ पूर्णपणे : *The stream has dried up, झरा पूर्ण आटला आहे.* ८ तुकडे करत : *tear the paper up, कागदाचे तुकडे करणे.* ९ (*अनौप*) घडणारा : *What's up? काय चाललंय्?* १० (*वाक्प्र*) **up against sth** (अनेक अडचणींना) तोंड देत. **,up and 'down** (क) मागे-पुढे : *walk up and down, येरझारा घालणे.* (ख) वर-खाली (होत) : *The boat bobbed up and down in the water, पाण्यात बोट वर-खाली हेलकावत होती.* **up for sth** (क) (गुन्ह्यासाठी) खटला भरलेला. (ख) एखाद्या गोष्टीसाठी विचारात घेतलेला; प्रस्ताव केलेला. **up to sb** एखाद्याची जबाबदारी. **up to sth** (क) जास्तीत जास्त : *My car takes up to four people, माझ्या गाडीत जास्तीत जास्त चार लोक बसतात.* (ख) पर्यंत : *up to now, आत्तापर्यंत किंवा आजपावेतो.* (ग) एखादी गोष्ट करू शकेलसा : *I don't feel up to going to work, कामावर मी जाऊ शकेन असं वाटत नाही.* **up** *शब्दयो* १ वर : *go up the stairs, जिन्यावर जाणे.* २ (सपाट पृष्ठभागाबाबत) वर, -ला : *There's another telephone-box up the road, रस्त्याच्या वरच्या बाजूला आणखी एक टेलिफोनचे खोके आहे.* **up** *वि* १ वर जाणारा : *the up escalator, वर जायचा फिरता जिना.* २ दुरुस्तीखालचा : *The road is up, रस्तादुरुस्ती चालू आहे.* **up** *क्रि* (**-pp-**) [*सक*] (*अनौप*) वाढवणे. **,up-and-'coming** *वि* (व्यक्तीबाबत) यशस्वी होऊ शकणारी. **,ups and 'downs** *ना* [*ब.व*] बरे-वाईट अनुभव.

upbringing /अप्ब्रिङ्गिङ्/ *ना* [*अगण*] लहानपणचे वळण, शिक्षण, संगोपन.

update /,अप्'डेइट्/ *क्रि* [*सक*] अधिक अद्ययावत करणे, अत्याधुनिक करणे.

upheaval /अप्'हीव्ह्ल्/ *ना* [*गण, अगण*] उलथापालथ.

uphill /,अप्'हिल्/ *क्रिवि* चढावर. **uphill** *वि* अवघड : *an ~ task, अवघड काम.*

uphold /,अप्'हउल्ड्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-held** /-'हेल्ड्/) [*सक*] १ पाठिंबा देणे : *~ the law, कायद्याला पाठिंबा देणे.* २ (कायदेशीर निकाल) पक्का करणे, शिक्कामोर्तब करणे, उचलून धरणे.

upholster /,अप्'हउल्स्ट(र्)/ *क्रि* [*सक*] बसायचे आसन गादी, कापूस, कापड, स्प्रिंग्ज वगैरे लावून नीट करणे. **upholsterer** *ना* [*गण*] गाद्या, गिर्द्या पुरवणारा, सज्जक. **upholstery** *ना* [*गण*] खुर्च्या, सोफा वगैरे नीट करण्यास वापरायचे सामान.

upkeep /'अप्कीप्/ *ना* [*अगण*] एखादी गोष्ट चांगल्या स्थितीत ठेवायला लागणारा खर्च, दुरुस्तीचा खर्च, निगा राखण्याची किंमत : *the ~ of a house, घराच्या डागडुजीचा खर्च.*

upland /'अप्लन्ड्/ *ना* [*गण, विशेषतः ब.व*] देशाचा पठारावरचा भाग, उच्चभूमी.

up-market /'अप् ,माकिट्/ *वि* (*अनौप*) उच्चवर्गीय लोकांचा, उच्चभ्रूंचा : *an ~ restaurant, वरच्या लोकांचे उपाहारगृह.*

upon /अ'पॉन्/ *शब्दयो* (*औप*) = ON^{2} १, २, ६, ११, १२, १४.

upper /'अप(र्)/ *वि* १ वरचा, वरिष्ठ; वरच्या बाजूचा : *the ~ lip, वरचा ओठ.* २ (*वाक्प्र*) **the upper 'hand** फायदा, वरचष्मा : *gain the ~ hand, वरचष्मा होणे.* **upper** *ना* [*गण*] बुटाचा वरचा भाग. **the ,upper 'class** *ना* [*गण*] मध्यमवर्गाच्या वरचा उच्च

वर्ग. **,upper-'class** *वि* वरच्या वर्गाचा. **'uppermost** *वि, क्रिवि* (श्रेणी किंवा स्थान याबाबत) सर्वोच्च, सर्वाधिक महत्त्वाचा: *thoughts ~most in his mind, त्याच्या मनातील सर्वप्रथम आलेले विचार.*

upright /'अप्राइट्/ *वि* १ सरळ, उभा; ताठ. २ प्रामाणिक, सचोटीचा, सरळ मार्गी; माननीय. **upright** *ना* [*गण*] आधाराचा उभा खांब.

uprising /'अप्राइझिङ्/ *ना* [*गण*] सत्ताधाऱ्यांविरुद्ध सामान्य लोकांनी केलेली लढाई, बंड, उठाव.

uproar /'अप्रॉऽ(र्)/ *ना* [*अगण, अ.व*] गोंधळ, कोलाहल, गदारोळ, रागाचा उद्रेक. **uproarious** /अप्'रॉऽरिअस्/ *वि* गोंधळाचा, आरडाओरडीचा.

uproot /,अप्'रूट्/ *क्रि* [*सक*] १ (झाड वगैरे) समूळ वर काढणे, उपटणे. २ (*ला*) स्वतःला वगैरे घर सोडायला लावणे, घराची नाळ तोडणे.

upset /,अप्'सेट्/ *क्रि* (**-tt-**, *भूत, भूत वि* **upset**) [*सक*] १ एखाद्याला निराश करणे, काळजीत टाकणे: *be ~ by the bad news, वाईट बातमीने अस्वस्थ होणे.* २ थोडेसे आजारी पाडणे: *Milk ~s her, दुधाने तिला आजारपण येते.* ३ बारगळायला किंवा कोलमडायला लावणे: *~ one's plans, योजना बारगळणे.* ४ चुकून पाडणे, कलंडणे: *~ a glass of water, पाण्याचा पेला पाडणे.* **upset** /'अप्सेट्/ *ना* १ [*अगण, गण*] काळजीत टाकणे. २ [*गण*] थोडेसे बरे नसणे: *a stomach ~, पोट बिघडणे.*

upshot /'अप्शॉट्/ *ना* **the upshot** [*अ.व*] (*of*)// अंतिम फल, परिणाम.

upside-down /,अप्साइड् 'डाउन्/ *वि, क्रिवि* १ वरचा भाग खाली असा, उलथापालथा. २ (*ला*) विस्कटलेला, अस्ताव्यस्त: *Burglars had turned the house ~, चोरट्यांनी घर अस्ताव्यस्त करून ठेवले होते.*

upstage /,अप्'स्टेइज्/ *क्रि* [*सक*] इतरांकडून स्वतःकडे लक्ष वेधून घेणे.

upstairs /,अप्'स्टेअझ्/ *क्रिवि, वि* वरच्या मजल्यावर.

upstanding /,अप्'स्टॅन्डिङ्/ *वि* (*औप*) १ सशक्त. २ प्रामाणिक आणि सज्जन.

upstart /'अप्स्टाट्/ *ना* [*गण*] (*अधिक्षेपी*) अचानक श्रीमंत आणि प्रतिष्ठित झालेला माणूस, धनदांडगा, उपटसुंभ.

upstream /,अप्'स्ट्रीम्/ *क्रिवि* नदीच्या प्रवाहाच्या दिशेने, वरच्या बाजूने.

uptake /'अप्टेइक्/ (*वाक्प्र*) **,quick/ ,slow on the 'uptake** अर्थ लवकर/ उशिरा कळणारा.

uptight /,अप्'टाइट्/ *वि* (*अनौप*) काळजीत पडलेला, अस्वस्थ.

up-to-date /,अप् ट 'डेइट्/ *वि* १ आधुनिक: *~ equipment, आधुनिक साधनसामग्री.* २ अद्ययावत माहिती असलेला: *an ~ report, अद्ययावत माहिती असलेला अहवाल.*

upward /'अप्वड्/ *वि* वर जाणारा, उर्ध्वगामी. **upwards** (तसेच **upward**) *क्रिवि* वर.

uranium /यु'रेइनिअम्/ *ना* [*अगण*] आण्विक ऊर्जा निर्माण करण्यास वापरायचा किरणोत्सर्गी धातू.

urban /'अऽबन्/ *वि* शहरी.

urchin /'अऽचिन्/ *ना* [*गण*] द्वाड मूल, गरीब गबाळे मूल.

urge /अऽज्/ *क्रि* [*सक*] १ अनुनय करणे, विनवणी करणे: *They ~d her to come back soon, पुन्हा लवकर परतण्याची त्यांनी तिला गळ घातली.* २ जोरदार शिफारस करणे, आग्रहपूर्वक सांगणे: *~ caution, सावधानतेचा आग्रह धरणे.* ३ (जनावराला) बळेच हाकणे. **urge** *ना* [*गण*] उत्कंठा, प्रबळ इच्छा: *a sudden ~ to run away, पळून जाण्याची तीव्र इच्छा.*

urgent /'अऽजन्ट्/ *वि* तातडीचा. **urgency** /'अऽजन्सि/ *ना* [*अगण*] तातडी, निकड. **urgently** *क्रिवि* तातडीने, त्वरेने.

urine /'युअरिन्/ *ना* [*अगण*] मूत्र, लघवी. **urinate** *क्रि* [*अक*] मुतणे, लघवी करणे.

urn /अऽन्/ *ना* [*गण*] १ मृत व्यक्तीच्या राखेचे भांडे, रक्षाकलश. २ चहा किंवा कॉफीचे मोठे धातूचे भांडे, चहापात्र.

US /ˌयू 'अेस्/ *संरू* **the US** the United States (of America) (अमेरिकेची) संघ राज्ये : *a US citizen, अमेरिकन नागरिक.*

us /अस्; अधिक बलयुक्त रूप अस्/ *सना* (क्रियापद किंवा शब्दयोगीचे कर्म म्हणून वापर) मला आणि इतरांना, आम्हाला, तुम्हाला/तुला आणि मला, आपल्याला.

USA /ˌयू अेस् 'अेइ/ *संरू* **the USA** the United States of America, अमेरिकन संघराज्ये : *visit the USA, अमेरिकेला भेट देणे.*

usage /'यूसिज्; *अमे* 'यूझिज्/ *ना* १ [*अगण, गण*] शब्दांच्या वापराची पद्धत, प्रयोग : *a guide to modern English ~, अर्वाचीन इंग्रजी प्रयोग मार्गदर्शिका.* २ [*अगण*] एखादी गोष्ट वापरायची रीत.

use^1 /यूझ्/ *क्रि* (*भूत, भूत वि* ~**d** /यूझ्ड्/) [*सक*] १ वापरणे; उपयोग करणे : *~ a pen to write, लेखनास पेन वापरणे.* २ वापरून संपवणे : *The car ~d 20 litres of petrol for the journey, प्रवासासाठी गाडीने २० लिटर पेट्रोल खाल्ले.* ३ एखाद्याचा वापर करणे, गैरफायदा घेणे; शोषण करणे. ४ (*क्रिब*) **use sth up** एखादी गोष्ट वापरून संपवणे. **usable** *वि* वापरण्याजोगा. **used** *वि* वापरलेला, वापरून जुना झालेला : *~d cars, वापरलेल्या गाड्या.* **user** *ना* [*गण*] वापरणारा माणूस किंवा वस्तू.

use^2 /यूस्/ *ना* १ [*अगण, अे.व*] वापर, उपयोग. २ [*गण, अगण*] वापरायचा हेतू : *a tool with many ~s, अनेक उपयोग असणारे हत्यार.* ३ [*अगण*] (क) वापर करायची ताकद : *lose the ~ of one's legs, पायांचा वापर करण्याची शक्ती गमावणे.* (ख) वापराचा हक्क : *You can have the ~ of my car, माझ्या गाडीचा वापर तू करू शकतोस.* ४ [*अगण*] उपयोग, फायदा : *It's no ~ worrying about it, काळजी करून काही फायदा नाही.* ५ (*वाक्प्र*) **ˌcome into/ˌgo out of 'use** वापरात येणे/वापरातून जाणे. **in 'use** वापरात, उपयोगात. **make use of sth** एखादी गोष्ट वापरणे किंवा उपयोगात आणणे. **of use** उपयोगी, उपयुक्त. **useful** /'यूस्फ्ल्/ *वि* उपयुक्त, उपयोगाचा; मदत करणारा. **usefully** *क्रिवि* उपयुक्तपणे; मदत होईल अशा रीतीने. **usefulness** *ना* [*अगण*] उपयुक्तता. **useless** *वि* १ निरुपयोगी. २ (*अनौप*) भिकार. **uselessly** *क्रिवि* निरुपयोगी अशा रीतीने, उगाच, भिकारपणे, व्यर्थ.

used /यूस्ट्/ *वि to//* सवयीचा, परिचयाचा; करण्याची सवय असलेला : *You will soon be/get ~ to the weather, तू लवकरच हवेला रुळशील.*

used to /'यूस् ट; स्वरांपूर्वी आणि अंत्य स्थानी 'यूस् टू/ *अभिद क्रि* (भूतकाळातील सवय किंवा स्थिती दाखविण्यास वापर) -आयचो, -अत् अस : *I ~ play football when I was a boy, मी लहानपणी फुटबॉल खेळत असे/खेळायचो.*

usher /'अेश(र्)/ *ना* [*गण*] चित्रपटगृह, नाट्यगृह वगैरे ठिकाणी बसायची जागा दाखविणारा माणूस. **usher** *क्रि* [*सक*] १ जागा दाखविणे; नेणे. २ (*क्रिब*) **usher sth in** (*औप*) एखाद्या गोष्टीची सुरुवात दाखवणे/करणे. **usherette** /ˌअेश'रेट्/ *ना* [*गण*] थिएटरमधे जागा दाखवण्याचे काम करणारी स्त्री.

USSR /ˌयू अेस् अेस् 'आ(र्)/ *संरू* (पूर्वीचे) **the USSR** the Union of Soviet Socialist Republics, सोव्हिएत महासंघ.

usual /'यूझल्/ *वि* नेहमीचा : *We'll meet at the ~ place, आपण नेहमीच्या ठिकाणी भेटू.* **usually** /'यूझलि/ *क्रिवि* अनेकदा, बरेच वेळा, प्रायः.

usurp /यू'झऽप्/ *क्रि* [*सक*] (*औप*) एखाद्याचा हक्क, अधिकार वगैरे अन्यायाने हिरावून घेणे, बळकावणे. **usurper** *ना* [*गण*] बळकावणारा.

utensil /यू'टेन्सल्/ *ना* [*गण*] (*औप*) विशेषतः घरात वापरायचे हत्यार किंवा साधन, भांडेकुंडे.

uterus /'यूटरस्/ *ना* [*गण*] (*शरीरशास्त्र*) = WOMB.

utility /यू'टिलटि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] उपयुक्तता. २ [*गण*] पाणीपुरवठा, रेल्वे यासारखी सार्वजनिक सेवा.

utilize /'यूटलाइझ्/ *क्रि* [*सक*] (*औप*)

वापरणे, उपयोग करणे. **utilization** /ˌयूटलाइ'ज़ेइश्न्/ *ना* [*अगण*] वापर.

utmost /'अॅट्मउस्ट्/ *वि* सर्वोच्च, कमाल, पराकाष्ठेचा : *of the ~ importance, सर्वात जास्त किंवा सर्वाधिक महत्त्वाचा.* **utmost** *ना* [*अे.व*] पराकाष्ठा, शिकस्त : *I shall do my ~, मी शिकस्त करीन.*

utter¹ /'अॅट(र्)/ *वि* निखालस, निव्वळ, पूर्ण; एकंदर : *~ darkness, पूर्ण काळोख.* **utterly** *क्रिवि* पूर्णपणे, एकंदरीने.

utter² /'अॅट(र्)/ *क्रि* [*सक*] उच्चारणे, तोंडातून शब्द काढणे; बोलणे, म्हणणे. **utterance** /'अॅटरन्स्/ *ना* [*गण*] (*औप*) बोललेला शब्द, बोल, उक्ती.

U-turn ➪ U, u.

V v

V, v /व्ही/ *ना* [*गण*] (*ब.व* **V's, v's** /व्हीझ़्/) १ इंग्रजी वर्णमालेतील बाविसावे अक्षर. २ ५ चा रोमन अंक.

v *संरू* १ versus विरुद्ध. २ volt(s) व्होल्ट(स्). ३ very फार.

vacancy /'व्हेइकन्सि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) १ रिक्त जागा/पद. २ मोकळी जागा.

vacant /'व्हेइकन्ट्/ *वि* १ रिक्त; मोकळा. २ विचारहीन, शून्यवत् : *a ~ expression, शून्यपणाचा भाव.*

vacate /व्ह'केइट्, व्हेइ'केइट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) रिक्त किंवा रिते ठेवणे; एखाद्यासाठी सोडून देणे, खाली करणे.

vacation /व्ह'केइश्न्; *अमे* व्हेइ-/ *ना* [*गण*] १ विद्यापीठाचा सुट्टीचा काळ. २ (विशेषतः *अमे*) सुट्टी.

vaccinate /'व्हॅक्सिनेइट्/ *क्रि* [*सक*] (एखाद्याला) रोगप्रतिबंधक लस टोचणे. **vaccination** /ˌव्हॅक्सि'नेइश्न्/ *ना* [*गण, अगण*] लस-टोचणी.

vaccine /'व्हॅक्सीन्; *अमे* व्हॅक्'सीन्/ *ना* [*गण, अगण*] रोगप्रतिबंधक लस.

vacuum /'व्हॅक्युअम्/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s** किंवा, वैज्ञानिक क्षेत्रात **vacua** /-युअ/) निर्वात पोकळी : (*ला*) *a ~ in his life since his wife died, पत्नीच्या मृत्यूनंतर त्याच्या जीवनात आलेली पोकळी.* **vacuum** *क्रि* [*अक, सक*] व्हॅक्यूम क्लिनरने साफ करणे. **'vacuum cleaner** *ना* [*गण*] जमिनीवरची वगैरे धूळ शोषून घेणारे एक विद्युत यंत्र/उपकरण. **'vacuum flask** *ना* [*गण*] पदार्थ गरम किंवा थंड ठेवण्यासाठी मधे निर्वात पोकळी असणारे दोन पदरी पात्र.

vagabond /'व्हॅगबॉन्ड्/ *ना* [*गण*] (*जुना, अप्रचलित*) कायमचे घर किंवा उपजीविकेचे निश्चित साधन नसलेला, उनाड माणूस, उडाणटप्पू; भटक्या, कलंदर.

vagina /व्ह'जाइन/ *ना* [*गण*] (*शरीरशास्त्र*) योनिमार्ग.

vagrant /'व्हेइग्रन्ट्/ *ना* [*गण*] (*औप* किंवा *कायदा*) कामधाम नसणारा आणि भीक मागणारा माणूस, भटक्या. **vagrancy** /-रन्सि/ *ना* [*अगण*] भटकेपणा, उनाडकेपणा.

vague /व्हेइग्/ *वि* (**~r, ~st**) १ संदिग्ध, अस्पष्टपणे व्यक्त केलेला. २ अस्फुट, स्पष्टपणे न सांगणारा. **vaguely** *क्रिवि* संदिग्धपणे, धूसरपणे. **vagueness** *ना* [*अगण*] संदिग्धता, अस्पष्टता.

vain /व्हेइन्/ *वि* १ स्वतःविषयी फार मोठ्या कल्पना असणारा, गर्विष्ठ, बढाईखोर. २ व्यर्थ, निष्फळ : *a ~ attempt, निष्फळ प्रयत्न.* ३ (*वाक्प्र*) **in 'vain** व्यर्थपणे, निष्फळपणे, निरर्थकपणे. **vainly** *क्रिवि* निरर्थकपणे, व्यर्थ.

vale /व्हेइल्/ *ना* [*गण*] (कवितेत किंवा स्थलवाचक नामात) दरी.

valentine /'व्हॅलन्टाइन्/ *ना* [*गण*] (१४ फेब्रुवारीला सेंट व्हॅलंटाइनच्या स्मृतिदिनी ज्याला पत्र पाठवायचे तो) प्रियकर, आषिक.

valet /'व्हॅलेइ, 'व्हॅलिट्/ *ना* [*गण*] पुरुषाचा खाजगी नोकर, हुजऱ्या.

valiant /'व्हॅलिअन्ट्/ *वि* शूर. **valiantly** *क्रिवि* शूरपणाने, शौर्याने.

valid /'व्हॅलिड्/ *वि* १ कायदेशीर मान्यता असलेला आणि कायदेशीरपणे वापरता येणारा, विधिग्राह्य : *The ticket is ~ until 1st May, १ मे पर्यंत हे तिकीट वैध आहे किंवा चालेल.* २

(युक्तिवादाबाबत) सबळ, भक्कम; योग्य, सप्रमाण. **validate** *क्रि* [*सक*] (*औप*) वैधता देणे, बळकटी आणणे. **validity** /व्ह'लिडटि/ *ना* [*अगण*] वैधता, विधिग्राह्यता, कायदेशीरपणा; आधार, सबळता, सप्रमाणता.

valley /'व्हॅलि/ *ना* [*गण*] डोंगरातील दरी – बहुधा नदी वाहणारी.

valour (*अमे* -or) /'व्हॅल(र्)/ *ना* [*अगण*] (*अलं*) महा पराक्रम, मोठे शौर्य, मर्दुमकी.

valuable /'व्हॅल्युअब्ल्/ *वि* १ मौल्यवान, किमती. २ फार उपयुक्त : ~ *advice, मौलिक उपदेश.* **valuables** *ना* [*ब.व*] मौल्यवान वस्तू, दागदागिने वगैरे.

valuation /,व्हॅल्यु'एइश्न्/ *ना* १ [*अगण*] मूल्यांकन. २ [*गण*] ठरवलेले मूल्य, किंमत.

value /'व्हॅल्यू/ *ना* १ (क) [*गण, अगण*] एखाद्या गोष्टीची किंमत. (ख) [*अगण*] भाव लक्षात घेता एखाद्या वस्तूची योग्यता, मोल : *This large packet is good ~ at 99p, हे मोठे पाकिट ९९ पेन्सला चांगले मिळाले.* २ [*अगण*] महत्त्व, गुण : *the ~ of regular exercise, नियमितपणे व्यायाम करण्याचे महत्त्व.* ३ **values** [*ब.व*] तत्त्वे : *high moral ~s, उच्च नैतिक मूल्ये.* **value** *क्रि* [*सक*] १ एखाद्या गोष्टीची किंमत ठरवणे, मूल्यनिर्धारण करणे. २ एखाद्याविषयी फार चांगले मत असणे, एखाद्याला मानणे : *I ~ my secretary, माझ्या सचिवाला मी मानतो किंवा त्याची किंमत मी जाणतो.* **,value 'added tax** *ना* [*अगण*] मालाची किंवा सेवेची करासहित किंमत, मालाच्या किंवा सेवेच्या किंमतीत मिळवलेला कर. **valueless** *वि* किंमत नसलेला, कवडीमोलाचा. **valuer** *ना* [*गण*] मालमत्तेची वगैरे किंमत करणारा अधिकारी, मूल्य निर्धारक.

valve /व्हॅल्व्ह्/ *ना* [*गण*] (क) हवेचा किंवा द्रवाचा प्रवाह विशिष्ट दिशेला वळवणारी झडप. (ख) हृदयातील झडप.

vampire /'व्हॅम्पाइअ(र्)/ *ना* [*गण*] (गोष्टींमधे) जिवंत माणसांचे रक्त पिणारे प्रेत.

van /व्हॅन्/ *ना* [*गण*] मालवाहतुकीसाठी असणारी, खिडक्या नसणारी, छपराची बंद गाडी.

vandal /'व्हॅन्ड्ल्/ *ना* [*गण*] मालमत्तेची वगैरे मुद्दाम नासधूस करणारा गुंड, मवाली. **vandalism** /-डलिझम्/ *ना* [*अगण*] मालमत्तेची केलेली नासधूस, मोडतोड. **vandalize** /-डलाइझ्/ *क्रि* [*सक*] मालमत्तेची वगैरे मुद्दाम नासधूस करणे, गुंडगिरी करणे.

vanguard /'व्हॅन्गाड्/ *ना* **the vanguard** [*ए.व*] १ चालून येणाऱ्या सैन्याची पुढची रांग, बिनी. २ (*ला*) एखाद्या चळवळीचे, वैज्ञानिक संशोधनाचे नेते, आघाडीचे वीर.

vanilla /व्ह'निल/ *ना* [*अगण*] आइस्क्रीम वगैरे अन्नपदार्थात स्वादासाठी वापरायचा एका वनस्पतीचा काढलेला अर्क.

vanish /'व्हॅनिश्/ *क्रि* [*अक*] १ एकाएकी दिसेनासा होणे, नाहीसा होणे. २ नष्ट होणे, संपणे : *Her hopes of finding a new job have ~ed, नवीन नोकरी मिळण्याच्या तिच्या आशा नष्ट झाल्या आहेत.*

vanity /'व्हॅनटि/ *ना* [*अगण*] १ स्वतःविषयी फार मोठी कल्पना असणे, गर्व. २ (*औप*) फोलपणा, पोकळपणा : *the ~ of pleasure, आनंदाचा पोकळपणा.*

vanquish /'व्हॅङ्क्विश्/ *क्रि* [*सक*] (*औप*) पूर्ण पाडाव करणे.

vaporize /'व्हेइपराइझ्/ *क्रि* [*अक, सक*] वाफ होणे, बाष्पीभवन होणे/करणे.

vapour (*अमे* -or) /'व्हेइप(र्)/ *ना* [*अगण*] वाफ, बाष्प : *'water ~, पाण्याची वाफ.*

variable /'व्हेअरिअब्ल्/ *वि* बदलू शकेल असा, अस्थिर, विकारी; बदलणारा. **variable** *ना* [*गण*] बदलती गोष्ट किंवा राशी, परिवर्तनशील गोष्ट, चल गोष्ट. **variably** *क्रिवि* परिवर्तनशीलतेने.

variant /'व्हेअरिअन्ट्/ *वि, ना* [*गण*] एखाद्या गोष्टीचे वेगळे रूप (असलेला), पर्यायी रूप (असलेला) : ~ *spelling of a word, शब्दाची वेगळी स्पेलिंग्ज.*

variation /,व्हेअरि'एइश्न्/ *ना* १ [*गण, अगण*] बदलण्याचे (मान), भिन्नता : *~(s) in temperature, तपमानातील बदल.* २ [*गण*] (*संगीत*) एका साध्या चालीची वेगळ्या रूपातील पुनरुक्ती.

varicose vein /'व्हॅरिकउस् व्हेइन्/ *ना*

[*गण, बहुधा ब.व*] पायातील सूज आलेली, ठणकणारी शीर.

varied /'व्हेअरिड्/ *वि* १ विभिन्न प्रकारचा. २ वैविध्यपूर्ण, बदलता : *a ~ life, वैविध्यपूर्ण आयुष्य.*

variety /व्ह'राइअटि/ *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] विविधता, वैविध्य, वैचित्र्य : *a life full of ~, वैचित्र्यपूर्ण जीवन.* २ [*अे.व*] विविध गोष्टी : *a wide ~ of interests, अनेक आणि विविध रुची.* ३ [*गण*] प्रकार : *rare varieties of birds, पक्ष्यांचे दुर्मिळ प्रकार.* ४ [*अगण*] विविधगुणदर्शन कार्यक्रम : *a ~ act, विविधगुणदर्शनातील एक कार्यक्रम.*

various /'व्हेअरिअस्/ *वि* १ विविध, वेगवेगळा : *This dress comes in ~ colours, हा पोषाख वेगवेगळ्या रंगात मिळतो.* २ अनेकदा, विविध : *at ~ times, विविध वेळी.* **variously** *क्रिवि* वेगवेगळ्या तऱ्हेने.

varnish /'व्हानिश्/ *ना* [*गण, अगण*] चकचकीतपणा आणण्यासाठी लाकडाला वगैरे लावायचा द्रव किंवा त्यामुळे येणारी झळाळी, रोगण. **varnish** *क्रि* [*सक*] रोगण लावणे.

vary /'व्हेअरि /*क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) १ [*अक*] आकार, किंमत वगैरेत फरक असणे : *Car prices ~ greatly, गाड्यांच्या किंमतीत खूप फरक आहे.* २ [*अक, सक*] बदलणे : *~ one's route, मार्ग बदलणे.*

vase /व्हाझ्; *अमे* व्हेइस्, व्हेइझ्/ *ना* [*गण*] काचेची किंवा चिनी मातीची मोठी फुलदाणी.

vast /व्हास्ट्; *अमे* व्हॅस्ट्/ *वि* विस्तीर्ण, खूप मोठा : *a ~ desert, विस्तीर्ण वाळवंट.* **vastly** *क्रिवि* फार मोठ्या प्रमाणात : *~ly improved, खूप सुधारलेला.* **vastness** *ना* [*अगण*] विस्तृतपणा, विस्तीर्णता, अफाटपणा.

VAT /,व्ही अेइ 'टी, तसेच व्हॅट्/ *संरू* value added tax, करासहित किंवा कर अंतर्भूत अशी किंमत.

vat /व्हॅट्/ *ना* [*गण*] विशेषतः दारू गाळण्यासाठीचे लांबोडे मोठे पिंप.

vault^{1} /व्हॉऽल्ट्/ *ना* [*गण*] १ मौल्यवान वस्तू ठेवायची जाड भिंतीची कोठी. २ विशेषतः मृत व्यक्ती पुरायचे तळघर. ३ घुमट, डेरा.

vault^{2} /व्हॉऽल्ट्/ *क्रि* [*अक, सक*] (*over*)// काठी किंवा हात टेकवून (कशावरून तरी) उडी मारणे : *~ (over) a wall, भिंतीवरून (पलीकडे) उडी मारणे.* **vault** *ना* [*गण*] अशी मारलेली उडी. **vaulter** *ना* [*गण*] उडी मारणारा माणूस : *a 'pole-~er, उंच आडव्या दांडीवरून लांब काठीच्या साहाय्याने उडी मारणारा.*

VDU /,व्ही डी 'यू/ *संरू* visual display unit, संगणकाचा दृश्य चित्र पडदा.

veal /व्हील्/ *ना* [*अगण*] वासराचे मांस.

veer /व्हिअ(र्)/ *क्रि* [*अक*] दिशा बदलणे.

vegetable /'व्हेज्टब्ल्/ *ना* [*गण*] बटाटा, शेंगा, कांदा यासारखी भाजी. **vegetable** *वि* वनस्पतीचा : *~ oils, वनस्पती तेले.*

vegetarian /,व्हेजि'टेअरिअन्/ *ना* [*गण*] शाकाहारी माणूस.

vegetate /'व्हेजिटेइट्/ *क्रि* [*अक*] (*ला*) काहीही न घडणारे कंटाळवाणे आयुष्य जगणे.

vegetation /,व्हेजि'टेइश्न्/ *ना* [*अगण*] वनस्पती, झाडेझुडपे.

vehement /'व्हीअमन्ट्/ *वि* आवेशजन्य किंवा आवेशयुक्त, जोरदार. **vehemence** /-मन्स्/ *ना* [*अगण*] आवेश. **vehemently** *क्रिवि* आवेशाने, उत्साहाने.

vehicle /'व्हिअक्ल्; *अमे* 'व्हीहिक्ल्/ *ना* [*गण*] १ गाडी, बस, ट्रक यासारखे माणसे किंवा माल वाहून नेणारे वाहन. २ (*औप*) व्यक्त करण्याचे साधन किंवा माध्यम : *Art may be a ~ for propaganda, प्रचारासाठी कलेचा साधन म्हणून वापर होऊ शकतो.*

veil /व्हेइल्/ *ना* १ [*गण*] स्त्रीने तोंडावर घ्यायचा बुरखा, पडदा. २ [*अे.व*] (*औप*) झाकून टाकणारा पडदा : *a ~ of mist, धुक्याचा पडदा.* **veil** *क्रि* [*सक*] १ बुरखा घेणे. २ (*ला*) दडवणे.

vein /व्हेइन्/ *ना* १ [*गण*] हृदयाकडे अशुद्ध रक्त नेणारी रक्तवाहिनी, नीला. २ [*गण*] पानाची शीर, किड्याच्या पंखावरील शीर. ३ [*गण*] खडकातील खनिज किंवा धातूचा थर, शिरा : *a ~ of gold, सोन्याचा थर/पदर.* ४ [*अे.व*] रीत, ढंग : *in a comic ~, हास्यप्रधान रीतीने.*

velocity /व्हि'लॉसटि/ *ना* [*अगण, गण*]

(*ब.व* **-ies**) (*औप* किंवा *पदार्थविज्ञान*) वेग, गती.

velvet /'व्हेल्व्हिट्/ *ना* [*अगण*] मखमलीचे कापड. **velvety** *वि* मखमली.

vendetta /व्हेन्'डेट/ *ना* [*गण*] दोन घराण्यांतील वैर.

vending-machine /'व्हेन्डिङ् म,शीन्/ *ना* [*गण*] पैसे टाकल्यावर अन्नपदार्थ, सिग्रेट वगैरे देणारे यंत्र.

vendor /'व्हेन्ड(र्)/ *ना* [*गण*] १ अन्नपदार्थ, गोळ्या, वृत्तपत्रे वगैरे विकणारा छोटा दुकानदार, किरकोळ विक्रेता. २ (*कायदा*) जमीन, घरे वगैरे विकणारा माणूस.

veneer /व्ह'निअ(र्)/ *ना* १ [*गण, अगण*] हलक्या लाकडावर चिकटवलेला प्लॅस्टिकचा किंवा लाकडाचा थर, पृष्ठावरण. २ [*अे.व*] (*ला*) खोटा आव, वरकरणी भाव : *a ~ of kindness, दयाळूपणाचा आव.* **veneer** *क्रि* [*सक*] लाकडावर प्लॅस्टिक किंवा लाकडी थर देणे.

venerable /'व्हेनरब्ल्/ *वि* (*औप*) वयामुळे वगैरे आदरणीय, वंदनीय, पूज्य.

venerate /'व्हेनरेइट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) आदर करणे, मान देणे. **veneration** /,व्हेन'रेइशन्/ *ना* [*अगण*] आदर, मान.

venereal disease /व्ह,निअरिअल् डि'झ़ीझ़्/ *ना* [*गण, अगण*] लैंगिक संबंधातून होणारा गुप्तरोग.

vengeance /'व्हेन्जन्स्/ *ना* १ [*अगण*] घेतलेला सूड. २ (*वाक्प्र*) **with a 'vengeance** (*अनौप*) नेहमीपेक्षा जास्त किंवा मोठ्या प्रमाणात.

vengeful /'व्हेन्ज्फ़ल्/ *वि* (*औप*) सूडाने पेटलेला, सूडयुक्त, खुनशी.

venison /'व्हेनिझ़न्; -इस्न्/ *ना* [*अगण*] हरणाचे मांस.

venom /'व्हेनम्/ *ना* [*अगण*] १ काही सर्पांचे वगैरे विष. २ (*ला*) द्वेष, वैर. **venomous** *वि* विषारी : *a ~ous snake/glance, विषारी साप/कटाक्ष.*

vent /व्हेन्ट्/ *ना* १ [*गण*] हवा, द्रव वगैरे बाहेर पडण्याचा मार्ग, वाट, भोक. २ (*वाक्प्र*) **give 'vent to sth** एखादी गोष्ट मोकळेपणाने मांडणे : *give ~ to one's feelings, स्वतःच्या भावनांना वाट करून देणे.* **vent** *क्रि* [*सक*] (*on*)// एखाद्यावर 'राग वगैरे भावना काढणे/व्यक्त करणे : *He ~ed his anger on his brother, त्याने भावावर राग काढला.*

ventilate /'व्हेन्टिलेइट्; *अमे* -टलेइट्/ *क्रि* [*सक*] (खोलीत, घरात वगैरे) हवा खेळवणे, वायुवीजन करणे. **ventilation** /,व्हेन्टि'लेइशन्; *अमे* -ट'ल्-/ *ना* [*अगण*] वायुवीजन. **ventilator** *ना* [*गण*] हवा खेळती ठेवण्याची युक्ती.

ventriloquist /व्हेन्'ट्रिलक्विस्ट्/ *ना* [*गण*] दुसऱ्याचा आवाज काढणारा माणूस, स्वतःचे बोलणे दुसऱ्याच्या मुखातून येत आहे असे भासवणारा माणूस.

venture /'व्हेन्च(र्)/ *ना* [*गण*] अपयशाचा धोका असलेले असे काहीतरी नवीन आणि वेगळे, साहस : *a 'business ~, धंद्याचे साहस.* **venture** *क्रि* (*औप*) १ [*अक*] साहस करणे. २ [*सक*] बोलण्याचे धाडस करणे.

venue /'व्हेन्यू/ *ना* [*गण*] स्थळ, एखाद्या समारंभाचे वगैरे ठिकाण, जागा : *a ~ for the football match, फुटबॉलच्या सामन्याचे ठिकाण.*

veranda (तसेच **verandah**) /व्ह'रॅन्ड/ *ना* [*गण*] घरासमोरची छप्पर आणि जमीन असलेली जागा, पडवी.

verb /व्हऽब/ *ना* [*गण*] एखादी व्यक्ती किंवा वस्तू काय आहे किंवा काय करते आहे हे दाखवणारा शब्द किंवा वाक्यांश, क्रियापद – उदा *bring आणणे, happen* घडणे किंवा *give up* सोडून देणे.

verbal /'व्हऽब्ल्/ *वि* १ शाब्दिक. २ तोंडी, न लिहिलेले. ३ (*व्याकरण*) क्रियापदाचा. **verbally** /'व्हऽबलि/ *क्रिवि* तोंडी. **verbal 'noun** *ना* [*गण*] क्रियापदसाधित नाम – उदा *Swimming is a good form of exercise, पोहणे हा चांगला व्यायाम आहे* या वाक्यातील *swimming* पोहणे हे क्रियापदसाधित नाम.

verbose /व्हऽ'बउस्/ *वि* (*औप*) शब्दबंबाळ. **verbosity** /व्हऽ'बॉसटि/ *ना* [*अगण*] शब्दबंबाळपणा.

verdict /'व्हऽडिक्ट्/ *ना* [*गण*] १ न्यायालयातील ज्यूरींचा निकाल, निवाडा, अधिमत : *a ~ of guilty/not guilty, अपराधी असल्याचा/नसल्याचा निवाडा.* २ कौल, मत.

verge /व्हऽज्/ *ना* [*गण*] १ रस्त्याची कड. २ (*वाक्प्र*) **on the 'verge of sth** एखाद्या गोष्टीच्या अगदी जवळ, बेतास : *on the ~ of war, युद्धाच्या काठावर.* **verge** *क्रि* (*क्रिब*) **verge on sth** बेतास येणे, एखाद्या गोष्टीसारखे असणे.

verify /'व्हेरिफाइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*सक*] सत्यता पडताळणे. **verifiable** *वि* पडताळण्याजोगा, तपासून पाहता येण्यासारखा. **verification** /,व्हेरिफि'केइश्न्/ *ना* [*अगण*] पडताळा, तपासून पाहणे.

veritable /'व्हेरिटब्ल्/ *वि* (*औप* किंवा *गंमत*) योग्य नाव दिलेला; खरोखरचा : *a ~ liar, खरोखरचा किंवा अगदी निखालस खोटारडा.*

vermin /'व्हऽमिन्/ *ना* [*अगण*] (बहुधा ब.व क्रियापदासह) १ पिके, पक्षी आणि जनावरांना धोकादायक अशी कीडामुंगी. २ (*ला*) समाजाला लागलेली कीड.

vernacular /व्ह'नॅक्युल(र्)/ *वि, ना* [*गण*] देशी भाषा किंवा देशी भाषेचा.

versatile /'व्हऽसटाइल्; *अमे* -ट्ल्/ *वि* हरहुन्नरी, नानाविषयपटू. **versatility** /,व्हऽस'टिलटि/ *ना* [*अगण*] नाना विषयात असलेला निष्णातपणा, हरहुन्नरीपणा.

verse /व्हऽस्/ *ना* १ [*अगण*] पद्य. २ [*गण*] कवितेतील कडवे, चरण. ३ [*गण*] बायबलमधील प्रकरणाचा भाग.

versed /व्हऽस्ट्/ *वि in//* (*औप*) एखाद्या गोष्टीतील तज्ज्ञ किंवा माहितगार.

version /'व्हऽश्न्; *अमे* -ज्न्/ *ना* [*गण*] १ एखाद्या गोष्टीचे विशिष्ट रूप, स्वरूप : *the film ~ of the play, नाटकाचे चित्रपटरूप.* २ विशिष्ट घटनेचे एका व्यक्तीने केलेले कथन, तर्जुमा, हकीगत : *There were three ~s of what happened, काय घडले याच्या तीन वेगवेगळ्या हकीगती सांगण्यात आल्या.*

versus /'व्हऽसस्/ *शब्दयो* विरुद्ध : *England ~ Brazil, इंग्लंड विरुद्ध ब्राझील.*

vertebra /'व्हऽटिब्र/ *ना* [*गण*] (*ब.व* **-brae** /-ब्री/) पाठीचा मणका किंवा त्यातील एक हाड, कशेरू. **vertebrate** /'व्हऽटिब्रेइट्/ *ना* [*गण*] *वि* पृष्ठवंशी (प्राणी).

vertical /'व्हऽटिक्ल्/ *वि* जमिनीशी काटकोनात, उभा. **vertical** *ना* [*अे.व*] काटकोन/उभी रेषा किंवा उभी अवस्था. **vertically** /-क्लि/ *क्रिवि* काटकोनात, सरळ, उभा.

vertigo /'व्हऽटिगउ/ *ना* [*अगण*] उंचावरून खाली पाहिल्याने येणारी भोवळ.

very^{1} /'व्हेरि/ *क्रिवि* १ खूप, मोठ्या प्रमाणात : *~ little/quickly, फार लहान/झटपट.* २ अगदी, पुरेपूर : *the ~ best quality, अगदी सर्वोत्तम प्रत.* ३ (*वाक्प्र*) **very likely** ⇨ LIKELY.

very^{2} /'व्हेरि/ *वि* १ विशिष्टमात्र, प्रत्यक्ष, हाच : *This is the ~ book I want! मला हवे असणारे हेच ते पुस्तक!* २ टोकाचा : *at the ~ end, अगदी शेवटी.* ३ (जोर देण्यासाठी वापर) : *The ~ thought of it upsets me, त्याचा अगदी विचारही मला बेचैन करतो.*

vessel /'व्हेस्ल्/ *ना* [*गण*] (*औप*) १ जहाज किंवा मोठी बोट. २ पात्र, विशेषतः द्रवपदार्थ ठेवायचे भांडे.

vest^{1} /व्हेस्ट्/ *ना* [*गण*] १ (*ब्रि*) शर्टच्या आतून घालायचा कमरेपर्यंतचा कपडा. २ (*अमे*) जाकीटाखाली घालायचा बिनबाह्याचा कपडा.

vest^{2} /व्हेस्ट्/ *क्रि* १ [*सक*] *in, with//* (*औप*) (बहुधा कर्मणी) अधिकार प्रदान करणे, जबाबदारी सोपवणे : *the authority ~ed in her, तिला दिलेला अधिकार* ○ *~ sb with authority, एखाद्याला अधिकार देणे.* २ (*वाक्प्र*) **have a vested interest in sth** एखादी गोष्ट करण्यात स्वतःचा फायदा असणे, हितसंबंध असणे.

vestige /'व्हेस्टिज्/ *ना* [*गण*] (*औप*) लवलेश, अल्पांश, नामोनिशाणी, मागमूस : *There is not a ~ of truth in the report, वृत्तांतामधे सत्याचा लवलेशही नाही.*

vet^{1} /व्हेट्/ *ना* [*गण*] (*अनौप*) VETERINARY

SURGEON (VETERINARY) पशुवैद्य याचे संक्षिप्त रूप.

vet^2 /व्हेट्/ *क्रि* (**-tt-**) [*सक*] (एखाद्याचा भूतकाळ, गुणवत्ता वगैरे) काळजीपूर्वक तपासणे.

veteran /'व्हेटरन्/ *ना* [*गण*] अनुभवी – उदाहरणार्थ सैनिक, मातब्बर. **,veteran 'car** *ना* [*गण*] १९१६ पूर्वी, विशेषतः १९०५ च्या आधी तयार केलेली मोटारगाडी.

veterinary /'व्हेट्रिन्रि; *अमे* 'व्हेटरिनेरि/ *वि* पशुवैद्यकीय. **,veterinary 'surgeon** *ना* [*गण*] (*औप*) पशुवैद्य, पशुरोगचिकित्सक.

veto /'व्हीटउ/ *ना* (*ब.व* **~es**) (**क**) [*गण*, *अगण*] एखाद्या गोष्टीस प्रतिबंध करण्याचा किंवा नकार देण्याचा अधिकृत अधिकार, नकाराधिकार. (**ख**) [*गण*] नकाराधिकाराचा वापर. **veto** *क्रि* [*सक*] नकाराधिकार वापरणे : *~ a proposal, प्रस्तावाविरुद्ध नकाराधिकार वापरणे.*

vex /व्हेक्स्/ *क्रि* [*सक*] (*औप*) त्रास देणे, ताप देणे. **vexation** /व्हेक्'सेइशन्/ *ना* [*गण*, *अगण*] त्रास, कटकट. **vexed** *वि* (समस्येबाबत) कटकटीची, ज्वलंत, खूप वादविवाद निर्माण करणारी.

via /'व्हाइ·अ/ *शब्दयो* मधून जाणारा; मार्गे, द्वारे.

viable /'व्हाइअब्ल्/ *वि* (विशेषतः योजना किंवा व्यवसायाबाबत) यशस्वी होऊ शकेल असा. **viability** /,व्हाइअ'बिलटि/ *ना* [*अगण*] यशस्वी होण्याची शक्यता, सफलक्षमता.

viaduct /'व्हाइअडैक्ट्/ *ना* [*गण*] दरी ओलांडणारा रेल्वेचा किंवा गाड्यांचा लांब उंच पूल.

vibrate /व्हाइ'ब्रेइट्; *अमे* 'व्हाइब्रेइट्/ *क्रि* [*अक*, *सक*] थरथरणे, कंप पावणे, कापणे, हादरणे : *The house ~s whenever a heavy lorry passes, जड ट्रक गेला की घर हादरते.* **vibration** /-'ब्रेइश्न्/ *ना* [*गण*, *अगण*] हादरा, कंप, कंपन.

vicar /'व्हिक(र्)/ *ना* [*गण*] परगण्याची देखभाल करणारा ख्रिस्ती धर्मगुरू. **vicarage** /'व्हिकरिज्/ *ना* [*गण*] अशा धर्मगुरूचे घर.

vice^1 /व्हाइस्/ *ना* १ [*गण*, *अगण*] पाप, दुर्गुण, वाईट गोष्ट, दुराचरण. २ [*गण*] (*अनौप किंवा गंमत*) दोष, वाईट सवय; दौर्बल्य, कमजोरी : *Chocolate is one of his ~s, चॉकलेट ही त्याची कमजोरी आहे.*

vice^2 /व्हाइस्/ *ना* [*गण*] दोन जबड्यात वस्तू घट्ट पकडून धरण्याचे साधन, शेगडा.

vice- /व्हाइस्-/ *पूर्वप्रत्यय* उप- : *vice-president, उपराष्ट्रपती किंवा उपाध्यक्ष.*

vice versa /,व्हाइस 'व्हऽस/ *क्रिवि* उलट (पक्षी) : *We gossip about them and ~, आम्ही त्यांच्या कुचाळक्या करतो आणि उलट ते आमच्या.*

vicinity /व्हि'सिनटि/ *ना* (*वाक्प्र*) **in the 'vicinity (of sth)** एखाद्या गोष्टीच्या जवळ, समीप.

vicious /'व्हिशस्/ *वि* १ दुष्ट हेतूने केलेला; क्रूर आणि हिंसक. २ (*वाक्प्र*) **a vicious 'circle** एखाद्या गोष्टीच्या परिणामातून पुन्हा तीच गोष्ट निर्माण होण्याची स्थिती, दुष्ट चक्र. **viciously** *क्रिवि* दुष्टपणे; क्रूरपणे.

victim /'व्हिक्टिम्/ *ना* [*गण*] मृत्यू, हानी, कष्ट हे ज्याच्या वाट्याला आले तो माणूस, बळी : *~s of the flood, पुराचे बळी.* **victimize** *क्रि* [*सक*] एखाद्याला अन्यायकारकपणे वागवणे, बळी घेणे. **victimization** /,व्हिक्टिमाइ'झ़ेइश्न्; *अमे* -मि'झ़्/ *ना* [*अगण*] बळी घेणे.

victor /'व्हिक्ट(र्)/ *ना* [*गण*] (*औप*) विजेता.

victory /'व्हिक्टरि/ *ना* [*गण*, *अगण*] (*ब.व* **-ies**) युद्ध, स्पर्धा वगैरेतील यश, विजयश्री. **victorious** /व्हिक्'टॉऽरिअस्/ *वि* विजयी, जेता.

video /'व्हिडिअउ/ *ना* (*ब.व* **~s**) १ [*अगण*, *गण*] चित्रफितीवरील चित्रमुद्रण. २ [*गण*] चित्रमुद्रक. **video** *क्रि* [*सक*] चित्रफितीवर (दूरदर्शनच्या कार्यक्रमाचे दृश्य) चित्रित करणे. **'video recorder** (तसेच **,video ca'ssette recorder**) *ना* [*गण*] दूरदर्शनच्या कार्यक्रमाचे चित्रीकरण करणारे आणि ते दाखविणारे यंत्र. **'videotape** *ना* [*अगण*, *गण*] चलत्चित्राचे आणि ध्वनीचे चित्रण करणारी चुंबकीय फीत, चित्रफीत.

vie /व्हाइ/ *क्रि* (*वर्त वि* **vying** /'व्हाइ.इङ्/) [*अक*] *with*// एखाद्याशी स्पर्धा करणे.

view^1 /व्ह्यू/ *ना* १ [*अगण*] दिसण्याची अवस्था, दर्शन; दृष्टीचा टप्पा, दृष्टिपथ : *The lake came into ~, सरोवर दृष्टिपथात आले* ○ *in full ~ of the crowd, गर्दीला संपूर्ण दिसेल असे.* २ [*गण*] दृश्य : *a magnificent ~ from the top of the mountain, पर्वतशिखरावरून दिसणारे नयनरम्य/भव्य दृश्य.* ३ [*गण*] वैयक्तिक मत : *In my ~, nurses deserve better pay, माझ्या मते परिचारिकांना अधिक चांगले वेतन द्यायला हवे.* ४ (*वाक्प्र*) **in view of sth** एखाद्या गोष्टीचा विचार करता : *In ~ of the weather, we will cancel the outing, हवामानाचा विचार करता, आपण बाहेर जाण्याचा बेत रद्द करू या.* **on 'view** सार्वजनिक प्रदर्शनासाठी, जाहीरपणे दाखवला जाणारा. **with a view to doing sth** एखादी गोष्ट करण्याच्या उद्देशाने. **'viewfinder** *ना* [*गण*] छायाचित्र काढण्याचे स्थळ दाखविणारी कॅमेऱ्यातील युक्ती, दृश्यदर्शक. **'viewpoint** *ना* [*गण*] दृष्टिकोन ➪ POINT^1.

view^2 /व्ह्यू/ *क्रि* (*औप*) १ [*सक*] समजणे, विचार करणे : *~ the problem with some concern, प्रश्नाचा काळजीपूर्वक विचार करणे.* २ [*अक*] नीट न्याहाळणे; परीक्षा करणे, तपासणे. ३ [*अक, सक*] (दूरदर्शन) पाहणे. **viewer** *ना* [*गण*] दूरदर्शन-प्रेक्षक.

vigil /'व्हिजिल्/ *ना* [*गण*] एखादा माणूस आजारी असताना वगैरे त्याच्यावर लक्ष ठेवण्यासाठी किंवा प्रार्थना करण्यासाठी जागे राहणे, पहारा.

vigilant /'व्हिजिलन्ट्/ *वि* (*औप*) दक्ष. **vigilance** /-लन्स्/ *ना* [*अगण*] दक्षता. **vigilantly** *क्रिवि* दक्षतापूर्वक, सावधानतेने.

vigour (*अमे* **-or**) /'व्हिग(र्)/ *ना* [*अगण*] जोम, ताकद, शक्ती, बळ. **vigorous** *वि* ताकदवान, बलवान. **vigorously** *क्रिवि* जोरदारपणे.

vile /व्हाइल्/ *वि* (**~r, ~st**) १ लज्जास्पद, वाईट; ओंगळ, किळसवाणा. २ (*अनौप*) फार वाईट, घाणेरडा : *~ weather, घाणेरडी हवा.*

vilely /'व्हाइल्लि/ *क्रिवि* बेशरमपणे, नीचपणे.

villa /'व्हिल/ *ना* [*गण*] सुट्टीत राहण्याचे घर – उदा शहराबाहेरचा विश्रांतीचा बंगला : *rent a ~ in Spain, स्पेनमधे घर भाड्याने घेणे.*

village /'व्हिलिज्/ *ना* [*गण*] खेडेगाव, ग्राम. **villager** *ना* [*गण*] खेडेगावात राहणारा माणूस, गावकरी.

villain /'व्हिलन्/ *ना* [*गण*] १ (*ब्रि ब्रात्य*) गुन्हेगार, बनेल. २ विशेषतः कथेतील दुष्ट माणूस, खलनायक. ३ (*वाक्प्र*) **the 'villain of the piece** (खास करून *गंमत*) एखाद्या नुकसानीला, समस्येला कारण असणारा माणूस.

vindicate /'व्हिन्डिकेइट्/ *क्रि* [*सक*] (*औप*) १ निर्दोष म्हणून सिद्ध करणे, संशय दूर करणे. २ सत्यता, न्याय, यथार्थता प्रस्थापित करणे, शाबित करणे. **vindication** /ˌव्हिन्डि'केइश्न्/ *ना* [*गण, अगण*] दोषनिरसन; शाबित करणे, समर्थन.

vindictive /व्हिन्'डिक्टिव्ह्/ *वि* सूडाचा, विद्वेषाचा, खुनशी. **vindictively** *क्रिवि* सूड बुद्धीने. **vindictiveness** *ना* [*अगण*] सूड बुद्धी, द्वेष.

vine /व्हाइन्/ *ना* [*गण*] खास करून द्राक्षाचा वेल. **vineyard** /'व्हिन्यड्/ *ना* [*गण*] मदिरेसाठी लावलेला द्राक्षाचा मळा, द्राक्षवाटिका.

vinegar /'व्हिनिग(र्)/ *ना* [*अगण*] सातू, मद्य वगैरेपासून केलेला आणि अन्नपदार्थात वापरला जाणारा एक आम्ल द्रव, सिरका. **vinegary** *वि* सिरक्याचा.

vintage /'व्हिन्टिज्/ *ना* [*गण*] विशिष्ट मद्य तयार केल्याचे वर्ष. **vintage** *वि* १ जुना दर्जेदार. २ (गाडीबाबत) १९१७ ते १९३० च्या दरम्यान तयार केलेली.

vinyl /'व्हाइन्ल्/ *ना* [*अगण*] टिकाऊ पण लवचिक असे एक प्लास्टिक.

viola /व्हि'अउल/ *ना* [*गण*] व्हायोलिनपेक्षा जरा मोठे असणारे एक तंतुवाद्य.

violate /'व्हाइअ·लेइट्/ *क्रि* [*सक*] १ (वचन, करार वगैरे) मोडणे, भंग करणे. २ (पवित्र स्थळाचे पावित्र्य) मोडणे. ३ (*ला*) (वैयक्तिक स्वातंत्र्यावर) आक्रमण करणे, ढवळाढवळ

करणे. **violation** /,व्हाइअ'लेइश्न्/ *ना* [*अगण, गण*] भंग; ढवळाढवळ.

violent /'व्हाइअ·लन्ट्/ *वि* १ अन्यायी बळाचा वापर करणारा किंवा तसे दाखवणारा किंवा त्यामुळे निर्माण झालेला, हिंसक : *a ~ attack, हिंसक हल्ला.* २ भावनावेगदर्शक, कडवा, तीव्र : *a ~ argument, खडाजंगी चर्चा.* ३ तुफान, तीव्र स्वरूपाचा, कडाक्याचा : *a ~ thunderstorm, विजांच्या कडकडाटाचे तुफानी वादळ.* **violence** /-लन्स्/ *ना* [*अगण*] १ हिंसाचार. २ हिंसा. **violently** *क्रिवि* हिंसकपणे.

violet /'व्हाइअलट्/ *ना* १ [*गण*] जांभुळकी किंवा पांढऱ्या रंगाची गोड वासाची फुले येणारे एक छोटे फुलझाड. २ [*गण*] निळसर जांभळा रंग.

violin /,व्हाइअ'लिन्/ *ना* [*गण*] हनुवटीखाली धरून धनुकलीने वाजवायचे एक तंतुवाद्य. **violinist** *ना* [*गण*] व्हायोलिन-वादक.

VIP /,व्ही· आइ 'पी/ *संरू, ना* [*गण*] very important person, अतिमहत्त्वाची व्यक्ती.

viper /'व्हाइप(र्)/ *ना* [*गण*] विषारी सर्प, मंडलीसर्प.

viral ➪ VIRUS.

virgin /'व्हऽजिन्/ *ना* [*गण*] संभोग न केलेली व्यक्ती – विशेषतः स्त्री, कुमारिका, कारा माणूस. **virgin** *वि* १ न विटाळलेला, अम्लान, शुद्ध : *~ snow, शुद्ध हिम.* २ न वापरलेला : *~ soil, कोरी जमीन.* **virginity** /व्ह'जिनटि/ *ना* [*अगण*] कौमार्य; न विटाळलेपणा, शुद्धता; कोरेपणा.

virile /'व्हिराइल्; *अमे* 'व्हिरल्/ *वि* वीर, मर्द. **virility** /व्ह'रिलटि/ *ना* [*अगण*] मर्दपणा, वीरता, पौरुष.

virtual /'व्हऽचुअल्/ *वि* जवळजवळ, प्रत्यक्षात नसला तरी जवळजवळ तसाच असलेला : *The deputy manager is the ~ head of the business, उपव्यवस्थापक जवळजवळ त्या उद्योगाचे प्रमुखच आहेत.* **virtually** /'व्हऽचुअलि/ *क्रिवि* सर्वथैव, सर्व प्रकारे; जवळजवळ.

virtue /'व्हऽचू/ *ना* १ [*अगण*] नीतिमानता, सदाचरण. २ [*गण*] सद्गुण : *Patience is a ~, सहनशीलता हा गुण आहे.* ३ [*गण, अगण*] फायदा : *The great ~ of the plan is its cheapness, या योजनेचा मोठा फायदा म्हणजे ती स्वस्त आहे.* ४ (*वाक्प्र*) **by virtue of sth** (*औप*) एखाद्या गोष्टीमुळे. **virtuous** *वि* सदाचरणी, गुणी, नेक, सत्वशील.

virus /'व्हाइरस्/ *ना* [*गण*] **(क)** अतिसूक्ष्म रोगाणू, विषाणू. **(ख)** (*अनौप*) अशा रोगाणूपासून झालेला रोग, सूक्ष्म रोगाणुबाधा. **viral** /'व्हाइरल्/ *वि* अतिसूक्ष्म रोगाणूचा : *a viral infection, अतिसूक्ष्म रोगाणूचा रोग संसर्ग.*

visa /'व्हीझ़/ *ना* [*गण*] एखाद्या देशाला भेट देण्यास किंवा तो सोडण्यास परवानगी देणारा पारपत्रावरील अधिकृत शिक्का, प्रवेशपत्र.

viscount /'व्हाइकाउन्ट्/ *ना* [*गण*] बॅरन आणि अर्ल यामधले ब्रिटिश उमरावाचे एक पद. **viscountess** *ना* [*गण*] १ व्हायकाउन्टची पत्नी किंवा विधवा. २ व्हायकाउन्टच्या पदाची बाई.

vise (*अमे*) ➪ VICE^{2}.

visible /'व्हिझ़ब्ल्/ *वि* दृश्य, दृश्यमान, दिसणारा. **visibility** /,व्हिझ़'बिलटि/ *ना* [*अगण*] प्रकाशाची किंवा हवेची दर्शनक्षमता, दृग्गोचरता. **visibly** *क्रिवि* स्पष्टपणे, उघड.

vision /'व्हिज्न्/ *ना* १ [*अगण*] दृष्टी, नजर. २ [*अगण*] दूरदृष्टी : *problems caused by lack of ~, दूरदृष्टीच्या अभावामुळे निर्माण झालेले प्रश्न.* ३ [*गण*] काल्पनिक चित्र, मनोराज्य : *~s of great wealth, ऐश्वर्याची स्वप्ने.*

visionary /'व्हिजन्रि; *अमे* -जनेरि/ *वि* १ दूरदृष्टीचा, द्रष्टेपणाचा. २ कल्पनारम्य म्हणून अव्यवहार्य. **visionary** *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) द्रष्टा.

visit /'व्हिझ़िट्/ *क्रि* १ [*अक, सक*] भेट देणे, -कडे जाणे : *~ a friend/Rome, मित्राला/रोमला भेट देणे.* २ [*सक*] तपासणीसाठी जागेला भेट देणे, पाहण्यासाठी जाणे. ३ [*अक*] *with*// (*अमे*) गप्पा मारण्यासाठी एखाद्याकडे जाणे. **visit** *ना* [*गण*] भेट, भेटीची वेळ : *pay a ~ to a friend, मित्राला भेट देणे* किंवा *मित्राची गाठ घेणे.* **visitor** *ना* [*गण*] भेटीला आलेला माणूस, पाहुणा, अभ्यागत.

visor /'व्हाइझ(र्)/ *ना* [*गण*] शिरस्त्राणाचा चेहरा झाकणारा आणि वर-खाली हालवता येणारा भाग.

vista /'व्हिस्ट/ *ना* [*गण*] (*औप*) १ दूरचे दृश्य, देखावा. २ (*ला*) देखावे किंवा घटना यांची मालिका, क्षेत्रे : *scientific discoveries that open up a new ~ of the future, भविष्यकाळची नवनवी क्षेत्रे दाखविणारे वैज्ञानिक शोध.*

visual /'व्हिजुअल/ *वि* दृष्टीचा, नजरेचा. **,visual 'aid** *ना* [*गण*] शिकवताना वगैरे वापरायची चित्र, चित्रपट, व्हिडियो यासारखी गोष्ट, दृक्साधन. **,visual dis'play unit** *ना* [*गण*] संगणकातील वगैरे माहिती पडद्यावर दाखविणारे यंत्र. **visualize** *क्रि* [*सक*] कल्पनाचित्र रंगवणे, डोळ्यांपुढे उभे करणे. **visually** *क्रिवि* दृष्टीत; डोळ्यांपुढे.

vital /'व्हाइट्ल/ *वि* १ आवश्यक किंवा खूप महत्त्वाचा : *a ~ part of the machine, यंत्राचा एक महत्त्वाचा भाग.* २ जिवंत, उत्साहकारक, रसरशीत. ३ जिवंतपणाचा, जीवनाबाबत. **vitality** /व्हाइ'टॅलटि/ *ना* [*अगण*] जिवंतपणा, चैतन्य. **vitally** /-टलि/ *क्रिवि* महत्त्वपूर्ण रीतीने, आवश्यकपणे. **,vital sta'tistics** *ना* [*ब.व*] (*अनौप*) स्त्रीची कंबर, छाती आणि नितंब यांची मापे.

vitamin /'व्हिटमिन्; *अमे* 'व्हाइट्-/ *ना* [*गण*] काही अन्नपदार्थात असणारे आणि आरोग्यकारक असे रासायनिक द्रव्य, जीवनसत्त्व.

vitriolic /,व्हिट्रि'ऑलिक्/ *वि* (*औप*) कडूजहर, कडवट, विरोधी.

vivacious /व्हि'व्हेइशस्/ *वि* जिवंत आणि उत्साही, उल्हासित. **vivaciously** *क्रिवि* उल्हसितपणे. **vivacity** /व्हि'व्हॅसटि/ *ना* [*अगण*] जिवंतपणा, उत्साहीपणा, उल्हासीपणा.

vivid /'व्हिव्हिड्/ *वि* १ (प्रकाश किंवा रंगाबाबत) ठळक आणि भडक, लखलखीत, लख्ख. २ स्पष्ट आणि ठासून केलेला : *a ~ description, स्वच्छ वर्णन.* **vividly** *क्रिवि* स्पष्टपणे, ठळकपणे.

vivisection /,व्हिव्हि'सेक्शन्/ *ना* [*गण*] वैज्ञानिक संशोधनासाठी जिवंत प्राण्यांवर केलेले प्रयोग, प्राणिव्यवच्छेदन.

vixen /'व्हिक्सन्/ *ना* [*गण*] कोल्ही.

vocabulary /व्ह'कॅब्युलरि; *अमे* -लेरि/ (*ब.व* **-ies**) *ना* १ [*गण*] भाषेचा शब्दसंग्रह, शब्दनिधी. २ [*गण, अगण*] एखाद्या माणसाची शब्दसंपत्ती : *the ~ of a three-year-old, तीन वर्षाच्या मुलाची शब्दसंपत्ती.* ३ [*गण*] परभाषेच्या पाठ्यपुस्तकाच्या शेवटी अर्थासकट दिलेली शब्दावली.

vocal /'व्हउक्ल/ *वि* १ वाचिक, मुखर, स्वरात्मक. २ स्पष्टवक्ता, बोलका. **vocal** *ना* [*गण, बहुधा ब.व*] पॉप संगीत म्हणणे, पॉप गायन. **,vocal 'cords** *ना* [*ब.व*] कंठातील स्वरतंतू, ध्वनीतंतू. **vocalist** /-कलिस्ट्/ *ना* [*गण*] गायक. **vocally** /-कलि/ *क्रिवि* स्पष्टपणे; आवाजाच्या बाबतीत, स्वरदृष्ट्या.

vocation /व्हउ'केइश्न्/ *ना* [*गण, अगण*] १ स्वतःला आवडणारा पेशा, आपला जन्मच त्यासाठी असा वाटणारा व्यवसाय : *She thinks nursing is her ~, रुग्णसेवा हे तिचं व्रत आहे असं तिला वाटतं.* २ (*औप*) माणसांची नोकरी, कामधंदा, व्यवसाय. **vocational** /-शन्ल/ *वि* व्यावसायिक, धंद्याचा : *~al training, व्यवसाय शिक्षण, धंदेप्रशिक्षण.*

vociferous /व्ह'सिफरस्/ *वि* तावातावाने बोलणारा, आरडाओरड करणारा : *a ~ group of demonstrators, आरडाओरड करणारा निदर्शकांचा एक गट.* **vociferously** *क्रिवि* आरडाओरड करत.

vodka /'व्हॉड्क/ *ना* [*अगण*] एक कडक रशियन मद्य.

vogue /व्हउग्/ *ना* [*गण, अगण*] लोकप्रिय फॅशन : *a new ~ for low-heeled shoes, कमी उंच टाचांच्या बुटांची नवीन टूम.*

voice /व्हॉइस्/ *ना* १ (क) [*गण*] आवाज : *recognize sb's ~, आवाज ओळखणे.* (ख) [*अगण*] बोलण्याची क्षमता, वाचा : *He's lost his ~, त्याची वाचा गेलीय.* २ [*अगण, अे.व*] मत (मांडण्याचे स्वातंत्र्य) : *They should be allowed a ~ in deciding their future, स्वतःचे भवितव्य ठरविताना मत मांडण्याचा अधिकार त्यांना द्यायला हवा.* **voice** *क्रि* [*सक*]

(भावना वगैरे) शब्दांत व्यक्त करणे.

void /व्हॉइड्/ *ना* [*गण, बहुधा अ.व*] पोकळी. **void** *वि* (*औप*) १ रिकामा, मोकळा, रिता. २ *of//* एखाद्या गोष्टीविना. ३ कायदेशीरदृष्ट्या कुचकामी, शून्य. **void** *क्रि* [*सक*] (*कायदा*) निरर्थक करणे.

volatile /'व्हॉलटाइल्; *अमे* -ट्ल्/ *वि* वागण्यात किंवा मनोवृत्तीत अचानक बदल होणारा, चंचल, अस्थिर, नाचरा.

vol au vent /'व्हॉलव्हाङ्/ *ना* [*गण*] मांस, मासे वगैरे आणि भरपूर सॉस घातलेली पेस्ट्री.

volcano /व्हॉल्'केइनउ/ *ना* [*गण*] (*ब.व* **~es**) ज्वालामुखी असलेला पर्वत. **volcanic** /-'कॅनिक्/ *वि* ज्वालामुखीचा.

volition /व्ह'लिश्न्; *अमे* व्हउ-/ *ना* (*वाक्प्र*) **of one's own volition** (*औप*) आपखुषीने, स्वेच्छेने.

volley /'व्हॉलि/ *ना* [*गण*] १ बंदुकीचे बार, सरबत्ती, गोळ्यांचा मारा. २ (टेनिस, फुटबॉल वगैरेत) जमिनीला टेकण्यापूर्वीच चेंडूला मारलेला फटका, वरचा फटका. **volley** *क्रि* १ [*अक*] (बंदुका, तोफा वगैरेबाबत) सरबत्ती करणे, मारा करणे. २ [*अक, सक*] चेंडूला वरच्यावर/हवेत फटका मारणे. **'volley-ball** *ना* [*अगण*] जाळ्यावरून चेंडू फेकायचा एक खेळ.

volt /व्हउल्ट्/ *ना* [*गण*] विद्युत्-दाबाचे एक परिमाण, व्होल्ट. **voltage** *ना* [*अगण, गण*] व्होल्टमधे मोजलेला विद्युत्-दाब.

voluble /'व्हॉल्युबल्/ *वि* (*औप*) बडबड्या, चुरचुर बोलणारा. **volubly** *क्रिवि* खूप बोलत/बोलून.

volume /'व्हॉल्यूम्; *अमे* -यम्/ *ना* १ [*गण*] एखाद्या मालिकेतील एक खंड. २ [*अगण, गण*] वस्तूने व्यापलेली जागा, आकारमान, घनफळ. ३ [*अगण*] प्रमाण : *The ~ of exports fell last month, गेल्या महिन्यात निर्यात मालाच्या प्रमाणात घट झाली.* ४ [*अगण*] रेडिओ, दूरदर्शन वगैरेचा लहानमोठा आवाज (करण्याचे साधन), ध्वनिमान.

voluminous /व्ह'लूमिनस्/ *वि* (*औप*) १ (कपड्यांबाबत) खूप कापड वापरलेला : *the ~ folds of a blanket, उबदार पांघरूणाच्या मोठमोठ्या घड्या.* २ (लेखनाबाबत) प्रचंड, विस्तृत.

voluntary /'व्हॉलन्ट्रि; *अमे* 'टेरि/ *वि* १ आपखुषीने केलेला किंवा दिलेला, ऐच्छिक, स्वेच्छेचा : *Attendance is ~, उपस्थिती ऐच्छिक आहे.* २ विनाशुल्क, स्वयंसेवी : *a ~ organization, स्वयंसेवी संघटना.* **voluntarily** /-ट्रलि; *अमे,* ,व्हॉलन्'टेरलि/ *क्रिवि* स्वेच्छेने, राजीखुषीने.

volunteer' /,व्हॉलन्'टिअ(र्)/ *ना* [*गण*] १ सक्तीविना किंवा पैशाविना सेवा देऊ करणारी व्यक्ती, स्वयंसेवक. २ सैन्यात स्वेच्छेने भरती होणारा माणूस. **volunteer** *क्रि* १ [*अक, सक*] (एखादी गोष्ट) स्वेच्छेने किंवा पैशाची अपेक्षा न करता देणे. २ [*अक*] *for//* सैन्यात स्वेच्छेने भरती होणे.

voluptuous /व्ह'लैप्चुअस्/ *वि* (*औप*) १ (स्त्रीबाबत) विषयासक्त, रत्युत्सुक. २ सुखलोलुप, विलासी. **voluptuously** *क्रिवि* सुखलोलुपतेने; आसक्तीने.

vomit /'व्हॉमिट्/ *क्रि* [*अक, सक*] ओकारी होणे/काढणे, ओकणे, उलटी होणे. **vomit** *ना* [*अगण*] ओकारी, उलटी, वान्ती.

vote /व्हउट्/ *ना* १ [*गण*] कागदावर खूण करून किंवा हात वर करून द्यायचे मत. २ **the vote** [*अ.व*] विशिष्ट गटाची मते, उदाहरणार्थ निवडणुकीतील : *the Labour ~, लेबर पार्टीची मते.* ३ **the vote** [*अ.व*] मताधिकार. **vote** *क्रि* १ [*अक, सक*] मतदान करणे/घेणे : *~ for/against sb, एखाद्याच्या बाजूने/विरोधात मत देणे* ○ *~ on the suggestion, सूचनेवर मतदान करणे.* २ [*सक*] एखाद्या गोष्टीवर खर्च करायचा ठरवणे, खर्च मंजूर करणे. **voter** *ना* [*गण*] मतदार.

vouch /व्हाउच्/ *क्रि* [*अक*] *for//* एखाद्याची हमी देणे, खात्री देणे.

voucher /'व्हाउच(र्)/ *ना* [*गण*] माल किंवा सेवा यांच्या बदल्यात देण्याचा कागद, प्रमाणक.

vow /व्हाउ/ *ना* [*गण*] वचन. **vow** *क्रि* [*सक*] वचन देणे, शब्द देणे.

vowel /'व्हाउ·अल्/ *ना* [*गण*] (क) स्वर. (ख) स्वरदर्शक अक्षर – उदा इंग्रजीतील a, e, i, o, u ही अक्षरे.

voyage /'व्हॉइ·इज्/ *ना* [*गण*] बोटीचा किंवा विमानाचा लांबचा प्रवास, सफर. **voyage** *क्रि* [*अक*] (*औप*) दूरच्या प्रवासाला जाणे. **voyager** *ना* [*गण*] प्रवासी, जलप्रवासी.

vs *संरू वि* versus विरुद्ध.

vulgar /'व्हल्ग(र्)/ *वि* १ अशिष्ट, उद्धट, ग्राम्य. २ रीतभात नसणारा, गावंढळ, खेडवळ. **vulgarity** /व्हल्'गॅरटि/ *ना* [*अगण*] अशिष्टपणा, ग्राम्यत्व; गावंढळपणा, अडाणीपणा.

vulnerable /'व्हल्नरब्ल्/ *वि* १ भेदनीय, मर्मभेद्य, सहज हल्ला करता येण्यासारखा. २ (माणसाबाबत) सहजपणे दुखावणारा; हळवा, संवेदनशील. **vulnerability** /,व्हल्नर'बिलटि/ *ना* [*अगण*] भेदनीयता; हळवेपणा.

vulture /'व्हल्च(र्)/ *ना* [*गण*] १ मृत जनावरांचे मांस खाणारा एक मोठा पक्षी, गिधाड. २ (*ला*) इतरांच्या आपत्तीवर स्वतःचा फायदा करून घेणारा.

vying ➪ VIE.

W w

W, w /'डब्ल्यू/ *ना* [*गण*] (*ब.व* **W's, w's** /'डब्ल्यूझ्/) इंग्रजी वर्णमालेतील तेविसावे अक्षर.

W *संरू* १ west(ern), (प)श्चिम किंवा पाश्चिमात्य: *W Yorkshire, पश्चिम यॉर्कशायर.* २ watt(s) वॉट(स्).

wad /वॉड्/ *ना* [*गण*] १ कागद, नोटा यांची चवड, बिंडी. २ मऊ पदार्थाचा गठ्ठा, बिंडा: *a ~ of cotton wool, कापसाचा बिंडा.*

waddle /'वॉड्ल्/ *क्रि* [*अक*] बदकासारखे डुलत चालणे. **waddle** *ना* [*गण*] डुलती चाल.

wade /वेइड्/ *क्रि* १ [*अक*] पाण्यातून पाय ओढत चालणे, पाणी तोडीत चालणे. २ (*क्रिब*) **wade into sth** एखाद्या गोष्टीला निर्धाराने हात घालणे. **wade through sth** (पुस्तक, वृत्तांत वगैरे) कष्टाने वाचणे. **wading-bird** (तसेच **wader**) *ना* [*गण*] लांब पायाचा आणि उथळ पाण्यात भक्ष्य शोधणारा पक्षी, बगळा.

wafer /'वेइफ(र्)/ *ना* [*गण*] आइस्क्रीम बरोबर खायचे पातळ कुरकुरीत गोड बिस्किट.

waffle^1 /'वॉफ्ल्/ *क्रि* [*अक*] (*ब्रि अनौप*) फुकट बडबड करणे, भरताड बोलत बसणे किंवा लिहिणे. **waffle** *ना* [*अगण*] व्यर्थ बडबड, वटवट.

waffle^2 /'वॉफ्ल्/ *ना* [*गण*] चौकोनाची नक्षी असलेला, एक प्रकारचा छोटा, कुरकुरीत केक.

waft /वॉफ्ट्; *अमे* वॅफ्ट्/ *क्रि* [*अक, सक*] हवेत मंद तरंगणे: *The scent ~ed into the room, खोलीत गंध मंदपणे पसरला/दरवळला.* **waft** *ना* [*गण*] दरवळ.

wag /वॅग्/ *क्रि* (-gg-) [*अक, सक*] हालवणे: *The dog ~ged its tail, कुत्र्याने शेपूट हालवली.* **wag** *ना* [*गण*] शेपूट हालवणे.

wage^1 /वेइज्/ *ना* [*गण*] (बहुधा *ब.व*) आठवड्याचा किंवा महिन्याचा कामाचा मोबदला, मजुरी: *fight for higher ~s, अधिक मजुरीसाठी लढणे* ○ *a ~ increase, मोबदल्यातील वाढ/वेतनवाढ.*

wage^2 /वेइज्/ *क्रि* [*सक*] (*against/on*)// (युद्ध, मोहीम वगैरे) चालू करणे: *~ a war on poverty, गरिबीविरुद्ध लढाई करणे.*

wager /'वेइज(र्)/ *ना* [*गण*], *क्रि* [*अक, सक*] (*जुना, अप्रचलित* किंवा *औप*) = BET.

waggle /'वॅग्ल्/ *क्रि* [*अक, सक*] वर-खाली किंवा एका बाजूहून दुसऱ्या बाजूकडे हालवणे.

wagon (*ब्रि* तसेच **waggon**) /'वॅगन्/ *ना* [*गण*] १ माल वाहून नेण्याची घोडागाडी. २ रेल्वेची मालवाहू उघडी वाघीण, मालडबा.

wail /वेइल्/ *क्रि* (क) [*अक, सक*] मोठ्याने रडणे, विलाप करणे, आक्रोश करणे: *a ~ing child, रडणारे मूल.* (ख) [*अक*] भोंगा, वारा वगैरेचा मोठा आवाज होणे. **wail** *ना* [*गण*] आक्रोश, आक्रंदन, विलाप.

waist /वेइस्ट्/ *ना* [*गण*] १ कंबर, कटी. २ कपड्याचा किंवा साधनाचा मधला अरुंद भाग. **waistcoat** /'वेइस्ट्कउद; *अमे* 'वेस्कट्/ *ना* [*गण*] जाकिटाच्या आतून घालायचा बिनबाह्याचा एक कपडा. **'waistline** *ना* [*गण*] कमरेचा आकार.

wait^1 /वेइट्/ *क्रि* १ [*अक*] वाट पाहणे,

तिष्ठणे : *We had to ~ an hour for the train, आगगाडीसाठी आम्हाला तासभर थांबावे लागले* ○ *I'm ~ing to see the manager, मॅनेजरला भेटायला मी वाट पाहत थांबलोय्* ○ *I can't ~ to tell her! तिला सांगायला मला थांबता येणार नाही!* म्हणजे *तिला सांगायला मी अधीर झालोय्!* २ [*सक*] तयारीत असणे : *He is ~ing his opportunity, तो संधीची वाट पाहतोय्.* ३ [*अक*] लगेच कारवाई करण्याचे थांबणे : *The matter isn't urgent; it can ~, ही बाब फार तातडीची नाही, ती थांबू शकते.* ४ (*वाक्प्र*) **,wait and 'see** थांबा आणि काही करण्यापूर्वी काय होतंय ते पाहा. **wait on sb hand and 'foot** एखाद्याला हवे ते सर्व करणे. ५ (*क्रिब*) **wait on sb** उपहारगृहात एखाद्याला अन्न वगैरे वाढणे. **wait up (for sb)** एखादा माणूस घरी येईपर्यंत जागे राहणे. **waiter** (*स्त्री* **waitress** /'वेइट्रिस्/) *ना* [*गण*] उपाहारगृहातील वाढपी, सेवक, परिवेष्टा. **'waiting-list** *ना* [*गण*] प्रतीक्षा-सूची, प्रतीक्षा यादी. **'waiting-room** *ना* [*गण*] स्टेशन, दवाखाना वगैरे ठिकाणचे प्रतीक्षालय, प्रतीक्षागृह.

wait^{2} /वेइट्/ *ना* [*गण, बहुधा अे.व*] प्रतीक्षा, प्रतीक्षेचा वेळ : *We had a long ~ for his bus, त्याच्या बसची आम्हाला दीर्घ प्रतीक्षा करावी लागली.*

waive /वेइव्ह्/ *क्रि* [*सक*] (*औप*) विशिष्ट परिस्थितीत (नियमाचा किंवा अधिकाराचा) आग्रह न धरणे, सोडणे, नियमात सूट देणे : *~ a fee, फीमधे सूट देणे.*

wake^{1} /वेइक्/ *क्रि* (*भूत* **woke** /वउक्/, *भूत वि* **woken** /'वउकन्/) १ [*अक, सक*] (*up*)// जागे होणे/करणे, उठणे/उठवणे : *What time did you ~ up? तू किती वाजता उठलास?* २ (*वाक्प्र*) **one's 'waking hours** जागे असण्याचा काळ. ३ (*क्रिब*) **wake up to sth** (एखाद्या प्रश्नाची वगैरे) जाणीव होणे.

wake^{2} /वेइक्/ *ना* [*गण*] १ चालत्या नावेचा मागे उमटणारा पट्टा, साखळी. २ (*वाक्प्र*) **in the 'wake of sth** एखाद्या गोष्टीनंतर.

waken /'वेइकन्/ *क्रि* [*अक, सक*] (*औप*) = WAKE^{1}.

walk^{1} /वॉऽक्/ *क्रि* १ [*अक*] चालणे, पावले टाकणे. २ [*सक*] एखाद्याबरोबर चालत जाणे : *I'll ~ you home, मी तुझ्या घरापर्यंत तुझ्याबरोबर चालत येईन.* ३ [*सक*] (कुत्र्याला) फिरायला नेणे. ४ (*क्रिब*) **walk away/off with sth** (*अनौप*) (क) सहजपणे (बक्षीस) जिंकणे. (ख) एखादी गोष्ट चोरणे. **walk into sth** (*अनौप*) (क) निष्काळजीपणाने (एखाद्या अप्रिय स्थितीत) अडकणे, सापडणे : *~ into a trap, सापळ्यात अडकणे.* (ख) (नोकरी) विनासायास/सहजपणे मिळणे. **walk out** (*अनौप*) (कामगारांबाबत) संपावर जाणे, काम सोडून बाहेर पडणे. **walk out (of sth)** रागाने (सभा वगैरे) सोडून निघून जाणे, सभात्याग करणे. **walk out on sb** (*अनौप*) एखाद्याशी संबंध तोडून निघून जाणे. **walk over sb** (*अनौप*) एखाद्याला वाईट वागणूक देणे, दादागिरी करणे. **'walkabout** *ना* [*गण*] राष्ट्रपतीसारख्या एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीचे गर्दीतून साधेपणाने हिंडणे. **walker** *ना* [*गण*] हिंडणारा किंवा चालणारा माणूस. **'walking-stick** *ना* [*गण*] फिरायला जाताना आधार म्हणून घ्यायची काठी. **'Walkman** *ना* [*गण*] (*ब.व ~s*) (*मालक*) चालताना वगैरे वापरायचा छोटा, हलका टेपरेकॉर्डर. **,walk-'on** *वि* (नाटकातल्या भागाबाबत) लहान आणि संवाद नसलेला/मूक. **'walk-out** *ना* [*गण*] अचानक केलेला संप. **'walk-over** *ना* [*गण*] सहज विजय.

walk^{2} /वॉऽक्/ *ना* १ [*गण*] पायी प्रवास : *My house is a five-minute ~ from the shops, दुकानांपासून पाच मिनिटांच्या अंतरावर माझे घर आहे.* २ [*अे.व*] चालण्याची पद्धत, चाल : *a slow ~, संथ गती.* ३ [*गण*] पायवाट. ४ (*वाक्प्र*) **a walk of 'life** नोकरी, व्यवसाय, वृत्ती, पेशा.

walkie-talkie /,वॉऽकि 'टॉऽकि/ *ना* [*गण*] (*अनौप*) वाहून नेता येण्यासारखा रेडिओ प्रक्षेपक आणि संदेशग्राहक.

wall /वॉऽल्/ *ना* [*गण*] १ भिंत, तट. २ इमारत किंवा खोलीची उभी बाजू, भिंत. ३ (*ला*) भिंतीसारखे दिसणारे काही : *a ~ of fire, आगीची भिंत* ○ *the abdominal ~, उदर भित्ती.* ४ (*वाक्प्र*) **go to the 'wall** पराभूत

होणे किंवा नष्ट होणे – विशेषतः आर्थिक दृष्ट्या, दिवाळे वाजणे. **up the 'wall** (*अनौप*) खूप रागावलेला: *That noise is driving me up the ~! हा आवाज माझं डोकं* चढवतोय्. **wall** *क्रि* १ [*सक*] भिंत घालून बंदिस्त करणे: *a ~ed garden, भिंतीचे कुंपण असलेली बाग.* २ (*क्रिब*) **wall sth in/off** एखादी गोष्ट भिंत घालून वेगळी करणे. **wall sth up** भिंत घालून एखाद्या गोष्टीला आडोसा करणे किंवा बंद करणे. **'wallflower** *ना* [*गण*] गोड वासाच्या फुलांचे एक झाड. **'wallpaper** *ना* [*अगण*] भिंती आच्छादायचा रंगीत डिझाईन असलेला कागद. **'wallpaper** *क्रि* [*सक*] भिंतीला नक्षीचा कागद चिकटवणे, भित्तीपत्र लावणे. **,wall-to-'wall** *वि* या भिंतीपासून त्या भिंतीपर्यंत, संपूर्ण खोलीभर.

wallet /'वॉलिट्/ *ना* [*गण*] पैशाचे पाकीट.

wallop /'वॉलप्/ *क्रि* [*सक*] (*अनौप*) एखाद्याला जोराने मारणे, ठोकणे.

wallow /'वॉलउ/ *क्रि* [*अक*] (*in*)// १ चिखलात वगैरे गडबडा लोळणे. २ (*ला*) एखाद्या गोष्टीचा आनंद लुटणे: ~ *in luxury/self-pity, ऐश्वर्यात लोळणे/स्वतःवर कीव करण्यात आनंद मानणे.*

Wall Street /'वॉऽल् स्ट्रीट्/ *ना* [*अगण*] न्यूयॉर्कमधील अमेरिकन व्यापार पेठ आणि आर्थिक उलाढालीचे केन्द्र.

wally /'वॉलि/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) (*ब्रि अनौप*) मूर्ख.

walnut /'वॉऽल्नट्/ *ना* (**क**) [*गण*] अक्रोड (किंवा त्याचे झाड). (**ख**) [*अगण*] फर्निचरसाठी वापरले जाणारे आक्रोडाचे लाकूड.

walrus /'वॉऽल्रस/ *ना* [*गण*] दोन मोठे सुळे असलेला एक समुद्रातला मोठा प्राणी, समुद्राश्व.

waltz /वॉऽल्स्; *अमे* वॉऽल्ट्स/ *ना* [*गण*] संथ गतीचा बॉलडान्स (किंवा त्याचे संगीत). **waltz** *क्रि* [*अक*] बॉलडान्स करणे.

wand /वॉन्ड्/ *ना* [*गण*] जादुगाराची जादूची छडी.

wander /'वॉन्ड(र्)/ *क्रि* १ [*अक, सक*] निर्हेतुकपणे फिरणे, भटकणे: ~ *round the town, गावात भटकणे* ○ ~ *the streets, रस्त्यांवर भटकत फिरणे.* २ [*अक*] (एखाद्याच्या विचारांबाबत) मुख्य विषय सोडून भलतीकडे जाणे, भरकटणे. **wanderer** *ना* [*गण*] फिरस्ता, भटक्या. **wanderings** *ना* [*ब.व*] भटकंती, भ्रमंती.

wane /वेइन्/ *क्रि* [*अक*] १ (चंद्राबाबत) कला कमी होणे, लहान होणे. २ अशक्त/क्षीण होणे. **wane** *ना* (*वाक्प्र*) **on the wane** क्षीण होणारा.

wangle /'वॅङ्ग्ल्/ *क्रि* [*सक*] (*अनौप*) फसवून किंवा गोडीगुलाबीने हवे ते मिळवणे: ~ *an extra week's holiday, एका आठवड्याची जादा सुट्टी मिळवणे.*

want^1 /वॉन्ट्; *अमे* वॉऽन्ट्/ *क्रि* [*सक*] १ हवे असणे, पाहिजे असणे: *They ~ a new car, त्यांना नवी गाडी हवीय्* ○ *I ~ to go home, मला घरी जायचंय्.* २ गरज असणे: *The grass ~s cutting, गवत कापायला झालंय्.* ३ *to*// जरूर असणे: *You ~ to be more careful, तू अधिक काळजी घ्यायला हवीस.* ४ (*औप*) अभाव किंवा कमतरता असणे. ५ शोधात असणे; मागावर असणे: *He is ~ed by the police, पोलीस त्याच्या शोधात आहेत.* ६ (*वाक्प्र*) **be found wanting** एखादी गोष्ट करण्यास भरवशाचा न ठरणे किंवा पात्र नसणे, कमी पडणे. ७ (*क्रिब*) **want for** एखाद्या गोष्टीची कमतरता असल्याने तोटा होणे, एखादी गोष्ट कमी पडणे: *They ~ for nothing, त्यांना कशाचीही कमतरता नाही* किंवा *त्यांना काहीही कमी नाही.*

want^2 /वॉन्ट्; *अमे* वॉऽन्ट्/ *ना* १ [*गण,* बहुधा *ब.व*] गरज, निकड. २ [*अे.व, अगण*] (*औप*) उणीव, तुटवडा, टंचाई: *die from/for ~ of water, पाण्यावाचून मरणे.*

war /वॉऽ(र्)/ *ना* [*गण, अगण*] १ युद्ध किंवा युद्धकाळ, लढाई: *the First World W~, पहिले महायुद्ध* ○ *at ~, युद्धात (व्यग्र).* २ (*ला*) संघर्ष किंवा स्पर्धा: *a trade ~, धंद्यातील स्पर्धा* ○ *the ~ on drugs, अमली पदार्थांविरुद्धची लढाई.* ३ (*वाक्प्र*) **have been in the 'wars** (*अनौप*) लढाई केल्याच्या खुणा असणे. **warfare** /'वॉऽफेअ(र्)/ *ना* [*अगण*] युद्ध (खेळणे),

संग्राम. **'war-game** *ना* [*गण*] सराव देण्यासाठी केलेली, लुटुपुटुची लढाई. **'warhead** *ना* [*गण*] क्षेपणास्त्राचे स्फोटक टोक, स्फोटकाग्र. **'warring** *वि* युद्ध करणारा, युद्धग्रस्त : *~ring tribes, युद्धात व्यग्र असणाऱ्या टोळ्या.* **'warlike** *वि* १ युद्धास सज्ज. २ युद्धप्रिय, संघर्षप्रिय; आक्रमक. **'war-path** *ना* (*वाक्प्र*) **on the 'war-path** (*अनौप*) युद्धास तयार, संघर्षास तयार. **'warship** *ना* [*गण*] युद्धनौका. **'wartime** *ना* [*अगण*] युद्धकाळ.

warble /'वॉऽब्ल्/ *क्रि* [*अक, सक*] (विशेषतः पक्ष्याबाबत) लकेर मारणे. **warbler** *ना* [*गण*] गाणारा पक्षी.

ward /वॉऽड्/ *ना* [*गण*] १ इस्पितळातील स्वतंत्र खोली, कक्ष. २ स्थानिक स्वराज्यसंस्थेचा एक भाग, प्रभाग. ३ पाल्य. **ward** *क्रि* (*क्रिब*) **ward sth off** वाईट किंवा धोकादायक गोष्ट टाळणे, हुकवणे, चुकवणे.

warden /'वॉऽड्न्/ *ना* [*गण*] एखाद्या गोष्टीचा रक्षक : *the ~ of a youth hostel, तरुणांच्या वसतिगृहाचा अधीक्षक.*

warder /'वॉऽड(र्)/ *ना* [*गण*] (*स्त्री* **wardress** /'वॉऽड्रिस्/) (*ब्रि*) तुरुंग-रक्षक.

wardrobe /'वॉऽड्रउब्/ *ना* [*गण*] १ कपडे टांगायचे उंच कपाट. २ [बहुधा *अ.व*] एखाद्याचा कपड्याचा साठा/संग्रह, एकूण कपडेलत्ते. ३ नाटक-मंडळीचे पोषाख.

ware /वेअ(र्)/ *ना* १ [*अगण*] (विशेषतः सामासिक शब्दांत) -चा माल : *'silver ~, चांदीची भांडी.* २ **wares** [*ब.व*] (*जुना, अप्रचलित*) विक्रीच्या वस्तू. **'warehouse** *ना* [*गण*] माल साठवण्याची इमारत, वखार.

warm /वॉऽम्/ *वि* १ ऊन, कढत; थंड आणि खूप उष्ण यामधला : *~ water, कढत पाणी.* २ (कपड्यांबाबत) गरम : *a ~ jumper, गरम झंपर.* ३ मित्रत्वाचा, सौहार्दपूर्ण : *a ~ welcome, प्रेमळ स्वागत.* ४ (रंगांबाबत) तजेलदार आणि रम्य. **warm** *क्रि* १ [*अक, सक*] गरम होणे/करणे. २ (*क्रिब*) **warm to sb/sth** (क) एखादा माणूस आवडू लागणे. (ख) एखाद्या गोष्टीत विशेष रस घेणे. **warm up** खेळ सुरू होण्यापूर्वी सराव करणे. **warm (sth) up** अधिक जोमदार/जिवंत होणे/करणे. **,warm-'blooded** *वि* (प्राण्यांबाबत) रक्ताचे तपमान स्थिर असणारा. **,warm-'hearted** *वि* दयाळू, उदार, उमदा. **warmly** *क्रिवि* गरम रीतीने; प्रेमळपणे. **warmth** *ना* [*अगण*] उबदारपणा; प्रेमळपणा.

warn /वॉऽन्/ *क्रि* [*सक*] सावधानतेची किंवा धोक्याची सूचना देणे, इशारा देणे : *I ~ed her that it would cost a lot, त्याला खूप खर्च येईल अशी ताकीद मी तिला दिली होती* ○ *They were ~ed not to climb the mountain in bad weather, खराब हवामानात गिर्यारोहण करणे धोक्याचे आहे अशी पूर्वसूचना त्यांना देण्यात आली होती.* **warning** *ना* [*गण, अगण*] इशारा, धोक्याची पूर्वसूचना, ताकीद : *He didn't listen to my ~ing, माझ्या इशाऱ्याकडे त्याने लक्ष दिले नाही.* **warning** *वि* इशारा देणारा : *~ing signals, इशारा देणारे संदेश.*

warp /वॉऽप्/ *क्रि* १ [*अक, सक*] वाकणे, वाकवणे : *Some wood ~s in hot weather, गरम हवामानात काही लाकडांना बाक येतो.* २ [*सक*] (*ला*) वाईट परिणाम होणे, बहकवणे : *a ~ed mind, बहकलेले किंवा वाकड्या मार्गाने जाणारे मन.* **warp** *ना* [*गण,* बहुधा *अ.व*] वाकलेपण, बाक, तिरकेपणा.

warrant /'वॉरन्ट्; *अमे* 'वॉऽर्-/ *ना* [*गण*] एखादी गोष्ट करण्याचे अधिकारपत्र, अधिपत्र : *a ~ for his arrest, त्याला पकडण्याचा लेखी हुकूम.* **warrant** *क्रि* [*सक*] (*औप*) आवश्यकता दाखविणे, योग्य आहे याची खात्री देणे. **warranty** *ना* [*अगण, गण*] (*ब.व* **-ies**) (लेखी किंवा छापील) हमी.

warren /'वॉरन्; *अमे* 'वॉऽरन्/ *ना* [*गण*] १ सशांची खूप बिळे आहेत अशी जागा, सशांचे रान. २ (*ला*) सहजपणे रस्ता चुकेल अशी इमारत किंवा शहर.

warrior /'वॉरिअ(र्); *अमे* 'वॉऽर्-/ *ना* [*गण*] (*औप*) (विशेषतः पूर्वीच्या काळी) योद्धा; लढवय्या, वीर.

wart /वॉऽट्/ *ना* [*गण*] कातडीवरची मस, चामखीळ.

wary /'वेअरि/ *वि* (**-ier, -iest**) दक्ष, मागचापुढचा विचार करणारा, सावध. **warily** *क्रिवि* सावधपणे, दक्षतेने.

was ➪ BE.

wash^{1} /वॉश्/ *क्रि* १ [*सक*] धुणे, पाण्याने वगैरे साफ करणे : ~ *one's hands/clothes, हात/कपडे धुणे.* २ [*अक*] आंघोळ करणे : *I had to ~ and dress in a hurry, मला घाईने आंघोळ करून कपडे घालायला लागले.* ३ [*अक*] (वस्तू किंवा साहित्याबाबत) धुतले जाणे, स्वच्छ होणे : *Does this sweater ~ well? हा स्वेटर चांगला धुता येतो का?* ४ [*अक, सक*] वाहत जाणे, वाहून नेणे : *Pieces of the wrecked boat were ~ed to the shore, फुटलेल्या बोटीचे तुकडे किनाऱ्यावर तरंगत आले.* ५ [*अक*] (*अनौप*) स्वीकार्य होणे, टिकणे : *That argument/excuse just won't ~, ते म्हणणे/ती सबब मुळीच पटणार नाही.* ६ (*वाक्प्र*) **wash one's hands of sth** एखाद्या गोष्टीतून अंग काढून घेणे, संबंध न ठेवणे, हात झटकणे. ७ (*क्रिब*) **wash sth away** (पाण्याबाबत) वाहून नेणे. **wash sth down** (क) खूप पाणी वापरून धुऊन काढणे, आंघोळ घालणे. (ख) पाणी पिऊन घास ढकलणे, खाताना पाण्याचे घोट घेणे, खाऊन झाल्यावर काहीतरी पिणे. **wash sth out** (क) डाग धुऊन काढणे. (ख) (पावसाबाबत) (खेळ) थांबवणे किंवा सुरू होऊ न देणे, खेळावर पाणी पडणे. **wash (sth) up** (डिशेस्, ताटे, वाट्या वगैरे) जेवणानंतर साफ करणे, (भांडी) घासणे. **washable** *वि* धुता येण्यासारखा, धुऊन खराब न होणारा. **'wash-basin** *ना* [*गण*] हात, तोंड धुण्याचे खोलगट भांडे. **,washed 'out** *वि* १ फिका झालेला, विटलेला. २ निस्तेज आणि थकलेला. **,washing-'up** *ना* [*गण*] जेवणानंतर ताटे, वाट्या, वगैरे धुणे/घासणे. **washing-'up 'liquid** *ना* [*अगण*] जेवणानंतरची भांडी घासण्याचा साबणाच्या पाण्यासारखा दाट द्रवपदार्थ. **'wash-out** *ना* [*गण*] (*अनौप*) पूर्ण अपयश, धुव्वा. **'washroom** *ना* [*गण*] (*अमे*) संडास, मोरी.

wash^{2} /वॉश्/ *ना* १ [*गण, बहुधा अ.व*] धुणे : *Give the car a good ~, गाडी छान धुऊन काढ.* २ **the wash** [*अ.व*] धुवायचे/धुण्याचे कपडे, धुणे. ३ नावेमुळे हालणारे पाणी, नावेच्या मागच्या बाजूला उठणाऱ्या लाटा.

washer /'वॉश(र्); *अमे* 'वॉऽ-/ *ना* [*गण*] १ स्क्रू किंवा जोड घट्ट बसवण्यासाठी वापरायची धातूची, रबराची वगैरे पातळ चकती, वायसर. २ (*अनौप*) धुण्याचे यंत्र, धुलाई यंत्र.

washing /'वॉशिङ्; *अमे* 'वॉऽ-/ *ना* [*अगण*] १ धुण्याचे कपडे, धुणे. २ धुणे, स्वच्छ करणे. **'washing-machine** *ना* [*गण*] धुलाई यंत्र, कपडे धुण्याचे यंत्र. **'washing-powder** *ना* [*अगण*] कपडे धुण्याच्या साबणाची पावडर.

wasn't /'वॉझ़न्द्; *अमे* 'वैझ़न्द्/ was not चा संक्षेप ➪ BE.

wasp /वॉस्प्/ *ना* [*गण*] काळे पिवळे पट्टे असलेला आणि शेपटीत नांगी असणारा एक उडता किडा, गांधीलमाशी.

wastage /'वेइस्टिज्/ *ना* [*अगण*] १ फुकट घालवलेला माल, वस्तू वगैरे. २ घट : *natural ~, नैसर्गिक घट.*

waste^{1} /वेइस्ट्/ *क्रि* [*सक*] १ भलत्या गोष्टीवर (पैसा किंवा वेळ) वाया घालवणे, व्यर्थ खर्च करणे, दवडणे. २ पुरता वापर न करणे : *~ an opportunity, संधी वाया घालवणे.* ३ (*औप*) अशक्त आणि कृश करणे.

waste^{2} /वेइस्ट्/ *ना* १ [*अगण, अ.व*] फुकट घालवणे, नासधूस : *a ~ of time, वेळ वाया घालवणे.* २ [*अगण*] टाकाऊ माल, अन्न वगैरे : *industrial ~, उद्योगातील फुकट जाणाऱ्या गोष्टी.* ३ [*अगण, गण,* बहुधा *ब.व*] उजाड जमीन, पडीक जमीन : *the ~s of the Sahara, सहाराची वैराण जमीन.* ४ (*वाक्प्र*) **go/run to waste** फुकट घालवणे. **waste** *वि* १ (जमिनीबाबत) ओसाड, पडीक : *~ ground, ओसाड जमीन.* २ फेकून देण्याच्या लायकीचा, टाकाऊ : *~-paper, टाकाऊ/कचरा कागद.* **wasteful** *वि* फुकट घालवणारा, नुकसानकारक : *~ful processes, निरर्थक प्रक्रिया.* **wastefully** *क्रिवि* निरर्थकपणे, नुकसानकारक रीतीने. **,waste-'paper basket** *ना* [*गण*] केराची टोपली.

watch^1 /वॉच्/ *क्रि* १ [*अक, सक*] काळजीपूर्वक पाहणे, निरखणे. २ [*सक*] (*अनौप*) काळजी घेणे : *~ one's language/manners, भाषेची/वागण्याची काळजी घेणे.* ३ (*वाक्प्र*) **watch one's step** ➪ STEP^1. ४ (*क्रिव*) **watch 'out** काळजी घेणे. **'watch over sb/sth** एखाद्या माणसावर/वस्तूवर पाहारा ठेवणे, राखण करणे; काळजी घेणे. **watcher** *ना* [*गण*] निरीक्षक, काळजीपूर्वक पाहणारा.

watch^2 /वॉच्/ *ना* १ [*गण*] मनगटी घड्याळ. २ [*अे.व, अगण*] नजर ठेवणे, लक्ष ठेवणे : *I kept (a) close ~ on her, मी तिच्यावर सक्त पाळत ठेवली.* ३ [*अे.व*] पाळत ठेवणारा माणूस किंवा गट. ४ [*गण*] बोटीवरील कामाचा काळ. **'watch-dog** *ना* [*गण*] १ राखण करणारा कुत्रा. २ (*ला*) लोकांचे हक्क सुरक्षित राखणारी व्यक्ती किंवा कमिटी, जागृती-मंडळ. **watchful** *वि* सक्त नजर ठेवणारा. **'watchman** /-मन्/ *ना* [*गण*] (*ब.व* **-men** /-मन्/) इमारतीचा गुरखा, रखवालदार. **'watchword** *ना* [*गण*] एखाद्या गटाचे तत्त्व किंवा ब्रीद सांगणारे वाक्य किंवा शब्द, ब्रीदवाक्य, परवलीचा शब्द.

water^1 /'वॉऽट(र्)/ *ना* १ (क) [*अगण*] पाणी, जल. (ख) [*अगण*] घरांना केला जाणारा पाणीपुरवठा. (ग) [*अे.व*] जलाशय; तळे, नदी वगैरे : *He fell in the ~ and drowned, तो पाण्यात पडला आणि बुडाला.* (घ) [*अे.व*] समुद्र, तळे वगैरेचा पृष्ठभाग : *swim under ~, पाण्याखालून पोहणे.* २ **waters** [*ब.व*] (क) जलाशय, पाण्याचा साठा. (ख) एखाद्या देशाला लागून असणारा समुद्र : *in British ~s, ब्रिटनच्या समुद्रात.* ३ (*वाक्प्र*) **under 'water** पाण्याखाली. **'water-cannon** *ना* [*गण*] गर्दी पांगविण्यासाठी पाण्याचे फवारे मारण्याचे यंत्र, पाणतोफ. **'water-closet** *ना* [*गण*] (*जुना अप्रचलित*) संडास, शौचालय. **'water-colour** (*अमे* **-color**) *ना* (क) **water-colours** [*ब व*] पाण्यात (तेलात नव्हे) मिसळून केलेले रंग. (ख) [*गण*] अशा रंगांनी काढलेले चित्र. **'water-cress** *ना* [*अगण*] पांढरी फुले येणारी तिखट पानांची एक खायची वनस्पती. **'waterfall** *ना* [*गण*] धबधबा. **'waterfront** *ना* [*गण, बहुधा अे.व*] बंदर, समुद्र वगैरेच्या जवळच्या शहराचा भाग किंवा रस्ता. **'water-hole** *ना* [*गण*] जनावरे पाणी पिण्यास जातात तो पाणवठा. **waterlogged** /-लॉग्ड्; *अमे* -लॉऽग्ड्/ *वि* १ (जमिनीबाबत) खूप ओली. २ (नावेबाबत) जलमय, पाणी शिरलेली. **'watermark** *ना* [*गण*] काही कागदांमधे असलेले आणि उजेडासमोर कागद धरल्यावर त्यात दिसणारे डिझाइन, पाणखूण, गर्भचिन्ह. **'water-melon** *ना* [*गण*] कलिंगड. **'water-mill** *ना* [*गण*] पाणचक्की. **'waterproof** *ना* [*गण*], *वि* जलरोधक (थर किंवा लेप). **'water-proof** *क्रि* [*सक*] जलरोधक करणे. **'watershed** *ना* [*गण*] १ नद्यांचे विभाजन करणारी उंचवट्याची जागा किंवा पठार, पाणंदी. २ (*ला*) महत्त्वाचे बदल होण्याचा क्षण, ऐतिहासिक क्षण. **'waterside** *ना* [*अे.व*] नदीकाठ, तळ्याचा काठ. **'water-ski** *क्रि* [*अक*] नौकेमागे पाण्यावर घसरपट्टीने जाणे. **'water-skiing** *ना* [*अगण*] पट्ट्यांवर उभे राहून बोटीच्या मागोमाग पाण्यावरून ओढले जाणे. **'water-table** *ना* [*गण*] जमिनीखालची पाण्याची पातळी, जलरेषा, जलस्तर. **'watertight** *वि* १ जलप्रतिबंधक, पाणबंद. २ (*ला*) (करार वगैरेबाबत) ज्यात कुठल्याही गैरसमजाला किंवा पळवाटेला वाव नाही असा, अगदी काटेकोर, कप्पेबंद. **'waterway** *ना* [*गण*] जलमार्ग, वाहतुकीचा कालवा. **'waterworks** *ना* (तसेच ब.व क्रियापदासह अे.व) १ विशिष्ट भागात पाणीपुरवठा करणारे केन्द्र, जलकेन्द्र. २ (*वाक्प्र*) **turn on the 'waterworks** (*अनौप अधिक्षेपी*) रडणे, डोळ्यातून पाणी काढणे.

water^2 /'वॉऽट(र्)/ *क्रि* १ [*सक*] पाणी ओतणे, पाणी घालणे : *~ the lawn, कुरणावर पाणी मारणे.* २ [*सक*] (जनावराला) पाणी पाजणे. ३ [*अक*] (डोळे किंवा तोंड याबाबत) पाणी येणे, पाणी सुटणे. ४ (*क्रिव*) **water sth down** (क) पाणी घालून द्राव पातळ किंवा फिका करणे. (ख) (*ला*) परिणाम क्षीण करणे, नरम करणे : *~ down a speech, भाषण नरम करणे.* **'watering-can** *ना* [*गण*] पाण्याची झारी.

watery /'वॉऽटरि/ *वि* १ खूप पाणी असलेला,

पाणीदार, पचपचीत. २ (रंगांबाबत) फिका; पुसट, हलकासा.

watt /वॉट्/ *ना* [*गण*] विद्युत्-शक्तीचे एक परिमाण.

wave /वेइव्ह्/ *क्रि* १ [*अक, सक*] भेट होताच (हात उंचावून) हालवणे. २ [*सक*] हाताने पुढे जायची किंवा सरकण्याची खूण करणे: *The guard ~d us on, पहारेकऱ्याने हाताने आम्हाला पुढे जाण्याची खूण केली.* ३ [*सक*] हातात धरून हालवणे, फडकावणे: *~ a flag, हातात निशाण फडकावणे.* ४ [*अक*] पुढे-मागे वाकणे, डोलणे: *branches waving in the wind, वाऱ्यावर डुलणाऱ्या फांद्या.* ५ (*क्रिब*) **wave sth aside** फारसे महत्त्वाचे नाही म्हणून बाजूला सारणे, झटकून टाकणे. **wave** *ना* [*गण*] १ लाट, लहर. २ हालवणे: *With a ~ of his hand, he turned away, हात उंचावून दाखवत तो दूर गेला.* ३ लाटेसारखा आकार: *the ~s in her hair, तिच्या केसांची नागमोडी वळणे.* ४ अचानक झालेली वाढ (आणि प्रसार): *a ~ of panic, भीतीची लाट म्हणजेच घबराट.* ५ प्रकाश, उष्णता यांचे स्वरूप किंवा यांचा आकार: *radio ~s, रेडिओ लहरी.* **'wavelength** *ना* [*गण*] १ दोन प्रकाशलहरी वगैरे मधील अंतर, तरंगलांबी. २ विशिष्ट रेडिओ केन्द्राच्या रेडिओ-लहरीची (किंवा ध्वनिलहरीची) लांबी. **wavy** *वि* (**-ier, -iest**) नागमोडी, लाटालाटांचा: *a wavy line, नागमोडी रेषा ○ wavy hair, नागमोडी केस.*

waver /'वेइव्ह(र्)/ *क्रि* [*अक*] १ लटपटणे, डळमळणे. २ निर्णय घेण्यात काकू करणे, घोटाळणे. ३ हेलकावणे, डोलणे.

wax^1 /वॅक्स्/ *ना* [*अगण*] मेण. **wax** *क्रि* [*सक*] मेण लावून पॉलिश करणे: *~ the floor, जमिनीला मेणाचा थर देणे.*

wax^2 /वॅक्स्/ *क्रि* [*अक*] १ (चंद्राबाबत) कलेकलेने वाढणे. २ (*अलं*) होणे, वाढणे: *~ eloquent, बोलणे रसाळ होणे.*

way^1 /वेइ/ *ना* १ [*गण*] एखादी गोष्ट करण्याचा मार्ग, उपाय: *the best ~ to help people, लोकांना मदत करण्याचा सर्वोत्तम मार्ग.* २ [*अ.व*] रीत, पद्धती: *I dislike the rude ~ in which he spoke to us, तो ज्या उद्धट रीतीने आमच्याशी बोलला ती मला अजिबात पसंत नाही.* ३ [*गण*] एखाद्या गोष्टीची विशिष्ट बाजू; मुद्दा: *In some ~s, I agree with you, काही बाबतीत मी तुझ्याशी सहमत आहे.* ४ **ways** [*ब.व*] सवयी: *She is not going to change her ~s, ती तिच्या सवयी बदलणार नाही.* ५ [*गण*] रस्ता, पथ वगैरे. ६ [*गण*] एखाद्या ठिकाणी जाण्याचा मार्ग, वाट: *ask sb the ~ to the airport, विमानतळावर जाण्याचा मार्ग एखाद्याला विचारणे.* ७ [*अ.व*] दिशा, बाजू: *He went the other ~, तो दुसऱ्या दिशेने गेला.* ८ [*अ.व*] अंतर: *It's a long ~ to London, लंडन खूप दूर आहे किंवा खूप अंतरावर आहे.* ९ [*अ.व*] (क्रियापदानंतर) प्रगती, चाल: *He made his ~ home, त्याने घरचा रस्ता धरला म्हणजे तो घरी गेला.* १० (*वाक्प्र*) **by the 'way** (बोलताना नवीन विषय उपस्थित करताना वापर) दुसरं असं की. **by way of sth** (*औप*) म्हणून: *say something by ~ of introduction, प्रस्तावना म्हणून काही सांगणे.* **get/have one's (own) 'way** स्वतःला हवे ते करणे, आपल्या मनाप्रमाणेच करणे – बहुधा विरोध असतानाही. **give 'way** कोलमडणे, मोडून पडणे. **give way to sb/sth** (क) एखाद्याला पहिले जाऊ देणे. (ख) एखाद्याच्या जागी येणे, ऐवजी येणे: *Sorrow gave ~ to smiles, दुःखाच्या जागी स्मित झळकले.* (ग) अनिच्छेने अखेर देऊन टाकणे: *Finally he gave ~ to their demands, शेवटी त्याने त्यांच्या मागण्या मान्य केल्या.* **go out of one's way (to do sth)** एखादी गोष्ट नेहमीचा परिपाठ बाजूला ठेऊन करणे, विशेष लक्ष घालून करणे. **go one's own 'way** स्वतःला हवे ते करणे. **make 'way (for sb/sth)** एखाद्याला जाऊ देणे, वाट देणे. **,no 'way** (*अनौप*) नक्की/निश्चितपणे नाही; नाही. **on one's 'way** जाताना, येताना, वाटेवर. **,out of the 'way** (क) संपलेला. (ख) दूरचा. (ग) क्वचित् आढळणारा. **out of/in the 'way** अडथळा नसलेला/असलेला, मार्गातील धोंड दूर झालेला/असलेला, सोयीचा/गैरसोयीचा. **under 'way** प्रगतिपथावर असलेला, चालू असून पुढे जाणारा. **way of**

'life व्यक्तीचा किंवा संघाचा जीवनक्रम, त्यांच्या श्रद्धा, सवयी, वागण्याच्या रीती.

way^{2} /वेइ/ *क्रिवि* (*अनौप*) खूप आधी, पूर्वी, खूप दूर : *She finished the race ~ ahead of the others, इतरांच्या कितीतरी आधी तिने शर्यत पूर्ण केली.* **,way-'out** *वि* (*अनौप*) वेगळा, विचित्र, मळलेली वाट सोडणारा.

waylay /,वेइ'लेइ/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-laid** /-'लेइड्/) [*सक*] वाटेत दबा धरून एखाद्यावर हल्ला करून त्याला लुटणे, वाटमारी करणे.

wayward /'वेइवड्/ *वि* हट्टी, द्वाड, औलाद, हूड : *a ~ child, हूड मुलगा.*

WC /,डब्ल्यू 'सी/ *संरू* water-closet, संडास.

we /वी/ *सना* (क्रियापदाचा कर्ता म्हणून वापर) मी आणि इतर, आम्ही : *We are all going to visit him, आम्ही सर्व त्याला भेटणार आहोत.*

weak /वीक्/ *वि* १ क्षीण, दुर्बल, अशक्त : *He's still ~ after his illness, आजारपणानंतर अजूनही तो अशक्तच आहे.* २ सहजपणे वाकणारा, हरणारा किंवा मोडणारा, कमकुवत : *a ~ joint/team, कमकुवत सांधा/संघ.* ३ इतरांचे चटकन् ऐकणारा; कणखर नसलेला, लेचापेचा : *a ~ leader, पिळपिळीत नेता.* ४ खात्री न पटवणारा, विश्वासार्ह न वाटणारा : *a ~ argument, कमजोर किंवा लंगडे समर्थन.* ५ सहज न दिसणारा, अंधुक; फिका : *~ sound/light, क्षीण आवाज/प्रकाश.* ६ कमजोर, फार चांगला नसलेला : *~ at mathematics, गणितात कच्चा.* ७ पाणीदार, फिका : *~ tea, फिका चहा.* **weaken** *क्रि* [*अक, सक*] क्षीण होणे/करणे. **,weak-'kneed** *वि* (*ला*) भेदरट; निश्चय करू न शकणारा, अस्थिर मनाचा. **weakling** /'वीक्लिङ्/ *ना* [*गण*] (*अधिक्षेपी*) दुबळा माणूस, बुळा. **weakly** *क्रिवि* क्षीणपणाने. **weakness** *ना* १ [*अगण*] अशक्तपणा. २ [*गण*] दोष, उणीव, कमजोरी, वर्मस्थान : *We all have our little ~nesses, आपणा सर्वांनाच काहीतरी कमजोरी असते.* ३ [*गण*] पराकोटीची आवड : *a ~ for cream cakes, क्रीमकेकची आवड.*

wealth /वेल्थ्/ *ना* १ [*अगण*] संपत्ती, मालमत्ता किंवा धन (यांची प्राप्ती). २ [*अ.व*] (*औप*) चिकार साठा, बहुमूल्य ठेवा : *a book with a ~ of illustrations, अनेक उदाहरणे असलेले पुस्तक.* **wealthy** *वि* (**-ier, -iest**) श्रीमंत, धनाढ्य.

wean /वीन्/ *क्रि* १ [*सक*] मुलाला अंगावर पाजायचे हळूहळू कमी करून त्याला अन्नाची सवय करण्यास सुरुवात करणे. २ (*क्रिब*) **wean sb from sth** एखाद्याला एखाद्या गोष्टीपासून हळूहळू परावृत्त करणे.

weapon /'वेपन्/ *ना* [*गण*] शस्त्र. **weaponry** *ना* [*अगण*] शस्त्रास्त्रे.

wear^{1} /वेअ(र्)/ *क्रि* (*भूत* **wore** /वॉऽ(र्)/, *भूत वि* **worn** /वॉऽन्/) १ [*सक*] अंगात (कपडे) घालणे, नेसणे : *~ a dress, पोषाख चढवणे/घालणे.* २ [*सक*] चेहऱ्यावर विशिष्ट भाव असणे : *~ a smile, चेहऱ्यावर हास्य/स्मित असणे.* ३ [*अक, सक*] वापरून बाद होणे/करणे : *The carpets are starting to ~, गालिचे वापरून वापरून खराब व्हायला लागलेत.* ४ [*अक*] टिकाऊ असणे : *These shoes have worn well, हे बूट छान टिकलेत्.* ५ [*सक*] (*अनौप*) स्वीकारणे किंवा सहन करणे. ६ (*क्रिब*) **wear (sth) away** वापरून वापरून निरुपयोगी किंवा खराब होणे/करणे. **wear (sth) down** कृश होणे/करणे, झिजणे/झिजवणे. **wear sb down** एखाद्याला क्षीण करणे, खिळखिळा करणे. **wear off** हळूहळू दिसेनासा होणे, लुप्त होणे. **wear on** (वेळेबाबत) हळूहळू जाणे. **wear (sth) out** वापरून झिजवणे किंवा निरुपयोगी करणे. **wear sb out** एखाद्याला खूप दमवणे, एखाद्याची दमछाक करणे.

wear^{2} /वेअ(र्)/ *ना* [*अगण*] १ नेसणे, घालणे : *a dress for evening ~, संध्याकाळी घालायचा पोषाख.* २ कपडे : *'mens~, पुरुषांचे कपडे.* ३ वापरून झालेली खराबी : *The carpet is showing signs of ~, गालिचा विटायला लागलाय्.* ४ वापरता येण्यासारखी अवस्था, टिकण्याची क्षमता : *There's a lot of ~ in those shoes yet, हे बूट अजून खूप दिवस टिकतील.* ५ (*वाक्प्र*) **,wear and 'tear** वापरून झालेले नुकसान, झीज.

weary /'विअरि/ *वि* (**-ier, -iest**) खूप दमलेला, शिणलेला. **wearily** *क्रिवि* दमून,

थकून भागून. **weariness** *ना* [*अगण*] थकवा, दमणूक. **weary** *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*अक, सक*] (*of*)// दमणे/दमवणे, थकणे/थकवणे, कंटाळणे.

weasel /'वीझ़ल्/ *ना* [*गण*] तांबूस रंगाचा एक तापट छोटा प्राणी, अंगुष.

weather^1 /'वेद(र्)/ *ना* १ [*अगण*] विशिष्ट प्रदेशातील आणि विशिष्ट काळातील हवामान. २ (*वाक्प्र*) **under the 'weather** (*अनौप*) किंचित् बरं नसलेला, थोडासा आजारी. **'weather-beaten** *वि* उन्हाने रापलेला, ऊनपाऊस खाल्लेला. **'weather forecast** *ना* [*गण*] हवामानाचा अंदाज. **'weatherman** *ना* [*गण*] (*ब.व* **-men** /-मेन्/) (*अनौप*) विशेषतः दूरदर्शन किंवा रेडिओवरून हवामानाचा अंदाज सांगणारा माणूस. **'weatherproof** *वि* पाऊसवारा यांचा परिणाम न होणारा. **'weather-vane** *ना* [*गण*] उंच इमारतीवर लावलेला वाऱ्याची दिशा दाखविणारा फिरता बाण, वातकुक्कुट.

weather^2 /'वेद(र्)/ *क्रि* १ [*अक, सक*] ऊनपावसाने रंग किंवा आकार बदलणे. २ [*सक*] सहीसलामत सुटणे : ~ *a storm/crisis, वादळातून/कठीण प्रसंगातून बचावणे.*

weave /वीव्ह्/ *क्रि* (*भूत* **wove** /वउव्ह्/ किंवा अर्थ क्र. ४ मधे **~d**, *भूत वि* **woven** /'वउव्ह्न्/ किंवा अर्थ क्र. ४ मधे **~d**) १ [*अक, सक*] कापड विणणे. २ [*सक*] (पाने, फुले) ओवणे किंवा गुंफणे : ~ *flowers into a wreath, फुलांची माळ गुंफणे.* ३ [*सक*] (*ला*) (गोष्ट) रचणे. ४ [*अक, सक*] अडथळे चुकवत वाट कापणे : ~ *through the traffic, रहदारीतून वाट काढणे.* **weave** *ना* [*गण*] वीण. **weaver** *ना* [*गण*] विणकर.

web /वेब्/ *ना* [*गण*] १ कोळ्याचे जाळे, कोळीष्टक. २ (*ला*) किचकट रचना. ३ बदक, बेडूक वगैरेच्या पायाच्या बोटांना जोडणारा पडदा, जाळ. **webbed** *वि* बोटे पडद्याने जोडलेली असणारा.

wed /वेड्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **~ded** किंवा **wed**) [*अक, सक*] (विशेषतः *जुना अप्रचलित*) लग्न होणे/करणे.

we'd /वीड्/ १ we had ➪ HAVE. २ we would ➪ WILL^1, WOULD^1.

wedding /'वेडिङ्/ *ना* [*गण*] विवाह-समारंभ, लग्नसोहळा. **'wedding-ring** *ना* [*गण*] लग्नाची खूण म्हणून घालायची अंगठी.

wedge /वेज्/ *ना* [*गण*] १ एखादी गोष्ट फोडण्यासाठी किंवा दोन गोष्टी अलग ठेवण्यासाठी वापरायचा V या आकाराचा धातूचा, लाकडाचा वगैरे तुकडा, पाचर. २ पाचरीच्या आकाराची गोष्ट : *a ~ of cake, पाचरीच्या आकाराचा केक.* **wedge** *क्रि* [*सक*] पाचर ठोकून (केल्यासारखे) घट्ट करणे : ~ *the door open, पाचर मारून दार उघडे ठेवणे.*

wedlock /'वेड्लॉक्/ *ना* [*अगण*] (*जुना अप्रचलित*) विवाहितावस्था, वैवाहिक संबंध.

Wednesday /'वेन्झ़डि/ *ना* [*अगण, गण*] आठवड्यातील चौथा म्हणजे मंगळवारनंतरचा दिवस, बुधवार. (Monday खालील उदाहरणे पहा.)

wee /वी/ *वि* (*स्कॉट*) लहान, छोटासा, थोडासा.

weed /वीड्/ *ना* [*गण*] १ नको असलेली रानटी वनस्पती, माजलेले रान. २ (*अनौप*) कृश मनुष्य, लुकडा किंवा किडकिडीत माणूस. **weed** *क्रि* १ [*अक, सक*] नको असलेले गवत काढणे, वेणणे. २ (*क्रिब*) **weed sth/sb out** एखादी गोष्ट/व्यक्ती काढून टाकणे : ~ *out the lazy students, आळशी विद्यार्थी काढून टाकणे.* **weedy** *वि* (**-ier, -iest**) १ तृण वाढलेला, रान माजलेला. २ (*अनौप*) किडकिडीत, कृश.

week /वीक्/ *ना* [*गण*] १ सात दिवसांचा काळ (विशेषतः रविवार ते शनिवारपर्यंतचा), आठवडा. २ कामावर खर्च केलेला आठवड्यातला काळ : *a 35-hour week, (कामाच्या) ३५ तासांचा आठवडा.* ३ (*वाक्प्र*) **,week after 'week, week in, week 'out** दर आठवड्याला. **'weekday** *ना* [*गण*] (शनिवार आणि) रविवार सोडून कोणताही दिवस. **,week'end** *ना* [*गण*] शनिवार-रविवार. **weekly** *वि, क्रिवि* दर आठवड्याला होणारा, साप्ताहिक. **weekly** *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) आठवड्यातून एकदा प्रसिद्ध होणारे वर्तमानपत्र वगैरे, साप्ताहिक.

weep /वीप्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **wept** /वेप्ट्/) [*अक, सक*] (*औप*) रडणे, (अश्रू) ढाळणे. **weeping** *वि* (झाडाबाबत) फांद्या वाकलेले.

weigh /वेइ/ *क्रि* [*सक*] १ वजन करणे : *She ~ed herself on the scales, तिने काट्यावर स्वतःचे वजन केले.* २ (वजन) असणे/होणे : *~ 10 kilograms, दहा किलो (वजन) असणे.* ३ *(up)*// (एखाद्या गोष्टीचा) काळजीपूर्वक विचार करणे, तोलून मापून पहाणे. ४ काळजीपूर्वक तुलना करणे : *~ one plan against another, एका योजनेशी दुसऱ्या योजनेची तुलना करणे.* ५ (*वाक्प्र*) **weigh 'anchor** बोट चालवण्यापूर्वी पाण्यातून नांगर वर उचलणे. ६ (*क्रिब*) **weigh sb down** (क) एखाद्यावर ओझे घालणे. (ख) एखाद्याला चिंतातूर किंवा निराश करणे. **weigh in (with sth)** (*अनौप*) (महत्त्वाचा) मुद्दा मांडून चर्चेत भाग घेणे. **weigh on sb** एखाद्याला काळजीत टाकणे. **weigh sth out** एखाद्या गोष्टीचे वजन करणे.

weight /वेइट्/ *ना* १ [*अगण*] वजन, भार : *My ~ is 70 kilograms, माझे वजन ७० किलो आहे.* २ [*गण*] धातूचे वजनाचे माप, वजन : *a 100-gram weight, शंभर ग्रॅमचे वजन.* ३ [*गण*] जड वस्तू, ओझे. ४ [*गण, अगण*] वजनाचे परिमाण. ५ [*अगण*] महत्त्व किंवा परिणाम : *opinions that carry ~, किंमत असलेली मते.* ४ [*अे.व*] काळजी, चिंता, समस्या : *feel a great ~ of responsibility, जबाबदारीची काळजी किंवा जबाबदारीचे ओझे वाटणे.* ७ (*वाक्प्र*) **be/take a weight off one's mind** ➪ MIND^1. **,over/,under 'weight** जादा/कमी वजन असणे. **put on/ lose 'weight** (माणसाबाबत) जाड/बारीक होणे किंवा वजन वाढणे/वजन कमी होणे. **weight** *क्रि* [*सक*] १ *(down)*// वजन घालून जड करणे. २ (बहुधा कर्मणी) एखाद्या व्यक्तीला किंवा गटाला फायदा होईल अशी व्यवस्था करणे : *The law is ~ed towards rich people, श्रीमंत लोकांच्या बाजूला झुकणारा हा कायदा आहे.* **weightless** *वि* वजनरहित. **'weight-lifting** *ना* [*अगण*] वजन उचलण्याचा व्यायाम. **'weight-lifter** *ना* [*गण*] वजन उचलणारा पटू. **weighty** *वि* **(-ier, -iest)** १ जड. २ (*ला*) महत्त्वाचा किंवा गंभीर.

weir /विअ(र्)/ *ना* [*गण*] नदीच्या पाण्याला घातलेला बंधारा, बांध.

weird /विअड्/ *वि* १ विचित्र; अस्वाभाविक : *~ shrieks, विलक्षण किंकाळ्या.* २ (*अनौप*) अस्वाभाविक आणि अपारंपरिक, भलता. **weirdly** *क्रिवि* विचित्रपणे. **weirdness** *ना* [*अगण*] विचित्रपणा.

welcome /'वेल्कम्/ *क्रि* [*सक*] १ स्वागत करणे. २ आनंदाने स्वीकारणे : *The decision has been ~ed by everyone, या निर्णयाचे प्रत्येकाने स्वागत केले आहे.* **welcome** *उद्गा* (येणाऱ्या माणसाचे स्वागत करताना वापर) : *W~ home! तुझे घरामधे स्वागत असो!* **welcome** *ना* [*गण*] स्वागत. **welcome** *वि* १ आनंददायक, इष्ट, स्वागतार्ह : *a ~ change, आनंददायक बदल.* २ *to*// एखादी गोष्ट करण्यास मोकळा असलेला : *You're ~ to use my car, माझी गाडी तू कधीही वापरू शकतोस.* ३ (*वाक्प्र*) **you're 'welcome** (आभार मानल्यावर द्यावयाचा विनम्र प्रतिसाद).

weld /वेल्ड्/ *क्रि* [*सक*] धातूचे तुकडे धातू तापवून जोडणे, सांधणे. **weld** *ना* [*गण*] असा जोडलेला सांधा. **welder** *ना* [*गण*] संधाता.

welfare /'वेल्फेअ(र्)/ *ना* [*अगण*] आरोग्य, सौख्य आणि आनंद, कल्याण : **the ,welfare 'state** *ना* [*अे.व*] रुग्ण, बेकार आणि वृद्ध वगैरे लोकांची काळजी घेणारी शासकीय यंत्रणा, कल्याणकारी राज्य.

well^1 /वेल्/ *उद्गा* (आश्चर्य, मान्यता, अनिश्चितता वगैरे दाखविण्यासाठी वापर) भले : *W~, . . . I don't know about that, मला त्याची कल्पना नाही* ○ *W~, ~, so you've come at last, ठीके! ठीके! आलास तू शेवटी!*

well^2 /वेल्/ *वि* (**better** /'बेट(र्)/, **best** /बेस्ट्/) १ बरा, खडखडीत : *feel/get ~, बरे वाटणे/होणे.* २ क्षेम, कुशल : *All is not ~ at home, घरी सर्व ठीक नाही.* ३ बरे, उचित : *It would be ~ to start early, लवकर निघणे बरे होईल.*

well^3 /वेल्/ *क्रिवि* (**better** /'बेट(र्)/, **best**

/बेस्ट्/) १ योग्य, चांगल्या किंवा समाधानकारक मार्गाने : *The children behaved ~, मुले चांगली/नीट वागली.* २ पूर्ण, भरपूर : *Shake the mixture ~, मिश्रण पूर्ण हालवून घ्या.* ३ वाजवीपणाने : *You may ~ be right, तू वाजवीपणाने कदाचित् बरोबर असशील.* ४ खूप, मोठ्या प्रमाणात : *drive at ~ over the speed limit, वेगमर्यादेपेक्षा खूप जास्त वेगाने गाडी चालवणे.* ५ (*वाक्प्र*) **as well (as sb/sth)** (एखाद्या गोष्टी/व्यक्ती) खेरीज अधिक, आणि सुद्धा, देखील. **do 'well** यश येणे; प्रगती करणे. **do well to do sth** एखादी गोष्ट करणे शहाणपणाचे असणे. **leave/let well a'lone** एखाद्या चांगल्या झालेल्या गोष्टीत ढवळाढवळ न करणे. **may/might (just) as well do sth** परिस्थितीचा विचार करता एखादी गोष्ट करणे उचित ठरणे. **,very 'well** (संमती दाखवताना वापर – बहुधा नाखुषीने) ठीक. **,well and 'truly** पूर्णपणे. **well done** (अभिनंदन किंवा प्रशंसा करण्यासाठी वापर) शाब्बास! **well in (with sb)** एखाद्याशी चांगले संबंध असणे. **well 'off** विशेषतः आर्थिकदृष्ट्या सुस्थितीत. **,well 'out of sth** एखाद्या गोष्टीत न अडकण्याचे सद्भाग्य (असणे). **,well-ad'vised** *वि* समजूतदार; शहाणा. **'well-being** *ना* [*अगण*] आनंदात, ठाकठीक वगैरे असण्याची स्थिती, क्षेम, कुशल. **,well-'bred** *वि* चांगल्या चालीरीती असलेला, घरंदाज. **,well-con'nected** *वि* महत्त्वाच्या व्यक्तींशी नात्याचे किंवा मित्रत्वाचे संबंध असलेला. **,well-'done** *वि* पूर्ण शिजवलेला. **,well-'earned** *वि* पूर्ण लायकी असलेला, पात्र. **,well-'heeled** *वि* (*अनौप*) श्रीमंत. **,well-in'formed** *वि* बहुश्रुत, जाणकार. **,well-in'tentioned** सद्हेतुपूर्ण पण बहुधा अपयशी. **,well-'known** *वि* प्रसिद्ध, ख्यातनाम. **,well-'meaning** *वि* = WELL-INTENTIONED. **wellnigh** /'वेल्नाइ/ *क्रिवि* (*औप*) जवळजवळ, प्रायः. **,well-'read** *वि* खूप वाचन केलेला, बहुश्रुत; जाणकार, व्युत्पन्न. **,well-'spoken** *वि* समयोचित भाषण करणारा. **,well-'timed** *वि* यथोचित केलेला, बोललेला, योग्यवेळी केलेला. **,well-to-'do** *वि* सधन, सुखवस्तू. **'well-wisher** *ना* [*गण*] हितचिंतक.

well^{4} /वेल्/ *ना* [*गण*] १ पाण्याची किंवा तेलाची विहीर. २ इमारतीतील जिना किंवा लिफ्ट यांची जागा. **well** *क्रि* [*अक*] (*up*)// विहिरीतील पाण्यासारखे वर येणे, वाहणे, ओसंडणे : *Tears ~ed up in his eyes, त्याच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले.*

we'll /वील्/ १ we shall ⇨ SHALL. २ we will ⇨ WILL^{1}.

wellington (तसेच **,wellington 'boot**) /'वेलिङ्टन्/ *ना* [*गण*] गुडघ्यापर्यंत येणारे गमबूट.

welter /'वेल्ट(र्)/ *ना* [*अे.व*] खिचडी, सरमिसळ : *a ~ of details, तपशिलांची खिचडी.*

wend /'वेन्ड्/ *क्रि* (*वाक्प्र*) **wend one's way** (*पुरा* किंवा *काव्य*) हळूहळू चालणे, रस्ता काटणे.

went GO^{1} चा *भूत.*

wept WEEP चा *भूत, भूत वि.*

were ⇨ BE.

we're /विअ(र्)/ we are ⇨ BE.

weren't /वऽन्ट्/ were not ⇨ BE.

werewolf /'विअवुल्फ्/ *ना* [*गण*] (*ब.व* **-wolves** /-वुल्व्ह्झ्/) (कथांमधे) लांडग्यामधे रूपांतर होणारा माणूस.

west /वेस्ट्/ *ना* [*अे.व*] १ **the west** पश्चिम दिशा. २ **the West** (क) युरोप आणि अमेरिकेतले (पूर्वी कम्युनिस्ट नसलेले) देश, पाश्चिमात्य देश/राष्ट्रे. (ख) देशाचा पश्चिम विभाग. **west** *वि* १ पश्चिमेचा, पाश्चिमात्य. २ (वाऱ्यांबाबत) पश्चिमेकडचा. **west** *क्रिवि* पश्चिमेला. **'westbound** /'वेस्ट्बाउन्ड्/ *वि* पश्चिमेला जाणारा. **westerly** *वि, क्रिवि* १ पश्चिमेचा. २ (वाऱ्यांबाबत) पश्चिमेकडून येणारा. **westward** /'वेस्ट्वड्/ *वि* पश्चिमेला. **westward(s)** *क्रिवि* पश्चिमेला.

western /'वेस्टन्/ *वि* **Western** जगाच्या किंवा देशाच्या पश्चिमेकडचा, पाश्चिमात्य. **western** *ना* [*गण*] १९ व्या शतकातील पश्चिम अमेरिकेतील गुराख्यांबाबतचा चित्रपट किंवा त्यावरचे पुस्तक. **westerner** *ना* [*गण*] पाश्चिमात्य देशातून आलेला किंवा तिकडे

राहणारा माणूस. **westernize** *क्रि* [*सक*] पाश्चिमात्यीकरण करणे, पश्चिमेकडच्या देशांच्या कल्पना, संस्था आणणे.

wet /वेट्/ *वि* (**~ter, ~test**) १ पाण्याने किंवा द्रवाने भिजलेला, ओला : ~ *clothes/roads, ओले कपडे/रस्ते.* २ पावसाळी : ~ *weather, पावसाळी हवा.* ३ (रंग, सिमेंट वगैरेबाबत) ओला, न वाळलेला. ४ (*अनौप अधिक्षेपी*) पिळपिळा, दुबळा; हेतुहीन. ५ (*वाक्प्र*) **a ,wet 'blanket** (*अनौप*) दुसऱ्यांना आनंद न मानू देणारा किंवा उपभोगू न देणारा माणूस, आनंदावर विरजण घालणारा माणूस. **,wet 'through** ओलाचिंब. **wet** *ना* १ **the wet** [*अे.व*] आर्द्र हवा, ओलसर हवा. २ [*गण*] (*ब्रि अनौप*) मवाळ पुराणमतवादी राजकारणी. **wet** *क्रि* (**-tt-**, *भूत, भूत वि* **wet** किंवा **~ted**) [*सक*] (एखाद्याला) भिजवणे. **'wet suit** *ना* [*गण*] पाण्याखालून पोहणाऱ्याने उबदारपणासाठी वापरायचा रबरी कपडा.

we've /वीव्ह्/ we have ➪ HAVE.

whack /वॅक्; *अमे* व्हॅक्/ *क्रि* [*सक*] दाणकन् मारणे, ठाणकन् मारणे, सपासप मारणे. **whack** *ना* [*गण*] १ सणकन् दिलेला ठोसा (किंवा त्याचा आवाज)/थप्पड. २ (*अनौप*) हिस्सा. **whacked** *वि* (*अनौप*) दमलेला. **whacking** *ना* [*गण*] (*जुना अप्रचलित अनौप*) बदडणे, लगावणे. **whacking** *वि* (*अनौप*) खूप मोठा.

whale /वेइल्; *अमे* व्हेइल्/ *ना* १ [*गण*] तेल आणि मांसासाठी पकडला जाणारा समुद्रातला एक मोठा मासा, देवमासा. २ (*वाक्प्र*) **have a 'whale of a time** (*अनौप*) मजा लुटणे. **whaler** *ना* [*गण*] १ देवमासे पकडण्यासाठी वापरायचे जहाज. २ देवमासे पकडणारा माणूस. **whaling** *ना* [*अगण*] देवमाशांची शिकार.

wharf /वॉऽफ्; *अमे* व्हॉऽर्फ्/ *ना* [*गण*] (*ब.व* **~s** किंवा **wharves** /वॉऽव्ह्झ्; *अमे* व्हॉऽर्व्ह्झ्/) माल उतरवण्यासाठी किंवा चढवण्यासाठी जहाज बांधायची जागा, धक्का.

what /वॉट्; *अमे* व्हॉट्/ *वि, सना* १ (एखाद्या व्यक्ती किंवा गोष्टीविषयी माहिती विचारताना प्रश्नार्थक वाक्यात वापर) काय : *W~ time is it? किती वाजले?* ○ *W~ are you reading? तू काय वाचतोयस्?* २ ती गोष्ट, ते : *Tell me ~ happened next, नंतर काय झालं ते मला सांग.* ३ (आश्चर्य व्यक्त करण्यासाठी वापर) : *W~ a good idea! काय छान कल्पना आहे!* ४ (*वाक्प्र*) **what about . . . ?** ➪ ABOUT^1. **what for** कशासाठी : *W~ is this tool used for? हे हत्यार कशासाठी वापरतात?* ○ *W~ did you do that for? तू ते कशासाठी/का केलंस्?* **what if** तर काय होईल. **what's more** अधिक महत्त्वाचं काय (तर). **what's 'what** कोणत्या गोष्टी महत्त्वाच्या, उपयुक्त वगैरे, कशाचं काय किंवा काय काय. **what with sth** (विशेषतः वाईट कारणांची यादी देताना वापर) त्याचं काय.

whatever /वॉट्'अेव्ह(र्); *अमे* व्हॉट्-/ *वि, सना* १ काहीही किंवा प्रत्येक (गोष्ट) : *You can eat ~ you like, तुला हवं ते खा.* २ काही झालं तरी : *Keep calm, ~ happens, काही झालं तरी शांत रहा.* ३ (आश्चर्य व्यक्त करण्यासाठी प्रश्नार्थक वाक्यात वापर) काय : *W~ do you mean? काय म्हणणं काय तुझं?* **whatever, whatsoever** *क्रिवि* (अधिक जोर देण्यासाठी वापर) काहीही : *no doubt ~, काहीही शंका नाही.*

wheat /वीट्; *अमे* व्हीट्/ *ना* [*अगण*] गहू किंवा गव्हाचे ताट.

wheedle /'वीड्ल्; *अमे* 'व्हीड्ल्/ *क्रि* [*अक, सक*] (*अधिक्षेपी*) खुशामत करून मिळवण्याचा प्रयत्न करणे, गोड बोलून काम साधणे : *She ~d the money out of her brother, भावाशी गोडगोड बोलून तिने पैसे काढले.*

wheel /वील्; *अमे* व्हील्/ *ना* [*गण*] १ चाक, चक्र. २ = STEERING-WHEEL (STEER). ३ (*वाक्प्र*) **at/behind the 'wheel** (क) गाडी वगैरे चालवणारा. (ख) (*ला*) ताब्यात असणारा. **wheel** *क्रि* १ [*सक*] (चाकाचे वाहन) ओढणे किंवा ढकलणे. २ [*अक*] वर्तुळाकार फिरणे, चक्राकार फिरणे, घिरट्या घालणे. ३ (*वाक्प्र*) **,wheel and 'deal** (*अनौप* विशेषतः *अमे*) धंद्यामधे बहुधा लबाडीने सौदेबाजी करणे. **'wheelbarrow** *ना* [*गण*] एका चाकाची दोन दांडे असलेली ढकलगाडी. **'wheelchair** *ना* [*गण*] चाकाची खुर्ची –

चालता न येणाऱ्या माणसासाठीची. **-wheeled** (सामासिक विशेषणे बनवताना वापर) (निर्देशित)-चाके असलेला, -चाकी : *three-wheeled vehicle, तीनचाकी वाहन.*

wheeze /वीझ़; *अमे* ह्वीझ़/ *क्रि* [*अक*] श्वास घेताना घरघर आवाज येणे. **wheeze** *ना* [*गण*] घरघर. **wheezy** *वि* (**-ier, -iest**) घरघरणारा.

whelk /वेल्क्; *अमे* ह्वेल्क्/ *ना* [*गण*] गोगलगायीसारखा एक समुद्र-प्राणी, डिंब, कोका.

when /वेन्; *अमे* ह्वेन्/ *क्रिवि* १ (प्रश्नार्थक वाक्यात वापर) केव्हा, कधी : *W~ did you come? तू कधी आलास?* २ (कालदर्शक शब्दांच्या किंवा पदबंधांच्या शेवटी वापर) जेव्हा, ज्यावेळी : *Sunday is the day ~ few people work, रविवार हा असा दिवस आहे की जेव्हा फार कमी लोक काम करतात* ○ *Her last visit to the town was in May, ~ she saw the new hospital, मेमधे तिने शहराला दिलेली शेवटची भेट, ज्यावेळी तिने हॉस्पिटल बघितले.* **when** उ. *अव्यय* १ जेव्हा, ज्यावेळी : *It was raining ~ we arrived, ज्यावेळी आम्ही आलो त्यावेळी पाऊस पडत होता.* २ विचारात घेता; जरी : *Why buy a new car ~ your present one runs well? जर सध्याची गाडी चांगली चालतीय् तर नवीन गाडी कशाला घ्यायची?*

whence /वेन्स्; *अमे* ह्वेन्स्/ *क्रिवि* (पुरा किंवा औप) कोठून.

whenever /वेन्'एव्ह(र्); *अमे* ह्वेन्-/ उ.*अव्यय* १ कधीही, कोणत्याही वेळी, जेव्हा कधी : *I'll discuss it ~ you like, जेव्हा कधी तुला वाटेल/हवं असेल तेव्हा मी याची चर्चा करीन.* २ जेव्हा होईल तेव्हा, वेळ मिळताच : *I go ~ I can, जेव्हा शक्य होईल तेव्हा मी जातो.* **whenever** *क्रिवि* (आश्चर्य व्यक्त करण्यासाठी प्रश्नार्थक वाक्यात वापर) जेव्हा.

where /वेअ(र्); *अमे* ह्वेअ(र्)/ *क्रिवि* १ (प्रश्नार्थक वाक्यात वापर) कोठे, कुठं : *W~ does he live? तो कुठं राहतो?* २ (स्थलदर्शक शब्दांच्या किंवा पदबंधांच्या शेवटी वापर) जेथे, ज्या ठिकाणी : *This is the place ~ you last saw it, हीच ती जागा की जिथे तू ते शेवटचं पाहिलंस* ○ *India is one of the few countries ~ people drive on the left, भारत हा जगातील फार थोड्या देशांपैकी एक असा देश आहे की जिथे लोक डाव्या बाजूने वाहने चालवतात* ○ *He then went to London, ~ he stayed for three days, नंतर तो लंडनला गेला, जिथे तो तीन दिवस राहिला.* **where** उ.*अव्यय* जिथे, जेथून : *Put it ~ we can all see it, आपण सर्व जेथून नीट पाहू शकू अशा ठिकाणी ते ठेव.* **'whereabouts** *क्रिवि* (प्रश्नार्थक वाक्यात वापर) कशाजवळ, कुठे : *W~abouts did you find it? कशाजवळ तुला ते सापडलं?* **'whereabouts** *ना* [*गण,* अे.व किंवा ब.व क्रियापदासह वापर] ठावठिकाणा, थांगपत्ता : *Her ~abouts is/are unknown, तिचा ठावठिकाणा माहीत नाही.* **where'as** उ.*अव्यय* उलट; त्यावेळी मात्र : *He gets to work late every day ~ she is always early, तो कामावर रोज उशिरा येतो, उलट ती मात्र नेहमी लवकर येते.* **where'by** *क्रिवि* (औप) ज्यायोगे : *He thought of a plan ~ he might escape, त्याने एक योजना आखली ज्यायोगे त्याला सुटता आले असते.* **whereu'pon** उ.*अव्यय* (औप) ज्यानंतर; आणि नंतर, मग, त्यावर.

wherever /वेअर्'एव्ह(र्); *अमे* ,ह्वेअर्-/ उ.*अव्यय* १ कुठेही; कुठे जिथे असेल तिथे : *I'll find him, ~ he is, तो जिथं असेल तेथून मी त्याला शोधून काढीन.* २ सर्वत्र; प्रत्येक ठिकाणी : *Crowds of people queue to see her ~ she goes, ती जेथे जाईल त्या प्रत्येक ठिकाणी तिला पाहण्यासाठी लोकांची रीघ लागते.* **wherever** *क्रिवि* (आश्चर्य व्यक्त करण्यासाठी प्रश्नार्थक वाक्यात वापर) जेथे.

wherewithal /'वेअविदॉऽल्; *अमे* 'ह्वेअर्-/ *ना* **the wherewithal** [*अे.व*] (औप) विशिष्ट कार्यासाठी लागणारा पैसा, पैशाची तरतूद : *Does he have the ~ to buy a car? गाडी घ्यायला त्याच्याकडे पैशाची तजवीज आहे का?*

whet /वेट्; *अमे* ह्वेट्/ *क्रि* (**-tt-**) (*वाकप्र*) **whet sb's appetite for sth** एखाद्याची एखाद्या गोष्टीची भूक वाढवणे.

whether /'वेद(र्); *अमे* ह्वेदर्/ *उ.अव्यय* (निवड किंवा शंका व्यक्त करताना वापर) की : *I don't know ~ to accept or refuse, मला कळत नाही की स्वीकारावं की नाकारावं.*

which /विच्; *अमे* ह्विच्/ १ *वि, सना* (निवडीचे स्वातंत्र्य असताना प्रश्नार्थक वाक्यात वापर) : *W~ way shall we go – up the hill or along the road? आपण कसं जायचं? टेकडीवरून की रस्त्याने?* २ *सना* (आधी उल्लेख केलेल्या गोष्टीचा निर्देश करताना वापर) जो, जी, जे : *This is the car ~ she drove, हीच ती गाडी जी तिनं चालवली* ○ *His best film, ~ won many awards, was about Gandhi, त्याचा सर्वोत्कृष्ट चित्रपट, की ज्याला अनेक पारितोषिके मिळाली, तो म्हणजे गांधींवरचा चित्रपट.* ३ *सना* (*औप*) (आत्ताच जे बोललो त्याचा पुन्हा उल्लेख करताना वापर) : *He said he had lost the key, ~ was untrue, त्याची किल्ली हरवली असं तो म्हणाला – जे खोटं होतं किंवा जी थाप होती.*

whichever /विच्'अेव्ह(र्); *अमे* ह्विच्-/ *वि, सना* १ जी कोणती व्यक्ती किंवा वस्तू, जी काय : *Take ~ hat you like best, तुला जी कोणती टोपी अधिक आवडेल ती तू घे.* २ जो कोणताही, जी कोणतीही, जे कोणतेही : *W~ way you travel, it is expensive, ज्या कोणत्याही मार्गे तू प्रवास करशील तो महागच आहे.* **whichever** *वि, सना* (आश्चर्य व्यक्त करण्यासाठी प्रश्नार्थक वाक्यात वापर) जो, जी, जे.

whiff /विफ्; *अमे* ह्विफ्/ *ना* [*गण*] १ किंचितसा घेतलेला वास, थोडेसे हुंगणे. २ (*ला*) लहान निधी.

while /वाइल्; *अमे* ह्वाइल/ *उ.अव्यय* १ -च्या वेळी, विशिष्ट काळात : *She fell asleep ~ watching television, दूरदर्शन पाहात असताना तिला झोप लागली.* २ (विरोध दाखविण्यासाठी वापर) तर : *She likes tea, ~ I prefer coffee, तिला चहा आवडतो तर मी कॉफी पसंत करतो.* ३ (*औप*) जरी : *W~ I want to help, I do not think I can, मला जरी मदत करायची इच्छा असली तरी मला नाही वाटत मी ती करू शकेन.* **while** *ना* [*अे.व*] वेळ, काळ : *for a long ~, दीर्घकाळापर्यंत.* **while** *क्रि* (*क्रिब*) **while sth away** आरामात वेळ घालवणे.

whilst /वाइल्स्ट्; *अमे* ह्वाइल्स्ट्/ *उ.अव्यय* = WHILE.

whim /विम्; *अमे* ह्विम्/ *ना* [*गण, अगण*] हुक्की, लहर, तलफ.

whimper /'विम्प(र्); *अमे* 'ह्वि-/ *क्रि* [*अक*] मुसमुसत रडणे, कुरकुरणे. **whimper** *ना* [*गण*] कुरकुर, धुसमुस.

whimsical /'विम्झ़िक्ल्; *अमे* 'ह्वि-/ *वि* लहरी, वेड घेणारा, चक्कर, तऱ्हेवाईक.

whine /वाइन्; *अमे* ह्वाइन्/ *ना* [*गण*] मोठ्याने केकाटणे, कोकलणे. **whine** *क्रि* [*अक*] १ केकाटणे : *The dog was whining to come in, आत येण्यासाठी कुत्रं केकाटत होतं.* २ तक्रार करणे, भुणभुण करणे : *a child that never stops whining, सतत भुणभुण करणारे किंवा किरकिरणारे मूल.*

whinny /'विनि; *अमे* 'ह्वि-/ *ना* [*गण*] (*ब.व* **-ies**) घोड्याचे फुरफुरणे, घोड्याचे सौम्य खिंकाळणे. **whinny** *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) [*अक*] फुरफुर आवाज करणे, सौम्य खिंकाळणे.

whip^1 /विप्; *अमे* ह्विप्/ *ना* १ [*गण*] चाबूक. २ [*गण*] एखाद्या प्रश्नावर सभागृहात उपस्थित राहून मत देण्याची आज्ञा (देणारा राजकीय पक्षाचा सभासद), राजकीय पक्षाचा प्रतोद. ३ [*गण, अगण*] अंडी, साय वगैरे घोटून केलेला पदार्थ.

whip^2 /विप्; *अमे* ह्विप्/ *क्रि* (**-pp-**) १ [*सक*] चाबूक मारणे. २ [*अक, सक*] पटकन् किंवा झटकन् हालणे/काढणे : *He ~ped out a knife, त्याने पटकन् चाकू दाखवला किंवा काढला.* ३ [*सक*] (साय, अंडी वगैरे) घट्ट, एकजीव होईपर्यंत घोटणे. ४ (*क्रिब*) **whip sth up** (लोकांच्या) भावना प्रक्षुब्ध करणे, भडकावणे किंवा चेतावणे. **whipping** *ना* [*गण, अगण*] चाबकाने फोडणे, चाबकाचे फटके. **'whip-round** *ना* [*गण*] (*ब्रि अनौप*) एखाद्या गटाकडून जमवलेली वर्गणी.

whirl /वऽल्; *अमे* ह्व-/ *क्रि* १ [*अक, सक*] गोलगोल फिरणे/फिरवणे, गरगर फिरणे/फिरवणे, गिरकी घेणे. २ [*अक*] फिरणे; गोंधळणे : *Her mind was ~ing, तिचे मन*

गोंधळून गेले. **whirl** *ना* [*अे.व*] १ गिरकी, भिरकांडी. २ कामांची किंवा घटनांची जलद मालिका. ३ गोंधळ. ४ (*वाक्प्र*) **give sth a 'whirl** (*अनौप*) एखादी गोष्ट करून पाहणे. **'whirlpool** *ना* [*गण*] पाण्याचा जोरदार भोवरा. **'whirlwind** *ना* [*गण*] वावटळ, चक्रवात, झंझावात: (*ला*) *a ~wind romance, झंझावाती प्रेमप्रकरण.*

whirr (तसेच विशेषतः *अमे* **whir**) /वऽ(र्); *अमे* ह्व-/ *ना* [*गण,* बहुधा *अे.व*] वेगाने फिरणाऱ्या यंत्राची घरघर, पक्ष्याच्या पंखांची फडफड, पंखांची सपसप. **whirr** (तसेच विशेषतः *अमे* **whir**) *क्रि* [*अक*] घरघर आवाज करणे, फडफड आवाज करणे.

whisk /विस्क्; *अमे* ह्व-/ *क्रि* [*सक*] १ एखादी व्यक्ती/वस्तू झटकन् दूर नेणे, त्वरेने बाजूला नेणे: *They ~ed him off to prison, त्यांनी त्याला झटकन् तुरुंगाकडे नेले.* २ (अंडी, साय वगैरे) फेसणे. **whisk** *ना* [*गण*] अंडी वगैरे फेसण्याचे हाताने धरायचे एक साधन.

whisker /'विस्क(र्); *अमे* 'ह्वि-/ *ना* १ [*गण*] मांजराच्या वगैरे मिशा. २ **whiskers** [*ब.व*] माणसाचे कल्ले.

whisky (*अमे* किंवा *आयरिश* **whiskey**) /'विस्कि; *अमे* 'ह्वि-/ *ना* [*अगण, गण*] (*ब.व* -ies) धान्यापासून बनवलेली एक कडक दारू.

whisper /'विस्प(र्); *अमे* 'ह्वि-/ *क्रि* १ [*अक, सक*] (**क**) कुजबुजणे, हलक्या आवाजात बोलणे. (**ख**) एखादी गोष्ट गुपचुप बोलणे, इतरांना कळू न देता बोलणे. २ [*अक*] (उदा वारा किंवा पानांबाबत) सळसळणे. **whisper** *ना* [*गण*] कुजबूज.

whist /विस्ट्; *अमे* ह्विस्ट्/ *ना* [*अगण*] चार गड्यात खेळायचा एक पत्त्यांचा खेळ.

whistle /'विस्ल्; *अमे* 'ह्वि-/ *ना* [*गण*] १ ओठांनी वाजवलेली शिट्टी किंवा शीळ: (*ला*) *the ~ of the wind through the trees, झाडातून येणारी वाऱ्याची शीळ.* २ वाजवायची शिट्टी. **whistle** *क्रि* १ (**क**) [*अक*] शिट्टी वाजवणे, शीळ घालणे. (**ख**) [*सक*] शिट्टीवर चाल वाजवणे. २ सुईऽ आवाज करत वेगाने जाणे: *The bullets ~d past us, बंदुकीच्या गोळ्या सुईऽ करत आमच्या जवळून गेल्या.*

white /वाइट्; *अमे* ह्वाइट्/ *वि* (~r, ~st) १ हिमासारखा शुभ्र, पांढरा स्वच्छ. २ गोऱ्या कातडीच्या लोकांचा, श्वेतवर्णीय. ३ धक्का वगैरे बसल्याने पांढरा फटक (झालेला). ४ (कॉफीबाबत) दूध किंवा साय घातलेली. ५ (*वाक्प्र*) **a white elephant** खूप महाग पण निरुपयोगी गोष्ट, पांढरा हत्ती. **a white lie** किरकोळ खोटेपणा. **white** *ना* १ [*अगण*] पांढरा रंग, धवल वर्ण. २ [*गण*] श्वेतवर्णीय माणूस. ३ [*गण, अगण*] अंड्यातील पांढरा पदार्थ, पांढरा बलक (= YOLK). ४ [*गण*] डोळ्यातला पांढरा भाग, कौडी. **,white-'collar** *वि* पांढरपेशांचा – श्रमजीवींचा नव्हे. **the 'White House** *ना* [*अे.व*] अमेरिकन अध्यक्ष (किंवा त्याचे सरकारी निवासस्थान). **whiten** *क्रि* [*अक, सक*] पांढरे होणे/करणे. **whiteness** *ना* [*अगण*] पांढरेपणा, धवलता. **,White 'Paper** *ना* [*गण*] एखाद्या गोष्टीबाबत शासन काय पावले उचलणार त्याचा अधिकृत वृत्तांत, श्वेतपत्रिका. **'whitewash** *ना* १ [*अगण*] भिंतीला लावायचा पाण्यात भिजवलेला चुना. २ [*गण, अगण*] (*ला*) चुकांवर केलेली सारवासारव, रंगसफेदी. **'whitewash** *क्रि* [*सक*] १ भिंतीला चुना फासणे. २ (*ला*) (चुका झाकण्यासाठी) रंगसफेदी करणे.

Whitsun /'विट्स्न्; *अमे* 'ह्वि-/ *ना* [*अगण, गण*] ईस्टरच्या सणानंतरचा सातवा रविवार आणि त्यानंतरचा आठवडा.

whittle /'विट्ल्; *अमे* 'ह्वि-/ *क्रि* १ [*अक, सक*] (लाकडाच्या) बारीक ढलप्या काढणे, (लाकूड) तासणे. २ (*क्रिब*) **whittle sth down/away** झिजवणे, हळूहळू कमी करणे किंवा घटणे: *The value of our savings is being slowly ~d down by inflation, चलनवाढीमुळे आपण बचत केलेल्या पैशांची किंमत कमी होतेय.*

whiz /विझ्; *अमे* ह्विझ्/ *क्रि* (-zz-) [*अक*] (*अनौप*) १ वेगाने जाणे. २ हवेतून वेगाने जाताना सुईऽ किंवा झूऽ असा आवाज करणे.

whiz-kid /'विझ्किड्; *अमे* 'ह्विझ्/ *ना* [*गण*] (*अनौप*) झटपट यशाचे शिखर गाठणारा माणूस.

who /हू/ *सना* १ (कर्त्याच्या स्थानी असलेल्या

माणसाविषयी प्रश्न विचारताना वापर) कोण : *W~ is the woman in the black hat? काळी हॅट घातलेली ती बाई कोण आहे?* २ (*अनौप*) (क्रियापद किंवा शब्दयोगी यांचे कर्म म्हणून वापर) कोण : *W~ are you phoning, तू कुणाला फोन करतोयस्? ○ W~ do you want to speak to? तुला कुणाशी बोलायचंय्?* ३ (पूर्वी उल्लेख केलेल्या व्यक्तीचा निर्देश करताना वापर) जो (कोणी) : *The people ~ called yesterday want to buy the house, त्या लोकांना, जे काल आले होते, घर विकत घ्यायचंय् ○ My husband, ~ has been ill, hopes to see you soon, माझा नवरा, जो आजारी आहे, तुझी लवकरच भेट होईल अशी आशा करतोय्.*

whoever /हू'अेव्ह(र्)/ *सना* १ तो माणूस जो, जो कोणी : *W~ says that is a liar, जो कोणी असं म्हणतो तो खोटारडा आहे ○ You must speak to ~ is the head of the department, जो कोणी विभाग-प्रमुख आहे त्याच्याशी तुला बोललं पाहिजे.* २ कोणीका : *W~ rings, I don't want to speak to them, कोणीका फोन करेना, मला त्यांच्याशी बोलायची इच्छा नाही.* **whoever** *सना* (आश्चर्य व्यक्त करताना प्रश्नार्थक वाक्यात वापर) कोण.

whole /हउल्/ *वि* १ पूर्ण; सबंध : *He told us the ~ story, त्याने आम्हाला संपूर्ण हकीगत सांगितली.* २ इजा किंवा नुकसान न झालेला, धड, शाबूत; न मोडलेला : *She swallowed the sweet ~, तिने अख्खी गोळी गिळली.* ३ (*वाक्प्र*) **go the whole hog** (*अनौप*) एखादी गोष्ट मन लावून, पूर्णपणे किंवा कुचराई न करता करणे. **whole** *ना* १ **the whole** [*अे.व*] *of//* एखाद्या गोष्टीचा संपूर्ण भाग, समग्र गोष्ट. २ [*गण*] पूर्ण गोष्ट. ३ (*वाक्प्र*) **on the whole** एकंदरीत. **ˌwhole-'hearted** *वि* पूर्ण पाठिंब्याचा, मनापासूनचा. **ˌwhole-'heartedly** *क्रिवि* मनापासून, पूर्ण पाठिंब्याने. **'wholemeal** *ना* [*अगण*] पूर्ण धान्याचे म्हणजे टरफले न काढलेल्या धान्याचे पीठ. **ˌwhole 'number** *ना* [*गण*] पूर्णांक – उदा १, ३, २७ वगैरे. **wholly** /'हउलि/ *क्रिवि* संपूर्णपणे; सबंध : *I'm not wholly convinced, माझी पूर्ण खात्री पटलेली नाही.*

wholesale /'हउल्सेइल्/ *ना* [*अगण*] गिऱ्हाइकांना माल देणाऱ्या दुकानदारांना (विशेषतः मोठ्या प्रमाणावर) माल विकणे, घाऊक विक्री, ठोक विक्री. **wholesale** *वि, क्रिवि* १ घाऊक विक्रीचा. २ मोठ्या प्रमाणावर : *the ~ slaughter of animals, प्राण्यांची प्रचंड प्रमाणावरील हत्त्या.* **wholesaler** *ना* [*गण*] घाऊक व्यापारी.

wholesome /'हउल्सम्/ *वि* १ (अन्नाबाबत) आरोग्यकारक. २ (*पसंती*) नैतिकदृष्ट्या हितकारक, हितावह; चांगला.

whom /हूम्/ *सना* (*औप*) १ (क्रियापद किंवा शब्दयोगी यांचे कर्म म्हणून प्रश्नार्थक वाक्यात वापर) कोणाला : *W~ did she invite? तिने कोणाला आमंत्रण दिले?* २ (क्रियापद किंवा शब्दयोगी यांचे कर्म म्हणून व्यक्तीचा निर्देश करताना वापर) ज्या (कुणा)ला : *The person to ~ this letter is addressed died two years ago, ज्या माणसाला हे पत्र लिहिलंय् तो दोन वर्षांपूर्वीच मेला.*

whoop /हूप्, वूप्; *अमे* ह्वूप्/ *ना* [*गण*] १ आनंदाची आरोळी, आनंदाचा चित्कार. २ खोकल्याची ढास. **whoop** *क्रि* [*अक*] चित्कार करणे, आरोळी ठोकणे : *~ing with joy, आनंदाने आरोळी ठोकणे.* **'whooping cough** *ना* [*अगण*] लहान मुलांना होणारा एक रोग – डांग्या खोकला.

whore /हॉऽ(र्)/ *ना* [*गण*] (*जुना अप्रचलित* किंवा *अधिक्षेपी*) वेश्या, छिनाल.

whose /हूझ्/ १ *सना, वि* (प्रश्नार्थक वाक्यात वापर) कोणाचा, कोणाची, कोणाचं : *W~ (house) is that? कुणाचं (घर) आहे ते?* २ *सना* (पूर्वी उल्लेख केलेल्या एखाद्या व्यक्तीचा निर्देश करताना वापर) ज्याचा, ज्याची, ज्याचे : *These are the children ~ mother is a doctor, ही ती मुले की ज्यांची आई डॉक्टर आहे.*

why /वाइ; *अमे* ह्वाइ/ *क्रिवि* १ (प्रश्नार्थक वाक्यात वापर) का : *W~ are you late? तुला उशीर का झाला?* २ कोणत्या कारणाने, कशामुळे, का : *Nobody understands ~ she left him, ती त्याला का सोडून गेली हे कुणालाच कळत नाही.* ३ (*वाक्प्र*) **why not** (सूचना करताना वापर) का नाही : *W~ not* *go home? घरी जायला काय हरकत आहे? किंवा घरी का नाही जाऊ?*

wick /विक्/ *ना* १ [*गण*] दिव्याची किंवा मेणबत्तीची जळती वात. २ (*वाक्प्र*) **get on sb's wick** (*ब्रि अनौप*) एखाद्याला सतावणे किंवा त्रास देणे, उच्छाद मांडणे.

wicked /'विकिड्/ *वि* १ नैतिकदृष्ट्या वाईट, पाजी, दुष्ट, हलकट. २ दुसऱ्याला इजा करणारा, अपायकारक. ३ खट्याळ : *a ~ grin, खट्याळ हसू.* **wickedly** *क्रिवि* दुष्टपणे; अपायकारक रीतीने किंवा दुष्ट बुद्धीने; खट्याळपणे. **wickedness** *ना* [*अगण*] दुष्टपणा, अपायकारकता; खट्याळपणा, रंगेलपणा.

wicker /'विक(र्)/ *ना* [*अगण*] विणलेला वेत किंवा फांद्या. **'wicker-work** *ना* [*अगण*] वेताच्या खुर्च्या, टोपल्या वगैरे.

wicket /'विकिट्/ *ना* [*गण*] (क) (क्रिकेटमधे) तीन स्टंप्स्, यष्टी. (ख) दोन बाजूच्या स्टंप्स्मधील हिरवळीची जागा.

wide /वाइड्/ *वि* (**~r, ~st**) १ रुंद : *a ~ river, रुंद पात्राची नदी.* २ रुंदीचा, विस्तीर्ण : *12 metres ~, १२ मीटर रुंदीचा.* ३ विविध गोष्टींचा समावेश असणारा, वैविध्यपूर्ण : *a ~ range of interests, विविध आवडींचा पट.* ४ लक्ष्यापासून दूर : *His shot was ~, त्याचा नेम भलतीकडेच गेला.* ५ (*वाक्प्र*) **give sb a wide berth** एखाद्याला टाळणे, हुलकावणी देणे. **wide of the 'mark** चुकलेला, भलतीकडे गेलेला. **wide** *क्रिवि* पूर्णपणे : *He was ~ awake, तो टक्क जागा होता* ○ *~ open, पूर्णपणे खुला.* **,wide-'eyed** *वि* आश्चर्याने (आणि अननुभवाने) डोळे विस्फारलेला. **widely** *क्रिवि* १ मोठ्या प्रमाणावर : *Prices vary ~ly from shop to shop, दुकानादुकानात किंमतीत मोठा फरक आहे.* २ विस्तीर्ण भागावर, दूरवर, लांबवर : *travel ~ly, दूरवर प्रवास करणे.* ३ खूप लोकांना, अनेकांना : *It is ~ly known that . . ., सर्वजनात/जगात सर्वत्र हे माहीत आहे की . . . .* **widen** *क्रि* [*अक, सक*] रुंद होणे/करणे, वाढवणे. **'widespread** *वि* सर्वत्र पसरलेला.

widow /'विडउ/ *ना* [*गण*] विधवा. **widow** *क्रि* [*सक*] (बहुधा कर्मणी) विधवा करणे किंवा विधुर करणे. **widower** *ना* [*गण*] विधुर.

width /विड्थ्, विट्थ्/ *ना* [*अगण, गण*] रुंदी.

wield /वील्ड्/ *क्रि* [*सक*] जवळ असून वापरणे : *~ an axe, कुऱ्हाड वापरणे* ○ *~ power, सत्ता वापरणे.*

wife /वाइफ्/ *ना* [*गण*] (*ब.व* **wives** /वाइव्झ्/) पत्नी, बायको.

wig /विग्/ डोक्यावर घालायचा केसांचा टोप.

wiggle /'विग्ल्/ *क्रि* [*अक, सक*] या बाजूकडून त्या बाजूकडे हालणे/हालवणे, डोलणे/डोलवणे : *The baby was wiggling its toes, मूल पायाची बोटे हालवत होते.* **wiggle** *ना* [*गण*] डोलवणे.

wigwam /'विग्वॅम्; *अमे* -वाम्/ *ना* [*गण*] उत्तर अमेरिकेतील रेड इंडियन माणसाची झोपडी किंवा तंबू.

wild /वाइल्ड्/ *वि* १ (क) (प्राणी, पक्षी वगैरेबाबत) वन्य, हिंस्र, जंगली; पाळीव नसलेला. (ख) (वनस्पतींबाबत) रानटी, रान-. २ (लोकांबाबत) रानटी, असंस्कृत. ३ (जमिनीबाबत) लागवडीसाठी आणि वस्तीसाठी न वापरलेली. ४ वादळी : *~ weather, वादळी हवा.* ५ बेफाम, उच्छृंखल, उनाड, बेबंद. ६ काही विचार न करता केलेला, स्वैर : *a ~ guess, स्वैर अंदाज.* ७ *about//* (*अनौप*) एखाद्या गोष्टीबाबत अतिउत्साही. ८ (*वाक्प्र*) **run 'wild** ➪ RUN¹. **wild** *ना* १ **the wild** [*ए.व*] नैसर्गिक परिस्थिती. २ **the wilds** [*ब.व*] दूरचा रानावनाचा भाग. **,wildcat 'strike** *ना* [*गण*] अचानकपणे पुकारलेला अनधिकृत संप. **,wild-'goose chase** *ना* [*गण*] (*अनौप*) न सापडू शकणाऱ्या व्यक्तीचा किंवा गोष्टीचा घेतलेला तपास, सुवर्णमृगाचा शोध. **'wildlife** *ना* [*अगण*] वन्यपशू, पक्षी वगैरे. **wildly** *क्रिवि* १ रानटी पद्धतीने. २ (*अनौप*) अतिशय, कमालीचा. **wildness** *ना* [*अगण*] रानजमीन; बेफामपणा.

wilderness /'विल्डनिस्/ *ना* [*गण, बहुधा ए.व*] १ लागवडीखाली नसलेली जमीन, रान, अरण्य. २ (*वाक्प्र*) **in the 'wilderness** कोणतेही राजकीय पद किंवा महत्त्व नसलेला,

सत्ताभ्रष्ट.

wiles /वाइल्झ्/ *ना* [*ब.व*] एखाद्याला फसवण्यासाठी केलेला कावा, कपट.

wilful (*अमे* तसेच **willful** /'विल्फ्ल्/) *वि* १ (वाईट गोष्टीबाबत) हेतुपुरस्सर, मुद्दाम केलेला, जाणूनबुजून केलेला. २ (माणसाबाबत) स्वतःला हवं ते करून घेणारा, हट्टी. **wilfully** *क्रिवि* बुद्ध्या; हेकेखोरपणे.

will^{1} /विल्/ *अभिद क्रि* (*संक्षेप* **'ll** /ल्/, *नकार* **will not** *संक्षेप* **won't** /वउन्ट्/, *भूत* **would** /वड्/ *अधिक बलयुक्त रूप* /वुड्/, *संक्षेप* **'d** /ड्/, *नकार* **would not**, *संक्षेप* **wouldn't** /'वुड्न्ट्/) १ (भविष्यकाळ व्यक्त करण्यास वापर): *He ~/He'll be here tomorrow, तो उद्या येथे असेल.* २ (सांप्रत काळात काय असण्याची शक्यता आहे हे व्यक्त करण्यास वापर): *That ~ be the postman at the door, दारात पोस्टमन असेल.* ३ (इच्छा किंवा पक्का हेतू दाखवण्यास वापर): *We ~ not obey you, आम्ही तुमचं ऐकणार नाही.* ४ (विनंती किंवा आमंत्रण दर्शक): *W~ you come this way please? कृपया तुम्ही इकडून येता?* ५ (आज्ञा देताना वापर): *You ~ carry out my instructions! तू माझ्या सूचनांची अंमलबजावणी करायची आहेस!* ६ (सर्वसाधारण सत्य सांगण्यास वापर): *Oil ~ float on water, तेल पाण्यावर तरंगेल/तरंगते.* ७ (सवयी वर्णन करण्यास वापर): *She would sit there, hour after hour, doing nothing, काहीही न करता तासन्तास ती नुसती बसून राहायची.* ८ (आग्रह, हट्ट दाखवण्यास वापर): *He '~ smoke between courses at dinner, रात्रीच्या जेवणाचे वेळी अन्न वाढतेवेळी मधूनमधून तो आवर्जून धूम्रपान करतो.*

will^{2} /विल्/ *क्रि* [*सक*] १ इच्छाशक्तीच्या जोरावर एखादी गोष्ट घडवून आणण्याचा प्रयत्न करणे. २ (*औप*) मृत्युपत्र करून एखाद्याला संपत्ती, जायदाद वगैरे देणे.

will^{3} /विल्/ *ना* १ [*अगण, अे.व*] स्वतःचे वर्तन आणि विचार यावर नियंत्रण ठेवण्यासाठीची मनःशक्ती, मनोप्रेरणा. २ [*अगण, अे.व*] (तसेच **'will-power**) [*अगण*] इच्छाशक्ती: *He has a strong/weak ~, त्याची इच्छाशक्ती प्रबळ/क्षीण आहे.* ३ [*अगण, गण*] निश्चय, निर्धार: *the ~ to live, जीवनेच्छा, जगण्याची ईर्षा.* ४ [*अगण*] एखाद्याची इच्छा, मर्जी: *the ~ of God, परमेश्वराची इच्छा, देवाचे मन.* ५ [*गण*] मृत्युपत्र किंवा इच्छापत्र. ६ (*वाक्प्र*) **at will** हवे तेव्हा, मनास येईल/वाटेल तेव्हा/तसे.

willing /'विलिङ्/ *वि* (*to*)// एखादी गोष्ट करण्यास राजी; तयार: *~ to learn, शिकायला तयार.* २ स्वेच्छेने आणि उत्साहाने काम करणारा: *a ~ helper, स्वतःच्या मनाने मदत करणारा.* **willingly** *क्रिवि* स्वेच्छेने, राजीखुषीने. **willingness** *ना* [*अगण*] स्वेच्छा, राजीखुषी.

willow (तसेच **'willow-tree**) /'विलउ/ *ना* [*गण*] पातळ लवचिक फांद्या असणारे एक झाड, वाळुंज.

wilt /विल्ट्/ *क्रि* [*अक*] १ (वनस्पतींबाबत) सुकणे, वाळू लागणे, कोमेजणे. २ (*ला*) (माणसांबाबत) क्षीण होणे, हतबल होणे.

wily /'वाइलि/ *वि* (**-ier, -iest**) कावेबाज, धूर्त, लबाड.

wimp /विम्प्/ *ना* [*गण*] (*अनौप अधिक्षेपी*) पुळचट – विशेषतः पुरुष.

win /विन्/ (**-nn-**, *भूत, भूत वि* **won** /वॅन्/) *क्रि* १ [*अक, सक*] खेळ, स्पर्धा वगैरे जिंकणे. २ [*सक*] स्पर्धेतील यशाचे बक्षीस मिळणे, पटकावणे. ३ [*सक*] मिळवणे, संपादन करणे: *try to ~ support for one's ideas, स्वतःच्या कल्पनांना पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न करणे.* ४ (*वाक्प्र*) **win (sth) ˌhands 'down** एखादी गोष्ट सहजपणे जिंकणे, हसत जिंकणे. ५ (*क्रिब*) **win sb over/round** एखाद्याचे मन वळवून त्याला आपल्या बाजूचे करणे. **win** *ना* [*गण*] यश, विजय. **winner** *ना* [*गण*] विजेता. **winning** *वि* १ जिंकणारा. २ आकर्षक; आनंददायक: *a ~ning smile, प्रसन्न स्मित/हास्य.* **winnings** *ना* [*ब.व*] जिंकलेले पैसे.

wince /विन्स्/ *क्रि* [*अक*] चेहऱ्यावर वेदना थरारणे. **wince** *ना* [*गण*] थरारणे, वेदनेची चमक.

winch /विन्च्/ *ना.* [*गण*] जड वजन उचलण्याचे किंवा ओढण्याचे रहाटासारखे यंत्र.

winch *क्रि* [*सक*] यंत्राने वजन उचलणे.

wind^1 /विन्ड्/ *ना* १ [*गण, अगण*] वारा. २ [*अगण*] व्यायामासाठी आवश्यक असा श्वास. ३ [*अगण*] पोटातील वात. ४ (*वाक्प्र*) **get wind of sth** (*अनौप*) इतरांना जे एखाद्याला कळू नये असे वाटते ते त्याला कळणे, नको ते कानावर येणे, गुणगुण लागणे. **put the wind up sb** (*अनौप*) एखाद्याला भिववणे. **wind** *क्रि* [*सक*] एखाद्याला धापा टाकायला लावणे, दमछाक करणे. **'windfall** *ना* [*गण*] १ वाऱ्याने पडलेले झाडाचे फळ. २ (*ला*) ध्यानीमनी नसताना उजळलेले भाग्य. **'wind instrument** *ना* [*गण*] फुंकून वाजवायचे वाद्य, वायुवाद्य, वाजंत्री. **'windmill** *ना* [*गण*] पवनचक्की. **'windpipe** *ना* [*गण*] घशातून फुफ्फुसांना जोडणारी श्वासनलिका. **'windscreen** (*अमे* **'windshield**) मोटारीची पुढच्या बाजूची काचेची खिडकी. **'windscreen wiper** *ना* [*गण*] मोटारीच्या पुढच्या काचेवर पडणारे पावसाचे पाणी दूर करणारे विजेवर चालणारे रबरी पट्टीसारखे एक साधन. **'windsurfing** *ना* [*अगण*] शीड बांधलेल्या फळीवर उभे राहून काठावर आदळणाऱ्या लाटांवर आरूढ होण्याचा एक खेळ. **'windsurfer** *ना* [*गण*] असा खेळ करणारा माणूस. **'wind-swept** *वि* (क) वादळ, वारे यांपासून सुरक्षित नसलेला, त्यांचा परिणाम होणारा. (ख) वाऱ्याने (केस, वेष वगैरे) विस्कटलेला. **windy** *वि* (**-ier, -iest**) खूप वारे असलेला, वारा सुटलेला : *a ~y day, वारा सुटलेला दिवस.*

wind^2 /वाइन्ड्/ *क्रि* (*भूत, भूत वि* **wound** /वाउन्ड्/) १ [*अक, सक*] नागमोडी जाणे (किंवा जायला लावणे), वाकडातिकडा जाणे : *The river ~s (its way) through the countryside, ग्रामीणभागातून ही नदी नागमोडी वाहत जाते किंवा ही नदी डोंगरदऱ्यातून, रानावनातून नागमोडी वळणे घेत जाते.* २ [*सक*] गुंडाळी करणे. ३ [*सक*] (*up*)// घड्याळाला किल्ली देणे. ४ (*क्रिब*) **wind sth back, down, forward, etc** दांडा फिरवून मागे, खाली, पुढे वगैरे करणे किंवा सरकवणे : *~ a window down, (मोटारची) खिडकी खाली करणे.* **wind down** (क) (घड्याळाबाबत) मागे पडून बंद पडणे. (ख) (*अनौप*) (माणसाबाबत) आराम करणे. **wind (sth) down** (धंदा वगैरे) हळूहळू कमी करणे. **wind up** (*अनौप*) विशिष्ट ठिकाणी किंवा परिस्थितीत येऊन थबकणे, परिणती होणे : *We eventually wound up in a little cottage by the sea, शेवटी समुद्रकाठच्या एका छोट्या झोपडीत येऊन आम्ही धडकलो.* **wind (sth) up** एखादी गोष्ट संपवणे, शेवट करणे, गुंडाळणे. **wind sb up** (*अनौप*) एखाद्याला भडकवण्यासाठी त्याची खोडी काढणे, त्रास देणे.

window /'विन्डउ/ *ना* [*गण*] प्रकाश किंवा हवा येण्यासाठी केलेली खिडकी, झरोका. **'window-box** *ना* [*गण*] फुले वाढवण्यासाठी ठेवलेली खिडकीतील पेटी किंवा चौकोनी कुंडी. **'window-dressing** *ना* [*अगण*] दुकानात दर्शनी भागात आकर्षक पद्धतीने माल लावणे. **'window-pane** *ना* [*गण*] खिडकीची काच. **'window-shopping** *ना* [*अगण*] विकत घेण्याचा हेतू नसताना दुकानातला माल बघत जाणे. **'window-sill** *ना* [*गण*] खिडकीचा खालचा कट्टा, तळसरी.

wine /वाइन्/ *ना* [*गण, अगण*] द्राक्षे वगैरे फळांपासून बनविलेले मद्य, दारू, मदिरा. **wine** *क्रि* (*वाक्प्र*) **,wine and 'dine** एखाद्याचे भोजन आणि मद्य देऊन आदरातिथ्य करणे किंवा त्याला प्रसन्न करणे; असे आदरातिथ्य केले जाणे.

wing /विङ्/ *ना* १ [*गण*] पंख. २ [*गण*] विमानाचा पंख. ३ [*गण*] इमारतीची एखाद्या दिशेने वाढवलेली बाजू : *add a new ~ to a hospital, इस्पितळाला नवीन भाग जोडणे.* ४ [*गण*] चाकाभोवतीचा मोटारीचा भाग. ५ [*गण,* बहुधा *अ.व*] खास करून राजकीय पक्षातील विशिष्ट मते आणि कार्य असणारा गट, फळी, आघाडी : *the left/right ~, डावी/उजवी फळी.* ६ [*गण*] फुटबॉल, हॉकी वगैरेच्या मैदानाची बाजूची किंवा कडेची जागा/पट्टी. ७ **the wings** [*ब.व*] रंगभूमीवरील प्रेक्षकांना न दिसणाऱ्या बाजू, पार्श्वपट, रंगपट. ८ (*वाक्प्र*) **take sb under one's 'wing** एखाद्याला आसरा देऊन त्याचे रक्षण करणे, पंखाखाली

घेणे, पदराखाली घेणे. **wing** *क्रि* १ [*अक, सक*] उडणे. २ [*सक*] किंचित् जखमी करणे. **winged** *वि* पंख असलेला, उडणारा. **winger** *ना* [*गण*] (फुटबॉल, हॉकी वगैरे खेळात) मैदानाच्या बाजूकडून खेळणारा गडी. **'wing-span** *ना* [*गण*] पक्ष्याचे किंवा विमानाचे पंख पूर्ण पसरल्यावर होणारे अंतर.

wink /विङ्क्/ *क्रि* [*अक*] १ (*at*)// डोळे मिचकावणे. २ (तारा किंवा प्रकाश यांबाबत) चमचमणे. **wink** *ना* १ [*गण*] डोळे मिचकावून केलेली खूण, डोळा घालणे, नेत्रपल्लवी. २ [*अे.व*] झोपेचा चुटका, डुलकी : *I didn't sleep a ~, मला घटकाभर देखील झोप लागली नाही म्हणजेच जराही डोळा लागला नाही.* ३ (*वाक्प्र*) **have forty 'winks** (*अनौप*) दिवसा थोडीशी वामकुक्षी करणे, थोडावेळ पडणे.

winkle /'विङ्क्ल्/ *ना* [*गण*] समुद्रात सापडणारी आणि खाण्यासाठी वापरली जाणारी एक गोगलगाय.

winner, winning ➪ WIN.

winter /'विन्ट(र्)/ *ना* [*अगण, गण*] हिवाळा, थंडीचे दिवस. **winter** *क्रि* [*अक*] (*औप*) हिवाळा काढणे. **,winter 'sports** *ना* [*ब.व*] हिमावर खेळायचे खेळ, हिमक्रीडा. **wintry** /'विन्ट्रि/ *वि* हिवाळी.

wipe /वाइप्/ *क्रि* [*सक*] १ (एखादी गोष्ट) साफ किंवा कोरडी करण्यासाठी (धूळ, पाणी वगैरे) पुसणे : *~ the dishes with a cloth, फडक्याने डिशेस् पुसणे* ○ *~ the writing off the blackboard, फळ्यावरचे अक्षर पुसून टाकणे.* २ (*क्रिब*) **wipe sth out** (क) पूर्ण नाश करणे, विध्वंस करणे, नामशेष करणे : *War ~d out whole villages, युद्धात अख्खी गावंच्या गावं नष्ट झाली.* (ख) (कर्ज) रद्द करणे. **wipe sth up** एखाद्या वस्तूवर बसलेली धूळ किंवा सांडलेले पाणी वगैरे फडक्याने स्वच्छ करणे, कोरडे करणे : *W~ up the milk you spilt, तू सांडलेलं दूध पुसून घे* ○ *~ up the cups, कप कोरडे करणे.* **wipe** *ना* [*गण*] पुसणे, कोरडे करणे.

wire /'वाइअ(र्)/ *ना* १ [*गण, अगण*] तार. २ [*गण*] (*अनौप* विशेषतः *अमे*) पोस्टाची तार. **wire** *क्रि* [*सक*] १ तारेने बांधणे. २ तार जोडून विद्युत्प्रवाह सुरू करणे. ३ (*अमे*) तार पाठवणे/करणे. **wiring** *ना* [*अगण*] वीजेच्या तारांचे जाळे. **wiry** *वि* १ तारेसारखा चिवट. २ (माणसाबाबत) काटक.

wireless /'वाइअलिस्/ *ना* [*गण*] (*जुना अप्रचलित*) रेडिओ.

wisdom /'विझ़डम्/ *ना* [*अगण*] १ शहाणपण, सुजाणता. २ (*औप*) शहाणपणाचे विचार, बोधवचने, सुविचार. **'wisdom tooth** *ना* [*गण*] वयाच्या विसाव्या वर्षानंतर येणारी अक्कल दाढ.

wise /वाइझ़/ *वि* (**~r, ~st**) १ शहाणा, सूज्ञ, जाणता. २ (*वाक्प्र*) **none the 'wiser** अधिक शहाणा न झालेला, आहे तसाच राहिलेला. **wisely** *क्रिवि* शहाणपणाने, सूज्ञपणे; विवेकाने.

wish /विश्/ *क्रि* १ [*सक*] *to*// (*औप*) एखादी गोष्ट करण्याची इच्छा असणे, मनात असणे : *He ~es to be alone, त्याला एकांत हवाय्.* २ [*सक*] (अशक्य गोष्ट) सत्य असण्याची इच्छा/आशा बाळगणे : *I ~ (that) I could be an astronaut, आपण अंतराळवीर असावं असं मला फार वाटतं.* ३ [*सक*] एखाद्याला शुभेच्छा वगैरे देणे, यश चिंतणे : *~ sb good luck/ happy birthday, एखाद्याला 'गुड लक' देणे/ वाढदिवसाच्या शुभेच्छा देणे.* ४ [*अक*] (*for*)// हवे ते घडावे असे वाटणे किंवा अशी प्रार्थना करणे, मनोरथ करणे : *Blow out the candles and wish!* (वाढदिवसाच्या केकवरच्या) *मेणबत्त्या फुंक आणि मनोरथ कर किंवा मनोकामना पूर्ण होवो असे म्हण.* **wish** *ना* १ [*गण*] इच्छा, कामना : *I have no ~ to interfere, but . . ., हस्तक्षेप करण्याची माझी इच्छा नाही, पण . . . .* २ [*गण*] इच्छित वस्तू, इष्ट वस्तू, ईप्सित. ३ **wishes** [*ब.व*] एखाद्याच्या भल्यासाठी (व्यक्त केलेल्या) सद्भावना, शुभेच्छा : *My father sends his best ~es, माझ्या वडलांनी शुभेच्या/शुभकामना पाठवल्या आहेत.* **,wishful 'thinking** *ना* [*अगण*] आपली इच्छा आहे म्हणून केवळ एखादी गोष्ट खरी होईल असा विश्वास, दिवास्वप्न.

wishy-washy /'विशिवॉशी; *अमे* -वॉडशि/

वि (*अनौप*) कसाबसा असा, यथातथा असा; संदिग्ध आणि अनिश्चित, गुळमुळीत.

wisp /विस्प्/ *ना* [*गण*] छोटी जुडी; पुंजका : *a ~ of hair/smoke, केसांचा/धुराचा पुंजका.* **wispy** *वि* पुंजक्याचा.

wistful /'विस्ट्फ्ल्/ *वि* गेलेल्या किंवा मिळू न शकणाऱ्या गोष्टीचा खेद करणारा, खंतावलेला. **wistfully** /-फलि/ *क्रिवि* खंतावून.

wit /विट्/ *ना* १ (क) [*अगण*] स्वतःचे विचार आकर्षक आणि चलाख रीतीने मांडण्याची क्षमता, बुद्धिचातुर्य, चमकदारपणा. (ख) [*गण*] बुद्धिचातुर्य असणारा माणूस, चतुर मनुष्य. २ (तसेच **wits**) [*अगण, ब.व*] चांगली समज; बुद्धिमत्ता. ३ (*वाक्प्र*) **at one's wits' 'end** पूर्ण भांबावलेला, बुचकळ्यात पडलेला. **have/keep one's 'wits about one** तयारीत असणे, सज्ज असणे. **scare, frighten, etc sb out of his/her 'wits** एखाद्याला खूप घाबरवून सोडणे. **witticism** /'विटिसिझम्/ *ना* [*गण*] चमकदार उक्ती, चपखल बोलणे. **witty** *वि* (**-ier, -iest**) उच्च विनोदयुक्त, खटकेबाज. **wittily** *क्रिवि* उत्तम विनोदपूर्ण शैलीत, खटकेबाजपणे.

witch /विच्/ *ना* [*गण*] चेटूक करणारी स्त्री, चेटकीण. **'witchcraft** *ना* [*अगण*] चेटुक, जादूटोणा. **'witch-doctor** *ना* [*गण*] अद्भूत शक्तीने किंवा चमत्कार करून रोग बरे करणारा माणूस. **'witch-hunt** *ना* [*गण*] अप्रिय विचार मांडणाऱ्या लोकांना धडा शिकवण्यासाठी त्यांचा केलेला शोध किंवा पाठलाग.

with /विद्, विथ्/ *शब्दयो* १ (क) सह, बरोबर, जवळ : *live ~ one's parents, स्वतःच्या आईवडलांबरोबर राहणे* ○ *discuss it ~ an expert, तज्ज्ञाबरोबर चर्चा करणे.* (ख) पाशी, जवळ : *leave a child ~ a baby-sitter, मूल सांभाळणाऱ्या व्यक्तीपाशी मूल ठेवणे.* २ असलेला, युक्त : *a coat ~ two pockets, दोन खिसे असलेला कोट* ○ *a girl ~ blue eyes, निळ्या डोळ्यांची मुलगी.* ३ (क) (साधनदर्शक) -ने : *Cut it ~ a knife, सुरीने ते काप.* (ख) (वापरलेले द्रव्य दाखविण्यासाठी वापर) -ने : *Fill the bottle ~ water, बाटली पाण्याने भर.* ४ बाजूचा, पक्षपाती : *The managers are ~ us, व्यवस्थापक आपल्याबरोबर आहेत.* ५ विरुद्ध, -शी : *argue ~ Rosie, रोझीशी वाद घालणे.* ६ -मुळे, -ने, कारणाने : *tremble ~ fear, भीतीने लटपटणे.* ७ (एखाद्या क्रियेची रीत दाखवण्यास वापर) -ने : *look at one's daughter ~ pride, स्वतःच्या मुलीकडे अभिमानाने पाहणे.* ८ -च्या दिशेने, बरोबर : *sail ~ the wind, वाऱ्याच्या दिशेने नौका नेणे.* ९ बाबत : *Be patient ~ them, त्यांच्याबाबत जरा सबुरीने घे.* १० -मुळे आणि बरोबर, -ने : *skill comes ~ experience, अनुभवाने कौशल्य येते.* ११ तरीही, एखाद्या गोष्टीसकट : *W~ all her faults, we still like her, तिच्या सर्व दोषांसकट आम्हाला ती आवडते.* १२ (*वाक्प्र*) **be 'with (sb)** (*अनौप*) एखादा काय म्हणतोय् ते समजणे : *I'm not really ~ you, I'm afraid, so could you explain it again? मला वाटतं तू काय म्हणतोयस् ते माझ्या लक्षात येत नाहीये – तू परत नीट सांगशील का सारं?* **'with it** (*जुना अप्रचलित व्रात्य*) (क) फॅशनेबल, लोकप्रिय. (ख) जाणकार, सूज्ञ.

withdraw /विद्'ड्रॉऽ; तसेच विथ्'ड्-/ *क्रि* (*भूत* **-drew** /-ड्रू/, *भूत वि* **~n** /-'ड्रॉऽन्/) १ [*सक*] (एखादी गोष्ट) काढून घेणे : *~ money from one's bank account, बँकेतील स्वतःच्या खात्यावरचे पैसे काढून घेणे.* २ [*अक, सक*] (*औप*) दूर जाणे/नेणे, हालणे/हालवणे : *~ troops from the battle, युद्धातून सैन्य काढून घेणे किंवा हालवणे.* ३ [*अक, सक*] भाग न घेणे, माघार घेणे किंवा घ्यायला लावणे : *~ from an argument, वादातून माघार घेणे.* ४ [*सक*] (वचन, निवेदन वगैरे) मागे घेणे : *If I don't have a reply by tonight I shall ~ my offer, आज रात्रीपर्यंत जर मला उत्तर मिळालं नाही तर दिलेला प्रस्ताव मी मागे घेईन.* **withdrawal** /'-ड्रॉऽअल्/ *ना* [*गण, अगण*] माघार, मागे घेणे. **withdrawal symptoms** *ना* [*ब.व*] अमली पदार्थाचे व्यसन असणाऱ्या माणसाने ते बंद केल्यानंतर त्याला भोगावे लागणारे तापदायक परिणाम. **withdrawn** *वि* (माणसाबाबत) फार शांत आणि बुजरा, लाजाळू.

wither /'विद(र्)/ *क्रि* [*अक, सक*] सुकणे/सुकवणे, कोमेजून मरणे : *The hot summer* *had ~ed the grass, कडक उन्हाळ्याने गवत कोळपून गेले* ○ (*ला*) *Their hopes ~ed, त्यांच्या आशा कोमेजल्या.* **withering** *वि* लाज वाटायला लावणारा, शरमेची भावना निर्माण करणारा : *a ~ing look, ओशाळलेपणा आणणारा कटाक्ष.*

withhold /विद्'हउल्ड्; तसेच विथ्'ह्-/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-held** /-हेल्ड्/) [*सक*] (*औप*) देण्यास नाकारणे, अडवणे, रोखून ठेवणे : *~ permission, परवानगी रोखून धरणे.*

within /वि'दिन्/ *शब्दयो* बाहेर किंवा पलीकडे नाही; आतमधे : *~ the city walls, शहराच्या तटबंदीच्या आत* ○ *~ seven days, सात दिवसांच्या आत.* **within** *क्रिवि* (*औप*) आतल्याआत : *I could feel the anger rising ~, आतल्याआत माझा पारा चढत होता हे मला कळत होतं.*

without /वि'दाउद्/ *शब्दयो* १ विना, शिवाय, वाचून : *You can't buy things ~ money, पैशावाचून तुम्ही गोष्टी विकत नाही घेऊ शकत.* २ (क्रियापदाला *-ing* प्रत्यय लावून नकारार्थी वापर) : *He can't speak German ~ making mistakes, चुका केल्याविना त्याला जर्मन बोलता येत नाही.*

withstand /विद्'स्टॅन्ड्, तसेच विथ्'स्-/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-stood** /-'स्टुड्/) [*सक*] (*औप*) न डगमगता सहन करणे, शूरपणे झेलणे; प्रतिकार करणे : *~ an attack, हल्ला परतवून लावणे* ○ *~ hard weather, खराब हवामान सहन करणे.*

witness /'विट्निस्/ *ना* [*गण*] १ साक्षी माणूस. २ न्यायालयातील साक्षीदार. ३ एखाद्या माणसाने केलेली सही खरी आहे हे निश्चित करण्यासाठी त्या कागदपत्रावर सही करणारी व्यक्ती. ४ (*औप*) साक्ष, पुरावा. **witness** *क्रि* [*सक*] १ साक्षी असणे : *~ an accident, अपघाताला साक्षी असणे.* २ दस्तऐवज करताना साक्षीदार होणे. **'witness-box** *ना* [*गण*] साक्षीदाराचा पिंजरा.

witticism, witty ➪ WIT.

wives WIFE चे *ब.व.*

wizard /'विझड्/ *ना* [*गण*] १ (विशेषतः परीकथांमधे) जादूगार. २ खूप चातुर्य किंवा क्षमता असणारा माणूस, दादा : *a financial ~, अर्थव्यवहारातील दादा.*

wizened /'विझन्ड्/ *वि* सुरकुत्या पडलेला.

wobble /'वॉब्ल्/ *क्रि* [*अक, सक*] लटपटणे, डुगडुगणे, कापणे. **wobbly** *वि* (*अनौप*) लटपटणारा, डुगडुगणारा : *a wobbly chair, डुगडुगणारी खुर्ची.*

woe /वउ/ *ना* (*जुना अप्रचलित* किंवा *औप*) १ [*अगण*] मोठे दुःख, शोक. २ **woes** [*ब.व*] संकटे, अरिष्टे. **woeful** *वि* (*औप*) १ दुःखदायक. २ फार वाईट.

wok /वॉक्/ *ना* [*गण*] घमेल्याच्या आकाराचे चिनी स्वयंपाकाचे भांडे.

woke WAKE^{1} चा *भूत.*

woken WAKE^{1} चे *भूत वि.*

wolf /वुल्फ्/ *ना* [*गण*] (*ब.व* **wolves** /वुल्व्ह्झ्/) लांडगा. **wolf** *क्रि* [*सक*] (*down*)// (*अनौप*) हावरटाप्रमाणे बकाबका खाणे, अधाशीपणे खाणे.

woman /'वुमन्/ *ना* (*ब.व* **women** /'विमिन्/) १ [*गण*] स्त्री, बाई. २ [*अगण*] सर्वसाधारण स्त्री. ३ **the woman** [*ए.व*] स्त्रीच्या स्वभावातला स्त्रीपणा, स्त्री. **womanhood** *ना* [*अगण*] स्त्रीचे गुण, स्त्रीत्व, स्त्रीधर्म. **womanizer** *ना* [*गण*] स्त्रियांना वश करणारा किंवा नादी लावणारा पुरुष. **'womankind** *ना* [*अगण*] (*औप*) स्त्री-जात, स्त्रीवर्ग. **womanly** *वि* (स्त्रीबाबत) स्त्रीला साजेसा, स्त्रीसुलभ. **,Women's Libe'ration** *ना* [*अगण*] पुरुषांप्रमाणेच आर्थिक आणि सामाजिक हक्क असण्याचे स्त्रियांचे स्वातंत्र्य, स्त्रीमुक्ती.

womb /वूम्/ *ना* [*गण*] जन्मापूर्वी मूल जेथे वाढते ते स्त्रीच्या शरीरातील इंद्रिय, गर्भाशय.

won WIN चा *भूत, भूत वि.*

wonder /'वॅन्ड(र)/ *क्रि* १ [*अक, सक*] आश्चर्य वाटणे/करणे; स्वतःला विचारणे : *I ~ who she is, ती कोण आहे असा मला प्रश्न पडलाय.* २ [*अक*] (विनम्रपणे विनंती करताना वापर) : *I ~ if you could come earlier, मला विचारायचंय की तू जरा लवकर येऊ शकशील?* ३ [*अक*] (*at*)// (*औप*) एखाद्या गोष्टीचा अचंबा वाटणे, नवल वाटणे : *I ~*

that you weren't killed, तू मारला गेला नाहीस याचं मला नवल वाटतं. **wonder** *ना* १ (क) [*अगण*] आश्चर्यभावना, अचंबा. (ख) [*गण*] आश्चर्यचकित करणारी गोष्ट: *the ~s of modern medicine, आधुनिक अद्‌भूत औषधांची किमया* ○ *a ~ drug, विस्मयकारक औषध.* २ (*वाक्प्र*) **do/work wonders** अनपेक्षितपणे चांगले परिणाम घडणे. **it's a wonder that ...** हे आश्चर्यकारक आहे ...: *It's a ~ that they weren't all killed, ते सर्व ठार झाले नाहीत हे आश्चर्यच आहे.* **no/little/small wonder** आश्चर्य वाटायला नको, यात आश्चर्य नाही. **wonderful** *वि* फार छान, सुंदर; आश्चर्यकारक. **wonderfully** *क्रिवि* फार चांगल्या रीतीने; आश्चर्यकारक रीतीने.

wonky /'वॉङ्कि/ *वि* (*ब्रि अनौप*) डळमळीत; दुबळा.

won't /वउन्ट्/ **will not** ➪ WILL^{1}.

woo /वू/ *क्रि* [*सक*] १ अनुनय करणे: *~ voters, मतदारांचा अनुनय करणे.* २ (*जुना अप्रचलित*) एखाद्या स्त्रीने आपल्याशी लग्न करावे म्हणून प्रेमाराधना करणे, प्रेमयाचना करणे.

wood /वुड्/ *ना* १ [*अगण*] लाकूड, काष्ठ. २ [*गण, बहुधा ब.व*] अरण्यापेक्षा लहान असे वन किंवा जंगल, झाडी. ३ (*वाक्प्र*) **,out of the 'wood(s)** (*अनौप*) संकटातून बचावलेला, संकटमुक्त. **wooded** *वि* झाडांनी घेरलेला/झाकलेला, भोवती झाडी असलेला. **wooden** *वि* १ लाकडी. २ वागण्यात आखडू किंवा वेंधळा. **'woodland** /-लन्ड्/ *ना* [*अगण*] झाडीचा प्रदेश, राई. **'woodpecker** *ना* [*गण*] सुतार पक्षी. **'woodwind** /-विन्ड्/ *ना* [*अे.व*] (अे.व किंवा ब.व क्रियापदासह) फुंकून वाजवायची वाद्ये (किंवा त्यांचे वादक) – उदा पावा. **'woodwork** *ना* [*अगण*] १ इमारतीचा लाकूड-कामाचा भाग. २ काष्ठकला, लाकडापासून वस्तू बनविण्याची कला. **'woodworm** *ना* [*अगण, गण*] लाकूड खाणारी कीड (किंवा तिने केलेली हानी, वाळवी. **woody** *वि* (-ier, -iest) १ गर्द झाडीचा: *a ~y hillside, झाडी असलेली टेकडी.* २ लाकडाचा, लाकडासारखा.

woof /वुफ्/ *उद्‌वा, ना* [*गण*] (*अनौप*) कुत्र्याचे भुंकणे, भूऽ भूऽ.

wool /वुल्/ *ना* [*अगण*] (क) बकरी वगैरे प्राण्याची मऊ लोकर. (ख) लोकरीचा धागा किंवा कापड. **woollen** (*अमे* -l-) *वि* लोकरीचा. **woollens** (*अमे* -l-) *ना* [*ब.व*] लोकरीचे कपडे. **woolly** (*अमे तसेच* -l-) *वि* (-ier, -iest) १ लोकरीचा किंवा लोकरीसारखा. २ (माणसे किंवा त्यांच्या कल्पना याबाबत) गोंधळलेला; स्पष्ट नसणारा. **woolly** *ना* [*गण*] (*ब.व* -ies) (*अनौप*) लोकरीचा स्वेटर.

word /वऽड्/ *ना* १ [*गण*] लिखित किंवा बोललेला शब्द. २ [*गण*] शेरा किंवा निवेदन: *Don't say a ~ about it, त्याबाबत एक शब्दही/अक्षरही बोलू नकोस.* ३ [*गण*] संभाषण: *have a ~/a few ~s with sb, एखाद्याशी चार शब्द बोलणे.* ४ [*अगण*] बातमी; निरोप: *Please send me ~ of your arrival, तू कधी येणार तेव्हा निरोप धाड.* ५ [*अे.व*] वचन: *I give you my ~ that I will come back, मी परत येईन असं वचन/असा शब्द तुला देतो.* ६ (बहुधा **the word**) [*अे.व*] आज्ञा, हुकूम; आदेश: *The officer gave the ~ to fire, गोळीबार करण्याचा आदेश अधिकाऱ्याने दिला.* ७ (*वाक्प्र*) **by ,word of 'mouth** लिखित नाही म्हणजे तोंडी (भाषेत). **have 'words with sb** एखाद्याशी भांडण करणे, शब्दाशब्दी करणे. **in 'other words** दुसऱ्या/वेगळ्या शब्दांत सांगायचे तर. **in a 'word** थोडक्यात. **not in so many 'words** अगदी याच शब्दांत नाही पण याच अर्थाने. **take sb's 'word for it** एखाद्याच्या शब्दावर विश्वास ठेवणे. **too funny, stupid, etc for 'words** (*अनौप*) फारच किंवा शब्दांनी वर्णन करण्यापलीकडच्या विनोदी पद्धतीने वगैरे. **,word for 'word** शब्दशः. **word** *क्रि* [*सक*] शब्दांत व्यक्त करणे, शब्दबद्ध करणे. **wording** *ना* [*अे.व*] वापरलेले शब्द, शब्दप्रयोग. **,word-'perfect** *वि* अचूकपणे पाठ असलेला. **'word processor** *ना* [*गण*] टंकलिखित केलेले शब्द दुरुस्त, संपादित किंवा छापील करण्यासाठी ते वाचायला पडद्यावर दाखविण्याचे

साधन, टाइप केलेले शब्द दृश्य स्वरूपात दाखविणारे साधन. **wordy** *वि* **(-ier, -iest)** शब्दबंबाळ.

wore WEAR^1 चा *भूत.*

work^1 /वɔक्/ *ना* १ [*अगण*] पैसे मिळवण्याकरता केलेले काहीतरी, कामधंदा, नोकरी : *He's been looking for ~ for a year, गेले वर्षभर तो कामाच्या शोधात आहे.* २ [*अगण*] मानसिक किंवा शारीरिक काम : *Do you like hard ~? तुला कष्टाचे काम आवडते?* ३ [*अगण*] करायचे काम : *I've plenty of ~ to do, मला चिकार कामं आहेत.* ४ [*अगण*] केलेले काम किंवा कामाचे फळ : *the ~ of young sculptors, तरुण शिल्पकारांचे काम.* ५ [*गण*] साहित्यकृती, संगीतकृती, कलाकृती वगैरे : *the ~s of Shakespeare, शेक्सपिअरच्या कलाकृती.* ६ **works** (अे.व किंवा ब.व क्रियापदासह वापर) औद्योगिक प्रक्रिया करण्याचे ठिकाण : *a 'gas ~, खनिजवायू करण्याचे ठिकाण.* ७ **works** [*ब.व*] बांधकाम किंवा दुरुस्तीची कामे : *'road-~, रस्ता-दुरुस्तीची कामे.* ८ **the works** [*ब.व*] यंत्राचे हालणारे भाग. ९ (*वाक्प्र*) **at 'work** (क) कामाच्या जागी, कामावर. (ख) चालू, कार्यान्वित : *new technology at ~, वापरातले नवीन तंत्रज्ञान.* **set to 'work** सुरू करणे. **have one's 'work cut out** दिलेल्या वेळात काहीतरी अवघड काम करायला लागणे. **in 'work/out of 'work** नोकरी असणारा/नसणारा. **'work-bench** *ना* [*गण*] हत्यारे घेऊन काम करायचे टेबल. **'workbook** *ना* [*गण*] प्रश्न दिलेली आणि उत्तरे लिहिण्यासाठी जागा सोडलेली विद्यार्थ्यांची वही, कार्यपुस्तिका. **'work-force** *ना* [*गण*, तसेच ब.व क्रियापदासह अे.व] कारखाना, कचेरी वगैरेतील एकंदर कर्मचारी. **'workload** *ना* [*गण*] एखाद्याचा कार्यभार. **'workman** *ना* [*गण*] श्रमिक, कर्मकार. **'workmanlike** *वि* नीट केलेले, सुबक; कौशल्यपूर्ण. **'workmanship** *ना* [*अगण*] कारागिरी, कसब. **,work of 'art** *ना* [*गण*] उत्तम चित्र, शिल्प वगैरे, कलाकृती. **'workshop** *ना* [*गण*] १ वस्तू तयार करण्याची किंवा दुरुस्त करण्याची जागा, कर्मशाळा. २ सांघिक चर्चा आणि प्रत्यक्ष कृती करण्याचा काळ, कार्यशाळा. **'work-shy** *वि* कामचुकार; आळशी. **'work top** *ना* [*गण*] स्वयंपाकघारातील अन्न शिजवण्याचा ओटा.

work^2 /वɔक्/ *क्रि* १ [*अक*] काम करणे – विशेषतः नोकरी म्हणून, चाकरी करणे : *I've been ~ing hard all day, मी दिवसभर खूप काम करत आलोय्.* २ [*अक*] व्यवस्थित चालणे; चालू असणे : *The lift is not ~ing, लिफ्ट चालू' नाहीये.* ३ [*अक*] फलद्रुप होणे; यशस्वी होणे : *Will your plan ~? तुझी योजना यशस्वी होईल का?* ४ [*सक*] एखाद्याला काम करायला लावणे, कार्यान्वित करणे. ५ [*सक*] चालू करणे; व्यवस्था पाहणे : *~ a mine, खाणीची व्यवस्था पाहणे.* ६ [*सक*] (जमीन) लागवडीखाली आणणे, मशागत करणे. ७ [*अक*] (*against/for*)// एखाद्या गोष्टीचा बोऱ्या वाजवणे/एखादी गोष्ट साध्य करणे : *a politician who ~s for peace, शांततेसाठी काम करणारा राजकीय नेता.* ८ [*सक*] दाबून, मळून, घाव घालून वगैरे आकार देणे किंवा तयार करणे : *~ clay/dough, मातीचा चिखल करणे/कणीक मळणे.* ९ [*अक, सक*] हळूहळू कष्टाने पुढे सरकणे, मार्ग काढणे : *~ one's way through a boring book, कंटाळवाणे पुस्तक हळूहळू संपवणे/वाचत आणणे.* १० (*वाक्प्र*) **work loose** ⇨ LOOSE. **work to 'rule** विलंब करण्याच्या हेतूने नियमाप्रमाणेच काम करणे. **work wonders** ⇨ WONDER. ११ (*क्रिब*) **work sth off** काम करून एखादी गोष्ट विसरणे किंवा तीपासून सुटका करणे : *He ~ed off his anger by digging the garden, बागेत खणून त्याने आलेला राग मागे टाकला.* **work out** (क) आखल्याप्रमाणे होणे : *The situation ~ed out well, परिस्थितीत हवी तशी प्रगती झाली.* (ख) व्यायाम करणे. **work out at sth** विशिष्ट गोष्टीइतकी, रकमेइतकी वगैरे होणे : *The total ~s out at £180, बेरीज १८० पौंडाइतकी होतेय्.* **work sb out** (*अनौप*) एखाद्याला समजून घेणे. **work sth out** (क) मोजून किंवा हिशेब करून काढणे : *~ out the new price, हिशेब करून नवीन किंमत ठरवणे.* (ख) उत्तर शोधणे; प्रश्न सोडवणे : *~ out a problem, प्रश्नावरचे उत्तर शोधणे.* (ग)

एखादी गोष्ट आखणे, योजणे : ~ *out a new scheme, नवीन योजना आखणे.* **work sb/oneself up** स्वतःला/एखाद्याला खूप बेचैन/अस्वस्थ करणे, मनाला लावून घेणे : *He gets very ~ed up about criticism, तो टीका मनाला फार लावून घेतो.* **work sth up** हळूहळू वाढवणे : ~ *up business, धंदा हळूहळू वाढवणे* ○ *I can't ~ up much energy to go out, बाहेर जाण्याइतकी ताकद मला नाही आणता येणार.* **work up to sth** परिणत होणे : *The music ~ed up to a lively finish, ते संगीत दमदार शेवटात परिणत झाले.* **worker** *ना* [*गण*] कामगार, कर्मचारी. **'work-out** *ना* [*गण*] व्यायामाचा काळ. **,work-to-'rule** *ना* [*गण*] निषेध म्हणून नियमाप्रमाणे केलेले काम.

workable /'वऽकब्ल्/ *वि* चांगला करता येण्याजोगा किंवा चांगला होण्याजोगा : *a ~ plan, यशस्वी होऊ शकणारी योजना.*

workaholic /,वऽक'हॉलिक्/ *ना* [*गण*] (*अनौप*) कामाविना राहू न शकणारा, कामाचे व्यसन असणारा.

working /'वऽकिङ्/ *वि* १ काम करणारा : *the ~ population, काम करणारे लोक.* २ कामाचा : ~ *hours/clothes, कामाचे तास/कामावरचा पोषाख.* ३ कामचलाऊ : *a ~ knowledge of Russian, रशियनचे कामचलाऊ किंवा कामापुरते ज्ञान.* ४ (*वाक्प्र*) **in 'working order** काम करू शकणारा, चालू. **working** *ना* १ **workings** [*ब.व*] यंत्र, संघटना वगैरेची कार्यपद्धती. २ [*गण*] खाण. **the ,working 'class** *ना* [*गण*] समाजातला श्रमजीवी किंवा कष्टकरी वर्ग. **,working-'class** *वि* श्रमजीवीवर्गाचा. **'working party** *ना* [*गण*] विशिष्ट विषयावर काम करणाऱ्या माणसांचा गट.

world /वऽल्ड्/ *ना* १ **the world** [*अ.व*] (**क**) पृथ्वीवरील देश आणि त्यातली माणसे, जग. (**ख**) विशिष्ट जग : *the French-speaking ~, फ्रेंच भाषकांचे जग.* २ [*गण*] ग्रह : *life on other ~s, इतर ग्रहांवरील जीवन.* ३ [*गण*] अस्तित्वकाळ आणि अस्तित्वस्थिती, लोक : *this ~ and the next, हे जग आणि यानंतरचे जग म्हणजेच इहलोक आणि परलोक.* ४ **the world** [*अ.व*] (**क**) संसार, प्रपंच : *a man/woman of the ~, प्रापंचिक पुरुष/स्त्री म्हणजेच जगाचा अनुभव असणारी व्यक्ती.* (**ख**) प्रत्येकजण : *I don't want the whole ~ to know about it, मला सगळ्या जगाला हे कळायला नकोय्.* ५ [*गण*] विशिष्ट प्रकारचे लोक किंवा वस्तू, विशिष्ट काम करणारे प्राणी किंवा लोक : *the insect ~, किड्यांचे जग* ○ *the ~ of sport, क्रीडाजगत्.* ६ (*वाक्प्र*) **how, why, where, etc in the world** (जोर देण्यासाठी वापर) : *How in the ~ did you manage to do it? तू कसं काय बुवा ते करू शकलास?* **,out of this 'world** (*अनौप*) निश्चितपणे आश्चर्यकारक, नामी. **a/the 'world of difference/good, etc** (*अनौप*) मोठा फरक वगैरे : *My holiday did me a ~ of good, सुट्टीमुळे मला खूप फरक पडला.* **,world-'class** *वि* सर्वोत्कृष्ट, सर्वोत्तम, अव्वल दर्जाचा. **,world-'famous** *वि* जगविख्यात, विश्वविख्यात. **worldly** *वि* १ ऐहिक, लौकिक. २ जगाचा अनुभव असलेला. **worldliness** *ना* [*अगण*] ऐहिकता, लौकिकता; अनुभवीपणा. **,world 'power** *ना* [*गण*] महासत्ता, जगातील एक शक्तिशाली देश. **,world 'war** *ना* [*गण*] जागतिक युद्ध, महायुद्ध. **,world-'wide** *वि, क्रिवि* सर्वत्र असणारा, घडणारा, जगभरचा.

worm /वऽम्/ *ना* [*गण*] १ (**क**) किडा, कीटक, कृमी. (**ख**) कीटकाची एक अवस्था, अळी : *'wood~, लाकूड पोखरणारी कीड, वाळवी.* २ (*अनौप अधिक्षेपी*) क्षुद्र, दुबळा माणूस. **worm** *क्रि* [*अक, सक*] हळूहळू किंवा कष्टाने वाट काढणे : *He ~ed his way through the narrow tunnel, त्या अरुंद बोगद्यातून त्याने वाट काढली.*

worn^1 WEAR^1 चे *भूत वि.*

worn^2 /वॉऽन्/ *वि* वापरून खराब झालेला, जुना. **,worn-'out** *वि* १ वापरून बाद झालेला, झिजलेला. २ खूप दमलेला.

worry /'वैरि/ *क्रि* (*भूत, भूत वि* **-ied**) १ [*अक*] (*about*)// एखाद्या व्यक्तीची/गोष्टीची काळजी करणे/वाटणे, चिंता करणे : *I'm worried about my son, मला मुलाची काळजी वाटते.* २ [*सक*] एखाद्याला काळजीत टाकणे,

त्रास देणे. ३ [सक] दातात पकडून हालवणे, लचके तोडणे: *The dog was ~ing a rat, कुत्रा घुशीचे लचके तोडत होता.* **worried** *वि* सचिंत, चिंताक्रांत; त्रासलेला. **worry** *ना* (*ब.व* **-ies**) १ [*अगण*] चिंता, काळजी. २ [*गण*] चिंता उत्पन्न करणारे काही; वैताग देणारी गोष्ट. **worrying** *वि* काळजीयुक्त, काळजीकारक.

worse /वऽस्/ BAD चे *तरभावदर्शक वि* १ इतका चांगला नसलेला, कमी दर्जाचा: *Her work is bad, but his is ~, तिचे काम वाईट आहे, पण त्याचे काम तिच्याहूनही अधिक वाईट आहे.* २ प्रकृतीने वाईट, खराब तब्येतीचा: *She got ~ in the night, रात्री तिची तब्येत जास्त बिघडली.* ३ (*वांक्प्र*) **be none the 'worse (for sth)** (एखाद्या गोष्टीचा) वाईट परिणाम न होणे, एखाद्या गोष्टीमुळे काही न बिघडणे. **the ,worse for 'wear** खूप वापरल्याने खराब झालेले, दमलेले वगैरे. **worse** *क्रिवि* १ अधिक वाईट: *She cooks badly, but I cook ~, ती स्वयंपाक वाईट करते पण मी त्याहूनही वाईट.* २ पूर्वीपेक्षा जास्त: *It's raining ~ than ever, कधीही नव्हता इतका पाऊस पडतोय्.* ३ (*वाक्प्र*) **,worse 'off** अधिक दरिद्री, दुःखी किंवा खराब तब्येतीचा. **worse** *ना* [*अगण*] अधिक वाईट गोष्टी. **worsen** *क्रि* [*अक, सक*] अधिक वाईट होणे/करणे, बिघडणे/बिघडवणे.

worship /'वऽशिप्/ *ना* [*अगण*] १ देवाविषयी भक्तिभाव, प्रेम किंवा आदर. २ एखाद्यावरचे प्रेम, कौतुक, ममत्व. **worship** *क्रि* (**-pp-**; *अमे* **-p-**) [*अक, सक*] आदर करणे, मानणे, पूजा करणे. **worshipper** (*अमे* **-p-**) *ना* [*गण*] भक्त.

worst /वऽस्ट्/ BAD चे *उच्चतमभावदर्शक वि* सर्वात वाईट किंवा हीन प्रतीचा: *the ~ storm for years, कैक वर्षांतील सर्वात वाईट वादळ.* **worst** *क्रिवि* अतिशय वाईट रीतीने. **worst** *ना* १ **the worst** [*अे.व*] सर्वात वाईट भाग, परिस्थिती, घटना वगैरे. २ (*वाक्प्र*) **at (the) 'worst** वाईटात वाईट, जास्तीत जास्त वाईट (म्हणजे). **if the ,worst comes to the 'worst** सर्वात वाईट गोष्ट घडली तरी.

worth /वऽथ्/ *वि* १ किंमत: *a car ~ £5000, ५००० पौंड किमतीची गाडी.* २ (एखादी गोष्ट करण्याचे) चीज करणारा, श्रेयस्कर: *The book is ~ reading, पुस्तक वाचण्यासारखे/वाचण्याच्या लायकीचे आहे.* ३ (*वाक्प्र*) **for ,all one is 'worth** (*अनौप*) सर्वशक्तीने, पराकाष्ठा करून. **'worth it** पैसा, वेळ, खटपट वगैरे सार्थकी लागेल असा. **,worth sb's 'while** एखाद्याला उपयुक्त, साजेसा किंवा हितकारक. **worth** *ना* [*अगण*] १ एखादी वस्तू विकत घेण्यासाठी लागणारे पैसे, किंमत: *a pound's ~ of apples, एक पौंड किमतीची सफरचंदे.* २ मूल्य, किंमत, महत्त्व. **worthless** *वि* १ किंमत नसलेला, क्षुल्लक, फालतू. २ (माणसाबाबत) दुर्गुणी. **worth'while** *वि* पैसा, शक्ती, वेळ वगैरे खर्च करण्यास योग्य असा, लायकीचा.

worthy /'वऽदि/ *वि* (**-ier, -iest**) १ (*of*)// योग्य, पात्र: *~ of blame, दोषास्पद, नावे ठेवण्यासारखा.* २ आदरणीय.

would^{1} /वड्; अधिक बलयुक्त रूप वुड्/ *अभिद क्रि* (*संक्षेप* **'d** /ड्/, *नकार* **would not**, *संक्षेप* **wouldn't** /'वुड्न्ट्/) १ (क) (कल्पित गोष्टीचा परिणाम सांगताना वापर): *If he shaved his beard off, he ~ look much younger, त्याने दाढी काढून टाकली तर तो खूप तरुण दिसेल.* (ख) (नम्र विनंती करताना वापर): *W~ you open a window, please? कृपया एक खिडकी उघडाल का?* २ (मत व्यक्त करताना वापर): *I ~ think the film will last about 90 minutes, मला वाटतं हा चित्रपट ९० मिनिटे चालेल किंवा ९० मिनिटांचा आहे.* ३ (प्रस्ताव मांडताना, निमंत्रण देताना किंवा आग्रह करताना वापर): *W~ you like a sandwich? तुला सँडविच देऊ?* ४ (इच्छा किंवा आवड व्यक्त करताना वापर): *I'd love a cup of coffee, मला एक कप कॉफी आवडेल.* **'would-be** *वि* भावी, होऊ घातलेला: *a ~-be artist, भावी कलाकार.*

would^{2} WILL^{1} चा *भूत.*

wouldn't १ would not ⇨ WILL^{1}. २ would not ⇨ WOULD^{1}.

wound^{1} /वून्ड्/ *ना* [*गण*] जखम, इजा: *a bullet ~, (बंदुकीच्या) गोळीने झालेली जखम.* **wound** *क्रि* [*सक*] १ जखम करणे, जखमी

करणे. २ (एखाद्याच्या भावना वगैरे) दुखावणे.

wound² WIND² चा *भूत, भूत वि.*

wove WEAVE चा *भूत.*

woven WEAVE चे *भूत वि.*

wow /वाउ/ *उद्वा* *(अनौप)* (आश्चर्य किंवा कौतुक व्यक्त करताना वापर) वा:!

wrangle /'रॅङ्ग्ल्/ *क्रि* *[अक]* *ना* *[गण]* वादावादी (होणे), बाचाबाची (करणे).

wrap /रॅप्/ *क्रि* (**-pp-**) *[सक]* १ कशात तरी गुंडाळणे, झाकणे; भोवतालून वेष्टण घालणे : *~ (up) a parcel, पार्सल वेष्टणात घालणे ○ W~ a cloth round your leg, तुझ्या पायाला कापड गुंडाळ.* २ *(वाक्प्र)* **be wrapped up in sb/sth** *(अनौप)* एखाद्या व्यक्तीत/गोष्टीत गुंतून पडणे. ३ *(क्रिब)* **wrap (sb/oneself) up** स्वतःला/एखाद्याला गरम कपडे घालणे. **wrap sth up** *(अनौप)* (काम, करार वगैरे) पूर्ण करणे. **wrap** *ना* *[गण]* स्कार्फसारखा बाहेरून अंगावर घ्यायचा कपडा. **wrapper** *ना* *[गण]* कागदाचे वेष्टण. **wrapping** *ना* *[गण, अगण]* वेष्टणासाठी वापरायची गोष्ट.

wrath /रॉथ्; *अमे* रॅथ्/ *ना* *[अगण]* *(औप किंवा जुना अप्रचलित)* क्रोध.

wreak /रीक्/ *क्रि* *[सक]* *(औप)* (हानिकारक गोष्ट) घडवणे.

wreath /रीथ्/ *ना* *[गण]* *(ब.व ~s /रीद्झ्/)* विशेषतः समाधीवर वाहायचे पुष्पचक्र.

wreathe /रीद्/ *क्रि* *[सक]* *(in/with)//* *(औप)* (बहुधा कर्मणी) वेढणे, लपेटणे : *hills ~d in mist, धुक्याने लपेटलेल्या टेकड्या.*

wreck /रेक्/ *ना* *[गण]* १ अपघातामधे चक्काचूर झालेली गाडी, विमान वगैरे. २ वादळात मोडतोड झालेले जहाज. ३ *(अनौप)* तब्येत ढासळलेला माणूस, खालावलेला माणूस. **wreck** *क्रि* *[सक]* नष्ट करणे : *The train had been ~ed by vandals, गुंडांनी आगगाडीची नासधूस केलेली होती ○ (ला) The weather ~ed all our plans, हवेने आमच्या सर्व योजनांचा धुव्वा उडवला.* **wreckage** *ना* *[अगण]* नासधूस झालेले अवशेष, भग्नावशेष, फूटतूट.

wren /रेन्/ *ना* *[गण]* तपकिरी रंगाचा गाणारा एक छोटा पक्षी.

wrench /रेन्च्/ *क्रि* *[सक]* १ जोरात ढकलणे/ओढणे, हिसका देणे, पिरगळणे : *~ a door open, दरवाजा हिसका देऊन उघडणे.* २ (पाय वगैरे) मुरगळणे. **wrench** *ना* १ *[गण]* हिसका. २ *[गण]* *(अमे)* स्पॅनर, पाना. ३ *[अ.व]* दुःखद किंवा क्लेशकारक वियोग, ताटातूट.

wrestle /'रेस्ल्/ *क्रि* *[अक]* १ *(with)//* कुस्ती करणे, झोंबी घेणे. २ *with//* (प्रश्नाशी) झोंबी घेणे, (प्रश्नाला) भिडणे. **wrestler** *ना* *[गण]* कुस्तीगीर, पहिलवान.

wretch /रेच्/ *ना* *[गण]* दुर्दैवी माणूस; ब्याद.

wretched /'रेचिड्/ *वि* १ दुःखी, हैराण : *His stomach-ache made him feel ~, पोटदुखीने तो अगदी हैराण झाला.* २ अतिशय त्रस्त करणारा, दुःख देणारा. ३ *(अनौप)* वैताग आणणारा : *That ~ dog! ते वैताग आणणारं कुत्रं!* **wretchedly** *क्रिवि* दुःखाने, हैराण होऊन; वैतागाने. **wretchedness** *ना* *[अगण]* दुःखी भावना, क्लेश.

wriggle /'रिग्ल्/ *क्रि* १ *[अक, सक]* चुळबूळ करणे : *Stop wriggling and sit still! चुळबूळ न करता स्वस्थ बस!* २ *(क्रिब)* **wriggle out of doing sth** *(अनौप)* अप्रिय गोष्ट करण्याचे टाळणे, हात झटकणे, अंग काढून घेणे. **wriggle** *ना* *[गण]* चुळबूळ.

wring /रिङ्/ *क्रि* *(भूत, भूत वि* **wrung** /रैङ्/) *[सक]* १ *(out)//* (ओला कपडा वगैरे) पिळणे. २ *(ला)* एखाद्याकडून (पैसे, कबुली वगैरे) बळजबरीने काढणे, उकळणे, द्यायला लावणे. ३ (पक्ष्याची) मान मुरगाळणे. ४ *(वाक्प्र)* **ˌwring one's 'hands** दुःखाने, काळजीने हातपाय झाडणे, आळोखेपिळोखे देणे. **ˌwringing 'wet** गच्च ओला. **wringer** *ना* *[गण]* ओले कपडे पिळण्याचे यंत्र.

wrinkle /'रिङ्कल्/ *ना* *[गण, बहुधा ब.व]* वयामुळे त्वचेवर पडणारी सुरकुती. **wrinkle** *क्रि* *[अक, सक]* सुरकुत्या पडणे/पाडणे. **wrinkly** *वि* सुरकुत्यांचा.

wrist /रिस्ट्/ *ना* *[गण]* मनगट. **'wrist watch** *ना* *[गण]* मनगटी घड्याळ.

writ /रिट्/ *ना* [*गण*] एखाद्याला एखादी गोष्ट करण्याचा किंवा न करण्याचा हुकूम देणारे अधिकृत कायदेशीर पत्र, लेखी ताकीद.

write /राइट्/ *क्रि* (*भूत* **wrote** /रउट्/, *भूत वि* **written** /'रिट्न्/) १ [*अक, सक*] लिहिणे, लेखन करणे. २ [*सक*] लिखित स्वरूपात देणे, लिहून काढणे : ~ *a report/book, अहवाल/पुस्तक लिहिणे.* ३ [*अक, सक*] (पत्र) लिहिणे आणि पाठवणे : *She promised to ~ to me every week, दर आठवड्याला पत्र पाठवीन असे तिने मला कबूल केले.* ४ [*सक*] हवी ती माहिती लिहून पूर्ण करणे, लिहून देणे, भरणे : ~ *a cheque, चेक लिहिणे.* ५ (*वाक्प्र*) **be written all over sb's 'face** एखाद्याच्या चेहेऱ्यावरून स्पष्ट होणे, चेहेरा सांगणे. ६ (*क्रिब*) **write sth down** कागदावर उतरवणे. **write off/away (to sb/sth)** (एखाद्या कंपनीला वगैरे) पत्र लिहून माहिती विचारणे, माल मागवणे वगैरे. **write sb/sth off** (क) एखाद्याचे नाव टाकणे, झटकून टाकणे. (ख) दुरुस्त करता येणार नाही इतके नुकसान करणे. (ग) (कर्ज) माफ करणे. **write sth out** पूर्ण लिहून काढणे. **write sth up** एखाद्या गोष्टीची पूर्ण लेखी नोंद करणे. **'write-off** *ना* [*गण*] दुरुस्ती पलीकडे मोडतोड झालेले वाहन. **'write-up** *ना* [*गण*] घटनेचा लेखी वृत्तांत.

writer /'राइट(र्)/ *ना* [*गण*] १ लेखनिक. २ लेखक.

writhe /राइद्/ *क्रि* [*अक*] वेदनेने गडाबडा लोळणे, दुःखाने तडफडणे.

writing /'राइटिङ्/ *ना* १ [*अगण*] लिहिणे, लेखनकृती; लिहिलेला किंवा छापलेला मजकूर. २ [*अगण*] हस्ताक्षर. ३ **writings** [*ब.व*] लेखकाच्या लिखित (साहित्य)कृती, ग्रंथसंपदा. **'writing-paper** *ना* [*अगण*] (बहुधा चांगल्या प्रतीचा) पत्रे लिहिण्याचा कागद.

written WRITE चे *भूत वि.*

wrong /रॉङ्; *अमे* रॉऽङ्/ *वि* १ नैतिकदृष्ट्या अयोग्य, गैर : *It is ~ to steal,* चोरी करणे *वाईट आहे.* २ असत्य किंवा चूक, चुकलेला, गल्लत झालेला : *a ~ answer,* चुकीचे उत्तर ○ *prove that sb is ~,* एखादा चुकतोय् असे *सिद्ध करणे.* ३ चुकीचा, भलता, अनिष्ट : *catch the ~ train, चुकीची गाडी पकडणे.* ४ बिघडलेला : *What's ~ with the engine? इंजिनाला काय झालंय्?* **wrong** *क्रिवि* १ चुकीच्या पद्धतीने : *You've spelt my name ~, तू माझं नाव चुकीचं लिहिलंयस्.* २ (*वाक्प्र*) **go 'wrong** (क) चूक करणे, प्रमाद घडणे. (ख) (यंत्राबाबत) नीट काम न करणे, नीट न चालणे. (ग) वाईट परिणाम होणे, अयशस्वी होणे. **wrong** *ना* १ [*अगण*] जे चूक/अयोग्य आहे ते : *know the difference between right and ~, बरोबर काय आणि चूक काय यातला फरक कळणे.* २ [*गण*] (*औप*) अन्याय्य कृती. ३ (*वाक्प्र*) **in the 'wrong** चुकीस जबाबदार; दोषी, अपराधी. **on the wrong 'track** ➪ TRACK. **wrong** *क्रि* [*सक*] अन्याय करणे, गैर वागणूक देणे. **'wrongdoer** *ना* [*गण*] अन्याय करणारा. **'wrongdoing** *ना* [*अगण*] अन्याय करणे, चुकी. **wrongful** *वि* अन्याय्य, बेकायदेशीर, अनुचित : *~ful dismissal (from a job), (नोकरीवरून) अन्याय्य रीतीने कमी करणे, अवैध बडतर्फी.* **wrongfully** *क्रिवि* अन्यायकारकपणे, अयोग्य रीतीने. **wrongly** *क्रिवि* चुकीने, गैर पद्धतीने.

wrote WRITE चा *भूत.*

wrought iron /ˌरॉऽट् 'आइ·अन्/ *ना* [*अगण*] घडीव लोखंड.

wrung WRING चा *भूत, भूत वि.*

wry /राइ/ *वि* १ किंचित् उपरोधिक : *a ~ smile, उपरोधिक हसू.* २ नापसंतीदर्शक वाकडातिकडा : *a ~ face, वाकडातिकडा केलेला चेहेरा.* **wryly** *क्रिवि* उपरोधिकपणे; त्रासून.

X x

X, x /अेक्स्/ *ना* [*गण*] (*ब.व* **X's, x's** /'अेक्सिझ़्/) १ इंग्रजी वर्णमालेतील चोविसावे अक्षर. २ रोमन संख्येचा १० आकडा. ३ (*गणित*) माहीत नसलेली राशी, क्ष.

xenophobia /ˌझ़ेन'फउबिअ/ *ना* [*अगण*] परकीय माणसांची प्रचंड भीती किंवा कमालीची नावड, परकीयभीतिगंड.

Xerox /'ज़िअरॉक्स्/ *ना* [*गण*] (*मालक*) (**क**) छायाचित्रप्रती काढणारे यंत्र. (**ख**) झेरॉक्स प्रत. **xerox** *क्रि* [*सक*] झेरॉक्स यंत्रावर प्रत काढणे.

Xmas /'क्रिस्मेस्, 'अेक्स्मस्/ *ना* [*अगण, गण*] (*अनौप*) ख्रिसमस्, नाताळ.

X-ray /'अेक्स् रेइ/ *ना* [*गण*] (**क**) घनवस्तूतून आरपार जाऊ शकणारे आणि घनवस्तूंचा आतील भाग दाखविणारे एकप्रकारचे किरण, क्ष-किरण. (**ख**) क्ष-किरणांच्या साहाय्याने काढलेले छायाचित्र : *a chest ~, छातीचा एक्स्-रे.* **X-ray** *क्रि* [*सक*] एखाद्याचा एक्स्-रे काढणे किंवा त्याच्यावर क्ष-किरणांचा उपचार करणे.

xylophone /'झ़ाइलफउन्/ *ना* [*गण*] लाकडाच्या पट्ट्यांवर छोट्या लाकडी हातोड्या मारून वाजवावयाचे एक वाद्य.

Y y

Y, y /वाइ/ *ना* [*गण*] (*ब.व* **Y's, y's** /वाइझ़्/) इंग्रजी वर्णमालेतील पंचविसावे अक्षर. **Y-fronts** *ना* [*ब.व*] (*ब्रि मालक*) पुढे उलट्या Y च्या आकाराची फट असलेली आणि दुणी असलेली पुरुषांची आतली चड्डी.

yacht /यॉट्/ *ना* [*गण*] १ विशेषतः नौकानयनस्पर्धेत वापरायची हलकी शिडाची नौका, विहारनौका. २ मोटरवर चालणारी मोठी विहार नौका. **yachting** *ना* [*अगण*] अशा नौका चालविण्याची कला किंवा त्यांच्या स्पर्धा.

yam /यॅम्/ *ना* [*गण*] (कोनफळाच्या किंवा सुरणाच्या जातीचा) पांढरा कंद येणारी वेल.

Yank /यॅङ्क्/ *ना* [*गण*] (*ब्रि अनौप अधिक्षेपी*) अमेरिकन माणूस.

yank /यॅङ्क्/ *क्रि* [*अक, सक*] (एखादी गोष्ट) एकदम जोरात ओढणे, उपटणे, उपसणे.

yap /यॅप्/ *क्रि* (**-pp-**) [*अक*] १ (कुत्र्याबाबत) भुंकणे. २ (*अनौप*) वेड्यासारखी जोरजोरात बडबड करणे.

yard^1 /याड्/ *ना* [*गण*] लांबी मोजायचे एक परिमाण, ३ फूट किंवा ०.९१४ मीटर इतकी लांबी. **'yardstick** *ना* [*गण*] (*ला*) मोजमाप, मोजपट्टी.

yard^2 /याड्/ *ना* [*गण*] १ (बहुधा बंदिस्त असे) इमारतीजवळचे पक्क्या जमिनीचे अंगण, वाडगे. २ विशिष्ट प्रकारच्या कार्याकरता बंदिस्त जागा, आवार : *a 'ship-~, जहाजांचा तळ.*

yarn /यान्/ *ना* १ [*अगण*] विणण्याचा धागा, सूत. २ [*गण*] (*अनौप*) कथा, गोष्ट.

yawn /यॉऽन्/ *क्रि* [*अक*] १ कंटाळून किंवा झोपेला आल्यावर जांभई देणे. २ आ वासणे : *a ~ing gap, आ वासलेली दरी.* **yawn** *ना* [*गण*] जांभई देणे, जांभई.

yd *संरू* (*ब.व* **~s**) yard^1 यार्ड.

yeah /येअ/ *उद्‌वा* (*अनौप*) होय, हो.

year /यिअ(र्), तसेच यऽ(र्)/ *ना* [*गण*] १ पृथ्वीला सूर्याभोवती एक प्रदक्षिणा घालण्यास लागणारा काळ, वर्ष. २ १ जानेवारी ते ३१ डिसेंबर हा ३६५ (किंवा ३६६) दिवसांचा काळ, वर्ष. ३ संस्थेचे वगैरे कामकाजाचे वर्ष : *the financial/school ~, आर्थिक/शालेय वर्ष.* ४ (*वाक्प्र*) **,all (the) year 'round** वर्षभर. **year 'in, year ,out, year after 'year** वर्षानुवर्षे, खूप वर्षे. **yearly** *वि, क्रिवि* वर्षातून एकदा किंवा दरसाल होणारा, वार्षिक.

yearn /यऽन्/ *क्रि* [*अक*] *for, to//* आस लागणे : *He ~ed for his home, त्याला घराचा ध्यास लागला.* **yearning** *ना* [*गण, अगण*] आस, तीव्र इच्छा, ओढ.

yeast /यीस्ट्/ *ना* [*गण, अगण*] बियर, मद्य करण्यासाठी किंवा पाव हलका करण्यासाठी वापरायचे द्रव्य, किण्व, खमीर.

yell /येल्/ *क्रि* [*अक, सक*] केकाटणे, कोकलणे, मोठ्याने ओरडणे. **yell** *ना* [*गण*] आरोळी.

yellow /'येलउ/ *वि* १ सोन्यासारखा पिवळा. २ (*अनौप अधिक्षेपी*) घाबरट, भेकड, भागुबाई. **yellow** *क्रि* [*अक, सक*] पिवळे पडणे/करणे : *The papers had ~ed with age, जुने झाल्यामुळे कागद पिवळे पडले होते.* **yellowish** *वि* पिवळसर. **,yellow 'pages** *ना* (अे.व किंवा ब.व क्रियापदासह) दूरध्वनि-निर्देशिकेतील कंपन्यांबाबतची माहिती देणारी वेगळी पिवळी पाने, कंपन्यांची त्यांच्या सेवेनुसार यादी असलेली दूरध्वनि-निर्देशिका.

yelp /येल्प्/ *क्रि* [*अक*] *ना* [*गण*] विशेषतः वेदनेने ओरडणे, किंचाळणे, किंकाळी.

yen^1 /येन्/ *ना* [*गण*] (*ब.व* **yen**) जपानमधील एक नाणे.

yen^2 /येन्/ *ना* [बहुधा *अे.व*] (*अनौप*) इच्छा : *a ~ to visit India, भारताला भेट देण्याची इच्छा.*

yes /येस्/ *उद्‌वा* (संमती, होकार वगैरे देताना वापर) हो, होय : *Y~, I'll come with you, हो, मी तुझ्याबरोबर येईन.* **yes** *ना* [*गण*] 'हो' हा शब्द किंवा उत्तर.

yesterday /'येस्टडि, -डेइ/ *क्रिवि, ना* [*अगण*] १ काल. २ परवापरवाच, थोड्या दिवसांपूर्वी, अगदी अलीकडे.

yet /येट्/ *क्रिवि* १ आत्तापावेतो, अद्याप, आजपर्यंत; तोपर्यंत : *They haven't come ~, ते अद्याप आलेले नाहीत.* २ भविष्यकाळात : *She may surprise us all ~, ती आपणा सर्वांनाच अजूनही/पुढे थक्क करेल.* ३ आणखी : *~ another government report, आणखी एक सरकारी अहवाल.* ४ अद्याप : *I have ~ to meet him, मला अजून/अद्याप त्याला भेटायचंय् म्हणजेच मी त्याला अजून भेटलेलो नाही.* ५ (*वाक्प्र*) **as 'yet** अद्याप पावेतो, आजपावेतो, तोपर्यंत. **yet** *उ.अव्यय* पण (त्याचवेळी) : *a clever ~ simple idea, हुशारीची पण साधी कल्पना.*

yew (तसेच **'yew-tree**) /यू/ *ना* [*गण*] तांबडी फळे येणारे गडद हिरव्या पानांचे एक झाड.

Y-fronts ➪ Y, y.

yield /यील्ड्/ *क्रि* १ [*सक*] स्वाभाविकपणे देणे, निपजणे, उत्पन्न होणे : *The tax increase would ~ £10 million a year, करवाढीतून १० लाख पौंडाचे उत्पन्न मिळेल.* २ [*अक*] (*to*)// (*औप*) बळी पडणे, शरण जाणे : *~ to temptation, मोहाला बळी पडणे.* ३ [*सक*] (*औप*) हवाली करणे. **yield** *ना* [*गण*] उत्पन्न, निपज : *a ~ of three tonnes of wheat per hectare, दर हेक्टरला तीन टन गव्हाचे उत्पन्न.* **yielding** *वि* १ सहज वाकणारा, नमणारा. २ (*ला*) इतरांच्या इच्छा मानणारा, वश होणारा.

yippee /'यिपी/ *उद्‌वा* (*अनौप*) (आनंद किंवा उत्कंठा व्यक्त करण्यास वापर) हुर्यो! आहा!

yodel /'यउड्ल्/ *क्रि* (**-ll-**; *अमे* **-l-**) [*अक, सक*] आवाज वर-खाली करत गाणे.

yoga /'यउग/ *ना* [*अगण*] ध्यान करण्याची आणि आत्मसंयमनाची हिंदू पद्धती, योग.

yoghurt /'यॉगट; *अमे* 'यउगर्ट्/ *ना* [*अगण, गण*] दूध विरजून केलेला एक किंचित् घट्ट, आंबट अन्नपदार्थ.

yoke /यउक्/ *ना* १ [*गण*] गाडीला किंवा नांगराला जुपलेल्या बैलाच्या मानेवर ठेवलेले लाकडी जोखड, जू, धुरा. २ [*अे.व*] (*औप ला*) जाचक निर्बंध : *freed from the ~ of slavery, गुलामगिरीच्या जोखडातून सुटका झालेला.*

yokel /'यउक्ल्/ *ना* [*गण*] (*गंमत किंवा अधिक्षेपी*) साधा खेडवळ माणूस, पावटा.

yolk /यउक्/ *ना* [*गण, अगण*] अंड्यातील पिवळा बलक.

yonder /'यॉन्ड(र्)/ *वि, क्रिवि* (*पुरा*) पलीकडे किंवा पलीकडचा, पैलतीरी.

you /यू/ *सना* (क्रियापदाचा कर्ता, क्रियापद किंवा शब्दयोगीचे कर्म म्हणून वापर) १ ज्याच्याशी बोलताहोत तो माणूस किंवा ती माणसं, तू, तुम्ही, आपण. २ (*अनौप*) प्रत्येकजण; कुणीही : *It's easier to cycle with the wind behind ~, वारा जर तुमच्या मागून येत असेल तर सायकल चालवणे अधिक सोपे जाते.*

you'd /यूड्/ १ you had ➪ HAVE. २ you would ➪ WILL^1, WOULD^1.

you'll /यूल्/ you will ➪ WILL^1.

young /यंङ्/ *वि* (**~er** /-ङ्ग(र्)/, **~est** /-ङ्गिस्ट्/) तरुण, वयाने लहान : *a ~ woman/nation, तरुण स्त्री/राष्ट्र.* **young** *ना* [*ब.व*] १ वयाने लहान असलेला प्राणी किंवा पक्षी; पिलू, बालक. २ **the young** तरुण मुले/स्त्री-पुरुष. **youngish** *वि* खूप तरुण. **youngster** /-स्टऽ(र्)/ *ना* [*गण*] तरुण माणूस.

your /यॉऽ(र्); *अमे* युअर्/ *वि* तुझा, तुमचा, आपला : *How old are ~ children? तुझी मुलं किती वर्षांची आहेत?* **yours** /यॉऽझ़्; *अमे*

युअझ्/ *सना* १ तुझा, तुमचा, आपला : *Is that book ~s? ते पुस्तक तुझंय् का?* २ (बहुधा **Yours**) (पत्राच्या शेवटी वापर) : *Y~s faithfully/sincerely/truly,* आपला विश्वासू/ *तुझाच.*

you're /युअ(र्), तसेच यॉऽ(र्)/ you are ⇨ BE.

yourself /यॉऽ'सेल्फ्; *अमे* युअर्'सेल्फ्/ *सना* (*ब.व* **-selves** /-'सेल्व्ह्झ्/) १ (एखादा माणूस किंवा माणसे करत असलेल्या कृतीचा परिणाम त्यांच्यावरच होत असेल तेव्हा आत्मवाचक म्हणून वापर) तुला स्वतःला, तुम्हाला स्वतःला : *Have you hurt ~? तू स्वतःलाच लागवून घेतलंस् का?* २ (जोर देण्यासाठी वापर) : *You told me so ~, तू स्वतःच मला तसं सांगितलंस्.* ३ (*वाक्प्र*) **(all) by your'self / your'selves** (क) एकट्याने. (ख) कुणाच्या मदतीशिवाय.

youth /यूथ्/ *ना* (*ब.व* **~s** /यूद्झ्/) १ [*अगण*] यौवनावस्था, यौवनकाल, तारुण्यावस्था, तारुण्यकाल : *in my ~, माझ्या तरुणपणात.* २ [*गण*] तरुण माणूस, युवक. ३ (तसेच **the youth**) (ब.व क्रियापदासह अे.व) तरुणवर्ग, युवक. **youthful** *वि* तरुण; तरुण दिसणारा : *a ~ful appearance, तारुण्यपूर्ण दिसणे.* **'youth hostel** *ना* [*गण*] सुट्टीत पर्यटन करणाऱ्या तरुणांसाठी बांधलेले स्वस्त निवासगृह.

you've /यूव्ह्/ you have ⇨ HAVE.

yuck /यैक्/ *उद्‌वा* (*अनौप*) (घृणा व्यक्त करण्यासाठी वापर) शी!

yule /यूल्/ *ना* [*अगण*] (*पुरा*) ख्रिसमस, नाताळ.

yuppie /'यपि/ *ना* [*गण*] (*अनौप*) महत्त्वाकांक्षी आणि पैसे कमावणारा तरुण व्यावसायिक.

Z z

Z, z /झ़ेड्; *अमे* झ़ी/ *ना* [*गण*] (*ब.व* **Z's, z's** /झ़ेड्झ़्; *अमे* झ़ीझ़्/) इंग्रजी वर्णमालेतील सव्विसावे अक्षर.

zany /'झ़ेइनि/ *वि* **(-ier, -iest)** (*अनौप*) विदूषकी.

zeal /झ़ील्/ *ना* [*अगण*] (*औप*) उत्साह. **zealous** /'झ़ेलस्/ *वि* उत्साही.

zealot /'झ़ेलट्/ *ना* [*गण*] (कधीकधी *अधिक्षेपी*) खास करून धर्म, राजकारण वगैरेतला अतिउत्साही माणूस.

zebra /'झ़ेब्र, 'झ़ीब्र/ *ना* [*गण*] काळे-पांढरे पट्टे असणारा घोड्याच्या जातीचा एक आफ्रिकन प्राणी. **,zebra 'crossing** *ना* [*गण*] (ब्रिटनमधे) पादचाऱ्यांना रस्ता ओलांडण्यासाठी रस्त्यावर मारलेले काळे-पांढरे पट्टे, पादचारी-पट्टा.

zenith /'झ़ेनिथ्/ *ना* [*गण*] यश, कीर्ती वगैरेचे अत्युच्च शिखर.

zero /'झ़िअरउ/ *सना, वि, ना* [*गण*] (*ब.व* **~s**) १ ०; शून्य. २ नीचांक; काहीही नाही. ३ मोजपट्टीवरील + आणि - यांच्या मधला बिंदू : *The temperature was ten degrees below ~, तपमान ० खाली १० अंश – म्हणजे -१० अंश – होते.* **zero** *क्रि* (*क्रिब*) **zero in on sth** एखाद्या गोष्टीवर सरळ नेम धरणे, लक्ष्याच्या दिशेने जाणे, वेध घेणे. **'zero-hour** *ना* [*अगण*] विशेषतः लष्करी कारवाई सुरू करण्याचा काल, शून्यप्रहर, आक्रमण वेळ.

zest /झ़ेस्ट्/ *ना* १ [*अगण, अे.व*] (क) खूप मजा, खूप आनंद. (ख) वाढलेली मौज, अधिक जोम. २ [*अगण*] लिंबू किंवा संत्र्याची बाहेरची साल.

zigzag /'झ़िग्झ़ॅग्/ *ना* [*गण*] नागमोडी रेषा. **zigzag** *क्रि* **(-gg-)** [*अक*] नागमोडी जाणे : *The path ~s up the cliff, रस्ता कड्यावरून नागमोडी जातो.*

zinc /झ़िङ्क्/ *ना* [*अगण*] निळसर पांढरा धातू, जस्त.

zip (तसेच **'zip-fastener**) /झ़िप्/ *ना* [*गण*] पिशव्यांची वगैरे चेन, सरकबंद. **zip** *क्रि* **(-pp-)** [*सक*] चेन लावणे किंवा उघडणे. **Zip code** *ना* [*गण*] (*अमे*) पोस्टाचा क्रमांक, पिनकोड. **zipper** *ना* [*गण*] (विशेषतः *अमे*) चेन, सरकबंद.

zither /'झ़िद(र्)/ *ना* [*गण*] खूप तारा असलेले एक सपाट तंतुवाद्य.

zodiac /'झ़उडिॲक्/ *ना* **the zodiac** [*अे.व*] बारा भागात विभागलेला आणि चंद्र, सूर्य वगैरेच्या जागा दाखविणारा आकाशातील काल्पनिक पट्टा, ग्रहपथ, राशीचक्र.

zombie /'झ़ॉम्बि/ *ना* [*गण*] (*अनौप*) परिस्थितीचे भान न ठेवता, विचार न करता वागणारा माणूस, उतावळा माणूस.

zone /झ़उन्/ *ना* [*गण*] विशिष्ट विशेष किंवा उपयोग असणारा प्रांत, क्षेत्र, परिमंडळ, टापा : *a time ~, काल-क्षेत्र* ○ *a nuclear-free ~, अण्वस्त्रमुक्त प्रदेश.*

zoo /झ़ू/ *ना* [*गण*] (*ब.व* ~**s**) प्राणिसंग्रहालय.

zoology /झ़उ'ऑलजि/ *ना* [*अगण*] प्राणिविज्ञान, प्राणिशास्त्र. **zoological** /,झ़उअ'लॉजिक्ल्/ *वि* प्राणिशास्त्रीय. **zoologist** *ना* [*गण*] प्राणिशास्त्रज्ञ, प्राणिशास्त्राचा अभ्यासक, प्राणिवैज्ञानिक.

zoom /झ़ूम्/ *क्रि* [*अक*] १ सूऽ करत वेगाने जाणे. २ (*ला अनौप*) एकदम वाढणे, वर सरकणे. ३ (*क्रिब*) **zoom in/out** (कॅमेऱ्याबाबत) ज्याचे छायाचित्र घ्यायचे ती वस्तू जवळ/दूर आहे असे भासवणे. **'zoom lens** *ना* [*गण*] वस्तू लहान-मोठी दाखविण्याची क्षमता असणारी कॅमेऱ्यातील भिंगे.

zucchini /झ़ु'कीनि/ *ना* [*गण*] (*ब.व* **zucchini** किंवा ~**s**) (विशेषतः *अमे*) लांब, हिरवी पण आतून पांढरी असणारी एक भाजी.

सर्वसामान्य अनियमित क्रियापदे

(दोन रूपे दिली असतील तर अर्थामधे फरक आहे की नाही हे कोशातील नोंदीत पाहावे)

मूळ रूप	भूतकाल	भूतकालवाचक धातुविशेषण
arise	arose	arisen
awake	awoke	awoken
be	was, were	been
bear	bore	borne
beat	beat	beaten
become	became	become
begin	began	begun
bend	bent	bent
beseech	besought, beseeched	besought, beseeched
beset	beset	beset
bet	bet, betted	bet, betted
bid	bid, bade	bid, bidden
bind	bound	bound
bite	bit	bitten
bleed	bled	bled
blow	blew	blown
break	broke	broken
breed	bred	bred
bring	brought	brought
broadcast	broadcast	broadcast
build	built	built
burn	burnt, burned	burnt, burned
burst	burst	burst
buy	bought	bought
cast	cast	cast
catch	caught	caught
choose	chose	chosen
cling	clung	clung
come	came	come
cost	cost, costed	cost, costed
creep	crept	crept
cut	cut	cut

मूळ रूप	भूतकाल	भूतकालवाचक धातुविशेषण
deal	dealt	dealt
dig	dug	dug
do	did	done
draw	drew	drawn
dream	dreamt, dreamed	dreamt, dreamed
drink	drank	drunk
drive	drove	driven
dwell	dwelt	dwelt
eat	ate	eaten
fall	fell	fallen
feed	fed	fed
feel	felt	felt
fight	fought	fought
flee	fled	fled
fling	flung	flung
fly	flew	flown
forbid	forbade	forbidden
forecast	forecast, forecasted	forecast, forecasted
foresee	foresaw	foreseen
foretell	foretold	foretold
forget	forgot	forgotten
forgive	forgave	forgiven
forsake	forsook	forsaken
freeze	froze	frozen
get	got	got
give	gave	given
go	went	gone
grind	ground	ground
grow	grew	grown
hang	hung, hanged	hung, hanged
have	had	had
hear	heard	heard
hide	hid	hidden
hit	hit	hit
hold	held	held
hurt	hurt	hurt
keep	kept	kept

मूळ रूप	भूतकाल	भूतकालवाचक धातुविशेषण
kneel	knelt	knelt
knit	knitted, knit	knitted, knit
know	knew	known
lay	laid	laid
lead	led	led
lean	leant, leaned	leant, leaned
leap	leapt, leaped	leapt, leaped
learn	learnt, learned	learnt, learned
leave	left	left
lend	lent	lent
let	let	let
lie[2]	lay	lain
light	lit, lighted	lit, lighted
lose	lost	lost
make	made	made
mean	meant	meant
meet	met	met
mislay	mislaid	mislaid
mislead	misled	misled
misspell	misspelled, misspelt	misspelled, misspelt
mistake	mistook	mistaken
misunderstand	misunderstood	misunderstood
mow	mowed	mown, mowed
outdo	outdid	outdone
outgrow	outgrew	outgrown
outshine	outshone	outshone
overcome	overcame	overcome
overdo	overdid	overdone
overhang	overhung	overhung
overhear	overheard	overheard
override	overrode	overridden
overrun	overran	overrun
oversee	oversaw	overseen
overshoot	overshot	overshot
oversleep	overslept	overslept
overtake	overtook	overtaken
overthrow	overthrew	overthrown

मूळ रूप	भूतकाल	भूतकालवाचक धातुविशेषण
partake	partook	partaken
pay	paid	paid
put	put	put
read	read	read
repay	repaid	repaid
rewind	rewound	rewound
rid	rid	rid
ride	rode	ridden
ring	rang	rung
run	ran	run
saw	sawed	sawn, sawed
say	said	said
see	saw	seen
seek	sought	sought
sell	sold	sold
send	sent	sent
set	set	set
sew	sewed	sewn, sewed
shake	shook	shaken
shear	sheared	shorn, sheared
shed	shed	shed
shine	shone, shined	shone, shined
shit	shat, shitted	shat, shitted
shoe	shod	shod
shoot	shot	shot
show	showed	shown, showed
shrink	shrank, shrunk	shrunk
shut	shut	shut
sing	sang	sung
sink	sank	sunk
sit	sat	sat
slay	slew	slain
sleep	slept	slept
slide	slid	slid
sling	slung	slung
slink	slunk	slunk
slit	slit	slit

मूळ रूप	भूतकाल	भूतकालवाचक धातुविशेषण
smell	smelt, smelled	smelt, smelled
sow	sowed	sown, sowed
speak	spoke	spoken
speed	sped, speeded	sped, speeded
spell	spelt, spelled	spelt, spelled
spend	spent	spent
spill	spilt, spilled	spilt, spilled
spin	spun	spun
spit	spat	spat
spoil	spoilt, spoiled	spoilt, spoiled
spread	spread	spread
spring	sprang	sprung
stand	stood	stood
stave	staved, stove	staved, stove
steal	stole	stolen
stick	stuck	stuck
stink	stank, stunk	stunk
stride	strode	stridden
strike	struck	struck
string	strung	strung
strive	strove	striven
swear	swore	sworn
sweep	swept	swept
swell	swelled	swollen, swelled
swim	swam	swum
swing	swung	swung
take	took	taken
teach	taught	taught
tear	tore	torn
tell	told	told
think	thought	thought
thrive	throve, thrived	thriven, thrived
throw	threw	thrown
thrust	thrust	thrust
tread	trod	trodden
undercut	undercut	undercut
undergo	underwent	undergone

मूळ रूप	भूतकाल	भूतकालवाचक धातुविशेषण
underlie	underlay	underlain
understand	understood	understood
undertake	undertook	undertaken
underwrite	underwrote	underwritten
undo	undid	undone
unwind	unwound	unwound
upset	upset	upset
wake	woke	woken
waylay	waylaid	waylaid
wear	wore	worn
weave	wove	woven
wed	wed, wedded	wed, wedded
weep	wept	wept
win	won	won
wind[2]	wound	wound
withdraw	withdrew	withdrawn
withhold	withheld	withheld
withstand	withstood	withstood
wring	wrung	wrung
write	wrote	written

ऑक्सफर्ड

इंग्रजी-मराठी शब्दकोश

र. वा. धोंगडे

A New Dictionary from Oxford

- Follows an authentic, up-to-date Oxford word list
- Contains over 26,000 words and phrases
- Gives clear and concise definitions as well as synonyms
- Explains many common idioms and practical usage with examples
- Provides information on irregular spellings, grammar and American English
- Indicates clearly pronunciation of all headwords and derivatives in Marathi transliteration for each entry

OXFORD
UNIVERSITY PRESS

OXFORD
UNIVERSITY PRESS
255.00

www.oup.com

ISBN 019 564244 9